CC-0. In Public Domain. Digitized by Muthulakshmi Research Academy

ॐ

संतश्रेष्ठ श्री एकनाथ महाराज कृत

भावार्थ रामायण

या प्रासादिक ओविबद्ध ग्रंथाचा सुबोध रसाळ गद्य अनुवाद.

अनुवादक : डॉ. म. वि. गोखले.

मोरया
प्रकाशन

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Muthulakshmi Research Academy

ॐ

संतश्रेष्ठ श्री एकनाथ महाराज कृत

भावार्थ रामायण

या प्रासादिक ओविबद्ध ग्रंथाचा सुबोध रसाळ गद्य अनुवाद.

अनुवादक : डॉ. म. वि. गोखले.

मोरया
प्रकाशन

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

शांतिब्रह्म म्हणून ओळखल्या जाणाऱ्या संतश्रेष्ठ श्री एकनाथ महाराजांनी तत्कालीन परिस्थितीचा विचार करून, जाणीवपूर्वक सर्वप्रथम संपूर्ण श्रीरामकथा **भावार्थ रामायण** या ग्रंथाच्या रूपाने मराठीतून सांगीतली. या अपूर्व आणि प्रेरणादायी ओवीबद्ध ग्रंथाच्या ४० हजार ओव्यांचा डॉ. म. वि. गोखले यांनी केलेला सुबोध व रसाळ अनुवाद प्रथमच वाचकांना सादर करतांना मनापासून आनंद वाटतो आहे.

आजच्या एकूणच गोंधळाच्या, अव्यवस्थेच्या परिस्थितीत जीवनाच्या सर्व क्षेत्रात मर्यादापुरुषोत्तम श्रीरामचंद्रांचा आदर्श आत्मसात करण्याची पूर्वी कधीही नव्हती एवढी आवश्यकता निर्माण झाली आहे.

रामराज्याची संकल्पना खऱ्या अर्थाने साकार करण्यासाठी प्रत्येकाने स्वतःच्या जीवनांत श्रीरामचंद्रांचे आदर्श प्रतिबिंबीत करण्याची, डोळस रामभक्तीची प्रेरणा या ग्रंथातून घ्यावी म्हणूनच हा खटाटोप!

हा ग्रंथ साकार होण्यासाठी अनुवादक, अक्षरजुळणी, मुद्राकादींचे सक्रीय सहकार्य लाभले त्या सर्वांवर प्रभूरामचंद्राची कृपा आहेच.

दिलीप महाजन

प्रकाशक / मुद्रक
दिलीप महाजन
मोरया प्रकाशन
संपदा, शास्त्रीनगर.
डोंबिवली (प). ४२१२०२

पुणे शाखा
'अनुश्री' ४०/१० एरंडवणा.
पुणे - ४११ ०३८.

© म. वि. गोखले

प्रथमावृत्ती :
१७ ऑगस्ट १९९९

मुखपृष्ठ
रमेश भारताल

अक्षरजुळणी
अक्षर विवेक
A - ३ शिवतीर्थ.
पांडुरंग कॉलनी
पुणे - ४११०३८.

मुद्रणस्थळ
संदीप प्रिंटर्स
१११ शनिवार पेठ.
पुणे - ४११०३०.

मूल्य : ६०० / -

https://archive.org/details/@sarayu_foundation_trust

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

ॐ

प्रास्ताविक

महाराष्ट्रातील भक्तिसंप्रदायाची पायाभरणी १३ व्या शतकात संतश्रेष्ठ ज्ञानदेव आणि संतश्रेष्ठ नामदेव यांनी केली; त्यावर १७ व्या शतकात संतश्रेष्ठ तुकारामांनी कळस चढविला. १३ ते १७ वे शतक यांमधील काल महाराष्ट्रातील परधर्मी परकीयांच्या आक्रमणाने ग्रासलेला होता. त्याच काळात संतश्रेष्ठ एकनाथांनी १६ व्या शतकात जे कार्य केले त्याचे श्रेय फार मोठे आहे. त्यांच्या जीवनकालात (१५३३-१५९९) त्यांनी 'एकनाथी भागवता'ने भक्तिसंप्रदायाला मोठाच आधार दिला. ('स्तंभ दिला भागवत' - बहिणाबाई) लोकशिक्षकाची भूमिका स्वीकारून 'भारुडां'च्या माध्यमातून रंजनाबरोबर परमार्थाची जाण जनमनात रुजवली. त्यांच्या कार्य-कर्तृत्वाला ४०० वर्षे पूर्ण होत आहेत. तेव्हा त्यांनिमित्ताने त्यांच्याकडून निर्माण झालेल्या 'भावार्थ रामायण' या ४० हजार ओव्यांच्या प्रचंड, अपूर्व आणि ऐतिहासिक महत्त्वाच्या ग्रंथाचा गद्य अनुवाद करून आपण त्यांना नम्र भावाने शब्दसुमन वाहावे असे वाटले 'भावार्थ रामायण' **ही श्रीरामाची संपूर्ण चरित्रकथा मराठी भाषेत श्रीएकनाथांनीच प्रथम आणली; तसेच 'रामराज्य संकल्पनेचा त्यांनीच प्रथम पुरस्कार केला. या** ग्रंथाच्या निर्माणानंतर केवळ ४०-५० वर्षांतच श्रीरामोपासना, बलोपासना आणि स्वराज्य-स्थापनेचे प्रयत्न दृढमूल झाल्याचे दिसते. हा योग महाराष्ट्रीयांना जाणवावा यासाठी हा अनुवाद - प्रपंच!

भारतीय संस्कृतीच्या समृद्ध परंपरेचा उल्लेख करताना, अपौरुषेय मानलेले वेद, उपनिषदे, त्यातील तात्त्विक संकल्पनांचा गूढार्थ प्रकट करणारी ऋषिभाषिते, यांच्या बरोबरच व्यासकृत महाभारत; महर्षी वाल्मीकींचे रामायण या महाकाव्यांचाही उल्लेख होतो. कारण, या महाकाव्यांमध्ये प्राचीन तत्त्वज्ञानपर सिद्धान्त-सूत्रांवर आधारलेल्या जीवनव्यवहाराचे मनोज्ञ चित्रण केलेले आहे. विशेषतः, ज्या ज्या प्रसंगी भयावह राजकीय किंवा सामाजिक दुरवस्था निर्माण झाली त्या त्या प्रसंगी राष्ट्रीय आणि सामाजिक पुनरुत्थानासाठी रामायणाचा आणि श्रीरामचरित्राचा आदर्शच समाजापुढे ठेवण्यात आला. आदर्श मानवी मूल्ये प्रभावीपणे जनमानसात रुजविण्याचे महान कार्य रामायण ग्रंथाने आजमितीपर्यंत अखंडपणे केले आहे.

भारतात उत्तरेपासून दक्षिणेपर्यंत महर्षी वाल्मीकींच्या रामायणाची महती सर्वमान्य झाल्याचे, भिन्न भिन्न भाषांतील श्रीरामकथांच्या उपलब्धतेवरून लक्षात येते. मूळ संस्कृत भाषेत असलेल्या वाल्मीकींच्या रामायणावर आधारित अनेक संस्करणे उपलब्ध आहेत. संस्कृत भाषेसह अनेक प्रादेशिक भाषांमध्ये ही श्रीरामकथा अनेकांनी आपापल्या पद्धतीने लिहिल्याचे आढळते. श्रीअध्यात्म रामायण, आनंदरामायण, चंपूरामायण, तोरवे रामायण, उत्तररामायण, श्रीरामचरितमानस, भावार्थ रामायण, मोरोपंती रामायणे इत्यादी प्रयत्न त्या दृष्टीने उल्लेखिता येतील.

महाराष्ट्रात तेराव्या शतकाच्या अखेरपर्यंत यादवांची सत्ता होती. त्यामुळे संत ज्ञानेश्वर, संत नामदेव यांना समाजातील स्वार्थी, ढोंगी, पढिक पंडितांनी जीवनव्यवहारात आवश्यक असलेल्या ज्ञानापासून सर्वसामान्य जनतेला दूर ठेवले होते; त्याविषयीचे महत्त्वाचे कार्य करता आले. विठ्ठलभक्तीच्या सूत्रात समाजाला गोवून त्यांना नामस्मरणासारख्या सुलभ, सोप्या मार्गाने परमार्थ साधतो ही शिकवण संतांनी दिली. समाज एकसंध

https://archive.org/details/@sarayu_foundation_trust, Lucknow

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

शांतिब्रह्म म्हणून ओळखल्या जाणाऱ्या संतश्रेष्ठ श्री एकनाथ महाराजांनी तत्कालीन परिस्थितीचा विचार करून, जाणीवपूर्वक सर्वप्रथम संपूर्ण श्रीरामकथा **भावार्थ रामायण** या ग्रंथाच्या रूपाने मराठीतून सांगीतली. या अपूर्व आणि प्रेरणादायी ओवीबद्ध ग्रंथाच्या ४० हजार ओव्यांचा डॉ. म. वि. गोखले यांनी केलेला सुबोध व रसाळ अनुवाद प्रथमच वाचकांना सादर करतांना मनापासून आनंद वाटतो आहे.

आजच्या एकूणच गोंधळाच्या, अव्यवस्थेच्या परिस्थितीत जीवनाच्या सर्व क्षेत्रात मर्यादापुरुषोत्तम श्रीरामचंद्रांचा आदर्श आत्मसात करण्याची पूर्वी कधीही नव्हती एवढी आवश्यकता निर्माण झाली आहे.

रामराज्याची संकल्पना खऱ्या अर्थाने साकार करण्यासाठी प्रत्येकाने स्वतःच्या जीवनांत श्रीरामचंद्रांचे आदर्श प्रतिबिंबीत करण्याची, डोळस रामभक्तीची प्रेरणा या ग्रंथातून घ्यावी म्हणूनच हा खटाटोप!

हा ग्रंथ साकार होण्यासाठी अनुवादक, अक्षरजुळणी, मुद्राकादींचे सक्रीय सहकार्य लाभले त्या सर्वांवर प्रभूरामचंद्राची कृपा आहेच.

दिलीप महाजन

प्रकाशक / मुद्रक
दिलीप महाजन
मोरया प्रकाशन
संपदा. शास्त्रीनगर.
डोंबिवली (प). ४२१२०२

पुणे शाखा
'अनुश्री' ४०/१० एरंडवणा.
पुणे - ४११ ०३८.

© म. वि. गोखले

प्रथमावृत्ती :
१५ ऑगस्ट १९९९

मुखपृष्ठ
रमेश भारताल

अक्षरजुळणी
अक्षर विवेक
A - ३ शिवतीर्थ.
पांडुरंग कॉलनी
पुणे - ४११०३८.

मुद्रणस्थळ
संदीप प्रिंटर्स
१११ शनिवार पेठ.
पुणे - ४११०३०.

मूल्य : ६०० / -

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

ॐ

प्रास्ताविक

महाराष्ट्रातील भक्तिसंप्रदायाची पायाभरणी १३ व्या शतकात संतश्रेष्ठ ज्ञानदेव आणि संतश्रेष्ठ नामदेव यांनी केली; त्यावर १७ व्या शतकात संतश्रेष्ठ तुकारामांनी कळस चढविला. १३ ते १७ वे शतक यांमधील काळ महाराष्ट्रातील परधर्मी परकीयांच्या आक्रमणाने ग्रासलेला होता. त्याच काळात संतश्रेष्ठ एकनाथांनी १६ व्या शतकात जे कार्य केले त्याचे श्रेय फार मोठे आहे. त्यांच्या जीवनकालात (१५३३-१५९९) त्यांनी 'एकनाथी भागवता'ने भक्तिसंप्रदायाला मोठाच आधार दिला. ('स्तंभ दिला भागवत' - बहिणाबाई) लोकशिक्षकाची भूमिका स्वीकारून 'भारुडां'च्या माध्यमातून रंजनाबरोबर परमार्थाची जाण जनमनात रुजवली. त्यांच्या कार्य-कर्तृत्वाला ४०० वर्षे पूर्ण होत आहेत. तेव्हा त्यानिमित्ताने त्यांच्याकडून निर्माण झालेल्या 'भावार्थ रामायण' या ४० हजार ओव्यांच्या प्रचंड, अपूर्व आणि ऐतिहासिक महत्त्वाच्या ग्रंथाचा गद्य अनुवाद करून आपण त्यांना नम्र भावाने शब्दसुमन वाहावे असे वाटले. 'भावार्थ रामायण' **ही श्रीरामाची संपूर्ण चरित्रकथा मराठी भाषेत श्रीएकनाथांनीच प्रथम आणली; तसेच 'रामराज्य संकल्पनेचा त्यांनीच प्रथम पुरस्कार केला. या** ग्रंथाच्या निर्माणानंतर केवळ ४०-५० वर्षातच श्रीरामोपासना, बलोपासना आणि स्वराज्य-स्थापनेचे प्रयत्न दृढमूल झाल्याचे दिसते. हा योग महाराष्ट्रीयांना जाणवावा यासाठी हा अनुवाद - प्रपंच!

भारतीय संस्कृतीच्या समृद्ध परंपरेचा उल्लेख करताना, अपौरुषेय मानलेले वेद, उपनिषदे, त्यातील तात्त्विक संकल्पनांचा गूढार्थ प्रकट करणारी ऋषिभाषिते, यांच्या बरोबरच व्यासकृत महाभारत; महर्षी वाल्मीकींचे रामायण या महाकाव्यांचाही उल्लेख होतो. कारण, या महाकाव्यांमध्ये प्राचीन तत्त्वज्ञानपर सिद्धान्त-सूत्रांवर आधारलेल्या जीवनव्यवहाराचे मनोज्ञ चित्रण केलेले आहे. विशेषतः, ज्या ज्या प्रसंगी भयावह राजकीय किंवा सामाजिक दुरवस्था निर्माण झाली त्या त्या प्रसंगी राष्ट्रीय आणि सामाजिक पुनरुत्थानासाठी रामायणाचा आणि श्रीरामचरित्राचा आदर्शच समाजापुढे ठेवण्यात आला. आदर्श मानवी मूल्ये प्रभावीपणे जनमानसात रुजविण्याचे महान कार्य रामायण ग्रंथाने आजमितीपर्यंत अखंडपणे केले आहे.

भारतात उत्तरेपासून दक्षिणेपर्यंत महर्षी वाल्मीकींच्या रामायणाची महती सर्वमान्य झाल्याचे, भिन्न भिन्न भाषांतील श्रीरामकथांच्या उपलब्धतेवरून लक्षात येते. मूळ संस्कृत भाषेत असलेल्या वाल्मीकींच्या रामायणावर आधारित अनेक संस्करणे उपलब्ध आहेत. संस्कृत भाषेसह अनेक प्रादेशिक भाषांमध्ये ही श्रीरामकथा अनेकांनी आपापल्या पद्धतीने लिहिल्याचे आढळते. श्रीअध्यात्म रामायण, आनंदरामायण, चंपूरामायण, तोरवे रामायण, उत्तररामायण, श्रीरामचरितमानस, भावार्थ रामायण, मोरोपंती रामायण इत्यादी प्रयत्न त्या दृष्टीने उल्लेखिता येतील.

महाराष्ट्रात तेराव्या शतकाच्या अखेरपर्यंत यादवांची सत्ता होती. त्यामुळे संत ज्ञानेश्वर, संत नामदेव यांना समाजातील स्वार्थी, ढोंगी, पढिक पंडितांनी जीवनव्यवहारात आवश्यक असलेल्या ज्ञानापासून सर्वसामान्य जनतेला दूर ठेवले होते; त्याविषयीचे महत्त्वाचे कार्य करता आले. विठ्ठलभक्तीच्या सूत्रात समाजाला गोवून त्यांना नामस्मरणासारख्या सुलभ, सोप्या मार्गाने परमार्थ साधतो ही शिकवण संतांनी दिली. समाज एकसंध

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized By Sarayu Foundation Trust and eGangotri

राहण्याला या शिकवणुकीचा उपयोग झाला. हे संतमंडळाचे कार्य बहुमोल होते. ज्ञानेश्वरांनी श्रीमद्भगवद्गीतेतील विचारधन मराठी भाषेत आणून बहुजनांसाठी ज्ञानभांडार खुले केले. नामदेवांना तर भक्तराज ही पदवी सार्थ ठरावी असे चरित्र आणि ' अभंगातून भक्तिमार्ग जनतेसमोर ठेवून संतमेळाच उभा केला. त्यांनी पंजाबापर्यंत भक्तीची पताका पोचविली. या संतांच्या काव्यरचनेत श्रीविठ्ठल या दैवताला प्राधान्य मिळाले. स्फुट स्वरूपात त्यांनी श्रीरामकथेवर लेखन केले ; परंतु ती रचना निवडक प्रसंगांवर आधारित आहे. **संपूर्ण श्रीरामचरित्रकथा मराठीत आणण्याचे श्रेय निःसंशय संत एकनाथांकडेच जाते.** त्यांचा 'भावार्थ रामायण' हा ग्रंथ म्हणजे मराठी भाषेत संपूर्ण श्रीरामचरित्र आणण्याचा पहिलाच प्रयत्न म्हणावा लागतो.

संत एकनाथमहाराज सोळाव्या शतकातले. इ. स. १५३३ ते १५९९ हा त्यांचा जीवनकाल आहे. तेराव्या शतकाच्या अखेरीस महाराष्ट्रावर परधर्मी परकीयांचे आक्रमण झाले. पुढे एकनाथांच्या काळापर्यंत म्हणजे जवळजवळ अडीचशे-तीनशे वर्षे ही परकीयांची सत्ता कायम होती. एवढ्या प्रदीर्घ काळात या सत्तेने राजकीय स्थित्यंतराबरोबरच महाराष्ट्रातील धार्मिक आणि सांस्कृतिक जीवनही उध्वस्त करण्याचा प्रयत्न केला. ज्या भक्तिसंप्रदायाची ज्ञानेश्वरांनी पायाभरणी केली आणि नामदेवांनी त्याचा विस्तार केला तो संप्रदाय नष्टप्राय होतो की काय अशी अवस्था आली. अशा कठिण प्रसंगात एकनाथांनी भक्तिमंदिराच्या स्थिरतेला आधार दिला. ज्ञानदेव-नामदेवांचे कार्य पुढे नेले. ज्ञानेश्वरांच्या भावार्थ दीपिकेप्रमाणे एकनाथी भागवत हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथाला वारकरी संप्रदायाच्या प्रस्थान त्रयीत स्थान मिळाले. भक्तिमाहात्म्य वाढीला लावण्यासाठी अटोकाट प्रयत्न करताना त्यांनी कीर्तन, प्रवचन, यांचा आधार घेतला. त्यासाठी आख्याने, चरित्रे, अभंग, तत्त्वज्ञानापर स्फुट प्रकरणे, कथाकाव्ये आणि भारुडे असे विविध प्रकारचे साहित्य मराठी भाषेत लिहिले. त्यांना भाषिक सामर्थ्याची मशागतही करावी लागली.

संत एकनाथांनी आदर्श प्रापंचिक आणि निस्सीम परमार्थमार्गी या दोन्ही भूमिका यशस्वी करून दाखविताना प्रपंच आणि परमार्थ यांचा समन्वय साधून भगवद्भक्ती कशी करावी हे जनसामान्यांना शिकविले. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरांच्या कार्याची महती पुनश्च जनमानसात रुजावी यासाठी नाथांनी ज्ञानदेवांच्या समाधीचे स्थळ शोधून त्याचा जीर्णोद्धार केला. ज्ञानेश्वरी ग्रंथ आक्रमणकालात अनेक अपपाठ शिरून अशुद्ध स्वरूपात गेला होता. त्यामुळे अनेक हस्तलिखित प्रती मिळवून, पाठनिश्चिती करून ज्ञानेश्वरी शुद्ध आणि मूळ स्वरूपात समाजापुढे ठेवली. एकनाथपूर्व काळात श्रीकृष्ण, श्रीविठ्ठल, श्रीदत्त या दैवतांची उपासना विशेषत्वाने होत असे. तीच उपासना रूढ करण्याचे कार्य एकनाथांनीही केले ; परंतु एकनाथांनी या कार्यासाठी जो सामाजिक अनुबंध निर्माण केला होता त्यातूनच त्यांना एक कालसापेक्ष अशी वेगळी दृष्टी मिळाली.

महाराष्ट्रात परकीयांची सत्ता स्थिरपद होण्यास महाराष्ट्रातील काही पराक्रमी मराठा सरदार हातभार लावत असल्याचे नाथांनी हेरले. त्यासाठी आयुष्याच्या अखेरच्या टप्प्यात त्यांनी श्रीराम या दैवताची चरित्रकथा मराठीत आणण्याचे ठरवून 'भावार्थ रामायण' हा ग्रंथ लिहायला घेतला. केवळ 'वाल्मीकींच्या रामायण' ग्रंथाचे भाषांतर करण्याचा त्यांचा हेतू नव्हता. त्यामुळे मूळ रामायणाबरोबरच 'हनुमन्नाटक', श्रीअध्यात्मरामायण, अद्भुत रामायण, आनंद रामायण इत्यादी संस्कृत ग्रंथातील श्रीरामकथांचा त्यांनी आधार घेतला. त्याचबरोबर त्यांच्या विस्तृत वाचनातून श्रीरामकथेला, उपयुक्त

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized By Sayyid Foundation Research Academy eGangotri

अशा अनेक कथा त्यांनी निवडल्या. या विविध कथा कौशल्याने आपल्या ग्रंथात बसवून, सामान्य वाचकाला समजतील अशा पद्धतीने गुंफल्या. त्यामुळे 'भावार्थ रामायण' हा ग्रंथ उद्‌बोधक आणि रंजकही झाला आहे.

लेखनाची प्रेरणा

एकनाथांनी समकालीन समाजाची दुरवस्था पाहिली आणि त्या दुरवस्थेचे कारण सत्ताधीशांनी चालविलेल्या राक्षसी अत्याचारांमध्ये असल्याचे मनोमन जाणले. त्याचप्रमाणे स्वाभिमान विकून परकीय सत्तेला साहाय्य करणाऱ्या परतंत्र समाजधुरीणांच्या अगतिकतेने ही दुरवस्था वाढत असल्याचेही त्यांना समजून आले. अशा भावनिक द्वंद्वातून नाथांना श्रीरामकथा लिहिण्याची आंतरिक प्रेरणा लाभली. परंतु त्यासाठी श्रीरामच आपल्याला प्रेरणा देत आहे. तो श्रीराम सातत्याने आपल्याला श्रीरामचरित्र सांगण्यासाठी उत्तेजित करत आहे. जागृतीत, निद्रेत, स्वप्नात, जेवताना, स्वस्थ असताना, तो चैन पडू देत नाही. अशा प्रकारे नाथांनी श्रीरामाचीच या कथानिरूपणाला प्रेरणा असल्याचे म्हटले आहे - 'न करी म्हणता रामायण। श्रीराम आपण कथा प्रेरी॥' श्रीरामाप्रमाणेच नाथांनी ग्रंथरचनेचे श्रेय आपले सद्‌गुरू श्रीजनार्दनस्वामी यांना असल्याचे ग्रंथात अनेक ठिकाणी नमूद केले आहे. यामागे नाथांचा विनय दिसतो आणि त्याचबरोबर कथा-प्रेरणा साक्षात् श्रीराम आणि सद्‌गुरू देतात हे वाचकाला सांगून ग्रंथप्रामाण्यही सांगण्याचा प्रयत्न सूचित होतो.

वास्तविक या ग्रंथरचनेची प्रेरणा ऐतिहासिक संदर्भातही शोधणे आवश्यक आहे असे मला वाटते. शिवाजीराजे भोसले यांचा जन्म १६३० (किंवा १६२७) असा मानला तर शहाजीराजे भोसले त्यावेळी १८/२० वर्षांचे असल्याचे म्हणता येईल. त्यामुळे साहजिकपणे शहाजीराजांचा जन्म १६१० किंवा १६१२ मानता येते. अर्थात १५९९ मध्ये नाथ समाधिस्त झाले त्यावेळी या ग्रंथाचे लेखन सुरू झालेले होते; याचा अर्थ शहाजीराजांचे वडील मालोजीराजे भोसले हे त्यावेळी असणार. यावरून एक गोष्ट स्पष्ट दिसते की नाथांना भोसले, जाधवराव इत्यादी मराठा सरदार निजामशाहीत चाकरी करत असल्याचे माहिती होते. त्याचप्रमाणे निंबाळकर, घोरपडे हे आदिलशाहीच्या चाकरीत होते. यातून या कल्पनेला पुष्टी मिळते की मराठा सरदारांच्या पराक्रमावर त्या शाह्या तग धरून राहिल्या होत्या. हा स्वकीयांचा पराक्रम एकवटला तर स्वराज्य निर्माण होऊन महाराष्ट्रात स्वकीयांची सत्ता प्रस्थापित होऊ शकेल. यासाठीच नाथांनी 'उभवा रामराज्याची गुढी' असा सूचित संदेश श्रीरामकथेच्या अनुषंगाने दिला असावा. कदाचित तीच त्यांच्या लेखनामागची प्रेरणा असणार. ही प्रेरणा मान्य केली म्हणजे पुढच्या ४०/५० वर्षात महाराष्ट्रात निर्माण झालेल्या स्वराज्य संस्थापनेच्या प्रयत्नाला आलेल्या यशाचे मर्म स्पष्ट होते. अशा क्रांतिकारी प्रयत्नांसाठी समाजघटकांची मानसिकता बदलण्याचे कार्य ग्रंथ करतात हा इतिहास सर्वज्ञात आहे.

नाथांनी वापरलेले संदर्भ

'भावार्थ रामायणा'ला मुख्यतः 'वाल्मीकी रामायणा'चा आधार असला तरी नाथांनी मूळ कथेच्या अनुषंगाने ज्या विविध समयोचित कथा लिखाणात आणल्या आहेत त्यासाठी अनेक संदर्भ वापरले आहेत. नाथांनी मूळ रामायणातले श्लोक उद्‌धृत करून त्याआधारे विवेचन जसे केले आहे तसे स्वरचित श्लोकही उपयोगात आणले आहेत. काही ठिकाणी त्यांनी सुयोग्य सुभाषितांचाही वापर केला आहे. एकनाथांनी मूळ रामायणाच्या नंतर झालेल्या अनेकविध रामायण ग्रंथांचा उपयोग करून घेतला आहे. हा उपयोग करताना त्यांनी प्रसंगानुरूप

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Research Academy and eGangotri

उपयोजना करण्याचे आणि तो भाग चपखलपणे आपल्या निरूपणात बसविण्याचे कौशल्य दाखविले आहे.

आपण जेव्हा सगरापसून सागर हे नामाभिदान आल्याचे वाचतो तेव्हाच नाथ तो कथाभाग कोठून आला याचा संदर्भ देऊन. पुढे 'सगरापासाव सागर। हा भागवती कथा विस्तार।' असे सांगतात. जेव्हा हनुमंत सागरावरून आवेशाने उड्डाण करून लंकेपर्लीकडे असलेल्या पडलंकेत पडल्याचे वर्णन येते तेव्हा 'हनुमंताचे पडलंके उड्डाण। हे कालिकाखंडींचे निरूपण। श्रोतीं पाहोनि सावधान। वृथा भाषण न म्हणावे॥' (अशी ह्या भागाची यथार्थता दार्खावतात. एकनाथांनी भावार्थ रामायणात वापरलेल्या संदर्भांची एक मोटीच नामावली देता येईल. त्यांनी शिवरामायण, स्कंदपुराण, योगवासिष्ठ, वेद, उपनिषदे, कालिकाखंड, ब्रह्मोत्तर खंड, पुराणे, सेतुबंध माहात्म्य, भगवद्गीता, भागवत, नारदभाष्य, सप्तशती इत्यादींचा उपयोग केला आहे. तसेच अध्यात्मरामायण, आनंद रामायण इत्यादी संस्कृत ग्रंथांचाही आधार घेतला आहे. त्यामुळे नाथांना ग्रंथलेखनात वैचित्र्य आणि रंजकता आणता आली आहे. त्याचबरोबर त्यांचे प्रतिपादन ससंदर्भ असल्याचे समाधान वाचकाला मिळते आहे. नाथांनी रामकथेशी संबंधित अनेक संदर्भ वापरून आपल्या वाचनाच्या कक्षा किती विशाल होत्या याचीही प्रचीति आणून दिली आहे.

ग्रंथाचे नामकरण

श्रीरामचरित्रकथा सांगण्यामागे नाथांचा कालसापेक्ष दृष्टिकोण वेगळा असला तरी श्रीरामाची भक्ती ही त्यांची आंतरिक प्रेरणा होती. यामुळे श्रीराम हा परब्रह्मस्वरूप असून तो अखिल विश्वाचा नियंता आहे ही नाथांची श्रद्धा होती. श्रीरामनामस्मरणाने अनेक दोषांचे निराकरण होते हे त्यांना आवर्जून सांगायचे होते. त्यामुळे श्रीरामाचे लौकिक चरित्र खुलवून सांगतानाच श्रीरामाचे चित्स्वरूप नाथ वारंवार सांगताना आढळतात. नाथांच्या रामायणात कोणताही प्रसंग असला तरी तो केवळ लौकिक पातळीवर न राहता परमार्थरसात भिजवून वर्णन करण्याची नाथांची दृष्टी असते. श्रीराम या दैवताच्या ठायी नाथांचा भक्तिभाव जडला होता. तो अंतरीचा भाव श्रीरामाच्या चरित्रकथेतून नाथ प्रकट करत राहातात. आपला 'भाव' रामकथा निरूपणातून एक अंतःसूत्र म्हणून आविष्कृत करण्याचा नाथांचा प्रयत्न आहे. याद्दष्टीने त्यांनी ग्रंथनामात 'भावार्थ' या शब्दाची योजना केली असणार. तसेच एकनाथांनी ज्या श्रद्धेने संत ज्ञानेश्वरांच्या कार्याकडे, लेखनाकडे पाहिले. ज्या श्रद्धेने त्यांनी ज्ञानेश्वरांच्या समाधीचा जीर्णोद्धार केला आणि ज्ञानेश्वरीची शुद्ध प्रत परिश्रमपूर्वक सिद्ध केली, त्याच श्रद्धेने त्यांनी ज्ञानेश्वरांच्या 'भावार्थदीपिके' तील 'भावार्थ' हा शब्द आपल्या 'रामायणा' वरील ग्रंथाच्या नावामध्ये वापरला असावा. प्रत्यक्ष 'भावार्थ रामायण' ग्रंथातील आरंभीचे नमन 'ॐ नमोजी .....' अशाच पद्धतीने केलेले आहे. यावरूनही वरील श्रद्धेला आणि नामकरणाला पुष्टी मिळते. ही नाथांची भूमिका नाथांच्या नंतर पुढे युद्धकाण्डाचे लेखन करणाऱ्या नाथशिष्य गावबाने स्पष्ट केली आहे.

एकनाथांची लेखनशैली

संत एकनाथांनी आपले सर्वच लेखन आध्यात्मिक दृष्टीने केले आहे. त्यातून त्यांना लोकोद्धार साधायचा होता. त्यामुळे नाथ लोकशिक्षकाच्या भूमिकेतून लेखन करत असे दिसते. त्यांनी कीर्तन, प्रवचन ही माध्यमेही लेखनाप्रमाणेच आपल्या त्या भूमिकेशी निगडित ठेवली होती. त्यांच्या मनात सतत जनसामान्यांना पारमार्थिक दृष्टी देण्याचा विचार असल्यामुळे ते नेहमी या वैचारिकतेशी प्रामाणिक राहून लेखन करीत.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized By Sarayu Foundation Trust, Delhi and eGangotri

कोणताही विचार प्रकट करताना नाथ त्या विचाराचे विस्ताराने, अनेक दाखल्यांनी समर्थन करत जात. त्यामुळे त्यांच्या लेखनात विस्तार होई. पुनरुक्तीचा दोष स्वीकारूनही ते हा विस्तार करत असताना दिसतात.

एकनाथ सामान्य गोष्टीतूनही परमार्थाकडे जाण्याच्या पुराणिकी पद्धतीचा वापर करत, आपल्या निरूपणात अनेक दृष्टान्त, कथा, उपदेश यांचा विस्तारभय दुर्लक्षित ठेवून उपयोग करतात. यामुळे ह्यांच्या लेखनात रचनात्मक बंदिस्तपणा आढळत नाही. प्रस्तुत ग्रंथातही ही बाब प्रकर्षाने जाणवते. श्रीराम हा परब्रह्मच आहे आणि त्याचे नाम भवभय दूर करणारे आहे; या एकमात्र निष्ठेचा सदर रामकथेत आवश्यक आणि अनावश्यक अशा उभय प्रकारांनी सातत्याने उल्लेख केला गेला आहे. श्रीरामाच्या भावभक्तीत नाथ एकदा रंगले की त्यांच्या भावगर्भ अंतःकरणातील भक्तिभावना गंगौघाप्रमाणे दुथडी भरून वाहू लागते.

एकदा विस्ताराचे भय दूर सारले म्हणजे मग नाथांना आपले प्रतिपाद्य रूपकांच्या भाषेत मांडवेसे वाटणे स्वाभाविक आहे. लग्नमंडप असो, राजसभा असो, स्वागताची किंवा नगरीच्या श्रृंगाराची बाब असो, कोणतीही वर्णने नाथ आध्यात्मिक आणि पारमार्थिक परिभाषेतील रूपकांनीच सजवतात. या शैलीचा वापर ते संधी मिळेल तेथे करत जातात. हा प्रकार कौसल्येच्या डोहाळ्यांच्या संदर्भात असेल किंवा एखाद्या युद्धप्रसंगात असेल, तेथे संधी मिळताच नाथ श्रीरामाच्या परब्रह्मस्वरूपाचा रूपकात्मक निर्देश आवर्जून करतात. कधी या रूपकात्मक शैलीला पाल्हाळाचे स्वरूपही येते. अल्पाक्षरत्वापेक्षा अनेक सुभाषिते, उपमा, दृष्टान्त, रूपके यांच्या भरघोस वापराने ते आपला विषय मांडतात. कित्येकदा औचित्यभंग करूनही ते लोकमनाला रुचेल अशा शैलीत लिहितात. सूचक अभिप्राय व्यक्त करण्यापेक्षा कित्येकदा नाथांनी जुगुप्सा निर्माण करणारे लेखनही केलेले आढळते. विशेषतः हनुमंताने राक्षसांच्या केलेल्या दुर्दशेच्या वर्णनात ह्यांनी औचित्याच्या मर्यादा ओलांडून लेखन केले आहे. त्यामागील हेतू लक्षात घेऊनच तो भाग वाचावा लागतो. लोकवाङ्याच्या भाषेत नाथ लिहितात तेव्हा आपण आश्चर्यचकित होतो. अशी एकनाथांची लेखनशैली संमिश्र भावना उत्पन्न करणारी आहे.

संत एकनाथांची विस्तारप्रवृत्ती निराळ्या दृष्टीने त्यांच्या लेखनशैलीला एक वेगळे परिमाण देऊन जाते. मूळ 'रामायण' या महाकाव्याचे त्यांनी 'महापुराण' केले. त्यांनी प्रदीर्घ मराठी कथात्म काव्याचा नवा आकृतीबंध निर्माण केला. शांतोदात्त रसाविष्काराच्या पूर्वपरंपरेला नाथांनी विविध मानवी भावनांच्या नवरसात्मक आविष्काराने रंगत आणली. लोकशिक्षणाचा हेतू बाळगून भक्तिमाहात्म्य, रचनेचे स्वातंत्र्य, सालंकृत निवेदने, अन्य ग्रंथांच्या साहाय्याने सजविलेले कथाभाग आणि व्यक्तिचित्रण किंवा प्रसंगवर्णन करताना त्यातील मर्म अध्यात्मसूत्रात गोवण्याची शैली अनुसरून नाथांनी आपले लेखन सुबोध आणि रसाळ केले आहे.

एकनाथांची बहुश्रुतता

'भावार्थ रामायण' ही श्रीरामाच्या संपूर्ण चरित्राशी संबंधित रचना असल्यामुळे एकनाथांना आपल्या बहुविध ज्ञानकक्षांचे दर्शन घडविण्याची संधी मिळाली आहे. स्वकालीन समाज, धर्मविषयक जाणिवा, राजकीय परिस्थिती, लोकभ्रम आणि समकालीन रीतिरिवाज यांची नाथांना चांगली जाण होती. ते विस्तृत वाचनाने विचारसमृद्ध झाले होते. आध्यात्मिक जाणिवांचे ते प्रगल्भ अधिकारी होते. प्रपंच आणि परमार्थ यांचा समन्वय साधून ते विवेकी झाले होते. शांतिब्रह्म अशी त्यांची ख्याती होती. तीर्थयात्रा आणि मराठी भाषेच्या वकिलीसाठी त्यांनी पुन्हा प्रवास करून काशीला मुक्काम केला होता.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

'संस्कृत वाणी देवे केली। मऱ्हाटी काय चोरापासून आली। ' अशा परखड शब्दांनी प्रतिपक्षाला निरुत्तर करण्याएवढे धैर्य त्यांनी दाखविले होते. श्रीसद्गुरू जनार्दनस्वामींच्या सहवासात असताना युद्ध अनुभवले होते. देशात यावनी सत्तेने केलेले अत्याचार पाहिले होते. या एवढ्या बहुविध अनुभवांनंतर आयुष्याच्या अखेरच्या टप्प्यात त्यांनी श्रीरामकथेचे लेखन केले होते; त्यामुळे त्यांच्या लेखनात ते अनुभवविश्व प्रकट होणे स्वाभाविक ठरते.

एकनाथ युद्धवर्णन करताना अनेक तपशील नोंदवितात. वाद्यांची नावे आणि त्यांचे विविध ध्वनी, रणयोद्ध्यांच्या पोषाखांची वर्णने, त्या योद्ध्यांची वाहने आणि शस्त्रे यांची माहिती, तसेच शस्त्रांचे अनेक प्रकार, त्याचबरोबर बाणांच्या विविध प्रकारांची नावे आणि त्यांचा परिणाम हे नाथ जाणकाराप्रमाणे सांगत राहातात. रामायणकालात विशेषतः राक्षससैन्यात समाविष्ट असलेल्या योद्ध्यांची वर्णने करताना नाथांनी त्यांची भेसूर दर्शने शब्दांकित करण्यात कुशलता दाखविली आहे. तसेच कौशल्य त्यांनी उभयपक्षी होणाऱ्या अस्त्रांच्या उपयोजनेबाबत दाखविले आहे. कोणी कोणते अस्त्र सोडले, त्या अस्त्राची काय शक्ती आहे, त्या अस्त्राचा परिहार दुसऱ्या कोणत्या अस्त्राने होतो हे नाथांनी एखाद्या अस्त्रप्रवीणाच्या सहजतेने नोंदविले आहे.

श्रीरामाच्या वानरसैन्याची लढण्याची पद्धती आणि त्यांनी मारगिरीसाठी वापरलेल्या विविध वृक्षांची विविध नावे नाथांच्या जाणकारीची साक्ष देतात. सुग्रीवाने श्रीरामाकार्यासाठी आमंत्रित केलेल्या वानरवीरांची माहिती तर नाथांनी बारकाईने वर्णन करून ठेवली आहे. वानरांच्या जाती, त्यांचे बाह्यदर्शन, प्रत्येकाची गुणवैशिष्ट्ये यांचा तपशील कुतूहलजनक आहे. त्यातच वानरसैन्याचे संख्याबल सांगताना नाथांनी गणिताचे सखोल ज्ञान दाखविले आहे. वानरवीर उड्डाण करून किती अंतरावर पोहोचू शकतात याविषयीही नाथ सविस्तर माहिती देतात.

हत्ती, घोडे, पक्षी, वानर, मृग यांच्या हालचालींचे नाथांनी केलेले वर्णन म्हणजे स्वभावोक्ती अलंकाराचे नमुनेच ठरतात. रावणाने सीतेला जिथे ठेवले होते त्या अशोकवनात हनुमंताला लाभलेल्या फलाहाराच्या वर्णनात आलेली नामावली थक्क करणारी आहे. त्याच परिसरात असलेल्या वनवृक्षांची, फुलझाडांची नाथ विस्ताराने माहिती देतात. यज्ञसामग्री, होमहवन, अभिचाराची प्रक्रिया यांसाठी लागणारी सामग्री वाचून वाचक थक्क होतो. श्रेष्टींच्या रथांची सजावट, किल्ल्याच्या सुरक्षतेत वापरलेली तंत्रे, मल्लयुद्धातील डावपेच यांचे तपशील नाथ देतात. स्त्रीयांनी वापरायच्या अलंकारांची माहिती, भोजनातले विविध पदार्थ, राजमहालाची लक्षवेधी वर्णने, सुगंधी पदार्थांचा वापर अशा एक ना अनेक प्रकारांच्या वर्णनात नाथांची बहुश्रुतता दिसून येते.

इथवर ज्या वर्णनाचा आणि तपशीलाचा उल्लेख झाला त्यासाठी एकनाथांनी त्यांच्या वाचनात आलेल्या अन्य ग्रंथांची जोड मिळविली असेल. त्याखेरीज नाथांनी एक-एका प्रसंगावरून तो प्रसंग घडला त्या स्थळाचे नामकरण कसे झाले याविषयी दिलेले स्पष्टीकरण मोठे नवलाईचे आहे. सुवर्णमृगामागे श्रीराम गेला आणि तो मायावी मृग दूर जात राहिला. अखेर श्रीरामाने त्याचा वध केला. हे सांगितल्यावर नाथ म्हणतात, "मृगाची काया पडली ते 'कायगाव' आणि मस्तक पडले ते 'टोके', मृगाचे खूर उमटले ते 'नेऊरगाव' अशी स्थलनामे रूढ झाली." याच पद्धतीने एकनाथांनी पार्वतीच्या गर्वहरणाचा प्रसंग बहारीने रंगविला आहे. पार्वती विरहव्याकुळ श्रीरामासमोर सीतेच्या रूपात येते. श्रीराम ती पार्वती असल्याचे ओळखून म्हणतो 'तू का आई'?' या उल्लेखाने पार्वती चकित होते. नाथ या प्रसंगातील 'तू

https://archive.org/details/muluksmiacademy Bhavan Varanasi Trust, Lucknow

CC-0. In Public Domain. Digitized By Sarayu Foundation Trust and eGangotri

का आई' हे शब्द घेऊन तुळजापूरची 'तुकाई' म्हणजेच पार्वती असा निर्देश करायला विसरत नाहीत.

एकनाथांनी लोकांमध्ये रूढ असलेल्या अनेक कल्पनांना आपल्या ग्रंथातील तपशीलाने वळकटी आणली आहे. कावळ्याला एकच वुबुळ असणे, सर्प उरग होणे, घोडे श्यामकर्ण असणे, दूर्वा अमर होणे, सर्प आणि मुंगुस यांचे वैर असणे यांसारख्या अनेक कारणांची नाथ व्युत्पत्ती सांगतात. या वरोवरच हत्ती, चक्रवाक, मृग, मोर इत्यादी प्राण्यांच्या संवंधात असलेली मैथुन-प्रवृत्ती कशी व का आहे याचा उल्लेख नाथ श्रीरामाच्या विरहदुःखी मनाच्या पार्श्वभूमीवर करतात. या प्रकारच्या अनेक चमत्कृतिपूर्ण उल्लेखांनंतर 'अद्यापी, अद्यापवरी' असे शब्द वापरून स्वतःच्या काळाशी त्यांचा अनुवंध जोडून दाखवितात. 'भावार्थ रामायणा'च्या विस्ताराला आणि 'लोकरंजन कथाविनोदे' या सूत्राला न्याय देण्यासाठीच नाथांची वहुश्रुतता उपयुक्त ठरली आहे.

भावार्थ रामायणातील अन्य कथांची योजना

संत एकनाथांचे रामायण ४० हजार ओव्यांचे झाले आहे. हा विस्तार एकनाथांनी जाणीवपूर्वक केला आहे. श्रीरामाची चरित्रकथा सांगताना त्यांनी जिथे जिथे संधी मिळाली तिथे तिथे अन्य ग्रंथातील कथासंदर्भ विस्ताराने आपल्या ग्रंथात अनुस्यूत केले आहेत. कित्येकदा स्वतः तर अनेकदा अन्य व्यक्तींच्या मुखातून त्यांनी त्या कथा निवेदिलेल्या आहेत. हे करताना काही ठिकाणी मूळ वाल्मीकी रामायणाशी फारकतही घेतली आहे. आरंभीच्या वालकाण्डात असलेली श्रावणाची कथा त्यांनी आपल्या विचाराने वेगळी लिहिली आहे. श्रावण आणि त्याचे माता-पिता यांच्या पूर्वजन्मातील हकीगत त्यासाठी निवेदिली आहे. परशुरामाचा संवंध येताच नाथ रेणुकाख्यानाचा संपूर्ण तपशील देऊन सहस्रार्जुन-परशुरामाचे युद्ध वर्णितात. श्रीराम वनवासात ज्या अनेक ऋषींच्या आश्रमांना भेट देतो त्या आश्रमांशी संवंधित कथा नाथ सांगतात. कित्येकदा शापदग्ध अप्सरा, ऋषिपुत्र, यक्ष इत्यादींची श्रीरामाने शाप निर्मुक्ती केली तेव्हा त्या त्या ठिकाणी मूळ कथेचे निवेदन येते.

श्रीराम लक्ष्मणाला हनुमंताशी आपले सपिंडत्व असल्याचे समजावितो तेव्हा पुत्रकामेष्टी यज्ञातील प्रसाद घारीने पळविला. ती घार कोण, मारुतीची जननी अंजनी कशी इत्यादी सर्व वृत्तान्त तेथे सांगितला जातो. अगस्तींकडून हनुमंताचा वालपणातील पराक्रम, त्याचे राहू आणि इंद्राशी युद्ध, त्याला असलेली जन्मापासूनची लंगोटी हे सर्व कथन ऐकविले जाते. दशरथ-कौसल्या विवाहाची अद्‌भुत कथा मधेच येऊन जाते. रावण-मंदोदरीच्या संवादात नारदभेटीचा वृत्तान्त येतो. मंदोदरीच्या जन्मकथेची हकीगत सांगण्यापूर्वी रावण-कैकसी, रावण-शंकर, आत्मलिंगप्राप्ती यांचा संदर्भ खुलासेवार कथन केला जातो. रंजनाच्या दृष्टीने ऋष्यशृंग आणि अप्सरा, वाली आणि रावण, यांच्या कथा खुलवून सांगितल्या जातात. श्रीराम आणि सुग्रीव यांच्या भेटीमुळे वानरराज्याच्या निर्मितीचा विस्तृत वृत्तान्त कथामिषाने अनुस्यूत होतो. प्रत्यक्ष लंकेत युद्ध सुरू असताना जेव्हा हनुमंत औषधी-पर्वत आणायला जातो तेव्हा त्या निमित्ताने एका शापित अप्सरेची कथा येऊन जाते. गजेन्द्र मोक्षाची कथाही नाथ सांगतात.

एकनाथांनी या विविध कथांचा उपयोग भिन्न रसांच्या निर्मितीसाठी जसा केला आहे; तसाच श्रीरामाच्या पूर्णव्रह्म स्वरूपाची ओळख करून देण्यासाठीही केला आहे. श्रीविष्णूने अवतार घेतला आणि सूर्यवंशातील राजा दशरथाचा तो पुत्र झाला. हे मधूनच केव्हा ऋषींकडून सांगितले जाते, तर केव्हा सागराकडून सूर्यवंशातील सत्त्वशील राजांचा आणि त्यांनी आपले सत्त्व टिकविण्यासाठी केलेल्या अलौकिक कार्याचा गौरव सांगितला जातो.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

अनुवादामागील धोरण

'भावार्थ रामायण' ग्रंथाचे लेखन संत एकनाथ आणि त्यांचा शिष्य गावबा यांनी केल्याचे सांगितले जाते. ग्रंथाच्या ४० हजार ओव्यांपैकी नाथांनी युद्धकाण्डाच्या ४४ अध्यायांपर्यंत २५ हजार ओव्यांचे लेखन केले आणि नंतर ते समाधिस्त झाले. पुढील १५ हजार ओव्यांचे लेखन गावबाकडून झाले आहे. 'रामराज्याची गुढी उभारण्याची नाथांची संकल्पना असल्याने नाथांचे जिथवर लेखन झाले आहे तिथवरची संहिता शब्दशः गद्य अनुवादात आणून पुढील भागातील सूत्र कायम ठेवून थोड्या संक्षेपाने त्याचा गद्य अनुवाद केला आहे. 'उत्तरकाण्ड' अनुवादासाठी विचारात घेतलेले नाही कारण त्याचे लेखन केले बऱ्याच जणांनी केले असावे असे संशोधनाने सिद्ध झाले आहे.

एकनाथांच्यानंतर लेखनाची जबाबदारी गावबाची आहे असे मानायचे तर त्यातही ५४ वा अहिरावणवध आणि चंद्रसेनाख्यानाचा अध्याय जयरामसुत कवीच्या नावावरचा उपलब्ध झाला आहे. उत्तरकाण्डाची गावबाची प्रत प्रमाण मानावी तर मुक्तेश्वराचेही उत्तरकाण्ड आहे, तसेच कोनेरीसुताचे उत्तरकाण्डही मिळाले आहे. शिवाय एका अनामकवीचेही उत्तरकाण्ड संशोधकांना मिळाले आहे. डॉ. वसंत स. जोशी, प्रा. पां. ना. कुलकर्णी यांनी या संबंधीचे संशोधन मांडून उत्तरकाण्ड स्वाभाविकतः नाथांशी संबंधित नसल्याचे स्पष्ट केले आहे. या सर्व कवींनी 'एका जनार्दनाशरण' या मुद्रिकेची नोंद करून नाथांविषयीची श्रद्धा मात्र आवर्जून व्यक्त केली आहे. या परिस्थितीत उत्तरकाण्डाचा अनुवाद करण्याचे टाळणेच श्रेयस्कर ठरते.

संत एकनाथांनी श्रीराम हा साक्षात् परब्रह्मच आहे. ही धारणा दृढ धरून लेखन केले. त्यामुळे कोणत्याही संकटात, यशात, अडचणीत श्रीरामनामस्मरण हे तारक असल्याचे वारंवार सांगितले आहे. याशिवाय श्रीहनुमान या रामभक्ताचा आदर्श लोकांना पटवून देण्याचाही नाथांचा स्पष्ट हेतू दिसतो. या उभय दैवतांच्या अतर्क्य, अलौकिक चरित्रकथनात त्यामुळे नाथ अनेक प्रसंगी अतिशयोक्तीचा, अद्भुताचा वापर करण्यासही कचरत नाहीत. त्याचप्रमाणे जिथे रामशत्रूंची म्हणजे राक्षसांची हेटाळणी करण्याची संधी मिळते तिथे नाथ ग्राम्य भाषेचा आणि वर्णनाचा बिनदिक्कत वापर करतात. ऐतिहासिक दृष्ट्या प्रस्तुत ग्रंथाचे माहात्म्य लक्षात घेताना त्यातील राजाची वर्तणूक, नीती, यांची सूचक कल्पना देऊन नाथ समकालीन सत्ताधीशांच्या नीतीवर आणि वर्तणुकीवर अप्रत्यक्ष टीका करतात; यातूनच सत्तेला लालचावलेल्या पराक्रमी पुरुषांना रामराज्य-स्थापनेची सूचनाही देतात.

'भावार्थ रामायण' ग्रंथाचा अनुवाद केल्याने श्रीराम दैवताच्या नाथकृत माहात्म्य-वर्णनाचा अखेर जो परिणाम झाला तो असा

"प्रतिश्वासं सविश्वासं रामं वद दिने दिने।
को विश्वासः पुनः श्वासः आगमिष्यति वा न वा।।'

१९/२७७ लोकमान्यनगर
पुणे ४११०३०
फोन : ४३३४०७८

म. वि. गोखले

https://archive.org/details/muluksbhiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by [illegible] Foundation Trust and eGangotri

संत एकनाथकृत भावार्थ रामायण

विषयानुक्रमणिका

बालकाण्ड

अध्याय पहिला : ईशस्तवन - १. श्रीरामावताराचे निमित्त - १. राजा दशरथाची अस्वस्थता - १. श्रावणाची कथा - २. श्रावणाच्या पूर्वजन्माची कथा - २. ब्रह्महत्येचा परिणाम - २. दैत्यगुरूंशी दशरथाचे युद्ध - २. बृहस्पतींकडून वरदान ३. दशरथाकडून कैकयीला वरदान - ३.

अध्याय दुसरा : अयोध्येत अप्सरा आल्या - ४. ऋष्यशृंग - अप्सरा प्रसंग - ४. स्त्रीसंगावर नाथांचे भाष्य - ५. ऋष्यशृंग अयोध्येत - ५. पुत्रकामेष्टी यज्ञ - ६. यज्ञपुरुषाकडून प्रसादान - ६. कैकयीचे प्रसाद - प्रकरण - ७. घारीकडून प्रसादावर झडप - ७. कैकयीचा पश्चात्ताप आणि आक्रोश - ८.

अध्याय तिसरा : कौसल्येकडून कैकयीचे सांत्वन - ९. कैकयीला दोघींकडून प्रसाददान - १०. सर्वांना आनंद झाला - १०, कैकयीच्या उद्वेगाचे परिणाम - ११. सत्संगमहिमा - ११.

अध्याय चवथा : श्रीरामकथेची महती - ११. एकनाथांची प्रेरणा आणि मनोगत - ११. एकनाथांना श्रोत्यांची विनंती - १२. दशरथ कैकयीकडे येतो - १३. कैकयीचे विचित्र डोहाळे - १३. दशरथाचे सुमित्रेकडून स्वागत - १३. सुमित्रेचे डोहाळे - १४. स्वानंद भोगणारी कौसल्या - १४.

अध्याय पाचवा : कौसल्येचे डोहाळे - १६. दशरथाची चिंता - १७. वसिष्ठांचे दशरथाला आश्वासन - १७.

अध्याय सहावा : श्रीरामजन्मप्रसंगीची ग्रहस्थिती - १८. श्रीरामाचे शरीरवर्णन - १९. श्रीरामाचे बालस्वरूप - २१. सुमित्रेला पुत्रप्राप्ती - २१. कैकयीला पुत्रप्राप्ती - २२. दशरथाचे चार पुत्र - २२.

अध्याय सातवा : रामजन्मानंतर लंकेत अशुभ घटना - २३. कुमारांचे संस्कार आणि अध्ययन - २३, तीर्थयात्रेचा वृत्तान्त - २४. श्रीरामाकडून सुखप्रदान - २४. तीर्थाटनानंतर श्रीराम अयोध्येत - २५.

अध्याय आठवा : श्रीरामाची विरक्ती - २५. विश्वामित्र अयोध्येत येतात - २६. विश्वामित्र - दशरथ संवाद - २६, वसिष्ठांकडून राजास सूचना - २८.

अध्याय नववा : देहाविषयी श्रीरामाचे विश्वामित्रांना प्रश्न - २८. देहाच्या उत्पत्ति - स्थितीचे वर्णन २९. गर्भातील दुःस्थितीचे वर्णन - २९. प्रसूतीच्या वेळचा प्रसंग - २९. बालपणही वेदनामय - ३०. अहंमन्य तारुण्यदशा - ३०. स्त्रियांच्या संबंधाचा परिणाम - ३०. वृद्धावस्था आणि व्याधी - ३१. विषयलोभ, अहंकार यांची निंदा - ३१. श्रीरामाचे सर्वांकडून कौतुक - ३२.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

अध्याय दहावा : विश्वामित्र शुकाख्यान सांगतात - ३३. शुक आणि व्यास यांची अप्सरांशी भेट - ३३. सद्गुरूंशिवाय ज्ञान व्यर्थ - ३४. शुक जनकराजाकडे जातो - ३४. शुकाची जनकाकडून परीक्षा व मार्गदर्शन - ३६. सद्गुरूमहात्म्याचा अनुभव - ३७. जनक शुकाला उपदेश करतो - ३७. शुक मेरुपर्वतावर जातो - ३८.

अध्याय अकरावा : वसिष्ठांचा गौरव - ३९. विश्वामित्रांचा गौरव - ४०. श्रीरामाची योग्यता - ४०. वसिष्ठांना श्रीराम विनंती करतो - ४१. श्रीरामाने प्रश्न केला - ४२. वसिष्ठांचे उत्तर - ४२, श्रीरामाचा प्रश्न ४३, वसिष्ठांचे उत्तर - ४३. सर्व ब्रह्म आहे असा उपदेश - ४४. अहंभावना भ्रांतीचे मूळ - ४५. श्रीरामाला पूर्णानन्द अवस्था येते - ४५. विश्वामित्रांची वसिष्ठांना विनंती - ४६. श्रीरामाच्या चरित्राचे माहात्म्य - ४६. वसिष्ठ रामाला समाधिविषयी सांगतात - ४७. अंतर आणि बाह्य स्थितीचे निरूपण - ४८. श्रीरामाच्या समाधिविसर्जनाचा प्रसंग - ४८. श्रीरामाचे मनोगत - ४९, रामकथेची फलश्रुती - ५०.

अध्याय बारावा : श्रीरामाच्या सावध होण्याचा आनंद - ५०. विश्वामित्रांना विनंती - ५१. श्रीरामाच्या प्रयाणाला शुभशकुन - ५१. शकुनांचे वसिष्ठांकडून निवेदन - ५१. राम कामाश्रमात येऊन थांबतो - ५१ विश्वामित्र रामाला सिद्ध मंत्र देतात - ५२. शरयूसंगमावर विश्रांती - ५२. दुसरे दिवशी शरयूच्या पैलतीरी - ५३. ताटिकेचा पूर्ववृत्तान्त - ५३. ताटिकेचा वध - ५४.

अध्याय तेरावा : अस्त्रांचे प्रकार आणि त्यांची शक्ती - ५५. धनुर्विद्या आणि मल्लविद्या - ५६. मंत्रदेवतांकडून श्रीरामप्रशस्ती - ५६. विश्वामित्रांच्या आश्रमात - ५७. श्रोत्यांना एकनाथांचे आत्मनिवेदन - ५८. श्रीरामामुळे राक्षसांना आडकाठी - ५८. श्रीरामाचे राक्षसांशी युद्ध - ५९. विश्वामित्रांचा दानधर्माने आनंदोत्सव - ६०.

अध्याय चौदावा : मिथिलेला जाण्याविषयी बोलणे - ६१. अहल्येच्या वृत्तान्ताची पार्श्वभूमी - ६१. अहल्या-गौतम यांचा विवाह - ६२. इंद्राचे कपट आणि गौतमांची शापवाणी - ६२. गौतमांकडून उःशाप व पश्चात्ताप - ६४, क्रोधावरील भाष्य - ६५, शापानंतरची इंद्राची स्थिती - ६५. श्रीरामस्तुती आणि रामनामाची महती - ६७. नाममाहात्म्य - ६७. अहल्येकडून रामस्तुती - ६७, अहल्या आणि गौतम यांचे मीलन - ६८

अध्याया पंधरावा : मिथिलेचे किंवा विदेहपुरीचे वर्णन - ६८. स्वयंवराच्या यज्ञमंडपावरचे रूपक - ६९. जनकाकडून स्वागत आणि प्रश्न - ७०, विश्वामित्रांकडून निवेदन - ७०. सीतेच्या पूर्ववृत्तान्ताचे कथन - ७१. पद्माक्षराजाचे मागणे - ७१. पद्मावतीचा विवाह - ७२, पेटीतून भविष्यवाणी आणि पेटीची प्राप्ती - ७३. जनकाकडून कन्येचा स्वीकार - ७४.

अध्याय सोळावा : परशुराम आणि रेणुका यांचे वृत्त - ७४. रेणुकेचा वृत्तान्त - ७४. ऋषींचा क्रोधत्याग - रेणुकेचा संभ्रम - ७५. रेणुकावध आणि परशुरामाला वर - ७५. क्रोधनिंदा आणि क्रोधाची दर्पोक्ती - ७६. जमदग्नींचे क्रोधाला उत्तर - ७७. परशुरामांकडून क्रोधाचा स्वीकार - ७८. सहस्रार्जुनाचे आतिथ्य - ७८. कामधेनूची मागणी - जमदग्नीचा वध - ७९, रेणुकेचा प्रतिकार - कामधेनूचा प्रभाव - ७९.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized By Sayma Foundation Research Academy eGangotri

परशुरामाचे आगमन. रेणुकेची आज्ञा - ८०, परशुरामाची सहस्रार्जुनावर चढाई - ८०, परशुराम सैन्याची दुर्दशा करतो ८२,

अध्याय सतरावा : राजपुत्रांशी परशुरामाचे युद्ध - ८३, सहस्रार्जुन आणि परशुराम यांचे युद्ध - ८३. सहस्रार्जुनाकडून मरताना स्तवन - ८४. परशुराम मिथिलेत - त्याचे स्वागत - ८५. शिवधनुष्याचा सीतेने केलेला खेळ - ८६. शिवधनुष्याचा वृत्तान्त - स्वयंवरासाठी पण - ८६,

अध्याय अठरावा : स्वयंवरासाठी आलेले राजे आणि निमंत्रित - ८७, सीतेचे आगमन आणि स्वरूपवर्णन - ८७, स्वयंवरमंडपात धनुष्य, धनुष्याचा पण - ९०, रावणाचा अहंकार - सीतेला चिंता - ९०. रावणाची दुर्दशा आणि जळफळाट - ९१.

अध्याय एकोणिसावा : श्रीरामाविषयीच्या प्रतिक्रिया - ९३. श्रीरामस्वरूपवर्णन - ९३. श्रीरामाच्या सामुद्रिकाचे वर्णन - ९४.

अध्याय विसावा : श्रीराम पाहून सभाजनांची स्थिती - ९६. शिवधनुष्याची पूर्वकथा - ९७. श्रीरामाकडून चापग्रहण - ९७. श्रीरामाकडून धनुष्य सज्ज होऊन भंगते - ९८. धनुर्भंगाच्या ध्वनीचे परिणाम - ९८. सीता. जनक यांची मनःस्थिती - ९९. सीता रामाला वरमाला घालते - १००, उपस्थितांच्या प्रतिक्रिया - १००.

अध्याय एकविसावा : विश्वामित्रांचे पत्र घेऊन दूताची पाठवणी - १०१. प्रधानाचे अयोध्येकडे गमन - निवेदन - १०१, राजा दशरथ आणि प्रजा आनंदित - १०२. श्रीवसिष्ठ पत्रिका वाचतात - १०२. मिथिलेला जाण्यासाठी सिद्धता - १०३.

अध्याय बाविसावा : जनकाकडून सर्वांचे स्वागत - १०४. दशरथपुत्रांचे वसिष्ठकृत वर्णन - त्यांचे विवाह - १०५. दशरथाकडून विश्वामित्रांची स्तुती - त्यांचे उत्तर - १०५. दशरथाच्या चार पुत्रांच्या लग्नाची तयारी - १०६. श्रीवसिष्ठ सूर्यवंशवर्णन करतात - १०६.

अध्याय तेविसावा : जनकाच्या कुलपरंपरेचे वर्णन - १०७, विवाहविषयक संकल्प, संमती, देवक - १०८, लग्नमंडपाचे वर्णन - १०८. देवतांना आवाहन - गोदान - १०९. भरताचा मामा युधाजित येतो - १०९, चारी जामातांचा सत्कार - ११०. ऋषिपूजन - विश्वामित्र अग्रपूजेचे मानकरी - ११०. भोजनाचे विस्ताराने वर्णन - ११०. भोजनानंतर विडे - दक्षिणा - ११२,

अध्याय चोविसावा : वस्त्रपरिधान आणि तेलफळ - ११३, जनकाकडून वऱ्हाडींचे स्वागत - ११४. वधूंचे आगमन - त्यांना फळे अर्पण - ११४, सुमेधाराणीकडून तेलवण - ११४. चौघे कुमार लग्नमंडपाकडे - ११५,

अध्याय पंचविसावा : मधुपर्काचे विधिविधान - ११७, वधूंचे गौरीहर पूजन - ११८, लग्नघटिका भरताच 'सावधान' झाले - ११८, कंकणबंधन - ११९, होमहवनादी विधी - ११९, धेंडा नाचवणे - १२०. वधूवरांना वस्त्रालंकारांचे आंदण - १२०, प्रयाण - अभिवादन - आशीर्वाद - १२०,

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

अध्याय सव्विसावा : दशरथ मार्गस्थ-अपशकुनांनी साशंक १२१. परशुरामांचे आगमन - दशरथाची प्रार्थना - १२२. परशुरामांचे श्रीरामाला युद्धार्थ आव्हान - १२२, श्रीरामाला विष्णुचाप सज्ज करण्याचे आव्हान - १२२. परशुरामांचे अभिनंदन - सज्ज बाणाचे कार्य - १२३. गत्यंतराचे वर्म श्रीराम छेदतो - १२४, परशुरामांचा गर्व जाऊन. क्रोधत्याग - १२४,

अध्याय सत्ताविसावा : अयोध्येत प्रवेश - प्रजेकडून स्वागत - १२५. श्रीरामाचे राजप्रासादात स्वागत - १२७. लक्ष्मीपूजन - गुरुभक्ती - १२७. श्रीराम आणि सीता यांचा प्रेमभाव - १२८. बालकाण्डाचा उपसंहार - १२८.

अयोध्याकाण्ड

अध्याय पहिला : कुटीविचांचे श्रीरामाशी संबंध - १३०. श्रीरामकथेच्या श्रवणाचे फळ - १३१. भरत आजोळी जातो - १३१.

अध्याय दुसरा : सर्वांची मान्यता - श्रीरामाची स्तुती - १३४. श्रीवसिष्ठांचे योजनापूर्वक निवेदन १३५. राजमंदिरे आणि अन्य स्थळे सजावणे - १३६. दशरथ ग्रहदशा, स्वप्ने यांमुळे चिंताग्रस्त १३६. श्रीराम आपल्या मंदिरात - १३७.

अध्याय तिसरा : ब्रह्मदेवाकडून विकल्पाची पाठवणी - १३९. मंथरेकडून कैकेयीचे मन कलुषित - १४०. सावत्रपणाचे वर्णन - १४१. कैकेयीवर परिणाम - मंथरेची शिकवण - १४२.

अध्याय चवथा : दशरथ आणि कैकेयी यांचा संवाद - १४४. क्रोध आणि विकल्प यांवर भाष्य - १४४, कैकेयी वरपूर्ती मागते - १४५. दशरथाची मनःस्थिती १४६. कैकेयीचा हट्ट - १४७, भविष्यातले परिणाम - १४८.

अध्याय पाचवा : कैकेयी रामाला बोलावते - १४९. अभिषेकाच्या तयारीचा तपशील - १४९. कैकेयीचे कथन आणि सुमंताचा धिक्कार - १४९. श्रीरामाच्या भुवनात सुमंत - १५०. श्रीराम दशरथाच्या भेटीस निघतो - १५१. श्रीराम, दशरथ आणि कैकेयी समोर १५२.

अध्याय सहावा : कैकेयीचे सविस्तर कथन - १५३. कैकेयी वराचे पूर्ववृत्त सांगते - १५३. श्रीराम पितृवचन पालनार्थ सिद्ध - १५४. कैकेयी आनंदित, राजा दुःखी, लक्ष्मण कोपी - १५४. कौसल्येच्या मंदिरात श्रीराम - १५५. कौसल्येची प्रतिक्रिया आणि मार्गदर्शन - १५५, मातृआज्ञेची प्रशस्ती - रामाचे उत्तर - १५६. कौसल्येचा आक्रांत - लक्ष्मणाचा संताप - १५७. श्रीरामाकडून सांत्वनपर उपदेश - १५८. लक्ष्मण आणि कौसल्या समाधानी - १५८.

अध्याय सातवा : भिन्न भिन्न देवतांची प्रार्थना - १५९. आकाशवाणीने कौसल्येस समाधान - १६०. रामाची योजना, सीता दुःखी, तिची प्रार्थना - १६१. सीतेची प्रतिक्रिया - युक्तिवाद - १६२. वसिष्ठांकडे अनुज्ञा मागणे - त्यांनी देणे - १६२. लक्ष्मणाची विनंती - हट्ट - अनुमती - १६३,

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

अध्याय आठवा : वनगमनापूर्वी सर्वांचा दानधर्म - १६४. दशरथाचा निरोप घेणे. त्याची विनंती - १६६. रामाला सुविधा देण्यावरून वाद - १६७. वसिष्ठ. दशरथ कैकेयीचा धिक्कार करतात - १६७. सर्वत्र शोकाकुल वातावरण - १६८.

अध्याय नववा : राजपरिवाराचा आक्रोश - वसिष्ठांचे सांत्वन - १६९. श्रीरामामागे धावणारे ब्राह्मण आणि इतरजन - १६९, गुहकाची रामाशी भेट - सुमंताची विनंती - १७०. गुहकाकडून जटाबंधन - मातेची शंका - १७१, गंगापार जाणे. त्रिवेणीदर्शन - १७१, भारद्वाज आश्रमाकडे प्रयाण - वास्तव्याचा आग्रह - १७२. श्रीरामाकडून अडचणींचे निवेदन - १७२. भारद्वाजांची वास्तव्यासाठी चित्रकूटाची सूचना १७२.

अध्याय दहावा : सुमंत अयोध्येत. निवेदन. राजा दुःखी - १७३, दशरथाचा शोक - आणि निधन - १७४ कैकेयीचा सर्वांकडून धिक्कार - १७५. नागरिकांकडून कैकेयीचा धिक्कार - १७६. ऋषी. प्रधान यांचे आगमन आणि चर्चा - १७७.

अध्याय अकरावा : भरताचे दुःस्वप्न - वसिष्ठांची योजना - १७८, भरत अयोध्येत - सुमंत वृत्तान्त सांगतो - १७९. भरताचा शोकपूर्ण आक्रोश - १७९. कैकेयीची निंदा - मंथरेवर क्रोध - १८०. भरताला वसिष्ठांचा उपदेश - १८१. अभिषेकाला भरत. शत्रुघ्न यांचा नकार - १८१. वसिष्ठांकडून उपायाचे निरूपण - १८२.

अध्याय बारावा : कैकेयी - भरत भेट, सावत्रपणाचा इतिहास - १८२. चारही बंधूंचे पिंडैक्य - भरताचा निर्धार - १८३. श्रीवसिष्ठ भरताची परीक्षा पाहतात - १८४, श्रीरामदर्शनाची उत्सुकता - १८४. भरताबरोबरच्या सैन्याचे वर्णन - १८५. ससैन्य भरत पाहून गुहकाची प्रतिक्रिया - १८५. भरत -गुहक ऐक्य. सुमंताची मध्यस्थी - १८६. श्रीरामाच्या निवासस्थळाचे दर्शन. गुहक गौरव - १८७. गुहक सर्वांना गंगापार करतो - १८७.

अध्याय तेरावा : भरद्वाज - भरत भेट. गैरसमज - १८८, भरद्वाजांना प्रथम राग-मग आनंद - १८९. वसिष्ठांची प्रशस्ती - भरद्वाज सुखी - १९०, भरद्वाजांचे निमंत्रण. स्वागत आणि भोजन - १९०, पक्षांची सुरेल साथ आणि सर्वांची तृप्ती - १९१. भरद्वाजांचा निरोप घेऊन चित्रकूटाकडे - १९२.

अध्याय चवदावा : राम- लक्ष्मणांचा जीवनक्रम - १९३. काकवेषात गंधर्व - सीतेवरच्या प्रसंग - १९३. सीतेकडून क्षमा. रामाकडून शासन. शाप १९५,

अध्याय पंधरावा : सैन्याचा संपूर्ण वनावर परिणाम - १९६. लक्ष्मणाला सैन्य कोणाचे शोधण्यास आज्ञा - १९७, लक्ष्मणाची युद्धसज्जता - १९७, श्रीराम लक्ष्मणाला समजावतो - सापिंड्य सांगणे - १९८, सैन्यात आनंद. भरताची भेटीची उत्कंठा - १९९. सर्व भेटतात - भावनांचा स्फोट २००.

अध्याय सोळावा : शत्रुघ्नाकडून वार्ताकथन - २०१. दशरथाची उत्तरक्रिया २०२.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized By Sarayu Foundation Trust and eGangotri

अध्याय सतरावा : प्रधानादींची भेट - भरताची विनंती - २०३, श्रीरामाचा नकार - भरताचा आग्रही युक्तिवाद - २०४, भरताचा अन्नत्यागाचा निर्धार - २०५, श्रीरामाचा व्रतपालनाचा कठोर निर्धार - २०६, वंशक्षय भीती - वाल्मीकींकडून रहस्यकथन - २०६.

अध्याय अठरावा : श्रीरामाचे भरताला सांत्वन, भरताची स्थिती - २०८, वसिष्ठांची युक्ती - भरताला रामपादुका प्राप्त - २०८, भरत नंदिग्रामात, शत्रुघ्नाकडे कारभार - २०९, वनवास पूर्ण करून येण्याचे आश्वासन - २१०, भरत, शत्रुघ्न यांचे अयोध्येकडे प्रयाण - २१०, नंदिग्रामातील स्थिती - गती - २११.

अरण्यकाण्ड

अध्याय पहिला : जाबाली ऋषींचे निवेदन - २१३, राक्षसांची भीती आणि गुप्तस्थानाची सूचना - २१३, श्रीराम जनस्थानाकडे जातो - २१४,

अध्याय दुसरा : पतिव्रता व्रत, दिव्यवस्त्र सीतेला मिळणे - २१५, अनसूयेची पूर्वकथा - २१५, दत्तात्रेय अवताराची कथा - २१६, विराधवनातील प्रसंग - २१७, श्रीराम - विराध यांचा संघर्ष २१८, विराधाला आत्मबोध, विराधकृतरामस्तुती - २१८, विराधाचे पूर्ववृत्त शाप-उःशाप कथन - २१९, शरभंग ऋषींच्या आश्रमाकडे राम जातो - २१९.

अध्याय तिसरा : शरभंग - श्रीराम भेट - २२०, शरभंगांचे स्ववृत्त कथन आणि प्रयाण - २२१, शरभंग आत्मदहन करून सत्यलोकी - २२२,

अध्याय चवथा : श्रीरामाकडे तापसांची विनंती - २२३, श्रीरामाचे नम्र आश्वासन - २२३, सुतीक्ष्णांच्या आश्रमात रामाचे स्वागत - २२३, दंडकारण्यातील कोणते स्थान निवडावे - २२४, दंडकारण्यातील भ्रमंती - २२४, सरोवराचा आणि मंदकर्णींचा वृत्तान्त - २२४, मंदकर्णींना इंद्राचे वरदान - २२५, श्रीरामाचे मंदकर्णीकडून स्वागत - २२५, अगस्तींचे महिमान - २२६.

अध्याय पाचवा : अगस्तींकडून स्वागत, श्रीरामाचे वंदन -२२७, अगस्तींकडून श्रीराम - स्तुती - महिमा वर्णन - २२८, अगस्तींकडून आयुधे, लोपामुद्रेचे सीतापूजन - २२९, दंडकारण्याची पूर्वकथा - २२९.

अध्याय सहावा : जटायूची भेट - कश्यपवंशाचा वृत्तान्त - २३१, जटायूचे पूर्ववृत्त कथन - २३३, कद्रू - विनता यांचा पण - २३३, कद्रू अमृत मागते - २३५,

अध्याय सातवा : गरुडाचे आक्रमण आणि देवांशी युद्ध - २३७, श्रीविष्णूचे आगमन, वरदान-संवाद २३८, श्रीविष्णूंची गरुडाला सूचना - २४०, जटायूचे रामाला आश्वासन - २४१.

अध्याय आठवा : आश्रमस्थापना, दिनक्रम, लक्ष्मणाचे कौतुक - २४२, सांब राक्षसाचा वध - लक्ष्मणाची शंका - २४३, श्रीरामाकडून लक्ष्मणाचे सांत्वन - २४४, शूर्पणखेचे सूडासाठी आगमन - २४५, लक्ष्मण -शूर्पणखा - श्रीराम यांचे डावपेच - २४६, श्रीरामाची आज्ञा-लक्ष्मणाकडून पालन - २४८, सौमित्र-श्रीराम भेटतात, पुढील योजना - २४९

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized By Sarayu Foundation Trust and eGangotri

अध्याय नववा : शूर्पणखेचे निवेदन - श्रीरामस्वरूप वर्णन २५०, दूत आणि श्रीराम यांचा संघर्ष - २५०, रामवाणाचे परिणाम - रामप्रताप वर्णन - २५१, खर - दूषण - त्रिशिर ससैन्य निघतात - २५२, श्रीरामाचा राक्षससैन्याशी संघर्ष - २५३, राक्षसांना दिसलेले श्रीरामस्वरूप - २५४.

अध्याय दहावा : श्रीरामाकडून राक्षससंहार - २५५, श्रीराम - दूषण संग्राम, दूषणाचा वध - २५७, श्रीराम अन्य राक्षसवीरांचा वध करतो - २५८,

अध्याय अकरावा : त्रिशिरा आणि श्रीराम यांचा संग्राम - २५९, खर आणि श्रीराम यांचे युद्ध - २६१, खराकडून रामस्तुती व त्याला उत्तम गती - २६४, श्रीरामाची सर्वांकडून स्तुती व अभिनंदन - २६४,

अध्याय बारावा : शूर्पणखेची कृती, तिची विटंवना - २६६, राक्षसस्त्रिया लंकेत, रावणाची भेट - २६६, शूर्पणखा श्रीरामाचे वर्णन करते - २६८, शूर्पणखाकृत सहेतुक सीतावर्णन - २६९, रावणाची अवस्था आणि भावी योजना - २६९,

अध्याय तेरावा : मारीचाला रावणाकडून निवेदन - २७०, मारीचाची प्रतिक्रिया - २७०, रावणाकडून प्रलोभन, नंतर धाक - २७२, रामाकडून मरणे मारीचाला मान्य - २७३.

अध्याय चौदावा : मारीच हरिणाचे रूप घेतो, सीता भुलते - २७३, सीतेची हौस पुरवण्यास श्रीरामाची सिद्धता - २७५, मारीच रामाला झुलवत दूर नेतो - २७५, मारीचाची लक्ष्मणाला हाक, नंतर मृत्यू - २७६, मारीचाच्या हाकेने श्रीराम साशंक - २७६,

अध्याय पंधरावा : सीता आणि लक्ष्मण यांच्यात मतभेद - २७७, लक्ष्मणरेषा घालून लक्ष्मणाचे रामाकडे जाणे - २७९, लक्ष्मणाचे रामभेटीत सीतेविषयी कथन - २७९, श्रीरामाच्या सर्वज्ञतेने रहस्य जाणले होते - २८१.

अध्याय सोळावा : रावणाचे आगमन, सीतादर्शन, तिला प्रश्न - २८२, सीतेकडून वृत्तान्त कथन - २८३, लक्ष्मणरेषा, रावण चकित, सीता वाहेर जाते - २८४, सीता आणि देव यांचा संवाद - २८५, मायासीता, रावणाकडून हरण २८६,

अध्याय सतरावा : लक्ष्मणाशी वागल्याचा सीतेला पश्चात्ताप - २८७, सीतेला पश्चात्ताप, तिचा संदेश आणि विश्वास - २८८, जटायूकडून रावणाला प्रतिवंध - २८९, रावणाशी जटायूचे युद्ध - २९०, रावण कपटाने जटायूला घायाळ करतो - २९२,

अध्याय अठरावा : सीतेकडून धाक, रावण सीतेसह लंकेकडे - २९३, अलंकार टाकून सीता मार्ग दाखविते - २९४, रावणाकडून सीतेचा अनुनय, ती धिक्कारते - २९५, सीता रावणाच्या महालात - २९६, रावणाचा अनुनय, सीतेकडून धिःक्कार - २९७, रावणाचा संताप, पुन्हा सीतेकडून धिःक्कार - २९७,

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized By Sarayu Foundation Trust and eGangotri

अध्याय सतरावा : प्रधानादींची भेट - भरताची विनंती - २०३, श्रीरामाचा नकार - भरताचा आग्रही युक्तिवाद - २०४, भरताचा अन्नत्यागाचा निर्धार - २०५, श्रीरामाचा व्रतपालनाचा कठोर निर्धार - २०६, वंशक्षय भीती - वाल्मीकींकडून रहस्यकथन - २०६.

अध्याय अठरावा : श्रीरामाचे भरताला सांत्वन, भरताची स्थिती - २०८, वसिष्ठांची युक्ती - भरताला रामपादुका प्राप्त - २०८, भरत नंदिग्रामात, शत्रुघ्नाकडे कारभार - २०९, वनवास पूर्ण करून येण्याचे आश्वासन - २१०, भरत, शत्रुघ्न यांचे अयोध्येकडे प्रयाण - २१०, नंदिग्रामातील स्थिती - गती - २११.

अरण्यकाण्ड

अध्याय पहिला : जाबाली ऋषींचे निवेदन - २१३, राक्षसांची भीती आणि गुप्तस्थानाची सूचना - २१३, श्रीराम जनस्थानाकडे जातो - २१४,

अध्याय दुसरा : पतिव्रता व्रत, दिव्यवस्त्र सीतेला मिळणे - २१५, अनसूयेची पूर्वकथा - २१५, दत्तात्रेय अवताराची कथा - २१६, विराधवनातील प्रसंग - २१७, श्रीराम - विराध यांचा संघर्ष २१८, विराधाला आत्मबोध, विराधकृतरामस्तुती - २१८, विराधाचे पूर्ववृत्त शाप-उःशाप कथन - २१९, शरभंग ऋषींच्या आश्रमाकडे राम जातो - २१९.

अध्याय तिसरा : शरभंग - श्रीराम भेट - २२०, शरभंगांचे स्ववृत्त कथन आणि प्रयाण - २२१, शरभंग आत्मदहन करून सत्यलोकी - २२२.

अध्याय चवथा : श्रीरामाकडे तापसांची विनंती - २२३, श्रीरामाचे नम्र आश्वासन - २२३, सुतीक्ष्णांच्या आश्रमात रामाचे स्वागत - २२३, दंडकारण्यातील कोणते स्थान निवडावे - २२४, दंडकारण्यातील भ्रमंती - २२४, सरोवराचा आणि मंदकर्णींचा वृत्तान्त - २२४, मंदकर्णींना इंद्राचे वरदान - २२५, श्रीरामाचे मंदकर्णींकडून स्वागत - २२५, अगस्तींचे महिमान - २२६.

अध्याय पाचवा : अगस्तींकडून स्वागत, श्रीरामाचे वंदन -२२७, अगस्तींकडून श्रीराम - स्तुती - महिमा वर्णन - २२८, अगस्तींकडून आयुधे, लोपामुद्रेचे सीतापूजन - २२९, दंडकारण्याची पूर्वकथा - २२९.

अध्याय सहावा : जटायूची भेट - कश्यपवंशाचा वृत्तान्त - २३१, जटायूचे पूर्ववृत्त कथन - २३३, कद्रू - विनता यांचा पण - २३३, कद्रू अमृत मागते - २३५,

अध्याय सातवा : गरुडाचे आक्रमण आणि देवांशी युद्ध - २३७, श्रीविष्णूचे आगमन, वरदान-संवाद २३८, श्रीविष्णूंची गरुडाला सूचना - २४०, जटायूचे रामाला आश्वासन - २४१.

अध्याय आठवा : आश्रमस्थापना, दिनक्रम, लक्ष्मणाचे कौतुक - २४२, सांब राक्षसाचा वध - लक्ष्मणाची शंका - २४३, श्रीरामाकडून लक्ष्मणाचे सांत्वन - २४४, शूर्पणखेचे सूडासाठी आगमन - २४५, लक्ष्मण -शूर्पणखा - श्रीराम यांचे डावपेच - २४६, श्रीरामाची आज्ञा-लक्ष्मणाकडून पालन - २४८, सौमित्र-श्रीराम भेटतात, पुढील योजना - २४९

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

अध्याय नववा : शूर्पणखेचे निवेदन - श्रीरामस्वरूप वर्णन २५०, दूत आणि श्रीराम यांचा संघर्ष - २५०, रामबाणाचे परिणाम - रामप्रताप वर्णन - २५१, खर - दूषण - त्रिशिर ससैन्य निघतात - २५२, श्रीरामाचा राक्षससैन्याशी संघर्ष - २५३, राक्षसांना दिसलेले श्रीरामस्वरूप - २५४.

अध्याय दहावा : श्रीरामाकडून राक्षससंहार - २५५, श्रीराम - दूषण संग्राम, दूषणाचा वध - २५७, श्रीराम अन्य राक्षसवीरांचा वध करतो - २५८,

अध्याय अकरावा : त्रिशिरा आणि श्रीराम यांचा संग्राम - २५९, खर आणि श्रीराम यांचे युद्ध - २६१, खराकडून रामस्तुती व त्याला उत्तम गती - २६४, श्रीरामाची सर्वांकडून स्तुती व अभिनंदन - २६४,

अध्याय बारावा : शूर्पणखेची कृती, तिची विटंबना - २६६, राक्षसस्त्रिया लंकेत, रावणाची भेट - २६६, शूर्पणखा श्रीरामाचे वर्णन करते - २६८, शूर्पणखाकृत सहेतुक सीतावर्णन - २६९, रावणाची अवस्था आणि भावी योजना - २६९,

अध्याय तेरावा : मारीचाला रावणाकडून निवेदन - २७०, मारीचाची प्रतिक्रिया - २७०, रावणाकडून प्रलोभन, नंतर धाक - २७२, रामाकडून मरणे मारीचाला मान्य - २७३.

अध्याय चौदावा : मारीच हरिणाचे रूप घेतो, सीता भुलते - २७३, सीतेची हौस पुरवण्यास श्रीरामाची सिद्धता - २७५, मारीच रामाला झुलवत दूर नेतो - २७५, मारीचाची लक्ष्मणाला हाक, नंतर मृत्यू - २७६, मारीचाच्या हाकेने श्रीराम साशंक - २७६,

अध्याय पंधरावा : सीता आणि लक्ष्मण यांच्यात मतभेद - २७७, लक्ष्मणरेषा घालून लक्ष्मणाचे रामाकडे जाणे - २७९, लक्ष्मणाचे रामभेटीत सीतेविषयी कथन - २७९, श्रीरामाच्या सर्वज्ञतेने रहस्य जाणले होते - २८१.

अध्याय सोळावा : रावणाचे आगमन, सीतादर्शन, तिला प्रश्न - २८२, सीतेकडून वृत्तान्त कथन - २८३, लक्ष्मणरेषा, रावण चकित, सीता बाहेर जाते - २८४, सीता आणि देव यांचा संवाद - २८५, मायासीता, रावणाकडून हरण २८६,

अध्याय सतरावा : लक्ष्मणाशी वागल्याचा सीतेला पश्चात्ताप - २८७, सीतेला पश्चात्ताप, तिचा संदेश आणि विश्वास - २८८, जटायूकडून रावणाला प्रतिबंध - २८९, रावणाशी जटायूचे युद्ध - २९०, रावण कपटाने जटायूला घायाळ करतो - २९२,

अध्याय अठरावा : सीतेकडून धाक, रावण सीतेसह लंकेकडे - २९३, अलंकार टाकून सीता मार्ग दाखविते - २९४, रावणाकडून सीतेचा अनुनय, ती धिक्कारते - २९५, सीता रावणाच्या महालात - २९६, रावणाचा अनुनय, सीतेकडून धिःक्कार - २९७, रावणाचा संताप, पुन्हा सीतेकडून धिःक्कार - २९७,

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

अध्याय एकोणिसावा : सीतेला भिवविणाऱ्या राक्षसी - २९९. राक्षसींचे प्रयत्न. सीतेवर परिणाम नाही - २९९. राम-लक्ष्मण सीता शोधार्थ. लक्ष्मणाला दोष - ३००. सीतेसाठीच्या श्रीरामाच्या शोकाची परमावधी - ३०१. श्रीरामाला मार्ग दाखविणाऱ्या खुणा दिसतात - ३०३. श्रीरामाचा क्रोध. लक्ष्मणाकडून सांत्वन - ३०४.

अध्याय विसावा : सीतावियोगाने श्रीरामाची भ्रममूल स्थिती - ३०५. श्रीरामाच्या स्थितीवर उमा - महेशांची चर्चा - ६०५. श्रीराम उमेला शरण आणून सज्ञान करतो - ३०८. उमा पश्चात्तापदग्ध - श्रीरामाचा उपदेश - ३०८. श्रीरामाच्या उपदेशाने सर्वांवर परिणाम - ३१०. एकनाथांचे शिवरामायणावर भाष्य - ३१०. श्रीरामायण कथेची विविध नावे - रूपे - ३११.

अध्याय एकविसावा : श्रीराम आणि जटायू यांची भेट - ३१२. श्रीरामकृपेने जटायूला उत्तम गती प्राप्त - ३१५.

अध्याय बाविसावा : श्रीराम-कबंध- राक्षस यांची भेट - ३१६, कबंध आपला वृत्तान्त सांगतो - ३१८. कबंधाचे देहदहन, त्याचे मार्गदर्शन - ३२०.

अध्याय तेविसावा : शबरीला रामाचा उपदेश - ३२२. प्राण्यांच्या कामक्रीडेने श्रीराम प्रक्षुब्ध - ३२३. श्रीराम ऋष्यमूक पर्वताकडे जातो - ३२५. एकनाथकृत अरण्यकाण्डाचा समारोप - ३२५.

किष्किंधाकाण्ड

अध्याय पहिला : श्रीसंत एकनाथकृत प्रास्ताविक - ३२६. श्रीराम किष्किंधेकडे. सुग्रीव भयभीत - ३२६. हनुमंत श्रीरामाकडे येतो - ३२७ श्रीराम-हनुमंत यांची शक्तिपरीक्षा - ३२८. हनुमंत आणि श्रीराम यांचे सख्य - ३२९.

अध्याय दुसरा : हनुमंत सुग्रीवाचे वृत्त सांगतो - ३३०. ऋक्षाची शापमुक्ती. वाली-सुग्रीवांना शक्तिप्राप्ती - ३३२. किष्किंधा नगरीची निर्मिती; वानर राजे झाले - ३३३.

अध्याय तिसरा : श्रीराम आणि सुग्रीव यांचे सख्य - ३३४. श्रीराम आणि सुग्रीव सीताशोधाविषयी बोलतात - ३३५. वालीच्या सामर्थ्याचे वर्णन - ३३६. श्रीरामाचे सुग्रीवाला आश्वासन - ३३८.

अध्याय चवथा : सुग्रीव वैराची कारणपरंपरा सांगतो - ३३८. मयासुराचे वालीला आव्हान - ३३८. वालीच्या वधाचा गैरसमज - ३३९. वालीचे पुनरागमन - सुग्रीवावर रोष - ३४०. वालीचा आरोप. तारेकडून स्पष्टीकरण - ३४२. वालीने सुग्रीवाला नगराबाहेर हुसकावले - ३४३.

अध्याय पांचवा : मतंगऋषींच्या शापाचा वृत्तान्त - ३४३. वाली-सुग्रीव संघर्षाचे निवेदन - ३४४. सुग्रीव आणि वाली यांचे युद्ध - ३४५. श्रीरामाचा वालीस ओळखताना गोंधळ - ३४६. श्रीरामाला दूषण आणि त्याचे स्पष्टीकरण - ३४७.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Trust and eGangotri

अध्याय सहावा : तारेची विनवणी, वालीचे प्रत्युत्तर ३४९, तारेचा उपदेश, वालीची प्रताप-प्रौढी-३५०, वाली-सुग्रीव युद्ध, राम-वाली संवाद - ३५१, वालीची रामाला विनंती, रामाचे आश्वासन - ३५३,

अध्याय सातवा : तारेचा सहगमनाचा निश्चय, रामाला दूषण - ३५५, वालीकडून तारेला उपदेश - ३५६, वालीचे निधन, तारेचा विलाप - ३५७, श्रीरामाकडून तारेचे सांत्वन, तिला उपदेश - ३५७, श्रीरामाच्या आज्ञेने तारा सुग्रीवाची पत्नी - ३५९, श्रीरामाला वंदन - ३६०,

अध्याय आठवा : सुग्रीवाची रामकार्याविषयी उपेक्षा - ३६०, सुग्रीवाला समजावणे, धाक, नंतर तो शरण ३६१, सुग्रीव शरण - लक्ष्मणाचा सन्मान - ३६३, सुग्रीवाचे आश्वासन आणि श्रीरामस्तुती - ३६४,

अध्याय नववा : सुग्रीवकृत वानरसेनेचे निवेदन - ३६५, अंगद-श्रीराम भेट - ३६६, वानरांच्या लीला, हनुमंताविषयी प्रश्न - ३६७,

अध्याय दहावा : अगस्तींनी मारुतीची जन्मकथा सांगितली - ३६८, राहूचे गाऱ्हाणे, इंद्र-हनुमान संग्राम - ३६९, वायूला देवांचे उत्तर, हनुमंताला वरदान - ३७१, वायूचा आनंद, मारुतीच्या बालक्रीडा, शाप -३७२,

अध्याय अकरावा : (पृष्ठ ३७३ ते ३७८) ,

अध्याय बारावा : : दक्षिण दिशेला गेलेले वानरवीर - ३७८, सुग्रीवाचे वानरवीरांना मार्गदर्शन - ३७९, शोधकाचा सत्कार, शोधासाठी मर्यादा - ३८२, वानरांचे उत्साहाने प्रयाण - ३८२,.

अध्याय तेरावा : हनुमंत-अंगद, हनुमंत-श्रीराम संवाद - ३८३, श्रीरामाकडून सीतेविषयी निवेदन - ३८४, श्रीराम मारुतीला खूण म्हणून मुद्रिका देतो - ३८६

अध्याय चौदावा : सुपर्णाचे शोधाविषयी निवेदन - ३८७, दक्षिणेकडे गेलेल्यांचा वृत्तान्त - ३८७, हनुमंत त्या शापित वनाविषयी सांगतो - ३८८, वानरांची तहानभुकेने व्याकुळ अवस्था - ३८८, वानरांचा विवर-प्रवेश, विवरातला वृत्तान्त - ३८९,

अध्याय पंधरावा : तापसी कुमारीचा वृत्तान्त - ३९०, वानरांची तृप्ती, अन्नदानाचे महत्त्व - ३९४,

अध्याय सोळावा : तापसीचा प्रश्न, हनुमंताचे निवेदन - ३९४, विवरावाहेर पडण्यासाठी वानरांना साहाय्य - ३९५, वानर विवरावाहेर, समुद्रतीरावर - ३९६, वानरांचा समुद्रापाशीच थांबण्याचा निर्णय - ३९६, अंगद-संपाती संवाद, हनुमंताचा प्रश्न - ३९७, संपातीचे पूर्ववृत्त-कथन ३९८, हनुमंत जटायूची वार्ता कथन करतो - ३९९

अध्याय सतरावा : वानरसैन्यातील योद्ध्यांचे स्व-पराक्रम कथन - ४०१, हनुमंताची स्तुती, त्याचे निवेदन - ४०२, हनुमंताच्या उड्डाणाचे परिणाम - ४०२, हनुमंताचे प्रत्यक्ष उड्डाण - ४०३, मैनाकगिरी आणि हनुमंत यांचा संवाद - ४०४, दनु, सुरसा-हनुमंत-संघर्ष - शक्ती परीक्षा - ४०५,

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

अध्याय एकोणिसावा : सीतेला भिवविणाऱ्या राक्षसी - २९९. राक्षसींचे प्रयत्न. सीतेवर परिणाम नाही - २९९. राम-लक्ष्मण सीता शोधार्थ. लक्ष्मणाला दोष - ३००. सीतेसाठीच्या श्रीरामाच्या शोकाची परमावधी - ३०१. श्रीरामाला मार्ग दाखविणाऱ्या खुणा दिसतात - ३०३. श्रीरामाचा क्रोध. लक्ष्मणाकडून सांत्वन - ३०४.

अध्याय विसावा : सीतावियोगाने श्रीरामाची भ्रममूल स्थिती - ३०५. श्रीरामाच्या स्थितीवर उमा - महेशांची चर्चा - ६०५. श्रीराम उमेला शरण आणून सज्ञान करतो - ३०८. उमा पश्चात्तापदग्ध - श्रीरामाचा उपदेश - ३०८. श्रीरामाच्या उपदेशाने सर्वांवर परिणाम - ३१०. एकनाथांचे शिवरामायणावर भाष्य - ३१०. श्रीरामायण कथेची विविध नावे - रूपे - ३११.

अध्याय एकविसावा : श्रीराम आणि जटायू यांची भेट - ३१२. श्रीरामकृपेने जटायूला उत्तम गती प्राप्त - ३१५.

अध्याय बाविसावा : श्रीराम-कवंध- राक्षस यांची भेट - ३१६. कवंध आपला वृत्तान्त सांगतो - ३१८. कवंधाचे देहदहन. त्याचे मार्गदर्शन - ३२०.

अध्याय तेविसावा : शबरीला रामाचा उपदेश - ३२२. प्राण्यांच्या कामक्रीडेने श्रीराम प्रक्षुब्ध - ३२३. श्रीराम ऋष्यमूक पर्वताकडे जातो - ३२५. एकनाथकृत अरण्यकाण्डाचा समारोप - ३२५.

किष्किंधाकाण्ड

अध्याय पहिला : श्रीसंत एकनाथकृत प्रास्ताविक - ३२६. श्रीराम किष्किंधेकडे. सुग्रीव भयभीत - ३२६. हनुमंत श्रीरामाकडे येतो - ३२७ श्रीराम-हनुमंत यांची शक्तिपरीक्षा - ३२८. हनुमंत आणि श्रीराम यांचे सख्य - ३२९.

अध्याय दुसरा : हनुमंत सुग्रीवाचे वृत्त सांगतो - ३३०. ऋक्षाची शापमुक्ती. वाली-सुग्रीवांना शक्तिप्राप्ती - ३३२. किष्किंधा नगरीची निर्मिती; वानर राजे झाले - ३३३.

अध्याय तिसरा : श्रीराम आणि सुग्रीव यांचे सख्य - ३३४. श्रीराम आणि सुग्रीव सीताशोधाविषयी बोलतात - ३३५. वालीच्या सामर्थ्याचे वर्णन - ३३६. श्रीरामाचे सुग्रीवाला आश्वासन - ३३८.

अध्याय चवथा : सुग्रीव वैराची कारणपरंपरा सांगतो - ३३८. मयासुराचे वालीला आव्हान - ३३८. वालीच्या वधाचा गैरसमज - ३३९. वालीचे पुनरागमन - सुग्रीवावर रोष - ३४०. वालीचा आरोप. ताराकडून स्पष्टीकरण - ३४२. वालीने सुग्रीवाला नगराबाहेर हुसकावले - ३४३.

अध्याय पांचवा : मतंगऋषींच्या शापाचा वृत्तान्त - ३४३. वाली-सुग्रीव संघर्षाचे निवेदन - ३४४. सुग्रीव आणि वाली यांचे युद्ध - ३४५. श्रीरामाचा वालीस ओळखताना गोंधळ - ३४६. श्रीरामाला दूषण आणि त्याचे स्पष्टीकरण - ३४७.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

अध्याय सहावा : तारेची विनवणी, वालीचे प्रत्युत्तर ३४९, तारेचा उपदेश, वालीची प्रताप-प्रौढी-३५०, वाली-सुग्रीव युद्ध, राम-वाली संवाद - ३५१, वालीची रामाला विनंती, रामाचे आश्वासन - ३५३,

अध्याय सातवा : तारेचा सहगमनाचा निश्चय, रामाला दूषण - ३५५, वालीकडून तारेला उपदेश - ३५६, वालीचे निधन, तारेचा विलाप - ३५७, श्रीरामाकडून तारेचे सांत्वन, तिला उपदेश - ३५७, श्रीरामाच्या आज्ञेने तारा सुग्रीवाची पत्नी - ३५९, श्रीरामाला वंदन - ३६०,

अध्याय आठवा : सुग्रीवाची रामकार्याविषयी उपेक्षा - ३६०, सुग्रीवाला समजावणे, धाक, नंतर तो शरण ३६१, सुग्रीव शरण - लक्ष्मणाचा सन्मान - ३६३, सुग्रीवाचे आश्वासन आणि श्रीरामस्तुती - ३६४,

अध्याय नववा : सुग्रीवकृत वानरसेनेचे निवेदन - ३६५, अंगद-श्रीराम भेट - ३६६, वानरांच्या लीला, हनुमंताविषयी प्रश्न - ३६७,

अध्याय दहावा : अगस्तींनी मारुतीची जन्मकथा सांगितली - ३६८, राहूचे गाऱ्हाणे, इंद्र-हनुमान संग्राम - ३६९, वायूला देवांचे उत्तर, हनुमंताला वरदान - ३७१, वायूचा आनंद, मारुतीच्या बालक्रीडा, शाप -३७२,

अध्याय अकरावा : (पृष्ठ ३७३ ते ३७८),

अध्याय बारावा : : दक्षिण दिशेला गेलेले वानरवीर - ३७८, सुग्रीवाचे वानरवीरांना मार्गदर्शन - ३७९, शोधकाचा सत्कार, शोधासाठी मर्यादा - ३८२, वानरांचे उत्साहाने प्रयाण - ३८२,.

अध्याय तेरावा : हनुमंत-अंगद, हनुमंत-श्रीराम संवाद - ३८३, श्रीरामाकडून सीतेविषयी निवेदन - ३८४, श्रीराम मारुतीला खूण म्हणून मुद्रिका देतो - ३८६

अध्याय चौदावा : सुषेणाचे शोधाविषयी निवेदन - ३८७, दक्षिणेकडे गेलेल्यांचा वृत्तान्त - ३८७, हनुमंत त्या शापित वनाविषयी सांगतो - ३८८, वानरांची तहानभुकेने व्याकुळ अवस्था - ३८८, वानरांचा विवर-प्रवेश, विवरातला वृत्तान्त - ३८९,

अध्याय पंधरावा : तापसी कुमारीचा वृत्तान्त - ३९०, वानरांची तृप्ती, अन्नदानाचे महत्त्व - ३९४,

अध्याय सोळावा : तापसीचा प्रश्न, हनुमंताचे निवेदन - ३९४, विवराबाहेर पडण्यासाठी वानरांना साहाय्य - ३९५, वानर विवराबाहेर, समुद्रतीरावर - ३९६, वानरांचा समुद्रापाशीच थांबण्याचा निर्णय - ३९६, अंगद-संपाती संवाद, हनुमंताचा प्रश्न - ३९७, संपातीचे पूर्ववृत्त-कथन ३९८, हनुमंत जटायूची वार्ता कथन करतो - ३९९

अध्याय सतरावा : वानरसैन्यातील योद्ध्यांचे स्व-पराक्रम कथन - ४०१, हनुमंताची स्तुती, त्याचे निवेदन - ४०२, हनुमंताच्या उड्डाणाचे परिणाम - ४०२, हनुमंताचे प्रत्यक्ष उड्डाण - ४०३, मैनाकगिरी आणि हनुमंत यांचा संवाद - ४०४, दनु, सुरसा-हनुमंत-संघर्ष - शक्ती परीक्षा - ४०५,

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized By Sarayu Foundation Trust and eGangotri

अध्याय अठरावा : सिंहिका - हनुमंत संग्राम - ४०७, मारुतीची चतुराई, पराक्रम यांचे वर्णन - ४०७, हनुमंत-क्रौंचा यांचा संघर्ष - ४०८, मारुतीचे लंकेत आगमन - ४१०

सुंदरकाण्ड

अध्याय पहिला : लंकेची जडण-घडण आणि अभेद्यता -४११, लंकेतले राक्षस - ४१२.

अध्याय दुसरा : प्रधानादींच्या घरात हनुमंताचा शोध - ४१५, हनुमान इंद्रजित-भुवनात सुलोचना-दर्शन -४१७, कुंभकर्ण भुवनात हनुमंत - ४१८, बिभीषणाच्या गृहात मारुतीचा प्रवेश - ४१९.

अध्याय तिसरा : मारुतीने शेपटीने लोकात कलह माजविला - ४२०, रावणाच्या सभेतला वृत्तान्त - ४२२, रावणाच्या सभेतला गोंधळ - ४२३.

अध्याय चवथा : हनुमंताचे दुःखपूर्ण मनोगत - ४२५, विचारग्रस्त मारुती, श्रीरामाचा धावा - ४२५, रावणाच्या मंदिरात मारुतीचा प्रवेश - ४२७

अध्याय पाचवा : मारुतीचा क्रोध - ४२९, मंदोदरी - रावण यांचा संवाद - ४२९, रावण मंदोदरीच्या विचाराने अस्वस्थ - ४३१, मारुतीकडून पाठलाग - त्याला सीतादर्शन - ४३१,

अध्याय सहावा : मंदोदरीची जीवनकथा - रावणमाता कैकसी - ४३३, रावण कैलासाला जातो - ४३३, रावणाकडून मस्तक समर्पण, वरप्राप्ती - ४३४, रावण, पार्वती व आत्मलिंग घेऊन निघतो - ४३४, रावण श्रीशिवाकडे, मंदोदरीचे निर्माण - ४३५, आत्मलिंगाची वार्ता - ४३६, रावणाचा शोक - क्षेत्रांची उत्पत्ती - ४३७,

अध्याय सातवा : अशोकवनाचे मारुतीला दर्शन, त्याच्या चेष्टा - ४३८, हनुमंताला दिसलेली अशोकवनाची शोभा - ४३८, सीतादर्शन, तिची मनोवस्था, नाममहिमा - ४३९, हनुमंताचे विचार - रात्रीची साथ - ४४०, रावणाची मनःस्थिती, अशोकवनात आगमन - ४४१,

अध्याय आठवा : रावणाचे भाषण - सीतेची प्रतिक्रिया - ४४३, सीतेचा क्रोध, संयमपूर्ण विवेचन, राममाहात्म्य - ४४८, रावण, मारुती प्रतिक्रिया, मंदोदरीचे आगमन - ४४९

अध्याय नववा : मंदोदरीची रावणाला समज - ४४९, मंदोदरी रावणाला नारदवचनाचे स्मरण देते - ४५०, कौसल्या-दशरथ यांचे पूर्ववृत्त, विवाह - ४५१, दशरथ - कौसल्या विवाह - ४५२, रावणाची प्रतिक्रिया-मंदोदरीची सूचना - ४५२,

अध्याय दहावा : रावण पत्न्यांकडून सीतेचे सांत्वन, ब्रह्माचा शाप - ४५३, सीतेची निर्भयता - राक्षसींवर परिणाम - ४५५, त्रिजटेचे स्वप्न - राक्षसींचे परतणे - ४५५, हनुमंताची प्रतिक्रिया - ४५६.

अध्याय अकरावा : सीतेचा पूर्वकृतीविषयी अनुताप - ४५८, हनुमंत सीतेकडे श्रीरामाची मुद्रिका टाकतो - ४५८, सीतेकडून मुद्रिकेला मनोगत कथन - ४५९, हनुमंत श्रीरामाचे गुणवर्णन करतो - ४६१, मारुतीचा आनंद, सीतेची शंका - ४६२

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Trust, Lucknow

अध्याय बारावा : हनुमंत श्रीरामवर्णनासह रामकथा सांगतो - ४६३, हनुमंताच्या निवेदनावर सीतेची प्रतिक्रिया - ४६४, हनुमंताचे आश्वासन, सीतेची शंका - ४६५, शेपटीच्या सामर्थ्याचे दर्शन, सीतेची प्रतिक्रिया - ४६६, मारुती सीतेकडून खूण आणि निरोप घेतो - ४६७

अध्याय तेरावा : मारुती राक्षसांना पीडा देऊ इच्छितो - ४६८, मारुतीच्या फलाहाराचे वर्णन - ४६९, राक्षसी-सीता यांचा संवाद, मारुतीची कृती - ४७१, रावणाला वृत्त समजते - राक्षसांचा विध्वंस - ४७२, मारुतीकडून राक्षसांचा विध्वंस रावणास निरोप - ४७२,

अध्याय चौदावा : मारुती आणि जंवुमाळी यांचे युद्ध - ४७३, प्रधानपुत्र हनुमंतावर चालून जातात - ४७५, प्रधानपुत्रांचा हनुमंताकडून घात - ४७५, रावण पाच सेनापतींना मारुतीवर धाडतो - ४७६, रावण अखयापुत्राला मारुतीवर पाठवतो - ४७७, मारुती अखयाचा वध करतो - ४७८

अध्याय पंधरावा : रावणाची साशंकता, इंद्रजिताचे आश्वासन - ४८०, मारुतीवर सैन्याची स्वारी व त्यांचा नाश - ४८१, रावणभगिनी असाळी आणि मारुती संघर्ष - ४८२, इंद्रजित आणि मारुती यांचा संग्राम - ४८३.

अध्याय सोळावा : इंद्रजिताचे पलायन - मारुतीचा विवेक - ४८६, मारुतीचा शेपटीशी विचार, राक्षससंहार - ४८६, इंद्रजितासाठी रावणाचा शोक, ब्रह्मयाची सूचना - ४८८

अध्याय सतरावा : इंद्रजित-ब्रह्मदेव यांचा संवाद - ४९०, ब्रह्मदेव मारुतीला बंधन मानायला सांगतो - ४९१, मारुतीची राक्षसांकडून चेष्टा - लंकेत आगमन - ४९१, मारुती लंकेत येतो - राक्षसांची प्रतिक्रिया - ४९२, मारुती आणि रावण यांचा प्रत्यक्ष संवाद - ४९३,

अध्याय अठरावा : रावणाचा प्रश्न - मारुतीचे उत्तर ४९६, मारुतीच्या शेपटीला वस्त्रे गुंडाळण्याचा प्रयत्न - ४९७, मारुतीचे शेपूट पेटविण्याचा प्रयत्न - ४९९,

अध्याय एकोणिसावा : मारुतीची स्थिती, राक्षसांची प्रतिक्रिया - ५००, जळत्या शेपटीने मारुती अनर्थ करतो - ५०१, राक्षसांकडून चाल - मारुतीची प्रतिक्रिया - ५०५,

अध्याय विसावा : मारुती जळाल्याची राक्षसींकडून सीतेला वार्ता ५०८, सरमेकडून मारुतीच्या सुरक्षिततेचे कथन - ५०८, हनुमंताची शंका, अस्वस्थता, क्रोध, विचार - ५०९, मारुतीला वायूचे आश्वासन, पुन्हा सीता भेट - ५१०, सीतेची शंका, मारुतीचे उत्तर - ५११,

अध्याय एकविसावा : गजेन्द्राच्या उद्धाराची कथा - ५१२, त्रिकूट पर्वत, गंडकी गिरी, सरोवर - ५१२, शापित राजा इंद्रद्युम्न आणि हूहू गंधर्व - ५१३ गजेन्द्राला अपघात - ५१५, नक्र आणि गजेन्द्र यांची झुंज - ५१५,

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized By Sarayu Foundation Trust and eGangotri

अध्याय बाविसावा : गजेन्द्रकृत भगवंतांना नमन - ५१७, श्रीकृष्ण आणि श्रीराम अवतारांची तुलना - ५१९, श्रीरामनामाची महती - ५१९, भगवंताचे हृद्‌गत् - ५१९, गजेन्द्राचा भगवंताकडून उद्धार - ५२०, नक्राची प्रार्थना आणि त्याचाही उद्धार - ५२२, गजेन्द्र, नक्र यांच्या प्रेतांची विल्हेवाट - ५२३, कनकजांबूची गरुडाला विनंती - ५२४, गरुडाची पिता कश्यपांशी भेट - ५२४, लंकेची निर्मिती, सुवर्णमय होणे - ५२५.

अध्याय तेविसावा : अरिष्ट पर्वताची वार्ता ५२६, हनुमंताचे महेंद्र पर्वतावर आगमन - ५२७, अंगदाकडून मारुतीला विनंती ५२९, हनुमंताकडून थोडक्यात निवेदन - ५२९, मारुतीऐवजी ब्रह्मदेवाकडून पराक्रम लेख - ५३०

अध्याय चोविसावा : वानर परतताना मधुवनात जातात - ५३२, वानरांचा धुमाकूळ - रक्षक दधिमुखाकडे - ५३३, दधिमुखाची चाल आणि त्याचा पराभव - ५३४

अध्याय पंचविसावा : सीताशोधाविषयी हनुमंताचे निवेदन - ५३७, सुग्रीव अंगदाचे कौतुक करतो - ५३९, श्रीरामाकडून वृत्तान्त कथनाची अंगदाला सूचना - ५४०, वानरांना सागरतीरावर संपाती भेटतो - ५४२,

अध्याय सव्विसावा : रावणाच्या मंदिरातील वार्ता - ५४६.

अध्याय सत्ताविसावा : (पृष्ठे ५४७ ते ५५२)

अध्याय अठ्ठाविसावा : मुद्रिका पाहून सीतेची प्रतिक्रिया - ५५२, सीता मूर्च्छित, मारुतीचे रामचरित्र कथन - ५५४, सीता मारुती भेट - संशय व्यक्त - ५५६,

अध्याय एकोणतिसावा : सीतेकडून हनुमंताचे कौतुक - ५५८, मारुतीची सूचना, सीतेच्या शंका, शंकानिरसन - ५५९, सीता खुणा सांगते - ५६०,

अध्याय तिसावा : मारुतीचा फलाहार - ५६२, वनरक्षक आणि किंकर मारुतीने मारले - ५६३, जंबुमाळीचा मारुतीकडून वध - ५६४, अखयाकुमाराचा वध - ५६५ इंद्रजित युद्धार्थ निघतो - ५६६, असाळीचे आक्रमण मारुतीने मोडले - ५६७,

अध्याय एकतिसावा : इंद्रजित - हनुमंत यांचे युद्ध - ५६९, इंद्रजित घावरून विवरात दडतो - ५७१, रणांगणाची स्थिती - ५७२,

अध्याय बत्तिसावा : लंकावासीयांची प्रतिक्रिया - ५७३, इंद्रजिताची शोकमग्नता - ५७४, इंद्रजित - ब्रह्मा भेट, मारुती पाशबंधनात - ५७५, हनुमंत रावणाच्या सभेत - ५७६, मारुतीचे रावणाला प्रत्युत्तर - ५७७, श्रीरामाच्या आज्ञेचे पालन - ५७८,

https://archive.org/details/muktabodhaindologicalresearchinstitute Bhavan Vani Trust, Lucknow

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

अध्याय तेहतिसावा : रावण मारुतीचे मरण कशात विचारतो - ५७९, शेपूट गुंडाळण्यात अपयश - ५८०, शेपूट पेटविण्यातले नाट्य -५८१ श्रीरामासह सर्वांकडून मारुतीचे कौतुक - ५८२, श्रीरामनाम माहात्म्य कथन - ५८२, मारुतीचे मरणाचे सोंग - त्यावर प्रतिक्रिया - ५८३, मारुतीने पेटत्या शेपटीने केलेली त्रेधा - ५८४, पेटलेल्या शेपटीकडून सर्वत्र जाळपोळ - ५८५, मारुतीवर आक्रमण - त्याचा प्रतिकार ५८६.

अध्याय चौतिसावा : श्रीरामाकडून मारुतीची स्तुती ५८८, हनुमंताकडून लंकादुर्गाविषयी कथन - ५८९, लंका-निर्मिती, संरक्षणव्यवस्था, मारुती सांगतो - ५८९ प्रयाणाचा मुहूर्त, सैन्यरचनेचा विचार - ५९०, श्रीराम-लक्ष्मण सैन्यासह दक्षिणेकडे - ५९२

अध्याय पस्तिसावा : माता कैकसीकडून रावणाचा निषेध - ५९३, विभीषणाला विनंती, त्याचा निश्चय - ५९४, विभीषण रावणाच्या सभेकडे जातो - स्वागत ५९४, उपाय कथन, प्रधानांवर रावणाचा राग - ५९५, विभीषणाकडून धिःक्कार; प्रधानांची प्रौढी - ५९६, राक्षसांच्या प्रौढीवर बिभीषणाची प्रतिक्रिया - ५९८,

अध्याय छत्तिसावा : इंद्रजित विभीषणाचा निषेध करतो - ५९९, विभीषणाचे इंद्रजिताला प्रत्युत्तर ६००, महापार्श्वाचा संताप, त्यावर प्रत्युत्तर - ६०२, विभीषण भावी परिणामांचे निवेदन करतो - ६०३, विभीषणाकडून मार्गदर्शक सूचना - ६०४, रावणाचा संताप, विभीषण - उत्तर - ६०५, रावण विभीषणाला अपमानित करतो - ६०६

अध्याय सदतिसावा : विभीषणाचे विचार मंथन - परिणाम कथन - ६०६, माता कैकसी, रावण, राक्षस यांच्या प्रतिक्रिया - ६०८, विभीषण चार प्रधानांसह श्रीरामाकडे ६०८, विभीषणाला पाहून वानरसेनेत संशय - ६०९, विभीषणाच्या आगमनावर प्रतिक्रिया - ६१०, बिभीषणाबद्दल मारुतीचे निवेदन - ६१०, मारुतीच्या कथनाने श्रीरामाला आनंद - ६१२,

अध्याय अडतिसावा : विभीषणाचे स्वागत, श्रीरामाची आनंदस्थिती - ६१३, विभीषणाचा आनंद, आश्वासन, त्याला अभिषेक - ६१४, लंका विभीषणाकडे - त्याला राज्याभिषेक - ६१५.

अध्याय एकोणचाळीसावा : सुग्रीव - हनुमंत विचारविनिमय करतात - ६१६, विभीषणाची सूचना - ६१७, रामाकडून सागरपूजन - तरी असहकार - ६१७, श्रीरामाचा सागराविषयी क्रोध - ६१८, सागर सहकुटुंब श्रीरामाला शरण येतो - ६१८, सागराकडून पूर्ववृत्ताचे निवेदन - ६१९, समुद्राकडून सेतुबंधनाची सूचना - ६२०, रामबाणाचे विसर्जन, सागराचा सन्मान - ६२१,

अध्याय चाळिसावा : सेतुबंधनाविषयी श्रीरामाचे निवेदन - ६२२, सेतुबंधनाची व्यवस्था आणि अडचण - ६२२, हनुमंताचे कथन, उपाय सापडला - ६२३, सेतुबंधनाच्या कार्याला गती मिळाली - ६२४, सेतुबंधनाचा दिनक्रम, वानरांचे श्रम - ६२४, हनुमंताची एकट्याची कामगिरी - ६२५, सेतुबंधनाची समाप्ती - ६२६,

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

अध्याय एकेचाळिसावा : जाबुवंताच्या मनातली भीती, रामाला विनंती - ६२७, मारुती-नीळाच्या खांद्यांवरून राम-लक्ष्मण - ६२७, वानरांसह श्रीराम लंकेत - ६२८, बिभीषणाला श्रीराम जवळ ठेवतो - ६२८, समुद्र श्रीरामभेटीला येतो - ६२९, श्रीरामाचे वस्त्रालंकारयुक्त दर्शन - ६३०, श्रीरामदर्शनाने समुद्र, वानर यांना आनंद - ६३१

अध्याय बेचाळिसावा : रावणाचा संताप - प्रधानांची निंदा - ६३२, इंद्रजिताचे रावणाला आश्वासन - ६३३, काही प्रधानांची दर्पोक्ती - ६३३, अतिकायाकडून हितोपदेश - ६३५, सुंदरकाण्डाच्या समाप्तीचे नाथकृत कथन - ६३६.

युद्धकाण्ड

अध्याय पहिला : ईशस्तवन - ६३७, नाथांचे आत्मनिवदेन - निरूपणाचे फळ - ६३७, रावणाकडून हेरांची पाठवणी - ६३८, हेर रामापुढे आणले जातात, त्यांची मुक्तता - ६३८, हेर-रावण भेट, हेरांची सूचना - ६३९, रावणाची प्रतिक्रिया - ६४०, शार्दूल हेराची पाठवणी, रामाकडून मुक्तता - ६४१,

अध्याय दुसरा : शार्दूलाचे निवेदन - ६४१, शार्दूलाकडून वानरवीरांविषयी कथन - ६४२, रावणाची छत्रे श्रीराम छेदतो - ६४४,

अध्याय तिसरा : रावण सूडासाठी कपटाचा आश्रय करतो - ६४५, विश्वकर्म्याची प्रतिक्रिया, ध्यानमूर्तीचे वरदान - ६४५, रावण सीतेच्या भेटीला अशोकवनात - ६४६, खोटे रामशिर पाहून सीतेची प्रतिक्रिया - ६४७, सीतेला रामशिराची कृत्रिमता समजली - ६४८,

अध्याय चौथा : माल्यवंताचे कथन, सूचना, त्याचा धिक्कार - ६५०, रावणाकडून सैन्यरचनेविषयी आदेश - ६५१, बिभीषण लंकादुर्गाच्या रक्षणाविषयी सांगतो - ६५१, वानरांची प्रतिक्रिया, राम सैन्यव्यूह करतो - ६५२, श्रीराम सुवेळागिरीवरून युद्ध पाहतो - ६५३, लंकेला वेढा घालून वानर लंकेत प्रवेशले - ६५३, राक्षससैन्य आणि वानरसैन्य यांचे युद्ध ६५५,

अध्याय पाचवा : रावणाशी सुग्रीवाचे युद्ध - ६५६, सुग्रीव रावणाला न मारता त्याचा मुकुट नेतो - ६५८, श्रीराम सुग्रीवाला चूक सांगतो - क्षमायाचना - ६५९,

अध्याय सहावा : श्रीराम आणि वानरवीर यांचा मतभेद - ६६०, शिष्टाईसाठी कोण आणि कसा असावा - ६६१, योग्य दूतासंबंधी विचार, अंगदाची निवड - ६६१, श्रीराम अंगदाला रावणासाठी निरोप देतो - ६६२, अंगदाचे लंकेकडे प्रयाण - ६६४,

अध्याय सातवा : अंगदाचे प्रारंभीचे भाषण - ६६४, रावणाचे दुरुत्तर, अंगदाची प्रतिक्रिया - ६६५, रावणापुढे अंगदाचे वर्तन आणि कथन - ६६५, रावणाकडून अंगदाचा उपहास, त्यावर प्रतिक्रिया - ६६६, अंगदकृत रावणाच्या अपमानाची उजळणी - ६६७, वामनाकडून रावणाचा उपमर्द - ६६८,

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

अध्याय आठवा : रावणाची प्रतिक्रिया - ६७२, अंगदाकडून रामस्तुती - रावणाचा धिक्कार - ६७३, अंगदकडून रावणाची हेटाळणी - ६७३, अंगद-शक्तींची चुणुक - रावण घावरतो - ६७४, अंगद रावणाचा मुकुट, सभामंडप आणतो- ६७५, अंगद रामाज्ञेने पुन्हा लंकेत मंडप स्थापतो - ६७५, अंगद रामाकडे परत, अंगदाच्या शौर्याचा गौरव - ६७

६, **अध्याय नववा :** विभीषण छत्र नाकारतो - ६७७, श्रीराम सुग्रीवासह लंकेच्या उत्तरद्वारी येतो - ६७७, राक्षसांशी युद्ध सुरू झाले - ६७८, इंद्रजित - अंगद आणि इतर वीरांची द्वंद्वयुद्धे - ६७९,

अध्याय दहावा : इंद्रजिताने रात्रीचे युद्ध आरंभिले - ६८२, श्रीरामाकडून महावीरांची दुर्दशा - ६८३, अंगदाने इंद्रजिताला पळवून लावले - ६८४, इंद्रजिताची यज्ञसाधना आणि विधिविधान - ६८४, श्रीरामाची प्रतिक्रिया, इंद्रजिताला रथप्राप्ती - ६८५, इंद्रजिताची प्रौढी आणि आकाशवाणीचा परिणाम - ६८६,

अध्याय अकरावा : श्रीरामाचे शब्दवेधी शरसंधान - ६८७, शिववरदबाणांविषयी रामाची भूमिका - ६८८, इंद्रजिताचे शरसंधान, राम-लक्ष्मण बंदिस्त - ६८८, इंद्रजिताला हर्ष, लक्ष्मणाचा संताप, सांत्वन - ६८९,

अध्याय बारावा : इंद्रजिताचे कथन, त्याचा सभेत गौरव - ६९०, सुग्रीवाचे दुःख, बिभीषणाकडून सांत्वन - ६९१, रावण सीतेला राम दाखवितो, तिचा अविश्वास - ६९२, सीतेचे बाह्यात्कारी दुःख त्रिजटेकडून सांत्वन - ६९३, सीतेची प्रतिक्रिया आणि प्रसन्नता - ६९४,

अध्याय तेरावा : श्रीराम दुःखाने निर्वाणीची भाषा करू लागतो - ६९५, राम-लक्ष्मण जलस्पर्शाने शुद्धीवर येतात - ६९६, अंगद, सुग्रीव, हनुमंत यांच्या प्रतिक्रिया - ६९७, नारदांचे आगमन, ते रामस्तुती करतात- ६९७, गरुडाचे आगमन - सर्पांचे पलायन - ६९८, गरुडाचे वंदन, अस्त्रप्रवेश, सर्वांना आनंद - ६९९,

अध्याय चौदावा : दूतांचे निरीक्षण - वृत्तान्त कथन - ७००, धूम्राक्ष युद्धासाठी निघतो, आरंभी अपशकुन - ७०१, राक्षस आणि वानर यांचे युद्ध - ७०१, धूम्राक्ष आणि हनुमान यांचे युद्ध - ७०२, धूम्राक्षाचा वध, वानरसेनेत आनंद - ७०३,

अध्याय पंधरावा : वानर आणि राक्षस यांचे युद्ध - ७०४, अंगदाचा आवेशयुक्त पराक्रम - ७०५, राक्षससेनेची दुर्दशा - ७०५, वज्रदंष्ट्राकडून संतापयुक्त प्रतिकार - ७०६, अंगद आणि वज्रदंष्ट्र यांचे घोर युद्ध - ७०७, अंगद आणि वज्रदंष्ट्र यांचे मल्लयुद्ध - ७०७, अकंपन युद्धासाठी येतो, त्याला अपशकुन - ७०९, वानर आणि राक्षस युद्ध, राक्षसांची दुर्दशा - ७०९; अकंपन आणि हनुमान यांचे युद्ध - ७१०, अकंपनाचा वध - ७११, राक्षसांचे पलायन, रावणाचा संताप - ७११,

अध्याय सोळावा : प्रहस्ताची पाठवणी, त्याचे मनोगत, प्रयाण - ७१२, प्रहस्ताला अपशकुन आणि त्याचे आव्हान - ७१३, राक्षस-वानर युद्ध, चार प्रमुख वीरही आले - ७१४, नीळ आणि प्रहस्त यांचे युद्ध - ७१५, राक्षसांची पळापळ, नीळाचा गौरव - ७१६,

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

अध्याय सतरावा : रावणासह निघालेले राक्षससैन्य - ७१७, श्रीराम आणि बिभीषण यांचा संवाद - ७१८, रावण आणि वानरवीर यांचे युद्ध - ७१९, सुग्रीव आणि रावण यांचे युद्ध - ७१९, रावणाला वानरसैन्य वेढा घालते - ७१९, श्रीरामाच्या अनुज्ञेने लक्ष्मण युद्धासाठी जातो - ७२०,

अध्याय अठरावा : हनुमंत आणि रावण यांचे युद्ध - ७२१, रावण आणि नीळ यांचे युद्ध - ७२२, नीळ सुरक्षित, लक्ष्मणाचे आगमन - ७२४,

अध्याय एकोणिसावा : लक्ष्मणाकडून रावणाची उपहासाने निर्भत्सना - ७२४, लक्ष्मण आणि रावण यांचे युद्ध - ७२५, शक्ती शरण, लक्ष्मण स्वतःवर घेऊन, मूर्च्छित - ७२६, लक्ष्मणाच्यासाठी मारुतीचे आगमन - ७२७, मारुती लक्ष्मणासह रामाकडे, लक्ष्मण सावध - ७२८, मारुतीच्या पाठीवरून राम युद्धक्षेत्रात - ७२८, श्रीराम आणि रावण यांचे युद्ध - ७२९, केविलवाणा रावण लंकेकडे, राम शिविराकडे - ७३०,

अध्याय विसावा : कुंभकर्णाची निद्रा संपविण्याची तयारी - ७३२, कुंभकर्णाची निद्रा, जागे करण्याचे उपाय - ७३२, जाग आणण्यासाठी अप्सरांची योजना - ७३४, कुंभकर्णाची भूक - ७३५, कुंभकर्णाची भूक शमली, झोप मोडल्याचा राग - ७३६, यूपाक्ष प्रधानाचे निवेदन, कुंभकर्णाचा राग - ६३७, कुंभकर्ण आणि रावण यांची भेट - ६३७,

अध्याय एकविसावा : श्रीरामाचा प्रश्न, विभीषणाचे निवेदन - ७३८, ब्रह्मदेवाचा कुंभकर्णाला शाप - ७३८, कुंभकर्ण - रावण यांची भेट - ७३९, रावण कुंभकर्णाला युद्धस्थिती सांगतो - ७३९, रावणाकडून मदतीची विनंती - ७४०, रावणाचे स्पष्टीकरण, कुंभकर्णाची सूचना - ७४१,

अध्याय बाविसावा : देवसभेचा वृत्तान्त नारद कथन करतात - ७४२, सीता परत करून शरणागतीची सूचना - ७४३, रावणाच्या मनातले विचार आणि त्याची दर्पोक्ती - ७४४, कुंभकर्णाला दूषणे, रावणाचा गर्व - ७४५, कुंभकर्णाचे रावणाला संयमाने प्रत्युत्तर - ७४६, रावणाची विनंती, कुंभकर्ण युद्धाला सिद्ध - ७४७, कुंभकर्ण स्वतःची प्रौढी सांगतो - ७४७,

अध्याय तेविसावा : रावणाचा आगमनाविषयी प्रश्न, तिची विनंती - ७४८, मंदोदरीकृत राम-पराक्रम वर्णन - ७४८, रावणाचे मंदोदरीला प्रत्युत्तर - ७४९,

अध्याय चोविसावा : रावणाची सनत्कुमारांशी भेट - ७५०, सायुज्यमुक्ती देणाऱ्या देवाविषयी प्रश्न, उत्तर - ७५१, रावण - नारद भेटीतली प्रश्नोत्तरे - ७५२, नारदांनी केलेले श्रीराममूर्ती - वर्णन - ७५३, श्रीरामाचे आत्मलक्षण, दर्शनाचे मार्ग - ७५४, श्रीरामाशी वैर उत्पन्न होण्याचा मार्ग - ७५५, सीताहरणाविषयी नारद- रावण संवाद - ७५५,

अध्याय पंचविसावा : कुंभकर्ण महोदराची निंदा करतो - ७५७, रावणाला वंदन करून कुंभकर्ण निघतो - ७५७, कुंभकर्णाची रणगर्जना, मार्गात अपशकुन - ७५८, वानरसैन्याची पळापळ, अंगदाने सावरले - ७५८,

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Trust and eGangotri

अध्याय सव्विसावा : वानरश्रेष्ठ आणि कुंभकर्ण यांचे युद्ध - ७६०, वानर रामाकडे, हनुमंत - कुंभकर्ण युद्ध - ७६२, सुग्रीव युद्धात - मारुतीचा संताप - ७६३,

अध्याय सत्ताविसावा : सुग्रीव आणि कुंभकर्ण यांचे युद्ध ७६४,

अध्याय अठ्ठाविसावा : बिभीषण कुंभकर्णाला भेटतो - ७६८, श्रीराम आणि कुंभकर्ण यांचे युद्ध - ७६९, कुंभकर्णाच्या मृत्यूचा पेच - ७७१, कुंभकर्णाचा मृत्यू, राक्षससैन्याची माघार - ७७२,

अध्याय एकोणतिसावा : राक्षससैन्य आणि वानरसैन्य यांचे युद्ध - ७७४, अंगद आणि नरांतक यांचे युद्ध - ७७५

अध्याय तिसावा : तिघे रावणपुत्र आणि अंगद यांचे युद्ध - ७७७, हनुमंत आणि नीळ युद्धासाठी आले - ७७९, हनुमंत आणि त्रिशिरा युद्ध , त्रिशिराचा वध - ७७९, महापार्श्वाचे आगमन, ऋषभाकडून वध - ७८०

अध्याय एकतिसावा : बिभीषण अतिकायाची माहिती सांगतो - ७८२, अतिकायाचा टणत्कार आणि गर्वाचे भाषण - ७८३, अतिकाय - लक्ष्मण यांची शाब्दिक चकमक ७८३, अतिकाय आणि लक्ष्मण यांचे युद्ध - ७८४, ब्रह्मवरदानामुळे लक्ष्मणाचे वाण व्यर्थ - ७८५, वायूची सूचना, अतिकायाचा वध - ७८६.

अध्याय बत्तिसावा : रावणाचा शोक, इंद्रजिताचे आश्वासन - ७८७, इंद्रजिताचे प्रयाण, रावणाचा आदेश - ७८७, इंद्रजिताचा अभिचाराचा प्रयोग - ७८८, इंद्रजिताला अदृश्य रथाची प्राप्ती, देवांना चिंता - ७८९, अदृश्य इंद्रजिताचे रामावर शरसंधान - ७८९, श्रीराम, लक्ष्मण शरबंधनात - ७९०, इंद्रजित हर्षाने लंकेत येतो - ७९०,

अध्याय तेहतिसावा : बिभीषण सुग्रीव, मारुती यांच्याशी बोलतो - ७९१, हनुमंताची दिव्यौषधीसाठी पाठवणी - ७९३, हनुमंताचे उड्डाण द्रोणाद्रीवर आगमन - ७९४, मारुती द्रोणाद्रीच उपटून घेऊन येतो - ७९४, औषधीचा परिणाम, हनुमानाचा सन्मान - ७९५,

अध्याय चौतिसावा : लंकादहनाने लंकेची, नागरिकांची दुर्दशा - ७९५, श्रीराम लंकादहन थांबवितो - ७९७, रावण कुंभ-निकुंभ यांना युद्धासाठी धाडतो - ७९७, राक्षस आणि वानर यांचे युद्ध ७९८, अंगद आणि कुंभ यांचे युद्ध - ७९९, कुंभ आणि सुग्रीव यांचे युद्ध - ८००,

अध्याय पस्तिसावा : हनुमंताचे निकुंभाशी युद्ध, त्याचा वध - ८०१, रावण दुःखी, मकराक्षाला पाठवितो - ८०२, मकराक्ष आणि श्रीराम यांची उत्तर - प्रत्युत्तरे - ८०४, श्रीराम - मकराक्ष युद्ध, मकराक्षाचा वध - ८०५,

अध्याय छत्तिसावा : मायिक सीतेच्या वधाची इंद्रजिताची कल्पना ८०६, इंद्रजित - पार्वती यांचा संवाद - ८०७, शिवाकडून वायूला मारुतीसाठी रहस्य - कथन - ८०७, इंद्रजिताची सीतेला दूषणे व तिचा

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized By Sarayu Foundation Trust and eGangotri

शिरच्छेद - ८०८, इंद्रजिताचे पलायन, मारुतीकडून कथन - ८०९, श्रीरामाची मूर्च्छा, विभीषणाकडून सांत्वन - ८१०, हनुमंत मायिक सीतेचे रहस्य सांगतो - ८११,

अध्याय सदतिसावा : इंद्रजित अभिचार - यज्ञ सुरू करतो - ८१२, यज्ञ थांबविण्याची विभीषणाची रामाला विनंती - ८१३, श्रीरामाकडून उपदेश आणि आज्ञा - ८१३, अनेक अडथळ्यांचे निर्दाळण - ८१५, लक्ष्मण, हनुमंत अडथळे नष्ट करतात - ८१५, वनदेवता हनुमंताला गुपित सांगतात - ८१७, हनुमंत झडप तोडतो, यज्ञाचे दर्शन - ८१८,

अध्याय अडतिसावा : होमातून रथ प्राप्ती, मारुतीकडून नाश - ८१९, इंद्रजिताची विभीषणाला दूषणे - ८२१, विभीषणाचे प्रत्युत्तर, इंद्रजिताचे आव्हान - ८२१, लक्ष्मणाकडून इंद्रजिताचा उपहास - ८२२, इंद्रजित आणि लक्ष्मण यांचे युद्ध - ८२२, इंद्रजिताचे कपट , मेघांच्या आडून युद्ध - ८२४,

अध्याय एकोणचाळिसावा : लक्ष्मण आणि इंद्रजित समोरा-समोर - ८२५, हनुमंत इंद्रजिताचे कपट निष्फळ करतो - ८२५, लक्ष्मण सारथी, घोडे मारतो - ८२६, लक्ष्मण आणि इंद्रजित यांचे द्वंद्व - ८२७, लक्ष्मण - इंद्रजित वरदवाणांनी लढतात - ८२८, लक्ष्मण इंद्रजिताचा शिरच्छेद करतो - ८२९,

अध्याय चाळिसावा : श्रीरामाला विभीषण वार्ता सांगतो - ८३२, लक्ष्मणाची स्थिती ऐकून राम मूर्च्छित - ८३२, श्रीरामाचा शोक आणि प्राणत्यागाची सिद्धता - ८३३, हनुमंताची वीरश्रीपूर्ण गर्जना - ८३४, सुषेणाचे आगमन, दिव्यौषधीने लक्ष्मण सावध - ८३५,

अध्याय एकेचाळिसावा : ध्यानस्थ इंद्रजित - पत्नीच्या पुढे इंद्रजित - भुजा - ८३६, सुलोचनेची प्रतिक्रिया आणि निरवानिरव - ८३७, रावणाची प्रतिक्रिया, मंदोदरीचा उपदेश - ८३८, सुलोचना रामाकडे येऊन विनंती करते - ८३९, सुलोचनेच्या कथनाला सुग्रीवाचे आव्हान - ८४०, सती सुलोचना सहगमन करते - ८४१,

अध्याय बेचाळिसावा : रावणाचा शोक, क्रोध, युद्धासाठी प्रयाण - ८४२, रावणकृत रामसेनेचे वर्णन, तो रणभूमीत - ८४३, लक्ष्मणाशी रावणाचे युद्ध - ८४४, श्रीरामाशी रावणाचे युद्ध - ८४४, रावणाचा रथ, सारथी, घोडे मारले गेले - ८४५,

अध्याय त्रेचाळिसावा : विभीषणावर शक्ती, लक्ष्मण ती निवारतो - ८४६, लक्ष्मणावर रावण ब्रह्मशक्ती सोडतो - ८४७, श्रीराम ब्रह्मशक्ती क्षीण करतो, लक्ष्मणावर शक्ती ८४७, श्रीरामाचा शरवर्षाव, रावणाचे पलायन - ८४८, लक्ष्मण शक्ती निघून शिबिरात, राम-रावण युद्ध ८४९, रामाकडून रावणाची दैना, तो लंकेत पळतो - ८४९,

अध्याय चव्वेचाळीसावा : लक्ष्मणाची अवस्था पाहून रामाचा शोक - ८५०, सुषेणाचे सांत्वनपर भाषण - ८५१, सुषेण मारुतीला विनंती करतो - ८५२, सुषेण औषधींचे गुणविशेष सांगतो - ८५३, श्रीराम आणि इतर वानरश्रेष्ठ यांची विनंती - ८५४, हनुमान नंतर आश्वासन देतो - ८५५

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Trust and eGangotri

अध्याय पंचेचाळीसावा : हनुमंताचे उड्डाण - त्याचा परिणाम - ८५६, कालनेमीला रावणाची विनंती - ८५६. कालनेमीचे अनिच्छेचे विचार - ८५७, कालनेमी मायावी कृती करतो - ८५७, हनुमंत कालनेमी भेट - ८५७. मगरीचे संकट, शापमुक्त अप्सरा पूर्ववृत्त - ८५८,

अध्याय सेहेचाळीसावा : कालनेमीचा वध, गंधर्वांशी संवाद - ८५९, मारुतीचे पर्वतासह उड्डाण - ८६०, रामनामांकित बाण आणि हनुमंताची स्थिती - ८६१, नंदिग्रामात हनुमंत - ८६१,

अध्याय सत्तेचाळिसावा : भरताला हनुमंत रामच समजतो - ८६२, भरत वस्तुस्थिती विचारतो - ८६२. हनुमंत भरताला राम समजून बोलतो - ८६२, भरताकडून वास्तवाचे निवेदन - ८६३, सूर्योदयाची मारुतीला चिंता, भरताचे आश्वासन - ८६३,

अध्याय अठ्ठेचाळीसावा : हनुमंताकडून श्रीरामकथा निवेदन - ८६४, श्रीरामकथा ऐकून - सांगून दोघे एकाग्र - ८६५, मारुतीची पाठवणी, श्रीराम सचिंत - ८६५, मारुतीला उशीर - श्रीरामाला चिंता - ८६५, श्रीरामाचा क्रोध - ८६६.

अध्याय एकोणपन्नासावा : श्रीरामाची निरवानिरवीची भाषा - ८६६, सुग्रीवाचे सांत्वन - ८६७. मारुतीची क्षमायाचना आणि वृत्तान्त कथन - ८६७, सुग्रीवाची विनंती, सुषेण औषधी वापरतो - ८६८. श्रीरामचरणतीर्थाने सौमित्र सावध - ८६८,

अध्याय पन्नासावा : सुषेणाचे औषधींच्या उत्पत्तीविषयी निवेदन - ८६९, वानरांकडून पर्वतावरील फळांचे भक्षण - ८७०, मारुती पर्वत नेतो, रावण तळमळतो - ८७१, हनुमान राक्षससंहार करून पर्वत नेतो - ८७१, लक्ष्मणाची कृतज्ञता, मारुतीचे प्रत्युत्तर - ८७२,

अध्याय एकावन्नावा : रावण नवे उपाय शोधण्यात मग्न - ८७२, भयग्रस्त रावणाला सर्वत्र रामच दिसतो - ८७३, दूत - अहिरावण संवाद - ८७३, दोघा रावणांची अंबिकेला प्रार्थना, मतभेद ८७४,

अध्याय बावन्नावा : दोन्ही रावणांचे देवतेला आवाहन, राम प्रसन्न - ८७५. राम-लक्ष्मणांचे अपहरण. मारुती चिंताग्रस्त - ८७५, आदिशक्तीची प्रार्थना, गिधाडांकडून मार्गदर्शन - ८७६, हनुमंताचे साधुवेषात पाताळात जाणे - ८७६, मकरध्वजाचे आत्मकथन - ८७७, मकरध्वजाची माता पूर्ववृत्त सांगते - ८७८.

अध्याय त्रेपन्नावा : राक्षसांकडून देवीची पूजाअर्चा व नैवेद्य ८७९, श्रीरामाला बळीसाठी सिद्ध करतात - ८७९, राम मारुतीचे चिंतन करतो, मारुती प्रकटतो - ८८०, हनुमंत राक्षस, महिरावण यांचा वध करतो - ८८०,

अध्याय चोपन्नावा : राम-लक्ष्मण युद्धासाठी मारुतीच्या खांद्यावर ८८१, हनुमंत चंद्रसेनेच्या सदनात जातो - ८८२, चंद्रसेना अटीसह उपाय सांगते - ८८२, हनुमंताकडून रक्षक, भ्रमर यांचा संहार - ८८३. श्रीराम अहिरावणाचा वध करतो - ८८३, मारुती श्रीरामाला चंद्रसेनेकडील वार्ता सांगतो - ८८३. चंद्रसेनेच्या बाबतीत मारुतीची युक्ती - ८८४, श्रीरामाकडून चंद्रसेनेला उपदेश, आश्वासन - ८८५, राम-लक्ष्मणांचे वानरसैन्यात आगमन - ८८५,

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

अध्याय पंचावन्नावा : रावण-मंदोदरी संवाद, तिची प्रतिक्रिया - ८८६, अशोकवनात मंदोदरी-सीता संवाद - ८८६.

अध्याय छप्पन्नावा : श्रीशिवाला रावणाची प्रार्थना - ८८७, रावणाचा यज्ञ - ८८८, वानरसैन्यातून श्रीरामाला युद्धाची विनंती - ८८८.

अध्याय सत्तावन्नावा : हेरांकडून रावणाचा शोध, विभीषणाची सूचना - ८८९.

अध्याय अठ्ठावन्नावा : मंत्रदेवतेचा असहकार - ८९१, अंगदाची युक्ती - मंदोदरीचा आक्रोश - ८९१, रावण-अंगद संवाद, रावण मूर्च्छित - ८९२.

अध्याय एकूणसाठावा : रावणाची प्रतिज्ञा - सैन्याची सिद्धता - प्रजा दुःखी - ८९२, अपशकुनांनी रावण त्रस्त, पण धैर्याने गमन - ८९३, रावणाची प्रौढी, लक्ष्मणाचे उत्तर, रावण संतप्त - ८९३, राक्षसांची हानी, रामकृपेने वानर सुरक्षित - ८९३, इंद्राकडून रामासाठी रथाची पाठवणी - ८९४.

अध्याय साठावा : श्रीरामाला विभीषण, वानरश्रेष्ठी यांची विनंती - ८९४, राम-रावण युद्धास अस्त्रप्रयोगाने प्रारंभ - ८९५, वायू-अस्त्र रावणावर उलटते, रामाची अस्त्रे - ८९५, रावण संतापून गुरुदत्त परिघ सोडतो - ८९६.

अध्याय एकसष्टावा : श्रीराम - रावण युद्धावर आध्यात्मिक रूपक - ८९७, रावण निंदायुक्त रामस्तुती करतो - ८९८, रावण - श्रीराम यांची सैन्याविना लढण्याची इच्छा - ८९९.

अध्याय बासष्टावा : श्रीरामाचे रावणाला दिसलेले स्वरूप - ९००, रावणाला सर्वत्र रामच दिसू लागला- ९०१, श्रीरामाच्या दोन हातांचा संवाद - ९०१, सर्वत्र राम दिसल्याने रावणाचा गोंधळ - ९०२, श्रीराम कृपा करून रावणाचा शिरच्छेद करतो - ९०२.

अध्याय त्रेसष्टावा : रावणकृत रामस्तुती, रावणाचे स्पष्टीकरण - ९०३, 'आपल्या उद्धारासाठी राम आला' - रावण मानतो - ९०३, श्रीरामाशी रावण एकरूप, सीतेमुळे रामप्राप्ती - ९०३, रावणाची विकारांना विनंती - त्यांचे प्रत्युत्तर - ९०४, रामबाणाची स्थिती - गती आणि उपरती - ९०४, रावणाच्या मृत देहाच्या मांसाचे भक्षण - ९०५.

अध्याय चौसष्टावा : श्रीरामाने रावणवध केल्याचा आनंदोत्सव - ९०६, रावणवधाने विभीषणास शोक, गिधाडांची धाड - ९०६, विभीषणाचे सांत्वन आणि रावणाची उत्तरक्रिया - ९०७, रावणस्त्रियांचा शोक - ९०७.

अध्याय पासष्टावा : विभीषणाचा मंदोदरीस उपदेश, सांत्वन - ९०८, मंदोदरी सहगमनास सिद्ध, रामस्तुती - ९०८.

https://archive.org/details/@sarayu_trust_lucknow / Bhavan Vani Trust, Lucknow / sanskritacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

अध्याय सहासष्टावा : इंद्रसारथी मातली रामाचा निरोप घेतो - ९०९, विभीषणाच्या राज्याभिषेकाची सौमित्राला आज्ञा ९१०, विभीषणाचा राज्याभिषेक - सिद्धता, पूर्तता - ९११.

अध्याय सदुसष्टावा : श्रीराम-विभीषण भेट - ९११, हनुमानाकडून सर्व वृत्तान्ताचे कथन - ९१२, सीतेला रामाकडे नेण्याविषयी मते - ९१२, सीतेला रामभेटीसाठी विनंती, तिची अट - ९१३, सीतेचे रामदर्शन, श्रीरामाचे तोंड फिरवणे - ९१३.

अध्याय अडुसष्टावा : श्रीरामाचे त्याच्या कृतीसंबंधी स्पष्टीकरण - ९१५, सीता दिव्य करायला सिद्ध-अग्निकुंडात प्रवेश - ९१६, सीता निष्पाप ठरून रामाशी मीलन - ९१६.

अध्याय ऐकोणसत्तरावा : श्रीराम आणि अग्नी परस्परांची स्तुती करतात - ९१७, श्रीशंकराकडून रामस्तुती आणि विनंती - ९१७, दशरथाचा आनंद आणि पश्चात्ताप व्यक्त करणे - ९१८, श्रीरामाची कृतज्ञता, दशरथ संतुष्ट - ९१८,

अध्याय सत्तरावा : दशरथाचा लक्ष्मणाला आणि सीतेला उपदेश - ९१८, देवकृत रामस्तुती, रामकृत विनंती - ९१९, देवांकडून जिवंत झालेल्या वानरांच्या चेष्टा - ९२०, श्रीराम आणि सीता यांचे मीलन, त्यांचा संवाद - ९२०, श्रीरामाने व्रत सोडावे - विभीषणाची विनंती - ९२१,

अध्याय एकाहत्तरावा : विभीषण अयोध्येस नेण्याची विनंती करतो - ९२१, त्रिजटा-श्रीराम भेटीचा वृत्तान्त - ९२२, 'विमान न्यावे' विभीषणाची विनंती, रामाचा नकार- ९२३.

अध्याय बहात्तरावा : विश्वकर्म्याने तयार केलेले नवे विमान - ९२३, विभीषणाची माता कैकसी रामाच्या भेटीला येते - ९२३, श्रीरामाकडून सांत्वन आणि उपदेश - ९२४, सीता-लक्ष्मण यांच्यातील आदरभाव - ९२४,

अध्याय त्र्याहत्तरावा : विमान प्रवासाविषयी योजना - ९२५, श्रीरामाकडून निरोपप्रसंगीची व्यवस्था - ९२५, विमान प्रवासाचा आरंभ - श्रीरामाचे कथन - ९२६,

अध्याय चौऱ्याहत्तरावा : रामेश्वर निर्मितीची पूर्वकथा - ९२६, श्रीकाशीविश्वेश्वराचे माहात्म्य कथन - ९२७, हनुमंताची काशीला पाठवणी - ९२७, मारुतीचे उड्डाण आणि काशीत आगमन - ९२७, काशीपुर वर्णन, शिवाची रामभक्ती - ९२७, मारुतीकडून पूर्ववृत्तान्त कथन - ९२८

अध्याय पंचाहत्तरावा : विंध्याद्रीची कथा - अगस्ती दक्षिणेकडे ९२९, श्रीशिवाकडून मारुतीला शिवलिंग प्राप्ती - ९३०

अध्याय शहात्तरावा : श्रीरामाचे मनोगत - ९३०, श्रीराम वाळूचे शिवलिंग करतो, त्यात शिवाचा प्रवेश - ९३०, मारुतीचा संताप, अभिमानाचा परिणाम - ९३१, श्रीराम समाधी अवस्थेत जातो, श्रीशिवाची विनंती - ९३१, श्रीराम सावध, तो रामेश्वरमहिमा सांगतो - ९३१, श्रीरामाने श्रीशिवाला रामेश्वरमाहात्म्य सांगितले - ९३२, मारुती सावध, त्याचा अनुताप, क्षमायाचना - ९३२,

https://archive.org/details/@sarayu_foundation_trust,_lucknow / Bhavan Vani Trust, Lucknow / mahalakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and Academy, Gangotri

अध्याय सत्त्याहत्तरावा : अगस्ती आणि श्रीराम एकमेकांची स्तुती करतात - ९३३. लोपामुद्रा - सीता संवाद - ९३३. श्रीरामाकडून सज्जन आणि अगस्ती यांचा गौरव - ९३३.

अध्याय अठ्ठ्याहत्तरावा : भारद्वाज - श्रीराम भेट - ९३४, हनुमंताची पाठवणी - - ९३५, हनुमंत - गुहक भेट. नंतर नंदिग्रामात जाणे - ९३५.

अध्याय एकोणऐंशीवा : श्रीराम येण्याला विलंब. सर्वजण चिंताग्रस्त - ९३६, हनुमंताकडून रामाचे आगमन सांगणे - ९३६.

अध्याय ऐंशीवा : नगरीचा थाट - ९३७, श्रीरामाच्या दर्शनाची सर्वांनाच उत्कंठा - ९३७, मिरवणुकीचे वर्णन - ९३७, भरताची निराशा. मारुतीचे आश्वासन - ९३७,

अध्याय एक्याऐंशीवा : श्रीरामाचे विमान येताच आनंदीआनंद - ९३७, श्रीरामाशी सर्वांची भेट- रामाकडून आदर व्यक्त - ९३८.

अध्याय ब्याऐंशीवा : भरताचा आश्रम, कुबेराची विमानाची मागणी - ९३९, श्रीराम राजभवनात. राज्याभिषेकाची सूचना - ९३९. रामाचे मौन. मारुतीची विनंती, वसिष्टांची आज्ञा - ९४०,

अध्याय त्र्याऐंशीवा : भरत वसिष्टांच्या सूचना घेऊन सुग्रीवाकडे - ९४०, अभिषेकाच्या उपचारांना आरंभ - ९४१

अध्याय चौऱ्याऐंशीवा : (पृष्ठ ९४१)

अध्याय पंचाऐंशीवा : लक्ष्मणाला यौवराज्याभिषेक करण्याची सूचना - ९४१, लक्ष्मणाची प्रतिक्रिया - नकार - ९४२, भरताच्या अभिषेकाला वसिष्ठांची मान्यता - ९४२,

अध्याय शहाऐंशीवा : वसिष्टांचा उपदेश, भरताची मान्यता - ९४३.

अध्याय सत्त्याऐंशीवा : हनुमंत डाव्या, अंगद उजव्या मांडीवर बसतात - ९४३, हनुमंताची वेगळी प्रतिक्रिया - स्पष्टीकरण - ९४४, मारुतीची इच्छा - रामाकडून मान्य - ९४४,

अध्याय अठ्ठ्याऐंशीवा : पारण्यासाठी अन्न सिद्ध करण्याची विनंती - ९४५, मारुतीची विलक्षण कृती - ९४५, मारुतीचे स्पष्टीकरण, सर्वांना कौतुक - ९४५,

अध्याय एकोणनव्वदावा : हनुमानाला श्रीरामाकडून वरदान - ९४५,

अध्याय नव्वदावा : विभीषणाची पाठवणी - उपदेश - ९४६,

अध्याय एक्याण्णवावा : सुग्रीवाची रामाला विनंती, रामाकडून इच्छादान - ९४६,

अध्याय ब्याण्णवावा : (पृष्ठ ९४७)

***

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

ॐ

संत एकनाथकृत भावार्थ रामायण

बालकाण्ड

अध्याय पहिला

ईशस्तवन

संत एकनाथांनी श्रीरामकथेच्या बालकाण्डाचा आरंभ श्रीगणेशवंदनाने केला आहे. हे श्रीगणेशस्तवन वाचताना आपल्याला संत ज्ञानेश्वरांच्या भावार्थदीपिकेतील श्रीगणेशस्तवनाचे सहज स्मरण व्हावे एवढे या दोहोंत साम्य आहे. दोन्ही ग्रंथांतील आरंभीच्या ओव्या पाहा.

ॐ नमो अनादि आद्या । वेदवेदान्तवेद्या ।
वंद्याही परमवंद्या । स्वसंवेद्या श्रीगणेशा ॥

(भा. रा)

ॐ नमो जी आद्या । वेद प्रतिपाद्या ।
जय जय स्वसंवेद्या । आत्मरूपा ॥

(ज्ञानेश्वरी)

श्रीगणेशवंदनाच्या पाठोपाठ श्रीदेवी सरस्वतीला वंदन केले आहे. 'चित्तचेतना चैतन्यशक्ती' आणिं 'जे सकळ स्फूर्तीची स्फूर्ती' अशा सरस्वतीला अभिवादन करून एकनाथ श्रीसंतवंदनाकडे वळतात. संतांची सहज संगत लाभली तरी ती फलदायी ठरते असा विश्वास व्यक्त केल्यावर, एकनाथांनी श्रीकुलदेवता जगदंबेचा आशीर्वाद मागितला आहे. यानंतर एकनाथ अत्यंत आदराने आपल्या श्रीसद्‌गुरूंचे म्हणजे जनार्दनस्वामींचे स्तवन करत आहेत. यामध्ये जनार्दन माझें मन, नयन, वदन असून तोच सद्‌गुरू माझ्याकडून ही श्रीरामकथा बोलवितो आहे. असा भाव प्रकट झाला आहे.

श्रीरामावताराचे निमित्त

लंकाधीश रावणाच्या राक्षसी शक्ति-सामर्थ्यामुळे देव त्याचे दास झाले. या घटनेने चिंतित झालेल्या ब्रह्मादिकांनी अखेर श्रीविष्णूकडे धाव घेतली. रमापती श्रीविष्णूने त्यांना आश्वासन दिले की, 'मी आणि रमादेवी दोघेही अवतार घेऊ. श्रीविष्णू रघुवंशात राजा दशरथाचा पुत्र म्हणून अवतार घेईल. रमादेवीही अवतार घेईल आणि कलहाचे निमित्त ठरून राक्षससंहाराला प्रेरक होईल.' याच वेळी श्रीविष्णूंनी देवांना वानर म्हणून जन्म घ्यावा असे सुचविले.

राजा दशरथाची अस्वस्थता

सूर्यवंशातील राजा अज याचा पुत्र दशरथ हा धर्माचरणी होता. त्याला शहाण्या आणि पतिनिष्ठ अशा तीन राण्या होत्या. सद्‌विद्या अशी ज्येष्ठ कौसल्या, बुद्धिमान अशी सुमित्रा आणि अविद्या ती कैकेयी. कैकेयीजवळ असलेली दासी मंथरा ही कुविद्येचे प्रतीकच म्हणावी. दशरथाला संतती नव्हती. त्यामुळे तो पुत्रप्राप्तीसाठी उत्सुक बनला होता. या दुःखामुळे त्याला राजभवन, सिंहासन, सुखोपभोग, सन्मान, स्तुती किंवा वस्त्रालंकार यांपैकी कशानेही सुख होत नव्हते. तो विमनस्क, विरक्त बनला होता. त्यामुळे नेहमीचे जीवन बदलावे म्हणून त्याने एकांतात राहण्याचे निमित्त सांगून वनात शिकारीला जाण्याचे ठरविले. वनात वनफळांचा आहार आणि एकाकी विहार हीच त्याची दिनचर्या बनली. पुत्रप्राप्तीची उत्सुकता मात्र मनात होतीच.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

श्रावणाची कथा

एकनाथांनी ही कथा सांगताना श्रावणाने माता-पित्यांना कावडीत ठेवले किंवा कावड झाडाखाली ठेवली या लोकवार्ता खोट्या असल्याचे सांगून पुढे स्वतःचे मत नोंदविले आहे. ते म्हणतात, 'श्रावण आपल्या पित्याला खांद्यावरून घेऊन पाण्यापाशी आला. कमंडलू पाण्याने भरताना बुड्बुड् आवाज झाला.' दशरथ राजा हा शब्दाचा -आवाजाचा - वेध घेऊन नेम धरण्यात कुशल होता. त्याने बाण सोडला आणि श्रावणाचा वध झाला. मरणसमयी श्रावणाने रामनाम घेतले. यामुळे तो नित्य मुक्त झाला. दशरथ रामनामाच्या श्रवणाने ब्रह्महत्येच्या पातकापासून मुक्त झाला.

दशरथ श्रावण होता त्याठिकाणी आला. त्याला तेथे श्रावणाची अंध माता-पिता दिसली. श्रावणाच्या वधाने व्यथित झालेल्या त्या उभय मातापित्यांनी राजाला शाप दिला. " आम्हाला पुत्रशोक दिलास तसा तूही पुत्रशोक पावशील." राजा दशरथाला त्या ब्राह्मणांच्या शापाने उलट आनंदच झाला. कारण हा शाप खरा ठरणार म्हणजे आपल्याला पुत्रप्राप्ती होणार, या विचाराने तो उल्हसित झाला. त्या वृद्धांनी देह ठेवले. राजाने तिघांवरही अग्निसंस्कार करून उत्तरक्रिया केली.

श्रावणाच्या पूर्वजन्माची कथा

पुराणात आलेली कथा अशी की, एका जलाशयापाशी दोन पक्ष्यांचे वास्तव्य होते. त्यांची एका मत्स्याशी मैत्री होती. पुढे जलाशय आटू लागला. तेव्हा त्या पक्ष्यांच्या जोडीने आपल्या मित्राला मोठ्या जलाशयाकडे न्यायचे म्हणून त्याला प्रेमाने चोचीत धरून वाहून नेण्याचे ठरविले. वाटेत एका मोठ्या वनातून जाताना त्या मत्स्याला लाकडाचा जोरदार धक्का लागून तो दुखंड होऊन जमिनीवर पडला. या घटनेने पक्ष्यांना तीव्र दुःख होऊन त्यांनी प्राण सोडला. अशी ही तिघे ऋणानुबंधी पुढच्या जन्मी एकत्र आली. ते दोन पक्षी हे माता-पिता आणि मत्स्य हा त्यांचा पुत्र श्रावण. एकाच वेळी तिघांचा मृत्यू सांगणारी अशी ही पुराणकथा आहे.

ब्रह्महत्येचा परिणाम

राजा दशरथ रामनामाच्या श्रवणाने दोषमुक्त झाला तरी त्याला लोकरूढ शास्त्राप्रमाणे अश्वमेध यज्ञ करण्याची सूचना वसिष्ठांनी केली. अश्वमेध यज्ञाने राजा शुद्ध झाला खरा, पण राष्ट्रावर अवर्षणाचे संकट आलेच. शुक्राचार्यांनी मेघ अडवून धरले; अनेक वर्षे पर्जन्यवृष्टी झाली नाही; गवताची काडी मिळणेही अवघड झाले. झाडे-झुडपे करपली; वृक्षांचे शेंडे वाळले; नद्या-नाले शुष्क झाले; सर्व प्रजा हवालदील होऊन रडकुंडीला आली. शुक्राचार्य हे दैत्यांचे गुरू होते.

दैत्यगुरूंशी दशरथाचे युद्ध

राजा दशरथाला प्रजेचे हाल पाहून अत्यंत दुःख झाले. शुक्राने मेघ अडविल्याचे समजले आणि दशरथ त्याच्याशी युद्ध करायला निघाला. या वेळी कैकेयीराणीने राजाबरोबर जाण्याचा हट्ट धरला. तिची समजूत पटणे शक्य झाले नाही. ती म्हणाली," तुम्ही स्वर्गात जाणार तेव्हा मी स्वर्गाचे वैभव पाहायला येते आहे." वसिष्ठमुनींनी भविष्यात काय घडणार हे ओळखून राजाला तिला अवश्य न्यावे असा सल्ला दिला. राजाचीही ती लाडकी होती. तेव्हा तिला रथात बसवून दशरथाने आपल्या शक्तिसामर्थ्याने रथ स्वर्गाकडे नेला. क्षणकालात त्याचा रथ शक्रलोकामध्ये पोहोचला आणि त्याने युद्ध सुरू केले.

राजा दशरथाच्या पराक्रमाचा शुक्राने धाक घेतला. शुक्राच्या साहाय्याला दैत्यांची सेना होती. दशरथाने आपल्या शरवर्षावाने एकेक दैत्य टिपला. वृषपर्वा हा थोर योद्धा, पण दशरथाने त्याचा रथ मोडून, त्याचा मुकुट खाली पाडून त्याला मोकळ्या केसांसह पळवून लावले. साक्षात् दैत्यराज वृषपर्व्याची ही अवस्था झाल्यावर दैत्यांच्या सेनेची

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

पळापळ झाली. शुक्राचार्य तेवढा दशरथाशी लढू लागला. दशरथासारखा अचूक योद्धा समोर शंखनाद करून युद्धासाठी येताच शुक्रानेही अनेक प्रकारे युद्ध केले. शुक्राने एका प्रसंगी दशरथाच्या रथाचा आख अचूक वेधला. या वेळी कैकेयीने त्या ठिकाणी आपला हात घातला आणि रथ सावरला. त्यामुळे दशरथ विचलित न होता, युद्ध करत राहिला आणि अखेर शुक्राने पळ काढला. या वेळी केवळ ब्राह्मण म्हणून दशरथाने त्याला न मारता जाऊ दिले.

राजा दशरथ विजयी झाला आणि देव-मानव यांना अत्यानंद झाला. मेघ मोकळे होऊन पर्जन्य पडू लागला. देव आणि पूर्वज दशरथाच्या पराक्रमाने प्रसन्न होऊन त्याचा जयजयकार करू लागले. देवांचा राजा इंद्र याने तर दिव्य वस्त्रालंकार देऊन दशरथाचा सन्मान केला. बृहस्पती हा देवांचा गुरू, त्याला दैत्यांच्या गुरूचा पराभव झाल्याचा अपार आनंद झाला. दशरथाला आलिंगन देऊन त्याने त्याला वरदान दिले.

बृहस्पतींकडून वरदान

देवगुरू बृहस्पतींनी राजा दशरथाला म्हटले, "तुझे सर्व मनोरथ पूर्ण होतील. तुला पुत्रसंतती होण्यासाठी मी एक श्रेष्ठ युक्ती सांगतो ती तू प्रत्यक्षात आण. तू अयोध्येत विभांडकाकडून पुत्रेष्टी यज्ञ कर. परंतु विभांडकऋषी हा नित्य वनात राहतो आणि तो तुमची भेटही घेणार नाही. त्याला मृगीपासून झालेला पुत्र असून त्याचे ऋष्यशृंग असे नाव आहे. तोही महातपस्वी आहे. त्याला स्त्रियांकडून भुलवून अयोध्येत आणायला हवे. तो अयोध्येत येताच तुला संतती नाही म्हणून तुझा मित्र शांतन याने तुला जी कन्या दिली आहे तिच्याशी ऋष्यशृंगाचा विवाह करून टाक." या वेळी इंद्राने दशरथाला आश्वासन दिले की, ऋष्यशृंगाला अयोध्येत आणण्यासाठी ज्या अप्सरा हव्यात त्या मी तुझ्याकडे पाठवीन. त्या ऋषीला निश्चित भुलवून अयोध्येत आणतील.

दशरथाकडून कैकेयीला वरदान

प्रत्यक्ष युद्धामध्ये कैकेयीने रथामध्ये हात घालून रथ सावरला होता, त्यामुळे दशरथ तिच्यावर संतुष्ट झाला होता. त्याने तिला वचनप्रमाण देऊन म्हटले, "जे जे मागशील ते ते तुला मी देईन." त्यावर कैकेयी म्हणाली, "तुमच्यामुळे मला काहीच कमी नाही. तुमच्यामुळेच मी स्वर्गादी दिव्य भूषणे भोगते आहे. तुमच्यामुळेच नर माझ्या गळ्यात कल्पवृक्षाच्या म्हणजे पारिजातकाच्या माळा शोभताहेत; स्वर्गसुखाचा सोहळा मी भोगते आहे; आपण शरीरासह स्वर्गभुवनाचे सुख अनुभवले आहे; सर्व सुखांनी मी संपन्न आहे. तुम्ही आहात त्यामुळे मला कसलीच कमतरता नाही." एवढे बोलून हसत हसत कैकेयी म्हणाली," तुम्ही वचन दिले आहेत त्यासाठी मी योग्यवेळी, विशेष प्रसंगी हवे ते मागून घेईन."

राजा दशरथाने पुन्हा एकदा वचनाचा पुनरुच्चार करून म्हटले, "माझे वचन हेच वरदान आणि तेच सत्य आहे. जेव्हा तू आपणहून काही मागशील तेव्हा ते मी तुला तत्काल देईन."

राजा दशरथाची आणि त्याच्या पराक्रमाची ख्याती सर्वत्र पसरली. स्वर्गातले देव, दिशांच्या देवता, त्याची स्तुती करू लागल्या. जिंकला न जाणाऱ्या दैत्यगुरूचा पराभव करण्याने दशरथाची कीर्ती त्रिजगतात झाली. त्याचा लौकिक सर्वत्र पसरला.

राजा दशरथाने पुनश्च अयोध्येत प्रवेश केला त्या वेळी प्रजेने त्याचे अभूतपूर्व स्वागत केले. घरोघरी गुढ्या उभारल्या गेल्या; भाट त्याची स्तुती गाऊ लागले; पायघड्या घालून स्त्रीपुरुषांनी त्याचे स्वागत केले; त्याच्या आरत्या केल्या; धनधान्याच्या ओवाळण्या झाल्या. दशरथाच्या महान पराक्रमाचा सर्वांनी यथोचित सन्मान करण्यात उणीव राहू दिली नाही. असा तो महाप्रतापी दशरथ अयोध्येत येऊन दाखल झाला.

https://archive.org/details/@sarayu_foundation_trust_lucknow

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

अध्याय दुसरा

राजा दशरथाने आपले राष्ट्रविषयक कर्तव्य पार पाडल्याने सर्वत्र आनंदीआनंद झाला. वैर, दुःख, दुष्काळ आणि दैन्य संपले. वृक्ष फळांनी परिपूर्ण झाले. प्रजा आनंदात राहू लागली. प्राणिमात्र सुखावले. राष्ट्र धनधान्याने समृद्ध झाले. दुःख–दैन्य दूर झाले. ईश्वरभक्तीचा घरोघरी उत्साह संचरला. पुढे होणाऱ्या श्रीरामावताराची जणू ही पूर्वतयारीच झाली.

अयोध्येत अप्सरा आल्या

इंद्राने दिलेल्या आश्वासनाप्रमाणे अप्सरा अयोध्येत आल्या. त्यांनी राजा दशरथाकडे येऊन, नमन करून, आपल्या पुढच्या कार्याविषयी प्रश्न केला. त्या वेळी दशरथ म्हणाला, "विभाण्डकाला न कळत ऋष्यशृंगाला भुलवून इकडे आणण्याचे काम तुम्ही करावे." दशरथाच्या सूचनेप्रमाणे त्या अप्सरा वनात विभाण्डकाचे वास्तव्य असलेल्या गुंफेकडे गेल्या.

विभाण्डक अनुष्ठानासाठी गुंफा सोडून गेला. गुंफेत एकटा ऋष्यशृंग होता. अप्सरा पुढे जाऊन, हावभाव करीत, ऋष्यशृंगाला दिसेल अशा अंतरावर पोहोचल्या.

ऋष्यशृंग - अप्सरा प्रसंग

ऋष्यशृंगाने अप्सरांना पाहून गुंफा सोडली. प्रत्यक्ष नजरभेट होताच तो हरिणाच्या स्वाभाविक चंचलतेने त्यांच्याकडे धावला. मधेच मुख मुरडून, कधी सरळ त्यांच्याकडे पाहून, वारंवार उंच उड्या मारून आणि कधी वेगात पळून तो त्यांना पाहात होता. त्या अप्सरांची भेट कशी होईल; अगदी प्रत्यक्ष त्यांच्याशी बोलणे जमले नाही, तर निदान त्यांच्याशी दृष्टिभेट तरी कशी होईल या विचाराने तो अस्वस्थ झाला.

तेवढ्यात विभाण्डक परतण्याची वेळ झाली, तेव्हा अप्सरा निघून गेल्या. ऋष्यशृंग मनातून व्यथित होऊन गुंफेत परतला. त्याने नित्याप्रमाणे पित्याची सेवा सुरू केली. परंतु त्याच्या मनातून अप्सरांचा - ज्यांना तो तापसी समजत होता - विचार जात नव्हता. त्याची ही मानसिक अस्वस्थता विभाण्डकाच्या लक्षात आली. त्यांनी मुलाला या अस्वस्थतेचे कारण विचारल्यावर ऋष्यशृंग म्हणाला, "तुम्हाला भेटण्यासाठी काही तापसी आले होते. त्या सज्जनांच्या जटांना चकाकी आणि मुलायमपणा होता, त्यांचे शरीर सोज्ज्वळ, आकर्षक होते. मी धावत त्यांच्याकडे गेलो पण तितक्यात ते अदृश्य झाले. मला त्यांचे दर्शनही घेता आले नाही. माझी पळापळ व्यर्थ झाली. आता त्यांची क्षणोक्षणी आठवण होऊन माझे मन उदास झाले आहे." असे सांगताना आपल्या मनाला लागलेली त्यांच्या भेटीची उत्कंठा किंवा त्यांच्या भेटीसाठी वाटणारी तळमळ मात्र ऋष्यशृंगाने सांगितली नाही.

"आपल्या आश्रमात आलेल्या अतिथींचे प्रेमाने स्वागत करून, त्यांची पूजा करण्याचे माझ्या अशक्त आणि देहभयाने ग्रासलेल्या मनाने टाळले. त्यांची भक्ती करणे माझ्याने घडले नाही. नमन, मृदू संभाषण न केल्याने मी सज्जनांच्या आतिथ्यात देहभयाने चुकलो. आता पुन्हा जर त्यांची भेट झाली तर त्यांच्याशी हितगुज करावे अशी मनात इच्छा आहे. माझ्या अंतःकरणात त्यांच्याविषयी आवड निर्माण झाली असल्याने त्यांची केव्हा भेट होईल अशी मला तळमळ लागली आहे."

दुसऱ्या दिवशी प्रातःकाळी अनुष्ठानशील विभाण्डक पर्णकुटीतून निघून गेला. ऋष्यशृंग एकटाच पर्णकुटीत असल्याचे पाहून अप्सरा तातडीने तेथे आल्या. त्यांना पाहून तो ऋषिपुत्र थोड्या बावचळलेल्या अवस्थेत त्यांच्याशी संभाषण करीत धीराने उभा राहिला. या वेळी त्याच्या मृगस्वभावाप्रमाणे काहीशा गोंधळलेल्या मनाने त्याच्या हालचाली होत होत्या. अप्सरांनी वीणाझंकार केला. त्या नादाने त्याच्या अंतःकरणात मोह उत्पन्न झाला आणि तो इकडे-तिकडे जाणे-

https://archive.org/details/@sarayu_foundation_trust_lucknow / Bhavana Vatika, Bhulakshmi academy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

येणे विसरला. एखाद्या पारध्याने मधुर स्वरांनी हरिणाच्या मनाला मोह पाडावा तशीच त्याची अवस्था झाली. त्याने कान उभे करून, मान उंचावून, अप्सरांना निरखून, सरळ त्यांच्या गळ्यात मान टाकली.

आता तर अप्सरांनी सुस्वर गायनाला आरंभ केला होता. ऋष्यशृंग मृगाच्या स्वभावधर्माचा असल्यामुळे नादाधीन होऊन, जसे जसे त्यांचे गायन भरात येत होते, तसे तसे त्याचे नर्तन सुरू झाले. हळू हळू तो त्या अप्सरांशी बोलू लागला. त्याचे प्रश्न होते, "तुमचे वसतिस्थान कोणते? तुम्ही काय हेतूने येथे आगमन केले आहे? तुमच्या वक्षावर तीक्ष्ण गाठी दिसताहेत त्यावरून तुमच्या हृदयांत काही व्यथा आहे काय?" या त्याच्या भाबड्या प्रश्नांना अप्सरांनी मोठी मार्मिक उत्तरे दिली.

"तुझ्या डोक्यावर तीक्ष्ण शिंगे असल्याने तुला जसे ऋष्यशृंग नाव प्राप्त झाले आहे; तसेच आमच्या हृदयावर (वक्षावर) तीक्ष्ण गंडे असल्याने आम्हाला गंडऋषी असे नाव पडले आहे. विलास भोगण्याचे रतिरमण हे आमचे वसतिस्थान आहे. तू तिथल्या जीवनाचे रसपान कर." असे म्हणून अप्सरांनी त्याच्या ओठांचे चुंबन घेऊन त्याला अधरामृत रसपानाचा अनुभव दिला.

"आमचा संपूर्ण देह हा एक सिद्ध अनुष्ठान आहे. आमच्या गंडांचा स्पर्श होताच सुख-समाधान मिळते." असे सांगून अप्सरांनी त्याला आलिंगन दिले. अशाच प्रकारे आपल्या वनातली फळे म्हणून साखरेचे लाडू, तुझ्या वनात हे सुख नाही असे म्हणत, त्यांनी त्याला दिले. आमचे अनुष्ठान फार दुर्मिळ आहे असे सांगत, पुढे समाधिस्थिती सांगत अप्सरांनी रतिमुद्रा लावली. ऋष्यशृंगाने रतिक्रीडा अनुभवली आणि तो त्यांना वश झाला.

ऋष्यशृंग अप्सरांना इतका भुलला की, तो आश्रमस्थिती, आपले नित्याचे व्यवहार, संध्यास्नान, अनुष्ठान, जप, ध्यान हे सारे विसरला. स्थिति-गती, प्राप्ती-अप्राप्ती, पितृभक्ती, वेदाध्ययन, शास्त्रपठण, या सर्वांचे त्याला विस्मरण होऊन तो केवळ त्या अप्सरांनी सांगितल्याप्रमाणे वागू लागला आणि त्यांच्या पूर्ण स्वाधीन झाला.

स्त्रीसंगावर नाथांचे भाष्य

क्षणभराच्या स्त्रियांच्या संगतीने जर एक वनवासी असा वश होतो, तर ज्यांना नित्य स्त्रियांचा संग आहे त्यांची अवस्था काय होईल? त्यांची मुक्तता कशी होईल? स्त्रियांकडून अनेक वनवासी, तपस्वी, सेवक, ग्रामवासी यांना भ्रष्ट केले गेले आहे. त्यांच्याकडून मुक्तीच्या मार्गाचा घात होतो. स्त्रियांचे दर्शन, स्पर्श, भाषण, स्मरण या सर्वांचा परिणाम विनाश करणारा आहे. स्त्रियांची संगत, त्यांच्याशी एकांतात केलेले भाषण, स्त्रीलाभाचा हेतू हे सारे घात करणारे आहे.

ऋष्यशृंग अयोध्येत

अप्सरांनी ऋष्यशृंगाला भुलवून अयोध्या-नगरीत आणल्यामुळे दशरथाला परमानंद झाला. त्याने सर्व नगर शृंगारण्याची आज्ञा केली. गुढ्या, तोरणे, टिळे, माळा, वस्त्रे, भूषणे सर्वांना वाटली. अगदी गोशाळा, गुराखी, गाई यांनाही शृंगारले. हे सारे विभाण्डकाला दिसावे असा त्याचा हेतू होता. संत, सज्जन, ऋषी, मुनी या सर्वांना निमंत्रित केले. शांतनेचा पिता आणि दशरथाचा परमस्नेही शांतन याला शांतनेच्या लग्नासाठी आमंत्रित केले. कुलगुरू वसिष्ठ आणि भाग्यवंत दशरथ यांनी विधियुक्त ऋष्यशृंग आणि शांतना यांचे लग्न लावले.

इकडे विभाण्डक जेव्हा आश्रमात परतला तेव्हा त्याला तेथे ऋष्यशृंग आढळला नाही. दशरथाने त्याला फसवून अयोध्येस नेल्याचे त्याला समजले. तेव्हा तो क्रोधाने अयोध्येत आला. त्या वेळी त्याला संपूर्ण नगरी शृंगारलेली दिसली. माझ्या पुत्राला फसवून इथे आणले आणि हा सारा सोहळा कसला? या प्रश्नाचे उत्तर मिळण्यासाठी

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

त्याने मार्गातील लोकांकडे विचारणा केली. त्याला त्यांच्याकडून असे कळले, की दशरथाने आपल्या कन्येशी ऋष्यशृंगाचा विवाह केला असून त्यानिमित्ताने ही नगरी सुशोभित केली आहे. हे ऐकल्यावर राजा दशरथावरचा राग जाऊन विभाण्डकाला मोठा संतोष झाला. विभाण्डक संतुष्ट होऊन उल्हसित झाला तेव्हा दशरथ त्याला सामोरा गेला. त्याने विभाण्डकाच्या चरणांना स्पर्श केला. विभाण्डकांनी दशरथाला आलिंगन देऊन त्याचा गौरव केला. "धन्य धन्य राजा तुझी!" असे उद्‌गार काढले. नंतर वधूवरांना वस्त्रालंकारांनी विभूषित झालेले पाहून तर त्याला दशरथाविषयी कृतज्ञता वाटली. तो म्हणाला, "दशरथा, तुझे जे जे मनोरथ असतील ते ते सर्व मी पूर्ण करीन." या शब्दांनी राजा दशरथाला पुत्रप्राप्तीचा आशीर्वाद मिळाल्याचा आनंद मिळाला. त्याने उच्चासनावर बसवून विभाण्डकाची षोडशोपचारे पूजा केली. चरणतीर्थ प्राशन केले. तो ऋषी यामुळे राजा दशरथावर अधिकच संतुष्ट झाला.

पुत्रकामेष्टी यज्ञ

अयोध्येत ऋष्यशृंगाच्या लग्नाचा सोहळा पार पडला आणि त्या वेळी अकस्मात् दशरथाचा प्रिय मित्र शांतन म्हणजेच राजा लोमपाद याच्या राज्यात अवर्षण झाले. लोमपादाने दशरथाला विनंती केली की, मला तू विभाण्डकाला नेऊन पर्जन्येष्टियाग म्हणजे पाऊस पडण्यासाठी करायचा यज्ञ करण्यासाठी मान्यता दे. दशरथ मित्रकार्य करण्यास तत्परतेने तयार झाला. त्याने औदार्य दाखवून स्वतः विभाण्डकाला यज्ञासाठी जावे अशी विनंती केली. त्या थोर विभाण्डकानेही दशरथाचा शब्द मोडायचा नाही म्हणून ती विनंती मान्य केली. नंतर लोमपादाच्या राज्यात जाऊन विभाण्डकाने यज्ञ केला. त्यामुळे राज्यात सर्वत्र पर्जन्यवृष्टी होऊन लोक आनंदित झाले. तृण आणि धान्य यांची समृद्धी झाली. लोमपादाने विभाण्डकाची यथोचित पूजा केली. त्याला सन्मानाने दशरथाकडे आणले. विभाण्डकाचे आगमन होताच दशरथाने पुत्रकामेष्टी यज्ञ सुरू केला.

कुलगुरू श्रेष्ठ वसिष्ठ, ऋषीश्वर विभाण्डक आणि आनंदी ऋष्यशृंग यांनी यज्ञाच्या कार्याचा स्वीकार केला. "राजा, मी तुला पुत्र देईन" असे म्हणून ऋष्यशृंगाने पुढाकार घेतला. आपल्या पित्याला आणि वसिष्ठांना वंदन करून दशरथाच्या हितासाठी ऋष्यशृंगाने यज्ञाला आरंभ केला. कुंड, मंडप, समिधा, दर्भ, दर्भाचा त्रिपेडी दोर, दर्भाने कुंडाच्या चारी बाजू वेढणे, या सर्व गोष्टींची सिद्धता होऊन अग्निस्थापना झाली. यज्ञपात्रे, घृताची भांडी, दर्भासन, यज्ञासाठी लागणारी लाकडाच्या पळ्यांची साधने धुणे, हे सारे सिद्ध करून मंत्रोक्त उदकसिंचन झाले. ऋष्यशृंगाने या प्रकारे यज्ञाचे सर्व उपचार पूर्ण केले. यज्ञकार्य सुरू झाले.

यज्ञपुरुषाकडून पायसदान

ऋष्यशृंगाचे अनुष्ठान श्रेष्ठ आणि संपूर्ण होते. त्याच्याकडून मुख्य होम केला जाताच, साक्षात् यज्ञपुरुष प्रकट झाला. आकाश प्रकाशाने उजळले. त्या यज्ञपुरुषाचे तेजस्वी स्वरूप असूनही शीत आणि ऊष्ण यांच्या समन्वयामुळे सर्वत्र आनंद निर्माण झाला. वसिष्ठांना आणि विभाण्डकाला, तसेच सर्व ऋषिगणांना आणि अयोध्यावासी प्रजेला आश्चर्याने तटस्थ केले. श्वासोच्छ्‌वास थांबला, पापण्यांची उघडझाप थांबली अशी ती तटस्थता होती. ऋष्यशृंगाच्या तपोबलाने हे घडल्यामुळे त्याची प्रशंसा झाली. आजवर अनेक यज्ञ झाले आणि त्यांची फलप्राप्तीही झाली. परंतु साक्षात् यज्ञपुरुष यज्ञात प्रकट झाला तो ऋष्यशृंगामुळे असेच सर्वजण म्हणू लागले. त्याची कीर्ती सर्वत्र पसरली.

यज्ञकुण्डात साक्षात् यज्ञमूर्ती यज्ञप्रसादाचे पायसपात्र घेऊन प्रकट झाली. भविष्यकाळी रघुकुलात येणाऱ्या श्रीरामावताराचे हे प्रसादचिन्ह होते. यज्ञदेवाने ऋष्यशृंगाच्या हाती पायसपात्र देऊन

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized By Sarayu Foundation Trust and eGangotri

सांगितले, "हा संपूर्ण यज्ञपुरोडाश राजा दशरथाच्या तीन राजपत्न्यांना विभागून द्यावा. या पुरोडाशामुळे त्यांना पुत्रसंतती होईल. ही पुत्रसंतती त्रिभुवनाला पवित्र करणारी असेल. या पुरोडाशाचे वाटप करण्यात क्षणभराचाही विलंब न होता तो तत्काळ प्राशन केला पाहिजे. विलंब झाल्याने मात्र विघ्न निर्माण होईल." एवढे बोलून यज्ञदेव अंतर्धान पावला. ऋष्यशृंगाने पायसपात्र राजा दशरथाकडे पुत्रांसाठीचा प्रसाद म्हणून दिले. नंतर वसिष्ठांना प्रसादाविषयीचे गुपित सांगताना ऋष्यशृंग म्हणाला, "आपण विलंब न करता या प्रसादाचे समभाग करून राण्यांना वाटून द्या. विलंबामुळे विघ्न येण्याची शक्यता आहे."

वसिष्ठ हे श्रेष्ठ कुलगुरू असल्यामुळे त्यांना योग्य विभाग करून त्यांचे वाटप करण्यास सांगण्यात आले. वसिष्ठांनी भविष्यातील स्थिती ध्यानात घेऊन हातातील पायसाचे योग्य भाग पुढीलप्रमाणे केले. कौसल्येचा भाग परब्रह्म, सुमित्रेचा भाग भजनोत्तम आणि कैकेयीचा भाग परमधर्म असे अनुक्रमे विभाग झाले. कौसल्येला धर्मपत्नी म्हणून, सुमित्रेला साध्वी म्हणून, राजा दशरथाने वरिले होते. कैकेयी सौंदर्यवती, रूपयौवनाने गर्विष्ठ असून त्यासाठीच दशरथाने तिला वरिले होते.

कैकेयीचे प्रसाद-प्रकरण

वसिष्ठांनी प्रसादाचे केलेले भाग अमान्य करून कैकेयीने त्या प्रसादाच्या वाटपाला विरोध दाखविला. ती म्हणाली, "मी राजाची आवडती आहे, तेव्हा ज्येष्ठ भाग मला द्या." वसिष्ठांनी तिचे म्हणणे अमान्य करून, "ज्येष्ठ भाग ज्येष्ठेकडे म्हणजे कौसल्येकडे जाणे योग्य आहे; तो कनिष्ठेला कसा मिळेल? ज्याप्रमाणे हत्तीसाठी तयार झालेली भूषणे शेळीला घातली तर ती तो भार कसा वाहू शकेल? जरी हिरा अमोल ठरला तरी त्याला कोणी शाळिग्रामाची पूज्यता देणार नाही. तू जरी राजाची आवडती असलीस तरी ज्येष्ठ भागासाठी अयोग्य आहेस."

वसिष्ठांनी प्रसादाचा ज्येष्ठ भाग कौसल्येला दिला. दुसरा भाग सुमित्रेला दिला आणि तिसरा भाग कैकेयीला दिला. यामुळे कैकेयी मनातून खूप संतापली; पण वसिष्ठांपुढे तिचे काही चालले नाही. ती कुलगुरूंचा द्वेष करू लागली. प्रसादाचा भाग हाती येऊनही तिच्या मनाला समाधान मिळाले नाही. 'मी स्वर्गापर्यंत गेले होते. मी स्वर्गीय ऐश्वर्य भोगले आहे, याचा द्वेष वाटत असल्यानेच कुलगुरूंनी ज्येष्ठ भाग माझ्या हाती दिलेला नाही. कौसल्या आणि सुमित्रा यांनी शुद्धाचमन करून प्रसादभक्षण करण्याची तयारी केली. कैकेयी मात्र राजाच्या तोंडाकडे पाहात राहिली. त्या विलंबाने नेमके विघ्न ओढवले.

घारीकडून प्रसादावर झडप

'जे गुरुवचन मानत नाहीत त्यांना तत्काळ विघ्न येते.' या वचनाला अनुसरून एक पुराणकथा सांगितली आहे. ही कथा म्हणजे घारीचा पूर्वजन्मवृतान्त आहे.

सुवर्चसा नावाची एक नृत्यनिपुण अप्सरा होती. एकदा सत्यलोकात ती मद्याने झिंगलेल्या अवस्थेत नृत्य करण्यासाठी आली. ती तालात नाचू शकत नव्हती. त्यावर ब्रह्म्याने तिला शाप दिला. 'सत्यलोकात मद्यपान निंद्य आहे. तू तालावर नाचू न शकण्याचे कारण मद्यपानच आहे. तेव्हा हे निर्लज्ज आणि उन्मत्त सुंदरी तू नतद्रष्ट पापिणी असल्यामुळे घार होशील. आता ताल चुकून झिंगल्यावर नाचलीस तशीच आकाशात भिरभिरत राहशील." ही कठोर शापवाणी ऐकल्यावर सुवर्चसा भानावर आली. अत्यंत नम्रपणे तिने उःशाप मागितला. अनेक प्रकारे विनवणी केल्यावर चतुरानन ब्रह्मा प्रसन्न झाला आणि म्हणाला, "दशरथ पुत्रासाठी यज्ञ करील. तेथे परमपवित्र अन्नाचा पुरोडाश असेल. त्या प्रसादाचे तीन भाग केलेले तीन ठिकाणी विभागले जातील. त्यांतला एक भाग तू प्राशन कर. लक्षत ठेव, ज्येष्ठ भागापर्यंत

https://archive.org/details/@sarayu_foundation

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

तू जाऊ शकणार नाहीस. मध्यमभाग तुझ्या शक्तीपलीकडचा असेल. तुझ्यासारख्या कनिष्ठेला कनिष्ठ भागच मिळेल. नंतर तुझी शापातून मुक्तता होईल. हे सारे अयोध्यानगरीत घडेल. अयोध्या ही मोक्षनगरी असून अग्रगण्य आहे. वेदांनी आणि शास्त्रांनी तिचा गौरव केला आहे. काशी हे मुक्तिक्षेत्र आहे खरे, पण तिच्याठायी मृत्यू झाल्यावर मुक्ती आहे. त्यातले सगळेच वैकुंठाला जात नाहीत. अयोध्येची नवलाई अपूर्व आहे. काशीहून अयोध्या अधिक श्रेष्ठ आणि उदार आहे. ही नगरी त्रिवार वैकुंठाला नेण्यात आली आणि तीही न मरता सकुटुंब नेण्यात आलेली आहे. प्रथम रुक्मांगदाने, दुसऱ्यांदा शिबीने नेली आणि पुढे श्रीराम नेईल. पुन्हा चवथ्यांदा ती नगरी वैकुंठाला नेली जावी अशी वसिष्ठादिकांची कीर्ती आहे. असे त्या श्रेष्ठ अयोध्यानगरीचे माहात्म्य आहे. यासाठी मुक्तिक्षेत्रांच्या शिरोभागी असलेली अयोध्या ही प्रथम आहे. जड जीवांचा उद्धार करणारी, केवळ स्नानाने शापाचे निवारण करणारी असल्यामुळे तू तेथील पुरोडाशाचा भाग प्राशन केलास तर शापमुक्त होशील.'' ब्रह्मदेवाने हे सांगितल्यावर ती सुवर्चसा अप्सरा घार झाली.

ब्रह्मदेवाच्या शापाने घार झाल्यावर ती सहस्रावधी वर्षे गगन अयोध्येच्या महाद्वारी फेऱ्या घालत राहिली. यज्ञपुरुषाने दिलेल्या प्रसादाचे भाग झाल्यावर ती झडप घालण्याची संधी पाहू लागली. कौसल्या सत्य पतिव्रता असल्याने तिच्या प्रसादभागावर किंवा शुद्ध सात्त्विकताच अशा सुमित्रेच्या प्रसादभागावर तिला झडप घालविली नाही. कैकेयी ही क्रोधाविष्ट झाली होती; तिचे हातातल्या भागावर मन नव्हते. ती रागाने राजाच्या तोंडाकडेच पाहात राहिली होती. त्या वेळी घारीने तिचा प्रसादभाग झडप घालून पळवायचे ठरविले.

घारीने कैकेयीच्या तोंडावर पंखांचे आघात केले; नख्यांनी हात ओरबाडला आणि प्रसादभाग चोचीने उचलून ती घार उंच आकाशात गेली. हा प्रकार घडताच लोकांनी हाहाःकार केला. कोणी घारीवर बाण सोडले. सारेजण वर माना करून पाहात राहिले. इकडे पंखांची झडप लागून कैकेयी जमिनीवर उलथून पडली. भाग गेला म्हणून रडू लागली. राजाकडे पाहात राजाला म्हणाली, ''अहो पाहता काय? माझा भाग गेला ना!'' यावर राजा म्हणाला, ''मी काय करू . तुझा गर्व तुला नडला. इथे काही उपाय चालत नाही.''

घारीने प्रसादभाग खाल्ला तेव्हा तिच्या घारीच्या देहाचे बंधन तुटले. तिचे भिरभिरत फेऱ्या घालणे थांबले. ती सुखसंपन्न झाली. कैकेयीने भागाची उपेक्षा केल्यामुळे तिला फार चिंता निर्माण झाली. गर्वामुळे आपला घात होतो. कारण ज्याप्रमाणे आत्मज्ञान उपेक्षिले म्हणजे अज्ञानच अंगिकारावे लागते आणि विषयासक्तांचे अधःपतन होते; तसेच भोगणे कैकेयीच्या वाट्याला आले.

कैकेयीचा पश्चात्ताप आणि आक्रोश

माता-पिता अनेक दिवस जगले तर पुत्रांकडून त्यांची अवहेलना होते. मरणोत्तर रडतात; तर्पण करतात, पिंड सद्‌गती अपेक्षितात; तशीच कैकेयीची दशा झाली होती. वाट्याला आलेल्या स्वतःच्या भागाची उपेक्षा केली आणि आता ती मरणारामागे रडतात तशी स्फुंदून, धुसफुसून रडत होती. त्याच वेळी म्हणत होती, ''मी जी राजाची आवडती होते, ती मी आता पूर्ण अभागी ठरले. मला पुत्रसंतती होणार नसल्याने मी सर्वार्थाने निंद्य होणार. राजाचे माझ्यावर प्रेम होते हे कोणाला आवडत नव्हते. माझे काळे तोंड जळो असे म्हणत आता सारे माझी अखंड निंदा करतील. मी आवडीने ज्येष्ठ भाग मागितला (तो तर नाहीच पण) आता कनिष्ठावरही धाड आली. मला आता न हे, न ते, असे होऊन मी धड ना इकडची, ना तिकडची झाले आणि फक्त निंद्य ठरले. मी स्वार्थीपणाने बुडाले. आता लोकापवादाच्या भीतीने जगणेही नको; मला मरण तरी येईल का?'' असे म्हणून ती रडू लागली.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

"मी स्वर्गात जी सुरवरांनाही वंद्य झाले होते; तीच या मृत्युलोकात निंद्य ठरले आहे. राजाची मी आवडती तर लोकांना नावडती झाले. माझे भाग्य फुटले; मी पाषाणवत् झाले. देव, पितर, सर्वांनीच मला निंद्य ठरवले तर एखाद्या दगडासारखी माझी किंमत होणार. एखाद्या अंधाच्या हातून रत्न पडले तर ते त्याचे त्याला सापडत नाही; तशी या कैकेयीची अवस्था झाली आहे." असे म्हणून ती पुन:पुन्हा रडत होती. केस मोकळे सुटलेले, पृथ्वीवर गडबडा लोळत असणारी, डोळ्यांतून अश्रूंच्या धारा गाळणारी; अत्यंत कळवळून तळमळणारी अशी त्या कैकेयीची स्थिती झालेली पाहून कौसल्येला कळवळा आला. तिचे असमाधान नाहीसे करण्याच्या भावनेने कौसल्या उपकार करायला सिद्ध झाली.

अध्याय तिसरा

कौसल्येकडून कैकेयीचे सांत्वन

कौसल्येने कैकेयीला पोटाशी धरून म्हटले, "तू व्यर्थ दु:ख का करते आहेस. आपल्या दोघींचे दु:ख एकच. अगं, अगदी सख्ख्या बहिणी असल्या आणि त्यांची दोन ठिकाणी लग्ने लागली तर त्यांच्या गाठी-भेटी होत नाहीत. एकमेकींशी त्यांची बोलणी होत नाहीत की दृष्टभेटही होत नाही. अशी स्थिती असल्यावर त्यांच्या सख्खेपणाला तरी काय अर्थ उरतो! नित्य संबंध, नित्य संवाद, नित्य बोध यांतले काहीच नसेल तर त्या दोघींना सख्ख्या मानणारे मूर्खच ठरतात. आता आपल्याला तर एकाच प्रकारचे सुख आहे. मग तू हा व्यर्थ शोक कशाला करतेस?"

"अगं, आपल्याला दोघींना एकच सौभाग्यपण, एकच आपले भूषण, एकच आपले शोभास्थान, असे तुझे माझे एकत्वाचे सौख्य आहे. आपल्याला एकाची संगत, एकच भोग, एकच पती, यामुळे आपले सख्य आणि आपला सख्यार्थ एकच तर आहे. आपल्याला एकच नाथ, एकच सद्भाव, एकात्म असा आपला स्नेह यामुळेच तुझे-माझे सख्यत्व आहे. एकच निवासस्थान, एकच भोगस्थान, एकाच सुखाने आपण संपन्न, आपला चालक, पालक, मालक एकच तर आहे. तुझा माझा स्वामी एक, आपले सांत्वन करणारा तोच एक, पोषणकर्ता एक, हेच तर खरे सख्यत्व आहे. आपले शरीर, हात-पाय, दृष्टी एकच हीच आपल्या सख्यत्वाची अपूर्वता आहे. आपल्या दोघींचाही नाथ दशरथच असताना तू व्यर्थ दु:ख करते आहेस. एक गोष्ट लक्षात ठेव. सखे कैकेयी, अगं, दुसऱ्याचे दु:ख पाहून जे सुख मानतात ते अत्यंत मूर्ख असतात. उलट इतरांचे दु:ख नाहीसे करणे आणि त्यांना सुखी करणे यातच शुद्धता आहे. परदु:खाने सुखी होणारा त्रिभुवनात ब्रह्मराक्षस, शास्त्रदृष्ट्या नित्य निंद्य, तो शुद्ध. सात्त्विक नव्हेच. तू निपुत्रिक राहशील आणि आम्हां सपुत्रक होऊ तर आपल्या पूर्वजांचे पतन होईल आणि तो त्रिभुवनात न मावणारा मोठा दोष ठरेल. आपला पुत्र दुसऱ्याला दिला तर तो दत्तक म्हटला जातो. तेव्हा आपण एकमेकींची फसवणूक न करता स्वार्थ आणि परमार्थ साधू हेच योग्य ठरेल."

"उदकाची गोडी शीतलता, अन्नाची गोडी ओलेपणा, स्त्रियांची गोडी अनुकूलता आणि निष्कपटता ही मित्रातली गोडी असे मानतात. आपण सख्ख्या बहिणी अशी गोष्ट बोलली जाते, तेव्हा ते कृतीने करून दाखविले पाहिजे. अन्यथा ते बोलणे खोटे ठरेल. जसा बोलतो तसे करतो त्याला हरहरीही वंदन करतात. बाकी बोलणी ही केवळ व्यर्थ बडबड ठरते. असा अचाट बडबड्या माणूस संसारातला पढतमूर्ख म्हटला जातो. जसे बोलणे तसे करणे हाच खरा परमार्थ; बाकीचे बोलणे म्हणजे विषयस्वार्थी जनांचा परमार्थ ठरतो."

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

कैकेयीला दोघींकडून प्रसाददान

कौसल्या कैकेयीला म्हणाली, "माझे बोलणे सत्य आणि संपूर्ण आहे. माझ्या भागातील अर्धा भाग लवकर घे. आपले दोघींचे यामुळे सख्यत्व राहील." या तिच्या बोलण्याने कैकेयीला समाधान झाले. तिने शुद्धाचमन करून आनंदाने अर्धा भाग स्वीकारला. कौसल्येच्या या कृतीने एखाद्या मृताला अमृतपान मिळावे; तहानेल्याच्या तोंडी पाणी पडावे; अंधाला दृष्टी यावी; रंकाला धनप्राप्ती व्हावी; दुष्काळग्रस्ताला मिष्टान्न मिळावे; यांमधून जो आनंद मिळतो तसा परमानंद कैकेयीला प्रसादाच्या प्राप्तीने अनुभवास आला. येथे समान भाग कैकेयीला देण्यात कौसल्येची समत्व बुद्धी प्रकट झाली. तिच्या मनात सवत म्हणून विचारही न येता, उलट ती उल्हसितच झाली. जशी कौसल्येची विचारसरणी होती तशीच सुमित्रेचीही होती. सत्संगामुळे सिद्ध झालेल्या सद्‌बुद्धीमुळे सुमित्रेनेही आपल्या वाट्याच्या प्रसादाचा अर्धा भाग कैकेयीला दिला. सत्संगाचे माहात्म्य असे असते. कौसल्येने आपला अर्धा भाग देताच सुमित्रेनेही अर्धा भाग दिला. सुमित्रेचा कौसल्येशी उत्तम मित्रसंबंध होता. यामुळे तिचे नाव सुमित्रा हे योग्य ठरते. यावरून ज्याला जशी संगत तशी त्याला बुद्धी हे म्हणणेही सार्थ ठरते. सुमित्रेने आपल्या कृतीने ते दाखविले.

सर्वांना आनंद झाला

कौसल्येचे भाषण, निःस्वार्थ कृती यांमुळे आणि तिने प्रसादभागाचे दान केल्यामुळे वसिष्ठांना अत्यंत आनंद झाला. कौसल्येने प्रसादभाग प्राशन केल्यामुळे आता तिच्या उदरी निश्चित श्रीराम जन्मणार, अयोध्येचे राजभुवन धन्य होणार आणि तेथे स्वानंद विहरणार अशा आनंदाने नारदमुनी तर नाचू लागले. "सूर्यवंशाला चांगली दशा प्राप्त झाली. आता देवांचे बंधन सुटेल; नवग्रहांची बेडी तुटेल. मुक्ती सुखाने वाढेल आणि सुखाला पालवी फुटेल. माझ्या वाल्मीकीचे वचन प्रत्यक्ष-प्रमाण ठरेल. आत्मनिधान श्रीराम प्रकटला की अयोध्येची सर्व जनता धन्य होईल. पुढे लंकेत दारुण युद्ध होईल. श्रीराम रणकंदन करील. ते मी स्वतः पाहू शकेन." असे म्हणत नारदमुनी हर्षभरित होऊन उड्या मारू लागले. वसिष्ठांची अवस्था तशीच होती. जसे जेवणारालाच जेवणाची चव कळते तसे वसिष्ठ आणि नारदांनाच भविष्यातील सुखाचे भान आले होते. ते त्यांचे त्यांनाच जाणवले. इतर नुसते टकमक पाहणार.

विभाण्डक मनातून आनंदले. 'कौसल्या खरोखर सत्त्वशिरोमणी आहे. हिच्यामुळे धरती पवित्र झाली. कौसल्या त्रिभुवनात धन्य आहे.' असे त्यांच्या मनात आले. ऋष्यशृंग त्या वेळी सुखाच्या तरंगांनी सुखावला होता. त्याने उडी मारून आरोळी ठोकली, "कौसल्या भूतलावर श्रीराम आणील. कौसल्येचा भाव शुद्ध असल्यामुळेच रामराजा प्रकटणार. महाबाहो दशरथही धन्य आहे. त्याचा गर्भसंबंध अलौकिक आहे." सर्व ऋषीश्वर आश्चर्य करत होते. देव तटस्थ झाले. सर्वांनी जयजयकार केला. रघुवीर चतुर्थ भागात विभागला. मुख्य द्वेष सवतीमत्सर हा असतो. कौसल्येच्या ठिकाणी सवतीमत्सर नाही म्हणून तिच्या कुशीत राम येणार.

कैकेयीच्या ठिकाणी सवतीमत्सर होता म्हणून तिने स्वतःचा प्रसादभाग हरविला. कौसल्येचा भाव शुद्ध होता म्हणून तिच्या गर्भात श्रीराम! यज्ञाच्या शेवटी एक ताट आले. तिथेच प्रसादचे चार भाग करण्यात आले. मुख्य अर्धा भाग कौसल्येपाशी, त्याच्या भजनाचा म्हणजे भक्तीचा अर्धा भाग सुमित्रेपाशी आणि दोन्हींचे अर्धे अर्धे भाग कैकेयीपाशी गेले. तिला स्वतंत्र भाग मिळाला नाही. तिच्या पोटी जन्मणारे पुत्र हे स्वतंत्रपणे तिचे असणार नाहीत म्हणून तिला परतंत्र म्हटले गेले. कैकेयीचे चरित्र त्या पुत्रांना आवडणार नाही असे होईल. वसिष्ठांनी तिघींना लवकर प्रसाद भक्षण

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Trust Foundation and eGangotri

करायला सांगून त्यांना भाग आणि विभाग दिले.

कैकेयीच्या उद्वेगाचे परिणाम

कौसल्या आणि सुमित्रा या दोघींनी दात न लावता प्रसादभाग प्राशन केला. कैकेयीने भागप्राशन करताच ती उद्विग्न झाली. दोन्ही अर्ध-भाग जेव्हा तिने मुखात घातले, तेव्हा ते तिच्या घशात अडकले. ते गिळणे अत्यंत कष्टमय झाले. गिळता गिळवेना असे संकट ओढवले. ते तिचे स्वतंत्र भाग नव्हते. परभाग तिचे तोंड गिळू शकत नव्हते. तिचे डोळे पांढरे झाले. ओकारी होण्यासारखी भावना होऊ लागली. दुसऱ्याचे ओझे वाहणे हे आपल्याला त्रासदायकच होते. त्याप्रमाणे दुसऱ्याचे प्रसादभाग गिळताना तिला जीवप्राण एकवटूनही ते गिळवेनात. तिच्या गळयात भाग अडकलेले पाहून वसिष्ठांनी तिला तातडीने मंत्रोदक दिले. त्यासह विभागांचे सेवन केल्यावर तिच्या मनातली शंका फिटली आणि ती सुखी झाली. पुत्रगर्भाचा अत्यंत संतोष तिच्या अनुभवाला आला. साधू जवळ असला की तो संकट निवारतो. कैकेयीला पोट गर्भमंडित झाल्यामुळे अपार सुख झाले. एखाद्याला हरवलेले रत्न सापडावे किंवा मरणाराला अमृतपान घडावे तसे वसिष्ठांनी दिलेल्या मंत्रोदकाने होऊन कैकेयीला परम सुख झाले.

सत्संगमहिमा

सत्संगाची ख्यातीच अशी आहे, की त्यामुळे दुःखही नाही, अधोगतीही नाही. सत्संगाने उद्धरलेल्यांची गणतीच करता येणार नाही. दैत्य, दानव, राक्षस, गण, गंधर्व, मृग, पक्षी, सिद्ध, चारण, गुह्यक अशांच्या कोटी सत्संगाने उद्धरल्या आहेत. मनुष्यलोकांतही कोटयवधींचा उद्धार सत्संगाने झाला. सत्संगाने सृष्टी भाग्यशाली झाली आहे. धन्य तो दशरथ की ज्याला सत्संगाला (वसिष्ठांसारखे) पुरोहित लाभले. साक्षात् सूर्यही ज्यांना मानतो, असे ते घरात होते. अशा त्या वसिष्ठांनी तिघींनाही प्रसादप्राशन करायला लावले.

अध्याय चवथा

श्रीरामकथेची महती

संत एकनाथांकडून श्रीरामकथा ऐकल्यावर, जर कोणी ज्ञानी म्हणत असतील की, 'ही अप्रमाण कथा आहे, हे मूळाप्रमाणे निरूपण नाही, तर त्यांनी शिवरामायण पाहावे', असे सांगून एकनाथ पुढे कथन करतात. कार्तिकस्वामींनी अगस्तींना विचारले, "शिव आणि भवानी नित्य राम जपतात; तर राम हा त्रिभुवनातला कोण ते मला सविस्तर सांगा." त्यावर अगस्ती म्हणाले, "श्रीरामाचे माहात्म्य सांगणे मला दीनाला काय जमणार? जिथे वेदांनाही मौन येते तिथे मला ते सांगायला कुठले तोंड असणार? तुझ्यासारखाच प्रश्न पार्वतीने सदाशिवाला विचारला होता. ती म्हणाली होती, 'श्रीराम हा कोण, त्याची स्थिती काय, कीर्ती काय ते सर्व मला समूळ सांगावे.' श्रीरामाची ख्याती, गती, उत्पत्ती, त्रिभुवनात तो कोण, हे स्वतः सदाशिवाने वक्ता होऊन सांगितले. पार्वती स्वतः श्रोता होती. अशी शिवरामायणी कथा संदर्भ म्हणून पाहावी.

एकनाथांची प्रेरणा आणि मनोगत

एकनाथांनी अत्यंत नम्रतेने पण काहीशा आत्मविश्वासाने आपल्या रामकथेच्या लेखनामागची भूमिका आणि प्रेरणा काय होती याचे येथे दिग्दर्शन केले आहे.

"तू वक्ता कसा झालास आणि तुझी योग्यता काय ती मी सांगतो, श्रोत्यांनी ती सावधपणे ऐकावी. मूळच्या संस्कृत ग्रंथाची समज नाही. मूर्खपण हीच माझी खरी मिरास. अशा या मूर्खाच्या तोंडून श्रीरामाने आपली कथा सांगितली. त्याचे असे झाले, माझ्याठायी असणाऱ्या मूर्खपणाची मला पूर्ण जाण आहे. त्यामुळे रामायण मी करणार नाही असे सांगितले तेव्हा श्रीरामानेच ही कथा माझ्या मनात प्रेरली. अशी प्रेरणा मनात होऊनही मी रामायण करत नाही असे दिसल्यावर श्रीरामाने

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

स्वप्नात येऊन मला संपूर्ण कथा सविस्तर सांगितली. ग्रंथातील सर्व बारकावेही सांगितले. जागेपणी वावरताना माझ्यापुढे रामकथा प्रकटे आणि उदासपणे ती दूर ठेविली तर मला रामायण दाखविले जाई. निष्फळ गोष्टी करू लागलो तर त्यातून रामकथाच निर्माण झाली. असा श्रीरामाने पाठपुरावा केल्यावर साहजिकच रामायणावर दृष्टी खिळली. अशातही न करावी म्हटली तर श्रीरामच माझ्यामधे मीपणाने स्वार झाला आणि स्वतःच्या सत्तेने माझ्याकडून बळाने कथा वदवू लागला. मी कधी झोपलो असलो तर राम येऊन थोपटायचा आणि म्हणायचा 'ऊठ रामायण कर.' तिथे माझे काय चालणार? मी कोण नकार देणारा?''

यासाठी (श्रोतेहो) कथेमधले दोष किंवा शोभागुण मला चिकटत नाहीत. स्वतः श्रीरामच कर्ता आहे. माझे मीपणही तोच झाला आहे. ग्रंथाची निंदा करतात किंवा त्याचे गुणगान करतात ते दोघेही आम्हाला ब्रह्ममूर्तीच आहेत. ही जनार्दनगुरूंची युक्ती आणि हाच त्यांनी केलेल्या उपदेशाचा गुह्यार्थ आहे. जरी ही रामकथा असंबद्ध असली, तरी ती गाता ऐकता पवित्र आहे. हे मानण्याबाबत ज्यांच्या मनात विकल्प आहे त्यांच्यापुढे मी लोटांगण घालतो. ही कथा अबद्ध असली तरी वक्ता तत्क्षणी पवित्र होतो. श्रोत्यांनी अबद्ध असूनही आवडीने कथा ऐकली तर त्यांची पापे धुतली जातील. अबद्ध रामचरित्र असले तरी महापातकी लोकांना ते पावन करते. मी वाणीने रामकथा सांगितली तर माझे मुख अपवित्र कसे होईल? ज्ञानी लोक तिला अपवित्र कसे म्हणतील? कथेला चांगली म्हणणारे आणि वाईट म्हणणारे दोघेही मला मातेसमान पूजनीय आहेत. निंदक हे माझे सखे असून कृपाळू आहेत. ज्याप्रमाणे मातेच्या हातांनी शरीरावरचा मळ धुवून काढला जातो, त्याप्रमाणे निंदक आपल्या निर्मळ मुखाने कलिमल बाह्यतः धुवून टाकतात. यासाठी निंदक हाच तत्त्वतः परमार्थासाठी मित्रभावाने साहाय्य करणारा असतो. अशा निंदकाची निंदा केली तर आपणच दोषी होतो. निंदा म्हणजे परमामृत, निंदा म्हणजे द्वंद्वरहित स्वार्थसुख; निंदक हा आपला स्वार्थ न पाहणारा समर्थ परोपकारी असतो. जेथे निंदा सुखाने राहते अशांचे पाय मस्तकी धारण करून, त्यांना वंदन करावे. धन्य त्यांची माता जो निंदा द्वंद्वरहित भावाने सहन करतो. आता असे किती निवारणाचे उपाय सुचवू, कारण यातून अहंकार प्रकट होईल. मी कवीश्वर होऊ पाहतोय हाच माझा अपराध आहे. परंतु रामायण आणि त्यातील श्रीरामकथा सांगणे हा अपराध आहे असे मी मानत नाही. तुम्ही कोणी तत्काल त्या अपराधाचे निवारण करा आणि या रामकथामृताची तृप्ती मला घेऊ द्या.

एकनाथांना श्रोत्यांची विनंती

एकनाथांचे मनोगत ऐकल्यावर श्रोते नवल प्रकट करीत म्हणाले, ''आश्चर्य आहे. शुद्ध अन्वयाने ग्रंथ सिद्ध झाला आहे. संशय निवारणाचा उपाय करण्याच्या निमित्तानेच निःसंशय हा ग्रंथ निर्मिला आहे. नाथांचे मराठी बोल अमृतालाही फोल करतात. क्षीरसागराहूनही सखोल अशी ही नवी बोली (मराठी भाषा) आत्मसुख देणारी आहे. ही कथा ऐकताना आमच्या चित्तात सुख निर्माण होते आहे. आपण धन्य रसाळ वक्ते आहात आणि कथेतील परमार्थ नित्य पूज्य आहे. आपल्या मुखाने स्वतः श्रीराम रामायण सांगतो आहे. त्यामुळे शंका निवारण होऊन पूर्ण ब्रह्मच कथा निरूपण करवीत आहे. अशी आमची धारणा झाली आहे. तेव्हा कथानिरूपण चालू ठेवावे.''

हे त्या संत-सज्जनांचे बोलणे ऐकून एकनाथ संतुष्ट झाले. मग त्यांचे चरण वंदन करून ते म्हणाले, ''ऐका. पुढच्या भागाचे अनुसंधान असे की, त्या तिघींनी प्रसाद प्राशन केल्यामुळे त्या सुखसंपन्नता आणि गर्भप्राप्तीचे समाधान पावल्या.''

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Trust and eGangotri

दशरथ कैकेयीकडे येतो

वसिष्ठांनी दशरथाला सांगितले की, धर्ममर्यादेप्रमाणे तू आपल्या पत्नींना त्यांचे डोहाळे विचारून, त्या जे मागतील ते त्यांना दिले पाहिजेस. तेव्हा ब्रह्मज्ञानी वसिष्ठांचे बोलणे ऐकून दशरथ तातडीने आणि पुत्रप्राप्तीच्या उल्हासाने कैकेयीच्या मंदिराकडे निघाला.

दशरथ येण्यापूर्वी कैकेयी गर्भविलासात-रममाण होऊन मंचकावर बसली होती. राजा दशरथ येत असल्याचे समजताच ती शय्येवर पहुडली. जिथे पतीवर पत्नीचे वर्चस्व असते तिथे मर्यादा कोण राखणार. आधीच रूपगुणाचा पूर्ण गर्व आणि त्यावर आता गर्भवती, मग काय सांगायचे! एखाद्या वेळी अमावास्येची अंधेरी रात्र, त्यात पुन्हा दाट धुके अशी स्थिती असल्यावर अंधार अधिकच गडद व्हावा, तशीच कैकेयीची स्थिती झाली होती. राजाने तिला डोहाळे विचारले तेव्हा ती हसत राजाला म्हणाली, "जर निश्चित पुरवणार असाल तरच मी सांगेन." त्यावर राजा अत्यंत प्रेमाने म्हणाला, "अगं, तुझे बोलणे न टाळता मी तुला स्वर्गातही नेले; इंद्रादिकांकडून तुझा गौरव करविला. मागे तुझे बोलणे मी टाळलेले नाही. आता तर प्राप्त काळ परिपूर्ण असल्याने मी तुझे डोहाळे निश्चित पूर्ण करीन."

कैकेयीचे विचित्र डोहाळे

कैकेयी राजाला म्हणाली, "माझ्या मनातले माझे डोहाळे असे आहेत की, कनिष्ठाला राज्य द्यावे; ज्येष्ठाला वनवासात पाठवावे. त्याला इतके दूर पाठवावे की जिथे त्याला ना अयोध्येची वार्ता समजेल ना त्या ज्येष्ठाची वार्ता अयोध्येला समजेल. हे असे विपरीत करायचे तर तुम्ही म्हणाल ही अधर्मता आहे. पण तो अधर्म तुम्ही माझ्या माथी ठेवा. कारण तो वेदशास्त्रार्थाच्या दृष्टीने अती निंद्य आहे. अत्यंत निंद्य अशी ही निंदेची टाळी माझ्या कपाळी वाजू दे. मला सर्व लोकांनी निंदावे अशीच माझ्या या डोहाळ्यांची अपूर्वता आहे."

कैकेयीचे हे डोहाळे ऐकून दशरथाच्या अंगावर काटाच उभा राहिला. त्याचे डोळे आसवांनी भरून आले. तो थरथर कापू लागला. त्याचे मन, बुद्धी, चित्त गडबडून गेले. अंगावर शहारे आले. इंद्रिये सुन्न झाली. दुःखरूप महापुरात त्याचे धैर्य गळाले. 'हिचे डोहाळे पुरविले तर स्वार्थ आणि परमार्थ दोहोंचाही नाश होईल. सर्वांचा सर्वप्रकारे घात होईल' असे राजाला वाटले. हे दुःख मनाला व्यथित करू लागल्यामुळे तो न बोलता तिथून माघारी फिरला. त्या वेळी तो आत्यंतिक दुःखी झाला होता.

दशरथाचे सुमित्रेकडून स्वागत

दशरथ लगेच सुमित्रेच्या मंदिराकडे गेला. तेव्हा ती त्याला सामोरी आली. तिने त्याच्या पायांवर डोके ठेवले आणि मग निंबलोण उतरून त्याची आरती केली. पती आपल्याकडे आल्याने तिच्या मनाला अपूर्व उल्हास वाटून ती आनंदी झाली. तिच्या ठायी प्रेमाचा पूर लोटला. तिने उत्तम आसनावर बसवून, भक्तिभावाने त्याचे चरण धुतले. चरणतीर्थ प्राशन करून तिने चंदन, सुमने वाहून दशरथाची पूजा केली. त्याच्या गळ्यात तिने पुष्पहार घातला आणि मर्यादेने हात जोडून ती दशरथाची प्रिया त्याच्याजवळ उभी राहिली. या वेळी तिचे मुखकमल पोटी असणाऱ्या गर्भामुळे टवटवीत झाले होते. त्या गर्भाच्या तेजाने तिचे सर्वांग सोज्ज्वळ दिसत होते. ती भक्तिभावपूर्ण प्रेमळ भासत होती. जो भाव आपल्या प्रिय पतीबद्दल तोच भाव इतरांबद्दलही ठेवल्याने तिला मिळालेला भक्तिभावाचा प्रसादभाग तिच्या उदरी केवळ भक्तिभावच साठवून होता. तिचे वर्तन त्या भावनेला अनुरूपच झाले. दशरथाने हे पाहून अत्यंत सुखी आणि आनंदी दृष्टीने सुमित्रेविषयी विचार केला. तिच्या गर्भाचा प्रतिपाळ देवाधिदेवांनी करावा असे त्याचे मत झाले. कैकेयीच्या डोहाळ्यांचे दुःख पूर्णपणे विसरून दशरथाने तिला जवळ घेऊन तिचे

https://archive.org/details/@sarayu_trust_lucknow
Bhavana Vaidya, Lakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

चुंबन घेतले. राजाने मग तिला तिच्या डोहाळ्यांविषयी विचारले. यावर सुमित्रा लाजली आणि दृष्टी खाली करून तिने थोडक्यात आपले मनोगत सांगितले.

सुमित्रेचे डोहाळे

"ज्येष्ठार्ची श्रेष्ठ सेवा मला द्यावी हीच माझ्या जिवार्ची ओढ आहे. सत्यस्वभावाप्रीत्यर्थ याचीच मला आवड वाटते आहे. ज्येष्ठसेवेतच मला अत्यंत सुख वाटते आहे. हे नाथ, मला आपण हेच एक द्या; मला दुसरे काही नको. वस्त्रे, उत्तम अन्न, त्रिभुवनाचे राज्य, ब्रह्मलोक, या कशाचीच मला आवड वाटत नाही. मला केवळ ज्येष्ठसेवाच सांगावी. स्वामी, प्राणप्रिय, पतिदेवा आपले पाय मला सेवा करायला मिळावेत. मला ज्येष्ठसेवेचे विशेष प्रेम वाटते हेच माझे डोहाळे आहेत." हे तिचे कथन ऐकून राजा दशरथ आश्चर्यचकित झाला. 'हिंचे डोहाळे विलक्षण आहेत खरे पण सर्वार्थाने सुलक्षणीही आहेत. वसिष्ठांनी प्रसादाच्या ताटातील पायसाचे योग्य भाग केले होते, मग तिचे डोहाळे बिकट का आणि हिचे डोहाळे असे श्रेष्ठ आणि परमार्थी का यावर विचार करता दशरथाला उमगले की, तिचे भाग स्वतंत्र नव्हते. तिच्या पोटातला गर्भ सावत्र, म्हणून तसे अपवित्र डोहाळे कैकेयीला लागले. सावत्र मातेला छळतात, शनी छायेला लाथा मारतो; हे त्या सूर्याला कळले; म्हणजे तो म्हणतो 'तू माझी माता नाहीस.' त्याप्रमाणे सावत्र गर्भ तिला छळत असतील म्हणूनच तिला अधम डोहाळे लागले. 'मी निंद्य व्हावे जगासी' असे तो सावत्र गर्भ म्हणतो. 'सुमित्रेचा भाग स्वतंत्र होता त्यामुळे तिचे डोहाळे अती पवित्र आहेत.' हा उमग पडल्याने राजा दशरथाचे अंतकःरण शांत झाले. तो हर्षाने फुलून गेला. मग त्याने उल्हासाने सुमित्रेजवळ जाऊन तिला आलिंगन दिले. 'जे जे डोहाळे तुझ्या मनात असतील, ते ते माझ्याकडून पूर्ण होतील' असे सांगून राजाने नाना अलंकारभूषणे तिच्यावरून ओवाळून टाकली. तिची दृष्ट काढली. लोकांना नाना वस्त्रे दान दिली.

स्वानंद भोगणारी कौसल्या

राजा दशरथाची ज्येष्ठ राणी कौसल्या ही त्याची धर्मपत्नी होती. जो श्रीराम त्रिभुवनातही सामावणार नाही 'तो तिच्या गर्भात सामावून राहिला होता. तिने तो आपल्या सद्भावाने धारण केला होता. संपूर्ण सद्भाव असला की परिपूर्ण ब्रह्मही हृदयांतरी राहते. सुमित्रेकडून निघून दशरथ तत्काळ कौसल्येकडे उत्कंठेने गेला. परंतु ती मंदिरात दिसली नाही. ती मंचकावर वा शय्येवरही दिसली नाही. कौसल्येच्या उदरात श्रीरामाचा संभव असल्याने तिची स्थिती काही निराळीच होती. तिचे डोहाळे संभ्रम निर्माण करणारेच होते. अखंड एकांतात राहणे, कोणाची संगत नको असे वाटणे हे श्रीराम गर्भात असल्याने तिला प्रतीत होत होते. वस्त्रभूषणे, सुमन, चंदन, दिव्यासन, मंचक यांतले काहीही तिला नकोसे झाले होते. तिच्या देहात कशाच्याही विषयी लोभ उरला नव्हता. तिला दारुण वैराग्य आले होते. कशाचीही आस्था उरली नव्हती. एकांत आवडता झाला होता. जणू तिची गर्भधारणा म्हणजे ते दिव्यांजनच होते. उदरी श्रीरामाचा ठेवा जपत ती कल्पनेच्या आहारी गेली होती. निर्विकल्प कल्पतरूच्या तळी आदराने ती सुंदरी बसली होती. उदरातील गर्भावर दृष्टी रोखल्याने तिची वृत्ती उलट झाली होती. तिला आपल्यासारखेच सारे दिसत होते. हा त्या गर्भाच्या स्वभावाचा परिणाम होता. यावरून त्या राजस्त्रीने शुद्ध सुमनांची एक जागा तयार केली आणि द्वैतदृष्टी सोडून ती अद्वैताचा सुखसोहळा अनुभवू लागली.

राजाने भोगगृहात शोध घेतला तेव्हा त्याला ती राजपत्नी तेथे आढळली नाही. त्याने तिला वाणीच्या निरनिराळ्या चार प्रकारांनी शोधून पाहिले, पण ती दिसली नाही. ती वैखरीमध्ये नव्हती, मध्यमेच्या माजघरात दिसली नाही किंवा

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

पश्यंतीच्या ओवरीतही नव्हती. नंतर तो परेच्याही वर चढला तरी निश्चित शुद्धी लाभली नाही. जेव्हा त्याने द्वैताचा अडसर काढून, शब्दांची शृंखला फेडून अद्वैताची सुमनशाला उघडून, निर्धाराने गुरुवाक्याचा अर्थमेळ घातला, रजतमाची वस्त्रे सोडून, शुद्ध सत्त्वाची भूषणे काढून मग एकटा सुमनशाळेत गेला तेव्हाही त्याला तेथे ती गर्भवती डोळ्यांनी पाहता आली नाही. त्याने डोळ्यांत विवेक आणून निर्विकल्प आत्मसुखाने पाहिले तेव्हा त्या स्थळी ती सुंदर कौसल्या बसलेली दिसली.

कौसल्या सहजासनात बसली होती आणि एखाद्या योग्याला लाभते तशीच उन्मनी अवस्था तिचीही झाली होती. तिच्या दर्शनाने राजा दशरथाला संतोष झाला. काही वेळ तो आपल्या गर्भवती धर्मपत्नीकडे पाहात राहिला. तिच्याकडे पाहून सर्व सृष्टीच आनंदाने भरून गेल्याचे त्याला जाणवले. तिच्याशी गोष्टी करू लागल्यावर तर तो स्वानंदात मग्न झाला. त्याने तिला आपल्या शेजारी खेटून बसविले आणि हातात तिची हनुवटी धरून त्याने कदाचित् आपलीच दृष्टी लागेल असे मनात आणून 'जे तुझ्या पोटी डोहाळे असतील ते मला सांग', असे म्हटले. कौसल्येने वरही पाहिले नाही. दृश्य किंवा द्रष्टा यांचे तिला भानच नव्हते. तिची चित्तवृत्ती रामरूपामध्ये रत झाली होती. व्यक्त वा अव्यक्त हे काहीच ती पाहात नव्हती. तिची ही अवस्था असून राजा दशरथ मात्र प्रेमभराने वोसंडत होता. त्याने दोन्ही हातांनी तिला आलिंगन दिले. कौसल्या विदेहस्थितीत असल्यामुळे तिला देहाची आठवणच उरली नव्हती. उदरात विदेही संभवल्यामुळे देह तिला आठवत नव्हता. सबाह्य अभ्यंतरी ती तटस्थपणे श्रीराम पाहात होती. राजा हे न समजून म्हणाला, "अरेरे, हिला कोणी झपाटली की महत् भूत हिच्या उदरी आले आहे. डोळ्यांत ताठा चढलाय. आता मेघश्याम काय करेल? पुत्राची इच्छा कशी पुरवेल? पुरुषोत्तम आत्माराम रघुवीर हाच आता सिद्धी देईल."

दशरथाने उच्चारलेले रामनाम कौसल्येने ऐकले. त्याबरोबर तिने डोळे उघडून पाहिले तेव्हा तिला सर्व राममय झालेले दिसले. जेव्हा तिने डोळे उघडलेले राजाने पाहिले तेव्हा त्याला भासले की, तिच्या डोळ्यांचे तेज न सामावणारे आहे. आपण एक गर्भिणी आहो ही देहाची स्थिती तिला आठवत नव्हती. जेव्हा तिने पाहिले की खाली असलेली पृथ्वी ही राममय झाली आहे. पार्थिवता संपली असून आपल्या देहात विदेही श्रीरामच आहे. तिने दशदिशा पाहिल्या तर त्यावर रामरूपाचाच ठसा होता. आकाश मुळी दिसतच नव्हते. श्वासोच्छ्वासातही राम आहे. वृक्ष, वेली, मंडप, नाग, चंपक, अशोक हे अवघे रामरूप झाले आहे. जो उदरात संभवला तोच सर्व इंद्रियांत भरून राहिला आहे. देहाचे पांग फिटून प्रपंच ब्रह्मरूप झाला आहे. जे जे पाहावे ते ते रामरूप झालेले आहे. क्रीडेचे पात्र पाहिले तरी तेथे रामच प्रकटतो. दोर साप झाला नाही, त्यांची भेट झाली नाही. दोराने सर्प पाहिलाही नाही. केवळ भ्रमाने तो साप मानला गेला. त्याप्रमाणे ब्रह्माने प्रपंच पाहिला नाही, चाखला नाही, ऐकला नाही, ब्रह्मात आणि प्रपंचात भ्रमाने त्यांचे अस्तित्व मानले गेले. प्रपंच झाला होता हेही खोटे आणि पुढे पुन्हा होईल, हेही कधीच न घडणारे आहे. याविषयीचा एक श्लोक वसिष्ठांनी म्हटला. त्या अलौकिक श्लोकाचा अर्थ तात्त्विक आहे. तो सात्त्विक सज्जनांनी ऐकावा. 'भ्रमाने ईश्वर श्रेष्ठ, भ्रमाने कर्म, धर्म, सदाचार, भ्रमाने वाढला व्यवहार, भ्रममूल संसार हाच नित्य सत्य मानले गेले. जनक इत्यादी मुक्त असती तरीही ते प्रपंचात वावरतात.' त्यांच्या प्रपंचाची स्थिती कशी ते सांगणारा आणखी एक श्लोक वसिष्ठांनी म्हटला, 'ज्याप्रमाणे सोन्याचा तुकडा घेतला तर तो सर्व अलंकारांना तत्त्वतः सोनेपण प्राप्त करून देऊ शकतो, त्याप्रमाणे व्यवहार-मुक्त हे परब्रह्मत्वे राहतात. मुक्तांना ब्रह्मरूप मी-तूपण, शत्रू-मित्र ब्रह्मपूर्ण, त्रिभुवन ब्रह्मरूप, सनातन भूतमात्र

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri / CC-0. Public Domain. Digitized by Muthulakshmi Research Academy

ब्रह्मरूप असते. अशा ब्रह्मस्थितीने हे मुक्त संसारात वर्तत असतात. जगण्या-मरण्याची भ्रांती त्यांना नसते कारण त्यांचे चित्त पूर्णपणे ब्रह्मरूप झालेले असते.

कौसल्या ही रामगर्भामुळे निभ्रांत-भ्रांतिरहित होती तर राजा दशरथ पुत्रधर्मामुळे कर्मभ्रांत होता. त्याने तिला डोहाळे विचारल्यावर मोठा चमत्कारिक परमार्थी विनोद झाला. तो पुढील निरूपणात ऐका.

अध्याय पाचवा

कौसल्येचे डोहाळे

कौसल्येने रामनाम ऐकताच डोळे उघडले. त्यावरोबर डोहाळे विचारण्यासाठी राजा दशरथ सावध झाला. कौसल्या ही रामगर्भामुळे स्वरूपस्थितीत होती; तर दशरथ प्रवृत्तिधर्मामुळे पुत्रार्थी होता. त्या वेळी त्या दोघांच्या संवादातली गंमत पाहा. तिचे डोहाळे ऐका. राजाने विचारले, "कांते, काय आवडते तुला ते डोहाळे लवकर सांग. आता सर्व भ्रम सोडून दे." ती म्हणाली, "मी तर अवघा राम आहे. माझ्यामधे कसला भ्रम असणार? मी पुरुषोत्तम म्हणून देवांचे कष्ट निवारण्यासाठी अवतरलो आहे." तिचे हे बोलणे ऐकून राजाला शंका आली की, हिला झाले आहे तरी काय? तो म्हणाला, "प्रिये, सावध हो, आपल्या स्वतःकडे पाहा." त्यावर ती म्हणाली, "मी स्त्री नाही की पुरुष नाही. नर, वानर, राक्षस हेही नाही. मी देवांचा देव - परमेश्वर आहे; परमपुरुष श्रीराम आहे." राजा पुन्हा म्हणाला, "हे सुंदरी, तुला काय झाले आहे? कसला भ्रम तुझ्या अंगात शिरला आहे? मी कोण आहे ते लवकर पाहा बरे." तेव्हा तिने म्हटले, "माझ्या ठिकाणी मी, तू असे काही उरलेच नाही. माझे अधिष्ठान आहे तो विदेही आत्मा श्रीराम." दशरथाने विचारले, "कौसल्ये, माझे तुझे लग्न झाले तेव्हा रावणाने मोठे विघ्न केले होते, ते विसरलीस कशी?"

रावणाचे नाव ऐकताच ती म्हणू लागली, "दे दे धनुष्यबाण, लंकेचे निर्दालन करू या. मोठमोठे राक्षस वधू या. वनातले वानर बोलवा. त्यांना मुकुट, कुंडले आणि अलंकार द्या. त्यांना राज्ये देऊन त्यांच्यावर छत्र धरा आणि त्या वानरांचा कारभार चालवा. कुठे गेला रे हनुमंत; अंगद, सुग्रीव, जांबुवंत यांना सांगा. अजून रावणाची कथा जगात उरली आहे असे दिसते. अहो वज्रदेही, स्वतः आपल्या शेपटीचा वेढा घालून लंका भडभडा जाळा. पाडा तडतडा राक्षस, असंख्य वानर बोलावून सागर शिळा टाकून बुजवा. ते नगर, ती निशाचरांची वस्ती पाडून टाका कुठे गेले वीर योद्धे? लंका हातोहात उलथून टाका चारी भिंती पाडा. आमच्या पुढे किल्ला तो काय! किल्ल्याचा मरळ भेद करा. लंकेतले त्रिकूट वधू. त्या दुष्ट रावणाला मारू कारण तो स्वधर्माच्या वाटा रोखतो आहे. आम्ही स्वतः बाण घेऊन कुंभकर्णाचे ललाट भेदू. रावणाची सर्व अंगे भेदू. युद्धाला मी भिडलो म्हणजे माघार घेत नाही. राक्षसांची मुंडकी घेऊन लंकेपुढे चेंडूफळी खेळू. साजुक रक्ताच्या कल्लोळांनी रानटी पशूंना तृप्त करू. तोडा नवग्रहांची बेडी, सोडा देवांची बांधवडी, रामराज्याची गुढी उभी करावी हीच खरी त्रिभुवनाला स्पष्ट आज्ञा आहे. पवित्र बिभीषणाला बोलावून त्याला राज्याभिषेक करा. त्याच्यावर छत्र धरा. त्याला आम्ही स्वतंत्र लंका यावत् चंद्रसूर्य दिली. जगाची दुःखे नाहीशी करा; म्हणजे त्रिभुवनात हर्ष भरा; परमपुरुष श्रीरामाने विश्वात सुख निर्मिले. केवळ नाम घेण्याने कळिकाळाला शिक्षा होणे, यमदूतांना भीक न घालणे, यम. कापत कापत परतणे, असा या दोन अक्षरांचा (राम) धाक आहे. जो मुखाने रामनाम उच्चारतो त्याचे सर्व मनोरथ पूर्ण करावे, जन्ममरणाचा त्रास दूर करावा, सर्वांना समता द्यावी, असे घडते. जो नित्य नाम जपतो, तो पुरुषोत्तम रामाकडून आपल्या सारखाच केला

https://archive.org/details/muthulakshmiacademy / Bhavana Vala Trust, Lucknow

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Trust and eGangotri

जातो."

कौसल्येचे बोलणे ऐकून राजा दशरथाला शंका आली की, हिला भुताने तर झपाटले नाही! की गर्भात ताटकाच उत्पन्न झाली! या स्थितीने मी मात्र सुखाला वंचित झालो. राजाच्या मनात असे विचार चालू असताना कौसल्या पुढे बोलू लागली. "अरे धीट सुमित्र असून अजून ताटका कशी? एका बाणानेच तिचा नाश करून लोकांना सुखी करील हे लक्षात घ्या." राजाला यावर कोणताच मंत्र चालणार नाही असे आढळून आले. तेव्हा त्याने ज्ञानी विश्वामित्राला बोलवा असे म्हटले. लगेच कौसल्या म्हणाली, "सुमित्र कुठे गेला? ब्राह्मण यज्ञासाठी आला. लवकर भरपूर बाण दे. मारीच, सुबाहू यांना टिपून मारू. हे राक्षस हाहा-हूहू करताहेत त्यांचा नाश करू." राजाने मग अवतारी परशुरामाचे स्मरण केले. त्याच्या नामस्मरणाने तरी हा महाभूताचा दारूण संचार नाहीसा होईल असे त्याला वाटले. लगेच कौसल्येने त्यावर भाष्य केले. "ऐक रे जमदग्न्या, मी प्रतिज्ञापूर्वक धनुष्याचा भंग केला. त्या सर्वज्ञ ब्राह्मणाला विचार. अरे अज्ञा, तू आपला तपश्चर्येला जा." राजा पुन्हा विचार करू लागला की हिच्या ठायी संचारामुळे गर्व आला आहे. हिची ही अशी बडबड चालू आहे. हे असले कसले कडकडीत डोहाळे! काय हिच्या पोटी आले आहे कोण जाणे! राजाने लगोलग आज्ञा केली, "वसिष्ठांना तातडीने बोलवा. एखादा दणकट पंचाक्षरी आणा. तोच परीक्षा करील. सर्व श्रेष्ठांमध्ये वसिष्ठ हे श्रेष्ठ गुरू आहेत."

वसिष्ठांनी येऊन पाहिले तेव्हा त्यांना कौसल्या पूर्णपणे राममय झालेली दिसली. 'धन्य धन्य गे माते! हिच्या चरणी वंदन करावे' असे म्हणताना वसिष्ठ आदरपूर्वक पाहात राहिले. चित्त-चैतन्य यांची एकाग्रता झाली. त्यांचा गळा दाटून आला आणि ते भूमीवर निश्चेष्ट पडले. त्यांच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहू लागल्या, त्यांच्या रोमारोमांत घामाचे बिंदू आले, अंग थरथरा कापू लागले, अशी त्यांची अनावर स्थिती झाली. हे सर्व पाहून राजा म्हणाला, "इथे काहीच चालत नाही. या गुणवंतालाही भुताने ग्रासले; याला कोण सोडवणार?" या विचाराने तो व्याकुळ झाला.

दशरथाची चिंता

"आता मी कौसल्येला आवरू की वसिष्ठांना सावध करू" अशी राजाची चिंताग्रस्त अवस्था होऊन तो धावा करू लागला. "श्रावणवधाचे दुःसह क्लेशही मी सोसले. आता पुढे तसेच मोठे वसिष्ठहत्येचे पातक आले. हे विधात्या-ब्रह्मदेवा-श्रेष्ठा, तू माझ्या प्रारब्धात काय लिहिले आहेस? वसिष्ठांना भुताने ग्रासले हा केवळ मोठा दोष मला लागला. मी पवित्र यज्ञ केला तो माझ्या कुळात सुपुत्र प्राप्त व्हावा म्हणून, आता तर मधेच हे कसे विचित्र घटित ओढवले आहे." असे राजा दुःखाने आपल्याशी विचार करत असताना वसिष्ठांनी त्यांची झालेली अवस्था पचवून डोळे उघडले. ते पाहून त्वरेने दशरथ त्यांच्या गळ्यात पडला आणि म्हणाला, "हे वसिष्ठा श्रेष्ठा, सारी सृष्टीच उफराटी झाली हो. स्वामी, तुम्हाला बाधा होणे ही न घडणारी गोष्ट घडली. पुत्रसुखाच्या आड हे संकट आम्हा भाग्यहीनांवर आले आहे."

वसिष्ठांचे दशरथाला आश्वासन

वसिष्ठ दशरथाला म्हणाले, "राजा, भाग्यहीन का म्हणतोस, तू श्रेष्ठ भाग्यशाली आहेस. तुझ्या पोटी वैकुंठपीठच पुरुषोत्तमाच्या रूपाने प्रकट होते आहे. कौसल्या त्यामुळेच उत्कट अवस्थेत गेली आहे. ती जे जे काही म्हणाली ते ते ब्रह्मवाक्य आहे. त्यामुळे खूप ख्याती करून तुझ्या सूर्यवंशाला उत्तम दशा प्राप्त होणार आहे. मुनिजनांच्या ध्यानाचे ध्येय, किंवा देवांचे देवतार्चन असा जगाला जगज्जीवन असणारा ठेवा असा तो श्रीरामच आहे. राजा, तुला मुळातले वर्म समजलेच नाही. तुझ्या पोटी साक्षात् परब्रह्म आले आहे. धन्य आमचे कर्म की आम्हाला या सूर्यवंशात

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Trust and eGangotri

पुरोहितपणा मिळाला. तो जिवाचा जिव्हाळा असा राम आपल्या चरणस्पर्शाने शिळा (होऊन पडलेली अहल्या) उद्धरील, जनककन्येशी विवाह करील, सर्व लोकांना आनंद देईल. याच्या नामस्मरणाने फुकट मुक्ती मिळते. अयोध्यानगरी तो वैकुंठाला नेईल. रामनाम घेणाऱ्या पापी माणसांनाही उत्कृष्ट गती प्राप्त करून देईल. सूर्यवंश, अयोध्या, कौसल्येचा गर्भ हे सारे जगन्निवास आल्याने धन्य धन्य झाले आहे. इथले लोक, दशरथा तुझे मन, आमचे डोळे यांना श्रीराम ठेवा पाहायला मिळाल्याने सर्व धन्य होणार."

वसिष्ठांकडून हे सर्व ऐकल्यावर दशरथालाही स्थितप्रज्ञता आली. पुत्रकथा ऐकून तो आपल्या चित्ताचे स्मरणही विसरला. त्या रामविषयींचे वर्णन ऐकूनच तनमनाला भूल पडली, मग प्रत्यक्ष दर्शन झाल्यावर काय होईल ते त्याचा तोच जाणे असे त्याला झाले. रामनामाशिवाय सर्व कथा अनाथ झाल्या होत्या, त्या कौसल्यासुताच्या नावाने सनाथ केल्या. कौसल्येचे डोहाळे ऐकून दशरथाला आता सुखसोहळा अनुभवास आला. त्या परमानंदाने मन उचंबळले आणि त्याने वसिष्ठांना वंदन केले. डोहाळेवर्णन झाले आणि चित्ताला उल्हास वाटला. आता अयोनिसंभव श्रीराम जन्मला ती पुढील कथा ऐका.

अध्याय सहावा

श्रीरामजन्मप्रसंगीची ग्रहस्थिती

श्रीराम अयोनिसंभव असा जन्मणार असल्याने त्याचा जन्मप्रभाव हा एक कुतूहलाचा विषय होता. ते नवल पाहण्यासाठी देवांचा आणि माणसांचा समुदाय उत्सुक होऊन जमला होता. कौसल्येचा प्रसूतिसमय जवळ आला तेव्हा अयोध्येच्या चौफेर आकाशात देवांच्या विमानांनी गर्दी केली. सूर्यवंशात रघुनाथ येणार म्हणून सूर्य माध्याह्नी आला. त्याने लग्नस्थानी अभिजित नक्षत्र यावे असा राघवाचा जन्ममुहूर्त साधला. वक्री ग्रह वेगाने निघाले आणि त्याच वेगाने येऊन केंद्रात -एक, चार, सात, दहा अशा - उच्चस्थानात सर्व ग्रहगण स्वतः जमले. शुद्ध सुमनांचा वसंत ऋतू, चैत्रमास अती विख्यात, त्यातल्या शुक्ल पक्षातील नवमीत रघुनाथ जन्मास आला.

श्रीराम जन्मला पण तो अयोनिसंभव असल्याने जन्मयोनीला त्याचा स्पर्श झाला नाही. कौसल्येने पुढे पाहिले आणि ती चकित होऊन तिला आश्चर्य वाटले. प्रसूतीच्या तीव्र वेदना तिला जाणवल्या नाहीत, की तिचे गर्भपोट दुखले नाही. स्वतः श्रीराम प्रकट झाला. त्याचे तेज उच्च प्रतीचे होते. स्वप्रकाश, स्वलीला, आत्मतेज यांनी सोज्ज्वळ असा घवघवीत मेघाप्रमाणे श्यामल असा तो राम कौसल्येला दिसला. ज्याने आपल्या तेजामुळे मी-तूपण नाहीसे केले, जग आत्मतेजाने प्रकाशिले, असा रामजन्माचा सोहळा परम उल्हास आणि आनंद देऊन गेला. त्या तेजाने निश्चयपूर्वक अहम्-सोहम् यांचा समूळ नाश झाला. त्रैलोक्यात ब्रह्मत्व अवतरले. सर्वांठायी स्वानंद भरला. त्या तेजाच्या सामर्थ्याने विषयांचे विषयत्व (शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध) संपले. वंधमोक्षाचा फास सुटला. स्वतः परब्रह्म सर्वत्र भरून गेले. ज्या तेजाच्या दीप्तीने सूर्य-चंद्र हे हरपले; ते तेज ब्रह्मस्फूर्तीने प्रकाशले. सर्वत्र निर्विषय स्थिती आल्याने सुख कोंदले, असे ते स्वाभाविक आत्मतेज म्हणजे तेजाचेही तेज होते. त्या चतुर्भुज मूर्तीकडे कौसल्या कौतुकाने पाहात राहिली. तिला सुंदरतेचे मूर्तिमंत चित्र दिसले. राक्षसांचा नाश करण्यासाठी दोन हातांत धनुष्य बाण; तो लीलया ओढून ठेवलेला; सुर-देव, नर आणि ग्रह यांचे बंधविमोचन करण्यासाठी अभयदान देणारा पूर्ण अभयहस्त, असा तो रघुवीर होता. रामनामाचे स्मरण हे जीवांना ब्रह्मपूर्ण करणारे असल्याने आणि तो स्वतः कृपाळू असल्याने पूर्ण वरदहस्ताचे आश्वासन देत होता.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

श्रीरामाचे शरीरवर्णन

श्रीरामाचे चरणतळ आरक्त आणि शोभायमान असून बालसूर्याची तेजस्विता त्यापुढे फिकी पडली. सर्व जगाला भूल पाडणारी जगदंबा पण ती सुद्धा त्या चरणरंगाला भुलली. वेदशास्त्रांनी प्रसिद्धीस आणलेली अतर्क्य माया; सनकादिक अत्यंत विरक्त तेही ह्या चरणकमलावर आसक्त झाले आणि भ्रमर होऊन सतत त्याचा आस्वाद घेत स्वानंदात रमले; त्या चरणांच्या सामुद्रिकाचे वर्णन वेद किंवा शेष यांनाही करता आले नाही. ध्वज, वज्र, अंकुश आणि ऊर्ध्व रेषांनी पायावर पद्म रेखांकित झाले होते. चरणांच्या तळव्यांवर अशी आरक्त शोभा होती; तर वरती शुद्ध श्यामल तेज होते. इंद्रधनुष्याने गगन सुशोभित करावे तशी त्यांची शोभा दिसत होती. उपासकांना पूर्ण यंत्र लाभते तसे घोट्यावर त्रिकोणांच्या आकृती होत्या. नीलवर्णाने ते दोन्ही पायांवर विराजमान होते. यंत्रपीठावर गडद वर्ण असावा तशा पोटऱ्या निव्वळ सरळ, सुकुमार आणि निर्मळ होत्या. गुडघ्यांच्या वाट्या ठीक वर्तुळाकार असून जणू आरशात प्रतिबिंब दिसावे तसे त्यात स्वच्छ, शुद्ध आत्मरूप दिसत होते. केळीच्या खुंटांचे सार शोभणाऱ्या त्याच्या मांड्या होत्या. चंद्रकिरणही खुपतील असा नरम त्याचा कटिभाग होता. त्याच्या चरणात वेद आणि स्मृती यांचे नाद करणारे वाळे होते आणि उपवेद हे स्थितिवश साखळ्या झाले होते. वेदान्त हे शुद्ध, थोर शास्त्र चरणांतील घागऱ्या बनले होते, त्याच्या साखळ्यांमध्ये दैत्यांचे शरीरभार रुळत होते.

अखिल विश्वाचे गूढ असा तो श्रीराम असून, त्या गूढाचे पूर्ण गूढ लक्षण जाणून तेथे कोण पोहोचू शकणार? पण जानकी ते सुख पूर्णपणे भोगत होती. स्वतः निर्दोष आणि मनोहर असा राम, इतरांचे दोष झाकणारा, देदीप्यमान पीतांबर कटीवर नेसला होता. पीतांबर श्रीरामाच्या कासेलाच लगटला असल्याने स्वभावाने अनायासेच गुह्यातिगुह्याचे ज्ञान मिळवून बसला. श्रीरामाची बेंबी सखोल होती आणि ब्रह्म्याची हजारो वर्षे त्यात बुडाली तरी त्यांचा ठावठिकाणा त्याला लागला नाही म्हणून तो कासावीस होऊन वरती आला (श्रीविष्णूंच्या नाभीतून ब्रह्म्याची उत्पत्ती हा संदर्भ). तेव्हा त्याला आश्वासन देऊन, कमळात बसवून, श्रीरामाने त्याला चतुःश्लोकी उपदेशून श्रेष्ठ करून ठेवले. श्रीरामाच्या नाभीमध्ये ब्रह्मदेव कमळाच्या आसनावर बसला होता. त्याच्या हृदयाचा महिमा एवढा की, वेदशास्त्रांनाही त्याबाबत मौन पाळावे लागले. ज्याच्या हृदयाच्या चिदाकाशात आकाश स्वकार्य विसरून गेले. त्या ठिकाणी सिद्धपुरुष चिदंशाशी एकत्व पावले. तेथे मुनिजन अभिन्नत्व आणि अनन्यत्व भावाने जडून गेले. त्याच्या हृदयावर एक निर्गुण पदक शोभत होते. (सिंहकटीची महती आहे.) सिंहाला आपल्या कटीविषयी सूक्ष्म अभिमान वाटून तो माजला होता; पण रामाची कटी पाहून तो लाजला आणि रानात निघून गेला. श्रीरामाच्या शरीरातील मध्यभागाची रचना पाहून सिंहाने अभिमानाचा त्याग केला. कटीवर मेखला एखाद्या चित्राप्रमाणे जडलेली असून ती अंगाचाच भाग बनली होती. जो स्वतः अनंत, अपरंपार आहे त्याला (राम) जसे अनुभवी लोक आपलासा करतात तसे त्या मेखलेने रघुनाथाला आपल्यात सामावून घेतलेले होते. आपल्याला हवी ती वस्तू मिळाली म्हणजे आपल्या चित्तवृत्ती शांत होतात. त्याप्रमाणे मेखलेला लावलेल्या छोट्या घंटिकांच्या ओळी (रामाचा सहवास मिळाल्याने शांतवृत्ती होऊन) खाली तोंड करून होत्या. अनेक मतांचा गलबला असावा तसा त्या घंटिका नाद करून लीला करत होत्या आणि मेखलेला शोभाही आणीत होत्या. पीतांबराचे दोन भाग असून त्या दोहींना मोत्यांचे सर लावलेले होते. मूलतः अव्यंग असलेले अंग शोभिवंत होतेच, पण त्याखेरीज या पीतांबराच्या शोभेने त्या शरीराचें ऋण फेडले.

https://archive.org/details/@lakshmiacademy Bhavan Vedic Trust, Lucknow

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

श्रीरामाचे वक्षस्थळ पाहता ते मुळात सबाह्य भरून गेले होते. कारण ते अरण्यवासी ; एकांतप्रिय ऋषींनी आणि अन्य जनांनी वसतिस्थान बनविले होते. त्याचा शंखासारखा गळा हा जणू वेदांच्या वहिवाटीची वाट झाला होता. तेथूनच श्रेष्ठ प्रतीचे स्वर आणि वर्ण प्रकटत होते. ॐकारामध्ये जशी वर्णाभिव्यक्ती तशी मुखामधील दंतपंक्ती होती. चौकाचे चार दात सोलीव चिदानंदाची प्रभा दाखवत होते. जनांमध्ये जसे जीव आणि शिव असे विभाग मानतात तसे त्याचे दोन ओठ असून ते श्रीरामाच्या मुखात ऐक्यभावाने मिळून गेले होते. नास्तिकपणा निपटून काढून सरळ जो आस्तिक्यभाव हेच श्रीरामाचे नाक असून ते शोभेचे बळ वाढवत होते. जेवढा काही चलन करणारा वायू तोच श्रीरामाचा मुख्य प्राण, तेच वेदांचे त्रिकांड जन्मस्थान असा त्याचा प्रताप परिपूर्ण होता. चैतन्याचे देखणेपण रामाच्या डोळ्यांना शरण आले आणि देखणा होऊन देखणे पाहतो तसे त्यांचे सबाह्य देखणेपण होते. स्वानंदाने पक्व अशा दृष्टीने चिन्मात्रैक सृष्टी पाहतो आहे, देखणेपणाने त्याला पुष्टी आली आहे आणि दृश्य मागे, पोटात द्रष्टाच असे त्याचे पाहणे होते. दिव्यामागे सावली असते तशा त्याच्या डोळ्यामागे भुवया होत्या. त्यांनी आपली वक्रता सोडून त्या रामदेहावर शोभायमान झाल्या होत्या. ज्याच्या नेत्रकटाक्षाने ब्रह्मांडाच्या कोटीच्या कोटी रचल्या जात तेथेच ती वक्रता जाऊन अगाध दृष्टी रामाची होती. पूर्व आणि उत्तर मीमांसा हेच रामाचे कान असून ते कान कानांचे भूषण आणि वेदान्ताचे मंडण होत. कर्णकुंडलांना कोणी साकार, कोणी मकराकार म्हणतात पण खरे तर ते निर्विकार असून त्यांच्यामुळे विकार नष्ट होतात. कानांची महात्मता ही सावधानतेमधेच असते, सावधानता नसेल तर कानांचे भूषण हे दूषण ठरते. श्रीरामाचे कर्ण हे वेदशास्त्रांना भूषण, तेथे दूषण प्रवेश करू शकत नाही. पवित्रांनाही पवित्र करणारा असा श्रीराम आहे.

एखाद्या अधिष्ठानाप्रमाणे श्रीरामाचे विशाल निर्मळ कपाळ असून त्याच्या कपाळाची सर्व देव उत्कंठेने वाट पाहतात. अहंपण उगाळून सोहंरूप शुद्ध चंदन काढून त्या चंदनाची उटी श्रीरामाच्या कपाळी लावली. त्या घन:श्यामाच्या कपाळावर पिवळा टिळा फार शोभत असून देवादींना त्याने आनंद वाटतो आहे. सत्-चित्-आनंद एकवटावा तशी त्याच्या ललाटावरची त्रिगुण (सत्त्व, रज, तम) त्रिवळी होती आणि त्याला बोधचंदनाच्या सुगंधाने निर्मळ संतसज्जनांनी पूजिला. त्याच्या मुकुटाचा महिमा वर्णन कसा करावा ; निरुपम असलेल्याला उपमा कोणती द्यावी ; मुकुटमण्यांची श्रेष्ठता ही ब्रह्मदेवही समजू शकला नाही. अलंकार घालून राम मिरवत असला तरी तोच वास्तविक अलंकारांचा अलंकार आहे. ज्याप्रमाणे सुवर्ण दागिन्यांमधे संपलेले दिसते आणि अलंकारांना सोनेपण येते त्याप्रमाणे अलंकारांनी सगुणस्वरूप राम नटलेला दिसला तरी तो निर्गुण असून भूषणांचे भूषण आहे. तो निर्गुण राम सगुणरूपात शोभत होता जसे अलंकार आणि सुवर्ण एकरूपात शोभतात. अशा त्या श्रीरामाच्या ठिकाणी सृष्टीला रामरूप दिसले आणि सबाह्य सृष्टी मुठीत श्रीराम पाहात होती.

श्रीराम पाहता कौसल्येला प्रेमभर आला. त्या सुखाच्या भ्रमाने ती देहधर्म विसरली. तिचे सर्वांग रोमांचित झाले. अंगावर घामाचे थेंब जमले. चैतन्यात रमले. डोळ्यांतून आनंदाचे अश्रू ओघळले. तो स्वानंद तिच्या पोटी मावेना. सुखाच्या ऊर्मींनी गळा दाटून आला. तिची दृष्टी विस्फारलेली होऊन अखेर ती जमिनीवर मूर्च्छित होऊन पडली. केळीच्या झाडाशी वाऱ्याने लगट केल्यावर ते जसे थरथरते तसे तिचे शरीर कंपायमान झाले. तिची वाचा मौन धरून बसली. कौसल्या देहभान विसरली. एखाद्या वेळी सत्त्वगुणाचे भरते अंगी भरते आणि मग आपोआप ते ओसरते ; त्यानुसार कौसल्याही

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Trust Foundation Research Academy, eGangotri

चमत्काराने सावध झाली आणि निर्धाराने तिने राम पाहिला.

श्रीरामाचे बालस्वरूप

कौसल्या श्रीरामाला म्हणाली, "हे रघुनाथा, या स्वरूपात तू इथे प्रकट झालास तर माझा पुत्र म्हणून लोक मान्य करणार नाहीत. कौसल्येचा पुत्र होईन हे पूर्वी दिलेले वचन आठव." हे ऐकून रघुनंदन हसला आणि तत्काळ त्याने बालकाचे रूप धारण केले. त्या बालसूर्याचे तेज आणि श्यामल वर्ण पाहून लोकांच्या डोळ्यांना समाधान झाले आणि ते सुखकल्लोळात बुडून गेले. माझे भक्त माझ्या ऐश्वर्याने ओसंडून जातात परंतु त्यांची चरणामृतावर उडी पडते. तिथे एवढी काय गोडी आहे ते तो पाहू लागला. चरणकमळाचा अंगठा हातात धरून स्पष्टपणे तोंडात घातला, तेव्हा त्याला उत्तम गोडी लागली. आपली आपल्यालाच गोडी लागून, ती स्वभावतः खरी असल्याचे ज्ञान त्याला मिळाले. त्यामुळे तोंडातला अंगठा न काढता तो चुरूचुरू चोखू लागला. माझ्या स्वरूपाची गोडी माझ्या भक्तांनी खरोखर भोगली. चरणामृताची गोडी सुखाच्या कोडी देणारी आहे हे जाणून तो आपला अंगठा आवडीने चोखू लागला. ते बालकांचे लक्षण अद्यापही तसेच भासते हे लक्षात घ्या. स्वतःच्या पायाचा अंगठा तोंडात घालून स्वानंदाने तो चोखत राहिला.

अशा प्रकारे रघुनंदनाने स्वीकारलेली बालभावना पाहून कौसल्येला पान्हा फुटला. ती जिवाची कुरवंडी करू लागली. देवांनी दुंदुभी, भेरी वाजविल्या, त्याचा जयजयकार केला, फुलांच्या हारांचा वर्षाव केला. चराचरात आल्हाद भरला. या आनंदाच्या गडबडीत नारद तेथे आले. सनकादिकांची धांदल उडाली. स्वानंदाने ते नाचू लागले. श्रेष्ठ श्रेष्ठ सिद्ध, ऋषी तेथे जमले. वेद स्तुतिपाठक होऊन उत्तम प्रकारे प्रशंसा करू लागले. योगी, संन्यासी यांनी गर्दी केली. पुण्याच्या काळाने थाट केला. तीर्थांची वाट नाहीशी होऊन, त्यांनी शरयूच्या तटावर बस्तान जमवले. अयोध्येचे बाजार आणि रस्ते महासिद्धी स्वतः झाडू लागल्या. सिद्धींनी रांगोळ्या घातल्या; स्वानंद-समाधीच्या गुढ्या उभारल्या. महासामांनी सुरेल गाणी गायली. चारी मुक्ती नाचू लागल्या. षट्शास्त्रे पाहून शब्दसमुदाय स्वतःहून आले. ही संधी साधून धर्माची पहाट झाली. स्वानंदाला मोकळी वाट मिळाली. सुखाची पेठ पिकली.

कौसल्येला पुत्र झाला ही वार्ता आल्यावर राजा दशरथ हर्षाने फुलून आला. स्वानंदाने भरून गेला. निशाण, भेरी वाजविल्या गेल्या. मंगलवाद्यांनी आकाश व्यापून टाकले. त्रैलोक्यात जयजयकार झाला. घराघरांत उल्हास आला. मंगल जलाने राजाने कौतुकाने स्नान केले. त्याचे शिंतोडे सर्वत्र उडाले. राजाचे पूर्वज सुखरूप झाले, सुखी झाले हे आश्चर्य कसे सांगावे. त्या जलाने त्रिभुवनात स्वानंदाला उधाण आले. राजाने पुत्रप्राप्तीमुळे उदारपणे सवत्स गोधनाचे कळप, अश्व, रथ, हत्ती, द्रव्य यांचे कोटी कोटी दान केले. त्याच्या उदारतेने सृष्टीतील याचक मागे हटले. राजाने मागणाराला हवे ते देण्याचे आश्वासन दिले पण मागणारेच पुढे आले नाहीत. कारण याचकांच्या ठायी संतुष्टता आणि तृप्ती आली होती. दशरथाने श्रीरामाचे मुख पाहिले आणि तो परम संतोष पावला. त्याने नंतर श्रीरामाचे जातक मोठ्या अपूर्वतेने करविले. नंतर तो दुसऱ्या पुत्राचा हर्ष अनुभवण्यासाठी निघाला.

सुमित्रेला पुत्रप्राप्ती

सुमित्रेला स्वप्नात दिसले की, आपल्याला पुत्ररत्न लाभले आहे. नंतर ती जागी झाली, तेव्हा तिला दिसले की आपल्या शय्येवर शेजारी पुत्र आहे. हा पुत्र म्हणजे श्रीराम क्षीरसागराहून निघाला आणि कौसल्येच्या पोटी आला, तेव्हा त्याच्या पाठोपाठ शेष निघाला आणि श्रीरामाचा कनिष्ठ बंधू सुमित्र झाला. श्रीरामाशी उत्तम प्रतीची मैत्री तो निर्धारपूर्वक चालवील यामुळे सुमित्र असे

https://archive.org/details/@sarayu_trust_foundation_research_academy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

त्याला म्हणणे योग्य ठरून, तो सुमित्रेच्या पोटी जन्मला. कौसल्येशी चांगला मित्रभाव चालविणारी अशीच सुमित्रा होती आणि हा तिच्या पोटी आला त्यामुळे तो सुमित्र हेही योग्यच. लक्ष्मण हा शेषावतार असल्याने योनीद्वार न स्वीकारता तो अयोनीसंभव निर्धाराने झाला आणि त्याने आपल्या कृतीने जन्मव्यवहार पूर्ण केला. सुमित्रेने पुत्राचे मुख पाहिले आणि अष्टांगी समाधान पावून मनाने पूर्ण आनंदित झाली. यावर आनंद वाढत गेला, हर्षातिरेक झाला आणि सद्‌भावनेची गुढी उभारली जाऊन राजाला तिने पुत्रसुखाविषयी सांगितले. दुसऱ्या पुत्राचा प्रभाव ऐकून राजालाही सुखसमाधान मिळाले. ऋषिसमुदाय बरोबर घेऊन तो स्वानंदाने पुत्राचे जातक करण्यासाठी आला. त्याने धनाची भांडारे आणि धान्याची कोठारे मुक्त केली, गोधनाचे कळप मोकळे केले. त्याच्या दातृत्वाने लोभी माणसेही दानातिरेकाने मूर्च्छित झाली. याचना दानसमुद्रात बुडाली. द्रारिद्र्य दातृत्वपुरात बुडाले. आणि याचकांचा दुष्काळ होऊन संपूर्ण नगरीत घरोघरी आनंद निर्माण झाला.

कैकेयीला पुत्रप्राप्ती

कैकेयीला दोन पुत्रांची प्राप्ती होऊन ती पुत्रवती झाली. तिच्या प्रसूतीची तऱ्हा थोर नवलाईची झाली. कैकेयी ना जागृत, ना निद्रिस्त अशा सुषुप्ती अवस्थेत होती. पुत्र कसे जन्मले, त्या पुत्रांच्या जन्माची विशेषता काय यांतले तिला काहीही समजले नाही. एक श्रीरामाचा भाग आणि एक लक्ष्मणाचा विभाग असे ते दोन पुत्र योनीच्या अंगाचा उपयोग न होता आपल्या इच्छेप्रमाणे जन्मले.

कैकेयीला तिच्या दासींनी जागे करून म्हटले, "दोघे पुत्र तुझ्या कुशीत जन्मले आणि तू अशी झोपेत कशी?" नंतर कैकेयीने जागी होऊन पुत्रांच्या मुखाकडे पाहिले, पण तिच्या अंतःकरणाला आनंद झाला नाही. सावत्रपणाचा भाव मांत्र लोकदृष्टीने तिला प्राप्त झाला. तिला पुत्रांचा पूर्ण कळवळा वाटला नाही, की तिचे मन स्वानंदस्नेहाने भरले नाही, त्यामुळे पान्हाही फुटला नाही. अखेर दासींच्याप्रमाणे दोन्ही पुत्रांना तिने स्तनाला लावले. हे पुत्र म्हणजे स्वतःच्या पिंडाचा गर्भ नव्हे, इतरांच्या भागाचे ते गर्भ अशी तिची सावत्रपणाची मातृधारणा झाल्याने तिचे स्तनपान हे एखाद्या दाईप्रमाणे झाले, कारण स्वभावाने ती दासीच झाली होती. पुढे सहजच तिचा सापत्नभाव वाढला. तिचे पुत्र तिचे सांगणे ऐकत नाहीसे झाले. त्यामुळे कैकेयीला पुत्रलाभाचे समाधान मिळाले नाही. कैकेयी प्रसूत होऊन तिने दोन पुत्रांना जन्म दिला आहे ही वार्ता राजाकडे पाठविली गेली. प्रेमाचा बहर, हेतूपूर्वक कामनेची आवड, दोन पुत्र झाल्याचा गर्व हा भाव तिच्या निरोपात होता. दोन पुत्रांच्या जन्माने राजाला अत्यंत सुख झाले. त्याने उदारपणे दानधर्म करून दोन्ही पुत्रांचे जातक केले.

दशरथाचे चार पुत्र

ज्याप्रमाणे चार पुरुषार्थ असतात (धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष) आणि ते एकाच वेळी घरी यावेत, त्याप्रमाणे दशरथाला चार पुत्र एकाच वेळी प्राप्त झाले. चार मुक्ती (सलोकता, समीपता, सरूपता, सायुज्यता) असतात, पण त्यांच्याकडून मिळणारे सुख एकच असते. ते सुख चार भागांत विभागून दशरथाला सुख देण्यासाठी अलौकिक पुत्र म्हणून जन्मले. सच्चिदानंद (सत्-चित्-आनंद) या तिन्हींना प्रकाश देणारी वस्तू चिद्‌घन, त्याप्रमाणे हे परिपूर्ण पुत्र राजाला स्वतःला प्राप्त झाले. प्रणव (ॐकार) हाच चार वेदांत आहे, एक वस्तू चार प्रकारांत असावी तसे चार पुत्र दशरथाच्या घरी येऊन सर्वांना सुख देणारे ठरले. एक निश्चित असे नित्य सुख आहे. त्यालाच बहुविध प्रकारांचे चतुष्टय म्हणतात. तेच हे चार पुत्र, पुत्रसुखार्थी दशरथाला लाभले. जो सकल जगाचा आत्मविश्राम, सर्व सुखांचा आराम, जो निष्कामाचा पूर्ण काम, तो श्रीराम दशरथाचा पुत्र झाला. सकल लक्षांना अलक्षण, जो सर्व लक्षणांनी संपूर्ण, तो लक्ष्मण

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Research Academy

सुमित्रानंदन म्हणून दशरथाचा पुत्र झाला. ज्याच्यामुळे सर्व पदार्थ सदासर्वदा संपूर्ण भरलेले असतात त्याला भरत म्हणतात. असा तो भरत कैकेयीसुत म्हणून दशरथाला लाभला. मनुष्य शत्रूंचे हनन करतो तो अल्प शत्रुघ्न आणि ज्याच्याकडून भवशत्रूंचे - संसारशत्रूंचे - निर्दाळण केले जाते तो मोठा शत्रुघ्न. असा हा मोठा शत्रुघ्न दशरथपुत्र जन्मला. . कनिष्ठ असे कैकेयीचे पुत्र, त्यांची नावे भरत आणि शत्रुघ्न. या प्रकारे वसिष्ठांनी नावे दिलेले ते चार दाशरथी म्हणजे दशरथाचे पुत्र होते.

श्रीवसिष्ठांनी आवश्यक ते चौघांचे जातक आणि जन्मपत्रिका सिद्ध करून त्या चौघांची निर्दोष अशी जगद्वंद्य नावे निश्चित केली. श्रीराम, लक्ष्मण, भरत, शत्रुघ्न हे चौघे दशरथाचे पुत्र जगाला या नावांनी वंदनीय झाले. आता पुढे श्रीरामाचे चरित्र अनुक्रमाने येईल. धन्य त्या वाल्मीकींचे मुख की ज्यांनी ही शतकोटी पवित्र अशी श्रीरामकथा निरूपण केली.

अध्याय सातवा

धन्य रामायण सृष्टी, धन्य वाल्मीकींची वाणी, अक्षर-रचनेची परिपाठी, ज्यामुळे कोट्यवधी दोषांचा नाश होतो; महापातके, द्वंद्वे, दुःखे ही सारी नष्ट होतात; अशी ती रामकथा असून, ती आनंदाने ऐकली तर सुखाचे महासुख लाभते. श्रीरामचरित्र अपवित्रांना पवित्र करते. ही चरित्रकथा विचित्र पण कौतुकाची आहे.

रामजन्मानंतर लंकेत अशुभ घटना

श्रीराम अयोध्यापुरीत जन्मला तेव्हा लंकेवर वीज पडली, लंकानगरीच्या प्रवेशद्वारापाशी स्फोट झाले आणि नगरीत भूकंप झाला. लंकाधीश रावण जेव्हा सिंहासनावर चढला तेव्हा त्याचा मुकुट पायरीवर पडला. वाऱ्याच्या झोताने त्याचे छत्र मोडले. सभागृह, तट खचून पडले. कुंभकर्णाच्या घरावर घुबडे घूं घूं करीत फिरू लागली. इंद्रजिताने आरशात शरीराऐवजी सांगाडा पाहिला. मंदोदरीची गळसरी तुटून अग्नीत पडली. तिने तेव्हा ती काढताच अग्नीने ती भस्मसात केली. अशा विघ्नांचा भोवरा निर्माण झाला. त्यामुळे अंतःपुरातल्या राण्यांनी आकांत मांडला. यामुळे राक्षसकुळाचा घात होईल या कल्पनेने निशाचरांत हाहाःकार उडाला. रावण भीतीग्रस्तांना धिटाईने सांगत होता की, 'सर्वांनी नगरातच राहावे, कोणी दूर जाऊ नये, मात्र अहोरात्र सावधान राहावे.' परंतु प्रधानादी सभानायकांनी धाक घेतला. रावणालाही हे अपरिहार्य संकट पाहून धाकधुक वाटू लागली.

कुमारांचे संस्कार आणि अध्ययन

अयोध्येमध्ये श्रीवसिष्ठांनी चारही कुमारांचे विधिपूर्वक संस्कार पूर्ण करत आणले. जातकर्म, नामकरण, कटिसूत्र (करदोटा), अन्नप्राशन, चौलकर्म, वायनदान हे सारे विधियुक्त पद्धतीने झाले. ऐश्वर्याच्या बळावर, व्रतबंधाच्या प्रसंगाने, राजाने सन्मानाने सत्पात्री दानाने सर्वांना सुखी केले. श्रीरामाच्या व्रतबंधानिमित्त जेव्हा ब्राह्मणभोजन झाले तेव्हा त्यांची स्वानंदाने पोटे फुटली आणि ते परमानंदाने डोलत राहिले. श्रीरामाच्या व्रतबंधाच्या निमित्ताने दरिद्री लोकांना धनाने सुखी केले गेले. त्यांची वणवण संपली. याचना उरली नाही.

व्रतबंधन झाल्यावर चौघांनी वसिष्ठांपाशी वेदाध्ययनास आरंभ केला. शास्त्रव्याख्यान आणि वेदान्त शिकून घेतला. श्रीराम हा वेदांचे जन्मस्थान होता. त्याला संस्कारमंत्रांनी पठण झाले. त्याच्या अगाध बुद्धीने संपूर्ण शास्त्र त्याने सहज आत्मसात केले. अध्ययन करता करता श्रीराम सोळा वर्षांचा झाला. आता रघुनंदन श्रीराम तीर्थयात्रा करण्यासाठी उत्सुक झाला. वसिष्ठांना विनंती करून, त्या सद्गुरूंच्या अनुमतीने आणि राजा दशरथाची आज्ञा मिळवून राम तीर्थयात्रेला निघाला. एक चांगला दिवस पाहून स्वस्तिवचन आणि पुण्याहवाचन करून, राजाने रामाबरोबर

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized By Sarayu Foundation Trust and eGangotri

सुबुद्धिप्रधान, सैन्य, आणि तीर्थाच्या ठिकाणी वाटण्यासाठी अक्षय भांडारे, सवत्स गायींचे समूह, नाना प्रकारची वस्त्रे इत्यादी देऊन त्याची पाठवणी केली.

तीर्थयात्रेचा वृत्तान्त

सरोवरे, नद्या, सिंधुसंगम, पुण्यभूमी, पुण्याश्रम, प्रयागादी पंचग्राम, अत्यंत दुर्गम मार्ग असलेला हिमालय हे सारे पूर्ण केले. बदरीमार्गाने पंचप्रयागही झाले. ते पाच म्हणजे वेदप्रयाग, शिवप्रयाग, कर्मप्रयाग, ब्रह्मप्रयाग आणि अतिगुप्तप्रयाग असे होते. शरयू, गंगा, सुवर्णभद्रा या तिन्ही ह्या पूर्वप्रयाग त्रिवेणी; कार्तिक मासात कृष्णा, वेणी, मुख्य त्रिवेणीत माघस्नान; वने, तपोवने, पर्वतशिखरे; अत्यंत पवित्र अशी माळराने; तीर्थादी तिन्ही पुष्करे; सर्व तीर्थक्षेत्रे विधियुक्त पूर्ण केली. तसेच नैमिषारण्य, धर्मारण्य, चंपकारण्य, ब्रह्मारण्य, महापंथाचे वेदारण्य इत्यादी अरण्ये, जेथे ऋषी आणि वेदज्ञ असत ती पाहिली. लोकांमध्ये जी अती श्रेष्ठ मानतात ती ठिकाणे म्हणजे मंदराद्री, विंध्याद्री, मूळपीठ असलेला सह्याद्री, गंगातीरावरचा ब्रह्माद्री ही पूर्ण केली. प्राची, सरस्वती, बिंदुसर, धर्मालय कुरुक्षेत्र, ज्वालामुखीच्या दुर्धर ज्वाला यांमधील पवित्र जलतीर्थे केली. गयादर्शन, धर्मस्तंभाचे स्पर्शन, ब्रह्मयोनीचे अवलोकन आटोपून संध्यावटाला गायत्रीचे ध्यान केले. ब्रह्मावर्त, गोमतीतीर, हिरण्यासहित सागर, सागरावर्ती शंखद्वार जेथे हरीने वेदोद्धार केला ते पाहिले. तीर्थमार्गातली सात पुरे पाहून, बारा ज्योतिर्लिंगे केली. प्रभासेला सोमनाथयोगाने आणि पंचकृष्णाप्रयोगाने मूळमाधव हेही झाले. द्वारकेचा कल्याणकृष्ण, दुसरा शंखनारायण, तिसरा पिंडारकी बालकृष्ण, चवथा गडदामोदर आणि मूळचे जे मूळस्थान मूलमाधव हा पाचवा कृष्ण असे हे यात्रामंडळ गमन झाले, जे सर्वांना पुण्यवंत आणि पावन करते. गंडकी, यमुना, सुरसरी, तापी, नर्मदा, मत्स्योदरी, कृष्णा, भीमा, गोदावरी या सरितांमुळे पापे नाश पावतात. मत्स्यतीर्थ, पक्षितीर्थ, शिवकांची, विष्णुकांची ही योग्य तीर्थे केली. नंतर त्रिकोण हस्ती तीर्थभूत असलेला पाहून, प्रसिद्ध तीर्थ कुंभकोण गाठले. पुढे प्रतीची, कावेरी, ताम्रपर्णी, कृतमाला आणि पयस्विनी या पाच नद्यांची स्नाने केली त्यामुळे भगवद्‌भजनाच्या ठायी दृढभाव आला. कन्याकुमारी, जनार्दन, शेषशायी, अनंतशयन, दोन्ही कावेरी, श्रीरंगस्थान, परम पावन अगस्त्याश्रम, यांच्या दर्शनाने चिदंबरी मुक्ती मिळाली. कमलालयी जन्ममुक्ती, काशीच्या ठायी मरणमुक्ती, अरुणाचलाच्या केवळ स्मरणाने मुक्ती, अशी सर्व तीर्थांची यात्रा पूर्ण केली.

श्रीरामाकडून सुखप्रदान

श्रीराम हा स्वतःच तीर्थांना तीर्थवत् आणि मोक्षाला मुक्ती देणारा होता. तरी त्याने लोकसंग्रह, लोकाचार सांभाळण्यासाठी आपणहून तीर्थयात्रा केली. ज्या तीर्थस्थानाची जी विधिविधाने असतील, ज्या तीर्थस्थानाच्या ठिकाणी जसे स्नानविधी असतील, ते सर्व तशाप्रकारे पूर्ण करून आणि दान-सन्मान देऊन रामाने लोकांना सुखी केले. या तीर्थाटनात श्रीरामाने महाऋषी, संन्यासी, तीर्थवासी, तसेच वनवासी या सर्वांना सुखी केले. लोकांमधील त्यागी, भोगी, विरागी, संभोगी यांच्यासह ब्रह्मचारी, व्रतधारी अशा स्त्रिया, पुरुष या सर्वांना श्रीराम सुखकर झाला. जपी, तपी, निर्विकल्पी, दिगंबर, वल्कलधारी, सदाचारी अशांना श्रीरामाने सुखरूप केले. सर्वांना खरे सुख देणारा राम होता. अयाचित, विरक्त, धर्मासक्त, दरिद्री, दीन, अज्ञानी यांना श्रीराम हा सुजन सुखकर वाटला. यात्रेकरू, गरीब, दुर्बल, ह्यांना श्रीराम सुखाची ठेवच वाटला. सेवक, रंक, सर्वच लोक हे जेव्हा भक्तिभावाने भेटायला आले, तेव्हा

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

रामाने त्यांना सुखी केले. यात्राक्रमात भेटलेल्या विवेकी, एकाकी अशा त्रिलोकांतील सर्वांना श्रीरामाने सुख दिले. विधियुक्त यात्रा करून, स्वेच्छेने रामाकडून दाने दिली गेली. त्याने चारी समुद्रांतील लोकांत सुख आणले.

तीर्थाटनानंतर श्रीराम अयोध्येत

श्रीरामाने द्वारकापश्चिमसमुद्र, जगन्नाथ पूर्वसमुद्र, मानसरोवर उत्तरसमुद्र, श्रीसेतुबंध दक्षिणसमुद्र याप्रकारे समुद्रवलयांकित सर्व तीर्थे केली. नंतर एका सुमुहूर्तावर स्वानंदाने तो अयोध्येला परत आला. तो परत येणार म्हणून राजा दशरथाने नगर शृंगारले. गुढ्या, तोरणे, मखरे उभी केली. गगनापर्यंत आवाज जाईल असा रामाचा जयजयकार करीत आणि वाद्यांचा गजर करीत रघुनाथाचे स्वागत केले. भाटांनी गंभीर वचने म्हटली, नृत्यांगनांनी नृत्य केले, बंदिजनांनी कीर्ती वर्णन केली, अशा रीतीने अयोध्याभुवनात उल्हास केला. श्रीरामाला पदोपदी ओवाळणी, अंतरा अंतरावर सुवासिनींकडून आरती आणि सुरेल मंत्रांचा उच्चार असे उपचार झाले.

श्रीरामासह चौघा बंधूंनी प्रथम वसिष्ठांना साष्टांग नमस्कार घातला. नंतर दशरथाला साष्टांग दंडवत घातला. राजाने अत्यंत तृप्त मनाने चौघा पुत्रांना आलिंगन दिले. यापुढे तिन्ही मातांना चौघांनी अभिवादन केले. दशरथाच्या चित्तात हर्ष उपजला. त्याने श्रीरामाला मांडीवर बसविले. सर्वांना अपार सुख झाले. एवढे झाल्यावर चौघांचे मंगलस्नान झाले; त्यांनी दिव्य वस्त्रे परिधान केली. दिव्य अलंकार, चंदन; फुले यांनी त्या चौघांना सद्भावनेने शृंगारण्यात आले. यावर वसिष्ठांचे वचन प्रमाण मानून, व्रत-विसर्जन करून, ब्राह्मणभोजन घालून, समारंभपूर्वक दान-सन्मान देण्यात आले. या प्रकारे तीर्थयात्रा करून रघुनंदन आला. तेथून पुढे तो वैराग्यपूर्ण झाला आणि त्याने ते आपल्या आचरणाने दाखवून दिले.

येथून पुढची कथा मोठी मनोहर आहे. ती गहन ज्ञानाने ज्ञानगंभीर झाली आहे. ती स्वतः रघुवीर कथन करील आणि त्यामध्ये वैराग्यविचार, मुमुक्षूंचा हेतू सांगितला जाईल. मोक्षाची इच्छा करणारांचा संसार तारून नेण्यासाठी श्रीराम स्वतः वैराग्य धारण करून, त्याचा धर्मलक्षणी अवतार खरा करून दाखवील.

अध्याय आठवा

श्रीराम हा सच्चिदानंदघन असून वैराग्यलक्षण लोकांच्या लक्षात येण्यासाठी आणि दीन जनांना तारण्यासाठी स्वतः आचरून दाखवू लागला. सर्व वैराग्याचे फल हे स्वतः रामच असून तोच लोकांवर उपकार करण्यासाठी आचरला.

श्रीरामाची विरक्ती

श्रीराम तीर्थयात्रेहून परतला आणि तो सर्व बाबतींत विरक्त बनला. त्याला राज्याचे राजकारण, लोकव्यवहार, विषयस्वार्थ आवडेनासे झाले. इंद्रियांचा संग, इंद्रियांचा भोग, इंद्रियप्रयोग नकोसे होऊन तो अती विरक्त आणि वैराग्यशील बनला. सांसारिक कर्मे, देहाचे देहधर्म, विलास इत्यादीं-विषयी तो पश्चात्तापपूर्वक विरक्त झाला. स्त्रियांची भेट, त्यांच्याशी बोलणे, त्यांची दृष्टभेट यांपासून त्याने पोटी विषयांचे वैराग्य बाणले. शाब्दिक चावटपणा, चातुर्ययुक्त बडबड, वादविवाद आणि त्यांतली खटपट आवडेनाशी होऊन तो अनुतापाने मौन धारण करून राहिला. कलाकौतुक, गीत, नृत्य, पारध, राजरंग यांपासून तो दूर राहू लागला. पूर्ण अनुताप आणि विरक्ती यांमुळे त्याला धनधान्याचा संग्रह, संपदा, पदाभिमान, मान-सन्मान हे नको असे झाले. कल्पतरू काय आणि कल्पनेचा सागर काय, सर्व संसारच कल्पनेतला असून जन्म-मरण हे अटळ आहेत असे तो मानू लागला. आपण केवळ चिंतायुक्त चिंतामणी आहोत; चिंता आणि चिता या समानच आहेत; चिता

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

निर्जीवाला जाळते आणि चिंता ही जिवंत असलेल्याला जाळते असे तो समजू लागला. त्याला परिस, धातू, अर्थ यांची अनावड निर्माण झाली. अर्थ हे अनर्थाचे मूळ आहे; ज्याच्या पोटात अर्थाचा स्वार्थ आहे त्याला परमार्थ कधीच प्राप्त होणार नाही; हे त्याच्या मनात दृढ झाले. त्याला कामधेनू हीही मनापासून आवडेना कारण ती कामनेचे म्हणजे इच्छेचे अधिष्ठान आहे; कामाने काम वाढून संसारबंधन दृढ होते हे त्याला जाणवले. अशा रीतीने सर्व दिव्य भोगांविषयी श्रीराम अनासक्त होऊन एकांतात राहू लागला. तो तर अनंत, अव्यक्त अशा स्थितीचा रहिवासी होता.

विश्वामित्र अयोध्येत येतात

राजा दशरथाला चार सुपुत्रांची प्राप्ती झाल्याचे ऐकून ऋषीश्वरांमध्ये पवित्र असे विश्वामित्र आपल्या यज्ञाच्या सिद्धीसाठी अयोध्येत आले. विश्वामित्र आल्याचे ऐकून नृपश्रेष्ठ दशरथ तातडीने त्यांना सामोरा गेला. त्यांना त्याने साष्टांग नमस्कार घालून, अत्यंत आनंदाने स्वगृही आणले. उत्तम आसनावर बसवून, मर्धुपर्कादी विधिविधान करून, सुवर्णाच्या फुलांनी त्याने त्यांची पूजा केली. ऋषिवरांना यामुळे अतिशय सुख झाले. नंतर वसिष्ठ आणि विश्वामित्र यांची भेट झाली. त्यांनी एकमेकांना आलिंगन दिले. दोघांची एकपणे एक दृष्टी होती आणि दोघांच्याही मनात एकाच प्रकारचे सुख दाटले होते. दोघेही कर्माचरण, अनुष्ठान, ब्रह्मज्ञान यांमध्ये एकपणाने पूर्ण होते. ते दोघे ऋषिवर राजा दशरथाच्या सभेत एकाच आसनावर बसले. त्या वेळी चंद्र-सूर्य गगनात एकत्र आले तर जशी शोभा दिसेल तशीच त्या वेळी शोभा दिसत होती. दशरथ म्हणाला, " हे विश्वामित्र, आपण प्रतिसृष्टीचे निर्माणकर्ते आहात. आमच्या गोत्राचा आणि कुळाचा उद्धार करण्यासाठी आपले पवित्र आगमन झाले. आम्ही खरोखर भाग्यवान ठरलो; अयोध्या भूमी धन्य झाली. जे आपण व्रते, जप, तप करूनही भेटणे कठीण ते आज येथे आपणहून आलात. जेथे आपल्यासारखे साधू येतात तेथे कल्याण आणि तीर्थाचे फळ प्राप्त होते. त्यामुळे संसारसागर तरून जाता येते. आपली कृपादृष्टी असेल तेथे भगवंत अवश्य असणार. आपले चरण जगालाही वंदनीय आहेत. त्यावर मी काय आणि किती बोलू. हे विश्वामित्र, आपले जे मनोगत असेल ते मी निश्चितपणे पूर्ण करीन हे माझे वचन समजा. जे जे आपल्या मनात असेल ते ते मी पूर्ण करीनच." असे दशरथ आनंदाने म्हणाला.

राजा दशरथाचे बोलणे ऐकून विश्वामित्र संतुष्ट झाले आणि स्वतः संतोषाने म्हणाले, "दशरथा, औदार्य, धैर्य, वीरता हे गुण खरोखर गंभीर आहेत. तुझ्या पुरुषार्थाचे, शौर्याचे स्वर्गात देवही वर्णन करतात. शुक्राला युद्धात जिंकून देवगुरूंना सुख दिलेस आणि इंद्राला यश दिलेस. त्यामुळे तू सूर्यवंशाचे भूषण ठरलास." हे ऋषिवरांचे बोलणे ऐकून राजा मनातून सुखावला आणि त्या सुखाने स्फूर्ती मिळून, अत्यंत नम्रपणे, दोन्ही हात जोडून त्याने आनंदाने त्यांचे कोणते कार्य करायचे आहे हे विचारण्यासाठी म्हटले, "गायत्रीमंत्राच्या कार्यात पूर्णता असलेल्या ऋषिवर्य विश्वामित्रांनी ते कोणते कार्य अपेक्षितात ते मला स्पष्टपणे सांगावे."

विश्वामित्र - दशरथ संवाद

विश्वामित्र म्हणाले, "सूर्यवंशातील महान् आणि परोपकारी तसाच देवांचे कार्य सिद्धीस नेणाऱ्या राजा, माझे मागणे ऐक. माझी मागणी द्रव्य किंवा सामान्य नाही. माझा यज्ञ सिद्धीस जाण्यासाठी मी रघुनाथ मागतो आहे." हे विश्वामित्रांचे बोलणे ऐकून दशरथाचे मन गलबलले. त्याचे धैर्य गळाले आणि तो थरथर कापू लागला. सापाच्या कपाळात काटा घुसावा, सापसुरळीचे शेपूट तुटावे, मासा जलापासून वेगळा व्हावा, तसे

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

राजाला दुःख झाले. वानरांच्या मुखांतले चणे, कंजुषाचे धन, भिकाऱ्याच्या पुढ्यातले ताट कोणी ओढून नेले तर त्यांना जे वाटेल तसे श्रीरामाच्या मागणीने दशरथाचे मन झाले. प्राण गेला म्हणजे देह किंवा मूर्च्छा आल्यावर इंद्रिये ही जशी विकल होतात, तसे श्रीरामाच्या जाण्याच्या कल्पनेने दशरथाचे मन विकल झाले. काही काळ त्याचे बोलणेच बंद पडले. ऋषिवरांना तत्काळ प्रत्युत्तर न देता, तो प्रसंगाचे अवधान राखून, चतुराईने, विचारपूर्वक बोलला.

दशरथ म्हणाला, "यज्ञामध्ये विघ्न करणारे कठोर राक्षस मनुष्यांचा घात करणारे असतात. श्रीराम तर अजून राजस बालक आहे. शिवाय त्याचा धनुर्विद्येचा अभ्यास व्हायचा आहे. त्याने अजून रणांगण पाहिलेले नाही, की युद्धही पूर्वी केलेले नाही. अशा रामाला प्रथमच राक्षसांशी युद्ध कसे करायला लावायचे? मी पुत्रांच्या बाबतीत अती कंजुष असून, श्रीराम हा तर माझा ठेवा आहे. तो माझे धन, माझे जीवन आहे. त्याचे राक्षसांनी भक्षण करण्यासाठी मला देववत नाही. श्रीरामाची पहिल्यांदाच गाठ पडणार आहे ती राक्षसांशी द्वंद्वयुद्ध करण्यासाठी. आपण विचाराने प्रकांड आहा, ज्ञानामध्ये श्रेष्ठ आहात. श्रीराम केवळ बालक आहे. त्याला प्रबळ शस्त्रविद्या किंवा मंत्रास्त्रशीलता यांची विद्या अवगत नाही; अशा त्याला प्रबळ राक्षसांशी युद्ध कसे करवेल? आपण समर्थ आहात, जे जे मागाल ते ते मी देईन. अगदी राज्य, राजवस्तू, अखेर जीवित-प्राणही-देईन पण मला रघुनाथ देववणार नाही."

राजा दशरथाचे असे बोलणे ऐकल्यावर विश्वामित्र कोपायमान झाले. अत्यंत क्रोधाने ते म्हणाले, "अरे दशरथा, मी भेटलो तेव्हा ब्रह्मर्षी तुमचे मनोरथ कृतार्थ होतील असे सभेमध्ये बडबडलास आणि आता मी दान मागितल्यावर ते देता येत नाही म्हणतोस! दिले दान न देववे असे म्हणणे मुख्यतः तुझ्या कुळाला दूषणास्पद आहे. तुझ्या सूर्यकुलात जे जे राजे होऊन गेले ते ते सर्व धर्मभूषण होते; त्यांतला तू मात्र धर्मदूषण आहेस. दिलेले दान देववत नाही म्हणतोस. हे कसे? अरे, हरिश्चन्द्राने स्वप्नात दिलेले दानही जागृत अवस्थेत पूर्णपणे खरे केले. दक्षिणा देण्याचे वचन खरे करण्यासाठी त्याने स्वतःला विकले. त्या वंशात तू जन्मलास आणि दिलेले दान देत नाहीस! खरोखर हे सामर्थ्य तुझ्यासारख्या सूर्यवंशाच्या निंदकाजवळच असणार. याच वंशात शिबी राजा झाला. त्याने पक्ष्याच्या वजनासमान आपले मांस तोलून दिले. पण आपले वचन खोटे ठरविले नाही. मुचकुंद याच वंशातला, त्याने इंद्राला साहाय्य करण्यासाठी तारकेशी दारुण युद्ध करून रणकंदन केले. त्याच वंशात जन्म होऊन तू दान देववत नाही म्हणतोस, हे त्या वंशाच्या यशाला तू दूषण लावलेस. रुक्मांगद याच वंशातला. त्याला मोहिनीने छळले असता, प्रत्यक्ष पुत्राचे शिर तिला देऊन त्याने एकादशी व्रत उद्धरले. तूही त्याच वंशात जन्मलास आणि पुत्र देता येत नाही म्हणतोस? तुझ्यामुळे सूर्यावंशातील पूर्वजांना लाज आणि कमीपणा आला आहे. कुकुत्स्थ इंद्राच्या खांद्यावर बसून लढला आणि त्याने दैत्यांचा युद्धात पराभव केला. त्या त्रिवार शुद्ध वंशातला तू मात्र पुत्र युद्धासाठी देणार नाही म्हणतोस!"

"श्रीरामाला तू बाळ म्हणतोस यात तुझी मूर्ख आणि स्थूल बुद्धीच दिसते. अरे, श्रीराम हा देवांच्या साहाय्यासाठी झालेला निर्मळ अवतार आहे. श्रीराम बालक तर नाहीच; तो साधूंचा साह्यकर्ता, राक्षसकुलाचा अंत करणारा आणि स्वधर्माचा संस्थापक आहे. धनुर्विद्या श्रीराम जाणत नाही हे म्हणणेच खोटे आहे; कारण तोच सर्व विद्यांचे जन्मस्थान आणि शस्त्रास्त्रज्ञानाचे आत्मबीज आहे. श्रीराम हा रणधीर, गुणगंभीर, वीराधिज महावीर असा परम शूर आहे. श्रीराम हा खरे म्हणजे माणूस नाहीच. तो देही असून विदेही आणि ज्ञानस्वरूप परब्रह्म आहे. राजा, अरे,

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized By Sarayu Foundation Trust and eGangotri

तू निश्चित अज्ञानाने श्रीरामाला सामान्य माणूस समजतो आहेस. तू वसिष्ठांना हा वृत्तान्त विचार, तेच तुला योग्य अर्थ सांगतील. ठीक आहे, तुम्हा सर्वांचे कल्याण असो. श्रीरामाचे कल्याण असो. मी माझ्या आश्रमाकडे जातो.'' असे म्हणून विश्वामित्र निघाले.

वसिष्ठांकडून राजास सूचना

विश्वामित्र परत निघालेले पाहून वसिष्ठ राजाला म्हणाले,''नृपश्रेष्ठा दशरथा, विश्वामित्रांना क्रोध आणू नकोस. ते प्रतिसृष्टीचे निर्माते आहेत. क्षणार्धात तुझ्या कुलगोत्रांना भस्म करतील.'' नंतर वसिष्ठांनी विचारपूर्वक एक उपाय सुचविला. ज्यामुळे राजा आणि विश्वामित्र दोघेही सुखी होतील. वसिष्ठांनी राजाला तो गूढ उपाय असा सांगितला, ''विश्वामित्रांना शांत करण्यासाठी दोन पुत्र त्यांना दे आणि दोघे पुत्र लाड करण्यासाठी स्वत:जवळ ठेव.'' वसिष्ठगुरूंची आज्ञा प्रमाण मानून राजा पुढे गेला आणि विश्वामित्रांपुढे दंडवत घालून त्यांना म्हणाला,'' मी रामलक्ष्मण तुम्हाला देतो, दुसरे दोघे माझ्यापाशी राहू द्या.'' विश्वामित्र म्हणाले,'' चांगलेच झाले. एकट्या रामाने काय केले नसते? आता बरोबर लक्ष्मणालाही दिले. माझे भाग्य फळले.'' नंतर विश्वामित्र वसिष्ठांना उद्देशून म्हणाले, ''आपण खरोखर या सूर्यवंशाचे सद्गुरू आहात. दोघांच्याही धर्माचे रक्षण केलेत. आपण ज्ञानाने परिपूर्ण आहात.''

यानंतर वसिष्ठ, विश्वामित्र आणि राजा दशरथ आपापल्या स्थानावर बसले. विश्वामित्र नि:संदेह होऊन अत्यंत आनंदित आणि उत्साही झाले. राजाने आज्ञा करून श्रीरामाला ऋषींच्या भेटीला बोलावून घेतले. श्रीराम राजाज्ञा ऐकून त्वरित पण नम्रपणे तेथे आला. वसिष्ठांना आणि राजाला साष्टांग नमस्कार घालून नंतर त्याने विश्वामित्रांच्या पायांवर डोके ठेवले. त्यांनी त्याला आलिंगन देऊन हृदयाशी धरले; ऋषिवर्य आणि राम यांची भेट झाली. त्यांनी श्रीरामाला डोळे भरून पाहिले आणि विश्वामित्रांच्या अंतरात आनंद होऊन तो जयजयकाराने उमटला.

अध्याय नववा

विश्वामित्रांनी श्रीराम जवळ उभा असलेला पहिला. त्यामुळे त्यांचा मनोधर्म सुखावला. ते प्रेमानंदाने 'आज माझ्या कर्माचे सार्थक झाले; माझा धर्म सफल झाला; माझी मनोकामना पूर्ण झाली; कारण दशरथाने श्रीराम यज्ञसिद्धीसाठी दिला.' असे स्वत:शी बोलून ते श्रीरामाला म्हणाले, ''तू सर्व कामनांना मुक्ती देणारा आहेस.'' त्यावर श्रीराम म्हणाला, ''हे ऋषीसमर्था, मी माझे मनोगत विचारीन. तेव्हा कृपा करून हे कृपावंता, हे माझे बोलणे तत्त्वतः मानावे.''

देहाविषयी श्रीरामाचे विश्वामित्रांना प्रश्न.

''देह हा तर अत्यंत अशक्त, देहधर्म सारे नाशवंत, कर्मफल ते नष्ट होणारे असे असल्याने देहासंगतीत कोणते सुख आहे? देहाच्या लोभाने दु:खी झालेला जो विषय सेवन करतो, त्याची विष्ठाच होते; देहामागे सतत काळ लागलेला असून तो अहोरात्र देहाचा क्षय करतो; शेवटी जन्म-मरणाच्या भोवऱ्यात देह अडकतो; देहावर क्षुधेचा मारा नित्य चालूच राहतो; तहान पाण्यासाठी पीडा देतच असते; देहाला निखालस भय असते; मग देहसंगतीने कोणते सुख मिळणार? देह तर दु:खाचा डोंगर आहे, संशयांचा सागर आहे, अति लोभाचा महापूर आहे; देह हा मूत्राची न्हाणी, नरकाची खाण, घाणेरडे डबके आणि रोगांचे आगर आहे; देह हा शंकांचा निखळ अर्क, ओतीव अहंकार, विषयांचे भरीव स्थान, कृमींचे पेव आहे. देह द्वंद्वाची स्वत: भूमी आहे; दु:खाची स्वत: खूण आहे; संशय आणि भेद यांचे कोठार आहे; अरिष्टांची रांग आहे. आशेचा कळवळा, अहंकाराचा आप्त, अहंममतेचा सोहळा आणि विकारांचा मळा, असा हा देह आहे.''

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized By Sarayu Foundation Trust and eGangotri

"देह अविद्येचा पाया, संकल्पाचे गोंडस वन, मोहमयतेचा मोहन, मुख्यतः अज्ञानी असा हा देह आहे. देह म्हणजे काम (इच्छा-वासना) रूप गूढ पर्वत, क्रोधाचा अवघड किल्ला, लोभाचा न ओलांडता येणारा संचय आणि विनाशाचा मठ आहे. देहाच्या ठायी अपवित्रतेचे मूळ असून तो घाणेरड्यांतला घाणेरडा, अमंगलांतला अमंगल आणि मुख्य विटाळ आहे. एखादा उत्तम पदार्थ, देहलोभाने खाणारा खातो, परंतु प्रहरभराने त्याची विष्ठा होते हा असा देहाचा परिणाम आहे; प्रहरभर देखील नको तत्काळ ओकारीने त्याचा त्याग होतो. नरकाहून अधिक किळसवाणा असा या देहाचा संग आहे. नित्य विषयांचे सेवन केले की नित्य त्यासाठीची आटापिटी, वणवण सुरू होते आणि कल्पांतीही तृप्ती होत नाही अशा देहाच्या संगतीने काय सुख होणार? भूक, तहान यांची पीडा होतच असते, झोप ही मूढता आणते, अशा देहसंगामध्ये कोणते सुख मिळणार?"

देहाच्या उत्पत्ति-स्थितीचे वर्णन

आता मी स्वामींना देहाच्या उत्पत्तिविषयी सांगतो. सर्वार्थाने अपवित्रांतली अपवित्र अशी ही देहसंगती आहे. रजस्वलेचा पदर जरी लागला तरी सचैल स्नान करावे लागते; त्याच रक्ताची ओतीव मूर्ती असा हा देह असतो; तो मूलतःच अपवित्र आहे. रजस्वला ही चवथे दिवशी शुद्ध होते आणि विटाळ मात्र गर्भाला लागून राहतो. नऊ महिने तो वाढतो आणि सर्व गोत्राला (जन्माने) अस्पर्श (सोयर) करतो. विटाळातच देहाचा संभव आणि त्यातच त्याची उत्पत्ती आणि शांती असून देह भस्मसात् झाला की पुन्हा सुतक आणतो. देहाच्या अस्थी आणि रक्षा गंगोदकात विसर्जित केली, पिंड, तिलांजली दिली तरी देहाचे सुतक सुटत नाही."

गर्भातील दुःस्थितीचे वर्णन

"देह हा मुख्यतः विटाळच असून तोच प्रबळ दुःख आहे. आता गर्भातील दुःखाची अवस्था स्पष्टपणे सांगतो ती शांत मनाने ऐका. रजस्वलेचे पूर्ण रक्त आणि पित्याचे वीर्य ही दोन्ही गोठून त्याचे शरीर बनत असल्यामुळे मुळात देहसंग हा अपवित्र आहेच. मातेच्या जठराग्नीच्या तोंडामध्ये, विष्ठेच्या उकाड्यात, मूत्राच्या आधणात नऊ महिने तो उकळत असतो. जठराग्नीच्या मुखामध्ये गर्भाची उंडी उकळत राहते आणि त्याचा रस होऊन, त्याची पिंडी हीच अष्टांगांची कांडी होते. सर्वत्र विष्ठेचे लेप, नाकातोंडात जंतू-कीटक, ते दुःख भोगताना रडून, चरफडून तो गर्भ तळमळत राहतो. गर्भाच्या आवरणाला त्वचा नसते म्हणून मातेला डोहाळे लागतात, ती कडू, आंबट, खारट पदार्थ त्यावेळी भक्षण करते, त्या मुळे गर्भ होरपळतो. मातेला त्रिकाळ भोजन म्हणजे गर्भाला त्रिकाळ दुःख असा प्रकार होतो. हे भोगताना गर्भ कासावीस होतो, पण कोणाला सांगणार! तिथे ना वाऱ्याचा प्रवेश, ना माता किंवा दाई यांचे सांत्वन; स्वजनांना समाधानही नाही, केवळ संपूर्ण दुःखाने तीव्र दुःख अनुभवणे. त्या अवस्थेतील त्याची दुःस्थिती काय असते हे माता किंवा पिता जाणत नाहीत. त्याला कोणी 'भिऊ नको' म्हणणाराही तेथे नसतो. आपले दुःख तो आपणच एकटा भोगत असतो."

प्रसूतीच्या वेळचा प्रसंग

"प्रसूतीचा काळ हा तर आणखी अडचणीचा असतो. गर्भ गुदद्वाराकडे अधोमुख होऊन योनिद्वाराकडे आणण्यासाठी अत्यंत वेदना निर्माण करतो. प्रसूतिवात अत्यंत खडतर होऊन, सर्वांगाला कळ लागते. योनिद्वारी त्याची तळमळ चालू राहते पण प्रसूती लवकर होत नाही. वेणेवर वेणा येतात तेव्हा गर्भ आणि माता दोघांनाही तीव्र दुःख सोसावे लागते. मातेला वेदना सहन होत नाहीत तरी गर्भाचा गोंधळ चालूच राहतो. त्या काळी त्याचा पूर्ण विचार असतो की आतां आपण जन्मलो की विषय सेवन करणार आणि पुन्हा गर्भात जाणार. त्यापेक्षा ते विषयसेवनच नको;

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

सद्‌गुरूंना शरण जाऊन, अभिमानाचा नाश करून, जन्ममरणातून सुटका करून घेईन, हा विचारही देहात आल्यावर विसरला जातो.

बालपणही वेदनामय

गर्भाने जन्म घेतला की तत्काळ सोऽहंभाव नाहीसा होऊन कोऽहं भावाने दीर्घ रडे सुरू होते. मग जन्मल्यानंतर सुख कोणते? जन्मल्यापासून आपले मौल्यवान आयुष्य संपतच जात राहते. यासाठी लोक 'जातक' विचारतात. 'रहातक' विचारत नाहीत. देहाबरोबरच जातक अखंड मागे लागल्यामुळे सगळे लोक मरणाचाच धाक मनात वाहतात. मरण केव्हा येईल याला निश्चित मर्यादा नाही. गर्भात असताना देखील गर्भपाताची धाकधुक असतेच. जन्म होताच सटवीची भीती वाटत राहते. मग जन्माला येऊन तरी काय सुख? बाळपणीच्या दुःख-शोकाची तर गणतीच होणार नाही. स्वतःची घाण स्वतः खाणे; ज्या ठिकाणाचे नावही घेऊ नये किंवा जे आपणहून दाखवू नये अशा योनिद्वारातून जन्म होतो हा कसला जन्माचा गौरव! लाळ, थुंकी, मल, मूत्र यांमध्ये शिजत-पिचत, शेंबूड खात राहणारें बाळपण कसले सुख? पोट दुखू लागले म्हणून रडू गेले, तर माता मुखात स्तन घालते, त्या बालकाला स्वतःचे दुःखही पूर्णपणे सांगता येत नाही, हे कसले बालपणातले सुख! दात, दोन्ही दाढा, डोळे सहा-सात महिन्यांनी निघतात; तान्हेपणी दुःखाचे उमाळे येतात अशा बाळपणाने कोणते फळ मिळणार? बाळपणी दुःखच निखळपणे मिळते, सुखाचा लवलेशही नसतो. हीच कथा तारुण्याची होते. ती अवस्थाही पुरुषाला दुःखदायक ठरते."

अहंमन्य तारुण्यदशा

"तरुणपणाचा तीव्र आघात आत्मस्वार्थ निःशेष बुडवतो. या काळात परमार्थ अजिबात आठवत नाही आणि उन्मत्तपणे विषयांचा स्वार्थ समजतो. शिणून जाऊन विषय पूर्ण केले तरी नित्य नवी ओढ आणि वणवण वाढत राहते. ज्याप्रमाणे अग्नीमध्ये इंधन घातले, की तो अधिकच खवळतो, त्याप्रमाणे विषयांनी विषयेच्छा वाढत जाऊन तृप्ती अवघड होऊन बसते. सतत विषयसेवन करूनही समाधान मिळतच नाही आणि दुसरीकडे आयुष्य हातोहात संपत जाते. हे तरुणपणात लक्षातच येत नाही. जो जो विषयांचा सोस वाढतो तो तो आयुष्याचा नाश होतो. परमार्थ ओस पडतो आणि तारुण्यामधे सुखाचा लेशही नसतो. तारुण्यात विषयांचा समूह मुसमुसत असतो. आयुष्याचा नित्य घात होत राहून परमार्थ समूळ नासतो. तारुण्यामध्ये अनेक दुःखे पाठीमागे लागतात. स्त्री ही धनधान्याच्या लोभाने पाठीमागे लागते; तारुण्यामुळे अभिमानाचा ताठा येतो, अकर्माचा फाटा फुटतो, गर्वाने फुगणे येते. 'मीच तेवढा चातुर्यसंपन्न, मी एकटाच सुब्राह्मण, मीच काय तो सधन आणि समर्थ, मीच पूर्ण पवित्र इतर जग अवघे अपवित्र' असा अहंभाव तारुण्यात निर्माण होऊन त्या अभिमानाने एक विचित्र घातकसूत्र निर्माण होते."

स्त्रियांच्या संबंधाचा परिणाम

"स्त्री म्हणजे हाडे आणि मांस यांची पिशवी, घाणीचा गोळा, विटाळाचे वसतिस्थान, अशा स्त्रीशी विषयसंग म्हणजे नरकसोहळा. अशा स्त्रीशी संग केला म्हणजे पुरुष तिचा दास होतो. अखंड तिच्याशी संबंध ठेवणाराची दशा काय होते ती ऐका. त्या स्त्रीपुढे तारुण्य माकड बनते. ती नाचवेल तसे नाचते, ती पाडेल तिथे पडते. स्त्री आपल्या आनंदासाठी त्याला खास नाचवते. तारुण्यरूपी गाढव स्त्रीपाशी आणि तिचा घरोबा भलतीकडे; तारुण्यरूपी कुत्रे स्त्रीआज्ञेत असून सुहृदांवर वसवस करते; तारुण्यरूपी मांजर स्त्रीगृहात राहते आणि म्यॉंव म्यॉंव करत तिच्या पायाशी घोटाळते; तिच्या अधरामृताला चाटण्यासाठी अहोरात्र प्रयत्नात असते. तारुण्यरूपी

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

उंदीर स्त्रीच्या घरी अष्टौप्रहर छिद्र कोरत राहतो. कोणी पाहिले असे वाटताच छिद्रात लपतो. अशा तारुण्यात सुख काय? तारुण्य हे विषयांबाबतच लोभावलेले असते. तारुण्य हे स्त्रीच्या इच्छेचे दास असते. गर्वाने मुसमुसणाऱ्या तारुण्याला काय प्रकारचे सुख आहे.''

वृद्धावस्था आणि व्याधी

''जर तारुण्याचीच अशी दैना तर म्हातारपणी सुख कोठून मिळणार? त्या वार्धक्याची स्थिती कशी ते ऐका. वृद्धावस्थेत नसत्या व्याधी उफाळून येतात. बुद्धी भ्रंशते. तेथे त्रिशुद्धी सुख कुठले. म्हातारपणाची अनेक प्रकारे भीती वाटत राहते. जरा म्हणजे म्हातारपण शरीराच्या आभासाचाही नाश करते. धाकाने केस (रंग) पालटतात. त्यामुळे त्या अवस्थेत सुख नसणारच. वार्धक्य हे केवळ पाप, सर्वांगात कंप येतो, भयाने लपलप कापायला होते, शब्दांचे उच्चार अस्पष्ट होतात, वार्धक्य आलेले पाहून दात समूळ पळून जातात; इंद्रियांना क्षीणता येते, सुखाची वार्ताच तेथे नसते. जो तारुण्यात सगळी संपत्ती मिळवितो; कांतेचा पूर्ण भोग घेतो, तोच वार्धक्यात त्यापासून विन्मुख होतो. हा या वार्धक्याचा थोरपणा! म्हातारपण आले की अन्न पचत नाही, पण ते खाण्याची तीव्र इच्छा असते. वृद्धाचे मन हे नेहमी चिंताग्रस्त असते, मग त्याला सुख कोठून मिळणार? वृद्धावस्थेत शोकाचे अनेक प्रसंग येतात, तशीच त्याला ममताही खूप असते. लहान बालके वृद्धाला बाऊ म्हणतात, हा केवढा सुखगौरव वार्धक्यात! बायको वृद्धाचे बोलणे मनावर घेत नाही, बालके वेडावून दाखवतात, जो तो वृद्धाची मूल म्हणून थट्टा करून विनोदाने त्याला खवळवतात. म्हातारपणात बळ असे थोर, की त्याच्याजवळ माणसे बसत नाहीत; त्याला भयंकर खोकला येतो आणि सभोवार सारी किळस निर्माण होते. जर्जर झालेल्या म्हाताऱ्या शरीरातून शक्ती नाहीशी होते; डोळे क्षीण आणि निस्तेज होतात; तोंडातून लाळ गळून अंगावर पडत असते. अशाप्रकारे शारीरिक अवस्था झाली तरी माझी बायको, माझे घर, माझे पुत्र, माझे नातू ही मोहममता काही तो सोडत नाही. जरी अर्धा जळात घातला तरी बायको-मुलांना न्याहाळत, नातवंडे जवळ आणा हो असे म्हणत त्या ममतेच्या अवस्थेत तो देह ठेवतो, प्राण सोडतो.''

विषयलोभ, अहंकार यांची निंदा

''नरदेहाला मिळालेल्या आयुष्याच्या मर्यादेचे विषयलोभाने तो देहधारी मातेरे-नाश-करतो. परलोकी त्याला मज्जाव होऊन तो नरकाच्या दाराकडे जातो. देहबुद्धीच्या गुरफट्यात, मोहममतेच्या मोठ्या ज्वाळांमध्ये, परमार्थाची होळी होते आणि निष्कारण त्या नरदेहाची तुडवातुडव चालू राहते. देहाला अकारण विषयांची गोडी लागते, त्यामुळे तो स्वर्गसुख गमावतो, मोक्षसुखाला वंचित होतो, आणि देहाबरोबर दुःख भोगतो. शंभर वर्षे विषयांची आसक्ती राहते, पण एकही इंद्रिय तृप्त होत नाही. उत्तम आयुष्याची यामुळे माती होते. असा हा नरदेहाचा संग अधःपात करणारा आहे. जे देहसंगात सुख आहे असे मानतात ते केवळ मूर्ख असतात. गर्भ नरकभोग मागे लावतो, त्यामुळे देहसंग केवळ दुःखच देतो.'' श्रीराम पुढे म्हणाला, ''हे गुरुवर्या, अंगात देहममता नांदत असल्यावर राज्यभोगात तरी स्वार्थ काय आणि विषयभोगाच्या स्वार्थात सुख कसले?''

''अहंकारासारखा वैरी उरावर बसलेला असताना निर्धारपूर्वक आणि निश्चित संसारात सुख मिळणार नाही. अहंकार जिवामधे आला की तो साधनेत स्वतःला गोवून घेतो आणि असा अहंकार जिवाभावाचा झाला तर जग उघडपणे फसते. मुख्यतः अहंपणा हा बाधक आहे. त्याला ममता साहाय्यभूत झाली की अहंकार न जिंकता सुख मिळतच नाही. शुद्ध शास्त्र श्रवण केले, उभय भोग हेच असे ह्याकडे पाहिले तर तेथे कुत्र्याने ओकारी

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

भक्षिली आणि ते आत्ताच पुन्हा ओकून गेले असे वाटते. एखाद्या कुत्र्याने ओकारी भक्षण करावी तसे हे इहलोकीचे भोग असतात. असे भोग जर ज्ञानवंत इच्छित असतील तर त्यांचे ज्ञान व्यर्थ ठरले असेच लोक समजतील."

"अहंकार हा मुख्य वैरी; तर विषयोपभोग डोक्यावर चढणारे. त्यामुळे हे ऋषिश्रेष्ठा, संसार निश्चितपणे अवघड वाटतो. तेव्हा जोवर अभिमान नष्ट होत नाही तोवर मी रसपान, मिष्टान्नभोजन, दिव्य वस्त्रांचा स्वीकार अजिवात करणार नाही. क्रियाकर्मांचे आचार मी करणार नाही. कर्म हे फक्त शरीराधार म्हणून केले; तरी तेथे अहंकार वाढतोच. मी पवित्र राहीन आणि श्रवणोत्सुक होईन."

श्रीरामाचे सर्वांकडून कौतुक

"ज्यामुळे ब्रह्मप्राप्ती होईल अशी काही युक्ती असेल तर कृपामूर्ती अशा ऋषिवरांनी मला सांगावी. मला तसा अधिकार नसेल तरीही तुम्ही संत हेच सर्वांना आधार आहात. सत्संगतीने दीनोद्धार होतो आणि तेच तर संतांचे खरोखर ब्रीद आहे. ज्याप्रमाणे चंदनाच्या संगतीमुळे, खैर-धामोठे हे वृक्ष चंदनाप्रमाणे होतात; त्याप्रमाणे संतांच्या संगतीने दीन-हीन अशांनाही ब्रह्मप्राप्ती होते." असे बोलून श्रीराम स्तब्ध राहिला. या प्रसंगी श्रीरामाच्या प्रश्नांनी ऋषिगण, राजा, आणि प्रजा हे सारे आश्चर्यचकित झाले. श्रीरामाच्या या वैराग्यदर्शनामुळे ऋषींनी भूतलावर, सिद्धांनी आकाशात आणि मुमूक्षूंनी चातकांप्रमाणे भोवताली एकच गर्दी केली. श्रीरामाचे वैराग्य पाहून आणि त्याचे बोलणे ऐकून देव, सिद्ध, ऋषी, जनता हे तटस्थपणे, चकित भावनेने भरून गेले आणि त्यांनी श्रीरामाच्या डोक्यावर पुष्पवृष्टी केली. सिद्धांनी आकाशातून, ऋषी आणि जनता यांनी भूतलावरून श्रीरामाचा जयजयकार केला. सर्व सभा सुखाने परिपूर्ण भरून गेली. सिद्ध म्हणाले, "आम्ही त्रिभुवनात संचार करतो. परंतु असे वैराग्यपूर्ण विवेचन कुठे ऐकायला मिळाले नव्हते. आज श्रीरामाचे विवेचन ऐकून आम्ही आनंदी आणि सुखी झालो आहो." नंतर आनंदित झालेले सिद्ध राजा दशरथाच्या सभेत आले आणि त्यांनी श्रीरामाकडून गुह्यज्ञान ऐकण्याची इच्छा व्यक्त केली. त्या वेळी दशरथाने वसिष्ठ, विश्वामित्र, सिद्ध आणि साधक अशा सर्व मुनींची पूजा केली. तोही आनंदाने परिपूर्ण झाला. श्रीरामानेही त्या सर्वांसह दशरथाची देखील पूजा केली. यापुढील विवेचन ऐकण्यासाठी सर्व उत्सुक बनले.

अध्याय दहावा

ऋषिवर्य विश्वामित्र श्रीरामाला म्हणाले, "हे रघुनाथा, तू सूक्ष्म आणि तीक्ष्ण बुद्धीचा आहेस. परमार्थाचे ज्ञान तुला असल्याने स्वभावतः परिपूर्णच आहेस. ज्ञानी लोकांमधील जे वरिष्ठ ज्ञानवंत, त्यांचा शुद्ध अनुभव जो, तो तुझ्यामध्ये दिसून येतो. तसेच तुझे ज्ञानगर्भ वैराग्य, हेही उत्तम प्रतीचे आहे. वास्तविक जे वैराग्य ज्ञानाधिष्ठित असते तेच खरे शोभनीय वैराग्य. तसेच वैराग्याशिवाय ज्ञानप्राप्ती ही दुर्लभ असते. तेच स्वभावतः तुझ्याठायी दोन्ही सहजच आहेत. ज्याप्रमाणे व्यासपुत्र शुक हा जन्मापासूनच स्वभावमुक्त होता, तसाच हे रघुनाथा तूही आहेस. तुला स्वभावतःच परमार्थ प्राप्त झाला आहे. त्या शुकाचा ज्ञानार्थ हा विकल्पानेच नाशकारक ठरला. परंतु गुरुवचनाने त्याला तोच निश्चितपणे प्राप्त झाला. शुकाने आपला परमार्थ जाणला."

यावर श्रीरामाने विचारले, "ऋषिवर्य, आपण म्हणता ते ऐकून अतिशय आश्चर्य वाटले. ज्ञाता असूनही शुकवर्यांनी विकल्प धरायचे काय कारण घडले? त्या शुकाची संपूर्ण कथाच आपण मला सांगा ना स्वामीनाथ. ज्ञानी असूनही शुकाच्या चित्तात ती विकल्पता का बाणली आणि पुढे ती

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Muthulakshmi Research Academy

विकल्पता नाहीशी होऊन तो, कसा समाधानी आणि शांत झाला. ते सर्व आपण मला सांगावे.''

विश्वामित्र शुकाख्यान सांगतात

विश्वामित्र श्रीरामाला म्हणाले, ''व्यासपुत्राच्या ठायी ज्ञानाची थोरवी, अगाथ महान् विचार, यांची महती एवढी होती, की त्याला अन्य उपमाच देता येत नाही. त्या शुकाचा स्वतःचा विचार आणि त्या विचाराचे मूळ सार मी तुला सविस्तर सांगतो. ऐक.''

''जन्मापासून शुक हा स्वभावतःच मुक्त होता. विवेक, वैराग्य यांनी परिपूर्ण होता. तो एकदा श्रीव्यासांना न विचारता आपल्याच इच्छेने वनात निघून गेला. तो लग्न न करता, संपूर्ण संन्यास न घेता, व्यासांना न विचारता, स्वतःहून सर्वस्वाचा त्याग करून वनात गेला. व्यासांना शुकाची पूर्णावस्था पाहून अत्यंत प्रेम वाटत होते. त्यांना शुकासंबंधात पूर्ण सुख वाटत होते. त्या पुत्रप्राप्तीच्या सुखामुळे व्यासांना पुत्रमुखाचे दर्शन व्हावे असे वाटून, ते आनंदाने 'शुका ये' असे म्हणाले. परंतु शुक हा एकाच ठायी - एकदेशी - नसून तो सर्व भूतमात्रांच्या ठायी आहे याचा व्यासांना अनुभव देण्यासाठी त्यांच्या हाकेला वृक्ष 'ओ' देत होते. व्यासांनी शुकाच्या नावाने हाक मारावी आणि वृक्षांनी त्याला प्रतिसाद द्यावा हा प्रकार होत राहिल्याने पुत्राच्या आगमनाच्या कल्पनेने व्यास सुखावले आणि उत्सुक बनले. आपल्या हाकेला वृक्षांकडून प्रतिसाद मिळतो आहे हे पाहून त्यांना शुकाची पूर्णावस्था कळून आली. असे पूर्णपण असूनही त्याला मुख्यतः स्त्रियांचा शब्द ऐकून त्या कौतुकाने विकल्प निर्माण झाला. शुकाने स्त्रिया कधी पाहिल्या नव्हत्या, त्यांची भेट झाली नव्हती, त्यामुळे स्त्रियांचे बोलणे ऐकून त्याच्या ठिकाणी विकल्प निर्माण झाला. एक स्त्री येऊन परमार्थज्ञान विचारू लागली. त्या वेळी गुरुत्वाची भूल शुकाला पडली. त्या स्त्रीच्या बोलण्याने चूक होऊन शुकाच्या ठिकाणी हा विकल्प निर्माण झाला. स्त्रीला परमार्थ सांगून गुरुपणाला कमीपणा आला आणि त्याने शुकाच्या दृष्टीने झालेला अनर्थ त्याच्या ठिकाणी विकल्प निर्माण करायला कारण ठरला. परमार्थ गुरूने सांगणे हा मोठाच अनर्थ घडल्याने त्यामुळे शुकाच्या मनात त्या अनर्थाने सावकाशपणे घात केला.''

शुक आणि व्यास यांची अप्सरांशी भेट

एक वेळी सिद्धसरोवरामध्ये अप्सरा नग्न स्थितीत स्नान करत होत्या. तेथे ब्रह्मस्थितीतला शुक गेला तरी त्या न लाजता तशाच क्रीडा करत राहिल्या. नंतर व्यास आले तेव्हा मात्र त्या लाजल्या. कोणी अंगाभोवती वस्त्राचा आडोसा केला, कोणी पाण्यात अंग बुडवून बसल्या. व्यासांना प्रश्न पडला की 'शुक तर तरुण आणि नग्न आहे, तरी अप्सरा लाजल्या नाहीत. मी त्यांचा आजा शोभेन एवढा वृद्ध आहे तर मला पाहून त्या देवांगना का लाजल्या?' व्यासांना वाटले, 'कदाचित् शुकाच्या ठिकाणी त्यांना आसक्ती वाटत असेल म्हणून त्यांनी लाज न धरता आपल्या अंगाचे प्रदर्शन केले असेल आणि मी वृद्ध असल्याने त्यांना न आवडून त्यांनी लाज बाळगली असेल.' त्या अप्सरांची भावना काय, हे त्यांनाच विचारावे असे व्यासांचे मत झाले आणि त्यांनी सरळ प्रश्न विचारला, ''तुम्ही शुकाला लाजला नाहीत आणि मलाच तेवढ्या लाजलात हे काय म्हणून? या माझ्या प्रश्नाचे निश्चित उत्तर द्या.''

व्यासांचा प्रश्न ऐकून अप्सरा हसून म्हणाल्या, ''ज्याची जशी आंतरिक वृत्ती असते, तसे आम्ही त्याच्याशी वागतो. हे मुनिवरा, तुझे ज्ञान भेदाभेद मानणारे आहे, तर शुक हा अभेदाने वागणारा आहे. त्यामुळे अभेदाला लाज प्राप्त नाही आणि भेदाच्या ठिकाणी सलज्जता असते.'' यावर व्यासांनी प्रश्न केला, ''शुकाचा अभेद तुम्हाला

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

कसा कळला आणि माझ्या ठायी भेद कसा दिसला?'' अप्सरांनी लगेच सांगितले, ''आपण लाजेचा प्रश्न केलात त्यावरून तुमच्या ठिकाणचा भेद समजला. आपण स्त्री-पुरुष भेद मानता म्हणून तुम्ही प्रश्न केलात. उलट शुक सूक्ष्म अभेद मानणारा असल्याने तो स्त्री-पुरुष अशी धारणा बाळगत नाही.''

अप्सरांचे उत्तर ऐकून शुकाला 'व्यास अज्ञानी आणि मी ज्ञाता' असा आपल्या ज्ञानाविषयी अभिमान निर्माण झाला. त्याचे अंतःकरण या भावनेने भरले. अशी ही स्त्रीवचनाची कीर्ती आहे. त्यामुळे शुकाला ब्रह्मज्ञानाची शांती झाली आणि त्याच्या मनात विकल्प निर्माण झाला. 'आपणच ज्ञानी' असे स्फुरण निर्माण झाले. मी ज्ञाता आणि तो अज्ञानी असा विचार जेथे स्फुरतो तेथून ब्रह्मज्ञान दूर जाते. केवळ ज्ञानाचा अभिमान तेवढा शिल्लक राहतो. ज्याप्रमाणे गोड पदार्थाच्या रांजणात हिंग पडला की त्या गोडवणीची हिंगवणी होते, त्याप्रमाणे विकल्पाने ज्ञानवंताच्या अंतरात प्रवेश केला, की ज्ञानाच्या अभिमानामुळे ज्ञान उडून जाते. दुधामधे ताकाचा थेंब पडला की दुधाचे दही होते, त्याप्रमाणे ज्ञानवंताच्या मनात विकल्प वाढला की ज्ञानाभिमानामुळे ज्ञान नष्ट होते. एखाद्याने सावधपणी धोतऱ्याचे बी खाल्ले तर लगेच तो भ्रमाने भांबावून जातो त्याप्रमाणे विकल्पाच्या परिणामाने ज्ञानी असलेल्याला ज्ञानाभिमानाने ग्रासले जाते. 'व्यास हे भेददृष्टीचे अज्ञानी आणि मी अभेद बळाने सज्ञानी आहे' असा विकल्प त्या अप्सरांच्या बोलण्याने दृढ केला. एखादा दिवा मालवला तर नंतर काही काळ काजळी आणि दुर्गंधी येतच राहते तसे ज्ञान नाहीसे झाले की ज्ञानाभिमानाचा मोठा गर्व निर्माण होतो.

सद्गुरूशिवाय ज्ञान व्यर्थ

स्वतःच्या बुद्धीने निश्चित केलेले विवेकज्ञान हे विकल्पामुळे क्षीण होते. गुरूकडून निपुणतेने मिळालेला उपदेश हेच निश्चयाने पूर्ण ज्ञान असते. श्रीगुरूकडून जो ज्ञानानुभव मिळतो ते ज्ञान अक्षय असून, विकल्पाला तेथे प्रवेश नसतो. गुरूने दिलेले ज्ञान कधी अपाय करणारे नसते. उलट गुरूपदेशाशिवाय जे ज्ञान ते क्षयरोगासह जन्मलेले मानावे. त्यामुळे विकल्पाच्या स्पर्शाने ते अपायकारक, क्षीण होऊन प्राण घालवते. 'आचार्यवान् पुरुषो वेद' हे वेदवाक्य प्रसिद्ध आहे. गुरूवचनाने विशेष शुद्ध ज्ञान मिळते आणि त्यामुळे प्रजा शहाणी होते. गुरुवाक्याशिवायचे ज्ञान हे सर्वप्रकारे विकल्पाने नष्ट होणारे असते. शुकाची तशीच अवस्था झाली आहे असे व्यासांना समजले. 'शुकाचे ब्रह्मज्ञान विकल्पाने क्षीण झाले असून शुक हा ज्ञानहीन झाला आहे,' हे व्यासांना कळून आले. व्यासांना भेदज्ञान असले तरी ते भेदात अभेद पाहणारे सर्वज्ञ आहेत, हे शुकाला कळाले नाही, म्हणूनच विकल्पाने तो पूर्ण ग्रासला गेला. व्यासांचे मन शुकावर अत्यंत आसक्त झालेले असल्यामुळे ते क्षणाक्षणाला शुकाला 'परत ये' असे म्हणत होते. परंतु आता तो विकल्पयुक्त झालेला असल्याने ते त्याला 'परत ये' म्हणाले नाहीत. व्यासांच्या अंतर्यामी असा विचार आला की, शुकाने विकल्पामुळे आपले ज्ञान क्षीण करून घेतले आहे. आता ज्यामुळे शुकाला संपूर्ण ज्ञान प्राप्त होईल असा एखादा सत्संग सांगून त्याच्यावर कृपा करावी असे श्रीव्यासांनी ठरविले.

शुक जनकराजाकडे जातो

शुकाला सत्संग घडविण्यासाठी श्रीव्यासांनी त्याला म्हटले, ''तू जर स्वतःच्या इच्छेप्रमाणे जातोस तर जनकाकडे अवश्य जा. त्याच्यामुळे तू निश्चित काही प्राप्त करशील. जनक राजा पृथ्वीवर राज्य करतो आहे; परंतु राज्य करत असूनही तो विदेही आहे. त्याच्या ठिकाणी ज्ञान आणि अनुभव परिपूर्ण झाले असून, तो पूर्णत्व पावलेला आहे. जो संशय तुझ्या मनात आहे तो दूर होऊन तू निःसंदेह होशील. जनकाच्या भेटीने समाधान आणि परम अर्थाचा परमार्थ यांची तुला प्राप्ती होईल.''

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

'आपणच ज्ञान सांगावे कारण व्यास अज्ञानी आहेत' हे शुकाच्या मनाने घेतले होते. यासाठीच त्याला व्यास जनकाकडे पाठवत होते. शुकाला मात्र वाटले की, 'व्यासांची काय ज्ञानवत्ता आहे ती समजली; आता जनकाकडून ज्ञानासंबंधात काय ऐकायला मिळते ते खरोखर पाहावे.' असा विचार करून, मेरूपर्वत उतरून, शुक हा तत्काळ जनकनगरीपाशी आला. त्या वेळी शुकाच्या मनात आले की, 'आपण या नग्न अवस्थेत नगरात गेलो तर लोकांकडून उपहास केला जाईल;' म्हणून त्याने लोकांच्या लाजेखातर वाटेतल्या चिंध्यांची कौपीन तयार केली. त्यांनतर शुकाच्या मनात विचार आला की, 'राजा, देवालय आणि श्रीगुरू यांच्या भेटीला जाताना कधी मोकळ्या हाताने (कोणतीही भेटवस्तू न घेता) जाऊ नये हेच वडीलधारे वृद्ध शिकवतात आणि धर्मशास्त्रात हीच नीती निश्चितपणे सांगितली आहे. शिवाय जनक हा गुरुपणात जगद्‌गुरू आहे, नरेन्द्रांचा नरेंद्र आहे; त्याला रिकाम्या हाताने भेटून नमस्कार केला तर आपण स्वधर्म न जाणणारा माणूस ठरू; परंतु जनक हा तर द्रव्याबाबत निर्लोभी आहे.' असा विचार करून शुकाने जनकाच्या भेटीला जाताना चिमूटभर राखुंडी घेतली, आणि तो निघाला.

शुक जेव्हा जनकाच्या राजद्वारापाशी आला तेव्हा, कमरेला चिंध्यांची कौपीन, गळ्यात जानवे, हातात राखुंडी असा त्याचा अवतार होता. द्वारपालाला त्याचे ते विचित्र ध्यान पाहून प्रश्न पडला 'ब्रह्मसूत्राशिवाय ब्राह्मण नसतो, दंड धारण न करणारा संन्यासी नसतो, हा पूर्ण दिगंबरही नाही. हा विलक्षण दिसतो.' या संभ्रमामुळे द्वारपालाने शुकाला अडविले. त्या वेळी श्रीशुकाने म्हटले, "तू राजाकडे जाऊन सांग की मी शुक असून त्याच्या भेटीला आलो आहे." श्रीशुकाच्या मनात असे होते की, 'मी ब्रह्मपुत्र आलो म्हणून स्वतः राजा मला सामोरा येईल आणि मला सन्मानपूर्वक राजगृहात घेऊन जाईल.' अशाप्रकारचा मोठा ज्ञानाभिमान निर्माण होऊन श्रीशुकाच्या ठिकाणी त्या विचाराने घर केले असल्याचे अंतर्ज्ञानाने राजा जनकाला समजले. 'शुकाच्या मनात ज्ञानाभिमानाचा विकार स्थिर झाला असल्यामुळे आपण त्याच्या भेटीला स्वतःहून गेलो तर तो विकल्प त्याच्या ठायी बळावेल आणि श्रीव्यासांनी त्याला जे सांगितले ते निश्चित ठरून, त्याच्या विकल्पाला पुष्टी चढेल. तेव्हा आपण त्याची भेट घेऊ नये आणि ज्यामुळे त्याचा विकल्प नष्ट होईल अशा त्यागाचा त्याला उपदेश करावा, म्हणजेच शुकाला सत्य असे आत्मज्ञान प्राप्त होईल.' या दृष्टीने जनकाने विचार निश्चित केला.

त्यानंतर जनकाने ठरविले की, आपण भेट न घेता शुक समाधान पावेल असा कुशल उपाय करावा. राजाने द्वारपालाला सांगितले, "दारात जो महाश्रेष्ठ उभा आहे त्याला निरोप दे की, 'संग सोडून सुखी हो.' त्यामुळे त्याला आत्मानुभव येईल." त्यावर द्वारपालाने तो निरोप सांगताना म्हटले, "राजाने तुम्हाला 'संगत्यागे सुखी व्हाल' असा निरोप दिला आहे." द्वारपालाने राजाचा असा निरोप सांगताच श्रीशुक संतापला. तो म्हणाला, "मी काय राज्यभार वाहतो आहे की मला स्त्रीसंग आहे? मी निःसंगपणेच वागतो आहे. जा जाऊन तुझ्या राजाला हे माझे बोलणे ऐकव." यानंतर शुकाने हातातली राखुंडी टाकून दिली, लंगोटी तोडून टाकली आणि 'मी एकच सृष्टीत निःसंग आहे हे त्या राजाने एकदा येऊन पाहू दे' असा त्याने विचार केला. द्वारपालाने जनकाला शुकाचे बोलणे ऐकविले. त्यावर जनकाने पुन्हा 'संगत्यागाची स्थिती आल्यानेच सुखी होशील' हाच निरोप शुकासाठी दिला. द्वारपालाने शुकाला 'संगत्यागाने सुखप्राप्ती' हा जनकराजाचा निरोप ऐकवला. यावर "आता मला कसला संग आहे ते राजाने येऊन खुशाल पाहावे. तो पुनःपुन्हा संगत्याग सांगतो आहे याचा काय अर्थ?" असे शुकाने म्हटले आणि तो त्या संगत्यागाविषयी

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Research Academy, eGangotri

विचार करू लागला. त्याला हळूहळू जाणवू लागले- 'मी इथे शुक म्हणून कोण आहे? मला शुकत्व कोणत्या कारणाने आले? वस्तू नामरूपाच्या पलीकडेही पूर्ण असते. शुकाचे शुकपण हे देहामुळेच आहे. देहामुळे माझे शुकपण आहे; परंतु देहाचे इथे काय लक्षण आहे. देह पांच भूतांपासून (पृथ्वी, आप, तेज, वायू, आकाश) पूर्णत्वाला आलेला आहे. त्यामधला मी कोणत्या लक्षणाचा ते पाहिले पाहिजे. देह हा पंचभूतांनी निर्मिलेला आभास आहे; पंचभूतांचा हा विलास सावकाशपणे विवरण करून स्वस्वरूप साधण्यासाठी चिकित्सा करून पाहू. मी जडपणे पृथ्वी नाही, अधोगमन करणारे जल तेही मी नाही, मी दाहक तेज नाही की चंचल असा वायूही नाही. जे जे रिकामे दिसते आहे ते आकाशही मी शुकत्वामुळे नाही. पंचमहाभूतांतील मी नव्हेच, म्हणजे त्यापेक्षा मी स्वतः कोणी वेगळाच आहे. देहममत्वाने मी अहं नाही, मायिकतेने सोऽहं असा मी नाही. यावरून अहम्-सोऽहम् याहून वेगळे असे माझे निश्चित आत्मरूप आहे.' अशा रीतीने चिकित्सापूर्वक विचार केल्यावर आणि आपल्या उपपत्तीचा माग घेतल्यावर शुकाची वृत्ती आत्मरूपी प्राप्त झाली. त्यामुळे त्याला तटस्थता आली. त्याची इंद्रियवृत्ती निश्चेष्ट - स्थिर - झाली. या निश्चेष्ट - हालचालरहित - अवस्थेत शुक त्या जनक राजाच्या दारात सात रात्री उभा होता. माशांचा आणि ढेकणांचा दंश न जाणवता तो निश्चल उभा होता. शुकाची ही निर्विकल्प समाधीची स्थिती द्वारपालाने जनक राजाला सांगितली 'शुक पूर्ण त्रिशुद्धी पावून अहंबुद्धिरहित झाला आहे' हे द्वारपालाचे सांगणे ऐकून विदेही जनक आनंदित झाला आणि तत्काळ सामोरा जाऊन शुकाला अंतर्गृहात घेऊन आला.

शुकाची जनकाकडून परीक्षा व मार्गदर्शन

शुकाला उचलून राण्यांच्या वसतिस्थानात - अंतःपुरात - आणले. त्या वेळी शुकाची अवस्था कशी आहे हे जनक राजाने राण्यांना विचारले. 'नाना तऱ्हेच्या भोगविलासांचा शुकावर काही परिणाम झाला नाही.' असे त्या म्हणाल्या. तो निर्द्वंद्व अवस्थेत असून त्याला विदेहावस्था प्राप्त झाली आहे, हे जनकाने ओळखले. त्या योगिराजाच्या ठायी आता ब्रह्मत्व बाणले आहे हे जाणून पृथ्वीपती जनकाला परम उल्हास वाटला. शुकाला सन्मानाने आणि कौतुकाने सिंहासनी बसवून राजाने शुकाची ब्रह्मत्वाच्या भावनेने पूजा केली. नंतर स्वतःच राजाने शुकाला म्हटले, "मी जनक आपल्या भेटीला आलो आहे." हे ऐकताच श्रीशुक उल्हसित झाला. त्याने सर्व भावांनी राजाला नमन केले. राजाला नमन करून शुकाने त्याचे पाय धरले. या वेळी शुक संपूर्णपणे तटस्थ झाला. शुकाची तटस्थता पाहून हे अपूर्ण ज्ञानाचे लक्षण आहे असे जनकाने ठरविले. सर्व इंद्रियांच्या ठिकाणी मुरलेले ज्ञान हे काही नित्यमुक्ततेचे नव्हे. हे ज्ञान शंकित असल्याने तेथे ज्ञानाची पूर्णता असणार नाही. ज्याप्रमाणे झाडावर आंब्याला पाड लागला तरी आढीत घातल्याशिवाय त्याला गोडी येत नाही, त्याप्रमाणे तटस्थतेने मोठी अपक्वता जोडते पण निःशंक ज्ञान होत नाही. तसेच दही घुसळून लोणी काढले आणि तसेच ठेवले तर त्याला खवट घाण येते; परंतु तेच लोणी अग्नीवर ठेवून तापवले तर त्याला सुगंध आणि सुस्थिरता यांचा लाभ होतो. त्याप्रमाणे अगदी संपूर्ण तटस्थता हीच मुख्यतः अपक्वता आहे. जर सर्व इंद्रियांनी चित्ताला समाधान दिले तर ते ज्ञान विशेषत्वाने अति शुद्ध असते. शुकाची तटस्थता नाहीशी होऊन, त्याला शुद्ध ज्ञानाची जोड होईल या विचाराने निश्चितपणे आत्मविश्वासाने राजा म्हणाला, "शुका, तुझी वृत्ती कोठे आहे? आत्मप्रतीतीत वृत्ती निश्चित सुखरूप आहे; त्यावर अशी आत्मस्थिती आहे की त्याची स्थिती आपण डोळ्यांनी पाहातो तेव्हा जे पाहायचे आणि जो पाहणारा हे पूर्ण ज्ञान होय. अशा प्रकारचा आत्मत्वाचा अनुभव असतो." नंतर शुकाने जेव्हा

https://archive.org/details/@sarayufoundationresearchacademy
Bhavarth Vani Trust, Lucknow

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

आत्मस्थितीने पाहिले तेव्हा तो आश्चर्याने चकित झाला; आपला देह नाहीसा झाला असून पूर्ण ब्रह्मत्वाने वश झालेला आहे हे त्याला जाणवले. जे जे तो डोळ्याने पाहू जाई ते ते आत्मत्वाने दिसू लागले. अहो, गुरुवचनाची हीच तर कसोटी आहे की प्रत्येक दृश्याच्या ठिकाणी परब्रह्मच नांदते. स्त्रीपुरुषांचे व्यक्तित्व, पशू, पक्षी, नाना जाती हे सर्व ब्रह्मत्वाचा अनुभव देतात आणि आत्मस्थितीत जग नांदल्याचे दिसते.

सद्‌गुरुमाहात्म्याचा अनुभव

जे पाहावे ते आत्मस्थिती, सर्व इंद्रियांना ब्रह्मप्राप्ती, हीच गुरुवाक्याची ख्याती आहे. ती ख्याती भाग्यवंतांना स्वानंदाने अनुभवास येते. सद्‌गुरूंचे अगाध मोठेपण हेच की इंद्रियकर्माला ब्रह्मत्व येते आणि परब्रह्माची भेट होऊन देहधर्म चिदत्व पावतो. चित्, चिन्मात्र यांच्यामुळे स्वभावतःच अशी निद्रा येते की आपल्या शय्येवर आपण हळुवारपणे पहुडतो, परंतु ना खाली पृथ्वी असते की ना वरती आकाश असते. शुक हा सर्व काही विसरला, त्याच्या आठवणी पुसून गेल्या; त्याच्या देहभावाचा दुष्काळ पडला आणि सुखाचा सुकाळ झाला. जागेपणी पूर्णब्रह्म, स्वप्नात चैतन्यघन, सुषुप्ती सुखसंपन्न अशी ख्याती त्या गुरूच्या आज्ञेने होते. गुरूच्या आज्ञेचा असा चमत्कार असतो की, ती कानावर पडताच संसार सुखरूप होतो आणि चराचर ब्रह्ममय होते. असाच गुरुवाक्याचा गौरव शुकाच्या सहज अनुभवास आला. त्यामुळे अत्यंत आनंदाने त्याने राजाला साष्टांग नमस्कार घालून, सद्‌भावाने नमन केले. राजाने शुकाला आलिंगन दिले. दोघांचे दोनपण जाऊन त्यांच्या ठायी चैतन्यघन एकत्र झाले. त्यामुळे शुक पूर्णपणे पूर्णत्वाला जाऊन परिपूर्ण झाला. यामुळे त्याला समाधान मिळाले. त्यांचे आलिंगन सुटले तरी दोनपण दिसेनासे झाले. आत्मत्वात तो अखंड पूर्णत्व पावला. नंतर शुक जनकाला म्हणाला, "ही सहजस्थिती न कळल्यामुळे मी चित्तात विकल्प धरला होता. आता समजले की मुख्यतः श्रीव्यास हे पूज्यतेची मूर्तीच आहेत. व्यासांना उद्देशून अप्सरा म्हणाल्या होत्या की त्यांच्या ठिकाणी स्त्रीपुरूष भेदाची, भिन्नत्वाची भावना आहे. ते अप्सरांचे बोलणे ऐकून माझे मन विकल्पाने भरले. व्यासांना मी निश्चयाने अज्ञानी मानले. पण तुझ्या शब्दांनी विकल्पाचे समूळ दहन झाले. तुझ्या वचनांच्यामुळे निःसंदेहपणे मी धन्य ज्ञानाचा अनुभव पावलो. द्वारपाळाच्या निरोपांनी माया, अविद्या आणि विकल्प यांचे भस्म झाले. तुझ्या ज्ञानवैभवाची थोरवी सर्वत्र आणि सुरश्रेष्ठांनाही वंदनीय आहे. तुझ्या तीक्ष्ण शब्दांच्या बाणांनी घाव घातल्याशिवाय प्राण छेदला, जीव पूर्णपणे मारून, मला पूर्णत्वात पूर्ण केले." शुकाचे भाषण ऐकून जनक सुखसंपन्न झाला. एथपासून शुक सुखपूर्ण झाला हे पाहून जनकाला संतोष झाला.

जनक शुकाला उपदेश करतो.

जनकाने शुकाला म्हटले, "धन्य धन्य! जे तुला समाधान मिळाले तेच गुह्यातले गुह्य ज्ञान असून त्यालाच ब्रह्मसमाधान असे नाव आहे. तू मूळचाच ज्ञानवंत, वस्तू आत्मबुद्धीने पाहिली, गुरुवाक्य तीच त्रिशुद्धी, ही निजआत्मसिद्धी आहे. जो तू समाधी पावलास, त्यावर ज्ञानसिद्धी नव्हे ती त्रिशुद्धी तिलाच आत्मबुद्धी हे नाव आहे. तुला जी आत्मप्राप्ती झाली, तीच नारायणाची ज्ञानोक्ती, तेच श्रीकृष्णनाथांचे ज्ञान आणि तीच नारदमुनींची स्थिती आहे. याज्ञवल्य, श्रीव्यास यांची हीच स्थिती असून माझ्यापाशी निश्चयपूर्वक तीच स्थिती आहे. तेल, वात यांपासून दीप भिन्न असला तरी त्या तिघांत एकत्वाने अभिन्न असा प्रकाश असतो. याप्रमाणेच ज्ञात्याचे कर्मचिन्ह वेगळे असले तरी ज्ञेय (जे जाणायचे ते) आणि ज्ञान हे एकच असते. नारद नित्य लंगोटीत असतात आणि श्रीकृष्ण वैभवसंपन्न सृष्टीत असतात; परंतु दोघांच्या ज्ञानाची कसोटी एकच आणि समान

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

असते. जडभरत हा जड, याज्ञवल्क्य ज्ञानारूढ असे म्हटले जाते खरे पण दोघांचे ज्ञान एकच असते. त्यांच्या ज्ञानामध्ये कमी-जास्त असे नसते. देहदृष्टीने पाहिले तर कोटयवधी दोष दिसतात पण आत्मत्वाने पाहिल्यास सारी सृष्टी निर्दोष भासते; यासाठी देहावर दृष्टी ठेवू नये, कारण देहात्मता हीच कोटयवधी दोषांप्रमाणे आहे." जनकाने केलेल्या उपदेशाच्या गोष्टी ऐकून शुकाला मनोमन सुख झाले. संशय लगोलग नष्ट होऊन सदोदित स्वानंदाला पुष्टी मिळाली. याप्रमाणे राजा जनकाने शुकाला शुद्ध ज्ञानाविषयी सांगितले; त्यामुळे राजालाही विश्रांती आणि सुख मिळाले. ते सुख शब्दातीत होते. संपूर्ण सुख निर्माण झाल्याने सर्व संशयांचे दहन झाले; वाचेला महामौन पडले; भय, शोक पूर्णपणे मावळले. हृदयाच्या व्याधी संपल्या, इंद्रिये सुखाच्या ज्ञानाने शांत झाली, त्रिशुद्धी विश्रांती पावली, सुख हे सुखाच्या जाणिवेने तृप्त झाले.

शुक मेरुपर्वतावर जातो.

शुक राजा जनकाला म्हणाला, "मला परम विश्रांती मिळाली आहे." नंतर ती विश्रांती उपभोगण्यासाठी एकांत मिळावा म्हणून शुक मेरुपर्वताकडे गेला. मेरुशिखरावर निर्विकार, निरहंकार आणि निर्विकल्प अवस्थेत, योगमुद्रा आणि योगासन घालून, शुक स्वानंदमग्न समाधीसाठी बसला. तेलाशिवाय प्रकाशरूप, निर्वातींचा जसा दिवा तसा शुक समाधिस्वरूपात दिसला. याचेच नाव निर्विकल्प. शुकाने विचार केला, 'मी क्षणभर सुखात मेरुशिखरावर बसलो, परंतु दहा सहस्रवर्षे एवढी शास्त्रोक्त संख्या बाहेर सांगितली गेली. अशा प्रकारे स्वरूपाच्या ठिकाणी उदय वा अस्त असतच नाही. काळाला तेथे प्रतिबंध असतो. तो तेथे टिकतच नाही.

हे असे शुकाख्यान सांगून विश्वामित्र म्हणाले, "हे कृपामूर्ती श्रीरामा, याप्रकारे शुकाला जनकाने यथास्थित अशी ब्रह्मप्राप्ती करून देऊन, त्याला आत्मप्रतीती आणि समाधी या स्थितीपर्यंत नेले. समाधी आणि उत्थान या दोन्ही अवस्था सोडून देऊन शुक हा संपूर्णपणे पूर्णत्वाला प्राप्त झाला; सुखी आणि ब्रह्मसंपन्न झाला."

अध्याय अकरावा

श्रीव्यासांचा विरक्त पुत्र जो शुक त्याचे चरित्र सांगितले. जनक राजाने द्वारपालाकडून शुकाचा विकल्प घालवून त्याला निरहंकार केले. त्या सज्ञान जनकाचे कृपावचन द्वारपालाकडून शुकाला ऐकायला मिळून त्याच्या विकल्पाचे दहन झाले. शुक पूर्ण समाधान पावला. जशी शुकाला विरक्ती होती, तशीच श्रीरामालाही होती. त्याला राज्यवैभव आवडत नव्हते, विषयांच्या बाबतीत तो विरक्त आणि निरिच्छ होता.

विश्वामित्र रामाला म्हणाले, "श्रीरामा, तुझे ध्यान गंभीर आहे. शुकासारखा विचार करून तूही खरोखर श्रीगुरू करावास. विश्रांतीचे घर विवेकापाशी असते. अरे, सर्व वासनांची शांती म्हणजेच तिचे नाव मुक्ती आहे. विषयवासनांची उत्पत्ती म्हणजे निश्चित बद्धता. जो देहात असून विदेहस्थिती, ज्याला विषयासक्ती नाही, अशालाच जीवन्मुक्त म्हणतात हे तू निश्चित समजून घे." यावर श्रीरामाच्या मनात आले की, विश्वामित्रांनी आपल्याला शुकासारखे संपूर्ण ज्ञान सांगावे. हा त्याचा विचार जाणून विश्वामित्र त्याला म्हणाले, "श्रीरामा, अरे, तुला समाधान आणि ब्रह्मज्ञान देण्यासाठी षड्गुणांचे ऐश्वर्य असणारे नित्य संपन्न असे तुझे कुलगुरू वसिष्ठ हे सज्ञान आहेत. भूत, भविष्य आणि वर्तमान यांचे त्या सर्वज्ञाला त्रिकाळ ज्ञान आहे. ते अंतर्यामी पूर्ण साक्षी आहेत. गुरुत्वात तर ते महान् आहेत. तुझ्या सूर्यवंशात जे जे जन्मले, त्यांना वसिष्ठांनीच ज्ञान सांगितले आहे. त्यांच्या ज्ञानाची महानता स्वतः हरि-हरांनीही वंदन करण्याएवढी मोठी आहे. असा थोर कुलगुरू असताना मी उपदेश करणे योग्य नाही. तेव्हा

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

रघुनाथा, तू अनन्यभावाने वसिष्ठांना ज्ञानप्राप्तीसाठी शरण जा. दुसऱ्याचा शिष्य जरी अती श्रेष्ठ असला तरी त्याला चाळविणारा गुरू भ्रष्टच ठरतो. त्याने उपदेश केला तर तो ज्ञान घालवून बसतो. तो त्या लोभापायी पापी ठरतो. तुझ्या कुळात सज्ञान गुरू असताना त्याला डावलून जो उपदेश करू पाहील तो पापाचरण करणारा पापी नर ठरेल. असा ज्ञानोपदेशातला आत्मनिर्धार आहे. श्रीवसिष्ठ हे सूर्यवंशाचे ज्ञानगुरू आहेत. त्यांच्या शिष्याला जो कोणी गुरुत्वाने उपदेश करील त्याने पापराशी जोडल्या असे होईल. तेव्हा हे रघुनाथा, ब्रह्मप्राप्तीसाठी वसिष्ठगुरूंची तू प्रार्थना कर. त्यानेच तुला विश्रांती आणि सुख प्राप्त होईल.'' असे श्रीरामाला सांगून विश्वामित्र वसिष्ठांना विनंती करताना म्हणाले,

''हे मुनिवर्या, श्रीरामाला पूर्णाधिकार असताना तुम्ही उपदेशाविषयी उदासीन का? वसिष्ठा, आपल्या दोघांमधले पूर्वीचे वैर तर तुला स्मरत नाही ना? आपले ते वैर शांत करण्यासाठी तर ब्रह्मा आपल्याला आत्मज्ञानाचे गुह्य उपदेशून गेला. त्या गुह्य ज्ञानाच्या प्राप्तीने मी-तूपणाची जाणीव मावळली; वैरही तत्काळ संपले, आपण दोघेही स्वानंदाच्या पुष्टीने तुष्ट झालो; त्या स्वानंदाच्या स्थितीमुळेच तुम्हां-आम्हांत प्रेमभाव निर्माण झाला, कल्पांती सुद्धा विकल्प उपजणार नाही अशी आपल्याला स्थिती प्राप्त झाली. तेच ज्ञान तू श्रीरामाला उपदेश करून दे. वरे ते ज्ञान विसरलो म्हणत असशील तर स्मरण हे विस्मरणाला ग्रासून टाकतें. ज्याला न आठवल्याची नेहमी आठवण होते त्याला विसरणे शक्यच होत नाही.''

''ज्ञानाची खोली ही विरक्त शिष्याच्या सुक्षेत्रीच राहते हे निश्चित समजावे, हीच गुरूच्या गुरुपणाची थोरवी आहे. कामक्रोधादींच्या महाज्वाळेत ज्याच्या शिष्याचे ज्ञान जळत नाही, अशा गुरूचे ज्ञान प्रांजळ, सोज्ज्वळ आणि अविनाशी असते. शिष्याचे सर्व विकल्प खंडित करून त्याला निर्विकल्प करते तेच ज्ञान अखंडित आणि त्यालाच शुद्ध शास्त्रार्थ असे म्हणतात. शुद्ध शास्त्रार्थ प्रतिपादन करतात, तेच सद्‌गुरू उपदेश करतात आणि ज्या शिष्याला त्याचा अनुभव मिळतो, अशा गुरुत्वाची कीर्ती स्वतः हरि-हरांनाही वंदनीय वाटते. ज्या शिष्याला ब्रह्मप्रतीती होत नाही आणि शब्दज्ञानाची युक्तीच जेथे विशेष ठरते, मनात विषयांची आसक्ती उरते, तो निश्चित अशिष्य मानावा.''

''मानवदेहाची प्राप्ती झाल्यावर, संसार तरून जाण्यासाठी गुरुभक्तीच आवश्यक आहे, अशी श्रद्धा ज्याच्या चित्तात नसते, तो निश्चयाने अशिष्य समजावा. ज्याच्या चित्तात विषयवासना आहे, संसारावर जो आसक्त आहे आणि ज्याला लोकप्रिय होण्याची हाव आहे तो अविरक्तच ठरतो. अशा अशिष्याला जो उपदेश केला जातो, ती उपदेशस्थिती अपवित्र होय. ही उपदेश-कृती म्हणजे कुत्र्याच्या कातड्यावर धारोष्ण दूध भरण्यासारखी म्हणावी लागते. दुसऱ्याच्या शिष्याला उपदेश करणे हे गुरूपणाचे दूषण आहे. तसेच अशिष्याला ज्ञान देणे हे सर्वार्थाने पूर्ण निंद्य कृत्य आहे. सच्छिष्याला त्याचे सद्‌गुण पाहून गुह्य ज्ञान सांगावे, तेच त्या गुरूचे गुरूपण धन्य आणि परमार्थाने परम पवित्र होय.''

वसिष्ठांचा गौरव

विश्वामित्रांचे बोलणे अति गहन असले तरी ते ऐकून संतुष्ट झालेले सिद्ध, साधक, ऋषी 'धन्य, धन्य' म्हणून कौतुक करत राहिले. व्यास, नारद, याज्ञवल्क्य, शुक, शौनक, असे सर्वजण विश्वामित्राचे वारंवार स्तवन करत होते. तसेच जे ब्रह्मज्ञानाचा महामेरू, स्वानंदाचा सुखसागर होते असे ऋषीश्वर विश्वामित्र आपले चित्तचमत्कारी मनोगत व्यक्त करताना म्हणाले, " ब्रह्मापासून ब्रह्मप्राप्ती परंतु ब्रह्मासमान ज्ञानशक्ती असलेले; ज्यांच्या वचनाने क्षणात ब्रह्मप्राप्ती होते आणि

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

सच्छिष्य स्वानंद मिळवतात; ज्ञान, वैराग्य, औदार्य, यश, श्री, ऐश्वर्य या सहा गुणांनी युक्त असलेले हे वसिष्ठ असून त्यांना भगवंत म्हटले जाते. ते सूर्यवंशात आत्मसन्मान मिळवून आहेत. गुरुपणातील मुकुटमणी असलेल्या त्यांची प्रतिदिनी राजा पूजा करतो. त्यांना वरासनावर बसविले जाते. अशा श्रेष्ठ वसिष्ठांनी उपदेश केल्यावर शिष्य तत्काळ निरास होतात आणि त्या निरासतेची कास यांनी सावकाश धरलेली असते. श्रीराम हा अधिकाराच्या दृष्टीने शिरोरत्न आहे. परंतु त्याने न विचारता ब्रह्मज्ञान सांगू नये कारण उपदेशाचे ते मुख्य लक्षण आहे."

वसिष्ठांची कीर्ती मोठी होती. त्यांनी दंडशक्तीने सूर्याला जिंकले होते. ते वसिष्ठ विश्वामित्रांना म्हणाले, "उपदेशस्थिती अशी आहे की सद्‌गुरूंची प्रार्थना न करता, आदराने शिष्याने न विचारता, जो गुरू ज्ञान सांगतो तो मूर्ख हेच तत्त्वतः खरे आहे. गुरू स्वतःच जर शिष्याला म्हणेल की माझा उपदेश घे, तेव्हा गुरूपणाला ते शोभत नाही. तेथे गुरुत्वाचा हावरेपणा दिसतो. यासाठी शिष्याने न विचारता आपण ब्रह्मज्ञान सांगू नये. शिष्य उपदेशाबाबत उदास असेल, गुरू मात्र उपदेश करायला आतुर झाला असेल, तर त्या ठिकाणी गुरू हा अविवेकी, लोभी, शिष्य मिळविण्याला उतावळा ठरून गुरूपणाचा घात होतो. अहो विश्वामित्रा, तुमची आज्ञा ऐकल्यावर तिचा अवमान माझ्याने करवणार नाही. साधूंची आज्ञा वंद्य मानून मी ब्रह्मज्ञान सांगेन."

विश्वामित्रांचा गौरव

वसिष्ठ म्हणाले, "विश्वामित्रा, आपण साधूरत्न असून, तुमचे माहात्म्य सुरवरांनाही वंदनीय आहे. क्षत्रीय असून ब्राह्मण असलेले आपण स्वतः ज्ञानाने सर्वांना वश केलेले आहा. अशा साधूची आज्ञा, हरिहरांनीही अवज्ञा करू नये अशी असल्याने, मी मान्य करून या रघुनंदनाला गुह्यज्ञान सांगेन. माझे तुमचे वैर शांत करण्यासाठी जे प्रजापतीने उपदेशिले होते ते संसारापासून निवृत्त करणारे स्फूर्तिदायक ज्ञान मला अखंड स्मरते आहे. त्याच ज्ञानाचा मी रघुनंदनाला उपदेश करीन. या उपदेशाला कोणतेही विघ्न कधीही बाध येणार नाही. जर विघ्न आलेच तर तेच निर्विघ्न होईल. प्रपंच चैतन्यमय होईल. शिष्य पूर्ण ब्रह्म होईल. अज्ञान हे ज्ञान होऊन राहील. अशी त्या ज्ञानाची गुह्य स्थिती मी श्रीरामाला उपदेशीन." हे वसिष्ठांचे बोलणे ऐकून श्रीरामाला सुख वाटले. नंतर त्याने वसिष्ठांना दंडवत घातले आणि "मी अनन्यभावाने आपल्याला शरण आलो आहे. मी आपला पूर्ण शिष्य आहे. आपल्या सद्‌गदित करणाऱ्या कृपावचनाने मी दीनपणे आपली करुणा मागतो आहे. स्वामी, आपण कृपा करून या दीनाचा उद्धार करावा. ज्याप्रमाणे दीप खिडक्यांना उजळतो, परंतु त्या खिडक्या दीपाला जाणत नाहीत, त्याप्रमाणे आपल्यामुळे सूर्यवंशाला ज्ञानप्राप्ती झाली तरी मी आपली ज्ञानस्थिती जाणत नाही. आपले अगाध ब्रह्मज्ञान मला अज्ञानाला समजत नाही. आपण सनातन कुलगुरू आहात, म्हणून मी आपले चरण दृढ धरिले आहेत."

श्रीरामाची योग्यता

श्रीराम हा स्वतःच चैतन्यघन असून त्याने देवांच्या कार्यासाठी अवतार घेतला आहे. देवकार्य आणि धर्मसंरक्षण पूर्ण करण्यासाठी तो मनुष्यपणाचे नटनाट्य करतो आहे. त्याने स्वतःला अज्ञान म्हणणे म्हणजे ब्रह्मात ब्रह्मत्वाचे न्यून - कमीपण - असणे किंवा त्याने स्वतःला सज्ञान म्हणणे म्हणजे ब्रह्मात ब्रह्मत्व पूर्ण असून अधिक काही नाही म्हणणेच. अशाप्रकारे श्रीराम हा ज्ञान आणि अज्ञान यांच्या पलीकडे आहे. स्वतः नित्य मुक्त असूनही तो लोकसंग्रहासाठी वसिष्ठांना गुरुभावनेने वंदन करतो आहे. सद्‌गुरूंना योग्य सन्मान देऊन, श्रीरामाने ब्रह्मज्ञान विचारले नसते तर ज्ञानमार्गाची हानी झाली असती आणि ती

https://archive.org/details/muthulakshmiacademy
Bhavan Varanasi Trust, Lucknow

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

हानी आपणच केली असे झाले असते. दीनोद्धार करण्यासाठी, गुरुशिष्य-परंपरा स्थापन करण्यासाठी ज्ञानमार्गाविषयी रामाला तीव्र उत्कंठा होती.

वसिष्ठांना श्रीराम विनंती करतो

श्रीरामाने आपले लोककल्याणाचे व्रत चालविण्यासाठी स्वतः अज्ञानी असल्याचे दाखवून, गुरुभावाने वसिष्ठांना सन्मान देऊन, नम्रपणे ब्रह्मज्ञानाविषयी विचारले. अज्ञानाचा बुरखा घेऊन, एखाद्या अज्ञानी माणसाने प्रश्न विचारावे, तसे रामाने स्वतः काही प्रश्न विचारले.

श्रीराम म्हणाला, "अहो मुनिश्रेष्ठ सावधतेने ऐका, माझे जसे पूर्व प्राक्तन - संचित - असेल त्यानुसार मी प्रारब्धाच्या अधीन असणार. मला स्वतःचे कर्तेपण नाही. प्रारब्धाकडे पाहिले तर त्यापुढे मी केवळ बापुडा - दीनवाणा - होतो. मी पुढे काय करावे हे स्पष्टपणे समजतही नाही. अर्थात् देह असेतो आपण प्रारब्धाच्या अधीन असणार; तेव्हा ज्यामुळे ब्रह्मज्ञान होईल अशी पूर्ण कृपा करा आणि ज्ञानविज्ञानाचा परिणाम मला समजावून सांगा."

श्रीरामाच्या बोलण्यानंतर वसिष्ठांनी त्याला हवे ते ज्ञान सांगायला आरंभ केला. "मनुष्यदेहात असताना देहभाव चित्तात न ठेवता, विदेहत्वाने परमार्थ गती लाभून त्यामुळे ब्रह्मप्राप्ती होते. खरे तर नरदेहाएवढे गोमटे - चांगले - त्रिलोक धुंडूनही मिळणार नाही. पण या देहासारखे वाईटही किंवा अत्यंत खोटेही दुसरे सापडणार नाही. वाईट म्हणून त्याग केला तर मोक्षसुख निसटून जाते आणि गोमटे म्हणून भोगले तर निश्चित अधःपात ठरलेला. हे भोगूही नये आणि त्यागूही नये, आत्मपुरुषार्थाच्या कौशल्याने भगवन्मार्गी लावावे, तरच परम सुखाची प्राप्ती होते. हे रघुनाथा, अशा युक्तीने पुरुषार्थ साधून परमार्थाची प्राप्ती करून घ्यावी. कारण, याला दुसरा उपाय नाही."

"नाना प्रकारचे मनोरथ असून त्यांना वासनासरिता (वासनांची नदी) असे नाव दिले जाते. या प्रवाहात कितीजण बुडाले त्याची गणतीच नाही. जे तरतात ते आपल्या पुरुषार्थाच्या बळावर तरतात. शुभ-अशुभ वासनांचा ओघ सबळ असल्याने असे अनेक त्यात वाहतात. त्यासाठी विवेकाने तो ओघ तोडून (धार तोडणे) परमार्थात चांगला पुरुषार्थ करावा. त्या तशा पुरुषार्थाचे लक्षण म्हणजे अशुभ वासनांचा त्याग करून, मन दृढपणे परमार्थात ठेवावे, हेच ते लक्षण होय. ज्याप्रमाणे बालकाला अभ्यासाला लावल्यावर हळूहळू त्याला योग्यता प्राप्त होते त्याप्रमाणे आत्मानुसंधान सावकाशपणे चित्ताला राखते. अनुसंधान सुटले की चित्ताला वळवून परमार्थाकडे ते लावावे. चित्तजयासाठी प्रयत्नपूर्वक असा पुरुषार्थ करावा. अगदी दात-ओठ जोराने खाऊन मनोजयाच्या मागे लागावे, तातडीने हात चोळून, चुरून मनोजयावर दृष्टी ठेवावी. आपणच आपल्याला आवरून संपूर्ण मनोजय करावा; हाच अत्यंत म्हणजे परिपूर्ण असा परमार्थाचा मार्ग आहे. अहोरात्र सावधानतेने चित्त चिन्मात्रावर केंद्रित करावे हेच परमार्थाचे सूत्र आहे. अति पवित्र अशा आत्मनिष्ठ रामा हे लक्षात घे. मनानेच मनाला सावधान करावे, मनानेच मनाचे निर्दाळण करावे, मनाने मनाशी अनुसंधान ठेवावे, याला पुरुषार्थ असे नाव आहे. अनेकांच्या विपत्ती अनभ्यासानेही शांत होतात; तशी ज्ञानस्थिती नाही. क्षणार्धात ती प्राप्ती प्रबळ होऊन वाढते."

वेद, शास्त्रे, पुराणे इत्यादी नाना प्रकारांनी नाना कौशल्ये प्रकट करतात. ती अनभ्यासाने क्षीण होतात. ज्ञानाचे लक्षण असे नसते. ज्ञान प्राप्त होण्याच्या वेळी अनभ्यासाने ते वाढते आणि जन्म-मरण क्षीण होते, तसे तसे ज्ञान प्रबळ होत जाते. साधक ज्ञान कमी करू पाहील तर त्यामुळे ते अधिकच होत जाते. अशी ज्ञानकलेची सोय असून ते सुलभतेने सुखरूप असते. ज्ञान सुलभतेने सुखप्राप्ती देते. असे असूनही साधक व्यर्थ शिणतात. त्याच्या चित्तात पश्चात्ताप नसतो. वैराग्य नसेल तर

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

ज्ञानाची प्राप्ती होत नाही. यासाठी आपण स्वतःचे महत्त्व सोडून, पूर्णपणे रंकाचे रंक होऊन, ज्ञानाचे अन्वेक्षण करावे. ज्याच्या पोटात भूक नाही तो पंचामृतही पायाने लोटतो; त्याप्रमाणे वैराग्य नसलेला करंटा शुद्ध ज्ञानाची भेट होताच शिणत नाही. हातात खापरी घेऊन, ज्ञानप्राप्तीसाठी चांडालांच्या दारोदार भीक मागणे अधिक श्रेयस्कर; परंतु मूर्ख शरीर त्याहूनही निंद्य. मूर्खत्वाने पूर्ण साम्राज्य मिळाले तरी ते निखळ दारुण दुःख होय. उलट जो द्रारिद्यात असून ज्ञान प्राप्त करतो तो ब्रह्मादी देवांनाही वंद्य ठरतो. ते आत्मज्ञान मिळविण्यासाठी विवेक, वैराग्य, आणि ज्ञान यांनी संपन्न असलेल्या सद्‌गुरूला शरण जावे. त्यामुळे मूर्खपण निघून जाते."

श्रीरामाने प्रश्न केला

"अहो आचार्य, अशी स्थिती असताना, जगज्जाळ माया वर्तत असताना कसे तरून जावे? हे गुरुवर्या, आत्मप्राप्तीसाठी काय उपाय आहे ते आपण सांगावे. श्रीगुरूंच्या उपदेशाने ब्रह्मप्राप्ती होते असे श्रुती-शास्त्रे गर्जून सांगत असतात तर त्या प्राप्तीसाठीची आत्मस्थिती मला कशी पावेल ते गुरुरायांनी निश्चितपणे सांगावे."

वसिष्ठांचे उत्तर

"गुरूपदेशाच्या गोष्टी म्हणजे काही ज्ञानाने भरलेली वाटी नव्हे की जी त्याने शिष्याच्या ओठाला लावली म्हणजे पाठोपाठ तो ब्रह्मज्ञान पावेल. गुरुपाशी ज्ञानाचा गोळा नसतो की जो शिष्याकडून तत्काळ गिळवावा. गुरूच्या रूपाने ज्ञानधनाचे गाठोडे नसते जे त्याने शिष्याजवळ द्यावे. गुरू आपण देतो आणि शिष्य ओंजळ भरून घेतो, तसे हे ब्रह्मज्ञान नसते. ज्ञानप्राप्तीचे कौशल्य अतर्क्य असते. रघुनाथा, उपदेशक्रम गुरू न बोलता सांगतात; शिष्य कानाशिवाय ऐकतो, तेव्हाच परमार्थाची प्राप्ती होते."

"जेव्हा सावध दृष्टीने पाहते तेव्हाच कासवीच्या पिलांना अमृतपान मिळते. तिची दृष्टी थोडीही चंचल झाली तरी त्या पिलाला लंघन पडते. त्याचप्रमाणे जेव्हा गुरुशिष्यांची एकात्मता होते तेव्हा शिष्याला परमार्थाचा लाभ होतो. शिष्याची भावना अणुमात्र जरी पालटली तरी तो उपदेशाबाबत रिकामा राहतो. गुरू गुह्यज्ञान सांगतो आणि शिष्य ते टाकून गुण, वर्ण यांतच रमतो. वर्ण - अवर्ण - देहाभिमान गेल्यावर मगच त्या शिष्याला स्वतःहून ज्ञानाचा लाभ होतो. सत्-चित्-आनंद यांची मूळ वार्ता गुरू शिष्याच्या स्वार्थासाठी सांगतो. शिष्य स्वार्थीपणा आणि चिंता सोडतो, तेव्हाच परमार्थ पावतो. शिष्याच्या मनात चिंता आणि देह-गृहाविषयी ममता असल्याने तो नेहमी गुरूपदेशात रिकामा राहतो. अशाला परमार्थप्राप्ती कधीच होत नाही. विषयस्वार्थ ज्याच्या पोटात असतो, तो वरवर आस्थेच्या दोनचार गोष्टी सांगतो. ही बुद्धी अती चोरटी असून परमार्थाची भेट होऊ देत नाही. यासाठी तत्काळ प्रबळ ब्रह्म पावावे म्हणून शिष्याची बुद्धीच एक अशी आहे की, जी परमार्थफळ मिळवून देते. शिष्याला जर चित्तशुद्धी नसेल, त्याला शास्त्रांमुळे आत्मबुद्धी नसेल, तो शास्त्र विकून विषयांची प्राप्ती करतो, परंतु शास्त्रांनी त्रिशुद्धीचे हित साधत नाही. शिष्याच्या चित्तात विषयासक्ती असेल तर त्याला गुरूपदेशाने परमार्थप्राप्ती होत नाही. तो उपदेश शेवटी वाया जातो आणि विपरीत ज्ञानगर्व तेवढा उरतो. उपदेश आपणहून व्यर्थ गेला की त्याबरोबरच ज्ञानगर्व घेऊन येतो. त्या ज्ञानगर्वाने ज्ञातेपणाचा गर्व चढतो. असा गर्विष्ठ मग श्रेष्ठांचे सांगणे ऐकत नाही. स्वतः केलेला उपदेश व्यर्थ झाला, तर त्याने अनर्थच वाढतो. चित्तशुद्धी खरी नसली तर तेथे परमार्थ कधीच घडत नाही. ज्याच्या ठायी चित्तशुद्धी असते तो पाषाणातही परमार्थ प्राप्त करतो. अशी ही चित्तशुद्धीची करणी कळून वनी, जनी जनार्दन दाखविते."

यावर श्रीरामाने प्रचंड ब्रह्मांडाचे आकलन

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

व्हावे यासाठी प्रश्न विचारला, "साधक-भावनेच्या पोटी दृश्यजाळामुळे ब्रह्मांडाच्या कोटी सहज नाहीशा होतात. एखाद्या राईच्या पोटी मेरू ज्याप्रमाणे मावत नाही तसेच हे आहे. ब्रह्मभावना सूक्ष्म आणि परिपूर्ण आहे. तिच्यामध्ये चराचर दिसते, जगडंबर कसे नष्ट होते, मशकाकडून (माशी) मोठा पर्वत गिळला जाईल कसा?" या प्रश्नांना वसिष्ठांनी अत्यंत सविस्तर उत्तर दिले. ते म्हणाले,

"साधुत्वाने साधूला पाहिले तर मुख्य साधुत्व सद्गुरूशीच असते. तो जे स्वात्मतत्त्व उपदेश करतो त्याला ज्ञाते लोक सच्छास्त्र म्हणतात. त्या गुरुवाक्याशी शिष्याची एकात्मता आणि सर्वात्मता झाली की दिवस, मास न लागता तो शिष्य तत्काळ योग्य परमार्थाला जाणतो. तत्काळ योग्यता येते ह्या म्हणण्यातला उशीरही त्याला सहन होत नाही. मूलतः हृदयात निजात्मता सिद्ध असल्याने गुरुवाक्य ऐकताच शिष्याच्या ठिकाणी नैराश्य निर्माण होते. जसे केवळ तंतू दृष्टीस पडला की वस्त्र लगेच दृष्टीआड जाते तसे सूक्ष्म ब्रह्मावर लक्ष केंद्रित झाले की, ब्रह्मांडाच्या कोटी नाहीशा होतात. जो मरतो, तो पुन्हा जन्माला येतो; पण जो जिवंतपणीच जीव शांत करून बसला, तो सत्संगाने सुखी झालेला आढळतो. सूक्ष्म दृष्टीने आणि सावधपणे पाहिले तर शून्याचे शून्यपण संपते, तेव्हा साधुसज्जनांच्या सत्संगामुळे तो पूर्ण ब्रह्म होतो. जसजसा नश्वर देह आहे - नाही असे वाटते, तसतसा तेथे सुखाचा उत्सव होऊन देह निःशेष नाहीसा होतो आणि सत्संगामुळे परमानंद लाभतो."

"दृश्य, द्रष्टा या दोहींत दर्शन निश्चित प्रकाशते. ते दर्शन ज्याला अनुभवता आले, त्याला अभंग ब्रह्मस्थिती मिळते. साखरेच्या कण्या वेगवेगळ्या असल्या तरी त्या कणिका स्वतः साखरच असतात. त्याप्रमाणे चराचर दृश्यमान असले तरी ते पूर्णत्व पावलेले ब्रह्मच असते. ज्याप्रमाणे लहान, मोठे अलंकार भिन्न दिसले तरी ते एकाच सोन्याचे असतात त्याप्रमाणे चराचर पाहताना सर्व वस्तू परात्पर परब्रह्म होते. जरी घटाकाश, मठाकाश असे म्हटले तरी पण ते सहजच महदाकाश असते. तसेच दृश्य, दर्शन आणि द्रष्टा असा आभास झाला तरी तो भास चिद्विलास असल्याचे चिन्मयत्वाने जाणवते. अशा स्वतःच्या आत्मदृष्टीने पाहिले म्हणजे विषयांचा विषय ब्रह्मरूप दिसतो. त्याचीच उपपत्ती तत्त्वतः सांगतो."

"शब्द, स्पर्श, रूप, रस आणि गंध असे पाच मुख्य विषय आहेत. आत्मज्ञानी त्यांची गोडी म्हणजे परमानंद असतो असे समजतात. या विषयांची गोडी म्हणजे पूर्ण ब्रह्मच आहे आणि त्या गोडीचे ज्ञातेपण हे चैतन्यघन समजावे, यांचा आनंद घेतच प्राणिमात्र जिवंत राहतात. विषयगोडी ही ब्रह्मस्फूर्ती असून भोगणारा स्वतःच्या चिच्छक्तीने ते भोगतो. त्याची जाणीव अशी की ते निश्चित परब्रह्मच आहे. हे रघुनाथा, ज्याला विषयांची गोडी समजते, त्यांच्या आस्वादाची जाण ज्याच्या हाती येते, तो तत्त्वतः स्वदेहातच ब्रह्म समजतो"

श्रीरामाचा प्रश्न

"अहो कुलगुरू, पूर्वीचे धीर, वीर, परमार्थी विनाशोक ब्रह्मप्राप्तीचे अधिकारी झाले. ती अशोकाची स्थिती माझ्या ठायी निश्चितपणे का प्रकटत नाही? आपण मला जो उपदेश कराल त्याने ज्ञानपदवी, धैर्याला धैर्याची जोडणी, अंगाने अंगाचा पराभव असा करा आणि मी सर्वार्थाने विनाशोक स्थिती मिळवीन असे पाहा. ब्रह्मज्ञानाच्या अनेक उपपत्ती सांगितल्यात, पण आता अशी युक्ती, की जिच्यामुळे मी तत्काळ ब्रह्मप्राप्ती करू शकेन, ती मला सांगा."

वसिष्ठांचे उत्तर

"हे रघुवीरा, तू चातकासारखा ऐकताक्षणी

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

ज्ञानाची प्राप्ती होत नाही. यासाठी आपण स्वतःचे महत्त्व सोडून, पूर्णपणे रंकाचे रंक होऊन, ज्ञानाचे अन्वेक्षण करावे. ज्याच्या पोटात भूक नाही तो पंचामृतही पायाने लोटतो; त्याप्रमाणे वैराग्य नसलेला करंटा शुद्ध ज्ञानाची भेट होताच शिणत नाही. हातात खापरी घेऊन, ज्ञानप्राप्तीसाठी चांडालांच्या दारोदार भीक मागणे अधिक श्रेयस्कर; परंतु मूर्ख शरीर त्याहूनही निंद्य. मूर्खत्वाने पूर्ण साम्राज्य मिळाले तरी ते निखळ दारुण दुःख होय. उलट जो द्रारिद्यात असून ज्ञान प्राप्त करतो तो ब्रह्मादी देवांनाही वंद्य ठरतो. ते आत्मज्ञान मिळविण्यासाठी विवेक, वैराग्य, आणि ज्ञान यांनी संपन्न असलेल्या सद्‌गुरूला शरण जावे. त्यामुळे मूर्खपण निघून जाते.''

श्रीरामाने प्रश्न केला

''अहो आचार्य, अशी स्थिती असताना, जगज्ञाळ माया वर्तत असताना कसे तरून जावे? हे गुरुवर्या, आत्मप्राप्तीसाठी काय उपाय आहे ते आपण सांगावे. श्रीगुरूंच्या उपदेशाने ब्रह्मप्राप्ती होते असे श्रुती-शास्त्रे गर्जून सांगत असतात तर त्या प्राप्तीसाठीची आत्मस्थिती मला कशी पावेल ते गुरुरायांनी निश्चितपणे सांगावे.''

वसिष्ठांचे उत्तर

''गुरूपदेशाच्या गोष्टी म्हणजे काही ज्ञानाने भरलेली वाटी नव्हे की जी त्याने शिष्याच्या ओठाला लावली म्हणजे पाठोपाठ तो ब्रह्मज्ञान पावेल. गुरुपाशी ज्ञानाचा गोळा नसतो की जो शिष्याकडून तत्काळ गिळवावा. गुरूच्या रूपाने ज्ञानधनाचे गाठोडे नसते जे त्याने शिष्याजवळ द्यावे. गुरू आपण देतो आणि शिष्य ओंजळ भरून घेतो, तसे हे ब्रह्मज्ञान नसते. ज्ञानप्राप्तीचे कौशल्य अतर्क्य असते. रघुनाथा, उपदेशक्रम गुरू न बोलता सांगतात; शिष्य कानाशिवाय ऐकतो, तेव्हाच परमार्थाची प्राप्ती होते.''

''जेव्हा सावध दृष्टीने पाहते तेव्हाच कासवीच्या पिलांना अमृतपान मिळते. तिची दृष्टी थोडीही चंचल झाली तरी त्या पिलाला लंघन पडते. त्याचप्रमाणे जेव्हा गुरुशिष्यांची एकात्मता होते तेव्हा शिष्याला परमार्थाचा लाभ होतो. शिष्याची भावना अणुमात्र जरी पालटली तरी तो उपदेशाबाबत रिकामा राहतो. गुरू गुह्यज्ञान सांगतो आणि शिष्य ते टाकून गुण, वर्ण यांतच रमतो. वर्ण - अवर्ण - देहाभिमान गेल्यावर मगच त्या शिष्याला स्वतःहून ज्ञानाचा लाभ होतो. सत्-चित्-आनंद यांची मूळ वार्ता गुरू शिष्याच्या स्वार्थासाठी सांगतो. शिष्य स्वार्थीपणा आणि चिंता सोडतो, तेव्हाच परमार्थ पावतो. शिष्याच्या मनात चिंता आणि देह-गृहाविषयी ममता असल्याने तो नेहमी गुरूपदेशात रिकामा राहतो. अशाला परमार्थप्राप्ती कधीच होत नाही. विषयस्वार्थ ज्याच्या पोटात असतो, तो वरवर आस्थेच्या दोनचार गोष्टी सांगतो. ही बुद्धी अती चोरटी असून परमार्थाची भेट होऊ देत नाही. यासाठी तत्काळ प्रबळ ब्रह्म पावावे म्हणून शिष्याची बुद्धीच एक अशी आहे की, जी परमार्थफळ मिळवून देते. शिष्याला जर चित्तशुद्धी नसेल, त्याला शास्त्रांमुळे आत्मबुद्धी नसेल, तो शास्त्र विकून विषयांची प्राप्ती करतो, परंतु शास्त्रांनी त्रिशुद्धीचे हित साधत नाही. शिष्याच्या चित्तात विषयासक्ती असेल तर त्याला गुरूपदेशाने परमार्थप्राप्ती होत नाही. तो उपदेश शेवटी वाया जातो आणि विपरीत ज्ञानगर्व तेवढा उरतो. उपदेश आपणहून व्यर्थ गेला की त्याबरोबरच ज्ञानगर्व घेऊन येतो. त्या ज्ञानगर्वाने ज्ञातेपणाचा गर्व चढतो. असा गर्विष्ठ मग श्रेष्ठांचे सांगणे ऐकत नाही. स्वतः केलेला उपदेश व्यर्थ झाला, तर त्याने अनर्थच वाढतो. चित्तशुद्धी खरी नसली तर तेथे परमार्थ कधीच घडत नाही. ज्याच्या ठायी चित्तशुद्धी असते तो पाषाणातही परमार्थ प्राप्त करतो. अशी ही चित्तशुद्धीची करणी कळून वनी, जनी जनार्दन दाखविते.''

यावर श्रीरामाने प्रचंड ब्रह्मांडाचे आकलन

https://archive.org/details/@sulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized By Sarayu Foundation Trust and eGangotri

व्हावे यासाठी प्रश्न विचारला, "साधक-भावनेच्या पोटी दृश्यजाळामुळे ब्रह्मांडाच्या कोटी सहज नाहीशा होतात. एखाद्या राईच्या पोटी मेरू ज्याप्रमाणे मावत नाही तसेच हे आहे. ब्रह्मभावना सूक्ष्म आणि परिपूर्ण आहे. तिच्यामध्ये चराचर दिसते, जगडंबर कसे नष्ट होते, मशकाकडून (माशी) मोठा पर्वत गिळला जाईल कसा?" या प्रश्नांना वसिष्ठांनी अत्यंत सविस्तर उत्तर दिले. ते म्हणाले,

"साधुत्वाने साधूला पाहिले तर मुख्य साधुत्व सद्‌गुरूशीच असते. तो जे स्वात्मतत्त्व उपदेश करतो त्याला ज्ञाते लोक सच्छास्त्र म्हणतात. त्या गुरुवाक्याशी शिष्याची एकात्मता आणि सर्वात्मता झाली की दिवस, मास न लागता तो शिष्य तत्काळ योग्य परमार्थाला जाणतो. तत्काळ योग्यता येते ह्या म्हणण्यातला उशीरही त्याला सहन होत नाही. मूलतः हृदयात निजात्मता सिद्ध असल्याने गुरुवाक्य ऐकताच शिष्याच्या ठिकाणी नैराश्य निर्माण होते. जसे केवळ तंतू दृष्टीस पडला की वस्त्र लगेच दृष्टीआड जाते तसे सूक्ष्म ब्रह्मावर लक्ष केंद्रित झाले की, ब्रह्मांडाच्या कोटी नाहीशा होतात. जो मरतो, तो पुन्हा जन्माला येतो; पण जो जिवंतपणीच जीव शांत करून बसला, तो सत्संगाने सुखी झालेला आढळतो. सूक्ष्म दृष्टीने आणि सावधपणे पाहिले तर शून्याचे शून्यपण संपते, तेव्हा साधुसज्जनांच्या सत्संगामुळे तो पूर्ण ब्रह्म होतो. जसजसा नश्वर देह आहे - नाही असे वाटते, तसतसा तेथे सुखाचा उत्सव होऊन देह निःशेष नाहीसा होतो आणि सत्संगामुळे परमानंद लाभतो."

"दृश्य, द्रष्टा या दोहींत दर्शन निश्चित प्रकाशते. ते दर्शन ज्याला अनुभवता आले, त्याला अभंग ब्रह्मस्थिती मिळते. साखरेच्या कण्या वेगवेगळ्या असल्या तरी त्या कणिका स्वतः साखरच असतात. त्याप्रमाणे चराचर दृश्यमान असले तरी ते पूर्णत्व पावलेले ब्रह्मच असते. ज्याप्रमाणे लहान, मोठे अलंकार भिन्न दिसले तरी ते एकाच सोन्याचे असतात त्याप्रमाणे चराचर पाहताना सर्व वस्तू परात्पर परब्रह्म होते. जरी घटाकाश, मठाकाश असे म्हटले तरी पण ते सहजच महदाकाश असते. तसेच दृश्य, दर्शन आणि द्रष्टा असा आभास झाला तरी तो भास चिद्विलास असल्याचे चिन्मयत्वाने जाणवते. अशा स्वतःच्या आत्मदृष्टीने पाहिले म्हणजे विषयांचा विषय ब्रह्मरूप दिसतो. त्याचीच उपपत्ती तत्त्वतः सांगतो."

"शब्द, स्पर्श, रूप, रस आणि गंध असे पाच मुख्य विषय आहेत. आत्मज्ञानी त्यांची गोडी म्हणजे परमानंद असतो असे समजतात. या विषयांची गोडी म्हणजे पूर्ण ब्रह्मच आहे आणि त्या गोडीचे ज्ञातेपण हे चैतन्यघन समजावे, यांचा आनंद घेतच प्राणिमात्र जिवंत राहतात. विषयगोडी ही ब्रह्मस्फूर्ती असून भोगणारा स्वतःच्या चिच्छक्तीने ते भोगतो. त्याची जाणीव अशी की ते निश्चित परब्रह्मच आहे. हे रघुनाथा, ज्याला विषयांची गोडी समजते, त्यांच्या आस्वादाची जाण ज्याच्या हाती येते, तो तत्त्वतः स्वदेहातच ब्रह्म समजतो"

श्रीरामाचा प्रश्न

"अहो कुलगुरू, पूर्वीचे धीर, वीर, परमार्थी विनाशोक ब्रह्मप्राप्तीचे अधिकारी झाले. ती अशोकाची स्थिती माझ्या ठायी निश्चितपणे का प्रकटत नाही? आपण मला जो उपदेश कराल त्याने ज्ञानपदवी, धैर्याला धैर्याची जोडणी, अंगाने अंगाचा पराभव असा करा आणि मी सर्वार्थाने विनाशोक स्थिती मिळवीन असे पाहा. ब्रह्मज्ञानाच्या अनेक उपपत्ती सांगितल्यात, पण आता अशी युक्ती, की जिच्यामुळे मी तत्काळ ब्रह्मप्राप्ती करू शकेन, ती मला सांगा."

वसिष्ठांचे उत्तर

"हे रघुवीरा, तू चातकासारखा ऐकताक्षणी

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized By Sarayu Foundation Trust and eGangotri

तात्पर्य जाणशील अशा विश्वासाने मी तुला ज्ञानाचे सारसर्वस्व सांगतो. ज्ञानकथा सगळेच ऐकतात परंतु ऐकल्याप्रमाणे वागत मात्र नाहीत. त्यामुळे ऐकलेल्याची माती होते. अशांना परमार्थप्राप्ती कशी होणार! ज्ञानाने परिपूर्ण भरलेले, ज्ञानगौरव सांगणारे भाषण परमपवित्र असले तरी ते लक्ष न देता ऐकले तर त्यामुळे श्रवणाची तृप्ती मिळत नाही. मग ते चित्तात कसे पोहोचणार? त्यांच्या मनाची वस्ती नेहमी ओसाडच राहणार. अशी ही आत्मकथा ऐकूनही न ऐकल्यासारखी करतात त्यांना कल्पांतीही परमार्थप्राप्ती होत नाही. तेव्हा श्रीरामा सावधानतेने ऐक. इथे भोगांची इच्छा हेच मुख्य बंधन आहे. त्यांचा त्याग करणारा पूर्ण ज्ञानी ठरतो आणि त्याला सहजच मुक्तपण येते. भोगेच्छेचा त्याग अत्यंत कठीण असतो. जो कोणी त्याग करतो, त्याच्या त्यागाचे लक्षण ही निर्वाणीची खूण मी सांगतो. तू ती ग्रहण कर."

"मनानेच मनाला आवरावे, निग्रह करावा, धरावे, मारावे. मनाचा असा निग्रह करावा की आशेचा समूळ नाश होईल; देहावर चैतन्याचा ठसा उमटेल आणि त्यामुळे आपोआपच प्रपंच परब्रह्म होतो. अशा अनेक सूक्ष्म युक्त्या आहेत, ज्यामुळे परब्रह्माची लगेच प्राप्ती होते. खरे म्हणजे आपण स्वतःच परब्रह्म आहोत, त्यामुळे प्राप्ती किंवा अप्राप्ती असा भेदभाव ही केवळ कल्पना आहे. हृदयात ब्रह्मस्थिती स्वयंभू असते, इंद्रियवृत्ती ही ब्रह्मप्रभा असते. कोणी अभावाने ब्रह्म नाही म्हणतात, तर कोणी सद्भावाने परब्रह्मच होतात. हे रघुपती, या सद्भावाची उपपत्ती सांगतो, ती ऐक. समाधानवृत्ती दृढ धरावी, तीच अभंग ब्रह्मस्थिती मिळवून देते. जिथे कामक्रोधांविषयी लोभ असतो. तेथे ब्रह्मशांतता असत नाही. ती शांतता स्वभावतः ब्रह्मामुळे देहात सबाह्य पूर्णत्वाने असते. ज्याला आपण 'मी' म्हणतो ते मीपणच देहात चैतन्य आणते, इंद्रिये कर्म करतात; ते आचरण पूर्ण परब्रह्मामुळेच होते. काया, वाचा, मन यांनी केलेले आचरण ते पूर्ण ब्रह्मच करते. ही खूण ज्याला समजली, तो तत्काळ परब्रह्म होतो. तो 'झाला' म्हणणे हेही लज्जास्पद आहे कारण तो स्वतः ब्रह्मरूपाने भरलेलाच असतो. आपण ज्ञानाविषयी अज्ञानी असल्यामुळे 'झाला किंवा न झाला' असे म्हणतो. यासाठी रघुनाथा, स्वतःसिद्ध ब्रह्मरूपता, स्वतःच आपल्याकडून हाती येते हे ध्यानात ठेव. इंद्रियांचे कर्माचरण, सर्व देहात समसमान असते. तो कर्मयोगी हा सावधान राहून, ब्रह्माशी अनुसंधान राखून असतो. योगी हेही स्वधर्मकर्म करतात, त्या कर्मातच त्यांना ब्रह्मानुभवाचे स्फुरण मिळते. तीच परमात्म्याची आत्मभक्ती सावधपणे केली तर नित्य मुक्ती लाभते. योगी हे जागेपणी सावधचित्त असतात. चित्सावधानपणाने स्वप्ने पाहतात. सुषुप्तीच्या सुखात समाधान पावून नेहमी चिद्रूप पूर्णत्वाने भोगतात. अशा तीनही अवस्थांत सावधान राहणे हेच परमात्मा जो भगवंत त्याचे भजन, पूजन असून, तेच जीवशिवांचे समाधान आहे. सद्भावाने सदाचार करताना निरंतर सावधान असेल त्याला चराचर ब्रह्मरूप आणि विषय चिद्रूप होतात."

सर्व ब्रह्म आहे असा उपदेश

"जे जे दिसते ते दृश्य दर्शन, जी जी विषयभोगाची स्थाने, ते ते सर्व निर्मळ ब्रह्मच आहे. अंतर्बाह्य असे ते पूर्ण परब्रह्मच असते. आता तुला काय एकेक सांगू की ज्यामुळे त्रिजगतात ब्रह्मच आहे हे तुझ्या मनात ठसेल. रघुनाथा तीही उपपत्ती ऐक. दृश्य, द्रष्टा, दर्शन, चौदा भुवने, भूतपरंपरा हे सारे ब्रह्मरूपच आहे. 'मी' म्हणताना असणारे 'मीपण' हे ब्रह्मत्वच आहे. मित्र, पुत्र, शत्रू हे ब्रह्मरूप असूनही तसे भासतात. चिन्मात्र असतात. ते सद्रूपाने सगळे सुहृदच असतात. शत्रू, मित्र, सखे, वंधू यांना भिन्नत्व देणे म्हणजे ब्रह्मात अपवाद करणे होय. ब्रह्म हे स्वानंदकंद, परिपूर्ण परमानंद आहे. ब्रह्माने प्रपंच केला नाही, ऐकला नाही, स्पर्शला नाही; तो केवळ आपल्या भावनेला

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

भ्रांतीने भासला. भ्रांत मनुष्याला जग दुःखानुभव देते, ज्ञानी माणसाला जग विश्वमूर्ती भासते. जसे आंधळ्याला सर्वत्र गडद काळोखच असतो आणि डोळसाला स्वप्रकाशामुळे प्रकाश दिसतो. यासाठी ज्यांना परमार्थबुद्धी असते ते भेदाचा व्यवहार तोडतात. भेद तोडण्यासाठी त्रिशुद्धी आणि सर्वत्र भगवद्‌बुद्धी हवी. ज्यांना सर्वांभूती ब्रह्मभाव असतो ते स्वतःच परब्रह्म होतात. भावनेने जी भ्रांती येते ती तोडली की ते पूर्वीच ब्रह्मरूप होते हे समजते. जो अमृतपान करतो तो अमर होतो; तसेच जो सर्वांभूती भगवद्‌स्वरूप मानतो तो स्वतःच पूर्ण परब्रह्म होतो. श्रीरामा, जगाची स्थिती म्हणजे एक परब्रह्म तरी किंवा भ्रांती तरी; याशिवाय तिसरी स्थिती नाही हे निश्चित समज. आपल्याला नाना प्रकारे जगाचा अनुभव येतो हीच मुख्यतः निव्वळ भ्रांती आहे. त्या भ्रांतीची विविधता आता तुला मी सांगतो.''

अहंभावना भ्रांतीचे मूळ

वसिष्ठ म्हणाले, ''श्रीरामा अरे, 'अहम् आत्मा' असे जे 'मीपण', तेच भ्रमाचे मूळ कारण आहे. 'तू' म्हणणे हाही मोठा भ्रमच आहे. कारण 'मी-तूपण' हेच समूळ भ्रमलक्षण आहे. देव आणि भक्त हे दोन्ही भिन्न आहेत अशा जाणिवेने उपासना करणे ही भ्रांतीच आहे; कारण ब्रह्म हे अखंड पूर्णस्थितीत असते. त्यामुळे सज्ञानांना हे भेद अतर्क्य वाटतात. दोरीतून सर्प जन्मत नसतो, तो भ्रांतीमुळे उपजत असतो. तसेच ब्रह्मामध्ये जग नसते, ते जग म्हणजे भ्रममूळ भास आहे. जग पाहाणे मोठा भ्रम आणि जग न पाहणे ते परब्रह्म. हे मूळ गुह्य वर्म जाणून घे. तू स्वतः पुरुषोत्तम परमात्माच आहेस. हे मी सांगितले तरी तुझा महिमा तूच जाण. तुझ्या स्वरूपाला सीमा नाही. हे रघुनाथा, तू अपार आणि जाणण्यास अशक्य आहेस. तू आत्मभावे परिपूर्ण आत्मा, तू कर्माकर्म विहीन, तुला स्थान, मान नाही, हेच तुझे आत्मलक्षण आहे. तुझ्या स्वरूपाच्या ठिकाणी आकाश कोनाकोनात लुप्त होते. डोळ्यांनी पाहून ते दिसत नाही. खोटेपणाने ते नाहीसे झालेले असते. शुद्धभावाने स्वरूप पाहिले, तर त्याचे सत्त्व शोधताना ते महत्त्वाने स्वतःमधेच सामावलेले आढळते. मायेचे सत्त्व असत्त्वाला आले होते हे कळते. एका राईच्या कोट्यवधी अंशाप्रमाणे वस्तू सावकाश नांदतात. अणूमध्ये सुखस्वरूप स्थितीत वस्तू सावकाश विश्रांती घेतात. सूक्ष्माहून सूक्ष्म असे जे नित्य आणि अविनाशी नित्यत्वाचे सार तेच तुझे खरे स्वरूप आहे. जीवशिवत्वाने विचार करता ते अव्ययात विरते.''

''रामा, वस्तूला माता-पिता नसतात, यामुळे जन्मकथाही नसते. जन्माशिवाय मरणवार्ता आत्मत्वात असत नाही. अशा रीतीने जन्ममरणातीत सदोदित अपार जे सुख त्याचे नावच स्वरूप असते, हे जाण. वेद, वेदांग, पुराणे, शास्त्रे, विज्ञान, इतिहास या सर्वांचे गुह्य ज्ञान तेच या निरूपणात आहे. सर्व साराचे मुख्य सार, सत्य इतिहास असे हे सर्व ज्ञानाचे ज्ञानभांडार मुक्तपणे उदार असते. हे निरूपण जिवामधे ठसेल तेव्हा विषयांचे कर्ज फिटते आणि जन्ममरणाचा करार फाटतो, तसेच मृगजळाप्रमाणे असलेले भवभय नष्ट होते. या इतिहासाचे आत्मवर्म हेच की कर्मच परब्रह्म होय. जर आत्माराम साधक होईल तर परम आत्ममुक्ती नित्य जोडली जाईल. मी जे निरूपण केले ते जीवन्मुक्ताचे लक्षण आहे. तू तर स्वतःच आत्माराम, पूर्णत्वाने परिपूर्ण परमात्मा आहेस.''

श्रीरामाला पूर्णानन्द अवस्था येते

श्रीवसिष्ठांचे निरूपण ऐकून श्रीरामाला स्वतःला पूर्णपण आणि स्वानंदघन असे स्वरूप जाणवले; स्वरूपात स्वतःला पाहताच जीवशिवांना, चित्तचैतन्याला एकता लाभली यामुळे रामाचा कंठ आनंदाने भरून आला. तो आनंद त्याच्या पोटात मावेनासा झाला. हृदयात न मावणारा आनंद डोळ्यांवाटे बाहेर येऊ लागला, आश्चर्याने पूर्ण

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

झाल्याने देहाचे विस्मरण झाले. प्राण तिथल्या तिथे अडकला, कंठ सद्‌गतित झाला, इंद्रिये सर्वप्रकारे स्थिर झाली, आणि तो राम चिद्रूपाने निर्मिलेल्या तटस्थतेत गेला. त्या स्थितीत सर्वांगावर रोमांच आणि घामाचे बिंदू दाटले, रामाला आत्मसत्त्वामुळे मुक्तीरूप मोत्यांच्या जाळीचे पांघरूण घातले गेले. त्याला मी तूपणाचा विसर पडला, त्याच्या वाणीला मौन पडले, जीवशिवांचे भान संपले, चित्त समाधान पावले. श्रीराम चैतन्यघन होऊन, स्वस्वरूपात निमग्न झाला.

श्रीराम तटस्थ झाला हे पाहून विश्वामित्र कासावीस झाले. त्यांनी वसिष्ठांना कळकळीने आपल्या नियोजित कार्याविषयी कळवळून विनंती करून श्रीरामाची समाधी उतरविण्याबद्दल सांगितले.

विश्वामित्रांची वसिष्ठांना विनंती

"अहो वसिष्ठ, स्वामी, आपण ब्रह्मपुत्र आहात. आपल्या गुरुपणाचे चरित्र हे अती विचित्र आणि अनुपम असून, आपण अती पवित्र ब्रह्मप्राप्ती करून देता. आपल्या गुरुपणाचे वर्म हेच आहे की देहादि इंद्रियकर्मांचे मिथ्यात्व समजून घेतल्यामुळे आपला शिष्य पूर्ण ब्रह्म होतो. त्यानुसारच श्रीराम परमश्रेष्ठ समाधीत गेला आहे. विशेष श्रम न करता तुम्ही या शिष्योत्तमाला शक्तिपाताने ही स्थिती दिलीत; खरोखर हा आपल्या गुरुत्वाचा गौरव असून, आपली अगाध कीर्ती तिन्ही लोकी पोहोचली आहे. शिष्याच्या सर्व वृत्ती आपल्या उपदेशाने ब्रह्मस्थितीला पोहोचतात; शिष्याला ही ब्रह्मस्थिती प्राप्त होते याचे नाव निश्चितपणे शक्तिपात हेच आहे. गुरुवाक्यानेच हा शक्तिपात होतो आणि क्षणात त्या शिष्याला ही स्थिती प्राप्त होते अशी कीर्ती आहे. उपदेशाने संशयाचे निर्दाळण, शब्दार्थ आपण निःशब्दाने बोध करता, आपल्या हाताचा शिष्याच्या मस्तकाला स्पर्श करून त्याला परमार्थाचे सुख मिळवून देता. दर्शन, स्पर्शन दूर राहिले केवळ आपल्या कृपावलोकनाने शिष्याला चैतन्यघनाचे आणि चित्सुखाचे समाधान मिळते. शिष्य चित्सुखाने संपन्न होतो, हे आपल्या कृपेच्या अधिष्ठानामुळेच. आपल्या पूर्ण कृपेने श्रीराम ब्रह्मसमाधानी झाला आहे. श्रीराम पूर्ण समाधीअवस्थेत गेला; पण त्यामुळे कर्माचरण, कर्तव्ये ही बंद झाली आहेत. हे वसिष्ठा, पुढील अवतारकार्याचा विचार आणि कृती ही व्यर्थ होऊ देऊ नका. हे वसिष्ठा, स्वामी, आमच्यावर कृपा करा आणि श्रीराम देहावर येईल अशी युक्ती स्वसत्तेने चालवा. सर्व इंद्रियांना नित्य उद्‌बोध आणि कर्मकर्तव्याची सावधानता येऊन माझा यज्ञ सिद्धीला जावा असा श्रीरामाला उपदेश करा. आपण समाधी आणि उत्थान या दोन्ही अवस्थांचे ज्ञान जाणता. शिष्यांना समाधान देऊन त्याबरोबर त्यांचे प्रबोधनही करता."

"रघुनाथ, हा देवकार्य करण्यासाठी अवतार घेऊन आला आहे. त्याला आपण समाधिस्थ केला, त्यामुळे तो देहव्यापारात तटस्थ होऊन बसला आहे. श्रीराम जर तटस्थ झाला तर अवतारकार्य थांबणार आणि माझेही यज्ञसिद्धीचे कार्य तिथेच राहणार. तेव्हा हे वसिष्ठा, माझ्या कार्याचे स्मरण ठेवा, ज्यासाठी मी येऊन दशरथाची प्रार्थना केली ते आठवा. आपणच स्वतः दशरथाला विनंती करून, मला यज्ञरक्षणासाठी राम आणि लक्ष्मण द्यावेत असे सांगितलेत. ते आपले वचन खोटे होईल, देवकार्यही राहून जाईल, यासाठी आपण श्रीरघुनाथाला कृतकार्यासाठी प्रबोधन करावे. भविष्याचे भाष्य वाल्मीकी ऋषींनी केले आणि शतकोटी रामायण रचले. ते त्यांचे वचन मिथ्या न व्हावे यासाठी रामाला प्रबोध करा."

श्रीरामाच्या चरित्राचे माहात्म्य

"अत्यंत पवित्र अशा वाल्मीकींच्या मुखातून भविष्यावरचे भाष्य श्रीरामाच्या चरित्राने व्यक्त झाले. त्या विचित्र चरित्राची महती ऐका. ताटका ही अति विक्राळ, क्रूर आणि रानटी म्हणून रामाने मारली. त्यामुळे जनवन निष्कंटक झाले. सिद्धाश्रमात

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

लोक सुखाने बसू लागले. त्याच सिद्धाश्रमात माझे ठिकाण आहे. तेथे रघुनंदन आणला. त्याने राक्षसांचा संहार करून संपूर्ण जय मिळविला. अहल्योद्धार, शिवधनुष्य-भंग, जानकीचे पाणिग्रहण (विवाह), तसेच जनकाच्या घरी चौघा बंधूंचे स्वानंदमय विवाह होतील. जमदग्नीपुत्र परशुराम आणि श्रीराम युद्ध करून सुख मिळवतील. परशुरामाला शांती देणारा श्रीराम असेल. नंतर श्रीरामाचे वनात जाणे, दंडकारण्याला पावन तीर्थाची पूर्णता देणे, त्या श्रीरामाचे चरण शिवालाही वंद्य ठरतील. समुद्रात शिला आपोआप तरतील, बिभीषणाला लंकेची प्राप्ती होईल. श्रीरामाची कीर्ती त्रिजगतात पोहोचून सर्व उद्धरतील. सीताशुद्धीच्या निमित्ताने राक्षसकुळांचा नाश होईल. काळिकाळही रामाला वंदन करील. असे ते थोर चरित्र, हे वसिष्ठा, आपण पूर्ण करा.''

''ज्यांनी आदराने श्रीरामचरित्र ऐकले, जे अहर्निश रामाला स्मरतात, त्यांना सायास (कष्ट) न करता मुक्ती मिळते. जो सार्थपणे रामस्मरण करतो आणि जो सार्थपणे नित्य स्वतः ऐकतो, ते इंद्रियाचरण करूनही जीवन्मुक्त होतात. ज्यांच्या मुखात सतत रामनाम असते, जे नेहमी रामनाम जपतात, त्या इंद्रियार्थात रमणाऱ्यांनाही सदेह नित्य मुक्ती मिळते. ज्या कोणाला जागृतीत, स्वप्नात आणि सुषुप्तीत नित्य मुक्ती हवी ते सदा रामनामाचा जप करतात. तेथे स्वतः श्रीराम स्वानंदात क्रीडा करतो. अशी या त्रैलोक्याची गती आणि स्थिती असून, श्रीरामचरित्रानेच ते तरतात. हे कृपामूर्ती वसिष्ठा, माझे कार्य श्रीरामाकडून होणार आहे. श्रीराम हा पुरुषोत्तम, परम श्रेष्ठांतला श्रेष्ठ, पूर्ण ब्रह्म असून, तो नित्य निष्कर्मसिद्धी करून देतो. अशा त्या श्रीरामाची स्थिती गती सांप्रत आपल्या हाती आहे. आमच्यावर कृपा करून श्रीराममूर्तीचा प्रबोध करा. श्रीराम जरी नेहमी दैवहीन, तरी त्याला दैन्य नाही. जगाच्या भाग्यासाठी आपण श्रीरामाचे प्रबोधन करावे. दैवाशिवाय भाग्यवंत असा जगात केवळ रामच आहे, त्याला वृत्ती देऊन आपण त्याच्या चरित्राचा अर्थ संपादन करू या. सर्व जगात पूर्ण विजयी आणि जगताचे जीवन असा रघुनंदन त्याला मी माझे मन अर्पण केले आहे. हे वसिष्ठा, आमच्यावर कृपा करण्यासाठी, अवतारकार्यासाठी तो रघुनंदन व्यवहाराला प्रवृत्त होईल असा त्याला उपदेश करा.'' अशाप्रकारे तटस्थ श्रीरामाला कार्यप्रवण करण्याची विनंती विश्वामित्रांनी वसिष्ठांना केली.

वसिष्ठ रामाला समाधिविषयी सांगतात

श्रीवसिष्ठ म्हणाले, ''हे रघुनाथा, तुला कसली समाधी! तू तर काळाला जिंकणारा, स्वरूपाने चिदानंद आहेस. हे आजानुबाहू, महाभुज, रामा, हा काळ तुझा समाधीचा नाही. तू त्रैलोक्याचा अधिराजा, तेव्हा देव आणि प्रजा यांना सुखी कर. तू साधुसंत, आपले भक्त आणि सर्व लोक यांना अवतारचरित्राच्या क्रमाने सुखी कर. निष्कर्म राहणे हे जीवसमाधीचे लक्षण अपरिपक्वतेचेही लक्षण आहे. तर आता पक्वतेचे लक्षण ऐक. सर्व भूतमात्रांचे गुणावगुण आणि जगाचे दोष दिसणे आणि ते दिसूनही आपले ब्रह्मपण न मोडणे हे पूर्ण समाधीचे पूर्णत्व आहे. भूतमात्रांचे विरोधी कर्माचरण दिसले तरी ते चैतन्यघन मानणे याचेच नाव शुद्ध समाधान आणि तीच संपूर्ण समाधी होय. असे समाधान न होता केवळ जे तटस्थपण येते ते मुक्तावस्थेचे लक्षण असते, ती संपूर्ण समाधी नसते. ज्याच्या दृष्टीने भूतांचे सर्व मळ निर्मळ होतात तेव्हाच तो समाधीसुखाचे कल्लोळ अनुभवतो, इतर सगळे भूतादिभाव असतात.''

श्रीवसिष्ठांनी यावर मनातली एक शंका बोलून दाखविताना विचारले, ''अरे, हा संसार तूच मिथ्याभूत करून दिलास असे म्हणतात; मग इथे कुठला देव आणि कसला भक्त आणि अवतार चरित्र तरी कशाचे? जेथे मी-तूपण नाही, तिथे

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

कर्मक्रियेचे आचरण नसते; मूलतः सर्व लौकिक ते नाहीच म्हटले तर लोकसंरक्षण ते तरी कशाचे? हे रघुनाथ, असेही ऐकून ठेव की ब्रह्मावतारीची आत्मसत्ता, सामान्य जीवांना यथार्थ मुक्ती मिळाली, तरी त्यांच्या हाती येत नाही. त्रिगुणांच्या एकत्रीकरणाने जीवपण, त्या भ्रमाने मीपण आणि मग ब्रह्म ते काय-कसले? अशांचा तुझ्याकडून उद्धार होतो. सामर्थ्य आणि पूर्णता हे अवताराचे मोठेपण जपणे आणि प्रपंच-परमार्थात सतत सावधानता असणे या दोहोंमधील कमीपणा न दाखवता कसे असावे ते तुला आता सांगतो."

अंतर आणि बाह्य स्थितीचे निरूपण

श्रीवसिष्ठ म्हणाले, "आपल्या अंतरात अद्वैत आत्मा आहे, त्या एकामुळे सर्व लोक खोटे आहेत हे जाणून, बाह्य कर्म विधिपूर्वक, वेदोक्तीप्रमाणे करून, तू लौकिक संपादन कर. अंतरात केवळ शुद्धबुद्ध आणि बाह्यतः विषयबद्ध दिसणारा, जडत्वाने मुग्ध भासणारा, शुद्ध विषयार्थी दिसणारा, असा हो. बाह्येंद्रियांचे विषयभोग भोगण्यात मग्न असून, अंतरातून संपूर्ण विषयत्यागी असले, तर आपल्याला विषयांचा स्पर्शही होत नाही. बाह्यतः लोभीपणाने काही इच्छा दाखविली तरी अंतरात विरक्ती असली म्हणजे एखाद्या पिशवीमध्ये आकाश - पोकळी - फुगले असा भास व्हावा तसे होते. अंतरात निर्मळ निरपेक्षता असेल तर बाह्यात्कारी दाखविलेली नाना प्रकारची तळमळ परिणामकारक नसते. आपल्या लाघवीपणाने लोकांना जरी फसवणे झाले तरी त्यात मुक्ताची कळकळ असते. अंतरीचे कामक्रोधादि विकार संपले, शांतीचे कल्याणस्वरूप प्रकटले म्हणजे बाह्यतः क्रोधाग्नी खवळला तरी तो प्रकार मृगजळात मासेमारी करण्यासारखा भ्रामक ठरतो. बाह्यतः कार्यकारणभावाने वाघासारखी गुरगुर केली तरी अंतरातून लोण्यासारखा मऊ असून तो कोणालाही जाचक नसतो. एखादी माशी कुंभाराच्या फिरत्या चाकावर बसली म्हणजे ती फिरल्यासारखी दिसते, पण तत्त्वतः ती हलत नसून स्थिर असते; त्याप्रमाणे बाह्यात्कारी कार्य करणारा भासला तरी अंतरदृष्ट्या तो आत्मस्थितीतला अकर्ता असतो. प्रपंच आणि परमार्थ या दोहीमध्ये सावधस्थिती असणे हीच अवताराची अवतारशक्ती आहे आणि हे रघुनाथा, ती शक्ती तुझ्या ठिकाणी आहे. अशी स्थिती असल्यामुळे तू स्वतःच्या आत्मचरित्रानुसार स्वानंदाने संसारात राहून, लोकाचारात आनंदाने सहभागी व्हावेस."

श्रीवसिष्ठांनी पुढे सांगितले, "श्रीरामा, ज्याप्रमाणे बुद्धिबळाच्या खेळातले राजा, प्रधान, हत्ती, घोडे खोटेच आहेत हे जाणून कौतुकाने खेळ खेळला जातो, त्याप्रमाणे मुक्त प्रपंचाबद्दल भावना ठेवून वागतो. सोंगट्यांना जीवभाव नाही हे जाणूनही लोक 'मारली' म्हणतात, त्याप्रमाणे मुक्त देहीच विदेही असून त्याला मरणाचे भय नसते. सोंगटी मेल्यानंतर कोण धर्मात्मा वैकुंठाला किंवा कोण जीव नरकाच्या संकटात पडतो? त्यानुसार आत्मदृष्टीने पाहणाराला प्रपंच मिथ्याच वाटतो. अशी स्थिती असल्यामुळे तूही सुखाने संसारात राहून स्वानंदपूर्ण व्यवहार कर. याविषयी कोणतेही भय बाळगू नकोस. राजा, प्रधान, पशू, सेवक हे सर्व लाकडाचे असूनही लोक बुद्धिबळाच्या खेळाचे कौतुक करतात; तसा मुक्त हा संसाराबाबत विचार करतो. अशी ही योगाची वृत्ती असल्याने हे रघुनाथा, रघुपती तूही सुखाने संसारामध्ये आपल्या स्वानंदस्थितीत राहून व्यवहार ठेव."

श्रीरामाच्या समाधिविसर्जनाचा प्रसंग.

श्रीवसिष्ठांनी सांगितले, "हे रामा, मायेने (जादूने) निर्माण झालेले आंब्याचे फळ, आणि त्यातला गोड रस हे सर्व खोटेच असते, त्याप्रमाणे सर्व लौकिक व्यवहार हा खोटाच आहे हे समजून, विकारशून्य होऊन लोकसंरक्षण कर. एखाद्या बहुरूप्याने राजा-राणी यांची संपादणी केली तरी ती मुळात तशी नसतात, त्याप्रमाणे तू श्रीरामा

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

राजा आणि राजेपण यांच्या अनुषंगाने वेदोक्ताप्रमाणे मर्यादा रक्षण कर. तुलाही तुझी अवतारवृत्ती आहे की संसारात सुखाने असावे आणि पुराणोक्त धर्ममर्यादिने स्वानंदस्थितीत वागावे. नवग्रहांची बेडी तोडून, देवांचे बंधन सोडवून, रामराज्याची गुढी-ध्वजा-उभारावी अशी त्रिलोकात स्पष्ट जाणीव असून तुलाही तशी स्पष्ट आज्ञा आहे. तेव्हा समाधीची भ्रांत सोड, धनुष्यबाण हाती घे आणि रामनामाची त्रिजगताचा उद्धार करणारे अशी कीर्ती कर." वसिष्ठांची ही सूचना ऐकून श्रीराम परमानंदात तल्लीन झाला. त्याचे प्रबोधन झाले नाही आणि त्याला आपले कार्य-कार्यार्थ आठवेनात. ही त्याची अवस्था जाणून वसिष्ठांनी रामाच्या सुषुम्ना नाडीत प्रवेश केला आणि त्याचे प्रबोधन केले. श्रीवसिष्ठ हे स्वतः चैतन्यरूप होते. त्यांनी चेतना पूर्ण चेतविली. चेतनेने प्राण चेतवला. हृदयी सावधानता आणली. या प्राण प्रवेशाने सोळा प्रकारे सर्व नाड्या चेतविल्या जाऊन श्रीरामाने हळूहळू डोळ्याची पापणी उघडायला आरंभ केला. त्याचे डोळे अर्धवट उघडले गेले, कानात शब्दांनी घर केले, शरीर सावध झाले, परंतु त्यात जीवपण नव्हते. श्रीरामाच्या स्वतःच्या देहात जीव नव्हता कारण तो देही असून विदेही होता. तो चैतन्यविग्रही होता. जीवशिवपणाला स्पर्श न करता तो रघुनंदन सावध झाला होता. त्याला वसिष्ठांनी पूर्ण बोध करून, डोळे उघडायला लावले, ते पाहून विश्वामित्र आणि देव संतुष्ट झाले. श्रीरामाच्या प्रबोधनाने आनंदित झालेले ऋषी, मुनी रामाचा जयजयकार करू लागले. प्रबोध झाल्यावर रामाला गुणदोषदर्शन, विधिनिषेधाचे लक्षण, कर्म-अकर्म यांतली जाणीव नव्हती. नंतर सावध झालेला राम जे विधिविधान बोलला ते लक्षणीय होते.

श्रीरामाचे मनोगत

श्रीराम प्रबोधानंतर म्हणाला, "अहो वसिष्ठ महामुनी, तुमचे वचन प्रतापकारक आहे. मी विधी-निषेध हे दोन्ही मनाने वा डोळ्याने पाहात नाही. अहो स्वामी मुनीनाथा आपले समर्थ गुरुवाक्य ऐकून कर्म, क्रिया, कर्तव्य हे मला उरलेच नाही. जरी असे असले तरी हे गुरुनाथ, आपले वचन मला टाळता येणार नाही. आपला उपदेश जसाच्या तसा मला अत्यंत प्रयत्नपूर्वक आणि विश्वासाने सार्थ केला पाहिजे. सद्‌गुरूचे वचन प्राणांतीही न उल्लंघणे आणि त्या गुरुवाक्याचे पालन करणे हे शिष्याचे मुख्य लक्षण आहे. वेद, शास्त्रे, पुराणे हेच लक्षण सांगतात. गुरुवाक्य उल्लंघणे हे मोठे पाप आहे. या महापापाला प्रायश्चित्त आहे ते विधान गुरुवाक्याची अवज्ञा म्हणजे वज्रपाप ठरते. ही आज्ञा न पाळण्याने महापातकांच्या कोटी आणि वज्रपापाच्या कोटी निर्माण होतात. गुरूची आज्ञा न पाळली तर स्वधर्मकर्माचा घात होतो आणि आपल्यावर अनर्थ ओढवून नरकात पडावे लागते. सूक्ष्म साराचे सार गुण, सर्व निश्चयांचा पूर्ण निश्चय कोणता तर आत्मज्ञानाचा लाभ हे सर्वजण सावधपणे ऐका.

आत्मज्ञानाशिवाय चौदा विद्या, चौसष्ट कला, त्या विकल आणि दुःखरूप आहेत. खरा आनंदसोहळा आत्मज्ञानातच आहे. सर्व सिद्धान्तांची मर्यादा म्हणजे आत्मज्ञान होय. इतर सर्व ज्या प्रसिद्ध चौदा विद्या त्या अविद्या आहेत. त्या आत्मज्ञानाचा स्वतः ज्ञाता असलेल्या सद्‌गुरूहून अधिक ज्ञान दैवतालाही नसते. सद्‌गुरू हा मुख्यतः गुणातीत आहे. (त्रिगुण) ब्रह्म, हरि, हर हेही सद्‌गुरूचे सेवक असतात. कारण, गुरूहून थोर आणि सत्पात्र त्रिलोकात कोणी नाही." एवढे बोलून श्रीराम स्वतः प्रेमभराने ओसंडून गेला आणि त्याने श्रीगुरू वसिष्ठांचे पाय डोक्यावर घेऊन, त्यांना वंदन केले. यावर वसिष्ठांनी श्रीरामाला आलिंगन दिले. गुरुशिष्यांना सारखेच समाधान झाले. रघुनाथाकडून गुरुमहिम्याच्या गोष्टी ऐकून चौदा भुवनातील आणि वैकुंठातील सर्वांनी टाळ्या वाजविल्या. त्या गोष्टींनी सिद्ध, ऋषी, सुरवर हे सारेच सुखी झाले. त्यांनी जयजयकार

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

करीत पुष्पवृष्टी केली. चहूकडे दिव्य फुलांचा सडा पडला आणि त्याने श्रीराम हा त्यामधे चिन्मात्र, पवित्र, सालंकृत असा शोभला."

रामकथेची फलश्रुती

वाल्मीकींनी स्वतः भरद्वाजाला सावधान करून, "रघुनाथाचे आत्मज्ञान हे प्रबोधलक्षण असल्याचे सांगितले. जे ज्ञानाविषयी ऐकले त्याचे अनुसंधान ठेवून तूही आपल्याला पूर्ण सुखी करून घे." असे भरद्वाजाला सांगून वाल्मीकी संतुष्ट झाले. त्यांनी वसिष्ठांच्या उपदेशाची महती अती उल्हासाने स्तुती करून गौरविली. "धन्य त्या वसिष्ठांची लीळा, जी सुरवरांना वंद्य आहे. त्यांनी चिद्रत्नांची माला श्रीरामाच्या गळ्यात उतरवली. त्या मालेच्या चिद्रत्नांशी अहोरात्र लगट करून कवी भ्रमर होऊन तिच्यातील रस आणि आमोदाचे सेवन करू लागतात. तिच्या योगाने योगाला पावून योगी योग्यतेला पोहोचले, आणि नित्य सुखामुळे देहभावाला विसरले. अहो, गुरुवाक्यरूप कटाक्षाने अलक्ष ते लक्ष देण्याशिवाय लक्षात येते. वसिष्ठांनी स्वतःच्या गुरुपक्षाने मोक्ष नांदविला. ही श्रीराम आणि वसिष्ठांची कथा म्हणजे मोक्षमार्गाची खूण आहे. मोक्ष आपणहून श्रवणात येऊन पोहोचतो अशी ही कथा सावधान होऊन ऐकावी."

"वेदान्तवार्तिकांचे आत्मजीवन, उपनिषदांचे पूर्ण सार, ॐकारातील अर्धमात्रेचे लक्षण असे हे गुह्यज्ञान वसिष्ठांनी सांगितले आहे. श्रीराम आणि वसिष्ठ यांच्या संवादातील गुह्यज्ञान जो नित्य सावधानतेने श्रवण करील तो सर्व अवस्थात पूर्ण मुक्त होईल. ज्यांना सार्थ वासिष्ठांचे श्रवण झाले ते प्रपंच व्यवहार करूनही नभासारखे पूर्ण अलिप्त राहतात. त्यांना कर्मबंधन बाधत नाही. जागृतीत, स्वप्नात, सुषुप्तीत ज्यांना नित्य वासिष्ठांचे श्रवण होते त्यांना नेहमी मुक्ती आपला करते अशी वासिष्ठांची कीर्ती आहे. जागृतीतले श्रवण, तेच स्वप्नातले मनन आणि सुषुप्तीतले समाधान असे हे वसिष्ठांचे अगाध ज्ञान आहे."

एकनाथ म्हणतात, "वासिष्ठग्रंथाच्या (म्हणजे योगवासिष्ठग्रंथाच्या) शतसहस्त्र श्लोकातील सत्याहत्तर श्लोकांवर मी ज्ञानार्थकारी भाष्य केले. श्लोकान्वयातील सत्यार्थ सांगण्यासाठी गुरू जनार्दन समर्थ असून त्यातील ग्रंथार्थाचा अर्थ विशद करून जनार्दन स्वामींनी सांगितला."

अध्याय बारावा

श्रीरामायणाची कथा जो श्रोता आदराने ऐकतो, तो पापपुण्याचा नाश करतो आणि स्वभावतः मुक्त होतो. कथाश्रवणाने मुक्ती मिळते हेही एक नवलच आहे. या रामकथेच्या अर्थाने अक्षरातून अविनाशी असा अर्थ निर्माण होतो. रघुनाथाचे चरित्र वाचले तर श्रोते आणि वक्ता नित्य पवित्र होतात. ऐकणारांचे कान आणि बोलणाराचे तोंड धन्य; धन्य वाल्मीकी मुनी ज्यांची वाणी ही त्रैलोक्यपावन कथा सांगून गेली. या कथेने संसारातून सुटका करणारा चरितार्थ प्राप्त होतो. रामनाम दोन अक्षरांचे असून सामान्यांपासून सुरश्रेष्ठांपर्यंत सर्व तिला वंदन करतात. अशी अगाध थोरवी असलेल्या कथेबद्दल शब्दात काय वर्णन करावे! श्रीवसिष्ठांच्या उद्‌बोधाने श्रीराम समाधीतून सावध झाला.

श्रीरामाच्या सावध होण्याचा आनंद

श्रीराम सावध झालेला पाहून विश्वामित्रांना विशेष आनंद झाला. देवादिकांनी सुख मानून पुष्पवृष्टी केली, दुंदभी वाजविल्या. राजद्वारावरचा नगारा वाजू लागला. गगनाला भिडणारा जयजयकार करीत सुरांनी आणि नरांनी आनंद व्यक्त केला. स्वतः रघुनाथ विश्वामित्रांच्या यज्ञासाठी जाणार म्हणून वसिष्ठांनी चांगला मुहूर्त शोधला. राजा दशरथाने प्रयाणाची तयारी सुरू केली. पुण्याहवाचन करून, संपूर्ण सैन्य बरोबर देऊन तो रामाला पाठविण्याच्या तयारीला लागला, परंतु वसिष्ठांनी

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

त्याला विरोध दर्शवून राम आणि लक्ष्मण या दोघांनाच रथात बसविले.

विश्वामित्रांना विनंती

राजा दशरथ विश्वामित्रांना म्हणाला, "मी माझा आत्माच आपल्या हातात देतो आहे. आपण कृपामूर्ती आहात. योग्य वाटेल त्याप्रमाणे यांचे रक्षण आपण करा." त्यावर वसिष्ठांनी विश्वामित्रांना सांगितले, "आपणही सूर्यवंशाचे गुरुत्व स्वीकारावे आणि श्रीरामाला मुळापासून धनुर्विद्या शिकवा." वसिष्ठांचे बोलणे ऐकून विश्वामित्रांनी वसिष्ठांना नमन करून म्हटले, "आपण अंतरात्माच आहात आणि माझ्या मनातले सर्व आपणाला ज्ञातच आहे. माझे मनोगत जाणूनच आपण मला रघुनाथाचा शिष्य म्हणून स्वीकार करायला सांगता आहात; खरोखर आपल्यासारखा ज्ञानवंत अन्य कोणी नाही. आपण आपल्या शिष्याला उपदेश करायला सांगता हे आपल्यालाच शोभेल. अन्य ऋषींना अती अभिमान असतो."

वसिष्ठ विश्वामित्रांना म्हणाले, "मी-तू हा भेद आपल्या दोघात नाहीच. यासाठी आपण श्रीरामाचे गुरुपण अवश्य घ्या." त्या दोन ऋषींचा संवाद ऐकून श्रीरामाला आनंद झाला. त्या दोघांची एकवाक्यता पाहून राम उल्हासाने रथात चढला. जीवाबरोबर जसा प्राण तसा श्रीरामासह लक्ष्मण असल्याने तोही धनुष्य आणि बाणांचा भाता घेऊन रथात चढला.

श्रीरामाच्या प्रयाणाला शुभशकुन

श्रीरामाच्या प्रयाणसमयी राजा दशरथाला स्वतःला शकुन दिसले. दोघे ब्राह्मण प्रसन्न वदनाने नेमके समोर येऊन भेटले. पूर्ण भरलेले कलश घेतलेल्या आणि अलंकार धारण केलेल्या पाच स्त्रिया सामोऱ्या आल्या. दही-दूध आणि लोणी डोईवर घेऊन जाणाऱ्या गौळणी दिसल्या. अपूर्व अमृत फळे, दुधाच्या घागरी, दही-दूध, यांचे वाण करणारी, एका हातात पुत्र आणि कडेवर वधू, अशी एक स्त्री भेटली. कावळे उजवीकडे गेले, तास डावीकडे गेले, पुढे तोंडात मोत्यांचे घोस असलेले राजहंस जवळ दिसले. दक्षिणेकडे जाणारे काळ्या रंगाचे मृग आणि डाव्या दिशेने जाणारी मृगी, भारद्वाजाचे डावे उड्डाण आणि मुंगुसही डाव्या अंगाला जाणे असे अनेक चांगले शकुन दशरथाने पाहिले. दशरथ रामाला पोहोचवून परतला तेव्हा श्रीरामाला झालेल्या शकुनांचे शुभचिन्ह ब्रह्मरूप वसिष्ठांनी मार्गात व्याख्यान करून सांगितले.

शकुनांचे वसिष्ठांकडून निवेदन

वसिष्ठ म्हणाले, "प्रथम ब्राह्मण भेटल्यामुळे श्रीराम ब्रह्मसृष्टीमध्ये संपूर्ण विजय प्राप्त करील. सुर-असुर यांचे समुदाय वंदन करतील. पूर्ण कलश जेव्हा पुढे येतात तेव्हा मनोरथ नेहमी पूर्ण होतात. दही-दूध, लोणी समोर येण्याने ऐश्वर्याची प्राप्ती होते. कावळा उजवीकडे गेला तर सर्वत्र यश मिळते. तास डावीकडे जाण्याने शत्रूचा पूर्ण नाश होतो. मोती मुखात असलेले हंस जवळ आले तर सुखप्राप्ती होते. अगदी स्वप्नातही दुःख असणार नाही. मृगगण उजवीकडे गेल्याने अपूर्व लाभ होतो. मृगीचे डावीकडे जाणे ही नववधू माळ घालत असल्याची खूण आहे. मुंगुसाने डावीकडे जाणे हे रणातील विजयाचे चिन्ह असते. शत्रूचे निर्दाळण करून त्रिभुवनात न मावणारे यश तो संपादन करील. डावीकडे जाणारा भारद्वाज कार्यसिद्धी दाखवितो. शत्रूला लाज आणून आनंदाचे सुख निर्माण होईल." अशा शब्दात शकुनांचे फलित ऐकल्यावर राजा सुखावला. राम विजयी होणार असा चित्तात विश्वास निर्माण झाला आणि दशरथ आनंदित झाला.

राम कामाश्रमात येऊन थांबतो

शरयू नदीच्या तीरावर, सहा कोसांवर कामाश्रम होता. विश्वामित्रांनी रथ तिथवर नेऊन कुमारांना चकित केले. श्रीरामाने कामाश्रमात वस्ती केली. त्यामुळे आपल्या सर्व इच्छा पूर्ण होतील हा

https://archive.org/details/@sarayu_foundation_trust_lucknow

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

विश्वास विश्वामित्रांना वाटला. त्यांनी मोठ्या चतुराईने रामाला तेथे कार्यसिद्धीसाठी आणून राहायला लावले. श्रीराम आणि लक्ष्मण आत्मतेजाने शोभत होते. त्यांच्या अंगुलीत्राण घातलेल्या बोटांनी धनुष्यबाण सिद्ध केले होते. त्यांनी अंगात कवच घातले असून त्यांची केसांची झुलपे आणि शेंडीसारखे बांधलेले केस हे काळ्या काकपक्षाच्या पंखासारखे होते. खड्ग धारण केलेले ते बाळपणातले दुर्धर महावीर तेजस्वी अग्नीप्रमाणे भासत होते. त्यांचे ते स्वरूप पाहून विश्वामित्र अमर्याद सुखी झाले. त्यांना श्रीराम लावण्याचा दीपच असा चित्स्वरूप आणि सुखकारी वाटला. विश्वामित्रांनी त्यांना 'आजची रात्र येथे राहावे' असे म्हटले. त्यावर 'आज्ञा प्रमाण' असे रामाने सांगितले. त्या रात्री सर्वजण तेथेच वस्ती करून राहिले.

विश्वामित्र रामाला सिद्ध मंत्र देतात

विश्वामित्रांबरोबर सुखाने ती रात्र निद्रा घेतल्यावर दुसरे दिवशी विश्वामित्रांनी श्रीरामाला जागे केले. नंतर रामाने विधियुक्त स्नान करून, संध्या गायत्रीजपाची आवर्तने, हे सर्व उरकून स्वानंदाने विश्वामित्रांना चरणस्पर्शाने वंदन आणि नमन केले. श्रीरामाची नम्रता पाहून विश्वामित्र उल्हसित झाले आणि त्याला आलिंगन देऊन म्हणाले, "हे रघुनाथा, आता तुम्हाला सिद्ध मंत्र देतो" त्यावर राम-लक्ष्मणांनी गुरूंच्या पायावर डोके टेकवून मंत्रासाठी सावधानता दाखविली. त्यावर विश्वामित्रांनी बोलणे सुरू केले.

"मी सांगेन तो मंत्रार्थ तुमच्या मनात ठसला तर मनात राक्षसांचे भय निर्माण होणार नाही. श्रम जाणवणार नाहीत. सर्व (तिन्ही) अवस्थांत सावधानता राहील. या मंत्रार्थाचे महिमान असे आहे की रणांगणात राक्षससमूहाचा नाश करायला अर्धी घडीही लागत नाही. क्षुधा, तृषा, निद्रा, आळस बाधू शकत नाही की शरीर दुबळे होत नाही. अशा त्या मंत्राचे रहस्य मी तुम्हाला अवश्य सांगेन. परम कठीण तपाने जी मी ही सिद्धार्थप्राप्ती केली ती तुम्हाला पूर्णपणे आणि स्पष्टपणे देईन." असे म्हणून विश्वामित्रांनी दोघांना जवळ घेतले. विश्वामित्रांची कृपादृष्टी पाहून दोघांनी त्यांचे पाय धरले आणि गुरूचे पुढील भाषण ऐकण्यासाठी ते सर्वभावाने सावधान आणि सिद्ध झाले.

विश्वामित्रांनी सांगितलेल्या मंत्राचे शब्द कानावर पडताच राम-लक्ष्मणांच्या अंतःकरणात मंत्रसिद्धीचा परिणाम पूर्णत्वाला गेला. मंत्रशक्ती आली आणि मंत्रशिरोमणी श्रीरामाच्या पायी लागली. श्रीराम मंत्राक्षरांचा मंत्री, क्षराक्षरांच्या पलीकडे असलेला, स्वयं ॐकार आणि मंत्रार्थाचे सार होता. श्रीराम हा मंत्राची आत्मशक्ती, मंत्राची साक्षात् मूर्ती, त्याच्या चित्तात मंत्रार्थ बाणला होता यात नवल ते काय सांगायचे. मंत्रार्थाचे आत्मबीज असलेला मंत्री असा श्रीराम स्वतः सहज त्यानेच त्यावेळी सद्गुरूंच्या चरणधूली वंदन करून शिष्यत्वाची रीत पाळून सेवाभाव दाखविला. सद्गुरूंची सेवा हेच आत्मबीज सर्व देवांना वाटते. ते राघवालाही समजले आणि गुरूंच्या आज्ञेसाठी मनापासून वाहून घेतले. राम-लक्ष्मणांना मंत्रार्थ पूर्ण बाणला गेल्याचे विश्वामित्रांनी जाणले. मग दोघांची पाठ थोपटून ऋषिवर्य स्वतः सुखसंपन्न झाले.

शरयूसंगमावर विश्रांती

विश्वामित्र श्रीरामाला म्हणाले, "आपण आता सिद्धाश्रमातील वास्तव्य सोडून पुढे जाऊ या." रामाने 'आज्ञा प्रमाण' म्हणताच तिघे रथात बसून निघाले. मार्गात मनोरम शरयूतीर; भागीरथीसंगम, अशा उत्तम स्थळांचे त्यांना दर्शन घडले. मानस सरोवरात जन्मल्यामुळे शरयू हे नाव दिले गेले. अयोध्यानगरी काठावर उभी राहिली. पुढे शरयू गंगेच्या संगमासाठी आली. त्या संगमाचे दर्शन होताच साष्टांग नमस्कार घालून, नंतर त्यांनी संध्या, जप, ध्यान, मंत्रावर्तन हे सारे प्रयोग केले. संगमाच्या सहवासात श्रीरामाला एक रात्र राहविण्याचे आणि दुसऱ्या दिवशी परतीरावर

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized By Sarayu Foundation Trust and eGangotri

जायचे विश्वामित्रांनी ठरविले. त्याप्रमाणे सर्वांनी शरयूसंगमावर विश्रांती घेतली.

दुसरे दिवशी शरयूच्या पैलतीरी

विश्वामित्र प्रातःकाळी उठून रामलक्ष्मणांसह नावेतून शरयूच्या पैलतीरी गेले. तेथे त्यांनी विधिपूर्वक प्रातःकाळची उपासना-कर्मे पूर्ण केली. त्या ठिकाणी तीरावरचे दाट वन पाहिल्यावर त्याच्या विपरीततेचे भान श्रीरामाला स्वतःला आले. तेथे उग्र पक्ष्यांचे चाळे, क्रूर श्वापदांची दाटी, घुबडांचे घुघुत्कार, कोल्ह्यांची कोल्हेकुई, भुंग्यांचे झणझणणे, या सर्वांचा भयानक ध्वनी सतत उमटत होता. तेव्हा रामाने 'हे वन असे घोर का?' असा प्रश्न विश्वामित्र ऋषींना विचारला. त्याचे सविस्तर उत्तर विश्वामित्रांनी दिले. "रघुनाथा, हे वन भयानक भासते कारण तेथे त्या अती क्रूर अशा प्राण्यांना खाणाऱ्या ताटिका राक्षसीचे वास्तव्याचे घर आहे. तिच्यामुळे हे वन तर ओसाड झाले आहेच, पण त्या कर्कश राक्षसीने मालव, केशिक, कारूप हे देशही क्षणार्धात उद्ध्वस्त केले आहेत. तिच्या दशदिशा मार्ग अडविण्यामुळे आणि भयामुळे कोणी तिकडे जाऊ शकत नाही. तेव्हा आपणही त्यामार्गाने न जाणे योग्य ठरेल. येथून अर्धा योजन अंतरावर ताटिकेचे भवन आहे. ती मार्गातच आपले प्राण घेईल." या स्पष्टीकरणावर श्रीरामाने विचारले, "अशी कशी ही कोण, कोठची, कोणाची? हिच्या ठायी एवढी शक्ती कुठून, कशी आली?" तेव्हा विश्वामित्रांनी तिची कथाच सांगितली.

ताटिकेचा पूर्ववृत्तान्त

"सुकेतु नावाचा एक पवित्र यक्ष होता. त्याला संतान नव्हते. त्यासाठी त्याने घोर अनुष्ठाने करून ब्रह्माला प्रसन्न केला. त्याच्याकडे पुत्रप्राप्तीची मागणी केली. ब्रह्माने कन्यारत्न दिले. अल्प वीर्याने कन्या होते हा कार्यकारण प्रवृतीचा परिणाम असतो. ब्रह्मा म्हणाला, 'तुला पुत्रसंतती होणार नाही. सहस्र बलवान हत्तींची शक्ती असलेली कन्या निश्चित होईल.' असे वरदान सांगून ब्रह्मा गेला. तीच ही ताटिका कन्यारत्न. तिने सुंद, उपसुंद या दोन भावांपैकी सुंद या ज्येष्ठाशी समारंभपूर्वक लग्न केले. सुंदापासून मारीच आणि सुबाहू हे दोघे भाऊ ताटिकेच्या पोटी जन्मले. सुंदोपसुंद हे महावीर श्रेष्ठ आणि दुर्धर योद्धे होते. त्यांनी देवांचा पराभव करून त्यांचे अधिकार स्वतःकडे घेतले."

"त्या दोन बंधूंचा वध करण्यासाठी विधात्याने एक युक्ती रचली. तिलोत्तमा ही सुंदर स्त्री त्या दोघा बंधूंनी पाहिली. तिला पाहताच दोघे तातडीने उठले. तिने आपल्याला वरावे म्हणून त्या सकाम आणि अति कामुक दोघांनी तत्परता दाखविली. धाकट्याने मोठ्याला म्हटले, 'तू हिला आपली वहिनी मान' त्यावर मोठा म्हणाला, 'तू निश्चयाने हिला ज्येष्ठाची पत्नी मान' 'कनिष्ठाचे लाड ज्येष्ठाने करावे. तू या वेल्हाळेला आपली भावजय मान.' 'ज्येष्ठाची आज्ञा थोर मानून कनिष्ठाने शिरसावंद्य समजावी. ही ज्येष्ठाची पत्नी आहे असेच तू मानावे' 'हे बंधो, कनिष्ठाने ज्या स्त्रीची इच्छा धरली ती वहिनी मानावी.' 'अरे, ज्येष्ठाची पत्नी ही आपली माता मानली पाहिजे, हे तत्त्वतः योग्य ठरते.' असा त्या दोघा बंधूंचा वाद सुरू होऊन दोघेही हट्टाने रागावले. दोघेही गदा घेऊन एकमेकांविरुद्ध निर्वाणीचे युद्ध करू लागले. दोघे युद्धात अजिंक्य, गदायुद्धात प्रवीण होते. त्यांनी आवेशाने युद्धाला आरंभ केला. एकमेकांना आटोपत नव्हते. अखेर कनिष्ठाने कलानिपुणतेने ज्येष्ठाचा घात केला आणि पडता पडता रागाने गदा मारून ज्येष्ठाने कनिष्ठाचा घात केला. दोघे एकमेकांच्या घावाने भूमीवर गतप्राण होऊन पडले. अशी स्त्रीविषयीच्या इच्छेची परिणती होते. तिने एकाच दृष्टिक्षेपाने दोघांना गतप्राण केले. स्त्रीशी कामेच्छेने एकांत, बोलणे, स्पर्श यांतले काहीही न केले तरी दृष्टिक्षेपानेही स्त्री अपघात करू शकते. स्त्रीशी भेट, गोष्ट झाली नाही तरी केवळ

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

दृष्टिक्षेपाने लगेच आत्मघात होतो. सख्खे दोन आत्मबंधू असून त्यांनी स्त्री डोळ्यांनी पाहिली आणि आत्मघात करून घेण्यासाठी युद्ध करून मेले. हा स्त्रीदर्शनाने झालेलाच अपघात होता. स्त्रीदर्शनाने देहपात, स्त्रीस्पर्शाने नरकभोवरा, अशी स्त्रियांची संगत पुरुषाला अनर्थकारी असते, असे ही कथा आपल्याला सांगते. मारीच आणि सुबाहू या सुंदपुत्रांना इंद्र ठार मारण्यासाठी टपला होता. ताटका त्यामुळे पुत्रांसह या वनात आली."

श्रीरामाने "तिला राक्षसपण का आले?" असा प्रश्न केला, तेव्हा ऋषिवर्य विश्वामित्रांनी सांगितले की, "ताटका आपल्या दोन पुत्रांसह वनवासी होऊन भटकत अगस्तीऋषींच्या आश्रमापाशी आली. त्या हत्तीचे बळ असलेल्या शक्तिशाली ताटकेने आपल्या बळाच्या गर्वाने आणि दुर्मतीने अगस्तींचा छळ सुरू केला. दोघा मुलांसह विक्राळ तोंड करून ती अगस्तींना छळू लागल्यावर तिला अगस्तींनी शाप दिला. 'तोंड विक्राळ करून तू माझा छळ करायला आली आहेस; तर तू पुत्रांसहित विक्राळ देहाची प्रचंड राक्षसी होऊन राहशील.' तीच ही अगस्तींनी शापदग्ध केलेली राक्षसी असून, ती प्राणिमात्रांना विरोध करून बाध आणते. तिनेच मार्ग अडवला आहे. तेव्हा ज्या मार्गावर ती राक्षसी असेल त्या मार्गाने आपण जाऊ नये हेच योग्य.' हे ऋषींचे वाक्य ऐकून श्रीरामाला हसू आले. "स्त्रीरूपातल्या ताटिकेच्या भयाने जर आम्ही पलायन करणार असू तर तुमच्या यज्ञाचे संरक्षण आम्ही काय करणार! हे स्वामिनाथा, आपण आज्ञा देत असाल, तर त्या राक्षसीचा मी आता वध करतो." हे रामाचे बोलणे ऐकून विश्वामित्रांनी त्याला आलिंगन देऊन म्हटले, "तुझा पुरुषार्थ पाहावा म्हणूनच मी भयाचा मार्ग सूचित केला. शिवाय तू निधडा वीर, निर्भय आणि मूलतः योद्धा असल्याचे मला माहिती होतेच. हिला तू सरळ ठार कर. अरे, स्त्रीचा वध करू नये असा शास्त्रार्थ असला तरी दुष्टांचे निर्दाळण करताना हे वाक्य व्यर्थ आहे. हिचा तू निखालस वध कर." नंतर "स्वामी, गुरूंची अवज्ञा करू नये ही सर्वच शास्त्रांची प्रतिज्ञा आहे. वसिष्ठ, दशरथ यांची आज्ञा आहे की आपली अवज्ञा करू नये. सकल शास्त्रार्थ आपणहून गुरुचरणी येतात. गुरूंचे महिमान अपार असून त्यांची अवज्ञा करू नये."

ताटिकेचा वध

श्रीरामाने गुरूंना वंदन केले आणि धनुष्य सज्ज करून तो अचल उभा राहिला. त्यावेळचे श्रीरामाचे स्वरूप पाहून काळालाही कंप सुटला. वीर्य-धैर्य आणि युद्धाचा प्रताप दाखवत त्याने धनुष्याचा टणत्कार केला. त्या ध्वनीने मेरुमंदार दुमदुमले, सप्तसागर खवळले, पाताळातले सर्प चाळवले. धनुष्याच्या आवाजाने सृष्टी कापू लागली, वैकुंठात प्रतिध्वनी उमटला. ध्यानस्थ हर आणि देव दचकून जाऊन त्यांच्यामधे गोंधळ माजला. आकाश कोंदले, दिशा नादाने भरल्या, त्यामुळे ताटिकेचे अंतःकरण थरथरू लागले. त्यामुळे ती गडबडून उठली. तिला समोर दोन कुमार दिसले. त्याबरोबर जिभल्या चाटत, रागाने भयानक आरोळी ठोकत, आपले विक्राळ तोंड पसरत, ती त्या कुमारांकडे धावली. ती श्रीरामासमोर उभी राहिली तरी तो निःशंकपणे तिचा वध करण्यासाठी उत्सुक झाला. तो लक्ष्मणाला म्हणाला, "पाहा ही भेसूर राक्षसी, जिला पाहताच प्राणी भीतीने प्राण सोडतात. हिच्यासमोर कोण टिकतो. पण आता माझ्या हातांचे कौतुकपूर्ण अनुसंधान आणि कौशल्य वापरून एकाच बाणाच्या आघाताने तिचे प्राण घेतो." असे सांगून रामाने बाण सोडला. धनुष्याची दोरी जेव्हा त्याने कानापर्यंत ओढली तेव्हाच ताटिकेचा प्राण ओढला गेला. बाण तिच्या हृदयावर आदळला आणि तिचे जिव्हार भेदून गेला. त्या आघाताने ताटिका आरोळी देऊन धाडकन् जमिनीवर आदळली. त्याचा पाताळात प्रतिध्वनी उमटला. ताटिकेच्या शरीराच्या भाराने गिरी-गुहा दुमदुमल्या, मेरुशिखरे डळमळली, वनचरे भयाने

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

मूर्च्छित झाली, दगडांचे चूर्ण झाले, वृक्ष समूळ उपटले; पक्षी आकाशात घिरट्या घालू लागले, दिग्गजांची टाळी चिकटली, भूकंप झाले, सागराचे पाणी उचंबळले, सर्वजण हाहाःकार करू लागले, राक्षस कंपायमान झाले. श्रीरामाने तिचे त्रिविध ताप, संकल्प-विकल्प, पुण्य-पाप हे छेदून निर्विकल्प अवस्थेत तिचा वध केला. देहाभिमान, जीवत्वबंधन, मीपण यांसह ताटिका मारिली.

ताटिकेचा वध होताच देवांची अनेक विमाने सृष्टीकडे आली, आणि त्यांनी विमानांतून पुष्पवृष्टी केली. भिन्न वाद्यांचा ध्वनी केला. जयजयकार करीत ते रामस्तुती करू लागले. योगी जेव्हा आपली कल्पना छेदतो तेव्हा त्याला सुख होते, तसेच सुख त्रिभुवनात ताटिकावधाने श्रीरामाने निर्माण केले. भक्त जसा साशंकता सोडून आत्मसुखाची प्राप्ती करून घेतो, तसाच आनंद सर्व लोकांना ताटिकेच्या वधाने झाला. स्वतः अमरेन्द्राने विश्वामित्रांचे कौतुक करताना म्हटले की, "तुझ्यामुळे रामाकडून दुष्टनिर्दाळण झाले." ताटिकेचा वध होताच कौशिकांनी आणि ऋषींनी टाळी पिटून आनंद व्यक्त केला. इंद्राने विश्वामित्रांना सांगितले की, "श्रीरामाला आपण अस्त्रविद्या द्या. कारण, हा सुरकार्य आणि यज्ञ या दोहोंनाही साहाय्यकारी होणारा आहे. श्रीरामासारखी योग्यता असलेल्यांना सत्-शास्त्र, सबीजमंत्र-विद्या, अवश्य सांगावी." देवेन्द्राचे वचन ऐकून विश्वामित्रांना संतोष झाला. त्यांनी रामाला जवळ घेऊन, कुरवंडी केली. ते म्हणाले, "ताटिका वध होण्यामुळे देव सुखावले, मार्गस्थांचा मार्ग मोकळा झाला, हा सर्व श्रीरामाच्या समर्थ पराक्रमाचा परिणाम आहे."

यानंतर विश्वामित्र राम-लक्ष्मणांसह पुढे निघाले.

अध्याय तेरावा

विश्वामित्र राम आणि लक्ष्मण यांना सिद्धाश्रमात घेऊन आल्यावर त्यांनी तेथे वस्तीला राहाण्याची इच्छा प्रकट केली आणि ते म्हणाले, "आपण येथे राहिल्याने याची कीर्ती वाढेल, उद्या पहाटे माझ्या आश्रमाकडे जाऊ." त्याप्रमाणे ते तेथे राहिले.

सिद्धाश्रमात सुखाने रात्रीची विश्रांती घेऊन, पुन्हा पहाटे उठून त्यांनी प्रातःकर्मे उरकली. नंतर विश्वामित्र आपणहून म्हणाले, "श्रीरामा, आता तुम्ही अस्त्र ग्रहण करा." ही आज्ञा प्रमाण मानून राम आणि लक्ष्मण गुरुचरणांना वंदन करून हात जोडून उभे राहिले. विश्वामित्रांनी मग अस्त्रविद्या देण्यास आरंभ करताना सांगितले, "हे अस्त्राभिग्रहण असल्याने त्रिशुद्धी सावधान व्हा. बीज मंत्रांचे उच्चारण करा. तसेच अस्त्र सोडणे आणि परत आणणे म्हणजे अस्त्रांचे प्रेरणावरण ऐका. अस्त्र सोडले की तत्काळ जाते आणि कार्य साधून परत हाती येते." अशा रीतीने अस्त्रमंत्र सबीज आणि निःसंदेह सांगून ऋषींनी त्यांचे वर्म सांगितले.

अस्त्रांचे प्रकार आणि त्यांची शक्ती

"पन्नगास्त्र, गरुडास्त्र, अग्न्यस्त्र, पर्जन्यास्त्र, वायव्यास्त्र, पर्वतास्त्र, वज्रास्त्र ही अत्यंत दुर्धर असतात. सोमास्त्र, हिमास्त्र, क्रोधास्त्र, नंदिकास्त्र, गंधर्वास्त्र, आदित्यास्त्र, हयशिरोस्त्र, ही दारुण आहेत. वीरघ्नास्त्र, विरोधास्त्र, दुर्मनास्त्र, सर्पघ्नास्त्र, घोरास्त्र, अघोरास्त्र, घोराघोरास्त्र ही अत्यंत प्रखर आहेत. संतापास्त्र, अतितापास्त्र, घोषणास्त्र, दानवास्त्र, पिशाचिकास्त्र, पिपीलिकास्त्र, विद्याधरास्त्र ही सारी मारक आहेत. वृकास्त्र, जंबुकास्त्र, जृंभकास्त्र, शुचिकास्त्र, मानवास्त्र, कालिकास्त्र, सूचिकास्त्र, विषूचिकास्त्र, चंडास्त्र, प्रचंडास्त्र, वितंडास्त्र ही अत्यंत दाहक आहेत. संवर्त्तकास्त्र, शलभास्त्र, विखंडास्त्र, दंडनास्त्र, शीतकास्त्र, वातास्त्र, वंशिकास्त्र ही विध्वंसक आहेत. मायास्त्र, मोहनास्त्र, पातनास्त्र, घातनास्त्र, मातंगीदहनास्त्र, ब्रह्मकपालास्त्र यांनी रक्तशोषण होते. भीमास्त्र, भयानकास्त्र, शृंगास्त्र, भृंगास्त्र, क्रूरास्त्र,

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

भैरवास्त्र, करालास्त्र ही सारी उग्र आहेत. वारुणास्त्र, दारुणास्त्र, कालरुद्रास्त्र, कार्तिकेयास्त्र, कपालास्त्र, भद्रास्त्र, वामनास्त्र; यांच्याकडून विघात होतो. तर संकर्षणास्त्र, नारायणास्त्र, शंकरास्त्र, नृसिंहास्त्र, प्रद्युम्नास्त्र, मदनास्त्र ही प्रतापी आहेत. ईषिकास्त्र, तृणशलाका ही प्रचंड आणि अनेक अस्त्रे जिंकून घेणारी आहेत. पाशुपतास्त्र हे तर तिन्ही लोकांना अनिवार्य असल्याची महती आहे."

"ब्रह्मशिरोस्त्राचा मंत्र प्रेरला तर चराचराचा छेद होतो असा याचा प्रभाव असल्याने ते राखून ठेवावे. अगदी निर्वाणीचा क्षण आल्यावरही विचारवंत त्याचे प्रेरण टाळतात इतके ते दारुण आणि भयंकर आहे. हे अस्त्र जो सांभाळून असतो त्याला सर्व अस्त्रांचे सामर्थ्य प्राप्त होते. यासाठी हे अस्त्र शहाणे लोक प्रयत्नपूर्वक सांभाळतात. अशी ही विविध अस्त्रे आहेत"

नंतर विश्वामित्र म्हणाले, "ही झाली अस्त्रांची माहिती, आता तुम्हाला शस्त्रविधी सांगतो. ज्यांचे स्मरण करताच खरोखर युद्धप्रसंगी ती आपणहून येतात."

"वायुचक्र, विष्णुचक्र, कूर्मचक्र, कालचक्र, नक्रचक्र, ही अती दुर्धर असतात. शूळ, त्रिशूळ, महाशूळ यांनी खोचून देह निष्प्रभ करता येतो त्यामुळे यांच्या समोर कोण टिकणार? साक्षात् कळिकाळ यांच्या धाकाने कापतो. कौमोदकी आणि शिवोदकी या दोन अलौकिक गदा असून त्या मोहममतेला छेदणाऱ्या असल्यामुळे तिन्ही लोकांत त्यांचा अत्यंत धाक आहे. दोन खड्गे ही अत्यंत तीक्ष्ण असतात. एक जीवाचा छेद करणारे आणि एक कल्पनेचा घात करणारे अशी ही खड्गे असल्याने यांच्यामुळे लोक थरथरा कापतात. शिवशक्ती, विष्णुशक्ती, अनादी आदिशक्ती या संदेहाने असणारा लिंगदेह छेदतात आणि त्यांच्या तेजाने कळिकाळ पळून जातो."

धनुर्विद्या आणि मल्लविद्या

"धनुष्याची दोरी कानापर्यंत ओढून टणत्कार केला म्हणजे त्या ध्वनीनेच राक्षससमूह मरतात, माया सकुटुंब प्राण सोडते. अशी ही धनुर्विद्या गहन असून गाढपणे ग्रहण कर. आत्मतेजाने तीव्र, सर्व आशांचा छेद करणारा तो दिव्य बाण, सावध आणि भाता बांधून सिद्ध असणारासाठी आहे."

शस्त्रास्त्रविद्या झाल्यावर विश्वामित्रांनी मल्लविद्येतील कौशल्य शिकविले. गुरुकृपेने ती खरोखर राम-लक्ष्मणांच्या ठिकाणी निर्माण झाली. विश्वामित्रांनी धनुर्विद्या, शस्त्रास्त्रविद्या शिकवताच क्षणार्धात रामचंद्राने त्या आत्मसात केल्या.

मंत्रदेवतांकडून श्रीरामप्रशस्ती

मंत्रशक्तींनी तत्त्वतः आणि मंत्रमूर्तींनी समक्षात रघुनाथाला वंदन करून म्हटले, "रघुनाथा, आमचे सामर्थ्य तुझ्यामुळेच आहे. आमचा स्वभाव लोकांना छेदक आहे. परंतु ती छेदकता तुझ्या हाती आली की मरणाराला अमृतप्राप्ती होते. या तुझ्या पवित्रतेला ऋषी वंदन करतात. दुष्ट अधर्मी यांचे निर्दाळण, स्वधर्माचरणींचे प्रतिपालन अशी जी तुझी कीर्ती आहे ती आम्हाला तू हाती धरलेस तर मिळते आणि पावन करते. तुझ्या युद्धाची कीर्ती कवी पुराणात वर्णन करतात. आमचे कर्म लोकांचा घात करणारे आहे. त्या घात केलेल्यांना तू मुक्ती देतोस, त्यामुळे आमची कीर्ती वाढते. तुला स्वतः देव आणि ब्राह्मण नमन करतात." अशी श्रीरामाची स्तुती करून त्या रामचरणी लागल्या. मग रामाला प्रदक्षिणा घालून त्याच्या हृदयात प्रवेश करून राहिल्या.

शस्त्रदेवता अहोरात्र हात जोडून श्रीरामचरणी राहिल्या. रामाला घोकून किंवा चिंतन करावे न लागता त्या सर्वज्ञाला त्या सहज प्राप्त होत होत्या. यामुळे युद्धामध्ये जे जे शस्त्र त्याला पाहिजे असेल ते ते त्याच्या हाती येऊन शत्रूंचा नाश करता येई.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized By Sarayu Foundation Trust and eGangotri

शस्त्रास्त्रांना श्रीरामाची भक्ती होती. त्यांची रामहृदयात वस्ती होती. अशी श्रीरामाची अभिनव युद्धस्थितीमधे गती होती. अशाप्रकारे श्रीराम आणि लक्ष्मण यांना विश्वामित्रांनी विद्यादान केल्यामुळे शस्त्रास्त्रांना उल्हास वाटून राक्षसांना मारण्यास ती उत्सुक झाली.

विश्वामित्रांनी डोक्यावर हात ठेवताच रघुनाथाच्या ठिकाणी विद्या बाणली. त्यामुळे ते अत्यंत आनंदित झाले. शिष्याला विद्या अवगत झाली की गुरूला आनंद होतो. हे शब्दांनी न सांगता येणे यातच बोधाची कसोटी असते. शब्दांतून शब्दज्ञान मिळणे म्हणजे एक अज्ञानलक्षणच आहे. तेच साधकाचे बंधन ठरते. श्रीराम तसा साधक नव्हता. श्रीराम म्हणजे विद्येचे अधिष्ठान होता. ती खूण विश्वामित्रांनी जाणली, त्यांना आनंद झाला.

विश्वामित्रांच्या आश्रमात

विश्वामित्रांची पुढच्या प्रवासाची सूचना ऐकताच राम आणि लक्ष्मण विश्वामित्रांसह रथात चढले. त्यांना वाटेत शोभिवंत वन दिसले. रामाने विचारले, "गुरूवर्य ही कोणाची शोभिवंत जागा हो?" त्यावर विश्वामित्रांनी तो आपलाच आश्रम असल्याचे सांगितले.

विश्वामित्रांच्या आश्रमात श्रीराम येताच तिथल्या ऋषिगणांना आनंद झाला. त्यांनी विश्वामित्र आणि श्रीराम यांची विधियुक्त आणि प्रेमपूर्वक पूजा केली. नंतर श्रीरामाला आणून आणि मुनिश्रेष्ठांना आमंत्रित करून धर्मयुक्त भावनेने अग्निप्रतिष्ठा करण्यात आली. कुंड, वेदी, मंडप, तोरणे, ध्वजा हे सर्व विधियुक्त तयार करण्यात आले. त्या वेळी सर्वांना श्रीराम हा यज्ञाचे स्वरूप आणि यज्ञकार्याचा आधारस्तंभ भासला. अग्निस्थापना, अग्निपूजा, भोवती जल संमार्जन, दर्भ चहू दिशांना मांडणे, यज्ञपात्रे जमविणे, समिधा सोडवून ठेवणे, दर्भासने पसरणे, तुपाची भांडी जागेवर आणणे, या सर्व गोष्टींची व्यवस्था पूर्ण करण्यात येऊन नंतर प्रत्यक्ष होमात, आधार आहुती मंत्रोच्चारासहित घालण्यात आली. मग ॐकार-वषट्कारासह यज्ञास आरंभ झाला. श्रीरामाने त्या वेळी ऋषींना विचारले, "राक्षस कोठून येऊन यज्ञाचा विध्वंस करतात?" यावर ऋषींना आनंद वाटून कौशिकांनी निवेदन केले. "अहो, यज्ञाच्या आरंभापासून सहावे रात्री न कळत असंख्य राक्षस येतात आणि यज्ञस्थानी धुसून विध्वंस करतात. जो कोणी सहा दिवस अहोरात्र निर्विकारपणे आणि धैर्याने सावधान राहून दाखवील त्यालाच राक्षसांना मारता येईल." हे गुरुवचन ऐकताच श्रीरामाने चपळपणे धनुष्यबाण घेतले आणि नित्य सावधानता राखून तो स्वतः यज्ञमंडपाच्या दारात उभा राहिला. कर्मयागकर्ता विश्वामित्र आणि क्षात्रधर्मयागाचा कर्ता रघुवीर अशी दोघांची सिद्धता झाली. कर्मयागात कुंडसाधन असते, क्षात्रयागात रणकंदन असते; कर्मयागात वेदविधान, क्षात्रयागात ठाम राहणे; ऋषियागात ब्रह्म श्रेष्ठ, रणयागात सत्त्व श्रेष्ठ; यज्ञयागात कर्माची खटपट असते तर रणयागात शस्त्रांचा खणखणाट असतो. यज्ञात लाकडाच्या पळ्या वापरतात, रणात धनुष्याला बाण, बाणाचा भाता, धैर्य असावे लागते; कर्मयागात अग्निस्थापना, रणयागात काळाग्नी हाच अग्नी; यज्ञात पळीने होमात अन्न टाकतात, रणात बाणाच्या टोकांनी मांसाचे समर्पण होते. ऋषियागात ॐकार-वषट्कार, तर रणात वीरांचा हाहाःकार; कर्मयागात अग्निज्वाला, रणयागात शस्त्रांचा खणखणाट; यज्ञात अचाट धूर निघतो, रणात वीरांचे श्रम, कष्ट यांतून घाम निघतो; यज्ञात अग्नी वाढला तर दहीयुक्त तुपाने अभिसिंचन केले जाते, तर रणात राक्षसांची क्रूरता वाढली म्हणजे अस्त्रांचा वर्षाव केला जातो. यज्ञात सदीप बलिदान होते, रणात जीवांचे बळी देऊन टाकतात; यज्ञबळी लोभ नाहीसा करतो, तर रणात देहलोभाने जीवपण टिकवले जाते; असे दोघांच्या

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

यज्ञाचे स्वरूप असते.

श्रीरामाकडे पाठ फिरवून जे युद्धातून पलायन करतात त्यांचे देहबंधन तुटत नाही आणि जीवबळी खाऊन त्यांचा अधःपात होतो. यज्ञयागात श्रीफलाने पूर्णाहुती होते तर रणयागात छाटलेल्या मस्तकांनी पूर्णाहुती दिली जाते. यज्ञात मंत्रोच्चाराने प्रदक्षिणा करतात, रणयागात रणकल्लोळात प्रदक्षिणा होते. कर्मयागात धनाची दक्षिणा असते, रणयागात निजपदाची पूर्णता ही दक्षिणा असते. यज्ञाची पूर्णता ब्राह्मणांच्या अभिसिंचनाने होते तर रणयागाची पूर्णता झाली म्हणजे देवगण पुष्पवृष्टी करतात.

यज्ञाच्या पूर्ततेचे श्रेय विश्वामित्रांना आणि संग्रामाचे श्रेय श्रीरामाला मिळणार होते. या श्रेयकल्पनेने चराचरात उल्हास निर्माण झाला होता. कर्मयागानंतर ब्राह्मणभोजन आणि रणयागात भूतसंतर्पण, असे समसमान श्रेय रघुवीरामुळे पूर्णपणे सिद्धीस जाणार होते. यज्ञ संपल्यावर अग्निविसर्जन होते, पण श्रीरामाने आपल्या रणयज्ञाचे पूर्ण भोजन देण्यासाठी काळरूपी अग्नीला निमंत्रण दिले. ताटिकावधाने पात्रप्रोक्षण, चित्राहुतीसाठी सुबाहू आणि त्रिशिर, खर, दूषण यांच्या प्राणाहुती योजिल्या. कुंभकर्ण हा कढिभात, इंद्रजित हा पक्वान्न, रावण हा दहिभात अशी उत्तरापोष्णी करूनच तो रणत्याग करणार होता. प्रधान आणि राक्षसगण हे त्या रणभोजनात भाजी आणि मीठ, अखयादि पुत्र हे लोणची अशीही योजना होती. हे सर्व पूर्ण झाल्यावरच कळिकाळरूपी अग्नीला भोजनाची तृप्ती द्यावी असे ठरवून श्रीराम युद्धासाठी सावधान झाला होता.

श्रोत्यांना एकनाथांचे आत्मनिवेदन

'श्रोते हो, मी रामायण सोडून मधेच हे व्यर्थ कथन केले आहे यासाठी मला क्षमा करा. मी संतांचा आवडता, माझ्या बोलांचे त्यांना कौतुक, यामुळे माझी बडबड त्यांना गोड लागते. साधूंना मी तान्ह्या बाळासारखा, गुण नसल्याने पूर्ण मूर्ख, पण ज्याच्या मुखातून रामकथा सांगितली जाते त्याला साधूंचे कृपामृत मिळते'. त्यावर संत म्हणतात. 'खरोखर दोन्ही यागांवरील अभिप्राय शुद्धपणे करून आत्मानुभव मिळाला हे नवलच! या निरूपणाने हे लक्षात आले की वेदोक्तात विरोधी भाव नाही, रामावर गाढ प्रेम आहे. तेव्हा आता पुढील रामायणकथा निरूपण कर.' हा साधूसंतांचा अभिप्राय ऐकून माझ्या कवित्वाला आल्हाद झाला असून आता त्यांच्या आज्ञेप्रमाणे पुन्हा कथासंबंध सांगतो तो ऐकावा.'

श्रीरामामुळे राक्षसांना आडकाठी

विश्वामित्रांच्या यज्ञाचे रक्षण करण्यासाठी स्वतः श्रीरामच असल्यामुळे राक्षससमूहाच्या प्रवेशाला प्रतिबंध झाला. अन्य राक्षस यज्ञस्थळी जाऊ शकत नाहीत हे पाहून स्वतः सुबाहू तेथे आला. यज्ञद्वारात श्रीराम असल्याने राक्षसांचे काही चालले नाही. जेव्हा ते अंधार पडल्यावर छळायला आले तेव्हाही श्रीराम सावधान होता. दिवसा त्रास द्यावा तरी राम सावधान. स्वतः सुबाहू आला, तोही गोंधळला, राम कशानेही फसत नव्हता आणि छळलाही जात नव्हता. अंधारात श्रीरामाचे आत्मतेज सहजच पसरे आणि दिवसा दशरथपुत्र राम आपल्या अंगच्या आत्मबीजाने दिवसालाच दिवसपण देत होता. राम यज्ञाचा रक्षक असल्यामुळे छळ करणे शक्य होत नव्हते. या बालवयातल्या प्रतापवंताला पाहून सुबाहूही तटस्थ झाला. आता भयानक, भेसूर, रूप धारण करून घाबरवावे म्हणून प्रयत्न केला तरी श्रीरामाला भीती वाटली नाही. यामुळे राक्षसांना काही सुचेना, त्यांच्या बुद्धीवर झापड आली. यज्ञात शिरणे नित्य सावधान असलेल्या रामामुळे अशक्य होऊन बसले. सर्वांगसुंदर अशा रामाला पाहून सुबाहू तळमळत राहिला. या ऋषींनी रामाला आणून चांगलीच गांजणूक केली असा विचार करता करता अखेर भक्कम युद्ध करून, ताटिकावधाचा सूड घ्यायचे सुबाहूने ठरविले. असंख्य राक्षसांनी आकाशात

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Muthulakshmi Research Academy

जमून गडगडाटाच्या गर्जना केल्या, रक्ताच्या धारांचा वर्षाव केला. द्विजांना भय दाखविले आणि नंतर 'सांभाळ रे रामा' म्हणत सुबाहू स्वतःच रामाला सामोरा आला.

श्रीरामाचे राक्षसांशी युद्ध

सुबाहूच्या आव्हान-गर्जनेने श्रीरामाला हसू आले. त्याने बाणांचा वर्षाव करत सुबाहूला पूर्णपणे त्रस्त केले. तेव्हा सुबाहूचा कैवार घेण्यासाठी मारीच पुढे धावला. त्याने रामाला आव्हान दिले. मस्तकावरच्या अस्ताव्यस्त बटा हालवत विक्राळ तोंड वासून तो घोर आवाजातली आरोळी ठोकत श्रीरामाजवळ धावून आला. मारीच्याच्या नुसत्या आरोळीनेच घाबरून द्विज जमिनीवर पडले. कोणाच्या दातखिळी बसल्या, कोणी भयकंपाने थरथरू लागले, काहींची धोतरे गळाली,कोणी धोतरातच लघवी केली, कोणाचा अधोवात सरला, कोणी किंकाळी फोडली. आरडा-ओरडा, आरोळ्या, रडणे, उपडे पडणे, चरफडणे, असे अनेक प्रकार धाकाने घडले. कोणाचे दात करकरले, ओठ फाटले, एकाचे पोट फुगले, अशी ऋषींची आणि ब्राह्मणांची संकटग्रस्त अवस्था झाली. तेव्हा रामाने लक्ष्मणाला म्हटले, "तू जाऊन त्या द्विजांना अभय दे. त्यांची कासाविशी झाली आहे. मी राक्षसांचा नाश करतो."

राक्षसांनी समुदायाने, आरडत ओरडत, विक्राळ रूपात आणि भयंकर संग्राम करण्याच्या तयारीत पुढे चाल केली. त्या वेळी कातिया, त्रिशूळ, तोमर, गदा, मुद्गल, चंड, चक्र, बाण, खड्गे, लहुडी अशा लहान मोठ्या शस्त्रांचे संभार वापरले गेले. महाशस्त्रांचा लखलखाट, खड्गांचा खणखणाट, बाणांच्या सुटण्यामुळे सणसणाट होऊ लागला. घाव पडू लागले. शूर वीर टिकले, सहन करत राहिले, इतर राक्षस निर्बळ होऊन पळू लागले. तेव्हा 'धीर धरा, पळू नका' असे वीरांना प्रोत्साहन देऊ लागले. तेव्हा रामाने एक बाण असा सोडला की, त्यामुळे शस्त्रांचे चूर्ण झाले, ढाली-कवचे तुकडे होऊन पडली. त्या बलसंपन्न रामबाणाचे निवारण करण्यासाठी सोडलेली शस्त्रे चूर्ण होऊन पडू लागली, वीर कठीण अवस्थेत सापडले. हे पाहून सुबाहू संतापला. त्याने गदा हाती घेऊन रामाकडे धाव घेतली. परंतु राम नेहमी सावध असल्याने त्याला राक्षसांची द्वंद्वयुद्धाची मनीषा समजली. त्याने बाण सोडून सुबाहूची गदा आणि मारीचाचे मुद्गल यांचे पीठ केले. अती तीक्ष्ण अशा शूळ, त्रिशूळ यांनाही सपाट केले.

श्रीरामाने अग्निअस्त्र बाणावर योजून सोडले. त्या घावाने सुबाहू संपला. मारीचाला भोवळ आली, त्याच्या हातापायांची गठडी वळली, तोंडातून रक्ताच्या धारा गळू लागल्या. त्या बाणपिसाऱ्याच्या वाऱ्याने मारीचाला आकाशात उडवले. एखाद्या गवताच्या काडीला वाऱ्याने उडवावे किंवा वावटळीत सापडून पान भिरभिरावे तसा मारीच आकाशात गरगर फिरू लागला. नंतर शतयोजने दूर, समुद्रतीरावर त्याला फेकण्यात आले. राम लक्ष्मणाला म्हणाला," मारीचाला जरी बाण लागला नसला तरी ह्याचा प्राण काही वाचणार नाही कारण पिसाऱ्याने त्याला उडवला आहे." तिकडे समुद्रतीरावर पडलेल्या मारीचाला मूर्च्छा आली, त्याचे डोळे विस्फारले गेले, गळ्यातून घरघर आवाज येऊ लागला. परंतु काही काळ गेल्यावर मारीच नशिबाने सावध झाला. परंतु त्याने युद्धाचा धाक घेतला होता. त्याने सुबुद्धपणे विचार केला, 'पिसाऱ्याकडून एवढी दुर्दशा तर समोरासमोर युद्ध कोणाला सहन होईल! रामाला पाहताच जीव जाईल. ह्याचे निर्वाणीचे घाव कोण देहधारी सहन करील? महाभयालाही भय दाखवील असा तो राम आहे.' हा विचार त्याच्या मनात आला आणि त्याचबरोबर श्रीरामाचे चरण पाहिल्याने त्याचा युद्धाभिमानही गळाला. संग्राम न करण्यावी शपथ घेऊन तो आपल्या आश्रमात शांतपणे जाऊन बसला.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sayu Foundation Trust and eGangotri

श्रीरामाचा बाण सुबाहूला लागून त्याचेही मन शुद्ध झाले, चित्त, बुद्धी आणि अभिमान यांचा छेद होऊन त्याचा प्राण गेला. रामाने नेटाने ज्याला मारले त्याला मरणाचे दुःख जाणवत नाही की पुढील जन्म मिळत नाही, असे ते निःशेष मरण असते. मारीच आणि सुबाहू यांचे जे अनेक राक्षस-सेवक आले होते त्यांना रामाने एकएकाला टिपून मारले. त्यामुळे राक्षसांची प्रचंड, निष्प्राण धुडे आश्रमात जागजागी पडली. त्यांच्या केवळ दर्शनाने आश्रमवासी शिष्य घाबरले. 'ही प्रेतांची धुडे कोण काढणार?' असे त्या शिष्यांना संकट वाटले. ही अडचण श्रीरामाने अर्ध्या क्षणात सोडवली. जगदंबा स्वतः कोटयवधी भुते घेऊन आली. साडेतीन कोटी भुते घेऊन भद्रकाली आली आणि तिने आरती उजळून रामाला ओवाळले. भुतांनी भराभरा प्रेते उचलून नेली. क्षणार्धात आश्रम सोज्वळ झाला. त्या भुतांनीच सडा-संमार्जन करून रांगोळ्या घातल्या.

आश्रमातील जे ऋषी राक्षसांच्या भीतीने बेशुद्ध होऊन पडले होते त्यांना लक्ष्मणाने सावध करून स्नानास पाठविले. ते तातडीने स्नान करून लगेच आश्रमाकडे परतले. त्या वेळी त्यांना आश्रम शोभिवंत झालेला पाहून आनंद झाला. त्यांच्या मनात आले, 'खरोखर हा रघुनंदन महाप्रतापी आहे.' या विचाराने त्यांनी श्रीरामाची स्तुती केली. रघुवीर विजयी होऊन त्याने ऋषीवरांना सुख दिले म्हणून देव जशी श्रीविष्णूची पूजा करतात तशी रामचंद्राची पूजा केली.

विश्वामित्रांना रामप्रताप पाहून अत्यंत आनंद झाला. त्यांनी रामाची पाठ थोपटली. "गुरूची आज्ञा तू पाळलीस, गुरूच्या सेवेचे फळ तुला मिळाले, गुरूची चिंता तू नाहीशी केलीस ही यथार्थपणे तू गुरूपूजा केलीस. वास्तविक सद्‌गुरूचे गुरुत्व, निश्चयपूर्ण गुरुज्ञान, गुरुवाक्याचे आत्मबीज हे सर्व तूच आहेस. तुझ्यामुळेच गुरुत्व खरे होते. गुरुत्वाचा थोरपणा, महिमा, सीमा हे सारे श्रीरामच आहे. त्याच्यामुळेच ब्रह्माला ब्रह्मत्व आहे. श्रीराम हाच गुरूचे वीर्य, धैर्य, गांभिर्य असून तो गुरुत्वाचा गुरुवर्य आहे. गुरुत्वाचे मूळ तेज, बीज, गुह्य-गूज, स्वानंदसुख हा श्रीरामच आहे. गुरूची उत्पत्ती, शांती, मूर्ती असा हा श्रीराम गुरुकृपेशिवाय समजणारच नाही. गुरूचा प्रताप, गुरूचे सद्रूप श्रीराम असून तो ब्रह्मरूप, चित्स्वरूप आहे." अशी स्तुती करून कौशिकांनी आनंदातिशयाने रामाला आलिंगन दिले. यामुळे गुरू आणि शिष्य दोघांनाही समाधान झाले.

विश्वामित्रांचा दानधर्माने आनंदोत्सव

यज्ञपूर्तीने आणि रामप्रतापाने विश्वामित्रांना परिपूर्ण आनंद झाला. त्यांनी द्विजांना सहस्त्राधिक गायी दिल्या. सोन्याची शिंगे, रुप्याचे खूर, पाठीवर तांबे आणि कांस्य यांच्या झुली, गोपुच्छाला प्रवाळ आणि रत्ने, मोती अशी गोदाने देऊन द्विजकुळे सुखी केली. सोन्याचे संभार, हजारोंची दक्षिणा यांचे वाटप करून याचकांना आनंदी केले. कौशिकांनी त्या यज्ञात आलेले याचक संपन्न करून सोडले. नित्य विजयी श्रीरामाने राक्षसगणांचा निःपात केला आणि ऋषींचा यज्ञ सिद्धीस गेला म्हणून ब्राह्मणभोजने घातली. श्रीराम विजयी झाला याचे कौतुक त्रैलोक्यात पसरले. ते ऐकून रावण चकित झाला आणि देवगणांना आनंद झाला.

अध्याय चौदावा

विश्वामित्रांच्या यज्ञासाठी जमलेले प्रसन्नमुख ऋषी एकत्र बसून आपसांत रघुकुळटिळक श्रीरामाचे गुणगान करत बसले होते. अशा वेळी जनक राजाचे दोन सेवक, कुंकू लावलेले पत्र घेऊन आले. त्या आमंत्रणपत्रात लिहिले होते की, 'विश्वामित्रांनी स्वतःच्या यज्ञाच्या निमित्ताने अनेक ऋषिगण एकत्रित आणले आहेत तर त्यांसह स्वामींनी स्वयंवराला यावे.' ही पत्रिका वाचल्याबरोबर कौशिकांनी सन्मानाने राम आणि

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Muthulakshmi Research Academy eGangotri

लक्ष्मण यांना बोलावले. त्या दोघांनी साष्टांग नमस्कार घालून, हात जोडून नम्रपणे म्हटले, "आम्ही, आपले नित्य अंकित आहोत. आम्ही निश्चयाने सेवक आहोत. यज्ञ सिद्धी पावला, आता पुढचे कार्य सांगावे. स्वामी, आपण जी आज्ञा कराल ते कार्य आम्ही क्षणार्धात पूर्ण करू. कारण गुरूकृपेचा महिमाच असा थोर की सर्व कार्य सिद्धीस जाते." एवढ्या बालवयात धैर्याने, शौर्याने उद्धट राक्षस मारले तरी रघुवीर गर्व करत नाही हे पाहून विश्वामित्र सुखी झाले. वीर्य आणि धैर्य यांना शुद्ध ज्ञानाची जोड मिळाली; तरी निगर्वी असा शिष्य मिळाला म्हणजे गुरू जे सुखसोहळे भोगतो; त्या सुखाची तुलनाच होणार नाही.

मिथिलेला जाण्याविषयी बोलणे

विश्वामित्रांना सुख झाले आणि त्यांनी राम आणि लक्ष्मण यांना जवळ घेतले. जनकाकडून आलेल्या आमंत्रणपत्रिकेविषयी सांगून, आपण मिथिलेकडे लगेच जाऊ असे म्हणून विश्वामित्रांनी त्यांचे मनोगत सांगितले. " जनक हा मिथिलेचा राजा आहे. त्याने धनुर्यागाचे सीता-स्वयंवर आयोजिले आहे. अनेक सुर आणि नर तेथे जमले आहेत. ऋषिवरांनाही त्याने आमंत्रित केले आहे. देशोदेशीच्या राजानांही त्याने निमंत्रण दिले आहे. दशरथालाही निमंत्रण गेले आहे. परंतु तो रामविरहाने विव्हळ झाल्याने येणार नाही. आम्ही सर्व ऋषिवर्य अवश्य जातो आहोत. तुम्हीही आमच्या समवेत यावे." त्यावर राम म्हणाला, "आज्ञा प्रमाण! गुरूंच्या आज्ञेचे पालन करणे हे सर्व भाग्याचे भूषण आहे; कल्याणाचे कल्याण आहे. शिष्यांचे ते कर्तव्यच ठरते. आम्ही आपले शिष्य आहोत." यावर पुन्हा विश्वामित्र बोलले, "तुमच्या शिष्यत्वाने माझी थोरवी, तेव्हा तुम्ही तिकडे आलात तर तेथे जमलेल्या राजांमध्ये तू हे श्रीरामा, प्रमुख होशील." या गुरुवचनाचा आदर करून राम आणि लक्ष्मण हे सद्गुरूंसह रथात बसले. मिथिलेकडे त्यांचा रथ निघाला तेव्हा सर्वांनी रामाचा जयजयकार केला. मिथिलेकडे जाताना त्या नगरीच्या अलीकडे पाच योजनांच्या अंतरावर सर्व मुनी कुशोपवनात थांबले.

अहल्येच्या वृत्तान्ताची पार्श्वभूमी

कुश-उपवनात विश्रांती घेत असताना चौफेर पाहणाऱ्या श्रीरामाला उपवनाच्या एका कोपऱ्यात एक आश्रम दिसला. त्या आश्रमात कोणाचाही वावर नव्हता आणि आसपासचे वृक्षही शुष्क, फलहीन दिसत होते. हे पाहून रघुनाथाने ऋषींना विचारले, "हे इकडचे उपवन असे उजाड का? इथे माणसांची वस्ती नाही, पक्ष्यांनी या भागाचा त्याग केलेला दिसतो, मुंगी-माशी असे कीटकही तिथे नाहीत, वृक्ष वाळलेले आहेत, ही अशी वाताहत का झाली?" असे श्रीरामाने विचारताच ऋषी म्हणाले. " अहल्या-गौतम यांचा हा आश्रम आहे. इंद्राने अहल्येचा छळ केला. गौतमांनी दोघांनाही शाप दिला. तेव्हापासून आश्रमात कोणाचीही वस्ती नाही." यावर श्रीरामाने 'अहल्या कोण? इंद्राने छळण्याचे कारण काय?' इत्यादी प्रश्न विचारून मूळ कथाच सांगण्याची विनंती केली. तेव्हा विश्वामित्रांनी सर्व वृत्तान्त सांगायचे ठरवून आरंभ केला.

"ब्रह्मदेवाने त्रैलोक्यातले सौंदर्य एकवटून स्वतः एक अहल्या नावाची कन्या निर्माण केली. तिचे शरीर इतके सुकुमार होते की चंद्रकिरणही तिला खुपावेत; नागकन्या याही तिच्यापुढे राकट वाटाव्या; आभाळापेक्षाही नाजूक, मृदू असे तिचे अंग होते. तिच्या केवळ स्पर्शाने मनासह सर्व इंद्रियांना गुदगुल्या होत. तिच्या गोडव्यापुढे अमृतही फिके ठरावे. तिचा चेहरा पाहून इतके सुख वाटे की पाहणाऱ्याला इतर काही पाहण्यासारखे नाही असे वाटून त्याचे डोळे त्यावरच खिळून राहात. तिच्या सौंदर्याची शोभा अशी की चंद्रही निस्तेज व्हावा. तिचे लावण्य पाहून विवेकाचा प्राण जावा.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

तिच्या डोळ्याला डोळा भिडला की धैर्याची ऐट संपावी. अशी तिच्या सुंदरतेची संपन्नता होती. तिच्याकडे पाहाणाराची दृष्टी हालत नसे. अशी ती सुंदर अहल्या हळूहळू मोठी होऊन लग्नाला योग्य वयाची झाली. आता ब्रह्मदेवाचा तिच्यासाठी वर शोधण्याचा विचार सुरू झाला. इंद्राला राणी म्हणून आणि चंद्राला पत्नी म्हणून ती हवीशी वाटून त्यांचे प्रयत्न सुरू झाले. त्यांच्याप्रमाणेच सूर्य, वरुण, वायू, यम, कुबेर, स्कंद आणि इतरही अनेक देव हे सारेच तिच्या प्राप्तीसाठी झटत होते. त्या सर्वांनी आपल्या भावना अहल्येपाशी व्यक्त करण्याचा प्रयत्न चालू केला. तेव्हा त्या वेळी विधाता ब्रह्मदेव विचारात पडला. 'कोणाविषयी विचार करावा?' अखेर त्याने एक युक्ती योजली. त्याने तिच्या प्राप्तीसाठी एक 'पण' लावायचे ठरवले.

अहल्या-गौतम यांचा विवाह

ब्रह्मदेवानें कुशलतेने 'पण' निश्चित करून असे वृत्त प्रसृत केले की, 'जो कोणी दोन प्रहरांत पृथ्वीप्रदक्षिणा करून येईल. त्याला वर ठरवून मी अहल्येचे कन्यादान करीन.' हा ब्रह्मदेवाने लावलेला 'पण' ऐकताच इंद्र ऐरावतावरून, चंद्र मृगावरून, मेषावरून अग्नी, सर्व जगाचा स्वामी असा यम कार्याविषयी अत्यंत तत्परतेने सजवलेल्या रेड्यावरून, स्कंद मयूरावरून, कामदेवाने मकरावरून, असे पृथ्वीची पूर्ण प्रदक्षिणा करायला सर्वजण तातडीने निघाले. ऋषिवर्यातले लहान-मोठे त्याच विचाराने, आपल्या तपःसामर्थ्याने पृथ्वीप्रदक्षिणेसाठी निघाले. गौतमाने आपले अनुष्ठान पूर्ण केल्यावर, एका गायीची प्रसूती होऊन तिला वासरू झाल्याचे स्वतःच्या दृष्टीने पाहून, गौतमाने त्या सवत्स धेनूचा गौरव जाणून त्रिवार तिची प्रदक्षिणा पूर्ण केली. सवत्स धेनूची प्रदक्षिणा ही पृथ्वीप्रदक्षिणा केल्याचे पुण्य देते. ब्रह्मदेवाने ते स्वीकारून गौतमाला आपली कन्या दान केली. इंद्र एका प्रहराने आश्रमात परत आला. तेथे त्याला बोहली आणि अन्य विवाहोपयोगी साहित्य दिसले. त्यामुळे तो मनातून अतिशय चिडला आणि चांगलाच संतापला. नंतर इतरही सारे इच्छुक आश्रमात परत आले. त्यांना देखील विवाहसामग्री पाहून आश्चर्य वाटले. त्या सर्वांनी ब्रह्मदेवाकडे विचारणा केली तेव्हा त्यांना अहल्येचा विवाह गौतमाबरोबर झाल्याचे समजले. त्यांना आश्चर्य वाटले.

इंद्र ब्रह्मदेवाला म्हणाला, "अहल्या गौतमाला द्यायची होती तर आम्हाला पृथ्वीप्रदक्षिणेला धाडून आमचा निष्कारण छळ का केला?" त्यावर ब्रह्मदेवाने सांगितले, "गौतमाला त्रिवार पृथ्वीप्रदक्षिणा घडली म्हणून मी त्याला कन्यादान केले." हे ऐकून इंद्राने विचारले, "आमच्यापेक्षा गौतमाला चालायची काय अधिक शक्ती आहे? तो त्रिवार प्रदक्षिणा कसा काय करू शकला? हे कसे काय झाले?" नंतर ब्रह्मदेवाने स्पष्टीकरण करताना म्हटले, "देवेन्द्रा, उगाच वितंड वाद करू नको. अरे, गोमाता प्रसूत होताना गौतमाला त्या सवत्स धेनूचे दर्शन घडले. असे दर्शन घडल्यावर गौतमाने तिला त्रिवार प्रदक्षिणा केली. यामुळे त्याची प्रदक्षिणा ही पृथ्वीप्रदक्षिणेसमान आहे हे जाणून मी कन्यादान केले. कारण, वेदांमध्येही तसा अभिप्राय आहे हे मी पाहिले." या ब्रह्मदेवाच्या स्पष्टीकरणाने इंद्राचे बोलणे खुंटले, परंतु त्याचा संताप मात्र वाढला. तो मनातून जळफळत राहिला. त्याने ठरविले की 'मी नाना तऱ्हेने कपट-कारस्थाने करून अहल्येची प्राप्ती करून घेईनच. चंद्राने गुरुपत्नीला भोगले, त्याप्रमाणे मी अहल्येला भोगीन.' याप्रमाणे इंद्राच्या मनात निश्चय दृढ झाला.

इंद्राचे कपट आणि गौतमांची शापवाणी

ब्रह्मदेवाने अहल्येची पाठवणी करताना गौतमाला सावधान राहण्याची सूचना दिली. 'इंद्र अहल्येची अभिलाषा बाळगून आहे. तेव्हा तुम्ही अहोरात्र दक्ष राहून तिचा सांभाळ करावा.'

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

तपश्चर्येचे प्रखर तेज असलेल्या गौतमांनी अहल्येला आपल्या आश्रमात आणले. इंद्र हा अनेक वर्षे अहल्या मिळाली नाही म्हणून दुःखी झाला. एकदा पूर्ण खग्रास सूर्यग्रहण आले. या निमित्ताने गौतमांनी अहल्येसह गंगास्नान करायला प्रयाण केले. ते इंद्राच्या बाबतीत अत्यंत सावधानता बाळगून होते. ग्रहणकालात विधिपूर्वक सर्व उपासना पूर्ण झाली. अहल्येने मुक्तिस्नान उरकले आणि ब्राह्मणभोजनाचा स्वयंपाक करण्यासाठी ती आश्रमात परतली. गौतम मागे राहून स्वधर्म संपन्न करण्यासाठी याचकांना दानधर्म करण्यात मग्न झाले. ही संधी साधून इंद्राने कपट करायचे ठरविले.

इंद्राने गौतमांचे रूप धारण केले आणि तो अहल्येकडे आश्रमात आला. त्याने तिला एकांतात नेले आणि अत्यंत घाईने रतिसुख द्यावे म्हणून सांगितले. हे ऐकून अहल्येला फार आश्चर्य वाटले आणि ती म्हणाली, "दिवसा आपण रतिसुख कसे मागता? शिवाय आज तर पितृतिथी आणि पर्वकाळ आहे. अशा स्थितीत कामक्रीडा सर्वथा निषिद्ध मानली जाते!" हे ऐकल्यावर गौतमाच्या रूपातील इंद्र म्हणाला, "पतीचे वचन कितीही विपरीत वा विचित्र असले, तरी पतिव्रता ते पूर्णपणे पाळतात. पतीच्या वचनाला दूषण लावणे हे स्त्रीच्या (पत्नीच्या) अधःपतनाचे लक्षण ठरते. तिने पतीच्या सांगण्याप्रमाणे नेहमी अनुसरावे; त्यातील दोष पाहू नयेत, अशी स्पष्ट मर्यादा वेदशास्त्राने घालून दिली आहे. पतीच्या बोलण्याला दोषी ठरवते ती स्त्री आकल्प अधःपतित होते. आता तर तू सज्ञान झाली आहेस आणि तरीही पतीचे सांगणे मानत नाहीस! जे जे माझ्या विरुद्ध आचरण होईल ते ते मी माझ्या स्वतःच्या तपाने तत्काळ नाश करीन, या बाबतीत तुला काही संशय आहे काय?" हे गौतम बोलत आहेत अशी समजूत झालेली अहल्या आपल्या स्वधर्माप्रमाणे (पतिनिष्ठा) संकोचली आणि काही बोलू शकली नाही. नंतर तिने एकांतात जाऊन त्याला (गौतम समजून इंद्राला) रतिसुख दिले. अशा रीतीने इंद्र आणि अहल्या एकत्र शय्येवर असताना गौतमांचे आगमन झाले. आपली पत्नी परपुरुषाबरोबर रममाण झाली असल्याचे त्यांना समजले. ते दारातच गुप्तपणे उभे राहिले.

अहल्येला एकांतात असताना 'हा गौतम नव्हे' याची जाण आली; तेव्हा तिने "माझ्या पतीचे रूप घेऊन आलेला तू कोण आहेस? कपटाने परस्त्रीचा भोग घेतोस" असे म्हणत इंद्राला घट्ट धरून ठेवले. "माझ्या पतीच्या रूपाचा बुरखा घेऊन आलेला तू कोण पापमूर्ती आहेस ते सांग. कारण तू कपटाने माझ्याकडून रतिसुख घेऊन माझा छळ केला आहेस." त्यावर इंद्राने 'मी अमरपती इंद्र' असे सांगितले. हे ऐकताच अहल्या म्हणाली, "आता रतिविलास पूर्ण झाला आहे. तू आता लवकर निघून जा. कारण ऋषी दोघांनाही शिक्षा म्हणून नष्ट करतील. हे पापी चांडाळा, तुला पापाचा कंटाळा नाही पण तू दोन्ही कुळांना विटाळले आहेस. दुष्टा, दुःशीला आता इथून तातडीने निघून जा. तुझे निंद्य कर्म, काळे तोंड आणि तुझे महिमान जळू दे. आता लगेच गेला नाहीस तर ऋषी तुला जाळून भस्म करतील. अरे तू देवांचा अधिपती असून परस्त्रीबद्दल कामवासना ठेवतोस यामुळे तू अधोगतीला जाशील, चल नीघ आणि पुन्हा मला तोंड दाखवू नकोस, जा."

अहल्येच्या शब्दांनी लज्जित झालेला इंद्र बाहेर आला, तेव्हा स्वतः गौतमऋषी दारात उभे असलेले त्याने पाहिले. त्यांच्याविषयीच्या भयाने हृदय कापू लागलेल्या इंद्राने लगेच मोराचे रूप घेऊन पळ काढला. परंतु गौतमांनी त्याची गती खुंटविली त्याला वेगाने जाता आले नाही. (इंद्रगोप म्हणजे मोर त्याला अद्यापही शीघ्रगतीने धावता येत नाही.) मग गौतमांनी इंद्राला उद्देशून शापवाणी उच्चारली, "परस्त्रीचा उपभोग घेण्यासाठी ज्यांचा उपयोग तू करतोस ते तुझे वृषण झडून जातील आणि परस्त्रीच्या ज्या ठिकाणावर तुझे लक्ष जडले आहे,

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

तशी भगे तुझ्या संपूर्ण शरीरावर निर्माण होतील. (सहस्त्रभग असे इंद्राला म्हणतात)" इंद्राला असा शाप देऊन गौतम आत आले तेव्हा अहल्या वस्त्रे सावरत होती. तिला उद्देशून गौतम म्हणाले, "हे दुराचारिणी, तू कशी रममाण झालीस?"

अहल्येने या प्रश्नाचे स्पष्टीकरण देताना सांगितले, "अहो, पतीचे रूप घेऊन त्या परपुरुषाने मला कपटाने छळले आहे. कोणतीही पतिव्रता सती स्मृतिवेदान्त वचनांचा अव्हेर करण्याचा धीर करू शकत नाही. आपल्या रूपात येऊन त्या परपुरुषाने एकांताची प्रार्थना केली. माझ्यापुरती भावना अशी होती की मी तुम्हालाच रतिसुख देते आहे. मला कपटाची काहीच माहिति नव्हती. आपले वचन मानले पाहिजे या धोरणामुळे मी नकार दिला नाही. त्याच्या कपटाची मला जाणीवच नव्हती. स्वामींच्या वचनाचे उल्लंघन केल्यास माझे अधःपतन होईल या भयाने मी, स्वधर्माचरण समजून वागले." परंतु इंद्र अहल्या यांचे बोलणे जरी एकांतात चालले होते तरी गौतमांनी ते गुप्तपणे ऐकले होते. त्यावरून अहल्या स्वतःच्या कामभावनेने इंद्राशी रममाण झाली असेच त्यांनी तत्त्वतः मानले.

गौतमांनी अहल्येला उद्देशून शापवाणी उच्चारली. "अगे, संभोग परपुरुषाशी होत असल्याचे जाणवताच जर तू लाथा मारून उठली असतीस तर मी तुला पतिव्रता मानले असते. पण तू तर पूर्णकाम होईतो रममाण झालीस. तो परपुरुष आहे हे ओळखल्यावरही तू बोललीस, 'भोग भोगून तुझी कामना पूर्ण झाली आहे, तेव्हा ऋषी आले नाहीत तोवरच तू निघून जा! परपुरुष असल्याचे तुला ज्ञान झाल्यावरही तुझे मन भोगामधे कंटाळले नाही. अशी तू पाषाणाची जड शिळा होशील. परपुरुषाशी कामक्रीडेचा सोहळा करणारी तू महाशिळा होशील. तुझ्याकडे कोणी पाहणार नाही, भुते देखील तुझा विटाळ मानतील. इथल्या वृक्षांना फुले, फळे येणार नाहीत. त्यांच्या छायेत विश्रांती मिळणार नाही. या आश्रमात प्राण्यांची वस्ती होणार नाही. तू पापाचरणाचे सर्व त्रास भोगशील." अहल्येने हा शाप ऐकून गौतमांची प्रार्थना केली, "माझ्याकडून पतिभ्रमामुळेच ती कृती घडली आणि मला दूषण लागले आहे. स्वामींनी कृपा करावी आणि या शापातून पूर्णपणे मला मुक्ती मिळेल असा उःशाप द्यावा."

अहल्येची दीनवाणी ऐकून गौतमांचे कृपाळू मन कळवळले.

गौतमांकडून उःशाप व पश्चात्ताप

गौतमांना अहल्येची कीव येऊन त्यांनी उःशाप देताना तिला सांगितले, "तू शिळा होऊन पडशील, आणि श्रीरामाचे चरण तुला लागले म्हणजे तुझा उद्धार होईल. जोपर्यंत तुला रामचरण स्पर्श करणार नाहीत, तोपर्यंत तू रामनामाचे स्मरण करत राहा. रामनामाहून अन्य कोणतेही प्रायश्चित नाही. रामनामाच्या आवृत्तीने पापांच्या राशी जळून जातात. तू शिळारूप झालीस की तुझी बुद्धी नाहीशी होईल. परंतु राम हा तुझ्या चित्तात निरंतर राहावा." एवढे सांगून गौतमांनी पाठ फिरवली आणि लगेच अहल्या शिळा होऊन पडली. तेव्हापासून या आश्रमाला अवकळा आली. प्राणी पळाले. शापाच्या प्रभावाने मुंग्या-माशाही इथून निघून गेल्या. पक्षी, श्वापदे यांनी देखील या स्थळाचा त्याग केला.

गौतमांनी क्रोधाने अहल्येला शाप दिल्यावर आणि उःशाप ऐकवल्यावर ती पर्णकुटी सोडली. नंतर त्यांच्या मनात अनुताप-पश्चात्ताप निर्माण झाला. अरेरे, क्रोधाने मला सहजपणे जिंकले. अहल्या आणि इंद्र यांचे एकमेकांवर प्रेम असून, त्यांनी एकांतात सुखभोग भोगले, तेव्हा माझ्या मनात शांती का उपजली नाही. स्त्रीविषयीच्या आसक्तीने मी क्रोधाविष्ट झालो. रतिक्रीडा करत एकांतात इंद्र अहल्येपाशी असताना मी शांतपणाने

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

तपाचरणाला निघून का गेलो नाही. सर्वांच्या अंतरात असणारा आत्मा एकच असून तोच भोगणारा असतो, हे मी जाणत असताना इंद्रसंभोगाचे मला दुःख झाले यावरून माझे ज्ञान आणि माझा विवेक यांना क्रोधाने गिळले हेच खरे. माझी स्त्री, माझे घर ही भावना म्हणजे कामक्रोधांचे मंदिरच म्हणावे लागेल. यामुळे थोर थोरही फसले आणि मलाही क्रोधानेच पुरते नाडले. माझी स्त्री हा जो अभिमान तेच सर्व दुःखाचे मूळ, क्रोधाचे तेच जन्मस्थान, त्यामुळेच मी पुरता नाडला गेलो. गौतम हा त्रिजगतात पवित्र अशी पुराणांतरी माझी प्रसिद्धी असून, तोच मी स्त्रीलोभाचे अनुसरण करणारा झालो, माझ्या विवेकसंपत्तीची क्रोधाने लुबाडणूक केली. पूर्वी या गौतमाने मध्याह्नकाळी सुद्धा साळी पिकवून अनेक ऋषींना दुष्काळात वाचविले, अशा मला क्रोधाने जिंकले. मुख्यतः स्त्रीविषयीच्या कामवासनेपाशी क्रोध भराला येतो, त्याच क्रोधाने या गौतमाला लुबाडले हे कोणाला कसे सांगावे!'

क्रोधावरील भाष्य

"आईवरून शिवी देणे ही भलत्याच प्रकारे सहन करावी लागणारी अवहेलना आहे. स्त्रीवरून शिवी दिली तर तत्काळ शस्त्राने किंवा शापाने मरण ओढवून घेणारी आहे. अहो, अशी त्या क्रोधाची प्रसिद्धी आहे. त्या दोन्हींची मी उपयोजना केली आणि माझ्या ज्ञानाधिष्ठित विरक्तीची लुबाडणूक झाली. क्रोध परमार्थाला घातक ठरतो. क्रोध हा केवळ महाघातक असून, तो वैराग्य मारून टाकतो, सर्व योगांचा भंग करतो, तो अतिशय अपवित्र आहे. एखाद्या अस्पृश्याचा विटाळ पाण्याने घालविता येतो (स्नानाने); परंतु चित्तामध्ये वस्ती करून राहणारा क्रोध कसा काढून टाकावा यावर कोणतीच युक्ती चालत नाही. तो सर्वार्थाने घात करणारा आहे. कसली कांता, कुठला पुत्र असे मी शास्त्रग्रंथात वाचले होते; पण ते पुराणपत्रातले वचन व्यर्थ झाले, क्रोधाने मला अपवित्र केले. जे कामवश होतात ते निदान काही भोग तरी भोगतात; पण जे क्रोधाच्या हाती सापडतात ते व्यर्थ भोगमोक्षाला पारखे होतात. क्रोधासारखा शत्रू मर्मस्थानी बसला असेल, जो त्याची थोरवी मान्य करत असेल, तो चराचरात मूर्ख ठरतो. अपकार करणारावर राग धरतात, परंतु क्रोधावर कोणी राग धरत नाहीत. क्रोध हा एखाद्या वाटमारी करणाऱ्यासारखा आपला पुरुषार्थ हिरावून नेतो. आता क्रोधाची शांती करावी यासाठी तपस्थिती आचरून राहावे" असा निश्चय करून ऋषी गौतम हे तप करण्यासाठी निघाले. चित्तात या विषयी निश्चित असे धोरण ठेवून ऋषी तपश्चर्या करायला निघाले.

सिद्धचारण लोकांवर, मेरू पर्वताच्या पठारावर, हिमालयाच्या शिखरी गौतमांनी आदराने तपाला जाण्याचा निश्चय केला. निर्विकारपणे बसून, अगाध निष्ठा ठेवून, तपाला आरंभ केला की कामक्रोध उतरतच नाहीत, अशी त्या तपाची थोरवी आहे.

शापानंतरची इंद्राची स्थिती

ब्रह्मर्षींचा शाप अत्यंत दारुण असतो. इंद्राचे वृषण झडले आणि त्याच्या सर्वांगावर भगे उमटली. परस्त्रीकडे पाहणारे त्याचे डोळे भगांकित झाले. परस्त्रीचे मुखचुंबन घेणारे त्याचे मुख, परस्त्रीला आलिंगन देणारे हृदय, बाहु, बोटे ही सर्व भगांनी भरून गेली. परस्त्रीच्या अधरांना स्पर्श करणारी जीभ, भुवयांनी खुणा करणाऱ्या भुवया भगांकित झाल्या. परस्त्रीकडे जाणे भगांकित पायांनी अशक्य केले; पायाच्या तळव्यावर भगे निर्माण झाली. ज्या ओठांनी परस्त्रीशी कामगोष्टी करायच्या ते ओठ भगांनी भरले. कपाळ, पाठ अशा सर्व ठिकाणी भगे उमटली. यामुळे इंद्र व्यथित होऊन, सर्वांगावर भगांची गर्दी झाली. आता त्याला स्वतःच्या कृत्याबद्दल खंत वाटू लागली आणि तो विलाप करू लागला. इंद्राच्या सर्वांगावर भगे आली त्यामुळे तो

https://archive.org/details/@tulsilakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

पक्षीरूपातच गुप्तपणे राहिला. देव, ऋषी अशा सर्वांना तो स्पष्ट असा दिसेना.

इंद्राने अमरमंडळाचा त्याग केला; नंतर मेघ उच्छृंखल झाले; पृथ्वीकडून फल मिळणे मंदावले; स्वधर्म सारेच कुंठित झाले. यामुळे देव, ऋषी हे त्याला अपेक्षेने शोधू लागले. ब्रह्मदेवाने त्यांना गौतमांकडून उःशाप मागण्यास सुचविले. नंतर देव आणि ऋषी एकत्रितपणे गौतमांकडे आले. त्यांना विनंती करून इंद्राचा उद्धार करण्याविषयी सांगितले. गौतमांना स्वतःलाही क्रोधाविषयी पश्चात्ताप वाटत असल्यामुळे, त्यांनी क्रोधाचे निर्दाळण केले आणि देवांनी प्रार्थना करताच संपूर्ण कळवळ्याने कृपा करायचे ठरविले.

गौतमांनी आश्वासन दिले. "इंद्राने भरपूर दुःख भोगले आहे तेव्हा आता मी त्याची महती वाढेल आणि पूर्वीपेक्षा त्याला अधिक मोठेपण मिळेल असे करतो." गौतमांच्या आश्वासनाने मयूरवेषातला इंद्र आनंदित झाला आणि आपली पिसे (पिसारा) उभारून उल्हासाने थुईथुई नाचू लागला. "इंद्र भगांकित असल्याने त्याला सहस्रभग असे म्हटले जात होते. आता भगांचे नयन होतील आणि इंद्र सहस्त्रनयन म्हणून ओळखला जाईल." असा गौतमांनी उःशाप उच्चारला. यांनतर इंद्राने गौतमांची स्तुती केली.

"पुरुषांमध्ये उत्तमोत्तम अशा गौतमांचा जयजयकार असो. आपला अगाध महिमा आम्हाला कळत नाही. आपण मला शाप दिलेला नाही, तर माझा कर्मभोग मी भोगला आहे. माझ्यामधला दुराचारी आपण संपविलात ही आपली महान् लीला आहे." याप्रमाणे इंद्राने गौतमांचा गौरव केल्यावर देवांनीही गौतमांची स्तुती केली. "आपली ख्याती अलौकिक आहे. एका अपराध्याचा आपण निश्चित उद्धार केला आहे."

मोराच्या ठिकाणी इंद्रपणाची खूण अजूनही दिसून येते. त्यालाही वृषण नाहीत. स्त्रीशी रतणे त्याला नसते. मोर आनंदाने नृत्य करतो आणि त्याच्या डोळ्यातून वीर्य स्रवते ते झेलून मोरणीच्या उदरात गर्भ राहतो. इंद्राला जरी पूर्ण महत्त्व आले तरी पुरुषत्व लाभले नाही. तेव्हा हत्तीचे वृषण देऊन त्याला पुरुषत्वाला आणण्यात आले यामुळे हत्तीला वृषण नाहीत असे झाले आणि तो वीर्यक्षीण झाला. पुढे इंद्राने त्याला वृषण दिले ते त्याने मस्तकी धारण करून इंद्राला वंदन केले. यामुळेच अजून हत्तीच्या लिंगापाशी वृषण नाहीत. ते त्याच्या मस्तकाच्या ठिकाणी असल्याने त्याला (गंडस्थलयुक्त) कुंभेभ म्हणतात. रतिक्रीडेच्या वेळी ते लिंगापाशी येतात पण एरवी मस्तकी असतात. यामुळेच तो पूर्ण कुंभेभ भासतो. हत्तीच्या वृषणांमुळे इंद्राला ऐश्वर्य प्राप्त झाले, यासाठी देवांनी त्याचे ऐरावत नाव ठेवले. इंद्रापाशी हत्तीचे वृषण असल्यामुळे त्याला हत्तीचे बळ आले आणि हत्तीपाशी इंद्राचे वृषण असल्याने त्याला इंद्रासमान बळ प्राप्त झाले. हत्तीला इंद्रासारखे बळ येऊन, इंद्रामुळे हत्तीचे महिमान वाढविले गेले. सैन्यामध्ये गजदळ असले तरच त्या सेनादलाला शोभा असते. अन्यथा ते दळ ओकेबोके भासते. गजेंद्राला राज्यप्राप्तीमुळे गजांतलक्ष्मी म्हणण्यात येऊन सर्व प्रजा वंदन करते. हीच लक्ष्मीची पूर्णावस्था मानतात.

अशाप्रकारे गौतमऋषींच्या कृपा करणाऱ्या वचनाने उद्धार झालेला इंद्र ऐरावतावर बसवून देवांनी स्वर्गात नेला. त्या वेळी त्याचा जयजयकारही केला." असे पूर्ण अहल्या-आख्यान विश्वामित्रांनी सांगितले आणि श्रीरामाला 'अहल्येचा उद्धार कर' असे म्हटले. ही सद्गुरूंची सूचना ऐकतांच रघुनंदन तातडीने उठून आश्रमात गेला. ऋषींच्या हातात हात घालून त्याने आश्रमात अहल्येचा शोध घेतला. ऋषींनी चौफेर पाहूनही ती त्यांना दिसेना. परंतु श्रीराम आश्रमात फिरत असताना अचानक त्याचा पाय लागला आणि अहल्येचा उद्धार झाला. तिने साष्टांग नमस्कार घातला. श्रीरामाचे चरण मस्तकी धरले आणि आनंदाश्रू ढाळून रामचरणांचे प्रक्षाळण केले.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

अहल्येला प्रेमाचे आणि आनंदाचे भरते आले.

श्रीरामस्तुती आणि रामनामाची महती

"रामचंद्राचा जय असो! पदस्पर्शाने शिळा उद्धरली. हे जगदुद्धारका, तुझे चरण हेच भवसागर तरून नेतात. तुझ्या चरणांच्या स्पर्शाने शिळा उद्धरते यात काय नवल! तुझ्या चरणांच्या स्पर्शाने कर्माकर्माची बोळवण केली जाऊन पूर्ण प्रपंच परमार्थ होतो. जोवर तुझ्या चरणांची भेट होत नाही तोवर प्रपंचाच्या सबळत्वाच्या गोष्टी होतात; परंतु एकदा तुझे चरण पाहिले की सारा प्रपंच ब्रह्ममय होतो. तुझ्या चरणस्पर्शाने स्थूल, लिंग, कारण आणि महाकारण ही देहस्थिती परिपूर्ण परब्रह्म होते; देह विदेह होतो; संदेह निःसंदेह होतो; जीव हा शिव साक्षी होतो. अशा तुझ्या चरणांची ख्याती वर्णन करताना वेद थकून मुके झाले. चारी मुक्ती तुझ्या चरणांना शरण आल्या."

"श्रीरामकथा अनुवादिली तर कळिकाळही माथा लपवितो, तीर्थे वंदन करतात, देव समाधान पावतात. रामायणाचे प्रेमाने गायन केले तर स्वतः श्रीरामही सुखावतो आणि वक्त्याचे जन्ममरण नाश पावते. श्रोते तर ब्रह्ममय होतात. अशी ही तुझी कथा सर्व लोकांना पावन करते. केवळ तुझे नामस्मरण केल्यानेही मुक्ती मिळते. रामनामाचे नित्य स्मरण केल्याने पातकांचे भस्म होते आणि चारी पुरुषार्थ सुलभ होतात. जन्म आणि मरण यांचा फेरा नष्ट होतो, मी-तूपण हरपते, प्रपंचाचे बंधन बाधत नाही. तुझ्या नामाच्या स्मरणाने मायामोह, कर्मबंधन, त्रिविध ताप यांची बाधा संपते. दृश्य, द्रष्टा, दर्शन; ध्येय, ध्याता, ध्यान; ज्ञेय, ज्ञाता; ज्ञान या त्रिपुटींचे रामस्मरण करणाराला भान राहात नाही. श्रीरामाच्या नामस्मरणाने देहात् देहभाव, जिवात जीवभाव किंवा मी-तूपणाचा ठाव उरत नाही. श्रीरामाच्या नामघोषामुळे काळ शरण जातो, भवभय पळून जाते आणि पूर्ण सुखाचे सोहळे अनुभवाला येतात. श्रीरामनामाचा गजर झाला की ब्रह्म स्वानंदाने हुंकार देते. ज्याप्रमाणे गाय वासराला अनुसरते त्याप्रमाणे नामोच्चाराने श्रीराम पावतो."

नाममाहात्म्य

"श्रीराम हे नामाक्षर क्षर (नाशिवंत) आणि अक्षर (अविनाशी) यांच्या फार पलीकडे आहे. हे नाम परात्पर परब्रह्म असून शिवालाही सेवन करण्यास योग्य वाटते. पंडितांनी पुराणांमध्ये म्हटले आहे की, 'नामापाशी लगेच मुक्ती आहे.' मी बोललो तो माझा अनुभव आहे. नाम हे निश्चित तारक आहे. नामाने भुक्ती, मुक्ती, ब्रह्मप्राप्ती होते. जे रामनाम जपतात ते त्रिजगात वंद्य होतात. रामनाम हे श्रेष्ठ तप आहे. रामनाम पाप-पुण्य नाहीसे करते. नाम ही निर्विकल्प समाधीच आहे. नामस्मरणात अवध्याय किंवा स्वाध्याय कधीच नसतो. नाम हे साक्षात् परब्रह्म आहे; परंतु अभाग्याला त्यातला भाव उमजत नाही. नामामध्ये अनध्ययन, विधिविधान, कर्मबंधन हे असत नाहीत. महापापी सुद्धा नामामुळे पवित्र होतो. जरी कोणी दुराचारी असेल आणि त्याला पश्चात्ताप होऊन तो जर अंतःकरणापासून रामनामाचा जप करील तर तो भगवंतवचनाप्रमाणे संसारात साधू ठरतो.

अहल्येकडून रामस्तुती

श्रीराम हा कृपेचा आत्मदीप आहे. त्याच्यामुळे अहल्येचे कल्पान्तापर्यंतचे पाप नाहीसे झाले. तिच्या तपामुळे पाप ते निष्पाप करून दाखविण्याचा प्रताप घडला. यामुळे ती कृतज्ञतेने म्हणाली, "इंद्राने व्यभिचार केला नसता, ऋषीश्वरांनी शाप दिला नसता, तर मला रामचंद्राची प्राप्ती कुठून झाली असती. माझे भाग्य ऋषींच्या शापाने थोर झाले. गौतमांचा शाप मला अमृतरूप झाला. माझे पापपुण्य जाऊन मी शुद्ध स्वरूप पावले. खरोखर इंद्राने व्यभिचार केला नाही तर माझा जन्मोद्धार केला आहे. गौतमांनी दिलेला शाप नव्हे वर होता,

https://archive.org/details/@tulaksharmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

म्हणून तर मला रघुवीर भेटला. गौतम हे माझे पती, सद्‌गुरू, आत्मनिर्धार असून त्यांनीच मला रघुवीर भेटविला. जगात अनेक वीर आहेत, पण त्यांना अहंकाराचा छेद करता येत नाही; श्रीरामचंद्र हा श्रेष्ठ वीर योद्धा असून, त्यानेच माझा सहपरिवार अहंकार नष्ट केला.'' याप्रकारे अहल्येने रामाची स्तुती केली. ती गौतमांना ज्ञानशक्तीने कळली. त्यांनी तातडीने येऊन स्वतः श्रीरामाची पूजा केली. कामक्रोधाचे गौतमांनी निर्दाळण केले. श्रीरामामुळे अहल्या निष्काम झाली. अशा रीतीने दोघांची वृत्ती समान झाल्याने रामामुळे परब्रह्म पावली.

अहल्या आणि गौतम यांचे मीलन

श्रीरामाने आपल्या भेटीने दोघांची (अहल्या आणिं गौतम) लिंगदेहाची मिठी सोडविली. दोंघांचे पाहणे, ऐकणे, मन, उन्मन, हे एकत्वाने त्याने चैतन्यघन केले. दोघांचा आत्मा, प्राण, अंतःकरण, ज्ञान, सुख, संपन्नता यांमध्ये एकात्मता आणली. दोघांची शब्दसिद्धी, इंद्रियविधी, प्रपंच-परमार्थात समान बुद्धी आणि समाधी ही एकच करून सोडली. या एकात्मनिष्ठेने दोघांचे जीवन भरून गेले. ऋषींमध्ये गौतम आणि पतिव्रतांमध्ये अहल्या यांना श्रेष्ठत्व प्राप्त झाले. अशा एकात्मतेने श्रीरामाने स्वतः अहल्योद्धार केला आणि गौतमांना पूर्ण सुखी केले. ऋषी सुखसंपन्न झाले, देवादिकांना आनंद झाला, त्यांनी मग पुष्पवृष्टी करून श्रीरामाचा जयजयकार केला. एकात्मतेने तरलो, अखेरीस विषयांची आसक्ती ही भेददृष्टी आहे, हे ऐकून सज्ञान श्रोते मुक्ती मिळवतात.

निखळ कवित्वाचा धीटपाठ हा कर्माचा त्रास मिळवतो. त्या कवित्वाची कटकट ऐकून श्रोते विटतात. ज्या कवित्वात शब्दचातुर्याची शोभा असते ते शब्दशास्त्र जाणणारांना प्रिय ठरते. पण ज्या निरूपणात परमार्थविषयक ज्ञानाचे मर्म असते ते कथानिरूपण जगाला शांत करते. ग्रंथात प्रेम राखून प्रतिपदी परब्रह्माचे प्रतिपादन करावे हाच कवित्वाचा खरा धर्म आहे. ज्ञानी परमार्थबोधाने, पंडित पदबंध-कौशल्याने, लोक कथाविनोदाने निवतात पण पारमार्थिक ग्रंथ-निवेदनाने जग शांत होते.

अध्याय पंधरावा

श्रीरामाच्या चरणस्पर्शाने शिळेमधून अहल्योद्धार झाला या प्रसंगाने संत एकनाथांना एक कल्पना मांडावीशी वाटली. ते म्हणतात, ''श्रीरामाच्या पावलांचा स्पर्श होताच पाषाणपण जाऊन अहल्या पुन्हा मूळ सौंदर्यासह उद्धरली गेली. गौतम ऋषींनी तिचा पत्नी म्हणून स्वीकार केला. चरणधुलीच्या प्रभावाने गौतमांचा विकल्प गेला, अहल्या निष्पाप झाली, स्त्रीत्वाला अनुरूप पतिव्रता ठरली. हा अगाध पदमहिमा पाहून ऋषिजन चकित झाले. स्वर्गात देवांनी रामस्तुती केली. त्रिलोकी रामनाम पावन म्हणून प्रसिद्ध झाले. आता पुढे पर्वतांच्या ठिकाणी जे पाषाण रामचरणाला स्पर्श करतील ते नाहीसे होऊन त्यातून स्त्रीदेह निर्माण होतील. त्या स्त्रियांना पाहून बहुतेक तपस्वीजन ब्रह्मचर्य सोडून पाणिग्रहण करतील.'' अशी शंका व्यक्त झाली.

यानंतर रामाचे गुणगान करत ऋषिमंडळ आनंदकल्लोळात मिथिलेच्या दिशेने मार्गक्रमण करू लागले.

मिथिलेचे किंवा विदेहपुरीचे वर्णन

विदेही जनकाची नगरी म्हणून विदेहपुरी म्हटली जाणारी ती नगरी अत्यंत सुशोभित होती. आकाशात झळकणाऱ्या पताका रवि-चंद्राची थोरवी झाकाळून टाकून रत्नकळसांवर ओळीने शोभायमान होत्या. तेथील वनश्रीची शोभा नभाला पूर्णत्व आणीत होती. ते सौंदर्य पाहून, क्षणभर चलनवलन थांबून, प्रवेश करणारा आल्हादाचा सुखद अनुभव घेई. वृक्ष मुळापासून लोभस पानांनी सजलेले;

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

बिनबियांच्या फळांचे घड; हे पाहून पांथस्थांची इच्छा पूर्ण होत असे. त्या वृक्षांच्या छायेत विश्रांती घेणारे कामक्रोधांची शांती मिळवत. त्रिविध ताप (आध्यात्मिक आधिदैविक, आधिभौतिक) येथे शमतात् आणि भ्रांती ही स्वतःच चिच्छक्ती होते. फळांचा आस्वाद घेतल्यावर तहानभुकेचा त्रास संपतो आणि दीर्घकाळ टिकणाऱ्या त्यांच्या सुस्वादाने सर्वत्र परमानंद कोंदून राहतो. त्या फळांची गोडी अशी की पोपट तेथे वेगाने येतात आणि इतके तृप्त होतात की तेथून उडून जाण्याची ओढच विसरतात. या वनातल्या हंसांची नवलीला अशी की उभय पक्षांना चिदाकाशात उड्डाण करता येते. या वनस्थळीचे दर्शन होताच मुमुक्षूमयूर स्वानंदाने पिसारा पसरून सुखाच्या सुकाळात नाचतात. विदेहवनातला सुगंध प्राप्त झाला की परमानंद प्रकटतो आणि देहामध्ये आनंद निर्माण होऊन त्यातून स्वानंदरूप आत्मबोध होतो. मोर स्वानंदाने गर्जू लागले की वेदार्थ चकित होऊन, कर्मवादवृत्ती सोडतात आणि पूर्ण निश्चल, निःशब्द होतात. या वनातले पारवे घुमतात तेव्हा गंधर्वांची गाणी भुलतात, सामदेवाची वृत्ती पक्ष्यांच्या बोलांनी उपशमते. श्रीरामाच्या प्रवेशामुळे त्या वनाची अशी स्थिती झाली. अशा त्या विदेहाच्या विदेहवनाचे अगाध महिमान कोण वर्णू शकेल? ज्या नगरीत स्वधर्माने राहणारी पिंगला वेश्या समाधीस्थितीला पोहोचू शकली त्या विदेहनगरीची थोरवी कोणी वर्णावी? ज्याच्या द्वारपालाच्या शब्दांनी शुकाला समाधान दिले, त्या जनकाचे महिमान अगाध आणि परमार्थी होते.

स्वयंवराच्या यज्ञमंडपावरचे रूपक

नगराच्या बाह्य भागात जनकाने यज्ञ आरंभिलेला श्रीरामाने पाहिला. सीतेच्या स्वयंवराच्या निमित्ताने अत्यंत कष्ट घेऊन त्याची योजना करण्यात आली होती. त्यासाठी धैर्याचे खांब उभारून, त्यावर धर्माच्या तुळया, कडिपाट इत्यादींची, शांतीच्या कौशल्याने जोडणी झालेली होती. अशा त्या मंडपात यज्ञभूमी सिद्ध झाली होती. धूर नसलेल्या आणि उंच जाणाऱ्या अग्नीला (ज्वाला) इंधनाशिवाय लखलखाट मिळाला, त्याच्या ज्वाला शुद्ध सुखद प्रकाश देणाऱ्या होत्या. ॐकारातील अर्धमात्रा जे स्वार्थाने आणि परमार्थाने जाणतात, तेच यज्ञातील ऋत्विज (यज्ञ चालविणारे पुरोहित इ.) आणि अक्षरार्थासाठी द्वारपाल अशी योजना होती. निर्गुणाचे वळलेले (तिपेडी) त्रिगुण, तेच त्यातले दोर, परिस्तरणासाठी विवेक आणि परिसंमोहनासाठी नैराश्य होते. निष्कंटकत्वाच्या समिधा, भूतमात्रांना एकत्र ठेवणारे बहिर्बंधन, श्रद्धा हीच तुपाचे पात्र आणि प्रत्यगावृत्ती ही स्रुकस्रवामार्जन अशी स्थापना केली होती. वक्रबुद्धीच्या तिरकस उक्ती ह्या तुपासहितच्या आहुती, त्यामागे प्रधान होम चालू होता. प्रकृतिमहत्तत्त्वाचा होम त्यातच होता. युक्ती-प्रयुक्ती, ज्ञानाचा अभिमान, द्रव्य, दारा, ममता, मान यांचे गुरुमंत्राने हवन करण्यात येत होते. तेथे विनियोगविधानाला ममता नव्हती. सावधानतासादृश्य, कर्मामध्ये ब्रह्मतारहस्य, तसेच अवभृथस्नान म्हणजे सामरस्य, त्यामुळे त्यात मग्न होण्यात परमानंदाचा उत्साह होता. साक्षात् चिद्घन हा क्षेत्रपाळ बनून संपूर्ण क्षेत्राचा प्रतिपाळ करत होता. त्याला वासनास्मरणासहित विषयांचे बलिदान दिले जाते. असे बलिदान देताना, त्याकडे पुन्हा वळून पाहू नये. मनात त्याचे स्मरणही उरू देऊ नये, असे ते शुद्ध विधिवत् बलिदान असावे. अखंड आत्मस्थिती हीच अहोरात्र वसुधारा मानून अहंकाराची पूर्णाहुती फलप्राप्तीसह होमून टाकली. आपण मी-तूपण संपविणे हेच श्रेयसंपादन आणि आत्मत्व हेच स्वानंदाचे समाधान आणि दान होय. परमानंदाचे अभिसिंचन आणि त्याचबरोबर भवभयाचे विसर्जन, असा विदेही जनकाचा यज्ञ श्रीरामाने स्वतः पाहिला. नाना देशींचे, नाना भाषांत प्रवीण, वेदशास्त्रार्थात संपन्न असे

https://archive.org/details/tulaksmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Trust Foundation and eGangotri

देदीप्यमान तेजस्वी ब्राह्मण त्या यज्ञासाठी एकत्र आले होते. अशा ब्राह्मणांच्या एकत्र समूहाने विदेहाच्या यज्ञभूमीत गर्दी केलेली पाहून श्रीरामाला आंतरिक सुख झाले.

जनकाकडून स्वागत आणि प्रश्न

श्रीरामाने विश्वामित्रांना सुचविले की त्यांनी यज्ञभूमीच्या सन्निधच राहावे. ते मान्य करून विश्वामित्रांनी सर्वांसह तेथेच निवास केला. महिकावतीचे स्वच्छ पाणी, तीरावर सदा फलभाराने शोभणारे उपवन, अशा ठिकाणी श्रीरामाने निवास केला. ऋषींचा समुदाय घेऊन विश्वामित्र आले आहेत, हे ऐकून जनक तातडीने आला आणि सद्‌भावाने विश्वामित्रांना त्याने नमन केले; शंभर गाईंचे आनंदाने दान केले; कौशिकांचे मधुपर्क-पूजन केले; तशाच आदराने अन्य साधू सज्जन आणि ऋषी यांचेही पूजन केले. नंतर जनकाने आपले मनोगत व्यक्त करताना म्हटले, "आज साधूंच्या दर्शनाने माझे नेत्र तृप्त झाले; माझा यज्ञ सफल झाला. ज्या भूमीला साधूंचे पाय लागतात, त्यांची भेट होते, तेव्हा शरीर पवित्र होते. साधूंशी मृदू भाषण करण्याने वाचा पावन होते. त्यांचे चरणतीर्थ प्राशन केल्याने अंतर शुद्ध होते. त्यांच्या संगतीने निश्चितपणे भाविकांना ब्रह्मप्राप्ती होते. कित्येक दिवस यज्ञ विधिपूर्वक चालवूनही यज्ञसिध्दी होत नव्हती. हे कृपानिधी, आपण आलात आणि यज्ञाची त्रिशुद्धी सिद्धी झाली." नंतर कौशिकांनी जनकराजाला क्षेमकुशल विचारले की, 'तुझे राज्य आणि चित्त स्वस्थ आहे ना?' त्यावर 'अहो कृपासमर्थ, सुनिश्चितपणे सर्वार्थदृष्टीने सारे स्वस्थ आहे,' असे जनकाने सांगितले.

नंतर जनकाने राम-लक्ष्मणांना पाहून विश्वामित्रांना प्रश्न विचारला, "अग्नीसारखे तेजस्वी म्हणून उपमा देऊनही ती गौण ठरविणारे हे दोघे कोण आहेत? अग्नीचे सान्निध्य तापदायक ठरते, यांचा सहवास सर्वांना निववविणारा भासतो; यांची योग्यता जीवमानांच्या जीवाला आल्हादकारी आहे. यांचे दर्शन झाल्याने अन्य काहीच डोळ्यांना आवडेनासे होते; यांच्या स्वरूपात मन जडून, चित्त, चिंतन सारे विसरले जाते आहे. सुंदर, सुकुमार अशी मनोरम रूपसंपदा आणि एकूण ठाणमाण गंभीर असणारे हे दोघे कुणाचे कुमार आहेत? इकडे येण्याचा मार्ग एवढा दुर्गम असताना यांचे इथवर आगमन कसे झाले? आणि आपले सान्निध्य यांना कशाने मिळाले? हे आपण मला सविस्तर आणि सकारण सांगावे."

विश्वामित्रांकडून निवेदन

विश्वामित्र म्हणाले, " हे राजन् तुला मी यांचे पवित्र चरित्र सांगतो, ऐक, हे दोघे दशरथाचे पुत्र राम आणि लक्ष्मण आहेत. ते महावीर पराक्रमी आहेत. माझ्या यज्ञात मारीच आणि सुबाहू हे नित्य बाधा आणत होते. ताटिका राक्षसी सर्व मार्ग अडवून आश्रमाच्या त्रिशुद्धीला व्यथा आणत होती. यासाठी मी अनुष्ठान करून श्रीशिवाला प्रसन्न करून घेतले. त्यानेच मला सावधान करून हे गूढ ज्ञान कथन केले की, साक्षात् पूर्ण परब्रह्म दाशरथी राम म्हणून अवतरले असून त्याच्याकडून राक्षसांचा नाश होऊन, तुझा यज्ञ सिद्धीस जाईल. श्रीशिवाच्या वचनाचा विश्वास धरून मी दशरथाकडे गेलो आणि माझ्या यागाच्या सिद्धीसाठी श्रीरामाला मागून आणले. श्रीरामाने वाटेतच ताटिकावध करून सर्व मार्ग मार्गस्थांना मुक्त केले. नंतर सिद्धाश्रमात वस्ती करून राक्षसांना धाक लावला. शरवर्षाव करून सुबाहू संपविला. मारीचाला पिसारा लागून तो समुद्रतीरापर्यंत उडविला. अन्य राक्षस ठार केले. श्रीरामाचे चरण लागून तत्क्षणी अहल्योद्धार झाला. अशी या श्रीरामाची अगाध करणी, वेदपुराणांना आणि अखिल जगाला तो वंद्य आहे. हा श्रीराम आता आमच्याबरोबर शिवधनुष्याच्या दर्शनासाठी आला आहे."

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

श्रीरामाच्या व्यक्तिमत्त्वाचा ठसा जनकाच्या मनात उमटून, त्याचा उल्हास वाढला. त्याने स्वतःच्या मनाने ठरविले की हा सीतेला अनुरूप नवरा आहे. परंतु त्या शिवधनुष्याच्या धारण करण्याचा बलवान महावीरांनाही मोठा दरारा वाटतो.

सीतेच्या पूर्ववृत्तान्ताचे कथन

जनक विश्वामित्रांना म्हणाला, "अहो ऋषिवर्य, सीता माझी स्वतःची कन्या खरी, पण ती अयोनिसंभवका आहे. शेतात नांगर चालविताना नांगराच्या फाळाला एक पेटी लागली. ती पेटी उघडल्यावर आतमधे ही माझी रूपवती कन्या होती." हे राजाचे शब्द ऐकताच त्याचा पुरोहित अहल्याकुमार 'शतानंद याने पूर्ववृत्त सांगायला आरंभ केला.

"ब्रह्मशापाच्या क्रूरतेविषयी अज्ञान असल्याने माझी माता त्यात निमग्न झाली. तिला श्रीरामाचे चरण लागताच तिचा उद्धार होऊन ती जगद्वंद्य झाली. श्रीरामाच्या चरणस्पर्शाने स्वतः पाषाणांचा उद्धार होतो यात नवल नाही, तो तर जगदुद्धारक आहे. त्या श्रीरामाचे नाम हे अगाध आहे. त्या नामाने काम, क्रोध, जन्म-मरण यांचा नाश होतो. ते नाम म्हणजे निर्द्वंद्व ब्रह्मच आहे. अबद्ध मंत्रांच्या पठणाने जप करणारे अनेक चळले; अबद्ध वेदपठण केले तर तत्काळ निषेध बाधतो; परंतु अबद्ध नामस्मरणाने महापापी शुद्ध होतात; त्या नामाच्या उक्तीने वाल्मीकांची अगाध कीर्ती झाली. अबद्ध नामामुळे नारदांची उक्ती 'मारा मारा' होती तरी रामनामात त्यांची वृत्ती लागून वाल्मीकींची पापनिष्कृती झाली. अबद्ध नामपठण करणारे वाल्मीकी उद्धरले. त्यांनी शतकोटी रामायण सांगितले ही रामकथा श्रीशिवालाही वंद्य आणि पवित्र वाटते. श्रीरामाची मूर्ती पाहताच चित्तवृत्ती हर्षात विरून जाते आणि त्रिभुवनात आनंद ओसंडतो, अशी या रामाची स्वरूपस्थिती आहे. रामनामाशी अभेदभक्ती जडली की जडजीव उद्धरतात. राम हा ब्रह्ममूर्ती आहे, तर सीता ही आद्यशक्ती आहे. आता मी जी सीतेची पूर्वकथा सांगणार आहे ती मी पूर्वी नारदमुनींकडून ऐकली होती."

पद्माक्षराजाचे मागणे

"फार पूर्वी पद्माक्ष नावाचा अती पवित्र राजा होता. त्याने अनुष्ठान करून देवी रमा प्रसन्न करून घेतली आणि त्याने 'तू माझे कन्यारत्न हो' असे म्हटले. त्यावर रमा म्हणाली, "हे नृपनाथा, मला भगवंतांच्या संबंधाशिवाय जन्म लाभत नाही." हे तिचे बोलणे ऐकल्यावर त्या राजाने दृढ ध्यानाने भगवंतांना प्रसन्न करून घेतले आणि रमादेवी कन्या म्हणून मिळावी असा वर देण्याविषयी प्रार्थना केली. तेव्हा भगवंत म्हणाले, "हे नृपनाथा, विषयांच्या वाढीसाठी प्रथम दृष्टीला रमा (लक्ष्मी) चांगली वाटते, पण तीच पाठ वळवून गेली म्हणजे श्रीमंतांनाही अपार दुःख होत असते. लक्ष्मी आल्याने जे सुख, ते खरे तर सुख नसून दुःखच असते. जे सुख आहे असे म्हणतात ते निःसंशय मूर्ख असतात." यावर पुन्हा त्या राजाने भगवंतांचे पाय धरून म्हटले, "श्रीहरी, माझ्या मांडीवर रमा खेळेल हीच माझ्यावर कृपा करा." राजाचा निश्चय आणि मनोगत जाणून श्रीविष्णूंनी त्याला महाळुंगाचे फळ दिले, आणि 'यामुळे तुला रमा कन्या म्हणून मिळेल' असेही सांगितले.

राजाने ते फळ फोडताच त्यात त्याला रूपवती कन्या दिसली. त्या कन्येला पाहून राजाच्या ठिकाणी ममता उत्पन्न झाली; 'माझी कन्या' असे तो म्हणाला. पद्माक्ष राजाच्या घरी जन्म झाल्यामुळे तिचे पद्मावती असे नामकरण झाले. त्या रूपसुंदर कन्येला पाहून राजाला परमानंद झाला होता. ज्या महाळुंगाची दोन शकले झाल्यावर कन्या जन्मली, ती दोन शकले नंतर एक झाली. सप्तशती असे आपण म्हणतो तेच मातुलिंग शक्तीच्या हाती असते.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized By Sarayu Foundation Trust and eGangotri

पद्मावतीचा विवाह

पद्मावती ही सर्वांगसुंदर कन्या उपवर झाली. अनेक राजे तिच्यावर भाळले. आपली कन्या स्वयंवराला योग्य झाल्याचे लक्षात येऊन राजा पद्माक्षाने विवाहाची तयारी केली. अनेक ऋषी तिला भुलून, आपली योग्यता मिरवत आले. देव, दानव, मानव, किन्नर, गंधर्व, राजे हे सर्व आले, तसे दैत्यसमुदायही जमले. कन्येचे रूप पाहून अनेक राक्षसांनी संघर्षाचा घाट घातला. पद्माक्ष राजाने स्वयंवराचा पण सांगितला की 'ज्याच्या अंगाला आकाशाची सुनीळ उटी शोभा देत असेल त्यालाच ही कन्या वरमाला घालील. हा अवघड पण ऐकून सर्व देव-दानव संतापले, कन्येचे हरण करण्यासाठी तातडीने सज्ज झाले. नरवीर, यक्ष, राक्षस कन्येकडे धावले. ते पाहून पद्माक्ष राजाही रागावला आणि त्याने बाणांचा वर्षाव करून शत्रुसमुदाय त्रस्त केला. राजाने राक्षसांचे संभार पळवून लावले. देवादिकांनी आकाश गाठले. दैत्यांशी भयंकर युद्ध झाले. यामध्ये दैत्यसंहार झाला पण त्याचबरोबर राजाला अनेक बाण लागून तो क्षत्रियवृत्तीने रणांगणावर निष्प्राण झाला.

अखेर ते रण संपले आणि पद्मावतीला धरायला काही जण धावताच तिने अग्नीमध्ये उडी घेतली. या घटनेने राक्षस संतापले. त्यांनी नगरातली घरे उद्‌ध्वस्त केली. प्रजा व्यथित झाली. सुर, नर आणि राक्षस यांचे कंदन करून स्वतः राजाने प्राणाहुती दिली. त्याच्या राण्यांनी सहगमन केले. लक्ष्मी ही श्रीमंतांना विघ्न करणारी ठरली. तिचा प्रतिपाळ करणारा प्राणास मुकला. तिची अभिलाषा बाळगणारे रणात पडले. उरले ते रडत गेले. लक्ष्मीचे कर्तृत्व हे असे आहे. नंतर ती आदिशक्ती नवरी अग्निकुंडातून बाहेर आली; तिने बाहेरची परिस्थिती पाहिली आणि मग ती एकाकी होऊन कुंडाच्या काठावर बसून राहिली.

या वेळी रावण हा विमानातून जात होता. त्याच्या प्रधानाने त्याला सांगितले की, " जिच्यासाठी एवढे रणकंदन झाले तीच ही नवरी आहे. हिला धरू पाहणाऱ्या सुर-असुरांपासून स्वरक्षण करण्यासाठी तिने अग्नीमध्ये उडी घेतली." तेव्हा तिचे चांगूलपण पाहून रावणाला अभिलाषा उत्पन्न झाली. तो तिला पकडण्यासाठी पुढे झाला तेव्हा तिने पुन्हा अग्निप्रवेश केला. तेव्हा रावण हसून म्हणाला, "अगे तू अग्नीमध्ये लपतेस, हे देवादिकांना माहिती नाही. मी मात्र तुला शोधून पकडणार." नंतर रावणाने अग्नी विझवला; शोध घेतला; परंतु ती नवरी त्याच्या हाती लागली नाही. त्या ठिकाणी त्याला पंचरत्ने सापडली. त्या रत्नांची शोभा अशी की त्यापुढे सूर्याचे तेज लोपावे. ती रत्ने म्हणजे महातेजाचा गाभाच होती. रावण चकित होऊन उभा राहिला. काही वेळाने त्याने स्वतःच्या मनाला सावध केले आणि त्या दिव्यरत्नांना अती प्रयत्नपूर्वक विमानात चढवून तो लंकेला परतला. ह्या सुंदर रत्नांची भेट मंदोदरीला द्यावी म्हणून त्याने ती रत्नांची पेटी आपल्या देव्हाऱ्यात नेऊन ठेवली. स्वतः तो शयनगृहात आला. त्याने आपल्या पत्नीला गुह्य गोष्ट सांगताना म्हटले, "ही रत्ने अत्यंत चांगली आहेत. ती तुझ्या गळ्यात आणि मुकुटात शोभून दिसतील. मी ती रत्नपेटी देव्हाऱ्यात ठेवली आहे. मंदोदरीने ती पेटी उचलून पाहिली पण ते तिला शक्य होणार नाही ,असे दिसून आले. त्यावर रावणाने उपहासाने तिला दोष दिला आणि तो स्वतः पेटी उचलण्यासाठी पुढे आला. परंतु त्याने आपले वीसही हात आणि सारे बळ एकवटूनही ती पेटी त्याला उचलता आली नाही. रावणाच्या मनात भीती निर्माण झाली. त्याचे सर्व प्रधान तेथे एकत्र जमले. आप्तजन आले. मग पेटीत असा कोणता ठेवा आहे ते पाहावे म्हणून त्यांनी पेटी उघडायचे ठरविले. त्यांनी पेटी उघडताच त्यांचे डोळे दिपवून टाकणारे तेज तेथून उमटले. नंतर त्या पेटीत एक अलौकिक रत्नाप्रमाणे सुंदर कन्या असल्याचे आढळले. रावण दचकून मागे सरला आणि त्याने त्या कन्येचा

Bhavan Vani Trust, Lucknow

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

पूर्ववृत्तांत सांगितला. त्यावर मंदोदरीने म्हटले, "ही कुळाचा घात करणारी कृत्या कशाला इथे आणली? हिने प्रतिपाळ करणाऱ्या माता-पिता यांचा नाश केला. सुर असुर यांनी भुलून रणात नाश करून घेतला. दानव आणि मानव यांच्या समूहांचा हिच्यामुळे नाश झाला. तेव्हा मी सांगते तसे करा."

मंदोदरीने भविष्यात काय घडेल याविषयी आणि त्यासाठी कोणता उपाय करावा यविषयी सांगायला आरंभ केला. ती म्हणाली, "ही प्रतिपाळ करणाराचा संहार करणारी आहे. उद्या आपल्यालाही भोवऱ्यासारखी फिरवेल. तेव्हा हिला देशाबाहेर सोडून द्या. हिला या बालपणातच मारले तरी अनर्थ निर्माण होईल. तेव्हा आपल्या राष्ट्रात न ठेवता, तातडीने राष्ट्राबाहेर दुसरीकडे टाकून द्या. एवढ्यातच पाहा, ही पेटी रावणाला मोठे कष्ट करूनही उचलत नाही. हिला मारून टाकले तरीही भीषण अनर्थ होईल. जसा पूर्वी अचेतन खांबाला लाथ मारताच हिरण्यकश्यपूचा घात झाला तशीच कथा इथेही घडेल. म्हणून हिचा त्याग करावा हेच योग्य आहे."

मंदोदरीचे म्हणणे लंकानाथ रावणाने मान्य करून, ही युक्ती सर्वांना पसंत असल्याचे पाहून तातडीने दूतांना बोलावले. त्यांना सांगण्यात आले की, 'त्या कन्येचा लवकर त्याग व्हावा म्हणून विमान आणवा.' मंदोदरीने दूतांना म्हटले, "ही पेटी जमिनीच्या आत ठेवा. ही जिथे ठेवाल तिथे अनर्थ ओढवेल. यासाठी ती गुप्तपणे भूमी खणून त्यामधे ठेवा. जो गृहस्थाश्रमी पण ब्रह्मचारी असेल त्याच्या घरी ही कन्या वाढेल. जो आत्मभावाने चराचरात वावरणारा असेल त्याच्या घरी ती नांदेल."

पेटीतून भविष्यवाणी आणि पेटीची प्राप्ती.

पेटी विमानात चढविली जाताच तिच्यातून आवाज उमटला. 'मी पुन्हा राक्षसांचा नाश आणि दहन करण्यासाठी लंकाभुवनात येईन. माझी अभिलाषा धरल्यामुळे रावणाला मरण येईल. माझ्या निमित्ताने संपूर्ण राक्षसगणांचा नाश ओढवेल." हे शब्द ऐकून रावण अतिशय स्तब्ध झाला; राक्षसांना फार धाक वाटला. कारण ती भविष्यवाणी त्यांच्या विरुद्ध होती. दूतांनी घाईने पेटी विमानातून त्वरित दूर नेली. ते दूत लवकर जनकाच्या नगरसीमेत पोहोचले. त्यांनी तिथल्याच एका शेतात ती पेटी खोलवर ठेवली आणि लगेच निघून गेले.

हे शेत जनकाने एका ब्राह्मणाला धर्मार्थ दिले होते. तो ब्राह्मण शेतीसाठीच ती शेतभूमी वापरत होता. एकदा शेतात नांगर धरण्याचे काम करण्यासाठी त्याने सुमुहूर्त पाहिला आणि त्या मुहूर्तावर त्याने नांगरणी सुरू केली. आरंभीचा काही काळ नांगर चालल्यावर फाळाला पेटी लागली. ही गोष्ट शेतात काम करणारा त्याचा सहाय्यक होता त्याने ब्राह्मणाला सांगितली. तो म्हणाला, "धन्य, धन्य! तुम्ही चांगला मुहूर्त काढलात. अहो, तुमच्या शेतात अद्भुत पीक पिकले आहे. तेथे निश्चित धनाचा साठा असणार!" त्या ब्राह्मणाने पेटी पाहून म्हटले, "ते गुप्त राजधन आहे. मला राजाने शेत दिले आहे. त्यातला हा ठेवा आपण घेऊ नये." नंतर ती पेटी घेऊन तो ब्राह्मण राजसभेत आला. "राजन् हा गुप्त ठेवा तुमच्या शेतात होता. तो आपला आपण घ्यावा" तेव्हा राजाने धर्मवचन म्हणून म्हटले, "मी तुम्हाला भूमिदान दिले आहे. तिथे जे धनधान्य उपजेल ते ब्रह्मार्पण आहे." तो ब्राह्मण धर्मप्रवीण असल्याने राजाला म्हणाला, "आपण मला शेताचे दान दिले. त्यांतले गुप्तधन मला दिलेले नाही. त्याला मी स्पर्श करणार नाही." त्या ब्राह्मणाला धनलोभ नव्हता तसा राजालाही धनलोभ नव्हता. त्यामुळे राजाला मोठा पेच पडला. ही वार्ता साधुसमाजाला समजली. ते म्हणाले, "या पेटीमधे कसले धन आहे ते आपण काढून पाहू, मग शास्त्राधाराचा विचार करू." नंतर ती पेटी उघडली गेली तेव्हा आत एक

https://archive.org/details/muthulakshmiacademy Bhuvan Vani Trust, Lucknow

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

तेजस्वी, सुंदर कन्या आढळली. सर्व चकित झाले. कन्येला पाहून सर्वांचे डोळे टकमका पाहात आणि आश्चर्याने भरून त्या कन्येच्या अलौकिक सौंदर्यावर खिळले.

जनकाकडून कन्येचा स्वीकार

राजा जनकाने पेटीतील लावण्यनिधान कन्या उचलली आणि म्हणाला, "हे माझे कन्यारत्न!" मग वाद्याचा गजर केला गेला. त्या मंगलवाद्यांचा आवाज गगनाला भिडला. सभेत जयजयकार झाला. ऋषींनी वेदोक्त मंत्र म्हणून शांतिपाठ केला. त्या कन्येला जनकाने पाळले म्हणून ती जनकात्मजा झाली. पृथ्वीने मोठ्या आपुलकीने तिचे रक्षण केले म्हणून तिला भूमिकन्या म्हटले गेले. परंतु वास्तविक ती अयोनिजा जगदंबा होती. नांगर चालविताना फाळाचा दात लागला आणि सीता शेतात जन्म पावली. अशी ही पूर्वकथा नारदांनी सांगितली त्याप्रमाणे यथार्थ निवेदन केली. स्कंदपुराणातील कालिकाखंडात हे मूळ निरूपण आले आहे." असा हा वृत्तान्त अहल्येचा ज्येष्ठ सुत आणि जनकाचा पुरोहित शतानंद याने कथन केला.

अध्याय सोळावा

सीतेच्या स्वयंवरात शिवधनुष्याला दोर चढविण्याचा 'पण' जनकाने लावला त्याला काय कारण झाले त्याची कारणकथा येथून पुढे सांगितली आहे.

परशुराम आणि रेणुका यांचे वृत्त

परशुराम हा पूर्वी कैलासात जाऊन शिवापाशी धनुर्विद्या, गणेशापाशी परशुविद्या अत्यंत लवकर आणि कुशलतेने शिकला. परशुराम कैलासामध्ये श्रीशिवाच्या सेवेसाठी अहर्निश तत्परतेने राहिला होता. त्याप्रमाणे त्याची समान श्रद्धा श्रीगणेशाशीही होती. तेथे असताना एके वेळी त्याला अत्यंत आक्रंदून आणि दीर्घ अशी रेणुकीची हाक ऐकू आली. परशुराम शंकित झाला आणि त्याने श्रीशिवाला म्हटले, "रेणुकामाता दीर्घ स्वरात आक्रंदत आहे; तेव्हा मातेकडे जाण्याची स्वामींनी आज्ञा द्यावी."

रेणूकेचा वृत्तान्त

आता रेणूकेची कथा! रेणुका ही अती पवित्र होती. तिची कथा ऐकली की दारूण, दुःखेही नाश पावतात. परशुरामाची विनंती ऐकून श्रीरुद्र कोपायमान होऊन म्हणाले, "जगात पूर्णपणे अधर्म वाढला आहे. दानवांनी गर्वाने ब्राह्मणाचा वध केला आहे. तेव्हा हे जमदग्नीपुत्रा, मी तुझ्यावर प्रसन्न आहे. हे सर्वज्ञा, विद्यासंपन्न परशुरामा, तू दुष्टांच्या वधाची लगेच प्रतिज्ञा कर. हे माझे त्र्यंबकधनुष्य घे आणि ब्रह्महत्या करणारांचे निर्दाळण कर. मदाने उन्मत्त झालेल्या एकएका क्षत्रियाचा नाश कर. या माझ्या त्र्यंबकाच्या बाणांनी पृथ्वी निःक्षत्रीय कर." नंतर श्रीगणेशाने परशू देऊन परशुरामाला पाठविले. यामुळेच त्याला परशुराम हे नाव पडले. श्रीगणेशाचा वर होता की, 'ज्या कार्याला तू प्रवृत्त होशील ते मी निर्विघ्न करीन.'

परशुराम वेगाने निघाला असता वाटेत त्याला जे आश्रमवासी भेटले, त्यांनी सांगितले की, भंयकर रणकंदन करून तुझ्या पित्याचा वध करण्यात आला." 'पितृघात करण्याचे कारण?" असा परशुरामाने प्रश्न केल्यावर त्या आश्रमवासींनी त्याला भांडणाचे मूळ कारण सविस्तर सांगितले, "सहस्रार्जुन वनक्रीडेसाठी म्हणून जमदग्नी ऋषींच्या आश्रमाकडे आला. रेणुकेने पतीला विनंती करून राजाला ससैन्य निमंत्रण द्यायला सांगितले. त्यावर ऋषी म्हणाले, राजाला बोलावून फलमूलांचा आहार घालू या." त्यावर रेणुका म्हणाली, "आश्रमधर्म विकल; अन्नाने सर्वांना तृप्त करावे. आश्रमात जे जे अतिथी आले ते ते सर्व तृप्त व्हावेत-करावेत. आपले सामर्थ्य हे समर्थ आहे. तेव्हा विकल

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Research Academy. Gangotri

परमार्थमार्गी न व्हावे. आपण कामधेनूला बोलवा. तिला सांगून पक्वान्ने मागवा. राजा हा श्रीभगवंताची विभूती असल्याने त्याचे यथोचित पूजन करा.

हे पत्नीचे धर्मवचन ऐकून ऋषी सुखावले. मग त्यांनी कामधेनूसाठी एकांतात अनुष्ठान आरंभ केले. राजाने आपले दूत पाठवून ऋषींच्या तयारीची माहिती घेतली. दूतांनी वार्ता दिली की, 'अन्नसिद्धी केली आहे; परंतु चुलीत अग्नीमात्र नाही. काय स्वयंपाकचे झाले कोण जाणे! त्या ऋषींची पत्नी मोठी उदार आहे. तिची अगाध नवलाई म्हणजे तिच्या मनात कसलीही चिंता नाही. ती राजस असून रांगोळ्या काढते आहे. राजपूजेचा मोठा थाट अपार उत्साहाने केला जात आहे.' राजदूत हे पाहून परतले. नंतर जमदग्नी ऋषींनी कामधेनू आणली. रेणूकेच्या स्वाधीन केली आणि 'राजासाठी भोजन सिद्ध कर. मला हे सारे राजाचे उपचार आणि त्यासाठीची खटपट सोसवत नाहीत. या धेनूकडे तू जे जे मागशील ते ते सर्व ती यथास्थित देईल.' त्या धेनूने कृपा केली आणि पहिले एक ताट सिद्ध केले. त्या ताटाच्या पोटातून मागोमाग असंख्य ताटे उत्पन्न झाली. ऋषींनी राग सोडला. त्यांच्या ठिकाणी संकल्प-विकल्प उरला नाही. लौकिक क्रियेचा सारा खटाटोप त्यांना नव्हता. राजभोजनाची व्यवस्था करण्याचे कर्तव्य त्यांनी रेणुकेच्या माथी ठेवले.

ऋषींचा क्रोधत्याग - रेणुकेचा संभ्रम

जमदग्नीऋषींनी कोणत्या कारणाने क्रोधाचा त्याग केला याविषयी ब्रह्मांडपुराणात मार्कंडेय ऋषींनी सांगितलेली कथा आहे. सहस्रार्जुनाचा वध करण्यासाठी इंद्र दीन, दरिद्री वेषात जमदग्नींकडे आला. आपल्याला फार तहान लागल्याचे सांगत त्याने अतिथी येण्याची वेळ साधून पाणी मागितले. ऋषींजवळ पाणी होते. अतिथी होऊन आलेल्या इंद्राचे तोंड कोरडे झाले होते, ओठ वाळले होते, तेव्हा त्याने हाताने खूण करून पाणी मागितले. ऋषींनी अतिथीला पाणी देण्याविषयी रेणुकेला सांगितले. रेणुकेला इंद्राच्या कपटवेषाचे मर्म उमजले आणि ती संभ्रमात पडली. 'याला पाणी दिले तर हा त्याचे कटू विष करील, ऋषींचा कोप होईल, असा तिला धाक वाटला. 'पाणी दिले तर हा त्रास निर्माण करील आणि न दिले तर ऋषींचा अनिवार राग होईल, असा पेच पडून काय करावे हे तिला सुचेनासे झाले. जमदग्नी हे समर्थ सर्वज्ञ होते. आश्रमधर्माचे संरक्षण कसे करावे हे त्यांना चांगले ठाऊक होते. त्यांनी जवळचे अग्रोदक अतिथीला प्राशन करायला दिले. ही ऋषींची कृती पाहून रेणूका चांगलीच धास्तावली. 'हे माझ्यावर संकटच आले,' असा विचार तिच्या मनात आला. ऋषी रेणुकेवर संतापून म्हणाले, "तू केवळ कर्कशा कृत्या आहेस. अतिथीला पाणी न देऊन तू पतीच्या आज्ञेला पाठमोरी झालीस. अगे, चोर, चांडाळ, कपटवेषधारी कोणीही आश्रमात कधीही आला तर त्याला तो मागेल ते द्यावे. यावेळी बिनमोल पाणीही न देऊन तू आश्रमधर्माला आणि पतिव्रताधर्माला पारखी झालीस. तुझे काळे तोंड जळो, तुझ्याकडून मला सुख नाही. पत्नीसाठी गृहस्थाश्रम, आणि तीच जर आपला धर्म पाळत नसेल, तर मग काय करायचा तो धर्म!' हे बोलून ऋषींनी आपला राग व्यक्त केला. त्यांचा रेणूकेवरचा राग इतका वाढला की त्यांनी आपल्या पुत्रांना बोलावून 'तुम्ही माझ्या आज्ञेने तात्काळ हिचा वध करा' असे म्हटले.

रेणुकावध आणि परशुरामाला वर

जमदग्नी ऋषींनी पुत्रांना रेणूकावधाची आज्ञा दिली तेव्हा पुत्र म्हणाले, "स्वामिनाथ, जसा पिता तशी माता! आम्हाला त्यांचा वध करणे योग्य नाही. आपण याचा तत्त्वतः विचार करावा." त्यावर "तुम्ही पित्याची आज्ञा मानत नाही आणि तुम्ही पाचही पुत्र सारखेच आहात, तर आताच तुमचे प्राण जाऊन प्रेत होऊन पडाल." अशी

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized By Sarayu Foundation Trust and eGangotri

शापवाणी ऋषींनी उच्चारली. त्याबरोबर ते पाचही पुत्र निष्प्राण होऊन प्रेत होऊन पडले. तरीही ऋषींचा राग ओसरला नाही. त्याच वेळी परशुधारी परशुराम हातात फुले घेऊन तेथे आला. पित्याला नमस्कार केला. त्याच्या पित्याने त्यालाही ती घोर आज्ञा ऐकवली. परशुरामाने लगेच रेणुकेचे मस्तक छेदले . ऋषींना प्रसन्नता वाटली. ते मनातून संतुष्ट झाले. "तू मागशील ते देईन' असे ते परशुरामाला म्हणाले. तेव्हा परशुरामाने पित्याच्या चरणावर डोके टेकवून विनंती केली की, "स्वामी, माझी माता आणि सर्व बंधू यांना प्राणदान द्यावे एवढीच माझी मागणी आहे. "यावर ऋषींनी "तथास्तु - दिले!" असे उच्चारून परशुरामाला सांगितले, "तुझा हात लागताच तुझे बंधू प्रेतत्वापासून मुक्त होऊन, सावधचित्त आणि चैतन्ययुक्त होतील आणि नेहमीप्रमाणे वर्तन करतील. तसेच रेणुकेचे दोन भाग, तुझ्या हाताचा स्पर्श होताच अखंड होतील. शांतीसुखाच्या कौतुकाने आणि आनंदभराने ती उठेल." परशुरामाने त्या सांगण्याप्रमाणे वागण्यापूर्वी म्हटले, "मी माता छेदली हे माझ्या मातेला आठवणार नाही असा मला वर द्यावा." एवढे बोलून त्याने पुन्हा पित्याच्या पायावर डोके टेकले. तेव्हा ऋषींनी आश्वासन दिले, "तू छेदलेस हे तिला आठवणार नाही एवढेच नव्हे तर कुठेही घावाचा वणसुद्धा दिसणार नाही. जणू निद्रेतून जागी झाली आहे असेच तिला लक्षण जाणवेल." पित्याचे आश्वासनपूर्वक दिलेले वरदान ऐकून, पित्याला वंदन करून परशुराम मातेला सजीव करण्यासाठी आनंदाने पुढे झाला.

रेणुका छेदली जाऊन पडली तेव्हा तिला आदिशक्ती येऊन भेटली आणि म्हणाली, "अगं, तू ज्या कार्यासाठी जन्मलीस ह्याबद्दल अशी उदासीन का? तू सहस्रार्जुनाचा वध करायचा आहेस हे विसरून गेलीस, तेव्हा त्याची आठवण देण्यासाठीच इंद्र येऊन त्याने तुला त्रास दिला." रेणुका म्हणाली, "कार्यसिद्धी गुप्तबुद्धीने साधावी लागेल. ती जनापवाद न येता व्हायला हवी. त्यामुळे विरोधाला वाव मिळाला नाही. जनतेला ते कळू न द्यावे, जमदग्नी ऋषींनाही ते कळू न द्यावे, यावर मी प्रत्येक दिवशी लक्ष ठेवून होते, पण तशी विरोधाची संधीच मिळेना." आदिशक्ती पुढे म्हणाली, "परशुरामाला मिळालेल्या वरामुळे तुला देहप्राप्ती होईल, ती हेच कार्य साधण्यासाठी आहे." त्यावर रेणुकेने म्हटले, "तूच कार्य आणि तूच कर्ती असून, मला जी युक्ती सांगशील ती तशी मी साधेन." "सहस्रार्जुन शिकारीसाठी तुझ्या आश्रमात येईल तेव्हा कार्यसिद्धीसाठी, त्याचे पूजन कर. ऋषींकडून त्याला ससैन्य आमंत्रण द्यायला लाव. त्रिजगात जे दुर्लभ उपचार ते ते पूर्ण करण्यासाठी ऋषींना सांगून कामधेनू त्यासाठी आणव. आपले इष्ट कार्य साधण्यासाठी त्या कामधेनूकडे आवश्यक ते माग. त्या नृपतीचा पूजोपचाराने आदर कर."

परशुरामाने रेणुका आणि आदिशक्ती या दोघींचा संवाद चालू असतानाच पित्याकडून मिळालेल्या वरदानाने मातेला सावध केले. नंतर बंधूंना हात लावून त्या सर्वांना सावध केले. त्या बंधूंना मातेच्या घाताची समज नव्हती आणि मातेलाही स्वतःचा घात स्मरत नव्हता. पुत्रांना शापातून मुक्त केले म्हणून रेणुकेला खूप आनंद झाला. तिने परशुरामाला आलिंगन देऊन, त्याला 'रणविजयी होशील' असा वर दिला.

क्रोधनिंदा आणि क्रोधाची दर्पोक्ती

जमदग्नींनी स्त्री आणि पुत्र सावध झाल्याचे पाहिले तेव्हा त्यांना क्रोधाचा परिणाम जाणवून स्वतःच्या अधःपतनाबद्दल उद्विग्नता वाटू लागली. "स्त्रीपुत्रांचा मी क्रोधामुळे घात केला आणि त्यामुळे माझे अधःपतन झाले. परंतु धन्य परशुराम की ज्याने अनर्थ चुकविला. त्याने माझ्याकडून वरदान घेऊन माझेच अधःपतन टाळले. ज्या क्रोधाने मला फसविले त्याचे मी निर्दालन करीन.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

क्रोध म्हणजे मांगच म्हणावा. तो क्रोध माझ्यामधे वसतो म्हणजे माझा योग, याग सारे जळाले आणि मला क्रोधाचा अपवित्र डाग लागला आहे. ज्याच्या जिव्हारी क्रोधासारखा महा वैरी बसला आहे तो ज्ञानाची थोरवी मानत असेल तर त्याला संसारात महामूर्खच म्हणावे लागेल. अल्पसा अन्याय पाहून त्यावरून जो कोप करतो तो क्रोधाएवढाच अपकारी ठरेल. क्रोधावरच क्रोध का करत नाहीत. क्रोध येणे ही अपराधाची थोरवी आहे. तो न कळता जिव्हारी प्रवेश करतो, आणि चारी पुरूषार्थांना निष्प्रभ करतो. काम लगोलग पळून जातो, धर्म बारा वाटा उधळला जातो, क्रोधामुळे अर्थस्वार्थात तुटी येते आणि हा क्रोध अंतरात शिरून मुख्य त्या मोक्षाला जिवानिशी मारतो. अशाप्रकारे हा क्रोध अनेक बाबतींत आपल्याशी वैर करतो. क्रोध हा आपला वैरी आहे; त्याचा मी खरोखर संहार करीन.'' असे सांगून ऋषींनी दृढ आसन घालून, प्राण-अपान आवरून क्रोधाचे दहन करायचे कार्य आरंभ केले.

जमदग्नींनी क्रोधाला घालवून देण्यासाठी प्रयत्न सुरू केले तेव्हा क्रोध गर्वाने म्हणाला, "ऋषिवर विचार करा. मी (क्रोध) देहाबाहेर निघून गेलो तर तुमची थोरवी व्यर्थ होईल. आणि तुम्ही गवतासमान (काडीमोल) व्हाल; तुम्हाला मग कोणी विचारणार नाही. क्रोध देहात राहाण्यात केवढा थोरपणा आहे ते मी सांगतो, ऐका. मी नृसिंहाच्या शरीरात प्रवेश केला तेव्हाच त्याने हिरण्यकशिपूएवढा वैरी नखाग्रांनी निपटला. मी श्रीशिवाच्या ठायी ठाणे केले म्हणून त्रिपुर एकाच बाणाने संपला. त्या श्रीशंकराने जालंधराला जिवे मारले ते माझ्याच अस्तित्वामुळे. श्रीविष्णूच्या देहात प्रवेश केला तेव्हाच त्याने मधुकैटभ जागच्या जागी मारले. माझा कुमारांच्या देहात संचार झाला आणि मगच त्यांनी लवणासुर मारला पाहा. अशाप्रकारे माझ्याच योगाने देवांनी दुष्टसंहार केला. तेव्हा हे ऋषिराया, तू स्वतःही विचार कर कारण माझ्याशिवाय तू तृणप्राय होशील. मला देहातून घालविलेस तर तुझी काय नी कशी दशा होईल ते पुन्हा सांगतो. सावधान राहून ऐकून ठेव. मला देहाबाहेर घालविल्यावर बायकाही तुला टोले देतील. तुझ्या तोंडात मारली तरी प्रतिकाराचा नेट तुझ्या ठायी असणार नाही.''

जमदग्नींचे क्रोधाला उत्तर

क्रोधाचे दर्पाने भरलेले भाषण ऐकून जमदग्नींच्या क्रोधाविषयीच्या संतापात भरच पडली, त्यांनी 'आता मी याला मारणारच!' ही भूमिका स्वतःमधे बाणविली. ते म्हणाले, "भगवंतांनीच थोर विचार सांगितला आहे की काम, क्रोध, लोभ ज्याच्या शरीरात असतात त्याची नरकामधे वस्ती होते. त्याच्या घरात नित्य नरकच असतो. त्याला नरकात जावे लागत नाही कारण तो स्वतः नरकाची राशीच असतो. अरे क्रोधा, अशी तुझी गती असताना व्यर्थ बडेजाव कशाला सांगतोस. क्रोध हा कामाचा कैवारी, अभिमानाचा साहाय्यकारी, लोभ अंतर्बाह्य भरलेला, असा हा क्रोध पापकारी असतो. क्रोध देहात संचारला तर अणुमात्र हित नाही. क्रोधाच्या पायात शोभणारा अलंकार म्हणजे पापाच्या कोटी असतात.'' एवढे बोलून जमदग्नींनी योगाग्नी चेतविण्यास आरंभ केला. त्यामुळे गडबडून गेलेला क्रोध घाईघाईने त्यांच्या शरीरातून निघून गेला. जाता जाता एवढेच म्हणाला, "ऋषिवरा आपली आज्ञा मानून मी तत्त्वतः निघालो खरा, पण आता मी कोठे राहावे?'' यावर ऋषिवर्य विचारात पडले. 'माझा क्रोध तर अती दुर्धर आहे. याला राहण्यासारखे ठिकाण तर कुठेच दिसत नाही. मग आता याला काय सांगणार!' ही जमदग्नींची चिंता तत्त्वतः परशुरामाला कळली. त्याने पित्याच्या चरणी माथा टेकून नम्रपणे म्हटले, "आपला क्रोध अती दाहक असल्याने तो सर्वत्र दहन करील. तेव्हा याला मला अर्पण करण्याची आपण कृपा करावी.'' जमदग्नींना

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

हा विचार पटला. 'परशुधर संपूर्ण शुद्ध असल्याने त्यालाच हा आपला क्रोध अर्पण करावा' असे त्यांनी ठरविले.

परशुरामांकडून क्रोधाचा स्वीकार

जमदग्नी म्हणाले, "जो नित्य ब्रह्मचारी, ज्याला धनलोभ नाही, जो कोणी ब्राह्मणांचा द्वेष करत नाही त्याच्या ठायी माझा क्रोध शांतपणे राहील. याहून वेगळे जर घडले तर क्रोध त्याचा घात करील. जर तुला पेलत असेल तरच मी तो तुला अर्पण करीन. द्रव्य, स्त्री यांचा लोभ ज्याच्यापाशी असेल, तेथे क्रोध नेहमी मुसमुसत असतो, ज्याच्या मनात ज्ञानाचा गर्व असेल त्याच्या ठिकाणी क्रोध जागा असतो. तेव्हा ज्ञानगर्व, द्रव्य आणि स्त्री यांच्याच ठिकाणी क्रोधाचा मारा होतो. परंतु हे परशुधरा, ह्यांना जिंकले तर तोच उपयुक्त होतो आणि कामाचा ठरतो."

परशुरामाने सांगितले, "तात, मी आपल्या चरणांचे तीर्थ प्राशन केले आहे. त्या तीर्थामुळे माझ्याठिकाणी समर्थता आली असून क्रोध राखण्यात मला भय नाही." नंतर त्याने पित्याला नमन करून, प्रार्थनेने चरणतीर्थ घेतले आणि त्या तीर्थाबरोबर क्रोधाचेही स्वतः प्राशन केले. त्या वेळी क्रोध म्हणाला, "हे भार्गवा, (परशुरामा) तू दुष्टांचे निर्दाळण करशील, त्या वेळी संग्रामात हे भृगुवीरा, मी तुला साहाय्यकारी होईन." जेव्हा परशुरामाने क्रोध प्राशन केला, तेव्हा त्याच्या शरीरात पुष्टी, तुष्टी चौगुणी वाढली. संग्रामात त्याची वीरवृत्ती बलिष्ठ झाली. क्रोधाच्या प्राशनामुळे परशुरामाला समाधान झाले, त्याचा पराक्रम वाढला, या साऱ्याचा उपयोग दुष्टनिर्दाळणाच्या प्रसंगी व्हावा. असा परिणाम घडला.

सहस्रार्जुनाचे आतिथ्य

कामधेनू ऋषींनी आणली आणि रेणुकेच्या स्वाधीन केली. तिने कामधेनूची पूजा करून तिच्याकडे राजोपचारांची मागणी केली. राजा सहस्रार्जुनाने पूर्वी कधी पाहिले, ऐकले, चाखले नव्हते असे उत्तमोत्तम उपचार कामधेनूने तत्काळ दिले. पक्वान्ने, लोणी, लुगडी एका ताटातून उत्पन्न झाली. दुसऱ्या एका ताटातून लक्षावधी, कोट्यवधी, असे ताटांचे ढीगच्या ढीग निघाले. राजदूताने राजाला सांगितले की चुलीमध्ये अग्नी नाही, मग अन्नसामग्री, स्वयंपाक हे कुठले? तेव्हा राजाने प्रधानाला आश्रमाकडे पाठवून, तेथे स्वयंपाकघरात काय आहे नाही ते पाहावे आणि ऋषींना अन्न आणि धन हवे का असे पाहण्यास सांगितले. या राजाच्या आज्ञेप्रमाणे प्रधान आश्रमात स्वतः आला. तेव्हा ऋषींनी बोलावणे पाठविले. प्रधानाने उशीराबद्दल विचारले तेव्हा शिष्यवर्गाने सांगितले की 'धीर धरा, अन्नप्रकार तयार आहेत. आता लवकर या.'

प्रधानाने राजाला कळविले. ऋषींनी बोलावणे पाठविले. राजाने सैन्यासह सर्व सिद्धता केली आणि तो भोजनासाठी आला. ऋषींनी सामोरे जाऊन, मोठ्या प्रेमाने त्याचे स्वागत केले; मधुपर्कासहित राजाचे पूजोपचार केले. राजा आणि प्रधान यांनी पाहिले तेव्हा दिव्य शोभायमान मंदिरे, सोन्याच्या ताटात पक्वान्ने, अशी सर्वांना समान सामग्री तिथे दिसली. ऋषींनी पंक्ती बसविल्या. राजा मनातून आश्चर्यचकित झाला. ऋषींची संपत्ती आणि स्थिती पाहून राजाला धन्यता वाटली. सर्वजण एकदमच भोजनास बसले. त्यांना पुन्हा मागावे लागले नाही की वाढावे लागले नाही. एका वाढ्यातच सर्वजण तृप्त झाले. नंतर दिव्य अलंकारभूषणे, दिव्य वस्त्रे सर्वांच्या अंगावर घालून त्यांचा सन्मान करण्यात आला. सर्वजण या प्रकाराने चकित झाले होते. नंतर राजाने प्रधानाकडे विचारणा केली की "आम्ही एवढे चक्रवर्ती राजे असून आमच्याकडेही अशी आणि एवढी संपत्ती नाही, तर ती ऋषींपाशी कशी?"

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Research Academy eGangotri

कामधेनूची मागणी - जमदग्नींचा वध

राजाच्या मनातले कुतूहल पुरोहितांच्या निवेदनाने पूर्ण झाले. ते म्हणाले, "हे ऋषी थोर आहेत. त्यांच्या घरी कामधेनू आहे. तिच्या प्रभावानेच सारे दिव्य उपचार उत्पन्न झाले" ऋषींपाशी कामधेनू असल्याचे समजताच सहस्रार्जुनाला ती आपल्याकडे मागून घ्यावी असा दृढ अभिमान निर्माण झाला. राजा ऋषींना म्हणाला की, "आपण आम्हाला अत्यंत सुखी केले आहे, आता काहीएक मागणे मागणार आहे ते अवश्य आपण आम्हाला द्यावे." ऋषी त्यावर, "आपण श्रेष्ठ राजे!" एवढेच म्हणाले. राजाने स्पष्टच बोलून दाखविले, "मी आपला याचक आहे. आपल्याकडे मी काही मागतो आहे ते आपण अवश्य द्यावे. आपल्या आश्रमात कामधेनू आहे, ती कृपा करून मला द्या." राजाचे हे मागणे ऐकून जमदग्नी उद्विग्न झाले. त्यांनी राजाला समजावले की, "कामधेनू हे स्वर्गाचे भूषण आहे, ती मृत्यूलोकीची नाही. हे राजन्, तुझ्या पूजेसाठी ती मी इंद्राकडून मागून आणली. ती दुसऱ्याची आहे तेव्हा तिचे दान कसे करता येईल? शिवाय इथले काम संपताच परत करीन असे स्पष्टपणे सांगून मी ती आश्रमात आणली आहे."

राजाने मनात विचार केला की, 'आपण बळजबरीने धेनू नेऊ आणि इंद्र चालून आला तर त्याला शिक्षा करीन.' यांनतर राजाने प्रधानाला धेनू सोडवून आणायला पाठविले. त्यावेळी देदीप्यमान, तेजस्वी जमदग्नी आडवे झाले. त्यांच्या तेजापुढे टिकाव न धरविल्याने प्रधान मागे पळाला. धैर्यवान इतर योद्धेही मागे पळाले. त्या तेजापुढे ते किती बिचारे टिकणार! हे पाहून राजा स्वतःच पुढे धावला. त्याने पुढे उभे असलेले जमदग्नी रतिभरही ढळले नाहीत हे पाहिले. हे लक्षात आल्यावर राजाने त्यांच्यावर शस्त्रांचा मारा केला. पण ती शस्त्रे ऋषींना लागत नव्हती. अखेर राजाने निर्वाणखड्ग हाती घेऊन मारले. जेथे विषयाचा अत्यंत स्वार्थ असतो तेथे कर्तव्याची जाण वा स्मरण होत नाही. त्यामुळे राजाच्या हातून ऋषींचा वध झाला. जमदग्नींनी क्रोध सोडला, त्यामुळे त्यांना शाप देता आला नाही आणि राजाचा प्रताप त्यामुळे चालला.

रेणुकेचा प्रतिकार - कामधेनूचा प्रभाव

जमदग्नींचा प्राण गेला. त्याबरोबर आश्रमातले ब्राह्मण पळाले. राजाने कामधेनू आणण्याची सेवकांना आज्ञा केली. सेवक कामधेनूला नेण्यासाठी आले तेव्हा रेणुका संतापून पुढे आली. तिने कानातले भूषण काढून त्याचे चक्र केले आणि युद्धार्थ सिद्ध झाली. त्या चक्राने तिने प्रधान पळवला. सेनाही जीव घेऊन बारा वाटा पळाली. त्या चक्राच्या तीक्ष्ण धारेने अनेक महावीर पाडले. रक्ताचा पूर वाहू लागला. तिच्यासमोर कोणी टिकून राहू शकेना. नंतर राजा स्वतःच कामधेनूला सोडून आणायला धावला. रेणुकेने त्याचा हात हिसडताच तो मूर्च्छा येऊन पडला. त्याबरोबर राजाचे पुत्र रागाने धावून आले आणि त्यांनी अत्यद्भुत युद्ध आरंभिले. तेवढ्या वेळात राजा सावध झाला. त्याने निर्वाणखड्गांचे घाव घालायला लगेच आरंभ केला. परंतु ते तिला लागत नाहीत हे पाहून राजा गडबडला: 'या सहस्रार्जुनाचा आवेश देव-दानवही सोसू शकत नाहीत; मग मनुष्यांचा काय पाड! अशा मला एका स्त्रीने कमीपणा आणावा!' असा विचार त्याच्या मनात आला. अखेर त्याने चामुंडास्त्राचा प्रलयकारी आघात सर्व शक्तीनिशी केला. तो आघात एकवीस वेळा सहन केल्यावर जगदंबा-रेणुका-मूर्च्छित होऊन पडली.

जमदग्नींच्या आज्ञेचे कामधेनूला पूर्ण बंधन होते. ते मृत होताच ती धेनू स्वतःच निर्बंधन झाली. इकडे रेणूका रणात पडल्यावर राजाने धाव घेऊन धेनू पकडली. तेव्हा ती धडका देऊन बाहेर पडली. राजाच्या सहस्र हातांनाही ती आवरत नव्हती.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

राजाने जेव्हा तिच्या खुरावर आघात केला तेव्हा खुरातून निघालेल्या रक्ताप्रमाणे आरक्त झालेले खुरासनी लोक राजाशी लढायला आले. राजाने त्यांना पळविले आणि धेनूच्या शिंगावर आघात केला. त्यातून सिंगाळ उत्पन्न झाले आणि त्यांनी राजाला हाकलले. यावेळी धेनूने आक्रंदून हंबरडा फोडला. त्यामुळे काळ्या शाईच्या रंगाचे हबशी जन्मले. त्यांनी सहस्त्रार्जुनाला हाकलले. इतके सारे कंदन केल्यावर कामधेनू स्वर्गात गेली. राजा म्लानवदन आणि उद्विग्न होऊन पश्चात्ताप करू लागला. तो स्वतःशीच बोलला, 'धड ना स्वार्थ, ना परमार्थ; निष्कारण शस्त्र घात केल्याने माझ्याकडून ब्रह्महत्या झाली. स्वलोभाने हा तत्काळ अनर्थ घडविला.' नंतर कोणाशी काही न बोलता, जिवंत राहिलेल्या सैनिकांसह तो आपल्या नगरीला परत गेला. रणामध्ये मूर्च्छित होऊन पडलेली रेणूका आपली आपण काही वेळाने सावधं झाली. तिने आपले प्रप्राण आणि आपली चेतना पुन्हा ठाकठीक करून घेतली. तिथले ते रणकंदन पाहून तिने आक्रंदून हाक दिली. 'परशुरामा धाव रे धाव. लवकर ये आणि माझे दुःख निवारण कर.' अशी तिची ती आक्रंदून मारलेली हाक तिकडे कैलासात परशुरामाच्या कानावर पडली. मातृवचनावर भक्ती असणारा तो तातडीने आला". अशी ही पूर्वकथा ब्राह्मणांनी मार्गात परशुरामाला सांगितली.

परशुरामाचे आगमन, रेणुकेची आज्ञा

परशुरामाला कैलासाकडून आश्रमाकडे येताना वाटेत भेटलेल्यांकडून सर्व वार्ता समजली आणि तो वेगाने मातेच्या दर्शनासाठी आला. त्याला माता घायाळ झालेली दिसली आणि तो गहिवरून रडू लागला. तेव्हा रेणुका त्याला म्हणाली, "तू इथे का रडायला आलास. तुझ्याजवळ पराक्रमाचा पुरुषार्थ नाही. तू कसला माझा कैवारी होणार." मातेचे हे उद्‌गार ऐकताच तो तिच्या पाया पडून म्हणाला, "मला आज्ञा दे. लवकर अनुज्ञा दे. मी सहस्रार्जुनाचे हजार हात तोडून त्याचे शिरही छेदतो." मग रेणुकेने संतापाने आज्ञा दिली, "सहस्रार्जुनाचे कर आणि मस्तक तर छेदच, पण सर्व दानवांचे निर्दाळणही कर. युद्धामध्ये क्षत्रियांनी मला शस्त्रास्त्रांनी घायाळ केले आहे, तेव्हा तू अजोड पराक्रमाने पृथ्वी निःक्षत्रीय करावीस. सहस्रार्जुनासहित त्याचे पुत्र शोधून सर्वांचा वध कर. दैत्य उन्मत्त आहेत त्यांचा समूळ नाश कर. माझे शरीर म्हणजे पृथ्वी, तिच्यावर एकवीस घाव पडले आहेत तेव्हा तू एकवीस वेळा पृथ्वी निःक्षत्रीय कर ही माझी तुला आज्ञा आहे." परशुरामाने मातेच्या चरणांना वंदन केले आणि धनुष्यबाण, परशु हातात धरून तो क्रोधाने कापत निघाला.

मातेची आज्ञा निःसीम असते कारण ते श्रेष्ठ मूळपीठ पवित्र आहे. रेणुका परशुरामाला म्हणाली, "मी सहगमन करते. मग तू पित्याचे उत्तरकार्य कर." एवढे बोलून रेणूकेने जमदग्नींच्या शरीरात प्रवेश केला. तिचे प्रेत उरले नाही. ती देहीच विदेही जगदंबा होती. परशुरामाने दुःख केले आणि तिच्या भेटीची इच्छा व्यक्त केली. ती भेट मूळपीठात होईल असे तिने सांगितले.

परशुरामाची सहस्रार्जुनावर चढाई.

परशुरामाने सिंहाद्रीला दोघांची उत्तरक्रिया उरकून, पुढे युद्धधर्माचे पालन करण्यासाठी सहस्रार्जुनाशी घोर संग्राम करायचे ठरवून, प्रयाण केले. तो जेथे राजा सहस्रार्जुन राहात होता त्या महिकावतीला आला. त्याच्या हातात त्या वेळी धनुष्यबाण होते. महिकावती नगरीपाशी आल्यावर त्याने विचार केला की आपण नगरीवर युद्ध लादले तर समस्त प्रजेला पीडा होईल. राजा नगरीबाहेर पडला तर त्याला सहपरिवार मारीन. नंतर परशुरामाने राजाला, 'नगराबाहेर येऊन रण करावे' असे धर्मवचन धाडण्याचे ठरविले. हे सांगूनही माझ्या भयाने राजा बाहेर आलाच नाही

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust, Lucknow

तर आपणच नगरप्रवेश करावा आणि राजभवनाकडे जावे. त्या वेळी प्रजेला आणि गोब्राह्मणांना अभयदान सांगून स्वस्थ राखावे. मग राजभवनात प्रवेश करून राजाचा वध करीन. 'माझ्याशी युद्ध करायला ये' हा निरोप कोणाबरोबर पाठवावा अशी चिंता मनात करत असलेल्या परशुरामाला तेवढ्यात हातात फुले घेऊन जाणारा माळी दिसला. राजाकडे देवपूजेसाठी हातात फुले घेऊन जाणाऱ्या त्या माळ्यानेही 'हा कोणी वेगळाच ब्राह्मण दिसतो. याचे स्वरूप आणि शैली काही निराळीच दिसते, असे मनात आणून परशुरामाच्या तो जवळ आला. परशुरामाने 'फुले कोणासाठी नेतो आहेस?' हा प्रश्न केल्यावर माळ्याने त्यावर 'मी राजाचा विश्वासू माळी असून त्याच्या देवपूजेला फुले नेतोय' असे सांगितले.

परशुरामाने त्या माळ्याला म्हटले, "हे पाहा, तुझ्या राजाला निरोप सांग की माझ्याशी युद्ध करण्यासाठी सर्व सैन्याला घेऊन नगराबाहेर ये." परशुरामाचे बोलणे ऐकून माळ्याने त्याचा उपहास करत म्हटले, "अरे बाबा, राजाशी युद्ध करून मरणाला का सामोरा जातो आहेस? तुझ्याकडे पाहून तुझे ब्राह्मणपण जाणवते आहे. तुझ्याकडे हे धनुष्यबाण कुठून आले? परशु धारण करायचे काय कारण? तू खरे तर वेदपठण करायचे. राजा आणि त्याचे प्रबळ सैन्य एकीकडे आणि तू एकाकी ब्राह्मणपुत्र, तुझ्याकडून घनघोर संग्राम आणि रणकल्लोळ कसा करवेल?" त्या वेळी जे जे त्या मार्गावरून जाणारे होते, त्यांना परशुरामाची मागणी कळताच ते म्हणू लागले, 'हा आत्मघातकी दिसतो. राजाशी युद्ध करून मरणाला हा आतुर झालेला दिसतो. अहो, क्षत्रियांना युद्धाचे आणि ब्राह्मणांना शापाचे बळ असते. हा युद्धाची इच्छा धरतोय, हा पूर्ण अविवेकी आहे.' नंतर तो माळी म्हणाला,' मी तुझा निरोप सांगताच राजा तुझी हत्या करील आणि ब्रह्महत्येचे पाप मात्र माझ्या माथी बसेल. मी नाही तुझा निरोप सांगणार" परशुरामाला यावरून जाणवले की, येथे सज्जनपणे सांगून कोणी ऐकणार नाही. तेव्हा या माणसांना पराक्रमी पुरुषार्थ दाखवूनच आपले वचन मान्य करायला लावले पाहिजे. परशुरामाला हा विचारच पटला. त्याने माळ्याला चांगला बडवला, फुले हिसकावली आणि, 'जा. आता तुझ्या राजसभेत जाऊन शंख कर' असे सांगून हाकलला.

परशुरामाच्या माराने त्रस्त झालेला माळी तडक राजभवनाच्या दारात जाऊन मोठमोठ्याने आक्रंदू आणि शंख करू लागला. ते ऐकून सर्व नरनारी धास्तावून विचार करू लागले की, हा माळी असा दारात उभा राहून शंख करतोय तर आतमधे राजाचे काही बरे वाईट झाले नसेल ना! सहस्रार्जुनाच्या राज्यात स्वप्नातही बोंब ऐकायला मिळत नाही आणि हा माळी तर राजद्वारातच शंख करतोय तेव्हा राजाच मृत झाला असावा. ही वार्ता सर्वतोमुखी होऊन जणू त्यातून भविष्यच सांगितले गेले. ती बोंब ऐकून राजाचाही थरकाप उडाला. "मी गाईवर शस्त्राघात केला, ब्राह्मणाला ठार केले. माझ्याकडूनही अनेक पापे घडली आणि त्यामुळे मला कधीच जय मिळणार नाही.' असे त्याच्या मनात येऊन गेले. प्रधानाने माळ्याकडे त्याच्या शंख करण्याच्या कारणाची विचारणा केली. माळी म्हणाला, "एक ब्राह्मण धनुष्यबाण आणि परशू घेऊन आला आहे. तो बलवान असून तो सैन्यासह राजाशी युद्ध करू म्हणतोय. त्याने ही वार्ता राजाला सांग असे मला म्हटले. तेव्हा मी त्याच्या बोलण्याचा उपहास केला. 'राजा आणि ब्राह्मण यांच्या युद्धाचे तुझे बोलणे हे अगदी व्यर्थ आहे' असे मी म्हणताच त्याने मला खूप पिटून काढले. माझ्या हातातली फुले हिसकावून घेतली आणि माझ्या तोंडात भडकावली. त्याने माझ्या जिवावर संकट आणले म्हणून मी ओरडतो आहे."

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

परशुराम सैन्याची दुर्दशा करतो

माळ्याचे बोलणे ऐकल्यावर सेनाधिकाऱ्याला बोलावून ब्राह्मण धरून आणण्याची आज्ञा झाली. स्वाभाविक कुतूहलाने नागरिक एकट्याचे अनेकांशी होणारे युद्ध पाहायला जमले. नगररक्षक बाहेर पडला. पुढे पायदळाच्या ओळी असून, ते सैनिक हाहाःकाराच्या गर्जना करत आणि शस्त्रे पेलत निघाले. परशुराम स्वतःशी म्हणाला, 'हे दीन, यांना मारण्यात काय पुरुषार्थ आहे. यांचा राजाला अपशकुन होईल असे काही करायला हवे.' असा विचार करून परशुरामाने एका बाणाची योजना केली की त्या बाणाने सर्वांची शस्त्रे तोडली, तसेच नाक-कान सोलपटून काढले आणि तो बाण पुन्हा भात्यात येऊन थांबला. कोणाचा व्याही, कोणाचा जावई, कोणाचा भाऊ हे भेटायला आले तर त्यांना नाक-कानाला मुकल्याचे कौतुक पाहायला मिळाले. त्यांचीही तीच अवस्था झाली. कोणाचा पाहुणा, मेव्हणा, दिवाळसणाला आणलेला जावई त्या सगळ्यांचे नाक-कान दोन्ही गेले. त्यांना तोंड दाखवायची लाज वाटली. त्यांनी आक्रंदून शंख केला. त्यांची फे - फे उडाली. अशी त्यांची युद्धात विटंबना झाली. समोरून आलेल्या घावाने प्राण गेला तरी ते वीराला शोभणारे मरण ठरते. परंतु जिवंत राहून नाक-कान गेले तर त्याचे चौपट मरणाचे दुःख होऊन, निंद्य वाटते, वीरांच्या या विटंबनेची वार्ता नगरात पसरली. त्यामुळे राजपुत्र अत्यंत संतापले. त्यांनी सैन्य एकत्र केले. साठ कोटी हत्ती, कोट्यवधी श्रेष्ठ रथ, असंख्य घोडेस्वार आणि शिवाय गर्जना करणारे पायदळ असे ते सैन्य होते. सैन्याच्या आघाडीला सेनानी, मध्यभागी राजपुत्र, दक्षिण दिशेला मुख्य राजे, डाव्या भागाला चंड-मुंड, अशी रचना करून सहस्रार्जुन वेगाने निघाला. त्याला त्याचे पुत्र आणि प्रधान यांनी विनंती करून थांबविले. 'आम्ही तो ब्राह्मण बांधून आणू. आम्ही इतके जण आहोत आणि तो एकटा एक ब्राह्मण आहे. तेव्हा आपण त्याच्यावर चालून जावे असे हे समरांगण नाही,' असे सर्वांनी सांगितले.

अशाप्रकारे राजाला नगरातच ठेवण्यात येऊन, मंत्री आणि राजपुत्र हे स्वतः दळभार घेऊन नगराबाहेर निघाले. त्यांना वाटेत नाक कापले गेलेले लोक भेटले. तो अपशकुन मुख्यतः राजासच घातक असा शास्त्रार्थ जाणून 'जळो तुमचे निंद्य मुख; अगदी मुहूर्त साधून आमच्या पुढे आलात' असे दूषण दिले गेले. जे लोक आधीच दुःखी आणि घायाळ होते त्यांना फारच वेदना झाल्या. ते लोक त्यावर म्हणाले "तो ब्राह्मण कोणाचे प्राण घेत नाही. तुम्ही तरी स्वपराक्रमाने आपले नाक-कान वाचवा म्हणजे धन्य व्हाल." नंतर प्रधान म्हणाला की, "आपण अपशकुनाला भिऊन माघारी परतू नये कारण मागे परतणे हाच जगातला मोठा निंद्य अपशकून आहे. आपण युद्धासाठी बाहेर पडलो आहोत. युद्ध करताना एकाचा जय आणि एकाचा पराभव हे न चुकता होणारच; म्हणून शकुनाची थोरवी मानणे हे मूर्खपण आहे. ज्याच्या अंगी पराक्रम नाही त्याला शकुन कसला जय देणार. हे मानणारे पूर्ण मूर्ख असतात. पण शूरांचे हे लक्षण नव्हे. देव जर शकुनाच्या ठिकाणी असेल तर तो अपशकुनातही असणारच. शकुन-अपशकुनाचा विचार निधडे वीर मानत नाहीत." यापुढे काही न बोलता प्रधानाने भेरी वाजविण्याची आज्ञा करून परशुरामाच्या दिशेने सैन्य पुढे नेले.

अध्याय सतरावा

परशुरामाने दुरूनच पाहिले आणि आलेले सैन्य निर्नायकी आहे हे ओळखले. राजा स्वतः आलेला नाही, राजपुत्र तेवढे दिसले. राजाचे पुत्र वेचून सर्व मारावेत अशीच मातेची आज्ञा आहे. तेच कार्य मी आता पूर्ण करतो.

https://archive.org/details/@sarayu_foundation_trust_lucknow / Bhavan Vani Trust, Lucknow / Sri Lakshmi academy

CC-0. In Public Domain. Digitized by Muthulakshmi Research Academy
CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Trust and eGangotri

राजपुत्रांशी परशुरामाचे युद्ध

परशुरामाने त्र्यंबक धनुष्याचा टणत्कार केला. त्या नादाने देव मूर्च्छित झाले. गिरिकंदर दुमदुमले. राजपुत्र धास्तावले. प्रधान धाकाने दचकला, पण धैर्य एकवटून उभा राहिला. अनेक सैनिकांनी उभ्या उभ्याच प्राण सोडले. टणत्काराच्या ध्वनीने पूर्ण आकाश कोंदून गेले. नंतर परशुरामाने सिंहमुख बाण सोडला. त्या बाणाने सर्व हत्ती मारले, रथांचे आख तोडले, घोड्यांची डोकी फोडली. बाणाच्या पिसाऱ्यामुळे वारा सुटला, त्या वाऱ्याने श्रेष्ठ रथी आकाशात उडविले. वर गेलेले वीर चक्री वादळात गरगर भिरभिरू लागले. जेव्हा ते वीर वरून खाली पडत तेव्हा ते तळाला येऊन चूर होत. वर रथ खाली आदळून रणातल्या वीरांचे त्याखाली पीठ होत होते. परशुरामाने अनेक बाण सोडून सारे सैन्य भोवऱ्यात सापडावे तसे गुंतवले. जो सैनिक बाण चुकवून जिकडे जाईल तिकडे पुन्हा दुसऱ्या बाणाने घायाळ केला जाई. धाकाने, घावांच्या भीतीने कोणी ढाल पुढे करीत, तेव्हा ढाल फोडून बाण सर्वांगाचा भेद करी. अशी परशुरामाने रणक्रीडा आरंभली. त्याने चेंडूफळीप्रमाणे योध्यांची शिरे उडविली. अनेक शक्तिशाली राजे त्याने ठार केले. रणात सांडलेले रक्त ओंजळी भरून भुते प्राशन करू लागली.

परशुरामाकडून आपल्या सैन्याला सपाटून मार मिळत असल्याचे पाहून राजकुमार खवळले. प्रधान आले. परशुरामाने झडाडून सोडलेल्या बाणांनी प्रधान तेवढा नेमका उडविला आणि राजापुढे नेऊन टाकला. तो प्रधान मस्तकाला तडा पडल्याने मेला. चंड आणि प्रचंड यांनी कसोशीने युद्ध सुरू केले. त्यांचे प्रथम हात छेदून नंतर दोघांची मस्तकेही परशुरामाने तोडून पाडली. त्या दोघां दुर्धर योद्ध्यांनाही रणात पाडलेले पाहून हाहाःकार उडाला. या हाहाःकार करणारांचे तोंड छेदले गेले. वीरांचे वीरत्व आटले. मग परशुरामाने राजाच्या पुत्रांवर लक्ष केंद्रित केले. राजपुत्रांनीही मोठ्या दुर्धरपणे युद्ध चालविले. त्यांचे शस्त्र चालविण्यातील कौशल्य दिसून आले. बाणांनी बाण तोडणे, शस्त्रांनी शस्त्रे निकामी करणे, अस्त्रांनी अस्त्रांचा बीमोड करणे, निर्वाण शस्त्रांची योजना करणे असा युद्धाचा प्रकार चालू झाला. परशुरामाने त्यांच्या रथांचा छेद केला. शतकावारी सारथी मारले. रथांतले वीर मारून त्यांना विरथ केले. अघोर काळाचाही अंत करील असा अर्धचंद्राच्या आकाराचा बाण परशुरामाने सोडला आणि त्यांची सर्व शस्त्रे, त्याबरोबरच मस्तकेही तोडली. रणातला रक्तप्रवाह भूमीवर वाहू लागला राजपुत्र भूमीवर कोसळल्यावर इतर वीरांच्या ओळी परशुरामाने रणात मारून कीर्ती केली. सर्वांची त्याने अशी शांती केली. रणात आलेले सारेच परशुरामाने मारले त्यामुळे या घटनेची बोंब करायलाही कोणी उरले नाही. अश्व, गज, रथ पायदळ, अतिरथी, महारथी जे जे युद्धासाठी आले त्या सर्वांना भार्गवाने रणातच शांत केले.

सहस्रार्जुन आणि परशुराम यांचे युद्ध

परशुरामाने प्रधान राजभवनात आणि राजपुत्र रणात पाडले, हे पाहून राजा सहस्रार्जुन संतापून युद्धासाठी निघाला. सर्व सैन्य युद्धात मारले गेले होते, त्यामुळे राजाबरोबर फक्त पाचशे सेवक उरले होते. तरी राजा एकाकीपणे लढण्यासाठी त्वरित रथावर चढला. त्याच्या मनात आले, 'मी गाय-ब्राह्मणांना शस्त्र लावले असल्याने अपयशाचा धनी झालो आहे. आता निदान आचरावे. रणामध्ये क्षात्रधर्म दाखवीन आणि भार्गवाला बाणांनी त्रस्त करीन. मी त्याच्या तोडीस तोड कटाक्षाने रण करीन आणि निर्वाणीचे युद्ध करून माझे सामर्थ्य दाखवीन. तो पित्याचा सूड घेण्यासाठी आणि मी पुत्रांचा सूड घेण्यासाठी असे लढू. बघू दोघांचा पराक्रम!" असा विचार करून तो गर्जना करत युद्धाला गेला.

https://archive.org/details/muthulakshmiacademy
Bhuvan Vani Trust, Lucknow

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

परशुरामाने तेजस्वीपणे म्हटले, "जिथे जेवायचे तेच घर घ्यायचे असा दुष्टपणा खरोखर तू केला आहेस. काहीही वैर नसताना तू जमदग्नींना मारलेस. जमदग्नींनी क्रोध सोडला होता, त्यांच्यावर तू आपला प्रताप दाखवलास. आता वृथा बळाच्या वल्गाना काय करतोस? तू क्षुद्रांतला क्षुद्र आहेस. स्त्रियांपुढे तुझा पराक्रम आणि पुरुषार्थ, माझ्या मातेला मूर्च्छित केलेस. आता इथे सापडलास. तुझा निःपात मी करतो" परशुरामाचे हे बोचणारे भाषण ऐकून तो सहस्रभुज राजा रागाने पुढे झाला. तेव्हा सिंह हत्तीवर जातो तसा त्याच्यावर द्विभुज (भार्गव) चालून गेला. जमदग्नींचा प्रखर क्रोध आता भार्गवाकडे आला असल्याने तो राजाविरुद्ध खवळून उठला, आणि राजाचा गर्व छेदायला सिद्ध झाला. धनुष्याला रागाने दोरी चढवून त्याने तीक्ष्ण बाण चढवला. सहस्रार्जुन पुढे सरसावला. दोघांचे घनघोर युद्ध सुरू झाले.

दोघे एकमेकांच्या बाणांना आपल्या बाणांनी निवारू लागले. शस्त्रांचा शस्त्रांनी संहार करत आणि अस्त्रे अस्त्रांनी निवारण करीत ते प्राविण्य दाखवू लागले. हजार बाहूंच्या धनुर्धराला दोन बाहूंच्या योद्ध्याने बाणांच्या वेढ्यात घेरले. राजाला त्यातून सुटण्याचा मार्ग आठवेना. त्याच कौशल्यात गुंतून पडलेल्या राजाचा रथ परशुरामाने छेदला. सारथी मारला. घोड्यांना रणभूमीवर पाडले. मागून जरी रथांचा पुरवठा झाला तरी तेही परशुरामाच्या बाणांनी छेदले गेले. अशाप्रकारे कोणीही साहाय्यकारी न उरल्याने राजा रणामध्ये एकाकी उरला.

राजा रथाशिवाय रणभूमीवर राहिला. तेव्हा त्याने रागाने निर्वाणीचा घनघोर संग्राम करण्यासाठी अनिवार अशा अस्त्रांची योजना केली. या अस्त्रांचे निवारण कोणी जाणत नव्हते. दंडास्त्र, चंडास्त्र, त्याचवेळी प्रचंडास्त्र अशी अस्त्रे एकदम सोडली. तसेच वितंडास्त्र, अनिवार आणि घोर असे घोरास्त्र सोडले. परशुराम हा नेटका धनुर्धर होता. त्याने मारा करणाऱ्या शस्त्रांचा संभार शस्त्रांनी संहार करून टाकला. नंतर दंडाने दंडास्त्र दंडिले, खंडास्त्र खंडाने खंडिले, चंडाने प्रचंडास्त्र छेदिले. घोरास्त्र हे त्याने अघोरास्त्राने परतविले. राजाची सर्व निर्वाणास्त्रे त्याने वाताहत केली. नंतर राजाने अत्यंत अनिवार असे चामुंडास्त्र घेतले. पूर्वी चंडमुंडांना ज्या अस्त्राने मारले होते ते राजाने घेतलेले पाहताच परशुरामाने कालिकेला आवाहन केले कारण चामुंडा ही तिची दासी होती. चामुंडेला कालीका म्हणाली, "रेणुका ही माझेच स्वरूप होती. तिच्या पतीचा घातक तू अवश्य निर्दाळ." चामुंडा कालिकेची दासी होती हे ज्यांना पटत नसेल. त्यांनी, चंडमुंडांना जेथे मारले तिथे, सप्तशतीला पहावे. कालिकेला नमन करून, तिची आज्ञा घेऊन, चामुंडा ही राजाचे निर्दाळण करावे म्हणून परतली. चामुंडा उलटी वळली. राजाने पाहिले की त्याचीच अस्त्रे त्याच्या पाठी लागत आहेत. या प्रकाराने तो गडबडला. 'चामुंडेचे निवारण करणे मलाच माहिती नाही. तेव्हा मला अवश्य मरण येणार, या धाकाने तो थरथर कापायला लागला. याच क्षणी परशुरामाने परशु हाती घेतला आणि राजाच्या हजार बाहूंची खांडोळी करून ती धरणीवर पाडली. नंतर निर्वाणीचे अवसान साधून त्याने राजाच्या मस्तकावर घाव घातला. त्या घावाने तो राजा रणभूमीवर कोसळला.

सहस्रार्जुनाकडून मरताना स्तवन

परशुरामाने एकाच घावात राजाला खाली पाडले आणि त्याच वेळी त्याचे मस्तक अंतराळात उडविले. त्या उडालेल्या मस्तकाने परशुरामाला ओवाळले आणि नंतर ते त्याच्या पायाशी चरणधूळीचे वंदन करण्यासाठी येऊन पडले. तेव्हा सद्भावनेने स्तुती करताना जणू ते म्हणाले, "मी गोब्राह्मणांचा घात करणारा आहे. अशा मला शस्त्राने धारातीर्थी मरण देऊन आपण माझ्या पापाचे क्षालन केले आहे. आपण माझ्या हजार

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

बाहूंचा भार छेदून, त्यासह माझा अहंकार, वासनासमूह यांचाही छेद केलात. त्यामुळे आपण माझा उद्धार केला. माझे कर्माकर्म, धर्माधर्म, मोहभ्रम यांचा छेद करून आपण मला परमश्रेष्ठ ब्रह्म केले. माझे नावरूप, पुण्यपाप, संकल्प-विकल्प यांचा नाश करून मला निर्विकल्प ब्रह्मच केले. अहंसोऽहंपण, मीपण, एकपण नाहीसे करून मला परिपूर्ण ब्रह्म केलेत.'' असे स्तवन करताना डोळे प्रेममय झाले आणि त्या राजाचे मस्तक परशुरामाच्या चरणांना वंदन करत असतानाच, सहस्रार्जुनाने प्राण सोडला.

रेणुका मातेने कठोर आज्ञा केली होती की 'प्रथम सहस्रकर छेदावे, नंतर त्याचे शिर छेदावे', तशाच प्रकारे परशुरामाने सहस्रार्जुनाला रणक्षेत्रावर मरण दिले. पुढे एकवीस वेळा पृथ्वी निःक्षत्रीय केली. अशा रीतीने त्याने मातेची आज्ञा पूर्ण पाळली.

परशुराम मिथिलेत - त्याचे स्वागत

परशुराम पृथ्वी निःक्षत्रीय केल्यावर अकस्मात् मिथिलेला आला. तेथील ब्रह्मवृंदाकडे त्याने 'येथे राज्यकर्ता कोण आहे?' अशी विचारणा केली. त्याला असे सांगण्यात आले की, 'हा चक्रवर्ती धर्मात्मा असून, देहात असूनही विदेहधर्माने वर्तन करणारा आहे. याचा अगाध महिमा आहे.' असे ब्राह्मणांनी सांगितले. तेवढ्यात जनक स्वतःच सामोरा आला. परम आदराने आलिंगन देऊन जनकाने सर्वांना राजभवनात नेले. जनक राजा ब्रह्माधिकारी असल्यामुळे परशुरामाने त्याला मारले नाही. उलट एकात्म प्रेमाने तो त्याच्या घरी राहिला. जनकाने त्याला भोजनासाठी ठेवून घेतले. परशुरामासह ऋषींनाही आमंत्रण देऊन भोजनासाठी येण्याविषयी विनंती केली. तेव्हा परशुरामाने धनुष्यबाण ठेवून स्वतःची स्नानसंध्या उरकली आणि मग भोजनासाठी आत आला. त्या वेळी ऋषींची मोठी पंगत जेवायला बसली.

भोजन-तांबूल यांतील स्वानंद

जनकाने अत्यंत प्रेमाने भृगुवर्य परशुरामासाठी उपचार केले होते. स्वच्छ ताटे, त्यांत वाढलेल्या पदार्थांत अनेक रस पण एकच गोडी, त्या पदार्थांकडे आणि पक्वान्नांकडे पाहताच, पाहणाराच्या डोळ्यांना दृश्य, द्रष्टा आणि दर्शन यांची समरसता जाणवून डोळे तृप्त व्हावे. ते स्वानंद-भोजन केले की शब्दांना निःशब्दता येऊन, कानामधे संतोषाचा आणि सुखाचा आनंद मिळत होता. त्यांतील पक्वान्नांचा सुवास अंतर्बाह्य परेशाशी समरसता आणून सुख आणि उल्हास यांची नाकाला जाणीव होत होती. त्या उत्तमोत्तम अन्नाचा स्पर्श हाताला झाला की अकर्मात्मता येऊन, तहान-भूक यांची तृप्ती मिळत राहून स्वतःच चित्सत्ता तेथे क्रियावान होत होती. त्या भोजनाचा रसास्वाद हा जिभेला आत्मानंद, पोटाला परमानंद आणि रस चाखल्याने अंतर्बाह्य स्वानंद मिळवून देतो. अशाप्रकारचे भोजन झाल्यावर मनाची उन्मन अवस्था, समाधीत समाधान देऊन अन्न हेच स्वतः चैतन्य झाले. सर्व साधना झाली आणि तीच निष्ठासारखी चव देवून गेली असे झाले. श्रीरामाच्या पंक्तीत बसून जे भोजन झाले त्यात अपूर्णता असणारच नाही. त्यामुळे सर्वांना पूर्ण तृप्त झालेले मग संसाराला आपोआप आचवले (किंवा विरक्त झाले); सुखी होऊन स्वस्थ झाले.

भोजनोत्तर झालेले तांबूलभक्षणही लक्षणीय होते. फळाशेच्या फोडी फोडून, वासनेच्या शिरा काढून, शांतीची परिपक्वता पानात आणून सहजपणे सर्वांनी मुखात तो विडा घातला. या विड्यात अहंकाराचा कठिणपणा जाळून शुद्ध, गाळीव असा काढून जे निजसार तोच यांतला कात, याप्रमाणे श्रीरंगाचा रंग आणणारा तो पवित्र तांबूल होता. जनकाने भार्गवाला फुले, चंदन अर्पण करून, नीरांजने ओवाळून, यथाविधी पूजा करून पूर्ण सुखसंपन्न केले.

https://archive.org/details/muthulakshmiacademy
Bhuvan Vani Trust, Lucknow

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

परशुरामाने तेजस्वीपणे म्हटले, "जिथे जेवायचे तेच घर घ्यायचे असा दुष्टपणा खरोखर तू केला आहेस. काहीही वैर नसताना तू जमदग्नींना मारलेस. जमदग्नींनी क्रोध सोडला होता, त्यांच्यावर तू आपला प्रताप दाखवलास. आता वृथा बळाच्या वल्गना काय करतोस? तू क्षुद्रांतला क्षुद्र आहेस. स्त्रियांपुढे तुझा पराक्रम आणि पुरुषार्थ, माझ्या मातेला मूर्च्छित केलेस. आता इथे सापडलास. तुझा निःपात मी करतो" परशुरामाचे हे बोचणारे भाषण ऐकून तो सहस्रभुज राजा रागाने पुढे झाला. तेव्हा सिंह हत्तीवर जातो तसा त्याच्यावर द्विभुज (भार्गव) चालून गेला. जमदग्नींचा प्रखर क्रोध आता भार्गवाकडे आला असल्याने तो राजाविरुद्ध खवळून उठला, आणि राजाचा गर्व छेदायला सिद्ध झाला. धनुष्याला रागाने दोरी चढवून त्याने तीक्ष्ण बाण चढवला. सहस्रार्जुन पुढे सरसावला. दोघांचे घनघोर युद्ध सुरू झाले.

दोघे एकमेकांच्या बाणांना आपल्या बाणांनी निवारू लागले. शस्त्रांचा शस्त्रांनी संहार करत आणि अस्त्रे अस्त्रांनी निवारण करीत ते प्राविण्य दाखवू लागले. हजार बाहूंच्या धनुर्धराला दोन बाहूंच्या योद्ध्याने बाणांच्या वेढ्यात घेरले. राजाला त्यातून सुटण्याचा मार्ग आठवेना. त्याच कौशल्यात गुंतून पडलेल्या राजाचा रथ परशुरामाने छेदला. सारथी मारला. घोड्यांना रणभूमीवर पाडले. मागून जरी रथांचा पुरवठा झाला तरी तेही परशुरामाच्या बाणांनी छेदले गेले. अशाप्रकारे कोणीही साहाय्यकारी न उरल्याने राजा रणामध्ये एकाकी उरला.

राजा रथाशिवाय रणभूमीवर राहिला. तेव्हा त्याने रागाने निर्वाणीचा घनघोर संग्राम करण्यासाठी अनिवार अशा अस्त्रांची योजना केली. या अस्त्रांचे निवारण कोणी जाणत नव्हते. दंडास्त्र, चंडास्त्र, त्याचवेळी प्रचंडास्त्र अशी अस्त्रे एकदम सोडली. तसेच वितंडास्त्र, अनिवार आणि घोर असे घोरास्त्र सोडले. परशुराम हा नेटका धनुर्धर होता. त्याने मारा करणाऱ्या शस्त्रांचा संभार शस्त्रांनी संहार करून टाकला. नंतर दंडाने दंडास्त्र दंडिले, खंडास्त्र खंडाने खंडिले, चंडाने प्रचंडास्त्र छेदिले. घोरास्त्र हे त्याने अघोरास्त्राने परतविले. राजाची सर्व निर्वाणास्त्रे त्याने वाताहत केली. नंतर राजाने अत्यंत अनिवार असे चामुंडास्त्र घेतले. पूर्वी चंडमुंडांना ज्या अस्त्राने मारले होते ते राजाने घेतलेले पाहताच परशुरामाने कालिकेला आवाहन केले कारण चामुंडा ही तिची दासी होती. चामुंडेला कालीका म्हणाली, "रेणुका ही माझेच स्वरूप होती. तिच्या पतीचा घातक तू अवश्य निर्दाळ." चामुंडा कालिकेची दासी होती हे ज्यांना पटत नसेल. त्यांनी, चंडमुंडांना जेथे मारले तिथे, सप्तशतीला पहावे. कालिकेला नमन करून, तिची आज्ञा घेऊन, चामुंडा ही राजाचे निर्दाळण करावे म्हणून परतली. चामुंडा उलटी वळली. राजाने पाहिले की त्याचीच अस्त्रे त्याच्या पाठी लागत आहेत. या प्रकाराने तो गडबडला. 'चामुंडेचे निवारण करणे मलाच माहिती नाही. तेव्हा मला अवश्य मरण येणार, या धाकाने तो थरथर कापायला लागला. याच क्षणी परशुरामाने परशु हाती घेतला आणि राजाच्या हजार बाहूंची खांडोळी करून ती धरणीवर पाडली. नंतर निर्वाणीचे अवसान साधून त्याने राजाच्या मस्तकावर घाव घातला. त्या घावाने तो राजा रणभूमीवर कोसळला.

सहस्रार्जुनाकडून मरताना स्तवन

परशुरामाने एकाच घावात राजाला खाली पाडले आणि त्याच वेळी त्याचे मस्तक अंतराळात उडविले. त्या उडालेल्या मस्तकाने परशुरामाला ओवाळले आणि नंतर ते त्याच्या पायाशी चरणधूळीचे वंदन करण्यासाठी येऊन पडले. तेव्हा सद्भावनेने स्तुती करताना जणू ते म्हणाले, "मी गोब्राह्मणांचा घात करणारा आहे. अशा मला शस्त्राने धारातीर्थी मरण देऊन आपण माझ्या पापाचे क्षालन केले आहे. आपण माझ्या हजार

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

बाहूंचा भार छेदून, त्यासह माझा अहंकार, वासनासमूह यांचाही छेद केलात. त्यामुळे आपण माझा उद्धार केला. माझे कर्माकर्म, धर्माधर्म, मोहभ्रम यांचा छेद करून आपण मला परमश्रेष्ठ ब्रह्म केले. माझे नावरूप, पुण्यपाप, संकल्प-विकल्प यांचा नाश करून मला निर्विकल्प ब्रह्मच केले. अहंसोऽहंपण, मीपण, एकपण नाहीसे करून मला परिपूर्ण ब्रह्म केलेत.'' असे स्तवन करताना डोळे प्रेममय झाले आणि त्या राजाचे मस्तक परशुरामाच्या चरणांना वंदन करत असतानाच, सहस्रार्जुनाने प्राण सोडला.

रेणुका मातेने कठोर आज्ञा केली होती की 'प्रथम सहस्रकर छेदावे, नंतर त्याचे शिर छेदावे, तशाच प्रकारे परशुरामाने सहस्रार्जुनाला रणक्षेत्रावर मरण दिले. पुढे एकवीस वेळा पृथ्वी निःक्षत्रीय केली. अशा रीतीने त्याने मातेची आज्ञा पूर्ण पाळली.

परशुराम मिथिलेत - त्याचे स्वागत

परशुराम पृथ्वी निःक्षत्रीय केल्यावर अकस्मात् मिथिलेला आला. तेथील ब्रह्मवृंदाकडे त्याने 'येथे राज्यकर्ता कोण आहे?' अशी विचारणा केली. त्याला असे सांगण्यात आले की, 'हा चक्रवर्ती धर्मात्मा असून, देहात असूनही विदेहधर्माने वर्तन करणारा आहे. याचा अगाध महिमा आहे.' असे ब्राह्मणांनी सांगितले. तेवढ्यात जनक स्वतःच सामोरा आला. परम आदराने आलिंगन देऊन जनकाने सर्वांना राजभवनात नेले. जनक राजा ब्रह्माधिकारी असल्यामुळे परशुरामाने त्याला मारले नाही. उलट एकात्म प्रेमाने तो त्याच्या घरी राहिला. जनकाने त्याला भोजनासाठी ठेवून घेतले. परशुरामासह ऋषींनाही आमंत्रण देऊन भोजनासाठी येण्याविषयी विनंती केली. तेव्हा परशुरामाने धनुष्यबाण ठेवून स्वतःची स्नानसंध्या उरकली आणि मग भोजनासाठी आत आला. त्या वेळी ऋषींची मोठी पंगत जेवायला बसली.

भोजन-तांबूल यांतील स्वानंद

जनकाने अत्यंत प्रेमाने भृगुवर्य परशुरामासाठी उपचार केले होते. स्वच्छ ताटे, त्यांत वाढलेल्या पदार्थांत अनेक रस पण एकच गोडी, त्या पदार्थांकडे आणि पक्वान्नांकडे पाहताच, पाहणाराच्या डोळ्यांना दृश्य, द्रष्टा आणि दर्शन यांची समरसता जाणवून डोळे तृप्त व्हावे. ते स्वानंद-भोजन केले की शब्दांना निःशब्दता येऊन, कानामधे संतोषाचा आणि सुखाचा आनंद मिळत होता. त्यांतील पक्वान्नांचा सुवास अंतर्बाह्य परेशाशी समरसता आणून सुख आणि उल्हास यांची नाकाला जाणीव होत होती. त्या उत्तमोत्तम अन्नाचा स्पर्श हाताला झाला की अकर्मात्मता येऊन, तहान-भूक यांची तृप्ती मिळत राहून स्वतःच चित्सत्ता तेथे क्रियावान होत होती. त्या भोजनाचा रसास्वाद हा जिभेला आत्मानंद, पोटाला परमानंद आणि रस चाखल्याने अंतर्बाह्य स्वानंद मिळवून देतो. अशाप्रकारचे भोजन झाल्यावर मनाची उन्मन अवस्था, समाधीत समाधान देऊन अन्न हेच स्वतः चैतन्य झाले. सर्व साधना झाली आणि तीच निष्ठासारखी चव देवून गेली असे झाले. श्रीरामाच्या पंक्तीत बसून जे भोजन झाले त्यात अपूर्णता असणारच नाही. त्यामुळे सर्वांना पूर्ण तृप्त झालेले मग संसाराला आपोआप आचवले (किंवा विरक्त झाले); सुखी होऊन स्वस्थ झाले.

भोजनोत्तर झालेले तांबूलभक्षणही लक्षणीय होते. फळाशेच्या फोडी फोडून, वासनेच्या शिरा काढून, शांतीची परिपक्वता पानात आणून सहजपणे सर्वांनी मुखात तो विडा घातला. या विड्यात अहंकाराचा कठिणपणा जाळून शुद्ध, गाळीव असा काढून जे निजसार तोच यांतला कात, याप्रमाणे श्रीरंगाचा रंग आणणारा तो पवित्र तांबूल होता. जनकाने भार्गवाला फुले, चंदन अर्पण करून, नीरांजने ओवाळून, यथाविधी पूजा करून पूर्ण सुखसंपन्न केले.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Trust and eGangotri

भोजन आणि तांबूल, नंतर पूजन हे सर्व उरकल्यावर परशुराम आपले धनुष्यबाण घेण्यासाठी आला. तेव्हा त्याला जे दिसले ते पाहून तो आश्चर्यचकित झाला.

शिवधनुष्याचा सीतेने केलेला खेळ

परशुराम धनुष्य नेण्यासाठी आला तेव्हा सीता त्या शिवधनुष्याचा घोडा करून खेळत होती. सीतेने धनुष्याचा घोडा, धनुष्याच्या दोरीचा लगाम, आणि बाणांच्या भात्याचा गाडा केला होता. धनुष्यावर बसून घोडा केलेला राजभवनाच्या अंगणात ती नाचवत होती. आपल्या मनाप्रमाणे राजभवनात, राजमार्गावरून, धावत ती खेळत होती. परशुरामाला आपले धनुष्य ठेवलेल्या जागेवर दिसले नाही. त्यामुळे तो राजावर संतापला आणि म्हणाला, "माझ्या धनुष्याची चोरी करेल असा कोण बलवान क्षत्रिय आहे? तूच त्याला आपल्या घरात लपविला आहेस; तेव्हा तो लवकर मला दाखव. पाचशे महावीरही त्या धनुष्याला उचलू शकत नाहीत की तिळभर हालवू शकत नाहीत. तेव्हा ज्याने ही चोरी केली तो मला तातडीने दाखव." हे परशुरामाचे संतापाचे बोलणे ऐकून जनक कापू लागला. 'आता हे माझ्यावर एक संकटच आले आहे. क्षत्रियांचा निःपात करणारा हा भार्गव रागावला. आता काय करू.' असे मनाशी म्हणत, तो स्वतःच त्या धनुष्याचा शोध घेऊ लागला. त्या वेळी त्याला अंगणात रेघ उमटलेली दिसली. त्या मार्गावर त्याने शोध घेतला. तेव्हा सीता धनुष्याचा घोडा करून खेळत असलेली त्याने पाहिली. राजमार्गावरून पळत ती बालिका खेळत होती. राजाने सीतेला थांबवून म्हटले, "अगं बाळे, तू फार मोठा अन्याय केला आहेस. ते धनुष्य आधी जमिनीवर ठेव पाहू." सीतेने धनुष्य भूमीवर ठेवले. राजाला ते हातांनी उचलेना. मग राजाने मोठ्या प्रेमाने सीतेला पोटाशी धरून म्हटले, "चल बैस या घोड्यावर." सीताही आनंदाने बसली आणि मग धनुष्याचा घोडा नाचवत नाचवत परशुरामाच्या पुढे आली. त्या वेळी ते पाहून स्वतः परशुराम चकित झाला. परशुराम म्हणाला, "ही आदिशक्तीच असली पाहिजे. कारण इतरांना हे धनुष्य उचलवणारच नाही. हिला आदिपुरुष हाच पती लाभेल. इतर कोणालाही हिची प्राप्ती होणार नाही." नंतर परशुरामाने जनकाला विचारले, "तू काय विचार केला आहेस? हिला कोण वर म्हणून निश्चित केला आहेस?" त्यावर राजा जनक म्हणाला, "मी काहीच निश्चित विचार केलेला नाही. हिचे स्वयंवर करावे असे माझ्या मनात आहे."

शिवधनुष्याचा वृत्ताना - स्वयंवरासाठी पण

सीतेचे स्वयंवर करायचे मनात आहे असे राजा जनकाने सांगताच परशुराम म्हणाला, "राजा, जर सीतेचे स्वयंवर करणार असलास तर मी सांगेन त्या प्रकारे कर. कारण मी सांगेन तो प्रकार अत्यंत कठीण आहे. ही आदिशक्तीचा अवतार असल्यामुळे हिचा नियोजित वर आदिपुरुष असणार. यासाठी मी जो पण सांगतो आहे तो लक्षात घे. स्वयंवराचा पण हा असेल की जो या धनुष्याला दोरी चढवील त्यालाच आपण ही देणार." भार्गवाची ही आज्ञा होती. त्याने सीतेच्या स्वयंवरासाठी ते धनुष्य जनकापाशी ठेवले. 'ज्या धनुष्याच्या एकाच बाणाने त्रिपुरासुराचा वध केला होता. श्री शिवाने या धनुष्यानेच दक्षयज्ञाचा विध्वंस केला होता आणि सुर-नर-ऋषी यांना पळवून लावून यज्ञाचा भंग केला होता. हे शिवधनुष्य हाती घेऊन परशुरामाने एकवीस वेळा पृथ्वी निःक्षत्रीय केली होती. असे ते महान् धनुष्य स्वयंवरासाठी ठेवण्यात आले.' अशी त्या धनुष्याची मूळवार्ता रसाळपणे शतानंदाने सांगितली तेव्हा सर्वांना आश्चर्य वाटले.

आता जनकाच्या स्वतःच्या घरी स्वयंवरसभेची तयारी सुरू झाली. त्या महासभेमध्ये

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

श्रीराम धनुर्भंग करण्याचा थोर प्रताप करणार होता. त्या स्वयंवराचे रसाळ निरूपण पुढे येणार आहे.

अध्याय अठरावा

सीतेचे स्वयंवर जनकाकडून घोषित होताच त्यांच्या स्वयंवरसभेची स्थिती स्वर्गातून देव आपापल्या विमानांतून पाहू लागले.

स्वयंवरासाठी आलेले राजे आणि निमंत्रित

त्या स्वयंवरसभेत शहाण्णव कुळीचे भूपती येऊन सन्मानाने जमले. तपस्वी, ऋषीश्वर, यक्ष, गंधर्व, किन्नर, निशाचर, राक्षस, आणि दैत्य महावीर हे सर्वजण स्वयंवराला आले. धैर्य, वीर्य, महाशौर्य, रूपगुणी, गांभीर्ययुक्त, धर्मी, अधर्मी, उदार अशा गुणवंत राजश्रेष्ठांचे आगमन झाले. गोब्राह्मणांचे साहाय्यकर्ते, ज्यांच्या यशाची किर्ती सर्वत्र झाली आहे, ज्यांचे शौर्य स्वर्गात गाजले जात आहे, तेही आले होते. सर्वस्वाचे दान देणारे, ज्यांचे सामर्थ्य वैकुंठात वर्णन केले जाते आहे, ज्यांची थोरवी त्रिभुवनांत प्रसिद्ध आहे, असेही राजे तेथे जमले होते. ज्यांच्या शस्त्रांचा आघात सुखही सहन करू शकत नाहीत आणि जे दान देण्यात तत्पर म्हणून गाजले होते ते राजेश्वर आले होते. जे दान, सैन्य, सामर्थ्य यांत प्रबळ होते असे शहाण्णव कुळीचे भूपाल सीतेचा लाभ व्हावा म्हणून स्वयंवराला उपस्थित झाले होते. नंतर जनकाने स्वयंवराचा पण सांगताना म्हटले, "आता स्वयंवरासाठी पण असलेले धनुष्य या सभेत आणले जाईल. ज्याला सामर्थ्य असेल त्याने त्या धनुष्याला दोरी चढवावी." असे सांगून प्रधानाला धनुष्य सभेत आणण्याची आज्ञा केली. तेव्हा महाऋषींनी "आधी नवरीस आणावे, मग धनुष्य आणावे" असे सांगितले. याला सर्वांनी अनुमती दिली. सीता ही कर्मबंधनात राहणारी नव्हती. ती गर्भातून जन्मलेली नव्हती. ब्रह्मदेवाला ती निर्माण करता आलेली नाही. श्रीराम प्रभावाला समान प्रभाव तिच्या ठायी होता. श्रीराम हा चैतन्याची कला, तर ही जनकबाला चिच्छक्ती होती. तिच्या स्वरूपाचा सोहळा भाग्यवानांनी आपल्या डोळ्यांनी पाहिला.

सीतेचे आगमन आणि स्वरूपवर्णन

सीता ही नवरी एका अलंकारांनी सजवलेल्या हत्तीवर बसली होती. तिच्या सौंदर्याची थोरवी अनुपम असून, चराचरांत तिला उपमा देण्यासाठी काहीच नव्हते. सीतेला शून्यत्वाने ठाकलेले अंतराळ शरण आले. रामाला वंदन करण्यासाठी मस्तकावर केस आले. लगेच शून्यत्व सांडून, मस्तकावरचे केस कुरळे झाले. तेच निळे आकाश असून त्यात चंद्रमंडळाप्रमाणे तिचा मुखचंद्र होता. जसा पौर्णिमेचा चंद्र पूर्ण असतो, तसा नित्य संपूर्ण असा तो मुखचंद्र होता. पर्वकाळात चंद्राला राहूचे ग्रहण लागते. त्याप्रमाणे इथे श्रीरामाचे सतत ग्रहण लागलेले असते. चंद्रबिंबावर डाग असतो, हा मुखचंद्र नित्य निष्कलंक आहे. सीतेचे श्रीमुख पाहून भावार्थी हे दुःखरहित होतात. ज्याप्रमाणे चंद्राच्या पुढेमागे नक्षत्रे असतात, त्याप्रमाणे तिच्या मुखाभोवती तानवडे-मोतीलग हे अंलकार होते. रामरंगाचा सुरंग असा कुंकवाचा मळवट अंगी होता.

श्रीरामाला पाहिल्यावर ती भोवरी घालायला विसरली. तिच्या मातेच्या हाती भवऱ्या होत्या. राजे तिच्यामुळे भ्रमचक्रात सापडले. सीतेविषयीच्या भ्रमात रावण चक्रावला. त्याला पुढे मोठे संकट भोगावे लागेल. भवरीभ्रमाचा नाश करण्यास श्रीरामच अग्रगण्य होता. त्याच्या नावाने भ्रमाचा नाश सावकाश पण निश्चित होतो. रामनामाने भ्रमाचे निरसन होते यामुळे भंवऱ्याचा संभ्रम, जानकीला नव्हता, परम भंवरीचे नाव ती घेत नव्हती. सीतेचे कपाळभाग्य रामचरणांमुळे नित्य सफळ असल्यामुळे, तिच्या भाग्याची धन्यता सर्व ऋषी वाखाणत असतात, जसा चंद्रबिंबावर

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

कालिम्याचा कलंक तसा हिच्या मुखचंद्रावर कस्तुरीचा मळवट शोभत असून त्यावर कुंकवाचे बोट लावले होते. त्या श्रीरामरंगाचा अत्यंत देखणा असा कुंकुमरंग अभंगपणे तिच्या सौभाग्याची शोभा ललाटावर दाखवत होता. चंद्र हा नेहमी क्षयरोगी; त्याने निरोगी होण्यासाठी सीतेच्या शरीराशी संबंध जडावा म्हणून तो अर्धचंद्र झाला. कपाळावर अर्धचंद्राकृती कुंकू रेखलेले होते. श्रीरामाचे अधरामृत प्राशन करावे म्हणून तो अर्धचंद्र होऊन तिथे राहिला आणि त्याने प्रकृति-पुरुषांचा एकांत पाहिला. त्या अर्धचंद्रावर असलेल्या भांगात सिंदूराची आरक्तता होती. रघुपतीला भावाने भाळण्यासाठी त्याने प्रेमभावाने माया पूजिली होती. माया ही विकल्पाने अज्ञान असते, तर भाविकांना ती शुद्ध ज्ञानपूर्ण ठरते. जानकीची बुद्धी श्रीरामाच्या ठिकाणी असल्याने ती आत्मपदावर आसक्त होईल. भांगात सिंदूर नव्हता तर ती प्रवाहित सरस्वती होती. ती रघुपतीला भावभक्तीने, विरक्त-प्रेमाने भेटायला आली होती.

सीतेच्या दोन्ही बाजूच्या हसळ्या श्रीरामाचे ध्यान धरून बसल्या होत्या, म्हणून त्या मुक्ताफळांनी शोभल्या आणि सीतेच्या बाह्या झाल्या. ज्याप्रमाणे आकाशात नक्षत्रे त्याप्रमाणे तिच्या मस्तकावर मोत्यांची जाळी असून ती श्रीरामाच्या अनुसंधानाने ओवली असून मुक्तत्वाने मस्तकावर आली. त्यावर भक्तिरूप फरा झळकत असून, तो नवविधरत्नांनी शोभत होता. स्वर्गस्थांना वाकुल्या दाखवून तो रघुनाथ अक्षय भजा असे सुचवत होता. श्रीराम दृष्टीला पडताच भुवयांची गाठ सुटून, त्या वक्रता सोडून, स्वरूपता पाहून उठल्या होत्या. जगाचे डोळे दृश्ये पाहून शिणले, तेव्हा सीतेच्या डोळ्यांना शरण जाऊन रघुनाथाला पहायला आले. श्रीरामाचे रूप पूर्णपणे पाहून डोळे सुखसंपन्न होतात. म्हणून ते जगाचे देखणेपण सीतेला शरण आले. जगाचे देखणेपण, तीच डोळ्यांची डोळसता श्रीरामाची स्वरूपता पाहायला अती सादर झाली. याप्रमाणे सीतेचे डोळे हे देखणे सुलोचन असून त्यावर रामरूपी ठेवा साधावा म्हणून काजळ घातले होते. साधूंचे जसे सरळ आस्तिक्य तसे सरळ नाक शोभत होते. त्या नाकाने नास्तिक्य निपटून काढून प्राणाचे श्रीरामाशी सख्य घडविले. एरवी स्वैर संचरणारा प्राण आता जानकीच्या नाकाची स्थापना करून श्रीरामाचा सहवास मिळवून, तो समाधान पावला.

श्रीरामाचे अधरामृत सेवन करण्यासाठी सीतेचे अधर - ओठ - अत्यंत आरक्त होऊन त्या इच्छेने इतके लाल झाले की त्यांनी प्रवाळाला लाजविले. प्रवाळाची उपमा कशी द्यावी कारण प्रवाळ कठीण असतात तर तिचे ओठ अती मृदू. रघुनंदन सीतेचे अधरपान कसे ते पूर्ण जाणत होता. सगळ्यांचे दात रसाविषयी अतृप्त असतात परंतु सीतेचे दात तृप्ती देतात, म्हणून तर रघुनाथ तिच्या मुखावर भाळला. ओठांच्या खाली असलेली हनुवटी रामरंगाने गोंदलेली होती. तो श्यामल तेजाचा सुरेख रंग रघुकुलटिळकाला भुरळ पाडत होता. मोती सोन्याच्या पाशात गुंतून जानकीच्या नाकात आले. त्या तिच्या नाकाने मुक्तिसुखाने श्रीराम पाहिला. जानकीचा मुखचंद्र पाहून चंद्र लाजला. लाजेमुळे अर्धा होऊन तिच्याच कपाळावर स्थिर झाला. चंद्र चकोरांचा, प्रतिपाळ करतो; हा मुखचंद्र जीवाशिवांचा सांभाळ करतो. शुद्ध श्यामता श्रीरामाची, सुनील नभाप्रमाणे होती. त्या श्रीरामरूपी आकाशात सीतेचा मुखचंद्र शोभायमान झाला होता.

श्रीरामनाम स्मरणाची छान गळसरी, ऐक्यभावाने एकरूप झाल्याने न तुटता सीतेने गळ्यात घातली होती. इतरांना ती दिसत नव्हती. ज्या गळ्यात राम नामाचा ठसा असेल तिथे चिंतेला प्रवेश कुठला. चिंतेचे लेणे दुर्दशा आणणारे, परंतु सीतेच्या मनाला शृंगार (लेण्यांची शोभा) श्रीरामाचा होता. जीवशिव पद सोडून श्रीरामाची पाऊले धरली तेच हृदयात (छातीवर) पदक म्हणून

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

सीतेने स्वीकारले. त्या हृदय-पदकाचे महिमान असे की, ते चिद्रत्नांनी जडवून, मुक्तमोत्यांनी दोऱ्याशिवाय ओवून ती ते धारण करत होती. त्रिगुण निर्गुणत्वाला आणून त्याचे बाजूबंद सीतेने धारण केले होते. त्यांना रामकीर्तीची जडणूक केली असून ते सीतेच्या दोन्ही बाहूंना भूषवीत होते. ॐकारात बुडलेल्या श्रुती, कर्मकांडाच्या उपपत्ती, अशी वेदार्थकंकणे सीतेच्या हातात रुणझुण ध्वनी करत स्वानंदात होती. दशांगुलांत दहा अंगठ्या, चढत्या वाढत्या जडवलेल्या टीका, दशावताराच्या माणकांनी जीवाच्या जीवत्वाने जडवल्या होत्या. पंचभूते पंचांगुळिका सीतेच्या मुठीत एकरूप झाल्या होत्या. श्रीराम सीतेच्या धनरेषा असून त्रिभुवनात वंद्य होत्या. दोऱ्यात ओवलेले मोती मुक्तीचा जिव्हाळा प्राप्त करू शकत नाहीत. त्या सीतेच्या गळ्यात येऊन पडून स्वलीलेने श्रीरामाची सेवा करण्याची इच्छा करत होत्या, सु-मने वि-मने फलद्रूप झाली. राम जीवीचा जिव्हाळा, त्याची सेवा करण्यासाठी सूत्राने बांधलेल्या सुमनांच्या फुलांच्या सीतेच्या गळ्यात माळा झाल्या.

सीता धरित्रीच्या पोटात होती. त्यामुळे धरित्रीच्या प्रेमामुळे तिने अंगात सुनील काचोळी घातली होती. भक्ती सकामत्वामुळे अत्यंत पीडली होती. निष्कामत्वे श्रीरामाची सेवा करण्यासाठी तातडीने सीतेच्या अंगातली नऊ तुकड्यांची काचोळी झाली. नवविधा भक्ती नेहमी नवखंड नवविधा असून, हे नवखंड अखंड असतात. सीतेने त्या नवखंडांशी बंड करून अखंड श्रीरामभजनाने भक्ती केली. पृथ्वी नवखंडात नांदत होती. पुढे तीही जड अशा जडत्वाला कंटाळली, भक्ती नवखंडातून अखंड होऊन सीतेची काचोळी झाली. या स्वार्थानेच धरित्रीने सीतेला उदरात ठेवले होते. आता ती बाहेर पडल्यावर धरित्रीने आपला उद्धार श्रीरामाच्या संगतीने करून घेतला. भक्तिभावाचे बिरडे काचोळीला घातले होते कारण खरोखर श्रीराम संकट फेडील आणि इतरांना नवखंडांत ते उगवणार नाही. अंगातल्या अंगात, भिन्न असून अभिन्न, असे जीव-शीव हृदयस्थानी वाढले. त्यामुळेच स्तनभाराने ती कामिनी दोन स्तनांनी शोभत होती. विद्या-अविद्या यांची दोन पाखे, दोन्ही स्तन आच्छादत होती. त्यांना देह-विदेह आणि गुण-अगुण यांच्या एकत्र कासण्या (कसून बांधायचे बंद) होत्या. त्रिगुणांचे नागर सुंदर गोंडे पाठीवर रुळत होते. श्रीराम तत्पर व्हावा म्हणून जानकीला मनोहारी शोभा देत होते. त्रिगुणांची गाठ अति दारूण असल्याने ती श्रीराम स्वतःच सोडवील. इतरांचे शहाणपण तिथे चालणार नाही आणि ते गर्वाभिमानाने दोराच गिळतील. भक्तिवैराग्य नित्य प्रकाशणारी, रामाच्या प्रेमावर अनुरक्त अशी सीता शेंदरी, आरक्त, साडी आनंदाने नेसली होती. सत्त्वाचा सात्त्विक, क्षीरसागरीचा क्षीरोदक, अशी अत्यंत चोख वैरणा शोभत होती. जिच्या तेजाने साक्षात् प्रकाशही लोपला होता. परिधान केलेले समजून हेच तिचे कटिसूत्र त्यामुळेच ती अपार महत्त्वाने शोभत होती. घटिकांचे जाळे असलेल्या माळा तिच्या कटिकासूत्रात सकळ सिद्धींच्या स्वरूपात आणि लहान घंटिका प्रबळ ऋद्धींच्या स्वरूपात कटिमेखलेला शोभा आणीत होत्या. तिच्या पृष्ठभागावर अनर्घ्य शाम मणी गुफलेले आहेत अशी वेणी रुळत होती. चिद्रत्नांची मूद मिरवत होती आणि त्यामुळे सौभाग्याने ती नटली होती.

सीतेच्या वैराग्यरूपी पदराला मुक्तमोत्यांची झालर झळकत होती. ते पाहून अहोरात्र त्याकडेच लक्ष देऊन संन्यासीही भाळले. त्यासाठी सीतास्वयंवराला ते मोठ्या संख्येने आले होते. तिच्या पदराला भुलून ते त्यावर लक्ष ठेवून होते. ज्याप्रमाणे सामवेदींचा गंभीर ध्वनी असतो त्याप्रमाणे तिच्या नूपुरांचा नाद होत होता. त्या नादाने राजकुमार भुलले आणि भूपालही विवाहाला उत्सुक झाले. देव म्हणत होते, 'ही सीता देवकांता म्हणून आमची व्हावी.' दैत्यदानवांना ती आपल्या

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

हानी यावी असेच मनातून वाटत होते. नंतर यक्ष, गंधर्व, किन्नर, नर, सिद्ध, चारण या सर्वांनी 'सीता स्वयंवराचा पण कोणता' याची विचारणा सुरू केली.

स्वयंवरमंडपात धनुष्य, धनुष्याचा पण

विश्वामित्रांनी राजा जनकाला म्हटले, "आता धनुष्य आणवावे." राजाने लगेच प्रधानाला पाठविले. तो परिवारासह निघाला. धनुष्याची अष्टचक्री पेटी पाचशे महावीर ओढत असूनही हालत नव्हती. मागून हत्तींचे समूह लोटत पेटीला रेटत होते. शिवाय भेटणारा प्रत्येकजण बोलावून त्याला लोटायला सांगितले जात होते. अशाप्रकारे अत्यंत कष्टाने धनुष्य सभेमध्ये आणले गेले.

पेटीतून धनुष्य बाहेर काढताच दैत्य-दानव कंपित झाले. राजांनी प्रताप सोडला. सामर्थ्याचा गर्व सर्वांनी सोडून दिला. जनकाने सर्वांना उद्देशून सांगितले, "श्रीशिवाने या त्र्यंबकाने बाण सोडून त्रिपुरवध केला; दक्षयज्ञाचा विध्वंस केला; याच धनुष्यामुळे परशुरामाने एकवीस वेळा पृथ्वी निःक्षत्रीय केली. तेच हे धनुष्य स्वयंवराचा पण म्हणून येथे आणले आहे. या धनुष्याला उचलून जो पराक्रमी पुरुषार्थी दोरी धनुष्यावर चढवील त्याच्याशी सीतेचे पाणिग्रहण होईल हे खरोखर समजून घ्या." जनकाचे सांगणे ऐकून सर्वजण तटस्थ झाले. त्यातले जे पुरुषसिंह सामर्थ्याने अती प्रबळ असून, ज्यांनी रणात रणकल्लोळ केला होता. असे राजे उठून समोर आले.

शिखिध्वज, कुशध्वज, गजध्वज तसेच राम हा गरुडध्वज राजांना लाजविण्यासाठी आला. सुरथ, भरत, विरथ, विदूरथ, विचित्ररथ, चैत्ररथ यांच्याबरोबरच गुप्तपणे रघुनाथही सीताकांत होण्यासाठी आला होता. वीरसेन, वीरघ्न, भारसेन, भद्रघ्न यांच्याप्रमाणेच सीतेला वरण्यासाठी रघुनंदन आला होता. जयपाळ, अजयपाळ, वीरपाळ, विजयपाळ तसाच शरणागतांचा प्रतिपाळ करणारा राम धनुर्बळ भंगण्यासाठी आला होता. चित्रकेतु, श्वेतकेतू, धूम्रकेतू यांच्याप्रमाणे भव्यकेतू राम रावणाचा गर्वघात करण्यासाठी आला होता. केशी, कारुष, कलिंग, मद्र, माथुर, अंग, वंग, तसाच राम हा श्रीरंग धनुर्भंग करण्यासाठी आला होता. हे राजे जेव्हा बलाने पुढे होऊन धनुष्याला दोरी चढवू पाहात होते, तेवढ्यात आमंत्रण नसतानाही अत्यंत गर्विष्ठ रावण त्या ठिकाणी उपस्थित झाला.

रावणाचा अहंकार-सीतेला चिंता.

रावणाचे आगमन होताच सर्व राजे भीतीने कापू लागले. देव, दानव, दैत्य यांना त्याच्या येण्याने लग्नात अरिष्ट आले असेच वाटले. लोक घावरले, जनक साशंक झाला, राम हा रावणाचा अन्त करणारा शत्रू असल्याने सावध होऊन बसला. रावण सभेत आल्यावर गर्वाने म्हणाला, "मी सीतेचे हरण केले तर माझ्या कृतीचे निवारण करू शकेल असा इथे कोण आहे? परंतु तरीही मी स्वयंवराचा पण काय आहे हे विचारतोय." रावणाने जनकाला पण विचारला. जनकाने "जो धनुष्याला दोरी चढवील त्याला सीता वरील." असे सांगितले. "धनुष्य वाहणे ही क्षुल्लक गोष्ट आहे. महारण करून तातडीने जे करता येऊ शकेल ते सोडून कसलीही दुर्दशा अंगावर न येता जानकीशी लग्न करावे" एवढे बोलून रावण लगबगीने उठून, सभांगणात उडी घेऊन, धनुष्य उचलायला गेला. तेव्हा त्याचे डोके तळात राहिले, धनुष्याचा तळचा भाग हातात आला. परंतु गर्वाने फुगलेल्या रावणाला ते समजलेच नाही. सभेत सर्वत्र दृष्टी फिरवून तो म्हणाला, "मी धनुष्याला दोरी चढविली आहे. आता सीतेला आणा. रावणाने पण जिंकला आहे" असे गर्जना करून तो सभेला सांगू लागला.

सीता ते सर्व पाहून आणि ऐकून मनातून अतिशय गडबडली. ती म्हणाली, "हे उमाकांता, तुझे धनुष्य याला उचलताच येणार नाही मात

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

धरित्री, रावणाला या वेळी पायतळी नेट, आधार देऊ नकोस. त्याला रसातळाला नेण्यासाठी धनुष्याच्या ठिकाणी भार घाल. आपला सर्व धरेवरचा भार धनुष्याच्या आत घालायला रावणाला मोह पडेल असे करून कार्य साधावे. रावणाला पूर्णपणे छळण्यासाठी ती कंकाळी तातडीने येऊ दे. आमची कुलदेवता भद्रकाली धनुष्य समूळ धरून ठेवू दे. इंद्रियांच्या अधिष्ठात्री देवता मला साहाय्यभूत होवोत. लंकानाथाला धनुष्य उचलता येऊ नये यासाठी त्याला अशक्तता यावी. रावणाच्या शरीरातले प्राण मला साहाय्य करोत. त्यांनी रावणाला धनुष्यावर दोरी चढवता न येईल एवढा क्षीण करावा. आपले धनुष्य विसरून तो त्रिनयन शंकर कुठे गेला बरे. त्याने रावणाचे पूर्ण वदन काळे करावे.'' सीता ही आदिमाता आत्मशक्ती असल्याने तिचा स्तुतिवाद ऐकताच इंद्रियदेवता साह्यकारी होऊन त्यांनी रावणाला क्षीणता आणली. भद्रकाली साडेतीन कोटी भुतांचा समुदाय घेऊन आली. महादेवाने आपली जटा धनुष्याजवळ पाठवून दिली. आणि नंतर तो स्वतःही आला. ''माझ्या स्वामीची कांता रावणाच्या हाती कशी जाईल?'' असे म्हणून त्याने क्रूर काळाग्नीच्या रूपाने धनुष्यामध्ये प्रवेश केला. रावणाच्या दुर्दैवाने धनुष्य उफराटे झाले. रावणाच्या डोक्यावर तळपट बसले आणि त्याने तळ मोठ्या गर्वाने हातात धरला.

रावणाची दुर्दशा आणि जळफळाट

जिथे गर्व आणि अभिमान असतो तेथे निश्चित अपमान संभवतो. रावण गर्वाने धनुष्याला दोरी लावायला गेला. जे पूर्वी पालथे होते ते उलथे करायाचा प्रयत्न करताना त्याच्या वीस हातांनाही ते फिरवता आले नाही. उलट तेच रावणाभोवती फिरले. त्याला ते महाजड धरता-धरवले नाही, लोटता लोटवणारे त्याचे वीस हात निष्फळ झाले. धनुष्य उरावर येऊन आदळले आणि तो डोक्यावर पालथा पडला. रावण भूमीवर आदळताच, पाताळात प्रतिध्वनी उमटला. त्याच्या दहा तोंडात धूळ भरली, आणि तो तळमळत पडला. सभामंडप हा पाटा तर धनुष्य हा वरवंटा होऊन दांडगा रावण त्याखाली सभेच्या चव्हाट्यावर लाटला गेला. रावण जमिनीवर पडल्यावर जी धूळ सभास्थानी उडाली ती जमलेल्या राजांच्या तोंडात माती घालून बसली. जानकीच्या चित्तात मात्र आल्हाद निर्माण झाला.

रावणाच्या दहाही गळ्यांना घरघर लागली. त्याचे वीसही डोळे विस्फारले. तोंडातून लाळ गळू लागली. सर्व गात्रे विकल झाली. त्या वेळी प्रधान कैवाराने मदत करायला धावला. त्याने धनुष्य कडेने काढायचा प्रयत्न केला तेव्हा रावणाची बाजूची हाडे रगडली गेली. तो चरफडून ओरडू लागला. ''तुम्ही सारे माझे साहाय्य करणारे नव्हेत. प्रधान नव्हे माझा घात करणारे आहात.'' असा क्षीणशक्तीने बोलत त्याने राग आणि संताप यामुळे प्रधानांना दूषण दिले. नंतर रावण जनकाला म्हणाला, 'इथे जर या धनुष्यामुळे माझा प्राण गेला तर इंद्रजित आणि कुंभकर्ण तुझ्या कुळाचे पूर्ण निर्दाळण करतील. मी रावण अत्यंत कृतान्त असून धनुष्याने मला गर्वहत केले आहे. तेव्हा जनका आता तूच तुला उचित वाटेल तसा विचार निश्चित कर.''

राजा जनकाला भूतदया फार असल्याने, वैऱ्याला जरी घावाने जखमी केले तरी तो परोपकारी त्याला साहाय्य करत असे. संसारातही तो पारमार्थिक होता. रावणाची अवस्था पाहून तो महावीर साहाय्यकांसह त्वरेने धावला आणि त्याने धनुष्य वरच्यावर काढून रावणाला सावध करण्याचे प्रयत्न आरंभिले. रावणाच्या तोंडावर पाणी शिंपडले, त्याला उठून बसविले, नंतर शुद्ध पाणी आणून त्याला चूळ भरण्यासाठी दिले. रावणाने मग शुद्धाचमन करून पाणी प्राशन केले. त्याला सावधानता आली आणि आपण आसनस्थ

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

झाला, 'माझा अपमान झाला. आता कोण धनुष्य पेलतो ते कौशल्य पाहू,' असा स्वतःशीच रागाने विचार करत तो तिथे थांबला. 'आता धनुष्याला दोरी न लावता जर जनकाने सीता कोणाला दिली तर मी त्याचा घातच करीन,' अशाप्रकारे क्रोधपूर्ण क्षुद्र विचार त्याच्या मनात चालू होते.

धनुष्याला दोरी लावताना रावणासारख्यांची झालेली दुर्दशा पाहून बहुतेक राजांचे धैर्य गळाले. या धनुष्याचा झपाटा फार भारी आहे या विचाराने त्यांनी सीतेची आशा सोडली. धनुष्यावर कधीच दोरी चढणार नाही; प्रयत्न करताना प्राण जाईल; मग जानकी भोगणे कुठले आले. त्यावर पुन्हा सभेत अपमानित व्हावे लागणार. अशारीतीने नरवीर राजे धनुष्याच्या संबंधात विरक्त झाले. आता श्रीरघुनाथ उठून चापाचा शेवट पूर्ण करील.

'एका जनार्दना शरण' (संत एकनाथांचे श्रीगुरू जनार्दनस्वामी होते.) रावण धनुष्याकडून अपमानित झाला तरी श्रीराम धनुष्याला दोरी तर लावीलच; पण पुढे त्या धनुष्याचा प्राणही घेईल. श्रीरामकथा अती रसाळ असल्याने कानांच्या तोंडालाही लाळ सुटते. सुखाची जीभ लवलव करते आणि जीवाकडून अर्थासाठी मुख पसरले जाते. रामकथाक्षर प्राप्त म्हणून डोळ्यांनी भुवया वाकड्या असल्यामुळे त्यांची साथ सोडली. त्या रामकथाक्षराला आलिंगन देण्यासाठी अष्टांगांचे बाहू स्फुरण पावले. रसनेने हा कथारस चाखल्याने इतर रसांचा विरस व्हावा अशी ही रामकथा सुरस आहे. तेव्हा श्रोत्यांनी मला थोडी सवड द्यावी. श्रीरामकथेचा प्रताप वर्णन करायला मी पामर काय पुरणार. परंतु श्रीजनार्दनांच्या कृपेचा दीप मला ही कथा व्यवस्थित स्वतः दाखवत आहे.

अध्याय एकोणिसावा

स्वयंवरमंडपात एकप्रकारे स्तब्धता निर्माण झाली होती. सीतेच्या सखीजनांनी तिला म्हटले, "रावणाचे संकट अनायासे दूर झाले. तू पूर्ण भाग्याची भाग्यवंत आहेस. आता तुला आवडेल तो राजा पाहून ठरव. नंतर त्या सख्यांनी तिला एकेका राजाविषयी माहिती देताना, त्या राजाचे दळ, बळ, संपत्ती, धैर्य, वीर्य, यश, कीर्ती, यांविषयी सांगितले. सीतेच्या मनाने त्यांतल्या एकालाही मान्यता दिली नाही. सीतेने मनात श्यामसुंदर असा एकच पती म्हणून रघुपतीला स्थान दिले होते. इतरांना तिची मान्यता नव्हती. सभेत रावण बसला होता. धनुष्याला दोरी लावणे त्याला जमले नव्हते. मग राम तरी ते करू शकेल का? जनकाने पण कठीणच लावला होता.

'जो धनुष्याला दोरी लावेल त्याचे मी पाणिग्रहण करावे. जनकाने अत्यंत दारुण आणि निष्ठुर पण केला आहे. धनुष्य कासवाच्या पाठीसारखे कठीण आहे. राम तर अत्यंत सुकुमार आहे. त्याच्याशी मी स्वयंवर कसे करणार' अशी सीतेची चिंता होती. रावणाची दुर्दशा पाहिल्यामुळे नृपनरवीरांनी पोटी भीती घेतली आहे. त्यामुळे धनुष्याकडे सारी सभा नुसतीच टकमक पाहते आहे परंतु धनुष्य पेलण्यासाठी कोणीच पुढे येत नाही. ही सभेची तटस्थता पाहून, सभास्थानी आलेल्यांना उद्देशून जनक म्हणाला, "कोणीही राजा हे शिवधनुष्य पेलायला समर्थ नाही यावरून क्षितिमंडळ पूर्णपणे निर्वीर झाले असावे."

राजा जनकाचे बोलणे ऐकताच रघुनंदन उभा राहिला. त्याने आपल्या गुरूंकडे धनुर्भंग करण्यासाठी आज्ञा मागितली. 'निर्वीर भूतळ' हे वाक्य त्याला सहन झाले नाही म्हणून तो रघुनाथ गुरूंकडे आज्ञा मागत होता. "श्रीगुरूंची आज्ञा झाली तर मी तत्काळ धनुष्य सज्ज करीन" असे रामाने म्हणताच विश्वामित्रांना आनंद झाला आणि ते म्हणाले, "रामचंद्रा, लगेच धनुष्यावर दोरी चढवून देव, वीर, राजे, धनुर्धर यांना कमीपणा आण." अशी गुरूंची स्पष्ट आज्ञा होताच रामचंद्र उडी मारून पुढे झाला. लक्ष्मणानेही कास आवळली. त्यावर श्रीराम म्हणाला, "लक्ष्मणा, धनुष्य एक

https://archive.org/details/@sumit_lakshmiacademy
Bhavarth Ramayan Trust, Lucknow

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

आणि आपण दोघे, हे लक्षात घेऊन राजे हसतील, सीताही स्वतः हसेल. हे वीरलक्षण ठरणार नाही. तेव्हा सौमित्रा; तू सावधान राहा. ज्या धनुष्याने रावणाला गांजले, त्या धनुष्याला निमिषार्धात मी दोरी चढवीन. तेही या राजांच्या आणि रावणाच्या समक्ष करीन." हे श्रीरामाचे बोलणे ऐकून रावणासह अन्य सारे चकित झाले. 'हा दिसायला बालक आहे, पण याचे धैर्य अलौकिक आहे.' असे ते मनाशी म्हणाले. शिवधनुष्य दृष्टीला पडताच सर्वांगावर काटा उभा राहतो. ते धनुष्य सज्ज करायला, ज्याच्या पोटी धैर्याचा निर्धार आहे, तो जगजेठी सिद्ध झाला.

श्रीरामाविषयीच्या प्रतिक्रिया

श्रीराम धनुर्भंगाचा निर्धार करून पुढे होताच रावणादिकांना आश्चर्य वाटले. काही सभाजन म्हणाले, "ऋषीश्वर (विश्वामित्र) वेडेच दिसतात. आपल्या प्रतिष्ठेच्या लोभाने ते लोकांची लाडकी बाळे धनुष्यापुढे घालत आहेत." दुसऱ्या कोणाच्या मनात विचार आला, की, "या श्यामसुंदर बालकाची मनोहर शोभा पाहून वाटते, धनुष्यावर दोरी चढवून दाखविण्याचा प्रकार थांबवून, सीतासुंदरी यालाच द्यावी." समस्त नरनारी हेच म्हणत होत्या की, सीता अवश्यं यालाच द्यावी. धनुष्य सज्ज करण्याची भाषाच कोणी करू नये. श्रीराम आणि सीता यांचा उत्तम जोडा देवांनीच मेळ घालून दिलेला आहे. हा जनकच खरोखर वेडा म्हणावा की त्याने हा धनुष्याच्या पणाचा गुंता त्यात गोवला आहे.'

सीता दृढ निश्चयाने रामाशी मनाने रममाण झालीच होती. जनकाचे मनही रामाच्या ठिकाणी गुंतले. राम जनकाला आवडला. बाप आणि लेक या दोघांची मने श्रीरामाशी एक झाली. त्याच्या स्वरूपाचा मूलार्थ दोघेही एकत्वाने पाहात होते. त्या श्रीरामाची चिन्मात्रैकस्थित चैतन्यमूर्ती असून, त्याच्या स्वरूपात अव्यक्त ते व्यक्त झाले आहे. भक्तभावार्थ तो साकार झाला आहे. ज्याप्रमाणे कपिलेचे (काळ्या रंगाच्या गाईचे) शुद्ध शुभ्र दूध आळवून त्याचे दही करतात; नंतर तेच घुसळून त्याचे सार जे नवनीत ते काढतात; हे नवनीत ठेवून विकार पावल्यावर अग्नीने त्याला तापवितात आणि मग तूप मिळवतात; हेच तूप थिजले की अविकारतेने स्वतः साकारल्याचा भास होतो; कारण कणिकांच्या रूपात त्याची अनेकता दिसते; परंतु तूप हे तूपच असते. त्याप्रमाणे वैराग्य-विवेकचतुर लोक नित्यानित्याचा आत्मविचार करून त्याचे शुद्ध सार काढतात आणि चिदचिन्मात्रस्वरूप जाणतात. तेच स्वरूप स्वभावतः साकार दशेला आले म्हणजे सगुण मूर्ती भासते. तसा हा चिद्विलासी श्रीराम आहे. श्रीराम कौसल्येच्या उदरात, की तो सबाह्य अंतरात, राम परमात्मा चराचरात, पण त्याचा दशरथाच्या घरी अवतार. राम अवतारींचा अवतारी, तोच आता स्वयंवराला आला आहे. सीता ही आदिशक्ती नवरी असल्याने तिच्याशी याचे लग्न व्हावे म्हणून तो उल्लास करील. नवरीची इच्छा सामान्यतः अशी असते की सुंदर वर आपल्याला लाभावा. तेव्हा श्रीरामाची सगुणता सीतेने सांगोपांग निरखून घेतली. श्रीरामाचे पूर्णपण सीताच पूर्णत्वाने जाणत होती. यासाठीच तिने त्याचे सगुणपण सर्व अवयवांच्या ठिकाणी पाहिले.

श्रीरामस्वरूपवर्णन

श्रीरामाची श्रीमूर्ती वर्णन करताना श्रुतींची वाणी बंद झाली. वेद नेति नेति असे आणि एवढेच म्हणत राहिले. कारण राम शब्दार्थात सापडणे अवघड होते. एखादी पळी मधुर रस वाटते; पण पळीच खाल्ली तर गोडी मिळत नाही. त्याप्रमाणे शब्दांची ओढ सोडून देऊन स्पष्ट, प्रत्यक्ष श्रीरामशोभा पाहावी. शब्दांनी राम परेश बोलले तर बोलणाराचे बोल ओस पडतात; जशी गाठोड्यात आकाश बांधू जाणाराच्या हातात केवळ चौपदरी पडते. जो आकाशाचे गाठोडे बांधू पाहतो त्याला

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

व्यर्थ कष्ट तेवढे होतात; त्याप्रमाणे शब्दांची व्यर्थ खटपट केली तरी श्रीराम स्पष्ट म्हणवत नाही. सगुण राम तोच निर्गुण परिपूर्ण परमात्मा होय. राम चिन्मात्रैक, चैतन्यघन, जगज्जीवन होय. त्या श्रीरामाचे सगुणपण बोलायला मी अत्यंत दीन, तोकड्या शक्तीचा आहे. वाणीचा उच्चार करविणारा एक श्रीजर्नादन असून तोच आपले आपण स्वरूप वदवितो. श्रीराम वास्तविक सर्वांगी नित्य निर्मळ आहे. त्यामधे सुनील आकाश बिंबले, त्यामुळे सोज्वळ श्यामलता येऊन तो आपल्या भक्तांना सुनीळ आणि निर्मल भासतो. रामाची श्यामलता गर्जे अहंब्रह्म, त्यामुळे तो मेघश्याम असे वेद. आणि श्रुतिशास्त्रे म्हणतात. श्रीराम परम निर्मळ हे सुरश्रेष्ठांनाही न कळलेले वर्म आहे. त्याच्या अंगात आकाश बिंबले आणि लोक त्याला मेघश्याम म्हणतात. अशाप्रकारे स्वतः श्रीराम मेघश्याम शोभून दिसतो. त्याच्या चरणांचा पराक्रम त्रिविक्रमच आक्रमू शकतो. शेषाला उदंड मुखे असल्यामुळे त्याने रामवर्णनाचे बंड केले, तेव्हा त्याच्या जिभा दुखंड झाल्या. शेषाकडून त्याचे वर्णन होऊ शकत नाही. अशा ठिकाणी माझी युक्ती किती! त्याची योग्यता मला कुठून येणार. तरीही माझ्या बालभाषेतल्या बोबड्या बोलांना ऐकून साधूजन सुख आणि संतोष मानतात.

श्रीरामाच्या सामुद्रिकाचे वर्णन

ध्वज, वज्रांकुश रेषा, दोन्ही पायांवर पद्म, असे पायीचे सामुद्रिक असून त्यामुळे महापातक्यांचाही उद्धार होतो. चारी मुक्तींना लाज आणून, चरणांवर भक्तीचा ध्वज शोभतो. वज्राने कर्मबीजाचा नाश होतो. स्मरणाचा सहज नित्यांकुश, सत्त्वाचे आक्रमण शोधताना दोन्ही पायांवर कमळे झळकतात. संध्यारंगाच्या प्रेमाने तळवे आरक्त आहेत. त्यांची शोभा कुंकुमरंगालाही लाजविणारी आहे. त्रिगुण हे जडत्व निस्तरण्यासाठी श्रीरामाचे चरण तातडीने ठाकले; घोटे हे त्रिकोण चरणाशी संपूर्ण जडून राहिले. ककसत्या कळण्यासाठी चित्कळा, सरळ सोज्वळ शोभत होत्या. तीच भक्तांची जीवनकळा आणि साधकांचा तोच जिव्हाळा आहे. पायांतले तोडर नव्हेत तर ते प्रलयगंघाळ, त्यांच्या आवाजाने कळिकाळ कापे. बाकी, अंदुवांचा खळाळ हा अहं-सोहं यांचा सुखकल्लोळ. कंदनाने कदर्थले काळचक्र ते त्याची गुडघ्याची वाटी झाले. अशा त्या चरणांशी सुखसार प्राप्त होते. म्हणून सुर-असुर वंदन करतात. रामाच्या गुडघ्यांची चक्राकार स्थिती पाहून काळचक्र भक्तांना वंदन करते. रघुनाथाचे चरणसामर्थ्य हे वेदशास्त्रांनाही न समजणारे आहे. त्या श्रीरामचरणांचा स्पर्श होताच तत्काळ शिळा झालेली अहल्या उद्धरली. ज्यांनी या चरणांचा प्रसाद घेतला ते कळिकाळालाही लुबाडतात. केळीच्या सोटांना लाज आणणाऱ्या त्याच्या मांड्या सरळ, मृदू आणि शोभिवंत आहेत. केळीच्या पोटात वक्र गर्भ असतो तर येथे अवक्रशोभा असते. श्रीरामाचे गुह्य स्थान प्राप्त होण्यासाठी आवश्यक संपन्नता सीतेच्या ठिकाणी आहे. तेथे वेद लाजतात आणि शास्त्रे कच खातात. वासनागंधाला जे निर्लज्ज लोकलाज मानतात तेच रामगुह्याला अहर्निश आणि सुखरूप प्राप्त होतात. श्रीराम हा एकपत्नीव्रती आहे. भक्त हे स्वतः पती किंवा पत्नी होतात. त्यांनाच गुह्याचे गुह्य प्राप्त होते. ती प्राप्ती भक्ती भावार्थ आणि अलौकिक असते.

वीज ही क्षणोक्षणी उदयास्त भोगते. ती श्रीरामाच्या कासेला बिलगली आहे. आत्मवस्तू गिळून ती अहोरात्र तेजस्वी असते. यासाठीच रविकिरण आणि चंद्र यांचा तडतडीत पीतांबर त्याच्या कासेला आहे. श्रीरामाला स्वतःचेच असे मनोहर सौंदर्य असून ते सर्वांगी आहे. ज्यामध्ये राम बंदिस्त झालेला आहे अशा भक्तिभावाची मेखला कमरेला आहे आणि त्या मेखलेला घंटिकांची दाट मालिका ही सर्व सद्विद्यांची शोभा आहे. श्रीरामाचे मुख पावल्यावर त्या घंटिका खाली

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Research Academy, eGangotri

तोंड करून आहेत; अलौकिक असे मोत्यांचे घोस लावलेली ती कटिमेखला निर्दोषत्वाने शोभते आहे. सिंहांना आपल्या कटीच्या आकाराचा मोठा अभिमान होता, परंतु रामाची कटी पाहून ते वनवासात पळून गेले. श्रीरामाच्या कटिभागाला पाहण्यासाठी शाहाडे मेखलेला जडून राहिले. अखेर श्रीरामाला भुलले आणि येणे-जाणे विसरले. पूर्वी ब्रह्मा हा कमळाच्या गर्भात राहून शिणला तेव्हा त्याला अभय देऊन आपल्या पोटाच्या आरंभी असणाऱ्या वर्तुळाकार बेंबीत त्याची स्थापना केली; अशी ती अभय बेंबी होती. ज्ञेय, ज्ञाता, ज्ञान यांची त्रिवळी उदराच्या तीन घड्यांत होती. हृदयस्थानी सत्कर्माच्या रोमावळी रेखिलेल्या होत्या. श्रीरामहृदयाची पोकळी घनानंदाने निरवकाश झालेली असून संत तेथे निवांत जडून राहिले, त्यामुळे त्यांना कल्पान्तीही नाश नाही. समाधीचे निखळ सुख तेच रामाच्या हृदयावरचे पदक असून, त्या पदकाला संतरूपी माणके सत्कोंदणात जडवलेली आहेत. अनन्यभाव आणि सत्प्रीती यांची वैजयंतीमाला वक्षावर रुळत होती. तशाच सु-मन मनाच्या रघुपतीच्या गळ्यातल्या माला तुळशींच्यासह शोभत होत्या. मुक्त सद्भावाचे मोती पूर्णानुसंधानाने ओवून मुक्तांची माला श्रीरामाच्या गळ्यात शोभत होती. शंखाचा आकार असलेला रामाचा कंठ हेच वेदांचे मूळपीठ असून स्वर-वर्ण यांच्या प्रवाहाची तीच वाट म्हणून तेथून परमार्थ प्रकट होतो.

श्रीराम हा खरे तर अबाहू, पण आता त्याला आजानुबाहू शोभा देत आहेत. या बाहूंचा पराक्रम मोठा असून त्यांनी दैत्यांचा ठाव मोडला आहे. रामाच्या डाव्या हातातले धनुष्य पुण्य-पाप निःशेष निर्दाळते; संकल्प-विकल्प निपटते; मदनाचा दर्प समूळ छेदते. त्याच्या उजव्या हातात लखलखीत बाण असून तो भक्त आणि वैरी यांना समान घाव घालून, त्यांची अहंममता जिवानिशी मारतो आणि उरातले द्वैतही उरू देत नाही. तो स्वतः चैतन्यतेजाने अती तेजस्वी असल्याने अहं-सोहं निःशेष आटतात. शुध्द कीर्ती सांगणारी मुखे म्हणजे उपनिषदे तीच रामाचे बखोटे, वीर्य, धैर्य ही रामाची कंकणे ज्यांच्या ठायी ती बाणली त्यांना पूर्णपणे लेणियांचे लेणे जो श्रीराम तो हातात. राममुद्रा हाती बाणल्या तर तो त्रिजगती वंद्य ठरतो. कळिकाळ पाय धरून चारी मुक्ती आंदण देऊ लागतो. अशा दहा बोटांतल्या दहा मुद्रिका दहा अवतारांचा प्रतिपाळ करतात. असा तो श्रीराम लंकानाथ रावणाला पराभूत करून सीतासुंदरीचा हात हाती धरेल.

श्रीराम हा आजानुबाहू पुरुषसिंह त्र्यंबकभंजन करणारा असून, भरसभेत रावणाला गांजून सीतेचे पाणिग्रहण करील. त्याच्या कानातली मकराकार कुंडले म्हणजे लौकिक बाह्याचार आणि बाह्यविचार आहेत; वास्तविक त्याच आकारात निराकार कान विकारांचे निर्दालण करतात. श्रीरामाचे मुख म्हणजे गाळीव आनंदाची मूस किंवा सोलीव सुखांचे सुख असून त्याचे दर्शन घेणारांना निर्दोष केले जाते. त्याच्या श्रवणांची शोभा नवलाईची आहे. आत्म्याशी त्यांची नित्य भेट असते. ऐकणे, पाहणे, अंशाअंशाने समरस होऊन निर्दोषत्व पावते. श्रीरामाचा मुखचंद्र पूर्णपणे निष्कलंक आहे. तो पाहून चंद्र लाजून स्वतः अधोमुख झाला. एका पक्षात वाढ आणि दुसऱ्या पक्षात क्षय असे चंद्राला दुःख आहे. यामुळेच तो रामाच्या पायाच्या अंगठ्याला येऊन मिळतो. जग हे यामुळेच त्या नखचंद्राच्या पाया पडते. श्रीरामाच्या अंगठ्याला मिळण्याने चंद्राला पुष्टी-तुष्टी झाली. श्रीरामचरण पाहून दृष्टीला आल्हाद मिळतो, सुखाच्या कोटी निर्माण होतात. श्रीरामाचे मुख पाहिले की जन्मदुःखाचा नाश होतो. परमानंदाचे सुख, हर्ष ओसंडून सुख होते. अकार, उकार, मकार ही ॐकाराची स्थिती, कर्म-निष्कर्म श्रुती त्याप्रमाणे रामसुखाच्या दोन भागांत दंतपंक्ती असून, चार वेदांच्या उक्ती चार चौकीचे दात आहेत. जगाचे

https://archive.org/details/muthulakshmiacademy Bhuvan Vani Trust, Lucknow

CC-0. In Public Domain. Digitized By Sarayu Foundation Trust and eGangotri

अधर ते निराधार, राममुखींचे अधर ते साधार, ते परमामृताला माहेर आणि आत्मजिव्हार सीतेचे. श्रीरामाची हनुवटी ही सृष्टीत पाहताच सुख वाढवते. र्ना हनुवटी पाहणाराला धन्य वाटते हे हनुमंत जाणतो. जगात सौंदर्याची शोभा असणारे असे श्रीरामाचे नाक आहे. ते नासिक (पंचवटीत) गावान शूर्पणखेला अवश्य निर्नासिक (नाक कापून) करील. श्रीरामाचे प्राण हे जगाचे प्राण म्हणून वावरतात. त्या ठिकाणी राहायला मिळते याचेच वायूला समाधान वाटते.

श्रीरामचे डोळे हे चैतन्याचे विश्रांतिस्थान आहे. ते अंतर्बाह्य पूर्ण डोळस आणि आपणच आपल्याला पाहणारे आहेत. श्रीरामाची दृष्टी पडताच जीव ब्रह्मानंदाने उचंबळतात. दृश्य द्रष्टा ही त्रिपुटी न दिसता सृष्टी स्वानंदाने हेलावते. श्रीरामाची भुवई ब्रह्माण्डाच्या कोटी रचते. त्यांचा विक्षेप कळिकाळ घोटतो. त्यांच्याकडून चहू देहांच्या गाठी छेदल्या जातात. श्रवणांना शोभणारे नयन, यालाच डोळसपण हे नाव देतात. पदार्थामध्ये परमार्थदर्शन हेच नयनांचे समाधान असते. श्रीरामाचे कपाळ मोठे असून त्यानेच सबळ अधिष्ठान येते. सच्चिदानंद सरळ तीन वळयांच्या रेषांनी ते कपाळ शोभिवंत झाले आहे. श्रीरामाच्या कपाळावरचे गंधार्चन म्हणजे अहंभावाचा कठीणपणा गाळून त्यापासून काढलेले शुद्ध चंदन हेच रामार्पण केलेले आहे. श्रद्धारूपी केशराचा मेळ घालून त्याचा पिवळा टिळा रामाच्या कपाळावर लावलेला असून, त्यावर सप्रेम सुरंगकला असलेल्या अक्षता लावलेल्या आहेत. श्रीराम सर्वांचा मुकुटमणी आणि राम हाच राजस्थानी शिरोरत्न होता. त्याच्या डोक्यावरचा मुकुटमणी असा कोणी दिसतच नाही. श्रीरामाचा मुकुट आत्मशोभेचा असल्याने आणि राम हा शिरोरत्नाचा गाभाच असल्याने त्याच्या मुकुटाची प्रभा (तेज) शब्दांत सांगणे अत्यंत अवघड आहे. श्रीरामाच्या डोक्यावर काही रिकामे उरले असते तर वाचेला मुकुटाचे वर्णन करायला अवकाश उरून सुख झाले असते. परंतु रामाच्या डोक्यावर काही रिकामे उरलेच नाही. मग मुकुट वर्णावा कसा नी वाणीने बोलावे तरी काय? श्रीरामाचा प्रताप नित्यत्वाने निर्विकल्प, तोच त्याच्या डोक्यावरचा मुकुट सद्रूप असून चित्स्वरूप असा शोभत होता. यासाठी रामाच्या डोक्यावर लेणियांचे लेणे असे सर्वथा श्रीमुकुटत्वे श्रीरघुनाथाला अंगत्वे शोभा देत होते.

सुवर्णाला जसे सोन्याचेच कोंदण तसे श्रीरामाचे लेणे श्रीरामच. ते स्वतः सीताच पाहू जाणे, इतरांचे जाणणे म्हणजे दिवसा काजवा पाहणे होय. तिचे सद्रूपपण स्वतः रामच जाणे. श्रीरामाचे संपूर्णपण फक्त सीताच पूर्ण जाणून होती. एकमेकांची एकमेकांना खूण पटली आणि ते ती दोघे जाणत होती.

अध्याय विसावा

श्रीरामाचे पूर्णपण, रूपरेखा, गुणलावण्य पाहून सीतेचे मन वेधले गेले. त्यामुळे तिला इतर कोणी आवडला नाही. चंद्रामृत टाकून चकोर अन्य काही सेवन करीत नाही त्याप्रमाणे रघुनाथ सोडून अन्य काही सीतेचे चित्त मानत नव्हते. जनकाने रामाला पाहताच आनंदाने सीता त्यालाच द्यावी असे त्याच्या मनात आले. परंतु धनुष्याचा पण त्याला शंकित करत होता.

श्रीराम पाहून सभाजनांची स्थिती

स्वयंवरासाठी आलेल्या सभाजनांचे डोळे रामरूपी अती एकाग्र झाले. रावणाला मोहाची झापड आली. सारे तटस्थ झाले. श्रीरामाला पाहून ऋषिसमुदाय आश्चर्य करू लागला. सीता रामाला द्यावी असेच सर्वांच्या मनात आले. परंतु पुढचे कार्य कठीण आहे; कारण हा धनुष्याला दोरी कशी चढवेल असे वाटून सारे चिंतित झाले. ते तर लग्नाचे बंधन आहे. सीतेचा भाव सत्य, श्रीराम अंतर्यामी समर्थ, सर्वांचे मनोरथ पूर्ण करण्यासाठी

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

तो निघाला. लक्ष्मणाला मागे ठेवून राम गतीने पुढे निघाला. ते पाहून रावण दचकला. 'हा धनुष्याला दोरी लावेल. हा बालक दिसला तरी याचा पराक्रम अलौकिक आहे. याने घाव घालून मारीचाला शिक्षा केली आहे. सुबाहूला तर ठारच केला आहे.' या विचारांनी रावणाची दहाही तोंडे म्लान झाली. ते पाहून विश्वामित्रांना अती आनंद झाला. 'रामचंद्रा लवकर कार्य कर आणि धनुर्धरांना लाजव' असे ते उल्हासाने म्हणाले. त्यामुळे रामाला आनंद झाला. त्याने विश्वामित्रांना वंदन केले. ब्राह्मणांचे आशीर्वाद घेतले. सभाजनांना सन्मान दिला. अतिशय सज्जन अशा जनकराजाला नमन केले. नंतर रामाच्या बाहूंना स्फुरण येऊन ते धनुष्य पेलण्यास उत्सुक झाले. रावणाने ज्याप्रमाणे सभाजनांची अवहेलना करून 'मीच एक समर्थ आहे' असा गर्व उच्चारला होता त्याप्रमाणे न करता रामाने सर्वांचा सन्मान करून, अत्यंत नम्रपणे धनुष्याला हात लावला.

शिवधनुष्याची पूर्वकथा

ते शिवधनुष्य अत्यंत जड होते. त्या जडपणासंबंधीचे निरूपण असे होते, की हे धनुष्य सदाशिवाच्या हातात होते. त्याच्या जडत्वाला कारण शिवशक्ती. चाप जडत्व पावले असे चापाला म्हणणारे महापापी. अती दुष्ट त्यांना हे निर्दाळते. ते पाप याच्या जवळ येत नाही. शिव हा रामनामाने पाप जाळतो आणि दुष्टांचा संहार करतो. या धनुष्याने पुष्कळ तप आणि व्रते केली म्हणून त्याला शिवाच्या हाताची प्राप्ती झाली. शिवाच्या हातांनी ते पवित्र झाले यामुळेच रघुनाथाने ते हातात धरले. शिवाचे अपूर्व असे ते धनुष्य सामान्य जीव कसे उचलू शकतील. तेथे अधिष्ठान म्हणून शिव वसत असल्यामुळेच त्या धनुष्याला शिवशक्तीचे जडत्व आले होते. शास्त्रार्थ असा की जे जड ते पापराशी. परंतु या चापाला ते जडत्व नव्हते तर उलट शिवशक्तीमुळेच ते धन्यत्व पावले होते. रावणाने धनुष्य उचलले तेव्हा शिव धनुष्यात प्रवेशला होता. त्यामुळे तो अपमानित झाला. चापात जडत्व शिवशक्ती असण्यानेच होते. त्या धनुष्याचा भाव असा की 'मी शिवाच्या हस्तस्पर्शाने पवित्र झालो आहे. श्रीरामाचे हात लागून मी परममुक्त होईन. तोच योग या स्वयंवरामुळे निश्चित झाला आहे. राम नेहमी शिवाला ध्यातो. शिव श्रीरामचरणांना वंदन करतो. तर आता जडत्व जाऊन मी पुष्पप्राय होतो.' अशी या शिवधनुष्याची कथा आहे.

स्वयंवरात सीता वरावी हेच रघुनाथाचे कार्य होते आणि त्या दृष्टीनेच त्याने त्या धनुष्याकडे पाहिले.

श्रीरामाकडून चापग्रहण

श्रीरामाने धनुष्याकडे पाहताच ते धनुष्य निष्पाप झाले. त्याचा जडजाड्यत्व अवस्थेतला संताप गेला आणि ते स्वतःच सुखरूपपणे उन्नत झाले. ज्याच्याकडे राम पाहतो त्याचे आकल्प जडत्व नाहीसे होते. तिथे या बापड्या चापाची काय कथा. त्याचे जडत्व उरेलच कसे? श्रीरामाने काही म्हटले तरी जड संसार तरून जातात हे सत्य आहे. मग त्या रामाचे प्रत्यक्ष दर्शन झाल्यावर चापाला जडत्व कुठून असणार? त्या चापाचे मनोगत हेच होते की, श्रीरामाचा हात लागताच आपण कृतकृतार्थ होऊ. राम हा स्वतः कर्मनिर्मुक्त आहे. चापाच्या ठायी अनुताप निर्माण व्हावा असा रामप्रताप होता. रामाने कृपादृष्टीने पाहिले तेव्हा चापाच्या अनुतापाने त्याचे जडत्व आणि पाप गेले. अशाप्रकारे श्रीरामाने चापाचे जडत्व घालविले, एकदा त्याच्याकडे पाहिले आणि डाव्या हाताने ते सज्ज करण्यासाठी धरले.

श्रीरामाने धनुष्य हातात धरलेले पाहून जनकाच्या मनात थोर संशय निर्माण झाला. त्याने विश्वामित्रांकडे येऊन अत्यंत काकुळतीने म्हटले, 'अहो महाऋषी, हा राम तर सौकुमार्याची रास आहे. तेव्हा ज्या चापाने रावणाला घोळसले, ते

https://archive.org/details/muthulakshmiacademy
Bhavan Vani Trust, Lucknow

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

धनुष्य रामाकडून कसे सज्ज केले जाईल?" हे जनकाचे बोलणे ऐकताच स्वतः निःशंक असलेले विश्वामित्र जनकाची शंका दूर करण्यासाठी म्हणाले, "ऐक बाबा रघुनंदना, हे पुरुषसिंहा, स्वतःची वृत्ती सावधान ठेवून धनुष्य अंगावर पेलून घे. तू तर पुरुषार्थ आहेस, रघुपती निमिषार्धात धनुष्य सज्ज करून जनक आणि जानकीचे मनोरथ कृतार्थ कर." हे श्रीगुरूंचे शब्द ऐकून रघुनंदनाने धनुष्य पाहिले. डाव्या हाताने ते पेलून त्याला दोरी चढविण्यास तो सज्ज झाला. त्याआधी तो गुरूंना म्हणाला, "आपल्या वचनाने कृपा प्राप्त झाली. धनुष्य सज्ज करणे म्हणजे काय मोठे कार्य आहे. हे नरश्रेष्ठ व्यर्थ कुंथत आहेत. हे शंकराचे दिव्य चाप आहे. याला गुण चढवणे हे कार्य अल्प आहे. आता माझा प्रताप पाहा. आता इतक्यात शराकर्षणेचे (दोरीचे) आरोपण (चढवणे) करतो." हे रामाचे वचन ऐकून विश्वामित्रांना हर्षोल्लास झाला. ते म्हणाले, "धन्य धन्य तुझे मुख. तू सूर्यवंशीचा प्रतापसमुद्रच आहेस."

श्रीरामाकडून धनुष्य सज्ज होऊन भंगते

'तुझ्या वचनासाठी मला अयुतकोटी दिल्या,' असे म्हणून पाठ थोपटून रामाने धनुष्याची मुठीने पकड केली. जनक म्हणाला, "रघुनाथा, मलाही असा भ्रम होता की हे शिवधनुष्य पेलणारा वीर असणारच नाही. तो तू सामर्थ्याचा माथा उजळ केलास. सभेदेखत तू हे केल्याने तुझे किती गुणगान करू. तुझा पुरुषार्थ आणि सामर्थ्य खरोखर धन्य आहेत. तू जे प्रतापगर्वाने बोललास ते सत्य करून दाखव. श्रीरामा आता लवकर चापकर्म संपादन कर." श्रीगुरू आणि श्वशुर या दोघांचे बोलणे ऐकून रघुनंदन धनुष्यावर दोरी चढविण्यासाठी ते पूर्णपणे आवाक्यात आणता झाला. अति कीर्तिमान समर्थ रघुनाथाने दुसरा हात न लावता एकाच हाताने दोरी धनुष्यावर चढविली. ती त्याची कृती पाहून सुरासुर विस्मित झाले. रामाने चापाचा टणत्कार करतलाने करताच रावणाची दातखीळ बसली. त्या ध्वनीने अनेक राजे मूर्च्छित होऊन भूमीवर पडले. दिग्गजांची टाळी चिकटली. रामाने धनुष्य ओढले तर ते मुठीमधेच तडकले. नंतर दोरी पूर्ण ओढताच ते कडाडत भंगले.

धनुर्भंगाच्या ध्वनीचे परिणाम

धनुष्य भंग पावताना झालेल्या घरघराटाने वीरांची दातखीळ बसली. हत्ती, घोडे करकरू लागले. उभी शरीरे उलथली. धनुर्भंगाच्या कडकडाटाने अखिल सृष्टी दुमदुमली. मेरू पर्वताला तडे पडू लागले. काळाची दृष्टी झाकोळली. कोटी विजा तुटून पडल्या. चापाचा कडकडाट त्यासारखाच होता. त्यामुळे सुर, किन्नर, नर भ्रमिष्ट झाले. त्या नादाने वादळ उठले. नादाच्या अत्यंत तीव्रतेने पृथ्वी वेडीवाकडी होऊन गेली. नभीच्या नक्षत्रांची पडापड होऊन ती डळमळून खाली पडली. त्या नादाच्या प्रकर्षाने अशी गर्ता निर्माण झाली की पक्षी पळायचे विसरले आणि भ्रमिष्ट होऊन आकाशात भिरभिरत राहिले. त्या सर्वांची गतीच खुंटली. काळाने प्राण्यांचा प्राण घ्यायचा पण काळच नादभयाने पळाला. तेव्हा आता मारणार कोण? काळाला श्रीरामाचे आकर्षण होते. धनुष्याचे तुकडे खाली पडताच शेष अती तडफडला. वराहाची दाढी तडतडली. कूर्माने (कासवाने) पाठ दृढ पृष्ठाची केली. सप्त पाताळे दडपली गेली; समुद्रजल उचंबळले; शेषशयन आंदोळले; मेरू कुलाचले कापू लागली. दिवसा कंप येऊन भूकंप झाला; सत्यलोकात थरकाप उडाला. रामाने शिवधनुष्य भंगले या प्रतापाची वार्ता तिन्ही लोकांत पसरली.

जनक, विश्वामित्र, राम आणि सौमित्र यांचेच तेवढे नेत्र सावधान होते. इतर सर्व मूर्च्छित झाले होते. या चौघांखेरीज जनककन्या सावध चित्त होती. तिने थोर रामप्रताप पाहिला आणि त्याला

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

वरण्यासाठी उतावीळ झाली. शिवचापाचे मनोगत असे की, रामाच्या हस्तस्पर्शाने आपण मुक्त झालो. हा व्यर्थ कडकडाट नसून चापाने स्वानंदाने केलेली गर्जना होती. तो आनंदनाद खूप मोठा असून त्याने वैकुंठही दुमदुमले. कैलासपीठ नादाने कोंदले पण शंकर डोलत राहिला. चापाने निर्मुक्त असा जो आनंदाचा गहिवर निर्मिला त्याने क्षीरसागर उलथला. शेषशयनाला (विष्णूला) अत्यंत आनंद झाला. स्वर्गात देवांनी जयजयकार केला. रामप्रतापाच्या आनंदद्वारी अकार, उकार, मकार यांना आनंदाने कोंदून रामप्रतापाने अर्धमात्राही कोंदली. श्रीरामाचा हात लागताच शिवचाप परम मुक्त झाले. तोही मुक्तीचा अर्थ श्रीरामप्रतापानेच. श्रीरामाचे चरण लागताच पाषाण तत्काळ मुक्त होतात. त्याच रामाच्या हातांनी चापग्रहण झाल्याने पूर्ण मुक्ती मिळाली. रामनामस्मरण केले तर जडाला मुक्ती मिळते. मग त्याच्याच हाताने चापग्रहण केल्याने पूर्ण मुक्ती चापाला मिळाली.

शिवचापाला पूर्ण मुक्ती, जनकाच्या संशयाला निर्मुक्ती, जानकीच्या डोळ्यांना नित्य तृप्ती देणारी श्रीरामाची मूर्ती, स्वयंवरास आली होती. रावणगर्वाची निर्मुक्ती, आशापाशांना निःशेष निवृत्ती, राजाभिमानाला नित्य मुक्ती असा श्रीरामाच्या स्वयंवरास येण्याचा परिणाम झाला. श्रीराम स्वयंवराला आल्याने वेदानुवादाला वचन अनुमुक्ती, शास्त्रानुवादाला युक्ती-प्रयुक्ती, जानकीच्या लोचनांना दृश्य निर्मुक्ती, प्राप्त झाली. श्रीराम स्वतः स्वयंवराला आल्याने जनसमुदायाची संदेह निर्मुक्ती, सुरसमुदायाला बंधनमुक्ती, भक्तजनांना संतापातून मुक्ती असे अनुभवाला आले.

सीता, जनक यांची मनःस्थिती

श्रीरामाचा प्रताप पाहण्याचे भाग्य सर्वांना कुठले असणार? त्यांच्या डोळ्यांवर झापड आलेली असते. जनककन्या सीता मात्र ते सुख भोगत होती. श्रीरामसुखाचा सोहळा पाहून जानकीचे डोळे निवले. रामाच्या गळ्यात माळ घालण्यासाठी ती भावार्थाने उत्सुक झाली. धनुर्भंगाच्या वेळी निर्माण झालेले कोटी कोटी नाद हळूहळू नभाच्या पोटात विरले. सृष्टीला चेतनेची उपलब्धी झाली. जनांची दृष्टी उघडली, आणि ते सावध झाले. पुन्हा सर्वजण सभेत आपापल्या आसनांवर स्थानापन्न झाले. त्यावेळी धनुष्य भंग झालेले पाहून त्या सर्वांचे मन आश्चर्य करत राहिले. जनकाच्या मनातला संदेह गेला. श्रीराम हा बलशाली, महावीर आहे. याबाबत तो सर्वार्थाने निःसंदेह झाला. त्याने त्यामुळेच धन्योद्‌गार काढले. तो अत्यंत आनंदाने आणि उत्साहाने विश्वामित्रांना म्हणाला, "श्रीराम सूर्यवंशाचा आणि दशरथाचा पुत्र असल्याचे पूर्वी मला अनेक ऋषींकडून समजले होते. तो आत्मतेजात अद्‌भुत, प्रतापवंत, अचिंत्य, अनंत आणि समर्थ आहे हे तर मी आता प्रत्यक्षच पाहिले आहे. ज्याने शिवाचे धनुष्य सहजपणे दुखंड केले त्याचा प्रचंड प्रताप मी पाहिला. रावणाचे तोंड काळे झाले. श्रीरामाने पूर्णपणे दोरी ओढण्यापूर्वीच ते शिवधनुष्य भंग पावले. अशा रामाच्या प्रतापाचे माहात्म्य कोण वर्णन करू शकणार?"

राजा जनकाने पुढे विश्वामित्रांना "जनककुलातली ही कुलकन्या श्रीरामाची भार्या होईल. माझ्या वंशाचे सार्थक झाल्याचे समाधान आम्हाला मिळेल. हे सारे आपल्या कृपेने घडून आले आहे ऋषिवर्य. हे विश्वामित्र, आपण धर्मात्माच आहात आणि आपल्या धर्मानेच श्रीरामाची भेट झाली. सर्व कर्मांची निष्कृती होऊन राम परमात्मा माझा सुहृद झाला. आपले नाव जरी विश्वामित्र असले तरी आपण माझे परम मित्र आहात. राम परमात्मा परम पवित्र आहे. आपल्याच कृपेने तो आता स्वतंत्रपणे माझा सुहृद झाला आहे. माझा पूर्वी केलेला संकल्प, सीता अमूल्य, प्रतापी धनुष्य असा होता तो आपण निर्विकल्प केलात. श्रीराम तर सत्यसंकल्प आहे. स्वयंवराचा पण कठीण होता, त्यामुळे रावणासह अनेक राजे

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

टिकाव धरू शकले नाहीत. त्या धनुष्याला दोरी चढवून श्रीरामाने सीतेला वरण्यासाठी महापराक्रम केला. सीतेला श्रीराम पती मिळविण्याचे कार्य करणारे आणि ब्रह्मसूत्र जाणणारे आपण पवित्र ऋषिवर्य आहात.'' नंतर विश्वामित्रांच्या पायांवर डोके ठेवून जनक म्हणाला, ''सीता मला प्राणाहून प्रिय आहे. ती मी रामाला अर्पण केली. माझा यज्ञ सफल झाला, माझे कुळ पावन झाले, सीतेचे भाग्य अनुकूल असल्याने रामाने सुख निर्माण केले. माझी अगुण, सगुण कन्या मी रामार्पण केली आहे. आपण सर्व जाणताच, तेव्हा लवकर हे लग्न लावा.''

सीता रामाला वरमाला घालते

राजा जनकाने विश्वामित्रांना विनंती केल्यावर त्यांनी उत्साहाने 'तथास्तु' म्हटले. हे विश्वामित्रांचे वचन ऐकून सीता श्रीरामाच्या कंठात माळ घालायला उत्सुकतेने आली. जे तिच्या मनात होते तेच श्रीरामाने केले. त्यामुळे तिला आनंद होऊन घाईघाईने ती वरमाला रामाला घालायला आली. चिद्रत्नांची माला घेऊन ती जनककन्या हर्षभराने येऊन, सर्व राजांच्या देखत श्रीरामाच्या गळ्यात माळ घालून, उभी राहिली. त्या वेळी सीता आणि राम यांची दृष्टिभेट झाली. लाज उलटी फिरली. सृष्टीत आनंदी आनंद उसळला. चहू देहांच्या गाठी फिटल्या. त्याबरोबर सावध राहून डोळ्या डोळ्यांनी एकमेकांना वरिले; प्राणांचे लग्न लागले; असा तो जिवा शिवांचा विवाह झाला होता. धनुष्याने वीरांच्या अभिमानाचा अस्त केला. माध्याह्नीच्या तळपत्या सूर्यासारखा श्रीराम सीतेला वरण्यासाठी अभिजित सुमुहूर्तावर आला. भास्वताने लग्न घटिका पाहिल्या. वाणी आपल्या ठिकाणी मौनात राहिली. स्वबोधाने सावधान म्हटले. या दोन्ही भागांत काल सावध होऊन राहिला. धनुर्भंगाच्या गजरात अंतःपट निर्मुक्त, भावार्थ ॐपुण्याह सांगत राहिला; आणि त्या रघुनाथाला वरण्यासाठी हे घडत गेले. असा उचित समय साधून, उभयपक्ष सोडून, अभिमानाचा अंत करून सीतेने रामाला वरिले. एकमेकांना त्यांनी प्रेमदृष्टीने पाहिले. चिदचिन्महाग्रंथी सुटल्या, आत्मैक्याचे बहुल बल वापरून ती दोघे एकात्म झाली. वधुवरांनी एकमेकांना पाहिल्यावर नवरीच्या ठायी नवरी आणि नवऱ्याच्या अंगा सुंदरा असे त्यांना दिसले, अशा स्थितीत त्यांचे लग्न लागले. सीतेने श्रीरामाला जेव्हा माळ घातली तेव्हा त्याच वेळी आणि त्याच काळी रावणाला दुर्दशेने वरिले. त्याच्या कपाळी काळिमेचा टिळा लागला. अवकळा पाठी लागल्याने रावणाचा सृष्टीत अपमान झाला. श्रीरामाचा प्रताप-पराक्रम पाहिल्यावर रावणाच्या पोटात धाकधुक निर्माण झाली.

उपस्थितांच्या प्रतिक्रिया

श्रीरामचंद्र विजयी झाला म्हणून विश्वामित्र आपल्याबरोबर ऋषिसमुदाय घेऊन तृप्त मनाने, हर्षाने, उत्साहाने स्वानंदमग्न होऊन नाचले. एक रोडके, एक बोडके, एक केवळ सुडके, असे सारेच हर्षभरित होऊन नाचू लागले, कारण सीतेने रघुकुलटिळक रामाला वरिले. सर्वजण आनंदाने नाचत होते. गोपीचंदनाचे रवे झेलत होते. सीतेने राघवाला पर्णिले तेव्हा धोतरांच्या घड्यांचे पदर झोलाने हालविले. कोणी एक अंगवस्त्राने ओवाळत होते. कोणी जुनी धोत्रे ओवाळत होते. कोणी पवित्र दर्भांनी ओवाळत होते. सीतेला रामचंद्राने जिंकले. कोणी कौपिन, कोणी कुशासन, कोणी कृष्णाजिन (हरणाचे कातडे) अशा प्रकारांनी रामाला ओवाळण्यात आले. असा तो रामविजय होता. ऋषिजनांनी मंत्रोच्चाराने, स्वर्गात सुरवरांनी जयजयकाराने रामचंद्राच्या विजयावरचा आनंद प्रकट केला आणि पुष्पवृष्टी केली. सुखाच्या तातडीने, देव ताबडतोब उठले आणि त्यांनी हर्षाच्या गुढ्या उभारल्या. कारण श्रीराम आपली बांधिवडी सोडवील असा त्यांचा विश्वास होता.

https://archive.org/details/@sultanlukshmiacademy Bhavan Vani Trust, Lucknow

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

जनकाच्या राजभवनाच्या दारात निशाण-भेरी वाजविण्यात आल्या, गगनाने मंगलवाद्यांनी गर्जना केली, सर्वत्र जयजयकाराच्या घोषणांचा गजर सुरू झाला.

विश्वामित्रांनी अत्यंत उल्हासाने राम आणि सीता यांना रथामध्ये बसवून दशरथ राजाला भेटविण्यासाठी तातडीने निघायचे ठरविले. आपण सीता जिंकली या विचाराने लक्ष्मण हाही उत्साहित झाला आणि रथाच्या घोड्यांचे लगाम आपल्या हातात घेऊन तो रथावर चढला राम आणि सीता यांचे जाणे विश्वामित्रांच्या हाती आहे हे जाणून जनक अत्यंत लीन होऊन विश्वामित्रांच्या पुढे लोटांगण घालत म्हणाला, "ऋषिराजा विश्वामित्र, आपण गुरुपणात पूर्ण आहात. स्वयंवरात सीतेला वरण्याचे कार्य केलेत; आता पाणिग्रहण करावे आणि विधियुक्त लग्नही आपणच करावे. उभयपक्षात आपणच सोयरे आहात. तेव्हा शास्त्रविचार करून वधूवरांना येथेच राहू द्यावे." नंतर जनकाची पत्नी सुमेधा, जी थोर पतिव्रता होती, ती त्या ठिकाणी आली. श्रीरामाच्या डावीकडे सीतेला बसवून श्रीरामाला डोळे भरून पाहावे अशी तिची इच्छा होती. जनकाने पुन्हा विश्वामित्रांना विनविले की, "राजा दशरथाला आणून मोठ्या उत्साहाने सोहळा करावा. हे ऋषिवर्या कृपावंता, याप्रकारे दोन्ही कुळांना सुख द्यावे." ही जनकाची विनंती ऐकून कौशिक ऋषी मनातून सुखावले. त्यांनी रामाला अन्य ऋषींसह मिथिलेत राहायला सांगितले.

अध्याय एकविसावा

सीतेचे श्रीरामाशी लग्न होणार हे ऐकताच रावण आपले म्लान वदन घेऊन तेथून निघून गेला. श्रीरामाचा प्रताप पाहून राजे आपला गर्व सोडून थरथरत आपापल्या नगरांना परतले. याप्रकारे राजे, राक्षस या सर्वांना रामाने आपल्या प्रतापाने विन्मुख केलेले पाहून जनक सुखी झाला. त्याला लग्न होण्याच्या कल्पनेने आनंद झाला.

विश्वामित्रांचे पत्र घेऊन दूताची पाठवणी

जनकाने विश्वामित्रांना सांगितले की, "राजा दशरथाला लवकर आणण्यासाठी माझ्या प्रधानाला मी पाठविले. परंतु राजा दशरथ ते मान्य करणार नाही. तेव्हा अहो कौशिक ऋषिवर्य, आपली पत्रिका नसेल तर दशरथ ब्रह्मादिकांचेही सांगणे मानणारा नाही, तिथे माझ्या प्रधानाची विनंती कशी मान्य होईल! आपली काही खूण लाभल्याखेरीज ऋषिवर्य वसिष्ठ कदापी लग्नाला येणार नाहीत. हे सर्व जाणून आपण पत्रातून अनुज्ञा द्यावी. आपल्या आणि आमच्या एकात्मतेसाठी विनंतीपूर्वक पत्र लिहावे आणि त्यात श्रीरामाचा पुरुषार्थ, त्याचा प्रताप यांची थोरवी पाहून, सीता रघुनाथाला देऊ केली आहे असे स्पष्ट म्हणावे. त्यामुळे श्रीवसिष्ठ सुखावतील आणि अज राजाचा पुत्र जो दशरथ तोही संतुष्ट होईल." जनकाचे बोलणे आणि विनंती ऐकून विश्वामित्रही सुखावले. त्यांनी प्रधानाला बोलावून अनुज्ञापत्र पत्रिका सांगितली. इतरांच्या दृष्टीने ते निर्जीव पत्र होते पण येथे प्रधान हा सजीव पत्रच होता. लिहिणारे वरिष्ठ विश्वामित्र हे त्याच्याहून परम पवित्र होते. क्षराक्षराहून पलीकडे असलेला श्रीराम होता. विश्वामित्रांनी पत्रिका पूर्ण करून प्रधानाकडे दिली. त्या पत्रिकेचा सूचक अर्थ केवळ एक श्रीवसिष्ठच जाणू शकतील; इतरांना तो अर्थ जाणणे कष्टप्रद होईल. प्रेमकुंकुम लावलेली ती पत्रिका शोभिवंत आणि त्रिजगतात श्रेष्ठ ठरावी अशी होती.

प्रधानाचे अयोध्येकडे गमन - निवेदन

प्रधान मनोरथांच्या रथात बसला. चार पुरुषार्थांचे घोडे जोडलेला तो रथ, मनाच्या गतीला मागे टाकणाऱ्या गतीने निघाला. अशा रीतीने प्रधान लगेच शीघ्रगतीने मार्गस्थ झाला. तो तिसऱ्या वस्तीला पोचला. पहिली वस्ती श्रवणमननपुरीत, दुसरी निदिध्यासनगरीतली वस्ती आणि तिसरी वस्ती साक्षात्काराची, असा तो अयोध्यानगरीत

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

पोहोचला. अयोध्या ही मोक्षपुरी हे पहिले, दुसरे तिथे अजाचा पुत्र दशरथ राज्य करत होता आणि ती श्रीरामाची स्वतःची नगरी होती. प्रधान तिथे पोहोचला. त्यांनतर तो राजसभेत गेला. ती राजसभा श्रीवसिष्ठांमुळे एवढी श्रेष्ठ की तिच्यापुढे इंद्रसभा बापुडी ठरावी. ती सभा प्रधानाने आवडीने पाहून विजयाची पताका उभविली. तो म्हणाला, "सीता ही अत्यंत सुंदर असून शिवधनुष्यभंग केल्याने श्रीरामाला वरणार आहे. आपल्याला त्याचे आमंत्रण करण्यासाठी मी आलो आहे." असे प्रधानाने सांगताच अयोध्येत आनंदीआनंद निर्माण झाला. नंतर प्रधानाने सर्व प्रसंग वर्णन केले. "श्रीरामाने पुरते ओढलेही नव्हते तेवढ्यात ते कडकडाट करीत भंगले. त्या नादाच्या धाकाने रावण खाली पडला, सभा मूर्च्छित झाली. धनुर्भंगाच्या कडकडाटाने अनेक राजे मूर्च्छित झाले. कृतान्त काळाची मुरकुंडी वळली. त्याने थोर धाक घेतला. श्रीसद्‌गुरू कौशिकांनी राम-लक्ष्मणांचा अभ्यास करवून घेऊन त्यांना सुविद्य केले आहे. पराक्रमात ते थोरांहून थोर झाले असून त्यांनी त्रिभुवनात यश मिळविले आहे. जनकाने स्वयंवरासाठी नेमलेला पण कठीण होता. शिवचापाला जो कोणी दोरी चढवून सज्ज करील त्यालाच जानकी माळ घालील असा तो अवघड पण होता. त्या जनकाच्या नेमलेल्या पणाला समर्थ श्रीरामाने सिद्धीस नेले. सर्व सभाजनाला मागे टाकले आणि त्यामुळे श्रीरामाने सीता जिंकली आहे."

राजा दशरथ आणि प्रजा आनंदित

प्रधानाचे सुख देणारे भाषण ऐकताच सभेने जयजयकार केला, निशाण-भेरी वाजविल्या, मंगलवाद्यांनी आल्हाद निर्माण केला, घरोघरी गुढ्या उभारल्या आणि परमानंदाने अयोध्येतील नरनारी श्रीरामाने जनकाच्या स्वयंवरसभेत पण जिंकून सीतासुंदरी वरिली हेच बोलत राहिले. श्रीरामाची कीर्ती आणि थोरवी वर्णन करून प्रधानाने सभेत दंडवत घातले. दशरथ प्रधानावर संतुष्ट झाला. त्याने. मुकुट, कुंडले देऊन आणि त्याला वसिष्ठांपाशी बसवून त्याचा गौरव केला. नंतर राजा दशरथाने राजभांडारातून अपार दानधर्म उदारपणे केला. गाईंची खिल्लारे, धान्य यांचे ब्राह्मणांना दान दिले. राजा परमानंदात मग्न झाला, वसिष्ठ पूर्ण सुखावले, प्रधान अती सुबुद्ध असल्याने त्याने त्याच वेळी पत्र दिले. विश्वामित्रांनी सर्व सिद्धींच्या पूर्ततेसाठी त्या पत्रिकेत मोठ्या युक्तीने प्रथम सद्‌गुरूंना विनंती करून नंतर राजाच्या कार्याचा भाग लिहिला होता.

श्रीवसिष्ठ पत्रिका वाचतात

श्रीवसिष्ठांनी पत्रिका वाचल्यावर त्यांना श्रीरामाचा थोर प्रताप समजला आणि त्यांच्या डोळ्यांत आनंदाश्रू उभे राहिले. ते म्हणाले, "धन्य विश्वामित्र, दशरथाचे भाग्य थोर, आम्ही सारेच भाग्यवान, धन्य जानकीचे अष्टांग की जे रामाचे अर्धांग पावली. श्रीराम हा अवतारी बाळलीला करून त्या बाळपणातच अजोड पराक्रम करतो आहे. धन्य जनककन्या जानकी, जिने स्वतःचा पती म्हणून हा ब्रह्मपुतळा मिळविला." अशी पत्रिकेची वसिष्ठांनी अत्यंत प्रेमाने प्रशंसा केली. त्या पत्रिकेत लिहिले होते, ॐनमो स्वामी वसिष्ठा, आत्मज्ञानश्रेष्ठा, परमानंदाने आपली प्रतिष्ठा जाणून ही विनंती ऐकावी. आपली आल्हाददायी भेट व्हावी अशी जनकाला मोठी उत्कंठा लागली आहे. वधुवरांना कृपादृष्टीने पाहून, आपणाकडून लग्नकार्य संतोषाने व्हावे. स्वयंवरात श्रीरामाने धनुर्वेध करून निश्चितपणे सीतेला जिंकले आहे. आपण कृपानिधी आहात. आपल्या येण्याने लग्न सिद्धीस जाईल. हे प्रकृति-पुरुषाचे पाणिग्रहण असून आपल्याकडूनच ते पूर्ण होईल कारण आपण कारणाचे कारण आहात. हे लग्न आपणामुळे सुलग्न होईल. दशेंद्रिय दशरथाचा कर्ता, नियंता हे आपणच आहात. श्रीराम-सीता यांचे पाणिग्रहण

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and Academy

आपणच मुख्य कर्ता आणि कुलगुरू म्हणून करावे. आपली आज्ञा अत्यंत समर्थ असते. आपल्या छातीला आदित्य गगनातून वंदन करतो. आपल्यामुळेच रघुवंश सनाथ असून आपणच लग्न समाप्तीस न्यावे ही विनंती. "

याप्रकारे श्रीवसिष्ठांना विनंतिपूर्वक विश्वामित्रांनी लिहिले. जनकाने दशरथ राजाला पत्रातून प्रार्थना केली होती की, 'स्वस्ति श्रीअजात्मजा (अजाच्या पुत्रा), सूर्यवंशाच्या वंशध्वजा, दशरथा महाराजा, श्रीराम तुमचा आत्मविजयी आहे. प्रतापामध्ये आगळा आहे. स्वयंवरात त्याने जानकीला वरिले आहे. त्यांच्या लग्नाचा सोहळा पाहण्यासाठी आपण अवश्य यावे. श्रीरामाच्या मातांना सुखाने आणावे. भरत, शत्रुघ्न यांनाही हत्तीवरून आणावे. आपले सुहृद, सोयरे, सेनानी, लहानथोर सेवक, असे सहपरिवार येऊन स्वयंवराचा सोहळा पाहावा.' असे जनकाचे आमंत्रण-पत्र वाचून दशरथाला थोर आनंद झाला. त्याने लगेच आपल्या प्रधानाला आज्ञा देऊन रथ, हत्ती यांना शृंगारण्यासाठी पाठविले. दशरथ म्हणाला. "धन्य सद्गुरू विश्वामित्र, त्यांनी श्रीरामाला अत्यंत चांगला धनुर्धर बनवून त्याच्याकडून थोर पराक्रम घडविला. अति कठीण असा त्राटिकावध, यज्ञप्रसंगी घोर राक्षसवध हे करवून आता चापभंगाने सीतासुंदरी रामचंद्राला वरते आहे. हा सर्व गुरुविद्येचाच प्रभाव आहे. आम्ही त्या श्रीसद्गुरूंकडून अनंत उपकार करून घेतले आहेत. तेव्हा आता त्या ऋषींची आज्ञा आहे की आम्ही लग्नार्थ यावे, तेव्हा आम्हाला सर्वार्थाने तेथे जाणे आवश्यक आहे."

मिथिलेला जाण्यासाठी सिद्धता

राजा दशरथाने अयोध्येत रात्र काढली आणि दुसरे दिवशी सुमंत प्रधानाला सांगितले की, "श्रीराम आणि सीतेच्या विवाहासाठी लगेच मिथिलेला जायचे आहे. भांडारे उघडा, द्रव्याच्या कोटी कोटी राशी काढून त्या हत्ती-घोड्यांच्या पाठीवर भरून घ्या. जे उरेल ते गाड्यांमधे भरा. मुकुट, कुंडले, अलंकार, रत्ने, मोती यांचे संभार, तसेच सुती, पटसूत्री, रोमसूत्री अशी अनेक आणि निरनिराळ्या प्रकारची वस्त्रे बरोबर घ्यावी. राजपत्न्या अती सुकुमार असून सालंकृत आणि वस्त्रे ल्यायल्या आहेत. त्यांना पालव छत्रे देऊन अति शीघ्र पुढे चालू द्या. राजा दशरथाला सालंकृत आणि मनोहर अशा भरत, शत्रुघ्न या आपल्या पुत्रांना पाहून आनंद झाला. त्यांना राजाने लगेच रथात बसविले. सेनापती, वीरवर, शृंगारलेला सैन्यसंभार, टकेपताका, वाद्यांचा गजर, रथांचा आणि हत्तींचा घडघडाट अशी ती सेना एकत्रच चालू लागली. नाना प्रकारची वाद्ये, हत्तींच्या भारदस्त गर्जना, भाटांचे मोठ्याने गाणे, यांच्या नादाने सर्वत्र भारलेल्या वातावरणात सेना पुढे पुढे जात होती. वीरांच्या आरोळ्या, सिंहनाद, टाळ्यांचा कडकडाट करीत ते राजकुळ जनककन्येच्या विवाहाला निघाले. त्या वेळी उत्तम रथ आणवून दशरथाने त्यात महाऋषी वसिष्ठ, वामदेव, कश्यप, मार्कंडेय, जाबाली, कात्यायन आणि राजापाशी नित्य राहणारे ज्ञानगंभीर ऋषीवर यांना अपार निष्ठेने बसविले. ज्यांच्या थोरवीने कलिकाळही पाया पडायला येतो असे निधडे ऋषीही रामाच्या वऱ्हाडात आले. अशाप्रकारे दोन्ही बाजूंना ऋषेश्वर आणि मधे राजकुमारांसह राजा, पृष्ठभागी सैन्यसंभार या पद्धतीने ते सारे मिथिलेला निघाले.

नामकीर्ती, विरक्ती, भक्ती या तीन मुक्कामांवर वस्ती करून चौथा मुक्काम श्रीराम येथे करून त्यांनी आत्मप्रेमाने त्याची भेट घेतली. त्या पहिल्या तीन मुक्कामांपर्यंत ज्यांची स्थिती त्यांनाच श्रीराम निश्चित भेटेल. दृश्य, द्रष्टा, दर्शनस्थिती या तीन वस्तींचे मुक्काम पार केल्यावरच चौथ्या ठायी श्रीराम निश्चित भेटेल. विदेहनगरीत विदेहगतीत श्रीराम सहजस्थितीत

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

राहिला होता. तिथवर जो जाईल त्याला श्रीराम निश्चित भेटेल. विदेह श्रीराम लवकर भेटेल. त्यासाठी ज्यांनी साधन चतुष्टय शृंगारले आहे, चार पुरुषार्थांचे अलंकार त्याले आहेत अशा धीट वीरांना तो निश्चित भेटेल. अशाप्रकारे टप्प्याटप्प्याने विदेहाचे नगर जी मिथिला तिथवर सर्व पाहोचले. ती नगरी मनोहर आणि सुंदर होती. त्यांनी मूळचे चार मुक्काम पूर्ण केले आणि विदेहनगरीला पोचल्यानंतर दशरथ आणि जनक यांची भेट झाली. त्यांनी एकमेकांशी गोड गोष्टी केल्या आणि दोघेही सुख, संतोष पावले.

रामायणाचे खरे सार म्हणजे हे सीतास्वयंवर, कारण यामुळे प्रकृती-पुरुष एकाकार झाले. त्यांचे सुलग्न झाले. ज्याच्यामुळे नवखंड पृथ्वी पावन, ज्याच्यामुळे पिंड-ब्रह्मांड पावन, त्याच्या लग्नाची ही कौतुककथा सांगायलाही गोड वाटते आहे.

अध्याय बाविसावा

श्रीरामाशी संलग्नता, सर्वांगाने समरस झालेली सीता, असे हे सुलग्न, त्याची कथा आता ऐका. मार्गातील चारी वस्ती करून राजा दशरथ विदेहपुराला आला. तेथे श्रीराम विजयी झाला होता. विदेहपुराला जे वस्तीला येतात ते त्रिभुवनात विजयी होतात. विश्वामित्रांनी मित्रभाव दाखविला आणि वसिष्ठांना गुरूत्व दिले. श्रीवसिष्ठांनी श्रीरामाला धनुर्विद्या शिकविण्यासाठी विश्वामित्रांना गुरूपण दिले आणि स्वतः ब्रह्मविद्यासद्गुरू राहून श्रीरामाला विजयी केले. श्रीवसिष्ठांविषयी निर्धाराने निष्ठा जपणारा राजा दशरथ विदेहपुरीला आला. ती नगरी रत्नकळसांच्या ओळींनी तेजस्वी बनून आकाशातल्या सूर्यालाही मागे टाकणारी होती. दशरथ जेव्हा नगरीत आला तेव्हा छत्रे, अब्दागिरी, मंगलवाद्यांचा गजर असा एकच थाट उडाला.

जनकाकडून सर्वांचे स्वागत

राजा दशरथ आल्याचे समजताच जनक राजा सामोरा आला. त्याच्या बरोबर शतानंद पुरोहित आणि प्रधानमंडळही आले. जनकाने श्रीवसिष्ठ समोर दिसताच त्यांच्या चरणांना मिठी घालून म्हटले, "आपल्या चरणाच्या अंगुष्टी जगदुद्धाराचे सामर्थ्य आहे. या सृष्टीत मी खरोखर एक भाग्यवान ठरलो की मला आपले चरण प्राप्त झाले. यामुळे माझे कुळ पवित्र झाले, माझे पितर तृप्त झाले, माझा वंश सनाथ झाला. श्रीवसिष्ठ भेटणे अत्यंत इष्ट होते कारण त्यांच्यामुळे अनिष्ट ते इष्ट होते; थोर भाग्य वाट्याला येते; मी थोर दास ठरलो." वसिष्ठ हे अत्यंत ज्ञानी होते. त्यांना जनकाचा पूर्ण सद्भाव जाणवला. त्या दोघांनी आलिंगन भेटीने मनातले समाधान व्यक्त केले. दोन दीप एक व्हावे आणि द्वैत संपून एकच प्रकाश निर्माण व्हावा तसे त्यांच्या भेटीने अभेदवृत्तीचा आल्हाद दोघांना एकदमच मिळाला. वसिष्ठ देहीच विदेही तर जनक हा सहजच विदेही म्हणून दोघेही निःसंदेह विदेही; ते आलिंगनाने भेटले. जनक-वसिष्ठ भेटीचा आनंद सृष्टीत न सामावणारा होता.

नंतर जनकाला राजा दशरथ दृष्टीस पडताच त्यांनी एकमेकांना आलिंगन दिले. जानकीचा पिता आणि श्रीरामाचा पिता यांची भेट सर्वांना आनंद देणारी होती. दोन समर्थ एकमेकांना भेटले त्याने रघुनाथ सुखावला, सीतेचे मनोरथ पूर्ण झाले. दोन्ही राजांना एकमेकांविषयी प्रेम होते, दोन्ही राजे सुखसंपन्न होते. सीता-रामाचे लग्न लवकर व्हावे अशी दोघांची इच्छा होती. दशरथाबरोबर आलेले भरत आणि शत्रुघ्न पाहून राजा जनक, त्याचे प्रधान आणि मिथिलेचे नागरिक आश्चर्यचकित होऊन 'हे काय राम-लक्ष्मण इथे कसे आले?' असा स्वतःला प्रश्न विचारू लागले. 'तिकडे राजभवनात त्यांचा काही अपमान झाला. किंवा विधिविधानात चूक झाली. म्हणून तर ते

https://archive.org/details/@sultan_lakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Research Academy Gangotri

राम-लक्ष्मण रुसून इथे आले काय?' या विचाराने जनक अस्वस्थ झाला. 'मी विश्वामित्रांना विचारून इकडे आलो तेव्हा राम-लक्ष्मण गुरूसेवेत मग्न असलेले मी पाहिले होते. आता तेच दोघे दशरथाजवळ इतक्या तातडीने कसे आले?' असा विचार करून जनकाने वसिष्ठांनाच प्रश्न केला, "हे ऋषिवरा, राम आणि लक्ष्मण हे दोघे रुसून इथे का आले, माझ्याकडून रीतीत काही चुकलो का?" यावर वसिष्ठांनी सांगितले, "रामलक्ष्मण हे ज्येष्ठ आणि भरतशत्रुघ्न हे कनिष्ठ." परंतु या सांगण्याने जनकाला स्पष्ट काही कळले नाही. "राम आणि लक्ष्मण यांच्याशी रूपरेखेत समान त्यांचा ठाणमाण, गुण, लावण्य सारे राम-लक्ष्मण यांच्यासारखे आहे; तर मग तुम्ही सांगता ते भरत-शत्रुघ्न कोण?" हा जनकाचा प्रश्न ऐकून वसिष्ठांना हसू आले. मग त्यांनी स्वतः जनकाला जवळ बसवून पूर्ववृत्तान्त सावकाश निवेदन करायला आरंभ केला.

दशरथपुत्रांचे वसिष्ठकृत वर्णन - त्यांचे विवाह

वसिष्ठ म्हणाले, "भरत हा रामपिंडाचा अर्धभाग असल्याने रामरूप दिसतो. शत्रुघ्न सौमित्राचा म्हणजे लक्ष्मणाचा अर्धाभाग असल्याने तो सर्वांगाने त्याच्यासारखा आहे. हे चौघेजण एकरूप असून चार वेगळे भासतात." हे ऐकून जनकमनाला आश्चर्य वाटले, तो स्तब्ध झाला. त्याच वेळी विश्वामित्र हे श्रीराम आणि लक्ष्मण यांना घेऊन तेथे आले. दशरथाचे चारही पुत्र एकत्र आले आणि त्यामुळे एक वेगळीच शोभा आली. ते चार सूर्यच भासत होते. तसेच ते एकरूपही दिसत होते. हे सारे पाहून व ऐकून जनकाला आनंद झाला.

नंतर जनकाने सूचना केली की माझा कनिष्ठ बंधू कुशध्वज म्हणून आहे. त्याच्या रूपवान दोन कन्या भरत आणि शत्रुघ्नांच्या वधू नियोजित करू आणि लक्ष्मणाला उर्मिला देऊ. अशाप्रकारे जनकाचा मनोरथ म्हणजे चौघा बंधूंसहित श्रीराम हा जावई जोडण्याचाच प्रकार होता.

दशरथाकडून विश्वामित्रांची स्तुती - त्यांचे उत्तर

श्रीराम आणि लक्ष्मण यांना घेऊन विश्वामित्र आले तेव्हा दशरथाने त्यांच्या पायांवर लोटांगण घातले; चरणांना नमन केले, आणि मग म्हणाला, "आपली धनुर्विद्या समर्थ आहे. आपल्यामुळेच श्रीराम विजयी झाला आणि त्याची कीर्ती झाली. ताटिकेचा वध, सुबाहूचा घात आपल्यामुळेच घडून आले. आपल्यामुळेच जानकी प्राप्त झाली. खरोखर आपण अती समर्थ आहात, ऋषिवर्य, मी असा कृपण - आप्पलपोटा - की मी राम-लक्ष्मण देणार नाही असे त्या वेळी म्हणालो होतो. परंतु आपण त्यांना घेऊन आलात एवढेच नाही तर त्यांना यशाने विभूषित केलेत. आपले शिष्यपण हे त्रिलोकी मिरविण्यासारखे भूषण आहे. अशी भूषणे श्रीशिवाला कंठाभरणाने लेवविलीत."

त्यावर विश्वामित्र हसतहसत उत्तरादाखल म्हणाले, "अरे राजन्, रामचंद्रामुळे मीच पवित्र झालो आहे. श्रीरामाने माझे शिष्यत्व पत्करल्याने मी महान् गुरू असल्याचा त्रिलोकी डंका झाला आणि वंदना झाली. श्रीरामामुळेच माझे जीवन सुफलित झाले आहे. मला जन्म-मरण उरले नाही. पूर्वी यज्ञाच्या संबंधात मी अनाथ होतो, पण श्रीरामाने कर्म-अकर्माचा घात करून मला सनाथ केले. त्याचाही त्याला संतोषच वाटतो आहे. श्रीरामाने माझे शिष्यत्व स्वीकारून एक नवलच केले आहे. मला देहवंताला तो विदेही वंदन करतो आहे. रामकीर्ती काय सांगावी! त्याच्या चरणस्पर्शाने पाषाणही पवित्र होतात. ज्याच्यामुळे पापातून पाषाण तरून जातात, त्याचे गुरुत्व मी कोण करणार, पण या गुरुत्वाने मला धन्य वाटते आहे. माझ्या यज्ञाचे हे फळ समज, श्रीराम परिपूर्ण ब्रह्म आहे." विश्वामित्रांनी असे सांगितल्यावर सर्वांनी श्रीरामाचा जयजयकार केला, फुले उधळली.

https://archive.org/details/muthulakshmiacademy Bhuvan Vani Trust, Lucknow

CC-0. In Public Domain. Digitized By Sayyamuth Foundation Trust and eGangotri

रामप्रेमाने विश्वामित्र मूर्च्छित झाले. तेव्हा श्रीवसिष्ठांनी तेथे येऊन विश्वामित्रांना सावध केले. "आपण श्रीराम परब्रह्म म्हणालात ते योग्य आहे," असे त्यांनी विश्वामित्रांना सांगितले. दशरथाने राम आणि लक्ष्मण यांना मिठीत घेऊन आपली भावना व्यक्त केली. त्यांच्यावरून रत्ने, धन, धान्य, यांची ओवाळणी केली आणि जवळ बसविले. श्रीवसिष्ठ आणि श्रीविश्वामित्र यांनी श्रीराम परिपूर्ण ब्रह्म असल्याचे म्हटले त्याचा जनकाला अत्यानंद होऊन, तो लवकर लग्नसोहळा करायला उत्सुक झाला.

दशरथाच्या चार पुत्रांच्या लग्नाची तयारी

राजा जनकाने पुरोहित शतानंद याला कुशध्वजाला घेऊन येण्यासाठी पाठविले. "कुशध्वज हा आम्हाला कनिष्ठ बंधूच आहे. मी संकाशा नावाच्या नगरीत प्रतिष्ठापूर्वक राज्य स्थापन केले आहे. त्याला दोन कन्या असून त्या लावण्यसुंदर आहेत. हा संबंध योग्य आहे. त्या कन्या भरत आणि शत्रुघ्न यांना द्याव्या. तेव्हा त्याला सत्वर येऊन लग्न साधण्यासाठी बोलवावे." असा शतानंद आणि इतरांसाठी जनकाने अभिप्राय व्यक्त केला. हे जनकाचे आमंत्रण स्वीकारून कुशध्वज शीघ्रतेने आला. त्याने जनकाला नमन करून नंतर आलिंगन दिले. नंतर यथावकाश जनकसभा भरली. त्याने दशरथाकडे लग्नदिवसाची निश्चिती करण्यासाठी आमंत्रण धाडले. राजा दशरथ आपल्याबरोबर वसिष्ठ, वामदेव, कश्यप, कात्यायन, जाबाली, मार्कंडेय अशा तपोबलधारी ऋषींना घेऊन आला. त्या वेळी मित्र आणि सुहृदजन हेही त्याच्याबरोबर होते. या सर्वांचा जनकाने यथोचित सन्मान केला आणि विचारपूर्वक लग्नतिथी निश्चित करण्यासाठी बैठक सुरू केली. दोन्ही वंशांची वंशावळ अभ्यासण्यासाठी आणि सत्कुळी विवाह होत असल्याचा शोध घेण्यासाठी ऋषींना सांगितले. वराच्या संपूर्ण कुळाचे आद्यंत निवेदन कुळदैवतच अशा श्रीवसिष्ठांनी करावे असे ऋषिसमुदायाने ठरविले.

श्रीवसिष्ठ सूर्यवंशवर्णन करतात

श्रीवसिष्ठांनी ऋषींच्या वचनाचा आदरपूर्वक स्वीकार करून निवेदनास आरंभ केला. "सूर्यवंशात अत्यंत पवित्र राजे होऊन गेले. सूर्यवंशाची ख्याती अशी की महापापी मुक्त होत. या वंशातला एक एक चक्रवर्ती राजा त्रिजगताचे भूषण ठरलेला आहे. सूर्याचा पुत्र मनू हा मुख्य, त्याचा पुत्र इक्ष्वाकु हा सर्वार्थाने पवित्र होता. त्यानेच अयोध्या नगर स्वतःच्या निवासासाठी निश्चित करून मुक्तक्षेत्र केले. सूर्यवंशातल्या पुत्र-पौत्रांना त्याच्यामुळेच इक्ष्वाकुनंदन म्हटले जाते. माझे पदव्याख्यान तसेच आहे. याच वंशात चक्रवर्ती पृथू झाला. सृष्टी रसातळाला जात असता यानेच आपल्या आत्मशक्तीने उचलून धरले म्हणून तिला पृथ्वी हे नाव रूढ झाले. त्याने पृथ्वीचे दोहन करून सर्व लोकांना सुखी केले. पूजाभक्तीने पूर्ण पवित्र असा तो सूर्यवंशातले अनर्घ्य रत्नच होता. याच वंशातला उत्तानपाद हा राजा होता. त्याचा पुत्र ध्रुव याने बालपणीच देव प्रसन्न करून घेऊन स्वतःसाठी अढळपण मिळविले होते. सूर्यवंशी मांधाता हा योनिद्वारे न जन्मता, पित्याच्या कुशीतून जन्मला आणि तरी त्याने आपल्या उत्पन्नकर्त्यास मरण येऊ दिले नाही. सत्वराशी चक्रवर्ती शिबी राजा हा याच वंशातला; त्याने पक्ष्यासाठी स्वतःचे मांस तोलून दिले. त्याच्या पुण्याईने नगरी वैकुंठाला नेली. अत्यंत पवित्र अशा सूर्यवंशात हरिश्चन्द्र जन्मला. त्याने स्वप्नात दानविधी उपचार केला तो जागृतावस्थेत सत्य करून दाखविला. ठरलेली संपूर्ण दक्षिणा देण्यासाठी तो डोंबाच्या घरी परतंत्र सेवक झाला. स्त्री-पुत्र विकून त्याने विश्वामित्र सुखी केला. रुक्मांगद याच वंशातला. त्याने एकादशी व्रत पाळून आपली नगरी वैकुंठाला नेली. त्याने आपल्या व्रताने जगदुद्धार केला. सुरासुरांना लुबाडणारा वैरी

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

धूमांकित पाताळविवरात गेला. त्याला शोधून ठार करणारा धुंधुमार रविवंशातच जन्मला होता. त्याचा पुत्र धर्मांगद हा एकादशीव्रतात आनंद मानणारा आणि स्वतःचे शिर देतानाही खेद न मानणारा, परमानंद पावला."

"सूर्यवंशात असे राजे होऊन गेले की एकापेक्षा चढ एक असे ख्यातनाम होते. त्या राजांची कीर्ती ऐकून लोक पावन होतात. अंबऋषी याच वंशातले. त्यांनी द्वादशीचे व्रत साधून देवाला गर्भवासात आणले आणि दुर्वासऋषींना वाचविले. याच वंशात सगर राजे झाले. त्यांच्यामुळेच सागर नाव रूढ झाले. कपिलमुनींच्या शापाने ते जळत असता त्यांचा उद्धार भगीरथाने केला. भगीरथाने आपल्या आत्मशक्तीने भागीरथी आणून कित्येक पूर्वज तारले आणि त्रिजगताचा उद्धार केला. भगीरथाचा पुत्र पुरंजय युद्धात प्रवीण होता. देव-दैत्य यांच्यात युद्धसंधी घडून आली असता याला इंद्राने खांद्यावरून आणून युद्धार्थ प्रेरिले. हा इंद्राच्या ककुदी (इंद्र बैलाच्या रूपात म्हणून त्याच्या वशिंडावर) बसून लढला म्हणून त्याला काकुत्स्थ म्हणतात. त्याच्या नावाची खूप ख्याती झाल्याने श्रीरामालाही काकुत्स्थ ही संज्ञा मिळाली आहे. सूर्यवंशातले राजे अत्यंत निष्पाप आहेत. दिलीप राजा हा त्यातलाच. त्याने पुत्रप्राप्तीच्या इच्छेने कामधेनूची उपासना केली. कामधेनू प्रसन्न झाली आणि दिलीप राजाला रघू हा सुलक्षणी पुत्र झाला. ज्याच्यामुळे वंशात रघुनंदन ही संज्ञा वापरली जाते. रघूचा पुत्र अज हा महापराक्रमी होता. अखिल भूमंडळात तो प्रतापी ठरला. त्याचे शत्रू बोकडासारखे बें-बें करीत त्याच्या पायाशी असत. त्या अजाचा पुत्र हा दशरथ."

"दशरथाने दैत्यगुरू शुकाचार्य याला युद्धात पराभूत केले त्यामुळे तो स्वर्गात यशवंत ठरला आणि अमरेंद्राने त्याचा सन्मान केला. तसेच दशरथाने दैत्यगुरूचा पराभव केला म्हणून देवगुरू बृहस्पतीला आनंद झाला, त्याने दशरथाला आलिंगन देऊन त्याला स्वतःच्या नगरीस धाडला. त्या दशरथाचे हे चौघे जण, श्रीराम, लक्ष्मण, धाकटे भरत आणि शत्रुघ्न, आदिकारण होत. श्रीरामाने ताटिकेचा नाश केला. सुबाहू राक्षससमूहासह मारला चरणाने शिळा उद्धरली आणि बलात रावणाला स्पष्ट अपमानास्पद केला." अशाप्रकारे वसिष्ठांनी उच्च स्वरात आनंदाने सूर्यवंशाचे वर्णन केले. ते ऐकून सुरगणांनी पुष्पवृष्टी केली. जनकाचे मन हर्षपूर्ण झाले. महासिद्धींनी टाळी पिटली. 'धन्य धन्य जनकबाळी, तिचे सद्भाग्याने या कुळात लग्न होते आहे' असे उद्गार काढले. स्वतःच्या वंशाचे वर्णन ऐकून दशरथाने आनंदाने वसिष्ठांवरून लक्षकोटी गाई ओवाळून दान दिले. नंतर महाऋषी वसिष्ठांना स्थानापन्न करून तो म्हणाला, "आपण सूर्यवंशाचे सद्गुरू आहात हे त्या वंशाचे भूषण आहे. सूर्यवंशातले जे जे राजे, त्यांचा महाप्रताप आपण सांगितलात पण तो सारा आपल्या आणि सद्रूप सद्गुरूपणाचाच परिणाम आहे. ज्याप्रमाणे सूर्य आपल्या तेजाने सूर्यकांती, तेजस्वी प्रकाश देतो, त्याप्रमाणे आपल्या कृपेनेच सूर्यवंश प्रतापी ठरला आहे. अचेतन अशी आपली कृपादृष्टी, सूर्यमंडळात तळपणारी छाटी असे आपले माहात्म्य असल्याने आपला अनुग्रह झाल्यानेच शिष्य सृष्टीत विजयी झाले." श्रीवसिष्ठांचे वक्तृत्व ऐकून सभेला परमानंद झाला. जनकाच्या परम भाग्याने त्याला श्रीरामाशी हा लग्नसंबंध जुळविता आला.

अध्याय तेविसावा

वसिष्ठांनी सूर्यवंशावळी वर्णिली. ते प्रांजळ कथन ऐकून जनक नम्रपणे हात जोडून उभा राहिला आणि त्याने आपल्या कुळाचे वर्णन करायला आरंभ केला.

जनकाच्या कुलपरंपरेचे वर्णन

"माझ्या कुळातले राजेही कीर्तिवंत आणि प्रबळ होते. कृपया राजेश्वराने माझ्या सर्व कुळाची विस्ताराने माहिती सांगतो ती ऐकावी. कारण

https://archive.org/details/muthulakshmiacademy Bhuvan Vani Trust, Lucknow

CC-0. In Public Domain. Digitized By Sarayu Foundation Trust and eGangotri

कन्यादान करताना सर्व कुळ सांगावे लागते ते मी स्वतःच मुळापासून कथन करतो. आमच्या कुळातला निमी राजा हा त्रिलोकी कीर्ती मिळविलेला होता. वसिष्ठांच्या शापस्थितीने जगाचे पाहणे हीच ज्याची वस्ती होती, ज्याच्यामुळे डोळे पाहण्यास समर्थ होतील असा तो निमी म्हटला गेला. निमिषानिमिषाची गती ज्याच्यामुळे रात्रंदिवस चाले असा तो असल्याने त्याला निमी म्हणत हे नरनाथाने जाणावे. निमीचा पुत्र मिथी हा सोज्वळ होता. त्यानेच आपल्या कर्तृत्वाने ही नगरी वसविली म्हणून हिला मिथिलानगरी नाव आहे. या नगरीच्या निमित्ताने त्याने आपल्या नावाचा सोहळा संपादिला. मिथीचा पुत्र पहिला जनक. तो अत्यंत सात्त्विक असून त्याने प्रजेला पुत्रवत् पाळले. यावरूनच त्याला लोक जनक म्हणू लागले. त्याचा पुत्र धृष्टकेतू जनकवंशात तो दळ आणि बळ यामुळे प्रतापी म्हणून प्रसिद्ध झाला. त्याच्यापासून पुढे जनक नावाचे अनेक नृपती होऊन गेले. ते असंख्य असल्याने ही कथा फारच वाढेल. बहुलाश्वजनक, स्वकीर्तिजनक, स्वदेहजनक, विदेहजनक इत्यादींमधला मी एक जनक असून आपला सेवक आहे." वंशावळ सांगणे वाढवत राहिले तर ते कथन फारच लांबेल असे जनकाला वाटले शिवाय त्याला लग्नात रघुनाथ प्राप्त व्हावा याची उत्कंठा वाटत असल्याने त्याने थोडक्यात आवरायचे ठरवून म्हटले, "आमचे राज्य बळकवावे आणि सीतेला हिरावून न्यावी या इच्छेने सुधन्वा रागाने चालून आला आणि त्याने मिथिला नगरीला वेढा दिला. त्यावेळी मी त्याच्याशी युद्ध करून, त्याला ठार मारले. त्याचे राज्य जिंकून मी कुशध्वजाला त्या राज्यावर बसविले. कुशध्वज माझा धाकटा भाऊ आहे. तो प्रतापात थोर आहे. त्याच्या दोन कन्या वधू नेमस्त करून हा लग्नसंबंध करावा अशी त्याची इच्छा आहे."

विवाहविषयक संकल्प, संमती, देवक

नंतर लग्नाविषयीचा संकल्प ठरविण्यात आला. त्यामध्ये सीता श्रीरामाला दिली जावी, ऊर्मिला लक्ष्मणाला, मांडवी भरताला आणि श्रुतकीर्ती शत्रुघ्नाला असे ठरले. चौघे बंधू, चौघी वधू योजिल्या, त्याला ऋषींनी 'योग्य संबंध आहे,' असे म्हणून निश्चय व्यक्त केला. वसिष्ठ, विश्वामित्र, वामदेव यांनी "अपूर्व, श्लाघ्यसंबध गौरवाचा, भाववैभवात समसाम्य" असा अभिप्राय व्यक्त केला. तसेच त्यांनी हेही सुचविले की, "आजपासून तिसऱ्या दिवशी उत्तराफल्गुनेच्या शुभदिनी अभिजित मुहूर्त मध्याह्नीचा साधून चौघांची लग्ने लावावीत." वसिष्ठविश्वामित्रांचे वचन ऐकून दशरथाने ते मस्तकी धारण केले आणि तो संमती देत म्हणाला, "आपले वचन आम्हाला अत्यंत प्रमाण आहे. चौघांचे लग्न करायचे आहे. जनक आणि कुशध्वज हे राजे म्हणजे दोघेही व्याही परमार्थी आहेत. रघुपती विजयी झाला ती कीर्ती तुमच्यामुळेच आहे. लग्न करायचे हे प्रमाण." यावर वाद्यांचा गजर करण्यात आला. दोन्ही राजांना आणि सुहृदजनांना परमानंद झाला.

राजा दशरथ जनकाला विचारून, महाऋषींना बरोबर घेऊन त्वरेने जानवशात आला. देवकाला आरंभ झाला. जनक सर्वांना विनवत, हात जोडून ऋषिवरांना सांगत होता, "मी आपला शिष्य आणि सेवक म्हणून सर्वपरिवार, बंधू आणि सैन्य यांसह तत्पर आहे." श्रीरामाच्या लग्नाचा महान् उत्साह दोन्ही मांडवात दिसला. अनेक ऋषींचा समुदाय एकत्र झाला. मोठ्या नवलाईचा हा लग्नसोहळा सुरू झाला.

लग्नमंडपाचे वर्णन

श्रीरामाच्या विवाहासाठी उभारलेल्या मंडपाचे चार खांब म्हणून स्वतःसिद्ध चार वेद होते. त्यावर धैर्याचे खांब आखले होते. निकोंभ विवेकाचे वासे घातले होते. त्यावर स्मृतिपुराणांचे आच्छादन, चारी

https://archive.org/details/muthulakshmiacademy
Bhuvan Vani Trust, Lucknow

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

पुरुषार्थांची तोरणे यांची योजना होती. त्यामुळे धर्मद्वारे, जी सलंबपणे मोत्यांच्या घोसांची होती ती शोभत होती. धर्मद्वारे नित्यमुक्त असल्याने द्वार-प्रतिबंध तिथे नव्हता. जे दीनपणे वरापर्यंत येत ते तत्काळ सुखी होत. सुबुद्धी असलेल्या पुरोहित वसिष्ठांनी मंडप उपनिषदांनी कापडला होता. त्याची खरी शोभा अशी होती की मंडप चिदानंदाचा झाला होता. मंडपाच्या वर असलेल्या पताका चिदाकाशी होत्या त्यामुळे दृष्टीला सुख होऊन मंडपातल्यांना आनंद होत होता. दुसरा जो कन्यामंडप तिथले खांब भावाचे होते. शुद्धसत्त्वाचे आडवळे घालून त्यावर विधीचे आच्छादन केले होते. तेथे सद्‌बुद्धीचे दारवंटे तयार केलेले होते.

कन्यामंडपाचे छत धर्म, तर वरमंडपाचे छत ब्रह्म; कन्यागृही कर्माचा देखावा, तर वरगृही कर्म निष्कर्म; कन्यागृहीचे साधन पंक्ती, तर वरगृहीचे साधन शांती; कन्यागृही रत्नज्योती, तर वरगृही आत्मप्रकाश; कन्यागृही नवरसप्रीती, तर वरगृही नवविधा भक्ती; कन्यागृही विधी सर्वार्थी; तर विधिनिर्मुक्ती वरगृही; कन्यागृही चंचल नृत्य, तर वरगृही कीर्तनगजर; कन्यागृही भाटांचे गान, तर वरगृही वेदनागरी, असा एकूण प्रकार होता. कन्यामंडपात चारी नवऱ्या होत्या इकडे वरमंडपात मिथ्या नरनारी होत्या. दोन्ही मंडपांमध्ये अगाध सामर्थ्य आणि थोरवी होती. वसिष्ठांनी दशरथाला सांगून देवकविधी, पुण्याहवाचन, नांदीश्राद्ध करवून घेतले आणि अमाप द्रव्य वाटले.

देवतांना आवाहन-गोदान

श्रीवसिष्ठांनी आवाहन केल्यावर नलिनी, नंदिनी, उमा इत्यादी सर्व मंडपदेवता तेथे मूर्तिमंत अवतरल्या. नवग्रहादी सर्व ग्रह आपली मंडले सोडून त्वरित श्रीरघुनाथाच्या लग्नासाठी मंडपात आले. मंडपदेवता, ग्रह यांनी श्रीरामाला आवडीने वंदन केले. त्यांना विश्वास होता की, हा आमची बेडी तोडेल आणि लंकेची बंधने सोडवील. अशाप्रकारे योग्य आणि विधानोक्त अशा पद्धतीने श्रीवसिष्ठांनी देवकप्रतिष्ठा दशरथाच्या हातून करविली त्यामुळे राजाला आनंद झाला.

राजा दशरथाने नंतर ब्राह्मणांना बोलावून शेकड्यांनी गोदाने केली. ही गोदाने केली जात असताना श्रीराम ध्यानात ठेवून लक्षपूर्वक त्यातील गायींची निवड केली. पान्हा चोरणाऱ्या, खादाड, मरतुकड्या, चुकार, बुजऱ्या, लाथा मारणाऱ्या, लूत लागलेल्या अशा गायी दिल्या नाहीत. अशा गाई दान दिल्या तर ती तत्काळ ब्रह्महत्या ठरते त्यामुळे दानात दुभत्या, शांत स्वभावाच्या अशाच गायींना निवडले गेले. प्रथमविताच्या, वांझ, वृद्ध, अनेक वितांच्या, न देता तरूण, दुभणाऱ्या, मोठ्या आचळांच्या, मूल्यवान, उत्तम अशाच दिल्या गेल्या. सोनेरी शिंगांच्या, रुप्याच्या खुरांच्या, दुभणाऱ्या कासेच्या, क्षौमचर्माच्या, रत्नपुच्छाच्या, सुकुमार, अलंकृत अशांची निवड झाली. जशा गाई दिल्या, तशीच वस्त्रे, दक्षिणा दान देऊन, पुत्राच्या लग्नात दशरथाने दानधर्म करून ब्राह्मणवर्गाला संतुष्ट केले. त्याच वेळी तिळपात्रे, घृतपात्रे, खिरीसहित भोजनपात्रे देण्यात आली. हा सर्व श्रीरामामुळे निर्माण झालेला उत्साह होता. श्रीरामभावनेने भारावलेल्या अनेकांनी दाने केली. प्रत्यक्ष श्रीरामाने आत्मदान करून राजा दशरथाला भाग्यसंपन्न केले.

भरताचा मामा युधाजित येतो

राजा दशरथाने अत्यंत उत्साहाने, वाद्यांच्या गजरात देवकप्रतिष्ठा, दानधर्म केला. त्याच समयी कैकेयीचा थोरला बंधू शूर युधाजित येऊन पोहचला. भरताचा मामा, सुहृत्संबंधी, बहिणीचा मुलगा, कुशल, स्नेहशील आणि मेव्हणा अशा नात्यांमुळे दशरथाने त्याला आलिंगन देऊन स्वागत केले. युधाजित दशरथाला म्हणाला, "कैकयराज दोन्ही पुत्रांना प्रेमाने भेटू इच्छितात म्हणून त्यांनी मला आपल्याकडे पाठविले आहे. मी जेव्हा अयोध्येला आलो तेव्हा कळले की आपण लग्नाच्या

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

निमित्ताने इकडे आला आहात. त्यामुळे लग्नोत्सवाची वार्ता ऐकताच मी उत्साहाने त्वरित इकडेच आलो.'' यावर उभे राहून, दशरथासह सर्वांनी त्याचा सत्कार केला; चंदन-फुले दिली आणि नंतर त्याला श्रेष्ठ आसनावर बसविले.

ज्या वेळी वरांचे अभ्यंगस्नान झाले त्या वेळी गगनाला भिडणाऱ्या आवाजात मंगलवाद्ये वाजली. दासदासींना अलंकार दिले. महाऋषींची पूजा करण्यात आली. या वेळी वस्त्रे, भूषणे, गंधाक्षता, पुष्पमाला, सुवासिक विडे यांची दाने शोभिवंत पद्धतीने झाली.

चारी जामातांचा सत्कार

श्रीरामाचे केळवण झाले. कोणी हीन, दीन नव्हता तर सारेच प्रसन्नवदन होते. राजा दशरथही प्रसन्न होता. उत्तम वस्रे, अलंकार, गर्दीने दाटलेली सभा, जणू राजा जनकाने वैकुंठाचीच रचना केल्याचा भास व्हावा अशी तेथील उत्तम शोभा दिसत होती. श्रीरामाच्या स्वतःच्या तेजाने मंडपाला शोभा आली होती. साक्षात् लक्ष्मीपेक्षाही श्रेष्ठ अशा सुंदर दासी श्रीरामाजवळ शोभत होत्या. श्रीवासिष्ठांना हाताला धरून पुढे आणून राजाने यागप्रतिष्ठा केली. अग्नीला होम दिला. ज्येष्ठ आणि श्रेष्ठ अशांची पूजा केली. जनकाने वाद्यांच्या गजरात सीमांतपूजा आयोजिली. सभा तेव्हा वैकुंठातल्या राजाप्रमाणे राजे आणि अन्य जन यांनी गजबजली. वैकुंठातले सामर्थ्य सर्वार्थाने तेथे आणले गेले. जनकाचे भाग्य खरोखर समर्थ म्हणून त्याला श्रीराम हा जावई लाभला. चारी मुक्तींच्या चौरंगांवर श्रीरामासह चारी जावई सन्मानाने बसविले. सत्, चित्त, आनंद असे तिघे गुणातीत शोभायमान असून श्रीरामामुळे ते पूर्ण शोभा देत होते. मुकुट, कुंडले, रत्नांच्या मेखला, बोटात अंगठ्या, गळ्यात रत्नमाला आणि आत्मभावाचे पदक जे हृदयकमळावर शोभत होते. जानकीचा पिता, विदेह वीर जनक, याने शुद्ध चैतन्यरूपी वस्त्रे आणली. ती श्रीरामाने अत्यादराने स्वीकारून परिधान केली. अशाप्रकारे इतरही तीन वरांना अत्यंत प्रेमाने गौरविले. विदेह राजा जनकाची भक्ती पाहून रघुनाथ सुखावला.

ऋषिपूजन - विश्वामित्र अग्रपूजेचे मानकरी

श्रीवसिष्ठांनी राजा जनकाला सांगितले की, प्रथम विश्वामित्रांची पूजा कर. त्याप्रमाणे जनकाने प्रथम - अग्रपूजा विश्वामित्रांची केली. त्याचप्रमाणे वसिष्ठ, वामदेव, कश्यपादी ऋषिसमुदाय पूजला. महापराक्रमी मामाची पूजा केली. राजा दशरथाला पूजला. अत्यंत श्रद्धेने जनकाने श्रीरामाचा पिता दशरथ, एकंदर सेवकवर्ग, सोयरे, सुहृद अशा प्रत्येकाला सत्काराने प्रसन्न केले. ऋष्यशृंगाची पत्नी आणि मुख्य करवली शांता हिचा अनेक दिव्य वस्त्रे आणि अलंकार देऊन जनकाने सन्मान केला. दशरथाच्या तीन पत्नींची (सुविद्या कौसल्या, श्रद्धा सुमित्रा, अविद्या कैकेयी) वरमाया म्हणून जनकाची पत्नी सुमेधा हिने रत्नभूषणे देऊन पूजा केली. जनकाची पत्नी आणि सीतेची माता सुमेधा ही थोर पतिव्रता होती; तिने भक्तिभावाने रघुनाथाच्या पायी मस्तक टेकवले, पूर्वपरंपरा पूर्णपणे पाळून वधूमाय, वराच्या पायाला चंदनाची उटी लावून, शुद्ध बुद्धीने सुमेधा श्रीरामचरणांची पूजा करती झाली. नंतर संकोच टाकून सुमेधेने अत्यंत प्रेमाने विनवणी केली की माझ्या रुखवतातले अनेक प्रकार स्वामींनी चाखावे. तुमच्यासाठी म्हणून अनेक प्रकारचे पदार्थ केले आहेत. आपण रघुनाथ भावाचे भुकेले आहात तेव्हा माझे मनोरथ पुरवावे. तिचा मनोरथ जाणून राम संतोषला. जनकाने दशरथाला विनंती करून रुखवताचे भोजन करण्यासाठी प्रार्थनापूर्वक आमंत्रण दिले.

भोजनाचे विस्ताराने वर्णन

श्रीराम स्वयंप्रकाशी असा प्रबळ दीप असल्याने त्याचे स्थान मध्यभागी आणि

https://archive.org/details/muthulakshmiacademy Bhuvan Vani Trust, Lucknow

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

सभोवताली सर्व राजे अशी भोजनाची पंगत बसली आणि सुमेधेचे भाग्य सफल झाले. तेथे चैतन्यतेजाने अती शुद्ध अशी समभावाची सुवर्णाची ताटे पूर्णरसाने भरलेली होती; अपूर्णता कुठेच नव्हती. एक भाजी कुटून, एक खुडून, एक देठासकट तोडून, एक सुरेख सुवासिक सोलीव, एक सरळ लांबट, एक कडवट, एक तिखट, एक वाटोळी, एक कर्कश हिरवी, एक टणक, कचकचीत, एक बियांनी भरलेली, एक कोरडी, एक अती आंबट, एक अंतर्बाह्य तिखट, एक सर्वांगी कडवट, एक तुरट, एक वाटोळी, एक भरदार, एक मुरडलेली, एक आपोआप तुटणारी, अशा फळफळावळ घातलेल्या भाज्या आणि तसेच केलेले रसाळ सांबार भोजनात होते. अशा सर्व वाढण्यात आणलेल्या पदार्थांचा श्रीरामाच्या ठायी एक भाव होता. नाना प्रकारच्या भाज्या रघुनायकाला वाढल्या आणि त्याने एकाच स्वादाच्या मानून त्या खाल्ल्या, असा तो व्यवस्थित जेवणारा होता.

एक पाकक्रियेत उतटली आणि स्नेहदेठापासून सुटली. अशी वनितेच्या हातून निसटलेली स्वादिष्ट शिकरण झाली. झाडावर पिकलेल्या देठासह असलेल्या आंब्यांचा आंबटपणा एकवटून मुरल्यामुळे त्याची (लोणचे) चव न चाखताही नाकाला जाणवत होती. रूपाने दृष्टीला, वासाने नाकाला, बरे म्हणून वाणी कानांना, त्वचेला स्पर्शाने पूर्व संतोष देत होते. रसना-जीभ-त्यांतला रस चाखत होती. त्यामुळे अंतरात सुख निर्माण होत होते. ते सेवन केल्यावर राम अंतर्बाह्य सुखावला. जसा एकच एक आंबा सर्व इंद्रियांना सुख देतो, तसा त्या पंगतीत अच्युतफळ असा श्रीराम अखिल जगाला सुख देत होता. वैराग्यतापाने तापल्यावर त्याच्या संतप्त काचऱ्या अनुतापतेलात तळून श्रीरामाच्या चवीला आल्या.

त्या भोजनात कोणी अविचाराने निंदेचे रायते खाल्ले तर त्यांच्या ते नाकाला झिणझिणत होते आणि असे ते हाताने कपाळ बडवू लागत. नाका-तोंडातून धूर येऊन त्यांची तळमळ होत होती. अशांकडे श्रीराम आपली दृष्टी वळवत नव्हता, असा क्रम चालू होता. अनेक प्रकारची लोणची जेवणात वाढली गेली. भक्तिरंगाने रंगलेली, सर्वांगाने समत्व पावलेली अशी ती आपला स्वाद श्रीरामाने चाखावा ही इच्छा धरून होती. अहं ही कडवट कुहिरी सोहं लोणच्याच्या खारात रंगली. खारवलेली वैराग्यभोकरे त्यात मुक्तपणे मिरवत होती. स्वबोधाचे आले आणि आवळे भोजनाला आगळीच चव आणत होते. मुळीच्या मुळीमुळे रंग भरला, स्वतः रामाने तो चाखला. त्रिगुणांचे त्रिकुट श्रीरामाने निर्गुणत्वाने भक्षून पोट भरले. त्याचा स्वाद रामाला अत्यंत आवडला. अशी नाना प्रकारची लोणची त्या भोजनात होती. मुख्य ते स्मरण, त्याचा स्वाद श्रीराम जाणून होता. जे पंगतीत होते ते सारे धन्य झाले.

तसेच सूक्ष्म सेवेच्या शेवया मोडून सगळ्यांना दिल्या, त्यांनी त्या दूधसाखर मिसळून आळविल्या. श्रीरामाने त्या सेवन केल्या. पोकळ वळवटे, सरळ, वाटोळी, लांबोळी सारी सेवेत आली आणि रामाच्या ठिकाणी पावली. परम स्वादाची साखर, पंचधार, पंचरस, सर्वसाराचे तूप वाढले. त्या स्वादाने श्रीराम डोलू लागला. पश्चात्तापाने साक्षात् तापलेले ते निजसाराचे सार असलेले तूप अखंडधारेने वाढले गेले. श्रीरघुनाथ हा त्याचा भोक्ता होता. शास्त्रप्रकाराचे पापड, नाना युक्तींनी तडफडले, त्यावर जळजळेचे फोड आले, त्यावर ते कडकड मोडत होते. यासाठी ते नंतर वाढले जावे म्हणून मागे ठेवले होते. भजनमार्गे ओढून सर्वांगाने विरवून, स्वादिष्ट असे रामाला भोजन भोगात वाढले. श्रीराम-सीतेची प्रीती निरंतर असून त्यात अबद्ध सांडग्या नकोत म्हणून वृद्धांच्या सांगण्यानुसार सुमेधेने वाढल्या नाहीत. समूळ गुंतली कुरवंडी, आपणहून उगवत नव्हती बिचारी, शांतीदातांनी कुडकुडी केली आणि मगच रामाच्या सुखाला आली. विषयलालसेचे लाडू विवेकाने फोडून

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

फोडून वाढले. त्याच्याच पद्धतीचे जिळण्याचे जोड, स्वाद गोड श्रीरामाने अनुभवला. वैराग्यकढाने कढविलेली कढी करून तिच्यात माया-मुगवडी विरवून स्वादाची सीमा वाढविली. तिची गोडी रामच जाणे. त्यात जिरे, मिरे, कापुर यांमुळे सुवास वाढून आकाशापर्यंत गेला होता. रमज्ञ तिचे भुरके मारत होते. श्रीराम मात्र चंद्रधर्माने (लहान-मोठा) घोट घोट सेवन करत होता.

भजनभावाच्या मांडेपुरिया, क्षीरसागरीच्या क्षीरघारिया, अंतर्बाह्य गुळवरिया, पूर्णपुरिया परिपूर्ण, भजनभेदाने शुभ्र फेण्या, प्रेमशर्करा भरलेल्या भरणी, अमृतफळाला लाजविणारे आयणी आंबवडे, नुसत्या गोडाची घडविलेली खांडवी, चंद्रबिंबाची घडी काढून वाढावी तशी मांड्यांची घडी असे सर्व पदार्थ वाढले होते. त्यातल्या मांड्यांची नवलाई अशी की चार वेद चार घड्या आणि कर्म कानवले त्याखेरीज होते. श्रीरामाने त्यांचा स्वाद चाखला. विवेकसडणीचे अत्यंत सोज्वळ, टोकदार, भावबळाने नाजूक असे दोन्ही बाजूंनी आत्मतेज दाखविणारे तांदूळ वेळले आणि सोहं ओगराळे सनाथ म्हणून अलिप्तपणे त्यात भात भरून पानात न फुटता वाढला. श्रीराम त्याचा भोक्ता होता. अन्नाला वरान्नाने श्रेष्ठता येते म्हणून त्यातला कोंडा अंतर्बाह्य काढून टाकला आणि मध्यनायकाच्या माथ्यावर ते चढले यासाठी रघुनाथाला प्रिय झाले. सर्व स्वादाचे कारण स्वतः श्रीराम होता यासाठी वर मीठ वाढले कारण जे अपूर्ण ते त्याच्याकडून पूर्ण होईल. श्रीरामाच्या पंगतीत रस म्हणून पियूष-अमृत-होते, त्याला श्रध्देची अत्यंत भूक असते आणि घासाघासाला सुख वाढत जाते म्हणून तो प्रकार केला होता.

श्रीरामाच्या पंगतीत कोणतेही न्यून राहू नये, जेवणारे जेवताना चव जाणतील आणि त्यांना रुचेल त्याप्रकारे वाढप होईल याविषयी राजा जनक सावधपणे लक्ष देत होता. सुमेधा राणी हीही सावधान राहून इच्छुकाची इच्छा जाणून ती पूर्ण करत होती. सुमेधा स्वतः खुणवून सांगत होती. चारी मुक्ती स्वतः राबत होत्या आणि ज्याला जे हवे ते तत्परतेने देत होत्या. पहिल्या नऊ जणी वाढणाऱ्या आणि चौघी पूर्ण करणाऱ्या (नऊ प्रकारची भक्ती आणि चार प्रकारची मुक्ती) असल्याने श्रीराम भोजनास होता त्या पंगतीत कसलीच अतृप्तता नव्हती. अशाप्रकारे अंतर्बाह्य तृप्त झालेले स्वानंदउद्‌गार काढत होते; जेवणारे स्वानंदाने तुडुंब भरले होते. श्रीराम आत्मसंतुष्ट भोक्ता होता. सुमेधा सावधानतेने वाढत असल्याने सर्व राजे आपल्या ठिकाणी संतुष्ट झाले. ब्रह्मवृंदाला गाढ तृप्ती लाभली आणि त्यांनी नेसण ढिले केले. सर्वांना समाधान झाले. श्रीरामाला उष्टावणी होऊन, रामनामाची मुद्रिका त्या ठिकाणी ठेवली. श्रीरामाची नाममुद्रा पाहून सुमेधेला अत्यंत आनंद होऊन ती संकोच सोडून रघुनाथाच्या पाया पडली. रघुपतीही आनंदला आणि त्याने तिला पुष्पमाला दिली. या घटनेचा आनंद त्रिलोकात न मावणारा होता. सीता सतीचे भाग्य थोर!

भोजनानंतर विडे-दक्षिणा

श्रीरामाच्या पंगतीला जे जेवले ते संसाराला आंचवले. रामनामाने सुखाने त्यांचे विडे रंगले आणि तो सुरंग शोभला. फलाशा फोडून, शांतीरूप पिकल्या पानांचे देठ काढून आणि वासनेच्या शिरा निःशेष काढून राम परेशाला विडा दिला. अहं कठीणपणा जाळूनही, सोहं गाळून काढलेला शुध्द चुना, शांतिपरिपक्व पानाला लागून रामवदनाला सुस्वाद मिळाला. सर्व सारांचे सार असा कात सेवन केल्याने श्रीरामाचे मुख रंगले आणि ओठांवर रंग चढून ते शोभिवंत झाले. श्रीरामप्रसाद (पुष्पमाला) हाती येताच सुमेधेला उल्हास वाटला. तिने ती सीतेच्या हाती दिली. तेव्हा तिने ती मस्तकाला लावून वंदन केले. श्रीरामचंद्राला वंदन करून, हृदयात राममुद्रा धारण करून, प्रसाद सेवनाने ती भाग्यवती नर-नरेंद्रांना श्रेष्ठ वाटली. श्रीरामाच्या

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Research Academy

आत्मप्रकाशाने उदय आणि अस्त यांचे स्मरण झाले नाही. तेव्हा उपाध्यायांनी राजाला म्हटले, "सूर्य उदयाला येतो आहे तर लगबगीने लग्नमांडवाकडे चला. तेथे घटीची प्रतिष्ठा केली पाहिजे. राजा दशरथानेही आपल्याकडून तातडीने फळ आणावे."

अध्याय चोविसावा

श्रीरामप्रसाद सेवन केल्यावर सीतेला श्रीरघुनाथाच्या तुलनेत समाधीचे सुखही फिकेच वाटले. त्या वेळी श्रीसद्गुरूंनी पाण्यावर घटिकापात्र प्रतिष्ठापन केले आणि सर्वांना सावधान केले. अक्षरा अक्षरांनी, पळापळांनी घटिकापात्र भरत जात होते. त्याला वेळ लागत नव्हता; पण लोक आपल्या उद्योगात मग्न राहिल्याने काळ जात होता तिकडे त्यांचे लक्ष नव्हते. प्रत्येक घटीला तास वाजवून काळ व्यर्थ न जावा ही सूचना मिळत होती. त्यामुळे काळ हा काळाचा अंत आणत होता आणि मुख्य मुद्दलाची हानी होत होती. लोकांच्या वागण्यातली नवाई नवलाचीच म्हणायची. त्यांच्या दुमाही, चौमाही वह्यांतल्या गणिती खटपटीनेच ते लुबाडले गेले. श्रीसद्गुरूंनी घडी भरल्याचे सांगितले तेव्हा वऱ्हाडी स्तब्धपणे पाहातच राहिले. ज्यांना आपल्या कार्याची तातडी समजते ते घडी-घडी साधतात. श्रीरामसेवक सावधचित्त होते, त्यांनी क्षण-क्षण सुद्धा व्यर्थ काळ जाऊ दिला नाही. श्रीराम जेव्हा फळ विस्तारून सांगतो तेव्हा त्यातून सकल अर्थ सुफल होतात.

वस्त्रपरिधान आणि तेलफळ

सीतेला चिदंबर नेसायला देण्यात आले. तिने नाना रत्नांचे अलंकार धारण केले. त्यामधे हृदयपदकात जडवलेले मनोहर नीळमणी, मोत्यांचे तऱ्हेतऱ्हेचे हार होते. अहंकाराचे बी भरडून, मोहममतेचा कोंडा काढून टाकून सोलीव डाळीने भावाची दुरडी भरली. नंतर विवेकाची चाळणी घेऊन, सुगरणींनी कणिक चाळली, भूस काढून टाकले आणि त्यात गोडव्यासाठी गूळ मिसळला. समूळ पण देठापासून अलग केलेली, आपल्याआपण पिकलेली, प्रमदांचा स्पर्श न झालेली फळे फलितार्थास आणली. परमपवित्र केळी जी वाकडेपणाने अपवित्र होती ती श्रीरामाने सोलली आणि त्यांची वक्रता घालविली. लोक जे आंब्याचे फळ म्हणतात त्यात कोय आणि गुठळ्या असतात, श्रीराम जे अच्युतफळ विस्तारून सांगतो ते विदेही सफळ असे फळ असते. प्रथम सौभाग्यद्रव्य ठेवले त्यात धने, हळद, जिरे यांचे मिश्रण होते; हे सद्बुद्धीतल्या विवेकाप्रमाणे असलेले मिश्रण होते; श्रीराम हा मुख्य सौभाग्याचा दोरा असून त्याने स्वतः काळे मणी ओवले, अशा त्या कंठात एकांतपणे घालायच्या एकसरीत, रामनामसंकेत सामावला. गाठाळ गाठी तोडून टाकून, सीतेच्या कंठात घालायची देखणी गळसरी जगजेठी रामाने स्वतः ओवली. सर्वत्र विमन टाळून शुद्ध सुमनांचे हार दोरा न वापरता रामाने गुंफले. त्यामुळे सीता मनोहर आणि शोभिवंत झाली. मधे-मधे गाठी नसलेले आणि अंतर्बाह्य रसाने पूर्ण असे रसाळ आणि सोज्वळ ऊस सफलपणे फळांबरोबर आणले. काटे असलेले, काळे, निर्मळ, चारी वर्णांहून वेगळे, प्रेमभराने भरलेले असे ऊस सीतेसाठी फलदायी फळ म्हणून आणले. बी शिवाय फळ, त्वचेशिवाय रसाळ, सबाह्य निर्मळ अशी सफळ फळे सीतेसाठी आणली.

चार मुक्तींच्या कुसरीच्या शेवया. श्रद्धेने भरलेल्या परड्या-दुरड्या, नवविधींच्या (नवविधा भक्ती) हातून फळ बाहेर काढले. त्या वेळी मंगलवाद्यांच्या निनादात ऋष्यशृंगाची पत्नी शांता ही अलंकार घालून, सौभाग्याची ऐट मिरवत, सर्वत्र दिमाखात वावरत होती. ती, सूर्यवंशातल्या राजस्त्रिया, सूर्याच्या तेजस्वितेने सर्वांगी जशी वेदगर्भात श्रुति प्रकटावी, तशी शोभा पसरत होत्या. लग्नात रघुपती पाहावा यासाठी वऱ्हाडिणी म्हणून श्रुतिस्मृती आल्या. त्यांनी कर्मकांडाचे बुरखे घालून सर्वत्र संचार चालू ठेवला होता.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

फोडून वाढले. त्याच्याच पद्धतीचे जिळण्याचे जोड, स्वाद गोड श्रीरामाने अनुभवला. वैराग्यकढाने कढविलेली कढी करून तिच्यात माया-मुगवडी विरवून स्वादाची सीमा वाढविली. तिची गोडी रामच जाणे. त्यात जिरे, मिरे, कापुर यांमुळे सुवास वाढून आकाशापर्यंत गेला होता. रमज्ञ तिचे भुरके मारत होते. श्रीराम मात्र चंद्रधर्माने (लहान-मोठा) घोट घोट सेवन करत होता.

भजनभावाच्या मांडेपुरिया, क्षीरसागरीच्या क्षीरघारिया, अंतर्बाह्य गुळवरिया, पूर्णपुरिया परिपूर्ण, भजनभेदाने शुभ्र फेण्या, प्रेमशर्करा भरलेल्या भरणी, अमृतफळाला लाजविणारे आयणी आंबवडे, नुसत्या गोडाची घडविलेली खांडवी, चंद्रबिंबाची घडी काढून वाढावी तशी मांड्यांची घडी असे सर्व पदार्थ वाढले होते. त्यातल्या मांड्यांची नवलाई अशी की चार वेद चार घड्या आणि कर्म कानवले त्याखेरीज होते. श्रीरामाने त्यांचा स्वाद चाखला. विवेकसडणीचे अत्यंत सोज्वळ, टोकदार, भावबळाने नाजूक असे दोन्ही बाजूंनी आत्मतेज दाखविणारे तांदूळ वेळले आणि सोहं ओगराळे सनाथ म्हणून अलिप्तपणे त्यात भात भरून पानात न फुटता वाढला. श्रीराम त्याचा भोक्ता होता. अन्नाला वरान्नाने श्रेष्ठता येते म्हणून त्यातला कोंडा अंतर्बाह्य काढून टाकला आणि मध्यनायकाच्या माथ्यावर ते चढले यासाठी रघुनाथाला प्रिय झाले. सर्व स्वादाचे कारण स्वतः श्रीराम होता यासाठी वर मीठ वाढले कारण जे अपूर्ण ते त्याच्याकडून पूर्ण होईल. श्रीरामाच्या पंगतीत रस म्हणून पियूष-अमृत-होते, त्याला श्रध्देची अत्यंत भूक असते आणि घासाघासाला सुख वाढत जाते म्हणून तो प्रकार केला होता.

श्रीरामाच्या पंगतीत कोणतेही न्यून राहू नये, जेवणारे जेवताना चव जाणतील आणि त्यांना रुचेल त्याप्रकारे वाढप होईल याविषयी राजा जनक सावधपणे लक्ष देत होता. सुमेधा राणी हीही सावधान राहून इच्छुकाची इच्छा जाणून ती पूर्ण करत होती. सुमेधा स्वतः खुणवून सांगत होती. चारी मुक्ती स्वतः राबत होत्या आणि ज्याला जे हवे ते तत्परतेने देत होत्या. पहिल्या नऊ जणी वाढणाऱ्या आणि चौघी पूर्ण करणाऱ्या (नऊ प्रकारची भक्ती आणि चार प्रकारची मुक्ती) असल्याने श्रीराम भोजनास होता त्या पंगतीत कसलीच अतृप्तता नव्हती. अशाप्रकारे अंतर्बाह्य तृप्त झालेले स्वानंदउद्गार काढत होते; जेवणारे स्वानंदाने तुडुंब भरले होते. श्रीराम आत्मसंतुष्ट भोक्ता होता. सुमेधा सावधानतेने वाढत असल्याने सर्व राजे आपल्या ठिकाणी संतुष्ट झाले. ब्रह्मवृंदाला गाढ तृप्ती लाभली आणि त्यांनी नेसण ढिले केले. सर्वांना समाधान झाले. श्रीरामाला उष्टावणी होऊन, रामनामाची मुद्रिका त्या ठिकाणी ठेवली. श्रीरामाची साममुद्रा पाहून सुमेधेला अत्यंत आनंद होऊन ती संकोच सोडून रघुनाथाच्या पाया पडली. रघुपतीही आनंदला आणि त्याने तिला पुष्पमाला दिली. या घटनेचा आनंद त्रिलोकात न मावणारा होता. सीता सतीचे भाग्य थोर!

भोजनानंतर विडे-दक्षिणा

श्रीरामाच्या पंगतीला जे जेवले ते संसाराला आंचवले. रामनामाने सुखाने त्यांचे विडे रंगले आणि तो सुरंग शोभला. फलाशा फोडून, शांतीरूप पिकल्या पानांचे देठ काढून आणि वासनेच्या शिरा निःशेष काढून राम परेशाला विडा दिला. अहं कठीणपणा जाळूनही, सोहं गाळून काढलेला शुद्ध चुना, शांतिपरिपक्व पानाला लागून रामवदनाला सुस्वाद मिळाला. सर्व सारांचे सार असा कात सेवन केल्याने श्रीरामाचे मुख रंगले आणि ओठांवर रंग चढून ते शोभिवंत झाले. श्रीरामप्रसाद (पुष्पमाला) हाती येताच सुमेधेला उल्हास वाटला. तिने ती सीतेच्या हाती दिली. तेव्हा तिने ती मस्तकाला लावून वंदन केले. श्रीरामचंद्राला वंदन करून, हृदयात राममुद्रा धारण करून, प्रसाद सेवनाने ती भाग्यवती नर-नरेंद्रांना श्रेष्ठ वाटली. श्रीरामाच्या

https://archive.org/details/@sarayu_foundation_trust_lucknow

CC-0. In Public Domain. Digitized By Sarayu Foundation Trust and eGangotri

आत्मप्रकाशाने उदय आणि अस्त यांचे स्मरण झाले नाही. तेव्हा उपाध्यायांनी राजाला म्हटले, ''सूर्य उदयाला येतो आहे तर लगबगीने लग्नमांडवाकडे चला. तेथे घटीची प्रतिष्ठा केली पाहिजे. राजा दशरथानेही आपल्याकडून तातडीने फळ आणावे.''

अध्याय चोविसावा

श्रीरामप्रसाद सेवन केल्यावर सीतेला श्रीरघुनाथाच्या तुलनेत समाधीचे सुखही फिकेच वाटले. त्या वेळी श्रीसद्‌गुरूंनी पाण्यावर घटिकापात्र प्रतिष्ठापन केले आणि सर्वांना सावधान केले. अक्षरा अक्षरांनी, पळापळांनी घटिकापात्र भरत जात होते. त्याला वेळ लागत नव्हता; पण लोक आपल्या उद्योगात मग्न राहिल्याने काळ जात होता तिकडे त्यांचे लक्ष नव्हते. प्रत्येक घटीला तास वाजवून काळ व्यर्थ न जावा ही सूचना मिळत होती. त्यामुळे काळ हा काळाचा अंत आणत होता आणि मुख्य मुद्दलाची हानी होत होती. लोकांच्या वागण्यातली नवाई नवलाचीच म्हणायची. त्यांच्या दुमाही, चौमाही वह्यांतल्या गणिती खटपटीनेच ते लुबाडले गेले. श्रीसद्‌गुरूंनी घडी भरल्याचे सांगितले तेव्हा वऱ्हाडी स्तब्धपणे पाहातच राहिले. ज्यांना आपल्या कार्याची तातडी समजते ते घडी-घडी साधतात. श्रीरामसेवक सावधचित्त होते, त्यांनी क्षण-क्षण सुद्धा व्यर्थ काळ जाऊ दिला नाही. श्रीराम जेव्हा फळ विस्तारून सांगतो तेव्हा त्यातून सकल अर्थ सुफल होतात.

वस्त्रपरिधान आणि तेलफळ

सीतेला चिदंबर नेसायला देण्यात आले. तिने नाना रत्नांचे अलंकार धारण केले. त्यामधे हृदयपदकात जडवलेले मनोहर नीळमणी, मोत्यांचे तऱ्हेतऱ्हेचे हार होते. अहंकाराचे बी भरडून, मोहममतेचा कोंडा काढून टाकून सोलीव डाळीने भावाची दुरडी भरली. नंतर विवेकाची चाळणी घेऊन, सुगरणींनी कणिक चाळली, भूस काढून टाकले आणि त्यात गोडव्यासाठी गूळ मिसळला. समूळ पण देठापासून अलग केलेली, आपल्याआपण पिकलेली, प्रमदांचा स्पर्श न झालेली फळे फलितार्थास आणली. परमपवित्र केळी जी वाकडेपणाने अपवित्र होती ती श्रीरामाने सोलली आणि त्यांची वक्रता घालविली. लोक जे आंब्याचे फळ म्हणतात त्यात कोय आणि गुठळ्या असतात, श्रीराम जे अच्युतफळ विस्तारून सांगतो ते विदेही सफळ असे फळ असते. प्रथम सौभाग्यद्रव्य ठेवले त्यात धने, हळद, जिरे यांचे मिश्रण होते; हे सद्‌बुद्धीतल्या विवेकाप्रमाणे असलेले मिश्रण होते; श्रीराम हा मुख्य सौभाग्याचा दोरा असून त्याने स्वतः काळे मणी ओवले, अशा त्या कंठात एकांतपणे घालायच्या एकसरीत, रामनामसंकेत सामावला. गाठाळ गाठी तोडून टाकून, सीतेच्या कंठात घालायची देखणी गळसरी जगजेठी रामाने स्वतः ओवली. सर्वत्र विमन टाळून शुद्ध सुमनांचे हार दोरा न वापरता रामाने गुंफले. त्यामुळे सीता मनोहर आणि शोभिवंत झाली. मधे-मधे गाठी नसलेले आणि अंतर्बाह्य रसाने पूर्ण असे रसाळ आणि सोज्वळ ऊस सफलपणे फळांबरोबर आणले. काटे असलेले, काळे, निर्मळ, चारी वर्णांहून वेगळे, प्रेमभराने भरलेले असे ऊस सीतेसाठी फलदायी फळ म्हणून आणले. बी शिवाय फळ, त्वचेशिवाय रसाळ, सबाह्य निर्मळ अशी सफळ फळे सीतेसाठी आणली.

चार मुक्तींच्या कुसरीच्या शेवया. श्रद्धेने भरलेल्या परड्या-दुरड्या, नवविधींच्या (नवविधा भक्ती) हातून फळ बाहेर काढले. त्या वेळी मंगलवाद्यांच्या निनादात ऋष्यशृंगाची पत्नी शांता ही अलंकार घालून, सौभाग्याची ऐट मिरवत, सर्वत्र दिमाखात वावरत होती. ती, सूर्यवंशातल्या राजस्त्रिया, सूर्याच्या तेजस्वितेने सर्वांगी जशी वेदगर्भात श्रुति प्रकटावी, तशी शोभा पसरत होत्या. लग्नात रघुपती पाहावा यासाठी वऱ्हाडिणी म्हणून श्रुतिस्मृती आल्या. त्यांनी कर्मकांडाचे बुरखे घालून सर्वत्र संचार चालू ठेवला होता.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

जनकाकडून वऱ्हाडींचे स्वागत

राजा दशरथ आपल्याबरोबर ऋषींचा मेळ, सुहृद आणि राजे यांना घेऊन वाद्यांच्या गजरात निघाला. जनक त्याला सामोरा आला. त्याने ऋषिवरांना वंदन केले. त्यांना आणि राजांना मंडपात नेऊन बसविले. वधू-कन्यांना बसण्यासाठी मूळपीठ तयार केले होते. त्यावर पुरोहित शतानंदाच्या सूचनेप्रमाणे प्रकृतीचे धूतवस्त्र आंथरले गेले होते. नंतर चौघी कन्यांना बाहेर आणले आणि त्यांच्या हातात वस्त्रे देऊन पुन्हा लगेच आत नेले. त्या कन्यांनी मग मायामलिन वस्त्रे सोडली आणि रामनामाच्या मनोहर चुण्या असलेली चिदंबरे नेसल्या. त्यांना जयजयकार करीत पुन्हा बाहेर बोलावण्यात आले.

वधूंचे आगमन - त्यांना फळे अर्पण

आपला पती वरण्यासाठी जणू चार मुक्तीच शृंगारून याव्या तशा त्या चौघीजणी मंडपात आल्या. त्यांत सीता प्रमुख होती. सीतेच्या वस्त्राचा पदर झळकत होता. त्याचा मंडपात सर्वत्र प्रकाश पडला. आपली सून पाहून राजा दशरथ विस्मित झाला. 'ही तर लेण्यांचे लेणे शोभते आहे. हिच्यामुळे भूषणांना शोभा आली आहे. हिच्या आत्मगुणाने सर्व सगुण भासत आहेत.' असे विचार त्याच्या मनात आले. सीतेच्या अंगातून निघणाऱ्या प्रकाशकिरणांनी अंधाराचे अस्तित्व संपले; उष्णता आणि चांदणे लोपले; प्राण्यांचे प्राण तटस्थ झाले; दिवस-रात्र यांतला फरक कळे ना; डोळ्यांच्या पापण्या उघडझाप विसरल्या; समूळ शब्दांची शांती झाली, लोक नुसते टकमक पाहात राहिले.

श्रीवसिष्ठ म्हणाले, "राजा दशरथाने सून पाहिली आहे. आता श्रीरामाचे लग्न साधण्यास तातडीने फल अर्पण करा. श्रीरामाचे लग्न होण्यात आता काही आडकाठी उरली नाही." आपले निधान प्राप्त करण्यासाठी सीतेला लगेच फल अर्पण केले. पहिले फल अर्पण करताच तत्काळ कार्य साधत नाही; त्यामुळे शिल्लक न ठेवता सर्व फळे अर्पण केल्यावर भूपालाला खूण पटली. वसिष्ठांच्या सांगण्याप्रमाणे चारी सुना सन्मुख बसवून राजाने सर्व फळे अर्पण केली. तसेच त्या वेळी वस्त्रे, भूषणे हीही दिली. जनकाच्या वंशाचा पुरोहित शतानंद हा द्रव्याविषयी उदासीन होता. दशरथाने त्याला आणून कलशात कोटीधन घातले. तेव्हा शतानंद म्हणाला, "राजा दशरथा, रघुनाथाच्या दर्शनानंतर आता मला द्रव्यलोभ उरला नाही." हे ऐकून राजाने चरणांवर मस्तक ठेविले. द्विजांना अग्रपूजेचा सन्मान, पुष्पे, चंदन, तांबूल देऊन सगळ्यांचे संपूर्ण स्वागत केल्यावर फलार्पण पूर्ण झाले.

नंतर वसिष्ठांनी जनकाला सांगून वरांना आमंत्रण द्यायला सांगितले. दशरथासह ऋषी जानवशात स्वतः आले. त्या वेळी वऱ्हाडातल्या स्त्रिया एकमेकींना सांगत होत्या 'कन्या किती वेल्हाळ आहेत, त्यांना पाहून तहान-भूक नाहीशी होते, अपूर्व सौभाग्यकळा आहे त्यांची, अत्यंत रूपवानही आहेत त्या चौघी, जणू सौंदर्याच्या खाणी, लावण्यपीठाच्या दिव्य योगिनी असून शिवाय गुणवान आहेत.' या वेळी नवविधान साधण्यासाठी, स्वतः सज्ञान असलेल्या श्रीरामाने त्र्यंबक (धनुष्य) भंगून हे सीतारूप दिव्यरत्न मिळविले आहे. तेव्हा हे जाणून आदिशक्तीने स्वतः येऊन अदृश्यपणे दृश्यकंकण श्रीरामाला बांधले आणि जीवाची कुरवंडी करून ती गेली.

सुमेधाराणीकडून तेलवण

जनक अत्यंत संभ्रमाने वराला आमंत्रण द्यायला निघाला तेव्हा सुमेधेने उल्हासाने तेलवण विस्ताराने सांगितले. सूक्ष्म सेवेचे लाडू श्रीरामाला आवडतात. वैराग्यसाखर गोड, त्याला स्वादिष्ट तिळव्याची जोड, शाब्दिक खसखस धुवून कसकस काढून, त्याचे सुरस लाडू शुद्ध चिदंश गुळगोडीसह वळले. चार्वाकमत फोडून फोडून, चैतन्यचारोळ्या

https://archive.org/details/@lakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Research Academy

कौतुकाने डालून चित्ताकारेत लाडू वळले ते श्रीरामाला अती सुख देणारे होते. अष्टांगयोगाचे अष्टदळबीजाचे सोलून काढलेले बीज त्याचे सुगंधी लाडू वळून सहजपणे आपले कौतुक तेलवणात दाखविले. सर्वांगी सरेन काटे असलेल्या फणसाच्या अंतरात गोड गरे असतात. त्याचेही बीज नेटाने काढून सुंदर लाडू वळले. अतिशय कुशल आणि सज्ञान अशी ही जनकाची भार्या सुमेधा होती. तिने भोपळ्याचे बीज सोलून त्याचेही लाडू सहजपणे वळले. काटेरी झुडपात लपलेली दांभिक बोरे, आत आंबट आणि वर चांगली असतात; पण अत्यंत निर्धाराने त्यांचे बीज बाहेर काढून, त्यात सद्भावाचा गोड गूळ घालून तिने लाडू वळले. श्रीराम चव ओळखण्यात पटाईत म्हणून हे तेलवणाचे प्रकार केले होते. वैराग्याच्या कडकडीतपणाने कडकणे, कुटणे, तुटणे काही न होता श्रीरामाच्या उद्देशाने गुणी सुमेधेने तेलवण केले. स्वप्रपंचाला उगवलेले वाकडे कानवले, सद्भावाने मुरडलेल्या मुरडी, श्रीरामाला प्रिय झाल्यामुळे सदेहाचे तेलवण अनेक अंगांनी सांगता येईल; पण ते विदेहाचे तेलवण असल्याने अर्थ सांगताना अती अवघड होते.

राजा जनक अत्यादराने, सुमेधा, सुवासिनींच्या संभारासह, वाद्यांच्या गजरात, अत्यंत गंभीरपणे वरांना आमंत्रित करण्यासाठी आला. दशरथाने त्यांचा सन्मान केला. तसेच दोन्ही पक्षांतले सुहृदजन प्रसन्न वदनाने सभेत बसविले. मंडपात समाधान पसरले. सर्वांच्या अंतरांत बसलेला वर भक्तिभावाने सभेत आणण्यासाठी वसिष्ठांनी सद्गुरूच्या नात्याने हाती धरून आणून श्रीरामाला प्रकट केला. श्रीराम लावण्याची रास होता. त्याच्यामुळे जग सुंदर झाले असल्याने त्याच्या रूपाची मर्यादा कशी करणार! श्रीवसिष्ठगुरूंनी सांगितल्यावर श्रीराम सभास्थानी आला. त्या वेळी आकाश आणि पृथ्वी तेजाने कोंदून गेली. श्रीरामाला एका श्रेष्ठ आसनावर बसविण्यात आले. श्रीरामाचे मुख पाहून सर्व लोक तटस्थ झाले; टकमक पाहात राहिले आणि त्यांच्या अंतःकरणात सुख भरून राहिले. श्रीरामाच्या दर्शनाने सर्वांच्या डोळ्यांचे पारणे फिटले, संपूर्ण इंद्रिये सुखावली, बोलणे चालणे स्थिर आणि तटस्थ झाले.

श्रीवसिष्ठांनी जेव्हा 'सावधान, आता लवकर तेलवणाचे समर्पण करा' असे म्हटले तेव्हा सुमेधेने पुढे होऊन वराचे मुख पाहिले. त्या मुखाचे दर्शन होताच तिचे डोळे परमानंदाने तृप्त झाले. एवढी तृप्ती होऊनही ते भुकेलेच राहिले. ती वारंवार रामाचे मुख न्याहाळत होती, हर्षाने लिंबलोण उतरत होती, सर्वांतराने जिवाची कुरवंडी करत होती. 'सर्वांतरी रामच परिपूर्ण दिसतो आहे, तर तेलवण कोणाला वाहू?' असा प्रश्न तिला पडला. तेव्हा वसिष्ठांनी येऊन खुणेने श्रीराम दाखविला, "ज्याचे दर्शन होताच सर्वांतरी तो जो परिपूर्ण दिसतो, तोच मुख्यतः श्रीराम हे जाणून त्याला तेलवण अर्पावे" असेही सांगितले. हे श्रीवसिष्ठांचे वचन ऐकून सुमेधा सावध झाली आणि तिने श्रीरामाला तेलवण आणि वस्त्रे अर्पण केली. हे होत असताना वऱ्हाडी आपसांत म्हणत होते, "नवलच आहे! मुख्य वधूमाय जावई ओळखत नाही तर आता आम्ही काय करावे? लवकर वराला घेऊन चला." ज्याप्रमाणे श्रीरामाला तेलवण, त्याचप्रमाणे भरत, शत्रुघ्न, लक्ष्मण यांनाही दिव्यांबरे, भूषणे, तेलवण समसमान देऊन त्यांचे पूजन करण्यात आले.

चौघे कुमार लग्नमंडपाकडे

श्रीरघुवीर शुद्ध सत्वाच्या पांढऱ्या घोड्यावर स्वार झाला. सत्वाच्या सामर्थ्याने भरलेल्या धैर्यवान् घोड्याने श्रीरामाचा भार साहिला. चौघांनाही समसमान पांढरे घोडेच बसायला दिले गेले होते. चौघेही नवरदेव शोभायमान दिसत असल्याने लोकांच्या डोळ्यांना आल्हाद देत होते. असा पूर्ण परमानंद लक्षात येऊन, सत्-चित्-आनंद प्रकट

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized By Sarayu Foundation Trust and eGangotri

होतो, तसे ते तीन बंधू रामासमवेत होते आणि त्या सर्वांमध्ये आत्मबोधाची एकात्मता होती. जसा ॐकार हाच मुख्य वेद आणि तोच चतुर्विध (चार वेद) भासतो, तसेच हे चौघेबंधू आत्मबोधी एकात्मता साधून होते. एकाच साधूच्या ठिकाणी चारी पुरुषार्थ भासतात, तसाच प्रकार या चौघांबाबत असून एकाकार असाच त्यांचा आत्मबोध होता. ज्याप्रमाणे एका श्लोकाचे चार चरण असतात त्याप्रमाणे या चौघांची स्थिती होती. श्रीराम हाच श्लोकाक्षरींचा अर्थ, असाच त्या चौघांमध्ये एकात्म भाव होता. ते वर एकत्र मिरवतात; त्यांनी तन्मयतेची छत्रे, निजबोधाची ढाळलेली चामरे धारण केली असून दशविध वाद्ये वाजत होती. घंटाकिंकिणींचे नाद म्हणजे मधुर शब्दांचाच अनुवाद, वीणा, वेणू, मृदंग यांचा नाद म्हणजे शुद्ध शब्दांचा कल्लोळ, तुरे कसून गर्जत होते, निशाण (एक वाद्य) वाजत होते, मंगल मोहरी दुमदुमत होती आणि त्या नादामुळे मन शांत होत होते. जसा अनुहताचा गजर तसा अपार नाद तुऱ्यांचा होता. तो नाद नभात कोंदून सारे गगन शब्दाकार झाले.

श्रीरामाच्या वर्णनात चतुर असे चौघे भाट अत्यंत गंभीरपणे वेगवेगळ्या आठ मगधांसह वंशवीरांचे वर्णन करत होते. शब्दयोजनेत अती समर्थ, साही जणांत वाद सबळ, शब्दांचा छळ करत, ज्ञानाचा मोठा अभिमान बाळगत असलेले असे ते होते. अष्टभाव अत्यंत प्रेमाने सत्वाचा घोडा हाती धरून श्रीरामासह नेहमी चालतात, त्यांना अन्य गती नाही. सुखछायेच्या अब्दागिरी, चिदंबराची छत्रे तेजस्वितेने झळकत होती त्याचा रामाला आनंद वाटला. अनुभवस्वानंदात दुर्धर असे भाट गंभीरपणे गर्जना करत चालले होते. दोन्ही बाजूला हत्तींचे समुदाय श्रीरामामुळे स्थिर गतीने चालले होते. श्रीरामाने त्याग केलेल्या अष्ट महासिद्धी नर्तकी होऊन चपळपणे नाचत जनसमुदायाला भुलवत होत्या. सिद्धीच जेथे नाचताना पहायला मिळतात तेथे योगी, साधक हेही भुलतात. सारे संन्यासीही रघुपतीकडे पाहायचे विसरून नर्तनात रमतात. रघुनाथ चैतन्याचा बुक्का उधळत होता. तो ज्यांना लागत होता ते जगात धन्य होत. याचकांचे चित्त शांत होऊन ते संज्ञेने मान्यता देत होते. जगजेठी शतानंद विवेकरूपी वेतकाठी घेऊन दृश्याची गर्दी मागे लोटत होता. त्याला श्रीराम पाहायचा होता. ज्यांचे श्रीरामावर अलोट प्रेम होते असे वैष्णव, अहं-सोहं ही वृत्ती सोडून नित्य स्वानंदाने पुढे नाचत होते. श्रीरामासमवेत असलेल्या सुवासिनी म्हणजे ब्रह्मविद्येच्या ब्राह्मणी आणि बोधपुत्राच्या माता असून त्या सुखात मिरवत होत्या. या सर्व सुवासिनी आत्मबोधाच्या अक्षता रामाच्या डोक्यावर टाकत होत्या. त्यांचे लक्ष अजिबात विचलित होत नव्हते.

श्रीरामाचे सोयरे, आप्त तसे योगी, अनुभवी, ज्ञानी, मुक्त यांना रघुनाथ वहने देत होता. एकाला सलोकता घोडे, एकाला शुद्ध समीपता रथ, एकाला गाढ स्वरूपता हत्ती, जे संसाराचा रणरंगात नाश करणारे होते. सायुज्याच्या डोलीवर आपले अधिकारी बसवून त्यांना क्षणभरही दूर जाऊ दिले नाही. काही प्रबुद्ध हे रज-तमाची औषधे भरून फटाके तयार करून श्रीरामाला मौज दाखवत होते. चैतन्यअग्नी देऊन, देहांतली ममता जाळून कोणी चंद्रज्योती उजळत होते. तेव्हा त्या गगनापर्यंत उसळून नंतर तिथल्या तिथे विझत होत्या. सलोभ लोभाच्या चिचुंदऱ्या या विवेकाने जाळून दूर टाकल्या तेव्हा त्या लोकांच्या अंगावर पडून पूर्णत्वाने जळत होत्या. अग्नीची धग देऊन, क्रोधाचा भुईनळा जाळला तेव्हा त्यातून भडभडा ज्वाला निघून नंतर तोही शांत झाला. श्रीरामाच्या युक्तीच्या स्वलीलेने कामाचा हातनळा जाळून टाकला. जे त्याला जाळण्याची कला जाणत नव्हते त्यांच्या जिवाला जिव्हाळा पोळत होता. तसे पाहिले तर अत्यंत अवघड असलेला अहंकारबाण चिन्मात्र-अग्नी लावून जाळला तेव्हा जीवपण दचकून

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

दूर पळाले. अहंता, ममता, काम, क्रोध, यांची शांती करत श्रीरघुपती येत होता. हे सारे उगीचच सांगून कथा मी वाढविली असे संतांनी म्हणू नये. कारण अहंममता इत्यादींची शांती होऊन निजात्मचंद्रज्योती जेव्हा उजळून परमप्रकाश प्रकटला ती स्थितीही ऐकावी. अंधार समूळ नाहीसा होऊन तेथे, ऊष्ण चांदणे त्याने पूर्ण गिळले. अती अद्‌भुत तेज प्रकटले आणि श्रीराम सुखाने डोलू लागला.

अशाप्रकारे नाना प्रकारचे त्याग, पदोपदी जे अनेक जीवभाग रामाला ओवाळत होते ते स्वतःच रामरूप झाले. जेव्हा श्रीराम कन्येच्या दारापाशी आला तेव्हा श्रीरामाला शुभशकुन करण्यासाठी एका बाजूला सिद्धीदासी पूर्ण जलाने भरलेल्या घागरी घेऊन उभ्या होत्या. दुसऱ्या बाजूला दारापाशी श्रद्धा, कीर्ती, धैर्य, विरक्ती रामाला जिवाभावाने ओवाळण्यासाठी थांबल्या होत्या. एकीने संपूर्ण त्याग, एकीने परम आनंद, एकीने अनंत सुख, एकीने आत्मनिवास, असे दिले. सुमेधा राणीने जीवभावाच्या भाताच्या मुदी ओवाळून टाकल्या आणि अनिर्वचनीय असा तो सोहळा पाहून ती परमानंद पावली. श्रीराम दारातून बंधूंसमवेत प्रवेश करून आत गेला. तेव्हा सर्वांनी जयजयकार करत त्यांना आत आणले. गुरुवाक्यातून प्रवेश झालेला बोध घेऊन, हृदयबंधन तोडण्यासाठी, तिघा बंधूंना घेऊन श्रीराम आत आला. हा सर्व सोहळा, अती समर्थ दशेंद्रिये असूनही त्यापासून दूर राहिलेल्या दशरथ राजामुळे झाला.

अध्याय पंचविसावा

श्रीराम हा आपल्या बंधूंसह आणि राजा दशरथ ऋषींसमवेत मंडपात आले. जनकाला आनंद झाला. जनकाने त्यांना सन्मानपूर्वक आसनांवर बसविले. गाद्या, पडगाद्या, उच्चासने, लोड, गिरद्या यांच्या आसनांवर ऋषी बसले आणि सभा संपन्न झाली.

मधुपर्काचे विधिविधान

चारी पुरुषार्थाचे चौरंग, त्यावर समाधीसुखासन आणि चौघांसाठी उच्चासन अशी व्यवस्था होऊन मधुपर्काचे विधिविधान सुरू झाले. नित्य प्रार्थनापूर्वक बोलावणे, अधिष्ठानासाठी आसन, कर्मरहित आचमन आणि आचरणाचे चरणप्रक्षाळण झाले. श्रीराम भूषण असता त्याला भूषणे, त्याला अलंकार आणि आभरणे, जो झाकला जात नाही त्याला वस्त्र प्रावरणे, सर्वगत असून त्याला आगमन, ब्रह्मनादी, सहज असलेल्याला पाठपोट, जो अखंड त्याला वस्तिस्थान, निःशब्दाला स्पष्ट शब्द, जो निरंतर आहे त्याच्या लग्नात अंतरपाट असा सर्व प्रकार तेथे चालू होता. जो श्रीराम स्वतंत्र परब्रह्म त्यानेही ब्रह्मसूत्र धरले, वेदविधानाचे सर्व आचार पाळले. हा परमार्थ तेथे होता. जनक मधुपर्कासाठी आला तेव्हा त्याचा भावार्थ जाणून श्रीरामाने तो स्वीकारला. सर्वत्र समता, सर्व समसमान तेच रामाचे आसन; आशानिराशेचे अर्घ्यदान, त्यामुळे श्रीचरण समर्थ झाले. पाद्यार्घ्यासाठी तीर्थ म्हणून त्रिगुणत्रिवेणी, गुणातीत, चैतन्यप्रवाहाने पवित्र अशी यथोचित चिद्‌गंगा होती. स्वतः सुमेधा पाणी घालत होती, विदेही जनक पाय धुवत होता आणि खाली सर्व तीर्थे आवर्जून चरणतीर्थात एकरूप होण्यासाठी आली. श्रीरामाचे चरणतीर्थ सेवन करून तीर्थे पवित्र झाली. सुर, नर, सिद्ध रघुनाथाचे लग्न पाहण्यासाठी तेथे आले.

श्रीरामाने संपूर्ण चोवीस नावे घेऊन आचमन करावे यासाठी सुमेधा त्याच्या हातावर शुद्ध आणि पवित्र जल घालत होती. रामाने सर्व कर्मांचे अपोषण केले. श्रीराम स्वतः परब्रह्माचा अधिष्ठाता होता तरी ब्रह्मसूत्र-यज्ञोपवीत-देण्यात आले. त्यानेही श्रुतिव्यवहार आणि वृद्धाचार यांचा मान राखून ते स्वीकारले. चौघाही बंधूंना टिळे, माळा, उत्तम फुले, चिद्रत्नादी दिव्य भूषणे देऊन

https://archive.org/details/muthulakshmiacademy Bhuvan Vani Trust, Lucknow

CC-0. In Public Domain. Digitized By Sayyam Foundation Research Academy eGangotri

सन्मानित केले. पीतांबर नेसायला दिले. ज्याप्रमाणे मुळाला पाणी घातले तर फांद्या, पाने टवटवीत होतात, त्याप्रमाणे रघुनाथाचे पूजन केल्याने त्याचे बंधूही सालंकृत झाले. जशाप्रकारे जीभ ही रसास्वाद गिळते आणि त्यामुळे सर्व इंद्रिये पुष्ट-तुष्ट होतात, तशाप्रकारे राम जगजेठी पूजला की बंधूंची त्रिपुटी संपूज्य झाली. यज्ञकुंडातील मुख्य ठिकाणी अग्नी संतुष्ट केला की त्यामुळे देवब्राह्मणांना सुख होते, तसे रघुनंदन पूजला की ते तीन बंधू पूजनीय ठरले. ज्याप्रमाणे मनाला संबोधन झाले की त्यामुळे इंद्रियांना पूर्ण समाधान मिळते, त्याप्रमाणे राम अधिष्ठान मानला की त्याचे बंधूही संतुष्ट होतात. दही-मध एकत्र करून चौघांच्याही हातांवर घातले. त्या वेळच्या विदेहाच्या आत्मभावाने राम प्रेमानंदाने भरला. वेदविधानाच्या विपरीत दही, मध रामाने प्राशन केले आणि निष्कर्माला कर्मबंधन आल्याचे पाहून नर, सिद्ध आश्चर्यचकित झाले. जनकाने 'स्वीकार करावा' असे म्हणताच रामाने 'स्वीकार करतो' असा प्रतिसाद दिला. विदेहीने अहंता सोडल्यावर सर्वांचाच स्वीकार झाला. नरेंद्र जनकाने संकल्प सोडल्यावर आणि रामाने दही, मध भक्षण केल्यावर सुमेधेने रामाच्या हातावर पाणी घातले आणि त्याने हात धुतले. त्याबरोबरच त्याने शुद्धाचमन केले. त्यावेळी सद्गुरूनी सांगितले की, "सावधान व्हा. आता कसलीच आडकाठी नाही तेव्हा त्वरेने सुलग्न साधावे." श्रीरामपद रिकामे राहात नव्हते, पावलो पावली पूर्णता मांडली जात होती. दोन्हीकडच्या दोघा सद्गुरुंनी वरांना कौतुकाने पुढे नेले.

वधूंचे गौरीहर पूजन

सीता सती गौरीहरातल्या शिवगौरीवर शिंपण करत होती. शिवाला रामाविषयी प्रेम असल्यामुळे तो भवानीसह लग्नाला आला. मुख्य मायेचा अंतरपाट, तिला श्रीराम हाच शेवट, जनकाचे भाग्य थोर म्हणून त्याला रामाची सोयरीक मिळाली. श्रीरामनामाचे नित्य स्मरण करून अंतःपट निवारण होते, त्यालाच वेदार्थी ब्राह्मणांनी अंतरपाट धरला. देवांचे बंधन सुटायला सीता हीच मुख्य कारण आणि तिचे सुलग्न साधण्यासाठी सूर्य सावधानतेने घटिका राखत होता.

लग्नघटिका भरताच 'सावधान' झाले

लग्नघटिका भरताच क्षणभरही लागला नाही तोच नित्यसावधान असे सत्य जीवन वेगाने वर चढले. 'नित्यसावधान' म्हटले गेले. चौघींनी चावटी (वाणीचे चार प्रकार) सांडून, महामौनाची मिठी पाडा, लगोलग घटिका भरत आहे तेव्हा आत्मदृष्टीने सावधान राहा हे सांगितले गेले. अंतःपट ज्याला आहे, त्याला आधी सावध करा. अक्षरनिमिष असा जो श्वासोच्छ्वास त्याची घडी वेगाने भरते आहे. यासाठी 'नित्य सावधान' असे सद्गुरु म्हणत आहेत. वचनाला (शब्दाला) प्रतिवचन (प्रतिशब्द) न देता नित्य आत्मरूपात सावधान रहावे. जो शब्दार्थाने महामौन पाळतो तो नित्यसावधान असतो आणि ज्याला शब्दार्थाचा अभिमान असतो तो नेहमी असावधान असतो. आपल्या ठिकाणी ज्ञानीपणाची जाणीव ठेवून ते शब्दाला प्रतिशब्द करत नाहीत; पण अशी जाण नसलेले शब्दांनी दूषण देऊन, शब्द करतात त्यांना सावधपण नसते. आता लग्नसमय अगदी जवळ आला तेव्हा दोन्ही भागांत सावधानता असावी, अच्युतचिंतनात मन राखावे, अत्यंत आनंदाचे ते सुलग्न आहे. ॐपुण्याहं वचन, पूर्णतेचे पूर्णपण, ती पूर्णता रघुनंदन, स्वतः आत्मलग्नाने साधतो.

वधू-वर परस्परांना वरतात

ॐकाराच्या पोटी ॐपुण्याहं ही मूळची गोष्ट त्या शब्दाने विरली. अंतःपट लागलीच दूर झाला आणि सुंदर सीतेने रामाला वरले. डोळ्यांशी डोळे भिडले आणि देखणेपण एकच झाले. प्राणपती वरल्याने पूर्णतया प्राणे प्राण एकच झाले.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Trust Foundation / Muthulakshmi Research Academy / eGangotri

श्रीवसिष्ठांच्या लग्नाक्षतांनी पंचभूतांना एकात्मता आली आणि श्रीरामाने सीतेला वरले त्यामुळे आत्मलग्नाने एकात्मता साधली. एक अवयवात एक अवयव होऊन सीताराघव एक झाले. वसिष्ठांनी हे अपूर्व लग्न लावून जीवाभावांची एकता साधली. श्रीरामाने सीतेच्या मस्तकावर लग्नाक्षता घातल्या. तेव्हा तोच हात पावल्याने तिला सुखरूपता आणि स्वानंद मिळाला. श्रीरामाच्या मस्तकावर सीता अक्षता घालू लागली तेव्हा सर्वांभूती तिला रघुनाथच दिसला. यामुळे ती कर्तव्यात लाजली. जी पाणीग्रहणी रघुनाथाला पावली ती सर्व क्रिया खुंटल्याने निष्कर्मता प्राप्त करून बसली. अर्धनारीनटेश्वरामधे जो पुरुष तोच नारी असतो तशाच प्रकारे सीतेने एकरूपतेने रामाला वरले. श्रीराम स्वतः चैतन्यमूर्ती तर सीता ही चिच्छक्ती होती. त्यांचे लग्न एकात्मप्रेमाने लागले अशी चतुरांची चौफेर बोलणी होत राहिली. सीतेने श्रीराम, ऊर्मिलेने सौमित्र-लक्ष्मण, मांडवीने वीर भरत आणि श्रुतकीर्तीने शूर शत्रुघ्न वरिले. चार कन्या-वधू चार वर असे सविस्तर लग्न लागले. वधूवर मनोहरपणे शोभले, सर्वांकडून जयजयकार केला गेला. ऋषींनीही जयजयकार केला, देवांनी पुष्पवृष्टी केली, मंगलवाद्यांचा गजर झाला, आणि आकाश कोंदून भरले. देवांच्या समुदायाने दुंदुभी वाजविल्या. भेरी, मृदंग, किंकाटी यांचा ध्वनी आकाशाच्या पोटात मावेना. वैकुंठात त्या नादाचा प्रतिध्वनी उमटला. रंभा, उर्वशी या नृत्यांगनांनी जनकाच्या रंगणात नर्तन केले. गंधर्वांनी मधुर गीते गायिली. दोन्ही पक्षांत ओवाळणी झाली.

कंकणबंधन

पाणिग्रहण झाले. त्यानंतर वधूवरांना कंकण बांधण्यासाठी वसिष्ठ आले आणि त्यांनी सूत्र परिधान सुचविले. गगनगर्भीचा सूक्ष्म तंतू अष्टधा वेढून झाल्यावर स्थूल अभिमानाने तो दृश्यमान झाला. नंतर तो दोन ठिकाणी तोडला. त्यावर त्रिगुणाचे वळण घालून अखंड खंड केले. अर्धे स्त्रीनामाचे कांकण, अर्धे पुरषत्वाने परिपूर्ण. त्यापुढे मायेची वधूवस्त्रे फेडून टाकून रामाने अच्छिद्रे मेचून अष्टपुत्र्या, पीतांबर वधू-वर स्वानंदाने नेसले. मायामलिन वधूवस्त्रांचा शतानंदाने उदासपणाने स्वीकार केला नाही; तसेच वसिष्ठांनी वरवस्त्रांना नकार दिला. दोघेही पुरोहित पूर्ण उदास होते. ती मायामलिन वस्त्रे घेण्यासाठी सगोत्रांमध्ये लोभामुळे कलह माजला. ते आत्मत्वास विसरून देहलोभामुळे भांडत होते. स्वतःच्या धनसंचयातून कोट्यानुकोटी वरदक्षिणा दिली. तसेच सौभाग्यद्रव्यांचे वाण देऊन निंबलोण उतरण्यात आले. जीवा-जीवांची मिठी पडली. बाह्य पदरांची गाठ बांधण्यात आली. रामाला पाहून जानकीच्या अंतरात उल्हास निर्माण झाला.

होम-हवनादी विधी

पुरोहितांनी सांगितले, "आता विवाहहोम निर्धारपूर्वक करण्यासाठी वधूवरांना बोहल्यावर आणावे." यावेळी श्रीरामाभोवती नरनारींचा वेढा होता. "आता तुम्ही नवरीला कडेवर घ्यावे" असे जेव्हा श्रीरामाला सांगण्यात आले तेव्हा त्याला हसू आले. 'हे लौकिकातले विधी किती विपरीत असतात,' असे त्याच्या मनात आले. वसिष्ठ त्या वेळी म्हणाले, "श्रीरामा वृद्धाचाराचा प्रतिपाळ करावा." यावर श्रीरामाने स्वतः विचार केला की, 'माझी प्रकृती माझ्या मधेच आहे. न घेताच ती माझ्या कडेवर बसली असून, माझ्यापासून ती दूर होणे जाणतच नाही. न बसवता ती माझ्या कडेवर बसली आहे कारण ती मला जीवाभावाने आवडती आहे. मला नावरूपाचे आवरण घालून, गुढ्या उभारून ही नांदते आहे. माझ्यामुळे ही रूपवंती शोभते आहे. माझ्यामुळेच हिला आत्मस्थिती आहे हिची गमनगती माझ्यामुळेच आहे. मी तरी लौकिकाला किती लाजावे. नवरीला हात न लावताच रघुनाथाने तिला उचलली आणि अलिप्तपणे घेऊन

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized By Sarayu Foundation Trust and eGangotri

आला. सारे ऋषीगण विस्मयचकित झाले. चार पुरुषार्थांना चार मुक्ती मिळाव्या तसे चारी वधूवर शोभले. वधूंना वरांनी कडेवर कसे घेतले ते ऐका. सीता सती ही सायुज्यता, तिला रामाने उचलले. ऊर्मिला ही स्वरूपता शोभत होती, तिला सौमित्राने उचलले. मांडवी ही स्वतः समीपता, तिला भरताने तत्त्वतः उचलली. श्रुतकीर्ती सलोकता असून शत्रुघ्नाने तिला उचलली. अशा रीतीने वधूवर बोहल्याकडे आले. शतानंदाने वेदोक्त विधीप्रमाणे विवाह-होमाची समाप्ती केली. द्विजांना धनधान्य वाटण्यात आले. जनकाने विचार मांडला की इथेच चतुर्थ होम करावा. चारी दिवस गडबडीचा परम सोहळा होऊ द्यावा.

धेंडा नाचवणे

'येथेच धेंडा नाचवावा. जनलोक ते पाहायला उत्सुक आहेत.' श्रीरामाने हे वचन भविष्याचा अर्थ जाणून नाकारले-मान्य केले नाही. 'धनुर्भंगाची वार्ता समजताच परशुरामाला क्रोध येईल. दारुण संग्राम होईल. तो संग्राम अत्यंत दुर्धर, दुर्गम असेल. जमदग्नींचा क्रोधाग्नि, परशुरामाचा तुंबळ क्रोध, या दोन्ही क्रोधांचा गर्व प्रबळ असेल आणि त्यामुळे नगरी भस्म होईल. प्रजेला सर्वार्थाने पीडा होईल.' हे श्रीरामाचे मनोगत होते. ते केवळ वसिष्ठच इत्थंभूत जाणत होते. रामाचे अन्य हृद्‌गत त्यांनी जाणले होते. 'वऱ्हाडाहून अधिक मोठे कार्य पुढे करायचे आहे. अयोध्येला गेल्यावर एकाकी वनवासाला अवश्य जावे लागेल. येथे पाणिग्रहण झाले; परंतु लंकेत रावणाचा वध केला म्हणजेच सीतेचे आणि माझे लग्न होईल. तो संपूर्ण सोहळा युद्धाचा असेल. तेथे नाचेल रणधेंडा. राक्षसांच्या शिरांची उदंड ओवाळणी प्रचंड बाणांसमवेत होईल. जानकीशी विवाह हा अल्प सोहळा झाला. आता देवांची बंदिशाळा सोडवायची आहे. ग्रहांचे शृंखलाबंधन तोडायचे आहे. तो आगळा उत्सव व्हायचा आहे.' श्रीरामाचे हे आत्मविचार जाणून वसिष्ठांनी ते सावकाश जनकाला सांगून, वधूवरांची सत्वर पाठवणी करायला सुचविले. 'श्रीराम हा प्राकृत नव्हे; त्याचे शब्द म्हणजे ब्रह्मलिखित.' वसिष्ठांनी हे सांगितलेले जनकाने मान्य करून हर्षयुक्त पाठवणी करायचे ठरविले.

वधूवरांना वस्त्रालंकारांचे आंदण

वधूवरांना आंदण म्हणून दिव्य अलंकार-भूषणे, नाना प्रकारची वस्त्रे, हत्तींच्या पाठीवर लादलेले भरपूर सोने, अती सूक्ष्म धाग्यांची लोकरीची, रेशमाची वस्त्रे, पीतांबर, मूल्यवान विविध प्रकारांतली वस्त्रे देण्यात आली. मोत्यांच्या झालरी, रथांच्या रांगा, गर्जना करणारे सालंकृत हत्तीदळ, रत्नालंकारांनी मनोहर झालेले असंख्य स्वार, पदके, कंठ्या, अनेक दासी, नवसर शोभिवंत हार हे सारे देण्यात आले. श्रीरामाची सेवा करण्यात जनकाला उत्साह वाटत होता. त्याने अत्यंत विश्वासाने मुकुट, कुंडले यांचे घोस दिले. सुमेधा भाविकतेने म्हणाली, "अनन्यभावाने आम्ही शरण येऊन श्रीरामाला आमचा जीव आंदण दिला आहे, त्यापुढे या बाह्य आभरणांची काय योग्यता आहे-" जनकही म्हणाला, "सुमेधा, देहरूपी घर, वित्त, जीवित हे सर्व रामार्पण केले हे निश्चित समज." अशाप्रकारे दोघांनी अती उल्हासाने वधूवरांना आंदणे देऊन, त्यांना निरोप देण्यासाठी राजा जनक स्वतः बराच मार्ग रामाबरोबर पुढे गेला.

प्रयाण - अभिवादन - आशीर्वाद

विश्वामित्रांनी तेव्हा वसिष्ठांना नमन करून, दोन्ही राजांना विचारून स्वतःच्या आश्रमाकडे जाण्याची तयारी केली. त्या वेळी राम आणि लक्ष्मण यांनी साष्टांग नमस्कार घालून नमन केले; तेव्हा ऋषींनी आशीर्वाद उच्चारला आणि मग स्वतःच्या आश्रमाकडे गमन केले. श्रीरामाने जनकाला म्हटले, "आपण येथून आता परत जावे." ते ऐकल्यावर जनकाने वसिष्ठांच्या पायी

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Trust and eGangotri

मस्तक टेकवले; व्याह्यांशी बोलून निरोप घेतला. दशरथाने सन्मानाने जनकाला आलिंगन दिले. जनकाने श्रीरामापुढे सद्भावाने लोटांगण घातले. नंतर कुशध्वजाला बरोबर घेऊन, चारी जावयांना आलिंगन देऊन, अत्यंत हर्षाने जनक आपल्या नगरीला जाण्यासाठी त्वरेने निघाला.

नंतर वऱ्हाड अयोध्येकडे निघाले. त्या वेळी परशुरामाचे आगमन झाले. ज्याच्या धाकाने विश्व कंपायमान होते, जो दारुण, भयानक आहे त्या परशुरामांची श्रीरामाएवढीच थोरवी होती. त्यांच्यात युद्ध होणार होते.

अध्याय सव्विसावा

जानकीसह चौघी बहिणींचे पाणीग्रहण झाले. जनकाने पाठवणी केली. दशरथाला संपूर्ण सुख झाले. चार पुत्र, चार सुना, त्रिभुवनात न मावणारी कीर्ती संपादन झालेली, एवढे त्याच्या गाठी असल्याने अत्यंत आनंदाने तो आपल्या अयोध्यानगरीकडे निघाला.

दशरथ मार्गस्थ - अपशकुनांनी साशंक

राजा दशरथ अयोध्येकडे निघाला तेव्हा त्याच्याबरोबर सिद्ध असे सैनिकदळ, मदाच्या धुंदीत गरजणारे हत्ती गळ्यातल्या घंटा-किंकिणींच्या अलंकारांनी सजलेले होते. पताकांनी अंतराळ शोभिवंत दिसत होते. घोडेस्वार 'जी-जी,' 'मा-मा,' 'थीर-थीर,' म्हणत आपल्या घोड्यांना नाचवत होते. तीन पायांवर नाचणारे घोडे हळुवार नाचताना सुंदर दिसत होते. त्या सैन्यात चढाऊ, लढाऊ, भालेवाले, कोयतेकार, धनुर्धर अशा प्रकारातले पायदळ होते. पुढे धावणारे, बाणाईत, अलगाईत, गाड्या ओढणारे, आरोळ्या देणारे, श्रेष्ठ सेनानी तळपत होते. असे ते सैन्य पुढे चालत होते. भाट गात होते. राजे आणि मुकुटाचे मानकरी मागून चालले असताना त्यांच्या रथांचा घडघडाट होत होता. राजा दशरथ अपार सुखात होता.

राजा आणि वसिष्ठ हे समसमान रथातून, इतरांसह सुखसंपन्नतेने निघाले होते. काही अंतर गेल्यावर त्यांना पुढे एकामागून एक अपशकुन होऊ लागले. तास उजवीकडे तर वायस डावीकडे जात होते. मोर पिसे टाकताना दिसले. मुंगुस आणि सापांचे भांडण चाललेले पाहण्यात आले. कोल्हे जवळपास कोल्हेकुई करत होते. पक्षी करकरत अग्निमुख दाखवत होते. यावरून पुढे युद्ध होणार अशी थोर सूचक जाणीव राजाला झाली. श्रीराम मात्र शकुन आणि अपशकुन हे सारखेच मानत होता; त्यामुळे त्याला भय, कंप नव्हते कारण तो नित्य निर्भय, सावधान होता. राजा दशरथाने वसिष्ठांना विचारले, "हे असे आम्हाला अपशकुन का होत आहेत? दिशा चौफेर धुरकटलेल्या, चंद्रसूर्याचे तेज मंदावलेले, दिवसा गगनात ग्रहगण दिसत आहेत, त्यांतला एक पूर्वेला तर दुसरा पश्चिमेला जातो आहे, रविचंद्र खळ्यांत अडकलेले, अशामुळे अती भीषण उत्पात होतात. पुढचे सारे आकाश अंधारल्यामुळे दृष्टीला काहीच कळत नाही. तेव्हा अहो सृष्टीचे मर्म जाणणाऱ्या श्रीवसिष्ठगुरू, आपण मला यातला यथार्थ सांगावा' अशी दशरथाने नम्र विनंती केली.

श्रीवसिष्ठ म्हणाले, "हे राजन्, जी जी चिन्हे दिसत आहेत त्यांतून दुस्तर अशी विघ्ने प्राप्त होणार आहेत. परंतु आपल्याबरोबर शांती चालत असल्यामुळे विघ्ने विमुख होतील. पूर्वेकडे जाणाराला अपशकुन आणि पश्चिमेकडच्याला शकुन, त्याप्रमाणे भूतमात्रात भगवद्भाव ज्याला, त्याला विघ्नात नेहमी विजय मिळतो. एरवी या विघ्नांची सूचना ठाकठोक युद्ध होईल अशीच आहे; परंतु त्यात रघुकुळ टिळक विजयी होईल हे निश्चित आहे. रामनामाचे स्मरण केले की विघ्ने ज्याच्या चरणाशी शरण येतात तो श्रीराम बरोबर असताना विघ्ने आली तरी त्यावर विजयच मिळवला जाईल."

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

परशुरामांचे आगमन - दशरथाची प्रार्थना

राजा दशरथ आणि श्रीवसिष्ठ यांचे बोलणे चालू असतानाच प्रचंड वावटळ निर्माण झाली. आकाश धुळीने भरून गेले. सैन्याची रचना भंगली. त्या वादळाची झडप लागून सात सागर, सात द्वीपे, पृथ्वी यांना कंप सुटला. मेरू पर्वताचाही थरकाप उडाला. त्यानंच एक भंयकर गर्जना झाली. त्यामुळे सैनिक मूर्च्छित होऊन पडले, दशरथाने धाक घेतला. श्रीराम हा मोठ्या धैर्याचा असल्याने निःशंक राहिला. शिरावर विजेमारख्या जटा आणि खांद्यावर सतेज परशु असलेले भार्गव-परशुराम-धनुष्यबाण हातात घेऊन श्रीरामावर चालून आले. परशुरामांना पाहून वसिष्ठांनी त्यांची पूजा केली. ती पूजा स्वीकारून भार्गव पुन्हा रामावर चालून गेले. त्यांचा अत्यंत पराक्रम पाहून दशरथ कंपायमान झाला. त्याने भार्गवांपुढे लोटांगण घालून दीनपणे म्हटले, "परशुरामा, आपण थोर आहात. एकवीस वेळा पृथ्वी निःक्षत्रीय करून आपण ती द्विजांकडे दिलीत; आपण तरीही आपल्या हाती शस्त्र ठेवले आहे. आपण क्षत्रियांचे कर्दनकाळ आहात आणि तेच आपल्या ब्रीदाचे शील आहे. हा श्रीराम माझे बालक आहे, त्याच्यावर तीव्र राग धरू नका. आपण जर रामाला मारलेत तर त्याचक्षणी आम्हाला सर्वांनाच मरण येईल. एवढी सगळ्यांची हानी करणे हे स्वामी, आपल्याला उचित होणार नाही. तेव्हा मी पुत्रार्थी दीन आहे, पुत्रभयाने कृपण झालो आहे. मला आपण एवढे पुत्रदान द्यावे" असे बोलून दशरथाने भार्गवांपुढे लोटांगण घातले.

परशुरामांचे श्रीरामाला युद्धार्थ आव्हान

राजा दशरथाच्या बोलण्याकडे लक्ष न देता, त्याची उपेक्षा करून, परशुराम जिथे राम होता तिथे गेले. (इथून पुढे परशुरामांचा उल्लेख राम असाही केला गेला आहे. शिवाय भार्गवही) राम आणि श्रीराम हे दोघे युद्धार्थ सिद्ध योद्धे होते. श्रीराम रामाला निवारत होता. राम आणि श्रीराम यांच्यात पूर्ण प्रेम होते. आत्मबोधाने त्यांचे ऐक्य झाले होते. अशा त्या दोघांचा तो संग्राम होता. सुर, नर, वीर यांना तो अवघड आणि न कळणारा होता. युद्धात स्वतःचे वर्म पावून अखेर आत्मबोधाने शांत होणारा तो संग्राम होता. भार्गवाने दारुण बाण सोडला की श्रीराम तो तोडून पाडत होता. याने तो जामदग्न्य परशुराम पूर्ण क्रोध पावला. त्याने दिव्यास्त्रे सोडली, ती श्रीरामाने क्षणभरात निवारली. त्यावर रामाने रागाने निर्वाणशस्त्रे सोडली. तीही श्रीरामाने निवारण केली. रेणुकेने आपल्या दोन्ही आत्मशक्ती भार्गवाच्या हाती दिल्या. सर्व शस्त्रास्त्रांच्या शेवटी निर्वाणीच्या प्रसंगी त्या सोडाव्या या संकेताप्रमाणे रामाने त्या सोडल्या. त्या वेळी काळी आणि कराळी या दोन्ही शक्ती श्रीरामाला ओळखून, त्यांनी श्रीरामाला ओवाळले आणि श्रीरामाच्या भात्यात प्रवेशिल्या. हे पाहून भार्गवाला याचे नवल वाटले. 'माझ्या शक्ती पुन्हा माझ्या हाती याव्या तर त्या श्रीरामाच्याच भात्यात प्रवेशल्या आणि त्यालाच साहाय्यकारी झाल्या!' आपल्या निर्वाणशक्ती श्रीरामाकडे जाऊन राहिल्या याचे भार्गवाला आश्चर्य वाटले. तेव्हा त्याने श्रीरामाला चिडवण्यासाठी असे म्हटले की, "जी जी शस्त्रे मी तुझ्यावर सोडली त्यांचे तू स्वतः निवारण केलेस खरे, पण तू आपली शस्त्रास्त्रे माझ्यावर सोडली नाहीस ही तुझी उणीवच आहे श्रीरामा. तू शस्त्रास्त्रांचे निवारण जाणतोस पण त्यांचे प्रेरण जाणत नाहीस हा तुझा उणेपणा असून, तुझ्या ठिकाणी पूर्ण शौर्य नाही असे दिसते." हे परशुरामांचे बोलणे ऐकल्यावर श्रीरामाने त्यांना नमन करून म्हटले, "ब्राह्मणांपुढे आम्ही नेहमीच उणे आहोत."

श्रीरामाला विष्णुचाप सज्ज करण्याचे आव्हान

श्रीरामाने परशुरामांना प्रत्युत्तर देताना म्हटले, "भार्गवा, तुझ्या हाती परशु आहे. मी आपला गळा तुला देतो आहे; तुझ्या मनात जे करावे असे असेल, ते तू निश्चिंत मनाने अवश्य

https://archive.org/details/muluksmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

कर. कारण, स्वप्नात देखील गाई-ब्राह्मणांचा घात करायचे आमच्या मनात येणार नाही. त्यांच्यावर शस्त्राचा हात उगारेल असा शूरवीर सूर्यवंशात नाही. गाई आणि ब्राह्मण यांच्यापुढे आमचे शौर्य क्षुद्र ठरते. तुझा परशु निवारण्यापुरता हे धनुष्यबाण मी पुढे धरले आहे.'' श्रीरामाचे बोलणे ऐकून परशुरामांना हसू आले. ते म्हणाले, ''शिवधनुष्याचा भंग तू केलास हे ऐकून मी तुझ्याकडे मुद्दाम आलो आहे. तेव्हा आता युद्धाची खटपट न करता आणि शस्त्र धरायची गोष्ट आपण सोडून देऊन निराळे करू या. हे विष्णुचाप माझ्या मुठीत आहे ते तू सज्ञ करून दाखव. हे जगजेठी, जर तू हे पूर्णपणे सज्ञ केलेस तर तू मला जिंकलेस असे समज.'' त्यावर श्रीराम म्हणाला, ''हे आपले जिंकण्याचे भाषण म्हणजे पुन्हा द्विजाविषयी मला दूषण देणारेच आहे. आपण श्रेष्ठ ब्रह्मचारी ब्राह्मण आहात. शिवाय पितृसेवेची परम थोरवी आपल्या ठायी आहे. तेव्हा मला आपली आज्ञा शिवसावंद्य आहे.'' असे म्हणून श्रीरामाने विष्णुचाप हातात घेतले. नंतर त्याने भार्गवरामांना म्हटले, ''हे भार्गवरामा, तुझ्या तीर्थांच्या प्रभावाने आमचा प्रताप; त्या प्रतापाने हे द्विजोत्तमा धनुर्वर्माला सज्ञ करीन.'' शिवधनुष्यापेक्षा भारी अशी विष्णुचापाची थोरवी असूनही श्रीरामाने हातात धरून क्षणभरात ते सज्ञ केले. भार्गवाच्या दृष्टीसमोर ते विष्णुधनुष्य श्रीरामाने सज्ञ केले. एवढेच नाही तर, ठाण मांडून निधडेपणाने त्या धनुष्याला बाणही जोडला. जसा अंतकाचा अंतक, कळिकाळाचा समूळ घातक, असा अलौकिक श्रीराम पाहून भार्गवाने त्याचा धाक घेतला. श्रीरामाच्या प्रतापप्रौढीने परशुरामांच्या डोळ्यांपुढे अंधेरी आणली. धनुष्याची दोरी ओढताच वैष्णव चाप कडाडले.

तेवढ्यात परशुरामांनी तातडीने उडी घेऊन लगबगीने श्रीरामाला लगेच म्हटले, ''हे वैष्णवचाप मोडू नको. तू शिवधनुष्य क्षणात मोडलेस तसे या वैष्णवचापाचे करू नकोस. खरोखर तुझ्या पराक्रमाची थोरवी चराचरात अतुलनीय आहे. तुझे सामर्थ्य अद्भुत आहे. कळिकाळ नित्य तुझे अंकित आहेत. तू रघुनाथा अवतार आहेस हे मला निश्चित समजले आहे. मी तुझा छळ करायला आलो होंतो; पण तुझे स्वभावशील पाहून माझी खळबळ शांत झाली आहे. तू केवळ परमात्मा आहेस'' असे बोलून भार्गवाने श्रीरामाला प्रेमाने आलिंगन दिले. दोघांनाही पूर्ण समाधान झाले आणि त्यांनी मूळची खूण जाणून घेतली.

परस्परांचे अभिनंदन - सज्ञ बाणाचे कार्य

श्रीरामामुळे परशुरामांना समाधान, सुखसंपन्नता, पूर्णानंद, चैतन्यघनत्व, आल्हाद, परमानंद, आत्मबोध यांची प्राप्ती होऊन, दोघांतील भेद जाऊन ते अभेद एकरूप झाले. मी दाशरथी राम हे श्रीरामाला आणि मी भार्गव भृगुपती आहे हे परशुरामांना आठवत नाहीसे झाले. अशी त्या आलिंगनाने स्थिती होऊन घनदाट चैतन्यघन सर्वत्र कोंदले. बोल खुंटले, मौन तुटले, पूर्णत्वाने ते दोघे परिपूर्ण झाले. अवतारकृत कार्यासाठी श्रीराम सावधचित्त राहिला. भार्गवांना श्रीरघुनाथाने आत्मबोधाने उद्बोधित केले. परशुरामांना जेव्हा सावधानता आली तेव्हा सावध करणारा रघुनंदन पाहून त्यांना विस्मय वाटला. श्रीराम त्यांनी शिरोधार्य मानला. कर्म-ब्रह्म-स्थिती समसमान असली तरी श्रीराम हा श्रेष्ठ अवतार आहे हे उमजून भार्गव श्रीरामामुळे सुखसंपन्न झाले.

श्रीरामाने परशुरामांना विचारले, ''हा अमोघ बाण मी धनुष्यावर चढविला आहे, आता तो मागे घेता येणार नाही, तेव्हा तो कोठे प्रेरावा ते स्वामींनी सांगावे.'' असा श्रीरामाचा प्रश्न ऐकून भार्गवांना आश्चर्य वाटले. ''बाणाचे लक्ष्य सावधचित्त, विचार करून तरी तेच सांगणार. श्रीरामाचा बाण अती दुर्धर, त्याने माझे गत्यंतर निपटले'' असे परशुरामांनी म्हटले. ते स्वतःशीच विचार करू लागले की, ''श्रीरामाचा बाण जिथे पडेल तिथे कंदन करतो. याने माझा अभिमान निपटावा, त्यामुळे माझे गमनागमन संपेल. मी अती श्रेष्ठ तपस्वी आहे; तपःसामर्थ्याने अनेक श्रेष्ठ

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized By Sarayu Foundation Trust and eGangotri

लोकांना मी जिंकले आहे; ही लोकविलक्षण विचारसरणी त्या बाणाने नष्ट करावी. मी वीर, धैर्यवान, महाशूर, रणांगणात दुर्धर, शत्रूचे निर्दाळण करणारा एकमेव वीर, हा सर्व प्रकारचा अहंकार नाहीसा व्हावा. माझा अहंकार निपटला गेला की माझे लोकलोकांतर आणि गत्यंतर खुंटले. हे श्रीरामच खरोखर करू शकेल. झुंजार योद्धा बाह्य शत्रूचा संहार करू शकतो; पण श्रीराम अंतरवैरी निपटतो; अहंममता जिवानिशी मारतो; असा हा श्रीराम धनुर्धारी आहे. श्रीरामाचे अनुसंधान शूर वीरांनाही कळत नाही. शिवधनुष्य त्याने धरले; त्याचे विशेष त्याला काही वाटले नाही; तेव्हा अहंकार छेदणेही त्याला फारसे कठीण नाही.' असा सर्व विचार करून भार्गवांनी श्रीरामाला विनंतीपूर्वक सांगितले, "श्रीरामा, या बाणाने तू आता, माझी अहंममता छेदावीस. मी कश्यपाला पृथ्वीचे दान दिले आहे. तेथे मी निरभिमान होऊन राहीन. लोकलोकांतर अभिमान हे श्रीरामा, पूर्ण छेदून टाक. पृथ्वीत निरभिमान राहिले म्हणजे दोष लागत नाही, तेव्हा हे रघुपती, माझी लोकलोकांतर गती तू निश्चितपणे निर्दाळण कर." हे परशुरामांनी सांगितले आणि परम आश्चर्य असे की श्रीराम तेच करू पाहात होता.

गत्यंतराचे वर्म श्रीराम छेदतो.

श्रीरामचंद्राने अलक्षलक्षून, निर्धाराने बाण जोडला. अर्धमात्रेच्या अर्धचंद्राकार बाणाने अहं निपटले. त्याने जेव्हा विष्णुचापाला दोरी चढवली तेव्हाच अहंकाराची बोळवण झाली. पुन्हा तो भार्गवापाशी न यावा म्हणून अर्धमात्रेने त्याला नष्ट केले. अहंकार नष्ट होताच लोकलोकांतर किंवा गतिगत्यंतर कुठून राहणार! परशुरामांना स्थिर केले. याप्रमाणे श्रीरामाने बाण सोडून परशुधरांना सुखी करून, त्यांचे स्वर्गादी गत्यंतर खुंटविले. यासंबंधी एक कथा अशीही सांगितली जाते की श्रीरामाने बाण सोडून क्षणात भार्गवांचे स्वर्गात जाणे खुंटविले. श्रीरामाने स्वर्गाच्या वाटेवर बाणांचे कूड देहाला घातले किंवा चौफेर भिंत घातली आणि भार्गवांची स्वर्गगती रोखली. या सर्वांकडे सूक्ष्म गतीने पाहिले तरी त्यातली अंतर्वृत्ती कळत नाही. बाह्य लौकिक पंडितांची युक्ती अशी की श्रीरामाने स्वर्गगती कुंठित केली. बाणाने स्वर्गगती खुंटली ही लौकिक कथा सांगण्याची पद्धती झाली. खरे तर अहं निपटून काढून लोकांतरगती खुंटविली. ज्याच्याकडे रामचंद्राचे लक्ष जाते त्याचा अहंकार गळतो आणि सहजच गत्यंतर कुंठित होते. याप्रकारे श्रीरामाकडून स्वर्गगती कुंठित केली जाते. श्रीरामाने याप्रकारे परशुरामांची स्वर्गगती खुंटित केली हे यथार्थ असून ते ग्रंथार्थाचे गुह्य आहे. श्रीरामाने परशुधर जिंकला त्यामुळे सुरवरांनी स्वर्गात आणि ऋषिवरांनी भूतळी आनंदाची गर्जना केली. आत्मवीर्याने रघुवीर विजयी झाला. शिवचाप आणि विष्णुचाप या दोन्ही धनुष्यांचा दुर्धर दर्प राघवाने निर्वीर्य केला. श्रीरामाचा असा प्रताप होता.

परशुरामांचा गर्व जाऊन, क्रोध-त्याग

श्रीराम आणि परशुराम यांची युद्धक्रीडा ब्रह्मादि देव विमानात बसून कौतुकाने पाहात होते, कारण दोघेही अद्भुत महावीर युद्ध करत होते. देव गगनातून गर्जना करत होते आणि श्रीराम निश्चित विजयी होणार या कल्पनेने पुष्पवृष्टी करत होते. ऋषी जयजयकार करत होते. परशुराम म्हणाले, "श्रीरघुनाथा, तू मला तत्त्वतः जिंकले आहेस, त्याची मला लाज वाटत नाही. तुझ्यामुळे मला अधिक मोठेपणाच प्राप्त झाला आहे. ज्याप्रमाणे गुळ आणि गोडी अशी दोन नावे असल्याने ती दोन वेगळी वाटली तरी स्वरूपी त्यांचे धर्म दोन प्रकारचे नसतात; त्याचप्रमाणे मी आणि तू आत्मारामच, तेव्हा लाज तरी कोणाची? देह अवयवांची लाज धरत नाही, देहभावाला रूप लाजत नाही; तसेच हे राघवा, मला आणि तुला लाजेचा हेवा असणारच नाही." असे तात्त्विक बोलून नंतर परशुराम म्हणाले, "हे रघुनाथा, धर्मरक्षणाचे कार्य तुझ्यावर आहे तेव्हा तूच लोकपालन कर. माझ्या ठिकाणी जमदग्नींचा कोप आणि माझा स्वतःबद्दलचा अभिमान होता तो तू काढून टाकलास. आता हा परशुराम सुखरूप

https://archive.org/details/muladhara Bhavani Trust, Lucknow

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Research Academy Gangotri

झाला." यांनतर श्रीराम परशुरामांच्या चरणी लागला, परशुरामांनी श्रीरामाला प्रदक्षिणा घातली. हे झाल्यावर रामनामाचा गजर करून परशुराम स्वस्थानी निघून गेले.

श्रीरामाने हा अलौकिक विजय मिळविल्याने वसिष्ठांना अधिक आनंद झाला. राजा दशरथाची धाकधुक संपली. श्रीरामाने वसिष्ठांना आणि दशरथाला साष्टांग नमस्कार घातला. इतरांना आलिंगन भेट दिली. राजाचे मन स्वस्थ झाले. रामचंद्र विजयी झाल्याचा ऋषींना आनंद होऊन त्यांनी श्रीरामाचा जयजयकार केला. यानंतर सर्वजण स्वानंदाने पुढे निघाले.

अध्याय सत्ताविसावा

परशुराम स्वस्थानी गेले, दशरथाचे मन शांत झाले, रघुनाथ विजयी झाल्याचा आनंद चौगुणा वाढला. भार्गवांनी विष्णुचाप तसेच सोडून स्वतःच्या आश्रमाकडे प्रयाण केले. धनुष्य श्रीरामाला त्यांनीच दिले. श्रीरामाने ते वरुणाला दिले. 'मी आपल्या शक्तीने राक्षससमूह रणात जिंकले. हे विष्णुचाप माझ्या हाती पाहून लोक म्हणतील धनुष्यबलाने मला यश मिळाले. तेव्हा या धनुष्यामुळे माझ्या यशाची थोरवी निघून जाईल' या विचारामुळे श्रीराम जगजेठीने त्याचा तत्काळ त्याग केला. स्वसामर्थ्य ज्याच्याजवळ नसेल त्याला धनुष्यानेच केवळ यश कसे मिळेल! याद्दष्टीनेच श्रीरामाने त्या धनुष्याची अभिलाषा न बाळगता ते वरुणाला दिले.

अयोध्येत प्रवेश - प्रजेकडून स्वागत

राजा दशरथ अयोध्येत लवकर प्रवेश करायला उत्सुक झाला होता. गजभार आणि सैन्यदळ यांच्या आनंदाने गर्जना चालू होत्या. निशाण, भेरी, मृदंग, शंख, ढोल, चोंडकी, काहळा वाजवत, जयजयकार करत सर्व नगरीच्या जवळ आले. ऋषी शांतिपाठ म्हणत होते; भाट ब्रीदवाक्ये मोठ्याने म्हणत होते; वीर सिंहनाद करत होते आणि रथांचा घडघडाट होत होता. श्रीवसिष्ठांनी दूत पुढे पाठवून नगर कौतुकाने शृंगारण्यासाठी, कुंकुमाचे सडे घालण्यासाठी, रांगोळ्या काढण्यासाठी, ठिकठिकाणी मखरे, तोरणे लावण्यासाठी सूचना दिली. घरोघरी गुढ्या उभारल्या गेल्या, गगनात पोहोचलेल्या पताका फडकवल्या, दिव्य वस्त्रे आणि दिव्य भूषणे घालून नगरीतल्या नर-नारी शोभिवंत झाल्या. कुंकुम, केशर, फुलांच्या माला, कंठात रत्नपदक, रत्नाच्याच मेखला, नवरत्नांचे हार गळ्यांत अशी सर्व जनता शोभत होती. दारादारांत पूर्णकलश, त्यामध्ये दही, दुर्वा, फुले घालून सिद्ध केले होते. तसेच घराघरांवर तेवत्या दीपांच्या ओळी होत्या. सर्वत्र उल्हास आणि आनंद होता.

राजगृहातही मोठा उत्साह दिसत होता. गुढ्या, मखरे उभारण्यात आली होती. आजानुबाहू प्रतापी श्रीरामच विजयी झाला, याचा सर्वत्र आनंद दिसत होता. श्रीरामाने शिवधनुष्याचा भंग करून, परशुरामांना जिंकून, सीता पर्णून आणली ही वार्ता जनमुखात उमटली होती. कोणी म्हणत होते, "श्रीगुरूंच्या यज्ञात अनेक राक्षस रणरंगात मारले. सुबाहू सर्वांगी छेदला, मारीचाला घायाळ केले." दुसरे कोणी सांगत होते, "दुष्ट ताटिका ही अनेक लोकांना नित्य त्रास देत होती; तिला एकाच बाणाने श्रीरामाने पाहता, पाहता नष्ट केली." कोणी म्हणत, "श्रीरामाने सहजपणे शिळा होऊन पडलेल्या अहल्येचा चरणस्पर्शाने उद्धार केला. श्रीराम ब्रह्मपुतळा आहे. सत्यतः तो सत्-चित्-कळा आहे. साकारही आणि निराकारही असा श्रीराम स्वतः चिन्मात्र आहे." ज्यांनी श्रीरामाचे मुख पाहिले त्या लोकांचे नेत्र धन्य धन्य झाले. श्रीरामाच्या मुखाचे दर्शन होताच तहान-भूक समूळ जाते. परमानंदाचे सुख कोंदाटून, हर्षावर हर्ष ओसंडतो.

श्रीरामाची कीर्ती घरोघरी बोलली जात होती. श्रीराम आल्याचे समजताच त्याला नगरवासी सामोरे आले. छत्रचामरे, गजभार, नानाविध वाद्ये यांच्या समवेत शोभिवंत चारी वधू-वर आले.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

जयजयकारात श्रीरामाचे आगमन झाले. चार पुत्र, चार सुना यांच्याकडे पाहून मनाला तृप्ती झाली. डोळ्यांचे पारणे फिटले. भाग्यभावना दशरथाच्या ठायी आली. श्रावणाच्या मातापित्यांचा शाप दशरथाला सुखस्वरूप झाला. सद्रूप, चित्स्वरूप पुत्राची त्याला प्राप्ती झाली. ज्याप्रमाणे मातेचा राग हा वरून कठोर पण आतून सुखद असतो, त्याप्रमाणे ब्राह्मणाचा शाप होता. कारण त्या शापाने दशरथाला निष्पाप सुख मिळाले होते. श्रावणाच्या पित्याच्या शापासाठी दशरथाला श्रीराम-भेट झाली. त्यामुळे आनंदाच्या कोटी भोगत, सृष्टीतला सद्भाग्यवंत असा दशरथ ठरला होता.

श्रीरामाने नगर-प्रवेश केला तेव्हा चारी मुक्ती पुढे नाचत होत्या. पायघड्यांच्या गतीने चारी पुरुषार्थ पायी लोळत होते. योगनादाच्या ध्वनी-बरोबरीने मंगलवाद्ये वाजत होती. त्या नादाने चिच्छक्ती कोंदाटून गेली. नभस्थिती चिन्मात्र झाली. श्रीराम पाहण्याच्या प्रेमभराने एक चढली परेच्या वर, तर एक गोपुरावर चढली, एक लोकांत राहून त्यामधेच श्रीराम पाहू लागली. एक लाजून एकांती थांबली, एक खिडकीमधून श्रीराम पाहू लागली. एकमेकांना हाताने धरून रामाकडे निर्देश करणारेही होते. 'हा नव्हे तो, तो नव्हे पलीकडचा तो तो' असे पाहणे जो दाखवितो तोच अनुभव एकाला होतो. वास्तविक श्रीरामच ते पाहणे पाहवितो. एक जिवाच्या माथ्यावर चढून आदराने श्रीरघुनाथाला पाहतो. एक जीवभावनेचा त्याग करून रघुनाथाला भेटतो. जीव-शीवांची सांगड कोणाला आवडत नाही. असे लोक एकाकी एकपणात परिपूर्ण रघुनाथ पाहून आल्हादयुक्त स्वानंदाचा अनुभव घेतात. एक कोणी प्रेमाच्या भावनेने श्रीरामापुढे आनंदाने नाचत होते. काहीजणांपैकी एकाला श्रीराम सांगाती, एकाला श्रीराम नित्यगती, एक कोणी श्रीरामाच्या निजस्थितीत स्वतःच आहोत या भावनेने वागत होते. एक निश्चित निःसंग, लोकांच्या लोकस्थितीत स्वतः श्रीराम पाहात. त्यांना कसलीही साशंकता नव्हती. कोणा एकाची नवलाईची तऱ्हा अशी की गर्दीमुळे त्यांना भीती वाटत नव्हती. कारण तो ठायी ठायी रामच पाहात असल्याने त्याच्या आड काहीच येऊ शकत नव्हते. अशा लोकांच्या झुंडी श्रीरामाला पाहण्यासाठी आल्या आणि सभामंडपात गर्दी होऊन गेली.

श्रीराम नगरात गेल्यावर अग्निहोत्री तेवढे आले नाहीत कारण त्यांना वाटत होते की, रामाला पाहून विटाळ होईल. पण त्यामुळे त्यांना श्रीराम अंतरला. श्रोत्री आणि स्वयंपाकी हे श्रीरामाला पाहून विटाळ होईल या चघळपणाच्या भावनेने भारून गेले आणि आधणात तांदूळ टाकायला विसरले. असा त्यांचा विटाळाचा प्रकार असल्याने त्यांना श्रीराम दूरच्या दूर अंतरला आणि हे बापडे धुपधुपीत स्वयंपाकाच्या कर्म-अहंकारात गुंतून पडले. आम्ही आश्रमवासी, श्रीराम जनप्रदेशात जातो. त्यामुळे त्याला पाहताना आम्हाला स्पर्श होईल अशा विचाराने संन्यासी त्याला दुरूनच पाहू लागले. विटाळाच्या भयाने दुरून पाहिल्यास श्रीराम सर्वथा दिसणार नाही, तसाच आश्रम-अभिमान कायम ठेवून पाहू गेल्यास श्रीराम तत्त्वतः दिसणार नाही.

श्रीरामावर लक्ष ठेवून पिंगला नावाची वेश्या उल्हासाने धावत निघाली. त्या वेळी मार्गात एका संन्याशाला ती शिवली, याचे तिला भान नव्हते. 'मला का शिवली ही रांड' अशा रागाने संन्याशाने तिला हातातल्या दंडाने ठोकले. पिंगलेला मात्र श्रीरामाचे मुख दिसले आणि त्या दंडाच्या मारानंतरही ती सुखी झाली. ती संन्याशाला म्हणाली, "अहो स्वामी, तुमच्या दंडाचा घाव पडला आणि माझा अहंभाव नष्ट झाला. तो तुम्हाला दंडीत नाही, तेव्हा पाहा श्रीराम पाहता विटाळ होईल." श्रीराम पाहताक्षणी विटाळ उडून जाऊन तो संन्याशामध्ये दडतो. त्यामुळे विटाळाचे संकट नेहमी संन्याशालाच असते. श्रीराम पाहणाऱ्या भक्त-भाविकांच्या ठिकाणी विकल्प-विटाळ तिळभरही राहात नाहीत. तो अंधपणे संन्याशामध्ये

https://archive.org/details/@sarayu_foundation_trust / Bhavana Trust, Lucknow

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

अभिमानाने आश्रम करून राहतो. "मी आत्मा सर्वांभूतीं परिपूर्ण असे भूतमात्रांना अभयदान देऊन स्वतः संन्यासग्रहण करणे हाच खरा विटाळ आहे. श्रोत्री, स्वयंपाकी, संन्यासी यांच्या अंतरांतच विटाळाचे माहेर असते. ह्यामध्ये तो नित्य मुसमुसत राहून सारे जग अपवित्र पाहात असतो." असे ती वेश्या संन्याशाला बोलत असताना श्रीराम स्वतःच्या निवासाकडे गेला. संन्यासी मृत्तिकास्नान करायला गेला त्यामुळे त्याच्या हाती मातीच आली.

'मी पवित्र आणि जग अपवित्र' हे स्वयंपाकाचे मुख्य सूत्र, त्यामुळे श्रीरामाचा विटाळ होतो म्हणून ते त्याला दूर ठेवतात. यानेच ते श्रीरामाला अंतरतात. वर्णाभिमान, स्वाश्रमाभिमान, कर्माभिमान, धर्माभिमान यांचा त्याग केल्याशिवाय श्रीराम भेटणार नाही. वेश्या सद्-उक्ती बोलली हे कसे म्हणाल, तर ती पिंगला वेश्या म्हणजे श्रीदत्तात्रेयाच्या चोवीस गुरूंपैकी जिचा वृत्तान्त यदूला सांगितला होता तीच होय. श्रीराम राजभवनापाशी आला तेव्हा शांतीने स्वतः येऊन जिवाभावाचे निंबलोण उतरले आणि वधू-वरांना ओवाळले.

श्रीरामाचे राजप्रासादात स्वागत

श्रीवसिष्ठगुरूंनी चारी पुत्र चारी सुना यांना हाताने धरून राजमंदिरात प्रवेश केला. त्या वेळी राणीवशात आनंद उसळला. मंगल वाद्यांचा गजर, द्विजांकडून जयजयकार होत असता राण्या मनोहर वधू-वरांना पाहण्यासाठी आदराने आल्या. प्रथम कौसल्येला नमन झाले. तेव्हा तिने चारी सुनांना जवळ घेऊन बाहूभूषणे, कंकणे, पदकभूषणे देऊन आपला आनंद व्यक्त केला. नंतर सौमित्रेचे चरणवंदन झाले. तिने चारी सुनांना आलिंगन दिले आणि कटिमेखला, करकंकणे देऊन आपला आनंद प्रकट केला. कैकेयीला नमन केल्यावर तिने चारी सुनांना चुंबन देऊन, त्यातल्या आपल्या दोघी सुनांच्या गळ्यात तिने पुष्पमाला घातल्या. राणीवशातल्या अन्य स्त्रियांनी प्रेमाने वधूंना भेटून, नानाप्रकारे ओवाळले. असा संपूर्ण राणिवसा आनंदात रंगून गेला.

श्रीराम आणि बंधू गृहप्रवेश करणार म्हणून भाणवशात सिद्ध केलेली कृत्रिम लक्ष्मी श्रीरामसामर्थ्यामुळे पूर्णांश लक्ष्मी म्हणून तेथे प्रकट झाली. कृत्रिम लक्ष्मीच्या अंतरात खरी लक्ष्मी प्रवेशली. त्यामुळे तिचे रूप मनोहर आणि देखणे दिसू लागले. यावेळी ऋषींसह सर्वांच्या मनास आश्चर्य वाटले की, 'धनुर्भंग करून सीता आणली आणि इथे अंतर्गृहात ही दुसरी सीता कुठून आली.' सीता त्या लक्ष्मीला पाहून साशंक मनाने विचार करू लागली की, 'ही स्त्री घरी असताना श्रीरामाने माझ्याशी विवाह कशाला केला? आम्ही दोघी श्रीरामाच्या असल्यावर त्याला एकपत्नित्व कसे? ती एकपत्नित्वाची कथा दूर, आता तत्त्वतः मला ही सवत झाली. माझ्या कपाळी सवत ओढवली,' असा भाव धरून सीता क्षोभली. तेव्हा लक्ष्मी तिच्या पायी लागून म्हणाली, "जानकी, अगं मी तुझी दासी" यावर तिने आलिंगन देऊन प्रेमभाव व्यक्त केला. मग दोघींचे दोनपण जाऊन दोघींमध्ये पूर्ण एकत्व आले. त्या दोघी एकमेकीत आपल्यालाच पाहू लागल्या. नंतर लक्ष्मी तीच सीता आणि सीता तीच लक्ष्मी असल्याने श्रीरामाचे एकपत्नीपण सीतेला पूर्णपणे समजून आले. सीता आणि लक्ष्मी यांच्या एकपणाचे मर्म ब्रह्मादिकांनाही कळले नाही; पण वसिष्ठ ते पूर्णपणे जाणत होते.

लक्ष्मीपूजन - गुरूभक्ती

श्रीवसिष्ठांनी लक्ष्मीपूजनाचा विधी आणि गृहप्रवेशाचे विधिविधान यथाशास्त्र पूर्ण केले. शुद्ध शस्त्रास्त्र विद्या शिकणे, अत्यंत उल्हासाने स्त्री आणणे, यामुळे लोकांमध्ये कीर्ती पसरणे, एवढे श्रीरामाने केले. चार पुत्र, चौघी सुना राजा दशरथाच्या सेवेत अहोरात्र सावधान होऊन राहिल्या. तसेच ते सर्वजण वसिष्ठांचे दास झाले. त्यामध्ये श्रीराम हा वसिष्ठांना प्रिय, दशरथाचा प्राण आणि सर्वांचा आवडता होता. श्रीराम सर्व भूतमात्रांचा प्रिय होता. त्याच्यामुळे सर्वांना सुखरूपता प्राप्त होत होती. असा तो श्रीराम स्वतः

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

वसिष्ठांच्या वचनांना मात्र दासभावाने वंदन करत होता. श्रीगुरुमहिमा अत्यंत थोर म्हणून श्रीराम त्यांची जपणूक करत होता. लोकसंग्रहार्थ तो हा भक्तीचा विचार खरा करून दाखवत होता.

श्रीराम आणि सीता यांचा प्रेमभाव

श्रीरामाच्या मनाप्रमाणे सीतेचे वर्तन होत असे. तसेच सीतेच्या मनोरथांना श्रीरामामुळे पूर्णता येत होती. सीता आणि श्रीराम यांना एकमेकांमुळे पूर्णता, सुखसंपन्नता, आली होती. रामरसाची रसज्ञ सीता होती आणि सीतारसांचा राम भोक्ता होता. श्रीरामाचे पाहणे सीतेच्या डोळसतेमुळे आणि तिच्यामुळे श्रीरामाचे पाहणे होते. श्रीरामामुळे सीतेला पूर्ण सुंदरता आणि सीतेमुळे राम सगुण शोभत होता. रामामुळे सीता सुलक्षण आणि सीतेमुळे राम लक्षणीय लक्ष्य बनलेला. श्रीराम सीतेचा आत्मभोग, सीतेमुळे राम सुरंग. रामामुळे सीता सांग शोभत होती आणि सीता सर्वांगे श्रीरामच झाली होती. सीता रस तर श्रीराम स्वाद; सीता पुष्प - श्रीराम सुगंध; सीता बुद्धी - श्रीराम बोध; याप्रमाणे त्या दोघांना परस्पर सिद्धी होती. सीता वचन-राम वचनार्थ; सीता पद - राम पदार्थ; सीता मुक्ती -राम मुक्तीचा अर्थ असा एकमेकांनी स्वार्थ साधला होता. सीता जीव - राम जीवन; सीता मन - राम मनोज्ञ; सीता चित्त - राम चैतन्य; असे ते परस्परांना आनंदघन झाले होते. सीता धरा - राम धारक; सीता चलन - राम चालक; सीता व्याप्य - राम व्यापक; त्यांना एकमेकांमुळे सुखसंतोष प्राप्त होता. सीता क्रिया - राम कर्ता; सीता भोग्य - राम भोक्ता; सीता ज्ञान - राम ज्ञाता; अत्यंत प्रेमाने त्यांना एकात्मता लाभली. सीता शर्करा - राम गोडी; सीता व्यवसाय - राम जोडी; अशी त्यांची आवडीने झालेली एकात्मता श्रुतिशास्त्रांनाही स्पष्टपणे कळत नव्हती.

श्रीराम आणि सीता एकमेकांशिवाय पाणी पीत नसत की पान खात नसत अशी त्यांची एकमेकांवर अनन्य प्रीती होती. एकमेकांपासून अर्धाक्षणही ते वेगळे होऊ शकत नव्हते. अणूमध्ये ते दोघे पूर्ण पूर्णत्वाने नांदत होते. अशाप्रकारे अनन्यभावाने ते राहात होते. श्रीराम भोगी सीता सती, सीतेच्या आत्मप्रीतीने श्रीराममूर्ती तिला आनंद देई. सीतेचा संपूर्ण भावार्थ पाहून रघुनंदन उल्हसित होता. सीता द्विगुण भाव धरत असे तर राम चतुर्गुण प्रीती धरत असे. सीता अधिकाधिक भाव धरत असे तर त्यामुळे श्रीरामाचे सुख ओसंडत असे. अशी त्यांची ही अलौकिक प्रीती अनन्यपणे एकमेकांवर निश्चित झाली होती. ज्याची श्रीरामावर जशी प्रीती तशीच त्याच्यावर रामाची प्रीती, हे अनेक ग्रंथांनी सांगितले आहे; त्याचा मी किती अनुवाद करणार! जसा भाव तशी प्रीती, प्रीती तशी प्राप्ती, जशी प्राप्ती तशी स्थिती, हाच परमार्थाचा मुख्य अर्थ आहे. यासाठी ग्रंथात गुह्यार्थ राखून, मुख्यत्वे परमार्थ दाखवावा, हाच कवित्वाचा आपला स्वार्थ असतो आणि त्यामुळेच श्रीराम संतुष्ट होतो.

बालकाण्डाचा उपसंहार

श्रोते, वक्ते, कथाकर्ते हे सर्व श्रीरामचरित्र रामायणाने संतुष्ट होतात. रामायणकथा ऐकून पूर्वजांचा उद्धार होतो. पूर्वजांचेच नवल काय, संपूर्ण त्रिजगत उद्धरते. श्रीरामकथेची नवलाई अशी की, ती सदाशिवाच्या जपमाळेत असते. अंतकाळी मणिकर्णिका हिचाच जप करते. कर्णमूळी असे हे ब्रह्म आहे. स्वतःच्या मनाला सावधान करणे, तेच मणिकर्णिका सत्य जाणा. आदराने रामायण ऐकले तर ते पूर्ण ब्रह्म तारक आहे. काशी मणिकर्णिका येथे हात जोडून उभ्या असतात. यासाठी रामकथेजवळ सर्व तीर्थे अहोरात्र तिष्ठत असतात. चारी मुक्ती येथे दासी होऊन कथाउल्हासाचा परमानंद अनुभवतात. रामायणी कथा अगाध असून तीत पदोपदी परमानंद कानावर पडून आनंद ओसंडतो आणि श्रीरामामुळे आत्मबोध होतो.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust, Lucknow

रामायणाच्या कीर्तीने शिवादिक सुखाने डोलतात. त्रिजगतात पावित्र्य येते. कथा श्रवणाने श्रीराम संतुष्ट होतो.

अशाप्रकारे अयोध्येमध्ये सीतेवर अनन्य प्रीती करणारा रघुपती स्थिर झाला. ही बालकाण्डाची समाप्ती झाली. कडकडीत वैराग्य वश करून, अखंड ब्रह्मज्ञान साधले. पिंडब्रह्मांड ऐक्याला आणून बालकाण्ड संपविले. उदंड शस्त्रास्त्रविद्या साधली. गुरुयाग सिद्धीस नेला. अहल्येचे पापबंड झाडून टाकून बालकाण्ड संपविले. तसेच ताटिका, सुबाहू, दुखंड करून अनेकानेक राजांना लाजवून, मारीचाचे तोंड ठेचून, शिवाचे धनुष्य भंगून, सीतेच्या संशयाला दडून, अहंरावणाचे तोंड काळे करून बालकाण्ड संपविले. पुढे प्रचंड प्रतापी परशुरामांच्या अहंकाराला खंडविखंड करून, विष्णुचापाच्या बंडाचे दमन करून बालकाण्ड संपविले.

बालकाण्ड या रीतीने संपले. पुढे श्रीरामप्रताप प्रचंड आहे. युद्धात तो अनेक राक्षसांना मारील, ते एक एका काण्डात माहिती होईल. एका जनार्दनांना शरण जाऊन ही रम्य रामयण कथा सांगताना इथे बालकाण्ड पूर्ण केले. संतांची परिपूर्ण कृपा माझ्यावर झाली. त्यामुळेच ही अगाध रामायण कथा, जी सांगायला मी अत्यंत दीन असूनही, श्रीजनार्दनगुरूंनी वदविली. स्वतः श्रीरामच ग्रंथ सांगणारा, ग्रंथकर्ता, लिहविता, वदविता आहे. श्रीजनार्दनगुरू यांना एका शरण गेला आणि त्यांनीच श्रीरामकृपेने कथा रामायणातले हे बालकाण्ड पूर्ण करविले.

***

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

वसिष्ठांच्या वचनांना मात्र दासभावाने वंदन करत होता. श्रीगुरुमहिमा अत्यंत थोर म्हणून श्रीराम त्यांची जपणूक करत होता. लोकसंग्रहार्थ तो हा भक्तीचा विचार खरा करून दाखवत होता.

श्रीराम आणि सीता यांचा प्रेमभाव

श्रीरामाच्या मनाप्रमाणे सीतेचे वर्तन होत असे. तसेच सीतेच्या मनोरथांना श्रीरामामुळे पूर्णता येत होती. सीता आणि श्रीराम यांना एकमेकांमुळे पूर्णता, सुखसंपन्नता, आली होती. रामरसाची रसज्ञ सीता होती आणि सीतारसांचा राम भोक्ता होता. श्रीरामाचे पाहणे सीतेच्या डोळसतेमुळे आणि तिच्यामुळे श्रीरामाचे पाहणे होते. श्रीरामामुळे सीतेला पूर्ण सुंदरता आणि सीतेमुळे राम सगुण शोभत होता. रामामुळे सीता सुलक्षण आणि सीतेमुळे राम लक्षणीय लक्ष्य बनलेला. श्रीराम सीतेचा आत्मभोग, सीतेमुळे राम सुरंग. रामामुळे सीता सांग शोभत होती आणि सीता सर्वांगे श्रीरामच झाली होती. सीता रस तर श्रीराम स्वाद; सीता पुष्प - श्रीराम सुगंध; सीता बुद्धी - श्रीराम बोध; याप्रमाणे त्या दोघांना परस्पर सिद्धी होती. सीता वचन-राम वचनार्थ; सीता पद - राम पदार्थ; सीता मुक्ती -राम मुक्तीचा अर्थ असा एकमेकांनी स्वार्थ साधला होता. सीता जीव - राम जीवन; सीता मन - राम मनोज्ञ; सीता चित्त - राम चैतन्य; असे ते परस्परांना आनंदघन झाले होते. सीता धरा - राम धारक; सीता चलन - राम चालक; सीता व्याप्य - राम व्यापक; त्यांना एकमेकांमुळे सुखसंतोष प्राप्त होता. सीता क्रिया - राम कर्ता; सीता भोग्य - राम भोक्ता; सीता ज्ञान - राम ज्ञाता; अत्यंत प्रेमाने त्यांना एकात्मता लाभली. सीता शर्करा - राम गोडी; सीता व्यवसाय - राम जोडी; अशी त्यांची आवडीने झालेली एकात्मता श्रुतिशास्त्रांनाही स्पष्टपणे कळत नव्हती.

श्रीराम आणि सीता एकमेकांशिवाय पाणी पीत नसत की पान खात नसत अशी त्यांची एकमेकांवर अनन्य प्रीती होती. एकमेकांपासून अर्धाक्षणही ते वेगळे होऊ शकत नव्हते. अणूमध्ये ते दोघे पूर्ण पूर्णत्वाने नांदत होते. अशाप्रकारे अनन्यभावाने ते राहात होते. श्रीराम भोगी सीता सती, सीतेच्या आत्मप्रीतीने श्रीराममूर्ती तिला आनंद देई. सीतेचा संपूर्ण भावार्थ पाहून रघुनंदन उल्हसित होता. सीता द्विगुण भाव धरत असे तर राम चतुर्गुण प्रीती धरत असे. सीता अधिकाधिक भाव धरत असे तर त्यामुळे श्रीरामाचे सुख ओसंडत असे. अशी त्यांची ही अलौकिक प्रीती अनन्यपणे एकमेकांवर निश्चित झाली होती. ज्याची श्रीरामावर जशी प्रीती तशीच त्याच्यावर रामाची प्रीती, हे अनेक ग्रंथांनी सांगितले आहे; त्याचा मी किती अनुवाद करणार! जसा भाव तशी प्रीती, प्रीती तशी प्राप्ती, जशी प्राप्ती तशी स्थिती, हाच परमार्थाचा मुख्य अर्थ आहे. यासाठी ग्रंथात गुह्यार्थ राखून, मुख्यत्वे परमार्थ दाखवावा, हाच कवित्वाचा आपला स्वार्थ असतो आणि त्यामुळेच श्रीराम संतुष्ट होतो.

बालकाण्डाचा उपसंहार

श्रोते, वक्ते, कथाकर्ते हे सर्व श्रीरामचरित्र रामायणाने संतुष्ट होतात. रामायणकथा ऐकून पूर्वजांचा उद्धार होतो. पूर्वजांचेच नवल काय, संपूर्ण त्रिजगत उद्धरते. श्रीरामकथेची नवलाई अशी की, ती सदाशिवाच्या जपमाळेत असते. अंतकाळी मणिकर्णिका हिचाच जप करते. कर्णमूळी असे हे ब्रह्म आहे. स्वतःच्या मनाला सावधान करणे, तेच मणिकर्णिका सत्य जाणा. आदराने रामायण ऐकले तर ते पूर्ण ब्रह्म तारक आहे. काशी मणिकर्णिका येथे हात जोडून उभ्या असतात. यासाठी रामकथेजवळ सर्व तीर्थे अहोरात्र तिष्ठत असतात. चारी मुक्ती येथे दासी होऊन कथाउल्हासाचा परमानंद अनुभवतात. रामायणी कथा अगाध असून तीत पदोपदी परमानंद कानावर पडून आनंद ओसंडतो आणि श्रीरामामुळे आत्मबोध होतो.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized By Sarayu Foundation Research Academy Gangotri

रामायणाच्या कीर्तीने शिवादिक सुखाने डोलतात. त्रिजगतात पावित्र्य येते. कथा श्रवणाने श्रीराम संतुष्ट होतो.

अशाप्रकारे अयोध्येमध्ये सीतेवर अनन्य प्रीती करणारा रघुपती स्थिर झाला. ही बालकाण्डाची समाप्ती झाली. कडकडीत वैराग्य वश करून, अखंड ब्रह्मज्ञान साधले. पिंडब्रह्मांड ऐक्याला आणून बालकाण्ड संपविले. उदंड शस्त्रास्त्रविद्या साधली. गुरुयाग सिद्धीस नेला. अहल्येचे पापबंड झाडून टाकून बालकाण्ड संपविले. तसेच ताटिका, सुबाहू, दुखंड करून अनेकानेक राजांना लाजवून, मारीचाचे तोंड ठेचून, शिवाचे धनुष्य भंगून, सीतेच्या संशयाला दंडून, अहंरावणाचे तोंड काळे करून बालकाण्ड संपविले. पुढे प्रचंड प्रतापी परशुरामांच्या अहंकाराला खंडविखंड करून, विष्णुचापाच्या बंडाचे दमन करून बालकाण्ड संपविले.

बालकाण्ड या रीतीने संपले. पुढे श्रीरामप्रताप प्रचंड आहे. युद्धात तो अनेक राक्षसांना मारील, ते एक एका काण्डात माहिती होईल. एका जनार्दनांना शरण जाऊन ही रम्य रामयण कथा सांगताना इथे बालकाण्ड पूर्ण केले. संतांची परिपूर्ण कृपा माझ्यावर झाली. त्यामुळेच ही अगाध रामायण कथा, जी सांगायला मी अत्यंत दीन असूनही, श्रीजनार्दनगुरूंनी वदविली. स्वतः श्रीरामच ग्रंथ सांगणारा, ग्रंथकर्ता, लिहविता, वदविता आहे. श्रीजनार्दनगुरू यांना एका शरण गेला आणि त्यांनीच श्रीरामकृपेने कथा रामायणातले हे बालकाण्ड पूर्ण करविले.

***

https://archive.org/details/muthulakshmiacademy
Bhuvan Vani Trust, Lucknow

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Research Academy, eGangotri

ॐ

श्रीसंत एकनाथकृत भावार्थ रामायण

अयोध्याकाण्ड

अध्याय पहिला

श्रीरामकथेची नव्हाळी अशी की शेष पाताळात वंदन करतो ; शिव प्रेमाने वंदन करतो ; ही कथा भूतलावर जगद्वंद्य झाली आहे ; तरी ते शतकोटी रामायण कोण वर्णन करू शकेल ; मी तर काय अपूर्ण , दीन , परंतु स्वतः श्रीजनार्दनगुरू हे माझ्याकडून वदवीत आहेत. श्रीरामस्वरूप ही चिद्रूपता , चैतन्यशोभांकित सीता हे देवभक्तांच्या कार्यासाठी जड मानवदेहांत अवतरले आहेत. अर्धनारीनटेश्वर म्हणजे जो पुरुष , तोच नारी त्याप्रमाणे सीता ही निर्धाराने एकात्मतेमुळे स्त्री-पुरुष. ज्याप्रमाणे बहुरूपी हाच राव-राणी होतो ; परंतु स्त्री-पुरुष हा भाव त्याच्या मनात नसतो तरी त्याची संपादणी मात्र करतो ; त्याप्रमाणे सीता ही लोकसंरक्षणार्थ सत्यस्वरूप दाखवते. 'एकाकी न रमते' या श्रुतीवचनाने सवतीमत्सर स्वतःच सांगितला. ही बृहदारण्यवेदोक्ती अद्वैतभावाची द्वैतभावात कल्पना करते. परब्रह्म हे आगळेच असून 'सद्दैतावानास' द्विधा अंग पावते तर हा वेदान्तीचा इत्यर्थ , द्वैत कल्पित अद्वैतत्त्वें. याप्रकारे श्रीराम-सीता दोघेही एकात्मतेने सुखाने नांदत होती. अशा स्थितीची व्यवस्था जी नटनाट्यात अवतरते , तरीही व्यवस्था अधिकारविधीने पावते आणि भक्तांना निजपदी नांदवावे म्हणून त्याचसाठी श्रीराम हा निखळ अवतारसिद्धी करणारा होता.

ऊस गाळून रस काढायचा , रस जाळून अखेर साखर करायची. या सुरस साखरेचा निर्मळांश खडीसाखर करायचा. नंतर या खडीसाखरेची अत्यंत योग्य अशी फळे नारळांनी करणे चतुर जाणतात. तिथेही कवळे काढतात ते निजस्वादाला निश्चित करंटे ठरतात. त्याप्रमाणे परब्रह्मतेच्या रसाने , देहाकृतीच्या मुशीत , रामरूपाचे ठसे ओतलेले असून ते आपोआप चित्स्वरूपच असतात. त्या श्रीरामाची मूर्ती शोभेला शोभा आणून त्रिजगतात वावरते ; परंतु तेथे जे स्थूलत्व भावतात ते निश्चित अभागी करंटे आहेत. जे लोक श्रीरामाला मानतात ; ज्याच्या नामामुळे भवभ्रमाचा नाश होतो ; त्यांनी मानवी महिमा बोलूच नये. श्रीरामाची आत्मस्थिती , शिवभवानी त्याचे नाम जपतात आणि ज्याला सखा , सांगाती म्हणून अनुसरणारा लक्ष्मण आहे असा तो श्रीराम आहे.

कुटुंबियांचे श्रीरामाशी संबंध

लक्ष्मण एकात्मतेने रामाचा अंकित , केवळ भावार्थ तो भरत , शत्रुघ्न धैर्यवंत , असा हा व्यूहवृत्तान्त चतुष्टयाचा होता. मुख्य मूळ एक मूर्ती , तीच चार प्रकारांनी अभिव्यक्त होते. यालाच व्यूहचतुष्टय असे नाव आहे. एक निश्चित , त्याचे विभाग आहेत. लक्ष्मण हा आत्मप्रबोध , भावार्थ तो भरत , निर्धारयुक्त शत्रुघ्न आणि आनंदाने विग्रही श्रीराम होता. अहम् आत्मा तोच दशरथ , उत्पत्तीला मुख्य हेतू होता. श्रीरघुनाथ दूर गेला की अहमात्मा निवर्तती. विवेक आणि विचार तसे वसिष्ठ-विश्वामित्र हे गुरू ; ज्यांच्यापासून अती योग्य

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sanskrit Research Academy, Jammu. Funded by IKS-MoE. CC-0. Bhavan Vani Trust, Lucknow eGangotri

शस्त्रास्त्रविद्या दृढ केली. कौसल्या ही सुविद्या, सुमित्रा ही शुध्द बुध्दी, कैकेयी ही अज्ञान-अविद्या, तिच्याजवळ मंथरा ही कुविद्या होती. कुविद्येने अविद्येला क्षोभ आणून श्रीराम वनवासी केला, तेव्हा अनन्यभावाने सीताही श्रीरामाबरोबर निघाली.

सूर्याबरोबर जशी प्रभा, वसंताबरोबर वनशोभा, तशी जानकी जगदंबा आपल्या प्राणवल्लभाबरोबर निघाली. ज्याप्रमाणे गोडी साखरेला सोडत नाही, त्याप्रमाणे सीता श्रीरामाला सोडत नाही. तिला केवळ सेवेची आवड होती म्हणून ती वनात दास्यत्वाने गेली. राज्यात असताना रघुनंदनाने अनेक सेवकांना सेवा वाटून दिली होती; तर वनात मी एकटीच सर्व सेवेला पात्र होईन असा तिचा भाव होता. श्रीरामाची सेवा करण्याची संधी हाती आली तर ते सर्वथा दुर्लभ भाग्य स्वतःला मिळेल आणि तत्त्वतः अशी सेवा करण्यासाठी श्रीरामाच्या पावलावर पाऊल ठेवून ती वनात आली. अशी ही सीतेची गती आणि तशीच स्थिती लक्ष्मणाचीही होती. तोही श्रीरामाची सेवा करण्यासाठी निश्चित सर्वभावाने वनात आला. जसा आत्म्यापाशी निजबोध तसा श्रीरामाबरोबर हा बंधू, दोघांचा एक संवाद होता. त्यामुळे अती आनंदाने तो वनात आला. ज्याप्रमाणे बोध, विरक्ती परमार्थासह असतात त्याप्रमाणे सीता, लक्ष्मण श्रीरामासह होते. असे ते तिघे कृतकार्यावर लक्ष ठेवून वनात वास करण्यासाठी आले. पुढील कार्यार्थाचा विचार करून श्रीरघुनाथ वनात जायला निघाला. इथून हा ग्रंथभाग चालणार आहे, श्रोत्यांनी तो भावार्थ ऐकावा. रामायणीचा ग्रंथार्थ, त्यामध्ये जो भावार्थ, तो श्रोत्यांनी सावधपणे पाहावा, कारण अर्थानेच सहजपणे परमार्थाची जोड होते. एका जनार्दनगुरूंना शरण जाऊन मी हे भावार्थरामायण म्हणजे श्रीरामकथा निरूपण करतो आहे आणि व्यूहचतुष्टयाचे लक्षण सांगतो आहे.

श्रीरामकथेच्या श्रवणाचे फळ

श्रीरामकथेचे अक्षर हे नाशिवंत-अविनाशी यांच्या पलीकडे आहे. जे भाग्यवान ही कथा ऐकतात ते खरोखर सद्‌भाग्याचे. या कथेच्या श्रवणाने विरक्ती निर्माण होते; शांती वाढते, परमानंद-प्राप्ती होते, महापापीही उद्धरतात. चोरटा वाल्मीकी महापापी, तोही रामनाम जपाने निष्पापी झाला. त्याची कथा नित्य जपून ती शिवाच्या नित्य बोलण्यात येत असे. ती ही शिवालाही सेव्य वाटलेली श्रीरामकथा ऐकली तर मरणाला मरण येते, त्याबरोबरच जन्माची बोळवण होते आणि परिपूर्ण ब्रह्माची प्राप्ती होते. नित्य रामनाम जपले तर तो वक्ता पूर्णब्रह्म होतो. त्याच्या कथेचा अनुक्रम कर्म-अकर्माचा छेदक आहे. ही कथा कर्म-अकर्म यांचे निर्दाळण करते. श्रोते स्वतःच परब्रह्म होतात. खरोखर वाल्मीकीचा हा थोर उपकार की त्याने परमार्थ सुगम केला. रामकथेचे बालकाण्ड संपताना विजयगजरात श्रीरामाला अयोध्येच्या आत राजाने आणला. त्या अयोध्येमध्ये स्वानंद सुखात दशरथ नांदत होता. त्याची नित्य सेवा रघुनाथ बंधूंसह करत होता.

भरत आजोळी जातो.

युधाजित हा भरताचा मामा भरताला आजोळी (मातुलकुळी) नेण्यासाठी उत्सुक होता. त्याने राजा दशरथाला एकांतात आग्रहपूर्वक विनंती केली. भरतालाही मनातून आजोळी जाण्याची उत्सुकता होती, हे जाणून दशरथाने स्वतःच त्याला मामाबरोबर पाठविले. हत्ती, घोडे, रथ, पायदळाचे सैनिक, तसेच चतुरंग सेना आणि संपत्ती देऊन भरत आणि शत्रुघ्न यांना दशरथाने आजोळी पाठविले. ते दोघे कैकेयीसुत उल्हासाने जाऊन आपल्या आजोळच्या आजोबा-आजींना वंदन करून राहिले. आजोळच्या सर्वांना आनंद झाला. दोघांनी नित्य नवे नानाप्रकारचे भोग, कौतुकसोहळे यांचा उपभोग घेत आनंदाने तिथल्या

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

वैभवाचा आणि भाग्याचा उल्हासाने स्वीकार केला.

श्रीराम आणि लक्ष्मण हे अयोध्येत राहून अत्यंत उल्हासाने आणि आदराने श्रीवसिष्ठांची सर्वस्वाने सेवा करत होते. तसेच ते दशरथाच्या जवळ राहून अहोरात्र त्याचीही सेवा करत होते. जे जे राजाचे मनोगत असेल ते ते कार्य ते कुशलतेने पूर्ण करत होते. कित्येकदा राजाने आपले मनोगत न सांगताही त्याच्या हृदयीचे कार्य जाणून, रघुनाथ मनोज्ञ असल्याने ते पूर्ण करत असे. श्रीराम समर्थ हा राजाचा अत्यंत लाडका, वसिष्ठांचा आवडता होता. सर्व प्राणिमात्रांनाही तो प्रिय झाला होता. जसे जीवाला जीवन-पाणी-तसा श्रीराम सर्वांना हवाहवासा वाटून ते अखंड आणि अहोरात्र जिवाच्या उल्हासाने श्रीरामाचे नित्य स्मरण करत असत. जसा चंद्रकिरण चकोरांना तसा श्रीराम चराचरांना, सर्व नरनारींना, समग्र जीवांना आवडून अत्यंत प्रिय झाला होता. वसिष्ठांनी राजा दशरथाजवळ एकदा श्रीराम शस्त्रास्त्रविद्याराशी असल्याचा उल्लेख केला. तेव्हा ते रामाचे प्राविण्य पाहण्याविषयी दशरथ मनातून अत्यंत उत्सुक झाला. हे राजाचे मनोगत जाणून वसिष्ठांनी श्रीरामाला शस्त्रविद्या पाहण्याविषयीची राजाची इच्छा सांगितली आणि त्याविषयी आज्ञा दिली. 'आज्ञा प्रमाण' असे म्हणून रामाने पुढे म्हटले, "पितृवचन, साधूसज्जनांची आज्ञा, जो उल्लंघन करतो तो पूर्ण अभागी ठरतो. तो नरदेहातला दगडच मानावा. गुरूंची आज्ञा ऐकताच ती सत्वर पूर्ण करावी. जो त्यासाठी मुहूर्त पाहील तो पामर आणि जो विचार करतो तो मूर्ख समजावा. मी केवळ आज्ञा पाळणारा आहे" असे म्हटल्यावर रामाने लगेच कास कसली आणि तो लक्ष्मणाजवळ येऊन म्हणाला, "गुरूंच्या आज्ञेने दोन्ही बाहूंना स्फुरण येऊन अंगात बळ मावत नाही असे झाले आहे. गुरूंच्या आज्ञेमुळे पूर्ण प्रताप जागला आहे. ज्याला गुरूंच्या वाक्याने उत्साह येत नाही तो पशूच म्हणावा, किंवा गुरूंच्या वचनांविषयी जो आळस करतो तो गाढवाच्या वेषातला शिष्य समजावा."

श्रीरामाचा उत्साह आणि उद्योगीपणा पाहून वसिष्ठांना थोर समाधान झाले. जसा पूर्ण चंद्राच्या दर्शनाने क्षीरसमुद्र उचंबळतो तसे वसिष्ठांना झाले. दशरथालाही आनंद झाला. आपल्या पुत्राच्या उत्साहाला अनुलक्षून त्याने रंगभूमी शृंगारण्याची आज्ञा केली. तो रंगमंडप असा ऐश्वर्यसंपन्न होता की तो पाहून विश्वकर्मा चकित झाला, स्वर्गही त्यापुढे फिका पडला, कैलासालाही लाजविले. अलकावतीचे सौभाग्य, तिची थोरवी, त्या रंगमंडपापुढे हीन ठरली. त्याप्रमाणे रंगधारी श्रीराम शोभला. धनुर्विद्या, अलक्षविद्या, छत्तीस दंडयुद्धविद्या, मल्लविद्या, संमुखी-विमुखीकरणविद्या, लाघवी लघुविद्या, गज-वाजी-रथ आरोहण, निराधारी युद्धकरण, आकाशात झेपावून परत आणणे, मेरू तृणप्राय उडविणे, अशा अलौकिक विद्या गुरूंच्या आज्ञेवरून त्याने दाखविल्या. त्या पाहण्यासाठी नागरिक, साधू यांनी गर्दी केली होती. रंगमंडपात उभा राहून रघुवीर विद्या दाखवत होता. त्या पाहण्यासाठी सुरश्रेष्ठ आले. त्यांच्या विमानांनी आकाशात गर्दी केली होती. त्यावेळी राम आणि लक्ष्मण धनुर्विद्येचे लक्षण, विरश्रीचे सामर्थ्य स्वतः संपूर्ण दाखवत होते.

श्रीरामाचे देदीप्यमान, तेजस्वी असे ठाण पाहून सुर-असुर कंपायमान झाले. लोकांच्या डोळ्यांवर झापड आली. रामाने बाणतेजाने गगन छेदले. गगनाच्या पोटातली अलक्ष खूण स्वतः रामच जाणत होता. श्रीरामाचे संधान अचूक होते. बाणपिसाऱ्याचा वारा शत्रूंसह रथांना उडवत होता. त्या वेळी वावटळीत गवत भिरभिरते त्याप्रकारे हे रथ आकाशात भिरभिरत गरगरा फिरत होते. श्रीरामाच्या बाणाचा प्रताप असा की मेरुमंदार पर्वत चळचळा कापले, सहस्रमुख शेषाच्या तोंडाला धाप लागली, कासवाची पाठ तडतडू लागली. श्रीरामाची सिंहगर्जना ऐकून शत्रूचे जिव्हार भेदले

https://archive.org/details/@sarayu_foundation_trust / Bhuvan Vani Trust, Lucknow

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

जाई, शत्रुदळात हाहाःकार होई, धैर्यवान वीरही मूर्च्छित होत. परशू, पट्टिश, तोमर, गदा, मुद्गर, लहुडी, चक्र या शस्त्रांचा महामार शत्रूचे दमन करी. असि, पाश, शूळ, शक्तिधर, छत्तीस दंडायुध या शस्त्रांचा महामार शत्रूसंभाराचे निर्दाळण करण्याचा चमत्कार दाखवी. वोढण खड्गाचा धारक, सरक थरक दाखवी, वोढण धाक लावून धडके, एकेकाला मूर्च्छा आणत असे. पुढील उड्डाणाच्या वेगाने शत्रुसमुदायाचे मर्दन करणे, तसेच पाठमोर्‍या उड्डाणाने शत्रूच्या वीरांचे निर्दाळण करणे. पुढच्या घावाने मागच्याला पाडणे, मागच्या घावाने पुढच्याला तोडणे असे आघाताचे प्रकार रणात कौशल्याने दाखविले जात. निर्वाणयुद्धाचा निर्वाह करताना मागच्या-पुढच्यांना एकच घाव घालण्याचा पराक्रम तो दाखवी. ऋषी आणि राजा चकित होऊन पाहात होते.

श्रीरामाने मल्लविद्येतले कौशल्य दाखविले. छातीवर, मस्तकावर कोपर हाणून, तळातल्याला वर आणून, चक्राकार फिरवून तो उखडत होता. अष्टांगाच्या कळा त्याला माहीत होत्या. कळा लावून प्राण घेणे, एका अंगठ्याने चेपणे, महावीरांचा जीव घेणे तो करू शकत होता. एक तडाका हाणून त्वरेने हत्तीसहित वीर पाडणे, रथ कडाकडा मोडणे, रथ पायाखाली रगडणे त्याला शक्य होते. त्याला रथारोहणाचे चांगलेच ज्ञान होते. रणात मारण्यासाठी प्रेरणे, गती-विगती, परिभ्रमण, चक्रावर्तन हे सारे तो करत होता. रथ वेगाने नेऊन शत्रुरथाला अपसव्य घालून, स्वतःचा रथ चालवून रथाविषयीचे कौशल्य त्याने दाखविले. निरालंबीच्या गमनासाठी रथ चालवू शके. रथगतिलक्षण दाखवून त्याने सुरसिद्धांच्या मनांत आश्चर्य निर्माण केले. एखादा हत्ती गर्जना करत चालून आला, त्याच्या कुंभावर उडी मारून बसे, मग युद्धामध्ये तो हत्ती वागवून गजयोद्धयांवर महामार करी. शत्रूसैन्य गर्जनेनं दणाणून सोडत हत्तीच्या पायाखाली चिरडी. गजावर बसून गजदळ नष्ट करी. रणात शत्रूची रांगोळी घालणे या गजयोद्धयाला सहज शक्य होते.

श्रीरामाला अश्वारोहण येत होते. युद्धाच्या धुमश्चक्रीत चार पायांवर घोडा नाचवत तो रणांगणात संचार करी. घोड्यांच्या खुरांनी उधळलेल्या प्रचंड धुळीने वैरी भयभीत होत, शस्त्रे गडबडीत विसरत, असा परिणाम रघुराजाने घोडा रणात घातल्यावर होई. घोड्यांची महाझड लागली की सैन्य दुखंड होई; वीरांची मुंडकी तुटत, वैरी रणरंगात दुखंड होत. असे नाना प्रकार अश्व, गज, रथ यांचे करत तो संचार करणारा श्रीराम शस्त्रास्त्रांचा महामार दाखवत अनेक चमत्कार करत होता. युद्धातला पराक्रम अती दारुण असल्याने श्रीरामाचे ते अनुकरण पाहून कोणी मूर्च्छित झाले, तर कोणी प्राण सोडले. एकाने तीव्र धाक घेतला, एकाला धाकधुक वाटू लागली, एकाने लघुशंका केली, तर एकाची वस्त्रे फिटून तो नागवा झाला. श्रीरामाचा पराक्रम पाहून सुर, सिद्ध, दैत्य, दानव अशा सर्वांना कापरे भरले. त्यांना श्रीराम दुर्धर रूपात दिसला. त्याचा दारुण पराक्रम पाहून भूत, भविष्य, वर्तमान जाणणारे सज्ञान लोकही धाकाने थरथर कापू लागले.

श्रीरामाचा अजोड पराक्रम पाहून राजा दशरथ सुखी झाला. आपले कुमार आता विद्यानिपुण झाले असा दृढ विश्वास राजाला वाटला त्यामुळे तो इतका आनंदित झाला की, त्या भरात त्याने अपार वस्तू कुमारांवरून ओवाळून टाकल्या. सुरवरांनी जयजयकार केला आणि पुष्पसंभाराचा त्यांनी वर्षाव केला. वसिष्ठांनाही रामाचा अजोड पराक्रम पाहून हर्ष झाला. त्यांनी प्रेमाने आणि सद्भावाने राघवाला आनंदातिशयाने आलिंगन दिले. ते म्हणाले, "तू शस्त्रास्त्रविद्येचा आवेशपूर्ण साक्षात् अनुभव दिला आहेस. धन्य धन्य तुझा प्रताप आणि विजय. हे माझ्या वरदानाचे दहाबाण तुम्हाला देतो. ते तुम्ही दोघे (राम व लक्ष्मण) यत्नपूर्वक राखा. जेव्हा अगदी निकराचे निर्वाणीचे युद्ध होईल तेव्हा या बाणांमुळे तुम्हाला संपूर्ण जय

https://archive.org/details/muthulakshmiacademy Bhuvan Vani Trust, Lucknow

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

प्राप्त होईल. एक गुपितही तुम्हाला सांगतो की, या बाणांच्या पोटात कोटयानुकोटी शस्त्रास्त्रे असून हे सोडल्यावर शत्रूसागर आटून जाईल.'' अशा भाषणानंतर अपत्यभावाने सन्मान करून, दोघा कुमारांना आश्वासन देऊन मोठ्या जयजयकारासह सर्वजण राजभवनात परतले. श्रीराम सर्वगुणसंपन्न झाला असल्याचे लक्षण राजाला कळले. त्याने वसिष्ठांशी पूर्ण गुह्य स्वतः विचारले आणि रघुनाथाला राज्याभिषेक करावा याविषयीचे मनोगत त्यांच्यापाशी व्यक्त केले. ''स्वामींनी इत्यर्थ सांगावा, तोच कार्यार्थ मी करीन.'' यावर वसिष्ठ काय सांगतात ते ऐकण्यास तो उत्सुक झाला.

अध्याय दुसरा

श्रीरामाला राज्याभिषेक करण्याविषयी दशरथ राजा अती उल्हसित झाला होता. त्याने ज्येष्ठ, श्रेष्ठ व्यक्तींना बोलावून आपल्या मनातले गुपित सांगितले. तसेच वसिष्ठादी महाऋषींना, पृथ्वीपाळ नरवीरांना, सेनापतींना अशा सर्वांना आपल्या मनातले विचार सांगितले. अठरापगड प्रजाजनांना बोलावून, अत्यंत प्रेमाने आणि सन्मानाने जवळ बसवून, तो त्यांना म्हणाला, ''रघुनाथाला राज्याभिषेक करावा हा माझा ठाम मनोरथ असला तरी तुम्हाला तो मान्य आहे का? जो सर्वांना संमत होईल तोच कार्यार्थ निश्चित होईल. तुम्ही सारे माझे परम आप्त आहात, तेव्हा मला निश्चित असे मत सांगा. अहो, विशेषज्ञ वसिष्ठ, माझ्या ठिकाणी आता म्हातारपण आले आहे. तेव्हा आणखी राज्योपभोगाचा विचार मला कसा करता येईल? अहो, सर्वज्ञ, हे लक्षात घ्या, दुष्टसंहारासाठीचा पराक्रम, गोब्राह्मणादी प्रजेच्या सुखस्वास्थ्याचे रक्षण, ही राज्यकारभारातील कर्तव्ये करत मी खूप थकून गेलो आहे. त्या थकण्याला विश्रांतीची गरज आहे. यासाठी श्रीरामाला राज्याभिषेक करावा असे मी म्हणतो. शिवाय त्या रघुनाथाची योग्यता तुम्हा सर्वांना माहिती आहेच. श्रीराम हा माझा सर्वांत ज्येष्ठ पुत्र आहे. तो वरिष्ठांना वरिष्ठ, बलवानांत बलवान, सर्वांना वंदनीय आहे. सर्वगुणसंपन्न, राजलक्षणांत सुलक्षण, साधुसेवेत आनंद मानणारा आणि गुरुवचनाला ब्रह्मतुल्य मानणारा आहे. त्याच्या थोरवीपुढे यम, इंद्र, वरुण हे थोरपणात दीनवाणे ठरतात. त्याच्या प्रतापतेजापुढे चंद्र-सूर्य एखाद्या काजव्यासारखे भासतात. त्याच्या सुंदरतेच्या शोभेपुढे साक्षात् मदनही विरून जाईल. श्रीराम हा प्रेमळांना प्रेमळ झाला आहे. तो लावण्यगाभाच आहे.''

''श्रीराम धैर्यवान, रणरंगधीर आहे. त्याने क्रूर सुबाहू मारला. शिवधनुष्य, ज्याचा मोठेपणा सर्वश्रुत, ते त्याने भंगले. श्रीराम शूर वीर असून त्याचा प्रतापसाठा असा की, त्याने महाप्रतापी ब्राह्मण भार्गवालाही जिंकले. श्रीरामाच्या भयानेच मला निर्भयता येऊन, मी त्रैलोकी पूज्य होईन. चैत्रमासातील पुण्यनक्षत्रावर श्रीरामाला राज्याभिषेक झाला तर तो नरेन्द्र त्रिभुवनाचा भोक्ता होईल, असे गुरूवचन निर्धाराने बोलले गेले आहे. माझे गुरू श्रीवसिष्ठ, हे त्रैलोक्यात परम श्रेष्ठ आहेत. त्यामुळे त्यांचे वचन मला वरिष्ठ वाटते. प्रभातकाळी रामाला राज्याभिषेक होईल.''

''श्रीरामाला प्रातःकाळी अभिसिंचन होईल हे निश्चित,'' असे राजा दशरथाने गर्जून म्हटले. त्यामुळे सर्व आनंदित झाले. राजे, प्रजा, सेना, प्रधान, नागरिक, राजा दशरथाचे बोलणे ऐकून उल्हसित झाले. मेघगर्जना ऐकून जसा मोर थैकार करीत आनंदाने नाचू लागतो, तसे रामराज्य येणार या कल्पनेने सर्वजण उत्साहित झाले.

सर्वांची संमती - श्रीरामाची स्तुती

''श्रीराम हा गुणनिधान आहे. तो राजांना शिरोरत्न आहे.'' असे सर्वांचे एकमुखी अभिप्राय सुखावलेल्या मनाने व्यक्त झाले. पुढे आणखी असे

https://archive.org/details/muluksamiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

म्हटले गेले की, "राम हा सत्यवादी, परम पवित्र, असून एखादा असत्यवादी रामनामाचा जप करील तर तोही निःसीम पवित्र होतो. कारण श्रीरामाने सत्यालाही विश्राम केले आहे. तो, परम धैर्यवान धर्मात्मा असून धर्माचे विश्रामधाम आहे. धार्मिकांचा धर्मात्मा असा राम धर्माश्रम आहे. गुणात गुणातीत असून गुणांचे निजधाम आहे. श्रीराम हा अप्रमेय आत्माराम असा पुरुषोत्तम आहे. श्रीरामाचे यश, कीर्ती अतुलनीय असूनही, नवल म्हणजे त्याची नित्यनूतन अशी ब्राह्मणभक्ती आहे. त्यामुळे षड्गुण त्याला शरण येतात. श्रीरामाला समसमान असा कोणीच तिन्ही लोकी दिसत नाही; मग त्याच्याहून श्रेष्ठ असा कोण असणार! प्रमाणात प्रमाण सांगावे असा तो नाही." हे सर्व सांगून आणि श्रीरामाची योग्यता जाणून, "श्रीराम हा आम्हाला राजा योग्य आहे. आम्ही यापूर्वीच मनाने निश्चित त्यालाच अभिसिंचन केले होते." असा सर्वांचा अभिप्राय व्यक्त झाला.

त्यानंतर घरोघरी त्या अभिषेकाची सत्यता हीच कथा चालू झाली. श्रीराम तत्त्वतः राजा झाला आणि आता रामराज्य येणार हीच वार्ता लोकात पसरली. श्रीरामाचे सर्वस्वाने अनुसरण करणारांना, प्रातःकाळी रघुनाथाला सुमुहूर्तावर वेदोक्त अभिषेक होणार आहे, हे समजल्यावर तो सोहळा पाहण्यास ते उत्सुक झाले. अशी सर्वांची मते ऐकल्यावर त्या शब्दांच्या सुमनमाळा राजाने आवडीने गळ्यात घातल्या आणि पुत्राचा हा सोहळा करण्याविषयी तो उत्साहित झाला. त्याच आनंदात वसिष्ठ-वामदेवादी ऋषीश्वरांना म्हणाला, "आपणही ऐका. अभिषेकाविषयी माझा दृढ निश्चय झाला आहे. चैत्रमास अत्यंत पवित्र आहे, या वेळी वसंतऋतूमुळे वनाची शोभा आकर्षक असते, गुरुपुष्य हे शुभ नक्षत्र लक्षात घेऊन श्रीरामाला अभिषेक करावा. हा माझा निश्चय आपल्याला योग्य वाटून मान्य होत असणार, तेव्हा तुम्ही श्रीरामचंद्राला समग्र तयारीने अभिषेक करावा."

हे राजाचे उद्‌गार ऐकल्यावर राजे, प्रजाजन, नागरिक हे 'आम्ही मनाने आणि वाणीने राजा रघुवीर हा खरोखर अभिषिंचिला आहे' असे म्हणाले. नंतर सर्वांनी आकाश जयजयकाराने कोंदून टाकले. शब्द सुखाने गर्जू लागला. त्या नादाने सुलीन होऊन सर्वजण हर्षयुक्त असे बसले. त्यानंतर दशरथाने उठून सद्‌गुरूंना वंदन केले. वसिष्ठांच्या पाया पडून त्याने विचारले, "राज्याभिषेकासाठी काय पाहिजे ते सांगण्याचे सामर्थ्य आपल्यापाशी आहे. राजे, प्रजा, प्रधान यांसह माझ्यासकट सर्वजण आपले आज्ञांकित आहो. तेव्हा आपण श्रीराम अभिसिंचावा."

राजा दशरथाचे वचन ऐकून, वसिष्ठ संतोषाने उठले. सभाजनांनी हे पाहताच सर्वांनी उभे राहून, हात जोडून, वसिष्ठांना अभिवादन केले. राजा दशरथाने राज्याभिषेक-सोहळ्यासाठी कोण कोण राजे आमंत्रित करून एकत्र आणले त्यांची माहिती पुढीलप्रमाणे आहे. पूर्व-पश्चिम-नृपती, उत्तरेतले चक्रवर्ती राजे, दक्षिणेचे राजे हे आले. पर्वतवासीयांचे प्रमुख, म्लेंछराजे, द्वीपा-द्वीपांवरचे अनेक राजे, गडांचे अधिपती, गडरक्षक, याशिवाय श्रीरामाचा आवाका, भार्गवावर जय मिळविणारा त्याचा प्रताप, यांच्या धाकानेही कित्येक राजे आपणहून उपस्थित झाले होते. हे सर्वजण श्रीवसिष्ठ काय सांगतात ते ऐकण्यासाठी हात जोडून, सावधचित्त उभे राहिले होते. वसिष्ठ जी काही आज्ञा सांगतील ती पूर्ण करण्यासाठी सर्वजण सावध आणि सिद्ध झाले. आणखीही अनेक देशांतले प्रधान आणि प्रजाजन चातकाप्रमाणे वसिष्ठ रामाच्या राज्याभिषेकाविषयी काय सांगतात ते ऐकून घ्यायला उत्सुक झाले होते.

श्रीवसिष्ठांचे योजनापूर्वक निवेदन

श्रीवसिष्ठांनी सर्वजण सावधपणे ऐकताहेत हे पाहून निवेदन करायला आरंभ केला. "सर्वांनी भेटी (उपायन) आणा, ज्या रघुनाथाला राज्याभिषेक

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized By Sarayu Foundation Trust and eGangotri

प्रसंगी द्यायच्या आहेत. शेकडो सुवर्ण भरलेले कलश, तसेच विविध रत्नांचे कुंभ राजांनी आणावे. पांढरे घोडे, पांढरे हत्ती, पांढरी चामरे घेऊन दशरथादी सर्व राजांनी पूजेसाठी उभे राहावे. रघुकुळतिलक श्रीरामाच्या पट्टपूजाप्रसंगी देशोदेशीचे प्रधान आणि प्रजाजन यांनी यथाशक्ती आपले सोने आणावे. ज्याचे शेपूट आणि ज्याची नखे कायम आहेत असे वाघाचे कातडे, सोनशिंगी उत्तम बैल, देखणे पांढऱ्या रंगाचे छत्र, हे सर्व आणावे. मग प्रातःकाळी सुमुहूर्तावर, जे जे आवश्यक ते ते वेदोक्त उपचार करण्यासाठी आवश्यक ते सर्व अभिषेकाकरता आणावे. ब्राह्मणांना निमंत्रण देऊन, उत्तम मिष्टान्नाचे परिपूर्ण भोजन त्यांना द्यावे. यामुळे कार्य सुफल आणि निर्विघ्न होईल. रथ, घोडे, हत्ती अलंकारांनी, सैनिक वस्त्रप्रावरणांनी, नटविण्यात यावेत. पवित्र देवालये, राममंदिर यांना देखील शृंगारावे." स्वतः वसिष्ठांनी सर्वांना आज्ञा करताच त्याप्रमाणे कार्य करण्यास सर्वजण शीघ्रतेने आणि उत्साहाने कामाला लागले.

राजमंदिरे आणि अन्य स्थळे सजविणे

राजमंदिरांना अशी शोभा आणली गेली की, ती मंदिरे जणू वैकुंठाची प्रतिकृतीच भासावी. चैतन्यतेजाने सभा मिरवू लागली. कैलास लाजून पाहात राहिला. देवालयात मूळारंभाचा स्वप्रकाश गर्भागारात पडला. चिदानंद शोभेने सुशोभित अशी प्रद्युम्नाची महापूजा गाभाऱ्यात करण्यात आली. राजप्रासादांच्या शिखरांवर ध्वज, पताका फडकत होत्या. घरोघरी महोत्सव झाला. दारोदारी रत्नदीप लागले. राजप्रासादाच्या प्रांगणात कुंकवाचे आणि चंदनाचे सडे घालून, कौतुकाने चित्रविचित्र रांगोळ्या सर्वत्र घालण्यात आल्या. त्या रंगावलींची शोभा वसंताच्या (ऋतूच्या) शोभेलाही लाजविणारी होती. राजसभा अशी शोभिवंत की त्यापुढे नंदनवन किंवा चित्ररथवन यांनी शरणागती पत्करून लोटांगण घालावे. त्यामध्ये श्रीराम विराजमान झाला. वैकुंठीच्या श्रीरामाला उत्साहाने अभिषेक होताना पाहण्यासाठी वैकुंठातला सर्व समुदाय अयोध्येला आला होता. दासदासी, नागरिक, राजे, सेना, प्रजाजन, प्रधान या सर्वांनी वस्त्राभूषणांची शोभा आणली. त्यामुळे त्याठिकाणी वैकुंठभुवनाची शोभा निर्माण झाली. राजप्रासादाच्या भिंतींवर नानाप्रकारची कलाकुसर करण्यात येऊन दोन्ही बाजूंवर रांगेने दीपमाला रचण्यात आल्या. सर्व मार्गांवर कस्तूरी-चंदनाचा चिखल व्हावा असे शिंपण झाले. त्यांच्या सुगंधी, सुवासाने साक्षात् वसंतालाही (ऋतू) मूर्च्छा आली. श्रीराम त्यात आपल्या शोभेने शोभत होता. बाजाराच्या दोन्ही बाजू चिद्रत्नांनी शोभायमान झाल्या होत्या. त्यातच ठिकठिकाणी हरिकीर्तने चालू होती आणि सर्व माणसे हरिनामाची गर्जना करत होती. कलाकुसर केलेली मखरे शोभत होती. मोत्यांच्या माळांच्या आणि आंब्याची पाने ओवून केलेल्या फुलांच्या माळांच्या ओळी सर्वत्र लावण्यात आल्या होत्या. दारांपुढे तोरणे लावलेली होती. घरांच्या दारात, कळसावर, दिव्यांची योजना केली होती. पुरुष आणि स्त्रिया यांनी घरे सजवून गुढ्या उभारल्या. कुठे अभिषेकाविषयी चर्चा चालू होती; कुठे रामकथा निवेदन केली जात होती; कोणी अत्यंत एकाग्र होऊन श्रीरामाच्या दर्शनार्थ वाट पाहात राहिले होते.

दशरथ ग्रहदशा, स्वप्ने यांमुळे चिंताग्रस्त

अयोध्यानगरी शोभायुक्त, सर्व माणसे उल्हसित झालेली पाहून दशरथ मनातून साशंक झाला. 'श्रीराम-राज्याभिषेकाचा सोहळा मी माझ्या डोळ्यांनी पाहीन असे भाग्य माझ्या कपाळी दुर्लभ दिसते' या विचाराने त्याच्या डोळ्यात अश्रू जमा झाले. तेव्हा त्याने श्रीरामाला बोलावून घेऊन त्याच्यापाशी आपल्या मनातले गुह्य प्रकट केले. तो म्हणाला, "प्रातःकाळी गुरुपुष्यावर तू यौवराज्यपद स्वीकार" तेव्हा श्रीरामाने पित्याच्या चरणांवर

https://archive.org/details/muluksmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust Lucknow and eGangotri

माथा टेकला. त्यामुळे गहिवरून दशरथ पुन्हा पुढे सांगू लागला, "श्रीरामा, मी जे गुह्य तुला सांगेन त्याकडे नीट लक्ष देऊन ऐक. जेव्हापासून मी तुला अभिषेक करण्याचा निर्धार केला, तेव्हापासून क्रूर ग्रह आकाशात अती ऊग्र भासू लागले आहेत. ज्योतिर्विद सांगतात की, माझ्या राशीला शनैश्चर असून तो अती क्रूर आहे. त्याची पीडा दुर्धर आहे. माझे जे जन्मनक्षत्र आहे तेथे वक्री भौम शनैश्चर आहे. त्यात राश्यंतर करून मधेच त्वरेने गुरू आला आहे. मृग नक्षत्रावर माझी उत्पत्ती आणि पुनर्वसूला तुझा जन्म, त्यामुळे दोघांनाही ग्रहगती दिसते. हे निश्चित आहे रघुनाथा की सूर्ययुक्त राहू रोहिणीला, केतू विशाखेला असे बसले आहेत. ते दोघे सूर्याचे वैरी रविरोहिणीला ग्रासू पाहातात. मृग मिथुन ही माझी राशी आहे. रवी बारावा, राहू वृषभेला, अशी क्रूर ग्रहगती दिसते आहे. हे सर्व विनाशाचे मूळ आहे. शनी आणि भौम दोन्ही वक्री असून, तेथेच गुरू मधेच घुसला आहे. हे माझ्या राशीवर क्रूर ग्रह आले असून, तेच श्रीरामाला बारावे आहेत, असे ते ज्योतिर्विद सांगतात."

"श्रीरामा, ग्रहगतीसारखे आणखी एक दुश्चिन्ह आहे. मला एक दुःस्वप्न पडले. त्या स्वप्नात माझ्यापुढे पूर्ण पदार्थ वाढलेले एक पात्र होते. त्यावर घारीने झडप घालून ते पळविले. ढगांशिवाय अत्यंत कडकडाट झाला. विजा वेगाने पडू लागल्या. तो जीवघेणा कडकडाट अत्यंत तीव्र उत्पात सुचवितो. त्याबरोबर मेरू कुळातले पर्वत हादरून टाकणारा अतीव प्रबळ भूकंपही झाला. श्रीरामा, या चिन्हांचे फळ केवळ अनिष्ट असते हे जाणून घे. या चिन्हांचा विलास राज्याचा घात की वनवास? जीवाचा नाश अवश्य होतो. सुहृदांना अत्यंत क्लेश होतात. यासाठी रघुनाथा यौवराज्याभिषेक अत्यंत त्वरेने स्वीकारून तू प्रातःकाळचे पुष्यनक्षत्र साधावेस." श्रीरामाने 'आज्ञा प्रमाण' असे म्हणून राजाचे चरणवंदन केले. राजा संतुष्ट होऊन त्याने श्रीरामाला त्याच्या मंदिरात जाण्याची अनुज्ञा दिली.

श्रीराम राजाला विचारून कौसल्येच्या मंदिरात आला. त्याला पाहून कौसल्या तृप्त झाली. श्रीरामाने तिला जेव्हा सांगितले की प्रातःकाळी यौवराज्याभिषेक करायचे राजाने ठरविले आहे, तेव्हा ती उल्हसित झाली. त्या आनंदाच्या भरात तिने गाई, भूमी, वस्त्रे, सोने अशी अनेक दाने दिली. तेवढ्यात तेथे आनंदित लक्ष्मण आला. त्याला रामाने म्हटले, "माझे राज्य ते तुझे राज्य आहे हे लक्षात घे. कारण आपल्यांत मी-तू हा भेदभावच असत नाही. गोडी आणि गूळ हे दोन्ही स्वरूपी एक असून फक्त नावे वेगळी, हा विवेक ठेवून पाहा की, तू आणि मी एकच आहोत. आपल्यात वेगळेपण नाही. जसे अलंकार आणि सोने यात एकाचेच दोन आकार, विकार असतात, तसे मी आणि तू सर्वदा, सर्व कर्मांत ऐक्यभाव ठेवून असतो. जसा जीव आणि प्राण तसे राम आणि लक्ष्मण." हे श्रीरामाचे बोलणे ऐकून कौसल्येने निबंलोण केले. सुमित्रेलाही पूर्ण आल्हाद वाटला. तिने राम-लक्ष्मणांना ओवाळणी केली. आनंदाने द्रव्यदान केले. नंतर लक्ष्मणाने श्रीरामाला साष्टांग नमन करून म्हटले, "श्रीरामा, तुझ्या सेवेतच मला संपूर्ण सुख वाटते, याला प्रमाण तुझे पायच आहेत. तुझ्या सेवेपुढे त्रैलोक्याचे राज्यही मला अस्वीकारणीय आहे. हे मी तुला शपथपूर्वक सांगतो." हे लक्ष्मणाचे बोलणे ऐकून रामाने त्याला आलिंगन दिले आणि सांगितले, "लक्ष्मणा, तू माझा जिवलग, सखा, सज्जन असा सर्वस्वाने आहेस." यानंतर कौसल्या आणि सुमित्रा यांना नमन करून आणि लक्ष्मणाला निरोप देऊन श्रीराम आपल्या मंदिराकडे निघाला.

श्रीराम आपल्या मंदिरात

प्रातःकाळी अभिसिंचन होणार असल्याने श्रीराम आणि सीता यांना उपोषण करायला सांगण्यासाठी वसिष्ठांना राजा दशरथाने पाठविले होते. श्रीगुरू श्रीरामाच्या मंदिरात येताच रामाने

https://archive.org/details/bhuvanvanitrust, lakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

उत्साहाने त्यांना साष्टांग दंडवत घातले. त्यांची मधुपर्कविधानाने पूजा केली. त्यांना अलंकृत अशा शंभर गायी दान दिल्या. त्यांचे चरण प्रक्षाळण करून तीर्थप्राशन केले. त्या वेळी वसिष्ठांनी स्वतः पुण्याहवाचन करवून, राम-सीता यांना उपोषण सांगण्याचा संकल्प पूर्ण केला. नंतर राम-सीता यांच्याकडून अभिषेकार्थ होमविधान, होमशेषघृतप्राशन, दर्भाच्या अथंरुणावर भूमीवर शयन हे सर्व करवून घेतले. वसिष्ठांनी दशरथाला सांगितले, "राजन्, प्रातःकाळी अभिषेक करण्यासाठी राम आणि सीता यांनी उपोषण करावे आणि दर्भाच्या शय्येवर भूमीवर शयन करायचे आहे." राजाने वसिष्ठांना नमन करून म्हटले, "रामाला अभिसिंचन केल्याने मी ऋणत्रयातून मुक्त होईन, गुरूवर्य." त्यावर वसिष्ठांनी सांगितले, "श्रीरामाला राज्याभिषेक केल्यावर राजा तुला स्वर्गसुख प्राप्त होईल." या उद्‌गारांनी उल्हसित होऊन दशरथ समाधानी झाला.

श्रीरामाला राज्याभिषेक होणार याची इंद्रादी देवांना अत्यंत चिंता वाटू लागली. त्यांनी विधाता-ब्रह्मदेवाला प्रार्थना करून आपली चिंता सांगितली. श्रीरामाच्या अभिषेकाला घरच्याघरी विघ्न उपजेल याविषयीची युक्ती चतुरानन ब्रह्मदेव सांगेल आणि त्यातूनच दशानन रावणाचा वध होईल अशी ती युक्ती असेल.

अध्याय तिसरा

श्रीरामाला राज्याभिषेक होईल याची इंद्रादी देवांना गहन चिंता वाटू लागली. तेव्हा सर्व मिळून चतुराननाकडे जाऊन त्याची विनवणी त्यांनी केली. "तुझे आम्हाला आश्वासन होते की राम सूर्यवंशात अवतरेल आणि तो रावणाचा वध करील. तसेच तो सपुत्र, सबंधू, सप्रधान राक्षसांचा समूळ संहार करील. त्यामुळे देवांची बंदिवासातून मुक्तता होईल. ते तुझे वचन खोटे ठरत आहे. तेव्हा तू ते वचन सत्य करून आमचे बंधविमोचन कर. आमच्या आपत्तीची वार्ता ऐक. इंद्र सेवक, चंद्र छत्रधारक, यम पाणी भरणारा, वायू नित्य ओसरीची पूजा करणारा, विधी दळण-कांडण करणारा, दोन्ही अश्विनी-कुमार हे स्त्रियांना सुगंधी द्रव्ये देणारे, यामध्ये जरा कुठे उशीर झाला की दासी धावून येऊन मारतात. माको तराळी आहे; सटवी बाळंत्याची वस्त्रे धुते आहे; कराळी रात्रीचा जागर घालते आहे; मेसको शेणी थापते आहे. मैराळ देव कानडे राक्षसांच्या दाढ्या करताहेत; त्यांनी समोर आरसा दाखवला नाही तर राक्षस त्यांना सरळ बुकलून काढतात."

"अशीच नवग्रहांची पीडाही मोठी दारूण आहे. रावणाने या नवग्रहांना पायात बेड्या अडकवून बंदिस्त केले असून पायरीखाली अडकवले आहे. राहू, केतू, शनी, मंगळ यांची सुर-असुरांना पीडा व्हायची, तर आता रावणाने त्यांनाच पायरी करून त्यावरून तो मंचकावर चढत असतो. ज्याच्यापुढे विघ्न राहू शकत नाही तो गणेश बापडा गाढवांचे मोठेमोठे कळप चहूकडे वळतो आहे. अग्नीला तर फार मोठे संकट आले आहे; तो रावणाचे अतिशय मलिन, नाना प्रकारचे स्पर्शदोष, अहोरात्र धूत असून ते स्वच्छ धुण्याचा उद्योग करतो आहे. वरुणाकडे पाणी भरणे, वसंताकडे पंखा हालवून वारा घालणे, बृहस्पतीकडे निरोप सांगणे अशी कामे आली असून, प्रजापती हा शांतीपाठक केला आहे. याप्रकारे आम्ही सर्व देव रावणाच्या अंकित आहोत; श्रीराम जर लंकेला आला तर तो आम्हाला बंधनातून मुक्त करील. जर त्या राघवाला अभिषेक झाला तर त्याचे लंकेला येणे घडणार नाही, आमची सुटकाही होणार नाही" असे अत्यंत दीनवाणे निवेदन देवांनी ब्रह्मदेवापुढे केले.

https://archive.org/details/@lakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

ब्रह्मदेवाकडून विकल्पाची पाठवणी

देवांची विनंती ऐकून ब्रह्मदेवाने आपल्याशी विचार केला आणि श्रीरामाच्या राज्यभिषेकात विघ्न यावे यासाठी एक ठाम युक्ती योजली. अविद्येचा अत्यंत लाडका, कार्यनाश करण्यात पटाईत, असा विकल्प राज्याभिषेकात विघ्न आणण्यासाठी पाठवायचे ठरविले. त्यावर विकल्प म्हणाला, " हे ब्रह्मदेवा, पट्टाभिषेक राघवाला होणार आहे. तेव्हा त्याच्यापुढे माझा काय टिकाव लागणार? तिथे माझा प्रवेशही होणार नाही. जिथे रामनाम उच्चारले जाते तिथे मला ते स्थान अतिशय दुर्गम असते. रामराज्याला विघ्न आणणे हे परम अवघड कार्य माझ्याने कसे होणार? श्रीरामाचे जिथे राज्य असते तिथे विकल्पाचा प्रवेश कसा होईल? हे श्रेष्ठ सर्वज्ञा, श्रीरामाच्या पुरुषार्थापुढे माझा पराक्रम चालणार नाही."

ब्रह्मदेवाने त्यावर सांगितले, "विकल्पा, एक गुह्य तुला सांगतो. श्रीरामाच्या दृष्टीला न पडता तू मंथरेच्या पोटात प्रवेश कर. तिच्यामध्ये विकल्पाला पुष्टी मिळेल. मंथरा ही कैकेयीची आंदण आलेली दासी आहे. ती दासी भरताला राज्य मिळावे अशी इच्छा बाळगणारी आहे. ती श्रीरामाचा सापत्नभावाने मत्सर करणारी आहे, स्वभावाने दुष्ट आहे. जिथे श्रीरामाचा द्वेष असेल तिथे विकल्पाची निवांत वस्ती होते. तेव्हा मंथरेमध्ये प्रवेश करून तू अभिषेकाचा विध्वंस कर. अभिषेकाचा विध्वंस करून, भरताला राज्याभिषेक आणि श्रीरामाला वनवास, असे कार्य करण्यासाठी तू लवकर जा." त्यावर विकल्पाने शंका विचारली की, "मंथरा अयोध्येत राहते आहे. तिथे माझा प्रवेश कसा होईल? तेथे प्रवेशच झाला नाही तर मी हे कार्य कसा साधणार?" ब्रह्मदेव म्हणाला, "अरे विकल्पा, मंथरा नगराबाहेरच्या बागेत वनक्रीडेसाठी म्हणून येईल. ती संधी साधून तू प्रवेश कर." नंतर विकल्पाने ब्रह्मदेवाचे पाय धरले आणि तो म्हणाला, "ठीक आहे. मी मंथरेच्या देहात प्रवेश करीन; मग कैकेयीला वश करीन; परंतु तरीही भरताला राज्य मिळणार नाही. श्रीराम ज्येष्ठ आणि भरत कनिष्ठ असे असल्यामुळे हे कसे घडणार? कारण ज्येष्ठ, आणि ज्ञाते हे मान्य करणारच नाहीत."

ब्रह्मदेवाने त्यावर सांगितले की, "तू सर्वज्ञ ज्ञानवंत होशील असे एक गुह्य मी तुला सांगतो, ज्यामुळे भरताला राज्यप्राप्ती होईल. ते वर्म नीट ऐक. दशरथाने शपथपूर्वक दोन वर कैकेयीला दिले आहेत. एका वराने रामाला वनवासी करायचे आणि दुसऱ्या वराने भरताला राज्यपट मागायचा." ब्रह्मदेवाची ही युक्ती ऐकून विकल्पाने शकुनगाठ बांधली आणि मंथरेच्या पोटात शिरण्यासाठी तो मोठ्या कष्टाने निघाला. अयोध्या, रामप्रताप यांच्या धाकाने विकल्प चळचळा कापू लागला. जिथल्या तिथे तो लपून राहिला. श्रीरामाच्या भीतीने तो साशंक बनला. गुप्त राहण्यासाठी त्याने हिंवराच्या खोडात दडी मारली. त्या ठिकाणी निळीची सुनीळ झाडी होती. त्यामध्ये तो दडी मारून राहिला. यासाठी ती झाडे सज्जन लोक अपवित्र मानतात. कारण विकल्पाचे जे जे वास्तव्यस्थान, ते ते शुभकार्याचा विध्वंस करणारे असते. या झाडांशिवाय वेगळे काही विकल्पाचा स्पर्श होईल असे ठिकाण नसल्याने ती झाडे निंद्य आणि सर्व कार्यांसाठी अपवित्र समजली जातात. यामुळे कलिंगफळात अपवित्र विकल्पाचा निवास होतो. जे ही फळे सेवन करतात त्यांना सहजच विकल्पाची प्राप्ती होते. मंथरेला कलिंगफळाची आवड होती. तिने ती फळे पाहिली.

मंथरा बागेत आली तेव्हा तिला अकस्मात् कलिंगफळे दिसली. त्यामुळे ती फार उल्हसित झाली आणि ती फळे सेवन करायला गेली. तिने ती फळे आवडीने हाती घेतली, आणि खाल्ली. त्या वेळी तिच्या पोटात विकल्पाने प्रवेश करून तिला व्यापून टाकली. मग तिच्या हृदयात असा अर्थ निर्माण झाला की, 'राजाच्या आवडत्या कैकेयीराणीचा

https://archive.org/details/muktabodh; Bhuvan Vani Trust, Lucknow; eGangotri academy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust, Lucknow

पुत्र भरत असताना, त्याला सोडून रघुनाथाला राज्य देण्यात येत आहे हे वाईट आहे. कनिष्ठ भरताला आजोळी धाडून, त्याच्या माघारी रामाला अभिषेक करणारा दशरथ हा दुष्टपणा करतो आहे. यामुळे आम्हावर केवढा अनर्थ होतो आहे. जर रामाला राज्य मिळाले तर भरत परदेशी होईल, कैकयी कौसल्येची दासी होईल.'' अशा कल्पनांचा विचार करतच मंथरा रामराज्याचा द्वेष मनात धरून, रागाने जळफळत कैकेयीच्या भवनात आली.

मंथरा मुळातच श्रीरामाचा द्वेष करत होती. एखाद्या प्रसंगी ती आंगण झाडत असेल आणि पुढे श्रीराम दिसला तर ती द्वेषभावनेने केर त्याच्याकडे लोटत असे. तेव्हा श्रीराम म्हणे, ''हे द्वेष करणाऱ्या मंथरे, वर न पाहता हे करते आहेस तर तू अधोमुख अशी कुब्जा होशील असा माझा तुला शाप आहे.'' या शापामुळे ती लगेच कुब्जा झाली. तेच तिचे स्वतःचे नाव पडले.

मंथरेकडून कैकेयीचे मन कलुषित

श्रीरामाचा राज्याभिषेक-सोहळा जेव्हा जेव्हा मंथरा पाहात होती तेव्हा तेव्हा तिचा राग बळावत होता. क्रोधाचा एक विशेष आक्रोश असतो. कैकेयीच्या भवनात रामराज्याचा उल्हास सर्वांच्या मनात उफाळून, ते भवन गुढ्या, तोरणे, ध्वजा, पुष्पहार यांनी सजविले जात आहे हे पाहून मंथरा अत्यंत संतापली. त्यातच, रामराज्य-कल्पनेने सुखावलेली कैकेयी अलंकार-भूषणे घालून, मंचकावर लोडाला टेकून, स्वस्थपणे विसावली असून, दोन दासी तिला विडे देत होत्या, एक पंख्याने वारा घालत होती, असे मंथरेला दिसले. रागाने डोळे गरगरा फिरवत, थरथर कापणारी मंथरा अत्यंत संतापाने कैकेयीला म्हणाली, ''मूर्ख बये ऊठ, तू सुखात स्वस्थ कशी? तू सुख मानतेस तेच दुःख आहे. रामराज्याचे सुख मानून गुढ्या-तोरणे मोठ्या आनंदाने उभारल्यास, पण तेच तुला महादुःख देणार आहे. पण तू मूर्ख म्हणून तुला ते समजत नाही. आपण राजाची आवडती राणी आहोत या गर्वाने तू भ्रमात पडली आहेस. अगं, सौभाग्य तिकडे कौसल्येकडे गेले. हे तुला निश्चितपणे कळलेलेच नाही. ज्याप्रमाणे केळी, पोफळी पाण्यातच वाढतात, पण ते पाण्याचे ओघ मुळाशी आले तर तीच झाडे त्याने उन्मळतात; त्याप्रमाणेच तुझी नाशस्थिती आली आहे.'' मंथरेचे उग्र उद्‌गार ऐकून सौभाग्यसुखी कैकेयी चकित झाली. तिने आश्वासनपूर्वक मंथरेला तिच्या रागाचे कारण विचारले.

''मंथरे, तुझा कोणी अपमान केला, तुला कोणी त्रास दिला, तुला कोणी काही बोलले, काय झाले तरी काय? मला आधी सारे सांग पाहू. तू तर माझी आवडती जिवलग आहेस. तू स्वतः कधी क्रोधाविष्ट होत नाहीस; मलाच क्रोधाचा त्याग करायला तू सांगतेस आणि आज तूच अत्यंत क्रोधाने दुःखी झालीस हे कसे? तुला फार मोठी चिंता लागलेली दिसते आहे. त्यामुळे तुझे मुख मलिन झाले आहे. असे कोणते दुःख तुला झाले आहे ते मला सविस्तर सांग पाहू. तुला कोणी वाईट शब्दांनी बोलले, की तुझ्यावर कोणी हात उगारला? सर्व वृत्तान्त मला सांग म्हणजे मी त्याचा नायनाट करीन.''

कैकेयीच्या शब्दांनी अधिकच संताप येऊन मंथरा म्हणाली, ''कैकेयी, अगं तुला भयानक विघ्न होणार आहे हे तुझ्या लक्षात कसं येत नाही. राजा दशरथ तुला पूर्ण फसवतो आहे. लाडकेपणाच्या गर्वामुळे तुला त्याचे लक्षण समजलेच नाही. तू ज्या राजवैभवाचा गर्व करते आहेस ते राज्य राजा दशरथ श्रीरामाला देतो आहे. त्यामुळे राजवैभव कौसल्येकडे गेले हेही तू मूर्ख समजत नाहीस. तुला गहन दुःख प्राप्त झाले, यामधे मी तुझ्या आजोळची म्हणून त्या दुःखात बुडून गेले आहे. तुझे मूर्खपण पाहून मला अधिक दुःख होते आहे. खरे तर, तुझ्या उत्कर्षातच माझा उत्कर्ष आहे, तुझ्या सुखसंपन्नतेतच माझे सुख आहे; तुझ्या दुःखाने मीही दुःखीच होणार. यासाठी

https://archive.org/details/muluk Bhavan Vani Trust, Lucknowmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust, Lucknow

तुझे अज्ञान मला तुझ्यासाठी संतप्त करते आहे. राजा वैभवलोभाने तुझ्याशी वागतो आणि तोच राजा तुला फसवतो आहे. भरताला त्याच्या आजोळी पाठवून, त्याच्या पाठीमागे रामाला राज्यपट देतो आहे. श्रीरामाला राज्य दिले तर भरताला दास्यभोग येईल. सत्तासामर्थ्य कौसल्येकडे जाईल आणि तू बसशील मूर्खपणे स्तुती करत. तू माझे हे बोलणे विवेकाने विचार करून लक्षात घे. भरताला साहाय्य कर. आपले आपण हित कर. उगाच गर्विष्ठपणाने फसू नकोस."

मंथरेचे बोलणे ऐकून कैकेयी अधिकच सुखावली. तिने गळ्यातला रत्नखचित अलंकार मंथरेला दान दिला. गळ्यातले पदकही मंथरेला दिले. कैकेयी तिला म्हणाली, "अगं मंथरे, रामराज्याचे सर्वांना सुख वाटते आहे, मग तूच तेवढी दुःखी का? मला तर भरताहूनही श्रीराम अधिकच प्रिय आणि अत्यंत आवडता आहे. तू मूर्खपणे दुःख मानतेस, पण मला रामराज्याने महासुख वाटते आहे. भरत इष्ट आणि राम अनिष्ट असे मानणारे महापापी ठरतात. श्रीराम ज्येष्ठांतला ज्येष्ठ आहे. श्रेष्ठांतला श्रेष्ठ आहे. राज्याचे हित श्रीरामच करील. जसा भरत तसा श्रीराम असे मला दोघेही समसमान वाटतात. कुब्जे, मंथरे, तुला त्यांच्यात दुजा, विषम भाव दिसतो हे तुझेच एक मूर्खपण आहे."

कैकेयीचे बोलणे ऐकल्यावर कुब्जा रागाने मूर्च्छित झाली. नंतर सावध होताच तिने गळ्यातले अलंकार काढून रागाने फेकून दिले. "राज्य गेले रामाला. वैभव गेले कौसल्येला. दशरथाने तुला ठकविले आणि तू मूर्खपणाने सुख मानते आहेस?" मंथरा रागाने बोलली. त्यावर कैकेयी पुन्हा, "राम राजांचा ज्येष्ठ पुत्र असल्याने त्यालाच राज्याचा अधिकार प्राप्त आहे. राम हा गुणगंभीर, त्रैलोक्यात महाशूर, त्यालाच राज्याचा अधिकार असताना तू क्षुद्रपणे रामद्वेष करतेस. राम भरताचे काही वाईट करेल हे तर कालत्रयी घडणार नाही. कुब्जे, तू सांगतेस ते सर्व खोटे आहे. तू हट्टाने श्रीरामाचा द्वेष करते आहेस."

कैकेयीने असे बोलून दाखविताच मंथरा रागाने कपाळ बडवू लागली. त्या वेळी ती 'तू एक मूर्खच आहेस, जी रामाला राज्यपदावर बसवते आहेस' असे म्हणत होती.

कैकेयी आपले म्हणणे ऐकणार नाही असे कुब्जेला निश्चितपणे वाटले. तेव्हा "तुझे दुःख मला पाहवणार नाही म्हणून मीच प्राणत्याग करीन" असा कांगावा करत ती जमिनीवर गडबडा लोळू लागली. तिचे केस मोकळे सुटले. कैकेयीने मग तिला उठवून आलिंगन दिले. या वेळी मंथरेच्या पोटात असलेला विकल्प हा कैकेयीच्या पोटात प्रवेशला. एका क्षणात त्या आलिंगन भेटीत हे नवल घडले. मंथरेच्या हृदयाला कैकेयीचे हृदय लागताच दोन्ही ठिकाणी एकच विकल्प अत्यंत वाढला. रामराज्याभिषेकाचा द्वेषही वाढीला लागला. मंथरा कैकेयीला म्हणाली, "रामराज्य तुला अपघात करणारे आहे. हे तू मानतच नाहीस. मी तरी तुला किती शिकवणार? तुला दास-दासी अनेक आहेत, पण ते दशरथाचे सेवक आहेत. तुला माहेराकडची मीच एक आप्तभावाची दासी असून, मलाच तू मूर्ख म्हणते आहेस."

सावत्रपणाचे वर्णन

"सवतीचे पुत्र हे निश्चित शत्रू, हा माझा मंत्र तू मानत नाहीस; पण याविषयी शास्त्रविचार काय आहे तेच मी आता तुला पूर्वपरंपरेनुसार सांगते; ऐक. कश्यपापासून निर्माण झालेले सावत्र बंधू देव आणि दैत्य होत. ते एकमेकांचा घात करतात हेच नित्य पुराणे गर्जून सांगतात. याच अर्थाची वेदोक्तीही आहे. याज्ञवल्क्य महामूर्ती उपनिषदातून काय सांगतात त्याचा अनुभव ऐकून ठेव. अशाप्रकारे वेदशास्त्रांचा विचार सावत्र ते वैरी हेच मुख्यतः सांगतो. तूही माहेरी पुराण ऐकले आहेस. ते तुला गर्वामुळे आठवत नाही. देव आपला

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust, Lucknow
CC-0. Public Domain. Digitized by Muthulakshmi Research Academy eGangotri

स्वार्थ सिद्ध करण्यासाठी महायुद्ध करून दैत्यांना मारतात. दैत्यही त्यांचे हित साधावे म्हणून देवांना ग्रासू पाहतात. एखाद्या कुत्र्या-कुत्र्यांमधल्या भांडणाप्रमाणे ते सतत एकमेकांशी भांडत असतात तसाच कलह राजपुत्रांमध्ये होतो. मग सावत्रपणात कसली आली आहे मैत्री! अगं दिती ही देवांची साक्षात् सावत्र माता ना; पण ती जेव्हा गरोदर होती तेव्हा तिच्या गर्भाचा घात करायला स्वतः इंद्र नम्रपणे तिच्या सेवेत राहिला. नंतर एक योग्य संधी पाहून इंद्रानेच तिच्या गर्भाचा वध केला. त्याने एकोणपन्नास वेळा वज्राने गर्भाचा छेद करून मरुद्गण विशुद्ध केले. यावरून हेच दिसते की, सावत्रांमध्ये नित्य स्वभावतःच थोर वैर असते. हा विचार तुला समजत नाही आणि मलाच तू क्षुद्र म्हणतेस?"

कैकेयीवर परिणाम - मंथरेची शिकवण

मंथरेच्या बोलण्याचा कैकेयीवर परिणाम होऊन ती उल्हसित झाली. श्रीरामाचा राज्याभिषेक चांगला नाही, अशा भावनेने ती रामाचा गाढ द्वेष मनातून करू लागली. ती मंथरेला म्हणाली, "राम ज्येष्ठ आणि भरत कनिष्ठ आहे. तेव्हा कनिष्ठाला राज्यपट द्या हे म्हणणे स्वतः वसिष्ठ केव्हाही मान्य करणार नाहीत. तेही अती श्रेष्ठ आत्मज्ञानी आहेत. मी जरी राजाला वश केला तरीही वसिष्ठ माझे बोलणे ऐकणार नाहीत. कनिष्ठाला प्रथम राज्यपट असे शास्त्रार्थही सांगत नाही. वसिष्ठ शास्त्रार्थ सांगू लागले तर दशरथ तिथे काय करणार. अशी वेदवाणीची बंदी पडल्यावर भरताला राज्य कसे मिळेल?" यावर मंथरा कैकेयीला म्हणाली, "जर तू माझ्या सांगण्याप्रमाणे करशील तर भरताला राज्य एका क्षणात मीच एक साधू शकेन." कैकेयीने विचारले, "कोणत्या युक्तीने तू भरताला राज्य साधशील, तो उपाय मला अगदी व्यवस्थितपणे सांग. वसिष्ठ-वामदेवादी ऋषी भरताला राज्य देण्याचा विचार मान्य करतील अशी कोणती तुझी युक्ती आहे ती यथार्थ मला सांग."

मंथरा नंतर आपला विचार सांगू लागली. "तुझी तुला आठवण नाही. राजाने पूर्वी शपथ घेऊन तुला दोन वर दिले होते. ते दोन वर राजापाशी या प्रसंगी मागावेत. एका वराने रामाला वनवास आणि एका वराने भरताला राज्यपद माग. पूर्वी दिलेले आम्ही मागून घेत असल्यामुळे वसिष्ठांना काही बोलता येणार नाही. दशरथ हा शपथेत गुंतला असल्याने 'देऊ नको' असेही त्यांना म्हणता येणार नाही." मंथरेचे बोलणे ऐकून कैकेयीला आश्चर्य आणि कौतुक वाटले. "कुब्जे, तू खरेच मोठी सज्ञान आहेस. तुला वरांचे नेमके स्मरण झाले. मला राजाचे वरदान असून माझी मलाच आठवण नव्हती. अगदी योग्य वेळी तुला हे स्मरणाचे ज्ञान स्फुरले. तू खरोखरीच सज्ञान आहेस ग कुब्जे." पुढे मंथरा म्हणाली, "रथाच्या आसाला हात घालून तू दशरथाला विजयी केलेस. तू त्यावेळी किती दुःख सहन केलेस. संग्रामात रथचक्रांचा केवढा वेग असतो, कदाचित् तुझ्या हाताचेच चूर्ण व्हायचे. तुला एवढा नेट कशामुळे धरवला ते मला स्पष्ट करून सांग पाहू."

मंथरेच्या प्रश्नाला उत्तर देण्यासाठी कैकेयीने उल्हासाने ऋषींच्या शापवचनाची आणि त्यांच्या वरदानाची संपूर्ण माहिती सांगायला आरंभ केला. "मी बालपणी पित्याच्या घरी असताना एक सज्ञान, कुशासन, कुशाभरण आणि कुशावरण घेतलेला वृद्ध, काळे रोमांच अंगावर असलेला, जटाधारी ऋषी तेथे आला. मी त्या वेळी अनुचित वागले. त्याला वेडावून दाखवून त्याची निंदा केली. तरी तो महाऋषी क्षमायुक्त राहून स्तब्ध बसला. त्याला गप्प राहिलेला पाहून मी त्याच्या नाकाला काळे फासले. मग मात्र रागाला येऊन त्या तपस्वी ऋषीने अत्यंत आवेशाने शाप दिला. "मला तू नानाप्रकारे निंदते आहेस तेव्हा तूही जगात निंद्य ठरशील." मी बालवयात असल्याने यावर उःशाप मागायचेही मला कळले नाही. तो ऋषी अत्यंत क्षुब्ध

https://archive.org/details/muthulakshmiacademy
Bhavan Varanasi Trust, Lucknow

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

होऊन, "माझ्या तोंडाला काळे लावलेस तेव्हा तू जगात काळतोंडीच होशील आणि अपयशाची गुढी उभारून, निखळ निंदा सहन करत राहशील." असेही पुढे म्हणाला. या त्याच्या रागाच्या बोलण्यात तो देवपूजा करायचे विसरला. त्या वेळी मी त्याला ती त्याच्या हातात आणून दिली. त्यामुळे तो सुखावला आणि लगेच त्याने मला वर दिला. "या तुझ्या हातांनी पतीला तू संग्रामात साह्यकारी होशील. त्यामुळे पतीकडून तुला दोन वर मिळतील. रथाच्या चाकात घातलेल्या तुझ्या हाताला संग्रामात कोणताही त्रास होणार नाही आणि तुझा पती विजयी होईल." असा वर त्या ऋषीने बोलून दाखविला. आता यानंतर मला काय करायचे आहे ते कर्तव्य सांग. मंथरे, तू आता जे जे सांगशील ते ते मी तत्त्वतः पूर्ण करीन."

कैकेयीचे निवेदन ऐकल्यावर कुब्जेने तिला यथास्थित विचार सांगितला. ती म्हणाली, "तू आता मुख्यतः केवळ राजावर राग धरावास. अंगावरची सारी भूषणे काढून टाक. मळकी वस्त्रे नेस. केस मोकळे सोड आणि मरण येईपर्यंत अन्नत्याग करण्यापर्यंत तुझ्या रागाची मर्यादा जाऊ दे. हे प्रायोपवेशन दोन वर मागण्यासाठी असेल. राजा जेव्हा तुझ्याकडे येईल. तेव्हा त्याला तोंड दाखवू नको, त्याच्याशी बोलू नको, अत्यंत राग आल्याचे दाखव. राजाने जरी अगदी सोन्याचा पर्वत दिला किंवा रत्नांचा समुद्र दिला तरी तू तो न स्वीकारता, त्याचा अव्हेर कर. त्यावेळी वरांचा विचार सोडून अन्य कसलाही विचार करायचा नाही. भरताला राज्यपट आणि रामाला वनवास द्यावा हेच सतत लक्षात ठेवायचे. त्यातल्या वनवासाबद्दलही मी सांगते ते नीट ऐकून ठेव. आणि तसेच बोल."

"श्रीराम वनवासी होऊन जर अयोध्येच्या जवळ असलेल्या वनात राहिला तर सगळी प्रजा तिथे जाईल. मग या ओसाड भागात भरत राजा कसा होणार? राम हा प्रजेचा अत्यंत आवडता आहे. प्रधानांनाही तो आवडतो. ते सर्वच रामाकडे गेले तर भरताचे राज्य कसले? दंडकारण्य अत्यंत दूरच्या प्रदेशात आहे. गंगातीराच्या पलीकडे श्रीराम गेल्यावर त्याची वार्ता कधीही अयोध्येला न यावी आणि अयोध्येतली वार्ता श्रीरामाने न ऐकावी. असे झाले तरच भरताला राज्य भोगता येईल." मंथरेची ही युक्ती ऐकून कैकेयीला उल्हास वाटला. तिने मनातल्या उत्साहामुळे मंथरेला दोन्ही हातांनी मिठी घातली आणि तिच्यावरचे प्रेम व्यक्त केले. कैकेयीने दिलेले पदक मंथरेने रागाने टाकून दिले होते, ते स्वतः तिला घातले. आपल्या कानांतली मूल्यवान कुंडले अत्यंत प्रेमाने मंथरेला दिली. "भरताला अभिषेक झाल्यावर तुला सोन्याने मढवीन, तुझ्या कपाळावर रत्नाचा तिलक लावीन आणि गळ्यात मोत्यांच्या माळा घालीन," असे कैकेयी बोलली.

कैकेयीने मंथरेच्या सांगण्याप्रमाणे वागायचे ठरविले. अलंकार, भारी वस्त्रे तिने टाकून दिली. मळकी वस्त्रे नेसून ती प्रायोपवेशनाच्या तयारीने जाऊन जमिनीवर पडून राहिली.

अध्याय चवथा

श्रीरामाला प्रातःकाळी पुष्यनक्षत्राच्या सुमुहूर्तावर अभिषेक करण्यासाठी आवश्यक सामग्री सिद्ध करण्याविषयी सर्व आज्ञा दिल्यावर आणि कामे नेमून दिल्यावर राजा दशरथ निवांत झाला. नंतर रतिक्रीडेसाठी दशरथ कैकेयीच्या भवनात आला. तेथे त्याला ती कुठेच दिसली नाही. त्याने आपली प्रिय राणी कुठे आहे म्हणून दास, दासी, सेवक यांच्याकडे विचारणा केली. परंतु ते सर्व खाली तोंड करून राजापुढे काही बोलेनात. त्यामुळे राजा साशंक झाला. यावेळी दूर उभ्या असलेल्या कुब्जेला राजाने खुणावून विचारले. कुब्जेने राजाला नमस्कार केला आणि भयभीत झाल्यासारखी ती काहीच बोलली नाही. तेव्हा राजाने तिला अभय देऊन, काय घडले आहे याचा

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

वृत्तान्त विचारला. तिने म्हटले, "कैकेयी क्रोधामुळे मूर्च्छित झाली आहे. ती संतप्त होऊन भोगांचा तिने त्याग केला आहे. वस्त्रे, आभरणे टाकून देऊन, मलिन वस्त्रे नेसून, ती भूमीवर पडली आहे." एवढे सांगून मंथरेने राजाला एका अंधाऱ्या जागी कैकेयी होती तेथे नेले. राजाला कैकेयीची अवस्था पाहून अत्यंत दुःख झाले.

दशरथ आणि कैकेयी यांचा संवाद

'तुला कोणी काय केले, ते आता मला तत्त्वतः सांग. तुला कोणी हात लावला असेल तर त्याचा मी समूळ घात करीन. तुला कोणी विरोधी, किंवा उलटून बोलले असेल तर मी त्याची जीभ आणि दात छेदीन. ज्याला समर्थ करा म्हणशील त्याला गजांतलक्ष्मी देईन. कोणाला बंधमुक्त करावे असे तू सांगशील तर त्याला लागलीच मुक्तही करीन. मी तुझ्या शिरावर असताना तू गळसरी का बरे तोडलीस. हे तुझे ज़मिनीवर एखाद्या प्रेतासारखे पडणे म्हणजे अशुभकारी चिन्ह आहे."

राजा दशरथ कैकेयीची समजूत घालण्यासाठी तिला हात लावू लागला. तेव्हा तिने त्याचा हात झिडकारला. तिचे मुख पाहण्याचा त्याने प्रयत्न केला; पण तिने मुख दिसू दिले नाही. राजाला तिचे मुख ती पाहू देत नाही म्हणून रडू कोसळले. त्याने धावून तिचे पाय धरून म्हटले, "प्रिये, तुझ्यावाचून मी परदेशी होईन." यावर तिने पाय झटकले आणि म्हणाली, "आधी इथून उठून माघारी जा. मला तोंड दाखवतोस कसा; तू एक निर्लज्ज आहेस." कुत्रा आला की कुत्री वसवसते, तशी कैकेयी दशरथावर वसवसली. स्त्रीलोभाची ही अशीच दशा असते. स्त्रीलोभ हा अधःपात करणारा असतो. एवढा सूर्यवंशी राजा दशरथ, त्याची स्त्रीलोभाने अशी दशा, इतर पुरुष तर स्त्रियांचे दास होतात, हा स्त्रीलोभाचा मोठेपणा आहे. कैकेयी म्हणते, "मला काय करायची आहे गळसरी; तू माझ्या कसला शिरावर? आता वरच्यावर प्राण सोडेन कारण तुझी माझ्यावर फार प्रीती आहे ना." राजा पुन्हा प्रेमाने म्हणाला, "तुझे जे मनोगत असेल ते सांग. ते मी-सर्व पूर्ण करीन. तुला हा कशाचा एवढा तीव्र क्रोध आला आहे?"

कैकेयी म्हणाली, "दोन स्त्रियांचा जो पती त्याला खरेपण नाही असा शास्त्रार्थच आहे. तशाची साक्ष साधूही मानत नाहीत. मग तुझी माझ्यावरची प्रीती खरी कशी? दोन स्त्रियांचा पती तो शठ, तू तर तिघींचा म्हणून अती पापिष्ट आहेस. माझा स्पष्ट अपमान करून कौसल्येला राज्यपट दिलास! माझी तुझी अत्यंत प्रीती म्हणून स्वर्गात इंद्रादिक पूजा करतात; अशा माझ्यावर अप्रीती दाखवून तू कौसल्येला राज्याधिकार दिलास! माझ्याशी तू सरळ वैरच मांडले आहेस. माझ्या दोन्ही पुत्रांना आजोळी धाडून तू श्रीरामाला राज्याधिकारी केलेस यावरून तू निश्चित महान् कपटी आहेस."

राजा दशरथ कैकेयीचे बोलणे ऐकल्यावर म्हणाला, "तूच आग्रह करून तुझ्या दोन्ही पुत्रांना आजोळी धाडलेस आणि पुन्हा मलाच कपटी म्हणतेस? राज्याधिकार हा नेहमी ज्येष्ठ पुत्रालाच असतो, तो अधिकार कनिष्ठाला कसा मिळेल. तुझा विवेक नष्ट झाला असल्याने तू व्यर्थ क्रोध करते आहेस. अनधिकारी व्यक्तीला राज्याधिकार हे साक्षात् ब्रह्माही करू शकणार नाही. तुझ्यात काय भूतसंचार झालाय की ज्यामुळे अविचाराने तू आत्यंतिक क्रोध करते आहेस?"

क्रोध आणि विकल्प यांवर भाष्य

"क्रोध हा पितापुत्रांना बाधक ठरतो; स्त्री-पुरुषांना क्रोध विरोधी असतो. क्रोध पित्याची प्रीती छेदतो, तो निश्चितपणे अखेर अनर्थच घडवितो. क्रोध आत्मज्ञानाचा घात करतो, क्रोध तापालाही जाळतो, स्वार्थाची तो होळी करतो. तो महाबळी अनर्थकारीच आहे. क्रोध कामाचा सहकारी असतो, शेवटी क्रोध आल्यावर कामाचा नाश होतो. तो विवेकाला ग्रासतो त्यामुळे तुझ्याजवळ केवळ

https://archive.org/details/@lakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust Lucknow, Gangotri

क्रोधच राहिला आहे. तुला श्रीरामाविषयी निश्चित प्रेम असताना, तुझी बुद्धी कोणी चाळविली? काय कारणाने तुझ्या ठिकाणी ही दारुण दुर्बुद्धी उत्पन्न झाली, आणि तू श्रीरामाची विरोधक झालीस?. श्रीरामाला विरोध केल्याने इह आणि पर अशा दोन्ही सुखांना तू मुकशील. जगात अत्यंत निंद्य ठरशील. हितोपदेश म्हणून हे तुला मी सांगतो आहे. माझी आणि तुझी फार मर्यादा असताना, माझे वचन तिळभरही न उल्लंघणारी अशी तू आज माझ्याशी धिक्काराने बोलते आहेस. तुझ्या बुद्धीत पालट झाला आहे; तेव्हा तुझा माझा इथून पुढे शेवट असून अत्यंत दुःखाचा राज्यपट या तुझ्या क्रोधामुळे मिळव. अगं प्रिये, शीतलता हीच उदकाची गोडी, मिष्टान्नाची चव आदरानेच अखेर मिळते. त्याचा अनादर केल्याने त्याची तुलना विषाच्याच योग्यतेची लागणार. अवंचकता परिपूर्ण असेल तरच मित्रपणात गोडी, वंचना झाली की मित्रांच्या मैत्रीची विटंबना होते."

"स्त्रीयांच्याबाबतीत गाढ अनुकूलता असेल तोंवर स्त्री-पुरुषांत गोडी राहते. परंतु त्यात जर विकल्पाला संधी मिळाली तर स्त्री-पुरुषात निश्चित तुटकपणा येतो. कैकेयी, पोटात विकल्प धरला की स्त्री-पुरुषांमध्ये ताटातूट संभवते म्हणून कळवळ्याने मी तुला ही गोष्ट सांगतो आहे की विवेकदृष्टीने विचार कर. तुझी ही स्वतःची बुद्धी निश्चित नाही. कोणी तुला ही दुर्बुद्धी दिली कोण जाणे. तेव्हा क्रोध कटाक्षाने सोडून दे आणि भोगसमृद्धी सुखाने स्वीकार. श्रीराम सर्वांचा आवडता आहे. तुझीही रामाशी एकात्मता आहे. त्यात कोणी विकल्प तुझ्या मनात भरवला असेल तर त्याचा त्याग कर. कैकेयी तुझ्यावर माझी खरी प्रीती आहे. तू जे मागशील ते मी देईन. अगदी श्रीरामाची शपथ घेऊन सांगतो हेच माझे वचन प्रमाण आहे." राजाचे हे समजावणी करणारे भाषण ऐकल्यावर कैकेयीने पोटातला विकल्प सोडला. 'भरत राज्यपटावर अयोग्य असताना मी तेच मागितले, तर जगात मी निंद्य ठरेन. अयोग्य असलेला राज्यभार मागितला तर ऋषीश्वर माझी निंदा करतील. लहान-थोर माझा उपहास करतील कारण हा विचार अत्यंत निंद्य आहे.' असे कैकेयीच्या मनात आले.

मंथरेला कैकेयीच्या मनात बदल झाल्याचे चिन्ह समजले. "हिला एकाएकी असे काय झाले? विवेकाचा प्रवेश करून राजाने ही पिशाची केली. मी एवढा हितार्थ तिला शिकवला, पण हिला स्वतःचे हित कळतच नाही. माझे शिकवलेले सर्व व्यर्थ झाले." असे स्वतःशीच म्हणत मंथरा चरफडत राहिली. दुष्टाला विवेकधर्म ऐकवला तर क्रोधच वाढतो. कैकेयीचे मन द्रवलेले पाहताच मंथरा रागाने चरफडू लागली. आपले हात चुरत ती स्वतःशी म्हणू लागली, "आता काय करावे. रामाच्या हाती राज्य दिले म्हणजे आम्ही निश्चित देशोधडीला लागणार. रामाला समजूत किंवा माया नाही. आम्हाविषयी तो पूर्ण निष्ठुर आहे. त्याला राज्याभिषेक झाला तर आपल्याला पुनरागमन नाही." हीच संधी आहे असे मंथरेने खुणावून सांगितले. "आता तुझा पूर्वीचा निर्धार सोडू नको. वेगळा विचार करू नको. दोन्ही वर लगेच मागून घे." मंथरा खुणावत असताना तिच्याकडे पाहून कैकेयीच्या पोटी पुन्हा विकल्प बळावला. तिने क्रोधदृष्टीने पाहून राजाला सांगितले की, "रामाची शपथ वाहिलीत, ते मी प्रमाण मानते. आता मी मागेन ते तुम्ही द्यावे. याविषयी अन्य काही करून वचन व्यर्थ करू नये."

कैकेयी वरपूर्ती मागते

"तुम्ही मला पूर्वी दिले तेच मी मागेन." असे कैकेयीने म्हटल्यावर दशरथ सुखावला आणि म्हणाला, "लवकर काय ते माग." यावर ती म्हणाली, "तुम्हीच युद्धात सुखावून मला दोन वरांचे वरदान दिले आहे. तेच मी आता मागते आहे. यात कृपणता करू नका." राजाने सांगितले,

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

"अवश्य देईन. जे जे अलौकिक मागशील ते ते देखील मी तुला देईन. ही माझी शपथ समज. ती पूर्वीची आणभाक मी प्रत्यक्षात पूर्ण केली नाही. तर हरिश्चन्द्रादिक मला हसतील. पूर्वज अवश्य शाप देतील. मला नरक प्राप्त होईल. कामधेनू, कल्पतरू, अमृतपान, जे जे मागशील ते ते मी तुला देईन. मी ते खरे करीन. मला श्रीरामाचे साहाय्य असताना, तुला हवे ते द्यायला मला काय अवघड आहे." नंतर दशरथ उल्हासाने कैकेयीवर संतुष्ट झाला. भोळेपणाने त्याने दोन्ही हात उंचावून, गर्जना केली. स्त्रियांचे कृत्रिम हृदय असते हे पुरुषाला ठाऊक नसते. संगतीचा चोर जसा तसा स्त्रियांचा वृत्तान्त असून तो सर्वस्वी फसवून घात करतो. स्त्रीसंग हा नरकपातच असतो.

राजाचे वचनपूत बोलणे ऐकून कैकेयी राजाला म्हणाली, "मी माझे दोन वरच मागते आहे ते नीट लक्षात घे. एका वराने भरताला स्वतः आपले राज्य द्यावे. जसा रामाच्या अभिषेकाविषयी उल्हास तशाच उल्हासाने भरताला अभिषेक व्हावा. दुसऱ्या वराने श्रीरामाला दंडकारण्यात, गोदातीरी, चौदा वर्षे वनवासात धाडावे. मला फार स्वार्थ नाही. नेमून चौदा वर्षे माझा भरत राज्य करील, पुढे रामाने राज्य करावे. चौदा वर्षांमध्ये चौदाभुवने भरत सांभाळील." राम परत आल्यावर मग त्याला कुठले राज्य मिळणार; दंडकारण्याच्या वनात राक्षसांकडून घात होईल. ते रघुनाथाला गिळतील. त्यामुळे भरतच अक्षय राज्य करील. रामाबरोबर लक्ष्मण गेला तर त्यालाही राक्षस खाऊन टाकतील. तेव्हा पूर्णपणे निष्कंटक असे राज्य भरत भोगील. हा कैकेयीच्या मनातला दृढ विचार होता. दशरथाला केवळ समजुतीसाठी चौदा वर्षांचा नेमस्त काळ अशी मर्यादा ती स्वतः सांगत होती. जर श्रीराम अयोध्येजवळच्या भागात वनवासी झाला तर अयोध्याच त्याच्यापाशी जाईल; मग भरत काय ओसाड प्रदेशावर राज्य करणार आहे. राम प्रजाजनांना, प्रधानांना आवडतो, सैन्यालाही तो प्रिय आहे. त्यामुळे ते त्याच्याजवळ जातील. ते सर्वजण जर रामाकडे गेले तर अयोध्या ही एक ओस नगरी होईल. मग तिथे भरत राजा होणार हा विचार मिथ्या ठरतो. यासाठी रामाला दंडकारण्यातच अवश्य धाडावे. तिथे गोदावरीच्या तीरावर वल्कले नेसून तो वनवासाचा रहिवासी होऊन राहील. श्रीरामाला राज्यामधले अणूभरही काही न देता, त्याने जटाधारी होऊन वल्कले परिधान करून गोदातीरी गमन करावे. असा कैकेयीचा विचार होता.

एखाद्या ओढाळ गायीच्या संगतीत धर्मधेनू शेतात चरत असेल तर ओढाळ गाय विलक्षण गतीने धावते, पण धर्मधेनूच्या गळ्यात मात्र लोढणे असते. तसे कैकेयीच्या सान्निध्यात मंथरेचे आप्तपण होते. भरतराज्याचे भूषण म्हणजे वैधव्याचे लोढणेच होते. त्यामुळे आपल्या पतीला न जुमानता, श्रीरामाचा द्वेष करून वैधव्याची प्राप्ती होईल. दुष्टांच्या संगतीचे असेच फळ असते. हा असा या कथेचा अर्थ आहे.

दशरथाची मनःस्थिती

कैकेयीचा वचनार्थ ऐकून दशरथ मूर्च्छित होऊन जमिनीवर पडला. त्याची अवस्था प्राणान्त ओढवल्यासारखी झाली. श्रीरामाच्या वियोगाचे बाण त्याच्या हृदयात रुतले. प्राण कंठात अर्ध्यावर येऊन श्रीरामाच्या दर्शनासाठी थांबला. कैकेयीच्या वज्रासमान बोलण्याने, रामवियोगाच्या तेजस्वी धारेने, मरणान्ताचा थोर घाव लागून त्या घावाने दशरथाला मूर्च्छा आली. असा तो अंतरात विव्हळ झाला, रामवियोगाची त्याला तळमळ लागली आणि त्याच्या डोळ्यातून अश्रू, तसेच शरीरातून घाम अशा धारा लागल्या. अंगावर घाव दिसला नाही तर वैद्याचे औषध उपयोगी पडत नाही. दशरथाच्या अंतरात खोच पडली, पोटात अशुद्ध पडले होते. काही वेळाने तो सावध झाला आणि म्हणाला, "मी हे कसले दुष्ट स्वप्न पाहिले. श्रीराम सर्वांचे

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Research Academy

जीवन, त्याला वनात पाठविण्याचे कोण ठरवणार? कैकेयीची मला प्रीती तर तीच मोहक मद्य उघडे करते आहे. श्रीरामाला वनवासाला धाडते आहे. ती प्रिया माझ्या प्रिय रामावर धाड घालते आहे.''

यानंतर दशरथाच्या मनात स्त्रीलोभाच्या परिणामांचे कटू विचार मूळ धरू लागले. ''स्त्री पतीला आप्तभाव देते असे मानतो तो मूर्खच समजावा. स्त्रीलोभानेच श्रीरामाच्या वनवासप्रयाणाची लुबाडणूक झाली. स्त्रीच्या प्रलोभनाने पुरुषाने कधीही आणभाक देऊ नये. स्वतः मागायचे नाही आणि संधी साधून, अडवून नरकासमान मागणे मागायचे अशी त्या दुष्ट स्त्रीचरित्राची रीत आहे. वेदशास्त्र हे सतत सांगत असता ते मी पामराने मानले नाही आणि आता गंभीर दुःखाला पात्र झालो. ज्याप्रमाणे कुत्रे उष्ट्या अन्नाची राखण करते, त्याप्रमाणे मी स्त्रीच्या आधीन झालो. त्याचे हे फळ पूर्ण पावलो की श्रीरामाला वनात जाते लागणार.'' असा विचार करत दशरथाने जेव्हा कैकेयीकडे पाहिले तेव्हा तिचे तोंड पाहून त्याला अत्यंत क्रोध आला. ''नष्टे, दुष्टे, दुर्भगे, तू पूर्णपणे श्रीरामाची द्वेष करणारी आहेस. रामाने तुझा असा कोणता अपराध केला होता, की ज्यासाठी त्याच्यावर एवढा राग व्हावा. दंडकारण्य हे तर अगदीच विरुद्ध आहे. ते वनवासाला भाषानिर्बंधानेही अयोग्य आहे. खरे तर भरतापेक्षाही तुझी रामावर अधिक प्रीती होती. कोणी तुझ्या मनात विकल्प घातला की त्याच रामाचा तू एवढा द्वेष करावास. कौसल्येपेक्षाही श्रीराम तुझा सेवक, पुन्हा सेवा करूनही कसली अपेक्षा न ठेवणारा आणि अशा रामाला तू दुःख देऊ पाहतेस? माझ्याच शपथेचा आधार घेऊन मलाच दुःख देऊ बघतेस? जळो तुझे काळे तोंड, दुःखाला सुख मानतेस. श्रीराम हा परेश, परमात्मा आहे. त्याचा तू द्वेष केलास तर सर्वस्वाचा नाश होईल. तू निंदेचा त्रास भोगशील.''

कैकेयीचा हट्ट

राजा दशरथाने एवढे सांगूनही कैकेयीने आपला हट्ट न सोडता उलट दशरथालाच वचन पाळण्याचा आग्रह चालविला. ''तू सर्वज्ञ आहेस ना! सूर्यवंशात दिलेले वरदान मिथ्या ठरविणे कोणीच केलेले नाही. नरेन्द्र हरिश्चन्द्राने स्वप्नातले वरदानही सत्य केले. त्यासाठी आपल्यासह स्त्री, पुत्र विकून त्याने दिलेले दान प्रत्यक्षात खरे केले. तूच एक सूर्यवंशात असा नपुंसक झालास की तुला राम वनात पाठवत नाही. तू पूर्वजांना उणेपण आणले कारण तू दिलेली आणभाक पाळत नाहीस. कपोताच्या वरदानासाठी शिबीराजाने आपले मास तोलून, वचन सत्य करून, अयोध्यानगरी वैकुंठाला नेली. अयोध्येचा राजा रुक्मांगद, याचा पुत्र धर्मांगद याने सप्तद्वीपांना जिंकून नाना प्रकारचे धन पित्याला अर्पण केले आणि आपला सद्भाव दाखविला. रुक्मांगदाचा हा एकुलता पुत्र समुद्रवलयांकित पृथ्वी जिंकून पित्याची सेवा करण्यास उत्सुक असे. पुढे मोहिनीला दिलेला वर सत्य व्हावा म्हणून पित्याने धर्मांगदाचा वध केला आणि एकादशी व्रताच्या प्रतापाने आपली नगरी वैकुंठाला नेली. त्याच वंशातला दशरथा तूही असून तुला रामाला वनात धाडणे शक्य होत नाही. दिलेला वर तुला पूर्ण करता येत नाही म्हणतोस, तर ती नपुंसकता तुलाच शोभते.'' त्या स्त्रीचे बोलणे अतिशय तीक्ष्ण असल्याने, ते ऐकून दशरथाचे जीव-प्राण निपटून तो मूर्च्छेच्या आधीन झाला. त्याची शुद्धही पूर्णपणे हरपली. स्त्रीचा विषय हा पूर्णतया विषमय आणि अत्यंत दुर्धर असतो. त्याचे सेवन अवश्य मरण आणते. कैकेयीने तेच केले.

राजा दशरथ अत्यंत दुःख झाल्याने बराच काळ मूर्च्छित होता. नंतर काही वेळाने तो आपणहून शुद्धीवर आला. मग कैकेयीला कारुण्यपूर्ण नम्रतेने विनवत बोलू लागला. ''अगं श्रीरामावर तुझी पूर्ण कृपा असताना त्याच्याच

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized By Sarayu Foundation Trust, Lucknow and eGangotri

बाबतीत एवढे कठोर व्हायचे तुला काय कारण? त्याच्याबाबतीत तू अशी दारुण निर्दय का झालीस? राजीवनयन श्रीराम हा सुंदर, सुकुमार आणि सुखैकधन आहे. त्याला दुर्धर वनात पायी जाणे कसे मानवेल? सुखात राहिलेला राम वल्कलांची वस्त्रे परिधान करून शीत, उष्ण कसा सहन करणार? मृदू, नाजुक शय्येवरची फुलेही ज्याला खुपतात तो राम गवत-पानांच्या शय्येवर शयन कसे सहन करेल? पंचामृत तर किती चांगले, पण ते खाऊनही रामाला वीट येतो, त्या रामाला तिखट, आंबट, तुरट, कडवट फळे, मुळे कशी खाता येतील? नेहमी प्रधान, सेना, सेवक आणि आप्त यांच्यामधे वावरणारा राम एकटाच वनात चौदा वर्षे कसा राहू शकेल?" असे नाना प्रश्न केल्यावर शेवटी "जळो माझे काळे तोंड, मोहात पडून स्त्रीला गुप्त वचनाचे वरदान देण्यामुळे मीच श्रीरामाला दृढ बंधनात अडकवले." असे म्हणून दशरथ रडू लागला.

भविष्यातले परिणाम

दशरथाची मनःस्थिती विचित्र झाली होती कारण राम वनवासात पाठविल्यावर होणाऱ्या परिणामाची त्याला कल्पना आली होती. "श्रीरामाने वनात प्रयाण केले तर लक्ष्मणही त्याच्यासह जाईल. माझा प्राणही त्याबरोबरच जाईल, हे कैकेयी तू निश्चित समज. त्या दुःखाने कौसल्या आणि सुमित्रा याही प्राणत्याग करतील. एवढे कंदन झाले म्हणजेच तू सुखसंपन्न होशील. दुर्धर आकांत करून तू भरताला राज्यावर स्थापन करू पाहते आहेस; पण असा घोर अनर्थ तू करू नको. मी शरणागत होऊन तुझ्या चरणावर डोके ठेवतो; मला क्षमा कर आणि असे वरदान मागू नको. श्रीरामाला वनात पाठवू नको, त्याला माझ्याजवळ असू दे. राज्य हवे तर भरताला देतो आणि आमचा नियंता श्रीवसिष्ठ जामीन देतो." असे म्हणून दशरथाने खरोखर लोटांगण घालून तिचे पाय मस्तकी धरले. तेव्हा ती अत्यंत संतापून म्हणाली, "हे शठा, नष्टपण का करतोस. तू अत्यंत हीन, दीन होऊन सूर्यवंशाला लाज आणली आहेस. बोललेला बोल टाळून तू कृपण होतो आहेस. राजा, पाया पडलास तरी मी वर देण्याची गोष्ट सोडणार नाही. तुला मनातून ते द्यायचे नाहीत. तू महा हट्टी झाला आहेस. तू आपले वरदान पूर्ण करत नाहीस आणि वर मलाच महाविघ्न करणारी म्हणतोस. तेव्हा मीच आता प्राणत्याग करते म्हणजे तुम्ही सर्वजण सुखी व्हाल. माझा पती सुखी व्हावा हाच माझा परमार्थ आहे तेव्हा माझा घात करून दशरथाने येथे सुखी व्हावे. तुझे वरदानाचे भाष्य खोटे करून माझी हत्या तुझ्यावर पडेल. मग रघुनाथाला निवांत अभिषेक करा. म्हणजे सर्वजण सुखी व्हाल." कैकेयीचे हे कठोर भाषण ऐकून राजाला रडू आले. तो मूर्च्छावस्थेकडे जाऊ लागला. त्याचे मन भ्रमले.

दशरथाला मनासमोर चित्र दिसू लागले की, "देशोदेशीचे राजे राज्याभिषेकासाठी जमले आहेत, ते माझी चहूकडे सर्वत्र निंदा पसरवतील. स्त्रीवंशाने जिंकलेला दशरथ अशी माझी कुप्रसिद्धी होईल. प्रधानादी सर्व आणि प्रजाजन माझी खूप निंदा करतील. रामाला वनात धाडणारा मी खरोखर निंदेला पात्र आहे. कैकेयीचे परम सुख इहलोकी वा परलोकी सर्वांना दुःख देण्यातच दिसते. ही सुंदरी कैकेयी परम विषारी आहे. मी जिला प्रेमाने पाळली, ती मलाच भोवली. ती केवळ काळरात्र आहे. पण हे मी सांगू कोणाला?" अशाप्रकारे राम वनवासात धाडायचे वचन देणारा दशरथ रात्रभर तळमळत होता. अखेर रात्र संपून सूर्याचा उदयकाल जवळ आला.

अध्याय पाचवा

श्रीरामाला अभिषेक करण्यासाठी प्रातःकाळचा सुमुहूर्त गुरूपुष्ययुक्त साधायचा म्हणून दशरथाचा बुद्धिमंत प्रधान सुमंत हा तत्परतेने उठला. तो दशरथ राजाला जागे करावे यासाठी राजभवनात आला. तेथून कैकेयीच्या महालातही गेला. त्याने राजाला सावधान केले. सुमंताची हाक ऐकताच दशरथ पुन्हा दुःखाने मूर्च्छित होऊ लागला. 'रामाला वनात पाठवायचे' हे कोणत्या तोंडाने

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

सांगावे या विचाराने तो पुन्हा पुन्हा भ्रमात जात होता.

'श्रीरामाला दशरथ वनात धाडणार हे वृत्त ऐकताच, पित्याचे वचन पाळण्यासाठी श्रीराम स्वतःहून वनात जाईल. रामाला राज्यलोभ नाही, विषयांचे कौतुक नाही; पित्याच्या शब्दाचे मोल राखण्यासाठी तो वनवासात जायला सिद्ध होईल. वनात जायची राजाची आज्ञा आहे ही गोष्ट नुसती कानावर आली तरी तो जगजेठी श्रीराम उठाउठी वनात जायला निघेल. वनवासाची ही कथा कानाने ऐकताच रघुनाथ वनात जायला निघेल, याला आता मी काय करू! विशेषतः माझी आणभाक मिथ्या होऊ नये यासाठी तो रघुकुलतिलक वनात जाईल.' या विचारांनी दशरथाला दुःख आणि शोक होत होता. 'कैकेयी ही तर खोटीच आहे. ती ही गोष्ट सर्वत्र विस्तारेल आणि माझी श्रीरामाशी ताटातूट करील.' असे दशरथाच्या मनात येऊन तो वारंवार मूर्च्छावस्थेत जात होता.

कैकेयी रामाला बोलावते

कैकेयीने सुमंत प्रधानाला म्हटले, "राजाला सुषुप्ती लागली आहे. श्रीरामाला तातडीने येथे आणा असे राजानेच मला सांगितले आहे." हे कैकेयीचे बोलणे ऐकत असतानाच सुमंत चकित होऊन आपल्याशी विचार करत होता की, 'ही असली कसली सुषुप्ती! राजा जमिनीवर लोळतो आहे. कैकेयीचे बोलणे खरे नाही, असे मनात म्हणत सुमंत तेथून निघाला. तेव्हा सभामंडपाच्या दारात स्वतः वसिष्ठ अभिषेकसामग्री आणि नाना उपचार यांची तयारी करत असलेले दिसले.

अभिषेकाच्या तयारीचा तपशील

वसिष्ठांनी सुमंताला सांगितले की "अभिषेकासाठी कोणती सामग्री जमविली ते मी सांगतो त्याप्रमाणे राजाला सांग आणि त्याला सुमुहूर्त साधण्यासाठी लवकर यायला सांग. सदाफळी औदुंबर, त्याचे मनोहर सिंहासन राज्यभिषेकासाठी सिद्ध केले आहे. त्यावर नख्या शेपूट यांसह असलेले पवित्र आणि अखंड व्याघ्रचर्म घालून श्रीरामासाठी उत्तम आसन सिद्ध करावे; शेकडो सुवर्णकलश, दीर्घ वशिंडाचे पांढरे वृषभ, हे सुवर्ण शिंगांचे असावेत. अखंड आणि शुद्ध वस्त्रे हवीत. सिंधूसंगम, सुधासंगम, गंगायमुनात्रिवेणीसंगम अशी परम पवित्र जले रामाच्या अभिषेकासाठी आणली आहेत. सात प्रकारचे दर्भ, सात प्रकारची माती, सात प्रमुख ऋषी आणले. चार समुद्रांचे पाणी आणले. पांढरे शुभ्र उत्तम घोडे असलेला रथ; चंद्राप्रमाणे शुभ्र छत्र, रत्नजडित पांढऱ्या चवऱ्या आणि सुशोभित पंखे तयार आहेत. गोरोचन, हळद, कुंकुम, वडाचे आणि आंब्याचे डहाळे, पानांसह असलेली कमळे आणली. सर्वत्र अपूर्व तोरणे बांधली आहेत. सर्व राजे थांबले आहेत. दह्यात, मधात, तुपात भिजवलेल्या अक्षता, अभिषेकासाठी सालंकृत आठ कन्या पूर्ण कलश घेऊन दानार्थ उभ्या आहेत. मुकुट, कुंडले, रत्नमेखला, बाहूबंद, कंठमाला ही सर्व सामग्री सिद्ध आहे. ब्रह्मवृंदही येऊन थांबले आहेत." हे वसिष्ठांचे सांगणे ऐकल्यावर सुमंताने राजाला नमन केले आणि तयारीचा सर्व वृत्तान्त सांगून म्हटले, "आता आपण बाहेर येऊन रघुनंदन अभिषेकावा अशी वसिष्ठांची आज्ञा आहे." वसिष्ठांची ही आज्ञा ऐकून राजा अतिशय उद्विग्न झाला. 'हे काळे तोंड कसे दाखवू' असे दुःखाने म्हणत तो पुन्हा मूर्च्छेत गेला.

कैकेयीचे कथन आणि सुमंताचा धिक्कार

राजाची ती अवस्था पाहून सुमंताला कापरे भरले. तेव्हा कैकेयीने सर्व वृत्तान्त सांगून म्हटले, "राजा का वृथा शोक करतो आहे. पूर्वी मला दिलेले वचन होते त्याप्रमाणे भरताला राज्य आणि रामाला वनवास हे मी मागितले तर राजाला इतके दुःख का व्हावे. हे निश्चयपूर्वक सुमंता तूही ऐक; राज्यपट माझ्या भरताला आणि दंडकारण्यात वनवास रामाला ही आणभाक मी खोटी होऊ देणार नाही."

कैकेयीचे बोलणे ऐकून सुमंताला मूर्च्छा आली.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized By Sayam Foundation Trust and eGangotri

तो कपाळ बडवत आक्रंदून म्हणाला, "काय बोललीस पापिणी! राम सर्वांना परम प्रिय आणि प्राणापेक्षा आवडता आहे, त्या रामाचा द्वेष तुला वाटतो म्हणजे दुर्भाग्यच आले." हिचे वचन अनर्थकारी असून, राजाने हिचा घातच करावा. रामाला वनात धाडले तर मोठा आकांत होईल, असे सुमंताला वाटले. पुन्हा कैकेयी म्हणाली, "पूर्वी दिलेले शपथवचन पूर्ण न केले तर राजा नरकात जाईल." सुमंत अतिशय दुःखी होऊन, मान खाली करून शोक करू लागला. त्यावेळी दशरथाने त्याला सांगितले, "हे बाहेर कोणाला कळू न देता श्रीरामाला त्वरित बोलाव म्हणजे सर्व स्पष्ट होईल."

श्रीरामाच्या भवनात सुमंत

राजा दशरथाच्या आज्ञेप्रमाणे सुमंत तातडीने श्रीरामाच्या निवासात आला. त्या भवनाची शोभा वैकुंठासारखी शोभत होती. कैलासही त्यापुढे लाजावा. त्या भवनात मोर नृत्य करत होते, तो नाच पाहून शंकर तांडव विसरला. पारवे मधुर स्वरात घुमत होते, त्यामुळे सामदेवही मनात चकित झाला. पारव्याची अमृतवाणी ऐकून गंधर्व वेडावून गेले. चारी वेदांनी मौन धारण केले. श्रीरामभवनात असा आल्हाद होता. श्रीरामाच्या भवनातले पोपट सुभाषिते बोलत होते. काही वेदात वेडावले, कित्येक उपनिषदांचा रस सेवन करीत होते. मैना अशा मंजुळ बोल काढत होत्या की सरस्वती लाजली, बृहस्पती आश्चर्य मानू लागला. कारण पक्षी आणि पक्षार्थी सारेच परमार्थी कसे! द्राक्षाच्या घडातून सर्वांपेक्षा गोड रस स्रवत होते. लोभी त्यामुळे निर्लोभी होऊन, मुमुक्षूंचे लाड पुरवले जात होते. रामभवनाच्या अंगणातल्या कमळिणी पाहून लक्ष्मी 'माझा रहिवास चरणी, यांना मात्र हृदयाभरणाची शोभा' असे वाटून लाजली. श्रीरामाच्या भवनातली फुले सुगंधाने मन उन्मन करत होती. त्या सुवासाने वारा पांगळून गेल्याने चिद्रूपात मिळून राही. त्या मंदिरावरच्या पताका चिदंबरात झळकत होत्या. जो त्यांची थोरवी पाहील तो चराचरात धन्य होत असे. राजभवनातले आम्रवृक्ष नाशरहित होऊन, फलभाराने सफल होऊन नम्रपणे वाकले होते. पुढे ते पिकून फलत्याग करत. स्वर्गसुवासी पारिजात पायदळी लोळत असून त्याची कोणी पर्वा करत नव्हते. श्रीराममंदिरातली माणसे त्यांच्याविषयी उदासीन होती. सात दालने, सात उंबरठे, त्यांचे रक्षण करणारे द्वारपाळ मोठे सज्ञान होते. ते कळिकाळालाही सोट्याने मारणारे अतीव प्रतापी होते. त्या द्वारपालांच्या हातातले वेत पाहून कृतान्त चळचळा कापत राही आणि काळ तिथे दासपण करत असे. कारण त्याला रघुनाथाची सेवा करायची होती. श्रीरामाचे मंदिर पाहून सुमंत मनातले पूर्वीचे दुःख विसरून परम आनंद आणि सुख पावला.

श्रीरामभवनाच्या सात द्वारांना एक पारमार्थिक अर्थ होता. एकएका दारात आपली एकएक उपभोग्य वस्तू सोडून पुढे जावे असा त्यात संदेशही होता. पहिल्या दारात रथ सोडावा; दुसऱ्या दारात छत्रचामरे त्यजावी, तिसऱ्या दाराबाहेर पादत्राणादी सामग्री ठेवावी; चौथ्या दारी धनसंपत्तीचा त्याग; पाचव्या दारात संपूर्ण स्वार्थ सोडावा; सहाव्या दारातून जाताना सर्व साधने मागे ठेवावी आणि मग मी-तूपणाची संगत सोडून सातव्यातून आत गेल्यावर रघुनाथाची भेट होते. हेच परमार्थाचे मुख्य सूत्र आहे. भावार्थ हे राजभवन, पहिला उंबरा म्हणजे श्रवण, दुसरे दार ते साधन, नित्यानित्याचे ज्ञान ते तिसरे दार, चौथा उंबरठा म्हणजे मनन, पाचवे तो निदिध्यासन उंबरा, सहावा उंबरठा पूर्ण वैराग्य आणि सातव्या दाराचा उंबरठा हा साक्षात्कार होय. या पद्धतीने क्रमाने गेले की श्रीरामाची भेट होते. जर अन्य वाकड्या वाटेने जीव गेला तर त्याच्या पाठीवर यमदंड बसतो.

हे काव्यमय वर्णन इथेच थांबवून, पुढील

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized By Sarayu Foundation Trust and eGangotri

कथा भागाकडे वळावे. श्रीरामाला बोलावण्यासाठी सुमंत तातडीने रामभवनात आला. सुमंताचे अंतर शुद्ध असल्याने त्याचा सातव्या दारातून एकदम प्रवेश झाला. त्याला स्वरूपात अनुपम्य असा श्रीराम दिसला. राम हा कमलनेत्र, मेघश्याम, अजानुबाहू, विशालभाल, मुकुटकुंडले आणि चित्रविचित्र माळा त्यालेला, गळ्यात तेजस्वी पदक घातलेला असा दिसला. वीजच जणू कासेला लागून अस्ताला जायचे विसरली तसा भास रामाच्या कटिप्रदेशी असणाऱ्या लखलखीत पितांबराचे तेज पाहून होई. त्याच्या सावळ्या अंगावर सुगंधी उटी लावलेली होती. बाहूंवर बाहूभूषणे, कपाळावर पिवळा तिलक, दृष्टीला पडून मन शांत होत होते. त्याच्या कटीच्या पीतांबरावर मेखला विराजमान होती. तो आनंदघन श्रीराम पाहून तहानभूक हरण केली जात होती. पायातल्या घागऱ्यांचा नादमधुर ध्वनी होता. सोन्याच्या पलंगावर श्रीराम पहुडला होता. सौंदर्याची असीम सीमा अशी सीता श्रीरामाची सेवा करताना, लक्ष्मी जशी विष्णूची सेवा करताना दिसेल तशीच प्रतिरूप शोभत होती.

श्रीराम दशरथाच्या भेटीस निघतो

सुमंताने श्रीरामाला नमस्कार करून "तुझ्या भेटीसाठी राजाधिराज अत्यंत उत्सुक असे एकांतात थांबले आहेत" हा निरोप सांगितला. सुमंताचे बोलणे ऐकून सीता सुहास्य वदनाने म्हणाली, "राज्याभिषेक करण्यासाठी राजांनी प्रधानाला पाठविला आहे." पित्याची आज्ञा ऐकून राम लगेच उठला. सीतेने रामाला नमन करून, त्याला ओवाळले. श्रीराम दाराशी येताच सुमंताने तातडीने रथ आणला. त्या रथात भास्करासारखा तेजस्वी श्रीराम बसला. लक्ष्मण झाला छत्रधारी, सुमंताने हाती चवऱ्या घेतल्या, राम बाहेर येताच त्याचा जयजयकार झाला. पुढे वेत्रपाणी वीर, वाजंत्री होते. तेथे आलेले राजे रामाच्या चरणी लागले. रामाच्या रथामागे श्रेष्ठ युवराजांचे रथ घडघडाट करत होते. दोन्ही बाजूंना हत्तींचा थाट आणि उत्साही महावीर होते. घोडेस्वारांच्या थव्यातले घोडे थुई थुई नाचत होते. अनेक मांडलिकही बरोबर होते, ते जयजयकार करत होते. अश्व, गज, रथ यांच्या संभाराप्रमाणेच पायदळाच्या तुकड्याही हैकार, थैकार, जयजयकार करत चालल्या होत्या. ही चतुरंग सेना होती. ध्वजांचे आणि पताकांचे डोलणे चालू होते. वीरांचा सिंहनाद, भाटांची स्तुतिपर कवने हे सर्व चालूच होते. मार्गातले नागरिक आपसांत 'राजाने रामाला राज्याभिषेक करायला बोलावले आहे' अशी बोलणी चालू ठेवून कौतुकाने पाहात होते. घरोघरी नरनारी हीच वार्ता करत असून, त्यांना राम हा राज्याधिकार स्वीकारायला चालल्याचा आनंद झाला होता. सर्वांनी सुगंधी सडे शिंपून, तोरणे, मखरे लावून नगरी कौतुकाने आणि आनंदाने शृंगारली होती. श्रीराम जात असताना त्याला पाहण्यासाठी एकच गर्दी उसळून चेंगराचेंगरीपर्यंत मजल गेली होती.

तेव्हा रामाला पाहण्यासाठी कोणी माडीवर किंवा गोपुरावर चढले. कोणी खिडकीतून पाहू लागले. संपूर्ण नगरात उत्साह संचारला होता. घरोघरी गुढ्या उभारल्या. नरनारी हातांत दीप आणि बलिदान घेऊन ओवाळू लागले. श्रीरामाचे मुख पाहणारांना परमानंद आणि सुख होऊन ते एकटक पाहात राहिले. त्यांना त्याशिवाय दुसरे पाहावेसेच वाटेना. डोळ्यांच्या पापण्यांची उघडझाप थांबवून ते पाहात राहिले. प्राण गोळा झाला, सर्व इंद्रिये एकवृत्तीची झाली. श्रीरामाची मूर्ती आदराने पाहताना त्रिजगतात आनंद भरला. देह-गृह यांचे स्मरण उरले नाही; दुःख पूर्णपणे निमाले, त्रिलोकी नुसते सुखच भरून राहिले तरीही सुख संपले नाही; जीव भूकतहान विसरला; डोळे आनंदाने शांत झाले. श्रीरामस्वरूप पाहून पुण्य-पापाचे नाव उरले नाही. त्रिविध ताप (आध्यात्मिक, अधिदैविक, अधिभौतिक) गेले. हे सारे सुस्वरूप

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

श्रीरामाच्या दर्शनाने झाले.

श्रीराम दशरथ आणि कैकेयी समोर

श्रीराम नाना वाद्यांच्या गजरात येताच, त्या वार्तेने दशरथ अश्रू ढाळत म्हणाला, "श्रीरामाला तोंड तरी कसे दाखवू!" सर्व जगाला रामाचे सुख पण दशरथाला परम दुःख, तो रामाचे मुख पाहूच शकत नव्हता. कैकेयीने तशी बंदी निर्माण केली होती. श्रीराम सर्वांना शांत करत होता, परंतु दशरथाला तो अत्यंत तापदायक झाला होता. कैकेयीने दशरथाला शपथेत गोवून भ्रांतीत पाडले. या सृष्टीमधे स्त्रीचरित्र अगम्य असते. कैकेयीने आपल्या वरांसाठी नेटाने हट्ट करून पिता-पुत्रांत उठाउठी फूट पाडली. स्त्रीचे दारुण कौशल्य असे की, श्रीरामाला वनात पाठवून, त्यामुळे दशरथाचे मरण ओढवून, स्वतःला वैधव्य आणून घेतले. असे सर्व लक्षात येऊन दशरथ सतत विलाप करत होता. अशा वेळी श्रीराम तेथे लक्ष्मणासह येऊन पोहोचला.

श्रीरामाने दशरथाला नमस्कार केला आणि कैकेयीच्या चरणांवर मस्तक ठेवले. तेव्हा तिने "विजयी हो रघुनाथा, सत्य माझी वाग्देवता बोलते" असा आशीर्वाद दिला. यामुळे राम शकुनगाठ बांधून आपल्याशी म्हणाला, " आता मी सृष्टीत विजयी होईन" आणि आनंदभराने त्यांने दंड थोपटला. हा रघुनाथाचा उल्हास पाहून दशरथाला दारुण मूर्च्छा आली. त्याला श्रीरामवियोगाची कल्पना बोलून दाखविता आली नाही. वसिष्ठांनी मात्र दशाननाचा वध करण्याचा मुहूर्तही सांगितला होता आणि अयोध्याराज्य हे कनिष्ठ असून रामराज्य तिन्ही लोकी श्रेष्ठ आहे असे म्हटले होते. श्रीरामाशी संभाषण करणे दशरथाला अशक्य झाले. कैकेयीने त्याच्या तोंडावर बंधन आणले, कारण वनात जाण्याची आज्ञा त्याला सांगवत नव्हती. इथे राहा, वनात जा, यांतले तो राजा काहीच सांगू शकत नव्हता. श्रीरामाचे पाय पाहून तो अत्यंत दुःखी झाला होता. त्याचा गळा भरून आला, कंठातून घरघर तेवढी चालू राहिली, डोळे विस्फारले गेले, अशी राजाची तीव्र व्यथाग्रस्त अवस्था झाली.

राजाची ही व्यथाग्रस्त अवस्था पाहून श्रीरामाने कैकेयीला विचारले, "ही अशी अद्‌भुत तापदायक स्थिती कशाने झाली? भूतसंचार झाला का? की माझ्याकडून काही एक न कळत अपराध झाला? भरताकडून काही वार्ता आली काय? की शत्रुघ्नाकडून बोलताना काही अन्याय घडला? हे सर्व जर घडले नसेल तर मग, महाराजांना देहतापाची निष्ठा नाही, भूतसंचाराचा ताठा नाही, त्रिदोषांचा त्रास नाही असे असताना ही कसली व्यथा झाली आहे? दैविक, देहिक, किंवा मानसिक अथवा काही अलौकिक असे काय घडल्याने महाराज दुःखी झाले आहेत? हे माते मी तुलाच विचारतो. कारण मुद्दाम सुमंत प्रधानाला पाठवून मला त्यांनी बोलावले आहे. तेव्हा त्यांची मला काय आज्ञा आहे ते आपणच विचारून पाहा."

कैकेयी रामाला म्हणाली, "रघुनाथा, तुझ्यामुळेच त्यांना ही व्यथा झाली आहे. ते सर्व मी तुला सांगते, पण तू राग मानू नकोस. मी तुला सांगणार आहे ते ऐकून तुला खूप राग येईल म्हणून मला भीती वाटते आहे." कैकेयीचे बोलणे ऐकल्यावर श्रीरामाने लागलीच तिचे पाय धरून म्हटले, "असा महापापी कोण असेल, की जो मातेच्या वचनाला विरोध करील. तुझे वचन मला प्रमाण आहे हे त्रिवार सत्य सांगतो; वसिष्ठांची शपथ घेतो; मनातला विकल्प सोडून, हे माते मला सर्व सांग." श्रीरामाचे बोलणे ऐकून कैकेयी अत्यंत उल्हसित झाली. रामाने वनगमन करावे यासाठी धर्मवचन सांगून तिने युक्तीने रामाला वनवासी करण्यासाठी धर्मवचनाच्या पाशात त्याला अडकवायचे ठरविले. त्यात रामाला बंदिस्त करावे आणि दशरथाने दिलेल्या वरांची पूर्तता करताना जरी दशरथाला दुःख झाले, तरी राम वनवासात

https://archive.org/details/muLukshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized By Sarayu Foundation Trust and eGangotri

जाण्याची प्रतिज्ञा खरी करेल असा तिचा यामागे हेतू होता. त्यादृष्टीने तिने आपले कथन मनात योजिले.

अध्याय सहावा

श्रीरामाने वसिष्ठांची शपथ घेऊन आश्वासन दिल्याने सुखावलेली कैकेयी तेव्हा भीती सोडून पूर्ववृत्त सांगायला मनाने तयार झाली.

कैकेयीचे सविस्तर कथन

कैकेयी म्हणाली, "महाराजांना ज्वर, भूतबाधा, किंवा तशी कसलीही व्यथा झालेली नाही. तुझ्यावरचे त्यांचे प्रेमच त्यांना बाधक झाले आहे. त्यांचे ते मनोगत तुला कथन केले तर तुझ्या चित्ताला जाळेल म्हणून त्यांना ते सांगवत नाही यामुळे ते दुःखी झाले आहेत. तू त्यांना अत्यंत प्रिय आहेस. तेव्हा, प्रियापाशी अप्रिय असे सांगणे अवघड झाल्याने त्यांनी मौन धरले आहे. राजांची एक पूर्वीची आणभाक आहे ती तू पूर्ण कर. कारण, पितृवचनाची पाळणूक करणारा त्रिलोकी धन्य होतो. त्रिजगतात तो वंदनीय ठरतो. सूर्यवंशातल्या रुक्मांगदाने एकादशीच्या व्रताचा भंग केल्याप्रसंगी त्याचा पुत्र धर्मांगद याने आपले शिर कापून दिले. त्याने तो वैकुंठवासी जगाला वंदनीय झाला. तू तर सत्यवादी आहेस, जगात तुझा थोर पुरुषार्थ गाजतो आहे; तेव्हा तू पित्याची आणभाक सत्य कर. पितृवचनाचा प्रतिपाळ तू करावास. राजांनी पूर्वी मला वरदान केले. ते माझे मला न देता, तुला कसे द्यायचे, याची त्यांना लज्जा वाटते आहे. मला जे दिले ते आता देववत नाही असेही त्यांना म्हणवत नाही. तुला काय नी कसे सांगावे हे न कळल्याने त्यांच्या चित्तात लज्जा उत्पन्न झाली आहे." कैकेयीचे सांगणे ऐकून तो सत्यशिरोमणी श्रीराम मातेच्या चरणी लागून गर्जून बोलला की, "गुरुवचन किंवा पितृवचन पूर्ण न करणारा पापीच ठरतो. त्याला मनुष्यवेषातला कुत्राच समजावा. त्याचे काळे तोंड अशुभ मानले पाहिजे. गुरुवाक्य विरोधी असले तरी त्याविषयी वितंडवाद करू नये. जो तसे करील त्याचे तोंड रौरव नरकाचे कुंड ठरून तो महापापी समजला जावा. गुरुवचन ऐकून जो अविश्वास दाखवितो तो जिवंत असून नरकवासी म्हणावा. त्या महापाप राशीला प्रेतांची संगत लाभेल. यासाठीच पितृवचनही मी व्यर्थ होऊ देणार नाही. हे त्रिवार सत्य आहे. तेव्हा कोणताही संशय न ठेवता तुला कसकसे वरदान राजांनी दिले त्याचे मुळापासून कथन तू कृपा करून मला निवेदन कर."

कैकेयी वराचे पूर्ववृत सांगते.

श्रीरामाने जी सत्यवचन प्रमाणाची गर्जना केली त्यामुळे संतुष्ट झालेली कैकेयी अत्यंत उत्साहानें वरांचे पूर्ववृत्त सांगू लागली. "पूर्वी शुक्राशी युद्ध करण्यासाठी दशरथ महाराज मला बरोबर घेऊन गेले होते. शुक्राला दैत्यांचे साहाय्य होते आणि देवांनी दशरथांचे साहाय्य घेतले होते. देव आणि दैत्य यांच्यात भयंकर रणकंदन झाले. राजांनी दारुण शरवर्षावाने दैत्यांचा निःपात केला. दैत्यराज वृषपर्वा याला त्यांनी रथाखाली आणला. तो पायी पळत जाऊ लागताच त्याला राजांनी बाणाने मूर्च्छित केला. राजांनी वृषपर्व्याची दुर्दशा केल्यावर शुक्राने त्याला पाठीशी घालून राजांशी निर्वाणयुद्ध सुरू केले. क्रोध आणि आवेश धरून शुक्राने बाणांचे कौशल्य वापरून राजांच्या रथाचा आस तोडला. यामुळे राजांना मोठे संकट आले. त्या वेळी मी रथाच्या चाकात माझा बाहू घातला. माझ्या बाहूच्या नेटाने रथ सावरून घडघडत चालला. नंतर राजांनी शुक्राच्या रथाचा नाश करून, त्याचा मुकुटही पाडला. शुक्राचा युद्धात नाश करता आला असता पण राजांनी तो ब्राह्मण म्हणून त्याला जीवदान दिले. अशाप्रकारे माझ्यामुळे राजांना विजय मिळाला. त्या वेळी राजांनी संतुष्ट होऊन मला शपथपूर्वक दोन वर दिले. एका वराने

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

भरताला राज्यपट आणि दुसऱ्या एका वराने श्रीरामाला वनवास व्हावा. रामाने गोदावरीच्या तीरावर, दंडकारण्यात, वल्कले नेसून जटाधारी होऊन रहिवास करावा, असे ठरले. ज्येष्ठाला दूर करून, भरतानेच राज्य करावे हा स्वार्थी विचार करणारी मी कोणी पापाचारी नाही. तू निर्धारपूर्वक माझा नेम ऐकून ठेव, मी स्वार्थी नाही, नेमून चौदा वर्षे माझा भरत राज्य करील आणि पुढे रघुनाथ आपले राज्य सांभाळील. जर खरोखर तुला पितृवचन प्रमाण असेल, तर राज्यातले अणूभरही बरोबर न घेता तू आजच वनगमन करावेस. मृगचर्म, वल्कले आणि जटा धारण करून वनात जाण्यासाठी लगेच नीघ. कंदमूळ, फळे यांचा आहार करून गोदातीरी वास्तव्याला जा.

श्रीराम पितृवचन-पालनार्थ सिद्ध

कैकेयीने सांगितलेला वृत्तान्त ऐकून श्रीराम हर्षभरित झाला आणि तातडीने वनात जायचे म्हणून आनंदित झाला. कैकेयी ही खोटेपणा करणारी आहे असा विकल्प रामाच्या ठिकाणी नव्हता. त्यामुळे त्याने तिची गोष्ट खरी मानून विश्वासाने तो जगजेठी वनात जायला तयार झाला. राज्य गेल्याच्या दुःखापेक्षा वनात जायचे याचे त्याला सुखच वाटले. त्याचा वनगमनाचा आनंद त्याच्या बाहू-स्फुरणातून आणि वदनावरच्या प्रसन्नतेतून व्यक्त झाला. त्याने मातेला विचारले की, "राजा स्वतः का बोलत नाही." त्यावर तिने सांगितले, "त्यांना अतिशय लज्जा उत्पन्न झाली आहे. प्रथम तुला राज्य देऊ केले आणि आता वनात जा हे कसे सांगायचे याची लाज वाटून, त्यांना मौन पडले आहे. त्यामुळे ते तुला आपले तोंडही दाखवत नाहीत." त्यावर राम म्हणाला, "पित्याचे वचन मानले पाहिजे. तू तर माझी माताच आहेस. तुझे वचन मानले नाही तर, मी वेदशास्त्रार्थाने निंद्य ठरेन. पित्यापेक्षा माता श्रेष्ठ ही पवित्र संन्यासपद्धती आहे. त्यामुळे तुझे वचन मला वरिष्ठ आहे. वनवासात खूप सुखही असते. संन्यास घेतल्यावर पिता हा पुत्राला नमस्कार करतो. तर संन्यासी मातेला वंदन करतो. तो तिचा आज्ञाधारक असतो. तेव्हा हे माते, तुला ज्यामुळे सुख होईल आणि पित्याच्या आणभाकेचा प्रतिपाल होईल तेच मला अवश्य केले पाहिजे. "श्रीराम हे निःशंकपणे बोलला. "माझ्या पित्याची खरोखरी आवडती, तत्त्वतः लाडकी, अशी तू माझी प्रिय माता आहेस. तेव्हा मनात कोणताही संशय बाळगू नको. तुझ्या विचाराला आणि वचनाला मी अनुकूल आहे." असे शेवटी रामाने सांगितले.

कैकेयी आनंदित, राजा दुःखी, लक्ष्मण कोपी

श्रीरामाने दिलेले आश्वासन ऐकून कैकेयीला अत्यानंद होऊन, तिच्या डोळ्यांतून आनंदाचे अश्रू ओघळले. तिने रामाला दृढ आलिंगन दिले. त्या आलिंगनामुळे तिच्या मनातला विकल्प निघाला. तिच्या ठायी सद्भाव उत्पन्न झाला. त्यामुळे तिच्या तोंडून सद्भावच उमटला. "श्रीरामा, तू निर्मळ मनाचा आहेस. तू वनवासात जाणार असल्याने अन्य काही सांगत नाही; पण माझ्या वाक्याने पूर्ण विजयी होशील." नंतर तिच्या मनात असे आले की, "आता राम काही राज्यावर बसणार नाही. मग व्यर्थ बोलायचे तरी कशाला? हा पित्याच्या वचनाची पूर्तता करण्यासाठी निश्चित वनात जाईल. श्रीराम सत्यवादी आणि आत्मनिर्धारी आहे हे मला आज कळले. त्याची थोरवी हीच की, पित्याच्या वचनासाठी हा दंडकारण्यातील वनात निश्चित जाईल."

श्रीराम वनात जाणार हे ऐकून राजा बेशुद्ध झाला. त्याचे चरण वंदून, राम कैकेयीच्या पाया पडला. "तू माझ्यावर पूर्ण कृपा केलीस. आता कौसल्या मातेला शांत कर. राजांना चिंता करू देऊ नकोस." असे सांगून रामाने दोघांना प्रदक्षिणा घातली आणि तो वनात जाण्यासाठी निघाला. तेव्हा कैकेयी गहिवरली. राजा दीर्घ स्वरात रडू लागला.

https://archive.org/details/@sulekhaacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

राजा ग्लानीत असतानाच धीर करून वनात जायचा उल्हास मनात धरून, सावत्रमातेच्या शब्दावर विश्वासून राम निघाला.

लक्ष्मण या वेळी पोटात राग धरून, भुवया चढवून, आठ्या घालून, श्रीरामाच्या पाठोपाठ निघाला. त्याच्या मनात निश्चितपणे विचार आला की, "राम वनात गेला तर मीही त्याच्यासह जाईन. रामावेगळे जीव-प्राणाने एक क्षणभरही राहायचे नाही." असा दृढ निश्चय लक्ष्मणाने केला. राजभवन ओलांडून, अभिषेकपात्राला टाळून राम वनात जायला निघाला. या वार्तेने सर्वजणांमध्ये हाहाःकार उडाला. त्याचवेळी कैकेयीच्या स्वतःच्या मंदिरातल्या स्त्रिया आक्रंदून रडू लागल्या. "रामाला वनात पाठविणारी कैकेयी अत्यंत दुराचारी आहे." हा भाव त्या व्यक्त करत होत्या. कोणी कान, कोणी केस तोडत होत्या; कोणी दुःखाने ओरडत होत्या. 'राजा स्त्रीकडून जिंकला गेला आणि बालक राम वनात पाठवला' असे म्हणाल्या.

कौसल्येच्या मंदिरात श्रीराम

श्रीराम कैकेयीच्या मंदिरातून त्वरेने निघून कौसल्येच्या मंदिरात आला. तिला वनगमन सांगायचे होते. कारण मातेची अनुज्ञा घेतल्याशिवाय कोणतेही कार्य निर्विघ्न होत नाही. हे जाणूनच राम मातृमंदिरात आला होता. लोक म्हणत होते की, श्रेष्ठ दशरथाचे नियामक वसिष्ठ आहेत. त्यांनी वरिष्ठ गुरुप्रतापाने श्रीरामाला राज्यपट द्यावा. वसिष्ठांच्या आज्ञेपुढे कैकेयी बापडी काय करणार? दशरथही तोंडाने काही बोलू शकणार नाही. त्याला कोणी निश्चयात्मक सांगितले पाहिजे. परंतु वसिष्ठ हे जाणून होते की राम वनात जाण्यानेच त्याची कीर्ती वाढणार आहे त्यामुळे त्यांनी नाही म्हटले नाही. आपण लवकरच वनात जाणार आहोत हे सांगण्यासाठी रामाने मनात उत्साह धरून मातेच्या मंदिरात प्रवेश केला. त्याने आपल्या मातेला नमस्कार केला. तिने उल्हासाने रामाला आलिंगन देऊन म्हटले, "गुरुपुष्यावर अभिषिंचन होऊन तू त्रिभुवनाचा राजा होशील. गुरुपुष्याचा सुमुहूर्त सभाग्याला प्राप्त होतो. त्या मुहूर्तावर दशरथाने अभिषिंचन केले की, रघुनाथ तिन्ही लोकांचा राजा होईल. त्या मुहूर्ताचे हेच कार्य आहे की, जगात रामराज्य येईल. सुरनर अत्यानंदाने नाचताहेत हे मला निश्चित कळले आहे. वसिष्ठांच्या अभिषेक-जलाचे असे सामर्थ्य आहे की, तिन्ही लोकांचे अढळ राज्य श्रीरामाला मिळेल." कौसल्येने हे बोलून दाखविल्यावर श्रीरामाने तिला सांगितले, "माते, झालेला प्रकार तुला ज्ञात नाही. मी सांगतो ते सावकाश ऐकून घे. पूर्वी महाराजांनी शपथपूर्वक दोन वर कैकेयीमातेला दिले होते. एकाने भरताला राज्यपट आणि एकाने श्रीरामाला वनवास. दशरथमहाराजांना शपथेत गोवून कैकेयीने आपला स्वार्थ साधला आहे. भरताला राज्याभिषेकासाठी नेमून मला वनात पाठविले आहे. चौदा वर्षांची मर्यादा नेमून गोदावरी तीरावरच्या दंडकारण्यातील निर्जन प्रदेशात मी रहिवास करायचा आहे. तेथे मी फळमुळे सेवन करायची आहेत. राज्यातले अणूमात्र न नेता, नेहमीची वस्त्रे टाकून, अलंकार काढून ठेवून मृगाजिन, वल्कले, जटाभार स्वीकारून मी वनवासी व्हावे. राजांनी नेमस्तपणे वनप्रयाणाचा सुमुहूर्त नेमून आजच निघावे असे ठरविल्याने त्वरित निघायचे म्हणून तुला विचारण्यासाठी येथे आलो आहे.

कौसल्येची प्रतिक्रिया आणि मार्गदर्शन

श्रीरामाने जे सांगितले, ते ऐकून कौसल्येच्या मनाला आणि जिवाला अत्यंत क्लेश होऊन ती मूर्च्छावस्थेत गेली. दुःखामुळे तिला बोलताही येईना. डोळ्यांतली बुबुळे गरगर फिरू लागली. कंठ दाटून आल्याने श्वास कोंडला, पोट फुटण्याएवढे फुगले, प्राणसंकटच आले. पुत्रवियोगाचा घाव दृढपणे जिव्हारी रुतला, पुत्रशोकाने पूर्ण विरहाच्या

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

कल्पनेने देह मूर्च्छित पडला. माता मूर्च्छित होऊन जमिनीवर पडलेली पाहून, रामाने तिला उचलून हृदयकमळाशी धरली. रामाने तिला सावध करताच ती म्हणाली, "मला मरू दे रे रघुनाथा, पुत्रवियोगात जगणे ही मातेची परम व्यथा असते." येथून पुढे श्रीरामाचे मुख पुन्हा कधी पाहीन असे म्हणून तिने आक्रंदून रामाला हाक दिली. हृदयी दुःख दाटले. ज्याप्रमाणे नागाच्या डोक्यात काटा रुतावा, सापसुरळीचे शेपूट तुटावे किंवा मासोळी जळावेगळी व्हावी, त्याप्रमाणे कौसल्या तळमळू लागली. "राजाला कपटी म्हणावे तर माझे पातिव्रत्य व्यर्थ होईल. पतीच्या अवज्ञेने घोर अन्याय होतो, पतिवाक्यासाठी आपला देह समर्पित आहे. कैकेयीचा भ्रतार प्रियकर, तिला माझा मत्सर आहे, पण मी तिचा मत्सर करणे हा माझा घोर अपराध ठरेल. हे सारे मला फार अवघड जाणार आहे रे रामा. आजवर कैकेयीचा मला तिळभर मत्सर नाही. जिच्यावर पतीची कृपा असेल ती मला पूज्य आहे. घारीने झडप घालून कैकेयीचा गर्भप्रसाद नेला तेव्हा मी तिला पतीच्या संतोषासाठी माझा अर्धा पिंड दिला. तेव्हापासून महाराजांची माझ्यावर अत्यंत कृपा झाली, नृपनाथ अन्यायी नाहीत. मीच अभागिनी आहे. कैकेयीचा काय दोष आहे? तिला पुत्रप्रेमाचा मोह आहे. परंतु श्रीराम वनात गेला तर मी अभागी, एकाकी पडणार."

"राजा दशरथांचे वचन शिरसावंद्य मानून तू वनवासात जाणार आहेस, तेव्हा आता माझेही वचन पाळावेस यासाठी गूढार्थ सांगते. राजाचे वचन सिद्धीला जाईल आणि माझेही वचन पाळले जाईल असे एक वर्म आहे ते तुला सांगते. पित्याची आज्ञा पुत्राने पाळली तर त्यामुळे त्याची माताही सुखावते. असे मला काही करायचे आहे. भरताला राज्य देऊन तू माझ्यापाशी राहावेस. माझ्या शृंगारवाटिकेत चौदा वर्षांचा वनवास कंठावास. तू सर्व सेवक पाठवून दे, राजवैभवाचा त्याग कर आणि माझ्या शृंगारवाटिकेत चौदा वर्षे वनवासात राहा. गृहस्त्रियांना भेटू नको, प्रियजनांना भेटू नको आणि एकाकी माझ्या शृंगारवाटिकेत चौदा वर्षांचा वनवास पूर्ण कर. राजा दशरथ, गुरु वसिष्ठ यांना न भेटता त्या वाटिकेत राहा. राजेश्वरांची आज्ञा अत्यंत बळकट आहे तेव्हा वस्त्रे टाकून वल्कले, अलंकार त्यागून जटाभार यांचा स्वीकार करून आपण दोघे फलाहार करून राहू या. तुझ्या संगतीत तृणशय्येचा उपभोग मला सुखकर वाटेल, उलट तुझ्याशिवाय मिळणारे अमृत हे मला विषासमान वाटते."

माता कौसल्येचे बोलणे ऐकून राम तिच्या पाया पडला आणि आश्वासनपूर्वक तिला म्हणाला, "महाराजांची आज्ञा अशी आहे की मी दंडकारण्यात जावे. मी शृंगारवाटिकेत राहिलो तर पितृवचनाला ते विरोधी होईल. तू मायामोहाने सांगते आहेस; पण मला पितृवचन परमपूज्य आहे. तेव्हा मोह-ममता-भ्रम सोडून तू मला आज्ञा दे. तुझी आज्ञा मला मिळाल्याशिवाय मी कधीही यशस्वी होणार नाही." असे म्हणून रामाने तिच्या पायावर मस्तक ठेवले. "मला प्रसन्न मनाने पाठव" असे रामाने सांगितले.

मातृआज्ञेची प्रशस्ती - रामाचे उत्तर

कौसल्या रामाला म्हणाली, "पित्याचे वचन न उल्लंघिता, त्याहून अधिक श्रेष्ठ माता आहे हे वेदशास्त्रार्थाचे मत सावधपणे ऐक रघुनाथा. सावधान राहून मी जे मातेचे महिमान सांगते आहे ते अतिगहन वेदोक्त आहे. स्वधर्मकर्मात अत्यंत निपुण असे दहा सज्ञान ब्राह्मण होते. एक आचार्य त्यांच्या समान ठरावा असे आचार्याचे महिमान होते. अशा श्रेष्ठ कर्मप्रवृत्ती असलेल्या दहा आचार्यांहून ज्याची अधिक शक्ती असा पिता, जरी पुत्रविक्रय करणारा किंवा दूरकार्यार्थी असला, तरी नियामकत्वे निश्चित अधिक ठरतो. दहा आचार्यविशेषांपेक्षा गुरुत्वे गौरव पित्याला आणि पित्याहून दशगुणांनी गुरुत्वे मातेला भजावे.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

गर्भधारण, पोषण यांमुळे मातेला विशेष गुरुत्व आहे. पृथ्वीपेक्षाही मातेला पूज्यत्वात अधिक गौरव असतो. पिता पतित झाला तर पुत्राने त्याचा अवश्य त्याग करावा. माता पतित झाली तरी तिचे पूज्यत्व शास्त्रार्थ प्रतिपादन करतो. पुत्र संन्यासी झाला, तर त्याने पित्याला अवश्य त्यागावे; परंतु भिक्षा मागून मातेस पोसावे असा संन्यासविधी शास्त्रे सांगतात. अशाप्रकारे रघुनाथा, पित्यापेक्षा माता ही अधिक पूजनीय असते. यासाठी माझ्या वचनाला भजावे, तू वनात सर्वथा न जावे. मातृवचन गौण मानून पितृवचनाचा प्रतिपाळ हे तुला दूषणास्पद आहे. म्हणून माझे वचन उल्लंघून जाऊ नकोस."

श्रीराम त्यावर कौसल्येला म्हणाला, "तू श्रेष्ठत्वाने पूजनीय होशील; पण तू याचविषयी घडलेली एक पूर्वकथा ऐक. ती मी तुला सांगतो. पितृवाक्यासाठी परशुरामाने मातेचा वध केला. त्याने पितृवचन न उल्लंघिता ही कृती केली कारण पिता पूज्य मानला. पुत्राने मातेचा वध केला तरी रेणुका परशुरामावर रागावली नाही. कारण त्याने तिच्या पतीचे वचन पाळले होते. तुलाही ही कथा माहिती आहे. मला पितृवचन पूज्य आहे तसे तुला पतिवचन प्रमाण आहे. तेव्हा त्याचे उल्लंघन केले तर आपल्या दोघांचाही अधःपात होईल.

कौसल्येचा आकांत - लक्ष्मणाचा संताप

श्रीरामाचे विचार ऐकल्यावर कौसल्या आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाली, "रघुनंदना, तुझा वियोग मला मरणाहून चौगुणा दुःखद होईल; तेव्हा मलाही तुझ्याबरोबर वनात घेऊन चल. हे माझे मागणे तरी पूर्ण कर. मलाही वनात बरोबर घेऊन चल." असे म्हणून ती श्रीरामाचे पाय धरून बसली आणि अत्यंत करुण स्वरात शोक करू लागली. "काय करू रे रघुनाथा, मला या क्षणीच मरण का येत नाही. वियोगव्यथा मला सहन होणार नाही तेव्हा मलाही वनवासात ने." त्यावर श्रीरामाने सांगितले, "पुत्राबरोबर वनवासाला मातेला नेणे सर्वथा अयोग्य आहे. तसे काही ऐकले तर वसिष्ठांचा कोप होईल. मग मी तुला कसा नेऊ?" असा पुत्रधर्म रामाने मातेला सांगितला. नंतर त्याने तिच्या चरणांवर डोके टेकून क्षमायाचना केली.

लक्ष्मण हा कौसल्येची करुण स्थिती आणि दीनवाणी विनंती ऐकून क्षोभला. तो श्रीरामाला म्हणाला, "श्रीरामा माझे सांगणे ऐक. वनप्रयाण करू नको. आपल्या पित्याला परम सुख होईल, कौसल्यामाताही सुखी होईल आणि तुलाही वनात जावे लागणार नाही असे एक वर्म माझ्यापाशी आहे. तुझी आज्ञा असेल तर मी ते कार्य साधीन. त्याची व्यवस्था मी आताच तुला सांगतो. कैकेयीचाच मी घात करतो. त्यामुळे राजा दशरथही आणि माता कौसल्याही सुखी होईल. तसेच रघुनाथा, तुला राज्याभिषेक होईल. कैकेयीचा कैवार घेऊन सुरवर जरी आले तरी मी त्यांचा नाश करीन, रणात असुरांचे निर्दाळण करीन, सागर रक्ताने भरीन. रक्ताने मास घोटीन, पृथ्वी निर्मनुष्य करीन, यमलोक ओस पाडीन आणि कळिकाळाला धाक लावीन. रघुवीर माझ्या पाठीशी असल्यावर कृतान्ताचे दात पाडीन, मला निश्चित कसलेही भय नाही. सर्व दुष्टांचा मी संहार करीन. माते, तू म्हणशील हे अप्रमाण बोलणे आहे, पण माझे बोलणे सप्रमाण आहे. दुष्टांचे निर्दाळण करण्यासाठी तर श्रीरामाचा पूर्णावतार आहे."

"कैकेयी ही दुष्टांमधली अतिदुष्ट आहे. सुहृदांच्या वैभवाचे विध्वंसन आणि प्रियजनांचा प्राणघात करणारी आहे. सुमुहूर्ताला दुष्टपणे नाट लावायला प्रथम कैकेयीनेच आरंभ केला आहे. माता-पुत्र यांच्यात बिघाड आणणारी आणि पतीला ताप देणारी अशी ती महापापिणी आहे. राजा दशरथ दुःखाने रडतो आहे, पाया पडतो आहे पण ही त्याचे वचन पतिवचन म्हणूनही मानायला तयार नाही. पिता-पुत्र यांची ताटातूट करण्याची दुष्टता कैकेयीच्या ठायी आहे. श्रीरामाला देशोधडी लावणारी ही एक अत्यंत खोटारडी आहे. हिचा घात केला तर जगात सुख निर्माण होईल.

https://archive.org/details/muthulakshmiacademy Bhuvan Vani Trust, Lucknow

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

कौसल्येला दशरथांची प्राप्ती होईल आणि रामाला राज्याभिषेक होईल. पतिवचन दृष्टिआड करणारी, रामाचा द्वेष करणारी आणि महाहट्टी अशी कैकेयी असून तिचा नाश केल्याने कोटी पुण्य प्राप्त होऊन त्रिलोकांत स्वानंदाला पुष्टी मिळेल. याविषयी श्रीरामा, मला आज्ञा दे.'' असे बोलून लक्ष्मणाने रामचरणांवर मस्तक ठेवले. या वेळी लक्ष्मणाला अनिवार क्षोभ झालेला होता.

श्रीरामाकडून सांत्वनपर उपदेश

सौमित्र लक्ष्मणाची मनःस्थिती आणि त्याचे क्रोधग्रस्त भाषण ऐकल्यावर श्रीरामाने त्याचे सांत्वन करण्यासाठी आणि त्याला योग्य मार्गाचा उपदेश करण्यासाठी सांगितले की, ''लक्ष्मणा, तुझा पराक्रम आणि तुझे सामर्थ्य मी जाणतो. तुझी वाढीव आणि घडीव वीरवृत्ती आहे, चारी पुरुषार्थ तुझ्या हाती आहेत, तेव्हा एवढे सारे असताना आपली अपकीर्ती होईल, असे काही होऊ देऊ नये. पुरुषार्थात महावीर असलेल्याने मातेला मारावे, पित्याला दुःख द्यावे यात आमचीच अपकीर्ती होईल. पित्याला सर्वथा प्रिय असलेली अशी ती आपली माता आहे. तिचा घात करणे ही शास्त्रार्थाच्या दृष्टीने अधर्मता आहे. अरे, एखाद्या पित्याने कोणा दासीशी संबंध ठेवला तर तीही त्या पुत्राला मातेसमान असते. तिच्याही विरुद्ध पुत्राने काही करू नये. असे असताना कैकेयीचा घात कसा करावा. पितृवचनाचे उल्लंघन, शिवाय मातेची हत्या, यांमुळे जगात नीच म्हणून निंदा होऊन त्रिलोकात अपकीर्ती वाढेल. सूर्यवंशात येऊन अशी अपकीर्ती जर सौमित्राची झाली तर स्वर्गस्थ पूर्वज संतापतील. जर आपण कैकेयीची हत्या केली तर आपल्याला 'सहा महिने सुरीला धार लावली आणि घरची म्हातारी खोचली' या वचनाप्रमाणे अपकीर्तीचे धनी व्हावे लागेल' तेव्हा लक्ष्मणा क्रोध आवर.''

''अरे सौमित्रा, ज्याची शक्ती पूर्ण आहे त्याने स्त्रीला मारले तर त्यात त्याचा कसला पुरुषार्थ आहे. पित्याला दारुण दुःख देण्याने आपलाच अधःपात होतो. आपल्या अंगच्या बळाची प्रौढी असेल तर वनात गेल्यावर कसली संकटे येणार. राक्षसांच्या समूहांना मारू, देवांची बंधने सोडवू, स्वधर्माचा सेतू बांधून दुष्ट लंकानाथाचे निर्दाळण करू. ते केल्याने त्रैलोक्यात सामावणार नाही अशी आपली कीर्ती होईल आणि पुरुषार्थही साध्य होईल.''

लक्ष्मण आणि कौसल्या समाधानी

श्रीरामाने केलेला सांत्वनपर उपदेश ऐकल्यावर लक्ष्मणाने श्रीरामाला साष्टांग दंडवत घातले. रामाने आलिंगन देऊन त्याला पूर्ण समाधान दिले. लक्ष्मणाने रामाचे चरणवंदन केले आणि म्हटले, ''तुझ्या सेवेसाठी मीही वनात येऊन, दुष्टांचे निर्दाळण करीन.'' पुनःपुन्हा रामाला वंदन करत लक्ष्मण प्रार्थना करू लागला. ''तूच माझा पिता, तूच माझी माता. श्रीरामा मला तू वचन दे की मला तुझ्याबरोबर वनात नेशील. कारण माझ्या मनात उल्हास आहे की मी तुझी सेवा करण्यासाठी वनवासात तुझ्याबरोबर जावे.''

श्रीरामाने केलेल्या युक्तिवादाने कौसल्याही मनातून सुखावली. श्रीरामाने वनात जाऊ नये हा तिचा पूर्वीचा आग्रह तिने सोडला. श्रीरामाच्या सांत्वनाने लक्ष्मण सुखी झाला, कौसल्याही सुखसंपन्न झाली. दोघांनाही समाधान वाटले. आता माता कौसल्या आणि बंधू सौमित्र हे शोकमुक्त होऊन सुखसंवाद करू लागले. कौसल्या स्वतःच श्रीरामाच्या वनात जाण्याविषयीची तयारी करू लागली.

अध्याय सातवा

कौसल्या प्रसन्न मनाने श्रीरामाच्या वनगमनासाठी पुण्याहवाचन, स्वस्तिवचन करण्याच्या तयारीला लागली. वनात जाऊन वनवासी होण्यातली रामाची उत्सुकता लक्षात घेऊन कौसल्येने आपले आशीर्वचन वनात पाठविले. त्यासाठी हात-पाय स्वच्छ धुवून तिने शुद्धाचमन

https://archive.org/details/@sarayu_foundation_trust_lucknow

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

केले. देवतार्चन करवून, श्रीरामाने नित्य विजयी व्हावे म्हणून, प्रार्थना केली. सुमनचंदनादींनी भक्तिभावाने अधोक्षज, गरुडध्वज यांची पूजा केली. 'माझ्या रामाचे तू रक्षण कर' अशी लोटांगण घालून त्यांना विनंती केली. ज्या जळाच्या सेवनाने रोग निर्माणच होत नाहीत ते आणविले. नाना प्रकारच्या औषधी आणून तत्परतेने रामाच्या बाहूवर बांधल्या. ज्या वनस्पती पाहिल्यावरच राक्षस जीव घेऊन पळतात, त्या आणवून रामाच्या हातावर बांधल्या. वनवास निर्विघ्न व्हावा, रघुनंदन विजयी व्हावा म्हणून सर्वांची प्रार्थना केली.

भिन्न भिन्न देवतांची प्रार्थना

"जगद्गुरू जो ब्रह्मा, त्याने रामाचे रक्षण करावे. सदाशिवासह पार्वतीने माझ्या श्रीरामाचे संरक्षण करावे. त्रैलोक्यनाथ विष्णूने वनात विहार करताना माझा राम रक्षावा. आरंभापासून अहोरात्र सतत ऋषिगणांचे, सिद्ध-चारणांचे, मरुद्गणांचे वनवासात रामाला साहाय्य होवो. पूषा, भगा, अर्यमा, धाता या देवता, तसेच सूर्य, चंद्र, यम, आदित्य, वरुण, सुविधी, विधाता अशा सर्वांनी मिळून वनामधे रघुनाथ रक्षावा."

"अकरा रुद्र, चौदा इंद्र, उपेंद्र यांनी पदोपदी श्रीरामाचे रक्षण करावे. सप्त सागर साहाय्यकारी होवोत, क्षीरसागर आणि शेषशायी यांचे साहाय्य व्हावे. चार वेद, चौदा विद्या, हे श्रीरामाला साहाय्यभूत होवोत. मंत्रमूर्ती मंत्रानुवादाने राम सर्वदा रक्षावा. वेदांमधील अथर्वाचे मंत्र अत्यंत दारुण आहेत, ते रामाला संपूर्ण साहाय्य करोत आणि त्याचे वनातले वास्तव्य निर्विघ्न करोत. सप्त ऋषी आणि ब्रह्मऋषी, तसेच देवऋषी यांनी रामाचे रक्षण करावे. श्रीनारदमुनींच्या पायी विनंती करते की, आपण माझ्या रामाचे रक्षण करा. शनी, भौम, हे महाक्रूर, तसेच राहू, केतू, गुरू, शुक्र हे रामाला वक्र न होता अहोरात्र रक्षण करोत. नक्षत्रे आणि नक्षत्रपती, तसेच ध्रुव या सर्वांनी रघुपती रक्षावा. सप्तऋषी आणि अरुंधती यांनी ही श्रीराममूर्ती रक्षावी. विजांना मी कळकळीने विनंती करते की तुम्ही रामाकडे न पडावे. नानाविध दिव्य दीप्तींनी रघुपतीचे रक्षण करावे. वृक, जंबुक, सिंह, वाघ, अस्वले, तरस, गौर, तगर, सर्प, वानर, शार्दूल या सर्वांनी रामाला रक्षावे. माजलेले रेडे, उन्मत्त गज, मृग, वराह आणि दिग्गज, शिवाय नृत्यभोग असणाऱ्या वनदेवता यांनी रघुराजाचे रक्षण करावे. अत्यंत दुर्धर असे महापक्षी, अग्निमुख आणि क्रूर नखांचे असे श्येन, गिधाड, उलूक, घार यांनी रामाला रक्षण द्यावे. जळातले क्रूर जलचर, मासे, मगरी, महामकर हे माझ्या रामचंद्राचे निरंतर रक्षण करोत. यक्ष, राक्षस, पिशाच्च हे सर्व शिवाचे सेवक असून त्यांनी रघुकुलतिलक रक्षावा."

"श्रीराम मार्गातून जाईल तेव्हा कंटकांनी निष्कंटक व्हावे; डास, माशा, गांधिलमाशा, विंचू हे सर्व निर्विष व्हावेत. गमन, शयन, भोजन या सर्व प्रसंगांत पृथ्वी रघुनंदनाला साहाय्य करो. जलाने प्राशन, स्नान इत्यादींत साहाय्य करावे. तमनिवारक प्रकाश, जठराग्नी प्रदीपन, शीत निवारण अशा अनेक दृष्टींनी अग्नीचे रामाला साहाय्य मिळो. श्रीराम जेव्हा वनात जायला निघेल तेव्हा पंचप्राणांनी आणि संग्रामाच्या दारुण स्थितीत बळासाठी वायूने साहाय्यभूत व्हावे. श्रीरामाच्या वनवासात आकाशाने संपूर्ण साहाय्य करून रामाच्या हृदयात चिंतेचा अल्पसा वळसाही प्रवेशू देऊ नये. दिशा, उपदिशा यांनी श्रीराम परेशाला साहाय्य करून, हृदयी चिद्विलास दाखवून, चिंतेचा गळा घोटावा. ऋतू, मास, संवत्सर, लवनिमेषादी तिथी-वार, होरा मुहूर्त यांनी अहोरात्र रामरक्षण करावे."

"जे जे अरण्यवासी सामर्थ्यवान असतील त्यांनी रामाला साहाय्य करावे. मी तुमची दासी झाले आहे. जेव्हा इंद्र वृत्रवधाला निघाला तेव्हा गुरूने त्याला मंगले केली होती ती ती मंगले रामापाशी नित्य थांबोत. गरुड जेव्हा अमृतासाठी

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

निघाला तेव्हा विनतेने त्याला मंगले केली होती; हर त्रिपुराला मारण्यासाठी निघाला तेव्हा उमेने मंगले केली होती; हरीने मुराला मर्दिताना रमेने मंगले केली होती, या सर्वांप्रमाणे ती ती मंगले अहोरात्र रामापाशी तिष्ठत राहोत. जळचर, भूचर, खेचर, उग्र रुद्र महाक्रूर यांच्यासह शंकराने राम रक्षावा. मी त्यांची दासी, सेवक झाले आहे. वनात रामाला, वामन, जनार्दन, मधुसूदन यांचे संपूर्ण संरक्षण मिळो. जळात नारायणाने, स्थळी संकर्षणाने, रणात सिंहवदन नरसिंहाने असे रामा तुझे रक्षण करावे. शयनी शेषशायी, स्मशानात शिव, सुषुप्तीमधे विदेही यांचे चित्सुख तुला रक्षो. वनात राहात असताना रघुनाथाचे वीर्य, धैर्य गळू नये. अच्युत तुझे रक्षण करो. आगम-निगम, स्थावर-जंगम, यांच्याकडून तुझ्या दुर्गम संकटात तुझे रक्षण व्हावे. ती संकटे पुरुषोत्तमाने निवारावीत. जनवना जो जीवन, जो निरंजन, तो तुझे रक्षण करो. मी जनार्दनापुढे लोटांगण घालून ही विनंती करते आहे."

"मी देव-देवता, सर्व भूतें, आदिअच्युत, या सर्वांना प्रार्थना करून रामाचे वनामध्ये रक्षण करा अशी विनवणी केली. राम जगाचा जीव की प्राण आहे. शिवाय माझा मातेचा कळवळा अधिकच आहे." असे म्हणत कौसल्या अश्रूपूर्ण डोळ्यांनी वारंवार रामाला आलिंगन देत होती. श्रीरामाचे मुख न्याहाळताना, त्याच्याशी गुज बोलताना, मुख कुरवाळताना, हृदयापाशी धरताना कौसल्येला वेळ पुरत नव्हता. अशी ती कृपाळू माता वदनाने गाताना, डोळ्यांनी पाहताना, हृदयी ध्याताना सतत श्रीरामच पाहात होती. अन्य तिला काही दिसत, सुचत नव्हते.

श्रीरामाने पुढे होऊन, त्रिवार प्रदक्षिणा घालून, मातेच्या चरणांना वंदन केले, कारण तिने वनप्रयाण करविले. मातेचे वदन पाहून पुनःपुन्हा राम नमन आणि दंडवत करत होता. मातेबद्दल त्याला पूर्ण प्रेम वाटत होते. श्रीरामाचा मातेविषयीचा कळवळा पाहून आणि त्याचे कृपेच्या बाबतीतले सुकुमारपण पाहून कौसल्येच्या डोळ्यांत आनंदाश्रू दाटले. गळा दाटून आला. कौसल्येने सहजच रामाला पोटाशी धरले, त्याच्या कपाळावर आपले कपाळ घासले आणि त्याला पायांनी घट्ट मिठी घातली. "श्रीरामा वनातून तू विजयी होऊन अयोध्येत परतून येशील ते मी कशी डोळ्यांनी पाहीन. पुन्हा हे श्रीमुख पाहीन तेव्हा डोळ्यांचे पारणे फिटेल." असे म्हणत ती जीव-प्राण एकवटून आलिंगने देत होती. तिला रामाचा वियोग सहन होत नव्हता. मातेच्या प्रेमपूर्णतेने डोळ्यातून अश्रू वाहून रामाच्या चरणांचे क्षालण झाले आणि तिच्या दुःखाचे प्रक्षाळण झाले.

आकाशवाणीने कौसल्येस समाधान

श्रीराम आणि कौसल्या यांचे एकमेकांवरचे प्रेम व्यक्त होत असतानाच गर्जून आकाशवाणी झाली. "श्रीरामाला वनात नित्य विजय मिळेल, तेव्हा हे जननी तू दुःख करू नकोस. श्रीराम त्रिभुवनांचा महाराजा आहे. तो ब्रह्मादी देवांना वंदनीय आहे. दैत्य-दानवांना, सर्व मानवांना वंद्य आहे. श्रीराम स्वयमेव परब्रह्म आहे. तो स्वतंत्र, परात्पर, चिन्मात्र असे परब्रह्म आहे. गुणांमध्ये गुणातीत, जीवशिवातीत आणि स्वतः सदोदित असून निश्चित परब्रह्म आहे. श्रीरामाला सुखदुःख नाही, ते आहेसे मानणारे मूर्ख आहेत." हे ऐकून कौसल्येला सुख झाले. तिच्या हृदयात हर्ष कोंदाटला.

आकाशवाणी ऐकून माय-लेकांना परम सुख वाटले. द्वंद्वदुःखता मावळली. श्रीराम जाणार म्हणून आता कौसल्येला हर्ष झाला. तिने निरांजनाने ओवाळून त्याला वनप्रयाणाची मान्यता दिली. जे रामाला तेच स्वस्तिवचन लक्ष्मणाला करवून दोघांनाही वनात पाठविले. श्रीरामाने चरणवंदन करून, प्रदक्षिणा करून, आपल्या भवनाकडे तो निघाला. त्याला वनात जायची घाई झाली होती. तिथे सीता ही राज्याभिषेक झालेल्या श्रीरामाला

https://archive.org/details/@sarayu_foundation_trust_lucknow

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

ओवाळायला आरती घेऊन थांबली होती.

सीतेने रामचंद्र येताना पाहिला. परंतु त्याच्यावर छत्र, चामर नव्हते, द्विजांचा जयजयकार होत नव्हता, वाद्यांचा गजर ऐकायला येत नव्हता. तेव्हा सीता रामाच्या पाया पडली आणि तिने आदरपूर्वक विचारले, "राज्याभिषेक माथ्यावर दिसत नाही. उशीर का झाला? की अभिषेकच झाला नाही? राज्याशिवाय उल्हास मी पाहते आहे रघुनाथा. ती कथा मला सांगावी." अभिषिंचन न झाले, अति दूर वनात जाणे आले, तरी रामाचे मन विषण्ण झाले नव्हते. पितृवाक्याने तो पूर्ण उत्साहित झाला होता. राम एकटाच वनात गेला असता तरी कैकेयी मातेला सुख झाले असते, दशरथाची आणभाक पूर्णतेला गेली असती, याचाच रामाला आनंद झाला होता. श्रीराम म्हणाला, "ऐक सीते, कैकेयीला दशरथांनी दोन वर दिले होते. शुक्र विजयार्थ युद्धप्रसंगी शुक्राने राजांचा रथ भंगला. कैकेयीने चक्रात हात घातला त्यामुळे राजांना विजय प्राप्त झाला. तेव्हा राजे वरदान बोलले होते. तेच दोन वर कैकेयीने आज मागितले. एकाने मला वनात जाणे आहे. तेही आजच लगेच जायचे आहे. राज्यातले अणुभरही काही न घेता जावे अशी राजांची आज्ञा आहे. आज्ञा प्रमाण मानून लगेच आजच जायचे आहे. दुसऱ्या वराने तिने राजांपाशी भरताला राज्याभिषेक व्हावा असे मागितले आहे. तेही चवदा वर्षांसाठी, मग आम्हाला राज्य मिळणार. अशी कथा झाली आहे. जानकी, मला आताच गुरूपुष्य सुमुहूर्तावर निघायचे आहे. तुला तत्त्वतः विचारावे म्हणून मी इकडे आलो आहे."

रामाची योजना, सीता दुःखी, तिची प्रार्थना

श्रीरामाने सीतेला सांगितले, "तू कौसल्यामातेजवळ राहा. कैकेयीचा द्वेष करू नकोस. तिच्यामुळे आम्हाला अत्यंत थोर कीर्ती मिळणार आहे. त्याविषयीचे गुह्य मी तुझ्यापाशी सांगतो. कैकेयीचे वरदान हे मला सुप्रसन्न करणारे आहे. समुद्रात पाषाण तरतील हे महिमान तिच्यामुळेच आहे. हिने मला वनात पाठवून माझ्या हाती प्रतापाचे भांडारच दिले आहे. त्रिभुवनात रामराज्य होणार आहे ते वनवासात हिच्याच पाठवण्याने. अशा स्वार्थाच्या जाणिवेने मला वनात जाताना आनंद आणि उत्साह वाटतो आहे. हे सर्व तू तत्त्वतः समजून घे. कैकेयीचा कधीही द्वेष करू नको. जसे लक्ष्मीनारायण तसे आपले सासू-सासरे मानावे, त्यांची आपण सेवा करावी, त्यांच्याविषयी सद्भाव आणि सावधानता ठेवावी. सौमित्राची जननी कौसल्येपेक्षा अधिक मानून, तिची सेवा करून तिला सुखी करावी. नित्य तिला भजावे. माझी आज्ञा जशी प्रमाण तशीच भरताची आज्ञा प्रमाण मानावी. त्याच्याविषयी मनात विकल्प धरू नये. पती आणि दीर यांच्यात भेद मानू नये. माझी तुला आज्ञा आहे की तू माहेरी जाऊ नये किंवा स्वतःच्या मंदिरात न राहता नित्य कौसल्येपाशी राहावे. जोवर माझे पुनरागमन होत नाही, तोवर माझे ध्यान करावे. मुखी माझे नामस्मरण असावे, माझे विस्मरण होऊ न द्यावे. माझे अहोरात्र ध्यान केलेस तर अनुपम सुख होईल, नामस्मरणाने वियोगाचे दुःख विसरून सुखी होशील."

श्रीरामाचे सांगणे ऐकल्यावर सीतेच्या हृदयाला तो वाग्बाण लागला. तिचे डोळे अश्रुपूर्ण झाले. जानकी अधोवदन होऊन दुःखी झाली. पतिवियोगाचे दुःख जाणवून तिचा घसा कोरडा पडला. सगळे सुख हरपले आणि परम दुःख वाट्याला आले. त्यामुळे ती कासावीस झाली आणि पतीच्या पायाशी बसून काय म्हणाली ते सावकाश ऐकावे. "राज्यावर असताना श्रीरामाने जशी सेवकांना सेवा वाटली असती, ती सर्व सेवा मी एकटी वनवासात सर्वस्वी करीन. श्रीरामाची सर्व सेवा करण्याचा स्वार्थ मला वनातच लाभेल. अहो

https://archive.org/details/@sarayulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

सर्वज्ञ रघुनाथा, आपण माझे मनोरथ पुरवावे.''

त्यावर श्रीराम म्हणाला, ''जानकी, तू वनवासाचे चिन्ह जाणत नाहीस. वनवासात दारुण दुःखे असतात. सावधानपणे ऐकून घे. राज्यातले अणुभरही काही आपण न्यायचे नाही, आभरणांचा त्याग करताना पादत्राणेही टाकावी, वल्कलांची वस्त्राभरणे, कृष्णाजिनाचे प्रावरण, हे सारे स्वीकारणे आहे. तू तर पूर्ण सुकुमार असून वनवासात दारुण दुःख असते. दंडकारण्य हे दुर्धर वन असून तेथेच आम्ही राहायचे आहे. पायी चालताना पूर्ण कंटकमय आहे. वनवासात कठीण संकटे असतात. सिंह, शार्दूल, वाघ, कोल्हे, तरस, डुकरे, मृग, जंबूक, अस्वल, वानर, सर्प, विंचू हे प्राणी तेथे असतात. पतंग, भुंगे, डास, मगरी, सुसरी, मासे, कंक, बक असे पक्षी, त्या घोर वनात हे सारेच असतात. वनात वनफळांचा आहार, तृणपर्णांची शय्या, ऋतुमानातले उष्ण आणि शीत हे बदल यांचा अनुभव घेत वनात राहावे लागते. तू तर राजाची राजकन्या, अतिशय नाजुक आहेस. वनातले द्वंद्व आणि दुःख यांचा तडाखा तू अबला कशी सहन करशील?''

सीतेची प्रतिक्रिया - युक्तिवाद

वनवासात होणाऱ्या बाधेचे वर्णन श्रीरामाने केल्यावर सीतेने ते सारे हसण्यावारी नेऊन म्हटले, ''माझ्या सन्निध रघुनंदन असल्यावर द्वंद्वबंधन मला कसे बाधेल? तुझे नामस्मरण नुसते केल्यावर द्वंद्वदुःखाचे निर्दाळण होते, तर तू प्रत्यक्षात जवळ असताना मला ते कसे बाधेल? वृक, व्याघ्र, सिंह यांचा आत्माच रघुनंदन, मग तोच तू बरोबर असता त्यांचा काय त्रास होणार? माझ्या सहवासात रघुकुलतिलक असल्याने कंटक निष्कंटक होतील आणि विषाचे अमृत होईल. यामुळे वनवासात परम सुखच होईल.''

''आपल्या संगतीने वनवास हा मला वैकुंठ-कैलास वाटेल. तुझ्याशिवाय संसार मला ओसाड वाटेल आणि मला सहन न होण्यासारखे दुःख होईल. माझा स्वामी तू रघुनाथा, माझे मनोगत ऐकावे, तुझ्याशिवाय जीवित म्हणजे दुःखपूर्ण संसार होय. पती हाच पत्नीचे आत्मजीवन, निधान, भूषण असतो. त्याच्याशिवाय ती सुंदरा अत्यंत दीन होते. पती हा पत्नीचे शोभन, मंडण, सौजन्य, त्याच्याशिवाय ती दीनवाणी होते. पती हाच पत्नीचे वैभव, सुख, गौरव असतो. त्याच्या नसण्याने ती अतिशय केविलवाणी होते तू तर माझा प्राणनाथ, तू नाहीस म्हणजे प्राणान्त. माझा परमात्मा रघुनाथ हा माझ्या हृदयात राहतो. तेव्हा आता मी काय सांगते ते ऐक.''

''जेव्हा हे रघुनंदना तू वनात जायला निघशील, तेव्हा तुझ्यासह माझे प्राणही येतील. मला जर मागे ठेवलेस तर अचुकपणे मला मरण येईल. तू कृपाळू हृषीकेशी असे स्वतःचे बिरुद वाहतोस, तर मला वनवासात तुझी दास्यत्वे सेवा करण्यासाठी बरोबर घेऊन जा.'' या वेळी सीतेने रामाचे चरण धरले. गहिवरलेल्या तिच्या डोळ्यांतून अश्रू ओघळत होते. त्यामुळे सहजच पतीचे चरण प्रक्षाळण झाले. श्रीराम संतुष्ट झाला. नंतर त्याने सीतेला म्हटले, ''हे पहा, कोणालाही न विचारता मी तुला माझ्याबरोबर वनात नेले तर जन म्हणतील याला स्त्रीने जिंकले, हा कामलोलुप आहे म्हणून राम सीतेला वनात नेतो आहे. तेव्हा ज्यामुळे लोकनिंदा टळेल, स्वार्थ आणि परमार्थ हे दोन्ही साधतील असे आत्मस्वार्थाने तुला सांगतो; तू त्याप्रमाणे कर. लौकिकात सर्वांना मानले पाहिजे. स्वार्थातून परमार्थ पावेल असे एक गुह्य मी तुला सांगतो. ते कार्य तू साध.''

वसिष्ठांकडे अनुज्ञा मागणे - त्यांनी देणे

''भूत, भविष्य, वर्तमान असे जाणणारे वसिष्ठांचे ज्ञान आहे. त्यांना तू शरण जावेस आणि वनात जाण्यासाठी विनंती करावीस. सद्गुरूंना

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized By Sarayu Foundation Trust and eGangotri

शरण गेल्यावर विघ्न हे सहज निर्विघ्न होते. ज्याला हरिहरही वंदन करतो त्या गुरूंचे वचन कोण उल्लंघणार. वसिष्ठांना आज्ञा मागितली की दशरथांनाही नाही म्हणवणार नाही. मलाही त्यांची आज्ञा उल्लंघता येणार नाही. गुरुवाक्य हे जगताला वंद्य आहे. ज्याच्या वचनासाठी सूर्यमंडलात छाटी तळपते एवढा महान् गुरू आमच्या गाठी आहे. तेव्हा तू ही गुह्य गोष्ट त्यांनाच विचार.'' श्रीरामाचे हे सांगणे ऐकून सीतेला पूर्ण आनंद झाला.

सीता हर्षभरित होऊन वसिष्ठांकडे गेली आणि त्यांचे चरण धरून तिने त्यांनी वनात जाण्यासाठी अनुज्ञा द्यावी म्हणून विनंती करताना म्हटले, ''अहो सर्वज्ञ गुरूराया, मला वनात जाताना बरोबर नेण्यासाठी आपण श्रीरामांना आज्ञा द्यावी. आपण तर हृदयस्थ ते सर्व जाणताच.'' मग वसिष्ठांनी त्यावर श्रीरामाला म्हटले, ''रघुनाथा तू सीतेला अवश्य वनात ने. हिच्यामुळेच तू पुरुषार्थ पावशील. हिच्यामुळेच तुला यश मिळेल. नंतर सुरवर स्तुती करतील, अशी कीर्ती हिच्यामुळे जोडली जाईल. तेव्हा हिला पुढे घालून स्पष्टपणे वनात जाण्यासाठी तू निघावेस.'' कौसल्याही सांगू लागली की, ''श्रीरामा वनवासाला जाताना तू सीतेला बरोबर न्यावेस. इथे तिला आमच्यापाशी ठेवलेस तर हिला नित्य दुःखीच पाहावे लागेल. स्त्रीपुरुषांची ताटातूट हे तर मरणाहून मरण असते. स्त्रीचे हेच दारुण दुःख असते की तिला पुरुषापेक्षा वेगळे शयन वाट्याला यावे.''

अयोध्येच्या जनांमध्येही हीच वार्ता होती की रघुनाथाने सीतेला वनात न्यावे. असे सर्वांचे मनोगत असल्याने श्रीरामाने ते मान्य करून स्वतःच्या पत्नीला वनात नेण्याची इच्छा प्रकट केली. खरोखर श्रीरामाची करणी अगाध आहे. सद्गुरूंची आज्ञा लाभली, स्वतःला लौकिक संपादन केला. वनात निजपत्नी नेण्याची व्यवस्था झाली. श्रीराम सीतेला म्हणाला, ''आता त्वरित वस्त्राभूषणांचा त्याग करून वल्कलांबरे परिधान करावीस. आपण त्वरेने वनगमन करू.'' वस्त्राभरणांचा त्याग करताच सीतेच्या चित्ताला उल्हास वाटला. तिने आपल्या सर्व वस्तूजातांचा साठा श्रीरामापुढे आणून ठेवला.

लक्ष्मणाची विनंती - हट्ट - अनुमती.

लक्ष्मण श्रीरामाला म्हणाला, ''रघुनाथा, आपण सीता बरोबर घेतलीत तर मीही आता वनात येतो. माझाही सेवा करण्याचा स्वार्थ मला साधू द्या.'' त्यावर श्रीरामाने म्हटले, ''तू माझा जिव्हाळ्याचा आप्त आहेस. माझ्यामागे राज्यभार धरणारा तुझ्याशिवाय मला अन्य कोणी दिसत नाही.'' श्रीरामाचे हे विधान ऐकून लक्ष्मणाने निर्वाणीची भाषाच सुरू केली. ''श्रीरामा तुझी शपथ घेऊन सांगतो, मी तुझ्यापासून वेगळा झालो तर मी प्राणच सोडीन.'' अशी निर्वाणीची शपथ वाहून त्याने श्रीरामाचे चरण धरले. सोडविता ते तो सोडेना. त्याचवेळी तो कळकळून म्हणाला, ''तुम्ही दोघे वनवासी होणार. सीतेला आश्रमात सोडून तू वनफळे आणायला जाशील. मागे हिचे रक्षण कोण करणार? स्त्रीला आरंभापासून रक्षण असतेच. माता बालपणी संरक्षण करते, कौमार्यात पिता रक्षण करतो, लग्न झाल्यावर सासरच्यांचे संरक्षण तिला लाभते. सासू-सासरे, दीर, नणंदा, जावा इत्यादी अनेकांचे रक्षण मिळाले तरी मुख्य रक्षक असतो तिचा पती - त्याने निरंतर तिचे रक्षण करावे. जिथे स्त्रीचे रक्षण होत नाही त्या घरावर अनर्थ ओढवतो. मग ती त्या कुळाचे लांछन ठरते, यामुळेच तिला प्रमदा म्हटले जाते. ही प्रमादी स्त्री पति-पुत्र यांना संकटात पाडते. कुळगोत्रावर संकट आणते. यासाठीही प्रमदा हे नाव तिला देणे वेदशास्त्रांनाही मान्य आहे.''

''तेव्हा तुम्ही दोघे वनवासी असताना, मी जर तुमच्याबरोबर असलो तर फळमूळे, फुले आणीन. तसेच अहोरात्र रक्षण करीन. तुझे

https://archive.org/details/muthulakshmiacademy Bhuvan Vani Trust, Lucknow

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

धनुष्यबाण वाहीन, लाकूडफाटा, पाणी आणीन, तुम्हाला शयन करण्यासाठी तृणपर्णांची शय्या तयार करीन. तुझ्या दासांचाही दास, मोलेविण सेवक, वनवासातला पाइक, विश्वासू अंगरक्षक म्हणून तुमच्याबरोबर राहीन. वनात सीतेला एकाकी ठेवण्याने रघुनाथा अनर्थ होईल. हा विचार समर्थ गुरूवर्य वसिष्ठांना विचारून घे." लक्ष्मणाचा हा युक्तिवाद सर्वांनी सत्य मानला की, सीता वनामधे एकटीच ठेवल्याने निश्चित अनर्थ होईल. लक्ष्मणाचे बोलणे ऐकून वसिष्ठांनी सर्वज्ञपणे आज्ञा दिली. त्यांनी खुणावून श्रीरामाला 'लक्ष्मणाला वनात घेऊन जा' असे सुचविले. श्रीगुरूंची आज्ञा झाल्यावर रामाने लक्ष्मणाला सांगितले, "लक्ष्मणा, जर तुला वनात यायचे असेल तर धन-धान्य वाटून टाक." श्रीरामाने असे म्हणताच लक्ष्मण अत्यंत आनंदित झाला.

अध्याय आठवा

श्रीरामाने लक्ष्मणाला वनात आपल्याबरोबर येण्यासाठी संमती दिल्यावर लक्ष्मणाला आपली माता आणि पत्नी यांची भेट घेण्यासाठी पाठविले. त्याचबरोबर इतरही सूचना दिल्या. श्रीराम लक्ष्मणाला म्हणाला, "सौमित्रा, तू आमच्यासह वनात येणार म्हणतोस तर प्रथम आपल्या मातेला आणि पत्नीला भेटून ये. तसेच इतरही सुहृदसंबंधी असतील त्यांना पूर्ण कल्पना देऊन, विचारून ये. तसेच माझी दिव्य आयुधे आण. ती अत्यंत शुद्ध ठेवून ती युद्धार्थासाठी आवश्यक असतील. मला महाराज दशरथांनी वरुणदत्ताचे धनुष्य दिले आहे. त्याचेच अक्षय भाते आणि अभेद्य कवच घेऊन ये. त्याचप्रमाणे शत्रूघातामधे अतिशय खडतर आणि सतेज धार असलेले खड्गही लवकर घेऊन ये. सद्गुरु वसिष्ठांच्या घरी माझी आयुधे-सामग्री आहे तीही त्वरा करून आणावी कारण वनात जायला विलंब नको."

लक्ष्मण माता सुमित्रेकडे गेला. तिला त्याने सांगितले की, "राम, सीता वनात राहायला जात आहेत. मीही त्यांची सेवा करण्यासाठी जातो आहे." त्याने मातेला वंदन केले. सुमित्रा म्हणाली, "श्रीरामाची सेवा केल्याने माझ्या जिवाला सुख वाटते. वनात सेवा करून तू राघवाला सुखी केलेस तर माझी कूस धन्य होईल. ज्येष्ठ बंधू परम सद्गुरूसमान आणि पित्यासमान असतो. ज्येष्ठ बंधू आत्माराम, पुरुषोतम मानावा. श्रीरामाची सेवा हे श्रेष्ठ दान आहे. परम ध्यान, समाधान आणि ब्रह्मज्ञान आहे. जो श्रीरामाच्या सेवेचा आदर करतो, तो नर नित्य सुखरूप होतो." असा सुमित्रामातेने आशीर्वाद देऊन लक्ष्मणाला वनात पाठविला. याप्रमाणे मातेला वंदन करून, लक्ष्मण पत्नीला आश्वासन देऊन, दिव्य आयुधे बरोबर घेऊन, धावत आला. त्याला आलेला पाहताच स्वतः सीतेला अत्यंत उल्हास वाटला, रामालाही सुख झाले. रामाने त्याला आनंदाने पोटाशी धरला. जो आपल्या पत्नीला, वित्तविषयांना त्यागतो तोच रामाचा प्रियसखा आणि अहोरात्र जीवांचा आवडता होतो.

वनगमनापूर्वी सर्वांचा दानधर्म

श्रीराम लक्ष्मणाला म्हणाला, "तू अगदी योग्य वेळी आणि शीघ्र आला आहेस. तर आता मी माझे धन दीनजनांना देणार आहे त्या कार्याचे संपादन कर. तू सखा साहाय्यकारी वनवासात, तू सखा निजधर्मासी, निजकर्मासी साहाय्यकारी तू निश्चित सर्वार्थी होशील. मी माझे स्वतःचे सर्व धन धर्मार्थ म्हणून दान करतो आहे. ते वाटण्याचे विधान सावधपणे ऐक. सर्वार्थी साहाय्यक सखा म्हणून आधी वसिष्ठगुरूंचे पूजन करावे. श्रीगुरूंना सर्वस्व अर्पण करावे. हा आमचा मुख्य स्वधर्म आहे. धन, धान्य, गायींचे कळप, अमोल वस्त्रे, अलौकिक रथ, घोडे हे श्रीगुरूंना अर्पण कर. अनर्घ्य रत्नांच्या कोटी भरून कावडीने धाडाव्या.

https://archive.org/details/@lakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized By Sarayu Foundation Trust and eGangotri

असा श्रीगुरू आवडीने पूजावा. हा शुद्ध धर्मप्रकार आहे. तू स्वतः बरोबर जाऊन आपल्या हाताने सद्गुरूंना अर्पण कर. शिवाय त्यांचा सुयज्ञ नावाचा ज्येठ पुत्र आहे. त्याला विनंती करून येथे घेऊन ये." श्रीवसिष्ठांना धन द्यावे हे श्रीरामाचे वचन ऐकून लक्ष्मणाला पूर्ण आनंद झाला. त्याने श्रीगुरूंकडे जाऊन त्यांची पूजा केली. तेव्हा वसिष्ठ उल्हासाने म्हणाले, "श्रीराम त्रैलोक्यविजयी होणार आहे. त्यामुळेच त्याला अशी बुद्धी झाली आहे. जी पूर्णभाग्याची प्रकाशक ठरावी."

नंतर लक्ष्मणाने सुयज्ञाच्या घरी जाऊन, त्याला वंदन करून म्हटले, "श्रीराम वनात जातो आहे आणि त्याने भेटीला बोलावले आहे." श्रीरामाचे वनगमन ऐकून सुयज्ञ उद्विग्न झाला दोन्ही डोळे मिटून तो काही काळ स्तब्ध, तटस्थ राहिला. मग संध्यावंदन करून तो सुयज्ञ रामाकडे आला. रघुनंदनाने सद्गुरुपुत्राला पाहून लोटांगण घातले. त्याची मधुपर्क विधिविधानपूर्वक पूजा केली. श्रीरामाने आपली भूषणे गुरुपुत्राला अर्पण केली. त्यामधे रत्नजडित कुंडले, मेखला, बाहूभूषणे, माला, करकंकणे, सर्व मुद्रा होत्या. त्या सर्व अलंकारांनी गुरुपुत्राला रामाने शृंगारले. श्रीरामाने सीतेलाही सुयज्ञाची पूजा करायला सांगितले. तेव्हा तिनेही सर्व अलंकार आनंदाने अर्पण केले. आपण श्रीरामाबरोबर वनात जात आहोत याचा सीतेला मनातून आनंद होत असल्यामुळे तिने सुयज्ञाला सर्वस्व अर्पण करण्यात आनंद मानला. सीतेपाशी असलेली अमूल्य वस्त्रेही तिने सुयज्ञाला दिली. तिने सुशोभित शय्या, पांघरुणे, दासी अर्पण केल्यावर सुयज्ञाला वंदन केले. नंतर मातुलाकडून मिळालेला एक हत्ती होता, तो शृंगारून, त्या सालंकृत हत्तीवर सुयज्ञाला बसवून मोठ्या थाटात सुयज्ञाची पाठवणी श्रीरामाने केली.

"जो उल्हासाने गुरुपूजन करत नाही, जो सत्पात्रांची भक्ती करत नाही त्या दात्याला दूषण लागते यासाठी आम्ही महाऋषींचेही पूजन केले पाहिजे. तेव्हा सौमित्रा, अगस्ती, शांडिल्य, गार्ग्य, वामदेव, कौशिक यांच्याकडे विपुल धन पाठवावे. वेदपाठक, अग्निहोत्री, सत्कर्माचारी, नित्यश्रोत्री, वेदज्ञ, महामंत्री या सर्वांची द्रव्यभाराने पूजा करावी. अशांना दान दिले तर ते अतिशय पवित्र आणि सत्पात्री दान असते." श्रीरामाने असे सांगून पुढे दानाचे अधिकारी कोण याची सविस्तर माहिती दिली.

श्रीराम म्हणाला, "जो याचना न करणारा भगवद्भक्त असेल त्याला अवश्य दान द्यावे. आपण स्वतः जाऊन याचकांना धन अर्पावे. कुटुंबवत्सल आणि निर्धन, तसेच ज्यांना अनेक अपत्ये आहेत अशा दीन जनांना, त्यांचे मन तृप्त होईल एवढे धन द्यावे. जे कोणी बुजरे आणि कष्टाने जगणारे असतील त्यांच्या घरी जाऊन ते मागतील तेवढे धन चौपट करून त्यांना अर्पावे. त्यांना साधन म्हणून सवत्स सहस्र गायी अवश्य द्याव्या म्हणजे त्यांना दही-ताक भोजनात मिळेल. कौसल्येच्या घरी असलेले धन-धान्य प्रथम धर्माचरण करणाराना, संन्यासी, मधूकरी, आपले सेवक आणि तिचे उपासक यांना द्यावे. सुमित्रेचेही धन तसेच दे."

"आपले सुहृद आणि सेवक, परिचारक आणि प्रेषक, कथाकथन करणारे पुराणिक, यांना विपुल धन द्यावे. वार्ता देणारे, गंधलेपक, सभारंजन करणारे यांना सुख होण्याएवढे धन दे. छत्रधारक, चामरधारक, विडा देणारे, व्यवहारी, पाणी देणारे, धोबी, माळी यांना द्रव्य देऊन सुखी कर. मल्ल, नट, अश्ववाहक, राज-विदूषक, शिल्पकार यांना सुखी कर. माझा सारथी चित्ररथ, त्याला भरपूर द्रव्य अर्पण कर. आपले स्नेही, भक्त, आश्रित, जे जे आम्हाला प्रेम देणारे ते धनाने सुखी कर. आपल्याला धन ठेवायचे नसल्याने ते सर्व धर्मकार्यात संपूर्ण खर्च कर. आणिक लागले तर ते मी देईन."

श्रीरामाने यानंतर राजभांडारी बोलावून आणून त्याला भांडारातले सर्व द्रव्य बाहेर

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

काढायला सांगितले. मग त्या द्रव्याच्या विनियोगाविषयीच्या सूचना सौमित्राला दिल्या. "कृपण, अनाथ, दीन, अंध, पंगू, विनावृत्ती जे जे मागतील ते ते त्यांना द्यावे. हे सर्व त्यांना सन्मानाने दे. कारण दान दिल्याने होणाऱ्या सुखापेक्षा सन्मानाचे सुख हे अधिक असते. ज्याने भगवानही सुखी होतो, असे दान अत्यंत श्रेष्ठ आहे. वृद्ध ब्राह्मण, स्त्रिया, तरुण, बरीच अपत्ये असलेले निर्धन, यांना सन्मानाने दिलेले दान म्हणजे सूक्ष्मदान म्हणावे. अशा ब्राह्मणांना सवत्स, भरपूर दूध देणाऱ्या हजारो गाई अर्पण कर. खिल्लारे उरू देऊ नकोस. माझे पुनरागमन होईपर्यंत खायला पुरेल असे धन दीनांना दान द्यावे. हा सनातन धर्म आहे. मी वनात गेल्यावर मागे कोणाला कष्ट होऊ नयेत, कोणी संकटात पडू नये असे अगाध तृप्ती देणारे धन दे." श्रीरामाने जशी आज्ञा दिली होती, त्याहूनही अधिक दान लक्ष्मणाने दिले. हे दान देताना लक्ष्मण चौपट आनंद मनाने घेत होता.

दशरथाचा निरोप घेणे - त्याची विनंती

श्रीराम, सीता आणि लक्ष्मण यांनी सर्व धन वाटून टाकल्यावर, वनात प्रयाण करायचे ठरवून, राजा दशरथाकडे आज्ञा मागण्यासाठी निवासाबाहेर पाऊल टाकले. त्यावेळी त्यांचे दर्शन घेण्यासाठी नरनारींनी एकच गर्दी केली. कोणी माडीवर, कोणी गोपुरी, कोणी घरावर चढले. श्रीराम जेव्हा पायी चालत राजपथावरून निघाला तेव्हा त्याच्याबरोबर लोकसमूहांनी दाटी केली. त्यांच्यात 'कैकेयीची दुष्ट बुद्धी आहे, पण राजाने निर्बुद्धपणे तिचे का ऐकावे. राम पूर्वी रथ, गज, चतुरंग सेना घेऊन मोठा गजर करत जात असे, तोच आज अनवाणी पायांनी वनवासात निघाला आहे. ज्या श्रीरामाला पाहून डोळे, मन, जन शांत होऊन जगज्जीवनाचा अलौकिक अनुभव घेत, तो राम आज दूर निघाला आहे. श्रीराम जगाचे जीवन आहे. त्या रामरूपी जलात जनरूपी मासे आनंदात असत. तो श्रीरामच जर निघून गेला तर जनांचे प्राण जातील. अशा सुखरूप रामाला दशरथ वनात धाडतो आहे. यावरून त्याला कैकेयीग्रहाने ग्रासले असून, त्याला स्त्रीचे वेड लागलेले दिसते. सीता ही सुकुमार महासती असून इंद्रादी देवही जिला पाहू शकत नाहीत तिला आज अनवाणी पायांनी जमिनीवरून चालताना वाटेवरचे लोक पाहताहेत.' अशी लोकांची बोलणी ऐकत तिघेही ती मनावर न घेता, खंत न करता, त्वेरेने राजगृहात दशरथाला विचारायला आली.

सुमंत प्रधान अत्यंत विश्वासातला म्हणून त्यानेच राजाला सांगितले, "श्रीराम वनवासाला निघाला आहे. आपली आज्ञा विचारण्यासाठी आला. इथे येण्यापूर्वी त्याने आपले धन सेवकांना, सुहृदांना, ब्राह्मणांना वाटून टाकले आहे. दीन जनांना सुखी केले आहे. तो सुमुहूर्तावर वनप्रयाण करणार आहे." सुमंताचे बोलणे ऐकून राजा पुन्हा मूर्च्छित अवस्थेत जाण्यापूर्वी रडू लागला आणि 'रामाला वनवासात धाडणाऱ्या कैकेयीचे तोंड जळो' असे म्हणाला. प्रत्यक्षात त्याने जेव्हा श्रीराम पाहिला तेव्हा तो पूर्ण मूर्च्छित होऊन जमिनीवर पडला.

श्रीरामाने तत्परतेने राजाला उचलले, पलंगावर निजवून स्वतः त्याला थोपटू लागला. राजा सावध होताच रामाला म्हणाला, "रामा तू वनप्रयाण करू नकोस. माझे प्राण मला सोडून जाऊ पाहात आहेत. कैकेयी ही कुठली माशी, मीच तुला संपूर्ण राज्य देतो. आताच ऋषिगणांसमक्ष तुला अभिसिंचन करतो," यावर श्रीरामाने राजाचे पाय धरून विनंती केली, "महाराज, मला अभिषेक करू नका. कारण, आपले शपथवचन त्यामुळे मिथ्या होईल आणि आपण दोघेही वेदोक्तीप्रमाणे दोषी ठरू. आता मी जर राज्य घेतले तर जग माझी निंदा करील. आपले वचन खोटे केले तर मीच अधःपाताला जाईन. वेदवचन, गुरुवचन

https://archive.org/details/muluk.lakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Research Academy, Gangotri

याहीपेक्षा पितृवचन थोर असल्याने त्याचे जो पालन करतो त्याचे वचन अनुल्लंघ्य होते. आपल्या वचनासाठी सीता, माझे स्वतःचे जीवित असा कशाचाही त्याग करीन, पण वनवासाचा निश्चितार्थ मी कधीही त्याग करणार नाही. माझा प्राण जरी गेला तरी वनप्रयाण सोडणार नाही. महाराज, हीच माझी प्रतिज्ञा आहे. त्यासाठीच मी आपले पाय धरले आहेत."

रामाला सुविधा देण्यावरून वाद

श्रीरामाचा निर्धार पाहून राजा दशरथ शोकग्रस्त झाला. "कैकेयीने पूर्णपणे आम्हाला लुबाडले. त्यामुळे रामनिधान अंतरले. यासाठी न विचार करता आपल्या कार्यासाठी कधीही स्त्रियांना शपथवचन देऊ नये. तशा आणभाकेमुळे आम्ही गुंतलो आणि राम वनवासी केला." राजाने श्रीरामाचा दृढनिश्चय आणि वनगमनाचा निर्धार यांची जाण आल्यावर आपल्या प्रधानाला आज्ञा केली की, चतुरंगसेना सिद्ध करून रामाबरोबर द्यावी, तसेच त्याला वनात खर्च करण्यासाठी विपुल धन बरोबर द्यावे. उन्हाचा रामचंद्राला त्रास होऊ नये म्हणून तंबू आणि छत्रचामरे द्या. धेनूंचे खिल्लारही त्याच्याबरोबर द्या." हे रामाचे सांगणे ऐकून कैकेयी अत्यंत संतापली. डोळे लाल करून ती म्हणाली, "उसाचा रस घेऊन एखाद्याला चोयट्या द्याव्या तसे रामाला सारी लक्ष्मी देऊन भरताला शून्य राज्य देतोस? भद्रजातीचा हत्ती द्विजाला दाखवून दानसंकल्प द्विजाच्या हातावर सोडायचा आणि देताना चित्रातला हत्ती द्यायचा अशाप्रकारे हे तुझे राज्य देणे आहे माझे तोंड काळे म्हणता, परंतु तुम्हीच दुष्ट आणि नष्टविवेक आहात. आपले वचन मिथ्या करता तर अवश्य नरक भोगाल." कैकेयीचे हे कठोर भाषण ऐकून राजा कोपायमान होऊन म्हणाला, "नष्ट, दुष्ट तूच असून कठोर वाग्बाणांनी आमचे वर्म भेदते आहेस."

श्रीरामाने माता-पित्यांचा वाद ऐकल्यावर नम्रपणे म्हटले, "स्वामी दशरथराजन्, सेनासंपत्ती मी बरोबर घेतल्याने राज्यभार माझ्या माथ्यावर येईल. तो मी कधीही घेणार नाही. गंगाजल हे अतिशय शुद्ध असते, पण त्यात मद्याचे थेंब पडल्यावर ते पूर्णपणे अशुद्ध होते; त्याप्रमाणे दुष्टसंग हा विरुद्धच असणार. तुम्ही राज्य भरताला दिले आहे, त्यातून अणुमात्रही मी घेतले तर माझ्या वनवासाच्या व्रताला दोष लागेल." हे श्रीरामाचे निवेदन ऐकताच कैकेयीने त्याला वल्कले आणून दिली. "ही वेढून शीघ्र वनाकडे निघावे. वस्त्रालंकार काढून वल्कलांबर परिधान करावे. डोक्यावर जटाभार असावा. वनवासात वनचरांप्रमाणे होऊन राहावे." दशरथासमोर श्रीरामाने स्वतः वल्कले वेढली. सीतेला वल्कले दिली, पण ती तिला नेसता आली नाहीत. तेव्हा श्रीरामाने तिच्याकडे जाऊन कुशलतेने नेसविली. लक्ष्मणानेही वल्कले वेढली. त्या वेळी राम, सीता आणि सौमित्र यांनी फेडलेली वस्त्रे कैकेयीने आपल्यापाशी ठेवली. ते पाहून दशरथाला राग येऊन त्याने रागाने तिची निर्भर्त्सना केली.

वसिष्ठ, दशरथ कैकेयीचा धिक्कार करतात.

कैकेयीचे बोलणे आणि वागणे पाहून वसिष्ठांना क्रोध आला. त्यांनी कैकेयीची निर्भत्सना केली. "नष्ट, दुष्ट, शठ अशी तू झालीस, आत्यंतिक स्वार्थाने तुला लाजही उरली नाही. तुझ्या वरदाच्या नियमाने एकटा राम वनवासी व्हावा असे आहे. तर तू सीतेला वल्कले कशी देतेस? हे दुर्भगे, तू अत्यंत दुष्ट आहेस. वस्त्रे, अलंकार त्यांचे तू का सभेदेखत घेतलेस? तत्त्वतः तुझे काळे तोंड आहे ते दाखवण्याची तुला लाजही नाही."

दशरथाचा क्रोध तर दुस्तर होता. तो कैकेयीला लाथा मारायला धावला. "तू माझी पत्नी नाहीस, मी तुझा पती नव्हे. माझ्या बाळांची वस्त्रे घेतेस? तू खरे तर बाजारात बसणारी निर्लज्ज स्त्री आहेस. घरी हा गोंधळ घालते आहेस त्यापेक्षा स्पष्टपणे बाजारात जाऊन बैस." असे रागाने

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

बोलताना त्याचा गळा दाटून आला. त्याने सीतेला पोटाशी धरून, तिला आभरणे अर्पण केली. चौदा वर्षे वनवासात पुरतील एवढी वस्त्राभरणे सीतेला द्यावीत, असे राजाने सुमंताला सांगितले. सुमंताने राजाज्ञेप्रमाणे सीतेजवळ वस्त्रे. भूषणे दिली. त्यावर ती जनककन्या दशरथाला, वसिष्ठांना वंदन करून नम्र उभी राहिली. वसिष्ठांनी आशीर्वचन उच्चारले, "वनात पूर्ण सतीत्वाचे पालन कर. रघुनंदन विजयी होईल. तुझी त्रिभुवनात वंदनीय म्हणून कीर्ती होईल." राजाने सुमंताला सांगून स्वतःचा रथ आणवून त्यात सीतासौमित्रांसह श्रीरामाला बसवावे असे सांगितले.

सर्वत्र शोकाकुल वातावरण

श्रीराम आणि लक्ष्मण यांनी प्रदक्षिणा करून पित्याचे चरणवंदन केले. सातशे मातांनाही वंदन केले. तेव्हा त्यांनी कोलाहल केला. सर्वांनी एकच आक्रोश मांडला. त्यामुळे राम तेथून तत्काळ निघाला. सर्वजण विव्हळ झाले होते. राम जातो आहे हे पाहून राजा मूर्च्छित झाला. सर्व लोक रुदन करू लागले. अयोध्या दीनवदन झाली. कोणी कपाळ बडवत होते, कोणी दीघस्वरात हाका मारत होते, कोणी ऊर बडवत होते. अनेकांना मूर्च्छा आली. श्रीरामाने विचार केला, की येथे अधिक थांबल्याने अधिक ममता वाढेल, म्हणून सीतेला रथात बसवून तो लक्ष्मणासह लगेच निघाला. त्या वेळी कौसल्या माता आक्रंदून म्हणाली, "मुख मला पाहू दे रामा. पुन्हा मला ते केव्हा दिसेल. रामा बघू दे मला. येई रे माझ्या रामा, मनमोहन मेघःश्यामा, आम्हाला असे दुःखात सोडून दुर्गम वनात का जातोस? तुला वनात जाताना पाहून हे रामा, मला प्रेमपान्हा फुटला आहे. तो कोणाला पाजू रे रघुनंदना. तुझे मुख एकदा तरी दाखव ना!"

श्रीराम वनात जायला निघाला तेव्हा गार्यींच्या डोळ्यातून अश्रू गळू लागले. अश्व, गज रडू लागले, पाषाण दुःखाने उलले. डोहातले पाणी आटल्यावर जसे मासे तळमळतात तसे अयोध्यावासी रामाविण तळमळत होते. कैकेयी अत्यंत निष्ठूर आहे. तिने सीतेचे वस्त्राभरणही हरण केले. तिच्या हाताखाली कोण राहील. त्यापेक्षा वनातच जाऊ असा त्या नगरजनांचा विचार झाला.

श्रीरामामागून ज्योतिषी, वेदपाठक, अग्निहोत्री अग्नीसह निघाले. त्यांच्या बरोबर एकएकजण निघाले. सुतार, कुंभार, न्हावी, नट, धोबी, रंगारी, चांभार आणि असेच अनेकजण निघाले. भुसी, साळी, माळी, चाटी, व्यापारी, भाटी, तेली, तांबोळी, कोष्टी, सोनार, शिंपी, गवळी, कोळी, माळी सर्वजण निघाले. "कैकेयी ही दुष्ट आणि बाधक आहे. ती आम्हाला छळील. जिकडे राम तिकडे अयोध्या" अशी सर्वांची श्रद्धा होती. श्रीरामाने जेव्हा मागे पाहिले, तेव्हा नगरवासी मागून धावत येत आहेत असे त्याला दिसले. त्याने सुमंताला सांगून रथ थांबवला आणि "हा जनसमुदाय का येतो आहे?" असे विचारले.

श्रीरामाने त्या लोकांना स्वतः विनवून सांगितले, "मला दंडकारण्यात जायचे आहे. तो मार्ग दूर आणि कठीण आहे तुम्हाला तिथे येववणार नाही. कृपा करून माझ्यासाठी तुम्ही अयोध्यानगरीतच राहा. राजा दशरथ शिरी आहे. तेथे सुखासमाधानाने नांदावे. माझी आज्ञा भरत निश्चित पाळेल. तुम्ही निश्चिंत मनाने राहा." असे सांगून नागरिकांना रामाने राहविले. "माझे ज्याला स्मरण अहर्निश असते त्याच्यापाशी मी अखंड असतो. मला मनाने कधी विसरू नका म्हणजे मी नित्य तुम्हापाशी असेन." याप्रकारेही सांगून सर्वांना मागे ठेवून श्रीराम वनात जाण्यासाठी मार्गस्थ झाला.

अध्याय नववा

श्रीराम वनात जायला निघाला त्या वेळी मायामोहाने राजा दशरथ मूर्च्छित पडला होता. तो सावध झाल्यावर विचारू लागला, "राम कोठे आहे?" त्यावेळी त्याच्या राण्यांनी त्याला घडली

https://archive.org/details/muluksmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized By Sarayu Foundation Research Academy

गोष्ट सांगितली. "तुम्हीच त्याला आपला रथ दिलात. त्यावर बसून राम निश्चित वनवासात गेला." तेवढ्यात कोणी सांगितले, "राम नगरवासीयांना आश्वासत नगराच्या द्वारापाशी थांबला आहे" त्याबरोबर राजा तिकडे वेगाने धावला.

राजपरिवाराचा आक्रोश - वसिष्ठांचे सांत्वन

राजा दशरथ त्याच्या सातशे राण्यांसह रामाकडे धावत निघाला. वाटेत सर्वांना तो विचारत होता. 'कुठे आहे माझा राम?' नंतर त्याने आक्रंदून हाक मारली. "श्रीरामा मला तुझे मुख पाहू दे. तुला विमुख झाल्यावर सर्वांना अपार दुःख होते आहे. कैकेयीने माझ्याकडून आणभाक घेऊन, मलाच महादुःख दिले आहे. तुझे मुख दिसले तरच मला परम सुख होणार आहे. श्रीराम हृदयात स्मरला तर सर्व दुःखांचा अंत होतो. मी अभागी म्हणून दुर्भाग्याने मी रघुनाथ वनात धाडला. धाव, पाव बा राघवा, परम कृपेने भेट दे. त्याने माझ्या जिवाला सुख होईल." असे म्हणत राजाने आक्रोश करीत रामाचा धावा केला. नंतर पुन्हा "गेला गेला रे रघुनाथ" म्हणत, आक्रंदत, रडत, स्वतः धावत निघाला. परंतु अतीव दुःखाने तो राजा मूर्च्छित झाला.

श्रीराम सुमंताला म्हणाला, "येथे अधिक काळ थांबलो तर मोहममता वाढेल. यासाठी महाराज माझ्यापर्यंत आले नाहीत तोवरच रथ वेगाने पुढे न्यावा." रथ पुढे जाताना पाहून दशरथाला निश्चित कळले की, श्रीराम आता परतून येणार नाही. यामुळे त्याने दृष्टी मुरडून रामरूपावर तिथूनच जडवून ठेवली.

श्रीराम दृष्टीला पडताच, दृष्टी रामापाठी लागली. श्रीराम दिसेनासा झाल्यावर दृष्टी ध्वजस्तंभावर अखेर स्थिरावली. जेव्हा दृष्टीपुढून ध्वजही गेला तेव्हा राजा रथाने उडविलेली धूळ पाहात राहिला. तेही श्रीरामाचे रज दृष्टिआड झाले त्याबरोबर राजा पुन्हा मूर्च्छित झाला. श्रीरामाचे स्मरण केल्यावर राजाला स्वतःच्या देहाचा विसर पडला. या कारणाने त्याला मूर्च्छा आली. तो देहभाव पूर्णपणे विसरला. त्याच्या राण्या, इतर सर्वजण रडत होते. गाईंनी गवत खाणे, पाणी पिणे बंद केले. वासरे स्तनपान विसरली, घोडे चारापाण्याला तोंड लावीनात, हत्ती तोंडात घास घालीनासे झाले पौरजनांनी आहाराचा त्याग केला. अयोध्याभुवनी एकच आकांत झाला. दिवस अस्तमानाकडे गेला तेव्हा राण्यांनी दशरथाला सावध केला. नंतर सर्वजण राजभवनात आले. तेथे स्वप्नातही सुख दिसेना. दीपदीपिका कोठे नाहीत, बाजारहाट, चौव्हाटे सारे ओस पडलेले. जो तो रडतच वाट चालत होता. मधूनच विचारत होता 'श्रीराम कुठे?' श्रीरामाने वनात प्रवेश केला तेव्हा घरोघरी दीर्घ स्वरात रडणे चालले होते. अयोध्याभुवनात सर्वत्र अंधार पडला होता. कोणाला अन्न खावेसे वाटत नव्हते. श्रीरामाच्या वियोगाचे दुःख राजा, राण्या, अन्य जन कोणाला सहन होत नव्हते. ते म्हणत होते विष घ्यावे. अशावेळी वसिष्ठच सावरण्यासाठी पुढे झाले. त्यांनी सर्वांना दुःखापासून निवारण्यासाठी सांत्वन केले.

"चौदा वर्षे वनवासाची राम निमिषार्धात क्रमून जाईल. त्रिभुवनातले यश मिळवून तो अयोध्येला येईल. राक्षसांचे समूह मारून, देवांची बंधने सोडवून, तो रामराज्याची गुढी उभारून सत्वर येईल. माझे वचन प्रमाण माना. मी श्रीरामाची शपथ वाहतो. तुम्ही विष घेऊन प्राण द्याल तर तुमचे अधःपतन होईल." वसिष्ठांचे बोलणे ऐकून राजाने राजभुवनात प्रवेश केला. परंतु मनात रामाची आठवण येताच तो परत मूर्च्छित झाला.

श्रीरामामागे धावणारे ब्राह्मण आणि इतरेजन

श्रीराम तिकडे शीघ्रगतीने वनप्रयाण करत असता त्याच्या पाठी ब्राह्मण लागले. कितीही सांगून

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

बोलताना त्याचा गळा दाटून आला. त्याने सीतेला पोटाशी धरून, तिला आभरणे अर्पण केली. चौदा वर्षे वनवासात पुरतील एवढी वस्त्राभरणे सीतेला द्यावीत, असे राजाने सुमंताला सांगितले. सुमंताने राजाज्ञेप्रमाणे सीतेजवळ वस्त्रे. भूषणे दिली. त्यावर ती जनककन्या दशरथाला, वसिष्ठांना वंदन करून नम्र उभी राहिली. वसिष्ठांनी आशीर्वचन उच्चारले, "वनात पूर्ण सतीत्वाचे पालन कर. रघुनंदन विजयी होईल. तुझी त्रिभुवनात वंदनीय म्हणून कीर्ती होईल." राजाने सुमंताला सांगून स्वतःचा रथ आणवून त्यात सीतासौमित्रांसह श्रीरामाला बसवावे असे सांगितले.

सर्वत्र शोकाकुल वातावरण

श्रीराम आणि लक्ष्मण यांनी प्रदक्षिणा करून पित्याचे चरणवंदन केले. सातशे मातांनाही वंदन केले. तेव्हा त्यांनी कोलाहल केला. सर्वांनी एकच आक्रोश मांडला. त्यामुळे राम तेथून तत्काळ निघाला. सर्वजण विव्हळ झाले होते. राम जातो आहे हे पाहून राजा मूर्च्छित झाला. सर्व लोक रुदन करू लागले. अयोध्या दीनवदन झाली. कोणी कपाळ बडवत होते, कोणी दीघस्वरात हाका मारत होते, कोणी ऊर बडवत होते. अनेकांना मूर्च्छा आली. श्रीरामाने विचार केला, की येथे अधिक थांबल्याने अधिक ममता वाढेल, म्हणून सीतेला रथात बसवून तो लक्ष्मणासह लगेच निघाला. त्या वेळी कौसल्या माता आक्रंदून म्हणाली, "मुख मला पाहू दे रामा. पुन्हा मला ते केव्हा दिसेल. रामा बघू दे मला. येई रे माझ्या रामा, मनमोहन मेघःश्यामा, आम्हाला असे दुःखात सोडून दुर्गम वनात का जातोस? तुला वनात जाताना पाहून हे रामा, मला प्रेमपान्हा फुटला आहे. तो कोणाला पाजू रे रघुनंदना. तुझे मुख एकदा तरी दाखव ना!"

श्रीराम वनात जायला निघाला तेव्हा गार्यींच्या डोळ्यातून अश्रू गळू लागले. अश्व, गज रडू लागले, पाषाण दुःखाने उलले. डोहातले पाणी आटल्यावर जसे मासे तळमळतात तसे अयोध्यावासी रामाविण तळमळत होते. कैकेयी अत्यंत निष्ठूर आहे. तिने सीतेचे वस्त्राभरणही हरण केले. तिच्या हाताखाली कोण राहील. त्यापेक्षा वनातच जाऊ असा त्या नगरजनांचा विचार झाला.

श्रीरामामागून ज्योतिषी, वेदपाठक, अग्निहोत्री अग्नीसह निघाले. त्यांच्या बरोबर एकएकजण निघाले. सुतार, कुंभार, न्हावी, नट, धोबी, रंगारी, चांभार आणि असेच अनेकजण निघाले. भुसी, साळी, माळी, चाटी, व्यापारी, भाटी, तेली, तांबोळी, कोष्टी, सोनार, शिंपी, गवळी, कोळी, माळी सर्वजण निघाले. "कैकेयी ही दुष्ट आणि बाधक आहे. ती आम्हाला छळील. जिकडे राम तिकडे अयोध्या" अशी सर्वांची श्रद्धा होती. श्रीरामाने जेव्हा मागे पाहिले, तेव्हा नगरवासी मागून धावत येत आहेत असे त्याला दिसले. त्याने सुमंताला सांगून रथ थांबवला आणि "हा जनसमुदाय का येतो आहे?" असे विचारले.

श्रीरामाने त्या लोकांना स्वतः विनवून सांगितले, "मला दंडकारण्यात जायचे आहे. तो मार्ग दूर आणि कठीण आहे तुम्हाला तिथे येववणार नाही कृपा करून माझ्यासाठी तुम्ही अयोध्यानगरीतच राहा. राजा दशरथ शिरी आहे. तेथे सुखासमाधानाने नांदावे. माझी आज्ञा भरत निश्चित पाळेल. तुम्ही निश्चिंत मनाने राहा." असे सांगून नागरिकांना रामाने राहविले. "माझे ज्याला स्मरण अहर्निश असते त्याच्यापाशी मी अखंड असतो. मला मनाने कधी विसरू नका म्हणजे मी नित्य तुम्हापाशी असेन." याप्रकारेही सांगून सर्वांना मागे ठेवून श्रीराम वनात जाण्यासाठी मार्गस्थ झाला.

अध्याय नववा

श्रीराम वनात जायला निघाला त्या वेळी मायामोहाने राजा दशरथ मूर्च्छित पडला होता. तो सावध झाल्यावर विचारू लागला, "राम कोठे आहे?" त्यावेळी त्याच्या राण्यांनी त्याला घडली

https://archive.org/details/@sarayu_foundation_trust_lucknow

CC-0. In Public Domain. Digitized by Sayajirao Research Academy, eGangotri

गोष्ट सांगितली. "तुम्हीच त्याला आपला रथ दिलात. त्यावर बसून राम निश्चित वनवासात गेला." तेवढ्यात कोणी सांगितले, "राम नगरवासीयांना आश्वासत नगराच्या द्वारापाशी थांबला आहे" त्याबरोबर राजा तिकडे वेगाने धावला.

राजपरिवाराचा आक्रोश - वसिष्टांचे सांत्वन

राजा दशरथ त्याच्या सातशे राण्यांसह रामाकडे धावत निघाला. वाटेत सर्वांना तो विचारत होता. 'कुठे आहे माझा राम?' नंतर त्याने आक्रंदून हाक मारली. "श्रीरामा मला तुझे मुख पाहू दे. तुला विमुख झाल्यावर सर्वांना अपार दुःख होते आहे. कैकेयीने माझ्याकडून आणभाक घेऊन, मलाच महादुःख दिले आहे. तुझे मुख दिसले तरच मला परम सुख होणार आहे. श्रीराम हृदयात स्मरला तर सर्व दुःखांचा अंत होतो. मी अभागी म्हणून दुर्भाग्याने मी रघुनाथ वनात धाडला. धाव, पाव बा राघवा, परम कृपेने भेट दे. त्याने माझ्या जिवाला सुख होईल." असे म्हणत राजाने आक्रोश करीत रामाचा धावा केला. नंतर पुन्हा "गेला गेला रे रघुनाथ" म्हणत, आक्रंदत, रडत, स्वतः धावत निघाला. परंतु अतीव दुःखाने तो राजा मूर्च्छित झाला.

श्रीराम सुमंताला म्हणाला, "येथे अधिक काळ थांबलो तर मोहममता वाढेल. यासाठी महाराज माझ्यापर्यंत आले नाहीत तोवरच रथ वेगाने पुढे न्यावा." रथ पुढे जाताना पाहून दशरथाला निश्चित कळले की, श्रीराम आता परतून येणार नाही. यामुळे त्याने दृष्टी मुरडून रामरूपावर तिथूनच जडवून ठेवली.

श्रीराम दृष्टीला पडताच, दृष्टी रामापाठी लागली. श्रीराम दिसेनासा झाल्यावर दृष्टी ध्वजस्तंभावर अखेर स्थिरावली. जेव्हा दृष्टीपुढून ध्वजही गेला तेव्हा राजा रथाने उडविलेली धूळ पाहात राहिला. तेही श्रीरामाचे रज दृष्टिआड झाले त्याबरोबर राजा पुन्हा मूर्च्छित झाला. श्रीरामाचे स्मरण केल्यावर राजाला स्वतःच्या देहाचा विसर पडला. या कारणाने त्याला मूर्च्छा आली. तो देहभाव पूर्णपणे विसरला. त्याच्या राण्या, इतर सर्वजण रडत होते. गाईंनी गवत खाणे, पाणी पिणे बंद केले. वासरे स्तनपान विसरली, घोडे चारापाण्याला तोंड लावीनात, हत्ती तोंडात घास घालीनासे झाले पौरजनांनी आहाराचा त्याग केला. अयोध्याभुवनी एकच आकांत झाला. दिवस अस्तमानाकडे गेला तेव्हा राण्यांनी दशरथाला सावध केला. नंतर सर्वजण राजभवनात आले. तेथे स्वप्नातही सुख दिसेना. दीपदीपिका कोठे नाहीत, बाजारहाट, चौव्हाटे सारे ओस पडलेले. जो तो रडतच वाट चालत होता. मधूनच विचारत होता 'श्रीराम कुठे?' श्रीरामाने वनात प्रवेश केला तेव्हा घरोघरी दीर्घ स्वरात रडणे चालले होते. अयोध्याभुवनात सर्वत्र अंधार पडला होता. कोणाला अन्न खावेसे वाटत नव्हते. श्रीरामाच्या वियोगाचे दुःख राजा, राण्या, अन्य जन कोणाला सहन होत नव्हते. ते म्हणत होते विष घ्यावे. अशावेळी वसिष्ठच सावरण्यासाठी पुढे झाले. त्यांनी सर्वांना दुःखापासून निवारण्यासाठी सांत्वन केले.

"चौदा वर्षे वनवासाची राम निमिषार्धात क्रमून जाईल. त्रिभुवनातले यश मिळवून तो अयोध्येला येईल. राक्षसांचे समूह मारून, देवांची बंधने सोडवून, तो रामराज्याची गुढी उभारून सत्वर येईल. माझे वचन प्रमाण माना. मी श्रीरामाची शपथ वाहतो. तुम्ही विष घेऊन प्राण द्याल तर तुमचे अधःपतन होईल." वसिष्ठांचे बोलणे ऐकून राजाने राजभुवनात प्रवेश केला. परंतु मनात रामाची आठवण येताच तो परत मूर्च्छित झाला.

श्रीरामामागे धावणारे ब्राह्मण आणि इतरेजन

श्रीराम तिकडे शीघ्रगतीने वनप्रयाण करत असता त्याच्या पाठी ब्राह्मण लागले. कितीही सांगून

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

पाहिले तरी ते राहिले नाहीत. रामाने रथ चालविला त्या पाठोपाठ ब्राह्मण धावले. त्यांच्या पोटात रामाविषयी अती प्रीती होती. श्रीरामाच्या संगतीत वनात वस्ती करण्याच्या इच्छेने ते रथावर दृष्टी ठेवून धावत होते. वृद्ध वेदपाठक, तपस्वी, याज्ञिक, अग्निहोत्री आणि इतरही अनेक लोक यांनी रथामागून जोराने हाक दिली. श्रीरामाला शीघ्र नेण्यासाठी रथ चालविला जात असता ते लोक रथाच्या घोड्यांपुढे शरण गेले. "रामाला आमच्या जवळ आणावा. वेगाने वनवासात न न्यावा." असे म्हणत त्यांनी रथचालकाला नमन केले. "रथ नगराजवळ आणावा, रामाला वनात नेऊ नये." श्रीरामाने मागे पाहिले तेव्हा त्याला प्रचंड जनसमुदाय धावताना दिसला. त्याने लगेच उडी मारून तत्परतेने त्यांचे पाय धरून म्हटले, "स्वामी फार कष्ट करून दूरवर आलात." असे सांगून तो ब्राह्मणांचे पाय चेपू लागला. "माझा वनवास दंडकारण्यामध्ये असेल. तुम्ही कसे तिथवर याल." त्यावर "श्रीरामा तुझ्या संगतीत आम्हाला ब्रह्मप्राप्ती होईल. वनवास तो किती बापुडा. आम्हाला निश्चित भय वाटत नाही. परतून आम्ही निश्चितच जाणार नाही. स्वामीने आम्हाला वनात न्यावे. वनसांगाती वनवास होऊ दे. तू जेव्हा आम्हाला सोडून दूर जाशील तेव्हा आम्ही सैरभैर होऊ. आमच्यावर कृपा कर. दीनोद्धार करावा." श्रीरामाने यावर मनातल्या मनात विचार करून असे ठरविले की, हे नगरवासी आपणाहून जातील अशी युक्ती योजावी. नंतर श्रीरामाने लक्ष्मणाला आज्ञा केली "हे ब्राह्मण चालून - पळून अत्यंत शिणले आहेत. तेव्हा आज आपण तमसा तीरावर वस्ती करू." सीता वृक्षातळी उतरली. श्रीरामाने अन्नसेवन केले नाही. सीतेसहित जलपान करून तृणशय्येवर शयन केले. नंतर त्याने लक्ष्मणाला म्हटले, "हे राहा म्हटल्याने राहणारे नाहीत. असे ब्राह्मण आहेत. हे निद्राधीन आहेत तोवर शीघ्रगतीने निघावे. सुमंताला रथ सिद्ध करायला सांग. आपण अयोध्येकडे जातो आहोत असा रथाचा मार्ग दाखवायला सांग." इकडे तमसेमधे शिरून तिघेही परतीरावर गेले.

ब्राह्मण प्रातःकाळी उठून पाहू लागले तेव्हा त्यांना अयोध्येकडे मार्ग गेलेला दिसला. त्यामुळे सर्वजण उल्हासाने नगराकडे परतले. तेवढ्यात श्रीराम पुढे निघून गेला. ते सारे नगरात आल्यावर त्यांना लोक विचारू लागले. "रघुनाथ कोठे आहे?" यांनी सांगितले" तो इथेच आला आहे." त्यावर सर्वजण त्या ब्राह्मणांना हसू लागले. "अनेकांना भ्रांती पाडून, श्रीराम हातोहात गेला. श्रीरामाची अगम्य गती वेदोक्त ब्राह्मणांनाही कळली नाही. हृदयात श्रीराम हाच आत्माराम असताना जन मोहभ्रमात पडतात, अवघे विषयांचे इच्छुक झाले त्यामुळे कल्पान्तीही त्यांना राम भेटणार नाही. फुकटचे रामनाम जे उच्चारत नाहीत ते परम अभागी. जे आत्मारामाचे स्मरण ठेवत नाहीत ते नरकाचे धनी होतात.

गुहकाची रामाशी भेट - सुमंताची विनंती

इकडे दुसरे दिवशी संध्याकाळी श्रीरामाने इंगुदीवृक्षापाशी वस्ती केली. तेथून जवळच भागीरथीचा प्रवाह होता. श्रीराम वनात आल्याचे ऐकून निषधराज गुहक अत्यंत प्रेमाने श्रीरामाला भेटण्यासाठी आला. त्याने जमिनीवर लोटांगण घालून आदर व्यक्त केला. जेव्हा त्याने श्रीरामाचे मुख पाहिले तेव्हा त्याला अत्यानंद झाला. रामानेही त्याला प्रेमालिंगन दिले. तत्क्षणी गुहक द्वंद्वदुःख विसरला. धर्म-अधर्म, उत्तम-अधम यांचे विस्मरण होऊन, त्याने सद्भावनेने रामाचे दर्शन घेतल्यामुळे जन्म-मरणही तो विसरला. कर्मकर्तेपण, मी-तूपण यांचे त्याला विस्मरण झाले. श्रीरामाचे चरण पाहून गुहकाला समाधान वाटले. श्रीरामाचे स्मरण केल्याने जन्ममरणाचे समूळ निर्दाळण होते. त्या रामाचे चरण पाहून प्रापंचिक भावभावनांची बोळवण होते.

गुहकाने फळसंभार आणला होता. परंतु

https://archive.org/details/mumukshu.bhawan.varanasi.collection

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

रामाने फळाहार केला नाही. जलाहार तेवढा केला. नंतर त्याने वृक्षाच्या मुळाशी शय्या केली. सीतेने शयन केले. सौमित्र तेवढा निद्रा न करता सतत श्रीरामाच्या सेवेत तत्पर राहिला. राम आणि गुहक यांनी एकांतात संवाद करत अती प्रेमाने निमिषार्धात रात्र घालविली. अरुणोदय झाला. श्रीरामाने गुहकाला सांगितले की आम्हाला परतीरावर नेण्यासाठी नौका आणावी. सुमंताने रथ सिद्ध केला. त्याला रामाने सांगितले, "आता येथून तू त्वरित अयोध्येस परतून जा. तमसातीरावरून रथ परत पाठवावा हे निश्चित ठरले आहे. केवळ ब्राह्मणसंगाचा त्याग करण्यासाठी तुला इथवर आणले." श्रीरामाचे बोलणे ऐकून सुमंताला मूर्च्छा आली. राम सद्‌चिद्‌घन अंतरणार म्हणून तो दीर्घ आक्रंदन करून रडू लागला. "रथ रिकामा आल्याचे पाहून अयोध्येत आकांत होईल. दशरथ राजा प्राण सोडील. तेव्हा मला तिकडे पाठवू नकोस. रघुनाथा, तुला सोडून अयोध्येमधे मला सर्वथा सुख मिळणार नाही." असे म्हणत त्याने रामाच्या चरणांवर मस्तक ठेवले. "हे रघुपती, माझ्यावर कृपा कर, मी वनात येतो. तुझी अहोरात्र सेवा करीन आणि रथगतीने विघ्ने टाळीन."

श्रीरामाने सुमंताला म्हटले, "अरे सुमंता, तुला मी एक गुह्य सांगतो, ऐक. तू जर अयोध्येला गेला नाहीस तर कैकेयी दशरथाला पीडा करील. राजाने रथ देऊन रघुनाथाला कोठे पाठविले?. माझ्यावरच्या रागाने दशरथ भरताचा घात करवील. पायी वनवासाला जायचे असताना राजाने लोभाने रामाला रथ का दिला? भरताला मारायलाच राजाने रामाला पाठविले. भरताला मारल्यावर रामाला राज्यपटावर बसवावा असे राजाने ठरविले असेल काय? याप्रकारचे नाना विकल्प किंवा संशय कैकेयीच्या पोटी येतील. तू गेल्यावर ती संशयाचा त्याग करील. रिकामा रथ पाहून, राम वनवासी झाला हे ती कैकेयी सत्य मानेल. या कार्यासाठी तू अयोध्येला अवश्य जा. माझी तुला आज्ञा आहे की, तू अयोध्येला जावेस. दशरथ, कौसल्या, ब्राह्मण यांना सुखाचा उपदेश करावास." श्रीरामाचे साकडे ऐकून, सुमंत रडण्यात संकोचला, त्याला पुढे काही बोलवेना. अत्यंत दुःखाने रथ वळवून तो निघाला.

गुहकाकडून जटाबंधन - मातेची शंका

श्रीरामाने गुहकाला सांगून वडाच्या झाडाचा चीक आणवला. नंतर त्याला त्वरेने जटाभार बांधण्यास सांगितले. गुहकाने चीक घेऊन अति सुंदर जटामुकुट दोघांचे बांधले. राम आणि सौमित्र वनवासी शोभू लागले. सुमंताला आज्ञा देऊन श्रीराम नावेपाशी आला. त्याने लगेच सौमित्राला नावेत बसविले. सीतेलाही त्याच्या जवळ बसविले. नंतर स्वतः श्रीराम नावेत चढू लागताच गुहकाची माता आक्रंदून गरजली, "श्रीरघुनाथा आमचा सगळ्यांचा घात करू नको. तुझी लीला अगाध आहे, गहनही आहे. आम्ही श्रीरामाचे महिमान जाणत नाही? त्याने चरणस्पर्शाने पाषाण उद्धरले. श्रीराम हा जड वस्तू म्हणजे अचेतन वस्तू सचेतन करणारा आहे. नावेवर आमचे जगणे अवलंबून आहे. त्या नावेला तुझे चरण लागून तिचाही उद्धार झाला तर मग आम्ही काय करणार? जाणे-येणे खुंटलेच तर काय करायचे? असे तुझे चरण अगाध आहेत. तुझ्या पायाचे रजःकण लागताच जडाचे उद्धरण होते. त्या चरणांचे मी क्षालण करीन."

त्या निषधमातेचा सद्‌भाव पाहून श्रीराम संतोषला. दीनांचा उद्धार करावा यासाठी श्रीरामाचा निर्वाह, त्यासाठीच त्याचे वनप्रयाण होते.

गंगापार जाणे, त्रिवेणीदर्शन

अशाप्रकारे रामचंद्र गंगापार उतरून गेला. श्रीराम, सीता, सौमित्र अशी एकत्र निघाली. पुढे ते पद्मपुष्करिणीच्या जवळ आले. तेथे त्यांनी तीन रात्री वस्ती केली. त्यावेळी कमलपुष्पातले तंतू त्यांनी भक्षण केले. प्रभाती त्रिवेणी पावती झाली.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Trust and eGangotri

राम, लक्ष्मण, सीता ही तिघांची श्रीत्रिवेणी पाहून गंगेच्या मनाला उल्हास वाटला. श्रीरामचरणांना स्पर्श करण्यासाठी ती उत्सुक झाली. गंगा म्हणाली 'माझे भाग्य थोर' यमुना म्हणाली, 'मी अती पावन', सरस्वती म्हणाली, 'मी धन्य झाले' श्रीरामचरणांचा स्पर्श असा तिघींना आनंद देऊन गेला. 'श्रीरामाच्या चरणी लागता आम्ही पावन तिघी जणी' या विचाराने त्रिवेणी आनंदली. तिघी जणी सनाथ झाल्या. प्रयाग पावन करून सीता, लक्ष्मण आणि श्रीराम यांनी संध्यास्नान, जपविधान यथोक्त केले.

भारद्वाज आश्रमाकडे प्रयाण - वास्तव्याचा आग्रह

श्रीराम, लक्ष्मण आणि सीता यांच्यासह भारद्वाजांच्या आश्रमाकडे आला. श्रीरघुनाथ आल्याचे पाहून ऋषी लगबगीने सामोरे आले. श्रीरामाने स्वतः ऋषींना साष्टांग दंडवत घातले. सौमित्रानेही लोटांगण घातले. सीतेने ऋषींचे चरण-वंदन केले. श्रीरघुनाथ आलेला पाहून भारद्वाजांना अद्भुत आनंद झाला. "आज माझे कुळ पवित्र झाले. पितर आज तृप्त झाले. आज माझा वंश धन्य झाला. आश्रम पावन झाला. माझे याग आज संपूर्ण झाले. माझे ध्यानही सफळ झाले. आज माझे डोळे धन्य झाले आणि समाधान विश्रांतीला येथे आले. श्रीरामाचे चरण पाहून ध्येय, ध्याता, ध्यान संपन्न झाले. स्वभावाने रघुपती पाहिला त्यामुळे ज्ञानाला विज्ञानाची प्राप्ती झाली. जिवाशिवाला श्रीराममूर्ती पाहून विश्रांती मिळाली."

भारद्वाज हर्षभरित होऊन श्रीरामाचे स्तवन करत असताना त्यांचे नेत्र अश्रुपूर्ण झाले. हृदयी रघुनंदन धरल्याने पूर्ण समाधान पावून ऋषिवर्य तृप्त झाले. त्यांनी श्रीरामाचे अर्ध्यपाद्यादी उपचारांनी पूजन केले. फळे आणून फळाहाराचे भोजन दिले. ऋषींनी सद्भावाने, निर्मळ मनाने श्रीरामाला फळ अर्पण केल्यावर देहगृह केवळ रामाचे झाले. सकळ सुफल श्रीराम. अशी सर्व समाधी लागल्याने ऋषींच्या चित्ताला धणी न पुरे असे झाले. श्रीरामसेवेचे सुख मिळाल्यावर ऋषींना समाधीची अवस्था तुच्छ वाटली. ऋषी श्रीरामाला म्हणाले, "दूरच्या वनवासास का जातोस? प्रयाग तीर्थ सर्व तीर्थांत श्रेष्ठ आहे. तेव्हा चौदा वर्षे येथेच राहा."

श्रीरामाकडून अडचणींचे निवेदन

श्रीराम म्हणाला, "ऋषीनाथा, मी येथे राहिलो तर निश्चितपणे अयोध्येची सगळी प्रजा या स्थळाची समीपता पाहून इथे येईल. मी द्विजगणांना चुकवून येथे आलो आहे. ते ब्राह्मण अवश्य येथे येतील. स्त्रिया, वृद्ध, अती दीन असे सर्वजण येतील. पुरोहित, प्रधान, नटगण, वारांगना सर्व येथे येतील. सेवकही येतील. श्रीरामाची भेट आणि प्रयागस्नान हा पर्वकाळ उत्तम आणि पवित्र असे मानून राजा जनक धावून येईल. मग सीतेला माहेरी जावे लागेल. तो म्हणेल, "तिला वनवासात का नेता, हिला माहेरी पाठवा." मग मी जनकाला काय सांगणार. हे वनवासाला मुख्य विघ्न होईल. राजा दशरथही येईल आणि त्याची आणभाक व्यर्थ होईल. यासाठी येथून गुप्तपणे दूर वनवासाला जावे हे उत्तम"

भारद्वाजांची वास्तव्यासाठी चित्रकूटाची सूचना

भारद्वाज ऋषिवर्य म्हणाले, "आपले वचन सत्य आहे. येथून पुढे चित्रकूट पर्वत आहे. तो फुलाफळांनी प्रफुल्लित आणि समृद्ध आहे. त्या ठिकाणच्या वनात तुम्ही राहावे. तो पर्वत पुण्यशील, जनांमधील निवासापेक्षा निर्मळ, नित्य फळांनी लगडलेल्या वृक्षांचा असल्याने तुम्हाला तेथे सुख प्राप्त होईल. मार्गामध्ये प्रसिद्ध सिद्धवट आहे. त्याला भावभक्तीने वंदन करा. त्याच्यामुळे पुरुषार्थ सफल होतो म्हणून निर्विघ्नतेसाठीही तो वंदनीय आहे."

नंतर भारद्वाजांना नमन करून तिघांनीही प्रयाण केले. त्यावेळी ऋषिवर्य स्वतः अर्धे योजन

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

अंतर त्यांच्याबरोबर जाऊन मग निरोप देऊन, रामाकडून अनुज्ञा घेऊन, परतले. तिघांनी यमुनेत उतरून नवकाननाची शोभा पाहिली आणि मग ते सिद्धवटाशी आले. अनंत शाखांच्या, सरळ वाढलेल्या सिद्धवटाच्या तळाशी आल्यावर राम आणि लक्ष्मण यांनी मस्तक टेकवून त्याला वंदन केले. सीतेने वटातळी वंदन करून म्हटले," वनवासात रघुनंदन विजयी होऊन, आमचे निर्विघ्न पुनरागमन झाले तर लक्ष गाईंचे दान मी देईन. लक्षभोजन द्विजांना घालीन. वटामध्ये वटसावित्रीचा वास असतो. तिला वस्त्रालंकारांनी मी पूजीन." असा संकल्प बोलून सीतेने त्या सिद्धवटाला नमन केले.

सिद्धवटापासून जलद चालीने ती तिघे चित्रकूट पर्वतापाशी आली. तिथली अद्भुत शोभा पाहून रघुनाथ सुखावला. तो शोभायमान पर्वत पाहून मार्गातले श्रम विसरले गेले. ती तिघेही सुखसंपन्न झाली आणि त्यांनी तेथे राहण्याचा निश्चय केला. श्रीरामाने लक्ष्मणाला म्हटले, "हत्तींकडून मोडले गेलेले वृक्ष आणून येथे त्वरित आश्रमाची निर्मिती करावी. पर्णशालाही सिद्ध करावी." लक्ष्मणाने लगेच त्याप्रमाणे केले. श्रीरामासाठी मनोहर शयनगृह तयार केले. शिवाय ऋषिवरांसाठी विस्तृत शाळा तयार केली. जळ आणि फळे आणून लक्ष्मणाने सीतेकडे दिली. तो स्वतः अहोरात्र जागृत राहून रामसेवेत राहिला. मुखाने नित्य रामनाम, सर्व इंद्रिये रामकर्मरत, हृदयात परमात्मा श्रीराम, असा तो भक्तोत्तम सौमित्र होता. श्रीरामाची अत्यंत निर्वाणीची सेवा करण्याचे भाग्य लक्ष्मणाला लाभले.

अध्याय दहावा

श्रीराम, सुमंत आणि गुहक यांचा निरोप घेऊन गेल्यावर त्या दोघांना रामवियोगाचे अपार दुःख झाले. जेव्हा त्या दोघांना सोडून श्रीराम नावेत बसून गंगेच्या परतीरावर जायला निघाला, तेव्हा ते दोघे एकटक रामाला पाहात राहिले. त्यांच्या पापणीला पापणी लागली नाही. सतत रामावर त्यांची दृष्टी खिळलेली होती. ज्या वेळी श्रीराम दृष्टीपलीकडे गेला तेव्हा दोघेही बेशुद्ध झाले. काही वेळाने जरी ते सावध झाले तरी त्यांचे मन विषण्णच होते. डोळ्यांतून अश्रुधारा वाहात होत्या. ते सतत रामनामाचे स्मरण करत होते. वाणीने रामनाम स्मरण, रामरूपी जडलेले डोळे, हृदयांतरी रघुनंदन असे झाल्यावरच त्यांची विषण्णता गेली आणि श्रीरामकृपेने त्यांचे मन सुमन झाले. गुहक सुमंताला म्हणाला, "अहो, केवळ एक रात्र राम भेटला तर आमची ही अशी अवस्था झाली; मग अयोध्येचे काय होईल!" त्यानंतर गुहकाने आपले दूत पाठविले. श्रीराम कोणत्या वनात वस्तीला आहे, कोठे स्थिर झाला आहे, ही वार्ता आणण्याची आज्ञा दूतांना केली. गुहकाने मोठ्या आदराने सुमंताला आपल्या घरी नेले. दूत वार्ता आणतील तोवर सुमंताला त्याने ठेवून घेतले. काही काळाने दूतांनी वार्ता आणली. "श्रीराम प्रयागाला जाऊन, भारद्वाजांना भेटून आता चित्रकूटावर त्याने स्थिर निवास केला आहे." असे दूतांनी सांगितले. ती वार्ता ऐकताच सुमंताने गुहकाचा निरोप घेतला आणि त्वरेने रथ जोडून तो अयोध्येला जाण्यासाठी निघाला.

सुमंत अयोध्येत, निवेदन, राजा दुःखी

सुमंत रथासह अयोध्येत आलेला पाहून अवघे नागरिक जन धावत त्याच्यापाशी आले. "श्रीरामाला कोणत्या स्थळी सोडून तू आला आहेस?" असे त्याला विचारू लागले. सुमंताने एकाला वार्ता सांगताच शतसहस्र तेथे आले. रिकामा रथ पाहून ते जमिनीवर बेशुद्ध होऊन पडले. नरनारींचा आक्रोश सुरू झाला. "सुमंत नव्हे हा कुमंत. रघुनाथाला वनात सोडून हा काळतोंड्या येथे आला आहे." असा सुमंताला पाहून सर्वांनी आकांत सुरू केला. सर्वजण चरफडत, घरोघरी आरडत होते. "जळो याचे काळे तोंड, हा सर्व

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized By Sarayu Foundation Trust and eGangotri

नगराला दुःखी करण्यासाठीच आला आहे.'' अशी निंदा सर्वांकडून होत असताना सुमंत खाली मान घालून ती ऐकत राहिला.

दशरथाच्या सातशे राण्या रिकामा रथ पाहून सुमंताची निंदा करू लागल्या. ''रघुनाथाला सोडून हा का आला?' असे त्या म्हणत होत्या. सुमंत दुःखाने म्हणू लागला, ''मी करंटा रामाकडून उलट फिरून का आलो. धिक् धिक् माझ्या नशिबा निर्लज्ञा.'' असे म्हणत त्याने कपाळ बडवायला आरंभ केला. ''श्रीरामाला सोडल्यावर मी सर्व सृष्टीला निंद्य झालो. रामरूपावरून दृष्टी ढळली की पदोपदी कोट्यवधी पापे वाट्याला येतात.'' अशी स्वतःला दूषणे देत, आत्मनिंदा करत, त्या दुःखाने अधिक दुःखी होत, शेवटी महाद्वारापाशी रथ सोडून सुमंत राजभवनात आला. तेथे त्याला पुत्रदुःखाने पूर्ण दुःखी, कळाहीन, दीन, निस्तेज, कृष्णवर्ण झालेला अत्यंत उद्विग्न असा राजा दशरथ दिसला. राजाने सुमंत एकटाच आलेला पाहिला आणि ''रघुनाथ नाहीच आला का?'' हे बोलून मूर्च्छित झाला. मग सुमंतानेच राजाला धीर देऊन सावध केले. तेव्हा सुमंत आलेला पाहून राजा बोलू लागला.

राजाने सुमंताला म्हटले, ''कोणत्या स्थळी, कोणत्या वस्तीशी, रामाने तुझ्याशी काय बोलून, तुला माझ्याकडे पाठविले आहे? सीता सती काय बोलली? रामाचा अत्यंत प्रिय लक्ष्मण काय बोलला? ती समूळ कथा मला सांग. सारे राजभोग सोडून रामाची कांता, तसाच माता-पित्यांचा त्याग करून लक्ष्मण, रघुनाथाची सेवा करण्यासाठी वनात गेले. ते खरोखर धन्य आहेत. धन्य ती सीता सती, धन्य तो लक्ष्मण बंधू, धन्य जन्म रघुनाथाचा, जो पितृवचन प्रतिपाळतो. त्यांना अन्न कुठे मिळाले, त्यांनी भोजन कुठे केले.'' हे विचारताना राजाच्या डोळ्यांतून अश्रू गळत होते. मधून मधून तो मूर्च्छावस्थेत जात होता. ''त्यांनी शयन कुठे केले, त्यांना आंथरूण, पांघरूण कशाचे होते. त्यांचे पाय कोणी चेपले, त्यांना पहाटे कोणी उठवले, हे सगळे मला समूळ सांग. मी काय करू रे सुमंता! रघुनाथावाचून माझ्या चित्ताला धीर धरवत नाही. अरे, श्रीराम आणि सीता यांना पायांनी चालत जावे लागते आहे, ही मी किती विपरीत करणी केली.'' असे बोलून राजा धरणीवर गडबडा लोळू लागला. ''त्या कैकेयी वैरिणीने असे वैर साधले. जेव्हा जेव्हा रघुनाथ आठवतो तेव्हा तेव्हा जे गहिवरून येते ते चित्तात धरवत नाही. धीर धरवत नाही. हृदय फाटून जाईल असे वाटते. तेव्हा त्यांच्या वनवासाची कथा लवकर सांग. रे सुमंता, श्रीरामकथा ऐकून तरी चित्ताला काही सुख होईल.''

राजाने कळवळून सांगितल्याप्रमाणे सुमंताने वार्ता ऐकवायला आरंभ केला. तो म्हणाला, ''श्रीरामाने गंगा उतरल्यावर रथ आपणाकडे पाठवून ते तिघे वनवासी होऊन पायीच चालत गेले. श्रीराम म्हणाला की, 'माझा पिता वृद्ध आहे, शिवाय माझ्या वियोगाने झालेल्या दुःखात तो निमग्न असेल, तेव्हा सुमंता, त्यांना आश्वासन दे की नेमलेला काळ संपताच मी तातडीने येईन. चौदा वर्षांचा वनवास संपला की मी शीघ्र गतीने येईन' एवढे आपल्याला सांगावे म्हणून त्याने माझ्या बरोबर निरोप दिला आहे. त्यांचे वनवासलक्षण म्हणजे तृणपर्णांचे आंथरूण, वल्कलांचे पांघरूण आणि पक्ष्यांकडून प्रातःकाळचे प्रबोधन, असे आहे. त्यांनी जेवण घेतले नाही की फळेही खाल्ली नाहीत. त्रिरात्री तिघे जण सूर्यास्तानंतर केवळ जलपान करून राहिले.''

दशरथाचा शोक आणि निधन

श्रीरामाच्या वनवासाविषयी सुमंताने केलेले निवेदन ऐकून राजा मूर्च्छित झाला. त्याचे हृदय दुःखाने फुटते काय असे झाले. तो कपाळ बडवून आक्रोश करू लागला. ज्याप्रमाणे गळाला अडकलेला मासा जगू शकत नाही आणि मरतही नाही,

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

नुसताच तडफडतो, त्याप्रप्रमाणे दशरथाची अवस्था झाली, तो मोहफासात सापडून शोक करत राहिला. "सुमंता, माझ्याकडून तुला खरोखर काही पूर्वी उपकार झाला असेल तर रघुवीर रामाला रथात घालून सत्वर माझ्यापाशी आण. श्रीराम शपथ कदापीही मोडणार नाही. तो परतून येणार नाही. तेव्हा मलाच रथातून नेऊन तत्वतः वनवासात घेऊन चल. काय करू रे सुमंता, श्रीरामाला पाहिले नाही तर खरेच माझा जीव जाईल. मला अत्यंत चिंता वाटते. श्रीरामाबरोबरच गती गेली, चित्तवृत्ती गेली, मती गेली, आता प्राण रामाकडे जाऊ पाहतो आहे. रामरूपात माझे डोळे, माझे मन जडून राहिले असून रामापाशी प्राण जातील हे तू सत्य समज." पुन्हा दशरथ मूर्च्छित झाला.

या वेळी मूर्च्छेतच त्याची रामाचे रूप, गुण आठविण्याची धडपड चालू होती. त्यातून ही मूर्च्छा अधिक काळ टिकली आणि रामस्मरण करतच त्याचा प्राण गेला. 'राम' 'राम' असे स्मरण चालू असतानाच दशरथाने प्राण सोडला. मन, बुद्धी, इंद्रिये, ही सर्व त्याने रामार्पण केली. श्रीरामाची पोटी आवड धरून, 'राम राम' असा तोंडाने जप करत, दशरथ देहत्याग करून श्रीरामसृष्टीत वैकुंठात प्रवेशला. अत्यंत आवडीने त्याने रामप्रेम धरले होते. त्याची दृष्टी रामप्रेमावर खिळली होती. वाचेने श्रीरामनामाचे स्मरण चालू असतानाच दशरथ मरणधर्मात गेला. मनात, ध्यानात, डोळ्यांत, तोंडात सर्वत्र रामच ठेवून 'राम राम' म्हणतच प्राणोत्क्रमण झाले. श्रीरामाचे स्मरण करताना विस्मरणाला स्मरण आले. तेव्हा श्रीरामाच्या ठिकाणी प्राण जडला. देहनिर्वाण तेवढे दशरथाचे झाले.

श्रीरामावरच्या आत्यंतिक प्रेमाने राजाने देहत्याग केला. हे कौसल्या, सुमित्रा यांनी जेव्हा पाहिले तेव्हा दशरथाला मरण आले होते. जसे आरसा पालथा केल्यावर त्यात प्रतिबिंब दिसत नाही; तसे श्रीराम वनात गेल्यावर राजा दशरथाला आपला मृत्यू दिसला नव्हता. संपूर्णपणे जलाचा घट पाझरल्यावर त्यातले चंद्राचे प्रतिबिंबही तत्काल लोपते, त्याप्रमाणे श्रीराममुखकमळ न दिसताच तत्काळ दशरथाला मरण आले. सूर्य अस्तमानाला गेला म्हणजे जसा गगनात अंधार कोंडून राहतो; त्याप्रमाणे रघुनंदन अंतरल्यावर दशरथ मरण पावला.

श्रीरामाच्या विरहाने पाहता पाहता दशरथाने सृष्टी सोडली. त्यामुळे राणीवशात आकांत उठला. कौसल्या कपाळ पिटू लागली. "रामाला वनसंकटात पाठवला, राजा वैकुंठात प्रवेशला, कैकेयी सुखसंतोष पावली, राज्यपटी तीच बसो. रघुनाथाला वनात पाठविले, दशरथ पूर्ण निमाला, कैकेयीचा मनोरथ सुखस्वार्थ पावला."

कैकेयीचा सर्वांकडून धिक्कार

"राज्यलोभाने परम दुःख, त्याचाच कैकेयीला हर्ष. अभिषेकासाठी वस्तऱ्याने मस्तकच कापून हिला राज्यसुख भोगायचे आहे. पतीच्या अंतकाळी तिच्या काळ्या तोंडावर आणि मस्तकावर छत्र धरा. तिचे डोके भादरून त्यावर चामरे ढाळावी. पतीला अग्नीत घालून कैकेयीला हत्तीवर बसवून बोंबेची हाक द्या, आणि त्या नादात तिला राज्यपदावर बसवा. दोन्ही पुत्र दूर सारून कैकेयीलाच सिंहासनावर बसवा. राजाला पिंडदान करून कैकेयी राजभवनात येईल. त्यावेळी राजाला घटस्फोट देऊन कैकेयीला विस्तृत ताट तयार करा. बत्तीस वाट्यांचे शुद्ध षड्रसांचे असे ते उत्तम ताट असू द्या. राजाला तिलांजली दिली जाताना गोत्र, कुटुंब, दुःख करेल तसतसा कैकेयीला हर्ष होत जाईल, राज्यसुख भोगण्याचा तो आनंद असेल."

नंतर कौसल्या म्हणाली," असो, हे कैकेयीचे वर्णन पुरे झाले. माझा रघुनंदन गेला. राजांचे निधन झाले आहे. मी सहगमन करीन. कैकेयी राहील राज्यभोगासाठी आणि मी

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

पतीबरोबर जाईन. वैधव्यात क्षणभर जरी राहिले तरी पदोपदी पापराशी वाट्याला येते. पती धडधडा जळत असता, त्या आगीत मूर्ख रंडक्या शिरत नाहीत. विधवा झाल्यावर गळसरी तोडावी, चुडा फोडावा, सुखभोगाविषयी पुढे ऐका. काजळ, कुंकू, चंदन लावू नये. काळे तोंड दाखवू नये. प्रत्येक महिन्याला मुंडण करणे ही लाज आणणारी शिक्षाच असते. विधवा शोभेत अशोभनीय, विधवा हे जिवंत प्रेतच समजावे. विधवा ही अपशकुनी मग जगण्यात सुख कोणते? केवळ देहलोभासाठी जी जी रंडकी पटी बसते; तिला स्वप्नातही सुख मिळत नाही. अनिवार दुःखच तिच्या वाट्याला येते. वैधव्याचे महादुःख एक कैकेयीच तेवढी सोसू शकेल. राज्यसुख भोगण्यासाठी तिला वैधव्याचे कौतुक आहे. वैधव्याचे दुःख दारुण असते, ते मी अर्धक्षणही सहन करू शकणार नाही. राजांच्या देहाचे दहन होईल तेव्हा मी सहगमन करीन.'' असे सांगून कौसल्या शोक करू लागली.

कौसल्येचा शोक पाहून राजाच्या अन्य पत्न्या तोंड बडवू लागल्या, दुःखाने केस, कान तोडू लागल्या. एक मूर्च्छित झाली; एकीने कपाळ बडविले; एक वक्षस्थळ पिटू लागली. एक अती दुःखाने खाली पडली. एक शोक करताना नुसती रडत होती. एक कोणी म्हणाली, ''एक दुःख रघुनाथाचा वियोग, दुसरे राजा दशरथांचे मरण, तिसरे दुःख म्हणजे वैधव्य कपाळी आले. या सर्व अनर्थाचे मूळ कैकेयीच आहे. राज्यपट भोगण्यासाठीच तिची वरदनिष्ठा होती. तिघांना तीन वाटा करण्याची मुख्य चेष्टा त्या मंथरेची आहे. श्रीरामाला वनप्रयाण, दशरथाला त्वरित मरण, याला मुख्य कारण ती मंथराच आहे. तिचे नाक, कान कापावे.'' राजपत्न्या अत्यंत प्रबळ दुःखाने हलकल्लोळ करत होत्या. सर्व नागरिक आले. नगरात कोलाहल माजला. नरनारी आक्रंदून शोक करत घरोघरी थांबले होते. राजद्वारात बोंब उठली. सेनानी, मंत्री चरफडत राहिले.

नागरिकांकडून कैकेयीचा धिक्कार

''श्रीरामाला नगराबाहेर घालवताच सगळ्या नगरीत अवदसा आली. राजा दुःखाने निधन पावला, घरोघरी आकांत झाला. कैकेयीचे काळे तोंड, तिनेच वरदबंड वाढवले. तिला ती दुष्ट मंथरा मिळून त्यांनी दुःखाचे वितंड वाढविले. जिच्यामुळे तिचा पती मृत झाला त्या कैकेयीचा घात करावा. मंथरेला चुनखडीत घालून जाळावे. रामाला राज्याभिषेक करावा. त्वरेने लक्ष्मणाला येथे आणावा म्हणजे तो सर्व कार्यार्थ साधेल'' असे नगरातले सर्व लोक बोलत होते. आत्यंतिक दुःखाने ते तळमळत होते.

''कैकेयीचा सगळा वृत्तान्त असा निर्लज्जपणाचा झाला की, ना राम ना दशरथ. शेवटी भरतही हिचा त्याग करील. हिने वृथा हा अनर्थ केला. भरत हा स्वधर्मशील आहे. तसा सात्त्विकही आहे. त्याला रामसेवेचे प्रेम आहे. तो हिचे काळे तोंडही पाहणार नाही. त्यालाही हिने दुःखच दिले आहे. कैकेयीने जे चरित्र केले ते भरत अपवित्र मानेल. पती गेला, पुत्र हिला त्यजील आणि हिने सर्व सख्खे-सावत्र दुःखीच केले आहेत. श्रीराम वनात गेला हे ऐकल्यावर भरत क्षणभरही येथे राहणार नाही. त्यालाही हिने रानभरी केला. जळो तिचे काळे तोंड! स्वतःच्या पतीला मारला, निर्दोष पुत्र दुरावले, सारे जग हिच्यामुळे दुःखी झाले.'' असे बोलून ते कैकेयीला दूषणे देत होते.

कैकेयी ज्याला सामोरी जाई, तो तिला 'तुझे अपवित्र मुख आधी झाक' असे म्हणत होता. तिच्यापुढे लोक थुंकत होते. नरनारी तिच्याविषयी वाईट बोलत राहात. 'अगे कैकेयी, काळतोंडे, रांडे, मूर्ख' असे म्हणत लोक तिच्या नावाने खडे फोडत होते. अत्यंत उदंड निंदा करत होते. यामुळे कैकेयीला परम दुःख प्राप्त झाले. जगात तिला तोंड दाखविणे अशक्य झाले. एखाद्या घुबडासारखी ती अंधारात लपून राहिली. राजगृहात गोंधळ, नरनारी

https://archive.org/details/@sulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Muthulakshmi Research Academy

अत्यंत दुःखी, तेथे सर्व सुहृद आणि ऋषिवर्य तत्काळ जमा झाले.

ऋषी, प्रधान यांचे आगमन आणि चर्चा

राजा दशरथाने थोर थोर ऋषींना नगरीत राहविले होते. ते सर्व पवित्र ऋषी त्वेरेने उपस्थित झाले. मार्कंडेय, मौद्गल्य, कात्यायन, जाबाली, गौतमी, कश्यप, वामदेव असे ज्यांची नावेही परम पवित्र होती ते सर्व ऋषी तातडीने राजसभेत आले. प्रधानांनी त्यांच्या जवळ जाऊन राजदेहाच्या दहनाचा विषय काढला. एकांनी सांगितले दहन करावे. एकाने विचारले की, "पुत्राशिवाय दाह कोण देईल? पुत्रालाच तो पूर्ण अधिकार आहे."

राजाचे प्रधान हे राजपुत्रासमान असतात. निसंतान असेल त्याचे दहन ते करू शकतात, परंतु सपुत्राचे दहन करण्यास ते अयोग्य ठरतात. मृताची धर्मपत्नी तयार असेल तर तिला दहनाची योग्यता असते. हा अधिकार वंध्येला नाही. पुत्रवती मातेलाच तो आहे. ऋषी सज्ञान असल्याने बोलत होते. परंतु तेथे वसिष्ठांचे प्राधान्य होते. ते तर राजाच्या दहनाच्या संस्काराबद्दल काहीच बोलत नव्हते. बुद्धिवंत बोलतात ते गहन असते. कैकेयीपुत्र पुढे येईल, तोवर राजदेहाला किडे लागतील. त्यासाठी स्पष्ट दहन करावे. अशाप्रकारचे ऋषी-अभिप्राय येत होते. आपसात त्यांचा वाद-संवाद-विवाद चालू होता. वसिष्ठांची मर्यादा अगाध, ते कार्यावबोध जाणणारे होते. त्यांना कर्मधर्मज्ञान, वेदशास्त्रविधान, ब्रह्मसमाधान, यांची चांगली जाण होती. त्यांच्यासारखा दुसरा कोणी नव्हता. ज्याच्या वचनासाठी सूर्यमंडळात छाटी तापली, त्याच्या ज्ञानाची अगाध थोरवी अशी की त्यांच्या योग्यतेचा सृष्टीत कोणी नव्हता.

श्रीवसिष्ठांनी येऊन स्वतः तेलाने भरलेल्या नौकेत राजाचा देह घातला. ज्यामुळे देह कोणताही विकार न होता राहू शकतो. त्यांनी अत्यंत यत्नपूर्वक राजदेहाचे रक्षण केले. नंतर भरताचे आगमन लवकर व्हावे यासाठी त्यांनी अत्यंत सज्ञान अशा सुमंताला सन्मानपूर्वक सांगून त्वरेने प्रयाण करायला लावले. वसिष्ठ म्हणाले, "सुमंता, तूच राजांचा एक जवळचा आप्त आहेस. तू याच वेळी जाऊन भरताला आजोळाहून आणावेस. लागलीच रथात बसून शीघ्रगतीने गिरिव्रज नगरीला जाऊन, केकय राजाला भेटून भरताला रातोरात येथे आणावा." सुमंताने त्यावर वसिष्ठांना नमन करून शीघ्र प्रयाण केले. मार्गामधे त्याला श्रीरामाचे स्मरण झाले. त्याचे गुण आठवून तो सतत रडत होता. श्रीरामाचे रूप, गुण आठवताच त्याला विरहाचे दुःख होत होते.

अध्याय अकरावा

श्रीरामाचे वनप्रयाण, त्या वेळचे त्याचे निर्लोभीपण, सुमंताला आठवले. त्याचे मन श्रीरामावर दृढपणे जडले. त्या त्यागाची मर्यादा रघुपती दाखवून गेला याचे सुमंत अत्यंत प्रेमाने स्मरण करत होता. त्यागस्थिती असावी तर अशी असावी. असत्य ते पवित्राने त्यागावे त्याप्रमाणे रामाने राज्यालंकार, वस्त्रे यांचा त्याग केला. वनात जाताना वल्कलांबर परिधान केले. ज्याप्रमाणे साधुसंत निंदेचा त्याग करतात, त्याप्रमाणे रघुपतीने राज्यवैभव, संपत्ती ह्या सर्वांचा त्याग केला. वनात जाताना वल्कलांबर परिधान करून तो गेला. जसे धोब्याने घाण केलेले पाणी साधूजन वापरत नाहीत, तसे राज्यादी धनमान सोडून देऊन रघुनंदन वनवासात जायला निघाला. राज्यातले अणुभरही न घेता श्रीराम, पादत्राणेही मागे ठेवून, आपण वनवासाला गेला. श्रीरामाचे निर्याण पाहून, त्यापूर्वीच सीता, लक्ष्मण हे वल्कले परिधान करून वनवासाला जाण्यासाठी उल्हसित होऊन आले. जसजसा सूर्याचा ताप वाढत जातो, तसतशी कमळाची शोभा वाढत जाते; त्याप्रमाणे राम एकाकी वनात निघाला, तेव्हा लक्ष्मण, सीता उल्हसित झाले होते.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sayyad Hashmi Research Academy

'पौर्णिमेचा पूर्णचंद्र पाहून चकोराला जसा अपार आनंद होतो, तसा श्रीराम वनात जायला निघाला तेव्हा सीता, सौमित्र यांना उल्हास वाटला. श्रीराम एकटा वनात जातो आहे, तेव्हा आमची सेवा सफळ होईल, या भावनेने लक्ष्मण आणि सीता उल्हासाने वनात गेली. रघुनाथाचे वनगमन, दशरथाचे प्राणोत्क्रमण म्हणजे स्थळीचे आटता जीवन प्रतिबिंब पूर्णपणे हरपते त्यातलाच प्रकार होता. आरसा पुढून नेताच. मुखाचे प्रतिबिंबही जाते, तसा रघुनंदन वनात जाताच दशरथाने प्राण सोडला. संपूर्ण जळ आटले की मासे मरायला पळभरही लागत नाही; त्याप्रमाणे राम वनात जाताच दशरथाने तत्काळ प्राण सोडला. श्रीराम जगाचे जीवन आहे. तोच दशरथाच्या मृत्यूचे कारण झाला. राम राम म्हणत राजाने प्राण सोडला. रामाने वनात प्रवेश केला तेव्हा भरत, शत्रुघ्न आजोळी होते. ते जर त्या वेळी तिथे असते तर तेही वनात गेले असते. मीच अभागी पूर्ण दुर्भाग्यवान की श्रीरामाची सेवा करून राहायचे सोडून परत अयोध्येला आलो.' अशा आठवणी काढत सुमंत रडत होता. 'श्रीरामाची सेवा प्राप्त होते त्यांचे भाग्य अती समर्थ असते. मी अभागी रथ घेऊन आलो' असे म्हणत मार्ग काटत तो जात होता.

भरताचे दुःस्वप्न - वसिष्ठांची योजना

भरत, शत्रुघ्न आजोळी राहात होते. त्या वेळी भरताला एक दुष्ट स्वप्न पडले. ज्याला शिर नाही अशाला तेलाचे अभ्यंजन. भरताने स्वप्नाचे लक्षण जाणले आणि तो आक्रंदून रडू लागला. त्याचे रडणे ऐकून मातुल गजबजून आला आणि त्याने विचारले, "व्यर्थ रडण्याचे काय मूळ कारण आहे?" भरत म्हणाला, "अती प्रबळ असे दुःखाचे मूळ आम्हाला झाले आहे. जे स्वप्न मी आज पाहिले, त्याचे लक्षण असे आहे की आम्हा पाचांमधला एक जण निश्चित मरण पावणार आहे. माझे स्वप्न व्यर्थ होणार नाही. राजा अथवा रघुनाथ, लक्ष्मण, शत्रुघ्न किंवा मी भरत एकाचा जीवघात होईल. तसेच आप्तसज्जनांची भेट, बराच काळ तटातूट" हे बोलत असताना भरताचा गळा दाटून आला. तो मूर्च्छित होऊन भूमीवर पडला. "श्रीराम कसा दृष्टीला पडेल; असे म्हणून त्याने आक्रंदून रामाच्या नावाने हाक दिली. दशरथांची कधी भेट होईल;" असे म्हणून तो कपाळ बडवू लागला. त्यावर मातुल म्हणाला, "सुमुहूर्त पाहून तुला तिकडे पाठवू" भरत म्हणाला, "मृत्यू आला निश्चित, सुमुहूर्त, कुमुहूर्त कोणासाठी?"

अयोध्येत श्रीवसिष्ठांनी योजना केली. ते श्रेष्ठ कुलगुरू आणि अर्थ, परमार्थ जाणणारे होते. त्यांनी शुद्ध विचार केला. भरताला राज्याभिषेक केला नाही तर राजदेहाचे दहन करता येणार नाही. यासाठी भरताचे त्वरित आगमन होईल असे ते पाहात होते. भरताला राजमरण सांगू नये, विशेषतः श्रीरामाचे वनगमन सांगू नये. अचानक त्याला ते कळले तर तो प्राणच सोडील. हे लक्षात घेऊनच त्यांनी उत्तम वस्त्रालंकार देऊन सुमंत प्रधानाला पाठविले होते. त्वरित भरताची भेट घेऊन त्याला शीघ्र आण असे त्याला सांगितले होते.

भरताला गोड वचनांनी मातुल शांत करत होता. तेवढ्यात सुमंत तिथे पोहोचला. मातुलाने सुमंताला विचारले, "अयोध्यानगरीत सर्वांचे कुशल आहे ना?" भरताने सुमंताकडे पाहिले आणि म्हटले, "तुझे मुख असे क्षीण का? तुझ्या हृदयात गाढ दुःख दाटले आहे हे तुझ्या मुखाकडे पाहिल्यावर समजते आहे. तुझ्या डोळ्यांत अश्रूही गोळा झाले आहेत. मार्गातून येताना रुदन करत आलास काय? एखादी लज्जास्पद वार्ता सांगायची आहे म्हणून का तुझे मुख असे हीन, दीन दिसते आहे? अंगठा कपाळावर टेकून तू तिळभरही सुख नाही हेच सुचवतो आहेस. तू दुःखसागरात बुडाला आहेस म्हणून तुझी दुःखाने भरलेली वाणी बोलायला चाचरते आहे काय? असो. तुझे दुःख असेल ते असो. मलाच आता जायचे आहे. विलंब

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

करू नको." असे बोलून भरत शत्रुघ्नासह रथात बसला. सुमंताने त्वरेने रथ चालविला. ते अयोध्येला पोहोचले. अयोध्येची स्थिती पाहून भरताला दुःखाने ग्रासले.

भरत अयोध्येत - सुमंत वृत्तान्त सांगतो

"ज्या अयोध्येत श्रीरामाचा श्रेयस्कर निवास आहे, जिथे दशरथासारखा पृथ्वीपती राहतो आहे त्या अयोध्येचे स्वरूप असे उजाड, शकुंत पक्ष्याच्या घरट्यासारखे का दिसते आहे?" भरताने असे उद्‌गार काढून अधिक निरीक्षण केल्यावर त्याला आढळले की अयोध्येची शोभा आरक्त झाली असून, नभात धुके दाटले आहे. रोहिणी मृग वृषभाला भेदून आहेत. ग्रहचक्र शनी, भौम, वक्री होऊन उभे आहे. अयोध्येत असाधारण मंडळी असून ग्रहगण क्रूर भासत आहेत. अयोध्येचे लक्षण अती विलक्षण आणि दुर्भाग्यपूर्ण दिसते आहे. राजद्वारात भंगलेले छत्र, मृत्युप्राय लोकलिंग, राजभवनात उद्वेग, राजपत्न्यांचा सौभाग्यभंग, पुढे राजभवनात तेलाच्या नौकेत राजा, हे सारे पाहून भरत मनातून अत्यंत गजबजला. त्याचे डोळे भरून आले. राजा जग सोडून गेला, तेव्हा श्रीरामाला आता मिठी घालावी म्हणून तो धावला, तर तोही कोठे दृष्टीला पडेना. जेव्हा त्याने विचारपूस केली तेव्हा मंत्र्याने हळूच त्याच्या कानात रहस्य सांगितले. "कैकेयीने रामाला वनात धाडले आहे. ही मुख्यतः सर्व करणी मंथरेची आहे, सीतेसह राम पायी गेला आहे." त्यावर भरताने आक्रोश करत रामाला हाक घातली. "श्रीरामा, मला आपले मुख दाखव. माझ्या सुखाचे तू निधान, तुझे मुख आत्मसुख देणारे. मला टाकून तू कसा गेलास? मी तुझी संगत सोडून आजोळी गेलो, त्यावरून माझी तुझ्याविषयी अभक्ती आहे असे समजूनच तू माझा त्याग केलास हे निश्चित. तुझा संग टाळून मी आजोळी भोग भोगत राहिलो आणि त्यामुळे तुझा वियोग झाला." असे दुःखाने भरत म्हणाला.

भरत नंतर विचारपूर्वक म्हणाला, "मी अत्यंत अभागी आहे श्रीरामा. जेवढी विषयांची आसक्ती ठेवावी तेवढी श्रीरामाच्या प्राप्तीमधे विघ्ने; विषय हेच भवबंधन आणणारे, त्यांच्यामुळे नरकप्राप्तीच होते. विष आणि विषय यांची समान स्थिती आहे. त्यातही विषयांची शक्ती अधिक आहे. विषयांमुळे जन्म-मरणाची ओळच पाठीमागे लागते. विषयांचे विषयभोग तेच इंद्रादिकांना पदभ्रष्ट करतात. विषय हाच मुख्य क्षयरोग आहे. विषय नित्य आघात करणारे आहेत. इतरांची इतर काहीही गती असो, मी मात्र विषयासक्तीने फसलो आणि आजोळाच्या मायेची विषयत्वे स्थिती भोगताना, हातोहात श्रीरामाला अंतरलो. श्रीरामाने स्वतः आजोळच्या मायेची स्थिती निश्चित त्यागिली. जोवर विषयप्रेम असते तोवर रामप्राप्ती कधीही घडत नाही. जिथवर मानाभिमान, ज्ञानगर्व तिथवर रामचरण भेटणे कठीण, याचे प्रत्यक्ष प्रमाण मीच अनुभवले आहे."

भरताचा शोकपूर्ण आक्रोश

"मला घोर दूषण लागले, अंगाला लांछन लागले, जळो माझे बंधूपण. मला श्रीरामाचे चरण अंतरले. जो मी आत्मबंधू होतो, तो आता अबंधू झालो. श्रीराम कृपासिंधू असून मी भाग्यहीन अतीव दुःखात पडलो. कैकेयीच्या अविद्येचा बाध आला आणि तिने बंधू होते ते अबंधू केले. सावत्रपणाचा संबंध लावला. त्यामुळे कृपावंत श्रीराम अंतरला. या निमित्ताने सुखावबोध, स्वानंदकंद, आत्मबंधू, परमानंद अंतरला. दशरथांनी परलोकात प्रयाण केले. श्रीरामाबरोबर प्राण दिला, मीच दगड वाचलो आहे. माझे कठीणपण असे की मी फुटतही नाही. श्रीराम वनात जाताच राजांनी देहत्याग केला. मी महापातकी म्हणून मागे उरलो आहे. मला देहमोह सोडवत नाही. रघुनाथ दूर जाताच दशरथांनी तत्काळ देहत्याग केला. मी भरत पापी म्हणून राहिलो आहे. अजून मला मृत्यू येत नाही. श्रीराम

https://archive.org/details/muthulakshmiacademy
Bhavan Vani Trust, Lucknow

CC-0. In Public Domain. Digitized By Sarayu Trust and eGangotri

दुरावला आणि राजांनी देहत्याग केला. मी पापराशी द्वंद्वदुःख भोगायला थांबलो आहे. अद्यापी मला मरण येत नाही तेव्हा मृत्यूलाच मरण आले असावे. काळाचे झाले काळे तोंड, माझे देहबंधन सुटेना. श्रीरामाच्या विरहाने साक्षात् मृत्यू निमाला, मी काळाचा काकडा, दुःखाचा हुडा, आत्यंतिक दुःख भोगायला राहिलो आहे. श्रीराम वनात जाताच मृत्यूनेच जर प्राण सोडला असेल, तर आता मला कोण मारील? मी पापी असाच राहणार. रामाविण जिवंत राहवत नाही, पण काळच निमाल्याने मरणही येत नाही. माझे हे दारुण दुःख रघुनाथाशिवाय कोण निवारणार?'' भरत दुःखग्रस्त झाला.

भरताने धरणीवर अंग टाकले. नंतर पुन्हा शोक प्रकट करू लागला. ''श्रीराम माझी माऊली मला चुकवून कुठे गेली. श्रीरामा मला तू भेट दे म्हणजे जीवींच्या गुह्य गोष्टी तुला सांगेन.'' श्रीरामचरण न दिसल्याने तो कपाळ पिटू लागला. ''राम माझा निजात्मा, माझा जीवात्मा, माझा परमात्मा असे असून तो आम्हाला का विसरला? हे श्रीरामा, तू कुठे गेला आहेस? हे मेघश्यामा, पुरुषोत्तमा मला लवकर भेट दे. धाव, पाव आणि माझा भवभ्रम निवारण कर. श्रीरामा धाव पाव तातडीने, त्वरित लागोलग माझ्यासाठी उडी घे आणि माझ्या दुःखाचे निवारण कर. येरे राघवा ये, मला कडेवर घे, मी तुझे लडिवाळ वाळ असून दुःखभाराने त्रासलो आहे. श्रीराम हा माझ्या गतीची गती, स्थितीची स्थिती, मुक्तीची मुक्ती पण हातोहात तो दुरावला आहे.''

''श्रीरामाची संगत अत्यंत गोड, लक्ष्मण परिणामी सुखदायक, मी रामसंगतीशिवाय मुगामधल्या चहाडाप्रमाणे मूढ उरलो आहे. रघुनाथाचा नित्यसांगाती झालेला लक्ष्मण त्रिजगतात धन्य. मी आजोळाच्या मायासंगतीत दुःखावर्तात सापडेलो दुःखी. बंधूभावात लक्ष्मण फार भाग्यवान आहे, मी तेवढा बंधुत्वात अभागी आहे. सर्व प्रकारच्या दुःखांनी माझे अंग व्यापले असूनही माझा अंगभंग होत नाही. भोपळ्याची स्थिती कशी असते, एकाला तो भीक मागण्याचे पात्र होतो. एकाला संकटात वाचवणारा ठरतो, तर एक त्यातून रक्त पितो. एक शुद्धसंगती, मधुरवचनी, विश्रांती देतो, तशी अशुचीही गती असते. संगप्राप्तीचा परिणाम तसाच असतो. लक्ष्मण शुद्धसंगती, तारक, त्रिजगती विश्रांती घेणारा. मी मातुलाची मायास्थिती घेऊन रुधिरप्राय दुःखप्राप्ती भोगणारा ठरलो.''

कैकेयीची निंदा - मंथरेवर क्रोध

''श्रीराम मला नित्य शांत करीत असे, तो जीवशिवांचा स्वामी आहे. तसाच राम हा सुखानंदाची गंगा असून ती कैकेयीने कोरडी केली. राम मला आपल्या ठिकाणी निवांत करतो, तो जीवाशिवाय जगवणारा, तो माझी स्वानंदपदवी आहे. कैकेयीने हे सर्व भेदाने मला वंचित केले. राम हा माझे मुख्य मुद्दल, भांडवल, आत्मबल, त्याचीच वंचना करून भेदभावाने तोडले. तो राम माझे निजजीवन, निजअंजन, निजनिधान असताना कैकेयीने भेद बुद्धीने चोरून नेले. आम्ही सारे सखे, आत्मवंधू असताना कैकेयीने आमच्यांत व्यर्थ भेद केला. मुख्यतः त्या मंथरेने सापत्न-विरोध सुवद्ध रीतीने वाढविला. भोळी कैकेयी, मंथरेने जी खोटी बुद्धी दिली त्याला भुलून रामाला तिने देशोधडीला लावला. अयोध्या स्पष्टपणे दुःखात लोटली. त्या मंथरेचाच मी आधी घात करतो.'' असे म्हणून भरत धावला.

भरताने मंथरेला केस धरून ओढत आणली. त्याने क्रोधात तलवारही उपसली. ''हिच्यामुळे रघुनाथ वनवासी झाला. हिच्यामुळे दशरथ निमाला. हिने अयोध्येत आकांत आणला. जगात हिच्यामुळे दुःखाचा आवर्त निर्माण झाला. हिच्यामुळे सवतीमत्सराचे बंड प्रचंड वाढले; कैकेयीचे तोंड काळे झाले. हिला मी दुखंड करीन. ही सूर्यवंशाला

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

लागलेली दुःखाची आग आहे. ही सख्यांना, सुहृदांना, योगभंगी आहे. हिच्यामुळे कैकेयी निंद्य ठरली. हिचा मी लगेच छेद करतो. हिने पायी चालत सीतेला वनात पाठविली; हिच्यामुळे बंधू लक्ष्मण मला अंतरला; माझा पिता दशरथ गिळला, हिला मी निश्चित छेदीन. हिने थोर अनर्थ केला आहे. माझ्या मातेला वैधव्य आणले, मला दुःखावर्तात लोटले. हिला मी आता मारीन. आमची रामापासून ताटातूट, आम्ही पोरकी पोरे, सृष्टीत दीनवाणी, हे सर्व हिच्यामुळे झाले म्हणून मी हिचा तातडीने वध करीन."

भरताला वसिष्ठांचा उपदेश

मंथरेचा वध करण्यासाठी भरत खड्ग उपसून सिद्ध आणि उत्सुक होता. परंतु वसिष्ठांनी धावून त्याचा हात धरला. ते भरताला म्हणाले, "स्त्रीचा घात करू नये. कधीही स्त्रियांचा घात करू नये. स्वतःच्या मातेची उपेक्षा करू नये. पुत्राने आपल्या पित्याला मूर्ख म्हणू नये, जरी तत्त्वतः तो अपंडित असेल. द्विजाचा विटाळ मानू नये. याचक भुकेला दवडू नये. साधूंचा छळ करू नये. स्त्रियांशी शस्त्रकल्लोळ करू नये. गो, ब्राह्मण, स्त्री, बंधू वधाला योग्य ठरविले तरी त्यांचा वध करू नये. भरता तू विवेकी म्हणून प्रसिद्ध आहेस." भरताला गुरुवाक्य उल्लंघता आले नाही, तरी त्याला आपला क्रोध आवरणे शक्य झाले नाही. त्याने मंथरेला लाथा हाणल्या आणि निष्ठुरपणे निघाला. लाथेसरशी ती जमिनीवर पडली. भरताने मारलेल्या आघातांनी तिची कंबरच मोडली. शरीर तीन ठिकाणी वाकडे झाल्यामुळे तिला त्रिवक्रा नाव पडले. पुढे राक्षसांना जिंकून श्रीराम अयोध्येत आल्यावर मंथरा त्याच्या पायी लागेल आणि 'माझी ही अशी दशा झाली श्रीरामस्वामी' असे सांगेल. तेव्हा राम म्हणेल, "तुला योग्य केली तर बंधू भरताला ते योग्य वाटणार नाही. स्वभावाने जेव्हा मी मथुरेला जाईन तेव्हा मी तुझ्या मनाप्रमाणे करीन. ती अहर्निश राम जपत असेल. तिने आणलेले चंदन श्रीकृष्ण आपल्या अंगाला लावेल आणि नीच दासी कुब्जा उद्धरेल. हे मधेच प्रसंग आला म्हणून सांगितले. मंथरा ही तत्त्वतः कुब्जा. आता पुन्हा भरताच्या कथेचा पुढचा भाग पाहू.

अभिषेकाला भरत, शत्रुघ्न यांचा नकार

श्रीवसिष्ठ म्हणाले, "राज्याभिसिंचन न करता राजदहन करू नये. तेव्हा तुलाच आता राज्याभिसिंचन करू या." हे ऐकताच भरताला रडू आले. दुःखाने त्याचे हृदय भरून आले. तत्काळ प्राण सोडावा असे त्याला वाटले. "श्रीराम गेल्यावर जर मी राज्यपटावर बसलो तर सृष्टीतल्या सगळ्या ब्रह्महत्त्या माझ्या ललाटावर पडोत. रघुनाथ वनात गेल्यावर भरताला पट्टाभिषिंचन झाले तर महादोषाच्या ज्या ज्या वार्ता त्या त्या सगळ्या मी केल्या असे होईल. रामचंद्र वनात गेल्यावर जर मी अभिषिंचन करून घेईन तर शूद्रांनी द्विजांच्या विधवा स्त्रिया भोगल्या आणि त्या गर्भस्थानाला मी गेलो असेच ठरेल. रजस्वलेच्या रुधिराने माझे शरीर अभिषेका, पण राज्याभिषेकाच्या पवित्र जळाला मी स्पर्शही करणार नाही. श्रीरामाची राजधानी ही माझी जननी असे मी मानतो. तेव्हा ती अभिषिंचन करून घेऊन मी भोगली तर त्याचा अर्थ मी मातृगमनी झालो असाच होईल. श्रीगुरू वसिष्ठा, मी आपले पाय धरतो, रघुनाथाची शपथ वाहतो, पण राज्याभिषिंचन प्राणांतीही मी करू देणार नाही." असे तो निर्धारपूर्वक म्हणाला.

श्रीवसिष्ठांनी भरताचे वक्तव्य ऐकल्यावर शत्रुघ्नाकडे पाहिले. तेव्हा तो मूकपणे रडत होता. श्रीरामाच्या विरहाने वेड लागल्यासारखे होऊन त्याला मागचे पुढचे काही आठवेचना. तो घरदार, इंद्रियव्यवहार, स्वतःचे शरीर हे सारे विसरला आणि तदाकार होऊन राहिला. श्रीरामचंद्राचे स्मरण करताच शत्रुघ्नाला योगमुद्रा लागली. तो निद्रा, तंद्रा

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Trust and eGangotri

विसरला. अशी श्रीरामचंद्रस्वामीची कृपा झाली. दृश्य, द्रष्टा, दर्शन, कर्म, क्रिया, कर्तेपण यांतले शत्रुघ्नाला काहीही आठवत नव्हते. तो स्वतःलाच विसरला. करणे, न करणे याचा विचारच त्याच्या ठिकाणी उरला नाही. धैर्याने श्रीरामाचे स्मरण केल्यावर तो देहात असून विदेही झाला. जे भरत बोलला तोच भावार्थ आपलाही आहे हे त्याने यथार्थपणे दाखविले. शत्रुघ्न हा मूर्तिमंत धैर्य असल्याने त्याने धैर्याने तोच वृत्तान्त निरूपण केला. शत्रुघ्नाची अशी स्थिती, तर भरताची तशी स्थिती, आता राज्याची काय गती असा वसिष्ठ विचार करू लागले.

वसिष्ठांकडून उपायाचे निरूपण

श्रीवसिष्ठांनी विचार केल्यावर भरताला उद्देशून ते म्हणाले, "भरता, व्यर्थ शोक का करतो आहेस? जे मी सांगतो ते यथार्थपणे तू निश्चित करावेस. अभिषेक करायचा तर तो श्रीरामाच्या पादुकांना करून राजाचे दहन आणि अंत्यसंस्कार करावे. नंतर आपण श्रीरामाच्या भेटीला वनात जाऊ." वसिष्ठांचे बोलणे ऐकून भरताला अमृतपानाचे सुख झाले. मग त्याने वसिष्ठांना नमन करण्यासाठी त्यांच्या चरणांवर मस्तक ठेवून वंदन केले.

भरताने राजांच्या देहाचे दहन करण्याची सिद्धता करताच, कौसल्येने सहगमन करायचे ठरविले. त्यावेळी वसिष्ठांनी स्वतः येऊन तिच्या विचाराचे निवारण केले. "पतिसंकटार्थ सहगमन पण त्याहून अधिक श्रीरामाची भेट आहे." त्यावर ती म्हणाली, "चौदा वर्षे जगण्याची गोष्ट दुर्लभ आहे. जर रघुनाथ अयोध्येत येण्यापूर्वीच मला मरण आले तर ना दशरथ, ना राम, असा मला अपघात घडेल." कौसल्येचे बोलणे ऐकून वसिष्ठ कळवळले. "राजांचे उत्तरकर्म उरकले म्हणजे नंतर रामाची भेट घडवीन." असे वसिष्ठ म्हणाले. कौसल्या त्यावर 'अहो गुरुनाथ, रघुनाथाला अवश्य भेटवीन अशी मला आपण शपथ देत असाल तर मी जिवंत राहीन. श्रीराम दृष्टीने पाहताच द्वंद्वदुःखाच्या कोटी मावळतात. सृष्टीत आनंद मावत नाही. श्रीरामामुळे सुखसंतोष होतो. श्रीरामाची भेट होणे हे दुर्लभ भाग्यच या संकटात आहे. ते जर श्रीसद्गुरूंच्या कृपादृष्टीने मिळाले तर मी सृष्टीमधे धन्य होईन." कौसल्येचे शुद्ध सत्त्व पाहून वसिष्ठांना आनंद आणि सुख वाटले. त्यांनी रामभेट घडविण्याची शपथ मोठ्या उल्हासाने देऊन, राममाता निश्चयपूर्वक तिच्या सहगमनाच्या विचारापासून परावृत्त केली.

भरताने उठून स्वतः रामपादुकांचे अभिषिंचन केले आणि राजाच्या देहाचे दहन केले. नंतर संपूर्ण उत्तरक्रिया केली. भरत अयोध्येत आला तोवर राम वनात दूर गेला होता.

अध्याय बारावा

सर्व लोक आपापल्या ठिकाणी गेल्यावर मध्यरात्री कैकेयी भरताच्या मंदिरात गेली.

कैकेयी-भरत-भेट सावत्रपणाचा इतिहास

कैकेयीने भरताला उठविले आणि तिने भरताला उपदेशाचा आव आणून आपले मनोगत सांगितले. "राम वनवासाला गेला तर तू कशासाठी शोक करतो आहेस? एखाद्या विधवा बाईसारखा भर सभेमध्ये रडायला तुला लाज नाही वाटली. ऊठ, धीर धर, अयोध्येचे स्वतःचे राज्य कर. मुख्यतः ज्येष्ठाचे असलेले राज्य हे, ते मी मोठ्या कष्टाने तुला मिळवून देण्याचे कार्य साधले. त्याचा अभिमान न बाळगता, माझे कर्तृत्व न मानता, उलट वनात जाण्याची आवड धरून नाचतोस? आयुष्य संपले म्हणून पती निवर्तला, पित्याच्या आज्ञेने रघुपती वनवासात गेला. त्याचा दोष माझ्यावर ठेवतोस? तुला तुझा स्वार्थ कळतच नाही. अरे मुळापासून संसारात सावत्र ते मुख्य वैरी मानले आहेत. तेच वेदशास्त्राला संमत असलेले मी

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Trust Foundation Research Academy, eGangotri

तुला निश्चयाने सांगते आहे.''

''दिती आणि अदिती या दोघी एकाच पित्याची संतती आणि सवतीही होत्या. देव आणि दैत्य यांच्यात वैर निर्माण झाले. एकमेकांचा घात करण्यास ते प्रवृत्त झाले. याच अर्थाची वेदोक्ती बृहदारण्याच्या प्रथम श्रुतीत आहे. देव - दैत्य वैरी झाले याला वेदांची मान्यता आहे. सावत्रांमधे प्रीती असे सांगणारे वेदशास्त्रात काहीच नाही. आता गरुड आणि सर्प यांच्यात वैर आहे. मग ते काय आत्मबंधू नव्हते का? तेव्हा माझी काय युक्ती आहे ते नीट ऐक. तू वनामधे जाऊ नकोस. वसिष्ठादी ऋषिपंक्ती आणून राज्यप्राप्तीचा अभिषेक करून घे. भरता तू तर सभाग्यपूर्ण आहेस. अभागी लक्ष्मण वनवासात गेला. तो जर इथे असता तर त्याने राज्यलोभाने कंदन केले असते. मी सांगते त्यातले हित लक्षात घे. तू राजा हो. शत्रुघ्नाला युवराज कर. माझे सांगणे प्रतिपाळ.''

मातेचे बोलणे ऐकून भरताला अत्यंत राग आला. त्या रागातच त्याला रडू आले. अत्यंत दुःखी होऊन तो पश्चात्ताप करू लागला. एखाद्याने घावावर लाथ मारावी तसा प्रकार इथे भरताच्या अनुभवाला आला. नंतर तो कैकेयीला म्हणाला, ''तू माझी माता नाहीस; संपूर्ण पापरूपता आहेस. स्वतःचा पती निवर्तला त्याचे तुला अणुमात्र दुःख नाही की त्याची तुला लाजही नाही. राज्यभोगाची; त्यातल्या सुखाची आवड बाळगून निर्लज्जपणे नाचते आहेस. मी रघुनाथाचा द्वेष करावा हे तुझे सांगणे मी ऐकायचे! स्वजनांना दुःखवार्ता देऊन मी स्वतः नरकात जावे म्हणतेस? आपल्या मातेचा हितोपदेश ऐकून रौरवात अवश्य जावे. पूर्वजांनाही नरकात लोटावे, सर्व जनतेला दुःख द्यावे? अगं, आपल्या पतीचा घात करणारी, श्रीरामाचा द्वेष संपादणारी, सुहृदांची दुःखकारिणी अशी तू पापिणी आहेस. चल जा. तू निंद्य आहेस. जळो तुझे काळे तोंड, श्रीरामाला दुःख दिलेस, तेव्हा तुझे मला काहीही सुख नाही. तुझ्यामुळे जग असुखी झाले आहे. स्वमातेचा वध करू नये यासाठीच मी तुझा वध करायचे टाळले आहे. तुझ्यामुळेच मला दुःखावस्था आली आहे. श्रीराम आणि दशरथ यांना तूच वेगळे केलेस. तुला जवळ पाहून मला फार दुःख होते आहे. नको दाखवू तुझे काळे तोंड. निंद्य आणि पूर्ण दुष्ट अशी तू आहेस.'' भरत फारच संतापला होता; म्हणून नाना प्रकारे निर्भत्सना करून त्याने कैकेयीला बाहेर घालविले. तिच्यामुळे तो अतिशय दुःख करू लागला. जिच्यामुळे राघव अंतरला ती माता नव्हे एक घातक स्त्री आहे. जगात हिचे निंद्य नाव दुःखओतीव कैकेयी असेच होईल.

चारही बंधूंचे पिंडैक्य - भरताचा निर्धार

श्रीराम आणि भरत यांचा पिंड एक होता. एकाच पिंडाचे ते दोघे होते. एकमेकांचे दुःख आणि सुख एकमेक मानत होते. परस्परांचे जीव-प्राण, जीवन, समाधान यांत श्रीराम आणि भरत सुखसंपन्न होते. भरताला श्रीरामाचे सुख, श्रीरामाला भरताचा आनंद, असे ते एकमेकांना एकच होते. हे मूर्ख कैकेयीला जाणवलेच नव्हते. रघुनाथ आठवताच भरत परम सुखाने सुखावत होता. त्याला राज्यलोभाचा स्वार्थ नव्हता. श्रीराम हा परमामृत आहे ही त्याची धारणा होती. श्रीरामाच्या पायांपेक्षा अन्य परमसुख भरत मानत नव्हता. यासाठी तो आपले राज्य सोडून, श्रीरामाच्या भेटीला निघाला होता. देव आणि दैत्य यांचे वैर आणि भांडण असण्याचे कारण त्यांचा पिंड एक नव्हता. राज्यलोभ हा उदंड दुःख देणारा असून त्यातून अखंडपणे एकमेकांचे वैर निर्माण होते. वेगवेगळ्या पिंडातून उत्पत्ती असल्याने गरुड आणि सर्प यांच्यात वैर होते. तसे श्रीराम आणि भरत यांचे नव्हते. तसे तर ते चौघेही एका पिंडाचेच होते. सौमित्र, भरत, शत्रूघ्न आणि चवथा श्रीराम या चारही श्रीरामाच्याच मूर्ती पूर्णत्वाने होत्या असा तो व्यूह होता. चार बंधू या भिन्न भिन्न चार व्यक्ती

https://archive.org/details/@sarayutrust, Lucknow / Bhavan, academy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Trust, Lucknow and eGangotri

होत्या. परंतु चार मिळून श्रीराममूर्तीच होत होती. याला व्यूहचतुष्टय म्हणतात. हे आगमार्थी वेदोक्त आहे. अशी एकात्मता आणि एकमेकांविषयी प्रीती असल्याने भरत श्रीरामाच्या भेटीसाठी दुसरे दिवशीच्या सूर्योदयाला वनगमनार्थ उत्सुक बनला होता.

श्रीवसिष्ठ भरताची परीक्षा पाहतात

भरताने प्रधानाला बोलावून सांगितले की, तातडीने सेना सिद्ध करा. श्रीरामाला भेटायला निश्चित वनात जायचे आहे. त्यावेळी वसिष्ठांनी येऊन, भरताचे मन पाहायचे म्हणून म्हटले, "पुत्रधर्माचे लक्षण मी आता तुला सांगतो आहे. तुम्ही चारही पुत्र पितृभक्त आहात. राजा दशरथ आज्ञा नेमून गेला आहे की राज्याभिषेक भरताला करा आणि श्रीरामाला वनवासाला पाठवा. तुझ्या मातेचे वरदान होते, तिचेही मागणे हेच होते की, भरताला राज्याभिषिंचन आणि रघुनंदनाला वनवास. श्रीराम पितृवचनावर विश्वास ठेवणारा असल्यामुळे त्वरित वनवासाला गेला. तूही पितृवाक्य पाळून अभिषेकाचा स्वीकार कर. श्रीरामाला निश्चितपणे अभिषेक करायचा म्हणून पूर्वी मी जी सामग्री सिद्ध केली होती. ती सर्व माझ्या घरी तशीच आहे. तेव्हा तू अभिषेक करून घे. पितृवचनाचे उल्लंघन केले तर अवश्य नरकाला जावे लागते. तेव्हा हे भरता, तुला आता अभिषेक करतो."

श्रीवसिष्ठांचे वचन ऐकताच भरत मूर्च्छित झाला. तो सावध झाल्यावर त्याला रडे आवरेना. अखेर आक्रंदून तो म्हणाला, "कैकेयी आनंदाने विधवा झाली. जळो तिचे काळे तोंड. वनवासाचे खोटे कारण पुढे करून तिनेच हे मोठे वाद वाढविले आहेत. कैकेयी ही खरोखर परमावधीची नष्ट, दुष्ट स्त्री आहे. आपल्या श्रेष्ठ पतीला तिने शपथेत गोवला. तिची मागणी ही स्पष्ट पाप आहे. तो राज्यपट मी घेणार नाही. अहो वसिष्ठगुरू मी आपल्याला नमन करतो. कितीदा माझ्या मनाची परीक्षा आपण पाहता. रघुनंदनाला टाळून मी अभिषिंचन करून घेणार नाही. श्रीरामाला वनात सोडून, जर मी राज्यावर बसलो तर मी मद्यपी आणि मातृगमनी, नष्ट ठरेन. गुरुवर्य, या आधीच मी आपले पाय धरून, श्रीरामाची आण वाहिली आहे. तेच माझे प्रमाण आहे. पुढे आपण काही विचारू नये. मी पुन्हा आपल्या चरणांवर मस्तक ठेवतो आणि म्हणतो इथून पुढे गुरुनाथा, राज्याभिषेकाची गोष्ट मला आपण विचारू नये." हे भरताचे बोलणे ऐकून वसिष्ठांना सुखसमाधान झाले. भरताला त्यांनी हृदयाशी धरला. ते म्हणाले, "भरता तू खरोखर अतिशय विवेकी आणि सज्ञान आहेस. तुझ्यासह मातेलाही घेऊन मी रघुनाथाच्या भेटीला येईन." वसिष्ठांचे सांत्वन ऐकून त्यांच्या पायांना स्पर्श करून भरताने, "आज मी भाग्यवान झालो, सद्‌गुरू माझ्यावर प्रसन्न झाले" असे म्हटले. लगेच भरताने आज्ञा केली की 'सेना सिद्ध करून, वनगमनाला शीघ्र तयार व्हा, भरत हर्षाने भरून आला होता. 'आता रघुनाथ पाहीन, आपले मनोरथ पूर्ण होतील, कृत-कृत्य होईन,' अशा शब्दांत तो आपल्याशी सतत बोलत होता. नंतर श्रीरामाच्या भेटीसाठी तत्काळ ससैन्य भरत निघाला. नागरिकांनी हर्षाने टाळी पिटली. वनात जाण्यासाठी सर्वजण उत्सुक झाले. रामाचे दर्शन होईल या आशेने नागरिकांबरोबर व्यापारीही निघाले. त्यांचे मन दोन्ही लाभांवर होते.

श्रीरामदर्शनाची उत्सुकता

अयोध्यावासी नागरिकांना रामदर्शनाची ओढ लागली होती. त्यांची उत्सुकता शिगेला पोहोचली. वाण्यांनी आपले सामान सिद्ध केले. शिंपी, सोनार, जोशी, व्यापारी यांनी जोडीचे मोठे सामान घेतले. गवळ्यांनी खिल्लारे घेतली. पकान्नांचे प्रकार, दुधा-दह्यांच्या कावडी बरोबर घेण्यात आल्या. तेल्यांनी तेलाच्या जोडी घेतल्या. कापडवाल्यांनी आपली गाठडी घोड्यांवर घातली. तांबोळ्यांनी आटकी

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

बांधल्या, ब्राह्मणांनी घडशा घेतल्या. एक कोणी आईवडिलांना न कळवता, चोरून मार्गी लागली. पुत्रासाठी माता धावे, स्त्रीपुत्रासाठी पिता निघे, पुतण्यासाठी चुलता धावे अशी सर्वांची एकच गडबड उडाली. हे सारे होते श्रीरामाला पाहण्यासाठी. भाड्यासाठी भारवाहक, शिंपी, नट, पटवेकरी, धोबी, न्हावी, नावाडी सर्वजण निघाले. सुतार, शस्त्रकार, दोर वळणारे, मार्गात अपार विक्री होईल या आशेने चांभार पायताणांचे भार घेऊन निघाले. सहकुटुंब असेही काही अनेक निघाले. कोणाला वाटले पैसे देऊनही भाडे मिळणार नाही म्हणून ते घाई करू लागले. एक म्हणाले लवकर गेलो नाही तर भरतही अंतरेल. घराची राखण करायला कोणीही मागे राहायला तयार होईना. एकमेकांवर रुसून ते निघाले. श्रीराम डोळ्यांनी पाहण्याविषयी सर्वांच्याच मनात उत्सुकता होती. कुंभारांच्या स्त्रिया गाढवांवर बसून निघाल्या. त्यांना यामुळे होणारा अपमान त्या सुखाने सहन करत होत्या. कारण श्रीराम पाहून होणारा आनंद त्यापेक्षा त्यांना मोठा वाटत होता. भाडेकऱ्यांनी आपले गाडे सर्वांपुढे नेले. त्यांचे घोडे थयथय करत भाडे मिळावे म्हणून उत्सुक झाले होते. द्विजांचे, संन्याशांचे, संभार आणि नग्न दिगंबरपंथी श्रीरामाच्या दर्शनासाठी निघाले.

भरताबरोबरच्या सैन्याचे वर्णन

अयोध्येची चतुरंग सेना भरताबरोबर निघाली. पांढऱ्या घोड्यांनी सजलेल्या रथात हर्षफुल्ल भरत बसला होता. शत्रुघ्नही आपला रथ सिद्ध करून भरताबरोबर श्रीरामाला भेटायला निघाला. पालखीमधून कौसल्येला आणि सुमित्रेला, वाहून नेले जात होते. इतरही राजपत्न्या श्रीरामाचे दर्शन घेण्यासाठी उत्सुक होऊन निघाल्या. कैकेयी माता आली नाही. तिला परम दुःख झाले. न राम ना भरत अशी स्थिती झालेली मी हे काळे तोंड कशी दाखवू? असे तिला झाले होते. वसिष्ठादी सर्व ऋषी, महंत, प्रधान, सुमंत यांना उत्तम रथांत बसवून भरताने त्यांना बरोबर घेतले. भरताच्या दोन्ही बाजूंना घंटा, घागऱ्या, पताका यांनी सजवलेले साठ वर्षांचे जातिवंत हत्ती, मत्त हत्ती असे दहा हजार हत्ती चालत होते. अतिरथी, महारथी, साठ हजार उत्तम जातीचे वीर, आपल्या रथांतून धडधडत, आयुधांसह भरतामागून चालले होते. रथांची गती, विगती याचे एकापेक्षा एक सरस प्रदर्शन आणि धनुष्य तसेच अन्य शस्त्रे यांचा साटोप ते वीर दाखवत होते. लाखो जातिवंत घोडे, वीरांचा संभार, नाना वस्त्रालंकारांनी सुशोभित होऊन प्रचंड सिंहनाद करत होता.

घोडेस्वारांनी आपले अंगटोप, मोहोरकी, रागावळी, तेजस्वी झालरी घालून त्यावर ते आरूढ झाले होते. त्यांचे घोडे तीन पायांवर नाचत होते. त्यांवरचे स्वार हो, हो, मा, मा, जी, जी, करत, हातांनी अंतराळाकडे निर्देश करत घोड्याला थापडत झेपावत होते. शस्त्रांचे नाना प्रकार वीरांच्या हातांत होते. कोयते, त्रिशूळ, तोमर, गोफणी, चेंडू, चक्र, गदा, मुद्गल, लहुडी ही शस्त्रे घेऊन पायदळांचे समूह निघाले. खेटक, भालेवाले, गर्जत होते आणि पुढे जात होते. त्या सैन्यात परशुधर, मल्ल हे तळपत होते. सेळी, सावळी शक्तिमान होते. तसेच अलंगाईत, बाणाईत, कोयतेकार हेही होते. कटारहस्त, लघुवेगी, आडाऊ, वोडणे पुढे थडकत होते. तळवे हैकार, थैकार देत तळपत होते. वीरांच्या गर्जना चालू होत्या. अशी ती दुर्धर चतुरंग सेना घेऊन भरत वाद्यांच्या गजरात पुढे पुढे घाईने चालला होता. त्यांच्या मार्गात येणारी झाडेझुडपे कापणारे कुऱ्हाड, कोयते, काठ्या घेऊन सर्वांपुढे चालले होते. जमीन चालण्यायोग्य करण्यासाठी मातीकाम करणारेही पुढेच चालले होते.

ससैन्य भरत पाहून गुहकाची प्रतिक्रिया

भरताचा सेनासंभार भागीरथीतीरावर येऊन पोहोचला. त्या वेळी तो सेनाभार पाहून गुहकाला राग आला. "राज्यलोभ किती दुर्धर असतो पाहा.

https://archive.org/details/muthulakshmiacademy
Bhavan Vedic Trust, Lucknow

CC-0. In Public Domain. Digitized By Sarayu Foundation Trust and eGangotri

सख्या बंधूशी वैर धरून भरताने सेनाभार सज्ज केला आणि श्रीरामचंद्राला मारण्यासाठी तो निघाला आहे. माझा स्वामी श्रीराम, त्याचा हा वध करू पाहतो आहे; पण मी भरताशी रणात युद्ध करीन आणि त्याची सर्व सेना छेदीन." असे गुहकाच्या मनातले क्रोधाचे विचार चालू होते. तो असेही मनाला सांगत होता की, "श्रीराम माझी माता, तोच माझा पिता, श्रीरामच माझा सुहृद, बंधू, तोच माझा सद्‌गुरू आत्मतः, श्रीराम तत्त्वतः माझा आत्मा आहे. त्याचा घात करण्यासाठी हा भरत सैन्यासह निघाला आहेः तर मी त्याचा निःपात करीन. मी सत्य श्रीरामभक्त आहे. श्रीरामाचा मी चौकीदार आहे. त्यानेच मला गंगातीरावर नेमले आहे. भरत येऊन पैलतीरावर कसा उतरेल तेच मी पाहतो." नंतर गुहकाने आपल्या निषादवीरांना सांगितले की, "जर भरत ससैन्य आला तर गंगातटाक दृढपणे रक्षावे. गंगोदकाला त्याला स्पर्श करू देऊ नका. ते जर युद्धाला आले तर मी अशी कीर्ती करीन की धड आणि मुंडक्यांनी पृथ्वी भरून जाईल असे क्षणार्धात करीन. रथ, घोडे, हत्ती रणात मारीन. नरवीरांच्या रक्ताचा पूर वाहेल, असे क्षात्रकर्म मी करीन. श्रीरामाच्या कार्यासाठी निःशेष जीवित वाहीन; पण येथून पुढे भरताला कदापी जाऊ देणार नाही." निधडे, निवडक आणि निःशंक असे निषादांचे सैन्य एकत्र करून त्यापुढे स्वतः गुहक सिद्ध होऊन उभा राहिला.

भरत-गुहक ऐक्य, सुमंताची मध्यस्थी

भरत गंगेच्या जवळपास पोहोचला तेव्हा त्याला सैनिकांकडून वार्ता समजली की 'गुहक युद्धाच्या तयारीने सिद्ध आहे. गंगातटाक रोखून गंगोदकाला स्पर्श करू देणार नाही म्हणतो.' एकजण म्हणाला की, 'राजा निश्चित निवर्तला म्हणून गुहक आम्हाला पारखा झाला आहे. तहानेने आमचे लोक व्याकुळ आहेत आणि हा गंगोदकाला स्पर्शू देणार नाही म्हणतो.' त्यावर सेनापती रागाने म्हणाला, "गुहक बापुडा तो काय! आम्हाला आज्ञा द्यावी, क्षणार्धात ख्याती करून दाखवितो." भरताने शांतपणे विचार करून म्हटले, "गुहक रामाचा अत्यंत जवळचा मित्र आहे. त्याच्याशी बोलल्याशिवाय एकदम युद्धकंदन योग्य नाही." मग भरताने गुहकाला विचारले, "तू युद्ध का करू पाहतो आहेस?" गुहकाने सांगितले, "तू बळ घेऊन श्रीरामाला का मारायला जातो आहेस. माझा स्वामी वनवासी आहे. तर तू सैन्यबळ घेऊन त्याचा वध करू पाहतो आहेस, हेच तुमच्या-माझ्यातल्या वैराचे कारण आहे. जो सद्‌गुरूचा द्वेष करतो तो आमचा मुख्य वैरी आहे. त्याला शस्त्राधाराने मी मारीन. हीच माझी खरी प्रतिज्ञा आहे." गुहकाच्या बोलण्याचा अर्थ समजल्यावर भरत रथातून खाली कोसळला. दुःखाने गडबडा लोळत राहिला. त्याची प्राणान्त अवस्था झाली.

भरत गुहकाला म्हणाला, "गुहका, लवकर माझा पाप्याचा वध कर. कैकेयीने पापराशी जोडल्या आणि मी जगाला अत्यंत निंद्य वाटू लागलो. कैकेयीने राज्यलोभाच्या थोरवीने मला श्रीरामाचा वैरी केले आहे. तिच्यामुळे मी चराचरात निंद्य ठरलो आहे आणि दुःखसागरात बुडालो आहे. जो श्रीरामाचा द्वेष करतो त्याला तीन काजळ्या लागतात. ती कैकेयी आर्जवाची काजळी असून ती काजळी माझ्या तोंडाला लागली आहे. त्यामुळे मी काळतोंड्या ठरलो आहे. त्यामुळे मी लोकांना तोंड दाखवू शकत नाही. कैकेयीने दिलेले परम दुःख, ते मी कोणाला सांगू रे गुहका? गुहका, मी तुझे पाय धरतो, तू वेगाने निर्वाणबाण सोडून माझे देहबंधन तोडून टाक. पापाचे पुरश्चरण तरी होईल. तू श्रीरामाचा परम आप्त असलास तरी माझाही सखा निश्चित आहेस. माझ्या आताच्या सांगण्याचा अर्थ लक्षात घेऊन प्रायश्चित म्हणून माझा देह छेद."

भरताचे बोलणे ऐकून गुहकाने लोटांगण

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

घालून भरताचे पाय मस्तकापाशी घट्ट धरले. नंतर आप्तभावाने दोघांनी एकमेकांना आलिंगन दिले. दोघांनाही पूर्ण प्रेम वाटल्याने डोळ्यांतून स्वानंदजीवन असे आनंदाश्रू गळू लागले. गुहक म्हणाला, "श्रीरामाची ज्याला पूर्णभक्ती तो माझा त्रिजगतातला आप्त मी मानतो. तोच माझा सांगाती, मी त्याचा चरणार्थी होतो."

त्यावेळी सुमंत पुढे होऊन गुहकाला म्हणाला, "भरताने देत असूनही राज्यपद नाकारले आहे. राज्याभिषेक रघुनाथाला करावा, यासाठी वनात जाऊन श्रीरामाला घेऊन यावे म्हणून भरत निघाला आहे." सुमंताचे बोलणे ऐकून, भरताचे प्रेम पाहून, गुहकाने सरळ भरताचे पाय धरून म्हटले, "या सृष्टीत तू खरोखर धन्य आहेस भरता." भरताने मग गुहकाला बरोबर घेऊन स्नानसंध्या उरकली; पितृतर्पण केले. गुहकाला विचारले, "राम एक रात्र गंगातारी राहिला होता तेव्हा त्यांनी कोठे शयन केले ते स्थळ मला दाखव."

श्रीरामाच्या निवासस्थळाचे दर्शन, गुहकगौरव

निषादपती गुहकाने भरताला हाताने धरून, श्रीरामाने जेथे वस्ती केली होती त्या ठिकाणापर्यंत आणले. भरताला गुहक म्हणाला, "याच इंगुदीवृक्षाच्या तळाशी महाबळी श्रीराम राहिला होता. त्याने गंगाजळाने स्नान केले. येथेच तृणशय्येवर श्रीरामाने आणि सीतेने शयन केले. त्यावेळी लक्ष्मणाने मात्र निद्रा केली नाही. मी त्याची अनेकदा प्रार्थना केली पण तो म्हणाला, "श्रीरामसेवेचे समाधान हे जडमूढ शयनाने होत नाही" हे ऐकताच भरताला रडू आले, काही काळ तो मूर्च्छितही झाला. शत्रुघ्नही उद्विग्न झाला. कौसल्या, सुमित्रा हडबडून गेल्या. राजपत्न्या धावून आल्या. नंतर वनवासाची वार्ता ऐकली. त्यामुळे भरत आणि शत्रुघ्न यांना अतिशय दुःख झाले. पण राम, लक्ष्मण, सीता ही सर्वजण वनात स्वस्थ आणि सुखी आहेत याविषयी काय ते लवकर सांग असे गुहकाला म्हटले गेले. राजपत्न्या दुःख करून रामविरहामुळे रडत होत्या. गुहकाला बोलत असताना रडू येत होते. तो सांगत होता की, "या वृक्षाजवळ रघुनंदन राहिला. त्याने येथेच शयन केले. तीच ही पवित्र तृणशय्या आहे. मी मोठ्या प्रेमाने आणि भक्तीने नित्य तृणशय्येचे पूजन करतो. श्रीरघुराजाच्या चरणनिष्ठेने तो ज्या मार्गाने गेला त्या मार्गावरची धूळ घेऊन तिला वंदन करतो."

गुहकाचे निवेदन ऐकून भरताने त्याचे पाय धरले. "गुहका, तू त्रिभुवनांत धन्य आहेस. श्रीरामभजनात तुझे शुद्ध प्रेम दिसते. कारण श्रीरामभक्तीने तू वृक्षाला, तृणशय्येला वंदनपूर्वक पूजतो आहेस. यापेक्षा मोठा लाभ कोणता? तुझी सूक्ष्म भक्ती आणि निष्ठा यात दिसते. धन्य धन्य गुहका तुझा भक्तिभाव! तुला श्रीरामाचा संतोष मिळाला, देहबुद्धीसंदेह फिटला, तू निःसंदेह रामभक्तीत मग्न आहेस. खरोखर गुहक निषाद अत्यंत पवित्र आहे, दीनदयाळ श्रीरामचंद्राचे नाम घेऊन महादोषीही पवित्र होतात. गुहकाची अनन्य भक्ती पाहून भरताला गुहकाबद्दल अत्यंत प्रेम वाटू लागले; मग चित्तात असलेला विषाद सोडून तो गुहकाचा जिवलग सांगाती झाला. श्रीराम आणि सीता यांच्या तृणशय्या पाहून कौसल्येला खूप दुःख झाले. ती म्हणाली, "सीता सती सुकुमार आहे, राम तर सुकुमारांमधे अत्यंत सुकुमार आहे. फुलांची शय्याही ज्यांना खुपते त्यांना तृणशय्या मिळाली. जे पवित्र राजान्नाचे सेवन करत त्यांना तीन रात्री उपवास घडला. कैकेयीने हे किती विचित्र केले. सखे, सावत्र दुःखी केले."

गुहक सर्वांना गंगापार करतो

सर्वजण एकमेकांशी गोष्टी करत असताना रात्र केव्हाच निघून गेली. सूर्योदय झाला. तेव्हा निषादपती गुहकाने आपल्या सहकारी निषादांना म्हटले, "भरताला गंगेच्या पैलतीराला नेण्यासाठी सत्वर नावा घेऊन या. घंटा, पताकांनी सजवून आणि मृदू नाजुक बैठका घालून नावा तयार करा. रथ, घोडे, हत्ती यांनी युक्त असा सर्वच्या सर्व

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

अध्याय तेरावा

भरताने गंगेत उतरून, स्नानसंध्या करून तर्पण केले, आणि वाद्ये वाजवून सेनेला इशारा देऊन सांगितले की, त्या दिवशीची वस्ती प्रयागस्थान येथे होईल. सैन्य पुढे निघाले तेव्हा रथ, गज, अश्व आणि वीरसमुदाय हे चालताना त्यांना धरणी पुरी पडत नव्हती. पुढे गेलेल्या दूतांनी गर्जून सांगितले की पुढे त्रिवेणी आहे. ती वार्ता ऐकून भरत लक्ष ठेवून त्रिवेणीजवळ गेला. त्रिवेणी पाहताच भरत आणि शत्रुघ्न यांनी साष्टांग दंडवत घातले. नंतर पादत्राणे काढून ते पायीच पुढे गेले. त्रिवेणीचा तीर पाहून वसिष्ठादी ऋषीश्वरही पायी चालत आणि मुखाने जयजयकार करत निघाले.

भरत आणि शत्रुघ्न यांनी स्नान केले. लक्षावधी गोदाने केली. तसेच तीर्थश्राद्ध, पिंडदान, पितृतर्पण हेही त्यांनी केले. तीर्थ, उपवास आणि मुंडन याचे राजाला बंधन नसते असे सज्ञान अशा श्रीगुरू वसिष्ठांनी सांगितले. तीर्थविधान तेवढे भरताला सांगून करविले. मागतील तेवढे धन देऊन याचकांचे मन शांत केले. तीर्थवासी ब्राह्मण, दीनजन यांना सुखी केले. भरताने द्रव्य वाटले त्यामुळे याचक कृतार्थ झाले. तीर्थस्थांना सुखी केले. या सर्वामागे श्रीराम आपल्याला भेटावा हीच भावना होती. तिथले स्थानिक द्विज भरताबरोबर आलेल्या द्विजांना सांगत होते की "जेव्हा श्रीराम या तीर्थाला आला होता. तेव्हा त्याच्यापाशी मूलतःच द्रव्य नव्हते, तो जटाधारी, वल्कले नेसलेला असा होता. परंतु त्याच्या मुखाकडे पाहून सर्वांना सुख झाले. त्यापुढे द्रव्य तुच्छ वाटले असे ते रामाचे अलौकिक सुख होते."

भरद्वाज - भरत भेट, गैरसमज

"श्रीरामाला भरद्वाजांनी सामोरे येऊन त्याला आपल्या आश्रमात नेले. कारण तेच त्या श्रीरामाचा महिमा जाणत होते. आम्हा मूर्खांना तो कळला

सेनाभार उतरेल असे करा." हे गुहकाचे सांगणे ऐकून भरत चकित झाला. नंतर निषादपती गुहक स्वतः नावा घेऊन आला आणि भरतापाशी येऊन म्हणाला, "आपण आरूढ व्हा." गुहक वसिष्ठांना साष्टांग लोटांगण घालून म्हणाला, "आपण भवसागर तारक आहात. स्वामी नावेत बसावे." वसिष्ठांनी त्या वेळी गुहकाला आत्मप्रीतीने आलिंगन दिले. ते म्हणाले, "आजचा आम्हाला पैलपार नेण्यासाठीचा तारक तूच आहेस." गुहक म्हणाला, "श्रीगुरुनाथ, तारक आहे तत्त्वतः आपली कृपा. आपण माझ्या मस्तकावर कृपाहस्त ठेवला म्हणजे मग मी सर्वांना तारून नेईन." गुहकाच्या बोलण्यातली आत्मखूण वसिष्ठांना समजली आणि ते हर्षाने टाळी वाजवून नावेजवळ आले.

गुहकाने वसिष्ठादी थोर महंतांना स्वतंत्र नाव दिली. वास्तविक ते परतंत्र नव्हतेच, ते भवसागर तारक होते. सुकुमार राजपत्न्यांना स्वतंत्र मोठी नाव दिली. त्या नावेत मृदू, सुखासन आंथरून त्यावर त्या सर्व राण्यांना बसविले. भरत, शत्रुघ्न हे नावेत चढल्यावर निशाण, भेरी, नाना वाद्ये वाजवून, जयजयकार करत नावा निघाल्या. त्वरेने सर्वांना परतीरावर नेऊन उतरविण्यात आले. भरताने गुहकाला विचारले, "सैन्याला कोणत्या मार्गाने पुढे न्यावे?" त्यावर गुहक म्हणाला, "मी वाटाड्यांना घेऊन तुमच्याबरोबर येतो." गुहक आनंदाने भरताबरोबर निघाला. बाह्य स्वार्थ सोडून श्रीरामाला डोळ्यांनी पाहावे हाच विचार त्याच्या मनात होता. मुमुक्षूंचे साधनांवर विशेष प्रेम असते, तसे गुहकाचे श्रीरामभक्तीवर होते. वाटाडे घेऊन अत्यंत निष्ठेने मार्ग शोधत तो निघाला. भरत आणि गुहकांचा विवाद संपून आता ते दोघे अनुतापाचा संवाद करू लागले होते.

https://archive.org/details/@sarayu_foundation_trust/ Bhavarth Ramayan, Luckshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

नाही. तीर्थी राहाणारे ब्राह्मण अत्यंत लोभी असतात. त्यांना वाटले हा वल्कलधारी श्रीरघुनाथ राजपुत्र आहे तेव्हा विपुल द्रव्य वाटेल. त्याच्या जवळ गुप्त धन असेल. श्रीरघुपती हा अत्यंत समर्थ असल्याने तो रिकाम्या हाती वनात येणार नाही. हा तीर्थक्षेत्रावर धन वाटेल, असे त्या द्रव्यलोभी ब्राह्मणांना वाटत होते. जिथे द्रव्यद्वाराचा अभिमान असतो, जिथे ज्ञानाचा गहन गर्व असतो, त्याला श्रीरामाचे महिमान स्वप्नातही समजणार नाही. आम्ही लोभाने जरी श्रीरामाचे मुख पाहिले तरी आम्हाला सुख झाले. परंतु आम्ही मूर्ख त्याचा महिमा जाणू शकलो नाही. श्रीराम हा सुखदायक आहे."

भरद्वाज ऋषींनी वाल्मिकींपाशी संपूर्ण ज्ञानकांडाचे श्रवण केले ते अत्यंत श्रद्धेने आणि सावधानतेने केले होते. जेव्हा श्रवणनिष्पत्ती होते तेव्हा सर्वांभूती श्रीराम दिसतो. यामुळे त्याची श्रीरामावर भक्ती जडते. त्या भरद्वाजांनी श्रीरामाला आश्रमात नेले. अशाप्रकारच्या तिथल्या ब्राह्मणांच्या कथा ऐकून भरताची अवस्था श्रीराम सर्वांना सुख देणारा असून मलाच अभाग्याला तो अंतरला अशी झाली. नंतर भरत वसिष्ठांना वंदन करून म्हणाला, "भरद्वाजांनी रघुनंदनाची पूजा केली आहे तेव्हा आपण त्यांचे दर्शन घेऊ." त्यावर वसिष्ठ म्हणाले, "धन्य तुझी वाणी, हेच माझ्याही मनात होते. भरद्वाज ऋषिशिरोमणी आहे. चला त्यांच्या भेटीला जाऊ." नंतर सैन्य गंगातीरावरच ठेवून भरत, वसिष्ठ आणि अन्य ऋषीश्वर भारद्वाजांच्या आश्रमामध्ये आले. भरद्वाजही तत्काळ पुढे आले.

भरद्वाजांना प्रथम रोष - मग आनंद

भरद्वाजांनी वसिष्ठांना साष्टांग नमन केले. वसिष्ठांनी आलिंगन दिले. दोघांनाही भेटीचे समाधान झाले. इतरही ऋषिजनांना भरद्वाजांनी वंदन केले. भरत आणि शत्रुघ्न यांनी भरद्वाजांना दंडवत घातले. भरद्वाजांनी त्या दोघांना हृदयाशी धरून, त्यांचे स्वागत केले. नंतर भरद्वाज भरताला म्हणाले, "सर्व सेना सज्ज करून रघुनाथाचा वध करण्यासाठी वनात जातो आहेस तो राज्यलोभानेच ना? निष्कंटक राज्य भोगायला मिळावे म्हणून तू रघुकुलटिळक रामाचा वध करू पाहतोस, म्हणजे तू पापकारी, अत्यंत मूर्ख आहेस. यामुळे तू दुःख पावशील. देव, दैत्य, दानव, यक्ष, राक्षस आणि मानव असे सर्व जरी एक झाले तरी तो राघव रणात जिंकला जाणार नाही. तो तू बालक कसा वध करू शकशील. श्रीरामाची क्रोध-भुवई रणात सर्व सृष्टी नष्ट करील. तिथे तुझी काय कथा. रुद्र संकटात राहू शकणार नाही. हे सारे श्रीरामाचेच सैन्य आहे. ते युद्ध करू शकणार नाही, करणार नाही. लक्ष्मण रागावला तर तुम्हा दोघांचेही प्राण घेईल. भरता माझे सांगणे ऐक. तू अयोध्येला परत जा. चौदा वर्षे राज्य करून मग श्रीरामाला शरण जा."

भरद्वाजांचे बोलणे भरताला वज्रासारखे तीक्ष्ण आणि हृदयभेदक, दारुण वाटले. भरताचा प्राण जाऊ पाहे अशी त्याची अवस्था झाली. भरत मूर्च्छेत गेला. नंतर तो सावध होऊन रडत त्यांना म्हणाला, "मला मरण का येत नाही. कैकेयीचा थोर राज्यलोभ मला जगात रामाचा वैरी ठरवून बसला. भरत वनामधे जाऊन रामाला मारील असे जग बोलू लागले. कैकेयी मातेने अनर्थ केला, त्यामुळे भरत वनात जाऊन श्रीरामाचा घात करील अशी माझी निंदा होते आहे. आपल्यासारखे साधुसंतही वनात जाऊन भरत श्रीरामाचा घात करील असे म्हणतात तेव्हाच माझा देहान्त का होत नाही. मी काय वज्राचा घडलो आहे की अपयशाची ओतीव मूर्ती आहे. दुर्धर दुःख भोगायलाच का मी जन्मलो आहे?. मी तर निंदेचा मेरूपर्वतच झालो आहे. मी अपयशाचे स्थान, अपकीर्तीचे अधिष्ठान झालो आहे. जळो माझे काळे तोंड. देहबंधनही तोडवत नाही. श्रीरामद्वेषी परम पापी, राज्यलोभी तो अत्यंत अधम, ऋषिवर्या, मला शाप देऊन

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized By Sarayu Foundation Trust and eGangotri

तत्काळ भस्म करा." असे बोलून भरताने भरद्वाजांचे पाय धरले. "स्वामींचा शाप हीच माझ्या पापाची समाप्ती होवो." हे बोलताना भरताचे डोळे गळू लागले आणि तो मूर्च्छित झाला. भरताचे रामावरचे प्रेम जाणवून भरद्वाजांनाही दुःख झाले.

भरताविषयीचा भरद्वाजांचा रोष गेला. त्यांचे सर्वांग रोमांचित झाले. प्रेमाने ते थरथरू लागले. "धन्य धन्य तू भरता, तुझे रामावरचे प्रेम अद्‌भुत आहे." असे म्हणून दोन्ही हातांनी भरताला उचलून त्यांनी त्याला प्रेमालिंगन दिले. "रामभक्ताच्या पायीची धूळही मी अहोरात्र वंदन करीन. श्रीरामावर ज्याची अनन्य प्रीती, गती आणि भक्ती तो माझा आत्मसखा आहे. श्रीरामाचे ज्याला अनन्य भावे भजन त्याचे आम्ही ध्यानपूजन करू. त्याच्यामुळे आम्हाला समाधान, हे माझे वचन सत्य आहे." भरत आणि भरद्वाज यांच्यात पूर्ण प्रेम निर्माण झालेले पाहून ऋषिगणांना हर्ष झाला. जयजयकार गर्जून त्यांनी आनंद व्यक्त केला. वसिष्ठांनाही पूर्ण सुख मिळाले.

वसिष्ठांची प्रशस्ती - भरद्वाज सुखी

श्रीवसिष्ठ स्वतः म्हणाले, "मी भरताला राज्य देत होतो पण त्याने माझे पाय धरून, निर्वाण शपथ वाहिली. तो त्यावेळी म्हणाला, रघुनाथाला टाळून भरताला जर राज्याभिषेक झाला तर मी माझ्या मातापित्यांचा, सद्‌गुरूंचा घात केला असे होईल. जी श्रीरामाची राजधानी ती माझी प्रेमळ माता आहे. मी जर अभिषिंचन करून ती नगरी भोगली तर मी निश्चयाने मातृगमनी झालो. अशी आण वाहून भरताने राज्य तर घेतले नाहीच; उलट तो वनात जायला निघाला. त्यामागचा हेतू ऐका. भरत रामाकडे जाऊन त्याला राज्य देऊन रघुपती पुन्हा अयोध्येत आणावा. अशा प्रेमभावाने तो वनात जातो आहे."

भरताची निर्वाण वाणी वसिष्ठांकडून ऐकल्यावर भरद्वाजांना अपार विस्मय आणि आनंद वाटला. त्यांनी हर्षभराने भरताला आलिंगन, मग वंदन, पुन्हा आलिंगन, पुन्हा वंदन असा प्रकार काही काळ केला. भरद्वाजांना भरताविषयी एवढे प्रेम वाटू लागले की, ते स्वतःलाच विसरले. वाल्मीकीगुरूंची अशी आज्ञाच आहे की, भगवद्‌भक्तांना प्रेमाने आलिंगन द्यावे. त्याने शरीर अतिशय पवित्र होते. जीवाशिवांना समाधान मिळते. अशामुळे भरतपूजनात अनन्य प्रीती वाटून त्याच्याविषयी भक्ती वाढली. वसिष्ठ पूजावा ब्रह्ममूर्ती म्हणून. असा भरद्वाजांच्या चित्तात उल्हास निर्माण झाला. वसिष्ठ केवळ पूर्ण ब्रह्मच. परम भाग्याने त्यांचे आगमन झाले. भरत हा थोर श्रीरामभक्त आहे. दोघांचे यथाशास्त्र पूजन करावे; असा भरद्वजांचा विचार ठरला.

भरद्वाजांचे निमंत्रण, स्वागत आणि भोजन

भरद्वाजांनी वसिष्ठांना नमन करून म्हटले, "आज माझे पूजन घ्यावे, माझ्या आश्रमात भोजन घ्यावे, ऋषिमंडळींसह यावे." वसिष्ठांसमवेत कोण कोण ऋषिवर्य आले होते, ज्यांचे नामस्मरण केल्याने महादोषांची समाप्ती होते. कश्यप, कात्यायन, वामदेव, जाबाली, मुद्‌गल, मार्कंडेय, महानुभाव गौतम ऋषी, हा सर्व ऋषिसमुदाय भरद्वाजांनी आमंत्रित केला. नंतर भरद्वाज भरताला म्हणाले, "तुम्ही सर्वांनी भोजनाला यावे" त्यावर "आम्ही दोघे ऋषींच्या पंक्तीला येऊ. आपण सर्वांना बोलावण्याचे काय कारण आहे." तेव्हा भरद्वाज म्हणाले, "भरता, जेवढे तुझे सैन्य आहे, अश्व, गज अवघे रामसेवक आहेत; त्यामुळे मला पूजनीय अवश्य वाटतात. त्या सर्वांना घेऊन या. समग्र सेना उतरायला माझ्या आश्रमात अवकाश आहे." अशी प्रेमाची आज्ञा देऊन भरद्वाज तयारीला लागले.

भरद्वाजांना एकदा वाटले की ऋषींचे पूजन आणि स्वागत करण्यासाठी कामधेनू मागून आणावी; पण लगेच त्यांच्या मनात विचार आला

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

की कामधेनू आली की जसे जमदग्नींकडे घडले तसे व्हायचे, कारण तिला पाहून राजांना अभिलाषा उत्पन्न व्हायची. तेव्हा मग भरद्वाज महामुनी अनुष्ठानाला बसले आणि त्यांनी स्वर्गच खाली आकर्षून आणला. घरे, चव्हाटे, पट्टशाळा, अश्वशाळा, गजशाळा, लोकांना बसायला विश्रामशाळा. अशा विशाल आणि विचित्र विभागांची योजना झाली. चित्रवन, नंदनवन, खांडववन तेथे आणले. त्यामुळे आश्रम एकाएकी शोभायमान झाला. राजे, ऋषीजन चकित झाले. भोजन व्यवस्थेत दुधाच्या, मधाच्या उपलब्धी, आम्ररसाच्या विहिरी, द्राक्षरसाच्या नद्या आणि दही-दुधाच्या नद्या ओसंडून वाहू लागल्या; नाना प्रकारच्या शिकरणी पुष्करिणीत भरल्या; साखरेचे पर्वत धरणीवर आले; स्वादिष्ट फळांची श्रेणी लागली.

चंपक, कल्पद्रुम, मांदार, पारिजातक आदींचे हार ऋषी आणि राजकुमार यांच्या पूजनासाठी होते. सुवासिक फुलांचे ढीग लागले होते. चंदन उगाळून शुद्ध केले, कनकाचे रांजण त्यांने भरले षड्रसांचे दिव्यान्न, विविध पक्वान्नांचे प्रकार सिद्ध झाले. अशी पूर्ण दिव्यान्ने सुवर्णाच्या ताटात वाढली. भिन्न भिन्न रसांच्या भरलेल्या वाट्या ठेवल्या. ज्यामुळे परमानंदाला मिठी पडावी अशा भाज्या आणि तऱ्हेतऱ्हेची छान लोणची वाढली. ठिकठिकाणी अत्यंत निर्मळ, सुवासिक आणि थंड पाणी वाढले जात होते. जे सेवन करताच तत्काळ सबाह्य सर्वजण शांत होत होते. अत्यंत सुंदर देवांगना पंखे हातात घेऊन मंद मंद वारा घालत होत्या. जेवणारे त्यांच्यावर भाळले. त्यांच्या तोंडाकडे पाहण्याने जेवणारे त्यांच्यासाठी वेडे झाले. त्या देवांगनांच्या मुखाची ठेवण पाहून आणि त्यांचा हावभावाचा विलास पाहून हातांतले घास हातांतच राहिले. तेव्हा त्या जेवणाला कावळ्यांचा स्पर्श झाला. त्यामुळे पुढचे भोजन अंतरले. शिवाय सचैल स्नान करणे भाग पडले. सकाम होते ते स्पष्टपणे फसलेच. नंतर ते तडफडू लागले. श्रीरामाचे भक्त अंगनांच्या मुखावर आसक्त झाले नाहीत. ते घासाघासाला रामाचे स्मरण करत राहिल्याने स्वानंदाने तृप्त झाले. प्रत्येक घासाला श्रीराम स्मरणारे होते, त्यांच्या भोजनात श्रीराम भोक्ता झाला आणि जेवणारे ते नित्यमुक्त झाले, हा श्रुतिसंमत असा शास्त्रार्थच आहे. अशी त्या भोजनाची स्थिती होती. सकाम हे निष्काम प्रयुक्तीने ज्या ज्या रसात आसक्ती होती तो तो रस सेवन करत होते.

वसिष्ठांच्या ताटात जे चोख प्रकार होते तसेच ताट रंक सेवन करत होते. उच्च नीच भेद तिथे नव्हता. सर्व सैन्याला समान तृप्तीचे भोजन मिळाले. काही मागावे लागत नव्हते, काही वाढावे लागत नव्हते. पात्राठायी वाढलेले अन्न संपतच नव्हते. जे जे आवडेल ज्याकारणाने ते ते गोडीने खावे. तेथे भूक हरपली, तहान तृप्त झाली. सर्व सैन्य समाधान पावले. कोणी अतृप्त राहिला नाही. अश्व, गज हे गवत खात नव्हते, त्यांनाही मिष्टान्न वाढले गेले. कोरडे झाले तर पाणी पाजले जात नव्हते. त्याऐवजी स्वादिष्ट खीरपान होत होते. कापडवाले, भाटे, व्यापारी लोक, वाणी, व्यवहारी, रजक, चांभार आदी सर्वजण तृप्त झाले. वसिष्ठ, भरत आणि शत्रुघ्न, तसेच ऋषींनी शुद्धाचमन केले. सभा प्रसन्नवदन होऊन बसली. सर्वांना संपूर्ण सुख मिळाले. टिळे, माळा, गंधाक्षता, विडे सर्वांना देऊन रामभक्तांना पूजेचा सन्मान देऊन भरद्वाज मनाने उल्हसित झाले.

पक्षांची सुरेल साथ आणि सर्वांची तृप्ती

वनश्री घमघमीत मनोहर परागांचा पूर उधळत होती. अती मधुर सामगायन भासावे तसे भ्रमर रुणझुणत होते. कोकिळा वेदवादांचे कूजन करत होत्या. पारवे वेदान्त घुमत होते. जसा उमापती तांडव नृत्य करतो तसा मयूरांचा नाच चालू होता. ब्रह्मज्ञानाची युक्ती फलाशा सोडून शुक बोलत होते. पिंगळे त्यांच्याशी सुसंवाद करत होते.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized By Sarayu Foundation Trust and eGangotri

सारिका संतुष्ट झाल्या होत्या. विवेकद्राक्षांचे घड पाहून डोळ्यांचे पारणे फिटत होते. गोडीत सर्वांत गोड असल्याने त्यांचे सेवन सुखाचा सुकाळ करी. हाहा-हूहू करत दोन गंधर्व मधुर स्वरात गाणी गात होते. रंभा, उर्वशी या विलासिनी रंगात येऊन नाचत होत्या. ज्यांचा प्रकाश सूर्यापुढे लोपत नव्हता असे तिथले निर्मळ रत्नदीप होते. ते आनंदाने उजळून चहूकडे लखलखीत प्रकाश पाडत होते. ज्या दिव्यांची जळजळ होऊन पुढे काजळी, माथ्यावर काजळी झाली होती ते मालवून चिद्‌रत्नांचे दीप उजळले गेले होते.

प्रत्येक पुरुषाला स्वतंत्र ओवरी, त्यात रत्नमंचक आणि प्रत्येक पुरुषाला पाच स्त्रिया सेवेसाठी होत्या. एक चरणक्षाळण, एक चरण चेपणे, एक चंदनाची उटी लावणे, एक दिव्य पंख्याचा वारा घालणे आणि एक विडे देणे अशी सेवा करत होत्या. अप्सरा पुरुषांना म्हणत होत्या, ''आम्ही अयोध्येला येणार नाही. आजची रात्र इथे काढून पुन्हा स्वर्गात जाऊ. येथे भरद्वाजांच्या ध्यानज्ञानामुळे आमचे आज आगमन झाले. दिवस उगवताच आम्हाला स्वर्गात जाणे आवश्यक असते. जवळ असूनही रामभक्त त्यांच्याबाबत उदास होते कारण भूती भगवंतच पाहात. स्त्री-पुरुष या भेदाचा त्यांच्या ठिकाणी अभाव होता. मुळात आत्मा आत्म्यात नाही, तेथे स्त्रीपुरुष भेद खोटाच ठरतो. स्त्री-पुरुष भेदाचा भास हा देहामुळे निर्माण होतो. पण हरिभक्तांना देहबुद्धीच नसते. विषयी पुरुष हे स्त्रीसह घरोघरी स्वर्ग भोगतात. भरद्वाजांनी अशाप्रकारे भरताची पूजा केली.

कोणी मलिन रहिवासात नाही, कोणी मलिन केसांचा नाही, कोणाची वस्त्रे मलिन नाहीत, सर्वांना स्वर्गाचा उल्हास मिळाला. अश्व, गज, गाढवे, उंट हे गवत खाणारे मिष्टान्ने भक्षण करत होते, असा भरद्वाजांनी चमत्कार केला. वाल्मीकींच्या रामायणात अनेक स्वर्गभोग लिहिले आहेत, परंतु तितका हा ग्रंथ न वाढवता संक्षेपाने अर्थ व्यक्त केला आहे. भरद्वाजांचे श्रेष्ठ ज्ञान असे की, क्षणैक ध्यान धरून स्वतःच्या घरी स्वर्गभोग आकर्षून सर्वांचे पूजन केले. राव आणि रंक यांचे भरद्वाजांनी समसमान पूजन केले. भरत, शत्रुघ्न आणि सर्व लोक विस्मयाने आणि आश्चर्याने थक्क झाले. स्वर्गात केवळ अमृतपान असते, स्वर्गात देवांना अन्न मिळत नाही; पण भरद्वाजांनी अमृतासह मिष्टान्न भोजन दिले. कामधेनू आणली नाही, स्वतःचे संचित धनही खर्च केले नाही, क्षणभर ध्यान धरून स्वर्गच आकर्षून आणला. अशी ऋषिवर्यांची बोलणी चालू होती. भरत, शत्रुघ्न चकित झाले. संवाद करता करता रात्र संपून सूर्योदयाची वेळ होत आली.

भरद्वाजांचा निरोप घेऊन चित्रकूटाकडे

भरताने भरद्वाजांना विनवले, ''स्वामींनी आम्हाला आज्ञा द्यावी. श्रीरामाच्या भेटीला आता आम्ही निघतो.'' असे म्हणून भरताने त्यांचे पाय धरले. भरद्वाजांनी अत्यंत आनंदाने भरताला प्रेमालिंगन दिले आणि 'चित्रकूटावर तुला रघुनाथ निश्चित भेटेल' असे सांगितले. भरद्वाजांच्या या सांगण्याची भरताने शकुनगाठ बांधली, चरण कपाळी घेऊन त्यांना वंदन केले. भरद्वाजांनी भरताची पाठ थोपटली.

भरद्वाजांनी वसिष्ठादी सर्व ऋषिगणांना साष्टांग नमन केले. वसिष्ठांचे चरण वंदन केले. ''वसिष्ठांचे पाय म्हणजे स्वर्गाला भिडलेले पवित्र शासन, आपल्या चरणांच्या प्रभावानेच मला भरताचे पूजन घडले.'' यावर वसिष्ठांनी भरद्वाजांना म्हटले, ''निगर्वी असेल त्याच्यापाशी सर्व सिद्धी असतात. तुम्ही निगर्वीपणे वागता म्हणून तिन्ही लोकी वंद्य आहात.'' भरद्वाजांचे अनुमोदन घेऊन सर्व ऋषी निघाले. भरताने त्यांना रथात बसविले. आपली सेना सिद्ध केली; सर्व मातांना शिबिकेत बसविले; मगच ते दोघे बंधू रथात बसले. वाजंत्री वाजू लागली, गर्जना झाली आणि ते

https://archive.org/details/@sarayu_foundation / Bhavana Lakshmi academy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

सर्वजण निघाले. यमुनातीर उतरून गिरिवर चित्रकूटापाशी ते पोहोचले. सर्वांनी हर्षाने श्रीरामाचा जयजयकार केला. चित्रकूट पर्वत पाहून भरत आनंदित झाला. आता रघुनाथ भेटेल या जाणिवेने शत्रुघ्नही उल्हसित झाला. भरताला रामदर्शनाने होणारे सुख कोण वर्णन करू शकेल. त्यांची भेट म्हणजे परब्रह्माला पडलेली मिठीच !

अध्याय चवदावा

श्रीराम चित्रकूटावर राहून सीतेसमवेत नित्य वेदात सांगितल्याप्रमाणे आणि श्रद्धापूर्वक अग्निहोत्र चालवत होता. सौमित्र हा रामाच्या सेवेत तत्पर राहून पर्णशाळा आणि अग्निहोत्र यांचे अहोरात्र रक्षण करत होता.

राम - लक्ष्मणांचा जीवनक्रम

श्रीरामाच्या सेवेत लक्ष्मण मग्न होता. निरनिराळी फळे आणणे, नित्याच्या वापरासाठी पाणी पुरवणे, लाकूडफाटा आणून अग्नी सोज्वळ आणि प्रबळ राहील याची दक्षता घेणे. श्रीराम आणि सीता यांचे चरणक्षाळण नित्यनेमाने करणे, सीता आणि राम म्हणजे लक्ष्मी आणि नारायणच आहेत, या पूज्य भावनेने त्यांची पूजा करणे, असे लक्ष्मणाचे कार्य सेवाभावाने चालले होते. श्रीराम विधिविधान जाणत होता. पौर्णिमेचा मासिक होम करणे, त्यासाठी मृगमांस मिळवणे अशी होमासाठीची खटपट सौमित्र नेमधर्माने करत होता. तो श्रीरामाची सेवा करताना शरीराची तिळभर पर्वा करत नव्हता. धनुष्यबाण घेऊन होमासाठी मृग मारून आणत होता. धन्य त्या मृगांचे जीवित की ज्यांचे मांस श्रीराम स्वतः होम करत होता. ज्यांची फळे राम स्वतः सेवन करत होता ते वृक्ष त्याच्यामुळे नित्यमुक्त होत. समिधा, दर्भ, दर्भासन यासाठी रामाने वापरलेले तृण उद्धरले गेले. रामाच्या पदस्पर्शाने पाषाणही नित्यमुक्त होत होते. निर्मळ अशा पाण्याने स्नान करताना त्यांतील मासे, मगरी यांचा रामाकडून उद्धार होत होता. वनवासी रामचंद्राने वनातली वनचरे उद्धरली. जगाचे उद्धरण करण्यासाठी श्रीरामाचे वनात येणे घडले. ज्यांना श्रीरामाचे दर्शन घडले ते सर्व उद्धरले.

श्रीरामाला डोळ्यांनी पाहण्यासाठी भाग्याच्या कोटी हव्यात. धन्य धन्य ते ज्यांना श्रीरामाची भेट झाली. श्रीरामकथा नित्य सावधपणे जो श्रवण करील तो धन्य होईल. निर्लोभपणे श्रीरामकथेचे जो पठण करील तो जडमूढही पावन होईल. ज्याच्या मुखात रामनाम त्याचा जन्म धन्य होतो. जे भक्तिभावाने रामनाम नित्य स्मरतात त्यांचा श्रीरामाकडून उद्धार होतो. असा श्रीराममहिमा गहन आहे. जो महिमा सांगताना वेदांनाही मौन पडते, तो महिमा मी दीन काय सांगणार. असो आता कथानुसंधान ऐका. श्रीरामाचे अग्निहोत्र चालविण्यासाठी तत्परतेने लक्ष्मण मृग मारून आणत असे. पौर्णिमा, अमावस्या यांचे याग असतील तेव्हा श्रीराम मृग मारत असे. एकदा त्याने मृगांचे यागासाठी विभाग केले असताना त्या मांसाच्या तुकड्यांसाठी कावळे तेथे जमले. लक्ष्मण फळे आणण्यासाठी बाहेर गेला होता म्हणून रामाने सीतेला पक्ष्यांचे निवारण करायला सांगितले. सीता तत्परतेने बाहेर येऊन कावळ्यांना निवारू लागली.

काकवेषात गंधर्व - सीतेवरचा प्रसंग

सीता कावळ्यांचे निवारण करत बसली असताना सुदसुव गंधर्वाने तिला पाहिले. ती सुकुमार, सुंदर, राजकुमारी पाहून गंधर्वाच्या मनात तिची अभिलाषा निर्माण झाली. त्याने लगेच कावळ्याचे रूप धारण केले आणि इतर कावळ्यांबरोबर सीतेच्या जवळ आला. सीतेने स्वतः कावळ्यांना हाकलले तेव्हा इतर कावळे दूर पळाले. तो कामासक्त गंधर्वकाक पुढे पुढेच झेपावत आला. सीतेने त्या धटिंगणाला जरा रागाने हाकलण्याचा प्रयत्न केला त्यावेळी तिच्या चोळीचे बिरडे सुटले. अंगावरून पदर ढळला. तेव्हा त्या कावळ्याला तिचे

https://archive.org/details/@sarayu_foundation_trust_lucknow
Bhavani Vedic Trust, Lakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

वक्ष दिसले. मुक्तकुच सुंदर दिसत होते, कुचांवर हार रुळत होता. ते पाहून कामाचारी काकरूपी गंधर्व तिच्या वक्षाकडे झेपावला. पंखांनी सीतेला झडपून त्याने तिच्या कुचांवर नखांनी ओरबाडले. चोचीने तिच्या मुखाचे चुंबन घेतले. त्याने जानकीला कासावीस केले. त्या कावळ्याच्या पंखांची झडप लागून सीता आक्रंदून जमिनीवर पडली. तो अधर्मी कामासक्त कावळा मग निवांत तिच्या छातीवर येऊन बसला. सीतेने हातांनी त्याला दूर लोटण्याचा प्रयत्न केला असता त्याने तिच्या हातावर चोचीने आघात केले. सीता ओरडून हाका मारू लागली.

सीतेची ओरडून मारलेली हाक ऐकून श्रीराम त्वरेने बाहेर आला. त्याने तो दुष्ट कावळा पाहिला आणि हातातली दर्भाची काडी कावळ्याकडे फेकली. ती दर्भाची काडी इषीकामंत्राने मंत्रून रामाने पाठविली असल्याने त्या कावळ्याच्या पाठीमागे लागली. ती दर्भकाडी सूर्यासारखी धगधगीत होती. तो काक वेगाने पळू लागला तरी ती इषीका त्याची पाठ सोडत नव्हती. तिन्ही लोकांत त्या कावळ्याने परिभ्रमण केले तरी इषीकेने त्याचा लाग सोडला नाही. श्रीरामाची इषीका पाहून इंद्राने सिंहासन सोडले, तिथे त्या कावळ्याचे रक्षण कोण करणार? तो पळत पळत देवांपाशी आला.

इंद्र, कुबेर, वरुण धाकाने पळू लागले. यमही चळचळ कापू लागला. श्रीरामाची इषीका पाहून कुलाचल कंपायमान झाले. इषीका पाहून चतुरानन ब्रह्मदेवाने वंदन केले. शिव आणि भवानी यांनी लोटांगण घातले. कावळा ज्या ज्या ठिकाणी जाई तिथे लागलीच इषीका पोहोचत असे. तो काक तिन्ही लोकांत हिंडून आला पण त्याला राहायला ठिकाण मिळेना. अखेर धाकाने तो कावळा पाताळात शिरला. तिथले दैत्य-दानव चळचळा कापू लागले. श्रीराम-इषीका आपलीही होळी करील या भीतीने त्यांनी तत्काळ कावळ्याला हाकलले. आतापर्यंत दशदिशा हिंडून तो काक कासावीस झाला होता. त्याला कोठेच आश्रय मिळत नव्हता. तेवढ्यात त्याला नारदमुनी दिसले. त्याने त्यांचे पाय धरून विनंती केली, "अहो देवऋषी, ही इषीका निवारा." नारदांनी सांगितले, "तू श्रीरामाला शरण जा. तो शरणागतांना मारत नाही." नारदांच्या सांगण्याप्रमाणे कावळ्याने चित्रकूटावर पुनरागमन केले. "श्रीरामा, मी तुझ्या पायी शरण आलो आहे. माझे प्राण वाचव." असे मनुष्यवाणीने बोलून कावळ्याने रामाला वंदन केले. तेजस्वी इषीका पाहून सीतेला आश्चर्य वाटले. काक पुन्हा म्हणाला, "वा रघुनाथा, माझ्याकडून घोर अपराध झाला आहे. मी तुला सर्वथा शरण आलो आहे. आता मला मारू नको राघवा. नारदसद्गुरूंनी सांगितल्यावरून मी तुला शरण आलो आहे. शरणागताचे रक्षण कर. माझे मरण तूच निवार. मरणाच्या भयाने पळून पळून मी पूर्ण शिणलो आहे. हे रघुनाथा, त्या थोर सद्गुरूंनी माझ्या मस्तकावर हात ठेवला म्हणून आता मी तुला शरण आलो आहे."

काक म्हणाला, "नारदमुनींनी माझ्या कानात सांगितले की जानकी माता ही जगज्जननी आहे. तिची मी कामभावनेने अभिलाषा धरली. त्यामुळे मी मातृगमनी महादोषी ठरलो आहे. महापापे ज्याच्या शिरावर असतात तोही श्रीरामाच्या स्मरणाने पापमुक्त होऊन तत्त्वतः श्रेष्ठ वैकुंठाला जातो. राम या दोन अक्षरांसाठी कोट्यवधी पातके जळतात. तो मनुष्य मग वैकुंठाचा अधिकारी बनून ब्रह्मदेवाच्या बरोबरीने तिथे वसतो. श्रीरामनामाचा प्रताप असा की आकल्प पापेही नाहीशी होतात. माझे पाप हे तर अल्प आहे. श्रीराममुळे मी निष्पाप होईन. श्रीरामनाम मुखाने स्मरण केले की कलियुगातली पातके नष्ट होतात. तो श्रीरामच मी समक्ष पाहात असल्याने मला पापाची भीती नाही. श्रीराममूर्ती ध्यानात आणली की सर्व पापे नाहीशी होतात. श्रीराम डोळ्यांनी पाहिला की मला त्रिभुवनात पाप लागणार नाही." एवढे बोलून रामाच्या चरणांना

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

वंदन करून, त्या काकाने सीतेपुढे लोटांगण घालून म्हटले, "माझ्यावर तुझी पूर्ण कृपा असू दे. स्तनाग्राला हात लावण्याची बालकाची सत्ताच असते. मी तुझे ज्येष्ठ अपत्य आहे असे जानकी तू निश्चित समज. एक कुच हातात धरून, दुसरे मुखात घालते अशी बालकाची प्रसिद्धी आहे. मी तुझ्याबाबतीत तेच केले. पतीला कुचसत्ता एकांतात, बालकाची लोकांदेखत कुचसत्ता चालते, तेच मी केले, हे तू निश्चित समज. पतीला कुचसत्ता केवळ मध्यरात्री, बालकाची सत्ता अहोरात्र असते, जानकी मी तुझ्याबावतीत जे केले ते याच भावनेने केले. पत्नी रजस्वला झाली तर तिला पतीने सर्वथा स्पर्शही करू नये, पण बालक मात्र तेथेही झोंबी घेते. बालक करकचून स्तनपान करते, मीही तसेच करकचून तुझे स्तनपान केले जानकीमाते. गाईचा गोरा गाईवर उडतो तरी त्या गोमातेला राग येत नाही, ती म्हणते तान्हे बालक वेडे आहे; तसेच हे माते माझ्याकडे तू पाहावेस. तू तर चराचराची जननी आहेस, आम्ही अपत्ये पशूसमान आहो, तेव्हा मनात राग धरू नको. प्रिय माताच आहेस तू आम्हाला."

सीतेकडून क्षमा, रामाकडून शासन, शाप

कावळ्याचे पश्चात्तापाचे बोलणे ऐकून सीता कळवळली. तिने श्रीरामाला त्या काकावर कृपा करून, त्याचे प्राण रक्षण करण्याची विनंती केली. त्यावर श्रीरामाने म्हटले, "तुझ्या सांगण्याप्रमाणे मी याच्यावर निर्वाण केले. ते आता निवारले जाणार नाही. अशी अडकाठी आहे जानकी." तेव्हा सीतेने म्हटले, "हे स्वामी रघुनाथा, आपण शरणागताला मारू नये असे असताना याचा घात कसा करणार, याचे रक्षणच करावे. हे रघुनाथा, शरणागताचे सर्वशक्तीने, सर्वसत्तेने रक्षण करावे असे तुमचे ब्रीदच आहे. तर आता याचा वध कसा करता येईल. इषीका अनिवार्य हे खरे, पण तरीही हा काक शरणागत रक्षावा. तरच व्रत सत्य ठरेल आणि प्रताप यथार्थ होईल." जिने कावळ्याला मारा म्हटले, तीच त्याला वाचवा म्हणते असे कौतुक करून पुन्हा श्रीराम स्वतः कर्मापासून अलिप्त राहिला. कावळ्याचा वृत्तान्त आणि सीतेचे मनोगत रघुनाथाने ऐकले. मग त्याने आपले विचार स्पष्ट केले.

सीतेने सांगितलेला अभिप्राय लक्षात घेऊन. श्रीरामाने त्या कावळ्याला म्हटले, "भिऊ नकोस. तुझे जीवित वाचविण्यासाठी मी एक हितोपदेश तुला सांगतो. इषीका निश्चितपणे अनिवार्य आहे. तिने तुझा प्राणान्त करायचा होता. पण तू शरणागत झालास त्यामुळे अजून तिष्ठत राहिला आहेस. इषीका दारुण अनिवार्य आहे तेव्हा प्राण वाचवण्यासाठी एकांग आपणहून दिलेस तर त्यामुळे निवारण होऊ शकेल. तुझ्या हितासाठी मी स्वतःच तुला सांगतो की आपले एकांग क्षीण करून जीवित वाचव." यावर काक म्हणाला, "श्रीरामा, तुझी आज्ञा मी शिरसावंद्य मानतो. माझे एकांग सुखाने घे. पण इषीकाघात चुकव." श्रीरामाने विचारले, "तू कोणते अंग देतोस? ते दिलेस की इषीकेपासून तुझे निश्चयाने रक्षण करीन." तेव्हा काकाने सांगितले, "उजव्या डोळ्याने मी जानकीमाता पाहिली पण डाव्याने मी तिची अभिलाषा धरली. तेव्हा तत्त्वतः वामनेत्रात इषीका त्याच्या माथ्यात घालून त्याला तू दंडावे." हे काकाचे बोलणे ऐकून इषीका वामनयनात प्रवेशली. काक मूर्च्छित होऊन धरणीवर कोसळला. श्रीरामाने त्याला लगेच सावध केले. त्या वेळी त्या कावळ्याला आपला डावा डोळा गेला आहे याचे ज्ञान नव्हते. आपण अंगहीन झालो याचेही त्याला भान नव्हते. मागे पाहिल्यावर त्या काकाला इषीका दिसली नाही. तेव्हा त्याने रामाला आनंदाने वंदन केले. "माझ्या मरणदुःखाचे निवारण झाले." असे तो कृतज्ञभावनेने म्हणाला. अद्यापही काकदेही हे नवल आहे की ते जराजर्जरित होत नाही, क्षयही होत नाही. श्वापदांनी धरले किंवा घाव लागला तरच कावळ्याला मृत्यू येतो अन्यथा नाही.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized By Sarayu Trust and eGangotri

अशाप्रकारे श्रीरामाने त्या कावळ्याचा मृत्यू टाळला याचे सगळ्यांना मोठे आश्चर्य वाटले. त्यांनी श्रीरामाचा कृपाळूपणा अनुभवला. जो तो म्हणे 'काक काणा आहे' याचे त्या काकाला दुःख झाले. "जग माझी निंदा करते. श्रीरामामुळे मी काणा झालो. कृपेने पूर्ण वाचवले पण त्या कृपेला काणेपण आले." असे त्या कावळ्याने म्हणताच श्रीराम हसून म्हणाला, "काय झाले? मी याच्या उजव्या बुबुळाला सामर्थ्य देतो. एकच बुबुळ दोन्ही डोळ्यांना. तुझी दृष्टी आणि कला वाढेल. सर्वांत श्रेष्ठ दृष्टीचा होशील" अशा रीतीने कृपेतून आलेले काणेपण रामाने निवारले. कावळ्याच्या दृष्टीचे श्रेष्ठपण सर्वजण स्वतःच मानू लागले. दहाव्या दिवसाच्या पिंडाला केवळ कावळाच पाहू शकतो. जो पापराशी असेल त्याच्या पिंडाला शिवत नाही. श्रीरामाच्या कृपेनेच पापपुण्याची दृष्टी कावळ्याला पूर्णपणे प्राप्त झाली. दहाव्याच्या दिवशी पिंडाच्या चिन्हाने सर्व जग ते पाहतेच आहे.

रामाने त्या कावळ्याला विशेष दृष्टी दिली, पापपुण्याची ओळख पटणारी दृष्टीही दिली. अशाप्रकारे रघुनंदनाने कावळ्याचे मरण दाचविले. समाधानी सुखी केला. परंतु त्याने चोचीने सीतेचे चुंबन घेतले होते त्या मुखाने तो नरक खाऊ लागला. एवढे शासन केल्यावर काकाला शरण आणून श्रीरामाने सीतेलाही सुखी केले. कृपेने काकाला वाचवून महादोषीला सुखी केले. हे सारे होत असताना श्रीरामाच्या भेटीसाठी उत्सुक झालेला भरत गजभारासह जवळ येत राहिला होता.

अध्याय पंधरावा

भरत चित्रकूटाच्या आसमंतात येऊन पोहोचला. तो चित्रकूट पर्वत पाहून फार आनंदित झाला. आता श्रीरघुनाथ दिसेल या कल्पनेने सर्वांना अद्‌भुत उल्हास वाटला. भरताची सेना मनोहर रीतीने शृंगारलेली होती. वीरांनी नाना प्रकारचे शृंगार केले होते. गर्जना करणारा गजभार घेऊन भरत त्वरेने चालला होता. कोयते, कातिया, कुऱ्हाडे पुढे राहून वन छाटत मार्ग मोकळा करत होते. मातीकाम करणारे जमीन सारखी करत होते. त्यामुळे गज, रथ, घोडे चालवायला सोपे जात होते. अश्व-गजांचा कडकडाट, रथांचा घडघडाट, सैन्य चालता वाट पुरत नव्हती, धुळीने अवकाश वैकुंठापर्यंत व्यापले होते. चरणधूळ अशी उधळली की लोकलोकांतर सोडून स्पष्टपणे वैकुंठाला पोचावे असा निश्चयच जणू त्या रजाचा झाला होता. हत्ती गंभीर गर्जना देत होते. घोडे एका सुरात खिंकाळत होते. वाद्यांचा अपार ध्वनी चालू होता. गंभीर वाणीने वीरांच्या गर्जना चालू होत्या. निशाण, भेरी, ढोल, ढमके, वाजंत्री बुरंगे, घोरे, तडक एकदम फुटत होते. सारी गिरिकंदरे दुमदुमून गेली होती.

सैन्याचा संपूर्ण वनावर परिणाम

भरताच्या सैन्याने निर्माण केलेला थोर नाद राम-लक्ष्मणापर्यंत गेला होता. गिरिकंदरे दुमदुमली, क्रूर श्वापदे गजबजली, आवाज गगनात मावेना, त्या नादाने पृथ्वी कंपायमान झाली. श्वापदे जीव घेऊन पळू लागली. पक्षी त्रासून कलकलाट करू लागले. वाघांनी जाळी सोडून पळ काढला. वराह महाबिळात दडले, साप सरळ वारुळात प्रवेशले आणि त्यांनी पाताळात दडी मारली. तरस, तगर, मृग, मुंगसे धाकाने आपोआप पळाली. जलातले मासे खळबळले, प्राणीमात्र आक्रोशाने धुगधुगू लागले. धाकाची दणदण ऐकून अस्वले गुणगुण विसरली. तीही जीव घेऊन पळाली. त्यांनी गुहा आणि अरण्य यांचा त्याग केला. नरवानर घाबरून पळाले, वनगजांचे भार पळू लागले. सिंहाला एवढा थोर धाक बसला की हत्ती मारण्याचे तो विसरला. रानम्हैसे, रानगाई ही आक्रोश करत पळू लागली, त्यांची वासरे हंबरडे फोडू लागली.

त्या रानातली घरे थरथरू लागली, वटवाघळे ढोलीत शिरली, वृक्ष समूळ उन्मळून पडले त्यामुळे

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

वाघळे भयाने आरोळ्या देऊ लागली. द्विजवरांचे शिष्य धाकाने चळचळा कापू लागले. कोणी धोत्रे ओली केली, कोणाचे अधोवात सरले, अत्यंत धाक वाटल्याने कोणाचे दात खटखटू लागले, एकाचे धाकाने पोट फुगले, एकाचा कंठ कोरडा पडला. ब्राह्मण शांतिपाठ म्हणू लागले. पण ते चित्तात धीर धरू शकत नव्हते. श्रीरामाला सोडून ते सगळे गुहांमधे पळून गेले. विद्याधर, किन्नर हे दिशा ओलांडून पलीकडे गेले. कारण ते नादाने त्रासले, तसेच वनातले वनचरही पळाले. नादाच्या धाकाने भिल्ल पळून रामाकडे आले आणि सांगू लागले. "अत्यंत वेगाने सीतेला दूर न्या. वनावर परचक्र आले आहे. जानकी सुंदरी पाहून क्षणामध्ये हरण करून किंवा नेतील. तेव्हा तुम्ही आर्धा हिला हाती धरून गिरिकंदरात प्रवेश करा. तुम्ही अवघे दोघे आहात. धनुष्यबाण जरी आहेत तरी असा किती पराक्रम कराल. सैन्य तर दारुण आले आहे.

लक्ष्मणाला सैन्य कोणाचे शोधण्यास आज्ञा

श्रीरामाने लक्ष्मणाला म्हटले, "सौमित्रा, कोणत्या राजाची ही सेना गर्जना करत आली आहे तेवढे जाणून घेऊन मला सांग. हे चतुरा सुमित्रानंदना, तू राजचिन्हे जाणतोस तेव्हा नीट पाहून मला सांग. या वनात वाल्मीकींच्या आश्रमात राजे त्यांना भेटण्यासाठी येतात; किंवा शिकारीसाठीही येतात, तेव्हा मनात काय ते ठरवून मला सांग." रामाचे सांगणे ऐकून, रामचरणांना वंदन करून लक्ष्मण त्वरेने सेना पाहण्यासाठी बाहेर पडला. तो राजचिन्हांचे लक्षपूर्वक निरीक्षण करू लागला. तेव्हा त्याला सेनेच्या ध्वजावर दशरथाचीच चिन्हे दिसली. त्याबरोबर ती सर्व राघवसेना आहे हे समजले. त्याच्या मनात विचार आला की, 'ही राघवसेना घेऊन, भरत रघुनाथाच्या वधासाठी ससैन्य आला आहे. किती हा राज्यलोभाचा स्वार्थ या भरताला! आमचा प्रियबंधू आणि आमचा आप्त असा हा भरत वैरभावनेने पेटून रघुनाथाला मारायला आला. प्रथम श्रीरामावर प्रेम दाखवे, डोळ्यात अश्रू, अंगावर रोमांच त्यावेळी येत आणि आता तोच रामाला मारायला अधमपणे स्वतः वनात आला आहे.'

लक्ष्मणाची युद्धसज्जता

'श्रीरामाचा मी अनन्य भक्त जिवंत असताना तो कसा रघुनाथाला मारील. मी सैन्यासह भरताला निपटीन. सारी धरणी धडे आणि मुंडकी यांनी भरून टाकीन. भरत आणि शत्रुघ्न यांना क्षणार्धात मारीन. श्रीरामाचा आत्मघातकी असा बंधू मी मारला तर पातकी होणार नाही तिन्ही लोकांत यश मिरवीन.' असा लक्ष्मणाने मनाशी निश्चय केला, रागाने धनुष्यावर प्रत्यंचा चढविली आणि एक प्रचंड आरोळी देऊन, लक्ष्मण त्या सैन्यासमोर निर्वाणबाण सज्ज करून उभा राहिला. त्याच्या गर्जनेने गरिकंदरे दुमदुमली, मेरुशिखरे डळमळली, धरणी कंपित झाली. आधीच तो शेषाचा अवतार, त्यातून रामविरहाने संतापलेला, त्यामुळे त्याच्या डोळ्यांतून दुर्धर ज्वाळा निघू लागल्या, ते पाहून सुरनर कापू लागले.

सौमित्राला सन्मुख उभा ठाकलेला पाहून सैनिक कासावीस होऊन एकमेकांत बोलू लागले, "हाही आमचा स्वामीच आहे. जसे भरत आणि शत्रुघ्न तसेच राम आणि लक्ष्मण. येथे कोणाशी झुंजणार. हे मोठेच संकट ओढवले. पुढे ज्याच्याशी झुंजायचे तो तर आमचा स्वामी आणि मागे पळावे तर ते वीरत्वाचे उणेपण. सौमित्राने तर धनुष्यबाण सज्ज केले आहे. आता आपण काय करायचे? श्रीरामाची भेट तर्शाच राहिली आणि मधेच हे युद्ध ओढवले. संग्रामाची गोष्ट संपली आता शस्त्रे पोटात घालावी. पुढे झुंजायचे म्हणजे स्वामीशी ताटातूट आणि संग्रामात पाठ दाखवायची नाही ही तर क्षात्रधर्माची मोठी अट. तेव्हा शस्त्रे पोटात घालावी हेच ठीक. यापेक्षा अधिक वेगळा विचार करवत नाही. विचाराची गती खुंटली, श्रीराम काही

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

दृष्टीला पडत नाही, क्षात्रधर्माचा प्रतिबंधही मोडवत नाही म्हणून शस्त्रे पोटात घालावी.''

इकडे सौमित्राचा सिंहनाद ऐकून श्रीरामही तयार झाला; दारुण युद्ध मांडले असावे म्हणून सक्रोध चालला. श्रीरामाने जेव्हा निरखून पाहिले तेव्हा त्याला तिथे दशरथसेना दिसली. मग त्याने लक्ष्मणाला सांगितले, ''अरे लक्ष्मणा, आपल्यात युद्ध कसे? आमची सेना, आमचे प्रधान, आमचे बंधू भरत आणि शत्रुघ्न. तुला युद्ध करायला काय कारण घडले? निर्वाणबाण का घेतला आहेस?'' त्यावर लक्ष्मणाने म्हटले, ''रघुनंदना, अरे संपूर्ण सेनेला बोलावून, सिद्धता करून हा भरत आपल्या दोघांना मारण्यासाठी वनात आला आहे. माझ्या रुक्मपुच्छ असलेल्या बाणांनी मी वीरांच्या श्रेणी मारीन. भरत आणि शत्रुघ्न रणात पाडीन. रक्ताने धरणीला न्हाऊ घालीन. जो श्रीरामाला संताप देतो तो बंधू मारला तर काही पाप नाही. श्रीरामाच्या कार्यासाठी मी सिद्ध आहे. पाहा माझा रणरंगातला प्रताप. मी तुझा अनन्य सेवक आहे. मी जवळ जिता जिवंत असताना भरत तुला कसा मारील? मी सर्वांचा घात करीन.'' असे सांगून लक्ष्मण युद्धकंदन करायला निघाला. तेव्हा श्रीरामाने धावून जाऊन त्याला धरले. राम त्याला म्हणाला, ''अरे, आपण असे करू नये. त्यांच्यापैकी पुढे युद्धासाठी कोण आले आहे? त्यांनी बाण सोडलेला नाही, तोवर आपण दारुणयुद्ध करू नये.''

श्रीराम लक्ष्मणाला समजावतो - सापिंड्य सांगणे

श्रीराम म्हणाला, ''लक्ष्मणा, अरे तुला झाले आहे तरी काय? तू कसले भय सांगून बोलतोस? भरत आमचे तान्हुले, सैन्य आले ते आमचेच, येथे परका आहे कोण? तू कोणाचा प्राण घेऊ पाहतो आहेस? युद्ध करीन म्हणतोस हे क्रोधाने आलेले मूर्खपण आहे. भरत आमच्याशी पूर्वीपासून कधी स्वप्नातही विरुद्ध बोलला नाही, तो वनात येऊन वध करील ही तुझी मिथ्या बोलणारी वाणी आहे. इथे काय धरतोस धनुष्यबाण, ढालखड्ग कोणावर धरतो आहेस? भरत माझा जीवप्राण आहे; त्याच्यावर निर्वाण करू नकोस. सैन्य आमच्या अंकित आहे, त्याचा तू घात करू नयेस. क्रोध सोडून शांत हो. माझे सांगणे ऐक. भरत आम्हाला वधील हा तुझ्या मनातला भयसंकोच आहे. भरताकडून आपल्या विरुद्ध कृती जागृतीत किंवा स्वप्नातही घडणार नाही. लक्ष्मणा, तुला काही गोष्टींचे ज्ञान नाही म्हणून क्रोधायमान होतो आहेस. तेव्हा मी आता तुला मूळची खूण सांगतो ती सावधानतेने ऐक.''

''एकाच पिंडाचे नित्योद्‌भूत असे भरत आणि मी राम आहोत. भरताचा तू घात केलास तर मलाही अनर्थ होईल. आम्हा दोघांचा एक प्राण, त्यामुळे विरुद्ध वचन भरताला आपण बोलू नये. ही माझी शिकवण मानावी. तू भरताला जे विरुद्ध बोलशील ते माझ्या शिरावर चढेल. हे तत्त्वतः जाणून विरुद्ध वार्ता न बोलावी हे योग्य. याच कारणाने सज्ञान लोक प्राणिमात्रांच्या ठिकाणी भगवंत पाहतात. विरुद्ध वचन बोलत नाहीत. त्यांना त्यामुळे समाधान मिळते. आणखीही एक चिन्ह आहे. आम्हा चौघांचा प्राण एक आहे. तेही लक्षण सांगतो. ऐक.''

''राजा दशरथांनी पुत्रकामेष्टी याग केला. ऋष्यशृंग हा तेथे होता. त्या वेळी यज्ञपुरुषाने एक पायसयुक्त ताट निश्चित दिले. त्याचे चार भाग केले होते. एका पिंडाचे आम्ही दोघे. सापत्नभागाचा विभाग. आम्हा दोघांत विकल्प नाही. प्रथम पायसाचे तीन भाग केले होते. परंतु कैकेयीचा भाग घारीने नेला. मग दोन भागांचे चार भाग केले. ते आम्ही चौघे एका पिंडाचे. पाचवा भाग जो घारीने नेला त्याने ती शापमुक्त झाली. तिला अंजनीचा जन्म प्राप्त झाला. भाग तिच्या उदरात होताच. त्या भागाचा जाण निश्चित हनुमंत जन्मला. यासाठी त्याला अंजनीसुत म्हणतात. तो वायुसुतही आहे. अंजनीच्या उदरात संपूर्ण भाग गेला होता. यज्ञपुरुष

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

आपण स्वतःच प्रविष्ट झाला त्याचा तो प्राण वायुनंदन याद्दष्टीने आहे. अर्ध्या भागांनी आम्हाला जन्म प्राप्त, सगळ्या भागाचा हनुमंत; यामुळेच तो बळात अद्‌भुत आणि तिन्ही लोकांत पराक्रमी आहे. हा एक पिंडाचा पाचवा का हे सौमित्रा तुला ठाऊक असावे कारण हा पाचवा सखा पुढे भेटेल. हनुमंत आपला साह्यकारी आहे. पिंडभागांचे हे गुह्य ज्ञान ते मी श्रीरामच केवळ जाणतो. वेदशास्त्रालाही त्याचा प्रतिबंध आहे. यासाठी मी ते कथन केले."

श्रीरामाने केलेले निवेदन ऐकून लक्ष्मण आश्चर्यचकित झाला. तो म्हणाला, "आम्हा चौघांचा एक प्राण, भरत, शत्रुघ्न भिन्न नव्हेत?" असे विचारताना लक्ष्मण लज्जायमान झाला. त्याने म्हटले, "अती दारुण युद्धक्रोध धरला हे माझे मूर्खपण होते." अशाप्रकारे लज्जायमान झाल्यावर त्याने धनुष्याची दोरी उतरविली. श्रीरामाच्या चरणांना वंदन करून लक्ष्मण शांत झाला. तो आपणच आपल्या ठिकाणी विचार करत राहिला. "केवढे माझे मूर्खपण. भरत शत्रुघ्न आमचा प्राण आणि त्यांच्याशी मी रण का करावे. धन्य धन्य श्रीरामाचे ज्ञान. तो भूत, भविष्य, वर्तमान सर्वच जाणतो. त्याने माझे अज्ञान दूर करून मला पूर्ण समाधान दिले." नंतर तो विरुद्ध कर्माचे दुःख करीत, क्रोध संपूर्ण सोडून, श्रीरामाच्या पाठीशी अधोमुख उभा राहिला.

सैन्यात आनंद, भरताची भेटीची उत्कंठा

श्रीरामाने लक्ष्मणाला परावृत्त केल्याचे पाहून सेनेत खरोखर आनंद पसरला आणि अवघ्यांनी रामाचा जयजयकार केला. सर्व सैन्य हर्षनिर्भर झाले. आम्ही रण केले नसते, मागेही परतलो नसतो. सौमित्राचे बाण सहन करून क्षात्रधर्माने प्राणत्याग केला असता. हा अनर्थ चुकवायला श्रीरामच समर्थ. तो स्वधर्म रक्षण करतो. दीनांवर कृपा करतो. युद्धाने स्वामीद्रोह, मागे पळता क्षात्रधर्माच्या अनर्थाने नरकपात हे सर्व श्रीरामाने चुकविले. रामनामाचे स्मरण करताच प्राप्त अनर्थाचे निर्दाळण होते. तो श्रीराम आज आम्ही पाहिला त्यामुळे आम्हाला आता जन्ममरण नाही." असे ते सैनिक बोलत होते. श्रीरामाची स्तुती करून सारे त्या कृपावंताचे दर्शन घेतल्याचा आनंद व्यक्त करत होते. भरत भेटण्यासाठी वनात आला त्यामुळे सीतेच्या मनाला हर्ष झाला. तसेच अयोध्येची सेना पाहूनही तिला चौपट आनंद झाला. भरत येथे भेटून श्रीरामाला अयोध्येला नेईल. स्वराज्य रघुनाथाला मिळेल असा तिच्या मनातला भावार्थ होता.

श्रीराम आल्याचे सेनेच्या जयजयकाराने आणि वार्ता समजल्याने भरताने सेना आणि सर्व लोक जागेवरच राहवून, रथातून उतरून, अनवाणी पायाने धाव घेतली. कृपणाला धनासाठी, दुष्काळात सापडलेल्याला मिष्टान्नासाठी जशी उत्कंठा वाटते तशी भरताला श्रीरामदर्शनासाठी उत्कंठा वाटत होती. चकोराला जसे चंद्रकिरण, पाण्यासाठी जसा मासा तसे रामचंद्र पाहण्यासाठी भरताचे मन झाले होते. आपले बाळ चुकले तर मातेला जशी भेटीची तळमळ लागून राहते, तशीच तळमळ श्रीराम तत्काळ भेटावा म्हणून भरताला लागली होती. अनेक दिवसांनी पती आल्यावर पतिव्रता जशी त्याला आल्हादाने भेटते. तसा रघुनाथाला भेटण्यासाठी भरताच्या चित्ताला उल्हास वाटत होता. वानरांना चणे आवडतात, ते जसे एकत्र करून वानर गालात भरतात, तसेच संपूर्ण प्रेमाने धावत जाऊन रामाला भेटेन असा भरताचा विचार होता. सोलीव केळे पाहून वानर तत्काळ उडी घेते तसा आनंदकल्लोळ भरताला आला. जीवासह प्राण जातो तसा भरतासह शत्रुघ्न रघुनंदनाला भेटण्यासाठी उत्सुक झाला होता. दोघांचीही मने उत्कंठापूर्ण होती. साखरेबरोबर जसे गोडपण, फुलाबरोबर पूर्ण सुगंध, तसा भरताबरोबर शत्रुघ्न हा रघुनंदन पाहण्यासाठी; उदकासह शीतपण, चंद्रासह प्रभा पूर्ण त्याप्रमाणे भरतासह शत्रुघ्न

https://archive.org/details/muLukshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

रामाला पाहण्यासाठी उत्सुकतेने निघाला.

सर्व भेटतात - भावनांचा स्फोट

श्रीराम, सीता आणि सौमित्र यांना भरताने पाहिले. तेव्हा त्याच्या चित्तात उल्हास मावत नव्हता. प्रेमावस्था आवरत नव्हती. त्याने धावून दृढ चरण धरले. लोटांगणही घातले. डोळ्यांतून अश्रुधारा ओघळू लागल्या; शत्रुघ्नही प्रेमाने पायी लागला. त्या दोघांचे डोळे गळत होते, श्रीरामाचे डोळेही पाझरत होते. तिघांचे आलिंगन पडले आणि जणू त्रिवेणी पूर्ण झाली. श्रीराम स्वतः गंगाजीवन, भरत यमुना अती पावन, सरस्वती तो शत्रुघ्न, अशी त्रिवेणी पूर्ण झाली. संगमात त्रिवेणीरूप दिसते. पुढे निष्पाप गंगोदक, भरत-शत्रुघ्न निर्विकल्प होऊन तेव्हाच रामरूप झाले. मीठ आणि पाणी यांची भेट झाली, तशी राम- भरताची आलिंगन भेटीची मिठी पडली. नंतर विरघळून ते एकमेकांच्या पोटात प्रवेशले. ऐक्य संतोषाने सुखावले. अग्नी आणि कर्पूर यांचे आलिंगन म्हणजे देदीप्यमान होऊन प्रेमाची परमावधी दाखवतात. दोन्ही एकदमच हरपतात आणि निर्विकार अवस्थेत जातात; त्याप्रमाणे भरत आणि शत्रुघ्न श्रीरामाला आलिंगन देताच त्यांना दोनपण आठवेना, ते परिपूर्ण रामरूप झाले. अग्नीला लाकडे मिठी घालतात तेव्हा ती स्वतःच अग्निरूप होतात. भरत-शत्रुघ्न यांची स्थिती तशीच झाली. ते स्वतःच श्रीराम झाले. त्यांचे आलिंगन पाहून सीता आणि लक्ष्मण यांना ऐक्याने त्यांचे आलिंगन पडले त्यामुळे भिन्नपण दिसेना. भरत आणि शत्रुघ्न यांनी लक्ष्मणाला वंदन केले. ऐक्याने आलिंगन पडले, भिन्नपण दिसेना. एक पिंडी जन्मले; त्यांची आलिंगन-भेटीने मिठी पडली, दुःख विसरून सुखसंतुष्ट झाले ते श्रीरामामुळे. रघुकुलटिलक जवळ असला की पूर्वीची हयगय स्वाभाविक ठरते. तसे वियोग-संगमाचे सुख वाटून द्वंद्वदुःख विसरले गेले. नित्य निकट असले की स्वभावतः हयगय उपजते; त्याबरोबर दोष-गुण सहजच पूर्णतः पाहिले जातात.

चंदनवृक्षासभोवतीचे सर्व आरीबोरीचे वृक्ष चंदन होतात. त्यांना द्विज देवाच्या माथ्यावर घालून वंदन करतात. श्रीमंत मोठी रक्कम देऊन ते विकत घेतात. येवढा चंदनाच्या ठायी अतिशय थोर प्रेमभाव असतो. द्वीपोद्वीपी त्याचा अगाध महिमा पोहोचलेला असतो; परंतु वनचर स्त्रिया अत्यंत अज्ञान, त्या कोळसा करून अधर्म करतात. मलय पर्वतावर मुख्यत्वे चंदन आहे, तेथील अज्ञानी वनवासी स्त्रिया, चंदन जाळून अग्नी चेतवतात आणि त्यावर स्वयंपाक करतात. त्यांना निकटच्या सुगंधाचा कंटाळा येऊन त्या सुवासाची हेळसांड करतात, आपला विषय साधण्यासाठी चंदन जाळतात. चंदनाचा गुण कसा आहे तर जाळणारालाही सुगंध देणे. तो त्या वनचर स्त्रियांच्या मनाला जाणवत नाही त्यामुळे त्या लाकूड म्हणून चंदन जाळून त्यावर अन्न शिजवतात.

साधूपाशी कोणी एक असतात. साधूचे गुण पाहून ते दुर्लक्ष करतात. मग आपल्या विषयाच्या स्वार्थासाठी वर्म तेवढे स्पर्शू पाहतात. अहोरात्र साधूच्या संगतीत राहूनही जे साधूचा दोष पाहात नाहीत ते त्रिजगतात धन्य होतात आणि शिव, इंद्र इत्यादी देवही त्यांना वंदन करतात. साधूच्या संगतीत अहर्निश असूनही जे गुणदोष पाहात नाहीत, त्यांच्याकडे अवतारी पुरुषही उपदेश घेण्यासाठी स्वतः येतात. अवतारमूर्ती श्रीवामनाला कश्यपांनी ज्ञान उपदेशिले, असे त्या साधूचे अगाध महिमान होते. ते तिन्ही लोकांत सज्जन आणि पूज्य ठरले. श्रीरामायणातही श्रीराम वसिष्ठांकडून नम्रपणे उपदेश घेत आहे. साधू, संत अत्यंत पूज्य आहेत. गुणदोषांची हयगय करू जाताना, साधूचा वियोग झाला तर त्याचा पश्चात्ताप दोषाचे निरसन करतो. पुढे स्वानंद भेटतो.

श्रीरामाला सोडून भरत आजोळी गेला, पण वियोगाचा त्याला पश्चात्ताप झाल्याने पुढे श्रीराम

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

भेटताच त्याला तत्काळ सुखाची प्राप्ती झाली. वियोगानंतरचा जो संयोग तो पापभंग करणारा' आणि सुखभोग देणारा असतो. त्यामुळे भरत संपूर्णपणे सुखी झाला. त्याचे सर्वांग शांत झाले. शत्रुघ्नाचेही तसेच झाले. श्रीराम, भरत आणि शत्रुघ्न यांचे ऐक्य पडले; ते आलिंगनाने मारलेल्या मिठीत सुखसंपन्न झाले. श्रीराम हा स्वानंदघन असल्याचे त्यांनी अनुभवले. प्रकाशासाठी अनेक दीप लावले जातात पण सर्व दीपांमधे तोच एक प्रकाश असतो. भरत, शत्रुघ्न अशाच रीतीने अभिन्न स्थितीत भिन्न झाले होते. भरत, शत्रुघ्न आणि अन्य जन यांना श्रीरामाच्या भेटीने जे सुख झाले ते शब्दांत सांगता येणार नाही.

अध्याय सोळावा

श्रीरामाने अत्यंत प्रेमाने भरत आणि शत्रुघ्न यांना हृदयाशी धरून आलिंगन दिले. यामुळे ते दोघे सुखसंपन्न झाले. हृदयांची मिळणी झाली, सुखाचे भरते आले, दुःख निःशेष संपले, स्वानंदाने सागर भरले. परमानंदाने गाढ तृप्ती होते, द्वंद्वदुःखाने देशोधडीला लागणे होते. हर्षाच्या कोटी निर्माण झाल्या. श्रीराम जोडला गेला. नंतर रघुनंदनाने भरताच्या मस्तकाचे अवघ्राण केले. त्याला मांडीवर बसवून विचारपूस करताना रामाने म्हटले, "तुला राज्याभिषेक न होण्याचे काय कारण? त्यात कोणते विघ्न आले ते मला सविस्तर सांग. दशरथ आपला पिता, तो स्वस्थचित्त आणि सुखी आहे ना? मी वनवासासाठी निघालो तेव्हा त्याने स्वतःची फार वाईट अवस्था करून घेतली. मी वनात आलो त्यावेळी तू तिथे नव्हतास. त्यामुळे जळावेगळी मासोळी तळमळते तसेच मला झाले होते. राजांना होणारे अपार दुःख पाहून, मी तातडीने निघालो. त्यांची भेटही घेतली नाही की त्यांच्याशी बोललोही नाही. अशा दुःखग्रस्त राजांना सोडून तू इकडे वनात आलास हे तुझे करणे योग्य नाही. या अनुचित कृतीने तू बुद्धिवंत ठरणार नाहीस. दुःखाने व्यापलेल्या राजांना सोडून, एवढा दूरवरचा पंथ आक्रमून, तुम्ही दोघे का आलात त्याचेही कारण मला सांगा. तुम्ही दोघे एकएका वेगळे न होता, दोघेही वनात का आलात? तुझे राज्याभिषिंचन का राहिले तेही मला सांग. माझी, तुझी सखी माता या सुखी, स्वस्थ आहेत ना? सुमित्रा पतिव्रता सुखरूप आहे ना? स्वामी वसिष्ठ तिथे असताना तुम्ही इथे का आलात? हा सारा वृत्तान्त मला इत्थंभूत सांगा."

शत्रुघ्नाकडून वार्ताकथन

श्रीरामाने असे प्रश्न विचारल्यावर भरताला रडू कोसळले. तो काही न बोलता सरळ मूर्च्छापन्न झाला. तेव्हा शत्रुघ्नाने अयोध्येतली दुःखावस्था सांगायला आरंभ केला. तो म्हणाला, "आम्ही अयोध्येत नसताना, तू वनवासास गेलास यामुळे राजांना प्राणान्त व्यथा झाली. सुमंताने रिकामा रथ आणलेला पाहून त्यांना अत्यंत दुःख झाले. श्रीरामा, तुझी वार्ता विचारत, ऐकत असतानाच ते मूर्च्छा येऊन धरणीवर कोसळले. 'श्रीरामाशी बोलणे झाले नाही, त्याची भेटही झाली नाही, त्याला डोळ्यांनी पाहिला नाही' असे म्हणत आणि कंठातून राम राम असा शब्द करतच ते मूर्च्छित होऊन धरणीवर पडले. त्या मूर्च्छेतही ते मधूनच बोलत, 'श्रीरामा मला तुझे मुख दाखव' असे म्हणत होते. अशाप्रकारे श्रीराम, श्रीराम असे स्मरण करतच त्यांनी प्राण सोडला. राम नयनी, राम वदनी, राम मनी, राम ध्यानी, असे श्रीरामाचे अनुसंधान ठेवूनच त्यांनी देहत्याग केला. आम्ही जवळ नसताना, तू वनप्रयाण केलेस आणि रामस्मरण करत करत राजांनी प्राण सोडला." हे निवेदन करता करताच शत्रुघ्न दुःखाने मूर्च्छित झाला. श्रीरामही पित्याचे मरण ऐकून मूर्च्छापन्न झाला. सीता दुःखाने रडू लागली. लक्ष्मण दुःखाने मूर्च्छित झाला. चौघेही बंधू अत्यंत दुःख करू लागले.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

श्रीरामाच्या डोळ्यांतून अश्रू गळून पडल्याने दशरथाच्या आत्म्याला सुखस्वानंद झाला. श्रीरामाला सुखावबोध तर दशरथाला परमांनद मिळाला. श्रीराम सुखरूप, स्वतंत्र, करुणारूप असल्याने त्याचे पितर उद्धरले. सुखसागर श्रीरामामुळे दशरथ सत्यतः सुखी केला. श्रीराम सावध झाला तेव्हा भरत, शत्रुघ्न त्याला म्हणाले, "आम्ही राजांची उत्तरक्रिया केली आहे. तू आता स्नान, पिंडदान कर. तू आता सत्वर स्नान कर आणि पिंडदान, तिलांजली अर्पण, सपिंडी करून सर्व कर्म पूर्ण करावेस. दशरथांना तुझी विशेष आवड होती. तुझ्या हाताने पिंड दिले तर त्यांना सुख मिळेल." श्रीरामाने रुदन करताच सर्व शाश्वत पितर सुखसंपन्न झाले हे गुह्यज्ञान इतरांना कळलेच नाही.

दशरथाची उत्तरक्रिया

श्रीरामाचे गुह्यज्ञान कर्मवादी, सज्ञान अशांना कळले नाही. त्यांनी रामालाच कर्मविधान सांगितले. स्नान, पिंडदान करायला रामाला सांगितले. अगाध ज्ञानी रघुपती, तो कर्माने ब्रह्माची प्रतीती घेण्यासाठी, जी वेदोक्त कर्मक्रिया ती ब्रह्मस्थिती प्रतिपाळी. कर्मात ब्रह्म आणि ब्रह्मात कर्म असे म्हणणारे मूर्ख असतात. कर्म हेच निखिल परब्रह्म हे वर्म केवळ श्रीरामच जाणत होता. श्रीरामाने कर्मात कर्मगती, कर्मात ब्रह्मस्थिती, कर्मात नित्यमुक्ती हे जाणले कारण तो स्वतः निश्चित परब्रह्म होता. असा स्वतः श्रीराम ब्रह्ममूर्ती, तोही वेदोक्त स्वधर्म पाळत होता. दशरथनिधनाची वार्ता ऐकताच तो मंदाकिनीवर स्नानार्थ आला. श्रीराम लक्ष्मण आणि सीता यांच्यासह, शत्रुघ्न, आणि भरत असे सर्व दशरथक्षयविधानाच्या पूर्णतेसाठी सर्वांसह स्नानासाठी आले. वसिष्ठ अत्यंत ज्ञानी, त्यांनी कौसल्या, सुमित्रा इत्यादी श्रीरामाच्या माता तेथे आणल्या. त्यांच्याकडून दुःखस्नान करविले. त्यांनी रघुनाथाला पाहून दीर्घ स्वरात रडायला आरंभ केला. दुःखाने तेथील सर्वजण पूर्ण दुःखात बुडाले.

श्रीरामाने कौसल्येला नमन केले, तिने रामाला हृदयाशी धरले. तिच्या डोळ्यांतून अश्रूंच्या धारा वाहू लागल्या. मातेच्या प्रेमाचे संपूर्ण दर्शन रामाला घडले. नंतर सुमित्रेच्या चरणांवर माथा ठेवला, तेव्हा तिनेही रघुनाथाला हृदयाशी धरले. रामाने सर्वच मातांना वंदन केले. लक्ष्मणाने कौसल्येला नमन केल्यावर तिने त्यालाही जवळ घेऊन म्हटले, "सौमित्रा, मी केसांनी तुझे पाय झाडीन, तू श्रीरामाचे नीट संरक्षण कर. स्वतःची माता, सुंदर कांता यांना सोडून तू रघुनाथाच्या रक्षणासाठी वनात आलास. खरोखर मी तुझी सर्वथा दासी आहे. श्रीरामाला स्वादिष्ट फळे अर्पण करतोस, मस्तकावर जळही वाहून आणतोस, काष्ठे पुरवतोस, मी तुझी केवळ दासी आहे." लक्ष्मण त्यावर म्हणाला, "अगं माते, मी तर तुझा पोसलेला पुत्र आहे. श्रीरघुनाथाने मला उद्धरले आहे." असे म्हणून त्याने पुन्हा कौसल्येच्या चरणांना वंदन केले. नंतर लक्ष्मणाने सुमित्रेला वंदन केले. तिने आपल्या पुत्राला हृदयाशी धरून म्हटले, "तू उभय पितरांना उद्धरलेस. कारण तुझ्याकडून श्रीरामाची सेवा घडते आहे." यानंतर लक्ष्मणाने अन्य सर्व मातांना वंदन केले.

कौसल्येने सीतेला आलिंगन दिले आणि सांगितले," तू खरी पतिव्रता आहेस बाई." सीतेने तिला लोटांगण घातले. सुमित्रेचेही चरण वंदिले तेव्हा सुमित्रेनेही तिला आलिंगन दिले. त्या साऱ्याच नंतर आक्रंदून रडू लागल्या. श्रीरामाला जवळ घेतल्यामुळे त्या माता दुःख विसरल्या. वल्कले नेसलेला आणि जटाबंधन केलेला श्रीराम पाहून तटस्थ राहून विस्मित दृष्टीने त्याला पाहात राहिल्या. श्रीरामाचे मुख पाहून त्यांचे सर्व दुःख विसरले गेले आणि त्या परम सुखी झाल्या. श्रीराम सुखदायक झाला. वसिष्ठ म्हणाले, "रघुनंदना शीघ्र स्नान करून दशरथाला पिंडदान द्यावे. ज्येष्ठविधान हे पितृप्रिय आहे." हे ऐकून श्रीरामासह चौघे बंधू,

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

त्यांच्या सर्व माता, सीतेला बरोबर घेऊन स्नानास गेल्या आणि दशरथाच्या उद्धारार्थ त्यांनी मनोमन प्रार्थना केली.

श्रीराम जेव्हा पिंडदान करू लागला तेव्हा भरताने स्वतः तीळ, तांदूळ, जव हे सर्व साहित्य आणले. परंतु रामाने ते घेतले नाही. तो म्हणाला, "मी अन्न सेवन करत नाही. केवळ वनफळांचे भक्षण करतो. त्या फळांचेच पिंडदान मी पितरांसाठी करीन. मला वनवासाचे दृढ व्रत आहे, अन्नाला मी हाताने स्पर्श करत नाही. इंगुदी, पुन्नाग हे अत्यंत पवित्र असतात, तेच पिंड पितरांसाठी देईन. ज्या काळी पुरुषाला जे जे अन्न असते, त्यानेच देवतांची पूजा करावी. त्यानेच पितरांना पिंडदान करावे, असे वेदोक्त श्रुतिवचन आहे." यावर सौमित्राने इंगुदीफळे मर्दून दिली आणि सीतेने पिंड वळले. श्रीरामाने पिंडदान केले. दर्भास्तरण दक्षिणेकडे टोक करून घातले. अरण्यतील आणून अवध्यांनी तिलांजली वाहिली. काळ्या तिळांनी तर्पण केले. सर्व काही त्या काळी अपूर्व झाले. 'आब्रह्मादीभुवन, सर्व ऋषी, पितृ, मानव' असे रामाने उच्चारताच तेथे अपूर्व घडले. श्रीरामाने पिंड देताच गयागदाधर हात पुढे करू लागला, आब्रह्मादी कुळ समस्त रघुनाथामुळे नित्यतृप्त झाले. "तू तिळोदक देताच आब्रह्मभुवनीचे लोक तेही नित्यमुक्त झाले. सर्व परम सुख पावले." असे बोलून गदाधर अदृश्य झाला. वसिष्ठांनी जयजयकार केला. श्रीरामाने पितर तारले.

श्रीराम स्वतः आत्माराम, त्याचे कर्म ते परब्रह्म, जो त्याचे नाव उच्चारतो तो विश्रामधाम पावतो. श्रीरामनाम मुखाने जप करत राहिले तर चार पुरूषार्थ पायी लागतात, चारी मुक्ती आंदण येतात, एवढी रामनामाची ख्याती आहे.

अध्याय सतरावा

श्रीरामाने पितरांना उद्धरले त्यामुळे ते गगनातून रामाचा जयजयकार करत होते. सुरवर जगदुद्धारक श्रीरामावर पुष्पवृष्टी करत होते. मग सर्वजण मार्गस्थ झाले त्या वेळी त्यांना रामाचे वास्तव्य असलेल्या पर्णशाळा दिसल्या. जानकीने स्वतःहून सांगितले की, "ह्या विशाल आणि मनोहर पर्णशाला सौमित्राने रचल्या आहेत." त्या पाहून माता म्हणाल्या, "धन्य जीवित त्या सौमित्राचे. त्याच्यामुळेच श्रीराम आणि सीता तत्त्वतः सुखाने वनात राहात आहेत. याची सेवा खरोखर पराकोटीची आहे. श्रीरामाला याने जणू आपला प्राणच अर्पण केला आहे. मस्तकावरून पाणी आणतो, काष्ठे आणतो, श्रीराम-सीतेचे चरणक्षाळण करतो, स्वादिष्ट फळे पुरवतो, स्वतः नित्य नेमस्त राहून अहर्निश जागरण करतो. श्रीरघुनाथाला वनात राहात असताना मातापिता, राज्योपभोग यांचा विसर पाडणारा तोच आहे. हाच रघुनाथाला सुख देणारा आहे." अशी लक्ष्मणाची स्थिती ऐकून, संपूर्ण आश्रम पाहून, सर्व आनंदित झाले. आश्रमाला पर्णशाळा शोभा देत होत्या, सडे, चौक, रंगमाळा, वृंदावने, सुमनशाळा यांनी आश्रम सजलेला पाहून सर्वांना सुख झाले. वसिष्ठांनी लक्ष्मणाला आलिंगन देऊन म्हटले, "धन्य लक्ष्मणा तुझी भक्ती आणि रामाविषयीचा सद्भाव." लक्ष्णाने वसिष्ठांचे चरणवंदन केले आणि तो त्यांना म्हणाला, "आपल्यामुळे तीर्थे पावन होतात. श्रीरामाचे आपण अनन्य आहात. आपली कृपा अत्यंत समर्थ आहे. आपल्या कृपेनेच आम्ही श्रीरघुनाथ जोडला आहे." हे ऐकून वसिष्ठ स्वानंदात डुलत, आश्रमात बसले.

प्रधानादींची भेट - भरताची विनंती

प्रधान, सेनानी आणि सेनासंभार जयजयकार करून श्रीरामाला भेटण्यासाठी सत्वर पुढे आले. अश्व, गज यांचा कडकडाट, रथांचा घडघडाट,

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized By Sarayu Foundation Trust and eGangotri

करत सेना पुढे निघाली. त्यांना वसिष्ठ आणि श्रीराम यांना वंदन करायचे होते. श्रीरामाचे मुख पाहून एकएक सुखी झाले. अयोध्येचे सर्व लोक परम सुखी झाले. श्रीराम दृष्टीला पडताच हर्ष पोटात मावेना, आनंद ओसंडून आला. त्या वेळी श्रीरामाने स्वतः उठून प्रधानादी सगळ्या लोकांना, अगदी गोरक्षकांपर्यंत सर्वांना प्रेमाने आलिंगन दिले. श्रीरामाच्या विरहदुःखाने व्याकुळ झालेले आणि वनात आलेले सर्वजण रामाने सुखी केले. श्रीराम सर्वांच्या हृदयात स्थित होता, सर्वांचे हृदय व्यापून होता. श्रीरामाचा निवास असलेला आश्रमही सर्वांनी पाहिला आणि त्यांना समाधान झाले. सर्वांनी श्रीरामाला वंदन केल्यावर सभा तटस्थ झाली. वनागमनातील मूळ कृतकार्याविषयी कोणालाही बोलायचे सामर्थ्य नव्हते. तेव्हा भरत उठून उभा राहिला आणि रामाला वंदन करून म्हणाला, "हे रघुनाथा, आता आपण अयोध्येला चला. राज्यभार स्वतःच्या शिरी घेऊन आम्हा सर्वांचा प्रतिपाळ करा. आम्ही त्वरेने येथे येण्यामागे माझे हेच मनोगत होते. रघुनाथा, तू सर्वज्ञ आहेस. तुला खरे आणि खोटे सगळे समजतेच."

श्रीरामाचा नकार - भरताचा आग्रही युक्तिवाद

भरताचे बोलणे ऐकून श्रीराम हसला आणि म्हणाला, "अरे, दशरथांनी आपल्याला कार्य नेमून दिले आहे. आता ते जरी नसले तरी आपण त्यांचा वचनार्थ पाळला पाहिजे. तुला अयोध्येचा राज्याभिषेक आणि मला वनप्रयाण त्यांनीच नेमले होते. पितृवचन हे परम प्रमाण असते, त्याविरुद्ध कोण काय करू शकतो. जिवंतपणी पित्याची आज्ञा पाळली तर मरणानंतर त्यांची अवज्ञा करू नये. तेव्हा हे सर्वज्ञा, भरता, तू पित्याची आज्ञा पाळ. वेदवचन, गुरुवचन आणि पितृवचन जो पाळत नाही त्याचे अधःपतन होते, आपण तसे करू नये. पित्याची आज्ञा शिरसावंद्य मानून, भरता तू राज्याचा अंगिकार कर. तुला मी आताच अभिषेक करतो. आग्रह सर्वथा करू नकोस. माझ्या हातून तुला राज्याभिषेक व्हावा यासाठी तू वनात आलास हे सत्य आहे ना सर्वज्ञा भरता."

श्रीरामाचे बोलणे ऐकून भरताला प्राण जावा असे वाटू लागले. "राज्य नव्हे हे महाविघ्न माझ्यावर ओढवले आहे. मी वनामधे यायला निघालो तर जो तो मला म्हणू लागला की रघुनाथाला मारायला जातो आहे. आता शेवटी श्रीरामही मलाच भोवू लागला. राज्य आल्याचे सुख जो मानी तो महामूर्ख, राज्यलोभाचे महाविष ते कैकेयीने मला दिले पाहा. श्रीरामसेवेतली सुखसंतुष्टी सोडून राज्यलोभाची जे दृष्टी ठेवतात ते अभागी म्हणूनच सृष्टीत जन्मले. ते दुःखकोटीच भोगणार. भरत रघुनाथाला मारायला जातो आहे अशी जगात निंदा झाली ती निंद्यता मी भोगली. आता वनवासात शरणार्थी म्हणून आलो तर तू म्हणतोस अभिषेकासाठी आलो. तुझ्या हातून जो अभिषेकाची इच्छा करतो तो अनामिक अंत्यजापेक्षा अंत्यज एक आहे, तो महापापी आत्मघातक आहे. रघुनाथा, तुझ्यावाचून राज्याभिषेक ज्याच्या शिरावर तो महापापीच. तत्त्वतः हे सर्वथा सत्य आहे."

"शिवाय वृद्धपरंपरा राज्यपट हा मुख्यतः वरिष्ठाला राज्याभिषेकाने मिळतो. तो राज्यपट कनिष्ठाला कसा लाभेल, याचा हे रामा, गंभीरपणे विचार कर. जो भार हत्तीला शोभतो, तो भार शेळीवर टाकला तर ती मरेल, त्याप्रमाणे तुझ्या राज्यावर मला अभिषेक झाला तर तो माझा प्राणान्त ठरेल. माझा जर तुला घातच करायचा असेल तर आताच या भरताला अभिषेक करावा. निदान तुझ्या समक्ष माझा प्राणान्त झाला तर मी परम मुक्त होईन. असे झालेच तर मला दशरथमहाराज भेटतील आणि मी त्यांना हा वृत्तान्त सांगेन आणि म्हणेन, अभिषेकाने मला मृत्यू आला आहे."

"श्रीरामा, तू स्वतःच सांगतोस की

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

राज्याभिषेकाविषयीचे पितृवचन असून ते मी प्रमाण मानत नाही. तर त्याचेही लक्षण सांगतो, ऐक. तुला वनवास आणि मला राज्यपद असे श्रीदशरथांनी वाटे केले त्या वेळी मीही जवळ नव्हतो. मी ते ऐकलेलेही नाही. जे मी पाहिले नाही, ऐकले नाही ते मला राज्य नको आहे. तू म्हणशील प्रेमाने दिले होते तर तेही खोटे मिथ्या ठरते. मला मायेने राज्य दिले म्हणालास तर ती मायाही मिथ्याच रे रघुराया. मी खरोखर तुझ्या पायाला शिवून सांगतो माया म्हणजे खोट्या कृतकार्याला मी करणार नाही. त्या मायेचा 'माय आणि माया यांचा श्लेष' कृतकार्यार्थ काय नर श्रीराम वनात धाडला, दशरथांचा जीव घेतला आणि भरताला दुःखी केला. मायेची करणी अशीच असते. एका पिंडाच्या बंधूंमध्ये वैर येते, सून आणि पुत्र यांना उघडे करून सरळ वनात पाठविले. मायेमधे आत्यंतिक निष्ठुरता असते. श्रीरघुनाथाला दुःख दिले, सीता पायी चालत पाठविली, सर्वांना अत्यंत दुःखी केले. अत्यंत विपरीत अशी ही माया आपले सौभाग्य आपणच भंग करते. जगात निंद्यत्व पावूनही ती स्वस्थ बसत नाही. अवघड मायेचे असे लक्षण असते की आपल्यालाच वैधव्य आपण आणते, आपले तोंड काळे करून सखे सज्जन दुःखी करते. अशी ही माया फार बाधक असते. तिच्यापुरती राज्यार्थी थोरवी, पण मी तरी ती मानत नाही. हे श्रीरामा. निर्धाराने मी सांगतो आहे." एवढे बोलून भरताने लोटांगण घातले आणि रामाचे पाय डोक्यावर घेतले. डोळ्यांत अश्रू जमा झाले. हे भरताचे लक्षण दिसल्यावर श्रीराम भरताला म्हणाला, "दशरथांचे शेवटचे वचन आपण कदापी अन्यथा करू नये. राम, राम असे स्मरण करत माझ्यासाठी त्यांनी प्राणत्याग केला आहे. त्यांनीच मला वनप्रयाण करायला सांगितले, ते आपण निराळे काही करू नये. वनवासाचे दृढ व्रत मी दशरथांच्या देखत घेतले, ते मी यथार्थपणे मोडणार नाही. हे निश्चित आहे."

भरताचा अन्नत्यागाचा निर्धार

श्रीरामाने निश्चित नकार दिल्यावर भरताने निर्वाण मांडले. तो आपला प्राण प्रायोपवेशन करून सोडण्याच्या निर्धारापर्यंत आला. श्रीरघुनाथ अयोध्येला येणार नाही असा इत्यर्थ जाणून भरत दुःखी झाला. प्राणत्यागासाठी सिद्ध झाला. त्याने सुमंताला सांगितले, "मंदाकिनी तीर पवित्र आहे. तिथे कुशास्तरण सिद्ध कर. मी प्राणत्याग करणार आहे. श्रीरामावेगळे राहणे हे निंद्य जगणे. त्यापेक्षा देहाचा त्याग करून रामादेखत मरणे हे परिपूर्ण ब्रह्म पावणे आहे. श्रीरामाला अयोध्येला परत न्यायला म्हणून प्रतिज्ञापूर्वक मी येथे आलो, राम माझे लाड पुरवत नाही तेव्हा मी आता प्राणत्याग करतो." भरताचा निर्धार ऐकून सुमंताला वाटले, भरत प्राणत्याग करायला निघालेला पाहून रघुनाथ अयोध्येला यायला तयार होईल, या आशेने तो कुशासन पसरू लागला. नंतर भरत पुढे म्हणाला, "आता या कुशास्तरणावर मी अन्न, पाणी न घेता, एकटाच एखाद्या दीन ब्राह्मणासारखा पडून राहीन. जोवर रघुनाथ कृपा करत नाही, तोवर मी इथे पडलेला असेन. त्याने कृपा केलीच नाही तर निश्चित इथेच माझे प्राण जातील. श्रीरामाचा मी लडिवाळ, तोच राम माझे लाड पुरवत नाही तर मलाही या देहाची चाड नाही. देहत्याग करून विदेही होईन. श्रीरामावर येथे असताना अत्यंत प्रेम असलेले आणि रामाचे ध्यान करतच मरून ज्यांनी नित्यमुक्ती मिळविली, त्या दशरथांची परलोक पावल्यावर मला कृपा मिळेल."

भरताने यानंतर श्रीरामाच्या समक्ष शुद्धाचमन करून, दर्भासनावर आसन घालून, नेत्र मिटून घेतले, ते पाहून सर्वजण चिंताग्रस्त झाले. भरत असत्यवादी नसल्यामुळे तो निश्चित प्राणत्याग करील. श्रीरामाच्या कृपेशिवाय भरत आता क्षणभरही वाचत नाही. श्रीरामध्यानात मग्न होऊन तो निमिषार्धात प्राण सोडील. हे पाहून श्रीराम

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized By Sarayu Foundation Trust and eGangotri

भरताला म्हणाला, "तुझे हे कर्म अनुचित आहे. हा निश्चित राजधर्म नव्हे. अंध, पांगळे, पांढरे कोड अंगावर उठलेले रोगी, दुःखी, दुर्धर कामुक असे लोकच देहत्याग करतात. हा ज्ञानविचारही नव्हे." त्यावर भरत म्हणाला, "तुझी कृपा नसेल तर आम्हाला कसली ज्ञानकथा! माझ्या शिरावर कोटी अधर्म बसले तरी मी आता जिवंत राहणार नाही."

श्रीरामाचा व्रतपालनाचा कठोर निर्धार

भरताचा निर्वाणीचा निर्धार पाहिल्यावर श्रीरामानेही निर्धारपूर्वक शपथ वाहिली. "श्रीवसिष्ठांच्या चरणाचे प्रमाण, मी दंडकारण्य सोडणार नाही. पूर्ण चंद्राची शोभा जावो, मेरूपर्वत उभा विरून जावो, सोन्यावर काळे तेज येवो, तरीही व्रतारंभ मी सोडणार नाही. सूर्य पश्चिमेला उगवो, सप्तसागर एकत्र येवोत, रुद्र प्रलय करो, तरी मी काही राजांचे वचन उल्लंघणार नाही. दीपाचा पतंगाने ग्रास केला, एखाद्या बालकाने आकाशाची मोट बांधली, उंदीर रुद्राला सुखाने सहजपणे गिळेल, तरीदेखील मी व्रतविचाराचा त्याग करणार नाही. सूर्य अडखळून विहिरीत पडला, मृगजळात मेरू बुडाला, माशीच्या पंखांनी आकाश उडाले, तरी मी आता मागे फिरू शकणार नाही." अशी श्रीरामाने निर्वाणीची आण वाहिली. तिकडे भरतही कुशासनावर निर्वाण-निर्धार करून बसलेला. त्यामुळे सर्वांना काळजी आणि दुःख यामुळे रडू आवरेना.

वंशक्षय भीती - वाल्मीकींकडून रहस्यकथन

सर्वत्र एकच गोंधळ माजला. नरनारी आक्रंदू लागून रडत होत्या. तेथे कोण कोणाची समजूत घालणार? त्यामुळे वनामधे आकांत झाला. 'अयोध्येला रघुनाथाला परत न्यावे म्हणून भरत उल्हासाने वनात आला. परंतु दोघेही प्रतिज्ञापूर्वक निर्धार करून बसले आहेत, त्यातून दोघांचाही अंत झाला म्हणजे महा अनर्थ ओढवेल. सूर्यवंशाची कीर्ती बुडाली, थोर आपत्ती ओढवली, त्यातून अपकीर्ती आली. केवढी त्या कैकेयीची ख्याती जिने सर्वांचीच शांती केली. राजा गेला रामस्मरणाने, श्रीराम आणि भरत जातील त्यांच्या प्रतिज्ञापणाने, लक्ष्मण प्राण सोडील, सीता आणि शत्रुघ्नही चिरशांतीत जातील. मग येथून मागे अयोध्येला कोण जाईल. त्या कैकेयीचे युक्तीने राज्य मिळविणे सर्वांची शांती करून बसले.' असा सर्वांच्या मनात राग आणि दुःख यांचा विचारकल्लोळ चालू होता. दारुण दुःख करणारे ते सर्वच असल्याने कोणी कोणाची समजूत घालत नव्हता. श्रीवसिष्ठ हे संपूर्ण भविष्य जाणून न बोलता स्वस्थ बसले होते. श्रीराम आणि भरत हे दोघेही सत्यवादी असून त्यांनी दोघांनी दुस्तर पण केले होते. त्यांची समजूत कोण कशी घालणार, त्यामुळे कोणाला निश्चित उपायही सुचत नव्हता. सर्वांना मोठी अडचण आली. ते केवळ दुःख करत राहिले. अशी परिस्थिती असताना एक अलौकिक घडले. स्वतः श्रीवाल्मीकी तेथे आले.

श्रीराम आणि भरत यांच्याजवळ येऊन वाल्मीकी उभे राहिले आणि म्हणाले, "तुम्ही पुण्यराशी, पुण्यपुरुष आहात. धन्य धन्य दशरथ पिता, धन्य तुमच्या माता, धन्य तुमची चरित्रकथा जी सर्व लोकांना तारणारी आहे. धैर्याला धैर्यता तुमच्यामुळे, तुमच्यामुळेच वीर्याला वीर्यता, शौर्याला शौर्यता आणि सत्याला सत्यता आली आहे. धन्य तुमचा सूर्यवंश, ज्याने वंशपरंपरेने कीर्ती जोडली. तुम्हा दोघांनाही राज्यलोभ नाही म्हणून मी तुमच्या भेटीला आलो आहे." वास्तविक वाल्मीकींचा आश्रम चित्रकूटावर होता; पण ते श्रीरामाच्या भेटीला आले नव्हते. यावेळी दोघे बंधू संकटात असल्यामुळे ते त्वरेने त्या बंधूंचे समाधान करावे म्हणून आले. दोघा बंधूंची समजूत घालण्यासाठी स्वतः वाल्मीकी आले. त्यांना भविष्यातील घटनांचे गुप्त ज्ञान असल्याने ते येऊन म्हणाले, "स्वामी रघुनाथा ऐक. धर्मज्ञ भरता तूही

https://archive.org/details/@sarayufoundationtrust, lucknow/eMahabharat Academy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

ऐक. मी तुमच्या हिताचे काही सांगतो आहे. हे श्रीरामचरित्रातील अत्यंत गुह्य असे ज्ञान आहे. माझ्याबरोबर हे ऋषिगण आले आहेत. त्याचेही कारण हेच आहे की मी आता श्रीरामचरित्रातील गुह्यज्ञान सांगणार आहे. भूत, भविष्य, वर्तमान हे अतिशय सज्ञानपणे जाणून, ते सांगण्यासाठीच हे तपोधन आले होते. श्रीरामचरित्राचे गुह्यज्ञान सांगण्यासाठी हे देवऋषी, राजऋषी, तपोनिधी ऋषी येथे आले आहेत. श्रीरामाचे गुह्यज्ञान, तुला भरता ते सांगायला आले आहेत. तेव्हा सावधान होऊन ऐक. तुम्ही दोघे हट्टाने प्राणसंकटात सापडला आहात म्हणून हे आले आहेत."

"श्रीराम, सीता आणि लक्ष्मण यांनी वनवासात येण्याचे खरे कारण हे आहे की, श्रीरामाने रावणाचा वध करावा. तेच देवांचे मनोगत, हेच ऋषींचे संमत, की रामाने तो लंकानाथ रावण वधावा. हाच सर्वांचा सिद्धान्त आहे. श्रीरामराज्याला विघ्न पडायचे हेच कारण आहे. तुला हे रहस्य माहिती नसल्याने प्राणान्ताचा दारुण आग्रह करतो आहेस. भविष्यात घडणाऱ्या गोष्टींचे हे गुह्यज्ञान आहे. माझे वचन सत्य मान आणि आग्रह सोडून तू अयोध्येला जा. देवकार्यार्थासाठी राम, सीता, लक्ष्मण यांना वनातच ठेवून तू अयोध्येला गमन करावेस. आता तू असे विचारशील की कुठे राम, कुठे रावण; त्याचा वध करायला याला काय कारण? या तुझ्या शंकेचे उत्तर म्हणून माझे कथन काय ते ऐक. तू अयोध्येकडे गमन केलेस की नंतर दंडकारण्यातील अत्यंत पवित्र असे जे गंगातीरावरचे नासिक (येथे गंगा शब्द सामान्यपणे नदी या अर्थी आहे. गोदावरीनदीचा तीर) आहे ते श्रीराम आपले निवासस्थान करील. गंगातटावर पंचवटी आहे. तेथे पर्णकुटी बांधून जगजेठी श्रीराम, लक्ष्मण आणि सीता सुंदरी समवेत वनवास करील."

"तेरा वर्षे सहा महिने श्रीराम सुखाने वनवास करील. शेवटच्या सहा महिन्यांत श्रीराम राक्षसांचा संहार करील. त्या वेळी पुत्रवधाच्या सूडासाठी लक्ष्मणाला पाहून शूर्पणखा सुंदर वधूचा कपटवेष धारण करून त्याच्याशी लग्न लावायला येईल. परंतु लक्ष्मण कपट ओळखून नासिकात तिला निर्नासिक करील. तिचे कैवारी त्रिशिरादी राक्षस चालून येतील त्यांना रघुकुलटिळक श्रीराम ठार करील. नंतर श्रीराम मृगामागे गेल्यावर रावण येऊन पंचवटीतून सीतेला चोरून नेऊन लंकात्रिकुटात ठेवील. सीताशोधाच्या निमित्ताने रघुनाथ पंपासरोवराकडे येईल. तेथे परम आप्त असा आत्मसखा हनुमंत भेटेल. हनुमंत स्वतः श्रीराम आणि सुग्रीव यांचे सख्य घडवील. पुढे अमित वानरसैन्य घेऊन श्रीराम लंकेकडे जाईल. महाबलवान वानर एकत्र मिळून समुद्रात शिळांचा सेतू बांधतील आणि ते महावीर लंकेपुढे रणकंदन करतील. एकटा लक्ष्मण आपल्या हाताने चतुरपणे अनेक वीर मारील. अखेर श्रीराम रावणाचे शिर तोडून विजयी होईल. यामुळे श्रीराम देवांचे बंधन सोडवील, नवग्रहांची बेडी तोडेल आणि श्रीरामराज्याची गुढी उभारून तातडीने अयोध्येला परत येईल."

"तेव्हा भरता वनात राहिल्याने श्रीराम त्रैलोक्यपावन कीर्ती संपादन करणार असल्यामुळे तू त्याला वनातच ठेवून शीघ्र अयोध्येला जा." वाल्मीकींचे कथन ऐकून भरताला हर्षाचे स्फुरण आले. त्याने कुशास्तरण सोडून ऋषींना वंदन केले. भरत म्हणाला, "अहो वाल्मीकमुनी, मी आपल्या बोलण्याने सुखी झालो आहे. आपल्या सांगण्याप्रमाणे श्रीरामाला वनात ठेवून मी शीघ्रगमन करतो." भरताचा उल्हास पाहून वाल्मीकींनी त्याला आलिंगन दिले. भरताने साष्टांग नमन केले. श्रीराम सुखसंपन्न झाला.

श्रीवाल्मीकींनी स्वतः येऊन भरताचे समाधान केले. रघुनंदन वनवासात राहील हे त्यांचे सांगणे भरताने मान्य केले. त्यामुळे रघुनंदन अत्यंत सुखी झाला. एकटाच त्रिभुवनाला आवर घालील असा

https://archive.org/details/bhavartharamayan Bhavan Vani Trust, Lucknow / sanskritacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

उत्साह त्याच्या ठिकाणी निर्माण झाला. सर्वांच्या ठायी संपूर्ण सुख दाटले. बाहूंना उल्हासाने स्फुरण चढले. लक्ष्मण हर्षाने नाचू लागला. रामाने परमानंदाने वाल्मीकींना नमन केले त्यावर श्रीरामाला आशीर्वाद देऊन ते स्वतःच्या आश्रमाकडे गेले.

अध्याय अठरावा

भरताने लगबगीने जाऊन श्रीरामाचे चरण धरले. त्याच्या डोळ्यातून गळणाऱ्या अश्रूंनी श्रीरामाचे पाय धुतले गेले. घामाने रोमांच लडबडले, सर्वांग तसेच डबडबले. हर्षाने उत्कंठित चित्त झाले. वाचा सद्‌गदित झाली. क्षीणवाचा होऊन, रामाचे पायी राहून, हात जोडून भरत विनवणी करू लागला. "कुशास्तरण करून तुझ्यापुढे प्राण देत होतो हा माझा दारुण अपराध झाला. हे स्वामी, मला पूर्ण क्षमा कर. भूतमात्र पृथ्वी नांगरून त्यावर गवत घालून जाळतात नंतर पाणी घालून तुडवतात, चिखलाचे कंदन ते लोक करतात. पृथ्वी तो अपराध न मानता, पाळत्या, पोळत्या लोकांना उलट दिव्यान्न देऊन सर्वांना संपूर्ण सुखी करते. त्याप्रमाणे आपणही मला क्षमा करा. श्रीराम आमची माता, आम्ही तिची तान्ही लेकरे. तेव्हा माझा अपराध न मानावा म्हणून तुझ्यापुढे लोटांगण घालतो आहे. तुझे चरणवंदन करून मी अयोध्यागमन करतो." असे सांगून रडे अनावर होऊन भरत मूर्च्छापन्न होऊन पडला.

श्रीरामाचे भरताला सांत्वन, भरताची स्थिती.

भरताचे आपल्यावरील प्रेम पाहून श्रीराम कळवळला. त्याने स्वतः भरताला उचलून, सावध केले आणि त्याचे सांत्वन करताना सांगितले, "भरता, आम्ही चौघे जण हे एका पिंडापासून उत्पन्न झालो. तेव्हा कोण कोणाचा अपराध मानणार. तू वृथा शोक करतो आहेस. एखाद्या वेळी जीभ दातांखाली रगडली गेली तर राग आला म्हणून कोणी दात पाडतो का, जीभ तोडतो का, मग तसाच प्रकार आम्हा-तुम्हामध्ये आहे. टाळी पिटली हातोहात तर त्याचे दुःख वाटते का सुख होते; तशीच येथे तुमच्या-आमच्यात अद्‌भुत एकात्मता आहे." असे आश्वासनपूर्ण बोलून श्रीरामाने भरताला जवळ घेतले. मग 'भरता आता तू अयोध्येला जा' असे सांगितले. भरतानेही ते वचन मान्य केले.

श्रीरामाची आज्ञा अत्यंत तत्परतेने पाळण्यासाठी भरत लगेच निघाला. परंतु पायात वेठ येऊन, मुरकुंडी वळून तो मूर्च्छित झाला. त्याचे मन रामापाशी गुंतले, डोळे रामरूपात गुंतले, रामदर्शनासाठी पायांनी ओढ लावली, यामुळे भरताची गती खुंटली. त्याची वाचा रामनामात, श्रवण रामकीर्तनात, क्रिया रामभक्तीत, अशी सर्व गुंतवणूक झाल्याने भरत जाऊ शकत नव्हता. प्राण रामापाशी पांगुळला, जीव रामाशी जडला, इंद्रिये त्याला परकी झाली. या सर्वाचा परिणाम होऊन भरताची गती खुंटली. भरताला असलेली रामाची अनन्य प्रीती, अगाध स्थिती, पाहून श्रीराम चित्तात सुखावला. राम भरताला उद्देशून बोलला, "भरता, ऐक. आपले रहस्य असे आहे की माझे प्रेम तुझ्या पोटात आहे, त्याच पोटी कैकेयी खोटी हेही आहे. पण अशी अढी तू धरू नकोस. मला वनवासाला धाडले, सीतेला पायी चालत वनात धाडली ही शल्ये अहर्निश तुझ्या मनात सलताहेत. परंतु ज्या हृदयात माझे पूर्ण प्रेम आहे, तेथे द्वेष, विषम नसावा." हे रामाचे कथन ऐकताच भरत निभ्रम होऊन त्याच्यापुढे पडला.

वसिष्ठांची युक्ती - भरताला रामपादुका प्राप्त

श्रीरामाच्या प्रेमाने तृप्त, रामविरहाने दुःखी असा भरत पाहून कृपाळू वसिष्ठ विकल भरताला म्हणाले, "श्रीराममूर्ती सोडून भरताला गमनाची शक्ती नाही." नंतर वसिष्ठगुरू रामाला कृपायुक्ती सांगताना म्हणाले, "श्रीरामा, अत्यंत आनंदाने

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

भरत शीघ्र गतीने परत अयोध्येला जाईल अशी एक युक्ती आहे. ती तू निश्चितपणे करावीस. तुझ्या पादुका तू भरताच्या मस्तकावर ठेव. त्यामुळे तत्त्वतः त्याला आनंद होईल आणि अयोध्येला जाताना उल्हास वाटेल.'' श्रीराम पायताण घालत नाही कारण त्याला दीनोद्धार करायचा आहे. वृक्षवल्ली आणि पाषाण तारण्यासाठी त्याचा वनातला विहार अनवाणीच होतो. रामाच्या पायाला काटे रुतत नाहीत, उलट रामाच्या पायाने काटेच उद्धरतात. वाटेत कधी श्रीराम दगडाला अडखळला तर ते दगडही उद्धरतात. श्रीरामाच्या पादुका ह्या सुवर्णभूषण मानून लक्ष्मण त्या आवडीने वागवतो. त्या गुरुवचनाचा आदर करून लक्ष्मणाने भरताला अर्पण केल्या.

श्रीरामाच्या पादुका प्राप्त होताच भरताच्या चित्ताला उल्हास वाटला. पादुका मस्ताकावर ठेवताच आनंदाने भरत म्हणाला, ''श्रीरामाच्या पादुका मस्तकावर ठेवताच जगातली द्वेषविषमता हरपली. ती मी आता कशी आणू. आता मी माझ्या मातेचा द्वेष कसा करू? कैकेयीच्या वरदानाने जे वनप्रयाण रामाला घडले, ते दूषण नव्हे तर भूषण ठरले. वाल्मीकींच्या बोलण्यातून ती खूण कळली. आता कोण तिचा द्वेष करील.'' भरत आणि शत्रुघ्न यांनी वसिष्ठांचे चरण वंदन केले. श्रीरामाला नमन केले, आणि म्हणाले, ''तुझ्या पादुका मस्तकावर ठेवल्या आहेत, त्या आता तुझ्या भेटीशिवाय उतरल्या जाणार नाहीत. तिन्ही त्रिकाळ, तिन्ही अवस्था त्या तिथेच राहतील. पादुका माझे निजजीवन, देवतार्चन, निजपूजन, आता नित्य ध्यान मला तुझ्या चरणांचे. हे रामा, तुझ्या पादुका त्या माझा परमात्मा.'' त्या पादुकांचा महिमा वर्णन करून, श्रीरामाला पुन्हा वंदन करून भरत निघाला. जाताना लोटांगण घालून वसिष्ठादींना आणि रामलक्ष्मणांना भरत म्हणाला, ''आता माझे बोलणे लक्षपूर्वक ऐका.''

भरत नंदिग्रामात, शत्रुघ्नाकडे कारभार

''श्रीरामाच्या आज्ञेवरून मी अयोध्येकडे गमन करतो आहे. पण तेथे मी अयोध्याभुवनात राहणार नाही. स्वतःचे राज्य त्यागून पित्याने वैकुंठभुवनात प्रवेश केला, श्रीरामाला मी वनात सोडून जातो आहे, तर मी राजभवनात कसा राहीन. मी सर्वांना विनंती करतो की मी नंदिग्रामात राहीन. अयोध्येचा राज्यकारभार मी तिथूनच तत्त्वतः चालवीन. सिंहासनावर राम नाही हे पाहून मला दुःखावस्था आवरणार नाही. यासाठी अयोध्येला न जाता राज्यभार शत्रुघ्नाच्या शिरावर देईन. रामाशिवाय अयोध्या दृष्टीला पडताच माझ्या मनात दुःखकोटी उपजतील. यासाठी मी अयोध्येची भेटच घेणार नाही. तेथे वस्तीची कल्पनाच मनाला रुचत नाही. नंदिग्रामात वस्ती करून, अयोध्येची राज्यस्थिती माझ्या अनुमतीने, शत्रुघ्नाच्या हातून करवीन. श्रीरामाच्या पादुकांपुढे भरत, शत्रुघ्न दोघे-जण अयोध्येचे राज्यलक्षण संपूर्ण या पादुकाच करतील.''

''श्रीरामाच्या पादुकांचा पूर्ण प्रताप ज्ञात असताना अयोध्येकडे पाहील कोण? जिथे कळिकाळाची शक्तीही टिकत नाही अशा या पादुका राज्यलक्षण आहेत. रामपादुका हा शब्द कानाने ऐकताच यम आणि काळ लोटांगण घालत येतील. इंद्रादिक चरणी लागतील. अशी या राज्यलक्षण पादुकांची थोरवी आहे. पादुकासामर्थ्याचे सामर्थ्य ते भाग्याने माझ्या हाती आले आहे. त्या मी दृढपणे शिरावर घेतल्या आहेत. कृपावंता श्रीरामा तुझ्या पादुका शिरोधार्य आहेत. श्रीरामवियोगाचे दुःख पादुका प्राप्त झाल्यावर निःशेष गेले आहे. पादुका पाहताच, हे श्रीरामा, आत्यंतिक स्वानंदसुख लाभले आहे. पुन्हा पुढे श्रीरामाची भेट होईल तोवर माझे हेच व्रत असेल. मी या पादुका स्वानंदाने सतत मस्तकी वाहीन. राम राहिला वनवासात ह्याचे दुःख विसरलो कारण पादुकांच्या रूपाने राम अहर्निश माझ्या सहवासात असेल. आता इथून पुढे

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

श्रीरामा मला तुझा वियोग होणार नाही.'' असा भरताला आल्हाद वाटला. तो स्वानंदाने गरजला. भरताचे बोलणे ऐकल्यावर श्रीराम सुखसंपन्न झाला. भरत शत्रुघ्न यांना त्याने आलिंगन दिले आणि तेही सुखरूप झाले.

वनवास पूर्ण करून येण्याचे आश्वासन

श्रीरामाने भरत आणि शत्रुघ्न यांना आश्वासन दिले की, ''चौदा वर्षे चौदा दिवस झाल्यावर मी नेमाप्रमाणे परत येईन. यावषियी मनात संदेह धरू नये. मी तुझ्याविषयी निःशंक आहे.'' असे रामाने सांगितले, ते भरत, शत्रुघ्न यांनी यथार्थ मानले. मग दोन्ही हात जोडून त्यांनी नमन केले. बंधू बंधूंमधे ऐक्यभाव झाला. त्यांचे एकमेकांवर अपूर्व प्रेम होते. यासाठी चित्रकूटाला श्रीरामाने 'बांधव' असे नाव ठेवले. चौघा बंधूची एकात्मता चित्रकूटावर हाती आली यासाठीही बांधव हे नाव तत्त्वतः आणि स्वभावतः चित्रकूटाला योग्य ठरले.

भरत, शत्रुघ्न यांचे अयोध्येकडे प्रयाण

श्रीरामांच्या चरणांना स्पर्शाने वंदन करून, जानकी आणि लक्ष्मण यांना वंदन करून, तिघांना प्रदक्षिणा घालून, भरत, शत्रुघ्न उल्हसित झाले. रामपादुका डोईवर ठेवून, दोघे रथात बसले. निशाण, भेरी वाजविल्या गेल्या आणि सर्वजण गर्जनांचा गजर करत निघाले. श्रीरामाने आपल्या मातांना सुखरूपता इच्छिली. त्यांच्या पायांवर मस्तक ठेवून सर्वजणींना परत पाठविले. सैन्य, सेनानी, प्रधान यांनी रघुनंदनाला वंदन करून, सुखसंपन्न होऊन अयोध्यागमन केले. मोठ्या उत्साहाने भरत प्रयागाला आला. भरद्वाजांना भेटून त्याने सर्व वृत्तान्त त्यांना निवेदन केला. श्रीरामाच्या पादुका भरताच्या मस्तकावर पाहून भरद्वाज हर्षित झाले ते म्हणाले, ''धन्य भरता, तिन्ही लोकांत तू धन्य आहेस.'' परमानंदाने परिपूर्ण होऊन त्यांनी भरताला आलिंगन दिले. नंतर आशीर्वाद देऊन त्याला अयोध्येकडे जाण्यास अनुज्ञा दिली.

पुढे गंगा उतरून भरत गजभाराने गर्जत त्वरेने गुहकाच्या नगरीत शृंगवेरपुरीत आला.

गुहकाने श्रीरामपादुका भरताच्या डोक्यावर असलेल्या पाहून त्यापुढे लोटांगण घातले. नंतर भरताचे चरण मस्तकावर घेऊन त्याने वंदन केले. हर्षाने तो नाचू लागला. ''रामपादुका हाती येताच त्या प्रेमाने माथ्यावर ठेवल्यास, त्यामुळे भरता, तुझे भाग्य धन्य झाले. तू श्रीरामाचा आवडता झालास.'' गुहकाला भेटून भरताला सुखसमाधान झाले, मग तो अयोध्येकडे निघाला. आपले सैन्य घेऊन तो सत्वर पुढे जात राहिला. अयोध्या नगरी दृष्टिपथात आल्यावर भरताच्या चित्तात सुखभावना निर्माण झाली. सर्व मातांना अयोध्येत ठेवून भरत नंदिग्रामाला जाण्यासाठी निघाला.

भ्रातृवत्सल भरतवीर सत्वर नंदिग्रामात आला. नंदिग्रामाच्या बाहेर एके ठिकाणी रामपादुकांची स्थापना करून, भरतराजा अनुतापाने राजऋषी तापसी झाला. सर्व मातांना अयोध्येत ठेवून, स्वतःची अनुकूल कांता त्यजून, राजभोग न स्वीकारता, भरत रामव्रताला अनुसरला. वनवासात रघुनाथ जे जे व्रत आचरत होता, ते ते भरतानेही अंगिकारले. राज्यवैभव दूर ठेवून, जटा, आणि वल्कलचीर धारण केले. रामपादुका शिरावर स्थापन करून, जलफळांच्या आहारावर भरत निर्वाह करू लागला. जेव्हा केव्हा श्रीरामाचे आगमन होईल, त्या वेळेपर्यंत भोजन करायचे नाही, अन्न दृष्टीने पाहायचे नाही, देहधारण केवळ जळफळांवरच करायचे असा त्याने निर्णय केला. श्रीरामपादुकांचे भजन, पूजन, निजध्यान आणि स्मरण, चिंतन श्रीरामाचे असा त्याचा निर्धार झाला होता. रामपादुकांवर छत्र ताडपत्राला मोत्यांच्या झालरी लावून, कनकदंड हाती धरून तो पादुकांवर ढाळत राही.

श्रीरामाचे नामस्मरण सतत केल्यामुळे कोणतीही गांजणूक भरताला झाली नाही. साधूसंतांना बोलावून तो रामकथा सांगे. श्रीरामाची

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

आज्ञा मानून भरत अयोध्येला परतला आणि रामपादुकांची एकाग्रतेने आणि प्रेमाने भक्ती करू लागला. श्रीरामाच्या शब्दासाठी त्याने आपला प्राण विकला, अयोध्याराज्याचे संरक्षण भरताच्या आज्ञेने शत्रुघ्न करू लागला. भरताच्या आज्ञेला शत्रुघ्न अष्टौप्रहर सादर असे. तो निरंतर आज्ञाधारक आज्ञेचे अणुमात्र उल्लंघन करत नसे. अनेक तापस अनुष्ठान करतात, त्यांमध्ये भरत महामुनी हा श्रीरामाच्या नित्य भजनी राही. तो अनुदिन त्या निष्ठेला स्मरून वागत असे.

नंदिग्रामातील स्थिती - गती

नंदिग्रामाच्या बाह्यप्रदेशी भरत मुनिवेषाने राहिला. तेथे योगी, दिगंबर संन्यासी, दूरदूरच्या भागांतून येत. तसेच तपोराशी ऋषीगण, आगम-निगमात सज्ञान, जपी, ध्यानी, मुमुक्षू, साधू, सज्जन हेही सर्व येत. देशोदेशीचे प्रजाजन, प्रधान, श्रवणी श्रद्धाळू असे जन तेथे येत. शत्रुघ्न हात जोडून भरताचे सांगणे ऐकायला उभा असे. भरताच्या मुखाने रामायण श्रवण केल्याने सुख, समाधान होत असे. रामपादुकांचे भजन, पूजन पाहून लोक आश्चर्य करत. भरताच्या नित्य संगतीत ज्यांना श्रवण, स्मरण अहोरात्र अनुभवायला मिळे ते सर्व भरताच्या ठिकाणची रामभक्ती पाहून सुखी होत. श्रीरामपादुका मस्तकी धारण करून भरत अयोध्येला आल्यापासून तेथे अधर्मकथा किंवा अकर्मवार्ता नव्हती. राजाज्ञा समर्थ असावीच कशाला, जर सर्व प्रजाच सत्यवादी, स्वधर्मकर्मात रत झालेली आणि श्रद्धेने श्रीरामभक्त असेल तर. राज्यामधले प्रजाजन स्वभावतःच श्रीरामस्मरण करत जीवितकार्य करणारे आणि अहर्निश रामचिंतन करणारे होते.

भरताचे शील ऐकून देशोदेशीचे राजे मोठ्या भेटी घेऊन त्याच्या भेटीला येत. रत्ने, धन, हत्ती, घोडे भेटीदाखल घेऊन राजे येत; भरत त्या भेटींना स्पर्श करत नसे. तो आपल्या मनाने निरपेक्ष होता. श्रीरामाचे नाम स्मरताच क्रोध, काम मावळले. लोभ, संभ्रम निघून गेले. श्रीरामामुळे भरत निष्काम झाला होता. त्यामुळे सर्व भेटी परत करून उलट भरतच त्या राजांचा सन्मान करून त्यांना गौरवत असे. भरत हा रामप्रतापाने अती उदार म्हणून त्रिलोकात विख्यात झाला. श्रीरामाच्या नित्य स्मरणाने बुद्धिवंत, प्रबुद्ध असा कनिष्ठ बंधू भरत, भजनामध्ये अगाधबोध असणारा तो नंदिग्रामात स्वानंदमग्न होऊन राहिला होता.

याप्रकारे अगाध स्थितीत भरत नंदिग्रामात राहात असताना, वनवासात रघुपती ख्याती करील. श्रीरामाने मातेची वचनोक्ती प्रेमाने पाळली; दशरथाच्या मृत्यूनंतरही त्याची शपथ मोडली नाही. कौसल्यामातेच्या काकुळतीच्या विनवणीवर मौन धरले; सीतेला वनामध्ये पायी चालावे लागते याचे दुःख मानले नाही. लक्ष्मणाच्या क्षोभपूर्ण बोलण्याचा राग धरला नाही; भरत स्वतः अत्यंत प्रेमाने अयोध्येला परत नेण्यासाठी आला, तेव्हा त्याची समजूत घालून सुखी स्थितीत त्याला परत पाठविले; स्वतःचे प्रचंड राज्य आणि वैभव त्याने दूर ठेवले, भोगांची तोंडे ठेचली; घोर संकटांचे दुःख ओढवले ते खंडविखंड केले; अभिमान सोडणे कठीण पण तोही भरडला; दुर्घट वनभयाचे तोंड ठेचले; अशा रीतीने श्रीराम वनवासी होऊन, अयोध्याकाण्डाची समाप्ती करून, पुढील कार्यासाठी दण्डकारण्यात राहिला.

***

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

ॐ

संत एकनाथकृत भावार्थ रामायण

अरण्यकाण्ड

अध्याय पहिला

श्रीराम हा प्रचंड आम्रवृक्ष आहे. त्यावर वाल्मीक कवी कोकिळ आहे. नारदवसंताचे कलातेज प्रस्फुट झाले आहे. मधुराक्षरी सरळ आलाप केला जातो आहे. त्या मधुर अक्षरांमधे मधुर श्रीरामनाम हे सुखसार असून त्याने चराचर सुखी केले. त्या सुखाने शंकर डोलत आहे. राम या अक्षरांचे उफराटे मरा मरा हे उत्तर येते. त्यानेच नारदांनी वाल्मीकाला उपदेश केला. तो दोन अक्षरांनी उद्धरला. नाम शुद्ध असो अथवा अशुद्ध असो, जो त्याचा जप करतो तो शुद्ध आणि पवित्र होतो. श्रीरामनाम जगद्वंद्य आहे. परमानंद हरिनामाने मिळतो. चोरटा वाल्मीक संसार तरून गेला ही नामाची केवढी थोरवी आहे. हे नाम पवित्र, जगदुद्धारक आहे. हे नाम महापातक्यांचाही उद्धार करते. इतर कवी हे गरजणारे गज, तर वाल्मीक कवी वनगजसिंह म्हणावा. श्रीरामनामाने सिंहनाद करतो आणि रानभर नवरस भरतो. नवरसांचा रसिक, नवरंगी रघुकुळटिळक, त्याच्या नामाचा एकेक श्लोक नवरसांना सुखदायक होतो. हास्यादी नवरसवृत्ती श्रीरामरसाने त्यांना सुखाची प्राप्ती होते. त्यामुळे वाल्मीकनामाच्या नामोच्चाराने कविकुळे पावन होतात.

श्रीराम नामाविण जे मुख ते केवळ चर्मकुंड आणि आतली जीभ ही चामड्याचा तुकडा असे मानावे. तीही कवित्वकाट्यांनी कापलेली अशीच समजावी. रामायणी कथा ऐकताना नवरसपापांचे क्षाळण होते. नामप्रभावाने वेश्याही उद्धरली. रामनामाने वाणी पवित्र होते. या श्रीरामकथेची अपूर्वता अशी की श्रीशिवही त्याला प्रेमभराने वंदन करतो. भूतलावर ही कथा जगद्वंद्य ठरली आहे. ते शतकोटी रामायण येथे कोण आकळू शकणार, त्यातून मी दुर्बल आणि दीन, परंतु सद्‌गुरू जनार्दन स्वतः माझ्याकरवी ती वदवितो आहे. जेव्हा लिंगदेहाचा नाश किंवा मर्दन तोच जन अर्दन म्हणजे लाभ मानतात यामुळे जनार्दन हे नाव आहे. तो शास्त्रार्थे व्याख्यान करतो. परंतु आपल्याला शास्त्रार्थाशी काय करायचे आहे. आपण येथे मुख्य श्रीरामकथा ही श्रवण, मनन ग्रंथार्थे करायची आहे. तेव्हा सावधानतेने ऐका.

भरत अयोध्येला परतला आणि मागे श्रीराम वनवासात राहिला. तेथे एक दिवस काय घडले तो वृत्तान्त प्रथम ऐका. भरत अयोध्येला गेल्यावर मागे चित्रकूटवासी ऋषीश्वर अत्यंत उद्वेग चित्तात आणून परस्परांना काही सांगत होते. ते येऊन श्रीरामाकडे खुणा करत कुजबुजत होते. हे सारे पाहून श्रीरघुपतीचे मन साशंक झाले. तो विचार करू लागला, 'भरत ससैन्य आला होता, त्यामुळे तर या ऋषींना काही उपद्रव झाला नसेल ना? की माझ्यापाशी त्यांना काही अधर्म दिसला? लक्ष्मणाने यांचा काही अपमान केला काय? किंवा सीतेकडून काही अधर्म घडला काय?' अशी श्रीरामाला चिंता लागून राहिली. हे जाबाली ऋषींना समजले. तेव्हा ते लगेच श्रीरामाकडे आले.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

जाबाली ऋषींचे निवेदन

जाबाली ऋषी हे वृद्ध असून तापसांमध्ये अत्यंत प्रसिद्ध होते. त्यांचे इंद्रियदमन अगाध होते. ते प्रज्ञाप्रबुद्ध ऋषिवर्य बुद्धिमंतात विख्यात होते. ते हात जोडून मधुर वाणीने मृदू आवाजात श्रीरामाला म्हणाले, "श्रीरामाकडून जागृतीत, स्वप्नात किंवा सुषुप्तीतही कधी दुश्चरित घडणे शक्य नाही. उलट तुझ्या नामाने दुष्कृत्य करणारे तरतात. असे असताना तू साशंक का झाला आहेस? तुझे मुख हे निष्कलंक चंद्र आहे. त्या तुझ्या मुखाच्या दर्शनाने कोटीजन्मांचे दुःख हरण केले जाते, आणि परम सुखाची प्राप्ती होते. लक्ष्मणापासून काही अनुचित घडेल हे मूर्खालाही खरे वाटणार नाही. श्रीरामा तुझ्या भक्ताकडून दुष्कृत्य कधीच घडणार नाही, हे निश्चित आहे, आपल्या भक्ताकडून तसे घडलेच तर तेही तू पावन करतोस. प्रल्हादाने पितृघात करविला, पण त्याची अत्यंत पवित्र अशीच लोकात कीर्ती झाली. प्रल्हादाचा पितृघात त्रैलोक्यात वंद्य ठरला. ज्यांच्याकडून स्वतःच्या मातेची हत्त्या होते त्यांना तू जवळचे आप्त मानतोस. मातृघात, पितृघात करणारे जे तुझे भक्त त्यांना तू आप्त मानतोस. त्यांना तिन्ही लोकात पावन ठरवितोस. मातृघातकी परशुराम, पितृघातकी प्रल्हाद या दोघांचे नाव घेतले तर स्वानंद होऊन श्रीरामाची भेट होते. प्रल्हाद हा भक्तांचा मुकुटमणी प्रातःस्मरणीय ठरला, दुसरा ब्रह्मचारींमधला शिरोमणी असा भार्गव हा वेद-पुराणांनी स्तुती करून श्रेष्ठ ठरवला. त्यांच्यापेक्षाही सौमित्र परम भक्त, सखा अत्यंत पवित्र, त्याच्याकडून अनुचित घडणारच नाही हे निश्चित."

"सीता ही तुझी धर्मपत्नी, अयोनिजा, जनकनंदिनी आहे. तिच्याकडून अधर्म घडणे हे जागृतीत, स्वप्नात किंवा सुषुप्तीतही होणार नाही. तुमच्या कोणाकडून अधर्म घडेल अशी शंकाही कोणाची तुमच्याविषयी नाही. रघुनाथा, ते ऋषी जे बोलत होते त्याविषयी मी काय सांगतो ते ऐक. जनस्थानात राहणारे ते सर्व, राक्षसांनी तापसांचे केलेले भयंकर कंदन पाहून भयभीत झाले आहेत. तेच ते सांगत होते. त्या महाभयाची वार्ता तुला सांगताना ऋषींचे मन साशंक झाले. त्यांनी माझ्याकडून तुला ही कथा सांगवायचे ठरवले. तर ऐक. तापसांना कोण बाधा करतो म्हणशील तर तो रावणाचा खर नावाचा धाकटा बंधू आहे. तो अगाध राक्षस आहे. त्रिशिर, खर आणि दूषण हे तिघे बंधू एकत्र जनस्थानात वास्तव्याला असून, त्यांच्याकडे चौदा हजारांचे राक्षससैन्य आहे. त्या राक्षसांच्या भीतीने ग्रासलेले ते ऋषी, तुझा आश्रम येथे आहे हे ऐकून आणि तू राक्षसांचा अंत करशील या भावनेने आले आहेत."

राक्षसांची भीती आणि गुप्तस्थानाची सूचना

"आज एक नवी वार्ता आली असून त्यामुळे हे सर्व ऋषी भयभीत झाले आहेत. हे रघुनाथा, या कारणाने ते तुला सोडून दुसऱ्या पर्वताकडे जाऊ पाहताहेत. राक्षसांनी खराला सांगितले की श्रीरामासह सर्व ऋषी चित्रकूटात राहिले आहेत. तेव्हा तो स्वतः येथे येणार आहे. ते तिघे बंधू सैन्यासह रात्री घाला घालून, रामलक्ष्मणांना मारून, सीतेला पळवून न्यावे असा त्यांचा विचार आहे. तुमच्या समोर यावे तर तुम्ही परमपुरुषार्थी आहात, याचा त्यांना धाक वाटतो आहे, कारण तुमची ख्याती त्यांना कळली आहे. एकाच बाणाने ताटिकेचा वध केला, सुबाहूचा प्राण घेतला, मारीच वेगाने उडवला अशांशी झुंजणे म्हणजे प्राणान्त असे त्यांना वाटते. ज्या धनुष्याने रावणालाही त्रस्त केले ते सहज हातात घेऊन मोडले, त्यांच्याशी युद्ध न घडावे म्हणून रात्री निद्रेतच मारावे हा त्या राक्षसांचा विचार आहे. त्यामुळे हे ब्राह्मण आणि ऋषी चळचळा कापत आहेत. तुला हे सांगायला संकोचत आहेत, यासाठी मी ते सर्व तुला ऐकवले आहे. श्रीरामा एक निश्चित आहे की येथे एक गुप्त वन आहे, हे सर्व ऋषी भयामुळे तिकडे जाणार आहेत. तुम्हीही शीघ्र

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

तिकडे यावे. हे जवळ असले तरी वन गहन आहे. ते तर्कालाही न सुचणारे गुप्त स्थान आहे. तेथे फळमूळे, गंगेचे पाणी आणि वस्तीसाठी विश्रामस्थानही आहे. तेथे तुम्ही तिघाजणांनी यावे, असे त्या ऋषीश्वरांच्या मनात होते. तेच ते बोलत असताना तुझ्या मनात शंका निर्माण झाली."

श्रीरामाने हे सर्व ऐकल्यावर समस्त ऋषींना हात जोडून नमन केले आणि विनवून सांगितले, "आपण सर्वजण आश्रमात सुखाने राहा. त्या राक्षसांकडे मी पाहतो. गोब्राह्मणांचे संरक्षण करणे हेच आमचे व्रत आणि स्वधर्माचरण आहे. मी स्वतः श्रीराम रक्षण करत असताना तुम्हाला भय कशाचेही नाही. मी बाणाने मेरुपर्वत भेदीन, राक्षसांच्या रांगा मारीन, मी रघुवीर तुमच्या घरी सेवेला असताना तुम्हाला कशाप्रकारचे भय आहे?" असे श्रीरामाने सांगता अवघे ऋषी विचार करू लागले. 'तीन धुरंधर राक्षस सैन्यबलासह आले तर या दोघांना ते कसे आवरतील? एक सीतेला घेऊन पळेल, श्रीराम एकटा उरेल राक्षसांच्या घातासाठी झुंजायला. हे त्याला कसे सहन करता येईल? पूर्वी याने सुबाहू मारला तेव्हा सीता जवळ नव्हती. दोघे बंधू एकात्मतेने झुंजले आणि सुबाहूचा घात केला. स्त्रीच्या काळजीमुळे पुरुषार्थाला धैर्य उरत नाही. स्त्रीचा लोभ मनात असताना जय सर्वथा मिळत नाही.'

'ते तीन राक्षसबंधू हत्तीसारखे बलदंड आहेत. त्यांच्याशी एकटा श्रीराम किती झुंजेल. त्याचे चार बाण संपून जातील आणि मग माघारी पळावे लागेल. चित्तात स्त्रीलोभ असला की युद्धात एकाग्रता राहात नाही. ह्यामुळे चिंता मंत्रबीज गिळून टाकते. मग विजय कसा मिळणार? आता हे तिघे वनात गुप्त होतील. मग राक्षस आम्हाला खातील. तेव्हा यांची संगत सोडून आपण निश्चित निघू या.' मग ते ऋषी युक्ती सांगतो असे म्हणून बोलले, "तुम्ही दोघेही पुरुषार्थी आहात, तेव्हा येथे वस्तीला राहू नका, आमच्यासह निश्चित या. राक्षस हे धर्मयुद्ध खेळणारे नसतात. छळणे, पळणे हीच त्यांची शक्ती असते. नाना युक्त्या करून, फसगतीने सुरवरांना मारतात. राक्षस हे निशाचर असतात. रात्री येऊन अर्ध्या झोपेत तुम्हाला मारतात. त्यांच्यापुढे तुमची शक्ती ती काय?" असे त्या ऋषीश्वरांनी म्हटल्यावर रामाने काहीही प्रत्युत्तर दिले नाही. ब्राह्मणांच्या मनात धैर्यनिर्धार नव्हता, त्यांना थोर विकल्पाने घेरले होते. जर या ब्राह्मणांना विश्वास नाही तर त्यांना माझी संगत मिळणार नाही. श्रीरामाला त्यागून ते ऋषी तत्काळ निघाले. एक रात्र राहायलाही त्यांना धीर धरवत नव्हता. रघुपतीला सोडून ते निराळ्या मार्गाने निघाले.

श्रीराम जनस्थानाकडे जातो

श्रीरामाला नमन करून, ते भीतीने कंपायमान झालेले ब्राह्मण, श्रीरामाकडे आज्ञा मागत होते. श्रीरामाने त्यांना "आपण सुखाने जावे," असे सांगितले. नंतर ती अविश्वासाने भारलेली द्विजमंडळी, हाताशी पत्नी, कडेवर लेकरे, डोक्यावर यज्ञपात्रे घेऊन दुसऱ्या आश्रमाला गेली.

श्रीरामाने विचार केला की जनस्थानात राक्षस वाढले आहेत, तर त्यांचे समूळ निर्दाळण करण्यासाठी आजच इथून निघावे. सीतेने रामाच्या विचाराला दुजोरा देत म्हटले, "सगळे ऋषी येथून गेल्यावर आता येथे राहणे आवडत नाही. तेव्हा आजच निघू या." लक्ष्मण म्हणाला, "ऋषीश्वर भयभीत मनाने गेले. ते भय निर्दाळून टाकण्यासाठी आपण शीघ्र प्रयाण करावे." राक्षसांचे निर्दाळण करण्याच्या विचाराने श्रीराम उल्हसित झाला. त्याच्या सर्वांगात स्फुरण निर्माण झाले. दंडकारण्य शुद्ध, निर्वेध करण्यासाठी तो उत्सुक बनला. त्याचे बाहू थरथरू लागले, रोमावळी पिंजारल्या, राक्षसांची होळी करण्यासाठी महा पराक्रमी श्रीराम सिद्ध झाला. श्रीरामाच्या चित्तात उल्हास येऊन तो लक्ष्मणाला म्हणाला, "सर्व आयुधे घेऊन, सीतेसह त्वरित निघ."

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust, Lucknow and eGangotri

अध्याय दुसरा

ऋषीवर्य अत्रि जेथे राहात होते, त्या दु:खितांचे विश्रांतिस्थान असलेल्या, पर्वतापर्यंत, सीता आणि लक्ष्मण यांच्यासह श्रीराम येऊन पोचला. तेथे अत्रिऋषींच्या पुढे श्रीरामाने साष्टांग नमस्कार घातला. अत्रींनी रामाला आलिंगन दिले. त्यांच्या ध्येयध्यानाचे त्यामुळे समाधान झाले. सीता आणि लक्ष्मण यांनीही ऋषींना साष्टांग वंदन केले. त्यांचे चरण मस्तकी धरले. त्यामुळे ऋषिवर्य सुखसंपन्न झाले. श्रीरामाने ऋषींची पत्नी अनसूया हिचेही चरणवंदन केले. तेव्हा अत्रि म्हणाले, "रघुनाथा, ही तुझी पुरातन काळातली माताच आहे." ऋषींचे हे वचन ऐकताच सौमित्रानेही तिच्या चरणांना वंदन केले. सीतेने तिच्या पायावर मस्तक ठेवून वंदन केले. अनसूयेने सीतेला हृदयाशी धरले. सीतेला पाहून अनसूयेला सुखानंद झाला. ती सीतेला म्हणाली, "धन्य धन्य तू सुंदरी. अत्यंत पतिनिष्ठ पतिव्रता आहेस तू. तुझ्या अंगी बाळपण आहे, पतीच्या व्रताला अनुलक्षून तू पायी चालत वनात गमन करते आहेस, तू खरोखर संपूर्ण पतिव्रता आहेस. पतीच्या वचनाबाहेर न जाता, ज्या सती पतीच्या व्रताला अनुसरतात त्याच खरोखर पतिव्रता. तशी तू सीता भाग्यवंत आहेस." अशा शब्दात सीतेची स्तुती करून, दोन्ही हातांनी जवळ ओढून, अनसूयेने सीता पतिव्रतेला स्वानंदाने आणि प्रेमाने आलिंगन दिले. सीतेचे हृद्गत जाणून अनसूया कृपायुक्त झाली तिने आपले पतिव्रता व्रत सीतेला आनंदाने सांगितले.

पतिव्रता व्रत, दिव्यवस्त्र सीतेला मिळणे.

सीतेला पतिव्रतेचे व्रत अनसूयेने उल्हासाने दिले. त्यावेळी दिव्य वस्त्रे, उटी यांचे आनंदाने दान केले. त्याविषयी आता संपूर्ण कथन ऐका.

अनसूया कृपावंत होती. तिने सीतेला दिव्य वस्त्रे नेसविली. दिव्य चंदनाची उटी लावली, दिव्य सुमनांच्या माळा घातल्या. सीतेचे लाड पुरवण्यासाठी अनसूयेने तिला एक अलंकार दिला, ज्याचा अहोरात्र एवढा उजेड पडेल, की त्यापुढे शशिसूर्य फिके पडावे. त्या अलंकाराच्या दिव्य प्रकाशापुढे चंद्रसूर्य काजवे ठरतील असा तो प्रकाश देणारा अलंकार होता. अनसूयेची स्वतःची प्रसिद्धी पतिव्रता म्हणूनच होती. पतिसामर्थ्य तिच्या व्रताचा आधार होता. तिचा हात लागताच तिन्ही देव बालक झाले असे तिचे सामर्थ्य अद्भुत होते. तेच तिने सीतेला अर्पण केले. अनसूया म्हणाली, "या माझ्या दिव्य वस्त्रांची थोरवी अशी आहे की ती वापरून देखील मलिन होत नाहीत. त्यामुळे ती कधी धोब्याचे दार पाहात नाहीत. ही वस्त्रे आत्मतेजाने निर्मळ राहतात."

"तसेच मी लावलेली उटी धुवूनही पुसली जात नाही. देहात दिव्य चंदनाचे महिमान असे आहे की अभ्यंगमर्दन झाले तरी त्याचा सुगंध उडून जात नाही. ही दिव्य सुमनमाळ कदापीही सुकत नाही. नित्य टवटवीत; सुपरिमळयुक्त, घमघमीत अशी गळ्यात राहाते. सीते सावधपणे ऐक. तू माझा प्रसाद पावलीस त्यामुळे तुला कधीही राक्षसांचे भय वाटणार नाही. नि:शंक आणि निर्भय हो. कधी रघुनाथाचा वियोग झालाच, तर तो वियोग तुझ्या चित्ताला बाधणार नाही. ही पूर्वापर पूर्वकथा श्रीरामच सांगेल." एवढे बोलून अनसूयेने सीतेच्या मस्तकावर हात ठेवला. याप्रकारे अनसूयेने सीतेला अनुग्रह दिला. त्या उपदेशाच्या प्राप्तीमुळे सीतेला सुखस्वानंद झाला. अनसूया महापतिव्रता होती. तिने पुढचा कार्यार्थ पाहून, लंकानाथाचा वध व्हावा यासाठीच सीता अनुग्रहिली. श्रीराम, सौमित्र, सीता यांना पाहून अत्रींच्या चित्तात उल्हास निर्माण झाला. नंतर पूर्वापर पूर्वकथा श्रीरामच अत्रिमुखाने सांगता झाला.

अनसूयेची पूर्वकथा

"अनसूया ही महापतिव्रता, तपस्विनी, अशी वृद्धा आहे. तिचे मस्तक चंद्रकिरणांसारखे शोभते आहे. पतिधर्माला ती अनुकूल असते. गिरिकंदरात

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Trust and eGangotri

तिकडे यावे. हे जवळ असले तरी वन गहन आहे. ते तर्कालाही न सुचणारे गुप्त स्थान आहे. तेथे फळमूळे, गंगेचे पाणी आणि वस्तीसाठी विश्रामस्थानही आहे. तेथे तुम्ही तिघाजणांनी यावे, असे त्या ऋषीश्वरांच्या मनात होते. तेच ते बोलत असताना तुझ्या मनात शंका निर्माण झाली.''

श्रीरामाने हे सर्व ऐकल्यावर समस्त ऋषींना हात जोडून नमन केले आणि विनवून सांगितले, ''आपण सर्वजण आश्रमात सुखाने राहा. त्या राक्षसांकडे मी पाहतो. गोब्राह्मणांचे संरक्षण करणे हेच आमचे व्रत आणि स्वधर्माचरण आहे. मी स्वतः श्रीराम रक्षण करत असताना तुम्हाला भय कशाचेही नाही. मी बाणाने मेरुपर्वत भेदीन, राक्षसांच्या रांगा मारीन, मी रघुवीर तुमच्या घरी सेवेला असताना तुम्हाला कशाप्रकारचे भय आहे?'' असे श्रीरामाने सांगता अवघे ऋषी विचार करू लागले. 'तीन धुरंधर राक्षस सैन्यबलासह आले तर या दोघांना ते कसे आवरतील? एक सीतेला घेऊन पळेल, श्रीराम एकटा उरेल राक्षसांच्या घातासाठी झुंजायला. हे त्याला कसे सहन करता येईल? पूर्वी याने सुबाहू मारला तेव्हा सीता जवळ नव्हती. दोघे बंधू एकात्मतेने झुंजले आणि सुबाहूचा घात केला. स्त्रीच्या काळजीमुळे पुरुषार्थाला धैर्य उरत नाही. स्त्रीचा लोभ मनात असताना जय सर्वथा मिळत नाही.'

'ते तीन राक्षसबंधू हत्तीसारखे बलदंड आहेत. त्यांच्याशी एकटा श्रीराम किती झुंजेल. त्याचे चार बाण संपून जातील आणि मग माघारी पळावे लागेल. चित्तात स्त्रीलोभ असला की युद्धात एकाग्रता राहात नाही. ह्यामुळे चिंता मंत्रबीज गिळून टाकते. मग विजय कसा मिळणार? आता हे तिघे वनात गुप्त होतील. मग राक्षस आम्हाला खातील. तेव्हा यांची संगत सोडून आपण निश्चित निघू या.' मग ते ऋषी युक्ती सांगतो असे म्हणून बोलले, ''तुम्ही दोघेही पुरुषार्थी आहात, तेव्हा येथे वस्तीला राहू नका, आमच्यासह निश्चित या. राक्षस हे धर्मयुद्ध खेळणारे नसतात. छळणे, पळणे हीच त्यांची शक्ती असते. नाना युक्त्या करून, फसगतीने सुरवरांना मारतात. राक्षस हे निशाचर असतात. रात्री येऊन अर्ध्या झोपेत तुम्हाला मारतात. त्यांच्यापुढे तुमची शक्ती ती काय?'' असे त्या ऋषीश्वरांनी म्हटल्यावर रामाने काहीही प्रत्युत्तर दिले नाही. ब्राह्मणांच्या मनात धैर्यनिर्धार नव्हता, त्यांना थोर विकल्पाने घेरले होते. जर या ब्राह्मणांना विश्वास नाही तर त्यांना माझी संगत मिळणार नाही. श्रीरामाला त्यागून ते ऋषी तत्काळ निघाले. एक रात्र राहायलाही त्यांना धीर धरवत नव्हता. रघुपतीला सोडून ते निराळ्या मार्गाने निघाले.

श्रीराम जनस्थानाकडे जातो

श्रीरामाला नमन करून, ते भीतीने कंपायमान झालेले ब्राह्मण, श्रीरामाकडे आज्ञा मागत होते. श्रीरामाने त्यांना ''आपण सुखाने जावे,'' असे सांगितले. नंतर ती अविश्वासाने भारलेली द्विजमंडळी, हाताशी पत्नी, कडेवर लेकरे, डोक्यावर यज्ञपात्रे घेऊन दुसऱ्या आश्रमाला गेली.

श्रीरामाने विचार केला की जनस्थानात राक्षस वाढले आहेत, तर त्यांचे समूळ निर्दाळण करण्यासाठी आजच इथून निघावे. सीतेने रामाच्या विचाराला दुजोरा देत म्हटले, ''सगळे ऋषी येथून गेल्यावर आता येथे राहणे आवडत नाही. तेव्हा आजच निघू या.'' लक्ष्मण म्हणाला, ''ऋषीश्वर भयभीत मनाने गेले. ते भय निर्दाळून टाकण्यासाठी आपण शीघ्र प्रयाण करावे.'' राक्षसांचे निर्दाळण करण्याच्या विचाराने श्रीराम उल्हसित झाला. त्याच्या सर्वांगात स्फुरण निर्माण झाले. दंडकारण्य शुद्ध, निर्वेध करण्यासाठी तो उत्सुक बनला. त्याचे बाहू थरथरू लागले, रोमावळी पिंजारल्या, राक्षसांची होळी करण्यासाठी महा पराक्रमी श्रीराम सिद्ध झाला. श्रीरामाच्या चित्तात उल्हास येऊन तो लक्ष्मणाला म्हणाला, ''सर्व आयुधे घेऊन, सीतेसह त्वरित निघ.''

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

अध्याय दुसरा

ऋषीवर्य अत्रि जेथे राहात होते, त्या दु:खितांचे विश्रांतिस्थान असलेल्या, पर्वतापर्यंत, सीता आणि लक्ष्मण यांच्यासह श्रीराम येऊन पोचला. तेथे अत्रिऋषींच्या पुढे श्रीरामाने साष्टांग नमस्कार घातला. अत्रींनी रामाला आलिंगन दिले. त्यांच्या ध्येयध्यानाचे त्यामुळे समाधान झाले. सीता आणि लक्ष्मण यांनीही ऋषींना साष्टांग वंदन केले. त्यांचे चरण मस्तकी धरले. त्यामुळे ऋषिवर्य सुखसंपन्न झाले. श्रीरामाने ऋषींची पत्नी अनसूया हिचेही चरणवंदन केले. तेव्हा अत्रि म्हणाले, "रघुनाथा, ही तुझी पुरातन काळातली माताच आहे." ऋषींचे हे वचन ऐकताच सौमित्रानेही तिच्या चरणांना वंदन केले. सीतेने तिच्या पायावर मस्तक ठेवून वंदन केले. अनसूयेने सीतेला हृदयाशी धरले. सीतेला पाहून अनसूयेला सुखानंद झाला. ती सीतेला म्हणाली, "धन्य धन्य तू सुंदरी. अत्यंत पतिनिष्ठ पतिव्रता आहेस तू. तुझ्या अंगी बाळपण आहे, पतीच्या व्रताला अनुलक्षून तू पायी चालत वनात गमन करते आहेस, तू खरोखर संपूर्ण पतिव्रता आहेस. पतीच्या वचनाबाहेर न जाता, ज्या सती पतीच्या व्रताला अनुसरतात त्याच खरोखर पतिव्रता. तशी तू सीता भाग्यवंत आहेस." अशा शब्दात सीतेची स्तुती करून, दोन्ही हातांनी जवळ ओढून, अनसूयेने सीता पतिव्रतेला स्वानंदाने आणि प्रेमाने आलिंगन दिले. सीतेचे हृद्गत जाणून अनसूया कृपायुक्त झाली तिने आपले पतिव्रता व्रत सीतेला आनंदाने सांगितले.

पतिव्रता व्रत, दिव्यवस्त्र सीतेला मिळणे.

सीतेला पतिव्रतेचे व्रत अनसूयेने उल्हासाने दिले. त्यावेळी दिव्य वस्त्रे, उटी यांचे आनंदाने दान केले. त्याविषयी आता संपूर्ण कथन ऐका.

अनसूया कृपावंत होती. तिने सीतेला दिव्य वस्त्रे नेसविली. दिव्य चंदनाची उटी लावली, दिव्य सुमनांच्या माळा घातल्या. सीतेचे लाड पुरवण्यासाठी अनसूयेने तिला एक अलंकार दिला, ज्याचा अहोरात्र एवढा उजेड पडेल, की त्यापुढे शशिसूर्य फिके पडावे. त्या अलंकाराच्या दिव्य प्रकाशापुढे चंद्रसूर्य काजवे ठरतील असा तो प्रकाश देणारा अलंकार होता. अनसूयेची स्वत:ची प्रसिद्धी पतिव्रता म्हणूनच होती. पतिसामर्थ्य तिच्या व्रताचा आधार होता. तिचा हात लागताच तिन्ही देव बालक झाले असे तिचे सामर्थ्य अद्‌भुत होते. तेच तिने सीतेला अर्पण केले. अनसूया म्हणाली, "या माझ्या दिव्य वस्त्रांची थोरवी अशी आहे की ती वापरून देखील मलिन होत नाहीत. त्यामुळे ती कधी धोब्याचे दार पाहात नाहीत. ही वस्त्रे आत्मतेजाने निर्मळ राहतात."

"तसेच मी लावलेली उटी धुवूनही पुसली जात नाही. देहात दिव्य चंदनाचे महिमान असे आहे की अभ्यंगमर्दन झाले तरी त्याचा सुगंध उडून जात नाही. ही दिव्य सुमनमाळ कदापीही सुकत नाही. नित्य टवटवीत; सुपरिमळयुक्त, घमघमीत अशी गळ्यात राहाते. सीते सावधपणे ऐक. तू माझा प्रसाद पावलीस त्यामुळे तुला कधीही राक्षसांचे भय वाटणार नाही. नि:शंक आणि निर्भय हो. कधी रघुनाथाचा वियोग झालाच, तर तो वियोग तुझ्या चित्ताला बाधणार नाही. ही पूर्वापर पूर्वकथा श्रीरामच सांगेल." एवढे बोलून अनसूयेने सीतेच्या मस्तकावर हात ठेवला. याप्रकारे अनसूयेने सीतेला अनुग्रह दिला. त्या उपदेशाच्या प्राप्तीमुळे सीतेला सुखस्वानंद झाला. अनसूया महापतिव्रता होती. तिने पुढचा कार्यार्थ पाहून, लंकानाथाचा वध व्हावा यासाठीच सीता अनुग्रहिली. श्रीराम, सौमित्र, सीता यांना पाहून अत्रींच्या चित्तात उल्हास निर्माण झाला. नंतर पूर्वापर पूर्वकथा श्रीरामच अत्रिमुखाने सांगता झाला.

अनसूयेची पूर्वकथा

"अनसूया ही महापतिव्रता, तपस्विनी, अशी वृद्धा आहे. तिचे मस्तक चंद्रकिरणांसारखे शोभते आहे. पतिधर्माला ती अनुकूल असते. गिरिकंदरात

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

न जाता, घरच्या घरी दहा हजार वर्षांवर तिने तप केले अशी तिची अगाध थोरवी आहे. आता 'घरच्या घरी कसले तप' असे विचारण्याचा तुझा संकल्प झाला असेल तर ऐक. त्या तपाचे स्वरूप, 'अत्यंत निष्पाप' असे मी म्हणेन. कोणाचीही असूया न करता ती राहिली, यासाठीच तिचे नाव अनसूया आहे, काम, क्रोध, लोभ ज्यांना कधीही बाधत नाही ते महातप. तप करून करून ते तापस क्रोधाने ते तप कठोर करतात. दंडमुंडन हा वेष वृथा होतो आणि तपश्चर्या व्यर्थ जाते. काम, क्रोध आणि लोभ यांचा त्याग हा तपातला दुर्लभ भाग आहे. ते हिने घरच्या घरी सुलभ केले. ती अत्यंत निर्लोभी राहिली. जेथे लोभ तेथे असूया, जिथे निर्लोभता तिथे अनसूया. याचे नाव तपश्चर्या हे रघुवर्या निश्चित समज. पतीच्या वचनाचे उल्लंघन न करणे हे परम तपच स्त्रियांना करावे लागते. ते हिने दहा हज़ार वर्षे केले, ते अनसूयेला प्राप्त झाले. पतीचे वचन उल्लंघून पतिव्रतात न्यून पडले तर ना सामर्थ्य, ना समाधान. स्त्रीपुरुष कुत्र्याप्रमाणे वसवसतात. दहा हज़ार वर्षे माझे वचन उल्लंघिले नाही. त्या तपाने ही अत्यंत समर्थ झाली आहे. तिच्या सामर्थ्याचे वर्णन ऐक."

"सृष्टीत एकदा दहा वर्षे अवर्षणाने दुर्भिक्ष पडले. पृथ्वीच्या पोटात तृणच नाही तिथे वृथा गोष्टी काय करणार. अशा त्या काळात अनसूयेने फळमूळे देऊन सर्व जन वाचविले. अहोरात्र तिने कधी पाठ फिरवली नाही. फळमूळांनी जन तृप्त केले. प्रातःकाळी गौतम पेरायचा, माध्याह्नी आणून द्यायचा साळी, त्या शिजवून अहल्येने ऋषीमंडळी वाचविली. गौतमाने ब्राह्मण वाचवले, पण अनसूयेने सर्व वर्णावर्ण, पशू, पक्षी, डुकरे, कुत्री या सर्वांना त्रास न मानता तृप्तिभोजन देऊन वाचविले. जो जो दारावर मागणारा येई, तेवढा तेवढा अनसूयेला उल्हास वाटे. अशी सर्वांना तृप्ती देताना, तिला अहर्निश उत्साह असे. पृथ्वीवर वृक्ष नाही तरी ही फळमूळे पुरवते असे अगाध सामर्थ्य हिच्यापाशी असलेले पाहून देवद्विजांना आश्चर्य वाटले. जसा गंगेचा प्रवाह वाहावा तसे फळमूळांना हिने पुरविले; ही तिच्या सामर्थ्याची कला द्विजदेवांना अतर्क्य होती. अवर्षण असताना तृप्तीभोजन द्यायचे हे हिचे व्रत असल्याचे ऐकून तिन्ही देव स्वतः हिचा छळ करण्यासाठी आले."

दत्तात्रेय अवताराची कथा

"ब्रह्मा, विष्णू, महेश हे तिन्ही देव ब्राह्मणवेषाने आले. त्यांनी याचक म्हणून येऊन अनसूयेकडून इच्छापूर्तीसाठी वचन घेतले. नंतर देवांनी इच्छा व्यक्त केली की अनसूयेने नग्न होऊन आपल्याला इच्छाभोजन द्यावे. त्यांची ही मागणी ऐकूनही, हिच्या मनात कसलीच शंका आली नाही. तिने स्वानंदस्थितीत राहून होकार दिला. पुढचा विनोद ऐकण्यासारखा आहे श्रीरामा. अनसूयेने माझे चरणतीर्थ हातात घेऊन, त्या तिघा ब्राह्मणवेषधारी देवांवर अभिषिंचन केले. त्याबरोबर ते तिघे बालरूपात आले. ती बालके सहा महिन्यांची अज्ञान होती. मग नग्न होऊन पायांवर ओठंगून हिने त्या तिन्ही बालकांना स्तनपान दिले आणि पाळण्यात घालून झोके द्यायला आरंभ केला."

"लक्ष्मी, सावित्री आणि पार्वती या तिघींमध्ये सामर्थ्यावरून नेहमी विवाद चाले. त्यांना अनसूयेच्या सामर्थ्याची स्थिती दाखविण्यासाठी त्या तिन्ही देवमूर्ती छळण्यास आलेल्या होत्या. इतरांना छळ करून त्रास देणारा स्वतःच छळाचा अनुभव घेतो. त्याप्रमाणे छळासाठी आलेले देव आपणच बालके झाले. अत्यंत अज्ञान अवस्थेत ते गेले. दहा महिन्यांची अहोरात्रीत अनसूयेने निश्चिती केली. तत्काळ तिघांची प्रसूती होऊन अपत्यस्थिती पावले. अतिशय आपत्ती भोगतात म्हणून अपत्य म्हणतात. स्वतःची विष्ठा स्वतःच चिवडतात अशी ती बालकत्व-प्राप्ती तीनही देवांना झाली."

"लक्ष्मी, सावित्री, पार्वती या तिघी ही परिस्थिती पाहून कुसमुसत होत्या. त्यांचे पती अनुसूयेच्या हाती अडकले होते आणि तिच्यापुढे

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

यांचे सामर्थ्य चालत नव्हते. जसे सूर्यापुढे काजवे तशा त्या तिघी अनसूयेपुढे गर्वहत झाल्या होत्या. अनसूयेपुढे लोटांगण घालून "आमचे पती आम्हाला दे माते" अशी विनवणी करू लागल्या. त्यावर अनसूया म्हणाली. "आपण ऋषिवर्यांना विचारा." त्या देवी मग काकुळतीला येऊन, "ऋषिराया, कृपामूर्ती, आपण पतिनिर्मुक्ती सांगावी" अशी प्रार्थना करू लागल्या. अनसूया पतिव्रताशिरोरत्न असल्याने तिने माझी आज्ञा लाभल्यावरच, त्या तिघांचे अज्ञान हरून, त्यांना सावधान आणि सुखरूप केले. त्या तिघांनीही अनसूयेचे स्तवन केले. तिघेही अत्रिगोत्री पुत्र म्हणून उत्पन्न झाले. ब्रह्मा चंद्र झाला, रुद्र हा कोपाग्नी दुर्वास झाला आणि विष्णू झाला दत्तात्रेय मुनी. त्यामुळे रामा, ही तुझी जननी प्राचीनतम अनसूया. ही तुझी आदिमाता हे सत्य मान. रघुनाथा, हिच्या चरणावर माथा टेकवलात तर वनवासात तुम्हाला पूर्ण निर्भयता लाभेल. अनसूया ही परम श्रेष्ठ पतिव्रता आहे. तिने सीतेला अनुग्रहित केले आहे. त्यामुळे वनवासात असताना तुम्हाला कोणतेही भय नाही. ज्या ज्या वेळी भय वाटेल त्या त्या प्रसंगात तुम्ही निर्भय व्हाल. जेव्हा कोणतेही अपयश पावाल तेव्हा त्या अपयशातून यशस्वी आणि जगद्वंद्य व्हाल." नंतर तीन रात्री तेथे राहून, फळमूळांचा आदर करून ते पुढे निघाले.

श्रीरामाने अत्रिऋषींना आणि अनसूयेला अभिवादन केले आणि दंडकारण्याकडे तो राक्षसांचा अंतक निघाला. मार्गात वनामधील ऋषींचे आश्रम, अग्निहोत्राची नव्हाळी, यागाची शुद्ध शैली पाहात वनस्थळातून फिरत फिरत ते मार्गक्रमण करत चालले.

विराधवनातील प्रसंग

वनवासातील त्यांची वाटचाल अनेक प्रकारांनी आनंद घेत सुरू होती. कोठे तीन रात्री, कुठे पाचरात्री, क्वचित सात रात्री अशी वस्ती करत श्रीराम तत्परतेने गमन करत होता. त्यांना पुढे एक दुर्गम वन आढळले. तेथे सिंह, हत्ती, वाघ, मृग, ससे, साळ्या, लांडगे, कोल्हे हे प्राणी जीव घेऊन पळताना दिसले. सिंहाने हत्ती मारावे पण ते दोघेही एका वाटेने पळत होते. वाघाकडून हरिणकंठ फोडला जायचा, तर ते दोघेही एकत्रच पळत आहेत हे पाहून श्रीराम म्हणाला, "सौमित्रा, या श्वापदांना महद्भय वाटते आहे. आपला वैरभाव विसरून सारे आक्रोश करत पळताना दिसतात. यांना कशाचे एवढे भय वाटते आहे?" असा विचार रघुनंदनाने बोलून दाखवला आणि तेवढ्यात धावत येऊन विराधाने सीतेचे हरण केले. श्रीराम, लक्ष्मण हे पुढे आणि त्यांच्या मागून सीता चालत होती. सीतेचे सौंदर्य पाहून विराधाने तिला तत्काळ पळविली.

सीतेला दोन्ही हातांनी धरून, तिला आपल्या मांडीवर बसवून विराध तिला म्हणाला, "मी तुझा पती होईन. तू चित्तात कसलीही चिंता आणू नकोस. तू अप्सरा का खेचरी आहेस, वनदेवता की देवेश्वरी कोणीही असलीस तरी हे सुंदरी माझ्या भाग्याने सापडली आहेस. तू सुखाने माझ्या घरी नांदावेस. तुझ्यासारखी सुंदरी जर माझ्या घरात प्रवेश करील तर मी हत्तींच्या गंडस्थळातील मोत्यांचे अलंकार करून तुला शृंगारीन." आपल्याला ही सुंदरी मिळाली या कल्पनेने त्या राक्षसाचे चित्त उल्हसित झाले. परंतु सीता डगमगली नाही. रघुनाथाचे बळ तिच्या पाठीशी होते. "श्रीरामाच्या बाणांपुढे विराध राक्षस केवळ बापुडा. मला कोणीकडे नेईल तेथे हा स्पष्ट मरण पावेल." इकडे ते वन अत्यंत गूढ आणि गहन असल्याने राम, लक्ष्मण पुढे गेले. त्यांना विराध दिसला नाही. सीतेला ते दोघेजण दिसले नाहीत.

अनसूयेने अनुग्रह केल्याने सीतेला कसलेही भय वाटत नव्हते. तिने श्रीरघुनाथाचे स्मरण केले. "हे कृपावंत रामा मला पाव." श्रीरामस्मरण ऐकून तो राक्षस कंपायमान झाला. सीतेला म्हणाला, "नको स्मरण करू कारण ते शब्द तीक्ष्ण असून मला बाधत आहेत" यावेळी सीतेचा शब्द ऐकून

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

राम, लक्ष्मण मागे परतले. परंतु त्या गूढ, गहन महावनात त्यांना सीतादर्शन झाले नाही. तेव्हा लक्ष्मण अत्यंत कोपला. त्याने बाण सोडून ते घनदाट वन छेदून सपाट केले. तेव्हा पापी विराध दिसला. तो राक्षस अत्यंत क्रूर, पर्वतासारखा महाथोर, वाकडे नाक, वाकडे तोंड, प्रचंड पोट असा अजिंक्य भासला. आठ महासिंहांची मढी भाल्यावर खोचून ती त्याने कावडीसारखी खांद्यावर घेतली होती. मृग, व्याळ, चितळ अशा श्वापदांचे समूह तो मारत असे. दातांसह हत्तींची शिरे आणि रक्ताने थबथबणारी गजचर्मे, पाच पाच वाघ मारून तो खांद्यावर वाहात होता. त्याची जीभ लालभडक आणि लवलवणारी होती. डोळे अत्यंत आरक्त झालेले होते. प्राणी दिसताच, त्याचा अन्त करायला तो स्वतः धावत असे.

श्रीराम - विराध यांचा संघर्ष

श्रीराम आणि लक्ष्मण हे विराधाला दिसताच, त्याने सीतेला "हे दोघे कोण?" असे विचारले. त्यावर "श्रीराम माझा पती आणि लक्ष्मण दीर, ते दोघे माझी सोडवणूक करायला आले आहेत." असे सीतेने सांगितले. विराध म्हणाला, "अग तू माझी कांता आहेस. तुला मी कधीही सोडणार नाही. या दोघांना मी आताच खाऊन टाकतो. तू मुळीसुद्धा चिंता करू नकोस." एवढे बोलून विराधाने एक भयंकर आरोळी दिली आणि धावत जाऊन श्रीरामासमोर उभा राहून मूर्खपणाने म्हणाला, "तुमच्याबरोबर असलेली सीता, आता माझी कांता झाली आहे. तुम्हाला मी मारणार नाही; पण तुम्ही जीव वाचवून येथून पळा पाहू. तुम्ही जर युद्ध करीन म्हणालात तर क्षणार्धात तुम्हाला मारून, मी तुमचे रक्त पिऊन आणि मांस खाऊन टाकीन. अरे मी महाबळी विराध आहे. याच वनात मी राहतो. तुम्ही दोघे मुळातच मूर्ख असावेत; कारण बायकोला घेऊन वनात आलात. तुम्ही दोघे तापसी दिसता, मग धनुष्यबाण कशाला बाळगता? तुम्ही कोण, कोणाचे, कुठले ते सर्व मला सविस्तर सांगा."

श्रीरामाने विराधाला सांगितले, "ज्या धनुष्याने रावणाला त्रस्त केले तेच धनुष्य ज्याने दोरी चढवून भंगले, तो श्रीराम मीच. सुबाहूचा मीच प्राण घेतला, मारीचाला मीच उडवला, बाणाने ताटिका मीच मारली, तो श्रीराम म्हणजे मीच आहे. एकवीस वेळा पृथ्वी ज्या भार्गव परशुरामाने निःक्षत्रीय केली, तोही मी शौर्याने लाजविला, तोच निश्चित श्रीराम मी आहे. सूर्यवंशातला विख्यात काकुत्स्थ दाशरथी श्रीराम हा मी या वनात राक्षसांचा संहार करण्यासाठीच निर्धाराने आलो आहे. सीता ही माझी स्वतःची पत्नी आहे आणि हा लक्ष्मण माझा धाकटा भाऊ आहे. आता तुझा कोणत्या राक्षसांशी काय संबंध आहे ते मला मुळापासून सांग पाहू." तेव्हा विराध राक्षस म्हणाला, "जगाद या नावाचा माझा पिता आणि शतरदा माझी माता, त्यांचा पुत्र मी विराध आहे. मी आता तुम्हाला ठार करणार आहे." हे त्याने म्हणताच लक्ष्मणाला भयंकर राग आला. त्याने सत्वर धनुष्याची प्रत्यंचा जोडून तीक्ष्ण असे अनेक बाण सोडले. कंकपत्री, बर्हपत्री सुवर्णपुंख, चौधारी या बाणांनी विराधाचे जिव्हार भेदले. त्यामुळे तो राक्षस फार संतापला. त्याने लक्ष्मणाचा प्राण घेण्यासाठी गर्जना करत शूळ सोडला. श्रीरामाने तो बाणाने मध्यंतरीच तोडला. त्याबरोबरच श्रीरामाने विरोधाला आव्हानाची हाक घालून एक अतिशय तीक्ष्ण आणि धगधगीत असा रुक्मपुंख बाण सोडला. त्यामुळे विराधाला झापड आली. मागे पळावे की पुढे जावे, हे करावे की करू नये, यावे की जावे हे त्याचे विचारच खुंटले.

विराधाला आत्मबोध, विराधकृतरामस्तुती

श्रीरामाच्या बाणाने जी लखलख निर्माण केली त्यामुळे विराधाला एकाएकी मोहात पाडले आणि तो विराध स्तब्ध झाला. सर्व क्रिया पूर्णपणे विसरला. राक्षसधर्म, युद्धाचा संभ्रम, क्रियाकर्म हे सर्वच विसरला. बाणाच्या घावाने विराध निर्भ्रम

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

केला. श्रीरामाचा बाण श्रीरामस्मरण घेवून आला. त्यामुळे विराधाचा देहाभिमान शांत झाला. तो गर्भबंधन घेऊन आला. अशी हृदयाची शुद्धता पाहून मगच रामबाण हृदय भेदून गेला. त्यामुळे पूर्ण बोध पावून विराध राक्षसाने प्राण सोडला. धन्य श्रीरामाचा बाण, जो लागताच राक्षस पूर्ण बोध पावला आणि मगच त्याने प्राण सोडला. त्यासंबधीचे निरूपण पुढे ऐका. रामबाणाने जिव्हार भेदले, रक्ताचा पूर वाहिला, शरीर विकल पडले, त्यामुळे विराध हर्षनिर्भर झाला. श्रीरामाच्या बाणाने भेदले, विकलेंद्रिय होऊन प्राण चालला, परंतु घावाने विराध संपूर्ण सुख पावला. श्रीरामाच्या बाणाने दुःखाचे निर्दाळण केले. वास्तविक घाव लागला तर दुःख व्हावे, परंतु दुःख जाऊन सुख प्राप्त झालेला विराध परम हर्षित झाला. बाणाने त्याला अलौकिक सुखी केले. "धन्य धन्य श्रीराममूर्ती, धन्य धन्य त्या बाणाची सुखशक्ती, धन्य धन्य सीता सती, जिने स्पर्शाने राक्षसत्वापासून निर्मुक्ती दिली. लक्ष्मणाने रागाने घोर अरण्य सपाट केले. माझ्या मोक्षाची वाट या सौमित्राने निर्दोष केली. जो करी शुद्ध मैत्री, त्याला म्हणतात सौमित्र. हा लक्ष्मण खरा सौमित्र आहे. त्यामुळे मी निशाचर सुखी झालो. मी अत्यंत अपवित्र राक्षस होतो. पण रामाच्या बाणाने पवित्र झालो. आता मला सुरवर वंदन करतात. रामबाणाने मला खरोखर सुखी केले. बाणात कसला सुखसंभ्रम, बाणात तर सुखरूप श्रीराम, बाणामधे अंतर्बाह्य परम श्रीराम, त्यामुळे मला सुखसंभ्रम झाला. मला शापामुळे अधम राक्षसाचे शरीर मिळाले होते. त्या शापाचे भस्म करून, श्रीरामाने मला अत्यंत सुखी केले आहे. मी आता माझ्या स्वतःच्या स्थानाला प्राप्त होईन. जन्ममरणाचा जो महाधाक तो हा घाव पूर्णत्वे फोडील. जगलो किंवा मेलो तरी आता त्याचे दुःख नाही. असे आत्मसुख रामाने दिले." यावर "शाप कसला? तू कोण?" असे रामाने प्रश्न केले. त्याविषयीचे पुढील निरूपण सांगावे अशी रामाने सूचना केली. तेव्हा विराधाने आपले पूर्ववृत्त सांगितले.

विराधाचे पूर्ववृत्त शाप-उःशाप कथन

कुबेर हा धन देणारा तुला माहिती आहेच. त्याने एकदा मला गायला बोलावले. मी तुंबरू. मी रंभेवर आसक्त होतो. मद्यपानाने उन्मत्त होतो. तशा स्थितीतच मला वळाने तिकडे नेण्यात आले. माझी मदगर्वित अवस्था पाहून "तू उन्मत्त राक्षस होऊन घोर वनात अघोरीपणे राहशील." असा शाप कुबेराने मला दिला. तो अद्‌भुत शाप ऐकून मी भयभीत झालो. कुबेराला लोटांगण घालून उःशाप मिळावा म्हणून प्रार्थना केली. त्यावेळी मला सांगण्यात आले, "श्रीराम, लक्ष्मण आणि सीता वनवासात असताना तू सीतेचे हरण करशील. नंतर दारुण युद्ध होईल. त्यामधे श्रीरामाचा बाण लागेल, आणि तू तत्काळ प्राण सोडशील. त्यावेळीच तुझे शापबंधन जाऊन तू आत्मभुवनाला प्राप्त होशील." अशी त्या उःशापाची कथा आहे. ती आज तत्त्वतः पूर्ण झाली. हे रामा, तुझा बाण लागताच अलौकिक सुखप्राप्ती झाली. तुझ्या बाणाची भेट होताच अहं, कोहं, सोहं ही त्रिपुटी छेदली जाऊन मी स्वानंदाने सुखी झालो. तुझा बाण लागताच माझे जन्म-मरण जिथे संपले, तिथे शाप बापुडा कोण! संपूर्ण सुख पावलो. जी सुखप्राप्ती झाली, तिला विकृती नाही; कल्पांतीही त्यात अधःपतन नाही. मला उःशापाने पुन्हा गंधर्वस्थिती प्राप्त झाली. गंधर्वदेहात वस्ती करूनही देहंकृती मला बाधत नाही. अशी नित्यमुक्ती तुझ्या बाणाने मला मिळाली आहे."

शरभंग ऋषींच्या आश्रमाकडे राम जातो

विराधाने राक्षसदेह पृथ्वीवर सोडला आणि तो विमानात बसला. जाताना त्याने श्रीरामाच्या वस्तीची सूचना सांगितली. 'येथून अर्धयोजन अंतरावर तपोधन शरभंग राहात आहेत. ते तपःतेजाने देदीप्यमान आहेत. तेथे तुम्ही अवश्य जा. ते ऋषी तुम्हाला वनवासाची स्थिती सांगतील आणि

https://archive.org/details/muthulakshmiacademy
Bhavan Vedic Trust, Lucknow

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Trust and eGangotri

तुझ्यामुळे त्यांना नित्यमुक्तीही मिळेल. हे तू श्रीरामा निश्चित समज."

"इंद्र शरभंगांकडे आला. तो त्यांना सत्यलोकामधे नेण्यासाठी आला होता. परंतु शरभंग तुझ्या भेटीसाठी सत्यलोक टाळून वनातच राहिले आहेत. श्रीराम दंडकारण्यात आला आणि विराध मारला हा वृत्तान्त आणि तुझा महाप्रताप जाणून ते तुझ्या भेटीसाठी थांबले आहेत. श्रीरामाच्या भेटीपुढे सत्यलोक ते काय बापडे, असे त्यांना सत्य ज्ञान झाले आहे. यामुळे तुझ्या भेटीची इच्छा धरून ते तिष्ठत आहेत. मला राक्षसाला सुखी केलेस, तसेच शरभंगांनाही तू सुखी कर." एवढे सांगून विराधाने श्रीरामासह तिघांना वंदन केले आणि मग विमानात बसून तो आत्मभुवनाला गेला. श्रीरामचरित्र पाहून विस्मित झालेले सुरवर श्रीरामाचा जयजयकार करून आणि पुष्पवृष्टी करून आनंद व्यक्त करू लागले. दुर्धर विराधाचा वध करून श्रीरामचंद्र विजयी झाला याचा तो आनंद होता. ते विराधाचे घोर वन असे होते की तेथे कोणी प्रवेश करू शकत नव्हते. तो विराध श्रीरामाने बाणाने वधून तारला. श्रीराम पूर्ण कृपाळू आहे, असे सर्व म्हणू लागले.

अध्याय तिसरा

महाभयानक विराधाचा क्षणार्धात वध करणारे ते दोघे बंधू प्रतापाने शोभतात याचा सीतेला परम आनंद झाला. नंतर तिघे जण त्वरेने शरभंगांच्या आश्रमाकडे निघाले. दोन कोस मार्गक्रमण केल्यावर त्यांना तो आश्रम दिसला. त्यावेळी शरभंगांना ब्रह्मलोकी नेण्यासाठी ब्रह्मदेवाने हंसयुक्त विमान घेऊन इंद्राला पाठविले होते.

शरभंग-श्रीराम भेट

हंसयुक्त विमानात बसून यायचे सामर्थ्य इंद्राला नव्हते. त्यामुळे विमानाला पुढे पाठवून स्वतः इंद्र रथातून आश्रमात आला. ज्या विमानात बसायचे इंद्रालाही सामर्थ्य नव्हते, असे विमान शरभंगांसाठी पाठविले, त्यावरून शरभंगांची निष्ठा ब्रह्मादिकांनाही किती पूज्य होती तेच स्पष्ट होते. इंद्रादिक देव त्या आश्रमात येऊन शरभंगांना लोटांगणाने नमन करून विनंती करत होते. इंद्र मधुर शब्दात म्हणाला, "ब्रह्मदेवाच्या आज्ञेवरून आलो आहोत. आपण हंसयुक्त विमानात बसून ब्रह्मभुवनात प्रवेश करावा." तेव्हा शरभंगांनी त्यांना सांगितले, "या वनात श्रीरघुनाथ निश्चित आला आहे. तो विराधाचा वध करून एवढ्यात येथे येईल. श्रीरामाचे दर्शन न घेता मला ब्रह्मसदनाला यायचे नाही. तुम्ही विमान घेऊन जा. मी स्वतः माझ्या सत्तेने येईन. श्रीरामाच्या भेटीपुढे ब्रह्मभुवन ते काय बिचारे. मला आता यावेळी येणे जमणार नाही असे ब्रह्मदेवाला सांगा." हे शरभंग बोलत असताना आणि हात जोडून असलेला इंद्र त्यांचे बोलणे ऐकत असताना, श्रीराम तेथे पोचला. त्याने इंद्राला पाहिले.

इंद्राची अंगशोभा म्हणजे सोलीव सूर्याची प्रभा किंवा अग्नीचा गाभा अशी शोभत होती. पृथ्वीला स्पर्श न करता अधांतरी चालणारे त्याच्या रथाचे घोडे, मस्तकावर चंद्राच्या तेजासारखे छत्र, दोन चवऱ्या ढाळल्या जाणे, त्याच्याबरोबर सिद्ध, भाट, देवगण, मरुद्‌गण, बृहस्पती हे सज्ञान गुरू असे सर्व होते. त्यांनी रघुनंदन पाहिला. सीता, सौमित्र, श्रीराम यांना पाहून त्यांच्या तेजापुढे सर्व काजवे ठरले. श्रीरामप्रभा अत्यंत अद्‌भुत होती. ती पाहून सुरसिद्ध चकित झाले. श्रीरामाला पाहताच सूर्यप्रकाशापुढे दिवा असावा तशी देवांना दशा आली; ते आपल्या देवस्वभावाला लाजले. श्रीरघुनाथाला त्यांनी पाहिल्यावर त्यांना अत्यंत अद्‌भुत सुख झाले. ते रामाचा जयजयकार करत निघाले. ते स्वतःच्या ठिकाणी जात असताना देवांना ऋषिवर्य शरभंग म्हणाले, "ब्रह्मसदनात याची पुनरावृत्ती होऊन, रामदर्शनाने अक्षयप्राप्ती होते, याविषयी तुम्ही ब्रह्मदेवाला विचारा. श्रीराम पाहताच

https://archive.org/details/@sarayu_trust, lucknow

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

जन्ममरणाला तुटी येते आणि पुनरावृत्तीची गोष्ट थांबते. अशी रामाच्या सुखभेटीची शक्ती आहे.'' इंद्रादी देवांना उपेक्षून, ब्रह्मसदनाची भेट टाळून, श्रीरामाच्या दर्शनासाठी सज्ञान शरभंग थांबले.

ऋषिवर्यांचे बोलणे ऐकल्यावर इंद्रादी देव निघून गेले. नंतर श्रीरामाने आश्रमात प्रवेश करून शरभंगांना वंदन केले. त्याने त्यांना चरणस्पर्श करून नमन केले. सीता आणि लक्ष्मण यांनी दंडवत घातले. ऋषींचे चरण मस्तकी धरले. ऋषींनी सर्वांना आलिंगन दिले. नंतर त्यांनी मधुपर्कविधीने रघुनंदनाची पूजा केली आणि सावधान चित्त होऊन बसले. मग श्रीरामाने ऋषींना विचारले, ''इंद्रादिक देवसमूह आश्रमामध्ये आले होते ते कशासाठी?'' श्रीरामाचा प्रश्न ऐकून शरभंगांना आश्चर्य वाटले. 'कोणतेही ध्यान, जप, तप न करताही श्रीरामाला दिव्यदर्शन घडते. दिव्यचक्षू श्रीरामाच्या पोटात असून, तो अखिल सृष्टी पाहतो. त्याला विशाल ब्रह्मदृष्टी आहे. श्रीराम हा वेदशास्त्रांचे वर्म, केवळ परब्रह्म असून दीनांना तारण्यासाठी वनवासासाठी आला आहे. श्रीराम म्हणजे विश्रामधाम आहे. अशी श्रीरामाची कीर्ती आहे. त्याची मला आज प्रतीती आली.' असे शरभंगांच्या मनात आले.

शरभंगांचे स्ववृत्त कथन आणि प्रयाण

श्रीरामाला आपली पूर्वस्थिती सांगावी यासाठी शरभंगांनी आपल्या धर्मस्थितीचे कथन केले. ''मी जी जी प्राप्ती साधली ती सामान्य जनांना दुस्तर आहे. त्या धर्माची आत्मस्थिती मी यथाक्रम सांगतो आहे. माझे सर्वांग कर्माने अविकल राहिले. मी पितृलोक मिळविला. त्याने मला सुख वाटले नाही. तेव्हा मी त्याचा पूर्णपणे त्याग केला. नंतर शंभर सोमयाग करून मी स्वर्गभोग साधला. तो मला क्षयरोगासारखा वाटून, मी त्याचाही संपूर्ण त्याग केला. पुढे महर्लोक, जनलोक, तपोलोक, हे साधूनही मला सुख मिळेना. तेव्हा मी त्यांचाही त्याग केला. ब्राह्मणभक्ती आणि सत्यव्रताचरण यांमधे सत्यलोक प्राप्त करून घेतला. त्यामुळेच इंद्रादी देव मला नेण्यासाठी स्वतः येथे आले.''

''चतुरानन ब्रह्मदेवाने त्यासाठी हंसयुक्त विमानही पाठविले. परंतु तुझे आगमन होणार असल्याने मी ब्रह्मसदनाचाही त्याग केला. मी आजवर इहलोक आणि परलोक हे प्राप्त होण्याएवढे पुण्य संपादन केले आहे. ते अद्भुत पुण्य आज मी तुला अर्पण केले आहे. मला श्रीरघुनाथाचे प्रेम मिळावे. कर्म जर ब्रह्मार्पण केले नाही तर ते जन्ममरण वाढविते. तुझे चरण पाहताच, मी सर्व कर्मे श्रीरामार्पण केली आहेत. पूर्वी मला असा भ्रम होता की त्या पुण्याने ब्रह्मप्राप्ती होते. पुण्यपापक्षयाच्या शेवटी ब्रह्मप्राप्ती होते आणि श्रीराममूर्ती भेटते. लोकलोकांतर पुण्याने दुःख संपत नाही आणि सुखही भेटत नाही. तुझे मुख पाहून मात्र अलौकिक सुखप्राप्ती होते. श्रीराम समक्ष दृष्टीने पाहिला म्हणजे समूळ संसार नष्ट होतो. निष्काम पुण्याच्या कोटी तुझ्या भेटीने प्राप्त होतात. या दृष्टीनेच मी तुझ्या भेटीसाठी सत्यलोकगमन टाळले. श्रीराम दर्शनाने जीवशिवांना समाधान होते.''

''श्रीराममूर्तीच्या दर्शनाने सर्वेंद्रियांना नित्य विश्रांती मिळते हा माझा स्वतःचाच अनुभव आहे. ते सत्य आहे.'' ही ऋषींची वचनोक्ती ऐकून श्रीराम संतोषला. शरभंग ऋषींची अद्भुत शक्ती पाहून, त्याने आपणहून त्यांना विचारले, ''दंडकारण्य हे महावन आहे. तेव्हा या माझ्या वनवासात मी माझे निवासस्थान कोठे करावे, त्याविषयी मला आज्ञा द्या.'' त्यावर शरभंगांनी सांगितले,'' याच वनात राहणारे सुतीक्ष्ण हे महाऋषी आहेत. त्यांच्याकडे तू त्वरित जा. ते तुम्हाला वनवासात कोठे वस्ती करावी याविषयी यथास्थित मार्गदर्शन करतील. त्या वास्तव्याने तुझी त्रैलोक्यात कीर्ती वाढेल. हे प्रज्ञावंत श्रीरामा, याच मार्गाने तुम्ही पुढे जावे. त्यामुळे तुम्हाला सुतीक्ष्ण ऋषींचे दर्शन होईल. परंतु तत्पूर्वी माझी एक विनंती आहे ती सर्वज्ञ श्रीरामा तू

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

ऐकावीस."

शरभंग आत्मदहन करून सत्यलोकी

"हे श्रीरामा, तुझे चरण पाहिल्यावर दृश्य, द्रष्टा, दर्शन हे सर्व खुंटले. भवभयाचे भान, गमनागमनाचे भय, मला उरले नाही. तेव्हा प्रारब्ध बळाने या सृष्टीत वर्णन करणे वाणीला शक्य नाही अशी गोष्ट मला येथे उठाउठी स्मरते आणि सत्यलोकात नेते. माझे प्रारब्ध पाहूनच ब्रह्मदेवाने विमान धाडले असणार; परंतु ते मी परत धाडले, याचे कारण मला तुझे दर्शन घ्यायचे होते. तुझी जेव्हा भेट होते तेव्हा प्रारब्धदेहाची गाठ सुटते. हे जगजेठी तुला पाहताच लागलीच देह पडेल. यामुळे तुला सावधपणे पाहून, स्वतःच्या देहाचे दहन करून, सत्यलोकात गमन करून स्थिर व्हावे असे माझ्या मनात आहे. श्रीरामा माझ्यासाठी तू आणखी क्षणभर थांब. साप जशी कात टाकतो, तशी ह्या स्थूल देहाची निवृत्ती मी निश्चित करीन. स्थूल देह होतात, जातात, परंतु आत्मस्थिती पालटत नाही, यासाठी योगाग्नी प्रज्वलित करून देहाकृती जाळून निश्चित सत्यलोकात जाईन. हे रघुनाथा, तुझ्या कृपेने जन्म झाला तरी, कर्म करतानाही किंवा देह मेला तरी मला भय नाही. दोराअंगी सर्प जन्मला, काही काळ नांदून स्वतः संपला, त्याला दोर भ्यायला नाही, तसा हा देहसंग झाला. ज्याप्रमाणे देहाबरोबर खोटी छाया, त्याप्रमाणे मुक्तांसह खोटी काया, आता रघुराया ती राहिली आहे केवळ अदृष्ट भोगण्यासाठी." असे बोलून श्रीरामाच्या समक्ष शरभंगांनी आसन घालून योगाग्नीच्या साहाय्याने आपले दहन केले. त्यांनी योगाग्नीने देहदहन केल्यामुळे सत्यलोक भोगण्यासाठी देदीप्यमान, तेजस्वी कुमारदेह पावले.

याज्ञिक स्वर्गभुवन साधतात, त्याहून या सत्यलोकाचा महिमा गहन आहे. पितृस्थान क्रमून, स्वर्ग महर्जन क्रमून, देवसदन क्रमून, सत्यलोकात ते शरभंग विराजमान झाले. सत्यलोकात शरभंगांना श्रीरामकृपा प्राप्त झाली. तेथेही त्यांना देहबुद्धी नव्हती. सर्वांना ते पूज्य झाले. ब्रह्मदेवाने सन्मान केला तरी त्यांनी त्याचा गर्व किंवा देहबुद्धी न मानता श्रीरामकृपेचे ऋण मानले. विदेहत्वे प्रारब्ध भोगत ते तिथे राहिले. श्रीरामनामस्मरण देहबंधन बाधू शकत नाही. श्रीरामचरण पाहिल्याने शरभंग देहात विदेहीपण भोगू लागले. दीनांना तारण्यासाठीच श्रीराम वनवासात आला होता. त्या श्रीरामाने विदेह कैवल्याचे ताट शरभंगांना शुद्ध स्वरूपात दिले.

अध्याय चवथा

विराध हा अती भयंकर राक्षस मारला. शरभंगाचा उद्धार केला. हे जाणून अनेक मुनी श्रीरामाकडे आले. त्यामध्ये वानप्रस्थातले, वालखिल्य, अग्निहोत्री, शुद्धशील असलेले असे अनेकजण राक्षसभयाने व्याकुळ होऊन श्रीरामापाशी आले. जलाहारी, फळाहारी, जटाधारी, ब्रह्मचारी, पत्राहारी, वायू आहारी, निराहारी ऋषीही श्रीरामाकडे आले. एक भगवे, एक नागवे, वल्कलधारी, मलिन वेषातले असे नाना प्रकारचे ऋषी राक्षसभयाने आले. आपल्याला राघवाने रक्षावे ही त्यांची इच्छा होती. त्यापैकी एकाला एकांगुष्ठव्रत, एक वृक्षाग्रनिवासी, एक हे एकपाद तापसी असे होते. संन्यासी तर भयामुळे आलेच नाहीत. जलवासी, आकाशवासी, विवरवासी, एक ते स्मशानवासी हेही भयाने आलेच नाहीत. राक्षसाच्या धाकाची धुकधुक असलेले सपत्नीक, अपत्नीक, विधुर असे अनेक श्रीरामाकडे संरक्षण मागत होते. वृद्ध, वृद्ध असे होते ते काकुळतीला येऊन श्रीरामाला विनंती करत होते की राक्षसमहामारापासून आमचे रक्षण कर. त्यातल्या काहींचे दात पडलेले असल्याने ते उखळ-मुसळांनी फळे ठेचून खात असत तेही राक्षसभयाने भयभीत होऊन रामाकडे आले. ज्ञानी, ध्यानी, समाधानी असे अवघे मुनी एकत्रितपणे राक्षसभयाने घाबरून श्रीरामाकडे आले.

https://archive.org/details/@sarayufoundation / Bhavarth Ramayan, Lucknow

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

श्रीरामाकडे तापसांची विनंती

श्रीरामाकडे राक्षसांविषयी गाऱ्हाणे घेऊन आलेल्या तापसांनी राक्षसांच्या दुष्कृत्यांचे वर्णन करून सांगताना म्हटले, "त्या राक्षसांनी तापसांचे समूहच्या समूह मारले आहेत. मांस खाऊन मढी तशीच टाकून दिली आहेत. ती शवे संस्कारांशिवाय लोळत पडली आहेत. जे कोणी त्यांवर संस्कार करायला जातात त्यांनाच राक्षस खातात. अशी किती मढी लोळत जमिनीवर पडली आहेत हे सांगणेही कठीण आहे. त्या राक्षसांनी आम्हाला कासावीस केले आहे म्हणून आम्ही तुझ्यापाशी आलो आहोत. श्रीरामा, आम्ही तुझ्या पायाशी शरण आलो आहोत, आमचे संरक्षण कर. आमचा कोणी रक्षणकर्ता नाही. सुदैवाने तू धनुष्यपाणी आला आहेस. आम्ही तुला लोटांगण घालतो. आमच्या रक्षणासाठी सज्ज हो. आम्ही तुझे शरणागत आहोत. सर्वजण तुला शरण आलो आहोत. तू कृपाळू रघुनाथा, दीन-अनाथांचे रक्षण कर रे दीनानाथा. आम्ही गोब्राह्मण काया, वाचा, मनसा तुला शरण येऊन सांगतो आमचे संरक्षण कर."

श्रीरामाचे नम्र आश्वासन

श्रीरामाने त्याच्याकडे आलेल्या ब्राह्मणांचे दीनवाणे भाषण ऐकून, पूर्ण कळवळ्याने, त्यांना आश्वासन देण्यासाठी सांगितले, "मी तर एक सामान्य सेवक आहे, तुमच्या दासासमान आहे. त्या मला तुम्ही शरण आलो म्हणता, हे तुम्हाला योग्य बोलणे नाही. तुम्ही वयोवृद्ध, तपोवृद्ध, सज्ञान आणि बुद्धिवान आहात. आपण ज्येष्ठ, ज्येष्ठ महासिद्ध असल्याने तुम्ही माझ्या सन्मानाच्या गोष्टी बोलू नयेत. तुमच्याकडून मान घेणे हे आम्हाला विषप्राशन ठरेल. आपण माझे देवतार्चन, साधुसज्जन मला पूज्य आहात. द्विजरक्षण हा आमचा धर्मच आहे. त्याच कारणाने मी वनात आलो आहे. मला खरदूषणांचे निर्दाळण आणि साधूंचे संरक्षण करायचे आहे. तुमचे आशीर्वाद जोडून, रणांगणात पराक्रम करून, राक्षसांचे समूहच्या समूह अर्ध्या घडीत नष्ट करीन." ही रामाची वाणी ऐकून मुनिगण हर्षित झाले आणि त्यांनी श्रीरामाचा जयजयकार केला. नंतर सर्वांनी रामाला आशीर्वाद वचनाने अभिषेक केला. मग सीता, लक्ष्मण आणि श्रीराम यांच्याबरोबर ते सर्व मुनिगण, शरभंग ऋषींनी ज्या आश्रमाची सूचना केली होती, त्या सुतीक्ष्णांच्या आश्रमाकडे निघाले.

सुतीक्ष्णांच्या आश्रमात रामाचे स्वागत

सुतीक्ष्ण ऋषी हे महाश्रेष्ठ आणि तपाच्या तेजाने अत्यंत तेजस्वी असे होते. त्यांचा आश्रम सुखदायक होता. तेथे दुःखसंकटाला वाव नव्हता. त्या आश्रमाची नवलाई अशी की तिथल्या फळमूळांना सुवास आणि उत्तम स्वाद होता. तिथल्या जळाने आचमन केले की सर्व श्रम दूर होत. त्यामुळे आश्रमात येताच सर्वांना परम सुख झाले. श्रीरामही सुखावून ऋषींकडे आला. तो आल्याचे पाहून ऋषींनी आसन सोडले आणि जप, ध्यान सोडून तत्परतेने ते भेटीला आले. ज्याच्यासाठी जप, ध्यान, तपःसाधन, अनुष्ठान तेच हे चिद्रत्न श्रीराम. ज्याच्यासाठी वेदपठण, शास्त्रश्रवण, योगसाधन, व्रत, तप, रुद्रजप करायचे तो हा श्रीराम चिद्रत्नासम आहे. ज्यासाठी आकल्प धैर्य तेच हे चित्स्वरूप श्रीराम. ज्याचे शिव आणि भवानी अनुदिनी चिंतन करतात तो हा श्रीराम डोळ्यांनी पाहिला जो त्रिभुवनातला परमात्मा आहे. ज्याच्या करता आम्ही नित्य तापसी, वनवासी, तो श्रीराम अनायासे, आमच्या भाग्याने आश्रमात स्वतःच आला आहे." असे त्या ऋषींचे मनोगत सुनिश्चित जाणवून श्रीराम उल्हसित झाला, आणि त्याने ऋषींच्या चरणांना वंदन केले. ऋषींचे मनोगत हृदयस्थ जाणतो तो श्रीराम परब्रह्म आहे हे ऋषी जाणत होते आत्मज्ञानाने. दृष्टी तीक्ष्ण असल्याने ज्यांना ही अंतर्दृष्टी होती त्यांचे नाव सुतीष्ण होते. त्यांचे चरणवंदन श्रीरामाने केल्यावर त्यांनी रामाला आलिंगन दिले आणि मस्तकाचे

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Trust and eGangotri

अवघ्राण केले. नंतर ते ऋषी म्हणाले, "दंडकारण्यात माझा आश्रम असला तरी येथे भवबंधन नाही. श्रीराम, सीता, लक्ष्मण यांनी येथे सुखसंपन्नतेत अवश्य राहावे. माझ्या आश्रमात राक्षसांची घातकी कृत्ये चालत नाहीत. तुम्ही येथे निर्भय राहा. तुम्ही सुखाने सीतेसह स्वानंदात राहा." सुतीष्ण ऋषींनी मग प्रेमाने राम आणि लक्ष्मण यांचे पूजन केले आणि वनफळे देऊन, त्यांना सहा महिने ठेवून घेतले.

दंडकारण्यातील कोणते स्थान निवडावे?

श्रीरामाने तपस्तेजोराशी सुतीष्णांना विचारले, "मी नित्य आश्रम करून कोठे राहावे असे स्थान आपण नेमके सांगावे. शरभंगांनी मला सांगितले होते की सुतीष्ण हे सत्यवादी तापसी असून त्यांना नेमके स्थान विचारून त्या ठिकाणी आश्रम करून राहा," श्रीरामाचे कथन ऐकून ऋषी सुखसंपन्न झाले. त्यांनी श्रीरामाला आलिंगन दिले आणि ते सर्वांगी शांत झाले. मग त्यांनी श्रीरामाला सांगितले की, "दंडकारण्यात राहणारे अनेक ऋषी आहेत. त्यांचे आश्रम तुम्ही पाहा. जो आश्रम पाहून तुम्हाला आल्हाद वाटेल, ज्या आश्रमात तुम्हाला विश्रांती मिळते असे वाटेल त्या निवासस्थानात तुम्हाला मी नेमस्तपणे नेमीन. तुम्ही सर्व ऋषींच्या आश्रमांना भेट देऊन नंतर इथे या. मग मी निवासासाठी कोणते स्थान योग्य ते सांगेन." ऋषींची सूचना लक्षात घेऊन, तिघांनी त्यांना वंदन केले आणि दंडकारण्यात गमन केले.

दंडकारण्यातील भ्रमंती

लक्ष्मण वाट चालू लागल्यावर श्रीरामाला म्हणाला, "आपण पुढे आणि सीता मागे असे चालत राहिलो तर मागे विराधाने जसे तिचे हरण केले होते तसे व्हायला नको." यावर श्रीरामाने लक्ष्मणाला क्रम विचारला. तेव्हा मधे सीतेला ठेवून ते महाबळी धनुर्धर त्वरेने निघाले. सीतेच्या बरोबर ऋषिगण, तापस, ब्रह्मचारी ब्राह्मण हेही निघाले. त्यांनाही त्यामुळे श्रीरामाचे रक्षण मिळाले. वने, उपवने, शुभ कानने, ऋषींचे आश्रम, अगाध स्थाने पाहात ते निघाले. तेथे तापस अनुष्ठाने करत होते; वेदाध्ययने, अग्निहोत्रे सुरू होती. त्या ऋषींचे महिमान जाणत दंडकारण्यात फिरत असताना पुढे एका सरोवरापासी राम-लक्ष्मणांना सुस्वर गायन ऐकू आले. श्रेष्ठ असे ते सरोवर अत्यंत पवित्र होते. त्यातून मनोहर नृत्य, गायन चालू होते; परंतु नाचणारे किंवा गाणारे हे मात्र दिसत नव्हते. यामुळे श्रीराम चकित झाला. त्याने बरोबरच्या ऋषिगणांना विचारले, "येथे गीत नृत्य कोण करते?" मग त्या ऋषींनी पूर्वकथन केले.

सरोवराचा आणि मंदकर्णीचा वृत्तान्त

या तडागाचे नाव पंचाप्सर असून, हे सरोवर फार पुरातन आहे. अत्यंत तीव्र तप करून मंदकर्णी ऋषीश्वराने याची निर्मिती केली. दहा सहस्त्र वर्षे निराहार राहून, वायू भक्षण करून, स्थिर बुद्धी ठेवून असलेल्या त्या तपस्वी ऋषीच्या मनाला कामाचा स्पर्शही झाला नव्हता. कर्मठ म्हणतात स्वर्ग चांगला, ऋषी म्हणत, 'तो क्षयरोग, सत्यलोकातले जे जे श्रेष्ठ भोग तो मरणमार्गच त्यांचा. जोवर विषयासक्ती तोवर पुनरावृत्ती ठरलेलीच.' हे लक्षात घेऊनच निर्धाराने तीव्र तपःस्थिती मंदकर्णी ऋषींनी स्वीकारली. त्यांच्या तीव्र तपश्चर्येला पाहून स्वर्गात हाहाःकार झाला. देवांना या गोष्टीने त्रस्त केले. मग इंद्राने मंदकर्णींच्या तपात विघ्न आणण्यासाठी पांच अप्सरांना पाठविले. रूप, यौवन यात मनोहारी, गीत, नृत्य सालंकृत करीत त्या पाच अप्सरा प्रभाव पाडू लागल्या. ते पाहून ऋषीश्वर पूर्णतया काममोहित झाला. त्याची कामासक्ती पाहून त्या अप्सरा नग्न होऊन नाचू लागल्या. तोही आपले लिंग हाती धरून कामपूर्तीसाठी नाचू लागला. त्याने अप्सरांना रतिसुख मागितले. तेव्हा त्या अप्सरा ऊर्ध्वगतीने निघाल्या. त्यावेळी काकुळतीला येऊन ऋषी त्यांनी रतिसुख कृपेने द्यावे अशी विनवणी

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

करू लागला. "मी तुमच्याकडे एक अतिथी म्हणून रतीसुखार्थ याचना करतो आहे. अतिथीला विन्मुख करणे तुम्हाला योग्य नव्हे. मी तुमच्या पाया पडतो. कृपा करून रतिसुख द्या. मी तुमचा परमार्थी धर्मसांगाती आहे तेव्हा मला तुम्ही रतिसुख द्या." त्याने त्यांचा अंगठा दातात धरला. तेव्हा अप्सरा त्याची उपेक्षा करून गेल्या.

वैराग्याची गोष्ट अशीच आहे. जोवर सुंदर स्त्री दृष्टीपुढे येत नाही, एकांती तिची भेट झाल्यास, विरक्तही भोगायला सिद्ध होतो. एखादी स्त्री मनात भरली आणि एकांतात ती दृष्टीसमोर आली की धावत जाऊन जपी, ध्यानी, तिला झोंबतो. स्त्रीसंगाने तपाचे निर्दाळण होते. जोपर्यंत पुरुष अत्यंत विरक्त असतो, तोपर्यंतच त्याच्याजवळ सिद्धी राहतात. जेव्हा पुरुष कामासक्त होतो तेव्हा सिद्धी त्याच्यावर थुंकून जातात. तसेच मंदकर्णी ऋषीचे झाले होते. स्त्रीगीत त्याच्या कानावर पडले आणि त्याचे वैराग्य हरपून गेले. यासाठीच त्याचे नाव श्रुतिपुराणात मंदकर्णी पडले. स्त्रीगीत कानावर पडले आणि तो तत्क्षणी अपराधी ठरला. वैराग्य आणि विवेक दोन्ही त्याला सोडून गेले. यामुळे मंदकर्णी नाव ठेवले गेले.

मंदकर्णींना इंद्राचे वरदान

इंद्राने पाठविलेल्या त्या पाच अप्सरा देवकार्य साधून, ऋषीला स्त्रीच्या मोहात पाडून, त्याला कामभावनेने संतप्त करून परतल्या. पुढे इंद्राने हे विघ्न करविले होते असे जर त्या ऋषींना कळले तर ते क्रोधाने शाप देतील असे इंद्राला भय वाटू लागले. कारण त्या श्रेष्ठ ऋषींना भूत, भविष्य आणि वर्तमान असे त्रिकालज्ञान आहे. ते ऋषी अपूर्ण कामवासनेने संतप्त होऊन दारुण शाप देतील याचा इंद्राला धाक वाटला. ते ऋषी महाक्रूर तपस्वी असून दहा हजार वर्षे त्यांनी अतिशय उग्र तप केले आहे. ते अतिशय दुर्धर शाप देतील अशी इंद्राला भीती वाटू लागली. भीतीने कंपायमान झालेला इंद्र, शापभयामुळे सत्वर ऋषींकडे आला आणि म्हणाला, "आपण मागाल तो वर मी देईन. स्वामी मी आपला आज्ञाधारक आहे." तेव्हा ऋषींनी सांगितले, "लावण्यराशी अशा पाच अप्सरा तू नित्यभोगासाठी मला दे." इंद्राने त्याप्रमाणे पाच अप्सरा मंदकर्णी ऋषींना दिल्या.

"दहा सहस्त्र वर्षे तप करून वृद्ध आणि जर्जर झालेले ऋषी असल्याने अप्सरांना ते आवडत नव्हते. त्यामुळे त्या ऋषींची उपेक्षा करू लागल्या. हे त्या पाचही अप्सरांचे मनोगत ऋषींनी जाणले. ते ऋषी असल्याने त्यांनी आपले स्वरूप बदलून टाकले. तारुण्याने विराजमान असे मदनमोहन रूप झालेले ऋषिवर्य पाहून त्या अप्सरा त्यांच्याशी जिवाभावाने समरस झाल्या. त्या थोर सामर्थ्यवान ऋषींनी नंतर तडागाच्या पाण्यातच जलमंदिर निर्माण केले. तेथे ते पाच अप्सरांसह कामक्रीडा करत राहू लागले. त्यांचेच गीतनृत्याचे स्वर श्रीरामा तुझ्या कानावर पडले आहेत," हे मुनींचे विस्तृत निवेदन ऐकल्यावर श्रीराम विस्मयचकित झाला. काही वेळ विचार करून श्रीरामाने सरोवरातील पाण्याने आचमन केले. त्याबरोबर त्याला ऋषिभुवन दिसले. मंदकर्णी ऋषींनीही श्रीरामाला पाहिले आणि ते आनंदित झाले.

श्रीरामाचे मंदकर्णींकडून स्वागत

मंदकर्णी ऋषींनी अत्यंत आदराने श्रीरामाला आपल्या जलमंदिरात नेले. पुढे सीता, राम आणि लक्ष्मण यांना त्यांनी अनेक वर्षे आपल्याकडे ठेवून घेतले. स्वतः ऋषिवर्य रामाच्या सेवेत तत्पर असत. पाच अप्सराही सेवेत सादर राहून श्रीरामचंद्राची भक्ती करत असत. पूर्वी जी निष्काम तपोवृत्ती मंदकर्णी ऋषींनी अनुसरली होती, त्या तपाची फलप्राप्ती म्हणूनच श्रीराम स्वतः घरी आला, हे ऋषींचे सद्‌भाग्य. त्यांचे भाग्य किती वर्णावे! चढती वाढती नित्य प्रीती झाल्याने त्यांना श्रीरामाची भक्ती आवडली आणि त्यांना अहोरात्र उल्हास वाटू लागला. मुखाने श्रीरामनाम जपण्याने कोट्यानुकोटी उद्धरले. येथे श्रीरामाचे प्रेमच पोटात धारण केल्याने ऋषींना ब्रह्मसंतोष मिळाला. श्रीरामाची भक्ती

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

केल्यामुळे मंदकर्णींना नित्यमुक्ती प्राप्त झाली. त्यांच्या संगतीत असलेल्या पाच अप्सरांनाही आत्ममुक्ती मिळाली. श्रीरामनामाने जड जीव तरतात, तो श्रीराम अत्यंत प्रेमाने पाहिल्यावर चारी मुक्ती श्रीरामाच्या भक्तिप्रतापाने दासी होतात. ऋषींना ब्रह्मसमाधान झाले. अप्सराही सुखसंपन्न झाल्या. श्रीराम दीनोद्धारण करून निघाला.

मंदकर्णी ऋषींची प्रेमभावना पाहून, त्या आश्रमात श्रीराम सुखी झाला. ऋषींनाही परम सुख झाले. अप्सरांना आत्यंतिक सुख मिळाले. लक्ष्मण, सीता हेही सुखी झाले. नंतर इतर सर्व आश्रम पाहण्यासाठी ऋषींना तसे विचारून श्रीराम पुढे निघाला. त्यापुढील प्रवासात निरनिराळ्या ऋषींचे आश्रम सावकाश पाहात श्रीराम कुठे एक मास, कुठे दोन मास, कोठे नेमस्त पाच मास असे वास्तव्य करत होता. कधी सहा मास तर एखाद्या ठिकाणी वर्ष-दीड वर्षांची वस्तीही श्रीरामाने केली. चातुर्मासात कुठे तो राहिला होता. अशाप्रकारे श्रीराम वनात फिरत फिरत परत सुतीक्ष्णांच्या आश्रमात आला.

श्रीरामाच्या पुनरागमनाने सुतीक्ष्ण हरखून गेले. त्यांनी राम-लक्ष्मणांना आलिंगन देऊन आपला आनंद व्यक्त केला. त्यांनी श्रीरामाचे नित्य पूजन करून, वनफळांचा आहार देऊन श्रीरामाला अर्ध्या वर्षाला काही दिवस कमी भरतील एवढा काळ आपल्याच आश्रमात ठेवून घेतले. श्रीरामाने निवांत बसून सुतीक्ष्णांना आदराने विचारले. "अगस्ती ऋषींचा आश्रम जिथे आहे तिथे आम्हाला आपण धाडावे." श्रीरामाने असे म्हणताच सुतीक्ष्ण आनंदित होऊन म्हणाले, "धन्य, धन्य. अगस्तींचा आश्रम परम पवित्र आहे. तिथे तुम्ही अवश्य जावे." त्यावर रामाने "पुढील वन घनदाट आहे, त्यामुळे सहजपणे मार्ग स्पष्ट असा कळून येत नाही. तेव्हा स्वामींनीच वाट दाखवावी. आम्हाला तिकडे जाण्याची उत्कट इच्छा आहे." हे रामाचे बोलणे ऐकून सुतीक्ष्ण आश्चर्य करत बोलले, "श्रीरामा मी काय सांगू. तू आमच्या गतीची गती असून आम्हालाच मार्ग विचारतो आहेस याचे किती नवल सांगावे. इथून अर्ध्या योजनांवर अगस्तींचे आश्रमस्थान आहे. या मार्गाने तुम्ही जावे" यावर श्रीराम, सीता आणि लक्ष्मण यांनी सुतीक्ष्णांना वंदन करून मग अगस्तींच्या आश्रमस्थानाकडे प्रयाण केले.

अगस्तींचे महिमान

अगस्ती ऋषी हे महान् तपस्वी होते. त्यांचा महिमा सर्वत्र गाजत होता. त्याविषयाशी संबंधित एक घटना ऐकण्यासारखी आहे. वातापी आणि इल्वल असे दोघे बंधू होते. ते ब्राह्मणांना मारून खाण्यासाठी एक युक्ती करत असत. वातापी हा ब्राह्मणवेष धरून असे आणि इल्वल कपटाने अन्न होत असे. नंतर ब्राह्मणांना श्राद्धभोजनाचे निमंत्रण देऊन बोलावले जाई. ते ब्राह्मण तृप्त होईपर्यंत अन्न खात असत. अन्नरूप असलेला इल्वल ब्राह्मणांच्या पोटात जाई. नंतर वातापी हा आपल्या बंधूला जोरात हाक मारून बोलावी. त्यावेळी इल्वल ब्राह्मणांचे पोट फाडून बाहेर येई. अशाप्रकारे ब्राह्मणांना मारून ते राक्षस त्यांना खात असत. यामुळे राक्षसांच्या छळाला ब्राह्मण कंटाळले होते. त्या ब्राह्मणघातकी राक्षसांचे हे कृत्य समजल्यावर स्वतः अगस्ती त्या राक्षसांकडे आले. त्यांनी इल्वल असलेला भात खाऊन घेतला. त्या भाताच्या प्रत्येक घासाबरोबर अगस्ती आपला जठराग्नी प्रज्वलित करून भात जाळत राहिले. जिथे इल्वलच राहिला नाही तिथे पोट फाडून कोण येणार. नेहमीप्रमाणे वातापीने बंधू इल्वलाला हाक मारून बोलावले. तेव्हा अगस्तींनी, "मी त्याला जिरवला आहे", असे प्रत्युत्तर दिले. या उत्तराने वातापीला अत्यंत क्रोध आला. तो अगस्तींना गिळायला धावला. विकट राक्षसवेष धरून, दारुण गर्जना करून तो अगस्तींच्या समोर विक्राळ मुख पसरून धावून आला. त्यावेळी अगस्तींच्या डोळ्यातल्या कोपाग्नीने त्या वातापीला अर्ध्या क्षणात भस्म करून टाकले. अशाप्रकारे ते दोन्ही ब्राम्हणघाती राक्षस अर्ध्या क्षणात अगस्तींनी जाळून भस्म केले. असे ते प्रतापी

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

महामुनी असल्याने अगस्तींच्या दर्शनाला अवश्य जावे, असे श्रीरामाला सांगण्यात आले.

स्वतः सुतीक्ष्ण रामाला सांगत होते, "पुढचे वन अत्यंत गहन आहे. सहजपणे अगस्तींचे निवासस्थान दिसत नाही. त्याविषयी मी खूण सांगेन ती नीट ऐका. "जेष्ठ बंधूंचे नाव अगस्ती आणि कनिष्ठ बंधू तो महामती नावाचा आहे. तिथून अर्धा योजनाच्या शेवटी त्याचा आश्रम आहे. त्याच्या आश्रमात जाऊन, आजची रात्र तेथेच राहा. प्रातःकाळी मग तुम्हाला अगस्तीची भेट होईल. महामतीची वनस्थळी अशी आहे की तेथे न पेरताच साळी, केळी, पिंपळी, नागवेली, पोफळी इत्यादी शोभा देत आहेत. तो ऋषिश्रेष्ठ महामती तुम्हाला अगस्ती भेटण्यासाठी ज्या मार्गाने जायला सांगेल त्याच मार्गाने तुम्ही जा." मग सुतीष्णांना नमन करून तिघांनी पुढे वाटचाल सुरू केली. वने, उपवने यांनी शोभायमान झालेले महामतीचे आश्रमस्थान पाहून तिघांनाही समाधान झाले. आपल्या आश्रमात श्रीरघुपती यावा याचा महामतींना आल्हाद वाटला. त्यांनी सर्वांना आश्रमात अत्यंत प्रेमाने ठेवून घेतले. श्रीरामाचे पूजनही केले.

अध्याय पाचवा

श्रीरामाने महामतींना विचारले, "महामती, आपले ज्येष्ठ बंधू अगस्ती यांच्या दर्शनाच्या उत्सुकतेने आम्ही आपल्याकडे आलो आहोत. त्या ज्येष्ठांचे दर्शन घेण्याविषयीची आमची उत्सुकता लक्षात घेऊन आम्ही कोणत्या मार्गाने जावे हे कृपा करून आपण सांगा."

महामती म्हणाले, "ज्या मार्गाने गेले असता आपण कधीही मार्ग चुकणार नाही असे मार्ग चिन्हं मी तुम्हाला सांगतो ते नीट सावधपणे ऐका. ज्या मार्गाने पंथ चालला असता श्रीराम, सीता, लक्ष्मण अशा सर्वांचे चित्त सुखावेल त्या पंथाच्या खुणाही सांगतो. अगस्त्याश्रम अत्यंत पावन असून शिवादी देवांनी एक भुवन निर्माण केले. तेथे ते अनुष्ठान करतात; तसेच ते श्रीरामकथेचे श्रवणही करतात. देवांचे पाय भूमीला लागत नाहीत. तेही नवल तुम्हाला पाहायला मिळेल. अगस्त्याश्रमात देवसमुदाय एकत्र बसून श्रीरामकथा ऐकतात. मुळात ती श्रीराम कथा पवित्र, शिवाय अगस्तींसारखा रसाळ वक्ता, त्यामुळे देव ती कथा आवडीने ऐकत बसतात. अगस्तींच्या आश्रमात कोणी कोणी देवस्थाने उभारली आहेत. त्याविषयी मी सांगतोच आहे. तसेच त्यामुळे मार्गचिन्हे लक्षात येतात."

"मार्गातली सुचिन्हे नेहमी निर्विघ्न अशी मार्गाची खूण असतात. सौब्रह्मण्य ब्रह्मस्थान, शिवस्थान शिवशक्ती, इंद्रचंद्रकुबेरस्थान, अग्निस्थान, भृगुस्थान, यमस्थान, धर्मस्थान, नित्य सावधान श्रवणार्थी असतात. धाता, विधाता हे आणि चंचळपण सोडून वायू हे नित्य रामायणाने सुखसंपन्न होऊन, अत्यंत तल्लीनतेने श्रवणार्थी होतात. शिवसुत स्वामी कार्तिक हाही तेथे राहून ऋषींना परमार्थ विचारत असतो; ऋषीही त्याला स्वानंदाने सांगत असतात. त्यांनी काशीखंड, केदारखंड, श्रीशैलखंड सांगितले. तरी श्रीरामायण कथा अत्यंत मधुर आणि सर्वांना अतिशय सुखद वाटते. भविष्यातील घटनांवरील भाष्य करणारे रामायण, त्याचे आपण श्रवण करावे म्हणून आश्रमात देवब्राह्मण वस्ती करून असतात, त्यांना रम्य रामायण ऐकायचे असते. अगस्तींचा आश्रम हा महिमासंपन्न असल्याने देव, द्विज यांनी पावन केलेला आहे. तेव्हा श्रीरामा मार्गातली सुचिन्हे पाहून तू तिकडे शीघ्र जा." हे ऋषींचे कथन ऐकल्यावर श्रीराम सुखसंपन्न झाला आणि पवित्र अगस्त्याश्रमाकडे स्वानंदाने जायला निघाला.

अगस्तींकडून स्वागत, श्रीरामाचे वंदन

श्रीराम, सीता आणि लक्ष्मण यांनी महामती ऋषींना वंदन करून, सन्मार्गाचे चिन्ह पाहून, त्वरेने अगस्तींच्या आश्रमाकडे प्रयाण केले. अगस्तिऋषी ज्ञानामध्ये अती समर्थ होते. ते

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

आपल्या शिष्यांना सांगत होते, "आता श्रीरघुनाथ येईल. त्याच्यासह सीता आणि सौमित्र असतील." त्यांनी आपल्या आश्रमात गुढ्या, मखरे उभारली. ते आल्हादयुक्त होऊन सांगत होते. "मूर्तिमंत परब्रह्मच आता येथे येईल. माझ्या भाग्याच्या कोटी आज सुफलित होणार, आज मला श्रीरामाचे आवडीने दर्शन घेता येईल. तो श्रीराम रामराज्याची गुढी उभारण्यासाठी तातडीने वनात आला आहे. कोट्यवधी राक्षसांचा संहार करण्यास, नवग्रहांची बेडी तोडण्यास आणि देवांचे बंधन फेडण्यास तो वनात आला आहे. स्वधर्माचे संरक्षण आणि दुष्टांचे निर्दाळण करण्यासाठी श्रीराम हा पूर्णावतार कृपा करून स्वतः येथे आला आहे. आज खरोखर मी त्रिलोकात भाग्यवान, कारण वेदशास्त्रांना देखील जो व्यक्त करता येत नाही, तो कृपामूर्ती, केवळ कृपाळू असा सीतापती राम येथे येतो आहे. माझे भाग्य ते काय बापडे! श्रीराम जो केवळ कृपामूर्ती, तो श्रीरघुपती आश्रमात आला.

अशी रामस्तुती करून, ऋषींना एकत्र करून, शिष्यसमुदायासह अगस्ती रामाला अती प्रेमाने सामोरे आले. ऋषी येत असलेले पाहून श्रीराम लक्ष्मणाला म्हणाला, "अगस्ती तपस्तेजोराशी असून आम्हाला सामोरे येत आहेत. ज्यांनी समुद्र एका आचमनात शोषला तेच हे अगस्तिऋषी. केवळ आमच्यासाठी कृपाळू होऊन सामोरे येत आहेत." असे म्हणून स्वतः श्रीरामाने लोटांगण घातले. ऋषींचे पाय मस्तकावर धारण केले. ऋषींनी श्रीरामाला उठवून त्याला आलिंगन दिले. जानकी आणि लक्ष्मण यांनीही मुनिचरणांना वंदन केले. नंतर तिघेही हात जोडून सावधपणे उभे राहिले. श्रीरामचंद्राला पाहून ऋषींना परम आल्हाद झाला. त्यांनी जयजयकार गर्जत, ऋषींच्या मंत्रोच्चारात, आश्रमात आणून, श्रीरामाची मधुपर्काने पूजा केली. शतसंख्य गोदाने दिली. श्रीराम म्हणाला, "मी सामान्य सेवक, आपल्या शिष्यांच्या रंकाचा रंक, आपण माझी एवढी पूजा करावी हे मला योग्य नव्हे."

अगस्तींकडून श्रीराम स्तुती-महिमा वर्णन

श्रीरामाचे नम्रतेचे बोलणे ऐकून, अगस्ती उल्हासाने म्हणाले, "श्रीरामा तुझे स्वतःचे महिमान, वेदशास्त्रांनाही अगम्य आहे. त्यांच्या स्वतःच्या उक्ती 'नेति नेति' म्हणत परतल्या. श्रीरामाला केवळ ब्रह्ममूर्ती म्हणून त्रिजगतात नित्य पूज्य मानतात. जे परब्रह्म अविनाशी आहे, ते तत्त्वतः तूच आहेस. भक्तकृपाळू म्हणून तू साकार झाला आहेस. खरोखर माझे भाग्यच थोर! इतर राजे ते भूपाल, श्रीरामराजा त्रिजगतात. तुझ्यामुळे भूमीला क्षिती वाहते, शशिसूर्यांना गती आहे. तुझी आज्ञा एवढी दुर्धर की सागरसुद्धा मर्यादा ओलांडत नाही. इंद्रादिक सारे तुझे सेवक, तुझ्यामुळेच शेष भूमीचा भार वाहतो. काळ तुझी आज्ञा शिरसावंद्य मानतो, आणि मर्यादित प्रलय करतो. भूते, भूतात्मा तूच होतोस. सर्वांनाच श्रीरामा तू पूज्य आहेस."

"आजवर अनेक उत्तमोत्तम अवतार झाले. त्यांमधला तू आत्माराम; तू तर केवळ परब्रह्म, परमार्थात परम पूज्य आहेस. अशी तुझी आत्मस्थिती आहे. तरी तू धर्मव्रत चालवतोस, पितृवचन पाळतोस, दुष्टांचे निर्दाळण करतोस. माता, पिता, गुरू यांच्याहूनही तू हे रघुनाथा पूज्य आहेस. चारी वेद तुला वाखाणतात, शास्त्रे तुझ्या चरणांना शरण येतात, शिव, ब्रह्मदेव तुझ्या पायी लागतात, असा श्रीरामा तू परमार्थाने पूज्य आहेस. तुला जो जो मान द्यावा तो तो तुझ्या दृष्टीने कमीच आहे, असे तुझे अगाध महिमान आहे. तुला मानापमान नाही. श्रीरामा, तुझे महिमान वर्णन करू जाता वेदांनाही मौन पडले. तो तू आज कृपा करून माझ्या आश्रमात आपणहून आलास यामुळे मी धन्य झालो. तुझी मी जी काही पूजा करीन ती हे अधोक्षजा, रघुराजा, स्वीकार कर. कारण ती राक्षसांचा वध करण्यासाठी आहे."

"श्रीरामा, तू आत्माराम प्रिय अतिथी आहेस. तू कृपामूर्ती आश्रमात आल्यावर जे तुझी

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

पूजा करत नाहीत ते अभागी, अधःपतन पावतील. अतिथी जर विन्मुख गेला तर गृहस्थाला कोटी पापांची प्राप्ती होते. कारण अतिथी त्याची पुण्यसंपत्ती घेऊन जातो आणि यजमानापाशी अधोगती उरते. यासाठी श्रीरघुराजा अतिथीची पूजा करावी. तू तर केवळ माझा आत्मा आहेस. तेव्हा माझ्या पूजेचा अंगिकार कर.'' अमृतासमान फळमूळे, सुगंधी पुष्पे, मधुपर्क विधिविधानाने अगस्तींनी रामाची पूजा केली. जयजयकाराचा गजर आणि वेदोक्त महामंत्रांनी युक्त अशी श्रीरामाची ऋषिवरांनी पूजा केली. श्रीराम हा चराचरातला परमात्मा मानून ही पूजा झाली. नंतर अगस्तींनी म्हटले, ''श्रीरघुराजा, आता या पुढची तुझी पूजा अधोक्षजा मी तुला दिव्य आयुधे देऊन करणार आहे. ह्या आयुधांनी शत्रुसमाजाला निपटून काढ.''

अगस्तींकडून आयुधे, लोपामुद्रेचे सीतापूजन

श्रीरामाला अगस्तीऋषींनी दिव्य चाप आणि भाते जे अनिवार बाणांनी पूर्ण होते ते दिले. सुवर्णाचे म्यान असलेले खड्ग दिले आणि रणात शत्रूला निपटायला ते दिल्याचे सांगितले. शस्त्रास्त्रांनी ज्याचा भेद होणार नाही असे सूर्याच्या तेजासारखे देदीप्यामान, तेजस्वी कवच दिले आणि सांगितले, ''हे कवच धारण करणाराला विश्रांती देते. त्याच्या तेजस्वी प्रकाशाने शत्रूचा संताप होतो. अशी या कवचाची गती असल्याने शत्रूनिर्दाळण करण्यासाठी तू याचा स्वीकार कर. तुझे मन जेव्हा रथाची, अपेक्षा करील, त्यावेळी रावणाला रणात मारण्यासाठी मातली हा सारथी इंद्राचा रथ घेऊन येईल.'' ऋषींचे हे भाषण ऐकल्यावर श्रीरामाने आणि लक्ष्मणाने ऋषींना वंदन केले. ऋषींनी त्या दोघांना आलिंगन दिले. स्वतः ऋषीही मनाने सुप्रसन्न झाले. श्रीरामावर संतुष्ट होऊन, रणामध्ये राक्षसांचे निर्दाळण करण्यासाठी, अगस्तीऋषींनी उल्हासाने त्याला दिव्य आयुधे अर्पण केली. त्यावेळी ते, ''रणात या शस्त्रांमुळे तू राक्षसांची धडे नाचवशील'' असे आल्हादाने म्हणाले. ऋषिवर्यांच्या वरदवाक्याने श्रीरामही मनातून संतुष्ट झाला.

त्याचवेळी लोपामुद्रेने येऊन सीतेची पूजा केली आणि ती म्हणाली, ''श्रीरामावर लक्ष केंद्रित करून तू पायाने चालत त्याच्यामागोमाग वनात आलीस, खरोखर तू धन्य, धन्य पतिव्रता आहेस. तुझ्यामुळे आम्ही पावन झालो.'' तेव्हा श्रीराम अगस्तींना म्हणाला, ''महाऋषी, या वनाला दंडकारण्य का म्हणतात ते आपण मला सविस्तर सांगावे.'' त्यावर ऋषींनी म्हटले, ''ऐक.''

दंडकारण्याची पूर्वकथा

''या प्रदेशाचा दंडक नावाचा अत्यंत गर्विष्ठ राजा होता. तो नेहमी राज्यप्रदेशात उन्मत्तपणे वागत असे. असाच एकदा शिकारीसाठी वनात फिरत असताना त्याने भृगुवंशातल्या च्यवन ऋषींचा अतिशय घोर अपमान केला. त्यामुळे ऋषींनी दंडकाला शाप दिला की 'राज्यासह तू भस्म होशील.' त्याप्रमाणे तो स्वदेशासह भस्म झाला. विंध्यपर्वत दक्षिणदिशेकडे जेव्हा सेतुबंधाला पोचेल तोवर या वनाला दंडकारण्य हे नाव असेल. असे हे ऋषींच्या शापाने भस्म झालेले आहे. राजा, त्याचे सैन्य, मनुष्यगण, वृक्ष, गवत, पशू, पक्षी सर्व पूर्ण भस्म झाले. इथल्या नद्या, सरोवरे, मृग, सर्प हेही भस्म झाले. एकूण इथले सारे जगच भस्म झाले. ऋषींचा क्रोध दुर्धर ठरला. तेव्हा दंडकाला मिळालेल्या शापाने अनेक वर्षे हे वन आणि इथला प्रदेश ओसाड होऊन पडला असल्याने याला दंडकारण्य असे नाव पडले आहे. भार्गवाच्या शापभयाने येथे पाऊस पडला नाही. चंद्र, सूर्य प्रकाश देईनात त्यामुळे येथे अहोरात्र अंधारच असे. अशी कित्येक वर्षे अंधकारमय गेली.'' त्यावर ''पुढे मग इथे वस्ती कशी झाली?'' रामाने ऋषींना विचारले. तेव्हा अगस्तींनी सांगितले, ''पुढे दंडकारण्य वसवावे म्हणून नारदांनी विंध्यपर्वत आणि मेरूपर्वत यांना विनंती केली.''

''मेरू पर्वत हा चराचरांचा आधार, तो स्वतः महामेरू झाला. मेरूहून बळकट असा दुसरा

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

थोर पर्वत नव्हता. नारदांची विनंती ऐकून मेरूशी स्पर्धा करण्याच्या भरात विंध्यपर्वत उंच वाढत गेला. त्यामुळे चंद्र-सूर्याची गती खुंटली. याचा परिणाम म्हणजे स्वाहास्वधाकार, स्वधर्मकर्माचार, जपतपविचार हे सारेच थांबले. देवपितृकर्मे बंद झाल्याने देव, पितर भुकेने तळमळून मरणपंथी लागले. ऋषीश्वर हेही संध्येशिवाय आहार सेवन नाही म्हणून तळमळत राहिले. गोधने रानात जाईनात, वासरे हंबरडा फोडू लागली, असा त्रिजगतात आकांत झाला. विंध्याद्री सूर्याला उगवूच देईना. हे झाल्यावर ऋषीश्वर ब्रह्मदेवाकडे जाऊन गाऱ्हाणे सांगू लागले. मग तिन्ही देव सूर्याला दक्षिणेकडे कसा पाठवावा याचा विचार करू लागले. नंतर देवांनी माझी विनवणी केली की, "मी वाराणसी सोडून, विंध्याद्रीचे नियमन करण्यासाठी त्वरेने दक्षिणेकडे जावे आणि विंध्याद्रीला पृथ्वीवर आणावा. तसेच दिवस-रात्रीची वहिवाट सुरू करण्यासाठी चंद्र-सूर्य मोकळे करावे." देव मला म्हणाले "हे ऋषी याचे तुला मोठे पुण्य लाभेल देव-पितर तृप्त होतील. ब्राह्मण स्वधर्म चालवतील. तुझ्याजवळ तेवढे सामर्थ्य आहे. तुझ्या सामर्थ्याचे वर्णन तरी किती करायचे. जिथे तू आचमनाने समुद्र प्राशन केलास तिथे विंध्याद्री बापडा काय आणि किती आहे. तेव्हा परोपकारासाठी तू जावेस. हा विंध्याद्री पुन्हा उचल खाणार नाही असे त्याचे नियमन कर. देव-ब्राह्मण यांची संस्थापना करण्यासाठी तू दक्षिणेला जा. देवांनी मला असे सांगितले."

"मी देवांचे सांगणे ऐकून आणि नारदांचे मन जाणून, दंडकारण्य वसवण्यासाठी दक्षिणेकडे आलो. हे रघुपती, ऐकून ठेव की माझे आगमन इकडे कशाप्रकारे झाले, आणि कोणत्या परिस्थितीत झाले ते तुला सांगतो आहे. मी पावसाचे पाणी असलेले मेघ बरोबर घेऊन, देवकार्य साधण्यासाठी त्वरेने विंध्याद्रीपाशी आलो. हे राजचुडामणी श्रीरामा, विंध्य पर्वताने मला येताना पाहून लोटांगण घातले. त्याने माझी यथास्थित पूजा केली. मला विंध्याने म्हटले, 'अहो महाऋषी, उत्तरेतली काय वार्ता आहे ती मला सांगा. आपण येथून कोठे जात आहात? आपण कोणती इच्छा धरून माझ्याकडे आला आहात; आपले इच्छित मी निश्चित पूर्ण करीन असे मी आपल्याला वचन देतो.' यावर मी त्याला उत्तरेतली वार्ता सांगितली. रघुनाथा, ती मी आता तुलाही यथार्थपणे सांगतो आहे."

"मी विंध्याद्रीला म्हटले, 'विंध्याद्री तुझा महाप्रताप पाहून मेरूला महाकंप सुटला आहे. सुर आणि असुर हे अत्यंत संतापले आहेत. कारण तुझे स्वरूप अतिशय श्रेष्ठ आहे. या पृथ्वीमध्ये, हे विंध्याद्री तुझी थोरवी सुरासुर वाखाणतात. तुझी सर मेरू पर्वताला येणे शक्य नाही.' हे माझे बोलणे ऐकून विंध्याद्रीला आनंद आणि उल्हास वाटला. त्याने पुन्हा लोटांगण घालून, माझे चरण मस्तकावर धरून वंदन केले. 'आपण मोठे भाग्यवान आहात, आपण कुठवर जाणार आहात ते मला अगदी निश्चितपणे सांगा', असे विंध्याद्रीने आदराने विचारताच मी सांगितले, 'मी दक्षिणतीर्थविधान करावे या इच्छेने निघालो आहे. तेव्हा तू मला खाली झोपून मार्ग करून द्यावास अशी विनंती आहे. खरोखर तुझी थोरवी फारच मोठी आहे कारण चंद्रसूर्यांपेक्षाही तू उंच वाढला आहेस. तेवढे उंच मला चढवत नाही. तेव्हा मला जाता यावे म्हणून तू भूमीवर शयन कर.' माझे सांगणे ऐकून विंध्याद्रीने शयन केले. 'मी दक्षिणेकडे गेलो की लगेच तू उंच उभा होऊ नकोस. तीर्थयात्रा करून मी परत येईन तोपर्यंत तू उठू नयेस.' अशाप्रकारच्या वचनबंधनाने त्याला नियमित करून मी इकडे आलो आहे."

"विंध्याद्रीला शयन करायला भाग पाडण्यामुळे रविचंद्रांची वाट मोकळी झाली. द्विज आणि देव यांचे कष्ट संपले, दिवसरात्र ही स्पष्टपणे जाणवू लागली. त्यानंतर मी येथे येताच

https://archive.org/details/@sarayu_foundation_trust_lucknow; Bhuvan Vani Trust, Lakshmi Academy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

भृगुशापही संपला. पाऊस पडला; धन-धान्य वाढले; महामेरूचे वृक्ष मी मनात चिंतन केल्याने या प्रदेशात चांगलेच फोफावून फळाफुलांनी बहरले. नद्यांचे प्रवाह वाहू लागले; सरोवरे कमल पुष्पांनी भरली; भिन्न भिन्न पक्षीगण, गज, सिंह, मृग मुक्तपणे विहार करू लागले. माझ्याबरोबर अनेक ऋषी इकडे येऊन दंडकारण्याचे निवासी झाले. या प्रदेशात कोणी राजा नसल्याने राक्षसांनी हे अरण्य व्यापले. दंडकाला मिळालेल्या शापाने दंडकारण्य झाले; ते पावन करण्यासाठी राक्षसांचा नाश करणारा तू रघुनंदन आता येथे आला आहेस. तुझ्या प्रतापी आगमनाने राक्षसांचे संपूर्ण निर्दाळण होणार आणि येथील वस्ती आणि वन पावन होणार. पुराणांमध्ये श्रीरामक्षेत्र दंडकारण्य असा गौरव केला जाईल आणि सज्ञान ब्राह्मण हाच प्रयोग पुढे करत राहतील. श्रीरामाकडून राक्षसांचे निर्दाळण होऊन या क्षेत्राचा पवित्र पुराणांमध्ये नेहमी श्रीरामक्षेत्र असा उल्लेख होईल.'' अशी अगस्तींकडून सांगितली गेलेली कथा ऐकून रामाला परम आश्चर्य वाटले. त्याने ऋषींच्या चरणांना वंदन करून विचारले, ''दंडकारण्यात सौमित्र आणि सीता यांच्यासह मी कोठे राहावे हे आपण मला सांगा. आपले वचन म्हणजे ब्रह्मलिखित, तेच मी प्रत्यक्षात आणीन हे निश्चित. तेव्हा आपण सांगा. मी कोठे राहावे?

श्रीरामाच्या प्रश्नावर कृपायुक्त होऊन ऋषी म्हणाले, ''गंगातीराजवळ (गोदावरी) अत्यंत पवित्र असे पंचवटी हे स्थान आहे. तेथे पर्णकुटी बांधून तुम्ही सुखासमाधानात राहा.'' पंचवटी ही गंगातटावर आहे हे ऐकून सीता उल्हसित झाली. श्रीरामही संतुष्ट आणि सुखी झाला. ''पंचवटीत रहिवास झाल्याने रघुपती तुझी त्रैलोक्यपावन कीर्ती होईल. तेव्हा माझ्या वचनावर विश्वास ठेवून तुम्ही निश्चित तिकडे जा.'' असे ऋषींनी आश्वासन दिल्यावर श्रीरामानेही मनात शकुनगाठ बांधली. नंतर लगेच ते तिघे पंचवटीकडे निघाले. राम, सीता, लक्ष्मण यांनी ऋषींना वंदन केले. ऋषींनी त्यांना आलिंगन देऊन त्यांना निरोप दिला. पंचवटीत आश्रम करण्यासाठी तो जगजेठी श्रीराम त्वेरेने निघाला. लक्ष्मणही रामाकडे पाहून उल्हसित झाला. ते पंचवटीकडे गेले.

अध्याय सहावा

श्रीअगस्तींना वंदन करून श्रीराम, सीता आणि लक्ष्मण हे पंचवटीच्या दिशेने त्वरित निघाले. पंचवटीची पंचक्रोशी रम्य असून रमणीय गंगातटावर ती वसली होती. त्यामुळे तिथे जाण्यासाठी ते तिघे उत्सुक झाले होते. अरुणा, वारुणा यांचा संगम होऊन, प्राची सरस्वती तेथे मिळाली होती. त्यामुळे त्रिजगतात ते पवित्र तीर्थ म्हणून प्रसिद्ध होते. तेथे वस्ती करणे श्रीरामाला आवडले. सुंदर आणि कपाळेश्वर हे दोन्ही तीरावर मनोहर दिसत होते. त्या सुंदर, पवित्र तीर्थाचा श्रीरामाला रहिवास होणार होता. परंतु अतिशय दुर्धर असे राक्षस पद्मपुरीत राहात असल्यामुळे, त्यांच्या भयाने नगर ओस पडून तीर्थाला जाणे-येणे लोकांनी बंद केले होते. कारण त्रिशिर, खर, दूषण या दुर्जन राक्षसांनी तेथील जनस्थान ओस केले आणि स्वतः तेथे वस्ती केली. त्यामुळे तीर्थाला कोणीच जाऊ शकत नव्हते. अशा त्या पंचवटीत वस्ती करण्यासाठी अगस्तींनी श्रीरामाला स्वतःच पाठविले. राम राक्षसांचा घात करणारा आणि त्यांचा समूळ नाश करणारा असल्यानेच अगस्तींनी रामाला पंचवटी हे स्थान निश्चित करून सांगितले.

जटायूची भेट - कश्यपवंशाचा वृत्तान्त

श्रीराम पंचवटीकडे वनामधून शीघ्रतेने जात असताना त्याने जटायू नावाचा पर्वतासारखा प्रचंड गृध्रपक्षी (गिधाडपक्षी) समोर पाहिला. त्याचे रक्ताळलेले धगधगीत डोळे. विक्राळ चमचमीत चोच हे सारे पाहून राम, लक्ष्मण दोघांनाही तो अद्भुत राक्षस आहे असेच त्यांना निश्चित वाटले. त्या

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

दोघांनी मुठीत धनुष्य सज्ज करून धरले. दोघेही त्या पक्ष्याच्या दिशेने पुढे गेले. रामाने शौर्यदृष्टीने बाण मुठीत धरून तो धनुष्यावर चढवून सज्ज केला, आणि त्या पक्षाला आव्हानात्मक हाक दिली, "अरे गृध्ररूपातल्या राक्षसा, तसाच थांब, धीर धर, सहन कर, आमचा मार्ग दुर्धरपणे अडवशील तर या बाणाने तुला क्षणात छेदतो. माझा बाण सुटल्यावर तुझे पंखबळ बापडे किती टिकणार आहे; माझ्यापुढे कुठे पळशील; रणात तुला स्पष्टपणे मारीन. गृध्ररूपातला तू कोण आहेस? मार्ग अडवायचे काय कारण? मला समूळ स्वत:विषयीचे वृत्त सांग. अन्यथा न बोलताच तुझा मी प्राण घेईन. मी दाशरथी रघुनंदन आहे. ही सीता माझी पत्नी आणि हा माझा बंधू लक्ष्मण. आम्ही पंचवटीकडे जात आहोत. तू आमच्या मार्गात का आडवा येत आहेस?"

श्रीरामाचे बोलणे ऐकून जटायूने रामापुढे लोटांगण घालून म्हटले, "हे दाशरथी रघुनंदना, मी तुझे महिमान जाणतो. पंचवटीच्या वनात तू राहायला येशील हे जाणून, तुझ्या दर्शनासाठी मी पुष्कळ काळ इथे तिष्ठत राहिलो आहे. तुझा पिता दशरथ आणि माझा युद्धातला सखा, आप्त, जेव्हा इंद्राला साहाय्य करण्यासाठी गेला आणि त्याने नमुचिदैत्याचा घात केला त्यावेळी मी आकाशातून झडप घालून दैत्यांचे शिरकवच उडविले आणि दशरथाने बाणाने वेधून अनेक दारुण दैत्यांचा नाश केला. त्या दशरथाचा तू ज्येष्ठ पुत्र आणि पूर्णब्रह्म रघुनाथ आहेस. तुझी सेवा करण्यासाठीच येथे आलो आहे हे निश्चित समज. तू स्वामी, मी तुझा दास आहे हा विश्वास तू दृढ धरावास. मला राक्षस म्हणू नकोस. मी कश्यप वंशातला आहे. काश्यपवंशातली माझी उत्पत्ती आहे. त्या कश्यपवंशाची स्थिती मी तुला सांगतो. त्यामुळे तरी तुझा माझ्यावर विश्वास बसेल."

"तू मला राक्षस म्हणालास, पण मी राक्षस नसून कश्यपवंशातला आहे. माझी वंशावळी खूप मोठी आहे. सावकाश ऐक. मनूपासून क्षत्रिय, वैश्य, शूद्र, ब्राह्मण यांची उत्पत्ती; इतर वरकड सृष्टी ही कश्यपाची उत्पत्ती आहे. त्याचे लक्षणही ऐक. अदितीपासून देव झाले. दितीचे दैत्य, दनूचे दानव, मनूपासून मानव अशी उत्पत्ती झाली. मानवी वैभव मनूचे आहे. स्वसेपासून रुद्रोत्पत्ती झाली, हे रुद्रगण रुद्राचे अनुयायी आहेत. भद्रेपासून गंधर्व जन्मतात जे अत्यंत मधुर गायन करतात. उभयसंध्यामैथुन स्थितीत राक्षसांना जन्म मिळाला. यासाठी संध्येपासून राक्षसांची उत्पत्ती झाली असे ज्ञाते मानतात. जे राक्षस वेदशास्त्राच्या व्युत्पत्तीची चर्चा करणाऱ्या ब्राह्मणांची निर्भत्सना करतात, ते ब्रह्मराक्षस होतात असे श्रीरामा तू निश्चितपणे समज. रावणाला ब्रह्मराक्षसपण आले याचे कारण हेच आहे की त्याने लक्षावधी वेद विभागून सज्जन ऋषींची निर्भत्सना केली. ज्ञानगर्वाची आत्यंतिक वाढ, ब्रह्मद्वेष यामुळे ब्रह्मराक्षसत्वाची प्राप्ती होते. क्रोधवशतेपासून सिंह, वाघ, वराह इत्यादी, तसेच मृग, ससे, वृक, जंबूक, गौरादी अनेक श्वापदे झाली. वारणीपासून ऐरावतीचा जन्म झाला. तिच्यापासून गज आणि दिग्गज यांची उत्पत्ती झाली. श्रीरामा मी सांगतो आहे ते निश्चित आहे."

'शरमेचे ज्येष्ठ पुत्र श्याम शवल यमाचे दूत, श्रीरामा तिच्यापासूनच श्वान, मार्जार इत्यादी सर्व झाले. वृत्तेपासून पुष्कळ विद्याधर, किन्नर आदी पुरुष, तपस्वी दुर्धर, अनावर बळी, अडाणी, गर्विष्ठ; जागळेपासून वने, उपवने, कंटकांची अरण्ये, डहाळ्या, वेली, औषधी वनस्पती यांनी भरलेले वन निर्माण झाले. कामधेनूपासून कामधेनू ठरलेल्या गाई, बैल आदीकरून पशूंची निर्मिती; वडवेपासून अश्वसंभूती; उच्चैःश्रवा स्वर्गसंपत्ती, श्यामकर्णादी भिन्न जाती अशी तिच्यापासून अश्वांची उत्पत्ती झाली. तिच्या ठिकाणीच दुर्धर भारवाहक गाढव, उंट हे जन्म पावले; गाढव आणि घोडा यांच्या

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

संयोगाने खेचर निर्माण झाले. गृध्री, श्येनी, धृतराष्ट्री, शुकी, क्रौंची अशा पाच नारींपासून पक्षी जन्मले. तसे त्यांच्यापासून मासे, मगरी इत्यादी जलचर निर्माण झाले. गृध्रीपासून गीध, घार, घुबड, वटवाघुळ असे अनेक आणि गंडभैरवादी दुर्धर आणि क्रूर अशांची निर्मिती झाली. श्येन, तित्तिर, लावक, कपोत, कुक्कुट, काक, सरडे, बेडूक हे श्येनी पासून प्रसवले. क्रौंचीच्या उदरी ढोंक, टिटवी, कांकणधारी, भोरड्या, अहोरात्र किरकिरणाऱ्या घुमरी यांचा जन्म झाला. शुक, सारिका, चाप, भारद्वाज, मयूर, चिड्या, काळचिड्या, पिंगळा अशा अनेकांची उत्पत्ती शुकीपासून झाली. धृतराष्ट्री हिने हंस, बक, कारंडक, चकोर, चक्रवाक आणि मासे इत्यादी जलचरांना जन्म दिला. कद्रूपासून काळ, कर्कोटक, भुजंग, शेष, वासुकी असे नाना नाग, आणि पाताळपन्नग यांची निर्मिती झाली.''

''कश्यपापासून सुर, असुर, नर, किन्नर, चराचर सृष्टी समग्र ही सारी कश्यपी झाली. अंडज, स्वेदज, जरायुज असे जे कोणी आणि वनस्पती ते सर्व त्या कश्यपाच्या तेजस्वी बीजापासून झाले. जलचर, भूचर, खेचर. (ख=आकाश) असे जे जे चराचरात भासते ते कश्यपाचे कृतिचरित्र आहे. ज्याचे कुळगोत्र स्मरत नसेल ते कश्यपाचे मानतात आणि ते तत्काळ पावन होतात असे कश्यप जगात विख्यात आहेत. जो कश्यपी लागला तो मुक्तीच्या घरी आला. भुक्तिमुक्तीचा आवडता असे कश्यपाला वाखाणतात. सृष्टीचा कर्ता, सृष्टीचा हर्ता एवढी थोर कश्यपाची सत्ता असल्याने त्याला भुक्तीमुक्तीचा दाता असे मानले जाते.'' ''खरोखर कश्यपाच्या सृष्टीचे वर्णन करू शकेल असा वक्ताच नाही. मी काहीशा संक्षेपाने बोलतो'' असे म्हणून संत एकनाथ सज्जनांची येथे क्षमा मागतात.

जटायू पुढे म्हणाला, ''मी कश्यपाचा नातू असून जटायू नावाने प्रसिद्ध आहे. आता मी माझा वृत्तान्त सांगतो.''

जटायुचे पूर्ववृत्त कथन

''माझा वृत्तान्त आरंभापासून अखेरपर्यंत मी सांगतो आहे. कश्यपाला अनेक पत्नी होत्या. मुख्य अदिती, दिती, दनी आणि चौथी माझ्या पित्याची जननी ही विनता नावाची पतिव्रता. ह्या विनतेला अरुण आणि गरुड असे दोन सुपुत्र होते. ते भगवद्‌भजनात रमणारे, अत्यंत पवित्र होते. अरुण हा सूर्याच्या रथाचा सावधान सारथी होता. तर गरुड हा श्रीविष्णूचे वाहन झाला होता. गरुड हा अमृत हिरावून आणणारा म्हणून ख्यांती झालेला.'' यावर श्रीरामाने ''गरुडाने स्वतः अमृतहरण का केले?'' असा प्रश्न केल्यावर जटायूने त्याविषयाचे कथन सुरू केले.

कद्रू-विनता यांचा पण

''विनता आणि कद्रू या दोघी सवती होत्या. सवतीमत्सराच्या आहारी जाऊन छळाच्या भावनेने कद्रूने विनतेला विचारले की सूर्याच्या रथाचे घोडे कसे आहेत? विनतेने ते घोडे पांढऱ्या रंगाचे आहेत असे उत्तर दिले. कद्रूने ते घोडे नीलवर्ण आहेत असे सांगितले. या मतभेदाने उग्र स्वरूप घेतले. बोलता बोलता या भांडणाचे रूपांतर पैजेचा प्रबळ पण लावण्यात झाले. कद्रू म्हणाली, 'घोडे पांढरे आहेत असे सिद्ध झाले तर डोक्यावर पाण्याचा घडा घेऊन तुझ्या घरी हजार वर्षे पाणी भरीन.' विनतेनेही त्यावेळी सांगितले, 'जर घोडे निळ्या रंगाचे असतील तर मी तुझ्या घरी पाण्याची दासी म्हणून हजार वर्षे डोक्यावर चुंबळ आणि घागर घेऊन पाणी भरीन.' असे दोघींनी शपथेने बांधून घेऊन पण केला. कद्रूने यामधे कपट करायचे ठरविले.''

''विनतेला अरुणानेच सांगितले होते की सूर्याच्या रथाचे घोडे पांढरे आहेत. तेव्हा त्याच्यावरच्या विश्वासामुळे विनतेच्या मनात कसलीही शंका नव्हती. कद्रूने आपले पुत्र जे सर्प

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

त्यांना विचारल्यावर त्यांनीही सूर्याच्या रथाला पांढरे घोडे आहेत असे सांगितले. त्यामुळे कद्रू मनातून अत्यंत दुःखी होती. तिने आपल्या पुत्रांना पण केल्याविषयी सांगून म्हटले, 'मी आता विनतेच्या घरी हजार वर्षे पाणी भरण्याच्या कामाची दासी होणार.' असे तिने सर्पपुत्रांना म्हटले. त्यावर त्या सर्पपुत्रांनी तिला विचारले, "तू न माहिती असताना हा निळ्या रंगाच्या घोड्यांचा नेम केलास तो कशासाठी? तू सवतीमत्सर केलास तेव्हा आता तो मत्सर दुस्तर भोग भोगायला लावेल. विनता ही सती पतिव्रता असताना, तू तिच्याशी व्यर्थ मत्सर केलास आणि त्यातून दासित्व शिरावर आले आहे. त्याला कोण काय करणार!" हे पुत्रांचे बोलणे ऐकून कद्रू म्हणाली, "तुम्ही मातेचा कैवार घेत नाही तेव्हा पुत्र नव्हे तर पाषाण मी प्रसवले. अरे सगळे मिळून तुम्ही सर्प घोड्यांना विषारी बनवून त्यांचे रंग निळे करा."

सर्प आपल्या मातेला म्हणाले, "असे कपट केल्याने सर्वांचे तळपट होईल. सर्व वंश सपाट होईल. कपट करणे चांगले नाही." पुत्रांचे बोलणे ऐकून कद्रू संतापली. तिने 'अग्नीत जळून भस्म व्हाल' असा शाप दिला. त्यामुळे सर्पांनी एकत्रित येऊन घोड्यांना चावून विषाने नीलवर्ण आणला. मग मातेला ते म्हणाले, "आता त्वरा करून विनतेला घोडे दाखव. याला विलंब झाला तर सूर्य विष शोषून घेईल आणि मग विनतेला दाखविले तर आपल्याला जय मिळणार नाही. कपटाने कार्य साधायचे तर ते तत्काळ साधले पाहिजे. विलंब झाला तर जय मिळत नाही." कद्रूने पुत्रांचे सांगणे ऐकून विनतेला त्वरेने आणून सूर्याच्या रथाचे निळे घोडे दाखविले. विनतेला सगळे घोडे नीलवर्ण दिसले. कद्रूने विनतेला म्हटले, "मी पैज जिंकली. तू माझी दासी झालीस." एवढे झाल्यावर कद्रू मोठ्या उल्हासाने घरी आली तेव्हा सर्पपुत्रांनी मातेची आनंदी अवस्था पाहून उःशाप देण्याची विनंती केली. कद्रूही त्या आनंदाच्या भरात उःशाप बोलली. "कन्या जरत्कारीच्या उदरी जरत्कारूपासून आस्तिक हा जन्मेल. तो ब्रह्मचारी शापरूपी अग्निप्रलयात तुमचे रक्षण करील."

"कद्रूच्या उःशापाप्रमाणे होताना, प्रथम दुर्धर शापाग्नीत सर्व सर्प जळतील, त्यावेळी तिथे आस्तिक येईल आणि तो सर्पदहनात अग्नीमधे त्यांचे रक्षण करील. मातृपक्षाचे कुळ शापाग्नीत जळताना मातुल आस्तिक तपोबळ प्रतापाने रक्षण करील. एवढे झाल्यावर उःशापाने माता आणि पुत्र यांना आनंद झाला; परंतु कद्रूला तरीही सतत चिंता वाटत राहिली. सुख वा समाधान वाटेना. कपटाने विनतेला जिंकले खरे, पण तेच कपट पुत्रांचा घात करील याची कद्रूला सतत घोर चिंता लागून राहिली. जरी कपटाने कपटी व्यक्ती जय मिळवते तरी त्या कपटाच्या धाकाची धुकधुक पोटात राहतेच. शेवटी कपटघातकी कपटाने अत्यंत दुःखीच होतो. आपल्या कपटाची चिंता कद्रूच्या माथ्यावर चढली आणि तिचे सुख नष्ट झाले. इकडे विनता आपल्या पुत्राला-अरुणाला-विचारत होती की, "तू मला सूर्याच्या रथाचे घोडे पांढरे असतात असे निश्चयाने का सांगितलेस? मी तर स्वतः ते निळे असल्याचा अनुभव घेतला आहे. आता नीलवर्ण असलेले घोडे पाहिल्यावर मी कद्रूची दासी झाले. त्यामुळे डोक्यावर पाण्याचा घडा घेऊन अहोरात्र मला पाणी भरावे लागणार आहे." त्यावर अरुणाने सांगितले, "सर्पांनी स्वतःचे विष घोड्यांवर चढवून ते निळे केले असणार यात शंका नाही; परंतु या कपटाचे दुःख ते भोगतील"

"सूर्याला रथाचे घोडे नीलवर्ण झाल्याचे दिसल्यावर तो संतापला. त्याने रागाच्या भरात सर्पांचे पंख उपटले आणि पाय तोडले. पूर्वी सर्पांना पंख होते आणि गोगलगायीसारखे पायही होते. तेच पंख आणि पाय सूर्याने छेदले. तेव्हापासून नागसर्प पोट आणि ऊर घासत चालू लागले. त्यामुळेच त्यांना उरग म्हटले गेले. हा कपटाचा दुःखभोग

https://archive.org/details/@bhavarthramayan_lakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

त्यांच्या वाट्याला आला. सूर्याने सर्पांना शाप देताना म्हटले होते की 'तुम्ही ज्या उदरात कपट धरले होते त्या तुमच्या उदरात नित्य उदरशूळ भोगाल. अशाप्रकारे पंख आणि पाय गमावून, सर्प उदरशूळ भोगत अहोरात्र दुःखी झाले. कपटाची ही अशी दशा त्यांच्या वाट्याला आली. एवढे झाले तरी कपटाने सर्पांची पाठ सोडली नाही. शेवटी त्यांना आगीत पडावेच लागले. कपटाने कपटकर्ता हा दुःखच भोगतो. नंतर सूर्याने घोड्यांचे विष आकर्षून घेऊन फक्त कानात तेवढे विष राखले. त्यामुळे ते श्वेत रंगाचे घोडे काळसर कानांचे शोभिवंत श्यामकर्ण म्हणून जगद्वंद्य झाले. तेव्हापासून हे श्यामकर्ण घोडे जगात यज्ञप्रसंगी पवित्र मानले गेले आणि शोभायमान म्हणून तिन्ही लोकात प्रसिद्ध झाले."

"अरुण मातेला म्हणाला, 'माते, माझ्या अधीन सूर्याची गती असल्यामुळे मला रथात जाऊन बसणे भाग आहे. गरुडाजवळ बंधनमुक्ती आहे. गरुडाची सामर्थ्यशक्ती त्रिलोकांना आकळण्याएवढी आहे. त्याच्या ठिकाणी सहिष्णुता आणि शांती आहे. तेव्हा तोच तुझी बंधनमुक्ती करील. मला सूर्याची आज्ञा आहे की उजाडताच माता-पित्यांना वंदन करावे म्हणून मी तुझ्याकडे वंदन करण्याकरता आलो आहे. पुन्हा मला रथ चालवायला गेले पाहिजे. तुझे बंधविमोचन गरुड करील." असा विचार मातेला सांगून अरुण सूर्याच्या रथात जाऊन बसला. गरुड हाही थोर मातृभक्त होता. विनतेने गरुडाला सांगितले, 'कद्रूने कपट करून पण जिंकला आणि मला सहस्त्र वर्षे पाणी वाहणारी दासी केले आहे. अरुणाने मला सांगितले की बंधनमुक्ती गरुडाकडून होईल. तेव्हा आता काय योजना करतोस की ज्यामुळे मला यथार्थ मुक्ती मिळेल ते सांग.' हे ऐकून गरुडाला राग आला आणि म्हणाला, 'तुला कपट करून जिंकणारांचे, त्या कपटींचे, मी तळपट करीन. सर्पांना सपाट करीन.' हे रागाचे बोलणे झाल्यावर गरुडाने शांत होऊन, मातेला वंदन केले आणि सांगितले, 'तुझे बंधन सुटावे म्हणून तू कद्रूला एखादी बदली वस्तू हवी का हे विचार. तिला कोणताही उत्तम पदार्थ हवा असेल तर तोही मी आणून देईन. मातेचे बंधन सुटण्यासाठी अत्यंत दुर्लभ असे काहीही, कोणताही पदार्थ तिला हवा असेल तर तो मी देईन असे तिला सांग.' नंतर विनता कद्रूकडे गेली."

कद्रू अमृत मागते

"विनतेने कद्रूला सांगितले की, 'गरुडाने मला तुझ्याकडे पाठविले आहे. तू जर माझे बंधन सोडविण्यासाठी एखादी पर्यायी वस्तू मागितलीस तर तो ती तुला आणून देईल. त्याने मातेचे बंधविमोचन करण्यसाठी कल्पतरू, चिंतामणी, कामधेनू जे आवडेल ते माग असे तुला सांगितले आहे.' यावर कद्रूने विचार केला की गरुडाचे सामर्थ्य अपार आहे, त्याची शक्तीही अचाट आहे, तेव्हा त्याच्याकडून अमृतप्राप्तीच करून घ्यावी हे योग्य ठरेल. मग कद्रू विनतेला म्हणाली, 'माझ्या शापामुळे माझ्या पुत्रांना शापबंधन आले आहे. त्यांना जर अमृतपान घडले तर त्यांची जरा, जन्म, मरण यापासून मुक्तता होईल. त्यांच्या या बाधा टळतील असेच काही मागावे अशी माझी इच्छा आहे. तेव्हा तू गरुडाला विचार की तो परमामृत देणार असेल तर तुझ्या बंधनातून मी तुला मुक्त करीन. माझे पुत्र अखंडपणे पाताळात राहून अमृताचे रक्षण करतात पण त्यांना अमृत मिळत नाही. तेव्हा गरुडाने अमृत द्यावे, त्यानंतर तू बंधनमुक्त होशील.'

जटायूने नंतर अमृताविषयी माहिती सांगताना पुढे म्हटले, "स्वादामृत, उन्मादामृत, सुप्तामृत, तृप्तामृत ही सारी फसगतीसाठीची असून, पाचवे जे परमामृत ते विशेष असते. अप्सरांसाठी स्वादामृत असल्याने त्यांचा सर्वांना स्वादिष्ट गोडवा अनुभवाला येतो. देवांना तृप्तामृत मिळाल्याने त्यांना भुकेचा त्रास नसतो. उन्मादामृत

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

मिळाल्याने दैत्य हे नेहमीच उन्मत्तपणे वागतात. सुषुप्ती-अमृत हे दिग्गजांसाठी असते आणि त्यामुळे ते सुखाने डुलत राहतात. माणसांना जशा डुलक्या येतात तसेच दिग्गजांचे डोलणे असते. अशा या फसव्या आणि लटक्या अमृतांनी देवांनी सर्वांना चाळविले. जेव्हा देव-दैत्यांनी समुद्रमंथन केले तेव्हा अमृताची प्राप्ती झाली. त्यासाठी देव-दैत्यांचे भांडण झाले; आणि अमृत मोहिनीच्या हाती सोपविले. मोहिनीरूपातील श्रीविष्णूने अमृत सर्वांना वाढले. त्यावेळी इतरांना ही लटकी अमृते देऊन विशेष असे परमामृत स्वतःकडे ठेवले. ज्या परमामृताने जरा, मरण चुकते ते परमामृत श्रीविष्णूच्या स्वाधीन आहे. ते जर गरुडाने आणून दिले तरच तुझे बंधन सुटेल.' हे कद्रूचे बोलणे ऐकल्यावर विनतेने गरुडाला सांगितले, 'तू परमामृत आणून दिलेस तरच माझे बंधविमोचन होईल.' मातेचे बोलणे ऐकल्यावर तिचे बंधन सोडविण्यासाठी अमृत आणण्याच्या निश्चयाने, मातेला वंदन करून गरुड उडण्याच्या पवित्र्यात उभा राहिला. तेव्हा विनतेच्या मनात कृपा निर्माण झाली. तिने त्याला हाताने धरून कश्यपांपाशी आणले आणि कश्यपांना सर्व वृत्तान्त कथन केला."

"कश्यपांना गरुडाची मातृभक्ती पाहून अत्यंत प्रसन्नता वाटली. त्यांनी कृपेने अभिषेक करून, त्याला जवळ घेऊन, स्वानंद सुख व्यक्त केले. नंतर त्यांनी गरुडाला हर्षभरित मनाने आशीर्वाद आणि वर दिला. 'तू पराक्रमाने परमामृताची प्राप्ती करून घेशील. युद्धात तू विष्णूभक्त होशील आणि आपल्या मातेला नित्यमुक्त करशील. परमामृत हे श्रीविष्णूच्या स्वाधीन आहे; तेव्हा त्याचे नामस्मरण कर. नामस्मरणाने निश्चितपणे हरिभक्तांना विजय प्राप्त होतो. अच्युतनामाच्या आवृत्तीने सृष्टीच्या अंताच्या प्रलयातही आपला नाश होत नाही. अच्युतपदाची प्राप्तीही युद्धसामर्थ्याने प्राप्त होईल.' अशा शब्दात गरुडाला कृपेने अच्युतनामाचा उपदेश करून कश्यपांनी त्याला अमृत घेऊन येण्यासाठी पाठविले. नामस्मरणाने विजय प्राप्त होतो हे गरुडाच्या मनावर बिंबले. त्याने तत्काळ माता-पित्यांना वंदन करून त्यांचे चरणतीर्थ प्राशन केले आणि तो हरिनामाविषयी सावधान राहून आल्हादपूर्वक आकाशातले मार्गक्रमण करण्यासाठी उडाला. त्यावेळी विनतेच्या घरची दासी जी नकुला म्हणून होती तिचा पुत्र नकुल हाही गरुडाला साहाय्य करण्यासाठी निघाला. नकुल (मुंगुस) हा सर्पांचा शत्रू होता. त्या दिवसापासून सर्प आणि मुंगुस यांच्यात वैर आहे. त्यांची एकमेकांशी भेट होताच सर्प प्राणत्याग करतात."

"गरुड हा मुखाने नामाची आवृत्ती करत अमृत आणण्यासाठी निघाला होता. कश्यपांनी केलेल्या उपदेशामुळे त्याला युद्धात विष्णुप्राप्ती झाली." त्या गरुडाच्या प्रयत्नांची सविस्तर वार्ता यापुढे जटायूने सांगितली.

श्रीसंत एकनाथ याठिकाणी नाममाहात्म्य सांगताना म्हणतात, "नामाचे माहात्म्य असे आहे की श्रीरामनामस्मरण करता भगवत्प्राप्ती, अलोट ज्ञानप्राप्ती होते. नामापाशी भुक्तिमुक्ती, नामापाशी यश, कीर्ती, विजय, कर्मनिर्मुक्ती हे सर्व देण्याचे सामर्थ्य असते. नामस्मरण सतत केले तर निवृत्ती आणि शांती मिळते. सर्वांनी बुद्धिपुरस्पर नाम घ्यावे, म्हणजे त्यांना सहज ब्रह्मप्राप्ती होते. नामस्मरणाने पातकी पावन होतात, प्रपंच ब्रह्मपूर्ण होतो कारण नाम हेच परब्रह्म आहे."

अध्याय सातवा

"श्रीअच्युताचे नाम मनामध्ये सतत ठेवून गरुड अमृतासाठी निघाला. कश्यपांना त्याने पूर्ण भक्तीभावाने वंदन केल्यामुळे सप्तऋषीही त्याला साहाय्यभूत झाले. गरुडाने गगन आक्रमून मग सूक्ष्मरूप धारण केले आणि परमामृतावर लक्ष ठेवून तो पाहणी करू लागला. तेव्हा त्याला आढळले की अमृताचे रक्षण मोठ्या काटेकोरपणे केले जात

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

आहे. अमृताभोवती भिन्न भिन्न सात रक्षककडी आहेत. पहिले संपूर्ण सर्पांचे रक्षण, दुसरे रक्षण वरुणाचे, तिसरे यक्षगणांचे, चौथे मरुद्‌गणांचे, पाचवे यमदूतांचे, सहावे शिवदूतांचे आणि सातवे रक्षण हे नेहमी सतर्क असणाऱ्या विष्णुदूतांचे होते."

गरुडाचे आक्रमण आणि देवांशी युद्ध

"गरुडाने संधी साधून कुंडात उडी घालून अमृत शोषले आणि तो तातडीने अत्यंत धडाडीने परत निघाला. तेव्हा सर्वत्र हाहाःकार उडाला. पक्षी नव्हे हा अमृतचोर आहे असे क्रोधाचे उद्‌गार सगळीकडून निघाले. त्या पाठोपाठ शस्त्रसंभार सुटले. गरुडाच्या पंखांच्या झडपण्याने राखणदार मूर्च्छित झाले. शस्त्रे उपडी पडली. सर्प कडाडून गरुडावर धावून आले. रागाने प्रक्षुब्ध झालेल्या त्या विषारी सर्पांना गरुडाने नखाग्रांनी घायाळ करून फाडले. तेवढ्यात नकुल मदतीला आला. त्याने सर्पांना मधेच छेदले. तेवढ्यात वरुणाने पाश टाकून गरुडाला जखडले. त्याचे पंखच बंदिस्त झाले. नंतर नकुलाने पाशाचे तुकडे करून गरुडाला पाशातून मुक्त केले. त्याबरोबर गरुडाने वरुणाला पंखांनी झडपून त्याला आकाशात उडवला. दाही दिशांना भोवंडून अखेर वरुण पृथ्वीवर मूर्च्छित होऊन पडला. वरुणाचे राखणदार पाण्यासारखे नखाग्रांनी विदारले. नकुल सर्पांवर शत्रूभावाने जाऊन त्याने अनेक सर्प छेदले."

"याप्रकारे रणकंदन करून गरुड सर्पांसह आकाशात वर वर चढला. अमृतपान करून तो बलवाहन चालला. त्यावेळी स्वर्गात हाकाटी उठली. शंकर रागाने निघाला. कोट्यवधी देव अमृतासाठी धावले. इंद्र त्वरेने सुरगजावर बसून धावून आला. त्याने गरुडावर वज्र फेकले. ते गरुडाने गिळले. गरुडपंखांच्या झडपण्याने इंद्राची मुरकुंडी वळली. त्याचे हत्ती पळाले. देव पळाले. गरुडाच्या पंखांनी निर्माण झालेल्या वाऱ्याने देवांना आपले निवासस्थान आठवेना. एखाद्या वावटळीत धुळीने कण उडतात तसे सुरगण भ्रमचक्रात सापडले. यम रागाने धावून आला. त्याने गरुडाला दंड मारला. तेव्हा गरुडाने तो यमदंड गिळून, नंतर यमाला शासन केले. यमाने अनेकांना गांजले होते, यावेळी गरुडाने यमाला गांजले. यमाला क़ासावीस करून गरुडाने धुळीला मिळवला. यमाला गरुड नानाप्रकारे छळत होता तरी कोणीही यमाचा कैवार घ्यायला आले नाही. कुबेर तर दूर पळाला. त्याने गरुडाशी सौजन्याने वागून शिवाय सांगितले, 'तुझ्या मातेचे बंधविमोचन व्हावे म्हणून कद्रूकडे मणिमय कलशातून अमृत पाठवीन.' गरुडपंखांची झडपणी अशी की त्यामुळे बिचारे दिग्गज रानात पळाले. गरुडाने सुर-असुरांच्या समूहांना देशोधडीला लावले. दैत्य, दानव, हे महाबळी रणकल्लोळात मारले. सर्प धाकाने पाताळात शिरले. असा त्या विनतात्मज गरुडाने पराक्रम केला. नंतर मंत्रयुक्त जलशक्ती घेऊन प्रजापती युद्धाला आला. तेव्हा गरुडाने त्याच्या हातातला कमंडलू हिसकावून घेऊन, अच्युतशक्तीने गिळून टाकला. प्रजापती हा आपल्या पित्याच्या पित्याचा पिता हे जाणून थोडी भीड राखली; एरवी गरुडाने क्षणमात्र न लागताच ब्रह्मदेवाला घोळसला असता."

"महादेव क्रोधानळाने रणात आला आणि त्याने गरुडावर आपला त्रिशूळ फेकला. तो त्रिशूळ गरुडाने गिळला. हे पाहून शिवाला विस्मय झाला. त्रिशूळ गिळायची शक्ती गरुडाला कशी आणि कोठून मिळाली हे निश्चित समजावे म्हणून सदाशिवाने गरुडाकडे निरखून पाहिले; तेव्हा त्याला हृदयस्थित श्रीराम दिसला. श्रीरामनामामुळे गरुडाने त्रिलोक जिंकले ही त्याची स्थिती लक्षात आल्यावर, त्रिशूळ गिळायची शक्ती ती निश्चित श्रीरामनामाने आली असणार हे स्पष्ट झाले. हृदयात अमृत आणि मुखात रामनाम, असे असल्यावर त्याच्याशी कोण संग्राम करणार; तिथेच शिवाचा पराक्रम रामनाम ऐकून कुंठित झाला. श्रीरामाचे नाम ऐकताना त्याचे सदाशिवाला

https://archive.org/details/muthulakshmiacademy
Bhavan Varanasi Trust, Lucknow

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

एवढे प्रेम वाटले की तो मूर्च्छेत जाऊन विश्राम पावला आणि संग्राम करायचे विसरला. कश्यपांच्या उपदेशाप्रमाणे नामस्मरण माहात्म्याने सदाशिवाला जिंकले. हरिभक्तांना बाधायची कळिकाळालाही गती कुठे असणार. एवढे झाल्यावर आपल्या भक्ताला भेट देण्यासाठी श्रीविष्णू हातात चक्र घेऊन कृपादृष्टीने त्वरेने तेथे आला.''

श्रीविष्णूचे आगमन, वरदान-संवाद

''श्रीविष्णूने लौकिकात जरी युद्धाचे निमित्त दाखविले तरी खरे म्हणजे तो भक्तप्रेमाने आला होता. गरुड त्याचे नाम नित्य स्मरतो यामुळे पुरुषोत्तम संतुष्ट झाला होता. जो प्रेमाने नाम स्मरतो त्याच्या अधीन पुरुषोत्तम असतो. तो आत्माराम, भक्तकाम कृपाळू नामस्मरणामुळे प्रसन्न होतो. जो श्रध्देने सहजपणे नामस्मरण करतो, त्याचे नाव श्रीविष्णू हृदयात धारण करतो. नामस्मरणावर निष्ठा ठेवणारांचे इच्छित पूर्ण करतो आणि नामानेच त्याची प्राप्ती होते. असे असूनही लौकिक कृती म्हणून त्या वनमाळीने अमृत सोडविण्यासाठी गरुडावर आपले चक्र सोडले. गरुडाने चक्रही गिळून टाकले. हे पाहून सर्वजण आश्चर्यचकित झाले. दैत्य, दानव मंडळींमध्येही विष्णुचक्र संपूर्ण गिळील असा कोणी बळी नाही. हा गरुड मात्र खरा पराक्रमी वीर आहे. विष्णुचक्राचा महामार असा की त्याच्या घावाने असुरही नाश पावतात, अशा त्रैलाक्यात दुर्धर ठरलेल्या चक्रालाही गरुडाने सहज गिळून गट्ट केले. राम, हरि, गोविंद या नामाचे स्मरण करणाराला परमानंद लाभतो आणि त्याला कोणतेही द्वंद्व बांधू शकत नाही. उलट हरिनामाने द्वंद्व निर्द्वंद्व होते. जिथे नित्य नामाचा गजर चालू असतो त्याच्या अधीन चक्रधर असतो. भक्तांना चक्र बांधू शकत नाही; हरी सत्यतः त्यांच्यापाशी असतो. नित्य निरंतर नामस्मरण करणारापाशी विष्णुचक्र वस्ती करून दुर्धर विघ्ने निपटते.''

''देवा-भक्तांमध्ये अंतर नसते. देव निरंतर त्याच्यापाशी असतो. यामुळेच त्याला चक्र बाधू शकत नाही. चक्र अभक्तांना दुर्धर असते. विष्णू म्हणाला, 'माझे चक्र गिळून तू गरुडा पूर्ण विजयी झाला आहेस. मी तुझ्यावर प्रसन्न आहे; लवकर वरदान माग. ज्या ज्या वरदानांची तू मागणी करशील, ते ते अति उल्हासाने मी देईन.' श्रीविष्णूचे हे बोलणे ऐकून गरुडाला हसू आले आणि तो विष्णूला म्हणाला, 'तू काही मला जिंकलेलं नाहीस. तर वर कशा अर्थाने देतोस. मीच तुझ्यावर प्रसन्न झालो आहे, तू मागशील ते मी तुला देईन. माझ्या शिरावर कश्यपगुरूंचा हात आहे. शिवाय तुझे अच्युत हे नाम नित्य स्मरत असल्याने मला काय अपूर्णता असणार. त्यामुळे तू मागशील ते आता मी तुला देईन.' हे गरुडाचे बोलणे ऐकल्यावर विष्णूने त्याला शपथवचनात गुंतवून त्याच्याकडे वर मागितला.''

श्रीविष्णूने वर मागताना म्हटले, 'गरुडा, तू माझे वाहन हो. माझ्या आज्ञेत, माझ्या अधीन होऊन राहा. हेच वरदान तू मला दे.' विष्णूचे मागणे ऐकून गरुडाने मनाशी विचार केला की 'वचन देऊन आता मागितलेले न देणे हे तिन्ही लोकात निंद्य जगणे ठरेल. जर दिलेले वचन खोटे ठरले तर देव, पितर कायमचे विन्मुख होतील. इहलोकी आणि परलोकी काळे तोंड होऊन, नरकाचे दुःख वाट्याला येईल. मिथ्या बोलणे हे वितंड ठरते. नरकात जातात ते षंढ ठरतात. त्यांचे मुख हे नरककुंड असल्याने ते पाहू नये. मिथ्या बोलणे म्हणजे तिन्ही लोकात घाणीचे चर्मकुंड असल्याने ते बोलणारे मुख न पाहता पितर तोंड फिरवतात. मिथ्या बोलणे तो नरकच. अशा अनेक उपपत्तींचा गरुडाने मनात विचार करून ठरविले की आपले जीवित्व विष्णूच्या हाती द्यावे. हाच त्याचा निश्चित निर्धार ठरला. शरीर विष्णूचे वाहन; जीवाने विष्णुवचन उल्लंघू नये; काया, वाचा, मने विष्णूच्या अधीन राहावे; त्यामुळे आपण तिन्ही लोकात पवित्र ठरू, असे त्याने

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

ठरविले. असा चित्तात निर्धार करताच गरुडाच्या हृदयात सद्गुरू प्रकटला. विवेक बळकट होऊन, कृपाळू गुरू अंतरी प्रकटला.'

गरुडाला कश्यपांचे बोलणे आठवले. 'श्रीविष्णू हा परमात्मा पूर्ण ब्रह्म आहे. असे ते म्हटल्याची खूण गरुडाला पटली. गुरुवाक्याने त्याला समाधान मिळाले. गुरूचे वाक्य हे बोधस्थिती देणारे, सर्व भयाची निवृत्ती करणारे, यश-कीर्ती देणारे आणि विजय प्राप्त करून देणारे असते हे त्याला जाणवले. ते गुरुवाक्य निर्धाराने जाणून घेतल्यावर असे समजते की विष्णू हाच आपल्या चित्ताचा चालक, इंद्रियांचे नियमन करणारा आहे. सर्वत्र श्रीविष्णूचीच सत्ता आहे. विष्णूचीच सर्व जगात एकात्मता असल्याने तेथे मी देणारा, तो मागणारा हे तत्त्वतः काहीच घडत नसते'. असा सर्व विचार करून गरुडाने विष्णूच्या चरणांवर मस्तक टेकवले. मग गरुड विष्णूला म्हणाला, 'मला देणारा, न देणारा हे सर्वस्वी तुझ्या अधीन आहे. माझे सत्त्व, तत्त्व तूच स्वतः आहेस. माझे परिपूर्ण जीवन, माझे मीपण तेही संपूर्ण महाविष्णू तूच आहेस. गोडी आणि साखर ही दोन्ही जशी एक, तसा तू स्वामी, मी सेवक यात माझी तुझी वेगळीक नाही. केवळ व्यवहारात दोहोंची भिन्नता आहे.' आपण श्रीविष्णूचे स्वतः सेवक होणार याचा गरुडाला अत्यंत हर्ष झाला. 'मला तुझ्या सेवेचे मोठे सुख वाटते. तू मला सतत दृष्टीसमोर ठेव. तुझे श्रीमुख पाहिल्यावर समाधीसुखही त्यापुढे फिके होते. मी तुझ्या चरणावर मस्तक टेकवतो. मला नित्य तुझ्या दृष्टीसमोर राहू दे.' असे गरुड म्हणाला.

गरुडाचे बोलणे ऐकून श्रीविष्णूला संतोष झाला. त्याने गरुडाला दृष्टीपुढे नित्य राहील असे स्थान नेमून दिले. गरुडाने देवाला पाठ दिली; देवाने गरुडाला दृष्टी दिली. देव आणि भक्त दोघांनाही उल्हास वाटला. गरुड हरिसेवेत मग्न झाला. गरुड हा काया, वाचा, मने श्रीविष्णूचा आज्ञाधारक होऊन, दोन्ही हात जोडून देवद्वारी तिष्ठत राहिला. देव आणि भक्त यांचे युद्ध झाले. खरे तर ते युद्ध नसून तो महाबोध होता. श्रीविष्णू म्हणाला, 'खगेश्वरा, तू माझा आज्ञाधारक म्हणून युद्धात गिळलेला. शस्त्रसंभार त्वरित शिवादिकांना देऊन टाक. जी शस्त्रे त्रैलोक्यात दुर्धर; सुर-असुरांना जी सहन करता येत नाहीत; ती तू समग्र गिळली आहेस. दंड, त्रिशूळ, वज्र, चक्र ही दुर्धर शस्त्रे गिळली आहेस. तुझ्या यशाचे डोंगर झाले, तू कीर्तीसागर भरून घेतले आहेस. तू शूर, वीर, धैर्यात श्रेष्ठ आहेस. श्रेष्ठ यशात तुझा मोठा वाटा आहे. त्या यशाच्या मोटा बांधल्या आहेस. आता सुरवरिष्ठांना त्यांची शस्त्रे परत कर. तुझे दोन्ही पंखांचे आक्रमण हेच प्रभावी असते, त्यामुळे तुला शस्त्रांचे काम नाही. तुझा अखंडित, कौतुकास्पद पराक्रम पाहून सुरोत्तम गौरव करतात.' याप्रकारे श्रीहरीकडून यशाच्या आणि कीर्तीच्या उत्तराने गरुड गौरविला गेला. त्यामुळे गरुडाने विष्णूच्या पायावर लोळण घेतली आणि 'तुझी आज्ञा शिरसावंद्य' असे म्हटले.

नंतर यमाला दंड, इंद्राला वज्र परत करून गरुडाने श्रीशंकरांची त्रिशूळाने पूजा केली; श्रीविष्णूची चक्राने पूजा केली. प्रजापतीला मुद्दाम आमंत्रित करून त्याच्या हाती कमंडलू दिला. यावर सर्वांनी गरुडाचा जयजयकार करून, त्याला आलिंगन दिले. इंद्राने नंतर अमृताची कथा काकुळतीने सांगितली. सर्पांना अमृत पाजले तरी तत्त्वतः त्याचे विषच होणार. सर्पांना अमृत पाजले आणि त्याचेही पुन्हा विष झाले तर अमृतावाचून ते निःशेष मरतील. सुरवरांची भूक भागवण्यासाठी देवांनी अमृत निर्माण केले. ते सर्पांच्या तोंडी विष झाले तर सर्व अमर मरतील. सर्पांना जर अमृत दिले तर स्वर्गस्थ उपवासाने मरतील. यासाठी गरुडाशी बळाने युद्ध करून अमृत त्याच्यापासून हिसकावून घ्यायचे होते. तेव्हा याने उभय पक्षांशी युद्ध करून स्वतः सुरासुरांची फळी मारून, सर्व

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri / CC-0. Public Domain Digitized by Muthulakshmi Research Academy

शस्त्रे गिळून, अमृत घेऊन तत्काळ तो निघाला. तेवढ्यात सुबुद्धीने श्रीविष्णुने युद्धात गरुडाला न जिंकता, त्याच्याशी दृढ आप्तसंबंध केला. कारण सुरकार्य त्याला साधायचे होते. श्रीविष्णूने थोर कीर्ती केली. जो गरुड महापराक्रमी त्याला आपल्या बोलण्यानेच आपलासा करून आम्हा देवांची शस्त्रे देवविली. यामुळे आम्हाला निश्चित बोलायला आधार मिळाला आहे. आता तो श्रीविष्णूच अमृतासाठीची काही युक्ती गरुडाला सांगेल. एक मात्र खरे की जर अमृत मिळाले नाही तर सर्व अमर मरण पावतील आणि तेव्हा गरुडाची यशःकीर्ती तीच त्याच्या अपकीर्तीला कारण होईल.' याप्रकारे बोलून इंद्राने श्रीविष्णूला सूचना केली.

श्रीविष्णूंची गरुडाला सूचना

श्रीविष्णूने इंद्राचे विनंतीवजा भाषण ऐकून, गरुडाला एक विचार सांगितला. "हे खगेश्वरा, तुझी दोन्ही कार्ये साध्य होतील अशी युक्ती मी तुला सांगतो. तुझ्या मातेचे बंधन सुटेल आणि सर्पांना अमृतपान घडणार नाही अशा कौशल्याने काय करावे हे मी सांगतो. ऐक. सर्पांना कळू न देता कद्रूला अमृत दे. त्यावेळी 'अपवित्रपणाच्या दोषामुळे याला गुप्तता होईल; म्हणून सुस्नात झाल्यावर तू अमृत घे. अमृतकलश मी दुर्वांकुरांमध्ये गंगातीरावर ठेवला आहे. तेव्हा तू माझ्या मातेचे बंधनविमोचन करावेस,' असे कद्रूला भक्तिभावाने नमस्कार करून सांग. तू नम्रपणे नमन केल्यावर कद्रू संतुष्ट होईल आणि तुझ्या मातेची बंधनमुक्ती करील. त्यावर कार्य उत्तीर्ण म्हणून तू जा. नंतर देवसमुदाय सर्पांना अमृतपान करू न देता, काकस्वरूपात जाऊन अमृतकुंभावर झडप घालून, तो घेऊन जातील.' अशी विष्णूने युक्ती गरुडाला सांगून, त्याच्या दैवी गतीने तो त्याप्रमाणे करण्यास सिद्ध झाला. कुबेराने रत्नकुंभ अमृताने भरून तो कुंभ गरुडाकडे दिला. नंतर विष्णूचे सांगणे चित्तात धरून गरुड कद्रूकडे आला. कद्रू गरुडावर संतुष्ट झाली. गरुडाने मातेला बोलावून तिच्या देखत कद्रूकडे अमृत दिले. विनता बंधनमुक्त झाल्याने उल्हसित झाली. कद्रू विनतेला म्हणाली, 'तू धन्य आहेस कारण गरुड तुझ्या कुशीत जन्मला. अमृत घेऊन येऊन मातेला त्याने मुक्त केले.' हे कद्रूचे वचन ऐकून गरुडाने तिला साष्टांग नमन केले. कद्रूने गरुडाला जवळ घेऊन नित्य विजयी होण्याचा आशीर्वाद दिला."

"गरुडाने विष्णूच्या सूचनेनुसार कद्रूला सांगितले की, 'अपवित्र स्थितीत स्पर्श झाला तर हे अमृत जिथल्या तिथे गुप्त होते. यासाठी व्यवस्थितपणे सुस्नात होऊन सर्वजण नंतरच अमृताचा स्वीकार करा. मी हा अमृतकुंभ गंगातीरावर दुर्वांकुरांमधे ठेवतो आहे. तुम्ही सर्वांनी स्नान करून मगच अमृताचा आहार घ्यायला बसावे.' एवढे बोलून, अमृतकलश दुर्वांकुरांवर ठेवून, गरुड आकाशात गेला. विनता निर्मुक्त होऊन आपल्या घरी गेली. अमृतप्राशनाच्या आशेने सर्प आनंदाने स्नान करू लागले. तेवढ्यात अमृताच्या आशेने असंख्य कावळे एकत्र जमले. इंद्राला अमृताचा फार कळवळा असल्याने तो डोमकावळा होऊन तेथे आगमन करून आला आणि अमृतकलश झडपून घेऊन गेला. सर्पांनी ते पाहून हाहाःकार केला. अमृत घाईघाईत नेल्यामुळे त्यातले काही दुर्वांकुरांवर सांडले. त्यामुळे पृथ्वीवर आजपर्यंत दुर्वा टवटवीत आहेत. दुर्वा अमर होऊन पृथ्वीवर राहिल्या आहेत. डोमकावळा अमृत घेऊन जात असल्याचे पाहून सर्पांनी विषाचे गरळ सोडले. त्यावेळी नकुल हा देवांच्या मदतीला आला. त्याने सर्पांना महामार दिला. गरुडगती आकाशी आणि नकुलगती विवराशी, अशा अवस्थेत त्यांनी सर्पांशी युद्ध सुरू केले. विषाने भरलेला फडा उभारून नागसर्प अमृताच्या लालसेने धावले. तेव्हा गरुडाने नकुलाला पाठविले. त्या पराक्रमी नकुलाने सर्पांशी झगडा करून त्यांचे जे पराक्रमी सर्पवीर त्यांना खंड-विखंड केले. सर्प जेव्हा चोहोकडून धावून नकुळाला मारायला जात तेव्हा गरुड त्याचा

https://archive.org/details/muthulakshmiacademy / Bhuvan Vani Trust, Lucknow

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

पाठिराखा होत असे. तो आकाशातून मारा करत असल्याने सर्पांना त्याला आवरणे कठिण होत होते. शिवाय घारी, गिधाडे ही गरुडसेना सर्पांवर झडप घालून त्यांना आकाशात नेऊन मारून फेकत. अशाप्रकारे सर्पांना युद्ध करत राहावे लागले आणि त्यामुळे ते अमृतपानाला मुकले. नकुळ जमिनीवरून मार करत होता, तर गरुड, घारी, गिधाडे हे अन्तराळातून लढत होते. त्यामुळे रणात सर्पांचा नाश होत होता. अखेर प्राणभयाने ते पाताळात शिरले.''

''सर्पांना सर्व कल्पना आल्यावर ते आपसात म्हणू लागले, 'गरुडाने कशी युक्ती केली पाहा. संधी साधून मातेची मुक्तता केली, आम्हाला नकुळाकडून मार दिला आणि अमृतप्राप्ती कावळ्यांना झालेली दिसली तरी ते काग नसून सुरवर होते. त्यासाठीच गरुडाने त्यांचा कैवार घेऊन आमचा संहार नकुळाकडून करविला.' नंतर दर्भावर सांडलेले अमृत सर्प तोंडाने चाटू लागले तेव्हा त्यांच्या जिभा दर्भाने दुखंड चिरल्या त्यांना त्यामुळे पुष्कळ दुःख झाले. अमृतस्वादाच्या लोभाने दर्भ चाटला तेव्हा जीभ चिरली आणि शेवटी व्यथा तेवढी उरली. ही स्वतःच्या कपटाने दिलेली शिक्षाच होती. पितृभक्ती, मातृभक्ती यामुळे गरुडाला अमृतप्राप्ती झाली आणि कद्रूच्या कपटामुळे सर्पांना दुःख भोगावे लागले. सद्भावाने भगवत्प्राप्ती होते आणि असद्भावाने अधोगती मिळते. भगवद्भक्तांना सुखप्राप्ती आणि अभक्तांना दुःखप्राप्ती ठरलेलीच आहे. सर्पांपासून अमृत काढून घेऊन गरुडाने देवांना ते प्राप्त करून दिले; गरुडाने इंद्रादी सर्व देव निश्चिंत आणि सुखी केले. देवांनी परमामृत मिळाल्यावर ते कुंडात भरून पाताळात ठेवून त्याच्या रक्षणाची सर्वांग परिपूर्ण व्यवस्था केली. त्यामुळे सर्व सुर सुखी झाले. गरुडाची ख्याती त्रैलोक्यविजयी महावीर, धीर, वीर, शूर आणि उदार अशी झाली. गुरुडामुळे पिता कश्यप, माता विनता, समस्त सुरगण आणि मुख्यतः श्रीविष्णू सुखी झाले. हे रघुपती, तो गरुड म्हणजे माझा चुलता आहे. आम्ही अरुणाची संतती आहोत.''

जटायूचे रामाला आश्वासन

''अरुणाची आम्ही दोघे, संपाती आणि मी जटायू अशी संतती. आम्हाला अरुणपित्याची स्पष्ट आज्ञा आहे की आम्ही सूर्यवंशाचे सेवक व्हावे. तेथे रघुकुळटिळक, विश्वतारक, जगद्वंद्य, पुत्र जन्मेल. यासाठीच सूर्यवंशी दशरथाशी सख्य केले. त्याचा तू श्रीराम भेटलास. आज माझे भाग्य धन्य झाले.'' एवढे बोलून जटायूने श्रीरामापुढे लोटांगण घातले. रामाने त्याला आलिंगन दिले त्यामुळे जटायू समाधान पावला. नंतर जटायू म्हणाला, ''श्रीरामा. तू पंचवटीत राहशील तेव्हा मला तुझी सेवा सांग. पंचवटीत सीतेला ठेवून श्रीराम आणि लक्ष्मण असे जर तुम्ही मृगया करण्यासाठी गेलात तर मी सीतेचे रक्षण करीन. श्रीराम असो, नसो मी सीतेचे रक्षण करीन. मग मी असताना राक्षसभयाची वार्ता कशाला. माझ्या पराक्रमापुढे राक्षसबळ क्षुद्र, आश्रमाकडे कोण दुष्ट पाहील. मी चहूकडून रक्षण करीन. मी आश्रमाजवळचा सेवक होऊन, आश्रमाभोवती अहोरात्र फिरत राहीन. तुम्ही सुखाने राहा. मी विघ्नांचा इथे प्रवेशच होऊ देणार नाही.''

''श्रीरामनामस्मरणाने विघ्न हे निर्विघ्न होते. तिथे मी कसला रक्षण करणार, पण मी सद्भावाने सेवा तेवढी करीन. आपण अवश्य पंचवटीला जा. मी मार्गदर्शक सेवक आहे, तुम्हाला सुखात तेथे नेईन.'' जटायूचे हे निवेदन ऐकल्यावर श्रीराम, सीता आणि लक्ष्मण हे तिघे लागलीच निघून पंचवटीस आले. गंगाजळाच्या काठाजवळची पंचवटी पाहून तिघांनाही आल्हाद वाटला. श्रीरामाने पंचवटीत वस्तिस्थान निर्माण केले. श्रीरामाजवळ दृष्टीपुढे राहावे म्हणून जटायू पर्वतावर राहून, अहोरात्र प्रदक्षिणा घालत राहिला.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

अध्याय आठवा

गंगातीरावर पंचवटीत आल्यावर जे दृश्य श्रीरामाने पाहिले त्याने तो सुखावला. सीता आणि सौमित्र हेही प्रसन्न झाले. त्याचबरोबर श्रीरामाला पाहून कोकिळाही आल्हादाने पंचमस्वरात कूजन करू लागल्या. पारवे स्वानंदाने घुमू लागले आणि सुखानुवाद करू लागले. 'श्रीरामा तू-तू, सीते तू-तू, सौमित्रा तू-तू असे कपोत पक्षी पुण्यपुरुषार्थासाठी या वनात कूजिते करत होते. परतःप्रमाण की स्वतःप्रमाण या प्रयोग-उपाधीने स्थलानुसार किंवा कालानुसार व्यावर्तित कोण आणि प्रयोजन काय, याविषयी शुक आणि सारिका यांच्यात विवाद चालू झाला. यावेळी शुक हा चिकित्सकपणे म्हणाला, 'येथे आत्मा हा स्वतःप्रमाण आहे. तो स्थल-कालपरत्वे बदलणे जाणत नाही. आपण श्रीरामावर लक्ष केन्द्रित करावे.' असा पक्ष्यांचा विवाद चालू झाल्याने श्रीराम सुखावला, लक्ष्मणाच्या चित्ताला हा चमत्कार वाटला. सीता स्वांनदाने विवाद ऐकत राहिली. मोर आनंदाने नाचत होते, शुक आणि पिंगळे एकमेकांना सांगत होते की, 'श्रीराम या वनात राहिला तर त्याला पुण्यपुरुषार्थाची प्राप्ती होईल. पंचवटी मुळात पवित्र आहे; त्यात श्रीराम जगजेठी वस्ती करून राहिला तर त्याच्याकडून राक्षससमूह मारले जाऊन तिन्ही लोक सुखी आणि संतुष्ट होतील.' हे पक्ष्यांचे कूजित ऐकून श्रीरघुनाथ सुखावला आणि त्याने संतुष्ट मनाने तिथेच आश्रम निर्माण करण्याविषयी लक्ष्मणाला सांगितले.

आश्रमस्थापना, दिनक्रम, लक्ष्मणाचे कौतुक

अरुणा-वरुणा संगमाचे सार, प्राची पवित्र सरस्वती, सुंदर कपालेश्वर या सर्वांना पाहून श्रीरामाने लक्ष्मणाला म्हटले, "गंगातीर सुशील आणि सम आहे, वृक्ष फुलाफळांनी परिपूर्ण आहेत. मलयपर्वतावरून येणारा सुगंधित वारा येथे येतो आहे, असे हे वन मोठे सुखद वाटते आहे. तू तर माझा प्रियसखा आहेस आणि सर्वांगी सुलक्षणही आहेस. तेव्हा येथे आपण वस्ती करून सुखात राहू. तू इथेच आश्रम तयार कर. लक्ष्मणाचे हेच शुभलक्षण होते की तो श्रीरामाच्या सूचनेला कधी नकार देत नसे. त्याने श्रीरामाच्या चरणांना वंदन करून आश्रम तयार केला. यज्ञशाळा, द्विजशाळा, जीवनशाळा, शयनशाळा, पर्णशाळा इत्यादी निर्माण करून मग एक विशाल अशी ऋषिशाळा तयार केली. वृंदावने, सुमनवने यामुळे वने उपवने शोभायमान दिसू लागली. थोड्या थोड्या अंतरावर वाढलेल्या लहान लहान वृक्षांच्या गर्दीप्रमाणेच, वेल, वड, मधुवने, आंबराई, यांचा घमघमीत दरवळ सर्वत्र पसरला होता. गंगातीराच्या तटाजवळच्या या शोभेत पंचवटीची शोभा खुलून दिसत होती. ती शोभा पाहून मन प्रसन्न होत होते. अरुणा, वरुणा, सरस्वती यांचा त्रिवेणी प्रवाह आश्रमाजवळून जात असून सुंदर कपिलेश्वराची स्थिती अशी होती की हे सारे आश्रमाच्या समोर आणि जवळ होते.

पंचवटीतला सुशोभित आश्रम सिद्ध करून एकप्रकारे लक्ष्मणाने सद्भावाने श्रीरामाच्या सुखासाठी त्याची सेवाच केली. उत्तमोत्तम सुविधा असलेला आश्रम पाहून रघुपती अत्यंत सुखी झाला. त्याने प्रेमाने लक्ष्मणाला सुखाचा अनुभव देण्यासाठी आलिंगन दिले. स्वतः श्रीरामाने तेथे नाना तऱ्हेची फुले, फळे यांच्या एकत्र करण्याने आश्रमात बळी दिला. त्यावेळी सीताही त्याच्याबरोबर होती. श्रीराम आणि सीता यांच्या आश्रमाविषयीच्या प्रसन्नतेने लक्ष्मणाला सुखसंपत्ती प्राप्त झाल्याचे समाधान मिळाले. त्याला अहोरात्र त्यांची सेवा करण्याविषयी उल्हास वाटत होता. दर्भ, पुष्पे, स्वादिष्ट फळे, शीतळ सुगंधित जळ या सर्व गोष्टी सर्वकाळ पुरविण्यासाठी त्याला सेवाबळाने उत्साह येई. लक्ष्मणाला श्रीरामाच्या सेवेत आत्यंतिक सुख वाटत असल्याने तो द्वंद्वदुःख विसरून सेवेतच परम हर्ष मानत होता. सौमित्र नित्य राम-सीतेचे चरणतीर्थ

https://archive.org/details/@sulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

प्राशन करत असे. त्याने आपले जीवन सेवेलाच समर्पित केले असून त्याविषयी सर्वाधिने सावधचित्त राहात होता.

एके दिवशी सीतेच्या संरक्षणासाठी लक्ष्मणाला ठेवून श्रीराम स्नानाला गेला त्यावेळी एक अद्‌भुत गोष्ट घडली. श्रीरामासमोर सीता कधीही निद्रावश होत नसे. त्या दिवशी राम स्नानाला गेला असताना सीता दमून झोपली. लक्ष्मणासमोर ती त्या दिवशी स्वाभाविकपणे झोपली. गाढ झोपेत तिच्या अंगावरचे कमरेखालचे वस्त्र बाजूला झाले. स्तनबंधनही मोकळे झाले. लक्ष्मण त्यावेळी श्रीरामाच्या ध्यानांत गुंग होता. त्यामुळे सीतेचे स्तन, मांड्या पाहिल्या नाहीत की तिची नग्न अवस्थाही पाहिली नाही. त्याला यापैकी कशाचेही ज्ञान नव्हते. तो ध्यानमग्न होता. नंतर श्रीराम जेव्हा स्नान करून परत आला तेव्हा सीता नग्न असल्याचे दिसले. तो स्वतःच लक्ष्मणाला म्हणाला, "स्त्री म्हणजे निव्वळ अग्निकुंड आणि पुरुष हा तुपाची घागर असल्याप्रमाणे आहे. स्त्रीचे गुह्य स्थळ पाहून तो व्याकुळ होतो. त्यावेळी कोणाचे मन निश्चल राहील?" त्यावर लक्ष्मणाने उत्तर दिले की, "ज्याचा पिता शुचिर्भूत आहे, ज्याची माता पतिव्रता आहे, जो रामाच्या सेवेत नित्य रंगून गेलेला असतो, त्याचे चित्त कदापी चळणार नाही. हे श्रीरामा, जे कोणी श्रीरामाचे भक्त आहेत, त्यांची आत्मस्थिती अशी असते की गुह्यगुह्यार्थ पाहूनही मन वा चित्तवृत्ती चळत नाही हे निश्चित आहे. देहाच्या विकारवृत्ती, स्त्रीपुरुष भेदाची अभिव्यक्ती, यापलीकडे जाऊन ते भक्त देहातीत राहून चित्तवृत्ती चळू देत नाहीत. सीता ही तर स्वतः जगदंबा होती. ती त्या दोघांचा संवाद ऐकून, लक्ष्मणाची परीक्षा पाहून सलज्जपणे उठली.

सीतेने लक्ष्मणाच्या ध्यानस्थितीबद्दल आदर वाटून त्याच्या पायावर डोके टेकवले. श्रीरामाने स्वतः लक्ष्मणाला परमपूज्य मानून त्याला वंदन केले. त्यानंतर लक्ष्मणानेही राम-सीता यांना साष्टांग नमस्कार घालून त्यांच्या पायावर मस्तक टेकवले. लक्ष्मण म्हणाला, "श्रीरामात पूर्ण पूज्यता आहे; त्याने मला अखंड सेवा करण्याचे सुख द्यावे." हे सौमित्राचे बोलणे ऐकून श्रीरामाने त्याला आलिंगन दिले; त्यावर दोघातले दोनपण संपून ते दोघेही परिपूर्ण परब्रह्मत्व पावले. लक्ष्मणाला पूर्ण बोध प्राप्त होऊन, त्याला सेवेतले सुखही मिळाले, तो सेवाकार्यार्थ सावध झाला. लक्ष्मण वनामध्ये जाऊन नित्य वनफळे आणत असे. एके दिवशी तो नेहमीप्रमाणे वनात गेला असता त्याने एक आश्चर्य अनुभवले.

सांब राक्षसाचा वध-लक्ष्मणाची शंका

शूर्पणखेचा लाडका पुत्र, सांब राक्षस हा काळखड्‌गाच्या प्राप्तीसाठी वनामध्ये तपश्चर्या करत होता. तपाच्या तेजाने तो महापराक्रमी सांब ध्यानामधे मंत्रमूर्तीचे आकलन करू शकत असे. तो एकाग्रतेने तपश्चर्या करत असताना त्याच्या अंगावर प्रथम वृक्ष-वेली चढून एक वृक्षजाळीच तयार झाली. पुढे काही दिवसांनी त्याच्या अंगाभोवती वारुळ निर्माण झाले. सांबाची तपश्चर्या एवढी अद्‌भुत आणि एकाग्रचित्ताने चालू होती की अखेर त्याला कालखड्‌ग प्राप्त झाले. पण दुर्दैवाने त्याबाबतीत एक चमत्कारिक घटना घडली. खड्‌ग खाली उतरले, तेव्हा शस्त्रदेवता विचार करू लागली की 'सांब हा दुर्धर राक्षस आहे, तो खड्‌गाचा उपयोग घोर कृत्ये करण्यासाठी करील. गोब्राह्मण, दीनदुर्बल यांचा घात करील. यासाठी मी त्याच्या हाताला स्पर्श करू देणार नाही. त्यापेक्षा मी लक्ष्मणाला शरण जाईन. कारण तो धर्माला साह्यकारी आहे. दीनजनांचा कैवारी आहे. लक्ष्मण हा सर्वांचा उद्धार करणारा आहे. तेव्हा मी लक्ष्मणाच्याच हातात गेल्याने पावन होईन.' सांब हा ज्या वृक्षवेलींच्या जाळीत तपश्चर्या करत होता. त्याच ठिकाणी लक्ष्मण फळे तोडण्यासाठी आला त्यावेळी काळखड्‌ग येऊन त्वरित लक्ष्मणाच्या हातात शिरले. वनफळे तोडताना अचानक

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Trust, Lucknow / Muthulakshmi Research Academy, eGangotri

काळखड्ग हातात आल्याने चकित होऊन त्याचा दाता आसपास कुठे दिसतो का हे तो पाहू लागला. परंतु त्याला कोणीच दिसेना. मग त्याने हातातल्या खड्गाचे वजन पेलून पाहिले आणि नंतर खड्गाची धार तपासून पाहावी म्हणून त्याने समोरच्या जाळीवर त्याचा घाव घातला. त्या घावाने जाळीखाली असलेला सांव मारला गेला.

लक्ष्मणाने घातलेला खड्गाचा घाव इतका सबळ होता की जाळीवरोवर सांवाचे शिरही तुटून पडले. भळाभळा रक्त वाहू लागले. हे पाहून सौमित्र चिंताग्रस्त झाला. त्याच्या मनात विचार आला की, 'इथे कोणी तपस्वी होता असे दिसते. यामुळे माझ्या हातून ब्रह्महत्या घडली निश्चित. आता स्वर्गात दशरथपिता क्षोभेल. हेही खरे की श्रीरघुनाथही क्षोभेल. कुठून हे खड्ग हाती कसे आले कोण जाणे. यामुळे माझ्या माथी ब्रह्महत्या मात्र आली. आता श्रीरामाला भेटायचे तरी कसे? लक्ष्मण अतिशय चिंतेत पडला. ब्रह्महत्या करणाराचे तोंडही श्रीराम पाहणार नाही. समोर येऊही देणार नाही. लक्ष्मणाच्या जिवाला ही धाकधूक वाटून तो अत्यंत दुःखी झाला. माझा श्रीराम हाच माझा पिता, बंधू गोत असून समर्थ आहे. त्याला सर्व घडलेला वृत्तान्त सांगून प्रायश्चित्ताविषयी त्यालाच विचारीन. श्रीरामनामाचे स्मरण केले तर कोटी दोषांचा नाश होतो. त्यामुळे त्यालाच शरण गेल्यावर निमिषार्धात हत्यादोषाचे हरण होईल. मुखाने श्रीरामनामाची आवृत्ती, हृदयात श्रीरामाची मूर्ती, पावलोपावली श्रीरामस्थितीचा ध्यास, हे घडले तर श्रीरामाकडून दोषनिवृत्ती होते. श्रीराम स्थितीत पाऊल पुढे पडले तर गाढ समाधिसुख अनुभवाला येते. श्रीरामाकडे पाहताच प्रायश्चित्त बापुडे ठरते.' असे विचार मनात आणून हत्येच्या भयामुळे लक्ष्मण प्रायश्चित्ताविषयी विचारण्यासाठी श्रीरामाकडे आला. लक्ष्मणाची उद्विग्नता पाहून सीतेने श्रीरामाला म्हटले, "स्त्रीवाचून लक्ष्मण अत्यंत अस्वस्थ झाला असावा, त्याचा चेहरा दीनवाणा दिसतो आहे." श्रीरामाने सीतेला सांगितले, "सौमित्र विषयार्थी नाही. त्याला नूतन खड्गाची प्राप्ती झाली. यावरून वनात काहीतरी घडले असावे." तेवढ्यात लक्ष्मण आला आणि साष्टांग नमस्कार घालून रामाला म्हणाला, "माझ्याकडून काही दोष घडला आहे, आपण कृपा करावी. हे रघुनाथा, अनाथबंधू, दीननाथा माझ्यावर दया कर. माझा रक्षणकर्ता तुझ्याशिवाय दुसरा कोणी नाही. तळात धरित्री पाहू जाता आणि वर आकाश न्याहाळता, हे रामा मला दाही दिशा शोधूनही तुझ्याशिवाय दुसरा कोणी आढळला नाही. मला तर माता, पिता, बंधू, भगिनी हे सर्व तत्त्वतः तूच आहेस, अन्य कोणाला मी जाणत नाही. वनात येताना कौसल्यामातेने हेच सांगितले होते की तूच माझा रक्षणकर्ता आहेस." लक्ष्मणाचे हे दीनवाणे बोलणे ऐकून श्रीरामाने त्यामागे काय कारण आहे हे लक्ष्मणाला विचारले. तेव्हा मान खाली घालून लक्ष्मण सांगू लागला. "वनामध्ये फळे तोडत असताना माझ्या हातात अकस्मात एक खड्ग आले. त्याची धार पाहण्यासाठी मी त्याचा त्याहस्तीने जाळीवर घाव घातला. तेव्हा जाळीखाली वाढलेल्या वारुळात एक तपस्वी बसला होता. त्याचा माझ्याकडून घात झाला. त्याचे प्रायश्चित आपण मला सांगा."

श्रीरामाकडून लक्ष्मणाचे सांत्वन

सौमित्राने सांगितलेली घटना ऐकून श्रीराम त्याला म्हणाला, "लक्ष्मणा, अरे तू ज्याचा घात केलास तो शूद्र, वैश्य, क्षत्रिय, ब्राह्मण यातला कोण होता हे निश्चित केल्याखेरीज प्रायश्चित्त सांगता येणार नाही. तर तू आधी प्रेताची परीक्षा करून ये पाहू." हे ऐकल्यावर लक्ष्मण तातडीने त्या जाळीजवळ गेला. त्याला तेथे एक भेसूर तोंडाचा, विक्राळ दाढा असलेला, खापरासारखा सबाह्य काळा, डोळे अग्नीसारखे असलेला, एका प्रचंड राक्षसाचा देह पडलेला दिसला. नंतर परत येऊन लक्ष्मणाने रामाला सांगितले, "माझ्याकडून

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

राक्षसाचा घात झाला आहे." श्रीराम ते ऐकून हसला आणि म्हणाला, "अरे हा तर आपला मुख्य धर्मार्थच आहे. तुला स्वतःविषयी जाण नव्हती; पण शस्त्रदेवता सज्ञान होती. तिने नेमके जाणले आणि स्वतःच दुष्टाचे निर्दाळण केले. कारण तो राक्षस जर सावध असता तर त्याने तुझाच घात केला असता. शस्त्रदेवता तुझ्यावर प्रसन्न होती म्हणून तिने तुझ्याकडून युद्धाविना त्याचा घात करविला. तो राक्षस महापराक्रमी, दुर्धर तप करून शस्त्रप्राप्ती साधणारा, असा असल्याने शस्त्रदेवतेने त्या दुष्टावर संतापून, त्याचाच घात घडवून आणला. तेव्हा तू आपल्याकडून तपस्व्याचा घात झाला, त्याचा दोष शिरावर आला असे मनात आणू नकोस किंवा त्या हत्येचा दोषही मानू नकोस."

त्यानंतर श्रीरामाने लक्ष्मणाचे सांत्वन करताना सांगितले की, "लक्ष्मणा, राक्षसांचा नाश करायला तर आपण वनात आलो आहोत. शस्त्रदेवतेने तुझ्या हाती शस्त्र देऊन दुष्टाचा प्राण घेतला आहे. यामध्ये तू कर्मकर्ता ठरतच नाहीस. तुझ्या हाताकडून शस्त्रदेवतेने दुष्ट निर्दाळण केले आहे. तेव्हा तुला दोष येत नाही. त्यामुळे तुला प्रायश्चित विचारण्याचेही कारण नाही." श्रीरामाने हे सांगितलेले स्पष्टीकरण ऐकून सौमित्राला आनंद झाला. तो म्हणाला, "धन्य धन्य आहेस तू श्रीरामा, तू घटनेचा इत्यर्थ शोधून काढलास. त्यामुळे मी कर्मकर्ता नाही, मला दोषही लागत नाही हे समजले. धन्य श्रीरामकृपा, जिच्यामुळे दोषाविषयी शंका घेतली ती माझी शंकाच निःशंक केली. पुण्य वा पाप आता मला काहीच नाही." असे म्हणून लक्ष्मणाने श्रीरामाचे चरण मस्तकी धरले. श्रीरामाने त्याला आलिंगन दिले. त्यामुळे तो सुबंधू सौमित्र समाधान पावला. श्रीरामाचे भक्त हे कर्म करून अलिप्त राहतात. अशा हरिभक्तांचे चरित्र पठण केल्याने महादोषी दोषमुक्त होतात. राक्षसांचा वध करणे शक्य व्हावे म्हणून जे काळखड्ग हाती आले होते त्याची रामाने श्रद्धेने पूजा करून "काळ हा सर्वथा आम्हाला साहाय्य करो" अशी प्रार्थना केली. "काळ मूलतः आणि स्वाभाविकपणे साहाय्यकारी झाला होता कारण प्रार्थना न करताच काळखड्ग हाती देऊन त्याने राक्षसाचे निर्दाळण करण्याची संधी दिली आहे हे तू लक्षात घे." असे लक्ष्मणाला सांगितले तसेच "राक्षसांचा रणात संहार करण्याचा हा आरंभ आहे. इथून पुढे वनात संचार करताना सावधपणे वागावे हेही लक्षात ठेव. या राक्षसवधाचा सूड घेण्यासाठी अनेक राक्षस येथे योगी, संन्यासी, तापसी, असे वेषांतर करून कपटवेषाने येतील तेव्हा त्यांचा विश्वास धरू नये. त्यांनी काही कर्तव्य करण्याविषयी अगत्याने सांगितले, तरी मला विचार. मला विचारल्याशिवाय लहानसेही कार्य करू नये." यावर श्रीरामाचे सांगणे शिरसावंद्य मानून सौमित्र नेहमी सावधान राहू लागला

शूर्पणखेचे सूडासाठी आगमन

शूर्पणखा ही सांबाची माता लंकेत होती तिला तिकडे एक दुष्ट स्वप्न पडले. या स्वप्नात, सांबाला पट्टाभिषेक होत असताना त्याला लाथ मारून दूर लोटला आहे; त्याच्या मस्तकावर शेंदुराचा टिळा आहे; गळयात लाल कण्हेरीच्या माळा आहेत; चेहरा काजळाने माखला आहे, त्याच्या सभोवार वानरांचा समूह जमला आहे; सर्वांगाला तेल चोपडले आहे; नागव्या गाढवावर त्याला बसविले असून तो दक्षिण दिशेकडे जातो आहे आणि अखेर त्याने शेणामधे प्रवेश केला आहे, असे तिने पाहिले. शूर्पणखेने रावणाला सांबाविषयी घडलेले हे दुष्ट स्वप्न सांगितले. लगेच ती विमानाने पद्मपुराकडे निघाली. प्रथम ती त्रिशिरा, खर, दूषण यांना भेटली आणि मग सांबाला पाहण्यासाठी आली. तिने सांबाचा शिरच्छेद झालेला पाहिला आणि हंबरडा फोडून ती आक्रोश करू लागली. "हे काय अघटित घडले; कोण चेटकी याच्या जिवावर उठली? ज्याला कृतान्त काळ भीत असे तो असा भूमीवर पडला हे कसे? हा सहज डोळे वटारून

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

पाही तर सुरासुर दाही दिशा पळू लागत; कळिकाळाची दृष्टी नाश पावत असे; असा हा हठवीर भूमीवर पडला! बाळा रे तुझ्यासाठी मी किती नवस केले, अश्वत्थ वृक्षाची सेवा केली, उपास केले; तुझ्या बद्दल मी केवढी थोर इच्छा बाळगली होती, आणि तूच असा उदास झालास. तुझे मुखकमल पाहूनच मला पान्हा सुटला. माझ्याशी अबोला धरून माझा सांब परलोकी गेला." अशाप्रकारे अनेक परींनी विलाप करून तिने सांबाच्या तोंडावर तोंड ठेवले. "अरेरे कोणी माझ्या बाळाचा वध करून मला हे घोर दुःख दिले आहे. आता इथे रडत बसून काय करणार. माझ्या पुत्राचा घात कोणी केला त्याला शोधण्यासाठी सर्व वन मी निश्चित शोधून काढीन."

शूर्पणखा वनात हिंडत असताना तिला खड्गासह धनुष्यबाण घेतलेला लक्ष्मण दिसला. तेव्हा हाच सांबाचा जीव घेणारा असणार, याला मी खाऊन टाकीन. माझा सांब ध्यानमग्न होता म्हणून त्याचा घात याला करता आला. तो जर सावधचित्त असता तर याला एका घोटात गिळून टाकण्याचे बळ सांबाजवळ होते. महापराक्रमी सांब याने ध्यानमग्न अवस्थेत मारला; तर मी आता संपूर्णच गिळून याच्या हाडांचे रांगोळीसारखे चूर्ण करते. याने माझा सांब मारला असे गाऱ्हाणे खरादिकांना सांगणे हे मला लाजिरवाणे आहे. त्यापेक्षा मीच त्याला मारून त्यांच्याकडे न्यावे हे चांगले. याच्या अंगी संपूर्ण बळ आहे याची लक्षणे दिसताहेत. याचे दोन डोळे सहस्त्रनयन इंद्रासारखे आहेत. त्याच्या बाहूंवर नागचिन्हे आहेत. डोळ्यांत कासवाची दृष्टी, कळिकाळही याच्या पुष्टीमुळे चळत नाही. शेषशायी श्रीविष्णूचे चिन्ह याच्या पाठीवर आहे आणि याचे एकूण आंगिक वैशिष्ट्य सृष्टीत नेहमी न दिसणारे आहे. याला जर मी बळाने गिळू गेले तर हा माझा घात करील. तेव्हा याची कांता होऊन याला नंतर छळून मारावा." असे सर्वदृष्टीने विचार करून शूर्पणखेने ठरविले.

यानंतर शूर्पणखेने आपले मूळचे क्रूर रूप टाकून, अति सुंदर स्वरूपरूप धारण केले. ती मनोहर अलंकार घालून, पैंजणांची छुमछुम करत सौमित्रासमोर उभी राहिली. यावेळी तिने शीर्षफूल, राखडी, कमरबंद, गोंडे, पोफळ, चाफेकळी, केतकी यांचे दांडे, दोन्ही हातात रत्नजडित चुडा आणि मुखात सुरंग विडा अशी तयारी केली होती. अंगात मदुवीची काचोळी, गळ्यात एकपदरी हार, मोकळी पाठीवर रुळणारी केसांची वेणी आणि त्यात दुफुलीसह गोंडा असा तिचा थाट होता. ती सागरी निळ्या रंगाचे वस्त्र नेसली होती. तिच्या कमरेला रत्नजडित मेखला होती. हळदीने मुखलेपन आणि डोळ्यात भळभळीत काजळ अशी ती नटली होती. अशी ती वेषांतराने सुंदर झालेली शूर्पणखा डोळे मोडत, हावभाव करत लक्ष्मणाकडे आली आणि त्याच्या पाया पडली.

लक्ष्मण-शूर्पणखा-श्रीराम यांचे डावपेच

लक्ष्मणाच्या पाया पडून शूर्पणखा लाजून पाठमोरी उभी राहून मुरडत होती. एका पायावर उभे राहून ती लक्ष्मणाला सांगू लागली. "मी कुबेराची बहीण आहे. तुमच्याच प्राप्तीसाठी मी अनुष्ठान केले होते. मी धर्मपत्नी होईन." ती सुंदरी लक्ष्मणाला आवडली खरी पण त्याला श्रीरामाची आज्ञा आठवली. 'राक्षस कपटवेषाने येतील तेव्हा त्यांचा विश्वास धरू नये.' तेवढ्यात कमळांची माला घेऊन येऊन ती लक्ष्मणाच्या गळ्यात घालण्यासाठी ती स्त्री पुढे आली. परंतु तिच्या स्पर्शाचा विटाळ मानून लक्ष्मण मागे सरला. त्यावर ती म्हणाली, "माझ्यासारखी सुंदर कांता वनामध्ये एकांतात भेटली तर नपुंसकही मागे सरणार नाही; मग तुझे पौरुष असे भयभीत का? मी तर केवळ तुझी चरणदासी असून अहोरात्र तुझी सेवा करीन. आपण पर्णशेजेवर शयन करू या; मनात कसलीही शंका धरू नकोस. माझा तू उपभोग घेतलास म्हणजे तुला सर्व भावार्थ समजेल आणि माझ्याशी तुझा पुरुषार्थ संग पावला तर जगात तू विख्यात होशील."

https://archive.org/details/muthulakshmiacademy
Bhavan Vedic Trust

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

शूर्पणखेचे बोलणे ऐकल्यावर लक्ष्मण म्हणाला, "आता माझे म्हणणे ऐक. श्रीराम हा माझा ज्येष्ठ बंधू आहे. त्याची मला आज्ञा झाल्याशिवाय मी तुझा अंगिकार करणार नाही." यावर शूर्पणखेने 'श्रीराम ज्येष्ठ बंधू कसा आहे, त्याचा पुरुषार्थ काय, त्याची दशा काय, हे सगळे मनापासून जाणून घेऊन, त्याच्याकडे जाण्याचा मार्ग कोणता' हे विचारून घेतले. लक्ष्मणाने उत्तर दिले की, "याच मार्गावर गंगेच्या किनाऱ्यावर पंचवटीत श्रीरामाचा आश्रम आहे. तेथे श्रीराम जगजेठी सीताकांतेसह राहतो आहे." शूर्पणखेने हे ऐकून मनात विचार केला की, 'हे माझ्या पुत्राचे वैरी असून गंगाकाठी रम्याश्रम बांधून चांगल्या प्रकारे नांदत आहेत. सीता ही सुंदरी त्याची प्रियतमा आहे. श्रीराम आणि लक्ष्मण या दोघांना मी छळून मारीन आणि सीता सुंदरीला नेऊन लंकानाथाला स्वतःच अर्पण करीन. मग शूर्पणखा पंचवटीला गेली. श्रीरामाला साष्टांग नमन केल्यानंतर ती त्याला म्हणाली, "भाऊजी आपले चरणवंदन करते आणि बाईंनाही नमन करून सर्वभावाने शरण जाते. मी आपली धाकटी जाऊ आहे, माझ्यावर कृपा असू द्या. आपले धाकटे भाऊ माझ्याशी लग्न करायला मान्यता देत नाहीत. आपल्या आज्ञेशिवाय ते मान्यता देत नाहीत. तुम्ही भाऊजींना सांगून माझे सौमित्रांशी लग्न लावून द्या." सीता या विनंतीला भुलून श्रीरामाला म्हणाली, "सौमित्र अहोरात्र कष्ट करतो आहे. त्याला ही सुंदर कांता मिळते आहे; शिवाय मलाही वनवासाच्या काळात ही सांगातीण होईल."

श्रीरामाने जेव्हा त्या सुंदर स्त्रीकडे निरखून पाहिले तेव्हा त्याला तिच्या डोळ्यातल्या उलट्या बाहुल्या दिसून आल्या. तेव्हा त्याने लगेच ओळखले की ही कोणी निशाचरी राक्षसी आहे. ही येथे छळ करण्यासाठी आली आहे. तिचा हेतू जाणून श्रीराम हसून म्हणाला, "हे सुंदरी, माझा आणि लक्ष्मणाचा एक चमत्कारिक संकेत आहे. त्याला पत्राने किंवा मुखाने आज्ञा केली तर तो ती मानत नाही. केवळ पाठीवरच्या लिहिलेल्या अक्षरांची आज्ञाच सौमित्र मानतो." यावर शूर्पणखेने विचार केला, 'मी रामाची आज्ञा मागायला आले तर मुहूर्ताबाबत तो मला विमुख करता झाला. आता जर लक्ष्मणाला पती करण्यासाठी ही पत्ररूप आज्ञा दाखवायची तर त्यावेळी मला तोंड फिरवावे लागणार आहे. हा विमुखपणाचा सोहळा माझ्या नशिबाने माझ्या मुळावरच आला. लग्नपत्रिका जी राम पाठीवर लिहिणार ती माझ्या डोळ्यांना दिसणार नाही. श्रीराम भोळा नक्कीच नाही. माझे या दोघांना छळण्याचे मनोगत होते; पण श्रीरामाची छळणूक शक्य दिसत नाही. आपले मनोगत तो समजू देत नाही, कारण पत्र पृष्ठभागी लिहिणार आहे. आता पृष्ठभागावर लग्नाविषयी आज्ञा घेऊन जाऊन वनातच लक्ष्मणाचा घात करीन. नंतर श्रीरामाचा घात करण्यासाठी खर आणि दूषण या दोघांना आणीन. या पद्मपुराजवळ श्रीरामाचा राक्षसवीर घात करतील. त्यानंतर ती सीतासुंदरी पळवून नेऊन लंकानाथाला अर्पण करीन. याप्रमाणे घडण्यात अडचण नाही. श्रीराम दोन हातांचा एक माणूस आहे, तर खर, दूषण हे उग्र राक्षस आहेत. रामाला मारायला त्यांना एक अर्धक्षणही लागणार नाही. मग लंकेश सीतेचा उपभोग घेईल. पुत्राचा वैरी नंतर वधावा' असा स्वतःशी निर्धार करून शूर्पणखा लाजून गेल्याचे भासवत सीतेला म्हणाली, "माझ्यावर हे मोठे संकटच ओढवले आहे. मी मनाने जे ठरविले ते लग्नपत्रिका पाठीवर असणार. पण मी पाठमोरी कशी बसू? तुम्हीच भाऊजींना सांगा ना की पाठमोरी बसताना लाजेने माझा प्राण जाईल. तेव्हा बाई, आपणच भाऊजींना सांगून पत्र लिहून माझ्या हाती द्यायला लावा. स्त्रियांचे जगणे किती लज्जायुक्त असते ते आपण जाणताच. यासाठी आपण श्रीरघुनाथांची प्रार्थना करून पत्र लिहून द्यायला सांगावे."

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

शूर्पणखेचा विचार ऐकल्यावर श्रीरामाने स्वतःशी विचार केला की, 'पत्र लिहून दिले तर ही ते पत्र वाचेल. मग अनर्थ करेल. कारण आपण तिच्या मनातल्या हेतूपेक्षा विपरीत अर्थ पत्रात लिहिलेला असेल. मग श्रीरामाने शूर्पणखेला स्पष्टपणे बजावले, "हे पाहा, तू सौमित्राशी लग्न करू म्हणत असशील तर पाठीवर पत्र लिहू दे. नाही तर सरळ वनात जाऊन, मनाला आवडेल त्याच्याशी लग्न कर" हे रामाचे स्पष्ट बोलणे ऐकून ती ओक्साबोक्शी रडू लागली आणि मग म्हणाली, "जळो ते दुसऱ्याचे तोंड. श्रीलक्ष्मण हाच माझा पती. भाऊजी मी तुमच्या पाया पडते. मी पूर्ण पतिव्रता आहे. माझा प्राणपती लक्ष्मणच. तेव्हा तुम्ही कठिण बोलू नका." मग श्रीरामाने तिला म्हटले, "हे धर्मवचन आहे की ज्येष्ठ भावजय ही मातेसमान आणि कनिष्ठ ही लेकरासमान असते. त्यामुळे लाजायचे कारण नाही" नंतर शूर्पणखा रामासमोर पाठमोरी बसली पाठीवर पत्र लिहावे अशी विनंती करून, आपण रामाची आज्ञा पाळते म्हणाली.

श्रीरामाची आज्ञा-लक्ष्मणाकडून पालन

शूर्पणखेची दृष्टी न पडेल असे पत्र श्रीरामाने तिच्या पाठीवर कमरेपर्यंत लिहिले. त्या पत्रात विकट गोष्टी लिहून लक्ष्मणाला सावधानतेची दृष्टी ठेवायला सांगितले. 'नाकासकट हिचे ओठ संपूर्ण कापावे हाच तिचा शेवट आहे अशी माझी तुला आज्ञा आहे. स्त्रीहत्या करू नये म्हणून हिला जिवंत ठेवावे. हिचे नाक कापणे हेच तिचे सुलग्न.' पाठीवर काय लिहिले हे शूर्पणखेला समजले नाही त्यामुळे तिने राम-सीतेला वंदन करून ती तडक लक्ष्मणापाशी आली. ती घाईने पुष्पमाला घेऊन लक्ष्मणाला वरण्यासाठी आली. तेव्हा लक्ष्मणाने तिला प्रतिकार करून म्हटले, "किती निर्लज्ज आहेस तू. श्रीरामाच्या आज्ञेखेरीज मी तुझे पाणिग्रहण करणार नाही. जळो तुझे काळे तोंड कारण आज्ञेशिवाय मला वरायला कशी आलीस." हे तो मनापासून बोलला. तेव्हा शूर्पणखा म्हणाली, "भाऊजी आणि बाई खरोखर कृपाळू आहेत त्यांनी आज्ञा दिली आहे. पण तुम्ही कठोरपणे वागता आहात. आता मी खूण सांगते ती ऐका, भाऊजी हे श्यामसुंदर जगजेठी आहेत आणि बाई ह्या नाजुक चाफेकळी आहेत. मला ती दोघे पंचवटीत भेटली. त्यांनी तोंडी सांगितले की तुम्हाला मी वरावे." "तोंडातोंडी दिलेली आज्ञा कोण पाळील. मग तोंडीच स्वीकार हेच खरे मान" असे सौमित्र म्हणाला. त्यावर, "माझा तुम्हाला विश्वास वाटत नाही; पण तुमच्या पायाशी मला जन्म घालवायचा आहे. मी जर खोटे बोलले तर श्रीरामाला मी तोंड कशी बरे दाखवू. तुम्ही वनात हिंडून खूप दमला आहात म्हणून मी तुमचे पाय रगडते. आपण दोघे एकांतात शयन करू या. त्यामुळे तुम्हाला विश्रांती मिळेल." लक्ष्मण म्हणाला, "तू एक मूर्ख आहेस. तू उदंड बडबडते आहेस. तर घाव घालून तुझे तोंड फोडीन तू वेश्या व्यभिचारिणी आहेस. श्रीरामाचे हस्ताक्षर पाहिल्याशिवाय मी तुला हात लावणार नाही. उगीच लगट केलीस तर मी तुझा घात करीन." असे म्हणून लक्ष्मणाने खड्गाला हात घातला. अखेर शूर्पणखेने भयाने सांगितले, "मीच कपाळकरंटी की माझे बोलणे तुम्हाला खरे वाटत नाही. तर मग आता श्रीरामाची लिखित आज्ञाच पाहा" एवढे बोलून तिने त्याला पाठ दाखविली.

सौमित्राने रामाची हस्ताक्षरे सार्थ वाचली. लगेच त्याने तिची वेणी धरून आणि तिचा दंड धरून तिला जमिनीवर पाडली. "मी काय लहानशी कुमारी का आहे की मला अशी झोंबून जमिनीवर पाडलीत. मीच आपणहून जमिनीवर पडते, आणि प्राणनाथा माझ्याशी पुरुषार्थ करा." असे शूर्पणखा म्हणाली, तेवढ्यात लक्ष्मणाने क्षणात तिच्या उरावर पाय देऊन ओठासकट तिचे नाक शस्त्राने कापून काढले. आपण लगेच शस्त्रासह दूर उभा राहिला. लक्ष्मणाच्या घावाने तिचे कपट दूर केले

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

आणि ती क्रूर राक्षसी झाली. तिचा एकेक स्तन वारा हात होता आणि ती नाकाशिवाय असल्याने अत्यंत विक्राळ दिसत होती. तिने आक्रोशपूर्ण शंख केला तेव्हा नाक नसल्यामुळे तिच्या तोंडून फं फं करत शब्द फुटले. तिला सौमित्राचा संताप आला "मी जसे कपट केले तशीच मी सपाट झाले. आता याचा मी घोटच घेते." असे म्हणत तिने आपले अचाट मुख पसरले आणि ती लक्ष्मणाला गिळण्यासाठी आली. तेव्हा लक्ष्मणाने शस्त्र सिद्ध करून हातात धरले. तिच्या डोक्यावर घाव घालण्याचा त्याचा पवित्रा पाहून ती राक्षसी पळून गेली.

सौमित्र-श्रीराम भेटतात, पुढील योजना

शूर्पणखा पळून गेल्यावर सौमित्र पंचवटीत परतला. त्याने श्रीरामाला घडलेले सर्व वर्तमान सांगितले तेव्हा ती राक्षसी खोटी होती हे जाणून दोघेही एकमेकांना टाळी देऊन ती घटना घडल्याविषयी बोलले. "सूर्यवंशी श्रीरामाची धन्यता अशी की त्याने कपटी राक्षसी ओळखली; तिच्या पाठीवर पत्र लिहिले; ते वाचून मी तिला शिक्षा केली. जर ते पत्र तिच्या हाती पडले असते तर ती आम्हाला चांगलीच भोवली असती. श्रीरामाने चांगली युक्ती केली आणि पाठीवरच्या पत्राने तिला शिक्षा करविली. श्रीरामा, तुझी आज्ञा झाली आणि तिला शिक्षा केली. तिचे ओठ आणि नाक कापून मी तिला विद्रूप केली. तिची नखे सुपाएवढी आहेत म्हणून तिला शूर्पणखा हे नाव मिळाले. तिचे नाक आणि ओठ कापून मी ते पाण्यात टाकून दिले. त्या ठिकाणचे मासे नाक नसणारे झाले आहेत. तिचा प्राण घेऊ नये अशी तुझी आज्ञा होती म्हणून मी तिला जिवंत सोडले. आता ती पद्मपुराला पळून गेली आहे." लक्ष्मणाकडून हा वृत्तान्त ऐकल्यावर श्रीराम सीतेला म्हणाला, "सुमित्रपत्नीचे लग्न नासिकेला सुलग्न लावून हा सौमित्र सावधपणे परतला आहे. आता या लग्नासाठीचा सोहळा रणबोहल्यावर होईल. बाणांचे उटणे होईल, रक्ताने आंबा शिंपण होईल. तळी शस्त्रांनीच बसविली जाईल. येथे रणधेंडा नाचेल, राक्षसांच्या मुंडक्यांची ओवाळणी होईल. आयणी पायणी दोन्ही कडांना शस्त्रे भडभडा पडतील." असे श्रीराम बोलला. "कारण कलहाला कारण झाले आहे. त्यातून रणकंदन झाले तर खर आणि दूषण यांना मी मारीन." हे बोलत असतानाच त्याचे बाहू स्फुरण पावू लागले. शत्रूंचे मर्दन करण्यासाठी त्याने धनुष्यबाण उचलले.

अध्याय नववा

लक्ष्मणाने शूर्पणखेची जी अवस्था केली त्यामुळे तिला धाक बसला आणि ती तडक पद्मपुराला आली. नाक कापल्याने विद्रूप झालेली, रक्ताच्या धारा लागलेली शूर्पणखा जेव्हा राक्षसांच्या मेळाव्यात येऊन पोचली तेव्हा त्या महापराक्रमी शूर्पणखेची ही सरसकट झालेली दुर्दशा म्हणजे राक्षसकुळाची गांजणूक झाली असेच सर्वांना वाटले. अत्यंत दुर्धर असणाऱ्या शूर्पणखेची विटंबना करणारा महावीर कोण असेल असा विचार करणाऱ्या राक्षसांनाही धाक वाटून ते चळचळा कापू लागले. त्यावेळी खर आणि दूषण हे शूर्पणखेचे विद्रूप दर्शन पाहून अतिशय संतापले आणि त्यांनी गर्जना करीत तिला वृत्तान्त सांग म्हटले. ती दुःखाने शंख करत मूर्च्छित झाली. तिचा विद्रूप चेहरा पाहून खर चकित झाला. 'ओठांसह नाक मुळापासून कापून तिची दंतपक्ती उघडी पाडणारा असा कोण बलवानातला बलवान आहे की ज्याने तिला रक्ताचे स्नान घातले आहे. शूर्पणखा बलवानात अशी श्रेष्ठ की जिला इंद्र, कलिकाल हेही भितात. ती तिन्ही लोकात अजिंक्य होती. अशा या बलिष्ठेला तिने केलेले कामरूपी कपटही श्रेष्ठ असून हिची अशी होलपट करणारा तो कोण वीरश्रेष्ठ आहे.' आपल्या भगिनीविषयीची अनुकंपा बाळगून, तिचा कैवार घेऊन खर बंधूने तिला सर्व वृत्तान्त सांगण्यास पुन्हा विचारले तेव्हा

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

ती राग आणि रडे अशा संमिश्र भावनांनी बोलू लागली.

शूर्पणखेचे निवेदन-श्रीरामस्वरूप वर्णन

"त्या तापसांनी माझी गांजणूक केली. पण ते तापसी ब्राह्मण नाहीत. क्षत्रिय पण ते साधारण नव्हते. वैश्य वा शुद्र ते नक्कीच नाहीत. ते महावीर योद्धे आहेत. ते राजकुमार असावेत. गौर-श्यामल वर्णाचे, देखणे, कमलनयन, राजस असून मृगचर्मांबर धारण केलेले आहेत. त्यातल्या ज्येष्ठाचे नाव रघुनंदन आहे आणि कनिष्ठाचे नाव लक्ष्मण आहे. त्या दोघांसारखे सुंदर तेच. इंद्रादी देव किंवा साक्षात् मदन हे त्यांच्यापुढे काजव्याप्रमाणे आहेत. दानव, मानव, कीटक या कोणाहीपेक्षा श्रीरामाची शोभा अद्‌भुत आहे. ज्येष्ठ जो श्रीराम त्याची पत्नी सीता ही लावण्यसंपन्न सुंदरी आहे. प्रत्यक्ष लक्ष्मीही तिच्या तुलनेस टिकणार नाही. तिच्यासारखी तीच. सीतेच्या दर्शनाने माझे डोळे निवले. राम-लक्ष्मण यांना पाहिल्यावर मला समाधान झाले. परंतु, पुत्राच्या सूड भावनेने मी त्यांचा छळ करायला गेले. त्यासाठी मी कपट केले. त्यांच्यापुढे माझ्या कपटाचा प्रभाव टिकला नाही. त्यांच्यावरचा राग बळ धरू शकला नाही. माझे वैर त्यांच्याबाबतीत सिद्धीस गेले नाही. उलट त्यांनीच माझी विटंबना केली. त्या लक्ष्मणाने माझ्या उरावर पाय ठेवून माझे नाक कापले आणि तो म्हणाला, 'जा सांग कोणा बलवानाला' म्हणून मी तुमच्याकडे आले आहे. असा माझा त्या तापसांनी अपमान केला आहे. तेव्हा माझे रक्षण करा." एवढे बोलून ती खर-दूषणांच्या पायाशी बसून रडू लागली. नंतर म्हणाली, "तुम्ही त्यांना रणात पाडा म्हणजे मी त्यांच्या छातीवर बसून घटाघटा रक्त प्राशन करीन. मी मनाशी असा दृढ नवसच केला आहे."

शूर्पणखा भगिनीचे हे बोलणे ऐकून खर आणि दूषण यांना अत्यंत राग आला. त्यांनी निधडे चौदा राक्षसवीर निवडून त्यांना आज्ञा केली, "तुम्ही पंचवटीला जाऊन राम आणि लक्ष्मण यांना मारून, सीतेला धरून आणा. नंतर शूर्पणखा रक्तप्राशन करील." शूर्पणखेची रक्त पिण्याची इच्छा पूर्ण करण्यासाठी ते दूत त्वरित पाठविण्यात आले. राक्षस भयंकर गर्जना करत निघाले. दोघांवर चौदा दूत चालून गेल्यावर रघुनाथ बापडा काय टिकणार, त्याला निमिषार्धात मारतील. तेव्हा रक्तप्राशन करण्यासाठी शूर्पणखेला त्यांच्या बरोबरच पाठविले.

दूत आणि श्रीराम यांचा संघर्ष

शूर्पणखेने चौदा दूतांबरोबर जाऊन त्यांना रघुवीरासह पंचवटी दाखविली. तेव्हा ते चौदा दुर्धर राक्षस कातिया, तोमर असा शस्त्रसंभार घेऊन श्रीरामावर चाल करून गेले. एक म्हणाला, 'मी रामाला मुद्‌गलाने मारीन;' एक म्हणाला, 'मी लक्ष्मणाला पट्ट्याने मारीन;' त्यावर आणखी एकजण म्हणाला, 'मी त्या दोघांना शस्त्रांसहित गिळून टाकतो;' तेव्हा एक त्याला म्हणतो, 'तूच कोण खाणार? आम्हालाही वाटा पाहिजे; आणखी एक बोलला, 'ही वीरांची जोडी मारून झाल्यावर शूर्पणखा त्यांचे रक्त प्राशन करील आणि आपण त्या दोघांचे मांस सर्वांनी वाटून घेऊ. मग निवांत ते कोवळे मांस खात बसू.' एकाने म्हटले की, 'या दोघांना धरून खराकडे नेऊ या. तो भगिनीला रक्त देईल आणि मांस त्याच्या भोजनाला राहील. ते दोघे आणि आपण तर अनेक आहोत. इथे विचार कसला करता.' असे म्हणून ते राक्षस आश्रमाकडे धावले.

श्रीराम, सीता आणि लक्ष्मण हे नेहमी आश्रमातही सावध असत. त्यावेळी हे चौदा राक्षस आलेले पाहून श्रीराम हसून लक्ष्मणाला म्हणाला, "अरे लक्ष्मणा, चौदा राक्षस आले आहेत. त्यांचा एकाच बाणाने मी प्राण घेईन. लवकर धनुष्यबाण दे पाहू. माझ्या बाणाचा महामार तुम्ही समक्षच पाहा." असे म्हणून श्रीरामाने धनुष्यावर बाण चढवला. त्याने राक्षसांना विचारले, "आम्ही गंगातीरावरचे तापसी आहोत. तुम्ही आम्हाला

https://archive.org/details/@sulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

मारायला का आलात? तुम्हाला कोणी पाठविले आहे?" त्यावर दूतांनी खुलासा केला तो असा की, "अरे तुम्ही दोघाजणांनी खराची बहीण शूर्पणखेची विटंबना केलीत. तापसी म्हणून ढोंग करता, पण तुम्हाला कोणी सोडणार नाही. तापसी असून धनुष्यबाण बाळगता, स्त्रीची विटंबना करता, धन्य तुमचे तापसीपण! अरे तुम्हाला स्वतःची लाज कशी नाही." एवढे बोलून त्या दूतांनी अनेक शस्त्रांचा मारा केला. धनुर्धर श्रीरामाने ती सर्व शस्त्रे हातोहात नष्ट केली. श्रीरामाच्या बाणांच्या कडाक्याने राक्षसांची मुरकुंडी वळली, डोळ्यांवर झापड आली, त्यांची अवस्था केविलवाणी झाली. श्रीरामाने जेव्हा एक सोनपंखी बाण घेऊन, चौदाविधींचे विधान अभिमंत्रून, राक्षसांवर सोडला तेव्हा चौदाही राक्षसांचा वध झाला. त्या महावीराने सोडलेल्या बाणाने चौदाही राक्षसांची शरीरे भेदली आणि ते धरणीवर पडले. श्रीरामचंद्र नित्य विजयी होता. चौदांची शरीरे भेदून गेलेला बाण आकाशात भ्रमण करत राहिला. जणू त्याला खर-दूषण कुठे आहेत त्याचा शोध घेऊन त्यांनाही मारायचे होते. खर-दूषण सापडले नाहीत तेव्हा तो बाण परत येऊन श्रीरामाच्या भात्यात प्रवेश करून बसला. हे श्रीरामाचे हस्तकौशल्य पाहून सीता विस्मित झाली. देवादिकांनाही आणि आकाशात भ्रमण करणारांनाही आश्चर्य वाटले. श्रीराम हा स्वतः रणधीर, एकांगवीर असल्याचे त्यांना पटले. त्या चौदाजणांच्या पाठीमागे नाकाशिवाय असलेली शूर्पणखा लक्ष्मणाने पाहिली आणि तो तिला मारायला धावला. तेव्हा ती आक्रोश करत पळाली. श्रीरामाने लक्ष्मणाला हात धरून थांबवले. त्यावेळी लक्ष्मणाच्या मनात आले की, 'हा (राम) असा हट्टी का आहे? दृष्टीला पडताच तिला मारायला मी धावलो, पण ती धाकाने लगेच पळाली. विनानाक तोंड घेऊन ती इथे आमचे रक्त प्राशन करायला आली तेव्हा बाणाने तिचा घात केला असता पण रामाने मला अडवले.' हा लक्ष्मणाचा विचार जाणून रामाने त्याला शास्त्रार्थ सांगितला.

श्रीराम म्हणाला, "अरे सौमित्रा, स्त्रीचा वध करू नये असा मुख्य शास्त्रार्थ आहे. त्याशिवाय आणखीही एक वृत्तान्त आहे तो सावधपणे ऐक. ज्याप्रमाणे सांडस भात्याजवळ ठेवून तापवतात आणि मग त्यावर घाव घालतात, त्याप्रमाणे शूर्पणखा राक्षसी ही राक्षसकुळी संपविणारी घातकी आहे. हिच्यामुळे रावण, कुंभकर्ण यांचा वध होणार आहे म्हणून हिला राखले पाहिजे. हिच्यामुळे राक्षसांचे निर्दाळण होणार आहे म्हणून हिला मारू नये. ज्याप्रमाणे जात्यावर दळणारी स्त्री ही बाजूला राहून जात्यात घासामागून घास घालत राहते, त्याप्रमाणे शूर्पणखा ही आमच्या पुढे राक्षसांमागून राक्षस आणून टाकील. पहिला घास हा खर-दूषणांचा, दुसरा लंकेच्या प्रधानांचा, तिसरा कुंभकर्ण, चौथा इंद्रजित आणि पाचवा पुत्र आणि सैन्य यांच्यासह रावण असे राक्षसांचे घासामागून घास आपल्याला ही राक्षसी शूर्पणखाच देणार आहे हे सत्य तू सौमित्रा लक्षात घे." हे श्रीरामाचे सांगणे ऐकल्यावर लक्ष्मणाने धनुष्यबाण खाली ठेवले. नंतर श्रीरामाचे चरण शिरसावंद्य करून लक्ष्मण म्हणाला, "श्रीराम हा ज्ञान-विज्ञान जाणतो. चौदा विद्यांनी अज्ञानाचा नाश करतो. तो श्रीरामाचा बाणबोध म्हणजे परमात्मबोध जागृत होऊन परमानंद मिळतो."

रामबाणाचे परिणाम-रामप्रताप वर्णन

श्रीरामाच्या बाणाने देह जाईल यात नवल नाही. चौदाही राक्षसांची रामबाणाने जरा, जन्म, मरण यातून सुटका होऊन, ते सुखी झाले. त्या बाणाने संकल्प-विकल्पापासून मन, चित्त-चिंतन, मान-अभिमान, विषय-ज्ञान, भवाचे भान, देहबंधन, कर्म-अकर्म बंधन, कार्य-कारण, मी-तूपण अशा सर्वांचा छेद होऊन ते चौदाही राक्षस सुखी झाले. शूर्पणखा पूर्ण अभागी होती त्यामुळे तिला रामबाणाने मरण न येता, ती देहलोभाने

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

शंख करत पळाली. श्रीराम हा मोक्षदाता आहे. तो वैरी मारून त्याला मुक्त करतो. रामनामाने जडजीव उद्धरतात. त्याच्या स्मरणाने सर्वच मुक्त होतात.

शूर्पणखा चौदा राक्षसांचा वध झालेला पाहून स्वतःला वाचविण्यासाठी आक्रोश करत खरादिकांसमोर जाऊन त्यांना त्रास देत राहिली. त्यामुळे खराला अत्यंत आवेश आला. "मी तुझ्यावरोवर चौदा महापराक्रमी, रणशूर राक्षस दिले होते. त्या चौदांचा क्रोध हा चौदा भुवनातील सुरनरांना थरकाप उडविणारा असतो. त्यांनी माझी आज्ञा पाळली नाही म्हणून का तू रडते आहेस? त्या चौदांचे गाऱ्हाणे सांगताना का तू रडते, पडते आहेस? का तू माझ्यासाठी शोक करते आहेस?" खराने असे म्हटल्यावर शूर्पणखेने वृत्तांत कथन केला. "तुझे चौदाही राक्षस अत्यंत कठोर आणि पराक्रमी होते ते सर्वजण कातिया, त्रिशूळ, फरश, पट्टे घेऊन निघाले त्यांच्यातले कोणी 'रामाला गिळू', कोणी 'लक्ष्मणाला मारू' असे म्हणत होते. तसेच 'मांस खाऊ, रक्त पिऊ, दोघांना गिळू' असेही कोणी कोणी म्हणत होते. त्यातलेच काहीजण म्हणत होते की 'शूर्पणखेला त्या दोघांचे रक्त पाजू आणि मग आपण मांस खाऊ.' त्या राक्षसांमध्ये अशी चर्चा चालू होती. तो श्रीराम वीर, धीर धरून उभा राहिला, त्या शूराने राक्षसांची ताडाची बडबड ऐकली तरी तो त्यांचे घाव सहन करण्यासाठी स्वस्थ उभा राहिला. नंतर जेव्हा ते राक्षस चालून गेले तेव्हा तो जगजेठी श्रीराम उठला आणि धनुष्यावर बाण चढवून सज्ज झाला. नक्षत्रांना संपवायला जसा सूर्य आकाशात येतो, तसा तो सूर्यवंशी राक्षसांना मारण्यासाठी पुढे आला. चौदा राक्षस 'श्रीराम एकटा आणि आम्ही अनेक आहोत तेव्हा या दीनवाण्याला क्षणार्धात मारू' असे म्हणत पुढे सरसावले. श्रीरामासमोर ते आले आणि तो बलवान आहे असे पाहून त्यांनी अनेक प्रबळ शस्त्रे सोडली. ती श्रीरामाने तत्काळ छेदली, आणि सर्वांना निःशस्त्र केले. राक्षसांनी एक विकट हाक देऊन, विक्राळ मुख पसरून, रामाला गिळण्यासाठी त्याच्याकडे सर्वजण धावले. श्रीराम हा श्रेष्ठ धनुर्धारी असल्याने त्याने एकच बाण दोरीवर चढवून, चौदाही राक्षसांना त्यात ओवले. ते राक्षस पाणी न मागताच गतप्राण झाले. लक्ष्मण माझ्यावर चिडून, 'ही नकटीच द्वंद्व चालवायला आली' असे म्हणून शस्त्र घेऊन माझ्या पाठीस लागला. त्या संकटातून मी पळून आले. तो श्रीराम भारी लाघवी आहे. तो तुम्हा सगळ्यांना जिंकून, तुमचा घात करून हे जनस्थान निश्चित जिंकून घेईल. श्रीरामाचा बाणक्रम राक्षसांचे भस्म करील. तुमच्या पराक्रमाच्या भ्रमाला तो निर्भ्रम करील" याप्रकारचे शूर्पणखेचे बोलणे ऐकून खर अतिशय क्रोधायमान झाला.

खर-दूषण-त्रिशिर ससैन्य निघतात

खर शूर्पणखेच्या निवेदनाने एवढा संतापला की त्याने दूषणाला बोलावून घेऊन लगेच रणवाद्ये वाजविण्याची आज्ञा केली. अत्यंत क्रूर असे चौदा हजार राक्षस तत्काळ जमले आणि खर रथात बसून सत्वर युद्धासाठी निघाला. खराच्या उजव्या बाजूला दूषण, डाव्या बाजूला त्रिशिर आणि खराच्या समोर पुढच्या बाजूला चार युद्धप्रवीण महायोद्धे होते. सैन्याच्या चौदा हजार राक्षसांपैकी बारा वीर निधड्या छातीचे असून त्यांचा सुरवरांना धाक वाटत असे. इंद्र तर त्यांच्यापुढे थरथर कापत असे. ते भेसूरपणाने जगाला घाबरवत होते. क्रोधामुळे त्यांच्या कडून वीरांना भय वाटे; ते लोखंडासारखे मासही गिळून टाकत आणि रक्तपान करण्यासाठी जिभल्या चाटत. त्यांची गर्जना लोकांना कंपायमान करत होती. विक्राळ दाढा आणि विकट मुख यांमुळे ते भयानकाहून भयंकर असे राक्षस त्रिलोकाचा ग्रास करू पाहात होते असे दुर्धर, दारुण रणकुशल, रणवेताळ सर्वांपुढे असलेले बाराजण कोण कोण होते ते ऐका.

पहिला दुर्गगामी, दुसरा पृथुवळ, तिसरा यज्ञभोक्ता, महाविप्र हा चौथा आणि दुर्जय हा पाचवा. शिवाय परवीरघ्न, परुष, मेघमाली आणि

https://archive.org/details/@sarayu_foundation_trust_lucknow

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

काळकार्मुक असे ते चार होते. महाबाहू हा अलौकिक महायोद्धा; महास्य आणि लोहितांबर हे बाराजण दु:सह, दुर्धर, असे झुंजार वीर होते. यांच्या बळावर दुर्धर खर सुरासुरांना महत्त्व देत नव्हता. या बारा जणांचा खराला फार भरवसा होता. त्यांच्या बळावर खर रावणालाही जुमानत नव्हता. श्रीरामाने चौदा जणांना मारले त्याचा सूड घेण्यासाठी हे बाराजण अत्यंत आवेशाने येऊन, श्रीरामाशी युद्ध करू पाहात होते. माणसाचे शरीर आणि गाढवाचे तोंड यामुळे खर हे नाव; नाक संपूर्ण पांढरे शुभ्र त्यामुळे दूषण हे नाव अशी खर-दूषण यांच्या नावांची उपपत्ती होती. दूषणाचे अत्यंत दुष्ट असे चौघे सांगाती हे युद्धातून माघार न घेणारे वीर होते. दूरवरचे पाहू शकणारे म्हणून दूराकृती म्हटले जाणारे ते अत्यंत विश्वास-घातकी होते. दूषणाचे हे चौघे जीवप्राण असलेले विश्वासू राक्षसवीर महाकपाल, स्थूलनयन, प्रमाथी आणि त्रिदशार्दन या नावाचे होते. यांच्याच सामर्थ्यावर दूषण यमालाही भीत नसे. ते घातपाती, रणकुशल चौघे निघाले होते. आपल्या कुशीत तिघे पुत्र एकाचवेळी जन्मावे आणि तिघांनाही एकच कार्य दिले जावे हे विशेष असलेला त्रिशिरा तिचा पुत्र झाला. अशाप्रकारे त्रिशिर, खर आणि दूषण एकत्र मिळून श्रीरामाशी युद्ध करायला निघाले. त्यांनी आपले रथ सिद्ध केले. त्यांच्या बरोबर चौदा हजार सैन्य होते. त्यामध्ये कोणालाही न आवरता येणारे बारा वीर, रणामध्ये अत्यंत दुस्तर असे घातक चौघजण होते. असा तो सेनाभार रणवाद्यांचा कल्लोळ आणि शंखनाद करीत निघाला. हयकार, थयकार, जयकार करीत त्यांचे भाट गर्जत होते. खर अत्यंत उत्साहित झालेला होता. त्याने लगेच आपला रथ पुढे काढला.

राक्षसांची सेना मार्गस्थ होताच त्यांना अनेक अपशकुन होऊ लागले. चांगल्या सपाट जमिनीवर घोडे अडखळून रथ उलथले. ध्वजस्तंभावर बसून घुबड घूं घूं करू लागले. या अपशकुनांमुळे खर साशंक झाला; सैन्य दचकले; सर्वजण गडबडून गेले. तेवढ्यात ध्वजस्तंभावरचे घुबड उतरून त्याने खराच्या कपाळावर झडपून जखम केली. त्यानंतर भूकंप, जमिनीचे दुभंगणे, उत्कापात होणे, विजा अंगावर पडणे हे प्रकार सुरू झाले. त्यामुळे सर्व राक्षसगण हाहा:कार करू लागले; चिंतातुर झाले. खराने सावधानतेने आपला रथ सावरला. तो सर्वांना धीर देत म्हणाला, "हे उत्पात माझ्यापुढे लटके वाटतात. हे थोडे अपशकुन झाले तरी दोन माणसांसाठी आपण माघार घेणे म्हणजे शुद्ध खोटेपणाच आहे. कारण आम्ही जग जिंकणारे महावीर योद्धे आहोत. समोरचा शत्रूही काही फार मोठा नाही, दोन राजकुमार तर आहेत त्यांच्यासाठी हे अपशकुन आम्ही कशाला मानावे." असे म्हणून खराने त्वरेने आपला रथ पेलला, त्यामुळे उल्हसित होऊन राक्षसांचे सैन्य निघाले. खर शूर्पणखेला म्हणाला, "मी तुला श्रीराम आणि लक्ष्मण यांचे रक्त पाजीन." त्यामुळे तिला खूप आनंद झाला. युद्ध व्हावे या हेतूने, रक्तप्राशनाच्या आवडीने आणि बंधूंच्या लाडाने शूर्पणखा सगळ्यांच्या पुढे चालू लागली. पंचवटी पाहून ते जगज्जेते राक्षसवीर हातात शस्त्रे सज्ज करून रागाने निघाले.

श्रीरामाचा राक्षससैन्याशी संघर्ष

श्रीरामाबरोबर वस्तीला असलेले ऋषिजन, वनवासी तपस्वी हे सारे राक्षसांच्या भीतीने पळून गेले आणि गुहा-गुंफामध्ये जाऊन लपले. नंतर श्रीरामाने लक्ष्मणाला सांगितले, "सौमित्रा, तू सीतेपाशी सावधपणे थांब. मी राक्षसांचा नि:पात करीन. त्यांना पिसांच्या बाणांनी भेदीन. माझे शस्त्र सुटल्यावर राक्षस कोणीकडे पळणार, त्यांना घाव घालून मारीन आणि रणात चोखपणे त्यांना पाडीन. आपल्याला वायू अनुकूल असून, राक्षसांना प्रतिकूल आहे. त्यांच्या समोर जाऊन कोल्ही ओरडून आपल्यालाच जय मिळेल असे त्यांना सांगत आहेत." एवढे बोलल्यावर श्रीरामाने लगेच

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

धनुष्याची दोरी चढविली, पुढे होऊन धनुष्यावर बाणही सज्ज केला. ज्याप्रमाणे हत्तींचा समुदाय विदारण्यासाठी एकाकी सिंह उठतो त्याप्रमाणे राक्षससैन्याचा विध्वंस करण्यासाठी एकटा रघुनंदन चालला होता. काजव्याचा नाश करण्यास जसा सूर्य आकाशात उगवतो तसा सूर्यवंशी श्रीराम राक्षसांचा अंत करणारा होता. सूर्योदयामुळे काजवे मावळतात, चंद्र, नक्षत्रे अस्ताला जातात; त्याप्रमाणे राक्षससेना श्रीरामाकडून निर्दाळली जात होती. अनेक राक्षस रणातच नष्ट होत होते.

सीता श्रीरामाला झुंजताना पाहायला उत्सुक होती. हे लक्ष्मणाला जाणवले. त्याला तिचे कौतुक होते त्यामुळे त्याने श्रीरामासाठी असलेली शय्या उंच केली. तेथून ती रणानले दृश्य पाहू शकत होती. एक कवित्व असे आहे की 'रामाने सीता आणि सौमित्र यांना गुहेत पाठवून तो स्वतः एकटाच लढायला थांबला.' 'श्रीराम राक्षसांना भीत नव्हता तर तो सीतेला लपवील कशाला?' असा त्यावरचा प्रतिवाद आहे. श्रीरामाने बाण जोडून ओढला की राक्षससेना लडबडत असे आणि सैनिक एकामागे एक दडत. बिचारे दडी मारून जीव वाचवत होते. श्रीराम दृष्टीस पडताच त्यांच्या पोटात थरकाप उडाला. काहींच्या खालून मूत्रप्रवाह सुरू झाला; शस्त्रे हातातून गळून पडली. वाघ पाहताच भीतीने सारी मेंढरे गोळा होतात त्याप्रमाणे त्या राक्षसांना शूर श्रीरामाच्या भीतीने गोळा केले. आपले दुर्धर आणि प्रबळ राक्षससैन्य तटस्थ झालेले पाहून खराला अतिशय क्रोध आला. तो दूषणाला म्हणाला, "अरे आमचे सैन्य निश्चळ पर्वतासारखे दिसते आहे. पुढे काहीही दुस्तर दिसत नसताना हे सैन्य एकत्र गोळा का झाले आहे. एखादे हिंस्त्र श्वापद दृष्टीस पडल्यावर मेंढरे जशी एकत्र येतात, तसे हे सैन्य जमिनीवर थांबून का राहिले आहे? पुढे कसे जात नाही?" असे खराचे बोलणे ऐकून दूषण आपल्या रथाचा खडखडाट करत निघाला; परंतु त्याच्या रथाला वाटच मिळेना कारण सर्व सैन्य एकत्र कोंदाटून राहिले होते. रथातले वीर गर्जना करत होते. परंतु पुढे मात्र प्राण गेला तरी सरकत नव्हते. दूषण सेनेच्या अग्रभागी आला तेव्हा त्याने श्रीरामाला पाहिले.

राक्षसांना दिसलेले श्रीरामस्वरूप

श्रीराम वनवासातल्या वेषात असताना राक्षसांना मात्र तो वेगळ्या स्वरूपात दिसला. मुकुट, कुंडले, रत्नमेखला, पिवळा टिळक रेखलेला, आजानुबाहू, श्यामलवर्ण, गळ्यात कमळांच्या माळा, विजेसारखी सुंदर कास त्यालेला, चंदनाची अंगाला उटी लावलेला आणि धनुष्यबाण सज्ज करून मुठीत धरलेला असा तो जगजेठी रणरंगात उभा होता. सुकुमार आरक्त पावले, वाकी अंदुवांचा गजर, ज्या ध्वनीने सुरनर कापत होते. अशा श्रीरामापुढे कोण उभा राहणार? त्याला पाहून दूषण चळचळा कापू लागला. हा माझा प्राण निश्चित घेईल या भीतीने तो खरापाशी पळून गेला. श्रीराम सेनेच्या तोंडाशी उभा ठाकला. त्यावेळी तो रागावलेला कृतांत भासला. राक्षसांचे सैन्य चळचळा कापत होते. रामापुढे त्यांचा पुरुषार्थ चालेना. जशा प्रलयाग्नीच्या ज्वाळा तसे त्याचे बाण होते. नुसत्या दृष्टीनेच तो सैन्य जाळून टाकील असे वाटत होते. श्रीराम उत्तम झुंजार होता. दृष्टीने पाहताच तो जिवाला जिवे मारील असे वाटत असताना त्याच्यापुढे कोण उभे राहील. शत्रूंचे मर्दन करणारा श्रीराम पाहताच स्वतःच्या जिवाच्या भीतीनेच प्राण पळून जाई मग तिथे कुठली अंगलट. तिकडे दूषणाकडून रणगर्जन श्रीरामाची वार्ता ऐकून, स्वतः खराने श्रीरघुनाथ पाहण्यासाठी आपला रथ पुढे काढला.

अध्याय दहावा

खर युद्धाच्या तयारीने पुढे आला. त्याने श्रीरघुवीर उभा असलेला पाहिला. तेव्हा सर्व राक्षस खवळले आणि त्यांचे शस्त्रसंभार सुटले. क्रूरकर्मी राक्षस एकत्र मिळून झालेला तो सेनासंभार होता. त्यांनी अपार शस्त्रांचा मारा केला. गदा, मुद्गल,

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

तोमर इत्यादी अनेक प्रकारची शस्त्रे त्यांनी श्रीरामावर टाकली. त्यामुळे श्रीराम झाकला गेला. त्यामुळे राक्षस अनेक तर्क करू लागले. श्रीराम एकाकी एकटा होता. तेव्हा तो गेला, तुटला, शस्त्रप्रहारांनी निपटला असे कोणी सांगत; कोणी म्हणत तो निःशेष संपला. एकाला वाटले राम शतखंड होऊन पडला असेल. इथे महावीरांचा घडघडाट, शस्त्रांचा कडकडाट, चालला असताना त्याला पळायलाही वाट नाही त्यावरून तो राम सपाट झाला असणार असे काहींना वाटले. शूर्पणखा येथे मोठ्या आशेने रक्तप्राशन करायला आली होती पण तिच्या तोंडात मातीच पडली कारण रक्त जमिनीत आटले. श्रीराम पूर्ण संपला असून काही राक्षस रणवेडाने उगीचच घाव घालत आहेत असे म्हटले जात होते. ज्याप्रमाणे पावसाच्या धारांनी पर्वत झाकला जातो त्याप्रमाणे राक्षसांच्या शस्त्रसंभाराने श्रीरामाला झाकले. श्रीराम अमोघ चित्पर्वत, राक्षस महामेघ, शस्त्रधारांनी झाकले सर्वांग असे लौकिकात सांगितले गेले. श्रीराम गाढ तेजाचा चिदादित्य राक्षस महामेघांमुळे झाकून गेला. हे यश ते मूर्ख मिरवत होते. जसा आत्मा हृदयात गुप्तपणे असतो, किंवा ढगांमध्ये सूर्य असतो, त्याप्रमाणे श्रीरघुनाथ शस्त्रांमध्ये होता. पण तो सावधचित्त आणि धनुष्यासह होता. ढगांच्या दाटीने झाकोळले असताना ती दाटी जसा वादळवारा तोडतो, तसा राक्षसशस्त्रांनी झाकलेला श्रीराम ती शस्त्रे छेदून चिद्‌भानू प्रकट झाला.

श्रीरामाकडून राक्षससंहार

राक्षसांचे बळ हेरून श्रीरामाने शरजाळ-बाणांचे जाळे सोडले. त्यामुळे राक्षसांची शस्त्रे छेदली जाऊन, अनेक राक्षसवीर जागीच खोचले गेले. एकामागून एक लक्षावधी बाण सुटले. त्यांनी शत्रूंची शस्त्रे छेदली आणि वीरांची मुरकुंडी वळली. राक्षसांच्या उरात, डोक्यात, दोन्ही हातात, भुजांवर बाण भेदले; सपिच्छाने कित्येकांची शरीरे बुडाली. श्रीराम त्या वीरांना महामारी ठरला. जे कोणी राक्षस राम गेला, मेला, संपला म्हणत होते, तोच श्रीराम वीरांचा वीर होऊन त्या राक्षसवीरांना निपटून काढत राहिला. राक्षसांचा अंत झाला. राक्षस जेव्हा घाव घालू लागत तेव्हा श्रीराम त्यांची शस्त्रे छेदून हात तोडी. जे वीर पुरुषार्थ मिरवत त्यांना बाणांनी रामाकडून मारले जाई. जर वीर मागे सरू लागले तर बाण त्यांच्या डोक्यावर लागे, जर ते रामाला सन्मुख झाले तर राम त्यांचा जीव घेत होता. कोणी वीर गर्जना करू लागले तर राम त्यांची दातांसकट जीभ छेदत होता. असा रामबाणांनी आकांत मांडला. तो राम विख्यात वीर होता. कंकपत्र, बर्हपत्र, हंसपत्र, सुवर्णपत्र याप्रकारच्या बाणांनी वीर भेदले गेले तेव्हा रणांगणावर मोर नाचत असल्याचे भासले. भोवती बाणांचा वेढा पाडला, धारदार बाणांनी सैन्य पाडले, महावीरही त्रस्त झाले; राक्षसांच्या उरात तो प्राण उरू देत नव्हता. श्रीरामाचा बाण राक्षसांच्या रक्तात न्हाऊन, त्यांना मोक्षाचे दान करून, पापी जन त्याच्यामुळे पावन झाले. रणरंगधीर श्रीरामाने राक्षससैन्याला मार दिला. त्यामुळे हाहाःकार उडाला. हे पाहून खर कोपला.

श्रीरामाचा पराक्रमी पुरुषार्थ पाहिल्यावर खराने आपल्या सारथ्याला सांगून जिथे श्रीराम रणांगणात उभा होता तेथे आपला रथ नेला. खराचा राग चौपट झाला. त्याने त्वरेने धनुष्यावर बाण चढविला आणि "आता रामाशी मी युद्ध करतो. पाहाच माझा पराक्रम" असे म्हणत तो निघाला. पुढे असलेला कडकडाट पाहून सारथ्याने घोड्यांना चाबकाचा इशारा केला. रथ घडघडाट करत पुढे आला. तेव्हा पुढेच श्रीराम उभा दिसला. आजानुबाहू धनुर्धारी श्रीराम राक्षसवीरांना महामार देत होता. तेवढ्यात रथातला खर त्याने पाहिला. त्यावेळी श्रीरामाने धनुष्याचा टणत्कार केला. त्या टणत्काराने गिरिकंदर, आकाश दुमदुमले. राक्षस भयभीत झाले त्यांच्यानले काही वेडे झाले,

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

काहींची मुरकुंडी वळली. बरीच पडझड झाली. असा श्रीरामाचा पराक्रम पाहून खरालाही जरा अवघड वाटले. त्यावेळी खराचे दुर्धर बारा वीर कैवार घेत धावले ते राक्षसांमध्ये नावाजलेले होते. त्यांना कृतान्त धावत्त असे त्यांनी श्रीरामाला निरखून घेतले आणि स्वामीकार्यासाठी ते योद्धे पुढे सरसावले.

खड्ग आणि ढाल घेऊन प्रथम उग्रनामा आला. स्वामीकार्यासाठी प्राण देण्यासाठी रणप्रवीण असे बाराही प्रमुख राक्षस आले. यज्ञाचा विध्वंस करणारा पृथुलव, महाविष, चौथा तो दुर्जय हा धनुष्यबाण सज्ज करून युद्धासाठी रामासमोर आला. त्याबरोबर परवीरघ्न, पुरुषवळी, काळकार्मुक, मेघमाळी हे चार महापराक्रमी वीर शूळ-त्रिशूळ घेऊन महापराक्रम करायला आले. महाबाहू, लोहितांबर, महाआस्य हे अती दुर्धर योद्धे गदा, मुद्गल घेऊन रणात रघुवीर पडताळून पाहायला आले. श्रीरामाचे राजस रूप पाहून त्यांनी अनेक प्रकारची शस्त्रे सोडली. हे बारा जण अत्यंत कपटी असल्याने खराला प्रिय झाले होते. त्यांच्या कपटाच्या कथा ह्या एकाव्यात अशा आहेत. ते गुप्तघाती, आकाशगामी होते एक कल्पनातीत विघातक होता. एक निमिषात मारणारा होता. पंचप्राणवृत्ती घेणारा होता. डोळ्यातून आत जाऊन शूळाने जिव्हार भेदणारा एक होता, तर एक कानातून प्रवेश करून वर्मावर शस्त्राघात करणारा होता. एक खड्ग हातात घेऊन मनाच्या वेगाने अंतरात शिरून हृदयावर शस्त्र चालवत असे. हा अनेक वीरांना याप्रकारे मारणारा दुष्ट होता. उरलेले जे चार थोर कपटी होते ते शत्रूच्या चहूबाजूंनी वेढून त्याला गुप्तशस्त्रांनी कासावीस करून मारणारे होते. कपटयुद्धात प्रवीण असलेले ते बारा राक्षसवीर श्रीरामाला मारायला निघाले. त्यांच्या आधाराने इतरही राक्षससैनिक 'धरा-मारा' अशा गर्जना करीत रामासमोर आले. श्रीराम हा कुशल धनुर्धारी असल्याने, त्याने बारा जणांना मारण्यासाठी दारुण दमनशक्ती वापरायचे ठरविले. त्याप्रमाणे ती शक्ती अभिमंत्रून श्रीरामाने राक्षसांवर सोडली. त्यावेळी त्या कपटींचे निश्चित निर्दाळण करण्यासाठी अनिवार्य शस्त्र म्हणजे दमनी चिच्छक्ती हीच योग्य असे ठरवून श्रीरामाने अलक्षगती ती सोडून शस्त्रसंहार केला. दमनी चिच्छक्ती पाहून कपटी राक्षसांना मोहिनी पडली. त्यामुळे त्यांचा प्रभाव रणात पडेना. त्यांच्या नाकात, तोंडात, कानात, डोळ्यात, हृदयात बाणच बाण भरले आणि ते बारा जण जागीच खिळून पडले. त्यातच त्यांचा नाश झाला. श्रीरामाच्या शरवर्षावापुढे ते बापडे जातील कुठे; मागे-पुढे कुठेच वाट दिसेना. त्यांचा शस्त्रांसह प्राण गेला. त्यातले काही ढाली छातीशी घेऊन पडले; कट्यारीसह कोणाच्या कंबरा तुटल्या; मुकुटासहित शिरच्छेद झाला; शस्त्रांसह हात तुटले; चार प्रकारचे देह छेदले ते कारण देह होते. श्रीरामाने महाकारण छेदून, पूर्णपणे जिवांसह मारून त्या बाराही जणांचे निर्दाळण केले.

कपटाने श्रीरामाला जिंकू पाहणारांचा कपटानेच वध केला गेला. श्रीराम हा थोर प्रतापी योद्धा असल्याने राक्षसांना आटोपता आला नाही. बारा महावीरांचा वध केल्यावर श्रीराम राक्षसांच्या सैन्यात घुसला. त्याने स्वत:भोवती बाणांचा वेढा करून अनेक राक्षसांना मारले. श्रीरघुनाथ रणात खवळला आणि त्याने अनिवार बाणप्रहार करून अनेक राक्षस बाणांच्या वेढ्यात घेऊन मारले. कोणी घावाने जागच्या जागी मारले गेले; कोणाचे पाय छाटल्याने भूमीवर पडले. अशा असंख्य वीरश्रेणी रामाने मारल्या. मस्तक छेदून त्याची चेंडूफळी करणे, खेळात रक्ताचा सडा घालणे, रणवसंत माजवणे, पळसाची फुले बाणांची (रक्तरंगाने) झाली. बरेच वीर कण्हत होते, ह्यातून कोकिळाच्या पंचमस्वराचा भास होत होता. श्रीरामाने असा प्रखर मार दिला की लहान-थोर कण्हत पडले. श्रीरामाचे बाण सहन न झाल्याने

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

राक्षसांनी पळायला सुरुवात केली; ते पाहून स्वतः दूषण पुढे सरसावला. त्याने राक्षसांना अडवून म्हटले, "रणातून पळता कसे?" नंतर त्याने आश्वासन देऊन सर्व सैनिक एकत्र केले. सेना सज्ज करून तो म्हणाला, "तुम्ही माझ्या पाठीशी राहा. मी रामाचा वध करतो." असे म्हणत तो पुढे धावला. दूषणाच्या आश्वासनाने बळ धरून राक्षससेना परतली. शालवृक्ष, तालवृक्ष आणि शिळा घेऊन राक्षसयोद्धे श्रीरामाला शस्त्राने छेदायला निघाले. श्रीराम आणि दूषण हे लढू लागले; त्या वेळी राक्षसांनी पाषाण आणि वृक्ष श्रीरामावर मोठ्या त्वेषाने टाकले. परंतु रणरंगात प्रवीण असलेल्या रामचंद्राने लगेचच कुशलतेने बाण मारून ते वृक्ष आणि पाषाण तोडून टाकले; दूषणाला कासावीस केले. एका बाणाचे निवारण करावे तेवढ्यात रामाचे अनेक बाण येत. दूषणाचे धनुष्य तोडले, भाता मोडला, दूषण मूर्च्छित होऊन पडला. श्रीराम भात्यातून बाण केव्हा काढतो, बाण धनुष्याला केव्हा जोडतो हे समजणेच कठीण झाल्याने राक्षस पटापट मरत होते. दूषणाचे बळ व्यर्थ ठरले. एकही बाण त्याला सहन करणे जमत नव्हते. त्याचे तोंड काळे झाले. त्याला लाज वाटली. तसाच रागही आला आणि तो रथात चढून पुन्हा युद्धासाठी निघाला.

श्रीराम-दूषण संग्राम, दूषणाचा वध

श्रीरामाने राक्षससेनेची दुर्दशा केलेली पाहून दूषण भयंकर संतापला. त्याच रागात रथात बसून त्याने रामावर सहस्रावधी बाण सोडले. श्रीरामाने ते सर्व बाण क्षणार्धात तोडले. शिवाय दूषणाचे धनुष्यही तोडले. यामुळे दूषण अधिकच चवताळला. त्याने शक्ती आणि गदा हातात घेतली. श्रीरामाने अत्यंत दारुण असे दहा बाण सोडले. त्यातल्या चार बाणांनी दूषणाच्या रथाचे चार घोडे मारले. तीन बाणांनी रथाची दोन चाके आणि आस तोडला. एका बाणाने रथावरचा ध्वज खाली पाडला. शेवटी एकाने रथ आणि एकाने सारथी यांचा नाश केला. दूषण रथातून आला होता तो श्रीरामाच्या पराक्रमाने विरथ झाला. तेव्हा पदाती झालेला दूषण गदा घेऊन श्रीरामावर धावला. "राक्षसांचा पराक्रम माहिती असूनही यशाचा आनंद मिरवतोस काय? माझी गदा पाहा, सहन कर, तरच मी तुला योद्धा मानीन. अरे, दूषणाबरोबर युद्ध कर की रणातच तुझा प्राण घेईन. तुला झालेला फाजील अभिमान झटकून टाकतो." असे म्हणत दूषण रामावर मारा करायला निघाला.

श्रीराम म्हणाला, "आपले नाव दूषण आहे हे सांगताना तुला लाजही वाटत नाही. दूषण हे खराचे भूषण असते. दोघांची तोंडे निंद्य आहेत. धर्म, कर्म, नाम, काम ही तुझ्या दूषण नावाशी संबद्ध आहेत. दूषणाचे बळ हेही दूषण, तुझ्याजवळ पराक्रम कुठला?" असे श्रीरामाने म्हणताच "बडबड किती करतोस' असे म्हणून, जसा पतंग दिव्यावर झडप घालायला यावा तसा तो दूषण हातात गदा घेऊन रामाच्या दिशेने धावला. त्याने गदेचा एक दुर्धर घाव घातला. तेव्हा रामाने सुवर्णपंखी बाणाने विंधून गदा चूर्ण केली. त्यावर करकरा दात खात, रागाने दूषणाने शूळ घेऊन 'रघुवीराला मारतोच' अशा आवेशाने आणि थरथरा कापत त्याने शूळ फेकला. तीन धारांचा बाण सोडून रामाने शूळ आकाशात उडविला. शूळाची बारा शकले झाली आणि राक्षसांवर पडली. अशी एकामागून एक दूषणाची शस्त्रे जेव्हा श्रीरामाने नष्ट, विफल केली, तेव्हा दूषणाला खूप राग आला. त्याने वज्रप्राय परिघ घेतला. रणमार करण्यात हा परिघ दुर्धर होता. वीरभद्राचे वरदान होते की परिघ सोडल्यास तो निश्चित प्राणहानी करणारच; त्याचे निवारण करणे अशक्य; असे ते निर्वाणीचे शस्त्र होते. घवघवीत आठ घंटा, वीरांच्या रक्ताने आरक्त असा परिघ हातात घेऊन दूषण रामाचा वध करण्यासाठी धावला. तो अनिवार परिघ पाहून स्वर्गात देवांनी हाहाःकार केला. सुरनरांना एकच घोर विचार की रघुवीर

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

कसा वाचेल? श्रीराम हा श्रेष्ठ धनुर्धर अचल होता. दूषणाने परिघ जेव्हा सोडला तेव्हा रामाने परिघाचे बाहू योग बाणांनी वेधून खुडले. त्या परिघासह बाहू खुडून, तोच बाण परत येऊन, दूषणाच्या हृदयात घुसून, दूषणाला रणात पाडला. दूषण जमिनीवर पडताच, परिघाने रघुनाथाचा आश्रय घेतला आणि तो रामाच्या भात्यात जाऊन राहिला. वीरभद्र ही शस्त्रदेवता रामाला प्रसन्न होती. अमोघ परिघ श्रीरामाच्या हातात येऊन प्रमाथाचा वध करण्यासाठी साहाय्यभूत झाला.

श्रीराम अन्य राक्षसवीरांचा वध करतो

दूषण रणात पडताच राक्षससेनेने केलेला हाहाःकार गगनाला जाऊन भिडला. सर्वांचा थरकाप उडाला. श्रीराम रणरुद्राच्या आवेशात उभा होता. त्याच्याशी युद्ध करण्यासाठी दूषणाचे तीन कैवारी राक्षस पुढे सरसावले. महाकपाळ, स्थूळाक्ष आणि प्रमाथी असे ते तिघे रामाला युद्धाचे आव्हान देऊन कर्कशपणे ओरडत रामासमोर आले. ते तिघे राक्षसवीर अतिशय दुर्धर समजले जात. त्यांनी शूळ, पट्टे, परशू अशी भिन्न शस्त्रे घेऊन रामाच्या दिशेने चाल केली. 'आमचा स्वामी (दूषण) रणात पाडलास, तसाच तुलाही शस्त्रांच्या घावाने पाडू' ही गर्जना करत त्यांनी रामावर शस्त्रे सोडली. तिघे एकजुटीने लढू लागले. एक पुढून रामासमोर आला, एक पाठीमागून आला, एक आकाशातून शस्त्रांचा वर्षाव करू लागला. श्रीरामाला समोरच्या प्रमाणे पाठीमागून होणारे आघात हेही दिसत असत याची कोणालाच कल्पना नव्हती. रामाने विकट बाण सोडून प्रमाथीला रणात आणला. महाकपाळ हा शूळ घेऊन आला तेव्हा श्रीरामाने बाणाने शूळ छेदला; आणि त्याचा कंठनाळ छेदला. आकाशातून गर्जना करणारा स्थूळाक्ष होता. त्याचे वक्ष छेदून, रामबाणाने त्याला रणात पाडून त्याचा संपूर्ण नाश केला. वक्री शनी, भौम केतू, सुर्योदयाचा अस्त होतोच, त्याप्रमाणे श्रीराम राक्षसांचा अंतक ठरून रणात उभा होता. एखाद्या गृहस्थाने अतिथी सन्मानाने वागवावा तसे श्रीरामाने तिघांनाही शरासन देऊन सुखी केले. सुवर्णपत्री शरसंधान करून रामाने प्रमाथीचे मथन केले. दहा बाणांनी ते महावीर राक्षस त्रासले आणि अन्य राक्षस पळवून लावले. श्रीरामाने एकएका बाणाने अनेक राक्षस मारले. त्यांना रामाने सकुंडल शिर छेदून, आयुधांसहित हात, कवचासहित शरीर असे मरण दिले. ब्रीदाचे राक्षस आणि त्याबरोबर अन्य अनेक राक्षस मारले. श्रीरामाने राक्षसांच्या रक्ताचे पाट वाहविले. श्रीरामाच्या बाणांनी राक्षसवीर भयभीत झाले. काही पळून गेले. अशाप्रकारे बाणांच्या कडाक्याने राक्षसगण वेडे झाले. काही करता न आल्याने ते तडफडत राहिले.

श्रीराम रथाशिवाय पायीच लढत होता. त्याने अती दुर्धर असे चौदा सहस्त्र राक्षस मारले. त्या राक्षसांमधला दूषण हा एवढा बलवान की त्याला रावणही भीत असे. त्याच्याजवळ असलेला अनिवार्य परीघ रामाने तोडला आणि दूषणाचा वध केला. राक्षसांची झालेली अपरिमित हानी पाहून खर क्रोधायमान झाला. त्रिशिराही अत्यंत संतापला. त्याने मग रामाला गाठला. तो म्हणाला, "राक्षसांचा घात करून तू कुठे आणि कसा जाशील? राक्षसांचा, मुख्य वीरांचा रणात नाश केल्याचा तुला गर्व चढला असेल; पण मी त्रिशिरा तुझा गर्व झाडीन. श्रीराम आणि त्रिशिरा एकमेकांसमोर आले. दोघांनी एकमेकांकडे क्रोधाने पाहिले. दोघांनी धनुष्ये पेलली आणि त्या दोघा महावीरांचे युद्ध सुरू झाले. त्यावेळी त्रिशिराला खराचे बोलणे आठवले.

अध्याय अकरावा

श्रीरामाने सैनिक आणि धुरीण या सर्वांचा वध केल्याने खराला खूप राग आला होता. त्याला विचारूनच त्रिशिरा रामावर चाल करून आला होता. त्यावेळी खर म्हणाला, "त्रिशिरा, रामाने दूषणाला रणात मारले म्हणून तू भिऊ नकोस. मी तुझ्या पाठीशी आहे. मनुष्य हा राक्षसांचे खाद्य

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

आहे; त्याचे काय भय बाळगायचे. फणसाचे काटे पाहून खाणारा थोडाच घाबरतो. फणसाचे काटे चिरून काढून, आतले मधुर गरे पटापट खाल्ले जातात; श्रीरामाचे युद्धसंकट तसेच आहे. श्रीराम हा जरी अती दुर्धर राक्षसांना बाणकंटकांचा भासला, तरी आपल्याला तो खायला गोडच आहे, तेव्हा रणात त्याचा वध कर." हे खराचे वचन ऐकून, एका गाढवाच्या ओरडण्याला दुसरे गाढव ओरडून साथ देते तसा त्रिशिरा आपल्या तिन्ही मुखातून गर्जना करत, रथात बसून वेगाने श्रीरामावर धावून गेला. त्याने धनुष्यातून असंख्य बाणांचा वर्षाव केला.

त्रिशिरा आणि श्रीराम यांचा संग्राम

"अरे त्या रामाची रणात काय योग्यता आहे. बाणांनी त्याला पुरता खिळवून टाकतो. शस्त्रसंभाराचा वर्षाव तू पाहाच." असे त्रिशिराने खराला सांगितले. नंतर तो रामाला म्हणाला, "ए रघुनाथा, अनेक राक्षसांचा वध करून, आता मागे पळून जाऊ नकोस. तुझा मी वध करतो. लहान माशांना मोठा मासा गिळतो, तसे तू राक्षसांच्या बाबतीत केलेस, तर आता मी तुलाच संपूर्ण गिळतो. तुला गिळायलाच मी आलो आहे." यावर श्रीराम प्रत्युत्तर देऊन म्हणाला, "अरे गाढव आणि घोडा यांपासून तुझा जन्म झालेला तू खराचा सांगाती; पण भारवाही खेचर आहेस. तू तीन शिरांचा भार वाहतोस, तीन तोंडांनी स्वैर बडबडतोस, तुला विचार करणारे एक मुख नाही. विजातीय तीन शिरांचा तू राक्षस आहेस. त्रिमुखांनी एकमुखी युद्ध होत नाही. त्या खरासमोर पळून जाशील आणि वल्गना भुंकत राहशील." श्रीरामाचे प्रत्युत्तर ऐकून त्रिशिराने असंख्य बाण सोडून श्रीरघुनंदन आच्छादून टाकला. आकाशात बाणच बाण दिसू लागले. श्रीराम बाणांनी झाकला गेल्याने राक्षसांचे उरलेले सैन्य पुन्हा गर्जना करत परतले आणि राम संपला म्हणू लागले. "त्रिशिरा खरोखर तू महान् योद्धा आहेस. रणात रामाला निपटलेस." अशी सैनिक राक्षसांची बडबड सुरू झाली.

श्रीराम ती राक्षसांची गजबज ऐकून रागावला. श्रीरामाने शत्रूच्या बाणांना बाण सोडून वेधले. बाणावर बाण आपटू लागले. कोणाच्या मस्तकावर ते बाण आदळले. बाणांच्या घर्षणाने ठिणग्या उडून आकाश भरून गेले. श्रीरामाच्या बाणांचा कडकडाट, राक्षसांच्या बाणांचा नेट यामुळे घावातून अग्नी निर्माण झाला. दोन महायोद्धयांचे द्वंद्व सुरू झाले. गरुडाने नखांनी साप चिरावे त्याप्रमाणे रामाच्या बाणांनी बाण विदीर्ण केले. ते तुटलेले बाण भूमीवर सापांप्रमाणे पसरले. वायू जसा आभाळ तोडतो, तसे श्रीरामाने राक्षसांचे बाणजाळे तोडले. त्रिशिरा यामुळे संतापला. त्याने रामावर तीन बाण सोडले. ते रामाच्या कपाळावर आदळले. रामाला बाणांनी कोणतीही व्यथा झाली नाही. उलट तो म्हणाला, "छान, मला गंधाक्षता वाहिल्या. तीन बाणांनी मृदु, मवाळ अशी मला रणात पुष्पांजली वाहिली. आता मी तुझी पूजा बाणजाळ्याने करतो." श्रीराम महाबळी क्रोधाविष्ट झाला. "तुझे तीन बाण मी सहन केले; आता तू माझे दारुण बाण सहन कर." असे म्हणून श्रीरामाने चौदा बाण सोडले. चौदा विद्यांची जशी गती तशी त्या बाणांची गती होती. ते बाण निवारण्याची कोणतीही युक्ती चालत नसे; त्रिशिराच्या हातातले धनुष्य तेवढे तोडले गेले. चार बाणांनी चार घोडे, एका बाणाने सारथी संपवला. एका बाणाने ध्वजस्तंभ तोडला आणि एकाने रथच मोडला. त्रिशिराला रथातून जमिनीवर आणला. तेव्हा त्रिशिरा पायीच रामावर धावून गेला. परंतु त्याचे सामर्थ्य रामापुढे चालेना. त्यावर निर्वाणीचा उपाय म्हणून कार्तिकस्वामींच्या वराने प्राप्त झालेली शक्ती त्रिशिराने हाती घेऊन रामावर चाल केली.

त्रिशिराच्या हातात ती शक्ती पाहून सुरवर कापू लागले. ऋषी पळू लागले. सर्वांना चिंता पडली की 'श्रीराम कसा वाचेल?' त्या शक्तीच्या

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

माराच्या भीतीने इंद्र, रुद्रगण, यम, वरुण सारे भीतीने कापू लागले. ती शक्ती श्रीराम कशी सहन करणार या काळजीने सुरासुर, यक्ष, किन्नर हे भयकंपित झाले. अत्यंत प्रभावी म्हणून त्रिजगतात गाजलेली ती शक्ती त्रिशिराने संतापाने श्रीरामाचा नाश करण्यासाठी सोडली. श्रीराम हा सर्व शक्तींची शक्ती असल्याने त्याच्यावर शक्तीचा उपाय चालला नाही. उलट शक्तीने श्रीरामाला वंदन करून, रामाचे पाय धरले आणि तिथेच ती विश्रांती पावली. शस्त्रदेवता श्रीरामाला म्हणाली, "श्रीरामाच्या दर्शनाने माझी बंधनातून मुक्तता झाली. त्या काळतोंड्या त्रिशिराचा संबंध संपला." असे म्हणत शक्ती राक्षसघात करण्यासाठी श्रीरामाच्या भात्यात जाऊन बसली. ही अद्‌भुत घटना पाहून त्रिशिरा चिंताग्रस्त होऊन म्हणाला, "अरेरे, जी माझी आत्मशक्ती होती ती रामाला वश झाली. आता आमची गती खुंटली. श्रीराम निश्चित राक्षसांना रणात शांत करणार." अखेर रणातच मारायचे किंवा मरायचे असा विचार करून एक तळपते खड्‌ग हातात घेऊन त्रिशिरा रामाला आव्हाने देऊ लागला.

श्रीरामाने तीन धारांचा बाण सोडून खड्‌गाची धार संपविली आणि पिसाऱ्याने त्रिशिराला आकाशात उडविले. त्या पिसाऱ्याचा प्रभाव एवढा की त्रिशिराला रविचंद्रमंडळ, ऋषिमंडळ, ध्रुवमंडळ इथवर फिरवले. घावाशिवाय त्याला भोवळ आली. त्याची मुरकुंडी वळली. नाकातोंडातून रक्त वाहू लागले. बाणाच्या अर्ध्या तुकड्याने त्रिशिराला शासन केले. त्रिशिरा जेव्हा सावध झाला तेव्हा त्याच्या लक्षात आले की अंगावर कुठेही घाव नाही. त्याला काय झाले हे कळलेच नाही. मग रामाचे भय कशाला? असा विचार करत तो सावध होऊन, शस्त्रांनी सज्ज होऊन, अत्यंत क्रोधाने श्रीरामाचा वध करायला निघाला. ज्याप्रमाणे पतंग दिव्यापासून माघारा फिरत नाही, त्याप्रमाणे त्रिशिरा मागे न फिरता रामाला गिळायच्या आवेशाने पुढे निघाला. त्याने श्रीरामाला आव्हानपूर्वक हाक दिली आणि आपली तिन्ही तोंडे वासून तो रामासमोर उभा राहिला. तेव्हा तो प्रलयाच्या प्रसंगीचा यमच भासला. श्रीरामाला गिळण्यासाठी काम, क्रोध, लोभ यांच्या गुहाच अशी त्याची तोंडे पसरलेल्या अवस्थेत दिसली. निर्गुण गिळण्यासाठी ज्याप्रमाणे त्रिगुण खवळतात. त्याप्रमाणे त्याची तिन्ही तोंडे श्रीरामनिधान गिळण्यासाठी पसरलेली होती. त्रिशिराची ती स्थिती पाहून रघुवीराला हसू फुटले. त्याने धनुष्यावर बाण सज्ज करून आत्मनिर्धाराने कार्य करायचे ठरविले. रामाने तीन बाण घेऊन त्रिशिराचा माथा वेधला. तो त्रिशिरा त्यावर हसत हसत म्हणाला, "वाः या तर पुष्पाक्षता आहेत. रामाच्या बाणात काही जोरच नाही. त्याचे बाण फुलासारखे रुतले आहेत." नंतर त्रिशिराने घुसलेले बाण उपसून काढायचा प्रयत्न केला, तेव्हा त्याला त्या बाणांचा कठिणपणा लक्षात आला. त्याचा पराक्रम आणि सामर्थ्य अपुरे ठरले. मस्तकातले बाण निघाले नाहीत. जसजसा तो बाण उपसू लागे तसतसे घावात ते घुसत. हे विपरीत घडल्याचे पाहून तो गोंधळून काय करावे याच्या विचारात पडला. प्रथम ते बाण फुलासारखे, बळ नसलेले वाटून तो हसत होता; ते वरवर लागले असे समजत होता; पण जेव्हा ते बाण उपसू लागला तेव्हा ते आतच घुसू लागले. अशी श्रीरामाच्या बाणांची कीर्ती होती. ते बाण जीवघेणे होते. त्याचा पुरुषार्थ पळाला. ते बाण सपिच्छ घुसले आणि ब्रह्मांड भेदू लागले. ज्याप्रमाणे वज्राचा आघात पर्वतालाही उलथून पाडतो; त्याप्रमाणे त्रिशिराला रामबाणांनी रणात भुईसपाट केला. त्रिशिरा जमिनीवर पडताच, पाताळात आवाज निर्माण झाला; दिग्गजांची टाळी पडली; राक्षसदळात थरकाप उडाला. श्रीराम जीव घेणारा आला म्हणून राक्षस पळू लागले. श्रीरामाच्या बाणांनी राक्षसांना प्रलय आल्याचा अनुभव मिळाला. चौदा सहस्र राक्षससैन्य होते त्यातले शंभरालाही कमी एवढेच

https://archive.org/details/@sarayu_foundation_trust_lucknow

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

उरले. श्रीरामाच्या बाणांच्या भीतीने कंपायमान होऊन तेही पळून गेले. राक्षससेनेचा रामाने नाश केला. उरलेले सैनिक दाही दिशांना पळू लागले. 'श्रीरामाच्या बाणवर्षावापुढे कोण टिकणार? आपण खरापाशी जाऊ, तोच आपले रक्षण करील' असे एकमेकांना ते सांगत होते. अशा राक्षसगणांना धाकाने पळताना पाहून खराने त्यांना अभय देऊन थोपवले.

खर आणि श्रीराम यांचे युद्ध

खरराक्षस सैनिकांना एकत्र करून, स्वतः श्रीरामासमोर आला. श्रीरामाला पाहताच खराला थरकाप सुटला. 'रामाने दूषणाला मारला, त्रिशिराचे निर्दाळण केले; एकटा पायउतार श्रीराम, त्याने थोर, थोर राक्षसवीर मारले, सैन्याचा विध्वंस केला. निश्चितच हा राम श्रेष्ठ धनुर्धर आहे, निधडा योद्धा आहे. त्याचे युद्धकौशल्य अद्भुत आहे' असा विचार करत धनुष्य सज्ज करून खराने रथ पुढे आणला. तो श्रीरामाला उद्देशून म्हणाला, "धीर धर वीरा, माझ्यापुढे तुझे बळ ते काय! माझ्याकडून केलेला घाव सहन करील अशी कोणाची माय व्याली आहे. अचानक बाण लागून दूषण आणि त्रिशिरा मेले. माझ्यासमोर राहून माझे बाणप्रहार सहन करशील तरच तुझा पराक्रम खरा मानीन. अरे, मी खर रणात समोर आलो म्हणताच कृतान्त काळाला धीर धरवत नाही. मी आजवर अनेक सुरासुर मारले. त्या तुलनेत तू रघुवीर किती टिकणार? माझे बाण सुटल्यावर कोदंड तोडीन, तुझा प्राणही घेईन. पाहाच माझा पराक्रम."

श्रीरामाने खराचे हे भाषण ऐकल्यावर त्याला तुच्छतेने हसत सांगितले की, "चर्मकुंडात भिजलेले परटाकडचे मलिन कापड खर वाहतो, कधी कुंभाराची माती खराच्या पाठीवरून वाहून नेली जाते, ही तर खराची (गाढवाची) प्रसिद्धी आहे. काळे कोळसे, कुंभाराच्या घराकडे कावडी वाहून नेण्यासाठी खराचा उपयोग करतात; आणखी उकिरडे फुंकणारा म्हणूनही खर प्रसिद्ध आहे. पाथरवट खर पाळतात कारण त्यावरून मनाप्रमाणे दगड वाहून नेता येतात. याचा परिणाम होतो पाठीवर खते पडण्यात आणि बूड सोलण्यात. नंतर त्या ठिकाणी माशांचा सुकाळ असतो. दूरवर गाढवी पाहून खर दीर्घ स्वरात ओरडतो. पुढे त्याच्या उरावर ती लाथा मारते याचेच त्याला सुख वाटते. खराचे मुख्य भूषण म्हणजे त्याचे लोळण घेणे. साऱ्या जगाची विष्ठा हे त्याचे आवडते भोजन असते हे त्याचे महिमान आहे. अशी ही खराची प्रतिष्ठा असल्यामुळे आता तू दुःशील, पापी खरा मर. तू ऋषीवरिष्ठांचा वध केलास, त्यांच्या कैवाराने तुझा मी सूड घेऊन बाणांनी तुझे थोबाड फोडतो. तू पळशील कुठे माझ्या बाणांपुढे. खराला गोमाशी लागली की ते जसे चौफेर तडफडत पळते तसे माझे पिसांचे बाण लागले म्हणजे तूही खरा त्याच्यासारखा पळशील." श्रीरामाच्या या बोलण्याने खरराक्षस चांगलाच संतापला.

खराने धनुष्यावर दोरी चढवून रागारागाने असंख्य बाणांचा वर्षाव केला. त्यामुळे दिशा-उपदिशा बाणांनी भरून गेल्या. हे पाहून श्रीरामालाही राग आला आणि तो धनुष्य सज्ज करून पुढे झाला. जसा हत्तीवर सिंह चालून जातो तसा श्रीराम राक्षसांवर चालून गेला आणि प्रलयकाळाची मेघवृष्टी व्हावी तशी त्याने शरवृष्टी केली. श्रीरामाने शरवर्षाव केला. तेव्हा बाणपिसाऱ्यांमुळे जोराचा वारा सुटला, त्यामुळे राक्षसगण भयभीत झाले. बाणांनी भय निर्माण केले. बाणांनी रणात वारा खिळला, मुख्य धुरीण खिळून राहिले, प्रचंड धुरळा उडाला आणि आकाश बाणमय झाले. खराच्या आणि रामाच्या बाणांचा खणखणाट चालू झाला. त्या आदळलेल्या बाणांनी अग्नी निर्माण होऊन बाणांचा पिसारा पेटला. खराचे डोळे धुराने पूर्ण भरून गेले. बाणांनी भूतल आणि गगनमंडळ भरून गेले. श्रीरामाच्या बाणजाळ्याने सूर्यमंडळ झाकून गेले. सर्वत्र बाणच बाण, कुठेही

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sayahu Foundation Trust and eGangotri

मोकळी जागा नाही. बाणांनी राक्षसांना त्रस्त केले. खर त्यामुळे कासावीस झाला. रणक्षेत्रात अंधार पसरविण्याचे श्रीरामाचे हस्तकौशल्य अलौकिक होते. त्या वेळी दोघे महावीर युद्धात आपले कौशल्य दाखवत होते.

खरराक्षसाने, "श्रीरामा, आता मी निर्वाणीचे शस्त्र म्हणून वरदबाण सोडतो. माझे हस्तकौशल्य पाहाच." असे सांगून त्या महाहट्टी खराने अत्यंत नेटाने वरदबाण सोडून श्रीरामाचे धनुष्य छेदून खाली पाडले. त्याचवेळी पूर्ण निर्वाणाचे सात बाण घेऊन, श्रीरामाचे हृदय लक्ष्य ठरवून वेगाने वेधले. परंतु श्रीरामाचे कवच अभेद्य होते, त्यामुळे बाण त्यात रुतले नाहीत. तरी त्या वरदशक्तीने कवचाची बंधने तोडली. हे होताच कवच निसटून जमिनीवर पडले. धनुष्य आणि कवच छेदले जाताच तिन्ही लोक भयकंपित झाले. आकाशातल्या देवांना आणि इंद्राला परम दुःख झाले. या प्रसंगी कवच धरणीवर पडताच ढगाआडून सूर्य प्रकटावा तसा श्रीराम रणात शोभला. त्याने गर्जना करीत म्हटले, "तुझे सर्व वरद बाण क्रोधाने सोडल्यामुळे व्यर्थ झाले आहेत. तुझा सर्व पुरुषार्थही संपला आहे. आता मी तुझा घात निश्चित करीन." मग रामाने अगस्तींनी दिलेले धनुष्य सज्ज केले. तो गर्जत निघाला आणि शरवर्षाव करू लागला. खराचे सगळे प्रबळ बाण श्रीरामाने निष्प्रभ केले. एखाद्या शेतकऱ्याने निवडुंग काढून टाकावे तसे रामाने खराचे बाण छेदले. सुवर्णपत्री बाण बीजमंत्रासह सोडून रामाने खराला घाबरा केला. त्याच्या रथावरचा ध्वजस्तंभ मोडला. रणात रघुराज क्षोभला, ज्याप्रमाणे स्वर्गभोगांपासून भ्रष्ट होऊन पुण्यक्षयामुळे एखादा पतित व्हावा तसा तो खांबावरचा ध्वज खाली आला. नंतर एका श्रेष्ठ बाणाने खराचा मुकुट पाडला, त्याचे धनुष्य तोडले आणि श्रीरामाने खराला रणसंकटात टाकले. खराने या रणसंकटातून सुटण्यासाठी आणि श्रीरामाचा नाश करण्यासाठी श्रेष्ठ बाण सज्ज केले. शक्तिवरदाचे निर्वाणबाण घाव घालून दुसऱ्याचे प्राण घेतात आणि अनिवार, दारुण असतात. तेच चार बाण घेऊन, बीजमंत्राने आवाहन केलेल्या शक्तीसहित, खराने श्रीरामावर सोडले. ते सतेज, धगधगीत बाण पाहून भूतलावरचे ऋषीश्वर, स्वर्गातले सुरवर हे भयाने कापू लागले. कारण शक्तिवरद बाण अत्यंत दुर्धर असतो तेव्हा श्रीराम कसा वाचणार याची त्यांना काळजी वाटली. खराचा बाण सुटताच देवांना झापड आली आणि ऋषी मूर्च्छित झाले.

श्रीरामाच्या हृदयावर बाण लागताच, त्याच्या अंतरात असलेल्या शस्त्रदेवतेने चारी बाण धरले आणि ते श्रीरामाच्या भात्यात शिरले. ते पाहून खर म्हणाला, "हे काय विपरीत झाले. वरदशक्ती ही श्रीरामाच्याच भजनी लागली. तिने आमचा घात केला. श्रीराम आता कसा आटोपणार?" श्रीरामाची थोरवी पाहून ऋषींनी आणि देवांनी रामाचा जयजयकार केला. श्रीरामावर सोडलेले चारी बाण निवारले गेले, परंतु श्रीराम खरोखर अत्यंत रागावला आणि त्याने खरावर महातीव्र असे तीन बाण सोडले. श्रीरामाच्या बाणांना पाहून त्यांचे निवारण कसे करावे याची खराला चिंता पडली. एका बाणाने धनुष्य तोडून ते दुखंड होऊन धरणीवर पडले; ध्वज छेदला; रथाचा आस आवेशाने तोडला, दोन्ही चाके तोडली, धुरा छेदली. नंतरच्या बाणांनी चारी घोडे, रथ यांचा विध्वंस केला आणि एक बाण खराला लागून रक्त वाहू लागले. अशा रीतीने घोडे, रथ, सारथी यांना मारून खराला विरथ केला. तेव्हा तो गदा घेऊन रामावर चालून आला. गदा हातात घेऊन 'घाव घालून रामाला मारीन' असे खर म्हणाला. त्याने सरक, थरक, दीप्ती, गती, विगती अशा गदेच्या हालचाली दाखविल्या.

श्रीराम त्या वेळी खराला म्हणाला, "अरे, रथ, सारथी, सैन्यसंभार साऱ्यांचा नाश झाल्यावर तू निर्लज्जपणे गदेच्या गती दाखवतोस कशाला?

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

तुझ्यापासून शक्तीही निघून गेली आहे, तर आता व्यर्थ गदा हातात घेऊन कसल्या वल्गना करतोस? गदेसहित तुला भूमीवर पाडीन. तू पापमूर्ती, पापात्मा आहेस. अनेक श्रेष्ठ ऋषी तू मारलेस, ज्येष्ठ तपस्वी भक्षण केलेस, त्या पापाचे फळ आता भोग, तुला मी बाणांनी यथेच्छ शासन करीन. खूप ब्राह्मण तू खाल्ले आहेस. तुला ब्रह्महत्येचा दोष लागला आहे. तेव्हा बाणाच्या आघाताने तुला मी निश्चित प्रायश्चित देईन. या दंडकारण्यातला तू काटा आहेस. तेव्हा बाणाने तुला अवश्य छेदीन आणि वन पूर्ण निष्कंटक करीन. ज्यामुळे ऋषी निःशंकपणे येथे वावरू लागतील. निर्नासिक व्यक्तीच्या दर्शनानंतर यशाची गोष्ट कशाला? ती नकटी भेटल्याने सैन्यासह धुरीण मरून गेले. त्या नकटीने हे फळ तुम्हाला दिले. ती तुमची सांगाती मग तुम्हाला यश कसे मिळेल? त्या निर्नासिकेमुळे आपले निर्दाळण होते आहे हे तुला खराला समजतच नाही. नावाने खर, रूपाने खर; शस्त्रभार वाहणारे तू एक गाढव आहेस, तुला बुद्धी, विचार कुठला असणार. तू खरोखर अत्यंत मूर्ख आहेस.'' श्रीरामाचे हे मर्माला झोंबणारे बोलणे ऐकल्यावर खर हा भयंकर संतप्त झाला; भूमीवर हात-पाय घासून गदा घेऊन रामावर धावला.

श्रीरामाला प्रत्युत्तर देताना खर म्हणाला, ''किती सैरावैरा बडबडतो आहेस रे रामचंद्रा. अधिक बडबड ही वीराला शोभत नाही. लढण्याबद्दल विचार कर. रामा, तू अनेक धुरीण मारलेस तेव्हा आता मी तुझ्या रक्ताने त्या धुरीणांचे समाधान करीन. तुझ्या रक्ताचे तर्पण केल्याने राक्षसगण तृप्त होतील. गदेचा घाव घालून मी तुझा प्राण घेईन, हा माझा संपूर्ण पणच आहे. तेव्हा रामा, सावध हो. एकाच घावाने तुला संपवीन.'' हे बोलताना तो करकर दात खात होता, गदा गरगरा फिरवत होता. त्याच्या डोळ्यातून धूर निघत होता. तो रागाने थरथरत होता. श्रीरामाला चावून त्याच्या कंठातले रक्त पिण्यासाठी तो संधी पाहात होता. ''तुझ्या शिरेतले रक्त प्राशन करीन तेव्हाच मी तृप्त होईन.'' असे खर म्हणाला. त्याचे दोन्ही डोळे श्रीरामाला पाहून वटारले गेले. नंतर श्रीरामाला पूर्णपणे मारण्यासाठी खराने मातंगास्त्र बोलावले. बीजमंत्र जपून, घातकमंत्राचा जप करून त्याने ते अस्त्र शस्त्रावर योजले. अशा रीतीने निर्वाण साधून झाल्यामुळे वृक्ष, गवत उन्मळले, पृथ्वी कंपायमान झाली. पशुपक्षी मूर्च्छित झाले.

खराची गदा तेजस्वी आणि दारुण होती. त्यामुळे तृण भस्मीभूत झाले, गुल्म पर्वत कंपायमान झाले. वृक्ष उन्मळून पडले. गदा गगनापर्यंत उसळल्याने सुरवर विमानातून पळाले. सूर्य आणि नक्षत्रे अस्त्र-मंत्राच्या धाकाने चळचळा कापू लागली. खराचे अस्त्र दुर्धर असल्याचे पाहून श्रीरामाने रुद्रमंत्र जपला आणि दारुण बाण सोडले. श्रीरामाचे ते दारुण बाण पाहताच अस्त्रमातंगी शरण आली, 'माझा प्राण वाचवावा' असे म्हणत तिने रामाचे पाय धरले. तीव्र बाणाने गदा शतकूट झाली. घावाने वैकुंठ दुमदुमले. गदा पीठ करून पाडली. त्या प्रसंगाने खर रणोन्मत्त झाला. निर्वाण गदाही व्यर्थ झाल्याने त्याचे चित्त चिंता विसरले. श्रीरामाच्या बाणाने गदेचा निःपात झाला, शिल्लक सैन्याचा घात केला, सर्व शस्त्रसामग्री व्यर्थ केली आणि मगच तो बाण रामाच्या भात्यात आला. एकटा खर रणात उरला. त्याला रामाने बाणांनी जर्जर केला. परंतु खर बाणांना जुमानत नव्हता. तो पुन्हा श्रीरामाला एका घासात खायचे हा विचार पोटात ठेवून रामाच्या दिशेने धावला.

श्रीरामाने खराची सर्व शस्त्रसामग्री छेदली. आजूबाजूला कोणतेच शस्त्र दिसेना तेव्हा खराने एक विशाल वृक्ष उपटून त्याचा घाव घालण्यासाठी तो पुढे सरला. 'या वृक्षाच्या घावाने श्रीरामाला मारले असे समजा' असे सांगत त्याने वृक्ष फेकला. श्रीरामाने बाण सोडून तो प्रचंड वृक्ष शतखंड

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sayahu Research Academy, Gangotri

करून पाडला. वृक्ष निवटला गेला. खराचे अंगोपांग बाणांनी खोचल्याने त्याच्या शरीरातून रक्त वाहू लागले. आता खराचा नाश करायचे ठरवून श्रीरामाने बाणावर अंतकास्त्र योजले. प्रलयरुद्राचा महामंत्र जपून तो बाण सोडला. त्यावेळची खराची अवस्था अशी होती की तो देहबुद्धीला मुकला; झुंजणे, पळणे हेही विसरला; धरणे, मारणे याविषयीचा विचारही विसरला. ज्याप्रमाणे ज्ञानवंत हा नित्य आत्मसिद्धी निश्चयपूर्वक अनुभवतो, आणि रामपदी निश्चयाने राहतो; त्याप्रमाणे श्रीराम त्रिशुद्धीत पाहून खराचीही रणसमाधी लागली. एखादा मुनीश्वर जसा तत्त्वांचा विकार निरसन करून मिरवतो, तसा श्रीराम पाहून खर निर्विकार झाला. रामाचा बाण येऊन आपला प्राण घेईल हेही त्याला आठवेना. श्रीराम हा रणसुखकारी आहे. श्रीरामाने दुर्धर बाण सोडून खराचे शिर उडविले. रणात तो महावीर खर पडला तेव्हा 'धन्य रघुवीर' एवढेच बोलला.

खराकडून रामस्तुती व त्याला उत्तम गती

श्रीरामाने खराचे शिर उडविल्यामुळे ते देहापासून वेगळे झाले आणि मग ते श्रीरामाची स्तुती करू लागले. "श्रीरामाने द्वंद्वाचे दुःख छेदले आणि शराघाताने आत्मसुख दिले. त्याने जन्म-मरण, तहान-भूक यांचे दुःख संपविले. जिवाची धुकधुक नाहीशी करून शराघाताने आत्मसुख मिळवून दिले. माझे मन, देहाभिमान, ज्ञान-अज्ञान, ह्यांचा छेद करून मला सुखसंपन्न केले. श्रीरामाच्या बाणाचा प्रताप असा की त्यामुळे माझे पाप-पुण्य, संकल्प-विकल्प सुखरूप झाले. सतेज अशा रामबाणाने स्थूळ लिंग कारण छेदून मी-तूपण नष्ट केले. माझा राक्षसविधी, माझी आधी-व्याधी, देहबुद्धी या सर्वांचा छेद झाल्याने मी त्रिशुद्धी सुखी झालो. श्रीराम हा निकराचा रणवीर योद्धा आहे; परंतु त्याच्यावर घाव पडूनही तो सुखरूप असतो." अशी श्रीरामाची स्तुती केल्यावर ते शिर रामाच्या पायापाशी आले. श्रीरामाच्या घावाने मरण आलेल्या खराला त्यामुळे उत्तम गती (सद्‌गती) प्राप्त झाली. जी गती तापसांना, योग्यांना किंवा संन्याशांना देखील दुर्लभ असते, ती गती श्रीरामाने खराला दिली. जी गती योगयाग वा सर्वत्याग करणारानांही मिळत नाही ती श्रीरामाने रणरंगाने खराला मिळवून दिली. वेदविधी, शास्त्रसिद्धी यांमुळेही जी गती मिळणे अशक्य ती गती बाणाने वेधून खराला घावाने प्राप्त झाली. कर्म करून, ध्यान धरून जी गती अप्राप्य ती बाणाग्राच्या घावाने खराच्या हाती श्रीरामामुळे आली. जो जो रणात श्रीरामाच्या दृष्टीस पडतो, तो तो सायुज्याला चढतो; राक्षसांचे भाग्य चोख म्हणून त्यांना रणात स्पष्ट सायुज्य (मुक्ती) मिळाले." सुरनरांना खर दुर्धर होता. दशानन रावणसुद्धा त्याला संशयाने पाही; पण श्रीरामाने रणात त्याच खराला मारले म्हणून देव आणि द्विज यांनी जयजयकार केला.

श्रीरामाची सर्वांकडून स्तुती व अभिनंदन

श्रीराम आणि राक्षसवीर यांचे युद्ध पाहण्यासाठी आकाशात सुरवरांच्या विमानांनी गर्दी केली होती. श्रीरामाचा जय होताच त्यांनी जयजयकारासह पुष्पवृष्टी केली. हे युद्ध पाहण्यासाठी ब्रह्मदेव, सदाशिव हेही आले होते; रणात राम नित्यविजयी झाला म्हणून त्यांनीही जयजयकार केला. आकाशात सिद्धांनी टाळी पिटली, भूतलावर ऋषींचा जयजयकार उमटला; श्रीरामाने राक्षसातले बलवान वीर मारले याचा सर्वांना संतोष झाला. श्रीरामप्रतापाचे पूर्ण समाधान स्वर्गात सर्वांनी हर्षाने नाचून व्यक्त केले आणि श्रीरामाकडून रावणवध होईल असा त्यांना निश्चित विश्वास वाटला.

पर्णकुटीत उंच अशा शय्येवरून युद्ध पाहात थांबलेल्या सीता आणि लक्ष्मण या दोघांना हर्ष झाला. त्यांनी श्रीरामाला लोटांगण घातले. त्या उल्हासात सीतेने रामाला आलिंगन दिले. रामाने

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

सीतेला आश्वासन देऊन, सौमित्राला आलिंगन दिले. श्रीरामाने नंतर ऋषिगणांना बोलावून आणून त्यांना साष्टांग नमन केले. "राक्षसांनी गांजणूक केलेल्या ब्राह्मणांची मुक्तता करण्यात मला उत्तीर्ण होता आले; 'राक्षसांचे भय निवारण कर', अशी आपली आज्ञा शिरसावंद्य मानून तुमच्या कृपेने मी राक्षसांचा नाश केला. आपल्याच कृपेच्या युक्तीने मला यश मिळाले आणि राक्षसांच्या नाशामुळे माझी कीर्ती झाली. सत्संगतीने असे बळ येते. द्विजवर ज्याच्या पाठीशी असतात, अभय देतात, तेव्हा तो एकटाही द्विजांच्या सधर कृपेने चराचरही जिंकतो. सद्‌गुण संपत्तीचे कारण ब्राह्मणांचा चरणरज प्रमाण; श्रेष्ठ आपत्तींचे समूळ निर्दाळण हे द्विज पदांच्या रजःकणाने; अपार भवसागरामधे द्विजांचे चरणरज बळकट सेतू असतो; त्यामुळे पडणे, बुडणे यांच्या फेऱ्यात सापडणे नसते; द्विजचरणांनी सुख आणि स्थार्थ प्राप्त होतात. द्विजांच्या चरणतीर्थाने गंगादी तीर्थे पवित्र होतात; चारी मुक्ती दासी होतात; त्या चरणांची भक्ती करणारे भाग्यवंत असतात. अशा द्विजवरांची मला नित्य संगती माझ्या भाग्याने प्राप्त झाली; त्यामुळेच मी अगाध कीर्ती मिळवू शकलो. अशा द्विजांचे महिमान किती वर्णन करू. तुम्हाला काही दान द्यावे असे वाटते; ब्रह्मार्पण हे जनस्थान केले आहे. येथे स्वधर्मानुष्ठान करून सुखसंपन्नतेने राहावे. अरुणा, वारुणा, सरस्वती, ब्रह्मगिरी, अष्टतीर्थे ही सर्व करताना मनात कोणतीही शंका धरू नका. मी आपला आज्ञाधारक आहे." असे सांगून रामाने साष्टांग नमन केले. त्यामुळे सर्व द्विज सुखी होऊन, ते श्रीरामाचे गुणगान करू लागले.

श्रीरामाची कीर्ती वर्णन करत, रामाची मूर्ती वंदन करत, रामाचे गुणगान करत, रामनाम गर्जत, द्विजांनी जनस्थान घेतले. राक्षसांच्या पत्नी पळून गेल्या. त्यांचे गाऱ्हाणे होते की, "गंगातीरीचे द्विज अतिशय कठोर आहेत. त्यांनी धनधान्य हिरावून घेतले, वस्त्र-भूषणे हरण केली, आम्हाला संपूर्ण लुबाडले, त्यांचे निवारण कोण करणार? पुरुषांची जात होती ती रामाने रणात ख्याती करून संपविली, आता आम्हा विधवांना द्विज लुबाडत आहेत." असे त्या राक्षसपत्नी शूर्पणखेला सांगत होत्या. त्या सर्वजणी शूर्पणखेला मुख्य करून, द्विजांनी भीती दाखविताच विमानात बसून, जीव घेऊन पळाल्या. नंतर ऋषीवर राहिले जनस्थानात आणि श्रीराम राहिला आपल्या आश्रमस्थानात.

अध्याय बारावा

श्रीरामाने खर, दूषण, त्रिशिरादींचा राक्षससैन्यासह रणात वध केला. एकटा श्रीराम हातात धनुष्य घेऊन रणात फिरला आणि त्याने शराघाताने राक्षससंहार केला. याची वार्ता सांगायला कोणी पुरुष राक्षस उरला नाही. सर्व बाणांच्या आवर्तात सापडून मरण पावले. ही वाताहत सांगायला एक शूर्पणखा तेवढी उरली होती. ती लक्ष्मणाच्या धाकाने ओरडत पळाली. रणात चाललेला राक्षसांचा नाश पाहून ती आक्रोश करत जनस्थानात आली. शूर्पणखेचे कापलेले नकटे नाक पाहून खरादिकांच्या पत्नी तिला हसू लागल्या. दोघेच तर माणसे आहेत. खरादिक त्यांना मारून येतील असा त्या स्त्रियांचा निश्चित विश्वास होता. त्यामुळे त्या शूर्पणखेला हसत होत्या. शूर्पणखा फें फें करत रणातली वार्ता सांगत होती. "रघुनाथाने क्षोभाने बाणांचा आवर्त सोडून राक्षसांचा पूर्ण निःपात केला आहे. त्रिशिरा, खर, दूषण आणि चौदा सहस्र राक्षसगण यांना श्रीरामाने मारले असून जनस्थान द्विजांना दिले आहे." ही वार्ता ऐकताच जनस्थानात हाहाःकार उडाला.

"जगज्जेते वीर निर्दाळून ही नकटी कशाला परत आली. या नकटीचा कैवार घेऊन गेलेले त्रिशिरा, दूषण, खर आणि चौदा सहस्त्र राक्षस मारले गेले. ही नकटी येथे भेटीला आली आणि

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

समस्त पुरुष जातीला हिने अपशकुन केला. आता आमच्याबरोबर रडायला आली आहे. घरोघरी अशीच स्थिती असल्याने सर्व घरातल्या नारी रडून रडून आक्रोश करू लागल्या. कोण कोणाचे सांत्वन करणार. सर्व समदुःखी होत्या. त्या म्हणत, "आम्ही घरोघरी रडतो आहोत. आमचे रक्षण करणारा कोणी कैवारी नाही. द्विज घराघरात घुसून लुबाडत आहेत. राक्षसांनी द्विजांचे भक्षण केले त्यामुळे द्विजांशी त्यांचे हाडवैर होते; आता ते द्विज आवेशाने येऊन आम्हाला लुटत आहेत. त्यांना जनस्थान मिळाले आणि आम्हाला वैधव्य आले. ब्रह्मदंड आता कठोरपणे आम्हा रंडक्यांवर चालला आहे. त्या काळतोंड्या शूर्पणखेने अवघ्यांना रांडपण आणले." असे ओरडत, रडत, केस उपटत, लोळत त्या राक्षसपत्नी आक्रोश करत होत्या.

शूर्पणखेची कृती, तिची विटंबना

शूर्पणखेने राक्षसस्त्रियांना म्हटले, "तुम्ही आता इथे किती रडाल. द्विज आले तर ते सर्वांनाच लुबाडतील. एकदा द्विजांच्या बंदीत पडलात तर कल्पान्तीही सुटका होणार नाही. मग काही बुद्धी चालणार नाही; त्यापेक्षा निश्चितपणे लंकेला जाऊ." त्यावर राक्षसस्त्रिया म्हणाल्या, "हिने इथे महाबलवान राक्षस मारवले, आता लंकेची होळी करायला निघाली आहे. ही नकटी राक्षसांच्या मुळावरच आली आहे. रावणाचाही कुळासह ही नाश करेल." तेवढ्यात द्विजांना जनस्थान मिळाले म्हणून ते शिष्यांसह धावून आले. राक्षसी गडबडून गेल्या आणि समूहाने पळू लागल्या. द्विज पूर्वीचे वैर आठवून, राक्षसांच्या संपत्तीसह विमानाची लुबाडणूक करण्याच्या विचाराने आले. त्यामुळे राक्षसी भयभीत होऊन, शूर्पणखेची विनवणी करू लागल्या. द्विजांची गर्दी वाढत गेली, तेव्हा नकटी शूर्पणखा विक्राळ रूप धारण करून, "तुम्हाला सगळ्यांना मी खाऊन टाकते", असे म्हणून त्यांच्यावर धावून गेली. तिचे भेसूर आणि विक्राळ स्वरूप पाहून द्विजांची पळापळ सुरू झाली. दोन्ही हातांनी शंख करत, धोतरे ओली करत ते पळत होते. कित्येकांची दातखिळी बसली तर काहींची वस्त्रे फिटली. त्या स्थितीतच ते श्रीरामाकडे आले. आपली त्रेधा शूर्पणखेमुळे झाली हे सांगताना अनेकांना धाप लागली. त्या द्विजांची स्थिती पाहून श्रीरामाने लक्ष्मणाला सांगितले, "यांना जनस्थानाचे दान दिले आहे तेव्हा त्यांना अभय दे. गोब्राह्मणांची गांजणूक हे रामराज्यावर आलेले संकटच आहे. यांचे भय निवारण कर."

शूर्पणखेने आरंभी ब्राह्मणांना पळवून लावले. नंतर तिला त्यांच्या मांसाचा लोभ सुटला. ती त्यासाठी पुढे धावली. हे लक्ष्मणाने पाहिले. स्वतःचे नाक कापले गेले, राक्षसांचा संहार झाला हे सर्व विसरून ती पुन्हा द्विजांचे मांस भक्षण करायला आली. एखादा मासा गळाचे अमिष खातो आणि नंतर गळ ओढला की तळमळतो तसा शूर्पणखेला द्विजांच्या मांसाचा मोह पडून ती आली. विषयांची आवड असली की त्यापासून होणाऱ्या दुःखाचे विस्मरण होते. मरण विसरून विषयाची गोडीच आठवते, तसे शूर्पणखेचे झाले होते. लक्ष्मणाने त्यामुळेच बाण सोडून तिचे कान कापले. स्त्रीची हत्या न करण्याची रामाची आज्ञा त्याने अशी पाळली. दोन्ही कान कापले गेल्याने शूर्पणखा तेथून पळून गेली.

राक्षसस्त्रिया लंकेत, रावणाची भेट

शूर्पणखा जनस्थानातून पळून आल्यावर ती राक्षसस्त्रियांसह विमानात बसली आणि तिने लंकेच्या दिशेने प्रयाण केले. विमानात मुख्य म्हणून शूर्पणखा बसली होती. तिच्या नाका-कानाच्या भोवती माशा घोंघावत होत्या. त्यातच राक्षसस्त्रियांचा आक्रोश आणि बडबड चालली होती. त्या म्हणत होत्या, "या नकटीने इथे असंख्य राक्षस मारविले, पुढे कोट्यवधींना मारील. ही उरफाटी परत चालली आहे रावणाला संकटात घालायला. पहिल्यांदा नकटी होऊन आली, मग खरादिक राक्षसांचा घात केला; यावेळी कानही

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

गेले आणि ही नकटी बुच्ची झाली. आता रावणाच्या उरावर आली, तो कसा उरेल? हिनेच ही कळ-भांडणे-लावली. चौदा सहस्र वीरांची होळी केली. ही नकटी राक्षसांच्या मुळावरच आली आहे. आता रावणाचा कुळासह नाश करायला निघाली आहे." त्या स्त्रिया दुःखाने आणि रागाने असे बोलत होत्या. अत्यंत कष्टी झाल्या होत्या.

विमान लंकेपाशी आले. लंकाभुवनापाशी ते थांबताच आपल्या विरुद्ध राक्षसस्त्रियांनी केलेल्या विरोधी भाषणाने उद्विग्न झालेली शूर्पणखा रावणाकडे गेली. लंकाभुवनात रावण ज्या सभेत बसला होता तेथे मरुद्गणांमध्ये बसलेल्या इंद्रासारखा शोभत होता. त्याच्या परिवारातले प्रधान सभोवती बसले असून स्वतः रावण सिंहासनावर होता. असा रावण पाहताच विमानातील स्त्रियांनी एकच आक्रोश केला. तेव्हा रावणाने विमानाकडे दृष्टी वळविली आणि त्याला नाककान कापलेली शूर्पणखा दिसली. शूर्पणखा दीर्घ स्वरात रडत रावणाकडे आली आणि रावणाचे पाय धरून बसली, तशीच अतिशय दुःखाने मूर्च्छित झाली. रावणाने तिची स्थिती पाहून म्हटले, "असा कोण महाबळी आहे की ज्याने हिचे नाक-ओठ कापून दात उघडे पाडले आहेत? हिचे कानही कापून बुची करणारा तो कोण आहे?" शूर्पणखेची झालेली विटंबना पाहून रावण गजबजला. प्रधानमंडळ कंपायमान झाले. लंकेतले लोक चकित झाले. रावणाच्या परिवारात शूर्पणखा महाबळी मानली जात असे. तेव्हा तिची समूळ विटंबना करणारा असा कोण वीर असावा, याच विचारात सारे मग्न झाले.

नंतर शूर्पणखा सावध झाल्यावर सर्व वृत्तान्त निवेदन करू लागली. "रावणा तू ज्येष्ठ असताना माझी ही विटंम्बना झाली. त्रिशिरा, दूषण, खर यांना श्रीरामाने रणात मारले. चौदा सहस्त्र मागे न हटणारे पराक्रमी वीर त्या रामाने बाणांच्या आवर्ताने संपविले. रणसमाप्ती होईपर्यंत रामाने राक्षसपुरुषांची जातीच नष्ट केली. आता शास्त्रार्थाप्रमाणे त्याने राक्षसस्त्रिया जिवंत ठेवल्या. हे सारे सांगण्यापुरती मीच एक उरले आहे. श्रीराम शास्त्रार्थामध्ये सर्वज्ञ असून, स्त्रियांची हत्या करू नये म्हणून मी त्यांचा छळ केल्यावरही त्या राम-लक्ष्मणांनी माझे नाक-कान कापले. जर दुसऱ्याचा छळ करू गेले तर स्वतःचाच छळ होतो याचे मला प्रमाण मिळाले. माझी विटंबना मुख्यत्वे माझ्या मुखाची झाली. माझा छळ असा झाला की मी कोणाला तोंड दाखवू नये. तो श्रीराम राक्षसांचा शेवट करणारा आहे अशी त्याची ख्याती आहे. माझे नाक-कान कापलेन आणि जनस्थान द्विजांना दिलेन. ते द्विज विमान पळवणार होते तेवढ्यात मी ते इकडे घेऊन आले. तो श्रीराम अत्यंत निर्लोभी आहे. त्याने जनस्थान घेतले आणि द्विजांना स्वतःच दान देऊन टाकले. त्या श्रीरामाचे महिमान अगाध आहे. त्याच्या प्रतापाचे तेज पाहून मला तर असे चिन्ह दिसते आहे की तुझे लंकाभुवनही घेऊन, लगेच कुणाला तरी दान देईल. रावणा, गर्वाने तू अज्ञान झाल्यामुळे तुला समजणार नाही, पण तुझ्या राज्यावर हे मोठेच संकट आले आहे. माझे बोलणे ऐकून तरी तू सावध व्हावेस असे मला वाटते."

शूर्पणखेचे निवेदन ऐकल्यावर रावणाला सीतास्वयंवराच्या प्रसंगीचा श्रीराम आठवला. त्याच्या आठवणीने त्याच्या पोटात भयाने थरकाप उठला. धनुष्याने मला लोळवले तेच धनुष्य रामाने भंगले. त्यावेळी तर तो बालक होता, आता पूर्ण तारुण्य त्याच्या ठिकाणी बाणले असणार. त्याच्या तारुण्यातला बाणांचा प्रताप सहन करायला चौदा सहस्र राक्षस आणि त्रिशिरा, खर, दूषण हेही कमी पडले, या विचाराने रावणाची भयकंपित स्थिती झाली. नकट्या शूर्पणखेच्या निवेदनाने रावणाने रामाचा धाक घेतला. लौकिकात आपला पराक्रम दाखविण्यासाठी मात्र तो अत्यंत क्रोधाने उठला आणि आपले शौर्य दाखविण्यासाठी

https://archive.org/details/muthulakshmiacademy Bhavan Vani Trust, Lucknow

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

म्हणाला, "माझ्या प्रिय भगिनीची विटंबना करून तिला शासन करणारा हा राम कुठला कोण ते मला सविस्तर सांग. त्याचे काय धैर्य, त्याची कसली शक्ती, त्याचे सैन्य किती, त्याचा सारथी कोण ते सांग. त्याने दंडकारण्यात वस्ती का केली आहे? त्याची आयुधे काय आहेत? त्रिशिरा, खर, दूषण यांना त्याने मारण्याचे कारण काय? तुझी विटंबना त्याने का केली? हे सर्व मला समूळ कथन कर पाहू." लंकानाथ रावणाने रघुनाथाविषयी, त्याच्या स्वरूपाविषयी विचारल्यावरून शूर्पणखेने श्रीरामाची इत्थंभूत माहिती सांगितली.

शूर्पणखा श्रीरामाचे वर्णन करते

शूर्पणखा व्यथित होती, विटंबनेमुळे क्रोधाविष्ट झाली होती. ती श्रीरामाचे वृत्त यथाक्रम सांगायला लागली. "श्रीराम श्यामवर्ण पण अती सुंदर आहे. रमारमणीय मनोहर, सुस्वरूप, सुखसार असा श्रीराम साकार ब्रह्म आहे. कमलनयन, कमलपत्र, सुखैकघन श्रीरामाचे मुख आहे. त्याचे मुख पाहिल्याने डोळे निवतात. श्रीराम सुखशृंगार आहे. जटा-मुकुट मनोहर असून वल्कले आणि मृगचर्म ही त्याची वस्त्रे आहेत. तो धनुर्धर आजानुबाहू असून, त्याचा भाता अक्षय बाणांनी भरलेला असतो. कापूरयुक्त पिवळा तिलक, कर्ण-कुंडले, कमळांच्या माळा, कंबरेला सोनसळा मिरवतो असा तो श्रीराम मंगल वीर आहे. ध्वजवज्रांकुश रेखा, दोन्ही पायांवर कमळ-चिन्हे, पाऊले अत्यंत सुकुमार असा तो रघुकुलतिलक आहे. त्याचे चरणकमल अत्यंत सुरेख आहेत. त्याच्या सावळ्या अंगावर शुभ्र उटी अशी शोभते की दृष्टी तिथून हलतच नाही. मनाला आणि डोळ्यांना आनंद देणारा असा तो जगजेठी राम आहे. तो इतका सुकुमार आहे की चंद्रकिरण त्याला खुपतात; परंतु रणरंगात तो रणरंगधीर परम शूर आहे. इंद्रधनुष्यासारखे त्याचे धनुष्य, सुवर्णभूषित भासते. श्रीरामाचा प्रताप पाहून तो सत्यसंकल्प वाटतो. त्याचे रूप पाहून कोटी मदनांचा गर्व हरण होतो. तो राम लावण्याचा परम दीप आणि सुखस्वरूप दिसतो."

"श्रीराम बाण केव्हा जोडतो आणि सोडतो हे कळतच नाही. त्याने युद्धकुशलतेने कोट्यवधी राक्षस मारले. त्याच्याकडे रथ, सारथी, सैन्य, संपत्ती, कसले साहाय्य नाही. तो एकटा एक पायीच रणात असतो आणि राक्षसांचा अंत करतो. त्रिशिरा, खर, दूषण हे शूर वीर आणि त्यांचे पाठीराखे चौदा सहस्र राक्षस श्रीरामाने दुसरे शस्त्र न घेता केवळ बाणाग्रांनी नष्ट केले. राक्षसांची संपूर्ण पुरुषजात त्याने रणात संपविली. मी सारी वाताहत सांगण्यापुरती तुझ्यापर्यंत आले आहे. जसा श्रीराम तसाच सौमित्र आहे. तोही रणरंगधीर असून परमशूर योद्धा आहे. त्यांचे समान बळ आणि समान शील आहे. दोघेही रूपाने निर्मळ आहेत. कुशल आहेत. प्रबळ आहेत. पित्याचे वचन पाळावे म्हणून ते दंडकारण्यात आले आहेत. त्यांच्यासह सीता सतीही आली आहे. लक्ष्मण हा रामाचा भक्त असून तो अनन्यभावाने रामावर प्रेम करून, त्याच्या सेवेत नित्य मग्न असतो. तसा सर्वस्वी सावधही असतो. त्यांनी माझी विटंबना करून तुमचे ठाणे उठवले. तुम्ही कसले जिणे जगता, ससैन्य धावा करा. तसे धावणे करूनच त्यांनी चौदा सहस्र मारले. येथे मात्र मी तशी दीनवाणी नाही. राम आटोपत नाही." हे सारे शूर्पणखेचे बोलणे ऐकून रावणाने पूर्ण विचार केला. लगेच तो धावून गेला नाही. त्याने शूर्पणखेचे गाऱ्हाणे जीवाभावाने उपेक्षिले. हे रावणाचे चिन्ह पाहून शूर्पणखा उद्विग्न झाली. नंतर रावणाच्या मनाला प्रलोभन दाखवून, उत्तेजित करावे म्हणून तिने काममोहनासाठी सीतेचे वर्णन केले.

https://archive.org/details/@bhuvanvanitrust_lucknow Bhuvan Vani Trust, Lucknow

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

शूर्पणखाकृत सहेतुक सीतावर्णन

श्रीरामाबरोबर सीता सुंदरी वनात आली आहे. तशी दुसरी स्त्री नाही. तिला पाहिल्यावर मला तरी तिची सर येईल अशी अन्य कोणी चराचरात आढळली नाही. रमा, उमा याही तिच्या बरोबरीला येणार नाहीत. मग सावित्रीचा कोण विचार करणार. देव, गंधर्व, असुर यांच्या स्त्रिया तेजात तिच्यापुढे काजवेच ठरतील. पद्मिनी स्त्रियांचे शरीर मृदू असते, त्याहूनही सीतेची नखे नाजुक आहेत. अशी ती सुंदर, सुकुमार, मनोहर जानकी आहे. तिचे ठाणमाण, गुणलक्षण, घवघवीत लावण्य पाहून आणि तिचे मुख न्याहाळून मदनालाही मूर्च्छा येईल. तिचा गोल चेहरा, विशाल डोळे, यांच्याकडे पाहण्याने तहान-भूक निघून जाते. तिचे सौंदर्य पाहून विरक्तांचेही मन मोहून जाते. सौभाग्ययुक्त सीता पाहण्याने पंचामृत फिके वाटते. तिच्यापासून चित्त अन्यत्र जातच नाही. तिच्यासाठी मन लालचावते. तिचे श्रीमुख पाहताच दशेन्द्रियांना हर्ष होतो; मनाची घालमेल थांबते; डोळे टक लावून बसतात. खरे तर श्रीराम हा विरक्त योगी असल्याने सीता त्याला शोभत नाही. ती वास्तविक तुलाच पत्नी म्हणून योग्य असून, लंकानाथा तूच तिला भोगावेस. तुला पाहिल्यापासून, माझे बोलणे सत्य मानशील, तर ती तुझ्या दृष्टीस पडावी हेच माझ्या मनात चालले आहे. तू बुद्धिपूर्वक स्वतः सीता हे अनर्घ्य रत्न पाहशील तेव्हाच तुला माझे बोलणे मान्य करावेसे वाटेल. मगच तू साक्षेपाने प्रयत्न करशील.'' शूर्पणखेने वर्णन करून सांगितले, त्यावरून सीता स्वयंवराच्या प्रसंगी पाहिली होती तशीच आहे आणि चाफेकळीसारखी लावण्यराशी सीता मनात ठसली आहे हे रावणाला जाणवले.

रावणाची अवस्था आणि भावी योजना

शूर्पणखेने केलेले वर्णन ऐकून आणि सीतेची आठवण जागी होताच रावणाच्या अंगावर रोमांच उभे राहिले. त्याला सीतेचे ध्यान लागले. येता-जाता त्याचे मन सीतेचाच विचार करू लागले. भोजन, शयन, या प्रसंगातही अखंड सीतेचेच तो ध्यान करू लागला. रावण स्वप्नातही सीताच पाहू लागला. ती कशी प्राप्त होईल याचाच त्याला घोर लागला. श्रीराम हा परम प्रतापी आहे तेव्हां त्याच्याशी युद्ध करणे मला नको आहे. त्यापेक्षा छळ-कपट करून सीता आणावी असे त्याने ठरवले. रघुनंदनाशी कपट करून, त्याची पत्नी आणावी. हे अगदी गुप्त ठेवून कोणाला कळू देऊ नये. प्रधानांजवळही हे सांगू नये. हे मनाशी निश्चित करून रावणाने सभास्थान सोडले. रावण स्वतःच्या भवनात आल्यावरही सीताप्राप्तीचीच विवंचना त्याला सोडता येईना. मनात सतत तोच विचार चालू होता.

रावणाला शांत झोपही त्याच्या शयनगृहात लागेना. लगेच सारथी बोलावून त्याला रथ सिद्ध करायला सांगितला. रथाला पिशाचखर जोडले आणि लंकानाथ मारीचाकडे जाण्यास निघाला. रावण आणि मारीच यांच्या भेटीत मायामृगाची योजना ठरली. सीतेचे हरण करण्याची बोलणी झाली.

अध्याय तेरावा

लंकानाथ रावण सीतेच्या प्राप्तीसाठी उद्विग्न झाला होता. तो रथातून मारीचाच्या आश्रमात अत्यंत वेगाने येऊन पोचला. मारीच वल्कले नेसलेला, जटाधारी असून, नेमस्थ असा फलाहार करून एकांतात वनवासी होऊन राहिला होता. मारीच आणि रावण यांची भेट होताच त्यांनी एकमेकांना प्रेमाने आलिंगन दिले. नंतर एकमेकांचे कुशल विचारून झाल्यावर रावणाने त्याची पूजा केली.

मारीचाला रावणाकडून निवेदन

रावणाने मारीचाला एकांतात नेऊन त्याला राम-सीता आणि राक्षससंहारासंबंधी निवेदन केले.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

"मारीचा, त्या रामाने किती प्रकारे गांजणूक केली आहे याविषयी तुला किती म्हणून सांगू. अरे, पद्मपुराणात माझे दुसरे स्थान म्हणतात तिथे दूषण, त्रिशिरा, खर, चौदा सहस्र राक्षसगण हे त्रिलोकी दुर्धर असे होते. श्रीरामाने बाणवर्षावाने त्या सर्वांचा नाश केला आहे. माझी धाकटी बहीण शूर्पणखा हिचे नाक-कान कापून तिला विद्रूप केले आहे. कोट्यवधी राक्षसांना लाज वाटावी अशी कृत्ये त्याने केली आहेत. शूर्पणखेला विद्रूप करण्याचा सूड म्हणून रामपत्नी सीतेचे हरण करून मी उतराई होणार आहे. सीता ही इतकी सुंदर आहे की तिच्या सौंदर्याच्या थोरवीची बरोबरी करू शकेल अशी दुसरी कोणी नाही. त्या लावण्यमंजिरीची सर रमा, उमा यांनाही येणार नाही. माझ्या अंतःपुरातल्या सुंदरी म्हणजे तिच्या नखासमोरचे काजवे ठरतील. मुख्य जी मंदोदरी ही तिच्या आंगठ्यासारखी आहे. त्या सीतेचे मी हरण करणार आहे. तेव्हा आपण मला साहाय्य करावे. आपण अनेक विचित्र गती जाणता, नाना रूपे धारण करू शकता. तुम्ही सुवर्णमृगाची आकृती होऊन सीतेकडे जा. सीतेला पंचवटीत सोडून श्रीराम सुवर्णमृगवधासाठी पाठोपाठ धावेल. या प्रकारात रामाला दूर दूर न्यावे. नंतर 'लक्ष्मणा वेगाने धावत ये' अशी हाक मारावी. एवढे लाघव साधावे."

रावणाने मारीचाला मोठेपणा देत आपली योजना सांगून नंतर त्याला म्हटले, "मारीचा तू माझा मंत्री आहेस. तुझी थोरवी मी जाणतो. तू मला साहाय्यकारी झालास म्हणजे मी चराचरात विजयी ठरेन. सीताहरणाविषयी मी अत्यंत उत्सुक आहे. ही माझी इच्छा पुरवण्यास तू समर्थ आहेस. माझे मनोरथ पुरवून कृतकार्य साधावे. तू साहाय्य केलेस तर सर्व देव, दानव, दैत्यगण यांना मी रावण जिंकू शकेन; मग त्या बापुड्या रामाची काय गोष्ट. तू राम-लक्ष्मणांना पर्णकुटी सोडायला लावलेस म्हणजे मागे मी सीताहरण करीन. मला नको कोण म्हणणार? राहू जसा चंद्रकला ग्रासतो तसा मी जनकबाळीला हरण करीन. मारीचाचे साहाय्य झाले तर मी काळिकाळाला आटोपणार नाही." रावणाच्या बोलण्यात श्रीरामाचे नाव आले ते ऐकून मारीचाला बोलता येईना, तो दचकला आणि त्याला अनिवार भय वाटले.

मारीचाची प्रतिक्रिया

श्रीरामाचे नाव ऐकताच मारीच दचकला. त्याची वाचा बंद झाली. अनिवार भीतीने त्याला ग्रासले. श्रीराम वनात आला आहे हे समजल्यावर मारीचाचे मन भ्रांत झाले, त्याच्या तोंडचे पाणी पळाले. तो मूर्च्छित झाला. रघुनाथाचे नाव ऐकताच मारीच मरणावस्थेत गेला, याचे लंकानाथाला आश्चर्य वाटले. 'मारीच हा महावीर, शूर, रणरंगधीर असा रणातला झुंजार योद्धा आणि अत्यंत विचारी आहे. जेव्हा भय निर्माण होते तेव्हा मला मारीचाचा आधार वाटत असे. याच्याच बळावर मी चराचर आणि सुरासुर जिंकले. कोणतेही अवघड कार्य असले तर समूळ अर्थ पाहून त्यातले गूढ उकलणारा आणि निधड्या छातीचा दृढ योद्धा असणारा प्रौढ विचारांचा असा हा मारीच आहे. अशा मारीचाला नुसते रामनाम ऐकताच ही मरणावस्था, भयग्रस्तता का आली?" कानाने रघुनंदनाचे नाव ऐकताच त्या मारीचाची चेतना गेली, प्रेतासारखे निर्जिव मुख झाले, श्वास जड झाला, एखाद्या जड पाषाणाप्रमाणे मारीच पडला होता. रावणाने स्वतः मारीचाला सावध करून विचारले, "घाव नाही, आघात नाही, नुसते रामाचे नाव ऐकून तुझी अशी मरणप्राय अवस्था का झाली?"

मारीच सावध झाल्यावर त्याने रावणाला लोटांगण घालून सांगितले, "श्रीरामाच्या विरोधात आपण काहीही करू नये. श्रीराम क्षोभला तर तुमचे सहपरिवार, सप्रधान, ससैन्य निर्दाळण करील. त्रिशिरा, खर, दूषण आणि चौदा सहस्र राक्षसगणांप्रमाणे तो बाणांनी तुमचाही नाश करील.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

त्याचा बाण सुटल्यावर त्याचे निवारण तुमच्यापैकी कोण करील? क्षणात तो संपूर्ण राक्षसकुळाचे निर्दाळण करील. तुमच्या सद्बुद्धीचे कोणा क्रूराने हरण केले आहे की ज्यामुळे आपण रामपत्नीचे हरण करायला निघाला आहात? ते आपणाकडून होणार कसे? शेषाच्या मस्तकावरील मणी कोणी आणू शकेल काय? त्याप्रमाणे श्रीरामापासून सीता आमच्याकडून कशी काढून आणली जाईल? जशी सूर्याची प्रभा त्याच्यापासून दूर करणे महाबळीलाही शक्य नाही, तशी रामावेगळी जानकी करताच येणार नाही. ज्याप्रमाणे आकाशापासून त्याची निळाई दूर करता येत नाही, त्याप्रमाणे सीतेला श्रीरामापासून वेगळी करणे अशक्य आहे. त्यातून आपण सीताहरण केलेच तर तुमचे-आमचे मरण ओढवेल आणि पूर्ण कुळाचाही नाश होईल हे आपण लक्षात घ्या. आधी नकटी होऊन जसा ससैन्य खराचा युद्धात तिने नाश केला, तशी त्या मूढ शूर्पणखेची बुद्धी ऐकून निश्चित तुम्हीही प्राणाला मुकाल. सहस्त्रार्जुनाने गर्वाने ऋषींची कामधेनू हरण करताच, परशुरामाने त्याचा ससैन्य संहार केला. परस्त्रीचे हरण केले तर आमचेही मरण निश्चित आहे." असे सांगून मारीचाने रावणाचे पाय धरले.

मारीचाचे सर्व भाषण ऐकल्यावर रावण अतिशय संतापला आणि मारीचाला म्हणाला, "अरे, दोन वनवासी माणसे, त्यांच्याजवळ नाही सैन्यसामग्री आणि त्यांचे भय तू मला घालतो आहेस तेव्हा तू निश्चित नपुंसक झाला असणार. तू तर पूर्ण बलवान होतास तो तुझा पुरुषार्थ काय झाला? नुसते रामाचे नाव घेतले की कंपायमान कसा होतोस? मी रावण आहे. माझ्याकडून ग्रह आणि सुरवर बंदीत घातले गेले; मग तो राम बापडा काय करणार आहे. त्याची कसली भीती घालतोस? अरे मी अनेक थोर थोर योद्धे जिंकले आहेत तर त्या रामाची काय योग्यता आहे. मला निशाचराला तो केवळ पोर वाटतो. तू पूर्ण धीर धरून मारीचा मला साहाय्य कर." रावणाचे हे बोलणे ऐकून दुर्मुखलेला मारीच हास्यवदन झाला.

"रावणा, गर्वाभिमान धरू नको. माझा पूर्वीचा अनुभव सांगतो तो नीट ऐक. पूर्वी मीही तुझ्याचसारखा बळाचा अभिमान बाळगत होतो. मीही रामाला एक पोर समजून त्याचा घात करायला गेलो होतो. माझ्या ठायी दहा हजार हत्तींचे बळ आहे, रामाला गिळून टाकीन आणि नंतर विश्वामित्रादी सर्व ऋषी मारून खाईन, अशी हाव धरून आश्रमाकडे धाव घेतली. तेव्हा तो निःशंक धनुर्धर राम अनिवार बाणकौशल्य दाखवू लागला. सुबाहू, मी आणि आमच्याबरोबरचे निधडे राक्षसवीर या सर्वांवर रामाचे दुर्धर बाण सुटले. क्रूर राक्षसांना पाहूनही श्रीराम डळमळला नाही. त्याने बाणांचा महापूर आमच्यावर सोडून वीर बंदिस्त केले. माझ्या मुद्गलाचे कूट झाले, सुबाहूच्या ढालीचे पीठ झाले, वीर रणात पडले असा तो राम योद्धा वीर आहे. त्याने सोडलेला त्रिधारेचा बाण मी खड्गाने तोडला, तेव्हा त्याच्या टोकाने सुबाहू मारला आणि मला पिसारा लागला. त्या ब्रह्मांडी लागलेल्या पिसाऱ्याने माझ्या डोळ्यांवर झापड आली. माझ्या नाकातोंडातून रक्त वाहू लागले, त्याने भोवळ येऊन हातापायाची मुरकुंडी वळली. त्या घावाने मला आकाशात उडवले आणि शंभर योजने दूर समुद्रतीरावर मी मूर्च्छित होऊन पडलो. मी विस्फारलेले डोळे, गळ्यातली घरघर, धाकाने धुकधुकणारे पोट अशा प्राणसंकटात होतो. माझे डोळे अर्धवट उघडले, प्राण क्षीण झाला, शरीर अचेतन झाले. बाणाच्या अर्ध्या खंडानेच मला मरणाच्या जवळ नेले. जो आयुष्याचा भाग शिल्लक होता, तेवढ्याने मी सावध झालो; परंतु माझा पराक्रम घावाने गेला होता, धैर्य पूर्णपणे पळाले होते. रामबाणाची भीती एवढी मोठी होती की रावणा, मला चराचरामध्ये श्रीरामच दिसू लागला.

"वल्कले आणि जटामुकुट धारण केलेला, धनुर्धर आणि प्रलयरुद्रासारखा मारक, असा श्रीराम मला झाडाझाडात दिसू लागला. भयभीत आणि आश्चर्यदृष्टीने मला बाणाचा धाक वाटून

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

सर्वत्र सारखे कोट्यवधी रामच दिसू लागले. सर्व सृष्टी राममय झाल्याचे मला जाणवले. वनामधले पक्षी, प्राणी यांची हालचाल झाली की रामच आला म्हणून मी दचकत असे. जे जे लहान-मोठे, ते ते मला धगधगीत रामस्वरूप दिसू लागले. वृक्षांची दाटी पाहिली की रामच दिसे. पोटातल्या भीतीने गजबजून जाऊन मला रामाने पाठ पुरविली असे झाले. स्वप्नात सुद्धा रामच येई. श्रीरामाच्या बाणाच्या पिसाऱ्यानेच एवढी भीती वाटू लागली. तर आता श्रीरामाला विरोध केल्यावर मी काही राक्षस उरणार नाही. ज्या रामाचा एवढा धाक माझ्या मनात आहे, त्या मला रामापाशी धाडता आहात. तेव्हा मी त्याला पाहताच हे रावणा, माझा प्राणच जाईल. अहो, रकाराचे नुसते वर्ण ऐकले तरी मी कापतो, श्रीरामनामाचा उच्चार माझा थरकाप उडवतो."

"लंकाधीश रावणा, पूर्वी रामबाणाच्या अर्ध्याने, माझ्या दैवगुणामुळे मी वाचलो. आता त्याच्यापाशी गेलो तर तो मला जिवंत ठेवणार नाही. मागे त्याने बाण सोडला तेव्हा त्याचे बाळपण होते. आता तर त्याचे तारुण्य आहे. त्याच्या घावाने प्राणच जाईल. श्रीरघुनाथाला पाहताच माझे जीवित्व संपेल. मी तिथे कदापी ज़ाणार नाही हे माझे वचन त्रिवार सत्य आहे."

रावणाकडून प्रलोभन,. नंतर धाक

मारीच पूर्ववृत्त सांगता सांगता ओक्साबोक्सी रडू लागला. तेव्हा रावणाने त्याला पोटाशी धरून त्याचे सांत्वन करताना म्हटले, "मारीचा, अरे मनुष्य आपले खाद्य आहे; त्याला काय भितोस. हे पाहा. मला सीता मिळाली तर मी तुला अर्धे राज्य देईन. जसा माझा ज्येष्ठ पुत्र, त्याहून मी तुला मोठा राज्याधिकार देईन. छत्र, चामर, सैन्यसंभार, हत्ती, घोडे सर्व काही देईन. रामभयाचा धसका सोड, निधडा आणि नि:शंक होऊन मला साहाय्य कर. मी अर्धे राज्य देण्याची शपथ घेतो ती ऐक."

हे रावणाचे प्रलोभन ऐकून मारीच त्याला म्हणाला, "अहो मेलेल्याच्या मागे पिंडदान केले तर निदान कावळे-कुत्रे तरी ते खातात. श्रीरामाने माझा प्राण घेतला तर नंतर राज्य कोण भोगील? रावणा, तुझी बुद्धी पाहून मला वाटते श्रीराम आपल्या बाणांनी ना रावण ना मारीच असे करील. संपूर्ण राक्षसकुळाचा संहार होईल. त्या नकट्या शूर्पणखेची दुर्बुद्धी ऐकून तुझी बुद्धी भ्रष्ट झाली आहे. दुसऱ्याची पत्नी पळविण्याचा प्रयत्न करणारा निश्चित महामूर्ख असतो. त्या नकटीचे तोंड पाहिले की निश्चित तत्काळ बुद्धीत पालट होतो. तसाच तू शठ, नष्ट, महापापी आणि स्त्रीलंपट झाला आहेस. असे पाहा, त्या नकटीचे दर्शन झाले आणि खरादी सर्व संपले. आता ती तुझे निर्दाळण करायला टपली आहे. शिवाय स्वयंवरात सीतेला वरण्यासाठी तू स्वार्थाने ते धनुष्य उचलायला गेलास; तुला ते उचलता आले नाही. तेच धनुष्य रामाने उचलून भंगले. तेव्हा तुझा पराक्रम, पुरुषार्थ काय झाला होता. त्या वेळीच सीताहरण का केले नाहीस. त्या सभेत तुझे तोंड काळे झाले आणि ते घेऊन तू पळून गेलास. तू विराधाला भिऊन पळतोस; पण त्याच विराधाला रामाने क्षणभरात मारला. तेव्हा रामापुढे तू रावण बापडा म्हणजे एक मशक ठरशील. शूर्पणखेची दुष्ट बुद्धी धरून रामाच्या सीतेचे हरण करायच्या कार्यात राम बाणाने तुझी दहा मस्तके छेदील आणि तू निश्चित मारला जाशील. हे पाहा, स्वामीची वासना पुरविणारे सहकारी अनेक मिळतील; परंतु यथार्थ धर्म आणि परमार्थ सांगणारा आप्त दुर्लभ असतो. ऐक बाबा लंकानाथा, मी यथार्थ तेच सांगितले आहे. ते जर तुझ्या चित्ताला मानवत नसेल तर माझा विचार ऐक. श्रीरामदर्शन होताच माझा प्राण तत्काळ जाईल. तेव्हा मी काही तेथे येणार नाही. तशी मी शपथच वाहतो."

मारीचाचे बोलणे ऐकून रावणाला संताप आला. "श्रीराम तुझा प्राण घेईल, तर मी मारताना

https://archive.org/details/@bhavarth_ramayan Bhuvan Vani Trust, Lucknow

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

तुला कोण राखायला येणार आहे?'' रावणाने वर्मातच खोचून सांगितले, ''तुझे निर्दाळण माझ्याकडूनच होणार, सेवकाकडून राजाच्या आज्ञेचा भंग आणि उल्लंघन केले गेले तर राजाने त्याचे निःसंशय हनन करावे. सेवक स्वामीचे वचन मोडतो, त्यासाठी शास्त्रविधीविधान म्हणजेच सेवकाचे हनन करणे. तेव्हा मारीचा हे जाणून घे की तुझे मरण माझ्याकडूनच होणार आहे. श्रीराम हा माणूस, दरिद्री तापसी आहे, त्याचे भय मला दाखवतोस. अरे, मी त्याला एका घासात गिळीन. त्या लक्ष्मणालाही त्याच घासात गिळीन. हा रावण एकदा क्षोभला की त्या धाकानेच ते राम-लक्ष्मण नमतील. मग मी प्रतापाने सीतेचे हरण करीन.

रामाकडून मरणे मारीचाला मान्य

मारीचाने विचार केला की, 'आपण पंचवटीत गेलो तर श्रीराम अवश्य वध करील. जर तिथे गेलो नाही तर लंकानाथ मारील. रावणाच्या हातून मरण म्हणजे आपले अधःपतन; उलट श्रीरामाचा बाण लागला तर ते कल्याणप्रद ठरते. श्रीरामाच्या दुर्धर बाणाच्या घावाने जन्ममरण टळेल. ज्याला तो बाण लागतो तो सुखसंपन्न आणि कृतकल्याण होतो.' असा चित्तात विचार आणून मारीचाने रावणाला म्हटले, ''अहो लंकानाथा, श्रीरामाच्या भयाची वार्ता मी केली ती केवळ आपला पुरुषार्थ पाहावा म्हणून बोलल्लो. श्रीरामाशी युद्ध करायला तू कितपत समर्थ आहेस हे मी पाहिले आणि माझी खात्री पटली की तू अत्यंत पराक्रमी आहेस. तेव्हा मी तुला पूर्ण साहाय्य करीन. सीतेचे हरण करणाच्या कार्यात प्रसंगी प्राण देईन. मृगवेषात वैभवाने जाऊन निमिषात सीतेला भुलवीन.'' हे मारीचाचे कथन ऐकून रावण सुखावला. त्याने मारीचाला आलिंगन देऊन स्वतःच्या गळ्यातला हार मारीचाच्या कंठात घातला. नंतर दोघांनी थोडावेळ गुपित गोष्टी केल्या आणि रथात बसून पंचवटीत येऊन पोचले. श्रीरामाच्या निवासाकडे जाताना, त्यांनी रथ, सारथी दूर ठेवले. ते दोघे पायीच वनात आले.

''मारीचा, आता आपले कार्य साधावे. विलासी जनांना आवडेल असे मृगाचे रूप धारण करून, त्वरित सीतेला प्रलोभन वाटेल असे करून श्रीरामाला दूर ने. त्याबरोबर सौमित्रबंधूही ने. श्रीरामबाण येतो आहे असे पाहताच अदृश्य हो. तोवर मी सीताहरण करतो. मग आपण दोघे लंकेला जाऊ.'' अशी आपली इच्छा व्यक्त करून रावणाने मारीचाची पाठ थोपटली. अत्यंत प्रेमाने ते दोघे पंचवटीत आले.

अध्याय चौदावा

श्रीरामाचा आश्रम रावणाने स्वतः पाहिला. श्रीरामाने कोट्यवधी राक्षसांचा संहार केला आहे हे आठवून तो मनात दचकला. राक्षसांची असंख्य शवे तुकडे होऊन पडलेली पाहून मारीच मनातून हबकला. तो भयभीत होऊन डोके खाजवू लागला. आधीच मारीच श्रीरामाची भीती बाळगून होता; त्यात राक्षससंहार पाहिल्यावर तो चळचळा कापू लागला. त्याची निश्चिती झाली की श्रीराम हा राक्षसांचा अंत करणारा आहे. तेव्हा राक्षसांचा संहार पाहून रावणाने स्वतः मारीचाचा सन्मान करून त्याचे पाय धरले. त्याने मारीचाला सांगितले की स्वामी-सेवक भाव विसरून, सीताहरण हेच निर्वाणीचे कार्य समजून, कृपा करून हे जानकीहरण साधावे. ज्यासाठी आपले आगमन झाले आहे ते कार्य साधावे. मायावी मृगमोहन दाखवून सीताहरण मला करू द्यावे.

मारीच हरिणाचे रूप घेतो. सीता भुलते

रावणाचे बोलणे ऐकून मारीचाला आपले मरण जवळ आले आहे हे जाणवले. श्रीरामाच्या बाणाने प्राण घेतला तर आपण धन्य होऊ. अखेरच्या क्षणी जो रामनामाचे स्मरण करतो तो स्वतः पूर्णब्रह्म होतो. श्रीरामाचा बाण लागला तर आपण कृतकार्य होऊ असे त्याला वाटले. रामाच्या

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

बाणाच्या आघाताने चारी मुक्ती दासी होतात; अनायासे ब्रह्मप्राप्ती होते. श्रीराममूर्ती पाहून हे श्रेय मिळते. असा चित्तात विचार आणून रावणाला सुख देण्यासाठी शेवटी मारीचाने आश्चर्यकारक असे मृगरूप धारण केले. ते पाहून रावणही आश्चर्य चकित झाला. सांडमांड न करता. फेडीवेडी न दाखविता मोहनीय अशी मृगशोभा पाहून रावणही भुलला.

मारीचाने मनोहर सुवर्णरंगी शरीर धारण केले. रोममूळ रत्नबिंदूंनी चमकणारे, पाठ मोत्यांनी शोभिवंत झालेली; प्रवाळाच्या रंगाचे आरक्त खूर असलेले, असे ते हरीण होते. मरकतमणी भासणारे सांधे, पाचूचे बिंदू उमटले असे वाटणारे कान, इंद्रनील शिंगे मुरडलेल्या जागी रत्ने, आरक्त नेत्र, तांबडी जीभ, उभे राहण्याच्या प्रकारातली ऐट यांमुळे त्या मृगाची शोभा वाढली होती. शिंगांच्या टोकावर मणी चमकत होते, सिंदूराकृती शेपूट तळपत होते, हंसाप्रमाणे शुभ्र पोटाचा रंग अशा चित्रविचित्र शरीराचा तो मृग होता. त्या मृगाच्या प्रगल्भ तेजाने रविचंद्रांची प्रभा लोपत होती, सोलीव लावण्याचा गाभा असा तो मृग शोभत होता. असा तो मृग घाबरत, बिचकत, चपळपणे इकडे तिकडे पाहात, मधेच चरत, मधेच उड्या मारत रामाच्या आश्रमात आला.

पंचवटीत प्रवेश करून, सीता आणि राम यांचे आपल्याकडे लक्ष जाईल अशा रीतीने तो मृग त्यांच्या आसपास फिरत होता. रामापासून दूर उड्या मारत आणि सीतेच्या जवळ जात मृगाने आपले सुंदर सर्वांग तिला दाखविले. सीता त्या मृगाच्या मोहात पडली. मृगाचे विविध अवयव पाहून सीतेला सुख वाटले. मृगाच्या अभिनव दर्शनाने सीता त्या मृगावर जीव जडवून बसली. या प्रकारचे सीतेचे भाव निर्माण होत असताना मृग तिच्या अधिकच जवळ गेला. त्याला आपले सर्वांग सीतेला दाखवायचे होते. सीतेनेही त्या मृगाचे सर्वांग न्याहाळून, त्याला कुरवाळून, त्याच्या कोवळ्या शरीरावरील मऊ केसात हात फिरवून आपले मन तृप्त करून घेतले. त्या मृगाची शोभा पाहून स्वर्गातल्या देवांनाही भ्रांत पडली. हा महा अद्‌भुत मृग कुठला, कोणाचा, इथे कसा आला या विचारात ते पडले. ऋषीवर चित्तवृत्ती स्तब्ध करून, टकमका पाहात राहिले. मृगाचे दर्शन होताच आणि स्पर्शसुख अनुभवताच सीतेची दृष्टी त्यावर आकर्षित झाली, त्याच्या सौंदर्याने तिचे मन वेधले, ती मृगाचे ध्यान करू लागली.

सीता अत्यंत आनंदाने श्रीरामाला आणि लक्ष्मणाला आपल्या भावना सांगू लागली. "काय या मृगसौंदर्याची शोभा आहे, सोन्यासारखे शरीर, रत्नांच्या ओळीच असे त्याचे केस, हे पाहून वाटते वनात हिंडून, कोट्यानुकोटी मृग पाहूनही, असा मृग भेटणार नाही. मला तर वाटते सर्व सृष्टीत असा दुसरा मृग नसेल. हा ब्रह्मदेवाने निर्मिलेला नाही. कर्मजन्य असाही तो नसावा, निखळ लावण्याचा गाभा दैवानेच माझ्यासाठी निर्माण केला असावा." असे बोलून सीतेने अती आदराने श्रीरामाला म्हटले, "जे अपूर्व दान मला मागायचे आहे ते आपण मला द्या. आपण उदार चक्रवर्ती आहात. मी अत्यंत प्रेमाने मागते आहे ते आपण मला द्यावे. कृपामूर्ती श्रीरामाकडे सलज्ज दृष्टीने पाहात म्हणाली, "या मृगाची त्वचा अत्यंत कोवळी आहे. सुवर्ण, रत्ने, मोती यांनी ती सुशोभित आहे. मी परत अयोध्येत प्रवेश करीन तेव्हा याची काचोळी करीन. आता अयोध्येत प्रवेश करायला केवळ सहा महिनेच उरले आहेत. तेव्हा कंचुकीची ही इच्छा पुरवण्याबाबत आपण उदासीन होऊ नये. दिव्य अलंकार आणि भूषणे याहीपेक्षा या मृगाची त्वचा अधिक सुंदर आहे. तिच्यापुढे नवरत्ने ही काजव्यासारखी वाटतात." हे सीतेचे मनोगत आणि मृगाचे हृद्‌गत जाणून श्रीराम संतुष्ट झाला. पुढे असणारे कर्तव्य आणि त्याचा अर्थ लक्षात घेऊन श्रीराम लक्ष्मणाशी त्याबाबत संवाद करू लागला.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Muthulakshmi Research Academy / Sarayu Foundation Trust and eGangotri

सीतेची हौस पुरवण्यास श्रीरामाची सिद्धता

श्रीराम सौमित्राला म्हणाला, "लक्ष्मणा, हा मृग किती सुंदर आहे. त्याचा ठाणमाण किती गंभीर आहे. सुवर्णशरीर रत्नांकित असलेला, असा हा मृग पूर्वी नंदनवनात, चित्ररथवनात किंवा त्रिभुवनात कुठेही आढळात आला नाही. अष्ट दिशा वनसंचार करूनही असा मृग कधी दिसला नाही. या लावण्यमृगाच्या कसोटीला उतरेल असा मृग कुठेच दिसला नाही. आता या मृगाच्या त्वचेची काचोळी करावी, असे मोठ्या प्रेमाने जानकीने मागितले आहे. अयोध्याप्रवेशाच्या वेळी ती काचोळी तिला घालायची आहे. मला जे अपूर्व करायचे आहे त्यात सीतेने मागितलेले न देणे ही लाजिरवाणी गोष्ट आहे. कातड्यासाठी मृग मारायला हवा." श्रीराम सीतेची मागणी पूर्ण करण्यासाठी, मृगाचा वध करण्यासाठी, मुठीत हेमाभरणी धनुष्य आणि पाठीवरच्या भात्यात बाण घेऊन निघाला. श्रीराम धनुष्याला दोरी आणि दोरीला बाण लावून मृगाचा पाठलाग करत निघाला. श्रीराम लक्ष्मणाला जाताना म्हणाला, "लक्ष्मणा ऐक, एका बाणाने मृग मारीन. सीतेच्या सुखासाठी शोभिवंत मृगचर्म आणीन. तिला मृगचर्म मिळाले की ती परम सुखी होईल. तिचे मनोगत असे आहे की, ते मृगचर्म दोघात विभागू. अर्ध्या कातड्याची कंचुकी आणि अर्ध्या कातड्याचे मला आसन असे करून अयोध्याप्रवेशाच्या वेळी दोघेही शोभायमान होऊ. सीतेची इच्छा मृगचर्माचे दोन भाग करून कंचुकी आणि आसन करावे अशी आहे. पतीने पत्नीची वंचना करू नये. उत्तम अन्न, उत्तम पक्वान्न, वस्त्रे, अलंकार, भूषणे ही पतीशिवाय कोणाकडून घेतली तर ती स्त्री वेश्याच ठरेल. असो. तर ही झाली सीतेची इच्छा; आता मी काय सांगतो ते अत्यंत लक्षपूर्वक ऐक."

"सौमित्रा, मी मृग मारून परत येईपर्यंत तिळभरही कुठे जाऊ नको. मृगाला मी निश्चित मारीन. त्रैलोक्यातले सर्व दैत्य जरी एकत्र झाले; तरी मी मागे हटणार नाही; यात कुठलाही संशय नाही. आपले राक्षसांशी हाडवैर निर्माण झाले आहे तेव्हा तू असावध राहू नकोस. शस्त्रास्त्रांनी सज्ज राहावे. सीतेचे सावधपणे रक्षण कर." यानंतर श्रीरामाने लक्ष्मणाच्या कानात गुपित सांगितले की, "या वनात मायावी राक्षस आहेत. ते सीतेला छळाने पळवून नेतील. तेव्हा सावधान राहून तिचे रक्षण कर. मृगाला मारून मी जोवर येत नाही तोवर तू येथून तिळभरही दूर होऊ नकोस. अगदी जिवावरचे संकट आले तरी धीर धरून ते सहन कर. माझ्याविषयी तू कसलीही चिंता करू नकोस. मी पुनःपुन्हा सीतेचे रक्षण कर हे सांगतो आहे. अत्यंत मोठे संकट जरी दृष्टीसमोर आले तरीही पर्णकुटी सोडू नकोस. सीतेचे रक्षण कर. ही गुह्य गोष्ट मी तुला सांगतो आहे. तुझ्या दृष्टीपुढे राक्षसांचे समूह आले तरी स्वतःच्या प्रौढीने युद्धाला लगेच जाऊ नकोस. कारण तेवढ्यात ते सीतेला सरळ पळवून नेतील. तुला संग्रामात गोवून ते सीता नेतील. तू सीतेपासून दूर होताच हे घडेल म्हणून तुला निश्चयाने हे सांगतो आहे. तू संग्रामामधे पुढे जाशील, तुला सीतेची आठवण राहणार नाही. तेव्हा सीता पर्णकुटीत एकटी आहे हे पाहून कपटी राक्षस तिचे हरण करतील. मी तुला ज्या ज्या युक्त्या सांगितल्या त्या चित्तात दृढ ठेव. नाना प्रकारे युक्तीने सीता रक्षावी." श्रीराम एवढे बोलून त्वरेने मृगाच्या दिशेने निघाला आणि पुन्हा परतून 'सीतेचे रक्षण कर' असे सांगून मगच पुढे मृगावर लक्ष ठेवत गेला.

मारीच रामाला झुलवत दूर नेतो

मृगावर नेम धरून राम वारंवार दिशा बदलत चालला होता. धनुष्यबाणाचा स्वीकार करून श्रीराम मृगाच्या वधासाठी आवेशाने निघाला; परंतु श्रीरामाच्या हातातले धनुष्य पाहून मृगाने उसळी घेतली आणि चकित दृष्टी करून तो पंचवटीच्या बाहेर लगबगीने पळू लागला. जिथे

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and Academy

शूर्पणखेचे नाक कापले गेले तिथे मृगाचे आगमन झाले. श्रीराम येत असल्याचे पाहून मृगाने तेथून पलायन केले. राम येताना दूरवरून दिसला की मृग आपली पाठ चाटत उभा राही. त्या गंगातीरावरच्या ठिकाणाला म्हणूनच चाटोरी हे नाव पडले. श्रीरामाचा मुखचंद्र पाहात मृग उभा राही त्या स्थळाला चांदोरी नाव आहे. श्रीरामाला खूप दूर न्यावा म्हणून तो मृग वेगाने वेगवेगळ्या ठिकाणांकडून जात राहिला. श्रीरामाला डावी हुलकावणी देत मृग मध्यमेश्वराकडे उड्या मारत गेला. पंचवटीपासून रामाला दूर नेताना मृग गंगेच्या काठाने जात होता आणि राम पाठोपाठ धावत होता. यावेळी रामाने धनुष्य सज्ज ठेवले होते. मृग मधेच कुठे दृष्टीला पडे, लगेच कुठे दृष्टीआड होई. श्रीराम मृगाची पाठ सोडत नव्हता. दृढपणे धनुष्यबाण त्याने सज्ज ठेवला होता. मृगाचे दिसणे, न दिसणे, कधी मृगस्वभावाप्रमाणे मुरडणे, उड्या मारणे चालू होते. राम आवेशाने त्याच्या मागे सपिच्छ बाण घेऊन, त्याला मारण्यासाठी धावत होता. श्रीरामाचा बाण पाहून मृग वेगाने ठिकाणे बदलत होता. त्याने ठाण केलेल्या ठिकाणांना तशीच नावे पडली. पहिले कुंकुमठाण, मातुळठाण, नागठाण, बादामठाण आणि पाचवे भौमठाण अशी मृगाने ठिकाणे बदलली. मृगाचे पाप रामाकडून छेदले गेले तो छिन्नपात देहगाव, रामाने मृगाचा घोटा विंधून पाडला तो नेऊरगाव. भाल जिव्हारी भेदले तो गंगेच्या तीरावरचा भाळगाव. त्यावेळी मृग मोठ्या आवाजात 'लक्ष्मणा लवकर धाव' असे ओरडला.

मारीचाची लक्ष्मणाला हाक, नंतर मृत्यू

श्रीरामाचा बाण लागताच सात ताड उंच उडून मारीचाने प्राण सोडताना लक्ष्मणाला श्रीरामाच्या आवाजात दीर्घ स्वरात हाक मारली. मारीच हा महा मायावी होता, त्यामुळे त्याला रामासारखा आवाज काढणे जमले. तो आक्रंदून, दीन स्वरात म्हणाला, "लक्ष्मणा लवकर ये, धाव. राक्षससमुदायाने मला रणात प्रतिबंधाने जखडले आहे. हे महाबाहो, त्वरा कर, धावून ये. तू तर माझा सखा, रणभूमीतला पाठिराखा आहेस. अरेरे, राक्षसांनी मारले रे, रणात मुक्तता कर." अशा युक्तीने लक्ष्मणाला बोलावून, मृगरूपातला मारीच मूळ राक्षसरूपात आला. तेव्हा त्याचा रामाच्या बाणाने प्राण घेतला. मृगदेह, राक्षसदेह, हे स्थूळलिंगकारणदेह श्रीरामाने निःसंदेह छेदले. मारीचाला मारले. जन्मासहित मारले. देही विदेही घात केला. समस्त माया मारून, बाणाने मारीचाला अत्यंत सुखी केले. श्रीरामाचा बाण ज्याला लागतो तो भाग्यवान ठरतो. बाण नव्हे तो आनंदघन रामामुळे सुखसंपन्न होतो. स्थूल देहाला छेदणारे योद्धे पुष्कळ असतात. श्रीराम हा असा योद्धा आहे की जो जीवांच्या जीवपणाचाच घात करतो. भयाभय, शोक, द्वंद्वदुःख छेदून मारीचाला श्रीरामाने महासुख दिले. श्रीराम हा स्वतः सुखाचे सुखच आहे. मारीचाची इच्छा होती की रामबाणाने सुख मिळवावे, त्याप्रमाणे रामाने ते त्याला दिले. कारण, रामाला शत्रू, सेवक दोघेही समानच असतात. जे सुख सनकादिक भोगतात, तेच सुख मारीचाला रामाने दिले. असा तो रघुकुळटिळक, कृपाळू, संग्रामात सुखदायक आहे. अशाप्रकारे रामाने बाणाने वेधून मारीचाला मारला.

मारीचाच्या हाकेने श्रीराम साशंक

मारीचाने 'धाव रे लक्ष्मणा' अशी आक्रंदून दिलेली हाक एवढी दीर्घस्वरातली होती की तिन्ही लोक दुमदुमले. त्यामुळे सौमित्र ती हाक ऐकून अवश्य धावून येईल आणि लक्ष्मण धावून आला तर दारुण अनर्थ होईल. रावण येऊन सीतेचे हरण करील. जर तत्त्वतः लक्ष्मण न येईल तर सीता त्याला तेथे राहू देणार नाही. भयंकर बोल लावेल आणि अत्यंत त्रास देऊन त्याला धाडील. ह्या मायावी मृगाने कल्पनातीत कौशल्य योजून लक्ष्मणाला इकडे धावायला लावून, तिकडे सीताहरण साधले असावे. असे राक्षसी मायेचे कृत्य रामाने पूर्णपणे जाणले आणि विलंब न करता

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

त्वरित येथून परतावे असे ठरविले. जोंवर लक्ष्मण आला नाही, तोवर तेथे जावे. विलंब केला तर रावण सीताहरण करील. लक्ष्मण तडकाफडकी धाव घेणार नाही तेव्हा लगेच पंचवटी गाठावी असा विचार करून राम तातडीने निघाला.

अध्याय पंधरावा

मारीचाने आक्रंदून लक्ष्मणाला मारलेली हाक ऐकून सीता रडू लागली. कारण, ती हाक श्रीरामाच्या स्वरासमान होती. श्रीराम रणरंगधीर; विकट दारुण योद्धा असूनही दीनवाणे आक्रंदन करत लक्ष्मणाला हाक दिली, यावरून तो संकटात सापडला असणार हे सीतेने निश्चित मानले. श्रीरामाचे ते दीनवाणे आक्रंदन ऐकूनही लक्ष्मण स्तब्धच कसा, त्याचे मन द्रवले कसे नाही?

सीता आणि लक्ष्मण यांच्यात मतभेद

सीता लक्ष्मणाला म्हणाली, "आज तू असा निष्ठुर कसा झाला आहेस? राक्षसांनी श्रीरामाला प्रतिबंध केला असताना तूं त्याच्याकडे धाव कशी घेत नाहीस? तू रामाचा जिवलग सखा, बंधू, रणांगणातला पाठिराखा, असे असून त्याच्या हाका ऐकूनही तू त्याच्याकडे धाव घेत नाहीस. जसा व्याधिग्रस्त सिंह वनात वानरांकडून वेढला जावा तसा श्रीराम वनामधे राक्षसांकडून वेढला गेला आहे. श्रीराम पूर्णत्वाने रणरंगधीर असून तोही आक्रंदून शरण आला आहे. शरणागताचे रक्षण तू स्वतः कसा करत नाहीस." एवढे बोलून सीतेने लक्ष्मणाच्या पायावर डोके ठेवून "श्रीराम अत्यंत आकांत करतो आहे तेव्हा तू तत्त्वतः त्वरित धाव घे." अशी त्याची विनवणी केली.

सीतेचे हे बोलणे ऐकून घेतल्यावर लक्ष्मणाने तिला साष्टांग नमन करून सांगितले, "माते, रघुनंदनाचा स्वतःचा महिमा सावधानतेने ऐक. श्रीरामाच्या बाणाने सुरवर, नर, किन्नर, दानव, मानव, निशाचर, यक्ष, राक्षस, विद्याधर सत्वर पळून जातात. रामबाणाने पिशाच, गुह्यक, गंधर्ववीर, त्रैलोक्यातले सर्व निधडे वीर, पक्षी, विषारी सर्प हेही सत्वर पळवून लावले जातात. ब्रह्मदेवादी श्रेष्ठ देव श्रीरामाच्या बाणापुढे कांपतात; पिनाकपाणी श्रीशंकर तोही श्रीरामासमोर येऊ शकत नाही. श्रीरामाचा बाण पाहून शंकर लोटांगण घालतो. त्या श्रीरामाला कोण मारील. तू व्यर्थ रडतेस कशाला? तुझ्यादेखत श्रीरामाने खर, त्रिशिरा आणि चौदा सहस्र राक्षस मारले, त्या रामाला तो क्षुल्लक मृग कसा मारू शकेल? श्रीरामाच्या बाणाच्या नेटाने मेरुमंदार पर्वत फुटतात, कळिकाळाचे पोट बाणाच्या घावाने फाटते, ब्रह्मांड उकलते. अशा श्रीरामाला एकटा एक मृग बापडा कसा मारू शकेल. तू वृथा दुःख करते आहेस. श्रीरामाचा वध कोणालाही करणे शक्य होणार नाही. श्रीरामच सर्वांचा वध करील. तू कशाला आक्रंदून रडते आहेस. श्रीरामाला मृत्यू नाहीच. श्रीवसिष्ठांनी तेव्हाच हे वर्म सांगितले होते की राम अजरामर परब्रह्म आहे, हे तुला आठवत नसेल तर तू परम मूर्ख आहेस. रडण्याचा धर्म मिथ्या आहे. 'लक्ष्मणा धाव, सत्वर धाव घे' हा श्रीरामाचा स्वर नव्हे. राक्षसांच्या मायावी शक्तीने निघालेला तो स्वर तू सत्य मानते आहेस. आता माझे ऐक. मृग मारून लवकरच तुझा पती परत येईल. धीर धर जानकीमाते."

"राक्षसाच्या मायावी बोलावण्याने, तुला या वनात एकटीला सोडून मी श्रीरामाच्या साहाय्याला जाणार नाही हे माझे सत्यवचन आहे. श्रीरामाने जाताना मला वारंवार सांगितले आहे की जिवावर दुर्धर प्रसंग आला तरी सीता सुंदरीला सोडून जाऊ नकोस. हे तुझ्यासमोर मला त्याने नेमून दिले आहे. लक्ष्मणा 'माझ्याविषयी काही चिंता करू नये, सीता सावधपणे रक्षावी' असे तो सांगून गेला आहे. हे त्याने पुनःपुन्हा कानगोष्ट म्हणून सांगितले आहे की या वनात मायावी राक्षस आहेत. सीतेचे ते कपटाने हरण करतील म्हणून सावध राहून तिचे रक्षण करावे. आपला छळ करण्यासाठी कपटी

https://archive.org/details/muthulakshmiacademy
Bhavan Vani Trust, Lucknow

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

शूर्पणखा सुंदरीच्या रूपात आली होती. त्याप्रमाणेच राक्षस वेषांतराने येतील तेव्हा सीतेला तिळभरही दूर करू नको. श्रीरामाची अशी शिकवण असताना मी तुझ्या सांगण्याप्रमाणे कसे करू. तुला वनवासात एकटीला सोडून रामापाशी मी जाणार नाही. श्रीरामाचे वचन उल्लंघून, तुझ्या बोलण्याप्रमाणे मी गेलो आणि राक्षसांनी तुझे हरण केले तर मग माझे मरणच ओढवणार आहे.''

''आत्मबुद्धी हितकारक, श्रीसद्गुरूंची बुद्धी सुखाच्या राशी देणारी आणि परबुद्धी ही विनाशकारी असते, त्यातून स्त्रीबुद्धी ही प्रलयाचे मूळ असते. स्त्रीचे वचन ऐकून जमदग्नी निमाला, रेणूका घाव लागून धरणीवर पडली, तेव्हा क्षत्रियांना रणात मारण्यात आले. एकवीस वेळा क्षत्रियांचा वध होऊन धरित्री रक्ताच्या पुरात वाहिली. स्त्रीवाक्याची ही थोरवी की ज्यामुळे चराचरात आकांत झाला. तेव्हा स्त्रीवाक्याचा हा प्रकार हितोपदेशाने अनर्थ घडवतो, म्हणून तुला गुंफेमधे एकटीला सोडून मी तिळभरही दूर जाणार नाही. माझा भाव अत्यंत कठीण, मला श्रीरामाचे प्रेम नाही? तुला एकटीला सोडून मी रामाच्या शोधासाठी जाणार नाही. मला गुंफेबाहेर काढण्यासाठी राक्षस 'धाव धाव' म्हणतो, तो मायिक हाक मारतो, परंतु मी तुझ्यापासून दूर होणार नाही.'' असे लक्ष्मणाने म्हणताच सीता चौगुणा संतापली.

सीता स्त्रीत्वाची मर्यादा सोडून लक्ष्मणाला कठोर शब्दात बोलू लागली. ती म्हणाली, ''प्रत्यक्ष श्रीरामाची हाक ऐकून ती मायिक म्हणतोस, तेव्हा तू निष्टंक पापी आहेस, तुझ्या मनात माझ्या ठिकाणी अभिलाषा आहे. माझा लोभ मनात धरून, आमच्याबरोबर वनात आलास. त्या वेळी सेवकाचा भाव दाखविलास. श्रीरामाला राक्षसांनी वनात मारले म्हणजे तू मला तुझी पत्नी करू पाहतो आहेस. सावत्रांची अशीच बुद्धी असते. बंधूला बंधूच छळून मारतो. त्याची भोगसमृद्धी आपण भोगावी हीच तुझी दुष्टबुद्धी आहे. सावपणे चोरी करणाऱ्या विश्वासघातक्याची सोबत मिळावी तशी लक्ष्मणाने सेवा केली आणि नाना युक्त्यांनी श्रीरामाला मारून मला भोगायसाठी आपण राहिला. श्रीरामाची तू सेवा प्रबळ केलीस. त्या सेवेचे हेच फळ तुला हवे होते की जनकबाळीला आपली पत्नी करून सेवा सफल व्हावी. परस्त्रीची इच्छा धरणारा दुष्ट, सेवा करण्यासामागची लबाडी, आज मला तुझा भाव स्पष्ट कळला आहे. तू महानष्ट आणि पापी आहेस. श्रीराम जवळ असला की म्हणायचास जानकी माझी जननी आहे; आणि आता श्रीरामाला वनात राक्षसांनी मारला तर सीतेला पत्नी करू पाहतो आहेस. मी तर श्रीरामाचीच दासी आहे. परपुरुषाच्या मांडीला स्पर्शही करणार नाही. माझी अभिलाषा धरणारा तू-तुझे काळे तोंड जळो. तू माझा अभिलाषी असल्याने माझ्यापासून दूर जात नाहीस. तेव्हा मीच आता श्रीरामापाशी जाते आणि त्याला काय संकट आले ते पाहते.''

''लक्ष्मणा नीट ऐक, श्रीरामापासून मी वेगळी झाले तर गंगेमध्ये मग्न होईन किंवा अग्नीत प्रवेश करीन. मी विषप्राशन करीन, पर्वतावरून उडी घेईन, वृक्षाला टांगून घेऊन प्राण देईन. परंतु तुझ्याशी अंगसंग, विषयभोग करणार नाही. हे माझे बोलणे काहीही उणे न करता मी पूर्ण करीन. तू निःसंग विषयार्थी आहेस. श्रीरामाशिवाय अन्य कोणाचाही स्पर्श जिला होणार नाही अशी मी निश्चित भावाने श्रीरामाला भजते आहे.'' हे जानकीचे बोलणे वर्मावर घाव घालणारे, दुष्टपणाचे आहे असे पाहून सौमित्राने कानात बोटे घातली. स्वतः श्रीरामनाम उच्चारत तो उद्विग्न झाला. तिचे वाग्बाण त्याला सहन झाले नाहीत. त्याचे अंतःकरण खचून गेले. त्याला प्राणांतिक दुःख झाले. लक्ष्मणाला टाकून बोलल्यावर सीता रडू लागली. तिचा आक्रोश पाहून लक्ष्मण क्षोभाने स्तब्ध झाला.

लक्ष्मणाला न राहवून त्याने सीतेला उद्देशून म्हटले, ''खरोखर स्त्रीस्वभाव अत्यंत दुष्ट असतो.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

जो नऊ मास उदरात वाहते, जो सदा नरक मूत सोसतो, त्या मातेला पुत्र पारखा होतो. बंधूबंधूत तीच द्वेष निर्माण करते. तो द्वेष वाढविणे सत्यतः स्त्रीसंगाचा बडिवार कारण असतो. सुहृद त्यामुळे वेगळे होतात. मी जे बोललो ते त्रिवार सत्य आणि माझ्या निष्पाप भावनेतून निर्माण झालेले बोल होते. त्याचा संशय श्रीरामप्रतापावर घेऊन तू माझ्यावर निंदा लादते आहेस. हे महापाप आहे जानकी. स्त्रीची धर्मरूप मर्यादा सोडून स्त्रिया उच्छृंखल कशा होतात ते मी आज समक्ष डोळ्यांनी पाहिले आहे. जानकीच्या अभिलाषेने मी वागतो आहे काय, याला समस्त भूतमात्रे साक्षी आहेत. श्रीरामाच्या आज्ञेचे उल्लंघन माझ्याकडून व्हावे यासाठी मला अभिशापाने छळले आहे. तुला वनामध्ये एकटीला सोडून मी दूर होऊ नये ही श्रीरामाची आज्ञा शिरसावंद्य मानून मी पाळली तर त्यासाठी तू माझा नानापरींनी छळ केला आहेस. तू मला निष्कारण अभिशाप घातलास तेव्हा पाप तुला फळेल. श्रीराम तुला सद्रूपात भेटणार नाही. तू सहा मास संताप भोगशील. तू जननी, मी तुझे अपत्य हा माझा दृढ भाव आहे. तुझा वचनार्थ फळेल तर अत्यंत अनर्थ भोगशील.''

लक्ष्मणरेषा घालून लक्ष्मणाचे रामाकडे जाणे

''तू जननी, मी अपत्य हा सद्‌भाव माझ्या मनात आहे. मृगाचा वध करून श्रीराम भेटेल तेव्हा द्वंद्वबंधनातून मुक्तता होते. श्रीरामाने तुझ्या रक्षणाची आज्ञा केली त्यानुसार मी तुझ्याजवळ थांबलो. मी वनात गेलो तर राक्षस तुझे हरण करतील. नंतर श्रीरामाची तुझ्याशी दृष्टभेटही होणार नाही. विघ्नांच्या कोटी सोसल्यानंतरच श्रीरामाला तू दृष्टीने पाहू शकशील. तुला रक्षणरहित सोडून माझ्याने जाववत नाही. माझे संपूर्ण सत्त्व तुझे रक्षण करो.''

''तू माझी भावना जाणतही नाहीस आणि मानतही नाहीस. मला श्रीराम विचारील त्यासाठी तुझ्या रक्षणाची योजना करून मी जातो. श्रीरामाचा निजसखा, निर्विकल्प, शुद्ध, नेटका असेन तर ही माझी मर्यादा रेषा ब्रह्मादिकांनाही उल्लंघता येणार नाही. कळिकाळालाही ती अटकाव करील. तिथे त्या क्षुद्र राक्षसांना ते कसे आवाक्यात आणवेल. राक्षसांना हरण करवणार नाही असे हे आत्मरक्षण ठेवतो आहे. कृपा करून तू माझे एवढे बंधन पाळावेस; या रेषेचे उल्लंघन करू नकोस. योगी, संन्यासी, तापसवेषातले, भिकेच्या निमित्ताने आश्रमाकडे येतील, त्यांच्यावर विश्वास ठेवू नको. रेषेच्या बाहेर जाऊ नको. ही रेषा ओलांडून तू भिक्षा द्यायला जाशील; तर तू राक्षसांकडून हरण केली जाशील; आणि मग अत्यंत दुःखी होशील.'' असे सांगून लक्ष्मण श्रीरामाचा शोध घेण्यासाठी धनुष्यबाण सज्ज करून वेगात निघाला.

लक्ष्मणाचे रामभेटीत सीतेविषयी कथन

देवांनाही राज्यवैभव लोभावते, पण केवळ पितृवचनासाठी सर्वांचा त्याग करून पायउतार होऊन राघव स्वतःहून वनात आला. सीतेचे प्रियवचन ऐकून मायामृगामागे धावत निघाला, त्या श्रीरामाचे सौमित्राने चरणवंदन केले. श्रीरामाच्या पायावरची ध्वज, वज्र, अंकुश रेखा पाहात लक्ष्मणसखा स्वानंदात मग्न होऊन डोलत राहिला. श्रीरामाच्या चरणांवर पूर्ण प्रेम असणाऱ्या सौमित्राने दोन्ही पायांवर लोटांगण घातले. चरणस्पर्श होताच त्याला आपले जीवित धन्य झाल्याचे समाधान झाले. श्रीरामचरणांचा स्पर्श झाला की गवत, पाने, माती हेही त्याचे रजःकण मस्तकावर घेऊन वंदन करतात. धन्य त्या रामाचे चरण! श्रीरामाची पाऊले दृष्टीस पडताच लक्ष्मणाला अपार आनंद झाला. तो त्या आनंदभरात रामनाम गात, नाचत चालला असताना त्याने श्रीराम पाहिला. मृग मारून गंगातटी अश्वत्थवृक्षाखाली श्रीराम स्वस्थ बसला होता. रामाला विरोध करणारांना जो कोटी कल्पांनंतरही भेटत, दिसत नाही तो सौमित्राला सहज दिसला. त्याचा स्वानंद पुष्ट झाला. रामाने रणकंदन केले

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Muthulakshmi Research Academy / Sarayu Foundation Trust and eGangotri

नव्हते, राक्षस नव्हते की बंधन नव्हते; नित्यमुक्त रघुनंदन सुखसंपन्न स्थितीत होता. 'लक्ष्मणा धाव सत्वर' ही हाक मायिक होती हे जाणून लक्ष्मणाने रामाला वंदन केले.

श्रीराम आणि लक्ष्मण यांची दृष्टभेट झाली. सृष्टी आनंदाने भरून गेली. मस्तकाला चरण लावून झाल्यावर आलिंगन भेट झाली. दोन दीपक एक झाले तरी दोहोंचा प्रकाश एकच असतो, तसे राम-लक्ष्मण एकत्वाने एकमेकांना क्षेमालिंगन देऊन राहिले. समुद्रात मीठ पडले की ते स्वतः समुद्रच होते त्याप्रमाणे राम-लक्ष्मण पूर्णत्वाने परिपूर्ण झाले. श्रीरामाला रामपण आठवेना आणि लक्ष्मणाला भक्तपण आठवेना. बोलणे बंद होऊन मौन आले. नित्यानंदात दोघे मग्न झाले. सीतेने आपल्याला दूषणे दिली हे लक्ष्मण विसरला आणि पंचवटीत जाणे श्रीराम विसरला. अशी स्वानंदाच्या पोटी त्या दोघांची मिठी पडली. सृष्टीचे संरक्षण करण्यासाठी प्रेमाची मिठी काही काळाने सुटली. नंतर श्रीरामाने लक्ष्मणाला विचारले, "सीतेला एकटीला सोडून तू इथे का धावला आहेस, ते मला लवकर आधी सांग." श्रीरामाने सीतेच्या रक्षणाबद्दल विचारताच लक्ष्मण स्तब्ध, अबोल झाला. दुःखाने त्याचे मुख अश्रूपूर्ण आणि म्लान झाले. सीतेची वार्ता विचारली जाताच लक्ष्मणाला झालेले दुःख आणि त्याचे म्लान मुख पाहून श्रीरामाचे मन धास्तावले. 'स्वतः सीतेने सौमित्राला दुष्ट, दुर्वचनांनी त्रस्त करून धावत माझ्याकडे पाठविला आणि दुःख दिले. सौमित्र माझे वचन कधीच उल्लंघणार नाही. परंतु सीतेने वर्माला स्पर्श करणारे बोलणे करून, त्याला आज्ञा केली' हे त्या सर्वज्ञ रामाला समजले. 'स्त्रीवाक्याचे दारुण बाण अंतःकरणात पूर्ण खोचले गेल्याने लक्ष्मण अत्यंत दुःखी झाला आणि माझ्याकडे धावून आला.' हेही रामाने जाणले. तेव्हा रामाने 'सीतेला सोडून इथे का आलास' असे विचारताच लक्ष्मण रामाचे पाय धरून ओक्साबोक्सी रडू लागला. अखेर त्याने सांगितले, "अहो, कोट्यवधी विघ्ने आली असती तरी मी पंचवटी सोडली नसती, परंतु सीतेच्या अभिशापाच्या बोलण्याने मी उठाउठी तिथून निघालो. ती असे दारुण बोल बोलली की तत्काळ मरणच यावे. मी तुझे नामस्मरण केले म्हणून माझे प्राण वाचले. आता तुझे चरण पाहून मी समाधान पावलो आहे. सीतामाई काय म्हणाली, तिने जे जे वाग्बाण सोडले, ते ते समग्र ऐक. 'लक्ष्मणा धाव रे धाव' असे मायामृगाचे आक्रंदन ऐकून ती रडू लागली. 'श्रीरामाला युद्धबंधन झाले आहे तेव्हा सत्वर धाव' असे जानकी म्हणाली. पुढे 'राक्षसांनी रघुवीर वेढला आहे त्याचा रणोद्धार कर, तू त्याचा पाठीराखा बंधू आहेस, तेव्हा लवकर जा.' असा तिचा धोशा होता. त्यावर मग मी प्रतिवचन बोललो."

"श्रीरामाचे महिमान असे आहे की त्याच्यापुढे राक्षस बिचारे मशकासारखे आहेत. त्यांना श्रीरामाला आटोपणे शक्य नाही. दैत्यदानवांच्या कोटी एकत्र झाल्या तरीही तो आवरणे शक्य नाही. श्रीराम बाणाने एकेकाचा कंठ तोडील. असे मी सांगूनही जानकी तुझा प्रताप मान्य करीना. तिने आक्रंदून, संतापून मला धाव घ्यायला पुनःपुन्हा सांगितले. त्यावर मी असेही सांगितले की श्रीरामाची आज्ञा माझ्या शिरावर आहे. त्याने तुझ्यापासून तिळभरही दूर होऊ नको म्हणून आज्ञा दिल्याने मी बाहेर जाणार नाही असे निर्धारपूर्वक म्हटले. शिवाय, मी तुला एकट्या स्त्रीला सोडून बाहेर धावलो आणि राक्षसांनी तुझे हरण केले तर तिघांचे नाव वाईट होईल हेही सांगून पाहिले. श्रीरामाने मला बजावून 'सीतेचे रक्षण सावधानतेने कर' असे सांगितल्यामुळे मी तुझ्यापासून दूर वनात धावून जाणार नाही. असे ठामपणे मी बोललो."

"हे माझे निर्धाराचे बोलणे ऐकून सीता शतपट क्षोभली. पूर्वीची मर्यादा सोडून टोचून बोलू लागली. ती म्हणाली की, "श्रीरामाचा धावा ऐकून

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

तू धाव घेत नाहीस, माझ्यापासून दूर होत नाहीस, तेव्हा राम राक्षसांकडून वनात मारला गेला की मला पत्नी करण्याचा तुझा विचार आहे. माझी अभिलाषा धरून आजवर सावपणे सेवा करून, विश्वासघातक्याप्रमाणे वागलास, श्रीराम वनात राक्षसांनी मारला की मला तू पत्नी करू पाहतो आहेस. परस्त्रीबद्दल अती लंपटा, सेवकवर्गातल्या महानष्टा, पापिष्टा मला तुझे काळे तोंड दाखवू नकोस. तू दुष्ट, भ्रष्ट, चांडाळ आहेस. श्रीरामाचा शत्रू होऊनच तू वनात माझ्याबरोबर आलास.' या बोलण्यामुळे सीतेला सोडून मी तुझ्यापाशी आलो रघुनाथा. जे महामारक विष ते घेतानाही मला अमृतासारखे वाटेल; पण सीतेच्या बोलण्याने झालेले असुख हे परम दुःख वाटते श्रीरामा. पिता रागावला तर माता मुलाला शांत करते; माता रागावली तर पिता मुलाला शांत करतो; याच भावनेने श्रीरामा मी तुझ्यापाशी आलो आहे.'' हे सौमित्राचे निवेदन ऐकून श्रीरामाने त्याला आलिंगन दिले. त्यामुळे लक्ष्मणाला पूर्ण सुखसंपन्नता लाभली. ते दोघेही समाधान पावले. साखर विरघळून पाण्यात मिसळली की ते पाणी गोड होते; त्याप्रमाणे राम-लक्ष्मण दोघेही एकमेकांच्या सहवासाने सुखसंपन्न झाले. लोह परिसाला भेटले की लगेच लोखंडाचा काळिमा जातो त्याप्रमाणे श्रीरामाच्या भेटीने सौमित्राचे दुःख नाहीसे झाले.

श्रीरामाच्या सर्वज्ञतेने रहस्य जाणले होते

श्रीरामाला सीतेचे वचन ऐकून विस्मय वाटला. मायामृगाचे कौशल्य तो जाणून होता. मायामृगाने आक्रंदून लक्ष्मणाला धावा करून बोलावले, मागे रावण येऊन सीतेचे हरण करील. असे हे सर्व कृतकार्य ठरल्याप्रमाणे झाले, हे जाणून रघुनाथाच्या पोटात सुख निर्माण झाले. राक्षसांच्या अंताला हे योग्य कारण झाले. कोणाला वाटेल, मायामृगाची गोष्ट समजली असूनही, बायकोच्या बोलण्यासाठी राम मृगामागे धावला कसा? परंतु राम स्त्रीकामाच्या आत्यंतिक प्रेमाने किंवा कामासक्त होऊन धावला नव्हता. त्यामागील गूढार्थ आता ऐका.

सीता केवळ पत्नी नव्हती. ती परम भक्त होती. त्यामुळेच श्रीरामाच्या सेवेसाठी ती पायी चालत वनात आली. राज्यावर असता तर श्रीरामाची सेवा सेवकांना वाटून देण्यात आली असती. वनात ती स्वतः सेवा करायला उल्हासाने आली होती. सीता ही निर्विकार भक्त असल्याने तिचे मनोगत श्रीराम जाणत होता. तिचा भावार्थ पुरवण्यासाठी म्हणून स्वतः तो मृगामागे धावला. भक्ताच्या वचनासाठी कोरड्या काष्टातून (खांबातून नृसिंहावतार) प्रकटला तोच श्रीराम सीतेच्या सुखासाठी आणि संतोषासाठी मृगामागे धावला. भक्ताच्या भावनेचे उल्लंघन न करता त्याचे वचन पूर्ण करणारा श्रीराम त्यासाठीच मृगापाठी गेला. जसा भाव तसा देव या अर्थाबद्दल संदेह नाही. सीतेचा सद्भाव पाहून तो मृगामागे धावला. मायामृगाचे धावणे, सीतेकडून लक्ष्मणाची निर्भत्सना, हे सर्व त्याला ज्ञात होते.

त्रैलोक्यपावन ही श्रीरामाची ख्याती, अगाध कीर्ती वाढविण्यासाठीच सीतेने लक्ष्मणाला बाहेर पाठविला. त्यासाठी ती अनेक दुरुत्तरे बोलली. सीतेची मुख्य इच्छा रामाने लंकाधीश रावणाचा वध करावा ही होती. तोच कार्यार्थ तिला साधायचा होता. त्यासाठी तिने सौमित्राची छळणूक केली. श्रीराम, सीता, सौमित्र या तिन्ही मूर्ती अत्यंत पवित्र होत्या. ही विचित्र कथा श्रीरामचरित प्रकट करण्यासाठीच अनुवादली आहे. अवताराचे नटनाट्य प्रकट आणि स्पष्ट करण्यासाठी कथानुवाद तसा बिकट वाटतो, परंतु तोच निर्दिष्ट परमार्थ आहे. सीता सती ही स्वतः सद्रूप असून ती लक्ष्मणाला अभिशाप लावते हे मूर्खपणाचे विधान होईल. तेच या कथेतील मर्माला अनुरूप आहे. श्रीराम हा एकमेकांचे मनोगत जाणूनच स्वतःचे वर्तन ठेवतो आणि अगाध कीर्ती संपादन

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

करतो. श्रीरामनामाने जग पवित्र होते. श्रीरामकथेतील अक्षर हे क्षराक्षरातील परम अक्षर आहे. या कथेतील चरित्रानुवादाने श्रोते आणि वक्ते पावन होतात. श्रीरामनामाचा जप केल्याने वक्ता परब्रह्म होतो.

अध्याय सोळावा

श्रीरामाकडे लक्ष्मण निघून गेल्यावर सीता एकटीच गुंफेत राहिली, ती संधी साधून रावण भिक्षूच्या वेषात सीतेपाशी आला. एखाद्या ओसाड घरात कुत्रा प्रवेश करतो, तसा रावण राम-लक्ष्मण गुंफेत नसताना सीताहरणासाठी आला.

रावणाचे आगमन, सीतादर्शन, तिला प्रश्न

सीता ही गर्भजन्माने जन्मली नव्हती. ती देहीच विदेही होती. तिचे हरण करण्यासाठी लंकानाथ रावण तातडीने आला. सीताहरण करताना मुळातच रावणाच्या नशिबी भीक मागणे आले. त्याच्या हाती झोळी आली आणि अंगात अशुभता आली. रावणाचे चौदा चौकड्यांचे राज्य असून ते बाजूला राहिले आणि क्षणात तो भिकारी झाला. सीतेचा आश्रम पाहताच राजवैभव पळाले आणि लंकानाथाला भिक्षेने वरले, असे सीतेचे सामर्थ्य होते. तिची अभिलाषा धरणाराला तिने भिकेला लावले. सीतेला लंकेत नेले तर ती एकएका राक्षसाला मारवील आणि लंका पूर्ण जाळील. वळचणीमधे दिव्याची ज्योत ठेवली तर ती क्षणात सारे घर जाळते, त्याप्रमाणे सीता समस्त राक्षसकुळाची क्षणात होळी करील कामधेनूची अभिलाषा धरली त्यामुळे सहस्त्रार्जुन नाश पावला, त्याप्रमाणे रावणाने सीताहरण केले तर त्याचे संपूर्ण कुळ आणि राक्षसकुळ यांचा नाश होईल.

रावणाला सीतेचे दर्शन होताच त्याचा पुरुषार्थ पळाला, तो संन्याशाच्या रूपात हीन दीन असा भिक्षार्थी झाला. स्वयंवराच्या प्रसंगी रावणाने सीता पाहिली तेव्हाही त्याचा अपमान झाला होता. आताही त्याने भिक्षुकत्व स्वीकारून स्वतःचा अपमान करून घेतला होता. सीतेचे कौशल्य असे की केवळ दृष्टीनेच रावण गांजला. आपला आपण अपमान करून घेऊन तो दीनवदन भिक्षार्थी बनला. रावणाला सीतेचे संपूर्ण आकलन झाले नाही, शुभ-अशुभ चिन्हे त्याला कळली नाहीत. भिक्षुवेषात दीनवदनाने भिक्षार्थी बनून तो सीतेकडे आला होता. सहा महिन्यात आपला घात होणार आहे हे रावणाला न कळल्याने, सीतेची अभिलाषा धरून तो स्वकुळासह आत्मघात करून घ्यायला उद्युक्त झाला. या वेळी रावणाने युक्ती अशी केली की, संपूर्ण भिक्षुवेष धारण करून, नारायणाचे स्मरण करत तो स्वतःच आश्रमाकडे आला. सीता सुंदरी पाहून रावणाची दृष्टी खुंटली. पूर्ण अभिलाषा पोटात निर्माण होऊन अत्यंत सुंदर रामकांता त्याला हवीशी वाटली. स्वरूपात अती सगुण, रूपरेखा गुणलावण्याची; सर्व अवयव सुखदायक अशी ती सुखनिधान जानकी होती. लावण्याची पुतळी, निखळ सौंदर्याची ओतीव मूर्ती आणि सौंदर्यवती अशी शोभणारी सीता त्याने पाहिली. सीतेच्या सुंदरतेने रावणाचे डोळे तृप्त झाले. तो भूक-तहान विसरला. केवळ नवनिधान जानकीच्या दर्शनानेच त्याचे मन सुखावले.

सीतेची दृष्टीभेट होताच त्याला आनंदातिशय झाला. 'हिच्यायोगाने आपल्याला सुख आणि संतोष लाभेल. एवढा आनंद सृष्टीत नसेल. अशा सौंदर्याचे कधी वर्णनही ऐकले नव्हते. घवघवीत सीता पाहून इंद्रियांना भूल पडली. देवी, गंधर्वस्त्रिया, सुरेश्वरी यांपैकी कोणालाही हिची सर येणार नाही. रंभा, उर्वशी, किन्नरी यांना हिच्या नखाची सर येणार नाही. दैत्यस्त्रिया, दानवस्त्रिया यांना हिची सर नाही. सावित्रीला हिची योग्यता मिळणार नाही. वनदेवता, उमा, रमा, यांना हिची स्वरूपता नाही. मंदोदरी तरी काय, जसा सूर्यापुढे काजवा. सीता लावण्यराशी असून, रूपाची मर्यादा करवतच नाही. हिचे बोलणे अमृतासमान, चालण्यात परमहंस

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

फिका पडावा, हिच्यामुळे मन आणि बुद्धी वेडावून जाते. हिला चंद्रकिरण खुपतात, सुकुमार, मनोहर अशी ही सीता आहे.'

रावण स्वतःशी विचार करत राहिला की, 'कविजन अन्य स्त्रिया मनोहर असल्याचे वर्णन करतात; परंतु सीताच खरोखर मनोहर आहे. मला हिने आपला दास केले. मी संपूर्ण सृष्टी हिंडलो; पण हिच्यासारखी सुंदरी पाहिली नाही. हिच्याशी माझी भोगभेट झाली तर सुख, संतोष आणि स्वानंद मिळेल. सीताभोगाला सृष्टीत तुलना नाही. ललाटी भाग्य असले तर सीतेचा लाभ होईल. जर स्वयंवर प्रसंगात धनुष्य उचलते तर तेव्हाच सीतेने मला वरले असते; पण ते धनुष्य मला भोवले, तिथे माझे सामर्थ्य चालले नाही. आता ही अत्यंत संकटात आहे, कारण वनात एकटीच आहे. श्रीरामाची इथे उडी पडली तर तो माझी मानच मुरगळेल.' श्रीरामाचा मनात धाक असल्याने आणि तो सीतेला सोडून जात नसल्याचे रावणाला ज्ञात होते; त्यामुळे कपटाने सीतेचे हरण करण्यासाठी रावण भिक्षुकाच्या मिषाने आला होता. रावणाने कपटवेष घेऊन, तो संन्यासी बनला.

सीतेकडे येऊन त्याने सद्भावाने विचारले, "वनात तू एकटी का राहतेस? तुझ्या बरोबर कोणी दिसत नाही. तू आपला वृत्तान्त मला सांग. तू कोण, कोणाची, इथे कशी? एकाकी वनात वस्ती करणे हे चांगले नाही. वनातली वस्ती अत्यंत कठीण असते. दंडकारण्यात तर ती अधिक दुस्तर आहे. या वनात मायावी राक्षस आहेत; ते फसवून स्त्रिया पळवतात. ब्राह्मणांना मारून खातात. तू तर राजकन्या दिसतेस. मग अशा भयानक वनातल्या स्थळी अशी एकाकी का राहाते आहेस? ते मला समूळ कथन कर."

सीतेकडून वृत्तान्त कथन

अतिथीचे प्रश्न ऐकून सीतेने आपला सविस्तर वृत्तान्त सांगितला. "मी दशरथाची सून आणि जनकाची कन्या आहे. माझ्या स्वयंवरात रावणाला अपमानित करून श्रीरामाने शिवधनुष्य भंगले; परशुरामाचा पराभव केला; माझे पाणिग्रहण केले. श्रीराम आणि लक्ष्मण तसेच भरत आणि शत्रुघ्न हे चौघे बंधू एकमेकांना जीवप्राण आहेत. कैकेयीला दिलेल्या वचनामुळे दशरथ राजाने श्रीरामाला वनात धाडले. रामाबरोबर लक्ष्मणही वनात येऊन दंडकारण्यात रामासह राहिला आहे. चौदा वर्षांचा काळ रामाने वनात राहावे असा तो वचनातला नेम होता. श्रीरामाच्या सेवेसाठी मलाही वनात धाडले. श्रीरामसेवेत सावधान राहून, माझे रक्षण करण्यासाठी प्रतापी वीर लक्ष्मणालाही वनात पाठविले. श्रीरामाने ताटकेला मारले. रणात सुबाहूचा वध केला आणि मारीचाला अर्ध्या बाणाने आकाशात उडविले. विराधाने मला धरताच श्रीरामाने बाण मारून एकाच घावात त्याचा वध केला. श्रीराम दुष्टांचे निर्दाळण करतो. विराधासारखा महाबळी श्रीरामाने एकाच घावात धुळीला मिळविल्यामुळे राक्षस चळचळा कापतात. श्रीराम महावीर पराक्रमी आहे. नंतर गंगातटी येऊन, पंचवटीत आश्रम करून, वनवासाचा काळ तो सुख, संतोषाने आणि स्वानंदाने कंठतो आहे. आता वनवासाची साडेतेरा वर्षे श्रीरामाने पूर्ण केली असून उरलेले सहा महिने संपल्यावर तो अयोध्येत प्रवेश करील. आता सुवर्णमृगाला मारायला श्रीराम वनात गेला आहे. नंतर लक्ष्मणही त्याच्याकडेच गेला आहे, त्यामुळे तुम्हाला इथे मी एकटीच दिसते आहे."

"मी एकटी आहे समजू नका. माझे रक्षण करण्याला राम आणि लक्ष्मण हे दोघे दुर्धर वीर आहेत आणि ते क्षणभरात येथे येतील. मृग मारून श्रीराम लक्ष्मणासह एवढ्यात येतील तोवर आपण थांबा म्हणजे राम आपल्याला पूर्ण भीक्षा देईल. श्रीराम याचकांचा सेवक असल्याने, तुम्हाला पाहून त्याला सुख होईल. तुम्ही क्षणभर थांबा म्हणजे तो तुम्हाला अवश्य भीक्षा देईल." सीतेचे बोलणे ऐकून

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

रावणाला भीतीने कापरे भरले. मागे, इकडे-तिकडे पाहून पळण्याचा विचार तो करू लागला. परंतु सीताहरणाच्या तीव्र अपेक्षेने तो थांबला आणि सीतेला विश्वास वाटावा म्हणून तो म्हणाला, "या वनात हिंस्त्र श्वापदे, वाघ, सिंह, सर्प, रानडुकरे, लांडगे, तरस, माणसे खाणारे राक्षस आहेत. त्यांची स्त्रीस्वभावाप्रमाणे भीती वाटायला हवी, पण तू तर या भयंकर वनात निर्भयपणे राहते आहेस. ही निर्भयता तुला कशी लाभली, तू निशंःक कशी?" या रावणाच्या प्रश्नाला उत्तर म्हणून ती म्हणाली, "अहो अतीथी, ऐका. श्रीरघुनंदन वनात आहे. प्रतापतेजात तो दारुण आहे. आपल्या भक्तांना तो संरक्षण देतो. माझ्या हृदयावर नखे मारून एका कावळ्याने माझी अभिलाषा धरली. मी हे रामाला सांगताच रामाने एक दर्भाची काडी फेकली. ती श्रीरामाची दर्भकाडी ब्रह्मादिकांनाही निवारेना. तो काक त्रिभुवनात तिन्ही लोकात हिंडला. शिवादिनांही ती काडी दुर्धर झाली. ती पाहून इंद्र, वरुण, कळिकाळ, यम हे सारे लोटांगण घालत, शरण आले. त्या काडीचे निवारण कोणालाच शक्य नव्हते. अखेर तो काक श्रीरामालाच शरण आला. मग ईषिकेने कावळ्याचा डावा डोळा फोडला आणि त्याच्या प्राणांचे रक्षण केले. तेव्हापासून कोणतीही श्वापदे माझ्याकडे वाईट दृष्टीने पाहात नाहीत. तिथे मग राक्षस बापडे माझ्यापुढे काय येणार. श्रीरामाची प्रतिज्ञाच आहे की जो जो सीताहरण करू पाहील त्याचा दुर्धर बाण सोडून तो प्राण घेईल."

"तुम्ही म्हणाल की पक्ष्यांवर पुरुषार्थ दाखवला म्हणून श्रीराम प्रतापशाली मानावा काय? तर त्याने केलेले रणकंदनही ऐका. श्रीरामाला कपटीपणा आवडत नाही. शूर्पणखा अत्यंत खोटी; कपटाने आम्हाला छळायला आली. तेव्हा सौमित्राने तिला नकटी केली. शूर्पणखेचा कैवार घेऊन आलेले त्रिशिरा, खर, दूषण आणि चौदा सहस्र राक्षसगण रामाने संपूर्ण निर्दाळले. लक्ष्मणाने अजून युद्धामध्ये हात घातलेला नाही. त्याचा अनुच्छिष्ट पुरुषार्थ इंद्रजिताच्या वधार्थ राखून ठेवला आहे. खर, त्रिशिरा आणि दूषण यांना मारले त्या वेळीच श्रीरामाने प्रतिज्ञा केली आहे की कुंभकर्ण आणि रावण यांना मारून मगच अयोध्याप्रवेश करायचा. असा श्रीराम प्रतापी असून, पशुपक्ष्यांना त्याचा धाक आहे; त्यामुळेच मी यथासुख निर्धास्त वावरते आहे." असे स्वतःविषयी सांगून सीतेने अतिथीसाठी आसन घातले. तेव्हा तो सीताहरणाच्या इच्छेने पुढे जाऊ लागला.

लक्ष्मणरेषा, रावण चकित, सीता बाहेर जाते

रावणाला लक्ष्मणाने घातलेल्या मर्यादा रेषेमुळे पुढे जाणे अशक्य झाले. बळाचा वापर करूनही त्याला ती ओलांडता येईना. तेव्हा रावणाला आढळले की ती रेषा सप्तपाताळांपर्यंत खोल तळात गेली आहे. वरती पाहिले तर अंतराळात ती नभोमंडळाला भिडली आहे. ती रेषा ओलांडण्यास रावणाची शक्ती पुरी पडेना. रेषेने त्याला पूर्ण अडथळा आणला. त्यामुळे त्याला सीतेपर्यंत जाताच आले नाही. जर आपण सीतेपर्यंत पोहोचूही शकत नाही तर तिचे हरण कसे करणार असा त्याला प्रश्न पडला. सीतेला सोडून लक्ष्मण गेला; परंतु त्याने तिच्या रक्षणासाठी ही दृढ रेषा ठेवली. रावणाला अत्यंत कष्टानेही पलीकडे जाणे आणि सीताहरण करणे शक्य झाले नाही. 'मारीच मारला गेला; मला रेषेचे उल्लंघन करता येत नाही; तेवढ्यात श्रीराम येऊन पोहोचला तर तो माझी दहाही मस्तके छेदील.' असे विचार रावणाच्या अंतरात चालू होते. सीता दिसताच मात्र त्याची वृत्ती उपशम करू शकली नाही. मग त्याने पूर्ण कपट करायचे ठरविले. तो सीतेला म्हणाला, "संन्यासी जर स्त्रियांच्या जवळ गेला तर तो महापापिष्ट समजावा. यतिधर्माला तो अगदी अयोग्य मानावा. संन्यासधर्माचे लक्षण हेच की स्त्रीचे दर्शन, स्त्रीशी संभाषण, स्त्रीची जवळीक ही

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

त्याने निंद्य मानावी. श्रीराम नेटका परमार्थी असून त्याने ही धर्माआड येणारी रेखा का ठेवली असेल; ह्याविषयीच मला शंका आहे. त्यामुळेच मी जाऊ शकत नाही. या वनात राहणारे राक्षस लक्षात घेऊन भीतभीतच मी या वनात आलो आहे. त्यात तुम्ही मनुष्यवेषातले पाहून येथे भिक्षेसाठी आलो. तू राक्षससुंदरी मनुष्यवेषात आहेस. मला मारायला आत नेते आहेस. त्यासाठीच आदराने बोलावते आहेस.''

अतिथीचे बोलणे ऐकून सीता म्हणाली, ''श्रीहरहर, आम्ही निशाचर नाही हो. अतिथींचे आम्ही नित्य दास आहोत.'' नंतर सीतेला बाहेर बोलावण्यासाठी रावणाने एक युक्ती योजली. तो सीतेला म्हणाला, ''भुकेने अत्यंत पीडलो आहे. डोळ्यापुढे अंधारी येते आहे. जर तुला अतिथीवर कृपा करायची असेल तर बाहेर येऊन भीक्षा दे. मग गंगातीरावर जाऊन निवांत आपला आहार घेईन. तुझे बोलणे अमृतासम गोड आहे; पण या वेळी भीक्षा घातली नाहीस. तर मला भूक सहन होणार नाही. तेव्हा मी विमुखच परत जातो.'' त्यावर सीता म्हणाली, ''स्वामिनाथा, आपण विमुख जाऊ नये. मी रेषा ओलांडून माझ्या स्वार्थासाठी आपल्याला भीक्षा देईन. अतिथी विमुख गेला तर राम-लक्ष्मण रणात कदापी विजयी होणार नाहीत. त्यांना विघात होईल. अतिथीला सुखी केले तर श्रीभगवंत सुखी होईल. राम-लक्ष्मण युद्धात विजयी होतील. लक्ष्मणाच्या मर्यादा रेषेचे पालन केले तर अतिथी विमुख होईल. त्या पापाने माझा पती दुःखी होईल. त्यासाठी मी आपल्याला अवश्य भीक्षा घालीन.'' असा विचार मनाशी निश्चित करून अतिथीसाठी भीक्षा आणायला ती गुंफेत गेली.

सीता आणि देव यांचा संवाद

सीतेचा विचार समजल्यावर देवांची गडबड उडाली. स्वर्गात ते कासावीस झाले. सर्व देव आणि ऋषी ब्रह्मदेवापाशी आले. 'देवांची बंधने सुटण्यासाठी, आजची घडी योग्य आहे. बुद्धीने विचारपूर्वक देवांचे बंधन सुटण्यासाठी काय व्हायला पाहिजे हे ठरवावे. रावणाला भीक्षा देताना रावण सीतेला हातांनी धरेल, तर सीता सती त्याला भस्म करील. ती आदिशक्ती जगदंबाच आहे. ज्याप्रमाणे पतंग हे दीपाला आलिंगन देताच मरून जातात; त्याप्रमाणे सीतेला हातांनी धरताच रावण भस्म होईल. रावण भस्मीभूत झाला म्हणजे श्रीराम लंकेला येणार नाही. त्यामुळे देवांना बंधनातून इंद्रजित सोडणार नाही.' असा विचार करून देवगण गुंफेत येऊन सीतेला चरणवंदन करून म्हणाले, ''तू भीक्षा घालू नकोस.'' त्यावर सीता म्हणाली, ''अतिथी जर विमुख गेला तर रामाला आणि लक्ष्मणाला दुःख होईल. तुम्ही सर्वज्ञ देव असून मला हा विवेक कसा सांगता?'' मग देवांनी सांगितले की ''अतिथीच्या रूपाने येऊन हा रावण तुझे हरण करणार आहे. तेव्हा तू भीक्षा घालू नयेस.'' सीतेने त्यावर प्रत्युत्तर दिले की, ''जर रावणाने मला हात लावला तर त्याला कल्पान्त आठवायला लावीन. मला त्याचे काय भय? रावण बापडा काय, दहा तोंडाचा किडा आहे. त्याची भीती मला खुलवून काय सांगता?'' तेव्हा देवांनी म्हटले, ''ऐक माते, आम्ही सर्व. रावणाचे बंदी आहोत. तू रावणाचा नाश केलास तर इंद्रजित आम्हाला सोडणार नाही. आम्हा देवांचे बंधविमोचन करण्यासाठी तर तुम्हा दोघांचा (राम-सीता) अवतार आहे. तूच विचार करून पूर्वीचे विधान आठव.''

देवांची विनंती ऐकल्यावर, सीता हास्यवदन झाली. तिला मूळची खूण आठवली ''जर मी गुप्तस्थितीत राहिले तर रावण भीक्षेसाठी आला आहे, त्याचे काय कराल?'' सीतेच्या प्रश्नाचे उत्तर म्हणून देवांनी सांगितले, ''रावणाच्या भीक्षेसाठी आम्ही मायिक सीता निर्माण करू.'' यावर जानकी नुसतीच हसली. ''साकार आणि

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

सचेतन अशी रामपत्नी सीता मायिक रूपाने करणे विधात्यालाही शक्य नाही. तुम्ही तत्त्वतः अज्ञानी आहात. पर्जन्याची जळधार ही अत्यंत चतुरालाही करता येत नाही, त्याप्रमाणे ब्रह्मादिक सुरवर हे कृत्रिम अवतार करू शकत नाहीत. जशी माझी सगुण काया तशी माझी माझ्यास्वरूपातली छाया आहे. सुरकार्य साधण्यासाठी मी तिला भीक्षा घालायला धाडते.'' सीतेचा विचार ऐकून, देवांनी लोटांगणाने सीतेचे चरणवंदन केले, आणि ते सर्वजण विमानात लपून बसले.

मायासीता, रावणाकडून हरण

रावणाला भीक्षा घालण्यासाठी सीतेची छाया बाहेर आली तेव्हा मुख्यत्वे हीच मूळची सीता सती आहे असे सर्वांना वाटले. ठाणमाण, गुणलक्षण, रूपरेखा हे दोही बाबतीत समानच होते. सिद्ध, चार, सुर या सर्वांना खरी सीता माहिती होती. यक्ष, राक्षस, दैत्य, दानव, मानव, जानकीचे कौशल्य पाहून चकित झाले. जानकीने आपली छाया सजीव केली. सद्भावात समर्थ अशी जानकी स्वतः अग्निमुखात राहिली आणि तिने आपली छाया भीक्षा वाढायला पाठविली. तिला येताना (जानकी म्हणून) सर्वांनी पाहिली. भीक्षा घेऊन, त्वरित मर्यादा-रेखा ओलांडून, सीता (मायासीता) रावणापाशी आली. तेव्हा रावण तिच्या अभिलाषेने तिचे हरण करायचा विचार करू लागला. जशी छाया रूपापाशी राहात नाही, तशी मर्यादारेषा ओलांडून सीताबाहेर आली. ती भीक्षा देऊ लागताच रावणाने सीतेला जवळ ओढली. अतिथीला भीक्षा वाढणाऱ्या सीतेला अतिथीने हातानी धरताच, तिने हात हिसडून त्याला जमिनीवर पाडला. नंतर लगेच ती मर्यादारेषेच्या आत जाऊ लागली, तेव्हा रावणाने तिला बाहेर ओढली. त्याने तत्काळ भिक्षुवेष टाकून देऊन मूळ राक्षसाचे अद्भुत रूप प्रकट केले. दहा डोकी, वीस हात असा रावण सीतेपुढे उभा राहून म्हणाला, ''मी लंकेचा राजा, तुला मी माझी राणी करीन. माझा सुखभोग तू भोग.''

''राम दीनवदन तापसी आहे. वनात राहून खूप कष्ट केलेस. मी तुला पट्टराणी करीन आणि मंदोदरी ही मुख्य विलासिनी होईल. तू माझ्या मांडीवर बसशील आणि मंदोदरी मुख्य सेविका असेल. अशा आणखी हजार राण्या तुझ्या बटकी करीन. मी ब्रह्मयाचा नातू असून, कुबेराचा धाकटा भाऊ आहे. माझा वंश अत्यंत शुद्ध आहे. तेव्हा श्रीरामाचा नाद सोड. माझ्या-तुझ्या शयनगृहात वसंत सेवा करील, मदन शय्या रचील, चंद्र शीतल किरणांनी शांत करील, आणखी सुर, सिद्ध हेही सेवक बनवीन. इंद्रादिक सुरश्रेष्ठ तुझ्या सेवेतले दास होतील. शिवाय तुझ्या आज्ञेचा मी मुख्य सेवक होईन. हे अलौकिक भोग मिळव. माझे अशोकवन पाहून तुझे तन-मन शांत होईल. लंकाभुवन पाहून म्हणशील 'धन्यदशानन,' चल.'' हे रावणाचे बोलणे चालू असताना सीता 'राम-राम' असा आक्रोश करत होती. रावण कामभावनेने तिच्या प्राप्तीची घाई करत तिला आलिंगन देऊ पाहात होता. सीता रावणाला झिडकारत म्हणाली, ''जशी वाळवी अग्नी चाखू पाहते, तशी तुझी कामना माझा भोग इच्छिते आहे; पण माझ्याविषयीच्या कामेच्छेने वाळवीसारखा तूही जळून जाशील. आलिंगनासाठी पतंग दीपकळीजवळ जातो आणि तत्काळ त्याची होळी होते. त्याप्रमाणे जनकबाळीविषयी भोगेच्छा ठेवलीस तर तू कुळासहित मरशील. अहल्येची अभिलाषा धरणाऱ्या सुरेन्द्राला सर्वांगावर भगे पडली. तशी माझी अभिलाषा धरशील तर रामपत्नीमुळे रामबाणांच्या धारेत तू मरशील. श्रीराम सूर्य तर तू रावण काजवा; रावण कांजी आणि श्रीराम अमृत; तुझ्या ठिकाणी जी भोगासक्ती ती चावणाऱ्या कीटकांची आहे. श्रीराम हा क्षीरसागर आहे तर तू गलिच्छ मूत्राचे डबके आहेस. तेथे भोगतत्पर असणारे नरदेही डुक्करच म्हणावे. श्रीराम जगाचे जीवन आणि रावण हा क्षुद्र डबके असून त्या ठायी हीन ढोंगी, बगळे असतात, तर श्रीरामाच्या ठिकाणी साधू मग्न

https://archive.org/details/muthulakshmiacademy Bhavarth Vedic Trust, Lucknow

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Trust Foundation Research Academy and eGangotri

होतात. अतिथीच्या वेषाने कपट करून, संन्यासी बनून आलेला तू स्त्रीलंपट आहेस आणि विषयाच्या प्रलोभनाच्या गोष्टी करतोस. अरे अमिषासाठी मरणारा मासा आहेस तू."

"अरे आम्ही वनात यायला निघालो तेव्हा श्रीराम सत्तावीस वर्षांचा होता आणि मी अठरा वर्षांची होते, हे वसिष्ठांकडून ऐकले होते. तू तर अनेक वर्षांचा म्हातारा असून, विषय भोगता भोगता तुला वृद्धत्व आले आहे. तरी तू माझी अभिलाषा धरून राक्षसा उगाच का मरतोस. मला न्यायला तुला कुठली शक्ती, निष्फळ वल्गना करतो आहेस झाले. श्रीराम धावत येईल आणि एकाच बाणात तुझी शांती करेल. एकदा श्रीरामाचे बाणामागून बाण सुटले तर बापड्या तू कुठे पळशील? दृढ बाण सोडून तो तुझे धड दुखंड करून पाडेल." श्रीराम निश्चित येईल हे जाणून त्या दुर्बुद्धी आठवलेल्या रावणाने सीतेला उचलून खांद्यावर घेतली आणि चपळाई करून तो तिथून निघाला. तेव्हा पिशाचाचे मुख असलेल्या सारथी खरसंयुक्ताने रथ पुढे आणला. रावण सीतेसह रथात बसताच रथ लंकेकडे निघाला.

अध्याय सतरावा

रावणाने सीतेचे हरण करून त्वरेने तो तेथून निघाला. सीतेला रथात बसविताना तिने अंग धरणीवर टाकले. रावणाने तिचे केस धरून वर ओढली आणि तिला रथात घेऊन मांडीवर बसविले. त्यामुळे रावण सुखी झाला, सीता परम दुःखी झाली आणि धावा करत आक्रंदून रडू लागली.

लक्ष्मणाशी वागल्याचा सीतेला पश्चात्ताप

सीता आक्रोश करू लागली. "धाव रे श्रीरघुवीरा, लक्ष्मणा वेगाने धाव. भिक्षेच्या ढोंगाने येऊन रावण मला पळवून, लंकेकडे नेतो आहे. कुठे श्रीराम, कुठे रावण, कसे माझे त्याने हरण केले. मी लक्ष्मणाला अभिशाप दिला, त्या पापाचे फळ आता मी भोगते आहे. सौमित्र हा निष्पाप हरिभक्त, त्याला मी छळवाद करून संत्रस्त केला. आता कसली श्रीरामाची आस धरायची, मी माझीच निराशा करून घेतली. सौमित्राची श्रीरामावर अनन्यभक्ती आहे, तो मी वेडेवाकडे बोलून छळला. त्या माझ्या पापाची मी सध्या प्रचीती घेते आहे की रावणाच्या हाती सापडले. लक्ष्मणाला श्रीरामाची आज्ञा होती माझ्या संरक्षणाची; पण मीच त्याला छळाने बोलून दूर पाठविला. आता हा रावण माझी वेणी धरून मला ओढत नेतो आहे. लक्ष्मण मला माता मानत असताना मी त्याला म्हणाले की मला पत्नी करशील. त्या माझ्या पापाने पृथ्वी फुटावी अशी मी महापापी आहे. मी लक्ष्मणाला निष्कारण अभिशाप दिला. ते माझे पाप मला आज फळले आहे. मीच माझ्या संतापाला आणि दुःखाला कारण झाले आहे. जो कोणी इतरांचा छळ करतो तो स्वतःच त्या छळाचा अनुभव घेतो. रावणाने माझे केस ओढून मला त्याचा पूर्ण अनुभव दिला आहे."

"छळाचा अनुभव किती तीव्र गतीने मला आला. सौमित्राला प्राप्त झाला श्रीरघुपती आणि मी मात्र रावणाच्या हातात सापडले. मला बंधन प्राप्त झाले. छळ, छद्म, वक्रदृष्टी असलेली महापापिणी अशी मी ठरले. आता श्रीरामाची भेट कुठली, केवळ दुःखच माझ्या वाट्याला येणार. श्रीरामाची भेट नाही, डोळ्यांना तो दिसणार नाही. सौमित्राचा छळ केल्यानेच हे दुःख माझ्या दुर्भाग्याने आले. माझ्यासारख्या छळवादिनीचे तोंडही श्रीराम पाहणार नाही. माझे दुःख मीच मला दिले आहे." असे अधोमुखाने सीता म्हणत होती आणि विलाप करत होती. "महापाप्याला श्रीरामनाम जपले तर अंती परम गती मिळते. त्याची श्रीराम मुक्तता करतो. तशीच आता माझी गती होणार. सौमित्राच्या छळण्यात होणारासारखी बुद्धी होते हेच कळले. त्यामुळे आता हे कृपानिधे, कृपा कर एवढीच इच्छा आहे. मी श्रीरामाची दासी असून मला राक्षसांनी गांजले. आपले ब्रीद खरे करण्यासाठी हे

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sayyam Foundation Trust and eGangotri

रामा आता धाव. लक्ष्मणा, मी तुझ्या चरणांवर मस्तक ठेवते. तू जर मला आपली माता मानतोस तर मी तुझा छळ करण्यासाठी जे बोलले त्याबद्दल क्षमा कर. लक्ष्मणा तू श्रीरामाचा निष्पाप भक्त आहेस. तुझ्यामध्ये क्रोध नाही. तेव्हा छळण्याबद्दल माझ्यावरचा तुझा संताप कृपा करून तू सोडून दे."

"लक्ष्मणा आता त्वरित धाव घे. श्रीराघवाला बरोबर घेऊन ये. या रावणाचा गर्व प्रतापाने हरण करून त्याला मार. तू माझ्यावर एवढा का रुसलास? अरे मी तुझे चरण केसांनी झाडीन. या राक्षसाने मला अत्यंत गांजले हे मी कोणापाशी सांगू? मी परपुरुषाची गोष्टही न करणारी, त्या मला आज रावणाने हात लावला. मी दुःखाने कढते पण श्रीरघुनाथ मला विसरला का? दुरुत्तरांनी छळून सौमित्राला दूर पाठविला त्याचा तुझ्या मनात संताप झाला असेल. हे रामा, तो राग सोडून या प्रसंगात आकांताने विनवते लवकर ये. तू जनक, तू जननी, सखा, सांगाती, जिवलग असा तू या वनवासात होतास म्हणून कळवळ्याने लवकर येऊन मला सोडव. विराधाचा वध ज्या बाणाने केला, तोच बाण दोरीवर चढवून प्रतापतेजाने गर्जत ये आणि माझी सोडवणूक कर."

"श्रीरामा, पाप माझ्या माथी आहे म्हणून माझी उपेक्षा करू नकोस. श्रीरामनाम हे मी स्मरते म्हणून मला पाप लागणार नाही. श्रीरामनामाच्या स्मरणाने पापांच्या महाकोटीही क्षणात नाहीशा होतात. तेव्हा तातडीने येऊन माझे बंधन सोडव. तू वनात आलास तो देवांचे बंधन सोडविण्यासाठी आलास. माझे संकट फेडण्यासाठी उडी घे. श्रीरामा मी तुला मृगामागे जायला उद्युक्त केले, तीच माझी खोटी बुद्धी होती. त्यामुळेच श्रीरामाची ताटातूट होऊन हे दुःख मीच माझ्यासाठी निर्माण केले. मी मृगचर्माच्या काचोळीची इच्छा धरली आणि माझ्या सर्व सुखाची होळी झाली. लक्ष्मणाला छळून दूर केला आणि महाबळी श्रीरामही मला अंतरला. जी स्त्री नवऱ्यापाशी मागते तिचे जिणे निंद्य ठरते. त्या मागण्यामुळे रावणाने माझ्या आकर्षणाने ही बंदी माझ्यावर आणली. पती संतुष्ट होऊन जे देईल ते स्त्रीने पवित्र मानावे. स्वमुखाने मी मागितले आणि हे दारुण दुःख वाट्याला आले. माझ्या मागण्याने माझाच घात झाला. मी लंकाधिपती रावणाच्या बंदीत सापडून, श्रीरामाला अंतरले."

सीतेला पश्चात्ताप, तिचा संदेश आणि विश्वास

सीता आपल्या आपणच केलेल्या अपराधाचा स्वतःच संतापाने अनुवाद करत होती. ती दुःखाने आर्त झाली होती. श्रीरघुनंदन दुरावला, लक्ष्मण त्याच्यापाशी गेला. ते दोघेही माझे हे आक्रंदन ऐकत नाहीत. माझा आक्रोश त्यांच्या कानावर पडला असता तर ते दोघेही त्वरेने गर्जत आले असते आणि रावणाला बाणांनी निर्दाळून, त्यांनी मला सोडविले असते. श्रीरामाला निरोप पाठविण्यासाठी सीतेने द्विज आणि शिष्य यांना पाहिले तर ते धाकाने पळून गेले होते. त्या प्रसंगी सीता वृक्षवल्लींना शरण गेली आणि त्यांनाच तिने विनविले की श्रीरामाला असे सांगा 'मला रावण घेऊन चालला आहे.' यावेळी सीतेने जनस्थानातील सर्वांना सांगितले की, "मी या जनस्थानातल्या सर्वांना, जन-वन यांना, लोटांगण घालते आणि विनंती करते की त्यांनी रावणाने सीताहरण केले आहे असे श्रीरामाला सांगावे. कर्णिकार, बिल्व, आम्र, या समस्त वृक्षांना माझा नमस्कार आहे; गुल्म, लता, तृण, पाषाण, दैवते, श्वापदे, पक्षीगण, यांना मी लोटांगण घालते; सिंह, वाघ, या क्रूर श्वापदांना मी वंदन करते आणि विनंती करते की त्यांनी मला रावण नेत असल्याचे श्रीरामाला कळवावे. काक, बक, हंस, मयूर, कारंडक, चातक, शुक यांनी श्रीरामाला अवश्य सांगावे की दशानन मला नेतो आहे. जलदेवता, वनदेवता, आकाशातल्या गुप्त देवता, तुम्ही सर्वांनी श्रीरामाला रावणाच्या वधासाठी सांगावे की रावण सीतेला घेऊन चालला आहे. श्रीरामाला माझा निरोप सांगण्यासाठी या सर्वांना वाचा येवो.

https://archive.org/details/@sulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

पंचभूतांना माझी विनंती आहे की त्यांनी श्रीरामाला धावून येऊन रावणवध करायला सांगावे." असा सीतेने जनस्थानातील निर्जीवांना, सजीवांना विनंतीवजा संदेश दिला.

सीतेला विश्वास होता की जानकी भेटली नाही तर श्रीराम स्वर्ग, मृत्यू, पाताळ अशा लोकात सर्व ठिकाणी शोध घेऊन आपल्याला परत आणील. सीताहरण झाल्याचे समजताच लक्ष्मण वेगाने येऊन, रागाने रावणवध करील. यासाठी त्याला अर्धक्षणही लागणार नाही. जेव्हा श्रीरामाला माझ्या हरणाचे वृत्त समजेल तेव्हा असेल तेथून बाण सोडून त्या घावाने रावणाचा प्राण घेऊन तो माझी मुक्तता करील. या जानकीला लोक, आलोक, कुलाचळ कुठेही लपविले तरी राम राक्षसांची होळी करून माझी सोडवणूक करील. रावणाने माझा घात केला तर तो प्रतापी रघुनाथ यमाचे दात पाडून मला निश्चित आणील. माझ्यावरील प्रेमाच्या आवडीने श्रीराम काळाचा गळा मुरडेल. तिथे राक्षस काय बापडे, राम बाणाने त्यांना निश्चित मारेल असा प्रतापी रघुनाथ आपल्या दुस्तर आकांतानंतर अजून का पावत नाही; असे आपल्याशी म्हणून ती विलाप करू लागली.

सीता स्वतः याच हेतूने ज्याला त्याला काकुळतीने सांगत होती की आपला शोध रामाला सांगून रावणवधासाठी त्याने लवकर यावे. "धाव पाव श्रीरामा, लवकर ये सौमित्रा. मला राक्षसेंद्राने गांजले आहे तरी कृपासमुद्रा मला का पावत नाहीस. माझ्या पापी प्रारब्धा मर; दुष्टा दुःख भोग. माझा श्रीरामवरिष्ठ दूर करून मला दुष्टाला वश केलेस. मी जनककन्या जानकी श्रीरामाची सेविका; परंतु त्या दुष्ट दशमुख रावणाने मला बंधनात अडकवून दुःखी केले. श्रीरामा तुझी थोरवी अगाध असूनही तुझे देहरूपी घर फोडून चोराने तुझ्या पत्नीची चोरी केली आहे. याने चराचरात तुझी लाज जाईल. आपल्या लज्जारक्षणार्थ तरी माझा धावा ऐक." असे सीता आक्रंदून म्हणत होती. ती दीर्घ स्वरात विलाप करत असलेली ऐकून, वाघ, सिंहादींनाही दुःख झाले. वृक्ष आणि पक्षी यांचे डोळे अश्रू गाळू लागले. पृथ्वीला दुःखाने ऊर फाटेल असे दुःख झाले. पाषाणही दुःखाने द्रवले. ऋषीजनांनी आकांत केला. सीतेचे हरण झाल्याने दाटलेले दुःख गगनात मावेना.

सीतेचे रडणे ऐकून रावण कंपायमान झाला. येथे त्वरेने रघुनंदन आला तर तो आपला प्राण घेईल अशी त्याला धास्ती वाटली. ज्या श्रीरामाने खर, दूषणादी मारले, बाणाने वेधून मारीच आणि विराध मारले, ताटका, सुबाहू यांचा वध केला, तो श्रीराम क्षणभरात आपलाही प्राण घेईल अशी रावणाला धाकधुक वाटू लागली. सीता रडत असताना, तिला आलिंगनाने धरून, रथात बसवून रावणाने रथ गगनात नेऊन मार्गक्रमण चालविले. रावणाचे सामर्थ्य असे की त्याने रथ आकाशातून चालविला होता. सीतेचा आक्रोश चालूच होता. तो आक्रोश ऐकून जटायू रागाने पुढे येऊन रावणाला म्हणाला, "माझ्या स्वामीची ही कांता, तिची गांजणूक करणारा तू कोण?"

जटायूकडून रावणाला प्रतिबंध,

रावणाने सीतेचे हरण केले त्यावेळी जटायू वनक्रीडेला गेला होता. त्याने जानकीचा आक्रोश ऐकला आणि तो वेगाने आला. त्रैलोक्याचा राजा श्रीराम, त्याचा भक्त म्हणून, तो रावणाच्या आड आला. "अरे उन्मत्त रावणा, तू सीतेला कसा नेतोस? मी पर्वतप्राय महाबळी या वनात असताना तू जानकीला कसा नेशील? मी रणरांगोळी करीन. पंचवटीत आश्रमाजवळ माझे पहारा देण्याचे नाके आहे. महानष्ट असा तू परद्वारी आलास पण तुला परतीची वाट कशी मिळेल? श्रीरामाची पत्नी चोरून नेऊ पाहतो आहेस; पण मी तुला चोराला जिवानिशी मारीन. चोरापाशी असलेले वस्तुजात सोडवून चोराचा घात करतात; तसा मी सीतेला सोडवून, तुझा निःपात करीन. चौदा चौकड्यांचे राज्य असल्याची ऐट मिरवतोस आणि इकडे चोरी

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sayma Foundation Trust and eGangotri

करायला धावतोस. जळो तुझी थोरवी रावणा. तू पापी, महानष्ट आहेस. श्रीरामाच्या कांतेला चोरून नेणाऱ्या तुझा मी घात करीन. श्रीराम त्रैलोक्याचा स्वामी आहे. त्याच्यासाठी मी रामभक्त तुला वांग्याचा किंवा पिकलेल्या फळाचा वाऱ्याने जसा सदेठ विध्वंस होतो, तसा तुझी कंठनाळ आणि दहा शिरे समूळ छेदीन.'' जटायूच्या पंखांच्या हालण्याने निर्माण होणाऱ्या दुर्धर वाऱ्यामुळे रावणाचा रथ चालू शकला नाही. त्या रथाला जुंपलेली गाढवे मागे सरली. तेव्हा रावणाला संताप आला. त्याने धनुष्यावर दोरी चढविली. जटायूला लक्षपूर्वक न्याहाळले, नंतर नाळीक आणि नाराच नावाचे बाण जटायूवर सोडले. जटायूने धीटपणे म्हटले, "तुझ्या अस्त्रांचा कडकडाट, नखांनी आणि पंखांनी पीठ करीन; माझी चोच अतिशय तीक्ष्ण आहे; तिने तुझे दहाही कंठ छेदीन. अरे रावणा, मी जटायू भेटलो नव्हतो तोवर तुझी प्रौढी. आता श्रीरामाची कांता हिरावून नेताना तुला मी ठार करणार आहे. रावण म्हणजे बापडा काय आहे तर दहा तोंडाचा एक किडा. त्याला चोचीने तडाखा हाणून तोंडासकट सगळी हाडे फोडीन. श्रीरामपत्नी चोरल्यामुळे तुझी अपकीर्ती होऊन कीर्ती पळाली. पापकृतीने तुझी शक्तीही गेली आहे रे लंकानाथा. तुला मारायला आता एक क्षणही लागणार नाही. पापामुळे तू निर्वीर्य झाला आहेस. तुला युद्ध करण्याचे धैर्य आहे कुठे. सर्वच राक्षसांना मारून मी श्रीरामाचे कार्य साधतो.''

रावणाशी जटायूचे युद्ध

रावणाने जटायूवर दुर्धर बाणांचा वर्षाव केला. जटायूने पंखांनी ते सर्व उडवून लावले. बाणांचा प्रभाव क्षीण झालेला पाहून रावण अत्यंत क्षोभला. जटायूच्या पंखांच्या झडपण्याने रावणाच्या वीसही हातांना वेठ आले; दहा शिरे कापू लागली; धनुष्य ओढता ओढवेना. जटायूच्या पंखांच्या आवर्तात सापडलेला लंकानाथ रथ पुढे नेऊ शकला नाही. रावण अत्यंत प्रक्षुब्ध होऊन जटायूवर हल्ला करण्याचा नुसता विचारच करत राहिला. जटायू रावणाचा रथ हलूच देत नव्हता त्यामुळे रावण आकांत करू लागला. कारण तेवढ्यात मागून श्रीराम आला तर आपला घात करील असे त्याला वाटत होते. मारीच म्हणाला होता, 'सीताहरण करू जाता आपण दोघेही मरून जाऊ, तेच आता खरे होणार, असे दिसते. मला साहाय्य करायला इंद्रजित, कुंभकर्ण, प्रधान, सैन्य हेही कोणी नाहीत. मग माझे रक्षण करून मरताना वाचवणार तरी कोण?' याप्रमाणे स्वतःशीच विचार करत रावण उद्विग्न झाला होता. 'अत्यंत कष्टाने सीता हाती आली आहे; हिला घेऊन लंकेत पोचलो तर तेथे राम येऊ शकणार नाही कारण तो दुर्घट मार्ग त्याला आक्रमिता येणार नाही. लंकेभोवती किल्ला आहे, ती न दिसणारी आहे, शिवाय भोवती समुद्राचा खंदक आहे. श्रीराम हा जड मानव आहे, त्याला तो अवघड मार्ग ओलांडता येणार नाही. परंतु सध्या हा जटायू येऊन एक दारुण विघ्नच आड आले आहे. हे शंकराने निवारण करावे आणि मला लंकेत जाता यावे. पुढे हा जटायू मार्ग अडवून आहे, मागून श्रीराम आला तर तो माझा प्राण घेईल.' अशी रावणाच्या मनात धाकधुक चालू होती.

रावणाने एकाच वेळी शेकडो बाण जटायूवर सोडले. जटायूने ते तत्परतेने चुकविले आणि तो पंख झडपत रावणाच्या दिशेने झेपावला. रावणाचे मोत्यांच्या झालरी आणि सोन्याने, रत्नांनी मढविलेल्या मंजिरी, असलेले धनुष्य जटायूने झडपून नखांनी खाली पाडले. रावणाच्या मस्तकावरचा मुकुट, ध्वज, चंद्राकित छत्र हे सर्व खाली पाडले. नंतर रावणाच्या अंगप्रत्यंगावर अत्यंत प्रखर नखांनी ओरबाडले. जटायूच्या पंखांचा वारा सहन न होऊन रावण थरथरा कापू लागला. जटायूने चोचीत धरून रावणाचा रथ भिरकावला. त्यामुळे रावणाने सीतेला पोटाशी धरून चपळपणे उडी टाकली. मग जटायूने नखाग्रांनी रथाची गाढवे

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

मारली. नंतर रथ, सारथी यांना पूर्ण चुरून टाकून जटायूने जोरदार दणका दिला. रावण भयकंपित झाला. जटायूने आरंभीच छत्र, धनुष्य, रथ यांचा विध्वंस केल्याने रावण घाबरा झाला. जटायूने धन्यता वाटावी असा पुरुषार्थ केला. जटायूचा आवेश पाहून स्वर्गातल्या देवांनीही त्याचा प्रताप वाखाणला. 'धन्य जटायूचे तप, रामाच्या कार्यासाठी त्याने हा पराक्रम केला.'

रावणाने स्वतःच्या मनाशी विचार केला की, 'जटायू आल्याने सीता मिळणार नाही. तिला सोडून दिली तर त्रिलोकात कमीपणा होईल. उमाशंकरासह मी कैलास पर्वत आंदोळला. कुबेराला जिंकून त्याच्या विमानाचे हरण केले. देवांच्या असंख्य समूहांना मी अद्यापी बंदीत ठेवले आहे. त्याबद्दलचा माझा सर्व अभिमान आणि गर्व या पक्ष्याने पूर्ण नाहीसा केला आहे. या जटायूची चोच अत्यंत तीक्ष्ण आहे. त्याने सर्व शस्त्रांना सपाट केले. यातून काय मार्ग?' असा विचार करून रावण अत्यंत कष्टी झाला. नंतर त्याने कपटमार्ग धरायचे ठरविले. तो राक्षसी गुप्त शक्तीचा वापर करून सीतेला खांद्यावर घेऊन आकाशमार्गाने गुप्तपणे निघाला. परंतु जटायूला अरुणाच्या भेटीमुळे दिव्यदृष्टी लाभली होती. त्याला रावण सीतेला घेऊन जाताना सहजपणे दिसला. त्याबरोबर तो रावणाच्या पाठीमागे लागला. जटायू त्वरित रावणाच्या रोखाने धावला. त्याने आपल्या सबळ पंखांचा त्यासाठी उपयोग केला. रावणाच्या दाही मुखावर त्याने झडप मारली आणि नखांनी रावणाचे सर्वांग फाडले. रावणाला तीक्ष्ण नखांनी ओरबाडल्यामुळे त्याच्या सर्वांगातून रक्ताच्या धारा लागल्या. रावणाला अन्य कोणी साहाय्यक नसल्यामुळे त्याचा देहान्तच आला. नखे, पंख आणि तीक्ष्ण चोच यांच्या घावांनी रावण घायाळ झाला. 'आता माझे प्राण वाचत नाहीत, हा जटायू दारुण योद्धा आहे' असे रावणाला वाटले. जटायू आकाशात तळपत राहून, रावणाचे केस, दाढी, मिशा उपटू लागला आणि त्यामुळे भीतीने, कासावीस झालेल्या रावणाने जीविताची आशा सोडली.

रावणाच्या मनात विचार आला की, मारीचाने म्हटले होते की 'जानकीचे हरण केलेस तर निश्चित मरशील, हे बोलणे सत्यच ठरणार आहे, असे दिसते. जानकीला नेताना हा जटायू माझा घात करील'. तेव्हा रावणाने भयापोटी सीतेला सोडून दिले आणि पळ काढला. रावण त्या वेळी असे म्हणत होता की, 'जटायूने मला गांजले आहे. कोणीतरी त्वरित धावून या', असे आक्रंदून म्हणत रावण सीतेला सोडून पळाला. तेव्हा जटायू म्हणाला, "लंकानाथा, जर तू सीतेला सोडलेस, तर मी तुला न मारता जीवदान देईन. रावणाने सीतेला सोडताच ती अत्यंत सुखी झाली. जटायू हा तिन्ही लोकात बलवान आहे. त्याला केवळ पंक्षी म्हणणे योग्य नाही. सीतेचे हरण करणाऱ्या पाप्याला, दाढी मिशा उपटून रावणाला, धडा शिकवणारा जटायू धर्मात्मा ऋषीच आहे. परंतु जटायूने सीतेची मुक्तता करताच स्वर्गातल्या देवांची धांदल उडाली. कारण, सीता लंकेला गेली नाही; तर रामाकडून आपले बंधन सोडविले जाणार नाही अशी त्यांना धास्ती वाटत होती. देवांच्या मनात ही खळबळ चालली असतानाच रावण पुन्हा सावध झाला.

रावणाने लगेच जटायूला आपल्याशी युद्ध करण्यासाठी आव्हान दिले. तो म्हणाला, "माझ्याजवळ सीता होती त्यामुळे तू मला कासावीस करू शकलास. आता निवांतपणे दोघे युद्ध करू आणि पाहू एकमेकांचा पुरुषार्थ आणि पराक्रम." त्यावर जटायूने प्रत्युत्तरादाखल म्हटले, "श्रीराम आणि लक्ष्मण गुंफेत नसताना, एखाद्या रिकाम्या घरात कुत्रे शिरावे तसा तू येऊन सीता

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized By Sarayu Foundation Trust and eGangotri

हरण करून चोरासारखा भिऊन पळू लागलास. तुझी कसली थोरवी, रामाला भिऊन घाईने पळत तर होतास. आता माझ्याशी युद्ध करू म्हणतोस तर पाहू या तुझा पराक्रम.'' दहा तोंडे आणि वीस हात असलेला राक्षसांचा मुख्य राजा रावण एका पक्ष्याशी युद्धाला सिद्ध झाला. हा पक्षी बलवानांच्या समाजात वरिष्ठ मानला गेलेला जटायू होता. रावणाचे शस्त्र म्हणजे बाण, ते जटायूने पूर्वीच चूर्ण केले होते. आता रावणाने अंगलटीने जटायूवर मुष्टीप्रहार करण्यासाठी धाव घेतली. अत्यंत रागाने आणि शक्तीने रावणाने जटायूवर हाताने प्रहार केला. जटायूने त्वरेने नखांनी तो हात विदीर्ण केला. मग रावणाने दृढपणे लाथेचा प्रहार केला, तर जटायूने चोचीच्या आघाताने घाव घालून रावणाला अस्ताव्यस्त केला. त्यामुळे रावण गडबडला. आकाशात उडत राहून, जटायू रावणाच्या दहा तोंडांवर पंखांनी झडपत होता. चोचीच्या चक्री घावांनी मस्तक आणि नखाग्रांनी तोंड ओरबाडून जटायू रावणाला विदारत राहिला. नखे, पंख आणि चोचीची धार यांनी जटायूने रावणाला त्रस्त केले.

रावणाला जटायूच्या घावांबरोबर असा वाऱ्याचाही फटकारा बसत होता की त्यामुळे तो धाकाने इकडे तिकडे सरकत होता. जटायू नखाग्रांनी त्याला मारत होता. जटायूच्या पंखांच्या आघाताने रावणाला आकाशात उडवला. अधांतरी आवर्तात भोवंडून रावण अखेर मुर्च्छित होऊन, धरणीवर अधोमुख होऊन, पडला. त्या अवस्थेत त्याच्या मनात विचार चालू झाला की, 'दाती तृण धरून जटायूला म्हणावे पुरे-पुरे आता हे युद्ध. मला वाटले होते की हा एक क्षुद्र पक्षी आहे. पण हा तर महाशूर धैर्यवान वीर आहे. माझ्या वीस हातांचा याने चूर केला. हा जटायू दुर्धर योद्धा आहे.' जटायूने रावणाला कठोर शिक्षा दिली; रावणाची दहाही तोंडे विदारून त्याला अधोमुख खाली पाडला आणि रावणावर प्राणसंकट आणले.

रावण कपटाने जटायूला घायाळ करतो

रावणाच्या अंगभूत सामर्थ्याचा प्रभाव जटायूपुढे चालला नाही. तेव्हा अत्यंत दुःखी झालेल्या रावणाने जटायूविरुद्ध कपट करण्याचे ठरविले. काही विचार मनात निश्चित करून तो लगेच जटायूला म्हणाला, ''आपण दोघे उसन्या घावांची झुंज करू या.'' त्यावर जटायूने म्हटले, ''तुला शक्तीच नाही तर उसना घाव फेडशील कसा? एखादा घाव वर्मावर हाणला गेला तरी जो ढळत नाही, पळत नाही तो खरा योद्धा. तू युद्धधर्म जाणत नाहीस आणि बळाची व्यर्थ बढाई मारतो आहेस.'' त्यानंतर रावणाने जटायूला श्रीरामाची शपथ घालून विचारले, ''तुझे मरण कोणत्या ठिकाणी आहे ते मला खरे सांग. अत्यंत मोठ्या संकटात पडल्यानेही हरिभक्त असत्य बोलत नाहीत. पक्षिराजा हे लक्षात ठेव. असा उदंड भावार्थ आहे आणि मधुर शब्दात जो नष्ट असत्य सांगतो त्याचे तोंड म्हणजे नरककुंड, तो काळतोंड्या म्हणावा.'' यावर जटायूने प्रत्युत्तर दिले की, ''जर तू आपला मृत्यू मला सांगशील तर मी तुला सांगेन.'' असा त्या दोघात नेम झाला.

जटायू म्हणाला, ''मला श्रीरामाची शपथ घातली आहेस तेव्हा मी प्राण गेला तरी असत्य बोलणार नाही. दोन्ही पंखात माझे मरण आहे.'' पक्षिराज सत्य बोलून गेला. रावण हा कपटी आणि पातकी होता. त्याने आपले मरण डाव्या अंगठ्याच्या नखात असल्याचे खोटेच सांगितले. जटायू सत्यवादी सात्त्विक योद्धा होता. जटायूने उसळी घेऊन रावणाचे डाव्या अंगठ्याचे नख छेदले. त्या वेळी नेमके जटायूचे पंख रावणाच्या हातात आले; त्याने ते समूळ उपटले. रावणाचा अंगठा छेदला जाऊन जिथे पडला त्याला अवंढापट्टा नाव पडले. हे ठिकाण त्र्यबकाच्या घाटाजवळ आहे.

https://archive.org/details/@sthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized By Sarayu Foundation Trust and eGangotri

जटायूचे मरण जवळ आले तेव्हा तो पडल्या पडल्या श्रीरामनामाचे स्मरण करत राहिला. नष्ट रावणाने कपट केले त्यामुळे त्याचे कुलनिर्दाळण होईल. कपटी, दुष्ट, क्रियानष्ट, अत्यंत पापी, परस्त्रीचा अपहार करणारा रावण कपटाचे फळ भोगील. कपटामुळे जटायू मूर्च्छित होऊन जमिनीवर पडला तरी श्रीरामाच्या भेटीसाठी त्याने आत्मा कंठात धरून ठेवला. तो मुखाने स्मरण, चित्तात चिंतन, डोळ्यांनी अवलोकन करीत सतत श्रीरामाचे ध्यान हृदयात करत होता. जटायूला पाषाण, तृण, वृक्ष, वेली, उपवन या सर्वांठायी संपूर्ण श्रीरामरूपच दिसत होते. त्याची अशी भावना होती की आपण श्रीरामाच्या कार्यात प्राण वेचले, तेव्हा कृपाळू श्रीराम स्वयं सर्वरूपात प्रेमाने भेटीला आला आहे.

जटायूच्या मनात हीच इच्छा होती की आयुष्याच्या अंतकाळी श्रीरामाला दृष्टीने पाहावा. देह पडताना आपल्या भक्ताच्या भेटीला श्रीराम आला आहे. रावणाला मी माझा वैरी मानत नाही, त्यानेच तर परमार्थाचा साहाय्यकारी होऊन श्रीराम चराचरात भेटवला आणि मला सुखसागरात सुखी केले. आपल्या भक्तांचे मनोगत पुरविणे श्रीरामच जाणतो. जटायू हा जन्म-मरणाच्या पलीकडे नेऊन श्रीरामाने आनंदभरित आणि सुखी केला.

अध्याय अठरावा

जटायूला रावणाने कपटाने मारले हे पाहून सीतेला फार दुःख झाले. जटायूचे पंख जेव्हा रावणाने उपटले तेव्हा जटायू मूर्च्छित होऊन जमिनीवर पडला. त्याचे दुःख पाहून सीताही दुःखी झाली. 'श्रीराम, लक्ष्मण आले नाहीत तरी जटायूकडून सुटका केली जाईल असे वाटले होते, पण त्यालाच मरण आले. रावण कपटी दुष्टात्मा आहे.' ती जटायूला म्हणाली, "तुझे मरण मलाच का येत नाही. तू पूर्ण बलवान आहेस आणि माझ्यासाठी तू आपले प्राण वेचले आहेस. युद्धात रावणाला गांजून माझी तू सुटका केलीस. परंतु त्या महापापी रावणाने तुला कपटाने मारले," असे म्हणून सीता कपाळ बडवून घेत म्हणाली, "जो माझा साहाय्यकारी त्याला निशाचराने मारले; जर श्रीराम त्वरित आला असता तर तुझे प्राण वाचले असते. श्रीरामाने रणात रावणाला मारून माझी त्याच्यापासून सुटका करून तुझे प्राण वाचविले असते. जटायूने पूर्ण सामर्थ्याने धाव घेतली, तो माझा साहाय्यकारी, कैवारी पाठिराखा झाला, तोही त्या दुष्ट निशाचराने मारला." या वेळी रावणाचा विचार चालला होता की, "सर्व चराचर श्रीरामाला साहाय्य करते आहे. भलताच कोणी सीतेला सोडवील. त्यापूर्वी हिला शीघ्र लंकेला न्यावी. शंकराने जटायूचे विघ्न टाळले. आता दुसरा कोणी आला तर माझे लंकेला पोहोचणे अशक्य होईल. यासाठी लवकर लंकेला जावे.

सीतेकडून धाक, रावण सीतेसह लंकेकडे

जटायूचा घात केल्याने सीता दुःखाने आक्रंदू लागली. तिला धरण्यासाठी पुन्हा रावण धावला. तेव्हा सीता रावणाला म्हणाली, "तू मला लंकेला नेलेस तर संपूर्ण राक्षसकुलाचा नाश करशील. तू स्वतःही नष्ट होशील. जटायूशी रण करताना तू दाती तृण धरून होतास. आता श्रीरामबाण आला तर तुझ्यासहित तुझे कुळ नाश पावेल. कसले समुद्राचे अफाटपण, काय ते लंकेचे त्रिकूट, श्रीराम एका बाणानेच तुझ्यासहित राक्षसांचे पीठ करील." असे सीता बोलताच रावणाला राग आला. त्याने धावून सीतेला केसांनी धरली, जसे अंतकाने जीवाला धरावे. रावणाने सीतेला धरताच तिने रागाने त्याला दूर लोटले. त्यामुळे रावण धडपडून पालथा पडला. पुन्हा उठून तिला धरायला तो धावला. ज्याप्रमाणे बेडकाजवळ साप येताच बेडूक

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

थरथरू लागतो, त्याप्रमाणे सीतेचा प्रताप पाहून रावणाला कंप सुटला. सीता जर युद्धाला प्रवर्तली तर ती आपल्याला आटोपणार नाही, हे रावणाला समजले. श्रीरामाची ही कांता दुर्धर असल्याचे त्याला जाणवले. असा रावणाचा विचार झाला, तेव्हा त्याने आपल्या वीस हातांनी सीतेला आवळून धरली. जसा स्वप्नातला धनाचा ठेवा पकडून ठेवावा तसे त्याने सीतेला धरले होते. 'मला सीता प्राप्त झाली आहे' हा रावणाचा मनोरथ केवळ स्वप्नप्राय व्यर्थ होता. जर सीता निर्बळ असती तर त्याने तिला बलात्काराने भोगली असती. परंतु तिची सबलता पाहून अखेर रावणाने तिला शरणभावाने प्रार्थना केली. सीता रावणापासून क्षणभरही न लागता स्वतःची सुटका करू शकली असती; पण सर्व दुष्टांचा संहार करण्यासाठी, आपले हरण झाले म्हणून आक्रंदत होती. ती दुसरी सीता (मायासीता) होती जिचे रावणाने हरण केले होते आणि तिला लंकेला नेत होता.

अलंकार टाकून सीता मार्ग दाखवते

जटायूने रथ भंगला तेव्हा रावणाने विमान आणवले नाही. तो सीतेला घेऊन आकाशमार्गाने जाऊ लागला. जटायूने सीता सोडविली त्यामुळे सुखी झालेले ऋषीजन, लगेच सीतेचे हरण झालेले पाहून तळमळू लागले. रावण सीतेला नेत असल्याचे पाहून सर्व प्राणिमात्र दुःखी झाले. सीतेला खांद्यावर टाकून रावण आकाशमार्गाने लंकाभुवन गाठण्यासाठी वेगाने निघाला. ज्या मार्गाने तो जात होता, सीतेला नेत होता, तो मार्ग श्रीरामाला कळावा म्हणून सीता आपल्या खुणा खाली फेकत राहिली. आपल्या माळेतली फुले इत्यादी टाकून ती मार्ग दाखविण्याचा प्रयत्न करत होती. श्रीराम धावा ऐकून येईल ही सीतेची आशा होती. त्यामुळे मार्गामध्ये ठिकठिकाणी, जागोजाग खुणेची चिन्हे टाकत राहिली. मोठे पर्वत ओलांडून, महा कठीण असा मार्ग आक्रमून जात असल्यामुळे श्रीरामाला आपला शोध घेता यावा म्हणून सीता आपली काही वस्त्रेही मार्गावर टाकत राहिली. मोठे पर्वत, कृष्णा, वेण्या, तुंगभद्रा, या नद्या उल्लंघून रावण आपल्याला लंकापुरीला नेतो आहे आणि आपला धावा ऐकून श्रीराम अजूनही येत नाही, आपली सुटका करणारा कोणी नाही या विचाराने सीता अत्यंत दुःखी झाली.

श्रीरामाला शोधकार्यात साहाय्य व्हावे म्हणून रामपत्नी सीता सभोवार पाहात असताना तिला एका पर्वताच्या माथ्यावर पाच वानर बसलेले दिसले. हे पाचही वानर श्रीरामाचे जीवप्राण होतील अशी सीतेला पूर्ण खात्री वाटली; त्यामुळे तिने काही वस्त्रे तेथे टाकली. अशी वारंवार वस्त्रे टाकणे हे जरी योग्य नव्हते, तरी अवतारकार्याची थोरवी जाणून, आपल्या प्रिय पतीला शोधमार्ग सांगण्यासाठी, ती ही वस्त्रे सोडून टाकत होती. ती सुवर्णशोभा असलेला पीतांबर, दिव्य अलंकार हे शोधकार्यार्थ सोडत होती. त्यावेळी नीळ, पीत, आरक्त असा हा माझ्या समोर वानरांमधला माझा सखा आहे, तो श्रीरामाला शोध सांगेल ज्यावर श्रीरामनाम कोरले आहे असा अलंकार, आंगठ्या, हातातली काकणे हे सर्व पीतांबरात बांधून खाली टाकले. सीतेने टाकलेले ते अलंकार हनुमंताच्या हातात पडले. त्याने ते मस्तकाचा स्पर्श करून त्याविषयी आदर व्यक्त केला आणि सुग्रीवाला सांगितले. तेव्हा सुग्रीवाने हनुमंताला म्हटले, "हे तू तुझ्याजवळच ठेव. आकाशातून हे कसे आले बुवा?" सुग्रीवाने आश्चर्य व्यक्त केले. ज्याचे भाग्य चांगले त्याच्याच हातात श्रीरामाची मुद्रा-अंगठी-येते. हनुमंताच्या चित्तात उल्हास निर्माण झाला. तो रामकार्यासाठी सिद्ध झाला. तेवढ्यात "श्रीरामा लवकर ये. धाव घे" असे सीतेने उच्चारलेले शब्द त्यांच्या कानावर पडले. आकाशातून हे कोण बोलते

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

आहे या अपूर्वतेने वानर चकित झाले. श्रीरामाचे अमृतमय नाम नभाच्या पोटातून उमटताना ऐकून वानर वर दृष्टी करून पाहू लागले; परंतु बोलणारी व्यक्ती त्यांना दिसेना. स्पष्ट शब्द तर कानावर येतात आणि बोलणारा दिसत नाही. आकाशवाणी म्हणावी तर शब्द आहेत आक्रोशाचे हे कसे?

हनुमंताला सीतेचा आक्रोश ऐकून स्फुरण चढले. तिची सोडवणूक करण्यासाठी त्याने आकाशात झेप घेतली. दोन्ही मुठी वळून, डोळे विस्फारून, रागाने शेपूट थरथरत ती जमिनीवर आपटून रावण वधार्थ तो देदीप्यमान काळाग्निरुद्र जणू आकाशच गिळण्याच्या आवेशाने झेपावला. दहा तोंडांच्या रावणावर करकरा दात खात, रोम थरारत, अत्यंत भेसूर दिसणारा तो वानरवीर अनिवार रागावला होता. त्या वानरवीराचे उड्डाण ध्रुवलोकापर्यंत जाणार हे पाहिल्यावर रावण खाली येऊन सीतेसह लंकेला गेला. हनुमंताने हे पाहिल्यावर, रावणाने भीतीने समुद्राच्या पैलतीरावर लगबगीने पळ काढला. जटायूप्रमाणे येथेही दारुण विघ्न उभे राहील या धाकाने रावणाने पळून जाऊन लंका गाठली. रावण लंकेला गेलेला पाहून हनुमंताने आपला राग आवरला. त्याचवेळी लंका जाळण्याविषयी दृढ निश्चय मनात करून ठेवला. त्याचप्रमाणे राक्षसांचे धुरीण आणि त्यांचे समूह मारीन अशा निश्चयाने तूर्त त्याने मन शांत केले.

रावण लंकेत गेल्यावर 'सीता मला प्राप्त झाली' या कल्पनेने उल्हसित होऊन मोठ्या आनंदात नाचत होता. शिवाय 'इथे श्रीराम कसा येईल, त्याची केवळ तडफड होईल. कारण, लंकागड दुर्घट आहे, शिवाय भोवती समुद्राचा खंदक आहे, येण्याचा मार्ग अत्यंत अवघड असल्याने श्रीरामाचे येथे काही चालणार नाही' या विचाराने तो आनंदात होता. सीतेला त्याने सांगितले, "तुला मी आकाशमार्गाने घेऊन आलो आहे. श्रीराम आणि लक्ष्मण पायी चालणारे, ते या ठिकाणी कसे येणार? वाटेतल्या वनामध्ये क्रूर श्वापदे आहेत, दुर्घट पर्वत आहेत, दुस्तर असे नद्यांचे प्रवाह आहेत, तेव्हा राम इथे येणार कसा?"

रावणाकडून सीतेचा अनुनय, ती धिक्कारते

रावण सीतेला प्रथम फुशारकीने आणि नंतर अनुनय करीत म्हणाला, "सीते, श्रीराम येथे येणे शक्य नाही; परंतु विशेष कष्ट करून समज आलाच तरी ते दोघे राम, लक्ष्मण हे सामान्य मानव; त्यांना मारायला मला किती वेळ लागणार? तेव्हा तू आता त्यांची आस्था सोडून दे. त्या दोघांचे मिळून चार हात आणि माझ्या एकट्याचे वीस हात आहेत. जानकी तुझ्या त्या रामराजाचा मी पैजेने वध करीन. तेव्हा रघुनाथ इथे येणे शक्य नाही, असा विचार करून तू आता माझ्याशी लग्न करून राज्यभोग सुखाने भोगत राहा."

"अनर्घ्यरत्नांचे अलंकार, मनोहर दिव्य वस्त्रे, जडशीळ पायीच्या साखळ्या, मण्यांचे चित्रविचित्र हार, चंदन, अगरू, कस्तुरी, कुंकुम, केशर यांच्या उटींचे विलेपन आणि पुष्पांचा सुखद शेजार तुला इथे मिळेल. आपण दोघे विमानातून नंदनवनात जाऊन क्रीडा करू; अथवा लंकाभुवनात, अशोकवनात कुठेही सुखोपभोग घेऊ. इंद्रादिक सुरवरांना मी तुझ्या आज्ञा पाळणारे सेवक बनवीन; मंदोदरीसह माझ्या सर्व स्त्रियांना तुझ्या कायमच्या दासी करीन. मृगाच्या काचोळीची काय थोरवी, तुला मोत्यांच्या काचोळ्या घालायला, अर्धा चंद्र कपाळावर लावायला आणि हत्तीच्या गंडस्थळावरून आणलेली मोत्यांची जाळी मस्तकावर घालायला देईन. श्रीरामाची प्रिया

https://archive.org/details/muthulakshmiacademy Bhuvan Vani Trust, Lucknow

CC-0. In Public Domain. Digitized By Sayta Foundation Research Academy, eGangotri

दशशिर रावण भोगतो आहे ह्या ब्रीदाचा तोडर आणि रावणाने सीता सुंदरी हरण केली हा अंदुवांचा गजर असे ऐश्वर्य तुला लाभेल. पायातल्या वाकी गर्जून सांगतील की सीता ही रावणाची पट्टराणी आहे.'' असे रावण प्रौढीने बोलला.

सीतेला रावणाचे बोलणे ऐकून संताप आला. ती त्याचा धिक्कार करत म्हणाली, ''मर, निर्लज्ज रावणा मर. दुष्टा काय बोलतोस हे. तुझ्यासारखा निर्लज्ज जगात कोणी नसेल. तू स्वयंवराच्या प्रसंगी धनुष्याकडून शिक्षा भोगलीस; सभेत तुझे तोंड काळे झाले ते श्रीरामाने धनुष्य भंगले म्हणूनच झाले. मग त्याचवेळी माझे हरण न करता काळे तोंड घेऊन पळालास कशाला? तू त्या शूर्पणखेसारखाच आहेस, नाकाशिवाय बडबड करणारा. रामासमोर तुझे काळे तोंड राहणारच नाही. माझी अभिलाषा धरून भीक मागायला आलास. त्यावेळी मला माता म्हणालास. आता पत्नी करीन म्हणतोस. खरोखर, तुझ्यासारखा मातृगमनी त्रिभुवनात नाही. संन्यासी असून चोरी, यतिधर्मी असून परद्वारी, वाः! तू अनेक दृष्टींनी मातृगमनी आहेस हीच तुझी थोरवी आहे. जटायूशी युद्ध करताना, दाती तृण धरून, मला सोडून पळून गेलास, तेव्हा तुझा पराक्रम कुठे गेला होता? श्रीरामाची शपथ घालताच जटायूने सत्य सांगून टाकले आणि तू कपटाने बोलून जटायूचा प्राण घेतलास. माझा भोग घेऊ पाहणाऱ्या रावणा, लक्षात ठेव, कावळ्याला विष्ठाच भक्षण करावी लागते; अमृतपान चकोरासाठी असते; त्याप्रमाणे रावणाला राक्षसीच भोगाव्या लागतील; सीता श्रीरामासाठीच आहे. जानकीची अभिलाषा धरून व्यर्थ मरशील. हत्तीचे आभरण गाढवावर घातले तर ते गाढव मरेल; त्याप्रमाणे सीतेची अभिलाषा धरणाऱ्या रावणाच्या कुळाचाच नाश होईल. ज्याप्रमाणे सर्व रस चाखणारा कीटक दीप चाखू लागला तर त्याचे मरण निश्चित; त्याप्रमाणे राज्य भोगणाऱ्या रावणाने सीतेची इच्छा धरली की त्याचा प्राणान्त ठरलेलाच. स्तनपान करणाऱ्या बालकाला पक्वान्ने जिरवता येणार नाहीत तशी सीता लंकानाथा तुला मिळणार नाही. जरी रत्न अनर्घ्य असले तरी त्याला शाळिग्रामाची योग्यता येत नाही, तशी श्रीरामाच्या भोगासाठी असलेली सीता दहातोंडच्या तुला कशी मिळेल? ऐरावतावर इंद्र बसतो, तेथे गाढव बसू पाहील तर मरेल, तसा सीतेची अपेक्षा धरणारा रावण हा कुळासहित नष्टच होईल. सुंदराला आरसा सुखी करतो, तोच नकटीला संताप आणतो. रावणाचे नकटीसारखे पाप आहे त्यामुळे सीता त्याला सुख देणारच नाही.'' अशा अनेक दाखल्यांचा युक्तिवाद करून सीतेने रावणाची निर्भत्सना केली. सीतेने केलेल्या उपहासाने चिडून रावणाने आपल्या आठ बलवान, कपटी, अशा राक्षसांना बोलावून म्हटले, ''तुम्ही दुर्धर निशाचर आहात. जनस्थानात एकत्र राहून, राम आणि लक्ष्मण यांचा वध करण्यासाठी तत्परतेने जाऊन राहा. त्रिशिरा, दूषण आणि खर यांचा वध करणाऱ्या श्रीरामाशी आमचे हाडवैर आहे. त्यासाठी तुम्ही आठही वीर तिथे जाऊन गुप्तपणे कार्य साधण्याचा प्रयत्न करा. रामाशी समोरा-समोर युद्ध केलेत तर तो सगळ्यांना जिवानिशी मारील. तेव्हा गुप्त वेषाने जाऊन त्याच्या वधाचे कार्य साधा. रामाला मारायला जाल तर लक्ष्मण तुम्हाला मारेल; म्हणून दोघांना एकाच वेळी मारण्याचा प्रयत्न करा. वनात ते झोपले असताना तसेच दोघे मारा; किंवा भोजन करताना, पहुडले असताना, पाणी पिताना, अशी संधी साधून मारा. श्रीरामाने तुम्हाला पाहिले तर जगण्याची गोष्टच करू नका. तो राम बाणांच्या प्रभावी वृष्टीने तुम्हा आठांचीही शरीरे नष्ट करील. यासाठी स्वतःला लपवून, लोकात किंवा वनात

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized By Sayaji Rao Gaekwad Research Academy / Sarayu Trust Foundation and eGangotri

सावधपणा ठेवा. सीतेचा शोध घेत राम वनात फिरत असेल तेव्हा त्याचा घात करावा. छळ, बळ, कपट काहीही करा आणि दोघांना एकाच वेळी मारा. या कामासाठी तुम्ही समर्थ आहात, तरी आपले कार्य निश्चयाने साध्य करा. जर तुम्ही रामाचा आणि लक्ष्मणाचा वध केलात, तर तुम्हालाच ते जनस्थान देईन. मग खुशाल आपले ढोल वाजवत तेथे सुखाने नांदा."

सीता रावणाच्या महालात

रावणाने आपल्या आठ राक्षसांना रामाला मारण्याचे काम सांगितले आणि नंतर तो सीतेला आपल्या भुवनात नेण्यासाठी आला. त्याने गृह चहूबाजूंनी शृंगारले. गुढ्या, तोरणे, मखरे उभारली. ते मनोहर गृह पाहून सीता आपल्याला वश होईल अशी त्याची कल्पना होती. रावणाने सीतेला हाताने धरून, आपल्या मंदिराची अपूर्व शोभा आणि आपले सामर्थ्य दाखविण्यासाठी एकांतात आणली. कोणी पाहू शकणार नाही, दुसऱ्या कोणाच्या दृष्टीला सीता पडणार नाही, अशाप्रकारे त्याने सीतेला त्या एकांत ठिकाणी त्वरेने आणली. सीता रावणासह त्या एकांत ठिकाणी मोठ्या निःशंकपणे आली. तिने आपल्याशी निश्चय केला की, 'रावण जर माझ्याशी लगट करू लागला, तर मी त्याचा संहार करीन. जगदंबेने जसे शुंभ, निशुंभ आणि चंडमुंड दुखंड केले, तसे या रावणाच्या बळाचे बंड मी खंडविखंड करीन. श्रीरामाच्या सेवेचे स्पष्ट आणि गहन बळ माझ्या अंगात आहे. हा दहा तोंडाचा रावण नावाचा किडा माझ्याशी कसली झोंबी करणार! याच्या वीसही हातांना माझ्या डाव्या हाताने दडपून टाकीन. त्याची कुंडले घातलेली दहा शिरे मी न कळता खुडीन. याची कंठनाळ छेदायला शस्त्रेच कशाला हवीत; रावण म्हणजे गवताचा भारा आहे, मी त्याचे शिर नखांनीच खुडीन." सीतेने पुढचाही विचार केला, 'जर इंद्रजित, कुंभकर्ण आले तर एका थपडेत त्यांना मारीन. कुमार, सेना, प्रधान यांना क्षणात संपवीन. माझे लंकेतले आगमन हे रावणाचे सैन्यासह निर्दाळण करण्यासाठीच आहे. तर मग एकांतात मिळालेल्या संधीची भीड कोण ठेवणार आहे.' श्रीरामाच्या सेवेचे संपूर्ण फळ हेच की दारुण द्वंद्वाचा नाश करावा; असे जर होणार नसेल तर ते खरे भक्तपण नाहीच. सीता ही श्रीरामाची आत्मशक्ती असल्याने, ती रावणाच्या हातात कशी सापडेल. या विचाराचे बळ लाभल्याने एकांतातही सीता निःशंक राहिली.

रावणाचा अनुनय, सीतेकडून धिःकार

सीता आपल्या स्वतःच्या बळावर मिळवता येणार नाही, हे रावणाला पूर्णपणे कळले होते. त्यामुळे त्या विषयासक्त रावणाने सीतेला प्रेमळपणे वश करण्याचा प्रयत्न सुरू करून प्रथम तिचे चरणवंदन केले. तिच्या पायावर मस्तक ठेवून, त्या एकांतात तो म्हणाला, "विषयवासना धरून शरण आलेल्या माझ्यावर, हे सीते, तू कृपा कर. श्रीरामाचा त्याग करून मला तू वर. ही माझी प्रार्थना व्यर्थ करू नको. शरणागताची उपेक्षा करू नको. मी तुझ्या पायावर मस्तक ठेवले तेव्हा ते अत्यंत कोमल वाटले. हाताच्या स्पर्शाला मृदुत्व जाणवले. त्यामुळे माझे मन भोगासाठी कळवळले आहे. जिचे पायच एवढे सुखरूप तिचा भोग जर मिळाला तर मला अमाप सुख मिळेल. तेव्हा मला स्वीकारून माझ्यावर कृपा कर. तसा मी रावण अत्यंत गर्विष्ठ आहे; ब्रह्मादी देवांनाही शरण न जाणारा आहे; तिथे दानवांना, मानवांना मी काय मानणार! असा मी तुझे पाय वंदन करतो आहे. तुझ्या चरणांना वंदन करून सांगतो, मी तुझा आज्ञाधारक सेवक होईन. नित्य तुझी कृपायाचना करून भोग घेईन." हे बोलून रावणाने सीतेचे पाय धरून, काकुळतीने विनविले की, "माझा

https://archive.org/details/muthulakshmiacademy Bhuvan Vani Trust, Lucknow

CC-0. In Public Domain. Digitized By Sarayu Foundation Trust and eGangotri

भोगासाठी स्वीकार कर."

सीता रावणाचे बोलणे, वागणे पाहून हंसली आणि त्याला झिडकारत म्हणाली, "श्रीराम हा सुरवरांनाही वंद्य आहे; त्याच्या पुढे राक्षसांचा राजा तुच्छ आहे. एखाद्याने आरोहणासाठी गजेंद्र सोडून गाढव निवडावे तसा मला तू आहेस. अमृतपान सोडून जशी कावळ्याची विष्ठा भक्षण करावी, तसा श्रीरघुपती सोडून तुच्छ रावण भोगावा असे कसे व्हावे? ज्याप्रमाणे सत्संगती सोडून डुकराच्या पंक्तीला बसावे त्याप्रमाणे श्रीरघुनंदन सोडून जर दुर्मती रावण भोगला तर होईल. अरे, कावळ्याच्या घरी श्राद्ध असले तर पितृतर्पणाला विष्ठाच असणार; पण ऋषिजन का ते कावळ्यांचे खाणे स्वीकारतील?" असे म्हणून सीतेने अनेक प्रकारे रावणाचा धिःकार केला.

रावणाचा संताप, पुन्हा सीतेकडून धिःक्कार

सीतेने केलेल्या अपमानाने रावण चांगलाच संतापला आणि निर्धारपूर्वक म्हणाला, "आता तुला कल्पान्तीही श्रीरामाचे दर्शन मी होऊ देणार नाही. तुला रामाची भेट, त्याच्याशी गोष्टी हे तर मी करू देणारच नाही; पण हा महाहट्टी रावण श्रीराम तुझ्या दृष्टीलाही पडू देणार नाही. सीते, नीट सावधपणे ऐक. मी तुला मारून टाकीन किंवा तू शरण येईपर्यंत तुला कुजवत ठेवीन. जोवर तू मला शरण येत नाहीस तोवर तुला अन्नपाणी, अभ्यंग स्नान, मर्दन, सुखासनावर शय्या यातले काहीही मिळणार नाही. जिथपर्यंत तू माझी बायको होत नाहीस तिथपर्यंत तुझ्या डोक्यावर प्राणी पडतील, वस्त्रे वज्रासारखी लागतील. जरा त्या तिकडे पाहा, इंद्रजित, कुंभकर्ण, कुमार, प्रधान, कोट्यवधी राक्षसगण हे सारे आहेत, त्यांच्यापुढे श्रीराम कोण किडा. श्रीराम आणि लक्ष्मण हे तर राक्षसांचे खाणे आहे. तुझी सोडवणूक कोण करणार आहे? पण तू तर मूर्ख आणि आग्रही आहेस. अग, माझ्या राक्षसांनी घाला घातला आणि राम, लक्ष्मण गेले, मेले. सीते, आपला दुराग्रह सोड आणि माझा अंगिकार कर. तुझे महापाप भोगण्यासाठी वनात रामाबरोबर कष्ट केलेस आणि आता परम पुण्याने लंकेश मिळाला आहे तर जानकी सुखाचा उपभोग घे. जर तुझ्या माथी पापच असेल, तर तू लंकानाथ सोडून, श्रीराम भोगू म्हणशील; परंतु तो तर आता मेला आहे." रावणाने सीतेला घाबरविण्यासाठी सांगितले.

सीता मात्र रावणाचे बोलणे ऐकून मोठमोठ्याने हसली आणि म्हणाली, "अरे, तूच माझा भोग घेण्याच्या निमित्ताने मरणापाशी धरणे धरून बसला आहेस. पतंगाने दीपाला मिठी घातली तर तो तेलाबरोबरच जळून मरतो. माझ्या भोगाची इच्छा धरून, मरणासाठी तू रावणा त्याच दशेला पोचला आहेस. परस्त्रीची इच्छा धरून चोरी केल्याने आयुष्य, यश, कीर्ती ह्या गोष्टी तुझ्यापासून गेल्या. तुझ्या मरणाने लंकेला खरेच वैधव्य प्राप्त होईल. श्रीरामाला मारल्याचे तुझे बोलणे निःशंसय खोटं आहे. अरे, तो श्रीराम काळाचा नियंता आहे. तेव्हा मी काय सांगते ते ऐक. श्रीरामाची थोरवी तू जाणत नाहीस. मृत्यूच रामाची आज्ञा पाळतो. दशाननाचे कुळासह मरण आणि राक्षसांचा संहार हा रामाच्या बाणाने होणार. त्याचा बाण अत्यंत तीक्ष्ण असल्यामुळे समुद्रही त्याला वाट करून देईल. गिरी त्रिकूट त्या बाणाने भेदले जाऊन, अखेर तुझे दाही कंठ छेदले जातील. लक्ष्मण हा क्षणार्धात सबळ आणि रणप्रवीण इंद्रजिताला मारील. तसेच घाव पडून कुमार, वीर, प्रधान, सैन्य या सर्वांचे प्राण जातील. श्रीरामाचा बाण लागून झोपाळू कुंभकर्णाचे नाक, कान कापले जातील. तो उभ्या उभ्याच प्राण सोडील" हे सांगून सीतेने रावणाकडे क्षुब्ध दृष्टीने पाहिले. रावणाला ते पाहून कंप सुटला. लगेच त्याने काही क्रूर अशा दूतांना बोलावले.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized By Sarayu Foundation Trust and eGangotri

रावणाने स्वतःशी विचार केला की, 'हिच्या बरोबरचा एकान्त योग्य नव्हे. कारण ही रागाने माझा घात करील.' नंतर आपले कार्य कसे साधावे याचा तो विचार करू लागला. 'हिला बलात्काराने भोगता येत नाही, पाया पडूनही ती आपला स्वीकार करत नाही. तेव्हा ही खरोखरच पतिव्रता असून राज्यभोगानेही हिला भुलवणे शक्य नाही.' रावणाला सीतेचे पातिव्रत्य मान्य झाले आणि आपल्या स्वार्थासाठी त्याने जानकीला जिवंत ठेवले. त्याने आपली बहीण त्रिजटा हिला कानगोष्ट सांगून सीतेला अशोकवनात नेऊन ठेवण्याविषयी सांगितले.

अशोकवनाबद्दल ऐकताच सीतेने शकुनगाठ बांधली आणि तिचा शोक संपला. श्रीरामाची भेट होणार असे तिला वाटले. अशोकवनाचा उल्लेख कानावर पडताच ती अशोकवन डोळ्यांनी पाहू लागली, श्रीरामाच्या हृदयभुवनात अशोक दिसला. त्यामुळे सीता त्या ठिकाणी जायला उत्सुक झाली. सीतेला अशोकवनात ठेवण्यात आले. अशोकामध्ये श्रीराम असतो त्यामुळे तो सीतेपाशी राहणार. अ-शोक असतो तेथे श्रीराम असतो. सीता त्या अ-शोक स्थितीला पोचली.

अध्याय एकोणिसावा

सीतेची अशोकवनात पाठवणी केल्यावर, रावणाने भय दाखविण्यास दुष्ट, दुर्धर राक्षसींना पाठविले. त्यामुळे तरी भीतीने सीता आपल्याला वश होईल, असे त्याला वाटत होते. सीतेबरोबर नित्य संरक्षणार्थ रावणाने विकट, विक्राळ, विरूप, विकृत अशा राक्षसी ठेवल्या.

सीतेला भिवविणाऱ्या राक्षसी

सीतेच्या संरक्षणासाठी ठेवलेल्या राक्षसींचे दर्शन भीतीदायक होते. नाना रूपांतल्या, भिन्न आकारांच्या आणि भयानक, भेसूर अशा त्या राक्षसी सीतेपाशी आल्या. एकीचे वदन विक्राळ होते एकीच्या सर्वांगाला एकच कान असून, त्या नग्न, कराळ राक्षसीला त्या कानाचेच आवरण होते. तिच्या कानाच्या फटकाऱ्याने नक्षत्रे गारांसारखी खाली पडत असत. ज्यांची सुरासुरांनाही भीती वाटायची अशा त्या भयंकर आणि भेसूर राक्षसी सीतेला भय दाखविण्यासाठी आल्या. एकीचे काटेरी, पिंजारलेले उभे केस असून ते लोकपाळांना धडक देत होते. एकीचा डोळा कपाळावर होता. अशा त्या जानकीला छळण्यासाठी आल्या. एकीचा कान आंथरूण, तर एक कानाच्या आवरणात, त्या कानांचा त्रिभुवनाला धाक; एकीचे स्तन एवढे मोठे की बारा गाव त्याचा विस्तार, तो एक स्तन धरायलाही दुर्धर; त्या स्तनाच्या आघाताने राक्षस मरायचा. भेसूर तोंड, पसरलेली दंतपक्ती, दातांनी दिग्गजांचे चूर्ण करणारी, दाताखाली वीरांना मरण देणारी अशी एक होती. दुसऱ्या एकीचे केसच एवढे लांब की तेच तिचे नेसणे आणि तेच तिचे पांघरूण; ते केस बाणाग्रासारखे तीक्ष्ण असून त्यांच्या भीतीनेच पळापळ व्हायची. त्या राक्षसींच्या समूहात घोडमुखी, अजामुखी, गजमुखी, सिंहमुखी, श्वानमुखी, शूकरमुखी अशाही विक्राळ राक्षसी होत्या. उंटासारखे तोंड, लांब ओठ, अशी एक एकाच घोटात प्राणी संपवत असे. विक्राळ तोंड, दीर्घ चामडे, तांबडी काटेरी जीभ अशी एक राक्षसी होती. तिला पाहून प्राणी प्राण सोडत. राक्षसांची प्रेते ती खात असे. अशा त्या सर्व राक्षसी सीतेपाशी येऊन तिला भीती दाखवत होत्या.

राक्षस माणसांना खातात; पण राक्षसांनाही खाणाऱ्या विक्राळ राक्षसी रावणाने सीतेकडे भय दाखविण्यासाठी पाठविल्या. कारण, त्या भयापोटी सीता त्याला वश व्हावी, अशी त्याची कल्पना होती. वाकडे तोंड, लांब नाक, ते नाक आणखी

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized By Sarayu Foundation Trust and eGangotri

लांब होणारे, अशा त्या राक्षसीच्या श्वासांच्या आवर्तात जग शतकानुशतके तळमळत राही. तिच्या नाकातल्या केसात गुंतलेले रेडे ओरडत होते; सिंह तडफडत होते; भयानक आकाराच्या तोंडात हत्ती गरगरा फिरवले जात होते. नखांची आयुधे केलेल्या क्रूर राक्षसीला तीक्ष्ण आणि लांब नखे होती. ज्या नखांना इंद्रादिकही भीत असत. नखांचा आघात अती जोरदार असून त्यामुळे शस्त्रांचे चूर्ण होई; पर्वत सपाट केले जात; अशा दुष्ट नखायुध राक्षसी होत्या. एकपाद, त्रिपाद, पंचपाद, हस्तपाद अशा राक्षसी शस्त्रसज्ज होत्या. त्यांना उन्माद चढला होता.

श्रीवाल्मीकी रामायणात अनेक राक्षसींची वर्णने आहेत; परंतु तो विस्तार माझ्या हाताने करवत नाही. कारण, त्यामुळे ही कथा आणि ग्रंथ वाढत जाईल. तेव्हा पुढील कथेची संगती न सुटावी म्हणून साधू-संतांनी कृपा करून हे समजून असावे. स्वतः रावण त्या राक्षसींना काय सांगत होता, ते ऐका. "सीतेला दुर्धर भीती दाखवा. अत्यंत मोठ्या आवाजात गर्जना करा; अपशब्दांचा आवेशाने उच्चार करा; याचा परिणाम होऊन ती चळचळा कापली पाहिजे. ती उद्विग्न होऊन, भयाने मूर्च्छित होऊन पडली पाहिजे. जेव्हा ती स्वतःहून 'मी रावणाला सुखाने आंगिकारते' असे म्हणत नाही तोवर भीती दाखवत राहा"

राक्षसींचे प्रयत्न, सीतेवर परिणाम नाही

रावणाने राक्षसींना प्रत्यक्ष अशोकवनात पाठविण्यापूर्वी सांगितले की, "तुम्ही भय दाखविल्यामुळे सीता मला अनन्य भावाने शरण आली तर तिची समजूत घाला, तिला सुखी आणि शांत करा. तिला म्हणा, 'सीते तुझे भाग्य थोर म्हणून तुला दशानन नवरा मिळाला. ती वश होताच तिला आनंदाने माझ्याकडे आणा." रावणाची आज्ञा ऐकल्यावर राक्षसी) एकत्रित होऊन, कोयते, मुद्गल, त्रिशूळ ही शस्त्रे हातात घेऊन, दुर्धर हाका देत अशोकवनात आल्या. त्यांच्या गर्जनांनी आकाश भरले, स्वर्गात सुरवरांचा थरकाप उडाला, भूतलावर नर, किन्नर, ऋषीश्वर भयभीत होऊन ओरडू लागले. राक्षसी गर्जून म्हणत होत्या, "सीते, तुला मारून मास आम्ही खाऊ; तुझ्या कंठातले रक्त पिऊ आणि तुझ्या हाडांच्या माळा करून त्या धारण करू. तुझ्या सर्वांगातल्या शिरा काढून त्यांची शेवयांची खीर करू, तुझे काळीज बाहेर काढून त्याची आम्ही कोशिंबिर करू." असा ओरडा करत त्या राक्षसी सीतेपाशी आल्या. सीता या कशानेही भ्यायली नाही. ती श्रीरामाच्या स्मरणात निःशंकपणे शांत राहिली होती.

राक्षसींनी सीतेला समक्ष पाहिल्यावर त्यांनाच कंप सुटला. सीतेने रागाने पाहिले तर तीच आपला प्राण घेईल अशी राक्षसींना भीती वाटली. सीतेला पाहून त्या राक्षसीच पोटात भयभीत होऊन त्वरेने पळाल्या. अशी या ठिकाणी उलटीच गोष्ट झाली. सीतेला भेडसावण्यासाठी आलेल्या राक्षसी स्वतःच भयभीत झाल्या. कारण तेथे श्रीराम स्मरणाचा महिमाच तसा होता. भक्तांना द्वंद्व बाधत नाही. राक्षसी रावणाकडे परत गेल्या आणि त्याला सांगू लागल्या की, "सीतेला आमचे मुळीच भय वाटले नाही. आम्हालाच सीतेचे फार भय वाटले". रावणाने ते ऐकून स्वतःशीच म्हटले, 'सीता सती खरोखरच मोठी निःशंक, धैर्यवान, पतिव्रता आहे. मला काही ती भोगायला मिळणार नाही. माझे सर्व कष्ट व्यर्थ झाले.'

राम-लक्ष्मण सीता शोधार्थ, लक्ष्मणाला दोष

इकडे श्रीराम आणि लक्ष्मण एकत्र आल्यावर, सीता आश्रमात एकटी असल्यामुळे तातडीने आश्रमाकडे निघाले. त्यावेळी रामाचा डावा डोळा लवण्याने अशुभ असे संकेत झाले. राम वाटेत सतत अडखळत होता. तेव्हा तो लक्ष्मणाला

https://archive.org/details/@sulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

म्हणाला, "सौमित्रा, सावधपणे ऐक. अशुभ दर्शक असे अपशकून होत आहेत. आज आता सीतेचे दर्शन होते की नाही काही कळत नाही. लक्ष्मणा आश्रमात एकटी सीता असेल काय रे?" सीतेच्या प्रबळ चिंतेमुळे श्रीराम हाच प्रश्न सारखा विचारत होता. नंतर त्याने लक्ष्मणालाच दोष द्यायला आरंभ केला.

"आश्रमात सीतेला एकटी सोडून तू इकडे का आलास? माझी कांता राक्षसांनी हरण केली तर तिला कोण सोडवणार? स्त्रीच्या क्षुद्र बोलण्याने रागावून, तू पंचवटी का सोडलीस? तो हट्टी रावण सीतेचे हरण करील ना. तू अत्यंत मोठी चूक केली आहेस. सतत अशुभ असे अपशकुन होत असल्यामुळे सीता दृष्टीला पडेल हे मानायला माझे मन तयारच होत नाही." असे वाटेने बोलत श्रीराम लक्ष्मणासह पंचवटीत आले. तेथे कपाळेशाच्या आसपास त्यांना सीता कुठेच दिसेना. पंचवटीत सर्वत्र शोधून पाहिले; गंगेचे दोन्ही तीर, सभोवारचे वन हे सारे शोधून झाले; तरी त्यांना सीता आढळली नाही. त्यामुळे श्रीराम वीर अत्यंत कष्टी आणि श्रांत झाला. ते दोघे पंचवटीत आले तेव्हा त्यांना ती रिकामी दिसली, जनी-वनी सीता कुठेच दिसली नाही. तिच्या शोधासाठी ऋषिजनांना विचारावे, तर ते जीव घेऊन पळाले होते. त्यामुळे त्या परिसरात कुठेच मनुष्यप्राणी दिसत नव्हते. तेव्हा लक्ष्मण मनातून धास्तावला. त्याच्या मनात विचारांचे थैमान सुरू झाले. 'श्रीरामाला मनातून जी धास्ती वाटत होती तीच गोष्ट इथे घडली आहे. मीच ह्या अपयशाला सृष्टीत एकमात्र पात्र झालो आहे. लक्ष्मणामुळे सीतेचे हरण झाले हे अपयश माझ्या माथी आले. सीता शोधूनही दिसत नाही. आता श्रीरामाला मी काय सांगू?'

वनात शोध घेत असताना वृक्ष फळा-फुलांच्या योगाने शब्द करत दुःख दाखवत होते; जशी माता दुरावल्यावर अपत्ये दीनवदन होतात तशी त्या वृक्षांची स्थिती झाली होती. वृक्षांप्रमाणे पशू, पक्षी हेही दुःखाने रडत होते. वनश्री पळून गेल्याने वनाला अवकळा आली होती. पक्षिणी पारध्याच्या हाती पडली की तिची पिले तडफडतात, तशी सीता नाहीशी झाली त्यामुळे सर्वत्र औदासिन्य आले होते. सीतेच्या दुःखाने पाषाण द्रवू लागले, गवतांमधून थेंब गळू लागले. सर्वजण दुःखी झाले. या प्रकारचे औदासिन्य पाहून श्रीरामाचे चित्त सुखावले. कारण तो अवताराची ख्याती करण्यासाठी पुरुषार्थ करायला प्रवृत्त झाला.

श्रीरामाच्या मनात आले, 'सीता ही माझी पत्नी सज्ञान आहे. सैन्यासहित रावणाचा वध करण्यासाठी ती स्वतःच लंकेला गेली. राक्षसांचे निर्दाळण व्हावे, यासाठीच ती गेली. मी समुद्रात पाषाण तारून, लंकेत जाऊन रावण, कुंभकर्ण यांना मारीन.' श्रीरामाला या विचाराने स्फुरण आले. राक्षसांचा संहार केल्यावर आपण काय करायचे हे त्याने ठरविले. 'राक्षसांना नष्ट करून, देवांचे बंधन सोडवायाचे, रामराज्याची गुढी उभारायची;' असे त्याचे उद्दिष्ट होते. श्रीराम सर्वज्ञ असल्याने, भविष्याचे त्याला ज्ञान होत असे. सीतेच्या शोधासाठी आपण भटकत राहायचे, ही अवताराची गती मानायची. श्रीराम या भूमिकेनुसार सीतेच्या शोधासाठी निघाला. जशी अवताराची गती तशी अवताराची स्थिती; त्यामुळे श्रीराम सीतेच्या शोधासाठी विलाप करत असा निघाला. श्रीराम अवतार होता निश्चित; पण लोकसंग्रहार्थ त्याला श्रीवसिष्ठांनी जो परमार्थ नेमून दिला त्यानुसार तो रघुनाथ त्याचे पालन करत होता. श्रीरामाची अवस्था दुहेरी होती. अंतरात तो परब्रह्म सर्व जाणून होता; बाह्यतः मात्र सीतेसाठी विरहभ्रम दाखवत होता. अंतरामध्ये स्वतः निष्काम सिद्ध असलेला तो बाह्यात्कारी सीतेच्या शोधाची

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized By Sarayu Foundation Trust and eGangotri

दुःखावस्था भोगत असल्याचे भासवत होता. अंतर्यामी अद्वैताचा अनुभव असलेला राम, बाहेरून जीवांना, वृक्षांना, वेलींना काकुळतीला येऊन 'सीता कुठे आहे? मला सांगा.' अशी विनवणी करत चालला होता. एकीकडे निजबोध अती सुखद आणि दुसरीकडे सीतेच्या दुःखाने जड; आत आनंद, बाहेर विपुल विषयदुःख; अद्वैततत्त्वाप्रमाणे सर्वत्याग अंतरात तर सीतेविषयीचा विषयसंग बाह्यात्कारी; मनात सुनिश्चितता चांगली भिनलेली, पण वरवर लगबगीने धावाधाव; इकडे आंत अणुमात्र चाड नसूनही, बाहेर सीतेसाठी अत्यंत चरफड; म्हणजे आत्मसुखाने अंतर भरलेले आणि बाह्यतः आत्यंतिक दुःख; नित्य नैराश्याचे अंतरात ठाण नसले, तरी बाहेर सीतेविषयीचा आशापाश दाखविला जात होता. त्या दुःखाने आपण संत्रस्त झाल्याचे आभास तो जगाला दाखवत होता.

श्रीराम मूलतः संतापनिवृत्त, सर्वार्थाने निर्मुक्त, असा असूनही आपण संतापी, विषयासक्त असल्याचे दाखवत होता. अंतर्यामी भूतमात्रांविषयी कृपाळूपण असून युद्धात पराक्रम करून राक्षससमूहाचा नाश करत होता. अकर्मात्मता आणि बोध अंतर्यामी असूनही युद्धकर्ता, राक्षसांचा संहार करणारा, रावणाचे निर्दाळण करणारा असे त्याचे बाह्य व्यक्तित्व प्रकट होत होते. श्रीवसिष्ठ सद्‌गुरूंच्या योजनेप्रमाणे राम आत्मस्थितीने वर्तत होता हे लोकांना कळले नाही. असा तो परब्रह्म श्रीराममूर्ती होता. श्रीवाल्मीकींचे भाषित सत्य करण्यासाठी तो रघुनाथ विलाप करत, सीतेचा शोध घेत असताना लक्ष्मणाला स्वतः सांगत होता की, "लक्ष्मणा, सीतेला तू लवकर बोलाव. माझी आज्ञा तू का मानत नाहीस? तू तिच्याशी अबोला धरला आहेस का? तू सीतेवर रागावलास आणि म्हणून तिच्याशी बोलत नाहीस ना, तर मीच तिला बोलावतो." नंतर श्रीराम आवेशाने 'सीते, सीते', असा विलाप करू लागला.

सीतेसाठीच्या श्रीरामाच्या शोकाची परमावधी

श्रीराम भावविवशतेने म्हणू लागला, "हे सीता सुंदरी, मी तुला शोधतो आहे तर तू दूर-दूर का पळते आहेस? वृक्षराजीमध्ये प्रवेश करून डोळ्याआड का लपते आहेस. येथे थांबून राहा. तू जाशील तिथे तिथे मी तुझ्याबरोबर येईन. मला सोडून तू जाऊ नकोस. मृगकंचुकीसाठी माझ्यावर रुसलीस का? त्यामुळे मला दृष्टभेट देत नाहीस का? माझे सांगणे का ऐकत नाहीस? माझी सेवा करायची तुला आवड आहे; मला अर्धा क्षणही विसंबत नव्हतीस. मग आताच तू अशी कटाक्षाने वृक्षातळी का लपतेस? मृग मारून मी परतण्यास विलंब लागला हे तत्त्वतः खरे आहे; त्यामुळे तुझ्या चित्तात क्षोभ झाला असला तर मला क्षमा कर. लक्ष्मण तुझ्या सांगण्याप्रमाणे वागला नाही, त्यामुळे तू क्षोभायमान झाली असशील तर मी त्यासाठी लोटांगण घालतो. मला तू पूर्ण क्षमा कर. कृपा करून मला भेट दे आणि तुझ्या मनातल्या गुप्त गोष्टी सांग. तू एकाकी वनांतरी का जातेस. तुझ्यासाठी मी एवढा आर्त झालो असताना तू एवढी निष्ठुर चित्त का? कृपा करून इथे येऊन माझे आर्त पुरव." श्रीरामाने आपली प्रिय पत्नी भेटत नाही असे पाहून वृक्षवेलींना, पशुपक्ष्यांना सर्वांना सीतेबद्दल विचारले. श्रीराम म्हणाला, "तुम्ही रागामुळे बोलत नाही का? मी तुमच्या पायावर मस्तक ठेवतो; पण माझी सीता कोठे आहे ते तत्त्वतः सांगा." पर्वत, पाषाण यांना श्रीरामाने लोटांगण घालून म्हटले, "तुम्ही कृपा करून सीतेचा शोध घेण्याचा मार्ग सांगा." अशाप्रकारे सीता दृष्टीला न पडल्यामुळे श्रीराम मोठ्या काळजीत पडला त्याने लक्ष्मणाला म्हटले, "सीता गेली की मृत झाली? ती एकटीच असल्याने राक्षसांच्या भयाने पळून गेली किंवा

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

आपल्याच ठिकाणी भयभीत होऊन निवान्त झाली. राक्षसांनी तिला मारून, स्वतःच्या इच्छेने भक्षण केले असेल का?" एवढे बोलून श्रीराम दुःखाने मूर्च्छापन्न झाला. 'सीता-सीता' सतत म्हणत राहिल्याने रामाचे ओठ वाळले, गळा सुकला. डोळे अश्रूंनी भरले. त्याला जानकी कुठे आहे ते न कळल्याने 'हाय हाय सीता' म्हणत सीतेच्या विरहाने रघुनाथ दुःखव्याप्त झाला. तो अडखळत होता, पुन्हा उठून तो शोध घेण्यासाठी पुढे जाई. 'सीता, सीता' हे शब्द कष्टाने उच्चारून सतत विचारत होता की, 'माझी सीता कुठे आहे.' सीताविरहाने वेड लागल्यासारखा तो क्षणाक्षणाला तेच विचारत होता.

श्रीराम हताश मनाने 'आता कुठली सीतेच्या भेटीची आशा' असे म्हणत दाही दिशांना धावत राहिला. सीतेसाठी वेड्याप्रमाणे विलाप करत, आक्रोश करत राहिला, "हा हा सीते, हा हा सीते!" आसमंतात सभोवार दृष्टी फिरवत राहून सीता न दिसल्याने वनात इथे-तिथे फिरत राहिला. "सीते सीते" अशा तो हाका देत आक्रोश करत होता आणि मधेच "लक्ष्मणा, तू माझा सखा असून नुसता काय पाहतोस?" असे म्हणत होता. नंतर पुन्हा सीतेला उद्देशून म्हणत होता, "सीते त्वरित धाव घे. मला आदराने आलिंगन दे. मी एवढ्या मोठ्याने हाका मारतोय तरी माझी तुला करुणा का येत नाही. सीते सखे तू का रुसली आहेस?" असा शोक करत तो धरणीवर अंग टाकत होता. लगेच उठून उन्मादाने वनात, रानात तिला शोधत धावत होता. दऱ्यादरकुटे, गिरिशिखरे, पर्वतगुहा यांमध्ये राम आणि लक्ष्मण सीतेला शोधून असफल झाले. मग श्रीराम लक्ष्मणाला म्हणाला, "सौमित्रा, देशातले पर्वतही शोधून सीता आपल्याला दिसली नाही तर आता तिच्या शोधासाठी कोणाला विचारायचे. हे वन केवळ विजन, येथे कोणी माणसे भेटत नाहीत. आपण काय करायचे?" असे म्हणून पुन्हा राम भावविवश होऊन पर्वत आणि त्यावरचे वृक्ष यांना विचारू लागला की त्यांनी सीता पाहिली काय?

श्रीराम म्हणाला, "पर्वताच्या माथ्यावर असलेल्या वृक्षांनो, तुम्ही दूरवरचे पाहू शकता, तेव्हा माझ्या मनातल्या शंकेचे निराकरण करा. तुम्ही म्हणाल 'तू कोण-कोणाचा,' तर ऐका. मी दशरथपुत्र राम आहे. सीतेच्या वियोग-विरहाचे मोठे पर्वतप्राय दुःख माझ्यावर कोसळले आहे. सीता कशी आहे म्हणाल, तर तिचे स्वरूप मी तुम्हाला सांगतो. त्यामध्ये अगदी योग्य आणि नेमक्या चिन्हांचे वर्णन करीन. तिचे डोळे आणि ओठ आरक्त आहेत. सुंदर आणि सुकुमार असे तिचे नाक आहे. कंबरेला रत्नांनी मढवलेले कटिसूत्र आहे. जानकी पीतांबरधारी आहे. अशी ती लावण्याची खाण तुमच्यापैकी कोणी पाहिली असेल तर मला सांगा. मी त्या दिशेने धाव घेईन." वनातले वृक्ष वाऱ्याने डोलत होते. श्रीरामाला वाटे ते आपल्यालाच बोलावत आहेत. त्या कल्पनेने तो त्यांच्याकडे मोठ्या वेगाने धावत जात होता. परंतु तिथे सीता दिसली नाही की तो अत्यंत दुःखी होऊन, मूर्च्छा अवस्थेत जाई. त्याचा 'सीता, सीता' असा विलाप चालू होता. अखेर सीतेविषयी पर्वत काहीच सांगत नाहीत म्हणून श्रीराम क्षोभला आणि पर्वतांचे भस्म करण्यासाठी त्याने धनुष्य सज्ज करून, त्या धनुष्याच्या दोरीला वज्रबाण लावला. तेव्हा लक्ष्मणाने रामाचे पाय धरून म्हटले, "आपण हे उलटेच करता आहात. हे पर्वत निरपराध असून, त्यांचा घात करू नये." या शब्दांनी रामाला शांत करून लक्ष्मण श्रीरामासह पुढे निघाला.

श्रीरामाला मार्ग दाखविणाऱ्या खुणा दिसतात.

श्रीराम लक्ष्मणासह पुढे जात असताना त्याला

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

एके ठिकाणी सीतेचे सुवर्णभूषण दिसले. त्यावर "लक्ष्मणा इकडे धाव. सीतेला या मार्गाने नेले आहे. आता योग्य मार्ग सापडला आहे तेव्हा सौमित्रा या वाटेने धाव घेऊ." थोडे पुढे गेल्यावर त्यांना जमिनीवर रक्त सांडलेले दिसले. श्रीरामाला चिंता वाटली. कपटरूपाने राक्षसांनी सीतेला इथवर आणून तिला मारले की काय? नंतर तिला विभागशः खाल्ली असणार. सीतेसारखे रत्न गेले या जाणिवेने तो अत्यंत दुःखी झाला. तेवढ्यात त्याला पुढे काही अंतरावर वीरांचे युद्ध झाल्याच्या खुणा दिसल्या. ती रणभूमी न्याहाळल्यावर त्याला असे आढळले की तेथे सुवर्णाने अलंकृत असे धनुष्य मोडून पडले आहे; जमिनीवर कवच पडले आहे; ते कवच मोत्यांनी जडवलेले आहे; रथ मोडून चाकेही तुटली आहेत; पिशाचासारखे तोंड असलेले गाढव मरून पडले आहे; दांडा मोडलेला ध्वज पडलेला आहे; असे वीरांचे युद्ध विचित्र अवस्थेत झाल्याचे दिसून आले. भात्यातले बाण विखरून पडले आहेत; देदीप्यमान मुकुट पडला आहे; इथे घोर रण होऊन सीता मारली गेली असणार असे श्रीरामाला वाटले. सीता अतिशय सुंदर असल्यामुळे राक्षस तिच्यासाठी एकमेकांशी युद्ध करायला सिद्ध झाले असावेत. या दुर्धर युद्धात सीता मारली गेली असेल; कारण, राक्षस महाकपटी असून त्यांनी मांसासाठी तिला मारले असेल. 'सीता राक्षसांकडून मारली गेली असेल तर अयोध्येत काय तोंड दाखवू? जनकाला काय सांगू? क्षत्रियधर्माला हे लज्जास्पद आहे.' असे श्रीरामाला वाटून तो दुःख करू लागला. 'सीतेच्या मातेला, माझ्या मातांना, सुहृदांना मी काय सांगू? वनवासात सीतेचे हरण झाले हे कसे सांगू. माझ्या यशाला, कीर्तीला, क्षात्रवृत्तीला लाज आणली आणि सीताहरण झाले. माझा पुरुषार्थ यामुळे लाजवला गेला आहे. श्रीदशरथ स्वर्गात लाजेल, तिन्ही लोकांनाही लाज वाटेल.' असे आपल्याशी म्हणताना श्रीरामाचा क्षोभ वाढत राहिला. तो रामाचा क्षोभ प्रकट झाला. "सौमित्रा, माझा पराक्रम पाहा" असे म्हणून धनुष्यबाण हातात घेऊन श्रीरामाने म्हटले, "सीतेसाठी बाणाने त्रिलोक निर्दाळीन."

श्रीरामाचा क्रोध, लक्ष्मणाकडून सांत्वन

श्रीरामाला, सीताहरणाचे कृत्य राक्षसांनीच केले असावे असे वाटून, तो संतापून म्हणाला, "राक्षसांनी सीतेला नेली असेल तर सकुल, सपुत्र, सपरिवार राक्षसांना मारून सर्व पृथ्वी शरवर्षावाने मी अराक्षसी करीन. सीतेला पाताळात नेले असेल तर समस्त सर्पजात निर्दाळीन. दानव, मानव, त्रिदश अशा सर्वांना वेधून घोळसीन. राक्षसांनी सीता मारली आणि यम तिला नेऊ लागला तर यमदूतांसह यमाचा मी घात करीन. यम जगाला शासन करतो, मी त्यालाच शासन करीन. त्याने जर सीता आणून दिली नाही तर मी त्याला बाणाने दंडीन. यमाची मान मोडीन, कळिकाळाची कवटी फोडीन, अखिल सृष्टीचे दमन करून सीतेला परत आणीन. मी तर काळाला आज्ञा देणारा, अंतकाचे निर्दाळण करणारा आहे. सर्व लोकांना मर्दून सीतेला क्षणात आणीन." श्रीराम एवढा क्रोधाविष्ट झाला होता की त्याच्या डोळ्यातून जणू आगीच्या ज्वालाच बाहेर पडत आहेत असे भासत होते. त्याने आपले विक्राळ धनुष्य सज्ज केले आणि स्वर्गात देवांमध्ये खळबळ माजली. देव, दानव, ऋषीश्वर भीतीने थरथर कापू लागले; चराचर दोलायमान झाले; श्रीराम अनावर संतापला. सीतेच्या शोधानिमित्त आलेल्या क्रोधामुळे तो सृष्टी जाळायला निघाला हे पाहून सदाशिवही धास्तावला आणि उमा त्याच्या गळ्याला मिठी घालून बसली. श्रीरामाचे ते क्रुद्ध काळाग्निरूप अवसान पाहून लक्ष्मणालाही धाक पडला. त्याच्या तोंडचे पाणी पळाले.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized By Sarayu Foundation Trust and eGangotri

अध्याय विसावा

श्रीराम पौर्णिमेच्या शोभायमान रात्री तृणशय्येवर सुखात शयन करत होता. लक्ष्मण त्याची चरणसेवा करत होता. चंद्रोदयाचे मनोहर दृश्य आणि सुकमार चंद्रकिरणांचा स्पर्श यांचा अनुभव घेत असताना श्रीराम एकाएकी गडबडून उठला. तो लक्ष्मणाला म्हणाला, "सूर्याचे असह्य किरण मला बाधत आहेत. आपण दोघे वृक्षाखाली बसू या." हे रामाचे विचित्र बोलणे ऐकून लक्ष्मण म्हणाला, "श्रीरामा, रात्री सूर्याच्या किरणांबद्दल काय सांगतो आहेस? हा तर अमृतासमान किरण असलेला चंद्र आहे. तो तर सर्वांना शांत करतो." त्यावर रामाने विचारले, "जर हे चंद्रबिंब आहे असे सांगतोस, तर तुझे हे कसले ज्ञान! चंद्रबिंबात असलेले मृगचिन्ह पाहून मीही चंद्रबिंब जाणतो. जर मृगचिन्ह असलेले हे चंद्रबिंब एकत्र आपण पाहतो आहोत, तर मृगनयना, चंद्रवदनी, जनकनंदिनी कुठे आहे? जर मृगचिन्हांकित चंद्र पाहतो आहेस, तर मला सीता दाखव ना!" एवढे बोलून श्रीराम स्फुंदून स्फुंदून शोक करू लागला. तो म्हणत होता, "हे प्रियकांता सीता, सुखरूपा, जनककन्ये! लक्ष्मणा कुठे आहे रे सीता? मागे उभी आहे माझी सीता; पुढे पळाली बघ जानकी; लक्ष्मणा धाव धाव; माझी कांता रुसली आहे तिची समजूत घाल. चंद्राने हे द्वंद्व मांडले आहे पाहा. त्याचे किरण मला पूर्ण तापवत आहेत." असे दुःखावेगाने निरनिराळेच तो बोलत होता.

सीतावियोगाने श्रीरामाची भ्रममूल स्थिती

श्रीराम भ्रमाने बोलत राहिला. "लक्ष्मणा तू सावधपणे ऐक. त्या चंद्राला परत पाठव. जर तो गेला नाही तर मी त्याचा घात करीन. तो मला संताप आणतो आहे. लक्ष्मणा मला गार वारा घाल. सौमित्रा तूच द्वंद्वाला पेटला आहेस. मला वज्रधारेने

लक्ष्मण भयकंपित होऊन स्वतःशीच विचार करू लागला की, 'ताटका, सुबाहू, यांना श्रीरामाने मारले, तेव्हाही असा दुर्धर क्रोध रामाला आला नव्हता. विराधाने सीतेला धरले, तेव्हाही श्रीराम एवढा क्रुद्ध झाला नव्हता. कैकेयीने जेव्हा राज्य आणि वस्त्राभरणे काढून घेतली तेव्हाही रघुनंदनाला असा राग आला नव्हता. त्रिशिरा, खर, दूषण, रामाने एकट्याने मारले त्या प्रसंगीही रामाचा एवढा क्रोध आपण पाहिला नव्हता. सीतेच्या शोधाच्या वेळी हा श्रीराम सृष्टीवर एवढा कोपला की स्वर्गात देवांची धांदल उडाली, कळिकाळही धास्तावला, दानव, मानव, ऋषीश्वर हे भीतीने कापू लागले, सृष्टी कंपायमान झाली.' श्रीराम निर्वाणीचा क्षोभला आहे असे पाहून लक्ष्मणाने रामाचे पाय धरले आणि विनवणी केली.

लक्ष्मण म्हणाला, "श्रीरामा, कृपामूर्ती, क्षमा कर. हे रघुपती, तूच ही भूतसृष्टी निर्माण केली आहेस तेव्हा भूतांवर तूच कृपाळू व्हावेस. वायूची गती, चंद्र-सूर्य यांचे तेज, सर्व भूतांचा भार वाहणारी पृथ्वी, या समस्तांचे हे सामर्थ्य तुझ्यामुळेच आहे. समुद्राचे मर्यादा रक्षण, काळ, दुष्काळ, प्रलय या सर्वांना तूच कह्यात ठेवले आहेस. श्रीरामा, असा तूच आता काळाला अकाली प्रलय करू देणारा होतो आहेस हे कसे? स्वतःच्या मनात विचार करून, रागालाही क्षमा कर. तू सृष्टीचा आदिकर्ता, तुझ्यापुढे ब्रह्मदेव हा बालक, तेव्हा हे रघुनाथा, आपली परिपूर्णता आठवून पाहा." ही लक्ष्मणाची विनवणी ऐकल्यावर श्रीरामाने स्वतःचा राग गिळून टाकला आणि संतोषाने सौमित्राला आलिंगन दिले. आपल्या प्रिय बंधूची विनंती ऐकून श्रीराम संतोष पावला. त्याने क्षोभवृत्ती सोडून सुखशांती स्वीकारली. दोघेही पौर्णिमेच्या रात्री शांत बसले. चंद्रोदय झाला तेव्हा सुखस्थितीत तृणशय्येवर सुखपूर्ण विश्रांती घेत तो श्रीराम विसावला.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized By Sarayu Foundation Trust and eGangotri

मारतो आहेस. त्या दशशिर रावणाला तू मिळाला आहेस. जा, इथून उठून जा. माझा घात करायला आला आहेस तू.'' सीताविरहाच्या ज्वराने पीडलेला राम असे बोलला. लक्ष्मणाला तो आणखी दूषणे देऊन म्हणाला, ''थंड कमलांच्या सुमनशय्येवर मला झोपविले, तर मग सुयांनी सारे शरीर कसे टोचले जाते आहे? तू आप्त बंधू सौमित्र माझ्यांशी दुटप्पीपणाने वागतो आहेस. जो तू सुमित्र होतास तो कुमित्र झालास. सुयांनी सारे शरीर टोचून काढले जाते आहे. तू वृथा वैर का करतोस?'' श्रीरामाच्या अंगाला वाटणारी धग शांत करण्यासाठी बावन्न चंदन अंगाला लावले तर राम रागाने म्हणाला, ''माझ्या सर्वांगाला आग लावली. सीतेच्या विरहाने मी विव्हल असताना तू माझ्या अंगाला निखारे लावलेस. ती जनकबाळी मला भेटली नाही तर प्रलयकाळच माझ्यावर आला. मला वाटते सीतेच्या वियोग-विरहानेच सूर्य अस्ताला गेला असावा; रात्र ही मला कल्पप्राय झाली आहे; मी काय करू रे सौमित्रा? चंद्र माझ्याशी वैर करतो, लक्ष्मण वैराला पेटला, वायू द्वेष करतो, वज्रधार मला लागली आहे. सीतेच्या वियोग-विरहाने माझा प्राण चालला आहे. सौमित्रा आता तातडीने सरण (चिता) रच, मला आता मरण येणारच आहे.''

श्रीराम बोलता बोलता एकदम धावून जाऊन, 'सीते, सीते' म्हणत वृक्षांना सीता समजून त्यांना आलिंगन देत होता. सीता समजून तो पाषाणांचे चुंबन घेई, गवत छातीशी धरून 'ही माझी सीता' म्हणे, लक्ष्मणाला 'तूच माझी सीता, तू माझी कांता' म्हणत होता. अशी अवस्था होऊन श्रीराम भ्रांतीत गेला होता. ''सौमित्रा मी कोण आहे? तू माझा सखा आणि स्वामी आहेस. मला स्वामित्व कुठले! श्रीराम संपूर्ण अयोध्यापती होणार आहे. तू माझ्याजवळ कोण आणि कसा?'' यावर लक्ष्मणाने म्हटले, ''हर, हर काय सांगू? मी लक्ष्मण, तुझे नित्य अनुसरण करणारा सेवक, आज्ञाधारी आहे. प्रियेच्या प्राप्तीसाठी वनात एकाकी का हिंडतो आहेस; तर तुझी पत्नी जनककन्या जानकी हिला शोधून तिची प्राप्ती करून घ्यायची आहे,'' लक्ष्मणाच्या या स्पष्टीकरणात जानकीचा उल्लेख येताच श्रीरामाला पुन्हा तिची आठवण झाली आणि तो म्हणाला, ''हा हा, अरेरे, कुठे गेली माझी सीता? सौमित्रा मला सीता भेटव.'' श्रीरामाची ही अशी शोकमय अवस्था झाली होती.

श्रीरामाच्या स्थितीवर उमा-महेशांची चर्चा

श्रीरामाची भ्रांत अवस्था पाहून उमा महेशाला म्हणाली, ''मी तुम्हाला काही शंका विचारणार आहे; त्याचे निश्चित उत्तर मला सांगावे अशी माझी विनंती आहे. तुम्हीच पूर्वी सांगितले होते की श्रीराम पूर्ण परब्रह्म आहे. त्याचे स्वरूप कोणते, हे मला कृपा करून सांगा असे म्हणून उमेने शिवापुढे लोटांगण घातले, त्याचे चरण मस्तकी धरले. तेव्हा स्वतः शिवाने तिला उठवले आणि तो सांगू लागला, ''पार्वती, वनामध्ये सीतेसाठी आर्तभूत होऊन जो हिंडतो आहे तो पूर्णब्रह्म रघुनाथ आहे, हे तू निश्चयाने मान्य कर.'' त्यावर पार्वतीने विचारले, ''तो विषयासक्त, स्त्रीकामार्थी लोलुप?'' ''होय तोच सदोदित ब्रह्म रघुनाथ आहे.'' शिव म्हणाला. उमेने पुन्हा विचारले, ''तो रडत, पडत, अहोरात्र तडफडत, सीतेसाठी चरफडत असणारा तो?'' शिवाने पुन्हा 'रघुनाथ हाच ब्रह्म' असे सांगितले. तेव्हा ''हेच का तुमचे ध्यान आणि हेच का तुमचे चिंतन?'' उमेने असे म्हटल्यावर शिवाचे म्हणणे एवढेच की, ''ज्ञान-विज्ञान आम्हाला पूर्ण ब्रह्म श्रीरामाच असल्याचे सांगते.'' आता मात्र उमा उपहासाने, हसत म्हणाली, ''धन्य हे दोघे देवभक्त!'' शिवाने आणखी एकदा निर्धारपूर्वक सांगितले की, ''रघुनाथ ब्रह्मच आहे. रडत, पडत, तरफडत,

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

विषयकामी, विषयासक्त कसाही असला तरी पार्वती, तू निश्चित समजून घे, तो रघुनाथ परब्रह्मच आहे.''

श्रीराम परब्रह्मच आहे हे शिवाचे सांगणे उमा सहज मान्य करत नव्हती आणि अखेर त्यांची पैज ठरली. उमा म्हणाली, ''जर मी रामाला फसवले तर?'' महेश म्हणाला, ''त्याला ब्रह्मत्व नाही.'' ''तुमची आज्ञा होत असेल तर क्षणार्धात रामाला कपटाने फसवीन'' या उमेच्या सांगण्यावर महेश म्हणाला, ''तो नित्य सावधान आहे, तू सुखाने कपट कर.'' असे शिवाने म्हटल्यावर उमा स्वतः सीतेचे रूप घेऊन मोठ्या चतुराईने श्रीरामाला फसवण्यासाठी निघाली. वनामध्ये 'हा हा सीते' असे म्हणत श्रीराम हिंडत होता. तेव्हा उमा त्याच्या जवळ जाऊन 'ओ' म्हणत वनात आली. ती समोर आली की 'सीता' अशी हाक देत राम दुसरीकडे जाई. तीही त्याच्या बरोबर तिकडे जाई. जशी ती समोर येई तसा श्रीराम तोंड फिरवून दुसरीकडे जाई. सीतेच्या नावाने हाक मारत, तोंड खाली करून, तो विलाप करत राही. हा प्रकार पाहून लक्ष्मण आश्चर्य करत स्वतःशी विचार करू लागला की, 'वृक्ष, पाषाण यांना सीता म्हणणारा श्रीराम, ही जानकी समोर असताना शोक का करतो आहे?' त्याने मग श्रीरामाला म्हटले, ''श्रीरामा, आता सीता भेटली असताना शोक का करतो आहेस?'' तेव्हा श्रीराम त्याच्याकडे धाव घेऊन मारायला निघाला. लक्ष्मण म्हणाला, ''हा वृथा कोप कशासाठी करतोस? पलीकडे सीता उभी आहे ना.'' हे ऐकून राम शस्त्र परजून लक्ष्मणाचा घात करायला निघाला आणि म्हणाला, ''सौमित्रा, अरे तू आणि मी सख्खे बंधू असून, तू माझ्याशी वैर का करतोस? इथे कुठे आहे सीता? मला दुर्धर दुःख झाले आहे.'' लक्ष्मणाने मग असे जाणले की श्रीरामाला भ्रम झाला असावा, कारण 'सीता आहे' म्हणताच तो मारायला धावतो आहे. तर 'आता न बोलणे हेच योग्य' असे त्याने ठरविले. ''सीता समोर भेटलीच आहे तर तीच त्याला समजावेल. आपण आता काही बोलायचे नाही'' असा निश्चय करून लक्ष्मणाने मौन स्वीकारले.

श्रीरामाच्या मनःस्थितीवर लक्ष ठेवून असलेल्यांना आश्चर्य वाटले की लंकानाथाच्या बंधनातून सुटून सीता इथे कशी आली? सीता लंकेतून परत आली या कल्पनेने स्वर्गातल्या सुरवरांना ते एक दुःखच झाले. दशानन रावणाला चकवून सीता वनात कशी आली याचे आश्चर्य ऋषीश्वरांनाही वाटले. लंकानाथाचे भस्म करून सीता पुन्हा वनात आली याची अपूर्वता ब्रह्मयाला वाटली. तो विधाता या घटनेने चकित झाला. पार्वतीच सीता झाली आहे हे ब्रह्मादिकांनाही कळले नाही, परंतु श्रीरामाला मात्र तो सर्वांगाचा ज्ञाता असल्याने पूर्णपणे समजले होते. श्रीराम अलिप्त, ज्ञानी, ज्ञाता असून त्याला भ्रांत मानल्यामुळे पुढे जी कथा झाली ती ऐका. जेव्हा लक्ष्मण मौन धरून बसला, तेव्हा सीता झालेली पार्वती, सीता म्हणून श्रीरामाशी बोलू लागली. तेव्हा श्रीराम तिच्याकडे धावला आणि त्याने तिला धरले. ती (पार्वती) सीता म्हणाली, ''मी इथे जवळच उभी असताना व्यर्थ सीता-सीता असा धावा का करता? पत्नीच्या विरहाने रडता, पडता, याची तुम्हाला लाज कशी वाटत नाही? पूर्वी मोठी प्रौढी सांगत होता, की, 'मी श्रीराम नित्य सावधान असतो.' आता पत्नीच्या विरहाने तुमचे ज्ञान बुडाले ना! अत्यंत अज्ञानी झाला आहात तुम्ही. तुमच्या अज्ञानाची अगाध कथा अशी की तुम्ही प्रपंच आणि स्वार्थ दोन्ही बुडवलेत. सखा, बंधू आणि भक्त विनवत असता त्याचाच घात करायला धावता! लक्ष्मण तुमचा सखा, बंधू आणि अनन्य भक्त असून त्याला मारायला जाता! तुमचे प्रपंचाचे ज्ञान

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

बुडाले, मग तुम्हाला ब्रह्मज्ञान कुठून असणार. माझी क्षणभर भेट झाली नाही, तर तेवढ्याने जड, मूढ होऊन, भ्रांत अवस्थेत गेलात. तुमच्या चित्ताला प्रापंचिक ज्ञानही आठवत नाही, मग परमार्थता कुठली असणार. मी मुद्दामच वनात गुप्तपणे राहिले आणि तुमचे आचरण कसे होते ते पाहिले; तर तुम्ही अत्यंत भ्रांत झालात; म्हणून मग मी धावत आले.''

सीता झालेली उमा पुढे म्हणाली, ''पूर्वी तुम्ही म्हणायचेत की मी तत्त्वतः आत्माच आहे; परंतु पत्नीच्या विरहाने तेच आता कर्म करून अकर्तृत्व, जडमूढता येऊन भ्रांत झाला आहात. जरी वियोगाने भ्रांती आली असेल तरी आता तुमची, माझी भेट झाली आहे. आता मनातली भ्रांत सोडा. आपण पंचवटीत दोघे जाऊ या. वनवासाची मर्यादा चौदा वर्षांची होती, त्यातले सहा महिनेच उरले आहेत. नंतर अयोध्येला जाऊ.'' या तिच्या बोलण्यावर प्रत्युत्तर देताना श्रीराम म्हणाला, ''तू काई'' हेच नाव लोकांत रूढ होऊन राहिले आहे. तुकाई जगदंबा असे नाव लोक घेतात. दण्डकारण्यातील हे पवित्र स्थान जगदंबेचे स्वयंभू स्थान म्हणून लोक पूजतात. श्रीरामाला वर देणारी माता जगदंबा ही रामाच्या बोलण्यावरून तुकाई म्हटली जाते. पुढील कथा आता ऐका. श्रीराम हसून म्हणाला, ''माते तुला मी लोटांगण घालतो, पण तू माझा छळ करू नकोस. मी श्रीशिवापुढे अनन्यभावाने दीन आहे.'' श्रीराम सीतेला 'माता' म्हणतो याचे लक्ष्मणाला आश्चर्य वाटले. सुरवरही चकित झाले. ऋषी म्हणाले, ''श्रीराम आपल्या पत्नीलाही ओळखत नाही.''

श्रीराम उमेला शरण आणून सज्ञान करतो

श्रीराम उमेला प्रश्न करू लागला की, ''शिवाला एकटा सोडून, सीतारूपाने मला छळायला का आलीस?'' हा प्रश्न ऐकताच सीतेचे रूप सोडून, उमा रामापुढे लोटांगण घालून, रामाची छळणूक थांबवते. 'शिव म्हणाला होता ते खरेच की, श्रीराम नित्य सावधान असून, त्याच्यापुढे तुझे कपटछळण चालणार नाही. याचा मला प्रत्यक्ष अनुभव आला. मी शिवाची शिवशक्ती. जेव्हा अतर्क्य युक्तीने मी सीतेचे रूप घेतले, तेव्हा ब्रह्मादी देवांनीही मला ओळखले नाही. श्रीरामाने तेवढे ओळखले. त्याच्या अगाध ज्ञानापुढे माझे छळणे टिकले नाही;' हे उमेला स्वतःला जाणवले आणि तिने रामाचे पाय धरले. नंतर रामाला तिने विचारले की, ''हे रामा, तू सर्वार्थ जाणणारा, संपूर्ण सर्वज्ञता तुझ्या ठायी असणारा, तरीही सभ्रांतपणे तृण-पाषाण यांना मिठी मारतोस याचे काय कारण? सीतेच्या विरहाने तुझी कामवासना बळावली असेही थोड्याशा शंकेनेही अणुप्रमाण दिसत नाही. मला ती खूण पूर्ण पटली आहे. तू परिपूर्ण ब्रह्मज्ञानी आहेस. तर मग दुर्धर अशी पिशाचता धारण करून, सीतेचा विरह सहन न होऊन, वनात धावत, रडत, पडत, दुःख करणारा का झालास?'' उमा नंतर रामाचे पाय धरलेल्या अवस्थेतच म्हणाली, ''श्रीरामा, तुझी संपूर्ण स्थिती कृपा करून मला सांग?'' त्यावर श्रीरामाने उमेला सांगितले, ''माझी स्थिती गती सदाशिव पूर्णपणे जाणतो, तो तुला ती सांगेल.''

उमा पश्चात्तापदग्ध-श्रीरामाचा उपदेश

उमेला श्रीराम म्हणाला, ''सदाशिव माझी स्थिती जाणतो हे निश्चित, तेव्हा तो तुला सांगेल. स्वतःच्या मुखाने आपली कीर्ती सांगू नये. त्यातून कृपा करायची म्हणून सांगायचे झालेच तर त्यावेळी ज्याला सांगायचे तो शुद्ध मनाचा आणि सुपात्र आहे ना हे पाहायला हवे. ज्याला सांगायचे तो कपटी, वाद घालणारा, वितंडवादी नसावा; कपटाने ज्ञानाची वंचना करणारा, नास्तिक, शब्द फिरवणारा, आळशी, नीतीसंबंधी कुतर्क

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

करणारा, नसावा; धन स्त्री यांचा त्याग करायला उत्सुक असेल, सात्त्विक सत्याचा शोध जो घेत असेल, पूर्ण विवेकी आणि परमार्थी असेल, अशालाच तत्त्वाचा बोध करावा. तुझ्या ठिकाणी ज्ञानाचा दुरभिमान आहे, शिवाचे सांगणे न ऐकता, तू माझा कपटाने छळ करायला आली आहेस, तेव्हा मी तुला काय सांगावे? तुला पतिवचनाप्रमाणे कर्तव्य नाही किंवा गुरुवचनाचा भावार्थ तू जाणत नाहीस, अशा तुला गुह्य ज्ञानार्थ सांगणे योग्य नाही."

श्रीरामाचे निवेदन ऐकून उमा मनातून खचली. 'आपण पतिवचन, गुरुवचन यांचे सरळ उल्लंघन केले; शिवाचे वचन न मानता रघुनंदनाचा कपटाने छळ करायला प्रवृत्त होऊन आले. जळो माझा ज्ञानगर्व' असा स्वतःशी विचार करत उमा रडू लागली. तिला पूर्ण पश्चात्ताप झाला. ज्ञानाभिमान्याचे हेच लक्षण असते की साधू-सज्जन भेटले की त्यांचा छळ करण्यासाठी त्यांचे दोष तेवढे तो ज्ञानाभिमानी पाहात असतो. छळायचे म्हटले तरी उमेला रामाचा छळ करता आला नाही, तेव्हा ती पश्चात्तापाने म्हणाली, "मी तुझा छळ करायला आले, ते मला साधले नाही. श्रीरामा, असे असूनही तू माझ्यावर सर्वथा रागावला नाहीस, ही तुझी थोरवी माझ्या चित्ताला पटली आहे. तुझे दर्शन होताच माझा ज्ञानाभिमान जळून गेला; कपटबुद्धी नष्ट झाली; हे मी श्रीरामा तुझीच शपथ घेऊन सांगते." उमेचे असे पश्चात्तापाचे बोलणे ऐकून श्रीरामाला तिची दया आली आणि त्याने तिच्यावर कृपा करून, तिला आपले अतर्क्य गुह्य ज्ञान, सद्भावाने सांगण्याचे ठरवले.

श्रीराम म्हणाला, "उमा, सावधानतेने ऐक. पूर्वी ऋषिजनांनी, माझ्या प्राप्तीसाठी म्हणून निष्काम बुद्धीने अनुष्ठान केले. माझ्या चरणांची प्राप्ती व्हावी यासाठी सर्व अभिमान सोडून, पूर्ण सद्भावाने तृण, पाषाण होऊन राहिले. एक वृक्ष झाले, एक पर्वत झाले तर एक कोणी तृण, एक कोणी पाषाण झाले. त्यामुळेच मी तिथे स्वतः धाव घेत होतो. त्यांचा भावार्थ पाहून अत्यंत प्रेमाने त्यांना आलिंगन देत होतो. त्यांना तू केवळ तृण-पाषाण समजून मी वेडा-पिसा झालो असे म्हणत होतीस. खरे तर ते निरभिमानी असे माझे भक्त आणि मी त्या भक्तांना प्रीतीने भेटण्यासाठी स्वतः वनांतरी भटकत ते कोठे सापडतात हे पाहात होतो. भक्तांच्या उद्धारासाठीच ते माझे धावणे, रडणे, पडणे, अडखळणे होते. पर्वतांकडे मी धाव घेत होतो किंवा वृक्षांना आलिंगन देत होतो, हे सर्व भक्तांसाठी होते. उमे, हे तू निश्चित समज की माझे पाऊल व्यर्थ पडत नाही. सदाशिव समर्थ ते जाणतो. तुझा भावार्थ तसा नाही."

"अग, गाळीव भावाचा भावार्थ असा की, सर्व भूतांमध्ये भगवंत असतो. हाच मुख्य परमार्थ आणि आपला स्वार्थ तोच परमार्थ. गुळाचे कारले केले तरी ते सकंटक कडू लागणार नाही, त्याप्रमाणे सर्व दृश्य तेवढे ब्रह्म अशी धारणा ठेऊन कर्म केले तर ते बंधुत्वापासून मुक्त होतात. ज्याप्रमाणे साखरेचे कवंडळ फळ केले तर ते कडू म्हणूनही स्वतःचे गुण ठेवून असते, त्याप्रमाणे साधूंचे कर्म ज्यांच्याकडून निंदले जाते ते सर्वजण अधःपात करून घेतात. साधूंची सत्-चित् थोरवी, त्यांचे कर्म-प्रेम अतर्क्य असल्याने ते मोह-भ्रमात सापडत नाहीत, साधूंचा महिमा अगाध असतो. तू ज्यांना तृण-पाषाण म्हणतेस ते तर ब्रह्मपूर्ण साधू आहेत." हे श्रीरामाचे स्पष्टीकरण ऐकून पार्वती मूर्च्छेच्या अवस्थेत गेली. त्या अवस्थेत तिला आपण शक्ती आणि तो शिव हे पूर्ववृत्त आठवेना; श्रीरामाला रूप वा नाव आहे असेही तिला आठवेना; ती पूर्णतया असणे नसणे विसरली.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized By Sarayu Foundation Trust and eGangotri

अहं, कोहं, सोहं, यामुळे मी-तूपण नाश पावले. सर्वत्र परिपूर्ण ब्रह्म भरून राहिले. तेव्हा शिवप्रिया पार्वती समाधान पावली. श्रीरामाशी कपटछळ करण्याची भाषा करणारी पार्वती समाधीत गेली. अशी संतांच्या संगतीची महती आहे की, ते अपकारकर्त्यांवरही उपकारच करतात. पूर्ण समाधान प्राप्त झालेली उमा नंतर समाधी उतरून सावध झाली, तेव्हा तिला त्रैलोक्य चैतन्यघन झाल्याचे जाणवले. त्याने श्रीरामही संतुष्ट झाला.

श्रीरामाच्या उपदेशाने सर्वांवर परिणाम

श्रीराम उमेला म्हणाला, "हे माते, मी तुला काहीएक सांगणार आहे." त्यावर उमा म्हणाली, "तुझ्या आज्ञेचे सर्वस्वार्थाने मी पालन करीन." मग श्रीरामाच्या चरणावर मस्तक टेकवून ती पुढे म्हणाली, "तुझ्यामुळे मी सुखरूप झाले. आता आणखी काय बोलू." तिच्या बोलण्यावर रामाने अशी प्रतिक्रिया व्यक्त केली की, "शिवाचे बोलणे खोटे मानू नये. कोणाशी कपट किंवा छळ करू नये एवढेच मी तुझ्याकडे मागणे मागतो आहे. माझ्यावर एवढीच कृपा कर." उमेने श्रीरामाला आश्वासनपूर्वक म्हटले, 'श्रीरामा, तुझे चरण पाहताच माझी छळणवृत्ती जळाली आहे. यापुढे मी शिवाच्या आज्ञेचा अधिक्षेप करणार नाही. मला पूर्णब्रह्म पावले हाच याचा परिणाम आहे. श्रीरामा, तुझे स्पष्टीकरण ऐकताच अविद्येचे दहन झाले. छळणे, फसवणे सारे संपले. हे तुझी शपथ घेऊन सांगते. तुझ्या उपदेशाने मी सुखसायुज्यता पावले." एवढे सांगून श्रीरामाचे चरणवंदन करून उमा कैलासाला गेली.

श्रीराम आणि उमा यांचे भाषण ऐकून आणि उमेने केलेले चरणवंदन पाहून सौमित्राने धावत येऊन रामाचे चरण मस्तकी धरले आणि तो म्हणाला, "मी हिलाच आमची सीता समजत होतो; पण ही तर शिवाची पत्नी पार्वती होती; तू रघुनाथा तिला बरी ओळखलीस. खरोखर रामा तू सर्वज्ञ आहेस." तसेच उमेची स्थिती-गती पाहून ब्रह्मादिकही आश्चर्यचकित झाले. "आम्हीही तिला सीताच समजत होतो, पण श्रीरामाने पार्वतीला बरोबर ओळखली. आम्हाला वाटत होते सीतेच्या विरहाने तो राम भ्रांत झाला आहे, पण भ्रमातही तो अचुक ज्ञान ठेवणारा होता. याचा खरा वृत्तान्त समजत नाही, हा राम नित्य ब्रह्म आहे. रडणे, पडणे, स्वैर धावणे, हे पाहून जग रामाला वेडाच मानत होते, परंतु श्रीराम ब्रह्मपणानेच वावरत होता. कारण त्याला जगदुद्धार करायचा आहे." असे आपसात बोलत सर्व देवांनी श्रीरामाला वंदन केले आणि आपापल्या ठिकाणी गेले. देवांची भ्रांती फिटली; लक्ष्मण शांत झाला; श्रीरामाची स्थिती अगाध असून त्याच्या नामाने जडजीव उद्धरतात. आता या नंतर राम आणि लक्ष्मण पुन्हा सीतेच्या शोधासाठी निघाले.

एकनाथांचे शिवरामायणावर भाष्य

श्रीराम आणि उमा यांच्यातील जो संवाद येथे सांगितला त्याला मूळचा आधार आहे तो शिवरामायणाचा. श्रीरामायणाचा मूळ ग्रंथ शतकोटींचा होता. सुर, नर, पन्नग, हे यथार्थ कलह करत राहिले. त्या कलहाचे कारण रामायणावरच्या स्वामित्वाबद्दल होते. "श्रीराम हा सुरवरांचा राजा आहे तेव्हा ही कथा देवांच्याच वाट्याची आहे." असे देव म्हणाले. त्यावर पन्नग म्हणाले, "शेषशयनीचा हा राम आमचा आहे, तुम्ही कुठले?" मानव म्हणाले, "श्रीराम हा मानव स्वरूपात आहे; त्याने येथे अगाध ख्याती केली आहे; तेव्हा श्रीरामकीर्ती हा आमचा वाटा आहे; तुम्ही त्यासाठी काय म्हणून भांडत आहात. श्रीराम तुमचा वैकुंठपती असला तरी त्याने वैकुंठात ख्याती केलेली नाही. तसेच जरी तो निश्चित शेषशयनी असला तरी त्याने काही

https://archive.org/details/@sulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized By Sarayu Foundation Trust and eGangotri

निजल्या-निजल्या कीर्ती केलेली नाही. श्रीरामाने मनुष्यलोकात येऊनच महान ख्याती केली आहे. याचा अर्थ त्याने मृत्युलोकीच कीर्ती मिळवली आहे. मग तुम्ही त्यासाठी का भांडत आहात. तुमच्यामध्ये एक वरचे, तर दुसरे खालचे (स्वर्ग आणि पाताळ यातले) इथे मृत्युलोकात येऊन वाटा मागायला तुम्हाला लज्जा कशी वाटली नाही. तुमचा काहीही संबंध नाही." मानवांनी असे देव, पन्नग यांना निरुत्तर केले.

श्रीरामकथेची सर्वांना एवढी गोडी की एकमेकांना ती सोडवत नव्हती. त्यांना रामकथामृत सेवन करायचे होते. हे भांडण सोडविण्यासाठी ब्रह्मदेवाने बुद्धी चालवून यावर तोडगा काढला. इथे तिघे वाटेकरी असल्यामुळे त्यांची समजूत घालण्यासाठी त्याने सर्वांनाच शिवाकडे पाठविले. शिवाने यामधे कशी युक्ती केली पाहा. तिघेजण त्याच्याकडे आल्यावर शिवाने स्वतःकडे कथासार राखून विभागाने त्यांची समजूत काढली. शिव त्यांना म्हणाला, "तुम्हा तिघांपैकी कोणालाही मी विमुख करून पाठविणार नाही सर्वांना समान भाग देईन." हे शिवाचे म्हणणे तिघांनीही मान्य केले. मूळ रामायणग्रंथाची संख्या शतकोटी होती. त्याचे विभाग त्रैलोक्यात. (स्वर्ग, मृत्यू, पाताळ) शिवाने कसे वाटले पाहा, तेहतीस कोटी, तेहतीस लक्ष, तेहतीस सहस्र, तीनशे, तेहेतीस श्लोक विभागल्यावर एक उरला. जो एक श्लोक उरला, त्याची बत्तीस अक्षरे तिघामधे शंकराने वाटली. अक्षरांचे हे वाटप सर्वांनी आदराने स्वीकारले प्रत्येकाच्या वाट्याला दहा-दहा अक्षरे आली आणि दोन अक्षरे उरली. तेव्हा शिवाने असे सांगितले की, "हे पाहा अक्षरे दोन आणि वाटेकरी तीन असे झाले आहे. आता याचा वाटा कसा करणार? तेव्हा मला वाटणीचे माप करणारा म्हणून, ही दोन अक्षरे मला द्या." हे ऐकून त्या तिघांनी उल्हासाने शिवाचे म्हणणे मान्य केले. शिवाला दोन अक्षरे दिली. शिवाने ती अक्षरे हृदयाशी धरली आणि तो अहर्निश 'राम' जपत राहिला. रामायण कथेचे हे सार की शिवाच्या अंतरात 'राम' बसला. ती दोन अक्षरे म्हणजे परिपूर्ण ब्रह्मच होती.

श्रीरामायण कथेची विविध नावे-रूपे

(एकनाथांनी त्यांच्या निवेदनात असे म्हटले आहे की, "मृत्युलोकाला जो लोकविभाग मिळाला, त्यात तेहतीस कोटी, तेहतीस लक्ष, तेहतीस सहस्र, तीनशे श्लोक आणि अधिक दहा अक्षरे वाट्याला आली. या लोकविभागाचे विवरण करणारे बहुविध कवित्व 'रामायण' नावानेच उल्लेखिले गेले त्याचे विवरण आता मी पुढे देत आहे."

"शिवरामायण शैवरामायण, आगम पंचरात्र रामायण, गुहा गुहक रामायण, हनुमंत रामायण नाटक, मत्स्य, कूर्म, वराह रामायण, कालिकाखंडींचे रामायण निरूपण ते महाकाली रामायण, स्कंदरामायण, अगस्ती पौलस्ती रामायण, पद्मपुराणातले रामायण, रवि, अग्नि, वरुण रामायण, ते ऐकून जटायू कथन, नंदिग्रामात भरत कथित भरतरामायण, महाभारतातले व्यासकथित रामायण, अजूनही क्रौंचद्वीपात क्रौंचऋषी सांगतात त्या पुराणातली पवित्र रामायणकथा ही अत्यंत अनुपम आणि पावन आहे. बिभीषणाला धर्मऋषी जी नित्य कथा सांगत ते धार्मिक धर्मरामायण, श्वेतद्वीपात कथन केले गेलेले श्वेतकेतुरामायण, त्या कथेतील अद्भुत, कुशल कथा त्रिलोकी पवित्र मानतात, शंकर स्वतः वक्ता आणि सावधान श्रोता भवानी ते शिवभवानी-रामायण, कथनातले कौशल्य त्यात होते. सदाशिव स्वतः वक्ता आणि श्रीराम श्रोता ती शिवरामायणी कथा ऐकून स्वानंद मिळतो. स्वतः श्रीराम स्वानंद परिपूर्ण होऊन आपल्यालाच, गोड निरूपण करतो ते आत्मरामायण कथन होय. अपूर्व कथनकौशल्य असलेले, आश्चर्ययुक्त चरित्राचे अलौकिक रामायण हे जैमिनीकृत रामायण; मूळ

https://archive.org/details/muthulakshmiacademy Bhuvan Vani Trust, Lucknow

CC-0. In Public Domain. Digitized By Sarayu Foundation Trust and eGangotri

रामायणातील वेचे काढून, आध्यात्मिक दृष्ट्या निरूपण केले ते अध्यात्मरामायण ऋषीकृत नव्हे, अशी मृत्युलोकात भाविकांनी असंख्य रामायणे सांगितली, ती सर्व काही मला आकलन झाली नाहीत, त्यातली थोडी सांगितली. उमा-श्रीराम-दर्शन याविषयीचे समूळ असे मूळचे निरूपण मी स्वामी जनार्दनांना शरण जाऊन सांगितले; हे सांगणे मधेच आल्याने श्रोत्यांनी क्षमा करावी.

हा उमा-राघव-संवाद ऐकून, जीवशिवांना विश्रांती, देह-विदेहांना परम विश्रांती, मिळते. हा विसावा अध्याय त्रिविधतापांना आणि देहभावाला विश्रांती देणारा आहे. या उमा-राघव संवादाच्या विसाव्या अध्यायाने, अहंभावाची निवृत्ती, सोहंभावाची निवृत्ती, अहमात्मभाव, ब्रह्मभाव, अशा सर्वांची प्राप्ती होते.)

अध्याय एकविसावा

उमा महेशाकडे गेली. श्रीराम आणि लक्ष्मण हे वनवासी दोघेजण सीतेचा शोध घेण्यासाठी मार्गातली चिन्हे पाहात निघाले. ते मार्ग काढत जात असताना अचानक त्यांना अत्यंत अद्‌भुत असा राक्षसाच्या पावलाचा ठसा दिसला. बारा हात लांब आणि चार हात रुंद असा तो ठसा होता. त्याच्या जवळच सीतेच्या पावलाचा कुंकुमाने भरलेला आणि कमलाकार असा ठसा दिसला. तो ठसा पाहून श्रीरामाला आनंद झाला. कारण या मार्गाने शोध घेण्यासाठी तो ठसा उपयोगी पडणार होता. श्रीरामाने तत्काल लक्ष्मणाला म्हटले, "लक्ष्मणा धाव, लवकर धाव घे. राक्षस सीतेला घेऊन जातो आहे. तू तत्त्वतः हा मार्ग ओळख; कदाचित ह्यामुळे तू दुश्चित्त होशील." तेव्हा तो राक्षसाच्या भयंकर पावलाचा ठसा पाहून लक्ष्मण चकित झाला; त्याला भीतीही वाटली की राक्षसांनी सीता भक्षण केली नसेल! नंतर त्याच मार्गाने शोध घेत ते दोघे धावत निघाले. पुढे त्यांना भग्न-अंग झालेला जटायू दिसला.

श्रीराम आणि जटायू यांची भेट

एखाद्या महापर्वताला शेंदूराने पूर्णपणे माखावे, तसा रक्ताने माखलेला जटायू श्रीरामाने पाहिला. त्याने लक्ष्मणाला म्हटले, "सौमित्रा, सीतेचे भक्षण करून तिचे रक्त प्यायल्यामुळे हा राक्षस रक्ताने माखून निघालेला दिसतो." नंतर श्रीराम धनुष्यबाण सज्ज करून, त्या राक्षसाचा घात करण्यासाठी कोपलेल्या कृतान्ताप्रमाणे तो निघाला. सीतासाह्यार्थ निघालेला प्रतापी राम म्हणाला, "माझी भार्या भक्षण करून तू कोण रे या वनात राहतोस; तुझा मी घात करीन." रामाचे हे गर्जनायुक्त बोलणे ऐकून, घायाळ होऊन धरणीवर पडलेला जटायू दीनवाणीने म्हणाला, "धन्य धन्य मी. माझे दीनोद्धारण व्हावे म्हणून स्वतः श्रीराम आला. श्रीरामाचे आगमन सीतेच्या शोधासाठी नाही तर दीनांचा उद्धार करण्यासाठी झाले आहे. त्यासाठीच तो वनात आला आहे." यावेळी जटायूच्या तोंडातून फेसासह रक्त ओकले जात असून तो प्राण सोडण्याच्या अवस्थेत होता. परंतु श्रीरामाचे बोलणे ऐकून तो भक्तिभावाने सावध होऊन 'श्रीराम जय राम, जयजय राम' असे रामनामाचे स्मरण करत होता. "माझा देहभ्रम नाहीसा करण्यासाठी शेवटी राम आला. धन्य, धन्य श्रीराम, जो औषधी वृक्षवेलीच आहे. श्रीराम कृपानिधी ज्याच्याजवळ जाईल, तो सत्यतः पावन होईल. हे श्रीरामा मी काय सांगतो ते ऐक,"

"वनांतरात तू जिचा शोध घेत फिरतो आहेस, ती सीता मी पाहिली आहे. तिला निश्चितपणे रावणाने नेली आहे. सीता मला गुरुपत्नी म्हणून पूज्य आहे. मला ती गुरुत्वामुळे प्राणाहूनही प्रिय आहे. तुम्ही आश्रमात कोणीच नसताना रावणाने तिला चोरून नेली. तू मृगापाठीमागे गेलास आणि नंतर लक्ष्मणानेही पर्णकुटी सोडली. त्यावेळी येऊन त्या कपटी रावणाने सीतासुंदरी नेली. सीतेचे बळाने हरण केले, त्यावेळी तुम्ही धावून आला नाहीत. सीता

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

आक्रंदत असताना त्याने तिला नेली हे मी माझ्या डोळ्यांनी पाहिले आहे. मी हे बोललेले ऐकून श्रीरामा तू मला नपुंसक ठरवशील, पण मी सीतेनिमित्त लंकानाथाला काय केले ते ऐक."

"रावणाने सीतेचे हरण केले तेव्हा मी वनक्रीडेला गेलो होतो. त्यावेळी सीता आक्रंदून आक्रोश करत असल्याचे ऐकून मी वेगाने तेथे आलो. रावणाशी घोर युद्ध केले. तिकडे पलीकडे तुला रक्तांकित भूमी दिसेल पाहा. मी रावणाला जेरीला आणून त्याचे छत्र मोडून पाडले. त्याचे धनुष्यबाण मी नखांनी चूर्ण केले. त्याच्या रथाला जोडलेली पिशाचवदनाची गाढवे सप्राण निर्दाळली. आमचे कडोकडीचे युद्ध झाले. त्याचा ध्वज भंगला, रथ आणि सारथी यांचे पीठ केले. त्याच्या डोक्यावरचा मुकुट पाडला. युद्धात रावण पराभूत झाला. माझ्यापुढे त्याचा पराक्रम चालेना. तेव्हा त्याने मला चुकवून, सीतेला घेऊन जाण्याचे ठरवले. राक्षसी मायेने गुप्तपणे सीता खाकेत धरून, पशूपक्ष्यांना कळू न देता, आकाशमार्गाने तो गुप्तपणे निघाला. माझी गडबड उडाली. हाताशी असलेली सीता रावणाने नेली. आता श्रीरामाला काय सांगायचे या विचाराने मला लाज वाटली. तेवढ्यात रावण सीतेला आकाशातून नेत असल्याचे माझ्या दृष्टीला दिसताच मी लगबगीने धावलो. एकाच झडपेत मी तिला सोडवली. वेगाने सत्वर धावून जाऊन, घावामागून घाव घालून रावणाचे शरीर घायाळ करून, दशाननाला नखांनी विदारून काढले. त्याच्या शरीरातून रक्ताचा पूर वाहविला. मुखाने, नखाने, पंखांनी झडपून मी रावणाला अस्ताव्यस्त केला. त्याबरोबर सीतेला सोडून रावण धाकाने पळून गेला."

"एका पक्ष्याने सीतेला सोडवले याची त्याला लाज वाटून, रावण पुन्हा युध्दाला आला. त्यावेळी लाजेने आणि अभिमानाने तो युध्द करू लागला. त्याने मला रागाने लाथा मारल्या. मी त्या चपळाईने चुकवल्या. त्याने मुठींचे आघात केले ते मी झडपून काढले. अशाप्रकारे माझ्या पंखांच्या वाऱ्याचे आवर्त, नखांचे आणि मुखाचे आघात, यांमुळे रावणाला पुन्हा अस्ताव्यस्त करून, त्याला रणात मूर्च्छित पाडला. माझ्या दोन्ही पंखांच्या वाऱ्याने त्याला आकाशात उडवला. तिथून तो खाली पडत असताना, मी उसळी घेऊन त्याला पुन्हा झडपला. माझा पराक्रम पाहून रावण दाती तृण धरून, शरण आला, दीनवदनाने, दुःखाने 'पुरे आता पुरे रण' असे म्हणाला. हा पक्षी आपल्याला रणात आवरत नाही. या जाणिवेने रावणाची मानहानी झाली. लोकांना तोंड दाखवायची त्याला लाज वाटली. तेव्हा तो पुन्हा परत युध्दासाठी आला. तो माझा छळ करण्यासाठी म्हणूनच लगेच परत आला होता. तो मला म्हणाला, 'आपण समोरासमोर झुंज करू'. मी तेही मान्य केले."

"रावणाच्या मनात कपट होते. त्याने मला श्रीरामा तुझी शपथ घातली आणि माझे मरण कशात आहे ते विचारले. मी प्राण गेला तरी खोटे बोलणार नाही आणि तुझी शपथही मोडणार नाही. तुझ्या भक्तीने, सत्य, सात्त्विक भावनेने माझा मृत्यू दोन्ही पंखात असल्याचे मी त्याला सांगितले. नंतर तुझा मृत्यू कशात आहे असे मी रावणाला विचारले. त्या खोटारड्या, पापी, कपट्याने मला त्याचे मरण डाव्या पायाच्या अंगठ्याच्या नखात असल्याचे खोटेच सांगितले. तो महापातकी, खोटेपणा करणारा रावण आकाशात संचार करणारा (खे-चर) आणि मी पक्षी (खग) दोघांचे युध्द सुरू झाले. आम्ही एकमेकांच्या वर्मावर लक्ष ठेवून आकाशात निराधारपणे युध्द करू लागलो. मी पंखांनी रावणाला तडाखे दिले आणि त्याच्या डाव्या पायाच्या अंगठ्याचे नख छेदले. रावण तरीही मेला नाही कारण तो खोटे बोलणारा आणि कपटी होता. मला वाटले रावणाने भावार्थाने नख म्हटले असेल म्हणून पुरूषार्थ करून मी त्याचा अंगठाच छेदला. तेव्हा माझी पंखे रावणाच्या हातात आली आणि त्याने ती उपटून काढली. मला फार

https://archive.org/details/muthulakshmiacademy Bhuvan Vani Trust, Lucknow

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

दुःख झाले. माझे पंख त्याने उपटले याचे मला काहीच दुःख नव्हते; सीता रावणाने नेली आणि माझ्या प्रत्यक्ष नेली याचेच श्रीरामा मला विशेष दुःख झाले आहे. अशी रावणाने ख्याती केली. तू पावला नाहीस तेव्हा यश माझ्या हाती येणारच नव्हते; त्यामुळे सीता त्याने नेली. पंख तोडल्याचे दुःख कसले, तू स्वतः त्वरेने आला नाहीस, रावणाने सीता नेली, याचे मला दुःख वाटते. माझ्या देखत रावणाने रडत असलेली सीता नेली, याचे मला फार दुःख होते आहे रघुनाथा, आता आणखी किती सांगू!"

श्रीरामाने जटायूचे बोलणे ऐकल्यावर त्याला कृपापूर्वक आलिंगन दिले. यावेळी श्रीरामाच्या डोळ्यात पाणी आले. आपला कोणी सखा, बंधू, पुत्र धाप लागून रणात पडला तर जसे दुःख होते तसेच श्रीरामाला दुःख झाले. तो कृपाळू राम स्फुंदत राहिला. युध्दात रावणाला गांजून, सीतेची ज्याने सुटका केली तो जटायू कपटाने मारला म्हणून दुःखाने लक्ष्मण विलाप करू लागला. 'जर हा युध्द झाले त्यावेळी आला असता, तर रावण कसा सीतेला नेऊ शकला असता; माझा जटायू वाचला असता' असे दुःखाने सौमित्र म्हणाला. "कोणीच नेमके सत्य सांगत नाही, यासाठी मागे-पुढे हिंडावे लागते आहे. नेमका मार्ग कळला, तर त्या मार्गाने जाता येईल; तिकडे धाव घ्यावी लागेल." असे म्हणून अत्यंत व्यथित होऊन लक्ष्मण बोलला. जटायूचा घात झालेला पाहून 'मित्राचा पूर्ण घात झाला' असे म्हणून तो विलाप करू लागला. नंतर श्रीरामाने जटायूला म्हटले, "तुला बोलण्यासाठी शक्ती असेल तर सीतेच्या शोधाविषयी यावेळी मी विचारीन तेवढे सांग. सीतेचे हरण करून रावण कोणत्या दिशेला गेला? त्याचे ठिकाण, भुवन कुठे आहे? हे सगळे मला सांग."

श्रीरामाचे प्रश्न ऐकून जटायूच्या मनास आनंद झाला. "मी सृष्टीत आज धन्य धन्य झालो. "श्रीराम माझ्या दृष्टीस पडला. रावणाने सीता नेली, हे समूळ कथन करण्यासाठीच मी आत्मा कंठात धरून ठेवला आहे. शिवाय तुझे चरण दृष्टीस पडावे म्हणून मी प्राण रोखून धरला आहे. मी मूर्च्छित झालो. नंतर रावण कोणत्या दिशेला निघून गेला ते किंवा त्याचे स्थान, भुवन मला माहिती नाही," हे सांगत असताना जटायूने डोळे विस्फारले. तो म्हणाला, "श्रीरामा सत्य सांगतो, आता माझ्याने बोलवत नाही. तुझ्या चरणांवर मस्तक ठेवून मी आपले जीवित संपवतो." यावर श्रीरामाने असे म्हटले की, "सीताहरणाचे दुःख हे मला अत्यंत दुःख देणारे नाही. जटायूच्या मरणाचे मला अत्यंत दुःख वाटते आहे लक्ष्मणा. माझ्या कार्यासाठी याने प्राण वेचले आहेत. तेव्हा याचे उतराई व्हायला हवे." एवढे बोलून श्रीरामाने जटायूला आश्वासन दिले, तो कृपादृष्टीने म्हणाला, "तू भिऊ नकोस मी तुला वाचवीन. एवढ्यात प्राण सोडू नकोस मी तुझे दुःख निवारण करीन. तुला मी तुझे दोन्ही पंखही देईन. असंख्य वर्षे तू जगशील. तू मरणोन्मुख का होतो आहेस. आम्ही, तुम्ही तिघे जण, शोधून रावणाला मारूया. तू युध्दात सहभागी होशील मगच प्राण सोडशील. पूर्वी स्वर्गात नमुचीच्या युध्दासाठी दशरथ सिध्द झाला त्यावेळी तू त्याला साहाय्य केलेस. तसेच आताही साहाय्यकारी होऊन लंकानाथाच्या वधासाठी आमचे साहाय्य करावेस."

श्रीरामाचे बोलणे ऐकून जटायू हसला, आणि म्हणाला, "तू मला वाचवशील यात काय नवल. तू तर अखिल सृष्टीचा स्रष्टा आहेस. तुझ्या संकल्पसत्तेमधूनच तर सृष्टीत उत्पत्ती, स्थिती, लय होत असतात. तुझी आज्ञा ब्रह्मा, विष्णू, शिव हेही मान्य करतात असा तू समर्थ आहेस. तुझ्याकडून रावण मारला जायला निमिषार्धही लागणार नाही. तेथे मी मशक काय करणार? माझी विनंती ऐक. माझ्या आयुष्याची आकल्प मर्यादा पूर्ण होईपर्यंत मला नित्य तुझ्या चरणांचे चिंतन व्हावे हीच माझी इच्छा आहे. तेव्हा माझे

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized By Sayahu Foundation Research Academy

जन्म-मरण संपव. श्रीराम अखेरच्या क्षणी भेटावा असेच योगी, संन्यासी सतत इच्छित असतात; मला तर तू कृपामूर्ती साक्षात भेटलास. यापुढे मला देहलोभ उरला नाही. श्रीरामा माझे ऐक. आतासारखे सुखद मरण मला पुढे कधीच लाभणार नाही हे जाणून घे. वाचेने श्रीरामाचे नामस्मरण, डोळ्यांना श्रीरामाचे दर्शन, हृदयी श्रीरामाचे ध्यान अशी स्थिती असताना मरण ते कसले. अन्ती श्रीरामा तुझे स्मरण केल्याने भक्तांना तू चारी मुक्ती देतोस. असे पूर्ण ब्रह्म मला आज भेटले; मला देहलोभ उरला नाही. माझ्या पूर्व भाग्याच्या कोटी सुफळ होऊन माझ्या दृष्टीने श्रीराम परब्रह्म पाहिला. माझा देहलोभ नाहीसा कर आणि माझ्याकडे कृपादृष्टीने पाहा. रावणाने पंख छेदले, त्यामुळे दोन्ही पक्षांचा अभिमानही नष्ट झाला. त्यामुळेच श्रीरघुनंदन संतोषला, तेव्हा आता जगणे पुरे झाले. माझ्या भाग्याच्या गतीने मला कृपामूर्ती श्रीराम पावला. यासाठी दोन्ही चरण धरून मी विनवतो आहे की माझे जन्म-मरण निवार.'' जटायूचे निवेदन आणि त्याची विनवणी ऐकून श्रीरामाला संतोष झाला.

श्रीरामकृपेने जटायूला उत्तम गती प्राप्त

श्रीरामाच्या हे लक्षात आले की सीतेकरिता जटायूने आपले प्राण वेचले आहेत. त्यामुळे श्रीराम संतुष्ट झाला आणि त्याने जटायूला स्वतः उत्तम गती मिळवून दिली. सोमयाग, श्येनयाग, अश्वमेघ यागादी नाना दाने जटायूसाठी गौण आहेत; असे स्वतः श्रीरामाने मान्य केले. शरण येणाराची शरणागती, धर्मशील असलेल्याची धर्मगती, पुन्हा जन्म न घेणाराची गती हेही श्रीराम गौण मानत होता. संन्याशांची ब्रह्मसदन प्राप्ती किंवा योग्यांची योगमुक्ती यांही जटायूच्या दृष्टीने निश्चित गौण आहेत असेच श्रीराम स्वतः मानत होता. त्यामुळेच त्याने जटायूला स्पष्टपणे सांगितले की, ''या सर्व गतींच्या वरची उत्तमोत्तम स्थिती, परात्पर परम गती माझ्या आज्ञेच्या शक्तीने तुला प्राप्त होईल.'' त्यावर जटायूने विचारले, ''तुझ्या आज्ञेची आत्मशक्ती तुझ्याजवळ आहे. मी तेथे कशा प्रकारे जावे?''

श्रीरामाने त्यावर सांगितले, ''तू कोणतीही शंका मनात आणू नकोस. अरे, योगयाग धर्मस्थिती करणारे धार्मिक जी गती प्राप्त करून घेतात, ते भोगक्षयाने क्षय पावतात. पुनरावृत्ती सर्वांना आहेच. माझ्या दर्शनाचे पुण्य हे कल्प होऊन गेल्यावरही क्षीण होत नाही. असे शाश्वत स्थान तुला प्राप्त होईल. हे माझे सत्यवचन आहे, लक्षात ठेव. जे सामान्य माणसे सहजपणे बोलतात तसे हे माझे बोलणे नाही. तू त्वरेने गमन कर.'' असे श्रीरामाने म्हणताच वैकुंठवासी, चतुर्भुज, पीतांबरधारी, शंखचक्रगदा धारण केलेले आणि विमानात बसलेले कोणी एकजण आले. त्यांनी श्रीरामचंद्राला हात जोडून नमन केले आणि उभे राहिले. श्रीराम त्या पुरुषाला म्हणाला, ''हा माझा जटायू पुण्यवंत आहे. त्याला तुम्ही वैकुंठाला न्या आणि अक्षयवासी म्हणून त्याची तिथे स्थापना करा. विमान पाहताच जटायू दिव्यदेही झाला. श्रीरामाच्या पायी लागला आणि म्हणाला, ''कोणत्या प्रकारे तुला वंदन करू. तुझे स्तवन करताना वेदशास्त्रांना मौन आले. मी तर दीन पक्षी आहे. तुझे गुणवर्णन मी काय करणार! काही न बोलणे हेच स्तवन, काही न करणे हेच भजन, काही न होणे हेच प्राप्त होणे, कारण श्रीरामा परिपूर्ण ब्रह्मच तू स्वतः आहेस.'' नंतर त्रिवार प्रदक्षिणा करून, श्रीरामाच्या पायांना वंदन करून, जटायू विमानात बसून वैकुंठाला निघाला. वैकुंठवासी पुरुषालाही श्रीरामाचे स्वामित्व मान्य आहे, हे पाहून जटायू मनात चकित झाला. त्यामुळे पुनःपुन्हा प्रदक्षिणा, पुनःपुन्हा चरणवंदन करून मगच जटायू विमानात बसून वैकुंठाला निघाला. त्यावेळी श्रीरामाने त्याला म्हटले, ''स्वतःच्या तेजाने देदीप्यमान, शोभायमान असा तू क्षणात वैकुंठात जाशील. कृतकल्याण असो जटायूचे.''

श्रीरामाने पवित्र जटायूला वैकुंठाला पाठविले.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Muthulakshmi Research Academy

"वैकुंठात तुझी अगाध कथा ऐकून त्रिलोकात तुझी ख्याती होईल. वैकुंठात माझा पिता दशरथ तुला भेटेल. माझी वनवार्ता विचारील. तेव्हा रावणाने सीतेचे हरण केले हे कदापी सांगू नकोस. कारण रामाने जटायूचा उद्धार केला हे ऐकून दशरथाला परम आल्हाद होईल; परंतु सीताहरणाचे वृत्त ऐकून मात्र त्याला अत्यंत दुःख होईल. सूर्यवंशात जन्म घेऊन, वनवासात सीताहरण झाले, यामुळे सूर्यवंशाला मी लाज आणली असे म्हणत, अत्यंत आवेशाने संतप्त होऊन, लंकानाथाचा वध करायला स्वतः दशरथ येईल. एवढा सगळा अनर्थ होईल; त्यामुळे सीताहरणाची वार्ता सांगू नकोस." त्यावर जटायू म्हणाला, "श्रीरघुनाथा, ही व्यवस्था मला सांगितलीस ते बरे केलेस; एरवी मी दशरथाला सारे सांगितले असते. कारण त्यामागचा गूढार्थ मला कळलाच नसता." एवढे चरित्रकथन करून पित्याला कसे ज्ञान होईल; यासाठी रावण मागून येऊन, स्वमुखानेच सर्व सांगेल.

श्रीरामाने सांगितले, "ज्याचे मी उद्धरण करीन, तोच स्वतः येऊन, सीतेचे हरण आणि कुळनिर्दाळण याविषयी सांगेल. सीताहरण करताच श्रीरामाने रावणाला सपुत्र, सबंधू, सप्रधान आणि ससैन्य बाणाने वेधून मारला अशी वार्ता ऐकताच दशरथाला सुख होईल. समस्त पूर्वजांना आनंद वाटेल. त्यांना माझा पुरुषार्थ पाहून आल्हाद वाटेल."

"श्रीराम हा ज्ञान-विज्ञानघन आहे. तुझे वचन म्हणजे ब्रह्मलिखित आहे." असे बोलून, जटायूने लोटांगण घालून वैकुंठाला गमन केले. श्रीराम हा स्वतः पूर्ण ब्रह्म, जटायू भक्त संपूर्ण, तो सुखसंपन्न झाला.

अध्याय बाविसावा

श्रीरामाने जटायूचा उद्धार केला आणि मग तो लक्ष्मणासह सीतेचा शोध करत वनोपवनात हिंडत राहिला. एका वनात लक्ष्मण शोध घेत असता, त्याला अपशकुन झाल्याचे दृष्टीस पडले. त्यामुळे भयकंपित होऊन तो श्रीरामाला ते सांगत राहिला. सौमित्र तेजस्वी महावीर, परस्त्रियांना भगिनी मानणारा, सत्यवादी, पवित्र आणि श्रीरामभजनात एकाग्र होऊन राहणारा होता. धन, मान यांचा त्याग करून, आपल्या पत्नीला सोडून श्रीरामाची भक्ती श्रेष्ठ मानणारा असा होता. तो अशुभ, अपशकुनी चिन्हे श्रीरामाला सांगू लागला. "माझे बाहूस्फुरण पावताना दुःखायमान होत आहेत, अशुभ सूचक डोळे लवताहेत, तेव्हा श्रीरामा सावधान राहा. पुढे एखादे विघ्न असावे असे दिसते. डावीकडून चाष जाताहेत, कावळ्यांचा कुशब्द ऐकू येतो आहे, दिशा कोंदाटल्या आहेत, पशुपक्ष्यांना त्रास होत आहे." ही अशुभ चिन्हे पाहून दोघेही सावधपणे पुढे जाऊ लागले. तेवढ्यात दुर्धर विघ्न ओढवले. श्रीराम आणि लक्ष्मण यांच्या समोर वनामध्ये ओरडा झाला. तिन्ही लोकात तो ओरडा दुमदुमला; वनातले वनचर गडबडून गेले; श्वापदे आक्रोशाने ओरडू लागली; कोणी तारस्वरात किंकाळ्या फोडू लागले; काही मूर्च्छित झाले; वृक्ष समूळ उन्मळून पडले; हे सर्व पाहून त्यांनी आपले धनुष्य-बाण सज्ज केले आणि वनामधले विघ्न निवारण करण्यासाठी ते पुढे जाऊ लागले.

श्रीराम-कवंध-राक्षस यांची भेट

श्रीरामाने लक्ष्मणाला सांगितले की, 'दण्डकारण्य शुद्ध आणि निर्वेध करावे ही माझी प्रतिज्ञा आहे; तेव्हा प्रथम इथल्या विघ्नाचे निराकरण करून मगच आपण पुढे जाऊ." नंतर श्रीराम विघ्नाचे निरसन करण्यासाठी लक्ष्मणासह पुढे निघाला. तेव्हा त्यांना एक अत्यंत अद्‌भुत राक्षस त्या वनात दिसला. त्याच्या कंठासह मस्तकावर शिर नव्हते; आकाशासारखे विशाल त्याचे शरीर होते; पोटाच्या आत त्याचे क्रूर मुख दिसत असून त्याच्या दाढा अति उग्र आणि भयंकर होत्या; धगधगीत आणि क्रोधाविष्ट असे

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized By Sarayu Foundation Trust and eGangotri

डोळे; रागात मग्न झालेली दृष्टी आणि पाय नसलेल्या अवस्थेत बसल्या जागी राहून तो आपले स्थान सोडत नव्हता. त्याचे हात इतके लांब होते की एकेक योजन लांबवर ते पोचत होते. त्या हातांचा दशदिशात संचार होऊन, त्या हातात पशूपक्षी पकडून तो खात होता. माजलेल्या हत्तींचे कळपच्या कळप त्याच्या तोंडात जाऊ शकत होते, तशीच अवस्था वाघ, सिंह, अस्वले यांचीही होत होती. आकाशात उडणारे पक्षी, वनात चरणारे पशू यांना हाताने पकडून तो तोंडात ढकलत होता. त्याच्या उंच हातांचा अवकाशात संचार चाललेला न कळल्याने प्राण्यांना पकडून तो खात होता. एखाद्या पर्वतासारखा हा कबंधराक्षस होता.

रावणाने राम आणि लक्ष्मण या दोघांना मारण्यासाठी पाठविले होते, ते आठ राक्षस राम आणि लक्ष्मण यांना वाटेत धरून मारावे म्हणून दाट कबंध वनात आले तेव्हा कबंध राक्षसाने त्या आठही जणांना धरून, त्यांना खाऊन टाकले. नंतर राम आणि लक्ष्मण यांना धरण्यासाठी त्यांच्यावर लक्ष ठेवून राहिला. शिर आणि चरण यांविरहित मध्यभाग असल्यामुळे त्याला कबंध हे नाव मिळाले होते. राम आणि लक्ष्मण जवळ येत असल्याचे पाहून त्यांना धरायला तो सिद्ध झाला. त्या दोघांना त्याने दोन हात पसरून पकडले. त्यांना खाण्यासाठी तो सर्व बळ वापरून जवळ ओढू लागला. परंतु श्रीराम अणुमात्र ओढला जाईना त्यामुळे तो राक्षस साशंक झाला, 'माझी, या कबंधाची एवढी शक्ती असताना, ही दोन माणसे मला ओढता येत नाहीत, तेव्हा यांच्या ठिकाणी ही दुर्धर शक्ती कुठून आली हे जाणून घ्यावे म्हणून यांना त्यांचे कुळ, हे कोणाचे कोण, इथे यायचे कारण, इथे येणारे सारे माझे भक्ष्य असतात;' असे सारे प्रश्न आणि विचार त्याच्या मनात आले.

श्रीरामाला लक्ष्मण म्हणाला, "या राक्षसाने आपल्याला दृढ बंधनात अडकवले आहे. शक्तीने सुटका करून घेणे अशक्य दिसते; तर आपण काय करावे?" श्रीरामाने त्यावर म्हटले, "लक्ष्मणा, दृढबंधन लागले तर ते आपले आपणच सोडवले पाहिजे. जो दुसऱ्याची आशा करील तो हीन, दीन, नपुंसकच म्हणावा. सौमित्रा सावधपणे ऐक. मला याचा वृत्तान्त विचारू दे. मग मी याचा क्षणही न लागता घात करीन." कबंधाने त्या दोघांना धमकावून म्हटले की, "तुम्ही जर मला तुमचा वृत्तान्त सांगितला नाहीत, तर मी तुमचा वध करीन." तेव्हा श्रीरघुनाथ हसून स्वतःचा वृत्तान्त सांगू लागला. "अरे, मी दाशरथी आहे. रावणाने सीतेचे हरण केले, त्यामुळे तिचा शोध घेताना आम्ही या वनात आलो आहो. तुझे दीर्घ, लांब हात, डोके खाली गेलेले विक्राळ रूप असा तू आहेस तरी कोण? आमचा मार्ग अडविण्याचे कारण काय? तुझी माहिती सांग." कंबध संतापून म्हणाला, "माझी माहिती एवढीच की हातांनी आकर्षित करून तुम्हा दोघांना तोंडात घालायचे आणि खाऊन टाकायचे" नंतर कबंधाने बळाने आणि रागाने दोघांना ओढायला आरंभ केला, परंतु त्या दोघा बंधूंना ओढणे त्याला कठीण जाऊ लागले आणि त्याचे खांद्यापासूनचे हात उखडू लागले.

त्यावेळी लक्ष्मण श्रीरामाला म्हणाला, "रघुनाथा, हा तर आपला घात करायला पेटला आहे. तेव्हा याचा लगेच वध करावा. उशीर करू नये." श्रीरामाने म्हटले, "याला पायच नाहीत. हा बाहूबळानेच पूर्णतया बलवान आहे. तेव्हा त्याचे बाहूच आपण तोडावे. आपल्याला दोघांना धरण्यासाठी त्याचे हात त्याने गुंतवले आहेत. त्यामुळे याच्या दोन्ही हातांचा खड्गाने सावधपणे छेद करावा." श्रीरामाने एवढे सांगून लगेच खड्ग काढून कबंधाचा उजवा हात तोडला. त्याचवेळी लक्ष्मणाने डावा हात तोडला. कबंधाच्या महाभुजा तोडल्यावर रक्ताचे पाट वाहू लागले; तो राक्षस आक्रंदून सारे चराचर दुमदुमेल असा आक्रोश करू लागला. अंतराळ, पाताळ त्या आवाजाने कोंदून

https://archive.org/details/muthulakshmiacademy Bhuvan Vani Trust, Lucknow

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

गेले. पशू, पक्षी, श्वापदे पळू लागले. दिग्गजांना टाळा बसला. राक्षस स्वतः कंपायमान होऊन म्हणाला, "तुम्हीच ते राम, लक्ष्मण काय? माझ्या भुजांचे छेदन अन्य कोणालाच तुटले नसते. माझ्या अतर्क्य भुजा केवळ राम, लक्ष्मण हेच तोडू शकतात, दुसरे तर त्या पाहूनच मूर्च्छित होतात. इतरांना माझे वर्म समजत नाही; इतर सर्वजण मी दृष्टीला पडलो की मूर्च्छित होतात आणि लगेच मी त्यांना खाऊन टाकतो. मी सर्व शक्तीने ओढत असतानाही तुम्ही ओढले गेलाच नाहीत; उलट माझे दोन्ही हात तोडलेत; त्यावरून तुम्ही दोघे म्हणजे राम, लक्ष्मण हेच असणार. तुमचा घाव लागताच दुःख न होता मी सुखच अनुभवले. त्यावरून तुम्हीच श्रीराम आणि सौमित्र असणार, तुम्ही अलौकिक आहात."

कबंध आपला वृत्तान्त सांगतो

कबंधाचे बोलणे ऐकून लक्ष्मणाने, "आम्हीच श्रीराम आणि लक्ष्मण आहोत. आम्ही दोघे सीतेचा शोध करत निघालो आणि इथे आलो. आता तू कोण? या वनात शिर आणि चरण यांविण कबंधच असलेला तू इथे राहायला का आला आहेस? तुझे प्रचंड पोट पायांशिवाय कसे? त्या विशाल पोटावर तुझे तोंड दिसते आहे; त्यामुळे तुझे दर्शन विक्राळ आहे. आपल्या हातांनी एवढे सर्व पशू, पक्षी तू तोंडात घालतोस तर तुझी भूकही फार विलक्षणच आहे. तू आहेस तरी कोण?" असे कबंधाला विचारले. तेव्हा संतोषाने तो कबंध राक्षस आपले पूर्ववृत्त सांगू लागला.

"कश्यपाची प्रियपत्नी दनी ही लक्ष्मीसारखी होती. ती दनी ही माझी माता आहे. त्या दनीचा मी पुत्र असून मला त्यामुळे दनू असेच म्हटले गेले. मी अत्यंत रूपवान, यौवनात सतेज आणि पूर्णपणे बळवंत होतो. मला या सर्वाचा गर्व वाटू लागून मी उद्धटपणे वागू लागलो. वनात फिरून नानाप्रकारची तोंडे करून, वेडेवाकडे वागून ऋषींना भिववू लागलो. पुढे एकदा महाऋषी स्थूलशिर हे वनफळे वेचत असताना मी खाली तोंड करून त्यांना भीती दाखविली. त्यावर त्यांनी रागाने मला शाप दिला की, 'विक्राळ मुख, चार कोस लांब हात, पाय नसलेले शरीर आणि पोटात घुसलेले डोके असा भयंकर राक्षस होशील.' मग मी त्यांचे पाय धरून उःशाप देण्याची विनंती केली. तेव्हा 'सीतेचा शोध घेत श्रीराम आणि लक्ष्मण वनात येतील. त्यांना भक्षण करण्यासाठी तू धरशील; त्यावेळी ते तुझे दोन्ही हात तोडतील. नंतर तुझा उद्धार होईल.' असे त्या ऋषींनी म्हटले. माझी आणखी एक उद्धट कृती आता तुम्हाला सांगतो.

"मी प्रदीर्घ तप केले आणि प्रजापती ब्रह्मदेवाला संतुष्ट करून घेतले. माझ्या तपश्चर्येने तो विधाता प्रसन्न झाल्यावर मी त्याला ब्रह्मशाप निवारण करण्याविषयी विनंती केली. तेव्हा त्यावर तो म्हणाला, 'द्विजशापावर सामर्थ्य चालवता येत नाही. ऋषींचे वचन, त्यांचा शाप निवारण करता येत नाही आणि त्यांचा शब्द खोटा ठरत नाही.' विधात्याने असे सांगितल्यावर मी त्याच्याकडून दीर्घायुष्य मागितले. त्याने लगेच तो वर दिला आणि तो तत्क्षणी अदृश्य झाला. नंतर मला वाटले मी फार श्रेष्ठ आहे, मी गर्वाने चित्तात आणले की, मी त्रिजगतात चिरंजीव आहे. इंद्र माझ्यापुढे कःपदार्थ आहे. मी एवढा गर्विष्ठ बनलो की मी इंद्राची स्वर्गसंपत्ती घ्यायला निघालो. मी इंद्रपदही मिळवीन. माझ्या या कृतीने आणि बोलण्याने इंद्र कोपला. मला खूप आयुष्य आहे त्यामुळे इंद्र मला एखाद्या कीटकासारखा वाटला. आमचे युद्ध झाले. इंद्राच्या घावांनी मी निष्प्रभ झालो. त्याच्या वज्राच्या आघातांनी माझे शरीर घायाळ झाले. डोके खाली आले. पाय वज्रधारेने कापले गेले. मी अत्यंत दुःखी झालो आणि त्याला म्हटले, 'माझा घात करू नको.' त्यावर इंद्र म्हणाला, 'अरे, तू तर चिरंजीव आहेस. तुझे जीवित संपणार नाही.' असे इंद्राने म्हणताच मला ब्रह्मशापाची प्राप्ती होऊन मी उन्मत्त राक्षस झालो. पोटात मुख आले. विक्राळ,

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized By Sayyam Foundation Research Academy Gangotri

विकट असा मी राक्षस झालो. दोन्ही हात योजन लांब झाले. जे जे हातात सापडे ते ते मी खाऊ लागलो. माझ्या भुकेला शेवटच नाहीसा झाला. काय आणि किती खायचे याला मर्यादाच उरली नाही. हे रघुनाथा, या उदरावस्थेने मी फार दुःखी झालो. पोटाच्या चिंतेत पडून, सर्व जगाला चिंतित केले. हृदयात कधी श्रीराम आठवला नाही. या पोटाने असा दुःखाचा फेरा निर्माण केला. जो मी वेदशास्त्राने संपन्न आणि स्वतःला सज्ञान समजत होतो, तो मी इतर सामान्य विषयासक्त, अधाशी माणसांना क्षुद्र कीटक समजत होतो. आता मात्र इतरांचे काय माझी तीच अवस्था झाली आहे. त्याविषयी मी काय सांगतो ते श्रीरामा सावधपणे ऐक."

"हे श्रीरामा, या देहाच्या संगतीने मी अपार दुःखी झालो आहे. एखाद्या मातीच्या गोळ्यासारखी ही अवस्था आहे. मला गती नाही, शेवट नाही, अंतर शुद्ध नाही, बाह्य वर्तन असे की सर्वार्थी निंद्य ठरावे. जीव मारून खाताना ब्राह्मण, क्षत्रिय, शूद्र असा विचार न करणारा मी एक अपवित्र राक्षस आहे. मी दुर्धर दुःखाने ग्रस्त असताना, माझ्या मूळच्या शापाच्या भाग्यामुळे आज तुम्ही दोघे आलात. तुम्ही सीतेच्या शोधासाठी नव्हे तर माझा उद्धार करण्यासाठी आलात. तुम्ही माझे हात तोडलेत, तेव्हाच माझा देहाभिमान नष्ट झाला. माझ्यावर घाव घालून श्रीरामा तू मला सावध करून सुखसंपन्न केलेस. तुम्ही दोघे सुखसंपन्न पूर्ण पुरुष, सत्त्वनिष्ठ, सद्विवेकी, सात्त्विक आहात. तुमचे चरण सुखदायक आहेत. तुम्ही दोघे धैर्यवान वीर, सत्स्वरूप महाशूर, आत्मधर्माचे माहेर, चिद्चिन्मात्रस्वरूप आहात. तुम्हाला पाहून अविद्या आणि पाप यांच्या कोटी नष्ट झाल्या; तुमच्या भेटीने सुखस्वरूपता आली; अखिल सृष्टीत कृपाळू असा श्रीरामच आहे. तुम्हा दोघा अलौकिकांची चरणसेवा केली तर दुःखाचा नाश होऊन सुख प्राप्त होते. पापी, निंद्य अशा राक्षसयोनीत अधःपतन झालेल्या मला निर्मुक्त करणारे तुम्ही ब्रह्मीभूत महात्मे आहात." एवढे बोलून कबंधाने श्रीरामापुढे लोटांगण घातले आणि म्हटले, "तुम्ही माझ्या देहाचे दहन केलेत, तर मी सीतेच्या शोधाविषयी सांगेन." हे ऐकल्यावर श्रीराम अत्यंत सावधानतेने त्याचे बोलणे ऐकू लागला.

श्रीरामाने कबंधाला विचारले, "सीतेच्या शोधाविषयी सांगेन म्हणतोस तर कोणी नेली, कोणत्या स्थळी, कोणत्या देशात नेली ते सांग. बुद्धी सावध करून, स्वस्थ मन करून, सीतेला कोणत्या स्थानाकडे नेण्यात आले, ते मला शांतपणे सांग." हे श्रीरामाचे बोलणे ऐकल्यावर कबंध म्हणाला, "मला जेवढे ज्ञात आहे तेवढे सांगतो." नंतर लक्ष्मणाला उभा करून कबंध गर्जून म्हणाला, "श्रीरामाची धर्मपत्नी रावण घेऊन गेला आहे. त्याचं नाव मी ऐकलं आहे; पण त्याला समक्ष पाहिलेले नाही. तो आकाशातून कुठे गेला, कोणीकडे गेला हे मला ठाऊक नाही. त्याचे राहण्याचे ठिकाण, जनवासात की वनवासात, यातले मला काहीही ठाऊक नाही. श्रीरामा, माझे शुद्ध ज्ञान ब्रह्मशापामुळे विच्छिन्न झाले आहे. या राक्षसदेहाचे दहन झाल्याशिवाय माझे ज्ञान मला प्रकट होणार नाही. स्वतःचे ज्ञान झाकले जाण्याचे मुख्य कारण देहाचे बंधन हेच आहे. तेव्हा देहाभिमान जाळला तर ज्ञानविज्ञान प्रांजळ होईल. यासाठी माझ्या या राक्षसी देहाला एखाद्या खड्ड्यात कोंबून, त्यामधे शुष्क लाकडे घालून देहाचे सौमित्रा तू दहन करावेस. अंतकाळी जो मित्रत्व करतो, त्यालाच सुमित्र हे नाव असते. मी तर तुमच्या कृपेची पात्रता असलेला आणि श्रीरामचंद्र हा कृपाळू आहेच. सौमित्रा सावधपणे ऐक. माझ्या या देहाला प्रेतत्व नाही कारण तो श्रीरामाच्या हस्तस्पर्शाने पवित्र झाला आहे. हे स्वामी, कृपा करून माझ्या देहाचे दहन कर. हा राक्षसदेह जळाला की सीतेच्या प्राप्तीचे विधान मी नीट सांगेन. हे श्रीरामा, माझे हे सत्यवचन आहे."

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

कबंधाचे देहदहन, त्याचे मार्गदर्शन

श्रीराम कबंधाचे निवेदन ऐकून संतोषला. त्याने लक्ष्मणाला सांगून कबंधाचे देहदहन करविले. चितेमध्ये कबंधाचे देहदहन होताच त्याने निंद्य राक्षसदेहाचा त्याग केला आणि दिव्यदेह धारण केला. दिव्य वस्त्रे परिधान केलेला, अनेक दिव्य भूषणे धारण केलेला, चंदन, मांदार, पारिजात अशा घमघमित माळा घातलेला असा तो दनुदानव राक्षसदेह त्यागून, उल्हासाने म्हणाला, "श्रीरामा तुझी कृपा पावून मी निमिषार्धात सुखी झालो आहे. तुझे नामस्मरण केले की सुरासुर शरण येतात. तुझे चरण पाहिले की सायुज्य मुक्ती ह्या चरणांना शरण येते. अशा तुझे सांग संदर्शन मला पूर्ण घडले आहे.' एवढे बोलून कबंधाने रामापुढे लोटांगण घातले. त्यावेळी हंसयुक्त असे विमान तेथे आले. "धन्य त्या द्विजाचा शाप! त्या शापानेच मी निष्पाप झालो. चित्स्वरूप श्रीराम मला भेटला, मी त्यामुळे सुखरूप झालो. सर्व चराचर मला चित्स्वरूप भासले; सुखाचे सागर झाले." असे अत्यंत उल्हासाने कबंध म्हणाला. श्रीरामालाही संतोष झाला. नंतर कबंध हंसयुक्त विमानात बसला आणि त्याने सीताप्राप्तीसाठीचे मार्गदर्शन मोठ्या उत्साहाने सांगायला आरंभ केला.

"श्रीरामा, माझे सत्यकथन ऐक. सीता त्वरित भेटावी म्हणून तू सुग्रीवाशी मैत्री कर. सुग्रीव हा वानर महाबलवान वीर आहे. हा वानर म्हणजे नुसती झाडाची पाने खाणारा सामान्य वानर नाही, तर तो किष्किंधेचा राजा असून, त्याचे अपार सैन्यही आहे. त्याचे चार प्रधान हे राजनीती जाणणारे, पराक्रमी, सज्ञान आणि बलवान आहेत. समानशील असलेल्यांना योग्य मैत्री करता येते. ते एकमेकांना साहाय्यकारी होतात. तुझी आणि सुग्रीवाची समसमान योग्यता आहे. ती कशी तेही सांगतो. ऐक. तुझी पत्नी रावणाने हरण केली; सुग्रीवाच्या पत्नीचे वालीने हरण केले आहे. तुम्हा दोघांची अवस्था स्त्रीविरहाने सारखीच झाली आहे. तुला राज्यत्याग करून वनवास झाला आहे; तोही राज्यत्याग करून ऋष्यमूक पर्वतावर राहतो आहे. दोघांचे दुःख समान असून, तुम्ही दीनवाण्या अवस्थेत आहात. तू नरपती आणि सुग्रीव वानरपती, दोघेही वीर आहात. त्याच्याशी मैत्री करून सीतेची प्राप्ती करून घ्यावी."

श्रीरामाला हे एकून कबंधाचे मार्गदर्शन पटले. त्याने कबंधाकडून सुग्रीव राहात असलेल्या जागेची, तेथे जाण्याच्या मार्गाची माहिती विचारून घेतली. कबंधाने त्याविषयी सर्व माहिती सांगितली. "रघुपती, याच मार्गाने पुढे गेलात म्हणजे तुम्हाला सुप्रसिद्ध पंपासरोवर दिसेल. त्या ठिकाणी तपस्वी शांत मनाने राहतात. पंपासरोवराच्या दर्शनाने दुःखी मने पूर्ण सुखसंपन्न होतात. तेच त्या वानरांचे स्थान असून, ते तिथेच स्वानंदाने क्रीडा करतात. तुझी आणि सुग्रीवाची भेट झाली तर दोघांचेही दुःख नष्ट होईल. सुग्रीव कोट्यवधी वानर मिळवून सीतेचा शोध करील. महाबलवान वानरांना त्रैलोक्यातील घराघरात शोध घ्यायला सांगून पाठविले जाईल. ते वानर सीतेचा ठाव-ठिकाणा शोधून तत्काळ परत येतील. सीताविरहाने तू स्वतः गिरिकंदरे आणि वने शोधत हिंडशील पण ते वानर अती शीघ्र तो शोध करतील. सुग्रीव आणि वाली यांचे स्त्रीवरूनच भांडण झाले आहे. सहा-सहा महिन्यांनी त्यांच्यात युद्ध होऊन, दोघेही मोठा पराक्रम करतात. तुझ्याकडून वालीचा वध होईल. हे मला पूर्णपणे ज्ञात आहे. तेव्हा त्वरित सुग्रीवाकडे जाऊन वालीचा वध कर. त्यांच्या युद्धप्रसंगी उपस्थित होऊन वालीचा वध केलास की सुग्रीवाला अत्यंत आनंद होईल. त्यामुळे तुझेही कल्याण होईल. हे माझे सत्यवचन आहे. सुग्रीवाच्या मैत्रीने तुला सीतेची प्राप्ती होईल." असे सांगून कबंध विमानातून गगनात उडाला. श्रीराम आणि लक्ष्मण तेथून पंपासरोवराच्या दिशेने पुढे निघाले.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Trust and eGangotri

अध्याय तेविसावा

श्रीराम आणि लक्ष्मण धनुष्यबाण सज्ज करून पंपासरोवराच्या दिशेने निघाले. ते सरोवराच्या पश्चिम तीरावर पोचले. त्या ठिकाणी सरोवराचे पवित्र पाणी पिऊन, विश्रांतीसाठी थांबले असताना, तिथे त्यांना अत्यंत मनोरम असा शबरीचा आश्रम दिसला. तेव्हा ते तिकडे गेले. स्वतः श्रीराम आणि लक्ष्मण आपणहून आलेले पाहून शबरीला परमानंद झाला. तिने रामचरणांवर लोटांगण घातले. लक्ष्मणाला सद्भावनेने तिने वंदन केले. श्रीरामाच्या दर्शनाचा तिला आनंद झाला. शबरीने मातंगऋषींची मनोभावे नित्य सेवा केल्यामुळे तिची बुद्धी शुद्ध होती. सर्वांभूती भगवद्भाव बाळगत असलेली शबरी श्रीरामाची अनन्य भक्ती करत होती. मातंगऋषींचे शिष्य निर्मळ मनाचे होते. एकदा दुष्काळ पडला असता ते गुरूसाठी फळमूळे आणत असत. त्यावेळी त्यांच्या शरीरातून जे घामाचे बिंदू पडले त्यांचे सरोवरात रूपांतर झाले. त्या पवित्र सरोवराचे पाणी कधीच आटत नाही. ते नित्य शुद्ध जलाने परिपूर्ण असते. त्या सरोवराचे पाणी श्रद्धेने प्यायले तर त्रिविध ताप शमतात. दुसऱ्या एका शिष्याच्या घामाचे बिंदू जमिनीवर पडून नाना जातीची फुले निर्माण झाली. ही फुले नेहमी घमघमीत, टवटवीत राहतात आणि कल्पांतीही सुकत नाहीत. त्या फुलांचा वास घेतला की मनाला होणारा त्रिगुणांचा त्रास नाहीसा होतो. मग तो परमेश्वर प्रकटपणे भोगतो. त्याने जीव-शिवांना उल्हास वाटतो. अशा त्या फुलांनी नटलेली वनश्री शोभा आणि सौभाग्याने युक्त असल्याने त्यांच्या दर्शनाने श्रीराम संतुष्ट झाला. त्याला शबरीचा संतोष देणारा भावार्थ समजला. मग त्याने शबरीला तिचा वृत्तान्त विचारला. तिच्या समाधानार्थ त्याने नंतर तिला उपदेशही केला.

श्रीराम म्हणाला, "शबरी मी सांगतो ते सावधपणे ऐक. मीच एक ज्ञाता आणि जग हे अज्ञानी आहे हे महाविघ्न जिंकले पाहिजे. ज्ञानाबद्दलचा अभिमान हेच तपस्व्यांना महाविघ्न आहे. ज्याने ज्ञानाभिमान जिंकला, त्याचे तप वाढत जाते. त्याच्या तपाची थोरवी अशी की स्वतः भगवंत त्याची आज्ञा पाळतात. तोच तपस्वी खरा असे या संसारी जगात मानतात आणि त्याला सुरवर वंदन करतात. अद्वैत भावाने स्वस्वरूप पाहिले की क्रोध जिंकला जातो. उलट द्वैतभावना असेल तर क्रोध कधीच जिंकला जात नाही. जो मागच्याचा धक्का लागून पडतो, तो तेव्हा कडाडून राग व्यक्त करतो; परंतु जो स्वतः घसरून पडतो तो उगीच इकडे तिकडे पाहून निमूट जातो. स्वतःची जीभ दाताखाली येते त्यावेळी येणारा राग व्यक्त करताना कोणी दात पाडण्याची किंवा जीभ तोडण्याची भाषा करतात का? तसेच अद्वैताचे ठायी क्रोधाला स्थान नाही. जेव्हा द्वंद्वाचा जोर असतो, तेव्हा मोह-ममता जिंकली जात नाही. अद्वैतभावना असली की मोह-ममता नष्ट होते. वृत्ती चित्स्वरूप झाल्या की मन सुखरूप होते. मनात दुःख-संताप असेल तर केलेले तपही खोटे ठरते."

"जर सद्गुरूची सेवा सफल झाली तर संसार मृगजळासारखा होतो. असे जे प्राप्त करून घेत नाहीत त्यांची व्यर्थ बडबड ठरते आणि त्यांना श्रीगुरूही ओळखता आलेला नसतो. जे गुरूला सामान्य मनुष्य मानतात; त्यांची गुरुभक्ती मिथ्याच ठरते; मग त्यांना कल्पांतीही समाधान किंवा विश्रांती मिळत नाही; उपदेश मुख्यतः भ्रांतीच ठरतो. जे मंत्र, तंत्र सांगतात ते तोंडीच उपदेश करतात; त्यांना आंतरिक आत्मानुभव असत नाही. ते उपदेशाबाबत भ्रांतीत असतात. सोन्याचा नाग असे म्हटले तरी तो खरोखर नाग नसतो तर ते सोनेच असते. त्याप्रमाणे दृश्य, द्रष्टा सांग दिसले तर उपदेश परिपूर्ण होतो. या अशा आत्मानुभवाने

https://archive.org/details/muthulakshmiacademy Bhuvan Vani Trust, Lucknow

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

सर्वथा गुरुभक्ती करावी. त्यासाठी ज्ञानाचा गर्व, उद्धटपणा सोडून देऊन सर्वांभूती निर्हेतुक नम्रता धरावी. इंद्रियकर्मांची प्रवृत्ती आहे की मी कर्माचा कर्ता नाही हा अनुभव गाठी आहे; त्यावरून वासनेची शांती आणि स्वानंदाची सुखस्थिती प्राप्त होते. अशी आत्मानंदाची अनुभूती आली म्हणजे ती खरी तपःस्थिती म्हणावी. स्वतःचा देह मिथ्या आहे असे पाहतात, तेच एक खरे परमार्थी होत.'' असे श्रीरामाने जेव्हा सांगितले, तेव्हा शबरीला पूर्णावस्था प्राप्त झाली. नंतर तिने श्रीरामाच्या पायावर डोके ठेवले आणि ती तात्त्विक दृष्टीने आपला वृत्तान्त सांगू लागली.

''श्रीरामा, तुझे दर्शन होताच माझे तप आणि ज्ञान सफल झाले. ध्येय, ध्याता, ध्यान सफल झाले आणि माझे अनुष्ठानही आज सफल झाले. हे रघुपती, तू आलास त्यामुळे माझी वृत्ती, स्थिती, भक्ती सर्व सफल झाली. तुझे नामस्मरण केल्याने पूर्वज उद्धरले आणि तुझ्या दर्शनाने माझ्या जन्माचे सार्थक झाले. तुझे चरण पाहिले त्यामुळे जन्ममरणाचा शेवट झाला; मी-तूपण संपले; मी सुखसंपन्न झाले. तू चित्रकूटाकडे येताना मार्गातले मुनी उद्धरले. शरभंग विमानातून जाताना मी त्याला विनंती केली तेव्हा त्याने मला सांगितले की, 'श्रीराम तुझ्या आश्रमात येईल.' त्यावेळेपासून मी अहोरात्र तुझे चरण चित्तात धारण करून राहिले आहे. माझी एकनिष्ठ भक्ती जाणून तू कृपावंत होऊन आलास. तेव्हा आता येथेच आज राहावेस आणि माझ्या पूजेचा स्वीकार करावास. थोडीशी पण पवित्र सामग्री मी जमविली आहे ती तू रघुनाथा स्वीकार कर. तुझ्या समवेत सखा सौमित्रीही आहे.'' हे शबरीचे बोलणे ऐकून श्रीरामाला संतोष झाला. त्याने विधियुक्त पूजेचा स्वीकार करून तेथे वनभोजनही केले.

श्रीराम संतोष पावून शबरीला म्हणाला, ''आम्हाला दनुजाने (कबंध) तुझे सामर्थ्य वर्णन करून सांगितले होते. त्यामुळेच आम्ही येथे आलो. तुझे आचरण आम्हाला पाहायचे होते. त्या दनुदानवाने सांगितले होते त्याहूनही अधिक आम्हाला दिसले.'' या श्रीरामाच्या बोलण्याने शबरीच्या मनाला आल्हाद वाटला. त्यावर शबरी म्हणाली, ''तुझ्या बोलण्याने माझे मन आनंदित झाले आहे. सद्गुरूंच्या पूर्ण मंत्रसामर्थ्याने हे वन कधी कोमेजत नाही की इथली फुले सुकत नाहीत. या ठिकाणचे पाणीही किती काळ लोटला तरी आटलेले नाही. सद्गुरूंचे सामर्थ्यच महान् आहे. त्यांचे ऐकले म्हणून हे पाहायला मिळाले. त्यांचे वचन मी पाळले म्हणून मला तुझ्या चरणांचे दर्शन झाले.'' असे बोलून तिने श्रीरामचरणांवर मस्तक टेकले. नंतर ती म्हणाली, ''आता मी काही मागते ते दयावंता तू दे. तुझे चरण पाहावे म्हणून आजवर देह धारण केला, आता हे चरण दिसल्यावर देहाचे कार्य काय उरले? तुला पाहिल्यावर माझी देहममता संपली. आता जीव सोडण्याविषयी हे कृपावंता आज्ञा दे. देहाच्या संगतीने असंख्य दोष निर्माण होतात. ही संगत कुत्र्याच्या ओकारीसारखी महानरक आणि दुःख देणारी आहे. देहसंगती कितीतरी दोष आणि दुःख निर्माण करते; तेव्हा देहसंगाची निवृत्ती करण्यासाठी कृपा करून मला आज्ञा दे.'' अशी प्रार्थना करून तिने रामचरणांपुढे लोटांगण घातले.

शबरीला श्रीरामाचा उपदेश

श्रीराम शबरीचे बोलणे ऐकून संतुष्ट झाला. त्याने उल्हासाने आज्ञा देऊन म्हटले, ''शबरी, खरोखर तू देहलोभ सोडून परलोकाला सुखाने जा.'' ही श्रीरामाची आज्ञा ऐकून शबरीने आसन घालून आणि आत्मतेज चेतवून देहाचे दहन केले. तेव्हा श्रीरामाच्या भक्तीच्या शक्तीने देह जाळून शबरी कोणत्या लोकात गेली ते ऐका.

ज्याप्रमाणे पुण्याचे सामर्थ्य असेल त्याप्रमाणे ऋषी ते ते लोक प्राप्त करतात. शबरी ही पाप किंवा पुण्य यांच्या पलीकडे अत्यंत समर्थ होती कारण तिला श्रीराम भेटला होता. श्रीरामदर्शनाचे

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

पुण्य हे दिव्य भोगांनीही क्षीण होत नाही. शबरीला अक्षय स्थान मिळाले. त्यामुळे जन्म-मरणाचा प्रश्न तिला नव्हता. ऋषीश्वरांची पुण्यसंपत्ती ही भोगक्षयाने कमी होते आणि ते पुनरावृत्तीला (जन्म-मरणाची) प्राप्त होतात. शबरीला ती पुनरावृत्ती नव्हती. जेथे श्रीशुक, सनकादिक यांची कायम वस्ती होती त्या लोकात शबरीला स्थान मिळाले. ह्या स्थानात राहणारे शिवादिकांनाही पूज्य असतात. श्रीराम जेव्हा दृष्टीने पाहतो तेव्हा परिपूर्ण पुण्य लाभते आणि देहदहनाने देदीप्यमान झालेली शबरी ही विमानाशिवाय निजगतीला गेली. जे कोणी विमानगतीने जातात त्यांना पुनरावृत्ती असते. शबरीला ती नसून अगम्यगती मिळाली.

श्रीरामाचे दर्शन झाल्याने पुण्यसंपत्ती, अक्षय सुखाची वस्ती आणि कल्पांतीही यातले काहीही क्षय न होणारी आत्मप्राप्ती शबरीला मिळाली. श्रीरामाचे दर्शन होताच पाप-पुण्य यांचा संबंध संपला आणि जन्म-मरणाची बाब बंद पडली. शबरीला अक्षय संतोष लाभला. श्रीराम हा स्वतः कृपामूर्ती असल्याने शबरी सुखानुभूती घेत तरली. स्वर्गामध्ये तिचा जयजयकार करून सुरसिद्धांनी पुष्पवृष्टी केली. अशाप्रकारे शबरीचा उद्धार श्रीरामाने केला. शबरीच्या आश्रमात विश्रांती घेत बसून वनशोभा पाहात बसलेल्या राम, लक्ष्मण यांना तेथे अपूर्व वर्तमान आढळले. मृगशावकांचे डोळे आणि मुख पाहून श्रीरामाला मृगनयना सीतेची आठवण झाली. त्याच्या ठिकाणी मदनभावना उत्पन्न झाली. मनमोहन श्रीराम नित्य निष्काम असूनही त्याच्या मनात कामभावनेचा क्षोभ झाला. काम हा निष्कामावर आक्रमण करणारा ठरला. त्यामुळे कामसंभ्रमाने राम ग्रस्त झाला.

प्राण्यांच्या कामक्रीडेने श्रीराम प्रक्षुब्ध

वसंताच्या आगमनाने वन शोभिवंत झाले होते; कोकिळांचे पंचमस्वरात आलाप काढणे सुरू होते; ते ऐकून सीतेच्या निमित्ताने राम पूर्ण सकाम झाला. त्याला वाटले की हे कोकिळकूजन नसून ते मदनाचे दुर्धर बाणच आहेत. ते बाण हृदयाचा दारुण वेध घेत असून सर्वस्वी वैर करताहेत. त्यामुळे श्रीराम लक्ष्मणाला म्हणाला, "लक्ष्मणा, या कोकिळांचे निवारण कर; कारण ते माझे बोलणे ऐकत नाहीत आणि कूजन थांबवत नाहीत." श्रीराम संतापला. त्याने असा विचार केला की त्या पक्षांचे बोलणारे तोंड बंद व्हावे, त्यांना मौन पडावे आणि संतापाने त्याने तसा शापच उच्चारला. तेव्हा कोकिळेने विनंती करताना दीनपणे म्हटले, "आम्ही केवळ वसंतात मधुर स्वरात कूजन करू आणि एरवी मौन पाळू."

श्रीराम नंतर लक्ष्मणाला म्हणाला, "सौमित्रा, माझ्या दृष्टीसमोर तो मृगीच्या पाठी रममाण झालेला मृग पाहून माझ्या मनात कामवासनेचा प्रक्षोभ होतो आहे. त्यामुळे तो मला वैरी वाटतो आहे. तो मृग माझ्या मूर्खपणाच्या गोष्टी मृगीच्या कानात सांगतो आहे. त्यामधे सीता हरण केली गेली आणि सृष्टीत राम किती मूर्ख आहे याचे निरूपण तो करतो आहे. पशू, पक्षी, कावळे हे सुद्धा आपल्या स्त्रीपासून वेगळे होत नाहीत; तर हा राम सीतेला वनात एकटी सोडून गेला हीच रामाची मुख्य मूर्खता आहे. हाती असलेली सीता हरवून आता हा राम वनात रडत फिरतो आहे, असा त्याचा मूर्खपणा मी कधीच करणार नाही हे तो मृग सांगतो आहे.' या मृगाचे मृगीपाशी माझ्या मूर्खपणाच्याच गोष्टी सांगून मला निंद्य ठरविणे चालले आहे." श्रीरामाने मृगाच्या बोलण्याची अशी कल्पना केल्यावर आणि त्यांचे मैथुन पाहिल्यावर संतापून मृगाला शाप दिला; तू आपल्या स्त्रीशी रममाण झाला असताना घाव पडून मरशील." हा श्रीरामाचा शाप ऐकून मृग काकुळतीला येऊन रामाला विनंती करू लागला. कृपामूर्ती श्रीरामाने मग संतोषाने शापनिवृत्ती सांगितली, "जे पारधी रात्रीच्या वेळी मृगांना संगीताने भुलवून, जाळ्यात, पकडून, घाव घालून

https://archive.org/details/@sarayu_foundation_trust, tulasibhavana academy

CC-0. In Public Domain. Digitized By Sarayu Foundation Trust and eGangotri

मारतात तेव्हाच तुमचे प्राण जातील. एरवी तुम्ही मृगीशी स्वानंदाने, सुखाने रममाण होऊन वनात हिंडाल.''

श्रीराम नंतर पुढे गेल्यावर त्याला कामवासनेने उन्मत्त झालेला हत्ती हत्तिणीशी रममाण झालेला दिसला. श्रीरामाला वाटले आपल्याला सीतेसंबंधातली लाज आणून तो सुखाने स्त्रीसंग घेतो आहे; ज्याप्रमाणे आपण प्रेमाने सीतेला आश्वासत होतो, त्याप्रमाणे तो हत्ती आपली सोंड हत्तिणीच्या माथ्यावर ठेवतो आहे. तो स्त्रीविषयक कामभावनेने उन्मत्त होऊन, माझा उपहास करतो आहे. श्रीरामाच्या मनात हे विचार आल्यावर त्याने हत्तिणीशी कामक्रीडा करणाऱ्या हत्तीला सीतेविषयी विचारले. त्यावेळी हत्तीकडून काहीच उत्तर न आल्याने श्रीरामाला अत्यंत राग आला. त्या भरातच त्याने हत्तीला कठोर शाप दिला की, ''हत्तिणीशी कामक्रीडा करतानाच तिच्यासह तुझा प्राण जाईल.'' हा रामाचा शाप ऐकून हत्ती आणि हत्तीण दोघेही दीनवदन होऊन श्रीरामाची प्रार्थना करू लागले. त्या विनवणीने संतुष्ट होऊन श्रीरामाने शापमुक्ती सांगितली. ''हत्तिणीशी मैथुन करताना तू अचेतन होऊन पडशील. मग हत्तिणी तुझ्या माथ्यावर पाणी घालेल. तुझे प्राण वाचतील. नंतर ती तुला गवत खायला देईल. पुढे सात दिवसांनी तू सावध होऊन वनविहार करशील, या प्रकाराला गजोपशेज असे म्हटले जाईल. असे सुखानंदाचे कौतुक तू मिरवशील.'' श्रीरामाचे बोलणे ऐकून हत्ती सुखी झाला. अद्यापी हत्ती-हत्तिणींच्या मैथुनात हा विचित्र प्रकार चालतो. श्रीराम विनोदाने हे बोलून जगात विचित्र प्रकार चालवितो.

श्रीराम आणि लक्ष्मण पुढे जात असताना एके ठिकाणी मयूर-मयूरी यांचे जुग त्यांना दिसले. श्रीराम ते पाहून लक्ष्मणाला म्हणाला, ''पाहा लक्ष्मणा, मोर-मोरणी दोघे कामभावनेने उन्मत्त होऊन नाचताहेत. मलाही कामपीडेने आर्त करत आहेत. तो मोर आपली मयूरी राक्षसांनी नेली नाही म्हणून वनात नाचून मला दुरून वेडावतो आहे. मी वनात सीता हरवली आणि दुःखी झालो हे पाहून ती दोघे नाचताहेत'' असे म्हणून रामाने त्या मोर-मोरणीला संतापून शाप दिला. ''मला दुःखी पाहून तुम्ही दोघे उन्मत्तपणे नाचत आहात तेव्हा तुला नपुंसकता येईल. तुमचा अंगसंग घडणारच नाही.'' श्रीरामाची शापवाणी ऐकून मयूर अती दीनवाणा होऊन, रामाचे पाय धरून विनवणी करू लागला. तेव्हा मोर म्हणाला, ''श्रीरामा, शापमुक्ती दे. सीतेच्या वियोगाने तू दुःखी होतो आहेस, तर आम्हा पक्ष्यांची काय कथा. आम्ही दारुण दुःख कसे सहन करणार.'' हे मोराचे करुण वचन ऐकून रामाला दया आली. तो प्रसन्न होऊन म्हणाला, ''तुम्ही दोघे नृत्य करत राहून सुखसंपन्न राहाल आणि डोळ्यातून वीर्य मिळून तुम्हाला पूर्ण सुख मिळेल.

यानंतर श्रीरामाने एका कावळ्याला कावळीसह पाहिले. तेव्हा तो लक्ष्मणाला म्हणाला, ''लक्ष्मणा, हे विपरीत पाहिलेस, तो काळा कावळा आपल्या पत्नीशी क्रीडा करत मला वाकुल्या दाखवतो आहे. श्रीरामाने कावळ्याला सीतेविषयी विचारले तेव्हा कावळा किंवा कावळी दोघेही रामाशी बोलले नाहीत. त्यावर श्रीरामाने रागावून आवेशाने त्या दोघांना शाप दिला. ''तुम्हा दोघात सबंध जन्मात एकदाच मैथुन होईल. पुन्हा स्त्रीसंग होणार नाही. संपूर्ण कागवंध्या होतील.'' अजूनही कावळ्यांच्या देहात दुसरा गर्भ राहात नाही. त्यावरून तिन्ही लोकात कावळ्यांना कागवंध्या म्हणतात. आणखी पुढे गेल्यावर श्रीरामाच्या दृष्टीस चक्रवाकांची जोडी पडली. अर्धा क्षणही एकमेकांपासून दूर न होता ती दोघे इकडे-तिकडे जोडीने फिरत होती. या लोकात चक्रवाक हे सुखी नव्हे, अत्यंत सुखी होते. देहामागे जशी सावली तशी चक्रवाकाची मादी चक्रवाकाच्या मागे असते. चक्रवाक हा चक्रवाकीला कथा सांगत होता की रामाने सीता हरवली, मी माझ्या प्रियेला सोडून जात नाही कारण रामासारखा मी मूर्ख नाही.

https://archive.org/details/@sutlukshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Muthulakshmi Research Academy

वनामध्ये पत्नीला एकटी सोडून जाणे हीच त्याची मुख्य मूर्खता आहे. हे ज्ञानच त्या श्रीरामाला नाही. त्यामुळे आपल्या मूर्खपणाने आता विलाप करतो आहे. हा मूर्खशिरोमणी स्वतःच्या पत्नीला सोडून गेलाच का? आता तिच्यासाठी दुःखी होऊन वनामध्ये हिंडतोय." तो चक्रवाक आपल्या पत्नीबरोबर एकांतात कामक्रीडा करताना पाहून रामाला अत्यंत राग आला. त्याला शांत राहवेना. श्रीरामाने त्या चक्रवाकाला सीतेविषयी विचारले. तेव्हा त्यांनी काहीच प्रत्युत्तर दिले नाही. श्रीरामाने 'तुम्ही वियोग पावाल' असा शाप दिला. चक्रवाक तळमळू लागले. दीनपणे आणि काकुळतीला येऊन त्यांनी श्रीरामाची विनवणी केली.

चक्रवाक म्हणाला, "आमची विनंती ऐक, श्रीरामकृपामूर्ती. सीतेची वियोगावस्था तुलाही सहन करवत नाही, तर तो वियोग आम्हाला कसा कंठवेल. त्यापेक्षा श्रीरामा, तू आमचा घात कर. तुझ्या हातून मरण्याने आम्ही सुखी होऊ. आमच्या देहाचा भंग झाला तर तो आम्ही सुखाने सोसू; परंतु स्त्रीचा वियोग आम्ही सहन करू शकणार नाही." हे चक्रवाकाचे बोलणे ऐकून श्रीरामाला पूर्ण संतोष झाला. त्याने उःशाप उच्चारला. "तुम्हा दोघांना दिवसा एकमेकांचा संग लाभेल, पण रात्री तुम्ही वियोग पावाल." अशाप्रकारे श्रीराम शापनिर्मुक्ती देऊन पुढे निघाला. पंपा सरोवराच्या तीरावर, अंतरात सीताविरह असल्याने श्रीराम चातुर्याने या गोष्टी बोलला. श्रीराम लीला अवधारी होता. खरे तर सीतावियोग प्राप्ती काय किंवा विरहस्थिती काय सारे मिथ्याच होते. सत्यात, प्रत्यक्षात किंवा वास्तवातील व्यवहारात या शापांचा उच्चार त्याने केला होता. श्रीराम हा सर्वांच्या ठायी सद्रूप होता. वियोग, शाप, विरहाचा प्रताप हे मिथ्या असून श्रीराम चित्स्वरूप होता. श्रीराम म्हणजेच ज्ञानविज्ञान यांची अभिव्यक्ती, निर्विकल्प ब्रह्ममूर्ती, तो चिन्मात्र आणि परब्रह्म होता. सीता ध्येय, श्रीराम ध्यान; सीता ज्ञेय, श्रीराम ज्ञान; सीता चेतना, श्रीराम चैतन्य; म्हणजे दोघे अभिन्नत्वे एकच. श्रीराम चित्स्वरूप असून त्याचे वर्णन करताना शास्त्रांना मौन पडले. श्रुती 'नेती नेती' म्हणत परतल्या. असो. माझी कथनाची शक्ती किती, तेव्हा ते जाऊ द्या. आता पुढील कथेकडे पाहू या.

श्रीराम ऋष्यमूक पर्वताकडे जातो.

श्रीरामाला ऋष्यमूक पर्वताकडे जाऊन सुग्रीवाशी सख्य करण्याची उत्कंठा होती. श्रीराम लक्ष्मणासह पुढे निघाला. "लक्ष्मणा, सावधपणे पाहा. हा ऋष्यमूक महापर्वत जवळच दिसतो आहे. चांगला फळाफुलांनी शोभिवंत आहे. येथे ऋषींनी यज्ञयाग केले त्यामुळे याला ऋष्यमूक असे नाव पडले. सुग्रीव येथे भयाने प्रधानांसह राहात आहे."

वालीच्या भीतीने सुग्रीव ऋष्यमूक पर्वतात राहतो आहे. ऋषींच्या शापामुळे वालीला येथे येण्याचे सामर्थ्य नाही. श्रीराम सुग्रीवाची भेट घेण्यासाठी तातडीने निघाला. सुग्रीवाला वालीच्या भयापासून मुक्त करून, त्याला सुखसंतुष्ट करावा असे त्याच्या मनात होते. सुग्रीवाच्या पत्नीचे हरण करून वालीने त्याला गांजले होते. अशा गांजलेल्यांचा तर कृपाळू श्रीराम धनुर्धारी कैवारीच होता.

एकनाथकृत अरण्यकाण्डाचा समारोप

अरण्यकाण्डाचे कौतुक येथे संपून पुढे गोड किष्किंधाकाण्डाचे सुख आहे. भरताचे कोड पुरविण्यासाठी त्याला पादुका दिल्या. रावणालाही ज्याचे भय वाटे अशा कबंध राक्षसाला नष्ट केला. श्रेष्ठ शरभंग महामुनींची भेट घेऊन त्यांचे कार्य केले. अनेक राक्षसांचा संहार केला. मायामृग मारीच मारला. रावणाकडून जटायूचा घात झाला. सीतेचा शोध, दुःखाने विलाप करणाऱ्या श्रीरामाने पार्वतीचे कौतुक पुरविले. शबरीचा उद्धार केला. कबंधाला मुक्ती दिली. अशा अनेक घटनांचे अरण्यकाण्ड पूर्ण झाले.

***

https://archive.org/details/@muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized By Sayyed Hashim Research Academy, Gangotri

ॐ

संत एकनाथकृत भावार्थ रामायण

किष्किंधाकाण्ड

अध्याय पहिला

श्रीसंत एकनाथकृत प्रास्ताविक

अरण्यकाण्डाचे निरूपण श्रीरामाने माझ्याकडून पूर्ण करून घेतले. आता येथपासून किष्किंधा कांण्डाविषयी तोच हे कथन करवून घेत आहे. माझ्या अंगी मूर्खपण असूनही श्रीराम माझ्याकडून रामायण स्वतः वदवून घेत आहे. ही रामकथा सांगताना मी विषय सोडून इकडे तिकडे गेलो, तर तोच मला मार्गदर्शन करून, रामायण स्वतः संपूर्ण प्रकाशित करतो आहे. मी भोजन करायला बसलो तरी घासाघासाला श्रीरामाचे स्मरण होत असते. अशा वेळी जेवण मागे पडून, स्वतः श्रीराम रामायण माझ्याकडून वदवितो. तो श्रीरामच स्वस्वभावानुसार एका ओवीपुढे एक ओवी अशी रामकथा चढवत नेतो. मी व्यर्थ काही बोलू लागलो तर तोच रामकथा माझ्या वाणीत घालून, माझी वाचा रामायणाने भरून टाकतो. यामुळे सतत वाचेत श्रीरामच येतो. मला निद्रावस्थेतही स्वप्नामध्ये श्रीराम रामायण दाखवतो आणि आपले गुह्यज्ञान कसे निरोपावे ते सांगतो. मी जेव्हा सुषुप्तीत असतो तेव्हा माझी पाठ थोपटून तो मला म्हणतो, "ऊठ, त्वरेने रामायण लिहायला आरंभ कर; वृथा झोपून काय लाभ?" रामायण लिहावे म्हणून श्रीरामाने माझी पाठ पुरविली आहे. श्रीराम माझ्या अंतरात शिरून माझ्याकडून त्वरेने श्रीरामकथा लिहवितो आहे. मी आत्मनिद्रेत डुलतो आहे, ग्रंथ लिहविणारा श्रीराम आहे. माझ्या कवित्वाचा इत्यर्थ हाच की या लेखनाचा कर्ता समर्थ श्रीरामच आहे. श्रीरघुनाथाला ही मराठीत सांगितलेली कथा आवडली की काय कोण जाणे; पण तो बळाने लिहवितो आहे खरा. अगदी थोडी अशीही वेळ तो दवडू देत नाही.

श्रीराम किष्किंधेकडे, सुग्रीव भयभीत

श्रीरामाने शवरीचा उद्धार केल्यावर, तो लक्ष्मणासह किष्किंधेकडे निघाला. ते दोघे वीर शस्त्रसज्ज होऊन दुर्धर असे वन ओलांडत धैर्याने पुढे जात राहिले. इंद्रादी देवांनाही दुर्गम असणारे ते वन या दोघांनी पायी चालत ओलांडले. हे सुग्रीवाने पाहिले तेव्हा तो म्हणाला, "देवांनाही ओलांडायला अवघड असे हे वन या दोघा योद्ध्यांनी पायी ओलांडले त्यावरून हे दोघे वेगळेच दिसतात. आम्हा वानरांना पाहून माणसे चळचळा कापतात आणि हे दोघे अगदी निःशंकपणे आमच्या समोर येताहेत, तेव्हा या दोघांची शक्ती विशेष आणि दुर्धर असावी. हे दोघे तापस-वेषात असले तरी यांना वालीने मला मारण्यासाठी मारेकरी म्हणून पाठविले असावे. असे वाटते." आपल्या प्रधानांना हे सांगून मनातून भयभीत झालेला सुग्रीव ती वस्ती सोडून शीघ्र पळायचा विचार करू लागला. त्याने प्रधानांना हा विचार सांगितला. त्यांना तो पटला.

श्रीराम आणि लक्ष्मण जवळ येत असलेले पाहून सुग्रीवाने वेगाने उड्डाण केले आणि तो

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

गिरीगव्हरात पळाला. सुग्रीवाचे चौघे प्रधान आणि इतर लहानसहान वानर हेही वने, उपवने वेगाने ओलांडत पळाले. कोणी पर्वताच्या गुहेत, तर कोणी शिखरावर जाऊन लपले. श्रीराम धनुर्धारी आहे हे पाहून त्या वानरांनी नाना प्रकारांनी पळापळ केली. त्या बलवान वानरांच्या उड्डाणामुळे वृक्ष उन्मळून पडले, पर्वताचे कडे ढासळले. नंतर सुग्रीव राजा स्वतः ज्या गुहेत रामभयाने बसला होता, तेथे त्याचे चौघे प्रधान आले. नळ, नीळ, जांबुवंत आणि हनुमंत असे ते चौघे प्रधान होते. हनुमंत हा बलवंत म्हणून प्रसिद्ध होता. त्याने सुग्रीवाला विचारले, "राजा, तू एवढा सृष्टीत सबळ म्हणून प्रसिद्ध असताना, ती दोन माणसे पाहताच तातडीने पळालास का? तुझ्या भीतीचे कारण तरी काय, ते मला सांग." तेव्हा सुग्रीव म्हणाला, "या दुर्धर वनात प्रवेश करणे हे सुरासुरांनाही अशक्य असताना ते दोघे वीर पायी इथवर आले आणि ते धनुर्धारी त्यावरून महाबलवान असावे असे मला वाटले. त्यांनी मृगचर्माची वस्त्रे पांघरली होती, ते वल्कले नेसलेले कोणी सुंदर तापसी असावेत असे दिसले; पण मग त्यांच्यापाशी धनुष्यबाण कसे असावे. यावरून ते मला मारण्यासाठी कपटवेषाने वालीनेच पाठविलेले मारेकरी असावेत अशी शंका आली. त्या भयाने मी तातडीने पळालो. त्याची आठवण देखील माझा प्राण घेईल अशी भीती वाटून मी पळालो. हे सत्य आहे. हनुमंता, आणखी एक गोष्ट लक्षात घे. वालीला शाप आहे की ऋष्यमूक पर्वताकडे तो आला तर त्याला मरण येईल. तेव्हा या दोघा वीरांना धनुष्यबाण घेऊन निर्भयपणे येताना पाहिल्यावर हे वालीचेच साहाय्यकारी असणार या विचाराने माझे धैर्य खचले आणि मी भयभीत झालो आणि पळालो."

सुग्रीवाचे स्पष्टीकरण ऐकल्यावर हनुमंत हसला आणि म्हणाला, "राजा, अरे मी एवढा बलवान मंत्री तुझ्याजवळ असताना तुला भय कशाचे? तू मला आज्ञा दिलीस तर मी त्यांच्याकडे जाऊन, सर्व वृत्तान्त त्यांना विचारून, ते कोणत्या कार्यासाठी इकडे आले आहेत हेही त्यांच्याकडून काढून घेईन." हनुमंताचे हे बोलणे ऐकून सुग्रीवाला संतोष झाला. तो हनुमंताला म्हणाला, "त्या दोघांचा वृत्तान्त विचारून मला सविस्तर सांग. तू हे मात्र लक्षात घे की ते दोघे धनुर्धर आहेत. ते तुला बाणाने वेधून मारतील. त्यासाठी तू स्वतःचा प्राण वाचवून त्यांचा संपूर्ण वृत्तान्त विचारून ये. तू त्यांना साधारण म्हणतो आहेस; पण ते महायोद्धे अत्यंत निष्णात आहेत. त्यांचा पराक्रम आणि पुरुषार्थ मी ऐकला आहे. ताटका, सुबाहू त्यांनी मारले; मारीचाला बाणाने वेधला. त्रिशिरा, खर, दूषण, विराध यांचा त्यांनी वध केला आहे. त्या दोघांनी मिळून कबंधाला क्षणात मारले. अशा त्या दोघा दुर्धर योद्ध्यांना पाहून मी पळालो. यासाठी अत्यंत सावधपणे त्यांच्याकडे जावे, स्वतःचे प्राण वाचवून त्यांचा वृत्तान्त आण."

हनुमंत श्रीरामाकडे येतो

सुग्रीवाने आज्ञा देताच वीर हनुमंत लगेच निघाला आणि श्रीरामासमोर आला. त्यावेळी एक विचित्र घटना घडली. अंजनीच्या पोटी हनुमंताचा जन्म झाला. तेव्हा तो पुष्ट आणि सबल होता. श्रीरामाची हनुमंताशी भेट झाली नाही तर तो अखिल सृष्टी उलथून टाकील अशी त्याची सबलता असल्यामुळे ब्रह्मदेवाला चिंता वाटू लागली. त्यामुळे ब्रह्मयाने एक युक्ती योजली. हनुमंताला वानर बनवून ब्रह्मदेवाने हनुमंताची शक्ती काढून टाकली आणि श्रीरामाची भेट झाल्यावरच त्याची शक्ती परत प्राप्त होईल अशी योजना केली. श्रीरामाला पाहताच बलशाली होणारा हनुमंत, जेव्हा खरोखरीच श्रीरामासमोर आला, तेव्हा त्याची सबल शक्ती पुन्हा त्याला मिळाली. तो एकटा त्रिजगतात कोणालाही आवरणार नाही असा सबल झाला. सुग्रीवाचे कार्य साधण्यासाठी हनुमंत रामाकडे आला आणि त्याचा पुरुषार्थ, पराक्रम,

https://archive.org/details/@sulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized By Sarayu Foundation Trust and eGangotri

सामर्थ्य आणि शक्ती यांचा त्याला पूर्ण लाभ झाला. हनुमंताला त्यावेळी अंजनीमातेशी झालेले संभाषण आठवले. "मी कोणाला स्वामी मानावे? सुग्रीव वीराला स्वामी मानावे तर तो पाला खाणारा भित्रा आहे. "यावर अंजनी म्हणाली होती. "तू गर्भात असताना तुझी जी लंगोटी होती, ती कडकडीत ब्रह्मचर्याची कासोटी होती. ती ज्याला आत्मदृष्टीने दिसेल, तोच तुझा सृष्टीतला स्वामी असेल." हे संभाषण त्याला आठवले आणि हनुमंत उड्डाण करून राम आणि लक्ष्मण होते तेथे आला.

श्रीराम आणि लक्ष्मण हे दोघे धनुर्धारी बंधू त्या वेळी एका वृक्षाच्या सावलीत विसावले होते. लक्ष्मणाच्या मांडीवर डोके ठेवून राम निद्रा घेत होता. हनुमंत गुप्तपणे येऊन त्याच झाडावर येऊन बसला. त्या दोघांचे अतर्क्य चरित्र समजावून घेण्यासाठी हनुमंत तिष्ठत बसला होता. तेव्हा श्रीराम लक्ष्मणाला एक आश्चर्य सांगण्याच्या दृष्टीने म्हणाला, "लक्ष्मणा, वर पाहा. त्या वानराला ब्रह्मचर्याची कासोटी असून ती गर्भासह पोटात असल्यासारखी दिसते आहे." हे श्रीरामाचे बोलणे ऐकून हनुमंताला आनंदाने हसू आले. 'हे दोघे मानव दुःखी आणि दीन दिसतात. त्यांना स्वामी कसे मानायचे? सेवक सबळ आणि स्वामी दुर्बल असेल तर ते स्वामित्व विफलच होईल. तेव्हा आता यांचे अंगात किती सामर्थ्य आहे याची परीक्षाच पाहतो.' असा हनुमंताने आपल्याशीच विचार केला.

श्रीराम-हनुमंत यांची शक्तिपरीक्षा

श्रीरामाला स्वामित्व द्यावे की नाही, त्याचा पुरुषार्थ पाहावा, यासाठी हनुमंत शालवृक्ष हातात घेऊन श्रीरामाच्या समोर आला. त्याने श्रीरामाचे चरण पाहताच, त्याला पूर्वस्मरण झाले. आपण अजरामर आहोत, आपल्याला जन्म-मरण नाही हे त्याला आठवले. श्रीरामाला पाहताच हनुमंताला अत्यानंद झाला. पूर्ववृत्त विचारताना त्याच्या पोटात हर्ष मावेना. तरीही त्याने विचारले, "तुम्ही दोघे कोण? कुठचे? इथे यायचे काय कारण? हे सर्व समूळ सांगा नाहीतर घाव घालून प्राण घेईन हे समजून असा." हे सर्व प्रश्न विचारताना हनुमंताने वरवर कठोरपणा दाखविला, पण अंतरात प्रेम होते. हे श्रीरामाला समजले होते, पण त्याने आपला वृतान्त सांगितला. "मी दशरथपुत्र राम, हा माझा धाकटा भाऊ लक्ष्मण, सीता ही माझी पत्नी. पित्याचे वचन खरे करण्यासाठी आम्ही वनवास पत्करला. पंचवटीत आम्ही राहात होतो. त्यावेळी आश्रमात कोणी नाही असे पाहून रावणाने सीतेचे हरण केले. तेव्हा सीतेचा शोध घेत घेत आम्ही येथे आलो आहोत." श्रीरामाचे कथन ऐकल्यावर हनुमंताच्या सर्वांगात उल्हास संचारला. आता दोघांचा वृत्तान्त कळला आहेच तर यांचा पुरुषार्थही पाहावा असा त्याने विचार केला. त्या दोघांचे धैर्य, वीर्य, शौर्य, स्वभाव हेही सर्व शोधावे म्हणून हनुमंताने प्रचंड कलह करायचे ठरविले.

श्रीरामाकडे पाहून, वानररूप हनुमंताने भयंकर आरोळी ठोकून, शालवृक्षासह क्रोधाने धाव घेतली. तेव्हा लक्ष्मणाने वेगाने धनुष्यबाण सज्ज केले. त्याने वानराला सबळ, कडकडाट करणारा असा पाहिला. श्रीराम मात्र निजूनच राहिला आणि त्याने लक्ष्मणालाही उठू दिले नाही. रामाने पडल्या पडल्याच बाण सोडून शालवृक्षाचे तुकडे केले. यावर हनुमंताने रागाने शेकडो मोठाले वृक्ष रामाकडे फेकले. रामाने शरसंधान करून निजल्या निजल्याच सर्व वृक्ष छेदले. आता हनुमंताला खूपच क्रोध आला. त्याने शेपटीवर एक, दोन हातात दोन आणि दोन्ही खांद्यांवर दोन असे पर्वत घेऊन रामावर चाल केली. श्रीरामाने शयन अवस्था न सोडता, बाणांनी वेधून पाचही पर्वतांचे चूर्ण केले. असे रामाने आपले बळ दाखविले. श्रीराम आपल्याला मारील अशी हनुमंताला भीती नव्हती आणि हनुमंत आपल्याला मारील अशी श्रीरामाला भीती नव्हती. पाच पर्वतांचे रामाच्या बाणांनी चूर्ण केले आणि

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

त्या बाणांच्या पिसाऱ्याचा वारा लागून हनुमंत आकाशात उडाला आणि गरगरा फिरू लागला. वावटळीमधे गवत भिरभिरते तसा हनुमंत अंतराळात भिरभिरत राहिला. त्याचे बळ चालेना; त्याच्या सर्व शक्ती क्षीण झाल्या; हातपाय वळू लागले; शेपूट पायात घालून हनुमंताने दात विचकले. तेव्हा हनुमंताचा पिता वायु तेथे आला. तो हनुमंताला म्हणाला, ''हनुमंता, सावध हो. तुझ्या रामाबरोबरच्या संग्रामात, शयन अवस्था न सोडता त्याने वृक्ष आणि पर्वत छेदले. अरे, श्रीराम हा त्रैलोक्याचा राजा आहे. त्याची पुरुषार्थ परीक्षा पाहू नको. तो क्षणात त्रैलोक्याचा घात करू शकेल. त्याला तू अनन्य भावाने शरण जावेस. श्रीरामाच्या सेवेसाठी प्राणही वेचावा. तो श्रीराम स्वामी मानावा.''

हनुमंत आणि श्रीराम यांचे सख्य

हनुमंताने पित्याचे वचन ऐकल्यावर श्रीरामाचे पाय धरले आणि म्हणाला, ''मी तुला शरण आलो आहे. मी तुझा दास आहे. रघुनाथा, माझ्या अंतर्यामीचे मनोगत तू जाणतो आहेस. तुझे स्वामित्व पाहण्यासाठीच मी तत्त्वतः अनुचित असा संग्राम केला. तो माझा अपराध होता. त्याची तू क्षमा कर. यासाठीच मी तुला शरण आलो असून तुझ्या चरणांवर माथा ठेवला आहे. शरणागताची उपेक्षा करू नकोस.'' हनुमंताचे यावेळचे वागणे आणि त्याची संग्रामाची कृती, यातली विसंगती लक्षात घेऊन, सौमित्र श्रीरामाला म्हणाला, ''रघुनाथा, हा धैर्यशाली पूर्ण झुंजार असून, लगेच आता तुझ्या चरणावर मस्तक ठेवतो आहे, तेव्हा याच्यावर अगदी विश्वास ठेवू नये. रावणाने असाच विश्वास दाखवून जटायूचा जसा घात केला. तसेच हा आमच्याशी करील, यासाठी या वानराचा विश्वास धरू नको. हे रामा, तू निधडा प्रतापी वीर आहेस म्हणून पाचही पर्वतांचा छेद केलास. अन्यथा त्याने आपला पूर्ण चुरा केला असता. याच्यावर विश्वास ठेवू नये.'' हा सौमित्राचा संशय आणि त्याची सूचना ऐकून श्रीराम त्याला म्हणाला, ''सौमित्रा, तू याला ओळखले नाहीस. अरे, याचे आणि आमचे एकपिंडत्व आहे. त्याविषयीची पूर्वकथा मी आता तुला सांगतो, सावधपणे ऐक.''

''मी चित्रकूटावर असताना तू भरताशी युद्ध करायला निघालास तेव्हा ती सांगितली होती. आता पुन्हा सांगतो. ऐक. पुत्रकामेष्टी यागामधून प्रकट झालेल्या यज्ञपुरुषाने पिता दशरथाला प्रसादाचे ताट दिले होते. त्या प्रसादाचे तीन भाग करून तिन्ही राण्यांना एक एक भाग दिला. परंतु पूर्वशापाच्या प्रभावाने कैकेयीचा भाग घारीने नेला. तेव्हा ती अत्यंत तळमळ करू लागली. त्यावेळी दोन भाग शिल्लक होते. त्यावेळी कौसल्या आणि सुमित्रा या दोघींनी कृपा करून आपल्यातला अर्धा अर्धा भाग तिला दिला. त्यामुळे कैकेयी सुखी झाली. ते आपण चौघे जण असे एकपिंडाचे पूर्ण आहोत. श्रीराम, भरत, लक्ष्मण आणि शत्रुघ्न. कैकेयीचा भाग घार प्राशन करताना तिला अंजनीचा जन्म प्राप्त झाला. त्यामुळे यज्ञविभाग तिच्या उदरात राहिला, म्हणून यज्ञपुरुषही राहिला. यज्ञपुरुषाचा स्वतःचा प्राण तिच्याशी एकरूप होऊन राहिला. त्यानेच तिची गर्भधारणा झाली आणि तोच हा वायुपुत्र हनुमंत आहे. या सर्वांचा विचार केला तर अंतरात हे पटते की अंजनीचा भ्रतार केसरी असला तरी यज्ञपुरुषाच्या प्राणामुळे हनुमंताचा जन्म झाला आहे. राम, लक्ष्मण, भरत, शत्रुघ्न, अर्ध्या अर्ध्या पिंडाचे आपण सर्व आणि संपूर्ण एका पिंडाचा हा मारुती हनुमंत आहे. त्यामुळे तो अत्यंत बलवान आणि समर्थ आहे. अशा प्रकाराने आम्हात आणि हनुमंतात मुळात एकात्मता आहे, भिन्नत्वाची गोष्टच नाही. सौमित्रा हे सर्व समजून घे.''

श्रीराम लक्ष्मणाला जे सांगत होता ते ऐकून हनुमंताला खूप आनंद झाला. त्याच्या सर्वांगावर रोमांच उभे राहिले, घाम आला आणि डोळ्यातून

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized By Sarayu Foundation Trust and eGangotri

आनंदाश्रू ओघळू लागले. त्याने रामाचे चरणवंदन केले. राम-हनुमंत यांचे भिन्नत्व संपले; मौन सुटले; ऐक्याची मिठी पडली. क्षेमाची दाटी झाली. ज्याप्रमाणे गंगा, यमुना, सरस्वती मिळून एक भागीरथी; त्याप्रमाणे श्रीराम, लक्ष्मण, मारुती हे ऐक्यत्वाने चिन्मात्र होते. अनेक नद्यांचे पाणी समूहाने मिळून समुद्र होतो, त्याप्रमाणे श्रीरामामुळे सौमित्र आणि मारुती चिन्मात्र झाले. यातल्या एकाला जनार्दन (एकनाथांचे गुरू - पर्यायाने एकनाथही) विनवितो तेव्हा तिघांनाही पूर्ण समाधान होते. श्रीरघुनंदन स्वामी आणि दोघे त्याचे सेवक. ज्याप्रमाणे गूळ आणि गोडी यात नावाची भिन्नता असली तरी स्वरूपात एकात्मता, त्याप्रमाणे लक्ष्मणाला आणि हनुमंताला श्रीरामाचा सेवाभाव. श्रीसंत एकनाथ सांगतात की ही पिंडभागव्यवस्था शिवरामायणातील कथेवर आधारित आहे. तेव्हा श्रोत्यांनी ती वृथा अनुवाद मानू नये. तो ग्रंथ समक्ष पाहावा.

अध्याय दुसरा

श्रीराम आणि हनुमंत यांची भेट झाल्यावर दोघांनाही अत्यंत आनंद झाला. पुढे त्यांचा जो संवाद झाला तो येथून पुढे ऐका.

हनुमंत सुग्रीवाचे वृत्त सांगतो

श्रीरामाला हनुमंताने सांगितले की, "सुग्रीवाने मला तुमच्याकडे तुमचा वृत्तान्त पाहण्यासाठी पाठविले आहे. तसेच तुमच्याशी सख्य करण्याबद्दलही सांगितले आहे. या वनात प्रवेश करणे देव, दैत्य, दानव यांनाही शक्य नसताना तुम्ही मानव येथे आलात, त्यामुळे वानरांना आश्चर्य वाटले. धीर, वीर, गंभीर अशा तुम्हा दोघांना येताना पाहून सुग्रीवाच्या चित्तात भीती आणि आश्चर्य निर्माण झाले. पत्नी आणि द्रव्य हरण केले गेलेला सुग्रीव वालीच्या भीतीने ग्रस्त असून तुमचे साहाय्य इच्छितो आहे. मला त्यासाठीच त्याने पाठविले आहे. तुम्ही दोघे निधडे निःशंक पराक्रमी वीर आहात; तेव्हा वालीच्या भयामुळे तुमचे साहाय्य मिळावे आणि त्यासाठी तुमच्याशी मैत्री करावी, असा विचार करून, तुम्हाला विचारायलाच मी आलो आहे. सुग्रीव कोण असे विचाराल, तर तो वानरांचा स्वामी आहे. मी त्याला माझा विश्वास दिला असून माझ्याकडे त्याचे प्रधानपद आहे. अतिशय आदरपूर्वक माझ्यावर त्याने विश्वास टाकला आहे. तुमच्याशी तो मैत्री करू इच्छितो, तेव्हा त्याला हे स्वामी, तुम्ही अभय द्यावे. मी तर केवळ आपले बालक आहे. सुग्रीव हा वानरसैन्यासह तुमचा सेवक होऊ पाहतो, तर तुम्ही श्रीरामा त्याच्यावर अवश्य कृपा करावी."

श्रीराम हनुमंताचे बोलणे ऐकून संतुष्ट होऊन, हे कार्यसिद्धीचे लक्षण आहे असे मानून, लक्ष्मणाला म्हणाला, "सौमित्रा, आपण सुग्रीवाशी ऐक्य करण्याची इच्छा धरून होतो, तर त्यानेच आपल्याकडे प्रधानाला पाठविले. शिवाय तो प्रधानही आपला जवळचा आप्त आणि अत्यंत जिवलग आहे. येथे हनुमंत आल्यामुळे आता आपल्याला शीण करावा लागणार नाही. सुलभपणे सीता प्राप्त होईल असे तू समज." नंतर रामाने हनुमंताला म्हटले, "जे जे काही तू सांगतो आहेस, ते ते मी निश्चित करीन. तुझे वचन उल्लंघणार नाही. तू सांगितलेस तर एका बाणानेच वालीचा वध करीन. पत्नीसह राज्य सुग्रीवाला क्षणात मिळवून देईन. वाली, सुग्रीव हे दोघे कोणाचे कोण? हे सर्व समूळ मला तू निवेदन कर. हनुमंता, वाली, सुग्रीव यांचा पिता ऋक्षराज असल्याची कथा मी ऐकली आहे. पण यांची माता कोण? वानरांचे सर्व सैन्य यांच्या स्वाधीन कोणी केले? हे सर्व समूळ कथन विचारपूर्वक मला सांग. यांचे पूर्वीचे ठिकाण कोणते? त्यांना हे स्थान कसे प्राप्त झाले? आणि किष्किंधेचे राज्य यांना दिले कोणी? हे सर्व हनुमंता मला सविस्तर सांग."

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Trust, Lucknow & eGangotri

श्रीरामाची उत्सुकता जाणून हनुमंत त्याला म्हणाला, "हे रघुनाथा, वाली आणि सुग्रीव यांच्या जन्माची वार्ता अगस्तींच्या मुखाने मी ऐकली; तीच आता तुला मी सांगतो. ब्रह्मयाच्या नेत्रांमधून वानरांचा जन्म याविषयीचीही कथा सांगतो ती सावधपणे ऐक. ब्रह्मा आत्मयोगासनात बसला होता आणि आत्मचिंतन करत होता. त्यावेळी त्याच्या डोळ्यातून आनंदाश्रू ओघळू लागले. ते त्याने ओंजळीत घेऊन धरणीवर टाकले. ते धरणीवर पडताच त्यातून तत्क्षणी वानर जन्मला. ब्रह्मा हाच वानराची माता आणि पिता झाला. त्यानेच वानराचा प्रतिपाळ केला. ब्रह्मयाने त्याचा प्रेमाने, आवडीने, लडिवाळपणे सांभाळ केला. त्याला फळे-मुळे खायला दिली, स्वतःच्या शेजारी निजविले. तो वानर ब्रह्मयाच्या आसनापाशी नृत्यांगना नृत्य करत ते पाही. त्या नृत्यांगनेला मजेने शेपटीत धरून तालावर नाचे आणि त्या तालावर नृत्यांगनेला पाडी. तो ऋषींच्या डोक्यावर उडी मारी, सुरवरांना वेडावून दाखवी. हे त्याचे चाळे पाहून ब्रह्मयाला आनंद होई आणि वानराविषयी प्रेम वाटे. जसे पोटच्या पोराचे लाड करावे तसे ब्रह्मा त्याचे लाड करी, हट्ट पुरवी. त्याच्या विनोदाची ब्रह्मयाला गोडी वाटे आणि तो कौतुकाने त्याचे लाड पुरवी. त्या वानराचे नाव ऋक्षराज ठेवून त्याचा ब्रह्मयाने प्रतिपाळ वैभवाने केला. नंतर एक अपूर्व कौतुक घडले."

"वानर प्रत्येक दिवशी वनात फिरून मग पुन्हा ब्रह्मयापाशी येत असे. तेथे तो ब्रह्मदेवाच्या पार तोंडांशी तोंड लावून दाढीतल्या उवा काढत असे. तो वानर एक दिवस दूरच्या वनात गेला आणि सत्यलोक सोडून कैलास पर्वतावर फिरत राहिला. तेथे कैलासाच्या बाहेरच्या प्रदेशात हिंडताना त्याने तिथल्या सरोवरात स्नान केले. हे सरोवर पार्वतीने शाप दिलेले होते. त्यामुळे त्या वानराला स्त्रीत्व प्राप्त झाले. या शापाचे कारण असे होते की, या उमावनात असलेल्या निर्मळ पाण्यात स्वतः शिव आणि भवानी नग्न अवस्थेत जलक्रीडा करत असत. अत्यंत उल्हासाने, आनंदाने ती दोघे क्रीडा करत असताना एके दिवशी सप्तर्षी तेथे आले. त्यांना पाहताच उमा लाजली आणि शिवासह ती पाण्यात लपली. यावेळी उमेने रागाने शाप दिला होता की सदाशिव सोडून अन्य कोणी नर येथे स्नान करील त्याला पूर्ण स्त्रीत्व येईल. हा दारुण शाप ऐकताच आचमनही न करता ऋषींनी तेथून पलायन केले. सरोवर मात्र शापित ठरले. या सर्व प्रकारामुळे वानराला स्त्रीत्व आले."

"ऋक्षराजाला स्त्रीत्व आल्यावर त्या वानरी झालेल्या वानराने स्वतःला फुलांनी सजवले आणि तो सरोवराजवळ आला. त्याने आपले प्रतिबिंब पाहिले. त्या प्रतिबिंबाला त्याने वेडावून दाखवले आणि मारायला धावला. त्यावेळी प्रतिबिंबाने त्याच क्रिया दाखविल्या. याचा राग येऊन वानर आवेशाने "हाच माझा मुख्य वैरी आहे. पाण्यात राहून मला धाक दाखवतो आहे काय; तर याचा पूर्ण नाशच करतो" असे म्हणत सरोवरात उडी घेऊन तो प्रतिबिंबाला धरायला गेला. क्रोधदृष्टीने आणि मुठी वळून, शेपटीचे वळसे घालून, प्रतिबिंबावर आघात करू लागला. परंतु वैरी आढळलाच नाही कारण ते तर त्याचेच प्रतिबिंब होते. नंतर तो बाहेर आला. त्याचे पुरुषत्व मात्र नष्ट झाले. स्त्रीचे सर्व भाव आणि शारीरिक बदल उत्पन्न झाले. स्तन, योनी, कटाक्ष, हावभाव यांसह तो पूर्ण स्त्रीदेहाचा झाला. एक सुंदर स्त्री बनला. तिच्या सौंदर्यावर सूर्य, इंद्र हे कामभावनेने आसक्त झाले. त्या स्त्रीशी संभोग करण्याची त्यांची इच्छा तीव्र होत गेली."

ऋक्षराज वानराच्या ठिकाणी अंगामध्ये जरी स्त्रीत्व आले तरी त्याला मनातून स्त्रीत्वाची आठवण नव्हती. परंतु त्याचे सुंदर रूप पाहून इंद्र आणि सूर्य हे दोघे कामातुर होऊन तिच्यासाठी धावले. तेव्हा ऋक्षराज भयभीत होऊन ब्रह्मयाकडे जाण्यासाठी भूतलावरून धावू लागला. इंद्र, सूर्य कामातुर होऊन अंतराळातून धावू लागले. त्यांना

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized By Sayyed Ahmed Research Academy Gangotri

त्या सुंदरीशी संभोग व्हावा म्हणून जी प्रभावी कामभावना झाली त्यामुळे त्यांचे वीर्यस्खलन एकाचवेळी झाले. इंद्राचे वीर्य केसात (केस - वाल) पडले आणि व्यर्थ न जाणाऱ्या त्या वीर्यामुळे केसामधे बालकाचा जन्म झाला. त्यामुळे त्याला वाली हे नाव दिले. हा मोठा पराक्रमी वानर होता. ऋक्षराज वानराने डोक्यावर काय पडले म्हणून वर पाहिले त्यावेळी त्याच्या कंठावर सूर्याचे वीर्य पडले. त्या वीर्यामुळे कंठापाशी (कंठ - ग्रीवा) एका बालकाचा जन्म झाला. त्यामुळे त्याचे नाव सुग्रीव झाले. असे त्या दोघा बंधूंचे जन्माविषयीचे कौतुकाचे वृत्त मोठे अपूर्व आहे.''

ऋक्षाची शापमुक्ती, वाली-सुग्रीवांना शक्तिप्राप्ती

''ऋक्षराज स्त्रीवेषात दोन पुत्रांसह ब्रह्मदेवापाशी आला. ऋक्षाचे ते रूप पाहून ब्रह्मा विस्मित झाला. त्याने विचार केला, 'या अत्यंत सुंदरीला पाहून दुष्टकर्मी, दुर्धर देव, योग्य-अयोग्यतेचा विचार न करता वेश्येप्रमाणे हिच्याशी व्यभिचार करतात. व्यर्थ न होणाऱ्या वीर्याचा व्यभिचार होऊन प्रत्येक सुरवर हिच्याशी रममाण होईल तर पोरांचा जोजार निर्माण होईल. माझ्यापासून याचा जन्म झाला आणि मूर्खपणाने हा स्त्रीत्व पावला. तेव्हा याला शापमुक्त करावे यासाठी कैलासालाच जावे.' असा विचार करून ब्रह्मा कैलासाला गेला. त्याने पार्वतीला विनंती केली की ऋक्षराजाला शापमुक्त कर. पार्वतीने सदाशिवाला विचारून वानराला शापमुक्त केले. ज्याप्रमाणे भुजंग असल्याचा भ्रमभार दूर झाला म्हणजे सर्परूपाचा दोर होतो; त्याप्रमाणे स्त्री-आकार सोडून पुन्हा वानर ऋक्षराज झाला. झोपेत अंत्यज झाल्याचे द्विजाला स्वप्न पडावे आणि जाग आल्यावर त्याला आपण द्विज आहोत हे जाणवावे त्याप्रमाणे स्त्रीत्व आणि स्त्रीस्वरूप गेल्यावर ऋक्षराज पुन्हा वानर झाला. संतसंगती अगाध असते. वानराला त्वरित शापमुक्ती मिळाली. प्रजापती सुखी झाला. ऋक्षराजही सुखस्थितीला प्राप्त झाला. वानरमूर्ती अशा पराक्रमी पुत्रसंततीला पाहून इंद्र आणि सूर्य हेही संतुष्ट झाले.''

''इंद्राने वाली पुत्र पाहून सुख सोहळा अनुभवला. त्याने आपली सोन्याची माळ वालीच्या गळ्यात घातली. ही माळ कंठात असेपर्यंत कृतान्ताशी युद्ध करून, शतवर्षे झुंजत राहिल्यावरही वालीला अन्न, पाणी मिळाले नाही तरीही श्रम जाणवणार नव्हते. पुढे एकदा दुंदुभीच्या मागे लागून अन्न-पाणी न घेता वालीने युद्ध केले तेव्हा त्याला श्रम झाले नाहीत. कारण ती माळ त्याच्या गळ्यात होती. तसेच ही माळ गळ्यात असताना वालीने महाबलवानांशी युद्ध केले तरी त्याचा पराभव होत नसे. या माळेमुळे नेहमी जयच होई. वाली आणि सुग्रीव हे बळात समान असले तरी माळेमुळे वाली अधिक बलवान होई. त्यामुळे रणकल्लोळात तो सुग्रीवाला जमिनीवर लोळवत असे. तो स्वतः युद्ध करताना जी माळ गळ्यात घालत असे ती शत्रूच्या कल्पनेत नसे त्यामुळे जो जो योद्धा समोर येईल तो तो त्या माळेमुळे विमुख होत असे. ही माळ कोणती म्हणाल, तर वृत्रासुराच्या वधासाठी इंद्र निघाला तेव्हा त्याचे सामर्थ्य वाढविण्यासाठी कश्यपाने त्याला दिली होती. आपल्या विजयासाठी सुरेन्द्राला कश्यपाने दिलेली ही सामर्थ्याची माळ इंद्राने वालीच्या गळ्यात घातली. त्यामुळे त्याचा प्रताप वाढला आणि तो कळिकाळाला देखील अनावर झाला.''

''इंद्राने वालीला माळ देऊन त्याचे सामर्थ्य वाढविले तेव्हा सूर्याने सुग्रीवाला हनुमंताची जोड दिली. हनुमंताच्या सामर्थ्याचा अनुभव सूर्याला होताच, कारण बालपणीच हनुमंताने राहूला पळवून लावून सूर्याला गिळण्यासाठी उड्डाण केले होते. हे लक्षात घेऊनच सूर्याने हनुमंताला सुग्रीवाच्या स्वाधीन केले होते. ''हनुमंतामुळे श्रीरामाशी सख्य होऊन तुझी कीर्ती वाढेल, हनुमंत श्रीरामाचा भक्त होईल आणि त्यामुळे तू सनाथ होशील.'' असे

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

सुग्रीवाला सूर्याने सांगितले आणि हनुमंताला त्याच्या स्वाधीन केले. बालीला माळ देऊन इंद्र आपल्या ठिकाणी गेला आणि हनुमंताला सुग्रीवाकडे सोपवून सूर्य आकाशात गेला. इंद्र, सूर्य दोघे गेल्यावर ब्रह्मदेवाने स्वतः ऋक्षराजा आणि त्याचे दोन्ही पुत्र यांना एक राजधानी दिली.''

किष्किंधा नगरीची निर्मिती; वानर राजे झाले.

''ऋक्षराजाला माता आणि पिता म्हणून स्वतः विधाताच होता. त्याने ऋक्षाचे गेलेले पुरुषत्व पुन्हा मिळवून दिले. ब्रह्मदेव हा त्याचा पालकच होता. त्याने विश्वकर्म्याला बोलावून त्याला किष्किंधा नगरी वसविण्यास सांगितले. नंतर ती नाना वृक्षांनी आणि फळांनी शोभनीय आणि नाना रत्नांनी समृद्ध केली. तिथे दुर्गम दुर्गांची अशी रचना केली की दैत्यदानवांना त्याचा माग लागणार नाही. तिथले आत बाहेर करणे हे अतर्क्य होते. हे सर्व ब्रह्मयाने पुत्रासाठी केले. नंतर मरीच्यादी ब्रह्मदूत ऋक्षराजाच्या अभिषेकासाठी किष्किंधेमध्ये आले. ब्रह्मयाची समर्थ आज्ञा होताच देशोदेशीचे सर्व वानर, त्यांचे सेनापती हे राज्याभिषेकासाठी आले. ऋक्षराजाला मुकुट, कुंडले, रत्नमेखला, बाजूबंद, रत्नमाळा या सर्वांमुळे राजकळा आली आणि तो सोहळा पुत्रांसह पूर्ण झाला. आता किष्किंधा ही राजधानी झाली आणि श्रेष्ट वरासनावर ऋक्षराजाचा अभिषेक झाला. वानरसैन्याचा तो राजा झाला. ऋषीश्वरांनी अभिषेक केला. वानरांनी जयजयकार केला. सुरवरांनी फुले उधळली. ब्रह्मदेवाला संतोष झाला. महाबळी ऋक्षराज राजा झाला. वालीला युवराज म्हणून अभिषेक झाला आणि सुग्रीव हा महाबळी सेनापती नियुक्त झाला. अशा रीतीने ऋक्षराजाला दोन्ही पुत्रांसह किष्किंधेचे समर्थ राज्य प्राप्त झाले. एरवी दरिद्री असणारे वानर राज्याचे अधिकारी झाले. सुरवर त्यांना वंदन करू लागले. पितृभाग्याने ते भाग्यवान ठरले. त्रिलोकातले वानर वाली-सुग्रीवांचे आज्ञांकित झाले. ऋक्षराज वानरांच्या सेनासंभाराने बलवान् झाला.''

''ऋक्षराज कालांतराने मरण पावला. दोन्ही पुत्रांनी त्याचे दहन करून, त्याची उत्तरक्रिया केली. नंतर प्रधानांनी एकत्र येऊन, सर्वांनी वालीला राज्याभिषेक आणि सुग्रीवाला यौवराज्याभिषेक केला. वालीने बळ, नीती, धर्मयुद्ध, व्रतस्थपणा हे सर्व पाहून नीळ हा सेनापती केला. रघुनाथा, तत्त्वतः ऋक्षराजा हा वाली-सुग्रीवांचा पिता नव्हता. दोघांची माता एक पण पिता भिन्न भिन्न होते. एक इंद्रपुत्र आणि एक सूर्यपुत्र हे जगात प्रसिद्ध आहे. असा हा दोघांचा पूर्ववृत्तान्त आहे.'' हनुमंताने समूळ साद्यंत हे पूर्ववृत्त सांगून श्रीरामापुढे लोटांगण घातले. ''श्रीरामा कृपा करून सुग्रीवाशी सख्य करावे. ते केवळ वनातले वनचर किंवा पाला खाणारे वानर नव्हेत; ते ब्रह्मकुळीचे कुलवंत, दुर्धर वीर, योद्धे आहेत.'' असे हनुमंताकडून सांगितले गेले. ती जुनी कथा ऐकून श्रीरामाला सुख झाले. त्याने हनुमंताला आलिंगन देऊन आनंद प्रकट केला.

अध्याय तिसरा

श्रीरामाने हनुमंताने सांगितलेली वाली आणि सुग्रीव यांची जन्मकथा ऐकल्यावर सुखी होऊन संतोष प्रकट केला. नंतर त्याने सुग्रीवाशी सख्य करण्याचे ठरवून हनुमंताला म्हटले, ''सुग्रीवाशी सख्य करावे हे आमचे मुख्य कर्तव्य आहे. तूही सख्य करण्यासाठीच आला आहेस. यामुळे आम्हाला सुख झाले. कबंध आम्हाला म्हणाला होता की सुग्रीवालाही पत्नी हरण केल्याचे दुःख आहे. तेव्हा त्याला सुखी करण्यासाठीच मी ऋष्यमूकाला आलो. जो मला अनन्य भावाने शरण येतो त्याचे दुःख नष्ट करून त्याला सुखी करावे हे माझे ब्रीदच आहे असे समज. दुःख नाहीसे करून सुख देण्यासाठी तर मी वनवासाला आलो. तेव्हा आता त्वरेने सुग्रीवाला बोलाव. त्याला सांग की मी त्याला सुखी करीन.'' श्रीरामाचे आश्वासन ऐकून सुखसंपन्न झालेल्या हनुमंताने श्रीरामाला वंदन

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

करून तातडीने उड्डाण केले. तो सुग्रीवापाशी आला. त्याने सुग्रीवाला म्हटले, "तू भाग्यवंत आहेस, श्रीरघुनंदन संतुष्ट झाला आहे. राम आणि लक्ष्मण हे दोघे महावीर नि:संशय निधडे धनुर्धर आहेत. तुझ्याशी मैत्री करण्यासाठीच ते ऋष्यमूकाला आलेत. ते कुठले, कोणाचे कोण, इथे यायचे काय कारण, हे मी समूळ शोधले आहे. त्यासंबंधी ऐक."

नंतर हनुमंताने श्रीरामाचा पूर्ण वृत्तान्त सुग्रीवाला सांगितला. "श्रीराम दाशरथी महावीर आहे. धनुर्धर लक्ष्मण त्याचा बंधू आहे. श्रीरामाची सुंदर पत्नी सीता आहे. ते तिघे पित्याच्या आज्ञेने वनवासाला आले. पित्याची आज्ञा मानून ते दण्डकारण्य वनात राहायला आले. त्यांना फळमूळे खाऊन चौदा वर्षे वनात काढायची आज्ञा होती. एकदा आश्रमात पंचवटीत सीता एकटी असताना रावणाने तिचे हरण केले. तिच्या शोधासाठीच जगजेठी श्रीराम ऋष्यमूकाला आला आहे. श्रीरामाने कबंधाचा उद्धार केला, त्याला शापमुक्त केला. त्यावेळी त्याने श्रीरामाला सांगितले की सुग्रीवाला सुखी कर. सीताहरणाचे दु:ख श्रीरामाला आहे, तसे तुलाही स्वत:च्या पत्नीच्या हरणाचे दु:ख आहे. तुम्हा दोघांचे दु:ख समान आहे, तेव्हा एकमेकांना तुम्ही सुखी करा. वालीला नि:शेष मारून, पत्नीसह राज्य सुग्रीवाला देण्यासाठी आणि सुखी करण्यासाठी श्रीराम किष्किंधेला आला आहे. सीतेचा शोध थांबवून, तुझे कार्य साधण्यासाठी कृपावंत श्रीराम आला हे सुग्रीवा तुझे भाग्य आहे. श्रीराम हा प्रेमळ, वत्सल, निरपेक्ष, स्नेहाळू असून, भक्तकार्याविषयी तो कृपाळू, दीनदयाळू आहे."

हनुमंताचे निवेदन ऐकल्यावर सुग्रीवाला अत्यंत आनंद झाला आणि त्याने हनुमंताची पाठ थोपटली; त्याला प्रेमाने, संतोषाने आलिंगन दिले. मेघगर्जना ऐकून मोर नाचतो तसा सुग्रीव हर्षभरित झाला. "हनुमंताचे भाग्य मोठे, त्याचे वर्णन मी काय करू शकणार! माझा कार्यार्थ साधताना तो श्रीरामाचा आप्त झाला. श्रीरामकृपेने हा भाग्यवान समर्थ झाला. मीही कृतार्थ झालो." नंतर एखादी फुलांची माळ सुकल्यावर टाकून द्यावी तसा सुग्रीवाने श्रीरामाविषयीच्या भयाचा त्याग केला. श्रीरामाची भेट घेण्यासाठी निर्भय होऊन सुग्रीव निघाला. हनुमंताचा हात धरून तो श्रीराम होता त्या ठिकाणी आला. त्याने श्रीरामाला उद्देशून म्हटले की, "मी तुला शरण आलो आहे. तू सत्यप्रतिज्ञ रघुवीर आहेस. माझा अंगिकार कर. मी तुझा दास झालो असून तुला शरण आहे." सुग्रीवाचे बोलणे ऐकून श्रीरामालाही आनंद झाला. त्याने स्वत: सुग्रीवाला आलिंगन देण्यासाठी हात पुढे केले त्यावेळी सुग्रीवाने श्रीरामाचे पाय धरले. तेव्हा श्रीरामाने त्याला उचलून, त्याचे हात धरून आलिंगन दिले. हृदयाला हृदय मिळाले. त्यामुळे दोघांची हृदये एकात्म झाली. त्यांच्यात सुहृदभाव निर्माण झाला.

श्रीराम आणि सुग्रीव यांचे सख्य

श्रीराम हा हृदयस्थ चिद्घन असल्याने त्याच्या आलिंगनामुळे सुग्रीवाच्या हृदयाला पूर्ण समाधान वाटले. त्याच्या मनातले वालीविषयीचे भय नष्ट झाले. नर आणि वानर यांची एकजूट झाली. आधिव्याधी नष्ट झाल्या; सांगणे-विचारणेही संपले आणि सुग्रीवाला अत्यानंद झाला. अलौकिक अशा या सख्यत्वाला अग्नी आणि सूर्य हे साक्षी झाले; काही न करता दोघांचे हृदय एक झाले. आत्म्यांचे सख्य श्रीराम आणि सुग्रीव यांनी अनुभवले. आण-प्रमाण हा लौकिक शपथेचा गौण प्रकार आहे असे भासून सुग्रीवाने श्रीरामसख्यत्वाला अंतर्यामी पूर्णत्व मानले. श्रीरामाच्या सख्यत्वाची थोरवी चराचरात अगाध असल्याने ते सख्यत्व प्राप्त झाल्यामुळे वानरांनी जयजयकार केला. श्रीराम नरपती आणि सुग्रीव हा वानरपती असल्याने त्या दोघांनाही या सख्यत्वामुळे अनन्य प्रेम आणि आल्हाद मिळाला.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Muthulakshmi Research Academy / Sarayu Foundation Trust and eGangotri

ज्याप्रमाणे पुष्प आणि सुगंध, जीव आणि मन यांच्यात प्रेम असते, त्याप्रमाणे सुग्रीव आणि रघुनंदन यांच्या एकत्वात अनन्य प्रेम दोघांनाही मिळाले. ज्याप्रमाणे गूळ आणि गोडी असते त्याप्रमाणे राम आणि सुग्रीव यांच्यात प्रेम निर्माण झाले. दोघे एकमेकांकडे प्रेमाने पाहात राहून आपल्या मनातली अतृप्त प्रीती डोळ्यावाटे व्यक्त करत राहिले. चंद्र आणि चकोर किंवा जळ आणि जळचर यांच्यात प्रेम असते तसेच प्रेम त्या दोघांना एकमेकांविषयी वाटत होते. श्रीरामाला सुग्रीवाविषयी प्रेम वाटत होते, सुग्रीवाला श्रीरामाविषयी अनन्य भक्तिप्रेम वाटत होते आणि एकमेक ही प्रेमभावना डोळ्यांमधून व्यक्त करत राहिले होते. तरी ते तृप्त होत नव्हते. काही वेळाने श्रीराम, मारुती आणि सुग्रीव एकत्र बसले आणि मग पुढील कार्याविषयी बोलणे सुरू झाले.

श्रीराम आणि सुग्रीव सीताशोधाविषयी बोलतात

श्रीराम आणि सुग्रीव यांच्या सख्यत्वानंतर त्यांचे प्रत्यक्ष संभाषण सुरू झाले. सुग्रीव म्हणाला, ''हे रघुपती, तुम्ही जिच्या शोधासाठी आलात, त्या सीतेला मी गगनमार्गाने नेताना पाहिले आहे. रावणाने तिला खांद्यावरून आकाशमार्गाने वेगाने नेताना आम्ही वानरांनी पाहिले आहे. त्यावेळी ती ''श्रीराम' असे आक्रंदून ओरडत होती. ती म्हणत होती, 'श्रीरामराया धाव, वेगाने ये'. त्याचवेळी ती लक्ष्मणाचेही नाव घेऊन आक्रंदत होती. रामनाम घेणाऱ्या सीतेचा आवाज आम्ही सर्व वानरांनी तर ऐकलाच, पण त्याहीपेक्षा आणखी एक कौतुक अपूर्व असे झाले. याच पर्वतशिखरावर आम्ही पाच वानर बसलो असताना सीतेने अलंकारांसह आपले उत्तरीय खाली टाकले. हनुमंताला पाहून तिने ते टाकलेले उत्तरीय आणि अलंकार, रामनामासह हनुमंताला थोर भाग्याने प्राप्त झाले. श्रीरामनामाचे उत्तरीय वस्त्र आणि श्रीरामाच्या नावासह असलेले अलंकार हनुमंताने आम्हाला दाखविले. ते त्याच्याकडे आहेत. जे रामनामाचा विश्वास धरतात ते भाग्यवंत असतात. त्यांनाच श्रीरामाचा सहवास लाभतो. हनुमंत हा तसा श्रेष्ठ भाग्यवंत आहे.''

''सीता! दीर्घस्वरात रामनाम घेऊन आक्रंदत होती हे आम्ही सर्व वानरांनी ऐकले. त्यावेळी हनुमंत खवळला आणि दुर्धर राक्षसाला मारून, दीनोद्धार करून, सीतेला सोडविण्यासाठी त्याने त्वरेने उड्डाण केले. रागाने शेपटी आपटून, डोळे लाल करून वटारून, वज्रमुष्टी वळून तो आकाशात उडाला. हनुमंताने उड्डाण करून ग्रहचक्र ओलांडले. तेव्हा रावणाने धाक धरून सागर ओलांडून पलायन केले. तेव्हा हनुमंत राग शांत करून परतला.

सुग्रीवाने सांगितलेला वृत्तान्त ऐकून श्रीरामाला आश्चर्य वाटले. सौमित्रही चकित झाला आणि त्याने तातडीने अलंकार पाहण्यासाठी आणायला सांगितले. त्यावेळी हनुमंताने श्रीरामाला वस्त्रालंकार आणून दाखविले. ते पाहून आणि हृदयाशी धरून श्रीराम शोक करू लागला. ''सीते माझ्यावर का रुसलीस? पूर्वीची प्रीती का विसरलीस? रागाने माझ्याशी बोलत नाहीस का? प्रिये, तू कुठे गेलीस?'' असे म्हणत, शोक करताना अखेर त्याला मूर्च्छा आली आणि तो निश्चेष्ट पडला. श्रीरामाची अवस्था पाहून सुग्रीवाला अत्यंत दुःख झाले. त्याने श्रीरामाला सावध करून नंतर म्हटले, ''स्वामी, तुमचे आमचे सख्य झाले असता, मी जर तुमचे दुःख दूर करू शकलो नाही तर मैत्रीला लाज आली म्हणावे लागेल. मी अवश्य सीतेला शोधून आणीन. श्रीरामा, माझे चौघे प्रधान कळिकाळाची मान मुरगाळतील असे आहेत, शिवाय असंख्य वानरांचे सैन्य जमवीन आणि सीतेला शोधून आणीन. स्वर्ग, मृत्यू, पाताळ कुठेही तिला नेली असेल तरी सर्व जग धुंडाळून तिला आणीन. श्रीरामा मी तुझी शपथ वाहून सांगतो की मी सीता शोधून आणीन. मी पुन्हा तुझे पाय शिवून सांगतो हेच माझे प्रमाण मान.''

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized By Sayyam Foundation Research Academy Gangotri

श्रीराम तरीही रडवेला होता हे पाहून सुग्रीव त्याला म्हणाला, "श्रीरामा शोक करू नकोस. माझ्या प्रमाणाची सीमा ऐक. मी जर सीतेला आणले नाही तर ह्या वानराचे अध:पतन झाले असे समज. जर मी सीतेचा शोध सोडून दुसऱ्या उद्योगात गुंतलो तर माझ्या जन्माचा धिःकार असो. तेव्हा तू सीतेच्या वियोगाचे दुःख करू नकोस. मी निमेषात तिला आणीन, पाहाच तू माझ्या प्रतापाचा थोरपणा, माझ्याकडून सीतेचा शोध झाला नाही तर त्यामुळे माझ्या आज्याला, पूर्वजांना, क्षात्रधर्माला मी लाज आणली असे मान." सुग्रीवाचे हे बोलणे ऐकल्यावर श्रीराम हास्यवदन करून म्हणाला, "मीही सांगतो, तुला राज्य आणि पत्नी मिळवून दिल्याशिवाय मी सीतेचे स्मरण करणार नाही. मित्रकार्यापुढे सीताशोध गौण मानून मी दशरथाची शपथ घेतो तेव्हा हे तू सत्य मान. तू जे निर्वाणीचे बोललास ते मी प्रमाण मानतो. तेव्हा तुझे कार्य पूर्ण होत नाही तोवर सीतेच्या आगमनाचा विचार मी निंद्य समजतो. ज्याप्रमाणे वैश्वदेव आणि बलीविधान न करता भोजन निंद्य; त्याचप्रमाणे तुझे कार्य न होता सीतेचे आगमन मला निंद्य आहे. जसे गृहातील अग्नीला वंदन करून पूजा केल्याशिवाय स्वतःच्या पत्नीकडे जाणे हे वेश्येकडे जाण्यासारखे आहे; तसे तुझे कार्य झाल्याशिवाय सीतेचे आगमन निंद्य ठरते. अतिथीला उपाशी पाठवून आपण भोजन करणे, संध्यास्नान न करता यज्ञादी कर्मे करणे. हे सारे जेवढे निंद्य तेवढेच तुझे कार्य न करता सीतेचे आगमन होणे हे निंद्यच असे मी मानतो."

श्रीराम पुढे म्हणाला, "सुग्रीवा, जरी तुझे कार्य पूर्ण होण्यापूर्वी सीतेला तू इथे आणलीस तरी मी दशरथाची शपथ घेऊन सांगतो, मी तिच्याकडे पाहणारही नाही. सीता आधी कोठे गेली ते पाहून तिची शुद्धी केल्यावरच तिचे आगमन होणार; वालीच्या वधासाठी असे कोणतेच व्यवधान नाही. प्रथम मित्रकार्य साधीन आणि मगच सीतेला शोधून आणीन" असे म्हणून श्रीराम धनुष्यबाण घेऊन निघाला. त्याने वालीचा वध करण्याचा निश्चय केला आणि सुग्रीवाला तो म्हणाला, "सुग्रीवा, नीट ऐक. ज्याने तुझ्या पत्नीचे हरण केले आहे त्या वालीवर तीक्ष्ण बाण सोडून त्याचा प्राण घेईन. माझे बाण अत्यंत तीक्ष्ण असून मी ते मंत्रून मारीन. त्यामुळे वालीचा कंठ छेदीन, आणि त्याला एकाच बाणाने भुईसपाट करीन. ज्याप्रमाणे वज्राघात झालेला पर्वत पृथ्वीवर विखरून पडतो, त्याप्रमाणे वालीचा वध करून इथे रक्ताचे पाट वाहविलेले पाहशील.". श्रीरामाचा क्षोभ पाहून सुग्रीवाने पायावर मस्तक ठेवले. नंतर सुग्रीवाने रामाला वालीच्या पुरुषार्थासंबंधी सावधानता बाळगण्यास सांगितले. "वाली अरुणोदयापूर्वी श्रम न मानता सप्त समुद्रांचे स्नान करतो. यासाठी त्याला अर्धा क्षणही लागत नाही. वाली उजव्या हाताने पर्वत उचलून वर आकाशात उडवतो आणि डाव्या हातात तो पर्वत झेलतो. असे त्याचे सामर्थ्य आहे."

वालीच्या सामर्थ्याचे वर्णन

सुग्रीवाने रामाला वालीच्या सामर्थ्याची कल्पना देण्यासाठी काही घटना सांगितल्या. "श्रीरामा, महिषासुराचा ज्येष्ठ पुत्र दुंदुभी हा अतिशय प्रसिद्ध महिप होता. तो नित्य युद्धासाठी उत्सुक असे. तो त्रिलोकात हिंडत असे. एकदा तो पाताळात गेला असता त्याने वरुणाला युद्धासाठी आव्हान दिले. वरुणाने त्याला मेरुपर्वताजवळ धाडून त्याच्याशी युद्ध करण्यास सांगितले. दुंदुभीने त्याप्रमाणे मेरुपर्वताला युद्धासाठी आव्हान देऊन युद्धासाठी बोलावले. तेव्हा मेरूने त्याला म्हटले, "अरे मी युद्धाच्या दृष्टीने अशक्त आहे. तू यासाठी यमाकडे जा." दुंदुभीने यमाकडे जाऊन युद्धाचे आव्हान दिले. त्यावर यमाने विचार केला की 'दुंदुभीला वालीच्या हातून मरण यायचे आहे; तेव्हा याला तिकडेच पाठवावे'. यमाने मग दुंदुभीला म्हटले, "मला काही तुझ्याशी युद्ध करवणार नाही.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Muthulakshmi Research Academy / Sarayu Foundation Trust and eGangotri

तू वालीकडे जा. तो तुला समबळ आहे. हा वाली वानर महाबलवान, पराक्रमी असा सर्व भूमंडळात प्रसिद्ध आहे. तो रणकंदन करील. शिवाय वाली हाही युद्धाची तहान असलेला आहे आणि तूही युद्धासाठी उत्सुक आहेस. तेव्हा तू त्वरित जाऊन वालीशी युद्ध करून, तुझा पुरुषार्थ दाखव. तू वाली कोण म्हणशील तर तो किष्किंधेचा राजा आहे. या वालीशी युद्ध करून दाखव म्हणजे तुझा पराक्रम आणि बल कळून येईल.''

यमाचे बोलणे ऐकून दुंदुभी तडक किष्किंधेला गेला आणि त्याने गर्जना केली की, ''येथे कोण बलशाली वाली म्हणून आहे त्याने याच वेळी बाहेर यावे आणि माझ्याशी युद्ध करावे. मी त्याचा युद्धात नाश करीन.'' दुंदुभीचे युद्धाचे आव्हान ऐकून वाली उड्डाण करून दुंदुभी समोर आला. वालीने रागाने भुभुःकार केला. त्याची आरोळी ऐकताच दुंदुभीच्या कानठळ्या बसल्या. दुंदुभी मनात म्हणाला, 'हा वानर चांगला बलशाली दिसतो. हा युद्धात सापडेल कसा?' नंतर दुंदुभीवर वालीने मुठीने आघात केला, त्यावेळी दुंदुभीचा हातच उखडला. त्यामुळे त्याने भयग्रस्त होऊन वनात पलायन केले. तो आपल्या गुप्त ठिकाणी असलेल्या बिळात जाऊ लागला. वालीने त्याला गाठून एकच थाप मारली आणि त्याबरोबर दुंदुभी रक्त ओकून, मरून पडला. दुंदुभीचे कैलासाएवढे प्रचंड शरीर उचलणे हे सुरवरांना अशक्य होते. ते शव उचलणे स्वतः वालीला शक्य होते. सुग्रीव हा दुसरा वानर वीर ते उचलू शकत होता. तिसरा कोणी नव्हता. दुंदुभीचा प्रचंड देह उचलणारा त्रिजगतात सापडणार नव्हता. हे दोघे बंधूच उचलू शकत होते. अन्य जो कोणी तो देह उचलेल त्याच्याकडून वालीला मरण येईल, असे भाकित मातंग ऋषींनी केले होते. असा तो वाली बलवान म्हणून प्रसिद्ध आहे. त्याच्या पराक्रमाविषयी श्रीरामा, मी तुला इत्थंभूत माहिती सांगतो. ऐक.''

सुग्रीव श्रीरामाला म्हणाला, ''एकदा वाली अनुष्ठानाला बसला असताना, त्याला धरण्यासाठी रावण आला. त्याने आपले वीस हात पसरून वालीला कवटाळण्याचा प्रयत्न केला. तेव्हा वालीने आपला डावा हात पसरून, वीस हातांसह रावणाला पकडून त्याला आपल्या काखेत दाबला. या प्रकाराने अनुष्ठानात आडकाठी आली म्हणून वाली लगेच स्नानासाठी निघाला. त्याच्या काखेत रावण तसाच होता. त्या स्थितीतच वालीने सप्त सागरांचे स्नान उरकले. रावणाच्या नाकातोंडात पाणी जाऊन तो कासावीस झाला. रावणाला काखेतून सुटणे शक्य झाले नाही. वालीला काखेतल्या रावणाचा विसर पडला होता. वाली स्नान करून घरी आला, तेव्हा एक मौज झाली. घरी आलेल्या वालीने त्याचा पुत्र अंगद याला प्रेमाने उचलले. त्यावेळी काखेतला रावण खाली पडला. रावणाला पाहण्यासाठी सर्व वानरांची भुतावळ जमली. रावणाची दहा शिरे आणि मुकुट पाहून त्या वानरांना मजा वाटली. त्यांनी रावणाला धरून उचलला आणि त्याला अंगदाच्या पाळण्यावरचे खेळणे म्हणून बांधले. त्यावेळी अंगदाने पाळण्यात पडल्या पडल्या रावणाला लाथा मारल्या. तसेच अंगदाचे उष्ण मूत्र रावणाच्या तोंडात गेले. वानरांच्या मुलांनी रावणाला चिमटे काढून सतावले. यातून रावणाची सुटका होणार नाही असे पाहून पौलस्त्य ऋषींनी तेथे येऊन वालीकडे भीक मागून रावणाला सोडवले. वानरांनी रावणाची खूप थट्टा केली. कोणी त्याच्या तोंडाला काजळ फासले; कोणी मुकुट पळविले. अशी रावणाची काळ्या तोंडाने सुटका झाली आणि त्याला लंकेला पाठविले. असा त्या वालीचा पराक्रम आहे. तेव्हा त्याच्या बळाचा पूर्ण विचार करून, त्याचा घात करणारा विक्रम होणार असेल तरच हे कार्य अंगीकार.'' या प्रकारे श्रीरामाला सावध करून नंतर सुग्रीवाने सांगितले की, ''वाली आणि मी स्वतः बळामधे समान आहोत; परंतु

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized By Sarayu Foundation Trust and Academy / eGangotri

वालीजवळ ती कश्यपांनी दिलेली माळ असल्यामुळे त्याची वेगळी शक्ती आहे. यामुळेच तो मला युद्धात जिंकतो. त्या माळेमुळे जो जो समोर येतो तो अपयशी ठरतो आणि वाली नित्य विजय मिळवतो.''

श्रीरामाचे सुग्रीवाला आश्वासन

श्रीरामाला सुग्रीवाकडून वालीच्या सामर्थ्याचे साद्यंत निवेदन ऐकायला मिळाले. नंतर श्रीरामाने स्वतःशी विचार करून पाहिला. 'वालीला सन्मुख न होता आपण दूर राहूनच वालीचा वध करावा. कश्यपांचे वरदान अवतारी पुरुषालाही व्यर्थ करता येणार नाही. तेव्हा दूर राहूनच वालीचा वध करावा आणि मित्रकार्य साधावे.' या पद्धतीने विचार करून श्रीरामाने वालीच्या वधाचा निश्चय केला. सुग्रीवाने जे सांगितले त्यात बरीच अतिशयोक्ती असावी असे ठरवून श्रीराम सुग्रीवाला म्हणाला, ''सुग्रीवा, मी एकाच बाणाने वालीचे निर्दाळण करीन. वाली आणि सुग्रीव हे दोघे दुंदुभीचे कलेवर उचलणारे बलवान वानर आहेत. तिसरा मी स्वतः आहे. मी दुंदुभी देह उचलीन. त्यामुळे माझ्याकडून वालीचा वध होईल. मला दुंदुभीचे कलेवर दाखव. अरे दुंदुभीचे शरीर मला गवतासारखे आहे. डाव्या अंगठ्याने मी ते सहज उचलीन. त्या सप्ततालांचाही छेद करीन.'' असे म्हणून श्रीरामाने धनुष्याला बाण चढविला. ''ते तालवन मला दाखव.'' असे म्हणून रामाने धनुष्य सज्ज केले. श्रीराम वालीचा वध करणार म्हणून सुग्रीव आनंदाने नाचू लागला. रघुनाथाच्या कृपेने सुग्रीव संतुष्ट झाला.

अध्याय चवथा

श्रीराम वालीचा वध करून सुग्रीवाला पत्नी आणि राज्य मिळवून देण्याचे मित्रकार्य करायला उत्सुक झाला होता. स्वतःचे काम बाजूला ठेवून मित्र भावनेने मित्रकार्य साधण्यासाठी रामाची लगबग चालली होती. शरणागताला साहाय्य करण्याचे रामाचे ब्रीदच होते. परंतु श्रीराम हा शुद्ध विचार करणारा असल्याने त्या दोघा बंधूत द्वेषभाव का निर्माण झाला असावा याविषयी तो आश्चर्य करत होता. तेव्हा त्याने सुग्रीवाला विचारले की, ''तुम्ही दोघे सहोदर, सख्खे बंधू असून तुम्हा दोघांचे वैर का? ते वैरही अगदी टोकाला गेलेले आणि दोघांनाही घातक असे तीव्र का?''

सुग्रीव वैराची कारणपरंपरा सांगतो

श्रीरामाने सुग्रीवाला वैराचे मूळ कारण काय असे विचारल्यावर सुग्रीव सांगू लागला. ''पिता-पुत्र, सहोदर यांचे सख्य असते; पण वैराला मूळ कारण द्रव्य आणि स्त्री ही असतात. द्रव्य आणि स्त्री यांच्या लोभाने सुहृद वैरभावाने पेटून उठतात. शिवाय अहंकार नेहमीच मुसमुसत असतोच. तो सुहृदात वैर निर्माण करतो. लोभामुळेच आम्हा दोघात वैर निर्माण झाले आहे. आता लोभ कशाचा, वैर कशाकरता हे सर्व मी मुळातून सांगतो. लक्ष देऊन ऐक. स्त्री आणि राज्य यांच्या लोभाने वालीने मला बाहेर काढले. आमचा पिता जिवंत असताना वालीला युवराज पद आणि मला सैन्याचा अधिपती अशी समसमान पदे मिळाली आणि आमच्यात एकात्मता होती. पुढे पित्याचे निधन झाल्यावर सर्व प्रधानांनी एकत्र येऊन वालीला ज्येष्ठ म्हणून राज्यपद आणि मला युवराजपद दिले. तसेच शांत, सुबुद्धी, बलशाली अशा नीलाला बिनचूक सेनाधिपती केला. वानरसेनेला त्याच्यामुळेच सामर्थ्य आले. आम्ही दोघे एकमेकांशी एकात्मतेने राहात होतो. एकाला पाणी प्यायचे तर तेही दुसऱ्याला न कळता पीत नव्हतो. एवढी आमच्यात भोगभिन्नता नव्हती. एकत्र शयन, आसन, भोजन असे. एकमेकांसाठी प्राणही देण्याची तयारी असलेल्या आमच्यात पूर्ण एकात्मता होती. असे आमचे विकल्परहित राज्य चालले होते. पुढे एका प्रसंगाने विघ्न आले आणि आमची एकात्मता भंग पावली. कशी ते ऐक.''

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

मयासुराचे वालीला आव्हान

"दुंदुभीचा ज्येष्ठ पुत्र मयासुर पित्याच्या वधामुळे वैरी बनून वालीचा वध करावा, या इच्छेने आला. किष्किंधा उध्वस्त करून वालीला मारावे ही त्याची प्रतिज्ञा होती. पित्याच्या वधाचा सूड घेण्यासाठी तो गर्विष्ट होऊन आला. एका मध्यरात्री मयासुर किष्किंधेच्या महाद्वारात आला. घर्घराटी गर्जना करून त्याने आसमंत दुमदुमून टाकले. त्याची गर्जना ऐकून वानर भयभीत झाले. थरथर कापू लागले. त्यांचा धीर सुटला. मयासुर गर्जत होता की, "वानरांचा राजा वाली म्हणून कोण आहे? त्याने माझ्याशी युद्ध करायला रणांगणात वीरश्रीने यावे." त्यावेळी वाली त्या असुराशी युद्ध करण्यास निघाला. बंधुप्रेमाच्या कळवळ्याने मी पाठेपाठ बाहेर आलो. बंधूला साहाय्य करायला मी आलो. त्यावेळी "माझा पिता दुंदुभी मारला, त्याचा मी सूड घेईन" असे मय म्हणत होता. हे ऐकताच वाली रागाने पुढे झाला आणि त्याने आव्हान देणारी आरोळी ठोकली. त्याबरोबर मयाची टाळी बसली. आम्हा दोघांना पाहून त्याने भीतीने पळ काढला. आपण एकटे हे दोघे तेव्हा घाव घालून आपला प्राण घेतील या भयाने तो पळू लागला. वालीने निश्चय केला की, 'मी याचा वध केल्याशिवाय नगरात परत रिकाम्या हाती येणार नाही.' नंतर वाली मयाचा जीव घेण्यासाठी त्याच्या पाठीस लागला. वाली पाठ सोडत नाही असे पाहून मय भयाने गिरिकंदरात पळाला आणि स्वतःच्या बिळात शिरून बसला."

सुग्रीव पुढे सांगू लागला. "मयासुर ज्या बिळात शिरून बसला ते सर्वांना अतर्क्य होते म्हणून तो असुर त्या बिळात राहात होता. आम्ही अंधारात त्याला बिळात शिरताना पाहून दोघे तिथे पोचलो. त्यावेळी वालीने मला सांगितले की तो आत जाऊन वैऱ्याला मारून येईपर्यंत मी सावधपणे बिळाच्या तोंडाशी थांबावे. मी वालीला म्हटले की 'मीही तुझ्या साहाय्याला येतो.' वालीने मला आज्ञा करून म्हटले की 'त्या मशकाला मारायला तुझे साहाय्य कशाला हवे. दारात सावधपणे थांब.' वालीने बिळात प्रवेश केल्यावर मयासुराने पाताळात वालीला नेले. तिथे कोट्यावधी दानव होते. तेथे प्रचंड रणधुमाळी होणार असे पाहताच वाली सावध झाला. त्याने आपल्या गळ्यात वरदमाळ असल्याची खात्री करून घेतली. इंद्राने दिलेली कश्यपविजयवरद माळ वालीच्या गळ्यात होती. मग तो वैऱ्यांच्या समूहात शिरला. ती माळ गळ्यात असल्यामुळे वैरी एकतर परत फिरत किंवा युद्धासाठी आलेच तर मरून पडत. वाली वर्षामागून वर्षे निराहार, पाण्याशिवाय युद्ध करत राहिला तरी त्याला तहानभुकेची बाधा होत नसे. त्याला माळेमुळे श्रमही जाणवत नसत. वरदमाळ जवळ असली की वाली अजिंक्य वानरवीर ठरून शत्रूवर विजय मिळवी. या प्रसंगातही त्याने अनेक दानवांचे रणात मर्दन केले. त्याने सैन्य, प्रधान, पुत्र असे अनेक दानव मारले. मुख्य, महत्त्वाच्या दानवांच्या रक्ताचे पाट वाहविले. जे उरले ते सर्व पळाले. नंतर दुंदुभीपुत्र मय वालीबरोबर युद्ध करू लागला. अनेक महिने तहानभुकेविना आणि श्रमाविना वालीने युद्ध केले, शिवाने मयासुराला वालीच्या हातून मृत्यू येईल असा शाप दिला होता. पंधरा महिने दुर्धर रण झाल्यावर मयासुराच्या शरीरातून रक्त वाहून सर्व बिळातही रक्तच भरले. त्या रक्ताचा प्रवाह वाहात बिळाच्या तोंडाशी आला. मी बिळाच्या दाराशीच बसून होतो. आत काय घडते आहे हे मला समजत नव्हते. मी सव्वा वर्ष थांबलो होतो."

वालीच्या वधाचा गैरसमज

"मी बाहेर ऐकू येणारे आवाज ऐकत होतो. रणक्रोधात वीरांनी केलेल्या गर्जनांचे शब्द तेवढे ऐकू येत होते. 'थांब, घे, पळू नको, धर,' या शब्दांसह निष्ठुरपणे घातलेले घाव आणि वीरांचे हुंकार ऐकू येत होते. काही रडत, काही पडत,

https://archive.org/details/@sulakshmiacademy Bhavani Vedic Trust, Lucknow

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

कोणी कण्हत असलेले ऐकू येत होते. हे शब्द ऐकतानाच बिळातून रक्ताचा प्रवाह बाहेर आला. फेसाळ, उसळणारे ते रक्त पाहून वालीला मृत्यू आला असावा असे मला वाटले आणि दुःखातिशयाने मी मूर्च्छित झालो. वालीसारखा उत्तम बंधू रणात पडला या जाणिवेने आक्रंदून, त्याच्या वधाचा सूड घेण्यासाठी मी कास घालून दंडांना थोपटून बिळात प्रवेश केला. तेवढ्यात लोमश ऋषींनी मला थांबवले. त्यांनी सांगितले की, ''या ठिकाणापासून किष्किंधा दूर राहिली आहे. मयासुर बिळाच्या आत आहे. तुम्ही दोघे इथेच गुंतला आहात. तिकडे नगरीला कोणी राजा नाही. हे जाणून विद्याधर गंधर्वांनी किष्किंधानगरी वेढून ते राज्य घेण्याचा विचार केला आहे. सर्व नगरीत हाहा:कार उडाला आहे.'' तेवढ्यात चारी प्रधानही आले आणि त्यांनी बिळात जाणाऱ्या मला अडवले. ते म्हणाले, ''बिळात वालीचा अंत झाला. तुझाही घात केला जाईल. हातचे राज्य व्यर्थ जाईल. तेव्हा तू हा अनर्थ करू नकोस. वालीला निश्चित मारला आहे, कारण हे फेसाळ रक्त येथे वाहात आहे. तू आणखी आत जाऊ नकोस'' ऋषींनी आणि इतर सर्वांनी मला सांगितले की, ''प्रथम शत्रूंना परतवून नगरीचे रक्षण करून स्वस्थता येऊ दे मग वाली बंधूच्या शोधासाठी सगळेच या बिळात जाऊ.''

''बिळाच्या तोंडाशी आलेला रक्तप्रवाह पाहून असुरांकडून वाली मारला गेला असावा असे मीही निश्चित मानले. नंतर दुःखाचा आवेश आवरून मी उठून स्नान केले आणि वालीचा उद्धार व्हावा म्हणून ऋषींच्या मंत्रानुसार वालीला मंत्रयुक्त तिलांजली दिली. नंतर आपल्या किष्किंधानगरीवर आलेले संकट आणि स्त्रिया, बालके यांच्यावरचा निर्बंध ऐकून मला क्रोध आला. मी नगरीचा प्रतिबंध छेदायचा निश्चय केला. त्यावेळी ऋषीवरांनी मला सांगितले की, ''विद्याधरांनी नगरी वेढली आहे. इकडे असुर विवराबाहेर आला तर दोहोंकडे युद्ध करण्याचे संकट प्राप्त होईल. याचा विचार केला पाहिजे.'' ही ऋषीश्वरांची सूचना मला पटली. मी एक प्रचंड पर्वत उचलून बिळाच्या तोंडाशी आणून वैरी बाहेर न यावा अशी व्यवस्था केली. मग एकाच उड्डाणात किष्किंधेत आलो. अजून प्रधान नगरीत आले नव्हते. माझ्या उड्डाणाची गती फारच असल्याने प्रधान मागे राहिले होते. मी एकट्यानेच विद्याधरांचे कंदन केले. वैऱ्यांना माझ्या पराक्रमाने आणि गर्जनेने धाक बसून, ते सर्व पळून गेले. काहींनी प्राण सोडले. स्त्रिया आणि बालके यांना बंधनमुक्त केले. नगरी सुखी केली. माझा पराक्रम पाहून ऋषींना संतोष झाला. नंतर प्रधानांनी येऊन पाहिले तेव्हा मी शत्रूंचा नायनाट केलेला होता. त्यामुळे त्यांना हर्ष आणि संतोष झाला. माझा पराक्रम पाहून त्या प्रधानांनी आणि ऋषींनी विचारपूर्वक मला किष्किंधेचा राजा म्हणून अभिषेक केला. पूर्ण सहा महिने मी धर्मयुक्त राज्य केले. समस्त प्रजा सुखी केली.''

वालीचे पुनरागमन - सुग्रीवावर रोष

''वालीने एकवीस महिने युद्ध करून मयासुराचा वध केला. त्याचे शिर घेऊन आणि बिळाचे दार मोकळे करून, भुभु:कार केला. वालीची गर्जना ऐकून मला आनंदच झाला. ज्याप्रमाणे प्रेतामध्ये प्राण यावा त्याप्रमाणे वालीचे आगमन झाले; मृताला अमृतपान मिळावे, अंधाला दृष्टी मिळावी, दुष्काळ असताना मेघांचा वर्षाव व्हावा, तसे वालीच्या आगमनाने मला वाटले. पतिव्रतेला प्रियदर्शन झाल्याने, साधकाला ब्रह्मज्ञान झाल्याने, जसे सुख वाटते तसे वाली येण्याने मला सुख झाले. वाली आलेला पाहून ऋषी, प्रधान, नागरिक, स्त्रिया, बालके सर्वजण सुखसंपन्न झाले. त्यांनी गुढ्या, मखरे उभारून ढोल-निशाणांचा गजर करून वालीचे स्वागत केले. त्याचा जयजयकार केला. मी स्वतः त्याच्याकडे जाऊन त्याच्या पायावर लोटांगण घातले. त्याच्या पायावर मस्तक टेकले. मग आलिंगन द्यायला गेलो. तेव्हा

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Muthulakshmi Research Academy

मला समोर पाहून वाली रागाने तोंड फिरवून, माझे तोंड पाहणे टाळू लागला. मला अत्यंत दुःख झाले. मला राज्याभिषेक झाला त्याचा वालीला राग आला होता. ज्या प्रधानांनी हे केले त्या सर्वांकडे तो रागानेच पाहात होता. मग मीच हात जोडून, पुढे होऊन, वालीला विनवून विचारले, "माझा काय अपराध? तू चित्तात राग का धरला आहेस? आम्ही तुझ्याशिवाय अनाथ होऊ. तू तर माझा ज्येष्ठ बंधू आहेस. तुझ्यामुळेच आम्ही सनाथ झालो. आम्ही तुझ्यामुळेच कृतार्थ आहोत. थोर भाग्याने शत्रूला जिंकून तू परत आलास. हे आमचे भाग्य की तू भेटलास."

"माझे भाषण ऐकल्यावर वाली अधिकच क्रोधायमान झाला. डोळे लाल करून त्याने अत्यंत कठिण शब्दात, सुहृदपण सोडून मला सुनावले. "तू बंधू नव्हेस माझा वैरी आहेस. मी अनेक वैरी पाहिले, पण तुझ्या वैराची थोरवी अशी की तू पदोपदी छळवादी आहेस. मी विवरात शिरलो आणि तुला तोंडाशी सावध राहायला सांगितले. तर तू दारावर पर्वत ठेवलास. सुग्रीवा, तुझे मनोगत असे होते की असुराने माझा घात करावा आणि स्वतः राज्य भोगावे. यासाठीच बीळ तू बुजवलेस. मला शोधण्यासाठी बिळात शिरायचे सोडून, तुम्ही राज्यभोगाचा स्वार्थ धरला. अशा तुला सुहृद कसे म्हणावे? स्वतः राज्य भोगावे आणि मी मरावे हेच तुझ्या मनात होते. तू बीळ बुझवलेस ते याच हेतूने; आता कपटाने उगाच विनवण्या करतो आहेस."

"वाली आपली वार्ता सांगताना म्हणाला, "मी बिळात शिरून, सर्व दानव मारले. सर्व सैन्य आणि दानव पुत्रही मारले त्यामुळे विवरात रक्ताचा प्रवाह वाहिला. वीरांशी संघर्ष करताना रक्त विवरात उलथून, त्याचा प्रवाह बिळाच्या दारात पोचला. वरद आणि मायावी अशा असुरांशी निराहार, निर्जल असे एकवीस मास युद्ध करून अखेर मयासुराचा मी अंत केला. नंतर मला बाहेर येण्याचा मार्ग दिसेना, मी कासावीस झालो, कारण तू बीळ बुजवलेस. त्या विवरात मी भोवंडत फिरत होतो. कदाचित गुप्तपणे येऊन दानव माझा घात करतील हा धाक मला त्या अंधारात फिरताना वाटत होता. मग मनाशी विचार केला की सुग्रीव दारापाशी आहे. आपण त्याला बोलावले तर येऊन त्वरेने आपल्याला बाहेर काढील. मग 'सुग्रीव, सुग्रीव' अशा सतत मी हाका मारल्या. तुझे प्रत्युतर आले नाही तेव्हा मला अपार दुःख वाटले. मी त्याला एकट्याला दारात बसवला होता. दानवांनी फसवून त्याचा घात केला असावा कारण तो कळिकाळालाही न आटोपणारा आहे. तेव्हा त्याच्याशी कपट करून दानवांनी त्याला छळून मारले असावे. सुग्रीव तत्त्वतः मारला गेला या जाणिवेने मला अत्यंत व्यथा झाली. बंधुस्नेहाने अपार दुःख झाले. मी रडत, पडत, चरफडत राहिलो. आपल्या दोघात सख्याचे संबंध होते; अणुमात्र विरोध नव्हता. सुग्रीव बंधू अंतरला म्हणून 'सुग्रीवा कुठे रे गेलास?' असे मी कळवळून दुःख व्यक्त करू लागलो. 'अरे तू माझ्या जिवाचा विसावा, दैत्य मारून आलो म्हणून आलिंगन दे. बंधूचा गौरव करायचे विसरलास का? मला पूर्ण विश्वास होता की माझी आज्ञा उल्लंघून सुग्रीव लघुशंकेलाही न जाणारा. दानवांनीच त्याचा वध केला.' असे म्हणत मी स्फुंदून स्फुंदून रडत होतो." पुढे वाली आणखी आठवणी काढत राहिला.

"सुग्रीव वानर युवराज हा माझा जीव की प्राण, माझा आत्मा, त्याला जर दैत्यांनी युद्धात मारला असेल तर मग मी काय कामाचा उरलो. जर तो माझ्या बरोबर आला असता तर माझा सुग्रीव वाचला असता; पण मीच त्याला दाराशी ठेवून त्याचा घात केला आहे. मला दानवांनी विवरात कोंडले आहे, तेव्हा माझ्या सुटकेसाठी ये रे बंधुराजा! तू आणि मी कधी वेगळे राहात नव्हतो. मला याच वेळी कुबुद्धी का आठवली. तुला दारात ठेवून मी युद्धाला निघालो. मला फार काळ

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Research Academy

लागला आणि तू तर माझ्याशिवाय फल किंवा जल घेत नव्हतास. त्यामुळे तुला भुकेने ग्लानी आली असेल आणि तू प्राण सोडला असशील असे वाटून मी सतत शोक करत विवरात, अंधारात फिरत असताना विवराच्या दाराशी पर्वत आहे हे सूर्यप्रकाशाच्या छिद्राने मला समजले.''

वालीचा आरोप, तारेकडून स्पष्टीकरण

''सुग्रीवाचे मनोगत की मला कोंडून विवरातच मारावे असे होते, म्हणूनच त्याने विवराच्या दारात पर्वत घातला, कारण राज्य भोगायचे होते. त्या पर्वताच्या फटीतून मला सूर्य दिसला तेव्हा मी घाव घालून पर्वत दूर केला. मी बिळाबाहेर आलो. सुग्रीवाला इथे बसवला होता, त्याचा वृतान्त काय झाला असेल, असा मी विचार करत होतो, तेव्हा विपरीतच दिसले. सुग्रीवाने किष्किंधेचा राजा बनून माझ्या भार्यांना तो भोगतो आहे. त्याने निश्चित शत्रुत्व जोडले. हा माझा वैरी झाला. ज्या सुग्रीवासाठी मी तळमळत होतो, तोच माझा घात करतो आहे हे केवढे विपरीत आणि हे सर्व राज्याचा भोग मिळावा यासाठी होते. विवरात माझा शोध घेण्याची सुहृदबुद्धी सोडून, सुग्रीव हा दुष्ट, दुरात्मा राज्यपदावर बसला आहे.'' वालीने सुग्रीवावर केलेले आरोप मिथ्या आहेत हे वालीची पत्नी तारा हिने सांगायचा प्रयत्न केला. सुग्रीव निर्दोष असल्याचे सांगताना तारा म्हणाली, ''किष्किंधेचे राज्य बुडत असताना सुग्रीवाने पराक्रमाने राखले ती वार्ता मी सांगते.''

''सत्य असे आहे की तुम्ही दोघे वीर बिळापाशी गुंतलेले पाहून हे राज्य घेण्यासाठी विद्याधरांनी संपूर्ण नगरी वेढली. नागरिकांना विरोध करून स्त्रिया आणि बालकांना त्रास दिला. हा सर्व आकांत पाहून ऋषीश्वरांना चिंता वाटली. वानरसैन्य, सेनापती यांना तेवढे ज्ञान नव्हते. त्यामुळे पूर्वीचे चौघे प्रधान तातडीने तुमच्याकडे आले. तुम्हा दोघांना परत आणण्यासाठी ऋषी, प्रधान विवरापाशी आले. तेव्हा विवरातून रक्त वाहात असून, सुग्रीव रडत आहे असे त्यांना दिसले. ते फेसाळ रक्त पाहून सुग्रीव कास घालून सज्ज झाला आणि 'मी वालीच्या शोधासाठी जातो, तुम्ही दाराशी थांबा' असे म्हणाला. तो ऋषींना म्हणाला, ''वाली दानवांकडून मारला गेला असावा असे या रक्तप्रवाहावरून वाटते. तेव्हा मी त्याच्या शोधासाठी जातो. प्रधानहो, तुम्ही सर्वजण नगरीचे रक्षण करा.'' एवढे बोलून सुग्रीव विवरात प्रवेश करणार आहे असे पाहताच ऋषींनी त्याला अडवले हा पूर्ववृत्तांत नीट ऐका. तुम्हाला शोधण्यासाठी प्रधान वनोपवनी गेले. राजधानीत कोणीच उरले नाही असे पाहून गंधर्वांनी किष्किंधेला वेढले. स्त्रिया, बालके आक्रंदू लागली. तेव्हा ऋषी धावत सुग्रीवाकडे गेले आणि 'राज्य चालले. रक्षणकर्ताच नाही' असे त्यांनी गंधर्वांच्या वार्तेसह सांगितले. ते सुग्रीवाला म्हणाले, ''वाली मरण पावला असे रुधिरप्रवाहावरून वाटते. तर मेलेल्याच्या मागे आपण मरू नये. ब्रह्मयाने दिलेले स्वतःचे राज्य आधी रक्षण कर. स्वराज्याचे रक्षण करून स्वस्थता आली म्हणजे मग वालीच्या शोधाला नीघ. तोवर या बिळाच्या तोंडावर पर्वत ठेव. हेही लक्षात घे की विद्याधरांशी युद्ध करत असताना कदाचित शत्रू विवरातून येतील. त्या प्रसंगी दोहीकडून संकट येईल, म्हणून बिळावर तोंडाशी पर्वत ठेव'' सुग्रीवाने ऋषींचे म्हणणे मान्य करून, बिळाशी पर्वत ठेवला आणि तो महावीर विद्याधरांशी युद्ध करण्यासाठी आला.'' तारेने हे पूर्ववृत्त सविस्तर सांगून नंतर काय घडले तेही सांगितले.''

''सुग्रीव हा धैर्यवान झुंजार वीर विद्याधरांशी युद्ध करून विजयी झाला. तो एकाकी वीर विजयी झाल्याचे पाहून ऋषींनी त्याचा जयजयकार केला. नंतर राजधानी ही निर्नायकी, शून्य राहू नये असा ऋषींनी आणि प्रधानांनी विचार करून सुग्रीवाला थांबवून, राज्याभिषेक केला. स्वतः सुग्रीवाने राज्य घेतले नाही, तर त्याला बळजबरीने राजपदावर

https://archive.org/details/@lucknowacademy Bhuvan Vani Trust, Lucknow

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

बसविले आहे. तेव्हा त्याच्यावर राग न धरता, त्याला आपण क्षमा करा.'' तारेने हे स्पष्टीकरण दिल्यावरही वालीचा राग गेला नाही. तो तारेला म्हणाला, ''अग, तुला याच्या कपटकुशलतेची जाण आलेली नाही. माझा हा पूर्ण वैरी आहे. मला वैऱ्याशी लढत ठेवून, स्वतःला याने राज्यपद घेतले. माझी याला का आठवण झाली नाही; कारण हा माझा द्वेष करतो. माझे काय झाले याचा परामर्श न घेता, हा सहा महिने सुखात राज्य करतो आहे. माझ्या मरणातच याला सुख मिळणार होते, म्हणूनच त्याने विवराचे तोंड बुजवले. राज्य स्वस्थपणे राखत, याने बिळावरचा पर्वत काढला असता, तरी मी त्याची सख्यता समजू शकलो असतो; पण हा तर सर्वस्वी माझा वैरीच आहे.'' एवढे रागाने बोलून सुग्रीवाचा घात करण्यासाठी वाली धावला. त्यावेळी तारेने त्याला अडविले आणि 'स्वतःच्या बंधूचा घात करू नये' असे सांगितले.''

वालीने सुग्रीवाला नगराबाहेर हुसकावले

''सुषेणाची कन्या, वालीची पत्नी तारा ही पतिव्रता; रुमा ही सुग्रीवाची पत्नी वालीने हरण केली. तारेच्या बोलण्याने सुग्रीवाचा प्राण वाचला. वालीने सुग्रीवाची पत्नी, वस्त्रे, भूषणे हे सर्व हरण करून सुग्रीवाला वस्त्ररहित अवस्थेत नगराबाहेर घालविले. एक लंगोटी नेसायला देऊन वालीने सुग्रीवाला गिरी-राईत पाठविले. नंतर वालीने प्रधानांकडे रागाने पाहिले; तेव्हा वालीला प्रधानांनी राज्याभिषेक केला आणि आता आपल्यालाही वाली दंड करेल, या भयाने सर्व प्रधान तातडीने आधी बाहेर पळाले. आणि ते सर्व माझ्याकडे आले. आम्हा दोघा बंधूत सख्य असताना, वैर निर्माण होण्याचे काय कारण झाले ते मी सांगितले. श्रीरामा, अशी आमच्या उभयतांची वार्ता मी तुला सांगितली. श्रीरामा, माझे युवराजपद, माझी तरुण पत्नी, यांचे वालीने हरण केल्यामुळे मी अतिशय दुःखी आहे; अहोरात्र मला निद्रा येत नाही; तुझी शपथ हे सत्य आहे.'' सुग्रीवाने जे सांगितले त्यामुळे श्रीरामाला त्याची दया येऊन, त्याच्यावर कृपा करावी म्हणून त्याने सुग्रीवाला म्हटले, ''मी निश्चित वालीचा वध करीन.'' एवढे सांगून श्रीरामाने सुग्रीवाच्या मस्तकावर हात ठेवला.

अध्याय पांचवा

सुग्रीवाने वालीच्या त्रासाची वार्ता पुन्हा पुढे सांगायला आरंभ केला. ''श्रीरामा, राज्य गेले आणि आम्ही वनवासात गुप्तपणे राहतो, तरी तिथेही वाली आम्हाला मारायला धावतो. आम्ही जेथे जातो तेथे वाली आमच्या मागे धावून येतो. आम्हाला जिवानिशी मारायचे असा त्याने दृढ वैरभाव मनात धरला आहे. वालीच्या भीतीमुळे भयभीत होऊन आम्ही अहोरात्र गुप्तपणे राहतो. अशावेळी आमच्यावर पाळत ठेवून असलेले वालीचे दूत आमचा शोध घेऊन वालीला सांगतात. आम्ही असे भीतीने दशदिशा फिरत असता, नारदांची भेट होऊन त्यांनी आम्हाला ऋष्यमूक पर्वतावर राहण्यास सांगितले, कारण या ठिकाणी वाली येणार नाही. त्याला तसा शापच आहे.''

मतंगऋषींच्या शापाचा वृत्तान्त

''वालीला मतंगऋषींनी शाप का दिला ते आता मी सांगतो. दुंदुभी हा बळाने उन्मत्त झाला होता. तो वालीकडे आला आणि आव्हान देऊन युद्ध करू लागला. वालीने त्यावेळी दुंदुभीला धरून जमिनीवर जोरात आपटला. त्या आघाताने दुंदुभीने प्राण सोडला, आणि तो पंचत्वात विलीन झाला. वालीने डाव्यापायाने दुंदुभीला आकाशात उडवला. अंतराळातून जात दुंदुभी मतंगऋषींच्या आश्रमाशी जाऊन पडला. तेथे त्याचे रक्त सांडले. ते वाहते रक्त पाहून ऋषींना राग आला. त्यांनी क्रोधाने ओरडून वालीला शाप दिला. ते म्हणाले, ''ज्याच्या शक्तीच्या आघाताने हे रक्त या आश्रमात सांडले आहे, तो या पर्वतप्रदेशात प्रवेश करील तर त्याच

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Trust and eGangotri

क्षणी मरून पडेल.'' हा शाप असल्याने ऋष्यमूकाला पाय लावताच वालीला मरण येईल, असे नारदांनी सांगून आम्हाला ऋष्यमूकावर पाठविले. नारद असेही म्हणाले की, ''तुम्ही ऋष्यमूकावर वास्तव्य केलेत म्हणजे वालीच्या भयाची निवृत्ती होईल; तुम्हाला थोर यश आणि कीर्ती प्राप्त होईल, कारण श्रीरामाचा कृपाप्रसाद तुम्हाला मिळेल.'' नारदांच्या सांगण्याने आम्ही ऋष्यमूकावर निर्भय आणि सुखी होऊन राहिलो. वालीच्या भयाची धाकधुक निःशेष संपली. वाली हा शापभयामुळे ऋष्यमूकाकडे पाहातही नाही; मग इथे येण्याची गोष्ट दूरच. आम्ही येथे सुखसंपन्न आणि संतुष्ट आहोत. आता तर नारदांच्या वचनाची साक्षात् प्रतीती तुझ्या भेटीने आली. हे कृपामूर्ती रामा, आम्ही पुढे त्रिजगतात विजयी होऊ.''

वाली-सुग्रीव संघर्षाचे निवेदन

सुग्रीवाने वालीशी वैर निर्माण होण्याचे कारण श्रीरामाला सांगताना असे निवेदन केले की, ''आमच्यातल्या वैराचे मुख्य कारण माझ्या पत्नीचे त्याने हरण केले हे आहे. माझी रूमा ही पत्नी मला अत्यंत प्रिय आहे. जसा आपला आत्मा तशी ती माझी लाडकी आहे. तिची सुटका झाली तर मी अत्यंत सुखी होईन. तारा ही वालीची पत्नी आहे, त्याने तिला सुखाने भोगावे. माझी रूमा त्याने गौरवाने मला द्यावी, म्हणजे आमच्यात वैर उरणारच नाही. आमच्या दोघात स्त्रीच्या हरणामुळे उगाच विरोध निर्माण झाला आहे. सहा महिने आमचे युद्ध स्त्रीलोभामुळे चालू आहे. अगदी ठरल्याप्रमाणे दर सहा महिन्यांनी आमचे द्वंद्व होत आहे, पण स्त्रीची सुटका काही मला करता आलेली नाही.'' असे बोलून सुग्रीव ओक्साबोक्सी स्फुंदून रडू लागला. त्यावेळी श्रीरामाला सुग्रीवाचे दुःख पाहवेना. श्रीरामाने मग निर्वाण बाण काढून म्हटले, ''एकाच घावात मी बळीचा प्राण घेईन हे सुग्रीवा तू सत्य मान.'' वाली सबल, बलवान आणि अजिंक्य पराक्रमी श्रीराम हे दोघे समसमान असून त्यांच्यात कोणतेही न्यून नव्हते.

श्रीरामाचे आश्वासन ऐकून सुग्रीव पुढे सांगू लागला की, ''पलीकडे दुंदुभीचे शव पडले आहे, ते जो कोणी उचलू शकेल त्याच्या हातून वालीला मरण येईल, असे मतंग ऋषी म्हणाले आहेत. एकाच बाणाने जो सात विषम ताडवृक्ष छेदील त्याच्या हातून वाली मारला जाईल असेही ते ऋषी म्हणाले आहेत.'' हे सुग्रीवाचे बोलणे ऐकल्यावर श्रीराम हसत दुंदुभीचे पर्वतासारखे शरीर पाहायला गेला. त्याने डाव्या अंगठ्याने उचलून वरच्यावर तीनदा तोलले आणि नंतर लीलया ते उगाच हळसून दहा योजने दूर उडवले. दुंदुभीचे शरीर अत्यंत जड असून रामाने ते अंगठ्याने उडवले, तरी सुग्रीव साशंकच होता. तो भयभीत होऊन म्हणाला, ''वालीने दुंदुभी जेव्हा रक्त-मांस-हाडांनी भरलेला होता तेव्हा त्याला आकाशात उडवला होता. हे आम्ही पाहिले आहे. आता हे रघुनाथा, दुंदुभीचे शरीर वाळून शुष्क आणि आक्रसून गेलेले असताना पायाने उडविले आहेस. हे समक्ष पाहूनही आम्हाला बळ-अबळ कोण कसा हे ठरवता येत नाही. तेव्हा तू जर ते विशाल ताड एका बाणाने छेदलेस तरच तू वालीचे हनन करणारा होशील.'' सुग्रीवाचे हे भयग्रस्त संदिग्ध भाषण ऐकून श्रीरामाने धनुष्यावर दोरी चढविली आणि एक फणीबाण त्यावर लावला. विषम ताडांचा छेद करण्यासाठी राम सज्ज झाला. विषम ताल असलेल्या ताडांची स्थिती ही शेषाच्या पाठीवर उगवल्यासारखी होती; त्यांचा छेद करण्यासाठी रामाने युक्ती केली. त्याने धनुष्य ओढले आणि लक्ष्मणाचा पाय चेपला. त्याने आपले अंग वाकवले आणि त्या कृतीमुळे विषम असलेले ताड सम झाले. लक्ष्मण हा शेषावतार असल्यामुळे त्याने अंग वाकवताच विषम ताड समान झाले. श्रीरामाने मग त्यांचा छेद करण्यासाठी दुर्धर अशा आपल्या धनुष्यावर अमोघ बाण लावून, तो सोडताच मोठी

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

विचित्र घटना घडली. सात ताड छेदून, पर्वतांचे विदारण करून, सप्त पाताळे भेदून तो बाण शेषाच्या अंगात शिरला. शेषाच्या अंगात ताडांची मुळे होती. त्यांना समूळ छेदून बाण परत रामाच्या हाती येऊन भात्यात स्वस्थपणे प्रवेश करून राहिला.

श्रीरामाने सात विषम ताड छेदल्यामुळे सुग्रीवाला अत्यानंद झाला. सर्वांनी श्रीरामाचा जयजयकार करणारी गर्जना केली. "श्रीरामामुळे आम्ही सबळ झालो" असे सर्वांनी म्हटले. भवभय ही ताडांची विषमता; ती विषमता रामाच्या दृष्टीने समता झाली. विषम ताडांना रामाने छेदल्यामुळे सर्व वानरकुळाला सुख झाले. "श्रीराम आम्हाला सुखसंपत्ती, आत्मविश्रांती, साहाय्य आणि संगत देणारा आहे. तो आमचा जिवलग आप्तसंबंधी, वानरांचा आत्मा, चराचरांचा स्वामी, सुरवरांना वंदनीय, आहे." सुग्रीवाने असे म्हणून लोटांगण घातले. श्रीरामाने त्याला उठवून आलिंगन दिले. जीव-शिवांना त्यामुळे समाधान झाले.

नंतर श्रीराम सुग्रीवाला म्हणाला, "तू पुढे किष्किंधेला जाऊन, वालीला युद्धासाठी पाचारण कर. मी तुझ्या पाठीशी आहे. वाली संग्रामासाठी आला की क्षणार्धात मी बाणाने त्याला मारीन. तू त्याला भिऊ नकोस; निःशंकपणे युद्ध कर. सुग्रीवा तू वालीशी युद्ध करशील तेव्हा मला विसरू नकोस. तू सर्वथा विजयी होशील." सुग्रीवाने रामाचे सांगणे शिरोधार्य मानले. सुग्रीवाने मग भुभुःकार केला. श्रीराम कौतुकाने पाहात होता. वाली वानर आपण मारू असे त्याने म्हटले. 'वाली बलवानातला बलवान आहे, तर मी श्रीराम अजिंक्य महावीर आहे. आज वालीची मी होळी करून टाकीन, माझे रणकौशल्य पाहाच." असा सुग्रीवाला विश्वास दाखवून, सौमित्रासह राम त्वरेने उठला. सखा जिवलग सौमित्र, सुग्रीव सन्मित्र अशा दोघांसह श्रीराम वालीच्या वधासाठी किष्किंधेकडे निघाला. नर-वानर एक झाले. वानरवीरांचा समूह श्रीरामाचा जयजयकार करत किष्किंधेच्या दाराशी आला. श्रीराम, सुग्रीव आणि सौमित्र असे तिघे एकत्र चालत होते. वानर आनंदाने गर्जना करत होते. सर्वजण किष्किंधेच्या दाराशी येऊन पोचले. ज्याप्रमाणे देहात असूनही आत्मा सर्वांना अदृश्य असतो, त्याप्रमाणे वानरांच्या समूहात श्रीराम असूनही तो जनदृष्टीला गुप्तच होता. वाली आणि सुग्रीव यांचे दुर्धर युद्ध पाहण्यासाठी श्रीराम वनात असूनही दृष्टीला दिसत नव्हता. नर-वानर त्याला पाहू शकत नव्हते. जवळ असूनही तो नरवीर, ऋषींनाही दिसत नव्हता, तर वाली वानर कसा पाहील. गोचरांना तो अगोचर दिसू नये हे स्वाभाविकच होते; कारण तो तर मूलतः ब्रह्मसूत्र होता. श्रीराम कोणाला स्पष्ट दिसत नाही हे साधुसज्जन जाणतात. श्रीरामचंद्र हा गुह्य आणि गुप्त होता.

सुग्रीव आणि वाली यांचे युद्ध

श्रीरामाच्या प्रेरणेने भुभुःकार करून अत्यंत उल्हासाने सर्व आकाश सुग्रीवाने दुमदुमून टाकले आणि तो कास घालून सिद्ध झाला. सुग्रीवाच्या गजर गर्जनेने दिवसा नक्षत्रे खाली पडली; मेरुपर्वताची शिखरे दोलायमान झाली; गिरिकंदरे दुमदुमली; दिग्गजांचे टाळे चिकटले. त्या गर्जनेने वाली गजबजून उठला आणि अशी प्रलयंकारी आरोळी देणारा कोण बलवान आला ते पाहू लागला. तेव्हा त्याला दूतांकडून समजले की, सुग्रीव युद्धासाठी आला आहे. वाली म्हणाला, "त्याला एवढे सामर्थ्य नाही. त्याला कोणीतरी बलवान भेटला असून त्याच्या पाठिंब्यावर हा महा आरोळी देतो आहे." एवढे बोलून वालीने तत्काळ कास घातली. आजचे संकट मोठे दिसते असे म्हणत वालीने विजयमाळ गळ्यात घातली, तरीही त्याच्या पोटात धाक उत्पन्न करणारी आरोळी त्याला भय दाखवत होतीच. नंतर आज मारायचे किंवा मरायचे, दोघातले वैर आज पूर्णपणे छेदायचे असा निश्चय करूनच वाली युद्धासाठी रागाने निघाला.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

सुग्रीवाची भयप्रद आरोळी ऐकून क्रोधाने युद्धासाठी आलेला वाली सरळ सुग्रीवाला भिडला. दोन महाबलवान वानर एकमेकांशी आवेशाने झुंजत राहिले. वाली आणि सुग्रीव यांच्यात युद्ध होते आहे हे ऐकून ते पाहण्यासाठी ब्रह्मादी देव आले; त्यामुळे आकाशात विमानांची गर्दी झाली; दोघांच्या शक्तिसामर्थ्याचे त्यांना कुतूहल होते. कारण दोघेही समानबळाचे असल्याने आणि दोघेही युद्धकुशल असल्याने कोण जिंकतो याविषयी सुरवरांना उत्सुकता होती. दोघा बंधूंची दृष्टादृष्ट झाली आणि दोघांच्या बंधुत्वभावनेत त्रुटी येऊन ते क्रोधाविष्ट झाले. हा अपघात स्त्रीलोभाने झाला होता. जसा ग्रहणपर्वात राहू सूर्याला ग्रासावे म्हणून धाव घेतो, तसा वाली सुग्रीवाला निर्दाळण्यासाठी धावला. वाली पर्वताचा दारुण आघात करी आणि सुग्रीव मुठीच्या आघातने पर्वताचे चूर्ण करी. शाल, ताल यांची पर्वा न करता दोघेही रणमदाने उन्मत्त झाले होते. दोघांची राकट शरीरे रण करता करताच घोटीव झाली होती. त्यांनी एकमेकांवर केलेले आघात, मारलेले धाव एवढे कठोर असत की भ्याडांचे प्राण जातील. वज्रासारखे हातांचे घाव, निष्ठुरपणे मुटींनी डोक्यावर केलेले आघात, एकमेकांना त्यांनी मारलेले सपाटे, अशा प्रकाराने त्यांचे घातक वार होत होते. दंड, मुंडके, ऊर, शिर यांवर आणि डोक्यावर, पोटात घाव घातले जात होते. गुडघ्यांनी, कोपरांनी ते एकमेकांना मारत होते. दोघेही शेपटीचे सपाटे मारत होते. ते एकमेकांना धडका देत होते. मधेच अंतराळात उसळी मारत होते. जमिनीवर एकमेकांना वर खाली घेत चक्रासारखे फिरत होते. कधी दोघेही उसळून अधांतरी भिडत होते. त्या महाबळींनी घातलेल्या घावांचा नाद पाताळात उमटत होता. त्यांनी आरोळी दिली की कृतान्ताची दातखीळ बसे. क्षणात जमिनीवर तर क्षणात अंतराळात असे ते युद्ध करत होते. त्या वानरवीरांचे युद्धकौशल्य सुरासुरांना चकित करत होते. ते दोघे महाबळी वानरवीर धैर्य, शौर्य यात अति दुर्धर असून एकमेकांना न आटोपणारे होते.

श्रीरामाचा वालीस ओळखताना गोंधळ

वाली आणि सुग्रीव हे दोघेही रणप्रवीण होते. त्यांचे युद्ध पाहून आणि त्यांची तुल्यबळता लक्षात येऊन श्रीराम संतुष्ट झाला. दोघे वानर एकसारखे आणि समान बळाचे असल्याचे जाणून रामाने वालीचा वेध घेण्यासाठी धनुष्य-बाण सज्ज केले. त्यावेळी वाली आणि सुग्रीव हे दोघेही वर्णाने, देहाने, रूपाने इतके सारखे होते की जणू समरूप, समभाव असे अश्विनीकुमारच भासावे. श्रीराम बाण सज्ज करून होता, पण बाण कोणाला मारावा? अशा संभ्रमात तो पडला. दोघातला वाली कोण? कोणाला मारावे? न कळता बाण सोडला आणि चुकून तो सुग्रीवाला लागला आणि त्याचा घात झाला तर? मग आपण विश्वासघातकी ठरू; आपली शपथ खोटी ठरेल; रामाने शरणागतालाच मारले; अशी निंदा वाट्याला येईल. त्यामुळे पूर्वजांचा आपल्यावर क्षोभ होईल. विशेषतः हरिश्चंद्र रागावेल, शिबी, भगीरथ, पृथु हे राजे आणि काकुत्स्थ, दिलीप हे नृपश्रेष्ठ सगळेच रागावतील. रुक्मांगद, धर्मांगद, सूर्यवंशातले सर्वच वीर, ज्ञाते आपल्यावर क्षोभ धरतील, म्हणतील, "रामाने विरुद्ध कर्म केले. शरणागताला वज्राघात करून निष्फळ रामचंद्र मिरवतो आहे" अशी सर्वत्र निंदा होईल. या प्रकारे विचार करून श्रीरामाने बाण सोडलाच नाही. तेवढ्यात वालीने एक निराळीच युक्ती केली. वीर्य, धैर्य, पराक्रम यांमध्ये दोघेही समान बळाचे आहोत हे ओळखून आणि सुग्रीव स्वतःच्या बळाने आटोपणार नाही असे पाहून, प्रत्यक्षात युद्धामधला अनुभव लक्षात घेऊन वालीने आपली विजय देणारी वरदमाळ दाखविली. हे युद्ध वर्षानुवर्ष चालले तरी कोणालाच श्रम, खेद होणार नाही असे मनात आणून वालीने माळेचा उपयोग केला. त्या वरदमाळेचे दर्शन होताच सुग्रीवाची

https://archive.org/details/@bhuvanvani_trust_lucknow; Bhuvan Vani Trust, Lucknow

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

शक्ती क्षीण झाली. त्याला भोवळ आली; पण तेवढ्यात त्याने स्वतःला सावरले आणि तो ऋष्यमूकावर जाऊन पडला.

श्रीरामाला दूषण आणि त्याचे स्पष्टीकरण

सुग्रीव ऋष्यमूकावर पडल्यामुळे वालीला त्याचा घात करणे शक्य झाले नाही. आपल्या विजयाच्या गर्जना करत वाली म्हणाला, "सुग्रीवा, व्यर्थ रामाचे साहाय्य घेतलेस. रामाच्या बळावर माझ्याशी युद्ध करायला आलास. युद्धात विफल झालास, आता व्यर्थ तळमळतोस कशाला. माझ्याशी संग्राम करायला रामही समोर येऊ शकत नाही. तेव्हा सुग्रीवा, स्त्री आणि राज्य यांचा भ्रम सोडून दे. व्यर्थ श्रम करू नको. सुग्रीवा, ऋक्षराजाची शपथ मी तुला मारणार नाही, तुला जीवदान देतो." अशी गर्जना करून वाली किष्किंधेत निघून गेला. तो विजयाच्या जयजयकारात नगरीत गेला. इकडे सुग्रीव ऋष्यमूकावर दुःखी मनाने विलाप करत राहिला, मूर्च्छित पडला. त्याला मूर्च्छित झालेला पाहून वानर हाहाःभूत झाले आणि वालीच्या भयाने ऋष्यमूकावर पळाले. वालीच्या घावांनी जर्जर होऊन, रक्ताने न्हायलेला सुग्रीव दुःखाने विलाप करत होता. राम साहाय्यकारी नव्हेच. वालीच्या वधाचा उपक्रम, श्रीरामाने पराक्रमाची तयारी दाखवून केला आणि युद्ध करायला लावले. परंतु वाली दुर्गम ठरला. सुग्रीवाच्या मनात रामाविषयीचा विरोधी विचार निर्माण झाला होता.

'वालीचा वध करण्यासाठी श्रीरामाचे बळ गृहीत धरून, निःशंकपणे वालीसारख्या बलवानाशी तुंबळ युद्ध केले. श्रीरामाच्या सामर्थ्यावर भिस्त ठेवून कडकडाटाने युद्ध केले; परंतु श्रीरामाने माझा अंत पाहिला. अखेर मी जखमी होऊन पडलो. वालीने मला जर्जर केले तरी रामाचे साहाय्य झाले नाही. दैवाने ऋष्यमूकात आलो अन्यथा प्राणच गेला असता. ऋष्यमूकाच्या बाहेर पडलो तर वाली क्षणात वध करील, श्रीराम साहाय्य करणार म्हणून रण केले आणि पीडित झालो. श्रीरामाचे साहाय्य बळ रणात विफल झाले. त्याच्या कृपेची ओल न मिळून गांजला गेलो. श्रीरामाने स्वतःचीच पत्नी हरविली, तो माझे काय साहाय्य करणार. श्रीरामाचे वृथा बोलणे मला तत्त्वतः सत्य भासले. श्रीराम सत्यवान आणि सर्वज्ञ असून त्याग करून वनात आला; पण तोही माझ्या संरक्षणाबाबतीत खोटी प्रतिज्ञा करणारा ठरला." असे सुग्रीव दुःखाने म्हणत होता. तेवढ्यात लक्ष्मण, हनुमंतासह श्रीराम तेथे आला. त्यावेळी सुग्रीव श्रीरामाला उद्देशून मनातले विचार प्रकट करू लागला.

"श्रीराम स्वतःच्या मुखाने म्हणाला होता की, "वालीला युद्धासाठी बोलाव. तो दृष्टीला पडला की तुझ्या कार्यासाठी मी त्याचा वध करीन." असे सांगून रामाने आम्हा दोघांना युद्ध करायला लावले, प्रत्यक्षात माझा प्राण जायची वेळ आली तरी साहाय्य मात्र केले नाही. आता इथे येऊन कसला कार्यार्थ साधणार आहेस? वाली विजय मिळवून स्वतःच्या नगरीत गेला. वालीने अत्यंत निकाराचे युद्ध करूनही मी अणुमात्र ढळलो नाही. त्याने वरदमाळ दाखविल्यावर मात्र मी मूर्च्छित झालो. दैवाने ऋष्यमूकात पाडले म्हणून वाचलो, नाहीतर वालीने माझा निश्चित घात केला असता. तू साहाय्य तर नाहीच केलेस, उलट मलाच दुःखव्याप्त केलेस, मी मूर्च्छित झालो तेव्हा वालीला सन्मुख न होऊन मला परम दुःख दिलेस. श्रीराम हा सत्यवादी अशी त्रिलोकात ख्याती आणि मला मात्र तू दुःखी केलेस. त्यामुळे ती तुझी कीर्तीही लटकीच ठरली." सुग्रीव हा दुःखाने व्याप्त झालेला पाहून श्रीराम कळवळला. सुग्रीवाचा शोक आणि आक्रोश ऐकून राम कृपाळू त्याचे सांत्वन करण्यासाठी स्पष्टीकरण देऊ लागला.

श्रीराम सुग्रीवाला म्हणाला, "सुग्रीवा, क्रोध सोडून शांतपणे माझे बोलणे ऐक. मी तुला साहाय्य करण्यामागचा चमत्कार समजून घे. धनुष्याला बाण

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

लावून मी वालीचा वध करावा म्हणून सज्ज होतो ; परंतु तुम्ही दोघे बंधू अगदी समसमान भासलात. वस्त्रे, अलंकार, रूप, शरीर हे इतके समान होते की, मला नेमका वाली कोणता तेच कळेना, म्हणून मी बाण सोडलाच नाही. समज न कळता मी बाण सोडला असता आणि तुलाच लागला असता तर 'रामाने शरणागताला मारले' अशी त्रिलोकी निंदा झाली असती. अवचित तुला बाण लागला तर मग मीही आपला प्राण दिला असता, हे लक्षात आणून, मी शरसंधान केले नाही. शिवाय तुझा कैवार घेऊन एकाएकी वालीशी युद्ध करायचे तर तिथे त्या वरदमाळेच्या सन्मुख जाण्याचा अटकाव होताच. जो जो युद्ध करण्यास समोर येईल तो विमुख होईल अशा वरदमाळेसमोर जाऊन मला पराङ्मुख व्हायचे नव्हते ही देखील एक प्रतिबंध करणारी बाब होतीच. मी वालीशी युद्ध न करण्याचे हेच कारण होते. तुला साहाय्य करावे तर तुम्ही दोघे बंधू समान दिसणारे, म्हणून मी त्यासाठी बाण वेधला नाही. हे अगदी सत्य आहे सुग्रीवा. तू व्यर्थ शोक का करतोस? हा तुझा प्रारब्धभोग होता निश्चित. तसेच वालीचे काही आयुष्य शिल्लक असल्यामुळेच हा सर्व प्रकार घडला असणार. बाणाच्या घावाने त्या वालीचा प्राण घेण्यासाठी मी हे पाहा लगेच धनुष्य घेतो. त्याला मारायला मला एक क्षणसुद्धा लागणार नाही. तू युद्धाचा आरंभ करण्यासाठी वालीला आव्हान दे."

सुग्रीव म्हणाला, "मला आता शक्तीच नाही ; मग मी युद्धासाठी वालीला कसे बोलावू." यावर सुग्रीवाला श्रीरामाने आलिंगन दिले आणि आपल्या अमृत-हातांनी स्पर्श केला. आलिंगनाच्या निमित्ताने आणि हस्तस्पर्शाने रामाने सुग्रीवाला संपूर्ण शक्ती दिली. त्यामुळे पूर्वीपेक्षा शतगुण शक्ती सुग्रीवाला मिळाली. सुग्रीवाने बारकाईने पाहिले तेव्हा त्याला शरीरावर कुठलाही घाव किंवा वण दिसला नाही. त्याच्या ठायी वालीशी युद्ध करण्यासाठी पूर्ण पराक्रम निर्माण झाला. नंतर सुग्रीव उठला आणि प्रतापवीराप्रमाणे श्रीरामाला म्हणाला, "आज मी युद्धात वालीला पुरता लोळवीन" एवढे बोलून सुग्रीव वेगाने तत्काळ वालीशी युद्ध करण्यासाठी आकाशात उडाला. श्रीरामाने त्याला परत बोलावून म्हटले, "तुम्हा दोघात समरूपता आहे तेव्हा सुग्रीवाच्या गळ्यात गजकमळमाळ घालावी." श्रीरामाने सुग्रीवाच्या गळ्यात स्वतः गजकमळमाळ घातली. अशा रीतीने युद्धप्रसंगी सुग्रीवाला ओळखण्याची सोय रामाने केली.

गजांतलक्ष्मी यावी म्हणून गजकमळमाळ त्याला घातली आणि रणभूमीवर ओळखण्याची खूणही केली. ह्यामुळेच मुख्यतः वालीच्या वधाचे कारण झाले. श्रीरामाची आज्ञा अशी समर्थ की ती माळ युद्धामध्ये आघात झाले तरी तुटणार नव्हती. लक्ष्मणाने कौशल्याने त्या माळेतील कमळांच्या आठ पाकळ्यांवर सबाह्य नामावळी लिहिल्या ; त्यामुळे सुग्रीव महापराक्रमी झाला. दोऱ्याशिवाय कमळांची निर्गुण गुंतवणूक करून माळ तयार केल्याने सुग्रीवाच्या गळ्यात असताना तो कळिकाळालाही अनावर झाला. सुग्रीवाच्या कंठात ती माळ घातल्यावर वानरसमुदाय हरखून गेला. नळ, नीळ, तार, तरळ आणि सर्व सैन्य आनंदले. एवढे झाल्यानंतर श्रीराम, सौमित्र, हनुमंत, सुग्रीव हे वानरांसह उल्हासाने किष्किंधेपर्यंत आले. सुग्रीवाने आक्रोशपूर्ण असा थोर भुभुःकार केला. तो ऐकून वाली कोपला आणि महाभयंकर युद्ध करण्यासाठी आला. दोघे बंधू क्रोधपूर्ण होऊन अद्‌भुत युद्ध करू लागले. आता श्रीराम वालीचा निश्चित वध करील असा सुग्रीवासह सर्वांना विश्वास वाटत होता.

अध्याय सहावा

सुग्रीवाचा भुभुःकार ऐकून वाली रागाने खवळला. त्या वीर वाली वानराचे रागाने अग्नीसारखे लाल झालेले डोळे क्षितिजावरच्या बालसूर्यासारखे दिसत होते. वालीच्या मनात विचार आला की, 'आताच युद्धात जर्जर करून सुग्रीवाला

https://archive.org/details/muluk Bhavan Vani Trust, Lucknow / lakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

मी मूर्च्छित पाडला होता आणि लगेच हा गर्जत कसा आला? माझ्या घावामुळे महिने-महिने नव्हे वर्ष-वर्ष कुंथत पडणारा सुग्रीव लगेच असा गर्जना करत उल्हासाने लगेच कसा आला? हा विचार आता राहू दे. तो बंधू माझा खरा वैरी आहे. त्या महाशूराने मला रणात बोलावले आहे तेव्हा लगेच युद्धासाठी निघावे.'

तारेची विनवणी, वालीचे प्रत्युत्तर

वाली युद्धासाठी निघाला तेव्हा तारेने त्याचे पाय धरून म्हटले, "मी आपल्याला स्वहित सांगते. ते विवेकपूर्वक ऐका. तुमच्या घावांनी कण्हत पडून राहिलेला सुग्रीव लगेच येऊन युद्धासाठी हाक देत आहे, ही काही सुग्रीवाची स्वतःची शक्ती नाही. त्याने श्रीरघुपती साहाय्यार्थ घेतला आहे. त्याच्याच बळाने हा युद्धासाठी पुन्हा गर्जना करत आला आहे. तुमचा घात करायला सुग्रीवाला रघुनाथ साहाय्य आहे. तुम्ही यातला अर्थ कळत नाही म्हणूनच बलोन्मत्त होऊन धाव घेता आहात. तुम्ही सुरनरांना जिंकले, दैत्यदानवांना मर्दिले, रावणाला काखेत कोंबलेत, परंतु श्रीरामापाशी तुमचे काही चालणार नाही. श्रीराम प्रतापी, तेजोराशी, सूर्यवंशीचा पूर्णावतार आहे. त्याचा प्रताप सांगते तो तुम्ही ऐकावा. ज़ी ताटका तिन्ही लोकांना प्रतिबंध करत होती तिला रामाने मारली. सुबाहूचे मस्तक छेदले, मारीचाला उडवले. चवदा हजार राक्षस आणि खर दूषण यांना रामाने मारले. हे सर्व त्याने बाणांनी विंधून केले. एकच बाण विंधून विराधाचा प्राण घेतला. काळच असा कबंध प्रतापी रामाने मारला. ज्या धनुष्याने रावणाची गांजणूक झाली ते धनुष्य रामाने सहज भंगले. जानकीशी विवाह केला. परशुरामाला जिंकले. श्रीरामाच्या बाणाच्या भयाने रावण भिक्षेकरी झाला. रावणाने मारीचाचा बळी देऊन सीतेचे चोरून हरण केले. श्रीराम धावून आला तर एकाच घावात प्राण घेईल या भीतीने मग रावण लंकेत पळून गेला. अशा दुर्धर पराक्रमी रामापुढे तुम्ही पाला खाणारे वानर युद्धासाठी बळ धरून जाता आहात. एकच बाण विंधून राम तुमचा प्राण घेईल. हे माझे सांगणे सत्य मानून तुम्ही युद्धासाठी जाऊ नका. श्रीरामाशी विरोध न करता, त्याच्याशी मैत्रीसंबंध करा. माझे हे सांगणे ऐका. आणि तुमचा युद्धाविषयीचा क्रोध सोडा."

वालीने तारेचे सांगणे ऐकून प्रत्युत्तर देताना म्हटले, "अगदी योग्य आणि सत्य असेच तू सर्व सांगितलेस. माझ्या मनात अणुमात्र देखील श्रीरामासंबंधी वैरभाव नाही. जे जे रामाचा विरोध करतील त्यांचा श्रीराम वध करील. हा शुद्ध बोध मला समजला. पण झाली कथा काय ते पाहा. ती ताटका लोकांना बाधा करत होती, सुबाहू यज्ञाला प्रतिबंध करत होता, विराधाने सीताहरण केले होते, कबंधाने दोघांना पकडले होते, शूर्पणखेचा कैवार घेऊन सीतेला पळवायला खर, त्रिशिरा आले होते यासाठी श्रीरामाने त्या सर्वांचा वध केला. माझे त्याच्याशी तसे कोणतेच वैर नाही. मारीच हा मारला कारण कपटी होता, रावणाने सीता पळवून वैर केले; तशा प्रकारचे विरोधलक्षण माझ्याबाबतीत नाही. मी तर एक केवळ निरपराध आहे, तेव्हा श्रीराम माझा कशासाठी वध करील. सुग्रीवाशी रणविरोध केला म्हणून श्रीरामाशी वैरसंबंध का व्हावा?" त्यावर तारा म्हणाली, "अहो, सुग्रीव श्रीरामाला शरण गेला आहे. श्रीराम हा शरणागतांचे सर्वार्थी संरक्षण करणारा आहे. यामुळे शरण आलेल्याचा विरोध करणारा तो श्रीरामाचाही शत्रू होतो. अशांचा श्रीराम स्वतः वध करतो हे आपण निश्चित लक्षात ठेवा. हे वानरराजा, शरणागताचा घात राम होऊ देणार नाही. यामुळे श्रीरामाशी वैर निर्माण होऊन तेच मग आत्मघाताचे प्रमुख कारण होईल. सुग्रीवाबरोबरचे वैर संपेल आणि रामाशी स्नेहसंबंध निर्माण होईल, असा माझा शब्द मानून, स्वतःशी काय तो बोध घ्या."

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

तारेचा उपदेश; वालीची प्रताप - प्रौढी

तारेने वालीला त्याच्या हिताचा उपदेश करताना पुढे सांगितले. "मी आपल्याला पुन्हा तेच सांगते कारण ते आपल्या हिताचे आहे. श्रीरामाशी सख्य केलेत तर त्रिलोकात पावन व्हाल. रामाशी सख्य कसे घडेल असा विकल्प जर आपल्या मनात आला असेल, तर माझ्या सांगण्याप्रमाणे कराल तेव्हा मी तो क्षणात साधीन." यावर वालीने "ज्यामुळे श्रीरघुनाथ आप्त होईल असे तुझ्या मनात जे काही असेल ते सांग." असे म्हटले. त्याबरोबर उल्हसित होऊन, पूर्ण हितकर असे वचन तारा बोलली. "तुम्हा बंधू-बंधूंमधला विरोध संपला, तर श्रीरामाशी पूर्ण सख्य होईल. युवराजपद सुग्रीवाला द्यावे, कारण त्यात आपलेच हित आहे. सुग्रीवाला यौवराज्यपद मिळाले की श्रीरघुनाथाला सुख होईल. त्यातून तुम्हा निघात ऐक्य आणि एकात्मतापूर्ण प्रेम निर्माण होईल. जसा तुला पुत्र अंगद प्रिय आहे, तसाच सुग्रीव कनिष्ठ बंधू आहे. त्याच्याशी असलेला विरोध सोडला तर श्रीरामाशी तुमचे मैत्रीसंबंध प्रस्थापित होतील." असे सांगून तारेने वालीचे पाय धरून विनविले, "श्रीरामाशी सख्य होण्यात सुख आहे. अहो कपिराज, आपण एवढे त्वरित करा."

तारा नंतर म्हणाली. "अंगदाला, रत्नालंकार, धन आणि वस्त्रे, घेऊन श्रीरामाकडे पाठवा. श्रीरामाला शरण जाऊन स्वतःला वाचवा. श्रीरामाला शरण गेल्याने तुमचे जन्म-मरण चुकेल. दोन्ही बंधूंची समजूत पटली की कृतकल्याण होईल. उलट जर श्रीरामाशी कपट कराल, तर किष्किंधा सोडून पळ काढावा लागेल; कारण युद्धामध्ये श्रीराम सबळ आहे. श्रीरामाच्या समोर जायला साक्षात् सुरासुरांनाही धीर होत नाही. तुम्ही तर वानर, पाला खाऊन राहणारे, तुमचा कसा टिकाव लागेल. श्रीरामाशी सख्य तरी करा, नाही तर सरळ पळ काढा. त्याच्याशी युद्ध कराल तर मराल. श्रीरामाचा बाण मेरुमांदारांनाही विदीर्ण करतो, तेथे तुझा काय पाड. उगीच हटाने प्राण देऊ नको. माझे सांगणे न ऐकता, तू मरणाशीच धरणे धरशील, श्रीरामाला विरोधच करशील, तर तुझे प्राण वाचणार नाहीत."

तारेचे बोलणे ऐकून, वाली कोपायमान झाला. तो म्हणाला, "तुम्ही स्त्रिया भित्र्या स्वभावाच्या असता. दुसऱ्याच्या प्रतापाने कापायला लागता. सुग्रीवाला युवराजपद मी कदापीही देणार नाही. त्याला श्रीरामाने साहाय्य केले तरी मी राज्य कदापी देणार नाही. त्या रामाचे बळ पाहून, हा वानर निर्बल आहे म्हणतेस; किष्किंधा सोडून पळ काढ असे प्रबळ भीतीमुळे बडबडतेस. तारे माझ्या शक्तीविषयी थोडे सांगतो, ते ऐक. श्रीरघुपती युद्धाला आला तरी माझ्या चित्तात कसलीही शंका नाही. बाहुबळाने विंध्यपर्वत रघुनाथाने उत्पाटला; समुद्रवलयांकित पृथ्वी एका बाणाने भस्म केली; त्याने चंद्र-ताऱ्यांसहित गंभीर गगन आणि सप्त सागर बाणाने शोषिले, तरी ह्या वानरवीराच्या मनात शंका येणार नाही. असा पुरुषार्थ प्रत्यक्ष डोळ्यादेखत रघुनाथाने केला, तरीही मला भयव्यथा बाधणार नाही उलट संग्रामाचाच मनात उल्हास येईल. रणात मरण्याची भीती बाळगतो त्याला ना यश ना पुरुषार्थ; तसा मी वाली नव्हे. मी रणात श्रीरामाला सुखी करीन. सुग्रीव बिचारा दास, श्रीराम रणवीर योद्धा, त्या रामाला मी वानर असून भिडेन. माझे दुर्धर युद्ध तू पाहाच. माझा पराक्रम पुरे, असा कोण योद्धा आहे जो रामाशी युद्ध करेल? माझे बाहू स्फुरत आहेत. श्रीराम समोर आलाच प्रतिज्ञेची हाक देऊन तर माघार न घेता युद्ध करीन" असे तारेला सांगून वाली युद्धासाठी आला.

वाली-सुग्रीव युद्ध, राम-वाली संवाद

सुग्रीव आणि वाली यांची दृष्टिभेट होताच, दोघेही मुठी आवळून, युद्धाच्या रागाने हट्टी बनून त्वरेने एकमेकांना भिडले. उरात, डोक्यावर मुठी

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Muthulakshmi Research Academy

गुडघे हाणत; धावून जाऊन शेपटीचे आघात करत; थपडा मारून एकमेकांना जमिनीवर पाडत; ते हट्टी महावीर झुंजत होते. सोन्याचा मुकुट सोन्याच्या माळा गळ्यात असा वाली शोभत होता; तर सुग्रीवाच्या गळ्यात कमळमाळा शोभत होत्या. त्या वीरांचा रणसोहळा चालू होता. मुठींचे, चपेटयांचें एकमेकांवर निष्ठुर आघात केले जात होते. एखाद्या पर्वताला गेरूने रंगवावा तसे दोघे रक्ताने रंगले होते. वसंतऋतूत पळस फुलावा, तसे रक्तरंगात रंगून ते वीर रणामध्ये वावरत होते. दोघेही युद्धक्रोधाने बलोन्मत्त होते. सुग्रीवाला पाहून, वालीने वज्रमुठीचा प्रहार केला तेव्हा सुग्रीव मूर्च्छापन्न झाला, पण धैर्याने उठून त्याने रागाने शालवृक्षाने वालीला ठोकले. त्या घावाने महाबळी वाली जमिनीवर मूर्च्छित होऊन पडला. वाली महावीर पडताच, वानरांनी हाहाःकार केला, त्या गर्जना ऐकून वाली तातडीने उसळून उभा ठाकला आणि दंड थोपटून, गर्जना करू लागला. क्रोधाग्नीने भडकून सुग्रीवही रणात धुमाकूळ करण्यासाठी पुढे झाला. सारखेपणाने तळपणे, उड्या घेणे, गती, विगती, उड्डाणे, क्षणात भूमीवर, क्षणात अंतराळी असे त्या दोघांचे युद्धकौशल्य चालू होते. दोघे अत्यंत समर्थ बलवान, एकमेकांना आटोपत नव्हते. कोणालाच सामर्थ्याने विजय मिळत नव्हता. वरदमालेने वाली बलवान तर श्रीराममालेने सुग्रीव बलवान, त्यामुळे त्यांचा रणसोहळा समबलाने होत राहिला. युद्धकंदनाने दोघांना घाम येऊन घामाने दोघेही क्षीण झालेले पाहून श्रीरामाने बाण सज्ज केला, तेवढ्यात वालीने सुग्रीवाला जमिनीवर पाडलेला पाहिला आणि आता वालीला न मारला तर पूर्वीसारखेच होईल असे श्रीरामाला वाटले.

सुग्रीवावर आक्रमण करून त्याला मारण्यासाठी वाली आकाशात उडाला; त्यावेळी श्रीरामाने बाणाने वालीला वेधला. सपिच्छ बाण लागून वाली धडपडला. जसा सर्प वारुळात शिरतो तसा तो श्रीरामाचा बाण वालीच्या हृदयकमळात घुसला आणि अंतकाळ आल्याने वाली मूर्च्छित होऊन पडला. ज्याप्रमाणे ईश्वर गुप्त राहून निमिषात निःपात करतो, त्याप्रमाणे श्रीरघुनाथ अतर्क्य राहिला आणि त्याच्या बाणाग्राने वालीवर घाव पडला. ज्याच्या ज्ञानाविषयी तर्क नसतो. अशा सद्गुरूचे वचन ऐकून शिष्य जसा समाधान पावतो; तसा श्रीरामाच्या बाणाने वाली सुखसंपन्न झाला. ज्याप्रमाणे धडधडणारा अग्नी सतीला स्पर्श करून सुखरूपता देतो, त्याप्रमाणे रामबाणाने वालीला सुखरूपता मिळाली. जगा शुद्ध, सात्त्विक असणारा ऊस टोकाला कठिण असला तरी शेवटी गोड असतो, तसा त्या दृष्टीने रामबाण उभयपक्षी सुखद ठरला. सुग्रीवाला अलौकिक सुख, वालीला त्याहून अधिक असे अलौकिक सुख लाभले. अशा प्रकारे एका बाणाने श्रीरामाने दोघांना सुख दिले. श्रीरामाच्या बाणाचा प्रताप असा की, सुग्रीव भयकंपित भ्रमत होता तो सुखी झाला. श्रीराम हा कृपाळू आणि चिद्रूप होता. श्रीरामाच्या बाणाच्या टोकाने दुःख झाले तरी परिणामी तोच परम सुख देणारा ठरतो. हे वालीच्या तोंडूनच श्रोत्यांनी ऐकावे.

वाली श्रीरामाला म्हणाला, "तू अधर्म करणी केलीस. मी दुसऱ्याशी युद्ध करत असताना तू गुप्त राहिलास आणि तुझ्या समोर न आलेल्या माझा घात केलास. तुझा यात काय पुरुषार्थ? एकाएकी, मला न बोलवता, समजून न येता, घात केलास. हा तुझा अधर्म पाहून माझ्या मनाला अत्यंत दुःख वाटते. राज्य गेल्याचे दुःख नाही की तारेचा वियोग झाल्याचे मला दुःख नाही. मला फार वाईट वाटते ते तुझी अधर्मता पाहून. सुहृदांचे दुःख मला बाधत नाही, अंगद पुत्राचा शोक मला बाधत नाही; पण अधर्म पाहून मात्र मला परम दुःख होते आहे. एखादा निद्रिस्त असताना, आपल्या प्रिय स्त्रीशी रममाण झाला असता, एखाद्याने बोलावले नसता किंवा एखादा लक्ष देत नसताना, त्यांचा वध करू नये असे आहे. श्रीरामा तू सर्वज्ञ असून शास्त्रार्थ जाणतोस; तरीही अधर्माने माझा घात करून, तू

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

अपयश माथ्यावर घेतले आहेस. तू चंद्राहून निर्मळ, नित्य, निर्दोष अशी तुझी श्रीरामा ख्याती, असे असून अधर्माने घात करण्याचा कलंक तू स्वतःवर बसवून घेतलास. सुग्रीव तो बापडा, तुला सीतेच्या शोधासाठी काय साहाय्य करणार? तेच जर तू मला सांगितले असतेस तर मी कशी ख्याती केली असती ते ऐक.''

''श्रीरामा, अरे रावण माझ्या काखेत मावणारा, त्याला गळ्याला बांधून, पळभर वेळ न लावता आणला असता. तू माझे बळ जाणत नाहीस. समुद्राच्या पाण्यात, सप्त पाताळात, लोक-अलोक पर्वतात कुठूनही मी जानकीला शोधून आणून, तुझ्याजवळ क्षणात आणली असती. चार समुद्रात प्रातःकाळचे स्नान करायला मला क्षणकालही लागत नाही. माझ्या बळापुढे रावण तुच्छ आहे. मी सीता आणून देतो. मला जर तू हा विचार सांगितला असतास तर सीता, रावण सहपरिवार अशी लंकाच संपूर्ण उपटून येथे आणली असती. सुग्रीवासाठी पक्षपात करून, अधर्माने माझा घात करून श्रीरामा तुझ्या माथ्यावर अपयशच आले; कीर्तीच्या माथ्यावर अपकीर्ती आली. श्रीरघुपती येथून पुढे जरी कितीही कीर्ती मिळवलीस तरी या अधर्माने घात करण्याची अपकीर्ती तिळभरही कमी होणार नाही. मी राज्यहरणामुळे किंवा मला मरण आले म्हणून शोक करणार नाही. श्रीरामचरणापाशी अधर्म घडला ह्यामुळे माझे मन दुःखी झाले आहे. सेवकाने अशी कीर्ती करावी की जगाने स्वामी आणि सेवकाला वंदन करावे. सुग्रीवाने श्रीरामाला असे गौरविले की त्या किर्तिवंताची अपकीर्ति व्हावी. श्रीरामा सुग्रीवाने तुझ्यावर असा काय उपकार केला किंवा मी काय अपकार केला, असा विचार न करताच तू एवढ्या त्वरेने माझा का वध केलास? समोर येऊन युद्धात मला मारले असतेस, तर मला मरणाचा आनंद झाला असता, तुला त्रिलोकांत कीर्ती मिळाली असती. त्यामध्ये तू चुकला आहेस. अधर्माने वालीचा वध केल्यामुळे श्रीरामाने माझा उद्धार केला म्हणजे मला यश मिळाले आणि तू अपयशी ठरलास. केवढी विशेष कीर्ती तू केलीस! श्रीरामाच्या हातून मला मृत्यू आल्यामुळे मी त्रिलोकात पवित्र ठरेन; श्रीरामा तू मात्र तुझे तुला दूषण लावून घेतलेस, कारण तू अधर्माने बाण सोडलास.'' वालीचे निंदा करणारे भाषण ऐकून, श्रीरामाने दुःख मानले नाही; उलट त्याने गुह्य आणि हितकर असे धर्मवचन वालीला ऐकवले.

श्रीराम म्हणाला,''इतरांना स्वधर्म शिकवणारे आणि स्वतः अधर्म आचरणारे जे असतात त्या मूर्खांची बडबड सत्य मानणारा तो महामूर्ख ठरतो. मी बाण मारल्याविषयी सांगतोस तेव्हा स्वधर्माच्या गोष्टी करतोस; परंतु आपल्या अधर्मपूर्ण आचरणाकडे आत्मदृष्टीने का पाहात नाहीस. कन्या, भगिनी, वहिनी या सर्व कन्येसमान असतात. तू बंधूची पत्नी हरण करून तिचा उपभोग अनुदिन घेतलास. तारेसारखी पतिव्रता, सुंदर, तुझी पत्नी असताना तू भावाच्या पत्नीशी अधर्माने संसर्ग ठेवलास. त्या तुझ्या अशुद्धतेत तुला शुद्धता भासली काय? ज्याप्रमाणे स्फटिक हा मुळात नित्य निर्मळ असतो; पण त्याचा काजळाशी संपर्क आला की त्याची शुद्धता तत्काळ जाऊन तो संपूर्ण काळा दिसतो; तेव्हा काजळामुळे जरी स्फटिक काळा दिसला तरी तो काळेपणाहून वेगळा असतो; त्याप्रमाणे पाप-पुण्याहून राम वेगळाच असतो कारण तो चित्कलास्वरूप, चिन्मूर्ती आहे. नभामध्ये थोडी सुद्धा निळाई नाही, निळे असते डोळ्यातले बुबुळ, त्यामुळे नभ निळे दिसते; म्हणजे डोळ्यातले रंग नभात दिसतात; मी राम नित्य शुद्धात्मा असून तू मला अधर्मकर्मा म्हणतोस. तुझ्या पापभ्रमाचा छेद करण्यासाठी तो अगाध महिमा असलेला बाण आहे. तुझ्या ठिकाणी सदोषत्व आणि पाप असल्यावर मी तुला सन्मुख होईन कसा; तुझे महादोष नष्ट करण्यासाठी तर मी अतर्क्य बाणाने वेध केला.''

https://archive.org/details/@lakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

"मी विश्वात्मा, विश्वतोमुख, साधुसंतांना नेहमी सन्मुख असतो. तू पापात्मा असून नेहमी विमुख असतोस, यासाठी बाणाने तुला निर्दोष केले. अतर्क्य राहून बाण वेधून तुझी पापात्मता छेदली. कृपेने तुला आता भेटलो ते तुला तारण्यासाठी. तुला तारण्याचे कारण हेच की तू सुग्रीवाचा बंधू आहेस. तुझा नरकवास चुकविण्यासाठी, बाणाने तुझ्या पापाचे मी निर्दाळण केले. माझ्या शरणागताचा बंधू आणि त्याला नरकवास झाला हे शब्दच मला सहन होत नाहीत; म्हणून मी बाणाने तुला शुद्ध केला आहे. विकल्प करण्याची वृत्ती सोडून जो जो माझ्या भक्तांच्या संगतीत राहील, त्यांचा त्यांचा मी उद्धार करतो. वाली हे तू निश्चित समज. तुझ्या ठिकाणी दारुण पाप असल्यामुळे यमाने तुला पूर्ण शिक्षा दिली असती. परंतु ती चुकविण्यासाठी मी बाणाने तुला वेधले. महापापी असेल त्याला जप करावा लागतो." अशा प्रकारे श्रीरामाच्या कृपेचा प्रताप म्हणून वालीचे पाप संपले आणि वाली पश्चात्ताप पावला.

नंतर वाली श्रीरामाला म्हणाला, "राज्यमदाने मी धुंद होऊन पूर्णतया पापच करत राहिलो. तू बाण सोडून अकल्पितपणे पापाचे निर्दाळण केलेस. तुझ्या बाणाने वेधला गेल्यावर माझा त्रिविध अभिमान, कुलाभिमान, कर्माभिमान, शौर्याचा गर्वाभिमान हे सर्व छेदले गेले ही तुझीच कृपा./तुझा बाणाच्या प्रतापाने संकल्प, विकल्प, पाप-पुण्य हे सर्व छेदून मी नित्य निष्पाप झालो. मला माझ्या अचाट पराक्रमाचा गर्व झाला, त्यामुळे समोरून युद्ध न करता दुश्चित्ताला मारण्याला मी अकर्म, अधर्म मानून श्रीरामाला दूषण दिले; मी पूर्णपणे महापापी आहे. श्रीराम, जो परब्रह्म, परमात्मा आहे, त्याचे वर्म न जाणता, मी त्याला अधर्मी म्हटले. श्रीराम हा स्वधर्म-कर्म-रहित आहे हा मुख्यार्थ न जाणता मी प्रवृत्तीच्या ज्ञानाने त्याला अधर्मरत मानले. रामा, तुझा बाण हृदयात गेल्याने ते पूर्णतया शुद्ध झाले./ आता अनुभव आला की श्रीरघुनाथ हा परब्रह्म आहे. सीतेचे हरण, रामाचा शोक हे सर्व लटके असून, तू दीनांचा उद्धार करण्यासाठी वनात वनवासी म्हणून विहरतो आहेस. रघुनंदना, तू वनात येऊन तृण, पाषाण यांचा उद्धार केलास. दीन जनांना पावन केलेस. रामा तू जगदोद्धारक आहेस. ईश्वर मायेचे नियंत्रण करतो; तू त्याही पलीकडे आहेस. तुझ्या स्वरूपाची स्थिती श्रुतिशास्त्रांनाही न दिसणारी आहे. श्रीरघुनाथा, अशी तुला कर्म-ज्ञान यांची योग्यता समजत असल्यानेच अधर्माने तू माझा घात केलास. पण मी ते जाणले नाही म्हणून मला क्षमा कर. पाण्यापाशी मीठ आले की ते पाण्यातच विरघळून जाते. मोती मात्र कठिण असल्याने पाण्यात विरघळत नाहीत. ते मोतीपणाने मूल्यवान ठरून, स्त्रीच्या ओठापाशी फासात पडतात; मोतीच नाकात येतो आणि त्याला कठिणपणानेच अभिमान चढतो. हा कर्म-धर्म-अभिमान, हा सज्ञानपणाचा ज्ञानाभिमान हे जळू देत. त्या अभिमानाच्या बंधनानेच मी तुझी निंदा केली. कर्मज्ञानाच्या धारणेने मी दुष्टपणे तुला दूषणे दिली, तुझी निर्भत्सना केली. हे कृपाळू कृपामूर्ती रामा मला क्षमा कर." वालीने असे म्हणून रामाला लोटांगण घालून, त्याचे पाय मस्तकी घेतले आणि क्षमा करण्याची विनंती केली.

वालीची रामाला विनंती, रामाचे आश्वासन

"श्रीरामा माझ्या मनात जे जे आहे ते मी तुला सांगतो. माझ्या मनात अंगदाविषयी काही एक आहे ते ऐक. माझ्यासारखाच माझा पुत्र अंगद बलवान आहे. ह्या माझ्या लाडक्या पुत्राला युद्धाची आवड आहे. त्याची ती आवड तू पूर्ण कर. हा सुवर्णाची भूषणे ल्यायलेला माझा पुत्र तुला युद्धामधे साहाय्य करील. यासाठी त्याला तुझ्या पायावर घालतो; त्याच्यावर हे कृपासागरा कृपा कर." नंतर अंगदाला रामचरणी निरवून वाली सावध झाला. श्रीरामाचे मुख पाहून उल्हासाने

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

म्हणाला, "तुझे शाश्वत पद हे सच्चिदानंदघन आहे. ते प्राप्त करून घेण्यासाठी मी प्राणत्याग करतो आहे." हे बोलून वालीने डोळे रामचरणावर दृढ केले. वालीचे प्रेम पाहून श्रीरघुनंदन कृपादृष्टीने कळवळला. नंतर स्वतः राम वालीला म्हणाला, "वाली, मी तुझ्या शरीरातला बाण उपटून तुझे प्राण स्वसामर्थ्याने वाचवीन. मग तू संपूर्ण सुखभोग अनुसरशील. सीतेच्या शोधामधे तू मला अवश्य साहाय्यकारी होशील. तू तारा, अंगद, राज्य यांचे सुख भोगावेस. मरणाची इच्छा धरू नकोस. रावणाच्या गळ्याला बांधून आणीन, सीतेला सोडवून आणीन हे तुझे बोलणे तू खरे करून मला साहाय्य कर."

श्रीरामाचे बोलणे ऐकून वालीचा चेहरा हसरा झाला, तो रामाला म्हणाला, "पूर्वीचा माझा बळाचा गर्व तुझ्यापुढे उरलाच नाही. सूर्यापुढे जसा काजवा, त्याप्रमाणे रामाला पाहून माझे सर्व बळ विरून गेले, कारण तुझ्याठायी अद्‌भुत तेज आहे. तुझ्या स्वतःच्या प्रतापापुढे रावण म्हणजे दहा तोंडाचा किडा आहे. तेव्हा मी क्षुद्र चिलट तुला साहाय्य काय करणार? तुझ्यामधेच अपार सामर्थ्य आहे. तुझ्या बाणापुढे रावण बापडा काय होय. त्रैलोक्याचेही निर्दाळण करण्याचे सामर्थ्य तुझ्यामधे आहे. स्त्री आणि पुत्र यांचे सुख भोगण्यासाठी जीव वाचवावा; तर स्त्रीभोग म्हणजे परम दुःख असे मी निश्चित मानले आहे. तुझी भुवई जरी क्रोधाने वाकडी झाली तरी अखिल सृष्टी रणात आटून जाईल. तेथे वानराच्या साहाय्याच्या काय गोष्टी कराव्या. तो कपटी रावण तरी कशाला उरणार आहे. स्त्रीभोगाचा परिणाम सख्या बंधूशी वैर करायला लावतो. स्वार्थ हा घातक असून त्यामुळे दुर्धर क्रोध निर्माण होतो तेव्हा तो विषयच नको. श्रीरामा तू नित्य विवेकी आहेस. विषयोपभोगाने उभय लोकात तरी कोणी सुखी झाला आहे काय? विषयोपभोग हा मुळातच दुःख देणारा आहे. योगसाधन न करता तुझ्या समक्ष देहत्याग झाल्याने मी कृतकृत्य होईन. तू पूर्णत्वाने ब्रह्मपरिपूर्ण आहेस. अंतकाळी अवचित जरी रामनामस्मरण केले तरी परमपदप्राप्ती होते. या पूर्णतेनंतर जन्ममरण तरी कुठले? हे रघुनाथा, आजच्या सारखे मरण पुढे मिळणार नाही. माझ्या हिताचा विचार करून माझे सांगणे ऐक."

वालीने रामस्तुती करताना म्हटले, "रामनामाच्या उद्‌घोषाने आकल्प दोष जळून जातात. शेवटी परमपद प्राप्ती होते. रामनामाची ही नित्य राहाटी आहे. एवढी ज्याच्या नामाची ख्याती तो तू स्वतः रघुपती अखेर कृपा करून भेटलास. तेव्हा आता मला जगणे नको. मला विषयाचरण किंवा जन्ममरण नको आहे." अशा शब्दात मनोगत व्यक्त करून, वालीने भक्तिपूर्वक रामचरण धरून विनंती केली की, "तुझा बाण लागताच मी पावन झालो. तुझ्या करकमळाचा स्पर्श होताच मी सुखाने मरणाची इच्छा धरली असून, मी नित्यमुक्त झालो आहे. तुझ्यामुळे मला निश्चित सच्चिदानंदपद प्राप्त होणार."

श्रीरामाने वालीचे म्हणणे ऐकल्यावर, त्याच्या हृदयात शिरलेला बाण आपल्या हाताने उपडून काढला. नंतर रामाने आपल्या अमृतहाताने स्पर्श केला. श्रीरामाचा हात लागताच वाली देहातीत झाला. श्रीरामाने वालीला बंध-मोक्षाच्या पलीकडे केला. श्रीरामाचा हात वालीच्या मस्तकावर ठेवला जाताच वालीला सृष्टी सुखरूप झाली; रामकृपेने त्याची परमानंदाशी एकरूपता झाली. 'मी सुग्रीवाशी वैर केले; पण सुग्रीव खरा परम सख्खा बंधू आहे. त्याच्यामुळेच परमानंद आणि सुखावबोध श्रीराम प्राप्त झाला. या रीतीने विचार करत वालीने वानरदेहाचा त्याग केला आणि रामकृपेने आत्मपदी पूर्णत्वाने विनटला. वालीने विरोधातून रामाला आपलासा केला आणि रामाने वालीचा उद्धार केला.

https://archive.org/details/bhavarthramayan · Bhuvan Vani Trust, Lucknow · Sarayu Foundation Trust

CC-0. In Public Domain. Digitized by Muthulakshmi Research Academy / Sarayu Foundation Trust and eGangotri

अध्याय सातवा

श्रीरामाच्या बाणाच्या आघाताने वाली पडलेला पाहून वानरसेना भय आणि संकट यांनी घाबरून तातडीने पळाली. बाणाने वेधून वाली मारला; तसाच सैन्यावर बाण सोडून श्रीराम सर्वांचा प्राण घेईल या धाकाने वानर पळाले. श्रीरामाचा बाण अत्यंत दुर्धर असून, त्याच्या घावाने त्रिशिरा, खर, चवदा हजार राक्षस सत्वर निर्दाळले. श्रीराम शिल्लक ठेवत नाही; दिसेल त्याला मारतो. त्यामुळे भयग्रस्त झालेला वानर-समुदाय किष्किंधेत पळाला. चळाचळा कापत ते सर्व वानर किष्किंधेत आले. त्यांनी, वालीचा श्रीरामाने वध केला, ही वार्ता सांगताच नगरीत आकांत झाला.

तारेचा सहगमनाचा निश्चय, रामाला दूषण

किष्किंधेतील मोठमोठ्या योद्ध्यांनी तारेला दुर्ग बळकट करण्याची, चारी द्वारांना बंद करण्याची आणि अंगदाला राज्यावर बसवावे अशी विनंती केली. वालीच्या मरणाचे वृत्त आले, तेव्हा अंगदाला हाताला धरून, आक्रंदन करत तारा निघाली. "वालीचे मरण झाल्यावर अंगदाची, राज्याची काय गोष्ट! मी तत्काळ माझ्या देहाचा त्याग करीन. कसले घर-दार, दुर्ग, नगर; कशाचा प्रधान, परिवार, मी मरणच पसंत करते". श्रीरामाने वालीच्या हृदयाचा भेद करणाऱ्या बाणाने वालीचा प्राण घेतला. मृत अशा वालीला पाहून तारेला मूर्च्छा येऊन, ती धरणीवर पडली. नंतर ती आक्रंदत उठली; दुःखाने कपाळ बडवू लागली; जमिनीवर गडबडा लोळत राहिली आणि आक्रोश करत छाती पिटू लागली. तिचे केस मोकळे सुटलेले होते; डोळ्यातून अश्रू वाहात होते; पुनःपुन्हा जमिनीवर लोळत, ती दुःखाने रडत होती. "माझे पूर्ण वैभव गेले; भोगभवन गेले; सुखसौभाग्य लुबाडले गेले; माझे निधान असा पती वाली अंतरला. जिचा पती जातो ती स्त्री नाश पावते. ती धर्मकार्यात उपयोगी पडत नाही; शुभकार्यात ती अशुभ मानली जाते." असे म्हणून तारेने अलंकार, वस्त्रे, भूषणे यांचा त्याग केला आणि पतीबरोबर सहगमन करायचे म्हणून गळसरी तेवढी ठेवली. तिला अनेक वृद्ध स्त्रियांनी सांगितले की, "अंगदासारखा पुत्र असताना, सर्व राज्य हाती येणार असता, व्यर्थ देहत्याग का करतेस?" त्यावर तारेने म्हटले, "पतीच्या सुखाला समान असे कोणीच नसते. त्याविषयी सांगते ऐका."

तारा पुढे म्हणाली, "पिता समर्थ असेल तर तो कन्येला बेताचे देईल; बंधूला राज्य प्राप्त झाले तरी ठराविक संपतीच बहिणीला मिळेल; पुत्र राज्याधिकारी झाला तर तो मातेला ठराविक उपचार देईल; पण पती हा पत्नीला सर्व सत्ता देतो. तेव्हा त्याच्यावाचून शरीर कशाला वाचवू? त्या पतीमुळे गजांत लक्ष्मी प्राप्त होते आणि पत्नी म्हणते मी स्वामिनी. हे पिता किंवा पुत्र यांच्याकडून होत नाही. पतीबरोबर सहगमन न करता मागे राहून जे मरण येते, ते निंद्यच मानावे. विधवेचे ते अधःपतन आहे. धर्मकर्मअर्थविहीन अशी विधवा स्त्री प्रेतासारखीच होय; हे श्रुतिशास्त्राचे वचन आहे, मग वैधव्याचे काय सुख? पतीसह सती झाल्याने इललोकी पुण्य आणि परलोकी मुक्ती अशी प्राप्ती होते, ती सोडून राज्य, पुत्र यांच्यापासून कसले सुख मिळणार आहे!" नंतर जेव्हा तारा पतीच्या देहाला आलिंगन द्यायला गेली. त्यावेळी तिला श्रीरामाचा बाण वालीच्या हृदयांत घुसलेला दिसला त्यामुळे तारा उद्विग्न आणि दुःखी झाली. आपला पती मरण पावला, त्याच्या प्रेतालाही आलिंगन देणे रामाने वैराने अशक्य केले. तेव्हा तारा रागाने बोलली.

तारा पतीच्या निधनाने दुःखाच्या आवर्तात सापडून मनातून अत्यंत संतापली. तिने श्रीरामाला शाप दिला. त्याची वार्ता ऐका. "श्रीरामा, तू लंकापतीचा युद्धात पराभव करून सीता प्राप्त करून घेशील; पण ती तुझ्याबरोबर न नांदता पुन्हा वनवासात जाईल. श्रीरामा तू बळजबरीने

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

तिला अयोध्येत नांदणे नाकारून वनात पाठविशील. नंतर माझ्यासारखेच दुःख भोगशील. वनवासात असताना वनातच ती लहु आणि कुश या पुत्रांना जन्म देईल. तिकडे बारा वर्षे श्रीराम अयोध्येत दुःखात राहील. लंकेत दिव्य करून सीता तिन्ही लोकात मान्य होईल. आता तिला वनात धाडायचे काय कारण? असे होऊन जग तुला अन्यायी म्हणेल. वालीचा तू विनाकारण वध केलास हे अपयश तुझ्या माथी बसलेच आहे; पुढे सीतेला वनात धाडून रघुनाथा दुसरे अपयश तुझ्या माथी येईल. पुत्रांच्या युद्धानंतर सीतेला तू अयोध्येत आणशील, परंतु ती तुझ्याबरोबर नांदणार नाही, ती धरणीमध्ये परत जाईल.''

वालीकडून तारेला उपदेश

तारेने श्रीरामाला शाप दिलेला ऐकून वाली पुन्हा सावध झाला आणि तारेला उद्देशून म्हणाला, ''हे मूढमती, पतिव्रते, तू महासती आहेस, तेव्हा रामाला तू शाप देऊ नको. तो तर परमात्मा परब्रह्म आहे. माझ्या अंगी जोवर विषयासक्ती होती, तोवर श्रीराम हा ब्रह्ममूर्ती आहे असे मला ओळखता आले नाही; परंतु त्याच्या बाणाने माझी विषयासक्ती छेदली गेली आणि मग मला स्फूर्ती आली. श्रीरामबाणाची हृदयाशी भेट झाली की जगाचे दोष आणि गुण जाणवतच नाहीत. श्रीराम पूर्ण ब्रह्म आणि संपूर्ण जग श्रीरामरूप दिसते. तो बाण नसून आत्मबोध आहे. त्याने माझ्या मनातला भेद संपूर्ण नष्ट केला. त्यामुळे मला परमानंद, आनंदकंद श्रीराम प्राप्त झाला. तुलाही जर बाण लागला असता तर तूही कल्याण प्राप्त करून घेतले असतेस. त्यामुळे जगाचे दोष आणि गुण न पाहता श्रीराम पूर्ण परमात्मा पाहिला असतास.''

नंतर वालीने तारेला सांगितले की, ''माझ्याबरोबर तू सती जाऊ नको. तू आपले जीवन श्रीरामाला अर्पण करावेस. तेच पातिव्रत्य त्रिजगतात सत्य ठरेल. प्रेताबरोबर मरण नको. प्रेताच्या प्रेमाने अग्नीत प्रवेश केला तर त्या सती प्रेतभूत होतात. पुढे डाकिणी भोग मिळवून जन्माला येतात आणि विषयांचा भोग भोगतात. तसे तू करू नयेस. जीवित रामार्पण करावे. श्रीरामाचे वचन अणुप्रमाण मानून, त्याचे उल्लंघन करू नये. अंगदाच्या हाताला धरून आणून तोही रामार्पण करावा. श्रीरामाची कृपा होण्यामुळे संपूर्ण सुख-प्राप्ती होईल.'' असे तारेला युक्तीचे वागणे सांगून वाली नंतर सुग्रीवाला आनंदाने म्हणाला, ''तू रामप्राप्ती करून घेऊन त्याचा जिवलग सहकारी झालास. मी तुझ्याशी वैर केले, पण तू माझा प्रिय बंधू; म्हणून श्रीरामचंद्राची भेट घडवून माझ्यावरचा यमप्रहार चुकवलास. माझा भयशोक, माझे जन्ममरणाचे दुःख चुकविलेस आणि श्रीरामाच्या प्राप्तीचे परम सुख मिळवून देऊन मला अलौकिकाची प्राप्ती करून दिलीस. तुझा मी कसा उतराई होऊ! तुझ्यामुळे मला अगाध सुख मिळाले आहे. आता मी जे काही थोडे देतो आहे त्याचा कृपा करून स्वीकार कर.''

''मी उतराई व्हावे म्हणून किष्किंधेचे संपूर्ण राज्य देतो, त्याचा स्वीकार कर. तू माझा प्रिय सखा आहेस. सुषेणाची कन्या तारा ही सारासार विचार करणारी आणि चतुर आहे. तिचा विचार लक्षात घेऊन राज्यकारभार चालवावास. अंगदाला युवराजपद देऊन, त्याला लळा लावून सांभाळ. तूच त्याचा पिता आणि तूच त्याची माता. त्याला श्रीरामाच्या भक्तीला लाव. मोठ्या शत्रूंना जिंकण्यासाठी अंगद हा महावीर तुझ्या पुढे होईल. लंका जिंकून रणात राक्षसांचा घात करील. श्रीरामाचे आम्हाला बळ आहे. आम्ही त्याच्यामुळे सबळ आहो. तुम्ही सर्वजण श्रीरामाला भजा कारण तो केवळ परब्रह्म आहे. श्रीराम सद्गुरू, आमचा आप्त, आमचे सर्वस्व, आमचे कुलदैवत आहे हे निश्चित. तारा, अंगद आणि सुग्रीव ह्या तिघांनी भक्तीने श्रीराम भजावा म्हणजे त्यांची त्रिलोकी कीर्ती होईल. तीच आम्हाला अपूर्व ठरणारी आहे.''

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

सुग्रीवाने वालीचे बोलणे ऐकल्यावर त्याला साष्टांग दंडवत घातले, त्याचे पाय मस्तकी धारण केले, आणि नंतर म्हणाला, "तुझ्या वैरामुळे ताटातूट झाली आणि त्यामुळे स्वामी श्रीराम जोडला गेला. त्यामुळे वैराची पूर्ण शांती झाली. तुझे मी किती उपकार मानू! मी-तूपणाचे वैर संपले आणि सुखाने भवसागर उतरलो. आपल्या वंशाचा उद्धार झाला. वाली, तुझेच हे उपकार आहेत. तारेच्या वचनाचे उल्लंघन मी करणार नाही. अंगदाला युवराजपद देईन. श्रीरामाची सर्वस्वी भक्ती करीन ही मी तुला शपथ देतो. आम्ही वनात राहणारे, पाला खाणारे, विषयोन्मत्त वानर, त्या आम्हाला श्रीरामचंद्र जोडता आला, हाही तुझाच उपकार आहे वाली." सुग्रीवाचे बोलणे ऐकून वाली सुखसंपन्न झाला. तो आपली विजयमाला सुग्रीवाला द्यायला उल्हसित झाला.

वालीचे निधन, तारेचा विलाप

"कश्यपांनी वृत्रासुराच्या वधाच्या प्रसंगी इंद्राच्या गळ्यात जी वरदमाला घातली होती ती पाहून शत्रू विन्मुख होतात. ही माळ समोर पाहताच धाकाने वैरी विमुख होतील. त्यामुळे विजयश्री मिळून तिन्ही लोकात त्याचे कौतुक होईल. अशी ही माळ इंद्राने मला दिली." असे सांगून ती सुवर्णमय माला वालीने, सुग्रीवाला प्रथम आलिंगन देऊन, नंतर अर्पण केली. पुढे वाली म्हणाला, "सुग्रीवा, ही विजयमाला मी तुझ्या गळ्यात घातली आहे तेव्हा आता तू कळिकाळालाही आवरणार नाहीस. आता वानरांच्या राज्याचे सुख उपभोग. ह्या विजयमाळेची प्राप्ती, श्रीरामाची सेवावृत्ती, यामुळे तुझी कीर्ती त्रिभुवनात विस्तारेल. तू श्रीरामाचा नित्याचा सेवक हो." असे सुग्रीवाला सांगून, श्रीरामाला नमस्कार करून, रामस्मरण करत वालीने देहत्याग केला. तो परमगतीला पावला. वालीने प्राण सोडल्यावर तारा अत्यंत दुःखी होऊन श्रीरामापाशी आली. ती म्हणाली, "श्रीरामा, वैधव्याचे दुःख मला क्षणार्धही सहन होत नाही. तेव्हा मी मागते आहे ते मला अवश्य देण्याची कृपा कर. माझे हे निर्वाणीचे मागणे आहे, तू कृपणपणे नाही न म्हणता माझ्याबाबतीत उदार होऊन कृपा कर. तू ज्या बाणाने वालीचा वध केलास, त्याच बाणाने माझाही वध कर. आम्ही दोघे एकदमच जाऊ. वियोग होऊ देऊ नकोस. पत्नीच्या वियोगाचे दुःख तू भोगले आहेस. माझा बाणाने वध करून मला माझ्या पतीकडे पाठव. वाली माझी वाट पाहात तिष्टत राहिला असेल; तेव्हा मलाही तिथे पाठव; त्याने हे रामा, अद्‌भुत पुण्य मिळेल. मला वालीकडे पाठविलेस तर तुला पत्नीदानाचे फळ मिळेल. पत्नी भेटविली तर पुण्याच्या राशी जोडल्या जातात." हे तारेचे भाषण ऐकून सखोल प्रवृत्तिशास्त्र फोल ठरविण्यासाठी श्रीरामाने तारेला समजावले.

श्रीरामाकडून तारेचे सांत्वन, तिला उपदेश

श्रीराम तारेला म्हणाला, "तारे, तू देहाला पती मानतेस की जीवाला पती म्हणतेस, हे मला स्वच्छपणे सांग. देहाला पती मानत असशील तर तो तुझ्यापाशीच आहे; असे असताना शोक का करतेस? अत्यंत उल्हासाने त्याचा भोग घे. जर जीवाला पती मानत असशील तर तू त्याला पाहिलेलेच नाहीस. मग गेला, गेला काय म्हणतेस? व्यर्थ मूर्खपणे तू वैधव्याचा विचार करते आहेस. जीवाला मरणे-जगणे, खाणे-भोगणे, येणे-जाणे यातले काहीच नसते. त्यामुळे तो गेला म्हणणेही खोटेच आहे. जीव चिदानंदस्वरूप आणि चैतन्यपूर्ण असतो; तो सर्वात, सर्वत्र परिपूर्ण असतो; त्यामुळे त्याला गमनागमन नसते. मग तू वृथा शोक का करतेस? घटाची घडामोड अनेकदा आणि अनेकप्रकारे होत असली तरी घटातील आकाशाची कधीच घडामोड होत नसते; त्याप्रमाणे देहाचा नाश झाला तरी जीव हा नित्य अविनाशी असतो. जरी घटात तूप किंवा मद्य काहीही भरले तरी

https://archive.org/details/@sarayu_foundation_trust, Lakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized By Sarayu Foundation Trust and eGangotri

त्याचा घटाकाशाला लेप नाही; तसेच देहाचे पापपुण्य जीवात्म्याच्या आत्मप्रकाशरूपात प्रवेश करत नाही. आत्मा परिपूर्ण असाच नेहमी राहतो; कर्मधर्म-विरहित आणि सुखदुःखापासून अलिप्त राहातो. मग तू व्यर्थ दुःख का करतेस?

नंतर तारेने श्रीरामाला विचारले, "देह हा तर लाकडासारखा जड आहे. त्याला सुख-दुःखाचा साक्षात् स्पर्श नाही. आत्मा सबाह्य चैतन्यघन असल्याने तेथेही सुख-दुःख समाविष्ट नसते. मग हा सुख-दुःखांचा परिणाम कोणाला बाधतो रामा? याचा मला तू उलगडा करून सांग. तसेच मला दुःखाच्या पलीकडे कसे जाता येईल? असे काही सांग." हे तारेचे प्रश्न आणि तिची विनंती ऐकून श्रीराम तिला म्हणाला, "जोंवर देहात देहाभिमान आहे तोवर त्या अविवेकीच्या ठायी दुःखबंधन असते. जर देहात सबाह्य चैतन्यघनत्वाची जाण असेल तर तेथे देहाभिमान मिथ्या भासतो. ज्याप्रमाणे दोराच्या ठिकाणी सर्प भासावा तसे हे असते आणि देहही संपूर्णतया खोटा आहे. जन्ममरण हा देहसंभ्रम; तहानभूक हा प्राणधर्म; विषयांचे भोग हे इंद्रियांचे इंद्रियकर्म असे ते आहे. सुख, दुःख, भय, शोक हे सर्व अवश्य मनोधर्म आहेत. हरि, हर, ब्रह्मा हे त्रिगुणात्मक, तर संसार हा कल्पनेने झालेला आहे. आत्मा हा गुणात गुणातीत, देहात असून देहबाधेपासून अलिप्त असतो. आता विषयांसंबंधीचा दृष्टान्त सांगतो तो मनःपूर्वक ऐक,"

"स्फटिक हा कृष्णवर्णाने काळा, पीतवर्णाने पिवळा, आरक्तवर्णाने तांबड्या प्रभेचा दिसतो; पण वास्तविक तो तिन्ही रंगांपेक्षा वेगळा असतो. त्याप्रमाणे आत्मा हा संसारात त्रिगुणात्मक भासला तरी तो गुणातीत असतो. असा ज्याने परमार्थ जोडला असेल त्याला सुखदुःख प्राप्त होत नाही. अशी आत्मप्राप्ती होण्यासाठी सत्संगती ही आवश्यक आहे. त्या संगतीने विषयविरक्ती येते आणि परमार्थातला अधिकार प्राप्त होतो. उपदेशाने संशय निवृत्ती करणारा, नित्य परमानंदात मग्न असणारा, अशा सद्‌गुरूपासून सुनिश्चित परमार्थ साधावा. वेदाने म्हटल्याप्रमाणे, सप्रमाण सद्‌गुरूचे वचन ऐकून देहाचे देहपण हे मिथ्या मानून नेहमी चैतन्यावर लक्ष केंद्रित करावे." हा श्रीरामाचा उपदेश ऐकल्यावर तारेने आपले लक्ष चैतन्यघनावर केंद्रित केले. त्यामुळे तिला परमानंद स्थितीतली मूर्च्छा आली. श्रीरामाच्या कृपेने ती पूर्णपणे देहाभिमान विसरली. मग तिने रामापुढे लोटांगण घालून त्याच्या पायांना वंदन केले. ती म्हणाली, "वालीने स्वतः सांगितले होते की श्रीरामाचे वचन हे ब्रह्मी ब्रह्मभूत आहे. ती खूण मला मनोमन पटली आहे. श्रीराम हा खरोखर परिपूर्ण ब्रह्मच आहे."

श्रीरामाने तारेला जो उपदेश केला तो सुग्रीवाने ऐकला. त्यामुळे तोही देहभान विसरला आणि सुखसंपन्न झाला. श्रीरामाच्या सांगण्याने तारा आणि सुग्रीव दोघेही सुखी आणि ज्ञानी झाले. दोघांनाही एकमेकांबद्दल प्रेम वाटू लागले आणि त्यांच्या चित्तात कोणताही विकल्प उरला नाही. दोघांना परम श्रेष्ठ समाधान लाभले. तेव्हा रघुनंदन राम म्हणाला, "आता वालीच्या देहाचे दहन करून त्याला तिलांजली आणि पिंडदान करावे." अंगद, सुग्रीव आणि प्रधान यांनी वालीला पालखीत घालून पंपातीरावर नेले आणि त्याचे दहन केले. बेल, चंदन इत्यादी लाकडांचा त्यासाठी वापर केला. नंतर वालीची उत्तरक्रिया तिलांजली, पिंडदान करून सुग्रीव आणि प्रधान अंगदाला घेऊन आले. सर्वजण आल्यावर रामाला वंदन करून सुग्रीव हात जोडून अंगदासह रामासमोर उभा राहिला. श्रीरामाने हनुमंताला म्हटले, "आता त्वरित सुग्रीवाला राज्याभिषेक करून अंगदाला युवराजपद द्यावे." त्यावर हनुमंताने विनंती केली की, "श्रीराम स्वामींनी किष्किंधेमधे येऊन स्वतः सुग्रीवाला राज्याभिषेक करावा. आपण सुग्रीवाला राज्यावर स्थापन केलेले आम्हाला आवडेल. तेव्हा कृपा करून एवढे करा." हनुमंताचे सांगणे ऐकून श्रीरामाला

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Muthulakshmi Research Academy

संतोष झाला. त्या नंतर रामाने आपल्या नेमाचे लक्षण स्वतःच सांगितले श्रीराम म्हणाला, "श्रीदशरथांची आज्ञा शिरोधार्य मानून मी चवदा वर्षे वनवासात राहावयाचा निर्धार केला आहे. तेंव्हा मी ग्राम, पुरी, नगरी यांमध्ये प्रवेश न करण्याचा नेम केला आहे."

श्रीरामाच्या आज्ञेने तारा सुग्रीवाची पत्नी

श्रीरामाने त्याचा नेम सांगितल्यावर हनुमंताने रामाचे पाय धरून विनंती केली की, "आपण नाही तर लक्ष्मणाला तरी सुग्रीवाला राज्याभिषेक करण्यासाठी पाठवा." श्रीरामाने ही विनंती मान्य करून लक्ष्मणाला आज्ञा केली की, "सुग्रीवाला तू राज्याभिषेक कर." लक्ष्मणाने आज्ञा शिरसावंद्य मानून जाण्याची तयारी दाखविताना रामाचे चरण वंदिले. मग सर्वांसह तो निघाला. सुग्रीवाला राज्याभिषेक करण्यासाठी प्रधानादी परिवारासह सौमित्र निघताच सर्वांनी जयजयकार केला. यावेळी श्रीरामाने तारेला बोलावून म्हटले, "तू सुग्रीवाचा स्वीकार करून, राजपत्नी होऊन, किष्किंधेचे राज्य माझ्या आज्ञेने कर. सर्वांभूती भगवद्भाव त्यातलाच सुग्रीवाला मानूंन त्याला पती समज. माझ्या आज्ञेचा अनुभव भोग. तेथे देहविषयक संशय नाही. दिरापासून पुत्रप्राप्ती धर्मशास्त्राने सांगितली आहे. माझ्या आज्ञेला प्रमाण मानून तू सुग्रीवाला भजावेस. स्त्री-पुरुष या दोहोंच्या देहात आत्म्यावाचून आत्मी नाही. तीवर दृष्टी ठेवल्यास देहात विदेहत्व सहज येते. ही आत्मदृष्टी असण्यात चूक झाली तर स्वपत्नीचा उपभोग हा नरकासम आहे. आत्मदृष्टीच्या संतोषामुळे माझी आज्ञा मानून द्वंद्व सहज दूर करता येते." श्रीरामाचे हे निवेदन ऐकल्यावर सुग्रीव आणि तारा समाधान पावली. श्रीरामाची आज्ञा त्यांनी उल्लंघिली नाही.

श्रीरामाने आज्ञा केली की, "सुग्रीव किष्किंधेचा राजा, तारा त्याची भार्या, तारेचा पुत्र अंगद हा युवराज." असे श्रीरामाने सांगताच सर्व वानर आणि सर्व सुरवर आनंदले आणि त्यांनी श्रीरामाचा जयजयकार केला. आता किष्किंधेत महोत्सव करण्यासाठी सर्व वानर एकत्र आले. सुग्रीवाला अभिषेक करण्यासाठी असंख्य ऋषींना आणले. नखासह वाघाचे कातडे, वराहाचे दात, कासवाची पाठ, सप्त समुद्रांचे जल, कामधेनूचे दूध, सात प्रकारची माती, तीर्थींचे जल, भूमीवरची आणि पाण्यातली अनेक कमळे, फुले, शुद्ध चंदन, सागरजल, मणिरत्ने, आंब्याचे टाळे, कमलपत्र, अशोकाची कोवळी पाने, इत्यादी सामग्री आणली. किष्किंधानगरी शृंगारून शोभिवंत केली. ही सर्व अपूर्व तयारी हनुमंताने केली. मुकुट, कुंडले, अलंकार, धवल छत्र आणि चवऱ्यांची जोडी, सदाफळी, औदुंबर, पवित्र आसन हे सारे अभिषेकासाठी आणले. सोने आणि चांदी यांच्या घागरी, सजवलेले पांढरे बैल, रत्नांनी भरलेले कलश हे वानरांच्या प्रिय राजाच्या अभिषेकासाठी जमविण्यात आले. प्रधानांनी होम करून, द्विजांचे पूजन करून तीळ, तूप, गायी इत्यादींची दाने दिली आणि मग सुग्रीवाला अभिषेक केला. ज्याप्रमाणे उमा आणि रमा, त्याप्रमाणे तारा आणि रूमा, अंगदाची पत्नी क्षमा अशा महान् महतीने शोभत असताना अभिषेक झाला. सुवासिक, शीतल गंधोदक, सुमनोदक, कुशोदक, श्रीरामाचे चरणोदक यांनी युक्त असा वेदघोषात ऋषींनी अभिषेक केला. वस्त्रे, अलंकार, धन, धान्य, भोजन द्विजांना दिले. अंगदाला युवराजपद देऊन सुग्रीव सुखी झाला. वेदमंत्रांनी अभिषेक करण्यासाठी अनेक ऋषीश्वर आले. तसेच अनेक थोर वानरही आले. त्यामध्ये गज, गवाक्ष, गवय, शरभ, गंधमादन, मैंद, द्विविद, नील हे सारे अभिषेकासाठी आले. याशिवाय नळ, सुषेण, जांबवंत हे सबळ आणि तसेच इतर सर्व वानर सुग्रीवाला अभिषेक करायला आले होते. त्यांनी सुग्रीवाला राज्याभिषेक आणि अंगदाला यौवराज्याभिषेक करून दोघांचे अत्यंत उल्हासाने

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

पूजन केले. युवराज अंगद आणि राजा सुग्रीव यांचा वानरांनी सन्मान केला. 'श्रीरामाने सुग्रीवाला राज्यपदावर स्थापिले हे योग्य केले' असे सर्वांनी म्हटले.

श्रीरामाला वंदन

सौमित्राला प्रथम रथात बसवून, मग सुग्रीवादी वीर पुढे अंगदकुमाराला घेऊन रथात बसले. ते त्वरेने श्रीरामाला नमन करायला निघाले. त्या वेळी वीर पनसाने सुग्रीवाच्या डोक्यावर छत्र धरले होते. नळ, तार हे सोन्याची दांडी असलेल्या चवऱ्या ढाळू लागले होते. राजा सुग्रीवाला अशा प्रकारे सन्मानाने आणि जयजयकार करत वानरांचा समूह घेऊन चालला होता. त्याने रघुवीर सुखी झाला. वानरवीरांचे हैकार, थैकार आणि जयजयकार करत येणे पाहून श्रीराम स्वानंदाने सुखपूर्ण झाला. श्रीरामाच्या जवळ जाताच सुग्रीव, अंगद आणि सौमित्र रथातून उतरून, लोटांगण घालून, त्या सर्वांनी रामाचे चरणवंदन केले. नंतर हनुमंताने श्रीरामाला म्हटले, "श्रीरघुनाथा, सुग्रीवाला राज्याभिषेक करून आणि अंगदाला युवराजपद देऊन आपल्या पायाशी आणले आहे. इथून पुढे कार्य आणि कर्तव्य यांचा विचार करून आपण आम्हा सर्व दासांना मार्गदर्शन करावे. "पावसाळा असण्याचा चार महिन्यांचा काळ सीताशोधाचे कार्य करता येणार नाही. तेव्हा सुग्रीवाला किष्किंधेला घेऊन जा. मी सौमित्रासह प्रस्रवण पर्वताच्या गुहेमध्ये राहीन. पावसाळा संपला की तुम्ही लगेच सीतेच्या शोधासाठी या." असे श्रीरामाने हनुमंताला सांगितले. त्यावर सुग्रीव श्रीरामाला म्हणाला, "श्रीरामा, पावसाळा संपताच, चार महिन्यांनी मी वानरसैन्यासह येऊन सीतेच्या शोधाचे कार्य करीन." असे सांगून रामाला वंदन करून सर्वजणांसह उल्हासाने सुग्रीव किष्किंधेकडे परत निघाला.

अध्याय आठवा

श्रीरामाने वालीचा उद्धार केला; सुग्रीवाला राज्याभिषेक करविला; अंगदाला युवराजपद दिलेले पाहून तारेला सुख झाले. तारेचा पती राजा आणि पुत्र युवराज असल्याने ती फार सुखी झाली; हा श्रीरामचंद्राचा प्रसाद होता.

सुग्रीवाची रामकार्याविषयी उपेक्षा

माल्यवंत पर्वतावरच्या प्रस्रवण गुहेत श्रीराम चार महिने सौमित्रासह राहिला. पावसाळ्याचे चार महिने श्रीराम स्वस्थ राहिला. नंतर रामकार्यासाठी उत्सुक झालेला शरद्काळ स्वतः पर्जन्यकाळाला गिळून त्वरेने आला. श्रीराम हा काळाचाही काळ असून स्वस्थानी निवांत आणि निश्चल राहिला होता. तो श्रीराम जणू साधूंचे नित्य निर्मळ, निर्दोष मन; मेघांनी दूर होऊन आकाशाला स्वयंप्रकाशित करावे तसा तो राम भासतो. शरद्काळात आकाशात निर्मळपणा येतो; सूर्य-चंद्र यांची प्रसन्न तेजस्विता दिसते; साधकांना हा सुखाचा काळ वाटतो, कारण त्यांना चारी पुरुषार्थ (धर्म, अर्थ, काम, मोक्ष) साधता येतात; असा हा शरद्काळ असतो. या काळात तीर्थाटण, अभ्यास, शत्रूला जिंकण्यासाठी राजांचे प्रस्थान, या गोष्टी करणारांना योग्य काळ असल्याने समाधान वाटते. काळ काळाला ग्रासतो, पण श्रीरघुनाथाला काळ ग्रासू शकत नाही. श्रीराम अजून सीतेच्या शोधाचे नाट्यमय सोंग करत पर्वताच्या गुहेत स्वस्थ बसला होता. शरद्काळ सुरू झाल्यावर श्रीराम लक्ष्मणाला म्हणाला, "सुग्रीव अजून इकडे कसा आला नाही. तो आपल्या स्वतःच्या नेमाला विसरला. जे विषयस्वार्थी असतात ते परमार्थी असत नाहीत. संतांनी त्यांना शिक्षा करून हितकार्याकडे वळवावे. जो अत्यंत विषयासक्त असतो तो परमार्थाकडे कधीच लक्ष देत नाही. तो केवळ शुद्ध परोपकारार्थ येईल हे निश्चितपणे घडणार नाही. पर्जन्यकाळाचा चार महिन्यांचा काळ संपल्यावर सीतेच्या

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

शोधासाठी यायचे आहे हे सुग्रीव विसरला आहे. त्याने माझ्याकडे तसे कबूल केले होते. तेव्हा तू किष्किंधेस जाऊन सुग्रीवाला आठवण दे. जर त्याने माझे वचन मानले नाही; तर बाणाने त्याचा वध करावा."

श्रीरामाने पुढे लक्ष्मणाला म्हटले, "तारा, रुमा या दोघी पत्नी आणि मद्यपान यांमुळे उन्मत्त झालेला सुग्रीव माझे वचन मानत नसेल तर तत्क्षणी त्याला मारावा. ज्याला माझ्या कार्याचे स्मरण नाही, जो माझी आठवण ठेवत नाही त्याला हे सौमित्र बाणाने विंधून मारावा. ज्या बाणाने वालीचे निर्दालण केले, तोच बाण सोडून अर्ध्या क्षणात सुग्रीवाचा प्राण घ्यावा. तो वानर शठ, नष्ट, कृतघ्न असून उपकाराची परतफेड प्रति-उपकाराने करण्याचे जाणत नाही. तो पाळणाणारा वानर खोटे बोलणारा आहे. हा मित्राला कुमित्र आहे. तेव्हा लक्ष्मणा, तू तर माझा सखा आणि सुग्रीव केवळ कुमित्र आहे. त्याचे मनोगत निरखून घेऊन, मग त्याचा संहार कर." हे एकल्यावर लक्ष्मणाला खूप राग आला. त्याने हातात इंद्रधनुष्याप्रमाणे असलेले धनुष्य घेतले आणि क्रोधयुक्त, शक्तिमान पावले टाकत तो निघाला. त्याच्या तशा चालीने सायसादंड, शाल, ताल असे अनेक वृक्ष उन्मळून पडले. त्याच्या क्रोधपूर्ण आणि वज्राघाताप्रमाणे पाय टाकण्याने, शिला, पाषाण यांची पायदळी रांगोळी झाली.

सुग्रीवाला समजावणे, धाक, नंतर तो शरण

हनुमंत पूर्वसूचना म्हणून स्वतः सुग्रीवाला सांगत होता की, "तू रामकार्याला विसरला आहेस आणि उन्मत्तपणे विषयांध झाला आहेस. स्त्रीविषय, मद्यपान, धन, मान, त्यावर शाब्दिक स्पष्टीकरण या सर्वांमुळे स्वहिताचे नुकसान होते. द्रव्य, दारा, मद्य यामुळे तुझे स्वहिताविषयीचे ज्ञान बुडाले. श्रीरामाची भक्ती विसरलास. तुझ्यावर फार मोठे संकट आले आहे. किती काळ गेला याची तुला जाणीव नाही. या काळात तू विषयात आयुष्य संपवलेस. चार महिने उलटले तरी सीतेच्या शोधासाठी निघाला नाहीस. सीतेचा शोध केला नाहीस तर श्रीरघुनाथाला क्रोध येईल. सुग्रीवा मग तो तुझा घात करील हे सत्य आहे." हे हनुमंताचे बोलणे ऐकूनही सुग्रीव सावध झाला नाही. तो उदासीनपणे म्हणाला, "कार्य तर गौण आहे. तातडीने वानरसैन्याला बोलावून घ्या." एवढेच बोलून सुग्रीव राण्यांच्या महालाकडे गेला. हनुमंताने त्वरेने जाऊन सेनानायकांना दहा हजार वानरवीर आणण्यासाठी लगेच पाठविले. इकडे लक्ष्मण रागारागाने काळाग्नी रुद्रासारखा किष्किंधेकडे जात होता. त्याला पाहून थोर थोर वानरवीर गडबडले. लक्ष्मण पायाखालच्या दगडांचे पीठ करत किष्किंधेच्या दिशेने येत असल्याचे पाहून सगळे वानरवीर धास्तावले. त्या वानरवीरांपैकी कोणाला दहा हत्तींचे बळ, एखाद्याला दसपट अधिक बळ; कोणाला सहस्र नागांचे बळ, असे असंख्य वानरवीर होते. एखाद्याच्या ठिकाणी विद्युल्लतेचे बळ, तर एखादा त्याहून अधिक बलवान, असे एकेकाहून एक सबळ वानरवीर होते. त्यांची एकमेकांशी तुलना करणेच अप्रस्तुत ठरेल. अशा सबळ वानरांचे असंख्य समूह किष्किंधेमध्ये होते. अत्यंत दुर्धर आणि बलवान महावीर किष्किंधेचे रक्षण करत होते.

लक्ष्मण धनुष्यबाण घेऊन निघाला. तो कृतान्त काळरुद्राप्रमाणे भासत होता. त्याला पाहून वानरसमूहातले वीर भयभीत झाले. लक्ष्मणाचे आगमन होताच वानरांना थरकाप सुटला. कोणी कोणाला धीर द्यायचा? कारण सगळेच भयभीत होते. लक्ष्मणाने धनुष्याच्या दोरीने टणत्कार केला. त्याबरोबर वानर उडाले आणि एकापुढे एक पळू लागले. नगरात एकच आकांत झाला. एक माणूस चालून आला तर वानरांच्या कोटी-कोटी पळू लागल्या. राजगृहात गाढ गडबड उडाली. वानर कलकलाट करू लागले. भयभीत होऊन, वानर

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

वालीच्या प्रतापाची ख्याती आठवून, म्हणू लागले की, "वाली मरताच ही धाड आली. कोण या संकटातून मुक्तता करणार?" तारा सुग्रीवाला म्हणाली, "नगरीत आकांत झाला आहे तरी तू अजून कामासक्तच कसा? आता तरी उन्मत्ता सावध हो." प्रधान राजा सुग्रीवाला सांगू लागले की, "सीतेचा शोध घेण्यासाठी दिलेली कालमर्यादा तुम्ही चुकवली. त्यामुळे श्रीराम अत्यंत क्षोभला आणि त्याने तुझा घात करण्यासाठी लक्ष्मणाला पाठविला आहे. सर्व वानर पळाले असून नगरीत हाहाःकार झाला आहे. आपण वेळ पाळण्यात चुकलो आहोत, त्याने श्रीराम कोपला हे योग्यच आहे. आता लक्ष्मणाला 'अनन्य भावाने शरण आहो' असे आपण सर्वजण सांगू या."

लक्ष्मणाने धनुष्याची दोरी ओढून, बाण चढवून रागाने नजर रोखली. त्यामुळे सुग्रीव घाबरला. लगेच तारा आणि रुमा ह्या पत्नी हात जोडून पुढे झाल्या; सुग्रीवाने लक्ष्मणाला प्रथम लोटांगण घातले आणि नंतर तो हात जोडून उभा राहिला. सुग्रीव म्हणाला, "मी अपराधी आहे. श्रीराम बाणाने माझा वेध घेईल. लक्ष्मणा, तू कृपानिधी आहेस. मला तू खरोखर वाचव." या प्रकारे सुग्रीवाने काकुळतीने विनंती केल्यावर, स्वतःच्या पतीला वाचविण्यासाठी मनापासून, दीनवाणेपणाने तारेने लक्ष्मणाला विनंती केली. "हा जरी खोटा ठरला आहे तरी शरण आला आहे. याचा घात करू नये. कारण, याला मारण्याने श्रीरामाची जगामध्ये अपकीर्ती होईल. सुग्रीव शरणागत झाला, श्रीरामानेच राज्यावर स्थापन केला, नंतर श्रीरामानेच मारला, असे होऊन, स्वतःच्या कीर्तीचाच रामाने शिरच्छेद केला असे होईल. जो शरण येतो तो वज्रप्राय पिंजऱ्यात सुरक्षित होतो ही सूर्यवंशाच्या मोठेपणाची कीर्ती आहे. त्यामुळे हा वानर मारल्याने श्रीरघुवीराच्या वंशाची अपकीर्ती होईल. वालीचा वध अवचित केल्याने श्रीरघुनाथाची अपकीर्ती आहेच; त्यात आता सुग्रीवालाही मारले तर दुसऱ्यांदा त्याच्या कपाळी अपकीर्ती येईल. एखादे बालक बापाच्या मांडीवर लघुशंका करते तेव्हा त्याने ते धुवायचे की बालकाला मारायचे! तसेच हे सौमित्रा, हा तुला शरण आला आहे, तेव्हा वाचव. सौमित्र असे तुझे नाव आहे. शरणागत वानराचा तू वध केलास तर सुमित्रा ऐवजी कुमित्र होशील. यासाठी आपले नाव अपवित्र होऊ देऊ नकोस. आम्हा दोघींचे सौभाग्य वाचव." या नंतर तारा आणि रुमा यांनी धावत जाऊन लक्ष्मणाचे पाय डोईवर धरले.

तारेचा सद्‌भावपूर्ण युक्तिवाद ऐकून लक्ष्मणाच्या चित्ताला सुख झाले. तो म्हणाला, "सुग्रीवा तू महापापी आहेस. मी काय म्हणतो ते नीट ऐक. खोटे बोलण्याने अधोगती प्राप्त होते. त्यातही साक्षात् श्रीरामाशी असत्य बोललास रे पापमूर्ती. यावरचा शास्त्रार्थाचा निर्णय आता तू ऐक. स्वार्थी माणूस असत्य बोलतो तेव्हा त्याचे पाच पूर्वज नरकात जातात; गोडस्वार्थीचे दहा पूर्वज, अश्वार्थींचे शंभर पूर्वज आणि जे पुरुषार्थाबाबत खोटे बोलतात त्यांचे हजार पूर्वज नरकात जातात. जे द्रव्यासाठी असत्य बोलतात त्यांच्यामुळे जिवंत आणि मृत अशांना अधोगती प्राप्त होते. भूमीसाठी जे असत्य बोलतात त्यांचे सर्व कुळच नरकात जाते. अशाच प्रकारे जे सत्पुरुषाकडे येऊन निश्चयाने कर्तव्याविषयी बोलतात आणि पुढे तो नेम पाळत नाहीत त्यांची दुर्गतीही ऐकून ठेव. ते संपूर्ण कुळ आणि स्वजनांसह आत्मघात करून घेतात. ते मेल्यावर त्यांना नरकच प्राप्त होतो; असे शास्त्राने निश्चयाने सांगितले आहे. मित्राकडून स्वतःचे काम करून घेतात; पण मित्रकार्य स्वतः करत नाहीत त्यांचा सर्वांनी वध करावा हा शास्त्राचा निर्णय म्हणजे ब्रह्मवाक्यच आहे. परोपकारी, सर्व कार्य करणारे त्यांना सर्वांनी वंदन करावे. परंतु जे मित्रकार्यात फसवणूक करतात अशांना सर्वांनी वेगळे ठेवावे आणि निंदावे. स्वतःचे घर, आश्रम, मठी असताना, दुसऱ्याला

https://archive.org/details/muhammadlaxmiacademy Bhavan Varanasi Trust, Lucknow

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

विनाकारण दोष देऊन पीडा करतात त्यांना नरकाची किती प्रकारे फेरी पडते त्याची संख्येने मोजदाद कोणी करावी. त्यांना साप डसतात, वाघ, अस्वले, कोल्हे खातात, धर्मरक्षक मारतात; अशा रीतीने ते सर्वांकडून वध्य ठरतात.

सुग्रीव शरण-लक्ष्मणाचा सन्मान

लक्ष्मणाचा युक्तिवाद ऐकून तारेने पुन्हा विनंतीपूर्वक म्हटले, "सुग्रीव निश्चित पापी आहे आणि त्याची पापापासून मुक्तता तुझ्याकडूनच होईल. श्रीरामनामाचे स्मरण केल्याने सर्व पापांचे दहन होते. प्रत्यक्ष रघुनंदनाचे दर्शन झाले म्हणजे सत्संगामुळे पापाचे निर्दाळण होते. आवडीने, प्रेमाने रामाच्या गोष्टी केल्या तर कल्पकोटी पापे जळून जातात. श्रीरामाला आत्मदृष्टीने पाहिले म्हणजे संपूर्ण सृष्टी निष्पाप दिसू लागते. श्रीरामनामाने पापनिर्मुक्ती होते कारण त्या नामाची प्रतापशक्ती अशी की चारी मुक्ती पायी लागतात; त्या नामाला ब्रह्मादिकही वंदन करतात." तारेची रामनामाची प्रशंसा ऐकून लक्ष्मणाला आनंद झाला. तारेने त्याचे पाय धरून म्हटले, "कृपा करून मला पतीचे दान द्यावे." तारेचे आणि लक्ष्मणाचे संभाषण ऐकून सुग्रीवाला रडू आले. तो म्हणाला, "श्रीरामाची सेवा मी चुकविली. मी पूर्णतया वधाला पात्र ठरलो आहे. श्रीरामाचा बाण लागला की तत्काळ माझे प्राण जातील. हे सौमित्र, मी तुला अनन्यभावे शरण आहे. मला जिवदान दे." एवढे बोलून सुवर्ण-सिंहासन, राजसन्मान, राज्याभिमान यांचा त्याग करून सुग्रीवाने लक्ष्मणाच्या चरणांना वंदन केले.

श्रीरामाच्या आज्ञेने सीतेच्या शोधाचे कार्य न करणाऱ्या सुग्रीवाला संतापाने लक्ष्मण म्हणाला, "मनाला वाटेल तसे वागणाऱ्या, स्त्रीलंपटा; स्वतःचे कार्यच करणाऱ्या, महाशठा, श्रीरामाच्या कार्याला विसरणाऱ्या, भ्रष्टा; अतिपापिष्टा माझे सांगणे ऐक. मद्य पिणारा, ब्रह्मघाती अशांना आणि चोर, ठक, भग्नव्रती अशांनाही शास्त्रात प्रायश्चित सांगितले आहे. परंतु जो मित्रोपकाराशी कृतघ्न होतो, त्याला प्रार्यश्चित्त नाही हे नीट लक्षात ठेव. तू रघुनंदनाला फसविलेस तेव्हा तू महान् पापी आहेस" असे लक्ष्मणाने कठोर भाषण केल्यामुळे तारा आणि सुग्रीव अत्यंत उद्विग्न झाले. हे संकट निर्माण झालेले पाहून स्वतः मारुती तेथे आला. तो म्हणाला, "सीतेच्या शोधाचे कार्य सोडून श्रीरामाला फसविले आहेस. यामुळेच श्रीरामाने सुग्रीवा तुझा घात करायला सौमित्राला पाठविले. तू पापी आणि कृतघ्न आहेस. पण आता दोघांचेही कार्य साधण्यासाठी, सुग्रीवाचा घात न करता रामाचे कार्य साधावे हेच योग्य आहे. श्रीरघुनाथाची सेवा चुकविल्याने सुग्रीवाच्या माथी कोटी अपराध आहेत. पण शरणागत मानून त्याला क्षमा करावी आणि रामकार्य साधावे." हे हनुमंताचे बोलणे ऐकून लक्ष्मण संतुष्ट झाला. त्यामुळे सुग्रीवही आनंदित झाला आणि त्याने लक्ष्मणाला नमन केले. नंतर "सीताशोधाचे रामाचे कार्य करण्यात आपल्याला आनंद वाटतो," असे तो वानरराज म्हणाला. सुग्रीवाने सौमित्राच्या पायावर डोके ठेवले आणि म्हणाला, "सैन्य, सेनापती, प्रधान आणि अंगद यांच्यासह श्रीरामाच्या सेवेसाठी मी प्राण देईन हे माझे सत्य वचन आहे. सौमित्रा, श्रीरामाचे जे मनोगत असेल ते मी सिद्धीला नेईन. मी इथूनच सैन्य बोलावण्यासाठी दूत पाठवितो. माझे रणकर्कश, महाबलवान् असे सेनापती सैन्यासह इथे यावे म्हणून मी लगेच दूत पाठवितो."

यानंतर सुग्रीवाने अर्घ्य, पाद्यपूजा, चंदन, धूप, दीप, पुष्पमाला यांसह लक्ष्मणाचे नम्रपणे पूजन केले. लक्ष्मणाने सुग्रीवाला, "त्वरित रामापाशी जाऊ या. त्याला एकाकी सोडून तुम्ही आम्ही इथे राहणे योग्य नव्हे" असे सांगितले. यावर सुग्रीवाने सर्व प्रधानांना समोर उभे करून त्यांना निर्वाणीचा संदेश दिला. "आता जो किष्किंधेच्या घरी परतेल त्याची गाढवावरून मी धिंड काढीन. तारा आणि रुमा परतल्यावर त्याला

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

मात्रागमनी, महापापी ठरवतील. सीतेचा शोध न लावता, श्रीरामाला सुखी न करता, जो मागे परतेल त्याला तापलेल्या तेलात पालथा पाडण्याची शिक्षा मिळेल.'' असे सर्वांना सुग्रीवाने बजावले. मग त्या ठिकाणी रणवाद्यांचा गजर करून, रथ, शिबिका इत्यादींची जुळणी करून सर्वजण त्वरेने निघाले. महाशूर असे अंगद, सौमित्र, सुग्रीव हे रथात चढले. चवऱ्या आणि शुभ्र छत्र राजाच्या डोक्यावर धरून, वाद्यांचा गजर करत, भाटांकडून गंभीर स्वरात गर्जना चालू असताना वानरांचा सैन्यसंभार घेऊन सुग्रीव लगेच निघाला. यावेळी श्रीराम हा माल्यवंत पर्वतामधील प्रस्रवण पर्वताच्या शिखरावर असलेल्या गुहेच्या तोंडापाशी एका मणिमय शिळेवर बसलेला होता. श्रीरामाला पाहून सर्व वानरांनी रामाचा जयजयकार केला. अंगद, सौमित्र आणि सुग्रीव यांनी रामाला साष्टांग दंडवत घातले.

सुग्रीवाचे आश्वासन आणि श्रीरामस्तुती

श्रीरामाने सुग्रीवाला आपले आजानुबाहू पसरून आलिंगन दिले. त्यामुळे सुग्रीवाला पूर्ण समाधान झाले आणि तो म्हणाला, ''मी तातडीने दूत धाडले असून लवकरच विविध सेनांचे सेनानी आपापले वानरसैन्य आणि अन्य सेनासंभार घेऊन येतील.'' थोड्याच काळात वानरसेना प्रचंड संख्येने, अपार जागा व्यापून जमू लागली. वानरसेना अत्यंत प्रबळ होती. जमीन दिसू नये. एवढी त्यांनी दाटी केली. कुलाचल व्यापून गोळांगुळ आले. त्या वानरांपैकी एक वानर पर्वताच्या आकाराचा होता. दुसरा एक सर्वात श्रेष्ठ होता. तीक्ष्ण नखे आणि क्रूर दाढा असलेला तो वानर दुर्धर योद्धा होता. त्याने शेपटीचा सपाटा मारला की हजारोंची हानी होत असे; त्याची नखे पर्वतांचे पीठ करू शकत आणि त्याच्या तीक्ष्ण दातांनी वीरांना मरण दिले जाई. पूर्वेला वानरांचे समूह, पश्चिम दिशेला वानरांची गर्दी, उत्तर आणि दक्षिण दिशांना वानरश्रेष्ठ अशी थोर वानरवीरांची कोंदाकोंदी झाली होती. शिवाय आग्नेय, वायव्य, नैऋत्य दिशांना असंख्य वानरांची दाटीवाटी झाली होती. ईशान्येकडचा भाग वानरांच्या किलकिल करण्याने भरला होता. सारे आकाश, भूमंडळ, कुळाचल पर्वत वानरांनी भरून गेले होते. या वानरांमध्ये काही काजळासारखे काळे, काही पिवळ्या वर्णाचे, काही गौरवर्ण सोनेरी, काही सुनीळ असे होते. वानरगणातले कोणी शेंदूराची आरक्ती घेतलेले; तर कोणी पूर्ण विजेसारखे; कोणी शुद्ध शुभ्रवर्णाचे, काही धुरकट वर्णाचेही होते. त्यातले काही भुरकट, काही डाळिंबाच्या फुलासारखे, काही वैडूर्याच्या रंगाचे डोंगर असतात तसे आणि काही अभ्रकासारखे शरीर असलेले, काही चंद्रासारखे चोख, काही कुंकुमाने माखलेले तांबडे, शिवाय त्यामध्ये केसाळ असून सैन्यापुढे राहून गुणगुणत होते. या अस्वलांनी रामनामाची गुणगुण चालविली होती; वानर रामनामाचे स्मरण करत होते, त्यामुळे रामनामाने त्रिभुवन कोंदले. श्रीरामाचे दर्शन होताच सर्वांच्या चित्तवृत्ती पालटल्या. वानरांना रामभक्ती आवडू लागून, ते अहोरात्र रामाचे नामस्मरण करू लागले. सत्संगाचा असा महिमा की वानरांसारख्या पशूंनीही रामनामाचा ध्यास घेतला. त्यांनी हनुमंताला गुरू केला. वानरांनी केलेला भुभुःकार आणि रामनामाचा गजर ऐकून श्रीरामाला सुख झाले, लक्ष्मणही आनंदित झाला. स्वतः श्रीरामाने सुग्रीवाला पोटाशी धरून म्हटले, '' खरोखर तू माझा सखा होशील, कार्यासाठी दृढ विश्वास दिलास.''

नंतर सौमित्राने विचारले, ''सुग्रीवा, या वानरसैन्याला मर्यादाच दिसत नाही. त्यांची संख्या तरी किती आहे, ते श्रीरामापाशी सांग.'' त्यावर सुग्रीव म्हणाला, ''श्रीरामा तुझ्या प्रतापाच्या मोठेपणापुढे ही तर थोडी सैन्ये आली आहेत. नंतर आणखी असंख्य प्रकारची कोट्यवधी सैन्ये येतील.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Muthulakshmi Research Academy

दशकोटी, शतकोटी, शकुसंख्य, महासंख्य याहूनही अधिक शंखांची गणतीही होणार नाही एवढे सैन्य येईल. समुद्रातले खडे कमी पडतील इतके सैन्य पुढे येऊन मिळेल. त्यापुढे रावण काय बापडे. त्याला निश्चित बांधून आणीन." एवढे बोलून सुग्रीवाने दंड थोपटले. श्रीरामाच्या पायाला स्पर्श करून, रणात काय करणार ते तो सांगू लागला. "रणात राक्षसांची दाणादाण करीन, लंकेची होळी करीन. त्रिकूट पर्वत समूळ उपटून, जनककन्येला आणीन. लंकानाथाचा वध करून, स्वतः सीतेला आणून श्रीरघुनाथाला सुखी करीन." अशी त्याने गर्जना केली. सुग्रीवाची गर्जना ऐकून श्रीरघुनाथाला संतोष होऊन, त्याने सुग्रीवाला जवळ घेतले आणि स्वानंदाने तो उल्हास दाखवू लागला. जणू काही सीता सुग्रीवाने आणूनच दिली या जाणिवेने रामाला सुख झाले. आपल्या आनंदात त्याने भक्ताला वर उचलले. वानरांनी भुभुःकार केला; ऋषींनी जयजयकार केला; सुरवरांनी पुष्पवृष्टी केली. श्रीराम सुखसमृद्ध झाला. सुग्रीवाला रामाने उचलला; त्या सुखाने देवभक्तांमध्ये पूर्ण ऐक्य झाले.

अध्याय नववा

श्रीरामाला सुग्रीवाने विनंती केली की, "सैन्य, सेनानी, सेनाधर, सैन्यपथकांचे प्रमुख महावीर हे सारे आपल्याला नमस्कार करू इच्छितात. तेव्हा सौमित्रासह आपण वानरांचा सेनासंभार पाहावा." ही सुग्रीवाची विनंती मान्य करून श्रीराम त्याच्याबरोबर निघाला. सुग्रीव सैन्य आणि सेनानींचा परिचय देऊ लागला.

सुग्रीवकृत वानरसेनेचे निवेदन

सुग्रीव म्हणाला, "माझ्या सैन्यात दश सहस्त्र सेनानायक, सेनाधर असून एकएकाच्या हाताखाली कोटी कोटी असे अत्यंत दुर्धर रणयोद्धे आहेत. उदयगिरी ते अस्तगिरी पर्यंतचे सर्व वानर आले आहेत. नंदनवनातले, सप्तसमुद्राचे, नदीस्रोतापासचे, माळजमिनीवरचे, अशा अनेक ठिकाणचे विख्यात महावीर रामकार्यासाठी तातडीने आले आहेत. मेरू, मंदार, विंध्याद्री, वेंकटाद्री, सह्याद्री या ठिकाणांहून वानरवीरांचे आगमन झाले आहे. ते रामकार्याची गर्जना करत आहेत. रामकार्य साधण्यासाठी हिमाचल, अर्बुदाचल, गंधमादन, श्रीशैल पर्वतावरचे वानरही आले आहेत. हे सारे वेगवेगळे असे आपापले सेनासंभार घेऊन नमस्कार करायला येतील. ते वानरवीर, रणयोद्धे स्वामींनी पाहावे. शतबळी नावाच्या ह्या वानराकडे दशकोटीसहस्त्र वानरवीरांचा संभार आहे, त्याचा रामाने नमस्कार घ्यावा. हा हनुमंताचा सावत्र पिता केसरिनामक महावीर, याच्याकडे कोट्यानुकोटी वानरसेना आहे. त्याने श्रीरामाला नमस्कार केला.

वानराच्या जातीमधला केसरी हा अंजनीचा पती म्हणून हनुमंताचा क्षेत्रज पिता हा ग्रंथार्थ सत्यच आहे. हनुमंताला वायु हा वीर्यज पिता आणि केसरी हा क्षेत्रज पिता. दोघांचा हनुमंत हा पुत्रच. वाल्मीकींच्या ग्रंथातील हा सत्यार्थ आहे. हा नळ नामक अग्नीसारखा तेजस्वी वीर जणू आरक्त बालसूर्यासारखा आहे. याची दशसहस्त्र सेना आहे. त्याने लगेच श्रीरामाला वंदन केले. असंख्य वानरांना घेऊन गवाक्ष आला होता. त्याने पुढे येऊन श्रीरामाला वंदन केले. ढगाळ वर्णाचा अत्यंत दुर्धर असा धूम्र नावाचा महावीर शतसहस्त्र सेना घेऊन आला आहे. त्याने श्रीरामाला नमस्कार केला. पनस नावाच्या दुर्धर आणि पर्वतासारख्या महावीराने आपल्या दशकोटी परिवारासह येऊन श्रीरामाला नमस्कार केला."

सुग्रीव पुढे सांगू लागला, "मैंद आणि द्विविद हे दोघे वीर अनुक्रमे सहाकोटी आणि अष्टकोटी वीरांच्या परिवारासह श्रीरामाला नमस्कार करायला आले आहेत. त्याचप्रमाणे गंधमादन हा वानरवीर साठ कोटी वानरसैन्यासह; तर तेजाचा घडला आहे की चंद्रबिंबाचा ओतला

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

आहे असा हा तार वानर आपल्याबरोबरच्या शतकोटी वानरसंभारासह तातडीने आला आहे. त्यांनी श्रीरामासमोर येऊन त्याला वंदन केले. आकाशाची निळाई गाळून प्रतिमा ओतावी तसा हा नीळ असून या वानराला सुनीळ शोभेने विभूषित केले आहे. तो श्रीरामाचा आवडता असून त्याला सेतुबंधाचे रचना-कौशल्य ज्ञात आहे. त्यामुळेही त्याच्यावर श्रीरामाचे प्रेम आहे. नाव नीळ, वर्ण निळा, कास सुनीळ आणि त्याने आपल्याबरोबर शतसहस्त्रकोटी दळभार घेऊन त्वरेने आगमन केले आहे. सुग्रीवाच्या सैन्याचा सेनापती असलेला हा नीळ दुर्धर प्रतापशक्तीने युक्त आहे. त्याने विनयाने श्रीरघुनाथाला वंदन केले. हा दधिमुख आणि तो दुराघर्ष हे दोघे अकरा कोटी सेना घेऊन येऊन रामाला अभिवंदन करून उभे आहेत. तरु, तरळ, कुमुद. कुमुदाक्ष, गज, शरभ, गवय, गवाक्ष, महाहनु इत्यादी प्रमुख वानर आणि त्यांचा असंख्य सेनासंभार पाहा. हा तारेचा पिता, वालीचा सासरा सुषेण वानर वैद्यराज आपले दशसहस्त्र वानरवीर घेऊन आला आहे; तो श्रीरामाला नमस्कार करतो आहे."

"जांबवंताचा थोरला भाऊ हा नावाने धूम्र असला तरी अगाध पराक्रमी आहे; तो आपले अस्वलांचे सैन्य घेऊन तत्परतेने रामकार्य साधण्यासाठी आला आहे. तसेच जांबवंत स्वतः बहात्तर कोटी सबळ अखलांचे सैन्य घेऊन इथे तत्काळ धावून आला आहे. जांबवंत नित्य रामस्मरण करतो; ती या अस्वलांची गुणगुण अहोरात्र प्रतिदिनी चालू असते. रामनामाच्या गुणगुणीने सारे आकाश कोंदते आणि पृथ्वीवरचे जीवन पवित्र होते." जांबवंताला पाहून श्रीराम आणि सौमित्र यांना आनंद झाला. श्रीरामाने स्वतः जांबवंताला आपल्या कार्यातील विजयासंबंधी विचारले. नामापाशी नित्य कीर्ती, नित्य शांती, विजयवृत्ती आणि भयापासून निर्मुक्ती असतेच; हे जाणून श्रीरघुनाथ हा जांबवंताला आप्त मानू लागला. जांबवंताशी राम हा नित्य एकांतात चर्चा करून आपल्या विजयासंबंधी बोलणे करत असे. अशा रीतीने वानरांचे सर्व सैन्य श्रीरामाने पाहिले. लागलीच वाद्यांचा ध्वनी सुरू झाला.

अंगद-श्रीराम भेट

रणवाद्ये तावडतोब वाजू लागली. ढोल, टिमक्या, बुरख्या, विराण्या जागच्या जागी गिडबिड गिडबिड करू लागल्या. काहळा, रणकाहळा, शंख जगात निनादला. भेरींचा महागजर झाला. अंगद युवराज आला. एकाच वेळी तडक गोफणीच्या दोऱ्या आणि ढाली खटखटल्या. रणवाद्ये आणि भुभुःकार यांनी पर्वत गरजले. पद्म, महापद्म अशा शंखांच्या असंख्य गणनेने अंगदाची शूर वानरसेना होती. फुलांसकट वृक्ष उन्मळले. वानरसेना श्वेत, पीत, केतकी अशी दिसू लागली. त्यांच्याकडचे शाल, ताल, कर्दल वृक्षांची पाने ध्वजासारखी शोभत होती. पळसाची आरक्त फुले, अगस्तीची पांढरी फुले, कांचन वृक्षांची पांढरी, पिवळी फुले यांनी सैन्याला अत्यंत शोभा आली. असा स्वतःचा सेनासंभार आणि त्यामधे राजकुमार अंगद हा मनोहर युवराज होता. त्याच्यावर रत्नांकित श्वेत छत्र होते. सोन्याचे दांडे असलेल्या चवऱ्या त्याच्यावर ढाळल्या जात होत्या. तो रथावर आरूढ होता आणि त्याच्या ध्वजावर मोत्याच्या झालरी होत्या. त्याचा सतत जयजयकार चालू होता. हैकार, थैकार, जैकार देत तळपत, चमकत, वृक्ष झेलण्याचा चमत्कार करत वानर उड्या मारत होते. वानरवीर अत्यंत सावध होते. शाल, ताल, शिळा यांसह युद्ध करणारे ते महावीर असले तरी तत्पर, सिद्ध आणि बद्ध असे त्यांचे सैन्य असते. घडघडाट करत रथ निघाले, वानरसेनेतले वीर कडकडाट करत चालले. वाजंत्र्यांचा गंभीर नाद, वानरांचा भुभुःकार अशी ती दुर्धर सेना होती. अंगद वीर सैन्यासह आला. त्यामुळे प्रबळ, दुर्धर असा युद्धासाठी पराक्रमाचा मेळ साधला.

https://archive.org/details/@sulekhmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

अंगदाचे आगमन होताच श्रीरामाला सुख झाले; सुग्रीवाला सुख झाले आणि सर्व सुरवरांनाही सुख झाले. अंगदाने रथातून उतरून श्रीरामाच्या पायावर मस्तक टेकून वंदन केले. श्रीरामानेही उल्हासाने अंगदाला आलिंगन दिले. अंगदाच्या मुखाचे चुंबन घेऊन रामाने त्याला पुन्हा आलिंगन दिले. त्यामुळे अंगदाला आणि रामालाही सुख झाले. अंगदाने सुग्रीवालाही नमन केले, त्यामुळे सुग्रीवाला समाधान वाटून त्याने अंगदाला आलिंगन दिले. ते पाहून श्रीराम सुखसंपन्न झाला. सुग्रीवाने वालीचा घात करविला असा द्वेष अंगदाच्या चित्तात राहिला नाही. उलट "श्रीरामाने माझ्या पित्याचा उद्धार केला; याला कारण सुग्रीव झाला अशी माझी भावना झाली. वालीच्या शतजन्मांच्या कोटीतून सुग्रीवाने सुटका केली आणि श्रीरामसुखाची ध्वजा निःसंशय वालीने उभविली. श्रीरघुनाथाची आम्हाला प्राप्ती झाली ही सुग्रीवाच्या धर्मानेच तत्त्वतः झाली. ज्याच्यामुळे परमार्थ प्राप्त होतो तोच माझा पित्याहून अधिक असा हा चुलता आहे. त्याने आम्हा सर्वांचा उद्धार केला आहे. सुग्रीवापेक्षा अन्य कोणी सखा, पिता मला नाही. सुग्रीवाने वंश उद्धरला; वानरांच्या सुखासाठीच तो अवतरला आहे." असे म्हणून अंगदाने पुन्हा सुग्रीवाच्या चरणांना वंदन केले. अंगदाचे बोलणे ऐकून सुग्रीवाला रडायला आले. "अंगद वंशाचे सुखनिधान असून, मला अंगदामुळेच सुख मिळाले." एवढे बोलून सुग्रीवाने अंगदाला आलिंगन दिले. यामुळे श्रीराम सुखसंपन्न झाला.

वानरांच्या लीला, हनुमंताविषयी प्रश्न

अंगदाचे सैन्य, नळ, नीळ इत्यादी प्रधान यांनी श्रीरामाचा जयजयकार केला. रामापुढे कोणी फळ ठेवले तर दुसऱ्याने ते उचलून उडी मारली. नंतर रामापुढेच समोर बसून ते फळ खाऊन वेडावत राहिले. रामापुढे वाकुल्या दाखवत, लक्ष्मणापुढे डोळे मिचकावत काही वानर समोर आले. सुग्रीवाला हुलकावणी देऊन ते वानर नाचत, उड्या मारत आणि किलकिलाट करत होते. श्रीराम मात्र 'सीते सीते' म्हणत ओक्साबोक्सी रडत आणि स्फुंदत रडत रडत मूर्च्छित झाला. परंतु वानरांच्या विविध चेष्टा पाहून रामाला हसू आले. राम खदखदा हसत राहिला. सौमित्र तर ते चेष्टेखोर वानर पाहून हसता हसता मूर्च्छित झाला. वानरांचा प्रचंड सैन्यसंभार पाहून श्रीरामचंद्र सुखी झाला. तेवढ्यात वायुपुत्र हनुमंताने पुढे येऊन श्रीरामाला नमस्कार केला. सुग्रीव म्हणाला, "सर्व सैन्य एकीकडे ठेवले तरी या हनुमंताच्या तुलनेला योग्य ठरणार नाही. याचे बळ फारच आहे. याच्या बळापुढे सर्व सैन्य बापडे ठरेल. याने राहूचे थोबाड फोडले आणि सूर्यही याच्यापुढे चळचळ कापतो."

सुग्रीवाचे बोलणे ऐकून श्रीरामाला आश्चर्य वाटले. हनुमंत महापराक्रमी असल्याचे श्रीरामाला ठाऊक होते. "सुग्रीवा, हा हनुमंत तुझा प्रियमित्र असताना, तुझे कार्य साधण्यासाठी याने वालीचा घात कसा केला नाही. त्याविषयी मला सांग." सुग्रीवाला श्रीरामाने असे विचारले आणि त्याचवेळी तेथे अगस्ती ऋषी आले. सर्व वानरांना पाहून त्यांनी श्रीरामाची भेट घेतली. पर्वकाळाच्या स्नानासाठी ते पंपा सरोवरावर आले होते. श्रीरामाला भेटण्यासाठी म्हणून ते उल्हासाने आले. ऋषींना रामाने सन्मानपूर्वक अभिवादन केले. नंतर त्यांना आसनावर व्यवस्थित बसवून श्रीरामाने प्रश्न विचारला की, "सुग्रीवाचा सखा हनुमंत एवढा वीर्यशाली आणि पराक्रमी असताना त्याने वालीचा वध का केला नाही? मला आपण तो सर्व वृत्तान्त सविस्तर सांगा." यावर ऋषी म्हणाले, "मला हनुमंताचे जन्मकथन नारदांनी संपूर्णपणे ऐकवले होते. तेच मी आता सांगतो; लक्षपूर्वक ऐक.

हनुमंताचे बाळपणीचे उड्डाण, रविबिंबाला ग्रासायला जाणे' ती पवित्र कथा अति रम्य आणि मनोरम असून स्वतः श्रीराम श्रोता आणि अगस्ती ऋषी हे वक्ता होते.

https://archive.org/details/@sarayulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

आहे असा हा तार वानर आपल्याबरोबरच्या शतकोटी वानरसंभारासह तातडीने आला आहे. त्यांनी श्रीरामासमोर येऊन त्याला वंदन केले. आकाशाची निळाई गाळून प्रतिमा ओतावी तसा हा नीळ असून या वानराला सुनीळ शोभेने विभूषित केले आहे. तो श्रीरामाचा आवडता असून त्याला सेतुबंधाचे रचना-कौशल्य ज्ञात आहे. त्यामुळेही त्याच्यावर श्रीरामाचे प्रेम आहे. नाव नीळ, वर्ण निळा, कास सुनीळ आणि त्याने आपल्याबरोबर शतसहस्त्रकोटी दळभार घेऊन त्वरेने आगमन केले आहे. सुग्रीवाच्या सैन्याचा सेनापती असलेला हा नीळ दुर्धर प्रतापशक्तीने युक्त आहे. त्याने विनयाने श्रीरघुनाथाला वंदन केले. हा दधिमुख आणि तो दुराघर्ष हे दोघे अकरा कोटी सेना घेऊन येऊन रामाला अभिवंदन करून उभे आहेत. तरु, तरळ, कुमुद. कुमुदाक्ष, गज, शरभ, गवय, गवाक्ष, महाहनु इत्यादी प्रमुख वानर आणि त्यांचा असंख्य सेनासंभार पाहा. हा तारेचा पिता, वालीचा सासरा सुषेण वानर वैद्यराज आपले दशसहस्त्र वानरवीर घेऊन आला आहे; तो श्रीरामाला नमस्कार करतो आहे."

"जांबवंताचा थोरला भाऊ हा नावाने धूम्र असला तरी अगाध पराक्रमी आहे; तो आपले अस्वलांचे सैन्य घेऊन तत्परतेने रामकार्य साधण्यासाठी आला आहे. तसेच जांबवंत स्वतः बहात्तर कोटी सबळ अखलांचे सैन्य घेऊन इथे तत्काळ धावून आला आहे. जांबवंत नित्य रामस्मरण करतो; ती या अस्वलांची गुणगुण अहोरात्र प्रतिदिनी चालू असते. रामनामाच्या गुणगुणीने सारे आकाश कोंदते आणि पृथ्वीवरचे जीवन पवित्र होते." जांबवंताला पाहून श्रीराम आणि सौमित्र यांना आनंद झाला. श्रीरामाने स्वतः जांबवंताला आपल्या कार्यातील विजयासबंधी विचारले. नामापाशी नित्य कीर्ती, नित्य शांती, विजयवृत्ती आणि भयापासून निर्मुक्ती असतेच; हे जाणून श्रीरघुनाथ हा जांबवंताला आप्त मानू लागला. जांबवंताशी राम हा नित्य एकांतात चर्चा करून आपल्या विजयासंबंधी बोलणे करत असे. अशा रीतीने वानरांचे सर्व सैन्य श्रीरामाने पाहिले. लागलीच वाद्यांचा ध्वनी सुरू झाला.

अंगद-श्रीराम भेट

रणवाद्ये ताबडतोब वाजू लागली. ढोल, टिमक्या, बुरख्या, विराण्या जागच्या जागी गिडबिड गिडबिड करू लागल्या. काहळा, रणकाहळा, शंख जगात निनादला. भेरींचा महागजर झाला. अंगद युवराज आला. एकाच वेळी तडक गोफणीच्या दोऱ्या आणि ढाली खटखटल्या. रणवाद्ये आणि भुभुःकार यांनी पर्वत गरजले. पद्म, महापद्म अशा शंखांच्या असंख्य गणनेने अंगदाची शूर वानरसेना होती. फुलांसकट वृक्ष उन्मळले. वानरसेना श्वेत, पीत, केतकी अशी दिसू लागली. त्यांच्याकडचे शाल, ताल, कर्दळ वृक्षांची पाने ध्वजासारखी शोभत होती. पळसाची आरक्त फुले, अगस्तीची पांढरी फुले, कांचन वृक्षांची पांढरी, पिवळी फुले यांनी सैन्याला अत्यंत शोभा आली. असा स्वतःचा सेनासंभार आणि त्यामधे राजकुमार अंगद हा मनोहर युवराज होता. त्याच्यावर रत्नांकित श्वेत छत्र होते. सोन्याचे दांडे असलेल्या चवऱ्या त्याच्यावर ढाळल्या जात होत्या. तो रथावर आरूढ होता आणि त्याच्या ध्वजावर मोत्याच्या झालरी होत्या. त्याचा सतत जयजयकार चालू होता. हैकार, थैकार, जैकार देत तळपत, चमकत, वृक्ष झेलण्याचा चमत्कार करत वानर उड्या मारत होते. वानरवीर अत्यंत सावध होते. शाल, ताल, शिळा यांसह युद्ध करणारे ते महावीर असले तरी तत्पर, सिद्ध आणि बद्ध असे त्यांचे सैन्य असते. घडघडाट करत रथ निघाले, वानरसेनेतले वीर कडकडाट करत चालले. वाजंत्र्यांचा गंभीर नाद, वानरांचा भुभुःकार अशी ती दुर्धर सेना होती. अंगद वीर सैन्यासह आला. त्यामुळे प्रबळ, दुर्धर असा युद्धासाठी पराक्रमाचा मेळ साधला.

https://archive.org/details/bhavarth_ramayan Bhuvan Vani Trust, Lucknow

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

अंगदाचे आगमन होताच श्रीरामाला सुख झाले; सुग्रीवाला सुख झाले आणि सर्व सुरवरांनाही सुख झाले. अंगदाने रथातून उतरून श्रीरामाच्या पायावर मस्तक टेकून वंदन केले. श्रीरामानेही उल्हासाने अंगदाला आलिंगन दिले. अंगदाच्या मुखाचे चुंबन घेऊन रामाने त्याला पुन्हा आलिंगन दिले. त्यामुळे अंगदाला आणि रामालाही सुख झाले. अंगदाने सुग्रीवालाही नमन केले, त्यामुळे सुग्रीवाला समाधान वाटून त्याने अंगदाला आलिंगन दिले. ते पाहून श्रीराम सुखसंपन्न झाला. सुग्रीवाने वालीचा घात करविला असा द्वेष अंगदाच्या चित्तात राहिला नाही. उलट "श्रीरामाने माझ्या पित्याचा उद्धार केला; याला कारण सुग्रीव झाला अशी माझी भावना झाली. वालीच्या शतजन्मांच्या कोटीतून सुग्रीवाने सुटका केली आणि श्रीरामसुखाची ध्वजा निःसंशय वालीने उभविली. श्रीरघुनाथाची आम्हाला प्राप्ती झाली ही सुग्रीवाच्या धर्मानेच तत्त्वतः झाली. ज्याच्यामुळे परमार्थ प्राप्त होतो तोच माझा पित्याहून अधिक असा हा चुलता आहे. त्याने आम्हा सर्वांचा उद्धार केला आहे. सुग्रीवापेक्षा अन्य कोणी सखा, पिता मला नाही. सुग्रीवाने वंश उद्धरला; वानरांच्या सुखासाठीच तो अवतरला आहे." असे म्हणून अंगदाने पुन्हा सुग्रीवाच्या चरणांना वंदन केले. अंगदाचे बोलणे ऐकून सुग्रीवाला रडायला आले. "अंगद वंशाचे सुखनिधान असून, मला अंगदामुळेच सुख मिळाले." एवढे बोलून सुग्रीवाने अंगदाला आलिंगन दिले. यामुळे श्रीराम सुखसंपन्न झाला.

वानरांच्या लीला, हनुमंताविषयी प्रश्न

अंगदाचे सैन्य, नळ, नीळ इत्यादी प्रधान यांनी श्रीरामाचा जयजयकार केला. रामापुढे कोणी फळ ठेवले तर दुसऱ्याने ते उचलून उडी मारली. नंतर रामापुढेच समोर बसून ते फळ खाऊन वेडावत राहिले. रामापुढे वाकुल्या दाखवत, लक्ष्मणापुढे डोळे मिचकावत काही वानर समोर आले. सुग्रीवाला हुलकावणी देऊन ते वानर नाचत, उड्या मारत आणि किलकिलाट करत होते. श्रीराम मात्र 'सीते सीते' म्हणत ओक्साबोक्सी रडत आणि स्फुंदत रडत रडत मूर्च्छित झाला. परंतु वानरांच्या विविध चेष्टा पाहून रामाला हसू आले. राम खदखदा हसत राहिला. सौमित्र तर ते चेष्टेखोर वानर पाहून हसता हसता मूर्च्छित झाला. वानरांचा प्रचंड सैन्यसंभार पाहून श्रीरामचंद्र सुखी झाला. तेवढ्यात वायुपुत्र हनुमंताने पुढे येऊन श्रीरामाला नमस्कार केला. सुग्रीव म्हणाला, "सर्व सैन्य एकीकडे ठेवले तरी या हनुमंताच्या तुलनेला योग्य ठरणार नाही. याचे बळ फारच आहे. याच्या बळापुढे सर्व सैन्य बापडे ठरेल. याने राहूचे थोबाड फोडले आणि सूर्यही याच्यापुढे चळचळ कापतो."

सुग्रीवाचे बोलणे ऐकून श्रीरामाला आश्चर्य वाटले. हनुमंत महापराक्रमी असल्याचे श्रीरामाला ठाऊक होते. "सुग्रीवा, हा हनुमंत तुझा प्रियमित्र असताना, तुझे कार्य साधण्यासाठी याने वालीचा घात कसा केला नाही. त्याविषयी मला सांग." सुग्रीवाला श्रीरामाने असे विचारले आणि त्याचवेळी तेथे अगस्ती ऋषी आले. सर्व वानरांना पाहून त्यांनी श्रीरामाची भेट घेतली. पर्वकाळाच्या स्नानासाठी ते पंपा सरोवरावर आले होते. श्रीरामाला भेटण्यासाठी म्हणून ते उल्हासाने आले. ऋषींना रामाने सन्मानपूर्वक अभिवादन केले. नंतर त्यांना आसनावर व्यवस्थित बसवून श्रीरामाने प्रश्न विचारला की, "सुग्रीवाचा सखा हनुमंत एवढा वीर्यशाली आणि पराक्रमी असताना त्याने वालीचा वध का केला नाही? मला आपण तो सर्व वृत्तान्त सविस्तर सांगा." यावर ऋषी म्हणाले, "मला हनुमंताचे जन्मकथन नारदांनी संपूर्णपणे ऐकवले होते. तेच मी आता सांगतो; लक्षपूर्वक ऐक.

हनुमंताचे बाळपणीचे उड्डाण, रविबिंबाला ग्रासायला जाणे' ती पवित्र कथा अति रम्य आणि मनोरम असून स्वतः श्रीराम श्रोता आणि अगस्ती ऋषी हे वक्ता होते.

https://archive.org/details/@sarayu_foundation_trust, lakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

आहे असा हा तार वानर आपल्याबरोबरच्या शतकोटी वानरसंभारासह तातडीने आला आहे. त्यांनी श्रीरामासमोर येऊन त्याला वंदन केले. आकाशाची निळाई गाळून प्रतिमा ओतावी तसा हा नीळ असून या वानराला सुनीळ शोभेने विभूषित केले आहे. तो श्रीरामाचा आवडता असून त्याला सेतुबंधाचे रचना-कौशल्य ज्ञात आहे. त्यामुळेही त्याच्यावर श्रीरामाचे प्रेम आहे. नाव नीळ, वर्ण निळा, कास सुनीळ आणि त्याने आपल्यावरोबर शतसहस्त्रकोटी दळभार घेऊन त्वरेने आगमन केले आहे. सुग्रीवाच्या सैन्याचा सेनापती असलेला हा नीळ दुर्धर प्रतापशक्तीने युक्त आहे. त्याने विनयाने श्रीरघुनाथाला वंदन केले. हा दधिमुख आणि तो दुराघर्ष हे दोघे अकरा कोटी सेना घेऊन येऊन रामाला अभिवंदन करून उभे आहेत. तरु, तरळ, कुमुद. कुमुदाक्ष, गज, शरभ, गवय, गवाक्ष, महाहनु इत्यादी प्रमुख वानर आणि त्यांचा असंख्य सेनासंभार पाहा. हा तारेचा पिता, वालीचा सासरा सुषेण वानर वैद्यराज आपले दशसहस्त्र वानरवीर घेऊन आला आहे; तो श्रीरामाला नमस्कार करतो आहे.''

''जांबवंताचा थोरला भाऊ हा नावाने धूम्र असला तरी अगाध पराक्रमी आहे; तो आपले अस्वलांचे सैन्य घेऊन तत्परतेने रामकार्य साधण्यासाठी आला आहे. तसेच जांबवंत स्वतः बहात्तर कोटी सबळ अखलांचे सैन्य घेऊन इथे तत्काळ धावून आला आहे. जांबवंत नित्य रामस्मरण करतो; ती या अस्वलांची गुणगुण अहोरात्र प्रतिदिनी चालू असते. रामनामाच्या गुणगुणीने सारे आकाश कोंदते आणि पृथ्वीवरचे जीवन पवित्र होते.'' जांबवंताला पाहून श्रीराम आणि सौमित्र यांना आनंद झाला. श्रीरामाने स्वतः जांबवंताला आपल्या कार्यातील विजयासवंधी विचारले. नामापाशी नित्य कीर्ती, नित्य शांती, विजयवृत्ती आणि भवापासून निर्मुक्ती असतेच; हे जाणून श्रीरघुनाथ हा जांबवंताला आप्त मानू लागला. जांबवंताशी राम हा नित्य एकांतात चर्चा करून आपल्या विजयासंबंधी बोलणे करत असे. अशा रीतीने वानरांचे सर्व सैन्य श्रीरामाने पाहिले. लागलीच वाद्यांचा ध्वनी सुरू झाला.

अंगद-श्रीराम भेट

रणवाद्ये तावडतोब वाजू लागली. ढोल, टिमक्या, बुरख्या, विराण्या जागच्या जागी गिडविड गिडविड करू लागल्या. काहळा, रणकाहळा, शंख जगात निनादला. भेरींचा महागजर झाला. अंगद युवराज आला. एकाच वेळी तडक गोफणीच्या दोऱ्या आणि ढाली खटखटल्या. रणवाद्ये आणि भुभुःकार यांनी पर्वत गरजले. पद्म, महापद्म अशा शंखांच्या असंख्य गणनेने अंगदाची शूर वानरसेना होती. फुलांसकट वृक्ष उन्मळले. वानरसेना श्वेत, पीत, केतकी अशी दिसू लागली. त्यांच्याकडचे शाल, ताल, कर्दळ वृक्षांची पाने ध्वजासारखी शोभत होती. पळसाची आरक्त फुले, अगस्तीची पांढरी फुले, कांचन वृक्षांची पांढरी, पिवळी फुले यांनी सैन्याला अत्यंत शोभा आली. असा स्वतःचा सेनासंभार आणि त्यामधे राजकुमार अंगद हा मनोहर युवराज होता. त्याच्यावर रत्नांकित श्वेत छत्र होते. सोन्याचे दांडे असलेल्या चवऱ्या त्याच्यावर ढाळल्या जात होत्या. तो रथावर आरूढ होता आणि त्याच्या ध्वजावर मोत्याच्या झालरी होत्या. त्याचा सतत जयजयकार चालू होता. हैकार, थैकार, जैकार देत तळपत, चमकत, वृक्ष झेलण्याचा चमत्कार करत वानर उड्या मारत होते. वानरवीर अत्यंत सावध होते. शाल, ताल, शिळा यांसह युद्ध करणारे ते महावीर असले तरी तत्पर, सिद्ध आणि बद्ध असे त्यांचे सैन्य असते. घडघडाट करत रथ निघाले, वानरसेनेतले वीर कडकडाट करत चालले. वाजंत्र्यांचा गंभीर नाद, वानरांचा भुभुःकार अशी ती दुर्धर सेना होती. अंगद वीर सैन्यासह आला. त्यामुळे प्रवळ, दुर्धर असा युद्धासाठी पराक्रमाचा मेळ साधला.

https://archive.org/details/muthulakshmiacademy
Bhuvan Vani Trust, Lucknow

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Trust and eGangotri

अंगदाचे आगमन होताच श्रीरामाला सुख झाले; सुग्रीवाला सुख झाले आणि सर्व सुरवरांनाही सुख झाले. अंगदाने रथातून उतरून श्रीरामाच्या पायावर मस्तक टेकून वंदन केले. श्रीरामानेही उल्हासाने अंगदाला आलिंगन दिले. अंगदाच्या मुखाचे चुंबन घेऊन रामाने त्याला पुन्हा आलिंगन दिले. त्यामुळे अंगदाला आणि रामालाही सुख झाले. अंगदाने सुग्रीवालाही नमन केले, त्यामुळे सुग्रीवाला समाधान वाटून त्याने अंगदाला आलिंगन दिले. ते पाहून श्रीराम सुखसंपन्न झाला. सुग्रीवाने वालीचा घात करविला असा द्वेष अंगदाच्या चित्तात राहिला नाही. उलट "श्रीरामाने माझ्या पित्याचा उद्धार केला; याला कारण सुग्रीव झाला अशी माझी भावना झाली. वालीच्या शतजन्मांच्या कोटीतून सुग्रीवाने सुटका केली आणि श्रीरामसुखाची ध्वजा नि:संशय वालीने उभविली. श्रीरघुनाथाची आम्हाला प्राप्ती झाली ही सुग्रीवाच्या धर्मानेच तत्त्वतः झाली. ज्याच्यामुळे परमार्थ प्राप्त होतो तोच माझा पित्याहून अधिक असा हा चुलता आहे. त्याने आम्हा सर्वांचा उद्धार केला आहे. सुग्रीवापेक्षा अन्य कोणी सखा, पिता मला नाही. सुग्रीवाने वंश उद्धरला; वानरांच्या सुखासाठीच तो अवतरला आहे." असे म्हणून अंगदाने पुन्हा सुग्रीवाच्या चरणांना वंदन केले. अंगदाचे बोलणे ऐकून सुग्रीवाला रडायला आले. "अंगद वंशाचे सुखनिधान असून, मला अंगदामुळेच सुख मिळाले." एवढे बोलून सुग्रीवाने अंगदाला आलिंगन दिले. यामुळे श्रीराम सुखसंपन्न झाला.

वानरांच्या लीला, हनुमंताविषयी प्रश्न

अंगदाचे सैन्य, नळ, नीळ इत्यादी प्रधान यांनी श्रीरामाचा जयजयकार केला. रामापुढे कोणी फळ ठेवले तर दुसऱ्याने ते उचलून उडी मारली. नंतर रामापुढेच समोर बसून ते फळ खाऊन वेडावत राहिले. रामापुढे वाकुल्या दाखवत, लक्ष्मणापुढे डोळे मिचकावत काही वानर समोर आले. सुग्रीवाला हुलकावणी देऊन ते वानर नाचत, उड्या मारत आणि किलकिलाट करत होते. श्रीराम मात्र 'सीते सीते' म्हणत ओक्साबोक्सी रडत आणि स्फुंदत रडत रडत मूर्च्छित झाला. परंतु वानरांच्या विविध चेष्टा पाहून रामाला हसू आले. राम खदखदा हसत राहिला. सौमित्र तर ते चेष्टेखोर वानर पाहून हसता हसता मूर्च्छित झाला. वानरांचा प्रचंड सैन्यसंभार पाहून श्रीरामचंद्र सुखी झाला. तेवढ्यात वायुपुत्र हनुमंताने पुढे येऊन श्रीरामाला नमस्कार केला. सुग्रीव म्हणाला, "सर्व सैन्य एकीकडे ठेवले तरी या हनुमंताच्या तुलनेला योग्य ठरणार नाही. याचे बळ फारच आहे. याच्या बळापुढे सर्व सैन्य बापडे ठरेल. याने राहूचे थोबाड फोडले आणि सूर्यही याच्यापुढे चळचळ कापतो."

सुग्रीवाचे बोलणे ऐकून श्रीरामाला आश्चर्य वाटले. हनुमंत महापराक्रमी असल्याचे श्रीरामाला ठाऊक होते. "सुग्रीवा, हा हनुमंत तुझा प्रियमित्र असताना, तुझे कार्य साधण्यासाठी याने वालीचा घात कसा केला नाही. त्याविषयी मला सांग." सुग्रीवाला श्रीरामाने असे विचारले आणि त्याचवेळी तेथे अगस्ती ऋषी आले. सर्व वानरांना पाहून त्यांनी श्रीरामाची भेट घेतली. पर्वकाळाच्या स्नानासाठी ते पंपा सरोवरावर आले होते. श्रीरामाला भेटण्यासाठी म्हणून ते उल्हासाने आले. ऋषींना रामाने सन्मानपूर्वक अभिवादन केले. नंतर त्यांना आसनावर व्यवस्थित बसवून श्रीरामाने प्रश्न विचारला की, "सुग्रीवाचा सखा हनुमंत एवढा वीर्यशाली आणि पराक्रमी असताना त्याने वालीचा वध का केला नाही? मला आपण तो सर्व वृत्तान्त सविस्तर सांगा." यावर ऋषी म्हणाले, "मला हनुमंताचे जन्मकथन नारदांनी संपूर्णपणे ऐकवले होते. तेच मी आता सांगतो; लक्षपूर्वक ऐक.

हनुमंताचे बाळपणीचे उड्डाण, रविबिंबाला ग्रासायला जाणे' ती पवित्र कथा अति रम्य आणि मनोरम असून स्वतः श्रीराम श्रोता आणि अगस्ती ऋषी हे वक्ता होते.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

अध्याय दहावा

श्रीरामाने अगस्तींना प्रश्न केला होता की हनुमंत हा सुग्रीवाचा सखा असताना आणि त्याला अद्‌भुत शक्ती असतानाही त्याने वालीचा वध मित्रकार्य म्हणून का केला नाही? या प्रश्नावर अगस्तींनी आरंभापासूनची हनुमंताची जन्मकथा सांगण्यातला आनंद व्यक्त करून ते हनुमंताचे आत्मसामर्थ्य आणि जन्मरहस्य सांगायला सिद्ध झाले.

अगस्तींनी मारुतीची जन्मकथा सांगितली

''राजा दशरथाने पुत्रकामेष्टियज्ञ केला त्यावेळी यज्ञपुरुषाने ताटभर प्रसाद दिला. वसिष्ठांनी त्या प्रसादाचे तीन भाग करून तिघी राण्यांना दिले. त्यातला कैकेयीचा भाग घारीने पळविला. ती शापामुळे स्त्री झाली ते नवल नीट श्रवण कर. तिच्या उदरात यज्ञभाग होता. श्रीरामाला ती साहाय्यभूत व्हावी म्हणून ब्रह्माने तिला वानरी केले. तीच केसरीची अंजनी. पोटातल्या यज्ञभागाची वृध्दी होण्यासाठी यज्ञपुरुषाचा स्वतःचा प्राण तिच्यामध्ये प्रविष्टला. यज्ञभाग अत्यंत बलवान असा हनुमंताचा जन्म पावला. यासाठी वायुसुत असे हनुमंताला म्हणतात. त्याचबरोबर वानरी अंजनीचा पुत्र म्हणून तो वानर. राहिलेल्या दोन यज्ञभागांचे तुम्ही चवघे जन्मलात. हनुमंत हा संपूर्ण एका भागाचा आहे. त्यामुळे तो अत्यंत प्रतापी, सबळ आहे. तेव्हा राम, लक्ष्मण, भरत, शत्रुघ्न आणि हनुमंत असे तुम्ही यज्ञभागाचेच असल्याने तुमच्यात एकात्मता असून तुम्ही भिन्न दिसलात तरी अभिन्नच आहात.'' हे अगस्तींचे निवेदन ऐकून रघुनाथ संतोषला, हनुमंत स्वतः हर्षभरित झाला आणि सौमित्राला अत्यानंद झाला.

नंतर अगस्ती म्हणाले, ''श्रीरामा, आता मी तुला या हनुमंताची बाळपणीची अद्‌भुत शक्तीमुळे कशी ख्याती झाली ते सांगतो. हनुमंताला गर्भामध्येच कासोटी येऊन त्याचे ब्रह्मचर्य अत्यंत रोकडे ठरले. ती कासोटी केवळ अंजनी माता आणि जगजेठी रामच पाहू शकतील. प्रत्यक्ष अंजनी ही माता असूनही तिला हनुमंताचे लिंगदर्शन झाले नाही. मग इतर कोण पाहू शकणार! हा वानरराज पूर्ण ब्रह्मचारी आहे. या हनुमंताने मातेला बालभावाने विचारले की, ''मी भुकेच्या वेळी काय खावे?'' त्यावर अंजनीमातेने सांगितले की, ''लाल फळ पाहून ते खावे.'' जन्मल्यापासून हनुमंत अग्नीसारखा तेजस्वी आणि देदीप्यमान होता. बालसूर्याप्रमाणे तो तेजःपुंज दिसे. एकदा सूर्योदयापूर्वी हनुमंताला शय्येवर निजवून अंजनी ही वनात फळे आणण्यासाठी घाईने गेली. हनुमंत खूप भूक लागल्याने आणि माता जवळ नसल्याने रडत होता. तेवढ्यात बालसूर्याचा लाल गोल दिसला आणि त्याला फळ समजून मारुती उडाला. भुकेची प्रबळ पीडा, बालसूर्याचे गोल फळ, यांमुळे तो ते खाण्यासाठी तडक, चपळपणे उडून गेला. हनुमंताची उड्डाणशक्ती ही गरुडाच्या गतीतही नसते. वायुसुताची शीघ्रगती ही मनोवृत्तीप्रमाणे होती. बालसूर्याला भक्षण करण्यासाठी वरच्या दिशेने चाललेल्या हनुमंताला पाहून सुरवर आणि देवऋषी आश्चर्यचकित झाले. धैर्य, शौर्य, महावीर्य आणि शीघ्रगतीने गमन यातले गांभीर्य लक्षात घेऊन परम उदार हनुमंताचा पराक्रम सुरवरांनी वर्णन करण्यासारखाच होता. हनुमंतासारखी शक्ती असलेला त्रिजगतात कोणीही नाही. तो बालभावाने सूर्याचे भक्षण करण्यासाठी शीघ्रगतीने निघाला होता.''

''मनाच्या गतीलाही मागे टाकून हनुमंत वर वर चालला होता. तो सूर्य किरणांच्या घातक संयोगाने सर्वांग भस्म करून घेईल, हे लक्षात आल्यावर त्याचा पिता वायू हा आपल्या पुत्राचे संरक्षण करण्यासाठी थंड पाण्याच्या कणांनी त्याला निववण्यासाठी पुत्राच्या मार्गाने निघाला. वायूने हनुमंताला धरण्याचा प्रयत्न केला; परंतु तो त्याला आटोपला नाही आणि वेगाने सूर्याला फळ मानून

https://archive.org/details/@bhuvanvanitrust,lucknow, lakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

खायला आला. हनुमंत सूर्यबिंबापाशी पोचला त्याच दिवशी त्याच वेळी सूर्याला राहूचे ग्रहण लागायचे असल्याने राहूने सूर्याला ग्रासले. तेव्हा हनुमंताला राग आला. "माझा गोड घास काढून घेणारा हा कोण मूर्ख इथे आला" असे म्हणत हनुमंताने आपल्या शेपटीचा सबळ तडाखा हाणून राहूचे थोबाडे फोडले. शेपटीचा फटकारा बसताच राहू घाबरा झाला. त्याच्या नाका-तोंडातून रक्ताच्या धारा लागल्या आणि तो थरथर कापू लागला. अंतराळात थरथरत, गरगरा फिरत राहू मूर्च्छित होऊ लागला; तेवढ्यात केतूने धावत येऊन राहूला सावरले. राहू आणि केतू यांच्यात उत्तम मैत्री होती. दोघांच्या देहात एकात्मता होती. केतू राहूच्या साहाय्यार्थ आला आणि त्याने हनुमंताकडे रागाने पाहिले. हनुमंताने केतू आणि राहू यांना एकत्र पाहून संतापाने ठोसा मारला. त्यामुळे राहू-केतू धूम पळाले आणि ग्रहचक्रात हाकाटी सुरू झाली."

राहूचे गाऱ्हाणे, इंद्र-हनुमान संग्राम

"सिंहिकासुत राहूला अन्य ग्रहांनी सांगितले की, "पुच्छकेतू तुझ्या साहाय्यार्थ आला तोही परतला. इंद्र हा नियंता अधिकारी आहे, तेव्हा तुम्ही त्याला गाऱ्हाणे सांगा."" नंतर वानराच्या धावाने रक्तबंबाळ झालेला राहू शंख करत इंद्रापाशी लगेच आला. राहू म्हणाला, "चंद्र-सूर्य यांना ग्रहण लावणे ही माझी जीवनवृत्ती आहे. त्याप्रमाणे आज ग्रहण-काल प्राप्त झाल्यावर सूर्याला ग्रहण लावण्यासाठी मी गेलो होतो. त्यावेळी माझ्यापेक्षा बलवान असलेला एक पुच्छराहू तेथे आला. त्याने घावाने मला रक्तबंबाळ केले, आणि मला इकडे शंख करत पाठविले. तू सर्वाधिकारी नियंता देवाधिदेव, माझा काहीही अपराध नसताना तू तो पुच्छराहू का पाठविलास? त्याने मला खूपच त्रास दिला आहे. शेवटी मला न विचारता तू हा गुप्तपणे माझा घात करविलास. आता मी काय करावे हे तत्त्वतः तूच मला सांगायला हवे. पुच्छराहूने तेथे येऊन संपूर्ण सूर्याला कह्यात घेतले; माझा घात करायलाही तो आला. मी रडगाणे सांगत तुझ्याकडे आलो आहे."

राहूचे बोलणे ऐकून इंद्रादी देव अत्यंत आश्चर्यात पडले. ग्रहचक्राला विपरीत करणारा हा कर्ता असा तो कोण आहे? नवा राहू कोणी केला? या प्रश्नाचे उत्तर शोधावे म्हणून नव्या राहूचे निर्दाळण करण्यासाठी सुरांच्या सेनासंभारासह इंद्र स्वतः त्या ठिकाणी आला. ऐरावत या सजवलेल्या हत्तीराजावर बसून, हातात वज्र घेऊन इंद्र सहपरिवार आला. राहूला पुढे बसवून इंद्राने "तो नवा राहू, ज्याने तुला बळाने गांजले, तो मला दाखव. मी त्याचे निर्दाळण करीन." असे राहूला म्हटले. राहूने हनुमंत दाखवला खरा पण तो स्वतः चळचळा कापत, ऐरावताच्या मागे दडून राहिला आणि त्याने दुरूनच इंद्राला हनुमंत दाखविला. इकडे भुकेजलेला हनुमंत सूर्याचा घास करण्यासाठी धावला. तेव्हा सूर्य चळचळा कापू लागला. मोठाच अनर्थ ओढवला. कारण दिवसाचे काम सोडून सूर्याला पळही काढता येईना. हनुमंताचे निवारणही करवेना. त्यामुळे तो आकांत करू लागला. वानरवीर हनुमंताने राहूला इंद्राजवळ पाहून, त्याचे निर्दाळण करण्यासाठी रागाने धाव घेतली. "मी क्षुधाग्रस्त असताना माझ्या खाण्याच्या आड ह्या राहूने अडथळा आणला आणि आता इंद्राच्या बळावर माझा ग्रास करायला त्याला घेऊन आला आहे काय?" असे म्हणून हनुमंताने सूर्याचा ग्रास करण्याचा विचार सोडून, राहूचा घात करण्यासाठी धाव घेतली. राहू इंद्राच्या नावाने ओरडू लागला. राहू इंद्राजवळ जाण्यासाठी पळाला, त्याचवेळी तेथे हनुमंताची उडी पडली. तेव्हा राहू आक्रोशाने रडत इंद्राला हाका मारू लागला. "इंद्रा, इंद्रा, हा हनुमंत मला मारू पाहतोय. या वानराने पुरता अन्त आणला." असा राहूचा आकांत ऐकून इंद्राने त्याला अभय देत म्हटले, "भिऊ नको. थोडे धैर्य धर. मी त्याचा-हनुमंताचा-घात करीन" एवढे

https://archive.org/details/@tulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

बोलून अमरपती इंद्राने ऐरावताला वेगाने पुढे नेला."

"मारुती ऐरावतावर धावून गेला. त्याने हाताने हत्ती उचलायला आरंभ केला. त्याने ऐरावताला धरून ठेवले आणि त्याच्या गंडस्थळावर शेपटीचा फटकारा मारला. त्यामुळे हत्तीने जोरात किंकाळी फोडली. त्याचा भयाने थरकाप उडाला. शेपटीचा नव्हे वज्राचाच घाव बसला असे त्याला वाटले. तेव्हा त्याने माघारी वळून पळायला आरंभ केला. इंद्राने त्याला आवरून धरण्याचा पुष्कळ प्रयत्न केला; पण ऐरावत काही युद्धासाठी परत येईना. वानराने शेपटीचा घाव घालताच हत्तीने त्या घावाचा एवढा धाक घेतला की, इंद्राच्या सामर्थ्यानेही तो आवरला नाही. त्याने इंद्राला घावरे केले. इंद्र हा देवांमधला बलवान; त्याने हनुमंताची कळ काढताच, हनुमंताने इंद्राचा मुकुट उडविला. त्यामुळे इंद्राचे केस मोकळे झाले. मुकुटाचे महत्त्व हनुमंताच्या बालवुद्धीला न समजल्यामुळे त्याने तो घेतला नाही. मरुद्‌गणांना मर्दून त्याने इंद्राला कासावीस केले. तेव्हा वानराने इंद्राला गांजलेले पाहून इंद्राचा कैवार घेण्यासाठी यम धावला. त्याने हनुमंतावर दंडाचा (यमदंडाचा) आघात केला. त्याने दंड मारताच हनुमंताने यमावर आपले शरीर आदळले आणि थपडा मारून यमाला तोंडघशी पाडले. वानरवीराने प्रचंड घाव घालून; प्रभावी बळाच्या साहाय्याने यमाचे तोंड ठेचले. ज्या यमाने जगाला गांजले त्याला बलराशी हनुमंताने गांजणूक करून धुळीला मिळवले. यम अत्यंत व्यथित झाला, वरुण भीतीने पळाला; कुबेराने लोटांगण घातले; सर्व कपिराजाचे पाय धरून शरण आले. हनुमंताने क्षणार्धात सुरसेना भंग केली; अवघ्यांची दाणादाण केली; देवांची पळापळ झाली. त्याच्या वेगापुढे त्यांना कोणीकडे पळावे हे कळेना. ते एकमेकांच्या मागे दडू लागले. देवांना संकट पडले. नंतर हनुमंताने हत्तीसकट इंद्राला उलथून टाकण्यासाठी, ऐरावताचे शेपूट धरून त्याला तो गरगरा आकाशात फिरवू लागला. तेव्हा देव आणि ऋषी गडबडून गेले."

"हनुमंताचे सामर्थ्य समक्ष पाहिल्यावर, इंद्राला तो आदळणार म्हणून जगात आकांत गुरू झाला. तेवढ्यात सुरपती इंद्राने कौशल्याने मारुतीवर वज्राचा आघात केला. त्या आघाताने हनुमंत मूर्च्छित होऊन पडला. मेरू पर्वताच्या पठारावर हनुमंत मूर्च्छित पडलेला पाहताच त्याचा पिता वायू त्वरित तेथे आला. त्याने आपल्या पुत्राला उचलला. आपल्या भुकेलेल्या मुलाला इंद्राने वज्राने आघात करून मूर्च्छित केले म्हणून वायूला राग आला. वायूने संतापून जगाचे प्राण आकर्षून घेतले. त्यामुळे ब्रह्मादिक संकटात पडले. ऋषी आणि भूतमात्र तळमळू लागले. वायूने अंतरात प्राणांचा निरोध केला. प्राण आणि अपान स्तब्ध झाले. त्यामुळे भूतमात्रांना विरोध जाणवू लागला. प्राणवायूच्या निरोधामुळे नेहमीची भूतमात्रांची गती रोखली जाऊन ते अस्वस्थ होऊन तळमळू लागले. त्यावर यक्ष, राक्षस, देव, गंधर्व, सिद्ध, चारण, मानव हे सारे सत्यलोकात ब्रह्मदेवाकडे जाऊन, वंदन करून, त्याला प्राणनिरोधाचे कष्ट सांगू लागले. यावेळी ब्रह्मदेवाचे ही पोट फुगले. सर्वांना संकट पडले. ब्रह्मदेवाने मग सर्वांना सांगितले की, "इंद्राने वज्राच्या घावाने हनुमंताला मूर्च्छित केले, त्यामुळे पुत्राच्यासाठी वायू रागावला आहे. त्यामुळे पुत्राविषयीच्या दुःखाने त्याने भूतमात्रांच्या अंतर्गत असणाऱ्या प्राणांचा निरोध केला आहे. राहूच्या कैवाराने अमरनाथाने वज्र मारले. हनुमंत मूर्च्छित झाल्याने वायूला राग येऊन त्याने प्राणांची अडवणूक केली." वायू हनुमंताला पुढ्यात घेऊन स्फुंदून रडत होता. "माझा तान्हा बाळ महामूढ इंद्राने मारला. माझा बाळ गेला तर मी इंद्रादी देवांचा घात करीन. एका क्षणात सर्वांना प्राणहीन करीन." वायूची प्राणवृत्ती बिघडली तर जगाच्या आयुष्याचा नाश होईल. पुत्राविषयीच्या रागाने वायूने प्रलय मांडला. सर्व भूतजात त्रस्त झाले."

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

"प्राणवायूमुळे प्राण्यांना सुख, हर्ष असतात. तो प्राणवायू जाताच त्यांना परम दुःख होते. तो प्राणवायू निघून गेला तर जगातले प्राणी काष्टवत् होतात. त्या स्थितीत प्राण्याला पाहून सर्वजण त्याचा विटाळ मानून सचैल स्नान करतात. यासाठी प्राणवायूमुळेच पवित्रता, प्रीती निर्माण होते. प्राणच गेला तर प्रियाही आपल्या प्रियकराला स्पर्श करत नाही. पत्नी ही परम आप्त, एरवी जीवन भोगते; पण प्राण गेल्यावर प्राण्याला प्रेत मानून, पतीला भूत मानू लागते. प्राणवायू सर्वांना प्रिय आहे. तोच क्षोभला तर काय करायचे असा विचार करून वैकुंठनाथाला सांगून हनुमंत वाचवावा असे ठरले. प्राणवायूच्या पीडेने महादेव त्रासला आणि वायूची समजूत घालण्यासाठी त्वरेने येऊन हनुमंताला वाचवा म्हणाला. शिव, इंद्र, ब्रह्मदेव या सर्वांनी जनार्दनाची प्रार्थना करून हनुमंताला जीवदान द्यावे हे सांगण्यासाठी त्याच्याकडे निघाले. ब्रह्मा, हरि, हर, स्वतः इंद्र आणि देवगण, तसेच श्रेष्ठ ऋषी आणि प्रजा सर्वजण तेथे जमले. नंतर हनुमंताला घेऊन वायू जेथे शोक करत बसला होता तेथे आले. ब्रह्मा, हरि, हर यांना पाहताच हनुमंताला उचलून घेऊन वायूने सद्भावनेने त्यांना वंदन केले. "एका पुत्राच्या घातासाठी अवघ्या जगाचे निर्दाळण करू नये प्राणनाथा." अशी वायूला विनंती करताच वायू रागाने म्हणाला, "माझा हनुमंत जिवंत राहिला नाही तर मी इंद्रादिकांचा घात करीन."

वायूला देवांचे उत्तर, हनुमंताला वरदान

"वायूचे बोलणे ऐकून जनार्दनाला हसू आले. तो म्हणाला, "हनुमंत हा पूर्ण भाग्यवान आहे. त्याला जन्म-मरणच नाही. श्रीरामभाग्याच्या दुप्पट भाग्य घेऊन हनुमंत जन्मला आहे. त्याला स्वप्नातही मृत्यू नाही. तो चिरंजीव आहे." असे वरद-वचन जनार्दनाने सांगताच महादेवानेही वर दिला. "सर्वजण सावधपणे ऐका. माझ्या तृतीय नेत्रातला अग्नीही त्या हनुमंताला जाळू शकणार नाही की माझा त्रिशूळ त्याचा अंगभेद करू शकणार नाही." त्यावर विष्णूने वर दिला की, "गदादी, बाण, चक्र यांनी त्याचे शरीर भेदले जाणार नाही. हनुमंत अजरामर होईल." ब्रह्मदेवाने वर देताना सांगितले की, "याला ब्रह्मदंड किंवा ब्रह्मशाप यांची बाधा होणार नाही. सर्व द्वंद्वांपासून हा मुक्त राहील." नंतर स्वतः इंद्रानेही वर दिला. "माझे वज्र याच्या हनुवटीला लागले असल्याने तो हनुमंत या नावाने सर्वत्र प्रसिद्ध होईल. माझे वज्र याला बाधा करू शकणार नाही त्यामुळे तो वज्रदेही होईल. सुर-असुरांना तो आवरणार नाही आणि याची त्रिलोकी कीर्ती होईल." हे सांगून इंद्राने कौशिक ऋषींची तेजस्वी कमलमाला हनुमंताच्या गळ्यात घातली. ही माला कदापीही सुकणार नाही अशी होती."

"इतरांप्रमाणे सूर्यानेही वरद-वचन सांगितले, "हनुमंत जसा जसा वाढेल तसा तसा माझ्या शक्तीपेक्षा अधिक सामर्थ्यवान होईल, आणि राक्षसांचा घात करील. याने ज्ञानवंत होण्याची आकांक्षा धरली तर सर्व वेदशास्त्रांचे ज्ञान मी याला देईन. त्यामुळे तो परमार्थी म्हणून प्रसिद्धी पावेल." वरुणाने वर देताना म्हटले, "शंभर वर्षे जरी हा हनुमंत पाण्यात बुडून राहिला तरी याला मरण येणार नाही. पाशबंधन याला बाधणार नाही. यम म्हणाला, "मी वर देतो की हा अत्यंत सुखी होईल; याला यमाचा कालदंड बाधा करणार नाही; याचे आरोग्य जरा नसल्याने अखंड राहील." कुवेराने वर देताना म्हटले, "वर्षानुवर्ष युद्ध करूनही तू दमणार नाहीस आणि तुला अस्त्रांची बाधा होणार नाही." विश्वकर्म्याने वर दिला तेव्हा म्हणाला, "मी शस्त्रे निर्माण केली, पण ती हनुमंताला अजिबात युद्धात बाधणार नाहीत. तसेच माझे शिल्पशास्त्राचे ज्ञान तुला पूर्णपणे प्राप्त होईल. "असे म्हणून त्याने हनुमंताला आलिंगन दिले. ब्रह्मा हा तर सर्वांचा जगद्गुरू; तो संतोषाने वायूला म्हणाला, "हनुमंत

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Muthulakshmi Research Academy / Sarayu Foundation Trust and eGangotri

म्हणजे भाग्याची रासच आहे. कारण सर्वच देव त्याच्यावर संतुष्ट झाले आहेत. धीर, वीर, महाशूर, अनावर, वज्रशरीराचा आणि शस्त्रसंभार त्याला बाधू शकणार नाही असा तुझा पुत्र सद्‌भाग्याचा आहे. हा भाग्यशाली हनुमंत लंकानाथाची गांजणूक करून, सीतेचा शोध लावून, रघुनाथाला सुखी करील. तुझा हा महापराक्रमी पुत्र इंद्रजिताशी झगडून, राक्षसांचे कंदन करून, लंकेची होळी करील. परम भाग्यवान असा हा हनुमंत सीतेची भेट घेऊन तिला सुखी करील. तसेच तिचा शोध रघुनाथाला सांगून त्यालाही सुखी करण्याचे कार्य करील. श्रीरामाच्या सैन्यातला अचाट, अदम्य हनुमंत हा सेवाभावामुळे श्रीरामाला आप्त वाटू लागेल.'' अशी भविष्यातली हनुमंताची ख्याती प्रत्यक्ष ब्रह्मदेवाने सांगितल्याने वायूच्या चित्ताला पुत्राची कीर्ती ऐकून उल्हास झाला.

वायूचा आनंद, मारुतीच्या बालक्रीडा, शाप

''हनुमंताला अनेक वर मिळाल्याने वायूला उल्हास वाटून, त्याने प्राणवायूची मुक्तता केली. त्यामुळे सर्वांना सुख वाटले. सुरवर, ऋषीश्वर, चराचर सुखी होऊन त्यांनी जयजयकार करून त्रिभुवने भरून टाकली. हनुमंताला वर देऊन देव आपापल्या ठिकाणी गेले. वायूने हनुमंताला आणून अंजनीच्या स्वाधीन केले. हनुमंताची बालकीर्ती त्रिजगतात पसरली. फळ म्हणून बालसूर्याला धरायला निघाला त्यामुळे सुरवरांनाही त्याची कीर्ती पटली. हनुमंताचे सिद्ध सामर्थ्य, तेच देवांनी पुन्हा वरदानाने दिले, त्यामुळे श्रीरामाला हनुमंताच्या अगाध सामर्थ्याच्या कीर्तीने सुख आणि समाधान झाले. श्रीरामाचे जे सामर्थ्य, हनुमंताच्या शक्तीचीही ती मर्यादा, त्या दोघांत अहोरात्र एकात्मता होती. लोकव्यवहारात मात्र ते देवभक्त म्हणून मानले गेले. लोकांच्या दृष्टीपुरता श्रीराम देव आणि हनुमान भक्त असा भेद होता. देव-भक्त हे राम-मारुती यांचे नाते केवळ लोकसंग्रहापुरते होते. ज्याप्रमाणे डोंगरात दावानलाची ख्याती; घरच्या दिव्याची तेवढीच प्रकाश-तेजस्विता, त्याप्रमाणेच राम-हनुमान यांची स्थिती होती.''

''हनुमंत हा जेव्हा मातेपाशी होता तेव्हाच त्याच्या अंगात अद्‌भुत शक्ती होती. त्यावेळी बालभावाने त्याने उद्धटपणे दांडगाई केली म्हणून ऋषींनी हितकर शाप दिला. गंगातीरावर ऋषींची वस्ती होती. तेव्हा हनुमंताने ऋषींचे सर्व आश्रम हाताने उचलून, ते दूरच्या पर्वतावर नेऊन ठेवले. तेथे ऋषींना स्नानाला आणि पिण्याला पाणी मिळेना. त्यांनी आपल्या तपःसामर्थ्याने पुन्हा गंगातीरावर आगमन केले. त्यावर हनुमानाने पुन्हा ते दूर पर्वतावर नेऊन ठेवले. पुण्यपर्वतावर ऋषींनी वस्ती केली तर हनुमंताने तो पर्वतच हाताने उचलून ओसाड माळरानात नेऊन ठेवला. ऋषींना जल आणि फळे न मिळाल्याने ते तळमळत राहिले. बालभावाच्या प्रकारे हनुमंत ऋषींची यज्ञपात्रे फोडी; दर्भासन., अजिने फाडी; भटांची जानवी तोडी. लहान ब्रह्मचारी बटूंना आपल्या शेपटीत गुंडाळून, स्वतः हनुमंत आकाशात उड्डाण करत असे. त्यावेळी ती मुले कासावीस होत आणि ऋषींच्या पत्नी तळमळत राहात. मारुती हाताच्या दणक्याने हत्ती मारून त्याचे शव आश्रमात टाकत असे. ते अजस्र शव काढताना सारे शिष्यसमूह रडकुंडीला येत; पण काही उपायच चालत नव्हता. ब्रह्मवराच्या वरदानामुळे हनुमंताला शाप बाधत नसे. तेव्हा सर्वजण ब्रह्मयाकडे येऊन त्याला त्यावर काय बुद्धी चालवावी हे विचारू लागले. ब्रह्मा त्यांना म्हणाला, ''हितकर असा त्याला शाप द्या. मारुती जेव्हा रघुनाथाला भेटेल तेव्हापर्यंत त्याची शक्ती लीन राहील. जशी यौवनाचे थोर सौभाग्य पावल्यावर कुमारी गुप्तता राखून असते, त्याप्रमाणे याच्या सामर्थ्याची थोरवी, याच्यातच होऊन राहील. नंतर ज्याप्रमाणे तारुण्य येऊन

https://archive.org/details/muthulakshmiacademy Bhuvan Vani Trust, Lucknow

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

स्त्री यौवनाने मुसमुसते, त्याप्रमाणे श्रीरघुनाथाची भेट झाल्यावर पुन्हा याला सामर्थ्य येईल.'' असा ऋषीवरांकडून शाप देवविला गेल्यावर हनुमंताची शक्ती लीन झाली. मग तो साधू वृत्तीने राहिला आणि ऋषींपुढे नम्र होऊन वागू लागला.''

''द्रव्यमद, तारुण्यमद, अंगातल्या वळामुळे शक्तिमद, यामुळे पुरुष क्षुब्ध होऊन, अभिमान धरून, विरोध करू लागतो. चांगला व्यापार झाल्यावर व्यापारी नाना प्रकारची कर्मे करतो; परंतु निराधार झाला म्हणजे मग पापपुण्याचा विचार करू लागतो. कसली संध्या, कसले स्नान, कशाला पाहिजे आत्मज्ञान, अधिकार क्षीण झाल्यावरच प्राण्याला विवेक सुचू लागतो. तसेच हनुमंताचे झाले. त्याचे बल निस्तेज झाल्याने आता तो परमार्थ-प्राप्ती, साधुसंतांची सेवा यांचा विचार करू लागला. पूर्वी त्याला सूर्याचे वरदान होते की जेव्हा तो इच्छा करेल तेव्हा सूर्य प्रसन्न होऊन त्याला ज्ञानसंपन्न करत होता. ते ज्ञान मारुतीने इच्छिले, त्याबरोबर अंतरात ज्ञानसूर्य उपजला, ज्ञान-विज्ञानाने लीनता आली आणि रामाच्या ठायी देहात विदेहता आली. ज्ञान-विज्ञानाची परिपूर्णता, देहात विदेहता, श्रीरामाची भक्ती यांमुळे हनुमंत जगात वंद्य ठरला. वाली आणि सुग्रीव यांच्यातील कलहाच्या प्रसंगी शापामुळे हनुमंताची शक्ती गुप्त झाली होती; यासाठीच त्याने वालीचा घात केला नाही हे सत्य श्रीरामा समजून घे. हनुमंत हा सुग्रीवाचाच आप्त होता. पण शक्ती गुप्त होण्यामुळे तो वालीचा घात करू शकला नाही. श्रीरामा हेच सत्य आहे.'' या प्रकारे हनुमंताची कीर्ती ऐकून श्रीराम सुखावला. नंतर श्रीरामाला विचारून अगस्ती ऋषी आपल्या आश्रमाकडे गेले. श्रीरामाने सुखभावनेने हनुमंताला आलिंगन देऊन म्हटले. ''हा मला सीतेच्या शोधात आणि रणकंदनात साह्यकर्ता होईल.''

अध्याय अकरावा

श्रीरामाला सर्व वानरसेनासंभार आणि अत्यंत धाडसी हनुमंत महावीर पाहून सुख झाले. नंतर सुग्रीवाने रामाला वंदन करून म्हटले., ''ही कडकडाट करणारी वानरसेना वेगात वैकुंठात प्रवेश करेल किंवा कैलास पर्वताच्या तटावर, अथवा मेरूच्या पाठीवर घाला घालू शकेल. आम्ही वानरवीर पाताळाच्या पोटात प्रवेशून कोट्यवधी दानवांना मारू किंवा दैत्यांचे समूह उठाउठी नष्ट करू. गंधर्व, गण, किन्नर, सुरवर, यक्ष, राक्षस, नर यांचे माझे वानरवीर निर्दाळण करतील. चराचर उलथतील. लोकालोकांही पलीकडे अवचित वेढा घालून हे वानर नियत कार्य साधतील. तर रघुपती आपण त्यांना लवकर आज्ञा द्यावी.'' सुग्रीवाचे बोलणे ऐकून श्रीराम प्रसन्न होऊन, आजानुबाहु पसरून, सुग्रीवाला अलिंगन देऊन, म्हणाला, ''हे कपिराजा, आता सीतेचा शोध घ्यावा आणि रावण कोणत्या ठिकाणी राहतो आहे तेही तत्त्वतः शोधावे.''

श्रीरामाने आज्ञा करताच, सुग्रीवाने त्याच्या चरणांवर मस्तक टेकले आणि हर्षभराने त्याने वानरांना आज्ञा सांगितली. विनतनामा या महावीराला शतसहस्त्र सेना देऊन तातडीने सीतेचा शोध करण्यासाठी पूर्वेला धाडले. नंतर तारेचा पिता सुषेण याचे चरणवंदन करून म्हटले, ''आपण सीतेच्या शोधासाठी जाऊन, संपूर्ण पश्चिम दिशा धुंडाळावी. आपण मला पितृतुल्य सासरे अशा नात्याने आदरणीय असून, माझी कळकळ पूर्णतः जाणताच. तेव्हा जन, विजन शोधून सावधानतेने सीता कुठे दिसते का पाहावी. तसेच राष्ट्रे, पुरे, पाटणे, नगरे, ग्राम, गुहा, गिरिकंदरे, शिखरे सर्वत्र शोध घ्यावा. मग सुग्रीवाने शतवळी नावाचा जो वानरांमधला अत्यंत श्रेष्ठ महावीर, त्याला शतकोटी सेनासंभार देऊन उत्तर दिशेला शोधासाठी पाठविला. ''आपण रावण

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

कोठे राहतो हे मुख्यतः शोधावे; तसेच रघुनंदनाच्या सुखासाठी सीतेचाही शोध घ्यावा. खेडी, शहरे, लहान गावे, नगरे, पर्वत-शिखरे, प्रवाह, गिरि-गुहा, विवरे, कंदरे, मेरूची पटारे शोधावी.'' नंतर आग्नेय, वायव्य, ईशान्य, नैऋत्य या दिशांना कोणा कोणाला पाठविले ते सावधपणे ऐका. पद्म, पद्माक्ष, कुमुद आणि कुमुदाक्ष हे चार अति दक्ष वीर होते; त्यांचा सुग्रीवाने सन्मान केला; कोटी, कोटी, सेना देऊन त्या चौघांना चार कोनात धाडले. त्यांनी रावणाला मारावे आणि सीतेला शोधावे असे सांगण्यात आले. रावण जर तत्त्वतः सापडलाच नाही, तर सीतेचा शोध तेवढा त्वरित आणा. नंतर मी रावणाचा वध करून, श्रीरामाची पत्नी घेऊन येईन. चवघांनी आपला पराक्रम सांगताना म्हटले, ''रावण बापडे घुंघुरटे ते कोण? दृष्टीला पडताच आम्ही एका घावात त्याचे निर्दाळण करू. त्यावर सीतेला खांद्यावर घेऊन नाचत येऊ. हे कपिराज आम्ही सत्य सांगतो की श्रीरघुनाथाला आम्ही सुखी करू.'' तार आणि तरळ यांना पाताळात शोध घेण्यासाठी कोटी सैन्य देऊन पाठविले. ते दोघे वानरांमधले प्रबळ वीर होते.

अतळ, वितळ, सुतळ, रसातळ, महातळ, तळातळ आणि पाताळ अशी सप्त पाताळे त्यांनी शोधावी असे सांगण्यात आले. '' पाताळ कसे शोधायचे याविषयीची रीत मी सांगेन त्याप्रमाणे शोध घ्या. नीट सावधपणे ऐका. पाताळ-लोकात कोठे कोण नांदतो आहे ते सांगतो. सीतेचा तसा शोध घ्या. अतळात मयपुत्र बळ राहतो. तो नावाप्रमाणे प्रतापात बलवान आहे. त्याचा मंत्री दैत्य बळ हा दुर्धर, हलकल्लोळ करणारा आहे. तेथे रावणाचा शोध घेताना दैत्यगण आडवे आले, तर रावणासह त्यांचेही मर्दन करून, आपण सीता आणावी. वितळात हाटकेश्वर असतो. उमाकांत, कर्पूरगौर जिथे हाटक नदीचा पूर, ज्यातून सुवर्णसंभाराचा प्रवाह जातो; रावण शिवाचा भक्तगण असल्याने तेथे सापडण्याची शक्यता आहे. तो सापडलाच तर त्याचा वध करून, आपण सीतेला आणावे. सुतळात महान् वैष्णव बळी असतो. त्याचा द्वारपाळ (वामन) वनमाळी असतो. प्रल्हाद त्याच्या जवळ, वैष्णवकुळात नांदतो. तिथे सीता आणि रावण यांचा शोध घेऊन, रावण सापडताच त्याला मारून, सीतेला आणावे. त्रिपुराचा वध शंकराने केल्यावर मयासुराला रसातळात शिवाने स्थापला. आता तो महावीर सपरिवार तेथे राहतो आहे. तो रावणाचा नातलग आहे. तेथे रावण सीतेसह असेल, तर त्याचा प्राण घेऊन, जानकीला आणावे. महातळात कद्रुसुत, जे विष धारण करणारे, रागीट असे सर्प, ते राहतात. तेथे रावण शोधावा. जर दृष्टीला पडलाच तर त्याला मारून, सीतेला आणून श्रीरामाला सुख आणि संतोष द्यावा. तळातळी फणी दानव राजा असून त्यांच्यातील निवातकवच आहेत ते सर्व वीर असून इंद्राचे वैरी आहेत. दनुपासून जन्मलेले ते दानवसमूह टवटाळक नामविधीचे आणि असंख्य आहेत. ते इंद्राचे शत्रू आहेत. तेथे रावण सापडल्यास त्याचे निर्दाळण करून टाकताना दानव आडवे आले तर त्यांचाही नाश करावा. दानव जरी असंख्य असले तरी तुम्ही वानरही कोट्यानुकोटी आहात; तेव्हा रामकार्यावरचे लक्ष डोळ्यापुढे ठेवून त्यांचा नाश करा. रणात अटीतटीचे युद्ध करून दानवांचा नाश करा. मग रावणाला मारून, सीतेला आणा. सातव्या पाताळात, शंभर आणि हजार फणा असलेले महा-नाग आहेत. वासुकी हा प्रमुख असून इतरही अनेक मुख्य नाग आहेत. ते सारे पद्मिनी भोगण्यात दंग असतात. स्वर्गातल्या उर्वशी, रंभा या सुंदर अप्सरांप्रमाणे पाताळातील या पद्मिनी स्त्रिया असून, काही अधिक सुंदर आहेत, अशी त्यांची चराचरात वाखाणणी होत असते. तेथे अत्यंत सावधपणे स्वतःशोध करून लंकानाथ सापडल्यास त्याचा वध करून, त्वरेने सीता घेऊन यावे.'' असे सुग्रीवाने वानरवीरांना सांगितले.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized By Sarayu Foundation Trust and eGangotri

सुग्रीव पुढे सांगू लागला की, "त्याच्या तळाशी त्रिशत योजनांवर सहस्त्र शिरांचा शेष आहे. त्याच्या शरीराचा भोग घेत, श्रीरंग त्यावर निद्रा करतो. तिथे जानकी आणि दशशिर रावण यांचा शोध घ्यावा; सापडल्यास रावणाला मारून सीतेला आणावे. तिथे शोध घेतल्यावर लगेच वानरांनी परत फिरावे. पुढे वाट काढत गेलात तर अघोर स्थितीत पडाल. त्याच्याही तळाशी अंधतामिस्त्र महानरक आहे. त्याच्याखाली कूर्म असून तेथे आवरणोदक आहे. पापी नर नरकात जातात. तुम्ही तो मार्ग सोडून, रामनामाचा गजर करून त्याची भक्ती करा. ज्यांना स्वर्गभोग आवडत नाही, भोगेच्छा धरून जे पुण्य करतात, ते जीव पाताळवासी होऊन आपले भोग भोगतात. ज्यांचे तिळभरही पुण्य नाही आणि जे केवळ पापाचरण करणारे आहेत, ते नर नरकात पडून शिजत राहतात. पापामुळे ते पापाचारी होतात. तुम्हाला जर रावण आवरत नाहीसा झाला तर सत्वर तो शोध मला सांगायला या म्हणजे मी त्याचे निर्दाळण करीन." सुग्रीवाचे बोलणे ऐकून वानर आवेशाने म्हणाले, "रावण म्हणजे एक दहा तोंडाचा किडा आहे. सीतेसह त्याला बांधून निश्चित रामापुढे आणू." सुग्रीवाने पाताळ शोधायची रीत अत्यंत व्यवस्थित कथन केली. नंतर त्याने तार वानराला स्वर्गाकडे पाठविला, त्या संबंधीची व्यवस्था ऐका.

सुग्रीवाने तार वानर, जो तेजोराशी होता, त्याच्या बरोबर शतकोटी सेना देऊन त्याला स्वर्गाकडे पाठवून सीतेचा शोध घ्यायला सांगितले. सुग्रीव तार वानराला म्हणाला, "स्वर्गामध्ये सीता कशी शोधावी हे सांगतो. सावधपणे स्वबळावर हा शोध घ्यावा. पृथ्वीच्या वर, सूर्यमंडळाच्या खाली, जेथे यक्ष, रक्ष, गंधर्व राहतात, तेथे सीता शोधावी. स्वर्गलोक अनेक आहेत. त्याविषयी मी थोडक्यात सांगतो. तुम्ही त्या त्या ठिकाणी सीतेचा शोध करा. सूर्यलोक लक्षांतरी, लक्षयोजने चंद्र त्यावर. तारालोक त्याच्या वर लक्षांतर दूर आहे. तारालोकाच्या वर बुधलोक लक्षांतरावर. बुधलोकाच्याही वर दोन लक्षांतर भृगुलोक आहे. दैत्यांचा गुरू भृगुपती असून, शुक्र आणि रावण यांचे अत्यंत प्रेमसंबंध आहेत. तेथे निश्चितपणे रावण सीतेसह असेल. तिथे सीता दिसली आणि तुम्ही तिला बळाने गर्जना करून आणू पाहाल. तर शुक्र मुद्दाम आडवा येईल. तर त्याविषयी ऐकून ठेवा की तो ब्राह्मण मारू नये. श्रीवामनाने त्याचा एक डोळा फोडून त्याला काणा केला आहे. त्याचा दुसरा डोळा फोडून रामपत्नीला आणावी. तिथे जर सीता नसेल तर लगेच शुक्रलोकाच्या वर दोन लक्ष असलेल्या भौमलोकात जावे. भौमलोकाच्या वर दोन लक्ष योजन अंतरावर देवगुरू वस्ती करून आहे. सुरवरांना तो पूज्य आहे. त्या ठिकाणाहून दोन लक्ष योजनांवर सूर्यपुत्र शनी आणि त्याहून लक्ष योजन अंतरावर सप्तऋषी आहेत. तेथे अरुंधती असेल; तिला सीतेविषयी विचारावे. ती श्रीरामासाठी सत्य तेच व्यवस्थित सांगेल. त्याच्या पुढे दशलक्ष योजन अंतरावर अमरावती आहे. तेथे इंद्र हा सुरपती स्वर्गसंपत्तीसह नांदतो त्या स्थानी सीतारत्न शोधावे. चैत्ररथ गंधर्वाचे नंदनवन, कल्पतरूंचे उद्यान हे स्वतः शोधून पाहावे."

"त्यापुढे संपूर्ण त्रैलोक्य म्हणजे स्वर्ग, मृत्यू, पाताळ ह्याच्याही वर सीतेला शोधायचे एक स्थळ आहे. ते म्हणजे कैलास पर्वताच्या पठारावरची कुबेराची अलका नगरी. तेथे सुगंधी सुवर्णकमळे सजीव सरोवरात विकसित होतात. ज्यांचा सुगंध घेऊन ब्रह्माही स्तब्ध होतो; अशा ठिकाणी श्रीरामाची भार्या शोधावी. कुबेर रावणाचा थोरला भाऊ आहे. तिन्ही लोकांच्या वर जाण्याची रावणाला शक्ती कुठली म्हणाल तर सीता बरोबर असल्यामुळे राक्षसाला ती गती मिळेल. कारण 'सीतेच्या हरण प्रसंगाबरोबर राक्षसांना वर जायची शक्ती प्राप्त होईल' असे अनेक ग्रंथात म्हटले आहे. त्यातले सत्य आणि मर्म सात्त्विकांना समजून येईल. तीन लोकांच्या पुढे भक्तकृपाळू

https://archive.org/details/muktabodhaacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

श्रीहरी अलक्षलक्ष लक्षांतरावर आहे. त्याच्या कृपेने ध्रुवलोक झाला. त्रिलोकात प्रलयकाळ आला तरी ध्रुवाला कधीही बाधा न होता, तो नित्य अचल आणि अढळ अशा ध्रुवपदी असतो. ध्रुव हा शूर, वीर भगवद्भक्त असून, त्याने सीतेचे आक्रंदन ऐकले तर तो रावणाचे दात पाडून, सीतेला निश्चित सोडवील. ध्रुव सीतेला माता मानून अढळपदावर तिचा प्रतिपाळ करील. रघुनाथाच्या सुखासाठी त्याला विचारावे. तिथेही जानकीचा शोध लागला नाही तर त्यापेक्षाही अधिक प्रबळ स्थान आहे. त्या विषयी मी आता सांगतो, तुम्ही निश्चलपणे ऐका. तेथे जाण्याविषयी एकच गती आहे. मनातला विकल्प सोडून देऊनच महावीराला त्या स्थानाची प्राप्ती होते हे निश्चितपणे जाणा.''

''पृथ्वीपासून कोटियोजने हा महर्लोक आहे. तेथे कल्पायू जन राहतात. ते त्यांचे वसतिस्थान आहे. तेथे सीता शोधावी. त्याच्याही वर कोटियोजनांवर जनलोक आहे. तिथे ऊर्ध्वरेते योगी, सनकादिक राहतात. त्यांना सीतेविषयी अवश्य विचारावे म्हणजे ते योग्य रीतीने सांगतील. तेथून पुढे दोन कोटी योजने तपोलोक वसलेला आहे. तेथे वैराजदेवांना निवासक तपस्वी हे अत्यंत शांत वृत्तीचे असून, प्रदीर्घ तपाने जे तापस कर्कश, रागीट, नित्य संतापणारे आणि लहानशा कारणासाठीही शाप देणारे असतात, तसे हे नाहीत. अत्यंत शांत, उपकारासाठी तप करणारे, सर्व दीनांना तारणारे, भक्तिभावाने भगवंताची उपासना करणारे, असे ते आहेत. दीनांचा उद्धार करावा म्हणून जे जे कर्म ते ते पूर्णपणे करणारे असे ते आहेत. त्यांना नमन करून सीतेविषयी विचारावे. पुढे ब्रह्मभुवन आहे तेथे शोध करावा. तपोलोकाहून चार कोटी अधिक उंच सत्यलोक असून तेथे चतुर्मुख ब्रह्मा हा स्वामी आहे. जो ब्रह्मा सृष्टी स्वतः निर्माण करतो त्या लोकाचा महिमा हे वानरश्रेष्ठा ऐक. अन्य कशाचीच उपमा त्या स्थानाला नाही. तेथे मूर्तिमंत वेद, धर्म, ब्रह्मचर्य, तप हे शुद्ध स्वरूपात सांगितले जातात. जे गायत्री वेदबीज अत्यंत गुप्त असते ते तेथे मूर्तिमंत असते. तेथे वाचा, दया, तिन्ही यज्ञ हे मूर्तिमंत होऊन राहतात, एकत्वाने नांदतात. असा सत्य सत्यलोक असून असत्य तिथे नसते. तेथे गायत्रीमंत्र जपणारे, तीर्थोपासक ब्राह्मण निष्कामपणे यज्ञोपासना करणारे असेच लोक राहतात. ब्राह्मणकार्यासाठी जे मेले, गोरक्षणार्थ जीव दिले, परोपकारासाठी ज्यांनी प्राण वेचले, ते सत्यलोक पावले. ज्यांनी निष्कामपणे द्विज पूजले, त्यांना भोजन दिले, निरपेक्षपणे ज्यांनी यजन केले, ते सत्यलोक पावले. जे कृपाळू, दीनोद्धारक, दयाळू, बंधविमोचक, सत्यवादी, सात्त्विक तेच सत्यलोकात राहतात. लोकांची निंदा करण्याविषयी जे मूक, परस्त्रीच्या बाबतीत जे नपुंसक, जे कोणी परद्रव्यापासून पराङ्मुख तेच सत्यलोकात राहतात. अशी त्या सत्यलोकाची स्थिती असून ब्रह्मा हा तिथला अधिपती आहे. याच्यावर निश्चितपणे ब्रह्मसृष्टी नाही. हे महावीर वानरश्रेष्ठा, रावण हा पौलस्तीचा पुत्र असल्याने ब्रह्मयाचा नातू आहे. तेव्हा तो सीतेसह सत्यलोकात राहिला असेल.''

सुग्रीव म्हणाला, ''इंदिरावर सरोवरात किंवा सामसोमवनवृक्षांमध्ये काय थोरवी आहे आणि चराचरात अनुपम असे ते ठिकाण का आहे ते ऐक. इंदिरावर सरोवरात स्नान केले तर सर्व रसांची गोडी सर्वांगाला मिळते; यापुढे अमृतपानही फिके पडते. तेथे सौभाग्याने स्नान घडलेच तर अगाध अशी पूर्ण गोडी प्राप्त होईल, म्हणून सीतेसह रावण तिथे असल्यास आपण शोध घ्यावा. सामसोमवृक्षाच्या छायेत बसल्यावर कशी विश्रांती मिळते? तर सुषुप्तिसुख ही तिथली दासी असते आणि स्वर्गसुख ओवाळणी करते. त्या छायेच्या सुखासाठी कोट्यानुकोटी जन पुण्य संपादन करतात; तरीही त्या छायेची प्राप्ती होत नाही. ती गोष्ट अगम्य आहे. अटीतटीने पुण्य संपादून प्राणी बापडे सत्यलोकात येतात. त्यांनाही ही गोडी लाभत

https://archive.org/details/@lucknowmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

नाही. त्यासाठी पुण्य जोडणे दुर्लभ आहे. जसे जावयाबरोबर घोडा आला की दाणापाणी, कडवा त्याला दिला जातो, पण त्याला पक्वान्न मिळत नाही, तसे साधकाचे होते. सत्त्वाचे प्रकार शोधत, गाळीव पुण्याच्या कोटी कराव्या, तेव्हाच तिथली अवस्था प्राप्त होते. येथील गोडी अगाध आहे. त्या ठिकाणचे समाधान समाधिसुखाच्या समान आहे. भगवद्भजन न करताही तेथे पुनरागमन नाही. यासाठी भगवद्भजन केले की चारी मुक्ती दासी होतात. श्रीरामनामाच्या पलीकडे साधनशक्ती असतच नाही. ते अभागी जन पाहा, जे श्रीरामस्मरण सोडून निरनिराळी साधना करत राहतात आणि मग जन्ममरणातून त्यांची सुटका होत नाही. नामापाशी साधनशक्ती असते. नामस्मरणाने भक्ती मुख्यत्वे होते. भक्तीपाशी चारी मुक्ती असतात हा वेदशास्त्रार्थ आहे निश्चित. श्रीरामनामस्मरण केल्याने मुख्य भक्ती होते हे संत स्वतः जाणतात. हे आता किती प्रकारे सांगावे. तर पुढे असे की, सामसोमवृक्षांमध्ये जानकीसह रावण महाबळी बसलेला दिसतो का ते शोधून पाहा."

सुग्रीवाने पुढे सांगितले की, "तेथेही रावण नसला, तर त्याला कैलासात शोधा. कारण, तो शिवभक्ती करणारा आहे त्यामुळे शिवलोकात त्याला शोधावा. शिवलोकात जाण्याची शक्ती आमच्यामधे नाही म्हणाल, तर रामनामाचे आवर्तन केल्याने शिवलोक सुलभपणे प्राप्त होतो. शिव पूर्णतया श्रीरामाचा भक्त आहे. श्रीरामस्मरण ऐकून तोच सामोरा येईल. तो रामनामाचा सन्मान करणारा आहे. रामनाम अहोरात्र स्मरावे कारण शिवाला रामाचा सन्मान आहे. त्यामुळे शिवलोकात जाण्यासाठी रामनाम हे सुलभ साधन आहे. वैकुंठ किंवा कैलास यांचा वृत्तान्त वेदशास्त्रालाही अगम्य आहे. त्याविषयी सीतेच्या शोधासाठी काय करावे ते मी सांगतो. सात आवरणांच्या बाहेर, मायेच्या आवरणामध्ये वैकुंठ आणि कैलास यांची थोरवी असते. हे भगवंत स्वतः करतो. ब्रह्मसृष्टीत प्रलय होतो. वैकुंठ, कैलास किंवा शेषशायी या तिहींना प्रलय नसतो. हे याज्ञवल्क्य ऋषींनी सांगितलेले आहे. तरी देखील ते तिन्ही प्रलयाच्या पलीकडचे नाहीत. तसे म्हणू नये हे निश्चित. कारण अत्यंत असा प्रलयातला प्रलय झाला तर त्यांनाही प्रलय प्राप्त होतो. असे प्रलय आहेत तरी किती? असा प्रश्न विचारण्याचे मनात असेल तर तेही सांगतो. साधुवृत्तीने ते ऐका. पहिला तो नित्यप्रलय, दुसरा हा मरणप्रलय, तिसरा दैनंदिन प्रलय, ब्रह्मप्रलय हा चवथा, पाचवा प्रलय हा आत्यंतिक, तो लोकांना माहिती नाही. त्या पाचांचा विवेक मी स्पष्ट करून सांगतो."

"नित्यप्रलय म्हणजे गाढ निद्रा किंवा सुषुप्ती. मृत्यू झाला की मरणप्रलय. ब्रह्मयाचा दिनान्त म्हणजे दैनंदिन महाप्रलय. सप्तावरणे विरून संपूर्ण ब्रह्मांड विरते तेव्हा सृष्टिकर्ता (हिरण्यगर्भ) स्वतः मरतो तो ब्रह्मप्रलय, असे हे चार प्रलय आहेत. आत्यंतिक प्रलय हा लोकांच्या दृष्टीला पडत नाही. तो ब्रह्मज्ञानाच्या पोटी असून. गुरुवाक्यानेच उजळून उठतो. गुरुवाक्याची दृष्टी जर लाभली तर लहान-थोर हा भेद समूळ नष्ट होतो. मग कुठला देव आणि कुठली सृष्टी. नळी निमटी जीवशिवाला होते. ज्ञेय-ज्ञाता-ज्ञान, ध्येय-ध्याता-ध्यान, दृश्य-द्रष्टा आणि दर्शन या त्रिगुण त्रिपुटीचे निर्दाळण होते. ब्रह्म हे पूर्णत्वाने परिपूर्ण असले की जीवशिवत्व नाहीसे होते. मग कसले वैकुंठ, कैलास, शेषशायी, मी-तूपण, यातले काहीच नसते. वैकुंठातला नारायण, शेषावरचे शेषशयन, कैलासातला त्रिनेत्र शिव सर्व काही परब्रह्मात विरून जाते. गुरुवाक्याच्या अनुषंगाने हे अत्यंतप्रलयाचे रूप सांगितले. एक ब्रह्मच एकटे सर्वत्र पूर्णपणे कोंदून असते."

श्रीराम सुग्रीवाचे कथन ऐकून मनात संतोष पावला. दोघांनी हर्षभराने एकमेकाला मिठी मारली. दोघांना सुख, स्वानंद, संतोष झाला. सुग्रीवाला वानरपण आणि रामाला रामपण आठवेना. त्या

https://archive.org/details/@tulasimaiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Trust and eGangotri

दोघांचे ऐक्य पाहून लक्ष्मण त्यात सहभागी झाला. त्यांची मिठी पडताच तिघांचीही ज्ञेय, ज्ञाता, ज्ञान ही त्रिपुटीच जणू विरून गेली; सृष्टी हर्षभरित झाली; श्रीराम सुखसंतुष्ट झाला. आत्यंतिक प्रलयाची परिपूर्णता म्हणजे स्वतः श्रीरामच होय. त्याला समोर पाहताच त्याचे सगुण रूप म्हणजे परिपूर्ण ब्रह्मच असा श्रीराम दिसतो. सीता शोधाचे ज्ञान शुद्ध ब्रह्म श्रीरामाला होते. आता सुग्रीव वानराला पूर्ण ब्रह्मप्राप्ती झाली. त्यामुळे सर्वार्थाने श्रीराम सुखी झाला. श्रीरामाच्या संगतीने वानराला ब्रह्मप्राप्ती झाली. अशी सत्संगाची ख्याती असून, निंद्य तेही अत्यंत वंद्य होतात. हा एका (संत एकनाथ) जनार्दन गुरूला शरण आहे. श्रीराम हा कारणाचे कारण आहे, त्याच्यामुळे रामायण रम्य आहे, त्याच्या नामाचे स्मरण तारक आहे. त्याच्या नामाने अहल्येचा उद्धार झाला, पिंगला गणिका पावन झाली; त्याच्या नामस्मरणाने भुक्ती, मुक्ती पूर्ण होतात; त्याचे नामस्मरण हे परब्रह्मच आहे. श्रीराम हा सगुण रूपात दिसला तरी तो देहातच विदेही आहे. दीनोद्धारासाठी हा आपल्या पायाने स्वतः वनात आला. जो देवांना नमस्काराला दुर्लभ, जो वेदशास्त्रांना कळत नाही, तो वानरांचा सखा झाला, त्या श्रीरामाने वनचर वानरांना उद्धरले. अशा रामाला एका जनार्दन (एकनाथ) शरण आहे. श्रीराम दीनोद्धारक असून, त्याच्या नामाने जन तरतात, त्याच्या नामाने भवबंधाचा छेद होतो; त्याच्या नामापरते अन्य साधन नाही."

अध्याय बारावा

सुग्रीवाने स्वर्गातल्या विविध स्थानांची माहिती सांगून, सीतेचा शोध करण्यासाठी वानरवीर ताराला पाठविले. स्वर्ग, पाताळ, उत्तर, पूर्व, पश्चिम अशा सर्व ठिकाणी सुग्रीवाने वीर धाडले. त्यावेळी तो दक्षिण दिशा विसरला असे नव्हे, तर दक्षिण दिशेला सीतेची प्राप्ती निश्चित होणार असल्याने, सुग्रीवाने तो गोड घास राखून ठेवला होता. रामायण ग्रंथातला गोड घास म्हणजे सीताशुद्धीचा प्रसंग होय. हनुमंत त्या प्रसंगात थोर ख्याती करण्यासाठी लंकेत जाईल. दक्षिण दिशेचा विचार हा सीतेच्या प्राप्तीचा मुख्य आधार असल्याने सुग्रीवाने तेथे सूर्यासारखे प्रतापी, महाशूर, वीर धाडले.

दक्षिण दिशेला गेलेले वानरवीर

सुग्रीवाने दक्षिण दिशेला शोध घेण्यासाठी ब्रह्माचा पुत्र, अस्वलांचा राजा, महाबळी जांबवंत याला नेमले. अग्निपुत्र आणि सेनापती नीळ, विश्वकर्म्याचा पुत्र नळ, गज, गवाक्ष, शरभ हे वीर आणि त्यांचे प्रचंड सेनासंभार दक्षिणेकडे जातील असे ठरले. मैंद, द्विविद हे अत्यंत प्रसिद्ध वीर, तसेच तयार सैन्यासह युवराज अंगद त्यांच्या बरोबर पाठविला. अंगद हा महावीर बरोबर श्रेष्ठ वानर घेऊन दक्षिणेकडे शोध घेण्यासाठी निघाला तेव्हा वानरांनी भुभु:कार केला. पूर्व, पश्चिम, उत्तर या दिशांना जे वानरवीर निघाले त्यांनीही भुभु:कार केला. त्या आवाजाने आकाश दुमदुमले. त्या नादाने, उच्चतम ध्वनीने अंतराळ कोंदून गेले. ध्यानस्थ नीलकंठ हा गजबजला. ब्रह्मांडस्फोट होईल काय असे वाटून कळिकाळाला अत्यंत भय वाटले.

सर्व वानरवीर जात असलेले पाहून हनुमंत चिंताग्रस्त झाला. "मला सुग्रीव विसरला. श्रीरामचंद्रही विसरला. सीतेच्या शोधाचे कार्य जर आज मला सांगितले गेले नाही, तर माझे जीवित व्यर्थ आहे; माझा पुरुषार्थ धिक्कार करण्यासारखा आहे;" असे हनुमंताला वाटले. वानरसमूह जाताना पाहून हनुमान कपाळ बडवू लागला, डोळे झाकून घेऊन, दु:खाने गडबडा लोळू लागला. हनुमंताची तीव्र व्यथा श्रीरामाला अंतर्यामी जाणवली आणि तो हसून सुग्रीवाला म्हणाला, "सीतेच्या शोधामध्ये मुख्य साधक हनुमंत आहे, त्याच्या ठिकाणी थोर

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

पुरूपार्थ आहे. त्याला तो कार्यार्थ सांगावा." हे श्रीरामाचे बोलणे ऐकून सुग्रीवाने त्याच्या पायावर मस्तक टेकले. सुग्रीव म्हणाला, "मी हनुमंताला विसरलो होतो. आपण धन्य आहात." असे श्रीरामाला सांगितल्यावर सुग्रीवाने अत्यंत उल्हासाने हनुमंताला बोलावून त्याला म्हटले, "हनुमंता, श्रीरामाच्या सुखासाठी सीतेच्या शोध-कार्याला तू शीघ्र जावेस. तू जाऊन तत्त्वतः सीतेचा शोध करून ये. तुझ्या ज्ञानाला आणि बळाला त्रिलोकी समान असे काही नाही. देव, मानव, दानव, दैत्य यांचे बळ तुझ्या तोडीचे नाही. जल, स्थल, आकाश इथे राहणाऱ्या प्राण्यात तुझ्या तुलनेत कोणी नाही." आपण सवेग आणि शीघ्र जाऊन कार्य करावे म्हणून हनुमंताने उड्डाण केले. त्यावेळी सुग्रीवाने धाव घेऊन त्याला धरले. सुग्रीव हनुमंताला म्हणाला, "तू एकटा शीघ्र जाशील आणि सीतेचा शोध घेऊन येशील हे आम्हाला मान्य आहे. परंतु हनुमंता युवराजाला मानून, तू अंगदाला यश द्यावेस. त्याला सीतेच्या शोधाला न्यावे असे माझे तुझ्याकडे मागणे आहे." सुग्रीवाचे म्हणणे ऐकून हनुमंताने त्याला वंदन करून म्हटले, "तू राजा आहेस. मी तुझ्या अधीन आहे. तुझी आज्ञा पूज्य आणि प्रमाण आहे." नंतर सुग्रीवाने अंगदाला बोलावून स्वतः हनुमंतापाशी दिला. हनुमंत युवराज अंगदाला वंदन करून शोधकार्यासाठी निघाला.

सुग्रीवाचे वानरवीरांना मार्गदर्शन

सुग्रीवाने शोधकार्यासाठी जे जे वानर ज्या ज्या दिशेला नेमले होते ते त्या त्या दिशेला निघाले त्यावेळी सुग्रीव त्यांना चहू दिशांचे गतिमान सांगू लागला. पूर्व दिशेला जे वानराधिपती वीरशार्दूल शोधासाठी जात होते त्या नम्र वानरांना सुग्रीवाने म्हटले, "महावीरांनो, पूर्वेला जाताना नाना प्रकारं शोध घ्या. देशोदेशांमध्ये आणि गिरीशिखरांवर शोध घ्यावा कसा ते ऐका. मंदराचल, अरुणाचल, मुख्यतः कुलाचल शोधावा. पूर्वेचे सर्व पर्वत, शिखरे शोधा. तिकडे अंग, वंग, कारुष, कलिंग, गौड, विदेह, पौंड्र, भृंग, कामरूप, कामाक्ष असे अनेक देश आहेत. तिथे शोध घ्यावा. मंदगिरीच्या एका भागात पापमार्गी लोक राहतात. त्या लोकांमध्ये महामांगी, विकटांगी, विक्राळ, कर्ण, प्रावरण, किरात, नर्दनाळिक, काळमुख, महायवन, कोळी, माळी, निषाद, हूण, केशकंवळी, केशावरण, लोमधारी, लोमप्रावरण, विक्राळवदन विकटाक्ष इत्यादी पापी लोकांमध्ये महापापी रावण असेल. तेथे आपण शोधावे. सौभाग्यरत्न सीतेचाही शोध घ्यावा. जलवासी, जलमाणसे, ही रक्तवर्ण आणि कर्कश अशी, रूमशाम, फिरंगवेषात, त्यांचा सागरप्रदेश शोधावा. जेथे मुरारीने मधू मारला तेथे सागरात रक्त भरले, त्या लोहसमुद्राच्या तीरावर रत्नागिरी पर्वत आहे. गरुडाची नित्य वस्ती त्याठिकाणी असते. त्याने लंकाधीशाला छळून, सीतेला सोडवून, रामाला अर्पण करण्यासाठी सांभाळली असेल. त्या स्थळी जाऊन, गरुडाचे दर्शन घ्यावे, सीतेविषयी विनयपूर्वक वंदन करून माहिती घ्यावी. तेथे ती नसली तर पुढे जावे."

"लोहसमुद्रामध्ये गोमंत नावाचा मोठा, लक्ष योजने उंचीचा, पर्वत आहे. त्यावर मंदेहांची वस्ती आहे. मंदेहराक्षसांची थोरवी अशी की त्यांच्या असंख्य उपजाती सागरात आहेत. सूर्योदय झाला की ते शतसहस्त्र राक्षस सूर्यावर चालून जातात. त्यावेळी सूर्याला अर्घ्ये देण्यासाठी, संध्या करण्यासाठी, द्विज जे पाणी सोडतात त्याने ते राक्षस शांत होतात. तसेच पुन्हा रात्री लक्षावधी संख्येने निर्माण होतात. धन्य त्या द्विजांचे अर्घ्यदान की ज्यामुळे दुष्टांचे निर्दाळण होते. तसेच सूर्याला मार्गदान मिळून तो मार्गस्थ होतो. यासाठीच म्हणतात की सूर्याची नित्यगती ब्राह्मणांच्या हाती असते. त्यांचा महिमा किती वर्णावा! भुक्ती, मुक्ती त्यांच्या चरणतीर्थी असते. तेथे ब्राह्मणांविषयी सेवावृत्ती धरून गेलात, तर तुम्हाला तेथे प्रवेश

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

मिळेल. नंतर श्रीरामाच्या भक्तिसामर्थ्याने, सावधपणे सीता शोधावी. वालखिल्य हा अंगठ्याएवढी आकृती असलेला, वैखानस म्हटला जाणारा, सामर्थ्यवान, त्याच पर्वतावर राहतो. त्याच्या पुढे नम्र होऊन, त्याला साष्टांग नमन करून, आपल्या येण्याचे कारण सांगून, सीतेचा शोध घ्यावा. पूर्वेला जगन्नाथ हे स्थळ असून, उदार, मंगल ब्रह्ममूर्ती तेथे आहे. तिथला महिमा अत्यंत प्रवळ आहे. तो ऐका. ब्रह्मभाव आणि चिच्छक्ती असलेल्या मूर्तिमंत अशा तीन मूर्ती तेथे आहेत. कृष्ण, वळिभद्र आणि सुभद्रासती यांना लोक क्रमाने वंदन करतात. प्रथम शक्तीचे दर्शन करणारा माणूस भाग्यवान होतो. प्रथम वळीभद्राचे दर्शन घेणारा धर्मपरायण पुरुप होतो. जो प्रथम भगवंताचे दर्शन घेतो तो तत्काळ भगवत्प्राप्ती करून घेतो. चारी मुक्ती त्याच्या पायी लागतात आणि शिवाय आंदण म्हणून भुक्ती, मुक्ती येतात. तिथे जाऊन आपण देवदर्शन करून सीतेचा सावधानतेने शोध करावा. तेथे तिचा शोध लागला नाही तर आणखी पुढे जावे."

"कोण्या एके काळी हरी स्वाभाविकपणे संतापला. त्याने आपला राग समुद्रात टाकला. त्यामुळे समुद्रात अग्नी पेटला. जलचरांना अत्यंत दुःख झाले कारण समुद्रातले पाणी कढू लागले. राग जाऊन कृपा उत्पन्न झाल्याने अनुकंपेने हरीने जाळणारा अग्नी वाहेर काढून त्याचा कनकगिरी रचला. तो सागराच्या पोटात असून वडवाग्नी असे त्याला म्हणतात. वडवानलाला वारा गावे एवढे समुद्राचे पाणी भक्षणाला देऊन, त्याला निश्चितपणे सागरात ठेवला आहे. सागर आपल्या सत्तेने पाण्याने त्याला विझवू शकत नाही. प्रलयकाळी वडवानल संपूर्ण सागर शोपून, भक्षण करतो. तेथून पुढे उड्डाण केल्यास महावीर वडवाग्निमध्ये जळतील, म्हणून पुढची वाट न धरता वानरांनी शीघ्र परतावे." वीरसिंह सुग्रीवाने सुषेणाला वोलावून पश्चिम दिशेला कसा शोध घ्यावा याविषयी सांगितले. तो म्हणाला, "सौराष्ट्र, सिद्ध, सौवीर, उखामंडळ, द्वारकापूर, त्रिगर्त, गांधार, काश्मीर हे सर्व देश शोधावे. मही, मेधावती, रेवा, साबरमती, मधुमती, वेदवती, पंचनद, प्राची, सरस्वती, पृथोदक येथे सीता दिसते का पाहावी. कुरुक्षेत्र, गीतावट, ज्वालामुखी, नगरकोट, नेपाळ, जयपाळ, नीळकंठ, काश्मीरघाट येथे शोध घ्यावा. केतकीखंड शंखनाळ वन, केशर उत्पादन करणारे सुगंधस्थान, जांगलादेवी, पीतवन, या ठिकाणी सीता शोधून पाहावी. प्राग्ज्योतिष नावाचे नगर, हेममय, मनोहर असून तेथे महादुष्ट नरकासुर राहतो. त्याची नित्य रावणाशी मैत्री असते. त्याच्या बळावर रावण तेथे असेल आणि त्याच्या समवेत सीता असेल. त्याचा शोध करून त्याला जिवंत धरा आणि येथे वांधून घेऊन या. सागरात मधु-कैटभ यांचे स्थान आहे. त्याचे नाव दशावर्त आहे. तेथे मधूचे मर्दन करणारा मधुसूदन, त्याचे ते हरीचे विजयस्थान आहे. तिथेच पंचजन दैत्याचा वध करून, पांचजन्य शंख काढला. या शंखाच्या नादाने त्रिभुवन आणि सुरासुर कंपायमान होतात."

"त्याच समुद्रात चक्रगिरी आहे. वज्रनामक, वज्रशरीराचा, सुरासुरांनाही अजिंक्य असा तेथेच राहतो. त्याचा वध करून त्याच्या शरीराचे चक्र करून, ते चक्रधर घेतो आणि इंद्रासाठी मयासुर थोड्या कुशलतेने वज्र निर्माण करतो. असे ते अतिशय दुर्गम स्थान आहे. रामनामाने तेथे प्रवेश मिळवून, काळजीपूर्वक शोध घेऊन रावणाला जिवंत धरावा. त्याच्याही पुढे अस्तगिरी असून सूर्य आपली प्रदक्षिणा पूर्ण करून तेथे मावळतो. पुढचा मार्ग अंधाराचा असल्याने पुढे न जाता वानरवीरांनी तेथून परत यावे." नंतर शतवळी उत्तर दिशेला जांगळी पर्वतात शोध घेण्यासाठी निघाला. त्याला सुग्रीवाने देशोदेशी कसा शोध घ्यावा ते सांगितले. "मद्रक, मथुरा, शूरसेन, कुरु, कैकय, माळव, मान, मत्स्य, पुलिंदादी

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

यवन, चीन, महाचीन ही ठिकाणे शोधावी. उत्तर कुरुदेशाच्या ठिकाणी शीतोष्ण बाधा होत नाही. म्हातारपणाचा रोग लागत नाही. त्या ठिकाणी चोर नसतात. त्या त्या देशांमध्ये सीतेसह रावणाचा शोध करा. हा शोध बारकाईने सर्वांनीच करावा. मेरु, मांदार, सोम, हेमाद्री, भृंग, तुंग, भ्रमरगिरी, क्रौंच, कालिंजर यावर सीतेचा शोध घ्यावा. सुगंध, सुरभी, पीत, पलाक्ष, देवदार हे तरु, तरक्ष, भूर्जपत्र, वल्कलवृक्ष, यात सीता समक्ष शोधावी."

"गंगा, यमुना, सरस्वती, तमसा, कौशिकी, गोमती, प्रयागतीर्थ जे महान ख्यातीचे आहे, तेथे सीता सतीला शोधावे. मानसरोवरापाशी जी जन्मली आणि प्रवाहित झाली, ती शरयू नावाची नदी असून तेथे सीता शोधा. नारायणाचे मंदिर असा बद्रिकाश्रम हा पवित्र आहे, तसेच पंचप्रयागादी केदार येथे सीता शोधावी. कनकगिरिशिखरी पाहा. कृत्तिकागर्भात स्वामी कार्तिक हा शरविल्वीच्या वीर्योदकाने जन्मलेला षण्मुख आहे. त्या पर्वताच्या एकांतात सीतेसह रावण असेल तर त्याचा शोध घ्या. मानस सरोवराचा प्रांत, मेरु पठारावर असून शोभिवंत अशा त्या स्थानी, तुम्ही बलवान अशा सर्व वानरांनी, सीता शोधावी. तिथून पुढे हिमालय असून, तेथे अत्यंत थंडी असलेली वाट असल्यामुळे, तुम्हाला पीडा होईल, तेव्हा तिथून सारे परत फिरा." दक्षिण दिशेकडे शोध करण्यासाठी युवराज अंगद कुमार हा दुर्धर असे नळ, नीळ, जांबवंत हे वीर घेऊन निघाला. हनुमंतही लगेच त्यांच्या बरोबर निघाला. दक्षिणेच्या शोधासाठी त्यांना सुग्रीवाने तिकडे किती देश, किती पर्वत आहेत याविषयी सविस्तर माहिती दिली.

सुग्रीव म्हणाला, "विंध्याद्री, सिंहाद्री, मलयाद्री, मतंग, श्रीशैल, अंतरगिरी, वेंकटाद्री, चंद्रगिरी, महेंद्री येथे सीतेचा शोध करावा. नर्मदा, तपती, गोदावरी, कृष्णा, वेण्या, मलप्रहारी, पातालगंगेच्या जवळच्या प्रदेशात, सीतेचा शोध घ्या. अहोबळ, महोबळ, धूतशंकरीत, पांडुरंगमहाक्षेत्रात, वेणुनाद भीमातीरी सीता आहे का पाहावी. प्रतीची, मैना, ताम्रपर्णी, कृतमाला, पयस्विनी, उभयकावेरी, श्रीरंगस्थानात सीतेचा शोध घ्यावा. अगस्त्याश्रम, कन्याकुमारी, मत्स्यतीर्थ, चिदंबरी, कर्दळीवन, मंगलागौरी येथे सीता शोधावी. कर्नाटक, तेलंगात्रिगुळमध्ये, ओढ्यामल्याळ पंचभर्तारी, चोरमंडळामध्ये शोध घ्यावा. पांचाळ देश, मथुरामान, रमणीय कुमुदवन, चंद्रहास्य गुप्तार्जुन, या ठिकाणी सीता शोधावी. अहोबळाद्री नृसिंहस्थान, चौक मथुरा दारुकवन, अनंतशयन कुंभकोण, श्रीरंगपट्टण येथे शोधावे. तिथून पुढे लंकापूर, जेथे महाशूर राक्षस आहेत. यामध्ये दुस्तर समुद्र असून, वानर जाऊ शकणार नाहीत. दक्षिणेला सीतेचे प्राप्तिस्थान मी स्थूलपणे सांगितले. तुम्ही सर्वजण बलवान आहात. सीता शोधून आणा. नळ, नीळ, बुद्धिमान जांबुवंत, महा पराक्रमी हनुमान आणि राजपुत्र अंगद तुमच्यामध्ये आहेत. तुम्ही सीतेचा शोध घेऊन आला तर माझे मुख श्रीरामाला मान्य होईल आणि त्यामुळे श्रीरामाला अत्यंत सुख आणि संतोष होईल. एवढे अवश्य साधावे. मी पदर पसरून विनंती करून, तुमच्याकडे हेच मागणे मागतो की सीतेचा शोध करून श्रीरामाला सुखी करावे. श्रीरामाला सुखी केल्याने आपल्याला सर्वांना सुख होईल. तेव्हा शीघ्र सीतेचा शोध करा." असे सुग्रीवाने वर दिल्याप्रमाणे सांगितले.

शोधकाचा सत्कार, शोधासाठी मर्यादा

सुग्रीवाने शोधासाठी जाणाऱ्या वीरांना म्हटले, "तुमच्यापैकी जो कोणी भला वीर यथायोग्य शोध करून सीतेविषयी सांगेल त्याला माझ्यासारखी राज्यसत्ता देऊन त्याला मी राजा करीन. मुकुट, कुंडले, कटिसूत्र, कंठी, पदक, हार, श्वेत छत्र, चवऱ्यांची जोडी हे सारे देऊन

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

त्याला राज्याचा स्वामी करीन. सीतेचा शोध घेऊन येणारा, रघुनाथाचा आप्त बनेल, श्रीराम भुक्तिमुक्तीचा दाता असून आलिंगनाने एकात्मता देतो. अंतरात आलिंगनाने एकात्मता साधते आणि बाह्यतः देव-भक्तपणा येतो. राजवैभव ही नित्यमुक्तत्ता होते. हे सर्व सीतेचा शोध सांगणाराला प्राप्त होते. सीता कोठे आहे याचा शोध घेणे याचा यथार्थ म्हणजे रघुपतीने प्राण्याला संतोषाने दिलेली परम मुक्ती आहे. अशी सीतेच्या शोधाने ही एवढी प्राप्ती होणार आहे.'' असे सुग्रीवाने सांगताच वानरवीरांचा उत्साह वाढला आणि शोधाची मर्यादा किती. कशी आहे ते सांगण्याची सुग्रीवाला विनंती केली. त्यावर सुग्रीव म्हणाला, ''मी जे जे स्थान सांगितले आहे, ते ते सावधपणे शोधून आपण एक महिन्यात परत यावे. जो एक महिन्यापेक्षा जास्त काळ राहील त्याला मी शिक्षा करीन. त्याचा घात करीन. शिवाय त्याला शिक्षा देताना श्रीरामभजनात विलंब, विषयात लोलुपता त्याच्याकडून झाल्यामुळे त्याच्या मस्तकावर मूत्र घालून. तोंड काळे करून, गळ्यात वाहणांच्या माळा घालून, त्याची गाढवावरून धिंड काढीन, आणि त्याच्यावर शेणाचा वर्षाव इतरांकडून केला जाईल. श्रीरामभजनात आळस कराल तर असे कष्ट भोगाल. तेव्हा प्रयत्नपूर्वक रामकार्याला निघा.'' सुग्रीवाने असे सांगितल्यावर वानरवीर तातडीने त्यांना नेमून दिलेल्या दिशेकडे, गर्जना करत निघाले.

वानरांचे उत्साहाने प्रयाण

सुग्रीवाने केलेल्या निवेदनानंतर वानरांनी गर्जना करीत आपापल्या दिशेला प्रयाण केले. त्यावेळी वानरांनी केलेल्या भुभःकाराने चराचर दुमदुमले. वीरांनी प्रतिज्ञा करून रावणाला पकडण्याचा निश्चय केला. ''कळिकाळाचेही तोंड फोडून आम्ही जानकीला काढून आणू. रावण तो काय बापडा, दिसल्या क्षणी त्याचा प्राण घेऊ.'' ही एकाची प्रतिज्ञा ऐकताच दुसरा म्हणाला, ''युद्धात रावण भेटला तर हत्ती जसा सिंहाशी झगडतो तसा रावणाला आणीन.'' आणखी एक वीर म्हणाला, ''मला युद्धात रावण भेटला तर मांजर उंदराला धरते तसे त्याला धरून आणीन.'' आणखी एकाने कठोर प्रतिज्ञा केली की, ''जसा पारधी हरिण बांधून आणतो तसा मी रावणाला बांधून श्रीरामाकडे आणीन. ज्याप्रमाणे चिमणी मारणारा चीं चीं करणाऱ्या चिमणीला धरून आणतो त्याप्रमाणे चीं चीं करत रावणाला सीतेसह आणीन. जसा मासा गळ गिळतो तसा रावणाला मी शेपटीला बांधून राघवापाशी आणीन. माझा भरवसा धरा. ज्याप्रमाणे पारधी आपले कुत्रे बांधून आणतो; त्याप्रमाणे रावणाच्या गळ्याला बांधून आणीन हे माझे वचन श्रीरामाने सत्य मानावे. जशी हुरड्याची लोंबी कुणबी बळाने रगडतो; तसे रावणाचे दहाही कंठ यथेष्ट चिरडून, त्याला आणीन.'' अशा विविध प्रतिज्ञा वानरवीरांनी केल्या. त्या ऐकून श्रीराम मनातून आनंदित झाला. वानरांचे बोलणे ऐकून राम आणि लक्ष्मण खदखदून हसू लागले; वानरांचे बळ त्यांना समजून आले. वानरांनी श्रीरामाचे चरणवंदन केले आणि सीतेच्या शोधासाठी उड्डाण करून; टोळांनी आकाश झाकावे तसे आकाशात चौफेर, दशदिशांना ते वानर धावले.

अंगद महावीर दक्षिण दिशेकडे शोधासाठी निघाला. त्याच्या परिवारात अत्यंत दुर्धर असे अनेक वानरवीर होते. हनुमंताने अंगदाला विनंतीपूर्वक म्हटले, ''श्रीरामाला विचारण्याचे राहून गेले; त्याला वंदन करून मी त्वरित तुझ्यापाशी येतो.'' श्रीरामाने सीतेच्या शोधासाठी वानर निघालेले पाहून, सुग्रीवाला आलिंगन दिले. लक्ष्मणही सुखसंपन्न झाला.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

अध्याय तेरावा

अंगदासह दक्षिणेकडे वानर निघाले. त्यावेळी सुग्रीवाने हनुमंताला बोलावून अंगदाला त्याच्या स्वाधीन केले. "सीतेच्या शोधाचे रामकार्य करताना तुझ्यामुळे तो विजयी होईल." अंगद वीर हा प्रसिद्धच आहे. त्याच्या बरोबर नळ, नीळ, जांबुवंत आणि इतर असंख्य वानरवीर होते. ते सर्वजण अवघड अशा दक्षिण पंथाला निघाले. रामकार्य सिद्धीला जाण्यासाठी आणि सीतेचा शोध लागावा यासाठी हनुमंताला मुख्य करून सुग्रीवाने पाठविले. सुग्रीवाने आपल्यावर सीतेच्या शोधाचे कार्य सोपविले यामुळे हनुमंताला रामपत्नीच्या शोधाविषयी उल्हास वाटला.

हनुमंत-अंगद, हनुमंत-श्रीराम संवाद

हनुमंताने अंगदाला म्हटले, "सीता ही गुण, लक्षण आणि स्वरूप या दृष्टीने कशी आहे ते श्रीरामाला समूळ विचारून येतो म्हणजे वनामध्ये ती सापडली तर ओळखता येईल. सद्गुरूच्या मुखाने. सद्भावनेने स्वरूपाचा निश्चय केला नाही तर वस्तूची प्राप्ती होत नाही. विनाकारण वनात भ्रमण तेवढे होईल. काही वानर सीतेच्या स्वरूपाविषयी निश्चित माहिती न घेता गेले आहेत, त्यांना ती सर्वथा मिळणार नाही. ते परतून येतील. स्वरूपनिश्चयाशिवाय वस्तु-प्राप्ती होत नाही. तेव्हा ते सर्वजण हीन, दीन, खाली मान असे परततील. वस्तुप्राप्ती न होता परत येईल त्याचे काळे मुख होईल; देव, पितर तोंड फिरवतील, सारे त्यांना हसतील. तसे आपण करू नये. पूर्ण निश्चयाने, सर्व भूतमात्रांविषयी सावध राहून, सीता शोधावी." असा सर्व विचार मांडून, हनुमंताने अंगदाला म्हटले, "श्रीरामाला वंदन करून मी शीघ्र तुझ्यापाशी येतो. सुग्रीवाने तुझ्याबरोबर पाठविले याचा मला एवढा आनंद झाला की श्रीरघुनाथाला विचारायचेच विसरलो. त्याला वंदन करून लगेच येतो." हनुमंताचे निवेदन ऐकून अंगदाने त्याला लोटांगण घालून सांगितले, "श्रीरामाच्या चरणांना वंदन करून तू शीघ्र गतीने येथे यावे. तुझ्यामुळेच माझा पिता वाली निर्मुक्त झाला; तुझ्यामुळे सुग्रीव सनाथ झाला; तुझ्यामुळेच आम्हाला स्वामी श्रीरघुनाथाचा लाभ झाला; तुझ्यामुळेच श्रीरामाचे दर्शन होऊन, वानरांना संसारतारक मिळाला; तूच सुग्रीवाला राजेपण मिळवून दिलेस; खरोखर तुझा महिमा अगाध आहे. तू स्वामी आम्ही दास; तू माउली आम्ही लेकरे; तू सद्गुरू आम्ही शिष्य; हे माझे बोलणे सत्य आहे. असे असूनही हनुमंता तत्त्वतः तू स्वतःला सेवक म्हणवतोस, ही तुझी अगाधता वेदशास्त्रांनाही अगम्य आहे."

अंगदाचे बोलणे ऐकून, नळ, नीळ, जांबुवंत यांनी अंगदासह लोटांगण घालून हनुमंताचे चरणवंदन केले. सर्वजण म्हणाले, "अंगदा, धन्य धन्य तुझी वाणी, जननी, करणी! वानरसैन्यात तू धन्य आहेस." अशा शब्दात सर्व वानरांनी अंगदाचे गुणवर्णन केले. हनुमंत आणि अंगद यांना शरणागत भावनेने वंदन केले. कुमार आणि विवेकता, राजा आणि विनीतता, यथार्थपणे रसाळ वक्ता अशा अंगदामुळे हनुमंताला आल्हाद झाला. अंगदाचे मुख चुंबून आणि त्याला आलिंगन देऊन हनुमंताने आपला आनंद व्यक्त केला. दोघांमधे सुखसमाधान असल्याचे पाहून रघुनंदनही आनंदला. गहन आणि गंभीर हनुमंत त्याचा स्वतःचा 'निश्चितार्थ लोकांना कळू न देता श्रीरामाला गुह्यार्थ विचारतो,' असे अंगदाला सांगून श्रीरामापाशी आला. तिथे एकांतात बसून त्याने रामाला सीतेविषयी विचारले. "दक्षिणेकडे शोधताना आम्हाला सीता दिसली तर आम्ही तिला ओळखावी कशी हे समजण्यासाठी तिच्या स्वरूपाविषयी सांगावे. रूपरेखा, अंगलट, गुणविशेष, लक्षणीय लावण्यखुणा, वस्ती, स्थिती, गती, महिमान हे सर्व कृपाकरून श्रीरामा आपण मला सांगा." हनुमंताची विनंती ऐकून श्रीरामाला संतोष झाला. शक्तीचे महिमान आणि लक्षण

https://archive.org/details/@tulaksmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

सांगण्यासाठी श्रीराम हनुमंताला म्हणाला, "ऐक हनुमंता, एकांतात विचारायला आलास, तुझ्या माझ्यामध्ये भिन्नता नाही, तेव्हा सीतेविषयी यथार्थ सांगतो."

श्रीरामाकडून सीतेविषयी निवेदन

श्रीराम हनुमंताला म्हणाला, "माझे स्वरूप चैतन्यघन असून सीता ही पूर्ण चिच्छक्ती आहे. ती माझ्यापासून अणुभरही वेगळी नाही. श्रीराम गोडी तर सीता साखर, श्रीराम रस तर सीता नीर, श्रीराम धृत तर सीता क्षीर, चिदचिन्मात्र रामसीता, असे आहे. द्रव्यांतराच्या मिळणीने अग्नी द्रव्याकार भासतो, त्याप्रमाणे चिन्मात्र सीता ही साकार विश्वरूपात दिसते. साखरेचा पूर्ण नारळ असून त्याची करवंटी काढू पाहतो तो तर करंटा म्हणावा, तशी सीता ही सच्चिद्घन असून तिला मनुष्यपण नाही. नारळ जसा सर्वांगी साखरच तशी सीता ही साकार चैतन्यच; तिचा इंद्रिय-व्यापार हा चिद्चिन्मात्र स्वभावाने होत असतो. जसा अर्धनारीनटेश्वर दोन स्वरूपी पण एक शरीरी, तशी सीता आणि राम भिन्नत्वाने अभिन्नाकार. पुरुषभाग स्वतः लपवतो, स्वच्छेने प्रकृतीला नाचवतो आणि प्रकृतिभाग लपवून पुरुषाची पदवी प्रकट करतो. भ्रांतीचा पडदा टाकून दिला म्हणजे प्रकृतिपुरुष हे भान ज्याप्रमाणे मिथ्या; त्याप्रमाणे सीता आणि राम हे चैतन्यघन स्वरूप हे जाणवते. भ्रांतीचा पडदा खरोखर असतो, तेव्हा तिथला निर्धार काय, हे माणूस शोधून पाहात नाही. हे का आणि कसे त्याचा विचार ऐक."

"नर आणि नारी या दोन्ही भागांचा व्यापार जसा नटेश्वर चालवितो; तसा श्रीराम-सीता यांनी देवकार्यासाठी अवतार घेतले आहेत. सुरवरांची स्वपदी स्थापना करण्यासाठी, भक्तांना खरे सुख देण्यासाठी सीता आणि राम यांनी स्वतःच्या लीलेने अवतार धारण केले आहेत. या स्वलीलेने घेतलेल्या अवतारातील साकार होण्याने जानकी शोभते आहे. तिच्या स्वरूपाचा सोहळा हनुमंता आता ऐक. सीतेला नित्याचे गमनागमन नाही, ही मुख्य खूण आहे. तिचे पायाशिवाय चलन असते. तिला पायाशिवाय गती आहे. तिचे दोन्ही पद द्वंद्वरहित आहेत. तेच सीतेचे स्वतःचे पाय आहेत. त्यांनी जीवशिवपणाचा उच्छेद केला आहे. तेच सीतेचे पद आहेत. फडा, शेपूट आणि वक्रता असलेला नाग, त्याला लोक सोनेच म्हणतात. तसेच जानू विभाग गुल्फा मानावी, हेच सीतेचे संपूर्ण अंग चिन्मात्र. सीतेच्या गुह्येंद्रियाचा विचार केलात, तर तिचे गुह्य म्हणजे श्रीरामच आहे. तिथल्या रतिसुखाचे सार हे असार सार रामच आहे. तिचे उदर मळ नसलेले सत्यतः निर्मळ आहे. चैतन्याग्नि जठर बसवितो; तेच जीव-शिवांचे माहेर आहे."

"हनुमंता, सीतेचे हृदयभुवन हे श्रीरघुनंदनालाच वसवते. ती श्रीरामामुळेच सुखसंपन्न असते. हीच तिची मुख्य ओळख आहे. अंगांगावर जे दोन स्तन वाढले ते जीव-शिव दोन भागी आहेत. त्यातील स्तनपानाने ती जग जगवते. स्तनभारामुळे ती कुचकामिनी झाली. जीव-शिव स्वरूप कुचांवर आच्छादन म्हणून विद्या–अविद्या यांचे दोन पदर त्रिगुणांनी घट्ट बांधलेले असून ते श्रीरामावाचून कोणी सोडणे शक्य नाही. जीव-शिवरूप कुचांचे मर्दन करणारा केवळ एक श्रीरामच आहे. अन्य धुंधुरटी बापडी कोण आहेत. तो रावण अभिलाषी असेल तर मरून जाईल. गाठ्याळ, फिके मणी सोडून देऊन श्रीरामनामाचे मणी अखंड दोरा घेऊन अनुसंधानाने ओवले आहेत. तिची सौभाग्य कल्याण श्रेणी लोकांच्या डोळ्यांना अतर्क्य आहे. कंठात श्रीराम सौभाग्यमणी असून तोच प्रमुख अलंकार आहे. तिच्या हनुवटीवरील गोंदण हे रामश्यामाने गोंदले आहे. रावण तिच्या मुखाकडे पाहील तेव्हा श्यामशंका येईल. जनमुखावरचे ओठ हे अधर असतात, तर सीतेच्या मुखावरचे ओठ सधर आहेत. त्यांचे श्रीरामाने चुंबन घेतले तर ते सीतेच्या सुखाचे सारसर्वस्व असते. मुक्तपणे विलास करणाऱ्या स्त्रिया

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized By Sayama Foundation Research Academy eGangotri

ह्या सोन्याचा फासा पडून गेल्याने मोती नाकात अडकवून घेतात. जानकीच्या नाकातले मोती जेव्हा राम सहज पाहतो तेव्हा अधोमुख होऊन लोंबतात कारण मुक्तांना मुक्ती श्रीरामच देतो."

"जगात लोकांची नाके शेंबूड आल्याने दुःख देतात. जानकीच्या मुखावरचे नाक रामामुळे तेजस्वी झालेले आहे. जानकीचे डोळे दिसायला सुंदर आणि देखणे आहेत. त्यांच्या देखणेपणाला श्रीरामच पाहता येतो; तो परिपूर्ण दिसतो. जानकीचे देखणे डोळे क्षराक्षर सोडून, भूतमात्रात अक्षर, चिद्‌चिन्मात्र श्रीरामच पाहतात. सीतेचे कान सतत सावधान राहून रघुनंदन वचनाक्षरे ऐकून समाधान पावतात. धन्य कपाळ सीतेचे! श्रीरामाला नित्य नमन करून सफळ झालेले आहे. त्यावर सोज्ज्वळ प्रेमकुंकुम असून श्रीरामामुळे तेथे सुखकल्लोळ असतो. सीतेची सर्व हस्तक्रिया रघुनाथ हाच कर्ता पाहते. श्रीराम हातांचाही हात असल्याने कर्मापासून मुक्त आहे. सीतेच्या शिरावर श्रीराम हा शिरोमणी आहे. चिद्रत्नांच्या अलंकारावर फरा शोभतो तसा श्रीराम आहे. परमामृत गाळून, सोलीव सुखाचे मुख होऊन, त्यामधून अलौकिक रामप्रियेचे ओतीव श्रीमुख सिद्ध झाले आहे."

"जानकीचे मन सुमन असून ते श्रीरामाच्या ध्यानात परिपूर्ण आहे. श्रीरामामुळे मनातले मन निर्मन झाले आहे. सीतेच्या चित्तात सतत रामाचेच चिंतन असल्याने चित्त चिंतामुक्त आहे. चित्तातले चित्त चैतन्यघन असून, रामामुळे समाधानी आहे. जानकीच्या देहातला देहाभिमान अहं-सोहं-कोहं विहीन आहे कारण श्रीरामनामाच्या स्मरणाने अहं हा पूर्ण परब्रह्म झालेला आहे. ज्याप्रमाणे समुद्रात मीठ विरून, स्वतःच समुद्र होते; त्याप्रमाणे श्रीरामामुळे सीतेचा अभिमान हा परिपूर्ण आहे. सीतेच्या देहाची बुद्धी अशी की प्रपंच, परत्र, व्याधी, जन्ममरणव्यथा काहीही नसून नित्य श्रीरामाची समाधी आहे, तिच्या देहाला देहत्वच नाही. देही म्हणून वावरताना ती विदेही असते ही तिची खूण नेहमी पाहा. हे असे सीतेचे लक्षण आहे. आता तिचे गुण ऐक. गुण-अगुणात नेहमी अगुण हा स्वतः सगुण दिसतो. जानकीचे ठाणमाण पाहू गेल्यास ते सर्वांना साधारण दिसते; परंतु तिला स्वरूपाने सामान्यपण असले; तरी गगन ठेंगणे असते. सीतेचे महिमान वेदशास्त्रांनाही अगम्य आहे. त्यामुळे तिचे ठाणमाण सांगू लागले तर चारही (परा, पश्यन्ति, मध्यमा, वैखरी) वाचांना मौन पडते. हनुमंता, इथवर तुला सीतेची रूपरेखा, तिचे गुणलक्षण, ठाणमाण यांविषयी सांगितले. आता स्थितीचे महिमान सांगतो."

श्रीराम म्हणाला, "सीतेचे वास्तव्य जिथे होते तेथील झाडे राम, राम असे नामस्मरण करतात; पशुपक्षी हेही रामाचे स्मरण करतात. पाषाणही रामाला स्मरतात. जानकी स्पर्शाचे जीवन असून नित्य श्रीरघुनंदनाला स्मरते. जानकी जीवननिमग्न असल्याने श्रीरामाला समाधान वाटते. सीतासतीची स्वतःची धारणा हीच असते की श्रीरामचंद्राला नित्य स्मरावे. सीतेच्या अंगाच्या स्पर्शाने निर्मिलेला वारा ह्या श्रीराघवेंद्राच्या स्मरणाने निर्माण होतो." सीतेच्या स्वरूपाचा वृत्तान्त श्रीरघुनाथाने आदराने सांगितला. ते सर्व ऐकून हनुमंत स्वानंदाने मूर्च्छित पडला. तेव्हा कृपाळू रामाने त्याला मिठीत घेऊन, आलिंगन देऊन हृदयात सामावले. श्रीरामाने मारुतीला आलिंगन दिल्यावर रामाला रामपण, मारुतीला वानरपण आठवेना. हनुमंत स्वतः ब्रह्मपरिपूर्ण झाला. मी-तूपण विरून गेले, बोलणे खुंटले, मौन तुटले, दोघेही चैतन्यघन झाले. वस्तू परिपूर्णत्वे परिपूर्ण असे झाले. सीतेचे स्वरूप सांगताना रघुनाथाला तृप्ती मिळाली नाही; धन्य धन्य रामपत्नी! हनुमंताला उल्लास वाटला. श्रीराम म्हणाला, "सीतेचा शोध करताना तुम्ही या खुणा पाहाव्या." हनुमंताच्या चित्ताला आल्हाद वाटला. हनुमंत म्हणाला, "हे श्रीरघुनाथा, ही लक्षणे पाहून मी जनककन्या सीता ओळखेन. सीता मला अगदीच ओळखत नाही. तिने पूर्वी मला

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

पाहिले किंवा माझ्याविषयी ऐकलेले नाही. मी रामाने धाडले म्हटले तर ती ते खरे मानणार नाही. ती असा विचार करील की, 'कपटी रावण असाच संन्याशाच्या वेषात येऊन भेटला आणि त्याने फसवले. त्याच्याच सारखा हा वानर असेल. रामाच्या गोड गोष्टी आणि शोध घेण्याविषयी सांगतोय, परंतु हा वानरही कपटीच असावा. याच्याविषयी विश्वास वाटतच नाही.' मग जिथे पोटात विश्वास नाही, तिथे भेट होऊनही व्यर्थच ठरणार. ती सीता सुंदरी भावार्थाच्या गोष्टी कशी सांगेल. भेट नाही, गोष्टी करणे नाही; केवळ दुरून सीतेला डोळ्यांनी पाहिली असा शोधाचा प्रकार हा कादिमोल म्हणावा. सीतेचे सर्व मनोगत, ती आहे ते स्थळ कोणते, रावणाचे सामर्थ्य किती, या सर्वांचा मी शोध घेईन. तेव्हा माझ्या मनात असे आहे रघुनाथा, काही असे दे की ज्यामुळे ती मला आप्त मानील, या दृष्टीने कार्याकडे पाहावे." असे म्हणून हनुमंताने रामाच्या पायावर डोके टेकले.

श्रीराम मारुतीला खूण म्हणून मुद्रिका देतो.

श्रीराम हनुमंताचे बोलणे ऐकून सुखावला. त्याने आपली मुद्रिका मारुतीला देऊन त्याच्या डोक्यावर वरदहस्त ठेवला. "हनुमंता', ही अंगठी पाहिल्यावर, सीता तुला कपटी मानणार नाही आणि तुला शोधासाठी मीच पाठविले हे सत्य मानील. श्रीरामनामांकित मुद्रिका पाहिल्यावर रामाच्या धर्माने सीता, कपींद्रा तुला आप्त मानील. मुद्रा नामांकित असलेली पाहून जिवापेक्षाही जवळचा आप्त म्हणून हनुमंता तुला ती मान्य करेल आणि रामकार्यार्थ साधील." मारुती हा आधीच बलवान, त्यावर मस्तकी रामाचा वरदहस्त, शिवाय श्रीरामाची मुद्रा प्राप्त झाली; तेव्हा हनुमंत अपार उल्हसित झाला. नंतर हनुमंत श्रीरामाला म्हणाला, "त्रिभुवनातल्या घरांची झडती घेऊन, शोधून जनककन्येला आणीन. राक्षसांचा संहार करीन." असे सांगून मारुतीने आनंदाने टाळी पिटली. "श्रीराममुद्रिका हाती आल्याने, आता मी लंका जाळीन. तसेच लंकानाथाचे बळ किती आहे तेही तोलून पाहीन. इंद्रजित हा निशाचरात बलवान आहे; त्याच्याशी मी घोर संग्राम करीन. रावणाशी थोर मारामारी करून राक्षसांचा पूर्ण निःपात करीन" असे हर्षभरित उद्‌गार काढून, तो श्रीरघुनाथाला नमस्कार करून, रामकार्य साधण्यासाठी वेगाने आकाशात उडाला. श्रीराममुद्रा हातात घातली तर उड्डाण करताना गळून पृथ्वीवर पडेल; ती वस्त्राच्या पदरात बांधावी तर मारुतीला वस्त्र नाही. गाठीत घालावी तर गाठ्याळ म्हणून टीकेचा विकल्प येईल; आळ घेणारा खट्याळ असून चांडाळाला आठवण राहणार नाही. ज्याला नाव आवडत नाही तो पापराशी समजावा. त्याला सर्व दोष चिकटतात आणि आकल्प त्याचा क्षय होत राहतो. रामनाम ज्याला मान्य नसते, जो नामाला अर्थवाद म्हणतो, त्याला जिवंतपणी प्रेतत्व येते, त्याला स्पर्शही करू नये.

नंतर हनुमंताने हातातली राममुद्रा तोंडात घालून स्वतःच्या हृदयाचा थारा दिला. वानरांचे ठेवणे म्हणजे गालफडात चणे भरणे. हनुमंताने तेच केले आणि राममुद्रा तोंडात घातली. जिभेपासून हृदयभुवनापर्यंत नाममुद्रेची साठवण हनुमंताने केली आणि लगेच रामकार्यासाठी उड्डाण केले. तेथून नळ, नीळ, जांबुवंत यांच्यासह अंगद जेथे वाट पाहात थांबला होता, तेथे हनुमंत आला. तो आलेला पाहून अंगदाला आनंद झाला. सर्व वानरांना आल्हाद वाटला. मग ते सर्वजण सीतेचा शोध करण्यासाठी दक्षिण दिशेकडे मोठ्या उत्साहाने निघाले.

अध्याय चौदावा

पूर्व, पश्चिम, वायव्य, ईशान्य, उत्तर, नैऋत्य, आग्नेयकोण, पाताळदिशा, स्वर्गभवन या सर्व ठिकाणी शोध घेऊन वानरवीर परत आले. राजा सुग्रीवाची आज्ञाच होती की पूर्ण महिना

https://archive.org/details/Bhuvan Vani Trust, Lucknow

CC-0. In Public Domain. Digitized by Muthulakshmi Research Academy

सीतेचा शोध घेऊन सर्वांनी परत यावे; न आल्यास कठोर राजदंडाची शिक्षा होईल. श्रीराम प्रस्रवण पर्वतावर थांबला होता. त्याच्या जवळ सुग्रीव नित्य सेवेत तत्पर होऊन राहिला होता. श्रीरामाने सुग्रीवाला विचारले, "वानर दाही दिशांना गेले आहेत; त्यातला कोणीच शोध घेऊन कसा आला नाही?" या प्रश्नावर त्यांचा विचार चालू असतानाच, सुग्रीवाच्या राजाज्ञेचा कठोर परिणाम लक्षात घेऊन, भीतीने सर्व वानरवीर एक महिन्यात परत आले. त्यांना काहीच निश्चित शोध न लागल्याने ते वानरवीर रामासमोर यायला लाजले. सुग्रीवाकडे जाऊन त्यांनी त्याला नमस्कार केला. जाताना प्रतिज्ञा करून गेले आणि अखेर शोध न लागताच परतले, त्यामुळे लाज वाटून ते काही न बोलता, खाली तोंड करून, स्तब्ध राहिले. वानरवीर तटस्थ झालेले पाहून वाली-सुग्रीवांचा सासरा सुषेण पुढे झाला आणि त्याने शोधाविषयीचा वृत्तान्त निवेदन केला.

सुषेणाचे शोधाविषयी निवेदन

सुषेण म्हणाला, "क्षीरसमुद्र, क्षारसमुद्र, दधिमधुघृतसमुद्र, सहावा इक्षुसमुद्र, सातवा सुरासमुद्र; शाल्मलिद्वीप, शाकद्वीप, क्रौंचद्वीप, कुशद्वीप, पुष्करद्वीप, लक्षद्वीप, सातवे जंबुद्वीप; तसेच अयोध्या, मथुरा, काशी, कांची, अवंतिका, आणि बळी द्वाराने आलो ती सातवी द्वारका; दंडकारण्य, खंडारण्य, चंपकारण्य, वेदारण्य, नैमिषारण्य, ब्रह्मारण्य, धर्मारण्य हे सातवे, नंतर सरोवरे, नद्या, गुहा, गव्हारे, खेडी लहान आणि मोठी, गावे, नगरे, गिरिकंदरे, विवरे सर्व ठिकाणी शोध घेतला. निंद्य, अनिंद्य स्थाने, दुर्धर राक्षसभवने या ठिकाणी प्रवेश करून सीतेचा शोध केला. महापराक्रमी, महावीर वानरांनी आळस सोडून समस्त भूमंडळ शोधूनही सीतेचा शोध लागला नाही. सप्तद्वीपे, सप्तसागर, सप्तपुरे, सप्तशिखरे, सप्तारण्ये आणि सप्तकंधर या सर्व ठिकाणी सीतेचा शोध केला. जळ, स्थळ, आकाश, येथे शोधून जानकीचा किंचित्‌ही शोध लागला नाही. त्यामुळे एक महिन्याने आम्ही परत आलो. कारण, राजाज्ञा अत्यंत कठोर होती की वेळेत परत न आल्यास थोर विटंबना होणार होती. त्या भीतीने आम्ही सर्व तातडीने एक महिन्याने परतलो."

वानरवीर लाजेने चूर होऊन श्रीरामासमोर आले नाहीत. त्याला तोंड कसे दाखवावे; सीतेविषयी तर काहीच माहिती नाही; श्रीरामाने सीतेविपयी विचारले तर आम्ही काय सांगणार? सर्व वानरांच्या माथ्यावर ही लाज आली, असे त्यांना वाटले. श्रीरामाने वानरांचे मनोगत जाणून त्यांना स्वतः आश्वासन देऊन युक्त-अयुक्त विभाग सांगितला. "आम्हीच तुम्हाला दिशा नेमून दिल्या. सीता जर त्या भागात नसेलच तर तुम्ही कसा शोध आणणार आणि सगळीकडे आक्रमण करून तरी काय उपयोग? सीता तिथे नाहीच, हे सत्य वचन आहे. या सत्याला जो खोटे मानील त्याचे गाढवाचे ते मत असेल." श्रीरामाचे बोलणे ऐकून वानरांनी त्याचे पाय धरले. नंतर श्रीरामाने त्यांना आलिंगन दिले तेव्हा वानरांना समाधान झाले. श्रीरामाचे कार्य साधण्यासाठी वानरांनी संकोच सोडला आणि रावणाशी झुंज द्यायची याच्या स्वानंदात ते नाचू लागले. नंतर श्रीराम म्हणाला, "दक्षिणेकडे गेलेले वीर बराच समय लोटला तरी ते आलेले नाहीत. ते निश्चित शोध करून येतील."

दक्षिणेकडे गेलेल्यांचा वृत्तान्त

श्रीरामाकडून मुद्रिका मिळाल्यावर हनुमंत वेगात निघून नळ, नीळ, जांबुवंत जेथे त्याची वाट पाहात थांबले होते तेथे आला. यापुढे दक्षिणेकडे गेलेल्या पराक्रमी वानरवीरांनी कसा शोध केला त्याविषयीची माहिती आता श्रोत्यांनी सावकाशपणे, सावधानतेने ऐकावी. हनुमंत तेथे येताच दक्षिण दिशेला शोधार्थ निघण्याविषयी अंगद उल्हसित झाला आणि वानरसैन्यासह निघाला. गुहा, गहन गव्हारे, पर्वत, भिन्न ठिकाणे, बिळे, विवरे,

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Trust and eGangotri

उजाड जमिनी, शिखरे, गिरिकंदरे शोधत ते वीर निघाले होते. नानाविध फळे खात, नदीचे निर्मळ पाणी पीत, नीतीने स्थळांचा शोध घेत, ते वानर आपल्या बळावर निघाले होते. वानरवीर महापराक्रमी होते. त्यांनी अरण्ये शोधत पुढे पुढे जात असता अचानक एक दुर्घट संकट उभे राहिले. पुढे एक बिकट वन लागले. तिथले वृक्ष वाळून गेले होते. पाने, फुले, फळे, नव्हती. नद्यांचे पाणी शुष्क झाले होते. त्या वनात मुंगी, माशी, पशू, पक्षी, कीटक नव्हते. सूर्य उष्णतेने तळपत होता, त्यामुळे वानर कासावीस होत होते. खायला फळमूळ नाही, पालाही नाही आणि प्यायला पाणी नाही त्यामुळे वानर भारी पीडित झाले. ते दुष्ट स्थान टाळावे म्हणून उड्डाण केले तर उडी पुन्हा त्याच वनात पडे, त्यामुळे सुटकेचाही मार्ग दिसेना. धड बाहेर पडता येईना, भुकेने वानर तळमळले, पाण्याशिवाय राहून घेऱ्या येऊ लागल्या, उष्णतेने तगमग होऊ लागली, असे वानरांना कष्ट होत राहिले; दुर्घट दुःख ओढवले; प्राणसंकट पडले. आता कसला सीतेचा शोध, आपलेच मरण ओढवले; यातून सुटका बुद्धीला सुचत नाही; आता खरोखर आपण संपलो अशी वानरांची भावना झाली.

हनुमंत त्या शापित वनाविषयी सांगतो

श्रीराम हा भक्तांचा साह्यकर्ता, त्याच्या नामाने दैन्य, दुःख यांचे निवारण होते. त्या शापदग्ध वनामध्ये ते वानर रामनामाच्या उच्चाराने वाचले. त्या वनाचा समूळ वृत्तान्त हनुमंत वानरांना सांगू लागला. "हे दण्डऋषींचे वन शापयुक्त आहे. यातून सुटका नाही. त्या शापाचे मूळ लक्षण आता ऐका. या दण्डऋषींना बुद्धिमान असा दहा वर्षांचा पुत्र होता. त्याला वनदेवतांनी मारले आणि त्याचे मांस खाल्ले. त्या पुत्राचे कातडे आणि त्याची हाडे पशू-पक्षांनी खाल्ली. ऋषींना याचे ज्ञान होताच त्यांनी दारुण शाप दिला. हे वन ओसाड झाले. जो प्राणी या वनात येईल त्याला मरण येईल, असा तो शाप होता. जो पुत्र मारला गेला तो विद्यासंपन्न होता. वेदशास्त्रार्थाच्या ज्ञानाने उन्मत्त झाला होता. ब्राह्मणांशी वाद करून त्यांची तो निर्भत्सना करत असे म्हणून भुतांनी त्याचा घात केला. जो वादात ब्राह्मणांना त्रास देतो तो ब्रह्मराक्षस जातीचा असून, त्याचा देह हा भुतांचे खाद्य असतो; यासाठीच भुतांनी त्याचा नाश केला." हनुमंताने ही गोष्ट सांगताच वानरांनी आकांत केला. त्याचवेळी आणखी एक दुसरा अनर्थ त्या वनात ओढवला. त्या ऋषींचा पुत्र जो ब्रह्मराक्षस झाला होता, तो त्या वनात राहून प्राणिमात्रांना खात होता. तो विकल झालेल्या वानरांना भक्षण करण्यासाठी प्रचंड गर्जना करत वानरांवर धावून आला. जसे एखादे प्रज्ज्वलित अग्निकुंड असावे, तसे त्याचे डोळे लालभडक होते. सर्व वानरांना गिळण्यासाठी तो जिभल्या चाटत धावत आला. तो येत असलेला पाहून वानर युद्धाला तयार झाले. अंगदाने आवेशाने उडून राक्षसाला तळहाताने ठोकले.

अंगदाला तो राक्षस रावण आहे असे वाटले आणि एक जोराची थप्पड मारून त्याचा घात केला. त्या बलवान घावाने त्या राक्षसाच्या नाका-तोंडातून रक्त वाहिले आणि तो पर्वताकार राक्षस निष्प्राण होऊन पडला. श्रीरामभक्तांच्या हाताने ब्रह्मराक्षसाला मुक्ती मिळाली. त्यामुळे ऋषी सुखावले. त्यांनी वन शापातून मुक्त केले. वानरांच्या वनातील प्रवेशामुळे ते वन शापमुक्त झाले. कारण जिथे जिथे भक्तजन जातात तिथे तिथे त्यांच्यामुळे स्थान मुक्त होते.

वानरांची तहानभुकेने व्याकुळ अवस्था

अंगद राजकुमाराने राक्षसाला मारून विजय मिळवला; पण वनात अन्न, पाणी न मिळाल्यामुळे वानर तळमळत होते. सुग्रीवाने जसे सांगितले होते त्याप्रमाणे शुष्क वने-विवरे सीतेसाठी शोधावीत, शतावर्तासह अनेक पर्वत, प्रयत्नपूर्वक शोधावे ही सीतेच्या शोधासाठीची पद्धत होती. परंतु हे करूनही तिचा थांगपत्ता लागला नाही. तेव्हा आता

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

काय करायचे ही वानरांची चिंता होती, गज, गवाक्ष, गवय, शरभ, गंधमादन, मैंद, द्विविद, जांबुवंत, हनुमंत, नळ, नीळ, स्वतः युवराज अंगद ह्या साऱ्यांचा भुकेने प्राण जाऊ पाहात होता; तहानेने अंतःकरण व्याकुळ झाले होते; आता मरण जवळ आले असेच वानरांना वाटत होते. वानरवीरांना खायला पालाही मिळाला नाही, तहान-भूक शिगेला पोचली तेव्हा त्यांनी हनुमंताची प्रार्थना केली. ते म्हणाले, "हनुमंता, आम्ही तुला शरण आलो आहोत. आम्हा सर्व शरणागतांचा तू प्राणदाता हो. आमचे प्राण वाचविण्याचे पूर्ण सामर्थ्य तुझ्या अंगी आहे. तुला देवांचे वरदान आहे तेव्हा आम्हाला जीवदान दे." वानर हे अशा रीतीने पीडेने काकुळतीला येऊन म्हणाले. तेव्हा त्यांचे प्राण वाचविण्यासाठी वनाचे हनुमंताने पूर्ण निरीक्षण केले. त्याला वनात एक विवर दिसले. ते वृक्षांच्या जाळीत लपलेले असून, जलपक्षी त्यामधे प्रवेश करताना त्याला आढळले. भूक आणि तहान यांनी व्याकुळ झालेल्या वानरांना तो म्हणाला, "येथे एक जलस्थान आहे. सावधपणे तुम्ही पाहा. चोचीत फळे धरून पक्षी आतून बाहेर निघत आहेत. हंस, सारस, बक, वंजुळ, चक्रवाक एकदम बाहेर येत आहेत. त्या विवरातून ढोक तोंडात मासा धरून बाहेर येत आहेत. यावरून विवरात फळे आणि जळ आहे असे निश्चितपणे म्हणता येईल. आता मी तुम्हाला तृप्त करीन. आम्ही श्रीरामाचे भक्त असून श्रीराम भक्तांचे रक्षण करतो. तो श्रीरघुनाथ संतुष्ट झाल्यावर भुकेने घात कसा होईल?" हनुमंताचे बोलणे ऐकून वानरांना श्रीरघुनाथाचे स्मरण झाले. त्यामुळे निमिषार्धात त्यांचे श्रम नाहीसे झाले आणि ते विवर पाहण्यास तिकडे गेले. चोचीत फळे घेऊन असंख्य पक्षी विवरातून बाहेर येत होते. वानरांचा समुदाय ते पाहून सुखी आणि हर्षभरित झाला. नंतर वानरांनी आश्चर्य करीत म्हटले, "धन्य धन्य हनुमंताची दृष्टी! जाळीमधले गुप्त असे जलयुक्त विवर याने नेमके पाहिले." अशी हनुमंताची स्तुती करून सर्व वानरांनी त्याच्या चरणावर मस्तक ठेवले आणि म्हणाले, "आमचा तू प्राणदाता, प्राणरक्षक आहेस. तू सर्वार्थाने अदम्य पराक्रमी आहेस. तुझा सत्संग आम्ही श्रेष्ठ मानतो. तू वरिष्ठ रक्षणकर्ता असल्याने आम्हाला संकटाची बाधा होत नाही."

वानरांचा विवर-प्रवेश, विवरातला वृत्तान्त

हनुमंत वानरांना म्हणाला, "तुम्ही सर्वजण या विवरात प्रवेश करा. फळे, जळ यांनी तृप्त व्हा. मग आपण जानकीचा शोध घेऊ." वानरांनी विवर पाहिले तेव्हा ते गडबडले कारण तेथे निबिड काळोख होता; सूर्य, चंद्र तेथे नव्हतेच. त्यामुळे विवरात प्रवेश करताना वानरांना भीती वाटत होती. हनुमंत पुढे चालला आणि विवर प्रांत शोधू लागला. वानर एकमेकांचा हात धरून, पुढच्याने हनुमंताला धरून, असे विवरात भयभीत मनाने प्रवेशले. विवरमार्ग अत्यंत कठिण होता. कोणी कोणाला पाहू शकत नव्हते एवढा दाट अंधार तिथे होता. उभ्यानेच प्राण जाईल असे त्यांना वाटत होते. वानरवीरांना एक महिना सतत उपास पडले होते; अन्नपाण्याविना ते कासावीस झाले होते. त्यामुळे विवरात त्यांना त्रास होत होता. पुढे जायला वानरांना शक्तीच उरली नव्हती आणि माघारी येणेही अशक्य झाले होते. त्यांना मार्ग सापडेना; ते अत्यंत दुःखी होते. विवरमार्ग हा अंधःकारमय, एक योजन लांब. ते वानर कसेबसे विवरात गेले. कष्टाने तिथवर जाऊन ते मूर्च्छित झाले. अंधाराने त्यांची बुद्धी गिळली; निराहार राहिल्याने चैतन्याला गिळून टाकले; तहानेने तोंडाला कोरड पडली आणि त्यांच्या तोंडातून शब्द फुटेना. ज्याप्रमाणे प्रलयकाळी जीव गडद अंधारात बुडून जातात, त्याप्रमाणे सर्व वानरवीर पूर्वापूर्व विसरले. ते अचेतन होऊन पडले. हनुमंत संपूर्ण बलवान होता. त्याने एकेकाला शेपटीत बांधून, त्यांच्यासह तो पुढे निघाला. वानरांची अवस्था पाहूनही तो मागे

https://archive.org/details/@tulakshmiacademy Bhavan Vedic Trust

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

सरला नाही. विवर शोधण्यासाठी तो सर्वांना घेऊन निघाला. हनुमंताच्या दिव्य दृष्टीला अंधार अडवू शकला नाही. शेपटीत वानरांचा संभार घेऊन तो सत्वर निघाला.''

वानरांचा प्राण वाचवण्यासाठी हनुमंताने युक्ती केली. आपला पिता जो वायू त्याला त्याने बोलावले. तो मग पित्याला म्हणाला, ''रामकार्यासाठी वानरांना मरणातही परमानंद आहे. तू यांचे प्राण वाचवलेस तर ती संपूर्णपणे श्रीरामाची सेवा ठरेल.'' श्रीरामसेवेचा विचार ऐकून वायूला संतोष झाला. त्याने वानरांचे प्राण रक्षण केले. श्रीरामाचे परमभक्त अदृष्टाने मूर्च्छित झाले तरी त्यांना काळाकडूनही घात होण्याची भीती नसते. कारण श्रीरामच त्यांचा रक्षणकर्ता असतो. भक्त सावधान किंवा असावधान असले तरी त्यांना श्रीरघुनंदन विसंबत नाही. त्यांना जन्म-मरण बाधू शकत नाही. काळाचे तोंड काळे होते. जे अखंड नाम गर्जत असतात त्यांच्यामुळे ब्रह्मांड पवित्र होते. श्रीराम त्यांचे कोड पुरवतो. काळाशी वितंड करताना ते नामाचा गजर करून काळाचे तोंड ठेचतात. हनुमंत हा रामदूत आहे असे पाहून कळिकाळ चळचळा कापतो आणि हरिभक्तांचा घात करण्याचे सामर्थ्य त्याच्यात उरत नाही. हनुमंताने त्याच आवेशात शेपटीत बांधून वानरांना तारले. सद्गुरूंचा शिष्य आपल्या कार्यासाठी अनाथांचा तारक होतो. वानरांना जरी प्राणान्ताची मूर्च्छा आली होती, तरी सद्गुरू हनुमंत जवळ होता, त्या सुसंगतीने त्यांचा घात चुकला. त्यांना समर्थ रक्षणकर्ता भेटला. हनुमंत कोट्यवधी वानर शेपटीत बांधून पुढे चालला. त्याला प्रकाश दिसला तेव्हा सर्वांना संतोष झाला.

हनुमंताच्या या गोष्टीचे सार हेच की संकटकाळी नामस्मरण केले तर संकटे बारा वाटा पळतात. कारण जगजेठी नामस्मरणामुळे तारक होतो. प्रकाशाचे भान झाल्यावर त्या अमृतमय प्रभेने वानर पूर्ण सावध झाले. ते स्थान पाहून चकित झाले. ''आम्ही धरणीवर मूर्च्छित होऊन पडलो. हनुमंताची अद्‌भुत शक्ती अशी की त्याने सर्व श्रमांचा परिहार करून आम्हाला स्वस्थ स्थितीला आणले. आम्हाला मूर्च्छित अवस्थेत सोडून तो एकटाच आला नाही. कोट्यानुकोटी वानरवीर उचलून घेऊन तो कृपाळू आला.'' अशा शब्दात नळ, नीळ, जांबुवंत आणि स्वतः अंगद यांनी हनुमंताचे गुणवर्णन केले आणि हनुमंताला वंदन करून ते स्वस्थचित्त झाले.

अध्याय पंधरावा

हनुमंताच्या प्रेरणेने विवरात प्रवेश केलेले वानर जेव्हा सावध होऊन पाहू लागले तेव्हा त्यांना सुवर्णभुवन दिसले. तिथे शय्या, आसने, छत, जमीन, भिंती, दिवे, पात्रे, विमाने, वस्त्रे, सरोवरे, मासे, नगरे, जलचर प्राणी, मोती, रत्ने, भूषणे, उपकरणे, आभरणे, पशुपक्षी सर्वकाही सुवर्णमयच होते. ते विवर धन, धान्य यांनी समृद्ध होते. तेथून परमामृताची नदी वाहात होती. तेथे ऋद्धिसिद्धी असून वानरांना ते पाहून खरोखर सुख झाले. तेथे सूर्य, चंद्र नसूनही नित्य प्रकाश पडलेला होता. त्यामुळे वानरांना अत्यंत उल्हास वाटून ते हनुमंताकडे पाहू लागले. ह्या रमणीय स्थळी हनुमंत होता. त्याला वानरांनी डोळेभरून पाहिला. त्यांनी सर्व विवर शोधून पाहिले तरी त्यांना तेथे मनुष्यप्राणी दिसला नाही.

तापसी कुमारीचा वृत्तान्त

विवरातील सुवर्णमंदिरात कृष्णाजिन धारण केलेली, एक तापसी कुमारी होती. तेजामुळे ती अत्यंत देदीप्यमान दिसत होती. तिच्या तपाचा प्रताप असा की तिचे सर्वांग तेजोमय झाले होते. तिला पाहून वानर समुदाय साशंक झाला. हनुमंताने तिला प्रश्न विचारला, ''तू या भुवनातली कोण आहेस? तुझा सर्व वृत्तान्त मला सांग. तू एकाकी, अबला, स्त्री येथे कशी? तपःप्रभावाने प्रबळ तेज

https://archive.org/details/muthulakshmiacademy Bhuvan Vani Trust, Lucknow

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

तुझ्या ठायी आलेले दिसते. या विवराची निर्मिती कोणी केली? या विवरात पूर्ण समृद्धी आहे, हे शोभिवंत भुवन येथे आहे. इथला राजा कोण? त्याने हे स्थान का सोडले? आम्ही येथे आश्रयाला आलो आहो. आम्ही तुझे पाहुणे आहोत. तेव्हा आम्हाला सर्व वृत्तान्त सांगून आमचे तू स्वागत कर.'' असे हनुमंताने म्हटल्यावर ती आश्चर्यचकित झाली. हे विवर अत्यंत गुप्त असता वानर येथे कसे आले असा तिला प्रश्न पडला. "यक्ष, राक्षस यांना दुर्गम आणि देव, दानवांपासून हे विवर गुप्त असताना, तुम्ही रामभक्त असल्यामुळेच येथे आलात.'' असे ती म्हणाली.

नंतर तिने श्रीरामनामाचे माहात्म्य वर्णन केले. ती म्हणाली, "श्रीरामनामाचा ज्यांना विश्वास आहे, जे रामनामात अहोरात्र गोडी ठेवतात, त्यांना दुर्गम अशा ठिकाणीही प्रवेश मिळतो हे मी जाणते. नाम मनातून आवडते परंतु आळसाने जो नामस्मरण करत नाही त्याची भक्ती ही वांझ कपिला गायीसारखीच असते. श्रीरामनाम पोटातून आवडते, पण जो नामाशिवायच्या टवाळ गोष्टीतच रंगून जातो, त्याची आवड समूळ खोटी असून त्याला ती आवड शेवटी उपयोगी पडत नाही. खोटी नाणी जशी घात करतात, तशी ही दांभिक भक्तांची भक्ती त्यांनाच अपघाती ठरते. ज्याच्याजवळ त्याचे भजन उरत नाही, भक्तीविषयी विकल्प मनात येतात, तो लोभाने लुबाडला जातो आणि मग त्याला आत्मप्रतीती कशी होणार? तुम्ही पात्र नेटाचे रामभक्त म्हणून विवरात येथे प्रवेशलात. देहलोभाविषयी नित्य निर्मुक्त असल्याने तुम्ही सर्वजण मला पूज्य आहात. जन्म-मरणाच्या भीतीला पायदळी घालून तुम्ही या विवरात प्रवेश केलात. श्रीराम हा भक्तांचा निर्धारक असतो. अहोरात्र जो रामाचे स्मरण करतो, त्याची विघ्ने निर्विघ्न होतात; तो पराक्रम तुम्ही वानरांनी केला आहे. आता मी तुमची दासी आहे. तुम्हा सर्व वानरांमधे मुख्य भक्त तू हनुमंता, तुमची रामभजनातली एकाग्रता तुम्हाला सर्वांना तारक होईल.''

"मी जे अनुष्ठान केले, त्यामुळे मला ज्ञान झाले की, हनुमंताच्या भक्तिसारखी भक्ती तिन्ही लोकात अन्य कोणाची नाही.'' हे बोलत असतानाच त्या तापसीच्या ठायी प्रेमभाव लोटला. तिने हनुमंताला लोटांगण घातले आणि ती ओक्साबोक्सी रडू लागली. अग्नी आणि कापूर यांची भेट झाली की ते एकमेकांच्या पोटात विरून जातात आणि ब्रह्म तेवढे उरते, तसेच येथे झाले. हनुमंताचे रूप निरखताच तापसी अ-रूप झाली. तापसीचे रूप पाहून हनुमंताला सुख झाले. भक्ता-भक्तांची भेट होण्याचे लक्षण, लक्षलक्षातीत गहन, मनात चैतन्य, ह्यामुळे एकमेकांना समाधान होते. तापसी म्हणाली, "मी निष्काम बुद्धीनं तप केलं. त्या तपाची फलप्राप्ती झाली. माझ्या भाग्यानं मला मारुती तू भेटलास. तू भव निर्मुक्ती देणारा तारक आहेस. श्रीरामभक्त ज्यांना भेटतात, त्यांना दर्शन, स्पर्शन, संवाद, स्थिती, भावाने संसारापासून मुक्तता मिळते, याची मला प्रतीती आली.'' असे म्हणून तिने मारुतीच्या पायावर मस्तक ठेवले आणि म्हणाली, "हनुमंता, जे तू मला विचारलेस ती समूळ कथाच मी आता सांगते.''

" मय नावाचा दानव तेजस्वी आणि मायावीपणात कुशल आहे असे पाहून दानवांनी त्याला आपल्या मायाविद्येने विश्वकर्मा केले. नंतर त्याने दानवांची नगरे, मंदिरे, कवचे, शस्त्रे, यंत्रे, सुवर्णाची विमाने आणि देखणी छत्रचामरे निर्माण केली. मोती, हिरे, रत्ने, सुवर्णाची भूषणे, उपकरणे यांची त्याने मायावीपणाने मायिक निर्मिती केली. मायावीविद्येच्या चपळाईने त्याने स्वतःला राहण्यासाठी हे अतर्क्य, गुप्त असे सुवर्ण-विवराचे स्थळ निर्माण केले. येथे सूर्य, चंद्र नसताही नित्य प्रकाश असतो. असे कौशल्य त्याच्यापाशी आहे, त्याविषयी कोणालाच काही तर्क करता येत नाही एवढे हे अतर्क्य आहे. इथे

https://archive.org/details/tulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

सरला नाही. विवर शोधण्यासाठी तो सर्वांना घेऊन निघाला. हनुमंताच्या दिव्य दृष्टीला अंधार अडवू शकला नाही. शेपटीत वानरांचा संभार घेऊन तो सत्वर निघाला.''

वानरांचा प्राण वाचवण्यासाठी हनुमंताने युक्ती केली. आपला पिता जो वायू त्याला त्याने बोलावले. तो मग पित्याला म्हणाला, ''रामकार्यासाठी वानरांना मरणातही परमानंद आहे. तू यांचे प्राण वाचवलेस तर ती संपूर्णपणे श्रीरामाची सेवा ठरेल.'' श्रीरामसेवेचा विचार ऐकून वायूला संतोष झाला. त्याने वानरांचे प्राण रक्षण केले. श्रीरामाचे परमभक्त अदृष्टाने मूर्च्छित झाले तरी त्यांना काळाकडूनही घात होण्याची भीती नसते. कारण श्रीरामच त्यांचा रक्षणकर्ता असतो. भक्त सावधान किंवा असावधान असले तरी त्यांना श्रीरघुनंदन विसंवत नाही. त्यांना जन्म-मरण बाधू शकत नाही. काळाचे तोंड काळे होते. जे अखंड नाम गर्जत असतात त्यांच्यामुळे ब्रह्मांड पवित्र होते. श्रीराम त्यांचे कोड पुरवतो. काळाशी वितंड करताना ते नामाचा गजर करून काळाचे तोंड ठेचतात. हनुमंत हा रामदूत आहे असे पाहून कळिकाळ चळचळा कापतो आणि हरिभक्तांचा घात करण्याचे सामर्थ्य त्याच्यात उरत नाही. हनुमंताने त्याच आवेशात शेपटीत बांधून वानरांना तारले. सद्‌गुरूंचा शिष्य आपल्या कार्यासाठी अनाथांचा तारक होतो. वानरांना जरी प्राणान्ताची मूर्च्छा आली होती, तरी सद्‌गुरू हनुमंत जवळ होता, त्या सुसंगतीने त्यांचा घात चुकला. त्यांना समर्थ रक्षणकर्ता भेटला. हनुमंत कोट्यवधी वानर शेपटीत बांधून पुढे चालला. त्याला प्रकाश दिसला तेव्हा सर्वांना संतोष झाला.

हनुमंताच्या या गोष्टीचे सार हेच की संकटकाळी नामस्मरण केले तर संकटे बारा वाटा पळतात. कारण जगजेठी नामस्मरणामुळे तारक होतो. प्रकाशाचे भान झाल्यावर त्या अमृतमय प्रभेने वानर पूर्ण सावध झाले. ते स्थान पाहून चकित झाले. ''आम्ही धरणीवर मूर्च्छित होऊन पडलो. हनुमंताची अद्‌भुत शक्ती अशी की त्याने सर्व श्रमांचा परिहार करून आम्हाला स्वस्थ स्थितीला आणले. आम्हाला मूर्च्छित अवस्थेत सोडून तो एकटाच आला नाही. कोट्यानुकोटी वानरवीर उचलून घेऊन तो कृपाळू आला.'' अशा शब्दात नळ, नीळ, जांबुवंत आणि स्वतः अंगद यांनी हनुमंताचे गुणवर्णन केले आणि हनुमंताला वंदन करून ते स्वस्थचित्त झाले.

अध्याय पंधरावा

हनुमंताच्या प्रेरणेने विवरात प्रवेश केलेले वानर जेव्हा सावध होऊन पाहू लागले तेव्हा त्यांना सुवर्णभुवन दिसले. तिथे शय्या, आसने, छत, जमीन, भिंती, दिवे, पात्रे, विमाने, वस्त्रे, सरोवरे, मासे, नगरे, जलचर प्राणी, मोती, रत्ने, भूषणे, उपकरणे, आभरणे, पशुपक्षी सर्वकाही सुवर्णमयच होते. ते विवर धन, धान्य यांनी समृद्ध होते. तेथून परमामृताची नदी वाहात होती. तेथे ऋद्धिसिद्धी असून वानरांना ते पाहून खरोखर सुख झाले. तेथे सूर्य, चंद्र नसूनही नित्य प्रकाश पडलेला होता. त्यामुळे वानरांना अत्यंत उल्हास वाटून ते हनुमंताकडे पाहू लागले. ह्या रमणीय स्थळी हनुमंत होता. त्याला वानरांनी डोळेभरून पाहिला. त्यांनी सर्व विवर शोधून पाहिले तरी त्यांना तेथे मनुष्यप्राणी दिसला नाही.

तापसी कुमारीचा वृत्तान्त

विवरातील सुवर्णमंदिरात कृष्णाजिन धारण केलेली, एक तापसी कुमारी होती. तेजामुळे ती अत्यंत देदीप्यमान दिसत होती. तिच्या तपाचा प्रताप असा की तिचे सर्वांग तेजोमय झाले होते. तिला पाहून वानर समुदाय साशंक झाला. हनुमंताने तिला प्रश्न विचारला, ''तू या भुवनातली कोण आहेस? तुझा सर्व वृत्तान्त मला सांग. तू एकाकी, अबला, स्त्री येथे कशी? तपःप्रभावाने प्रबळ तेज

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sayahu Foundation Trust and eGangotri

तुझ्या ठायी आलेले दिसते. या विवराची निर्मिती कोणी केली? या विवरात पूर्ण समृद्धी आहे, हे शोभिवंत भुवन येथे आहे. इथला राजा कोण? त्याने हे स्थान का सोडले? आम्ही येथे आश्रयाला आलो आहो. आम्ही तुझे पाहुणे आहोत. तेव्हा आम्हाला सर्व वृत्तान्त सांगून आमचे तू स्वागत कर." असे हनुमंताने म्हटल्यावर ती आश्चर्यचकित झाली. हे विवर अत्यंत गुप्त असता वानर येथे कसे आले असा तिला प्रश्न पडला. "यक्ष, राक्षस यांना दुर्गम आणि देव, दानवांपासून हे विवर गुप्त असताना, तुम्ही रामभक्त असल्यामुळेच येथे आलात." असे ती म्हणाली.

नंतर तिने श्रीरामनामाचे माहात्म्य वर्णन केले. ती म्हणाली, "श्रीरामनामाचा ज्यांना विश्वास आहे, जे रामनामात अहोरात्र गोडी ठेवतात, त्यांना दुर्गम अशा ठिकाणीही प्रवेश मिळतो हे मी जाणते. नाम मनातून आवडते परंतु आळसाने जो नामस्मरण करत नाही त्याची भक्ती ही वांझ कपिला गायीसारखीच असते. श्रीरामनाम पोटातून आवडते, पण जो नामाशिवायच्या टवाळ गोष्टीतच रंगून जातो, त्याची आवड समूळ खोटी असून त्याला ती आवड शेवटी उपयोगी पडत नाही. खोटी नाणी जशी घात करतात, तशी ही दांभिक भक्तांची भक्ती त्यांनाच अपघाती ठरते. ज्याच्याजवळ त्याचे भजन उरत नाही, भक्तीविषयी विकल्प मनात येतात, तो लोभाने लुबाडला जातो आणि मग त्याला आत्मप्रतीती कशी होणार? तुम्ही पात्र नेटाचे रामभक्त म्हणून विवरात येथे प्रवेशिलात. देहलोभाविषयी नित्य निर्मुक्त असल्याने तुम्ही सर्वजण मला पूज्य आहात. जन्म-मरणाच्या भीतीला पायदळी घालून तुम्ही या विवरात प्रवेश केलात. श्रीराम हा भक्तांचा निर्धारक असतो. अहोरात्र जो रामाचे स्मरण करतो, त्याची विघ्ने निर्विघ्न होतात; तो पराक्रम तुम्ही वानरांनी केला आहे. आता मी तुमची दासी आहे. तुम्हा सर्व वानरांमधे मुख्य भक्त तू हनुमंता, तुमची रामभजनातली एकाग्रता तुम्हाला सर्वांना तारक होईल."

"मी जे अनुष्ठान केले, त्यामुळे मला ज्ञान झाले की, हनुमंताच्या भक्तिसारखी भक्ती तिन्ही लोकात अन्य कोणाची नाही." हे बोलत असतानाच त्या तापसीच्या ठायी प्रेमभाव लोटला. तिने हनुमंताला लोटांगण घातले आणि ती ओक्साबोक्सी रडू लागली. अग्नी आणि कापूर यांची भेट झाली की ते एकमेकांच्या पोटात विरून जातात आणि ब्रह्म तेवढे उरते, तसेच येथे झाले. हनुमंताचे रूप निरखताच तापसी अ-रूप झाली. तापसीचे रूप पाहून हनुमंताला सुख झाले. भक्ता-भक्तांची भेट होण्याचे लक्षण, लक्षलक्षातीत गहन, मनात चैतन्य, ह्यामुळे एकमेकांना समाधान होते. तापसी म्हणाली, "मी निष्काम बुद्धीनं तप केलं. त्या तपाची फलप्राप्ती झाली. माझ्या भाग्यानं मला मारुती तू भेटलास. तू भव निर्मुक्ती देणारा तारक आहेस. श्रीरामभक्त ज्यांना भेटतात, त्यांना दर्शन, स्पर्शन, संवाद, स्थिती, भावाने संसारापासून मुक्तता मिळते, याची मला प्रतीती आली." असे म्हणून तिने मारुतीच्या पायावर मस्तक ठेवले आणि म्हणाली, "हनुमंता, जे तू मला विचारलेस ती समूळ कथाच मी आता सांगते."

" मय नावाचा दानव तेजस्वी आणि मायावीपणात कुशल आहे असे पाहून दानवांनी त्याला आपल्या मायाविद्येने विश्वकर्मा केले. नंतर त्याने दानवांची नगरे, मंदिरे, कवचे, शस्त्रे, यंत्रे, सुवर्णाची विमाने आणि देखणी छत्रचामरे निर्माण केली. मोती, हिरे, रत्ने, सुवर्णाची भूषणे, उपकरणे यांची त्याने मायावीपणाने मायिक निर्मिती केली. मायावीविद्येच्या चपळाईने त्याने स्वतःला राहण्यासाठी हे अतर्क्य, गुप्त असे सुवर्ण-विवराचे स्थळ निर्माण केले. येथे सूर्य, चंद्र नसताही नित्य प्रकाश असतो. असे कौशल्य त्याच्यापाशी आहे, त्याविषयी कोणालाच काही तर्क करता येत नाही एवढे हे अतर्क्य आहे. इथे

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

सर्वच सुवर्णमय असून स्वादिष्ट फळे. अमृतमय जल, जळचर, सुगंधी कमळे यांची येथे उपलब्धी आहे. मय मायिक विद्येने मायावी स्थिती निर्माण करू शकतो हे तू लक्षात घे. मयासुराने येथे महावनात बसून तपोयुक्त तपनेम साधून ब्रह्मा प्रसन्न करून घेतला. मयाने वर मागताना म्हटले, "मी शत्रूंना मारावे, मला मात्र मरण येणार नाही असा वर मला द्यावा." हे मयाचे मागणे ऐकून ब्रह्माला हसू आले. कारण जन्माबरोबर मरण ठरलेलेच आहे; हा वर कसा लाभेल. मय मरण न येण्याचा वर मागतो; पण हिरण्यकशिपूची एवढी योग्यता असून त्याने सजीव, निर्जीव नको असे म्हटल्यावर नखाग्रांनी तो मारला गेला. मयासुराची तीच कथा, मरण नको असा वर तो मागतो आहे याचा अर्थ त्याची मरणावस्थाच आली आहे. त्याला निर्मरणता कशी लाभेल. देहाभिमानाच्या माथ्यावर नित्य मरणावस्था वसते. अहंममता न सोडता निर्मरणता कशी मिळेल. असा विचार करून ब्रह्मा म्हणाला, "माझे वरदान ऐक. या विवरात असेपर्यंत तुला मरण येणार नाही. येथून बाहेर पडताच वैरी तुझा प्राण घेतील. वैरी विवरात आले तर ते तुझ्यांकडून मारले जातील. बाहेर गेलास तर निश्चित तिथल्या तिथे मरशील. मयासुरा हे निश्चित की जो विषयासक्त होतो, त्याच्यावर काळाचा आघात होतो. ही ब्रह्मवाणी सत्य आहे."

"ब्रह्मा वर तर बोलून गेला, पण त्याचवेळी विचारात पडला. सुरवर लोभाने इथे आले तर या विवरातच त्यांचा घात होईल. यासाठी सुरवरांना अतर्क्य असे विवराचे दार गुप्त केले. मयासुर इथे राहात होता. पुढे तोही मरण पावला" यावर हनुमंताने विचारले की, "विवरात मरण येणार नाही असा ब्रह्माचा वर असून मयासूर मरण का पावला?" तापसी म्हणाली, "मयासुर, विवरात बसून इंद्राच्या वधासाठी जारण-मारण करून दैत्यांना आणि दानवांना युक्ती सांगत असे. त्यामधे मंत्रयंत्र मोहकाचा वापर सांगितलेला असायचा. यामुळे इंद्रही मयासुराच्या वधासाठी सावधपणे टपून राहिला होता. तो विवरात जाऊ शकत नव्हता म्हणून दारात तिष्ठत उभा असे. मयासुर बाहेर येत नसल्यामुळे इंद्र त्याला मारू शकत नव्हता. मग इंद्राने ब्रह्मालाच मयाला मारण्यासाठी युक्ती विचारली. ब्रह्मा इंद्राला म्हणाला, "मयासुराला कामिनीकामाची विशेष गोडी आहे. तेव्हा प्रमदांच्या युक्तीने त्याला बाहेर आणून त्याचा घात करावा." त्यानंतर माझी सखी हेमा अप्सरा निर्धाराने ब्रह्मयाने विवरात घातली. त्यामागे मयाच्या वधाचा विचार होता. या कामिनीकामाचा आल्हाद वाटून शुंभनिशुंभ, सुंदोपसुंद अशा पुरुषांचा वध झाला होता. स्त्रीच्यासाठी मरण हे प्रसिद्धच आहे. कामिनीकामाची आसक्ती धरून पूर्वी किती संपले कोण जाणे. पुढेही अनेक स्त्रीकामाने मरतील आणि अधोगतीला जातील. हेमा अप्सरा सुंदरी विवरात आलेली पाहून मयासुर फेऱ्यात पडला आणि "भाग्याने माझ्याकडे आलीस", असे म्हणाला. हेमा ही कामात गहन होती. दोघांनी मद्यपान केले. नंतर गायन, नर्तन करत ती दोघे विवराबाहेर आली. त्यावेळी वैर साधून इंद्राने त्याला वज्राने मारला. ब्रह्माने प्रसन्न होऊन हेमा अप्सरेला सुवर्णभुवन आणि हे स्थान दिले. त्याचबरोबर हे स्थान दुर्गमही करून दिले."

"मी सुवर्णमनूची कन्या, स्वयंप्रभा नावाची आहे. हेमाशी माझी मित्रता आणि एकात्मता होती. मी त्याचवेळी ब्रह्मयाकडे वरदान मागितले की, 'मला निष्काम अनुष्ठानासाठी पूर्ण मुक्तत्व द्यावे'. माझी विनंती ऐकून प्रजापती ब्रह्माला संतोष झाला. माझी विनंती त्याला आवडून तो स्वतः म्हणाला, "धन्य. निष्कामाचे वदन, वचन आणि आगमन. निष्कामानेच जग पवित्र होते. निष्कामाचे मला कौतुक आणि सुख वाटते. निष्कामाचे मुख पाहून हरिहरांनाही हर्ष होतो. या विवरात हरिहर स्थान आहे. तेथे तू निष्काम अनुष्ठान करशील. स्वयंप्रभे हे माझे वरदान सत्य आहे. या विवरात

https://archive.org/details/@sulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

श्रीरामभक्तांशिवाय इतर कोणालाही प्रवेश मिळणार नाही. त्यांचे आतिथ्य केल्याने नित्यमुक्त होशील. हरिदासांचे दर्शन, स्पर्शन, अभिवंदन, त्यांच्याशी संभाषण, या प्रकाराने आतिथ्य केल्यास वंद्य मुक्तपण येते. हरिदासांची संगती भाग्याशिवाय प्राप्त होत नाही. हरिदासांची सद्‌भक्ती ही स्वभावतःच नित्यमुक्ती असते." ब्रह्मयाने मला असे वरदान दिले आणि तो चतुरानन अदृश्य झाला. माझी सखी हेमा हिचे हे ब्रह्मदत्त भुवन आहे."

"हेमा ही सकाम कामासक्त होती आणि येथे तर पुरुष येणार नाही; म्हणून ती मला भुवनाच्या रक्षणासाठी ठेवून स्वतः स्वर्गात निघून गेली. आता ब्रह्मवाणी खरी ठरून माझ्या भाग्याने तुम्ही रामभक्त येथे येऊन मला निर्मुक्ती द्याल." असे म्हणून त्या तापसीने लोटांगण घालून हनुमंताचे चरणवंदन केले. नंतर ती म्हणाली, "वानर भुकेने पीडित आहेत, तेव्हा इथल्या वनात जाऊन मधुर फळे खा आणि स्वादिष्ट पाणी प्या." हे तापसीचे सांगणे ऐकल्यावर हनुमंत म्हणाला, "भुकेने वानरांचे प्राण जातील इतके ते क्षीण झाले आहेत. त्यांना झाडावर चढणे शक्य होणार नाही. वानर सावधान असते तर मघाशीच त्यांनी वनाचा विध्वंस केला असता. तुला विचारायला ते थोडेच थांबणार होते. भुकेने त्यांची बलशक्ती क्षीण झाली आहे. त्यांना वृक्षावर चढणे जमणार नाही. आपणच आणून दिल्याने या भुकेल्यांचे प्राण वाचतील. आपण आणून देणे हे दानामधील उत्तम दान आहे. जे घरी बोलावून दिले जाते त्याचे नाव मध्यमदान आहे. वेळोवेळी काकुळतीला येऊन याचक दान मागतात आणि मग ते दिले जाते, ते दान निंद्य होय. काहीजण वसवसून, काहीजण निर्भत्सना करून जे देतात ते दान हे अधमाधम दान होय. आपण सेवा घेऊन द्विजांना जे दान दिले जाते ते दान नव्हेच, ती मजुरी असते. असले दातृत्व हेही अधमाधम दातृत्व आहे. यासाठी स्वयंप्रभे स्वधर्मरक्षण करण्यासाठी अतिथींना फळे अर्पण करून वानरांचे प्राण वाचव." तापसी स्वयंप्रभेने हे हनुमंताचे बोलणे ऐकल्यावर फळे आणून, विधियुक्त पूजन करून, वानरांना भोजन दिले.

ज्याप्रमाणे पृथु चक्रवर्ती भगवत्पूजन करतो, त्याप्रमाणे तिने पूर्ण उल्हासाने हनुमंतादी वानरगणांचे पूजन केले. ज्याला जे फळ आवडे, ज्याला जे मूळ आवडेल तसे देऊन आणि पाणी देऊन मग सुगंधी शिखरणी दिली. तिने वानरांना सोन्याची ताटे देऊन त्यात चांगली फळे वाढून, शिवाय नाना रसांच्या वाट्या भरून दिल्या. कोठे काही अपूर्णता तिने राहू दिली नाही. महिन्याभराच्या उपासाने पीडित झालेल्या वानरांना आंबरस, मधुरस, अमृतरस असे सुरस रस मिळून ते त्यांनी उल्हासाने खाल्ले. फळांची तऱ्हा वेगळीच होती. काही सकाम वाऱ्याने अगदी पिचपिचीत झालेली, काही हिरवी करकरीत, काही बिया फार असल्याने बुचबुचीत, काही अर्धी आणि कचकचीत, काही निबर आणि जून झालेली, काही सकाम लोभाने सालपटलेली, विकल्प मुरडीने मुरकुटलेली, अवेळी झडून पडलेली अशी काही त्यात होती. कित्येक वनिताकुचकर्दमात पडली. तशीच तिथून गडबडून अंधारात बुडाली; विवादकर्मठ अशी काही विधिनिषेधाने अत्यंत आंबट झाली; काही तपाच्या तेजाने तिखट, काही मतमुद्रेने तुरट, काही फळे वरवर बरी पण आत द्विजद्वेषाचे काटे असलेली; काही दिसायला चांगली पण परनिंदेने कडवट झालेली; काही भेदवादाने खुणावलेली; काही भेदाच्या आळीने बुचबुचीत झालेली, ज्यांना कावळीही खात नव्हती, ती धुळीत पडून मातीला मिळाली. त्यात काही गारठलेली, पडून जिथल्या तिथे फुटलेली होती. वानर त्यांना हात लावत नव्हते त्यांना दुष्ट दुर्गंधी येत होती. काही फळांचे गच्च घड पाखंड्यांपुढे आदळले तेव्हा ते फुटून त्यांचे तुकडे झाले आणि त्यातून सुळसुळीत किडे निघाले. काही फळे संज्ञानतेच्या शिखरावर पडून त्यांच्या काचऱ्या झाल्या; त्यांना वानर खात नव्हते, तेव्हा गर्वाच्या

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Muthulakshmi Research Academy

घारींनी झडपून नेली. जी फळे वनितांच्या हातातून निसटली, अहंममतेच्या देठापासून सुटली, संकल्प-विकल्यांनी तुटली, तेवढीच फळे परिपक्कतेला गेली. त्यापैकी काही फळे निर्विकारतेने पाडाला आली आणि शांतिसेजेत स्वतः मुरली, नैराश्याने घमघमली तेवढी वानरांनी खाल्ली

वानरांनी जी फळे खाल्ली, ती आत्मबोधाने घमघमित, नैराश्याचा रस गळत असलेली आणि ज्यावर हंस, शुक झेपावत होते अशी होती. अहं-कोहं-सोहं विहीन, ब्रह्मात ब्रह्मत्वलीन, मी-तूपण सोडून, परिपूर्ण फळे वानरांनी सेवन केली. बराच काळ बुभुक्षित राहिलेल्या वानरांना श्रीरामकृपेने तृप्त केले आणि संकटातून भक्त वाचविले. संकटात सापडलेल्या भक्ताला श्रीरघुनाथ जवळ राहून द्वंद्वाला निर्द्वंद्व करतो. श्रीरामामुळे भक्त हे निर्मुक्त होतात. अशी पूर्णत्वाची सिद्धी वानरांना त्या भोजनाने झाली. श्रीराम कृपाळू हा द्वंद्वाला बाध आणून भक्तांना निश्चित वाचवितो. ग्रंथामध्ये निश्चिती सांगितली तरी या निश्चितीसाठी कोणता विधी आहे तर सद्‌गुरुवाचून ही सिद्धी होत नाही हे सावध बुद्धीने ऐका. शब्द निःशब्द ही शब्दशुद्धी; आशा निराशा ही मनःशुद्धी; देहात विदेहत्व ही देहशुद्धी; या त्रिशुद्धीने पावन होता येते. अशा त्रिशुद्धीने वानर तृप्त, अभयंकर होऊन स्वानंदाने ढेकर देऊ लागले. त्या नादाने आकाश गर्जले.

वानरांची तृप्ती, अन्नदानाचे महत्त्व

वानर भुकेजलेले असल्याने त्यांनी फळे गटागटा खाल्ली. मिटक्या मारत मटमट खातांना त्यांच्या तोंडातून लाळ गळत होती. सुरवरांना, ऋषिवरांना वाकुल्या दाखवत त्यांचे फळे खाणे चालू होते. मोठ्या दुःखातून ते बाहेर आले होते. वानर खात असताना त्यांनी मारलेल्या तृप्तीच्या मिटक्यांनी आकाश गजबजले. श्रीरघुराजाने वानरसमूह वाचविण्यासाठी तापसी धाडली, भक्तरक्षणासाठी विवर निर्मिले अशी भावना निर्माण झाली. जर बुभुक्षितांना तृप्त करणारे भोजन दिले तर त्यामुळे श्रीभगवान सुखी होतो. दुष्काळात दिलेले द्विजभोजन इतके श्रेष्ठ की त्यापुढे अश्वमेध यज्ञ, राजसूय यज्ञ हे क्षुल्लक ठरतात. तापसीचे भाग्य थोर, तिने फळे आणून वानरांना ती भोजनासाठी दिली आणि त्यामुळे वानर सावध झाले.

अध्याय सोळावा

वानरांना एक महिना उपास पडला होता; पण तापसीने फळे आणून देऊन त्यांना तृप्त करणारे भोजन दिले. त्यामुळे वानरांना उत्साह वाटला. फळेमुळे खाऊन, निर्मळ जल पिऊन सुखी झालेल्या वानरांना तृप्तीचा खूप हर्ष झाला होता. वानरांचे सर्व दळ पूर्वीपेक्षा अधिक प्रबळ झाले. आता जनककन्या शोधण्यासाठी त्यांचे बळ शतगुणित झाले होते. वानर हनुमंताला म्हणाले, "आपण काय इथे फळे खायला आलो आहोत की सीतेला शोधण्यासाठी आलो आहोत. त्या रामकार्याला साधावे. या विवरात शोधून सीता सापडणार नाही हे निश्चित. तेव्हा पुढे काय कर्तव्य आहे ते सांग. दक्षिणपंथ शोधायचा तर या विवरात सूर्य, चंद्र यांच्याशिवाय नित्य प्रकाश आहे. दाहीदिशांना पाहूनही दक्षिणपंथ दिसेना. पूर्व कोणती, पश्चिम कुठली किंवा उत्तर, दक्षिण हे काहीच कळत नाही. दिशांचे ज्ञान होत नाही तर कुणीकडे जायचे.

तापसीचा प्रश्न, हनुमंताचे निवेदन

अत्यंत भार ज्याच्या माथ्यावर असतो, तो लगबगीने पळतो; अतिशय उन्मत्तता आली की कथा, वार्ता विचारू नये. जो ज्ञानगर्वाने पीडित असतो, जो विषयमदाने उन्मत्त होतो, जो भुकेने अत्यंत त्रस्त असतो, त्यांना वृत्तान्त विचारू नये. तापसी म्हणाली, "हे वानरनाथा, भूकपीडिताला वार्ता विचारू नये; पण फळभोजनाने सावधानता आली असल्याने, आता मनातला वृत्तान्त सांग. हे गूढ वन, हे गुप्त विवर असून सर्व वानरसमूह

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

येथे मिळून का आलात, तेही मला सांगा. तुम्ही श्रीरामाचे भक्त माझ्या भाग्याने येथे आलात आणि या गुप्त विवरात प्रवेश केलात; हे कोणत्या कार्यासाठी ते मला सांगा. मी तर तुमची केवळ दासी आहे. मला कार्य सांगावे असे जर तुम्हाला मान्य असेल तर ते कार्य मला सांगा.''

हनुमंताने तापसीला म्हटले, ''ऐक तापसी, मी पूर्ववृत्तान्त सांगतो. श्रीरघुनाथ पूर्ण ब्रह्म असून सूर्यकुळात अवतरला आहे. तो कौसल्येचा पुत्र दाशरथी म्हणून आला. पित्याच्या आज्ञेचा नेट धरून, वंधू लक्ष्मण आणि सुकुमार सीता यांच्यासह वनात येऊन श्रीराम वनवासात पंचवटीत राहिला. गंगेच्या तटावर ते राहात असताना राम, लक्ष्मण हे मृगापाठीमागे गेले. इकडे पंचवटी शून्य आहे असे पाहून कपटी रावण भिक्षुरूपात आला. त्याने सीता हरण करून नेली. सीतेचा शोध घेण्यासाठी राम किष्किंधेला आला. तेथे त्याने भाऊ आणि भार्या यांचे हरण करणाऱ्या वालीचा बाणाने वध केला. सुग्रीवाला राजा करून अंगदाला युवराजपद दिले. राजा सुग्रीवाने आम्हाला सीतेच्या शोधासाठी दक्षिणदिशेला पाठविले. आम्ही दक्षिणेकडील शतवर्त शोधले. सीतेचा तेथे शोध लागला नाही. मग आम्ही विवरापाशी आलो. सुग्रीवाची कठोर आज्ञा होती की एक महिन्यात परत यावे; जो येणार नाही त्याची गाढवावरून अपमान आणि निर्भत्सना होईल अशी धिंड काढली जाईल. आम्ही विवरात प्रवेश केला त्यानंतर एक महिना लोटला. हे विवर तर गहन, दुर्गम असून वाहेर पडण्याचा मार्ग दिसेना. विवराच्या बिळात प्रवेश करताच आम्ही मूर्च्छित झालो. येथे आम्ही कसे आलो हेही समजेना. या विवरातला विचित्र प्रकार असा की येथे उत्तर-दक्षिण कोणती हेच कळत नाही. पूर्व-पश्चिमही कळत नाही. आम्हाला आमचे येणे-जाणे निश्चितपणे कळत नाही. आम्ही तुझ्या अधीन असून तुलाच आमची गती समजणार. तेव्हा हे कृपामूर्ती आमच्यावर कृपा कर.''

विवराबाहेर पडण्यासाठी वानरांना साहाय्य

''आमची विवराबाहेर गती झाली तरच आम्हाला सीता भेटेल. त्यासाठी त्वरित कृपा करून आम्हाला उद्धार.'' असे वानरांचे विनंतीपर भाषण ऐकून तापसी सुप्रसन्न झाली. विवरात येणे-जाणे सज्ञान द्विजदेवही जाणत नाहीत. ब्रह्मयाची वरदोक्तीच होती की, विवरात आलेले, बाहेर पडणार नाहीत. या विवरातून बाहेर येण्याची कोणतीही युक्ती नाही. नंतर ती तापसी म्हणाली, ''माझ्यावर ब्रह्मा सुप्रसन्न, विवरातून येणे-जाणे करण्याविषयी मी जाणकार आहे. मला ते ब्रह्मयाने दिलेले वरदान आहे. ज्याला श्रीरामाची भक्ती आहे त्याला दुर्गम ठिकाणीही प्रवेश असतो. रामनामाची प्रताप-शक्ती एवढी आहे की हरिभक्तांना तो संसारातून निश्चित मुक्ती देतो. श्रीरामनामाच्या साहाय्याने कळिकाळही पुढे पळतो, तर त्यापुढे विवर काय बापडे की ज्याचे संकट तुम्हाला बाधावे. श्रीरामाची सेवा हे नित्यकर्म. हृदयात श्रीरामाचे प्रेम, मुखात नित्य रामनाम अशा भक्तांना सर्वत्र सहज गती असते. शिवाय हनुमंतादी वीर हे भक्तिप्रतापात श्रेष्ठ आहेत. श्रीरामाच्या नामाने गुणगंभीर असलेल्या वानरांचा याने उद्धार होतो. आज माझे अनुष्ठान सफळ झाले; कारण हनुमंताचे दर्शन झाले. त्यामुळे मी सुखसंपन्न झाले आहे. सत्संगाचा महिमा मोठा असतो. जप, तप, ध्यानस्थिती ह्या सर्वांचे सत्संगतीने सार्थक होते. सत्संगाची महती फार मोठी असून. त्यामुळे भवापासून मुक्ती मिळते. श्रीरामभक्तांच्या पंक्ती आज माझ्या भाग्यामुळे येथे आल्या आहेत. त्यांची यथाशक्ती सेवा करून, वानरांना विवरातून बाहेर जाण्यासाठी मी साहाय्य करीन.''

वानर विवराबाहेर, समुद्रतीरावर

''विवरातून बाहेर पडण्यासाठी, माझ्या बोलण्यावर विश्वास ठेवून, सर्व वानरांनी स्वतःच्या हातांनी आपले डोळे झाकावे. डोळे उघडे ठेवून देव, दानव, ऋषी, महंत यांनाही कल्पांती

https://archive.org/details/tulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized By Sarayu Foundation Trust and eGangotri

विवराबाहेर पडणे शक्य होणार नाही.'' असे त्या तापसीने म्हटले. त्यावर सर्व वानरांनी आपले डोळे आपल्या हातांनी झाकून ते बाहेर पडण्याची वाट पाहू लागले. काही क्षण ते त्या स्थितीत राहिले आणि कोणी तरी 'उघडा' म्हणण्याची वाट पाहात राहिले. कोणीच तसे न म्हटल्याने त्यांनी आपणहूनच डोळे उघडले. त्यांनी डोळे उघडताच त्यांना समोर दुर्धर, गडगडाट करणारा समुद्र दिसला. वानरांना आश्चर्य वाटले. ''आपण येथे आलो कसे? त्या तापसीने हे काय विचित्र केले? आम्हाला हाताला धरून चालविले नाही की कडेवर घेतले नाही. मग आम्हाला विवराबाहेर आणले कसे? एवढे कौशल्य जिच्याजवळ आहे, ती तापसी आहे कुठे?'' असा विचार करत वानरांनी चौफेर शोध केला. वानरांनी मोठ्या आवेशाने सर्व वन शोधले; परंतु त्यांना तापसी आणि विवर कुठेच दिसेना, याचे त्यांना आश्चर्य वाटले. मुळात वानरांची भ्रांती नाहीशी करण्यासाठी, तापसी नव्हे ती श्रीरामशक्तीच कृपेने विवराकडे आली आणि तिने वानरसमूह तारला. मयासुराच्या मायेच्या मायावीशक्तीने विवरामध्ये वानरांना भ्रांत केले होते. पण रामनामाची आवर्तने करणाऱ्या वानरांची त्यापासून सुटका झाली. श्रीरामाची भक्ती करणाऱ्या भक्तांना भ्रांतीची बाधा होत नाही. रामनामाच्या महतीनेच वानरांना विवरापासून सुटका करून घेता आली.

श्रीरामाच्या नामभयाने माया प्राण घेऊन पळते; मग कोण बापडे भक्तांना भुलवायला स्थिर राहणार? भुकेपोटी हनुमंताने भक्ती केली; तापसीला नित्यमुक्ती प्राप्त झाली. हरिभक्तांची संगती मिळाली तर भवापासून भाविकांना कायम मुक्ती मिळते. रामनामाच्या आवर्तनाने तापसी तरली त्याचे किती वर्णन करावे! वानरांनी विवरामध्ये काय ख्याती केली ती आता सावधपणे ऐका. नामाचा गजर वानरांनी केला; त्या गर्जनेने विवर कोंदाटले; त्यामुळे विवराचा उद्धार झाला. रामनामाने जगाचा उद्धार होतो. भक्त ज्या ठिकाणी जातात ते ठिकाण मुक्त होते. रामनामाच्या सतत स्मरणाने जड जीव उद्धरतात. वनात वानरांनी पाहिले; नामप्रभावाने विचार मुक्त झाले. वानरांना विवरातून मुक्तता मिळाली. रामनामामुळे त्या जडजीवांचा उद्धार झाला. अशा प्रकारे वानर विवराचा उद्धार करून, स्वतः समुद्रतीरावर आले. त्यांना सीतेचा शोध करायचा होता. या आधी त्यांनी गिरिगव्हारे शोधली. तिथे सीता आढळली नाही. आता त्यांच्या पुढे दुस्तर असा समुद्र आला. ''सुग्रीवाने दिलेली एक महिन्याची मुदत विवरातच संपली. तेथेही सीतेचा शोध न लागल्याने कार्य पूर्ण झाले नाही. हा सीतेचा शोध पूर्ण न होताच आम्ही परतलो तर राजाच्या आज्ञेचे उल्लंघन केले म्हणून सुग्रीव आम्हाला शासन करून अपमान करील.'' असे वानर म्हणू लागले.

वानरांचा समुद्रापाशीच थांबण्याचा निर्णय

''सीतेच्या शोधासाठी सर्वत्र दक्षिणेत शोध घेतला; आता हा दारुण समुद्र पुढे आल्याने जाण्याची गतीच खुंटली. सीतेच्या शोधासाठी या समुद्रामुळे पुढे जाता येत नाही आणि मागे जाणे म्हणजे वानरांच्या प्राणाशी गाठ पडणार.'' असे म्हणत अंगदाने दुःख व्यक्त केले. ''सुग्रीव निश्चितपणे मला विरोध करून म्हणेल 'अंगदा, तू युवराज, तुझ्या अधीन वानरसमूह तरी सीतेचा शोध न करताच परतलास;' असे म्हणून तो मला शिक्षा करील. माझी गाढवावरून धिंड काढील, गळ्यात पादत्राणांच्या माळा घालील, शेणाच्या गोळ्यांचा अभिषेक करील, अशा रीतीने माझी घोर दुर्दशा केली जाईल. हे सर्व सोसत असताना लोकलज्जेने मला मरण येईल. त्यापेक्षा आपण येथेच प्राण जाईपर्यंत थांबावे हेच योग्य ठरेल. सीतेचा शोध पूर्ण न केल्यामुळे माझीच भीड राखली जाणार नाही तर इतरांचा काय पाड; सर्व वानरांची दुर्दशाच होईल. तो जटायू खरोखर धन्य म्हणावा. सीतेची सोडवणूक करण्यासाठी रावणाशी

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

युद्ध करून त्याने रणात प्राण दिले." अंगदाचे हे भाषण ऐकल्यावर वानरांनी भीतीने विचार केला की, "पुढची दुर्दशा कशी सोसावी. त्यापेक्षा या समुद्रतीरावरच प्राण सोडावा. देहाच्या लोभाने दुर्दशा करून घेण्यापेक्षा येथे रामनामाचे स्मरण करत प्राण दिला तर परमार्थ प्राप्त होईल. यासाठी आपण सर्वजण दर्भासनावर बसून मरणासाठी धरणे देऊन येथेच थांबू या." असा सर्वांचा निश्चय झाल्यावर वानरांनी गवत आणून त्यावर बसून मरणासाठी तयारी केली. त्या कोट्यवधी वानरांनी समुद्रतीरावर धरणे धरले आणि संपातीने (गृध्रपक्षाचे नाव) त्यांना पाहिले. त्याने विचार केला की, "जे जे समुद्रतीरावर आले ते संपातीचे भक्ष्य होतात." असा विचार करून तो वानरांना खाण्यासाठी तेथे आला. तो अनेक दिवसांचा उपाशी होता. त्यामुळे त्याला वाटले, "देवांनीच कृपा करून हे वानर मला खायला मिळावेत म्हणून इथे आणले. येथे जे येतात ते माझे भक्ष्य होतात आणि त्यांना मरण येते. तर तुम्ही कोण, कोणाचे, इथे का आलात?" संपातीने प्रश्न विचारले त्यावेळी वानर गवतावर निवांत पडून श्रीरामाच्या गोष्टी करत होते. त्यांना मरणभय वाटतच नव्हते. हे पाहून संपाती त्यांना म्हणाला, "माझ्या उग्र दर्शनामुळे प्राणी प्राणभयाने पळतात. तुम्ही मात्र मनातून गजबजून जाता मरणासाठी धरणे धरून का बसला आहात. तुम्ही मरायला का टेकला आहात. या ठिकाणी जे तुम्हाला आणण्यात आले ते माझ्या भोजनासाठीच, सर्व वानरसमूह मरून जाईल. तुम्ही ज्या रामनामाच्या गोष्टी करता आहात. तो राम या सृष्टीतला कोण? तुम्हाला कुठे भेटला? सर्व मला सविस्तर सांगा."

अगंद-संपाती सवांद, हनुमंताचा प्रश्न

संपातीचे बोलणे ऐकून, अंगद त्याला म्हणाला, "आम्ही वानर खरोखर धन्य आहोत कारण गृध्राचे भक्ष्य होऊन आम्हाला अनायासे मरण येते आहे. अन्नपाणी वर्ज्य करून चरफडत प्राण देणार होतो आम्ही; पण श्रीरामाने कृपा करून हे विनासायास मरण दिले आहे. हे गृध्र, तू रामकथा कशाला विचारतोस? तू आज आमचा अतिथी आहेस, तेव्हा वानरांना सुखाने भक्षण कर. भुकेल्यांना अन्नदान करावे हे तर सनातन शास्त्रच आहे. आम्ही तुला देहदान केले आहे तेव्हा वानरांना खाऊन टाक." अंगदाने असे म्हटल्यावर संपाती म्हणाला, "तुम्ही रामनामस्मरण करता आहात त्यामुळे तुम्हाला माझ्याने भक्षण करवत नाही. कारण नाम हे भक्ताचे रक्षण करते. जिथे रामनामस्मरण होते तिथे मरण प्रवेश करू शकत नाही. नाम हे भक्तांचे रक्षण करते, तेव्हा मी तुमचे भक्षण करू शकत नाही. रामनामाचे स्मरण केले की जन्म-मरण पळून जाते. अखेरीस, माझ्या भाग्याने तुम्ही श्रीरामभक्त येथे आलात. तुम्ही मुखाने रामनामाची आवर्तने करता, हृदयात रामप्रीती बाळगता, रामभक्तीला तुम्ही देह विकले आहेत, हे केवढे माझे भाग्य वानू? अतिथीच्या भोजनासाठी तुम्ही सर्व देहदानाला सिद्ध झालात; खरोखर तुम्ही श्रीरामाच्या भाग्याने लोकात सभाग्य आहात; तुम्ही त्रिभुवनात धन्य आहात. कोणत्या कार्यासाठी तुम्ही भाग्यवान इकडे आलात ते मला स्पस्ट सांगा; मी कार्यसिद्धी करून देईन. मला त्याविषयी विशेष प्रेम आहे; म्हणून मी ही गुप्त गोष्ट विचारतो. तुम्ही श्रीराम डोळ्यांनी पाहिलात म्हणता, तेव्हा त्याची भेट तुम्हाला कशी झाली ते सांगा. श्रीराम हा राजराजेश्वर; तुम्ही वनचरवानरे; तुम्ही रामभजनात तत्पर कसे ते सविस्तर मला सांगा."

संपातीची विनंती ऐकून वानरांना आश्चर्य वाटले. "रामनामस्मरण केल्याने गृध्र भक्षण करू शकत नाही हे कसे! जे या समुद्रतीरावर आले ते संपातीचे भक्ष्य झाले. आता मात्र श्रीरामाच्या नामस्मरणाने तो वानरांना खाऊ शकत नाही. रामनामाचे स्मरण केल्यास त्या स्मरणकर्त्याला

https://archive.org/details/@tulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

मरणही मारू शकत नाही. आम्ही पूर्णपणे अभागी कारण आम्हाला रामनाम स्मरण करवत नाही. नित्य नामस्मरण करणाराचे चरण मृत्यू वंदन करतो. आम्हाला हे प्रत्यक्ष प्रमाणच मिळाले की गृध्राला भक्षण करवत नाही. प्रत्यक्ष मरणही जिथे रामनाम म्हटल्याने येऊ शकत नाही, तिथे समुद्र बापडा काय; आम्ही नामस्मरणाची शक्ती मिळाली की हा समुद्रही लंघून जाऊ. रामनामाचा निर्धार केला तर आम्ही भवसागर तरून जाऊ. तिथे समुद्राचे काय मोटे. आमच्या भाग्यानेच हा गृध्र आम्हाला भेटला." या प्रकारे नामाची महती ऐकल्यावर हनुमंताच्या मनाला समुद्र लंघून जाण्याएवढा उल्हास वाटला. त्याने संपातीला विचारले, "तू अंड्यातून जन्मणारा पक्षी असून, रामनामाने मरण चुकते हे गुपित तुला कसे माहिती? तुझे मूळ आम्हाला सांग." श्रीरामाच्या भक्तांच्या संगतीत आल्यामुळे संपातीची भ्रांती नाहीशी होऊन पूर्वीचे जीवन त्याला आठवले आणि तो मारुतीला ते सांगू लागला.

संपातीचे पूर्ववृत्त कथन

संपाती म्हणाला. "कश्यपाच्या कुळात सूर्याच्या वीर्यामुळे आम्ही जटायू आणि संपाती असे दोघे पराक्रमी, जुळे भाऊ जन्मलो. दैत्य, दानव, मानव, तेहतीस कोटी देवांसह सर्व आमच्या दृष्टीला घुंगुरटी वाटली असा आमच्या ठिकाणी बळाचा गर्व होता. स्वभावात असलेला हा बळाचा ताठा आणि तशात तारुण्य आले. आम्ही दोघे पैज लावून सूर्यचरणाला वंदन करण्यासाठी निघालो. पंखांची फडफड करत एक एकापुढे धावत, एक एकाच्या अधिक वर चढत, सूर्यावर लक्ष ठेवून निघालो. आम्ही वेगाने सूर्यापाशी गेलो, तेव्हा तो मध्याह्नी आला होता. त्यावेळी सूर्यकिरणांच्या तेजाने तापून जटायू कासावीस झाला. तो माझ्यापेक्षा खाली आला. मी तेवढा आत्मप्रौढी मिरवत वरच गेलो. तेव्हा माझ्या पंखांची होळी होऊन, गर्वामुळे हा नाश झाला. जटायूचे पंख वाचले, माझे पंख जळाले. हा ह्या गर्विष्ठपणाचा परिणाम झाला आणि मी आत्यंतिक दुःखाला प्राप्त झालो. माझे पंख जळायला लागले तेव्हा मी मोठ्याने किंकाळी फोडली. सूर्याने ते पाहून पुत्राच्या प्रेमाने कळवळा दाखविला. सूर्याचा सारथी अरुणाने सूर्याला सांगितले की, 'हे दोघे माझे पुत्र आहेत. स्वामींच्या चरणांना वंदन करण्यासाठी येत असताना आपल्या तेजाने पंख जळाले."

सूर्याने अरुणाला म्हटले, "पृथ्वीवरचे लोक मला वंदन करतात त्यामुळे मी त्यांच्याकडे चांगले भान ठेवून पाहतो. या उलट मला पराक्रमाचा गर्व दाखविण्याने दोन्ही पंख जळाले. माझे तेज आणि प्रकाश यांमुळे गर्विष्ठ तेवढे भस्म होतात. अरुणा, ही तुझी संतती म्हणूनच संपाती वाचला. तुझे मन राखण्यासाठी म्हणून पुत्ररक्षणासाठी मी वरदान देतो. पुत्रसंतानाचा उद्धार होण्यासाठी नीटपणे ऐक. तू माझा सारथी आहेस, तुझी माझी नित्य एक गती आहे, तुझी संतती उद्धरण्यासाठी खरोखर मी हे वरदान देतो आहे. श्रीरामभक्तांच्या संगतीने रामनामाचे स्मरण ऐकल्यावर निरभिमान होऊन हा संपाती पुन्हा पंखांची प्राप्ती करून घेईल. रामनामाचे श्रवण केल्याने निरभिमान झालेला संपाती नंतर दोन्ही पंखांच्या साहाय्याने गमन करील. संपाती निरभिमान, येण्या-जाण्याची अगम्य गती प्राप्त होऊन सुखाचा अनुभव मिळवील. रामनामाने दुःख-निवृत्ती, सुखसंपत्ती, अगम्य गती प्राप्त होते हे निश्चित आहे. जेथे श्रीरामाचे आगमन त्या जनस्थानात जटायू जाईल आणि सीताहरण प्रसंगी तिचे संरक्षण करताना रामाकडून त्याचा उद्धार होईल."

सूर्य पुढे म्हणाला, "दशरथ-कौसल्येच्या कुशीत, सूर्यवंशात, श्रीराम अवतार घेईल. यासाठी दशरथाशी मैत्री करून जटायूला विश्वास संपादन करता येईल. जनस्थानामध्ये जटायू पंखांसह गेला

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

आणि मी येथे दक्षिणसमुद्राच्या तीरावर पडलो आहे. पंख जाळलेला, देह व्यथित, काय खावे याची नित्य चिंता, तरीही श्रीरामाची आठवण झालीच नाही; वरदाची वार्ताही विसरलो. जटायू कोठे गेला ते मला ठाऊक नाही. त्यालाही माझ्याविषयी काही जाण नाही. जटायू धन्य असे तुम्ही म्हणता, आज आताच मी ते ऐकले. हनुमंता कृपा करून मला जटायूची समूळ कथा सांगा.'' असे म्हणून संपातीने मारुतीच्या पायावर डोके टेकले. जटायूचे नाव ऐकून संपातीला प्रेमभाव वाटला. ''धन्य जटायूचा धर्म की त्याने रामाची सेवा केली. मी करंटा, पंख नसलेला, रामाचे स्मरण न करणारा, पापी आहे. धन्य, वानरांचे दर्शन की ज्यामुळे रामनाम कानावर पडले. आपण मला श्रीरामाची स्थिती, जटायूची गती आणि सर्व वानर प्राणत्यागासाठी येथे का आलात ते सांगा.''

हनुमंत जटायूची वार्ता कथन करतो

संपाती म्हणाला, ''सातशे वर्षांनंतर तुम्हा वानरांच्या तोंडून जटायूचे नाव ऐकले. माझ्या चित्तात त्याच्याविषयी चिंता होती. जटायू कोणत्या अवस्थेत आहे, त्याची स्थिती, गती काय अशी चिंता अनेकदा वाटायची; त्याचा शोध आज निश्चित लागला. रावणाने सीताहरण केले, तेव्हा जटायूने रावणाशी युद्ध केले, त्यात त्याला मरण कसे आले आणि श्रीरामाने त्याचा उद्धार कसा केला ते मला ऐकायचे आहे. कारण जटायू पूर्ण बलवान होता. त्याला रावण मारू शकत नाही, मग जटायू कसा मरण पावला? ते मला सविस्तर सांगा.'' ही संपातीची विनवणी ऐकून हनुमंताला त्याची अनुकंपा वाटली. त्यामुळे जटायूची संपूर्ण वार्ता हनुमंताने स्वानंदाने सांगितली. ''दाशरथी श्रीरघुनंदन पित्याच्या वचनाप्रमाणे वनागमन करून सीता आणि लक्ष्मण यांच्यासह जनस्थानात येऊन राहिला. त्याची जटायूशी भेट झाली. स्वामी-सेवक यांची ही भेट झाल्यावर गंगातटी (गोदावरीच्या तीरावर) पंचवटीच्या रम्य ठिकाणी आश्रम केला. रामाच्या आश्रमापाशी जटायू अहोरात्र राहात होता. जानकीचे तो अष्टौप्रहर रक्षण करत असे. एकदा जटायू वनात भ्रमण करण्यासाठी गेला असताना मृगाच्या कपटाने राम-लक्ष्मणांना फसविले. इकडे रावण भिक्षेच्या निमित्ताने आला आणि त्याने सीतेचे हरण केले. त्यावेळी सीतेचे आक्रंदन ऐकून जटायू धावून आला. त्याने रावणाशी निर्वाणीचे युद्ध केले. त्याची वार्ता ऐका.''

''जटायूने रावणाचे धनुष्य, बाण, पिशाच तोंडाची गाढवे, रथ हे सारे झडपा मारून भंग केले. रावणाच्या डोक्यावरचा मुकुट पाडला आणि त्याची दहा तोंडे थोबाडली. रावणाला चकवून वाट अडवली आणि रावणापुढे प्राणसंकट उभे केले. जटायूच्या नखांनी ओरखाडून रावणाला रक्तबंबाळ केला. वीस हातांचे चूर्ण केले. असा दशाननाला गांजवून सीतेची सोडवणूक केली. रावण काकुळतीने विनवून म्हणाला, ''पुरे, जटायू पुरे कर हे युद्ध. माझा प्राण जाऊ पाहतोय.'' रावण दाती तृण धरून जटायूकडे जीवदान मागू लागला.

रावण शरण आल्यामुळे जटायूने त्याचा प्राण घेतला नाही. शरणागत म्हणून त्याचे रक्षण केले आणि त्याबदली सीतेला सोडविली. पंखांनी गांजणूक निश्चित झाली आणि रावणाची यशकीर्ती धुळीला मिळाली. रावण नंतर पण लावून युद्ध करण्यासाठी कपटभावाने परतला. त्याने श्रीरामाची शपथ घालून जटायूला त्याचे मरण कशात हे विचारले आणि स्वतः खोटेच सांगितले की आपले मरण डाव्या पायाच्या अंगठ्यात आहे.'' आपल्या बंधूची पराक्रमाची ख्याती ऐकून संपातीच्या चित्ताला आनंद झाला. त्याची स्वतःची पंखे हळूहळू वसंतातल्या वृक्षांगाप्रमाणे वाढू लागली. हनुमंत पुढे म्हणाला, ''श्रीरामाची निर्वाणीची शपथ प्रमाण मानून जटायू म्हणाला की आपले मरण दोन्ही पंखात आहे. त्यावेळी रावणाने युद्ध सुरू केले. जटायूने रावणाचा डाव्या पायाचा अंगठा

https://archive.org/details/@sulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

नखासहित छेदला. रावणाने जटायूचे दोन्ही पंख तोडले. त्यामुळे जटायू दुःखी झाला. पंख उपटले जाऊन मरण येणार म्हणून जटायू श्रीरामाच्या दर्शनासाठी कंठात प्राण आणून रामनामस्मरण करू लागला. नंतर कृपावंत श्रीरामाने जटायूचे प्राण राखले. जटायूने श्रीराम भेटताच त्याचे पाय धरून म्हटले की, "तुझ्यापुढे प्राणत्याग केल्याने मी पूर्ण ब्रह्म होईन. आणखी पुढे जगून काय मोठे भाग्य; हे असे मरण कसे मिळेल." हे जटायूचे म्हणणे ऐकून श्रीराम प्रसन्न झाला. देहात विदेही, ब्रह्मपूर्ण असा जटायू झाला. अशा प्रकारे जटायू श्रीरामाकडून उद्धरला गेला. नंतर श्रीराम आणि लक्ष्मण सीतेचा शोध घेत किष्किंधेला आले. तेथे वालीचा वध करून सुग्रीवाला राज्य आणि वालीपुत्र अंगदाला युवराजपद दिले. नंतर अंगदाबरोबर योद्धे देऊन दक्षिणेकडे सीतेचा शोध घेण्यासाठी श्रीरामाने पाठविले, त्याचबरोबर एका महिन्यात परत येण्यास सांगितले. सर्व दक्षिण दिशा शोधूनही सीतेचा शोध लागला नाही. विवरातच बराच काळ जाऊन मर्यादा संपली. त्यामुळे सर्वांना धाक पडला की सुग्रीव क्रूरपणे शिक्षा करील. त्या भयाने सर्व वानर प्राणत्यागाला सिद्ध झाले. कारण सीतेचा शोध न लागल्याने आम्हाला मोठी लाज वाटली; रामाला तोंड दाखविण्यापेक्षा प्राणत्यागाचा निश्चय केला." असे हनुमंताने सांगितले.

संपातीने मारुतीचे निवेदन ऐकून त्याला लोटांगण घातले. नंतर तो म्हणाला, "तुम्ही प्राणत्याग करू नका; मी तुम्हाला सीतेविषयी सांगतो. तुम्ही रामभक्त, माझे भवपाश तोडणारे, मी तुमच्या चरणरजाचा दास; मी सांगतो तो शोध ऐका. शंभर योजने समुद्रात, लंकादुर्गामध्ये, अशोकवनात सीता आहे. तिची वाचा नित्य रामनाम घेत आहे. रामस्मरणामुळे माझी दृष्टी पलीकडे असलेली सीता पाहाते आहे. मला जर पंख असते तर रावणाला मारून मी लगेच सीतेला आणून रामाला सुखी केले असते." हे बोलत असताना संपाती निरभिमान झाला आणि सूर्याने दिलेल्या वरदानाप्रमाणे त्याला त्याचे पंख पुन्हा प्राप्त झाले. वानरगणांनी हे पाहिले की निरभिमान झालेल्या संपातीला पंख फुटले. आता निरभिमानपणाचे चिन्ह ऐका. लंकापतीला मारून मी सीतेला आणीन आणि त्यामुळे जगात माझी ख्याती होईल असा अहंकार संपातीला नव्हता. सीतेला सोडवून श्रीरामाला सुखी करावे आणि मी त्याचा आवडता सेवक व्हावे अशीही अहंभावना त्याला नव्हती. निरभिमानपणा असला की मी-तूपण राहात नाही. श्रीराम माझ्यापेक्षा वेगळा असेही मनात येत नाही. श्रीरामभक्तांच्या संगतीने संपातीला ही प्राप्ती झाली. श्रीरामाची कीर्ती ऐकून तो आत्मविश्रांती पावला. निरभिमानी हा त्रिभुवन ओलांडून जातो. भूगोल भेदून परिपूर्ण परब्रह्मपद पावतो. तसेच संपातीचे झाले. श्रीरामाची कीर्ती ऐकून पशुपक्षी उद्धरतात, यासाठीच श्रीरामाचे वनाभिगमन झाले आणि त्याने त्रिजगतांचा उद्धार केला.

अध्याय सतरावा

संपातीने सीतेच्या शोधाची निश्चित आणि यथार्थ वार्ता सांगितल्यावर वानरसमूहाने मोठ्या आवाजात जयजयकाराची गर्जना केली. सर्व वानरांचा आवाज सिंहनादाहून मोठा होता. सीता सापडली म्हणून त्यांनी भुभुःकार केला. एकमेकांना आलिंगन दिले, एकमेकांचे अभिवंदन केले, सीता चिद्रत्न सापडले त्यामुळे हर्षाने उड्डाण केले. आपल्या कष्टाची सिद्धी झाली, सीतेचा शोध लागला म्हणून वानरसमुदाय हर्षाने डुलू लागला. एकमेकांना वाकुल्या दाखवत, गुदगुल्या करत सीतेच्या शोधाविषयी आपली शंका फिटली अशा भावनेत ते रंगून गेले. नंतर अंगदाने आपल्या परिवारासह एकत्र बसून असा प्रश्न केला की, "हा शतयोजन सागर उल्लंघून जाण्यासाठी कोणा योद्ध्यात शक्ती आहे? ते सर्वांनी सांगावे."

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

वानरसैन्यातील योद्ध्यांचे स्व-पराक्रम कथन

अंगदाचा प्रश्न ऐकल्यावर त्याच्या अकरा सेनापतींनी समुद्रलंघून जाण्यासंबंधातली आपापली शक्ती सांगायला आरंभ केला. गज म्हणाला, "मी दहा योजने उड्डाण निश्चयपूर्वक करू शकतो." त्यावर गवाक्षाने म्हटले, "माझे प्रमाण याच्या दुप्पट आहे." शरभाने नेमकी तीस योजनांची मर्यादा उड्डाणाची सांगितली. तेव्हा पराक्रमी वृषभाने चाळीस योजनांची गती बोलून दाखविली. याप्रमाणे गंधमादनाने पन्नास, मैदाने साठ, द्विविदाने सत्तर अशी आपापली उड्डाणाची शक्ती असल्याचे म्हटले. वानरांमधला महावीर सुषेण याची बरोबरी करूच नये. सुषेण हा तारेचा पिता जो पश्चिम दिशेला पाठविला होता त्याचे उड्डाण ऐंशी योजने असल्याचे इतर वीरांनी सांगितले. जांबुवंत हा वृद्धत्वामुळे बळाची क्षीणता आल्याने, श्रीरघुनाथाला आपण सुखी करू शकत नाही, म्हणून लज्जित झाल्याने, आपला पुरुषार्थ सांगताना संकोचला. तो म्हणाला, "मी जर तरुणपणात असतो तर सीता आणून श्रीरामाला सुखी केले असते. पण वार्धक्यामुळे माझी शक्ती गेली आहे. माझा तरुणपणातला पराक्रम सांगतो; पण माझा उपहास न करता मूळ कथा नीट ऐका. बळीच्या यज्ञात जाऊन नारायणाने वामनरूपाने बळीला फसविले आणि स्वतः त्रिविक्रम झाला. त्यावेळी मी आणि सुषेण दोघेही पूर्ण तारुण्यात होतो. आम्ही त्रिविक्रम प्रदक्षिणा करायला निघालो. त्रिवार प्रदक्षिणा करताना सुषेणाची शक्ती क्षीण होऊन त्याचे अवसान संपले. तो मूर्च्छित झाला. त्याकाळी माझी शक्ती एवढी होती की मी त्रिविक्रमचरणांचे लक्ष्य ठेवून, पृथ्वी, पर्वत, वने, अरण्ये यांची एकवीस वेळा प्रदक्षिणा केली. एका निश्वासात एकवीस वेळा पृथ्वी प्रदक्षिणा करून, महेशाला वंदन करण्यासाठी मी कैलासाला गेलो."

"ज्यावेळी मी कैलासाला पोचून महेशाला वंदन केले त्याचवेळी बलपुत्र स्वर्गात आला. त्याला इंद्रादिकांचा वध करायचा होता. तो म्हणाला, "वल दैत्य माझा पिता, इंद्राने त्याचा एकाएकी वध केला. त्या इंद्राचा आता मी सूड घेतो, त्याला ठार करतो." असे म्हणत त्या दैत्यपुत्राने रागाने इंद्राला मारायला जाताना एक पर्वतच उचलून हातात घेतला. वलिपुत्राने उगारलेला तो पर्वतराज पाहून स्वर्गातले सुरवर कापू लागले. तेवढ्यात मी उडी घेऊन तो पर्वत मधेच झेलला. परंतु तो माझ्या हातातून निसटला. मी त्वरेने तो गुडघ्यांवर पेलून अमरपुरी वाचविली. त्यावेळी रागाने चालून आलेल्या वलपुत्राशी मी दृढतेने युद्ध केले. माझ्या सामर्थ्याने कासावीस होऊन बलपुत्र पळू लागला. पर्वताच्या आघाताने पाय तुटल्यावर, मी त्वरेने उड्डाण करून बलपुत्राचा वध केला. सुरगण सुखावले. तेव्हापासून लंगडा, माझी वृद्धपणाने शक्तीही क्षीण झाली. तरी मी नव्वद योजने सागरावरून उड्डाण करीन." नळ म्हणाला. "मी समुद्रात फारतर सत्याण्णव योजने उड्डाण करीन; त्यापेक्षा मला अधिक त्राण नाही. नीळाने एका उड्डाणात शंभर योजने समुद्रावरून जाण्याचा स्वतःचा पराक्रम बोलून दाखविला. महावीर अंगदाने समुद्र उल्लंघनाविषयी म्हटले, "शंभर योजने एका उड्डाणात मी सहज पार करीन; परंतु पुन्हा परत येण्याविषयी तेवढेच अंतर मला झेपेल काय, याविषयी मी साशंक आहे. एकाच उड्डाणात मी समुद्राच्या परतीरावर जाईन. तिथे राक्षसांचा समूह आला तर त्यांच्याशी नेटाने युद्ध होईल की नाही ते सांगता येत नाही. माझे बालपण, किती पराक्रम अंगी आहे त्याची कल्पना नाही. तरीही रामनामाचे स्मरण करून सीतेला क्षणमात्रात सोडवीन. रामनामाचे स्मरण केल्यावर राक्षस बापडे कोण आणि काय तो वलवान रावण, निमिषार्धात सीता आणीन." अंगदाचे भाषण ऐकून वानरांनी जयजयकार केला. योद्ध्यांनी त्याला वंदन केले आणि "तू महापराक्रमी राजकुमार आहेस; आम्ही सर्व सेवक असताना तुला बाल राजकुमाराला समुद्र

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

ओलांडण्याचे मोठे संकट कसे सोपवू." असे म्हटले.

हनुमंताची स्तुती, त्याचे निवेदन

अंगदाने पुढे म्हटले, "हे करताना सर्वांना प्राण द्यावा लागेल. तसेच सीतेचा शोध न घेता गेल्यावर घोर अपमान होईल." तेव्हा जांबुवंत म्हणाला, "हनुमंत हा विख्यात वीर आहे. तो का निमूट पाहातो आहे. तो अत्यंत प्रतापी आहे. बालपणी सूर्याला आकळताना त्याने राहूचा अभिमान निर्दाळला. याचा पिता वायू आणि हनुमंत बलवाहन आहे. त्याला ब्रह्मचर्य-कौपिन गर्भातच प्राप्त झाले. त्याची माताही त्याला नग्नावस्थेत पाहू शकली नाही. श्रीराम हाच केवळ पाहणारा. असा हा कपिराज पूर्ण ब्रह्मचारी आहे." जाववंताने असे म्हटल्यावर हनुमंताला आनंद झाला. आपले रोमांकित शेपूट त्याने आपटले आणि तो उत्साहपूर्ण होऊन उठला, आणि म्हणाला, "शंभर योजने सागर उल्लंघून जाणे म्हणजे मला पाउल पुढे टाकल्यासारखे आहे. तुम्हाला शंकाच नको. मी सीतेला निमिषार्धात आणीन. रावणाला धडा शिकवून, राक्षसांना माझा पराक्रम दाखवून, प्रतापाने सीता आणून श्रीरघुपतीला सुखी करीन. आणखी एक विचार तुम्हाला योग्य म्हणून सांगतो, की ज्यामुळे रघुवीर सुखी होईल, असाच प्रकार मी करीन. आज्ञा नसताना सीतेला आणले तर श्रीरघुनाथाला राग येईल. तेव्हा लंकानाथाला त्रस्त करून, सीतेचा शोध तेवढा मी घेऊन येईन."

हनुमंत म्हणाला, "राक्षसांचे शत्रू श्रीराम आणि लक्ष्मण हे दोघेही शूर वीर आहेत. त्यांना मी सीतेकडे नेईन म्हणजे ते रावणाचा कुळासकट नाश करतील. त्यासाठी ऋष्यमूक पर्वताहून त्यांना घेऊन मी लंकेवर उड्डाण करीन. ते सकुल रावणाचा वध करतील. अथवा मीच पराक्रमाने तेथे राक्षसांचा नाश करून, हर्षाने टाळ्या वाजवत सीतेला रामाजवळ आणीन. सीता रामापाशी किंवा राम सीतेपाशी नेईन; किंवा नुसता शोध करून तुम्हाला सांगायला तुमच्याकडे येईन. हे कार्य मी करीन. लंकेच्या दारात रण करून, राक्षसांच्या शिरांची चेंडूफळी खेळेन, लंकेची होळी करीन तरच मी बलवान हनुमंत. सीतेचा शोध म्हणजे तो काय आणि त्यासाठी एवढी धडपड कशाला? सर्व वानर तुम्ही सुखात राहा; मी लंकेकडे जातो." एवढे बोलून हनुमंताने सर्वांपुढे लोटांगण घातले. तेव्हा अंगदाने हनुमंताला आलिंगन दिले. वानरांनी आकाश दुमदुमणारी गर्जना केली.

हनुमंताच्या उड्डाणाचे परिणाम

हनुमंताने वानर समूहाला आपल्या उड्डाणाविषयी माहिती दिली. त्याने सांगितले की, "माझ्या उड्डाणामुळे निर्माण होणारा अंगवात तुम्हाला सहन करवणार नाही. माझ्या उड्डाणाच्या नेटाने महेंद्र पृथ्वीमध्ये दबून जातील; पर्वतशिखरे पीठ होतील; कडे-कपाटे बुजतील. त्या वायूने पर्वत तुटून भुईवर पडतील; शिखरे गवतासारखी उडून जातील; वृक्ष उन्मळून पडतील आणि अंतराळात भिरभिरत राहतील; वाळलेल्या पानांची वावटळ यावी तशी वेळूची वने देखील उपटून पडतील समुद्राचे पाणी एवढे उसळेल की त्याने ध्रुवमंडळ भिजेल. दिग्गज चळचळ कापतील आणि जळचर तळमळतील. माझ्या अंगवाताने जो घरघर असा आवाज होईल त्यामुळे मेघांची दातखीळ बसेल आणि सागर गर्जनेने कळिकाळाला शहारे येतील. त्या नादाचा धाक एवढा असेल की भयभीत होऊन उमा नीलकंठाला विलगेल आणि रमा विष्णूला थापटून म्हणेल की हे आलेले भयसंकट त्वरित निवारण करा. माझ्या उड्डाणाचा काळ अत्यंत दुर्धर असेल. त्याने सुर, नर, निशाचर हे सुद्धा घाबरतील; तिथे तुम्ही वानर कसा धीर धराल? यासाठी तुम्ही वानरगण एकमेकांचे हात धरून, सर्व शक्तीने पर्वताला धरून ठेवा; तरच तुमचे प्राण वाचतील. त्यातही पुन्हा हे लक्षात घ्या की

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

दक्षिणेकडचे पर्वतकडे धडाधडा कोसळून, तुटून पडतील; म्हणून तुम्ही उत्तरेकडे वाकून, घट्ट राहा. ज्याप्रमाणे श्रीरामाचा बाण सरसरत जातो, त्याप्रमाणे उड्डाण करून मी लंकेत घुसून रणकंदन करीन आणि तीच माझी बोहणी असेल. इंद्रजिताशी झगडून, रावणाचे बळ अजमावून आणि राक्षससमूह त्रस्त करून, सर्वांना छळीन. लंकेतील राक्षसांचे दात पाडून त्यांची रास करीन. मग त्यांची गणती करून रावणापुढे रचून त्याचा छळ करीन. संपूर्ण लंकेतील घरांची झडती घेईन आणि सीतेचा शोध घेईन. तरीही ती आढळली नाही तर लंकाच उपटून रामाकडे आणीन." हनुमंताचे उत्साहवर्धक बोलणे ऐकून वानरगण आनंदित झाले आणि ज्याप्रमाणे मरुद्‌गण इंद्राला वंदन करतात तसे त्यांनी मारुतीला वंदन केले. श्रीरामस्मरणाची लीला ह्याच पुष्पमाला वानरांनी गळ्यात घातल्या. त्याने त्यांची शोभा वाढली. इंद्राप्रमाणे ज्याची थोरवी आणि जो वानरसमुदायाने वेढलेला होता तो हनुमंत लंकापुरीवर लक्ष केंद्रित करून महेंद्रपर्वतावर चढला.

हनुमंताने मग श्रीरामाचे स्मरण केले, वानरांना आलिंगन दिले आणि उल्हासाने तो उड्डाण करायला सिद्ध झाला. मुखात रामनाम असलेली मुद्रिका आणि हृदयात श्रीरामचंद्र धरून तो कपिश्रेष्ठ आनंदाने समुद्र उल्लंघून जाण्यासाठी उत्सुक झाला. त्याने आपल्या बाहूंचे सामर्थ्य अजमावले तेव्हा त्याच्या सर्वांगात स्फुरण आले. त्याने शेपूट आपटताच त्याच्या अंगावर रोमांच थरथरले. त्याने शेपूट आपटताच त्याच्या बळाने शिळाशिखरे चूर झाली. वृक्ष फल-पुष्पांसह धुळीला मिळाले. आकाशात पक्षीगण कळवळले; दिग्गजांना महाप्रलय जाणवला; तरसादी बिळात राहणारे आणि सिंह; डुकरे इत्यादी अत्यंत त्रासले. त्या महाबली हनुमंताने उड्डाण करण्यासाठी पर्वत पायाखाली दाबला, त्यामुळे तो पर्वत भूमीत घुसला आणि परिणामी सर्प पाताळात दडपले गेले. अर्धवट दडपला गेलेला अर्धा सर्प तोंड बाहेर काढून रागाने विष ओकला. त्या विषाने शिळा पूर्णपणे भस्म झाल्या. अर्धी शरीरे दडपली गेली असे सर्प फणा काढून फूत्कार टाकत गर्जू लागले. तेव्हा छत्रे उभारल्याप्रमाणे दिसले. सर्पांनी गरळ टाकताच अग्नीचे कल्लोळ उठले आणि विष सरल्यावर ते विकल होऊन तळमळले. पर्वतावर असलेल्या दिव्यौषधी अमृत स्रवत होत्या, त्यामुळे विषाचा प्रभाव संपला. भाराने दडपडलेला पर्वत पांढरे, पिवळे, लाल असे धातू स्रवू लागले. त्यांच्या धारांनी पर्वत शोभले. वामन जसा वाढून त्रिविक्रम झाला, तसा हनुमंत वाढला. त्याने स्वामिकार्यासाठी पराक्रम करावा म्हणून आक्रम धरला. पर्वणीला (पौर्णिमा/अमावास्या) जसा समुद्र वाढतो, त्याप्रमाणे तो कपींद्र वाढला. त्यामुळे काळाग्निरुद्र दचकला, कारण हनुमंत भेसूर भासत होता.

हनुमंताचे प्रत्यक्ष उड्डाण

हनुमंत कसे उड्डाण करतो आणि समुद्र ओलांडून जातो ते कौतुक पाहण्यासाठी ब्रह्मादिक, सुरवर, सिद्ध, गुह्यक, गंधर्व हे आकाशात जमले. नाना प्रकारच्या विमानांची आकाशात दाटी झाली. मारुती कसे उड्डाण करतो ते पाहण्यासाठी आणि आनंद अनुभवण्यासाठी सर्वजण उत्सुक होते. उमा, रमा, सावित्री इत्यादी नऊ नारी तो वानरवीर कसा झेप घेतो ते पाहायला आल्या. हनुमंताने मुठी वळून हात पुढे धरले; शेपटीचा वळवून आकडा केला; त्याच्या बळाने पर्वत तटाला भेगा पडल्या; कडे सागरात खचले, शिखरे आकाशात उडाली, मुळासकट वाऱ्याने उन्मळलेले वृक्ष आकाशात भिरभिरत राहिले. जसे आप्ताला निरोप देऊन सुहृद माघारी परततात, तसे पाषाण, वृक्ष हे सर्व सागरात मागे पडले. हनुमंताने एक विकट आरोळी ठोकली. त्यामुळे त्रिलोक दुमदुमले; कळिकाळाने धाक घेतला. सुर साशंक मनाने विमानातून पाहात राहिले.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

वायूची शक्ती लक्षात घेऊन, मनाची गती मागे टाकून, लंकेवर लक्ष केंद्रित करून, मारुती शीघ्र गतीने निघाला.

वानरवीर मारुती वेगाने उडताच रागाने समुद्र खवळला. त्यामुळे त्यातील जलचर भ्रमले आणि एकमेकांशी झोंबू लागले. मारुतीच्या अंगवाताने रवि-चंद्रांची गती खुंटली. ग्रहनक्षत्रे डळमळली. त्यांची आत्मगती कुंठित झाली. हनुमंताच्या अंगदीप्तीने आकाशातले चंद्र-सूर्य लोपले. नक्षत्रे भाजून लाह्या झाल्या. मारुती तेजात देदीप्यमान होता. तो जणू बालसूर्याचा ओतीव होता, किंवा शेंदुराचा रचलेला होता, का कुंकुमाचा घडला होता असा भासत होता. त्याच्या अंगच्या प्रभेने नभाचे नभत्व लोपले. दिव्य तेजाचा गाभा असावा तसा तो शोभला. रामबाणच नभातून चालला असावा, तसा हनुमंत जात राहिला. स्वामीचे कार्य साधण्यासाठी मारुती त्वरेने निघाला होता. जसे तापलेले सोने दिसते तसा दिसणारा तो हनुमंत वानरवीर निघाला होता. त्यावेळी त्याला विश्रांती देण्यासाठी सागराने मैनाद्रीला वर यायला सांगितले. "मी सूर्यवंशाचा नित्य अंकित असून हनुमंत रामकार्य साधण्यासाठी त्वरेने निघाला आहे. मला सूर्यवंशाविषयी पूज्यभाव आहे. रामाला साहाय्य करावे म्हणून हा हनुमंत जातो आहे; तेव्हा हनुमंताला साहाय्य करून, दमलेल्या त्याला विश्रांतीसाठी साहाय्य केले पाहिजे. यासाठी मैनाद्री तू त्वरित जलाबाहेर येऊन, समोर राहून कपींद्राला विश्रांती घेऊ दे. हनुमंत अत्यंत वेगाने जातो आहे. तुला उशीर झाला. तर तो दूरवर जाईल. यासाठी मला प्राधान्याने हवे म्हणून तू त्याला विश्रांती दे. त्याला विश्रांती दिली तर ती सेवा श्रीरामचंद्राला पोचेल. शिवाय या विश्रांतीमुळे पुढे लंकेत तो क्षणामध्ये जाऊन पोचेल. मैनाद्री पर्वतनाथा. विश्रांती हनुमंताला दिली तर सुख-संतोष श्रीरघुनाथाला होईल. यासाठी हनुमंताला विश्रांती दिली पाहिजे. हे एवढे कार्य तू अवश्य कर."

सागराने मैनाद्रीला केलेल्या विनंती नंतर तो पर्वतश्रेष्ठ उल्हासाने वाढला. त्यावर रसाळ मधुर फळे आणि निर्मळ पाणी होते. ही एकप्रकारे मारुतीची पूजाच होती. मैनाद्रीवर अत्यंत चांगले विश्रांतीस्थळ होते. मंद सुगंध असलेला मलयानील; पंचम स्वरातले कोकिळ-कूजन, झणत्कार करणारा भुंग्यांचा ध्वनी तेथे होता. मागचे सर्व श्रम विसरले जाऊन हनुमंत पुढे परम विश्रांती पावेल असा आराम साधला जावा म्हणून आरामाच्या निमित्ताने तो पर्वत उल्हासाने वाढला. पर्वत वाढला असे पाहून स्वतः हनुमंतही उंच चढत गेला. मैनाक पर्वत हनुमंताचा मार्ग रोखत आणखी वाढला तेव्हा हनुमंतही त्याच्यापेक्षा उंच वाढला. अशा रीतीने जसजसा पर्वत वरती जाई तसतसा मारुती उंच उंच आकाशात चढे. त्याला श्रम बाधत नव्हते. या चढाओढीकडे उदासीनपणे पाहून मारुती विश्रांती म्हणून समजत होता. तो शंभर योजने आकाशात चढला; त्याच्या दुप्पट पर्वत वाढला. नंतर हनुमंत पाच शतके वाढला पर्वत सात शते तर हनुमंत हजार शते उंच वाढला. अशी दोघांची उंची वाढण्याची चढाओढ चालू राहिली. अखेर मैनाक पर्वताने मारुती पुढे हात टेकले.

मैनाकगिरी आणि हनुमंत यांचा संवाद

हनुमंत मैनाकाला ओलांडून जाऊ लागल्यावर मैनाक निराशेने म्हणाला, "तू कृपाळू रामदूत आहेस. तू माझी उपेक्षा करून का जातोस. तुझे पाय लागले तर मी पावन होईन. यासाठी मी सतत उंच वाढत होतो. त्यामागे तुला अभिमान दाखविणे नव्हते. मला सागराने सांगितले की हनुमंताचा अतिथी म्हणून सन्मान करून त्याची पूजा कर. यासाठी मी तुझ्याकडे आलो. रामभक्त म्हणून तुला विश्रांती द्यायची होती. सगराने स्थापन केला म्हणून सागर हे नाव पडले. तू त्या सूर्यवंशाचा दास आणि आम्ही सर्व तुझे दास आहोत. तुझ्या वडिलांनी स्थापन केलेला मी समुद्रात राहतो आहे.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Research Academy

त्याविषयीचा वृत्तान्त मी तुला सांगतो आहे. तू मला उपेक्षू नकोस. पूर्वी पर्वत हे पक्षधर म्हणजे पंख असलेले होते. त्यावेळी खूप उंचावर अशी ते झेप घेत असत. आणि पुरे, नगरे चूर करत असत. त्यामुळे अनेक नगरे भंगली. त्यामुळे इंद्राने वज्राने पर्वतांचे पंख छाटायला आरंभ केला. मी त्यावेळी पळालो. त्या परिस्थितीत तुझा पिता वायू माझ्या साहाय्यार्थ आला. त्याने मला समुद्राकडे आणले आणि माझे प्राण वाचले. तुझ्या पित्याने स्थापना केल्याप्रमाणे समुद्रामध्ये मी गुप्तपणे राहिलो. आता तू हनुमंत येत असल्याचे पाहून, तुला विश्रांती देण्यासाठी वाढून वर आलो."

मैनाक पर्वताचा हा वृत्तान्त ऐकल्यावर कृपाळूपणे हनुमंताने आपल्या कार्याविषयी सांगताना म्हटले, "श्रीरामाची कांता शोधण्यासाठी मी त्वरेने जातो आहे. आधी मनाला विश्रामता असावी, मग विश्रांती द्यावी. श्रीरामाच्या नामस्मरणामुळे मला श्रमावस्थाच नाही. ज्याचा नामस्मरणावर विश्वास नाही, त्याला श्रम, त्रास, शोक यांची बाधा होते. मी श्रीरामाचा दास असल्याने मला लेशभरही श्रम नाही." हे हनुमंताचे सांगणे ऐकून मैनाकाला रडू आले. तो म्हणाला, "मी पूर्णपणे दुर्भागी आहे. हनुमंताचे चरणही मला अप्राप्य आहेत." हा मैनाक पर्वताचा खेद ऐकून हनुमंत म्हणाला, "मी तुझ्याकडून फळ, मूळ, पाणी घेणार नाही. बोटाने तुला स्पर्शही करणार नाही." त्यावर पर्वत म्हणाला, "हनुमंता, तू केवळ माझ्या मस्तकावर कृपेने हात ठेव. तेवढ्यानेही मी सनाथ होईन. आणखी मी काही मागत नाही." हे त्या दोघांचे, विशेषतः मैनाक पर्वताचे भाषण ऐकून इंद्र म्हणाला, "मैनाका, तू हनुमंताला साहाय्यकारी झाल्यामुळे आता मी तुला मारणार नाही. तू आता सुखाने समुद्रातून बाहेर येऊन कुठेही जा." नंतर हनुमंताने मैनाकाच्या डोईवर अंगुली ठेवली. त्या भाराने मैनाक समुद्राच्या तळाशी जाऊन बसला. त्यामुळे पाताळात सर्वत्र हाहाःकार झाला. सर्प म्हणाले, "पर्वतावर खूप मोठा भार पडला आहे. त्यामुळे सप्तपाताळे चूर्ण होतील. नवनागांमध्ये हाहाःकार उडाला आहे. एक अंगुली ठेवली तर पर्वत सागरात बुडाला; मग जर हनुमंत पर्वतावर बसला असता तर तो पर्वत चक्काचूर होऊन त्याची नावनिशाणी उरली नसती." अशी ख्याती करून हनुमंत पुढे चालला. समुद्र उल्लंघून जाण्यासाठी तो शीघ्र गतीने पुढे निघाला. त्यावेळी ब्रह्मादिकांना आश्चर्य वाटले. सुर, सिद्ध यांनी मारुतीचा जयजयकार केला. देव, दानव हे सर्व हनुमंताचा मार्ग अडवून त्याला विघ्न करायचे ठरवून त्या व्यवस्थेला लागले.

दनु सुरसा-हनुमंत-संघर्ष-शक्ति परीक्षा

वायुनंदन हनुमंत सागरावरून शीघ्र गमन करत असलेला पाहून देवांनी त्याचे गमन खंडित करण्यासाठी राक्षसरूपाने विघ्न करायचे ठरवले. हनुमंताचे सामर्थ्य किती आहे ते पहावे. याची देवांना आवड असल्याने, त्यांनी दानवांची दनु ही जी माता तिला विघ्न करण्यासाठी धाडली. हनुमंत आपल्या शक्तीने जाऊ तरी शकेल किंवा काकुळतीला येईल; काय करतो ते पाहायचे असे देवांनी ठरवले होते. दनु सुरसा ही दानवांची माता कपटामध्ये प्रवीण आणि मनोज असल्याने देवांच्या सांगण्याप्रमाणे मारुतीला विघ्न करण्यासाठी आली. समुद्राच्या पाण्याचा आश्रय घेऊन तिने विकराळ रूप धारण केले. नंतर आपले भयंकर तोंड पसरून वानरवीराला गिळण्यासाठी ती पाण्याबाहेर आली. ती मारुतीला म्हणाली, "या मार्गाने जे कोणी जातात, ते माझे निश्चित भक्ष्य होतात. तेव्हा तुला मी गिळीन, यासाठी माझ्या मुखात प्रवेश कर." यावर हनुमंताने तिला म्हटले, "हे माये, मी सीतेच्या शोधासाठी त्वरेने जातो आहे. तू श्रीरामाच्या कार्याला साहाय्य कर. मी तुझ्या पाया पडतो. मला विघ्न करू नकोस." सुरसेने सांगितले की, "भोजन भुकेलेल्याने सोडावे हा सज्ञान

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

असलेल्याचा मूर्खपणाच ठरेल. कसला राम आणि कुठली सीता. तुला मी खाणारच. तू आपले मरण चुकवण्याठी ब्रह्मज्ञान सांगतोस; पण अरे भुकेने मेल्यावर पुण्य भोगणार कोण सांग बरे.'' यानंतर राक्षसीने मुख पसरले तेव्हा हनुमंत एक योजन मोठा झाला. यापुढे हनुमंताचे उंची वाढवणे आणि राक्षसीचे मुख पसरणे यामध्ये चढाओढ निर्माण झाली. हे मोठे होणे वाढत जाऊन हनुमंत पन्नास योजने मोठा झाला, त्यावेळी राक्षसीने शंभर योजने तोंड मोठे केले. त्या संधीला हनुमंत अंगठ्याएवढा लहान होऊन त्वरेने तिच्या मुखात शिरला. हे देवांनी पाहिले. देव म्हणाले, ''हनुमंताला सुरसेने तत्त्वतः गिळलेच आहे. यामुळे सीतेच्या शोधाचे कार्य तसेच राहिले. हा आमचा मोठाच मूर्खपणा झाला. हनुमंत चांगला गतीने जात होता; त्यात आम्ही हे विघ्न करविले. आता श्रीरघुनंदन आमच्यावर कोपेल.'' असा विचार करत देव खूप धास्तावले.

हनुमंत राक्षसीच्या तोंडात प्रवेश करून गेला. तर तेथे त्याला कश्यपांची पत्नी, दानवांची माता, देवांची सापत्न माता, दिसली. त्याने विचार केला, ''वायू जो माझा पिता त्याची तर ही सावत्र माता, तेव्हा हिचा घात करू नये, असे मला वाटते. रामकार्यासाठी त्वरित येथून बाहेर निघावे.'' नंतर त्या वानरवीराला एक युक्ती सुचली. कानाच्या भोकातून बाहेर पडणे शक्य आहे हे त्याच्या लक्षात आले. इकडे सुरसा जिभल्या चाटत होती; पण मारुती काही तिच्या दाता-तोंडात सापडत नव्हता. तोंडातल्या तोंडात हा कुठे हरवला की दातामधे अडकला, यासाठी राक्षसीने तोंडात धुंडाळायला आरंभ केला. तेवढ्यात हनुमंत कानातून बाहेर आला. त्याने प्रचंड भुभु:कार केला. ते पाहून देवांनी टाळ्या वाजवल्या. सुरवरांनी विचार केला की, ''हनुमंत हा विवेकी म्हणून विख्यात आहे. त्याने सुरसेचा घात न करता कानातून बाहेर येण्याचा मार्ग स्वीकारला. तो रामनामामुळे विघ्नाच्या पलीकडे आहे. हे रामभक्त विघ्नातीत असतात आणि त्यातून हनुमंत हा मुख्य रामभक्त आहे. श्रीरामनाम स्मरण करणारे त्रिलोकात यशवंत होतात.'' असा विचार करत देवांनी पुष्पवृष्टी करत जयजयकार केला. हनुमंताचे कौशल्य तिन्ही लोकात अपूर्व ठरले.

श्रीरामनाम असलेली मुद्रा-अंगठी-मुखात आणि अंतरात श्रीरामाचे स्मरण असताना हनुमंताला कुठले विघ्न बाधा आणणार, तो क्षणात समुद्र पार करील. ''माझा घात न करणारा हा हनुमंत आपल्या बळावर मुक्त झाला'' असे पाहून सुरसा संतोषली. तिने हनुमंताला आशीर्वाद दिला. राक्षसी क्रूरता सोडून सुरसा शांतीरूप झाली; ''हनुमंता तू अर्थसिद्धी पावशील. श्रीराम आणि सीता यांचा संयोग घडवशील. श्रीरामनामावर तुझी पकड असल्याने तू बलवान म्हणून सृष्टीत विख्यात होशील. तुझ्यामुळे राम आणि सीता यांची भेट होऊन, सृष्टीत रामराज्य निर्माण होईल. सीतेचा शोध योग्य वेळी सिद्धीस जाऊन त्याचा तूच खरोखर कर्ता असशील. हे सद्‌बुद्धी कपींद्रा तू निमिषात सागर ओलांडशील.'' असे सांगून सुरसेने मारुतीच्या चरणांना वंदन केले. मारुती लगेच समुद्र उल्लंघण्यास निघाला. देवांनी विघ्न करण्यासाठी पाठविलेली सुरसा मारुतीने मारली नाही. हेच त्याचे अजिंक्यपण होते. पुढे त्या बलवाहनाने सागरात आणखी पराक्रम केला.

श्रीरामचरित्र हे सर्व ग्रंथांचे माहेर आहे. ते सांगणारे मुख आणि ऐकणाराचे कान पवित्र होतात. ज्याने स्वामिसेवेसाठी प्राण विकला, जो ब्रह्मज्ञानाचे भूषण आहे, ज्याचे जीवन नवविधा भक्तीने परिपूर्ण आहे, जो शिवालाही वंद्य आहे, अशा हनुमंताचे स्मरण केले म्हणजे विघ्न हे निर्विघ्न होते, त्याच्या स्मरणाने ब्रह्मज्ञान सुलभ होते अशी त्याची कथा पवित्र आहे.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Research Academy, Gangotri

अध्याय अठरावा

सुरसेकडून देवांनी विघ्न करण्याचा प्रयत्न केल्यावर हनुमंताने तिला जिंकून पुढे समुद्रावरचे उल्लंघन चालू केले. त्यावेळी सिंहिका नामक राक्षसी त्याला गिळावे म्हणून आली.

सिंहिका-हनुमंत संग्राम

हनुमंत समुद्रावरून आकाशमार्गे जात असताना त्याची समुद्रात सावली पडली. त्यामुळे सिंहिकेच्या मनात त्याचा घास गिळण्याची इच्छा वाढली. शिवाकडून वर मिळालेली सिंहिका सावली पकडून प्राण्याला ग्रासत असे. यावरून तिला छायाग्रही असे नाव पडले होते. ती हनुमंताची सावली धरून त्याला ग्रासण्यासाठी आली. तिने हनुमंताची छाया गिळली. त्यामुळे हनुमंताची गतीच खुंटली. त्याच्या शरीराची मुरकुंडी वळली. त्यामुळे तो कासावीस झाला आणि गोंधळून इकडे-तिकडे पाहू लागला. या नंतर त्याने रघुनाथाचे स्मरण केले. त्याने खाली-वर पाहिले. तेव्हा त्याला पाण्यातली अद्‌भुत राक्षसी दिसली. छायाग्रही या नावाची ती हीच राक्षसी, म्हणजे वैरी राहूची माता, हे त्याला समजले. तिचा घात करण्याचे त्याने ठरविले. हे निर्विघ्नपणे करीन अशा विश्वासाने त्याने उद्योग सुरू केला.

सिंहिका तोंड वासून हनुमंताजवळ येताच त्याने आपला आकार अधिकाधिक वाढवायला आरंभ केला. तिनेही आपले तोंड मोठे करायला सुरुवात केली. यावेळी तिच्या जबड्याची एक बाजू पाताळात तर दुसरी बाजू आकाशात होती. हनुमान महाबळी गिळावा म्हणून तिने एक प्रदीर्घ किंकाळी फोडली. हनुमंताने ताबडतोब तिच्या मुखात उडी घेतली. ती त्याला दाताखाली रगडू लागली तेव्हा त्याने तिच्या गळ्याच्या घाटीत प्रवेश केला. मग तो तिच्या पोटात शिरला आणि त्याने तिचे काळीजच चिरले. अखेर तिच्या आतड्याची माळ घेऊन तो बाहेर आला. सिंहिकेला जाणवले की, "मी याला दाताखाली अडकवू शकले नाही; त्याला चावून चाखले नाही. याने मला मेद, मांस खाऊ न देता, माझाच प्राण घेतला. मला वाटले होते हा वानर म्हणजे सामान्य पशू आहे; परंतु हा वानर अत्यंतच कर्कश ठरला. याने मला त्याचा घास न भरू देता, उलट माझाच प्राणनाश केला. मी याची छाया धरायला गेले तर छायेच्या मायेने माझीच काया याने नष्ट केली. यामुळे मी उद्धरले. हे कपिराजा तुझ्या चरणधुळीने माझा उद्धार झाला. श्रीरामभक्तांची पायधूळ जन्ममरण निःशेष नासते; ध्यान करणाराला पूर्ण ब्रह्मत्व देते; हे रामभक्त साधू, सज्जन आणि कृपाळू असतात. श्रीरामाची भक्ती करावी, कीर्ती सांगावी. रामनामाची आवर्तने केली तर तिन्ही लोकातले जड-मूढ उद्धरतात." अशी आरोळी देऊन सिंहिका समुद्राच्या पाण्यात पडली. तेव्हा महापराक्रमी हनुमंताच्या यशाने आनंदित झालेल्या देवांनी टाळ्या पिटल्या. राहूपासून चंद्राची सोडवणूक व्हावी तसा सिंहिकेपासून सुटका झालेला हनुमंत शोभला. त्याला पाहून इंद्र, ब्रह्मा, शंकर स्तुती करू लागले.

मारुतीची चतुराई, पराक्रम यांचे वर्णन

हनुमंताने दुष्ट, नष्ट कामाचारी, भयानक आणि अत्यंत क्रूर अशी छायाग्रही नखाग्रांनी ठार केली. "समुद्रावरून उड्डाण करताना चार पराक्रम करून तू तुझा पराक्रम आणि तुझे सामर्थ्य दाखविलेस. हे तुझ्या श्रीरामभक्तीच्या नेटाने झाले. रामनामामधे दृढ भक्ती, रामस्मरणात दृढ बुद्धी, रामभक्तीबाबत दक्षता, श्रीरामशक्तीने बलिष्ट अशा तू बळाने समुद्र उल्लंघून जाताना ख्याती केलीस. त्या तुझ्या पराक्रमाची कीर्ती आम्ही स्वर्गातले देव मानतो," असे सर्व देव म्हणाले, आणि ते हनुमंताच्या पराक्रमाचे वर्णन करू लागले. "पहिल्या पराक्रमी उड्डाणी महाबळी मारुतीने महेंद्र भूतलात दडपला, त्याखाली सर्प दडपले गेले, पाताळातले नाग गडबडले. दुसऱ्या पराक्रमात मैनाक पर्वताने

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized By Sarayu Foundation Trust and eGangotri

देऊ केलेली विश्रांती त्याने घेतली नाही. उलट त्या पर्वताला अंगुलीच्या स्पर्शाने एवढा भार दिला की तो पर्वत पार समुद्राच्या तळाला गेला. त्यामुळे अतळ, वितळ, सुतळ, रसातळ, तळातळ इत्यादी सप्त पाताळे दडपली गेली. नंतर समुद्र उल्लंघून जाताना हनुमंताने सुरसेला आपल्या शक्तीने जिंकून तिसरा पराक्रम दाखविला. सुरसा ही कपटमूर्ती दनुदानवमाता सर्वांना छळत असे; पण तिचे कपटी छळण मारुतीपुढे चालले नाही. ऋषी, दानव, मानव, देव यांना छळणाऱ्या सुरसेला शरीरप्रवेश करून पराभूत केले. यावेळी तिला जिवानिशी न मारता तिच्या कपटाचा त्याने समाचार घेतला. अखेर ती शरण येऊन, वंदन करून, हनुमंताला यश मिळावे अशी तिने सदिच्छा व्यक्त केली. हनुमंताच्या या पराक्रमाचे सर्वांनी त्रिजगनात वर्णन केले. त्याचा चवथा पराक्रम म्हणजे सिंहिकेला पैजेने निर्दाळण करणे. ही सिंहिका एक दुर्धर राक्षसी होती. छायाग्राही, दुष्ट अशी ती सर्व प्राण्यांचा घात करत असे. हनुमंताने तिचे पोट फाडून तिला मारली आणि सर्वांना सुखी केले."

हनुमंत-क्रौंचा यांचा संघर्ष

सिंहिकेचा नाश केल्यावर हनुमंताने जे उड्डाण केले त्यात तो पडलंकेत पोचला. तेथे रावणाची बहीण आणि घर्घर राक्षसाची पत्नी क्रौंचा ही मुख्य होती. पूर्वी रावण आणि इंद्र यांचे घोर युद्ध झाले होते. त्या युद्धात घर्धर मारला गेला. राक्षसमूहाला इंद्राने फार पीडा दिली. इंद्राने घोर युद्ध करून राक्षसांना दाती तृण धरायला लावले. त्या युद्धात राक्षसांची हानी पाहून रावण आक्रंदू लागला. रणांगणावर रावणाला धरले, त्यावेळी कोणी पाठिराखा नव्हता. सेना आणि प्रधान पळून गेले. कुंभकर्ण गाढ झोपेत होता. त्यावेळी घर्घरच साहाय्यकर्ता झाला आणि त्याने इंद्राशी घोर संग्राम केला. इंद्राने वज्र हाणून त्याच्या हाडांचा चक्काचूर केला आणि त्याला मारले. या संकटकाळी इंद्रजित शिवाच्या वराने गुप्तपणे आला आणि जारण-मारण विद्येचा उपयोग करून त्याने इंद्राला पकडले. त्याच्या गळ्याला फास लावून इंद्रजिताने त्याला लंकेत आणले. तेव्हापासूनच त्याचे इंद्रजित हे नाव पडले. रावणाचे साहाय्य करताना घर्घर रणात पडला, त्याविषयी आदर व्यक्त करावा म्हणून क्रौंचेला पडलंकेचे राज्य देण्यात आले. तिच्या सेवेसाठी चवदा सहस्त्र राक्षसिणी ठेवल्या. त्या अत्यंत दुर्धर झुंज देणाऱ्या आणि आकाशातून फिरणाऱ्या होत्या.

हनुमंताने समुद्र पार करून जी उडी मारली, ती पडलंकेच्या जवळ असलेल्या उत्तरस्रोताच्या काठी पडली. ती कडाडणारी दुर्धर उडी पडताच पडलंका, लंकात्रिकूट येथे कडकडाट झाला. निकुंवळेला अत्यंत भारी कडकडाट उठला. लंकेमध्ये भूकंप होऊन तिथल्या नरनारींचा थरकाप उडाला. सीता चोरून आणली त्यामुळे नगरात अनेक विघ्ने निर्माण झाली. हनुमंताच्या उडीने झालेल्या आवाजामुळे पडलंकेतल्या राक्षसी बाहेर आल्या. त्यांनी हनुमंताला पाहिले आणि त्याला चहू बाजूंनी वेढले. हनुमंत बालब्रह्मचारी असल्यामुळे त्याने स्त्रियांविरुद्ध पराक्रम केला नाही. राक्षसिणींनी मारुतीला बांधून पडलंकेच्या आत नेला. यावेळी हनुमंताने सामान्य रूप धारण केले होते. त्याचे दीनवदन पाहून क्रौंचेने त्याला गळ्याला बांधले आणि विचारले, "हा कोण वानर, कोणाचा?" तेव्हा राक्षसिणी म्हणाल्या, "याच्या उड्डाणाने मोठाच दणका उडाला. तेव्हा आम्ही त्वरित याला पकडून भक्ष्य म्हणून आपल्याकडे फलाहारासाठी म्हणून आणला आहे." हे ऐकून वानराला मारण्यासाठी क्रौंचेने शस्त्राला हात घातला. ते पाहून हनुमंत हसत हसत म्हणाला, "मला खाण्यात काय अर्थ आहे याची तुम्हाला जाण नाही. माझ्या शरीराला जाडपणा यावा एवढे माझ्यात मांस नाही; म्हणून तर आम्ही झाडावर उडून बसू शकतो. तसेच निष्काळजी (आपल्याला काळीज

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sayaji Hamkhan... Research Academy, eGangotri

नाही हा गुह्यार्थ) असल्याने आम्ही गिरिकंदरात राहतो शरीरात नुसते रक्तच भरले असून. तुम्ही शरीर भदलेत तर सारे रक्त जमिनीमध्ये जिरेल. मग काय माती खाल? तेव्हा तसं काही न करावे माझ्या शरीरात मांस नाही. शरीराला मगमांसह नाही. तेव्हा हा माझा देह परोपकारी लावावा यासाठी मला सबंधच खाऊन टाका. मला संपूर्ण गिळल्यावर तोंडात चव चाखावी. त्यातूनच क्षणात माझ्या पुष्टतेची थोरवी आपल्याला समजून येईल."

हनुमंताचे हे बोलणे क्रौचेने खरं मानले आणि त्याबरोबर हनुमंताला गिळण्यासाठी आपले तोंड तिने मोठे केले. तिचा जबडा मोठा होऊन पसरताच हनुमंताने वेगाने आत उडी घेतली. तेव्हा तिने जिभेत त्याला धरण्यासाठी जिभेचा लडबडाट केला, लगेच मारुती गळ्याच्या घाटीत प्रवेशला. ती त्याला जिभेच्या दातांच्या पकडीत घेऊ शकली नाही. तिच्या तोंडाची आग तेवढी झाली. ती राक्षसी उगीच जिभल्या चाटत राहिली. तिला आंबट, तिखट, खारट, गोड, तुरट कुठलीच चव स्पष्टपणे कळली नाही. राक्षसी फारच कटकट, धडपड करते आहे असे पाहून मारुतीने तिचे काळीज मुठीत धरले. तेव्हा तिच्या पोटात शूळ उठला. ती जमिनीवर गडबडा लोळू लागली. मारुती काळीज मुठीत धरून पाहात चकित झाला. कारण राक्षसीच्या दोन्ही कुशी एवढ्या मोठ्या होत्या की त्यात कोटी हत्ती बांधायला मिळतील. तिचा जठराग्नी तर त्यात पर्वत टाकताच त्यांचा चुना व्हावा असा प्रदीप्त होता. क्रौंचाचे काळीज घट्ट धरून मारूतीने तिला लोळायला लावले. त्यावेळी तिच्या लक्षात आले की आपण वानराला संपूर्ण गिळण्यात चूक केली. आपल्याला वानर त्रासदायक आहे; दाताखाली न सापडता वानर आत पित्ताशयात बसल्यामुळे आपल्याला त्रास होतो आहे. यावर तिने औषध घ्यावे असे ठरवले.

क्रौंचेने शेकडो कडुनिंबाची झाडे, दाढेखाली रगडली. त्यावेळी तिने गिळलेल्या रसात मारुती बुडू लागला. तेव्हा त्याने तिच्या पोटात उड्या मारल्या. त्याच्या उड्यांनी राक्षसीला परम वेदना झाल्या. हनुमंताने तिचा घात कसा करावा याचा विचार करून योजना ठरवली. त्याने आपले शेपूट लांब वाढवून, शेपटीची टोके तिच्या घशात घातली. त्यामुळे तिला खूप मोठा खोकला आला आणि अखेर ओकाऱ्या होऊ लागल्या. अधोवात जोरजोराने होऊ लागला. त्याच्या जोराने शौचाला झाले. तो वात एवढा प्रबळ की त्याने अन्य राक्षसी उडविल्या आणि आकाशात काही वेळ भिरभिरत राहून शेवटी समुद्रात पडून बुडाल्या. मलद्वारे बाहेर येणाऱ्या वात-मलाने दुर्गंधी सुटून प्राणावर बेतले. त्यामुळे राक्षसी प्राणभयाने धास्तावल्या. धड त्यांना मागेही राहवेना. क्रौंचेने ओकारीच्या प्रसंगी तोंडात आलेले शेपूट घट्ट धरून कष्टाने वाहेर ओढायला आरंभ केला. इतर राक्षसींना तिने "ओढा ओढा ग लवकर" असा आदेश दिला. दहा-वीस राक्षसींनी ते ओढायचा प्रयत्न केला पण ते तिळभरही त्यांना ओढले गेले नाही. नंतर सहस्रावधी राक्षसींनी ते ओढायचा प्रयत्न केला. तरी शेपटाचा शेवट होत नव्हता एवढे ते लांब झाले. क्रौंचेचे पोट तेवढे फुगत चालले. प्रथम सामान्य वाटलेला वानर, क्रौंचेच्या पोटात वाढत होता. शेपटाचा शेवट मिळत नव्हता. अखेर तिच्या भाग्याने ओकारीसह मारुती वाहेर पडला, अन्यथा त्याने संहारच केला असता. अजूनही अनेक राक्षसी शेपूट ओढतच होत्या. मारुती क्रौंचेचे काळीज हातात घेऊन बाहेर आला होता. या काळीज उपटले जाण्याने क्रौंचेने दीर्घ आरोळी ठोकून, जमिनीवर देह टाकला. तिचा प्राण गेला. क्रौंचेच्या आरोळीने गिरिकंदरात प्रतिध्वनी उमटला, निकुंबळ थरारले, लंकेत भूकंप झाला. सहस्रावधी राक्षसींना शेपटीत गुंडाळून मारुतीने सागरात फेकल्या. त्या जलचरांनी खायला नेल्या. "या हनुमंताच्या पडलंकेतील उड्डाणाला कालिका खंडाचा आधार आहे हे श्रोत्यांनी जाणून घ्यावे. हे वृथा कथन म्हणू नये. ही रामायणी कथा जरी वृथा

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

सांगितली असे म्हटले तरी ती तत्त्वतः तारकच आहे. तेव्हा श्रोत्यांनी क्षमा करावी;'' असे एकनाथ विनवतात.

पडलंकेतल्या अनेक स्त्रियांचा हनुमंताने नाश केला. एक वृद्ध स्त्री तेवढी पडलंकेत मागे उरली. त्या वृद्धेकडे मारुतीने कृपादृष्टीने पाहून म्हटले, ''मी विचारतो ते खरे सांग, नाहीतर घात करीन. मला सांग, इथून लंका किती दूर आहे?'' वृद्धा म्हणाली, ''ती नग मागे राहिली. ते पाहा, तिकडे त्या कळसांच्या ओळी दिसत आहेत.'' मारुतीने मागे वळून पाहिले तेव्हा त्याला लंकापुरी दिसली. लंकेतील रावणमंदिराचे वैभव हनुमंताने पाहिले. सोन्याचे कळस, रत्नांनी सजलेली गोपुरे आणि माड्या, सूर्याला लोपविणाऱ्या रत्नजडित कळसांच्या ओळी, हे सारे पाहून हनुमंत उल्हसित झाला. श्रीरामाच्या पत्नीला शोधण्यासाठी आता घरोघरी धुंडाळायचे, लंकानाथाला त्रस्त करायचे, राक्षसांचा नाश करायचा, इंद्रजिताशी रणकंदन करून त्याला कासावीस करायचे, राक्षसगण रणात मारायचे, असे अनेक संकल्प मनाशी योजून हनुमंताने उलटे उड्डाण करून लंका गाठली.

मारुतीचे लंकेत आगमन

हनुमंताने लंकेत प्रवेश करताच रावणाचा विजयध्वज शेपटीच्या फटकाऱ्याने लंकेत पाडला. ते पाहून राक्षसांनी आकांत केला. शिखरांसह विजयध्वज लंकेत पडलेला पाहून लंकानाथ दचकला. लंकेवर संकट आल्याची त्याला जाणीव झाली. वाऱ्याची झडझड, मेघांचा गडगडाट, ह्यातले काही नाही, तरीही शिखरे कडकडाट करत खचली आणि विजयध्वज पूर्ण फाटला. या प्रकारांमुळे लंकेतील लोक म्हणू लागले, ''रावणाने रामाची पत्नी हरण करून आणली तेव्हापासून आम्हाला विजय नाही. राजा अधर्म करू लागला; तो मरण पावेल.'' जनतेची ही बोलणी ऐकून हनुमंताच्या चित्तात उल्हास निर्माण झाला. त्याने शेपटीला शकुनगाठ बांधून कोटी राक्षसांचा नाश करायचा निश्चय केला. सीतेला शोधण्यासाठी त्याने निरनिराळी रूपे घेतली आणि काय काय उद्योग केले ते आता ऐका.

हनुमंत अत्यंत दुर्धर वीर असून, सीतेला शोधण्यासाठी त्याने स्वतःच्या मनाशी काही विचार निश्चित केला, आणि तो पर्वताएवढा वाढला. रामाचे कार्य साधायला स्थूल रूप योग्य नाही तर सीतेच्या शोधासाठी निष्कारण का कष्टायचे; असा विचार करून तो सामान्य वानर न राहता, तो कधी दृश्य, कधी अदृश्य असा सीतेच्या शोधासाठी लंकेत फिरत राहिला. ज्याचा आत्मा श्रीरामचंद्र आहे असा तो आत्मनिर्धार केलेला हनुमंत अनेक विघ्ने येणार हे जाणून लीलया समुद्र ओलांडून आला. रावणाचा विजयकेतू तोडून, सीतेच्या शोधासाठी हनुमंत केतकीवनात आला. पडलंकेची वाट लावून, आता लंकेवर धाड घालून, राक्षससमूहाचा नाश करून, त्याला सीता शोधायची होती. सीता शोधताना इंद्रजिताची पाठ पुरवायची आणि राक्षसांचा विध्वंस करायचा, रावणाच्या सभेत जाऊन त्याला छळायचे, शेपूट वापरून लंका जाळायची, असा हनुमंताचा विचार ठरला. त्यासाठी त्याने काय कौशल्य दाखविले ते ऐका. रावणाच्या उपरमाड्यांवर नारळ, केळ्यांची ओळ होती; त्यावर तो सामान्य वानराचे रूप धरून गुप्तपणे चढला. तेथून त्याला लंकेचे जे दर्शन झाले, त्यावरून लंका अमरावतीपेक्षाही सुंदर असल्याचे जाणवले. त्रैलोक्याचे सर्व वैभव जणू लंकेत आणले आहे असे त्याला वाटले. अत्यंत मोठी ख्याती करून, समुद्र ओलांडून हनुमंत लंकेत आला हेच किष्किंधाकाण्डाचे मर्म आहे. तिथेच ते काण्ड पूर्ण होते.

सीतेचा शोध घेण्यासाठी, तिचा कैवार घेऊन, पुढच्या सुंदरकाण्डात हनुमंताने कोणता पराक्रम केला त्याचे वर्णन येईल.

***

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

ॐ

संत एकनाथकृत भावार्थ रामायण
सुंदरकाण्ड

अध्याय पहिला

हनुमंताने सीतेचा शोध घेताना जो अतुल पराक्रम केला तो सुंदरकाण्डात वर्णिला आहे. तो त्रिकूटाच्या शिखरावर चढून चौफेर लंका पाहू लागला. तेव्हा त्याला आढळले की सोन्याच्या कळसांच्या ओळी आभाळातील नक्षत्रांप्रमाणे लखलखत आहेत. असे कोट्यवधी कळस लंकेत दिसत होते. त्रिकूटावर उभा राहून लंका न्याहाळत मारुती पुढील कार्याच्या योजनेवर विचार करत राहिला.

लंकेची जडण-घडण आणि अभेद्यता

लंकेला अमरावतीची उपमा द्यावी तर ती त्यापेक्षाही थोर होती. विश्वकर्मा पाठवून ब्रम्हयाने तिचे निर्माण करविले. कुबेराची अलकावती रावणाने हिरावून घेतली पण शंकराने ती सोडवली. त्यावेळी ब्रह्मदेवाने विश्वकर्म्याकडून दुर्गम किल्ले, सुरेख आणि सुरासुरांना अगम्य अशी लंका निर्माण करविली. अमरावती, अलकावती, भोगावती यांच्यापेक्षा लंका अधिक सुंदर असल्याचे पाहून रावणाने तेथे वस्ती केली. लंकेचे महिमान कैलासाप्रमाणे होते. अत्यंत दुर्धर पण तेवढीच सुंदर लंका रावणाने राक्षसांसह राहून रक्षण केली. उत्तम, मध्यम, शुद्ध, अशुद्ध नरनारी लंकेतील सुवर्णाच्या मंदिरांमध्ये नांदत होते असे लंकेचे माहात्म्य होते. अनुपम, थोर अशा लंकेत कोट्यवधी राक्षसगण नित्य संचार करत आणि स्वतः रावण तिचे संरक्षण करीत असे. लंकेत प्रवेश करायला अणुमात्र संधी मिळत नव्हती. लंकादुर्ग अत्यंत दुर्धर असून तेथे प्रवेश कसा करायचा असा प्रश्न पडे; कारण तेथे वाऱ्यालाही संचार करणे कठीण वाटत असे. शिवाय रावणाचा धाक असे; त्याने वाऱ्याला केरकाढ्या बनवला होता. जिथे केराचे ढीग जमलेले असून सर्व वाटा गलिच्छ झाल्या असतील तिथे चावकाचे फटकारे मारून वाऱ्याला कामाला लावले जात होते. या अशा लंकेत आपण वानर म्हणून उघडपणे कसे वागायचे असा मारुतीला प्रश्न पडला. आपण जर वानररूपात लंकेत वावरू लागलो तर जो तो आपल्याला कौतुकाने धरेल आणि रामकार्याचा नाश होईल. हे हनुमंताच्या लक्षात आले. मग काय करावे? राक्षसरूप धरावे? याचा तो विचार करू लागला.

"आपण क्रूर राक्षसरूप धारण केले तर त्यातूनही अनर्थच होईल; कारण राक्षस ब्राह्मणमांसाचा आहार करवतील. राक्षसजातीची परीक्षा म्हणजे द्विजांचे मांस स्वेच्छेने खाईल तो शुद्ध राक्षस अन्यथा तो शत्रूपक्षाचा समजतात. मी जर ते मांस खाल्ले तर माझे सागरावरचे उड्डाण व्यर्थ होईल. मग कुठचा राम आणि कुठची सीता. माझा अधःपात तेवढा होईल. असा राक्षसरूपाचा विटाळ मला अणुमात्र होऊ नये." नंतर शेपूट गुंडाळून त्याने काही स्थूल विचार करत. रामनामाचे स्मरण करून विश्रांती घेतली. "या लंकेतला प्रवेश फार कठीण आहे. नीतिधर्माचा

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized By Sarayu Trust and eGangotri

सांगितली असे म्हटले तरी ती तत्त्वतः तारकच आहे. तेव्हा श्रोत्यांनी क्षमा करावी;" असे एकनाथ विनवतात.

पडलंकेतल्या अनेक स्त्रियांचा हनुमंताने नाश केला. एक वृद्ध स्त्री तेवढी पडलंकेत मागे उरली. त्या वृद्धेकडे मारुतीने कृपादृष्टीने पाहून म्हटले, "मी विचारतो ते खरे सांग, नाहीतर घात करीन. मला सांग, इथून लंका किती दूर आहे?" वृद्धा म्हणाली, "ती नग मागे राहिली. ते पाहा, तिकडे त्या कळसांच्या ओळी दिसत आहेत." मारुतीने मागे वळून पाहिले तेव्हा त्याला लंकापुरी दिसली. लंकेतील रावणमंदिराचे वैभव हनुमंताने पाहिले. सोन्याचे कळस, रत्नांनी सजलेली गोपुरे आणि माड्या, सूर्याला लोपविणाऱ्या रत्नजडित कळसांच्या ओळी, हे सारे पाहून हनुमंत उल्हसित झाला. श्रीरामाच्या पत्नीला शोधण्यासाठी आता घरोघरी धुंडाळायचे, लंकानाथाला त्रस्त करायचे, राक्षसांचा नाश करायचा, इंद्रजिताशी रणकंदन करून त्याला कासावीस करायचे, राक्षसगण रणात मारायचे, असे अनेक संकल्प मनाशी योजून हनुमंताने उलटे उड्डाण करून लंका गाठली.

मारुतीचे लंकेत आगमन

हनुमंताने लंकेत प्रवेश करताच रावणाचा विजयध्वज शेपटीच्या फटकाऱ्याने लंकेत पाडला. ते पाहून राक्षसांनी आकांत केला. शिखरांसह विजयध्वज लंकेत पडलेला पाहून लंकानाथ दचकला. लंकेवर संकट आल्याची त्याला जाणीव झाली. वाऱ्याची झडझड, मेघांचा गडगडाट, ह्यातलं काही नाही, तरीही शिखरे कडकडाट करत खचली आणि विजयध्वज पूर्ण फाटला. या प्रकारांमुळे लंकेतील लोक म्हणू लागले, "रावणाने रामाची पत्नी हरण करून आणली तेव्हापासून आम्हाला विजय नाही. राजा अधर्म करू लागला; तो मरण पावेल." जनतेची ही बोलणी ऐकून हनुमंताच्या चित्तात उल्हास निर्माण झाला. त्याने शेपटीला शकुनगाठ बांधून कोटी राक्षसांचा नाश करायचा निश्चय केला. सीतेला शोधण्यासाठी त्याने निरनिराळी रूपे घेतली आणि काय काय उद्योग केले ते आता ऐका.

हनुमंत अत्यंत दुर्धर वीर असून, सीतेला शोधण्यासाठी त्याने स्वतःच्या मनाशी काही विचार निश्चित केला, आणि तो पर्वताएवढा वाढला. रामाचे कार्य साधायला स्थूल रूप योग्य नाही तर सीतेच्या शोधासाठी निष्कारण का कष्टायचे; असा विचार करून तो सामान्य वानर न राहता, तो कधी दृश्य, कधी अदृश्य असा सीतेच्या शोधासाठी लंकेत फिरत राहिला. ज्याचा आत्मा श्रीरामचंद्र आहे असा तो आत्मनिर्धार केलेला हनुमंत अनेक विघ्ने येणार हे जाणून लीलया समुद्र ओलांडून आला. रावणाचा विजयकेतू तोडून, सीतेच्या शोधासाठी हनुमंत केतकीवनात आला. पडलंकेची वाट लावून, आता लंकेवर धाड घालून, राक्षससमूहाचा नाश करून, त्याला सीता शोधायची होती. सीता शोधताना इंद्रजिताची पाठ पुरवायची आणि राक्षसांचा विध्वंस करायचा, रावणाच्या सभेत जाऊन त्याला छळायचे, शेपूट वापरून लंका जाळायची, असा हनुमंताचा विचार ठरला. त्यासाठी त्याने काय कौशल्य दाखविले ते ऐका. रावणाच्या उपरमाड्यांवर नारळ, केळ्यांची ओळ होती; त्यावर तो सामान्य वानराचे रूप धरून गुप्तपणे चढला. तेथून त्याला लंकेचे जे दर्शन झाले, त्यावरून लंका अमरावतीपेक्षाही सुंदर असल्याचे जाणवले. त्रैलोक्याचे सर्व वैभव जणू लंकेत आणले आहे असे त्याला वाटले. अत्यंत मोठी ख्याती करून, समुद्र ओलांडून हनुमंत लंकेत आला हेच किष्किंधाकाण्डाचे मर्म आहे. तिथेच ते काण्ड पूर्ण होते.

सीतेचा शोध घेण्यासाठी, तिचा कैवार घेऊन, पुढच्या सुंदरकाण्डात हनुमंताने कोणता पराक्रम केला त्याचे वर्णन येईल.

***

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

ॐ

संत एकनाथकृत भावार्थ रामायण
सुंदरकाण्ड

अध्याय पहिला

हनुमंताने सीतेचा शोध घेताना जो अतुल पराक्रम केला तो सुंदरकाण्डात वर्णिला आहे. तो त्रिकूटाच्या शिखरावर चढून चौफेर लंका पाहू लागला. तेव्हा त्याला आढळले की सोन्याच्या कळसांच्या ओळी आभाळातील नक्षत्रांप्रमाणे लखलखत आहेत. असे कोट्यवधी कळस लंकेत दिसत होते. त्रिकूटावर उभा राहून लंका न्याहाळत मारुती पुढील कार्याच्या योजनेवर विचार करत राहिला.

लंकेची जडण-घडण आणि अभेद्यता

लंकेला अमरावतीची उपमा द्यावी तर ती त्यापेक्षाही थोर होती. विश्वकर्मा पाठवून ब्रम्हयाने तिचे निर्माण करविले. कुबेराची अलकावती रावणाने हिरावून घेतली पण शंकराने ती सोडवली. त्यावेळी ब्रह्मदेवाने विश्वकर्म्याकडून दुर्गम किल्ले, गुरंख आणि सुरासुरांना अगम्य अशी लंका निर्माण करविली. अमरावती, अलकावती, भोगावती यांच्यापेक्षा लंका अधिक सुंदर असल्याचे पाहून रावणाने तेथे वस्ती केली. लंकेचे महिमान कैलासाप्रमाणे होते. अत्यंत दुर्धर पण तेवढीच सुंदर लंका रावणाने राक्षसांसह राहून रक्षण केली. उत्तम, मध्यम, शुद्ध, अशुद्ध नरनारी लंकेतील सुवर्णाच्या मंदिरांमध्ये नांदत होते असे लंकेचे माहात्म्य होते. अनुपम, थोर अशा लंकेत कोट्यवधी राक्षसगण नित्य संचार करत आणि स्वतः रावण तिचे संरक्षण करीत असे. लंकेत प्रवेश करायला अणुमात्र संधी मिळत नव्हती. लंकादुर्ग अत्यंत दुर्धर असून तेथे प्रवेश कसा करायचा असा प्रश्न पडे; कारण तेथे वाऱ्यालाही संचार करणे कठीण वाटत असे. शिवाय रावणाचा धाक असे; त्याने वाऱ्याला केरकाढ्या बनवला होता. जिथे केराचे ढीग जमलेले असून सर्व वाटा गलिच्छ झाल्या असतील तिथे चावकाचे फटकारे मारून वाऱ्याला कामाला लावले जात होते. या अशा लंकेत आपण वानर म्हणून उघडपणे कसे वागायचे असा मारुतीला प्रश्न पडला. आपण जर वानररूपात लंकेत वावरू लागलो तर जो तो आपल्याला कौतुकाने धरेल आणि रामकार्याचा नाश होईल. हे हनुमंताच्या लक्षात आले. मग काय करावे? राक्षसरूप धरावे? याचा तो विचार करू लागला.

"आपण क्रूर राक्षसरूप धारण केले तर त्यातूनही अनर्थच होईल; कारण राक्षस ब्राह्मणमांसाचा आहार करवतील. राक्षसजातीची परीक्षा म्हणजे द्विजांचे मांस स्वेच्छेने खाईल तो शुद्ध राक्षस अन्यथा तो शत्रूपक्षाचा समजतात. मी जर ते मांस खाल्ले तर माझे सागरावरचे उड्डाण व्यर्थ होईल. मग कुठचा राम आणि कुठची सीता. माझा अधःपात तेवढा होईल. असा राक्षसरूपाचा विटाळ मला अणुमात्र होऊ नये." नंतर शेपूट गुंडाळून त्याने काही स्थूल विचार करत, रामनामाचे स्मरण करून विश्रांती घेतली. "या लंकेतला प्रवेश फार कठीण आहे. नीतिधर्माचा

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

विचार करूनही मला वाटते, आपण स्वतः शिष्टाई करायला गेलो तरी गर्विष्ट रावण ती मान्य करणार नाही. सीतेची सुटका होईल असे दान नाही; म्हणजे सीता दानानेही मुक्त होणार नाही. राक्षसांमधे फूट पाडायची तर तेथे आपलेपणाचा बोध घडणार नाही. कारण त्यामधे मांसभक्षणाचा संबंध येणार. मग आप्तत्व कुठले असणार. शिवाय राक्षसांमधे भेद करायला गेलो की दशाननापर्यंत ती वार्ता जाईल. त्याच्यापाशी भेदनीती चालणार नाही. त्याच्याशी युद्ध करणेही कठीण आहे. लंकादुर्ग अत्यंत दुर्धर; इंद्रजित, कुंभकर्ण हे झुंजार योद्धे आहेत; भोवताली सागर आहे; तेव्हा नर आणि वानर येथे कसे येतील? श्रीराम निधडा झुंझार वीर रावणाचे सपरिवार निर्दाळण करील; परंतु हा दुस्तर सागर आडवा असल्यामुळे राम येथे येणार कसा? नीतिशास्त्राने सांगितलेला साम, दाम, भेद, युद्ध हा उपदेश रावणाशी संबंध असल्याने उपयोगी नाही; कारण राक्षस नीतीविरुद्ध वागणारे असतात." असा नानाप्रकारे विचार लंकेच्या शिखरावर बसून मारुतीने केला. लंकादुर्ग ही मोठीच अडचण आहे. सीतेला कशी शोधावी? असा मारुतीने स्वतःशी विचार केला. शेवटी त्याने ठरविले की, "श्रीराम माझा साहाय्यकर्ता आहे. त्याच्या साहाय्याने संपूर्ण लंका मी स्वतः शोधून सीतेचा शोध घेईन."

"राक्षसांच्या बुद्धीला फसवून लक्षावधी रूपात जाता येईल; तसे करून मी सीतेचा शोध घेऊन श्रीरामाचे कार्य सिद्धीला नेईन. सुर, असुर, निशाचर यांचे माझ्यासारख्या वानराकडे लक्ष जाणार नसल्याने नगरातले प्रत्येक घर धुंडाळून मी सीतेचा शोध घेईन." असा विचार करून मारुती मशकाएवढा लहान होऊन, अत्यंत छोटा वानर झाला. अगदी मुंगीच्या डोळ्यांनाही खुपणार नाही इतका लहान होऊन लंकेत शिरला आणि रामपत्नीला शोधू लागला. कोणाला न कळता, जगाला दुःख न देता, हनुमंत लंकेत प्रवेशला. त्याने खोल खंदकात, गच्चांवर, माड्यांवर, मजल्यांवर, किल्ल्याच्या तटांवर, वना-उपवनात, देवळात, शिवालयात, मठात, ध्यानमंदिरात, सर्वत्र सीतेचा शोध घेतला. कडे-कपाऱ्या, अरण्ये, जलप्रवाह, पर्वत, गुहा, गिरिकंदरे, विवरे अशी ठिकाणे बारकाईने शोधली. आराम, विराम, आश्रम येथे तो स्वतः शोध करून आला. विविध बागा, पर्वतांचे कडे, सरोवर येथेही तो शोध करून आला. वृक्ष, गवत, चिखल, पाणी ही धांडोळून त्याने सीता शोधली. अशा सर्व बाह्य परिसराचा शोध करून झाल्यावर तो नगरातील घराघरात शिरून शोधू लागला. साधक हा जसा तत्त्वांची चर्चा करून आत्म्याची निश्चित जाण मिळवतो, तसा हनुमंताने सीतेचा शोध घेतला.

लंकेतले राक्षस

लंकेमध्ये नगरभागात ब्रह्मराक्षस वस्ती करून होते. त्यांच्या निवासांची थोरवी आता ऐका. लंकेतला एक राक्षस गळ्यात आणि केसात रुद्राक्षाच्या माळा धारण करणारा, शिवाच्या पंथाची दीक्षा घेतलेला असून तो मंत्रोक्त त्रिपुंड्रधारी होता. भूतांना अन्नदान देऊन, काषायवस्त्रे ल्यालेला एक संन्यासी दृष्टीला पडेल त्या मनुष्याला गिळत होता. तसेच आचमन करून, होमहवनात स्वाहाकार करून, चमत्कारिक कर्मे करणारे काहीजण आहारासाठी ध्यान धरून होते. कोणी जटाधारी नागवे होते. ते शरीराला भस्म लावून, वनात जाऊन गायी भक्षण करणारे होते. नंतर ते त्याच गायीचे कातडे धरून लोकांमध्ये आपण गायीचे कातडे धारण केलेले वेषधारी आहोत असे म्हणून मिरवत होते. असे मांस भक्षणाचा स्वार्थ साधून वर त्याची खोटी वतावर्णी करणारे राक्षस लंकेत होते. हनुमंताने असे राक्षस त्याच्या भ्रमणात पाहिले. हे राक्षस स्वतः मांस खात; पण कोणाला त्यातला वाटा देत नसत. ते इतरांना म्हणत, "संन्याशाचे तुम्ही घेतलेत तर तुम्हाला नरकवास होईल." तिथे

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

अग्निहोत्री राक्षस असून, कुंड, मंडप, वेदिकायुक्त उपासना करणारे होते. ते दोन्ही हातांना कुशतृण वेढून प्रातःकाळी आणि सायंकाळी होम करत होते. मुठी, मुठी कुशतृण हातात घेऊन मनुष्य दिसला की तेथेच त्याला कुशतृणाने मारून, त्याचे मांस भक्षण करण्यासाठी त्यांचा होम असे. असे ते सर्व पापाचारी राक्षस होते-नव्हते तोच यज्ञातला पुरोडाश मानून, त्याचा स्वतःच ग्रास करत, आणि कोणालाही वाटा देत नसत. असे ते मांसभक्षक क्रूर आणि कठोर राक्षस होते.

हनुमंताला वाटले की जिथे एवढा खोटेपणा आहे तिथे कुठला राम आणि कुठली सीता! तिथून पुढे गेल्यावर हनुमंताला एक आश्चर्य दिसले. लंकेत वेदपाठक, विजनात राहून आरण्यके पठण करणारे राक्षस होते; पण तेही मनुष्य दिसताच फळाहार म्हणून त्यांना मारून खात होते. राक्षसांच्या घरी पूर्णत्वाने अग्निहोत्र, वेदाध्ययन होत असे. परंतु दया, सत्य, शुचित्व यांची त्या राक्षसांना जाणीवच नव्हती. मारुतीने संपूर्ण ब्रह्मपुरी शोधली तेव्हा त्याला आढळले की तेथे ब्राह्मणांना दोरीने बांधले असून त्यांच्या शिरावर कर्माभिमान चढला होता. सीता तेथे नव्हती. सर्वांभूती भगवंत या सूत्रानुसार आवश्यक दया तिथे नव्हती. मग तिथे कुठला राम आणि कुठली सीता! मुद्रा, मंत्र ही त्यांची दीक्षा. तिथले क्षत्रिय तरी काय! त्यांना पराक्रमाचा फार मोठा गर्व होता; परंतु हनुमंताचा तडाखा बसला तर ते पटापट कोसळतील. वीरवृत्ती नाही, मरणभयाची संगत सुटलेली नाही अशा भित्र्या क्षत्रियांच्या घरी सीता कशी भेटेल? ह्या मरणाला भिणाऱ्या, अशक्त, नपुंसक क्षत्रियांकडे सीता भेटणारच नाही. हनुमंताने संपूर्ण क्षत्रिय-पुरान शोध घेतला तरी त्याला सीता आढळली नाही. नंतर तो वैश्यपुराकडे निघाला. वैश्यांचे चित्त व्यापारात असून द्रव्याबाबत ते अत्यंत लोभी होते. हनुमंताने वैश्यपुरीतली घरे शोधली. वैश्य हे मनाने कंजुप असून कवडी-कवडी धन साठवत होते. त्यांच्या घरी सीतारूपी ठेव असणारच नाही, हे हनुमंताने जाणले. यापुढे शूद्र जातीत शोध घ्यायचा असे त्याने ठरविले. त्यांच्या अठरापगड जाती होत्या. त्या सर्वांच्या घरी मारुतीने सीतेचा शोध केला. साळ्यांच्या घरी पाहिले तर ते आपल्या मागाच्या गराड्यात गुडघे घालून बसलेले; त्यांना मारुती आपल्या शेपटीच्या साहाय्याने जाळील. कापडाचा व्यवसाय करणारे चाटे हे खोटे बोलणारे. अंगळू मंगळू अशी त्यांची भाषा होती ते त्या भाषेत बोलत असल्याचे आढळले. हनुमंताने पुढे पुरदहनाच्या प्रसंगी त्यांना शिक्षा देता येईल असे ठरविले. अशी चाटेआळी शोधूनही मारुतीला तिथे सीता आढळली नाही.

नंतर हनुमंताने सोनार-आळी मध्ये शोध घेतला. सोनारांचे कर्म खोटेपणाचे असून ते मूळ सोन्याला खार लावतात, नीटपणे घट आणतात. बाहेर लगडींचे साठे पण त्यांचे शिशाच्या काट्याचे भांडवल असते. एकाला रूपासाठी, दुसऱ्याला शिशासाठी नादी लावून सर्व हीण तेवढे वजन करतात. अशा ठिकाणी जानकी आढळणारच नाही. सोनारांचा परिपाक असा की अवघे ठकठक करतात आणि ते देहाचे चोर एक एक करत लोकांना विश्वास दाखवून लुबाडतात. कडी, मोती यांची झगमग ते झळाळून दाखवितात; परंतु ते सर्व नग डाग लावल्याने हिणकस झालेले असतात. सोनारांचे काम आणि त्यांचा विवेक म्हणजे समूळ विश्वासघात असतो. खोटी वजने करून तोलून देतात आणि तेच सोनार घेताना मात्र दोन-दोन वेळा मोजून घेतात. विश्वासाच्या गोष्टी बोलून सोनार मागे-पुढे खोट आणतात; मित्रत्वाच्या बावी सांगून मुद्दलात तोटा आणतात. सोने हातात घेऊन यांनी कितीतरी लोकांना फसवले आहे. अशी सोनारकामाची प्रसिद्धी असल्याने सीता तिथे असणार नाही. कासारकामाचे कौतुक असे की त्यांचे एकएक फुटके, जुने, काळे, त्यामुळे तोलणेच तुटले. ही त्यांच्या कामाची परिपाठी असून

https://archive.org/details/@sarayu_lakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

विचार करूनही मला वाटते, आपण स्वतः शिष्टाई करायला गेलो तरी गर्विष्ट रावण ती मान्य करणार नाही. सीतेची सुटका होईल असे दान नाही; म्हणजे सीता दानानेही मुक्त होणार नाही. राक्षसांमधे फूट पाडायची तर तेथे आपलेपणाचा बोध घडणार नाही. कारण त्यामधे मांसभक्षणाचा संबंध येणार. मग आप्तत्व कुठले असणार. शिवाय राक्षसांमधे भेद करायला गेलो की दशाननापर्यंत ती वार्ता जाईल. त्याच्यापाशी भेदनीती चालणार नाही. त्याच्याशी युद्ध करणेही कठीण आहे. लंकादुर्ग अत्यंत दुर्धर; इंद्रजित, कुंभकर्ण हे झुंजार योद्धे आहेत; भोवताली सागर आहे; तेव्हा नर आणि वानर येथे कसे येतील? श्रीराम निधडा झुंझार वीर रावणाचे सपरिवार निर्दाळण करील; परंतु हा दुस्तर सागर आडवा असल्यामुळे राम येथे येणार कसा? नीतिशास्त्राने सांगितलेला साम, दाम, भेद, युद्ध हा उपदेश रावणाशी संबंध असल्याने उपयोगी नाही; कारण राक्षस नीतीविरुद्ध वागणारे असतात." असा नानाप्रकारे विचार लंकेच्या शिखरावर बसून मारुतीने केला. लंकादुर्ग ही मोठीच अडचण आहे. सीतेला कशी शोधावी? असा मारुतीने स्वतःशी विचार केला. शेवटी त्याने ठरविले की, "श्रीराम माझा साहाय्यकर्ता आहे. त्याच्या साहाय्याने संपूर्ण लंका मी स्वतः शोधून सीतेचा शोध घेईन."

"राक्षसांच्या बुद्धीला फसवून लक्षावधी रूपात जाता येईल; तसे करून मी सीतेचा शोध घेऊन श्रीरामाचे कार्य सिद्धीला नेईन. सुर, असुर, निशाचर यांचे माझ्यासारख्या वानराकडे लक्ष जाणार नसल्याने नगरातले प्रत्येक घर धुंडाळून मी सीतेचा शोध घेईन." असा विचार करून मारुती मशकाएवढा लहान होऊन, अत्यंत छोटा वानर झाला. अगदी मुंगीच्या डोळ्यांनाही खुपणार नाही इतका लहान होऊन लंकेत शिरला आणि रामपत्नीला शोधू लागला. कोणाला न कळता, जगाला दुःख न देता, हनुमंत लंकेत प्रवेशला. त्याने खोल खंदकात, गच्च्यांवर, माड्यांवर, मजल्यांवर, किल्ल्याच्या तटांवर, वना-उपवनात, देवळात, शिवालयात, मठात, ध्यानमंदिरात, सर्वत्र सीतेचा शोध घेतला. कडे-कपाऱ्या, अरण्ये, जलप्रवाह, पर्वत, गुहा, गिरिकंदरे, विवरे अशी ठिकाणे बारकाईने शोधली. आराम, विराम, आश्रम येथे तो स्वतः शोध करून आला. विविध बागा, पर्वतांचे कडे, सरोवर येथेही तो शोध करून आला. वृक्ष, गवत, चिखल, पाणी ही धांडोळून त्याने सीता शोधली. अशा सर्व बाह्य परिसराचा शोध करून झाल्यावर तो नगरातील घराघरात शिरून शोधू लागला. साधक हा जसा तत्त्वांची चर्चा करून आत्म्याची निश्चित जाण मिळवतो, तसा हनुमंताने सीतेचा शोध घेतला.

लंकेतले राक्षस

लंकेमध्ये नगरभागात ब्रह्मराक्षस वस्ती करून होते. त्यांच्या निवासांची थोरवी आता ऐका. लंकेतला एक राक्षस गळ्यात आणि केसात रुद्राक्षाच्या माळा धारण करणारा, शिवाच्या पंथाची दीक्षा घेतलेला असून तो मंत्रोक्त त्रिपुंड्रधारी होता. भुतांना अन्नदान देऊन, काषायवस्त्रे ल्यालेला एक संन्यासी दृष्टीला पडेल त्या मनुष्याला गिळत होता. तसेच आचमन करून, होमहवनात स्वाहाकार करून, चमत्कारिक कर्मे करणारे काहीजण आहारासाठी ध्यान धरून होते. कोणी जटाधारी नागवे होते. ते शरीराला भस्म लावून, वनात जाऊन गायी भक्षण करणारे होते. नंतर ते त्याच गायीचे कातडे धरून लोकांमध्ये आपण गायीचे कातडे धारण केलेले वेषधारी आहोत असे म्हणून मिरवत होते. असे मांस भक्षणाचा स्वार्थ साधून वर त्याची खोटी वतावणी करणारे राक्षस लंकेत होते. हनुमंताने असे राक्षस त्याच्या भ्रमणात पाहिले. हे राक्षस स्वतः मांस खात; पण कोणाला त्यातला वाटा देत नसत. ते इतरांना म्हणत, "संन्याशाचे तुम्ही घेतलेत तर तुम्हाला नरकवास होईल." तिथे

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

अग्निहोत्री राक्षस असून, कुंड, मंडप, वेदिकायुक्त उपासना करणारे होते. ते दोन्ही हातांना कुशतृण वेढून प्रातःकाळी आणि सायंकाळी होम करत होते. मुठी, मुठी कुशतृण हातात घेऊन मनुष्य दिसला की तेथेच त्याला कुशतृणाने मारून, त्याचे मांस भक्षण करण्यासाठी त्यांचा होम असे. असे ते सर्व पापाचारी राक्षस होते-नव्हते तोच यज्ञातला पुरोडाश मानून, त्याचा स्वतःच ग्रास करत, आणि कोणालाही वाटा देत नसत. असे ते मांसभक्षक क्रूर आणि कठोर राक्षस होते.

हनुमंताला वाटले की जिथे एवढा खोटेपणा आहे तिथे कुठला राम आणि कुठली सीता! तिथून पुढे गेल्यावर हनुमंताला एक आश्चर्य दिसले. लंकेत वेदपाठक, विजनात राहून आरण्यक पठण करणारे राक्षस होते; पण तेही मनुष्य दिसताच फळाहार म्हणून त्यांना मारून खात होते. राक्षसांच्या घरी पूर्णत्वाने अग्निहोत्र, वेदाध्ययन होत असे. परंतु दया, सत्य, शुचित्व यांची त्या राक्षसांना जाणीवच नव्हती. मारुतीने संपूर्ण ब्रह्मपुरी शोधली तेव्हा त्याला आढळले की तेथे ब्राह्मणांना दोरीने बांधले असून त्यांच्या शिरावर कर्माभिमान चढला होता. सीता तेथे नव्हती. सर्वांभूती भगवंत या सूत्रानुसार आवश्यक दया तिथे नव्हती. मग तिथे कुठला राम आणि कुठली सीता! मुद्रा, मंत्र ही त्यांची दीक्षा. तिथले क्षत्रिय तरी काय! त्यांना पराक्रमाचा फार मोठा गर्व होता; परंतु हनुमंताचा तडाखा बसला तर ते पटापट कोसळतील. वीरवृत्ती नाही, मरणभयाची संगत सुटलेली नाही अशा भित्र्या क्षत्रियांच्या घरी सीता कशी भेटेल? ह्या मरणाला भिणाऱ्या, अशक्त, नपुंसक क्षत्रियांकडे सीता भेटणारच नाही. हनुमंताने संपूर्ण क्षत्रिय-पुरान शोध घेतला तरी त्याला सीता आढळली नाही. नंतर तो वैश्यपुराकडे निघाला. वैश्यांचे चित्त व्यापारात असून द्रव्याबाबत ते अत्यंत लोभी होते. हनुमंताने वैश्यपुरीतली घरे शोधली. वैश्य हे मनाने कंजुप असून कवडी-कवडी धन साठवत होते. त्यांच्या घरी सीतारूपी ठेव असणारच नाही, हे हनुमंताने जाणले. यापुढे शूद्र जातीत शोध घ्यायचा असे त्याने ठरविले. त्यांच्या अठरापगड जाती होत्या. त्या सर्वांच्या घरी मारुतीने सीतेचा शोध केला. साळ्यांच्या घरी पाहिले तर ते आपल्या मागाच्या गराड्यात गुडघे घालून बसलेले; त्यांना मारुती आपल्या शेपटीच्या साहाय्याने जाळील. कापडाचा व्यवसाय करणारे चाटे हे खोटे बोलणारे. अंगळू मंगळू अशी त्यांची भाषा होती ते त्या भाषेत बोलत असल्याचे आढळले. हनुमंताने पुढे पुरदहनाच्या प्रसंगी त्यांना शिक्षा देता येईल असे ठरविले. अशी चाटेआळी शोधूनही मारुतीला तिथे सीता आढळली नाही.

नंतर हनुमंताने सोनार-आळी मध्ये शोध घेतला. सोनारांचे कर्म खोटेपणाचे असून ते मूळ सोन्याला खार लावतात, नीटपणे घट आणतात. बाहेर लगडींचे साठे पण त्यांचे शिशाच्या काट्याचे भांडवल असते. एकाला रूपासाठी, दुसऱ्याला शिशासाठी नादी लावून सर्व हीण तेवढे वजन करतात. अशा ठिकाणी जानकी आढळणारच नाही. सोनारांचा परिपाक असा की अवघे ठकठक करतात आणि ते देहाचे चोर एक एक करत लोकांना विश्वास दाखवून लुबाडतात. कडी, मोती यांची झगमग ते झळाळून दाखवितात; परंतु ते सर्व नग डाग लावल्याने हिणकस झालेले असतात. सोनारांचे काम आणि त्यांचा विवेक म्हणजे समूळ विश्वासघात असतो. खोटी वजने करून तोलून देतात आणि तेच सोनार घेताना मात्र दोन-दोन वेळा मोजून घेतात. विश्वासाच्या गोष्टी बोलून सोनार मागे-पुढे खोट आणतात; मित्रत्वाच्या बावी सांगून मुद्दलात तोटा आणतात. सोने हातात घेऊन यांनी कितीतरी लोकांना फसवले आहे. अशी सोनारकामाची प्रसिद्धी असल्याने सीता तिथे असणार नाही. कासारकामाचे कौतुक असे की त्यांचे एकएक फुटके, जुने, काळे, त्यामुळे तोलणेच तुटले. ही त्यांच्या कामाची परिपाठी असून

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

सर्व लोकांनी त्यांना टाळले आहे; तेव्हा तिथे सीता असणार नाही म्हणून हनुमंतही तिथून निघाला.

हनुमंताने पाहिले की आर्थिक व्यवहार करणारे त्याच दशेचे आहेत. त्यांना व्याजाची अधिक आशा असते. ते मुदलाला फास लावून आशा ठेवून लोभीपणा करतात. द्रव्य पुढे करून; ते समोरच्याकडून काळा-खोटा-कागद लिहून घेतात. त्यामुळे त्यांचे तोंड काळे होते आणि मग त्यांना खंत वाटत राहते. त्यांच्या देहाच्या खतांच्या-व्रणांच्या-व्यथांपेक्षा कागदावरच्या खतांच्या व्यथा तीव्र असतात. त्याच व्यथा त्यांच्या जिवावर येतात आणि या तिन्ही व्यथांची अवस्था त्यांना दुःखी करते. ते खत (गहाणखत इत्यादी) फाडतात, तेव्हा भेटेल त्याला साक्षी करतात, स्वप्नातही व्यवहार सांगतात आणि झोपेत तेच बडबडतात. स्वतःची संपत्ती पाहून हे व्यवहारी उल्हसित होतात. जेव्हा ते मागतात आणि ते मिळत नाही तेव्हा मग दुःखी होतात. व्यवहारियांची ही अशी गत असते. त्यांनी धरणे धरले तरी त्यांना मुक्ती मिळत नाही कारण धनलोभ्यांना कुठली मुक्ती मिळणार. सीता तेथे असत नाही. हनुमंत नंतर तेल्यांच्या घरी गेला. तेथे नित्य करकर चालते. सर्वजण उठताबसता प्रहर-प्रहर म्हणतात श्रीराम भेटो. जेव्हापासून जानकी आणली तेव्हापासून लंकेची कळा गेली. हनुमंताने सर्वांचा धिक्कार केला आणि पुर पेटले म्हणजे तळमळ कराल असे म्हटले. मारुतीला वाटले हे नित्य नवे फेरे खाणारे तेली असल्याने तेथेही सीता असणार नाही. मग तो पुढे विणकरांच्या वस्तीत गेला. तेथे मूळचा तंतू तुटल्याने साळी हे माग मागे घेणे विसरले. त्यांना पांजणीपरवणीचा उद्वेग येऊन त्यांना खळीसाठी लगबग करावी लागत होती. त्यांच्या विणीतले खाचे जिवंत झाले आणि घडीला घडी सांधणे होईना. त्यामुळे वस्त्राचे स्वरूप बरोबर उतरेना आणि उगीचच ते तणतणून ताणत राहिले. अहोरात्र धोटे हाणल्याने त्या साळ्यांचे स्वरूप उतरेना, ताणे-वाणे बाया गेले. अशा ठार्या सीता सापडणारच नाही.

हनुमंत मग तांबोळ्यांकडे गेला. त्यांचा सन्मान पानात होता. देठ झडून गेलेले असे ते फेरारे-फरारे म्हणत अंतरातून मुरकटून गेले होते. रुसण्या-फुगण्याचे त्यांचे कारण एवढेच की त्यांचा पानांमधेच सन्मान होता. ती सर्व मंडळी पाने आतून सडल्यामुळे स्वतःच्या लोभाला हानी पोचल्याचे मानत होती. मानसन्मानाचा अत्यंत गर्व असल्याने, त्यांचा अभिमान आटला आणि तोंडे तेवढी तांबडी झाली. तिथे जानकी नव्हती. शिंप्यांचे कौशल्य असे की लोभाची कात्री घेऊन ते अखंड, नानाप्रकारे कापत होते आणि गुप्तपणे त्यात चोरी (कापडाची) करत होते. प्रथम अखंड होते ते खंडित केले, मग शिवणीला दंड घातला म्हणाले, असे त्या शिंप्यांचे कर्म होते. त्यामुळे त्यांनाच ते बाधक झाले. अखंडाचे तुकडे करून चोरी करायची; त्याने कुमारी आणि नारी शृंगारायच्या, त्यांच्या गळ्याला बिरडे (गाठ) लावायचे आणि असे घरोघरी टाचून द्यायचे. हे कर्म केल्याने शिंपी लोभाने बोटे चाटतात आणि त्या शिवण्याने त्यांचे पोट भरत नाही. अशा ठिकाणी ती पवित्र सीता कशी असेल? रंगाऱ्यांची रंगशाळा तर अलौकिकच होती असे त्या मारुतीला आढळले. शुद्ध-सात्त्विक असलेले रंगारी काळे करत होते. हात, तोंड सारे काळे झालेले ते रंगारी नामरूपाच्या ठशावर काळाबेरा पदर धरत होते. अशा रंगाऱ्यांच्या घरी सीता असणार नाही. नंतर मारुतीने वेदपाठकांच्या ठिकाणांना भेट दिली. त्यांचे नवल असे की त्यांचा स्वाध्याय आणि अनाध्याय घरीच चाले. लघु-ऱ्हस्व आणि दीर्घ स्वरात वर्णोच्चार करण्याचा त्यांना अभिमान वाटत होता. अनुनासिक नाकातून उच्चारताना त्यांचा अजाणता निर्नासिक उच्चार होत होता. अशांना इतर वेदपाठक हसत होते. ते एकमेकांचा उपहास करत होते. असे वेदपठण म्हणजे कोरड्या शब्दांची खणखण. त्यांनी

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust, Lucknow

मानाभिमान सोडला नव्हता. तिथे सीता असणार नाही म्हणून चिद्रत्न सीता शोधायला मारुती पुढे शास्त्री-पंडितांच्याकडे गेला. तेथील विद्वानांचे व्याख्यान आणि त्यांची शास्त्राची जाण चांगली होती. पण त्यांनी ज्ञातेपणाने जडलेला गर्वाभिमान सोडला नव्हता. जो जो शास्त्रज्ञान वाढले तो तो त्यांचा अभिमान आणि गर्व यांची स्फूर्ती वाढत गेली. सीता तेथे असणार नाही. हनुमंताने नंतर ज्योतिषांची स्थिती पाहिली. ते ग्रहगतीत गुंतून पडलेले असून सर्वांना ग्रहगतीच लावत होते. तेथे सीता नसणार. हनुमंत पुढे सीतेचा शोध घेत बाजार, व्यापारपेठा, चौक सावधपणे शोधू लागला.

हनुमंताला सीता सर्वत्र भासू लागली. धान्यकणांच्या राशी पाहताना त्यातील बीजतत्त्वात, फुलारी फुले गुंफत असता त्यातील सुवासात, वाण्याच्या ठायी आतल्या पोत्यात, अंतरात साठवण केलेल्या ठिकाणात, जे जे वाटसरू भेटतील त्यांच्यात, हत्ती-घोड्यात, पक्वान्नांमधे, अशी सर्वत्र त्याला सीताच दिसू लागली. त्याला अन्नाची आठवण नव्हती तर सीतेचेच ध्यान लागले होते. त्याने घरे, परसदारे, चौक, माड्या, ओवऱ्या, सर्वत्र सीतेचा शोध घेतला. परंतु सर्वांतरी विषमता भरलेली दिसल्याने, तेथे सीता सापडणार नाही हे त्याने जाणले. अशाप्रकारे लंकेत त्याने सर्वत्र सीतेचा शोध घेतला. जिकडे दृष्टी जाईल तिकडे तो केवळ सीताच शोधत होता. पुढे त्याला फळांनी लवलवणारे जंबुमाळी मळे आढळले, ते त्याने समूळ उपटून पाहिले. सांदीकोपरे, गल्ली-गल्ली, नद्या-नाले, अशा लंकेतील सर्व ठिकाणांचा शोध घेऊनही त्याला सीता सापडली नाही. सीता ही जिथे शोक नाही अशा अशोकवनात होती ही वार्ता त्याला कोणी सांगितली नाही. मग ती कशी शोधली जाणार?

मोठी घरे, इंद्रजित, कुंभकर्ण यांची ठिकाणे, थोर सेनानी, प्रधान आणि रावणाचे स्वतःचे स्थान, त्याचे शयनगृह, हे सर्व हनुमंताने शोधले. कोठेही त्याला सीता सापडली नाही.

अध्याय दुसरा

महावीर हनुमंताने लंकेत घरोघरी, बाजारहाटात, चव्हाट्यात, सर्व वस्त्यात, एवढेच नाही तर स्त्रीयांची गुप्त ठिकाणे, अशी सर्व ठिकाणे सीतेच्या शोधासाठी पाहिली पंण ती आढळली नाही. नंतर हनुमंताने राजवर्गाच्या घरात सीतेचा शोध घेण्यासाठी प्रवेश केला.

प्रधानादींच्या घरात हनुमंताचा शोध

हनुमंताने उड्डाण करून प्रहस्ताच्या मंदिरात प्रवेश केला. तेथे सर्वत्र शोधूनही त्याला सीता कुठेही आढळली नाही. प्रहस्त या महाबळी प्रधानाच्या घरी शोध घेऊन हनुमंत महापार्श्वाच्या अंतःपुरात शोधासाठी गेला. तेथेही त्याला सीता आढळली नाही. या नंतर हनुमंताने महोदराच्या घरात; अतिकाय, महाकाय यांच्या घरात; अखया कुमाराच्या ठिकाणी, वज्रदंष्ट्र, जंबुमाळी, विद्युत्-जिव्ह, महाबळी रावणाचे सर्व आप्त, शुक, सारण, विद्युन्माळी, सुमाळी, विकटशत्र, बहुशत्र, सूर्यशत्र, अमित्र, कुमित्र, शठमित्र, गर्विष्ठ चित्रविचित्र, धूम्राक्ष, ताम्राक्ष, विरूपाक्ष, मकराक्ष, मृगशावाक्ष अशा सर्वांची घरे सीतेसाठी पवनपुत्र हनुमंताने शोधली. तसेच घस, प्रहस, महघस, विघस, शठ, निशठ, महाशठ, भट, उद्भट, महाभट, यांची घरेही मारुतीने सावकाश, वारकाईने शोधली. पुढे युद्धोन्मत्त, महोन्मत्त, शूर, उन्मत्त, अशा भीम, महाभीम, सभीम अशा दुर्गम आणि कळिकाळाला धाक लावणाऱ्या वीरांची घरे धांडोळून हनुमंताने सीतेचा शोध घेतला. वीरजिव्ह हा वीर वज्रासारखी तीक्ष्ण जीभ असलेला असून, तो जिभेच्या आघाताने पर्वताचे

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

पीठ करणारा होता. त्याची जीभ एक योजन लांब असून सुरवर, सर्प यांना त्याचा धाक वाटे, त्याचेही घर शोधले आणि मारुती पुढे गेला. विद्युर्जिव्हाची जीभ विजेच्या तेजाची आणि तिच्या कडकडाटाने लोक कापत असत होती. अशा अनेक वीरांची घरे सीतेसाठी मारुतीने धांडोळली.

निधडा वीर विकर्ण याच्या कानांच्या जागी दाढा होत्या; तो वृक्ष-पर्वतांचा दाढेने चुराडा करत असल्याने त्याच्या पुढे कोणी जात नसत; त्याच्या दाढेच्या भीतीने वाराही वाहणे थांबवत असे; तसाच एक तीक्ष्ण आणि पोपटाच्या चोचीसारखे नाक असलेला वीर नाकानेच पर्वत रगडत असणारा होता; त्यामुळे त्याचे नाव शुकनासिक पडले होते. त्याच्या नाकाच्या आघाताची भीती वाटून दैत्य, दानव, चळचळा कापत असत. त्याचेही घर हनुमंताने शोधले. अश्वमुख, गजमुख, तरसमुख, व्याघ्रमुख यांच्याही घरी मारुतीने शोध घेतला. करालाक्ष, विकरालाक्ष, शोणिताक्ष, भीमाक्ष, यांच्या घरात शोध घेताना मारुतीला दिसले की त्यातल्या एकएका राक्षसांची तोंडे सूर्यचक्राएवढी होती आणि म्हणून त्यांना चक्रमुख असेही नाव होते. त्यांनी रणात तोंड उघडले की तिन्ही लोकात आकांत होई, ते मेरु पर्वत गिळू शकत; त्यांच्या तोंडातून निघणाऱ्या वाफेने सूर्य आच्छादून जातो आणि आकाशात धुके दाटते.

हनुमंताने अशा रीतीने सर्व घरे साक्षेपाने शोधली. त्यावेळी त्याला स्त्रीपुरुषांचा एकांत आणि त्यामधे चाललेली रतिक्रीडा पाहावी लागली. त्या स्त्री-पुरुषांच्या नाना प्रकारच्या रतिक्रीडा पाहून मारुती उद्विग्न झाला. तेव्हा स्वतः हनुमंताने आपल्याशी संवाद केला. तो म्हणाला, "सीतेचा शोध घेताना ही ग्रहगती मुख्यतः ब्रह्मचर्याचा नाश करणारी ठरली. दुसऱ्याच्या स्त्रीचे दर्शन, तिच्याशी संभाषण करणे हेही मी कधी केले नाही; अशा मला स्त्रीपुरुषांचे मैथुन, योनीदर्शन आता झाले. जो स्त्रीपुरुषांचे मैथुन पाहतो त्याच्या ब्रह्मचर्याची हानी होते. मी तर ते पाहिले. श्रीरामाच्या सेवेवर अतिशय प्रेम असल्यामुळे मी समुद्र लंघून आलो आणि इथे तर सीतेचा शोध घेत असताना माझी अधोगती झाली. नग्न स्त्रियांचे दर्शन हे ब्रह्मचर्याला दूषण ठरणारे, लुबाडणारे आहे. त्यावर मला इथे मैथुन पाहावे लागले. यामुळे माझा अधःपात झाला आहे. सीतेचा शोध घेताना ब्रह्मचर्यावर संकट आले. जर शोध न घेतला तर तो जगजेठी श्रीराम क्षोभेल; तो क्षोभला तर जन्म आणि कर्म व्यर्थ ठरेल; माझा भजनधर्म व्यर्थ होईल असे हे संकट मला अटळपणे सामोरे आले आहे. सीतेच्या शोधार्थ मी फिरलो नाही तर माझ्या कपाळी अपयश येईल. तेव्हा हे रघुनाथा, तूच आता माझा बुद्धिदाता हो. आगम-निगमात तुझी प्रतिज्ञाच आहे की 'बुद्धिर्बुद्धिमतास्मि' तर माझ्या संकटग्रस्त, संभ्रमित अवस्थेत, तू कृपा करून पावावेस. 'न मे भक्तः प्रणश्यति' हे तर रघुपती तुझे ब्रीदच आहे. तेव्हा सीता शोधण्याच्या कार्यात कृपया तू मला पावावेस."

हनुमंताची चिंता श्रीरामाला समजली. तो श्रीराम आपल्या भक्ताच्या अंतर्यामी प्रकट झाला. भक्तसाह्यार्थ त्याचे प्रकटीकरण होताच, मुखात श्रीरामनाममुद्रा असलेल्या हनुमंताला श्रीरामाच्या स्मरणाने उत्साह येऊन तो सीतेच्या शोधकार्याला उद्युक्त झाला. "श्रीरामाचे स्मरण केल्याने आणि अंतरात श्रीरामाची आठवण जागल्याने मला परस्त्रीच्या मैथुनाची बाधा झाली नाही. श्रीरामाच्या चरणप्रसादाने नग्न परस्त्री किंवा तिचे मैथुन पाहूनही माझ्या मनात अल्पशीही कामभावाची स्फूर्ती निर्माण झाली नाही. ज्ञानीजनांच्या चित्ताला त्याची बाधा रामकृपेने होत नाही. चित्तामध्ये जर श्रीरामाची भक्ती असेल तर तेथे कामवासनेची वस्ती होत नाही. कारण चित्त चैतन्यस्थितीला पावल्याने कामवासना सहजच निवृत्त होते. ज्याप्रमाणे अंधाऱ्या रात्री काजव्यांची नक्षत्रे चमचमतात, पण सूर्य उगवताच ती सर्व अस्तंगत

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

होतात; त्याप्रमाणे चित्तात काम, क्रोध, लोभ असतील तर त्या चित्तात रामभक्ती उपजताच ते सर्व अस्ताला जातात. मन हे इंद्रियांना प्रवृत्त करते, मनाच्या पोटातच स्त्री-पुरुष भेद असतो. मन हेच कामवासनेचे कारण आहे; तेच बाधक असते. जसे समुद्रातील पाण्यात मिठाचे खडे विरघळून त्यांचे पाणी होते, त्याप्रमाणे श्रीरामाचे स्मरण करताच मन हे परिपूर्ण परब्रह्म होते. मनाची मनोवृत्ती मावळली असल्याने स्त्री-पुरुषांच्या एकांतातही मी केवळ सीतेचाच शोध घेतो आहे. मला कसलाही अडथळा नाही. मन मावळल्याने मी देहातच विदेही झालो आहे. आता नग्न स्त्रियांच्या ठिकाणीही मी विदेहत्वाने सीतेचा शोध घेईन."

"डुक्कर किंवा कुत्रा नग्नावस्थेत पाहून पुरुषाला कामभावना होत नाही; त्याप्रमाणे स्त्री-पुरुष मैथुनाच्या दर्शनाने मला बाधा होत नाही. जसे शस्त्र हे शत्रूदळाच्या शरीरात गेल्याने पुरुष कामासक्त होत नाही, तसे योनीमध्ये प्रवेश झालेला पाहून माझे मन कामार्थी होत नाही. माशीवर माशी बसलेली पाहून जसे कामभाव उपजत नाहीत, तसे मैथुनाच्या दर्शनाने माझ्या मनात कसलीही शंका उपजत नाही. सद्‌गुरूंचे वचन प्राप्त झाले की त्यानेच काम समूळ नष्ट होतो. मला श्रीरामाचा संतोष प्राप्त झाल्याने माझ्या ठिकाणी कामवासना निर्माण होत नाही. सीता ही चुकलेली स्त्री असल्याने तिचा स्त्रियांमध्येच शोध घेतला पाहिजे; तेथे जरी स्त्रियांची रतिक्रीडा पाहावी लागली तरी त्यामुळे मला कामाविषयी स्फूर्ती येत नाही. ती सीता स्त्रियांमध्येच शोधली पाहिजे; कारण ते सोडून डुकरे आणि कुत्री यांच्यात ती कशी सापडेल! सीता चुकल्यावर उठाउठी वनात धावून जाऊन मृगसमूहात तिचा शोध घेणारा शोधक मूर्खच म्हणावा लागेल. मी असा मूर्खपणा करणार नाही. मी सज्ञानपणे तिचा समस्त भुवने, अगदी स्त्रियांची गुह्यस्थानेही शोधीन. जे जे अत्यंत नकोसे स्थान असेल, जेथे केलेला प्रवेश गहन संकट आणणारा असेल, तेथे तेथे जाऊन मी बारकाईने सीतेचा शोध घेईन." असा निश्चय करून, उड्डाण घेऊन हनुमंत निघाला.

हनुमंताने उड्डाण केले आणि त्याला इंद्रजिताचे भुवन दिसले. ते मंदिर रत्नजडित होते, त्याचा प्रकाश पडून आकाश लखलखीत झाले होते. त्या गृहावर कलाकुसर केलेली होती, त्याचे एकावर एक मजले चढलेले असून सर्वात वरही गच्ची व मनोरे होते. रावणाच्या घरापेक्षाही इंद्रजिताचे घर अधिक शोभिवंत होते. त्यावर सोन्याचे रत्नजडित कळस होते. त्या घरावर पांढऱ्या, पिवळ्या, तांबड्या पताका झळकत होत्या. सर्वत्र दिवे लावलेले असून महा असुर तेथे गस्त घालत होते. ते पहारेकरी एकमेकांना हाक घालून गस्त घालत भोवती फिरत होते. तेथे वाऱ्यालाही प्रवेश नव्हता. हनुमंताने मग चौफेर न्याहाळले. पाच, सात, नऊ खणांच्या आत कुठे प्रत्यक्षात महादुखणे होते. त्याचे नित्य कुंथणे चालू होते. त्या दुखण्याचा छेद लक्ष्मणाच्या बाणाने होईल. युद्धात गर्वाचे हे खण पाडले जातील. हनुमंताला इंद्रजिताचे भुवन दिसताच तो खवळला आणि अणुरूप होऊन त्याने आत प्रवेश केला. एका खिडकीतून प्रवेश करून हनुमंताने चारी घरे, ओवरी-ओवरी आणि कोपरा-कोपरा शोधला.

हनुमान इंद्रजित भुवनात-सुलोचना दर्शन

इंद्रजिताच्या मंदिरातील अनेक दालने हिंडून मारुतीने सीतेचा शोध घेत धुंडाळली. त्यावेळी त्याला इंद्रजितासह असलेली स्त्री दिसली. मरकत मण्यांच्या पलंगावर सुंदर मोरांची नक्षी असलेली शय्या आणि त्यावर नाजुक सुगंधी फुलांची पखरण केलेली होती; पलंगाचे छत उत्तम मोत्यांनी मढवलेले होते. घवघवीत कापूर-वातींचा शोभायमान प्रकाश पडला होता. तिथली पिकदाणी रत्नांकित होती. सोन्याच्या भिंतींना सुगंध येत होता. सर्व जमीन पाचूंनी सजवलेली होती. महासती सुलोचना

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

इंद्रजिताला विडे देत होती. सुलोचना ही पतिव्रता पतीचे वचन न उल्लंघणारी होती. तिला पाहून मारुतीला ती सीताच असावी असे वाटले. नागकन्या सुलोचना ही कमलनयन सुंदरी पाहून हनुमानाला ती सीताच असणार असे वाटले. त्या सुंदर स्त्रीच्या पावलापावलांच्या भोवती भुंगे फिरत होते, तिच्या सर्वांगाला मनोहरपणा आणि सुगंध लाभला होता, अशी ती स्त्री म्हणजे आपल्या स्वामीची-श्रीरामाची पत्नीच असणार या खात्रीने हनुमंत पाहात होता. रामपत्नी रावणपुत्राला वश आहे या कल्पनेने मारुतीला राग आला. त्याने इंद्रजितासह तिचा नाश करायचे ठरविले. त्या विचाराने त्याचे डोळे लाल होऊन विस्फारले, त्याची शेपूट वेटोळ्यात मुरडली गेली आणि त्या दोघांची नरडी आवळण्यासाठी त्याचे मस्तक तडतडले. "सीता अधर्मात रममाण झाली आहे, तेव्हा आता त्या दोघांचाही घात करतो. श्रीरामाला राग आला तर या दोघांची प्रेते त्याला दाखवीन; किंवा दोघांना माझ्या शेपटीत बांधून जिवंतच त्यांना घेऊन जाईन." असा विचार करून रागाने फणकारत त्याने उंच उड्डाण केले.

त्यावेळी सुलोचना पतिव्रता आपल्या पतीच्या चरणांवर मस्तक ठेवून म्हणत होती, "मी आता आपल्याला काही एक विचारणार आहे. आपण क्षमा करा कारण आजवर मी आपल्याला कधीही काही विचारले नाही. अहो, लंकापती, पुढे होणारा घात पाहून मी काकुळतीने विचारते आहे. अशोकवनाचे रक्षण करताना तुमचा घोर अपमान होईल. अखया कुमाराला मरण आले. राक्षसांच्या कुळाचा घात होईल. असे मला वाटते." त्यावर इंद्रजिताने पत्नीला विचारले, "असे कसे होईल?" सुलोचना म्हणाली, "रावणाने सीता सती आणली त्यामुळेच राक्षसांचे कुळ संपेल. वनामध्ये जानकीला छळले आणि बलवान रामाचाही छळ केला. त्यामुळे तो श्रीराम लंकेची होळी करील आणि राक्षसकुळात आकांत होईल. तुमच्यावर येणारे हे वाईट संकट पाहून माझे मन धास्तावले आहे. आपण दशाननाला सुबुद्धी सांगून पाहावी. आपण त्यांचे ज्येष्ठ पुत्र असून आपल्यावर त्यांचा विश्वासही आहे. सीता सुंदरी श्रीरघुनाथाला देऊन त्याच्याशी मैत्री करा. श्रीरामाशी मित्रत्व केल्याने राक्षसकुल स्वस्थ होईल. नंतर तुम्ही सर्वजण तिन्ही लोकात यशवंत व्हाल." इंद्रजिताने हे ऐकून सुलोचनेला एकांतात सांगितले की, "अग, रावणाला सीतेने अगदी झपाटून टाकले आहे. जो कोणी त्याला हितपर सांगेल त्याचा घात करायला तो धावतो. सीतेला सोडून श्रीरामाशी सख्य कर असे मी म्हणताच तो माझाच घात करायला धावून येईल. निष्कारण पितृद्रोह तेवढा माझ्या माथी बसेल. तेव्हा प्रिये, माझे सांगणे सावधपणे ऐक. अग मरण चुकवून चुकत नाही. जे व्हायचे ते होणारच यासाठी आपण कोणाला काही न सांगावे हे उत्तम."

इंद्रजित आणि सुलोचना यांचे एकांतात झालेले बोलणे ऐकून हनुमंताची खात्री पटली की ही सुलोचना म्हणजे सीता नव्हे. परंतु सीतेला कोठे ठेवले आहे याविषयी त्या दोघांच्या एकांतात चाललेल्या बोलण्यातला उल्लेख मारुतीने ऐकला नाही. लंकानाथाने सीतेला कुठे ठेवले आहे हे समजले नाही तरी सीता लंकेतच आहे एवढा त्याला शोध लागला. नंतर तो तिच्या शोधासाठी निघाला.

कुंभकर्ण-भुवनात हनुमंत

मेघांहून उंच शिखर असून ते मेघवर्णाचे होते, त्यावर सीतेला शोधण्यासाठी हनुमंताने उड्डाण केले. अत्यंत काळजीपूर्वक तिथली घरे शोधताना एकदम तो दचकला. कारण एका ठिकाणी महाथोर कुंभकर्ण तेथे पहुडला होता. त्याच्या मोठ्याने घोरण्यामुळे सारे आकाश त्या

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

नादाने भरून गेले होते. त्या कुंभकर्णाच्या समोर मोठा शंखध्वनी केला तरी तो त्याच्या कानात शिरत नव्हता. त्याच्या श्वासोच्छ्वासाच्या भोवऱ्यात शेकड्याने हत्ती सापडत होते आणि सुटका होत नाही म्हणून तळमळत होते. रेड्यांचे ओरडणे चालू होते कारण दोन्ही नाकपुड्यातून कळपच्या कळप आत जात होते. पण त्यांना बाहेर येता येत नव्हते. गाई, म्हशी, बैल, घोडे हे सर्व प्राणी श्वासोच्छ्वासासह घुंगुरट्यांप्रमाणे आत जात होते. कुंभकर्ण त्यावेळी झोपेतच नाक रगडायचा त्यामुळे प्राणी किड्यांसारखे मरत होते. हे सर्व पाहून हनुमंताने मनात विचार केला की, "प्रजापतीने जेव्हा कुंभकर्णाची मूर्ती तयार केली तेव्हा आळस न करता त्याने भरपूर माती वापरली असणार." त्याच्या राठ झिंज्या विशाल होत्या आणि भाल्यासारख्या अणकुचीदार होत्या. त्याच्या शरीरावरचे रोम अणू शूळच होते. त्याच्या विक्राळ दातांना भेगा पडलेल्या होत्या. ते दात कधीही न घासल्याने बुरसटलेले होते. कुंभकर्णाचे तोंड पाहून हनुमंताला ओकारी आली. श्रीराम येथे आल्यावर याचा पराक्रम पाहील तेव्हा प्रथम आपण याच्याशी झुंज घ्यायची असा हनुमंताने निश्चय केला. कुंभकर्णाची देहस्थिती पाहून मारुती स्वतः कंटाळला तेव्हा 'तेथे सीता कशी असणार'; या विचाराने त्रस्त झाला. त्या उद्वेगातच त्याला जाणवले की, "ब्राह्मण म्हणून हा जन्मला पण झोपेने याचे जीवन व्यर्थ केले. याचे अर्धे आयुष्य झोपेत गेले, रात्रीने ते हिरावले. कधी जाग आली तर स्त्रीशी हा कामासक्त रत होत असेल. कुटुंबाची चिंता मनात बसली की ती कल्पान्तीही सुटत नाही. त्यातच आयुष्य संपते. द्रव्याची तहान लागते आणि भोजन, शयन, द्रव्य यांची आसक्ती निर्माण झाल्यानेच लोक लुवाडले जातात. कुंभकर्ण मात्र झोपेनेच लुबाडला आहे. मग येथे सीता कशी असेल?"

बिभीषणाच्या गृहात मारुतीचा प्रवेश

कुंभकर्णाच्या घरून मारुतीने उड्डाण केले आणि त्याला बिभीषणाचे घर आढळले. तेथे वृंदावन होते. पताका होत्या आणि रामाचे कीर्तन चालले होते. टाळ-मृदंगांच्या नादघोषात निधडा वैष्णव वीर रामनामाचा गजर करून, टाळी वाजवून, सुखात डोलत होता. कीर्तनाच्या सुखाने जे कोणी समाधान पावतात ते स्वतःलाही विसरतात; परमानंदाने तृप्त झालेले ते मग रामगुण गाऊ लागतात. ते निरपेक्षपणे, चिकित्सेने, श्रुतींमध्ये रंगून जातात आणि सगुण श्रीरामाचे निर्गुणपण जाणून त्याचे कीर्तन करतात. त्या कीर्तनात ते म्हणतात, "श्रीरामामुळे धरणी पवित्र आहे; राम हाच जीवन, दहन, तपन, गगन असून तो परिपूर्ण परब्रह्म आहे. श्रीराम हा मनाचे उन्मन, चित्ताचे चैतन्यघन, बुद्धीचे सज्ञान आहे. जंगम, स्थावर, सबाह्य, अभ्यंतर अशा सर्वात तो परमात्मा राम श्रीहरी, जगदुद्धारी आहे." त्या कीर्तनाची गोडी अनुभवल्यावर हनुमंताला ती आवडली. त्याने गिरकी घेऊन, रंगात येऊन वेगात उडी मारली. गुप्तपणे तो गडबडा नाचला. त्याच्या रंगात येऊन नाचण्यातून परमार्थ ओसंडला आणि त्यामुळे बिभीषण मूर्च्छित झाला, कारण तो परमार्थी परम भक्त होता. हनुमंताला आत्मदर्शन होऊन त्याला देह-विदेह यांचे भान उरले नाही. बिभीषणही मूर्च्छापन्न होऊन आपल्या स्वतःला विसरला. मारुती आणि बिभीषण यांची एकमेकांशी ओळख नसतानाही आणि त्यांच्यात बोलणे न होताही त्यांची दोघांची भेट झाली. त्यांच्यात एकात्मता निर्माण होण्यास श्रीरामकथेचे कीर्तन हेच कारण झाले.

हरिकीर्तन हे स्वकर्म, स्वधर्म, परम प्रेम आणि परब्रह्माविषयी सांगणारे असते. बिभीषणाच्या हातावर दिग्विजयी श्रीरामाची मूर्ती होती. ते पाहून

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

हनुमंताला बिभीषणाविषयी प्रेम वाटून सुख झाले. बिभीषण श्रीरामाचा भक्त आहे हे पाहून हनुमान आनंदाने नाचला. श्रीरघुनाथाची भक्ती करणारा विभीषण नित्य मुक्त आहे हे त्याला जाणवले. राक्षस असून रामभक्ती करणारा विभीषण पाहून मारुती हर्षभरित झाला. "श्रीरामाने रावणाचा नाश केला की विभीषणालाच राज्याची प्राप्ती होणार" असे त्याच्या मनाने ठरविले. "माझ्या श्रीरामाची भक्ती करणाऱ्या विभीषणाला राज्य करतानाच नित्यमुक्ती मिळणार. त्याला स्त्री आणि पुत्रसंतती असली तरी त्याची भुक्ती, मुक्ती भंग पावणार नाही." मग मारुतीने निश्चयच केला की, "रामाकडून रावणाचे मर्दन झाले की विभीषण लंकापती होणार हे शुभ चिन्ह सत्य आहे. जेथे रामभक्ती असते तेथे रामशक्ती असते. यामुळे लंकेत रामराज्य येणार आणि सीता येथे येताच हे घडणार. जेथे रामशक्ती प्रवेश करते तेथे भक्ती, मुक्ती असते. अशी रामराज्याची स्थिती असते." हा निश्चय मारुतीच्या मनाने केला. त्याला आणवले की, "सीतेचे लंकेत आगमन होणे ही रावणाची मरणमुक्ती, विभीषणाला राज्यप्राप्ती" हा मारुतीचा विचार ठरला. इथवर मारुतीला झालेले श्रम, खेद, दुःख संपून त्याला शांती मिळाली. वैष्णवांची संगत महान् असते हे त्याच्या अनुभवाला आले. "वैष्णवांची संगत अशी महान असते की त्या संतांची संगती भ्रमांचे निरसन करते, जडजीवांचा उद्धार होतो, ब्रह्मप्राप्ती होते, नित्य मुक्ती मिळते." हनुमंताने नंतर संतचरणाच्या धूळीला वंदन केले, त्याने लोटांगण घातले आणि पवित्र चरणरजाचे स्नान घडले तर त्यापुढे तीर्थेही बापडी ठरतात. संतचरणरजामुळे मुक्ती मिळते, ब्रह्म प्राप्त होते.

विभीषणाच्या घरी मारुतीला सुख आणि विश्रांती मिळाली. जेथे भगवद्‌भक्त भेटतात तेथे पृथ्वीचा लय होईतो भ्रम-निवृत्ती होऊन, अर्थ-स्वार्थ-परमार्थ मिळून, सुखप्राप्ती होते.

अध्याय तिसरा

विभीषणाच्या मंदिरात शोध घेताना एकीकडे सुखी झालेला कपिराज हनुमंत, सीतेचा शोध लागला नाही म्हणून दुसरीकडे दुःखी झाला होता. नंतर त्याने संपूर्ण नगर, त्यातील बाजार, सर्व घरे शोधली तरी त्याला सीतेचा शोध लागला नाही; त्यामुळे तो उद्विग्न झाला; त्या चिंतेने तो कंपायमान झाला. अखेर त्याने आपली बुद्धी चालवून सीतेचा निश्चित शोध लागेल अशी युक्ती काढली.

मारुतीने शेपटीने लोकात कलह माजवला

"सीतेचा शोध लावायचा तर लोकात कलह निर्माण करायचा. त्यांना निष्ठुर आघाताने त्रस्त केले म्हणजे त्यांच्या तोंडून सीतेविषयी ऐकायला मिळेल. रावणाची कठोर आज्ञा असल्यामुळे त्या भीतीने लोक काही बोलत नाहीत. तेव्हा त्यांच्यामध्ये आपण गुप्त राहून कळ लावून दिली की लोक बोलतील." असा त्याच्या बुद्धीने निर्णय केला. हा विचार ठरल्यावर तो लंकेत, राजद्वारात आला आणि त्याने आपले कौशल्य दाखवले. स्वतः गुप्त राहून त्याने मांकडचेष्टा करत लोकांची थट्टा आरंभली. प्रथम त्याने आपल्या शेपटीला नमन करत म्हटले, "सीताशोधाच्या कार्यात आपण मला साहाय्य करावे." नंतर तो शेपटीचा उपयोग करू लागला. घरी पाणी साठवलेल्या घागरींमध्ये शेपूट अडकवून तो त्या फोडू लागला. अशा एकामागून एक सहा-सहा घागरी फुटलेल्या पाहून स्त्रिया "कोण मेला आमच्यात येऊन घागरी फोडतोय?" असे म्हणू लागल्या. नंतर हनुमंताने त्यांच्या नाकात शेपटी घातली तेव्हा त्या गडबडून नाचू लागल्या; टसठसा शिंकू लागल्या; त्यामुळे आणखी घागरी फुटू लागल्या. मारुतीने आपल्या शेपटीचा नगराला वेढा घातल्यामुळे नगरात पाण्याचा तुटवडा पडला. कारण भरलेली घागर नगरात येऊच शकत नव्हती. हे सारे घडताना हनुमंत गुप्तच राहिला. "या

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

नगरीचा राजा मेला की काय?" असा स्त्रियांचा आणि पुरुषांचा राजद्वारात आक्रोश सुरू झाला. त्यांची कल्पना झाली की सीतेच्या संतापामुळेच हे घडते आहे. "श्रीरामाची धर्मपत्नी चोरून आणल्यानेच, तिने हा आकांत, रावणवधासाठी सुरू केला आहे" असे लंकेतले नागरिक म्हणू लागले. "सीता संतापली आणि तिनेच राक्षसांचे जीवन-पाणी शोषले. आता आमचे प्राण कुठले राहणार! जीवनाशिवाय-पाण्याविना-जगायचे कसे?" असे म्हणत स्त्रियांनी बोटे मोडली. पुरुषांनी शंख केला. "आता राक्षसांची धडगत नाही. सीतेकडून लंकेचा नाश होणार," असे सर्वजण म्हणू लागले. राजद्वारात खापऱ्यांचा ढीग झाल्याने तेथील वाटच बंद झाली. लंकेवर हे महासंकट आले, कलह निर्माण झाला. हनुमंत तटस्थपणे हे सारे पाहात होता आणि सीतेचा शोध घेण्याचा प्रयत्न करत होता.

राजद्वारात महावीर घोड्यावर बसून हो-हो, जी-जी करत घोडे नाचवत होते. हनुमंताने घोड्यांच्या पायात शेपूट अडकवून अनेक वीरांना तोंडघशी पाडले. त्यांचे दात घशात जाऊन त्यांची तोंडे रक्ताने रंगली. घोड्याच्या पायात शेपूट घालून उखडल्याने अनेक वीरांच्या तोंडातून रक्त गळाले आणि ते राजद्वारात कुंथत पडले. जी गत अश्वपतींची तीच गत गजपतींचीही झाली. मारुतीच्या शेपटीने त्या महाशूर, पायात बिरुदांच्या साखळ्या घातलेल्या आणि डोक्यावर छत्र धरून राजद्वारात थांबलेल्या गजारूढ योद्ध्यांना त्रस्त केले. मारुतीने गजगती शेपटीने रोखली. त्याने मागचा हत्ती ओढून त्याच्या दातांनी पुढच्या हत्तीला मारले. त्यावेळी माझ्या हत्तीवर तू आपला हत्ती का घातलास असे म्हणत ते वीर आपसात हाणामारी करू लागले. हत्तीच्या दातांची खणखण, शस्त्रांची सणसण सुरू होऊन राजद्वारात अत्यंत भीषण रण माजले. हत्तींचीही झुंज सुरू झाली. गजयुद्धात प्रत्येक वीर दुसऱ्यावर विजय मिळविण्यासाठी धडपडत असताना मधेच गुप्त शेपटीच्या फटकाऱ्याने वीरांचा घात होऊन ते कुंथत पडले. राजद्वारात हत्ती आणि वीर प्रेतवत् होऊन लोळत, कुंथत पडले. नंतर वाजंत्री वाजवत आणि चवऱ्या ढाळून घेत, राजकुमार रथातून आले. मारुतीने गुप्त राहून घोडी थांबवली, सारथ्याला शेपटीने खाली ओढले, ध्वज हिसडून पाडला, राजकुमारांना जमिनीवर पाडले. त्यांच्यावर रथ आणि चारी घोडे उलथून पडले आणि त्याखाली महावीर चेपले गेले. वाजंत्री शंख करू लागले, चवरीधारक लोळत पडले. असे अनेक रथ मारुतीने गुप्तपणे शेपटीच्या आघाताने राजद्वारी पाडले. अनेक वीर कुंथत पडले होते. त्यांना दांड्या असलेल्या खाटेवरून नेले जात असतानाही ते गुप्तघावाच्या भीतीत होते. मागचा मागे, पुढचा पुढे असे सर्वजण पळत होते. हा उपद्रव कोण करतो आहे ते मात्र त्यांना समजत नव्हते. "श्रीरामाची पत्नी क्षोभली असून तिनेच हा उत्पात घडविला आहे. आता लंकानाथासह ती राक्षसांचा घात करील." ही त्यांची समजूत झाली.

नंतर राजसन्मान प्राप्त झालेले प्रधानमंडळ पालख्या, मेणे यात बसून आले. त्यावेळी भोयांच्या कानात शेपूट गेल्याने ते चक्रावले आणि चमकून पाहू लागले. भोयी थयथया नाचू लागले, कान झाडू लागले. शेपटीने वेढा घालताच पालखी पुढे आदळली. तिची दांडी मोडून प्रधानांच्या आणि भोयांच्या डोक्यात पडली. प्रधान खालीतोंडकरून आदळले. हा सारा प्रकार पाहून सेवकांनी आकांत केला. कोणी पाणी शिंपडून सावध करण्याचा यत्न केला. लंकेतल्या माणसांची ही अवस्था पाहून हनुमंताला हसू आले. रावणापाशी ज्यांचा सन्मान होई तेच आता राजद्वारी अपमान सोसावा लागून, लोकांकडून त्यांचे हसू झाले आणि त्यामुळे ते अधिक चिडले. ज्यांना घरी चौशेरी तुपाचे भोजन नेहमी मिळत होते तेच आता राजद्वारात अपमानित होऊन पडले होते. त्यांनी भोयांना

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

लाथा, बुक्या हाणल्या. तेव्हा ते भोयी म्हणाले, "आम्हाला निष्कारण का मारता? ती श्रीरामाची बायको ही भुताटकी चेतवते आहे. तिनेच तुम्हाला अपमानित केले आहे." इकडे हनुमंताने शेपटीने पालख्यांची रांगच उलथून टाकण्याचा सपाटा चालविला होता. सर्वांची अवकळा करून त्यांना मातीत मिळवले. पालखी मोडल्याने ती उपयोगाला येणार नव्हती म्हणून दांडीच्या खाटेवरून कुंथत प्रधानांना घरी जावे लागले. त्याचवेळी हनुमंताला सीता लंकेतच असल्याचे ऐकून आनंद झाला. आपली कार्यसिद्धी व्हावी म्हणून त्याने कलह उत्पन्न केला.

लंकेत हनुमंत आणखी हिंडू लागला. त्याला एक नामवंत मल्ल चाललेला दिसला. त्याच्या मागून काही उन्मत्त मल्ल चालले होते. मारुतीने त्यातल्या एकाची लाथ उचलून जोरात पुढच्याला मारली. तेव्हा "का रे लाथ हाणलीस?, असे पुढच्याने विचारले. त्यावर काहीच न सांगता आल्याने आणि ते अकस्मात घडल्याने मागचा चाचरला. त्यावर "तू फार माजला आहेस. आता तुझाच घात करतो" असे पहिल्या मल्लाने म्हटले. नंतर दात-ओठ खाऊन, भिवया चढवून, त्यांची मारामारी सुरू झाली. क्रोधाने खवळून मुष्टिप्रहार करत; डोके, शरीर मुरडून, हात हिसकून, धडका देऊन, गुडघ्यांनी आघात करत; एकमेकाला तळात घालण्यासाठी उड्डाण करत, टक्करा देत ते मल्ल एकमेकांशी झुंजू लागले. एक खाली पडला तर दुसरा त्याच्या अंगावर बसून त्याचा गळा दाबायला लागे. तेवढ्यात त्याच्या पायाला कळ आणून गळा सोडवून घेतला जाई. ते एकमेकांचे हात-पाय उखडण्याचा प्रयत्न करत; एकमेकांच्या छातीवर लाथा हाणत; अशी त्यांची झुंज चाले. दोन्ही वीर सारखेच शक्तिमान असल्याने त्यांच्यात मल्लविद्येचा कस दाखवून एकमेकांशी कुस्ती चाले. अशी मल्लात भांडणे लावल्यावर हनुमंताने मृदंगे, स्वार, शिपाई, वेदज्ञ ब्राह्मण यांच्यात कलह निर्माण केला. पण त्यांच्यापैकी कोणीच सीतेविषयी काही सांगितले नाही.

रावणाच्या सभेतला वृत्तान्त

हनुमंताने नगरात कलह माजवून सीतेविषयी काही कळते का हे पाहिले आणि त्यात यश न आल्यामुळे त्याने रावणाच्या सभेतच शोध घ्यायचे ठरविले. तेथे प्रवेश केल्यावर त्याला आढळले की, दशानन सिंहासनावर बसला असून, सभेत युद्धप्रवीण आणि सावध प्रधान आणि असंख्य सभासद सेवक होते. सभेमध्ये हेर आले आणि त्यांनी रावणाला वंदन करून नगरीतली परिस्थिती सांगितली. "एक दुर्घट विघ्न आले आहे. जिकडे पाहिले तिकडे सर्वत्र राजद्वारात नाशकारी स्थिती निर्माण झाली आहे. देवांच्या वराचा हा परिणाम आहे असे सामान्यांना वाटते आहे. प्रतापवंत असा हिरण्यकशिपू नाश पावला. ज्याचे आमंत्रण असेल, त्याच्या घरी भोजन करून अधर्माने द्विजांचे धन हरण करणारा सहस्रार्जुन संपला. त्याच्या दुर्दशेच्या संधीत सहस्र भुजा तोडल्या गेल्या; पुत्रांसहित त्याच्या सैन्यसमूहाचा द्विजपुत्राकडून वध झाला. नंतर ज्योतिषांनी सांगितले, राजाला सांगा की त्याने अधर्माने सीतेला आणली; त्यामुळे नगरीवर हे संकट आले आहे. घोडेस्वार, गजारूढ स्वार, अतिरथी, महारथी, राजद्वारात उलथून पडले असून, ते दडपले गेल्याने लागलेल्या घावांमुळे कुंथत आहेत. आघात करणारा कोणाला दिसत नाही, पण वीर कुंथत आहेत, अश्व, गज तळमळत आहेत, सर्वांना मूर्च्छा आली आहे; त्यांच्यावर प्राणसंकट ओढवले आहे. यांपैकी आणखी घोर अरिष्ट म्हणजे राजद्वारात असंख्य फुटुन पडलेले घट असून नारीजन आकांताने ओरडत आहेत. पालखीत बसून येणारे पराक्रमी वीर धुळीला मिळविले गेले आहेत. या सर्व प्रकाराने सर्वांचे एकच म्हणणे आहे की, सीता क्षोभली असून नगराची होळी होईल."

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

रावणाने हेरांकडून वृत्तान्त ऐकला आणि तो संतापून म्हणाला, "या दुष्टाने ही वार्ता सांगितली तेव्हा याचा घात करा. हाच सर्वस्वी दुटप्पी आहे. त्याला हात बांधून समोर आणा, त्याची जीभ कापा, त्याचे दात पाडा, त्याचे कान कापून गाढवावरून याची नगरातून धिंड काढा." ही रावणाची आज्ञा ऐकून हनुमंत अतिशय रागावला. "हा रावण जर विघ्नाचे चिन्ह असत्य मानतो आहे; तर याला आता तेच सत्य करून दाखवावे." असा त्याने विचार केला. सर्वजण विघ्न सत्य मानतात यामुळे रावण मनातून घाबरला. मारुतीने सभेमध्ये अशी ख्याती केली. "मी केलेली दुश्चिन्हे सांगणाऱ्या हेरावर जर शिक्षा भोगण्याचा प्रसंग आला तर या सृष्टीत हेर हा भूमीला भारच होईल. तेव्हा आता माझ्या शेपटीला असे आयुष्य मिळावे की ही रावणसभाच काय, सगळ्यांनाच धाक लावून, रावणालाही त्रस्त करतो." असा निश्चय मारुतीने केला. सभेमध्ये प्रधानांसह रावण स्वतः सिंहासनावर बसला होता. सभेत सुगंधी तेलाचे अनेक दिवे, कापराचे अठरा लाख दिवे होते. त्यामुळे सभा लखलखीत प्रकाशात शोभयमान झालेली होती. अशा वेळी अत्यंत आवेशाने हनुमानाने आपल्या शेपटीचा आघात करून सर्व दीप मालवले. सभेत अंधार झाला.

रावणाच्या सभेतला गोंधळ

हनुमंताने दिवे विझवल्याने सभेत अंधार झाला, मग मारुतीने गुप्तपणे कार्य सुरू केले. मुकुट, कुंडले, छत्रे हिरावून, शस्त्रास्त्रे, वस्त्रे मारुतीने काढून घेतली. एक म्हणाला, "माझी वस्त्रे नेली, दुसरा म्हणाला माझी शस्त्रे नेली. द्विज म्हणे माझी धोत्रे नेली." मारुतीने सभेत एकच गोंधळ माजवला. त्याने कोणाच्या कानातली कुंडले तोडताना कानही तोडले, वस्त्रे काढताना डोळे फोडले, बाहूभूषण घेताना बाहूच उखडले, अशी राक्षसांची फरफट केली. मुकुट घेताना मस्तक तोडले, कमरेच्या साखळ्या काढताना कंबर मोडली, अंगठ्या घेताना बोटेच उपटली अशी त्याने राक्षसांची वाताहत केली. कंठमाळा काढताना गळे मुरडले, पदके (हृदये) फोडली, वस्त्रे घेताना त्याने लिंगे तोडली. सर्वजण म्हणू लागले, "अरे, लवकर वस्त्रे सोडा. नाही तर लिंगच तुटेल आणि नपुंसकता येईल. संसारात हे कसे सोसवेल?" हनुमंताने वीरांच्या पायातले दागिने काढताना वीरांचे पाय तोडले. त्यावेळी जे ओरडत त्यांचे त्याने नाक तोडले आणि राक्षस फें फें करू लागले. तेव्हा सर्वजण एकमेकांना सांगू लागले, "अरे शंख करू नका, अन्यथा तुमचे नाक कापले जाईल. न बोलता मुकाट राहा."

मारुतीने रावणाच्या डोक्यावर आणि छातीवर जोरदार टोले मारले. त्यामुळे रावणाला घेरी आली; तो भीतीमुळे बोलू शकेना. अंधेरी आणि शिवाय अंधार यामुळे त्याला काही दिसत नव्हते, पण अंगावर तडाखे तेवढे बसत होते. यामुळे भयभीत होऊन रावण थरथर कापू लागला. मारुतीने वस्त्रे, अलंकार काढले. नाके तोडली तेव्हा सभाजन एकामागे एक दडू लागले. हेराने जे सांगितले ते विघ्न प्रत्यक्षात अनुभवाला आले त्यामुळे सभाजनही म्हणू लागले, "जानकी क्षोभली आणि तिने रावणाच्या वधासाठी हा शेपटीचा यशध्वज सोडला असणार. रावण मेला की जिवंत आहे याविषयी कोणीच सांगू शकत नव्हता. "अंधारामधे रावणाला मृत्यू आला, त्याच्यावर विघ्न आले," अशी सभेत आरोळी उठली. राक्षसांना धडकी भरली. "इंद्रजित आणि कुंभकर्ण यांना मारले. आता त्यानंतर रावण गेला. आता धावायचे कुठे. धाव घ्यायचा कोणाकडे?" या भीतीने राक्षस कंपायमान झाले. मारुतीचा पिता वायू हा क्षोभला; त्यामुळे दीपिका विझल्या. राक्षस

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized By Sarayu Foundation Trust and eGangotri

संकटात सापडून त्यांचा नाश झाला. रावण मरण पावल्याने सभेत राजाज्ञेचे सूत्र उरले नाही; चोरांचे फावले; ह्यामुळे त्या चोरांनी सभेत शिरून लुटालूट केली. राक्षस पळून जाऊ लागले. जो कोणी सभेच्या बाहेर पडे त्याला शेपटीचा मार बसे. "सीता संतापली त्यामुळे आमच्यावर हे संकट आले आहे. बाहेर पडायलाही वाट उरली नाही, असे दुर्घट विघ्न ओढवले आहे."

हनुमंताने नंतर रावणाचा मुकुट जोराने ओढला, त्यामुळे रावण इतका भ्यायला की त्याला वाटले आपला शेवट आला. हेर सांगत होते ते सत्य होते हे आता पटले. गुप्तपणे झालेले हे दुर्धर आघात निष्ठुर असून त्याने प्राणान्त ओढवतो. यावेळी हनुमंत रावणाच्या कानात बीजाक्षर मंत्र सांगावा तसे पुटपुटला की, "तू सीतेला चोरून आणलीस म्हणून तुझे शिर छेदण्यासाठी मी रामदूत आलो आहे." नंतर हनुमंत रावणाची दहा तोंडे नखांनी कुरतडू लागला. तेवढ्यात रामचंद्राने त्याला थांबवून म्हटले, "तू जर रावणाला मारशील तर माझा पुरुषार्थ वाया जाईल." हे श्रीरामाचे बोलणे ऐकून मारुतीने रावणाला मारले नाही. परंतु जेव्हा मारुतीचा हात रावणाला लागला तेव्हा रावण भ्रमात गेला आणि त्यामुळे त्याला कानमंत्रातला गुह्यार्थ समजलाच नाही. नंतर जेव्हा सभेत दीप आणले गेले तेव्हा सर्वजण नागवेच असून हळहळत होते. त्यांनी एकमेकांकडे पाहिले तेव्हा ते लाजून खाली पाहू लागले. एकाची बोबडी वळली; एक धास्तावला; एक वेडा झाला. कोण्या एकाचे दात पडले; दुसरा एक प्रेतवत झाला. एकाला अधोवात झाला, एकाला कंपवात सुटला; एकूण सभेचा पुरुषार्थ मिटला. अशा प्रकारे रावणाच्या सभेत आकांत करून, सभाजनांना लज्जित करून, हनुमंत लंकानाथाचे तोंड काळे करून गेला. या रीतीने असंख्य राक्षसांची गांजणूक करून रावणसभेचे हनुमंताने बळ हिरावले. रावणालाही गांजून त्याचे तोंड काळे केले.

या पुढे एकनाथांनी नम्रतापूर्वक निवेदन केले आहे. ते म्हणतात, "हनुमंताला महात्मा म्हणायचे यासाठी की त्याने रावणाच्या सभेत वसून रावण-राक्षस यांच्यात अत्यंत आकांत घडविला. मी बालक केवळ त्याच्या चरणरजांनी या ग्रंथात सामर्थ्य आणू शकलो. श्रीरामच स्वतः माझ्याकडून हे वदवून घेत आहे. माझ्या भावार्थरामायणाला मूळ कारण तोच आहे. श्रीराम हाच माझे बोलते वदन आहे. अक्षराअक्षरात रामच आहे. माझी बुद्धी ज्या गुह्यज्ञानाचा आविष्कार करते आहे ती त्या चैतन्यघन श्रीरामाचीच कृपा आहे. माझ्या हृदयांतरी प्रवेशून श्रीरामच ही रामकथा स्वतः घडवितो आहे. मी तर वेद वा शास्त्रार्थ न जाणणारा मूर्ख आहे. तेव्हा जे मी ग्रंथात बोलतो आहे ते श्रीरामाला आवडले म्हणून तोच वदवितो आहे.

अध्याय चवथा

हनुमंताला रावणाच्या सभेतही सीता नेमकी कोठे आहे याचा शोध लागला नाही म्हणून तो अत्यंत दुःखी झाला. त्याला चिंता लागून राहिली. 'मी प्रयत्नांची शर्थ केली. संपूर्ण लंकापुरी आणि तिथले घर न् घर शोधले; विनोदवाटिका, आरामगृहे, नद, नद्या, विहिरी, पुष्करणी शोधल्या; प्रत्यक्ष राजकुमारांची मंदिरे, नर-नारींची शयनगृहे, रावणाच्या सभेमध्ये असे सर्वत्र शोधून पाहिले; सीता कुठेच आढळली नाही. तेव्हा निश्चितपणे सीता लंकेत नसावी, असेच त्याला वाटू लागले. 'मी माझ्या बुद्धीने सर्वत्र शोधले पण विधात्याने मला सिद्धी दिली नाही. मी गुह्यपणे एवढा शोध केला. लंकेत चार बोटेही जागा सोडली नाही तरी ती आढळली नाही. यावरून ती लंकेत नसावीच.' सीतेचा शोध लागला नाही म्हणून मारुतीला मोठी काळजी पडली. तो ओक्साबोक्सी रडू लागला. 'आता श्रीरामाला मी तोंड कसे दाखवू?' या दुःखात तो पडला.

https://archive.org/details/@sarayulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

हनुमंताला नंतर आणखी एक विचार सुचला. 'रावणाच्या हाती पडल्यावर सीतेने आपल्या योगसामर्थ्याने देहत्याग तर केला नसेल! रामबाणाच्या धाकाने रावण पळत असताना त्या घाईत सीता पडून तिचे तुकडे तर झाले नसतील. पळणाऱ्या रावणाने घट्ट आवळून धरल्यामुळे सीता कळ लागून मरण तर पावली नसेल. रावणापासून निसटून सीता समुद्रात पडली आणि तिला जलचरांनी खाऊन तर टाकली नाही ना! असा नाना प्रकारचा युक्तिवाद त्याने स्वतःशीच केला. परंतु हे सारे मी म्हणतो ते खोटेच असणार कारण संपातीने ती लंकेतच असल्याचे सांगितले आहे. त्याचे वचन खोटे ठरणार नाही. सीता लंकेतच आणली गेली आहे. मग त्या दुष्ट, नष्ट रावणाने तिला खाऊन टाकली असेल. कारण रावणाने तिला एकांतात नेल्यावर ती त्याला वश न झाल्याने रागावून त्याने तिला खाल्लीही असेल. तेव्हा आता तिचा शोध कसा लागणार! शिवाय रावणाच्या किती पत्न्या आहेत कोण जाणे. सुंदर सीता पाहून सर्वांच्या वर ती श्रेष्ठ सवत म्हणून येईल या कल्पनेने त्यांनी तिला खाल्ली असेल.' या प्रकारे हनुमंताने विचार केला आणि आता तिचा शोध लागणार नाही त्यामुळे आपले सर्व कष्ट वृथा झाले असे त्याला वाटले.

हनुमंताचे दुःखपूर्ण मनोगत

मारुतीचे डोळे अश्रूंनी भरले, तो दुःखाने गडबडा लोळू लागला. जानकीचा शोध लागला नसल्याने आपले कष्ट वाया गेले. "समुद्र उल्लंघिला, लंकेत शोध घेतला पण सीता चिद्रत्न सापडलेच नाही. माझे मोठेपण व्यर्थ झाले. मी राममुद्रा घेऊन आलो खरा, पण श्रीरामाची सीता सापडलीच नाही. आता श्रीरामाला आणि कपिश्रेष्ट सुग्रीवाला कसा भेटू? सीता मेली की मारली: का रामाच्या विरहाने ती मृत झाली; का तरळ भरून ती मेली; किंवा आत्यंतिक दुःखाने ती संपून गेली. सीता निःशेष संपली ही वार्ता रामापाशी नेली तर माझीच अपकीर्ती होईल. सीतापती श्रीराम भेटीच्या इच्छेने धरणे धरून बसला आहे. त्याने तिचे मरण ऐकले तर तोही आपले प्राण ठेवणार नाही. वेगाने समुद्र उल्लंघन करून ज्याने श्रीरामाला मरण देणारी शोधवार्ता आणली तो हा दुर्बुद्धीवानर अशी माझी संभावना होईल. हा सेवक नव्हे तर अधःपात करणारा आहे; हा आप्त नव्हे तर अत्यंत घातक आहे; कुशल नसून मंदबुद्धी आहे; हा मारुती श्रीरामाचा घात करणारा आहे. याने हा अनर्थ का केला की याच्यामुळे रघुनाथ गतप्राण झाला. याने कार्याचा पूर्ण नाश केला आहे. सीतेची ही वार्ता मी सांगितली तर अपयश माझ्या माथी येणार आणि न सांगता राहिलो तरी माझ्या माथी दोष येणारच. जो सेवक स्वामीपाशी सर्व गोष्टी न सांगेल तर तो कपटी ठरेल; सृष्टीत दोषी ठरून, नरकात जाईल. जसे तसे श्रीगुरूला इत्थंभूत मनातले सर्व सांगावे. असा विश्वास जिथे नसेल त्या नराला नरकवास मिळणार. श्रीगुरूला मनातले सांगितले, संकल्प-विकल्प मनातून मोकळेपणाने मुक्त केले पाहिजेत; हा विश्वास ज्याला नसेल त्याला नरकात जावे लागेल. सांगावे तर मोठा अनर्थ होणार; न सांगावे तर नरकाची प्राप्ती होणार" या विचारांच्या द्वंद्वात सापडलेल्या मारुतीला कोणताच उपाय सापडला नाही त्यामुळे तो चिंताग्रस्त झाला. समुद्राचे उल्लंघन करून मला लंकेत आणले. इथे सीतेचा शोध लागला नाही; तेव्हा पुढे काय करायचे याची मारुतीला विवंचना पडली. आता मी इथे राहण्याने की किष्किंधेला जाण्याने कल्याण होईल याची त्याला चिंता पडली.

विचारग्रस्त मारुती-श्रीरामाचा धावा

मारुतीने विचार केला की, "आपण किष्किंधेला परत गेलो आणि सीतेच्या मृत्यूविषयी सांगितले तर श्रीराम प्राण सोडील. लक्ष्मणही तत्काळ जाईल. राम आणि लक्ष्मण हे दोघे

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

वारल्याचे ऐकून भरत प्राण सोडील. त्याच्या पाठोपाठ शत्रुघ्न जाईल. आपल्या पुत्रांचे निधन ऐकून त्यांच्या तिन्ही माता, त्यांचे प्रधान, अयोध्येचे जन हेही प्राणत्याग करतील. श्रीरामाचे मरण पाहून सुग्रीव, अंगद, वानरगण दुःखाने मरतील. त्यांच्या नंतर तारा, रुमा ह्या प्राण सोडतील. पुढे नळ, नीळ, जांबुवंत, वानरवीर हे सर्व राम, सुग्रीव यांच्या जाण्याने दुःखी होऊन कडेलोट करून घेतील. थोडक्यात मी तेथे जाताच सूर्यवंशाचे निःसंतान होईल आणि वानरवंश शून्यवत् होईल. हा माझा कसला पुरुषार्थ! बरे, मी इथेच राहिलो तर जो श्रीराम माझा परमधर्म त्याची प्रतारणा केली असे होईल. श्रीरघुनाथाची उपेक्षा मी कशी करावी. याने माझ्या कपाळी गुरूच्या फसवणुकीचा दोष येईल. श्रीरामाची उपेक्षा करून मी तिकडे गेलोच नाही तर पृथ्वीचा दोष माझ्या माथी येईल; मी अधःपाताला जाईन." हनुमंताला विचारांनी भंडावले. किष्किंधेला गेल्याने अनर्थ आणि लंकेत राहिल्याने दोष यामुळे त्याला सुचनेसे झाले, काय करावे याचा निर्णय करता येईना.

"मी जर स्वतःच्या विचाराने सीतेच्या शोधासाठी राहिलो, तर माझाच शोध घेण्याचे संकट श्रीरामावर येईल. माझ्या शोधाच्या कारणासाठी अथांग आणि अपार समुद्राचे उड्डाण कोण करणार? श्रीराम आणि सुग्रीव यांना तो पेच पडणार. माझे इथे राहणे व्यर्थ आहे. या संकटातून सुटका करण्यासाठी प्राण द्यावा म्हटले तर मला मरणही येणार नाही. कारण, मला अग्नी जाळू शकत नाही; वारा मारू शकत नाही; पर्वतावरून पडावे तर ते माझे नित्याचे उड्डाण होणार; पाणी मला बुडवू शकत नाही; म्हणजे मरायचे म्हटले तर मरणही येणार नाही. एवढा मी वज्रदेही वीर पण सीतेच्या शोधापायी करंटा ठरलो. हाय हाय मला मरणही येत नाही." असे म्हणत मारुती जमिनीवर पडून धाय मोकलून रडू लागला. "माझे हे दुस्तर संकट सांगू तरी कोणाला? हा माझा आकांत ऐकून श्रीरामा तूच आता धाव आणि मला पाव. कृपाळू श्रीरामा माझी उपेक्षा करू नको." भक्तिभावाने त्याने श्रीरामाचे स्मरण केल्यावर, चिंता दूर झाली. मग आनंदाने आणि उत्साहाने सीतेच्या शोधाला तो तयार झाला. "सीतेचा शोध घेताना इंद्रजित, कुंभकर्ण यांच्यासह रावणाचा आणि सर्व राक्षसांचा मी नाश करीन."अशा निश्चयापर्यंत मारुती आला.

"रावणाला जिवंत स्थितीत शेपटीत बांधून, श्रीरामापाशी नेईन. तो रामच त्याला सीतेविषयी विचारेल. एखाद्या रंडकीसारखा मी लंकेत का रडत राहू. स्वामी श्रीराम माझ्या शिरावर आशीर्वादाचा हात ठेवून आहे; श्रीराम भक्तांचा साहाय्यकर्ता आहे." आपल्याला श्रीपतीच साहाय्य आहे असा उत्साह त्याला वाटला आणि मारुती पुन्हा सीतेच्या शोधाच्या कार्याला प्रवृत्त झाला. आळस आणि संभ्रम सोडून, विषयाची विषकामता सोडून प्रयत्न केला तर परम परब्रह्मही आवाक्यात येते. काळजी-पूर्वक नेमका प्रयत्न केला तर आपण वैकुंठाचा रहिवास मिळवू शकतो. आपण शेषशायी नारायणही होतो. आपण कसून प्रयत्न तेवढा केला पाहिजे. मनाने प्रयत्न केला तर परम सुख मिळते. मी तर रामाचा सेवक आहे तेव्हा सीता निश्चित शोधीन." असा हनुमंताच्या चित्ताला उत्साह वाटला. त्याने आळस सोडून, विकल्प-विचारांचा त्याग करून, साक्षेपाने शोधकार्य सुरू केले. श्रीरामाचे बळ घेऊन त्याने शोधाचा विचार केला. सर्व लंका शोधून जे जे स्थान राहले त्याचा त्याने विचार केला. रावणाचे जे शयनमंदिर तेथे प्रवेश करण्याच्या तो प्रयत्नाला लागला. "श्रीरामा मी तुला अनन्यभावाने शरण आहे; लक्ष्मणा तुला माझे वंदन. जानकीला लोटांगण. तुम्ही मला दर्शन द्या. हे जानकी, मी तुझा तान्हा बाळ आहे. मला श्रीरामाने पाठविले आहे. वासराच्या भेटीसाठी धेनू धाव घेते, तशी तू मला भेट दे. तू श्रीरामाची शक्ती असून,

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Research Academy, Gangotri

तुझ्यामुळे मला चिरंतन गती मिळेल." एवढे बोलून मारुतीने दंडवत घातले आणि श्रीरघुनाथाला मनोमनवंदन करून जानकीच्या शोधाला निघाला.

रावणाच्या मंदिरात मारुतीचा प्रवेश

सीतेचा शोध घेण्यासाठी हनुमंताने सूक्ष्म रूप धारण करून रावणाच्या मंदिरात प्रवेश केला. तेथे रावणाच्या घरी एकावर एक एकवीस मजले होते. ठिकठिकाणी गोपुरे होती. त्यावर हेरांचा जागता पहारा होता. शेंदरी, पांढरे, पिवळे, चतुर्दंत हत्ती गर्जत होते. सैनिकांचे गट सर्वत्र जागत, ललकारत होते. अश्व, गज, सैनिक, सेनापती हे सारे राजगृहात नित्य जागत असत. तेथे अपार शस्त्रे होती. ढोल, दमामे, शंख, किंकाट्या, या वाद्यांचा गजर चालू असे. सावधपणे आणि शोधक दृष्टीने हेर गस्त घालत असत. ते एकमेकांना आळीपाळीने मोठमोठ्याने हाका घालून, परस्परांना सावधान करत. निशाणे, भेरी यांचा गडगडाट राजद्वारात होई आणि इतरही वाद्यांचा गजर चालू असे. सात खणांमधे सर्वत्र सैनिकांची गर्दी होती. तिथे वाऱ्यालाही वाट मिळणे अवघड व्हावे अशी तेथे बंदिस्त व्यवस्था होती. अशातच मारुती गुप्तपणे, युक्तीने सीतेचा शोध घेत होता. जेव्हा रावणाच्या पत्न्या मेण्यात बसून जात तेव्हा मारुती युक्तीने गुप्तपणे त्यांच्या घुंगटात शिरून सीतेचा शोध घेत होता. अश्वशाळा, गजशाळा, शस्त्रशाळा, पानशाळा, चित्रशाळा, पाठशाळा, स्नानशाळा, गायनशाळा, शाकशाळा, पाकशाळा, टांकशाळा, कर्मशाळा, लतामृगशाळा, रत्नशाळा, धर्मशाळा, बावन्न चंदनइंधनशाळा, यंत्र-तंत्रशाळा, रंगशाळा अशा ठिकाणी मारुतीने गुप्त राहून शोध केला. शिवाय नाना वातायने, विताने, गोपुरे अशा अनेक स्थळांमधे त्याने शोध घेतला. या पद्धतीने सर्व बाह्य भाग शोधल्यावर हनुमंत रावणाच्या शयनगृहात गेला. त्याने कामग विमानही तपासले.

रावणाचे शयनगृह दहा योजने विस्तीर्ण, त्याच प्रमाणात रुंदी असलेले असे होते. त्या गृहाच्या भिंती रत्नजडित सोन्याच्या होत्या. जमीन घोटीव पाचूंची होती. सर्वत्र सूर्यप्रकाशाप्रमाणे उजेड देणाऱ्या ज्योती रत्नदीपांमध्ये तेवत होत्या. मोत्यांच्या माळा गुंफून खिडक्यांवर लटकावल्या होत्या. सोन्याच्या मंचकाला माणके जडवून, मोती गुंफलेल्या सोन्याच्या माळा त्यावर सोडल्या होत्या. सोनसाखळ्या असलेले छत शोभत होते. सर्वत्र सुगंध दरवळत असून, वसंतातला काम उद्दीपक वारा वाहात होता. छतावर असलेल्या खिडकीतून येणारा सुगंधी सुवासिक वारा त्या ठिकाणी असलेल्या कामग या देदीप्यमान, तेजस्वी विमानातून येत होता. हे विमान ब्रह्मदेवासाठी विश्वकर्म्याने सिद्ध केले होते. त्यामधे बसून ब्रह्मदेव सुखाने संचार करत असे. या विमानासाठीच कुबेराने एका पायाच्या अंगठ्यावर राहून आणि एकाग्रतेने, निराहार राहून तप केले होते. शतकानुशतके हे तप केल्यावर ब्रह्मदेव प्रसन्न झाला आणि त्याने कुबेराला आनंदाने ते विमान दिले. कुबेर ते कामग विमान घेऊन चैत्रवन, तपोवन, नंदनवन अशा ठिकाणी सुखात हिंडत होता. हे रावणाने पाहिल्यावर बंधुभाव सोडून, त्याने कुबेराशी युद्ध करून, विमान हिरावून घेतले. तेच विमान आता रावणाच्या भुवनात असून त्यात बसून रावण स्त्रियांबरोबर क्रीडा करत असे. त्या विमानाच्या शोभेला सीमा नव्हती. इंद्रनील मण्यांचे खांब, त्यावर महानील असल्याने विमानाची सुनील शोभा सर्वत्र पसरत होती. विमानाला मोत्यांच्या झालरी होत्या ठिकठिकाणी रत्ने जडविली होती. हनुमंत त्यावर चढला. तो सूक्ष्म रूपाने विमानात शिरून सीतेचा शोध घेऊ लागला.

रावणाचे मंदिर शोभिवंत होतेच. त्यामधे कामग विमानाने भर घातली होती. त्या विमानात रावणाच्या अनेक स्त्रिया विराजमान झाल्या होत्या. इंद्र, यम, वरुण यांच्या गृहांपेक्षा रावणाचे गृह अधिक शोभायमान होते. स्वर्गात राहणाऱ्यांपेक्षा आणि कुबेरापेक्षाही श्रेष्ठ वैभव रावणाच्या

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Trust and eGangotri

मंदिरात होते. नित्य नूतन आणि उपाय न करणारी संपत्ती रावणाकडे होती आणि त्याच्या शयनस्थानी दिव्ययोगिनी स्त्रिया होत्या. शुद्ध पद्मिनींच्या प्रकारातील जातिवंत स्त्रिया, असंख्य नागकन्या, देवकन्या, राजकन्या, सुरवरकन्या, गंधर्वांच्या नायिका, दैत्यदानवांच्या स्त्रिया अशा अनेक स्त्रिया रावणाने आणलेल्या होत्या. जी जी अपूर्व स्त्रीरत्ने आढळली ती ती रावणाने आपल्या सुखोपभोगासाठी आणली होती. अशा अनेक स्त्रियांचा रावणाने उपभोग घेतला. तशीच तो सीता घेऊन आला; परंतु ते त्याला जमले नाही आणि हनुमंताकडून तो अपमानित मात्र झाला. रावणाच्या शय्येशेजारी अनेक सुकुमार, अलंकृत, सुंदर स्त्रियांची रांगच लागली होती. असंख्य स्त्रिया नाना साधने हातात घेऊन, गीत गात, नृत्य करत रावणाची सेवा करत होत्या. भिन्न वयाच्या स्त्रिया, भिन्न भिन्न संगीत विषयक आणि नृत्य विषयक प्रकार सादर करत होत्या. त्यातल्या तरुण, कामासक्त स्त्रियांना पुरुषाची संगत लाभली नाही. त्यामुळे त्या दुःखी कामोन्मादी झाल्या. त्यांना कामपूर्ती न झाल्यामुळे रावणाच्या वैभवाचा धिःकार करावा असे वाटत होते. त्या गाढ आलिंगन देऊनही समाधान पावत नव्हत्या. मग एकमेकींना त्या सावध करत होत्या. उन्मादकारक अन्न खाणे, उन्मादक पेय-प्राशन, करत त्या एकमेकींशी रममाण होत राहिल्या. या प्रकारच्या मदाने विव्हळ झालेल्या असंख्य स्त्रिया रावणाच्या घरी होत्या. एखाद्या माळ्याने माळेत फुले गुंफावी तशा स्त्रियांच्या तेथे रांगा लागल्या होत्या. हनुमंत त्यांच्यामधे शिरून सीतेचा शोध घेत राहिला. त्या कामाचारी स्त्रियात सीता असणार नाही. त्या असंख्य स्त्रियांच्या गर्दीत सीता आढळली नाही म्हणून तो आणखी पुढे निघाला.

हनुमंत पुढे जात असता रावणाच्या रत्नखचित मंचकापाशी पोचला. त्या मंचकावर फुलांची शय्या तयार केलेली होती. रावण पहुडला म्हणून वाऱ्याचा सुस्वर आणि वसंतातील फुलांचा सुगंध तेथे निर्माण केला जाई. त्या मंचका-शेजारी मंदोदरी एकटीच निजलेली हनुमंताला दिसली. तिचे साजरे, शोभिवंत रूप पाहून हीच सीता असावी असे त्याला वाटले. श्रीरामाची पत्नी सीता आपल्याला सापडली या कल्पनेने उल्हसित होऊन तो नाचू लागला. "रावणाची कृती चांगली; पुष्पशय्येवर एकटी सीता असून, तिचा अभिलाष न धरता निष्पाप राखली आहे. सीता ही निरुपम पतिव्रता असून तिचा अभिलाषा धरली तर भस्म करील. रावणाचा परमधर्म आहे, म्हणून त्याने स्वधर्माने ती रक्षिली आहे. ती जागी झाली म्हणजे ती कपटी की रावण कपटी हे समजावे म्हणून मारुती मंचकाजवळ गुप्तपणे गुह्य गोष्टी ऐकायला थांबला. सभेमध्ये आलेल्या विघ्नाची शांती करण्यासाठी रावण उद्विग्न, भयभीत होऊन होम करायला गेला. सभेतले विघ्न आठवून रावणाला प्राणान्ताचे भय वाटून, त्या विघ्नाची शांती करण्यासाठी तो पश्चात्तापाने होम करू लागला. मंदोदरी ही एकटीच शय्येवर निजलेली पाहून तिलाच सीता समजून, हनुमंत रावण-मंदोदरी यांच्यातल्या गुह्य गोष्टी ऐकण्यासाठी आणि सीतेची भेट होण्यासाठी उत्सुक होऊन तिथे थांबला.

अध्याय पाचवा

रावणाच्या घरच्या विमानात शोधताना, हनुमंताला एका मंचकावर, एकांतातल्या खोलीत, रावणाच्या शय्येवर मंदोदरी निजलेली दिसली. ती निश्चित सीताच असणार असे हनुमंताला वाटले. टाणमाण, गुणलक्षण, रूपरेखा, यौवन यात ती सीतेच्या समसमान आणि अनुपम असल्याने तीच रामपत्नी, आपली स्वामिनी असे समजून हनुमंताला अत्यानंद झाला. त्या भरात दंड थोपटले, शेपटीचे चुंबन घेतले, प्रसन्न होऊन टाळ्या पिटल्या.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Research Academy, Gangotri

"जानकी भेटली. मी तिचा शोध लावला. आता संकट फिटले. रावण बापडा काय करणार? देवांकडे पाहून वाकुल्या दाखवत मारुती स्वानंदाने उड्या मारू लागला. "माझा स्वार्थ साधला. श्रीरघुनाथ माझ्यावर संतुष्ट होणार; वानरांचा अनर्थ टळला. सीतेचा शोध लागला हे ऐकून श्रीरामाला अत्यानंद होऊन तो मारुतीची पाट थोपटील या कल्पनेने मारुती संतुष्ट झाला. रावण होमाचे कार्य पूर्ण करून परत आला. त्याची मनःस्थिती त्यावेळी चिंताग्रस्त होती. विघ्नांच्या भयाने रावण ग्रासला असल्याने त्याने मंदोदरीला न जागे करता तो पहुडला. मंदोदरी रावणाच्या चाहुलीने जागी झाली. तिने सत्वर उठून रावणाच्या पायांना वंदन केले. नंतर सोन्याचे तस्त घेऊन तिने रावणाचे पाय धुतले. हे सर्व पाहून हनुमंताला अत्यंत राग आला.

मारुतीचा क्रोध

"माझ्या स्वामीची ही पत्नी लंकानाथ रावणाला अनुसरते आहे; हे काय मी मुकाट्याने पाहात राहू? छेः! आता मी त्या दोघांचाही घात करतो. रावणाची दहा शिरे आणि सीतेचे डोके अशी अकरा डोकी नखांनी खुडून रघुनाथाच्या भेटीला घेऊन जातो. सीता रावणाला वश झाली म्हणून मी त्या दोघांना मारले म्हणून श्रीराम रागावला तर त्याच्या पायावर डोके ठेवीन. या दोघांना जिवंतच शेपटीत बांधून श्रीरामाकडे न्यावे. मग तोच स्वतःच्या बाणाने शासन करील असेही करता येईल. अथवा मंचकच शेपटीत बांधून किष्किंधेला न्यावा म्हणजे दोषी वा निर्दोषी हे श्रीरामच ठरवील. परंतु हे सर्व करण्यापूर्वी श्रीरामाने सांगितलेली खूण पाहून सीतेचे नाममहिमान पाहावे." मारुतीने सीता आहे या समजुतीने भिंतीला कान लावून पाहिला. पण तेथे रामनामस्मरण ऐकू आले नाही. "पापाणाला कान लावल्यामुळे नामोच्चार झाला नसावा; किंवा पतिव्रतेने पतीचा त्याग केल्याने तिथून नामशक्ती दूर झाली; कदाचित सीता अनाचारात रमली म्हणूनही नामोच्चार होत नसेल. तेव्हा आता हिचा जीवच घेतो" असे विचार करताना मारुतीचा राग अनावर झाला. तो रागाने थरथरू लागला, करकरा दात खाऊ लागला, डोळे गरगरा फिरवू लागला, रागाने त्याच्या शरीरावरचे रोम थरारले. रावणसह मंदोदरीचा (ती सीता समजून) वध करण्यासाठी त्याने आपल्या शेपटीची गुंडाळी केली आणि रागाने उठला. तेवढ्यात त्याच्या बुद्धीमुळे तो काहीसा शांत झाला. कारण त्याने सुलोचनेचे भाषण ऐकल्याने इंद्रजित वाचला होता. तसेच या वेळीही दोघांचे बोलणे ऐकून, त्यावर विचार करून, मगच कार्य करावे असा त्याने निर्णय केला. हनुमंताला त्याच्या बुद्धीने राग आवरण्यास भाग पाडले. तो बुद्धिमंत होताच. त्यामुळे जेव्हा दुर्धर कोप येतो त्यावेळीही ज्याची विचारशक्ती लोप पावत नाही तो स्वर्ग मिळवणारा होतो. तोच परम धैर्यवान ठरतो. राग आल्यावेळीही जो सावधान असतो तो अवतारी पुरुप असल्याचे ते चिन्ह असते. त्यालाच ब्रह्मज्ञान प्राप्त होते आणि तो जगाला पवित्र करतो. लोभ हे रागाचे कारण असते; पण हनुमंताला लोभ नव्हता. यामुळे रघुनंदनाच्या गुरूकृपेने मारुती रागामध्येही सावध राहिला.

मंदोदरी-रावण यांचा संवाद

हनुमंताने राग आवरून दोघांचे बोलणे ऐकण्याचे ठरविले आणि तो गुप्तपणे सावधान होऊन राहिला. मंदोदरी रावणाला म्हणाली, "आताच मी एक वाईट स्वप्न पाहिले. त्या स्वप्नाने मी अत्यंत भयग्रस्त झाले. ते स्वप्न ऐका. पडलंकेत क्रौंचाचा वध करून एक पुरुप अशोकवनात रामाच्या पत्नीचा शोध घ्यायला गेला आहे. लंकेमध्ये त्रिविध शोक निर्माण झाला आहे. पुत्रशोक, पतीचा अपमान, नगरीचे दहन, असा

https://archive.org/details/muthulakshmiacademy
Bhavan Vani Trust, Lucknow

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

सर्वत्र आकांत सुरू झाला आहे. अशोकवनात प्रवेश करून त्याने सीतेशी आप्तभावाने संवाद केला. तेथील वनरक्षकांना त्याने मारून, समुद्रात फेकले आहे. अशोकवनाचा नाश करून, जंबुमाळीला मारले आहे. राक्षसपुत्रांची होळी केली असून अखयाचा घात केला आहे. सैन्याचा नाश झाल्यावर इंद्रजित युद्धाला गेला, तोही भयाने पडला. त्याला ब्रह्मयाने बांधून आणला. त्याने रागाने शेपटी पेटवून तुमच्या दाढी-मिशा जाळल्या. असे त्याने कंदन केले. मग लंका भडभडा जाळत, नगराला वेढा घातला असून कोणाला तो मागे-पुढे हलू देत नाही. या प्रकारे चौफेर आकांत झाला असलेला मी स्वप्नात पाहिला. हे दुष्ट स्वप्न पाहून मी गडबडून उठले. मनात भयंकर भीती वाटते आहे. झोप उडाली म्हणून मग मी पाय धुवून, पाणी पिऊन सदाशिवाचे स्मरण करून डाव्या कुशीवर झोपले. त्या नंतर आणखी एक दुष्ट स्वप्न मी पाहिले. त्यामध्ये असे दिसले की, शिळा बांधून सागरावरून नर-वानर लंकेत आले असून ते राक्षसांचा नाश करत आहेत. इंद्रजित आणि कुंभकर्ण या दोघांना दोघांनी मारले. तुमची शिरे रामबाणाने तुटून ती गिधाडांपुढे पडली आहेत. रणात दशानन पडला; माझी काकणे तुटली. हे पाहून मी आक्रंदून रडू लागले आणि लगेच जागी झाले." एवढे बोलून मंदोदरी रावणाच्या समोर बसली आणि एकाएकी ओरडू लागली की, "लंकेत बोंब उठली की लंकानाथ युद्धात मारला गेला," हे म्हणत ती मोठमोठ्याने रडू-ओरडू लागली. तेव्हा रावणही गडबडला. त्याने तिचा हात धरून म्हटले, "मी तर हा इथे जिवंत आहे. तू उगीच का तळमळते आहेस."

मंदोदरी पूर्ण जागी झाली आणि रावणाला म्हणाली, "लंकानाथ, सावध व्हा. माझे स्वप्न खोटे होत नाही. अशोकवनात राहणारी सीता तुमचा घात करील. श्रीरामाशी सख्य करून त्याची सीता त्याला आनंदाने परत करा. त्यामुळे तुमचे आणि राक्षसकुळाचे कल्याण होईल. मी तर तुमची दासी आहे म्हणून तुमचे पाय धरून सांगते, सीता रामाला दिलीत तर आपल्याला भुक्ती-मुक्ती प्राप्त होईल." इकडे हनुमंताला सीता अशोकवनात असल्याचे ऐकून आनंद झाला. त्याचा हर्ष त्रिभुवनात मावेना. त्याला श्रीरामाच्या पत्नीचा शोध लागला. सीता अशोकवनात आहे एवढे समजल्यावर ते अशोकवन कोठे आहे हे ऐकण्यासाठी तो तसाच गुप्त राहून सावधपणे ऐकू लागला. जानकीचे नाव ऐकताच रावणाची कामवासना उचंबळली. अशोकवनात जाऊन आताच सीतेचा उपभोग घ्यावा असे त्याच्या मनात आले. रावणाला मग सभेतले विघ्न, मंदोदरीचे स्वप्न यांचा विसर पडला. सीतेच्या संभोगासाठी तो कामवासना धरून उद्विग्न झाला.

रावण स्वतःशीच विचार करू लागला की, "सहा महिने मी जनककन्येला अशोकवनात कशाला ठेवली? आता स्वतःच्या बळावर मी त्या रामपत्नीचा उपभोग घेतो." सीतेविषयीच्या कामवासनेने रावण भारावला; त्याला आपल्या स्वार्थाचा, हित-अहिताचा पूर्ण विसर पडला. नंतर तो सीतेविषयीच्याच चिंतनात मग्न झाला. त्याच्या तोंडी नित्य सीतेचेच नाव येऊ लागले; त्याचेच तो नित्य स्मरण करू लागला आणि त्याच्या ध्यानी-मनी जानकीच राहिली. कामुक विचारांनी सीतेचे स्मरण केल्यानेही रावणाचे पाप धुवून गेले. रामभक्तांना त्यामुळे सामर्थ्य येते आणि त्यानेच रघुनाथाची भेट होते. रावणाची सकाम वृत्ती पाहून मंदोदरीने नमन करून ह्याला सीता रघुनाथाला अर्पण करण्याविषयी नमनपूर्वक विनविले. परंतु सीता रामाला अर्पण करावी हा विचार रावणाला मान्य झाला नाही. मंदोदरीला रावणाच्या मनातला भाव समजला आणि तीच स्वहिताचा विचार करू लागली. "मीच स्वतः इंद्रजित, कुंभकर्ण आणि प्रधान यांच्यासह जाऊन सीता श्रीरामाला अर्पण

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

करीन. सीतेविषयीच्या कामभावनेने वेडावलेला असल्याने रावणाला काही सांगण्यात अर्थ नाही. मीच सीता श्रीरामाला अर्पण केली म्हणजे मला श्रीरामाची जोड मिळून संसाराचे संकट दूर होईल. रघुनंदनाशी सख्य केल्याने विघ्न ने अविघ्न होऊन, चित्त चैतन्यघन होऊन, दुःख नाहीसे होऊन संपूर्ण सुख प्राप्त होईल. श्रेष्ठ सुख हेच मरण; मरताना श्रीरामाच्या चरणांचे स्मरण केल्याने मरण हेच पूर्ण ब्रह्म होते; असा श्रीराम हा सुखरूप मेघ आहे. तर मी आता श्रीरघुनाथाला शरण जाईन, आणि सीता स्वतःच श्रीरामाला अर्पण करीन. त्यामुळे लंकानाथाचेही कल्याण होईल.''

रावण मंदोदरीच्या विचाराने अस्वस्थ

रावणाने मंदोदरीचे विचार ऐकले आणि तो अत्यंत अस्वस्थ झाला. त्याच्या मनात आले की, ''माझी ही प्रिया नव्हे तर ती एक विघ्नच आहे. ही सीतेला माझ्यापासून दूर करू पाहते आहे. मंदोदरीने खरोखर आज्ञा केली तर इंद्रजित, कुंभकर्ण किंवा प्रधानमंडळ त्या आज्ञेचे उल्लंघन करणार नाहीत. मंदोदरीने सांगितलेले कार्य मला न विचारताही ते पूर्ण करतील.'' मंदोदरीने सीता दूर नेली तर रावणाला अत्यंत दुःख होणार. त्यामुळे रावण खवळला. मंदोदरीला फसविण्यासाठी त्याने युक्ती करायचे ठरविले. तो म्हणाला, ''आलेली सर्व विघ्ने निवारण्यासाठी आणि श्रीरघुनाथाला अनुसरण्यासाठी आपण प्रथम शंकराची पूजा करू या. तो सदाशिव आपले कुलदैवतच आहे. त्या सदाशिवाच्या आज्ञेप्रमाणे श्रीरामाला सीता अर्पण करू या.'' असे कपटयुक्त भाषण रावणाने केले आणि मंदोदरीला अन्य कामात गुंतवले. रावणाने श्रीशंकराची खरेच पूजा केली. ते पाहून मंदोदरीला आनंद झाला. परंतु रावणाच्या मनात वेगळाच विचार होता. त्याने एका विश्वासू दूतीला बोलावून घेतले आणि तिला एक गुप्त संदेश दिला. ''तू अशोकवनात तातडीने शरमा आणि त्रिजटा यांच्याकडे जाऊन त्यांना सांग की सीतेला सोडू नका. माझा आवडता पुत्र इंद्रजित, माझा बंधू कुंभकर्ण, माझी आवडती आणि पतिव्रता मंदोदरी, थोर असलेला प्रधान किंवा मला पूज्य असलेले सन्मान्य भट, जोशी, विद्वान लोक यांपैकी कोणीही सीतेला सोडण्याविषयी सांगितले तरी तुम्ही सीतेला सोडू नका. नाही तर मी तुमचा घात करीन, तुम्हाला जिवानिशी मारीन, तुमचे प्राण घेईन, स्वर्गातले देव, स्वतः ब्रह्मदेव, कोणीही आले तरी सीतेला सोडायची नाही ही माझी आज्ञा आहे.'' रावणाचे हे वचन ऐकून तो गुप्त संदेश घेऊन दूतिका लगेच अशोकवनाकडे सावधपणे निघाली.

मारुतीकडून पाठलाग-त्याला सीतादर्शन

रावणाची आज्ञा घेऊन दूतिका लगबगीने अशोकवनाकडे निघाली. हनुमानही तिच्या मागोमाग निघाला. श्रीरामाने कृपा केली आणि विना सायास त्याला सीतेचा शोध लागला, याचा त्याला अत्यानंद झाला. मारुती आनंदाने नाचत, बागडत दासीच्या मागून जात होता आणि श्रीशंकराने कृपा केली असे मानून तो अपार हर्षामुळे अनेक गोष्टी करत होता. स्वतःच स्वतःला वेडावत होता, स्वतःलाच गुदगुल्या करत होता आणि ''माझी सीतामाउली मला अनायासे भेटली. मंदोदरीशी रावणाने कपट केले; पण श्रीरामकृपेने मला सीतामाता भेटली. रावणाने हा माझ्यावर उपकारच केला. दुस्तर अशा शोधामुळेही न भेटणारी सीता अनायासे भेटली.'' असा विचार करत मारुती दूतिकेच्या मागून गेला. त्याला साजिरे अशोकवन दिसले. श्रीरामाची पत्नी सीता ही शोकस्थानी नसून अशोकवनात आहे हे सत्य त्याला आढळले. अशोकवनाची गती सोडून आपण शोकामध्ये सीतेला शोधले; पण ती अशोकवनातच असणार हेच खरे आणि योग्य आहे हे त्याला उमगले. सीतेच्या चरणी, दर्शनी, डोळ्यात, स्मरणात

https://archive.org/details/muktabodhaiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

अशोकच असणार हेच सत्य आहे असे त्याला मान्य झाले. सीतेच्या अंगठ्यात, पोटात, अशोकच असणार; सीतेच्या पोटात अशोक असल्यामुळे सृष्टी शोकरहित झाली. रावणाने हरण करून आणल्यावर तिने केलेला शोक दिसला नाही म्हणून रावणाने तिला अशोकवनात ठेवले. सीता अशोकच आहे. अशोकाची वस्ती झाल्याने शोकाची शांती झाली म्हणून याला अशोकवन नाव असावे असे मारुतीला वाटले.

हनुमंत अत्यंत आनंदाने अशोकवनात शिरला. तेथे सीतेला पाहून तो हर्षभरित झाला आणि त्याने लोटांगण घातले. पाषाण रामनाम स्मरण करत आहेत; अणू-रेणू तृण, सर्व रामनाम जपताहेत, वृक्षांची पाने वाऱ्यामुळे हलताना रामनामाने दुमदुमत आहेत, पृथ्वी रामनाम स्मरते आहे, यावरून हीच श्रीरामपत्नी सीता आहे अशी त्याची खात्री झाली. तेथे आचमन केले तर ते जल श्रीरामामुळे स्वादिष्ट झाले आहे; वाऱ्याला मंद सुगंध येतो आहे सर्वत्र रामनामच आहे हे त्याला मान्य झाले. रामनामाने आकाश गर्जत आहे; सावधपणे पाहता हीच सीता आहे हे सत्य मारुतीला पटले. कारण, जेथे हरिभक्तांची वस्ती, तेथे रामनाम पंचभूतात कोंदते. रामनामाने भरून गेल्याने अखिल सृष्टीत रामनामस्मरण होते आणि त्यावरून हीच सीता असणार हे मारुतीला जाणवले. श्रीरामाने सांगितलेली खूण त्याला पटली.

अध्याय सहावा

श्रीरामाची भक्ती करण्यात सीता श्रेष्ठ होती. त्यामुळे तृण, पाषाण हेही नामोच्चार गर्जत होते. नामाने त्रिजगते कोंदली गेली. सीता रामाची परम भक्ती स्वतः करताना कशी स्थिती होई हे पाहण्याने भक्तीची युक्ती समजते. हृदयात श्रीरघुपती हा आत्मा, याची वेदशास्त्रातली व्युत्पत्ती अशी की ही आत्मानुभवाची प्रचीती होती आणि तिला भजनभक्ती हे नाव आहे. चित्तात ही भक्ती असेल तर सर्वांभूती श्रीराम दिसेल. या भजनस्थितीचा वेदांनी या दृष्टीने निश्चय केला आहे. या स्थितीत केलेला उच्चार म्हणजे निश्चित वाचिक भजन होय. श्रीराम ही अक्षरे अ-क्षर असल्याने नामोच्चार श्रीरामच होतो. श्री राम जय राम ही अक्षरे क्षराक्षराच्या पलीकडे असून, ती शंकराने भवानीला आदराने सांगितली. याच स्थितीत श्रवण केल्यास श्रीराम हाच पूर्ण अक्षरार्थ त्यातून दिसतो. हे श्रवणाचे भजन श्रीरघुनंदनानेच सांगितले. 'श्रीराम' हीच रसांना स्वाद देणारी आणि जिभेला रसज्ञता देणारी अक्षरे आहेत. त्यांच्यामुळेच रसभोग भोगता येऊन श्रीरघुनाथाचे भजन होते. याच प्रकारे नाकाला श्रीरामनामाने सुगंध जाणवतो. तो श्रीरामच जीवन असून, तो सर्वज्ञच नाकाचे भजन आहे. त्वचेचा स्पर्श तेथे श्रीरामच त्वचा असल्याने पूर्ण श्रीरामच त्वचेचे सबाह्य भजन ठरतो. मनाचे आत्मभान श्रीराम; चित्ताचे चैतन्य श्रीराम, बुद्धीचे समाधान श्रीराम, विवेकाने सज्ञान करणारा श्रीराम अशी ती भजनस्थिती असते. अहम्-सोहम्-कोहम् या पलीकडे स्वभावतः श्रीराम वसतो. अशा अनन्य भावाने सीता श्रीरघुनाथाची भक्ती करते. श्रीराम हा गतीची गती, सीतेची आत्मशक्ती, सर्वांभूती सबाह्य असून जानकी त्याची स्थिती आहे.

श्रीरामाच्या अशा भजनभक्तीच्या तुलनेत रावणाचे बापडे भय ते काय असणार? तो रावण सीतेपुढे येऊच शकत नाही. सीताही खोटेच रडते. श्रीराम आणि सीता यांचे ऐक्य असल्याने सीता रामावेगळी नाहीच. तसेच सीतेवेगळा श्रीराम नसून, तो सर्वथा दूर होणार नाही. अशी सीता श्रीरामाची भक्ती करते हे हनुमंताला समूळ समजले. श्रीरघुनाथ भक्तांचे रक्षण करतो हेही त्याला कळून आले. मंदोदरीलाच सीता मानून ती रावणाला वश झाली या रागाने मारुतीने दोघांचा घात केला असता; परंतु रामाने तो अनर्थ चुकवला. आपण केवळ

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

उन्मत्त वानर असून, संमूळ विचार न करता दोघांचा घात करणार होतो पण श्रीरामाने त्या अनर्थातून सोडविले. मंदोदरी सीताच असल्याचे मारुतीला जाणवले कारण ती विष्णुसंभूता आहे.

मंदोदरीची जीवनकथा - रावणमाता कैकसी

रावणाची माता कैकसी ही पांच धान्यांचे पीठ करून, पांच मुखे असणाऱ्या शंकराची म्हणून शिवलिंगाची नित्य पूजा करत असे. पाच पिठांचे शिवलिंग हाच पंचानन शिव मानून ती नेमाने पूजा करत असे. त्यातून आपले पुत्र अक्षय व्हावे हे तिचे सूत्र होते. एका शिवरात्रीला समुद्रतीरावर जाऊन, शिवलिंग तयार करून कैकसी षोडश उपचार पूजा करत होती. तिने त्यावर त्रिपर्ण बेलाची लाखोली वाहून अनुपम महापूजा केली. एकेक बेलपत्र शिवनाम घेत वाहून तिने भक्तिभावाने श्रीशंकराची मनोहर पूजा केली. यावेळी तिने दोन्ही डोळे लावून ध्यान सुरू केले. त्या प्रसंगी वेगळेच काही घडले. राक्षसांचा द्वेष करणाऱ्या इंद्राने ते शिवलिंग समुद्रात टाकून दिले. सागराने ते लिंग भग्न होऊ दिले नाही, उलट त्या लिंगाची हाटकेश्वराला स्थापना केली. त्या हाटकेश्वरात अजूनही पूजा होते आणि गोमतीसमुद्राच्या प्रवाहात बेल असल्याचे शिवरात्रीला अनेकांनी पाहिले आहे. नंतर कैकसीने जेव्हा डोळे उघडले तेव्हा तिला पूजेतल्या लिंगाला हानी पोचली असल्याचे आढळले. हे विघ्न आता पुत्र, पौत्र (नातवंडे) अशा सर्व संतानाचा नाश करील. या दुःखाने कैकसी मोठमोठ्याने रडू लागली. "माझी देवपूजा चोरांनी नेली. त्या रावणाचे थोर राज्य काय कामाचे. संसारात हे काय घडते आहे." असे ती रडत-ओरडत होती.

रावण मातेचे रडणे ऐकून, धावून आला. त्याला माता म्हणाली. "अरे माझ्या पूजेतील शिवलिंग संकटात सापडले असताना कशाला तोंड दाखवतोस? जर लिंगाचे विसर्जन केले नाही; उलट तेच संकटात सापडले तर मोठा अनर्थ होतो. संताने मरून निःसंतान होते; असे शैवागमातले शिवाचे वचन आहे." यावर रावण म्हणाला, "माते, माझे बोलणे ऐक. सहा सूत्रांकडून रक्षण केले गेलेले रत्नलिंग आहे, त्याचे तू पूजन कर." त्यावर कैकसी म्हणाली, "अनेक प्रकारे त्या लिंगाची थोरवी आगमशास्त्रात सांगितली आहे. ही कैकसी लिंगाला हात लावणार नाही. मी अनाचार करणार नाही. माझे ते लिंग मिळाले नाही तर मी दुसऱ्या लिंगाचा स्वीकार करणार नाही. अरे, शैवदीक्षा अशी आहे की ते लिंग हाती आले नाही तर प्राणत्याग करावा. आजवरचा शैवमार्ग असा आहे की, दुसऱ्या लिंगाचा मार्ग सोडून लिंगपूजा करण्यासाठी प्राणपणाने झटावे."

रावण कैलासाला जातो

रावणाने मातेला म्हटले, "माझी विनंती ऐक. माते, तू व्यर्थ प्राणत्याग करू नकोस. मी शिवाकडे जाऊन तुझे पूजनीय लिंग तुला आणून देईन. शिव हा माझा स्वामी आहे हे तर तत्त्वतः तू जाणतेस. त्या विश्वनाथाला प्रसन्न करून, तुझे लिंग तुला आणून देईन." यावर कैकसीने म्हटले, "रावणा, मला नारदाने सांगितले आहे की शिवाजवळ आत्मलिंग आहे. ते जर तू आणलेस तरच मी धन्य होईन." हे मातेचे बोलणे ऐकून रावण तातडीने शिवाकडे जाण्यासाठी निघाला. शिवाकडे स्वतः जाऊन त्याने शिवाला साष्टांग नमन केले. रावण जवळ आला तरी शिवाने त्याला 'तू का आला आहेस?' असे विचारले नाही की त्याच्या उदासीनपणाविषयी विचारणा केली नाही. वास्तविक बाण आणि रावण हे शिवाचे अत्यंत प्रिय होते. त्यांचे वचन अणुभरही शिव टाळत नसे. त्याच रावणाला यावेळी शिवाने काहीच विचारले नाही. रावणाला यामुळे थोर चिंता वाटली. "आता मी काय करू?" अशा विचारात रावण पडला. जो भक्त निष्काम भावनेने येतो, त्याला शिव प्रसन्न

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

होतो. तोच भक्त सकाम भावनेने आला तर शिव त्याच्याकडे लक्ष देत नाही. रावणाने शिवाची पत्नी जगन्माता पार्वती पाहिली. त्याच्या मनात विचार आला की हीच आपण श्रीशिवाकडे मागावी. रावण दोन प्रहर उभा होता तरी श्रीसदाशिवाने त्याला प्रतिसाद दिला नाही. श्रीशंकर कुठे गुंतला असावा हे रावणाने आंतरदृष्टीने पाहिले. तेव्हा त्याला शृंगीच्या झणत्कारात आणि नादामध्ये श्रीशिव गुंतला असल्याचे समजले. हे जाणून घेतल्यावर रावणाने मनाशी काही एक निर्धार केला.

रावणाकडून मस्तक समर्पण, वरप्राप्ती

रावणाने आपले मस्तक कापून घेतले आणि त्याला शरीरातील शिरा लावून तो त्याची वीणा तयार करून, हातात घेऊन ती कौशल्याने वाजवू लागला. रावणाच्या वादनातले मधुर, मंजुळ आणि हळुवार स्वर ऐकून श्रीशंकर संतुष्ट झाला. रावणाला काही माग म्हणावे तर त्याचे मस्तकच तुटल्याने त्याला मागता येणार नाही हे जाणवल्याने श्रीशिवाच्या मनात कृपा निर्माण झाली. त्याने न मागताच वर दिला. "तू स्वतःचे मस्तक तोडून मला सुखी केले आहेस. तेव्हा तू दशशिरे असलेला होऊन तिन्ही लोकात शूर वीर होशील." नंतर ज्याच्या ध्वजावर बैलाचे चिन्ह आहे त्या श्रीशंकराने तातडीने शिरा काढून, तंतू तेथे लावले. श्रीशिवाच्या वराने रावणाला दहा शिरे आणि वीस हात फुटले. वर आणखी अमृत कुपी देऊन बलवानांमध्ये श्रेष्ठ पराक्रमी बनविले गेले. पुढे श्रीशंकर म्हणाला, "लंकानाथा, तुझ्या मनाला जे जे आवडेल ते ते आता मी तुला देईन." असे तो भोळा सदाशिव प्रसन्न होऊन म्हणाला. त्याला राक्षसाच्या मनातले ओळखता आले नाही. दुष्ट बुद्धीचा त्याला डोळसपणे थांग लागला नाही.

रावणाने "लावण्यराशी पार्वती मला स्वतःला भोगायला मिळावी आणि कैकसी मातेला आत्मलिंग द्यावे." अशी मागणी केली. त्याबरोबर श्रीशिवाची वर देतानाची उदारता आणि त्यावेळचा उत्साह मावळला. पुत्र मातेशी रतिभोग मागतो आहे हे पाहून तो संतापला. परंतु कितीही क्रोध आला तरी याला दिलेले वरदान पूर्ण न करावे तर आपल्या माथ्यावर असत्यता येईल या विचारामुळे धड 'नाही देत' म्हणणेही शक्य नाही. माता आणि पुत्र एकमेकांजवळ आनंदात असताना जर मातेकडे पुत्राने रतिभोग मागितला तर ती माता प्राणाच्या अन्ताने क्रोधाविष्ट होईल; तसेच यावेळी श्रीशिवाच्या चित्ताचे झाले. "गुरुपत्नी ही शिष्याची माता; तिचा अभिलाप शिष्याने धरला तर मातृगमनी होण्याचे पातक होते. यातून हा रावण कसा वाचणार?" पार्वतीला रावणाच्या हाती सोपविताना शिवाने "हिच्यामुळे तुला सर्वशांती मिळेल," असे म्हटले. परंतु या उद्‌गारामागील अर्थ न समजल्याने रावण उल्हसित झाला. श्रीशिव रावणाला म्हणाला, "हे आत्मलिंग तुझ्याकडे देताना अहोरात्र पवित्रता राखली पाहिजे. हे भूमीवर ठेवलेस तर ते तुला मिळणार नाही." चैतन्यज्योती आकर्षित करून, तेज आत्मशक्तीने एकत्र करून, ते आत्मलिंग श्रीशंकर नित्य पूजित असे. ते लिंग रावणाच्या हाती देताना, लिंग हातोहात जाईल; तिसऱ्या डोळ्यातली शक्ती क्षोभेल आणि रावणाला धडा शिकवील,

रावण पार्वती व आत्मलिंग घेऊन निघतो

रावण पार्वतीसह आत्मलिंग हातात घेऊन आनंदित होऊन लंकेकडे निघाला. रावणाला पाहून उमा दीन, हीन झाली. तिला चिंता वाटली. उमेने मग श्रीविष्णूचा धावा सुरू केला. "शिवाने मला रावणाच्या हाती सोपविले. आता माझी सुटका कशी होणार? हे विष्णो, मला सत्वर पाव. कृपाळा. पूर्वी ग्रहांनी गजेंद्राला गिळले होते त्यावेळी तू त्याला लगेच उद्धरले होतेस. आता रावणग्रस्त झालेल्या या

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

दीन उमेला सत्वर पाव. रामनाम घेतल्यावर कुंटिणीला वैकुंठात नेलेस; तशीच कृपादृष्टी हे दीनदयाळा, जगजेठी आताही माझ्यावर कर. महापातकांची रास असणाऱ्या अजामिळाला नामाने उद्धरून नेले. मी तर तुझीच दासी आहे. कृपा कर. शिवाला त्रस्त करणाऱ्या भस्मासुरापासून तूच तारलेस.'' ही उमेची विनवणी ऐकताच श्रीविष्णू त्वरेने धावून आला. ''श्रीशिवाची पत्नी ही तर माझी प्रिय माता. तिची अभिलाषा धरणाऱ्या रावणाला मी पुरता गांजीन. पार्वतीची सुटका करण्यात श्रीगणेश आणि कार्तिकेय यांना शिवाच्या वरदानामुळे अडचण येणार. कारण श्रीशिवाचा वर खोटा ठरेल. शिवाला क्रोध येईल. मी रावणाचे दात पाडून क्षणात मातेची सुटका करीन. शिवाचे वरदान खोटे झाले तर तो शिव क्रोधाने आमचा घात करील.'' नंतर पार्वतीला सोडविण्यासाठी श्रीविष्णू धावून आला. त्याला कार्तिककुमार आणि गणेश हे दोघे भेटले. त्यांनी एकमेकांना वृत्तान्त सांगितला. रावणाला छळण्यासाठी श्रीविष्णूने कुशल युक्ती योजिली. गणेशाला श्रीविष्णूने द्विजांच्या गाईंचे रक्षण करण्यासाठी गोपाल होण्यास सांगितले. स्वतः श्रीविष्णू धर्मऋषी झाला आणि कार्तिककुमाराला आपला शिष्य बनविले. ते जेव्हा उत्साहाने रावणाच्या समोर आले तेव्हा रावण उल्हसित झालेला दिसला. ''शिवाने पार्वतीला दिले आणि त्या कृपामूर्तीने आत्मलिंगही मला दिले आहे.'' असे रावणाने सांगितले. तेव्हा शिष्य झालेल्या कुमाराने त्याला म्हटले, ''आत्मलिंग ही खरी प्राप्ती आहे; पण ही काही उमा-पार्वती-नव्हे. शिवाने तुला फसविले आहे. स्वतःची पत्नी शिव दुसऱ्याला देणे शक्यच नाही. फसवले रे फसवले रावणा तुला. तू पार्वतीकडे पाहा तरी एकदा.''

रावण श्रीशिवाकडे, मंदोदरीचे निर्माण

रावणाने शिष्याच्या सांगण्याप्रमाणे पार्वतीकडे पाहिले तेव्हा पार्वती त्याला अत्यंत गलिच्छ रूपात दिसली. निंद्य, कुत्सित, हीन, दीन असे तिचे त्याला दर्शन झाले. पिचके, पाणी गळणारे डोळे, तोंडाभोवती घोंगावणाऱ्या माशा, नाक शेंबडाने लडवडलेले, तोंडाला दुर्गंधी, शरीर वाकडे झालेले अशी ती रावणाला दिसली. त्याला ओकारीच आली. श्रीविष्णूने अशा कौशल्याने फसवून रावणाची दुर्दशा केली. त्यावेळी ऋषीच्या रूपात असलेल्या विष्णूला रावण म्हणाला, 'माझ्या भाग्याने मला मिळालेली मूळ पार्वती आताच शिवाकडे जाऊन मागून आणतो.'' त्यावर श्रीविष्णू म्हणाला, ''शिवाने आपली दशा राखून तुला अवदसा दिली. हे लंकेशा हे त्रिवार सत्य मान. त्या महेशाला तू भोळा मानू नको. त्या उमापतीने उमेला लपवली आहे. त्याची खूण तुला सांगतो. शिवाच्या आसनाखालची लखलखीत पार्वती तू त्याच्याकडे माग.'' या सांगण्याप्रमाणे रावण अत्यंत आवेशाने श्रीशिवाकडे त्वरित गेला. त्यावेळी तत्परतापूर्वक कौशल्याने श्रीविष्णूने मंदोदरीची निर्मिती केली. रमेने केशराची उटी त्याच्या पोटावर-उदरावर-लावली होती. एक सुंदर स्त्री निर्माण करण्यासाठी हाताशी काहीच नव्हते. तेव्हा उदरावरची केशर, चंदन यांची उटी काढून, त्या मळीपासून सुंदर स्त्री निर्माण केली. तीच मंदोदरी. श्रीविष्णूच्या उदरावरची उटी आणि चंदनाचा सुगंध लाभलेली, विष्णूच्या मध्यांगातून जन्मलेली, ती स्त्री असल्याने, त्या हेतूमुळेच मंदोदरी हे तिचे नाव झाले. तिची कंबर मुठीत मावण्याएवढी होती; तिच्या पोटी विषयतृष्णा नव्हती यामुळेही ती मंदोदरी म्हटली गेली. तसेच श्रीविष्णूच्या हाती जन्मल्याने तिच्या ठिकाणी संकल्प-विकल्पही नव्हते; शोभिवंत सौंदर्य; नाक, डोळे, कान, मुख हे सर्व रेखीव आणि जिथल्या तिथे; गुणगंभीर अशी ती लक्ष्मीसारखी शोभिवंत बनविण्यात आली. श्रीविष्णूने कौशल्याने अशी स्त्री निर्माण करून श्रीशिवाच्या आसनाखाली तिची स्थापना केली.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

होतो. तोच भक्त सकाम भावनेने आला तर शिव त्याच्याकडे लक्ष देत नाही. रावणाने शिवाची पत्नी जगन्माता पार्वती पाहिली. त्याच्या मनात विचार आला की हीच आपण श्रीशिवाकडे मागावी. रावण दोन प्रहर उभा होता तरी श्रीसदाशिवाने त्याला प्रतिसाद दिला नाही. श्रीशंकर कुठे गुंतला असावा हे रावणाने आंतरदृष्टीने पाहिले. तेव्हा त्याला शृंगीच्या झणत्कारात आणि नादामध्ये श्रीशिव गुंतला असल्याचे समजले. हे जाणून घेतल्यावर रावणाने मनाशी काही एक निर्धार केला.

रावणाकडून मस्तक समर्पण, वरप्राप्ती

रावणाने आपले मस्तक कापून घेतले आणि त्याला शरीरातील शिरा लावून तो त्याची वीणा तयार करून, हातात घेऊन ती कौशल्याने वाजवू लागला. रावणाच्या वादनातले मधुर, मंजुळ आणि हळुवार स्वर ऐकून श्रीशंकर संतुष्ट झाला. रावणाला काही माग म्हणावे तर त्याचे मस्तकच तुटल्याने त्याला मागता येणार नाही हे जाणवल्याने श्रीशिवाच्या मनात कृपा निर्माण झाली. त्याने न मागताच वर दिला. "तू स्वतःचे मस्तक तोडून मला सुखी केले आहेस. तेव्हा तू दशशिरे असलेला होऊन तिन्ही लोकात शूर वीर होशील." नंतर ज्याच्या ध्वजावर बैलाचे चिन्ह आहे त्या श्रीशंकराने तातडीने शिरा काढून, तंतू तेथे लावले. श्रीशिवाच्या वराने रावणाला दहा शिरे आणि वीस हात फुटले. वर आणखी अमृत कुपी देऊन बलवानांमध्ये श्रेष्ठ पराक्रमी बनविले गेले. पुढे श्रीशंकर म्हणाला, "लंकानाथा, तुझ्या मनाला जे जे आवडेल ते ते आता मी तुला देईन." असे तो भोळा सदाशिव प्रसन्न होऊन म्हणाला. त्याला राक्षसाच्या मनातले ओळखता आले नाही. दुष्ट बुद्धीचा त्याला डोळसपणे थांग लागला नाही.

रावणाने "लावण्यराशी पार्वती मला स्वतःला भोगायला मिळावी आणि कैकसी मातेला आत्मलिंग द्यावे." अशी मागणी केली. त्याबरोबर श्रीशिवाची वर देतानाची उदारता आणि त्यावेळचा उत्साह मावळला. पुत्र मातेशी रतिभोग मागतो आहे हे पाहून तो संतापला. परंतु कितीही क्रोध आला तरी याला दिलेले वरदान पूर्ण न करावे तर आपल्या माथ्यावर असत्यता येईल या विचारामुळे धड 'नाही देत' म्हणणेही शक्य नाही. माता आणि पुत्र एकमेकांजवळ आनंदात असताना जर मातेकडे पुत्राने रतिभोग मागितला तर ती माता प्राणाच्या अन्ताने क्रोधाविष्ट होईल; तसेच यावेळी श्रीशिवाच्या चित्ताचे झाले. "गुरुपत्नी ही शिष्याची माता; तिचा अभिलाप शिष्याने धरला तर मातृगमनी होण्याचे पातक होते. यातून हा रावण कसा वाचणार?" पार्वतीला रावणाच्या हाती सोपविताना शिवाने "हिच्यामुळे तुला सर्वशांती मिळेल," असे म्हटले. परंतु या उद्‌गारामागील अर्थ न समजल्याने रावण उल्हसित झाला. श्रीशिव रावणाला म्हणाला, "हे आत्मलिंग तुझ्याकडे देताना अहोरात्र पवित्रता राखली पाहिजे. हे भूमीवर ठेवलेस तर ते तुला मिळणार नाही." चैतन्यज्योती आकर्षित करून, तेज आत्मशक्तीने एकत्र करून, ते आत्मलिंग श्रीशंकर नित्य पूजित असे. ते लिंग रावणाच्या हाती देताना, लिंग हातोहात जाईल; तिसऱ्या डोळ्यातली शक्ती क्षोभेल आणि रावणाला धडा शिकवील,

रावण पार्वती व आत्मलिंग घेऊन निघतो

रावण पार्वतीसह आत्मलिंग हातात घेऊन आनंदित होऊन लंकेकडे निघाला. रावणाला पाहून उमा दीन, हीन झाली. तिला चिंता वाटली. उमेने मग श्रीविष्णूचा धावा सुरू केला. "शिवाने मला रावणाच्या हाती सोपविले. आता माझी सुटका कशी होणार? हे विष्णो, मला सत्वर पाव. कृपाळा. पूर्वी ग्रहांनी गजेंद्राला गिळले होते त्यावेळी तू त्याला लगेच उद्धरले होतेस. आता रावणग्रस्त झालेल्या या

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust, Lucknow and eGangotri

दीन उमेला सत्वर पाव. रामनाम घेतल्यावर कुंटिणीला वैकुंठात नेलेस; तशीच कृपादृष्टी हे दीनदयाळा, जगजेठी आताही माझ्यावर कर. महापातकांची रास असणाऱ्या अजामिळाला नामाने उद्धरून नेले. मी तर तुझीच दासी आहे. कृपा कर. शिवाला त्रस्त करणाऱ्या भस्मासुरापासून तूच तारलेस." ही उमेची विनवणी ऐकताच श्रीविष्णू त्वरेने धावून आला. "श्रीशिवाची पत्नी ही तर माझी प्रिय माता. तिची अभिलाषा धरणाऱ्या रावणाला मी पुरता गांजीन. पार्वतीची सुटका करण्यात श्रीगणेश आणि कार्तिकेय यांना शिवाच्या वरदानामुळे अडचण येणार. कारण श्रीशिवाचा वर खोटा ठरेल. शिवाला क्रोध येईल. मी रावणाचे दात पाडून क्षणात मातेची सुटका करीन. शिवाचे वरदान खोटे झाले तर तो शिव क्रोधाने आमचा घात करील." नंतर पार्वतीला सोडविण्यासाठी श्रीविष्णू धावून आला. त्याला कार्तिककुमार आणि गणेश हे दोघे भेटले. त्यांनी एकमेकांना वृत्तान्त सांगितला. रावणाला छळण्यासाठी श्रीविष्णूने कुशल युक्ती योजिली. गणेशाला श्रीविष्णूने द्विजांच्या गाईंचे रक्षण करण्यासाठी गोपाल होण्यास सांगितले. स्वतः श्रीविष्णू धर्मऋषी झाला आणि कार्तिककुमाराला आपला शिष्य बनविले. ते जेव्हा उत्साहाने रावणाच्या समोर आले तेव्हा रावण उल्हसित झालेला दिसला. "शिवाने पार्वतीला दिले आणि त्या कृपामूर्तीने आत्मलिंगही मला दिले आहे." असे रावणाने सांगितले. तेव्हा शिष्य झालेल्या कुमाराने त्याला म्हटले, "आत्मलिंग ही खरी प्राप्ती आहे; पण ही काही उमा-पार्वती-नव्हे. शिवाने तुला फसविले आहे. स्वतःची पत्नी शिव दुसऱ्याला देणे शक्यच नाही. फसवले रे फसवले रावणा तुला. तू पार्वतीकडे पाहा तरी एकदा."

रावण श्रीशिवाकडे, मंदोदरीचे निर्माण

रावणाने शिष्याच्या सांगण्याप्रमाणे पार्वतीकडे पाहिले तेव्हा पार्वती त्याला अत्यंत गलिच्छ रूपात दिसली. निंद्य, कुत्सित, हीन, दीन असे तिचे त्याला दर्शन झाले. पिचके, पाणी गळणारे डोळे, तोंडाभोवती घोंगावणाऱ्या माशा, नाक शेंबडाने लडवडलेले, तोंडाला दुर्गंधी, शरीर वाकडे झालेले अशी ती रावणाला दिसली. त्याला ओकारीच आली. श्रीविष्णूने अशा कौशल्याने फसवून रावणाची दुर्दशा केली. त्यावेळी ऋषीच्या रूपात असलेल्या विष्णूला रावण म्हणाला, 'माझ्या भाग्याने मला मिळालेली मूळ पार्वती आताच शिवाकडे जाऊन मागून आणतो." त्यावर श्रीविष्णू म्हणाला, "शिवाने आपली दशा राखून तुला अवदसा दिली. हे लंकेशा हे त्रिवार सत्य मान. त्या महेशाला तू भोळा मानू नको. त्या उमापतीने उमेला लपवली आहे. त्याची खूण तुला सांगतो. शिवाच्या आसनाखालची लखलखीत पार्वती तू त्याच्याकडे माग." या सांगण्याप्रमाणे रावण अत्यंत आवेशाने श्रीशिवाकडे त्वरित गेला. त्यावेळी तत्परतापूर्वक कौशल्याने श्रीविष्णूने मंदोदरीची निर्मिती केली. रमेने केशराची उटी त्याच्या पोटावर-उदरावर-लावली होती. एक सुंदर स्त्री निर्माण करण्यासाठी हाताशी काहीच नव्हते. तेव्हा उदरावरची केशर, चंदन यांची उटी काढून, त्या मळीपासून सुंदर स्त्री निर्माण केली. तीच मंदोदरी. श्रीविष्णूच्या उदरावरची उटी आणि चंदनाचा सुगंध लाभलेली, विष्णूच्या मध्यांगातून जन्मलेली, ती स्त्री असल्याने, त्या हेतूमुळेच मंदोदरी हे तिचे नाव झाले. तिची कंबर मुठीत मावण्याएवढी होती; तिच्या पोटी विषयतृष्णा नव्हती यामुळेही ती मंदोदरी म्हटली गेली. तसेच श्रीविष्णूच्या हाती जन्मल्याने तिच्या ठिकाणी संकल्प-विकल्पही नव्हते; शोभिवंत सौंदर्य; नाक, डोळे, कान, मुख हे सर्व रेखीव आणि जिथल्या तिथे; गुणगंभीर अशी ती लक्ष्मीसारखी शोभिवंत बनविण्यात आली. श्रीविष्णूने कौशल्याने अशी स्त्री निर्माण करून श्रीशिवाच्या आसनाखाली तिची स्थापना केली.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

रावण शिवाकडे येऊन म्हणाला, "तू पार्वतीला लपवून ठेवून ही अवदसा माझ्या हाती सोपवलीस. धन्य म्हणायची तुझी वरदानाची उक्ती! शिवाने आपल्या मनाशी विचार करून पाहिला. 'यानं पार्वतीची अभिलाषा धरली आणि त्याला अवदसेची प्राप्ती झाली. यावरून जगदंबेनेच निश्चितपणे याला फसविले असणार, तिला विष्णूने साहाय्य केले. त्यामुळे रावणाला अपाय झाला. यावर काही उपाय चालणार नाही. तर त्यामधे मी काय करावे? रावण माझा पाठचा गण आहे; पण त्याने पार्वतीची म्हणजे गुरुपत्नीची अभिलाषा धरली. यातून त्याला अचूक मरण आले. कारण जी उमा तीच सीता आणि तिची अभिलाषा धरणे म्हणजे तत्त्वतः मरणाला ते कारण; श्रीविष्णू म्हणून त्याच्या घाताला उद्युक्त झाला आहे.' रावण अत्यंत आवेशाने श्रीशिवाला म्हणाला, "म्हातारपणी तुला हे महेशा, एवढा लोभ कसा सुटला? मला अवदसा दिलीस काय?" यावर श्रीशिव "तथास्तु" म्हणाला. सदाशिवाने ठरविले की, "हा जीव अनेक प्रकारची अवदसाच भोगील. रावण अत्यंत विषयांध झाला असून त्याला वरदानामुळे गर्व झाला आहे. रावणाने शिवाला पुन्हा म्हटले, "तू उमा आसनाखाली लपविलीस; मला ती सोज्वळ उमा तिथे दिसते आहे. आता हे शंकरा, किती फसवणूक करशील?" आसनाजवळ असलेली सुंदर स्त्री पाहून रावणाला आश्चर्य वाटले. नंतर उमा जगन्माता हिच्या ऐवजी रावणाला मंदोदरी देण्यात आली. रावण तिलाच पार्वती समजून अत्यंत प्रेमाने, संतुष्ट होऊन, निघताना श्रीशिवाला रागाने म्हणाला, "अरे, म्हातारपणी स्त्रीलोभ धरलास, माझी प्रिया जगन्माता तुला तारील. तू मात्र तिची अभिलाषा धरू नको."

आत्मलिंगाची वार्ता

रावणाने मंदोदरीला खांद्यावर घेतली आणि हातात आत्मलिंग घेतले. नंतर तो तातडीने निघाला. श्रीविष्णूने त्याचा पुरता छळ करायचे ठरविले होते. रावण मोठ्या हर्षाने लंकेच्या दिशेने जात असताना वाटेत त्याला लघुशंका (लघ्वीला) लागली. त्याला पाऊलही पुढे टाकवेना. "आता ही अडचण कशी सोडवायची? आत्मलिंग खाली ठेवायचे नाही तेव्हा आता ते कोणाच्या हातात द्यायचे? लघुशंका कशी करायची?" रावण अशा अडचणीत पडला आणि त्याची कुचंबणा झाली. श्रीशिवाच्या पत्नीची त्याने अभिलाषा धरली; रावण चराचरात अशुद्ध ठरला. तो मातीच्या पाण्यासारख्या उपयोगाने शौच करणारा होता; त्याला शुद्धता समजतच नव्हती. मातीच्या रूपातल्या पाण्याने फारतर ढुंगण स्वच्छ होईलही; परंतु हृदयाची शुद्धता कशाने होणार? कर्ममंद कर्मठ हे जाणत नाहीत. शौचाचाराचे उदाहरण अबद्ध आहे.

आपल्या हातातले आत्मलिंग कोणाच्या हाती द्यावे हे ठरविण्यासाठी रावणाने चौफेर पाहिले आणि त्याला द्विजांच्या गायी राखणारा गणेश दिसला. दर्भाची पवित्रके, जानवे, बारा नाममुद्रांचे टिळे, अशा गणेशाला पाहून रावणाने त्याला आत्मलिंग घेण्याची विनंती केली. "जोवर मी लघुशंका करून येत आहे तोवर हे लिंग हातात धरावे" त्यावर गणेश म्हणाला, "गाई इकडे-तिकडे जातील, त्यांना वासरे पितील. गाई वासरांकडून पाजविल्या तर द्विज रागावतील. तुझे लिंग मी घेणार नाही." हे गणेशाचे बोलणे ऐकून रावणाने त्याचे पाय धरले. गणेशाने म्हटले, "माझी एक अट आहे की तू जर लवकर आला नाहीस तर मी लिंग जमिनीवर ठेवीन, हे मी त्रिवार गर्जनेसह सांगतो आहे." ही अट मान्य करून रावण लघुशंकेला गेला. रावणाला लघुशंकेत असे गुंतविले की त्याला तो आवेग आवरेना. रावणाचे मूत्र मोठ्या कष्टाने मोकळे होत होते. त्यावेळी अशी अद्‌भुत घटना झाली की त्याचे मूत्र धारवाहीत होत राहिले. रावण त्या कार्यात गुंतून

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

पडला. गणेशाने त्याला हाका मारल्या पण रावण येऊ शकला नाही. गणेश लिंग जमिनीवर ठेवून गाईंना घेऊन निघाला. अशा रीतीने रावणाला लघुशंकेच्या कार्यात गुंतवले गेले आणि त्याला निष्क्रीय करण्यात आले. रावणाचे मलमूत्र विसर्जन झाल्यावर, शुद्ध होऊन तो तातडीने आला. तेव्हा त्याला आत्मलिंग जमिनीवर ठेवलेले आढळले. तो श्रद्धने ते उचलण्यासाठी गेला. त्याने एका हाताने, दोन हातांनी उचलण्याचा यत्न केला. अगदी कुंथून, सर्व शक्तीनिशी, वीसही हात लावूनही ते उचलणे त्याला शक्य झाले नाही. एवढे प्रयास करूनही रावणाला ते महा बलवान लिंग किंचितही जमिनीपासून वर घेता येऊ शकले नाही. रावणाने एकदा कैलास पर्वत आपल्या हातांनी गदगदा हालविला होता; परंतु ते शक्तिशाली लिंग तिळभरही उचलले गेले नाही. नंतर गणेश लिंग जमिनीवर ठेवून गेला म्हणून रावणाने अभ्रांतपणे रागावून गणेशाला टोला मारला. त्यावेळी गणेश तिथे उभा होता.

रावणाचा शोक-क्षेत्रांची उत्पत्ती

आत्मलिंग कोणत्याही उपायाने हाती येत नाही असे दिसल्यावर रावण स्फुंदून ओक्साबोक्सी रडू लागाला. 'आता माता कैकसीला काय सांगू?' लघुशंकेच्या अनावर कृतीने लिंग गेले, काही केले तरी ते हाताने उचलवेना, हे सर्व ऐकल्यावर माता संतापेल; पण भयामुळे दोन्ही दृष्टींनी अपायच होणार. ना देव, ना पितर, दोघांनाही अपवित्रता येणार. या प्रकाराने श्रीविष्णूकडून छळ झालेला रावण केवळ तळमळत राहिला. लिंगबंधनात दोन्ही मुद्रा होत्या. श्रीशिवाने शिवदोरा लाविला. रावणाने इकडे-तिकडे केल्याने पाच मुद्रा असलेले पंचलिंग सिद्ध झाले. मुरडून वस्त्र बाजूला करताच तेथे मुरडेश्वर झाला. पवित्र मुद्रिका टाकताच तेथे गुप्तेश्वर झाला. शिवदोरा रागाने टाकताच तेथे गणकेश्वर झाला. यालाच सर्वसामान्य जन धनेश्वर म्हणतात; असा लोकवव्यवहार आहे. शिवसेज टाकताच खरोखर तेथे शेजेश्वर झाला. अशा प्रकारे पंचमुखी श्रीशंकर नांदू लागला. गोकर्ण हे तर अनादी क्षेत्र असून, तेथे महाबळ ईश्वर असल्यामुळे गोकर्णमहाबळेश्वर असा लोकव्यवहारात तो प्रसिद्ध झाला. समुद्राच्या तीरावर आहे तो गौतमपर्वत आणि तिथे आहे तो गोकर्णमहाबळेश्वर आणि वाईजवळचा महाबळ याचा विचार वेगळा आहे. तो परिचार ब्रह्मयागात आहे. ब्रह्मयाने मोठा यज्ञ केला. तेव्हा त्या ठिकाणी महाबळ प्रकट झाला. दोन्ही महाबळांचे वेगवेगळे ठिकाण आहे, हे सर्व लोक जाणतात. अशी या तीर्थांची वार्ता आहे. अशी असंख्य तीर्थे आहेत. या अगणित तीर्थांची मूळ कथा ब्रह्मोत्तर खंडात आली आहे. विष्णूसंभूता मंदोदरी ही सीतेसारखी हनुमंताला का भासली ही कथाही त्या खंडात आहे. स्वतः श्रीविष्णूने मंदोदरी ही सुंदर स्त्री निर्माण केली. तिच्या ठिकाणी सीतेची समानता स्वाभाविकपणे आली. श्रीविष्णूने तिच्याकडे पाहिले तेव्हा ती लक्ष्मीसारखी झाली. विष्णूनिर्मित मंदोदरी हनुमंताला त्यामुळेच सीतेसारखी भासली. दोघीही अयोनिजा, दोघीही पतिव्रता, मंदोदरीला त्यामुळेच हनुमंताने तिला सीता मानली. रावणाच्या एकांतात मंदोदरीची कथा ऐकून सीता अशोकवनात भेटेल हे मारुतीला समजले. तो अशोकवनात सीतेला भेटण्यासाठी निघाला.

अध्याय सातवा

हनुमंत दासीच्या मागोमाग अशोकवनाकडे निघाला होता, तो अशोकवनात पोचला. तो सीतेला वंदन करण्यासाठी उत्सुक होता त्यामुळे अशोकवन दिसताच त्याने लोटांगण घातले. श्रीरामाचे स्मरण करून तो सीतादर्शन करायला निघाला. सीता हे चिद्रत्न पाहण्यापूर्वी त्याने काही काळ ध्यान केले.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Trust and Lakshmi Research Academy Gangotri

अशोकवनात येताच मारुतीला स्फुरण चढले. श्रीरामाच्या बाणाप्रमाणे त्याने उड्डाण करून वनात प्रवेश केला.

अशोकवनाचे मारुतीला दर्शन, त्याच्या चेष्टा

अशोकवनात फळांनी लगडलेले आणि सरळ वृक्ष पाहून हनुमंताला हर्ष झाला. त्याच्या तोंडाला लाळ सुटून तो मिटक्या मारू लागला. तिथले दाट वृक्ष पाहून तो उल्हसित झाला आणि वृक्षा-वृक्षांवर उड्या मारत, आपले शेपूट नाचवू लागला. श्रीरामाची पत्नी सापडल्याने आपली आधिव्याधींची काळजी मिटली म्हणून तो दात विचकून देव-देवतांना वेडावून दाखवू लागला. नारळाच्या घडांची घडघड ऐकून मारुतीचे तिकडे लक्ष गेले. तेवढ्यात पिकलेला खजूर दिसताच तो मटकावण्यासाठी मारुती वेगाने उड्डाण करून गेला. पिकलेल्या आंब्यांकडे पाहून त्याने डोळे मिचकावले. द्राक्षांचे लोंबणारे घड दिसताच तो तिथे शेपूट हलवत राहिला. महाळुंगे आणि नारंगे पाहताच तो आनंदाने नाचू लागला आणि "माझे दात भाग्यवान आहेत कारण त्यांना ही फळे चावायला मिळणार" असे म्हणाला. घनदाट आणि पिकलेले फणस दिसताच त्याने त्यांचे काटे नखांनी कुरतडले; पिकलेली केळी बोटांनी चेपली. "ही आंवट लिंबे मी घेणार नाही" असा विचार तो बोलला. काळीकुळकुळीत जांभळे पाहून त्याने दात विचकले आणि जणू कार्तिक व्रत असल्याप्रमाणे त्याने आवळ्यांचा स्वीकार टाळला. उंबरे, टेंबरे, बिब्बे, विधामणे, चारे, बोरे, करवंदे, या पिकल्या फळांकडे त्याने मिटक्या मारत पाहिले. तोरणे, अळुचे, मव्हके, वाळके, काकड्या, मधाचे मोहळ पाहून त्याच्या तोंडाला लाळ सुटली. खर्बुजांचे भार, पिकलेली भोकरे यांच्यापुढे तो शेपूट पुढे करून नाचून आनंद करत राहिला. साखरेची रास दिसताच त्याने दोन्ही कुशी खाजवल्या आणि "हा गूळ कोण खातो, आपण खडीसाखरच मटकावू" हा अभिप्राय त्याने दिला. ऊस पेरलेला पाहिल्यावर तो हर्षाने नाचला. मातीच्या भांड्यामधे रस भरून ठेवलेला पाहिला आणि त्याने त्यात शेपूट बुडवली. त्यापूर्वी शेपूट स्वच्छ पाण्यात त्याने धुवून घेतली होती. त्याने आपल्या शेपटीजवळ हितगुज करताना म्हटले, "जनककन्या सीता भेटली म्हणजे मग या वनात एकच धुमाकूळ करू. आधी सीतेची भेट घेऊन, नंतर इथल्या सर्व फळांचा समाचार घेऊ, तोंवर तू शांत राहा." एवढे मनोगत बोलून मारुतीने तिथल्या प्राकारावर उड्डाण केले. अशोकवनात रावणाची श्रृंगारासाठी जी इमारत होती तिच्या गोपुरावर हनुमंत चढून बसला.

हनुमंताला दिसलेली अशोकवनाची शोभा

हनुमंत उंच गोपुरावरून अशोकवन पाहू लागला. वसंत ऋतूप्रमाणे नित्य शोभायमान असे ते वन नेहमी फळाफुलांनी संपन्न असलेले त्याला आढळले. तेथील सर्व वृक्ष नित्य सुफळित असल्याचे त्याने पाहिले आणि तो हर्षभरित झाला, शाल, तमाल, तरुवर; कर्णिकारी फुले असंख्य. विश्रांती देणारे विशाल अशोक; कपित्थ, विल्व, आम्र, चंपक, पिचुमंद, नीप, शिंसिपक आवळे, सालफळी, मधुक, असे अनेक वृक्ष वनाची शोभा वाढवत होते. नागचाफा, उधालक, मांदार, कल्पतरू, पारिजातक, फणस, पाटल, नंदानक असे टवटवीत वृक्ष शोभिवंत दिसत होते. रावणाने श्रीशंकराची प्रार्थना करून कैलास पर्वतावरचा रजतवृक्ष आणला होता. त्याची आर्द्र, सुगंधी फुले दरवळत होती. अशोक वनामध्ये हे रजतवृक्ष होते. कुबेराशी भांडून त्याच्या नगरीतून नाना प्रकारची फुलझाडे आणून रावणाने अशोकवनामध्ये लावली होती; त्यांचा सुगंध सर्वत्र भरून राहिला होता. यज्ञासाठी सुगंधिती, आर्द्र सुवर्णकमलिनी रावणाने हिरावून आणली होती: तिचा घमघमाट

https://archive.org/details/@sarayutrust, lakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

अशोकवनात सुटला होता. सुवर्ण आणि रजत अशा वृक्षांच्या मेळाव्यात पांढरी, पिवळी सुगंधी फुले आणि स्वादिष्ट वेगळ्या चवीची फळे असून त्यात रत्नांची बीजे भरलेली होती. त्या बीजांपासून नव्या वृक्षांची उपज होत नव्हती. एक वेळच फळे येत होती; मग वृक्ष नुसतेच शोभेसाठी राहात. या प्रकारे अनेक जातीचे, असंख्य वृक्ष त्या अशोकवनात होते. मारुती त्या शोभिवंत वृक्षांवर उड्या मारत होता. त्या वनाची शोभा पाहिल्यावर मन भ्रांत होई आणि दृष्टी त्यावरून हलली तरी सर्वत्र सुगंध दरवळत राहिलेला अनुभवास येई.

अशोकवनातल्या त्या वृक्षराजीत हनुमंत स्वेच्छेप्रमाणे क्रीडा करत होता. त्यावेळी तेथे असलेल्या रक्षक राक्षसांच्या बळाकडे तृणवत मानून मारुतीवीर दुर्लक्ष करत होता. त्यांची त्याला दादही नव्हती. अशोकवनात रावणाने एक राऊळ बांधले होते. त्याला सहस्त्र, सबळ खांब असून त्यांवर रत्ने, प्रवाळ, मेंखधा जडविलेले होते. पाच पाचू, त्यावर माणके आणि ठिकठिकाणी हिरे-मोती यांच्या ओळी होत्या. असे त्या राऊळाचे कळस असून ते आकाशात लखलखत होते. त्या कळसांवर पताका होत्या. राऊळाच्या दोन्ही बाजूंना सोन्याचे कट्टे होते. त्यांवरही रत्ने लावलेली होती. ठिकठिकाणी असलेल्या ओटंगणांमध्ये भूमी प्रतिबिंबित झाली होती. ते अत्यंत शोभिवंत असून नंदनवन, चैत्रवन यांना मागे टाकणारे होते. आनंदवनाशी समान असून कैलासभुवन जसे तसे शोभत होते. अशोकवनाच्या आणि प्रासादाच्या दारात शस्त्रसज्ज, सावध राक्षस रक्षकाचे काम करत होते. त्यामुळे वारा सुध्दा आत जाऊ शकत नव्हता, तिथे सुरासुरांची काय कथा? बोट दाखवले तर हात तोडत आणि डोळा दाखवला तर डोळे फोडत, असे दुर्धर राक्षसांचे भिन्न समुदाय अत्यंत कटाक्षाने प्रासादाचे रक्षण करत होते.

लंकेच्या प्रवेशाला प्रथम सागर, पुढे किल्ला यांची आडकाठी होती. नंतर रावणाचा प्रासाद, तेथला प्रवेश अधिक अवघड होता. त्यामधील स्त्रियांचे भुवन तर प्रवेश करण्यास दुर्गम असून त्यात असलेल्या अशोकभुवनात सुरासुरांनाही प्रवेश अशक्य होता. अशा त्या दुर्गम ठिकाणी प्रवेश करणे दक्ष आणि समर्थ हनुमंताला सहज शक्य झाले. तो निःशंकपणे सुवर्ण आणि रजत वृक्षांमधे क्रीडा करत राहिला. आता हनुमंताला सीतादर्शनाची ओढ लागल्याने तो त्यावर लक्ष केंद्रित करून निघाला.

सीतावर्णन, तिची मनोवस्था, नाममहिमा

सीता यावेळी जरी वरवर मलिन दिसली तरी तिचे अंतःकरण रामाच्या ध्यानाने निर्मळ होते. बाहेरून अत्यंत चिंताग्रस्त आणि व्याकुळ दिसली तरी अंतरात ती चिन्मय रामामुळे निश्चळ होती. ती उपवासाने व्याप्त असली तरी आतून परमानंदाने तृप्त होती. बाह्यतः ती बंदीत असली तरी आत निर्मुक्त अशा देहात होती. दर्शनी ती रोडावलेली काष्ठवत दिसली तरी अंतरात रामनामाने धष्टपुष्ट होती. जरी बाह्यतः ती राक्षसांना दुष्ट मानत असली, तरी अंतःकरणात तिचा आत्मा त्यांना अदुष्ट मानत होता. बाहेरून ती रामापासून दुरावलेली वाटली, तरी आतून ती श्रीरामाशी नित्य जोडलेली होती. दुःखाने ती गांजली आहे असे जरी बाह्यतः दिसले, तरी ती अंतरात स्वानंदाचा अनुभव घेत होती. बाहेरून ती हीन, दीन, खिन्न वाटली तरी आतून ती सुप्रसन्न आणि चैतन्यचिन्मात्र ज्योती होती. सीता लंकेला नेल्यासारखी असली तरी ती रामापासून वेगळी झालीच नव्हती. तिचे कोमेजलेपण हे बाह्य होते, तिचे अंतर टवटवीतच होते. मळक्या वस्त्रांत दिसणारी ती अंतरात चिदंबराने शोभायमान झाली होती. तिच्या अंगावर अलंकार नसले तरी तिच्या

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sayu Foundation Trust and eGangotri

मनात श्रीरामाचा साजशृंगार होता. श्रीरामाहून ती वेगळी झाल्याचे दिसले तरी ती तर सबाह्य रामरूपच होती. अशी सीता दृष्टीस पडताच हनुमंताने आनंदाने टाळी पिटली.

सीता ही सतत श्रीरामचंद्राचा अनुभव घेत असल्याचे मारुतीला जाणवले कारण रामाने त्याला नाममुद्रा दिली होती. श्रीरामाने सीतेविषयी जी जी खूण सांगितली होती, तीच स्थिती सीतेच्या ठायी हनुमंताला आढळली. या प्रकारे सीतेचे पूर्णपण मारुतीने स्वतःच्या ठिकाणी अनुभवले. परंतु त्याला सीता बाह्यतः वेगळ्याच अवस्थेत असल्याचे आढळले. एखाद्या धनकोषाभोवती हडळी असाव्या तशा तेथे सीतेभोवती राक्षसी होत्या. त्या राक्षसींना खाऊ, गिळू की त्यांचे रक्त पिऊ असे हनुमानाला झाले. हनुमानाने चौफेर पाहिले तेव्हा एखादी हत्तीण आपल्या नेत्याला सोडून संकटात सापडावी तशी सीता त्या अशोकवनात दीनवदन अशी आढळली. अभ्यंग स्नान न झाल्याने तिचे सर्वांग मलिन झाले होते. तिची वस्त्रे जीर्ण झाली होती. तिला बदलायला दुसरे वस्त्र नव्हते. कसेतरी वक्षस्थल झाकून, दोन्ही गुडघे पोटाशी घेऊन ती रामप्र[illegible] मनात अहोरात्र रामाचे चिंतन करत बसली होता. रामाची भेट व्हावी या इच्छेने तिने कसाबसा प्राण कंठात धरला होता. अशा अवस्थेतली सीता हनुमंताच्या दृष्टीला पडली. कराल, विक्राळ, दुष्ट अशा असंख्य राक्षसी सीतेच्या भोवती होत्या, परंतु त्यांची सीतेला भीती वाटत नव्हती. तिच्या अंतरात श्रीराम असल्याने ती निर्भय होती. जेव्हा रामाचे स्मरण होत नसते तेव्हाच भीतीचा भोवरा मनात गरगरू लागतो. जर श्रीरामाचे अंतःकरणाने स्मरण केले तर भवभयाचे काय महत्त्व असणार! सीतेला राक्षसी, वृक्ष, वेली तृण, पाषाण या सर्वांमध्ये श्रीरामच दिसत होता. भयाला भय भेटले. सुख हे सुखावर्तात प्राप्त होते. या निष्ठेने सीता वागत आहे हे पाहून मारुतीला आनंद झाला. हृदयात श्रीरामाची प्रीती असणे सर्व भूतमात्रांच्या ठिकाणी श्रीराम पाहणे, भयग्रस्त परिस्थितीत निर्भय राहणे, अशी सीता स्वतः भोग भोगत होती. श्रीरामच सर्वत्र पाहिल्यावर भय समाप्त होते. भय ब्रह्ममूर्ती होऊन श्रीरामामुळे सुखाचा अनुभव येतो. हा अनुभव येण्यासाठी श्रीरामनाम हे मुख्य साधन आहे. रामनामाने जन्ममरणाचा त्रास नष्ट होतो. रामनाम हेच पूर्ण परब्रह्म आहे. नामापाशीच विरक्ती, शांती, श्रेष्ट भक्ती, चारी मुक्ती, परब्रह्माची प्राप्ती आहे. नामाला स्नान, विधिविधान असली सारी बंधने अनावश्यक आहेत. कारण नाम हे अत्यंत पवित्र असून तेच परिपूर्ण परब्रह्म आहे. नामामुळे दूषण हे भूषण होते; पापी प्राणी पवित्र होतात. नामास्मरणाने यमही शरण येतो. नामाला कर्मबंधन नसते, अच्युताच्या नामाने कर्म पावन होते, हे स्मृतिवचन श्रुत्यर्थ आहे. नामस्मरणाला अनाध्याय नसतो, नामाचा स्वाध्याय नित्य व्हावा लागतो. नाम हे स्वतःच परब्रह्म आहे. नामनिर्वाह सद्‌भाग्यानेच होतो. नाम हे चैतन्याचा गड, परब्रह्माचा ठाव आहे. ब्रह्म नामापुढे स्वानंदाने घडघडा नाचते. रामनाम स्त्रियांना भूपणाचे भूषण, सौभाग्याचे सौभाग्य असते; नामाने स्त्रीशुद्र पावन होतात. स्त्रियांच्या गळसरीत कृष्णमणी तशी पुरुषांच्या गळसरीत नामस्मरणी; ती तुटली तर वैधव्यात कालक्रमणा करावी लागते. सीतेला श्रीराम हाच स्वधर्म, नित्यकर्म, पती आणि परब्रह्म होता. श्रीरामाचे नामस्मरण करताना सीता देहीच विदेही होई. तिला रावणाचे भय वाटत नव्हते हे मारुतीला कळून आले. श्रीरामनामाच्या अंकित झालेली सीता पत्नी म्हणून भूषणांनाही शिरोभूषण व्हावी अशा योग्यतेला पोचली होती. नामामुळे ती निर्द्वंद्व होऊन अशोकवनात निःशंकपणे राहिली होती.

हनुमंताचे विचार-रात्रीची साथ

सीतेला पाहिल्यावर तिच्या भेटीसाठी हनुमंत तळमळत होता. परंतु सीतेच्या आसपास असलेल्या

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

राक्षसींच्या किंकाळ्यांनी तो साशंक झाला. "जशी नारायणाची रमा तशी श्रीरामाला सीता. तिची आम्ही भेट घ्यावी तर या अधम राक्षसी प्रतिबंध करणार. त्यांच्या समक्ष सीतेची भेट घ्यावी तर या राक्षसी निश्चित माझ्याशी झोंबी घेतील. समजा मी त्यांचा घात केला तर रावण सीतेचा वध करील. सीतेचा वध झाला तर माझे कष्ट व्यर्थ होतील. त्यातून मी लंकानाथाचा वध केला तर त्याने रामाला सुख होणार नाही. तेव्हा आपण तत्त्वतः या राक्षसी झोपी जाईतों गुप्तपणे झाडांवरच राहावे. मग एकान्तात सीतेची जेव्हा भेट शक्य होईल तेव्हाच भेट घेऊ." असा स्वतःशीच विचार करून मारुती झाडांमधेच थांबला. ज्याप्रमाणे चपळ वारा आकाशात लीन व्हावा तसा तो हनुमान वृक्षराजीत स्थिर झाला. ज्याप्रमाणे सूर्य ढगांमधे गुप्तपणे असतो, त्याप्रमाणे हनुमान वृक्षांमधे सावध पण गुप्ततेने राहिला. आत्मा हृदयात असूनही जसा कोणाला दिसत नाही तसा झाडांमधे हनुमान गुप्त राहिला. ज्याप्रमाणे वेदांचा अर्थ असून कोणालाही तो व्यक्त स्वरूपात पाहता येत नाही, तसा हनुमंत वृक्षांमधे असून कोणाला दिसला नाही. तो वृक्षांमधे असताना सूर्योदय झाला. त्यावेळी गवळी धारा काढतात, गोपी दधिमंथन करतात, गंधर्व ललित गायन करू लागतात, राजद्वारात मंगलवाद्ये वाजू लागतात, देवाच्या दारी जयघोष होतो, अग्निहोत्री होम करतात आणि त्यातील तुपाचा सुगंध सुटतो, उन्मत्त हत्तींचा मदगंध जाणवतो, शुद्ध सुमनांचा सुगंध दरवळतो आणि देवालयात उत्तम गंधाचा धूप जळू लागतो, अशी भिन्न कार्ये आरंभ होतात. एखादी प्रिया काळे परिधान केलेली असावी आणि पतीने ते वस्त्र सोडून तिला उत्तम वस्त्र द्यावे, त्याप्रमाणे रात्रीने अंधाराचा त्याग करून सूर्याने दिलेली पीतप्रभा ती परिधान करते. सूर्योदयाबरोबर त्रिजग हे व्यवहारपर होते, निशाचर लीन होतो. मनुष्यप्राण्यांना सुख लाभते. हनुमंताच्या मनात सीतेच्या भेटीची उत्सुकता होती. सीता एकान्तात पण लवकर भेटावी असे त्याला वाटत होते, त्यासाठी लवकर रात्र व्हावी असे मनाशी म्हणत तो झाडांवर तिष्ठत थांबला होता

हनुमंताने असा मनाशी विचार केला. श्रीरामाचे कार्य हाच स्वार्थ असल्याने हनुमंताला सीता भेटावी म्हणून सूर्य अस्ताला गेला. ज्याप्रमाणे श्यामसुंदर अशा बालिकेने मोत्याची जाळी घालावी त्याप्रमाणे आकाशात नक्षत्रांच्या ओळी शोभू लागल्या. रात्र ही हनुमंताला सखी वाटली कारण रामपत्नीला तीही भेटायला आली होती. त्याविषयी जणू मारुतीशी तिचा संवाद झाला होता आणि एकान्तात सीतेला भेटायचे ठरले होते. सीता स्वामिनी मानून तिला भेटायला ती रात्र सखी जननी संवाद-पान्हा पाजून समाधान देण्यासाठी आली होती. संवाद-पान्हा प्यायल्याने धष्टपुष्ट होऊन रावणपुत्र अखया, इंद्रजित आणि असंख्य राक्षस यांची गांजणूक करील. रात्र नव्हे ती महाकाली हनुमंताजवळ आली. ती त्याला जानकीला भेटवून लंकेची होळी करील. ती रात्र म्हणजे सप्तशती होती; जिने निशुंभाचा नाश केला होता. तीच हनुमंताकडे येऊन राक्षसांचा संहार करील. रात्र नव्हे ती चामुंडा होती; जी काळिमेचा वलदंड घेऊन रावणाच्या शिरांचा छेद करण्यासाठी बाहुवली मारुतीकडे भेटायला आली होती. ती रात्र म्हणजे काळरात्र असून, तिने मारुतीच्या शरीरात प्रवेश करून, लंकेमध्ये जाऊन राक्षसांचा नायनाट करायचे ठरविले होते. रावणाला रात्र झाली हे पाहताच विरहज्वर आला आणि सीतेविषयीच्या कामभावनेने तो पीडित झाला. हनुमंताला रात्र झाली हे पाहून अमाप उल्हास झाला.

रावणाची मनःस्थिती, अशोकवनात आगमन

रावण वस्त्राभरणांनी भूषित होऊन आणि दिव्य अशा चंदन, अगरू यांची अंगभर उटी लेवून सीतेविषयीच्या कामनेने पुष्पशय्येवर तळमळत

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

होता. त्याला पुष्पशय्या खदिरांगारासारखी वाटत होती. फुलांच्या माळा त्याच्या जिव्हारी आग निर्माण करत होत्या. चंदनाने त्याला शरीर तापल्याचे जाणवत होते. त्याला भोगोपचार, मधुर वीणावादन, अन्य स्त्रियांचा शेजार, मधुर रसपान यांपैकी काहीही आवडत नव्हते. त्याच्या दृष्टीसमोर स्वयंवराच्या प्रसंगातली सीता येत होती. शेंदूराने भांग भरलेली, चाफ्याप्रमाणे सुंदर, सुकुमार अशी सीता आठवत होती. डोळे, चेहरा कमळाप्रमाणे, बांधा ठाकठीक, गुणवंत, भरदार स्तन असलेली अशी सीता आठवताच रावण मूर्च्छांकित झाला. त्याला इतरांचा सहवास, गायन आवडेनासे झाले. जणू सीतारूपी भुताने त्याला झपाटले होते. ते सीता नामक भूत हे महाभूत बनून रावणाचा जीव घेणार होते. त्याच्यावर भरणी, सांडणी यांची योजना निष्फळ होणार होती. रावणाला आपले मन आवरता आले नाही. त्याला सीतेची अवस्था लागली; धीर धरवेना, तो कामभावनेने विव्हळ झाला. सीतेविषयी कामातुर होऊन त्याने अन्य स्त्रीयांचा शेजार आणि शय्या सोडली. तो विनाकारण सेवकांवर संतापला. ब्रह्मा वेद घडघडाटाने म्हणत होता, शांतिपाठ नित्य म्हटला जात होता. राजभाटांनी त्यांना ते सर्व बंद करायला लावून, रावणस्वामींसाठी मौन धरायला सांगितले. सेवकांनी म्हटले, "अरे बृहस्पती, व्यर्थ किती बडबड करतोस? त्या इंद्रसभेत करतोस तशी बडबड करू नकोस. नारदा तुझे ते वीणावादन, तुंबरू तुझे गायन पुरे करा. रावणमहाराजांच्या शरीरात स्वस्थता नाही तेव्हा सर्व नर्तकींना दूर न्या. भाटांनी ब्रीद्रे, कीर्ती यांच्या गर्जना बंद करून, शांत राहावे." दूतांनी ब्रह्मदेवाला नमस्कार केला तेव्हा "रावणस्वामी व्यथित असून ही अध्ययनाची वेळ नव्हे.", असे सांगितले. त्यावर "लंकानाथाला काय व्यथा आहे?" असे ब्रम्हदेवाने विचारले. सेवक म्हणाले, "ही एक गुप्त गोष्ट आहे. ती लोकांमध्ये प्रकट न व्हावी अशी आहे, तरी तुम्हाला सांगतो."

सेवक म्हणाला, "सीतेचा शेंदूर चर्चित भांग हा जणू धारदार भाला बनून रावणाच्या हृदयात घुसला आहे. त्यामुळे रावण अस्वस्थ झाला आहे. जानकीविषयींच्या कामवासनेने रावण भ्रमिष्ट झाला आहे. त्याला स्वार्थ समजत नाही. कोणी हिताची गोष्ट सांगू पाहील तर रावण त्याचा घात करतो. त्याला सीतेच्या विचाराने पछाडले आहे. जरी रावण ब्रह्मवंशज असला, तरी आपण त्याला जानकीविषयीचा मुख्य विचार सांगू नये. तो त्यामुळे सीतेविषयीच्या भावनेने अनर्थ करायला धावून येईल." अशा एकान्तातल्या गुप्त गोष्टी सेवक सांगत असताना, तिकडे रावण कामुकतेने त्रस्त होऊन, सीतेला पाहण्यासाठी निघाला. त्याचे लक्ष अशोकवनाकडे लागले. "मी चार महिने सीतेला अशोकवनात विनाकारण ठेवली. आता मात्र मी बलाने तिचा उपभोग घेईन." असे बोलून तो कामासक्ततेने निघाला. तो कामोन्मत्त रावण अशोकवनाकडे जात असता त्याच्या बरोबर शेकडो स्त्रियाही हातात सुवर्ण दीप घेऊन सुगंधी तेल शिंपडत चालल्या होत्या. काहींच्या हातात सुवर्णदंडावर माणके जडविलेली चंद्राकृती छत्रे होती. अनेक जणी पंख्यांनी वारा घालत होत्या. कित्येक रावणाला विडे देत होत्या. रावणाने निळ्या रंगाचे वस्त्र नेसले होते. त्यावर करदोटा कसलेला होता. गळ्यात लहान घंटा असलेल्या चकचकीत चित्रविचित्र माळा होत्या. ब्रह्मसूत्र त्याने परिधान केले होते. मुकुट, कुंडले, अलंकार, मणी, मोत्यांच्या माळा, नीलमण्यांचे हार, वाकी, नूपुर, ब्रीदांचा नाद यांसह रावण नटला होता. चंदनादींची सुगंधी उटी त्याने लावली होती. त्याच्या दहाही कंठांमध्ये पदके शोभत होती. त्याने मुठीत खड्ग

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

धरले होते. अशा थाटात तो सीतेच्या भेटीला चालला होता. अशोकवनाकडे जाताना त्याच्या बरोबर ज्या असंख्य स्त्रिया होत्या त्यांच्या पायतळी द्राक्षांची आळी चेपत होती. नागवेलींची पाळी खचत होती. सोनकेळी लपलपत होती. असा तो चालला असताना वनकरांचा थाट पाहात होता. त्याच्या समवेत असलेल्या स्त्रियांच्या घडघडत चालण्यामुळे वृक्ष वाकून सपाट होत होते. त्या दुष्ट स्त्रियांचा स्पर्श वृक्षांना नकोसा वाटत होता. स्त्रियांच्या स्पर्शामुळे वाटिका समूळ वाळून जात होत्या; वृक्षांची फुले, फळे झडत होती; त्या सर्व पुढे जात होत्या. त्या स्त्रियांच्या हातातील दीपांच्या तेजामुळे वृक्षांची पान-फल-झडी होत असून, अमृतवेल ही तडतडत होती; तर रोपे जळत होती. त्या स्त्रियांकडून चाफे मोडले गेले, सुवर्णकमळांचे वाफे मोडले, अखेर रावणासह त्या अखेर सीतेजवळ येऊन पोचल्या.

रावण सीतेकडे आलेला पाहून हनुमान मनातून संतापला आणि वृक्ष उपटून त्याने रावणाला धोपटण्यासाठी पुढे चाल केली. त्याच्या मनात यावेळी विचार आला की, "रावण सीतेशी झोंबू लागला तर ती वोंब रामापाशी, सुग्रीवापाशी सांगायला गेलो तर माझा पुरुषार्थ माझ्यापाशी लाजेल. वानरांना सांगायला जायचे म्हणजे आपली नपुंसकता सांगण्यासारखे होईल. त्यापेक्षा श्रीरामाला न विचारता रावणाचा घातच मी करीन. मला श्रीरामभक्ताला पाहताच राक्षसराजाचा छळ थांबेल. त्याची दहा शिरे, वीज भुजा यांची मी घाव घालून पूजा करीन." पण लगेच त्याला असा विचार सुचला की, "परंतु याचा आधीच घात करण्यापेक्षा सीतेपाशी रावण काय काय वोलतो ते ऐकावे. सीता रावणाला अनुसरणे तर शक्यच नाही. जर रावणाने वळाने काही करायला आरंभ केला तर आपण त्याला सरळ धोपटावे. रावण मान, पान, राज्य वल आणि ज्ञान या पाच प्रकारांनी उन्मत्त झाला आहे. शिवाय सीतेविषयी कामोन्मत्त होऊन भ्रमोन्मत्त झाला आहे." अशा प्रकारे हनुमंताने विचार केला. अशोकवनात रावण आणि हनुमान हे दोघेही आपापला स्वार्थ साधावा म्हणून एकत्र आले होते.

अध्याय आठवा

रावण अशोकवनात येताना भोगाची इच्छा धरून आला आणि सीतेकडे पाहात राहिला. तेव्हा त्याला भयाने पीडलेली सीता दिसली. ज्याप्रमाणे वायूच्या आघाताने केळी कापते, त्याप्रमाणे सीता कापत होती. रावणाला पाहताच सीतेने आपल्या जीर्ण वस्त्राने कसेतरी वक्ष, पोट, हात झाकून घेतले. त्या जीर्ण वस्त्राने जेवढे अवयव झाकता आले तेवढे झाकून, लाजेने चूर होऊन, खाली मान घालून वसली. स्नान, न्हाणे न झालेली, सर्वांग मलिन झालेली. अंगावर पुरेसे वस्त्र नाही, अंथरायला काही नाही, बसायला आसन नाही अशा अवस्थेतली ती भूमिकन्या सीता, जमिनीवरच सुखसंपन्न होऊन, सावधानपणे वसलेली पाहून रावणालाच लाज वाटली. एखाद्या गंजलेल्या पेटीतही ज्याप्रमाणे मूळ संपत्ती सुरक्षित असते, त्याप्रमाणे वाह्यतः मलिन झालेल्या सीतेच्या अंतरात श्रीराम सुरक्षित होता. ती वाहेरून भयग्रस्त वाटली तरी अंतर्यामी निर्धास्त होती. तिची ही अवस्था न समजल्याने रावण तिच्या कामभोगासाठी तिला विनवू लागला.

रावणाचे भाषण-सीतेची प्रतिक्रिया

रावण सीतेला म्हणाला, "प्रिये तू मला भिऊ नकोस. मला पाहताच तू विनाकारण आपले शरीर झाकून का टाकते आहेस. मी दशानन तुला विनंतीपूर्वक सांगतो आहे की तू मला प्रसन्न हो आणि सर्व लाज सोडून सुखाने माझ्याशी रममाण हो. श्रीरामाची आशा सोड, माझे भाषण सत्य

https://archive.org/details/@sarayu_trust, Lucknow

CC-0. In Public Domain. Digitized by Sri Muthulakshmi Research Academy

मानून घे की तू मला आलिंगन दिलेस की तू पूर्ण राज्याचा भोग घेशील. माझ्या ऐंशी सहस्त्र स्त्रिया ज्यामध्ये मंदोदरी मुख्य आहे तिलाही मी तुझी दासी करीन आणि सर्वांपेक्षा तू श्रेष्ठ असशील. इंद्रादिक सर्व देवांना तुझे सेवक करून, मीही शंकराची शपथ घेऊन सांगतो की तुझा आज्ञाधारक होईन. मी स्वर्गलोक, मृत्युलोक आणि पाताळलोक येथून त्रिभुवनाची संपत्ती आणली आहे, ती तुलाच अर्पण करीन. ही माझी शपथ मान. त्वरेने तुझी दिव्य वस्त्रे फेड. श्रीरामाचे आकर्षण सोड; मलाच आवडीने तू भोग. तुझे मस्तक मलिन झाले आहे, तेव्हा जवादी मिसळून मंगल स्नान कर. तुझे भरीव स्तन शांत करण्यासाठी मी स्वतः चंदन लावीन. रत्नजडित अलंकार, रत्नकुंडले, पदके, हार, कंकणे, वाकी, रत्नांचे अर्धचंद्र अशी मनोहर भूषणे मी तुला देईन. शिवाय किंकिणीज्वाळमाला आणि कटीला मेखला देईन. तुझ्या अंदुवांचा, खळखळाट होत राहील. तू कळिकाळाचेही भय वाळगू नकोस. तुझे रूप आणि यौवन पाहून साक्षात ब्रह्मदेवालाही मूर्च्छा येईल. माझे मनही उतावीळ झाले आहे. तेव्हा जानकी मला आलिंगन दे. मी देवांनाही शरण जाऊन मान खाली घालणार नाही, पण तुझ्यापुढे लोटांगण घालतो, तुझे पाय धरतो, तू माझे सत्वर पाणीग्रहण कर. कुंभकर्णाला तुझा सेवक करीन; इंद्रजिताला फुले धरायला लावीन; अखयादी सर्व पुत्र तुझे आज्ञांकित दास करीन. स्वतः मंदोदरी नित्य तुझे पाय धुवील, मी ते चरण कुरवाळीन; केवळ तुझ्या अंगाचा स्पर्श होण्याचे सुख मला हवे आहे. तुझ्या अंगाचा सहजपणे स्पर्श होण्याएवढे माझे भाग्य कुठे आहे! तेव्हा माझी लाज सोडून तू माझे निर्लज्य भोग भोगून मला सुखी कर. आपल्याला हव्या त्या इच्छित स्थळी जाणाऱ्या विमानात बसून एकत्र नंदनवनात, चैत्रवनात जाऊ. तसेच अशोकवनात क्रीडा करू. त्या श्रीरामाचा त्याग करून तू माझा स्वीकार कर. तो वापडा राम माझ्यासमोर काय येतो.''

रावण पुढे म्हणाला, ''तो राम तो काय वापडा, तू त्याच्यासाठी का दुःख करते आहेस. त्या रामाची काय स्थिती आहे ते मी तुला सांगतो. ऐक. तो राम वनवासी, वल्कले नेसणारा, अन्नाशिवाय राहून उपास करणारा, त्याला का तू भोगणार. त्यापेक्षा मला भोग म्हणजे तुला त्रिविध भोग मिळतील. पराक्रम आणि जय ज्याला सोडून गेले आहेत असा तो राम आहे. ऐश्वर्याने त्याचा त्याग केला असून तो वनात हिंडताना दिसतो. हे सुंदरी, तू त्याच्याकडून कसले भोग मिळवणार. त्यावर तू माझे निरंतर भोग मिळव. रामाला नाही शौर्य, त्याची पत्नी हिरावून नेली कारण त्याचे तप अपुरे पडले. त्याचा श्रेष्ठ कर्मप्रताप आणि धैर्य यातही कमीपणा आहे. धैर्यामध्ये जर राम निधडा असता तर एका स्त्रीसाठी रडत, 'सीते-सीते' म्हणत झाडांना मिठ्या मारत का बसला असता? त्याला माझ्यासारखे धैर्य, राज्य, ऐश्वर्य नाही. तो हीन, दीन आहे. त्याला यश, सेना, ज्ञान यामध्ये माझी बरोबरी करता येणार नाही. आपली स्त्री हरवून अपयशी ठरलेला राम वनामध्ये हीन, दीन होऊन रडत फिरतो आहे. अशी त्या रामाची स्थिती असून मी तुला ती ऐकवणार नाही. माझ्यापासून सुटका झाली तरी तो राम तुला कसा मिळणार आहे? तुझे यौवन व्यर्थ जाते आहे. ते तर पुन्हा परत येणार नाही. मग त्यापेक्षा माझ्यासह शय्या भोग म्हणजेच तू सुखी होशील. तुला असे वाटत असेल की परस्त्रीला भोगल्याने मला पाप लागेल तर आम्हा राक्षसांचा स्वधर्म काय ते आता ऐक. आम्ही राक्षसांनी परस्त्रियांना पळवून आणून बळाने स्वतःच्या घरी भोगाव्या; मोठी परकी राज्ये बळाने हिरावून घ्यावी; देव, दैत्य, दानव, मानव यांचा पराभव करून त्यांच्या स्त्रिया, वैभव आम्ही स्वतः भोगावे; असाच आमचा राक्षसांचा स्वधर्म आहे. तेव्हा सीते, आपला हट्ट सोडून माझे सांगणे ऐक. राम अत्यंत

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

दु:खाने वारला; लक्ष्मणानेही प्राणत्याग केला. त्यामुळे राम आणि लक्ष्मण आहेत की नाहीत ही शंकाच सोडून दे आणि मला अनुसरून सुखी हो. मी तुझ्या पाया पडतो. सीते, मी तुझा खूप सन्मान करतो म्हणून तुला सहा महिन्यांवर मोकळी सोडली. आता मात्र सरळ बलात्काराने भोगीन. तेव्हा सीते, माझा स्वीकार कर. अरे, पालखी, छत्र आणा रे. सीता या दशानन रावणाला वरणार आहे. वाजवा निशाणे, वाद्यांचा गजर करा.''

सीतेने रावणाचे बोलणे ऐकल्यावर त्याची उपेक्षा केली. एखादे कुत्रे हत्तीवर भुंकते तसा रावण भुंकतो आहे; उत्तम पक्वान्न पाहून कुत्र्याने वसवस करावी तशीच वसवस सीता पाहून दहा तोंडाचा कुत्रा रावण करतो आहे; दहीभाताचा गोळा पाहून कावळा त्यावर झडप घालायला धावतो, तसेच जानकीला पाहून तो डोंबकावळा रावण झडपू पाहात होता. रावणाला पाहून मनामध्ये कोणतीही बाधा न आणता. श्रीरामाच्या विश्वासावर नि:शंकपणे सीता स्वस्थ बसली. ती स्वत: पतिव्रता, परिपूर्णतेने सबाह्य रामरूप होती. रामनामाचे स्मरण हेच तिचे नित्यस्मरण असल्याने रावण तिला तृणप्राय क्षुद्र वाटत होता. रावणाच्या बोलण्यातील आशय म्हणजे प्रलोभनयुक्त समाधान होते. त्यामुळे एखाद्या साधूपुढे कुत्रे भुंकत राहावे, त्याप्रमाणे सीता ते बोलणे मानत होती. दहा तोंडाचे घुवड असाच तिला रावण आणि त्याची बडबड वाटली. त्याचे बोलणे हे अपवित्र असल्याने तिला आवडले नाही. परस्त्रीच्या भोगाची रावणाची इच्छा ही आमिषासाठीची माशाने केलेली धडपड असून श्रीरामाच्या बाणांचा फास लागेल हे त्याच्या लक्षातच येत नव्हते. रावणाला कामसर्पाने पीडले असून तत्त्वत: परस्त्री कटू असून त्याला तिचीच गोडी वाटत होती; परंतु रामबाणाची लहर आली तर रावण क्षणार्धात संपेल अशी तिला निश्चिती वाटत होती. अशी सीता सावधान होती, परंतु लौकिकार्थासाठी लोकलज्जा बाळगून ती रावणाला हाताने आठकाठी करून शिकवल्यासारखे दाखवत होती.

सीता नंतर रावणाला म्हणाली, ''ब्रह्मदेवाच्या वंशात जन्म पावून तू भाग्याने वेदांची खंडे केलीस. आता परस्त्रीची अभिलाषा धरून, अधर्माने वागून, वृथा मरशील. ज्याप्रमाणे विकल्पवंत हा अपवित्र असल्याने ऋद्धी-सिद्धी त्याच्या हाती येत नाहीत; त्याप्रमाणे मी रामाची पतिव्रता पत्नी तुझ्या अपवित्र हाती येणार नाही. पोपटाला साळीचे खाणे हेच योग्य, ते सोडून तो नारळ खाऊ जाईल तर त्याला चोच भंग पावल्याने तळमळत राहावे लागेल. तसाच तू जर स्वत:च्या पत्नीचा त्याग करून परस्त्रीला भोगू जाशील तर श्रीरामाच्या बाणाने दु:खी होशील. रावणा, तुझ्या स्त्रियाच स्वेच्छेने परपुरुषाशी रमू लागल्या तर त्यांना तू पवित्र न मानता त्यांची परपुरूषासह हत्याच करशील; मग तसेच मी जर श्रीरामाची पत्नी आहे तर मी तुझ्याशी बोलणे हे सुद्धा अपवित्रच आहे. मग अंगसंगाची गोष्ट तर दूरच राहिली. तेव्हा वृथा अभिलाषा धरून मरशील. आपल्याप्रमाणेच सर्वांना जो मानतो तोच खरा ज्ञानी पुरुष; त्याने जशी स्वपत्नी रक्षण करावी, तशी परक्याची पत्नीही संरक्षावी. तू जरी श्रीराम दूर आहे असे म्हणतोस तरी तो माझ्यामध्येच नांदत असल्याचे तुला समजेल. त्याची चोरी होऊच शकत नाही. भुईला भिऊन जो पळू पाहील त्याला जिकडे तिकडे भुईच दिसेल. तसाच माझा राम सबाह्य परिपूर्ण आहे. श्रीरामाशी चोरी-मारी चालत नाही. त्याची पत्नी भोगणाराचा शय्येवरच कंठ छेदला जाईल. पुढे संसार करायला तो उरणारच नाही. 'माझ्यापासून सीता सुटणारच नाही,' असे तू म्हणतो आहेस पण ते व्यर्थ आहे; कारण रावणा तुला सबाह्य निपटून रामाने गिळले आहे. स्वपत्नीशी केलेला भोग हा स्वधर्म ठरतो. परक्याच्या पत्नीशी केलेला भोग हा नरकात नेतो. डुक्कर डुकरीणीशी जो भोग भोगतो, तसाच भोग

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Muthulakshmi Research Academy, Gangotri

इंद्र आणि उर्वशी हेही भोगतात; भोगामधे अशी समानता असते, परंतु परस्त्रीशी भोग म्हणजे अध:पात आहे. यासाठी हे दशानना, तू सुखाने स्वत:च्या पत्नीशी भोग भोगण्यात तुझे हित आहे. तू मला श्रीरामाला अर्पण करून आपले कुलगोत्र रक्षण करावेस. दुसऱ्याची पत्नी ही माता मानावी असा वेदशास्त्रांना संमत अर्थ आहे. तू परस्त्रीला भोगणारा मातृगमनी ठरून अध:पाताला जाशील.'' एवढे बोलून त्या महापापी रावणाचे दर्शनही नको म्हणून सीता तोंड फिरवून बसली. सीता पाठमोरी झाल्याने रावण दु:खी झाला. आपला लोभ आणि क्रोध शांत व्हावा म्हणून मग तो संतापून बोलू लागला. रागाने रावण थरथर कापत होता.

रावण म्हणाला, ''सीते, मी तर स्वत: राक्षसराज आहे. देव, दानव माझे प्रजाजन आहेत. अग रामपत्नी म्हणून तू माझा अपमान करणार काय? मला पाहताच देव, दानव भीतीने कापतात आणि तू एवढ्या धीटपणे बोलून माझा अपमान करणारे बोलतेस. माझ्या पत्नी-पुत्रांसमोर माझी तू निर्भत्सना करते आहेस यामुळे मी तुझा घातच करायला हवा; पण स्त्रीचा वध निषिद्ध आहे. शिवाय तुझ्या अंगसंगाची मला तीव्र इच्छा असून, माझ्या रागलोभाची त्याने शांती होणार आहे; तसेच तुझ्यावर माझे प्रेम आहे, त्यामुळे तुझा वध मला करवत नाही. जर तू मला अंगसंग न देशील तर शेवटी मात्र मी तुझ्या शरीराचे तुकडे-तुकडे करीन. ज्या श्रीरामाची तू शक्तिवान म्हणून स्तुती करतेस तो बापडा तर सामान्य मानव, त्याची लंकेपर्यंत पोचण्याची काय शक्यता, याचा तू विचारच करत नाहीस. सीतेला लंकेत आणले हे रामाला सांगणार कोण आणि कळले तरी समुद्राचा दुर्घट मार्ग तो पार कसा करणार? राम विचारा पायी चालणारा, सीतेच्या विरहाने भ्रमिष्ट झालेला. समुद्राची अगाध खोली, ती तो कशी उतरणार? राम म्हणजे आम्हा राक्षसांचे खाद्य आहे. मी मोठ्या कौतुकाने त्याला खाईन. लक्ष्मणाला घोटात गिळीन. तू मला सुखाने भजावेस. तुझी रामाशी कधीही भेट होणार नाही. तू रामाची आसक्ती सोडून मला प्रेमाने अनुसरावेस. रामाला पित्याने हाकलून लावला. आता तो राज्यहीन, स्वधर्महीन झाला असून त्याच्याकडे नाही अन्न, नाही द्रव्य. तो अत्यंत दीन झाला आहे. त्याला रोज गवताच्या शय्येवर झोप, तोंडात घालायला साधे पान नाही, वनवासात अन्न नाही, भूषणे नाहीत, अभ्यंग स्नान नाही, केसांच्या तेलाशिवाय जटा वळलेल्या, नेसायला वल्कले अशी त्याची दैन्यावस्था आहे. श्रीरामाला बळ असते तर तो वनात रडत का राहिला आहे. त्याला इथवर येववत नाही, तो निश्चित दीनवाणा आहे. त्याला माझ्यासारखे बळ, सैन्य नाही. त्या दीनाला माझ्याशी वैर करवणार नाही. वनवासात राहून राक्षसांशी झुंजण्यासाठी त्याने वानरांना एकत्र केले आहे. ते वानरही आमचे खाद्यच आहेत. रामाने वनचर होऊन वानर मिळवले आहेत; पण राक्षस त्यांना गिळतील. ते तर आमचे भक्ष्य आहे.''

रावणाने या नंतर प्रयत्नपूर्वक आणि साक्षेपाने डमरूपुराणातल्या ऋषींचे जे भाष्य ऐकले होते ते सीतेला ऐकवले. तो म्हणाला, ''सीते, सावधपणे ऋषींचे श्लोकावरील भाष्य ऐक. केळीच्या गाभ्याप्रमाणे अत्यंत सुकुमार आणि नाजुक असे ऊर असल्याने रंभोरु म्हणतात. जे तीस तोंडांचे देव ते सुद्धा सर्वजण माझ्यामुळे थोर संकटात पडतात. तसाच रामही रणात भंग पावेल. लक्ष्मणही विमुख होईल. माझ्या रणकंदनात रघुनाथ पडला की वानरे वाताहत होऊन पडतील आणि राक्षस सर्वांना खातील.'' सीता ही सज्ञान असल्याने रावणाला म्हणाली, ''रावणा हा श्लोक चांगला आहे. त्यातले सातवे अक्षर वगळून तो श्लोक म्हणून पाहा. रावणा तू अत्यंत हलक्या वृत्तीचा आहेस. दहा तोंडे मूर्खपणे वागवतोस.'' रावणाचे भाष्य ऐकूनही सीता त्याला असत्य वचन न म्हणता श्लोकातले सातवे अक्षर वगळून श्लोक

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

घडघड म्हणून पाहा एवढेच म्हणाली. तेव्हा त्या श्लोकाचा गूढार्थ असा झाला की, 'दशवदन रावण ग्लानीत जाईल. रघुनाथ रणात विजयी होईल. त्याच्यासह लक्ष्मणही असेल. सर्व वानरसेना रामाकडून रावणाचा नाश होताच विजयाचा गौरव करील. तिन्ही लोकी रामराज्य निर्माण होईल.' सीतेने श्लोकाचा असा अर्थ सांगितल्यावर रावण संतापून सीतेचा घात करण्यासाठी हात उगारून पुढे झाला आणि वृक्षावर बसलेल्या हनुमंताला त्यामुळे राग आला.

रावणाने हात उगारताच सीतेने त्याची, "कामोन्मत्त, गर्वोन्मत्त, मरणोन्मत्त झाला आहेस," असे म्हणून निर्भत्सना केली. रावण संतापला पण ती त्याला क्षुद्र कीटक मानत होती. नित्य श्रीरामाचे नामस्मरण करण्यामुळे ती समर्थ आणि निःशंक बनली होती. पावसाच्या अखंड धारांचा मेघांमधून वर्षाव होत राहिला तरी आकाश भिजत नाही; तशी रावणाच्या दुःखदायक अखंड बोलण्यामुळे सीता डळमळली नाही. रावणाच्या लाघवी बोलण्याला ती मृगजळाचे हेलकावे मानून त्याचा गर्व झडून जावा असे अनुभवाचे बोल बोलत होती. तिचे बोलणे असा गूढार्थ व्यक्त करत होते की त्यामधून स्वहित आणि परहित या दोहोंचा अर्थ व्यक्त व्हावा; ती तो अर्थ समर्थपणे, शुद्ध शब्दात सांगत होती. जशी अपकीर्ती ही शुद्ध पुण्यकीर्तीला झाकळू शकत नाही, तशी रावणाची दुष्ट दुर्वचने सीतेला स्पर्शही करत नव्हती. "ज्या रावणाची देव, दानव सेवा करतात, तो यश आणि कीर्ती संपादून लंकेवर राज्य करत होता. परंतु यानंतर त्याने सीतेला चोरून आणून अपकीर्ती संपादन केली. शिवाचा सेवक म्हणून प्रसिद्ध असा रावण श्रीरामाची पत्नी चोरल्यामुळे बुद्धिमंद, पापबद्ध झाला. अशी चोरी करून लंकाधीशा आता पळून कुठे जातोस? श्रीरामाच्या बाणांच्या आघातापासून तुझे कोण रक्षण करील? रघुनाथ कोपला म्हणजे ब्रह्मा, विष्णू, चंद्र, सूर्य, अग्नी, यम, विधाता यांच्याकडूनही रक्षण मिळू शकत नाही. शिवाच्या नगरीत लपू पाहशील तर शिव तुला त्रिशुळाने मारील. कारण शिव म्हणेल, माझ्या स्वामीची पत्नी तू चोरलीस त्यामुळे तू माझा वैरी आहेस. श्रीरामपत्नी ही जगत्त्रयजननी आणि विशेषकरून माझी गुरुपत्नी आहे. तिचा अभिलाष धरून तू तिला चोरलीस तेव्हा तुला शिव तृतीय नेत्राने जाळेल. अशा प्रकारे लंकेशा श्रीरामपत्नी चोरल्यावर कोणीही रक्षणकर्ता नाही. त्यामुळे तत्त्वतः तू मारला जाशील. तुला वाटत असेल की आपल्याजवळ सैन्य आणि सामर्थ्य आहे आणि श्रीराम एकाकी, निर्बळ आहे, पण रामाचे प्रबळ बळ मी प्रांजळपणे सांगते ते ऐक. त्याने ताटका आणि सुबाहू यांना मारले. मारीच आणि त्याचा भाऊ यांनी गर्वाने विरोध करताच त्यांना एका बाणाने संपविले. श्रीरामाने एकट्याने एकाच बाणाने चौदा सहस्त्र राक्षस, त्रिशिर, खर, दूषण यांना जनस्थानातल्या रणकंदनात मारले. तुझी बहीण शूर्पणखा हिचे नाक, कान कापून, विटंबना करून पाठविली, त्याचीही तुला लाज नाही. तिचा कैवार घेऊन तू भिकारी झालास आणि रामपत्नी घेऊन भीतीने पळालास. तेव्हा रामाला तोंड न दाखवता त्याच्या बाणाच्या भीतीने धास्तावून लंकेत लपलास. आता मोठी बडबड करतो आहेस, पण जटायूबरोबर युद्ध करताना माझ्यादेखत स्वतः दाती तृण धरून शरण गेलास. काय तुझा पराक्रम सांगतोस!"

सीतेने रावणाची निर्भत्सना केलेली पाहून हनुमंत वृक्षावर बसून हसत होता. सीतेचा तो पुरुषार्थ बघून मारुती चकित झाला. श्रीरामाने खर आणि दूषण मारल्यावर दोघे बंधू एकत्र बसून वाटणी करत असतील असे त्याच्या मनात आले. श्रीरामाला मोठा वाटा म्हणून दोघे बंधू रावण आणि कुंभकर्ण; तर लक्ष्मणाला एकट्या इंद्रजिताचा लहान वाटा मिळेल. इतर शूर वीरांचा वाटा हनुमंताला मिळेल. अंगदाला शिष्टाई दिली. नल

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

आणि नील यांना सेतूबंधनाचे कार्य सांगितले. इतर सारे सैन्य सुग्रीवाला देऊन वीरवृत्ती दाखविण्याचे विभाग समजाविण्याचे काम दिले. सीता रावणाला पुढे सांगू लागली, "श्रीराम स्वतः सच्चिदानंद आहे आणि तू त्याला दीन म्हणतोस. श्रीरामाचे माहात्म्य नीट लक्ष देऊन ऐक. श्रीरामनाम नित्य स्मरून, शिव रामाच्या पायाचे तीर्थ वंदनीय मानतो. ब्रह्मा रामाला लोटांगण घालतो. देव रामाला शिरोधार्य मानतात. श्रीशिव एकान्तात बसून श्रीरामनामाचे पठण करतो. त्याच श्रीरामाची तू मूर्खासारखी निंदा करतो आहेस, तेव्हा तुझे मरण निश्चित ओढवले आहे. जो जो श्रीरामाची निंदा करतो, त्याला श्रीशिव साक्षेपाने मारतो. तू तुझ्या स्वामीलाच आपला वैरी केला आहेस त्यामुळे या जगात तू मूर्खच ठरतोस. श्रीरामाची निंदा करण्याने तुझी जीभ झडेल, नरकाचा पाहुणा होशील आणि महान दुःखाचा वाटेकरी होशील."

सीतेचा क्रोध, संयमपूर्ण विवेचन, राममाहात्म्य

श्रीरामाची रावणाकडून होणारी निंदा ऐकून सीता क्रोधायमान होऊन म्हणाली, "रावणा, मी तुझे अर्ध्या क्षणात भस्म करीन. बलाने सीता भोगीन म्हणतोस, रघुनाथाची निंदा करतोस तेव्हा मी तुझे भस्म केले असते; परंतु समर्थ रघुनाथाला मोठा आघात झाल्यावरही क्रोध न करावा अशी आज्ञा आहे. तेव्हा रावणाचे भस्म कसे करायचे? कारण अंगात क्रोध शिरला की सर्वांग अपवित्र होते. तो क्रोध ब्रह्मचर्य भंग करणारा, तपाचा नाश करणारा, यज्ञ, दान, व्रत, दक्षिणा ही सर्व क्रियाकर्मे व्यर्थ ठरविणारा आहे. जसे घटाला भोक पडले तर तो गळू लागतो, तसे क्रोधाग्नीने तप जळते, योगी, संन्यासी क्रोधामुळे गांजले जाऊन मलिन होतात. बाह्यांगाचा विटाळ स्नानाने धुतला जातो; क्रोधाने विटाळलेला तीर्थस्नानानेही पवित्र होत नाही. काशीला राहून गंगास्नान केले तरी क्रोध अत्यंत खवळतो. क्रोधासारखा पूर्णपापी जगात कोणी नाही. काम क्रोध-लोभ हे नरकाचे पाहुणे असल्याने त्यांचा आपण त्याग करावा अशी श्रीरामाची आज्ञा आहे. श्रीरामाची आज्ञा असल्याने, ती पाळताना चित्तात क्रोध मी येऊ दिला नाही. त्यामुळेच रावणा तू अपघातापासून वाचलास. परंतु 'आता मी वाचलो' असे मात्र समजू नकोस. स्वतः श्रीरामच तुझा घात कसा करणार आहे ते ऐक. श्रीरामाच्या धनुष्याचा टणत्कार लंकाभुवनात उमटला की सर्व राक्षस मूर्च्छित होऊन पडतील आणि त्रिकूट खचून धाकाने पडेल. समुद्र पायउतार होईल. बाणांच्या वर्षावाच्या प्रभावाने वीर धरणीवर पडतील; त्यांच्यावरोबर अश्व-गज-रथ हेही उध्वस्त होतील. इंद्रजित हा लक्ष्मणाचा भाग आहे. तो इंद्रजितावर दारुण शस्त्रांचा आघात करून त्याचा प्राण घेईल. श्रीराम बाणाने वेधून कुंभकर्ण आणि रावण अशा तुम्हा दोघांनाही अर्ध्या क्षणात नष्ट करील. जसे डबक्यातले थोडेसे पाणी शोषून घ्यायला सूर्याला वेळ लागत नाही, तसे श्रीरामाच्या प्रबळ बाणांनी तुमचे प्राण तत्काळ घेतले जातील. ज्या राजाला कामासक्ती असते आणि ती अधर्माची असेल तर ते राष्ट्र नासते आणि राज्यसंपत्तीसह नष्ट होते. रावणा, परस्त्रीची चोरी केल्यामुळे रत्नाने भरलेली आणि सुवर्णपर्वतावरची तुझी लंका तुझ्या परिवारासह, पुत्रांसह क्षणात भस्म होईल."

सीता पुढे म्हणाली, "वज्राची धार, कालचक्र यांचे निवारण करता येईल; परंतु श्रीरामचा बाण दशशिर वधासाठी अनिवार्य आहे. कारण ज्याच्या हातातली दर्भशिखा कावळ्याच्या पाठीमागे लागल्यावर प्रत्यक्ष शिवादिकांसह त्रिलोकातल्या कोणालाच निवारण करता आले नाही; अशा रामाचा रागाने सोडलेला बाण निवारू शकेल असा कोण आहे? तो बाण राक्षस आणि मुख्यतः रावणाचा प्राण घेईल. तू म्हणतोस की रावण सबळ असून राम त्याच्या समान नाही.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

वस्तुतः श्रीराम सिंह असून तू कुत्रा आहेस. त्यामुळेच चोरा तू पळून आलास. कुत्र्याला हाडहाड केले तर तो जसे पक्वान्न तोंडात धरून पळतो, तसे सीतारूपी चिद्रत्न चोरून तू पळालास. श्रीराम हा चिन्मात्र गजेन्द्र आहे; तू विषयाचा काळा कुत्रा आहेस. तू घरच्यांवर कुरकुर करणार पण श्रीरामासमोर तुला राहवणार नाही. तू शूर्पणखेसारखाच, चोरी करून शूर पूर्ण, त्यावरही तू व्यर्थच पराक्रमाची गोष्ट करतो आहेस, काळतोंड्या रावणा."

रावण, मारुती प्रतिक्रिया, मंदोदरीचे आगमन

सीतेचे भाषण ऐकून रावणाला अत्यंत राग आला. सीतेचा वध करण्यासाठी तो सिद्ध झाला. सीतेच्या शब्दरूपी बाणांनी रावणाच्या मर्मस्थानाला टोचले; तो करकरा दात खाऊन, डोळे रागाने लाल करून, म्हणाला, "फोडा रे हिचे डोळे, हिची मान त्वरित मोडा, हिची आतडी बाहेर काढा, हिची जीभ कापा, तातडीने हिचे शरीर विदीर्ण करून त्याचे वेगवेगळे भाग करा." रावण सीतेचा घात करण्यासाठी शस्त्र घेऊन धावला, हे पाहून हनुमान रागाने थरथर कापू लागला. दोन्ही हात चोळत, शेपूट गोलाकार फिरवत, केसांची थरथर होत असताना झाडावर लोंबकळू लागला. डोळे गरगरा फिरवत, दात करकरा खात, रोमांचांची थरथर होत त्याचा राग प्रकट झाला. रावणाने सीतेला हात लावला तर आपण त्याचा घात करायचा असे ठरवून मारुती झाडावर लोंबत राहिला. हनुमंत रागावलेला पाहून सर्व सुरवरात हाहाःकार माजला आणि रावण संतापला हे पाहून सर्व स्त्रियांना कापरे भरले. सीतेचा छळ होत असताना आणि मारुतीने झाडावरून खाली उडी घेतली नसताना त्या ठिकाणी बुद्धिवंत मंदोदरी उपस्थिती झाली. रावण खड्ग घेऊन सीतेचा घात करणार होता; तेवढ्यात त्या मंदोदरीने रावणाचा खड्ग असलेला हात धरला. आपला हात मंदोदरीने धरलेला आहे, असे समजताच रावण दचकला. हनुमंत झाडावरच गुप्तपणे राहिला. यापुढील सीता-रावण यांच्या संवादातून प्रकट झालेली अद्‌भुत कथा ऐका.

अध्याय नववा

सीतेला रावणाने हात लावला असता तर हनुमंताने त्याचा घात केला असता. पण तेवढ्यात मंदोदरी तेथे आली आणि तिने अनर्थ चुकवला. अतिकायाची माता आणि रावणाची वनमालिनी प्रिय पत्नी मंदोदरी रावणाला आलिंगन देऊन हितकारक वचन बोलली.

मंदोदरीची रावणाला समज

"मी तुझी पत्नी स्वेच्छेने सांगते की तू माझ्याशी रममाण हो कारण तो स्वधर्म आहे. सीता ही चित्तात कामवासना नसल्याने निष्काम आहे. तिच्याशी कामभोग म्हणजे परम अधर्म असून निश्चित त्यात तुझा अधःपात आहे. कामवासना नसलेल्या सीतेचा भोग सोडून मी स्वेच्छेने सांगते जर आहे तर माझ्याशी रमावेस. माझ्याशी रमण्याने तुला सुख होईल; सीतेपाशी दुःख होईल. सीता ही श्रीरामाची पत्नी पतिव्रता सती आहे. तिच्याविषयी कामासक्ती ठेवण्याने राक्षसांचा आणि वंशाचा संपूर्ण नाश होईल. कुमार, प्रधान, सेनापती, अश्व, गज, रथ, पायदळ, इंद्रजित, कुंभकर्ण आणि लंकानाथ या सर्वांचे सीतेच्या क्षोभाने भस्म होईल. ज्याप्रमाणे सर्व रस चाखणारी माशी दिव्याच्या ज्योतीला चाखू पाहील तर ती जळून भस्म होईल, त्याप्रमाणे स्वतःची पत्नी सोडून सीतेला भोगू पाहशील तर लंकानाथा तुझे भस्म होईल. स्वतःच्या पुत्राचा द्वेष करणाऱ्या हिरण्यकशिपूने खांबावर शस्त्राचा आघात करताच त्याचा नखाग्रांनी घात करून त्याला परिवारासह संपविला. खांबातून नरहरी निर्माण झाला. इथे सीता

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

क्षोभल्यावर वनातला वनसिंह निर्माण होऊन राक्षसांचा संहार करील. जानकीच्या गुह्यस्थानात काय अमृत भरले आहे? की आमच्या गुह्यस्थानात विष भरले असून ते रावणाला कडू लागते आहे. स्वतःची किंवा परक्याची कोणतीही स्त्री ही कामवासनेने पाहिली तर दोघांकडून समान सुखच प्राप्त होते. पण स्वस्त्रीशी केलेल्या कामक्रीडेने परम सुख मिळते, उलट परस्त्रीकडून परम दुःख मिळते. परस्त्रीची आसक्ती धरणारा पूर्वजांना अधोगतीला नेतो, स्वतः नरकात जातो आणि वंशाची समाप्ती करतो." वनमालिनी मंदोदरीने नाना प्रकारच्या युक्तींनी पटवून रावणाला हाताला धरून एकान्तात नेले.

मंदोदरी रावणाला नारदवचनाचे स्मरण देते

मंदोदरीने एकान्तात नेऊन बसविल्यावर रावणाला नारदांनी बोललेले ऐकवले. "तू आपल्या अंगच्या सामर्थ्याच्या गर्वाने नारदांना विचारलेस की, "माझा वध करील असा त्रिजगतात कोण आहे? देव, दैत्य, दानव यातला कोण?" त्यावर नारद म्हणाले होते, "अरे दशानना, देवांना तर तू बंदिस्तच केले आहेस. दैत्य तुझ्यापुढे क्षुद्र आहेत. दानवांना तुझे धैर्य तीक्ष्ण ठरणारे आहे. पण मानव नर मात्र तुला युद्धात भारी ठरेल. रावणा, तू मला भविष्य विचारू नकोस. त्याने मनात संकल्पाची भावना येते; मग भविष्य चुकवण्यासाठी प्राणिमात्र अनेक युक्त्या-प्रयुक्त्या करतात." नारदांचे बोलणे ऐकल्यावर रावणाने त्यांचे पाय धरले आणि म्हटले, "मला माझे मरण सांगा." नंतर रामायण जाणणाऱ्या नारदांनी सत्य भाषण केले. "रावणा, तुझा वध कौसल्येचा पुत्र दाशरथी श्रीराम करील. तो लंकेत येऊन राक्षसांना संपवून टाकील." एवढे सांगून नारद आकाशमार्गाने निघाले. त्यांची गती त्रिजगात असामान्य होती. त्यांच्या वीणेवर रामनाम वाजत होते. मुखाने ते रामनाम गात होते. त्या नामामृताने तृप्त होऊन ते स्वानंदात डुलत होते. नामसंकीर्तनाने ते संतुष्ट होऊन, श्रीरामरूप दृष्टीने पाहून, सतत आनंदात, सुखात, उल्हासात, संतुष्ट झाले होते. नारदांनी गमन केल्यावर रावण उद्‌विग्न झाला. त्याने ब्रह्मदेवाला बोलावले आणि विचारले, "ही कौसल्या कोण? दशरथ कोण आणि त्याचे कुळ कोणते? तो कोणत्या देशात राहतो? हे सर्व मला सांगा." कौसल्येचा विवाह झालेला नाही, दशरथ जन्मलाच नाही; रामही जन्माला आलेला नाही असे नारद म्हणाले. रावणाकडून हे ऐकल्यावर चारही तोंडांनी ब्रह्मदेव हसला. नारदांचे बोलणे कोण बदलू शकणार? नंतर ब्रह्मदेव रावणाला म्हणाला, "कौसल्या ही कोसलराजाची कन्या, दशरथ हा अयोध्येचा सूर्यवंशी राजा. त्या दोघांचे लग्न झाले तेव्हा रावणाने त्यात विघ्न आणले. अखेर नारदांचे वचन सत्यच होणार. लग्न समुद्रात लागले. कौसल्या आणि दशरथ समुद्रात का गेले? तिथे लग्न कसे लागले? असे प्रश्न पडतात. त्यासाठी कालिकाखंडात ज्या गुप्त गोष्टी घडल्या ती जुनी परंपरा नारदांनी ज्ञानदृष्टीने पाहून निःशंकपणे कथन केली. सेतुबंधमाहात्म्यात, लघुमाहात्म्यात, थोरल्या माहात्म्यामध्ये सर्व वृत्तान्त लिहिलेला आहे. तो असा की अहिरावण, महिरावण यांचे कौसल्या-दशरथ यांच्या लग्नामुळे जीवन आणि मरण ठरणार होते. त्याची संपूर्ण कथा त्यामध्ये आहे. (तर असा हा पूर्वीच्या ग्रंथातला उल्लेख किती सांगावा त्याचा झाडा किती द्यायचा. माझ्याकडून रघुपतीच ते कवितेतून वदवितो आहे. मी महामूर्ख असून लटके रामायण लिहिले तर ते वाचल्यानेही पापाचे क्षालन होईल. निरनिराळे अनेक ग्रंथ आहेत; त्यात भिन्न भिन्न प्रकारे निरूपण आले आहे. मी माझे भावार्थरामायण सांगतो आहे. - ही मधेच पुस्ती जोडली आहे)

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

कौसल्या-दशरथ यांचे पूर्ववृत्त, विवाह

ब्रह्मदेव रावणाला म्हणाला, "कौसल्या-दशरथ यांच्या लग्नासाठी वऱ्हाड कोसलदेशाला गेले. पाचव्या दिवशी लग्न लागणार होते. ही गोष्ट रावणाला समजताच तो कौसल्येवर रागावून तातडीने धाड घालून कौसल्येला पळवून घेऊन आला. रावण मनातून भिऊन होता, त्यामुळे त्याने कौसल्येला लंकेत न ठेवण्याचा निर्णय केला. "देव माझा घात चिंतितात, त्यामुळे याचा विपरीत अर्थ काढतील. देव माझे सेवक वनल्यामुळे, माझा मृत्यू त्यांना आवडणारच. त्यामुळे चतुराई करून ते कौसल्येला दशरथाकडे नेतील". असा त्याला धाक वाटत होता. तेव्हा लंकेत न ठेवता एका पेटीत कौसल्येला घालून, त्याने द्राक्षे, आंबे, लाडू, पक्वाने, गार पाण्याची पात्रे त्या पेटीत ठेवली आणि ती पेटी समुद्राकडे पाठवून दिली. समुद्राने ती पेटी मीन माशाकडे दिली. मीन मासा पेटी दाढेत ठेवून समुद्रात वावरत होता. एका प्रसंगी दुसऱ्या एका मोठ्या माशाशी त्याचे युद्ध होण्याचा संभव निर्माण झाला. त्या युद्धात पेटीची मोडतोड होईल म्हणून त्याने ती पेटी समुद्रातल्या बेटावर ठेवली आणि मग तो युद्धासाठी परतला.

इकडे दशरथ लग्नासाठी त्वरेने जाता यावे म्हणून दूरची पायवाट टाळून तारव्यातून समुद्रमार्गे निघाला. त्यामुळे तीन रात्रीत कोसलदेशाला जाता येईल असा त्याचा विचार होता. ज्याप्रमाणे द्वारकेला चेउलीहून, जायचे तर पायवाट दूरची ठरते आणि तारव्यात बसून जाणारे लोक दोन दिवसात जाऊन पोचतात; त्याप्रमाणेच दशरथानेही नावेतून लवकर जाता येईल म्हणून वऱ्हाड नावेवर चढवून तो निघाला. नावेवर ध्वज, पताका होत्या. वाद्ये वाजत होती; असे उल्हासाने गर्जना करत वऱ्हाड नावेतून चालले होते. अशावेळी रावणाने पाळत ठेवून, अंधारात विमानाने येऊन रात्रीच्या वेळी दशरथाची नाव फोडली. जे होणार आहे ते कधी चुकत नाही. दशरथ जेव्हा पाण्यात बुडला तेव्हा जे झाले ते अपूर्व झाले. दशरथ बुडताना रामनाम तोंडाने म्हणत होता. ह्यावेळी त्याला एक फुटकी पाटी मिळाली. श्रीराम दशरथाच्या पोटी येणार म्हणून त्याला रामाचे नाव सहज आठवले. त्याला बुडताना रामनामामुळे कासवीस वाटले नाही. मोठ्या संकटात असताना रामनाम आठवले तर मनाला विश्रांती मिळते. नाम स्मरले की त्रिजगतातले सुखसमाधान प्राप्त होते. दशरथाला फुटकी पाटी मिळाली आणि त्या पाटीमुळे समुद्राच्या लाटांबरोबर लोटला जाऊन दशरथ जिथे कौसल्येची पेटी होती तिथे पोचला. त्या बेटावर पोचल्यानंतर तातडीने उठून दशरथ वेगाने बेटावर चालू लागला. त्यावेळी त्याला जवळच ती पेटी दिसली आणि तो आश्चर्यचकित झाला. सभोवार सर्वत्र समुद्रच असताना इथे पेटी कोणी ठेवली असेल; दुसरे काही दृष्टीला पडत नाही; याचे त्याला आश्चर्य वाटले. त्याने ती पेटी हातात धरून खटपटीने ती उघडली. तेव्हा त्याला कौसल्या आत सचिंत बसली आहे असे दिसले. नंतर त्याने तिला आणि तिने त्याला 'तुम्ही कोण?' असे प्रश्न केले. 'इथे कसे?' असेही विचारले दशरथाने मग कौसल्येला विचारले, "तू एक सुंदर तरुणी आहेस. तू या पेटीत कशी? तुला या बेटावर कोणी आणून ठेवले? हा अगाध, गहन, समुद्र असून, त्यामध्ये मोठे मासे, उग्र मगर असल्याने हे स्थान दुस्तर आणि दुर्गम आहे." त्यावर कौसल्येने सांगितले की, "मी कौसलराजाची राजकन्या आहे. राजाने माझ्यासाठी दशरथ हा वर नेमस्त केला आहे. तेवढ्यात रावणाने घाला घालून मला पळविले आणि लंकेला घेऊन आला. परंतु भविष्य ऐकून रावण गडबडला. भयाने मला पेटीत घालून समुद्राकडे पेटी सोपविली. समुद्राने पेटी या बेटावर ठेवली." हे सांगत असताना कौसल्येचा कंठ दाटून आला. नंतर ती म्हणाली, "माझ्या अभाग्याने मीच सृष्टीमधली अभागिनी ठरले. आता माझी दशरथाशी भेट होणार नाही. दशरथाशी माझे लग्न

https://archive.org/details/@sanskrit_shastra_lucknow_mahila_academy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

होऊ नये म्हणून रावणाने विघ्न आणले आणि दशरथाचा नाश करण्यासाठी त्वरेने सैन्यही पाठविले आहे. जळो तो दशानन; त्याच्याशी स्वप्नातही संभाषण होऊ नये. मी दशरथाचे ध्यान करत आनंदाने प्राण सोडीन'' कौसल्येचे कथन ऐकून दशरथ चकित झाला. सप्तसागरात जाऊनही होणार असेल ते चुकत नाही असे त्याला वाटले. त्याने आपला वृत्तान्त कौसल्येला सांगताना म्हटले, ''रावणाने माझा घात योजला, पण श्रीरघुनाथाने माझे समुद्रात बुडताना रक्षण केले. समुद्र एवढा भरला असतानाही मी दशरथ येथे पोचलो आहे. त्यावर कौसल्येने म्हटले, ''म्हणजे तू अजाचा पुत्र आणि सूर्यवंशी रघूचा नातू आहेस तर!''

दशरथ-कौसल्या विवाह

दशरथाचे निश्चयाचे बोलणे ऐकून कौसल्या सुखसंपन्न झाली. ती म्हणाली, ''माझ्यावर जनार्दन संतुष्ट झाला. त्याने माझे लग्न एकान्तात लावले. यामधे कर्माची खटपट, लौकिक अंतरपाट, लोकांची कटकट यातले काही नसताना हे निर्दोष सुलग्न लागले.'' दोघांचा जो अत्यानंद तो त्यांचा मधुपर्क; ती जे अनेक बोल बोलली तीच त्यांची मंगलाष्टके; विकल्पाची पळे झाडली, संकल्पाला मूदेने ओवाळले; स्वधर्माचा दीप उजळला; असा लग्नासाठी सुखकल्लोळ झाला. एकमेकांची अनोळख संपली, तीच त्यांना पायमांडे झाली. परमानंद, कौतुक लग्नात सुख निर्माण करण्यास कारण झाले. रघुनाथ उदरी येईल हा लग्नात आशीर्वाद मिळाला. यावेळी सूर्य लग्नघटिका पाहात होता., काल सावधान सांगत होता; दोघांची एकमेकांना स्पष्ट ओळख होताच अंतरपाट सुटला. दोघेही श्रेष्ठ अशा ॐपुण्याहवचनाने मौननिष्ठ झाले. समुद्रातले बेट हे लग्नघर, पेटी हे बोहले होऊन एकमेकांची दृष्टादृष्ट होताच लगेच लग्न लागले. या प्रकारे कौसल्येने स्वतःचा पती म्हणून लग्नात दशरथाला वरले. पुढे जो अर्थार्थ, आश्चर्यार्थ घडला तो ऐका.

कौसल्या आणि दशरथ दोघे पेटीत बसले आणि पेटीतली फळे, पक्वान्ने खाऊन, पाणी पिऊन आनंदित झाली. नंतर कौसल्येने दशरथाला विचारले, ''आपली पुढे सुटका कशी होणार?'' राजाने कौसल्येला सांगितले, ''रामनामाने आपल्याला मुक्ती मिळेल. वसिष्ठसद्गुरूंनी असे म्हटले आहे की, रामनामाचे स्मरण केल्याने भवभयाचे निर्दालण होते. बंधविमोचन ते आणखी काय? आम्ही-तुम्ही मिळून आता सावधानतेने आणि एकाग्रतेने श्रीरघुनाथाला भावभक्तीने स्मरले तर आपल्याला भवभय सर्वस्वी बाधणार नाही. पृथ्वी बुडताना गडबडली, आकाश तुटून पडू लागले तरी नामस्मरणाने भक्ताचे भवभय नष्ट होते. रामनामाच्या गोष्टी ऐकल्याने विघ्ने बारा वाटा पळतात. हे सुंदरी, तू भिऊ नकोस. श्रीराम सुखसंतुष्ट करील.'' श्रीरघुनाथ हा आत्मसामर्थ्यवान प्रतापवंत असून तो दशरथाच्या अंतरात प्रवेशला कारण तो दशरथाच्या पोटी जन्म घेणार होता; कारण दशरथाला नामामध्ये भक्ती होती. अशा त्यांच्या गोष्टी चालल्या असताना तिकडे मीन माशाने दुसऱ्या माशाला युद्धात आवेशाने जिंकले आणि तो तातडीने बेटावर येऊन पेटी घेऊन निघाला.

रावणाची प्रतिक्रिया-मंदोदरीची सूचना

रावणाने ब्रह्मदेवाला कौसल्येच्या लग्नाची वेळ विचारल्यावर ब्रह्मदेवाने सांगितले की, ''जे आधीचे संधान होते त्याप्रमाणे दशरथाशी तिचे लग्न लागले.'' हे ब्रह्मदेवाने सांगताच रावण खदखदा हसला आणि म्हणाला, ''पाहा, सत्यलोकनाथ स्वतःच मला असत्य ऐकवतो आहे.'' मग ब्रह्मदेव म्हणाला, ''रावणा, मी सत्यलोकातला असून मला असत्य म्हणतोस, तेव्हा ब्रह्मदेवाने लिहिलेल्याचा अर्थच तुला तत्त्वतः कळलेला नाही.'' त्यावर रावणाने सांगितले की, ''मी दशरथाचा घात केला, कौसल्येला समुद्रात घातली, तर आता

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

दशरथाचे लग्न कसे होईल? तुमचे बोलणे असत्य का मानू नये?" रावणाच्या प्रश्नांना प्रत्युत्तर देताना ब्रह्मदेवाने म्हटले, "रावणा, जगणे वा मरणे यावर भगवंताची सत्ता आहे. तू म्हणत असशील की, मी दशरथाला मारले तर ते तत्त्वतः असत्य आहे." असे ब्रह्मदेवाचे बोलणे ऐकून आणि त्यातली वक्रोक्ती ऐकून रावणाने पेटी आणवली. पेटी उघडून पाहताच त्याला दशरथ आणि कौसल्या आत असल्याचे दिसले. दशरथ पेटीतून बाहेर येताच रावण चकित होऊन दचकला; नंतर त्याचा घात करण्यासाठी रावणाने शस्त्राला हात घातला. दशरथाला समोर रावण दिसताच स्फुरण आले. "तुझे दहा कंठ वीस डोळे हाताच्या आघाताने भुईवर पाडीन." त्यावेळी रघुनाथ दशरथाच्या अंतरात पूर्णप्रताप निर्माण करत होता. त्यामुळे दशरथ रावणाला पाहून न भिता निःशंक पुरुषार्थाने उभा राहिला. जेव्हा दशरथाला निःशंक अवस्थेत रावणाने पाहिले तेव्हा तो त्याचा घात करायला उद्युक्त झाला. तेवढ्यात मंदोदरी तेथे आली आणि तिने रावणाला आवरले. तिने रावणाला एकान्तात नेऊन समजावले की "तू दशरथाला मारू पाहशील तर तूच अपघातात सापडशील. रावणा, पेटीतून अचानक दशरथ निघाला, तसाच श्रीराम निघेल तर तुझे मरण निश्चित असेल." हे ऐकल्यावर रावणाच्या मनात भय निर्माण होऊन तो कापू लागला. दशरथाच्या लग्नाला विरोध करताना रावण अत्यंत उद्विग्न झाला. भीतीने त्याची दहाडी तोंडे हीन, दीन आणि म्लान झाली.

मंदोदरीने रावणाला हिताचे बोलणे ऐकवले, "होणार असेल ते कोणीच टाळू शकत नाही. दशरथाला कौसल्येसह अयोध्येला धाडावे. त्या दोघांना आपण मारू म्हटल्याने ते मरणार नाहीत. त्यांना लंकेत न ठेवता अयोध्येला पाठवावे. कारण आपण काहीही वेगळे करायचे ठरविले तरी यांना कधीही मरण येणार नाही." अखेर रावणाने तिचे सांगणे मानले आणि त्वरित विमान आणवले. दशरथ आणि कौसल्या या दोघांना विमानात बसवून त्याने अयोध्येला पाठविले. तिकडे अयोध्येत आपला राजा दशरथ समुद्रात बुडाला या वार्तेने आकांत निर्माण झाला होता. तेवढ्यात दशरथ कौसल्येसह अयोध्येत आला. त्याला पाहून सर्व नगरात आनंद निर्माण झाला. गुढ्या-तोरणे उभारून आणि वाद्ये वाजवून नरनारींनी आपला आनंद व्यक्त केला. हा सर्व पूर्वीचा वृत्तान्त ऐकवून मंदोदरीने रावणाला म्हटले, "रावणा, तू का भ्रम करतोस, होणारे चुकत नाही." एवढे सांगून मंदोदरीने रावणाला सीतेची अभिलाषा सोडायला सांगून आपल्या भुवनात नेले.

अध्याय दहावा

सीतेला रावणाने भीती दाखविली, त्यावेळी त्याच्या सर्व पत्नींनी श्रीरामाच्या पत्नीला - सीतेला-डोळ्यांनी खुणावून आश्वासन दिले. रावण सीतेला म्हणाला, "तू माझी पूर्णपणे भार्या हो अन्यथा मी तुझा प्राण घेईन, नाक, कान कापीन. अरे, हिचे दोन्ही डोळे फोडा, त्वरित हिंचे डोके मारा, स्तनाचे मासाचे गोळे कापा, आतडी बाहेर काढा. तुझ्या पातिव्रत्याची थोरवी मानून सहा महिन्यापेक्षा अधिक भीड धरली. आता बलात्काराने भोगीन. तुझा राम एक वनवासी भिकारी तर आहे.

रावण-पत्न्यांकडून सीतेचे सांत्वन, ब्रह्माचा शाप

सीतेची रावणाकडून गांजणूक झालेली पाहून रावणाच्या सर्व पत्नी संतापल्या. त्यांनी सीतेचे सांत्वन करून तिला आश्वासन देऊन म्हटले, "तू याचे भय धरू नकोस." देवी, गंधर्वी अशा सुंदर स्त्रिया, नागकन्या, निशाचरी या सर्वजणी सीतेला आश्वासत होत्या. कोणी डोळ्यांनी, कोणी ओठांनी, कोणी हातांनी आणि कोणी बोटांनी असे आश्वासन देत होत्या. त्यांनी ब्रह्मदेवाचा शाप ऐकवला, "अग रावणाच्या माथ्यावर ब्रह्मयाचा

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

शाप आहे की रावण परस्त्रीला झोंबू शकणार नाही. त्यामुळे याचे भय बाळगू नको. सीते धीर धर. एकदा सत्यलोकातल्या वनप्रदेशात रावण उर्वशीला झोंबू लागला तेव्हा तिने त्याला अडवून विचारले की, 'तू नलकूबराच्या स्त्रीशी झोंबी का घेतोस?'' त्यावर न थांबता रावण उर्वशीला बलाने झोंबू लागला, उर्वशी आक्रंदून ओरडू लागली. त्यावेळी ब्रह्मदेव तेथे आला. अत्यंत संतापाने म्हणाला, ''लंकाधीश रावणा, दुष्टा, नतद्रष्टा, परस्त्रीशी असे वर्तन इथून पुढे करशील तर ब्रह्मशापामुळे दुर्लंघ्य होणारा परिणाम म्हणून तुझे मस्तक तुटून पडेल. ज्याचा आत्मभाव निर्मळ असतो त्यावर सर्वार्थाने कृपा केली जाते'' असा रावणाला मिळालेल्या शापाचा मूळ वृत्तान्त कथन केला गेला. हनुमंत पाहात होता की मंदोदरीने रावणाला घरात नेले. मंदोदरीने नाना युक्त्यांनी रावणाकडून दशरथ आणि कौसल्या यांना अयोध्येला पाठविले होते. तसेच आताही त्याला शिकवून स्वतःच्या घरी आणले होते.

रावणाने भयंकर, क्रूर, विक्राळ अशा सर्व राक्षसींना बोलावून त्यांना एकान्तात सांगितले की, ''सीतेला वश करा. त्यासाठी मोठे भय दाखवा. ज्यामुळे ती मला वश होईल; अशी प्रलोभने तिला दाखवा, साम-दाम भेद वापरा, भय दाखवा. ती भीतीने मला वश होईल. हे तुम्ही केलेत तर मी तुमचा अत्यंत चांगला मित्र होईन, उपकारकर्ता होईन'' असे त्या राक्षसींना एकान्तात सांगून मगच तो मंदोदरीसह भुवनात परतला. राक्षसी परत वनाकडे गेल्या. राक्षसी विकट आणि विक्राळ स्वरूपाच्या, तर काही वाकड्या नजरेच्या होत्या. त्या तोंड उघडून सीतेच्या समोर धावत जाऊन उभ्या राहिल्या. एक राक्षसी जटाधारी, एक हिरव्या जटा धारण करणारी, आणखी एक विस्तीर्ण कान उदरावर लोंबत असलेली, स्थूल उदराची विक्राळ, अहिमुखी, हयमुखी, महामारी, प्रचंड पोट असलेली विकट आणि क्रूर, एक घर्घर आवाज करणारी अशा अनेक राक्षसी सीतेकडे धावल्या. त्यांच्या हातात शूल, पट्टिश, मुद्गल, लहुडी, अशी लखलखीत दृढ शस्त्रे होती. त्या अनेक राक्षसी म्हणू लागल्या, ''हिच्या शरीराची तोडतोड करू या; तिची भीड काय धरायची? तडतडा हिचे मांस तोडून नेऊ, हिचे काळीज भाजून खाऊ, हिच्या हाडांचे मणी केसात ओवून घेऊ. ही जनककन्या रावणाला वरत नाही तेव्हा हिची आतडी बाहेर काढू; हिचा गळा मोडून सगळ्या वाटून खाऊ. हिला धरा, मारा, हिचे शेकडो तुकडे करा.'' सीता रावणाला वरायला तयार नव्हती म्हणून त्या कर्कश किंकाळ्या फोडत होत्या.

त्या राक्षसींच्या पाठोपाठ नंतर नाक कापल्याने नकटी झालेली शूर्पणखा सीतेच्या रोखाने फेंफें करत बडबडत आली, ''सीते, रावणाची उत्पत्ती ऐक. ब्रह्मदेवाचा पौलस्त्य, पुढे त्याचा विश्रवा, प्रजापती आणि निश्चित त्याचाच रावण. सारांश रावण हा ब्रह्मयाच्या चवथ्या पिढीतला असून, त्याची बुद्धी गाढी असून, वेदांची खंडे करणारी आहे. शिवाय त्याला चवदा चौकड्यांचे राज्य प्राप्त आहे. अशा त्याला तू वेडी वरायला तयार नाहीस! रावण हा ब्रह्मवंशी ब्राह्मण, श्रीराम हा हीन सूर्यवंशी क्षत्रिय, त्या रामाची तुला आवड कशी वाटते, रावण श्रेष्ठ वर्णाचा आहे. सुर-असुरांमध्ये रावणाची सत्ता आहे. श्रीराम केवळ भिकारी आहे. ऋद्धि-सिद्धी रावणाच्या घरी तर राम वनवासात फळे खाणारा आहे. आता माझे सांगणे ऐक. रावणाची आवडती राणी हो आणि दिव्य भोगांचा अनुभव भोग. सीता धन्य सद्भाग्यी आहे असेच जग म्हणेल. आपण गाढवाचे वाहन सोडून हत्तीच्या पाठीवर स्वार होऊन फिरले तर जग आपल्या सद्भाग्याचे कौतुक करते. यासाठी रावणाचे पाणिग्रहण कर.'' शूर्पणखेचे बोलणे ऐकून सीतेने तिची हेटाळणी केली. ज्याप्रमाणे हंस शेणाकडे पाहणार नाही, त्याप्रमाणे सीतेने

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Research Academy Gangotri

शूर्पणखेच्या बोलण्याची उपेक्षा केली. सीतेने काही प्रत्युत्तर दिले नाही म्हणून शूर्पणखा संतापली आणि "हिची जीभ आणि कान कापून त्यातून येणारे रक्त पिईन" असे मनाशी ठरवून इतर राक्षसींना तिने आज्ञा केली की, "जा मद्य आणा, आपण हिच्या मांसाचा फराळ करू. हिचे शरीर सर्वजणी वाटून घेऊ आणि या सीतेला सगळ्या मिळून खाऊ. सीतेचे मांस आणि चरबी याच्या बरोबर मद्याला चव येईल. ते खाताना आनंद-कल्लोळात निकुंबलेमध्ये बेहोश नाचू.

सीतेची निर्भयता-राक्षसींवर परिणाम

राक्षसी सीतेला नाना प्रकारांनी भेडसावत असतानाही, सीता श्रीरामचंद्राचा आत्मबोध असल्याने राक्षसींचे भय वाळगत नव्हती. ती रडत नव्हती की दीन झाली नव्हती. श्रीरामसुखाने ती सुखी झाली होती. सीतेच्या सुखसंपन्नतेमुळे तिला राक्षसी तृणासमान वाटल्या, त्यांचे भय वाटले नाही. नित्य रामनामस्मरण केल्याने सीतेला देहीच विदेहता आली होती. देह नष्ट होण्याविषयीची शंकाही तिच्या मनाला शिवली नाही. तिचे नावच वैदेही असल्याने तिला देहभयाचा भ्रम नव्हता. श्रीरामाच्या ध्यानामुळे भयनिवृत्ती झाल्याने तिला देहाची पर्वा नव्हती. ती राक्षसींना म्हणाली, "तुम्ही मला तोडा मोडा आणि संपूर्ण खा. श्रीराम सर्व भूतांचा भोक्ता आहे. रावणाचे नावही मी पाहणार नाही, तशी स्वप्नस्थिती मला स्पर्शही करणार नाही. देह रामाला अर्पण करावा ही माझी इच्छा आहे. श्रीराम तर पूर्णपणे तुमच्यात सबाह्य आहे. तुम्ही भक्षण करताच माझा देह ब्रह्मार्पण होईल. देह ठेवताच त्यामध्ये कृमी होतात, तेव्हा देह परोपकारार्थ लावावा. तुम्ही सर्वजणी मला भक्षण करा. श्रीराम सर्वां भूतांत भोक्ता आहे. माझा देह छिन्नभिन्न करा किंवा अग्नीत घाला; परंतु रावणाचा मला स्पर्श नको हे निश्चित, तोच माझा नेम आहे. कराल, विक्राळ अशी तोंडे करत, घर्घर आरोळ्या कितीही मारा. मी स्वप्नात, सुषुप्तीत वा जागृतीत लंकाधीशाला वरणे शक्य नाही हे निश्चित. सीतेचे निधडे धैर्य पाहून राक्षसी चळचळा कापू लागल्या. "ही सीता क्षोभली तर आम्हा सर्वांचीच शांती करील. सीता आमचा द्वेष न करता सर्वांच्या ठायी रघुनाथ पाहते. रावणाच्या आज्ञेने हिला छळले तर आमचे सर्वांचे मरण ओढवणार. हिची अभिलाषा रावणाने धरली तर तो जागीच मरून जाईल." असे राक्षसी आपसात कुजबुजत होत्या.

त्रिजटेचे स्वप्न-राक्षसींचे परतणे

त्रिजटा संतापून राक्षसींना बोलली, "मी त्रिजटा, बिभीषणाची भगिनी, सत्त्वशिरोमणी राक्षसी, तुम्हा क्रूर राक्षसींना दूर व्हायला सांगते आहे. मी जे सत्य सांगते आहे ते ऐका. मी झोपेत असताना एक स्वप्न पाहिले. तुम्ही सीतेला लोटांगण घालून शरण जा. तिचा विरोध करू नका. तुम्ही सीतेला खाऊ पाहाल तर तुम्ही एकमेकींना खाल. सीता सत्त्वराशी आहे. तिच्या विरुद्ध बोलू नका. कारण सीता ही सर्व भूतांमध्ये समान आहे. मग तुम्ही तिच्या विरोधात का बोलावे. जानकी परिपूर्ण जगदंबा आहे, तिच्या पायांना वंदन करा." हे त्रिजटेचे बोलणे ऐकून राक्षसी भयाने कापू लागल्या. त्यांनी त्रिजटेला विनंती केली की, "त्या स्वप्नात काय काय पाहिले ते सर्व सांग." नंतर त्रिजटा सांगू लागली. "स्वप्नात मला दिसले की एका पांढऱ्या, चार दात असलेल्या हत्तीच्या पाठीवर श्रीरघुनाथ, सीता आणि लक्ष्मण यांच्यासह बसला होता. सुरासुर चवऱ्या ढाळत होते. नर आणि वानर त्याचे गुणवर्णन करत होते. अपार वाद्यांच्या गजरासह ऋषी त्याचा जयजयकार करत होते. श्रीराम आणि सीता हे अभेद असल्याचे मी स्वप्नात पाहिले. याची उपपत्ती यथायोग्य रीतीने सांगते. ऐका. सूर्यासह जसा प्रकाश, चंद्रासह जसे शांत करणारे चांदणे, वायूसह जशी गती, गुळासह

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

जशी गोडी, कापूराबरोबर जसा सुगंध, जलासह जशी शीतलता, त्याप्रमाणेच सीता पतिव्रता श्रीरामासह होती. असे मला राम आणि सीता यांचे स्वप्नात दर्शन झाले. हे माझे सौभाग्य होते. पण त्याचबरोबर रावणाची पुढे होणारी दुर्गतीही मी पाहिली. ती उपपत्ती ऐका. स्वप्नात दिसलेला रावण असा होता. त्याच्या सर्वांगावर शेंदुराची उटी होती. संपूर्ण कपाळ शेंदुराने भरलेले होते. त्याच्या गळ्यात लाल फुलांच्या माळा होत्या. त्याची दाही शिरे बोडकी होती. त्याच्या नाकावर काळी काजळी लावलेली होती. सुसरी रावणाला धरत असून त्याला पाताळात नेण्यासाठी प्रयत्न करत होत्या. तो उंटावर बसून दक्षिण दिशेकडे जात होता. त्याचवेळी तो डुकरावर बसून अग्नीत खेळत असताना दिसला. तो शेणाच्या डोहात आपणहून लोळत होता. पुढचा स्वप्नातला भाग फार अद्‌भुत होता. तो आता ऐका. इंद्रजित आणि कुंभकर्ण हे सैन्यासह तेलपान करून शेणाच्या डोहात नागडे होऊन, वर-खाली होऊन डुंबत होते. तेवढ्यात मला दिसले की रावणाच्या शयनगृहावर वीज पडली. अशी सारी दुश्चिन्हे दिसली. तेव्हा सीता ही भाग्यवान आणि पतिव्रता असल्यामुळे तुम्ही सत्प्रवृत्ती धरून तिला वंदन करा.'' त्रिजटेचे बोलणे ऐकल्यावर सर्व राक्षसी परतून गेल्या.

हनुमंत स्वतःशीच म्हणाला, ''त्रिजटा ही सात्त्विक राक्षसी मला पाहायला मिळाली. ती चांगली असून, तिच्या योग्य बोलण्याने सीतेला ती साहाय्यभूत झाली.'' सीता ही अशोक, भाग्यवान सती अशोकवनात बसली असून लौकिक दृष्टीने ती दुःख करत होती. ती म्हणत होती, ''रावणाच्या बंदिवासात मी इथे राक्षसींच्या अधीन, या वनात आहे. मी माझे जीवित संपवावे म्हटले तर सर्व राक्षसी माझे रक्षण करणार. मला कोणी विष दिले तर रावणाचा जाच चुकेल. माझा मी एखाद्या शस्त्राने घात करावा म्हटले तरी मला शस्त्र आणून देणाराही कोणी दिसत नाही. श्रीराम माझा विचारच करत नाही; त्यामुळे मी घोर संकटात पडले आहे. रावणाने मला पळवून वेगाने इथे लंकेला आणले हे श्रीरामाला कळलेच नसेल म्हणून तो शोधायला आला नाही. मला लंकेत आणून ठेवली हे श्रीरामाला कोण सांगेल? जो सांगेल त्याला अमित पुण्य लागेल. त्या पुण्याची गणनाच होणार नाही. अन्नदान, उदकदान, सामवेदाचे अध्ययन, द्विजपत्नीची मुक्तता, ही दानेही या पुण्याची बरोबरी करणार नाहीत. कोट्यवधी राजसूय यज्ञ, ग्रहणाच्या वेळचे कोट्यवधी गाईंचे दान, सोन्याने परिपूर्ण धरादान, हीही या शुद्ध दानादानाची समान होणार नाहीत. सीतेच्या शोधाचे उत्तर एकच की श्रीरामाचे परम सुख. ब्रह्मज्ञान त्यापुढे क्षुद्र आणि मोक्ष हा अत्यल्प ठरेल. श्रीरामाच्या परम सुखापुढे भ्रांतिगत मोक्षही तुलनेला येणार नाही. माझे व्रत, तप. दान, शील, माझे निर्मळ पातिव्रत्य ही माझी मलाच सफळ न होता, रामाविण निष्फळ झाली. शेंगेत हिरवा दाणा तयार होतो. परंतु दाणा दिसत नाही तर शेंग दिसते, त्याचप्रमाणे रघुनंदनाशिवाय व्रत, तप, दान ही निष्फळ होतात. श्रीराम पुरुष तर सीता प्रकृती असून. त्या दोहोंचे ऐक्य जो नित्य करतो तो खरा पुण्यपुरुष असतो आणि तिन्ही लोकात तसा अन्य कोणी नसतो. त्याच्यामुळे इहलोक, परलोक सुखी होतात. त्याच्यामुळे पितरांना मोक्षसुख मिळते, शिवादिक त्याच्यामुळे सुखी होतात.''

हनुमंताची प्रतिक्रिया

''सीतेशी श्रीरामाविषयी बोलण्याने मला पुण्याच्या कोटी मिळतील.'' असे म्हणत हनुमंत झाडांवर नाचू लागला. त्याच्या तोंडाला, सीतेच्या भेटीच्या कल्पनेने, पाणी सुटले. तो आपल्याशी म्हणाला, ''धन्य धन्य सीता, चांगल्या गोड गोष्टी बोलली, ज्या शब्दांनी अमृताने कान भरले.'' तिचे

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

शब्द कानात येताच अर्थ न समजताही परम आनंद होतो आणि हनुमंत तर त्यादृष्टीने प्रबुद्ध होता. त्याने तिच्या शब्दांचा अर्थावबोध घुटकन गिळला. हनुमंताला बुद्धी स्फुरली. "आताच हिची भेट घेतली तर सीतेच्या मनात विकल्प येईल. तिला वाटेल पुन्हा रावण आला. तेव्हा संन्यासी होऊन आला होता, आता वानरवेषात आला आहे. सीतेच्या मनात विकल्प प्रवेशल्यावर भेटीला काय अर्थ उरला. हिची भेट न घेता गेलो तर श्रीरघुनाथाला काय सांगू? मी तिला दुरून पाहिली हे सांगण्यात मूर्खपणाच ठरणार. प्रत्येक जण विचारेल सीता काय आणि कसे बोलली? मी सर्वांना आणि वानरराजा सुग्रीवाला काय सांगणार? एकान्तात श्रीराम विचारेल त्या खुणांबद्दल काय सांगू? तेव्हा माझ्या काळ्या तोंडातून प्रतिवचन कसे देणार? समुद्र लंघून हनुमंत गेला आणि आला हे सर्व व्यर्थच झाले असे सर्व वानर दूषण देतील. माझ्यावर सतत असा भडिमार होत राहील. सीतेची भेट न घेता, तिच्या संबंधात विचारपूस न करता मी जर परत गेलो तर राम जगजेठी क्षोभेल. सीतेला एकान्तात न भेटता, व तिच्या गोष्टी न विचारता जर मी रघुनाथाला भेटलो तर तो कृतांतकाळासारखा क्षोभेल. श्रीरामाच्या डोळ्यातला क्रोधाग्नी मला तत्क्षणी जाळेल. सीतामातेची भेट न घेता येथून जाणे ही मोठीच चूक होईल. राक्षसींनी गांजलेली, रामाच्या विरहाने अत्यंत दुःखी झालेली, अशा सीतेला आश्वासन न देता गेलो तर ती प्राण सोडील. सीतेने प्राणत्याग केला तर अवघे रामायण तिथेच संपेल. त्याचे अपयश माझ्यावरच येईल आणि श्रीराम पूर्ण क्षोभेल. सीतेने प्राणत्याग करणे हेही अपयश माझ्याच माथी येणार. हे मी श्रीरामापाशी सांगितले नाही तर मी महादोषी ठरेन. शुभ वा अशुभ जशी असेल तशी वार्ता सद्गुरूला सांगितली नाही तर शिष्याला परम दोष लागतो. ही वंचना म्हणजे गुरुद्रोह ठरतो." तेव्हा हनुमंताला अशी युक्ती सुचली. "जर राक्षसींना न कळता मी सीतेला खांद्यावरून श्रीरामापाशी वाहून नेली तर-छेः! यामुळे श्रीरामाला सुखप्राप्ती होणार नाही. कारण वानरांचे सैन्य घेऊन, हातात सज्ज केलेले धनुष्यबाण घेऊन, श्रीरामाने रावण आणि कुंभकर्ण यांचा, प्रधान आणि सैन्य यांसह वध करावा; देवांचा बंदिवास संपवावा, नवग्रहांची बेडी तोडावी आणि रामराज्याची गुढी उभारावी यातच श्रीरामाची खरी कीर्ती आहे. मग मी जर सीतेला तिथे नेली तर श्रीरामाची कीर्ती माझ्यामुळे अपकीर्ती होईल. तेव्हा ही युक्ती योग्य नाही: ती करूच नये."

नंतर हनुमंताने ठरविले की, "सीतेची भेट अवश्य घ्यायची. ती भेट रावण वा राक्षसी यांना न कळता गुप्तपणे घ्यायची. सीतेला एकान्तात भेटलो तर तिच्या मनात विकल्प येईल. पूर्वी संन्यासवेषाने येऊन कपट केले; आता वानराच्या रूपाने छळायला आलेला रावणच आहे. यासाठी तिला विश्वास वाटावा म्हणून तिच्या पुढे श्रीरामाची पवित्र राममुद्रा असलेली अंगठी टाकावी. त्या मुद्रिकेचा भावार्थ जाणून ती वानराला भेटेल." सीतेला श्रीराम भेटल्यासारखे वाटेल. ती मुद्रिकेशी संवाद करू लागेल. त्या संवादाने ज्या गोड गोष्टी ऐकायला मिळाल्या त्यापुढे अमृतही फिके ठरेल असे हनुमंताला वाटले.

अध्याय अकरावा

आपली रामपत्नी सीतेशी भेट होणार म्हणून हनुमंत परम आवेगाने आनंदित होऊन, जेथे सीता एकान्तात निरपेक्षतेने वृक्षातळी बसली होती तिथल्याच एका वृक्षामध्ये गुप्तपणे बसला होता. सर्व राक्षसी आपापल्या ठिकाणी स्वाभाविकपणे झोपी गेल्या होत्या. सीता सावधपणे अशोकवृक्षाच्या तळाशी बसली होती. ती आपल्याशी विचार करत होती की, "मी पापकर्मापासून दूर राहात असूनही

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Trust and eGangotri

ही दुःखावस्था का भोगते आहे. मी लक्ष्मणाला विनाकारण शाप दिला आणि त्या पापामुळे या रावणाच्या कचाट्यात सापडले. लक्ष्मणाने सांगितलेली मर्यादारेषा ओलांडली आणि श्रीरामाला अंतरले. श्रीरामभक्तांची छळणूक केल्याने मला श्रीराम दुरावला. ही पापे माझ्या माथ्यावर आहेत म्हणूनच मी रावणाच्या हाती सापडले आणि ही दुःखावस्था भोगते आहे. मी अवज्ञा करणारी पापिणी असल्यामुळे रावण मला पत्नी हो म्हणतो आहे. मी खोटी करणी केली म्हणून स्वप्नातसुद्धा मला श्रीरामाचे दर्शन होत नाही. पापाच्या परिणामाने जनात फार मोठी हानी होऊन श्रीरामाचा शब्द कानावर पडत नाही की स्वप्नात श्रीराम दिसत नाही. यासाठी आपण कोणाचा छळ, फसवणूक, अवज्ञा प्राणान्तीही करू नये, कारण त्या पापाचा भोग आपल्याला भोगावा लागतो.'' असे पापाविषयीचे विचार करून पश्चात्ताप झालेली जानकी एकटी विचार करत बसली होती.

सीतेचा पूर्वकृतींविषयी अनुताप

"मी जो कळिकाळरूपी कांटा होता तो स्वतःच्या बुद्धीने निश्चयाने मृग मानला आणि अखेर तिघांच्या तीन वाटा करण्याचे कृत्य केले. तो मृगरूपी काळ असताना माझ्या त्या काळवेळेच्या लोभाने खवळून तत्काळ मीच मला फसविले. माझ्या कुबुद्धीच्या मृगलोभाने मीच श्रीरामाला त्या मृगाच्या पाठीमागे धाडले आणि मी करंटी झाले. माझी बुद्धी करंटी झाली आणि सत्त्वराशी लक्ष्मणाला श्रीरामाने माझ्या रक्षणासाठी ठेवले असताना, मी त्याला दूषणे देवून दूर पाठविले. त्याने माझ्या प्रथमच्या सामान्य दूषणांकडे दुर्लक्ष केले; पण माझी पापबुद्धी उफाळून मी म्हटले, "तू एकटा इथे मला, रामपत्नीला, भोगण्यासाठी राहिला आहेस. रामाने हाक देऊनही तिकडे धाव न घेता या ठिकाणी स्वतः सीतेला भोगण्यासाठी थांबला आहेस का?'' अशा वेड्यावाकड्या शब्दांनी मी त्याचा अपमान केला. मी ऐकवलेली पापवाणी ऐकावी लागू नये म्हणून लक्ष्मणाने कानात बोटे घालून तेथून त्वरेने गमन केले. अशी मी खोटी पापिणी ठरले. श्रीरामाच्या आज्ञेने माझ्या रक्षणासाठी थांबला असताना मीच रामाच्या आज्ञेचे उल्लंघन करून, छळवादी बोलण्याने त्या लक्ष्मणाला दूर पाठविले. श्रीरामाच्या आज्ञेचे उल्लंघन केल्याने मला रामाची भेट दुरावली. पुढे रावणाने माझे हरण करून माझी दुरवस्था माझ्याच पापाने केली. लक्ष्मण हा सर्वांना सुमित्र, त्याचा छळ करून मी त्याला कुमित्र ठरवला. त्या माझ्या पापामुळेच दहा तोंडांचा अपवित्र रावण माझ्याशी झोंबला. धन्य त्या लक्ष्मणाने आखलेली मर्यादारेषा रावणाला उल्लंघता आली नाही; ती मी ओलांडताच दुःखाची धनीण झाले. श्रीरामाला मृगाच्या मागे पाठविला, ही माझी खोटी बुद्धीच रामाशी माझी ताटातूट होण्यास कारण झाली. तिनेच मला दुःख प्राप्त झाले. भ्रताराकडे काही स्वतः मागणे हेच स्त्रियांच्या निंद्य जीवनाचे कारण आहे. त्या माझ्या निंद्य मागणीमुळेच मला रावणाकडून धरून लंकेला आणले गेले. मी लोभाने मृगाच्या कातडीच्या काचोळीची मागणी करून माझ्या व्रताची होळी केली. महाबळी श्रीराम दुरावला, लोभाने दुःखाची प्राप्ती तेवढी झाली. राम केवळ आत्माराम, लक्ष्मण सबाह्य निष्काम, लाभ-अलाभ दोन्ही सम असून देहात निर्द्वंद्व आराम असतो. लाभ आणि अलाभ असमान मानणारे ते राम आणि लक्ष्मण आहेत. त्यांना माझा दंडवत; त्यांना मी अनन्य भावाने शरण आहे.'' हे बोलणारी सीता पश्चात्तापाने पोळली गेल्याचे पाहून मारुतीला तिची कीव आली.

हनुमंत सीतेकडे श्रीरामाची मुद्रिका टाकतो.

सीतेची अनुतापयुक्त स्थिती समजल्यावर तिचे दुःख कमी करण्यासाठी हनुमंत

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

श्रीराममुद्रिका सीतेकडे टाकतो. त्या राममुद्रिकेचे महानपण असे की तिच्यामुळे सर्व दुःख नाहीसे होते आणि ती सत्यज्ञानस्वरूप मुद्रिका अपरंपार सुख मिळवून देते. ज्याप्रमाणे दीप अंधाराला त्याप्रमाणे मुद्रिका क्लेशांना दूर करते. सूर्य-चंद्र जसे काजव्याला तशी ही राममुद्रा जीवन प्रकाशमय करते. सीतेने ती प्रकाशवंत श्रीराममुद्रा पाहिली तेव्हा तिला आश्चर्य वाटले. "ही अचानक येथे कशी आली?" असा तिने स्वतःला प्रश्न केला. ती सुवर्णमुद्रिका श्रीरामाच्या संगाने शुद्ध सुवर्णाची होती. जानकी ही स्वतः सुवर्णवर्णाची होती. मुद्रिकेच्या पाठीवर सहस्त्रनामांची प्रभावळ होती; अक्षरांच्या ओळी होत्या. ती अक्षरे जानकीने पाहिली. त्यात दशावतारांचे भाष्य होते. ती मुद्रिका पाचू आणि माणके यांनी जडवलेली होती. सीतेला ती पाहून सुख झाले. मुद्रिकेचा अंतर्भाग अत्यंत पवित्र असून त्यामधे परात्पराचे सार होते. श्रीरामनामाने निरक्षर असे चित्-चिन्मात्र स्वरूप त्या मुद्रिकेचे होते. अशी ती मुद्रिका पाहून सीता सद्गदित झाली, तिच्या डोळ्यातून अश्रू ओघळू लागले, ती अत्यंत हर्षभरित झाली. मुद्रिका श्रीरामनामाने शोभत होती आणि तिच्यामुळे श्रीरामच मुद्रिकेतून अंतर्बाह्य सीतेला दिसत होता. मुद्रिका पाहताच असा चमत्कार झाला की सीतेला वाटले स्वतः श्रीरामच प्रत्यक्ष आला आणि त्या भासाने तिने पदर सावरला. श्रीराम अचानक आला म्हणून सीता लाजून खाली पाहू लागली. तिच्या सर्वांगात हर्ष भरला आणि सुखभावनेने ती डोलू लागली. "लक्ष्मण कुठे आहे? दुष्ट अपशब्दांनी मी त्याचा छळ केला म्हणून मी त्याचे पाय केसांनी झाडीन. त्याला लोटांगण घालीन" असे तिच्या मनात आले.

सीता अनुतापाच्या या विचारांनी असावध झाली होती. ती पुन्हा सावध झाली तेव्हा तिने पुढे पडलेली श्रीरामाची मुद्रिका ओळखली आणि तिचे मन प्रेमोत्सुक झाले. तिने मुद्रिका कपाळाला लावून वंदन केले; मग मुद्रिका हृदयाशी धरली; मग जानकीने स्वानंदाने मुद्रिकेचे चुंबन घेतले. "तू सुख घेऊन आलीस प्रेमले" असे म्हणत मुद्रिकेसमोर लोटांगण घातले. "बैस. तुझे पाय धुवून, ते तीर्थ मी प्राशन करीन; तुझे चरण कुरवाळीन. तू माझी सखी आहेस कारण तू श्रीरामाची अंगठी आहेस तुला निद्रा यावी म्हणून मी शय्या तयार करते. कारण समुद्र ओलांडून, पर्वत पार करून तू दमली असशील." सीता मुद्रिका सजीव की निर्जीव याचा विचारही करत नसल्याचे पाहून हनुमंताला तिचे भक्तिप्रेम समजून आले. तो वृक्षाच्या आडून हे पाहात असताना त्याच्या डोळ्यातून अश्रू ओघळायला लागले. "आम्ही स्वतःला भक्त म्हणवतो पण असे प्रेम आमच्या ठिकाणी नाही. जानकीच्या अशा नित्य प्रेमाने हिच्यावर रघुनाथ संतोषला. अचेतनामध्ये प्रेमपान्हा फुटावा, असा भाव कोणाच्याही ठिकाणी नसतो. श्रीराम, जो सर्वांच्या ठायी असून, सर्वांना वंदनीय आहे तो हिच्यावर संतोषला. सगुण, निर्गुण, सद्गुरुभक्त यांना जो वंदन करतो तो मुक्त होतो; जो निंदा करतो त्याला नरक प्राप्त होतो; हे वेदशास्त्रांनी गर्जून सांगितले आहे." असे विचार हनुमंताच्या मनात आले.

सीतेकडून मुद्रिकेला मनोगत कथन

श्रीराममुद्रिका पाहून सीतेला अत्यानंद झाला. ती मुद्रिकेला मनात होते ते विचारू लागली. "श्रीराम आणि लक्ष्मण कुशल असून, माझी सुटका का करत नाहीत. त्यांचे दुर्धर बाण असूनही ते पराक्रम का करत नाहीत? श्रीरामाचे बाण सुटले तर ते संपूर्ण समुद्राचे शोषण करू शकतील. मग रावणाचे कुलासह निर्दाळण श्रीराम का करत नाही? त्या दोघा वीरांनी सृष्टी सोडली हे सांगणे म्हणजे दुःखातिरेकच आहे, आणि ते सांगवत नाही म्हणून का ही मौनदृष्टी स्वीकारली आहेस? तू मोठी सज्ञान आहेस. श्रीराम परलोकास गेला

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized By Sarayu Foundation Trust and eGangotri

आणि तू मला बोलवायला आली आहेस. कारण तो जर सुस्थित असता तर त्याने निमिषार्धात माझी सोडवणूक केली असती. मुद्रिके, तूच मला काही गोष्टी सांग. रावणाने माझे हरण केल्यानंतर, राम-लक्ष्मण हे दोघे पंचवटीत परतले असतील तेव्हा त्या संकटात त्यांनी काय केले? मी पर्णकुटीत नाही असे पाहून त्या दोघांनी कडेलोटाचे दुःख केले, किंवा शस्त्रे स्वतःवरच चालविली, की त्या संकटामुळे गळफास लावून घेतला? त्यांना लोकलज्जा असह्य वाटून त्यांनी विष घेऊन प्राणत्याग केला; का केवळ माझ्या दुःखामुळे ते मूर्च्छित झाले. आणि अखेर दुःखाने विव्हळ होऊन त्यांचे प्राण गेले. 'सीते, सीते' असा आक्रोश करत त्यांनी प्राण सोडले का? 'पाणी, पाणी' म्हणत व्याकुळतेने का त्यांचा प्राण गेला? माझ्या दुःखाने त्यांना भ्रम होऊन त्यांनी प्राण सोडले का? पर्वत; पठारावर प्रचंड धोंड्यावर दोघांनी मुरकुंडी घातली आणि तिथेच वाळून त्यांची दुःखातिशयाने कुरवंडी होऊन ते गतप्राण झाले का? ते निर्जन वनात मूर्च्छित होऊन पडले आणि कोल्हे, वाघ, सिंह, वनहत्ती यांच्याकडून फाडले, तोडले, चिरडले गेले का? का त्यांना सुसरी, माझे यांनी गिळले? सागरात ते बुडाले की गुहेत शिरल्यावर त्यांना तरसांनी, तगरांनी खाल्ले?"

सीता पुढे म्हणाली, "ते दोघे निधडे महावीर असून त्यांच्या पुढे वाघ, सिंह वापडे काय करणार? ते दोघे स्नानादी करताना, फलमूल खाताना किंवा निद्रिस्त असताना त्यांचा रावणाने तर कपटाने घात केला नाही ना? परंतु रामाशी कपट चालत नाही. श्रीरामाचा बाण पाहताच रावण पळ काढतो. श्रीराम नित्य सावध असतो. विश्वामित्रांच्या यज्ञामध्ये अहोरात्र सावध राहून त्याने कपट करणाऱ्या सुबाहूला मारले. सुंदर स्त्री बनून कपट करण्यासाठी आलेल्या शूर्पणखेची त्याने विटंबना केली. माझ्या दुःखाने शोकग्रस्त होऊन श्रीरामाने प्राण सोडला, एरवी त्याने रावणाला निर्दाळून, माझी सुटका करण्यासाठी तो आला असता. श्रीरामाच्या दुर्धर बाणांनी दुष्ट राक्षस मारले गेले असते; महासागर शोषला जाऊन नरवानर येथे आले असते. बाणांचा अखंड वर्षाव करून त्याने लंकेची होळी केली असती, रावणाचा समूळ नाश करून जनककन्येला सोडविले असते. विराधाने मला हात लावताच एका बाणाने त्याचा रामाने घात केला. श्रीराम जिवंत असता तर त्याने रावणालाही मारले असते. चवदा सहस्र राक्षसांसह त्रिशिरा, खर, दूषण हे मारले, त्याने रावणाचा अर्ध्या क्षणात वध केला असता. श्रीराम सहज उदास बनला, रावणाने स्वतःच्या स्त्रीचे हरण केल्यावर तो शस्त्रांचा त्याग करून संन्यासी झाला आणि वनात हिंडत राहिला. संन्याशाचे हे सहज स्वाभाविक लक्षण आहे की देहाची ममता धरू नये, स्त्रीची चिंता करू नये, मग धावून येण्याची काय कथा? संन्यासधर्म हा स्वाभाविकपणे भूतमात्रांना अभयदान करतो; तेव्हा आता रावणाचा वध करू नये असे रामाने ठरविले असणार; म्हणजे लंकेची कथा खुंटलीच."

नंतर सीतेने असाही विचार केला की, "शिवाय आणखी एक गूढ असणार. श्रीराम हा मूलतः आत्माराम आहे. रावणाने माझे हरण करताच तो श्रीराम समाधिमध्ये प्रवेशला असेल. समाधिसुखात असताना कुठला राम आणि कुठली सीता, रावणाने आपली पत्नी हरण करून नेली हेही तो विसरला असणार. समाधिसुखाने संपन्न असताना प्रपंचाचे भान मिथ्या वाटते; मग श्रीराम काय रावण काय सर्व मिथ्याच आहे; तेव्हा कोण कोणासाठी धाव घेणार! मुद्रिके, मला खरं खरं सांग, श्रीराम संन्यासी झाला, समाधिस्थ झाला की त्याने देहत्याग केला. तुझे मौन हेच सांगते की राम आणि लक्ष्मण मरण पावले. तुझे मौन यासाठीच आहे. तू अत्यंत सावधान आहेस हेच तुझ्या मौनाचे लक्षण आहे. जो अबोल असतो त्याच्या ज्ञानाला मार्यादा नाही. हे ज्ञान तुझ्या ठिकाणी आहे, तेव्हा

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

तुझे गुण किती वर्णन करावे. मी डाव्या भागात आहे, तू दक्षिण-अंगी राहतेस; तू श्रीरामाच्या अंगसंगात असतेस, तू सर्वांगाने सर्वज्ञ आहेस." सद्‌गुरूच्या अंगावरचे जे अचेतन त्यालाही सीता सज्ञानपणे मिथ्या मानत नाही; तिची अवहेलना वा उपेक्षा करत नाही. अचेतन अशा श्रीरामाच्या मुद्रिकेलाही सीता सन्मान देते. मृदू, मंजुळ विनवण्या करून मुद्रिकेलाच सीता विचारू लागली की, "तू एवढी वाट कशी चाललीस? घाट ओलांडून, दुस्तर समुद्र तरून, या परतीराला कशी आलीस? माझे सांत्वन करण्यासाठी श्रीरामाने तुला पाठविले आहे काय?" एवढे बोलता बोलता जानकी तेथे मूर्च्छित पडली. ती मूर्च्छित पडताच हनुमानाला संशय आला की ती श्रीरामाच्या विरहाने संतापली असून निश्चित प्राणत्याग करील. श्रीरामाची मुद्रिका पाहून श्रीराम वनवासात मरण पावला असा मनाशी निश्चय करून सीता देहत्याग करील. सीतेने खरोखर प्राणत्याग केला तर श्रीराम मलाच विचारील, "हनुमंता, समुद्रलंघन करून तू तत्त्वतः काय अर्थ साधला?" यामुळे लंकेत येऊन ना राम ना सीता असा अनर्थ आपल्यावर ओढवला या विचाराने हनुमंत अत्यंत दुःखी झाला.

हनुमंत श्रीरामाचे गुणवर्णन करतो.

सीता मूर्च्छित झालेली पाहून हनुमंत उद्‌विग्न झाला. त्याने हृदयांतरात श्रीरामाचे स्मरण केले. त्यावरोबर त्याला विघ्न नष्ट करणारी बुद्धी स्फुरली. सीतेला सावध करण्यासाठी आपण आता श्रीरामाचे गुणगान करावे असे त्याने ठरवले आणि त्याने लगेच रामकथा गायला आरंभही केला. "कौसल्येच्या गर्भात गर्भातीत असा दशरथी श्रीरघुनाथ हा परब्रह्म सूर्यवंशात मूर्तिमंत अवतरला. श्रीराम परब्रह्म सीता प्रकृती; श्रीराम चैतन्य सीता चिच्छक्ती; श्रीराम धैर्य सीता धैर्यवती; श्रीराम हा अनन्यगती अवतार आहे. श्रीरामाचे आचरण हे गुरू, पिता यांच्या आज्ञेप्रमाणे आहे. ब्राह्मणांचा स्वतः भक्त असलेला श्रीराम सुरांचा साह्यकर्ता आहे. कैकेयीला दिलेल्या वरामुळे दशरथाने श्रीरामाला दंडकारण्यात पाठविले. श्रीरामासमवेत सीता आणि लक्ष्मण हेही वनवासाला गेले. गंगातटावर पंचवटीमध्ये श्रीराम सीतेसह वस्तीला राहिला. तेथे शूर्पणखेचे कपट ओळखून, सज्ञान श्रीरामाने तिचे नाक आणि कान कापून तिची विटंबना केली; तिचा कैवार घेऊन आलेल्या त्रिशिरा, खर, आणि दूषण यांना मारले. नंतर जनस्थान जिंकून त्याने ते ब्राह्मणांना दान दिले. सुवर्णमृगाच्या कंचुकीचा लोभ धरून सीतेने रामाला मृगामागे पाठविले. सीतेने दूषणांनी छळ करून सौमित्राला घालविले आणि रावणाने तिचे हरण केले. पुढे श्रीराम आणि लक्ष्मण सीतेचा शोध करत, जेथे जटायू आणि रावण यांचे युद्ध झाले होते तेथे आले. रथ, छत्र यांचा नाश करून जटायू पक्ष्याने रावणाला अडवले. अखेर रावणाने जटायूला मारले. त्या ठिकाणी आल्यावर श्रीरामाने जटायूचा उद्धार केला. पुढे कवंधाचा वध करून राम आणि लक्ष्मण किष्किंधेला आले. श्रीरामाने वालीचा वध करून सुग्रीवाला राज्य दिले. अंगदाला युवराज केले. यामुळे वानरांशी श्रीरामाचे सख्य झाले. त्यामुळेच तुझ्या शोधासाठी श्रीरामाने मला पाठविले. तुझ्या भेटीसाठी श्रीरामाने व्रत धरले आहे. सागरात शिळा बांधून, पुत्र, प्रधान, राक्षस यांसह रावणाला मारून सीतेचा उद्धार करायचा. कदाचित् माझ्यासारख्या वानरावर तुझा विश्वास बसणार नाही म्हणून ही खुणेची मुद्रिका मी आणली आहे. तेव्हा आता या वानराला रामदूत मानून, दुःख टाकून, मूर्च्छा सोडून तू भेट." हनुमंताकडून श्रीरामाचे चरित्र ऐकल्यावर सीता सावध झाली. वृक्षामधून ही कथा कथन होत असल्याचे जाणून ती चकित झाली.

सीता मग वृक्षाकडे पाहात म्हणाली, "कृपाळू श्रीरघुनाथ मला आश्वासन देण्यासाठी येथे

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

आला असणार. वृक्ष कथा सांगतो त्याअर्थी श्रीराम निश्चित आला आहे.'' सीतेने वृक्षाला वंदन करून विचारले. ''श्रीरामाचे कीर्तन कोण करतो आहे? त्याचे मुख पाहून. मी त्याला दंडवत घालीन. ज्याला श्रीरामकथेचे ज्ञान आहे त्याची पायधूळ मी मुखाने वंदीन. मला त्याचे मुख दाखवा. कारण ज्याच्या मुखात श्रीरामकथाकीर्तन आहे. त्याच्या मुखदर्शनाने परम सुखसमाधान मिळते. या सीतेला चित्तात प्रेम आणि उत्कंठा वाटत आहे; तेव्हा ज्याने ही खुणेची मुद्रिका आणली त्या कृपावंताने मला भेट द्यावी.'' सीतेची भावपूर्ण विनंती ऐकून हनुमंत वृक्षावरून खाली उतरला. त्याने सीतेला लोटांगण घातले आणि तिचे पाय मस्तकी धरले. सीतेला पाहून. तिची समक्ष भेट होऊन, हनुमंताला हर्ष आणि आनंद पोटी मावेनासा झाला. एखाद्याला महानिधीचा लाभ व्हावा, समुद्र चुळक्यात प्राशन व्हावा किंवा कळिकाळ जिंकला जावा. असा हनुमंताच्या मनाचा प्रकार झाला.

मारुतीचा आनंद, सीतेची शंका

मारुतीला एवढा आनंद झाला की तो सीतेच्या पायावर गडबडा लोळू लागला, त्याच्या डोळ्यातून आनंदाने अश्रू गळू लागले आणि सुखाच्या उत्साहात तो नाचू लागला. तो वारंवार तिच्या पाया पडू लागला, सद्गदित होऊन त्याला रडू फुटले, तो शेपूट हलवून नाचू लागला, हर्षभरित होऊन उड्या मारू लागला. येथे सीता सापडली, रघुनाथाचे कार्य सिद्धीस गेले आणि हनुमंताला यश आले यामुळे त्याला उल्हास वाटला. मारुतीची ती अवस्था पाहून सीता भांबावली आणि तिच्या मनात संशय निर्माण झाला. ''हा स्वतःला श्रीरामाचा दूत म्हणवितो; पण श्रीरामाला कुठला हनुमंत, पूर्ववृत्तान्त मला ज्ञात आहे. श्रीराम आणि लक्ष्मण हे दोघे शूर वीर आहेत, त्यांच्या बरोबर नरवानर नव्हते. मग हा वानर कोण जो नाना प्रकारचे विकार करतो आहे! हा निश्चित रावणच असणार. प्रथम संन्यासी होऊन आला होता. आता वानर होऊन आला असावा. तेव्हा याचा विश्वास कसा वाटावा? परंतु हा तर श्रीरामकथा सांगतो आहे. तेव्हा या हनुमंताला कपटी तरी कसे म्हणावे? मी स्वप्नात पाहिले तेच हा बोलत आहे. मला श्रीरामाचे नित्य ध्यान आहे. त्यामुळे मी ते स्वप्न पाहिले. येथे रामदूताचे आगमन होणे शक्य नाही. लंकेचा दुर्ग दुर्गम आहे; शिवाय मध्ये दुर्धर सागर आहे; अशोकवन हे दुस्तर आहे; तेव्हा वानर येथे कसा प्रवेश करणार. रावण राणीवशात असतो, हे अशोकवन त्यातच गुप्त आहे. तेव्हा हा रामदूत येथे प्रवेश करील हे प्रत्यक्षात सत्य नसणार. जरी मी हे स्वप्न मानले, तरी मी सावध आहे. ना निद्रा ना स्वप्न अशी माझी अवस्था असताना हा वानर तर खरोखर आला आहे. तो श्रीरामकथा सांगतो आहे. धन्य धन्य हा श्रीरामभक्त. माझ्या भाग्यानेच हा हनुमंत माझ्या कैवाराने शोधासाठी आला.''

नंतर सीतेने ठरविले की, ''हनुमंताला खोटा मानू नये. तो जे बोलेल ती सत्य वार्ता असेल. तेव्हा प्रथम त्याचाच पूर्ववृत्तान्त विचारावा.''

अध्याय बारावा

हनुमंत अचानक अशोकवनात आलेला पाहून सीता त्याला समूळ वृत्तान्त विचारते. ती म्हणाली, ''मी वनवासात असताना त्यावेळी तू नव्हतास. हनुमंता तू आताच कसा आलास? तो सर्व वृत्तान्त सांग. तू रामाला कसे पाहिलेस, तुझी त्याच्याशी भेट कशी झाली; तुम्ही काय काय गोष्टी केल्यात? ज्यांच्या पोटात अत्यंत प्रेम असते त्यांच्यातील गोष्टी एकमेकांना पटतात. श्रीरामकार्य साधण्यासाठी तू प्राणपणाने साहाय्यभूत का झालास त्यातले गूढ मला सांग. श्रीरामाच्या भेटीने कसे सुख होते; त्याच्या बोलण्यात अमृत कसे असते ते सांग. श्रीरामाच्या अंगाची ठेवण, रूपरेखा आणि

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

गुणलक्षण सांग. लक्ष्मण कसा आहे हे तू मनापासून सांग. श्रीरामाची कथा ऐकली की दुःख, शोक चित्तात येतच नाहीत. संसारभयाची व्यथा संपते. कथा ऐकून आनंद होतो. यासाठी मी तुला पुनःपुन्हा विचारते आहे. त्या कथेमुळे आत्मशांती मिळते हे तू निश्चित समज हनुमंता.''

''श्रीरामाच्या कथेचे श्रवण केल्याने मनन, निदिध्यास उरत नाही. जसे पाण्याशिवाय धान्य वाळते, तसे या कथेचे होते. श्रद्धेने कथा ऐकली की त्यांचे महिमान वाढते, मननाने मन उन्मन होते, आणि अहम् सोहम्‌मध्ये विरून जातो. चित्त चैतन्य होते, बुद्धीत साम्य आणि समाधान येते. कर्म पूर्ण ब्रह्म होते. इंद्रियांचा आचार चिन्मात्र बनतो.'' असे सीतेने श्रीरामकथेचे स्वरूप आदराने वर्णन करताच हनुमंत तटस्थ झाला. त्याला रामकथा आठवेना. पण हनुमंताचे ज्ञान धन्य की त्याने श्रीरामाचे कीर्तन करताच आठवण आणि विस्मरण या अवस्था संपल्या आणि तो सावध झाला.

हनुमंत श्रीरामवर्णनासह रामकथा सांगतो

सीतेने विचारल्यावरून हनुमंत श्रीरामस्वरूपासह यथार्थ वर्णन करत श्रीरामकथा सांगू लागतो. लक्ष्मणाचे आत्मलक्षण, देहस्थिती, गुणलावण्य हे सर्व त्याने समूळ सांगायला आरंभ केला. मारुतीला श्रीरामकथा सांगताना चित्तात उत्साह आला आणि सीता आदराने ऐकू लागल्याने तो स्वानंदाने सांगू लागला. ''श्रीराम हा सुस्वरूप, चित्स्वरूप, कमलनेत्र, जगाच्या नयनाचा नयन असून डोळ्याविण पाहू शकणारा आहे. हे असे देखणेपण आहे जानकी. त्याच्या कुंडलांचे आकारवर्णन करताना कोणी म्हणतात मकराकार, श्रवणाने विकार मावळतात म्हणून कोणी ते निर्विकार आत्मलेणे म्हणतात. श्रीरामाच्या श्रवणांमुळे ती कर्णभूषणे शोभायमान होतात. त्याचे कर्ण भूषणांचे लेणे बनतात. श्रवणांच्या देखणेपणाला परब्रह्म म्हणावे. ते त्याचे निरपेक्ष नाक परमार्थाचे तेज आणि सौंदर्य दाखवते. त्याच्याशिवाय ते निर्नासिक ठरते. ते सुख साक्षेपाने कसे मिळेल? श्रीरामाची नासिकस्थिती प्राणिमात्रांना नित्य विश्रांती देणारी आहे. श्रीरामाच्या प्राणाने प्राण्यांना गती मिळते. श्रीराम हाच त्यांची विश्रांती आहे. श्रीरामाचा मुखचंद्र हा निष्कलंक असून नित्य आनंद देतो; ब्रह्मादिक देवांना सुखदायक आणि जीवशिवांना सुखकर आहे. एरवी निराधार असणारे जीवशिव हे श्रीरामाच्या अधरांमुळे साधार होतात. त्यांची मिळणी होऊन ते एकाकार होतात. शिवाचे सर्व सुख म्हणजे श्रीराम आहे. श्रीरामाच्या मुखातली दंतपंक्ती म्हणजे जणू ओंकारामधली श्रुती; श्रुतीची विश्रांती म्हणजे श्रीराममुखचंद्र आहे. श्रीरामाच्या कपाळावरील तीन रेषा म्हणजे सत्-चित्-आनंद; त्याच्या ललाटभाग्याने सर्व लोक एकत्र नांदतात. प्रेमरूपी केशरासमवेत असलेला पिवळा तिलक त्याच्या कपाळावर रेखलेला असून त्यावर निर्धाराच्या अक्षता लावलेल्या आहेत. प्रेमळांचा श्रीराम हा आवडता आहे.''

''अहम्-मृग निर्लोभाने मारला; त्या मृगाच्या नाभीतली कस्तुरी म्हणजे सोहम् काढून ती श्रीरामाला अर्पण करून त्याच्या शरीराला ती लावली आहे. जन, विजन यांची विवंचना नाहीशी करून, त्यातून आत्मधैर्याचे चंदन मिळवून, त्याचा सुगंध काढून रामाला अंगभर उटी लावली होती. स्वधर्मकर्मफळ टाकून त्याचीच मुक्ताफळमाला केलेली श्रीरामाच्या गळ्यात शोभत होती. श्रीराम हा प्रेमळभक्तांचा आवडता आहे. (ओंकार हाच त्याचा शंखाकृती कंठ असून, तिथून वेदांना प्रकटीकरणाला वाट मिळते. ते विधिवादात उद्भट होऊन त्रिकांडात प्रकट होतात. त्वंपदतत्पद) यांच्या अतीत असे पदक नित्य शोभते. ते चिद्रत्नजडित, स्वच्छ, लखलखित, अशा आत्मतेजाने झळकते. त्याच्या कमरेला पीतांबर आहे म्हणतात, पण ते

https://archive.org/details/@sulakshmiacademy
Bhavani Vanmala Trust, Lucknow

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

चिदंबर असून शून्यत्वाचे छिद्र झाकते. त्यामुळे श्रीराम कासेला अच्छिद्र आहे. श्रीराम कासेला दृढ असून, एकपत्नीव्रत धारण करणारा आहे. जो त्याच्या कासेला लागतो तो भवसागर तरतो. श्रीराम हा सर्वव्यापी आहे. भक्तिभावासाठी कमरेला मेखला धारण करून, निळा ज्या लहान लहान घंटिका लावल्या होत्या त्या सर्वांना ऋद्धिसिध्दी प्रदान करत होत्या. सिंहाला आपल्या बारक्या कमरेचा अभिमान होता, पण श्रीरामाची कंवर पाहून तो लाजला आणि वनात गेला. श्रीरामाच्या कमरेला पाहून सिंह त्याच्या कटिमेखलेला लोभावून तेथे जडून राहिले, मग रानात जायचेही विसरले." श्रीरामाचे असे वर्णन हनुमंताने केले.

श्रीरामदर्शनाने होणाऱ्या लाभाचे वर्णन करताना हनुमान म्हणाला, "श्रीरामाच्या चरणांची स्थिती अशी की त्यामुळे गतीची ती गती असून, गतीला ते विश्रांती देतात. श्रीरामाच्या चरणातले निजभूषण असलेल्या वाकींनी वेदांना उणेपण आणले. त्यामुळे ते मौन धारण करून राहिले आणि श्रीरामाचे गुणकीर्तन गर्जत राहिले. परा, पश्यन्ती, मध्यमा, वैखरी या चारी वाचा परात्पर असून ह्याच चरणातले तोडर झाल्या. श्रीराम हा चिन्मात्र म्हणजे ज्ञानस्वरूप असून तो परब्रह्मच आहे. श्रीरामाची शरीरयष्टी पाहिली तर त्याला गगन ठेंगणे वाटते. त्याचे मन पाहिले की श्रुतिशास्त्रांना मौन पडते. त्याचे गुण पाहता तो सगुण दिसतो; परंतु त्याने त्रिगुण हरले आहेत; असा तो स्वतः निर्गुण आहे. श्रीराम आणि लक्ष्मण यांचे विचक्षणपणे निरीक्षण केले तर लक्ष्य आणि अलक्ष्य याहून वेगळे असे ते आहेत. त्यांना लक्षण-अलक्षण नाही. श्रीरामाच्या मुखातून निघणारी अक्षरे अमृतापेक्षा मधुर असतात आणि ती जे कानांनी ऐकतात त्या भाग्यवंतांच्या सर्वांगात आनंदरस भरतो. श्रीरामाचे मुख पाहिल्यावर समाधिसुखही त्यापुढे फिके पडते. त्या मुखदर्शनाने स्वप्नातही दुःख दिसत नाही आणि हर्षच हर्ष कोंदाटतो. परब्रह्म कोंदाटले जाऊन सर्व क्रियाकर्म ब्रह्मरूप होते. धर्म आणि अधर्म हरपले जाऊन वेदवादही कुंठित होतो. असा तो श्रीराम नेटका आहे आणि तसाच त्याचा बंधू लक्ष्मण आहे. त्या दोघात भिन्न आवाका दिसला तरी दोघात अभिन्नत्व आहे. तुला लोटांगण घालून सीतादेवी तुझे कुशल कल्याण लक्ष्मणाने स्वतः विचारले आहे. श्रीरामानेही कल्याण विचारले आहे.

हनुमंताच्या निवेदनावर सीतेची प्रतिक्रिया

हनुमंताचे निवेदन ऐकल्यावर रामपत्नी सीता स्तब्ध झाली. स्वतःला विसरली. मारुतीने कथनात संपूर्ण श्रीराम आणला त्यामुळे सीतेचे मनोरथ पूर्ण होऊन ती स्वानंदभरित झाली. तिच्या पोटी हर्ष मावेना. कोटीप्रमाण संतोष होऊन, सीता सुख पावली आणि तिने मारुतीला मिठी घातली. "वानराच्या तोंडी मनुष्यवाणी, त्याच्या मुखात श्रीरामकथा, ज्या कथेच्या श्रवणाने भवबंधनातून मुक्तता होते," असा प्रकार पाहून सीतेला आनंद झाला. जणू श्रीरामाचीच भेट झाली आणि त्यामुळे दुःखकोटी संपल्या, सृष्टी सुखरूप झाली असे तिला वाटले. हर्षाने उत्साहित होऊन तिने स्वानंदाने त्वरित हात पसरून कपिराय मारुतीला जशी माता प्रियपुत्राला तसे आलिंगन दिले. सीतेला गाढ सुख झाले. पुत्रसुख तृणवत् ठरावे एवढे कौतुक आणि प्रेम वाटून हनुमंत तिला आवडता झाला. "श्रीराम पती आणि दीर लक्ष्मण दोघेही सुखसंपन्न वीर आहेत, हे तुझे उत्तर ऐकून मला अपार सुख झाले. श्रीरामस्वरूपाची कथा तू सांगितलीस त्यामुळे ब्रह्मसायुज्यता प्राप्त होऊन जे सुख झाले त्याची कशाशीच तुलना होणार नाही. श्रीरामकथा ऐकवून तू मला सुख दिलेस म्हणून मी तुला वरदान देते."

सीतेने हनुमंताला वर देताना म्हटले, "हनुमंता, तू चिरंजीव हो. तुझे सारे जीवित हे ज्ञान आणि अनुभवाने संपन्न होऊन, नित्य नवनवीन सुख श्रीरामपदवीच्या वैभवाने पूर्ण होईल. तुझ्यापुढे कळिकाळ चळचळा कापेल असा तुझा

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

पराक्रम असेल. श्रीरामनामाने तुला भूमंडळात सदा यश मिळेल. प्रापंचिक ज्ञान निरसून श्रीरामभक्तीने तुझी बुद्धी प्रबुद्ध होईल. ज्ञान ज्ञानपणात नाहीसे होऊन श्रीरामस्मरणाच्या बळाने तुला मूळ ज्ञान प्राप्त होईल. श्रीरामाच्या स्मरणाने अपयश तत्क्षणी नष्ट होते, यश त्रिभुवनात मावत नाही असा नामस्मरणाचा प्रताप आहे. चिरंजीवित्व तू सुखात अनुभवशील. बळ, बुद्धी, यश यांपेक्षा तुझी योग्यता अधिक असल्याचे देव, दानव यांना दिसेल. जसे गोपद ओलांडावे तसा शतयोजन आणि अगाध सागर उल्लंघून तू आलास तेव्हा हे प्रबुद्ध प्रज्ञेच्या हनुमंता ह्यापुढे माझे वरदान काय ठरावे? तुला वानर म्हणू नये. सुरासुरांना दुर्धर असे लंकापुर धुंडाळून तू राक्षसांना पीडलेस; एकटा एक असून रावणाच्या सभेतल्या राक्षसांना आकांत करायला लावून तू रावणाला त्रस्त केलेस; कडोविकट अशा कोट्यवधी राक्षसांना लंकेत तू पीडा केलीस आणि रावणाची सभा तू स्पष्टपणे उघडी केलीस; दशानन रावणाच्या सभेत त्याच्या समक्ष राक्षसांना लुबाडलेस, शेवटी रावणाचीही गांजणूक केलीस; एवढा आकांत घडविलास तरी हनुमंत येथे आला हे लंकेत कोणाला कळले नाही; असा तू एकमेव समर्थ आहेस. तू प्रतापी पुरुषांमध्ये श्रेष्ठ आहेस. अशोकवनात येऊन पोचलास तेव्हा तूच जनक आणि तूच जननी आहेस. आता श्रीरामाला सत्वर घेऊन ये. मी तुझी दासी होऊन माझ्या केसांनी तुझे चरण झाडीन. श्रीरामाला लवकर आण.'' असे म्हणून सीता हनुमंताच्या पाया पडली.

हनुमंताचे आश्वासन, सीतेची शंका

सीतेने व्यक्त केलेल्या भावनांमुळे हनुमंताला स्फुरण आले. तो सीतेला म्हणाला, ''तू निष्कारण शोक कशाला करतेस. मला त्वरित आपली खूण दे म्हणजे मी श्रीरामाला आणतो. तुझ्यासाठी खूण म्हणून मुद्रिका आणली त्यामुळे तू या वानराला ओळखलेस; तशीच श्रीरामाची खूण पटून त्याला माझे बोलणे सत्य वाटावे म्हणून तुझी खूण दे. पण ते जाऊ दे. खूण देऊन तरी तू काय करणार? ज्यासाठी वचन किंवा शपथ लागणार नाही अशी एक वेगळी युक्ती मला सुचली आहे. ती ऐक. तू माझ्या पाठीवर बसलीस तर लगेच मी तुला श्रीराम भेटवीन; तेव्हा आता विलंब करू नकोस. तुझा शोध लागला हे श्रीरामाला सांगायला मी तुला इथेच सोडून गेलो तर राक्षसी तुझा घात करतील आणि हा शोध व्यर्थ होईल. आताच माझ्या समोर रावण तुझा वध करायला आला होता. तो अनर्थ दैवानेच टळला. यामुळे मला तुला सोडून जाता येत नाही. त्या शूर्पणखेला श्रीरामाने नकटी केली त्यामुळे तुझ्यावर तिचा मोठा राग आहे. ती दुष्ट राक्षसी उठाउठी तुझा वध करील. तेव्हा तुला सोडून जाणे अशक्य झाले आहे. आता त्वरित माझ्या पाठीवर बैस. मी श्रीरामाशी तुझी भेट घडवतो. मनात कोणतीही शंका धरू नको. आपल्या बळाने लंका, त्रिकूट, कनकगिरी उपटून टाकून, एकाच उड्डाणात समुद्राच्या पैलतीरावर नेईन. तिथून एकाच उड्डाणात तुला श्रीराम आणि लक्ष्मण यांना भेटवीन. श्रीरामाची शपथ घेऊन सांगतो तू माझ्या पाठीवर आरूढ हो. तुला मी त्वरेने नेत असताना राक्षसातील महाशूर वीरांनाही वेगाने जाणाऱ्या माझ्याजवळ येणे शक्य होणार नाही. त्या चिलटांना काय ठाऊक आहे. इंद्रजित, कुंभकर्ण यांच्याशी लढून, रावणाचीही गांजणूक करीन आणि तुला श्रीरामाला भेटवीन.

हनुमंताचे बोलणे ऐकल्यावर सीतेने आपल्या मनातल्या शंका आणि विचार प्रकट करताना म्हटले, ''तुझ्या पाठीवर बसल्यानंतर तुझ्या उड्डाणाच्या वेगाने हेंदकाळून मी सागरात पडेन. तेव्हा समुद्रातल्या सुसरी, मासे, मगर मला खातील. तेव्हा तू विनाकारण संकटात पडशील, मग मी कशी येऊ? जर राक्षसांनी पाठलाग केला

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

तर तू युद्धासाठी परत फिरशील; तेव्हा समरांगणावरच्या युद्धप्रसंगात मी खाली पडेन. मी जमिनीवर पडलेली असताना राक्षस रागाने माझा वध करतील. हेही योग्य होणार नाही, मग मी कशी येऊ? मला मारल्यानंतर जरी तू कोट्यवधी राक्षस मारलेस तरी त्यामुळे श्रीराम सुखी होणार नाही. त्यामुळे हनुमंता हा विचार चुकीचा ठरतो.'' सीतेने या शंका व्यक्त केल्यावर हनुमंत म्हणाला, ''सीतामाई, सावधपणे माझे बोलणे ऐक. मला कसलाही आटापिटा करावा लागणार नाही. मी रागावलो की माझे शेपूट कोट्यवधी राक्षस मारील. तुला मी सुरक्षित ठेवीन. राक्षस दशकोटींच्या संख्येने आले तरी माझे प्रतापी शेपूट त्या सर्व राक्षसांचा घात करील.'' या मारुतीच्या सांगण्यावर सीतेने शंका विचारली की, ''तू एवढासा, तुझे शेपूट ते काय आणि ते असंख्य राक्षसांचा घात करील हे सत्य होईल असे माझ्या चित्ताला पटत नाही.''

शेपटीच्या सामर्थ्याचे दर्शन, सीतेची प्रतिक्रिया

मारुती सीतेच्या शंकेला उत्तर देताना म्हणाला, ''हा वानर किती, त्याच्या शेपटाची किती शक्ती, असे तू म्हणतेस तर माझी स्वरूपस्थिती प्रत्यक्षच पाहा.'' एवढे बोलून मारुतीने वाढायला आरंभ केला. विंध्य, मेरू, मांदार या पर्वतांहून तो अधिक वाढला. त्यावेळी तो प्रलयकाळीच्या रुद्राप्रमाणे दुर्धर भासला. नंतर मारुती म्हणाला, ''तू माझे सत्त्व जाणत नाहीस. माझ्या स्वरूपाचा प्रभाव पाहा. मानव, दानव, देव, राक्षस या सर्वांची मी गांजणूक करीन. माझे पुच्छ प्रतापवंत आहे. सर्व राक्षस मारून, तुझ्यासह सर्व लंकाच निमिषार्धात नेईन. तेव्हा तू मनातली शंका सोडून माझ्या पाठीवर बैस. तुझी श्रीरामाशी मी भेट घडवीन आणि तुला स्वानंदसुखाचा अनुभव देईन. तुला श्रीरामाकडे नेण्यासाठी माझी दुर्धर शक्ती कशी आहे ते पाहा. मनातली शंका काढून टाक आणि माझ्या पाठीवर बैस.'' मारुतीचे दुर्धर सामर्थ्य पाहून देव, दानव चळचळा कापतात. सीता ही धैर्यवान आणि निःशंक होऊन स्वधर्म सांगू लागली. ''मला श्रीरामाला भेटविण्यासाठी तुझी निधडी शक्ती समर्थ आहे. तुझी अचलस्थिती पाहून मला निश्चितपणे तसे वाटते. परंतु एका श्रीरामाशिवाय परपुरुषाच्या शरीरावर आरोहण करणे हे पतिव्रतेला दूषण आहे, असे वेदपुराणेही सांगतात. श्रीरामासारखा उत्तम पुरुष सोडून नरवानरांचा शरीरस्पर्श म्हणजे पतिव्रतेचा महादोष असल्याचे हरिहरांच्या इतिहासाने सांगितले आहे. अंगोअंगी प्रवेश करून गुरुपत्नीचे रक्षण करणाऱ्या चंद्राला दूषण लागले आणि त्याला पूर्ण प्रायश्चित्त घ्यावे लागले. त्याचप्रमाणे मला खांद्यावर वाहिल्याने हनुमंता तू दोषी ठरशील. मी तर सर्वथा येणार नाही. दोघांच्याही कपाळी महादोष येईल. परपुरुषाला अनुसरून एकटीने सहगमन केले तर दोघांनाही दूषण लागेल हे सत्य आहे, ते लक्षात घे.'' या सीतेच्या बोलण्यावर मारुतीला हसू आले.

नंतर हनुमंत म्हणाला, ''माझी श्रीरामाशी जवळची आप्तता आहे. त्याविषयीची समूळ कथा काय ते ऐक. मी अंजनीला विचारले होते की, या सृष्टीत माझा स्वामी कोण आहे. त्यावर तिने सांगितले होते की, ज्याला सगर्भ कासोटी दृष्टीस पडेल तो तुझा स्वामी आहे. एकदा श्रीराम एका वृक्षाखाली निजला होता त्यावेळी मी वृक्षावर बसलो असताना, त्याने सगर्भ ब्रह्मचर्य कासोटी पाहिली. रामाने ते लक्ष्मणाला सांगितले. ''त्या वानराला गर्भात ब्रह्मचर्य असून तो सगर्भकौपीन असलेला आहे'' हे त्याचे आश्चर्याने बोललेले ऐकून आणि माझ्या ठिकाणचे लक्षण ऐकून माझ्या मनात विचार आला की या हीन-दीन माणसांना माझा स्वामी कसा मानू? सेवक सबळ आणि स्वामी दुर्बळ, विकल, असे कसे? नंतर श्रीरामाचे बळ पाहण्यासाठी मी रणकल्लोळ केला. शेकडो वृक्ष त्यांच्याकडे फेकले, अखेर पाच पर्वत फेकले,

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust Lucknow and eGangotri

परंतु आपली निद्रास्थिती न मोडता श्रीरघुनाथाने वृक्ष, पर्वत छेदले. श्रीराम खरा कृपाळू, त्याने मला वानराला बाणांनी मारले नाही. त्याने माझ्या दिशेने बाणांच्या पिसाऱ्याने वारा सोडला आणि मला आकाशात उडविले. त्या बाणपिसाऱ्याच्या झडपणीने माझे हात-पाय वाकडे झाले. मी दात विचकले आणि स्वतःच्या शेपटीला वेढे दिले. अशी माझी मुरकुंडी वळली, तेवढ्यात माझा पिता वायू गडबडीने तेथे आला आणि त्याने मला गहन बुद्धी सांगितली. "श्रीराम हा परिपूर्ण परमात्मा आहे. त्याचा पराक्रम पाहायला जाशील तर तत्काळ तुझा प्राण जाईल. तेव्हा तू आपला देह श्रीरामार्पण कर. रामाच्या आज्ञेने आपले जीवित्व विकावे. देह रामसेवेत घालवावा. श्रीरामाच्या संगतीत नित्य मुक्त, तृप्त, द्वंद्वनिर्मुक्त होशील." हे पित्याचे बोलणे ऐकल्यावर मी काया-वाचा-मने अनन्य भावाने शरण जाऊन श्रीरामचरणांना वंदन केले, आणि देह श्रीरामार्पण केला.

ध्यानी, मनी, नित्य निदिध्यासनी, कानी, नयनी, वदनी, आसनी, शयनी, गमनागमनी, भोजनी, जागृतीमध्ये, स्वप्नात मी नित्य श्रीरामच स्मरतो. असा मी श्रीरामचा अनन्य भक्त आहे. तुझा विकल्प परपुरुषाच्या संबंधातला आहे. त्याविषयी मी जे सांगतो ते सावध चित्ताने ऐक, गहन गुपित आहे. मला गर्भातच ब्रह्मचर्यकौपिन प्राप्त झाले. अंजनी मातेलाही मी नग्न अवस्थेत दिसलो नाही. माझ्या लिंगाचे दर्शन ब्रह्मदेवाला सुद्धा झाले नाही. अशी माझी स्थिती असल्यानेच श्रीरामाने मुद्रिका देऊन मला तुझ्याकडे पाठविले; पण तू मनात विकल्प आणलास. श्रीरामाने आणखी खूण अशी सांगितली की तुला वल्कले परिधान करता येत नव्हती; तेव्हा श्रीरामाने स्वतःच तुला ती नेसविली." हनुमंताने ती खूण सांगताच सीता मनामध्ये चमत्कारली. नंतर तिची शंका फिटून ती मारुतीला एकान्तात तत्त्वतः विचारू लागली की, "श्रीरामाने आज्ञा दिलेली आम्हाला वंद्य आहे. श्रीरामाने तुला काय सांगितले आहे? तू सीतेचा शोध करून यावेस की सीतेला घेऊन यावे. जर सीतेला आणण्यास सांगितले असेल तर मी तुझ्याबरोबर येईन; परंतु जर तुला शोध घेऊन येण्यास सांगितले असेल तर तू त्वरित जावेस हे योग्य आहे."

मारुती सीतेकडून खूण आणि निरोप घेतो

सीतेने विचारपूर्वक प्रश्न केल्याचे ऐकून हनुमंत गहिवरला. सीता ही सज्ञान आणि निर्लोभी असल्याचे जाणवून त्याला तिच्याविषयी धन्यता वाटली. मग तो म्हणाला, "माते मी असत्य बोलत नाही. श्रीरामाने मला शोध घेण्यासच आज्ञा केली होती." त्यावर सीता म्हणाली, "तर आता उशीर न करता, शीघ्र जाऊन श्रीरामाला शोधाविषयी सांग. माझी तुझ्यावर पूर्ण कृपा आहे. त्याच्या पायावर मस्तक ठेव आणि शोधाविषयी सांग." हे सांगताना सीतेचे मुख दीनवाणे झाले आणि डोळ्यातून अश्रू गळू लागले. हनुमंत जाणार याचे तिला वाईट वाटले. हनुमंताने दातात बोटे धरून सीतेला लोटांगण घातले. सीतेची करुणावस्था पाहून हनुमंताला स्फुरण आले, "माते, लवकर आपली खूण मला दे म्हणजे मी आताच जातो. श्रीरामाने मुद्रिका देऊन निरोपासाठी खूण सांगितली. त्याचप्रमाणे तू भूषणे पाहून मला तोंडी निरोप सांग. तू स्वतःची वस्त्रे आणि भूषणे किंष्किंधेत टाकलीस ती वानरांनी घेतली. ती जेव्हा श्रीरामाला दाखविली तेव्हा तो ओक्साबोक्सी रडत होता. श्रीरघुनाथाला तुझी अतिशय आठवण आणि अवस्था आठवते. तो नित्य 'सीता, सीता' म्हणत आपल्या आवडत्या पत्नीचे स्मरण करतो. त्याने माझ्या लंकेतल्या आगमनाला सत्य मानावे यासाठी स्वतःचे भूषण आणि तोंडी निरोप दे म्हणजे त्यामुळे श्रीरामाला सुख होईल." मारुतीने हे सांगितल्यावर सीता सुखावली. तिने तिच्या वेणीमध्ये मणी होता तो

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Trust and eGangotri

रामाकडे खूण म्हणून पाठवला. "श्रीराम सुखाने सुखभरित होऊन, मन शिळेचा तो योग्य टिळा राम आपल्या कपाळाला लावील," असे तिने मारुतीला सांगितले. त्याला खूण म्हणून सांग की, पूर्वी सीतेचे सांगणे ऐकताच श्रीरामाने कावळ्यावर ब्रह्मास्त्र सोडले होते ही गुपित गोष्ट त्याला सांग. ही गुपित, गंभीर, गोष्ट सांगितल्यावर श्रीराम सत्य मानील. तो कावळा तिन्ही लोकात हिंडला पण रामाला विरोध करण्याचे धैर्य कोणी दाखविले नाही. अखेर तो काक श्रीरामाला शरण आला. नंतर दर्भशिखा मंत्रासहित निवारली, पण कावळ्याचा डावा डोळा घेऊनच त्याचा प्राण वाचविला. ही आत्मखूण सांगताच श्रीराम सुखावेल. हे श्रीरामा, अशी शस्त्रास्त्रे तुझ्याजवळ असताना मृगाचा पाठलाग करत का धावलास? आमचे आता बंधविमोचन कर हे कृपावंत पुरुषोत्तमा! लक्ष्मणालाही लोटांगण घालून माझी विनवणी सांग की, मी तुझा व्यर्थ छळ केला, ह्या पापाचे फळ मला मिळाले की रावण मला छळतो आहे."

कोणाचाही छळ करणे हे अद्भुत पाप आहे. सीता आणि राम यांच्यामधे सागर आणि पर्वत हे आडवे आले. त्यांना दूरस्थ ठेवणारे अडथळे आले. छळाने जे पाप लागते ते अत्यंत दारुण असते. "पापिष्ठ रावणाच्या हाती लागून सीता बंदीत पडली. ना राम, ना लक्ष्मण असे होऊन, राक्षसांकडून नित्य होणारा छळ, यांमुळे मीच माझा छळ केला आहे."

अध्याय तेरावा

सीतेने मणी मारुतीकडे देऊन म्हटले, "हा मणी पाहून श्रीरामाच्या मनात तिघांचे स्मरण जागे होईल. कौसल्यमाता, सीता आणि पिता दशरथ असे तिघे रामाला आठवतील. असे का ते नीट ऐक. पूर्वी समुद्रमंथन झाले तेव्हा कौस्तुभमणी निघाला होता. तो श्रीविष्णूंनी घेतला त्यामुळे इंद्राचे मन तळमळले. "ब्रह्मशापाच्या शापवाणीमुळे सर्व संपत्ती समुद्रात बुडाली. श्रीपती, त्यातला कौस्तुभमणी माझा मला दे." ही इंद्राने केविलवाणेपणाने केलेली मागणी ऐकून विष्णूने त्यास फणिमणी हा बदललेला मणी दिला. इंद्राने तो आनंदाने गळ्यात धारण केला. पुढे इंद्राने नमुची नामक दैत्याच्या युद्धात राजा दशरथाला साहाय्यासाठी नेला. राजाने नमुची दैत्याला मारून युद्धात इंद्राला जय मिळवून दिला. तेव्हा इंद्राने संतुष्ट होऊन कंठमणी दशरथाला दिला. दशरथाने आपल्या नगरीत आल्यावर तो मणी प्रियपत्नी कौसल्येला दिला. कौसल्येने नंतर तो मणी अत्यंत प्रेमाने जानकीला दिला. तिने तो वेणीत घातला आणि तशीच वनवासात आली." तोच मणी हनुमंताच्या हातात देऊन सीतेने खूण म्हणून श्रीरामाकडे पाठविला. "असा हा मणी पाहताच श्रीरामाला पिता, माता आणि सीता या तिघांची आठवण होईल. ही खूण देऊन तत्त्वतः श्रीरघुनाथाला इकडे आण. हेच तुझ्या कार्याचे प्रमाण तुझ्या माथी आहे हनुमंता." यावर मारुती म्हणाला, "तू चिंता करू नकोस. लवकरच मी रामाला इथे आणीन." असे म्हणून हनुमंताने सीतेला माथा टेकवून साष्टांग नमन केले. सीतेने त्याला प्रेमाने कुरवाळिले.

मारुती राक्षसांना पीडा देऊ इच्छितो

हनुमंताने सीतेला खुणेविषयी विचारल्यावर, त्याच्या मनात असे आले की, "राक्षसांशी युद्ध न करता श्रीरामाकडे जाणे योग्य नाही. इथे कलहाचे कारण असलेले आणि नंदनवनाची बरोबरी करणारे हे रावणाचे अशोकवन मी आपल्या बलाने विध्वंसून टाकीन. ही वनाच्या विध्वंसाची वार्ता ऐकून रावणाला संताप येईल. तो आपले निधडे महावीर असंख्य गज आणि रथ यांसह युद्धाला पाठवील. त्या सैन्याशी युद्ध करून,

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

इंद्रजिताला कासावीस करून, राक्षसांचे निर्दालण करून, लंकेत तोडफोड करून, नंतर श्रीरामापाशी जावे" हनुमंताला हा विचार आवडला. कारण त्याला वाटले, "यामुळे सर्व वानरकुळाला आणि श्रीरघुनाथाला सुख होईल. मला युद्धाचे समाधान आणि सुख मिळेल; पण सीतेची आज्ञा घेतली पाहिजे, कारण तिची आज्ञा न घेता वनाचा विध्वंस करता येणार नाही." सीतेला आज्ञा विचारण्यासाठी मारुतीने युक्ती केली. सीतेला लोटांगण घातल्यावर हनुमंताला सीता म्हणाली, "तू लवकर जा रे." यावर लाजून, खाली मान घालून, तो अबोलपणे उभा राहिला. सीतेने त्याला म्हटले, "माझा शोध लागला हे सांगण्याचा तुला काही उल्लास दिसत नाही; तू उद्विग्न दिसतोस; याचे काय कारण आहे मला सांग पाहू." मारुतीने म्हटले, "तुझा शोध घेताना मला ना अन्न ना पाणी मिळाले. भुकेने माझा प्राण जाऊ लागला आहे. सागर उल्लंघून जाणे शक्य होणार नाही." हे हनुमंताचे बोलणे ऐकून सीतेला दुःख होऊन रडू आले.

सीतेने विचार केला की, "याला समाधान दिले नाही तर हा जावा कसा? याचे स्वागत न करता, आतिथ्य न करता या श्रीरामभक्ताला भुकेला ठेवला तर मी महापापिणी ठरेन." मग ती हनुमंताला म्हणाली, "सखया हनुमंता, माझा शोध घेण्यासाठी तू फार शिणला आहेस. तेव्हा मी सांगते ते ऐक. हे माझ्या हातातले कंकण घेऊन लंकेमध्ये जा. तिथे चतुर्विध प्रकारचे (भक्ष्य, भोज्य, लेह्य, चोष्य) अन्न घेऊन यथेष्ट भोजन कर." सीतेच्या सूचनेवर हनुमंताने "अन्नाची चव कशी असते?" असा प्रश्न विचारला. त्यामुळे सीता मनातून चकित झाली. तिने विचारले, "तर मारुती तुम्ही काय भक्षण करता. जे मीठ अधिक खातात त्यांना लवकर म्हातारपण येते; जे चुना लावून विडा खातात त्यांचे दात पडतात." मारुती म्हणाला, "आम्ही श्रीरामदूत वानर, नित्य वनात वास करतो आणि नेहमी वनफळांचा आहार घेतो. हे अगदी खरे आहे जानकी." हे ऐकल्यावर सीतेने सांगितले की, "माझे कंकण मोडून तू लंकेमध्ये आवडतील ती फळे घेऊन फळभोजन कर." त्यावर पुन्हा मारुतीने म्हटले, "सीतादेवी माझे शील काय आहे ते ऐक. मी स्वतःचे अन्न स्वतः तयार करणारा आहे. ज्याला मनुष्याचा स्पर्श झाला, असले फळ आम्ही वानर अपवित्र मानतो. आम्ही वानर स्वतःच्या हाताने फळे तोडून नंतर ती खाऊ. सुर वा नर ज्या फळांना स्पर्श करतात ती फळे आम्ही वानर खात नाही." सीता म्हणाली, "या अशोकवनामध्ये सुंदर आणि मधुर फळे आहेत. परंतु तू त्यांना हात लावलास तर रावण तुझा घात करील. तुझे मरण हनुमंता म्हणजे माझाही प्राणान्त ठरेल. तिकडे दुःखाने श्रीराम लक्ष्मणासह निधन पावेल. श्रीरामाच्या जाण्यानंतर सुग्रीव आणि कोट्यवधी वानर संपतील. भरत, शत्रुघ्न हेही पाठोपाठ मरण पावतील. या फळांना तू हात लावलास तर एवढा अनर्थ होईल." "पुरे करा आता. मी इथून भुकेलाच जातो" मारुती म्हणाला,

मारुतीच्या फलाहाराचे वर्णन

मारुतीने विचार प्रकट केला, "या वनात बरीच फळे दिसताहेत, पण माझे नशीब निष्फळ झाले आहे. जानकी मला निरोप देत नाही, त्यामुळे माझी प्राणान्त-वेळ आली आहे. मार्गात माझे प्राण जातील, मग श्रीरामाला कोण सांगील, नंतर तुझी सुटका कशी होईल? हे मोठे संकट ओढवले आहे. क्षुधा म्हणजे कल्पान्त नव्हे, पण माझा प्राणान्त होईल." मारुतीच्या बोलण्याने सीतेच्या अंतःकरणात करुणा निर्माण झाली. ती म्हणाली, "जोवर तुझी भूक भागेल तोवर तू पडलेली सगळी फळे खा. पण श्रीरामाची तुला शपथ आहे. फळं तोडून खाऊ नकोस." सीतेने घातलेली शपथ ऐकल्यावर हनुमानाने दोन्ही कुशींना खाजवले. तो

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

स्वतःशी म्हणाला, "हे मला मनातून पटले आहे. इथल्या वृक्षांचा मात्र अन्त आला." नंतर हनुमंत सीतेपासून दूर जाऊन, त्या वनातच फळे खाण्यासाठी विचार करत बसला. त्याने प्रलयकालाग्नीशी मेळ साधला, जठराग्नीला अभिमंत्रित केले आणि मग फळभोजनाला सावधपणे आरंभ केला. भोजनाच्या प्रसंगीचा अतिथी, मुख्य द्विज (ब्राह्मण अथवा दात) तोंडामधे, त्याला आधी तृप्त करून, धर्मयुक्त भोजन सुरू झाले. द्विजांनी प्रथम आहुती न घेतली तर आपण स्वतः भोजन-अन्न-घेऊ नये. तेव्हा सर्वज्ञ मारुतीने प्रथम द्विजांना भोजन करविले. द्विजांच्या दोन पंक्ती (दांताच्या दोन ओळी) सादर झाल्या. मारुतीने आपल्या शेपटीला आज्ञा करून त्वरित रुचकर, स्वादिष्ट फळांचा संभार अर्पण केला. त्याने साखरेची रास पाहिली आणि लिंबाच्या रसाला पित्तशामक म्हणून आधी सेवन करून नंतर अनेक फळे खाऊ असे त्याने ठरविले. यापुढे निंबोणी, नारंगी, साखरनिंबोणी, महाळुंगे, साखरेत घोळून त्याने गटागटा खाल्ली. तो श्रीरामाची शपथ पाळत, वृक्ष उपटून त्यावरून पडलेली फळे, सीतेच्या आज्ञेनुसार खात राहिला. आंबे, जांभळे, फणस, जांब, कर्दळीफळे यांचा फडशा पाडत राहिला. पिंपळ्या, मिरे यांचे घोस लोणच्यासारखे खात होता. द्विजांना तो सांगत होता की श्रीरघुनाथ भोक्ता आहे म्हणा. द्विज(दात) काही न बोलता रसास्वाद लोलुपतेने घेत होते. द्राक्षांचे घड, खजूरांची फळे यांची गोडी घेण्यास शेपटीने झाडे पाडून कौतुक पुरविले.

मारुतीचे फळे खाणे बसल्या जागेवरून होत होते. आपली जागा न सोडता शेपटाची लांबी वाढवून त्याने फळे झोडपणे चालू ठेवले. श्रीराम भोक्ता आहे असे म्हणत मारुतीने चोरे, बोरे, मोह, भोकरे, आवळे, उंबरे, टेंबरे अशी सारी फळे खाल्ली. तसेच धामणे, येरमणे, तोरणे, पाणीदार गोंदणे हीही फळे रामार्पण करून त्याने भक्षण केली. जी फळे पिकलेली असतील ती गटागटा खाल्ली. हिरवी तोंडपालटासाठी, पाडाची मटामटा खाताना तो सुरश्रेष्ठांना वेडावून दाखवत होता. ऊसाच्या रसाचे रांजण त्याने जसे एखाद्या तहानेल्याने पाणी गटागटा प्यावे, तसे प्राशन केले आणि तृप्तीची ढेकर दिली. तो देवांकडे डोळे मिचकावत पाहून, राक्षसांना अंगठा दाखवून, दानवांना वेडावून दाखवत, मानवांना धुडकावून लावत गमती करत होता. हनुमंताच्या अंगाच्या वाऱ्याने सुगंधी फुले, पारिजात, चंदन, आगरू यांची झाडे उन्मळून पडली तेव्हा त्यांच्या भोवती शेपटीचा वेढा होता. पक्षी किलबिल करत आकाशात उडत होते कारण झाडे कडकडा मोडत होती. वृक्षांनाही वेढा पडल्याने आकांत झाला होता. नंतर मुखशुद्धीसाठी मारुतीने पोफळी उपडून पाडल्या. पोफळे दाढेखाली घालून नष्ट केली. याप्रकारे त्याने वनाची रांगोळी केली. शाल, ताल, तमाल, नारळी ही झाडे उपटून घेतली आणि राक्षसांशी युद्ध करताना त्यांच्यावर मारा करण्यासाठी हातात घेतली. अशी युद्धाची सामग्री गोळा करून तो स्वतः देवद्वाराच्या शिखरावर बसला आणि तिथून वृक्ष टाकू लागला.

अशोकवनाचा विध्वंस होत असल्याचे ऐकून वनरक्षक आणि तिथल्या विरूप, विक्राळ सर्व राक्षसिणी भयचकित झाल्या. मूळ वृक्ष उपटले गेले; सारणी, रहाट, पाट मोडून पडले; तिथली विचित्र गृहे जमीनदोस्त झाली; लतागृहे सपाट झाली; हे सर्व मारुतीने केले. त्याने गोपुरे, देवालये या सर्वांना मात्र हात लावला नाही; पण अंतरगृहे मात्र विध्वंसून पाडली हे पाहून राक्षसी चकित झाल्या. सबळ राक्षस राखणीसाठी होते; ते वृक्षांच्या तळाशी झोपले होते; हनुमंताने ते सर्व वृक्ष उपटून दूर फेकले होते. तेव्हा ते राखणीचे राक्षस जागे झाले. त्यांना तिथे वृक्ष दिसले नाहीत त्यामुळे त्यांना आश्चर्य वाटले. "महेशाने विपरीत असे हे काय केले? महेशाकडूनच तर ते मागून आणले होते. ते

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

त्याने कैलासाला परत नेले की आकाशात उडाले?'' असे प्रश्न राक्षसांच्या मनात आले. रावणाचे शासन दुर्धर असून विनाकारण वनाचा विध्वंस झाला हे दिसते ते स्वप्न तर नव्हे म्हणून त्यांनी डोळे मिटले. राक्षसी कळवळून म्हणाल्या, ''हा वानर नव्हे हा कृतान्त काळ वनात संचार करून, राक्षसांचा घात करायला आला आहे.'' हे ऐकल्यावर राखणीचे राक्षस धावाधाव करून मारुती कोठे आहे हे पाहून, 'धरा धरा' म्हणत मारुतीला रावणाच्या पुढे नेण्यासाठी एकत्र चालून गेले. एकूण चवदा सहस्र राक्षस वानररूप मारुतीला धरण्यासाठी धावले. कोणी लाकडे, कोणी गोफणगुंडे, तर कोणी धोंडे मारुतीकडे वेगात फेकू लागले. ते वनरक्षक ओरडत मारुतीच्या दिशेने आले तेव्हा तो सावधपणे त्या रक्षकांचा घात करण्यासाठी टपून होता. त्याने आपली शेपटी मोकळी सोडली. त्या शेपटीचा जोरदार आघात करून, शेपटीत धरून, ओढून, एकेकाचे आपटून त्याने पीठ केले. हनुमंताच्या शेपटीचा तडाखा बसला की राक्षसांची शस्त्रे निष्प्रभ होत; शेपटीत सापडत त्या राक्षसांची हृदये फुटत; जो कोणी पळून जाऊ पाही त्याला शेपटी अटकाव करी; त्यामुळे राक्षसांवर, हलणे अशक्य होऊन, मोठेच संकट ओढवले. असे होता होता मारुतीने अनेक राक्षसांना शेपटीत वांधून, गुंतवून समुद्रामधे फेकून दिले. त्या राक्षसांचे मगर-माशांना खाद्य मिळाले. यामुळे भुते हीन-दीन होऊन म्हणू लागली, ''एवढे सहस्रावधी राक्षस समुद्रातल्या माशांना खाद्य म्हणून दिल्याने, आम्हाला आता उपासच पडणार.'' यावर महाकाली म्हणाली, ''हनुमान अनेक बलवान राक्षसांना मारील. तेव्हा भुतांना मास, चरबी, रक्त ओंजळी भरून मिळेल आणि भुते तृप्त होतील. समुद्रातल्या माशांना त्याने मीनभोजन दिले, तसे भुतांना भूतभोजन मिळेल. लांडगे, कोल्हे, गिधाडे, घारी यांना आणि काळाला तृप्तिभोजन मिळेल.'' हे ऐकून भुतांनी जगदंबेला प्रश्न केला, ''हे कोणत्या दिवशी होईल?'' त्यावर जगदंबा म्हणाली, ''याच दिवशी, याच क्षणी हनुमंत सर्वांना तृप्त करील.'' हनुमंताने चवदा सहस्र राक्षस राखणदारांचा शेपटीने नाश केला त्यामुळे राक्षसी भयभीत झाल्या.

राक्षसी-सीता यांचा संवाद, मारुतीची कृती

राक्षसींनी सीतेकडे विचारणा केली की, ''हा कोण, कोणाचा, थोर वानर येथे आला आहे? तुला नमस्कार करून काय विचार निश्चित केलात? तुझी आज्ञा घेऊन त्याने राक्षसांना मारले. तुझ्या सांगण्याने वनाचा विध्वंस केला. तूच हा कलह पेटविलास.'' अशी सीतेभोवती जमून राक्षसींनी कलकल केली आणि ''हिला धरा, मारा, केसांना बांधा. हिनेच वानराला चेतवले.'' असा ओरडा केला. परंतु सीता स्वतः मनातून निःशंक असल्याने, तिला राक्षसींचे भय वाटले नाही. उलट तिने योग्य शब्दात प्रत्युत्तर देत म्हटले, ''राक्षसांपाशी अनेक प्रकारची मायावी शक्ती असते. मारीचाने मृगवेष धारण करून श्रीरामाची फसवणूक केली आणि स्वतः प्राणास मुकला. शूर्पणखा सुंदर बनून लक्ष्मणाला फसवायला आली पण त्या कपटामुळे तिने स्वतःचे नाक कापून घेतले. सीतेचे कपटाने हरण करण्यासाठी रावण संन्यासी बनला परंतु तो मुळात भीक मागणारा झाला. अशी राक्षसांपाशी अपार मायावी शक्ती असते; तेव्हा कोण कोणाचा वानरवेषात आलेला आहे मला काय विचारता. तुम्हीच त्याचा मायावीपणा जाणू शकाल.'' सीतेच्या सभोवती अनेक राक्षसी जमलेल्या पाहून हनुमानाने त्यांना गुरकावले; त्यामुळे भयभीत झालेल्या त्या राक्षसिणी विव्हळत पळू लागल्या. कोणी चळचळ कापू लागल्या, कोणाला लघुशंका झाली, कोणाला भ्रम झाले, कोणी मूर्च्छित पडल्या. त्यांची बोबडी वळल्याने त्या ओरडूही शकत नव्हत्या. एकीचे आतडे तुटले. भयग्रस्त अवस्थेत काहींची वस्त्रे फिटली. त्याचे भान

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

न राहून त्या नग्नावस्थेत तशाच रावणापाशी गेल्या. तेथे त्यांनी रावणाला वनातली वार्ता सांगितली. मागे वनात राहिलेल्या राक्षसिणी भीतीच्या प्रभावाने राक्षसांना 'पळा रे लवकर' म्हणाल्या, वनरक्षकांना शेपटीच्या आघाताने मारले. कोणी राक्षसिणी सीतेमागे दडल्या. कोणी चौफेर पळाल्या. त्याना हनुमंताला पाहून आपला-दुसरा याचे भानही राहिले नाही. हनुमंताने गर्जना करताच सीता बंधनरहित झाली. श्रीरामभक्तांचे बोलणे ऐकताच तत्काळ बंधनातून मुक्तता होते.

रावणाला वृत्त समजते-राक्षसांचा विध्वंस

राक्षसिणींनी रावणाला सांगितले, "प्रतापी अशा एका वानरवीराने वनाचा विध्वंस करून वनरक्षकांना मारले. कोण कुठला वानरवीर आहे कोण जाणे. सामर्थ्यात जणू काळाग्निरुद्रच आहे. सीतेला नमस्कार करून त्याने वनरक्षकांचा घात केला. ज्या वनप्रदेशात जानकी आहे तो वनप्रदेश फळाफुलांसह सुरक्षित राखून, इतर वनाचा त्याने वृक्ष उपटून विध्वंस केला. प्रथम सीतेशी एकान्तात बोलून मगच त्याने वनाचा विध्वंस केला." हा वृत्तान्त ऐकून रावणाला राग आला. त्याने रक्षकांना बोलावून त्यांना म्हटले, "तो वनाचा विध्वंस करणारा वानर धरून आणा." राक्षसिणी ते ऐकून म्हणाल्या, "वनरक्षक ते काय बापुडे. त्या वानराच्या शेपटीत एवढी दुर्धर शक्ती आहे की तेवढ्यानेच वनरक्षकांचा घात केला. चवदा सहस्र वनरक्षकांचा शेपटीत भारा बांधून त्यांना वानराने समुद्रात जलचरांनी खावे म्हणून फेकून दिले. हनुमंताने रणात अनेक राक्षसांना मारून, मेद-मांस यांनी भुतांना तृप्त करण्यासाठी महाकालीला आमंत्रित केले आहे. अशा वानरवीराला हे वनरक्षक काय पुरे पडणार? तेव्हा मुळात विचार करून दुर्धर असा सैन्यभार पाठवावा." असे राक्षसिणींनी सांगितले. हे सांगताना त्या चळचळा कापत होत्या. त्या राक्षसी पुढे म्हणाल्या, "तो मारुती अनेकांना आवरणार नाही. त्याच्या शेपटाची शक्ती अनावर आहे. सीतेजवळचे सर्व वन, देऊळ त्याने मोडले नाही. तो स्वधर्मशील असून शिवाय प्रबळ आणि प्रतापी आहे." राक्षसिणींचे बोलणे ऐकल्यावर रावण दचकला, बलशाली वानर असल्याचे ऐकून रावणाचे सभाजनही कंपायमान झाले. वनाचा विध्वंस झाल्याचे ऐकून रावणही कांपू लागला. आपल्यासारखेच बलवान आणि युद्धातून माघार न घेणारे पराक्रमी, युद्धोत्सुक, महागहन हटवादी, रणशूर, किंकर नावाचे, असे नावाजलेले ऐंशी सहस्र महावीर वानराला धरण्यासाठी रावणाने धाडले. ते वीर म्हणाले, "रावणाला आमची कीर्ती ठाऊक आहे. तरीही क्षुद्र वानराला पकडायला तो पाठवतो आहे. ते वानर बापडे आमच्या पुढे काय टिकणार. आमच्या एवढ्यांच्या हातून कसा वाचेल." अशी गर्जना करत, शस्त्रसज्ज होऊन सर्वजण अशोकवनाकडे धावत जाऊन पोचले.

मारुतीकडून राक्षसांचा विध्वंस-रावणास निरोप

अशोकवनातल्या प्रासादाच्या पुढच्या कमानीत कृतान्तकाळ, प्रलयाग्नी असा हनुमंत निवांत बसला होता. त्याला पाहताच शस्त्रे हातात सावरून तातडीने एकत्रितपणे सर्व किंकर धावले. शूल, मुद्गल, गदा, फरशी, त्रिशूल, तोमर, पट्टा, चेंडूचक्रे, लहुडी अशा अनेक शस्त्रांचा त्यांनी मारा केला. त्यांना वाटले वानर खंगला, भंगला, तुटला, शस्त्रांच्या आघाताने मरण पावला. या कल्पनेने किंकर राक्षसांनी टाळी पिटली. "हा वानर फार पराक्रमी आहे म्हणत होते, पण हा तर आमच्याशी रणधुमाळी न करताच राखरांगोळी होऊन गेला. ऐंशी सहस्र महावीर निशाचरांनी, जशी पर्वतावर पर्जन्यधार व्हावी, तशी मोठ्या बळाने मारुतीवर शस्त्रांचा वर्षाव केला. आपण रणकल्लोळात यशस्वी झालो असे समजून टाळ्या

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

वाजवल्या, ते पाहून मारुती क्रोधाग्नीसारखा खवळला. त्याने स्वतः आपली शेपटी थोपटली. शेपटीला गुप्तपणे सांगितले की कोट्यवधी राक्षसांना आपल्या बुद्धिचातुर्याने मारायचे आहे. ही गुप्त गोष्ट सांगताच शेपूट त्वरेने फडकावले गेले आणि त्याचा प्रतिध्वनी गिरिकुहरात आणि संपूर्ण लंकात्रिकूटात दुमदुमित झाला. राक्षसांचा प्राण हरण करणाऱ्या मारुतीने भुभुःकार एवढ्या जोराने केला की किंकर राक्षसांचा संभार दचकून जमिनीवर पडला. धाकाने त्यांचे डोळे विस्फारले, त्यांच्या हातातली शस्त्रे गळाली. राक्षसांनी धाक घेतला पण शेपटाने त्यांचा पिच्छा पुरवला. राक्षस भीतीने पळू लागले तेव्हा मारुतीने त्यांना शेपटीत बांधून मारले. कोणाला दगडाने ठेचून, कोणावर पर्वतखंड टाकून मारुतीने मारले. सर्व राक्षसांना मारून मारुती स्वानंदाने गर्जत राहिला. नंतर म्हणाला, "मी श्रीरामाचा दूत सीतेच्या शोधासाठी येथे आलो. मीच या वनाचा विध्वंस केला. रावणाला जाऊन सांगा हे. इथे येऊन श्रीराम स्वामी, महावीर लक्ष्मण, वानरराज सुग्रीव रावणाला मारतील."

अध्याय चौदावा

हनुमंताने ऐंशी सहस्र किंकर, चवदा सहस्र वनरक्षक मारले आणि मनोहर वनाचा विध्वंस केला त्यामुळे रावण संतापला. वानर महाबलवान असल्याचे त्याच्या लक्षात आले. तेव्हा त्याने प्रहस्ताचा पुत्र जंबुमाळी याला बोलावून घेतले. त्याला जवळ घेऊन त्याला मनातले गुपित सांगितले. रावण म्हणाला, "ज्या वानराने किंकर, वनरक्षक मारले, वनाचा विध्संस केला, त्याला युद्ध करून तू मार. वानराला न मारता तू परतलास तर तुझे नाक कापले जाऊन राक्षसांमधला तू नपुंसक ठरशील. वानराचा तुझ्याकडून नाश झाला नाही तर तुझे तोंड काळे करून, गाढवावर बसवून, तुझ्या डोक्यावर मूत्र शिंपडून केस भादरले जातील." असा धाक घालून रावणाने जंबुमाळीला युद्धासाठी पाठवला. जंबुमाळी हा पराक्रमी वीर रागाने फणफणत युद्धासाठी निघाला.

मारुती आणि जंबुमाळी यांचे युद्ध

जंबुमाळीने मोठ्या गाढवांचा रथ जुंपला आणि रथात सर्व शस्त्रसामग्री भरून, अद्भुत धनुष्य घेऊन तो युद्धासाठी आला. धनुष्याचा टणत्कार करून, रागाने गर्जना करत "किंकरांच्या आणि वनरक्षकांच्या मृत्यूचा सूड घेण्यासाठी मी आलो आहे," असे म्हणाला. त्यावर मारुतीने गोड शब्दात सांगितले की, "तुम्ही सीतेला हरण करून आणले आहे. तेव्हा मी कोट्यवधी राक्षस आणि शेवटी रावण यांचा नाश करीन. जंबू, तुला फारच आवड असली तर तुला किंकरांच्या आणि वनरक्षकांच्या भेटीला रथासकट लगेच पाठवतो. जंबूने अर्धचंद्र बाण एकवटून सोडले. ते बाण हनुमंताच्या कपाळावर आदळले. परंतु ते बाण लागलीच परतून जंबूच्या मस्तकावर आदळले. त्या बाणांच्या आघाताने जंबुमाळी मूर्च्छित झाला. असे विपरीत तेथे घडले. हनुमंत खदखदा हसू लागला. नंतर जंबुमाळी सावध झाला. त्याने हनुमंतावर बाणांचा वर्षाव केला. त्या बाणांनी सर्व आभाळ झाकाळून टाकले. भूमंडळ बाणांच्या जाळ्यात गुरफटले. हनुमंत रामस्मरणाने अत्यंत सामर्थ्यवान असल्याने त्याचे रणात नाचणे चालूच होते. त्याच्या अंगाला बाणांचा आघात लागत नव्हता. हनुमंताने आसपासच्या शिळा मोठ्या त्वेषाने जंबूमाळीवर टाकल्या; त्या शिळांचे जंबूमाळीने बाणांनी चूर्ण केले. याचा राग येऊन मारुतीने मोठमोठे वृक्ष हातात घेऊन जंबूला मारले. ते वृक्षही जंबूने बाणांनी छेदले. जंबूने अत्यंत वेगाने चार बाणांनी वृक्ष वेधून तो तिळासारखा केला. हनुमंताला याचे आश्चर्य वाटले.

आता हनुमंताचा प्राण घेण्यासाठी जंबूमाळीने

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Trust and eGangotri

रागाने निर्वाणीचा धगधगीत, घंटायुक्त परिघ काढला. परिघ हातात घेऊन जंबूने गर्जना केली की, "वानरा हनुमंता, तुझी होळी करीन. या माझ्या परिघाच्या आघाताचा घाव सांभाळ. रघुनाथ तुझे कसे रक्षण करील. रावणाने वानराला मारण्यासाठी मला नेमले आहे. माझ्या परिघाचे निवारण करून हनुमंता तुला वाचवण्यासाठी कोण येणार?" एवढे बोलून जंबूने परिघ वेगाने सोडला. हनुमंताला यातले सूक्ष्म कौशल्य माहिती होते. त्याने परिघाचा आघात अंग झुकवून चुकवला आणि तो आकाशात उडाला. परिघाची शस्त्रदेवता मोठी कठोर होती. त्यामुळे परिघ मारुतीच्या पाठोपाठ गेला. तेव्हा हनुमंताने परिघाला शेपटीने वेढले आणि आणि शस्त्रदेवतेचा गळा चेपला. तेव्हा देवता म्हणाली, "रे हनुमंता, मी तुला शरण आले आहे. सर्व शस्त्रशक्ती तुला शरण आहेत. शस्त्रशक्ती, भूतशक्ती, मंत्रशक्ती या सर्व तुला शरण येतील; जर तू मला वाचवलेस तरच हे घडेल." त्यावर शेपटीचे बंधन सोडवून, शस्त्रदेवतेला वाचवून हनुमंताने शक्तिमंडळाला लोटांगण घातले. शरणागताला मारू नये म्हणून शस्त्रदेवतेला हनुमंताने वाचविले. भूतांनी श्रीरघुनाथाला भजावे हीच बुद्धी मारुतीची सर्व शक्तींना वंदन करण्यामागे होती. तेव्हा त्या सर्व शक्तींनी हनुमंताला ओवाळले आणि म्हटले, "राक्षसांच्या घातासाठी आम्ही युद्धामध्ये तुझे साहाय्य करू. सीता आमची आद्यशक्ती आहे. रावण तिला छळतो आहे. यासाठीच आम्ही राक्षसांना सोडून, रामभक्तांना सर्वार्थाने साहाय्य करू." मारुती आपल्या शेपटीला म्हणाला, "जगजेठी, युद्धामध्ये कोट्यवधी शक्तीदेवता मला साहाय्य करणार आहेत. तेव्हा तू माझी पाठ राखावीस. तुझ्यामुळेच त्या माझ्या साहाय्याला तयार झाल्या." असे शेपटीचे स्तवन करून, कौतुक करून, चुंबन घेऊन मारुती युद्धासाठी सज्ज झाला. मारुती परिघ हातात घेऊन येत असलेला पाहून जंबुमाळी अत्यंत चिंतित झाला. आपलेच शस्त्र आपला घात करायला आले याचे त्याला दुःख झाले. "रावणाने परस्त्रीशी अधर्म केला, त्या पापाने शक्ती अत्यंत संतापल्या. त्यामुळे सगळा पराक्रम नासला आणि राक्षसांचे मरण ओढवले" असे त्याच्या मनात आले.

हनुमंताचा घात करण्यासाठी राक्षसाने परिघ सोडला होता, तो आता जंबूचा माथा फोडण्यासाठी हनुमंताच्या हाती आला होता. हनुमंताने रागाने, आवेशाने परिघ जंबूमाळीच्या मस्तकाचा वेध घेऊन भिरकावला. यावेळी वेगाने आकाशात उडालेल्या मारुतीने करकरा दात खात, परिघ गरगरा फिरवून रथावर आपटला. मारुतीची शक्ती मोठी होती. तरी राक्षस त्याला दिसतच नव्हता; कारण ना त्याचे शरीर, ना त्याच्या अस्थी, ना त्याचे हातपाय त्याला दिसले. रथ, घोडा, धनुष्य, शस्त्रसंभार काहीच न दिसल्याने मारुतीने राक्षस दृष्टीला न पडताच अंदाजाने वार केला. हनुमंताचा आघात दुर्धर होता, त्या घावाने जीव घेतला, पण घाव असलेले प्रेतही दिसले नाही, त्या घावाने राक्षसाचे भस्म झाले होते. हनुमंत महाबली, तसाच जंबुमाळी होता, पण हनुमंताच्या घावाने तो धुळीला मिळवला. जंबूला जेव्हा मारुतीने मारले तेव्हा प्रहस्त दोन्ही हातांनी बोंब मारू लागला. जंबूला मंत्राग्नी द्यावा तर प्रहस्ताला जंबूच्या अस्थीही मिळाल्या नाहीत. पुत्रशोक करत, आकांत करत प्रहस्त रावणासमोर आला. त्याचे केस मोकळे सुटले होते आणि तो जमिनीवर गडबडा लोळू लागला. नंतर प्रहस्त म्हणाला, "माझा ज्येष्ठ पुत्र जंबुमाळी वानराने धुळीला मिळवला." हे ऐकल्यावर रावणाने इतर प्रधानांचे पुत्र वानराला मारण्यासाठी तातडीने पाठवले.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

प्रधानपुत्र हनुमंतावर चालून जातात

रावणाच्या सभेतले प्रधानपुत्र अत्यंत गर्विष्ट होते. महावीरांनाही ते जुमानत नसत एवढे ते सारे पराक्रमाच्या बळाने उन्मत्त झाले होते. ते बळाच्या अभिमानाने गर्विष्ठ असून, शस्त्रास्त्रातील निपुणतेने इतरांची उपेक्षा करत. युद्धामध्येही ते समर्थ होते. त्यातले युद्धकुशल प्रधानपुत्र निवडून रावणाने हनुमंताशी युद्ध करण्यासाठी पाठविले. रावण त्यांना म्हणाला, "तुम्ही युद्धनिपुण आहात, नेहमी आपला पराक्रम वर्णन करता, वनाचा विध्वंस करणाऱ्या वानराशी संग्राम करून त्याला बांधून आणा किंवा त्याचा घात करा; पाहू तुमचा पराक्रम. मोठ्या प्रतापाच्या गोष्टी नित्य सभेमध्ये सांगता, तोच पुरुषार्थ दाखवा, आणि हनुमंताला युद्धात जिंका." रावणाने असे म्हणताच सर्व प्रधानपुत्र तातडीने रथ जुंपून युद्ध करण्यासाठी निघाले. त्यांच्या गळ्यात सुवर्णात रत्ने गुंफलेल्या माळा शोभत होत्या, त्यांच्या शृंगारलेले घोडे जुंपलेल्या रथांवर ध्वज-पताका डोलत होत्या. "हनुमंताला मारल्याशिवाय जो परतेल तो मातृगमनी ठरेल" अशी शपथ घेऊन सर्व प्रधानपुत्र युद्धासाठी आले. रथात बसून, हातात शस्त्रे घेऊन, पुढे वाजंत्री वाजवत चाललेल्या पुत्रांच्या मागे त्यांच्या माता पुत्रसंतती नाश पावली या दुःखाने आकांत करत जात होत्या. त्या माता म्हणत होत्या, "प्रहस्तासारखे दुःख देऊन प्रधानांना दुःखी करायला रावण हट्टाला पेटला आहे; त्यामुळे त्याने आमचे पुत्र पाठवले. महाबलवान असा प्रहस्तपुत्र जंबुमाळी युद्धात मारला, किंकरांची होळी केली, वनरक्षकांची राखरांगोळी केली, त्या वानरापुढे प्रधानपुत्र ते काय! आजच आमचे निःसंतान झाले निश्चित. वानर नव्हे तो महाविघ्न आहे. राक्षसांचा शेवट आला आहे." अशा प्रकारे प्रधानपुत्रांच्या स्त्रिया, सुहृद, माता, पिता हे तळमळत, आकांताने आक्रोश करत होते, "त्या मारुतीला मारण्यासाठी पाठविलेल्यांनाच तो वानर मारून, आमच्या पुत्रांचा शेवट करील."

प्रधानपुत्रांचा हनुमंताकडून नाश

अनेक प्रधानपुत्रांनी गर्दी करून, रथचक्रांचा घडघडाट आणि दुसरीकडे कडकडाट करीत मारुतीवर चाल केली. ते मारुतीच्या जवळ आले. तेव्हा मारुती देवालयाच्या महाद्वारावर असलेल्या तोरणावर निवांत बसला होता. प्रधानपुत्रांची ओळ पाहून हनुमंत उल्हसित झाला. पतंग जसा दिव्यावर झडप घेतो तशा प्रधानपुत्रांच्या ओळी शरवर्षाव करत मारुतीवर लोटल्या. बाण सणसणत सुटले, शस्त्रांचा खणखणाट सुरू झाला. बाण झणझण करीत एकमेकांवर घासत होते. मोठाच उच्छेद मांडला होता. एकाच वेळी अनेक बाणांचा वर्षाव होऊ लागला. हनुमान सावध होऊन बसला. बाण चुकवण्यासाठी आणि प्रधानपुत्र मारण्यासाठी तो पुढे धावून जात होता. त्यावेळी पर्वतात घनवर्षाव व्हावा त्याप्रमाणे बाणांचा अद्‌भुत वर्षाव झाला. प्रधानपुत्र एकमेकांना म्हणत होते. "आपण अचुक नेम धरणारे आहोत तेव्हा सर्वांनी नेम धरून हनुमंताला मारावे." कोणी डोईवर नेम धरा म्हणत होते, कोणी उरात म्हणत होते; काहींनी नायनाट करा म्हणत खांडोळी करावी म्हटले, कोणी पायांचा चुरा करा म्हटले. कोणी पोट, कोणी पाठ, कोणी कंठ असे सुचवले. काहींनी घाटी फोडू म्हटले. एकाला मारुतीचे नाक छेदण्यासाठी शरसंधान करावेसे वाटले; तर दुसरा दोन्ही कान छेदीन म्हणाला. एकाला शेपूट छेदावे असे वाटले आणि तो तसे म्हणाला.

प्रधानपुत्रांच्या मनातल्या गोष्टी ऐकून हनुमंताला मनापासून हसू आले. नंतर त्याने आपले शेपूट अत्यंत जोरात आपटले; उच्च स्वरात

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized By Sarayu Foundation Trust and eGangotri

भुभःकार केला; त्यामुळे अवघ्यांचा हृदयस्फोट झाला. नंतर मारुतीने सर्वांना एकदम शेपटीत आवळून त्यांचे एकाच घावात पीठ केले. हनुमंताने उडी टाकताच सर्वांचा प्राणांत होऊन ते प्रधानपुत्र धरणीवर धडाधडा पडले. त्यांचे रथ घोड्यासह पडले. त्यांची प्रेते भूतल, अतल, वितल, सुतल या ठिकाणी न पडता, हनुमंताच्या आगळ्या सामर्थ्याने रसातळाला नेली. हनुमंताचा घाव लागला की देहाचा प्रेतपणा उरतच नाही. रसातळात ठाव न मिळाल्याने मारुतीने त्यांना वैकुंठात पाठविले. अशा रीतीने हनुमंताने प्रधानपुत्रांना मारले. याची वाच्यता करायलाही कोणी उरले नव्हते. मारुतीने सर्वांचाच नाश केला होता. हा प्रकार दुरून सुहृद पाहात होते. त्यांनी प्रधानपुत्र एकाएकी रणात निःशंकपणे मारले गेलेले पाहून आक्रोश केला. हाका आणि आकांत यांचा गोंधळ ऐकून लंकेतही हलकल्लोळ होऊन लोक म्हणू लागले की, "आता रावणाचा विनाशकाल आलेला दिसतो." प्रहस्तादी सर्व प्रधान रावणापाशी येऊन ओरडून म्हणू लागले की "तू आमचे निःसंतान केलेस. तो केवळ वानर नसून सीतेच्या कोपाग्नीचा भडकाच आहे. तो वनात प्रबळ वाढला असून राक्षसकुळाचे निर्दाळण करायला आला आहे.

रावण पाच सेनापतींना मारुतीवर धाडतो

यूपाक्ष आणि विरुपाक्ष हे दोघे आणि दारुण वीरश्रेष्ठ प्रघस, दुर्धर आणि भासकर्ण असे पाच सेनानी बोलावून रावणाने त्यांना युक्ती सांगितली की, "तुम्ही अजोड पुरुषार्थ करणारे वीर आहात. तुम्ही तुमच्या शक्तीनिशी युद्ध करून सर्वांनी मिळून वानर धरावा. प्रधानपुत्र समोर येताच वानराने त्यांचा घात केला. तुम्ही बुद्धिमंत आणि प्रतिभावंत आहात. प्रदीर्घ युद्ध करा. चौघांनी चार दिशांना राहावे आणि एकाने आकाशात स्थिर व्हावे. नंतर आपली शक्ती दाखवून युद्धात मारुतीला धरावे. युद्धात तो हातात सापडला नाही तर त्याचा नाश करा." असे सांगून रावणाने सर्वांना पाठविले. ज्यांच्या रथावर पताका फडकत होत्या अशा त्या युद्धप्रवीण सेनानींनी पाच ठिकाणी विखरून दारुण युद्ध सुरू केले. पाच ठिकाणी पाच जण हनुमंताला वेढून युद्ध करू लागले. त्यांच्या हातात अनेक शस्त्रे होती. त्यांनी दुर्धर असे पंचमुखी पाच बाण मारुतीच्या माथ्यावर समोरून वेधले. मारुतीच्या पाठीमागे भासकर्ण होता, त्याने मारुतीवर दारुण गदाप्रहार केला. दक्षिणेकडून यूपाक्ष, डावीकडून बिरुपाक्ष यांनी मारुतीवर शूलाचे वार केले. हे वार त्यांनी दोन्ही कुशींच्या जवळ केले. हनुमंताचा घात करण्यासाठी प्रघस गगनात उंच गेला आणि त्याने मेघधारांच्या वर्षावाप्रमाणे बाणांचा वर्षाव केला. जेव्हा त्या पाच जणांची उडी अचानक मारुतीच्या दिशेने भोवती पडली तेव्हा मारुतीच्या शेपटीने युद्धात नेहमीप्रमाणे मोठा पराक्रम केला. शेपटीने पाचही जणांना वेढा घालून, त्यांच्या शस्त्रांचा नाश करून, पाचही जणांना शेपटीत गुंडाळले. ज्याप्रमाणे योगी स्वतःच आपल्या पंचप्राणांचा निरोध करतो, त्याप्रमाणे शेपटीमध्ये त्या वीर सेनानींचे प्राण गुंतून राहिले. ज्याप्रमाणे काळ हा प्रलयाच्या वेळी पंचमहाभूतांना वेढतो, त्याप्रमाणे हनुमंताने पाचही राक्षस सेनानींचा वध करण्यासाठी त्यांना शेपटीमध्ये बांधले. ज्याप्रमाणे विवेकी साधूजन पाचही विषयांचे दमन करतात, त्याप्रमाणे ते पाच वीर मारुतीच्या शेपटीत गुंतून राहिले.

मारुती रागाने लाल होऊन बालसूर्यासारखा भासू लागला. त्याने महापर्वत उपटून त्या पाचांवर टाकले, तेव्हा त्या आघाताने पाचही सेनानी चक्काचूर होऊन नाश पावले. पाच विषयांचे निर्दाळण केल्यावर परमार्थी व्यक्तीला जसे सुख होते, तसेच पाच सेनापतींचा नाश केल्याने मारुतीला सुख आणि उल्हास वाटला.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

श्रीरामभक्ताच्या आघाताने अस्थी-मांस हे गुणधर्म राहात नाहीत. मारुती हा सुखदायक मरण देणारा असल्यामुळे त्याने पाचांनाही त्या गुणधर्मांपलीकडे नेले. धन्य रामभक्त हनुमंत की जो मरण देऊन वर सुखही देतो. कोटी जन्मांचे दुःख नष्ट करून तो संग्राम सुखदायक करतो. मारुतीने पाचही सेनापतींचे निर्दाळण करून मोठ्याने भुभुःकार केला. नंतर तो उड्डाण करून देवालयाच्या कमानीत स्वस्थ बसून राहिला. पंचभूतांना निवृत्ती दिल्याने साधकाला परमानंद प्राप्त होतो, तसा पाचही सेनापतींना मारून हनुमंताने सुख आणि उल्हास यांची प्राप्ती करून घेतली होती. मारुतीने पाच सेनापतींना मारल्याची वार्ता लंकेमध्ये पोचली आणि लंकापती रावण आश्चर्याने दचकला. वानर चांगला पराक्रमी दिसतो. त्याने अशोकवन आपल्याला पारखे केले तेव्हा तो सीतेला सहज हरण करून नेईल असे विचार मनात येऊन रावण क्रोधाने कापू लागला आणि कोणाला पाठवावे याचा तो आपल्याशी विचार करू लागला. तेव्हा त्याला समोर पुत्र अखयाकुमार दिसला.

रावण अखयापुत्राला मारुतीवर पाठवितो

रावणाने समोर अखयापुत्राला पाहताच त्याला आज्ञा केली की "तू आपल्या पराक्रमाने वानराचा वध करण्यासाठी जा." पित्याची आज्ञा होताच अखया निघाला. त्याच्या रत्नजडित रथावर ध्वज आणि मनोहर पताका होत्या. आठ उत्तम घोडे जोडलेल्या रथात सुवर्णाचे बाण भात्यात भरलेले असून सुवर्णाचे धनुष्य ठेवलेले होते. अखयाकुमाराच्या पाठोपाठ त्याच्या श्रेणीचे राजकुमार होते. ते निपुण असे रणवीर होते. अखयाकुमाराला त्याच्या सामर्थ्याचा मोठा गर्व होता. तो रथात बसून जिथे हनुमंत होता तिथे आला. इकडे थोर थोर प्रधान आपसात कुजबुजत म्हणत होते, "रावणाने त्या दुर्धर बलवान वानराच्या पुढे अखयाकुमाराला मरायलाच पाठविला आहे. त्या वानराने चवदा सहस्र वनरक्षकांना शेपटीत बांधून तो भारा मत्स्यमगरांना खायला दिला. त्याने किंकरांना मारले. गर्विष्ट आणि नित्य सामर्थ्याचे वर्णन करणाऱ्या सर्व प्रधानपुत्रांचा त्याने नाश केला. जंबूमाळीचा निःपात केला. शेपटीचा वेढा घालून पाच सेनापतींचा वध केला. अशा वानरापुढे अखयाकुमार बापडा काय टिकणार. मारुती क्षणात त्याचा वध करील. अखयाकुमार रावणाचा लाडका पुत्र आहे हे जाणून हनुमंत त्याला निश्चित मारील. अखयाला पाठविण्यात रावणाने मोठी चूक केली आहे. अखया हनुमंताच्या दृष्टीला पडला तर अखया परतणार नाही. तेव्हा रावणमहाराजांनी अखयाच्या रक्षणासाठी शूर योद्धे पाठवावे."

रावणाने चांगले, युद्धकुशल, उत्साही असे रणवीर निवडून अखयाच्या साहाय्यासाठी पाठविले. ते निधडे महायोद्धे अश्व, गज, रथ यांचा घडघडाट करत मारुतीच्या जवळ आले. ते वीर तेथे येण्यापूर्वीच अखया हनुमंतावर चालून गेला. त्याने कौशल्याने शरवर्षाव करून मारुतीला आच्छादले. अनेक बाण डोक्यावर, हातावर, छातीवर मारून त्याने मारुतीचे सर्वांग व्यापले. त्याच वेळी मागून आलेल्या वीरांनी शस्त्रसंभाराने मारुतीला आच्छादून सूर्य जसा मेघांनी झाकावा तसे केले. परंतु कितीही गर्जना करीत पर्जन्यधारा वर्षल्या तरी त्या पर्वतश्रेष्ठाला खुपत नाहीत, त्याप्रमाणे राक्षसांच्या शरवर्षाने व्यापला गेला तरी हनुमंताला त्याची बाधा झाली नाही. हनुमंताची शक्तीच एवढी मोठी होती की बाण लागताच बाणांचे पीठ होई; शस्त्रे मोडून पडत. युद्धात मारुती आटोपणे अशक्य होते. शत्रूच्या शस्त्रांना निष्प्रभ करून हनुमान आकाशात उडाला. अखयाचीही शक्ती अशी की त्याने रथ आकाशात नेऊन चालविला. हनुमंत आणि अखया हे दोघेही

https://archive.org/details/@sarayu_foundation_trust_lucknow
Bhavan Vani Trust, Lakshmi academy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

आधाराशिवाय अंतराळात चक्राकार संग्राम करत होते. त्यांच्या बळाची सुरवर स्तुती करत होते. रथाची गती-विगती, तसेच मारुतीचे पुढे-मागे धावणे. त्या दोघांची दुर्धर शक्ती होती. ते क्षणात जमिनीवर येत, तर क्षणात आकाशात जात. अखया जेव्हा मारुतीला मारू पाही तेव्हा त्याला नेमका घाव आढळत नव्हता. तसेच जेव्हा हनुमंत अखयाला मारू पाही तेव्हा त्याला रथ आटोपता येत नव्हता. क्षणात रथ भूतळी दिसे, क्षणात आभाळात रथ दिसे; क्षणात रथ समुद्राच्या पाण्यात, तर क्षणात रथ त्रिकूट पर्वतावर दिसे. अखयाकुमार अत्यंत समर्थ योद्धा होतो. त्याच्या हालचालींनी मारुती वेडावला आणि चकित झाला. त्याला प्रश्न पडला की या रावणपुत्राला मारायचे कसे? तिकडे अखयाच्या साहाय्यार्थ आलेले राक्षसवीर आपल्याशी म्हणत होते; "अखयाकुमार निधडा योद्धा आहे हे जाणूनच दशाननाने त्याला पाठविला आहे. हा एकटा वानराला मारील. जर अखयाकुमाराला फसवून तो वानर पळून जायला लागला तर आपण धावून जाऊन, बाणवर्षाव करून त्याच्याशी युद्ध करू."

मारुती अखयाचा वध करतो

अखया रणात आटोपत नाही असे जाणवल्यावर मारुती त्याला कसा मारावा याचा गंभीरपणे विचार करू लागला. हा विचार गुप्तपणे मनात चालू असताना मारुतीच्या शेपटीला राग आला. त्या राजपुत्राला आपण मारायचा असा शेपटीने निश्चय केला. अखयाकडे स्वेच्छेने जाणारा रथ असल्यामुळे रणात तो आटोपत नाही. तेव्हा शेपूट पाठीमागे लागून रथ चौफेर वेढला गेला. स्वर्ग, मृत्यू, कैलास कुठेही रथ संकटकाळी पळविला तरी शेपटाने पाठलाग न सोडता कडकडून बांधला. नंतर मारुतीने लाथेने छत्र, हाताच्या घावाने ध्वज आणि तालवृक्षाच्या आघाताने रथ असे मोडून पाडले. एकाच घावात मारुतीने रथाच्या आखाचा दांडा, पोंवळवेलीच्या मोठ्या धुरा, आठही घोडे, वीर सारथी, या सर्वांचा चकाचूर केला. शेपटीच्या वेगाने हालचाली करून रथ उलथला; त्यावेळी तातडी करून अखयाने रथातून उडी मारली. नंतर त्याने ढाल-तलवार हातात घेऊन हनुमानाला मारण्यासाठी तो धावून गेला. त्यावेळी त्याने प्रचंड आरोळ्या ठोकल्या. अखया म्हणाला, "हनुमंता, आता सावध राहा. मी तुझा घात करीनच. रणात माझा रथ भंगू शकलास याचा डौल करू नकोस." धाकाने थरकत, तलवार चमकावत, कौशल्याने तळपत अखया त्वरेने आणि सामर्थ्याने मारुतीवर धावला. त्यावेळी दोघांचे जोरदार युद्ध सुरू झाले. क्षणात जमिनीवर, क्षणात आकाशात असे जात ते एकमेकांचा वध करण्यासाठी आवेशाने युद्ध करू लागले.

हनुमंताचा वध करण्यासाठी अखया तातडीने युद्धात रंगला. हनुमंताने वायुवेगाने लगेच त्याला पायाकडून धरला. नंतर अखयाला गरगरा फिरवला. अखया आक्रोश करत असताना मारुतीच्या गरगरा फिरवण्याने त्याला घेरी येऊन तो देहभान विसरला. त्याची ढाल त्रिकूटावर पडली, खड्ग समुद्रात पडले, मुकुट सभेत पडला आणि भूषणे जमिनीवर पडली. हनुमंताने आवाका जाणून बळाने अखयाला शिळेवर आपटले. तेव्हा लंकादुर्ग चळ भरल्यासारखा कापला. त्याचा प्रतिध्वनी पाताळात उमटला. दिग्गजांची टाळी चिकटून त्यांच्या कानात दडे बसले. पाताळातले सर्प पळू लागले, मेरू तुटून पडला, सारी पृथ्वी या प्रकरांनी कंपायमान झाली. रामभक्त हनुमान ज्ञानवंत रत्न होता. युद्धातही तो कृपावंत असल्याने अखया जन्ममरणापासून सुटला. अखयाला असे मरण आले. रावणाने अखयाकुमाराच्या रक्षणासाठी कोट्यवधी राक्षससैन्य अश्व, गज, रथ, यांसह पाठविले होते.

https://archive.org/details/muktabodhaindologicalresearchinstitute

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust, Delhi and eGangotri

त्या सैन्याला शेपटीने पाठलाग करून पळवून लावले. असा सगळ्यांचा कोंडमारा करून मारुतीने त्यांच्यावर दगड-शिळांचा मारा केला. तेव्हा ते राक्षसवीर रक्ताच्या प्रवाहात रणात पडले. अशा रीतीने हनुमंताने अवघ्यांच्या आयुष्याची समाप्ती केली. त्याच्या कीर्तीचे सुरनर, ऋषीमुनी यांनी गुणगान केले. देवांनी पुष्पवृष्टी केली, ऋषींनी जयजयकार केला. धन्य तो अंजनीसुत की ज्याची त्रिभुवनात कीर्ती गाजली.

अध्याय पंधरावा

अखयापुत्र रणात मारला गेल्याचे ऐकताच रावण दाही तोंडावर हात घेऊन बोंब मारत जमिनीवर गडबडा लोळू लागला. सभास्थानात अखयाचा मुकुट पडलेला प्रत्यक्ष पाहून रावण आक्रंदून रडू लागला. "मी ही कशी उलटी करणी केली. माझा बुद्धिभ्रंश झाला आणि मी अखयाकुमाराला युद्ध करायला पाठविला. रणात त्या वानरानं त्याला मारला. याचा बोल कोणाला लावायचा? माझ्या अशोकवनाचं शोकस्थान झालं. त्या वानरानं लंकेचा नाश करून, पुत्राचा वध केला. आम्हा सर्वांच्या देखत देहाचा नाश करून अखयाचे निधान माझ्यापासून नेऊन, त्या वानराने माझी लुबाडणूक केली. त्याची ही चोरी-मारी झाली. हनुमान हा लुटारू आहे. त्याने आमच्या कपाळी लाज आणली आणि अखयाला मारून त्याने पुरुषार्थ केला." सगळे प्रधान म्हणत होते, "आमचे पुत्र रावणाने रणात पाडले. रावण स्वतः म्हणत होता ना संग्रामात मरण येणे श्रेष्ठ मरण असते. अखया पुत्र रणात पडला तेव्हा दाही तोंडांनी शंख करतोय, म्हणजे बोलल्यासारखी त्याची कृती नाही. हा अभिमानी रावण निंद्य आहे. कोट्यवधी सैन्य पाठवले ते वानराच्या शेपटीने पाठलाग करून मारले."

रावणाच्या पोटात धुकधुक चालू होती. "शिवपत्नी उमेची अभिलाषा धरून मी तिची भोगार्थ मागणी केली. ते पाप माझ्या माथी बसले आहे. शंकर तत्त्वतः कोपला; कारण उमा ही तर त्रैलोक्याची माता, विशेष म्हणजे माझ्या सद्‌गुरूची पत्नी, तिची अभिलाषा धरून मी तिच्याकडे त्या दृष्टीने पाहिले त्यामुळे कोपलेला रुद्र स्वतः आला. अखयाचा नाश झाला म्हणजे खरेच स्वतः रुद्र संतापला. राक्षसांचा नाश झाला तो मी केलेल्या महापापामुळे झाला. हा वानर नव्हे प्रत्यक्ष काळाग्निरुद्रच आहे. त्याच्या पुढे कसला राक्षसांचा भार, येथे हा सर्व संहारकच आला आहे. जो जो अशोकवनात पाठविला तो तो काळमुखात पडला. आता कोणालाही पाठविले तर तो जाणार नाही." असा विचार करून रावणाने ठरविले की, "अखयाच्या कैवारासाठी इतर कोणाला पाठविता येत नाही तर मीच स्वतः संग्रामासाठी जातो." असे म्हणून त्याने कंबर कसली. "मी त्या वानराला मारले तरच लंका संकटामुक्त होईल. उलट मला त्या वानराने मारले तर सीता मुक्त होईल." रावणाला एवढी लाज वाटत होती की तो कोणालाही न सांगता अंगावर कवच बांधून युद्धाला निघाला.

रावण स्वतः युद्धाला निघाला आहे ही वार्ता समजताच इंद्रजित गडबडीने आला. त्याने वंदन करून रावणाला सिंहासनावर बसविला. "एकटा तो वनवासी पाला खाणारा वानर आणि त्याच्यावर दशाननाने चालून जाणे हा योग्य विचार ठरणार नाही. वीरांनी वानराचा धाक घेतल्यामुळे कोणाला पाठविले तर तो जाणार नाही. मी तर घरचाच सेवक, तेव्हा आपण मला पाठवा. वीरांचे प्रौढीचे बोल रणांगणात फोल होतात. माझे बोलणे सत्य आणि सखोल आहे. हे सर्व सुरगणही जाणतात. माझ्या प्रतापाची ख्याती लंकानाथा तूही जाणतोस.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

मला त्वरित पाठव म्हणजे क्षणात मी मारुतीला घेऊन येईन. एकटा तो वानर म्हणजे काय मोठे; तेव्हा लंकापती आपण जाऊ नये. मला संग्रामासाठी पाठवा.'' इंद्रजिताने रावणाला लोटांगण घालून, पाय धरून युद्धाला पाठविण्याची विनंती केली आणि तशी आज्ञा मागितली. तेव्हा रावणाला रडू आले.

रावणाची साशंकता, इंद्रजिताचे आश्वासन

''चवदा सहस्र वनरक्षक, ऐंशी सहस्र किंकर, जंबुमाळी, प्रधानपुत्र आणि शूर सेनानी वानराने मारले. देवा-दानवांना दुर्धर, बलवानांना बळी असलेला, शूर वीर, असा तुझा बंधू अखयाकुमार वानरांने मारला. या सर्वांना रणांगणात बोलावून एका मागून एक त्याने ते वीर मारले. असा तो वानर युद्धात दुर्धर असून त्याच्या समोर कोणी उरत नाही. त्या वानराच्या समान असा कोणी वीर भूमंडलात दिसत नाही. त्याच्याशी तू युद्ध करू जाशील, तर तो रणात होळी करील. जी गती अखयाची झाली, तीच माझ्या इंद्रजिताची होईल.'' असे म्हणून पुत्राला पोटाशी धरून रावण ओक्साबोक्सी रडू लागला. तेव्हा इंद्रजित रावणाला म्हणाला, ''त्या वानराची काय कथा? तू का व्यर्थ चिंता करतोस? आता त्याला बांधून आणतो. युद्धामध्ये मी इंद्राला जिंकून, गळ्याला बांधून आणला. तेव्हापासून इंद्रजित असे माझे नाव प्रसिद्ध झाले. अशा मला वानराशी युद्ध करायचे असताना तुला शंका का यावी? वानराला मी गळ्याला बांधून आणीन हीच माझी भक्ती असे समज.'' इंद्रजिताचे बोलणे ऐकून दशानन रावण सुखावला. त्याने दुर्धर असे स्वतःचे सैन्य इंद्रजिताबरोबर देऊन मोठ्या सन्मानाने इंद्रजिताला पाठविण्याचे ठरविले.

रावणाच्या मनात अनेक विचार आले, ''निराहारी आणि ब्रह्मचर्याचे पूर्ण पालन करणारा जो कोणी असेल त्याच्याकडून मेघनादाला मरण आहे. वानराने येथे फळे खाल्ली आहेत, तेव्हा तो इंद्रजिताला मारू शकणार नाही. मग इंद्रजिताला युद्धासाठी पाठवायला संशयाचे कारण नाही.'' रावणाने इंद्रजिताला आनंदाने पाठवला. अखयाला मारल्यामुळे रावण क्रोधाविष्ट झाला आणि त्याने इंद्रजिताला म्हटले, ''तो वानर कपटी आहे, त्याला तू मार. तुला ब्रह्मयापासून सर्व विद्या प्राप्त झाल्या आहेत. तू अस्त्रबळ शिकला आहेस. तुझ्याजवळ अनेक शस्त्रे आहेत. सृष्टीमध्ये तूच एक बलवान आहेस. इंद्रादी देवांना युद्धाच्या धामधुमीत तू जिंकलेस. तेहतीस कोटी देवांना तू लंकेत बंधनात घातलेस. तुझी पुत्रा थोर कीर्ती आहे. तू मेघांचा धिक्कार करून, त्यांची प्रचंड गर्जना हरण केलीस, त्यामुळेच तुला मेघनाद नाव मिळाले आणि ते तुला शोभून दिसते मुला. अस्त्रबळ, शस्त्रबळ, बुध्दिबळ, शारीरिक बळ ही सर्व सामर्थ्ये एकवटून त्या वानराला तत्काळ धरावेस. जर बळाने तो आटोपत नाही असे दिसले, तर तू त्याच्याशी कपट कर. तुझ्यापाशी त्या वानराला धरण्यासाठी आवश्यक अशा अनेक प्रबळ विद्या आहेतच. बळात हनुमंत प्रबळ ठरला आणि तुला त्याची बरोबर करता आली नाही, तर तुझ्यापाशी असलेली सर्व शस्त्रे त्या त्या प्रसंगात घे. वेळ पाहून, सावध मनाने, तू त्वरित युद्धाला जावेस. तुला निश्चित विजय मिळेल.''

इंद्रजित आपल्या पित्याचे बोलणे आणि आशीर्वाद ऐकल्यानंतर मोठ्या भक्तीने पित्याला प्रदक्षिणा घालून, पायावर मस्तक टेकवून, वंदन करून युद्धासाठी निघाला. तो उत्साहाने निघाला खरा पण त्याचवेळी एक नग्न कुमारी पाठीमागे शिंकली; तेव्हा रावण दचकला. इंद्रजित शंकित झाला. शिंक पाठीमागे झाली याविषयीचे भविष्य काय असे रावणाने ब्रह्मदेवाला विचारले. ब्रह्मदेवाने त्यामागचे गुह्यज्ञान रावणाला गुप्तपणे सांगितले.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

ब्रह्मदेव म्हणाला, "यशात अपयश आणि अपयशांत यश आहे. इंद्रजिताला मरण नाही. तो वानराला तुझ्यासमोर लंकेत आणील. युद्धात इंद्रजित वानराला धरेल." ब्रह्मदेवाचे उत्तर ऐकून सर्वांनी जयजयकार केला आणि सैन्यसंभार सज्ज केला. स्वतः रावणाने गुह्य स्पष्ट केले, "हा वानर साधारण नव्हे; अत्यंत दुर्धर रणशूर योद्धा आहे. साक्षात् यमच आहे. जे जे अशोकवनी गेले, ते ते काळाच्या मुखात गेले. त्याने अश्व, गज, रथ मोडून, वीरांचे निर्दाळण केले. जे जे हनुमंताच्या दृष्टीस पडले ते ते निश्चित मेले. कोणी बोंब मारायलाही वीर तो उरू देत नाही. त्याच्यापुढे कवच टिकत नाही मग ढाल-तलवार बापडी काय टिकणार. त्याच्यापुढे कोणीच टिकत नाही, घावाने नेमका तो नाश करून टाकतो. शस्त्रे किंवा बाण त्याच्या देहात रुतत नाहीत. अस्त्रांची प्रेरकशक्ती त्याच्यावर चालत नाही. तेव्हा पुत्रा, तू आपले प्राण वाचवून रणांगण साधावेस. तुला एक गुपित सांगायचे तर त्या वानराच्या शेपटीत अचाट शक्ती आहे. त्याच्या शेपटीने महावीरांसह सैन्याचे निर्दाळण केले आहे." रावणाच्या बोलण्यावर इंद्रजित म्हणाला, "त्या वानराच्या युक्त्या असोत की ब्रह्मदेवाची सत्य वचनोक्ती असो, मी गळ्याला बांधून मारुतीला लंकेत आणीनच." इंद्रजिताचे प्रतिज्ञोत्तर ऐकून सर्वांनी त्याचा जयजयकार केला आणि वाद्यांचा गजर करून सैन्यसंभार चालला.

मारुतीवर सैन्याची स्वारी व त्यांचा नाश

मारुतीवर चालून जाण्यासाठी शहाऐंशी प्रयुत माजलेले महाथोर हत्ती, शतानुशत कोटी रथ, असंख्य घोडेस्वार, काही उंटावर, काही मोठ्या गाढवांवर चढलेले स्वार, पर्वतप्राय गर्जना करत निघाले. काही स्वार अंतराळी केसर उडावे तसे घोडे उडवीत होते; घोडे तीन पायांवर नाचवीत होते. हो-हो-मा-मा-जी-जी अशा आवेशपूर्ण गर्जना स्वारांकडून होत होत्या. ते पराक्रमी निवडक वीर असून, त्यांच्या हातात, दंडावर, मनगटावर कंकणे, आणि शिरावर टोप असून, त्यांनी मोती आणि मणी गुंफलेल्या झुली घातल्या होत्या. त्या वीरांनी हिरे, माणके जडविल्याने लखलखीत तेजोराशीप्रमाणे असणारी आणि सूर्यतेजाशी समान असा तेजस्वी प्रकाश असलेली चिलखते धारण केली होती. सैन्यातील पायदळ धनुर्धारींचे होते आणि इतरांजवळ/शेळी, साबळी, शक्ती, तोमर, अढाउ, चव्हाण, कोयते अशी शस्त्रे होती. त्या सैन्याकडे भिंडीमाळा, चेंडू, चक्रे, गदा, मुद्गल, परिघपत्रे, असून सिद्ध केलेली अग्निशस्त्रे आणि युद्धात मारा करणारी यंत्रे होती. सैन्यामध्ये अलंगाइत, बाणाईत, तुळणे, ढाली घेतलेले धडाडीचे, तसेच तळपणारे कोयतेधारी, मुठीच्या आघाताने वानराला चूर करणारे पहिलवान होते. तलवार हातात घेतलेले, खेटक हातात घेतलेले, पट्टिश हातात घेतलेले पटाईत, जमदाढा आणि कटार हाती असलेले, अचूक धोंडमार करणारे, पायदळातले काही गोफणगुंडा चालविणारे असे अनेक वीर होते. ते युद्धासाठी चालले असताना भाट गजगंभीर अशा गडगर्जना करत होते.

तो सैन्यसंभार जाताना त्यात पायदळातले निधडे वीर पुढे, त्यांच्यामागे घोडेस्वार, नंतर रथ, आणि त्यामागे राजकुमार होते. दातात तिखट लोहसेंब्या, वाऱ्यालाही वाट मिळत नव्हती, दोन्ही बाजूला मदोन्मत्त हत्तींचा समूह चालत होता. पांढऱ्या, पिवळ्या, भडक लाल रंगाच्या पताकांनी सैन्याला शोभा आली होती. त्या पताका पुरुषार्थ वाढविण्याचे ब्रीद वागवत होत्या. सूर्याच्या प्रभेसमान स्वतःच्या लखलखीत तेजाने ओथंबलेल्या अनेक माळांनी ध्वज-पताका शोभत होत्या. एकाच वेळी फुटणारे तडक, भिंडिमाळांची वृष्टी, रणवाद्यांचे गजर आणि वीरांच्या गर्जना केल्या जात होत्या. तसेच धडधडा पडणाऱ्या आघातांनी रणभेरींची एकच गर्दी उडाली. विराणीही लगोलग

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

दुंदुभींसह वाजू लागल्या. शंख, मृदंग, टाळ, झांजा, छोट्या झांजा, घर्घरित घोगरगळा, बुरंगांचा वेगळा ध्वनी, पावे, थापटीने वाजवायची वाद्ये या सर्वांचे वादन चालू होते. तशातच भेरी, चंडमोहरी, निशाणे ही वाद्ये गर्जत होती आणि त्यामुळे योद्धे रणात गजबजून गेले, तर भेकड मलमूत्रात लडबडले कारण त्यांनी हनुमंताची कीर्ती ऐकून त्याचा भीतीने धाक घेतला होता. हनुमंत एकटा एक आणि त्याच्यावर एवढा अपार सैन्यभार चालून आला; तरीही त्यांना धाक वाटत होता आणि आपल्याला तो वानर मारील असे वाटत होते. इकडे वाजंत्र्यांचा आवाज ऐकून आणि सैन्य जवळ आलेले पाहून मारुतीला आनंद झाला.

हनुमंताने राक्षसांशी झगडा करायचा निश्चय त्या उजाड वनात क्षणात केला. तसेच त्याने ठरविले की इंद्राजिताची प्रौढी रणात पूर्णपणे झटकून टाकायची. " माझे मनोरथ पूर्ण करण्यासाठी श्रीरघुनाथ प्रसन्न झाला आहे. रणात सर्वांना मारून इंद्राजिताला त्रस्त करीन. अखयाकुमाराला रणात मारून प्रथम मी बोहणी केली. आता तर वीरांच्या ओळीच लागल्या आहेत. त्या सर्वांना मी रणात मारीन. माझे शेपूट जमिनीवर नाचते आहे. हे सैन्य मारून चामुंडा भवानीची पूजा करीन, कारण मांसाने भूतांना संतोष होतो. हे शेपूट अतिशय जाणकार आहे. भूतांना आमंत्रण देऊन मांसाचे भोजन आणि रुधिराचे पान कृपा करून सेवन करावे असे त्यांना म्हणावे. तसेच ज्याची जी आवड असेल त्याने ती मला स्पष्ट सांगावी. राक्षसांना मारून ती ती आवड मी निश्चित पुरवीन. आज हीच माझी भाजी-भाकरी आहे. तुम्हीही न्याहारी करा. श्रीराम रणकेसरी पुढे होऊन पंचधारांनी सर्वांना निववील." नंतर हनुमंताने आपल्या शेपटीला गुपित सांगितले. "जो जो सैन्यात आला आहे तो नगरात परतू न द्यावा. सर्वांचा घात करावा; परंतु जो जो शरण येईल त्याला निश्चित राखावे. इतर सर्वांना मारावे हीच माझी तुला समर्थ आज्ञा आहे." आपल्या स्वामीची आज्ञा मानून लंकानगरीच्या दारात रक्षण करायला आणि जो राक्षस परतेल त्याचा प्राण घ्यायला सिद्ध होऊन शेपूट थांबले.

रावणभगिनी असाळी आणि मारुती संघर्ष

इंद्रजित ज्या रथात बसून हनुमंतावर चालून आला त्या रथाची चाके प्रवाळाची, रथाचा आस पांचूचा निळसर रंगाचा, रथाची धुरा आणि जूं इंद्रनीळांचे आणि रथाची अन्य घडण रत्नांची होती. त्या रथाला नखे आणि दात असलेले वाघ-सिंह जुंपलेले होते. त्यांची तोंडे भयप्रद आणि विक्राळ असून त्यांच्या जिभा अग्नीप्रमाणे जळजळीत होत्या. कपटांची रास असा सारथी रथाचे लगाम हातात घेऊन होता. स्वतः इंद्रजित धनुष्य सज्ज करून रथात बसला होता. रथावर निळ्या पताका आणि ध्वज असून, शिवाय चित्रविचित्र ध्वजपताका आणि रत्ने, मोती यांच्या माळा होत्या. अशा त्या रथात इंद्रजित बसला. ज्याप्रमाणे सुरवरांना इंद्र त्याप्रमाणे राक्षसांना इंद्रजित होता. मोत्यांच्या झालरींनी शोभिवंत, सोन्याचे दांडे असलेल्या दोन चवऱ्या यांचा नानाप्रकारे उपभोग त्याला दिला जात होता. असा इंद्रजित सैन्यसंभाराकडून जयजयकार केला जात असताना पुढे निघाला. जशी गरुडाच्या उड्डाणाची शक्ती असते. तशीच त्याच्या रथाची गती होती. युद्धात मारुतीला जिंकण्यासाठी तो शीघ्र गतीने निघाला होता. इंद्रजित सैन्यासह येत असतानाच पडलंकेची स्वामिनी आणि रावणाची बहीण असाळी पुढे धावली. "ज्याने अखयाकुमार मारला त्याची मी होळी करीन. ते एक पाला खाणारे वानर ते काय आणि त्याच्यावर सेनासंभार रागावून, पिसाळून हे राक्षसगण चालून जाताहेत. मीच त्या वानराला मारीन. असाळी अशोकवनात आली. तिला समोर मारुती दिसला. तेव्हा तिने डोळे वटारले, विक्राळ वदन पसरले.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

तिच्या जबड्याचा एक भाग भूतलावर तर दुसरा आकाशाला भिडला. कराल, विक्राळ असे तिचे दात होते आणि तिची जीभ काळीकुट्ट होती. मारुतीने हे पाहून मनात म्हटले, "मी स्वानंदाने युद्ध करणार होतो तर मधेच ही राक्षसी आडवी आली. ज्याप्रमाणे धनसाठा मिळवताना प्रथम डाकीण उठते, त्याप्रमाणे युद्धनिधानाजवळ प्रथम ही विषसी असाळी पुढे आली. तेव्हा आता कालिका, कली, चामुंडा यांना भोजनाने तृप्त करावे म्हणून या असाळीलाच पहिला बळी करतो. पहिली प्राणाहुती लहान असते; संग्रामप्रसंगात तृप्ती व्हावी म्हणून प्रथम असाळीची प्राणाहुती द्यावी. प्रथम समिधा होमून मग प्रधानद्रव्ये होमतात त्याचप्रमाणे संग्रामयज्ञात असाळीरूपी समिधा देतो." असा विचार करून, चिलटाएवढे रूप धारण करून हनुमंताने असाळीच्या पसरलेल्या मुखात मागे-पुढे न पाहता उडी घेतली. त्याने असाळीच्या दातांना किंवा जिभेला स्पर्श न करता एकदम तिच्या पोटात प्रवेश केला. हे त्या राक्षसीला जाणवलेच नाही. वानर मुखातून प्रवेशले, मुखातल्या मुखातच हरवले की दाताखाली दडले, जिभेच्या आरंभीच संपले काय झाले कोण जाणे! मुखातच लीन झाले का श्वासोच्छ्वासासह पळून गेले, काय झाले त्या वानराचे हेच असाळीला समजेना. तिला आंबट, खारट, तिखट, गोड, कडू, तुरट कोणतीच स्पष्ट चव कळेना. ती राक्षसी नुसतीच कटकट करत होती. तिला वानर जीभेखाली वा दाताखाली, ओठात कुठेच आढळेना, शेवटी पोटातही समाधान मिळेना, म्हणजे त्या वानराने आपल्याला फसविले हे तिच्या दृष्टीला अतर्क्य वाटत राहिले.

हनुमंताला असाळीने गिळला, इंद्रजिताचा अनर्थ टळला अशा प्रकारची वार्ता युद्धासाठी आलेल्या सैन्याने लोकात पसरविली. तेव्हा लोक म्हणू लागले, "तिने आरंभीच वानराला गिळले असते तर अखयाकुमार मेला नसता आणि किंकर, वनरक्षक, प्रधानपुत्र वाचले असते." अशी लोकांची बोलणी चालू असतानाच असाळीच्या पोटात कळा येऊ लागल्या. कारण हनुमंताने तिचे काळीज मुठीत आवळले. त्यामुळे असाळी गडबडा लोळू लागली. इंद्रजिताशी युद्ध करायला मारुती उत्सुक होता, तेव्हा तो असाळीच्या पोटात न राहता कौशल्याने बाहेर येण्यासाठी सिद्ध झाला. त्याने तिच्या काळजाचा देठ उपटला आणि तिच्या बेंबीपाशी पोट फाडून तो बाहेर आला. त्याने बाहेर येताच प्रकट भुभुःकार केला. त्याचा भुभुःकार ऐकून राक्षस कापू लागले, मुख्य तो इंद्रजित दचकला आणि सेनासंभार खळबळला. रावणाकडे असाळीने मारुतीला गिळले ही वार्ता सांगण्यासाठी गेलेल्या लोकांपाठोपाठ मारुतीने असाळीला मारले ही वार्ता सांगणारे लोक रावणाकडे आले. "राक्षसांच्या मायावी कपटापेक्षा त्या वानराची विद्या थोर असणार. कारण, तो वानर असाळीच्या पोटात शिरून, पोट फाडून बाहेर आला आहे. जशी शूर्पणखा तशीच ही असाळी रावणाची बहीण असल्याने त्या दशाननाला खूप दुःख झाले. त्याच्या मनात विचार आला, "वानर युद्धासाठी पेटला आहे; मी कोणाकोणाच्या दुःखाचा विचार करू. आता इंद्रद्रजिताचे काय होणार?" या विचारांनी रावण धास्तावला.

इंद्रजित आणि मारुती यांचा संग्राम

हनुमंताने असाळीचा वध केल्याचे ऐकून, इंद्रजित कृतान्त कोपाने हनुमंताला शासन करावे म्हणून निघाला. हनुमंताला पाहताच सैन्याचे धैर्य गळते हे लक्षात घेऊन इंद्रजिताने आपला रथ पुढे काढला. विजेच्या गर्जनेने आकाश गडगडावे तसा धनुष्याचा टणत्कार करत निधड्या महाशूर इंद्रजिताने रथश्रेष्ठ पुढे नेला. धनुष्याचा टणत्कार ऐकून मारुतीने भुभुःकार केला आणि त्यामुळे आकाश कोंदले, गिरिकुहरे दुमदुमली. त्या नादाचा

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

प्रतिध्वनी पाताळात उमटला. भूते अंतराळात कळवळली. पक्षी नभोमंडळात भिरभिरू लागले. दिग्गजांची टाळी चिकटली. इंद्रजिताला युद्धाची आवड असल्याने त्याने आपला रथ कडकडत पुढे काढला. मारुतीने आपली शेपटी गुढीसारखी उभारली आणि रणरंगाच्या आवडीने तो नाचू लागला. एक रावणाचा राजकुमार तर दुसरा रामदूत वानर; एक राक्षसांचा राक्षसेंद्र तर दुसरा वानरांचा वानरेंद्र; दोघेही वीर अत्यंत प्रबळ, दोघांचे बळ समान आणि शील समान होते. दोघेही संग्रामात कुशल आणि तसेच रणमारामध्ये चपळ होते.

दोन महावीर एकमेकांना भिडत असल्याचे पाहण्यास सुरवर, सिद्ध, ऋषीश्वर, गंधर्व, किन्नर, नर विमानातून आले. इंद्र शचीसह, ब्रह्मदेव सावित्रीसह, शंकर उमेसह संग्राम पाहण्यासाठी आले. दोघेही वीर खवळले तेव्हा दुर्धर काळकृतांत किंवा काळाग्निरुद्र सत्वर युद्धाला आल्यासारखे भासले. एक हत्ती तर एक सिंह, एक हिरण्यकशिपु तर एक नरहरी किंवा सहस्रबाहू परशूधर यांसारखे युद्धात मिसळले. एक सर्प तर एक सर्पशत्रू, एक त्रिपुर तर एक त्रिपुरारी, एक मुर तर एक मुरारी असे ते वाटले. इंद्रजित दुर्धर घाव हाणत होता, तर हनुमान निवांत फळे खात होता; कुशी खाजवत होता, डोळे मिचकावत होता आणि इंद्रजिताला अंगठा दाखवत होता. त्यामुळे चिडून इंद्रजिताने दुर्धर बाणांचा वर्षाव केला. मारुतीने रणगर्जना करत पाषाण फेकले. इंद्रजिताने मारुतीच्या कपाळावर सोन्याचा पिसारा असलेले बाण तसेच विविध प्रकारचे बाण वेधले, मारुतीने बळाने शिळा फेकली, मारुतीने चपटे दगड, रागाने उड्डाण घेऊन शिलाखंड, वृक्षखंड यांचा मारा केला. इंद्रजिताने शिवशक्ती शक्तीने सोडली तेव्हा मारुतीने मोठे पर्वत फेकले. यामुळे इंद्रजित वेडावला, कारण युद्धात मारुती आटोपत नव्हता. त्यावर इंद्रजिताने एक चेंडूचक्र सोडले, मारुतीने त्यावर सामर्थ्याने शिळा मारली. एकाने वेगाने लहुडी मारताच दुसऱ्याने धोंड्याची फेक केली. एकाने आवेशाने पट्टिश हाणताच त्यावर मारुतीने खडक फेकला. या प्रतिकारामुळे इंद्रजिताचे धैर्य खचले आणि तो शेपटाच्या अटकेत प[illegible]ला.

इंद्रजिताचे रणकौशल्य असे की रणात [illegible]वड मिळताच तो ख्याती करी; परंतु शत्रू आटोपत नाही असे दिसताच मागे पळ काढी. मारुतीच्या शेपटीपुढे त्याचे बळ चालत नव्हते. सैन्याभोवती चौफेर शेपटीचा वेढा पडल्याने मागे-पुढे सरता येत नव्हते. युद्धात बाणांचे पाषाणाने आणि पाषाणांचे बाणांनी पीठ केले जात होते. मारुतीने अचाट युद्ध सुरू केल्याने इंद्रजिताला पेच पडला. तेव्हा इंद्रजिताच्या मनात असा विचार आला की मारुती आपल्या शक्तीने आटोपत नसल्याने त्याला कपटाने मारावा. शेपटीवर कपट चालत नाही कारण ते वानराचे शेपूट कपटाचा घात करणारे आहे. इंद्रजित शरवर्षाव करत होता तर मारुतीकडून शिळा-शिखरांचा वर्षाव होत होता. यामध्ये सैन्याचा चूर होऊन नाश होत होता. अशी राक्षसांची दुर्दशा झाली. तेवढ्यात सैन्यात एकच गोंधळ माजून मारुतीने केलेल्या पर्वताच्या आघातामुळे इंद्रजित मेला की जिवंत आहे याविषयी राक्षस शंकित झाले. युद्धात शस्त्राची वा अस्त्राची युक्ती चालत नव्हती; मागे सरावे तर शेपटीत सापडण्याचा धोका होता. मारुती आटोपत नसल्याने इंद्रजित चिंताग्रस्त झाला. त्याला चिंतातुर झालेला पाहून हनुमंत इंद्रजिताला म्हणाला, "मी तुला शिळा, वृक्ष, पर्वत यांनी मारणार नाही असे शपथपूर्वक सांगतो. इंद्रजित नावाची कीर्ती अशी आहे की तू बाणांनी साक्षात इंद्राला जिंकलेस. तेव्हा त्या बाणांनी मला वेधून विजयवृत्ती साधून घे. ज्या बाणांच्या कडाक्याने देव बंदीत पडले त्याच बाणांनी मला विंधून विजयाचा ध्वज उभार आणि मला जिंकून घे." हनुमंताचे हे सांगणे ऐकल्यावर इंद्रजिताला संताप आला आणि त्याने सर्व मंत्रयुक्त

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

अस्त्रांनी मारुतीवर चढाई केली.

इंद्रजिताने मंत्रयुक्त अस्त्रे आणि शरवर्षाव केल्यावरही मारुती मागे सरला नाही किंवा तो मनातून शंकितही झाला नाही. आपल्या अंगात बाण रुपले असे त्याला जाणवले असेही दिसेना. त्यामुळे सुर-नर आश्चर्य करू लागले. अशी मारुतीने ख्याती केली. श्रीरामनामाच्या शक्तीने मारुती नित्य निर्द्वंद्व स्थितीत असे. त्यामुळेच इंद्रजिताची ख्याती झाली. यामागचे कारण लक्षणीय आहे. दोन्ही हात पसरून, सर्व बाण पकडून गगनात झेप घेऊन मारुती ते राक्षसांना मारत होता. बाणांचा वर्षाव समूहाने झाल्यामुळे सैन्याचा नाश होत होता. राक्षस घावांमुळे कण्हत होते आणि युद्धात विपरीत घडत होते. हनुमंताशी युद्ध करताना इंद्रजित चांगलाच फसला. कारण तो निर्वाण बाणांचा वर्षाव करत होता आणि ते बाण त्याच्याच सैन्यावर पडून सैन्याचा नाश होत होता. धनुष्यबाण हनुमंतासाठी असले तरी युद्ध त्याच्याशी न होता, आवेशाने भारलेला इंद्रजित आपल्याच सैन्याला मारत होता. मग त्याने विचार केला, "माझे निर्वाणीचे बाण हा वानर पकडून आमच्यावरच उलटवून रणकंदन करतो आहे." इंद्रजिताच्या बाणांमधे हनुमान स्वानंदाने फिरत होता. मंत्रशक्तीने युक्त असलेले बाणही हनुमंताने व्यर्थ केले. त्याच्याविरुद्ध शस्त्रांची खटपट, अस्त्रांचा नेट किंवा कपट परिणाम करत नव्हते. त्याने युद्धात सर्वांना त्रस्त केले. एकेक दिव्य अस्त्र मारुतीने निष्प्रभ केल्यामुळे इंद्रजित धास्तावला. त्याच्या जिवाला धाक वाटला. इंद्रजिताने सोडलेल्या बाणांनी मारुतीने अंगाला उटी लावली अशी अवस्था झाली. नंतर मारुती धावून जाऊन इंद्रजिताच्या गळ्याला झोंबला आणि त्याने मुठीत धरून इंद्रजिताचे धनुष्य मोडले. बाणांची ओढ संपली तरी मारुतीची प्रौढी मोठी की त्याला मल्लविद्येची आवड होती. त्यामुळे तो कडोविकडीने इंद्रजिताला भिडला.

हनुमंत आणि इंद्रजित यांचे मल्लयुद्ध सुरू झाले. उरात, डोक्यावर, कोपरावर परस्परांचे तडाखे सुरू झाले. हातांना कळ लावून पोटात धपाटे मारत ते झुंजत होते. मारुतीची लाथ चुकवून इंद्रजिताने मारुतीच्या मस्तकावर आघात केला. उजवा हात अडवल्यावर डाव्याने घाव घातला. मल्लविद्येतले कौशल्य मारुती दाखवत होता त्यावेळी मागे शेपटीच्या आघातांनी घोड्यांसह रथ आणि सारथी यांचा नाश केला. सारथी मारून आणि रथ मोडून इंद्रजिताला दैवहत केला गेला. शेपटीचा वेढा सुटत नव्हता आणि मारुती युद्धात आवरत नव्हता. ध्वज आघाताने भंगला; छत्रे लाथेने भंग केली; इंद्रजिताचा मुकुट पाडून त्याला त्रस्त केले. हा प्रकार जमिनीवर सर्व ऋषीवर, आकाशातून सुरवर पाहात होते. हनुमंत श्रीरामाने विजयी केला म्हणून त्यांनी जयजयकार केला. इंद्रजिताचा अपमान झाला.

अध्याय सोळावा

इंद्रजित अपमानित झाल्याने अत्यंत उद्विग्न झाला. हनुमंताचे बळलक्षण समजेना. हनुमंताची धैर्यवृत्ती, संग्रामशक्ती, त्याची सवेग गती सारेच अतर्क्य असल्याने काहीच समजेना. इंद्रजिताची बुद्धी कुंठित झाली. युध्दामध्ये तो आटोपत नव्हता. इंद्रजिताला असे वाटले की "आपले पूर्वीचे शौर्य, कीर्ती ही वानराने निंदास्पद ठरवली. त्यामुळे मला लाज आली. आपण इंद्राला जिंकले म्हणून आपल्याला इंद्रजित असे नाव मिळाले. परंतु या वानराशी युद्ध करण्याने आपण तृणासमान ठरविले गेलो. मी सृष्टीतला एक गाढा योद्धा आहे असा मला मोठा गर्व होता. पण या वानराने पाठ पुरवून मला तृणप्राय केले. माझी धैर्यशक्ती, वीरवृत्ती जळो; कारण मला मारुती युद्धात आवरता आला नाही. माझी कीर्ती मलाच अपकीर्ती ठरवून गेली. माझा रथ, सारथी, भंगून, शस्त्रसंपत्ती भस्म करून टाकल्याने मला युद्धात मारुतीला जिंकणे

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized By Sarayu Foundation Trust and eGangotri

शक्य नाही.'' या प्रकारे विचार मनात आल्याने इंद्रजित क्षीणशक्ती झाला.

इंद्रजिताचे पलायन-मारुतीचा विवेक

इंद्रजिताची शस्त्रास्त्रयुक्ती, मल्लविद्येचे ज्ञान, कपट यातल्या कशाचाही उपयोग मारुतीच्या संबंधात होत नाही असे जाणवून चिंताग्रस्त होऊन इंद्रजित म्हणाला, ''जळो माझे यश आणि कीर्ती. मला मिळालेल्या वरामुळे मारुती मला मारू शकत नाही; पण त्याने मला पकडून रामाकडे नेले, तर वानरांकडून विटंबना होईल. रावणाने सीतेला आणले, त्यामुळे मारुतीने मला बांधून रामाकडे नेले आणि तेथे माझा अपमान केला तर ह्या वानरांना कोण प्रतिबंध करील. रावणाने भिक्षेकरी बनून सीतेला चोरून आणली; या वानरवीराने युद्धात मला पराभूत केले तर तो निश्चितच मला नेईल. पूर्वी अंगदाच्या पाळण्याला दशमुखाला खेळण्याप्रमाणे बांधला होता. पुढे पौलस्तीने त्याच्या सुटकेची मागणी केली; तेव्हा रावणाच्या दाढी-मिशांचे मुंडण करून, त्याच्या डोक्याचे पाच पाट काढून, तोंडाला काळे फासून, अपमानित करून त्याला सोडले आणि तसेच लंकेला पाठविले होते. मला धरून नेले तर मारुती आणि अन्य वानर माझीही तीच अवस्था करतील.'' असा विचार करून, कोणतीच युक्ती सुचेना म्हणून इंद्रजित चिंताग्रस्त झाला. ''जर हनुमंताने मला शेपटीत बांधले, तर माझ्या साहाय्यार्थ कोणी सर्वथा येणार नाही,'' हाही विचार इंद्रजिताने केला. त्याने अत्यंत भीतीने मारुतीला पाठ दाखवून रणातून पळ काढला. त्याला पळताही येईना कारण शेपटीशी त्याची गाठ पडणार होती. अखेर त्या छळाला कंटाळून इंद्रजित तिथल्या एका विवरात दडून बसला. अशोकवनात एक गुप्त विवर होते; त्यात दुस्तर धाक घेतलेला इंद्रजित गुप्त होऊन गेला.

मारुतीचा शेपटीशी विचार, राक्षससंहार

हनुमंत हा जगजेठी वीर होता, त्यामुळे तो पळत्याच्या पाठीमागे लागला नाही. विवेकदृष्टीने पूर्ण विचार करून तो स्वस्थ राहिला. ''इंद्रजिताचे मरण सर्वथा माझ्या अधीन नाही. तेव्हा मी तरी व्यर्थ निर्वाणीचा प्रयत्न करून माझे सामर्थ्य कशाला वाया घालवू. ब्रह्मदेवाच्या वराचा शब्द मी असत्य करणार नाही.'' अशा रीतीने विवेकदृष्टीने विचार करून हनुमान इंद्रजिताच्या पाठीमागे लागला नाही. त्याने राक्षससैन्य न्याहाळले आणि तो जळफळत त्यांचा वध करण्यासाठी धावला. तेव्हा त्याचे शेपूट म्हणाले, ''स्वामी, मी सर्वांना कवळून धरले आहे. आपण युद्ध करून दमला आहात. त्यामुळे मला त्यांना मारण्याची आज्ञा द्या.'' त्यावर हनुमंत म्हणाला, ''तुझ्या सामर्थ्यानेच महावीरांचा मी छळ मांडला. आता सैन्याशी झगडून रणात हिंडून मी कल्लोळ करीन. मी जाते तर तू जात्यात वैरण घालणारा; असे राक्षसरूपी धान्य भरडून काढू. जे भरड जाड डोळ उरतील त्यांच्याशी रणकंदन करू.'' राक्षसांचा सैन्यसंभार मारण्यासाठी शेपटीशी असा विचार विनिमय करून नंतर मारुतीने असा जोराचा भुभु:कार केला की राक्षस खळबळले. हनुमान महाबळी पाहून राक्षसांनी युद्ध आरंभले. एकाच वेळी अनेक शस्त्रांचा एवढा मारा झाला की ती शस्त्रे आकाशात किंवा धरणीवरही मावेनात. त्या शस्त्रांच्या आघाताच्या मेळ्यात हनुमान गोंधळ घालत नाचत होता. त्यावेळी शेपूट शस्त्रांची होळी करत रणाच्या गर्दीत फिरत होते. हनुमंत युद्धात वहिवाटलेला होता. तो वीरयोद्धयांनी मारलेल्या शस्त्रांचे पीठ करत होता. त्यामुळे राक्षसांची कटकट वाढून त्यांच्यात हाहा:कार माजला. सैन्याचा शेवट करण्यासाठी मारुती खवळला आणि सर्व मारणारांना आपल्या शक्तीच्या कौशल्याने त्याने चूर केले.

हनुमंताने आरंभ केलेल्या गोंधळामुळे रणात घोडे घोड्यांना, हत्ती हत्तींना, मारू लागले. रथ रथांना उलथवून सारथ्यांना मारू लागले. पायदळ पायाखाली पदातींना रगडत होते. वीर वीरांना

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

झोडपत होते. ध्वज, छत्रे मोडून रणात अनेकजण मरत होते. शेपटीत कोट्यवधी हत्तींना कवटाळून मारुती त्यांना आपटत होता. त्यामुळे हत्तींकडून हत्ती मारले जाऊन हत्तीदळे जमिनीवर मरून पडली. त्यांची गंडस्थळे विदारली जाऊन त्यातून मोती ओघळून पडले. शेपटीच्या सामर्थ्याने रणात मोठमोठ्या हत्तींचे समूह पडले. दशलक्ष माजलेले हत्ती शेपटीने रणात नष्ट केले. त्यांच्या हाडांचे चूर्ण करून मारुतीच्या शेपटीने महान कीर्ती केली. तसेच शेपूट सैन्यात घुसले आणि महावीरांची मोळी बांधून त्यांना जमिनीवर आपटले. त्यामुळे सैन्याची रांगोळी झाली. गाढवे, उंट, घोडे शेपटीत एकत्र आवळून, तळाला उभे असलेल्या घोड्यांच्या समूहावर आघात करून त्यांचे पीठ केले. शेपटीने जोराचा मारा करण्यामुळे रणात हाहाःकार झाला. अन्यत्र हनुमंत वीरांना ठोकून काढत राहिला. एकाला तळहाताने मारी; अनेकांना पायातळी रगडले; कित्येक मुठींच्या तडाख्याने मारले; नखांनी काहींना चिरले; एखाद्याला गुडघ्यांनी मारले; कोणाला गचांडी धरून चेपले; तर काहींवर मारुतीने पर्वत फेकून मारले. हनुमानाने अनेक वीर उराशी कवटाळून मारले. वरचेवर तळवे हाणून लक्षावधी राक्षसांचा संहार केला. मारुतीने आवेशाने भुभुःकार केल्यावर काहीजण धाकाने मेले; कोणी खाली तोंड करून पडले; काहींना कापरे भरून त्यातच ते मेले. त्याच्या प्रबळ भुभुःकाराने हलकल्लोळ माजला आणि रणातच भयाने मलमूत्र विसर्जन करून कित्येकांनी प्राण सोडले. हनुमंताच्या प्रचंड गर्जनेने वाजंत्री मेले आणि रणवाद्यांचा नाद बंद पडला. रणात राक्षसांची दुर्दशा होऊन ते शंखध्वनी करू लागले. राक्षससैन्याभोवती शेपटीचा वेढा आणि मधे हनुमंताने चालवलेली मारामार, यामुळे सैन्याचा प्राणान्ताने अन्त झाला.

हनुमंताच्या शेपटीने राक्षसांची पाठ पुरविली. त्यांची कुटुंबाशी भेट होईना, लंका त्यांच्या दृष्टीलाही पडेना, त्यांचा जीव वाचेना. रणात मारुती मारी आणि शेपूट नगरात जाऊ देत नव्हते, यामुळे प्रत्येक राक्षससैनिक युद्धात येई आणि धाकाने मूर्च्छित पडे. राक्षससैनिकांतील एखादा घाव लागल्याने वेडा होई, कोणी भूमीवर उपडा पडे, काही नागवी उघडी प्रेते होऊन पडत होते. या रीतीने इंद्रजिताचा गर्व झडला. सैन्याचा नाश झाला, रामनामावर गाढ निष्ठा असलेल्या मारुतीने निकराने युद्ध केले. त्याने कोट्यवधी रथांचा भंग केला; अश्व आणि गज यांचे समूह मारले; छत्रे आणि ध्वज जमिनीवर लोळू लागले, त्यांच्या चिंध्या सर्वत्र विखुरल्या होत्या. रक्ताच्या धडाडत जाण्याने त्या प्रवाहांनी रणात गहन रक्तनदी निर्माण केली. प्रेतांचे ढीग झाले. हत्तींची प्रेते रक्तनदीतल्या जणू सुसरी होत्या. पिसाऱ्यासह नदीत तरंगणारे बाण तेच मासे, त्या नदीत वाहात जाणाऱ्या ढाली म्हणजे कासवे, भाले हे शेपूट असलेले मासे, असे त्या रक्तनदीचे चित्र दिसत होते. ह्या नदीत चरबी, मांस यांचा एवढा मोठा गाळ होता की तो दोन्ही तीरांवरचा चिखल झाला. त्या चिखलात लोळणारे पराक्रमी वीर म्हणजे दोन्ही भागातल्या सुसरी भासत होत्या. मोक्षसुखाची परवडी अशी ती रणातली रक्तनदी पूर आलेली होती; तीमध्ये सर्वस्वाचा त्याग करून जो जो उडी घेई त्याला त्याला ती सामावून घेत होती. ध्वजासकट असलेला रथ हा शिडासहित असलेले तारू असून श्रीराम हा त्यातला तारक असल्याने तो पापापलीकडे नेत होता. जो कोणी या तारवावर बसून रणसमुद्रात प्रवेश करील तर त्याला श्रीराम हा सूत्रधार बनून पैलपाराला लावतो. या तारवाला जो दृढ धरील त्याला श्रीराम स्वतः तारतो. या तारवाची जो कीर्ती करील त्याला श्रीराम पैलतीरी नेतो.

भद्रकाली उदो म्हणून भुतावळ घेऊन आली. ती भुते मांसाचे घास खात होती. ओंजळीभरून रक्त पीत होती. या युद्धाची ख्याती जे नित्य आवडीने

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sayuj Foundation Research Academy, Gangotri

गातात, त्यांना श्रीराम सुख देतो, स्वानंदाने त्यांना तारतो. क्षेत्रपाळ आनंदाने नाचे, वेताळ डोक्यावर चौंडके वाही, अशी सगळी भुते रणगोंधळ करत नाचत होती. मारुतीने अनेक दिवसांचे धरणे दिले आणि पारणे फेडले. ते सारे मारुती युद्धात विजयी व्हावा म्हणून लोटांगणे घालत होते. हातात काळीजे घेऊन यक्षिणी वाणे देत होत्या. शंखिणी, डाकिणी ती वाणे घेत होत्या आणि स्वानंदाने खात होत्या. रणनगरीत राक्षसांच्या दातांची पिके पिकून त्यांच्या राशी झाल्या आणि भुते कुडवे करून मोजत होती. हा सर्व खेळ हनुमंत पाहात होता. देव आणि ब्राह्मण भैरवांना दिले; बलुते वेताळाला दिले; खळेदान भुतांना दिले, महाकालीला राजभाग दिला; मारकोला खळे-मातेरे दिले; मेसको तिच्या घरची दासी झाली; सटवीला वेसपेंडी आणि पाळीचा भारा कालिकेला, अशी अग्रपिकाची विभागणी, मोठ्या कौशल्याने मारुतीने स्वतः केली. पश्चिम धान्याची मोठी ख्याती असल्याने ती विभागणी रघुपती करील. सैन्याचा नाश करून शेपटीचा वेढा काढून, हनुमान देवळाच्या पहिल्या पूर्वीच्या ठिकाणी दृढपणे जाऊन बसला. हनुमंत गेल्याचे पाहून राक्षसवीरांना बळ आले. जे घायाळ होते ते कण्हत-कुंथत स्वतःच्या नगरीकडे निघाले.

नगरीकडे निघालेल्या राक्षसांपैकी कोणी कण्हत, कोणी कुंथत, काही हुंकार देत, काहीजण विव्हळत असे निघाले. एखादा हाताने खुणा करून पाणी मागत होता. ते रडत, पडत, चरफडत, दुःखाने तडफडत होते. कोणी कंबरेचे हाड मोडल्याने खुरडत जात होते. युद्धातल्या आघाताने कोणाचे कपाळ फुटून तो रक्तबंबाळ झाला होता; तर कोणाचे आतडे ओढल्याने तो तळमळत होता. कोणाला घाव लागल्याचे दुःख होते. एकाचे डोके फुटले, एकाचे अंग पर्वताखाली चेचले; एकाच्या पायात व्यंग आले, एकाच्या पोटात क्षयरोग शिरला, काही राक्षसांचे दात पाडले आणि मुठीच्या आघाताने घशात घातले गेले, नखे-नाके छेदून अनेकांना व्यथित करण्यात आले, यामुळे राक्षसवीर कुंथत असून लज्जित झाले होते. युद्ध पाहावे म्हणून लोक अशोकवनाकडे येत नव्हते; कारण त्यांना शेपटीने धाक दाखवला. सर्वत्र पळापळ झाली. संपूर्ण सैन्याचा नाश झाल्याने लंकेतील नर-नारी कळवळले आणि घरोघरी बोंब उठली. लंकानगरीत एकच आकांत निर्माण झाला. रावणाची थोरवी काळतोंडी ठरली. त्याने सीता चोरून आणली म्हणून वानराने महामारी करून राक्षसांचा नाश केला. "दशमुख काळतोंड्या आहे. त्याने सीता चोरून आणली त्यामुळे राक्षससैन्याला मरण आणले" अशा दुःखात लंका बुडाली. "मुळात राजाच भिकारी झाला, त्यावर त्याने परस्त्री हरण केली, आणि त्याच्या निंद्य कर्माने राक्षसांवर ही दुर्दशा ओढवली.

इंद्रजितासाठी रावणाचा शोक, ब्रह्मयाची सूचना

मारुतीशी युद्ध करताना रावण मेला असता तर लंकेतले लोक स्वस्थ राहिले असते. परंतु त्याने इंद्रजिताला हनुमंतावर पाठवून त्याचा घात केला. अखयाकुमाराला साहाय्य करण्यासाठी पाठवून युद्धात ज्येष्ठ पुत्र मारविला. अशी खंत करत राक्षस शंख करू लागले. त्यामुळे रावण हादरला. इंद्रजित मेला की जिवंत आहे याविषयी कोणीच निश्चित सांगत नव्हते; त्यामुळेही रावण गडबडून जाऊन वानराने इंद्रजिताचा घात केला या कल्पनेने दुःखी झाला. प्रत्यक्ष रणभूमीवर जाऊन शोध घ्यावा तर भुतांनी प्रेते खाल्यामुळे ओळख कशी पटणार, असा प्रश्न पडून रावण अधिक दुःखी झाला. युद्धात आपला ज्येष्ठ पुत्र मेला याचे दुःख वाटून रावण तोंडात धूळ घालू लागला, दहाही तोंडांनी तो शंख करू लागला, दुःखाने आक्रंदून आकांत करू लागला. तो दुःखाने गडबडा लोळू लागला, त्याचे केस मोकळे होऊन सुटले, डोळ्यातून अश्रूंच्या धारा वाहू लागल्या, नंतर कपाळ बडवू लागला.

https://archive.org/details/muthulakshmiacademy Bhavan Vani Trust, Lucknow

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

"मी इंद्रजिताचा घात केला. आता मी काय करू?" रणात हनुमंताला धरणे अशक्य झाल्यामुळे रावणाला मोठी काळजी लागली. "ब्रह्मयाने माझ्यापाशी असे सांगितले होते की इंद्रजित वानराला बांधून माझ्यापाशी घेऊन येईल. त्याचे बोलणे असत्य का झाले. ब्रह्मदेवाच्या ब्रह्मवाणीला असत्याचा विटाळ नाही. त्यामुळे इंद्रजिताला भय नाही हे मी निश्चितपणे जाणून आहे." नंतर रावणाने ब्रह्मदेवाला बोलावून त्याला म्हटले, "वानराला इंद्रजित बांधून आणील हे आपले वचन आपण सत्य करावे. इंद्रजिताची स्थितिगती राक्षस जाणत नाहीत. तो राक्षसघाती महावीर मारुती वनात बसला आहे." तेव्हा "आता मीच अशोकवनात जाऊन इंद्रजिताविषयीची वार्ता समूळ मनात आणून रावणाला सांगेन." असे ब्रह्मा म्हणाला, आणि तो प्रजापती ब्रह्मदेव अशोकवनात गेला. हनुमंताने ब्रह्मदेवाला लोटांगण घातले.

ब्रह्मदेव हनुमंताला म्हणाला, "राक्षसांचा अन्त आला असल्याने, त्यांचा तू अवश्य नाश कर. लंकाधीशाला तेवढा मारू नको. कुंभकर्ण आणि रावण यांचा वध श्रीरघुनाथ करील. लक्ष्मण इंद्रजिताला मारील. इतरांचा अन्त वानरांकडून होईल." यावर मारुतीने म्हटले, "माझी आवड अशी आहे की रावणाची भेट घ्यावी आणि लंकेची वाताहत करावी." ब्रह्माने सांगितले, "इंद्रजित तुझ्या भीतीने विवरात लपला आहे. मी त्याच्याकडे जातो आहे. तुला पाशबंधन लागत नाही, हे मला ज्ञात आहे; पण माझे सांगणे ऐक. तू ब्रह्मबंधन मान्य कर म्हणजे इंद्रजित तुला ब्रह्मपाश टाकून पकडेल तेव्हा आपण बद्ध असल्याचे भासवून स्वतः रावणाच्या भेटीला लंकेत जा. तुझ्या मनात आहे, त्याप्रमाणे रावणाची भेट घ्यावीस. ब्रह्मपाश आपल्या गळ्यात आहे असे मानून त्रिकूटावर लंकेत यावेस." इंद्रजिताच्या हातातून पडलेले पाशबंधन हनुमंताने मानले. ब्रह्मदेवाला मात्र त्याने सांगितले की "तुझ्याच हातून आलेले ब्रह्मबंधन मान्य करीन." ब्रह्मदेवाने म्हटले, "तसेच घडेल. माझ्या पराक्रमी हातातून आलेल्या पाशबंधनतच हनुमंत पडेल. नंतर तो रावणापुढे नेला जाईल." इंद्रजित मारुतीला पाठ दाखवून, अत्यंत संकटात सापडून, विवरात पळाला. पश्चात्तापाने कपाळ बडवू लागला. त्याच्या पराक्रमाची प्रौढी संपली. तो लाजून विवरातच बसून राहिला होता.

अध्याय सतरावा

इंद्रजित युद्धात मारुतीला पाठ दाखवून विवरात अत्यंत लाजून तो राजकुमार बसला असताना "महावीरांना कसे तोंड दाखवू? मी मोठी वीरवृत्ती असलेला, इंद्रजित या नावाची कीर्ती मोठी असलेली, परंतु त्या वानराच्या शेपटीने मला युद्धात संकटात पाडून छळले आहे. त्या शेपटीचा दुर्धर मार न साहून युद्धात राजकुमार असून मी गांजला गेलो. सैन्याचा समूळ नाश झाला. आता मी काय करू महावीरांना कसा भेटू? राक्षसराजाला तोंड कसे दाखवू? आता मी काही लंकानगरीत जात नाही, कारण लाजेची स्थिती वीरांना अत्यंत दुःख देते. मी सदाशिवाची शपथ घेतली, रावणाचे चरणवंदन केले, सर्व प्रमाणे अप्रमाण होऊन वानराकडून पूर्ण गांजला गेलो. मला युद्धात मरण आले असते, तरी माझे कोटकल्याण झाले असते. अपमानित होऊन माझे प्राण वाचले, जळो माझे वरदान! या अपमानित जगण्यापेक्षा युद्धातले मरण श्रेष्ठ. जळोत ती सगळी मला मिळालेली वरदानवचने. त्या वरदानांनीच मला लुवाडले. मी माझ्या पोटात एखादे शस्त्र घालीन म्हटले तर माझ्याजवळ शस्त्रही उरले नाही. लाजेने मला जीव द्यावासा वाटतो, पण काय करू ते वरदान मला मरू देत नाही. युद्धात मारुतीने गांजले आणि त्याच्यापुढे काहीच उपाय न

https://archive.org/details/@sarayu_foundation_trust_lucknow

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

चालल्याने इंद्रजित खळखळून रडला, त्याच्यावर मोठेच संकट ओढवले. लाजेमुळे कोणाला तोंड दाखवायचे नाही. वरदानामुळे मरणही येत नाही, अशा आकांतात इंद्रजित सापडला. अचानक त्याला ब्रह्मदेवाचे वचन आठवले. "मारुतीच्या गळ्याला बांधून, इंद्रजित त्याला लंकेमधे सभेत आणील." असे ब्रह्मदेव म्हणाल्याचे त्याला स्मरण झाले. तेव्हा त्या ब्रह्मदेवालाच बोलावू. "त्या ब्रह्मयाची वाणी असत्य होणार नाही म्हणावे तर मी रणात पराजीत का झालो? मारुती बंधनात अडकू शकला नाही, तर ब्रह्मा सत्यवचनी कसा? ब्रह्मदेवाला बोलवायला पाठवावे तर इथे कोणी सेवकही नाही. आपण स्वतः बाहेर निघावे तर निश्चित मारुतीचे शेपूट मला मारील. मी बाहेर गेलो की शेपूट माझा घात करील. माझ्या भोवती हनुमंत लागल्यामुळे ब्रह्मदेव मला भेट देणार नाही. तो माझ्या पित्याच्या पित्याचा पिता (इंद्रजित-रावण-पुलस्त्य-ब्रह्मदेव) विधाता मला भेटणार कसा?" इंद्रजित अशा चिंतेत पडला असताना अवचित ब्रह्मदेव तेथे आला.

इंद्रजित-ब्रह्मदेव यांचा संवाद

ब्रह्मदेवाचे अकस्मात आगमन झाले तेव्हा इंद्रजिताच्या चित्ताला हर्ष झाला. त्याने ब्रह्मदेवाचे चरणवंदन केले आणि त्याने उल्हासाने ब्रह्मदेवाला म्हटले, "स्वामी आपण असे म्हणाला होतात की मारुतीच्या गळ्याला बांधून मी लंकेमधे आणीन. मग माझा प्रतिवंध आणि नाश का झाला?" राक्षसपुत्राने ब्रह्मदेवाला पुढे विचारले, "हनुमंत कशाप्रकारे बंधनात सापडेल याविषयी निश्चयपूर्वक सांगा. हनुमान हा हरिहरांनाही अवध्य आहे. त्याला बंधनात घालणे मला शक्य नाही. तो वानर माझ्या क्रोधाला वळी पडत नाही. तसेच त्याला बंधनात आणणे अशक्य असल्याचे म्हटले जाते. तेव्हा माझ्या हातून बंधनात पडून, लंकेत आणला जाईल, हे आपले वचन आपण सत्य करा. ब्रह्मवचन असत्य न व्हावे आणि वानर ब्रह्मपाशाच्या बंधनात पडेल असे नारद म्हणाल्याचे आपण सांगितले होते त्याची मला आठवण झाली. स्वामींनी कृपा करून मला ब्रह्मपाशबंधन द्यावे म्हणजे त्याने मी हनुमंताला बंधनात आणून माझी कीर्ती वाढवीन." ब्रह्मदेवाने विचार केला, "याला जर ब्रह्मपाश दिला नाही तर ब्रह्मवाक्य मिथ्या मानले जाईल. दिले तरी मारुतीला बंधनात आणणे शक्य नाही. तेव्हा प्रत्यय म्हणून द्यावा." इंद्रजिताने ब्रह्मपाश घेऊन मारुतीवर लक्ष ठेवून तो सोडला. मारुती ब्रह्मपाशात न अडकणारा असल्याने पाशबंधनात अडकला नाही. इंद्र, यम, वरुण, वायू यांच्याप्रमाणेच चंद्र, सूर्य, अग्नी, शंकर यांचे हनुमंताला वरदान होते. हरिहरांचे, ब्रह्मदेवाचे हनुमंताला वरदान असल्याने तो ब्रह्मपाशाच्या बंधनात अडकला नाही. त्याला कर्मपाश, धर्मपाश, ब्रह्मपाश, जन्मपाश यांपैकी कोणताही पाश बांधू शकत नव्हता. तो नित्य निर्दोष होता. हनुमान अंतर्बाह्य आशारहित, निरपेक्ष असा हरिहरांचा दास असल्यामुळे त्याला पाश कसे बांधतील. मारुतीला पाश बांधत नाहीत याची इंद्रजिताला चिंता लागली. त्याचा ब्रह्मपाश वृथा ठरला होता.

इंद्रजिताने धाडलेला ब्रह्मपाश लागत नव्हता. तेव्हा इंद्रजित म्हणाला, "वानराने माझे महाकर्म व्यर्थ केले आणि मला कमीपणा आला. जिथे माझी मंत्रशक्ती, ब्रह्मपाश, ब्रह्मशक्ती या चालत नाहीत, तिथे राक्षसी मंत्रयुक्ती कशी पुरी पडेल? माझ्या सर्व शक्ती मारुतीने जर निष्प्रभ केल्या तर राक्षसयुक्ती मिथ्या होणारच. ज्याला ब्रह्मपाशाचे शस्त्र बांधू शकत नाही त्याच्यावर इतर कुठले अस्त्र चालणार आहे. तो वानर सर्वार्थी दुर्धर असल्याने अटोक्यात आणणे कठीणच. ब्रह्मयाने खोटी शक्ती दिली म्हणूनच मारुती बांधला गेला नाही." या कल्पनेने इंद्रजित ब्रह्मदेवावर संतापला. "ब्रह्मयाची दुष्टमती आमच्यावर उलटली. अरे, ब्रह्मदेवा, तू तर आमचा मूळपुरुष आणि तूच आमचा द्वेष करतोस. रणात राक्षस मारवतोस आणि वानराला उपदेश करतोस?" हे ऐकल्यावर

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

ब्रह्मदेव म्हणाला, "तू संशयाची मूर्ती आहेस, तुझ्या चित्तात ब्रह्मद्वेष आहे. तुला ब्रह्मशक्ती हाताळता येत नाही, मग रणात मारुती बंधनात कसा येणार? जो निष्कपट, निर्मळवृत्तीचा, शम, दम, नित्य शांत असा असेल त्याच्या हातून ब्रह्मशक्ती वापरल्याने स्वानंदाने विजय प्राप्त होतो. माझी शक्ती मला परत दे म्हणजे मी मारुतीला बांधीन. तुमच्या युक्ती इथे चालणार नाहीत आणि तुम्ही मारुतीला बांधू शकणार नाही. कणांच्या राशी या मापाड्याशिवाय इतरांना मोजता येणार नाहीत. राक्षसांनी भूतमात्रांना पीडा द्यावी, त्यांना हनुमंताला बंधन करता येणार नाही. डोळा सर्व रूपे पाहू शकतो, परंतु आपल्या स्वतःला पाहू शकत नाही. त्याप्रमाणे राक्षसांपाशी प्राणिमात्रांना पीडा देण्याची शक्ती असली तरी हनुमंताला ते बांधू शकणार नाहीत." नंतर पाशशक्ती हातात घेऊन ब्रह्मदेव हनुमंताच्या समोर जवळ आला.

ब्रह्मदेव मारुतीला बंधन मानायला सांगतो.

ब्रह्मदेव हनुमानाला म्हणाला, "तुला ब्रह्मपाशात बांधता येणार नाही हे माझे वचन सत्य करून, या पाशात तू बांधून घेण्याचे मान्य कर. माझ्या कपाळी असत्यवचनाचा दोष येऊ देऊ नकोस. ब्रह्मवाक्याचे बंधन म्हणून हे पाशबंधन मान्य कर. ब्राह्मणाचे ब्रह्मवचन तू अणुमात्र उल्लंघन करत नाहीस; तेव्हा माझे वचन पाळून, पाशबंधन मानावेस. ब्रह्मवचन साध्य होण्यासाठी हनुमंताने ब्रह्मदेवापुढे लोटांगण घातले आणि तो म्हणाला, "तुझ्या वचनासाठी मी देहत्यागही करीन, पाशबंधन ते किती." असे सांगून ब्रह्मापुढे मारुती मूर्च्छित पडला. तो जमिनीवर निश्चेष्ठ असा एखाद्या भ्याड व्यक्तीसारखा धपापत पडला. हनुमंत जरी ब्रह्मदेवापाशी निपचीत पडलेला दिसला तरी मूलतः तो बंधमोक्षाच्या पलीकडे होता. तो रामभक्त नित्य निर्मुक्त होता. ब्रह्मापाशी हनुमंत असल्याने तो निश्चित निर्मुक्त होता. केवळ ब्रह्माज्ञा दाखविण्यासाठी त्याने बंधन स्वीकारले होते. सामान्यजन मात्र त्याला बांधला असे समजत होते. ज्याप्रमाणे डबक्यात सूर्याचे बिंब पाहून सूर्य डबक्यात राहतो असे सामान्य लोक मानतात, त्याप्रमाणे ते मारुतीला ब्रह्मपाशात बांधला गेला असे मानत होते, वस्तुतः तो मुक्त होता. लंकेत घरोघर अशा गोष्टी चालल्या होत्या की इंद्रजित विजयी वीर असून त्याने हनुमंताला ब्रह्मपाशात बांधले आहे. ब्रह्मपाशाने बांधला गेला तरी हनुमंत ब्रह्मबंधापलीकडे आहे हे जाणून इंद्रजित आश्चर्य चकित झाला.

मारुतीची राक्षसांकडून चेष्टा-लंकेत आगमन

हनुमंत जमिनीवर निपचीत पडलेला पाहताच सर्व राक्षस धावत पुढे आले आणि त्यांनी हनुमंताला वेलीच्या दोराने बांधले. काही राक्षस गवताचे दोर विणत होते; कोणी वृक्षांच्या साली काढत होते; अन्य काही झाडांच्या चिरफळ्या काढत होते. हा सर्व खटाटोप रणात मारुतीला बांधण्यासाठी चालला होता. एकाने चऱ्हाट आणले, एक लांब धागे विणत होता. ही धडपड पाहून मारुती हसत होता आणि म्हणत होता, "ही खोटी बंधने मला नकोतच. राक्षस बापडे वेडे आहेत, म्हणूनच ही ओढाओढ करताहेत. आता मी लंकेच्या किल्ल्याच्या दरडी पाडून, एक एक उतरंड फोडून टाकीन. रावणाला दृष्टीने पाहीन, त्यावेळी यांचे घाव पाठीवर पडले तर ते सहन करीन. ते घाव गवतासाठी नेऊन लगेचच लंका जाळीन." असा मनात निश्चय करून, वृक्षवेलींचे बंधन कंठात असल्याचे मानून हनुमान रावणाच्या भेटीला लंकेत गेला. हनुमंताकडे जाताच ब्रह्मशक्ती भिऊन पळाली. ब्रह्मपाशातून मारुती मोकळा असलेला पाहून चिंतेने इंद्रजिताला ग्रासले. "जो ब्रह्मपाशात बांधला जात नाही, तो वेलींच्या पाशांनी कसा बांधला जाईल. हा बंधनाचे निमित्त करून रावणाला गांजण्यासाठी लंकेत जातो आहे. आम्हाला अशोकवनात त्याने गांजले, आता लंकाभुवनात रावणाला गांजेल." अशी इंद्रजिताला चिंता वाटली आणि त्याला

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sayma Foundation Trust and eGangotri

अपयश आल्याचे दुःख झाले. लोकात मात्र इंद्रजिताने मारुतीला बांधून आणले अशी वार्ता पसरली, हनुमंत काय अनर्थ करील हे त्यांना कळलेच नाही.

मारुती लंकेत येतो-राक्षसांची प्रतिक्रिया

ब्रह्मदेवाने कानात सांगितले होते, ते हनुमानाने मनात धरून, लंकेत प्रवेश केला. इकडे त्यामुळे इंद्रजिताचा थरकाप उडाला. इंद्रजित राक्षसांना म्हणाला, "अरे हनुमानाला ब्रह्मपाशात बांधा. जिथे ब्रह्मापाशात तो बांधला जात नाही तिथे तो तुम्हाला कसा धरता येईल?" त्यावर राक्षस म्हणाले, "हा वानर तो किती! आमच्या हाती तो सापडलाच आहे तर आम्ही त्याचा नाश करू, तू व्यर्थ चिंता का करतोस. तू भिऊ नकोस." जसा एखादा मदमस्त हत्ती उगीच कमळाच्या तंतूंनी बांधावा, त्याप्रमाणे राक्षसांनी महाबळी हनुमंताला वृक्षवेलींनी बांधला होता. कोणी दोरीने, कोणी वाख वळून, कोणी मुंज चिरफाळून त्याला बांधून आणला होता. काही पूर्वेला तर काही पश्चिमेला, कोणी दक्षिणेला तर कोणी उत्तरेला, मारुतीची ओढाताण करत होते. एक रागाने बुक्क्या मारत होता, पण तोच दुःखी होत होता; त्याची मनगटे मोडून, काळजीमुळे तो डाव्या हाताने शंख करी. एखाद्याने आकांताने मुसळ मारले, तर मुसळाचे पीठ होऊन मारणाराचाच हात उखडे आणि तो मूर्च्छा येऊन पडे. कोणी धावत येऊन टोला मारी तेव्हा त्या घावाने मारणाराचा हात रक्तबंबाळ होई. हनुमंत हे पाहून गदगदा हासत होता आणि म्हणे, "व्यर्थ या राक्षसांचा पुरुषार्थ!"

हनुमंताची ओढाओढी करून राक्षस कासावीस झाले होते. मारुती लौकिकापुरता कण्हत होता, पण मनातून उत्साहित झाला होता. "मला धरून यांनी रावणाकडे नेले तर रावणाला गांजीन." असा त्याचा विचार होता. राक्षस आपला घात करतील अशी शंकाही त्याच्या मनात नव्हती. राक्षस मोठी गर्जना करत होते की, "हा अखयाचा घात करणारा आता आमच्या हाती सापडलाच आहे तेव्हा याचा प्राण घेऊ." हनुमंताला राक्षस पुढे नेत होते आणि ब्रह्मदेव इंद्रजिताचा हात धरून त्यांच्या मागून जात होता. ब्रह्मदेव स्वानंदाने जप करत होता, "गृहा वै प्रतिष्ठासूक्त, हनुमान लंकेत प्रवेशला की लंकेत रामराज्य येईल." हनुमंताला त्वरेने रावणापाशी आणण्यात आले. रावणाला राग येऊन त्याने म्हटले, "राक्षसहो, तुम्ही याला खाऊन टाका." रावण करकरा दात खात म्हणाला, "माझ्या समोर धारदार शस्त्राने याचे तुकडे तुकडे करा." रावणाने असे सांगताच कोट्यवधी सेवक गदा आणि अन्य आयुधे घेऊन धावले. वानराचे तुकडे करण्यासाठी ते घाव घालू लागले. सणसण बाण सुटले, खणखणाट करत शस्त्रे चालवून दणादण घाव घालून मारुतीचा प्राण घेण्याचे प्रयत्न सुरू झाले. एकाने बळाने शूळ खोचला, एक जोराने मुसळ मारू लागला, एक धारदार त्रिशूळाने मारू लागला. कोणी गदा, कोणी मुद्गल हाणू लागला. आलगाईत, कोयतेवाले, अढाउ, चव्हाण, चेंडूचक्र, फरशी, पट्टीश, तोमर, जमदाडा अशांचा मारुतीवर मारा सुरू झाला. तसेच आवेशाने भाले मारणे, ओढाण खांडे, लहुडी, प्रचंड धोंडी यांचाही मारा झाला. मारुतीला जिवानिशी मारण्यासाठी राक्षसांनी निष्ठुरपणे शस्त्राचे संभार फेकले. हनुमान रामनाम सतत घेत, सावधचित्त असल्याने त्याच्यावर शस्त्रांचा घातक वर्षाव झाला तरी सर्व शस्त्रे तृणप्राय झाली. उलट त्याने पराक्रमी वीरांना मारले, शस्त्रांची मोडतोड केली, कोणाचे हात उखडले, यामुळे वीर दात विचकत पडले. घाव घालणारांची पोटे धापा टाकून फुगली आणि सरसकट रक्त ओकू लागून सर्वांचा हृदयस्फोट झाला. यावेळी एक एक करत सर्व वीर मूर्च्छित पडले; परंतु हनुमानाला घाव लागत नव्हते, त्यामुळे लंकाधीश संतापला. हनुमंताच्या अंतरात श्रीराम नांदत असल्याने त्याला शस्त्रे तिळभर रुपत

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

नव्हती. राक्षसवीरांना महामारी करताना मूर्च्छा आली.

मारुती आणि रावण यांचा प्रत्यक्ष संवाद

हनुमंताचा घात न होता, राक्षसवीर मूर्च्छित पडलेले पाहून रावणाला कृतान्तकोप आला. त्याने चंद्रसेन खड्ग हातात घेतले आणि रागने मारुतीवर मारले. यावर मारुती खदखदा हसला. रावणाने जो घाव घातला त्याने सर्व ब्रह्मांड दणाणले. रावणाचे बळ संपले, त्याने तोंड खाली केले. रावणाने मारुतीला प्रश्न केला की, "तू कोणत्या अर्थाने हसलास?" हनुमंताने प्रश्नाचे उत्तर दिले, "राक्षसराज लंकानाथा, तुझ्या बळाविषयी माझा आजवर भ्रम होता. तू आताच घाव घालून तुझा पुरुषार्थ व्यर्थ आणि खोटा ठरवलास. तुझ्या घावाचा परिणाम म्हणजे पिसाची बुळबुळ होती. तुझा घाव अत्यंत निर्बळ, जसा कापसाची वात होता. रावणा तू हीन, दीन आणि दुर्बळ आहेस, तर रामाशी युद्ध कसे करणार? जगातली तू एक निर्लज्ज व्यक्ती आहेस, त्यामुळेच मी तुला हसलो. सीतेच्या स्वयंवराच्या प्रसंगी शिवधनुष्य पाहताच तुझे तोंड काळे झाले. श्रीरामाने ते दुभंग केले. आता त्याच्याशी तुझे मोठे युद्ध कसे होणार? श्रीरघुनाथाच्या समोर येणे तुला शक्य नाही. त्यामुळे सीतेला घेऊन चोरून पळालास. त्या श्रीरामाशी युद्ध करतो म्हणणे हा तुझा निर्लज्जपणा आहे रावणा. तुझे शुभचिन्ह समजले आता; सीता चोरलीस तेव्हा तुला भीक लागली होती. तुझी राज्यसत्ता यापुढे निश्चित राहात नाही. तुझा हात हलका असल्याने तुझा घाव अत्यंत पोचट होता. त्या घावाने माझी लव तुटली नाही."

रावणासमोर बसून हनुमान निःशंकपणे बोलत होता. रावणाला मात्र काळजी लागली होती कारण हनुमान अवध्य होता. तेव्हा रावणाने प्रहस्ताकडून मारुतीला प्रश्न केला, "तू कोण कोणाचा, इथे कसा आलास आणि वनाचा विध्वंस का केलास?" मारुती म्हणाला, "रावणराजा प्रतापशाली असून त्याच्याशी माझी-एका वानराची भेट होणार नाही यासाठी वनाचा विध्वंस केला. राक्षस मला मारायला आले म्हणून स्वतःला वाचविण्यासाठी त्यांच्याशी युद्ध करून राक्षसांना मारले." असे प्रहस्ताला सांगून मारुतीने आपला वृत्तान्त ऐकवला. प्रहस्ताकडे दृष्टी न वळवता, राक्षसांना न जुमानता, मारुती रावणाच्या समोर शेपटीच्या आसनावर बसला होता. रावणाविषयी सुद्धा साशंक नव्हता असा तो तेथे निःशंकपणे बसला होता. रावणासमोर बसून मारुती वेडावत होता, डोळे मिचकावत होता, धिक्कार करण्यासाठी अंगठा दाखवत होता. हनुमान राक्षसांना भीत नाही, प्रहस्तप्रधानाकडे पाहात नाही हे रावणाने मनोमन जाणले आणि मग त्याने स्वतःच मारुतीला विचारले, "अरे, तू कोणाचा वानर आहेस?"

हनुमंत म्हणाला, "रावणा, सर्व सत्य तुला सांगतो, ऐक. वनरक्षक, किंकर, राक्षस जंबुमाळी, प्रधानकुमार यांना ज्याने रणात मारले तोच मी महावीर वानर आहे. तुझे पाच शूर सेनानी, राक्षससैन्य, यांच्यासारखाच अखयाकुमारही रणात मारला तो मीच महावीर वानर आहे. अखयापुत्र मारला, ज्येष्ठपुत्र इंद्रजिताला गांजले, त्याच्या सैन्याचा निःपात केला तो मीच हनुमंत महावीर आहे. वनाचा विध्वंस करण्याच्या इच्छेने जशी मी झाडे उपटली तसे राक्षसकुळ संपूर्ण उपडावे म्हणून स्पष्टपणे मी आलो आहे. आता तू मला प्रश्न विचारलास की, "तू कोणाचा कोण? इथे यायचे काय कारण?" त्याचे मी उत्तर देतो आहे, ऐक. सुबाहू आणि ताटका यांना ज्याने निर्दाळले; त्रिशिरा, खर, दूषण यांना ज्याने मारले त्या श्रीरामाचा मी दूत असून तुझा प्राण घेण्यासाठी आलो आहे. चवदा सहस्र राक्षससमूहाचा नाश करून, ज्याने जनस्थान जिंकून घेतले त्या श्रीरामाचा मी दूत आहे आणि तुझा प्राण घ्यायला आलो आहे. बाणाने वेधून विराध मारला, कपटी

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

मारीचाचा वध केला त्या श्रीरामाचा मी भक्त असून तुझा जीव घेण्यासाठी आलो आहे. श्रीराम या धनुर्धराला मी माझा दीक्षागुरू मानतो; सूर्यवंशी श्रीरामचंद्राचा मी वानर दूत बनून तुझा संहार करण्यासाठी आलो आहे. तो कोदंडधारी माझा परम गुरू रघुवीर काम, क्रोध यांचा नाश करतो. मी त्याचा दूत असलेला वानर तुझा संहार करायला आलो आहे. तुला वाटेल आणि म्हणशील की रावणाचा वध करण्याएवढा मी समर्थ आहे का? तर ऐक, माझे बळ असाधारण आहे आणि मी रणात असा मार देतो की त्याला प्रमाण नाही. माझ्या हाताचा सपाटा लागला तर मेरू-मंदार या पर्वतांचे पीठ होते. दहातोंडाचा रावण किडा आणि लंका-त्रिकूट ते माझ्यापुढे काय आहेत. दशमुखांच्या ओळीच्या ओळी नखांनीच छेदीन. जशी अग्नीवर झडपणाऱ्या पतंगाची अवस्था होते, तशी राक्षसांची स्थिती होईल. तुझ्यासारखे कोट्यवधी दशकंठी आले तरी त्यांना लंका-त्रिकूटासह केवळ डाव्या अंगठ्याने निर्दाळीन."

हनुमंत पुढे म्हणाला, "जळो तुझी पुरुषार्थाची थोरवी, जो राजा भिकारी होतो, चोरीसारखे कर्म करतो, पतिव्रता परनारी पळवितो, त्याचे जिणे जळो. रावणा जळो तुझे कुळ, शील, बळ; तू केवळ परस्त्रीच्या इच्छेचा धनी आहेस. रावणा, तुझ्या राक्षसजातीचा, कीर्तीचा, धिक्कार असून तिन्ही लोकात तुझी अपकीर्तीच झाली आहे. तुझी श्रीमंती, शक्ती यांचा धिक्कार असो. तुझ्या हातातल्या खड्गाचा धिक्कार असो, कारण त्याने मारुतीची लवही तुटली नाही. रावणा तुझा जन्म, धर्म, कर्म हे सारे त्रिलोकी परम निंद्य ठरणार आणि तुझा धिक्कार होणार. रावणा तुझ्या शौर्याचा आणि वृत्तीचाही धिक्कार असो. अरे, श्रीरामाच्या बाणाच्या भयाने त्याच्या न कळत तू सीतेचे हरण केलेस. तू माझ्या स्वामींची पत्नी चोरलीस, त्यामुळे तू माझा प्रत्यक्ष वैरी झाला आहेस. मी सीतेचा साहाय्यकर्ता म्हणून तुझा वध करीन. तुझी प्रत्यक्ष भेट व्हावी म्हणून मी वनाची नासाडी केली आणि कोट्यवधी राक्षसांना मारले. तू दृष्टीला पडावास म्हणून गळ्याला बंधन घालू दिले, लाथा बुक्क्यांचा मार सहन केला. अखेर तुझ्या भेटीला आलो. या भेटीचे फळ हेच की मी तुला तत्काळ मारावे. त्यामुळे श्रीरामाचे शल्य सिद्धीला नेता येईल आणि जानकीची मुक्तता करता येईल. तुझी आणि माझी भेट झाली; तू मला माझ्याविषयीची गुह्यगोष्ट विचारलीस; मी ती क्रमाने सांगितली; आता केवळ तुला मरण देणे उरले आहे."

हनुमंत नंतर आवेशाने म्हणाला, "रावणा, तुझ्या अंगी प्रचंड सामर्थ्य आहे; तुझे प्रधान, सेनानी आणि सैन्य प्रबळ आहे; तेव्हा मला तत्काळ मारून जनककन्या भोगावीस. अरे, रावणा राक्षसांच्या देखत मी तुझे ओठ तोडीन तुझे दहा कंठ छेदायलाच मी रामाऐवजी आलो आहे." मारुती एवढा बोलला आणि त्याचे केस फिस्कारले, शेपूट जमिनीवर आदळले; शेपूट स्वतंत्रपणे वाढत गेले; डोक्यावरचे केस थरथरले, डोळे विस्फारले गेले. मारुतीची ही अवस्था पाहून रावण कापू लागला. तीच राक्षसांची अवस्था झाली. सर्वांचा संहार करण्यासाठी जसा प्रलयरुद्र वाढतो, तसा मारुती वाढू लागला. ते पाहून राक्षस कापू लागले. मारुती म्हणाला, "मी तर एकटा एक श्रीरामाचा दास वानर आहे. तुझे कोट्यवधी झुंजार वीर माझ्या समोर उभे कर. ती कोटी झुंजार चिलटे आहेत. माझ्याकडून रावणाचा घात केला जात असताना, कुठला राक्षस त्याचे रक्षण करील. सुरासुरांनो पाहा. हनुमंताचा क्षोभ पाहून इंद्रजिताला चिंतेने कापरे भरले. हा वानर आता रावणाचा निश्चित घात करणार असे त्याला वाटले." इंद्रजित चिंताग्रस्त झाला.

हनुमंत पुन्हा पुढे बोलू लागला. तो म्हणाला, "युद्धात रावणाला मारून, सीतेची सुटका करून, तिला श्रीरामाकडे नेताना मला कोण अडवणार आहे? एक क्षणात मी हे सर्व करीन; पण श्रीरामाने शपथ घेतली आहे की, 'उजव्या हाताने

https://archive.org/details/@lakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

बाण सोडून रावणाला रणात मारीन. दशमुखाला मारून, पृथ्वी निर्वेध करीन, चराचर सुखी करीन. हाच श्रीरामचंद्राचा स्वतःचा निश्चय आहे. देवांचे बंधन सोडवावे, नवग्रहांची बेडी तोडावी, रामराज्याची ध्वजा उभारावी असे त्याने ठरविले आहे. खरोखर श्रीरामाची मर्यादा गहन आहे. तो बलवंतांचे बल आहे, त्याचे शील पवित्र आहे आणि त्याची प्रतिज्ञा अढळ आहे. त्यामुळे श्रीरामाने केलेली प्रतिज्ञा खरी ठरली पाहिजे, ती माझ्याने अन्यथा करवणार नाही. तेव्हा आता मी तुला कसा मारणार! रावणाला समोर पाहताच वानराने उडी घेऊन त्याचा वध करावा, पण श्रीरामाने रावणाला वाचवले आहे, त्यामुळेच मी स्वतःच्या हाताने त्याला मारणार नाही.'' हनुमंताकडून रावण मारला जाणार नाही कारण श्रीरामाच्या प्रतिज्ञेने रावणाला वाचवले; परंतु इंद्रजिताने पूर्वी हनुमंताने 'रावणा, मी तुला आता मारीन'' हे शब्द उच्चारलेले ऐकल्यापासून त्याला चिंता लागली होती. त्याने बिभीषणाला सांगितले की; ''हनुमंत रागाने खवळला असून, रावण आज मारला जाणार. यावर कोणताच उपाय चालणार नाही. मारुतीवर शस्त्र, अस्त्र चालत नाही. त्याच्याविरुद्ध बळाचा, कपटविद्येचा उपयोग होत नाही. तो वानर सामर्थ्यात प्रबळ आहे. मंत्रशक्ती, तंत्रशक्ती, आक्रमविद्याशक्ती यामध्ये तो सापडत नाही. त्याच्यावर मायामोहनशक्ती परिणाम करत नाही. तो युद्धात आटोपत नाही. हा वानर सैन्याला, ब्रह्मपाशाला आवरता आला नाही तो रावणाकडून कसा आवरला जाणार? त्याला जे जे बंधन बांधावे त्याला तो तृणप्रमाण मानतो. त्याला पाशामधे बांधणे शक्य नाही मग त्याला मारणार कसे?''

विभीषणाने इंद्रजिताचे बोलणे ऐकल्यावर रावणाला सांगितले की, ''लंकानाथा, हा वानर तत्त्वतः अवध्य आहे, तू त्याला मारू शकणार नाहीस. तेव्हा हे समजून तू सीता श्रीरामाला अर्पण करून, त्याला शरण जा. श्रीरामाला शरण गेल्यावर आपल्याला जन्ममरण नाही हे त्रिवार सत्य आहे. तेव्हा हे जाणून तू दुसरा कोणता विचार करू नकोस. दुसरा विचार केला असता, हनुमंत स्पष्टच घात करील. कोणताही उपाय चालणार नाही. लंकानाथा तू भ्रमात राहू नको श्रीरामाचा एक वानर आम्हाला आटोपत नाही; मग श्रीरामच रागाने आल्यावर केवढे दुर्धर रण होईल ते कोण सहन करील. त्यापेक्षा जर जानकीला काया, वाचा, मनाने, वित्तासह अर्पून, रघूत्तम रामाला शरण गेल्यास कल्याण होईल.'' सत्त्वशील बुद्धीच्या बिभीषणाचे बोलणे न मानता रावण गर्वाभिमानाने म्हणाला, ''एका वनचर वानराच्या भीतीने जर मी रामाला शरण गेलो तर मला आणि माझ्या पराक्रमाला केवढी हेटाळणी सहन करावी लागेल. हनुमंताला मरण हवे काय असा प्रश्न विचारून मी त्याच्याच शब्दात त्याचा घात करीन. पूर्वी जटायूला फसवून त्याचे पंख तोडून मारले, तसेच या हनुमंताला मारीन.'' रावणाला अशी कुबुद्धी सुचली.

अध्याय अठरावा

रावणाचा ज्येष्ठ पुत्र इंद्रजिताने परोपरीने रावणाला सांगितले की, ''त्या हनुमंताला शस्त्रास्त्रात, ब्रह्मपाशात बांधता येत नाही. त्याच्यावर शस्त्रशक्ती, मंत्रशक्ती, तंत्रशक्ती, कपट किंवा मायामोहनशक्ती यांचा परिणाम होत नाही. युद्धात त्याला धरणे अशक्य आहे. कर्म, धर्म, यांचे पाश, ब्रह्मयाचा ब्रह्मपाश, त्या वानरवीराला बांधू शकत नाहीत. तसेच जन्मपाशाचे आहे. आपला प्रिय बंधू बिभीषण आपल्या परम हिताचेच सांगतो आहे. आपण श्रीरघुनाथाला शरण जावे.'' हे ऐकून रावणाला काय करावे हे समजेना. मारुती सर्वथा अवध्य आहे हाच इंद्रजिताच्या बोलण्याचा मुख्यार्थ होता. बिभीषणाने निराळी युक्ती संगितली. रावणाला काळजी वाटली, तसाच रागही आला तरी त्याच्याने हनुमंताला मारवेना. तो अवध्य असल्याचे पाहून रावणाला चिंता वाटली. हनुमंताचा वध न

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

केला तर तो संपूर्ण कुळाचा घात करील. हनुमंताला मारू म्हटले तरी तो मरत नाही यामुळे रावणाला परम चिंता वाटली.

रावणाचा प्रश्न-मारुतीचे उत्तर

रावणाने मारुतीला श्रीरामाची शपथ घालून त्याचे मरण कशात ते विचारले. मरणाचा क्रम एकदा हातात आला की नंतर हनुमंताला मारावे असा रावणाने मनात विचार केला. त्याने लगेच मारुतीच्या मरण्याची युक्ती विचारण्यापूर्वी मारुतीची स्वतःच्या तोंडाने स्तुती करायला आरंभ केला. "वीरा हनुमंता, श्रीरामाच्या परम भक्ता, मी तुला आता जे विचारतो आहे त्याचे तत्त्वतः सत्य उत्तर दे. हरिभक्तांनी असत्य बोलू नये. तुला श्रीरामाची शपथ घालतो आणि विचारतो की तुला कशाने मरण येईल ते यथार्थ सांग." श्रीरामाची शपथ घातल्याचे ऐकून हनुमंताने लोटांगण घातले आणि म्हणाला, "मला सर्वथा मरण नाहीच हेच सत्य आहे रावणा." हे हनुमंताचे उत्तर ऐकून रावण खदखदा हसला आणि म्हणाला, "जन्मामागून नित्य मरण येतेच. हनुमंता अमरत्व हे खोटे बोलणे आहे. अरे देवांना म्हातारपणरहित अमर म्हणतात. त्यांनाही मरण असते तिथे तुझी काय योग्यता. अमरत्वाची तुझी भाषा खोटी आहे. त्या मार्कंडेयाला चवदा कल्प आयुष्य असल्याचा मोठेपणा सांगून त्याचा महिमा सांगतात. तो सुद्धा जिथे मरणाच्या गावाला जातो. तशीच रोमा रोमहर्षणासह झडते. युगानयुग ज्याला लोम झडतो, त्या लोमहर्षण ऋषीला वकदाल्भ्याच्या श्वासाने मरण येते. बकदाल्भ्याला हंस पक्ष्याकडून मरण येते. हंसाचे पंख जेव्हा झडतात तेव्हा वकदाल्भ्याचे आयुष्य संपते. त्या हंसाला भृशुंडीचे नख खंडून पडते तेव्हा हंस मरतो, हे निश्चित आहे. सर्वांना मरण हे आहेच." नंतर रावण पुढे म्हणाला, "अरे, कूर्म जेव्हा निमख हालवितो तेव्हा भृशुंडी (या नावाचा कावळा) हा मरतो. अशी ही मरणपरंपरा आहे. थोरामोठ्यांनाही ते चुकत नाही. तू तर पाला खाणारा एक सामान्य वानर आहेस. तुला कुठले अमरत्व?"

"महाऋषी तपाच्या तेजाने पूर्ण असून, काळाने त्यांचे दासीपण घेतलेले असते. ज्याला श्रीरामाच्या नामामधे प्रेम असते, त्याचा काळ दास होतो. जागृतीत, सुषुप्तीत, स्वप्नातही जे अखंडपणे नामस्मरण करतात, त्यांच्या चरणांना काळ वंदन करतो. त्याचा असा महिमा आहे रावणा. भक्तिभावाने भजन केले हे स्वतः भगवान जाणतात; रावण विषयासक्तीने अत्यंत दीनवाणा असल्याने, त्याला हे ज्ञान कसे लाभणार? असो ही रावणाची स्थिती; मला श्रीरामाची भक्ती आहे. माझ्या अमरत्वाची काय कीर्ती आहे त्याची रावणाला प्रचीती दाखवावी. हनुमंताची श्रीरामाविषयीची भक्ती थोर होती, तेव्हा तो खोटे कशाला बोलेल. पण मी खोटे बोललो असे तो रावण चावटपणे मला का म्हणाला?" असे रावणाला आदराने विचारतानाच मारुतीला बुद्धीचे स्फुरण झाले. त्याने रावणाचा अपमान करण्यासाठी त्याला आपले गुपित सांगायला आरंभ केला. रावण अतिशय कपटी आहे. त्याला आपण सत्यच सांगितले तरी ते सत्य न मानता त्याने संशय व्यक्त केला. जो अंतरबाह्य नित्य असत्य वागतो, तो सत्य मानत नाही. सत्याला भावार्थ सत्याचाच असतो, रावणात तो भाव नाही. रावणाचा संशय फिटला तरच त्याला माझे स्पष्ट आणि सत्य भाषण पटेल." असा विचार करून मारुती रावणाला म्हणाला, "मला विश्वासाने माझे मरण विचारतो आहेस पण त्याच विश्वासाने जटायूला तू मारलेस. मलाही तसेच करशील या भीतीने मी खोटे बोललो." त्यावर रावणाने हनुमंताला म्हटले, "मरणाला जो भितो त्याला श्रीरामाची भक्ती कशी असणार? देहलोभ ठेवणाराला श्रीराम कसा पावेल?" हनुमंताने नंतर रावणाला म्हटले, "लंकाधीशा, दुसऱ्याला उपदेश करण्यातली तुझी योग्यता मी तत्त्वतः पाहिली; परंतु शेवटी तुझा

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

कपटीपणा आहेच. तू कपटाने संन्यासी होऊन सीतेला चोरून आणलेस, सदाशिवाने तुला सोडविले पण कपट करण्याने तुझा कुलक्षय होईल.'' हे मारुतीचे बोलणे ऐकून त्यातले वर्म रावणाला बोचले. नंतर मारुती म्हणाला, ''आता मी माझी मरणावस्था तत्त्वतः सांगतो ती ऐक.'' यावेळी रावण मारुतीचे पुढचे भाषण ऐकायला उत्सुक झाला. मारुतीने मग युक्तीने जे सांगितले ते रावणाने सावधपणे ऐकले. ''मी असत्य तुला सांगितले नाही. माझ्या देहाला खरोखरीच मरण नाही. माझ्या शेपटीला मरण आहे. ते शेपूट मारलेस तर मी मरेन.''

मारुतीच्या शेपटीला वस्त्रे गुंडाळण्याचा प्रयत्न

रावणाचा जेष्ठ पुत्र इंद्रजित, श्रेष्ठ प्रधान, सेनापती, सैनिक या सर्वांनी 'शेपटीत मरण आहे' हे मारुतीचे सांगणे सत्य असल्याचे सांगून म्हटले, ''या वानराचे शेपूट वाऱ्यापेक्षा चपळ असून त्यात प्रबळ सामर्थ्य आहे. या शेपटीनेच सर्वांचे निर्दाळण केले. शक्तीने वानराला मारणे शक्य नाही. या शेपटीने रथाचा सारथी मारला; इंद्रजिताची वाताहत केली, रणात कीर्ती करून, वीरांचा नाश केला. इंद्रजिताने युद्धातला अनुभव सांगितला की, ''युद्धात हे शेपूट अत्यंत दारुण आहे. शेपटीला मारू गेल्यास ते रणकंदन करील. ते खवळले तर सर्व वीरांना मारील, लंकेची वाताहत करील, मग लंकानाथ कसा वाचेल?'' इंद्रजित, सेनापती, प्रधान शेपटीच्या भीतीने कापत असल्याचे पाहून रावणाने स्वतःशीच विचार केला आणि नंतर हनुमंताला विचारले, ''शेपूट अत्यंत दारुण आहे. ते कसे मरेल याविषयीचे संपूर्ण सत्य सांग.'' हनुमंत म्हणाला, ''दशानना, शेपटीचे मरण अतिशय दुस्तर आहे. कापड तेला-तुपात भिजवून संपूर्ण शेपटी त्यात गुंडाळावी. हनुमानाला निश्चित मारण्यासाठी नंतर शेपटीच्या टोकाला अग्नी लावावा. मग ज्वाला आकाशात धडाडत गेल्या की मी तत्काळ मरेन. परंतु शेपूट तिळभर जरी उघडे राहिले तरी शेपटीला मरण येणार नाही. उलट राक्षसांना महामारीची पीडा होईल आणि ते शेपूट संपूर्ण लंकेचा नाश करील. हनुमान कपटी आहे असे म्हणू नको. मी सत्य तेच सांगतो आहे. तुला अशी शक्ती असेल तर तू माझ्या शेपटीला वेढून टाक. हे घे शेपूट तुझ्या हाती देतो. आता त्वरित तेलात भिजलेली कापडे आणून अत्यंत काळजीपूर्वक गुंडाळ.'' नंतर मारुतीचे शेपूट वेढण्यासाठी ओढाओढी सुरू झाली; स्त्री-पुरुष नागडे-उघडे झाले. या रीतीने लंका कडोविकड असे शेपूट गुंडाळण्यापायी लुबाडली गेली. मारुती म्हणत होता, ''मी रात्री सभा तर दिवसा लंका यांना शेपटाने कासावीस करून आणि राक्षसांचा नाश करून लुबाडीन. शेपूट गुंडाळण्याच्या निमित्ताने राजद्वारापाशी चौकात लंकेचे वस्त्रहरण करीन आणि राक्षसांवर ओरडीन. शेपूट गुंडाळण्यासाठी सांठवणीतले कापड तटतटा फाडून, तेलासाठी त्यांच्यात भांडण करवून, तेल्याला राजाकडून दंड करवीन.'' अशा रीतीने हनुमंताचा विचार चालला होता. त्याच्या मनात होते की शेपटीच्या निमित्ताने संपूर्ण नगर लुबाडून, लंकेत आणि त्रिकुटावर आग लावावी आणि त्यात राक्षस भाजू. असा विचार करून मारुतीने शेपूट रावणाच्या हातात देऊन, मोठाच पराक्रम केला. रावणाने आपल्या सेवकांना सांगितले की, मारुतीच्या शेपटीला आग लावा. त्यासाठी तेला-तुपात भिजवून जुनी कापडे शेपटीला गुंडाळा.'' ही रावणाची आज्ञा ऐकून शूर, वीर, रागीट, क्रूर आणि अत्यंत दारुण, अशा जाणिवेचे सर्व राक्षस शेपूट वेढण्यासाठी सरसावले. जेव्हा जुनी कापडे संपली तेव्हा रावणाने नवीन वस्त्रे गुंडाळायला सांगितले. ती नवी वस्त्रेही संपली तरी संपूर्ण शेपूट गुंडाळले गेले नाही. घोंगड्या, बारके फाळके, तेलात बुडविलेली धूतवस्त्रे, काळजीपूर्वक गुंडाळली तरी मारुतीचे शेपूट वेढले जाईना. पांगडी, गुंडगी, तुटकी वस्त्रे सरवरे, निरवरे अशी पुष्कळ वस्त्रे गुंडाळून शिवाय मोठमोठी

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

कापडाची ओझी आणली. तरीही शेपूट वेढले गेले नाही. कापडबाजार ओस पडला. राजवाड्यातील अमाप वस्त्रे यांचा उपयोग करूनही शेपूट वेढणे शक्य होईना. या सर्वांच्या वापराने शेपटीचा चवथा हिस्सा देखील झाकला गेला नाही इतके ते शेपूट वाढले होते.

मारुतीचे शेपूट वाढलेले पाहून रावण, इंद्रजित, राक्षसश्रेष्ठ सहपरिवार मनातून फार धास्तावले. मारुतीचे मरण शेपटीत आहे निश्चित असे ते एकमेकांना सांगू लागले. नंतर पडदे फाडून, बैठका उस्कटून, छताची कापडे सोडून ती गुंडाळली तरी शेपूट आवरेना. अखेर शेपटीचा बराच भाग गुंडाळून एक भाग उरला तेव्हा आता तेवढा अवश्य गुंडाळावा असे सर्व लोक म्हणू लागले. नंतर शेपूट गुंडाळण्यासाठी नातर्डाने सभेची वस्त्रे घेतली गेली. त्यामुळे सभा उघडी झाली. कटाक्षाने सभा नागवली गेली. सभेची अवस्था पाहून वीरांनी रावणाची वस्त्रे आणली; तरी ती पुरी पडली नाहीत; मारुतीने सर्वांना ओढ लावली. तेव्हा रावणाने सेवकांना आज्ञा केली की, "नगरामध्ये राहिली असतील ती हिरावून आणा आणि नातर्डाने वानराचे शेपूट वेढून टाका." नगरात कोणी जावई दिवाळसणाला आणला होता; कोणाचा पाहुणा, कुणाचा मेव्हणा आला होता. त्या सर्वांची वस्त्रे दूतांनी हिरावून नेली. तेव्हा सर्वजण शंखध्वनी करू लागले. नगरात नरनारी वावरत होते, त्यांची वस्त्रे दूतांनी नेल्यामुळे ते सर्व हळहळत नागवेच पळू लागले. त्या सर्वांनी शंख करीत चहू दिशांना धूम ठोकली. नवरी, कुमारी, गर्भवती या साऱ्याजणी अलंकार घालून आपल्या सौभाग्यासाठी घरोघरी वाणं वाटत होत्या. मारुतीचे शेपूट वेढण्यासाठी राजदूतांनी त्यांचीही वस्त्रे नेल्याने त्या उघड्या पडून लज्जित झाल्या. लंकेत एकच आकांत निर्माण झाला.

राजवाड्यात ज्यांची वहिवाट होती ते ओली धोतरं नेसून जाणारे भट, मारमारून त्यांची वस्त्रे हिरावून नेली गेली. त्यावेळी वस्त्रे न देण्याच्या प्रयत्नाला भटांशी झोंबून राजदूतांनी वस्त्रे नेऊन भटांचे प्रयत्न असफल केले. मग ते व्युत्पन्न भट नाना प्रकारे शंख करू लागले. ओठावर मनगट आणून जिभेसह निरनिराळे स्वर, वर्ण, अक्षरे यांचा उपयोग करून ते शंख करत होते. या शंख करणाऱ्या, वेद म्हणणाऱ्या, भटांनी रावण जिवंत की मेला असे म्हणण्यापर्यंत आपला शंखध्वनी चालूच ठेवला. अनुनासिक, सानुनासिक, स्वरमेळात वेदपाठक वेदाचा निर्वाळा देऊन शंख करत सांगू लागले की रावण वारला. दिवसा ढवळ्या नगरात, राजद्वारातून वाट काढत ते म्हणत की, "राजा, जर जिवाने जिवंत असेल तर तो पारिपत्य करत का नाही? आमची पोटे शंख करून फुगली; ओरडून घसे सुकले, निश्चित राजा मेला असणार" अशी ब्राह्मणांची कटकट सुरू झाली. हनुमान वीर गरजेठी. त्याने शेपटासाठी लंका नागवली. कोट्यवधी राक्षस थकले तरी शेपूट शेवटापर्यंत वेढता आले नाही. अजून शेपटाचे टोक वुजलेले दिसेना. शेपूट वेढण्यासाठी एवढे प्रयत्न करूनही यश आले नाही त्यामुळे रावण दीनवाणा झाला. जसजसे शेपूट वेढावे तसतसे ते वाढत होते. त्यामुळे अनेक राक्षसांनी वेढले तरी त्याचे टोक उघडेच राही. मारुतीने राक्षसांना वेडे केले. मरणप्राय श्रम तेवढे राक्षसांना झाले. कापडाचे व्यापारी राजद्वारात येऊन आक्रंदू लागले. लंकेतील नरनारी कळवळल्या, घरोघरी बोंब उठली आणि लंकेत एकच आकांत झाला. पुष्कळ किल्ल्यांच्या संग्रहातल्या तेल-तुपाच्या टाक्या कोरड्या पडल्या. शेपटासाठी तुपात वस्त्रे भिजवण्यामुळे हे घडले. तेलतुपाचा नाश होऊन नगरातले साठे संपले. हा शेपूट गुंडाळण्यात झालेला प्रकार पाहून रावण वेडा झाला. खाण्यापुरतेही तूप न मिळाल्याने रावण कोरडा भात खाऊ लागला, लेकरांच्या तोंडाला माखायला तूप कुठे मिळेना. सर्व तेल-तूप हातोहात संपल्याने घरोघरच्या वाती मालवल्या. सर्वत्र अंधार झाला. शेपटाने अशी कीर्ती केली.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust, Lucknow

हनुमंताच्या युक्तीने संपूर्ण लंकेला लुबाडले. हे करताना लंका ज्यांची त्यांच्या हाती राहिली. झगडा नाही, भांडण नाही, पण मारुतीचे शेपूट वेढताना रावणाची अवस्था केविलवाणी झाली, असा हनुमंताचा पराक्रम होता.

मारुतीचे शेपूट पेटविण्याचा प्रयत्न

रावणाने सांगितले, "आता थोडे टोकच राहिले आहे. तेव्हा शेपूट पीतांबराने वेढून त्याला पेटवून हा वानर मारून टाकू." मग पीतांबर, श्वेतांबर, देखणी वस्त्रे, रेशमी वस्त्रे गुंडाळली तरी मारुतीचे शेपूट वेढले जाईना. हे पाहून इंद्रजित मनातून घावरला. "हनुमंताची शेपूट सुद्धा आवरता येत नाही. मग त्या ठिकाणी आग लावली तर तो लंकेत अनर्थच करील." असे इंद्रजित म्हणाला. त्यावर विद्युन्माळी म्हणाला, "या वानराला आकळायला फार वळ लागेल. तेव्हा जानकीला मुक्त करा म्हणजे तत्काळ शेपूट आकळेल." रावणही मनातून धास्तावला होताच. "आम्हाला ज्याचे शेपूटही गुंडाळता येत नाही त्या वानराला कसे मारायचे; यावर काही उपाय दिसत नाही." रावणाचे मनोगत ऐकताच हनुमंताने आपले शेपूट आक्रसून घेतले. त्यावरोबर सेवकांनी. रावणाला सांगितले की "आम्ही शेपूट गुंडाळले. आम्ही मोठे बलवान आहोत. संपूर्ण शेपूट आम्ही वेढले आहे." सर्वजण मग गर्जना करत टाळ्या वाजवू लागले. रावणाने लगेच "शेपटीला अग्नी लावा" अशी आज्ञा केली. मग लोहारांना बोलावून त्यांच्या भात्यांनी अग्नी पेटवण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्यावेळी हनुमंताने आपल्या पित्याला-वायूला-विनवून म्हटले, "वायू हा अग्नीचा खरा मित्र, तेव्हा तू इथे जाळ होऊ देऊ नकोस." वायूला नमन करून मारुती राक्षसांना छळण्यासाठी शेपटाच्या निमित्ताने असा खवळला. लोहारांनी चौफेर भाते फुंकले तरी अग्नी शेपटीला लागेना. राक्षस अत्यंत कासावीस झाले तरी अग्नी शेपटीला स्पर्श करेना.

नंतर हनुमंत रावणाला म्हणाला, "रावणा, तू महामूर्ख आहेस. वेदाचे विभागशः विवरण केले तरी व्यासांच्या वेदविवरणाने ते संपत नाही. संत-असंत यांनाही स्थिती कळत नाही. तू गर्वाची मूर्ती आहेस. अरे, संत-असंत याचा तिळमात्र विवेक मूलतः ज्याच्या ठिकाणी नाही. त्याला ही राजपदवी शोभत नाही. तू वृथा गर्व करतोस. अचेतन भाते फुंकून सचेतन कसे जाळता येईल? एवढे विवेकज्ञान तुला नाही. रावणा तू अज्ञानी आहेस." हे मारुतीचे सांगणे रावणाला पटले. त्याने आपल्या विश्वासातले सेवक बोलावून त्यांना "फुंकून अग्नी चेतवा" अशी राक्षसांना आज्ञा केली. राक्षसांनी चारी बाजूंनी फुंकायला आरंभ करताच मारुतीने अग्नी शेपटीने दडपला, त्यामुळे खवट घाण वास नाकात जाऊन राक्षस कासावीस झाले. तो खवट घाण वास इतका तीव्र होता की राक्षसांच्या डोळ्यातून अश्रू, मुखातून लाळ गळायला सुरवात झाली. कोणी श्वास अडण्याने, कोणी खोकण्याने घावरे झाले. एकच हलकल्लोळ निर्माण झाला. तेव्हा रावण हनुमंताला म्हणाला, "आता फुंकूनही शेपूट का जळत नाही?" हनुमंताने त्यावर म्हटले, "लंकानाथा, तत्त्वतः सांगतो ते ऐक. गृहस्थाने आमंत्रण दिले नाही तर अतिथीला भोजनाला येववत नाही. त्याप्रमाणे तू स्वतः फुंकले नाहीस तर अग्नी सर्वथा प्रज्वलित होणार नाही. गृहस्थाने ब्रह्मार्पण म्हटले नाही तर ब्राह्मण भोजनापूर्वीचे आचमन घेत नाहीत. तसेच रावणाने स्वतः फुंकले नाही तर अग्नी प्रज्वलित होणार नाही. हे फुंकणारे एका मुखाने फुंकताहेत: तुला दहा तोंडे आहेत. लंकाधीशा, तू फुंकलेस तर शेपटीचा अग्नी चांगला प्रदीप्त होईल." मारुतीने युक्तीने केलेले भाषण रावणाला खरे वाटले.

रावणाने फुंकण्यापूर्वी यथास्थित तयारी केली. त्याने शुद्धाचमन करून प्रथम तुपाच्या आहुती दिल्या. नंतर तो दशानन अग्नी फुंकायला बसला. रावणाच्या मनात मात्र कपट होते की शेपटीसह

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sanatan Foundation Research Academy, eGangotri

मारुतीला जाळावे. यासाठी अग्नी फुंकायला तो मोठ्या आवेशाने बसला होता. त्याच्या मनात असा विचार चालू होता की "माझ्या मुखांनी शेपटीचा अग्नी प्रदीप्त होऊन मारुती जळाला तर जगात माझी सर्वत्र कीर्ती होईल" असा गर्वाभिमान बाळगून रावणाने अग्नी फुंकला आणि एकच भडका उडून रावणाच्या दाढी–मिशा जळाल्या. आरंभीच हा अपमान होऊन काळे तोंड घेऊन रावण लज्जित होऊन सिंहासनावर बसला. कीर्ती ऐवजी अपकीर्ती झाली. मारुती पुढे काय करील या चिंतेच्या आवर्तात सापडून रावण पुन्हा लज्जित झाला.

अध्याय एकोणिसावा

हनुमंताने आपल्या पित्याला-वायूला-सांगितले होते की शेपटीचा अग्नी रावणाने फुंकला की भडका उडून रावणाचा अपमान व्हावा. हे पुत्राचे सांगणे ऐकून वायूने अग्नी प्रज्वलित केला आणि रावणाचे तोंड भाजून त्याच्या दाढीमिशा जाळल्या. यामुळे रावण अपमानित झाला. त्याचे ओठ जळाल्यामुळे तो शंख करू शकत नव्हता. नुसता टेऱ्या बडवत ओरडत होता. त्यावेळी याचे शंखस्फुरण उलटे झाले. प्रारंभी अपमान झाला पण शेपूटाचे दहन काही झाले नाही.

मारुतीची स्थिती, राक्षसांची प्रतिक्रिया

रावण विवेकाने विचार करू लागला तेव्हा त्याला वाटले "आम्ही त्याच्या शेपटीला आग लावली हे आमच्या हितासाठी परंतु तरी हा वानर सर्वांगाने निःशंक आहे. आम्ही वानराला छळून जाळू पाहिले पण रामभक्तांपाशी छळाचे काही चालत नाही. उलट वानराला जाळताना माझ्या तोंडाला दाढी-मिशा जाळून त्याने काळे फासले." शेपूट जळत असताना हनुमंत बालसूर्यच असा शोभत होता. शेपटीचे तेज जणू किरणांचा आवर्त होता. राक्षसांमध्ये वानराचे शेपूट होते. वानररूपी सूर्य उगवल्यावर राक्षस अस्त पावतात; तर रावणाची गर्वरूप अंधारी रात्र नाश पावते.

नंतर हनुमंताने उड्डाण केले, त्यामुळे दोऱ्या, वेली यांची बंधने तुटली, ब्रह्मपाशाचेही निर्दाळण झाले आणि नामस्मरणाने भवपाश छेदले गेले. श्रीरामनामाच्या भोवऱ्यात सप्तपाशांची निवृत्ती होऊन स्वतः मारुती त्रिलोकात स्वानंदाने गर्जत राहिला. काळपाश, कर्मपाश, धर्मपाश, ब्रह्मपाश, मायापाश, मोहपाश, जन्मपाश हे सात पाश आहेत. काळपाश आयुष्याचा घात करतो. कर्मपाश हा अनैश्वर्यवंत आहे. धर्मपाश आश्रमगत असून वेदविहितासाठी ब्रह्मपाश आहे. देहममता म्हणजेच मोहपाश आणि माया तोच आशापाश होय. कनक आणि कांता हाच जन्मपाश आहे. अशा सात पाशांत जीव बद्ध असतो. या सप्तपाशांची निवृत्ती मारुतीने रामनामामुळे केली. तिथे इतरांची युक्ती चालत नाही, त्यांची गुंतवणूक देहपाशात असते. आठवा पाश वितंडाचा असून त्याच्यामध्ये अनेक पाश असतात, त्यांचे नाव पापंड, त्यांच्या कर्त्याचे तोंड काळे असते. सर्व पाशांचा छेद करण्यात रामनाम निष्णात आहे. त्या रामनामाने हनुमंत संपन्न असल्यामुळे त्याने पाशांचा सहजतेने छेद केला. जाळ धडाडू लागताच हनुमंत गडबडा लोळू लागला. तेव्हा धगीच्या धाकाने पाश धरणारे पळून गेले. जसजसे शेपूट पेटत गेले तसतसा मारुती पळापळ करू लागला. तेव्हा द्वंद्वाचा निरास करणारा, नित्य स्वतःच्या भक्तांना साहाय्य करणारा श्रीरघुनाथ साह्यकारी झाला. तो कौतुकाच्या भावनेने नेहमी सूक्ष्म रूपात भक्तांच्या आसपास असतो; तो सर्वत्र भरून राहिलेला असतो. श्रीरघुनाथाचे साहाय्य असल्यावर द्वंद्वाची बाधा कशी होणार, तेथे द्वंद्व सुखरूप होते. त्यामुळे हनुमंत द्वंद्वनिर्मुक्त झाला होता. शेपटीची आग वाढू लागली तसा मारुती संतोष पावला. जणू अग्नी नव्हे अमृतकर चंद्रच शेपटीला बांधला आहे असा मारुतीला उल्हास वाटला. पेटलेल्या अग्नीमुळे चंद्रच आलिंगन द्यायला आला आहे असे मारुतीला

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

वाटले, कारण त्याला श्रीरामचंद्राचे साहाय्य होते. श्रीरामनामाची नवलाई अशी की त्यामुळे द्वंद्वाच्या मागे-पुढे चिद्रूप दृष्टीने सारी सृष्टी रामनाममय होते. मारुती मनात म्हणत होता, ''रामाचे नामस्मरण करण्यासारखे दुसरे साधन नाही. त्यामुळेच शेपटीला लागलेला अग्नी मला बाधू शकला नाही. श्रीरघुनाथाने माझ्यावर ही कृपा केली.''

हनुमंताचे शेपूट जसजसे पेटून धडाडू लागले, तसतसा हनुमंत मुद्दाम तळमळू लागला कारण त्याला राक्षसांना शांत करायचे होते. डोळे फिरवले, तोंडाला फेस आणला आणि शेपूट जमिनीवर पसरून तो मेल्यासारखा निश्चेष्ट पडला. त्यावेळी राक्षसांनी जवळ येऊन मारुतीला हलवून पाहिले. त्याने दात विचकले होते आणि तो हातपायही हलवत नव्हता. राक्षसांनी त्याला उलथा-पालथा केला. कोणी उलटे धरण्याचा प्रयत्न केला तेव्हा शेपटीच्या जाळाने ते भाजले आणि पळून दूर गेले. कोणी त्याच्या गुदात काड्या घातल्या, काहींनी फडाफडा मारले तरी मारुती निःशंकपणे स्वस्थ राहिला. त्याने दात-दाढा सुद्धा हलविल्या नाहीत. असे यथास्थित नाटक करताना त्याने पापण्यांची हालचाल मुळीच केली नाही. मग राक्षसांची बोलणी सुरू झाली की, ''युद्धात कीर्ती करून मारुती अखेर मेला. मारुतीने आधी राक्षसांचा कोटी संख्येने नाश केला होता. रावण, इंद्रजित यांना मोठी काळजी वाटत होती की जर मेला नसता, तर सर्वांचा त्याने घात केला असता. रावणाचे बुद्धी चातुर्य मोठे म्हणूनच कपटाने त्याने हनुमंताला फसवून मारले. आमच्या सैन्यात इंद्रजित हा बलवान, पण त्याचीही या वानराने रणात राखरांगोळी केली; मोठे पराक्रमी वीर मारले; कोण त्याच्याशी झुंज घेऊ शकणार होते. स्वतः रावणालाही तेवढे सामर्थ्य नव्हते, पण त्याला कपट येत होते. त्यामुळे शेपूट पेटवून वानर मारू शकला. हा वानर खरा सत्यवादी! श्रीरामाची शपथ पाळून, स्वतःचे मरण सांगून, त्याने स्वतःच स्वतःला मरण दिले.'' जेव्हा वैद्यांनी चिकित्सा केली तेव्हा ते म्हणाले, ''हृदयात प्राण आहे तो अतिशय क्षीण आहे, तेव्हा हा क्षणार्धात मरेल.'' हनुमंत मेला हे ऐकताच वाद्ये वाजविण्यात आली; इंद्रजिताला हर्ष झाला; रावणाने खिरापत वाटली. राक्षसींनी सीतेला म्हटले, ''तू ज्याच्याशी बोलली होतीस तो वानर, त्याच्या शेपटीला आग लावून, रावणाने मारला.'' राक्षसींकडून मारुतीला मारल्याची वार्ता ऐकून सीता कासावीस झाली. तिने जठराग्नीला ध्यानाने जागे करून, स्वतः त्याची प्रार्थना करून म्हटले. ''जर मी श्रीरामाची गुरुभक्ती केली असेल, श्रीरामाच्या सेवेची तपःसंपत्ती संपादिली असेल आणि हनुमंत जर श्रीरामाची भक्ती करणारा असेल तर मारुतीला वाचव.'' सीतेची प्रार्थना ऐकून अग्नीने लोटांगण घातले आणि म्हटले, ''श्रीरामाची शपथ वाहून सांगतो हनुमंताला मरण नाही. त्यापुढची त्याची महती ऐक. तो समस्त लंका जाळील. कोट्यवधी राक्षसांना मारील. त्याने रावणाची दाढी जाळली आहे.'' मारुतीकडून रावणाचा अपमान झाला आणि तो पुढे लंकापुराचे दहन करील हे ऐकून जानकी सुखसंपन्न झाली.

जळत्या शेपटीने मारुती अनर्थ करतो

हनुमंत मृत झाला या कल्पनेने त्याला पाहण्यासाठी अनेक लोक आले आणि त्याचे तोंड पाहण्यासाठी एक एक करत जमले. मारुतीने अनेक राक्षस एकत्र यावे म्हणून सोंग घेतले होते. त्याने आपल्या बुद्धीने सर्वांना मारण्यासाठी स्पष्टपणे मरण्याचे सोंग घेतले आणि नंतर द्वंद्वच पेटवले. राक्षसांच्या ओळींनी गर्दी झाल्यावर मारुतीने जळते शेपूट त्यांच्यावर टाकले. तेव्हा ते राक्षस उरा-पोटी भाजले, असे त्यांच्यावर महासंकट आले. राक्षस जेव्हा बाहेर पळू लागले तेव्हा मारुतीने जळते शेपूट दारात आडवे लावले. सर्वांचा कोंडमारा होऊन राक्षसात आकांत उठला. घुसमटून राक्षसांची

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Trust Foundation and eGangotri

डोकी पाठीवर लोंबली. त्यात शेपूट शिरल्यावर देह पेटून बोंब सुरू झाली. कोणाच्या वस्त्रांना पेटवल्याने त्यांचे सर्वांग जळू लागले; एकाच्या गुदात जाऊन शेपटीने त्याचे नेसणे पेटले. कोणाचे मुंडासे जळू लागले आणि ते विझवताना हात पोळले. कोणाचे अंगरखे तर कोणाचे कटिवस्त्र जळाले. द्विजांच्या धोतरांना आग लागली त्यामुळे त्यांचा लिंगभाग जळाला. ते सर्व रावणासमोर नाचू लागले आणि त्याला आपले लिंग दाखवू लागले; मग म्हणाले, "रावणा तिथे हात लाव म्हणजे व्यथा थोडी तरी कमी होईल कारण की तू वेदविभाग करणारा पुण्यवंत आहेस. कन्यासंक्रांतीत स्मश्रुकर्म करू नये म्हणून लिंगप्रदेशातले केस वाढवलेले आहेत, तेव्हा याचा राग धरू नये. हनुमानाला मारले म्हणून राजद्वारात वाद्यांचा गजर केलास; जळो रावणा तुझी थोरवी; तू केवळ आगीत मारण्याचा उद्योग केलास. वस्त्रांसाठी लंका नागवलीस, तेला-तुपाचा तुटवडा झाला, दिवे लावणेही थांबले. अखेर जीवाला अढी पडून जीव नकोसा झाला."

नंतर रावणाने मारुतीला विचारले की, "हनुमंता, तू लोकांना काय म्हणून जाळतो आहेस?" त्यावर मारुती म्हणाला, "एक लंकानाथा, मी तुला त्यातले तत्त्व सांगतो. शेपटीला मरण निश्चित येणार आहे. तेव्हा मरणभयाने ते धडपड करते आहे. भीतीने लोकांमध्ये लपते आहे, याला मी काय करणार. एकाचे पाय धरते, एखाद्याच्या पाठी लागते, कोणाच्या पदराला झोंबते आणि हे सर्व मरणभय चुकवण्यासाठी करते आहे. एखाद्याला शरण जात, दुसऱ्याच्या गळ्यात पडत, रावणाला विनवणी करून मरणमुक्त करा म्हणते आहे." रावणाने विचारले, "अरे ते तर सर्वांना उरापोटी जाळते आहे आणि याला तू शरणागती म्हणतोस? राक्षसांना मारायची ही तुझी चांगली बुद्धी आहे." हनुमंताने रावणाला सांगितले की, "रावणा, शेपूट खवळण्यामागे काय गूढ आहे ते सांगतो. शेपूट तिळभर जरी उघडे राहिले तरी मरण येणार नाही. ते राक्षसांचा आणि लंकेचा नाश करील हे मी तुला पूर्वीच सांगितले होते. त्या माझ्या सांगण्याची उपेक्षा करून तू स्वतः ते न सांभाळता, त्याला जाळ लावलास. शेपूट तीन ठिकाणी उघडे होते, त्यामुळे त्याला मरण आले नाही. नंतर अग्नीवर राग धरून ते परतले आणि त्रिविध घातासाठी घाव घालू लागले. ते राक्षसांपैकी महाबळींना मारील, लंकेची होळी करील, खंदकांना बुजवील, किल्ल्याचे तट पाडील. शेपूट आता एवढे संतापले आहे की माझ्याकडूनही आवरले जाणार नाही. यातले सत्य जाणून घे कारण ते तुझाही घात करील. तू पराक्रमी जर असशील तर शेपटीशी युद्ध कर. माझ्याने काही त्याचे निवारण होणार नाही; कारण शेपूट पूर्णपणे रागावले आहे."

हनुमंताने एवढे सांगितल्यावर जळते शेपूट राक्षसांच्या डोक्यावर आदळले. शेपटीचा बलवान आघात आणि त्यावरोबर जाळणारा अग्नी यांमुळे राक्षसवीरांचा संहार सुरू झाला. स्वतः हनुमान रावणाजवळ निःशंकपणे पण सावधान चित्ताने बसून होता. शेपटाने राक्षसांना अग्नीच्या संतापाने त्रस्त केले होते. यामुळे राक्षसांच्या सैन्यात आकांत झाला. यावर सर्व राक्षसमहावीर एकत्रित पुढे धावले आणि एखाद्या माजलेल्या हत्तीला मारण्यासाठी सहस्त्रावधी शस्त्रे घेऊन जातात तसे मारुतीला मारायला गेले. आपल्यावर राक्षसवीर चालून आलेले पाहताच मारुती स्वानंदाने नाचू लागला. त्याने अद्भुत उड्डाण करून भुभुःकाराची गर्जना केली. नंतर गिरिशिखराप्रमाणे आकार असलेल्या राजवाड्याच्या पूर्वद्वारावर तो जाऊन बसला. त्या पूर्वद्वारापाशी एक शृंखलायुक्त अडसर होता; तो हातात घेऊन मारुती युद्धात मिसळला आणि राक्षसांचा नाश करू लागला. शेपूट जळत होते आणि मारुती मारत होता. अशा रीतीने राक्षसांची रणात मारुतीने वाताहत आरंभली. ज्या हनुमानाच्या मरणवार्तेने वाद्यांच्या गजरात खिरापत वाटली होती, तोच आता राक्षसांचे निर्दाळण करत, त्यांच्यामध्ये पळापळ निर्माण करत होता.

https://archive.org/details/@sarayu_trust_foundation / Bhavan Varta Trust, Lucknow / Lakshmi academy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust And eGangotri

राक्षसांना पळायलाही योग्य तेवढी सवड नव्हती, कारण लंका अग्नीने वेढली होती. असा मारुतीने हाहा:कार उडवला होता. त्याचे शेपूट म्हणजे अग्नीकल्लोळच होता. लंकेची तटबंदी जळाली, राक्षस तळमळू लागले, शेपटीपुढे कोणाचे बळ चालेना. रावणाच्या विरोधात बोलले गेले की, "रावण पराकोटीचा अन्यायी आहे. त्याने नगरी वस्त्रांच्या बाबतीत उघडी केली, तेला-तुपाचा नाश केला आणि वानराचे शेपूट पेटवले. ते पेटविले होते वानराला मारण्यासाठी; पण तेच त्या वानराचे हत्यार झाले आणि त्याने लंका जाळायला, राक्षसांना भाजायला आरंभ केला."

हनुमंत आपल्या मनात म्हणत होता, "माझ्या कासेला अग्नी लागला आहे. तेव्हा त्याचे चांगले आतिथ्य करूया. त्याला उत्तम घरे खायला देऊ. मूलभूत विचार केला तर वेदानुवादाने आम्ही दोघे सख्खे बंधू आहोत. कारण, दोघांचाही पिता वायूच आहे. आम्ही आप्तभावाचे सुहृद आहो. खरोखर हा माझा सख्खा बंधू आहे. त्याला परम आदराने तृप्त करावे. रत्नखचित माड्या, गोपुरे, सुवर्णमंदिरे जी मणियुक्त होती ही अग्नीला देऊन आदर दाखवावा. ज्येष्ठ बंधू अत्यंत वरिष्ठ असतो तेव्हा त्याला लंकाभुवन हे जेवणाचे ताट आणि राजमंदिरे हे परम श्रेष्ठ शुद्ध भक्ष्य द्यावे. श्वेत-पीत क्षौमांबरे ही भोजनातली क्षीरसाखर; मणिमोत्यांचा संभार ही तुपाची धार शोभते आहे. चंदनमंदिरे हे ओदन आणि अन्य सामान म्हणजे भातवरण, यासाठी फडफडणाऱ्या पताका आणि फुरफुरणाऱ्या पूर्ण कथिका आहेत. तिळतंदुळकणांच्या राशी आणि तूपसाखरेची प्राणाहुती होईल. नगरातली घरे घासाघासाला पूर्ण समाधानाने खाण्यासाठी द्यावी. जे जे त्याला आवडीने गोड वाटेल ते ते निश्चित पुरवीन. घरोघरी असलेल्या उतरंडी त्याने स्वेच्छेने प्रकार म्हणून सेवाव्या. जी जी घरात सामग्री असेल ती ती लोणची, कोशिंबिरी आणि तिखट शस्त्रे ही खरी रायते असतील. घराची दारे पापड, विचित्र पडदे आणि छते, तशीच नाना कुसरीची श्रेष्ठ आसने हीच विविध प्रकारची पक्वान्ने असून चांदवे म्हणजे चाकुळ्या असतील. बांधलेली बोचकी म्हणजे लाडू, स्त्रियांची पोती तिळचे समजावे आणि पलंग, आच्छादने या पूर्ण सपदरा फेण्या आहेत. गाद्या, पसारे, पोतडी अनुक्रमे सांड्या, काचऱ्या आणि कुरवड्या; तिथेच मुगवडी असणार आणि तवकांचे प्रकार होतील आंबवडे. वर ध्वजस्तंभाचे मीठ, मंडप दही, तृणघरांचे दहन ही समाप्तीची उत्तर अपोशणी." सख्खा बंधू जो अग्नी त्याला आदराने भोजन देण्यासाठी मारुतीला पूर्ण उल्हास वाटत होता.

हनुमंत, वायु आणि अग्नी हे अत्यंत अद्भुत असे तिघे मग लंका जाळण्यासाठी निघाले. शेपटीचा अग्नी अत्यंत प्रदीप्त होता, हनुमंत लंकेत हिंडत होता. जिथल्या तिथे आग लावत होता त्यामुळे लंकेत आकांत झाला. हनुमंत लंकेतील एका उंच जागी बसून घरोघरी आगी लावत होता. त्यामुळे राक्षस नरनारी दुर्दशेत सापडून कळवळत राहिल्या. घरे, बाजार, चौक, दुकाने, माड्या, गोपुरे सर्वत्र मारुतीने आगी लावल्या. तळघरे, ओवऱ्या, विकरे, वस्त्रे साठविण्याचे पेटारे, मठ, मंडप, चव्हाटे यांनाही त्याने आगी लावल्या. पाकशाळा, पाठशाळा, विचित्रशाळा, यंत्रशाळा तंत्रशाळा, मृदंगशाळा, अश्वशाळा, गजशाळा, भोगशाळा, संग्रहशाळा, रंगशाळा, गंधर्वशाळा यांना आग लावून, त्या जाळल्या. लंकादुर्गाच्या सभोवती जे रक्षकसैन्य होते त्यांना छळाने बळाने जाळले. लंकादुर्गाचे उंबरठे, अडसर, दारे, जाळून मोकळे सात उंबरठे अडगळ टाकून बुजवले. त्यांना आग लावून दुर्गाच्या भिंतींचे पाये खचले, अशी दुर्गाची होळी केली. दुर्गाच्या भिंत–बुरजांना आग लागून ते धडधडा कोसळले. त्याखाली सापडून राक्षसांचा चुराडा झाला. हनुमंताने पुढे होणाऱ्या युद्धासाठी श्रीरामाला ससैन्य येण्यासाठी वाट मोकळी केली. निवांत एके ठिकाणी हनुमंत बसून होता आणि त्याचे शेपूट इकडे-तिकडे जाऊन सर्वत्र आगी

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

लावत होते. त्यामुळे लंका ज्वालांनी वेढली होती. मारुती त्याचा पिता वायूला म्हणाला, "ज्येष्ठ बंधू मला अत्यंत पूज्य असल्याने मी त्या सख्या बंधूला भोजन देतो आहे. तूही आम्हाला सहाय्यभूत व्हावे". मारुतीची विनंती ऐकून वायू सुखावला. त्याला दोघे बंधू प्रिय होते, त्यामुळे तो साह्य करायला सिद्ध झाला. अग्नी वायूचा ज्येष्ठ पुत्र, त्याला कनिष्ठ बंधू हनुमंत भेटला. दोघांनी एकमेकांना आलिंगन दिले. ते पाहून वायू उल्हसित झाला. वायू अग्नीला साह्य झाला; त्यामुळे लंका चौफेर पेटली. लंकेत उफाळलेल्या अग्नीच्या ज्वाळांचा कधी काचवर्ण, कधी पिवळा तर कुठे काळाठिक्कर असे रंग दिसत होते. कुठे निर्मळ सोनेरी, कुठे अत्यंत शुभ्र, कुठे अशोकपुष्पाचा असे त्या लालरंगी ज्वाळात इतर रंगही मिसळलेले भासत होते. त्या ज्वाळांनी शेंदरी रंगाचा प्रकाश दिसावा आणि तेव्हा पळसच वसंतात फुलल्याचा भास व्हावा. त्या ज्वाळा कधी लवलवत, कधी लखलखत प्रकाशमान होत होत्या. लाल आणि पांढरा असा एकत्र प्रकाश पसरून कधी इंद्रधनुष्याची शोभा दिसे, तर कधी पद्मगर्भ नीलकमलांची शोभा दिसे. एखाद्या मोठ्या तलावात अनेक कमळे असावीत तशी ज्वालांनी वेढलेली लंका आकाशातील विमानातून भूतलाकडे पाहणाऱ्या लोकांना दिसत होती, ज्वाला आकाशाला भिडल्या, विमानांना झोंबल्या तेव्हा ज्वालांच्या माळेतील मणी पडावे तशी विमाने धरणीवर पडली. स्वतःची पुण्यसंपत्ती संपल्यावर जसे स्वर्गस्थांचे पतन होते तशी ती ज्वालांनी वेढलेली विमाने वेगाने धरणीवर कोसळली. जसा प्रलयकाळचा अग्नी सत्यलोकापर्यंत जाऊन पोचतो, त्याप्रमाणे लंकेचे दहन करणाऱ्या अग्नीच्या ज्वाला आकाशात जाऊन भिडल्या. श्वापदे जीव घेऊन पळाली, पक्षी आकाशात घिरट्या घालत कलकलाट करू लागले, देव विमानातून पळाले, सर्प पाताळात पळाले. वायू, मारुती आणि अग्नी असे तिघे जण लंका जाळत होते. त्या धगीने जमीन तापली आणि सर्व नाग पोळले, ते सर्व नाग समुद्राच्या पाण्यात दडले. एक शेष तेवढा त्याच्या फणीवर मणी असल्यामुळे आणि त्याच्या अंगाच्या शय्येवर श्रीराम निद्रा घेत असल्याने वाचला. मारुतीने लंका जाळल्यामुळे त्रिजगत तापले; लंकेतले लोक पेचात सापडून राक्षसांची शांती झाली.

राक्षस रावणाला म्हणाले, "तू शेपूट पेटवून इथे वानराला का खवळलेस? त्याने सर्व लोक पुच्छाने मारले. आधीच त्याचे शेपूट दुर्धर, त्यात पुन्हा त्याला अग्नीचे साहाय्य मिळाले त्यामुळे लंका, गिरिकंदरे, दुर्ग हे सर्व जाळले. दुर्गाची तटबंदी पाडली, खंदक पुर्ण बुजवले अशी दुर्गाची हानी केली. दुर्गाभोवती तोफा होत्या. त्यांना वानराने आग लावताच त्या भडकल्या आणि एकदम अनेक तोफगोळे सुटल्याने नगरात हाहाःकार झाला. हलकल्लोळ उठला. त्यात अनेक वीर मरण पावले. दुर्गाची रचना ढासळली, नगर जळाले, वृद्ध संकटात पडले, मुले आणि माता यांना जाळ लागला. जरी वीरांचे बळ मोठे होते तरी ते अग्नीपुढे काय करणार! रावणा तू फार वाईट केले. आता तुला निश्चित मरण येणार. ही चौफेर लागलेली आग बाल, स्त्रिया कोणाला सोडत नव्हती. एखादी स्त्री जळताना हातपाय झाडी तेव्हा ती नग्न होई आणि लोकलाजेसाठी उपडी पडे. मार्गात पुच्छ येताना दिसले की लोक सांदीकोपऱ्यात दडत. त्यावेळी अनेक जण एकत्र आले की शेपूट नेमके त्यांना जाळते. वस्त्र पेटले की मरणभयाने ते फेडून मागे-पुढे हात ठेवून स्त्रिया पळत आहेत. अग्नीने अनेकजण पोळले आहेत. कोणी कुंथत, कण्हत, थकून तळमळत पडले आहेत. सर्वत्र सर्वांची पळापळ सुरू आहे. एकमेकांचे हात धरून, एकमेकांना हाका देत, आपल्या घरांना आग लागलेली पाहून, "राम्या, पेम्या, धर्म्या पाव रे" असा आकांत होतो आहे "धाव रे व्यंकटेशा, पाव रे वितंकमुखा, धाव रे सुपुत्रा दुर्मखा" असा आक्रोश चालू आहे.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

लंकानगरी जळत असल्याने नगराबाहेर पडण्यासाठी लोकांच्या रांगा लागल्या आहेत. परंतु नगराच्या द्वाराशी पुन्हा चौफेर शेपूट असल्याचे दिसले. ज्या ज्या दारी जावे त्या त्या ठिकाणी धगधगीत शेपूट दिसे. तेव्हा बाहेर पडणे अशक्य झाल्याने लोक भ्रम होऊन गडबडले. जळणाऱ्या घरात म्हातारी माता सोडून कोणी स्त्रीलोभी पत्नीला खांद्यावर घेऊन निघाला; एखादी स्त्री पतीला जळत्या घरात सोडून लेकराला कडेवर घेऊन बाहेर निघाली आणि पतीला म्हणाली, "तुम्ही चांगल्या रीतीने घर सांभाळा. चण्यांचे टोपले जळत आहे, त्याचे झालेले फुटाणे भूक लागल्यावर खा. पाण्याचे रांजण भरलेले आहेत. तेव्हा घर नीट राखा." असे सांगून आपली बाळे अग्नीच्या बाहेर पडावीत म्हणून माता त्यांना कडेवर घेऊन पतीला घराच्या राखणीला ठेवून पळत सुटल्या. एक स्त्री एका पुरुषाला म्हणाली, "मी आकांत करूनही माझा पती मला भेटत नाही; तेव्हा मी तुझीच पत्नी होते. मी त्याला सोडला." एक सुंदरी भ्रमिष्ट होऊन दिसेल त्याला पती म्हणू लागली. असा कित्येकांना भ्रम झाला. नगरात धुमाकूळ होऊन अश्रू ओघळणाऱ्या डोळ्यांनी, दुःखाने आक्रंदत नागरिक इतस्ततः फिरत राहिले होते. हिरे, वैदुर्य, प्रवाळ, रत्ने, माणके, मोती, रत्नखचित मंदिरे, सगळी आगीच्या भक्ष्यस्थानी पडली. जसजसे लंकाभवन जाळले जात होते तसतशी अग्नीची तृप्ती न होता, सर्व लंका जाळावी असे त्याला वाटत होते. मारुतीच्या मनाला हे पटत नव्हते. अग्नी आणि हनुमंत यांना पिता वायू हा साहाय्य यांचे कार्य होते लंकानगरी जाळून राक्षसांची वाताहत करायची, ते पूर्ण झाले. मग हनुमंत रावणाच्या घरावर आला. राजमंदिर आग लावून पेटवले तेव्हा राणीवशात एकच आकांत उसळला. रावणाची सातखणी, नवखणी मंदिरे, माड्या, ओवऱ्या, गोपुरे, घराची तळघरे, ही जाळली. रावणाचे शयनगृह, राणिवशाची मंदिरे, यांना आग लागली. त्यावेळी मंदोदरीसह सर्व राण्या कड्याकपाऱ्यात लपल्या. नंतर शेपूट रावण बसला होता त्याठिकाणी पोचले. राक्षसांनी आकांत केला. रावणाला बाहेर काढला पाहिजे नाही तर शेपूट त्याचा नाश करील, असा विचार करून राक्षसांनी दुर्ग पाडून मोठ्या कष्टाने वाट तयार केली. मारुतीच्या शेपटीची थोरवी अशी की ते जळते शेपूट दारात येऊन थांबले. त्यामुळे बाहेर जायला सुटका मिळेना. तेव्हा सर्वत्र हाहाःकार झाला की रावणावर संकट आले. निशाचरात आकांत झाला. इंद्रजित आपल्या ठिकाणी रावणाच्या नाशाच्या कल्पनेने धास्तावला. मग त्याने निवडक राक्षसवीर शस्त्रास्त्रांनी सिद्ध करून चाल केली.

राक्षसांकडून चाल-मारुतीची प्रतिक्रिया

हनुमंतावर राक्षसांनी धारदार शूळ, ढाल-तलवारी, पाश, फरशी, सूर्यासारखे तेजस्वी बाण यांनी आघात केले. नाना प्रकारची शस्त्रे, यंत्रे, भिंडीमाळा, पांगोरे यांचा राक्षसांनी रागाने मारा केला. रावणाच्या समोर मोठे युद्ध सुरू केले. निधडे शूरवीर रणात त्वरित उतरले. रणवाद्ये, झांजा, सिंहनाद करत ते मारुतीवर चालून गेले. इकडे वाजंत्री वाजत असताना तिकडे लोकांच्या हाका आणि ओरडा चालूच होता. यावेळी हनुमंत पुढे होऊन वीरांचा समूह पाहून रणात शेपूट नाचवत पूर्वीची युद्धाची आठवण करीत आपल्या शेपटीला म्हणाला, "तू चौफेर लंकेला जाळल्याने दमला असशील. आता विश्रांती घेत राहा. राक्षसवीरांचा समूह आला तर त्यांना मी अर्ध्या क्षणात मारीन." तेव्हा शेपूट लगोलग मारुतीच्या पायी लागून म्हणाले, "स्वामींनी असे करू नये. अर्धासंग्राम केल्यावर माझ्या तोंडचा घास आपण काढू नये. राजधर्माने विचार करा. मी तुमचा सेवक आहे. कपिराजांनी माझा संग्राम पाहावा. राक्षसांचे सैन्य आले तर रणात त्यांचे मर्दन करीन. राक्षस बापडे

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Muthulakshmi Research Academy eGangotri

किती, त्यांच्यासाठी तू कशाला उठाव करतोस. तू माझ्या पाठीशी असल्यावर त्या राक्षस मशकांची काय योग्यता." असे शेपटाने सांगताच हनुमंताला हसू आले आणि प्रेमाने शेपटीला आलिंगन देऊन, त्याने शेपटीचे चुंबन घेतले. मग तो म्हणाला, "तू माझे साहाय्य कर. माझे स्फुरण मला आवरता येणार नाही. आपण दोघे मिळून सर्व राक्षसवीरांचे निर्दाळण करू. शेपटीने विचार केला की तसे करणेच चांगले आहे. स्वामींचे वचन ऐकले पाहिजे. अशा विचाराने शेपूट संग्रामासाठी सरसावले. तेव्हा मारुतीने एकान्तात घेऊन शेपटीला सांगितले, "तू लंकानाथ रावणाला मारू नको. त्याचा घात श्रीराम करील. तसेच लक्ष्मण इंद्रजिताला मारील. उरलेले सर्व राक्षस आपण मारू." असा विचार निश्चित करून मारुती युद्धाला निघाला. "तू वेढायचे आणि मी निर्दाळण करायचे, याप्रकाराने राक्षसांची धुळदाण करू." यावर शेपटीने संमती दाखविली.

राक्षससमुदाय वाद्यांचा गजर करत हनुमंताच्या समोर येऊन त्याच्यावर अनेक शस्त्रांचा मारा करू लागला. राक्षसांशी रावणासमोर निर्वाणीचा झगडा करून हनुमंत रणरगडा करत सर्व राक्षसांचा नाश करील. अत्यंत क्रूर असे राक्षसवीर गर्जना करत आले; पण हनुमंत आपल्या ठिकाणी किंचितही विचलित न होता स्वस्थ राहिला होता. अंगावर राक्षसांनी केलेले आघात लागले तरी तो मुकाट राहिला. नंतर एकाएकी तो उठला आणि सभामंडपातील रत्नखचित सोन्याचा मोठा खांब उपटून तो राक्षसांचा घात करण्यासाठी सिद्ध झाला. राक्षस दुर्धर शस्त्रे घेऊन मारुतीवर एकत्रितपणे आघात करू लागले. तेव्हा मारुती अष्टकोनी खांब घेऊन रणात मिसळला. "मी श्रीरामाचा रामदूत राक्षसांचा नाश करायला आलो आहे." अशी गर्जना करत मारुती खांब लाठीसारखा गरगरा चौफेर फिरवत राक्षसांचे बाण दूर सारत होता; शस्त्रास्त्रांचा मारा झाला तर शेपटीकडून त्यांचे वरच्यावर निवारण करत होता; राक्षसवीरांच्या डोक्यावर खांब हाणून त्यांचा नाश करत होता. शेपूट आपल्या परीने राक्षसांना सर्वांगाला चटके देऊन जाळत होते आणि मारुती बळाने खांब हाणून राक्षसांची धुळदाण करत होता. हनुमंताला मारण्यासाठी कवच, खड्ग धारण केलेले राक्षसवीर इकडे-तिकडे सरकून एकसारखे घाव घालत होते. शेपटीचा आघात चुकवून, समोरून घाव घालत वीर हनुमंताला मारण्यासाठी प्रयत्न करत होते. त्यावेळी मारुतीने विचार केला की राक्षसवीर चांगलेच खवळले आहेत, तर अंगावर घाव सोसून त्यांचा पुरुषार्थ पाहावा. यांच्या शस्त्रांनी माझे रोमही तुटत नाहीत. त्यावर त्याने थोडी चेष्टा करायचे ठरविले.

हनुमंतावर महाबळी राक्षस शस्त्रांचा मारा करत असताना हनुमान त्यांच्या शस्त्रसंभारात दडला. त्याबरोबर राक्षसांची आरोळी उठली, "आम्ही बळी रे बळी. वानर जमिनीवर पाडला." समोरून कोणी तोमर हाणले, पाठीमागून महावज्र मारले, उजव्या डाव्या बाजूने बाणांचा वर्षाव केला. अंतराळातून शस्त्रे येऊन आदळली. मारुती स्वस्थ पडलेला पाहून राक्षसगण म्हणाले, "याचे भ्रमणे, उड्डाण थांबले. त्याचा प्राण निःशेष गेला आहे. आमचा पराक्रम मोठा आहे." असे म्हणून त्यांनी रणवाद्ये वाजवली. एक म्हणाला, "मी शस्त्राच्या आघाताने हनुमंत समोर पाडला" एकाने म्हटले, "त्याच्या उरात मी शूळ खोचला." एकाने सांगितले, "मी खड्ग धारण करून त्याच्या मस्तकावर घाव घातला आणि तो संपला." आणखी एकाने "मी धनुर्धारी असल्याने माझ्या बाणांनी त्याचे सर्वांग भरले" अशी बढाई मारली. याप्रकारे एकएकजण आपली प्रौढी सांगत होता. हर्षाने साखर वाटली गेली. "आता लंकानगरी विझवा. युद्धात आम्ही वानर मारला आहे. या वानराने खूप कीर्ती केली, पण आमचा पराक्रम असा की आम्ही शस्त्रबळाने रणमार करून हनुमंताला पराभूत केला. तातडीने रणक्षेत्र शोधून

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

वानर कुठे पडलाय ते पाहा.'' तेवढ्यात प्रचंड भुभु:कार करून, वेगाने मारुती उसळी मारून उठला.

हनुमंताच्या भुभु:काराची गर्जना ऐकून रावणही दचकला. राक्षसांना मरणच समोर दिसल्याने भयाने त्यांचा प्राण गेला. मारुतीने सर्वांना शेपटीमध्ये एकत्र गुंडाळले आणि खांब जोरजोराने मारून सर्वांचे चूर्ण केले. सगळ्यांचे एकत्रित चूर्ण करून मारुतीने त्यांना पाताळात, रसातळात नेऊन निर्गुणत्वाला पोहोचविले. अव्यक्त देहाला इंद्रियांमुळे वेगळेपण येते; त्रिगुणात्मकतेमुळे नाव, रूप प्राप्त होते; तो देह नष्ट करून मारुतीने त्यांना गुणातीत केले. श्रीरामभक्ताच्या हातून मरण येते ते सर्व गुणातीत अशी अवस्था पावतात अशी भक्तीची महती आहे. श्रीरामभक्ताच्या दृष्टीपुढे मरणाराचे भाग्य थोर असते. तो मरणारा त्रिगुणांचे संकट जिंकून स्पष्ट परब्रह्मरूप प्राप्त करून घेतो. श्रीरामाचे अखंड स्मरण करतो किंवा त्या नामाचे श्रवण करतो. त्याच्या कर्म-अकर्माचे क्षालन होऊन तो आत्मा निर्गुणत्व मिळवतो. मुखाने, ध्यानाने, भजनाने जो श्रीरामच सतत जपतो तो त्रिभुवनात धन्य होतो. हनुमंताच्या ठिकाणी श्रीरामाची अशीच भक्ती असल्याने त्याने युद्धात राक्षसांना मारून त्यांना मुक्ती दिली. हनुमंत रावणाला म्हणाला, ''तुझा घात मी करणार नाही. आज तुला जिवंत सोडतो कारण श्रीराम तुझा वध करणार आहे.''

अध्याय विसावा

हनुमंत कोट्यवधी राक्षसांचा नाश करून, लंकाभुवन जाळून, रावणाचा अपमान करून, मग लंका सोडून, परत निघाला. अनेक राक्षसवीर मारले तरी हनुमंताने तावडीत सापडलेल्या रावणाला मारले नाही, कारण त्यामुळे श्रीराम रागावेल असे त्याला वाटले. ''पूर्वीच श्रीरामाने प्रतिज्ञा केली होती की, माझ्या बाणाने युद्धात रावणाला मारीन. रामाची प्रतिज्ञा खोटी कोण करील? स्वामीच्या माथी असत्य ठेवून, मी शूरता मिरवावी? छे; जळो तसली थोरवी. मी म्हणूनच रावणाचा घात करणार नाही.'' असा स्वतःशी विचार करून हनुमंत निघाला. हनुमंताच्या मनात विचार चालू होते की, ''अशोकवनाची पडघड करून, निधड्या वीरांचा नाश करून, वीर इंद्रजिताला पळवून लावले; रावणाला जिवानिशी मारायला मला क्षणही लागणार नसता, पण श्रीरघुनाथाची मर्यादा मला उल्लंघन करविली नाही, त्यामुळे मी रावणाला मारले नाही.'' जंबुमाळीला वळाने मारून, अखयाला तटामधेच उपटून, राक्षसभवनाची होळी करून महाबलवान मारुती परतला. वन-उपवने धुंडाळून पाहिल्यावर भाग्याने सीतेचा शोध लागला. त्या शोधाची वार्ता श्रीरघुनाथाला सांगण्यासाठी हनुमान उल्हसित झाला होता एकाच उड्डाणात श्रीरामाच्या चरणावर मस्तक ठेवून सीतेच्या शोधाची वार्ता सांगावी असे त्याला वाटत होते. कधी एकदा श्रीरामाचे दर्शन घेईन, कधी त्याला सीताशोध सांगेन असे मारुतीला झाले होते. तो उल्हासाने परतला.

मारुतीने लंकेतून परतताना आपले जळते शेपूट वर केले होते, ते सागरात विझवावे असा त्याचा विचार होता. त्यावेळी लाटांनी त्याचे निवारण करून सागर म्हणाला, ''हनुमंता असे करू नको. तू शेपूट सागरात बुचकळलेस तर सागराच्या पाण्याला कढ येईल. त्याची झळ जलचर प्राण्यांना लागेल. तेव्हा हे वानरश्रेष्ठा असे करू नकोस. त्यापेक्षा तू आपले शेपूट तीरावर पसर म्हणजे मी लाटांनी त्यावर पाणी घालून क्षणभरात ते विझवीन.'' मारुतीला ही युक्ती पटली. त्यावेळी मारुतीने जे उग्र, प्रचंड रूप धारण करून, शेपूट आकाशाला भिडेल असे प्रदीर्घ केले होते, ते रूप टाकून सामान्य वानराचे रूप धारण केले. सामान्य

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Trust, Lucknow and eGangotri

रूपातले शेपूट सागरतीरावर पसरताच सागरलाटांनी ते क्षणात विझवले. त्यामुळे मारुतीला शांती वाटली. नंतर हनुमंताने आपल्या शरीरावरचा घाम निपटून काढला. तेव्हा त्या घामाचे थेंब सागरात पडले. ते थेंब मगरीने गिळले आणि त्यातून मगरीला गर्भधारणा झाली. त्यातून घामापासून मकरध्वज हा हनुमंताचा पुत्र जन्मला. तो पुत्रही हनुमंताप्रमाणे बलवान झाला. असा प्रकार होऊन मारुतीचे शेपूट सागराने विझवले.

मारुती जळाल्याची राक्षसींकडून सीतेला वार्ता

रावणाने शेपटीला आग लावून मारुतीला जाळले अशी वार्ता राक्षसिणी सीतेला सांगतात त्यामुळे सीतेची चिंता वाढते; राक्षसिणी म्हणाल्या, "तो वानर वनाचा विध्वंस करून राक्षसांशी झुंज करून, राक्षसवीर मारून, खंदक बुजवून, आपणही नंतर मेला. अनेक वीरांना युद्धात मारून आपण स्वतःही युद्धात पडलाच. त्या वानराच्या उन्मत्तपणाने स्वामिकार्य साधले नाही. पाला खाणारा तो वानर लंकानाथाला मारायला गेला तेव्हा शेपूट पेटवून त्याला लंकाधीशाने जाळले. सीतेच्या शोधाचे कार्य सीतेच्या पतीला कळणारच नाही. वानराचे आणखी एक मूर्खपण म्हणजे त्याने आपले मरण स्वतःच सांगितले आणि आपणच आपले मरण ओढवून घेतले; असा तो वानर अभागी." "रावणाने हनुमंताला मारल्यामुळे श्रीरघुनाथाला आता माझा शोध कळणारच नाही, हे माझेच दुदैव. आता मी काय करू." असा शोक करत सीता दुःखी झाली. "शतयोजन असा दुस्तर सागर उड्डाण करून कोणाला पार करता येईल? श्रीरघुनंदनाला माझा ठावठिकाणा शोधलेला कळणार नाही हेच माझे दुर्भाग्य आहे." हनुमंताच्या मरणाची वार्ता ऐकून सीतेच्या डोळ्यातून अश्रुधारा पाझरू लागल्या, दुःखाने ती आक्रंदन करू लागली आणि अखेर मूर्च्छित झाली. हनुमंताच्या मरणाने जानकीला झालेले दुःख एवढे तीव्र होते की त्यापुढे कोणाला होणारा पुत्र शोक केविलवाणा ठरेल. त्या वार्तेचा धक्का एवढा जोराचा होता की ती आतल्या आत तडफड करू लागली. माझ्या आकांताचा सोबती असलेला मारुती हाच मरण पावला; तेव्हा आता रघुनाथ कसा भेटेल याची जानकीला चिंता वाटू लागली.

सरमेकडून मारुतीच्या सुरक्षिततेचे कथन

त्रिजटेची सखी सरमा ही हर्षाने सांगत होती की, "वानराला मरण आले नाही. त्याचे पराक्रम ऐक. ज्याप्रमाणे कमलतंतू तोडताना कष्ट होत नाहीत त्याप्रमाणे पाश तोडताना वानराला कष्ट झाले नाहीत. पाशातून मुक्त झाल्यावर त्याने मेल्याचे नाटक केले आणि स्वस्थ पडून राहिला. नंतर जेव्हा त्याचे शेपूट पेटविण्यात आले, तेव्हा त्याने रावणाच्या दाही तोंडांना आणि दाढी-मिशांना जाळले. रावणाचा अपमान केला. तू राहात असलेले अशोकवन तेवढे जाळले नाही. बाकी लंकेत सर्वत्र आग लावली घर न् घर शोधून पेटविले. शेपूट पेटवल्यावर त्या योद्धा वीराने कोट्यवधी राक्षस मारले. लंकेत त्याच्या पेटत्या शेपटीने जाळण्याचा एवढा हाहाःकार माजवला की रावण गांजून गेला. एवढा आकांत माजवून, समुद्रात शेपूट विझवून, तुझ्या शोधाची वार्ता श्रीरामाला सांगण्यासाठी तो तडक निघून गेला. हनुमंत आता तिथे जाऊन, श्रीरामाला घेऊन त्वरित परत येईल हे तू निश्चित समजून राहा." सरमेचे कथन ऐकून सीता सुखसंपन्न झाली. तिने सरमेला आलिंगन देऊन, शिवाय आपली अंगठी दिली. सरमा म्हणाली, "माते, आम्ही तुझ्या आज्ञांकित सेविका आहोत, आमचा कशासाठी सन्मान करतेस. आम्हाला तू राक्षसी म्हणू नकोस." तेव्हा सीता म्हणाली, "तू माझ्या आकांतातली माझी सांगातीण आहेस. आपण संकटसमयी भगिनी झालो. तुम्ही मनात भेदभाव धरू नका." यावर सरमा सीतेच्या पाया पडली. सरमेच्या निवेदनाने सीता समाधान पावली.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized By Sarayu Foundation Trust and eGangotri

दुसरीकडे मारुती मात्र मनातून काहीसा अस्वस्थ झाला होता. हनुमंताला शेपूट समुद्राच्या पाण्याने विझवल्यावर श्रीरामाचे दर्शन घेण्याची उत्कंठा लागली आणि तो उड्डाण करायला सज्ज झाला. परंतु त्याने मागे वळून पाहिले तेव्हा त्याला धगधगती लंका दिसली आणि त्याबरोबर 'सीताही भस्म झाली नसेल ना' अशी शंका मनात आली.

हनुमंताची शंका, अस्वस्थता, क्रोध, विचार

"आपण स्वामीची पत्नी जाळून टाकल्यावर आता त्या रघुनाथाला शोधाविषयी तरी काय सांगणार! आपण वानरस्वभावाने हा अनर्थ केला आहे. लंका उत्साहाने जाळताना आपण स्वामीच्या कार्याचा, स्वार्थाचा मुळीच विचार केला नाही. कोट्यवधी राक्षसवीर मारले आणि लगबगीने लंकापुरी जाळताना सीताही जळाली हा माझ्या नष्ट बुद्धीचा परिणाम आहे. मी जो जो पराक्रम केला तो तो माझी निंदा करणारा ठरला. आता सीता जाळल्यावर त्या रघुनाथाला तोंड कसे दाखवू? माझी प्रौढी जळो, जळो माझी कीर्ती जी अपकीर्ती ठरली. श्रीरामापुढे कोणत्या तोंडाने जाऊ? सीतेचा शोध सांगताना तिला मीच जाळली हे का सांगायचे? ह्या शेपटीच्या गोंधळात मी संपूर्ण लंकापुरी जमिनीसहित जाळली. तिथे चार बोटेही उरली नसताना सीता कशी वाचेल. मी विचार न करता ज्या माकडचेष्टा केल्या, त्यामुळे श्रेष्ठ अशा बारा जाणांना बारा वाटा मोकळल्या आहेत. सीतेचे मरण ऐकताच श्रीराम प्राणत्याग करील, पाठोपाठ लक्ष्मण, भरत, शत्रुघ्न प्राण सोडतील. तिन्ही माता, नळ, नीळ, जांबुवंत, वानरराज सुग्रीव, अंगद हे सर्वजण मरण पावतील. असे हे श्रेष्ठ-श्रेष्ठ माझ्यामुळे बारा वाटांना जातील त्याहून श्रेष्ठ आणि कनिष्ठ अशा अनेकांना माझ्यामुळे मरण येणार. अयोध्येतील नर-नारी, समग्र वानरजाती मरतील. सीतेला जाळल्याने मी एवढ्या मोठ्या अपयशाला पात्र झालो आहे. क्रोध हा केवळ क्रूर मांग असून, त्याने सर्वांग अपवित्र होते. अनेक शरीरांचा भंग साधला परंतु क्रोधाने लुबाडले. सीतेचा शोध लागला, त्या पाठोपाठ माझ्या अंगात क्रोध संचारला. क्रोधाने मी लंका नगरी आणि तशीच सीताही जाळली."

"क्रोध हा क्रूर मांग अत्यंत चांडाळ आहे; मांगाचा विटाळ निदान पाण्याने नाहीसा करता येतो; पण क्रोध हा त्याहून प्रबळ असून निर्मळ स्नानाने तो जात नाही. या क्रोधासारखा महावैरी अंतरात शिरल्यावर जो ज्ञानाची महती मानतो तो जगात मूर्ख ठरतो. तेव्हा जे क्रोधाला दृष्टीपुढे येऊच देत नाहीत, ते नरश्रेष्ठ खरोखर धन्य होत. क्रोध त्यांच्या ठिकाणी निर्माण झालाच तर ते विवेकदृष्टीने त्याचे निर्दाळण करतात. अशी दृष्टी असलेले नरश्रेष्ठ हे ज्ञानदृष्टीचे परब्रह्मस्वरूपाचे मंदिर होत. त्यांच्या ठायी परब्रह्माचे भांडार असल्याने ते साकार झालेले ब्रह्मस्वरूप ठरतात. सर्व भूतांच्या ठिकाणी भगवद्भाव मानणाऱ्यांच्या ठायी क्रोध असणारच नाही. जे सद्भावाने वागतात ते स्वतः परब्रह्मच असतात. अशा तऱ्हेचा संपूर्ण विचार मी पामर करू शकलो नाही आणि क्रोधामुळे सर्वस्व गमावून बसलो आणि सीतेला जाळली. खरोखर क्रोध आल्यावर अणूमात्र स्वार्थ न करता, कोट्यवधी अनर्थ केले जातात आणि जगात नीच ठरून सर्वत्र निंदा होते. अशी निंदा माझ्या वाट्याला आली. अशा अवस्थेत श्रीरामाची भेट झाली तर सीता मरण पावली हे ऐकून सगळा प्रलय होईल. श्रीरामाकडे न जाता इथेच संन्यास घ्यावा; पण इथे तर माझे राक्षसांशी हाडवैर निर्माण झाले आहे, तेव्हा इथे राहणेही योग्य नाही. बरे प्राणत्याग करावा तर मला मरण येणारच नाही, हे माझे आत्मलक्षण आहे." असा मारुतीने आपल्याशी विचार केला.

मारुतीने पुढे असा विचार केला की, "मला अग्नी जाळू शकत नाही, की सागर मला बुडवू शकत नाही, तसेच मासे-मगरी मला खाऊ शकत

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sayamun Foundation Trust and eGangotri

नाहीत, माझे शरीर वज्रासारखे आहे. मी वज्रदेही आहे हे जाणून वाघ, सिंह असे वनचर मला भक्षू शकत नाहीत. या हनुमंताला मृत्यू नाही; मला रामाच्या भेटीलाही जाता येईना; संन्यास सुद्धा घेता येईना. मग आता मी काय करावे?" सीता मरण पावली असे मानून हनुमंत अत्यंत व्यथित झाला आणि त्याला समाधान मिळेना. नंतर तो म्हणाला, "हे श्रीरघुनाथा, माझ्या संकटात मला पाव आणि मी आता काय करावे याविषयी माझा बुद्धिदाता हो." अशी विनंती करतानाच त्याला एक चांगली युक्ती सुचली की श्रीराम सर्वांच्या ठायी असतो. शिवाय श्रीराम एकपत्नीव्रत पाळतो, श्रीरामाची सेवा हीच तपसामग्री आहे, श्रीरामनाम जिभेवर खरोखर असते अशा व्यक्तीला अग्नी जाळेलच कसा! सीता ही तर श्रीरामव्रत पाळणारी आणि श्रीरामाची अनन्य भक्ती करणारी आहे. त्याच्यावर अनन्य प्रीती करणारी आहे, तेव्हा अग्नी तिला कसा जाळील? रावणाने शेपटीला आग लावली तर तीही अग्नीला जाळता आली नाही, मग श्रीरामाला प्रिय असणारी सीता तो कशी जाळू शकेल? श्रीरामप्रतापामुळे अग्नी हा सीतेला जाळणार नाही. मी रामाचा साधा दास असून, पाला खाणारा सामान्य वानर असून त्याला माझे शेपूट जाळता आले नाही तर तो चिन्मात्र सीतेला काय जाळणार! त्यातून अग्नीने सीतेला जाळलेच तर मी त्याला शिक्षा करीन." इतका मारुतीला क्रोध आला की त्याच्या डोक्याचे केस थरथरले; दात-दाढा करकरल्या; शेपटीचा आकडा वळला. अग्नीला शिक्षा करण्यासाठी तो खवळला.

मारुतीला वायूचे आश्वासन, पुन्हा सीता-भेट

वायूने आपला पुत्र मारुतीला कानात सांगितले की, "हनुमंता, अग्नी तुझा ज्येष्ठ बंधू आहे तेव्हा त्याला तू शासन करू नको. सीता तिकडे सुरक्षित आहे. अग्नीने सीतेला वंदन करून अशोकवनात निवांत ठेवली आहे." हे कानाने ऐकताच मारुतीच्या मनाला उल्हास वाटला. नंतर त्याने पित्याला लोटांगणाने वंदन करून आणि ज्येष्ठ बंधू अग्नीलाही वंदन करून, सीतेचे दर्शन घ्यायचे ठरवून उड्डाण केले. प्रत्यक्ष लंकेत आल्यावर त्याला हत्तीचे तुटलेले आणि जळालेले दात दिसले, संपूर्ण नगरीचा विध्वंस आढळला. विमानाकार मुख्य मंदिरे सर्वत्र जळून पडलेली दिसली. तसेच अग्नीच्या दाहक धर्माने पक्षी आणि मोर यांची पिसे गळून पडलेली त्याने पाहिली. शेपटीच्या आगीने जळलेले लंकाभुवन आणि न जळलेले अशोकवन पाहिल्यावर त्याला सीता दिसली. ती सुरक्षित असल्याचे दिसताच त्याने लोटांगण घातले. नंतर चरणवंदन करून त्याने आपल्या अश्रूंनी सीतेचे पाय धुतले. हनुमंताने मागे-पुढे होत सीतेचे निरीक्षण केले; पुनःपुन्हा तो तिला प्रयत्नपूर्वक निरखत होता. ती जळली नाही, पोळली नाही, तिच्या केसालाही जाळ लागलेला नाही, ती अगदी सुखरूप आहे असे पाहिल्यावर त्याने आनंदाने टाळ्या पिटल्या. तो आनंदाने नाचला. मारुतीने म्हटले "पुरुषार्थ सफल झाला, रामकार्य साधले. सीतेचा शोध इथे लागला आणि तिचे मनोगत समजले." नंतर सीतेच्या चरणावर मस्तक टेकवून मारुतीने तिला सांगितले, "माते, चिंता करू नको. मी श्रीरघुनाथाला घेऊन येईन. हे मी शपथ घेऊन सांगतो आहे." "मारुती हा श्रीरामाचा आप्त, माझाही मित्र आहे. त्याने वनात मला भेटून भवभयाचे निरसन केले आहे. अनेक समर्थ राक्षस मारून, लंकेची वाताहत करून, लंकानाथाला त्रस्त करून राम-पराक्रम प्रकट केला" असे सीता मनोमन म्हणाली.

हनुमंताने बोललेले ऐकल्यावर सीतेला अगदी पित्याची भेट झाल्यासारखे वाटून ती सुख आणि संतोष पावली. हनुमंताला दृष्टीपुढे पाहून तिला वाटले "जो संकटात रक्षण करतो तो हनुमंत आपला माता-पिता आहे. हनुमंत श्रीरघुनाथाला प्रिय आहे म्हणजे वेदशास्त्रार्थाच्या दृष्टीने मलाही पूज्य

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Trust and eGangotri

आहे.'' नंतर तिने मारुतीला म्हटले, ''लंकेत चौफेर आगी लावत हिंडून, युद्ध करून तू खूप दमला असशील; पण तुला विश्रांतीसाठी द्यायला माझ्याजवळ शेजबाज नाही. हनुमंता तुझी तेवढी सेवाही करता येऊ नये अशी मी अभागी आहे. तू आता एखाद्या आडवाजूला आज विश्रांती घे. नंतर प्रातःकाळी तू रघुपतीच्या भेटीला जा. एवढी माझी विनंती ऐक.'' सीतेचे बोलणे ऐकल्यावर मारुती हसत म्हणाला, ''हे माते, सावधानपणे माझ्या विश्रांतिस्थानाविषयी ऐक. जन्ममरणाच्या चक्राचा नाश करणाऱ्या त्या रामनामाची नित्य आवृत्ती करत राहणे हीच माझ्या सर्व श्रमांना विश्रांती आहे. जेव्हा मी रणात युद्ध करतो, तेव्हा मला सबाह्य रामनामाचे कवच असते. तसेच जेव्हा दुर्गम पथाने एकाकी जात असतो, तेव्हा मला निर्भय करणाऱ्या रामनामाची सोबत असते. आसनावर असताना, भोजन घेताना, शय्येवर असताना, नित्याच्या येण्या-जाण्यात राम हा सोबत असतो. जागृतीत वा स्वप्नातही तोच संगतीत असतो. हे पूर्ण सत्य आहे.'' ही हनुमंताने सांगितली त्याची स्थिती ऐकून त्याच्यावरून जीव ओवाळून टाकावा असे सीतेला वाटले. ती म्हणाली, ''मारुती तू तर सबाह्य श्रीरामभक्तीला अर्पण झालेला आहेस. तुझा जन्म धन्य आहे.'' हनुमंताची अकृत्रिम भक्ती पाहून सीता मनातून अत्यंत सुखावली. नंतर ती काहीशी अस्वस्थ झाली कारण आता मारुती जाईल आणि माघारी केव्हा येऊन भेटेल याची तिला चिंता वाटली. तेव्हा ती मारुतीला म्हणाली, ''तुझे प्रयाण होणार या विचाराने माझा प्राण जाईल असे मला वाटते आहे. मला माझे चित्त आवरता आवरत नाही. आणखी एक शंका चित्तात आली आहे तीही लक्ष देऊन ऐक.''

सीतेची शंका, मारुतीचे उत्तर

''कोट्यवधी वानरांचा समूह सागर ओलांडून या तटावर येऊन दशशिराचा वध कसा करणार? समुद्र उल्लंघनाची शक्ती गरुड, वायू आणि मारुती अशा तिघातच आहे. तिथे चवथा कोणी काही करणार नाही. सर्व नरवानर महासागर उल्लंघून कसे येणार? हीच खरी मला चिंता वाटते आहे. हनुमंता, रामकार्यासाठी सागर ओलांडणे हे तुझ्याच माथी आले; राक्षसांचा बीमोड करण्याचे आणि रावण, इंद्रजित यांनी तुझा धाक वाटून थरथर कापण्याचे तुझे सामर्थ्य हे अनुपम आहे.'' सीतेची शंकास्पद चिंता ऐकून मारुती म्हणाला. ''मी केवळ दास आहे, सेवक आहे, पण श्रीरामाच्या दुर्धर प्रतापाविषयी ऐक. श्रीरामाच्या भात्यात दुर्धर बाण आहेत; त्या बाणांवरून वाहून नरवानरांना श्रीराम सागरपार करील. श्रीरामचंद्र महाप्रतापी आहे. वानरसेनेच्या रांगा बाणांच्या टोकावर बसवून राम समुद्राच्या पैलतटी लंकेकडील तटावर आणील. श्रीराम आणि लक्ष्मण हे महान वीर धनुर्विद्येत अत्यंत श्रेष्ठ आहेत. ते प्रभावी बाणांचा वर्षाव करून रावणाचे दशकंठ छेदतील. रावण युद्धात पडला म्हणजे मग इंद्रजित, कुंभकर्ण हे मुख्य आणि अन्य प्रधान सरसकट राक्षसांसह भुईसपाट करतील. हे सर्व करण्यासाठी रघुनाथाला त्वरित येथे आणतो. याला विलंब लागणार नाही हे माझे त्रिवार सत्यवचन आहे. श्रीरामाची शपथ घेऊन, तुझा चरणस्पर्श करून सांगतो की मी रघुनंदन श्रीरामाला शीघ्र येथे आणीन. हे माझे प्रमाण आहे.'' हनुमंताने एवढे बोलून सीतेला आश्वासन देऊन, तिला नमन केले. त्यानंतर त्याने सागरावरून उड्डाण करण्याची सिध्दता केली. त्याचे नमन स्वीकारताना सीता गहिवरली. तेव्हा मारुतीने तिला शोधाविषयीचा निर्धार लक्षात घेऊन विनंती केली की, ''श्रीरामाचे ध्यान धरून सर्व चिंता सोडावी. त्यामुळे श्रीरघुनाथाची निश्चित प्राप्ती होऊन स्वानंदाचा उल्हास होईल. श्रीरामाचे ध्यान धरावे, देहभावाची चिंता सोडावी म्हणजे जीवाला जीवात ब्रह्मत्व मिळेल आणि हीच जीवाशिवांची विश्रांती आहे. चित्त, चिंता आणि चिंतन यांचा

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

त्याग करून श्रीरघुपती स्मरावा, त्यामुळे जीव-शिव परब्रह्म होतील. जीवाला जीवत्व आठवणार नाही, शिवत्व आठवणार नाही, असे होण्यासाठी नित्य श्रीरामाचे स्मरण करावे. श्रीरामाच्या आठवाने परब्रह्माचे ब्रह्मपण आठवते. हाच जीवाचा विसावा आहे हे लक्षात घे." हे हनुमंताचे बोलणे ऐकल्यावर सीता सुखसंपन्न झाली.

अध्याय एकविसावा

श्रीरामभक्तांचे माहात्म्य अगाध, गहन आणि अत्यंत पवित्र आहे. हनुमंताने जेव्हा लंकादहन केले, तेव्हा नंतर ती संपूर्ण सुवर्णाची झाली. श्रीरामभक्त जेव्हा रणकंदन करतात, तेव्हा ते सुखसंपन्नच होते. असे रामकृपेचे आणि रामभक्तीचे महिमान आहे. हनुमंताकडून लंका जाळिली गेली, त्यावेळी तिचा काळा कोळसा झाला नाही, उलट चौफेर सोने ओतल्यासारखी ती पीतप्रकाशाने शोभू लागली.

गजेन्द्राच्या उद्धाराची कथा

भगवंताच्या नामस्मरणाचे माहात्म्य असे की त्याच्या कृपेने गजेन्द्राचा उद्धार झाला. तसाच प्रसंग सुवर्णमय लंकेचा झाला. याविषयी योग्यांचा अग्रणी, ब्रह्मचर्याशिरोमणी, ज्ञानियांचा मुकुटमणी जो श्रीशुकमुनी त्याने सांगितलेली ही कथा आहे. श्रीशुकमुनी हा वैराग्याचा निधी, ज्ञानविज्ञानाचा सागर, सद्बुद्धीवान असून तो खरेपणाने ही कथा सांगत होता. त्याने ही कथा पांडवकुळदीपक, कौरवकुळनायक, ज्याने पाणी पिणेही सोडले आहे, त्या कथा श्रवणार्थ चातकासारखा उत्सुक झालेल्या परीक्षितीला सांगितली होती. परीक्षितीसाठी गजेन्द्राच्या उद्धाराची कथा श्रीशुकाने सांगताना गजाचे वसतीस्थान वर्णन केले.

त्रिकूट पर्वत, गंडकी गिरी, सरोवर

त्रिकूट नामक पर्वत हा दहा सहस्त्र अयुत, गंडकीपासून क्षीरसागरापर्यंत असा थोर होता. त्याचा पृथ्वीवर जेवढा विस्तार होता, तेवढीच त्यांची उंची होती. अगदी टोकाला त्रिकूट नावाची ती शिखरे होती. तो पर्वत शोभिवंत दिसत असे. त्या ठिकाणी रत्नांच्या धातूच्या खाणी होत्या; स्वच्छ पाण्याचे झरे होते; अनेक सरोवरे आणि पुष्करणी यांची तेथे विपुलता होती. पर्वताचे स्वतःचे महिमान त्याच्या विविध रंगच्छटांनी जाणवत होते. काळ्या, पांढऱ्या, सोनेरी अशा रंगच्छटा संपूर्ण पर्वतावर पसरून शोभा वाढवत होत्या. वृक्ष, वेली; वाघ, सिंह हे पशू, वानरे, भिन्न भिन्न जातींचे पक्षी; ऋषी-मुनींचे आश्रम, निर्मळ सरोवरे, विविध पक्षीगणांची किलबिल, वनगाईचे वस्तीस्थान यांमुळे तो पर्वत शोभायमान दिसत होता. पर्वतावरील लोहपाषाणातून लोह प्राप्त होत असे, तसेच नाना धातूंचे प्रवाह त्या पर्वतावर निर्माण होत होते. त्या पर्वताला जोडून असलेल्या गंडकीगिरीला लागून एक दरी होती. तिथे वने, उपवने असल्यामुळे ती शोभत होती. तिथले उपवन पाहून मनाला विश्रांती मिळते. सावली, शीतल सुगंधी वारा, कोकिळकूजन या सर्वांमुळे सुख वाटते. सर्व ऋतूंचे, फळांचे, फुलांचे त्या वनात नित्य सुख लाभत असल्याने ते अप्सरांचे क्रीडास्थान झाले आहे. अमृतस्वादाची फळे, कस्तुरीहून सुगंधी, मंजूळ ध्वनी करणारा मलयावरचा वारा यांचा आस्वाद घेत अप्सरा येथे क्रीडा करत आनंद लुटतात. कृष्णाच्या रंगाशी साम्य असणारे भ्रमर, फुलात प्रवेश करून, केंबी केशर, कुचुंबे यांचा ते सुखाने आस्वाद घेतात. देवदाराचे शोभायमान वृक्ष, पाटली, पारिजात, मंदार, कल्पतरू, चंदन असे वृक्ष तेथे होते. चंदन, चंपक, हरिचंदन, आम्रवन, अशोकवन, खर्जुरीवन, तालवन येथे नंदनवनाची शोभा आणत होते. रायकेळी, सोनकेळी, घमघमणाऱ्या कापूरकर्दळी, नारीकेळी यांनी त्या वनफळाला शोभा आणली होती. मधुवन, विमलार्जुन, औदुंबर, शोभिवंत द्राक्षमंडप, एकसारखे

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

जांबूळवृक्ष, पांढरे-काळे आणि उलण्याने रस वाहणारे ऊसफड, रसाळ बिनकाट्याच्या बोरी, साधे आणि राय आवळे, घमघमणारी फणसफळे, मोहाची फळे, निंबाचे शीतल वृक्ष सर्व व्याधी नष्ट करणारे होते. नेटके गुग्गुळ वृक्ष, वड, पिंपळ, पलाश, निंबोणी, नारिंग, पोफळी, कवठी अशा वृक्षांच्या विशाल रांगा तेथे होत्या. हे वृक्ष पिकलेल्या भरदार फळांनी युक्त होते. कांचनवृक्षासमान कोरांटी, वटवृक्षाहून थोर, पांढऱ्या, पिवळ्या फुलांनी सुंदर दिसत होते, महाळुंगे, सुगंधी देवदार, बिब्ब्याची झाडे, हिंगणबेटाची झाडे, बहुपुष्पी आणि फळांचे संभार असलेले असे वृक्ष आणि त्यांच्या असंख्य जाती, त्या पर्वताला शोभा आणत होत्या. त्या पर्वतावर ऋषी, मुनी, सिद्ध यांचे वास्तव्य होते.

त्या गिरिकंदरात एक अगाध सरोवर होते. त्यातील जल अमर्याद, पूर्ण होते. त्या पाण्याला कधी कमतरता नसे. त्या पाण्यात रातकमळे, पांढरी कमळे, सुवर्णकमळे शोभत होती. कुमुदे, कल्हारे, नीलकमळे, मल्लिका, शतपत्रे, कुड्मळे या सर्वांमुळे तिथले पाणी सुगंधी आणि स्वादिष्ट झाले होते. सर्व ऋतूत पुष्पांनी आणि फळांनी शोभणाऱ्या त्या सरोवरात जलचर आनंदाने क्रीडा करत असत. त्या जलचरात मत्स्य, कच्छ, हे पर्वताकार असून त्यांनाही ग्रासणारा एक गजवैरी प्रचंड मगर होता. तिथल्यावनात एक गजेंद्र राहात होता आणि तिथल्याच सरोवरात मगर राहात होता. त्या दोघांमध्ये ब्रह्मशापामुळे पूर्वापार वैर होते.

शापित राजा इंद्रद्युम्न आणि हूहू गंधर्व

फार पूर्वी इंद्रद्युम्न राजा ब्रह्मदेवाच्या शापाने गजेन्द्र झाला आणि दुर्धर हूहू गंधर्व हा ब्रह्मदेवाच्या शापाने नक्र म्हणजे मगर झाला. राजा इंद्रद्युम्न हा भगवद्भक्तिपरायण होता. तो या सरोवराकडे आला आणि ते एकान्त स्थळ पाहून तिथेच राहिला. राजा एकान्त आणि विश्रांती यांमुळे सुखावला आणि तेथे राहून तपश्चर्येचे व्रत पाळू लागला. त्रिकाळ स्नानसंध्या करत, केसांची जटाबंधने वळून, तो पूर्ण तापसत्व स्वीकारलेला तपस्वी झाला. एकदा तो त्याचा आराधनाकाळ लक्षात घेऊन, सरोवराच्या पाण्यात स्नान करून, आसन घालून बसला होता. त्याच वेळी अगस्तिमुनी आपल्या शिष्यपरिवारासमवेत आले. राजाने अगस्तींचा उठून आदरसत्कार केला नाही, तो आसन घालून ध्यानस्थ होऊन बसला. ऋषी येताहेत हे पाहून त्यांची उपेक्षा केली, नमन नाही, उठून आदरसत्कार केला नाही, स्वस्थ ध्यान लावून बसून राहिला. साधू हा सर्वांगी चैतन्यघन-ज्ञानस्वरूप-असतो. त्याची भक्ती न करता ध्यान धरून बसले तर तो ध्यानगर्व ठरतो आणि त्यामुळे अधःपतन होते. ज्याच्या ठायी ध्यानगर्व असतो आणि ज्ञानगर्वाने जो उद्धट बनतो, तसेच विद्यागर्व ज्याच्या देहात मुसमुसत असतो तो निश्चित अधःपाती ठरतो. साधू म्हणजे साक्षात् सच्चिदानंद व्यक्ती, ह्या साधूची उपेक्षा करून जर काल्पनिक मूर्ती ध्यानात आणून कोणी ध्यान करील तर त्याचे अधःपतनच होणार. जो साधूसज्जन उपेक्षून, प्रयत्नपूर्वक ध्यान धरेल; ते त्याचे ध्यान हानी करते आणि आपणच आपल्याला लुबाडले असे होते. ब्रह्मभाव नाही आणि ब्राह्मणी ध्यान धरणे, आपण सर्व भूतमात्रांच्या ठायी भगवद्भाव न बाळगणे, अशा प्रकारचे ध्यान व्यर्थ आहे. अशा प्रकारच्या ध्यानगर्वाने हानीच होते.

सर्वांभूती भगवद्भाव नाही, ब्राह्मणांच्या ठिकाणी ब्रह्मत्वभक्ती नाही, अशी राजाची खोटी ध्यानस्थिती पाहून अगस्तिमुनी संतापले. भगवद्ध्यानात राजा सावधान होता; परंतु साधुसज्जनांची त्याने उपेक्षा केली, त्यामुळे ध्यानस्थानामधे परम विघ्न पाहून मुनी रागावले. नंतर राजाचा ध्यानाभिमान उतरावा, त्याला पूर्ण भगवत्प्राप्ती व्हावी, असा शाप परम कृपाळू

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized By Sarayu Foundation Trust and eGangotri

अगस्तींनी उच्चारला. ते म्हणाले, "साधुसज्जनांविषयी गर्वबुद्धी बाळगल्याने तू गजत्व प्राप्त करून घेशील. तू एक उन्मत्त गज होशील." असे अगस्तींनी म्हणताच राजा हत्ती झाला. अभक्ती, ध्यानोन्मत्ती यांमुळे राजा त्या वनातला उन्मत्त, बलवान हत्ती झाला. राजा इंद्रद्युम्नाची जी गती झाली तशीच हूहू गंधर्वाची गती झाली. ब्रह्मशापाने तो मकर-नक्र-झाला. तिथल्या सरोवरात माध्याह्नकाळी देवऋषी स्नान करत असताना त्याचवेळी तेथे हूहू गंधर्व पाण्यातून गुप्तपणे आला. त्याने ऋषींचे पाय धरले. एखाद्या सुसरीने पाण्यात एखाद्याला अचानक येऊन झोंबावे, तसा तो अविवेकी गंधर्व ऋषींच्या पायांना झोंबला. तेव्हा ऋषी रागावले आणि त्यांनी शाप दिला की, "तू गुप्तरूपातला जळचर नक्र होशील.' हा शाप ऐकताच गंधर्व आणि इंद्रद्युम्न राजा हे दोघे उःशाप मागण्यासाठी हात जोडून विनंती करू लागले की, "आम्ही गर्वोन्मत्त झालो त्यामुळे आम्हाला ब्रह्मशाप प्राप्त झाला. आपण कृपावन्त, आहात आपण कृपावंत होऊन शापमुक्त करावे. आम्ही दोघे अत्यंत अपराधी आहोत. आपण कृपासागर, क्रोध न येणारे, अगाध बुद्धीचे आहात. तेव्हा आम्हाला उद्धरावे. आपण मायबापाहून जवळचे आप्त आहात. आम्हा अपराध्यांवर कृपा करून आम्हाला शापमुक्त करावे."

अशी प्रार्थना ऐकल्यावर ऋषींचे अंतःकरण द्रवले आणि त्यांनी उःशापाचा उच्चार केला. "एक जळात आणि एक जमिनीवर राहून एकमेकांचे पराक्रमी वैरी व्हाल. तुम्ही पाण्यात युद्ध कराल तेव्हा तुम्हाला ईश्वर पावेल. तुम्ही युद्ध करताना जेव्हा प्राणान्ताची स्थिती येईल तेव्हा भगवंत प्रसन्न होऊन तुम्हाला नित्य निर्मुक्त करील. तो श्रीहरी तुम्हाला, शापोन्मुक्त, जन्मोन्मुक्त, प्रपंचनिर्मुक्त करील." असे त्या समर्थ, कृपाळू ऋषींनी वरदान बोलून दाखविले. ब्रह्मज्ञानी हे क्रोधाने शाप देतात हे म्हणणे समूळ मिथ्या आहे. ऋषी हे कृपाळू, दीनोद्धारक असल्याने त्यांनी हे वरदवचन सांगून उद्धार केला. त्यांची उद्धार करण्याची पद्धतही नवलाईची असते. ते जन्ममरणाच्या फेऱ्यातून बाहेर काढतात. अशी त्या ऋषींच्या क्रोधामध्येही कृपेची थोरवी असते. ज्याप्रमाणे मातेचा राग हा वरून कठीण आणि आतून सुखकारक असतो; तसाच ब्रह्मज्ञानवंतांचा शाप असतो कारण त्यांच्या शापाने चिद्रूपता प्राप्त होते; पापक्षालन होऊन ब्रह्मप्राप्ती होते; ते संतुष्ट झाल्यावर काय देतील हे श्रुतिस्मृतींनाही अगम्य आहे. ऋषींनी वर बोलून झाल्यावर स्नान उरकले आणि ते निघून गेले. नंतर ऋषींच्या शापाने राजा इंद्रद्युम्न गजेन्द्र झाला आणि हूहू गंधर्व नक्र झाला. दोघेही महापराक्रमी असून एक जमिनीवर आणि एक जळात असे ते राहू लागले.

पाण्यामध्ये राहणारा नक्र महा बलवान होता. तिमिंगलासारखा मोठा मासा तो संपूर्ण गिळू शकत असे. सर्व जलचर त्याच्यापुढे भयग्रस्त होऊन कापत असत. जलकल्लोळात राहात असताना लहानसहान प्राणी त्याच्या गणतीत नसत; तो पर्वतप्राय मोठे मासेच खाई; असा तो पराक्रमी नक्र सुखात आणि संतोषात राहात होता. गजेन्द्र हा शापग्रस्त झाल्यापासून त्याची स्मृती गेली; तरी त्याला आपला वैरी सरोवराच्या पाण्यात राहतो हे नित्य स्मरणात असे; त्यामुळे तो पाण्यासाठी सरोवराकडे येत नसे. नक्रालाही नित्य हे स्मरण असे की गजेन्द्र हा आपला वैरी या वनात राहतो; त्यामुळे तो खाद्य मिळवण्याला सरोवराच्या बाहेर येत नसे. याप्रमाणे नक्र महाबळी सरोवरात आणि गजेन्द्र वनामध्ये बलवान, असे शापामुळे एक जळात आणि एक वनात राहात होते. गजेन्द्र गिरिकंदरात आपली मादी आणि पिले या परिवारासह वनामधे उन्मत्तपणे हिंडत, क्रीडा करत राही.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

गजेन्द्राला अपघात

एकदा चैत्र महिन्यात गजेन्द्राच्या खाण्यात एक वनस्पती आली. त्यामुळे त्याच्या गंडस्थळातून मद वाहू लागला. त्याच्या मदाच्या अतिरेकाने त्याला उन्माद चढला. त्या उन्मादामुळे तो गजेन्द्र वनात फिरू लागला. त्याने वेताचे वन-वेळू उपटून त्या वनाचा विध्वंस केला. मोठमोठे गगनाला स्पर्श करणारे वृक्ष, वेली, काटेसावरी, यांचा दाताच्या टोकाने समूळ नाश केला. दाताचे आघात करून त्याने पर्वताचे कडे पाडले. त्याच्या मदाच्या गंधाने वनसिंह पळवून लावले. गजेन्द्राच्या मदाचा वास घेतल्याने दिग्गज कापू लागले, सिंहांना मारणारा शरभ, वाघ, डुक्कर, अस्वल, कोल्हे, गौरवानर, लांडगे, गोचमरी शाल, ससे, मृग भीतीने पळू लागले. त्या पळून जाणाऱ्या पशूंना अभय देऊन थांबविले. ते सर्व पशू मदाचा दुर्धर दर्प सहन न झाल्यामुळे पाणी पिऊ लागले. पर्वतावरून चालताना बलवान गजेन्द्र पर्वतांना दडपून पाताळात रेटत गेला. त्यामुळे फणीदार सर्प चेपले गेले आणि सर्पकुळात आकांत झाला. अशा प्रकारे मदाच्या उन्मादात गजेन्द्र वनाचा नाश करत होता. चैत्रातल्या माध्याह्नीच्या उन्हाने गजेन्द्राचे गंडस्थळ पोळत होते. मादी, पिले आणि स्वतः गजेन्द्र हे सर्वजण उन्हामुळे अत्यंत त्रस्त झाले. ते सर्व तहानेने व्याकुळ होऊन पाण्यासाठी तळमळू लागले.

गजेन्द्र आणि त्याचा परिवार पूर्वीपासून पाच योजने दूर असलेल्या गंडकीचे पाणी पिण्यासाठी जात; पण नक्राच्या भयामुळे सरोवरातील पाण्याला स्पर्श करत नसत. यावेळी उन्हाच्या पोळण्याने गंडकीपर्यंत त्यांना जाववेना; सूर्यकिरणांच्या प्रखरतेने गजेन्द्राचे गंडस्थळ चांगलेच पोळले. सरोवराच्या आसमंतात आल्यावर तहान आणि भय यांनी तो त्रस्त झाला. गजेन्द्राच्या जिव्हारी धाक होता की आपण सरोवरात सोंड घातली तर आपला वैरी नक्र आपल्याला झोंबेल; असे पाणी पिताना त्याला भय वाटत होते. सोंड पाण्यात घालताच, गजाच्या मदाच्या वासाने भ्रमर तो मद खाण्यासाठी गंडस्थलाशी झोंबू लागले आणि भुंग्याचे समूह भोवती रुणझुण करू लागले. गजेन्द्राची मादी, पिले हे सर्वजण पाण्याची तहान लागल्याने पीडीत झाले होते. तेव्हा गजेन्द्रासह सर्वजण धावत सरोवरापाशी आले. ते सरोवर आकाराने मोठे असून त्यात निळसर स्वच्छ पाणी होते. त्यातील पाण्याला कमलाचा सुगंधी वास होता. त्याचे शीतल तुषार सर्वत्र उडत होते.

गजेन्द्र हा जळाबाहेर राहिला आणि सरोवरात सोंड घालून तो मनसोक्त पाणी प्यायला. त्याने सोंडेने पाणी घेऊन स्वतःच्या मस्तकावर शिंपडले. त्याला पाणी पायल्याने सर्व श्रम शांत झाल्याचे समाधान मिळाले. अंगावर पाणी शिंपडल्याने विश्रांती मिळाली. यामुळे त्याचा मद आणखी वाढला. तेव्हा त्याने सरोवरात प्रवेश करून उन्मादाने त्या पाण्यात क्रीडा करायला आरंभ केला. त्याने जलकल्लोळात कमळांचा विध्वंस केला. त्याचा परिवार पाण्यात शिरायला भीत होता म्हणून तोच सोंडेने पाणी घेऊन सर्वांना पाजत होता. प्रथम त्याने प्रिय पत्नीला पाणी पाजले, पत्नीने पुत्रांना पाजले. एखाद्या कुटुंबाचे गृहस्थाने पोषण करावे तसा प्रकार चालला. यामध्ये गजेन्द्र नक्रग्रहण विसरला. प्राणी आपले मरण विसरतो आणि काळ त्याला टिपतो, त्याप्रमाणे नक्राने गजेन्द्राला टिपले. ज्याप्रमाणे काळ अंत पाहून प्राण्याचा घात करतो, त्याप्रमाणे सरोवराच्या पाण्यात शिरलेल्या गजेन्द्राला नक्राने आवेशाने पकडले. मायावश झालेल्या गजेन्द्राने स्त्री-पुत्र यांच्या मोहात पडून, त्या भ्रांत अवस्थेत अपघात करून घेतला.

नक्र आणि गजेन्द्र यांची झुंज

अंगात देहलोभाचा मद, दुसरा बळाचा उन्माद आणि तिसरा गजमदाचा अहंकार या सर्वांमुळे गजेन्द्र मदांध झाला होता. ज्याला

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

जन्ममरणाचा महाबाध आठवत नाही तो मोहांध होऊन नरकात पडण्याचे भय बाळगत नाही; त्यामुळे तो मोहांध महामूर्ख ठरतो. वरील तीन प्रकारच्या मदाने मोहवश होऊन आणि स्त्रीलोभाने बुद्धिभ्रष्ट होऊन गजेन्द्र नक्राकडून होणाऱ्या घाताचे परिणाम विसरला आणि पाण्यात उतरून क्रीडा करू लागला. त्यावेळी नक्राने तातडीने येऊन गजेन्द्राचा पाय धरला. गजेन्द्राने ताकदीने नक्राला ओढून जमिनीवर आणून मारण्याचा प्रयत्न केला. नक्रही महाबलवान असल्याने त्याने जोरकस हिसका मारून गजेन्द्राला पाण्यात ओढले. त्यावेळी गजेन्द्राने युद्ध सुरू केले. नक्राला सोंडेत आवळले. नंतर आवेशाने सोंड नक्राच्या मस्तकावर हाणली; पण सोंड पाण्यावरच आपटली; कारण नक्र पाण्यात खाली होता. नक्राला सोंडेचे भय वाटत नव्हते. गजेन्द्राने सोंड पाण्यात बुडवताच नक्राने सोंडेचे टोक खुडले गजेन्द्र यामुळे दुःखी झाला. शिवाय मगराची मिठी सुटेना. नक्राला गजवर्म माहिती होते. त्याने अचूक संधी साधून सोंडेचा टोकाकडचा भाग नेमका कुरतडला. अपार रक्त प्रवाहित झाले आणि गजेन्द्र त्या व्यथेने कुरकुरू लागला.

गजेन्द्र जेव्हा नक्राला जमिनीवर ओढून आणायला पाहात होता, तेव्हा नक्र आपल्या बळाने गजेन्द्राला पाण्यात ओढू पाहात होता. असे त्या दोघांचे युद्ध हजार वर्षे चालले होते. हे हजार वर्षे चाललेले युद्ध दोघांची शक्ती समान असल्यामुळे चालले होते. हे पाहून देवादिक आश्चर्यचकित झाले. नक्राला पाण्यात आहार मिळत असे; गजेन्द्राला मात्र उपवास पडले. नक्राला जमिनीवर आणणे उपवासामुळे शक्ती क्षीण झाल्याने अशक्य झाले. शिवाय नक्राकडून सोंडेचे टोक कुरतडले जात असल्यामुळे गजेन्द्र कासावीस झाला. तेव्हा स्त्री पुत्रांना तो ओरडून सांगू लागला की "माझी शेपूट धरून मला ओढून पाण्याबाहेर काढा." यावर त्याची स्त्री-पुत्रांसह सर्वजण त्याचे शेपूट धरून शक्तीनिशी ओढू लागले. परंतु गजेन्द्र तिळभर हलला नाही की नक्राला ओढून काढणेही त्यांना शक्य झाले नाही. उलट नक्राने हिसका देताच गजेन्द्र स्त्री-पुत्रांसह सरोवराच्या पाण्यात ओढला गेला आणि पाण्यात ते बुडू लागले. तेव्हा नक्राच्या भयाने आणि पाण्याच्या त्रासाने गजेन्द्राला सोडून त्याचे आप्त लगबगीने तीरावर आले. स्त्री म्हणाली, "आमचे भाग्य थोर म्हणून पुत्र संकटातून इजा न होता सुखरूप तीरावर आले." गजेन्द्र नक्राने गिळला. स्त्री पुत्रांना म्हणाली, "गजेन्द्राविषयी विचार करू नका. जलसंकटात सापडू नका." असे पुत्रांवर कृपा करणाऱ्या मातेने पुत्रांच्या आयुष्याचा विचार करून, पतीला संकटात सोडून, सर्व पुत्रांना पाणी पाजून, वनाची वाट धरून, पुत्रांसह गमन केले.

गजेन्द्राने निराहार राहून, सहस्र वर्षे नक्राशी युद्ध चालू ठेवले. त्यामुळे तो क्षीण होत गेला. शरीरातली बळशक्ती, मनःशक्ती, प्राणशक्ती, इंद्रियशक्ती या सर्वांत क्षीणशक्ती असा गजेन्द्र झाला. तो क्षीणशक्ती गजेन्द्र स्त्री-पुत्रांना काकुळतीला येऊन विनवत असता आणि तो प्राणसंकटात असताना त्याची पत्नी त्याला सोडून गेली. शेवटी कोणीच आपल्या उपयोगी पडत नाहीत हेच खरे! गजेन्द्राने ममतेने सर्वांना पाळले, परंतु शेवटी सुहृदांनी त्याचा त्याग केला. "ज्येष्ठ, कनिष्ठ सर्व पत्नी शेवटी त्याग करून गेल्या. माझ्यासारखे दुर्धर बळ असलेले माझे शेकडो पुत्र अन्ती तोंड फिरवून गेले. खरोखर, पुत्र पत्नी कोणीच आपल्या कामाला येत नाहीत. सुहृद, प्रौढ, पुत्र त्यांनी माझी अडचण मानली नाही तिथे हत्तिणींची काय कथा? अन्ती प्राणान्त अवघडच!" सर्व आप्त निरुपयोगी असल्याने नक्रापासून सुटका करण्यासाठी गजेन्द्राने आपली सर्व शक्ती वापरली. अन्तकाळ सार्थकी लागावा म्हणून एक भगवंतच कृपा करतो. त्याच्या नामस्मरणाने मोक्षाचा सुकाळ होऊन प्रत्यक्ष

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

कृतान्त काळ स्वाधीन होतो. आदराने ज्याचे स्मरण केले असता जन्ममरण निःशेष थांबते, त्याच्या चरणी शरण गेले की संसाराचे बंधन छेदले जाते. जीव-शिवाहून पलीकडे, चारी वाचांच्यापेक्षा श्रेष्ठ, गुणागुणात अनिवार अशा भगवंताला सत्यतः शरण जावे. श्रीहरीला शरण गेल्याने देही असून देहातीत अवस्था येते; कळिकाळाचे दात पाडून, विषयांचा पदर फाडला जातो. श्रीरामनामाचे गुणगान केल्याने कर्मबंधन समूळ तोडले जाते; अन्तक यम पाया पडतो; तिथे नक्र बापडे काय होय. मला जी श्रीहरीची आठवण झाली ती त्याचीच कृपा; कारण हरीची कृपा झाल्याशिवाय आठवण होत नाही. गजेन्द्राने अशी योजना ठरवून निश्चित केली की, श्रीहरीचे स्मरण करावे. मन, बुद्धी, हृदय समाधानी ठेवून आपण स्वस्थ राहावे. नक्राने त्याला चिंताग्रस्त केले होते. तेव्हा ती चिंता सर्वथा नाहीशी व्हावी आणि धैर्याने चिंतारहित धारणा धरावी यासाठी त्याने परात्पर अशा शक्तीचे ध्यान करून जप केला. ज्यांच्यापाशी धैर्य नसते ते सहजपणे जन्ममरणाचे दास होतात. गजेन्द्राला पूर्वजन्मातील संस्कारांमुळे धैर्य असल्याने त्याने हरिस्मरण करण्यास आरंभ केला. पूर्वीची भजनाची परिपाठी आणि हरिस्मरणाने आलेली धृष्टी आणि पुष्टी यांमुळे मंत्राचा जम त्याच्या ओठी आला. त्यामुळे त्याच्या पोटात उल्हास दाटला.

अध्याय बाविसावा

गजेन्द्राच्या हृदयात सर्वज्ञ अंतरात्मा होता; त्याच्यामुळे बुद्धी आणि इंद्रिये सज्ञान झाली. होती; यामुळे त्याला काया, वाचा, मने नमन घडून तो अनन्य भावे भगवंताला शरण गेला. या शरणागतीमुळे देह-चिन्ह पालटते. इंद्रियांचे विपरीत ज्ञान नष्ट होते. भगवंतावरील अनन्य निष्ठेमुळे मन उन्मन होते; चित्त चैतन्यघन होते, बुद्धी समाधान पावते आणि अहम्‌पणा सोहम्‌मध्ये पूर्णपणे विरून जातो. भूतजात ब्रह्मस्वरूप होते; विषय तन्मात्र होतात; अनन्य शरणत्वाचे सूत्र म्हणजे संसार परब्रह्मरूप होतो. अर्थात् अनन्य शरणत्वासाठी सत्त्वसंपन्न भाग्य पाहिजे. तसे भाग्य गजेन्द्राला असल्याने त्याने भगवंताला नमन केले.

गजेन्द्रकृत भगवंतांना नमन

"ॐ कार हा पूर्णतः ब्रह्मरूप असून त्याला चैतन्यघन प्रकाशित करतो. अशा त्या भगवंताला काया, वाचा, मने अनन्य निष्ठेने मी नमन करतो. 'ओमित्येकाक्षरं ब्रह्म' हे स्वतः पुरुषोत्तम श्रीकृष्ण 'ओंकार ब्रह्मवेदबीजत्वे' असे म्हणून भगवद्‌गीतेचे वर्मच सांगतो. ॐकारबीज हे सनातन आहे. स्वरवर्ण उच्चार हा ब्रह्मपूर्ण आहे आणि भूतजात भौतिके चैतन्यघन आहेत; त्या भगवंताला माझे नमन असो. जो भगवंत या सर्वांचे आदिकारण आणि स्वतः कारणरहित आहे, अशा पुरुषोत्तमाला मी अनन्यभावाने शरण आहे. ब्रह्मा, विष्णू, महेश हे ज्याचे अंशांश असा तो परेशाचाही ईश त्याला माझे अनन्यत्त्वाने नमन,त्याचे ध्यान करू गेले की ध्येय ध्याता हे शून्य होतात आणि ध्यानानेच तो चैतन्यघन होतो त्याला माझे नमन. ज्याच्या ठायी सर्व भासते, ज्याच्यामुळे सर्व प्रकाशित होते, जो सर्वांठायी कोंदलेला आहे, जो आपणच सर्व काही असतो, त्याला नमन असो. ज्याप्रमाणे गुळाचे कारले केले असता देठ आणि काठी येथे गोडच लागते, त्याप्रमाणे हे सर्व निर्माण झालेले दिसते ते परब्रह्मरूपच असते. ज्याप्रमाणे साखरेचा नारळ असताना त्याची करवंटी काढू पाहणारे करंटे ठरतात, त्याप्रमाणे जे भासते ते सर्व चैतन्यच असा निश्चय न करणारे करंटेच ठरणार. त्या चैतन्याच्या ठिकाणी जो दोष गुण पाहतो तो नरकात जातो. मी गजेन्द्र मुनींच्या शापाने आत्मखूण पावलो आहे. जो मी-तूपणाच्या पलीकडे आहे, ज्याला जन्मही नाही आणि मरणही नाही त्या भगवंताला मी अनन्यभावाने शरण आहे."

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Muthulakshmi Research Academy

"भगवंताला जन्मकथा नाही मग त्याला रूप, नाम कसे असेल? देहाविना त्याला गुणदोष किंवा धर्म-अधर्म हे तरी कोठून असणार? तो भगवंत स्वलीलेने ब्रह्मा, विष्णू, महेश हे सर्व गुणकर्मानुसार अवतार घेतो. उत्पत्तीच्या काळी तो चतुरानन ब्रह्मदेव असतो; स्थितीच्या अवस्थेत विष्णू असतो आणि प्रलयाच्या प्रसंगी त्रिनेत्र महेश असतो; असे गुणकर्माने त्याला नामाधिधान प्राप्त होते. जो पेरतो, तोच रक्षण करतो आणि कापणीही तोच करतो. तसाच तो श्रीहरी गुणावताराने त्रिरूप होतो. नट हा जसा नानावेष धारण करून, त्याप्रमाणे भूमिका वटवून, तो वेष टाकून देतो, त्यामुळे त्याचे मूळ स्वरूप नष्ट होत नाही, तसाच प्रकार भगवंताच्या बाबतीत घडत असतो. नाना प्रकारचे अवतार धारण केले तरी त्या श्रीहरीला जन्मकथा नसते; त्याने घेतलेला अवतार संपविताना त्याला मरणवार्ताही नसते. तस्मै नमः परेशाय! माझ्यासारखे दीन, स्वार्थी, विमुख, पशूसमान तुला शरण आल्यावर तू पाशछेदन करतोस. नक्रपशुपाशाचे ग्रहण हे तर क्षुद्र आहे, त्याला कोण जुमानतो! कर्मपाश हा अत्यंत कठिण असतो तो कृपा करून तू तोडतोस. शरणागताचे पाश तोडल्यास ते स्वस्वरूपात लीन होतात; अशी कृपा करून तू आपले मुक्तपण त्यांना देतोस. त्यांची भ्रांती समूळ नष्ट करण्याच्या युक्तीने त्यांना तू त्यांची सहज मुक्ती देतोस. हे कृपावंत श्रीहरी तुला माझे अनन्यभावे नमन असो. तुला नमन केल्याने हे भगवंता आम्हाला सर्वां भूतांच्या ठिकाणी आप्तपणा जाणवतो. अंतरात्मा भगवंत सर्व भूतमात्रांच्या हृदयात प्रतिशरीरी नित्य नांदत असतो. अंतर्मुख दृष्टीने पाहणारास भगवंत हा दृश्य, द्रष्टा स्थितीने सर्वत्र कोंदला असल्याचे जाणवते. सनातन वृहद्ब्रह्म या नावाने भगवंत ओळखला जातो; त्याचे पाशबंधन तोडावे म्हणून त्याला अनन्य भावाने नमन. भगवंताची कृपा झाली नाही तर अहंममता सुटणार नाही."

"मला वाटते गृहस्थी हा एक खोडा असून, माझी पत्नी ही त्यात कठिण खीळ आहे. गृहसामग्री ही उत्तम प्रकारे, संपूर्ण होण्यासाठी विविध प्रकारे धन जोडले जाते. त्यात पुत्रांची आनंदसूचक पताका लावली म्हणजे ती खोड्यावर बेडी होते. मग लौकिक कर्म, स्वजन यांची आवड निर्माण होऊन खोडा आणि खीळ यावर बेडी पडून नंतर कंजुषपणाची हातकडी घातली जाते. अशा रीतीने कुटुंबाच्या धाडीची बंधने पडतात. त्यावर नित्य विषय भरडू लागतात. खोड्याची कठिण खीळ जी पत्नी तिचे कठिणपणाचे कौशल्य असे की आपल्या मातेला सोडून आपली पत्नीच आपल्याला आप्तसंबंधी वाटू लागते. मातृसेवा हे वेदविहित कृत्य सोडून, पत्नीच्या कामविषयक आसक्तीने आम्ही पुरुष वश होतो. ज्याप्रमाणे दरवेशाचे वानर त्याला वश असते, त्याप्रमाणे स्त्री पुरुषाला वश करते. ती नाचवेल तसा तो नाचतो; त्याला दुसरे काही करवत नाही. एखाद्या पाळीव कुत्र्यासारखा तो स्त्रीच्या अधीन होऊन राहतो. तिला डिवचले तर ती वसवसू लागते आणि दूर केले तर ती रुसून मौन धारण करते. मातेची सेवा हीच भुक्तिमुक्ती जे म्हणतात तेच आता स्त्रीकामाची आसक्ती धरून मातेचा त्याग करतात. मातृसेवा ही भुक्तिमुक्ती तर स्त्रीची आसक्ती ही नरकप्राप्ती असे म्हणणारे ज्ञातेही भ्रांत होऊन स्त्रीलाच आप्त समजतात. भ्रांतीमध्ये अहंभाव, पत्नी, पुत्र, गृह, धन, स्वजन, आशा असे सात पाश असतात. ज्याला सत्संगती नाही, त्याला रामनाम आठवत नाही. ते कर्मपाशातच गुंतून पडतात, त्यामुळे त्यांना हृदयस्थ भगवंताची भेट होत नाही. सात पाशांचे बंधन तोडण्यासाठी एकच

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

उपाय आहे, तो म्हणजे सत्संग. सत्संगाचा महिमा थोर आहे.''

श्रीकृष्ण आणि श्रीराम अवतारांची तुलना

''एक अजन्म (अयोनीसंभव) सोमवंशी तसाच दुसरा अयोनिज सूर्यवंशी असे त्यांचे जन्म. एकाने पूतनेचे, दुसऱ्याने ताटकेचे शोषण (नाश) केले. एकाने गुरुपुत्र आणला, तर एकाने आपल्या गुरूचा यज्ञ सिद्धीस नेला. एकाने गोवर्धन उचलला तर एकाने पाषाणाचा सेतू बांधला. एक मातेला सोडून गोकुळात गेला, एकाने राज्यत्याग करून दंडकारण्यातला वनवास स्वीकारला. कोणालाही न कळता कृष्णाने मथुरा द्वारकेला नेली; श्रीरामाने आपल्या सामर्थ्याने अयोध्या वैकुंठाला नेली. एकजण लोण्यासाठी मातेपुढे रडत होता तर दुसऱ्याला सीताविरहाचा शोक होऊन तो वनवासात रडत होता. एकाने फसवून कालयवन मारला, तसा दुसऱ्याने वाली फसवून मारला. कृष्णाने शिशुपाळादी दैत्य मारले; श्रीरामाने खर, दूषण राक्षस मारले. कृष्णाने कंस, चाणूर निर्दाळले; श्रीरामाने रावण, कुंभकर्ण यांचा वध केला. कृष्णाने उग्रसेनाला राज्यावर बसवले आणि श्रीरामाने विभीषणाला लंकेचे राज्य दिले. श्रीरामाचे एकपत्नी व्रत होते; श्रीकृष्ण स्त्रीया भोगून ब्रह्मचारी राहिला. कृष्णाने पृथ्वी आणि गोकुळ तारले; श्रीरामनामाने जगाचा उद्धार झाला. असे हरिकीर्तन करणारा जारजपुत्र व्यास पावन झाला; श्रीरामामुळे चोरट्या वाल्मीकीचे रामायण शिवाला वंदनीय झाले. त्या श्रीहरीची (अवतारातील) थोरवी वर्णन केल्यामुळे दोन्ही कवी महाकवी झाले. त्यांच्या ह्या गौरवग्रंथांमुळे सर्वांना मुक्ती प्राप्त झाली. अमंगलाला मंगल करणारी श्रीहरीची निर्मळ कीर्ती आहे. नामस्मरण हे मंगलाला मंगल करणारे असून श्रीहरीची कीर्ती सुमंगल आहे.''

श्रीरामनामाची महती

''श्रीरामनाम वारंवार घेत राहिल्याने कोट्यवधी दोषांचा नाश होतो. भुक्तिमुक्ती मागे लागतात आणि सृष्टी पावन होते. यमयातनेचे पितर निरंतर एकादशीच्या हरिजागराची चिंता करतात की आपल्या वंशात कोणी ते तत्परतेने करणारा असावा. कारण पुत्र, भावाचा मुलगा, कन्या, तिचा पुत्र म्हणजे नातू यांपैकी कोणी एकादशीचा हरिजागर केला तर त्यामुळे त्या पितरांवरचे यमप्रहार चुकतील. नामामुळे नरकातले उद्धरतात, स्वर्गस्थांना मुक्ती मिळते आणि ब्रह्मादिक देव कलियुगातल्या जन्माची इच्छा धरतात. कलियुगाची ख्याती थोर आहे; नामामुळे स्त्रिया आणि कनिष्ठ जाती उद्धारून त्यांनाही मुक्ती मिळते; अशी नामाची श्रेष्ठ कीर्ती आहे. नामस्मरणाला स्नानाचे, विधिविधानाचे बंधन नाही; आसनी, शयनी, भोजनी केव्हाही हरीचे नाम हे पवित्रच असते. अर्धवट निद्रेत असलेला, किंवा शय्येवर असलेला, कोणी नामस्मरण करील तर ब्रह्मादिकही त्याला वंदन करतात; कारण तो मुक्तीचे माहेरच असतो. नामाबरोबर जेव्हा टाळी वाजते, तेव्हा आशापाशांची होळी होते. नामसंकीर्तनाच्या समयी वनमाळी रंगून डोलत राहतो. हरिकीर्तनामध्ये भक्ताच्या अंतरात भगवंत नाचत असतो आणि चरणधूळीने विभूषित होऊन स्वानंदाने तो डोलत असतो.''

भगवंताचे हृद्‌गत्

''संकीर्तनाच्या अलोट सुखापुढे मला वैकुंठही नकोसे होते. सूर्यबिंबही मला सुख देऊ शकत नाही म्हणून तेही नकोसे वाटते. योग्यांच्या मनाकडून मागे वळून, मी कीर्तनाकडे धावतो. तिथेच अहोरात्र थांबून स्वानंदात रंगून जातो. मी भक्तांच्या प्रेमाने हरिकीर्तनाला जातो आणि मला

https://archive.org/details/muthulakshmiacademy

 CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Trust and eGangotri

कीर्तनसुखाची गोडी असून तिथे तल्लीनतेने नाचतो. हे गुपित भगवंतांनीच नारदाजवळ व्यक्त केले आहे. त्यामुळे तोही अहोरात्र हरिकीर्तनातच रंगून जातो. नामस्मरणाने महादोषी नित्यमुक्त होतो. यमलोकात त्यामुळे वस्ती कमी होते. काहीजण व्यर्थ तीर्थाच्या ठिकाणी उपवास, यमनियम आणि लंघन करत राहतात. नामस्मरणाने भुक्ती मिळत असल्याने, चित्रगुप्ताच्या वहीची पाने कोरीच राहतात, कारण हरिनामामुळे भक्त कर्मनिर्मुक्त झालेले असतात. रामनामाची शक्ती गहन असल्याने वहीची पाने चित्रगुप्ताकडून खोडली, फाडली जातात. त्याची सगळी वहीच स्पष्टपणे रामनामाने उघडी केलेली असते. आनंदघन श्रीरामनामाच्या कीर्तनाने श्रोते, वक्ते दोघेही आनंदात मग्न होतात. रामनामाच्या पारायणाने त्याला स्वरूपप्राप्ती झाली. ज्याच्या दृष्टीने त्रिजगतातील मायेची, खोटेपणाची प्रतीती आली. आदिब्रह्मा आणि इंद्रादी देव, लोकपाळादी अखिल विश्व, वेदान्तवाद, रूप, नाव हे रामनामाने मिथ्या ठरले. एका रामनामासाठी ब्रह्मादी देवांची ही स्थिती, ते मायावी सृष्टीत उडाले, अशी रामनामाची अगाध शक्ती आहे. रामनाम हेच चित्कळा असून, त्याचे हृदयकमळात प्रेम निर्माण झाले म्हणजे सर्व संसार हा तृणवत् होऊन डोळ्यात केवळ रामकळाच कोंदून राहते. रामनामाच्या ठिकाणीच विरक्ती, परम प्राप्ती, भुक्तिमुक्ती; असते हे निश्चित.''

रामनामाचे नित्य स्मरण केल्याने कल्पान्ता - एवढे पापही नष्ट होते; अद्भुत असे पुण्य निर्माण होते, जे नित्य-अनित्य अशांचा नाश करणारे आहे. रामनामस्मरण हे पूर्ण वैराग्य आणते; मग इंद्रलोक, ब्रह्मसदन हे स्वप्नाप्रमाणे खोटे ठरते आणि गहन वैराग्य या नामानेच प्राप्त होते. नित्य नामस्मरण करण्याने पुण्य हे भोगक्षयाने क्षीण होत नाही, उलट ते परिपूर्ण ब्रह्मप्राप्ती करून देते. नामस्मरणाने विरक्ती आल्यावर सद्गुरू हाच ब्रह्ममूर्ती असे जाणवते आणि त्यामुळे अभेदभक्ती निर्माण होऊन सर्वांभूती भगवंत हा भाव येतो. अभेद गुरुभक्तीचे ज्ञान मिळाले की सर्वांभूती भगवद्भजन ही जाण येते. त्यावर भूतभौतिक ही चैतन्यघन असल्याचे जाणवते आणि तेच ब्रह्मज्ञान असे समजून येते. अशा प्रकारे ब्रह्मस्थिती आली की जन्ममरण थांबते, सजीवांची भ्रांती नष्ट होते त्याचा परिणाम असा की येथे प्रपंच झाला होता, पुढे होईल, मागे होता हे सर्व मिथ्या वाटायला लागून, तो कल्पान्ती घडेल असेही मानणे होत नाही. अशी जी सहजस्थिती तीच सबीज भ्रांती नष्ट करून, पुरुषाला परमानंद प्राप्त करून देते. त्या परमानंद प्राप्तीमुळे पुन्हा मागे परतणे होत नाही. रामनामाच्या सतत स्मरणाने जडाला मुक्ती मिळते. रामनामस्मरणामुळे परमानंदाशी ऐक्य होते; सृष्टीत ब्रह्मरूप प्रकटते आणि आनंदच आनंद निर्माण होतो. ज्याच्या नामाचे असे माहात्म्य तो स्वामी जनीजनार्दन त्याला काया, वाचा, मने आणि अनन्य सद्भावाने शरण जावे. ही शरणागताची दीनवाणी ऐकताच तो कृपाळू, दीनोद्धारक जनार्दन धावून येतो.

गजेन्द्राचा भगवंताकडून उद्धार

श्रीशुक हर्षाने राजा परीक्षिताला म्हणाला, ''भगवंत दीनोद्धारासाठी त्वरेने कृपावंत होऊन आला. सगुण तेच निर्गुण आणि निर्गुण तेच सगुण, त्याच्या नामस्मरणाने पूर्ण ब्रह्मप्राप्ती होऊन, जगाचा उद्धार होतो. गजेन्द्राने सविशेष, निर्विशेष अशा स्थितीत राहून त्या कृपाळू अशा कृपामूर्ती श्रीपतीची स्तुतियुक्त प्रार्थना केली. इंद्र, ब्रह्मदेव, शंकर इत्यादी पदाभिमानी थोर थोर सुरवरांना गजेन्द्राचा उद्धार करवेना. त्या सर्व सुरवरांनी आपले सामर्थ्य परोपरीने वापरूनही गजेन्द्राची मुक्तता झाली नाही. त्या हृषिकेशीवाचून ते शक्य होईना. भिन्न इंद्रियांची सत्ता नित्य भगवंताच्या अधीन असल्याने त्याच्याशिवाय दीनांचा उद्धार

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized By Sarayu Foundation Trust and eGangotri

करणे कधीच शक्य नसते. तेव्हा सर्व सुरवरांनाही गजेन्द्राचा उद्धार करवत नाही असे पाहून स्वतः हृषिकेशी त्वरेने निघाला. गजेन्द्राचे स्तवन ऐकून, सुदर्शन हातात घेऊन, तातडीने गरुडावर चढून श्रीभगवान निघाला. सर्व जीवांचा जीव, सर्व देव ज्याचे अवयव असा सर्वात्मा श्रीकेशव स्वतः साहाय्यार्थ निघाला. तेव्हा गजेन्द्राचे स्तवन ऐकून गरुडवाहन येताना पाहून, देवांनी त्या दीनदयाळाचे दिव्य स्तवन केले. ते म्हणाले, "जयजयाजी दीनरक्षणा, जयजयाजी दीनपालना, जयजयाजी दीनोद्धरणा, कृपाळू पूर्णत्वे पूर्णा, जयजयाजी संसाराच्या निर्मात्या, जयजय संसारभाव समूळ निर्दाळणा, जयजय भवगजपंचानना जय जनार्दना जगद्‌गुरो" अशा शब्दात सुरवरांच्या तोंडून नानाप्रकारे स्तुती होत असताना त्यावेळी श्रीपती येत असलेला सुरवरांनी आपल्या विमानातून पाहिला.

मेघश्याम गरुडावर आरूढ असून गरुडाच्या दोन्ही पंखांची हालचाल होत होती ती रथंतरबृहत्साम, मनोरम सामगान करत होते. वामरथंतरसाम, दक्षिणपक्षबृहत्साम या गायनाच्या नादाने गरुडावरून येणारा पुरुषोत्तम स्वानंदात डोलू लागला. या छंदोमय नामाने स्वतः गरुडोत्तम हा स्वतःच्या गतीविषयी संभ्रमात पडला. पाठीवर भगवंत आणि दोन्ही हातात पाय धरून मुखाने श्रीहरिनाम स्मरण करत तो दोन्ही पंखांनी सामगीत गात होता. दोन हातात पाय, पाठीवर भगवंत, हृदयात श्रीराम, मुखात श्रीहरिनाम आणि दोन पंखात बृहत्साम अशी गरुडाची स्थिती होती. त्याच्या सबाह्य हरिभक्ती व्यापून होती. यासाठी छंदोमय गायनाने वेदानुवृत्तीचा अनुवाद सुरू होता, पर्वतांसह सागर यांची हरीशी तुलना केली असता ते तृणप्राय ठरतात. अशा श्रीहरीला गरुड अहोरात्र पाठीवर वाहात होता. तो गरुडारूढ भगवंत परमानंदात डोलत येत होता त्यावेळी त्याने ग्रहग्रस्त, आर्त गजेन्द्र पाहिला. तेव्हा श्रीहरी हातातले चक्र सरसावून गरुडाला म्हणाला, "तू शीघ्रगतीने मला गजेन्द्राच्या उद्धारासाठी घेऊन चल." मनाच्या वेगापेक्षा सहस्त्रपटीने गरुडाची गती असून, तो सर्वशक्तीनिशी जात होता, तरी त्याची गती भगवंताच्या मनाला येईना. गजेन्द्राचा उद्धार करण्यासाठी भगवंताला स्फुरण चढले होते, त्यामुळे त्याचे कंकणासह असलेले बाहू थरथरत होते आणि त्याला स्वतःचेच विस्मरण झाले होते. केस मोकळे सुटलेले, अंगावरचे रोम पिंजारलेले, फुले जमिनीवर पडत असलेली असा तो पराक्रमी भगवंत गजेन्द्राकडे निघाला होता.

भगवंताने गरुडावरून त्वरेने उडी घेऊन, जिथे गजेन्द्राला अटकाव झाला होता तेथे तो पोचला. गजेन्द्र त्यावेळी ग्रहग्रस्त, अत्यंत दीनवाणा झाला होता. तेव्हा गजेन्द्र जे करुणास्पद बोलला त्यामुळे भगवंत पावला. गजेन्द्र म्हणाला, "ह्या अगाध सरोवरात नक्राने गर्जना करून मज हत्तीवर आक्रमण केले आणि जळामध्ये पकडून, बळजबरीने पीडले आहे. मी संकटात सापडलेला पाहून माझ्या पत्नीने, पुत्रांनी, स्वजनांनी माझा त्याग केला आहे. शेवटी कोण कामाला येणार? मला ग्रहग्रस्त स्थितीत, संकटात सोडून, अवघे जल पिऊन 'आपण संकटातून वाचलो' असे म्हणत उल्हासाने वनात निघून गेले. माझा त्यांनी या प्रकारे त्याग केल्यावर मीही त्यांच्याविषयीची ममता सोडली. त्यावेळी मला स्मरण झाले की प्राणान्ताच्या प्रसंगात श्रीहरीच रक्षण करतो, कारण तो कृपाळू आहे. श्रीहरी हाच निश्चितपणे आपल्या अंतकाळातला सोयरा असतो." असे गजेन्द्राला त्याच्या आप्तांनी त्याग केल्यामुळे जाणवले. मोहममता पूर्णतया संपल्यामुळे त्याला नामस्मरणाविषयीची आवड निर्माण झाली. तो मोठ्या उल्हासाने, स्वानंदाने भगवंताचे आवडीने भजन करू लागला. भगवंताला काही अर्पण करावे असे वाटले; परंतु त्याचे संचितही त्याच्या हाती नव्हते. कारण, त्यावर स्त्रीपुरुषांची सत्ता असून,

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri / CC-0. Public Domain. Digitized By Sarayu Trust and Lakshmi Research Academy

स्वतः मागूनही ते देत नव्हते. अखेरच्या क्षणी काही मागितले तर त्याला अखेर वातभ्रम झाला म्हणून स्त्री-पुत्रांनी लुबाडले आणि त्याच्या संचिताऐवजी तोंडात माती घातली. आप्त म्हणाले, "हा आता मरेल, द्रव्य सारे खर्चील आणि आम्हाला भिकेला लावील. तेव्हा याचे बोलणे ऐकूच नये." असे हे सुहृद संचित लुबाडतात आणि गृहस्थ चरफडत मरतो. तीच गजेन्द्राची गत झाली.

श्रीहरीला अर्पण करण्यासाठी हाताशी किंवा जवळ काही नव्हते. थोडा शोध केल्यावर त्याला सरोवराच्या पाण्यातले कमळ दिसले. आपल्या सोंडेने त्याने कमळ मिळविले त्यामुळे त्याच्या मनाला खूप उत्साह वाटला. नंतर श्रीपतीचे स्मरण मोठ्याने करू पाहता त्याला जाणवले की आपली वाचा विकल झाली आहे. प्राणच विकल झाल्याने वाचाही विकल झाली, तरी पशूजन्म असूनही गजेन्द्र प्रेमळ, स्मरणशील होता. सोंडेने कमळ उचलून वर केल्यावर त्याला गरुडारूढ लक्ष्मीपती दिसला. शंख, चक्र हातात घेतलेला श्रीविष्णू पाहताच गजेन्द्र त्याला प्रेमभराने पाहात राहिला. दोघांची दृष्टभेट होताच मनात प्रेमभाव निर्माण होऊन, सृष्टी सुखाने कोंदली असल्याचे जाणवून गजेन्द्राला अनंत उत्साह आला. पूर्वी विकल असलेली वाचा श्रीहरिदर्शनाने मूळच्या सारखी होऊन अक्षर अन् अक्षर अविकलपणे सफळपणे बोलू लागली. 'अच्युत, अव्यय, अव्यक्त, व्यक्त-अव्यक्तत्वाने अनंत आणि स्वयंप्रकाशी नित्य असणारा, अजन्मा, अविनाशी असा भगवंत नराचे आधारस्थान असतो. यासाठीच त्याचे नाव नारायण आहे; अशा त्या भगवंताला नमन असो," ही गजेन्द्राची आर्त भावना व्यक्त झाली. तेव्हा तो कृपाळू भगवान गरुडासन सोडून, सरोवरात उडी घेऊन गजेन्द्राकडे आला. आपल्या चक्राने त्याने नक्राचे तोंड फोडले. परंतु तरीही नक्र गजेन्द्राची मगरमिठी सोडीना. रक्ताने न्हाऊन निघालेला नक्र गजेन्द्राला सोडत नव्हता कारण द्विजशापाने त्यांचे दृढ वैर होते. यावर कृपाळू भगवंताने दोन हात तळाशी घालून गजेन्द्राला त्वरित उचलून पाण्याबाहेर काढले. यावेळी भगवंताचा हात लागल्यामुळे गजेन्द्र आणि नक्र हे दोघे दांडगे शापमुक्त झाले. दोघेही सारख्या भाग्याचे भाग्यवंत ठरले. गजेन्द्र आणि नक्र या दोघांचा उद्धार झालेला. विमानातून सुरवर, भूतलावरून ऋषी आणि आकाशातून खेचर (आकाशात फिरणारे अशा अर्थी) पाहात होते. भगवंताने कृपा करून दोघांनाही सरोवराच्या बाहेर आणले आणि गजेन्द्राला विमानात घेऊन भगवंत जाऊ लागला, तेव्हा नक्र हसला. श्रीहरीने हसण्याचे कारण विचारल्यावर नक्राने आपले मनोगत व्यक्त केले.

नक्राची प्रार्थना आणि त्याचाही उद्धार

भगवंताने हसण्याचे कारण विचारल्यावर नक्र म्हणाला, "सर्वांभूती हरी समान आहे असे तर वेद-शास्त्रे-पुराणे गर्जून सांगत असतात; पण आज मी तुझे विषमपण पाहिले. गजेन्द्राचा उद्धार केलास आणि मला का उपेक्षिले? ही अत्यद्‌भुत विषमता पाहूनच मी हसलो." यावर श्रीहरीने स्वतःच सांगितले की," गजेन्द्राने माझे स्मरण केले; त्यामुळे त्याच्या पापपुण्याचे निर्दाळण झाले आणि त्याचा उद्धार झाला." नक्र पुढे म्हणाला, "तुझे दर्शन झाल्यावर माझे पाप क्षीण झाले नाही; म्हणजे मी पापबळाने भगवान जिंकला असे म्हणायला हवे. तुझ्या नामस्मरणाने पाप नष्ट होते ना; मग तुला पाहिल्यावर माझे पाप ढळले नाही. यावरून माझ्या पापाच्या भीतीने हरी पळाला, म्हणजे मीच गोविंदाला जिंकले. श्रीहरी सर्व पापांचा संहार करतो यामुळेच हरी हे नाव दिले गेले. माझ्या पापांची त्याहून थोरवी असून मी श्रीहरीला जिंकले आहे." अत्यंत वक्रोक्तीपूर्ण असे नक्राचे भाषण ऐकून भगवान संतुष्ट होऊन म्हणाला, "तुझे आत्मज्ञान पाहण्यासाठीच मी तुझी उपेक्षा

https://archive.org/details/muthulakshmiacademy / Bhavarth Ramayan

CC-0. In Public Domain. Digitized By Sarayu Foundation Trust and eGangotri

केली. माझे दर्शन तुला प्राप्त झाले त्यामुळेच तुला ही ज्ञानस्फूर्ती झाली आहे.'' एवढे बोलून श्रीपतीने गजेन्द्र आणि नक्र यांची भेट घडविली. नक्राने गजेन्द्राचे पाय धरून म्हटले, ''गजेन्द्रा तुझ्यामुळे मला श्रीपती भेटला.'' यावर गजेन्द्राने नक्रापुढे लोटांगण घातले आणि म्हटले, ''नक्रा तू माझे पाय धरून ठेवलेस, त्यामुळे मला श्रीभगवंताचे स्मरण झाले आणि तुझ्यामुळे माझा उद्धार झाला.'' अशा रीतीने एकमेकांनी एकमेकांचे उपकार मान्य केले; श्रीहरी खरोखर भेटला आणि पूर्वीच्या वैराचा उपशम झाला. ते म्हणाले, ''आपण दोघे पूर्वीचे सख्खे ब्राह्मणबंधू होतो; परंतु आपल्याला धनलोभाने शाप मिळाला आणि आपल्याला गज-नक्रपण प्राप्त झाले. त्या वैराचा आज शेवट होऊन आपल्याला पूर्ण विश्रांती मिळाली, आणि भगवंताची भेट झाली.'' श्रीहरीसमान समतेने दोघांनाही स्वरूपता प्राप्त झाली. ते भगवंतस्वरूपाशी एकता पावले.

श्यामवर्ण, कमलनयन, गुणलक्षण, रूपरेखा समसमान होऊन, दोघेही हरिरूप झाले. शंख, चक्र, गदा, पद्म, यांमुळे तिघे समसमान दिसू लागले. त्यामुळे त्यातला पुरुषोत्तम ओळखणे देवांनाही दुर्गम झाले. त्या तीन मूर्ती पाहून लक्ष्मी म्हणाली, ''यातल्या कोणाला भजावे. ब्रह्मादिक हेही आश्चर्य वाटून मूळमूर्ती कोणती अशा संभ्रमात पडले. श्रीभगवानाने संतुष्ट होऊन दोघांना संपूर्ण हरिरूप केले. पण भगवंताने त्यांना श्रीवत्सलांछन तेवढे दिले नाही कारण ''ते माझ्या हाती नाही'' असे तो म्हणाला. पुढे तो म्हणाला, ''ब्राह्मणाची दूषणे आणि त्याच्या लाथाही मी हृदयावर सहन केल्या. तेव्हा मला श्रीवत्स लाभले. वेदार्थाची ही सत्यवाक्यता आहे.'' ज्याला श्रीवत्सलांछन आहे तोच स्वामी श्रीभगवान; इतर ते भक्त त्याच्यासारखे हे साधू आणि सज्ञान यांच्या लक्षात येते. भगवद्‌भक्त इंद्रद्युम्नाचे उद्धरण केले; त्यावेळी त्या भक्ताचे चरण धरले म्हणून नक्राचा उद्धार झाला. जे जे भक्ताची संगत धरतात, ते ते भगवंताकडून तारले जातात; असे भागवत ग्रंथ गर्जून सांगतो. नक्राला अशामुळेच पदप्राप्ती झाली. कृपाळू श्रीभगवंत आपल्या भक्तांचा उद्धार करतो. सर्व भक्त त्याचा जयजयकार करतात आणि सुर पुष्पवृष्टी करतात.

गजेन्द्र, नक्र यांच्या प्रेतांची विल्हेवाट

गजेन्द्र आणि नक्र यांचे देह निष्प्राण पडलेले पाहून गरुड धापा टाकत वेगाने त्वरित त्या ठिकाणी आला; परंतु तेथे भगवंत असलेला दिसताच लाजला. तो भगवंताला म्हणाला, ''मला न सांगता हे श्रीपती, पुढे कसा गेलास?''त्यावर भगवंत म्हणाला, ''गरुडा, तुझी गती मंद असल्याने गजेन्द्रासाठी धावलो.'' हे स्वामींचे बोलणे ऐकून गरुडाला लाज वाटली आणि त्याने लोटांगण घालून श्रीहरीचे पाय धरले. गरुड म्हणाला. ''कृपामूर्ती श्रीकृष्णा (श्रीविष्णू) तूच आमच्या गतीची गती, शक्तीची शक्ती तूच आणि आमच्या मतीची मतीही तूच आहेस. वेगाने येताना मी भुकेने फार व्यथित झालो. तू कृपाळू भगवंत आहेस तेव्हा मला काही खायला दे.'' तेव्हा कृपावंत भगवंताने सांगितले, ''गज आणि नक्र यांचे गहन देह माझ्याच हातून पावन झाले आहेत, ते खाण्यासाठी घेऊन भक्षण कर.'' हे ऐकून गरुड तिथे आला; परंतु त्याला एक विपरीत दृश्य पाहावे लागले. भ्रूभंग पक्षी (गिधाडासारखा मांसाहारी पक्षी) हा वेगाने येऊन त्याने दोन्ही देह खाण्यासाठी धरले आहेत. भ्रूभंग पक्षी आकाशात भ्रमण करताना गजेन्द्र आणि नक्र एकत्र पाहिले आणि झडप घालून धरले आहेत असे गरुडाने लांबून पाहिले. गरूड वेगाने येत असल्याचे दिसताच भ्रूभंगाने दोन्ही देह घेऊन आकाशात उड्डाण केले. तळात गजेन्द्र, त्यावर नक्र आणि त्यांच्याहून मोठा भ्रूभंग, अशांना गरुडाने उचलला आणि ती विचित्र माळ आकाशात लोंबू लागली. गरुड भ्रूभंगाला

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Trust and eGangotri

भिडताच त्या पक्षाने गज आणि नक्र यांना सोडले. गरुडाने तिघांनाही आपल्या नखाच्या टोकाने धरले आणि तिघांसह आकाशात उडाला. काही वेळानंतर गरुडाने भ्रूभंगाला तोंडात धरले आणि नखांनी गज-नक्र यांना धरले. मग त्यांचे भक्षण करण्यासाठी स्वतःला योग्य स्थळ कोणते ते तो पाहू लागला.

कनकजांबूची गरुडाला विनंती

गरुडाला आपल्या दिशेने येत असल्याचे पाहून कनकजांबूने विचार केला की, "हरीच्या हस्तस्पर्शाने गज, नक्र पावन झाले. गरुड हा तर भगवद्भक्त, तेव्हा यांचा स्पर्श झाला म्हणजे मी नित्य मुक्ती मिळवीन. भक्त गजेन्द्राच्या संगतीने घातकी नक्र मुक्ती पावला. मीही यांच्या संगतीने मुक्ती पावेन. जे सत्संगतीला लागतात ते नित्य मुक्त होतात." या विचाराने कनकजांबूने गरुडाला विनविले. "शत योजने विस्तार असलेली माझी शाखा खूप मोठी आहे. हे पक्षीराजा गरुडा, या फांदीवर बसून तिहींचा आहार भक्षण कर. गरुड भुकेने पीडला होता. शिवाय तिघांसह उडल्याने दमलाही होता. त्यामुळे कनकजांबूची विनंती ऐकून तो लगेच फांदीवर बसला. गरुडाने पाहिले तेव्हा त्याला तो वृक्ष मेरू पर्वतासारखा भासला. त्या वृक्षाच्या शतसहस्र फांद्या सभोवार पसरल्या होत्या आणि त्या वृक्षाचा विस्तार शतयोजन होता. वृक्षावर शतसहस्र संख्येने पक्ष्यांची घरटी असून, फळाफुलांनी लगडलेल्या त्या वृक्षावर पक्षी विश्रांती घेत होते. गरुडाची थोरवी पाहण्यासाठी साठ सहस्र वालखिल्य ऋषी येऊन फांद्यांमध्ये गुप्तपणे राहिले. त्याच फांदीवर गरुड बसला होता. गरुड बसताच फांदी कडकड आवाज करत मोडली. गरुडाने शंकित दृष्टीने पाहिले तेव्हा त्याला ऋषी लोंबताना दिसले, त्या ऋषींची तोंडे खाली होती. त्यामुळे त्यांना इजा झाली तर आपण नरकात जाऊ अशी गरुडाला चिंता वाटली. तेव्हा डाव्या पायाने फांदी धरून उजव्या पायात गज, नक्र पकडून आणि तोंडात भ्रूभंग पक्षी धरून गरुड आकाशात उडाला. हे सर्व वजन घेऊन आकाशात फिरणारा गरुड स्वस्थपणे कोठे बसूही शकत नव्हता कारण त्यामुळे ऋषी दुखावतील ही भीती होती. आपण खाली बसलो तर सर्व भार ऋषींवर पडून त्यांचा नाश होईल अशा धाकामुळे गरुड आकाशातच फिरत राहिला. त्याला स्थस्थपणे खाता येत नव्हते की बसता येत नव्हते. तेव्हा त्याने श्रीहरीचे स्मरण केले. "मी महान् संकटात सापडलो आहे तेव्हा भगवंता लवकर पाव. मी आता काय करू? अनाथनाथा माझा उद्धार कर. आताच तू गजेन्द्राचा उद्धार केलास. मग मलाच कसा विसरलास? उडी घालून वेगाने येणे तुला शक्य आहे तर हे गोविंदा तू का रुसला आहेस? जनांना सबाह्य जनार्दन, तुझे नाव जगज्जीवन, मी अनाथदीन तरी तुझाच, म्हणून माझे विघ्न निवारण कर." गरूड श्रीहरीचा परम भक्त, त्याने आनंदाने नामस्मरण केले आणि नामापाशी भगवंत असतो. नाम ऐकून तो स्वानंदाने डोलत राहतो. हरिस्मरणाने विघ्नांचा नाश होतो. श्रीहरीने गरुडाचे समाधान कौशल्याने केले.

गरुडाची पिता कश्यपांशी भेट

गरुड आकाशात भ्रमण करत असताना त्याला तेजोराशी तपस्वी कश्यपांचे दर्शन झाले. गन्धमादन पर्वतात पिता कश्यप तपश्चर्या करत असल्याचे आकाशातून गरुडाने पाहिले. तो त्वरित कश्यपांपाशी गेला. गरुड येताना पाहताच कश्यपांना सर्व वृत्तान्त समजला. वालखिल्य ऋषींना पाहून कश्यपांनी लोटांगण घातले आणि त्यांना विनंती केली की, "गरुड हे माझे दीन अपत्य आहे, त्याच्यावर कृपा करावी. गरुडाच्या मनात आहे की परमामृत आणून मातेला निर्मुक्त करावे त्यासाठी तुम्ही त्याला सामर्थ्य द्यावे." ही कश्यपाची विनंती ऐकल्यावर ऋषी म्हणाले, "अरे, तू अनुष्ठान करत असल्याने तुला कळले नाही की गरुडाचे

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized By Sayamu Foundation Trust and eGangotri

केवढे सामर्थ्य आहे. त्याने माता केव्हाच मुक्त केली असून आता तो श्रीविष्णूचे वहन झाला आहे. गरुडाचे सामर्थ्य पाहण्यासाठी आम्ही फांदीवर बसलो. तेव्हा समजले की बलवानातला बलवान आहे आणि त्रिलोकात हा निश्चित विजयी होईल." नंतर कश्यपांना नमन करून, गरुडाला आशीर्वाद देऊन, वालखिल्य ऋषी बदरीला तपश्चर्या करण्यासाठी गेले. ऋषी गेलेले पाहून गरुडाला समाधान झाले. त्याने पित्याला नमन केले. पुढे तो कश्यपांना म्हणाला, "त्या वालखिल्य ऋषींसाठी मी खूप त्रस्त झालो आणि दमलो. तुझ्या भाषणाने मुक्त झालो. ऋषींना कष्ट होतील म्हणून मी ही फांदी आणली. ही कनकजांबू वृक्षाची फांदी बळकट असून, हिचा शतयोजने विस्तार आहे. आता ही कोठे ठेवावी आणि मी आहार कोठे घ्यावा?" कनकजांबू पाहून अनेक ब्राह्मण धनलोभाने ती तोडायला धावले; परंतु त्यांचे बळ चालेना. ते पाहून गरुडाने पुन्हा कश्यपांना विचारले की, "जिथे ब्राह्मण पोचणार नाहीत असे कोणते स्थान आहे, की जिथे ही शाखा ठेवून मी भूक भागविण्यासाठी भोजन करू शकेन." गरुडाला भूक लागली असल्याचे ऐकल्यावर कश्यपांना त्याची दया येऊन, त्यांनी त्याला दुर्गम असे एक स्थान सांगितले. ते स्थान मन आणि वाचा यांनाही अगम्य होते. ते म्हणाले, "दक्षिण समुद्रामध्ये एक सुनामी लंकापर्वत आहे, तेथे शाखा ठेवून, सुपुत्रा निवांत भोजन कर." कश्यापांचे भाषण ऐकल्यावर सुवर्णशाखा, गज, नक्र आणि भ्रूभंग पक्षी यांच्यासह गरुड उडाला आणि लंकेला येऊन पोचला.

लंकापठार हे निर्जन होते. गरुडाने सुवर्णशाखा तेथे ठेवून सावधानतेने हरिस्मरण करत भोजन केले. भ्रूभंग भक्षण करताना प्रत्येक घास कृष्णार्पण, नक्राचे भक्षण करताना ब्रह्मार्पण आणि गजेन्द्राचे भक्षण करताना प्रत्येक घासाच्या वेळी 'भोक्ता हृषिकेशी' म्हणत गरुड भोजन करत होता. भक्त जे जे सेवन करतो ते ते अर्थार्थ हरिस्मरणपूर्वक सावधानतेने करतो. गरुड भुकेने त्रासला होता; पण भोजन केल्याने परम तृप्त झाला आणि त्याने आनंदाने हरिस्मरण केले. फळ, मूळ, पाणी जे काही भक्त सेवन करतात ते सर्व ब्रह्मार्पण करतात, त्यामुळे त्यांना पूर्ण तृप्ती मिळते. अन्न ब्रह्म, अहम् ब्रह्म, हृदयात आत्माराम भोक्ता, कर्म परब्रह्म हे मर्म ज्यांनी जाणले ते धन्य होत. अशामध्ये जेव्हा सहस्रपर्यंत लोकांची पंगत बसते तेव्हा ती पवित्र होते असे वेदश्रुती सांगतात. सभाग्यालाच ही पंगत मिळते कारण तो हरिभक्त असतो. घासाघासाला ते हरिस्मरण करतात त्यांना भोक्ता श्रीभगवान असतो; त्यामुळे त्यांच्याकडे भोक्तेपण येत नाही. अशाच प्रयुक्तीने भोजन केले म्हणून गरुडाला परम तृप्ती लाभली. नंतर त्याने विश्रांती घेण्याची तयारी केली. मोठा भार वाहून महाबळी गरुड शिणला होता; त्यामुळे त्याने पंखांच्या खाली झोप घेतली. विश्रांती घेऊन गरुड शीघ्रगतीने गेला. भगवद्भक्ताच्या प्रयुक्तीने लंकेला भाग्यप्राप्ती झाली. गरुडाची तीक्ष्ण नखे लंकेमध्ये रुतली आणि जोरदार पाऊस पडल्यावर त्रिकूट हे खूप वाढले.

लंकेची निर्मिती, सुवर्णमय होणे

कुबेराची अलकावती रावणाने राहण्यासाठी हिरावून घेतल्यावर त्याला दूर करून प्रजापतीने त्याला लंकापती केला. स्वतः ब्रह्मदेवाने विश्वकर्म्यासह येऊन लंकाभुवन निर्माण केले. तसेच दुर्गम असा दारुण किल्लाही सिद्ध केला. विश्वकर्म्याने पर्वताचे कडे तासून त्रिकूट सज्ज केले; ते एवढे गहन होते की त्याचा मागे-पुढे संबंध लागू नये; चहूकडून ते दुर्धर होते. मागच्या बाजूला पडलंका; सुवेला लंकेपुढे शोभे; अवघड असा निकुंबळा गड दक्षिणेकडे होता. त्या लंकेच्या शिखरावर कनकशाखा होती. (हनुमंताने) शेपटीने आग लावल्यावर शाखा रसमय झाली. हनुमंताने

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sayajirao Research Academy

लंका जाळली पण सुवर्णाची झाली. भगवद्भक्ताचा आवाका असा असतो की दुःखदायक असते ते सुखरूप होते. बराच काळ शाखा तेथे पडून राहिली आणि शेवाळली जाऊन खडकप्राय झाली; त्यामुळे उपेक्षित राहून, कोणाचे तिच्याकडे लक्ष गेले नाही. वारा, मारुती, प्रलयाग्नी या तिघांनी लंका जाळल्यावर शाखा रसमय होऊन लंकाभुवन सुवर्णमय झाले. हनुमंताने जाळल्यावर शाखा सुवर्णरसमय झाली. तेव्हापासून लोकात सुवर्णलंका असे म्हणण्याची प्रथा पडली. मारुतीने लंकादहन केल्यावर लंका सोनेरीवर्णाची झाली. मग हनुमंताने सीतेकडे येऊन तिला नमन केले, आणि श्रीरामाच्या भेटीला जाण्यासाठी तिची आज्ञा त्वरेने देण्याची विनंती केली. आपल्या स्वामीच्या भेटीसाठी हनुमंताला स्फुरण आले. त्याचे बाहू उल्हासाने थरथरू लागले. त्याचे शेपूट आकाशात तळपू लागले. त्याने मनाने श्रीरामाला कवटाळले होते आणि सीतेच्या पायाशी त्याची श्रद्धा होती. तिला आज्ञा विचारून तो एकाग्रतेने तिष्ठत उभा होता. हे पाहून जानकीच्या चित्ताला आनंद झाला आणि उल्हासाने म्हणाली, "ऐक हनुमंता, मी तुला आशीर्वाद देऊन सांगते की लंकानाथाला मारण्यासाठी रघुनाथाला शीघ्र आण. मार्गात तुला कोणतेही संकट अडकाठी करू शकणार नाही. तू चिद्घन श्रीरामापाशी जाशील." सीतेचे बोलणे ऐकल्यावर हनुमंताने तिच्या पुढे लोटांगण घातले आणि तिचे चरणवंदन करून, उड्डाण केले.

अध्याय तेविसावा

हनुमंताने संपूर्ण लंकेचे दहन केले आणि जाताना सीतेचे दर्शन घेण्यासाठी तो परतून तिच्याकडे आला. सीता सर्वांगी सुखरूप आणि चित्ताने सावध असल्याचे पाहून त्याला आनंद झाला. सीतेचे सांत्वन करून नंतर तो श्रीरघुनाथाला भेटण्यासाठी शीघ्र उड्डाण करून निघाला. सागर उल्लंघून जात असता मारुती चौफेर न्याहाळत होता. तेव्हा त्याला अरिष्ट नावाचा पर्वत एकदम उंच वाढून मधे आलेला दिसला.

अरिष्ट पर्वताची वार्ता

हा पर्वत सर्व अरिष्टांचा आधार असल्याने त्याला ऋषीश्रेष्ठांनी अरिष्ट असे नाव दिले होते. दाही इंद्रियांना विक्षेप करणारा तो पर्वत दहायोजने रुंद, वासनेचा जेवढा विस्तार तेवढी त्याची उंची ही शतयोजने होती. जागृतीत, स्वप्नात आणि सुषुप्तीतही मारुती श्रीरामाचे स्मरण करत असल्याने तो निर्भयपणे अरिष्टगिरीच्या माथ्यावर चढला. तेथून नामस्मरणाच्या सामर्थ्याने मारुतीने पर्वताला लाथा मारल्या. श्रीरघुनाथाची पूर्ण कृपा त्याला प्राप्त झाली असल्यामुळे हनुमंताने पर्वताला लाथेने दडपून पृथ्वीत रेटला आणि भूमीसपाट केला. श्रीरामाच्या भजनात निष्ठा ठेवल्याने अरिष्टगिरी वृक्ष-शिखरांसकट भूमीत गाडून मारुतीने त्या पर्वताचे कूट केले. रामनामाने महापराक्रमी झालेल्या मारुतीने अरिष्टगिरीला धुळीला मिळविले.

श्रेष्ठ भाग्याची स्थिती म्हणून मनुष्यजन्म प्राप्त होतो. शुद्ध सत्वगुणाने सत्ववृत्ती आली म्हणजे ब्राह्मणजन्म मिळतो. अशात ज्यामुळे परब्रह्म हाती सापडते ती वेदशास्त्रव्युत्पत्ती आणि बुद्धी सोडून ते बुद्धिभ्रष्ट होऊन वागू लागतात. मुक्तत्वाचा खोटा अभिमान बाळगणारे ते बोलक्या वादामध्ये निपुण होतात. ते भगवद्भजन करत नाहीत आणि त्यामुळे त्यांचे अलोट अधःपतन होते. चांगला ब्रह्मप्राप्तीच्या घरी येऊनही मुक्ततेचा अभिमान त्या नराला लुबाडतो. भगवद्भजनाला पाठमोरा असणाऱ्या नराचे अधःपतन होते. भगवद्भजनाकडे पाठ केल्यामुळे त्याला जन्ममरणाच्या फेऱ्यात अडकावे लागते. कोट्यानुकोटी योनींमध्ये अडकण्याने त्याचा अधःपातच होतो. काही पाने वाचून झाली की लगेच 'घ्या माझी परीक्षा' असे तो म्हणतो; याला ज्ञान

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

म्हणायचे की ज्ञानाभिमान म्हणायचे! अशांचे अधःपतनच होणार. जे सज्ञान भक्त असतात ते अहम्, सोहम्, कोहम् असला अभिमान बाळगत नाहीत. त्यामुळे त्यांना संकटे बांधू शकत नाहीत. श्रीरामनामच विघ्नांचे दमन करते. त्या श्रीरामनामाच्या शक्तीने भक्तच संकटाच्या डोक्यावर चढतात. सकटांचा नाश करतात; असे रामनामाने सुख मिळते. ज्याप्रमाणे पक्षिणी आपल्या पिलांच्या मुखात चारा घालून त्यांचे पोषण करते त्याप्रमाणे भगवंत अहोरात्र आपल्या भक्तांचे रक्षण करतो. विघ्न हे जर नामाच्या आसपास फिरकत नाही, तर ते भक्तांपाशी कसे येईल. भगवंत भक्ताचे रक्षण करताना त्यांना निर्विघ्न करतो. विघ्न छळ करण्यासाठी येईल तर त्या विघ्नाचा आत्मा भगवंतच असल्यामुळे भक्तांसाठी ते विघ्न निर्विघ्न होते. भूते भक्तांना भगवद्रूप असतात. सर्वांभूती भगवद्भाव असेल तेथे विघ्नांना थारा नसतो. विघ्नातला विघ्नभाव नष्ट होऊन स्वतःच देवरूप होते. भगवद्भाव धरून जाणाऱ्या भक्तापुढे विघ्ने नतमस्तक होतात. अशी श्रीरामनामाने हरिभक्ती करणारा हनुमंत होता.

श्रीरामनामाने हनुमान बलवान होता. अरिष्ट पर्वत पायाखाली दडपून मारुतीने त्याची रांगोळी केली; त्याला धुळीला मिळवला. अरिष्टाचे भाग्य थोर म्हणून हनुमंताचा अंगठा लागताच त्याची माती विरून, तो परब्रह्मात प्रविष्ट झाला. हनुमंताच्या पायतली अरिष्टाचे भाग्य होते, त्यामुळे तो भूतली, पाताळी न उरता, तत्काळ परब्रह्मात मिळून गेला. दशशतसहस्र योजनांचा विस्तार असलेला अरिष्ट नावाचा पर्वतश्रेष्ठ हनुमंताकडून लाथ मारली जाताच उद्धरला गेला. अरिष्टाचा उद्धार श्रीरामभक्त वीर हनुमंताकडून झाला. जो जडाचा उद्धार करतो तोच खरोखर हरिभक्त म्हणावा. जो धरा म्हणजे पृथ्वी धरतो तोच धराधर (पर्वत) त्या अरिष्टाचा ऐक्याकार श्रीरामभजनाने मारुतीने केला. मारुतीने लाथ मारून अरिष्टाचे जडत्व घालवून त्याचे ऐक्य केले. हनुमंत हा जगदुद्धारक होता. हनुमंत समुद्र पार करण्यासाठी अरिष्टगिरीवर चढला. त्याच्या सामर्थ्याने पर्वत दडपला गेला. त्यामुळे पाताळातले सर्प दडपले गेले आणि काळे विषारी गरळ ओकू लागले. पर्वत दडपला गेल्याने त्यामधून पांढरे, पिवळे, लाल धातू पाझरू लागले. त्यांच्या रंगांनी वसंतातल्या फुलांप्रमाणे शोभा दिसू लागली. जसा पर्वत पंखांसह उडावा, तसा मारुती आकाशातून जात होता. त्यावेळी मारुतीचा बाहू छातीशी धरलेला होता. त्याचे उत्तरीय वस्त्र राजवस्त्राप्रमाणे दिसत होते. तो सुनीळ भासत असून मेघाप्रमाणे सावळा दिसत होता. मारुतीच्या अंगाला ढग भिडल्यानेच तो धनःश्याम झाला होता. त्यावेळी त्याला श्रीरामसरूपता आल्याचे सर्व सुरसिद्धांना भासले. नंतर मारुतीला महेंद्रपर्वत दिसला तेव्हा त्याच्या मनात हर्ष कोंदला. त्याने मग प्रलयकालच्या मेघांनी गडगडाट करावा तसा प्रचंड भुभुःकाराचा गजर केला. श्रीरामाच्या धनुष्यातून सुटलेल्या बाणासारखा मारुती वेगाने समुद्र ओलांडून जात होता. ते पाहून सुरासुर विस्मित झाले. या प्रसंगी आकाशात, सागरात आणि जिथे वानर थांबले होते त्या महेंद्र पर्वतावर हनुमंताच्या भुभुःकाराचा नाद कोंदला.

हनुमंताचे महेंद्र पर्वतावर आगमन

हनुमंताने केलेला भुभुःकार ऐकून महेंद्र पर्वतावर थांबलेले वानर सावध झाले एवढी हनुमंताची गर्जना गंभीर होती. ती अत्यंत अद्भुत गर्जना ऐकून जांबुवंत वानरांना म्हणाला, "अरे मारुती समुद्रपार करून, सीतेचा शोध लावून आला. सीतेचा शोध लागल्यानेच हर्षाने तो गर्जना करतो आहे." या नंतर अंगदादी वानरांमध्ये दूतचिन्ह सांगताना जांबुवंत म्हणाला, "दूताकडून कार्य साध्य झाले नाही तर त्याचे मुख्य लक्षण म्हणजे म्लानवदन असते. दूताच्या वाचेला मौन येते.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

मग ही एवढी गर्जना कुठली होणार. सीतेच्या शोधाचा कार्यभाग साधूनच हनुमंत परत आलेला असणार; त्यामुळेच तो आनंदाने गर्जना करतो आहे.'' असे जांबुवंताने निश्चितपणे सांगितले. पुढे तो म्हणाला, ''उरूवेग, बाहुवेग, लागवेग हे पाहता हनुमंत संपूर्ण कार्य साधूनच वेगाने येतो आहे.'' जांबुवंताने सांगितलेला इत्यर्थ ऐकून, सीतेचा शोध लागला, म्हणून सर्व वानर अत्यंत आनंदाने नाचू लागले. सीतेचा शोध लावून समुद्रापार आलेला मारुती इंद्रकीळ नीळपर्वताप्रमाणे शोभत होता. मारुतीला येताना पाहून आनंदित झालेले सर्व वानर हात जोडून उभे राहिले. फळे, फुले यांनी युक्त असलेल्या सुशोभित महेंद्र पर्वतावर वानर थांबलेल्या जागी हनुमंत वेगाने आला. त्याने एकाच उड्डाणात समुद्र ओलांडला होता. हनुमंताच्या वेगाबरोबर धावणारा वारा चक्रावून मागे राहिला. मनोवेगाहून अधिक वेगाने मारुती आला होता. चिद्रूप म्हणजे तो ज्ञानस्वरूप श्रीराम आठविल्याने हनुमंत धाप न लागता, घाम न येता, कंप न सुटता सुखरूप परतला होता. ज्याप्रमाणे श्रीरामाचा बाण कार्य साधून परत हातात येतो, त्याप्रमाणे मारुतीचे महेंद्र पर्वतावर आगमन झाले होते.

हनुमंताने नळ, नीळ, जांबुवंत, अंगदादी सर्व वानरवीर दिसताच आनंदाने रामनामाची गर्जना केली. 'श्रीराम जयराम' असा गजर मारुतीने आकाशात केला, तेव्हा वानरांनीही आनंदाने ''जय जय राम' असा नामोच्चार करत पर्वत दणाणून सोडला. 'श्रीराम जयराम' असा वानरांनी नामाचा गजर केला आणि त्या नादाने आकाश गर्जनेने भारून टाकत हनुमंत सप्रेम आला. हनुमंताच्या नामोच्चाराच्या नादाने आकाश, गिरिकंदर कोंदले; असा नामाचा गजर करतच हनुमंत आला. त्याने वानरगणही श्रीरामाचे नामस्मरण करत असल्याचे पाहताच लोटांगण घालून सर्वांना नमन केले. आपण सीतेचा शोध करून आलो याचा हनुमंताला गर्व नव्हता, त्यामुळेच त्याने सर्वांभूती भगवंत मानून प्रत्येकाला नमन केले. वृद्धगुरू जांबुवंताला प्रथम नमस्कार; राजकुमार अंगदाला नमस्कार; अशा प्रकारे योग्यतेची परंपरा राखून हनुमंताने सर्वांना वंदन केले. त्यामुळे पवनपुत्र मारुतीला पाहून सर्वांना आनंद झाला. नंतर हनुमंताचा सन्मान करून, त्याला मधे बसवून, सर्व वानर सीताशोधाविषयीची वार्ता ऐकण्यासाठी त्याच्या भोवती बसले. जांबुवंतांनी आणि इतर सर्वांनी हनुमंताचा सन्मान केला त्यामुळे हनुमंताला आनंद झाला आणि तो सीताशोधाची वार्ता सांगू लागला. ''लंकानगरी ही सागरात बसली आहे. तिथे रावण राज्य करतो आहे. नगरीत प्रवेश करताना अनेक अडथळे येतात. तेथे जाणे सुरासुरांनाही दुर्घट आहे. मी रामनामाच्या प्रभावाने उड्डाण करून लंका शोधली. तसेच त्रिकूट, नगरातली घरे धांडोळली. रावणाच्या स्वतःच्या भवनात मला अशोकवनात सीतादेवी भेटली. सीतेने हा मस्तकमणी खूण म्हणून देऊन मला परत पाठविले आहे.'' तो मण्याचा अलंकार पाहून सर्व वानरवीरांनी रामनामाचा गजर केला. ''हा मस्तकमण्याचा अलंकार सीतेने दिला तेव्हा याला खरोखर सीता भेटली'' असा विचार करून वानरांनी स्वानंदाने भुभुःकार केला.

सीतादेवी सापडली याचा हर्ष वाटून वानरगण या झाडावरून त्या झाडावर, या पर्वतावरून त्या पर्वतावर उड्या मारू लागले. वानरांच्या पांढऱ्या, निळ्या, तांबड्या शेपट्यांनी झाडाच्या फांद्या फुलून गेल्या. आकाशात जणू गुढ्या उभाराव्या तशा वानरांच्या शेपटांनी आकाशात शोभा आणली. फळा-फुलांनी लगडलेल्या फांद्यावरून आपल्या शेपट्या उंच आकाशात नाचवत वानरांनी आनंद व्यक्त केला. सीतेचा मस्तकमणी पाहण्यासाठी वानरांनी उड्या मारून एकच गर्दी केली. तो मणी पाहून सर्व वानर आनंदित होऊन आपली शेपूट उंचावून नाचू लागले. एकमेकांना धडक देत,

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

चापट्या मारत, धक्के देत, एकमेकांना पाडत वानर आपला आनंद व्यक्त करत होते. वाकुल्या दाखवत, लोळण घेत, एकमेकांना गुदगुल्या करत, कानांची ओढाताण करत वानरांची धडपड चालू होती. कौतुकाने गुडघ्यांनी ढुशी देत, बुक्या हाणत, वानर आपला आनंद व्यक्त करत होते. ते वानर एकमेकांचा निषेध करत, चिडवत, उपहास करत हर्षाने गर्जना करत होते. काहीजण वानर-स्वभावानुसार कलकलाट करत होते. काही रामनामाचा गजर करत होते, कोणी भुभु:कार करत होते. हनुमंताला कोण आधी वंदन करतो यासाठीच्या चढाओढीत ते असंख्य वानर उड्या मारत पुढे होऊन हनुमंताच्या पायावर डोके ठेवत होते. हनुमान वीर जगजेठी हा सहजगत्या सीतेचा शोध घेऊन परतला याविषयीच्या आनंदाने ते कोट्यवधी वानर नाचत होते. आपल्या शेपटीने निरनिराळ्या फांद्यांना कवटाळून ते वानर आकाशात शेपूट उभारून , तोंडाने सुखाचा उद्‌गार करत नाचत होते. सर्वांनी एकत्रितपणे रामनामाचा कल्लोळ करत, टाळ्या पिटत, हनुमंताच्या जवळ गर्दी केली. वानरांनी मारुतीची स्तुती करून, आलिंगन देऊन त्याला वंदन केले.

अंगदाकडून मारुतीला विनंती

युवराज अंगद, बुद्धिमान नळ, नीळ, पनस, जांबुवंत, गज, गवय, गवाक्ष यांसह समस्त वानरवीर सभोवार बसले आणि मध्यभागी हनुमंताला बसविला. हनुमंताच्या अंगावर असणारे घाव पाहून झुंझार वीर वानरांना आश्चर्य वाटले. "हनुमान हा वज्रदेही असूनही त्याच्या अंगावर हे घावांचे ओरखडे दिसताहेत त्याअर्थी दारुण युद्ध झाले असणार; पण मारुती काही सांगत नाही" असे त्यांना वाटले. इतर वानरवीरांनाही मारुती घावांनी जर्जर झालेला पाहून वाटले की मारुतीने अतिशय भयंकर आणि दुस्तर युद्ध केले असणार. तेव्हा हनुमंताने केलेले युद्ध ऐकण्यासाठी वानरांना स्फुरण आले. आता सीतेच्या शोधाविषयी प्रश्न विचारून त्याने केलेल्या युद्धाविषयी विचारावे असे त्यांनी ठरविले. "हा हनुमंत स्वतः बलाढ्य असून त्याने युद्धात केलेले आघात कोण सहन करणार. एखाद्या काटेरी झुडुपाने सिंहावर ओरखडे काढावे तसे याच्या शरीरावर हे शस्त्रांचे ओरखडे दिसत आहेत. तो आपला युद्धातला पराक्रम आपणहून सांगणार नाही. तेव्हा सीतेच्या शोधाविषयी प्रश्न विचारून, त्यातून युद्धाविषयीची वार्ता विचारावी हेच योग्य!"

यानंतर युवराज अंगदाने पवनपुत्र मारुतीला विचारले, "तुला श्रीरामाची पत्नी कशी भेटली ते मला सविस्तर सांग. कोणत्या भुवनात, कोणत्या ठिकाणी तुला सीतादेवी भेटली? मस्तकमणी काय कारणाने दिला? याविषयीची संपूर्ण वार्ता मला सांग." हे अंगदाचे प्रश्न ऐकून हनुमंताने सीताशोधाचे सविस्तर वर्णन सांगायला आरंभ केला.

हनुमंताकडून थोडक्यात निवेदन

अंगदाचे शुभवचन ऐकून मारुती हसला आणि सीतेच्या शोधाचे निमित्त करून गौरव सांगू लागला. "अंगदा समर्थ युवराजा, नळ, नील, जांबुवंत आणि तुम्ही समस्त वानरवीरहो ऐका. सीताशोधाची वार्ता मी तुम्हाला थोडक्यात सांगतो. लंकादुर्ग हा अत्यंत दुर्धर असून, त्याच्या सभोवार दुस्तर असा समुद्र आहे. त्यामध्ये रावणाचे लंकापुर नामक नगर आहे. तेथे प्रवेश करणे अत्यंत अवघड आहे. मी स्वतःही परम कष्टानेच जाऊ शकलो. कारण रामनामाने संकटाचे आणि विघ्नाचे निरसन होते. त्या नगरीत रावणाचा राजवाडा आहे. त्या वाड्यात गहन राणीवसा आहे. त्याच्या आत अशोकवन असून चिद्रत्न सीतादेवी तिथेच आहे. सीतेजवळ कराळ, विक्राळ, दारुण, भयानक राक्षसी संरक्षणार्थ ठेवल्या आहेत. तेथे मग कोण जाऊ शकणार? दुष्ट, दुर्मुख, दारुण असे ब्रह्मराक्षस रक्षकगण तेथे सात वेढ्यात पूर्ण

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

भेसूरपणे आहेत, मग तिथे कसे जाता येणार? अशोकवन इतके दुर्घट आहे की तेथे वाऱ्याला देखील शिरायला वाट नाही. अखेर तिथेही मी संकटे सोसून, मोठ्या कष्टाने प्रवेश केला. सीता मी स्वतःच्या डोळ्यांनी पाहिली; पण तिच्या भोवती राक्षसांचा वेढा होता. म्हणून मी तिची भेट न घेता वृक्षांच्या दाट झाडीत लपलो. सीतेचे त्यावेळचे दर्शन दुःखदायक होते. तिला अंथरूण-पांघरूण नव्हते. एकमेव वस्त्र तिने परिधान केलेले होते आणि तेही अत्यंत मळकट, घाणेरडे होते. ना स्नान, ना भोजन यामुळे घडलेल्या उपवासांनी ती दीन झाली होती. मंगलस्नान न केल्यामुळे तिची जटायुक्त वेणी वाळली होती. तरी धन्य त्या सीतेची की तिला जागृती, स्वप्नी, सुषुप्ती या सर्व अवस्थेत प्रेमाने श्रीरामभजन करण्याचे विस्मरण झाले नाही.''

''सीतादेवी सावधानतेने श्रीरामनामाचे स्मरण करत होती आणि तिच्याबरोबर तेथील वृक्ष, वेली, तृणपाती, पाषाण हेही श्रीरामनाम जपत होते. धन्य सीतेची रामभक्ती! सर्वेंद्रियांच्या ठायी श्रीरामस्फूर्ती, सर्वांभूती राम पाहणे, त्रिजगतात श्रीरामनाम ऐकणे, अशी तिची सहजस्थिती होती. श्रीरामाच्या भेटीची तीव्र आसक्ती असल्यामुळे तिने मला काकुळतीने श्रीराम भेटव अशी विनंती केली. त्यावर मी तिला गुह्य सांगितले की, श्रीरामाला तुझ्याविषयी प्रेम आहे. त्यासाठीच त्याने मला सीता कोठे आहे याचा शोध घेण्यासाठी पाठविले. तुझा शोध लागताच श्रीराम हा वानरांचा समुदाय घेऊन निश्चित येईल. मला श्रीरामाने खूण म्हणून ही मुद्रिका दिली आहे. ती मुद्रिका पाहताच सीता आनंदित झाली. तिने माझी पाठ थोपटली आणि तातडीने जाऊन श्रीरामाला शोध लागल्याचे सांग असे म्हणाली. नंतर तू माझा सखा जिवलग आहेस असे म्हणत माझ्या पायावर मस्तक टेकवले. पुढे तिने मला शीघ्र गतीने जाऊन श्रीरामाला घेऊन येण्याविषयी सांगितले. तेव्हा शीघ्र गतीने जाण्यापूर्वी मी तिच्याकडे खूण मागितली. त्यावर तिचा मस्तकमणी घेऊन मी तुमच्याकडे धावत आलो आहे. सीता लंकेत आहे हा निश्चित शोध घेऊन मी आलो आहे. तेव्हा मनात संशय न ठेवता आपण श्रीरघुनाथाला शोधाविषयी सांगायला जाऊ या.'' हनुमंताचे हे वचन ऐकल्यावरही वानरांची तळमळ काही थांबली नाही कारण मारुतीने केलेल्या युद्धाविषयी त्याने काहीच सांगितले नाही. आता यावर कोणता उपाय करावा याविषयी त्यांचा विचार सुरू झाला. हनुमंताचे निवेदन ऐकून अंगद सुखावला आणि म्हणाला, ''तू सीतेचा शोध लावून, रामाचे प्राण वाचविलेस. तसेच वानरांच्या कोट्यवधी प्राणसंकटात पडल्या होत्या, त्यांचे प्राण तू वाचवलेस. हे हनुमंता तुझे जीवित धन्य झाले. श्रीरामाला सीतेचा शोध लागल्याचे हा अंगद आनंदाने सांगू शकेल.'' अंगदाने असे म्हटल्यावर जांबुवंत म्हणाला, ''हा हनुमंत निधडा वीर आहे. त्याची लंकानाथाशी गाठ कशी पडली आणि तेव्हा युद्धकंदन का झाले. हे मारुतीने सांगावे.''

मारुतीऐवजी ब्रह्मदेवाकडून पराक्रम-लेख

जांबुवंत म्हणाला, ''हनुमंता, तत्त्वतः तू वज्रदेही असूनही, तुझ्या अंगावर शस्त्रांचे वार दिसताहेत, तेव्हा त्या युद्धाविषयी सांग. रावण हा क्रूर आणि कपटी आहे तर त्याच्याशी तुझी भेट कशी झाली? सीता संकटात असताना तुला भेटली तर त्याविषयीचेही सर्व गुह्य निवेदन कर. तुझा पिता पवन सांगत होता की तू इंद्रजिताला गांजलेस. पवनाने नीळाजवळ एकान्तात पुत्राचा पुरुषार्थ सांगितला. त्या युद्धाची समूळ कथा आणि समुद्रलंघनाची वार्ता कृपा करून आम्हाला सांग.'' या विषयाच्या प्रकारची पूर्वी हनुमंताला बुद्धी स्फुरली असता स्वमुखाने आपली कीर्ती सांगू नये असे त्याला वाटले होते. प्रत्यक्ष स्वामींनीच वार्ता विचारली तर ती लपवू नये. कारण अशा लपविण्याने दूषण लागते. तेव्हा आता काय करावे

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

असा मारुतीला प्रश्न पडला. स्वमुखाने कीर्ती सांगू नये आणि स्वामींची वंचना तर करू नये अशा संकटात सापडलेल्या मारुतीने मग ब्रह्मदेवाला विनंती केली. त्याने ब्रह्मदेवाला म्हटले, "मी आपल्याला वंदन करून पाया पडतो. लंकेमध्ये माझ्याकडून जे घडले ते सर्व आपण पत्रातून लिहून माझ्याकडे द्यावे. कारण स्वामींजवळ जो स्वपराक्रमाचे कौतुक सांगतो तो उन्मत्त आणि मूर्ख ठरतो. उलट स्वामींची फसवणूक केली तर तो अधःपतित होतो. असा स्वामींचा शास्त्रार्थ आहे. माझा असा कोणी सोबतीही नाही की जो माझा पराक्रम सांगू शकेल. त्यामुळे माझा मलाच हा गुंता पडला आहे. तेव्हा यासाठी मला पत्र द्यावे. ब्रह्माच्या हातचे लिहिलेले म्हणजे ब्रह्मलिखित ते श्रीरघुनाथ निश्चित सत्य मानील असे माझे मला वाटते."

हनुमंताची विनंती ऐकून चतुरानन ब्रह्मदेव हसला आणि मारुतीला प्रेमाने आलिंगन देऊन पत्र लिहून दिले. शूर, वीर, गुणगंभीर, शास्त्रवेत्ता, चतुर आणि समयोचित विचार करणारा निधडा असा हनुमंत असल्याने ब्रह्मदेवाने उल्हासाने मारुतीची आदरपूर्वक स्तुती केली. अत्यंत कीर्ती केलेली पत्रात लिहून प्रेमाने पत्र दिले. ते ब्रह्मपत्र घेऊन, हातात धरून, मारुती उड्डाण करून, सीतेला वंदन करून, वानरांकडे आला. जेव्हा जांबुवंताने पराक्रमाविषयी विचारले तेव्हा मारुतीने ब्रह्मलिखित पत्र त्याच्या हाती दिले. अस्वल जाती जांबुवंताला त्या पत्राचा अर्थ समजला नाही. त्यामुळे पुन्हा गुंता तसाच राहिला. लक्ष्मणाला वाचकशक्ती होती कारण तो तर शेषाचाच अवतार होता. श्रीरघुपती तर अर्थ जाणणाराच. इतरांना मात्र पत्रातला अर्थ समजेना. जांबुवंत हा बुद्धिमान होता त्यामुळे त्याने आपले अज्ञान वानरांना न कळेल अशी युक्ती केली. तो म्हणाला, "हे संपूर्ण ब्रह्मलिखित आहे तेव्हा श्रीरामावाचून पत्र वाचले तर दूषण लागेल, म्हणून पत्र घेऊन आपण रामाकडे जावे. श्रीरामाला आणि वानरराजा सुग्रीव यांना बसवून पत्र लक्ष्मणाला देऊन, त्याच्याकडून ते अर्थयुक्त वाचून घ्यावे." ही युक्ती सर्वांना मान्य झाली. श्रीरामाला भेटून, सीतेच्या शोधाविषयी सांगून, मगच पत्रार्थ वाचावा असे त्यांनी ठरविले. नंतर सर्व वानरांचा समूह उठला आणि त्यांनी श्रीरामाचा जयजयकार केला. श्रीरामाच्या दर्शनाने हनुमंताला अपार आनंद होईल. श्रीरामही सुखी होईल असा त्यांचा विचार झाला.

अध्याय चोविसावा

हनुमंताने सर्व वीरांना सांगितले की, "श्रीरामपत्नी सीता ही तपस्विनी असून तिने आपल्या कोपाग्नीने राक्षसांची वीर्यशक्ती भस्मसात केली आहे. रावणाची शक्ती म्हणजे तेजोराशी, पण त्यालाही सीतेने भस्मसात केले. आता रावणाला रणसंग्रामात मारण्यासाठी श्रीराम निमित्तमात्र आहे. सीतेच्या रागामुळे दशानन रावण जळून भस्म झाला असून सीतेने पतीला पूर्ण यश दिले असल्याने राम रावणाला मारील. सीतेने जाळला आणि श्रीरामाने मारला. अशा रीतीने सर्व राक्षसांचा नाश लंकेमध्येच क्षणात होईल". हनुमंताचे हे बोलणे ऐकल्यावर अंगदाला स्फुरण आले. तो म्हणाला, "सीतेने रावण जाळला, मग त्याला मारण्यात भय काय? मी अंगद एकटा त्या रावणाचा समूळ नाश करीन. त्याचे स्वजन, सुहृद, सखे, बंधू यांचा सैन्यासह वध करीन. जर श्रीराम सखा आणि सुहृद जगजेठी माझ्या पाठीमागे उभा असेल तर मी लंकेच्या त्रिकुटावर कोट्यवधी राक्षस मारीन. रावण, कुंभकर्ण, इंद्रजितासह सर्व राजपुत्र आणि सर्व प्रधान मारीन. राक्षसांच्या सेनासागराला ढवळून काढीन. हनुमंताने समर्थ वीर मारलेच आहेत. इंद्रजिताला अर्धमेला केला आहे. रावणाची वाताहत करून तो धुगधुगीने वाचला आहे. हनुमंतासह आम्ही तिथे गेलो की केवळ धाकानेच सर्व मरतील. मग लंकानाथ तो किती

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

भेसूरपणे आहेत, मग तिथे कसे जाता येणार? अशोकवन इतके दुर्घट आहे की तेथे वाऱ्याला देखील शिरायला वाट नाही. अखेर तिथेही मी संकटे सोसून, मोठ्या कष्टाने प्रवेश केला. सीता मी स्वतःच्या डोळ्यांनी पाहिली; पण तिच्या भोवती राक्षसांचा वेढा होता. म्हणून मी तिची भेट न घेता वृक्षांच्या दाट झाडीत लपलो. सीतेचे त्यावेळचे दर्शन दुःखदायक होते. तिला अंथरूण-पांघरूण नव्हते. एकमेव वस्त्र तिने परिधान केलेले होते आणि तेही अत्यंत मळकट, घाणेरडे होते. ना स्नान, ना भोजन यामुळे घडलेल्या उपवासांनी ती दीन झाली होती. मंगलस्नान न केल्यामुळे तिची जटायुक्त वेणी वाळली होती. तरी धन्य त्या सीतेची की तिला जागृती, स्वप्नी, सुषुप्ती या सर्व अवस्थेत प्रेमाने श्रीरामभजन करण्याचे विस्मरण झाले नाही.''

''सीतादेवी सावधानतेने श्रीरामनामाचे स्मरण करत होती आणि तिच्याबरोबर तेथील वृक्ष, वेली, तृणपाती, पाषाण हेही श्रीरामनाम जपत होते. धन्य सीतेची रामभक्ती! सर्वेंद्रियांच्या ठायी श्रीरामस्फूर्ती, सर्वांभूती राम पाहणे, त्रिजगतात श्रीरामनाम ऐकणे, अशी तिची सहजस्थिती होती. श्रीरामाच्या भेटीची तीव्र आसक्ती असल्यामुळे तिने मला काकुळतीने श्रीराम भेटव अशी विनंती केली. त्यावर मी तिला गुह्य सांगितले की, श्रीरामाला तुझ्याविषयी प्रेम आहे. त्यासाठीच त्याने मला सीता कोठे आहे याचा शोध घेण्यासाठी पाठविले. तुझा शोध लागताच श्रीराम हा वानरांचा समुदाय घेऊन निश्चित येईल. मला श्रीरामाने खूण म्हणून ही मुद्रिका दिली आहे. ती मुद्रिका पाहताच सीता आनंदित झाली. तिने माझी पाठ थोपटली आणि तातडीने जाऊन श्रीरामाला शोध लागल्याचे सांग असे म्हणाली. नंतर तू माझा सखा जिवलग आहेस असे म्हणत माझ्या पायावर मस्तक टेकवले. पुढे तिने मला शीघ्र गतीने जाऊन श्रीरामाला घेऊन येण्याविषयी सांगितले. तेव्हा शीघ्र गतीने जाण्यापूर्वी मी तिच्याकडे खूण मागितली. त्यावर तिचा मस्तकमणी घेऊन मी तुमच्याकडे धावत आलो आहे. सीता लंकेत आहे हा निश्चित शोध घेऊन मी आलो आहे. तेव्हा मनात संशय न ठेवता आपण श्रीरघुनाथाला शोधाविषयी सांगायला जाऊ या.'' हनुमंताचे हे वचन ऐकल्यावरही वानरांची तळमळ काही थांबली नाही कारण मारुतीने केलेल्या युद्धाविषयी त्याने काहीच सांगितले नाही. आता यावर कोणता उपाय करावा याविषयी त्यांचा विचार सुरू झाला. हनुमंताचे निवेदन ऐकून अंगद सुखावला आणि म्हणाला, ''तू सीतेचा शोध लावून, रामाचे प्राण वाचविलेस. तसेच वानरांच्या कोट्यवधी प्राणसंकटात पडल्या होत्या, त्यांचे प्राण तू वाचवलेस. हे हनुमंता तुझे जीवित धन्य झाले. श्रीरामाला सीतेचा शोध लागल्याचे हा अंगद आनंदाने सांगू शकेल.'' अंगदाने असे म्हटल्यावर जांबुवंत म्हणाला, ''हा हनुमंत निधडा वीर आहे. त्याची लंकानाथाशी गाठ कशी पडली आणि तेव्हा युद्धकंदन का झाले. हे मारुतीने सांगावे.''

मारुतीऐवजी ब्रह्मदेवाकडून पराक्रम-लेख

जांबुवंत म्हणाला, ''हनुमंता, तत्त्वतः तू वज्रदेही असूनही, तुझ्या अंगावर शस्त्रांचे वार दिसताहेत, तेव्हा त्या युद्धाविषयी सांग. रावण हा क्रूर आणि कपटी आहे तर त्याच्याशी तुझी भेट कशी झाली? सीता संकटात असताना तुला भेटली तर त्याविषयीचेही सर्व गुह्य निवेदन कर. तुझा पिता पवन सांगत होता की तू इंद्रजिताला गांजलेस. पवनाने नीळाजवळ एकान्तात पुत्राचा पुरुषार्थ सांगितला. त्या युद्धाची समूळ कथा आणि समुद्रलंघनाची वार्ता कृपा करून आम्हाला सांग.'' या विषयाच्या प्रकारची पूर्वी हनुमंताला बुद्धी स्फुरली असता स्वमुखाने आपली कीर्ती सांगू नये असे त्याला वाटले होते. प्रत्यक्ष स्वामींनीच वार्ता विचारली तर ती लपवू नये. कारण अशा लपविण्याने दूषण लागते. तेव्हा आता काय करावे

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

असा मारुतीला प्रश्न पडला. स्वमुखाने कीर्ती सांगू नये आणि स्वामींची वंचना तर करू नये अशा संकटात सापडलेल्या मारुतीने मग ब्रह्मदेवाला विनंती केली. त्याने ब्रह्मदेवाला म्हटले, "मी आपल्याला वंदन करून पाया पडतो. लंकेमध्ये माझ्याकडून जे घडले ते सर्व आपण पत्रातून लिहून माझ्याकडे द्यावे. कारण स्वामींजवळ जो स्वपराक्रमाचे कौतुक सांगतो तो उन्मत्त आणि मूर्ख ठरतो. उलट स्वामींची फसवणूक केली तर तो अधःपतित होतो. असा स्वामींचा शास्त्रार्थ आहे. माझा असा कोणी सोबतीही नाही की जो माझा पराक्रम सांगू शकेल. त्यामुळे माझा मलाच हा गुंता पडला आहे. तेव्हा यासाठी मला पत्र द्यावे. ब्रह्माच्या हातचे लिहिलेले म्हणजे ब्रह्मलिखित ते श्रीरघुनाथ निश्चित सत्य मानील असे माझे मला वाटते."

हनुमंताची विनंती ऐकून चतुरानन ब्रह्मदेव हसला आणि मारुतीला प्रेमाने आलिंगन देऊन पत्र लिहून दिले. शूर, वीर, गुणगंभीर, शास्त्रवेत्ता, चतुर आणि समयोचित विचार करणारा निधडा असा हनुमंत असल्याने ब्रह्मदेवाने उल्हासाने मारुतीची आदरपूर्वक स्तुती केली. अत्यंत कीर्ती केलेली पत्रात लिहून प्रेमाने पत्र दिले. ते ब्रह्मपत्र घेऊन, हातात धरून, मारुती उड्डाण करून, सीतेला वंदन करून, वानरांकडे आला. जेव्हा जांबुवंताने पराक्रमाविषयी विचारले तेव्हा मारुतीने ब्रह्मलिखित पत्र त्याच्या हाती दिले. अस्वल जाती जांबुवंताला त्या पत्राचा अर्थ समजला नाही. त्यामुळे पुन्हा गुंता तसाच राहिला. लक्ष्मणाला वाचकशक्ती होती कारण तो तर शेषाचाच अवतार होता. श्रीरघुपती तर अर्थ जाणणाराच. इतरांना मात्र पत्रातला अर्थ समजेना. जांबुवंत हा बुद्धिमान होता त्यामुळे त्याने आपले अज्ञान वानरांना न कळेल अशी युक्ती केली. तो म्हणाला, "हे संपूर्ण ब्रह्मलिखित आहे तेव्हा श्रीरामावाचून पत्र वाचले तर दूषण लागेल, म्हणून पत्र घेऊन आपण रामाकडे जावे. श्रीरामाला आणि वानरराजा सुग्रीव यांना बसवून पत्र लक्ष्मणाला देऊन, त्याच्याकडून ते अर्थयुक्त वाचून घ्यावे." ही युक्ती सर्वांना मान्य झाली. श्रीरामाला भेटून, सीतेच्या शोधाविषयी सांगून, मगच पत्रार्थ वाचावा असे त्यांनी ठरविले. नंतर सर्व वानरांचा समूह उठला आणि त्यांनी श्रीरामाचा जयजयकार केला. श्रीरामाच्या दर्शनाने हनुमंताला अपार आनंद होईल. श्रीरामही सुखी होईल असा त्यांचा विचार झाला.

अध्याय चोविसावा

हनुमंताने सर्व वीरांना सांगितले की, "श्रीरामपत्नी सीता ही तपस्विनी असून तिने आपल्या कोपाग्नीने राक्षसांची वीर्यशक्ती भस्मसात केली आहे. रावणाची शक्ती म्हणजे तेजोराशी, पण त्यालाही सीतेने भस्मसात केले. आता रावणाला रणसंग्रामात मारण्यासाठी श्रीराम निमित्तमात्र आहे. सीतेच्या रागामुळे दशानन रावण जळून भस्म झाला असून सीतेने पतीला पूर्ण यश दिले असल्याने राम रावणाला मारील. सीतेने जाळला आणि श्रीरामाने मारला. अशा रीतीने सर्व राक्षसांचा नाश लंकेमध्येच क्षणात होईल". हनुमंताचे हे बोलणे ऐकल्यावर अंगदाला स्फुरण आले. तो म्हणाला, "सीतेने रावण जाळला, मग त्याला मारण्यात भय काय? मी अगंद एकटा त्या रावणाचा समूळ नाश करीन. त्याचे स्वजन, सुहृद, सखे, बंधू यांचा सैन्यासह वध करीन. जर श्रीराम सखा आणि सुहृद जगजेठी माझ्या पाठीमागे उभा असेल तर मी लंकेच्या त्रिकुटावर कोट्यवधी राक्षस मारीन. रावण, कुंभकर्ण, इंद्रजितासह सर्व राजपुत्र आणि सर्व प्रधान मारीन. राक्षसांच्या सेनासागराला ढवळून काढीन. हनुमंताने समर्थ वीर मारलेच आहेत. इंद्रजिताला अर्धमेला केला आहे. रावणाची वाताहत करून तो धुगधुगीने वाचला आहे. हनुमंतासह आम्ही तिथे गेलो की केवळ धाकानेच सर्व मरतील. मग लंकानाथ तो किती

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

टिकणार. तेव्हा रणात रावणाला मारून, आपण सीतेला घेऊन, विजयी गर्जना करून, स्वानंदाने गुढी उभवू. सीतेला पुढे करून, श्रीरघुनाथाची श्रेष्ठ भेट घडवू. त्यामुळे वानरराजा सुग्रीवासह सर्वांनाच उल्हास वाटेल."

अंगद पुढे म्हणाला, "सीतेला न घेता रामाच्या भेटीला जाऊन आपण त्याला सांगणार काय? सीतेच्या शोधकार्याला बराच विलंब लागला असल्याने रामाच्या भेटीला जाताना आम्हाला लाज वाटते. रिकाम्या हाताने भेटीला गेलो तर पूर्वी जे रिकाम्या हाताने आले ते वीर आमची लाज काढतील; सुग्रीवही रागावेल. राम आणि लक्ष्मण म्हणतील, "वानरांची शक्ती करंटी आहे." तेव्हा माझी विनंती ऐकली नाहीत तर अशी विटंबना होईल. आधीच वेळेची मर्यादा ओलांडली गेली आहे; त्यात पुन्हा रिकामे जाऊ तर सुग्रीव संतापून आपला अपमान करील. तोंडाला काळे फासून गाढवावर बसवून, पायताणांचे हार घालून, शेणाच्या फुलांचे अभिसिंचन करून, फाल्गुनातल्या पद्धतीने (बोंब मारून) आपल्या स्तुतीचे स्तवन केले जाईल. यासाठी मी लोटांगण घालून तुम्हाला सर्व वानरांना विनंती करतो की सीतेशिवाय रघुनाथाच्या भेटीला न जावे हेच योग्य आहे. तिथे जाऊन अपमान सहन करण्यापेक्षा लंकेत जाऊन रावणाचा सैन्यासह नाश करून, सीतेला तातडीने घेऊन यावे." हे बोलत असताना अंगदाला स्फुरण आले. त्याच्या सर्वांगावर रोमांच थरथरून उभे राहिले. त्याचे शेपूट आकाशात तळपत राहिले. अंगदाचा रणआवेश पाहून हनुमंताने त्याला आलिंगन दिले. अंगदाचा शूर वीर पुरुषार्थी आवेश पाहून जांबुवंताने त्याला वंदन केले. सर्व वानरांनी अंगदाच्या पाया पडून युवराजाला शांत केला. नंतर जांबुवंताने युक्तिप्रयुक्तीने अंगदाला समजावले.

अंगदाचे पराक्रमाचे भाषण ऐकून, जांबुवंताने अंगदाची समजूत पटविण्यासाठी, पूर्वी ज्या गोष्टी ठरलेल्या होत्या त्या सांगायला आरंभ केला. "आम्हाला दक्षिणेकडे पाठविताना श्रीरामाने आणि सुग्रीवाने अशी आज्ञा केली होती की, तुम्ही एक महिन्याची मर्यादा पाळून सीतेच्या शोधाची वार्ता आणावी. रावणाला मारून सीतेला पाहून सीतेला शीघ्र घेऊन या अशी श्रीरामाची आज्ञा नाही. राजाज्ञाही तशी नाही. तेव्हा त्यांच्या आज्ञेविरुद्ध रावणाला मारले तर श्रीराम आणि सुग्रीव अतिशय रागावतील हे कारण लक्षात घे. रावणाला स्वतःच्या हाताने युद्धात मारून सीतेला आपण सोडवू अशी श्रीरामाने शपथ घेतली आहे. तेव्हा आपण रावणाला मारून सीतेला सोडवून आणली तर रामाच्या प्रतिज्ञेचा भंग होईल आणि मग तिघेही आपल्यावर संतापतील. श्रीरामाची प्रतिज्ञा खोटी ठरली तर सुग्रीव, लक्ष्मण आणि स्वतः श्रीराम अत्यंत कोपतील शिवाय रावणाला मारणे शक्य असताना हनुमंताने त्याला कशाला सोडले? रावणाला मारून आणि सीतेला घेऊन मारुती क्षणात आला असता. धन्य हनुमंताचे ज्ञान! त्याने श्रीरामाची मर्यादा पाळून, रावणाला न मारता केवळ सीतेचा शोध तेवढा आणला." असा जांबुवंताचा निश्चित विचार ऐकल्यावर अंगदाने त्याला वंदन करून म्हटले, "शूर, वीर, विवेकी, ज्ञानवंत असा तुझ्याहून कोणी नाही."

वानर परतताना मधुवनात जातात

जांबुवंताच्या सांगण्यावरून वानर सीतेच्या शोधाविषयी सांगायला श्रीरामाकडे शीघ्र निघाले. हनुमंताला पुढे ठेवून, अंगदादी सर्व वीर रामनामाची गर्जना करत भुभुःकारासह चालले. प्रथम श्रीरामाला, नंतर लक्ष्मण आणि सुग्रीव यांना लोटांगण घालून वंदन करावे असे ठरवून सीताशोधाची वार्ता सांगायला सर्व वानर सिद्ध झाले. महेंद्र पर्वतावरून वानरांनी उड्डाण केले त्यावेळी आकाश एकाहून एक सरस अशा वीरांनी भरून गेले. हस्तचित्रांचे आभाळ जसे रविमंडळाला आच्छादते तसे ते वानर उतावीळ होऊन निघाले

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

होते. वानरांनी उड्डाण करताच पर्वत धरणीत खचले आणि मोठमोठे वृक्ष समूळ उपटून आकाशात भिरभिरू लागले. उल्हास आणि आनंद व्यक्त करीत वानरसमूह जात असताना त्यांना वाटेत मधुवनातला सुगंध जाणवला. तो गंध नाकात शिरताच वानरांपैकी कोणाला लाळ सुटली, कोणी मिटक्या मारू लागले, त्यांची तळमळ सुरू झाली. "हे तर सुग्रीवाचे वन. दधिमुख त्याची राखण करतो आहे; तेव्हा येथे कोण प्रवेश करू शकणार? तर आता काय करायचे? सीताशोधाहून आम्हाला मधुवन अधिक महत्त्वाचे वाटते. रघुकुळटिळक श्रीरामाने कृपा करावी. श्रीराम सर्वात्मा सर्वज्ञ आहे असे पुराणे सांगतात. आम्हाला मधुपान दिले तर आम्ही तो श्रीराम सर्वज्ञ आहे हे सत्य मानू. हे श्रीरामा, मधू (मद्य) पिण्यासाठी जीभ वळवळते आहे, दोन्ही ओठांनी तोच ठेका घेतला आहे, मुखाला ग्लानी येते आहे. हे सुग्रीवाचे मधुवन असून सुरां-असुरांनाही ते अगम्य असे स्थान आहे. अशा या वनातले मधुपान आम्हाला कसे प्राप्त होणार? त्या मधुपानाची मनाला सतत टोचणी लागली आहे. चित्तात मधुपानाचेच चिंतन चालू आहे. ते मधुपान केल्या शिवाय मन हालतच नाही." असे ते सर्व वानर मधुपानाची आसक्ती धरून होते. श्रीरघुनाथाने कृपा केली तरच आपल्याला मधुपान करायला मिळेल अशी त्यांची श्रद्धा होती. राम सर्वांच्या हृदयात वास करतो, तेव्हा त्याने वानरांना अशी बुद्धी दिली की हनुमंताला विनंती करून त्याला अंगदाकडे मागणी करायला सांगावे. सुग्रीव हा वानरराज जसा, तसाच युवराज अंगद आहे. हनुमंताने मधुपान मागितले तर तो ते अवश्य देईल.

नंतर जांबुवंतादी सर्व वानर हनुमंताकडे आले आणि म्हणाले, "आम्हाला मधू चाखायला मिळावा म्हणून तू अंगदाकडे वन माग." तेव्हा हनुमंत अंगदाला म्हणाला, "मला तुझ्याकडे एक मागणी करायची आहे. तू तर आमचा युवराज आहेस. कृपा करून मला मागितलेले दे.' अंगद हनुमंताला म्हणाला, "हनुमंता, तुझ्या शब्दासाठी मी प्राणही देईन, तिथे इतर गोष्टींची काय कथा! सांग, आता तुला काय देऊ?" त्यावर हनुमंताने सांगितले, "हे वानरवीर, परक्या ठिकाणी राहून आणि आता वेगाने येऊन अत्यंत श्रमले आहेत. तेव्हा हे महाराजा, ते तुझ्याकडे मधुपानासाठी आज्ञा मागत आहेत." अंगदाने लगेच म्हटले, "हे वन माझ्या पित्याचे आहे, तेव्हा माझ्याकडेच त्याचा अधिकार आहे. वानर वनात जाऊन यथेष्ट मधुपान करू देत. बाल, वृद्ध, कर्म करू न शकणारे अशांना न मागताच राजा देत असतो, म्हणूनच त्याला दीनदयाळ ही बिरुदे शोभतात. तुम्ही सर्व तर कार्य केलेले आहात. मी तुम्ही काही न मागताच तुम्हाला माझे जीवन अर्पण करायला हवे. त्यापुढे मधुवनाची काय प्रौढी! हनुमंता, श्रीरामाची शपथ घेऊन सांगतो, वानरांनी वन धुंडाळून मधुपान करावे" यानंतर सोनेरी केसाच्या अंगदाने जांबुवंतादी प्रमुख वीरांना अलिंगन दिले; हनुमंताच्या पायाला वंदन केले आणि "सर्वांनी भरपूर मधुपान करावे." असे सांगितले. अंगदाच्या अनुज्ञेने वानरगण उल्हसित झाले आणि त्यांनी वनात प्रवेश करून, मधुपानास आरंभ केला. वानरांनी, "अंगद हा धैर्यवान, वीर, महाशूर असा उदार राजकुमार आहे. धन्य अंगदाची उदार कीर्ती, स्थिती!" अशी स्तुती केली. अंगदाची आज्ञा मिळताच वनात शिरून वनरक्षकांना मारहाण केली. त्यांच्या पृष्ठभागावर गुडघ्यांनी ठोसे दिले, आणि वनरक्षकांना बुकलून बाहेर घालविले.

वानरांचा धुमाकूळ-रक्षक दधिमुखाकडे

वानरांचा मार चुकविण्यासाठी रक्षक बारा वाटा, धाप लागेपर्यंत पळाले. ते थेट जाऊन दधिमुखाकडे पोचले. इकडे वानरांनी वनरक्षक गेल्यावर वन धुंडाळले, मधुर मधुप्राशन करत मिटक्या मारल्या. प्रत्येक वानर द्रोणातून मधू

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Muthulakshmi Research Academy

प्यायला. त्या मद्याच्या धुंदीत डुलत त्यांनी सर्व वन व्यापले. कोणी झाडांवर उड्या मारत, कोणी फांद्यात लपत, एकमेकांच्या डोक्यावर चढत, कोणी झाडाच्या टोकावर जाऊन नाचत होते. एखादा वृक्षाच्या तळाशी झोपला की कोणीतरी त्याच्या शेपटीखाली मद्याची पिचकारी मारत, असे ते वानर मद्याने विव्हळ आणि उन्मत्त झाले होते. मनसोक्त मधुप्राशनाने तृप्त झाल्यावर त्या वानरांनी मद्याचे शिंपण करण्याचा खेळ सुरू केला. एकमेकांना अडवणे, त्याच्या अंगावर मद्य टाकणे, शेपटीने कोणाला मारणे, कोणाच्या पाठीमागे लागणे, अडखळून पडणे, उन्मादात लोळणे असे अनेक प्रकारे त्यांचे खेळ चालू होते. काही वानर निवांत मद्यपान करत होते, तर काही कोशिंबिरीबरोबर मद्य खात होते. एकमेकांचे मद्यपात्र हिंसकावणे, त्यामुळे कोणाचे रडणे, कोणाचे पडणे, कोणी जागोजागी अडखळणे हेही चालू होते. मद्याच्या धुंदीत कोणी नाचत होते, कोणी रामकथा गात होते, कोणी रागावून रुसले, त्यांची कोणी समजूत घालत होते, कोणी मद्याने सुखावून, डोलत होते. एखादा कोणी मद्योन्मादाने धुंद होऊन हाका मारत होता, तर एखादा गोड गोष्टी सांगत होता. कोणी वनाची मोडतोड करण्यात गुंग होता. झाडे तोडणे, मद्यपात्रे उलथणे, मध गोळा करण्याची साधने फोडणे असे ह्या उन्माद आलेल्या वानरांचे विविध उद्योग आणि चाळे चालले होते.

वानरांनी त्रस्त केलेले, मारहाणीने दुःखी आणि विव्हळ झालेले वनरक्षक दधिमुखाकडे आले आणि त्यांनी गाऱ्हाणे सांगितले. "आमचे वानरवीर सर्व मिळून मधुवनाचा विध्वंस करत आहेत. आम्ही त्यांचे निवारण करू गेलो तर त्यांनी आम्हालाच दुःखी करून पळवून लावले. त्यांनी लाथा, बुक्या, जोराचे प्रहार केल्यावर शिळा, ताल, शाल यांनी ताडन केले. त्यांनी आपल्या गुडघ्यांनी आमच्या ढुंगणावर असे ठोसे दिले की ती जागा सुजली. जळो तुझे मधुवन, ढुंगणावरचे घाव कोण सोशील. ते घाव असे की शेपट्याच आत गेल्या." असे दधिमुखाला सांगून त्यांनी आपला पाठीकडचा भाग त्याला दाखवला. "तू आमचा स्वामी म्हणून तुला सर्व दुःख सांगितले. आता यावर जे करण्यासारखे आहे ते तू कर." हे त्या रक्षक वानरांचे कथन ऐकून दधिमुख क्रोधायमान झाला. आपले वानरसैन्य घेऊन तो मधुवनाकडे आला. "अंगद राजपुत्र असला, हनुमंत जरी जवळचा आप्त असला तरी जे राजाज्ञेचे उल्लंघन करतील त्या सर्वांना मी शिक्षा करीन. वाली-सुग्रीवांचा जो पिता ऋक्षराजा त्याच्यापासून मी या वनाचा रक्षणकर्ता आहे हे सर्व वानरांना माहिती आहे. तरीही मला न विचारता, राजाज्ञा न घेता, मधुवनात उद्धट वर्तन ज्यांनी केले त्या सर्वांना मी शासन करीन." असे वनरक्षकांना आश्वासन देऊन, आपल्या सेवकांना ज्यांनी त्रस्त केले, त्यांना शिक्षा करण्यासाठी दधिमुख क्रोधाने मधुवनात आला.

दधिमुखाचे आश्वासन ऐकल्यावर वानरवीर वनरक्षक शिळा, शाल, ताल घेऊन सगळे एकत्रित झाले. त्यांच्या ढुंगणावर बसलेल्या माराचा आणि सूज आल्याचा राग त्यांच्या मनात होताच. दधिमुखासह वनात येताच त्यांनी वानरांना आव्हानपूर्वक हाकारले. त्यावेळी जळ, स्थळ, वृक्ष, वन या सर्व ठिकाणी असलेले वानर सुग्रीवाच्या भीतीने अंगदापाशी धावत गोळा झाले आणि त्यांनी दुरूनच दधिमुख दाखविला. दधिमुख वीर मध्यभागी हातात प्रचंड शालवृक्ष घेऊन उभा होता आणि त्याच्या भोवती वानर-रक्षकांचा समुदाय होता. जांबुवंताच्या समान बळ असलेला दधिमुख पराक्रमी असून तो हातात वृक्ष घेऊन वानरांचा नाश करणार होता.

दधिमुखाची चाल आणि त्याचा पराभव

"सुग्रीवाची आज्ञा समर्थ असल्याने, मधुवनाची वाताहत केली म्हणून, शिक्षा देण्यासाठी या दधिमुखाला पाठविले आहे." असे वानरांनी

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Trust, Lucknow and eGangotri

अंगदाला सांगितले. दधिमुख अविचारी होता त्यामुळे त्याने अंगद, हनुमान इत्यादी बलवान वीरांचा विचार न घेता रागाच्या भरात वृक्ष फेकला. अंगदाने तो तमालवृक्ष वरच्यावर उड्डाण करून झेलला आणि तोच दधिमुखाला मारला. महावीर अंगद रागावला म्हणजे अत्यंत मदोन्मत्त आणि दुर्धर होई. त्यामुळे पित्याच्या मामाला मारू नये हाही विचार विसरला. दधिमुख हा वानर वृद्ध असून श्रेष्ठ, परमपूज्य हेही अंगदाच्या मनाला आठवले नाही. रागाच्या उन्मादाने त्याने दधिमुखाला वृक्ष मारला. दधिमुखाने मोठा वृक्ष मारताच अंगदाने डाव्या हाताने तो धरला आणि उजव्या हाताने दधिमुखाला मारून धरणीवर पाडले. दधिमुखाचे हातपाय वेडेवाकडे, अव्यवस्थ आणि विकल झाले, डोके फुटले, डोळे विस्फारले गेले; तो रक्तक्तबंबाळ होऊन त्याचे विक्राळ मुख विचकले. नंतर वानरांनी दधिमुखाला उचलून मधुवनाच्या बाहेर टाकले. वानरांनी त्याच्या अंगावर पाणी शिंपडले आणि वनरक्षकांनी वारा घातला. दधिमुख सावध झाला आणि वनरक्षकांना म्हणाला, "चला आपण सुग्रीवाला सांगायला जाऊ." दधिमुखाने आकाशात झेप घेतली आणि निमिषात सुग्रीवापुढे पोचला. त्यावेळी त्याच्याबरोबर वनरक्षकही होते.

सुग्रीवाला वृत्तान्त कथन, तो मर्म समजतो.

श्रीराम स्वामी, सौमित्र यांच्यापुढे वानर हात जोडून उभे राहिले. तिथेच वानरराजा सुग्रीवही बसला होता. सुग्रीवाची आज्ञा दुर्धर असून, त्या आज्ञेचे उल्लंघन झाले तर अणूभर अशा त्या कृतीसाठी तो अत्यंत कठोर शासन करत असे. नाक, कान खरडून काढून शिवाय तत्काळ गाढवावर बसवून धिंड काढत असे. दधिमुख ओक्साबोक्सी रडत सुग्रीवापुढे आडवा पडला. "वानरांनी अपमान केला आहे, तेव्हा त्यांचे पारिपत्य कर." दधिमुखाच्या या विनंतीवर सुग्रीव म्हणाला, "मी तुला अभय दिले आहे. कोणत्या वानरांनी कसा अपमान केला ते मला सविस्तर सांग पाहू." मग दधिमुख आपले दुःख सांगू लागला, "अंगद, हनुमंत इत्यादी मधुवनाचा विध्वंस करताहेत. राजासाठी असलेला मधू पीत आहेत. तुझा पिता जो ऋक्षराज त्याच्या वेळेपासून मी वनाचे रक्षण करतो आहे. वनावर माझाच अधिकार आहे. तू मागितलेस तरी मी देत नाही. आता तुझी राजाज्ञा न घेता आणि मलाही न विचारता त्यांनी मधुवनाचा विध्वंस केला आणि ते मद्यपानाने उन्मत्त झाले आहेत. राजपान असलेला स्वाद, सुगंध वानरांनी हातात घेऊन भक्षण करायला सुरुवात केली तेव्हा राजाज्ञेप्रमाणे त्यांना शिक्षा करायला रागाने मी धावून गेलो. त्यावेळी अंगदाने माझा उपमर्द करून वनात मला मूर्च्छित केले. वनकरांच्या ढुंगणावर गुडघ्याने आघात करून ती जागा सुजवली आहे. आता अनेक वनरक्षक वीर तेला-तुपाने ती जागा शेकत बसले असून निंदा आणि अपमानाने त्रस्त झाले आहेत. यासाठी आम्ही तुला शरण आलो आहोत. तू आमच्या डोक्यावर कृपावंत स्वामी असताना आम्ही अशा रीतीने गांजलो आता तू आमचा कैवारी होऊन स्वतःच राजाज्ञेचा उद्धार कर. राजाज्ञेचे सामर्थ्य दिसेल, आमचे दुःख निरसेल अशी शिक्षा त्या उद्धटांना दे." अशी दधिमुखाने विनंती केली.

दधिमुखाचे निवेदन ऐकल्यावर सुग्रीव आणि लक्ष्मण या दोघांनी कार्यकारण जाणून चिकित्सा केली. वानर परदेशी राहून क्षुधा आणि तृषा यांच्या उपवासाने पीडले असणार. शिवाय त्यांनी सीताशोधाचे कार्य साधले असणार म्हणूनच अंगदाने त्यांना मधुवन भक्षण करायला दिले असावे. कारण अंगद हा वीरश्रेष्ठ, विचारी राजपुत्र आहे. त्याने मोठेपणाने सीताशोधाचे कष्ट लक्षात घेऊन वानरांना मधुपान दिले असणार. सीतेचा शोध लावलेल्या वानरांचे सामर्थ्य वाढले असल्याने त्यांनी मधुवनात विध्वंस केला असावा.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

असा त्या दोघांनी-सुग्रीव आणि लक्ष्मण-निश्चितार्थ मान्य केला. ज्याचे कार्य साधत नाही, तो नेहमी हीन-दीन असतो. त्यांच्या काळवंडलेल्या मुखातून शब्दही निघत नाही. ज्याला कार्य साधले नाही त्याला तोंड दाखवायची लाज वाटते आणि तो काळाठिक्कर पडतो. त्याला सामर्थ्य असत नाही. सीताशोधाचे कार्य निश्चित साधले म्हणूनच वानरांनी मधुवनामध्ये वनरक्षकांशी मारामारी करून त्यांची दुर्दशा केली. शिवाय तिथे जांबुवंत मंत्री, अत्यंत अद्‌भुत वीर अंगद होते, हनुमंताने सीतेचा शोध लावला हे निश्चित. हनुमंताने जानकीचा शोध लावून कार्यसिद्धी केली असणार. त्यामुळे प्रबळ हनुमंत आणि सर्व विजयी वानर तसे वागले. हनुमंताविना इतरांना सीता चिद्रत्न शोधणे साधणार नाही. त्या निमित्तानेच वानरांनी मधुवन भक्षण केले. सीतेच्या शोधाचे कार्य सिद्धीला गेले असा निश्चय सुग्रीव आणि लक्ष्मण यांनी मानून ते कृतकल्याणाने संतुष्ट झाले.

नंतर सुग्रीव दधिमुखाला म्हणाला, "तू तर अत्यंत मूर्ख आहेस. हनुमंताला न विचारता तू त्यांच्याशी एकदम युद्ध कशाला केलेस. हनुमंत हा काही मद्यपानी नव्हे आणि तो तुझा आप्तही आहे. त्याला वृत्तान्त न विचारता एकाएकी युद्धकंदनाचा अनर्थ का केलास? सीतेच्या शोधाचे कार्य साधून वानरगण मधुपानासाठी वनात आले यामुळे आम्ही सुखसंपन्न झालो आहोत. तुझा जो अपमान झाला तो तू माझ्यासाठी क्षमा करून, अंगदाला भेटून, त्याच्याशी सलोखा कर." यावर सीतेचा शोध घेऊन वानरगण वनात आले यामुळे दधिमुख आनंदित झाला, त्याने सुग्रीवाला वंदन केले. नंतर वनरक्षक वानरांना घेऊन दधिमुख परतला आणि त्याने 'माझाच अपराध झाला' असे म्हणत अंगदाला दंडवत घातले. आणि 'मला क्षमा करावी' अशी विनंती केली. अंगद म्हणाला, "उन्मादाच्या अवस्थेत अपमान झाला असेल तर तो मला आता आठवत नाही. तेव्हा खरोखर क्षमा करावी." मग अंगद आणि दधिमुख यांनी परस्परांना अभिवंदन, आलिंगन देऊन एकमेकांचे समाधान केले. दधिमुखाने अंगदाला म्हटले, "तुम्ही सीतेचा शोध लावून आलात यामुळे सुग्रीवाला अत्यंत सुख झाले असून, त्याने तुम्हाला त्वरेने श्रीरामाच्या भेटीसाठी यायला सांगितले आहे." मधुवनातले वानर श्रीरामाच्या प्रेमाने भारावले होते. जरी मद्यपानाने ते उन्मत्त झाले होते तरी रामनाम स्मरत विव्हळत होते. एक मद्याच्या उन्मादात रामनामाच्या हाका देत होता. एक रामनाम घेत डोलत होता, एक रामनाम घेत होता. रामनाम घेताना एक अडखळत होता; एक नामाने ओरडत होता, एक मद्याच्या धुंदीत नाचत होता, एक धुंदीत गाणे गात होता, ते नाचताना आणि गाताना रामनाम स्मरत होते. सगळे वानर असे मद्याच्या उन्मादात असले तरी हनुमान रामकार्यासाठी उत्सुक होता. त्यामुळे श्रीरामाला वंदन करण्यासाठी तो त्वरेने निघाला.

अध्याय पंचविसावा

श्रीरामाच्या मनात चिंता होती. "वानर दक्षिणेकडे जाऊन मर्यादेपेक्षा जास्त काळ लोटला तरी कोणीच सीतेच्या शोधाची वार्ता आणली नाही. माझ्याशी एकान्तात भेट घेऊन मुद्रिका-अंगठी घेऊन हनुमन्त गेला, तोही त्वरित का आला नाही? हनुमंत हा कार्यकर्ता आहे असा मला भरवसा होता, तरी तोही एवढी वाट पाहूनही कसा आला नाही." ही श्रीरामाची चिंता मारुतीला समजली आणि सीताशोधाची वार्ता सांगण्यासाठी त्वरेने निघाला. श्रीरामाची चिंता हनुमंताने अंगद आणि जांबुवंत यांना सांगितली तेव्हा ते म्हणाले, "हनुमंता, कोणाच्या घासाआड येऊ नये. आता आम्हाला तृप्त होऊ दे. वानरगण दीन आणि त्रस्त आहेत; भाग्याने त्यांना मधुपान मिळाले आहे; त्यामध्ये आता तू अडथळा आणू नकोस. तू दीनदयाळ, सज्ञान आहेस." हे ऐकल्यावर

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri
CC-0. Public Domain. Digitized by Muthulakshmi Research Academy

हनुमंताने विचार केला की, "विषयरस भोगापुढे परमार्थ समूळ नष्ट होतो. वानर मद्यपानाने वेडे झाले असल्यामुळे ते कोणी श्रीरामाकडे येऊ इच्छित नाहीत. हे वानर मद्यपानाने धुंद झाल्यामुळे त्यांना परमार्थाचा बोध होणार नाही." असा स्वतःच्या मनाशी विचार करून हनुमंत एकटाच त्वरेने निघाला. तिकडे सुग्रीव निश्चयाने लक्ष्मणाला सांगत होता की, "सीताशोधाचे कार्य झाल्यामुळेच वानरांनी मधुपान केले असणार." मग सुग्रीव आणि लक्ष्मण हे आनंदित होऊन सीताशोधाची वार्ता श्रीरामाला सांगू लागले. तेवढ्यात श्रीरामाला आकाशातून वेगाने येणारा हनुमंत दिसला. श्रीरघुनाथाला त्यामुळे एवढा आनंद झाला की तो आकाशाकडे धाव घेऊन सीताशोधाविषयी विचारेल असे हनुमंताला त्यावेळी जाणवले. तेव्हा श्रीरामाला उठू न देता लांबूनच हनुमंत सीताशोधाविषयी सांगू लागला.

सीताशोधाविषयी हनुमंताचे निवेदन

हनुमंताने श्रीराम उठण्यापूर्वीच दुरून सांगायला सुरुवात केली. "श्रीरामा, तुझ्या कृपेने मी साक्षात् जनककन्या सीता पाहिली. समुद्रामध्ये असलेल्या एका महापर्वतावर लंकापुरी वसली आहे. तेथे रावणाच्या स्वतःच्या मंदिरात सीतादेवीला सुरक्षित ठेवले आहे. तिला रावणाच्या घरात नव्हे तर अशोकवनात ठेवले असून तिच्या भोवती अक्राळ-विक्राळ राक्षसिणी आहेत. एकवस्त्रा, जमिनीवर निजणारी, मळकी वस्त्रे, मलिन देह, मंगल स्नान नाही, डोक्यावर जटांचा गुंता अशी सीता राहिली आहे. ज्याप्रमाणे श्रीरामा तू जटाधारी आहेस, सीता तेच व्रत चालविते आहे. ती जटाधारी जानकी हातात स्नेह दृष्टीही धरत नाही. ती अंजन-चंदन घेत नाही; भोजन रसपान करत नाही; जलप्राशनही न करता ती केवळ उपोषण करते आहे. नित्य समाधानाचे अवदान, ब्राह्मणांना ब्रह्मौदान न देता सीता राहते आणि सर्वज्ञ अशांनाही न पाहता निंद्य मानून स्पर्श करत नाही. परपुरुषाचे जी अन्नदान घेते ती परस्त्री झाली असे समजावे; सीता ते कुत्र्याची ओकारी समजून थुंकून टाकते. श्रीरामाच्या वियोगानंतरचे अन्न सीता कुत्र्याच्या विष्टेसारखे मानते आणि रसभोग रजस्वलेच्या रुधिराचे पान केल्याप्रमाणे मानते. ती हे रघुपती, पाण्याला स्पर्शही करत नाही. अशी ती सीता सती पतिव्रता असल्याची किती उदाहरणे सांगू. जसा चंद्र ग्रहणकाळात हीनकळा असतो, तशी सती जानकी हीन-दीन झालेली मी स्वतःच्या डोळ्यांनी पाहिली रे वीरश्रेष्ठा श्रीरामा!" यावर श्रीरामाने, "ती अन्न, पाणी घेत नाही तर तिचे प्राण कसे वाचले?" असे कळवळून विचारले. "सख्या हनुमंता, माझी प्रिय पत्नी कशामुळे वाचली?" असा रामाने प्रश्न केला. हनुमानाने सीतादेवीचे प्राण कसे वाचले त्याविषयी चिकित्सापूर्वक म्हटले, "हृदयात चिन्मूर्ती श्रीराम, मुखात अहोरात्र रामनाम अशी ती सीता सर्व प्राणिमात्रांच्या ठिकाणी श्रीराम पाहते आणि स्वतःच्या चित्तात श्रीरामच अहोरात्र धरते."

नंतर हनुमंताने म्हटले, "श्रीराम हा पृथ्वी धारण करणारा, जीवनाला जीवन देणारा आणि गहन असे चंद्रसूर्याचे तेज असलेला श्रीराम तिच्या चित्तात विराजमान आहे. श्रीराम हा वायूचा प्राण, गगनाचे चिद्गगन, बुद्धीचे समाधीधन आणि प्राणपोषण कर्ता आहे. श्रीराम अहम्-सोहम् यांत सामावलेला, मनाचे उन्मन, चित्तचैतन्य, जीवांचे जीवन आहे. अशी आत्मस्थिती, मी-तूपणाहून पलीकडे असून सीतेला श्रीराममूर्ती हेच जीवन वाटते आहे, असे माझी बुद्धी सत्य असल्याचे मानते. निर्विकल्प भजनविधी, कायावाचामनोबुद्धी ठेवून मी सीतेचा शोध घेऊन आलो आहे, हे निश्चितपणे सत्य आहे. श्रीरामनाम हे परमामृत आहे. अमृतपान करूनही अमर मरतात; पण ज्याला रामनाम प्राप्त झाले आहे त्याच्याकडून मरणच मरते. रामनामावर अढळ श्रद्धा असणाराला

https://archive.org/details/muthulakshmiacademy
Bhavan Vedavati Trust, Lucknow

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

हलाहलासारखे विषही बाधत नाही; प्रलयाग्नी त्याला जाळू शकत नाही; सर्व द्वंद्वे निर्द्वंद्व होतात. असे श्रीरामनामामृत हेच सीतेचे नित्याचे जीवन आहे. हे सर्वज्ञ रघुनाथा, श्रीरामा मी सांगितले ते त्रिवार सत्य आहे.''

हनुमंताने जे सांगितले ते ऐकून श्रीराम अत्यंत संतुष्ट झाला आणि त्याने आपले दोन्ही हात पसरून आनंदाने हनुमंताला प्रेमाने आणि ऐक्यभावाने आलिंगन दिले. श्रीरघुनाथ स्वामित्व विसरला, हनुमंत दासत्व विसरला. दोघेही परमानंदाने जगात भरून राहिले. अहम्, कोहम् सोहम् हे ज्ञान त्यांच्या समरसतेत विसरून गेले आणि मी-तूपणही हारपले. दोघेही स्वानंदात सुखसंपन्न झाले. त्या अवस्थेत ज्ञान-अज्ञान विरून गेले, त्यांचा बोल खुंटला, मौन पडले, चैतन्याचे मेघ सर्वत्र कोंदले. दृश्य, द्रष्टा, दर्शन; ज्ञेय, ज्ञाता, ज्ञान; ध्येय, ध्याता, ध्यान हे सर्व स्वानंदात विरून गेले. देव देवपणे, भक्त भावार्थे दाटले. परमानंद प्रगटला, आशेचा संबंध तुटला. भजनाची आवड आणि भावार्थ यांनी भक्तांकडून श्रीरघुनाथ गिळला; नामाने देव-भक्त दोघेही गिळले; याचेच मुख्य नाव परमार्थ आहे. असा परमार्थ प्राप्त होऊन, हनुमंत श्रीरामाला भजू लागला आणि भजनामुळे नित्य यशस्वी होऊन, हरिभजनामुळे द्वंद्वापासून मुक्तही झाला. हनुमंताला स्वरूपस्थिती प्राप्त झाली. जो अखंड सद्गुरुभक्ती करतो त्याची कीर्ती देवही वर्णन करतो. शिवादी श्रेष्ठ त्याला वंदन करतात. भगवद्भक्ती अशी थोर असून चारी मुक्ती या भक्तीच्या दासी होतात. (समीपता, सलोकता, सरूपता, सायुज्यता) सर्वांभूती भगवद्भजन करीत हरिनाम घेण्याने ब्रह्मप्राप्ती होते. हनुमंताने विनयवृत्तीने भक्ती, त्रिलोकी विजय मिळवून श्रीरामकृपेने सूक्ष्म शांती मिळविली, अशा स्थितीला तो पोचला.

हनुमंताला प्राप्त झालेल्या सूक्ष्म शांतीचे लक्षण असे की रणामध्ये कोट्यवधींना मारले तरी अणूभरही शांती मोडत नाही. बुद्धिबळाच्या खेळात हत्ती, घोडे मारले तरी ती हिंसा घडली असे होत नाही; तसाच प्रकार संग्रामात होतो. अशी हनुमंताची गती साधुजनांना समजून येते, इतरांना तो वानरवृत्तीचा भासतो. श्रीरामकृपेने त्याला दुर्धर शक्ती प्राप्त झाली होती. हनुमान आणि श्रीरघुनंदन यांनी अनन्य भावाने एकमेकांना आलिंगन दिले. त्यामुळे दोघांनाही समाधान झाले आणि ते देव-भक्त एकरूप झाले. हनुमंताने सीतेच्याकडून प्राप्त झालेला मस्तकमणी श्रीरामाच्या चरणावर ठेवून, त्याला दंडवत घालून, तो हात जोडून उभा राहिला. इकडे मद्याने धुंद झालेल्या वानरांना तसेच अंगद, नळ, नीळ, जांबुवंत यांना हनुमंत पुढे गेला हे जाणवलेच नाही. हनुमंताने श्रीरामाला वंदन करून, सीतेचा वृत्तान्त सांगून, परत मधुवनात उपस्थित झाला. त्याचे जाणे-येणे अंगद, जांबुवंत यांनाही जाणवले नाही, तिथे इतरांची काय कथा; की मारुतीचा काय वृत्तान्त झाला. सुग्रीव लक्ष्मणाला म्हणाला, "आमच्या देखत हनुमंत आला. त्याने सीतेचा वृत्तान्त सांगताच श्रीरघुनाथाने त्याला आलिंगन दिले. दोघांनी एकमेकांना आलिंगन देऊन ते परस्परात लीन झाले. दोघात भिन्नता राहिली नाही. धन्य हनुमानाचे महिमान.''

हनुमान श्रीरामात आणि श्रीराम हनुमानात नांदत असल्याचे ऐकून सौमित्र मूर्च्छित झाला. जशी हनुमंताला रामभक्ती होती, तसेच लक्ष्मणाला भजनलक्षण होते. त्या तिघात एकमेकांशी अभिन्न एकात्मता होती. ही अनन्य भक्ती पाहून सुग्रीवाने श्रीरामाला लोटांगण घातले. तेव्हा श्रीरामाने सुग्रीवाला आलिंगन दिले, त्यामुळे सुग्रीवाला समाधान झाले. अनन्य भक्तीमुळे श्रीराम सुखी होतो आणि भजनभावाने भक्त मुक्त होतो. महादोषी सुद्धा नामाने निर्दोष होतो. एका रामनामाने ब्रह्मप्राप्ती होते. चार मुक्तींचा भ्रम नाहीसा करून नामाने परम परमार्थ साधतो. त्यावेळी सुग्रीव आणि लक्ष्मण समाधान पावून सुखकल्लोळात मग्न झाले आणि

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

श्रीरामाजवळ थांबले. तिकडे सीतेच्या शोधाचे कार्य साधून, हनुमंताला मुख्य करून युवराज अंगद होता, तेथे दधिमुख आला आणि त्याने लोटांगण घातले. तो आनंदाने वृत्त सांगू लागला की, "सुग्रीव स्वतः म्हणाला की सीताशोधार्थाच्या कार्यापुढे मधुवन हे तृणासमान आहे. तो तर तुमच्यावरून जिवाचे लिंबलोण उतरायला सिद्ध झाला. शरीराच्या कातड्याचे जोडे केले तरी तुमचे उतराई होता येणार नाही. अंगदाचे परम भाग्य की त्याने वानरवंशाचा उद्धार केला. अंगदाला त्याने वानरवंशाचे मंडण, भूषण, तारण असे गौरविले." दधिमुखाचे हे बोलणे ऐकून वानरांना श्रीरामाचे स्मरण झाले आणि ते रामनामाचा गजर करून उल्हासाने निघाले.

श्रीरामाला वंदन करण्यासाठी वानरांनी रामनामाचा गजर करत, भुभुःकार करून आकाशात झेप घेतली. हनुमंताच्या विजयवृत्ताने प्रमुख वीरयोद्धे समाधान पावले. रामनामाची त्रिजगतात गाजेल अशी गर्जना करत ते सारे किष्किंधेला पोचले. वानरांच्या वाणीच्या ध्वनीने आकाश कोंदले; गिरिकंदर दणाणले आणि पर्वतशिखरे दुमदुमली. त्या वानरसमूहाच्या नादाने सीताच भेटीला आली असे वाटून श्रीराम सुखावला. अंगदादींचा गजर ऐकून वानरराज सुग्रीव सुखावला. शेपूट थरथरून प्रचंड भुभुःकार केला. सुग्रीवाचा भुभुःकार ऐकून किष्किंधेत वानर उतरले. पांढऱ्या, सुनीळ, पिवळ्या, तांबड्या अशा सुफलित फुलांनी आणि वृक्षाच्या फांद्यांनी अंगदाच्या सेनासंभाराला शोभा आणली होती. फुललेले मनोहर पलश, शाल, ताल, तमार अशा चित्रविचित्र पताका वानर नाचवत होते. वनवृक्षांचे प्रकार तर होतेच, पण वानरांच्या उभारलेल्या शेपट्यांच्या विचित्र शाखा गुढ्या उभाराव्या तशा आकाशात शोभत होत्या.

सुग्रीव अंगदाचे कौतुक करतो

अंगद युवराज हा प्रसिद्ध वीर, नळ, नीळ, जांबुवंत आणि मुख्य पुढारी हनुमंत ज्याच्यामुळे ते जयवंत झाले असा अंगदाचा सेनासंभार शोभत होता. वानर रामनामाचा गजर करत आनंदाने नाचत होते. अंगदाचे आगमन पाहून सुग्रीवाला संतोष झाला. तसाच संतोष श्रीरामालाही झाला. अंगदाला पाहून लक्ष्मणही आनंदित झाला. सीताशोध झाला म्हणून त्याने टाळी पिटली. श्रीरामाच्या भेटीला अंगद, हनुमान हे पुढे झाले तेव्हा सुग्रीव आणि वानर यांना उल्हास वाटला. श्रीराम प्रस्रवणनामक महापर्वतावर वस्तीला होता. वने, अरण्ये, देखणी असून तेथे वानरांचे आगमन झाले. समोर श्रीरघुनंदन दिसताच सर्वांच्या डोळ्यातून अश्रुधारा वाहू लागल्या त्यावेळी अंगद आणि हनुमंत यांनी लोटांगण घातले, आणि श्रीरामाचे पाय मस्तकी धारण केले. तेव्हा श्रीरामाने त्यांना आलिंगन दिले. त्यामुळे त्यांचे कोटी जन्माचे श्रम नाहीसे झाले. अंगद आणि हनुमंत यांनी लगेच लक्ष्मणाला वंदन करून त्यांनी त्याच्या पायावर मस्तक टेकवले. लक्ष्मणानेही दोघांना आलिंगन दिले. त्यामुळे त्यांचे कुमित्रपण नाहीसे होऊन मन, चित्त, अभिमान, बुद्धी सुमित्र झाली. त्यांची इंद्रिये सुमित्रतेने श्रीरामभजनात तत्पर झाली. जीभ रामनामात एकाग्र झाली आणि वाणीच स्वतः सुमित्र झाली. हरिदासाचे आलिंगन असे सबाह्य पवित्र करते. जे दोषगुण पाहतात ते अभागी होतात आणि सद्भाव धरला तर सद्भाग्य लाभते.

साधूंचे दर्शन हेच श्रेष्ठ अनुष्ठान; साधूंचे भाषण हीच पूर्णत्वाला नेणारी पूर्ण तपश्चर्या असते. साधूंच्या चरणस्पर्शापुढे कैवल्यही तृणासमान ठरते. साधूंचे अगाध चरण हे महादोषी अशा व्यक्तीला पावन करतात. सज्जनांच्या आलिंगनाने सर्वांग पवित्र होते; देह चैतन्यघन होतो; हे सज्जन कृपा करतात तेव्हा सहज होते. साधुसज्जनांच्या संगतीने सद्भाग्य लाभते, संसारापासून मुक्तता होते. हे वेदशास्त्रांनीही मानले आहे. सज्जनांच्या चरणस्पर्शाने कर्माकर्माचा निरास होतो; जन्ममरणाचा फेरा पूर्णपणे नष्ट होतो; ब्रह्माच्या ठायी रहिवास

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and Lakshmi Academy

मिळतो. सौमित्र हा रामभक्त असल्याने त्याला अंगद आणि हनुमंत यांनी आलिंगन दिल्यामुळे ते आनंदित झाले. नंतर अंगदाला हाती धरून हनुमंत त्याला सुग्रीवाकडे घेऊन गेला. त्याला दोघांनी वंदन केल्यावर त्याने उल्हासाने दोघांना प्रेमाने आलिंगन दिले. सुग्रीव म्हणाला, "हनुमंता, तुझ्यामुळेच अंगदाला प्रौढी मिळाली. तू सर्वांचा जीवदाता असून तू आमचे संरक्षण करणारा आहेस." यावर जांबुवंतादी वानरवीरांनी श्रीरामाला वंदन केले आणि सुग्रीवाला अभिवादन करून सर्वजण सभेसाठी एकत्र बसले.

श्रीरामाकडून वृत्तान्त कथनाची अंगदाला सूचना

श्रीरामाने सीताशोधाचा वृत्तान्त ऐकण्यासाठी अंगदाला म्हटले, "तुम्ही येथून गेल्यापासून जो मार्ग आक्रमिलात त्याचा समूळ वृत्तान्त मला सांग." श्रीरामाने असे म्हटल्यावर मारुतीने मौन धरले. मग अंगदाने स्वतः सीतेच्या शोधाची साधारण वार्ता सांगायला आरंभ केला. तो म्हणाला, "स्वामींची आज्ञा घेऊन आम्ही अनेकदा दक्षिणेत शोध घेतला. पण अणूभरही कुठे सीताशोधाचे लक्षण दिसले नाही. नंतर पुढे शोध करण्याच्या उत्साहाने वानरांनी उड्डाण केले. ते उड्डाण ब्रह्मशापाने ओसाड झालेल्या एका वनात पडले. त्या वनात पाला, फळे यातले काहीच नव्हते; शोधूनही कोठे पाणी मिळत नव्हते; तिथले वृक्ष वाळले होते. त्यामुळे वानरांना उपास पडला. दंडी नावाचा एक समर्थ ऋषी होता. त्याचा पुत्र वेदशास्त्रसंपन्न असून अत्यंत गर्विष्ठ झाला होता. त्याचा वनदेवतांनी घात केला, कारण तो पुत्र विद्येच्या गर्वाने उन्मत्त झाल्यामुळे वादविवादात ब्रह्मज्ञान्यांची निर्भत्सना करत असे. तो जणू जिवंत असलेला ब्रह्मराक्षस म्हणूनच जगत होता. यासाठी त्याचा घात केला गेला. आपल्या पुत्राचे निधन झाल्याचे समजल्यावर ऋषीने त्या वनाला शाप दिला की, त्या वनात ज्याचे आगमन होईल, त्याची तेथून सुटका होणार नाही."

"आम्ही त्या वनात पडताच तत्क्षणी आमचे प्राण जायचे; परंतु आम्ही रामनाम स्मरणामुळे वाचलो. श्रीराम संकटात भक्तांचे रक्षण करतो. त्या वनात मुंगी, माशी, श्वापदे तर नव्हतीच, पण गवताची काडीही कुठे नव्हती, त्यामुळे वानरांची उपासमार झाली. तेव्हा त्या वनातून बाहेर पडण्यासाठी म्हणून सर्व सामर्थ्य एकवटून आम्ही उड्डाण केले तर पुन्हा जेथून उड्डाण केले तिथेच परत आलो. ब्रह्मशापाने त्या वनातून बाहेर पडणे अशक्य झाले. नंतर त्या ऋषीचा पुत्र ब्रह्मराक्षस होऊन वानरांना खायला आला तेव्हा आम्ही त्याचा नाश केला. हनुमंतासमक्ष मरण आल्याने त्या ब्रह्मराक्षसाचा उद्धार झाला. जडजीवांचे तारण करणाऱ्या श्रीरामाच्या नामस्मरणाचा असा प्रताप आहे. पुत्राचा उद्धार झाल्यामुळे दंडी ऋषी संतुष्ट होऊन त्याने वन शापमुक्त केले. असे हरिभक्तांचे महिमान आहे. हरिभक्त जेथे जातात तेथील वन पुण्याश्रम म्हटला जातो." असे अंगदाने सांगितले तेव्हा श्रीराम सुखाने डोलत होता. श्रीरघुनाथ कृपाळू असल्याचे ऐकून लक्ष्मण स्वानंदाने गजबजला. वानरसभा स्तब्ध झाली आणि सुग्रीव चकित झाला.

अंगद पुढे म्हणाला, "ऋषीने वन शापमुक्त केले खरे, पण वानरांना उपास पडल्याने त्यांना बाहेर पडवेना, त्यांना तहानभुकेने घेरी येऊ लागली. त्यावेळी हनुमंताला वनातील एका वेलाच्या झाडाखाली पाण्याने भरलेले एक विवर दिसले. आम्ही हनुमंताला पुढे ठेवून सर्वजण त्या विवरात शिरलो. तिथे प्राणघातक आवर्तात सापडलो पण रामतेजाने हनुमंताने आमचे रक्षण केले. त्या विवरात पूर्ण अंधार होता. स्वतःला स्वतःचे शरीर सापडणे अशक्य झाले. सर्व वानर कासावीस झाले, आणि निश्चेष्ट पडले. मी स्वतः आणि नळ, नीळ, जांबुवंत सारेच निश्चेष्ट झालो, हनुमंत तेवढा सावध होता. भुकेने आमचे प्राण कंठाशी आले

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Trust and eGangotri / Lakshmi Research Academy

आणि रामस्मरण विसरलो. हनुमंत हा सबाह्य पूर्णपणे राममय असल्याने सावध होता. श्रीराम हा हनुमंताचा प्राण, त्याची सर्व इंद्रिये राम असे असल्याने रामतेजाने त्याला अंधारातही चांगले दिसत होते. त्यावेळी ह्या धैर्यवान हनुमंताने आपल्या शेपटीमध्ये सर्व मूर्च्छित वानरांना गुंडाळून विवरामध्ये शतयोजने आत नेले. नंतर आपला पिता वायू ह्याला सर्व गोष्टी सांगून, रामाच्या सुखासाठी वानरांचे प्राण वाचविण्यासाठी मारुतीने विनंती केली. त्याबरोबर वानरांना प्राण येऊन ते सावध झाले. आम्ही चकित झालो, कारण तेव्हा विवरातल्या एका सुवर्ण मंदिरात आम्ही पोचलो होतो. तेथे सुरसा नावाची एक तपस्विनी होती."

"सुरसेने हनुमंताला पाहिले आणि ती आश्चर्याने त्याला म्हणाली, "तू कोण आहेस?" त्यावर हनुमंताने सांगितले की, "मी रामभक्त असून सीतेचा शोध घेण्यासाठी वानरांसह आलो आहे." हे ऐकताच सुरसा म्हणाली, "तुम्ही श्रीरामाचे भक्त आहात म्हणूनच तुम्हाला इथवर येता आले, इतर कोणालाही या स्थळी येता येत नाही. मी तुमच्यामुळे धन्य झाले. कारण, मला ब्रह्माचा वर होता की तुला रामभक्त भेटतील तेव्हा तू मुक्त होशील. आज मला ते भाग्य प्राप्त झाले आहे." नंतर त्या सुरसेने सज्ञानपणे आम्हा वानरांना विश्रांती मिळेल असे उपचार केले. आम्हाला तिने मग विश्रांतीरसपान दिले. स्वानंदघन पाणी, सुखस्वादिष्ट फळे दिली. रामस्मरण करत आम्ही ते घेतले. घासाघासाला रामस्मरण करत, हरिचिंतन करत रसपान असे केल्याने वानरांच्या जिवात जीव आला आणि सर्वांनी रामनामाची प्रचंड गर्जना केली. सर्वांची भूक शमल्याने सर्व नित्यतृप्त झाले. सुखानुभवाने निद्रा संपली, स्वानंदसुख उचंबळून आले आणि वानरांना पूर्ण विश्रांती मिळाली. रामनामाने तृप्त झालेल्या वानरांनी रामगर्जनेने विवर व्यापले. त्या रामनामाच्या गर्जनेने सर्व चराचर भरून गेले अशी वानरांची गर्जना होती. त्या नामोच्चाराने वैकुंठपीठ कोंदले. श्रीनीलकंठ नामामुळे डोलू लागला. सुरसेचे भाग्य थोर आणि हनुमंत श्रेष्ठ भाग्यवंत. हरिभक्तांची संगत लाभली तर जड, मूढ उद्धरतात. हनुमंतावर विश्वास ठेवलेल्या सुरसेचे भाग्य काय वर्णावे! हनुमंताची निष्ठा रामस्मरणावर होती. त्यामुळे कलिकाळाची पाठवणी होऊन जन्ममरणाला नामामुळे मरण येते. नाम हे परिपूर्ण ब्रह्मच आहे. त्यामुळे वानरांना आत्मतृप्ती मिळाली, सुरसेला विश्रांती मिळाली, हनुमंताच्या संगतीत सर्वजण स्वानंदात डोलत राहिले."

अंगदाच्या गोष्टी ऐकून श्रीरामाला अपार सुख झाले. त्याने आनंदाने अंगदाची पाठ थोपटली. श्रीराम स्वानंदाने पुष्ट होऊन डोलू लागला. भक्तांची आत्मकथा ऐकल्याने श्रीरघुनाथाला अत्यंत सुख होते. त्यातून हनुमंत हा आवडता भक्त असल्याने त्याची कथा रामाला अधिकच गोड वाटली. रघुवीर नंतर अंगदाला म्हणाला, "आता पुढची वार्ता सांग." श्रीरामाला हनुमानाचा पराक्रम ऐकायला आवडे. अंगद म्हणाला, "श्रीरामा, वानरांना विश्रांती मिळाली. तेव्हा त्यांनी हनुमंताला सीतेच्या शोधाविषयी विचारले. त्या विवरात सूर्य, चंद्र यांचा प्रकाशविलास नव्हता. त्या विवरात स्वतःसिद्ध प्रकाश होता. तेथे दक्षिणदिशा कळत नव्हती, मग शोधासाठी धैर्य कुठुन असणार. त्यावेळी सुरसा हनुमंताला म्हणाली. "ब्रह्मयाच्या वरानेच येथील जाणे-येणे होते. विवराची स्थिती मी जाणते. तुमच्या सामर्थ्यावर तुम्ही येथून निघू शकणार नाही. मी सांगते, तुम्हाला सीतासतीचा शोध लागेल, यशस्वी होऊन तुम्ही महान् कीर्ती मिळवाल. ही माझी वचनोक्ती सत्य होणारच." हनुमानाने सुरसेला सांगितले की, "वानरांना येथून त्वरित बाहेर काढ." त्यावर सुरसा हनुमंताचे पाय धरून म्हणाली, "मी सांगते त्याप्रमाणे तुम्ही करा. तुमचे डोळे उघडे असताना विवराबाहेर काढणे मला शक्य होणार नाही. तुम्ही जर डोळे मिटलेत तर

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and Academy

क्षणार्धात बाहेर काढीन." नंतर सर्व वानरांनी डोळे झाकले, तेव्हा त्यांना एकदम सागरगर्जना ऐकू येऊ लागल्या डोळे उघडले तर मागे विवर दिसेना, याचे वानरांना आश्चर्य वाटले."

वानरांना सागरतीरावर संपाती भेटतो

"वानरांनी डोळे झाकल्यावर त्यांना ना कोणी कडेवर घेतले ना हाती धरले, पण ते सर्व विवराबाहेर येऊन सागरतीरावर उभे राहिले. रामनामाची आवृत्ती करत असलेल्या वानरांना विवर, सुरसा किंवा अन्य काही आढळले नाही. एवढे झाले खरे पण त्यामुळे सीतेचा शोध लागलाच नाही कारण पुढे समुद्राचा अडथळा उभा राहिला. मागे परतावे तर बराच काळ लोटला होता. त्यामुळे वानरसमूह सचिंत होता. मागे परतले तर आपला अपमान होईल, सुग्रीव मोठी शिक्षा करील अशी त्यांना भीती वाटत होती. समुद्र वाटेत असल्यामुळे पुढेही जाता येईना. अखेर सर्वजण प्राणत्याग करायला सिद्ध झाले. तेवढ्यात संपाती हा गृध्रपक्षी आला. त्याने पाहिले की समुद्र तीरावर प्रायोपवेशन करण्यासाठी वानर जमले आहेत. तेव्हा त्या वानरांना खाण्यासाठी तो दांडगा पक्षी पुढे आला. बराच काळ लंघन करून मग प्राण सोडावा हा विचार वानर करत असताना श्रीरामाने पूर्ण कृपा केली आणि तातडीने मरण येण्यासाठी पक्ष्याचे आम्हाला भक्ष्य केले असे सर्वांनी मानले. समुद्रतीरावर व्यर्थ प्राण देण्यापेक्षा देह परोपकाराला लागला या विचाराने वानर उल्हसित झाले. त्यांनी श्रीरामनामस्मरण केले. तेव्हा संपातीचे अज्ञानपण संपले आणि त्याच्या ठिकाणी श्रेष्ठ ज्ञान निर्माण झाले. जिथे रामनामाचे स्मरण होते तेथे कल्पांतीही मरणाला प्रवेश मिळत नाही हे उमजून आल्याने संपातीने वानरांपुढे लोटांगण घालून विचारले, "तुम्ही धन्य असे कोणाचे कोण आहात. ज्याच्या स्मरणात रामाचे नाम असते त्याचा जन्म आणि त्यांचे कर्म सफळ होतात. त्यांचा देहधर्मही सफळ होतो. माझ्या परम भाग्याने तुम्ही मला भेटलात. येथे श्रीरामनामस्मरण करता आहात, तेव्हा काय कारणाने आला आहात आणि आता देहत्याग करायला सिद्ध झाला आहात ते काय कारणाने, हे सर्व मला सांगा"

संपातीचे बोलणे ऐकल्यावर मी म्हणालो, "आम्हाला खा." संपती म्हणाला, "रामनामस्मरणामुळे मरणाचा प्रवेश होत नाही हे संपूर्ण सत्य आहे." नंतर हनुमंत म्हणाला, "आम्ही श्रीरामाचे भक्त असून सीतेच्या शोधासाठी येथे आलो आहोत. आम्ही समग्र दक्षिण शोधून समुद्रापर्यंत आलो परंतु कोठेच सीता दिसली नाही. आता श्रीरामाने दिलेली कालमर्यादा उलटून गेली असल्यामुळे आम्ही मरण पत्करायला सिद्ध झालो आहोत." हनुमंताने असे सांगताच संपाती हसत म्हणाला, "मला सीतेविषयीचे ज्ञान आहे. मी सांगतो ते सावध चित्ताने नीट ऐका. या शतयोजने असलेल्या समुद्रापार लंकाभुवन आहे. त्यामध्ये असलेल्या अशोकवनात सीता चिद्रत्न आहे. मला पंखांची शक्ती असती तर मीच सीतेला घेऊन आलो असतो." असे संपातीने म्हणताच त्याला पंख मिळाले. कारण सूर्याने त्याला वर दिला होता की, त्याची रामभक्तांशी भेट होताच निःसंशय त्याला पंख मिळतील. ह्याप्रमाणे खरोखर संपातीला पंख मिळाले, गुणातीत होऊन त्याची जन्ममरणाची आवृत्तीही खुंटली." श्रीरामभक्तक्तांच्या संगतीने न जाणो किती जणांचा उद्धार झाला. आता संपातीचाही उद्धार झाला. संतांची संगती धन्य आहे. "सागराची मर्यादा शतयोजने असल्यामुळे वानरांना त्याचे उल्लंघन करणे शक्य नव्हते. पण हनुमंत हा एकाच उड्डाणात गेला. स्वतः उड्डाण करताना त्याने जे बळ वापरले त्यामुळे पर्वत समुद्रात खचले, काही शिखरे आकाशात उडाली, पक्ष्यांना संकट पडले. आम्ही वानर बलवान होतो तेव्हा दक्षिणेकडे आम्ही राहिलो तर काही अनर्थ होईल म्हणून आम्हाला उत्तरभागात ठेवले. त्याच्या

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

उड्डाणामुळे सागरातले पाणी उचंबळून आकाशाला भिडले तसेच विमानांना अडचण निर्माण झाली. श्रीरामबाणाच्या गतीने वेगात मारुती गेला आणि मग त्याने लंकेत जो पराक्रम केला, त्याविषयी रघुवीरांनी त्यालाच विचारावे." असे अंगदाने म्हटल्यावर रघुपती सुखावला. त्याने हनुमंताला स्वतः बोलाविले. हनुमंत अंतरात श्रीराम धरून पुढे आला.

अध्याय सव्विसावा

मारुती स्वतःच्या मुखाने स्वतःचा पराक्रम सांगणार नाही हे लक्षात घेऊन श्रीरघुपतीने स्वतःच प्रश्न विचारायला आरंभ केला. श्रीरामचंद्राने मोठ्या आदराने विचारले, "हनुमंता तू तर वनचर आहेस, मग सागर कसा पार केलास ते सत्य मला सांग." श्रीरामाचा प्रश्न ऐकून हनुमानाने लोटांगण घालून वंदन केले. मग तो म्हणाला, "श्रीरामनामाच्या उच्चाराने जड, मूढ हे भवसागरही तरून जातात. मी राममुद्रांकित वानर असून त्यामुळे पैलपार पोचलो. त्या रामनामाचा कडकडाट केल्यास भवसागरात पायवाट निर्माण होते आणि त्या पायरीवरून वैकुंठात आणि नंतर परब्रह्मात प्रवेश होतो. जे नर रामनामांकित असतात त्यांना सागर बुडवू शकत नाही. मी तसा रामनामांकित वानर असल्याने परतीराला गेलो. श्रीरामांनी माझ्या हातात आपली मुद्रिका ठेवली, तेव्हाच माझ्यात विजयवृत्ती संचारली. राममुद्रिकेची ख्याती श्रुतीही सांगतात, पुराणे सांगतात. श्रीराममुद्रिकेमुळेच समुद्रतरण, सीतादर्शन, रणकंदन, लंकादहन, यात विजयवृत्ती आली. लंकाभुवनात मी मारुतीने पराक्रम केला असे म्हणतात, पण ती अगाध करणी त्या मुद्रेचीच आहे. जिथे नित्य श्रीरामनामस्मरण असते तेथे वीर्य, शौर्य, कीर्ती आणि कल्याण असते. त्या नामाने सनातन प्राप्त होते असे त्या नामस्मरणाचे महिमान आहे. जिथे नामस्मरण नसते तिथे अपयश, अकीर्ती, अकल्याण, निंद्यत्व, पूर्ण पाप आणि महानरकात अधःपतन होते. यासाठी आपण प्रयत्नाने नामस्मरणाचे विस्मरण होऊ देऊ नये. नित्य नामस्मरण केल्यामुळे कीर्ती, कल्याण, नित्य विजय यांची प्राप्ती होते. वास्तविक श्रीराममुद्रेची स्वतःची प्राप्ती असताना हनुमंताचा गौरव सांगतात पण जे जे लंकेत घडले ती सारी कीर्ती मुद्रिकेची होती. हनुमंताने आपली कीर्ती स्वतःच्या तोंडाने न सांगता मुद्रिकेची स्तुती करत सर्व वार्ता श्रीरामाला सांगितली. हे मारुतीच्या मनातले श्रीरामाला मनोमन समजले होते. नंतर रामाने मारुतीला सद्भक्त म्हणून आनंदाने हृदयाशी धरला. हनुमंताने राक्षसांशी केलेल्या युद्धाविषयी ऐकायला वानरांची तळमळ चालू होती हे जाणून रामाने हनुमंताला पुढे आणखी प्रश्न केला.

श्रीराम मारुतीला म्हणाला, "हे मारुती, समुद्र उल्लंघन आणि लंकेची ख्याती यथार्थ वार्ता सांगितलीस ती संक्षिप्त आणि गौण होती. सीता सुरक्षित आहे हे ऐकून आनंद झाला; पण राक्षसांशी झालेले युद्धकंदन का आणि कसे झाले ते स्पष्टपणे आणि सविस्तर सांग." असे श्रीरामाने म्हटल्यावर मारुतीने त्याच्या चरणांना वंदन केले. स्वतःच्या तोंडाने स्वतःची कीर्ती सांगू नये आणि आपल्या स्वामीलाही फसवू नये याच दृष्टीने मारुतीने ब्रह्मदेवाला विनंती केली होती की, "स्वामी, आपण माझे समुद्र ओलांडणे आणि सीतेचा शोध घेणे याविषयी पत्र लिहून द्या. कारण, आपल्या हातचे म्हणजे ब्रह्मलिखित पाहून सीताशोधाची वार्ता श्रीराम सत्य मानील. त्यामुळे कार्यार्थ साधेल." हे मारुतीचे बोलणे ऐकून चतुरानन ब्रह्मदेव संतुष्ट झाला आणि त्याने हनुमंताच्या ख्यातीविषयी साद्यंत पत्र लिहून दिले. ते पत्र मोठ्या आनंदाने मारुतीकडे देऊन आणि मारुतीला आलिंगन देऊन ब्रह्मदेव म्हणाला, "सर्वत्र विजयी होशील." मग ते पत्र घेऊन स्वतः

https://archive.org/details/@sarayu_foundation_trust_lucknow

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Research Academy, eGangotri

क्षणार्धात बाहेर काढीन.'' नंतर सर्व वानरांनी डोळे झाकले, तेव्हा त्यांना एकदम सागरगर्जना ऐकू येऊ लागल्या डोळे उघडले तर मागे विवर दिसेना, याचे वानरांना आश्चर्य वाटले.''

वानरांना सागरतीरावर संपाती भेटतो

''वानरांनी डोळे झाकल्यावर त्यांना ना कोणी कडेवर घेतले ना हाती धरले, पण ते सर्व विवराबाहेर येऊन सागरतीरावर उभे राहिले. रामनामाची आवृत्ती करत असलेल्या वानरांना विवर, सुरसा किंवा अन्य काही आढळले नाही. एवढे झाले खरे पण त्यामुळे सीतेचा शोध लागलाच नाही कारण पुढे समुद्राचा अडथळा उभा राहिला. मागे परतावे तर बराच काळ लोटला होता. त्यामुळे वानरसमूह सचिंत होता. मागे परतले तर आपला अपमान होईल, सुग्रीव मोठी शिक्षा करील अशी त्यांना भीती वाटत होती. समुद्र वाटेत असल्यामुळे पुढेही जाता येईना. अखेर सर्वजण प्राणत्याग करायला सिद्ध झाले. तेवढ्यात संपाती हा गृध्रपक्षी आला. त्याने पाहिले की समुद्र तीरावर प्रायोपवेशन करण्यासाठी वानर जमले आहेत. तेव्हा त्या वानरांना खाण्यासाठी तो दांडगा पक्षी पुढे आला. बराच काळ लंघन करून मग प्राण सोडावा हा विचार वानर करत असताना श्रीरामाने पूर्ण कृपा केली आणि तातडीने मरण येण्यासाठी पक्ष्याचे आम्हाला भक्ष्य केले असे सर्वांनी मानले. समुद्रतीरावर व्यर्थ प्राण देण्यापेक्षा देह परोपकाराला लागला या विचाराने वानर उल्हसित झाले. त्यांनी श्रीरामनामस्मरण केले. तेव्हा संपातीचे अज्ञानपण संपले आणि त्याच्या ठिकाणी श्रेष्ठ ज्ञान निर्माण झाले. जिथे रामनामाचे स्मरण होते तेथे कल्पांतीही मरणाला प्रवेश मिळत नाही हे उमजून आल्याने संपातीने वानरांपुढे लोटांगण घालून विचारले, ''तुम्ही धन्य असे कोणाचे कोण आहात. ज्याच्या स्मरणात रामाचे नाम असते त्याचा जन्म आणि त्यांचे कर्म सफळ होतात. त्यांचा देहधर्मही सफळ होतो. माझ्या परम भाग्याने तुम्ही मला भेटलात. येथे श्रीरामनामस्मरण करता आहात, तेव्हा काय कारणाने आला आहात आणि आता देहत्याग करायला सिद्ध झाला आहात ते काय कारणाने, हे सर्व मला सांगा''

संपातीचे बोलणे ऐकल्यावर मी म्हणालो, ''आम्हाला खा.'' संपती म्हणाला, ''रामनामस्मरणामुळे मरणाचा प्रवेश होत नाही हे संपूर्ण सत्य आहे.'' नंतर हनुमंत म्हणाला, ''आम्ही श्रीरामाचे भक्त असून सीतेच्या शोधासाठी येथे आलो आहोत. आम्ही समग्र दक्षिण शोधून समुद्रापर्यंत आलो परंतु कोठेच सीता दिसली नाही. आता श्रीरामाने दिलेली कालमर्यादा उलटून गेली असल्यामुळे आम्ही मरण पत्करायला सिद्ध झालो आहोत.'' हनुमंताने असे सांगताच संपाती हसत म्हणाला, ''मला सीतेविषयीचे ज्ञान आहे. मी सांगतो ते सावध चित्ताने नीट ऐका. या शतयोजने असलेल्या समुद्रापार लंकाभुवन आहे. त्यामध्ये असलेल्या अशोकवनात सीता चिद्रत्न आहे. मला पंखांची शक्ती असती तर मीच सीतेला घेऊन आलो असतो.'' असे संपातीने म्हणताच त्याला पंख मिळाले. कारण सूर्याने त्याला वर दिला होता की, त्याची रामभक्तांशी भेट होताच निःसंशय त्याला पंख मिळतील. ह्याप्रमाणे खरोखर संपातीला पंख मिळाले, गुणातीत होऊन त्याची जन्ममरणाची आवृत्तीही खुंटली.'' श्रीरामभक्तक्तांच्या संगतीने न जाणो किती जणांचा उद्धार झाला. आता संपातीचाही उद्धार झाला. संतांची संगती धन्य आहे. ''सागराची मर्यादा शतयोजने असल्यामुळे वानरांना त्याचे उल्लंघन करणे शक्य नव्हते. पण हनुमंत हा एकाच उड्डाणात गेला. स्वतः उड्डाण करताना त्याने जे बळ वापरले त्यामुळे पर्वत समुद्रात खचले, काही शिखरे आकाशात उडाली, पक्ष्यांना संकट पडले. आम्ही वानर बलवान होतो तेव्हा दक्षिणेकडे आम्ही राहिलो तर काही अनर्थ होईल म्हणून आम्हाला उत्तरभागात ठेवले. त्याच्या

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Trust, Lucknow and Shri Lakshmi Research Academy

उड्डाणामुळे सागरातले पाणी उचंबळून आकाशाला भिडले तसेच विमानांना अडचण निर्माण झाली. श्रीरामबाणाच्या गतीने वेगात मारुती गेला आणि मग त्याने लंकेत जो पराक्रम केला, त्याविषयी रघुवीरांनी त्यालाच विचारावे." असे अंगदाने म्हटल्यावर रघुपती सुखावला. त्याने हनुमंताला स्वतः बोलाविले. हनुमंत अंतरात श्रीराम धरून पुढे आला.

अध्याय सव्विसावा

मारुती स्वतःच्या मुखाने स्वतःचा पराक्रम सांगणार नाही हे लक्षात घेऊन श्रीरघुपतीने स्वतःच प्रश्न विचारायला आरंभ केला. श्रीरामचंद्राने मोठ्या आदराने विचारले, "हनुमंता तू तर वनचर आहेस, मग सागर कसा पार केलास ते सत्य मला सांग." श्रीरामाचा प्रश्न ऐकून हनुमानाने लोटांगण घालून वंदन केले. मग तो म्हणाला, "श्रीरामनामाच्या उच्चाराने जड, मूढ हे भवसागरही तरून जातात. मी राममुद्रांकित वानर असून त्यामुळे पैलपार पोचलो. त्या रामनामाचा कडकडाट केल्यास भवसागरात पायवाट निर्माण होते आणि त्या पायरीवरून वैकुंठात आणि नंतर परब्रह्मात प्रवेश होतो. जे नर रामनामांकित असतात त्यांना सागर बुडवू शकत नाही. मी तसा रामनामांकित वानर असल्याने परतीराला गेलो. श्रीरामांनी माझ्या हातात आपली मुद्रिका ठेवली, तेव्हाच माझ्यात विजयवृत्ती संचारली. राममुद्रिकेची ख्याती श्रुतीही सांगतात, पुराणे सांगतात. श्रीराममुद्रिकेमुळेच समुद्रतरण, सीतादर्शन, रणकंदन, लंकादहन, यात विजयवृत्ती आली. लंकाभुवनात मी मारुतीने पराक्रम केला असे म्हणतात, पण ती अगाध करणी त्या मुद्रेचीच आहे. जिथे नित्य श्रीरामनामस्मरण असते तेथे वीर्य, शौर्य, कीर्ती आणि कल्याण असते. त्या नामाने सनातन प्राप्त होते असे त्या नामस्मरणाचे महिमान आहे. जिथे नामस्मरण नसते तिथे अपयश, अकीर्ती, अकल्याण, निंद्यत्व, पूर्ण पाप आणि महानरकात अधःपतन होते. यासाठी आपण प्रयत्नाने नामस्मरणाचे विस्मरण होऊ देऊ नये. नित्य नामस्मरण केल्यामुळे कीर्ती, कल्याण, नित्य विजय यांची प्राप्ती होते. वास्तविक श्रीराममुद्रेची स्वतःची प्राप्ती असताना हनुमंताचा गौरव सांगतात पण जे जे लंकेत घडले ती सारी कीर्ती मुद्रिकेची होती. हनुमंताने आपली कीर्ती स्वतःच्या तोंडाने न सांगता मुद्रिकेची स्तुती करत सर्व वार्ता श्रीरामाला सांगितली. हे मारुतीच्या मनातले श्रीरामाला मनोमन समजले होते. नंतर रामाने मारुतीला सद्भक्त म्हणून आनंदाने हृदयाशी धरला. हनुमंताने राक्षसांशी केलेल्या युद्धाविषयी ऐकायला वानरांची तळमळ चालू होती हे जाणून रामाने हनुमंताला पुढे आणखी प्रश्न केला.

श्रीराम मारुतीला म्हणाला, "हे मारुती, समुद्र उल्लंघन आणि लंकेची ख्याती यथार्थ वार्ता सांगितलीस ती संक्षिप्त आणि गौण होती. सीता सुरक्षित आहे हे ऐकून आनंद झाला; पण राक्षसांशी झालेले युद्धकंदन का आणि कसे झाले ते स्पष्टपणे आणि सविस्तर सांग." असे श्रीरामाने म्हटल्यावर मारुतीने त्याच्या चरणांना वंदन केले. स्वतःच्या तोंडाने स्वतःची कीर्ती सांगू नये आणि आपल्या स्वामीलाही फसवू नये याच दृष्टीने मारुतीने ब्रह्मदेवाला विनंती केली होती की, "स्वामी, आपण माझे समुद्र ओलांडणे आणि सीतेचा शोध घेणे याविषयी पत्र लिहून द्या. कारण, आपल्या हातचे म्हणजे ब्रह्मलिखित पाहून सीताशोधाची वार्ता श्रीराम सत्य मानील. त्यामुळे कार्यार्थ साधेल." हे मारुतीचे बोलणे ऐकून चतुरानन ब्रह्मदेव संतुष्ट झाला आणि त्याने हनुमंताच्या ख्यातीविषयी साद्यंत पत्र लिहून दिले. ते पत्र मोठया आनंदाने मारुतीकडे देऊन आणि मारुतीला आलिंगन देऊन ब्रह्मदेव म्हणाला, "सर्वत्र विजयी होशील." मग ते पत्र घेऊन स्वतः

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

हनुमंताने श्रीरामाला विनंती केली की, "हे ब्रह्मदेवाचे लिखित आहे. ते वाचून कार्यार्थ जाणून घ्यावा."

श्रीरामाने ते पत्र हातात घेऊन त्या पत्राला प्रेमाने वंदन केले आणि पत्र लक्ष्मणाकडे देऊन त्याला ते वाचायला सांगितले. पत्र लिहिणारा प्रजापती होता, श्रीराम श्रोता होता आणि लक्ष्मण ते वाचणार होता; असा तो अपूर्व योग होता. सुग्रीवादी वीरयोद्धे आणि वानरांच्या पंगती असे सर्वजण हनुमंताच्या पराक्रमाची ख्याती ऐकायला उत्सुक होऊन चातकाप्रमाणे वाट पाहात होते. त्या पत्रात लिहिले होते, "ॐ नमोजी श्रीरामचंद्रा, क्षराक्षरातीत परा, त्रिगुणातीत चिदचिन्मात्रा, परात्परा, परब्रह्मा, जेथे मी-तूपणा नाही, ब्रह्माला ब्रह्मस्फुरण आठवत नाही, असा तो तू सगुण राम पूर्णत्वाने पूर्ण परब्रह्मच आहेस. ब्रह्मदेवाला तुझ्यामुळेच ब्रह्मत्व, धर्माला धर्मत्व, कर्माला कर्मत्व तुझ्यामुळेच येते; असा तू स्वतःच चिन्मात्र आहेस. वेद तुला निर्विकार म्हणतात; तू मात्र विश्वमूर्ती भासतोस; विश्व तूच आहेस हे निश्चित मानले तर वास्तविक हे श्रीपती ती तुझी माया असते. तू साकारही नाहीस आणि निराकारही नाहीस; तू विश्वनाथ विश्वंभर असून, तुझ्या स्वरूपाचा निर्धार हा श्रुतिशास्त्रांनाही यथार्थपणे कळत नाही. त्यामुळे श्रुती केवळ नेती नेती म्हणतात, शास्त्रे चित्तात थिटेपण घेतात, चारही वाणी मौनावतात, असा तू हे श्रीरामा परमात्मा आहेस. तर आता जसा आहेस तशा तुला नमन असो. तुझ्याच कृपेने हे श्रीरामा तुझी स्तुती करण्याचे मला सामर्थ्य आहे. तू अपरंपार, अनंत, अवतारी असा श्रीरघुनाथ आहेस आणि हनुमंत तुझा सेवक आहे. ह्याने समुद्र ओलांडून, लंकेत येऊन जो जो अद्‌भुत पराक्रम केला, कीर्ती केली ती आता ऐक."

"सामर्थ्यशाली हनुमंताने समुद्र ओलांडला, महेंद्रपर्वत चेपला, सर्प पाताळात दडपले तेव्हा त्यांनी तोंडे वासली; मारुतीच्या अंगाच्या झपाट्याने पर्वतकडे समुद्रात खचले; शिखरे घुंगुरटी आकाशात उडतात तशी उडाली. त्याच्या उड्डाणप्रसंगी निर्माण झालेल्या वाऱ्यामुळे घर्घर लागून मेघांची दातखीळ बसली. दिग्गजांचा थरकाप उडाला आणि कळिकाळाला शहारे उठले. त्याच्या उड्डाणप्रसंगी जो कल्लोळ झाला, त्याने समुद्राचे पाणी उचंबळले, सत्यलोकात पर्जन्यकाळ सुरू होऊन ध्रुवमंडळ भिजवून चिंब झाले. मोठा दुर्धर असा तो उड्डाणकाळचा वानरराज भासत होता. सुर, खेचर, सिद्ध, गंधर्व, विद्याधर, नर, किन्नर धाकाने कापत होते. जसा श्रीरामाचा बाण तसा मारुती वेगाने उड्डाण करून गेला. त्याला त्यावेळी आलेले दुर्धर स्फुरण कोणालाही आवरणे शक्य नव्हते. तरी हनुमंताची शक्ती किती आहे हे पाहण्यासाठी सर्व देवांनी मिळून, ह्याचा छळ करण्यासाठी आणि मार्ग अडवण्यासाठी सुरसेला धाडले. दनु दानवाची माता, कश्यपाची पत्नी असलेली सुरसा योजनांच्या मापाने विक्राळ जबडा उघडून मारुतीला गिळायला आली. हनुमान जेवढी योजने आकार वाढवील त्या प्रमाणात सुरसेला तोंड पसरावे लागत होते. त्यावेळी मारुतीने एकदम अणू एवढे लहान होऊन सुटका करून घेतली. त्यामध्ये कश्यपपत्नी मारावी लागली नाही. कारण तो तोंडातून प्रवेश करून कानातून निघून गेला. श्रीरामाच्या बळाने मारुती हातोहात गेला म्हणून सुरसा जिभळ्या चाटत बसली आणि देव, दानव, शिव हे सारे चकित झाले. सुरसा ही कश्यपाची पत्नी, पिता जो वायू त्याची सावत्र माता, म्हणून त्या विवेकी आणि सज्ञान मारुतीने तिचा वध न करता रामनामाच्या बळावर आपली सुटका करून घेतली. हनुमान आपला वध न करता निघून गेला म्हणून सुरसेने त्याला तिन्ही लोकात विजयी होशील असा आशीर्वाद दिला."

"समुद्र ओलांडताना विश्रांती घेण्यासाठी स्थळ शोधत मारुती सभोवार न्याहाळत असताना

https://archive.org/details/@sarayu_foundation_trust_lucknow / Bhavarth Vedic Trust, Lakshmi academy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

मैनाक पर्वत वरच्या दिशेकडे खूप उंच वाढला आणि मारुतीला विश्रांती मिळावी हाच त्याचा हेतू होता. पण मारुतीने ह्या पर्वतश्रेष्ठाला स्पर्श न करता आपली उंची आणखी वाढविली. त्यावेळी हनुमंताचा मार्ग अडवावा म्हणून पर्वतही उंच वाढला. अशा प्रकारे हनुमंत आणि मैनाक पर्वत हे उंच उंच वाढत राहिले; परंतु हनुमान अखेर पर्वताला ओलांडून जाऊ लागल्यावर पर्वताला फार वाईट वाटले आणि हरिभक्ताचा चरणस्पर्श आपल्या दुर्भाग्याने आपल्याला झाला नाही म्हणून तो दुःख करू लागला. तेव्हा पर्वताचे प्रेमपूर्ण भाषण ऐकून हनुमानाला त्याची दया आली. हनुमंताने पर्वताच्या माथ्यावर आपले बोट टेकवले, त्याबरोबर पर्वत पाताळात दडपला गेला. सुरासुरांनी आनंद व्यक्त करताना आणि हनुमंताच्या पराक्रमाचे कौतुक करताना म्हटले, "बोटाने रेटला तर पाताळात गेला; जर मारुती पर्वतावर बसला असता तर पर्वताचा चुराडाच झाला असता." हनुमंताला पुढे मार्गात सिंहिका नावाची क्रूर राक्षसी दिसली. सावली धरून ती प्राण्यांचा पूर्ण ग्रास करत असे. हनुमानाने तिला फाडून तिचा वध केला. नंतर हनुमंताने एवढ्या आवेशाने उड्डाण केले की तो लंकेला मागे टाकून पडलंकेत पोचला. तिथे क्रौंचा ही राक्षसी त्याने जिवानिशी मारली. शिवाय चवदा सहस्त्र राक्षसींना शेपटीत धरून त्याने त्यांना समुद्रात बुडविले."

"तेथून मारुती लंकेमध्ये सीताशोधाचे कार्य करण्यासाठी आला. त्याने अत्यंत बारकाईने आणि प्रयत्नपूर्वक सर्व घरे शोधली. नगरीत गोंधळ उडवला; सभेतले सभाजन लुबाडले; अनेक वस्त्रहीन होऊन हळहळत बसले, लक्षावधी दिवे शेपटीच्या साहाय्याने विझवले; त्या अंधारात रावणाच्या मस्तकावर टोले मारले; सभेत अंधारामुळे गडबड उडवून दिली. तिथले मोठे थोर प्रधान आणि अन्य थोरांची घरे मारुतीने धुंडाळली. इंद्रजिताच्या घरी काही वेगळाच प्रकार झाला. त्या ठिकाणी इंद्रजिताची पत्नी सुलोचना हीच सीता आहे असे मारुतीला वाटले; त्याला त्यापुढे असे सुद्धा वाटले की सीता ही रावणपुत्राला वश झाली आहे त्यामुळे त्या दोघांना मारले पाहिजे. तेव्हा सुलोचना म्हणाली, "रावणाने सीता चोरून आणली, तिला इंद्रजिताने सोडवावे. अन्यथा यामधे संपूर्ण कुळाचा घात होईल." त्यावर इंद्रजिताने सांगितले की, "रावणाला सीतेला सोड म्हणून सांगायला गेले तर तो घात करायला धावून येतो. त्यावेळी त्याला सुहृदभाव स्मरत नाही. रावणाला सीतेविषयी लोभ निर्माण झाला आहे त्यामुळे त्याला कोणी बुद्धिपूर्वक हिताचा विचार सांगितला तरी तो रावण उलट घातच करू लागतो. तेव्हा आपण ही गोष्ट न बोलावी. सीताच कुलक्षय घडवील." याप्रमाणे इंद्रजित बोलला त्यामुळे सुलोचना ही सीता नव्हे हे पटून मारुती तिथून निघाला. आणि वेगाने उड्डाण करून कुंभकर्णाच्या घराकडे गेला. कुंभकर्णाच्या घोरण्याचा आवाज सर्व त्रिभुवनात गाजत होता. त्याच्या श्वासातून हत्ती, रेडे हे जात-येत होते; त्याच्या नाकातल्या केसात अडकलेले उंट ओरडत होते; त्यातच माजलेले हत्ती झुंजत होते; सिंह घशात जात होते. त्या कुंभकर्णाचे सामर्थ्य पाहून हनुमान स्वतःशीच म्हणाला, "याचा पुरुषार्थ पाहण्यासाठी मीच याच्याशी प्रथम युद्ध करीन." त्या राक्षसाने कधी तोंड, दात यांना पाणी लावले होते की नाही कोण जाणे. त्याच्या दंतपंक्तींना बुरशी आली होती एकूणच तोंडाला नरकाची दुर्गंधी येत होती. हनुमान या सर्वांमुळे कंटाळला आणि बिभिषणाच्या मंदिरामध्ये सीतेचा शोध घेऊ लागला. तेव्हा कीर्तनाचा गजर ऐकून मारुतीला सुख मिळाले. ताल, छंद, गीत, नृत्य ऐकताना श्रीरामचरित्रच ऐकायला मिळाल्याने मारुती स्वानंदाने डोलू लागला आणि गुप्तपणे नाचात रंगला. श्रीरामाने लंका जिंकली तर बिभीषणाला लंकाधिपती करायचे असा हनुमंताचा निश्चय झाला. त्या घरी पूर्ण विश्रांती घेऊन,

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

रावणाच्या मंदिरात सीतेचा शोध घेण्यासाठी मारुती शीघ्रगतीने निघाला."

रावणाच्या मंदिरातील वार्ता

"हनुमंत रावणाच्या भुवनाचा शोध घेत असताना रावणाच्या शयनगृहात आला. तेथे रावणासह शय्येवर असलेल्या मंदोदरीला पाहून, तीच सीता आहे असे त्याला वाटले. त्यामुळे तो मनातून खूप संतापला. आता श्रीरघुनाथाला ही अपकीर्ती कशी सांगायची? त्यापेक्षा मीच या दोघांचा घात करतो म्हणजे 'सीता रावणाला वश झाली' हे रडत सांगणे टळेल. मग मारुतीने दात-दाढा करकरा वाजवत, शेपटीचा आकडा वळवून दोघांचा घात करण्याची तयारी केली. तो स्वतःशी म्हणाला, "आता रावणाची दहा शिरे आणि अकरावे सीतेचे शिर डाव्या हाताने खुडून श्रीरामाच्या भेटीला नेईन. किंवा दोघांनाही शेपटीत बांधून श्रीरामाकडे नेऊन भेटवीन म्हणजे यांचे अधर्माचरण पाहून श्रीरामच त्यांना शासन करील." हे विचार हनुमंताच्या मनात चालले असताना, त्याचवेळी मंदोदरीकडून तिला पडलेल्या दुःखदायक स्वप्नाची वार्ता रावणाला सांगितली जात होती. ती स्वप्नवार्ता दुःखद होती. मंदोदरी सांगू लागली."

"आताच मी स्वप्नात पाहिले की सीतेला अशोकवनात ठेवले असून तिचा कैवार घेण्यासाठी स्वतः महारुद्र संतापून आला आहे. क्रौंचा या तुमच्या लाडक्या बहिणीला पडलंकेत मारून तो लंकेत सीतेच्या शोधासाठी आला आहे. मी तुम्हाला विनंती करते की माझे स्वप्न संपूर्ण ऐका. सीतेच्या रक्षणासाठी अशोकवनात तो तेथे धावून गेला. सीतेची भेट घेऊन, त्याने अशोकवन उध्वस्त केले. स्वप्नात मी पाहिले की त्याने कोट्यवधी राक्षस मारले. चवदा सहस्र वनरक्षक, ऐंशी सहस्र किंकर, प्रधानपुत्र, जंबुमाळी, अखयाकुमार यांचा वध केला. अखयाला त्याने शिळेवर आपटला, त्याच्या बरोबरचे सैनिक मारले. इंद्रजित महाबळी त्याने गांजला आणि लंकेची होळी केली. हे रणकंदन पाहून मी गजबजून जागी झाले. मग शिवाचे स्मरण करून, शुद्ध जलाचे आचमन करून मी डाव्या कुशीवर झोपले. त्यावेळीही मी अधिक दुर्धर स्वप्न पाहिले. त्यामध्ये सागर शिळांनी बुजवून वानरांचे सैन्य लंकेत आले. त्यांनी राक्षसांचा संहार चालविला. श्रीरामाने कुंभकर्ण मारला आणि लक्ष्मणाने इंद्रजिताचा वध केला. तुमच्यावर येणारे अरिष्ट मी त्याच स्वप्नात पाहिले. श्रीरामाच्या बाणांनी तुमची दाही शिरे जमिनीवर पाडलेली मी त्याच स्वप्नात पाहिली." एवढे सांगून मंदोदरी पतीबद्दल शोक करत शंख करू लागली. रावणासमोर बसून ती म्हणू लागली की माझ्या कंकणांना फूट आली आणि पुन्हा शंख करू लागली. तेव्हा रावणाने त्वरेने पुढे होऊन तिला जवळ घेत म्हटले, "मी ज़िवंत असताना तू व्यर्थ शोक का करतेस?" त्यावर मंदोदरी म्हणाली, "तुमच्या धडावर शिरे तर दिसत नाहीत, मग जिवंत असल्याचे काय सांगता?" रावणाने मंदोदरीला पोटाशी धरून तिचे सांत्वन केले. त्यावर ती म्हणाली, "स्वप्न खोटे होत नाही. मोठे अनिवार्य विघ्न आले आहे."

"लंकानाथा, सीतेला अशोकवनात ठेवली, तर ती कुळाचा घात करील. त्यापेक्षा स्वतःच सीतेला श्रीरामाला अर्पण करून जन्ममरणाची कथा निवारण होऊन सुखरूप अक्षयता लाभेल. श्रीरामाला अनन्य भावाने शरण गेल्यास जन्ममरणाची बाधा होत नाही. रावणा, आपले यामुळे कोटकल्याण होईल. हे माझे भाषण सत्य आहे. जर आपण माझे सांगणे मान्य केले नाही तर मी इंद्रजित, कुंभकर्ण यांना बोलावून, सीता श्रीरामाला अर्पण करीन. रावणा, आपण कुळाच्या हितासाठी श्रीरामाला सीता अर्पण करा." हे मंदोदरीचे बोलणे ऐकून रावणाला उद्वेग आला. मंदोदरीचे सांगणे कुंभकर्णाला मान्य होईल आणि इंद्रजित हा वचनाधीन असल्याने ते सीता रामाला

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

अर्पण करतील. यासाठी रावण मंदोदरीला म्हणाला, "स्वप्नाचे विघ्न निवारण करण्यासाठी आपण प्रथम सदाशिवाची पूजा करू. तू पूजेचे साहित्य घेऊन ये." अशा रीतीने रावणाने मंदोदरीला कामात गुंतवून दुर्मना ह्या विश्वासू राक्षसीला बोलावले आणि सीतेला समजावण्यासाठी अशोकवनाकडे पाठविले. इंद्रजित, कुंभकर्ण, मंदोदरी किंवा बिभीषण यांच्या सांगण्यावरून आपण सीता सर्वथा सोडू नये, असे रावणाने ठरविले. नंतर ती राक्षसी अशोकवनाकडे निघाली तेव्हा हनुमानही तिच्या मागोमाग निघाला. श्रीरामाने कशी कृपा केली की ज्यामुळे सीतेशी मारुतीची भेट होईल. हनुमानाने सीतेला डोळ्यांनी पाहिली, पण तिची त्याला भेट घेता आली नाही; कारण तिच्या रक्षणासाठी अनेक राक्षसी होत्या. तेव्हा मारुती झाडांच्या गर्दीत लपून गुप्तपणे राहिला. त्याला सीतेची एकान्तात भेट घ्यायची असल्याने तो स्वस्थ राहिला. त्यावेळी सीतेची स्थिती अशी होती की ती वृक्षवेलींसह सतत श्रीरामाचे स्मरण करत होती. तिच्या प्रभावामुळे अशोकवनातले पाषाण, लताकुंज, पक्षी, तृण हे सर्व श्रीरामस्मरण करत होते. जागृती, स्वप्न, तूर्या, सुषुप्ती या आनंदाच्या अवस्थेत हनुमान सीतेचा शोध घेत असता मी-तूपणापलीकडील सहजस्थितीच शोधत होता."

सीतेची स्वरूपस्थिती ऐकून आणि हनुमंताची शोधक शक्ती ऐकून श्रीरामाला सुख झाले. त्याचे डोळे स्वानंदाच्या अश्रूंनी भरले. त्याच्या डोळ्यातून पाणी नव्हे तर पूर्णानंदाचा अभिषेक हनुमंतावर झाला. धन्य सीतेचे मनोगत की जी नित्य श्रीरामावर अनुरक्त होती; धन्य हनुमंताचे जीवित की जो श्रीरामाची सेवा करण्यामधे अनुरक्त होता. धन्य त्या ब्रह्मयाचे लिखित की ज्याचा अर्थ परमार्थपर होता आणि जो ऐकताना श्रीराम स्वानंदात डोलत होता. सीतेची स्वरूपस्थिती आणि हनुमंताचा पुरुषार्थ ऐकून संतुष्ट झालेल्या श्रीरामाने हर्षाने हनुमंताला आलिंगन दिले. त्यावेळी दोघांचे बोलणे खुंटले, मौन तुटले, एकमेकांनी एकमेकांमध्ये विश्रांती आणि प्रीती अनुभवली. श्रुतिशास्त्रांनाही अगम्य अशी त्यांची स्थिती झाली. भक्तभावार्थाचे वर्म त्यांना समजले; त्याची अभिव्यक्ती करणे शक्य नाही अशीच ती स्थिती होती.

अध्याय सत्ताविसावा

ब्रह्मदेवाने लिहिलेले आणि हनुमंताने आणलेले ते धन्यता व्यक्त करणारे पत्र लक्ष्मण सावधान चित्ताने पुढे वाचू लागला आणि त्यातील अर्थाने श्रीराम सुखावला हनुमंताने सीतेचा शोध लागेपर्यंत लंकेमध्ये जी घालमेल केली त्याचे वर्णन ब्रह्मदेवाने पुढील भागात लिहिले होते.

"लंकेच्या दारात गुप्त राहून मारुतीने नानापरीच्या वानरचेष्टा केल्या. राक्षसांमध्ये भांडणे लावली. आपल्या शेपटीत नगरातल्या स्त्रीयांना लपेटले. त्या स्त्रियांच्या जवळ असलेल्या पाण्याच्या घागरी राजद्वारात फोडून टाकल्या. पाण्याचा त्यामुळे नगरात तुटवडा झाला. राजद्वारात घट फोडल्यामुळे राजा दशानन रावण मेला असे स्पष्ट होऊन सर्व स्त्रिया व्यथित झाल्या. त्यांचा आकांत सुरू झाला. हत्तीवर हत्ती आदळावे म्हणून त्याने पुढचे हत्ती अडवले आणि मग हत्तींमध्ये झुंज सुरू झाली. त्यातून हत्तीवरचे माहूत हेही भांडू लागले. त्यातच मारुती दोघांनाही शेपटीत गुंडाळून त्यांना आदळत होता. हत्ती एकमेकांवर आदळून तडफडत होते, वीर हत्तींच्या अंगाखाली रगडले जाऊन चरफडत होते. अशा रीतीनेच घोडे आणि घोडेस्वार यांचीही मारुतीने गांजणूक केली. राजद्वारात हा हलकल्लोळ उडाला तेव्हा मारुती स्वतः गुप्तरूपातच होता. त्याने तिथल्या अतिरथी, महारथी यांचीही दैना केली. तो गुप्त राहून पुढच्या मल्लाची शेंडी ओढी, मागच्या मल्लाला पुढच्यावर ढकली. त्यातून त्या बलवान आणि उन्मत्त मल्लांमध्ये भांडण सुरू

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

होई. नंतर मारुतीने त्या मल्लांना मारले आणि ते राजद्वारात कुंथत पडले."

"वेदपठण करणारे आपसात सानुनासिक आणि अनुनासिक असा वाद करत होते. त्यांना रामनामस्मरणाचा विवेक नव्हता. त्यामुळे मारुतीने त्यांना निर्नासिक ठरविले. अस्मात् कस्मात् याची उपपत्ती ही विद्वानांच्या ठिकाणची विवेकयुक्ती होती, पण त्यांची नामस्मरणात बुद्धी नव्हती. त्यामुळे मारुतीने ते भूमीला भार आहेत असे मानले. प्रधान मोठ्या गर्वाने आणि सन्मानाने पालखीत बसून येत असता हनुमानाने कौशल्याने पालखी वाहणाऱ्या भोयांच्या कानात शेपूट फिरवली. त्याबरोबर भोयांनी दचकून माघार घेतली. त्यामुळे पालखी जमिनीवर आदळली आणि त्यांचे दात पडले आणि तोंडात धूळ गेली. ज्यांना राजसभेत सन्मान होता ते प्रधान राजद्वारात अपमानित झाले. त्यांना लंकेचे नागरिक हसले त्यामुळे प्रधान संतापले. ते म्हणाले, "चार शेर धारण असलेला तूपभात आणि श्रेष्ठ प्रतीचे अन्न घरी खाणारे आम्ही, आणि आम्हाला राजद्वारात पाडलेत तुम्ही." असे म्हणून प्रधान भोयांना व्यवस्थित बडवू लागले. तेव्हा भोयी म्हणाले, "आमचे बोलणे तरी ऐका, उगीच आम्हाला का मारता? सीतेने शेपटीचे टोक सोडले त्यामुळे तुमचे दात पडले." यावरून सीता लंकेत आहे निश्चित हे मारुतीला लोकांच्या बोलण्यावरून समजले; पण नेमकी ती कोणत्या ठिकाणी आहे याचा शोध त्याला मिळाला नाही. एवढ्यात रात्र झाली आणि सीतेचा शोध घेण्यासाठी तो रावणाच्या सभेत जाण्यासाठी निघाला. ती वार्ता ऐका."

"रावणाची सभा सुंदर होती. रावण सिंहासनावर बसला होता. सभेत राक्षसवीर, प्रधान, आणि रावणपुत्र बसले होते. त्या सभेत गस्तीचे सेवक येऊन, रावणाला वंदन करून, नगरातली वार्ता सांगून, "हे संकट दुर्धर आहे. मुख्य विघ्नाची थोरवी अशी की महाद्वारात कल्पनातीत कलह निर्माण झाला. आहे. हत्ती, रथ यांच्या ओळी आणि महावीर अपमानित झाले आहेत. राजसभेत ज्यांना सन्मान आहे ते प्रधान पालखीतून आले तेव्हा त्यांची पालखी मोडून दात पडले. तसेच राजद्वारात घट फुटले, त्यामुळे नर-नारी कळवळत आहेत. नगरात पाण्याचा तुटवडा झाला आहे. त्यामुळे घरोघरी आकांत झाला आहे. नागरिक सरसकट बोलत आहेत की, दशानन मृत झाला असून, त्यासाठी राजद्वारात घट फोडले गेले आहेत. सर्व स्त्रिया दुःख करत आहेत." हे वृत्त ऐकून रावण अत्यंत संतापला. "हे गस्तीवाले अपवित्र बोलत आहेत, त्यांना धरा आणि मारा" असे तो म्हणाला. यावर मारुतीने स्वतःशी विचार केला की, "मी केलेल्या विघ्नाचे वर्णन केले म्हणून जर हे गस्तीवाले मारले गेले तर मी केवळ भूमीला भार ठरेन." नंतर त्याने आपल्या शेपटीच्या फटकाऱ्याने सुगंधी तेलाच्या, कापराच्या, अठरा लाख एवढ्या दोन्ही बाजूच्या दीपिका विझवल्या. हे पाहून सभेत एकच गोंधळ उडाला. सर्वत्र अंधार झाला. ज्यांनी गस्तवाला धरला होता त्या राक्षसांना मारून मारुतीने गस्तवाले मुक्त केले. त्यांची मुक्तता केल्यावर मारुतीने सभेत रागारागाने अद्भुत कृती केली."

"सभेत अंधार झाल्यावर हनुमंताने लुबाडणूक केली. वस्त्रे, अलंकार, शस्त्रे काढून घेतली. त्यावेळी एक म्हणाला 'तू माझी वस्त्रे नेलीस'; दुसरा म्हणाला, 'तू माझी शस्त्रे घेतली'; भट म्हणाले, 'माझी धोत्रे नेली' अशी मारुतीने गुप्तपणे लुबाडणूक केली. त्याने कुंडले घेताना कोणाचे कान तोडले, वस्त्रे घेताना डोळे फोडले, हातातले अलंकार घेताना हात तोडले; असे मारुतीने राक्षसांना गांजले. मुकुट घेताना मस्तक फोडले, करगोटा घेताना कंबर मोडली, अंगठ्यांसाठी बोटे तोडली, राक्षसांना छळून वेडे केले. गळ्यातले हार काढताना गळे मुरगळले, पदकासाठी हृदय फोडले, नेसती वस्त्रे घेताना लिंगे

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

दुखावली, राक्षसांना बापडे पुरते त्रस्त केले. त्यावेळी काहीजण ओरडू लागले, "आपली वस्त्रे त्वरित सोडा नाही तर आपली लिंगे उध्वस्त होतील. त्यामुळे येणारी नपुंसकता संसारात कशी सोसवेल.' राक्षसवीरांच्या पायातली भूषणे घेताना मारुतीने त्यांचे पाय मोडले, त्यावेळी कोणी ओरडू लागल्यास त्याचे नाक छेदले. त्यामुळे राक्षस फें फें करत इतरांना सांगू लागले की 'ओरडू नका रे कारण त्यामुळे नाक जाईल. गप्प राहा. आपले अलंकार किंवा वस्त्रे गेली तर ती पुन्हा मिळवता येतील; पण नाक कसे जोडता येईल." असे म्हणत एका मागे एक ते राक्षस दडू लागले. हनुमंताने असा अद्‌भुत पराक्रम केला."

"गस्तवाले जे सांगत होते ते विघ्न खरोखरच आले आहे. सीता अत्यंत संतापली असून रावणाचा ती वध करणार. जानकीचा राग अत्यंत अद्‌भुत आहे. तिनेच हा शेपटीचा झेंडा सोडला असणार. रावण जिवंत आहे की मृत झाला हेही कोणी सांगेना. सभेत अंधार असून त्यामधेच त्याच्यावर हे विघ्न आले आहे अशी सभेत हाकाटी उठली. राक्षसांना दुःखावस्था आली. इंद्रजित, कुंभकर्ण मारले, त्यानंतर इथे रावण, त्याच्यासाठी कोण धावून जाणार असे म्हणत राक्षसगण कापू लागले. मारुतीचा पिता वायू रागावला आणि त्याने दीप विझवले. राक्षसांचे कंदन झाले. रावण संपला. राजाज्ञेचे सूत्र तुटले. सभेमधले चोर हेरले आणि अनेक थोर राक्षस लुबाडले. त्यावेळी जे राक्षस पळून जाऊ लागले त्यांना मारुतीने शेपटीचे जोरदार फटके मारले. अवघे अंधारात सापडून राक्षसांचा कोंडमारा झाला. सीता अत्यंत संतापली आणि राक्षसांवर हे महासंकट आले. बाहेर जायला वाट मिळेना त्यामुळे मरण अटळपणे ओढवले. मारुतीने अंधारात रावणाचा मुकुट शेपटीने ओढला. त्यावेळी रावण धास्तावला आणि 'माझा शेवट आला' असे म्हणाला. हनुमानाने रावणाच्या डोक्यावर, छातीत टोले मारले, त्यामुळे रावणाला भोवळ आली; पण धाकामुळे त्याला बोलवले नाही. अंधारात दिसत नव्हते पण प्रत्यक्षात शरीरावर दणके बसत होते; त्यामुळे रावण भयाने थरथर कापत होता. 'गस्तवाला खरे बोलला, माझ्यावर खरोखरच हे विघ्न आले आहे. गुप्तपणे माझ्यावर मार पडतो आहे. या निष्ठुर आघातांनी माझ्या प्राणाचा नाश होईल. तेव्हा हनुमंत म्हणाला, "हे रावणा, तू सीता चोरून आणलीस म्हणून तुझा शिरच्छेद करण्यासाठी मी रामदूत येथे आलो आहे."

मारुतीने आपल्या नखांनी रावणाची दहा शिरे छेदली असती; परंतु श्रीरामाने त्याला तसे करू दिले नाही, म्हणून त्याने रावणाला सोडले. श्रीराम म्हणाला होता, "तू जर रावणाला मारलेस तर माझा पुरुषार्थ व्यर्थ ठरेल.' नंतर रावणाला न मारता हनुमंताने राक्षससमूह लुबाडला, रावणाला गांजले आणि सभेत असा पराक्रम करून तो निघाला. मारुतीने हात लावताच रावण मूर्च्छित झाला. त्याच्या कानात मारुतीने गुपित सांगितले पण रावणाला भ्रांतीमुळे त्याची जाण आली नाही. हनुमंताचे नाव ऐकताच कोणाला लघुशंका झाली तर कोणाचे अधोवात सरले." हे ब्रह्मलिखित वाचताना लक्ष्मण गदगदा हसू लागला, वानरांची हसून मुरकुंडी वळली, श्रीरामही हसला. हनुमंताने सभेत घातलेला गोंधळ ऐकून श्रीराम, लक्ष्मण, सुग्रीव, वानरगण सारेच सुखावले. ब्रह्मदेवाने पुढे लिहिले होते - - "नंतर हनुमंत अशोकवनात आला होता. सीतेशी एकटीची भेट घ्यावी म्हणून झाडावर गुप्तपणे तो बसून होता. तेवढ्यात सीतेच्या विरहाने विषयासक्त रावण तेथे येऊन सीतेला स्वतः म्हणाला, "माझा तू स्वीकार कर. तुला मी सर्वश्रेष्ठ राणी करीन. हे मी शिवाची शपथ घेऊन त्याच्या साक्षीने सांगतो आहे. श्रीराम हा हीन वनवासी आहे, राज्यभ्रष्ट आणि दीनवाणा आहे. त्याचे ध्यान सोडून या राजा रावणाला तू वर. सीते तू निव्वळ वेडी आहेस. अग, माझी

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

प्रतापातील प्रौढी, श्रेष्ठता पाहा. तेहतीस कोटी देव माझ्या बंदिवासात आहेत. इंद्र माझा छत्रधारी आहे, आणि चंद्र हा माझ्या स्नानगृहाचा अधिकारी आहे, वसंताला माझी शय्या सजवायचे काम दिले आहे. तू या रावणाला वरलेस तर सुरासुर तुला वंदन करतील. मंदोदरी ही मुख्य धरून माझ्या ऐंशी सहस्र पत्नी आहेत. त्या सर्व तुझ्या दासी होऊन तुझ्या आज्ञाधारक सेविका होतील. तू माझा स्वीकार करावास म्हणून मी अनन्यभावाने शरण आलो आहे. मी तुझे चरणवंदन करतो; पण तू माझे पाणिग्रहण कर. सुरासुरांनाही कृतान्तकाळ ठरणारा हा प्रतापी लंकानाथ तुला शरण आलो आहे. तेव्हा रघुनाथाला सोडून तू माझी भक्त हो."

"रावणाचे बोलणे ऐकून सीता हसून त्याला म्हणाली, "जळो तुझे मोठेपण आणि काळे तोंड. रावणा, स्वयंवराचा वेळी शिवधनुष्य पेलताना तुझे तोंड काळे पडले आणि श्रीरामाने तुझ्या एका तोंडाची दोन तोंडे केली, आता वृथा बळाच्या वल्गना कशाला करतोस. श्रीरामाने बालवयातच ताटकेचा प्राण घेतला होता आणि सुबाहूला मारून गुरूंचा यज्ञ पूर्णत्वाला नेला. शूर्पणखेची विटंबना करून, चवदा सहस्र राक्षस मारून, त्रिशिरा आणि खर, दूषण यांचा वध करून जनस्थान द्विजांना दिले. रघुनाथाला रथ नव्हता, तो एकटा पायाने लढला तरी केवढा मोठा पराक्रम त्याने केला. तुझी अपकीर्ती आता ऐक. पार्वतीसह शंकर असलेल्या कैलास पर्वताला आंदोलित करणारा तू अखेर श्रीरामाच्या भीतीने भिकारी संन्यासी झालास. कपटी संन्यासी होऊनच शेवटी तू परस्त्रीला चोरलेस. अशा तुझ्याजवळ पुरुषार्थ मुळीच नसताना व्यर्थ वल्गना कशाला करतोस. श्रीराम हा परब्रह्म-पुतळा आहे आणि तू काळा डोमकावळा आहेस. ही सीता तुझा विटाळ कल्पान्त काळीही स्पर्शाने करणार नाही. तू श्रीरामपत्नी चोरल्याने तिन्ही लोकात निंद्य ठरला आहेस. रावणा डुक्करतोंड्या तुझे तोंड सुद्धा मी पाहणार नाही. अरे, कावळ्याचा सोबती जसा चंद्रचकोर असणार नाही, तसा श्रीरामाचा त्याग करून मी दशाननाला स्पर्शही करणार नाही. लक्ष्मणाची मर्यादा रेषा तुला ओलांडता आली नाही; अशा कुत्र्या, डुक्करा, मी तुझ्याकडे ढुंकून देखील पाहणार नाही. साधू, सज्जन, सौम्य संत हे कधीही विष्ठेला हात लावणार नाहीत, त्याप्रमाणे हे अपवित्र रावणा तुझा स्पर्शही मी मला होऊ देणार नाही." सीतेची ही प्रतिक्रिया ऐकल्यावर ते बोलणे रावणाच्या वर्मी लागून रावण संतापला. "ही निंद्य भाषा करणाऱ्या सीतेची जीभ कापून काढा," असे म्हणाला. आता मी हिला बळजबरीनेच भोगतो. त्यावेळी मला कोण अडवणार आहे, रघुनाथ कसा रक्षण करणार आहे आणि ही तरी पतिव्रता कशी राहते पाहू!"

"रावणाचे हे भाषण ऐकून मारुतीला राग आला आणि रावणाचा घात करावा म्हणून वृक्षामध्येच बसून खवळला. त्याने डोळे विस्फारले. शेपटाची चाबुकांसारखी वळी केली आणि रावणाची दहा शिरे छेदण्यासाठी तो मोठ्याने गुरगुरू लागला. "माझ्या समक्ष हा सीतेचा छळ करतो आहे, तेव्हा केवळ हेर म्हणून हे रडत रघुनाथाला सांगणे म्हणजे मला नपुंसकता आली म्हणायची. रावणाने सीतेला हात लावला तर मी त्याचा जीवच घेईन." असा त्या बलवान मारुतीने विचार करून वृक्षावरून गुरगुर केली. ती गुरगुर ऐकून रावणाला कापरे भरले. अशा रीतीने सीतेचे रक्षण करण्यासाठी श्रीरामच त्वरेने त्या ठिकाणी जणू उपस्थित झाला. रावण काय करावे या विचारात पडला तेवढ्यात मंदोदरी तेथे आली. तिने रावणाला हाताला धरून मंदिरात नेले आणि म्हटले, "तुला एक गुपित सांगते. श्रीराम सीतेपाशी अखंड असतो. जर तू तिला हात लावलास तर निष्कारण तू मरशील." असे तिने सांगितल्यावर रावणाला धाकधुक वाटू लागली. तिकडे सीता वृक्षवाटिकेत बसून विलाप करू लागली. "श्रीरामभक्त लक्ष्मणाला मी छळल्यामुळेच मला श्रीराम अंतरला, मला

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

रावणाने पळविले, भक्तांचा छळ करणे हे महापाप आहे. श्रीरामाने केलेल्या आज्ञेनेच माझ्या रक्षणासाठी लक्ष्मण माझ्याजवळ थांबला असताना मी त्याचा छळ केला, म्हणूनच रावण मला बंदीत घालू शकला. छळवाद करणाराचे तोंड रघुनंदन कधीच पाहात नाही. त्याने मला निंद्य मानूनच सोडले. छळवादी शोकात बुडतो तो यामुळेच.''

''श्रीरामाच्या भक्ताचा छळ करणे हे पंचमहापातकांहून अधिक दारुण असते. (ब्रह्महत्या, सोने चोरणे, गुरुपत्नीशी संभोग, इत्यादींचा त्यात समावेश आहे) ह्यामुळेच श्रीराम माझ्यावर रागावला, आता मला बंदीतून कोण सोडवणार? श्रीरामाच्या भात्यातील दुर्धर बाणाने लंकेचा निश्चित विध्वंस होईल, रावण सपरिवार निर्दाळला जाईल; पण तो श्रीरामच माझ्यावर रुष्ट आहे. श्रीरामाचा बाण सुटल्यावर रावण म्हणजे एखाद्या चिलटासारखा आहे; परंतु मी सखा लक्ष्मण छळला म्हणून तो रघुनंदन माझ्यावर रागावला आहे. क्षणभरही न लागता रामाने दशानन रावणाचा वध केला असता पण लक्ष्मणाच्या छळाने राम रागावला आहे. खरे तर दासाला शिक्षा डोक्याचे मुंडण, स्त्रीला शीक्षा म्हणजे तिची उपेक्षा'' असे म्हणत सीता मोठ्याने रडू लागली. ''श्रीरामाकडून उपेक्षा झाल्याने मी करंटी जिवंत तरी कशी? त्वरित माझा प्राण जावा.'' असा ती पश्चात्ताप करू लागली. श्रीरामाचे स्मरण केल्याने तिच्या शरीरावर रोमांच, घाम उपजला आणि अश्रू ओघळू लागले.''

''सीतेचे रडणे पाहून हनुमंतालाही रडू आले आणि त्याच्या मनात तिच्याविषयी कळकळ निर्माण झाली. तेव्हा त्याने तिच्यापुढे मुद्रिका टाकली. ती मुद्रिका पाहून तिची निद्रा, ग्लानी संपली. तिने कान टवकारले, तिची चिंता नाहीशी झाली, मन तटस्थ झाले, ती आश्चर्यचकित झाली. श्रीरमाच्या मुद्रिकेची हीच थोरवी की सर्व दुःख संपवून ती अपरंपार सुख देणारी चिदचिन्मात्र आहे. अंधारातले दीपिकेचे तेज ग्रासून, सूर्य-चंद्र यांना काजव्यासारखे करून, प्रकाशवंत अशी ती होते. मुद्रिकेवरचे श्रीरामाचे नाव पाहून सीतेने ती मुद्रिका बाहेरून पाहिली. मुद्रिकेच्या पाकळ्यांवर सहस्र वेळा श्रीरामाच्या नावाच्या अक्षरांच्या ओळीच ओळी लिहिल्या असल्याचे वाटून सीता ती अक्षरे न्याहाळत राहिली. तेव्हा त्या अविनाशी मुद्रिकेवरील अक्षरांमध्ये दशावतारांचे भाष्य, चरित्रमालिका दिसून सुखदायक अशी सीतेला भासली. मुद्रिकेचा अंतर्भाग अत्यंत पवित्र असून, त्यामध्ये परात्पर श्रीरामनाम, जे विनाश आणि अविनाश यांच्या पलीकडे आहे, ते दिसले. अशी ती मुद्रिका आनंदयुक्त असल्याने सीता रोमांचित होऊन, सद्‌गतित होऊन आनंदाश्रू ढाळू लागली. मूळ मुद्रिका सोन्याची, त्यावर श्रीरामनामाचे सुवर्ण नाम असलेले पाहून त्या महतीमुळे सीता सुखसंपन्न झाली. ती मुद्रिका नव्हे प्रत्यक्ष श्रीरामच आला आहे असा भाव सीतेच्या ठिकाणी निर्माण होऊन तिने पदर सावरला. श्रीराम अचानक आल्याचा भास झाल्याने ती लाजेने अधोमुख झाली, सर्वांगी हर्षित झाली आणि सुखाने डोलू लागली. ''तो लक्ष्मण, ज्याचा मी छळ केला तो कुठे असेल? मी त्याचे पाय केसांनी झाडीन, त्याला लोटांगणे घालीन. त्याबरोबर श्रीरामाच्या गोडीने म्हणेन ''घ्याजी फोडी, देईन विडी कारण माझ्यासाठी तातडीने आलात तेव्हा तुमचे चरण केसांनी झाडीन.'' अशा प्रकारे निरुपम ब्रह्मलिखित सीताचरित्र ऐकून श्रीराम संभ्रमित झाला आणि त्याचे मन प्रेमभावाने भरून गेले.

सीतेला 'आलिंगन दे' म्हणत रघुनंदन उठला. त्याला पलीकडे चिद्रत्न सीता दिसली आणि रामाला भेटायला आली. श्रीराम दोन्ही हात पसरून आलिंगन देण्यासाठी उभा राहिला होता. श्रीराम या अवस्थेतच पुढे धावला. हे पाहून वानरगण चकित झाले. सुग्रीव मूर्च्छित झाला. पत्राचा अर्थ जाणलेला लक्ष्मणही मूर्च्छित झाला. रघुनाथाचा हर्ष ओसंडून चालला पदोपदी तो नाचत होता.'' धन्य हा सुदिन.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

हनुमंता, माझी सीता मला भेटवलीस.'' हे ऐकून हनुमंत म्हणाला, ''मी फार मोठी चूक केली. मी सीतेला इथे आणली असती, तर रघुनाथ सुखी झाला असता. मला पश्चात्ताप होतो आहे. मी सर्वथा चुकलो. मला काय नपुंसकता आलीय. एका क्षणात सीतेला आणतो. रघुनाथा, एक क्षणभर धीर धर. वेगात जाऊन सीतेला घेऊन येतो.'' असे म्हणून रामाच्या पायावर डोके ठेवून हनुमंताने उड्डाण केले. हनुमंताने उड्डाण करताच श्रीरामाला परिस्थितीचा उमज पडला. त्याने स्वतः धावून हनुमंताला धरले आणि म्हणाला मी सांगतो ते ऐक. ''ब्रह्मलिखित ऐकताच माझ्या मनात प्रेम उसळले. दुश्चित्त अवस्थेत 'सीता-सीता' असे म्हणालो. तू त्यामुळे तो अर्थ घेऊन जाऊ नयेस.'' यावर हनुमंत श्रीरामाला घेऊन उड्डाण करणार होता. तेव्हा अंगदाने तो अर्थ समजून घेऊन हनुमंताला धरले. मग हनुमान रामासह अंगदालाही घेऊन जाऊ लागताच जांबुवंताने त्याला सर्वांसह अडवून धरले. हनुमंत पुन्हा उड्डाण करणार असताना सुग्रीवाने मारुतीला धरले. नंतर सुग्रीवासह मारुती जाऊ लागताच लक्ष्मणाने धावून जाऊन अडवले. मारुती अंगद, सुग्रीव, जांबुवत आणि राम-लक्ष्मण यांना घेऊन लंकेत नेऊ लागला.

मारुतीचे मनोगत असे होते की श्रीराम रावणाला, लक्ष्मण इंद्रजिताला मारतील आणि आम्ही वानरगण राक्षसगणाला मारू. नंतर सीतेला घेऊन सुखाने परत येऊ. हे मारुतीचे मनोगत जाणून श्रीरामाने हनुमंताची क्षमा मागितली. श्रीरामाची ही कृती पाहून मारुतीने रामाला लोटांगण घालून म्हटले, ''आपली आज्ञा प्रमाण आहे, प्राणांतीही मी तिचे उल्लंघन करणार नाही. तुम्हाला सीतेची अवस्था कळली. तिला शीघ्र येथे आणण्याची धिटाई केली. आपण मला क्षमा करावी.'' असे म्हणून त्याने रामाचे पाय धरले. श्रीरामाने मारुतीला आलिंगन दिले. स्वामीभक्ताला समाधान झाले. सर्वांनी हनुमंताच्या अद्भुत सामर्थ्याचे कौतुक केले.

अध्याय अठ्ठाविसावा

हनुमंत राम-लक्ष्मण आणि सुग्रीव, अंगद, जांबुवंत यांच्यासह उड्डाण करू लागला तेव्हा त्याची कीर्ती सुरवरांनी गगनात वाखाणली. भूतलावर मोठ्या वीर योद्धयांनी वाखाणली. नंतर श्रीरामाने मोठ्या प्रेमाने लक्ष्मणाला म्हटले, ''सौमित्रा, पुढचे ब्रह्मह्मलिखित वाच.'' मारुतीने मुद्रिका दिल्यावर त्याने सीतेची एकटीची भेट घेतली; धन्य ब्रह्मयाचे ब्रह्मपत्र, धन्य श्रोता हा राम, धन्य पत्राचा वाचक लक्ष्मण आणि धन्य ते वानरगण. पत्राचे वाचन सुरू झाले.

मुद्रिका पाहून सीतेची प्रतिक्रिया

''मुद्रिकेच्या देदीप्यमान तेजामुळे सीतेला श्रीराम आला असे वाटले. त्यामुळे ती लाजली आणि प्रेमाने बावरली. सावधान झाल्यावर तिला पुढे अंगठी दिसली आणि ती श्रीरामाची मुद्रिका आहे हे जाणून ती सुखी झाली. तिने मुद्रिका हृदयाशी धरून आलिंगन दिले; स्वानंदाने चुंबन घेतले आणि ती सुख पावली. ''तुला लोटांगण घालते. तू माझ्यापासून दूर गेलीस. तुझे चरण धुवून ते तीर्थ प्राशन करीन. मी लक्ष्मणाचा छळ केला, त्या पापाचे परिमार्जन होऊन मला श्रीरामाची पूर्ण प्राप्ती झाली. तू राममुद्रा म्हणजे माझी सखी. तुला शय्या घालून देते, तिच्यावर विश्रांती घे. कारण, समुद्र आणि मार्गातले पर्वत ओलांडून दमली असशील. मी डाव्या अंगावर आणि तू उजव्या अंगावर अशा मैत्रिणीच नव्हे तर स्वानंद भगिनीच आहोत. माझ्यावर दया करून श्रीरामाची संपूर्ण कहाणी मला सांग.'' सीतेला त्या अवस्थेत सचेतन, अचेतन हे जाणवत नव्हते. सद्गुरुविषयी असलेले

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sayaji Rao... Research Academy eGangotri

ते भक्तिप्रेम पाहून मारुतीचे डोळे भरून आले. "धन्य सीतेची भक्ती! हे भक्तिप्रेम आमच्यात नाही; आम्ही स्वतःला रामभक्त म्हणवितो; पण सीतेचे प्रेम नित्य असल्याने हिच्यावर श्रीराम संतुष्ट आहे. जो कोणी सगुण आणि निर्गुण श्रीरामभक्ताला वंदन करतो तो नित्यमुक्त होतो. जो श्रीरामभक्ताची निंदा करतो तो नरकात पडतो." असे हनुमंत स्वतःशी म्हणाला. इकडे सीता मुद्रिकेशी बोलत होती. मुद्रिका पाहताच तिचा आदर करून तिच्याशी सप्रेम गोष्टी करत होती. "श्रीराम जगजेठी काय करतो? जर राम-लक्ष्मण उत्तम स्थितीत असतील तर ते दोघे माझी सोडवणूक करायला का येत नाहीत? दुर्धर असे बाण त्यांच्याजवळ असताना ते पराक्रम का दाखवत नाहीत? श्रीरामाच्या भात्यातील दुर्धर बाण समुद्र शोषतील, दशाननाचा नाश करतील आणि माझी सुटका करतील; किंवा असे असेल का की त्या दोघांनी सृष्टीचा त्याग केला असल्याने ते दुःख सांगवत नाही म्हणून त्यांनी ही मौनाची युक्ती सुचून या सज्ञान राममुद्रेला पाठविली आहे. श्रीराम परलोकात गेला असेच ही मौनमुद्रा वार्ता सांगते आहे; कारण तो जर असता तर त्याने माझी निमिषात सुटका केली असती. श्रीरामाचा एक एक बाण त्रैलोक्याचे कंदन करील, त्यापुढे रावण काय आहे. राम मला सोडून परलोकी गेला असावा. मी सखा लक्ष्मणाचा छळ केला त्यामुळे राम रागावला असावा. त्यासाठी मला अशी समुद्रात सोडून, दोघेही परलोकात गेले असणार."

"मुद्रिके मला खरे काय ते सांग. माझे रावणाकडून हरण झाल्यावर, दोघे पंचवटीत येऊन, त्या संकटात त्यांनी काय केले? तू ज्या अर्थी प्रत्युत्तर देत नाहीस त्या अर्थी माझ्या विरहाने राम-लक्ष्मण हे दोघे परलोकी गेले असावेत आणि हेच तुझ्या मौनाचे कारण असणार; किंवा त्यांनी लोकलज्जेच्या भयाने विषप्राशन केले असणार; माझ्या विषयीच्या दुःखाने मूर्च्छित होऊन ते गेले असावेत. माझ्या दुःखाने अतीव शोक करत त्यांनी फलमूलांचा आहार आणि जल यांचा त्याग केल्यामुळे त्यांना भ्रम झाला असेल आणि ते शक्तिहीन झाले असतील. 'सीता-सीता' असा आक्रोश करण्याने त्यांनी प्राण सोडले किंवा तहानेने व्याकुळ होऊन 'पाणी-पाणी' म्हणत ते गेले. मी पर्णकुटीत दिसले नाही तेव्हा त्यांनी दुःखाच्या कडेलोटात शस्त्रे पोटात घातली असतील किंवा गळफास लावून घेतला असेल. पर्वतकड्यावरील प्रचंड धोंड्यावरून दोघांनी लोटून घेतले असेल आणि आता ते वाळून करवडून गेले असतील; किंवा ते दोघे दुःखाने वनात मूर्च्छित पडले असताना कोल्हे, वाघ, सिंह यांनी फाडले असतील; अथवा वनहत्तींनी तुडवले असतील. वास्तविक ते दोघे निधडे वीर असून त्यांच्यापुढे वाघ-सिंह काय बापडे; अथवा असे असेल की रावणाने कपट करून त्यांना छळून मारले असेल. विश्वामित्रांच्या यज्ञप्रसंगी श्रीराम अहोरात्र जागा राहिला आणि सुबाहू यज्ञात व्यत्यय आणत असताना रामाने त्याला मारले. श्रीराम आणि लक्ष्मण यांना छळावे म्हणून सुंदर बनून आलेल्या शूर्पणखेची त्यांनी विटंबना केली. रामापुढे छळ-कपट चालत नाही."

"श्रीराम मुळातच उदासवृत्तीचा, त्यात रावणाने माझे हरण केल्यामुळे श्रीराम शस्त्रत्याग केलेला संन्यासी झाला असेल आणि वनात राहणारा वनवासी बनला असेल. किंवा आणखी एक गुह्य असेल, की श्रीराम मुळातला आत्माराम असल्याने, रावणाने माझे हरण करताच समाधीशय्येत त्याने प्रवेश केला असेल. जन्म, मरण, आधी, व्याधी जिथे निश्चित शमतात त्या समाधीचा त्याने स्वीकार केला असेल. तिथे देहाची उपाधी उरत नाही. देहबुद्धीच्या वर गेल्याने मी राम, सीता माझी पत्नी, हे रघुनाथाला आठवत नसेल. तो समाधी अवस्थेत गेल्याने समपदी पोचला असणार. त्या अवस्थेत कुठला राम आणि कुठली

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sayaji Rao Gaekwad Research Academy, eGangotri

सीता असे झाल्याने रावणाने आपली पत्नी हरण केली हेही त्याला आठवत नसणार. समाधीशय्येने सुखसंपन्न केल्यावर देहादी प्रपंचभान खोटे ठरते. मग मिथ्या राम आणि मिथ्या रावण असे झाल्यावर माझ्यासाठी कोण धावेल." हे ब्रह्मलिखित ऐकल्यावर श्रीरामाची समाधी लागून, सर्व इंद्रियांचा उपशम होऊन, त्याला कर्तव्यार्थ आठवत नाहीसे झाले, ब्रह्मलिखित जे होते, जे सीता म्हणाली होती, तसाच श्रीराम होऊन स्वाभाविकच स्वरूपस्थितीत गेला. त्याचे डोळे अर्धवट मिटले, प्राण पांगुळले, चित्त जिथल्या तिथे चैतन्याशी समरस झाले आणि तो नित्य परब्रह्म झाला. ब्रह्मस्थितीचे हेच लक्षण की जिथे मी-तूपण नसते. राम स्वतःला विसरला. लक्ष्मणाची वाचा बंद झाली, राम स्वरूपात लीन झाला. तेव्हा सुग्रीव कळवळला आणि वानरगण तळमळू लागला. त्यावेळी हनुमंताला वाटले की लक्ष्मणाची वाचासिद्धी खुंटली आणि श्रीराम समाधी पावला म्हणून सीतेचा लंकेतला बंदिवास सुटणार नाही, पर्यायाने कार्य पूर्णपणे नासले.

हनुमंत मौन धारण करून, हात जोडून कथा ऐकत होता. रामाची समाधी अवस्था पाहून तो खवळला. "श्रीरामाची समाधी ही उपाधी असल्याचे मला निश्चित समजले आहे. मी सीतेचा शोध करून आलो आहे; ती वार्ता आता व्यर्थ होते आहे; पुढची कार्यसिद्धी थांबली आहे; रामाची समाधी ही चांगली नाही. मी सीतेला शपथपूर्वक सांगितले आहे की श्रीरामाला इथे घेऊन येईन. समाधीसुख ते काय बापडे. माझी शपथ मिथ्या होणार नाही. श्रीराम हा स्वतः स्वभावतः समाधी उतरण्याच्या परता आहे; त्याला कसली समाधीअवस्था; आता मी त्याला सावध करतो." श्रीरामाची स्वरूपस्थिती मारुती पूर्णपणे जाणून होता. त्याने श्रीरामाला सावध करण्यासाठी एक युक्ती केली. मारुती स्थूळ, लिंग आणि कारण या (देहावस्था) तिन्हींपासून वेगळा होऊन, जेथे मी-तूपण नाही तेथे त्याने प्रवेश केला. महाकारणात प्रवेश करून श्रीरामाला सावध करण्यासाठी वाणीशिवाय संपर्क आणि अभिव्यक्ती करून गुरुवचन सांगू लागला. सद्गुरू वसिष्ठांचा एक श्लोक पाचव्या वाचेने (म्हणजे शब्देविण) हनुमान रामाची समाधी उतरविण्यासाठी म्हणू लागला. त्याचा अर्थ असा होता की हातातल्या हातात वस्तू घेता , शब्दाविना अर्थ प्राप्त होणे, हाच पाचव्या वाचेचा अर्थ आहे. श्रीराम हा समर्थ श्रोता असल्याने त्याला त्यातला अर्थ समजला. तो अर्थ होता. 'अंतरी अद्वैत एक, बाह्यतः लोक स्वधर्म पाळतात. अंतरात चोख आत्मबोध आणि वेदविवेक बाह्यतः पाळतात. अंतरातून सर्वस्वाचा त्याग आणि बाहेर भोग भोगणे. आपला समाधियोग सोडून आपल्या कीर्तीने जगाचा उद्धार करणे. देवांचा बंदिवास सोडवून हे रामराजा विजयध्वज उभा कर.' ही सद्गुरू वसिष्ठांची उक्ती ऐकून रघुनंदन स्वतः सावध झाला आणि त्याने हनुमंताला आलिंगन दिले. श्रीरामाचे जे हृद्गत ते भगवद्भक्त मारुती जाणत होता आणि हनुमानाचा भावार्थ हृदयस्थ राम जाणत होता. हे देवभक्तांचे अनन्यपण श्रुतिशास्त्रांनाही अगम्य आहे. श्रीरामाची अनन्यभक्त सीता आणि तसाच हनुमंत. त्या दोघांची कथा ऐकायला श्रीरघुनाथाला आनंद वाटत होता.

सीता मूर्च्छित, मारुतीचे रामचरित्र कथन

ब्रह्मलिखितात पुढे अशोकवनात सीतेने काय म्हटले ते सांगितले होते. "त्या अचेतन राममुद्रिकेला सन्मान देऊन, लोटांगण घालून सीतेने विचारले की तुला इथवर वाटेने कसे चालविले, तू घाट कसे ओलांडलेस, समुद्र पार करायला अवघड असताना तू या काठावर कशी आलीस? तुला श्रीरामाने आणले की आणखी कोणाबरोबर आलीस? ते सगळे मला सांग. एक खरे की तुझ्यावर रामनाम कोरले असल्याने तुला चराचरात कुठेच प्रतिबंध असणार नाही. तू सुखाने

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized By Sarayu Trust and eGangotri

भवसागर तरशील, संसारात धन्य होशील. ज्याला राममुद्रा लाभेल तो संसारात सर्वार्थाने तरतो. वास्तविक हे तुला विचारायलाच नको. रामाच्या कृपाप्रेमाने तू आलीस. माझ्याविषयी तुझ्या पोटी प्रेम आहे, तेव्हा मला सर्व गुपिते सांग. माझ्यामागे पंचवटीत रामाने त्या संकटात काय केले?" यावर मुद्रिकेने प्रत्युत्तर न दिल्यामुळे सीताच पुढे म्हणाली, "राम-लक्ष्मण गेले हेच तुझ्या मौनाचे कारण आहे. तुझ्या न सांगण्यानेच तू ते सांगितले आहेस. श्रीराम निजधामाला गेला हे सांगण्यासाठी त्याने तुला पाठविले आहे. तर आता मीही देहत्याग करते." असे बोलून सीता प्राणत्यागाला सिद्ध झाली. राममुद्रा हृदयाशी धरून, तिच्या साक्षीने रामाचे स्मरण करत सीता मूर्च्छित होऊन धरणीवर पडली. सीता मूर्च्छित होऊन पडल्यावर मारुती गडबडला. त्याला वाटले की रामाच्या विरहाने संतप्त झालेली सीता खरोखरच प्राणत्याग करील. मग सीतेने प्राणत्याग केल्यावर रामाला तोंड कसे दाखवायचे?"

"तुझी कांता मेली आणि मी मोठा पराक्रमी म्हणून परत आलो. समुद्र उल्लंघून मीच सीतेला विघ्न ठरलो. श्रीरामाची मुद्रिका तिच्यापुढे टाकून मी तिचा प्राण घेतला. मुद्रिकेची खूण दाखवून तिला परत आणायचे त्याऐवजी मुद्रिकेच्या खुणेनेच तिला मारली. आता श्रीरघुनाथाला कसा भेटू?" असे मारुतीला प्राणांतिक संकट पडले. "आपण मुद्रिका सत्वर टाकली हीच चूक केली. श्रीरामाच्या मुद्रिकेने विरही होऊन सीतेचा प्राण गेला. मी लंकेत आलो आणि ना सीता ना राम असा माझ्यावर अनर्थ ओढवला आहे. माझ्यामुळेच सीता गेली आणि अपयश माझ्या माथी आले. तर आता मी काय करू रे रघुनाथा! तूच माझा बुद्धिदाता हो. मी तुझा दीन भक्त असून, माझ्यावर हे संकट आले आहे. तू कृपाळू असून माझे संकट दूर कर." अशा शब्दात दुःखी हनुमंताने श्रीरामाचे आदराने स्मरण केले आणि त्याला लगेच बुद्धी सुचली की सीतेला सावध करण्यासाठी श्रीरामाचे नामसंकीर्तन करावे. त्याबरोबर त्याने वृक्षावर बसूनच श्रीरामाची कीर्ती आदरपूर्वक गायला आरंभ केला. ज्यामुळे स्वार्थ आणि परमार्थ साधेल असा अर्थ व्यक्त होईल असे वर्णन तो करू लागला. श्रीरामाचे कीर्तन ऐकून सीता सावध होईल असे कीर्तन हनुमंताने सुरू केले.

"कौसल्येच्या पोटी गर्भातीत दाशरथी श्रीरघुनाथ मूर्तिमंत परब्रह्म सूर्यवंशात अवतरला. राम हा पुरुष आणि सीता ही प्रकृती (माया), राम चैतन्य आणि सीता चिच्छक्ती, तो धैर्य ती धीरता, असे ते धन्य जगी अवतार झाले. गोडी आणि साखर ह्या दोन नावांची एकच वस्तू त्याप्रमाणे राम आणि सीता हे एकात्म असे अवतार आहेत. श्रीरामाचे आचरण असे की तो नित्य गुरू आणि पिता यांच्या आज्ञेत वागे. द्विजांचा अनन्य भक्त असा तो देवांच्या साहाय्यार्थ अवतरला. कैकेयीच्या वराने दशरथाने रामाला दंडकारण्यात पाठविले. सखा लक्ष्मण त्याच्या बरोबरच वनवासाला निघाला. वनवासात श्रीराम गंगातटी (गोदातटी) पंचवटीत राहिला. सीता त्याच्यासह तिथे होती. शूर्पणखेची विटंबना करून, त्रिशिरा, खर, दूषण यांना मारून रामाने जनस्थान जिंकून ते द्विजांना दान केले. सीतेने मृगकंचुकीच्या लोभाने रामाला मृगामागे पाठविले. नंतर लक्ष्मणाला दूषणांनी छळून सीतेने बाहेर पाठविले. त्यावेळी रावणाने सीतेचे हरण केले. श्रीराम आणि लक्ष्मण सीतेचा शोध करत जटायू आणि रावण यांचे युद्ध झाले तेथे आले. श्रीराम हा कृपाळू असल्याने त्याने जटायूचा उद्धार केला. पुढे कबंधाचा वध करून ते दोघे किष्किंधेला आले. तेथे श्रीरामाने वालीचे निर्दाळण करून, सुग्रीवाला राज्य दिले आणि अंगदाला युवराजपद दिले. यामुळे वानरांशी त्यांचे सख्य झाले. तुझ्या शोधासाठी त्या रघुनाथानेच पाठविले आहे. तुझ्या भेटीसाठी सीते रामाने व्रत धरले आहे. ह्या वानराचा तुला मनातून विश्वास वाटावा म्हणून रामाने मला मुद्रिका दिली.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Research Academy Gangotri

तेव्हा तू निद्रा, तंद्रा सोडून या रामदूत वानराला भेट." हे रामकथामृत ऐकून सीता आनंदाने उठली; पण त्या कथेचे निरूपण वृक्षामधून होते आहे म्हणून आश्चर्यचकित झाली."

सीता-मारुती भेट-संशय व्यक्त

"माझ्यावरील कृपेमुळे श्रीराम कळवळला आणि मला आश्वासन देण्यासाठी वृक्षांकरवी कथा सांगत श्रीराम निश्चित येथे आला. वृक्षांनो मी तुम्हाला वंदन करून विचारते की कोण रामकीर्तन करत आहे? त्याचे मुख पाहून मी त्याला लोटांगण घालीन. ज्याला ही रामकथा शैलीदारपणे सांगता आली त्या भाग्यवानाची पायधूळ मी सुखाने वंदीन. त्याने मला आपले मुख दाखवावे. ज्याच्या मुखी रामकीर्तन आहे त्याचे मुख पाहून मला परम समाधान वाटेल. तेव्हा कृपा करून त्याने मला भेटावे. मी आपल्या चित्तात प्रेम बाळगून, उत्कंठित भावार्थाने मी त्या खुणेची मुद्रा आणणाराला भेटू इच्छिते." सीतेने असे म्हणताच हनुमंत वृक्षावरून स्वतः उतरला. त्याने सीतेपुढे लोटांगण घालून तिचे पाय मस्तकावर धरून तिला वंदन केले. जणू महानिधीचा लाभ झाला, अमृतसागराची चूळ भरली किंवा कळिकाळाला आपण जिंकून आलो असा आनंद त्यावेळी हनुमंताला झाला. त्यावेळी त्याच्या डोळ्यातून आनंदाश्रू झरू लागले. तो सीतेच्या पायावर गडबळा लोळला आणि सुखाच्या भावनेने डोलू लागला. वारंवार तो तिच्या पाया पडू लागला, घामाने भरून गेला, भावपूर्ण गद्‌गतीत होऊन रडू लागला आणि आनंदाने शेपूट उंचावून तिच्यापुढे नाचू लागला."

सीतेच्या मनात मात्र शंका आली की "हा स्वतःला रामदूत म्हणवतो, पण हा रामाबरोबर कसा असेल, कारण पंचवटीत तर हा नव्हता. राम-लक्ष्मण हे दोघे वीर होते परंतु हा वानर त्यांच्यासह नव्हता. हा वनचर कसा आहे कोण जाणे, हा नाना प्रकारच्या चेष्टा करतो आहे. पूर्वी जटायू मी पाहिला होता, या वानराला काही पाहिले नव्हते. असेही असेल की माझा छळ करण्यासाठी रावणच अकस्मात आला असेल. पूर्वी संन्यासी होऊन आला होता. आता वानरवेषात आला असेल. मी याच्यावर का विश्वास ठेवू" असा सीता विचार करत होती. नंतर तिला वाटले, "हा श्रीरामकथा नीट सांगतो आहे. धन्य हा रामभक्त! तेव्हा हा कपटी निश्चितच नाही. त्याने सत्य रामकथा सांगितली आहे, तेव्हा याला खोटा समजणे योग्य नाही. आता याला मी त्याचे पूर्ववृत्त विचारते." तिने मग त्याला त्याचे पूर्ववृत्त विचारण्यासाठी म्हटले, "मी वनवासात असताना तू नव्हतास. आताच तू कसा आलास हे मला साद्यंत सांग. श्रीरामाला तू कुठे पाहिलेस? त्याची भेट कशी झाली? तुमच्या काय काय गोष्टी झाल्या की ज्यामुळे तुझ्या मनात रामाविषयी प्रेम उत्पन्न झाले? श्रीरामाचे कार्य करण्यासाठी तुझ्या ठिकाणी उत्साह कसा आला ते सर्व गुह्य मला सांग. श्रीरामाच्या भेटीने तुला सुख कसे झाले? त्याच्या वाणीचे अमृत, त्याच्या संगतीचे सुख आणि आनंद याविषयी योगायोग कसा झाला ते सांग. तसेच श्रीरामाची ठेवण, त्याचे रूप, त्याचे गुणलक्षण याविषयी आणि लक्ष्मण सखा कसा आहे याची खूणही मला सांग. श्रीरामकथा ऐकताना चित्तातला शोक नाहीसा होतो. भवभयाची चिंता संपते आणि आनंद होतो. याचसाठी मी पुनःपुन्हा तुला हे प्रेमाने विचारते आहे. कारण त्या कथाश्रवणाने मनाला विश्रांती मिळते, हे रामभक्ता तू लक्षात घे. त्या श्रवणाने मनन, निदिध्यासन झाले नाही तर ती कथा एखाद्या वांझ स्त्रीनं मैथुन करावे तशी व्यर्थ होते. श्रद्धेने जे श्रीरामकथा ऐकतात त्यांचे महिमान असे की अहम्, सोहम्, कोहम् विरून ते स्वतः पूर्णपणे ब्रह्मस्वरूप होतात. चित्त चैतन्य होते, बुद्धीला समाधिधनाचे साम्य

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

येते, कर्म ब्रह्मपूर्ण होते, इंद्रियांचे आचरण चिन्मात्र होते."

"सीतेने श्रीरामस्वरूपाविषयी विचारल्याने हनुमंताचे मन एकाग्र झाले आणि तो रामकथेची वार्ता विसरला. श्रीरामस्वरूप आठवून तो त्याच अवस्थेत गेला. त्याच्या डोळ्याला अश्रूधारा लागल्या, अंग थरथरू लागले, अंगावर रोमांच आले, घामाने शरीर थबथबले आणि तो मूर्च्छित झाला. हे पाहून जानकी चकित झाली. "हा वनचर, पाला खाणारा, वानर असून श्रीरामविषयीच्या अलोट प्रेमाने सागर ओलांडून आला तेव्हा हा खरा रामभक्त आहे." असा विचार करून सीतेने प्रेमाने त्याला सावध केले आणि आश्वासन देऊन रामवार्ता विचारली."

अध्याय एकोणतिसावा

"सीतेने श्रीरामकथा विचारल्यावर ती स्वरूपता असल्याने हनुमंताच्या चित्तात उल्हास निर्माण झाला आणि त्याने ती यथार्थ सांगायला आरंभ केला. सीता स्वतःच श्रोता असल्यामुळे त्याला विशेष आनंद झाला. श्रोता लक्षपूर्वक ऐकणारा असल्यावर वक्ता आनंदित होतो. तसा आनंद मनात ठेवून मारुतीने कथनास आरंभ केला. "श्रीराम अत्यंत सुस्वरूप असून त्याने त्याबाबतीत मदनालाही जिंकले होते. तरीही राम हा सरूप असून अरूप होता कारण तो चित्स्वरूप होता. तो कमलनयन असल्याचे जगाच्या (लोकांच्या) डोळ्यांना दिसले तरी तत्त्वतः तो डोळ्याविना देखणा दिसत होता, असे त्याचे देखणेपण होते. त्याचे डोळे कानापर्यंत पोचले आहेत. कुंडले वर्णन करताना एक म्हणतो ती मकराकार आहेत. श्रवणामुळे विकार नष्ट होतात. ते निर्विकार लेणे आहे. श्रीरामाच्या कानांमुळे त्याच्या भूषणांना शोभा येते. श्रवणांना श्रवणच भूषण असून ते कान देखणे परब्रह्म आहे. परमार्थाचे मुख्य तेज म्हणजे निरिच्छता, तेच त्याचे नाक आहे. त्याच्याशिंवाय ते निर्नासिक, मग त्याच्याकडून कसले सुख अपेक्षायचे. श्रीरामाच्या नाकाची स्थिती अशी की प्राण्यांना त्याच्या प्राणाने नित्य विश्रांती मिळते. श्रीरामालाच प्राणगती समजते. त्या गतीची विश्रांती श्रीरामच आहे. श्रीरामाचा मुखचंद्र नित्यानंदामुळे निष्कलंक आहे. श्रीरामामुळे ब्रह्मादी देवांना आणि जीवशिवांना सुख होते. त्याचे दोन ओठ हेच जीव आणि शिव आहेत. श्रीरामाच्या अधरांनी त्यांना स्थिरता मिळाली आहे. ते एकमेकांना मिळाल्याने एकाकार होऊन श्रीरामामुळे खरोखर शिवसुख त्यांना प्राप्त झाले. श्रीरामाच्या मुखातल्या दंतपंक्ती म्हणजे जणू ॐकारामधल्या श्रुती आहेत. श्रुतिस्मृती श्रीरामाच्या मुखचंद्रामुळे विश्रांती पावल्या आहेत. सत्-चित्-आनंद ही त्रिवळी श्रीरामाच्या कपाळावर आहे. त्याच्या ललाटभाग्यासह लोक नांदतात. प्रेमरूपी केशरासह त्याच्या भालावर पिवळा तिलक आहे. निर्धाररूपी अक्षता कपाळावर लावल्याने राम प्रेमळांचा आवडता झाला आहे."

"श्रीराम निर्लोभी होऊन अहम् मृगाचा वध करतो. सोहम् ही मृगनाभीतली काढलेली कस्तुरी श्रीरामालाच अर्पण करून त्याच्या सर्वांगाला लावली आहे. जन-विजन यांना घोळून निजधैर्यरूपी चंदन साधले आणि त्याचा सुगंध काढून श्रीरामाला ती उटी लावली आहे. विद्या-अविद्या यांच्या शक्तीचे पटल दूर करून त्यातील मोत्यांची केलेली माला श्रीरामाच्या कंठात शोभते आहे. त्याचा शंखाकृती गळा हा ॐकार असून तिथूनच वेदांना मार्ग मिळाला आणि विधिवाद जोरात उफाळला की जो त्रिकांडात प्रकट झाला. त्वंपद, तत्पद यांच्या पलीकडे असलेले साधुरूपी रत्नखचित, आत्मतेजाने लखलखित असे पदक त्याच्या हृदयात नित्य असते. लोक म्हणतात श्रीरामाने कासेला पीतांबर कसला आहे; परंतु श्रीरामाच्या कासेला चिदंबर आहे. जे अंबर (वस्त्र) शून्यत्वाने छिद्र झाकते. श्रीरामाची कास अछिद्र आहे. त्याची कास

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Research Academy / eGangotri

अत्यंत दृढ असून तो एकपत्नीव्रत धारण करतो. जो त्याच्या कासेला लागतो त्याला तो भवसागरातून तारून नेतो. श्रीराम पूर्णपणे आत्मसात करण्यासाठी भक्तिभावाची कटिमेखला असून तिला छोट्या घंटिकांच्या माळा ह्या ऋद्धी-सिद्धी झाल्या आहेत. त्याच्या शरीराचा मध्य म्हणजे त्याची कंबर पाहून, सिंह आपल्या कटीचा अभिमान सोडून, लाज वाटून, वनात निघून गेला. श्रीरामाची कंबर पाहण्यासाठी हरण सर्वस्वे वेधले आणि त्याच्या मेखलेला जडले, त्यामुळे वनात जाणे विसरले. त्या श्रीरामाची कीर्ती अशी की त्याच्या चरणाने जड पाषाण उद्धरतात. तो सर्वांची गती असून, श्रीराम हा त्या गतीची सद्‌गती आहे. श्रीरामाच्या चरणातील भूषणांपैकी वाकीवळ्याने वेदांना उणेपण आणले. ते मौन धरुन बसले आणि हरिकीर्तन तेवढे गर्जत राहिले. चारी वाणींना न दिसणाऱ्या तोडरांची गर्जना चालू राहिली. श्रीराम चिदचिन्मात्र परात्पर परब्रह्म आहे. श्रीरामाचे मन पाहता त्यापुढे गगन ठेंगणे दिसते. श्रीरामाचे मन पाहून श्रुतिशास्त्रांना मौन पडले. श्रीरामाचे गुण पाहता सगुण दिसतो पण तो निर्गुण आहे. रामानामाने त्रिगुण नाहीसे होतात. श्रीराम स्वतः निर्गुण आहे."

"श्रीराम-लक्षण जो पाहतो तो सुलक्षण होतो. श्रीराम हा असा विचक्षण आहे की त्याला लक्ष्य-लक्षण नाही. श्रीरामाच्या मुखातली अक्षरे ही क्षराक्षराच्या पलीकडची असतात आणि भाग्यवान त्यांचे कानाने श्रवण करतात, ते सर्वांगाने आनंदभरित होतात. श्रीरामाचे मुख पाहताच त्याच्यापुढे समाधीचे सुखही फिके पडते; स्वप्नातही दुःख दिसत नाही, उलट हर्षाने जीवन कोंदते. परब्रह्म कोंदाटले की क्रियाकर्म ब्रह्मरूप होते, धर्माधर्म हरपून वेदवादाचा उपशम होतो. असा श्रीराम नेटका आहे. निजसखा सौमित्रीही तसाच आहे. दोघात अभिन्नत्व आहे. त्यांचा आवाका तेवढा भिन्न आहे. तुला लोटांगण घालून लक्ष्मणाने तुझे कुशल विचारले आहे. श्रीरामाने तुझे कल्याण विचारले आहे." हनुमंताने असे सांगितल्यावर सीता तटस्थ झाली. त्याच्या बोलण्यामुळे ती स्वतःला विसरली. हनुमंताच्या कथनातून अवघा रघुनाथ उभा राहिला. त्यामुळे सीतेचा मनोरथ पूर्ण होऊन ती नित्य स्वानंद भोगू लागली. तिच्या पोटी हर्ष मावेना. त्या हर्षभरित अवस्थेत तिने हनुमंताला मिठी घातली. वानर मनुष्यवाणीने बोलतो आणि जी कथा ऐकल्याने भवबंधनातून मुक्त होता येते ती रामकथा त्याच्या मुखी आहे. अशा त्या वानराच्या गोष्टींचे श्रवण केल्याने खरोखर श्रीरामाची भेट झाली असे तिला वाटले. त्यामुळे दुःखकोटी विसरून तिची सृष्टी सुखरूप झाली. हर्षभरित होऊन तिने बाहू पसरून मारुतीला एखाद्या मातेने बालकाला मिठी घालावी तशी मिठी घातली. सीतेला इतका आनंद झाला की त्यापुढे पुत्रप्रेमाचे सुख उणे ठरावे. हनुमंत सीतेचा कौतुकाने, प्रेमभराने आवडता झाला. "पती श्रीराम आणि दीर लक्ष्मण हे दोघे सुखरूप असल्याचे ऐकून मला अपार सुख झाले आहे. येथे सहा महिन्यांनी श्रीरामाच्या गोष्टी हनुमंता तुझ्या तोंडून ऐकायला मिळाल्या; खरोखर तू धन्य आहेस."

सीतेकडून हनुमंताचे कौतुक

"हनुमंता, मरणावस्थेत एखाद्याला अमृत प्यायला मिळावे; कोरड्या स्थितीतल्या माशाला पाणी मिळावे; दुष्काळग्रस्ताला मिष्टान्न मिळावे; तसे तुझ्या बोलण्याने वाटले. तू जेव्हा रामस्वरूप वर्णन केलेस तेव्हा तुझ्या शब्दांना ब्रह्मसायुज्यताही तुलनेस येणार नाही असेच मला वाटले. तुझ्या कथनाने मी सुखसंपन्न झाले आहे. तुला मी आता वर देते की तू चिरंजीव होशील. तुझे जीवित ज्ञान आणि अनुभव यांनी संपन्न होईल. श्रीरामपदवीच्या वैभवाने नित्य नव्या सुखाचा संभव तुला मिळेल. तुझ्यापुढे कलिकाल चळचळा कापेल. असा तू महापराक्रमी होऊन भूमंडळात यशस्वी होशील. हे

https://archive.org/details/@sarayu_foundation / Bhavan Vani Trust, Lucknow

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

रामनामाच्या समवेत तुला मिळेल. तू श्रीरामाच्या भजनाने प्रबुद्ध बुद्धिवंत होशील आणि रामस्मरणाच्या प्रभावाने तुला ज्ञेयाचे जाणते मौन प्राप्त होईल. शंभर योजने असलेला अगाध सागर तू ओलांडलास तो जसा काही गाईच्या पावलातल्या पाण्यासारखा तुला वाटला. त्यापुढे माझे वरदान ते केवढे. तू महाबुद्धिवान आहेस. तुला वानर कसे म्हणावे. तू तर सुरासुरांना दुर्धर असे लंकानगर धुंडाळलेस. राक्षसांना गांजलेस. एकट्याने तू रावणाच्या सभेतल्या राक्षसांना पीडा करून, रावणाला त्रस्त केलेस. लंकेत अकटोविकट गोंधळ उडवून कोट्यवधी राक्षस गांजलेस. रावणाची सभा उघडी केलीस. एवढा आकांत करून, पुन्हा तू येथे आलास हे लंकेत समजलेच नाही. असा तू समर्थ आहेस. रावण आणि मंदोदरीचा एकांतातला संवाद ऐकून अशोकवनात आलास. खरोखर तू धन्य आहेस. असा तू प्रतापशिरोमणी अशोकवनात आलास तेव्हा तूच जनक आणि तूच जननी होऊन श्रीरामाला त्वरित घेऊन ये. मी तुझी सेवा करीन, तुझे-चरण केसांनी झाडीन.'' असे म्हणून सीता मारुतीच्या पाया पडली. तेव्हा मारुतीला स्फुरण आले आणि तो म्हणाला, "तू माझे चरणवंदन केलेस तेव्हा मी तुला निश्चित श्रीरामाला भेटवीन. तुझी एवढी अवस्था आहे तर मग उशीर कशाला आता तू माझ्या पाठीवर बैस म्हणजे त्वरित तुला श्रीरामाची भेट घडवितो.''

मारुतीची सूचना, सीतेच्या शंका, शंकानिरसन

"माझ्या पाठीवर जर सीता बसली तर क्षणात मी तिला श्रीराम भेटवीन. तेव्हा आता विलंब करू नको. जर मी तुला इथेच सोडून श्रीरामाला तुझा शोध लागल्याचे सांगायला गेलो आणि इकडे त्या राक्षसांनी तुझा घात केला तर माझा शोध व्यर्थ ठरेल. आताच इथे माझ्या देखत रावण तुला मारायला आला होता; दैवानेच तो अनर्थ चुकवला. तेव्हा तुला इथे सोडून मला जाता येणार नाही. तेव्हा तुला सोडून जाण्याची गोष्टच सोड आणि लगेच माझ्या पाठीवर बैस म्हणजे श्रीरामाशी तुझी भेट घडवितो. मनात कोणतीही शंका ठेवू नकोस. शूर्पणखेला नकटी केली त्यामुळे तिच्या मनात तुझ्याविषयी राग आहे. ती महाखोटी राक्षसी सहज तुझा वध करील. लंकात्रिकूट महापर्वत बळाने उपटून, एकाच उड्डाणात तुला समुद्राच्या पैलतीरावर नेईन. तिथून एकाच उड्डाणात राम-लक्ष्मण तुला भेटवतो. श्रीरामाची शपथ वाहून हे सांगतो. तू माझ्या पाठीवर बैस. तुला मी अत्यंत वेगाने नेत असताना राक्षसवीर महासुरांना माझ्या वेगाने येता येणार नाही, मग ते मला कसे गाठणार. जर इंद्रजित, कुंभकर्ण आले तर त्यांच्याशी झुंजून, रावणालाही त्रस्त करून तुला श्रीराम भेटवीन.'' असे ब्रह्मलिखिताताले वर्णन आणि सीता-मारुती यांचा संवाद होता. श्रीरामाला मारुतीचा पराक्रम नाना प्रकारांनी सांगितला गेला. हनुमंताचे बोलणे ऐकल्यावर सीतेने अनेक शंका व्यक्त करीत म्हटले, "हनुमंता, मी तुझ्या पाठीवर बसले तर तुझ्या उड्डाणाच्या वेगाने मी हिंदकाळून समुद्रात पडेन. मला समुद्रातले मासे आणि मगरी गिळतील. त्यावेळी तू गोंधळात आणि संकटात पडशील. तसेच लगोलग जर पाठलाग करीत शत्रू आला तर तू युद्धासाठी परतशील. त्यावेळी युद्धाच्या झटापटीत मी रणांगणी पडेन आणि मी धरणीवर पडताच राक्षस मला मारतील. मला मारल्यावर तू जरी कोट्यवधी राक्षस मारलेस तरी श्रीरामाला सुख होणार नाही. तर मी तुझ्या पाठीवर बसून येण्याचा विचार व्यर्थ आहे. मग मी कशी येऊ?''

"सीतेच्या शंका ऐकून मारुती म्हणाला, "सीते, हे सावधपणे ऐक की मला युद्धाची आटाआटी करावी लागतच नाही. माझे शेपूट कोपले तर कोटी कोटी राक्षस मारील. माझे शेपूट प्रतापी आहे. राक्षस केवढ्याही मोठ्या संख्येने

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

आले तरी ते राक्षसांचा घात करील. तुला मी स्वस्थ, सुरक्षित राखीन.'' यावर सीतेने प्रश्न केला, ''अरे, तू एवढासा, तुझे शेपूट ते केवढे, ते राक्षसांना काय मारणार? हे खरे वाटतच नाही मला.'' सीतेच्या प्रश्नावर हनुमंताने उत्तर देताना म्हटले, ''सीते, तू मला वानर म्हणतेस आणि माझ्या शेपटीची किती शक्ती असणार असे म्हणतेस, तर आता माझी स्वरूपस्थितीच पाहा.'' असे बोलून मारूती-वाढत गेला. विंध्य, मेरू, मंदार या पर्वतांहून तो वाढला. त्यावेळी तो प्रलयकालाग्निरुद्रच भासला. ''सीते माझे सत्त्व तू जाणत नाहीस. माझ्या स्वरूपाचा प्रभाव पाहा. देव, दानव, मानव, राक्षस या सर्वांना मी त्रस्त करीन. माझे शेपूट प्रतापवंत असून राक्षसांना मारण्यास समर्थ आहे. तुझ्यासह सगळी लंका निमेषार्धात नेईन. तू आता मनातला संशय सोडून दे आणि माझ्या पाठीवर बैस. तुझी श्रीरामाशी भेट घडवून तुम्हाला सुखी संतोषी आणि स्वानंदी करीन.'' यावर सीतेने ''परपुरुषाच्या अंगावर चढणे हे पतिव्रतेला दूषण आहे.'' असे म्हटले. त्यामुळे मारुती आपले पूर्ववृत्त सांगू लागला. ''श्रीराम सर्वार्थाने सर्वज्ञ आहे, गर्भातच मला ब्रह्मचर्याचे कौपीन होते हे जाणूनच त्याने मला तुझ्याकडे पाठविले. माझी संपूर्ण स्थिती जाणून आपल्या स्त्रीला एकान्तात भेटण्यास रघुपतीने तुझ्याकडे पाठविले. तुझ्या मनातली शंका दूर व्हावी म्हणून रामाने आपली मुद्रिका देऊन स्वतः मला धाडले. मी तुझा पुत्रच आहे असे समज. शिवाय मी तुला आणखीही एक खूण सांगितली की कैकेयीने दिलेली वल्कले तुला नेसता आली नाहीत म्हणून श्रीरामाने तुला ती नेसवली.'' हनुमंताने ही खूण सांगताच सीता मनातून चकित झाली. मग तिने शंका न धरता त्याला एक गुह्य विचारले.''

''श्रीरामाने तुला शोधासाठी पाठविले की सीतेला आणण्यासाठी पाठविले आहे हे खरे खरे सांग. मी त्याप्रमाणे कृती करीन. श्रीरामाने सीता आणविण्यास पाठवले असेल तर मी आताच येईन.'' सीतेने असे म्हटल्यावर मारुती गहिवरला. आपला पुरुषार्थ दाखवून सीतेला त्वरित नेऊ म्हणणारा मारुती सीतेचे महिमासामर्थ्य आणि आज्ञेचा इत्यर्थ विचारणे यामुळे थक्क होऊन म्हणाला, ''माते, मी असत्य येथे बोलणार नाही. श्रीरामाने मला शोधासाठी पाठविले होते. हीच निश्चित रामाज्ञा होती.'' त्यानंतर सीता म्हणाली, ''हनुमंता, आता अगदी विलंब न लावता श्रीरघुनाथाला सांग. माझ्यावर कृपा करून त्वरित जाऊन श्रीरामाला शोधाविषयी सांग.'' सीता मारुतीच्या पाया पडली. तिने वंदन करताच हनुमानाने तिच्या पायावर लोळण घेतली आणि म्हणाला, ''अग, मी तुझा सामान्य सेवक आहे. मी नेमस्त आज्ञाधारक दास आहे.'' सीता त्याला म्हणाली, ''जो जो कोणी श्रीरामाचा सेवक आहे तो तो मला मुकुटमणीच आहे. त्याच्या चरणावर माझे लोटांगण आहे. हे सत्य आहे.'' हे तिचे सद्भावयुक्त वचन ऐकताच हनुमंताला स्फुरण आले. 'आताच आपली खूण दे की मी त्वरित निघतोच. मी माझी खात्री पटविण्यासाठी राममुद्रा आणली. तूही श्रीरामाला देण्यासाठी आपली खूण दे, म्हणजे माझे सांगणे त्याला सत्य वाटेल.'' मारुतीचे मागणे ऐकल्यावर सीतेला कळवळा येऊन आपली वेणी सोडवून खुणेसाठी तिने चूडामणी दिला. तसेच श्रीरामाला खूण सांगण्यासाठी तोंडी निरोप दिला.''

सीता खुणा सांगते

''श्रीरामाने स्वतःच्या हाताने एक धातू उगाळून त्याचा टिळा माझ्या कपाळावर लावला. ही खूण तू सांग. तसेच चित्रकूट पर्वतावर असताना एका कावळ्याने माझ्या वक्षावर चोचीने आघात करून रक्त काढले. त्यामुळे श्रीराम रागावला आणि त्याने ईषिकास्त्र सोडले. कावळा तिन्ही लोकात पळून संरक्षण मागू लागला; परंतु इंद्र, यम,

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

विधाता यांपैकी कोणीच त्याचे रक्षण करत नव्हता. अखेर नारदांनी त्या कावळ्याला समजावले तेव्हा तो परतला आणि श्रीरघुनाथाला शरण आला. त्यावेळी रामाने त्याच्या डाव्या डोळ्यावर आघात करून त्याचे रक्षण केले. श्रीरामाजवळ अशी दिव्य अस्त्रे असून तरी माझी उपेक्षा का करतो आहे? हे रामा, मी तुला मृगामागे धाडले म्हणून तू रुसलास का? मी महापापीण आहे कारण मी स्वामीवर सत्ता गाजवली. त्यामुळेच लंकानाथाला सापडले. ही माझी अधर्मता महादोषपूर्ण आहे. लक्ष्मण तू माझ्या रक्षणासाठी ठेवलास, पण मी त्याचाही छळ केला, अशी मी पापिणी आहे. हे जाणून का तू माझी सोडवणूक करत नाहीस? माझे सर्व दोष हे कृपावंत रामा क्षमा करून टाक." सीता हनुमंताला हे अत्यंत केविलवाणेपणे सांगून दीन झाली."

"हनुमंताशी संभाषण करून सीता दीनवदन झाली हे ऐकून चिंतामणी हृदयाशी धरून श्रीराम आणि लक्ष्मण अत्यंत दुःखी झाले. श्रीरामाला रडू आले, त्याच्या डोळ्यातून अश्रूधारा ओघळू लागल्या. मस्तकमणी हृदयाशी धरून तो स्फुंदू लागला. "हा पाण्यातून उत्पन्न झालेला समुद्रातला मणी इंद्राने दशरथाला पराक्रम केला म्हणून दिला. त्या युद्धात नमूची नावाच्या दैत्याचा पराभव झाला होता. तो हा महामणी प्रियपत्नी कौसल्येला दिला होता. तिने प्रथम सूनमुख पाहल्यावेळी सीतेला दिला होता. सीतेने हा मणी हनुमंताला दिला त्यावेळी माता, पिता, प्रियकांता ही तिघे तत्त्वतः भेटली अशी आठवण होऊन मला चिंतायुक्त दुःख होते आहे." श्रीराम असे म्हणाला. तो मणी हाती घेतल्यावर श्रीरामाला सीता प्रत्यक्ष भेटल्याचा आनंद झाला आणि त्याने हनुमंताला आलिंगन दिले. "हनुमंता, सीता पुढे काय काय म्हणाली ते सांग." श्रीरामाने असे म्हटल्यावर हनुमंताने त्याला लोटांगण घातले. नंतर लक्ष्मणाने पुढील वार्ता ब्रह्मलिखितातून वाचायला आरंभ केला.

"सीता पुढे मारुतीला म्हणाली, "हनुमंता, माझ्या मनात एक मोठी चिंता आहे. समुद्राचे उल्लंघन करण्यावर तिघेच सत्ता गाजवतात. गरूड, वायू, हनुमान हे तिघे सोडून चवथा पुरुषार्थी काही दिसत नाही. इतरांना समुद्र दुस्तर, दुर्धर आहे. मग रघुनाथ नरवानरांसह कसा येईल? हा सागर उल्लंघिला जाणार नाही, वानरांचा समुदाय आणता येणार नाही, राम-लक्ष्मणही येऊ शकणार नाहीत, मग दशानन रावण मारला जाणार नाही." ही सीतेची शंका ऐकल्यावर मारुती हसून म्हणाला, "श्रीरामाचे माहात्म्य तू जाणत नाहीस. त्याची बाण सोडण्याची प्रेरणा अनिवार आहे. श्रीरामाच्या भात्यात दुर्धर बाण आहेत. तो राम बाणांवरून नरवानर वाहून समुद्राच्या पैलतीरावर उतरून राक्षसांना मारील. तसेच राक्षसांसह लंकानगरी आणि रावण यांचा विध्वंस करून तो तुझा उद्धार करील." हनुमंताचे हे उत्तर ऐकून सुखी झाली आणि उल्हासाने म्हणाली, "मग आता लवकर जा हनुमंता आणि श्रीरामाला त्वरेने घेऊन ये." मारुतीने यावेळी स्वतःशी विचार केला की, 'युद्धकंदन न करता, राक्षसांचे दमन न करता येथून आपण लंकादहन केल्याविना जाणार नाही. मी काय सामान्य निरोप्या का आहे. मी प्रत्युत्तर नेईन ते लंकेमध्ये रणक्षेत्र करून रावणाला त्रस्त करून. राक्षसांचे किती सामर्थ्य आहे, सैन्य किती आहे, त्याची शस्त्रशक्ती किती आहे, हे सर्व तोलून, रणाचा आरंभ करीन आणि मगच जाईन. तर राक्षसांशी वैर निर्माण करण्यासाठी वनाचा विध्वंस हेच मूळ साधन आहे.' मारुती असा विचार करत थांबला असताना सीता त्याला 'आता जा' असे म्हणाली. त्यावेळी मारुती खाली मान घालून, लाजून अबोलपणे उभा राहिला. तेव्हा सीता त्याला म्हणाली, "श्रीरामाला भेटायला उल्हास तुला दिसत नाही. कसली एवढी मोठी चिंता तुला आहे ती मला सांग."

"हनुमंत म्हणाला, "माझा वृत्तान्त ऐकून

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

तुला चिंता लागेल. तुझा शोध हो ना करताना मला अन्नपाणी घ्यायलाही मिळाले नाही. त्यामुळे भुकेने माझे प्राण कंठाशी आले आहेत. तेव्हा मला समुद्र उल्लंघन करवणार नाही. या कारणाने मी उद्‌विग्न झालो आहे.'' मारुतीचे निवेदन ऐकून सीतेने गहिवरून म्हटले, ''मी महापापीण आहे; हनुमंत भुकेलाच मी पाठवू लागले. हनुमंता, हे माझे करकंकण घे आणि लंकेत जाऊन, चतुर्विध (चौरस) अन्न घेऊन, यथेष्ट भोजन कर.'' हनुमंताने विचारले, ''अन्नाची चव कशी असते?'' सीता त्याला म्हणाली, ''तुम्ही काय खाता?'' मारुतीने सांगितले, ''आम्ही वनात नेहमी राहणारे असल्यामुळे आम्ही नित्य फळांचा आहार घेतो. अन्नाला स्पर्शही करत नाही.'' सीतेने म्हटले, ''हे माझे कंकण मोडून लंकेत मिळतील तेवढी फळे आवडीप्रमाणे घेऊन फलाहार कर.'' त्यावर मारुतीने आणखी स्पष्टीकरण केले की, ''हे माते सीते, माझे शील ऐक. मी केवळ स्वयंपाकी (स्वतःचे खाणे स्वतः करणारा) आहे. ज्याला मनुष्याचा स्पर्श होतो ते फळ अपवित्र असे मी मानतो. ब्राह्मण ज्याप्रमाणे बाजारातले अन्न घेत नाहीत, त्याप्रमाणे विकायला आलेली फळे माझ्या दृष्टीने अपवित्र आहेत.'' मारुतीचे हे बोलणे आणि मत ऐकून सीता सचिंत झाली. हनुमंताला आहारासाठी आता काय द्यावे याची तिला चिंता वाटली. ती म्हणाली, ''या अशोकवनात अद्‌भुत फळे आहेत खरी पण त्यांना हात लावताच राक्षस तुझा घात करतील. तू केलेला प्रयत्न व्यर्थ होऊन स्वामीकार्यही नासेल.'' यावर हनुमंत म्हणाला, ''ठीक आहे. असाच भुकेला कुंथत जाईन. ही भूक नव्हे हा कल्पान्त आहे. माझा प्राणान्त आला.'' एवढे बोलता बोलता झोक जाऊन तो धरणीवर मूर्च्छित होऊन पडला. दोन्ही डोळे वर चंद्राकडे लागले. हे पाहून सीता गलबलली. तिने थोपटून थोपटून त्याला सावध केले. नंतर ती म्हणाली, ''गुप्तपणे तू इथली फळे सेवन कर. कोणालाही कळू देऊ नकोस. जोवर तुझी भूक भागेल तोवर खाली पडलेली फळे तू खा. श्रीरामाची शपथ घालून सांगते झाडावरची फळे तोडून खाऊ नको.'' सीतेचे सांगणे ऐकून हनुमंताने दोन्ही कुशी खाजवल्या आणि मग तो वनातल्या वृक्षांपाशी आला. त्याने मनात विचार केला. श्रीरामाची शपथ पाळून, सीतेचे सांगणे प्रमाण मानून आपण वृक्ष उपटून, झोडपून जी फळे पडतील ती खावी.''

हनुमंताचे हे वृत्त ऐकून श्रीराम गदगदा हसला. तसेच सुग्रीव, सर्व वानर आणि लक्ष्मणही हसू लागला. श्रीरामाने मग लक्ष्मणाला म्हटले, ''सौमित्रा, मारुतीने राक्षसांचे दमन केले, लंकेमधे रणक्षेत्र केले. त्याविषयीचे ब्रह्मलिखित लवकर वाच. वन कसे विध्वंसिले, राक्षसकंदन त्याने कसे केले, त्याने इंद्रजिताला कसे गांजले, रावणाला कसे त्रस्त केले त्याविषयीचे ब्रह्मलेखन वाच.''

अध्याय तिसावा

''हनुमंताने सीतेची आज्ञा घेऊन फळे खायला आरंभ केला. श्रीरामाची शपथ घालून सीतेने फळे तोडून खाऊ नको असे सांगितले आणि पडलेली फळे पोटभर खायला अनुज्ञा दिली आहे, हे लक्षात घेऊन, जानकीची आज्ञा शिरसावंद्य मानून हनुमानाने वनाचा विध्वंस करण्याचा प्रयत्न केला. काही पडलेली फळे घेऊन तो दूरवर जाऊन बसला आणि फळे खाऊ लागला.

मारुतीचा फलाहार

हनुमंताने काळाग्नीला बोलावून जठराग्नी प्रदीप्त केला. तिकडे शेपटीने वृक्ष उपटून, वृक्ष झाडून खाली पडणारी फळे खायला घेतली. अशी सीतेची आज्ञा आणि श्रीरामाची शपथ सांभाळली. प्रथम साखरेचे टेंक, जे पित्तशामक असते, ते पाडले आणि खाल्ले. नंतर अनेक वृक्ष पाडून, त्यांची फळे खाऊन, वृक्ष झुगारले. हनुमानाने अपोशन मोडले नाही, बैठक सोडली नाही. त्याचे

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized By Sayaji Lakshmi Research Academy

शेपूट त्याला नाना प्रकार पुरवत राहिले. त्यामुळे वनातले अनेक वृक्ष समूळ उपटले गेले. मारुतीचे भोजन धर्माज्ञेप्रमाणे चालले. प्रथम दोन्ही बाजूला द्विजांच्या पंक्ती बसविल्या आणि त्यांना प्रेमाने फळे अर्पण केली. नंतर हनुमानाने स्वतः फळे खाल्ली. त्यामुळे तृप्त होऊन त्याने संतोषाने ढेकर दिली. त्याच्या शेपटीने वनाचा विध्वंस केला. हनुमान भगवंताचे नामसंकीर्तन केल्याशिवाय अवदान घेत नव्हता. त्या वनातल्या फळांचे भाग्य असे की मारुतीच्या मुखाने ती ब्रह्मार्पण केली गेली. मारुती सावधपणे प्रत्येक घास घेताना, पिकलेली फळे रामार्पण, पाडाची फळे कृष्णार्पण आणि हिरवी फळे ब्रह्मार्पण करी, असे त्या वनफळांचे भाग्य उजळले. तो गटगटा फळे खाताना मटमटा मिटक्या मारत होता. त्याचवेळी सुरश्रेष्ठांना वाकुल्या दाखवत होता आणि दैत्यांना अंगठा दाखवत होता. पिकलेली फळे आवडीने, हिरवी फळे तोंडपालटासाठी, पिवळी कोशिंबीर किंवा लोणचे म्हणून, खात होता. जेव्हा खारटपणा कमी वाटे तेव्हा त्यात सामुद्रिक मिळवून खात राहिला. त्याची शेपटी वृक्ष चौफेर उपटून वनाचा विध्वंस करत होती. ताल, तमाल हे सरळ वृक्ष आणि खजूर, पोफळी, नारळ हे वृक्ष उपटून तो त्यांचा ग्रास करत होता. तसेच पराक्रमी राक्षससैन्याशी रणकल्लोळ करताना युद्धात त्यांना मारण्यासाठी ते हाताशी ठेवत होता. युद्ध निश्चित होणार असे समजून मारुतीने शिळा, पाषाण, वृक्ष, पर्वत युद्धासाठी जमवून ठेवले."

वनरक्षक आणि किंकर मारुतीने मारले

"मारुती वृक्ष उपटून टाकतो आहे हे पाहून वनरक्षक सावध झाले आणि "मारा रे, वानर वनाचा विध्वंस करतो आहे त्याला मारा रे." असे एकसुरात ओरडत शस्त्रे घेऊन मारुतीवर धावून गेले. कोणी ढाल-तलवार घेऊन आले; कोणी नेम धरून बाण सोडू लागले, कोणी गोफणगुंडे तर कोणी दगडधोंडे मारुतीवर फेकू लागले. "एका वानराने वनाचा विध्वंस केला असे सांगितले तर राजा ते खरे मानणार नाही; तेव्हा याला पकडून राजापुढे न्यावे. ह्याचे शेपूट विशेष लांब आहे. त्याच्यावर टपून धरू असे कोणी म्हणे; तर कोणी त्याच्यावर झडप टाकून धरू म्हणाले." असे त्या वनरक्षकांचे बोलणे चाललेले हनुमानाने ऐकले. त्यामुळे तो त्यांचा घात करण्यासाठी कृतान्ताप्रमाणे सिद्ध झाला. त्याने शेपटीचा असा तडाखा रक्षकांना दिला की त्यांच्या शस्त्रांचे चूर्ण झाले आणि ते सर्व रक्षक एकत्र आवळून मारुतीने त्यांची मोट बांधली. चवदा सहस्र रक्षकांचा भारा शेपटीत बांधून मारुतीने त्यांना समुद्रात टाकले आणि मासे-मगरींना खायला दिले. इकडे काही राक्षसी सीतेला सतावून म्हणू लागल्या, "तू ज्याच्याशी संवाद करत होतीस त्याने वनाचा विध्वंस केला आणि वनरक्षकांना मारले. तो वानर युद्धार्थ पेटला आहे. तेव्हा आता आम्ही तुला धरू, चिरू, मारू; तुझे रक्त पिऊ; तुला सगळीच गिळू." राक्षसी सीतेला त्रास देत असल्याने हनुमान त्यांच्यावर गुरगुरला. तेव्हा त्या राक्षसी भिऊन पळाल्या. त्यांची अत्यंत दुर्दशा झाली. भीतीने त्यांची देहस्मृती नष्ट झाली; नेसती वस्त्रे गळाली याचेही त्यांना भान राहिले नाही. त्या नग्न अवस्थेतच रावणाकडे गेल्या आणि वनविध्वंसाची वार्ता सांगू लागल्या. "कोण कुठला एक वानर आला आहे, त्याने संपूर्ण वनाचा विध्वंस केला आहे. शिवाय चवदा सहस्र वानरक्षकांना शेपटीने मारले आहे."

"रावणाने त्वरित ऐंशी सहस्र किंकराना पाठवून "त्या वानराला धरून आणा" असे त्यांना सांगितले. रणात चेमटून पुढे व्हावे तसे ऐंशी सहस्र किंकर आले. त्यांनी अपार शस्त्रांचा वर्षाव केला आणि शेवटी त्या शस्त्रसंभाराखाली वानर झाकला गेला. हनुमान मनात विचार करत होता की, आपल्याला शस्त्राघात रुतत नाही, हा शस्त्रसंघात साहल्यावर ते सर्व काय करतील? हनुमान,

https://archive.org/details/muktabodh Bhavan Vedanta Trust, Lucknow

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

शस्त्रांच्या खाली निश्चल राहिला तेव्हा किंकरांनी आनंदाने टाळी वाजवली. "आम्ही महाबळी रणवीर, त्या वानराची रणरांगोळी केली. घावांनी त्याला तोडला, बाणांनी तृणप्राय केला." हे किंकरांचे बोलणे ऐकून मारुतीला रणरागाने क्षोभ चढला. त्याने आपल्या शेपटाशी गोष्टी केल्या. आजच आता कोट्यवधी राक्षसांचे निर्दाळण करू. शेपटीच्या आघाताने किंकरांना जीवाचे भय निर्माण होईल, त्यांच्या शस्त्रांचे भस्म होईल. नंतर सर्व किंकरांना मारून हनुमानाने रामाचा जयजयकार केला. "मी श्रीरामाचा दूत असून सीतेच्या शोधासाठी आलो होतो. सीता इथे सापडली त्यामुळे राक्षसांचा अन्त जवळ आला. राक्षसांचा रगडा करून, इंद्रजिताचा अभिमान झाडीन आणि रावण पुरता गांजीन. नंतर श्रीरामाला निश्चित आणीन." हनुमंताच्या बोलण्याने लंकेमध्ये बोंब उठली. किंकरांचा नाश झालेला ऐकून, लंकानाथ रावण दचकला. त्याने प्रहस्तपुत्र जंबुमाळी याला रागाने मारुतीवर पाठविले आणि त्याचवेळी बजावले की, "त्या वानराच्या गळ्याला पाश लावून माझ्याकडे घेऊन ये. जर त्या वानराला न आणता वा मारता परत आलास तर तुझे केस मूत्र लावून ताशीन; नाक कापीन, गाढवावरून धिंड काढून तुझी विटंबना करीन." रावणाच्या भाषणाने संतप्त झालेला जंबुमाळी मारुतीवर चालून गेला."

जंबुमाळीचा मारुतीकडून वध

"प्रहस्ताचा पुत्र महापराक्रमी जंबुमाळी क्रोधायमान होऊन निघाला. त्याने शरधारांनी पृथ्वी आणि आकाश व्यापून जाईल असा दारुण बाणांचा वर्षाव केला. आपल्या अंगात बाण रुतत नाहीत या विश्वासाने मारुती निशंक होता. रामनामाची मुखाने आवृत्ती करत तो निर्धास्तपणे वावरत होता. त्याने पंचक्रोशीत प्रचंड शिळा मारल्या; पण जंबुमाळी पूर्ण धनुर्धारी असल्याने त्याने एकाच बाणाने त्या शिळा शतखंड केल्या. मारुतीने वृक्षांचा आघात केला तोही जंबुमाळीने व्यर्थ केला. हे पाहून हनुमान म्हणाला, "धन्य आहे याची माता. हा जगजेठी महायोद्धा आहे. माझ्या शिळांचे घाव, वृक्षांचे आघात निवारण करणारा हा महाबळी, राक्षसकुळातला जंबुमाळी महावीर आहे. अर्धचंद्राकृती बाण जंबुमाळीने फेकला तेव्हा तो बाण मारुतीच्या कपाळावर लागला; परंतु तेथे आपटून तो बाण उलटला आणि जंबुमाळीच्याच कपाळावर लागला. त्यामुळे जंबुमाळी मूर्च्छित झाला. तेव्हा हनुमंत गदगदा हसला आणि म्हणाला, "तुझे बाण माझ्या शरीरात रुतत नाहीत, उलट ते तुझाच प्राण घेऊ पाहतात. तेव्हा आता कसले आले युद्ध; तू परत जा, मी तुला मारणार नाही." हे हनुमंताचे बोलणे ऐकल्यावर जंबुमाळीने विचार केला की, आपण परत गेलो तर रावण शिक्षा करणारच, त्यापेक्षा याच्याशीच निर्वाणीचे युद्ध करावे. मग त्याने वनचामुंडेच्या वराने मिळालेला घंटायुक्त परिघ रागाने सोडून मारुतीचा घात करायचा प्रयत्न केला. "माझ्या परिघाच्या घावाने हनुमंत निश्चित मरणार. रघुनाथ याचे कसे रक्षण करील? आता पाहू याचा युद्धातला पुरुषार्थ." असे जंबुमाळी म्हणाला.

तो परिघ हनुमंताच्या अंगाजवळ येताच हनुमान आकाशात उंच उडाला; पण त्या परिघाच्या वरदशक्तीने तो हनुमानाच्या पाठीमागे लागला. अत्यंत वेगाने मारुती जात असतानाही त्या परिघाने मारुतीचा पाठलाग सोडला नाही. यामुळे मारुती चकित झाला. अशी त्या शस्त्राची शक्ती होती. हनुमंत विचारात पडलेला पाहून स्वर्गात हाहाःकार उडाला. या दुर्धर परिघाच्या सुटण्यामुळे आता मारुती वाचत नाही. असे सर्वांना वाटू लागले. या नंतर परिघ पाठीमागून येत असल्याचे पाहून मारुतीने शेपटीने परिघाला मिठी घातली आणि त्याचवेळी वनदेवतेचा गळा आवळला. तेव्हा देवता म्हणाली, "श्रीरामभक्ता मी तुला शरण आले आहे. जर मला जीवदान दिलेस तर शस्त्रशक्ती,

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized By Sarayu Foundation Trust and eGangotri

भूतशक्ती, मंत्र-तंत्र-यंत्रशक्ती सर्व तुला शरण येतील.'' त्यावर मारुतीने शेपटीचे बंधन मोकळे करून शस्त्रदेवतेला वाचविले आणि त्याने शक्तिमंडळाला लोटांगण घातले. शरणागताला मारू नये म्हणून शस्त्रदेवतेला वाचविले. सर्वांभूती श्रीराम असे पाहून सर्व शक्तींना त्याने वंदन केले. सर्व शक्तींनीही 'उदो' म्हणून हनुमंताला ओवाळले. त्या म्हणाल्या, ''आम्ही सर्वजणी राक्षसांना विमुख होऊन श्रीरामालाच युद्धात साहाय्य करू. सीता आमची आदिशक्ती आहे. तिला लंकापती रावण छळतो आहे. त्यामुळे युद्धामध्ये राक्षसांविरुद्ध आम्ही तुला साहाय्य करून, पराक्रम घडवू.'' नंतर हनुमंताने म्हटले, ''बा पुच्छा जगजेठी, युद्धात माझी पाठराखण करून, तुझ्यामुळेच कोटयानुकोटी शक्ती मला साहाय्य करायला सिद्ध झाल्या.'' अशी आपल्या शेपटीची स्तुती करून मारुती युद्धासाठी परतला. त्यावेळी मारुतीच्या हातात परिघ पाहून जंबुमाळीचा थरकाप झाला. ''माझा परिघ हनुमंताच्या हातात गेला, याला रावणाची अधर्मताच कारण आहे. शस्त्रदेवताही त्यामुळेच रागावल्या.'' असा जंबुमाळी विचार करत असताना परिघ त्याच्या मस्तकावर आदळला. रथ आणि सारथी यांचा चक्काचूर झाला. जंबुमाळीचा ऊरही उरला नाही. रथ, घोडे, सारथी, तो स्वतः, यांचे शिर, अस्थी यांचा मागमूसही राहिला नाही. त्याला मारुतीने अव्यक्तात नेले.''

अखयाकुमाराचा वध

''हनुमंताने जंबुमाळीवर आघात करून त्याचा नाश केला याची बोंब रावणापाशी गेली. त्या वार्तेने तो क्रोधाग्नीमुळे भयभीत झाला. त्याने मारुतीला मारण्यासाठी दहा सहस्र प्रधानपुत्र पाठविले. ते सर्व महावीर असे रणयोद्धे होते. ध्वज, पताका रणाकडे निघाल्या पुढे वाजंत्री वाजत होत्या. मागे त्यांच्या माता पुत्रसंतती नष्ट होणार म्हणून दुःख करत होत्या. प्रधानपुत्र आणि हत्तींचा समूह येत असल्याचे पाहून, त्यांच्या गर्जना ऐकून, हनुमानानेही भुभुःकार करत गर्जना केली. त्याचे शेपूट त्यावेळी आकाशात तळपत होते. मारुतीने शेपटीमधे असलेल्या सामर्थ्याने जोराचा आघात केला. त्या पर्वतप्राय आघाताने सर्वांचा एकाच वेळी प्राणान्त होऊन ते मरण पावले. सर्वच प्रधानपुत्र मरण पावल्याचे ऐकल्यावर रावण धास्तावला. हनुमंत महापराक्रमी असून रणरंगात साक्षात् कृतान्तकाळ आहे. त्यामुळे रावण चिंताग्रस्त झाला. रणात मारुती आवरत नाही. हत्ती आणि राक्षसवीर यांना मारून त्याने ख्याती केली होती. नंतर रावणाने रणात अपार कर्कश पराक्रम करणारे निधडे पाच राक्षससेनानी मारुतीचा घात करण्यासाठी त्वरेने पाठविले. त्या सेनानींपैकी चारजण चार दिशांना आणि एक आकाशात स्थिर होऊन, हनुमानाला मारण्यासाठी भव्य योजना करून ते हनुमानावर शस्त्रे चालवू लागले. यावेळी मारुतीच्या महाबलवान शेपटीने त्यांच्या शस्त्रांची होळी केली. त्या पाच जणांना शेपटीचा वेढा घालून, आवळून धरले. मारुती स्वतः योगी होता. योगी ज्याप्रमाणे आपल्या पंचप्राणांचा निरोध करतो, त्याप्रमाणे शेपटीने पाच जण कवळून धरले. विवेक-वैराग्यसंपन्न लोक जसे पाच विषयांचे (शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध) दमन करतात, तसे त्या पाचांना शेपटीने अडकवून ठेवले. पंचभूतांची (पृथ्वी, आप, तेज, वायू, आकाश), यांची निवृत्ती झाल्यावर जसा परमार्थी सुखी होतो, तसा ह्या पाचही जणांना पर्वताच्या आघाताने मारून हनुमंत सुखी झाला. एकाच घावात मारुतीने त्या पाचांना मारले.''

रावणाला जेव्हा पाच सेनापतींच्या वधाची वार्ता समजली तेव्हा तो दचकला. प्रधान आणि सेना यांना कापरे भरले. नंतर रावणाला अत्यंत क्रोध आला. त्याने मारुतीला मारण्यासाठी रणचतुर दिव्य योद्धा आपला पुत्र अखया याला स्वतः पाठविला. ''अखया तू उत्तम युद्ध करणारा,

https://archive.org/details/muluksharmiacademy Bhavan Vedic Trust, Lucknow

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

शस्त्रे, अस्त्रे चालविण्याने अतर्क्य वाराने घात करू शकतोस. तू रथ अधांतरी चालवून हनुमंताला मार." रावणाची आज्ञा होताच तुरे, निशाण वाजवत, रथ, छत्र, सेना, गजदळ यांसह अखयाकुमार अशोकवनात पोचला. त्याने बाणांचा वर्षाव करून मारुतीला आच्छादले. तेव्हा अन्य वीर सिंहनाद करून 'वानर मारला' म्हणाले. अखयाच्या विजयाची नवलाई वाजंत्र्यांनी एकच कल्लोळ करून प्रकट केली. इकडे मारुतीने संपूर्ण सेनेला शेपटीने विळखा घातला. नंतर शस्त्रांचे पीठ करून संपूर्ण सैन्य एकवट मारले. अखयाला अत्यंत त्रास दिला. अखयाला शेपटीने आवळले, त्याचा रथ आकाशात उडवला. हनुमंताला धरता धरवेना कारण तो मोठ्या कौशल्याने तळपत होता. शेवटी हनुमंत आणि अखया हे दोघे वीर इतरांच्या आधाराशिवाय युद्ध करू लागले. सुरवर ते पाहून चकित झाले. दोघे चक्राकार फिरत होते. कधी जमिनीवर, कधी आकाशात; क्षणात रथ सागरात दिसे, क्षणात त्रिकुटावर दिसे असे अखयाचे युद्ध-लाघव दिसत होते. मारुतीची शेपटी रथ दिशांतरात पळाला की त्याला वेढून रागाने कडकडाट करत जमिनीवर आदळे. रथ खाली आपटताच अखया हातात ढाल-तलवार घेऊन हनुमानाला मारायला उसळून चपळपणे धावला. ढाल-तलवार तळपत ठेवून हनुमानाचा घात करण्यासाठी तो आकाशात उसळला. लगेच मारुतीने त्याचे पाय धरून त्याला गरगरा फिरवला. तेव्हा तो देहभाव विसरला. त्याचे खड्ग मातेच्या वाड्यात, मुकुट रावणापुढे आणि ढाल लंकेच्या सीमेवर पडली. असा त्याचा नाश झाला. जेव्हा मारुतीने त्याला दगडावर आपटला तेव्हा पाताळात प्रतिध्वनी उमटला; दिग्गजांची दातखीळ बसली आणि हाडांचे चूर्ण झाले. अखयाचा वध झाल्यावर स्वर्गात सुरवरांनी हनुमंताची कीर्ती वर्णन केली. भूतलावर ऋषींनी मारुतीला वाखाणले. ज्यावेळी रावणाच्या समोर मुकुट पडला त्यावेळी अखयाच्या मरणाने त्याला रडू आले."

"रावण म्हणू लागला, "मीच खोटे कर्म केले. पुत्राला पुढे का धाडला." नंतर प्रत्यक्ष वार्ता ऐकली तेव्हा रावण तोंडात माती घालून घेऊन शोक करत मूर्च्छित झाला. पुत्रशोकाने त्याला कापरे भरले. मग भानावर येऊन तो संतापाने म्हणाला, "माझे अशोकवन आता शोकस्थान झाले आहे. युद्धात वानराने वीरांना घाव घालून मारले. अखयाचा कैवार घेईल असा कोणी दिसत नाही. तेव्हा कोणाला पाठविण्यापेक्षा मीच स्वतः वनाकडे जातो. अखयाच्या घाताचा सूड घेण्यासाठी त्या वानराला निश्चयपूर्वक मारतो." असे म्हणून त्याने कंबर कसली. "मी त्या वानराला मारले तर खरोखर अखयासाठी सूड उगवला असे होईल; पण मलाच जर त्याने मारले तर सीता निर्मुक्त होईल." असा विचार करून रावण युद्धासाठी निघाला. त्यावेळी त्याचा जेष्ठ पुत्र महावीर इंद्रजित धावत पुढे येऊन म्हणाला, "एकटा तो पाला खाणारा वानर आणि त्याच्यावर स्वतः लंकाधिपतीने चालून जाणे हा काही योग्य विचार नव्हे. वीरांनी धाक घेतला म्हणून दशाननाने युद्धाला जायचे का? मी आपला घरचा सेवक आहे तेव्हा आपण मला पाठवा. मी सदाशिवाची शपथ घेऊन सांगतो, तुझे पाय धरतो आणि सांगतो, त्या वानराला रणात न मारता, गळ्याला बांधून आणतो." यावर रावणाने असा विचार केला की तो वानर ब्रह्मचारी, निराहारी आहे तेव्हा त्याच्याकडून इंद्रजिताला मारणे होणार नाही. या विचाराने रावणाने इंद्रजिताला "रणात वानर गांजवून त्याला बांधून आण" अशी आज्ञा दिली.

इंद्रजित युद्धार्थ निघतो

"इंद्रजित जेव्हा युद्धासाठी निघाला त्यावेळी रणवाद्ये वाजू लागली. कंगल, टोप आणि रक्तवर्ण वस्त्रे परिधान केलेल्या वीरांनी आरोळी दिली. दशलक्ष हत्ती, कोट्यवधी महारथी आणि असंख्य

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Trust, Lucknow

पायदळातले वीर स्वारीवर निघाले. त्या वीरांची रत्नखचित कवचे, लखलखीत शस्त्रे, त्यांच्या तेजस्वी झुली होत्या. ते वीर सिंहनाद करीत गर्जना देत होते. त्यांच्या जवळ गोफणगुंडे आणि गोफणी होत्या. ते वीर खवखवीत रणवाद्ये वाजवीत, गर्जना करत निघाले. इंद्रजितही उत्साहाने निघाला. त्यावेळी त्याच्या पाठीमागे एक नग्न कुमारी शिंकली. त्यामुळे इंद्रजिताचे मन (अपशकुन मानून) साशंक झाले. रावणाचाही थरकाप झाला. याचा अर्थ ब्रह्मदेवाला जेव्हा विचारला गेला, तेव्हा त्याला भविष्य समजले. त्यानेही तेच गुह्य, तसेच सांगितले. "वानराशी युद्ध करून अपयशात यश आणि यशात अपयश मिळेल. इंद्रजित त्या वानराला बांधून तुझ्याकडे आणील." ब्रह्मदेवाचे बोलणे ऐकून इंद्रजिताने त्याला नमन करून, जयजयकार केला. इंद्रजित येताना पाहून हनुमंत आनंदाने नाचू लागला. त्याचे युद्धाविषयीचे मनोरथ पूर्ण करण्यासाठी श्रीराम संतोषला. रणात शेपूट नाचवत, सैन्याला चहूबाजूंनी वेढा घालून, रणात वीरांच्या श्रेणी मारून रक्ताने धरणीला न्हाऊ घालावे असा मारुतीचा विचार होता. शेपूट विचक्षण होते. मारुतीने भुतांना मांसभक्षण आणि रक्तपात करून रणभोजन करण्यासाठी आमंत्रण दिले. त्यासाठी कोटयवधी राक्षस मारून ज्याला जशी आणि ज्याची आवड असेल ते ते प्रकार पुरवीन असा त्याचा निश्चय होता. तो म्हणाला, "आताचे हे खाणे म्हणजे भाजीभाकरीची न्याहारी समजा. पुढे नरकेसरी श्रीराम येऊन तो तुम्हाला पंचधारी (पंचपक्वान्नांनी) भोजन घालून संतुष्ट करील."

असाळीचे आक्रमण मारुतीने मोडले

"इंद्रजित ससैन्य युद्धार्थ आला, त्यावेळी असाळी पुढे धावत आली. "ज्याने अखया मारला त्याची मी होळी करीन" असे म्हणत ती अशोकवनात पोचली. तिथे हनुमंताला पाहून डोळे चमत्कारिकपणे वटारून आपले विक्राळ तोंड पसरले. त्यावेळी तिचा एक जबडा भूतलावर आणि दुसरा जबडा आकाशात टेकला. तिची विक्राळ दंतपक्ती, लवथवीत काळी जीभ मारुतीने पाहिली; तेव्हा त्याने अणूएवढे लहान रूप घेतले. मग तो तिच्या दातांना आणि जिभेला स्पर्श न होऊ देता तो वेगाने तिच्या घशात प्रवेशला आणि नंतर पोटात गेला. तोंडातून आत गेलेला मारुती जीभ किंवा दात यांमध्ये कसा सापडत नाही याचे तिला आश्चर्य वाटले. मारुतीने आपल्याला निश्चित फसवले असे तिला वाटले. गोड, कडू, खारट, आंबट, तिखट कसलीच त्याची चव न कळल्याने ती राक्षसी चवताळली. तो वानर आपल्या हातून मरत नाही. त्याचे जाणे अनर्क्य आहे तेव्हा तो आता काय ख्याती करील कोण जाणे या विचाराने असाळी धास्तावली. हनुमंताला इंद्रजिताशी युद्ध करण्याची खरी आवड असल्याने तो असाळीच्या पोटात क्षणभरही न थांबता कौशल्याने बाहेर आला. त्यापूर्वी त्याने तिचे काळीज देहासकट उपटले आणि बेंबीपाशी पोट फाडून काढले. बाहेर येताच त्याने प्रदीर्घ भुभुःकार केला."

"इकडे असाळीने वानर गिळला, अशी वार्ता पसरली. त्यामुळे इंद्रजिताचा आणि सैन्याचा युद्धाचा अनर्थ टळला असे सर्वांना वाटले. तसेच असाळीने मारुतीला पूर्वीच गिळले असते तर वनरक्षक, किंकर, प्रधानपुत्र, जंबुमाळी आणि अखयाकुमार हे सर्वजण वाचले असते असेही त्यांना वाटत राहिले. दूत रावणाला असाळीने वानर गिळला हे आनंदाने सांगत असतानाच दुसरी बोंब आली की मारुतीने असाळीचा निःपात केला आहे. रावण हे ऐकून स्वतःशी म्हणाला, "पडलंकेत क्रौंचा मारली, शूर्पणखेची विटंबना झाली, आता असाळीला मारले. मी कोणकोणती दुःखे भोगावी. जो पोटात शिरून राक्षसिणीला घात करतो, तो इंद्रजिताचाही घात करील." या विचाराने रावण थरथरा कापू लागला."

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

अध्याय एकतिसावा

लक्ष्मण ब्रह्मलिखित पुढे वाचू लागला, "इंद्रजित युद्धासाठी आवेशाने निघाल्यावर मधेच असाळी ही विवशी उठली; परंतु श्रीरामाने तिचे निरसन केले त्यामुळे हनुमंताला उत्साह वाटला. नंतर आवेशयुक्त गजदळासह सिद्ध झालेले सैन्य पाहून, हनुमंताला अत्यंत आल्हाद झाला आणि श्रीराम संतोषला अशी त्याची भावना झाली. राक्षस मारण्यासाठी वनाच्या विध्वंसाचा सुमुहूर्त त्याने केला आणि "इंद्रजिताला तिथे त्रस्त करून मी त्याला गर्वहत करीन. श्रीरघुनाथ आज संतुष्ट झाला असावा म्हणूनच इंद्रजित सैन्यासह आला आहे." असे म्हणत हनुमान स्वानंदाने नाचू लागला. "माझे शेपूट रणांगणात नाचते आणि राक्षससमुदायाचा नाश करते. चामुंडा, चवंडायणी यांची पूजा करू, भुतांना मांस देऊन धन्य करू. प्रथम मी अखयाकुमाराला मारला. आता पुढे रणमार युद्धात राक्षसवीरांच्या रांगा मारीन." असा हनुमानाने शेपटीशी एकांतात संवाद केला. तो म्हणाला, "जो जो युद्धार्थ येईल तो परत नगरामध्ये जाऊ नये. सर्वांचा घात करावा. जो शरण येईल त्याला मारू नये, हाच मोठेपणा आहे." हे सांगितल्यावर शेपटीला त्याने पोटाशी धरून आलिंगन दिले. त्याने असे ठरविले की शेपटीने सर्व सैन्य कवळून राक्षसांना मारायचे. मारुतीस्वामीची आज्ञा शिरोधार्य मानून पुच्छ लंकाद्वारात रक्षणासाठी थांबून मागे परतणाऱ्या राक्षसांना मारायला सिद्ध झाले. हा मारुती आणि पुच्छ यांचा संवाद झाल्यावर मारुती राक्षसांची वाताहत करायला युद्धानंदाने टाळी पिटून, पराक्रमासाठी खवळला."

मारुती आणि त्याचे पुच्छ यांचा संवाद ऐकून, वानरांना अत्यानंद झाला. ते हनुमंताचे युद्ध ऐकण्यासाठी स्वानंदाने सावध झाले. सुग्रीवाने उठून लक्ष्मणाचे पाय धरले आणि "इंद्रजित-हनुमंत यांचे युद्ध कसे झाले ते सांगोपांग संपूर्ण वाचावे" अशी लक्ष्मणाला विनंती केली. नंतर त्याने श्रीरामाची शपथ घालून सर्वांना शांत राहायला सांगितले. तेव्हा सर्व वानरगण हनुमानाचे युद्ध ऐकायला सावध झाले. तेव्हा त्या घोर युद्धाचे वर्णन ऐकण्यासाठी सर्वांनी कान टवकारले, शेपटीचा वळवून आकडा केला आणि स्तब्ध झाले. लक्ष्मण आता काय वाचतो ते ऐकायला उत्सुक होऊन त्याच्या तोंडाकडे पाहात वानरे एकाग्र झाली. श्रीरामही अत्यंत उल्हासाने मारुतीच्या रणकंदनाची आणि पुरुषार्थाची वार्ता ऐकण्यासाठी लक्ष्मणाला पुढील ब्रह्मलिखित वाचायला सांगू लागला. सर्व वानरांनी त्यावेळी आनंदाने टाळी वाजविली, कारण जे त्यांच्या मनात होते तेच श्रीरामाच्या मनात असल्याचा त्यांना हर्ष झाला होता. अशा प्रकारे सारेच हनुमानाच्या युद्धाची वार्ता ऐकायला सावधान होऊन बसले. सौमित्राने पत्राचे वाचन सुरू केले.

"असाळी राक्षसीचा घात झाल्याचे ऐकून इंद्रजित खवळला. मारुतीचा घात करण्यासाठी त्याने आपला रथ पुढे नेला. तेव्हा नगारा कडकडला, निशाणे, भेरी, शिंगे गडगडून वाजली आणि त्यांनी इंद्रजिताचे आगमन प्रकट केले. एकाकी एकट्या वानरावर असंख्य वीर चाल करून आले. त्या नंतर मारुतीचा दुर्धर मार खाऊन ते महाशूर राक्षसवीर चळचळा कापू लागले.

सैन्याची अवस्था पाहून इंद्रजिताने रथ पुढे नेला. त्याने हनुमंताला लक्ष्य मानून बाणांचा वर्षाव सुरू केला. त्याने धनुष्याचा टणत्कार करताच गिरिकंदरे दुमदुमली; नादाने आकाश कोंदले. इंद्रजित हा दुर्धर योद्धा होता. मारुतीने भुभुःकार करताच सप्त सागर उचंबळले; महादेव ध्यानात मग्न असून दचकला: सुरासुर कंपायमान झाले. नक्षत्रे तुटून खाली पडली. त्यामुळे रणांगणात राक्षसांची हानी झाली; भुने कापू लागली: तेव्हा भद्रकाळीने आश्वासन दिले की, "या रणमारात तो कृपाळू हनुमंत तुम्हाला मेदमांसाने तृप्त करील.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Muthulakshmi Research Academy

तुम्हाला निश्चित भय नाही. मरणोन्मुख राक्षस, खळबळलेले हत्ती आणि रथ, निधडे वीर कापू लागतील अशी प्रचंड गर्जना हनुमंताने केली. इंद्रजिताने युद्धाच्या तातडीने रथ पुढे नेला. त्यावेळी मारुती शेपूट गुढीप्रमाणे उभारून रणमाराच्या आवडीने नाचू लागला."

इंद्रजित-हनुमंत यांचे युद्ध

"एक रावणाचा राजपुत्र तर दुसरा रामदूत वानर; एक राक्षसांचा नेता तर दुसरा वानर- –समूहातला श्रेष्ठ; दोघेही अत्यंत प्रबळ वीर; दोघांचे समान शील आणि बळ; दोघेही युद्धप्रवीण; असे ते रणमारात चपळाई दाखविणारे महावीर एकमेकांना भिडले. तेव्हा त्यांचे युद्ध पाहायला सुरवर, किन्नर, सिद्ध, गंधर्व, विद्याधर, नाग, ऋषी हे उत्सुक झाले. सावित्रीसह ब्रह्मदेव, उमेसह शिव, शक्तीसह षण्मुख, तसाच देवमुख्य अग्नी हा आला आणि शचीसह इंद्र, विकटेसह वीरभद्र, सिद्धिबुद्धी यांच्यासह गणेश हे सर्व ते युद्ध पाहण्यासाठी आले. दोन्ही वीर हे खवळले होते. ते महावीर दुर्धर कृतान्तकाळ किंवा काळरुद्राग्नी असे भासत होते. एक त्रिपुर-एक शंकर, एक मदन-एक शंबर, एक अनिरुद्ध-एक बाणासुर, एक आदिवराह (अवतार) एक हिरण्याक्ष, एक हत्ती-एक सिंह, एक सर्प-एक गरुड, एक वृत्र-एक इंद्र, एक मुर-एक मुरारी, एक त्रिपुर-एक त्रिपुरारी, सहस्रबाहू वज्रधारी असे ते एकमेकाला युद्धासाठी भिडले; जसा नरहरि (नृसिंह) हिरण्यकशिपूला भिडला. एकाला रथाची रथगती, दुसऱ्याला स्वतःचे पुच्छ हाच सारथी होता. दोघे पराक्रम दाखविण्यासाठी रणात महामार करावा म्हणून ऐकमेकाला भिडले. त्यांची भेट क्षणात पृथ्वीवर, क्षणात अंतराळात, क्षणात सागरजळात, क्षणात कुलाचलावर अशी होत होती. इंद्रजिनाच्या गतीपेक्षा वेगवान हनुमान होता. तेथे ना शक्तीचा ना कपटाचा उपयोग होई. रणात मारुती आटोपणे अशक्य होते. इंद्रजित आपल्याशी विचार करू लागला की "याचे घाव दुर्धर आहेत; वास्तविक हा पडलेली फळे खाणारा, पण हा खाका पिटून हुलकावतो आणि मग मला अंगठा दाखवतो आहे." या विचाराने इंद्रजित खवळला आणि त्याने युद्धात दुर्धर बाणांचा वर्षाव केला. मारुतीने लगेच गर्जना करत पाषाणांचा वर्षाव केला."

"मारुतीने फेकलेल्या पाषाणांचा इंद्रजिताने बाणांनी चुरा केला. बाणांचे पाषाणांनी पीठ होत असे. दोघे समसमान असल्याने कडोविकडीचे युद्ध होत राहिले. इंद्रजिताने सुवर्णाचा ज्याला पिसारा आहे असा बाण मारुतीच्या कपाळावर वेधून मारला. मारुतीने प्रबळ शिळा इंद्रजिताच्या कपाळावर हाणली आणि त्यामुळे मुकुट जमिनीवर पडला. इंद्रजित मोकळ्या केसाने आवेशाने शस्त्रे मारत होता, ती शेपटीने तोडून मारुती इंद्रजितावर ताण करत होता. चेंडूचक्र इंद्रजिताने टाकले, मारुतीने शिखरशिला मारली; इंद्रजिताने चक्रकाण्डे वर्षली तर मारुतीने पर्वतधोंडे वर्षले. एकाने उड्डाण करून खांड हाणले, दुसऱ्याने तोंडावर ठोसा ठोकला. असे युद्ध करताना इंद्रजित पूर्ण त्रासला. त्याच्या मुखातून रक्ताच्या धारा लागल्या. अखेर त्याने मारुतीला मारण्यासाठी निर्वाण-शस्त्र घेतले. त्याने अत्यंत कौशल्याने शूलशक्ती मारली पण तो पर्वताच्या आघाताने त्रस्त झाला. तेव्हा इंद्रजित मनातून निराश झाला, कारण हनुमान युद्धामध्ये आटोपणे शक्य होत नव्हते. जरी यंत्र-शस्त्रांचा धैर्याने मारा केला तरी मारुतीने खडकांनी तो मारा ढिला केला. त्यामुळे इंद्रजिताचे धैर्य संपले. त्याला शेपटीची अटक पडली."

"इंद्रजिताचे युद्धकौशल्य असे होते की संधी सापडताच तो रणात ख्याती करत असे. तसेच युद्ध आवाक्यात नसले की तो माघार घेई; परंतु शेपटामुळे त्याला तेही जमत नव्हते. मारुतीने सर्व सैन्याला शेपटीचा वेढा दिला होता. त्यामुळे कोणाला

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized By Sarayu Foundation Research Academy

मागे--पुढे होता येत नव्हते. इंद्रजित हा मेघांकित असल्याने इंद्रजिताला मेघांच्या पाठीकडून पळूनही जाता येईना कारण आकाशात शेपूट तळपत होते त्यामुळे पळायला वाट मिळत नव्हती. इंद्रजिताने निर्वाणीचा आघात केला तेव्हा मारुतीने पर्वतांचा वर्षाव केला. त्याखाली सैन्य चिरडले गेले आणि महावीरांनी आकांत केला. सैन्यात बोंब उठली, इंद्रजित जिवंत आहे की मेला! मारुतीने पर्वताचा आघात केल्यामुळे रणात राक्षस कण्हत पडले. "मारुतीला बळाने धरता येत नाही; कपटाने धरावा तर शेपूट कपटाचे निवारण करते. या वानराने आम्हाला लाजविले आहे. हा धड शस्त्राघाताने आटोपत नाही, उलट त्याच्या धाकाने शस्त्रे-अस्त्रे ही गळून पडतात." रणात मारुती आटोपत नाही हे अनुभवल्याने इंद्रजित चिंताक्रान्त झाला. "याच्यावर शस्त्रास्त्रांची शक्ती चालत नाही, पुच्छामुळे मागे जाता येत नाही, समोर मारुती अनावर आहे." इंद्रजिताला चिंताग्रस्त झालेला पाहून हनुमान त्याला म्हणाला, "इंद्रजिता, मी तुला शिळाशिखरे मारणार नाही. मी शपथपूर्वक तुला सांगतो पर्वतही मारणार नाही. इंद्रजित नावाची प्रौढी मोठी आहे. ज्याने बाणाने इंद्राला जिंकले, त्याच बाणाने वानराला मारून विजयाची गर्जना कर. ज्या बाणांच्या सामर्थ्याने देव बंदीत घातले, त्या बाणांनी मला मारून, प्रौढीने विजयाची गुढी उभार." हे मारुतीचे खोचक बोलणे ऐकून इंद्रजित अत्यंत संतापला. त्याने विविध निर्वाणशस्त्रांचा हनुमंतावर मारा सुरू केला."

"मारुतीला युद्धात मारून पाडण्यासाठी इंद्रजिताने मंत्रयुक्ती, शरणशक्ती सोडल्या. यावर मारुतीने निराळे कौशल्य वापरले. इंद्रजिताने मारक शक्ती सोडली तेव्हा रामनामाची आवर्तने करत मारुती निःशंक स्थितीत राहिला. इंद्रजिताने निर्वाणबाण सोडल्यावर मारुती ते वरच्यावर झेलत असे. मग शेपटीची गुंडाळी करून इंद्रजिताला वेडावून दाखवी. ते बाण पकडून मारुती अंतराळात उसळी घेई आणि तेच बाण परत इंद्रजितावर सोडून रणकंदन करी. त्या बाणांच्या पडण्याने इंद्रजित कासावीस होई. सैन्य मारले जाई. असे युद्धात विपरीत घडत होते. हनुमानाशी युद्ध करताना इंद्रजित पूर्ण भ्रमला. आपले सैन्य आपणच सोडलेल्या निर्वाणबाणांनी मरत असल्याचे त्याला दिसले. मारुतीजवळ धनुष्यबाण किंवा अन्य शस्त्रसामग्री नाही तरी आपले सैन्य मरते आहे हे पाहून इंद्रजित चक्रावला. आपण निर्वाणबाण सोडतो, मारुती ते पकडतो आणि आमच्याच बाणांनी आम्हाला मारून युद्ध करतो आहे. वास्तविक, "माझे बाण सुटले की सुरासुर भयाने पळू लागतात; पण हा निःशंक निधडा वानरवीर आहे. तो सगळे बाण झेलतो आहे. आमची शस्त्रे आमच्यावरच आघात करत आहेत. आता राक्षसांना कुठले धैर्य असणार, हा वानरवीरश्रेष्ठ आवरत नाही; शेपूट तसेच अनावर आहे. धनुष्य हातातल्या हातात भंग होते; रथ उलथून धरणीवर पडल्यामुळे सारथी आणि घोडे मारले गेले. नंतर इंद्रजितही उडाला आणि रथातून खाली पडला. त्यावेळी रणात हाहाःकार उडाला आणि राजकुमार मारला गेला अशी वार्ता पसरली. मारुती रामनामाच्या सामर्थ्यामुळे निःशंक बनून रणात वावरत होता. त्याने इंद्रजिताला रथातून खाली पाडून कीर्ती मिळविली."

"मारुतीने बाण, मंत्र या शक्तियुक्त साधनांना व्यर्थ ठरवले, सारथी मारला, रथ तोडला, त्यामुळे इंद्रजित धास्तावला. एकेक दिव्य अस्त्र मारुतीने निरर्थक केले त्यामुळे इंद्रजिताला धाक वाटू लागला. शस्त्रांची खटपट, मंत्रास्त्रांचा नेट, शेपटीशी कपट यातल्या कशाचाच उपयोग न होता त्या युद्धात मोठमोठ्या वीरांना मारुतीने गांजले. या नंतर शस्त्रांची गती खुंटली, तेव्हा मारुती विचार करून मनाशी ठरवतो की इंद्रजिताची शरीर शक्ती किती ते मल्लयुद्धाने पाहू. इंद्रजित मोठ्या संकटात पडला. मारुतीने

https://archive.org/details/@sat_lakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

इंद्रजिताच्या गळ्याशी झोंबून, लटपटी, दंगामस्ती करायला आरंभ केला. ते दोघे एकमेकांना उरात, डोक्यावर, कोपरावर हाताचे तळवे मारू लागले. हातांना दुःख सोसायला लावून, छातीवर दणके देऊ लागले. मारुती इंद्रजिताला म्हणाला, "तू नेहमी तूप-खीर खातोस रे पराक्रमी राजकुमारा, मी तर पाला खाणारा वानर आहे, तेव्हा माझ्यासमोर उभा राहा" असे बोलून मारुतीने मल्लयुद्धातली लाथ हाणली; ती इंद्रजिताने पुढे सरकून चुकवली, त्यावर मारुतीने तळव्यांनी ठोकले. तो आघात चुकवला गेला तेव्हा उरावर, मस्तकावर, कपाळावर मोठ्या आवेशाने आघात केले. मल्लविद्येनला मार देऊन मारुतीने राक्षसवीर इंद्रजिताला पुरता गांजला. नंतर मारुतीने इंद्रजिताला चक्राकार फिरवून सोडला, पण जिवानिशी मारला नाही. इंद्रजित रक्त ओकून रणक्षेत्रावर मूर्च्छा येऊन पडला; परंतु त्याला लक्ष्मण मारणार असल्याने जिवंत ठेवला. भूतलावरचे सर्व ऋषीश्वर, आकाशातले सुरवर, किन्नर या सर्वांनी तेव्हा त्याचा जयजयकार केला. इंद्रजित मूर्च्छेतून स्वतःच सावध झाला आणि लज्जायमान होऊन अत्यंत उद्विग्न झाला."

इंद्रजित घाबरून विवरात दडतो

"इंद्रजित आपल्याशी म्हणाला, "हनुमंताची धैर्यवृत्ती, शौर्यशक्ती आणि संग्रामगती अतर्क्य आहे. रणात इंद्राला जिंकून इंद्रजित असे नाव मी मिळविले; परंतु वानराबरोबर युद्ध करताना तृणासमान झालो. अखिल सृष्टीत मीच एक गाढा वीर आहे असा माझ्या पोटात ताठा होता; पण वानराच्या शेपटीने माझी पाठ पुरवून मला कस्पटासमान केले. जळो माझी वीर्यवृत्ती आणि शौर्यशक्ती! युद्धात मारुती आटोक्यात येत नाही म्हणून माझी कीर्ती ही अपकीर्ती झाली. कोणतीच युक्ती मारुतीला बांधायला उपयोगी ठरत नाही. जळो माझी यशकीर्ती! केवळ मला मिळालेल्या वरामुळे मारुती मला मारू शकत नाही. जर त्याने मला धरून रामाकडे नेले, तर वानरे माझी विटंबना करतील. रावणाने सीतेला जसे आणले तसे बदल्यात हा मला रामापाशी नेईल. मग तिथे माझा वानरांकडून अपमान झाला तर त्याचे निवारण कोण करील. रावण भिक्षेकरी होऊन सीतेला चोरून घेऊन आला. हा वानर युद्ध करून मला निश्चित धरून नेईल. पूर्वी अंगदाच्या पाळण्यावर रावणाला खेळणे म्हणून बांधले होते. त्यावेळी पौलस्तीने त्याला परत मागितल्यावर रावणाचा अपमान करून त्याला सोडले होते. त्याची दाढी-मिशी कापून, दाही नोंडाना काळे फासून, डोक्यावरच्या केसांचे पाच पाट काढून, त्याला लंकेकडे फेकून दिला होता. लंकेतल्या चव्हाट्यावर पडलेल्या रावणाची दुर्यो झाली. लहानथोरांनी चेष्टा केल्याने रावणाला खूप लाज वाटली. मला धरून नेल्यावर माझीही तीच अवस्था होईल. हा वानरवीर मला आवरता येत नाही आणि पुच्छाने पाठ पुरवली आहे. मला शेपटीत बांधून मारुती नेऊ लागला तर माझ्या मदतीला कोणीही येणार नाही. अखयाच्या मदतीला कोणी आले नाही तसेच मला धरून नेतानाही भीतीमुळे कोणी येणार नाही." असा मनात धाक घेऊन इंद्रजित मारुतीला पाठ दाखवून, शेपटीची भीती वाटून घाईने पळू लागला. परंतु शेपटीच्या वेढ्यामुळे त्याला पुढे पळणे अशक्य झाले म्हणून अशोकवनातल्या एका दुस्तर, गुप्त विवरात तो दडून बसला."

"इंद्रजित पळाला तेव्हा पळत्यापाठीमागे लागू नये हे धर्मयुद्धातले तत्त्व लक्षात घेऊन आणि इंद्रजिताला मारायचे नसल्यामुळे मारुतीला त्याचा पाठलाग करावा लागला नाही. तेव्हा शेपूट हनुमानाला म्हणाले, "अहो स्वामी, मी सर्व सैन्याला कोंडून ठेवले आहे. तुम्ही इंद्रजिताचे दमन करून दमला असाल. मला आज्ञा द्या म्हणजे मी युद्ध करतो." हनुमानाने म्हटले, "तुझ्या बळावरच मी दुष्ट महावीर मारले. आता आपण रणकल्लोळ

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

विचारपूर्वक करू. मी जाते आणि तू घास घालणारा होऊन राक्षससैन्य भरडू. जे त्यातले डोळ उरतील ते रणकंदन करून मारू.'' असा पुच्छाशी विचार करून सैन्याचा संहार करण्याचे ठरविल्यावर हनुमंताने राक्षससमूह खळबळेल असा भुभुःकार केला. जेव्हा मारुती येत असल्याचे राक्षसवीरांनी पाहिले तेव्हा ते सर्व एकत्र आले आणि त्यांनी सतत शस्त्रांचा वर्षाव सुरू ठेवला. त्या राक्षसवीरांनी गर्जना करत बाण सोडले आणि पृथ्वीला जागीच खिळवून टाकले. शस्त्रे आकाशात मावू शकत नव्हती एवढी फेकली. हनुमंताला शस्त्रांनी झाकून टाकले. हनुमंत निर्ढावलेला योद्धा होता. राक्षसांनी त्याच्यावर बाणांचा, शस्त्रांचा मारा केला तेव्हा त्यांचे चूर्ण झाले. राक्षस हाय-हाय करू लागले. हनुमंताने शस्त्रांचा मारा साहिला आणि तो निधडा वीर सर्वांचा संहार करावा म्हणून खवळून युद्ध करू लागला.''

''घोडे घोड्यांना मारत, हत्ती हत्तींचा संहार करत, रथ रथांना उलथत, मत्त सारथ्याला बाजूला करत, पायाखाली पदातींना रगडत, वीर वीरांना झोडपत, ध्वज-शस्त्रे-छत्रे मोडत, हनुमंत महामार करून अनेकांना रणात पाडत होता. हनुमानाचे वेगळे युद्ध चालले असताना, पुच्छ वेगळ्याच रणमर्दनात मग्न होते. शहाऐंशी प्रयुत मत्त हत्ती शेपटीत पकडून मारुतीने हत्तींच्या हाडांचे पीठ केले. त्यामुळे गजदळ संपले. हत्तीच्या गंडस्थळांना विदारल्यामुळे गजमुक्ताफळे अस्ताव्यस्त उधळली. त्याच रंगमाळांनी तो युद्धाचा सोहळा सजला. शेपूट सैन्याखाली घुसून वीरांची मोळी बांधली गेली आणि मग ती मोळी जमिनीवर उपडी केली गेली. त्यामुळे खाली असणारे नाश पावले. खेचरे, गाढवे, उंट यांना शेपटाने बांधून घेतले आणि त्यांच्या पायाखाली उभ्या असलेल्या अश्वदळाचा पायांखाली चक्काचूर केला. मारुतीच्या शेपटाचा महामार असह्य होऊन रणात हाहाःकार झाला. दुसरीकडे हनुमंत वीर रणमार करत होता. रागाने हाताची थप्पड मारून तो लक्षावधी राक्षस मारत होता. कोट्यवधी पायाखाली रगडत होता. काहीना मुष्टिप्रहाराने पाडत होता. अनेकांना नखाग्रांनी, कोणाला गुडघ्याने, कोणाला गचांडीने तो घात करत राहिला. त्याचा भुभुःकार ऐकून रणात कल्लोळ झाला. त्याच्या भयाने मूत्र-मळ, तसाच प्राणही सोडला. या रीतीने अपार राक्षस आणि त्यांचे वीरश्रेष्ठ युद्धात मारले गेले.''

रणांगणाची स्थिती

''अशा प्रकारे सभोवती शेपटीचा वेढा आणि मधे हनुमानाकडून मार यांमुळे सैन्याचा अन्त झाला. पुच्छाने अशी पाठ पुरवली की कुटुंबाची भेट होऊ देईना अथवा लंका दृष्टीस पडू देईना. मग मरण चुकवण्यासाठी काहीजण प्रेतांमध्येच लपले, खोटे मूर्च्छित पडले. कोणी आघातांनी वेडे झाले, ते नागवे, उघडे असे प्रेतासारखे पडले. इंद्रजिताचा गर्व झडला. सैन्याचा नाश झाला. रामनामाने समर्थ झालेल्या हनुमानाने नेटाने झुंज दिली. त्यावेळचे युद्ध अत्यंत भीषण झाले. रणक्षेत्रात रक्ताचे पाट वाहू लागले. तीं रणनदीच झाली. पिसाऱ्यासह वाहणारे बाण हे रणनदीतले मासे आणि ढाली या कासवे, तसेच भाले म्हणजे शेपूट असलेले साप; मेद-मांस जणू दोन्ही तीरांवरचा चिखल, विक्राळ शिसाळे या दोन भागातल्या सुसरी, अशी ती नदी ही पूर येऊन वाहात राहून मोक्षसुख देणारी होती. सर्वस्वाचा त्याग करून जो नदीत उडी घेई तो दुसऱ्यासह जोडला जाई. ध्वज लावलेला रथ हा रणनदीतले शिडासहित असलेले जहाज असून त्याचा तारक जो श्रीराम. तो परतीरावर पोचवी. भद्रकाळी तेथे भुतावळ घेऊन आली. त्यांना मांसाचे अन्न खायला आणि रक्ताच्या ओंजळी प्यायला मिळून आनंद झाला. यक्षिणी ह्या पुष्कळ काळ वृतस्थ होत्या. त्यांनी लक्षावधी काळीजे हातात घेऊन, शंखिणी, डाकिणी यांना वाणे दिली. नंतर ती खाल्ली. क्षेत्रपाळ आनंदाने नाचू लागला.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Trust and eGangotri

रणवीरांची शिरे चोंडके म्हणून वेताळ वाहू लागला. सर्व भूते रणगोंधळाचे समूह नृत्य करू लागली. अनेक दिवसांचे राहिलेले पारणे हनुमंताने फेडले म्हणून त्याला अवघ्यांनी लोटांगण घालून रणात विजयी व्हावे असे म्हटले. रणांगणात राक्षसांच्या दातांच्या राशी पडून अमाप पीक आले. भुतांनी त्यांचे कुडवे करून मोजले. याला कौल देणारा हनुमंतच होता. देव, ब्राह्मण, भैरवाला, वेताळाला बलुते दान, भुतांना खळे दान, महाकाळीला राजभाग मिळाला. खळमातेरे हे मारकोला, मेसको घरची दासी, वेसी पेंढी ही सटवाईला, पाळभारकाला कालिका, अशी पहिल्या पिकाची व्यवस्था स्वतः मारुतीने विभागून दिली. उर्वरित धान्याची महाख्याती श्रीराम विभागेल."

हे सर्व ऐकून कुडवे दात मोजतात अशी हनुमंताने ख्याती केली त्यामुळे वानरगणांना आनंद झाला आणि त्यांनी हर्षाने गर्जना केली, "आमचा हनुमंत महापराक्रमी आहे. त्याने युद्धात राक्षसांचा नाश केला." ते वानरगण नंतर टाळ्या पिटून, सुखानंदाने नाचू लागले. त्यावेळी सुग्रीवाने द्रव्याच्या ओंजळी आणून मारुतीवरून ओवाळल्या आणि त्याला हृदयाशी धरले. सुग्रीव म्हणाला, "कपिकुळाला तू आधार दिलास, श्रीरामाला सुखी केलेस, वानरांना वाचवलेस, तुझ्यामुळेच आम्हाला यश मिळाले." अंगदाला एवढे स्फुरण आले. की त्याने हनुमंताला खांद्यावर घेऊन हर्षाने चौफेर नाचायला आरंभ केला; कळिकाळाला वेडावले. "हनुमंताचे चरण धरल्यावर कळिकाळ बापडा त्यापुढे काय आहे! हनुमंताचे स्मरण करून मी आता मरणालाही मारीन." ब्रह्मलिखित हनुमानाचे अगाध चरित्र ऐकून श्रीराम चकित झाला आणि त्याने हनुमानाला आलिंगन दिले. श्रीरामाने डोळ्यावाटे हनुमानाला स्वतः परमामृताचे अभिषिंचन केले. स्वर्गातले सुरगण विस्मित झाले. शंकराने स्वमुखाने आणि भेरी, निशाणे यांच्या गजरात म्हटले, "या हनुमंताचे भाग्य थोर, त्याच्यावर रघुनंदनाने कृपा केली आहे. श्रीराम आणि मारुती यांची आलिंगन भेट झाली आणि दोघेही स्वतःला विसरले. ते एकात्म झाले. मी-तूपण सोडून देव-भक्त भेटले. त्या मौनावस्थेत श्रीराम सुखदाता झाला. ते सुख निबिड, नित्य आणि दृढ, घनदाट असे कोंदले आणि आदि-मध्य-अन्त उरला नाही. वेदवाद संपला. श्रुती मौन होतात तेथे मारुती पोचला." त्याची भक्ती सार्थकी लागली. त्रिलोकात त्याची पवित्र कीर्ती गेली. स्वतः श्रीरामही सुखावला.

अध्याय बत्तिसावा

श्रीरामाने सावधान चित्त करून लक्ष्मणाला "पुढे ब्रह्मलिखितात मारुतीचे काय चरित्रवर्णन आले आहे ते वाच. राक्षसांच्या दातांच्या राशी रणभूमीवर पाडल्या; त्यानंतर मारुतीने लंकेत काय केले ते मला ऐकव," असे सांगितले. श्रीरामाची सूचना ऐकून सुग्रीव आणि वानरगण यांना हर्ष झाला. सभेत बसलेल्या असंख्य वानरांना हनुमंताच्या श्रेष्ठ प्रतापाच्या गोष्टी ऐकायची आवड होती. लक्ष्मणालाही हनुमंताची प्रतापकीर्ती वाचताना अपार प्रेम वाटत होते. त्याने श्रीरामाकडे पाहून पत्राचे यथास्थित वाचन सुरू केले.

लंकावासीयांची प्रतिक्रिया

"इंद्रजिताचे गर्वहरण आणि सैन्याचा नाश करून, आपल्या शेपटीचा वेढा काढून घेऊन मारुती स्वस्थ पण दृढ सावधानतेने बसला. रावण आता युद्धासाठी कोण कोण पाठवतो आणि आपण त्यांचे निर्दाळण करायचे कसे एवढाच विचार त्याच्या मनात होता. हनुमंत गेला असे पाहून काहीतरी निमित्त करून राक्षसवीर आणि कुंथत पडलेले घायाळ सैनिक लंकानगरीत निघाले. राक्षसवीरांनी मारुतीकडून होणाऱ्या आघातांची भीती घेतली आणि ते 'पळा रे पळा, वानर युद्धात मारेल' असे म्हणत रावणाच्या सभेकडे धावले. 'रावण बापडा किती! युद्धात मारुती

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

आटोपत नाही. सेनापतीसह सैन्याचे भस्म झाले. तो मारुती लंकेचाही नाश करील. सर्व सैन्याची त्याने धुळदाण केली आहे' अशी घरोघरी ओरड झाली. नगरातल्या स्त्रिया कळवळल्या, लंकापुरीत आकांत झाला. 'समरात रावणाची थोरी असून, त्याने परस्त्री चोरून आणली. इकडे त्या वानराने माहामार देऊन सैन्याचा नाश केला. रणात रावण मेला असता, तर लंकेतले लोक स्वस्थ राहिले असते. परंतु युद्धात हनुमंताला खवळवून इंद्रजिताचा घात करवला. अखयाकुमाराचा कैवार घेताना युद्धात ज्येष्ठ पुत्रही मारविला.' अशी राक्षसांनी ओरड करताच लंकाधीश दशवदन हडबडून गेला. इंद्रजित जिवंत आहे की मेला याविषयी कोणीच सांगत नव्हते. त्यामुळे रावण खराच गडबडला."

मारुतीने रणात आघात करून इंद्रजित मारला आणि वीरांच्या श्रेणी मारल्या. इंद्रजित जर सावधान असता तर वानराने त्याला कसा मारला असता? त्याला रणात शोधायला जावे तर राक्षसांनी मारुतीच्या शेपटीचा धाक घेतला होता. भुतांनी प्रेतांना खाल्यामुळे तिथे ओळख तरी कशी पटणार? असे लोक म्हणत होते. आपला ज्येष्ठ पुत्र युद्धात मेला म्हणून रावण तोंडात माती घालून घेत होता; दहाही तोंडांनी शंख करत होता. आक्रंदून रडत होता. तो गडबडा लोळत, मोकळ्या केसांनी अश्रू ढाळत होता, कपाळ बडवत म्हणत होता, 'इंद्रजिताचा घात झाला, वानर अनावर युद्ध करतो आहे. ब्रह्मदेवाने तर माझ्यापाशी सांगितले होते की इंद्रजित वानराच्या गळ्याला बांधून माझ्याकडे घेऊन येईल. ब्रह्मयाने सांगितलेले असत्य कसे ठरले?' मग रावणाने ब्रह्मदेवाला सांगितले, 'इंद्रजित वानराला बांधून घेऊन येईल. तर आता तू तुझे वचन सत्य करून दाखव. आम्ही तुझी मुले असून पृथ्वीतले आमचे श्रेष्ठत्व तुझ्याच वरदानाने मिळाले आहे. तेव्हा मला माझा पुत्र भेटव हीच तुझ्या चरणाचे वंदन करून विनंती आहे."

यावर ब्रह्मदेवाने, "तुला इंद्रजिताचा खरा वृत्तान्त आणता येणार नाही. कारण तो वानर राक्षसांचा घात करतो आहे. त्याला तू टाळू शकणार नाहीस तेव्हा मीच अशोकवनात जाऊन इंद्रजिताचा शोध घेऊन, सर्व काही समजून घेऊन मग दशानना तुला सांगेन" असे सांगितले. तेव्हा ग्लानीत असलेल्या रावणाने विचारले, "पण इंद्रजित मेला की जिवंत आहे? कारण वानराने त्याला पुष्कळ पीडा केली आहे." ब्रह्मदेव म्हणाला, "इंद्रजित गुप्त आहे."

इंद्रजिताची शोकमग्नता

"ब्रह्मदेव वनात आला. त्याला पाहून मारुतीने त्याला दंडवत घातले. मारुतीने सांगितले, "मला रावणाची शक्ती तोलून पाहण्याची मनापासून इच्छा आणि आवड आहे; ती पूर्ण करून लंकेत कीर्ती करावी असे मला वाटते." त्यावर ब्रह्मदेवाने म्हटले, "हनुमंता, तुझ्या भीतीने इंद्रजित विवरात लपून बसला आहे. मी त्याच्याकडे जातो आहे. तू इंद्रजिताच्या हातून टाकलेला ब्रह्मपाश गळ्यात घालून रावणाच्या भेटीला ये. मग लंका-त्रिकूटाचे कंदन साध." मारुतीने स्पष्ट केले की, "इंद्रजिताच्या हातून आलेले पाशबंधन मी कदापी स्वीकारणार नाही. ब्रह्मदेवा, आपल्या हाताने आलेल्या पाशबंधनाला मी मानीन." ब्रह्मदेव म्हणाला, "तसेच घडेल. माझ्या हातून लाडिकपणे टाकलेल्या पाशात हनुमंत पडेल आणि त्याला रावणापुढे नेता येईल." तिकडे इंद्रजित चिंताग्रस्त होता; कारण रणात मारुतीला पाठ दाखवून पळताना मोठ्या संकटाने तो विवरात शिरला होता. त्याच्या पोटात धाकधुक होती की, युद्धात मारुतीने पुरते पीडले होते तेव्हा रावणाला तोंड कसे दाखवावे! तो खळखळून रडत होता. त्याच्यावर मोठेच संकट आले होते. त्याला वाटत होते, 'मला युद्धात मरण आले असते तरी

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Trust and eGangotri

कृतकल्याण झालो असतो. त्यातून वाचल्याचे फळ म्हणजे तिन्ही लोकात काळे तोंड झाले. इंद्रजित या माझ्या नावाची ख्याती म्हणजे त्रिलोकात माझी कीर्ती झाली. ती कीर्तीच आता अपकीर्ती ठरते आहे कारण युद्धात एका वानराला मी आवरू शकलो नाही. तो एक पाला खाणारा वानर असून, आम्हा निधड्या महावीरांना तो युद्धात आटोपला नाही यात माझी मलाच लाज वाटते आहे. माझे काळे तोंड आणि ही लज्जास्पद अवस्था मला मरणही येऊ देत नाही.' असे विचार मनात चिंतेने चालू असताना त्याला एकाएकी ब्रह्मदेवाचे बोलणे आठवले.''

इंद्रजित-ब्रह्मा भेट, मारुती पाशबंधनात

''ब्रह्मदेव म्हणाला होता, 'इंद्रजित मारुतीच्या गळ्याला बांधून लंकेत आणील.' ब्रह्मदेवाने स्वमुखाने बोललेल्या या उक्तीचा मला प्रत्यक्ष अनुभव यायला हवा. परंतु ब्रह्मदेवाला बोलावणे करण्यासाठी कोणी सेवक उरला नाही. मी कसातरी प्राण वाचवून विवरात दडून बसलो आहे.'' कोणी सेवक जवळ नाही, स्वतः बाहेर पडावे तर स्पष्टच मारुतीच्या शेपटाकडून मरण येणार अशा निराशेच्या विचारांनी इंद्रजिताला रडू कोसळले. 'माझ्या पित्याच्या पित्याचा पिता असा तो विधाता ब्रह्मदेव मला कसा भेटेल' अशी इंद्रजिताला चिंता वाटली. तेवढ्यात अचानक ब्रह्मदेव आला. त्याला पाहताच इंद्रजिताला मनातून धीर आला. त्याने ब्रह्मदेवाला युद्धाची समूळ वार्ता सांगून म्हटले, 'वानराने मला अतिशय दुःख दिले आहे. आपण तर म्हणाला होतात की तो युद्धात माझ्या हातून बांधला जाईल. कृपामूर्ती आपण ती उक्ती सत्य करा. नारदांनीच सांगितले की ब्रह्मवचन असत्य होत नाही. तेव्हा कृपा करून वानराला माझ्याकडून पाशबंधन करू द्यावे. मला पाशबंधनात यश दिलेत तर रणात गर्जना करून, वानराला ब्रह्मपाशात बांधीन, म्हणजे माझ्या पराक्रमाला प्रौढी मिळेल.''

ब्रह्मदेवाने दिलेले पाशबंधन नेम धरून इंद्रजिताने मारुतीवर सोडले. मारुतीला कधीच पाशबंधनाने बांधले जात नाही. हरिवरदान, हरवरदान यामुळे मारुतीला ब्रह्मपाशात बांधणे शक्य नसते. पाश तुटून जातात आणि मारुती बंधनमुक्त राहतो. पाशाच्या निमित्ताने मारुती खवळला, ह्यामुळे 'पुढे आता माझेच मरण असेल' अशा विचाराने इंद्रजिताच्या मनात चिंता निर्माण झाली. त्याचा थरकाप उडाला. इंद्रजिताने घातलेला ब्रह्मपाश हनुमंताला लागला नाही. त्यामुळे इंद्रजिताला वाटले, 'माझा रणधर्म वृथा झाला. मला कमीपणा आला. माझी अस्त्रशक्ती, शस्त्रशक्ती, ब्रह्मपाश, ब्रह्मशक्ती हे सर्व मारुतीने व्यर्थ केले. त्यापुढे राक्षसपंक्ती कशी चालेल. जिथे ब्रह्मपाश वाया जातो तिथे अन्य अस्त्रे काय करणार. या मारुतीपुढे कोणताच उपाय चालत नाही, म्हणजे राक्षसांचा नाशच आला. ब्रह्मदेवाने ही खोटीच शक्ती दिली असेल, यामुळेच मारुतीला धरता येत नाही.' या विचारामुळे इंद्रजित ब्रह्मयावर संतापला आणि म्हणाला, ''तुझी आमच्या बाबतीत दुष्ट बुद्धी आहे. रावणाने वेदांना विभागले, त्याचा तुझ्या मनात राग असल्यामुळे तूच राक्षसांचा नाश करण्यास मारुतीला सांगत असणार. तू आमचा मूळ पुरुष, आम्ही तुझी ब्रह्मसंतती, तरीही आम्हाला खोटी शक्ती देऊन मारुतीकडून मारवतोस?''

''इंद्रजिताची शंका ऐकल्यावर ब्रह्मदेव म्हणाला, 'इंद्रजिता, तू संशयमूर्ती, ब्रह्मद्वेषी, ब्रह्मघाती आहेस, म्हणून तुला ब्रह्मशक्ती वापरता आली नाही, मग मारुती कसा बांधवेल.' हे ब्रह्मदेवाचे प्रत्युत्तर ऐकून इंद्रजित पुन्हा म्हणाला, 'तूच म्हटले होतेस की इंद्रजित महावीर, वानराच्या गळ्याला बांधून आणील तर ते म्हणणे खरे करून दाखव.' त्यावर ब्रह्मा म्हणाला, 'माझा

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Research Academy, Gangotri

पाश माझ्या हातात दे, म्हणजे मारुतीच्या गळ्याला बांधून त्याला लंकेकडे नेता येईल.' इंद्रजिताने म्हटले, 'मी सोडलेल्या ब्रह्मपाशाला मारुतीने शेपटीत गुंडाळून ठेवले आहे, तर तुम्हाला काय देऊ?' हे इंद्रजिताचे बोलणे ऐकल्यावर ब्रह्मा हसला आणि त्याने मारुतीला म्हटले, "बा हनुमंता, तुला पाशबंधन नाही, पण माझे वचन सत्य होण्यासाठी पाशबंधन मान्य कर." ब्रह्मदेवाचे सांगणे ऐकून हनुमंताने लोटांगण घालून म्हटले, "तुझ्या शब्दासाठी प्राणही देईन. मग या पाशबंधनाचे काय मोठे." असे म्हणून मारुती पाशबंधनात पडला. धरणीवर निश्चेष्ट, धाकधुकीने भयभीत मूर्च्छा आल्याप्रमाणे पडून राहिला. हनुमंत ब्रह्मपाशात निश्चेष्ट पडलेला दिसला तरी तो बंधमोक्षापलीकडे श्रीरामकृपेने नित्य निर्मुक्त होता. ज्याप्रमाणे सूर्य डबक्यातल्या पाण्यात दिसला की मूर्ख लोक सूर्याला डबक्यातला मानतात, त्याप्रमाणे मारुती ब्रह्मपाशात पाहून राक्षसांनी आपणच बांधला अशी समजूत करून घेतली. इंद्रजित विजयी वीर झाला म्हणून रणवाद्ये वाजू लागली. रावणही आनंदित झाला."

"ब्रह्मदेवाने हनुमंत बांधला तरी तो ब्रह्मबंधनाच्या पलीकडे आहे हे पाहून इंद्रजित मनामध्ये धास्तावला आणि हा हनुमंत लंकेत अनर्थ करील अशी त्याला भीती वाटली. हनुमान हालचाल न करता जमिनीवर पडलेला पाहून सर्व राक्षस धावत गेले आणि त्यांनी हनुमंताला वेली-वाखांच्या दोरांनी बांधला; तसेच कोणी चऱ्हाटाने, कोणी साली आणि झाडाच्या फाळक्यांनी बांधला. हा प्रकार होत असताना मारुती आपल्याला कोणतेही बंधन चालत नाही या कल्पनेने हसत होता. ज्याला ब्रह्मपाशाचेही बंधन नाही त्याला चऱ्हाटाच्या बंधनाने काय होणार? मारुती बंधनाचे निमित्त करून लंकेत रावणाला त्रस्त करायला निघाला होता. त्यावेळी इंद्रजिताच्या मनात विचार आला की, 'आम्हाला याने अशोकवनात पीडले; आता हा लंकाभुवनात रावणाला पीडा करील. मला मात्र लोक अपयशी म्हणणार.' खरे तर, इंद्रजिताने मारुतीला बांधून लंकेत आणला हीच गोष्ट खोटी होती. मारुती स्वतःच अनर्थ करण्यासाठी लंकेत चालला होता. ब्रह्मदेवाने जे कानात सांगितले होते, ते मनात धरून हनुमंत लंकाभुवनात गेला होता. इंद्रजित मनातून भ्यायला होता. एक पाला खाणारा वानर असून त्याचा इंद्रजिताला धाक वाटत होता. राक्षस मात्र 'आम्ही निधडे राक्षसवीर, क्षणात या वानराला मारू' असे म्हणत मारुतीला दोरांनी बांधत होते. नंतर निरनिराळ्या दिशांना त्याला ते ओढत होते. मारुतीला कासावीस करायचा त्यांचा प्रयत्न होता. मारुती आपल्या मनात हसत होता; त्याच्या मनात विचार चालला होता की, 'हे राक्षस केवळ वेडे आहेत म्हणून व्यर्थ ओढाओढी करत आहेत. मी लंकेची खूप मोडतोड करीन. किल्ल्याच्या भिंती पाडीन. मला दुर्गात नेले तर महावीरांचा घात करीन. मुख्यतः लंकानाथाला त्रस्त करीन. लंका जाळीन.' मारुतीला बांधला म्हणून राक्षस आनंदित झाले. त्यांनी त्याला रावणाकडे आणले. त्यावेळी वज्रदेही मारुतीने बुकी हाणून काहींना मूर्च्छित केले. मुसळासारखे आघात करून, कोणाचे हात उखडले."

हनुमंत रावणाच्या सभेत

"इंद्रजितासहित हनुमंताला लंकेत आणण्यात आले. त्यावेळी ब्रह्मा स्वतः तोंडाने जप करत विपरीत अर्थ व्यक्त करत होता. 'गृहा वै प्रतिष्ठा' हे सूक्त म्हणून लंकेत हनुमानाच्या प्रवेशाने येथे रामराज्य येईल असा त्याचा भाव होता. रावणाने मारुतीला पाहून कराकरा दात खाऊन म्हटले, "याने अखयाकुमाराला जिवानिशी मारले तेव्हा याचे तिळाएवढे तुकडे करा." त्याबरोबर सर्व सैन्याने एकदम शस्त्रे मारून कडकडाट केला; परंतु ती शस्त्रे मारुतीला लागताच त्यांचे पीठ झाले. राक्षसांची त्यामुळे हृदये फाटली. एकाचे हात

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized By Sarayu Foundation Trust and eGangotri

उखडले, एकाचे दात विचकले, अनेकांना धाप लागली, काही मूर्च्छित झाले. हनुमान रामनाम जपत राहिला आणि शस्त्रांसह सैन्याची त्याने वाताहत केली; हे पाहून रावण कृतान्ताप्रमाणे संतापला. रावणाने मारुतीवर खड्गाने वार केला. यामुळे रावणाचा हात लचकला आणि झिणझिण्या आल्या. त्याचा तो घाव एवढा प्रचंड होता की त्यावेळी ब्रह्मांड दणाणले; पण रावणाचे सामर्थ्य उणे ठरून, त्याची मान लाजेने खाली आली. हनुमंत घावाला जुमानत नाही हे जाणवून रावण चिंताग्रस्त झाला आणि हनुमान गदगदून हसला. मारुतीने रावणाचा पुरुषार्थ व्यर्थ ठरवला. मारुती म्हणाला, "राक्षसांनी एकत्रितपणे केलेला घाव म्हणजे केवळ ढेकणांची चुळबूळ होती. तुझा स्वतःचा घाव इतका निर्बळ होता की जणू कापसाचा पेळू वाटला. लंकानाथा, तुझ्याबद्दल मला घोर भ्रम होता; परंतु घाव घालून तू आपला पुरुषार्थ व्यर्थ केला आहेस. तुझ्या घावाने माझी रोमावळी सुद्धा तुटली नाही. आता पुढे तू श्रीरामाशी रणकल्लोळात कशी जोड घेणार? सीतास्वयंवराच्या प्रसंगी शिवधनुष्य पेलताना तुझे तोंड काळे झाले. नंतर तेच धनुष्य श्रीरामाने दुखंड केले; तर त्याच्याशी तू युद्ध कसे करणार? तुझे शुभ चिन्ह आता मला कळले. तू स्वतः भिकारी झालास. त्यातही तुझे कपटच होते. तू श्रीरामाची पत्नी चोरलीस. जी गृहस्थाची पत्नी ती भिक्षेकऱ्याची माता असते. तू मात्रागमनी होऊन, सीतेशी पाणीग्रहण करायला उद्युक्त झालास. 'भिक्षा दे ग माते' असे प्रथम म्हणून नंतर तिचाच म्हणजे सीतेची अभिलाषा धरतोस! तू सर्व दृष्टींनी महापापी आहेस. अरे, राजेपण सोडून, त्यापासून दूर जाऊन, हातात झोळी घेऊन स्वतः भिकारी झालास; त्यामुळे स्वतःच भिकारी झाल्यामुळे तुझी राजेपणाची पदवी दूर पळाली. राजाची थोरवी सांगणारे वेदभाष्य जळो. तू तर परस्त्री चोरणारा आहेस."

मारुतीला अमरत्व आहे तेव्हा आपल्या कडून तो मारला जात नाही, हे सभेकडे पाहून रावणाला जाणवले. त्यामुळे त्याला मोठी चिंता वाटू लागली. मारुतीला येथे आणूनही आम्हाला पुरूषार्थ करता येत नाही. हा आपलीच हत्या करील या भीतीने रावण चळचळा कापू लागला. रावणाला सिंहासन होते तसे मारुतीला शेपटीचे आसन होते, त्यावर तो सावधपणे बसून रावणाकडे पाहात होता. रावणासमोर मारुती निःशंकपणे बसला होता. ते पाहून रावणाला त्याचा धाक वाटला आणि त्याने मान खाली घातली. 'इंद्रजिताने मारुतीला लंकेत आणला आणि ब्रह्मवाक्य खरे ठरले; माझे मात्र मरण ओढवले.' अशी रावणाच्या मनात भीती निर्माण झाली. ही रावणाची चिंता मारुतीला समजली. त्या नंतर मारुतीने रावणाला चिडवण्यासाठी अनेक वानरचेष्टा सुरू केल्या. रावणासमोर बसून त्याने वेडावले, काखा खाजवल्या, शेपूट रावणाच्या नाकाला लावले. रावण शिंकेमागून शिंकत राहिला आणि शेवटी ओकला. रावणाच्या दहाही नाकातून थडाथडा शिंका आल्याने शेंबडाचा सडाच पडला. असा तो सिंहासनाधीश मारुतीने पूर्ण गांजला. शिंकांच्या जोराने दाब पडून रावणाचा अधोवात सरू लागला. वानरचेष्टांनी दशानन रावणाला पूर्ण गांजले. राजसन्मान, राजेपणाचा अभिमान मारुतीने उध्वस्त केला. मारुती रावणासमोर बसून होता, त्याने रावणाला लाज आणली. राक्षस, प्रधान, स्वतः रावण यांपैकी कोणाचीच मारुतीने पर्वा केली नाही. शेवटी रावणाने स्वतः मारुतीशी बोलणे सुरू केले. "अरे, तू कोणाचा कोण आहेस?"

मारुतीचे रावणाला प्रत्युत्तर

"मारुतीने मग रावणाच्या प्रश्नावर एकाने 'अरे' म्हटले तर दुसरा 'कारे' म्हणतो तसे तिरस्कारपूर्वक प्रत्युत्तर दिले. तो म्हणाला, "वनरक्षक, किंकर, जंबुमाळी, प्रधानपुत्र, पाच शूर सेनापती ज्याने मारले तोच मी हनुमंत वानर.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

मी वन-वृक्षांना उपटले, इंद्रजिताची प्रौढी झटकली, अखयाकुमाराला मारले तोच मी निधडा हनुमंत आहे. कोणाचा कोण, कसा आणि येथे येण्याचे कारण, असे प्रश्न मला विचारशील तर त्यांचे उत्तर सावधपणे ऐक. ज्याने सुबाहु, ताटका यांचे निर्दाळण केले; त्रिशिरा, दूषण, खर यांना मारले, त्या श्रीरामाचा मी दूत आहे हे समजून राहा. आता तुझा प्राण घ्यायला आलो आहे. धनुर्धरांचा दीक्षागुरू, स्वतः कोदंडधारी, अशा सूर्यवंशी श्रीरामचंद्राचा मी दूत असून तुझ्या संहारासाठी आलो आहे. राक्षसांचा राजा मी रावण, मला मारायला कोणाजवळ एवढा पराक्रम आहे, असे जर तुला वाटत असेल, तर ऐकून ठेव की, माझे बळही असाधारण आहे. तुला मारायला प्रमाण काय म्हणशील तर माझ्या हाताचा एक धपाटा बसला तर प्रत्यक्ष मेरूमंदाराचे चूर्ण होते. मग तिथे दशानन रावणासारखा कीटक किंवा लंकात्रिकूट ते काय मोठे! दशमुखी असे कोट्यवधी रावण मी रणात मर्दीन आणि लंका-त्रिकुटाचा डाव्या मुठीने नाश करीन. तुला वाटत असेल माझ्याबरोबर अनेक वानर पाठिराखे म्हणून असतील; पण तसे नाही. मी एकटा अनेक राक्षसवीर आणि दशशिर रावण यांच्याशी लढून त्यांना शिक्षा करीन. मी तर एकटा एक वानरवीर, श्रीरामाच्या सैन्यातला सैनिक आहे. तुझे कोट्यवधी योद्धे माझ्यासमोर उभे कर. ते सारे माझ्यासमोर घुंगुरटी आहेत. मी दशशिर रावणाला मारू लागलो तर राक्षस, सुरासुर यातले कोण त्याचे रक्षण करणार? वास्तविक सदाशिव तुझा रक्षणकर्ता, पण तू श्रीरामाची पत्नी चोरलीस; त्यामुळे शिवच तुझ्या घातला उद्युक्त झाला आहे. अरे, चोराचे रक्षण कोण करील! ब्रह्मा तुला नेहमी साहाय्य करणारा, परंतु तू त्याच्या वंशातला असून दुराचारी, परक्या घरी चोरीमारी करणारा, म्हणून तोही तुझ्यावर रागावला आहे. ब्रह्मा, शिव, इंद्र आणि सर्व देव तुझ्यावर रागावले असल्यामुळे, मी तुला मारू लागलो तर कोण समोर येईल? मुख्यतः तू सीता सती चोरलीस, जटायूला विश्वासघाताने मारलेस, पतिव्रतेकडे शरीरसुख मागितलेस यामुळे प्रजापती संतापला आहे. आता दशानन, कुमार, प्रधान आणि सर्व सैन्य युद्धात मारून, मी सीतेला घेऊन जाईन.''

श्रीरामाच्या प्रतिज्ञेचे पालन

''हनुमंताची गर्जना ऐकून इंद्रजित चळचळा कापू लागला आणि तो बिभीषणाला म्हणाला, ''आता रावणाचा घात होणार.'' हनुमंताचा रणातला पराक्रम अनुभवल्यामुळे इंद्रजित भयभीत झाला होता. 'मारुतीच्या शेपटीचे आघातही सहन होत नाहीत, मग रावण कसा वाचणार? हनुमंताला लंकेत आणून काय पुरुषार्थ साधला? आता राक्षसांसह रावणाचा अंत होणार' असे इंद्रजिताच्या मनात आले. रावण कसा वाचेल या विचाराने तो सचिंत झाला. त्यावेळी हनुमान म्हणाला, ''श्रीरामाचा पुरुषार्थ फारच मोठा आहे. मीच रावणाला मारून, सीतेची मुक्तता करून तिला घेऊन जाईन त्यावेळी कोण अडवायला येणार आहे; हे मी एका क्षणात करू शकेन; परंतु श्रीरामाने अशी प्रतिज्ञा केली आहे की रावणाला तो स्वतःच्या हाताने मारील. त्याची शपथ कोण व्यर्थ करणार? दशशिर रावणाचा वध करून पृथ्वीला पूर्णतः सुखसंपन्न करावी, चराचराला सुखी करावे हा श्रीरामाचा नेम आहे. देवांचे बंधन सोडवावे, नवग्रहांची बेडी तोडावी, रामराज्याची गुढी उभारावी, हे श्रीराम करील एवढे त्याचे सामर्थ्य आहे.'' नंतर मारुतीने उड्डाण केले. रावणाचा वध करावा असे मनात असूनही श्रीरामाच्या प्रतिज्ञेचे पालन करण्यासाठी त्याने रावणाला मारले नाही. त्याने केवळ रावणाच्या दहा तोंडांवर नखांनी ओरबाडले. श्रीरामाने घातलेली मर्यादा सांभाळावी म्हणून मारुतीने रावणाला जिवंत ठेवले. श्रीरामाची मर्यादा त्याला ओलांडायची नव्हती. यामुळे रावणाला मारण्याऐवजी त्याने त्याची निर्भत्सना केली.''

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized By Sarayu Foundation Trust and eGangotri

"रावणा, जळो तुझी थोरवी. जळो तो राजा जो भिकारी होतो, चोरीचे कर्म करतो, दुसऱ्याची पतिव्रता स्त्री हरण करतो. रावणा, जळो तुझे कुळ. तुझे शील, तुझे बळ, तू परद्वारीचा पापी आहेस. तुझ्या पुरुषार्थाचा धिक्कार असो. तू तुझ्या कृतकर्माने तुझे व्रत, स्वार्थ आणि परमार्थ यांचा नाश केलास. तुझी राक्षसजात, तुझी कीर्ती, ख्याती या सर्वांची तिन्ही लोकात अपकीर्ती झाली आहे. तुझा जन्म, तुझे कर्म, तुझा धर्म हे त्रिलोकात निंद्य ठरले आहे. तुझी श्रीमंती, शक्ती व्यर्थ आहे. तुझ्या हातातले खड्ग या मारुतीची लवही तोडू शकणार नाही. श्रीरामाच्या बाणाच्या भीतीने त्याच्या पाठीमागे तू सीता चोरलीस तेव्हा तुझ्या शौर्यशक्तीचा धिक्कार असो. तुझे पृथ्वीवरचे जीवित निषेधार्ह आहे. माझ्या स्वामीची पत्नी चोरलीस आणि मी तुझी चोरी पकडली आहे. चोर हा वैरीच तेव्हा मी तुझा सपरिवार घात करीन. मी तुझ्या सैन्याच्या, वीरांच्या समक्ष तुझे वीसही ओठ तोडीन आणि दहा कंठ छेदीन. त्यासाठीच मी रामाच्या ऐवजी आलो आहे." असे बोलून त्या महाबळी हनुमानाने आपले केस पिंजारले, शेपूट जमिनीवर आपटली आणि तेव्हा त्याचे शेपूट वाढत गेले. त्याचवेळी त्याला श्रीराम रावणाचा वध करणार आहे हे आठवले. मग आपण उगीच कशाला संताप करायचा असे ठरवून त्याने आपला राग आवरला."

अध्याय तेहेतिसावा

"लंकाधीश रावणाच्या सिंहासनाप्रमाणे शेपटीचे आसन तयार करून, हनुमान सावधान बसून, रावणाकडे पाहात होता. जसा सिंहापुढे हत्ती किंवा गरूडापुढे सर्प यांना कंप सुटतो, तसा मारुतीचा प्रताप पाहून रावणाला कंप भरला. जेव्हा रावण भयभीत झालेला पाहिला तेव्हा इंद्रजित आणि बिभीषण यांनी संयुक्तपणे रावणाला उपदेश केला की, "हनुमंत सर्वथा अवध्य आहे. त्याला मारू गेल्यावर त्याने महावीरांना त्रस्त केले, केवळ शेपटीने सैन्य मारले. तो कोणालाच आटोपत नाही. तेव्हा त्याची समजूत घालण्यासाठी श्रीरामाला सीता अर्पण करावी आणि शरण जावे. त्यामुळे आपले सर्वांचे कल्याण साधणार आहे. श्रीरामाचा हा एकटा पाला खाणारा वानर असून आम्हाला तो दुर्धर ठरला, आम्ही त्याला आवरू शकलो नाही. मग श्रीराम स्वतः आल्यावर कोणाला सहन होईल." बिभीषणाचे बोलणे ऐकून आणि इंद्रजिताला वाटणारे युद्धाचे भय पाहून, रावणाला मोठी चिंता लागली आणि मारुतीकडे पाहून तो थरथर कापू लागला. इंद्रजिताचा विचार वेगळा, विभीषणाची शरण जाण्याची सूचना, यांमुळे आपण नेमके काय करावे या विचारात रावण पडला. एका वानराच्या भीतीने श्रीरामाला शरण जाण्याने आपल्याला उणेपणा येईल असे त्याला वाटले. तेव्हा त्याने विचार केला की हनुमंताला कपटाने मारावा."

रावण मारुतीचे मरण कशात विचारतो

"रावण विचार करू लागला की आपल्याला जटायू आटोपत नव्हता म्हणून आपण तेव्हा त्याच्याशी कपट करून, मरण विचारून, त्याचा वध केला. तसेच मारुतीला श्रीरामाची शपथ घालून ह्याचे मरण कशात आहे ते विचारून त्याला मारावे. श्रीरामाचे भक्त हे सत्यवादी असतात, खोटे कधी बोलत नाहीत; तेव्हा याला श्रीरामाची शपथ घातली की तो खरोखर मरण कशात ते सांगेल. अशा प्रकारे कपट करून त्याला मारावे. ही विचारपूर्वक युक्ती ठरवून, रावण मारुतीला आदरपूर्वक त्याची स्तुती करून म्हणाला, "वानरश्रेष्ठा, तुला श्रीरामाची शपथ घालून विचारतो की तुला मरण कशाने येईल, ते मला खरे सांग." श्रीरामाची शपथ घातलेली ऐकून मारुतीने लोटांगणाने रामाला म्हणून वंदन केले. नंतर तो म्हणाला, "लंकेशा, मला कधीच मरण येणार नाही हे माझे सत्यवचन आहे." मारुतीचे

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sayaji Foundation Research Academy

हे वचन ऐकून रावण गदगदा हसला आणि म्हणाला, "अरे, जन्माआधी गर्भातच मरण निश्चित होते. मग तुला अमरपण कसे? हनुमंता, श्रीरामभक्ता, खोटे बोलू नको. श्रीरामाचा भक्त असून तू खोटे कसे बोलतोस?" त्यावर हनुमंत म्हणाला, "जसे जटायूला त्याचे मरण कशात आहे हे विचारून तू कपटाने त्याला मारलेस, तसे माझ्याविषयीही करशील या भीतीने मी खोटे बोललो." मग रावण म्हणाला, "अरे, ज्याच्या मनात मरणाचे भय असते, त्याची श्रीरामभक्ती कसली? देहलोभ ठेवणाराला श्रीरामाची प्राप्ती कदापीही होणार नाही." अशा प्रकारे रावणाने परोपरीने ज्ञान आणि योग्यता यावर भाष्य केले. तेव्हा मारुतीने त्याला म्हटले, "परस्त्रीचा अपहार करणारा तू; रावणा कसले तुझे जाणतेपण! त्यावेळी स्वतः कासावीस होऊन, मरणभयाने सीतेचे हरण करून पळालास; आणि आता तू मला शिकवतो आहेस की मरणाला का भ्यावे." हे बोलणे रावणाच्या वर्मी लागले. नंतर हनुमंत त्याला "ऐक तर आता माझे मरण कशात आहे ते खरे खरे सांगतो, ऐक"

शेपूट गुंडाळण्यातच अपयश

मारुती रावणाला म्हणाला, "मी तुझ्याशी खोटे बोललो नाही. माझ्या देहाला मरण नाही, परंतु माझ्या शेपटीला मरण आहे. पुच्छ मारलेस तर मीही मरेन." हे ऐकून इंद्रजिताने ते सत्य मानले. प्रधानांनी आणि सैन्याने ते सत्य मानले. मारुतीच्या शेपटीचे दहन केले की मारुती अवश्य मरेल असे त्यांनी ठरवले. श्रीरामाची शपथ घातल्यामुळे भयभीत होऊन मारुतीने आपले मरण सांगितले. तेव्हा पुच्छ दहनाने मारुतीला मृत्यू येईल हे रावणानेही सत्य मानले. मग रावणाने "शेपूट कसे जाळावे?" असे मारुतीला स्वतःच विचारले. त्यावर हनुमंताने लंका जाळण्याचा हेतू मनात ठेऊन, कपट करायचे ठरवून, म्हटले, "वस्त्रे तेलतुपात भिजवून संपूर्ण पुच्छाला गुंडाळावी आणि मग ते जाळण्यासाठी त्याला अग्नी लावावा; त्यामुळे मलाही मरण येईल." हे ऐकल्यावर हनुमंताच्या मरणाचे वर्म सापडल्याचा रावणाला आनंद झाला. त्याने मारुतीचे शेपूट वेढण्याची दूतांना आज्ञा केली. त्यावर मग घाईघाईने शेपूट गुंडाळायला आरंभ झाला. जुनी-पानी वस्त्रे संपली; मग नवीन घोंगड्या, धूत वस्त्रे, अनेक कापडे आणून झाली; तरीही शेपूट आच्छादले नाही. या प्रकारात कापडाच्या व्यापाऱ्यांच्या गाठी गेल्या त्यामुळे ते आरडा-ओरडा करू लागले. शेले, खास वस्त्रे, काळी-बेरी सरसकट, शेपटीला वस्त्रे गुंडाळली तरी मारुतीचे शेपूट वेढले जाईना. नंतर राजगृहातली वस्त्रे, नगरवासीयांची वस्त्रे आणली; सभाजनांची सगळी वस्त्रे लुबाडून आणली तरी चतकोर शेपूटही गुंडाळले गेले नाही. पोताची चांगली वस्त्रे, पडदे, पांघरायची वस्त्रे, उघडून, फाडून वेढण्यासाठी वापरली तरी पुच्छ वेढले गेले नाही. मारुती हट्टाला पेटला होता."

"लंकेतील रहिवाशांकडे आलेले मेहुणे, पाहुणे, दिवाळसणाला आलेले जावई अशा सगळ्यांची वस्त्रे हिरावून आणली गेली त्यामुळे ते शंख करू लागले. जो जो कोणी वस्त्रासकट दिसे त्याची वस्त्रे दूत काढून घेत; त्यामुळे संपूर्ण नगरी त्या शेपटीच्या गोंधळात गोवली गेली आणि नगरीतले स्त्री--पुरुष कळवळले. पुरुष नग्न होऊन हळहळले आणि त्यांनी आपली लिंगे गवताने झाकली. स्त्रिया मागे-पुढे हात ठेवून नग्नावस्थेत पळू लागल्या. अंतःपुरातल्या राजस्त्रियांची वस्त्रे त्यांना उघड्या करून आणली गेली. अशा प्रकारे लंकेतले नागरिक, सभेतले सर्व सदस्य आणि राजस्त्रिया अशा सर्वांची वस्त्रे लुबाडून मारुतीच्या शेपटाने अंत पाहिला. दुर्गामध्ये असलेली साठवणींची तेला-तुपाची टाकी रिकामी करून घोंगड्या भिजवून कोरडी केली; नगरातले तेल-तूप संपल्याने दिव्याच्या वाती देखील मालवल्या; त्यामुळे सर्वत्र अंधार पसरला. रावण धास्तावला. नगरात

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized By Sayyed Foundation Research Academy eGangotri

तेलातुपाचा तुटवडा आणि भोवती वस्त्रांचा ढीग, तरी पुच्छ गुंडाळणे होईना. मारुतीने सर्वांना वेड लागायची पाळी आणली. सभेतले सर्व वीर लुबाडले. नगरात कुठे वस्त्र मिळेना. नग्न स्त्रीपुरुष हळहळत बसले. पुच्छ गुंडाळण्याचा प्रकार असा झाला की नगर ज्याचे त्याच्या हाती; पण मारुतीने स्वतः नगर नागवे केले; अशी त्याच्या शेपटीने ख्याती केली."

"वानरवीर मारुती महापराक्रमी होता. त्याने शेपटीसाठी सारी लंका लुबाडली. अनेक राक्षस दमले परंतु शेपूट गुंडाळले गेले नाही. थोडेफार शेपूट गुंडाळले की त्याचे टोक पुढे पुढे वाढत जाई. अशी त्याने ख्याती केली आणि राक्षसांचेच मरण ओढवले. भांडण तंटा न करता, शेपूट गुंडाळण्यात रावण तृणप्राय केला; असा मोठा पराक्रम मारुतीने केला. शेपूट जवळ जवळ गुंडाळले गेले आणि त्याचे टोक तेवढे उरले. हे ऐकल्यावर रावण म्हणाला, "पीतांबर गुंडाळा." इंद्रजित, प्रधान आणि रावणही मनातून संतोषला. शेपूट जळेल तेव्हा मारुती मरेल या विचाराने सगळे शेपूट गुंडाळायची रावणाने आज्ञा दिली. लगेच पीतांबर, श्वेतांबर, रेशमी मनोहर वस्त्रे, महावस्त्रे ही गुंडाळली तरी पूर्ण शेपूट वेढले गेले नाही. तेव्हा इंद्रजिताला धाक वाटला. "जर हनुमंत वाचला तर तो सर्वांचा घात करील. त्यासाठी शेपूट जाळून त्याला मारले पाहिजे," असे तो म्हणत होता. रावणाच्या मनातही भीती होती. जर याचे शेपूट आम्ही गुंडाळू शकत नाही तर याला आम्ही कसे मारणार या विचाराने तो ओक्साबोक्सी रडू लागला. त्यावेळी विद्युन्माळी हा राक्षस म्हणाला, "जर हा महाबळी वानर आवरत नाही तर जानकीला उघडी करावी म्हणजे लगेच शेपूट कह्यात येईल." हे त्या राक्षसांचे शब्द ऐकताच मारुतीने शेपूट आवरले. तेव्हा दूत रावणाला सांगू लागले की, "आम्ही सेवक महापराक्रमी आहोत कारण आम्ही शेपूट संपूर्ण वेढले आहे." असे म्हणून ते दूत टाळ्या पिटून गर्जना करू लागले."

शेपूट पेटवण्यातले नाट्य

"रावणाने रागाने म्हटले, "शेपटीला आग लावा" त्यावर लोहारांना त्यांचे भाते घेऊन बोलावले आणि अग्नी भाते लावून पेटवला. रावण सुखावला. शेपटीची होळी करून महाबळी मारुती मारावा, यासाठी स्वतः अग्नीजवळ आला. त्यावेळी अग्नीच्या मनात रावणाची फजिती करायचे होते. मारुतीच्या मनातही तोच विचार होता. त्यासाठी मारुतीने आपला पिता वायू याला विनंती केली की, "वायूचा अग्नी पुत्र आहे तेव्हा त्याने ज्वाळा होऊ देऊ नयेत." त्यामुळे चौफेर भात्यांनी फुंकले तरी शेपटीला अग्नीचा स्पर्श होईना. राक्षस कासावीस झाले. रावणाला अपमानित झाल्यासारखे वाटले. रावणाने "हे असे का होते आहे? अग्नी पुच्छाला स्पर्श का करत नाही?' असे हनुमंताला विचारले. तेव्हा हनुमंत म्हणाला, "तू अत्यंत मूर्ख आहेस. ज्याला सदसद्विवेकज्ञान नाही तो अज्ञानीच. तू तर ज्ञानगर्वाचा पाषाणच आहेस. तुला धर्मलक्षण समजत नाही. अरे, अचेतन भाते फुंकून ज्वाला सचेतन कशा होतील? हेही ज्ञान तुला नाही. लंकाधीशा, तू अत्यंत अज्ञानी आहेस" हे मारुतीचे सांगणे रावणाला पटले. मग त्याने राक्षसांना बोलावून फुंकायला सांगितले. "अगदी जोराने फुंका." असे सांगताच शेपटीच्या चौफेर जमून राक्षस फूंकू लागले. तेव्हा हनुमंताने अग्नीला शेपटीने दडपले. त्याबरोबर घाण वास राक्षसांच्या घशात गेला आणि ते कासावीस झाले. तो घाण वास प्रबळ झाल्यामुळे डोळ्यातून पाणी, मुखातून लाळ गळू लागून राक्षसांचा श्वास अडकून खोकला आला. हलकल्लोळ झाला."

"हनुमंत द्वंद्वाला पेटला होता सर्वत्र धूर भरला. मारुतीने असा अनर्थ मांडला, तेव्हा मारुतीला रावणाने विचारले, "एवढे फुंकल्यावरही शेपूट पेटत कसे नाही?" त्यावेळी मारुती म्हणाला, "रावणा, ऐक मी काय सांगतो ते.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sayaji Rao Gaekwad Research Academy

"ज्याप्रमाणे यजमानाने सुपारी दिली नाही तर त्याचा होम करत नाहीत. त्याप्रमाणे स्वतः रावणाने फुंकल्याशिवाय अग्नी शेपटीला स्पर्श करणार नाही की प्रज्वलित होणार नाही. हे तुझे राक्षस गण एका तोंडाने कीती फुंकणार; तुला दहा तोंडे आहेत, त्यांनी तू स्वतः फुंकलेस तर अग्नी शेपूट जाळील." या सूचनेनंतर शुद्धाचमन करून, प्रथम तुपाची आहुती देऊन, मग दशमुख रावण स्वतः फुंकायला बसला. हनुमंताने केलेली विवेकपूर्ण युक्ती सफळ झाली. त्याचे सांगणे रावणाने सत्य मानले. रावण मोठ्या तयारीने अग्नी प्रदीप्त करायला सिद्ध झाला. त्याने हनुमंताला मारण्यासाठी मनात कपट धरून, मोठ्या आवेशाने फुंकायचे ठरविले. 'माझ्या तोंडाने शेपूट पेटली आणि मारुती मेला म्हणजे जगात माझी कीर्ती होईल." हनुमान त्याचवेळी त्याचा पिता वायूला विनवून सांगत होता की, "रावणाने अग्नी फुंकला म्हणजे त्याचा असा अपमान कर की त्याने कोणाला तोंड दाखवू नये." रावण आवेशाने, ओरडून, अग्नी फुंकू लागला तेव्हा एकदम भडका होऊन, रावणाच्या दाढी-मिशा जळाल्या, रावणाचे तोंड भाजले, तेव्हा तो टेऱ्या बडवत शंख करू लागला. त्याचे तोंड काळे झाले. रावण जेव्हा तोंड वळवी तेव्हा मारुती शेपूट वरती करी. अशा रीतीने राजमस्तकावर अपमान ठेऊन, त्याच्या दाढी-मिशा जाळून नष्ट केल्या."

श्रीरामासह सर्वांकडून मारुतीचे कौतुक

हनुमंताने अभिनव कल्पनेने केलेला पराक्रम ऐकून श्रीरामाला हसू आले. तसेच सुग्रीवादी वीरांनाही हसू फुटले. लक्ष्मण ब्रह्मलिखित वाचतानाच हसू लागला. हनुमानाने कौशल्य दाखवून रावणाचे तोंड काळे केले याचे सर्वांनाच कौतुक वाटले. वानरांनी 'आमचा हनुमान महापराक्रमी आहे. त्याने एका महान् व्यक्तीचे मुख काळे करून दाखवले' असे म्हणत टाळ्या पिटून हर्षाने गर्जना केली. वानर 'विजयी महावीर हनुमान' असे म्हणत नाचू लागले. जयजयकार करू लागले. श्रीरामाचेही त्यांनी स्मरण केले. नंतर अंगदाने उठून रणवाद्यांचा गजर केला. त्यावेळी आकाशातून सुरगणांनी पुष्पवृष्टी केली. श्रीरामाला त्यामुळे अपार सुख आणि समाधान वाटले. आपल्या सेवकभक्ताची कीर्ती ऐकून रघुपती स्वतः आनंदून "धन्य धन्य हा मारुती, ज्याची तिन्ही लोकात पवित्र कीर्ती झाली." श्रीरामाने लक्ष्मणाला "ब्रह्मलिखित वाच म्हणजे हनुमंताने शेपूट पेटवल्यावर पुढे काय पुरुषार्थ केला ते समजेल" असे म्हटले. लक्ष्मणाने श्रीरामाच्या चरणांना वंदन करून ब्रह्मलिखित पत्राचे वाचन सुरू केले. श्रीराम मन लावून ऐकू लागला. त्यावेळी हनुमान तिथेच हात जोडून उभा होता. आपली स्तुती ऐकून त्याला बढाई वाटली नाही की अभिमान वाटला नाही. तो म्हणाला, "मी साधा पाला खाणारा वानर, श्रीराम माझे कौतुक करून माझी कीर्ती वाढवतो; पण वास्तविक युद्धक्षेत्रात रामनाम हेच महाशूर आणि दुर्धर आहे. श्रीराम हाच हाताचा हात, शस्त्राचे सामर्थ्य आहे. तोच राक्षसांचा घात करतो, रणकंदन तोच करतो. श्रीराम प्राणाचा प्राण, बाणाचा बाण, माझा पुरुषार्थ मी श्रीरामालाच समर्पण करतो." हनुमानाचे बोलणे ऐकून श्रीराम सुखाने डोलू लागला. भक्तिभावार्थाची ओल श्रीरामाच्या अंतरात सखोल पोचली.

श्रीरामनाम माहात्म्य वर्णन

सौमित्र ब्रह्मलिखित पुढे वाचू लागला. "रावण अपमानित होऊन लाजेने सभेत थांबला. अग्नीने दाढी-मिशा जाळल्या त्यापूर्वी शेपटाने धुमाकूळ केला होता. रावण काळे तोंड घेऊन सिंहासनावर लाजेने चूर होऊन बसला होता. आजवरच्या कीर्तीची अपकीर्ती झाली याची रावणाला चिंता वाटली. यापुढे मारुती पुच्छदहनामुळे काय करील याचीही त्याला काळजी लागली. "आपण मारुतीशी कपट करायला गेलो, पण श्रीरामभक्तांपुढे कपट चालत नाही. उलट माझे तोंड आणि माझ्या दाढी-

https://archive.org/details/muluksmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

मिशा जळून माझाच छळ झाला." मारुतीने उड्डाण करताना रामनाम घेतले आणि दुर्धर असे सात पाश छेदले. तिथे वेलींचा, दोऱ्यांचा पाश आणि यमपाशाची काय योग्यता! काळपाश, कर्मपाश, धर्मपाश, ब्रह्मपाश, मायापाश, मोहपाश आणि जन्मपाश असे सात पाश मारुतीने छेदले. काळपाश हा आयुष्यघात, कर्मपाश हा नैश्वर्यवंत, धर्मपाश हा आश्रमगत, वेदविहितार्थ तो ब्रह्मपाश, देहममतेचा मोहपाश, माया हा मुख्यत्वे आशापाश, कनककांता हा जन्मपाश, अशा सात पाशांनी जीव बद्ध असतो, या सात पाशांची निवृत्ती मारुतीने रामनामाने साधली. मग तिथे इतरांची युक्ती कशी चालणार. शास्त्रव्युत्पत्तीही तेथे श्रमते. जे श्रीरामाचे नाम तेच केवळ परब्रह्म. त्या नामाने कर्माकर्म नष्ट होते आणि धर्माधर्माचा छेद केला जातो. जर वेद अबद्धपणे म्हटले तर अनिवार निषेधाने बाधतात; पण नामस्मरण करताच अबद्ध ते सुबद्ध होऊन ऐकायला मिळतात. अबद्ध मंत्रोच्चाराने जपणारे कित्येक चळले, परंतु जरी अबद्ध नामस्मरण झाले तरी असंख्य जड-मूढ तरले. क्रियाकर्माची व्युत्पत्ती केली किंवा विधिविधाने करण्यात चूक झाली तर त्या व्यंग्य कर्माने उद्धारगती प्राप्त होत नाही. हरिनाम उच्चारून मात्र शाश्वत स्थिती प्राप्त होते.

श्रीरामनामाला कर्मबंधन किंवा विधिविधान नाही. आसनी, भोजनी, शयनी श्रीहरीचे नाम पवित्र असते. स्वप्नात जरी रामनामस्मरण केले, तरी तिन्ही अवस्था भस्म होतात. असे श्रीहरीचे नाम प्रभावी आहे. नाम हे प्रत्यक्ष परब्रह्म आहे. स्वप्नामध्ये स्वप्नस्थितीतच बुधकौशिक ऋषींना रामरक्षेची प्राप्ती झाली. ही रामरक्षा त्रिलोकात उद्धारकर्ती म्हणून महत्त्व पावली. ज्याच्या हातात रामरक्षा असेल त्याच्यापुढे कळिकाळ कापतो, यमधर्म त्याच्या पाया पडतो, तीर्थे त्याचे चरणतीर्थ मागतात. या रामरक्षेचे सामर्थ्य असे आहे की दोनच अक्षरे म्हणजे रामनाम म्हटले तर चारी मुक्तींची भ्रांती फिटते आणि ब्रह्मप्राप्ती ठसते. श्रीरामनाम-स्मरणानुळे ब्रह्मस्थिती घरी प्रवेशते; कळिकाळाला थांबवते; असे श्रीहरीचे नाम प्रभावी आहे. अशी श्रीरामनामाची स्थिती हनुमंतामधे पूर्णत्वाने बाणली, त्यामुळे त्याची पवित्र कीर्ती त्रिजगतात नित्य विजयी झाली." अशी हनुमंताची स्थिती ब्रह्मलिखितात ब्रह्मदेवाने लिहिली. त्यापुढे मारुतीचे शेपूट पेटल्यावर त्याने काय ख्याती केली ते लिहिले होते.

मारुतीचे मरणाचे सोंग-त्यावर प्रतिक्रिया

"शेपूट धडाडून पेटले तेव्हा हनुमंताला, जसा अग्नी चंद्राला आलिंगन देण्यासाठी यावा तसा आवेश आला. "रामनामापलीकडे कोणतेही श्रेष्ठ साधन नाही. रघुनाथाने माझ्यावर कृपा केली, त्यामुळे अग्नीची मला बाधा झाली नाही." श्रीरामनामाने हनुमंत साता पाशातून निर्मुक्त झाला होता तरी त्याचे पुच्छ राक्षसांचा नाश करण्यासाठी तळमळत होते. त्यावेळी मारुतीने डोळे अर्धगोलाकार फिरवले, तोंडाला फेस आणला आणि शेपूट जमिनीवर पसरून तो निपचीत पडून राहिला. ते पाहून राक्षस आनंदित झाले. मग त्यांनी जवळ जाऊन त्याला हालवून पाहिले. त्यावेळी मारुतीने हात-पाय न हलविता, केवळ दात विचकले. राक्षसांनी त्याला उलथा-पालथा केला, कोणी उलटा धरला, तेव्हा ते अग्नीने पोळले, म्हणून माघारी पळाले. नंतर कोणी त्याला काठीने ढोसले, कोणी थपडा मारल्या, पण त्या ढोंग करणाऱ्या मारुतीने दात-दाढा हलवल्या नाहीत. त्याने आपले ढोंग व्यवस्थित केले, डोळ्याच्या पापण्याही हालू दिल्या नाहीत, त्यामुळे तो मरण पावला, असेच सर्वजण म्हणू लागले. रणात ख्याती केलेला, तो पराक्रमी जगजेठी कोट्यवधी राक्षसांच्या वधाला कारण झाला, इंद्रजित आणि रावणाला त्याने धाक लावला होता. त्यामुळे 'जर याने आपले मरण सांगितले नसते तर त्याने सर्वांचा घात केला असता. परंतु तीक्ष्ण बुद्धीच्या

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sayaji Rao Gaekwad Research Academy and eGangotri

रावणाने कपटाने मारले म्हणून बरे झाले. या वानराने आपण आपले मरण ओढवून घेतले.' असा राक्षसांनी विचार केला. नंतर जेव्हा राक्षसांच्या वैद्याने हनुमंताची तपासणी केली तेव्हा वैद्द म्हणाला, "या वानराच्या हृदयात प्राण आहे, पण तो अतिशय क्षीण झाला असून क्षणार्धात तो मरेल." हनुमंत मरणार हे ऐकून रणवाद्ये वाजविण्यात आली. इंद्रजिताला अत्यानंद होऊन त्याने सर्वांना खिरापत वाटली. रावणाने मारुतीला मारले हे ऐकून लंकेतले नागरिक आणि राक्षसवीर यांनी मारुतीला पाहण्यासाठी प्रचंड संख्येने गर्दी केली."

मारुतीने पेटत्या शेपटीने केलेली त्रेधा

"मारुतीने आपणहून मेल्याचे सोंग घेतले आणि त्यामुळे राक्षसांचा समूह एकत्र झाला होता. त्या सर्वांचा नाश करायला हनुमंताला संधी मिळाली आणि खरोखरीच तो द्वंद्वाला सिद्ध झाला. मग राक्षसांच्या समूहावर त्याने पेटत्या शेपटीने घाव घातला; त्यामुळे राक्षस उरा-शिरी पोळले जाऊन त्यांची दुर्दशा झाली. त्याने पेटते पुच्छ दारात लावले आणि सर्वांचा कोंडमारा करून त्यांना बाहेर पळू दिले नाही. त्याने नंतर राक्षसांच्या वस्त्रांना आग लावली आणि त्यांचे सर्वांग जाळले. ज्यांची धोतरे पेटली त्यांच्या गुप्तेंद्रियांना आगीचे चटके बसले. ते नग्न अवस्थेतच रावणाकडे येऊन आपली अवस्था दाखवून, गाऱ्हाणे सांगू लागले. हनुमान नंतर राजद्वारी आला. तेव्हा रणभेरी वाजवून प्रजाजन म्हणू लागले, "जळो रे रावण तुझी थोरवी. याने आगीने सर्वनाश केला, ती आग तूच लावलीस. वस्त्रांसाठी सगळी लंका लुबाडली गेली. तेला-तुपाचा तर एवढा तुटवडा झाला आहे की दिवा लावणेही बंद झाले. अखेर जिवाचेच भय ते वानरपुच्छ दाखवते आहे. आधीच तो वानर सबळ, त्यात पुच्छ पेटवले ते प्रबळ, त्यामुळे आता तो वानर तत्काळ लंका जाळील आणि राक्षसांना मारील. रावणा, तुझ्या मनात कपट होते, त्या कपटानेच तळपट झाले. पुच्छ पेटलेला वानर सर्वांना सपाट करील." यावर रावणाने मारुतीला विचारले, "हनुमंता, तू लंका कोणत्या हेतून जाळतो आहेस?"

"मारुतीने रावणाला सांगितले की, "लंकानाथा, मी तत्त्वतः काय ते सांगतो. ऐक. पुच्छाला निश्चित मरण आले. आता ते मरणभयाने धडपडत, लोकांमध्ये लपते आहे, तर त्याला मी आता काय करू? मरणभय चुकवण्यासाठी ते कोणाचे पाय धरते आहे, कोणाच्या पोटात शिरते आहे, कोणाच्या पदराला झोंबते आहे. कोणा एकाला शरण जाते आहे, कोणाच्या गळ्यात पडते आहे. लंकाधीशा, ते विनंती करते आहे की 'मला मरणमुक्त करा.' रावणा, मीही विनंती करतो की दहनामुळे त्रासून शेपूट फार काकुळतीला आले आहे. तेव्हा त्याला मरणापासून मुक्त कर. उरी-शिरी स्वतः जाळून घेते त्याला शरणागत असे म्हटले जाते. पुच्छाने मरणभयाने गोंधळ माजवला आहे, तेव्हा मरणमुक्त करा असे ते म्हणते आहे." मारुती राक्षसांचा नाश करण्यासाठी हट्टाला पेटला होता. रावण मात्र शेपटीच्या पेटवण्याने निर्माण झालेल्या गोंधळामुळे चळचळा कापत होता. मारुती निःशंक बसला होता. तिकडे पुच्छाने पेटत्या शेपटीने जाळण्याचा धडाका लावून आकांत मांडला होता. मारुती रावणासमोर निवांत बसून राहिला असला तरी शेपटीने सैनिकांना एकेक करत पोळले. राक्षससैन्यात बोंब उठली. कारण शेपटीच्या महामाराने आणि उरी-शिरी अग्नीच्या जाळण्याने ते सर्व त्रस्त झाले होते. अग्निकल्लोळ करत पुच्छाने लंका वेढली; राक्षस तळमळत राहिले; पण त्या शेपटीपुढे कोणाचेच बळ चालेना."

"मारुती स्वतःशी विचार करू लागला की, 'अग्नी माझ्या कमरेशी लागला आहे. तेव्हा त्याला पूर्ण तृप्ती द्यावी.' या विचाराने त्याला खूप उल्हास वाटला. विचारान्ती त्याने मूळ कल्पना लक्षात घेतली

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

की वेदानुवादाप्रमाणे तो स्वतः आणि अग्नी हे सख्खे बंधू, दोघांचाही पिता वायू हे प्रसिद्ध आहे. तेव्हा दोघे आत्मभावाने सुहृद ठरतात. अग्नी वायूचा जेष्ठ पुत्र आणि कनिष्ठ पुत्र हनुमान हे भेटले आहेत. त्यामुळे वायू उल्हसित झाला. ज्येष्ठ बंधू फार महान आहे. त्याला लंकाभुवनाचे ताट भोजनासाठी द्यावे. राजमंदिरात श्रेष्ठ प्रकार असून, शुद्ध भक्ष्य तेथे मिळेल.

"मारुतीकडून सर्वत्र हाहाःकार माजवला गेला. अग्नीला पहिली प्राणाहुती म्हणून रावणाचे छत्र जाळले; माड्या, गोपुरे, घरे, या सर्वांचे भोजन दिले. भात म्हणून चंदनमंदिरे, वरान्न म्हणून गृहसामग्री, पताका या कढी आणि मणिमाळा या तूप म्हणून अग्नीला अर्पण केल्या; नाना प्रकारचे वृक्ष जाळून भाज्या दिल्या, त्या स्वादिष्ट ही होत्या. मीठ म्हणून सारे गुप्तधन, दध्योदन पुरविले तृणभांडाररूपाने; या तृणघरांचे दहन करून त्याची आपोष्णी दिली. असे आपल्या ज्येष्ठ बंधूला म्हणजे अग्नीला भोजनार्थाने लंकाभुवन अर्पिले. हनुमान पूर्वद्वारी बसला आणि त्याने आपल्या शेपटीला लंकानगरीत पाठविले. घरोघरी आगी लावल्या. संपूर्ण नगरीत आकांत झाला. त्या लाघवी मारुतीने मोठे नवल केले. शेपूट चौफेर फिरवून सगळे नगर आक्रमिले. त्यामुळे राक्षस तळमळू लागले. संपूर्ण नगरीतले राक्षस बाहेर जाऊ शकत नव्हते. राक्षसांची अशी दुर्दशा झाली."

पेटलेल्या शेपटीकडून सर्वत्र जाळपोळ

"मारुतीच्या पेटलेल्या शेपटीने प्रथम नेसती वस्त्रे पेटवल्याने नरनारी नग्नावस्थेत धावत होत्या. राक्षससमूह हळहळत, सांदीकोपऱ्यात लपून, कळवळत होते. लेक मातेला विचारत होती 'तू का अशी त्रस्त?' ती माता म्हणे माझे जननेंद्रिय पोळले आहे. जर तेवढ्यात जावई आला तर तो नग्न, सासू नग्नावस्थेत पाही. तो म्हणे, "आज मी धन्य झालो कारण मला पत्नीचे जन्मस्थान दिसले." हे ऐकून सासू लाजेने डोळे मिटून घेई, असे ते सारेच नग्न हळहळत राहात. कोणाचे स्तन आणि आतले हृदय, कोणाचे जननेंद्रिय, कोणी उरी-शिरी, तर कोणाचा पार्श्वभाग असे जाळले गेले. अशा रीतीने राक्षसांचा आकांत चालला होता. त्यावेळी नगरीभोवती पुच्छाचा वेढा पडला होता लंकानाथाचे तोंड काळे करून पेटत्या शेपटीने सर्वत्र हाहाःकार माजविला होता. शेपूट पेटवून मारुतीला मारावा हा मूळ विचार बाजूला राहून उलट अग्नी तीव्र करून त्या शेपटीकडून मारुतीने संपूर्ण लंकानगरी आणि राक्षस यांना जाळले. जे नागरिक नगराबाहेर पडू पाहात ते चौफेर वेढा घालून असलेल्या पेटत्या शेपटीमुळे अडवले जात. त्यांना दाराबाहेर पडणे अशक्य झाले. त्यामुळे लोकात गोंधळ माजून ते भ्रांत अवस्थेत भटकत राहिले. शेपटीने सर्वत्र मोठमोठ्या आगी लावल्या; दुर्गाचे तट, तळातल्या वाटा, जाळून दुर्गाची होळी केली. रचलेले धडधडा खचून पडले आणि त्याखाली राक्षस चिरडले. असे सर्व सैन्य मारून पुढे जिंकण्यासाठी धडपड करत शेपटीने दुर्गाच्या भिंती पाडल्या, खंदक बुजवले. त्यामुळे श्रीरामाला सैन्यासह येण्यासाठी वाट मोकळी झाली. जी लंकानगरी दुर्घट होती तिच्यातले अडथळे, अडसर, दारे, सात रक्षक उंबरठे ह्या सर्वांना आग लावून मारुतीने ख्याती केली."

"लंकानगरीच्या सभोवार जे जागृत गडरक्षक सैन्य होते त्यांच्या सर्व ठिकाणांना मारुतीने बळाने आणि निश्चयाने आगी लावल्या. गडाभोवती असलेल्या तोफांना जाळ लागून त्या एकदम धडाडल्या आणि एकदम त्यातून तोफगोळे सुटले. त्यामुळे नगरात हलकल्लोळ माजला आणि अनेक वीर मारले गेले. हनुमान, अग्नी आणि वायू ह्या तिघांनी एकत्र होऊन लंका जाळली. त्यावेळी पृथ्वी तापली आणि पृथ्वी तोलणाऱ्या नागफणीला चटके बसले. तेव्हा नागाभोवती असलेल्या पाण्यात बुडी घेतली. तेव्हा सहस्रफणी शेषनागाचे चटके थांबले.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sanskrit Research Academy / Muthulakshmi Research Academy

त्या शेषावर श्रीरामाने शयन केले होते. (शेषशायी श्रीविष्णू हाच श्रीराम ही कल्पना.) जसा प्रलयकाळचा अग्नी सत्यलोक जाळतो, तसा लंकादहन प्रसंगीचा अग्नी आकाशात झेपावला. लंका जेव्हा मारुतीने जाळली, तेव्हा त्रिजगताला त्याचा ताप भिडून ते तापले. लंकाजन मोठ्या संकटात सापडले. राक्षसांना मरण आले. नंतर मारुतीने रावणाच्या राणीवशात प्रवेशून आग लावली. त्यावेळी रावण जिथे बसला होता तिथे मारुतीचे शेपूट आले. रावण ओरडा करू लागला. त्यामुळे सर्व राक्षस धास्तावले. इंद्रजित शोकाकुल झाला. "आता लंकानाथ कसा वाचणार? मारुतीशी युद्ध करताना आमच्या सर्व शक्ती खुंटल्या. आता लंकानाथालाही मरण आले, तो कसा वाचेल? रावणाला बाहेर काढा रे, नाहीतर तो शेपटीच्या आवर्तात पडेल." असे इंद्रजिताचे बोलणे ऐकून राक्षसांनी भिंती पाडून वाट काढली. तेव्हा मारुतीने थोर नवल केले; आपले पेटलेले पुच्छ वाटेवर टाकले; त्यामुळे बाहेर पडण्याचा मार्ग बंद झाला. सर्वत्र हाहाःकार उडाला. मग त्या प्रसंगी निधडे, धाडसी असे राक्षसवीर निवडून रागाने ते शस्त्रांसह मारुतीवर चालून गेले. ढाल-तलवार, शूळ, त्रिशूळ, परशू, पट्टिश, गदा, मुद्गल अशी शस्त्रे त्यांनी घेतली होती. आकाश आणि भूतल बाणांनी कोंदले. असा रणकल्लोळ करीत राक्षसांनी रावणासमक्ष निर्वाणीची झुंज सुरू केली. हनुमानही रणमर्द होऊन झुंजीला सिद्ध झाला."

मारुतीवर आक्रमण-त्याचा प्रतिकार

"या मारुतीने अनेकांना धूळ चारली आहे, तर आता यालाच मारू" अशी गर्जना करत आणि शस्त्रांचा मारा करत राक्षसवीर युद्धासाठी सरसावले. मारुतीला मारण्यासाठी कवचधारी, तलवारी घेतलेले वीर पुढे येऊन, सरकून, थरकून चहूबाजूंनी घाव घालत होते. मारुतीच्या शेपटीचा आकांत कौशल्याने चुकवत, राक्षसवीर समोर न येता रण करत होते. तेव्हा मारुतीने आपल्याशी विचार केला की, "हे राक्षसवीर फारच खवळले आहेत, तर यांचे घाव अंगावर घेऊन यांचा पुरुषार्थ तर पाहू. यांच्या शस्त्रमाराने माझी लव सुद्धा तुटणार नाही.' त्याच्यावर शस्त्रांचा मारा होत असताना तो त्या घावांखाली राहिला. हनुमान घावांखाली आल्यावर राक्षसवीरांनी आरोळी दिली की 'आम्ही बलवान ठरलो, आम्ही वानराला जमिनीवर पाडला.' मग समोरून तोमर, मागून वज्र यांचा त्यांनी मारा केला. एकाच वेळी नाना शस्त्रे हाणली. त्या वीरांनी बाणांचाही वर्षाव केला. तेव्हा हनुमान त्या खाली पडून राहिला. त्यामुळे 'महाबळी वानर मारला' या कल्पनेने सर्वांनी टाळी पिटली. 'याने उड्डाण केले नाही, हालचाल केली नाही, तेव्हा निश्चित याचा प्राण गेला आहे. आम्ही मोठे पराक्रमी आहोत' असे म्हणत राक्षसांनी विजयाची वाद्ये वाजवली. 'या वानराने फार कीर्ती केली, पण आम्ही पराक्रमी वीर आहोत. आम्ही मारुतीला युद्धात आणला आणि रणमाराने त्याला संपवला.' अशी मोठी प्रौढी राक्षसवीर मिरवू लागले. त्यांनी आनंदाने साखर वाटली. 'आता विझवा रे लंकापुर, वानर युद्धात आम्ही मारला. आता रणक्षेत्र शोधून सत्वर ज्या कोणाच्या घावांनी वानर मेला ते पाहा.' असे ते म्हणाले. तेवढ्यात हनुमानाने भुभुःकार करून उसळी मारली."

"मारुतीची गर्जना ऐकून रावण घाबरला. राक्षसांचे प्राण गेले. असे अचूक मरण ओढवले. लंका दहनाच्या आवर्तात सापडली. कुठे पळायलाही वाट राहिली नाही. नंतर मारुती खवळल्याने राक्षसांचे मरण ओढवले. हनुमंत सभामंडपातले अष्टधारेचे मोठे स्तंभ उपटून आणि राक्षसांना कवटाळून एकदम घाव घालून त्यांचा चुराडा करत होता. शेपटीत राक्षसांना पकडून, सर्वांना एकत्र करून, मारुती त्यांना खांबाचे जोरकस घाव घालून मारत होता. सर्वांचे हात, पाय, मनगट,

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

नाड्या, अस्थी, शिर, कंठ आणि पोट-पाठ अशा प्रकारे पीठ करून सर्वांना मिसळले. ऊर्ध्वगती, अधोगती, पुन्हा पुढे मरण प्राप्ती होणार नाही अशा रीतीने राक्षसांना मारून मारुतीने त्यांना सत्त्व, रज, तम या गुणांच्या पलीकडे नेले. त्यांची सर्व इंद्रिये त्रिगुणवृत्तीची होती, इंद्रिय-देवता नानारूप ज्योती, त्यांना जिवानिशी मारून, मारुतीने त्यांना गुणातीत नेले. श्रीरामभक्ताच्या स्वतःच्या हाताने मारकयुक्तीने मरण पावतात ते गुणातीत होतात अशी श्रीरामभक्तांची ख्याती आहे. हरिभक्तापुढे ज्यांना मरण येते त्यांचे भाग्य मोठे असते, त्रिगुणांचे साकडे जाणून ते निश्चित परब्रह्म पावतात. अशा रीतीने ते युद्ध झाले. मारुतीने सैन्याचा नाश केला, हे पाहून रावण पुढे आला, पण तोही मरणाच्या कल्पनेने धास्तावला."

"रावण मनात धाक घेऊन विचार करू लागला की, 'मारुतीने सैन्य मारले तेव्हा आता तो माझ्याकडे आला, तर त्याचे निवारण कोण करील? त्याने अखयाकुमाराचा वध केला, राक्षस युद्धात मारले, इंद्रजिताला युद्धाचा धाक लावला, मग मारुतीला कोण निवारील?' त्याने मारुतीलाच मनातले प्रश्न विचारले, तेव्हा मारुती म्हणाला, "रावणा, तुझी दहा शिरे मी माझ्या हातांनीच तोडली असती, पण श्रीरघुनाथानेच मला प्रतिबंध केला कारण तो स्वहस्ते तुला मारणार आहे." श्रीरामाची मर्यादा-रेषा मारुती उल्लंघणे शक्य नव्हते, त्यामुळे रावण वाचला आणि त्याचे प्राप्त मरण चुकले. अशा प्रकारे रावणाला छळून, लंकाभुवन जाळून, हनुमान श्रीरामाचे चरणवंदन करण्यासाठी परतला. सीतेला लोटांगण घालून, तिला अनन्य भावाने शरण जाऊन हनुमान श्रीरामचरणांना वंदन करण्यासाठी परतला. त्यावेळी सीतेचा मस्तकमणी खूण म्हणून घेऊन, तसेच तोंडी खुणा विचारून तो परत निघाला. मुखाने श्रीरामनाम घेत, हृदयात श्रीराममूर्ती ठसवून, श्रीरामाच्या कीर्तीसाठी देह अर्पण करून, हनुमंत अनन्य भक्तीने परत निघाला. श्रीरामाला सत्सर्वार्थी, सर्वांभूती पाहात, श्रीरामाच्या कार्यासाठी देह देऊन हनुमंताने त्याची अनन्यभक्ती प्रकट केली. हनुमंत हा श्रीराम गतीची गती, नयनस्वार्थी, सर्वांभूती, आहे असे मानून परमार्थी भक्त झाला होता. त्याला इंद्रियस्थिती, नानावृत्ती, स्वप्नात आणि सुषुप्तीत श्रीरामरूप दिसत होते असा तो परमार्थी भक्त होता." असे वर्णन करून ब्रह्मलिखित पूर्ण झाले. पुढे आता श्रीरामाचे आगमन, सेतूबंधन हे विषय येत आहेत.

अध्याय चौतिसावा

ब्रह्मदेव म्हणाला, "ब्रह्मलिखितात मारुतीची ही कीर्ती थोडक्यात सांगितली; परंतु त्यापेक्षा अगाध अशी हनुमंताची कीर्ती आहे. ती किती लिहिणार. श्रीरामा तुझे हे पाला खाणारे वानर लंकेला आले, त्याची दुर्धर कीर्ती मला सविस्तर लिहिता आली नाही. अठरा लक्ष दीपिका विझवून, रावणाची सभा नागवी करून, त्याला पीडले. रावणाच्या शयनमंदिरात प्रवेश करून, मंदोदरीचे स्वप्न ऐकून, त्याने सीतेचा शोध लावला. अशोकवनात जाऊन त्याने श्रीराममुद्रा देऊन, सीतेला सुखी केले. नंतर राक्षसराजाला छळावे म्हणून वनातली झाडे उध्वस्त केली. वनरक्षक, किंकर, पाच मुख्य सेनानी, प्रधानपुत्र, जंबुमाळी या सर्वांचे राक्षसांसह निर्दाळण केले. मुख्य धुरीण अखयाकुमाराला मारले. इंद्रजिताला भयग्रस्त करून, बलाढ्य राक्षस वीरांना मारले. कोट्यवधी राक्षससैन्य युद्धात पाडले. त्यावेळी रक्ताच्या प्रवाहाने पृथ्वी भिजवून, भुतांना मेदमांस पारणे फेडायला दिले. त्यांना रक्ताचे स्नान करता यावे म्हणून रक्ताची नदी वाहविली, मेदमांस हे तृप्ती होईपर्यंत भोजनासाठी दिले. तेव्हा भूतप्रेतांनी, पिशाचांनी रणनर्तन केले. रावणाची दाढी जाळली आणि लंकेची होळी केली. नंतरच हा महापराक्रमी

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

हनुमान तुझ्याकडे आला आहे. माझ्या शक्तीप्रमाणे मला झेपली तेवढी त्याची कीर्ती मी लिहिली. खरे तर मलाही त्याची ख्याती कळली नाही, तर मी किती आणि कशी ती लिहू. जसा श्रीरामचंद्र अवतार तसाच खरोखर हनुमंत, वीर, धीर, महाशूर, गुणगंभीर आहे. श्रीराम देव तर हनुमंत भक्त, दोहोंच्या स्वरूपाचा इत्यर्थ श्रुतिशास्त्रे जाणत नाहीत तर मी ते सर्व इत्थंभूत कसा जाणणार. श्रीराम जीव तर हनुमंत प्राण, श्रीराम शिव तर हनुमान ज्ञान, श्रीराम ब्रह्म आणि हनुमान पूर्ण, दोघेही परिपूर्ण ब्रह्म.''

श्रीरामाकडून मारुतीची स्तुती

ब्रह्मदेवाने ब्रह्मलिखितात जे लिहिले होते ते समग्र ऐकल्यावर, हनुमंताच्या पराक्रमाने संतुष्ट झालेल्या श्रीरामाने मारुतीला आनंदाने आलिंगन दिले. त्यांची हृदये एकमेकांना भिडताच दोन्ही हृदये श्रीराममय झाली. श्रीराम एकत्वात अनेक, अनेकत्वात एक झाला. हनुमान पूर्णपणे श्रीरामाच्या अंतरात, सबाह्य श्रीरघुनाथ झाला. जसे मीठ समुद्रात एकरूप होते तसा हनुमंत श्रीरामाशी एकरूप झाला. देव-भक्तांची भेट झाली, निर्विकल्पाने मिठी पडली. परमानंदाने सृष्टी कोंदली. हे पाहून सुग्रीवाला पराकोटीचा आनंद झाला. 'विजयी आमचा हनुमान वीर' असे म्हणत वानरांनी भुभुःकार केला. सर्वांनी मारुतीचा जयजयकार केला. त्याचवेळी श्रीरामाचे स्मरण केले. हनुमंताची अगाध कीर्ती ऐकून श्रीरामाने हनुमानावरच्या प्रेमाने स्वतः त्याची स्तुती केली. हनुमंताची कीर्ती वर्णन करताना, त्याची स्तुती करताना श्रीरघुपतीला तृप्ती होत नव्हती. श्रीराम म्हणाला, ''सागर उल्लंघून, लंकेत जाऊन हनुमानाने अतर्क्य अशी श्रुतिशास्त्रप्रयुक्ती वापरून सर्वत्र ख्याती केली. एकाच उड्डाणात समुद्र पार करणे हे गरुड, वायू आणि वायूनंदन मारुती यांनाच शक्य आहे; इतरांना ते करणे शक्य नाही. मारुती शिवाय अन्य कोण आहे? गरुडाचे गमन पंखांच्या गतीने, वायूला सर्वत्र गमन करण्याची शक्ती आहे; पण एकाच उड्डाणात सागर ओलांडून मारुतीने ख्याती केली आहे. सुरसा, सिंहिका, मैनाक पर्वत यांनी जेव्हा हनुमंताचा मार्ग सागरात रोखला तेव्हा एकाला सोडून, एकाला मारून, एकाला स्पर्श करून त्याचा गर्व हरण केला. याच्या उड्डाणाची थोरवी अशी की हा लंका मागे टाकून एकदम पडलंकेमध्ये गेला आणि तेथे त्याने क्रौंचा परिवारासहित मारली.''

श्रीराम पुढे म्हणाला, ''लंकादुर्ग हा समुद्रामध्ये आहे; रावण सहपरिवार त्याचे रक्षण करतो; अत्यंत दुर्गम गिरिशिखरावर दुर्धर असे ते गर्वाचे स्थान आहे. त्या दुर्गाची महती अशी की तेहतीस कोटी देव तेथे बंदीत आहेत, नवग्रहांच्या पायात बेडी पडली आहे, इतर सामान्यांना कोण विचारतो. देव, दैत्य, गुह्यक दानव, यक्ष, रक्ष सिद्ध, गंधर्व हे आणि पन्नग, ऋषीश्वर, मानव हे रावणाला भिऊन असतात. अशा दुर्धर लंकेत, ना कोणाची सोबत ना कोणाचे साहाय्य, असा एकटा प्रवेश करून मारुती गेला आणि त्याने विलक्षण अशी कीर्ती केली. इंद्रजित दाती तृण धरून युद्धामधे आला असा पराक्रम मारुतीने केला. रावणाचे तोंड काळे करून याने लंकेचे दहन केले. सीतेची सावकाश भेट घेऊन तिच्या गुपितांची माहिती घेऊन, मणी घेऊन हा जगजेठी वीर हनुमान येथे परतला आहे.'' हनुमानाने सीतेच्या शोधासाठी जाऊन जे रणकंदन केले, यामुळे वानरराज सुग्रीव सुखी झाला. तसाच राम सीतेच्या गुपितार्थाचे श्रवण करून सुखी झाला. सीतेच्या पश्चात्तापामुळे लक्ष्मण सुखावला. वानरांना मारुतीचे बोलणे ऐकून अतीव सुख झाले. वानरजातीला कमीपणा न येता मारुतीने रणात केलेल्या पुरुषार्थाने वानरराज सुग्रीवाला धन्यता वाटली.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

"हनुमानाने राक्षसांना मारून, सीतेचा शोध करून, आम्हा सर्व वानरजातीयांचा पुरुषार्थ आणि अभिमान यांचे संरक्षण केले आहे." असे सुग्रीव म्हणाला.

हनुमंताकडून लंकादुर्गाविषयी कथन

श्रीरामाने हनुमंताची स्तुती केल्यावर हनुमंताने अत्यंत विनयाने जमिनीवर लोटांगण घालून स्वतः श्रीरामाला म्हटले, "श्रीरामा, तुझी नामशक्ती थोर म्हणून मी लंकेत पराक्रम करू शकलो. अशा माझ्यासारख्या सेवकाची तू स्तुती का करावीस." हे हनुमंताचे बोलणे ऐकून श्रीरघुनंदन अधिकच संतुष्ट झाला आणि त्याने मारुतीला म्हटले, "आता लंकादुर्गाविषयी, तो कसा आहे, तेथे सैन्य किती आहे, दुर्गद्वारात तोफा किती आणि कशा आहेत, गुप्त वाटा कशा आहेत, दुर्गात प्रवेश करणे कोणत्या युक्तीने साधेल, हे सर्व साभिप्राय मला सांग. कारण, तू समूळ, संपूर्ण दुर्ग शोधला आहेस, तसेच घराघरातून शोध घेतला आहेस. रावणाजवळ किती सैन्य आहे, कोण कोण पराक्रमी योद्धे किती आहेत, आमच्याशी युद्ध करायला पुढे कोण कोण येतील हे यथास्थित सांग. स्वतः तू युद्धप्रवीण आहेस तेव्हा रणलक्षणही मला सांग." श्रीराम हा सज्ञान राजपुत्र होता त्यामुळे हनुमंताला उद्देशून लंकेतील दुर्गाविषयी त्याने प्रश्न केले. तेव्हा मारुतीने त्याविषयी कथन करताना म्हटले, "लंकादुर्गाला समुद्राचा खंदक लाभला आहे, त्यामुळे तो अत्यंत अवघड झाला आहे. आतली सुरासुरांची घडामोड कळत नाही. असा तो लंकादुर्ग समुद्रात अत्यंत गूढ स्थितीत आहे. मदोन्मत्त हत्तींच्या ओळी लंकानगरीत मद स्रवत असतात. त्या मदाचा वास आकाशातही मावत नाही. तेथे मदमत्त भुंग्यांचा झंकार चालू असतो. अश्वरथांची तेथे गर्दी असते. त्यामुळे उडणारी धूळ आकाशात मावत नाही. वीर जगजेठी राक्षसांचे कोट्यानुकोटी सैन्य तेथे आहे. तो लंकादुर्ग दुर्धर आहे. खंदकात अपरंपार पाणी असून, त्यात मासे, सुसरी, मगरी असे असंख्य जळचर प्राणी असतात. तोफांवर तोफा चढवून, परसेनेचा भार पाहून, दुरूनच तोफातून महागोळ्यांचा वर्षाव करून, शत्रूसैन्याचा चक्काचूर केला जातो. चोरवाटांची व्यवस्था अशी आहे की कपटी इंद्रजित गुप्त रीतीने घाला घालून रातोरात शत्रूच्या प्रमुख वीरांना मारून टाकतो. त्या दुर्गात शतानुशत उंबरठे असून प्रत्यक्ष वहिवाट चार दारांनी होते. त्या ठिकाणी अर्गळा, साखळ्या यांचा घडघडाट चालू असतो. तेथे लोखंडी साखळ्यांनी बद्ध केलेली, कठिण कोनाड्यांची रचना केलेली आहे. श्रीरामाशी युद्ध करण्याच्या कल्पनेने आनंदित झालेल्या रावणाने सशस्त्र सैन्य एकत्र केले आहे. ते पुढे राहून युद्ध करील."

लंका-निर्मिती, संरक्षण-व्यवस्था, मारुती सांगतो

"लंकाधीश रावणाला राहण्यासाठी विधात्याने समुद्राच्या मध्यभागी असलेल्या पर्वतावर लंका बसविली. दुर्गाचे काम विश्वकर्म्याने केले. विश्वकर्म्याने आपल्या कौशल्याने लंकादुर्ग हा प्रवेशाला अत्यंत अवघड असा बनविला आहे. त्याविषयी मी आधी सांगितलेच आहे. दुर्गाच्या चार दारांवर रावणाने मोठे पराक्रमी असे योद्धे रक्षक म्हणून ठेवले आहेत. पूर्वेकडच्या दारावर शूलधारी आणि खड्गधारी असे दहा सहस्त्र निधडे राक्षसवीर नेमले असून, ते दुर्धर, निःशंक असे आहेत. पश्चिमेकडच्या दारावर महाशूर, शस्त्रास्त्रप्रवीण असे लक्षावधी राक्षस रक्षणार्थ ठेवले आहेत. दक्षिणेकडील दार हे रथ, हत्ती, घोडे यांवर स्वार झालेल्या लाखो राक्षसांकडून रक्षण केले जात आहे. त्यांची अहोरात्र गर्जना चालू असते. दुर्गाचे प्रमुख दार हे स्वतः दशानन राखत असल्याने त्याचा मोठा धाक आहे. याच दाराने रघुकुलटिलक श्रीराम अवश्य येईल. शेकडो, सहस्र अशा ठिकठिकाणी लावलेल्या चौक्या राक्षसवीरांनी

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

गजबजल्या असून, रावण स्वतः आपल्या परिवारासह या उत्तरेकडील दाराचे संरक्षण करतो आहे. समुद्राच्या बेटात त्रिकूट पर्वत असून त्यावर लंका बसली आहे. सभोवती राक्षसांची घरे आहेत. तेव्हा परक्यांच्या (म्हणजे शत्रूच्या) दृष्टीला ती कशी पडेल? लंकादुर्ग हा गुप्त आणि अवघड वाटतो; पण मी निश्चयाने त्याची पडझड केली आहे.''

मारुती पुढे म्हणाला, ''श्रीरघुपती, मी संपूर्ण लंकादुर्ग समक्ष पहिला आहे हे निश्चित समज. तुला वाटेल की मी रात्रीच्या वेळी चोरून प्रवेश करून, राक्षसवीरांशी युद्ध केले आणि ख्याती झाली. पण प्रत्यक्षात रावणाने माझ्या शेपटीला आग लावताच मी उभयभागी लंका जाळली आणि राक्षसवीर त्या प्रसंगी झालेल्या युद्धात मारले. त्यावेळी उंच, पांढरी गोपुरे, सात खणांच्या ओळीतली घरे आणि लंकेतले घरनूघर, तसेच मुख्यतः राजमंदिरे जाळली. अडसर, साखळ्या, दुर्गाचे ओटे, लोखंडाची बंधने असलेल्या जागा, दुर्गाचे उंबरे या हनुमान नावाच्या श्रीरामाच्या वानराने जाळले आहेत. दुर्गाभोवती असलेले, मासे-मगरींच्या समुदायांनी भरलेले खंदक, दुर्गाचेच तट पाडून, मी बुजवले आहेत. नाना प्रकारे दुर्ग जाळताना, मुख्य दुर्गवस्तीचा जो पर्वत तोही मी शेपटीच्या साहाय्याने जाळला आणि त्यावेळी राक्षसांचा संहार केला. रावणाला दीनवाणा करून लंकाभुवन मी जाळले. त्यावेळी बिभीषण हा पूर्ण परमार्थी भक्त असल्यामुळे त्याचे घर तेवढे वाचवले. जो कोणी श्रीरामाचा भक्त तो आमचा आप्त आम्ही मानतो. रावणाच्या घरातल्या त्याच्या सर्व राण्याही मी वाचवल्या. त्यावेळी श्रीरामाला ससैन्य सहज प्रवेश करता यावा यासाठी दुर्गासह लंकेची होळी केली. समुद्र ओलांडून वानर तरून आले तर ते तत्काळ लंका घेतील. समुद्राच्या पलीकडे लंकादुर्गात रावण निश्चित राहतो आहे. समुद्रात महामीन (मोठे मासे) असून ते नावा गिळत असल्यामुळे तेथे नावांचा काही उपयोग नाही. छोटे-मोठे मासे, मगरी आणि नावा गिळणारे महानक्र त्या समुद्रात असल्यामुळे तो दुर्धर आहे. तर तुम्ही पैलपार कसे याल? यासाठी सर्वप्रथम समुद्र तरून जाण्यासाठीचा उपाय काय, याची चिंता करा.''

हनुमंताने समुद्र दुस्तर आहे असे सांगताच श्रीरामाला स्फुरण चढले. तो म्हणाला, ''मी अग्निबाण सोडून समुद्राचे शोषण करीन; जळजंतूंचे प्राण जातील, तरी मी दुसरे काही करणार नाही. तीव्र तप, सत्यनिष्ठा, यांमुळे समुद्रात पायवाट करून वानरवीर सुखाने आणि संतोषाने पैलतटावर जातील. वास्तविक समुद्र उल्लंघन ते किती आहे आणि त्यासाठी तपाची संपत्ती तरी कशाला खर्चायची. समुद्रावर सेतू बांधून मी योद्धे पलीकडे नेईन.''

प्रयाणाचा मुहूर्त, सैन्यरचनेचा विचार

श्रीरामाने सुग्रीवाला उद्देशून म्हटले, ''रावणाला युद्धात मारण्यासाठी आपण आजच प्रयाण करू विजयादशमीचा सुमुहूर्त आहे. याच मुहूर्तावर आमचा पणजा चक्रवर्ती रघुराजा विजय पावला होता. शमीच्या वृक्षाच्या खाली त्याच रात्री कुबेराने अपार संपत्तीचा वर्षाव केला आणि जमिनीवर सर्वत्र धन विखुरले गेले. तेव्हापासून आजपर्यंत विपुल धन आणण्यासाठी विजयादशमीलाच सीमोल्लंघन केले जाते. लोक याच दिवशी शमीपूजन करतात. हा पूर्वजांचा सुमुहूर्त आता मला प्राप्त आहे. तेव्हा लंकेला त्वरित जाण्यासाठी सर्व सेना सिद्ध करा. रणात लंकाधीशाला शासन करण्यासाठी माझा शुभ लोचन-डोळा-लवतो आहे. सीतेला आलिंगन देण्यासाठी माझे बाहू स्वानंदाने स्फुरण पावत आहेत. सूर्य माध्यान्ही येताच, युद्धात विजय देणारा अभिजित योग असल्याने निश्चित प्रयाण करावे.'' असे श्रीरामाने म्हणताच सुग्रीवालाही स्फुरण चढले. त्याने रणवाद्यांचा गजर करून लंकेला प्रयाण करण्याची सूचक गर्जना केली.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Trust Foundation, Lucknow

तत्काळ अंगदालाही हर्ष झाला. वानरसेनेत उत्साह आला. महाबळी रावणाला मारून जनककन्या आणण्याविषयी सर्वजण उत्सुक झाले. सुग्रीवाच्या राजाज्ञेची जी नीती तशी वानरांची जातानाची स्थिती ठरली. ज्याला जसा मार्ग नेमून दिला असेल, तसे त्याने त्या रीतीने जायचे असे ठरविले.

सुग्रीवाची वानरसेना आज्ञाधारक होती. नीळ महावीर सेनापती होता. त्याने मार्गक्रमण करताना कसे पुढे जावे त्याची रीत सांगितली 'त्याने जलद चालणारे वानर पुढे पाठवून फळ, मूळ आणि जल उपलब्ध होईल अशा स्थळाची माहिती मिळवून, तत्काळ स्वतःते स्थळ पाहून यावे आणि मग सुखपूर्ण रीतीने सेना पुढे न्यावी. जिकडे फळ, मूळ, जळ यांची सुविधा नसेल त्या स्थळी सेना नेली तर सर्व वानर कष्टी होतील. तेव्हा सेना विकल होऊ नये याची दक्षता घ्यावी. यासाठी मार्गाची स्थिती नीट शोधून, वानरांना वारंवार विश्रांती देत, सेना या रीतीने न्यावी. सेनापतीने सज्ञानपणे हे करावे.' श्रीरामाच्या सूचना देणाऱ्या भाषणाने सर्व वानर आनंदित झाले. ते म्हणाले, "श्रीरघुनाथ हा कृपाळू आहे. आम्ही या श्रीरामामुळे सनाथ झालो आहोत. जरी आम्ही उद्धट वानरे आहोत तरी आम्हाला रामदूत म्हणतात." यामुळे आनंदित झालेल्या वानरांनी हर्षाने रामनामाचा गजर केला आणि 'श्रीरामाने आम्हाला सनाथ केले' असे ते म्हणू लागले. मार्गक्रमणाचे लक्षण श्रीरामाने सांगितल्यावर, सेनापती नीळाने श्रीरामाच्या पुढे लोटांगण घातले आणि चरण वंदन केले. नंतर नीळ आणि त्याच्या परिवारातले शतसहस्र वानर सर्वांच्या पुढे जयजयकार करत चालू लागले. गज, गवाक्ष, शरभ हे वानरवीर नीळाच्या मागून आपल्या परिवारासह होते; असा तिघांचा तो परिवारही जयजयकाराच्या गर्जना करत होता. गाईमागे गोऱ्हा जातो, तसा तो सेनाभार नीळामागे चालला होता. ऋषभ हा वानरबोधी वीर दक्षिण-उजवी-भागी चालत होता. गंधहस्ती आणि गंधमादन यांनी वाम (डावी) बाजूने चालावे असे सांगण्यात आले होते. नंतर युवराज राजकुमार अंगदाने आपल्या परिवारातील कोट्यवधी वानरांचा संभार घेऊन जाण्यापूर्वी श्रीरामाला नमस्कार घातला. नंतर निशाणे, भेरी, तडक, काहाळा, चिनकाहाळा, रणमोहरी इत्यादी वाद्यांचा एकदमच गजर झाला. मग सुग्रीवराजा सहपरिवार निघाला; त्यावेळी वानरांनी श्रीरामाबरोबर त्याचाही जयजयकार केला.

जो वानरांचा सेनासंभार मार्गस्थ झाला, त्यामध्ये शेकडो काळ्या तोंडाचे वानर, शतसहस्त्र गोळांगुळ, कोटयवधी पांढरे, असंख्य सोनेरी रंगाचे असे वानर होते. काही डाळिंबीच्या फुलाप्रमाणे, शिवाय अपार शेंदुरवर्णाचे, तसेच सुनीळ निळे असे आणि असंख्य अंजनाकार वानर होते. कोणी उदयकाळच्या लाल बालसूर्यासारखे, तर कोणी चंद्रबिंबासारखे स्वच्छ, कोणी इंद्रधनुष्याप्रमाणे वाकलेले, तर कोणी चांगले स्फटिकासारखे असे वानर होते. एकूण कोटी-अयुत-प्रयुत-अर्बुद आणि शेकडो अर्बुद होतील असे असंख्य वानरवीर रामनामाची गर्जना करत निघाले होते. असा त्या सुग्रीवराजाचा सेनाभार होता. त्याच्या डोक्यावर चंद्रबिंबासारखे छत्र, चवऱ्यांची जोडी, अशा थाटात तो जात असताना रणवाद्यांचा गजर चालू होता. फलित, पुष्पित वृक्ष आणि किंशुक फुले झेलत वानर चालले होते. सैन्यात पताका होत्या आणि वीर रामनामाच्या गर्जना करत होते. वानरवीरांना अत्यंत हर्ष झाला होता. ते सर्व रावणाला मारून सीतेला अवश्य आणायची या भावनेने आनंदात श्रीरामाचे नाव घेत निघाले होते. कोणी रामनामस्मरणात मग्न होते, कोणी आनंदाने नाचत होते. त्यांना श्रीराम-सीता यांच्या अभिषेकाचे निमित्त उल्हसित करत होते. 'आम्ही श्रीरामाच्या अंकित असलेले योद्धे आहोत; आमच्या पुढे रावण बापडा काय आणि किती टिकणार! 'आम्ही सीतेला आणून श्रीरामाला

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust, Lucknow

अभिषेक करू;' अशी त्यांची थोर मनोभावना होती. सुग्रीवाचा एवढा सेनासंभार पाहून श्रीराम संतुष्ट झाला होता. मग त्वरेने निघावे यासाठी राम-लक्ष्मण यांनी एक वेगळाच प्रकार केला.

श्रीराम-लक्ष्मण सैन्यासह दक्षिणेकडे

इंद्र जसा ऐरावतावर चढतो, तसा श्रीराम हनुमंताच्या खांद्यावर चढला. अंगदाने उल्हासाने लक्ष्मणाला उचलले. जसा भूतनाथ भुतावर आरूढ व्हावा, तसा अंगदाच्या खांद्यावर उर्मिलाकांत लक्ष्मण आरूढ झालेला पाहून श्रीरघुनाथ आनंदित झाला. सुग्रीवही त्यामुळे उल्हसित झाला. श्रीराम-लक्ष्मण हे वरिष्ठ वीर, त्यांच्या निकट सुग्रीवराजा असे ते वीर योद्धे घडघडाट करत दक्षिणदिशेला निघाले. सुषेण, जांबुवंत, जांबुवंताचा ज्येष्ठ बंधू धूम्राक्ष हेही निघाले. सुषेण हा महापराक्रमी वीर, त्याच्या निकट जांबुवंत असे ते श्रीरामावर दृष्टी ठेवून सुखसंतोषाने चालले. श्रीरामाच्या पाठीमागे जांबुवंत आणि सुषेण सावधानतेने जात होते. त्यांना ती जागा नेमून दिलेली होती. श्रेष्ठ श्रेष्ठ वानरवीरांना त्यांनी वाटचालीत कोणत्या बाजूस कोणी चालायचे हे वाटून दिलेले होते. शतबळी नावाचा वानरश्रेष्ठ आपल्या दहा कोटी सेनापरिवारासह श्रीरामाचा दक्षिणभाग रक्षण करत उल्हासाने चालला होता. केशरी हा अंजनीचा पूर्वीचा पती आणि मारुतीचा सावत्र पिता, हा शंभर कोटी सेनासंभाराचा प्रमुख आणि पराक्रमी वीर होता. त्याच्यासह प्रबळ वानरवीर गज, गवाक्ष आणि विक्राळ वानरवीर गवय हे होते. सर्व सैन्याचे ते संरक्षण करत होते. महावीर उल्कामुख, दुर्धर प्रभव, थोर इंद्रजानू हे सर्व श्रीरामाच्या कार्यासाठी आले होते. श्रीरामाच्या सैन्याचे सर्वांगाने आणि अष्ट दिशाभागांचे रक्षण दधिमुख, प्रजंघ, जंघ, शरभ, क्षुरभ असे वानर करत होते. गाढी आणि दुर्धर अशी रामाची आज्ञा पाळून, नेमलेल्या भिन्न भागांमध्ये कोट्यवधी वानर समुद्राचा किनारा हे लक्ष्य समोर ठेवून चालले होते.

सीतेच्या प्राप्तीसाठी वानरसैन्य अत्यद्‌भूत उल्हासाने चालले होते. त्यावेळी ते वानर एकमेकांपुढे उड्या मारत, उत्साहाने मग्न झालेले होते. एकमेकांच्या अंगावर चढत, उड्या मारत; एकमेकांना पाडत, ओढत; एकमेकांची थट्टा, टीका करत; एकमेकांशी कुस्ती करत, चुकवत; वेडावून दाखवत आणि गुदगुल्या करत असे चालले असतानाच, आकाशातही न मावेल अशा रामनामाच्या आरोळ्यांची गर्जना करत होते; सुग्रीवाकडे पाहून माकडचेष्टा करत होते; मोठ्या लाडाने एकमेकांना बिलगत होते; सर्व वानर रामापुढे नाचत होते; जसा काही त्यांना मद चढला होता. जेव्हा स्वेच्छेने काही वानर इकडे तिकडे जात तेव्हा राक्षसांना फसवत असत. त्यातले काही वानरयोद्धे पुढचा मार्ग शोधायला पाठविलेले असत. नीळ हा अतिशय पराक्रमी वीर होता. राक्षसांना मारून तो पुढची वाट शोधत असे. पनस हा वीर अधिक वरिष्ट होता. त्याला अतर्क्य वृत्तीने राक्षसांची गती–अगती समज होती. कुमुद हा वानरवीर महाबुद्धिमान होता. तो राक्षसजातीचा घात करणारा होता. त्यामुळे रामाने हे तीन वीर पुढचा मार्ग शोधण्यासाठी धाडले होते. ते तिघे वानरसैन्यासमवेत होते. वानरसेना ही समुद्राचे पाणी, तर नीळ हा किनारा गाठणारी लाट होता. तो वीररूपी अडसर सर्व दळभार आवरत होता. नीळाने निग्रहपूर्वक दिलेली आज्ञा ऋक्ष, वानर आणि योद्धे उलंघू शकत नसत, असा तो प्रतापमूर्ती सेनानी होता.

श्रीरामाने निश्चयाने सांगितले की, मधे कुठे वस्ती न करता आजच्या आज लंकेकडे त्वरित जायचे. श्रीरामाचे सांगणे ऐकल्यावर सर्व वानरभार हातांनी आणि नखांनी जमीन पकडून पुढे चालू लागले. श्रीरामनामाचे गुणगुणणे करत अपार

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

अस्वले निघाली. वानरसमूह रामनाम गर्जत चालत राहिले. देशोदेशीच्या नद-नद्या, गिरिकंदरे, विवरे हे सोडून पृथ्वी चौफेर कवळून रामकार्यासाठी वानर आले. वानरांनी चार बोटे सुद्‌धा जमीन शिल्लक ठेवली नाही. ते सर्वजण सीतेला सोडविण्यासाठी शीघ्रगतीने निघाले होते. वानरसंभार चालत जात असताना जमिनीवरची उडालेली धूळ इतकी झाली की आकाश कोंदले. मध्यान्ही सूर्य लोपला आणि काळाच्या मनाचा थरकाप उडाला. सूर्य माध्यान्ही लोपला. त्याबरोबर गायी (संध्याकाळ झाली असे समजून) गोठ्यात परतल्या; पक्षी आकाशात कलकलाट करू लागले; देव विमानातच कंपायमान झाले. वानरवीर वाटेत विश्रांती न घेता अहोरात्र चालत राहिले; सीतेला मुक्त करण्यासाठी शीघ्र गतीने निघाले. श्रीरामकार्याचे त्यांना एवढे सुख झाले की त्यांना तहान-भूक, निद्रा आठवलीच नाही. वानरांनी क्षणभरात विंध्याद्री, मलयाद्री, अनेक वने उल्लंघिली. मोठमोठ्या नद-नद्यांना क्षणात पार करून ते पुढे गेले; तेव्हा त्यांना पुढे घोर गर्जना करणारा समुद्र दिसला. सागरगर्जना ऐकल्यावर वानरांनी रामनामाचा गजर केला. त्यांच्या भुभुःकाराने आकाश कोंदले. वानरांच्या रामनामाने आकाश, सागर, चराचर कोंदले. समुद्राचा ध्वनी गिळून उदकामध्ये नाम भरले. त्या नामनादाने पृथ्वीसह त्रिभुवने भरून गेली.

पुढे महासागर, मागे वानरसेनासमुद्र आणि मधे धैर्याचा मर्यादामेरू असा श्रीरामचंद्र शोभत होता. गंगा आणि यमुना यांच्या संगमात प्रयागवट मध्यस्थ शोभतो, त्याप्रमाणे सैन्यजलसागरामध्ये श्रीरघुनाथ प्रतापाने शोभत होता. समुद्रतीरावर सर्व सैन्य पोचले आणि नंतर सागर उल्लंघण्यासाठी वानरवीर उत्सुक झाले. सागरात जसे महामीन. तसे सैन्यात वानर शोभत होते. समुद्रात मासे उसळत होते तसे वानर गगनात उड्या मारत होते. अत्यंत कठिण पाठ असलेले कासव पाहून वानर पाठीवर शिला बांधून नाचू लागले. तीक्ष्ण दात असलेली मगर पाहून वानर दात विचकून तिच्या पुढे धावत जात होते. वानरांचे शेपूट हाच फडा. समुद्रात माश्यांची चळवळ तशी वानरांची सीतेला आणण्याची कळकळ चालली. सारेच उतावीळ झाले होते. समुद्रात दुर्धर लाटा उसळून येतात, तसा वानरांचा प्रतापताठा होता की त्वरित परतीरावर जाऊन दशकंठ रावण मारावा. ज्याप्रमाणे सागराला मर्यादारेषा ओलांडता येत नाही, त्याप्रमाणे वानरांना श्रीरामाची आज्ञा उल्लंघिता येत नव्हती. सर्वजण लंकापुरीला जाण्यासाठी समुद्रतीरावर आले.

अध्याय पस्तिसावा

श्रीराम जगदानंदकंद, सच्चिदानंद, नित्यशुद्ध असून, त्याच्या स्मरणाने भवबंध नाहीसा होतो. वानरसेनासमूह समुद्रतीरावर श्रीरामचंद्रासमवेत येऊन पोचला. तिकडे लंकानगरी जाळून हनुमंत निघून गेला त्यानंतर रावणाची माता कैकसी ही राक्षसांचा अंत निश्चित आला या विचारामुळे आकांत करू लागली. लंकादुर्गाला आग लागलेली पाहून ती मनातून अत्यंत दुःखी झाली. तिच्या डोळ्यातून अश्रूधारा वाहू लागल्या. नंतर ती बिभीषणाकडे जाऊन आपले दुःख प्रकट करू लागली.

माता कैकसीकडून रावणाचा निषेध

कैकसी बिभीषणाला म्हणाली, "अरे, रावणाचे मरण जवळ आले असून, राक्षसकुलाचा नाश होईल. याला कारण तुझा ज्येष्ठ बंधू रावणच आहे. त्याने श्रीरामाची पत्नी चोरून आणली. त्यामुळे श्रीराम आता रावणाचा वध आणि राक्षसकुळाचा घात करील. सीता श्रीरामाला अत्यंत प्रिय आहे; त्याने तिचा शोध घेण्यासाठी वानर पाठविला. त्या वानराने लंकानगरी जाळली आणि राक्षस मारले. आमच्यामधे बलाढ्य असा इंद्रजित, पण वानराने त्याचीही खोड मोडली. त्या मर्कटाने

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

रणात खवळून नाश केला, तसा दशकंठ रावणालाही त्रस्त केला. ज्याप्रमाणे सविष असे उत्तम पक्वान्न भक्षण केले तर मरण येणारच; त्याप्रमाणे सीतेविषयीची अभिलाषा राक्षसकुळाचे निर्दाळण करणारच. एखाद्या संतान असलेल्याचे निःसंतान व्हावे तसे अटळ विघ्न आम्हावर आले आहे." असे बोलून कैकसीमाता बिभीषणपुत्राच्या गळ्यात पडून रडू लागली. काही वेळाने ती म्हणाली, "श्रीरामाच्या एकेक गोष्टी ऐक. जो जो वीर दृष्टीला पडला, तो तो बाणांची वृष्टी करून रामाने मारला. असा तो श्रीराम महापराक्रमी आहे. त्याने ताटका बघता बघता मारली. यज्ञाच्या वाटेवर सुबाहूला मारले. रणात विराधाचा वध केला. कोणी राक्षस दृष्टीला पडला की राम त्याला सोडतच नाही. एकटा आणि पायी चालणारा राम, पण त्याने त्रिशिरा, खर, दूषण आणि चवदा सहस्र राक्षसांचे रणकंदनात निर्दाळण केले. बलवान कबंधाचा वध केला. वाली एकाच बाणात मारला. आता सुग्रीव त्याला वानरसेनेसह साहाय्य करतो आहे. त्यामधलाच एक तो हनुमंत आहे. त्याने निःशंकपणे लंका जाळली, रावणाला छळले आणि राक्षसांना धाक बसवला. पुढे श्रीरघुनाथ येथे आला तर त्याची शरवृष्टी कोण सहन करील! लंकानाथाच्या अविवेकाने संपूर्ण राक्षसकुळाचा घात होईल."

बिभीषणाला विनंती-त्याचा निश्चय

कैकसी बिभीषणाला म्हणाली, "दशानन रावण अत्यंत गर्विष्ट आहे. माझी शिकवण तो ऐकत नाही. तुझे सांगणे तो ऐकतो. तेव्हा त्याला संपूर्ण हिताचा उपदेश कर. बिभीषणा, तू शांत, क्रोध न येणारा, असल्यामुळे अपमान मनात न ठेवता रावणाला उपदेश करू शकशील." एवढे बोलून पुन्हा कैकसी ओक्साबोक्सी रडू लागली. पुढे ती म्हणाली, "बिभीषणा माझा पुत्र वाचव. मी तुला शरण येऊन विनंती करते आहे." मातेचे बोलणे ऐकून बिभीषणाने म्हटले, "मी माझ्या प्राणाची शपथ घेऊन सांगतो माते, प्राणान्त सहन करून आणि अपमान झाला तरी मी रावणाला हिताचेच सांगीन. रावणाला हित शिकवले, की सीतेचा त्याला त्याग करावा लागेल. त्यावेळी तो माझा घात करायला धावून येईल. मग मी रघुनाथाला शरण जाईन." बिभीषणाचे म्हणणे ऐकल्यावर माता कैकसी म्हणाली, "अरे, तू श्रीरामाला शरण गेलास, तर तुझ्यामुळे माझी कूस धन्य होईल. तुझ्याकडून रावणाचे कल्याण झाले तर तुझ्यामुळे वंशवर्धन होईल. श्रीरामाला शरण गेल्याने संपूर्ण कुटुंब पवित्र होते; पृथ्वी सुखसंपन्न होते; त्याच्यामुळे तीर्थेही पावन होतात. श्रीरघुनाथाला शरण गेल्याने शरणार्थीची माता कृतार्थ होते; पूर्वजांना सुखरूपता मिळते; तो सर्वांना एकदमच उद्धरतो. त्याच्यामुळे संसार, सुरासुर, चराचर सुखी होत असते. श्रीरामाला शरण गेले तर जन्म-मरण स्वप्नवत् होते; कळिकाळ लोटांगण घालतो; यासाठी रामाचे चरण वंदावे, त्याची सेवा करावी." रावण श्रीरामाचा वैरी झाला, तरी त्याची माता रामाचा द्वेष करत नव्हती, मातेच्या बोलण्याने बिभीषणाला आनंद झाला.

बिभीषण रावणाच्या सभेकडे जातो-स्वागत

बिभीषणाने आपल्या मातेचे निर्मत्सर बोलणे ऐकले; तेव्हा त्याला आनंद झाला. त्याने तिच्या चरणांना वंदन केले, दंडवत घातले. "मातृवचन हे अत्यंत समर्थ असते," असे म्हणून हात जोडून तिला नमस्कार करून बिभीषण आनंदाने जानकीला मुक्त करण्यासाठी रावणाकडे निघाला. त्याला जाताना पाहून मातेने निंबलोण उतरवले आणि 'तुझी कीर्ती होईल. तू सुखसंपन्न होशील.' असा आशीर्वाद दिला. मातेचे आशीर्वचन ऐकून बिभीषणाने शकुनगाठ बांधली आणि तो त्वरित रावणाची भेट घेण्यासाठी निघाला. रावणाच्या सभेत इंद्रजित आणि अतिकाय हे दोन पुत्र, प्रधान मंडळी सभोवार आणि रावण सिंहासनावर बसला

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

होता. बिभीषण सभेत आला तेव्हा सर्वजण उठून उभे राहिले. बिभीषणाने एकाग्र चित्ताने रावणाला नमस्कार केला. रावणाने अत्यंत प्रेमाने आणि सन्मानाने, बिभीषणाला आपल्या सुवर्णसिंहासनावर जवळ बसविले. मग बिभीषण रावणाला म्हणाला, "सर्व प्रधान इथे जमले आहेत, पण तिकडे राक्षसांवर दुर्धर विघ्न आले आहे. हनुमंताने मोठा प्रलय मांडला आहे ब्रह्मदेवाच्या ब्रह्मासनाला क्षुद्र कीटक, विंचवांचे समूह दंश करत आहेत. लंकाभुवनातले सर्वजण व्याकुळ असून, कोणाला स्वस्थता नाही. हनुमंताने मोठी ख्याती केली आणि लंकानगरीत हाहाःकार झाला आहे. अग्निहोत्रामधे सर्प उठले आणि हविर्द्रव्याला मुंग्या लागल्या. आता भविष्याची गती काय? याविषयी रावणा मी तुला हिताचे काही सांगणार आहे. जेव्हापासून सीतेला आणली तेव्हापासून सारखी विघ्ने येत आहेत. रावणा, मी धाकटा भाऊ, तू माझा थोरला भाऊ; मी स्पष्टपणे तुला काही शिकवू नये; परंतु अत्यंत अनिष्ट विघ्न आले आहे. यासाठी श्रेष्ठपणे माझ्या विचाराचा विचार कर. श्रीरामाचा तो एकटा वानर आला आणि तुम्ही सर्वजण असतानाही त्याने असंख्य राक्षस मारले, लंकापुरी जाळली. तुमच्या मस्तकावर पाय ठेवून अखया मारला; महापराक्रमी इंद्रजिताच्या जीविताविषयी संदेह निर्माण केला; लंकादहन केले. तुम्ही समक्ष असून, कोणीही त्या वानराला धरू शकले नाही. मग तुम्ही श्रीरामचंद्राला कसा जिंकाल? पुढचा काही विचार करा. श्रीरामाशी वैर करण्याने राक्षसकुळाचा नाश होणार आहे. तेव्हा मी स्वार्थ आणि परमार्थ साधेल असा त्यासंबंधी उपाय सांगतो."

उपाय कथन, प्रधानांवर रावणाचा राग

"रावणा, तू सीता चोरून आणलीस, त्या अपराधासाठी प्रायश्चित्त सांगतो, त्याप्रमाणे तू करावेस. त्यामुळे तुला सुखोपभोग आणि मुक्ती मिळेल; यश आणि कीर्ती मिळेल; कुळाला विश्रांती मिळेल; हे अगदी निश्चित समज. रावणा, सर्व पापांचे प्रायश्चित्त म्हणजे श्रीरामनाम स्मरावे. तो सीताकांत सेविल्याने तुला सुखस्वास्थ्य प्राप्त होईल. हे तुझे प्रधान, अंगावर विघ्न येऊन कोसळले तरी त्यांच्या मनात विचाराचा प्रवेश झाला नाही. ते मौन धरून बसले. त्या एका वानराच्या युद्धप्रवीणतेने यांची सामर्थ्याची प्रौढी पळाली आणि पराक्रमाचा गर्व संपला. हे प्रधान नुसते संभ्रमात सापडलेले आहेत. ऐकले आणि पाहिले त्यावरून मला जे अनुमान दिसले ते मी तुला सांगितले. आपले संबंध मला न सांगता राहू देईनात म्हणून येऊन सांगितले. आता यावर पुढे काय कृती करायची, ते हित-अहित पाहून राजाने ठरवावे. निश्चित असा उपाय की जो स्वार्थ-परमार्थ साधून देईल, तो करावा." असे बिभीषणाने सांगितले. रावणाला संतोष झाला. नंतर स्वतः उद्विग्न होऊन तो प्रधानांवर रागावला. राक्षसांचे निर्दाळण करून हनुमंताने लंकेचाही विध्वंस केला हे पाहून रावणाने हनुमंताला मानले. 'एकटा एक वानर, पण रणरंगात धैर्यवान वीर, स्वामीकार्यात महाशूर असा तो मारुती श्रेष्ठ वीर आहे.' असे मनात म्हणत रावण प्रधान, सेनापती आणि राक्षस यांच्यावर अत्यंत संतापला. डोळे लाल करून आणि कठिण शब्द उच्चारून तो म्हणाला, "कळिकाळालाही दुर्धर अशी माझी लंकानगरी असता, ती शोधून सीतेचा शोध लावून आणि विध्वंस करून तो वानर गेला. अखया आणि सैन्यदळ यांचे तुमच्या देखत त्याने कंदन केले, जळो तुमचे काळे तोंड. मोठ्या शौर्याच्या वृथा वल्गना तेवढ्या करता, जळो तुमचा पराक्रम; आता जाऊन विहिरीत पडा, किंवा सुरी पोटात खुपसा. एका वानराने सर्व नगरी लुबाडली; त्याच्यासमोर तुम्ही टिकला नाहीत; पुढे तो राम आला तर तुम्ही सर्व पळून जाल."

रावण प्रधानांवर रागावला तेव्हा सर्व सोळा प्रधान आपल्या पराक्रमाची फुशारकी सांगू लागले.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Research Academy

सप्तघ्न, यज्ञगोपास्य, यज्ञकेतू, दुर्धर्ष, रश्मिकेतू, प्रघस, विरुपाक्ष, वज्रदंष्ट्र, धूम्राक्ष, वज्रनाभी, विद्युन्मुख, विद्युज्जिव्ह, त्रिशिख, मेघवर्ण, आणि ज्यांच्या बळाची तुलनाच करता येत नाही असे कुंभ आणि निकुंभ हे ते सोळा प्रधान होते. ते सर्व रथ, घोडे, पायदळ, हत्ती, शस्त्रास्त्रे यांसह समूहाने येऊन रावणासमोर आपल्या मोठेपणाचे, पराक्रमाचे वर्णन स्वतःच करू लागले. त्यावेळी पतंगाच्या पंक्ती जशा आगीवर उडी घालतात, तसे जणू ते राक्षस श्रीरामावर चालून जातात असे भासले. ते प्रौढीने म्हणाले, "रावणा, सावधपणे ऐक. अर्ध्या क्षणात आम्ही श्रीरामाचा वध करू. त्याच्याबरोबर सुग्रीव, लक्ष्मण यांनाही मारू. थोर थोर मल्ल, योद्धे, अंगदादी वानरवीर या सर्वांना रणात मारून आम्ही धरणीवर रक्ताचे पाट वाहवू. ज्याने लंकेत येऊन नगरी जाळली, राक्षस मारले त्या हनुमंतालाही क्षणात उपटून टाकू आणि मारू." पुढे भरलेला समुद्र असून, त्यांच्याजवळ तरून जाण्याचे साधन वा अन्य उपाय नसताना ते दुर्बुद्धीने मरणाच्या उन्मादाने उन्मत्तपणे धावत आहेत, हे पाहून बिभीषणाने योग्य-अयोग्य विचार सांगून त्यांना परतवले.

बिभीषणाकडून धिःकार; प्रधानांची प्रौढी

प्रधानांना उद्देशून बिभीषण म्हणाला, "अरे, तुम्ही युद्धात कुशल असून दुर्धर वीर आहात, तर बळाबळाचा विचार न करता एकदम सगळे युद्धासाठी कसे जाता आहात? एक श्रीरामाचे वानर आले आणि त्याने कुमाराला, राक्षसांना मारले, लंकानगरी जाळली, तेव्हा त्याला सामोरे का झाला नाहीत. हनुमंत आलेला पाहून एखाद्या रंडकीप्रमाणे लपलात आणि आता रावणासमोर मोठा पुरुषार्थ मिरवता आहात. अशोकवनात युद्ध झाले तर सर्वजण पळून गेलात. अखयाला पाठविले आणि हनुमंताने त्याचा प्राण घेतला; नंतर अखयाच्या कैवारासाठी पाठविण्यासारखा कोणी राक्षस दिसेना म्हणून जेष्ठ कुमार जो इंद्रजित त्याला पाठवला. तुमच्या बळावर विश्वास ठेवला आणि अखयाकुमार प्राणास मुकला, इंद्रजिताची युद्धात गांजणूक झाली; शिवाय लंका जळाली. धिःकार असो तुमच्या पुरुषार्थाचा, धिःकार तुमच्या जीविताचा. तुम्ही भोळ्या रावणाला वृथा चाळवत आहात. रावण खरोखर महाभोळा आहे. तो बापडा वेडा तुमच्यावर विश्वासला. तुमच्या मनात कपट आहे हे खरोखर त्याला समजलेच नाही." बिभीषणाचे हे बोलणे ऐकल्यावर सर्व प्रधान लज्जित झाले.

नंतर पाच प्रधान उठले आणि आपल्या पराक्रमाची प्रौढी वर्णन करू लागले. प्रहस्त, महोदर, पार्श्वद, यज्ञहनु आणि दुर्मुख हे पाच प्रधान अलौकिक सामर्थ्याचे आणि पराक्रमी होते. रावणाच्या स्वतःच्या सेनादळात प्रहस्त हा महाबळी होता. तो प्रथम रावणाजवळ आपल्या पराक्रमाची नवलाई सांगू लागला. युद्धामध्ये त्याचे हात शत्रूचा पराभव करण्यास अत्यंत समर्थ असल्यामुळे त्याचे नाव प्रहस्त असे होते. तो रावणाच्या अत्यंत निकटचा होता. तो प्रहस्त म्हणाला, "आम्ही खड्ग, धनुष्य, शूल, फरश, हाती गदा घेतलेले राक्षसवीर रणयोद्धे आहोत. आम्ही त्या वानराला मारू. भूमीला बराच काळ रक्ताची तहान लागलेली आहे; तेव्हा तिला वानराच्या रक्ताने तृप्त करू. त्यासाठी तो वानरस्वामी मारून आम्ही विजयी होऊ. लक्ष्मणासह रामस्वामीही रणात पाडू. तसा विचार केला तर आमच्याशी संग्राम करू शकेल असा पराक्रमी वीर कोण आहे? राम-लक्ष्मणांचा, तसाच सुग्रीव, अंगद यांचा अंत करून सर्व वानर मारीन तरच हा प्रहस्त वीर तुझा म्हण. तालफळे वनात गळून पडतात, तशी वानरसेना आणि राम-लक्ष्मण यांना रणात पाडीन. यासाठी अर्धा क्षण लागेल."

प्रहस्ताचे बोलणे झाल्यावर महोदर उठला त्याने 'नरवानरांना मी स्वतःच्या प्रतापाने मारीन'

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Trust Foundation and eGangotri

अशी गर्जना केली. बळवंत, बुद्धिवंत आणि रावणाचा परम आप्त, असा तो महोदर मोठा पराक्रमी होता. तो मोठ्या आवेशाने बोलू लागला होता. त्याचे पोट दुष्ट, दुराश आणि दुर्भर असण्यामुळे त्याचे महोदर असे नाव होते. जसा एखादा सर्प महाविषारी असतो तसा तो होता. तो रावणाला म्हणाला. "हे राजा नीट ऐक. मी शस्त्रास्त्रात प्रवीण आहे. रणात राम-लक्ष्मण यांना रणरंगात मारून खाली पाडीन. अंगद, सुग्रीव, जांबुवंत या योध्यांचा घात करीन. समस्त वानरसेना जमीनीवर उलथून पाडीन. मग वानरांचे रक्त राक्षसांची तहान भागवेल." एवढे बोलून महोदर युद्धासाठी उठला. महोदर जात असल्याचे पाहून महापार्श्वाने आरोळी दिली की, "माझा अलौकिक पुरुषार्थ लंकाधीशाने ऐकावा." सर्व पार्षदांचा तो मुख्य होता म्हणून त्याला महापार्श्व नाव मिळाले होते. रावणाशी तो एकांतात विचारविनिमय करणारा निकटवर्ती होता. महापार्श्व रावणाच्या समोर उभा राहून आपण संग्रामात किती दारुण पराक्रम करतो ते सांगू लागला. बृहस्पतीसारखी बुद्धी, निर्वाण युद्धात भयंकर आणि निःसंशय धीर, वीर, पण दुष्टबुद्धी महापार्श्व म्हणाला, "माझ्या पहिल्याच आघाताने राम–लक्ष्मणांना जमीनीवर पाडीन, आणि सुग्रीवादी वानरांना घाव घालून माझ्या पायाशी लोळवीन. माझे हात हेच पारध्याच्या जाळ्याप्रमाणे वानरांना दृढ बंधनात आणतील. मग त्या वानरश्रेष्ठांना रगडून मी त्यांच्या रक्ताचे पाट वाहवीन. जसा महामेरू पर्वत वर्षाकाळी पाझरतो तसा वानरांच्या रक्ताचा प्रवाह तुम्ही पाहाल. जसा सिंहाच्या पंजांच्या तडाख्याने हत्ती पडावेत, तसे वानर घावाबरोबर जमिनीवर इतस्ततः पडलेले दिसतील. माझ्या शस्त्रांच्या घावांनी वानर पडले म्हणजे राक्षसांना रक्ताचे स्नान घडेल आणि ते मांसाच्या भोजनाने तृप्त होतील. हे लंकाधीशा, तू निश्चित समज की माझ्याकडून राम, लक्ष्मण, सुग्रीव आणि वानरगण मारले गेले आहेत. मी जवळ असताना तुला कशाला काळजी, तू सुखाने सीतेचा उपभोग महावनात घे."

दुर्मुख महापार्श्वाने केलेल्या वल्गना ऐकून रागाने उठला. हनुमानाने रावण गांजला याचे महादुःख त्याला सहन झाले नाही. तो गर्जना करत म्हणाला, "अत्यंत दुर्धर अशा हनुमंताला मारीन तरच मी खरा वीर दुर्मुख. माझ्या बळाचा असा प्रभाव की, मी समोर येताच तो चपळ, पळपुटा वानर पळून जाऊ लागेल, पण मी त्याचा निश्चित वध करीन, हा माझा निर्धार आहे. जरी तो अतल, वितल, सुतल अशा सप्त पाताळात पळाला तरी तिथेही त्या वानराला धरून त्याचा तत्काल वध करीन. मला भिऊन तो सागरात पळाला तर तिथून बाहेर काढून जमिनीवर जोरात आपटीन. प्रथम हनुमंताला मारून, नंतर श्रीराम, लक्ष्मण, सुग्रीव यांचा अंत करीन. जर वानरसमुदाय आला तर त्यांना पायातळी आणि प्रहाराखाली रगडीन. नंतर मी एकटा एक पराक्रमी वीर म्हणून तुझ्याजवळ येईन. दुसऱ्याच्या संगतीची अपेक्षा करणाऱ्याचा जळो तो पुरुषार्थ. माझ्याकडून राम-लक्ष्मण-वानरगण ह्यांचे रणकंदन होईल." ही दुर्मुखाची दर्पोक्ती ऐकून वज्रहन रागाने उठला आणि रावणासमोर जाऊन गर्जना करत स्वतःची प्रौढी सांगू लागला.

वज्रहन म्हणाला, "पायदळ, रथ, घोडे, हत्ती आणि राक्षस सुखात स्वस्थ राहू देत. माझे भयंकर चक्र नर-वानर यांचा संहार करायला समर्थ आहे. प्रहस्त, महोदर, महापार्षदादी, दुर्मुख यांनी रावणापाशी आनंदाने आणि सुखाने राहावे. वानरसैन्याकडे मी जातो. आम्हाला शस्त्रास्त्रांचा भरणा नको की रणांगण नको. केवळ माझ्या जिभेच्या टोकानेच नर-वानर यांना मरण येईल. प्रथम मी रामाला लक्ष्मणासह गिळीन. नंतर अंगद, सुग्रीव, जांबुवंत, हनुमंत हे महावीर आणि नळ, नीळ, तरस, तरळ, सुषेण, मैंद इत्यादी सर्व

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

संपवीन. माझ्या दर्शनानेच वानरसेनेला प्रलयकाळ प्राप्त होईल." हा पर्वताप्रमाणे प्रचंड आकाराचा राक्षस जिभेने तोंड चाटत होता, दात करकरा खात होता, त्याला नर आणि वानर खायचे होते. त्याची जीभ काटेरी आणि काळी होती, त्याचे दर्शन काळे आणि विक्राळ होते. तो रावणासमोर येऊन गर्जून म्हणाला, "जा रे, सांगा लंकानाथ रावणाला की मी श्रीरामाला मारले आहे, सर्व वानरांचा वध केला आहे, आता तू सुखाने सीता भोगावी. आजपासून लंकानगरी निर्भय झाली आणि राक्षसांना भीती उरली नाही. त्यांनी आपल्या स्वतःच्या पत्नीला पुष्पशय्येवर एकत्र येऊन भोगाव्या." असे अनेक राक्षस अत्यंत कर्कश बोलून आपले यश सांगत होते; पण त्यांचे अपयश चुकणार नव्हते.

राक्षसांच्या प्रौढीवर बिभीषणाची प्रतिक्रिया

राक्षसवीरांनी उद्धटपणे जे भाषण केले ते महाबुद्धिवान बिभीषणाने ऐकले, त्यावर त्याने त्यांच्या दर्पोक्तीचे निवारण करताना युक्ति-प्रयुक्तीने विभागशः आपले मनोगत व्यक्त केले. तो सर्वांपुढे हात जोडून, आपल्या मृदू, मधुर आणि मंजुळ शब्दात, स्वधर्मनीती आणि धर्मार्थ यांना अनुसरून म्हणाला, "तुम्ही प्रधान बुद्धिमंत आहात. तेव्हा येथे धर्म-अधर्म विचाराने प्रस्तुत विषय जो राम-रावण यांच्या वैराचा आहे, त्यात अधर्म हा मुख्यत्वे आहे 'हे समजाल असे मला वाटते. श्रीरामाच्या पत्नीचे रावणाने कोणत्या कारणाने हरण केले आहे? तेच वैराचे प्रमुख कारण आहे. परस्त्रीच्या प्राणहरणाचाच हा प्रकार आहे. कारण सीता ही सृष्टीमधील परमश्रेष्ठ सती-पतिव्रता आहे. तिची अभिलाषा धरण्यात रावणाची बुद्धी खोटी ठरते आणि तो सृष्टीतला एक महापापी गणला जातो. अशा वेळी त्याला योग्य मार्गदर्शन करण्याचे टाळून, तुम्ही युद्धाला साहाय्यकारी होता आहात; यावरून तुम्ही सर्व मंदबुद्धीचे आहात. प्रधान हो, तुम्ही महामूर्ख बुद्धीचे आहात. विष खाणाऱ्यांच्या पंगतीत जो बसतो तो मरणासाठी उतावीळ झालेला असतो. पापी माणसाची संगत धरली की अधोगतीला जावे लागते. बळाबळाचा विचार करून मगच प्रबळ युद्ध करावे. त्या दृष्टीने पाहिले तर तुम्ही सर्व मूर्ख ठरता. तुम्ही निर्बळ असून युद्धासाठी अयोग्य आहात. जर तुम्हाला सुबुद्धीने काही सांगितले तर तुम्हाला दुःख होते. सत्य बोलणे विषवत वाटते. दशानन रावणासह तुम्ही सारे मूर्ख आणि अविवेकी आहात. त्या अविवेकाचे लक्षण मी संपूर्णपणे तुम्हाला सांगतो. दुसऱ्याची (शत्रूची) पराक्रमाची गणना करून, मग वाटले तर युद्ध करावे. रावण हा बापडा भोळा आहे, प्रधान खोटारडे मिथ्यावादी आहेत. कोणी फसवले तर फसणारे आहात. तुम्हला हित-अहित कळत नाही. एखाद्या कुष्टरोग्याला त्याचा रोग सांगितला तर त्याला राग येतो; वेश्येला वेश्या म्हटले तर तिला राग येतो; परंतु मी रावणाच्या हितासाठी योग्य ते यथार्थपणे बोलणार आहे."

बिभीषण पुढे बोलू लागला, "प्रहस्त स्वतःला बलवान म्हणवतो, पण त्याचा पुत्र जंबुमाळी याला हनुमानाने रणकल्लोळात उपटून मारले त्यावेळी हा प्रहस्त पुत्रशोकामुळे रडत रावणापाशी आला होता. तेव्हा आता राम, लक्ष्मण, हनुमंत मारीन हे त्याचे बोलणे व्यर्थ आणि खोटे आहे. अचाट प्रौढीची बडबड करून वितंड माजविणाऱ्या प्रहस्ताचे तोंड काळे झाले आहे. तसाच हा महोदरही खोटारडा आहे. जेव्हा हनुमंताने अखयाकुमाराचा वध केला, तेव्हा हनुमंताला सामोरा होऊन, या महोदराने युद्ध करून त्याचा वध का केला नाही? अखया मारला गेल्याचे पाहताच हा महोदर पळत सुटला होता; आता मोठी पराक्रमाची प्रौढी मिरवतो आहे आणि राम-लक्ष्मणांना मारण्याच्या गोष्टी करतो आहे. ज्याप्रमाणे सूर्याला जिंकण्यासाठी काजवा आपल्या तेजाने खटपट आणि धडपड करतो, त्याप्रमाणे महोदराची वटवट आहे. तो महामूर्ख

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Research Academy, eGangotri

खोट्या वल्गना करतो आहे. तसाच तो महापार्षद. इंद्रजिताला यथास्थित त्रस्त केले तेव्हा हनुमंताशी युद्ध न करता तो पडलंकेत पळून गेला, हे प्रसिद्धच आहे. आता मोठ्या पराक्रमाच्या गोष्टी सांगून मिरवतो आहे आणि राम, लक्ष्मण, अंगद, सुग्रीव, वानरगण यांना मारीन म्हणतो आहे. रावणा हे सर्व बोलणे म्हणजे तुला मोहात पाडण्याचाच प्रयत्न आहे."

नंतर विभीषण म्हणाला, "महापार्श्व, हा तर खोटेपणाने निष्फळ वटवट करणारा, सर्व प्रधानांमधे अत्यंत मंद, निंद्य आणि नपुंसक आहे. दुर्मुख काळतोंड्या हा जेव्हा रावण गांजला तेव्हा वानरासमोर जाऊन युद्ध करून त्या वानराला मारू शकला नाही. आता फुशारकी सांगतो आहे की ज्याने लंका जाळली त्याला सप्त पाताळातून शोधून, जळी, स्थळी मारीन. अरे, तुमच्या देखत लंका जाळली, तेव्हा तुम्ही हनुमंत मारला नाहीत आणि आता त्याला मारण्याच्या गोष्टी बोलता! तुम्हाला लाजही वाटत नाही. नित्य असत्य बोलतो म्हणूनच याचे नाव दुर्मुख आहे. लंकाधीशा, याचे एक एक बोलणे हे सर्वथा खोटे आहे. वज्रहनु सांगतो की राम, लक्ष्मण, वानर या सर्वांना गिळीन; मग लंकेची हनुमानाने होळी केली त्यावेळीच याने त्याला का गिळले नाही? वानर लंकेची होळी करत असताना या वज्रहनूची दातखिळी बसली, हा घाबरून अर्ध्या पाण्यात दडून बसला. राजाजवळही थांबला नव्हता. लंकानाथा, या प्रधानांची अशी स्थिती आहे. हे सर्व खोटारडे आहेत. तेव्हा तू श्रीरामाला सीता अर्पण करून, आपले राक्षसकुळ वाचव." विभीषणाचे भाषण ऐकल्यावर प्रधान, सेनानी आणि रावण हे सर्व लज्जायमान झाले, त्यांच्या माना खाली झुकल्या. सर्वांचा अपमान झालेला पाहून इंद्रजित संतापला. त्याने अत्यंत आवेशाने विभीषणाला प्रत्युत्तर देणारे भाषण केले.

अध्याय छत्तिसावा

"मारुतीचा पुरुषार्थ फार मोठा आहे. राक्षसांचे बळ व्यर्थ आहे. मारुतीचा प्रताप ऐकून त्यांची तोंडे काळी पडली. रावणाला लाज आली." अशा प्रकारचे हनुमंताच्या सामर्थ्याचे वर्णन विभीषणाने केल्यावर राक्षस तळमळ करू लागले. सेनानी, प्रधान हे सर्व हीन, दीन झाले. समस्त सभा लाजून चूर झाली. दशाननाची मुखे म्लान झाली. हे पाहून इंद्रजिताला कृतान्त कोप आला. त्याने विभीषणाला आपला पुरुषार्थ वर्णन करून सांगायला प्रारंभ केला.

इंद्रजित विभीषणाचा निषेध करतो

इंद्रजित म्हणाला, "काकाजी, आपण धर्मसंपन्न आहात, बुद्धी, युक्ती, ज्ञान यांनी परिपूर्ण आहात, तरी असे क्षुद्र भाषण का करता? सेनानी, राक्षसगण यांची निंदा, प्रधानांची निर्भत्सना, हे करून उलट राम-लक्ष्मण यांचा पुरुषार्थ तेवढा दारुण असल्याचे वर्णन करता आहात. एकेकाला, उद्देशून बोलत आपण आमच्या सेनेची निंदा केलीत. श्रीरामाची आम्ही खोडी केली याचे वर्णन करता! वास्तविक तुम्ही श्रेष्ठ आणि प्रौढ बुद्धीचे असे असून, शिवाय युवराजपदाचे माहात्म्य मिरवता आहात. मग ज्यामुळे राजाचे अंतःकरण व्यथित होईल असे कठिण भाषण का करता? अहो, पाठ थोपटली तर एडका सुद्धा चार अधिक लाथा मारतो, असा विचार करून सेनानी आणि सैनिक यांना तुम्ही सन्मान द्यायला हवा. असा जर सन्मान दिला तर संग्रामासाठी आपले सैन्य अधिक उत्साह दाखवील; पण तुम्ही तर श्रीरामाचे पराक्रमी म्हणून वर्णन करून आपल्या सैन्याची हेटाळणी करता आहात, हे कसे? राजा रावण तुमचा ज्येष्ठ बंधू आणि तुम्ही सर्वात कनिष्ठ असून वाद करता! यामुळे युवराजाच्या संबंधाचे अत्यंत विरुद्ध असे वर्तन घडले आहे. जसा पिता तसा चुलता, आणखी तुमच्याकडे

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

युवराजापदाचा मान आहे; तरीही ज्येष्ठ बंधू रावणाची निंदा करून श्रीरामाची स्तुती कशी करता? राम-लक्ष्मण ते किती, आमचा एकेक राक्षसगण दोघांना खाऊन टाकतील. त्यासाठी रणांगण कशाला हवे.?"

इंद्रजित पुढे म्हणाला, "राम-लक्ष्मण बापडे आमच्या दृष्टीने तृणप्राय आहेत. आता माझा पराक्रम पाहा. माझ्या चरणापाशी राजे शरण येतात. समुद्रवलयांकित राजेच काय, यज्ञ भोगणारा जो देवांचा राजा इंद्र त्यालाही मी पृथ्वीवर आणून लंकेचा सेवक केला आहे. ऐरावतावरून खाली ओढून ओरडत, तो इंद्र जमिनीवर पाडला आणि मी त्याचा दात उपटून हातात घेतला. माझ्यापुढे त्रैलोक्य चळचळा कापते. माझी गर्जना ऐकताच शूरगण एकाएकी दीनवाणे होऊन, रंकाप्रमाणे खाली मान घालून, पळतात. इंद्रासह देवांच्या कोटी मी बंदीत घातल्या, तिथे रामाची प्रौढी आणि त्याच्या साहाय्यकारी वानरांचे वर्णन कसले सांगता. अंगद, सुग्रीव, हनुमंत, नळ, नीळ आणि जांबुवंत हे सर्व दाताला दात न लागता राक्षस भक्षण करतील. मानव हा आमचा आहार, वानर म्हणजे जशी कोशिंबीर, त्यांच्याशी युद्ध कसले करायचे; क्षणात मी त्या सर्वांना मारीन. अहो, रणात नेटाने भिडून रामाचा वध करीन. रावणाने सर्व चिंता सोडून खुशाल सीता भोगावी. प्रत्यक्ष युद्धात बाणाने विंधून राम-लक्ष्मण यांना पाडीन आणि वानरगण निर्दाळीन. माझा पराक्रम पाहाच."

बिभीषणाचे इंद्रजिताला प्रत्युत्तर

श्रीरामाची निंदा करणारे इंद्रजिताचे भाषण ऐकल्यावर बिभीषण संतापला आणि म्हणाला, "इंद्रजिता, नीट, लक्षपूर्वक ऐक. तू अहंकारी, अपक्व, बालस्वभावाचा आहेस. तुझ्या माथ्यावरचा जार अजून वाळला नाही. स्वहिताचा विचार तुला सुचणार नाही. तेव्हा विचारपूर्वक आणि अनेकदा विचार करून, विवेकाने, मी काय सांगतो ते ऐक. एक तर तुला स्वहिताची दृष्टी नाही, जे बोलतोस ते मिथ्या आहे. त्या बोलण्याची नवलाई मूलतः काय हे माझ्याकडून ऐक. तू म्हणतोस, 'आमचा एकेक राक्षस राम-लक्ष्मण भक्षण करील, तसेच रामाच्या पराक्रमाचे मी केलेले वर्णन खोटे आहे.' मग पुढे ऐक. अरे, रामाने बालपणीच एक बाण सोडून ताटकेचा वध केला. सुबाहूला युद्धात सैन्यासह मारले. रामाच्या बाणपिसाऱ्यामुळे मारीच हा आकाशात उडाला. श्रीराम हा राक्षसांचा काळ आहे. तू उन्मादाने निद्रिस्त आहेस. सीतेच्या स्वयंवरप्रसंगी धनुष्य उचलताना रावणाचे तोंड काळे झाले तेच धनुष्य श्रीरामाने दुखंड केले. तो श्रीराम प्रचंड बळ असलेला आहे. सीतेची अभिलाषा धरणारा विराध रामाने मारला. तुम्हा मूर्खांच्या बोलण्याने रावणाची तीच अवस्था होणार. शूर्पणखेने कपट करताच तिचे नाक कान गेले. ज्यांच्याकडे तिने गाऱ्हाणे नेले ते खर आणि दूषण हेही रामाने मारले. श्रीरामाने दुर्धर बाणांचा वर्षाव करून त्रिशिरा, खर, दूषण आणि चवदा सहस्र राक्षस युद्धात मारले. श्रीरामाजवळ सैन्य नाही की रथसंपत्ती नाही. तो एकटा आणि पादचारी असून त्याने एवढी कीर्ती केली. तू दुष्ट बुद्धीने कशाला बोलतोस?"

"ह्या नकट्या शूर्पणखेच्या सांगण्यावरून रावणाने पापबुद्धीने वर्तन केले. सीतेची चोरी करताना त्याला भीक मागावी लागली, अशी अवदसा आली. परस्त्री चोरण्यासाठी राजा भिकारी झाला. जळो ती पराक्रमाची थोरवी. तू मोठा निर्लज्ज आहेस. लंकानाथाचा तरी पराक्रम काय? तर मारीच्याच्या माथ्यावर मरण दिले, सौमित्राचा छळ केला, सीता चोरून पळाला. लक्ष्मणाने त्यावेळी आखलेली मर्यादारेषा रावण उल्लंघू शकला नाही, बळाचा आवाका व्यर्थ बोलावा आणि सारा

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Trust, Lucknow

पुरुषार्थ काळाच्या मुखात घालावा असेच सारे झाले. जटायूशी युद्ध करताना रावणाला दाती तृण धरून शरण जावे लागले. नंतर त्याला कपटाने मारले. तुम्ही एकजात पूर्णपणे पापी आहात. चोरी, मारी आणि परस्त्रीचे हरण एवढी पापे रावणाच्या शिरावर आहेत. तिथे तुझे ज्येष्ठत्व फार तर गारुडी विद्येसम आहे. तू म्हणतोस ऐरावत आणि अमरपती इंद्र जिंकला, देवांना पराभूत करून ख्याती केली; पण श्रीरामापाशी हे काही चालणार नाही. अरे बालबुद्धी इंद्रजिता, वरुण, इंद्र, ब्रह्मा इत्यादी देव हे श्रीरामाचे अंशानुअंश आहेत याची तुला जाण नाही. जगाचा ईश हा श्रीराम आहे. तू म्हणतोस ऐरावताचे दमन केले; पण श्रीरामाने तर पाषाणाची शिळा पायांनी उद्धरली. तुझ्या पोरबुद्धीला श्रीरामाची श्रेष्ठ शक्ती समजणार नाही. स्वतःच आपला पुरुषार्थ सांगतोस, आणि म्हणतोस की, 'श्रीरघुनाथाला मी मारीन. रावणाने सुखाने सीता भोगावी.' परस्त्रीविषयी असे बोलणारा तू महापापी आहेस. राजाला अशी पापबुद्धी सांगणाराला सभेमधेच मारले पाहिजे. राजपुत्रा तू दुर्बुद्धीचा महामूर्ख आणि कुळाचा घात करणारा आहेस. तू एकटा मारला गेलास तरी कुळाचे कल्याण होईल. ही मी सांगितलेली बुद्धी रावणाने ऐकली नाही तर सर्व राक्षसकुळाचे निर्दाळण होईल."

नंतर बिभीषणाने म्हटले, "इंद्रजित आपल्या बळाबद्दल जे बोलतो आहे, ते सर्व समूळ असत्य आहे. सर्व सभा-सदस्यांनी ऐकावे आणि राजानेही प्रामाणिकपणे ऐकावे, लंकानाथाला संतुष्ट करण्यासयाठी इंद्रजीत श्रीरामाला मारीन म्हणतो आहे, पण हनुमंताशी युद्ध करताना त्याचा पराक्रम पाहिला. हनुमंताला सामोरा गेल्यावर त्याची शस्त्रास्त्रे व्यर्थ झाली. मारुतीच्या शेपटीने मस्तकावर आघात केल्यावर त्याला धीर धरवेना. दुर्धर शस्त्रांचा वर्षाव झाल्यावर मारुतीने ती शस्त्रे झेलून इंद्रजिताच्या सैन्याचा नाश केला. तेव्हा सैनिक कुंथत-कण्हत पडले. हा विनाश लंकेमधे सांगायलाही कोणी जिवंत राहिले नाही. मारुतीने इंद्रजिताच्या समक्षच सर्वांचा घात केला. त्यांची सोडवणूक करायला तुझा पुरुषार्थ काही पुरला नाही. मारुतीने पूर्ण गांजले, घावांनी प्राण जाण्याची वेळ आली. हनुमंताचे कौशल्य असे की त्याने सारथी मारला, रथ मोडला, युद्धात इंद्रजिताला विरथ केला आणि शेपटीच्या आघाताने छत्र पाडले. अरे, मल्लविद्येतली त्याची कुशलता अशी की त्याने उरावर आणि शिरावर सपाटे हाणले. तेव्हा तू व्याकुळ होऊन रक्त ओकलास. तुला दूर पळताही आले नाही. युद्धाची तऱ्हा अशी की संधी मिळताच शत्रूला मारायचे आणि नाहीतर सरळ मेघांपाशी पळून जायचे; पण मारुतीच्या शेपटीपुढे तुझे काही चालले नाही. शेपटीचा असा फास पडला की मागे-पुढे सरकताच येईना. त्यावेळी हा इंद्रजित वानराने गांजले म्हणून खळाखळा रडला. रडत, पडत, रक्त ओकत मारुतीच्या शेपटीच्या भीतीने धावत, पळत विवरात शिरलास हा तुझा मुख्य पराक्रम. आता रावणासमोर म्हणतोस की 'मी एकटा श्रीरामाला मारीन.' सभेतले हे तुझे बोलणे खोटेपणाचे आहे. तू अत्यंत निर्लज्ज आहेस. वानराला युद्धात पाठ दाखवून तातडीने पळालास; असा तुझा पराक्रम असून तुझी बुद्धी समूळ खोटीच आहे."

बिभीषणाने परिणामावर बोलताना म्हटले, "अरे, तुझ्या बुद्धीमुळे रावण प्रथम मरेल. नंतर राक्षसांचा समुदाय आणि खरोखर कुळही बुडेल. राजासमोर सभेत जो मिथ्या बोलतो त्याचे तोंड काळे करून, जीभ आणि कान कापावे. राजनीती अशी आहे की कुळाचा घात करणारा पुत्रही मारावा. ज्याने त्याला सभेत आणले, तोही निश्चित मारावा. ज्याने त्याला दारातून प्रवेश दिला तोही निर्धाराने मारावा. इंद्रजिताची काय थोरवी, तो तर राक्षसकुळाचा घात करणारा आहे. रावणाचा तो

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

ज्येष्ठ पुत्र आहे म्हणूनच मी हात आवरला. वास्तविक कुलक्षय चुकवण्यासाठी त्याचा अवश्य घात करावा.''

बिभीषणाचे भाषण ऐकून प्रधान, सैनिकवीर यांच्यामधे संतापाचा भोवरा निर्माण झाला. रावणही कृतान्ताप्रमाणे संतापला. प्रधान, सेनापती यांनी डोळे वटारून दात खाल्ले. कोणी हात चोळू लागले. कोणी मुठी वळल्या. बिभीषणाच्या बोलण्यावर एकाने धिक्कार केला, कोणी एक रागाने हसला, सर्वजण रागाने झुलू लागले. सभेतले सदस्य एकमेकांना सांगू लागले की, ''बिभीषण फारच उन्मत्त झाला आहे. रावणासमोर इंद्रजिताला मारीन म्हणतो आहे.'' बिभीषणाच्या बोलण्यात 'चोरी, मारी, परस्त्रीविषयी पापबुद्धी ठेवणारा पापी' असे रावणाविषयी उल्लेख आल्यामुळे रावणाच्या मर्माला ते शब्द झोंबले आणि तो रागाने तडफडू लागला. इंद्रजिताविषयी बोलताना, बिभीषणाने त्याला 'वानराच्या समोर तू उभा राहू शकला नाहीस, पळून जाऊन विवरात लपलास' असे म्हटले. त्यामुळे इंद्रजित लाजून गप्प बसला. बिभीषणासमोर स्वतः रावणही काही बोलू शकला नाही; तर मग इतर सामान्य जन कसे बोलणार ? सर्वजण नुसते टकमक पाहात राहिले.

महापार्श्वाचा संताप, त्यावर प्रत्युत्तर

सभेतले सर्वजण स्तब्ध आणि तटस्थ झालेले पाहून महापार्श्व गर्जना करत उठून म्हणाला, ''बिभीषण अत्यंत उन्मत्त झाला आहे. राजा आणि राजपुत्र यांची त्याने निंदा केली. राजा रावणाची समक्ष निंदा करून हा श्रीरामाचे गुणगान करतो आहे, तेव्हा याची भीड कोण धरतो. सर्वजण नुसते पाहात काय राहिला आहात. हा रावणाचा कनिष्ठ बंधू, प्रतापसागर युवराज असला तरी त्याने सुहृदसंबंध तोडला आहे. तेव्हा याचा वधच केला पाहिजे. लंकानाथ याला मारा असे म्हणत नसला, तरी आम्ही याचा घात करू.'' यानंतर सभेत एकच गलका झाला. सर्वजण 'हा अतिशय उन्मत्त झाला आहे' असे म्हणू लागले. हे महापार्श्वाचे आणि नंतर सभेतील सर्वांचे आपल्याविषयीच्या संतापाचे उद्गार ऐकूनही बिभीषणाची शांती ढळली नाही की त्याला थोडाही राग आला नाही. त्याला मारावा असे म्हटल्याने तो किंचितही भ्यायला नाही. जसा सागर अगाध तसा बिभीषणाचा बोध हा अगाध होता. महापार्श्वद निंदा करणारे बोलला तरी बिभीषणाने त्याचा विषाद मानला नाही. जसे घुंगुरडे सिंहापुढे तसा महापार्श्व बिभीषणापुढे होता. त्याच्या विरोधी भाषणाचा विचार करून त्याचा बिभीषणाने राग धरला नाही. बिभीषण महापार्श्वाला स्वतः काहीच बोलला नाही; उलट शांती आणि मौन धरून, तृणप्राय समजून त्याची उपेक्षाच केली.

बिभीषण काही बोलला नाही हे खरे, पण त्याचा अत्यंत निकटचा प्रमुख हेर असा सेवक मात्र महापार्श्वाला गंभीर वाणीने प्रत्युत्तर देण्यासाठी म्हणाला, ''अरे, बंधू बंधूच्या हितासाठी म्हणजे राजा आणि युवराज यांचे बोलणे चालू असताना तू निष्कारण मधेच कशाला कुंथतोस, तुझ्या ठिकाणी महामूर्खपणाच आहे असे दिसते. दोन्ही धुरीण आहेत, एकमेकांचे आप्त आहेत. अशा वेळी काही स्वहिताचा विचार न करता मधे कधीही बोलू नये; तसे बोलणारा तत्त्वतः महामूर्ख ठरतो. जसा राजा रावण तसा युवराज बिभीषण, त्यांना कठोर शब्द वापरलेस तर तुझा प्राण वाचणार नाही. राजा रावणाचा कनिष्ठ बंधूशी म्हणजे धुरीणांचा संवाद होत असताना तू विनाकारण निंदास्पद बोलून स्वतःचा प्राण का घालवतोस. राजनीती अशी आहे की दोन प्रमुख व्यक्ती बोलत असताना त्यामधे तिसरा जो निंदावाचक बोलेल त्याचा राजाकडून वध केला जातो. राजा आणि युवराज आपल्या हितासाठी राजनीतीप्रमाणे वाद करतात, परस्परांना धिःकारतात, तिथे तू रे चिलटा किती! बंधू-बंधूच्या हितकर, युक्त, निग्रहाच्या बोलण्यातून

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Research Academy

शेवटी संताप व्यक्त होईल; पण तू दुर्बुद्धी धरून, महापार्श्वा निंदापर कशाला बडबडतोस? हनुमंत आलेला पाहून राजादेखत तुम्ही पळालात; आणि आता पराक्रमाच्या गर्जना अत्यंत निर्लज्जपणे करता! तुम्ही राक्षस रणात दीनवाणे, नपुंसकाहून हीन ठरल्यानंतर आता प्रौढीने पुरुषार्थ सांगून दशाननाला आशा लावता आहात काय? श्रीरामाच्या एका वानराने अखया सैन्यासह मारला, ज्येष्ठपुत्र इंद्रजिताचे दमन केले, लंका जाळली; त्या पाला खाणाऱ्या, वनचर अशा वानरापुढून तुम्ही सर्व पळालात. पुढे श्रीराम इथे आला तर त्याचे दुर्धर बाण कोण सहन करील? जर श्रीरामाचा बाण सुटला तर राक्षसकुळाचे निर्दाळण होईल. यासाठीच हितचिंतक बिभीषण बोलला, पण रावण ऐकत नाही. श्रीरामाला सीता अर्पण करून, सर्वांनी सुखात राहावे, अशी बिभीषणाची युक्ती आहे. तू का कुत्सितपणे त्याची निंदा करतो आहेस?'' हे हेराचे भाषण ऐकल्यावर महापार्श्व लज्जित झाला आणि खाली तोंड करून, दीनवाणा होऊन, स्वस्थ बसला.

बिभीषण भावी परिणामांचे निवेदन करतो

बिभीषण, जो सत्त्वयुक्त, धैर्यवंत, वीर्यवंत, माधुर्ययुक्त बुद्धिवंत होता, तो क्षमायुक्त होऊन रावणाच्या हितासाठी विचार सांगत होता. पुनःपुन्हा हितबुद्धीने सांगूनही रावणाच्या मनाला ते मान्य होत नव्हते. तरी पुन्हा बिभीषण सीता श्रीरामाला अर्पण करण्याविषयीच सांगत राहिला. ''प्रहस्त, महापार्श्व, महोदर, कुमार इंद्रजित, शुकसारण, इत्यादी थोर थोर सर्वजण माझी समग्र बुद्धी ऐका. रावणाचे केस ओढून मी अशीच सुबुद्धी सांगेन की आपण सीता श्रीरामाला अर्पण करून राक्षसकुळाचे निर्दाळण चुकवावे. ज्याला भूत लागलेले असते, त्याला मांत्रिक केस धरून हिसडतो, तशीच मी रावणाला सुबुद्धी, सांगेन की सीता श्रीरामाला अर्पण कर. सीता रावणाजवळ राहिली, तर राक्षसांचा कुलक्षय होईल, यासाठी रावणाला केस धरून सुबुद्धी शिकवीन. याचे नाव परम आप्त, सर्व सुहृद यांनी संकटात सापडला असताना त्याला निश्चयाने वाचवावे. सर्व कुटुंब घरात झोपवून, एखाद्या कोणी घराला आग लावायला निघाला असेल, तर त्याला सज्ञान लोक बाजूला करतात, तशी या रावणाची अवस्था आहे. श्रीरामाशी वैर केल्याने सर्व राक्षस मरतील, रावण आपल्या पुत्रांसह मरेल, हे माझे प्रतिज्ञोत्तर आहे.''

यानंतर बिभीषण म्हणाला, ''श्रीरामाच्या एका वानरापुढे सर्वजण पळाले; मग श्रीरामाचा दुर्धर बाण कोण, कसा सहन करील. श्रीरामाच्या बाणाचा कुऱ्हाडा, तेलसाहाणे, खरसाहाणे असे ते बाण, कंकपत्र-बाणांचा झडाडा, या सर्वांना कोण सहन करू शकणार आहे. श्रीरामाचा बाण सुटला की त्या धाकानेच रावण मरेल; अतिकाय, इंद्रजित, कुंभकर्ण, सेनानी, प्रधान हे सर्व मरतील; प्रहस्त, महोदर प्राण सोडतील, शुकसारण धास्ती खाऊन मरतील; सर्व सैन्य मरेल. श्रीरामाचे दुर्धर बाण समुद्र पूर्णपणे शोषून लंकेचे निर्दाळण करतील; रावणाचाही वध करतील हे माझे सत्य वचन आहे. इंद्रादिकांच्या कोटी श्रीरामाच्या बाणाची ओढ सहन करू शकत नाहीत, तिथे हे बापडे राक्षस काय करणार. यासाठी हे लंकानाथा, त्वरित सीता श्रीरामाला अर्पण कर. मी तुझ्या चरणावर मस्तक ठेवून विनवतो, पण आता शंका धरू नको. जरी मनात काही विकल्प धरलास तरी श्रीराम तुझ्याकडून जिंकला जाणार नाही.''

''आता श्रीरामाची प्रतापकथा सांगतो. ती ऐक.'' असे म्हणून बिभीषण रावणाला उद्देशून पुढे म्हणाला, ''जर श्रीराम वेगाने आलाच तर ते सहन करणारा पुरुषार्थ तुझ्याजवळ नाही. गर्वाने वागून विनाकारण प्राण गमावशील. हा माझा सत्य वचनार्थ आहे. रामबाणांचे तेज निवारण होईल असे शस्त्रबळ तुझ्याजवळ नाही. श्रीरामाशी कपट [illegible]

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Research Academy

तर रणात विकल होऊन पडशील. युद्धात श्रीरामाला जिंकण्यास आवश्यक तेवढे बळही तुझ्यापाशी नाही. स्वयंवराच्या सभेत धनुष्य पेलताना सर्वांच्या देखत पडलास. तुझ्या देखत लंकादहन करणाऱ्या हनुमंताला पाहून तुझे प्रधान आणि वीरसमुदाय पळत सुटले; मग राम रणात कसा जिंकला जाईल. तुझे तोंड काळे करून, रामाने धनुष्याचे दोन तुकडे केले. तू बळाचा वृथा अभिमान बाळगणारा निर्लज्ज आहेस. श्रीरामाला दृष्टीसमोर पाहण्याचे धैर्य तुझ्या पोटी नाही, म्हणूनच तू श्रीरामाला मृगापाठीमागे पाठवून सीता सुंदरी चोरलीस. श्रीरामाच्या समोर जाण्यासाठी तुझे काळे तोंड सरसावणारच नाही. दशमुखा, तू व्यर्थ वडवड करतोस. तुला अगदी थोडीही लाज नाही. सीतेचे हरण करण्याचे सामर्थ्य तुझ्या ठिकाणी नाही, म्हणून तू भिकारी झालास; पण तुला कुटीत प्रवेश करवेना, लक्ष्मणाची मर्यादारेषा तुला ओलांडता येईना; असे असून वर श्रीरामाला युद्धात समोर पाहण्याची वडवड करतोस. तुझ्या स्वतःच्या अंगात बळ नाही, आपले सैन्य युद्ध करेल असे म्हणत असशील तर लंकादहनाच्या प्रसंगात हनुमंताने ते सैन्य विकल केले आहे. इंद्रजिताचे अद्‌भुत बळही मारुतीने हताहत केले आहे. पुढे प्रत्यक्ष श्रीरघुनाथ येथे आला तर त्याला तोंड द्यायला कोणात सामर्थ्य आहे! तेव्हा लंकानाथा, तुला सीता कदापी प्राप्त होणार नाही, हे जाणून श्रीरामाला शरण जाऊन जानकी त्याला अर्पण कर.''

बिभीषणाकडून मार्गदर्शक सूचना

बिभीषण म्हणाला, ''लंकानाथा, माझी सुबुद्धी ऐक. अरे श्रीरामाला सीता देण्याने सर्वांचे सर्व प्रकारे कल्याण होणार आहे. शिवाय त्यामुळे कुळाचा घातही चुकेल. मी इथवर नाना प्रकारे विवेकाच्या, युक्तीच्या गोष्टी सांगितल्या. त्या हिताच्या गोष्टी न ऐकता वागाल, तर रणाच्या आवर्तात सापडून व्यर्थ मराल. श्रीराम हा अवतारी असून, चराचरात आलेले पूर्ण ब्रह्मच तो आहे. त्याची पत्नी सीता तुला कधीच मिळणार नाही. जर तू श्रीरामाला बापुडा म्हणतोस तर मग मागे का लपतोस. चोरी करून पुढे पळतोस हे तुझे खोटे कर्म आहे. त्रिशिरा, खर, दूषण यांना मारले तेव्हा श्रीरामाशी युद्ध करायला तुझे सैन्य त्याच्या समोर गेलेच नाही, कारण त्यांच्यात तेवढा पराक्रम नाहीच. श्रीराम सशक्त असो वा अशक्त असो, तुझा तो घात करू शकतो. यासाठी सीता अर्पण करून श्रीरघुनाथ सुखी कर. हा माझा विचार ऐकला नाहीस आणि श्रीरघुनाथाशी वैर केलेस. तर तो निश्चित तुझा घात करील. सैन्य आणि पुत्र यांच्यासह तुला मारील. तुला कळिकाळ जरी साहाय्यकारी झाला तरी अनिवार अशा श्रीरामबाणांनी काळालाही गांजून तो तुझा कंठ छेदील. कळिकाळाचे दात पाडून तो तुला लंकाधीशा निश्चित मारील, हे समजून राहा. ब्रह्मा, इंद्र हे साहाय्यार्थ आले तर श्रीरामाचे बाण त्यांचे निवारण करतील. शिव तर रामाचा सेवक असल्याने त्याच्या समोर येणारच नाही. श्रीराम हा शिवाची ध्येयमूर्ती असताना तू रामाची पत्नी चोरलीस त्यामुळे उमापती शंकर रागावला आहे. तेव्हा तू वाचण्याची शक्यता नाही.''

''चोरी, मारी आणि तीही परस्त्रीच्या संवधात करणाऱ्या, कपटवेषाने संन्याशी बनलेल्या, तुझ्यावर ब्रह्माही रागावला असल्यामुळे तुला वाचण्याची सोय नाही. राजा अधर्मशील असेल तर कळिकाळ त्याचे निर्दाळण करतो; तेव्हा काळाने तुझे सामर्थ्य ग्रासले असणार, म्हणजे तू युद्धामधे मरणार. शक्तींमधली आदिशक्ती अशी सीता तू चोरली आहेस, त्यामुळे सर्व शस्त्रदेवता रागावल्या असून तुझा घात करण्यासाठी उद्युक्त झाल्या आहेत. विवेकविधीने विचार केला तर तुझा

https://archive.org/details/sarayu_lakshmiacademy Bhavan Vedic Trust, Lucknow

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

खरोखर नाश होणार असे दिसते. माझे सांगणे न ऐकल्यामुळे तू युद्धाच्या धुमाळीत मरशील. रावणा, स्वतःचे हित साधणारे माझे सांगणे पुन्हा ऐक. श्रीरामाला शरण जाऊन सीता अर्पण केल्याने सर्वार्थाने कल्याण होईल. श्रीरामाला शरण जाण्याने तुझे जन्ममरण चुकेल, द्वंद्वबुद्धी तुला बांधू शकणार नाही. कृतकल्याण तुला प्राप्त होईल. लंकानाथा, गर्व न करता, श्रीरामाच्या चरणावर मस्तक ठेव, सद्‌भावाने सीता त्याला अर्पण कर, म्हणजे स्वार्थ आणि परमार्थ साधेल.

रावणाचा संताप, बिभीषण-उत्तर

बिभीषणाचे भाषण ऐकून रावण क्रोधवश होऊन अत्यंत संतापला. रागाने लाल झालेले त्याचे डोळे जास्वंदाच्या फुललेल्या फुलासारखे भासले. रावण रागाने बिभीषणाला म्हणाला, "अरे बिभीषणा, नष्टा, चांडाळा, दुर्जना, मला हीनत्व देऊन रघुनंदनाची वाखाणणी करतोस? आम्ही पुत्र, प्रधान यांच्यासह रणात मराल म्हणतोस आणि रामाला विजयस्थानी स्थापतोस, वाः! धन्य आहे तुझी वाणी! राम बापडा मनुष्य, त्याचे माझ्यापुढे काय वर्णन सांगतोस, एका घावात त्याच्या हाडांचा चुरा करीन. तू रडत त्याच्याकडे जा. जशी मांजरे-बोका-आपलीच पिले आपण खातात, तसा तू राक्षस असून राक्षसकुळाचा नाश करण्याचा हेतू बाळगतोस. आम्हाला शत्रूच्या कैवाराने भेडसावतो आहेस आणि आम्हाला माकडे मारतील असे म्हणतो आहेस; तेव्हा तू हीन. दीन, बापडा रामाकडेच सुखाने जा. आता माझे सत्य भाषण ऐक. आजच बिभीषणाचे संबंध तोडा. तो कुळदूषण आणि कुळाचा घात करणारा बिभीषण आज आम्हाला मेला.

बिभीषण रावणाचे भाषण ऐकून हसला आणि म्हणाला, "मुख्य धुरीणालाच मूर्खपण, तिथे शिकवण्याचा काय उपयोग! एखाद्याने धोतऱ्याचे बी खाल्ले म्हणजे तो वाघ, ससे, मासे अशी बडबड करतो, रावणा तुला सीतेच्या अभिलाषेत पडल्याने तसे झाले आहे. रावण सीतेच्या प्राप्तीत दंग, प्रधान गर्वाने मदोन्मत्त, मग स्वहिताचा विचार-विवेक इथे कोणाला मानवणार! कपटाचे काम, कामासक्ती, परक्याची पत्नी, अधर्माने रती, यांमुळे रावणा तुला ससैन्य, सपुत्र, मरण प्राप्त होणार. दुर्गेची अभिलाषा करण्यामुळे शुंभ-निशुंभ सैन्यासह मारले गेले. रक्तबीज चंडमुंड यांचा प्राण जगदंबेने घेतला. त्याच प्रकारे श्रीरामाच्या सीतेची अभिलाषा धरून लंकापती, व्यर्थ मरशील. या मरणावर्तात तू सैन्य आणि पुत्र यांसह मरशील. विषाच्या भोजनाच्या पंक्तीला वसतो त्याला मरण येते, तसा सुबुद्धीचा विचार सोडून जातो तो रावण इथे आहे. श्रीरघुपतीला शरण जाऊन, प्रेमाने सीता त्याला अर्पण केली तर अर्थ, स्वार्थ, परमार्थ प्राप्ती होईल हीच परम युक्ती आहे, हे ऐक. माझी ही सुबुद्धीने सांगितलेली युक्ती न ऐकलीस तर तुला सीता प्राप्त न होता तू गर्वामुळे व्यर्थ मरशील ही माझी निश्चित प्रतिज्ञा आहे. तुम्ही मी मेलो म्हणून मला सोडले, तेव्हा सुहृद असे कोण उरले! स्वहिताची शिकवणही खुंटली! आता मी श्रीरामालाच शरण जातो. त्याला शरण गेल्यामुळे मी कृतकल्याण प्राप्त करीन; तुम्हाला रामबाणाच्या प्रतापाने निश्चित मरण येईल. श्रीरामाला शरण गेल्याने चारी मुक्ती दासी होतात, त्रिजगतात आनंद ओसंडून राहील, अशी प्राप्ती श्रीरामामुळे होते. श्रीराम एकाएकाला मारील, नंतर क्रियाकर्म करायलाही कोणी उरणार नाही. मीच तुम्हाला आवश्यक ती तिलांजली देईन." बिभीषणाच्या बोलण्याचा रावणाला अत्यंत राग आला. त्याने खड्ग हातात घेऊन मुठी आवळल्या, दातांनी ओठ चावले. अंतरात [illegible]ळलेला रावण, कृतान्त, काळाग्नी जसा होऊन बिभीष[illegible]कडे जाऊ लागला.

https://archive.org/details/muktabodhaindologicalresearchinstitute / Bhavan Vedic Trust, lucknow academy

CC-0. In Public Domain. Digitized by Muthulakshmi Research Academy

रावण बिभीषणाला अपमानित करतो

रावणाचे डोळे मुळात लाल होतेच, त्यात पुन्हा त्याला राग आला होता. त्यामुळे त्याचे वीसही डोळे लाखेच्या रंगाप्रमाणे लाल झाले आणि वटारले गेले. त्याचे डोळे आणि आवेश पाहून सर्व लोक घाबरले. क्रोधामुळे त्याच्या डोळ्यातून जणू लाल ज्वाला निघताहेत असे भासले आणि सभेत खळबळ माजली. बिभीषणावर उडी घालण्यासाठी, त्याने म्यानातून खड्ग बाहेर काढले. त्यावेळी विजेच्या तेजाप्रमाणे लखलखाट होऊन सभेतल्या लोकांच्या डोळ्यावर झापड आली. प्रलयकाळच्या मेघांच्या कडकडाटाची गर्जना व्हावी तसा रावण क्रोधाने गरजला आणि बिभीषणावर नेटका प्रहार करण्यासाठी त्याने शस्त्र झाडले. रावणाच्या गर्जनेने सर्व लोक घाबरले, पण बिभीषण नि:शंक मनाने स्वस्थ राहिला. रामनामामुळे त्याला धाक वाटला नाही. रावण त्याला म्हणाला, "माझा स्वामी जो श्रीशंकर, त्याला तू रामाचा सेवक म्हणालास, ते तुझे तोंडच मी छेदीन." एवढे बोलून रावणाने शस्त्र उगारले. नंतर आकाशात उसळी मारून त्याने घाव घातला; पण त्यावेळी त्याचा हात लचकला. श्रीराम आपल्या भक्ताचे रक्षण करतो. तेव्हा चमत्कार असा घडला की रावणाच्या हात लचकण्याने त्याची शस्त्रावरची मुठीची पकड सुटली आणि शस्त्र गळून जमिनीवर पडले. या प्रकाराने रावण घाबरला. त्याचा हेतू उलटला. रावण घाव हाणताना गडबडला आणि सिंहासनाच्या खाली पडला. अशा रितीने राजा रावणाचा पराक्रम व्यर्थ होऊन रामाने भक्ताचे रक्षण केले. रावण पुन्हा खड्ग घेऊ लागला तेव्हा प्रहस्ताने धावत जाऊन त्याचा हात धरला. त्यावेळी राग न आवरून रावणाने बिभीषणाला लाथा मारल्या. तेव्हा बिभीषणाने त्याचे पाय मस्तकी धरून त्यांना वंदन केले आणि म्हटले, "श्रीरघुनाथाला शरण जाण्यासाठी हा मला सुमुहूर्तच सापडला." प्रहस्ताने संतापलेल्या रावणाला शांत करून, खड्ग म्यानात घालून, त्याला स्वस्थपणे सिंहासनावर बसविला.

एखाद्या पर्वतावर वज्राघात व्हावा, तशी रावणाची लाथ बिभीषणाला लागून तो मूर्छित होऊन पडला. बिभीषण सुखदु:खांपासून श्रीरामनामामुळे मुक्त झाला होता. त्याच्या ठायी अगाध शांती असल्याने त्याच्या मनात अणुमात्र क्रोध येत नव्हता. त्यामुळे तो दुर्वचन न बोलता स्वस्थ राहिला. "सुहृद म्हणून सुबुद्धी सांगण्याची गोष्ट आता थांबली आहे. लंकानाथा, आपण स्वस्थ असा, मी श्रीरामाला शरण जातो. आपण स्वत: मला लाथ मारून संतुष्टच केले आहे. मला श्रीरघुनाथ भेटेल, ते भाग्य स्वामी, तुझ्यामुळेच प्राप्त झाले आहे." असे म्हणून बिभीषणाने श्रीरामाकडे जायचे ठरविले.

अध्याय सदतिसावा

बिभीषणाचा रावणाने अपमान केला तरी तो क्रोधाच्या आहारी गेला नाही. स्वत: श्रीरामाचे स्मरण करून तो स्वस्थ राहिला. काही न बोलता, आपला उद्देश विवेकयुक्त विचाराने निश्चित करून, श्रीरामाला शरण जावे असा त्याने चित्तात दृढ निश्चय केला.

बिभीषणाचे विचार मंथन-परिणाम कथन

बिभीषण चार प्रधानांसह स्वत: जायला निघाला त्यावेळी त्याने रावणाला गोड शब्दात सांगितले, "रावणा, आपण सख्खे भाऊ, आपल्यात कसलेही वितुष्ट नाही. मी तुला हिताच्या गोष्टी सांगितल्या त्याचा तुला उगीचच राग आला. लंकानाथाला निंदून, मी स्वपक्षासाठी श्रीरामाची स्तुती केली असली तर माझे अध:पतन झाले असेच तू तत्त्वत: समज. हनुमंतापुढे तुझे सैन्य, तुझ्या देखत पळाले तेच मी दु:खाने आणि प्रांजळपणे तुला सांगितले. त्याचा प्रधानांना, सर्व सैन्याला राग आला. लंकानाथ तूही आपले

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

स्वार्थहित न जाणता माझ्यावर रागावलास. चोरी, मारी, परद्वार हा तुझ्या घरचा धर्म झाला. त्याविषयी जो पश्चात्ताप तुझ्या ठिकाणी निर्माण व्हावा, म्हणून मी स्पष्टपणे बोललो. ही राक्षसांची सभा खोटी आहे, मी स्वहिताच्या गोष्टी सांगितल्या. सर्व उरफाटे ठरून तुम्ही माझ्याविषयी महाक्रोध धरला आहात. ज्याप्रमाणे ज्वर आलेल्याच्या तोंडाला दूध कडू लागावे, तसे इथे झाले. रावणा, स्वहिताला असुख मानलेस."

"लंकानाथा, अत्यंत रागाने, तू मला लाथा मारल्यास, तर त्यामुळे श्रीरघुनाथ जिंकला गेला का? तुला तरी स्वस्थता लाभली का? क्रोध हा जगामधला मोठा अपकारकर्ता आहे. त्या क्रोधानेच तुझ्या ठायी वस्ती केली; त्यामुळे विवेकाचा नाश झाला, आणि स्वहित अधिकच दुरावले क्रोधाचे अनुसरण करणारा, क्रोधाविष्ट होऊन काही अन्याय करून बसतो. क्रोध अत्यंत अपकारी असल्याने त्याच्यावर कोणीच रागावत नाही. उन्मत्त हत्ती जिवानिशी मारतो, त्याला सिंह जमिनीवर पाडतो; परंतु क्रोधावर क्रोध करणारा कोणीही वीर जगात आढळत नाही. क्रोध एकटा एक असा आहे की, जो चारी पुरुषार्थांचा घात करणारा आहे. त्याचाही विवेक आणि क्रोधाचा दुष्ट परिणाम ऐक. मनात क्रोध आला की तो स्वधर्म-कर्माला त्रास देतो. तो अर्थ, स्वार्थ यांचा विध्वंस करतो. क्रोधामुळे मोक्ष कदापी मिळणार नाही. स्त्री-पुरुष एकांतात असताना क्रोध आला, तर त्यांच्यात कलह निर्माण होतो आणि त्या भांडणात्, धक्काबुक्कीत रात्र जाते; असा तो क्रोध मुळात कामविघातक आहे. धर्मविषयात क्रोध आला तर मुख्य ब्राह्मणाची निंदा केली जाते. दुसऱ्याला दोष देण्याच्या बोलण्यात क्रोधाने प्रवेश केला म्हणजे धर्मसिद्धी होत नाही. क्रोध धर्माचा नाश करतो, कर्माची निंदा करतो. क्रोध पापी आणि दुर्बुद्धी असणारा, त्यामुळे निंदाव्यंजक बोलायला लावतो. तो पित्याची निर्भत्सना करवतो, मातेला दासी म्हणवतो. क्रोधाजवळ अधर्म असून तो आपल्या स्वधर्माचा नाश करतो. बंधू हा अत्यंत जवळचा आप्त, पण अर्थस्वार्थाने क्रोधायमान झालेला एक बंधू दुसऱ्या बंधूला लाथ मारायचा अनर्थ घडवतो. उत्तम अशा अर्थाच्या प्राप्तीत क्रोध हा मुख्य विश्वासघात करणारा; त्यामुळे अर्थामध्ये तो अनर्थ हे निश्चित जाणून ऐस. लंकेशा, जर अंधारात सूर्य बुडेल तरच क्रोधामुळे मोक्ष घडेल. काम, क्रोध, लोभ जेव्हा झडून जातात तेव्हा मोक्ष प्राप्त होतो. धर्म, अर्थ, काम, मोक्ष ह्या चारी पुरुषार्थांना क्रोध लुबाडतो. असा क्रोध रावणा तुझ्यामध्ये वस्ती करून आहे आणि त्यानेच तुझ्याकडून मला लाथा मारविल्या."

"अरे, मला लाथा मारून तू आपला कोणता स्वार्थ साधलास? किंवा काय परमार्थ प्राप्त केलास? श्रीरामाचा द्रोह करून अधःपाताला जाशील. श्रीरघुनाथाची कृपा एवढी मोठी की तू मला लाथा मारल्यास तरी माझ्या चित्तात क्रोध आला नाही. श्रीरामामुळे आत्मशांती मिळते. उलट तू लाथा मारल्यामुळे मी परम विरक्तपण मिळवले; स्वराज्य, सुहृदता सोडून मी आता श्रीरघुनाथाला शरण जातो आहे. ज्याप्रमाणे ध्रुवाला सावत्रभावनेने लाथा मारल्या आणि त्यामुळे तो परम स्वार्थाला प्राप्त झाला, त्याप्रमाणेच रावणा तुझ्या लाथा याही मला श्रीरघुनाथाची प्राप्ती करून देणाऱ्या ठरतील. श्रीराम हा कृपाळू, दयाळू, भक्तवत्सल आहे, ही भाषा तू समजणार नाहीस, कारण तुला क्रोधाने ग्रासले आहे. हे लंकानाथा, अजूनही तू गर्वाचा त्याग करून श्रीरामाला सीता अर्पण केलीस तर निजस्वार्थ प्राप्त करशील; अन्यथा वृथा मरशील. श्रीरामाचे बाण सुटल्यावर तुझे इथे कोण रक्षण करणार आहे? हनुमंताला भिऊन पळालेल्या राक्षसांचा कसला आलाय पुरुषार्थ आणि पराक्रम!"

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Muthulakshmi Research Academy

माता कैकसी, रावण, राक्षस यांच्या प्रतिक्रिया

बिभीषणाच्या भाषणाने रावण मनात खोचला. क्रोधामुळे आपला बंधू दुरावला म्हणून तो कंपायमान झाला. मनात म्हणाला, "माझी बुद्धी पूर्णपणे अपक्क आहे. मी लाथा मारल्याने माझा बंधू सखा बिभीषण मला अंतरला आणि श्रीरामाला शरण गेला." त्याचवेळी विभीषणाच्या मनात आले की आपण प्रथम मातेला वंदन करून, तिला सर्व वृत्तान्त सांगून, मग श्रीरामाला शरण जावे. कुलक्षय होणार असे पाहून, रावणाला काही सुबुद्धी सांगण्यासाठी कैकसी मातेनेच विभीषणाला पाठविले होते. त्यानुसार हिताच्या गोष्टी सांगितल्यावर, रावणाला क्रोध येऊन त्याने बिभीषणाला लाथा मारल्या; हे ऐकून माता अतिशय दुःखी होऊन म्हणाली, "बिभीषणा भाग्यवंता, तू रघुनाथ पावलास आणि रावणाचा समस्त कुळासह नाश ओढवला." माता बिभीषणावर संतुष्ट झाली. ती म्हणाली, "तुझ्यामुळे माझी कूस धन्य झाली. तू श्रीरामाशी जवळीक करून सर्व कुळाचे भूषण झाला आहेस. तुझ्यामुळे कुळ पावन झाले, वंश सनाथ झाला, मीही तुझ्या श्रीरामाच्या सेवेमुळे नित्यमुक्त झाले." हे मातेचे मनोगत ऐकल्यावर बिभीषणाने लोटांगण घातले आणि तिच्या चरणांना त्याने वंदन केले. मग तो श्रीरामाला शरण जाण्यासाठी आकाशात झेपावला. काही काळ अंतराळात सावकाश आणि स्वस्थ राहून रावणाला म्हणाला, "रावणा, तू खरोखर माझा सखा आहेस. मोह, ममता यांचे सखेपण हे हीन, दीन आणि गौण असते. क्रोधामध्येच पूर्ण कृपाळूपण असल्यामुळे रावणच माझा सत्य सखा आहे. मला आपल्या लाथेने मारून रघुनाथाकडे शरणार्थ धाडलेस, असा तुझ्यासारखा सखा तत्त्वतः तिन्ही लोकात नाही. कोटी जन्म-मरणाची बेडी तू लाथा मारून तोडलीस. असा तुझ्या कोपकृपेचा प्रकार आहे. त्यामुळे श्रीराम जोडला गेला." अशी बिभीषणाने केलेली स्तुती ऐकून रावण मनातून वचकला. त्याला पश्चात्ताप होऊन, 'माझी बुद्धी पूर्णपणे अपक्क म्हणूनच सखा बिभीषण मला दुरावला आणि श्रीरामाला शरण गेला.' असे त्याच्या मनात आले. सैनिक, सेनानी, प्रधान सर्व जण बिभीषणाची स्तुती करू लागले. 'धन्य बिभीषणाची शांती! त्याला अणुमात्र क्रोध आला नाही. रावण निष्कारण संतापला. धन्य बिभीषणाची स्थिती आणि कीर्ती! हा श्रीरामाला शरण गेला आहे तेव्हा तो रामाला राक्षसांच्या घाताची युक्ती सांगेल, म्हणजे राक्षसांचा अंतकाळ आलाच.' असे त्यांना वाटले.

बिभीषण चार प्रधानांसह श्रीरामाकडे

बिभीषणाने पुन्हा एकदा अखेरची विनंती म्हणून रावणाला म्हटले, "तुझ्या मनात जी जी इच्छा असेल ती ती मला सांग, श्रीराम हाच सर्वार्थाने सिद्धिदाता आहे. मला लाथा मारून कृपा केलीस आणि श्रीरघुनाथाकडे पाठवलेस. आता माझा प्रत्युपकार मी सांगतो तो ऐक. दशशिरा, मीच अंतकाळचा तुझा सोयरा-आप्त-आहे. तू श्रीरामाचा द्वेष केलास तरी तुला मी नरकाच्या दारात जाऊ देणार नाही. शेवटी परम मुक्ती अशी श्रीरामनामाची कीर्ती आहे. श्रीरामाची भक्ती केल्यास वंशस्थांना उद्धारगती प्राप्त होते." एवढे सांगून बिभीषण रावणाला नमन करून, चार प्रधानांना बरोबर घेऊन, श्रीरामाला शरण जाण्यासाठी निघाला.

चार पुरुषार्थ जसे जीवाला नित्य मुक्त करतात, तसे चार प्रधान बिभीषणाला सतत साहाय्य करत; किंवा चारी वेद जसे उपनिषदातून बोध करतात आणि जीव परमानंद पावतो तसे ते प्रबुद्ध प्रधान होते. जशा चार मुक्ती जिवाला ब्रह्मप्राप्ती करून देतात, तसे ते परमार्थी बिभीषणाला अनुसरणारे होते. तशाच प्रकारे चारी वाणी जशा नित्य-अनित्य विवेक करून, जीवाला

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

साक्षात्कारापर्यंत नेतात, तसे ते चार प्रधान होते. अशा त्या चार प्रधानांना घेऊन मेरुमंदारासारखा बिभीषण येताना पाहून वानरगण खवळले.

बिभीषणाला पाहून वानरसेनेत संशय

बिभीषण हा मेरुशिखराच्या आकाराचा राक्षसेश्वर आकाशातून येताना पाहून, जमिनीवर असलेले वानर तातडीने उठले. बिभीषण इंद्रियनिग्रही, शांत, विवेकवैराग्याने विरक्त असून, श्रीराम दर्शनासाठी अनुरक्त असल्यामुळे प्रीतियुक्त झाला होता, त्यामुळे तो लाल दिसत होता. जेव्हा रजतमाचा धूर निघून जातो, तेव्हा लखलखीत चैतन्याग्नी भासतो, तसा तो तेजस्वी बिभीषण आकाशात वानरांना भासला. तो पुढचा वीर धैर्याने विराजमान आणि मागचे चारी प्रधान हे आम्हाला मारण्यासाठी आयुधांसह आले आहेत; ढाल, तलवार, गदा धारण केलेले, धनुष्यबाण, पाठीला बाणांचा भाता ही आयुधे घेऊन ते राक्षस आम्हाला मारायला धावून आले आहेत; आमचा घात करण्यासाठी नेमलेले ते पाच जण आले आहेत; तेव्हा त्या पाचांचे इथे निर्दाळण केले, तर रामकार्यार्थ साधेल. जो यांचा घात करील तोच समर्थ पुरुषार्थी, तोच श्रीरामाचा आप्त, मग युद्धकंदन कुठले? या पुढे आलेल्या पाचांना मार्गातच मारून जर चकाचूर केला, तर मग अन्य राक्षस मरायला येणार नाहीत, असा वानरांनी निश्चित, दृढ विचार केला. राक्षसांची जात पाहून त्वरित मल्लयोद्धे उठले. त्यांनी शाल, ताल, शिळा, पर्वत हातात घेऊन ते मारायला सरसावले. सर्व वानरांनी मिळून भुभुःकार केला. त्यामुळे सेनासागर खळबळला आणि आकाश त्या आवाजाने कोंदले. 'पाडा, पाडा' म्हणत, एकापुढे एक उड्या मारत, वानरगण आलेले पाहून बिभीषण दचकला. त्याच्या मनात आले, 'श्रीरामाला शरण जाताना मधेच हे वानर मला मारतील. त्यामुळे ना ही गती, ना ती गती, मुख्यत्वे ग्रहगती अशी माझी अवस्था होईल. मुख्य विरोधाशी संबंध म्हणजे मी रावणाचा कनिष्ठ बंधू आहे. वानरांनी माझा वध करू नये म्हणून श्रीरामानेच माझे मरण चुकवावे. श्रीरामनामाचे स्मरण केल्याने दीनांचे मरण चुकते. मीही श्रीरामाचा अनन्यशरण भक्त असून वानरांचे हे विघ्न का यावे. इथे हनुमंत भेटला असता तर तो माझा परम आप्त असल्याने, त्याने श्रीरामाची आणि माझी भेट घडविली असती. त्यामुळे वानरांकडून होणारे कंदन चुकले असते. आता इतर गोष्टी सोडून, वानरांना शरण जाऊन, बिभीषण त्यांना लोटांगण घालून म्हणाला, "श्रीरघुपतीला अनन्य शरण आलो आहे, तर तुम्ही युद्धासाठी का धावता?" नंतर बिभीषणाने वानरांचा आवेश पाहून आकाशातूनच मोठ्याने हाक घातली. त्यामुळे वानरवीर दचकले, त्यांनी मग तो राक्षस काय म्हणतो ते ऐकायचे ठरविले. मग बिभीषण सुग्रीवाला उद्देशून बोलला.

"मी श्रीरामचंद्राच्या पायी शरण आलो आहे. वानरराज सुग्रीवा, वानरांचा तू स्वामी आहेस. मला शरणागताला वानर मारायला येत आहेत, त्यांना तू आवर. मी रावणाचा धाकटा भाऊ बिभीषण या नावाने प्रसिद्ध आहे. यासाठी माझा वध कराल, तर मी शुद्ध मनाचा शरणार्थी आहे. इथे जर हनुमंत असता तर त्याने माझा वृत्तान्त सांगून, माझी श्रीरामाशी भेट घालून दिली असती. मी शरणागत आहे असे त्याने श्रीरामाला सांगितले असते. श्रीरामाचे सत्य व्रत आहे की शरणागताला मारू नये. हे सर्व वानर मला मारावे म्हणून उद्युक्त झाले आहेत. त्यांना तू थोपव. सुग्रीवा, मी तुझ्या पायावर मस्तक ठेवतो; तू माझा वृत्तान्त श्रीरामाला सांग. त्याला म्हणावे, रावणाचा कनिष्ठ बंधू बिभीषण, चौघे प्रधान समवेत घेऊन श्रीरामाला शरण आला आहे. नंतर श्रीरघुनाथ सांगेल त्याप्रमाणे कार्यवाही करावी. कौसल्येचा पुत्र, कौसलेन्द्र श्रीरघुनाथ, त्याला अनन्यभावे मी शरण आलो आहे. माझे नाव बिभीषण आहे."

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

सुग्रीवाला बिभीषण सत्यतः शरण आला आहे हे मान्य झाले मग तो स्वतः श्रीराम-लक्ष्मणांकडे गेला आणि त्यांना वंदन करून त्याने बिभीषणाच्या आगमनाविषयी सांगितले. "श्रीरामाला सीता अर्पण करावी असा हिताचा उपदेश केल्यावर लंकानाथाने बिभीषणाला लाथा मारून अनाथाप्रमाणे हाकलला. नगरात दवंडी पिटून, लंकानगरीतून बिभीषणाला हाकलताना रावण म्हणाला, 'जा तू श्रीरामाला शरण जा.' श्रीराम पक्षपाती झाल्यावर कसा लंकेत येईल; राक्षसांवर कशी ख्याती करील, याचा अनुभव ऐका. जो बिभीषण सद्भावाने श्रीरघुनाथाला शरण आला आहे. त्याचे काय करायचे? याविषयी श्रीरामांनी आज्ञा करावी. चौघे प्रधान घेऊन तो शरण आला आहे. श्रीरामाचे चरण पाहताच काया-वाचा-मने तो आनंदित झाला आहे."

बिभीषणाच्या आगमनावर प्रतिक्रिया

बिभीषण भेटीला आल्याचा श्रीरामाला अत्यंत आनंद झाला. रामाने सुग्रीवाची पाठ थोपटली आणि आपल्या मनातला आनंद आणि प्रेम व्यक्त केले. बिभीषणाच्या मनातील शरण येण्याचा अनन्यभाव श्रीराम अंतर्यामी जाणून होता. कारण राम हा प्रत्येकाच्या हृदयात वास करतो. श्रीराम जरी बिभीषण अत्यंत सरळपणे शरण आल्याचे जाणत होता, तरी त्या आत्मारामाने सुग्रीवाला क्रमवार राजधर्म सांगितला. हनुमंत इत्यादी प्रमुख वानर प्रधान बोलावले. त्यांना बिभीषण शरण येतो आहे याचे लक्षण पाहायला सांगितले. नंतर बिभीषणाचे मनोगत खरे की खोटे याचा निश्चित निर्धार करायला त्यांना बोलावले आहे असे सांगितले. सुग्रीव हा मुख्य असल्याने तो प्रथम म्हणाला, "हा रावणाचा बंधू आहे, तेव्हा याचा अवश्य वध करावा." कुमुदही 'मारावा' असेच म्हणाला. नळ, नीळ म्हणाले, "विषापोटी विषच असते. हा रावणाचा कनिष्ठ बंधू कपटीच असणार तेव्हा लगेच मारावा." गज, गवय यांनी "हा शत्रूचा बंधू असून शरण येण्यातही त्याचे कपट असणार. याचा स्वीकार न करता याला परत लंकेत घालवून द्यावा." मैंदाने "हा कपटी रावणाचा बंधू असल्याने त्याला मारावा," असे सांगितले. द्विविदाने तसेच म्हटले. सुषेण, पनस, दधिमुख या तिघांनी एकत्रितपणे सांगितले की, "याला जिवंत ठेवल्याने मोठेच दुःख ओढवेल, म्हणून याला अवश्य मारावा." नंतर जांबुवंत बोलला, "बिभीषणाला इथे बोलवावे. त्याचे वर्तन पाहून त्याचे मनोगत समजून येईल. स्थिती, गती, गमनागमन, डोळे, तोंड, संभाषण यावरून दुसऱ्याचे म्हणजे शत्रूचे लक्षण चिकित्सक दृष्टीने पाहिले जाते." अंगद अत्यंत कौतुकाचे भाषण करताना म्हणाला, "एकटा एक बिभीषण बापडा, त्याच्याकडून युद्धप्रवीण नेटके वानरसैन्य हरणार! धन्य आहे वानरांची! शरण आलेल्या एका राक्षसाला जो तो मारा, मारा म्हणतो आहे, हा काय खरा पुरुषार्थ म्हणावा!"

श्रीरामाच्या मनात काय आहे हे कोणालाच समजले नव्हते. वानर व्यर्थ काहीतरी बोलत होते. "पलीकडे हनुमंत बसला आहे. त्याचा विचार ऐका. मारुतीने संपूर्ण लंका शोधली होती. बिभीषण सज्जन आहे की दुर्जन आहे याचे लक्षण मारुती जाणतो. त्याला माहिती नाही असे लंकेत काही नाही. तो सर्व काही इत्थंभूत सांगेल." असे सांगून श्रीरामाने हनुमंताला म्हटले, "हनुमंता, शरणागत बिभीषणाचे काय करायचे ते तत्त्वतः मला सांग." आपल्या स्वामीचे बोलणे ऐकून मारुतीने दंडवत घातले आणि श्रीरामाचे चरणवंदन करून तो योग्य ते बोलला.

बिभीषणाबद्दल मारुतीचे निवेदन

हनुमंत सर्वांगाने सज्ञान, सर्वेंद्रियांनी विशेष ज्ञानी, परिपक्व आणि अत्यंत योग्य तेच बोलणारा

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

असून, तो श्रीरघुनंदनाला सुख देणारा होता. त्यामुळे तो श्रीरामाचा आवडता होता. त्याचे बोल अमृताहून गोड आणि वेदशास्त्राची त्याला आवड असल्यामुळे श्रीरामाला त्याचे बोलणे ऐकायला आवडत होते. हनुमान बोलणार म्हणून वानरगणांनी कान टवकारले, सर्वजण मारुतीच्या तोंडाकडे एकटक पाहू लागले. ज्याप्रमाणे बृहस्पती निरूपण करू लागला म्हणजे देवसमुदाय एकाग्र होऊन ऐकतात, त्याप्रमाणे हनुमंताचे सांगणे वानरगण एकाग्र होऊन ऐकू लागले. मारुतीच्या बोलण्यातली वाक्यांची मांडणी, वानरांना चकित करी, त्याच्या बोलण्यात सत्यत्त्वाची प्रौढी असल्याने ते ऐकण्यात श्रीरामाला गोडी वाटत होती. खिरीवर, तुपावर, साखर असावी तसे मारुतीचे बोलणे अत्यंत मधुर होते. श्रीरामाचा अनुचर, सत्य बोलणारा, म्हणूनही श्रीरामाला तो सुखकर होता. हनुमंत म्हणाला, "श्रीरघुनाथा, सावध चित्ताने ऐक. बिभीषणाच्या हृदयातले न समजल्यामुळे वानर-प्रधान काहीतरी बोलत आहेत. त्यांची कल्पना मिथ्या आहे. बिभीषणाचा विचार न कळल्याने, शरण आलेला तो शत्रूचा बंधू आहे, तो आमचा वध करील हे वानरांचे बोलणे खरे नाही."

"त्रिकूटावर लंकेचा शोध घेताना, मी स्वतः पाहिले आहे की बिभीषण कपटी नाही. माझे हे सत्य वचन आहे. बिभीषण हा शठ, नष्ट कपटी नाही, हे माझे सांगणे निर्दुष्ट म्हणजे प्रांजळ आहे." हनुमंताने सर्व लंकेचा शोध घेताना राक्षसांचे हृद्‌गत जाणले होते. त्याला धरूनच तो बोलत होता. त्याच्या सांगण्यात समर्थ सत्य होते. श्रीरामाची सेवा आणि तप यांच्या बळावर, हनुमान सर्वांच्या अंतरात खेळत असतो. त्यामुळे त्याला सत्य-असत्य समजून येते आणि तो सत्यच मधुर, प्रांजळ शब्दात सांगतो. "वानर-प्रधान जे म्हणतात की बिभीषण कपटी आहे, ते त्यांचे म्हणणे खरे नाही. बिभीषणाची भावना शुद्ध आहे. त्याची धर्मस्थिती, अगाध कीर्ती, भगवद्‌भक्ती हे सर्व शुद्ध भावाचे आहे. तो कुकर्म, अधर्म करणारा नाही हे माझे सत्य वचन आहे. बिभीषण हा धर्ममूर्ती असून त्याच्या ठायी नित्य निवृत्ती, नित्य शांती आणि शुद्ध भाव आहे. त्याने युवराजपदाचा, आपल्या बंधूचा-रावणाचा-त्याग केला असून युद्धाच्या वेळी तो शरण आला आहे. तेव्हा त्याला आपण मारू नये. त्याच्या मनात प्रथमपासून श्रीरामाविषयी प्रेम होते; त्यात रावणाने लाथा मारल्या, म्हणून तो श्रीरघुनाथाला भावार्थाने आणि स्वानंदाने शरण आला आहे. जो भावार्थी आणि कपटीही आहे, तो जर म्हणाला की मी शरण आहे तर त्याला मारण्याने सूर्यवंशाला दूषण लागेल. शिबी, हरिश्चंद्र, रुक्मांगद हे सूर्यवंशातले धर्मविद म्हणून शोभतात. अशातही जर आपण शरणागताचा वध केला, तर त्रिलोकात ते विरोधी वर्तन ठरेल. स्वर्गात दशरथ रागावून म्हणेल, श्रीरघुनाथ अधर्मी झाला. शरणागताला मारू नये हाच निश्चितार्थ आहे श्रीरामा."

हनुमंत पुढे म्हणाला, "एकटा एक बिभीषण त्याचे आम्हाला काय भय. जे वानरगण त्याचा वधच करावा म्हणतात त्यांचा पराक्रम तुच्छ आहे. आकाश तुटून पडले तरी श्रीरघुनंदन गडबडत नाही, तेथे हा बिभीषण बापडा काय आहे. त्याचे काय भय बाळगायचे." असे हनुमान म्हणाल्यावर श्रीरामाला संतोष झाला. नंतर हनुमंताने म्हटले, "बिभीषणाच्या संगतीमुळे राक्षसांच्या दुर्गम गती श्रीरामाला वश होतील. त्याने विजय प्राप्त होईल. जारण-मारण करणारे, विघ्ने निर्माण करणारे, बिभीषणामुळे श्रीरामाला वश झाल्याने तो विजय मिळवील. रात्री-अपरात्री जवळ असणारे, अकस्मात घाला घालून मारणारे जे राक्षस त्यांचा बिभीषणाच्या साहाय्याने नाश करून विजयप्राप्ती श्रीराम करू शकेल. त्याच्या जवळ असण्याने अलक्ष, अगम्य, अतर्क्य गतीचे, पृथ्वीच्या आडून मुख्य योद्धे चोरणारे राक्षस सापडून विजय मिळेल. जी मोठी संकटे, जी स्थाने दुर्घट, जेथे जाताना

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sayajirao Foundation Research Academy eGangotri

अत्यंत कष्ट होतात, ती सर्व बिभीषणाच्या संगतीने सपाट होऊन श्रीरामाला विजय मिळेल. तेव्हा बिभीषण हा शुद्ध बुद्धीचा, परमार्थी असल्याबदल कोणताही संशय मनात न ठेवता त्या शरणागताचा शुद्ध भाव लक्षात घ्यावा. लंकेत शोध घेत असताना मी स्वतः माझ्या दृष्टीने जे पाहिले त्यावरून मी त्रिवार सत्य सांगतो की बिभीषण कपटी नाही. श्रीरामा, मी हे तुझ्या चरणांना स्पर्श करून, तुझी शपथ घेऊन सांगतो की बिभीषण कपटी नाही हे सत्य आहे."

मारुतीच्या कथनाने श्रीरामाला आनंद

हनुमंताने बिभीषणाविषयी केलेले स्पष्टीकरण ऐकून श्रीरामाला मनातून आनंद झाला. त्याने मनातील हर्षाला आतून आलिंगन दिले आणि सृष्टीत मावणार नाही असा आनंद अनुभवला. जे श्रीरामाच्या मनात होते तेच मारुती बोलला याचाच श्रीरामाला अत्यंत आनंद होता. श्रीराम आपल्याशीच म्हणाला, 'मला मारण्यासाठी कपटी रावण जरी शरण आला तरी माझे अभयदान असेल; मग बिभीषणाचा त्याग का करायचा? बिभीषण माझा आत्मा, जीवप्राण, माझ्यामुळे तो चिरंजीव, त्याला जन्म-मरण नाही. आता त्याला त्वरेने बोलावून घ्या. लंका माझे राज्य झाले असे समजून त्याला ती लंका तत्त्वतः दिली. मी रावणाला मारून बिभीषणाला लंकेचे राज्य दिले. त्याची शरणागती प्रेमपूर्ण आहे, तो स्वतः स्वतःला विसरला आहे." हे श्रीरामाचे विचार समजल्यावर हनुमानाने त्याच्या चरणांवर लोळण घेतली. "जे माझ्या मनाने ठरवले होते, तेच निश्चयाने श्रीरामाच्या वाणीतून प्रकटले." "माझ्या भक्ताला भेटण्यासाठी माझे बाहू स्फुरण पावत आहेत. हनुमंता शरणागत बिभीषणाला त्वरित बोलाव." श्रीरामाने असे म्हटल्यावर सुग्रीवाने मान खाली घातली, वानर लाजेने चूर झाले, श्रीराम तेवढा आनंदित झाला. बिभीषणाचे भाग्य थोर, श्रीराम पूर्ण संतोष पावला. आता दोघांची दृष्टभेट कशी होईल, दोघे कशा नी काय गोष्टी करतील, ती अनुपम कथा यापुढे ऐका.

अध्याय अडतिसावा

हनुमंताने बिभीषणाचा जो वृत्तान्त सांगितला, त्यामुळे श्रीरघुनंदन संतोषला. त्याने मग सुग्रीवादी वानरगणांना धर्म सांगितला. "सद्भावाने पूर्णतया अथवा कपटानेही शरण आलेल्या शरणागताला मरण सर्वथा नाहीच. हे माझे सत्य भाषण आहे." असे म्हणून श्रीरामाने त्यानंतर शरणागताला कसे वागवले जाईल ते सांगितले.

"माझा घात करण्यासाठी जरी रावण शरण आला, तरी त्यालाही माझ्याकडून अभयहस्तच मिळेल." असे रामाने वानरगणांना सांगितले. "शरणागतापासून आम्हाला कधीही मरण येणार नाही हे तुम्ही निश्चित समजा. हे माझे सत्य भाषण तुम्ही लक्षात घ्या. शरणागतावर रागावून जो कोणी हात उगारेल, त्याची मी होळी करीन, त्याच्यावर बाणांचा वर्षाव करीन. जो कोणी माझ्या शरणागताला हात लावील त्याचा मी निश्चिपणे घात करीन." श्रीराम कृपेचा कल्लोळ, शरणागतवत्सल, दीनदयाळ, प्रेमप्रांजळ आहे. नंतर श्रीराम स्वानंदाने गर्जना करत म्हणाला, "जो बिभीषण शरणागत आहे त्याला माझा अभयहस्त आहे. त्याला त्वरित माझ्या भेटीला आणा." श्रीरामाने असे म्हणताच सुग्रीवासह हनुमान आकाशात उडाला. त्यांच्याबरोबर वानरांचा समुदाय होता. श्रीराम त्यांना उद्देशून म्हणाला, "रावण जर शरण आला तर त्यालाही सर्वथा माझा वरदहस्त लाभेल. जर लंकानाथ रावण शरण आला तर त्याला बिभीषणाहून अधिक सुखी करीन हे तत्त्वतः सुग्रीवा समजून घे. रावण किंवा बिभीषण हे दुष्ट,

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Research Academy

नष्ट, दुर्जन कसेही असले तरी मला ते शरण आले की माझे त्यांना अभयदान मिळेल. जो शरणागताला भितो, मरणाचे भय ज्याच्या चित्तात असते, तो कधी जय मिळवत नाही हेही तू सुग्रीवा तत्त्वतः जाण. ज्याच्या पोटात भय आहे तो शरणागताला निर्भय कसे करील.'' श्रीराम स्वतः निःशंक आणि निर्भय होता. श्रीरामाचे निवेदन ऐकून सर्वजण आश्चर्य करू लागले. 'तो श्रीराम मोठा पराक्रमी, निधडा, निःशंक आहे, त्याला चिंता नाही, मरणभय नाही, तो शरणागताचे रक्षण करायला समर्थ आहे हे सर्वांना पटले.' श्रीराम समर्थ आहे असे आपसात बोलत सर्वजण शरणागत बिभीषण होता तेथे जमले.

बिभीषणाचे स्वागत श्रीरामाची आनंदस्थिती

बिभीषण दिसताच सुग्रीवाने त्याला आलिंगन दिले. 'बिभीषण भाग्यवान आहे' अशा शब्दात वानरगणांनी त्याचे स्वागत केले. नळ, नीळ, अंगद, जांबुवंत अशा सर्वांनी भाग्यवंत बिभीषणाला आलिंगन दिले. हनुमंताला पाहून बिभीषणाला अत्यंत उल्हास झाला; त्याने हनुमंताला प्रेमपूर्वक आणि अत्यंत सद्‌गदित होऊन, चरणावर मस्तक ठेवून वंदन केले. "आता माझ्यासाठी तूच माता, पिता, बंधू, भगिनी सर्व काही आहेस. तुझ्याशिवाय त्रिभुवनात दुसरा कोणी मला आप्त नाही.'' बिभीषणाने मग हनुमंताला सर्व रावणकथा सांगितली आणि म्हटले, "स्वराज्य, आप्त, सुहृद, माता या सर्वांचा त्याग करून मी श्रीरामाला शरण आलो आहे.'' हे बोलताना आनंदाने त्याचा गळा दाटून आला; सुख-स्वानंदाच्या मिठीत पडून तो मूर्च्छित होऊन पडला. त्याची ती अवस्था पाहून हनुमानाला हर्ष झाला आणि त्याने स्वानंदाने त्याला उचलून आलिंगन दिले. हनुमंताच्या आलिंगनाने दोघांची शरीरे एकमेकांना भिडली; त्यामुळे बिभीषण सुखसंपन्न आणि समाधानी झाला. तेव्हा हनुमंत कृपाळूपणे म्हणाला, "बिभीषणा, तू खरोखर भाग्यवान आहेस. कृपावंत, कृपाळू श्रीरघुनाथ तुझ्यावर संतुष्ट झाला आहे. श्रीरामाने तुला भेटीसाठी बोलावले आहे. तर लगेच चल.'' हनुमंताने मग हातांनी धरून श्रीरामाच्या भेटीसाठी त्याला चालविले. तेव्हा वानरगणांना आनंद झाला, त्यांनी श्रीरामनामाचा गजर करत सर्व आकाश भरून टाकले.

श्रीराम शरणागत बिभीषणाला भेटण्यासाठी उत्सुक बनला होता; आलिंगनासाठी त्याचे बाहू स्फुरण पावत होते; त्याचे चित्त आल्हादाने भरून गेले होते; डोळे शुभ चिन्हे सुचवीत लवत होते; अष्टांगे हर्षाने थरथरत होती; शरणागताच्या भेटीचा आनंद मनात दाटला असून त्याला श्रीराम प्राप्ती व्हावी अशी मनात उत्सुकता होती. शरणागताला पाहण्यासाठी डोळे, पापण्याही न हालवता, एकटक, स्थिर झाले होते. अशा उल्हसित मनाने श्रीराम बिभीषणाच्या येण्याची उत्कंठेने वाट पाहात होता. तिकडे हनुमंत बिभीषणाचा हात धरून आणि सुग्रीवादी सर्व वानर रामनामाची गर्जना करत, येत होते. श्रीरामाचे दर्शन होताच बिभीषणाने दंडवत घालून रामाचे पाय मस्तकावर धारण केले. त्यावेळी तो स्वतः स्वतःला विसरला. युवराजपद, संपत्ती, स्त्री, पुत्रसंतती, राक्षसजात या सर्वांचा रामदर्शनाने त्याला विसर पडला. बिभीषण जीव-जीवित्व, देह-अहंभाव, शिव-शिवत्व, हे सर्व श्रीरामाला पाहताच विसरला. श्रीरामाला पाहताच सुख-दुःखादी द्वंद्वाचे दुःख; ज्ञेय, ज्ञाता, ज्ञान ही त्रिपुटी; स्वदेह आणि सृष्टी विसरून तो आनंदमय झाला. अशा अवस्थेत लोटांगण घातलेला बिभीषण रामाला अनन्यभावाने शरण जाऊन समाधान पावला. त्याचे चौघे प्रधान हे मन, बुद्धी, चित्त, अभिमान असे श्रीरामाला शरण आले. धर्म, अर्थ, काम, मोक्ष हे साधक जसा ब्रह्मार्पण करतो, तसे ते चौघे श्रीरामाला शरण गेले. साधन चतुष्टयसंपत्ती (नित्य-अनित्य-

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

वस्तु-विवेक, वैराग्य, शमानिषट्क-शम, दम, उपरति तितिक्षा, श्रद्धा, समाधानसंपत्ती आणि मुमुक्षत्व) साधून जशी ब्रह्मार्पण करतात, तसेच सजीव चारी मुक्ती असे प्रधान श्रीरामाचे शरणार्थी झाले. बिभीषणाने अनन्यभावाने लोटांगण घातले तेव्हा श्रीरामाने त्याला उठवून आलिंगन दिले. पाणी आणि मीठ यांच्या भेटीप्रमाणे त्या दोघांची भेट होऊन, ते अंतर्यामी एकरूप झाले. दोघांचा आनंद सृष्टीत मावला नाही. दोन दीपांच्या ज्योती एकत्र आणल्यावर त्या दोन्ही मिळून जाऊन एक होतात; त्याप्रमाणे श्रीरामाच्या आलिंगनाने बिभीषणाला अद्वैतस्थिती प्राप्त झाली; तो रामरूप झाला. अलंकाराने सोन्याला आलिंगन द्यावे, अशी स्थिती होऊन श्रीराम बिभीषणाला भेटला. मग श्रीराम म्हणाला, "तू पूर्ण माझा सखा, माझा तू जीव-प्राण आहेस."

बिभीषणाचा आनंद, आश्वासन, त्याला अभिषेक

ज्याप्रमाणे पाण्यात साखर मिसळली की ती पाणीच होते आणि त्याचवेळी साखरेमुळे पाणी मधुर होते, त्याप्रमाणे श्रीराम आणि बिभीषण यांचे संबंध झाले. श्रीरामाचे पूर्णत्व भक्त बिभीषणात बिंबले आणि बिभीषणाच्या भक्तिभावाची माधुरी श्रीरामाच्या ठायी बिंबली. अशा प्रकारे दोघेही पूर्ण समाधान पावले. नंतर आनंदित झालेला बिभीषण श्रीरामाला म्हणाला, "राक्षसांना मारायची, मुख्य मुख्य धुरीण युद्धात पाडायची, युक्ती मी सांगतो आणि राक्षसांची रणसमाप्ती कशी करावी तेही सांगतो. मला लंकादुर्गात झटपट शिरण्याची युक्ती माहिती आहे; परंतु त्याचा वानरांना काय उपयोग, कारण ते तर उड्या मारून दुर्गाच्या कडा चढतील. वेगाने उड्डाण करून वानरगण दुर्गात प्रवेश करतील, तिथे माझ्या युक्तीची काय थोरवी. ते माझे वेडेपण ठरेल. श्रीरामाचे बाण सुटले की मेरू-सिंधूसहित रावण मरेल तिथे माझे युक्ती सांगणे म्हणजे मूर्खपणच म्हणावे लागेल." असे बिभीषण बोलला तेव्हा श्रीरघुनाथाच्या ठिकाणी कृपा उपजली. त्याने बिभीषणाच्या मस्तकावर अभयहस्त ठेवला. श्रीरामाने बिभीषणाला पुन्हा आलिंगन दिले आणि स्वतः संतुष्ट होऊन म्हणाला, "लक्ष्मणा, सिंधुजळाचे सिंचन करून बिभीषणाला लंकापती म्हणून अभिषेक कर." श्रीरामाने असे सांगताच, श्रीरघुकुळटिळकाची आज्ञा पाळावी म्हणून वानरांनी आवश्यक तीर्थोदक, प्रयागोदक, शिवाय चार समुद्रांचे उदक आणले. वाघाचे नखांसह असलेले कातडे, सप्तमुद्रिका कुशोदक, औदुंबरी सुचिन्हांकित पीठ हे बिभीषणाला लंकाभिषेक करण्यासाठी आणले. घडासहित सोनकेळी, घडघडीत नारळाचे घड, पुष्पे, फळे अभिषेकासाठी वानरांनी सुखभावनेने आणली. 'दशाननाचा वध न करता बिभीषणाला अभिषेक करण्याची खोटी युक्ती श्रीरामाला सुचली,' असे सर्व वानर म्हणत होते.

श्रीरामाची प्रतिलंका निर्मिण्याची मारुतीला आज्ञा

श्रीरामाने हनुमंताला सांगितले की, "तू तत्त्वतः लंका पाहिली आहेस. आता समुद्रतीरावर ती यथार्थ मला दाखव." श्रीरामाचे सांगणे ऐकून मारुतीने श्रीरामाला दंडवत घातले आणि समुद्रतीरावर त्याने लंका निर्माण केली. भोवती समुद्राचा परिघ, उजवीकडे निकुंबला, मागे पडलंका आणि मध्यभागी ध्वजपताकांनी शोभायमान झालेली लंका निर्माण केली. गडप्रवेश अत्यंत अवघड असून चोरदरवाजे फार गूढ होते. दृढ आणि विक्राळ अशा मारक तोफा, पाण्याने पूर्ण भरलेले खंदक होते. महाद्वाराच्या जवळ लपविलेल्या घातक, मारक अशा तोफा असून शत्रूच्या सैन्याला मारण्यासाठी त्या तिथे गुप्तपणे ठेवलेल्या होत्या. उलटून येणारे त्यांचे लोट अतर्क्य

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

असून शत्रूचे सैनिक ठायी ठायी पडत होते. असा दुर्गाच्या आतून मारा होत असल्याचे हनुमंताने गडभागात दाखविले होते. गडाचे तट, भिंती आणि दुर्गम कडे असा दोन्ही बाजूंनी होणारा आघात, मागे किंवा पुढे होऊन ढळत नव्हता असे हनुमानाने स्पष्ट दाखवले होते. अशी लंकेची प्रतिकृती मारुतीने तयार केली, तिच्यापुढे अमरावतीही तुच्छ ठरावी. राजमंदिरे टके, पताकांनी शोभत होती. माड्या, गोपुरे, सातखणी, त्यावर नवखणी अशा होत्या. घराघरात दोखणी जागा लंकेत असंख्य होत्या. तिथला राण्यांचा महाल अत्यंत शोभिवंत होता. त्याहीपेक्षा तिथला अशोकवनाचा भाग शोभायमान होता. तेथे सीतेला बंधनात ठेवले असून राक्षसिणी तिचे संरक्षण करत होत्या. तिथे एकवस्त्रा, अत्यंत दीनवाणी, मलिन केसांची, कंपायमान झालेली अशी सीता पाहून श्रीरामाला मूर्च्छा आली. बिभीषणही मनातून चक्रावला. 'हनुमंताने ती लंकाच उपटून इथे आणली की काय?' असे मनाशी म्हणत तो विस्मयचकित झाला. समोर लंका दिसताच वानरांनी त्वेषाने उड्या मारल्या; पण लंकादुर्गाचे दुर्धर बुरुज असल्याने त्यांच्या उड्या त्यांना माघारी पडल्या. 'सर्वांनी पराक्रम करा आणि रावणाला शोधून काढा रे', असे वानरगण म्हणू लागले. अशी त्यांची फसगत व्हावी, एवढे हनुमंताने प्रतिकृतीत कौशल्य दाखविले होते. श्रीराम सावध होऊन पाहू लागला तेव्हा त्याला समजले की हनुमंताने शोभायमान, हुबेहूब लंकेप्रमाणे दिसणारे लंकाभुवन केवळ वाळूचे बनविले आहे. तो दुर्ग पाहून लक्ष्मणाला विस्मय वाटला. अंगद, सुग्रीव चकित झाले. हनुमंताने केलेली लंका पाहून ब्रह्मादिकांना आश्चर्य वाटले. ब्रह्मांड निर्माण करणारा ब्रह्मा विस्मित होऊन टकमका पाहात राहिला. हनुमंताची ती खोटी रचना ब्रह्मादिक खरी मानू लागले. हे हनुमंताचे कौशल्य पाहून श्रीराम सुखावला. त्याने उल्हासाने हनुमंताची पाठ थोपटली आणि अपार आनंद व्यक्त केला.

लंका बिभीषणाकडे-त्याला राज्याभिषेक

श्रीराम म्हणाला, "रावण, कुंभकर्ण मारून मुख्य लंका बिभीषणाला देईन हे सत्य समजा. जोवर मुख्य लंका दिली नाही तोवर ही हनुमंताने केलेली लंका तुझ्याकडे मी गहाण ठेवली असून, तिची सोडवणूक रावणवधाच्या नंतर करीन. फार दिवस ही गहाण ठेवणार नाही. आमचा तुमचा हा ठराव समज की रावणाचे निर्दाळण हीच तिची सोडवणूक. लंकेपेक्षाही कोटी गुणांनी हिचे मोल अधिक आहे कारण ही माझ्या प्रिय हनुमंताची लंका आहे. ती तुझ्यादेखत डोलू देत नाही. बिभीषणा, प्रेम, ज्ञान, धन हे सर्व मी तुला यथेच्छ देईन आणि हनुमंताची लंका सोडवीन हे निश्चित समज." श्रीरामाचे बोलणे ऐकून संतुष्ट झालेल्या वानरांनी श्रीरामाचा जयजयकार केला. लक्ष्मण सुखसंपन्न झाला. ती हनुमंताची लंका अजूनही समुद्राच्या तीरावर आहे. काळ धाकामुळे तिचे रक्षण करतो आहे, कारण हनुमंताचे त्याला भय आहे.

नंतर वानरांनी राज्याभिषेकाची जी सामग्री सिद्ध केली होती ती घेऊन, लक्ष्मण बिभीषणाला राज्यभिषेक करायला श्रीरामाची आज्ञा घेऊन पुढील कार्य करू लागला. राज्यपट-अभिसिंचन आणि अंगद, सुग्रीव यांच्याप्रमाणे श्रीरामाच्या वरदानाने सिंहासन बिभीषणाला मिळाले. बिभीषणाला श्रीरामाने संतोषाने लंकादान दिले; ते पाहून वानरगण आनंदित झाले. त्यांनी हर्षभराने रामनामाचा जयजयकार केला. श्रीराम हा निजभक्तकृपाळू, शरणागत वत्सल, प्रेमळ, प्रांजळ, दीनदयाळ, सज्जन, असा स्वामी आहे. श्रीरामस्वामी साधू, शरणागत बिभीषण साधू आणि स्वामिकार्यसाधक हनुमंतही साधू आहे. जसा

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Muthulakshmi Research Academy / Sarayu Foundation Trust and eGangotri

रघुपती राजा, तसा सुग्रीव वानरपती आणि तसाच बिभीषण लंकापती असे रामाने केले. मनात कोणतीही शंका न धरता शत्रूबंधू शरणार्थी झाला तेव्हा त्याला आपल्या समान करणे हे कर्तव्य श्रीराम जाणत होता. अनन्यत्वाच्या कारणाने त्याने कृपा केली. रावणाला जिंकण्यापूर्वीच बिभीषणाला त्याने लंका दान केली. श्रीरामाची कीर्ती पवित्र आणि दीनोद्धारक अशी आहे. सुरगण, ऋषीजन, वानरगण त्याची कीर्ती वर्णन करतात. त्याची कीर्ती त्रिलोकात पवित्र आहे. बिभीषण हा सत्य बंधू, कर्ता श्रीरघुनंदन, त्याला शरण गेले तर जन्म-मरण कुठले राहणार!

अध्याय एकोणचाळीसावा

श्रीरामाने बिभीषणाला लंकेचे दान दिल्यावर सभा सावध होऊन बसली. सर्व स्वानंदाने सुप्रसन्न झाले होते. वानरांचा गलबला चालू होता, बिभीषण सुखकल्लोळात रंगला होता. सुग्रीव सर्व दळ पाहून उल्हसित झाला होता. वानरांचे मोठे समूह रामनामाचा गजर आणि भुभु:कार करत नमस्कार करायला येत होते. त्यावेळी हनुमंत तेथे येऊन सुग्रीवाशी एकांत - गोष्टी करत होता. सीतेची सुटका करण्यासाठी मुख्यत: रावणाचा वध करायला हवा. समुद्राच्या तटावर वानरांच्या ओळीच्या ओळी बसल्या होत्या. सागरपार कसे जायचे याच विचारात सर्वजण होते.

सुग्रीव-हनुमंत विचारविनिमय करतात

सुग्रीवाने आपला विचार मांडला. "नद्या पर्जन्यकाळात भरून वाहतात; त्याची सागराला पर्वा नसते. उन्हाळ्यात नद्या सुकून जातात; परंतु त्यामुळे सागर काही आटत नाही. सागर हा नित्य पूर्णत्वाने गंभीर, अगाध आणि न क्षोभणारा आहे. आमची सेना ही वनचरांची आहे; ती पैलतीरावर कशी पोचणार. समुद्र ओलांडण्याचा उपाय आम्हाला तरी दिसत नाही. हनुमाना तू तर वानरांमधला महाबाहू आहेस; तूच सांग काय उपाय करावा. वानर समुद्र किनाऱ्यावर बसून मोठ-मोठ्या गोष्टी करतात खरे, पण ते सर्व खोटे आणि खोडकर बोलणे असते; त्यांच्यात परतीरावर जाण्याएवढी शक्ती नाही. हनुमंता, आता काय बुद्धी चालवावी की ज्यामुळे समुद्र पार करता येईल. त्यासाठी काही उपायही सापडत नाही. मग लंकाधीशाला मारायचे कसे आणि सीता आणणार कशी? आपण श्रीरामाला सुखी करू शकणार नाही अशीच अवस्था दिसते आहे. तुला आप्तभावाने विचारतो आहे की समुद्र ओलांडण्याचा उपाय व्यर्थ आहे, तेव्हा श्रीरामाचे कार्य साधणार नाही. मग आता मी काय करावे?" सुग्रीवाने 'श्रीरामाचे कार्य साधणार नाही' असे म्हणताच हनुमंताला स्फुरण आले आणि तो नेटाने उठला.

हनुमंताने प्रलयकाळच्या रुद्राप्रमाणे आपले शरीर वेगाने वाढवून भयंकर केले. त्या आकृतीला पाहून सुरवर भयाने कापू लागले. मारुतीच्या रोमावली पिंजारल्या गेल्या, डोक्यावरचे केस समूळ थरथरले, शेपूट गगनाला भिडण्याएवढे वाढले, तो महाबळी खवळून म्हणाला, "तुम्ही सर्व वानरगण माझे पुच्छ धरा, राम लक्ष्मणांना खांद्यावर वाहतो आणि लंकेला घेऊन जातो. शरणागत बिभीषणाला हृदयाशी धरतो आणि एकाच खेपेत सर्वांना निश्चित लंकेला घेऊन जातो." हनुमान महापराक्रमी, त्याचे डोळे पूर्ण वटारले गेले, बाहू थरथराट करत स्फुरण पावू लागले. पुच्छाचा आकडा वळला. हनुमंताची शक्ती पाहून सुग्रीव दचकला, वानरवीर गडबडले. मारुती शांत कसा होणार याचा ते विचार करू लागले. हनुमंताचे त्राण आणि भयंकर रूप पाहून श्रीराम त्वरेने उठला. हनुमंताला हृदयाशी धरून श्रीराम मधुर शब्दात म्हणाला, "अरे, समुद्र बापडा तो काय. अग्नीबाणाने त्याला कोरडा करून, सर्व वानरगण पायीच पलीकडे नेऊन, लंकेत कंदन करवीन. काय त्या रावणाचा पुरुषार्थ, अर्ध्या क्षणात त्याचा वध

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

करीन.'' असे बोलून हनुमंताला शांत करून, श्रीरामाने त्याला स्वस्थ बसविले.

बिभीषणाची सूचना

श्रीरामाचे बोलणे ऐकून विभीषण सुखावला. मग त्याने समुद्र तरून जाण्याचा उपाय, मूळ कारणासह सांगितला. तो म्हणाला, ''श्रीरामाचे वाक्य हे प्रतापपूर्ण आहे; पण अग्नीबाण सोडून सागराचे शोषण करायला श्रीरामाला एक क्षणही लागणार नाही, हे खरे असले तरी ते भूषणावह नाही, उलट ते सूर्यवंशाचे दूषणच ठरेल. मी त्यासाठीची जी समूळ कथा सांगणार आहे ती श्रीरघुनाथा, सावधानपणे ऐक. समुद्र हा तत्त्वतः पूर्वज कसा ते मूळ कथानुषंगाने ऐकून घे. तुझे पूर्वज म्हणजे सगर. त्यांच्यामुळे सागर निर्माण झाला. त्यावरूनच सागर हे नाव दिले गेले. याला वेदपुराणांचा आधार आहे. पूर्वी समुद्र प्रत्यक्ष असा नव्हता. सर्व जगाला आच्छादून टाकणाऱ्या जलात तो गुप्त होता. सगरांनी खणून तो प्रकट अवस्थेत आणला. सगरांनी खणून तो प्रकट अवस्थेत आणला. तेव्हा सगरांपासून सागरता असल्याने तो तत्त्वतः तुझा पूर्वज आहे. तेव्हा आपल्याच वंशातील समुद्राचा घात तू कसा करणार? दशरथ सोडला तर समुद्र तुझा सातवा पूर्वज आहे.'' अशी सूर्यवंशाची कथा बिभीषणाने सांगितली. नंतर तो पुढे म्हणाला, ''समुद्र हा पूज्य पूर्वज आहे. श्रीरामा, तू त्याला शरण गेलास तर तो तुला भेटून स्वतःच सागर ओलांडून जाण्याची युक्ती सांगेल. समुद्र तुझा प्रताप जाणतो. त्याला तुझ्या भेटीविषयी परम आस्था आहे, हे मला कळले आहे. तू तर प्रतापी रघुराज असून, शिवाय सगरवंशाचा वंशध्वज आहेस. समुद्र हा तुझा स्वतःचाच पूर्वज असल्यामुळे वंशाचे कार्य तो निश्चितपणे करील. आपलाच पूर्वज असलेल्या सिंधूला शरण जाण्यात तुला लाज वाटण्याचे काय कारण आहे. सुखदायक उपायाने समुद्र तरून जाण्याचा मार्ग तो स्वतःच तुला सांगेल.'' धर्मशील सज्ञानता सुचविणारी आपल्या वंशाची कथा बिभीषणाने स्वतः सांगितल्यामुळे श्रीरामाला आल्हाद वाटला. त्याला ती गोष्ट रुचली. तेव्हा श्रीरामाने लक्ष्मण आणि सुग्रीव यांना ती कथा सांगितली.

रामाकडून सागरपूजन-तरी असहकार

श्रीराम म्हणाला, ''विभीषणाने सागराला शरण जावे असे गोड शब्दात सांगितले आहे. तेव्हा सुग्रीवराजा आणि सखा लक्ष्मण यांना ते सांगणे रुचते का?'' ह्यावर श्रीरामाचे चरणवंदन करून सुग्रीव आणि लक्ष्मण म्हणाले, ''विभीषणाचे सांगणे अत्यंत योग्य आहे. तुम्ही तसेच करावे. विभीषण सत्यवादी आहे. सिंधूपूर्वजाला शरण जावे म्हणजे अनायासे समुद्रतरण शक्य होईल. तेव्हा तुम्ही तेच करा.'' हे त्या दोघांचे म्हणणे ऐकून, समुद्राला शरण जाण्याचे ठरवून, श्रीरामाने सुमने, चंदन, फळमूळे यांसह समुद्राची पूजा केली. समुद्राच्या रम्य तीरावर दर्भासन पसरून श्रीराम बसला आणि ''आप्तसंबंध असल्याने तू माझे कार्य सिद्धीला ने. मी तुला अनन्यभावे शरण आलो आहे.'' एवढे बोलून, जसा अग्नी देदीप्यमान अग्निहोत्रात पुरतात, तसा श्रीरामाने दर्भासनावरच शयन केले. या रीतीने आपले कार्यसाधण्यासाठी सिंधूशरणागत होऊन तीन रात्री श्रीराम तिथे थांबला. तो निद्रिस्त दिसला तरी सावध होता. जागृती, स्वप्न, सुषुप्ती आणि तुर्या या अवस्थांच्या पलीकडे असलेला श्रीराम सागराचा शरणार्थी झाला असे सुरनरांनी प्रत्यक्षात अनुभवले. असा प्रसुप्त श्रीरामचंद्र पाहून वानरगण तळमळले. रावणवधासाठी आपण केव्हा समुद्रपार होणार याची त्यांना उत्कंठा लागली. श्रीरघुनाथाला पाहून हनुमंताने आपले मनोगत प्रकट केले. ''इथे निद्रा करण्याने पुरुषार्थ व्यर्थ झाला असे दिसते. स्वतः

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Muthulakshmi Research Academy

वानर म्हणतात की श्रीरामाच्या भात्यात दुर्धर बाण आहेत; मग हा शरण का जातो आहे, असे गाढेपण धरून? मी याचा सेवक असताना समुद्र तरून जाण्यात कसला अडथळा आहे. पुच्छाच्या टोकावर सर्व सैन्य बसवून एकदम उतरून देईन.'' श्रीरामाने अंतर्यामी हनुमंताचे हृद्‌गत जाणले आणि सावधपणे आपला पुरुषार्थ दाखविण्यासाठी उठला.

श्रीरामाचा सागराविषयी क्रोध

जेव्हा तीन दिवस उलटल्यावरही स्वतः समुद्र भेटीला आला नाही, तेव्हा श्रीराम रागावला. त्यावेळी लाल रंगाच्या आकाशासारखे त्याचे डोळे होऊन, तो कृतान्त भासला. ''सागर हा आमचा खरा पूर्वज म्हणून मी त्याला सद्‌भावनेने शरण गेलो; परंतु त्याचे दुर्जनपण असे की तो भेटीला आलाच नाही. त्याचा सन्मान करावा. म्हणून त्याचे अर्घ्य देऊन पूजन केले, अनन्यभावाने त्याला शरण गेलो, तरी तो भेटीला आला नाही. यावरून त्याच्या अंगी मोठा गर्व आहे, अशोभनीय असा ताठा आहे असे दिसते. तेव्हा वीर लक्ष्मणा आता मी त्याला मरणाच्या वाटेकडेच नेतो. पुरुषार्थ असलेल्याने शरण जाण्याने कीर्तीची अपकीर्ती होते. अशक्तांनी शरण जावे. ते केल्याने शक्तिलाभ कसा होईल? शरण जाण्याच्या पाठोपाठ पराक्रम उलटा होतो; मग तिथे यशाच्या गोष्टी कशा? जगाच्या बोलण्यात अपयशच येते. बलवानाने शरणागती पत्करली तर यश, कीर्ती समूळ निघून जाते. मग विजयप्राप्ती कुठून होणार? सर्व तुम्हाला अशक्त म्हणतील. स्वतः समुद्र हा अभक्त असून मी भक्त त्याला शरण गेलो; तरी त्याने पूर्ण गर्व धरून माझी उपेक्षा केली आहे. आपण नम्रपणे वागलो तर यश, कीर्ती, लाभ, विजय मिळत नाही हे निश्चित आहे लक्ष्मणा. मृदुत्वाने संन्याशाला परमार्थप्राप्ती होईल. आम्हा राजांना मृदुत्वाने अपकीर्ती मिळेल. राजे बंडखोराला दंडतात, उद्धटाचे दमन करतात, या उलट जे राजे शांत राहातात त्यांची अपकीर्ती होते. समुद्राला मोठा गर्व आहे, पण मी क्षणही न लागता त्याचा गर्वपरिहार करीन. आता त्वरित माझे सर्पासारखे दारुण धनुष्यबाण दे. सर्पाने दंश केला तर त्याचे विष उतरेल, पण माझे तीक्ष्ण बाण सुरासुरांना प्राणांतक आहेत. जीवाचा जीव घेणारे आहेत.'' एवढे बोलून श्रीरामाने धनुष्य हातात घेतले.

श्रीरामाने रागाने धनुष्यबाण सज्ज केले. अग्निअस्त्र सिद्ध करून आणि धनुष्याची दोरी ओढून तो त्वेषाने निघाला. श्रीराम क्षोभला हे पाहून स्वर्गात देव कंपायमान झाले. सागरातले मगर, मासे सागराला आता मरण येणार म्हणून तळमळले. श्रीराम सागर शोषणार म्हणून पाताळातले दानव, दैत्य, नाग, मानव धास्तावले. कारण श्रीरामाचा बाण समुद्राच्या पाण्यात पडला की सप्तपाताळांची होळी करील, म्हणून सर्व पाताळवासी कापू लागले. श्रीरामाने धनुष्यावर बाण चढवताच चंद्र-सूर्य काळवंडले, नक्षत्रे आकाशातून खाली पडली. ऋषी स्वधर्म विसरले. जेव्हा रामबाणाचा अग्नी समुद्राचे पाणी शोषण करील तेव्हा त्याचे वडवानलाशी (समुद्रातला अग्नी) मीलन होईल. त्या दोघांकडून मग पृथ्वीचे भस्म केले जाईल. ब्रह्मा यामुळे चिंतेत पडला. ब्रह्मा चिंतित झाल्याने ब्रह्मभुवनात थोर आकांत झाला. श्रीराम सागराचे निर्दाळण करील तेव्हा सृष्टीचा अंत होईल, अशी ती चिंता होती. श्रीराम म्हणाला, ''ऐक सौमित्रा सत्य, समुद्राचे पाणी शोषून घेऊन मी राक्षसांच्या वधासाठी सर्व वानरसैन्य पायीच पैलतीरावर नेईन.''

सागर सहकुटुंब श्रीरामाला शरण येतो

श्रीरामाने जोरात धनुष्य ओढले, त्यावेळी डोळे वटारलेले असून, तो कृतान्तकाळासमान दिसला. त्याचे ते स्वरूप पाहून वानरगणही कांपू लागले. श्रीरघुनाथ क्षोभला हे पाहून सागर आणि त्याचे कुटुंबीय स्त्री-पुत्र आकांत करू लागले. श्रीराम आपला प्राणान्त करणार असे त्यांना वाटले.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

श्रीरामाचा बाण सुटल्यावर, त्याचे निवारण कोण करू शकणार. श्रीरामाला शरण न गेलो तर मरण निश्चित येणार असा विचार करून स्त्रिया आणि पुत्र यांच्यासह स्वतः सागर मूर्तिमंत होऊन समुद्रामधेच प्रकट झाला. श्रीरामापासून जवळच, सहस्त्र लाटांच्या आणि प्रचंड लहरींच्या मधून सागरजळात सागरदेव साकार, रूपधारी असा प्रकट झाला. बारा टिळे, गळ्यात जानवे असलेला सागर, स्त्रीपुत्रांसह समुद्रजळात श्रीरामाने पाहिला. आपल्या स्त्रीपुत्रांसमवेत सागर पायवाटेवरून यावे तसा येताना पाहून श्रीरामाला आश्चर्य वाटले.

ब्रह्मयाने पूर्वी सिंधू निर्माण केला म्हणून तो शुद्ध ब्राह्मण आहे. पुढे सगरांनी खणून त्याला प्रकट केला, त्यावरून त्याला सागर हे नाव प्राप्त झाले. असा ब्राह्मण समोर पाहताच कृपाळू रघुनाथाने शरवृष्टी थांबवून द्विजघात चुकवला. तो ब्राह्मण बाहेर आला म्हणजे मगच बाण सोडावा असा विचार करून श्रीरामाने धनुष्याची ओढ ढिली केली. तो सागरजलातला ब्राह्मण मग श्रीरामाला म्हणाला, "शरण, श्रीरघुनाथा, मी शरण आहे; माझा घात करू नको. मी तुला शरण आलो आहे." नंतर श्रीराम म्हणाला, "हे द्विजवरा, तुझा कोणी अपमान केला का? तुझी संपत्ती किंवा पत्नी कोणी हरण करून नेली काय? मी तुझा कैवार घेईन. आधी द्विजकार्य साधून मग सीतेला सोडवीन. हा रघुनाथ सत्य, त्रिवार सत्य सांगतो आहे. सांग आता मी काय करू? ह्या श्रीरामाला शरण आल्यावर, तुला कल्पान्तीही मरण नाही." श्रीरामाने द्विजाचे चरणवंदन करून, पुन्हा विचारले "मी काय करू?" यावर द्विज म्हणाला, "हे रघुनाथा, मी समुद्र तुला शरण आलो आहे. आता बाण सोडून, माझा घात का करतोस?"

श्रीराम समुद्राला म्हणाला, "तू माझा पूर्वीपासूनचा पूर्वज आहेस; त्यामुळे तुझा योग्य सन्मान करण्यासाठी मी तीन दिवस निर्दोष राहून, दर्भासनावर शयन केले. परंतु तुझ्या अंगी पूर्ण गर्व आहे. त्यामुळे जाणून बुजून भेट दिली नाहीस आणि आता स्वतःचा प्राण वाचावा म्हणून शरण आलो म्हणतो आहेस." यावर सागर म्हणाला, "तुझ्यामुळे सूर्यवंशाची अपकीर्ती झाली, त्या रागाने मी तुझ्या भेटीला आलो नाही. आता तू पराक्रमाची प्रतिष्ठा दाखविलीस, म्हणून मी तुझे दर्शन घेण्यासाठी आलो. तुला मी काही गुह्य सांगण्यासाठी आलो आहे. ते सावधपणे ऐक. वानरांचा कोट्यवधीचा समूह पाहिल्यावर मुठीत रत्नांना घेऊन श्रीरामाच्या चरणावर अर्पण करून, ते चरण मस्तकी लावून त्यांना वंदन केले. कारण श्रीराम हा पूर्णावतार आहे हे मी जाणतो. यासाठी पुनःपुन्हा दंडवत, वारंवार चरणांना वंदन केले. श्रीरामा सावध चित्ताने ऐक. तुला एक गुह्य गोष्ट सांगायची आहे. सूर्यवंशाची कीर्ती मोठी आहे आणि ती तू उफराटी केली आहेस. अरे, हरिश्चन्द्राची कीर्ती त्रिगताने वाखाणली आहे. शिबिराजाने मांस कपोताएवढे तोलून आपली नगरी वैकुंठाप्रति नेली. रुक्मांगदाने धर्मांगदासाठी एकादशी व्रत पाळून, नगरी वैकुंठाला नेली. जगाला ते उपकारकर्ते झाले. माझी सूर्यवंशात उत्पत्ती कशी झाली तेही सांगतो, सावधानतेने ऐक.

सागराकडून पूर्ववृत्ताचे निवेदन

"सगरापासून म्हणून सागर असा हा कथाविस्तार भागवतात आहे. कपिलमुनिचरित्र हे अती विचित्र म्हणून तिन्ही लोकात मानतात. त्या चरित्रामधे कपिलांकडे साठ सहस्र सगरवीरांनी क्षुब्ध दृष्टींनी पाहिले म्हणून वाणीरूपी वज्रप्राय दाढांनी त्यांना कपिलांनी शाप दिला की, 'बलोन्मत्त असे तुम्ही साठ सहस्र सगर आहात. तुमच्या ठिकाणी अणुमात्र भूतदया नाही. तुम्ही सर्व अहोरात्र जळत राहाल' कपिलांनी असे वाग्वज्र सोडले. वज्राचा आघात एकालाच मारतो, पण वाग्वज्राची त्याहून थोरवी असते. साठ सहस्र वीरांना कवळून, वाग्वज्राने एकदमच आग लावली.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Research Academy

वानर म्हणतात की श्रीरामाच्या भात्यात दुर्धर बाण आहेत; मग हा शरण का जातो आहे, असे गाढेपण धरून? मी याचा सेवक असताना समुद्र तरून जाण्यात कसला अडथळा आहे. पुच्छाच्या टोकावर सर्व सैन्य बसवून एकदम उतरून देईन.'' श्रीरामाने अंतर्यामी हनुमंताचे हृद्‌गत जाणले आणि सावधपणे आपला पुरुषार्थ दाखविण्यासाठी उठला.

श्रीरामाचा सागराविषयी क्रोध

जेव्हा तीन दिवस उलटल्यावरही स्वतः समुद्र भेटीला आला नाही, तेव्हा श्रीराम रागावला. त्यावेळी लाल रंगाच्या आकाशासारखे त्याचे डोळे होऊन, तो कृतान्त भासला. ''सागर हा आमचा खरा पूर्वज म्हणून मी त्याला सद्‌भावनेने शरण गेलो; परंतु त्याचे दुर्जनपण असे की तो भेटीला आलाच नाही. त्याचा सन्मान करावा. म्हणून त्याचे अर्घ्य देऊन पूजन केले, अनन्यभावाने त्याला शरण गेलो, तरी तो भेटीला आला नाही. यावरून त्याच्या अंगी मोठा गर्व आहे, अशोभनीय असा ताठा आहे असे दिसते. तेव्हा वीर लक्ष्मणा आता मी त्याला मरणाच्या वाटेकडेच नेतो. पुरुषार्थ असलेल्याने शरण जाण्याने कीर्तीची अपकीर्ती होते. अशक्तांनी शरण जावे. ते केल्याने शक्तिलाभ कसा होईल? शरण जाण्याच्या पाठोपाठ पराक्रम उलटा होतो; मग तिथे यशाच्या गोष्टी कशा? जगाच्या बोलण्यात अपयशच येते. बलवानाने शरणागती पत्करली तर यश, कीर्ती समूळ निघून जाते. मग विजयप्राप्ती कुठून होणार? सर्व तुम्हाला अशक्त म्हणतील. स्वतः समुद्र हा अभक्त असून मी भक्त त्याला शरण गेलो; तरी त्याने पूर्ण गर्व धरून माझी उपेक्षा केली आहे. आपण नम्रपणे वागलो तर यश, कीर्ती, लाभ, विजय मिळत नाही हे निश्चित आहे लक्ष्मणा. मृदुत्वाने संन्याशाला परमार्थप्राप्ती होईल. आम्हा राजांना मृदुत्वाने अपकीर्ती मिळेल. राजे बंडखोराला दंडतात, उद्धटाचे दमन करतात, या उलट जे राजे शांत राहातात त्यांची अपकीर्ती होते. समुद्राला मोठा गर्व आहे, पण मी क्षणही न लागता त्याचा गर्वपरिहार करीन. आता त्वरित माझे सर्पासारखे दारुण धनुष्यबाण दे. सर्पाने दंश केला तर त्याचे विष उतरेल, पण माझे तीक्ष्ण बाण सुरासुरांना प्राणांतक आहेत. जीवाचा जीव घेणारे आहेत.'' एवढे बोलून श्रीरामाने धनुष्य हातात घेतले.

श्रीरामाने रागाने धनुष्यबाण सज्ज केले. अग्निअस्त्र सिद्ध करून आणि धनुष्याची दोरी ओढून तो त्वेषाने निघाला. श्रीराम क्षोभला हे पाहून स्वर्गात देव कंपायमान झाले. सागरातले मगर, मासे सागराला आता मरण येणार म्हणून तळमळले. श्रीराम सागर शोषणार म्हणून पाताळातले दानव, दैत्य, नाग, मानव धास्तावले. कारण श्रीरामाचा बाण समुद्राच्या पाण्यात पडला की सप्तपाताळांची होळी करील, म्हणून सर्व पाताळवासी कापू लागले. श्रीरामाने धनुष्यावर बाण चढवताच चंद्र-सूर्य काळवंडले, नक्षत्रे आकाशातून खाली पडली. ऋषी स्वधर्म विसरले. जेव्हा रामबाणाचा अग्नी समुद्राचे पाणी शोषण करील तेव्हा त्याचे वडवानलाशी (समुद्रातला अग्नी) मीलन होईल. त्या दोघांकडून मग पृथ्वीचे भस्म केले जाईल. ब्रह्मा यामुळे चिंतेत पडला. ब्रह्मा चिंतित झाल्याने ब्रह्मभुवनात थोर आकांत झाला. श्रीराम सागराचे निर्दाळण करील तेव्हा सृष्टीचा अंत होईल, अशी ती चिंता होती. श्रीराम म्हणाला, ''ऐक सौमित्रा सत्य, समुद्राचे पाणी शोषून घेऊन मी राक्षसांच्या वधासाठी सर्व वानरसैन्य पायीच पैलतीरावर नेईन.''

सागर सहकुटुंब श्रीरामाला शरण येतो

श्रीरामाने जोरात धनुष्य ओढले, त्यावेळी डोळे वटारलेले असून, तो कृतान्तकाळासमान दिसला. त्याचे ते स्वरूप पाहून वानरगणही कांपू लागले. श्रीरघुनाथ क्षोभला हे पाहून सागर आणि त्याचे कुटुंबीय स्त्री-पुत्र आकांत करू लागले. श्रीराम आपला प्राणान्त करणार असे त्यांना वाटले.

https://archive.org/details/muluksha Bhavan Vedanta Trust, Lucknow

CC-0. In Public Domain. Digitized by Sayu Foundation Trust and eGangotri

श्रीरामाचा बाण सुटल्यावर, त्याचे निवारण कोण करू शकणार. श्रीरामाला शरण न गेलो तर मरण निश्चित येणार असा विचार करून स्त्रिया आणि पुत्र यांच्यासह स्वतः सागर मूर्तिमंत होऊन समुद्रामधेच प्रकट झाला. श्रीरामापासून जवळच, सहस्त्र लाटांच्या आणि प्रचंड लहरींच्या मधून सागरजळात सागरदेव साकार, रूपधारी असा प्रकट झाला. बारा टिळे, गळ्यात जानवे असलेला सागर, स्त्रीपुत्रांसह समुद्रजळात श्रीरामाने पाहिला. आपल्या स्त्रीपुत्रांसमवेत सागर पायवाटेवरून यावे तसा येताना पाहून श्रीरामाला आश्चर्य वाटले.

ब्रह्मयाने पूर्वी सिंधू निर्माण केला म्हणून तो शुद्ध ब्राह्मण आहे. पुढे सगरांनी खणून त्याला प्रकट केला, त्यावरून त्याला सागर हे नाव प्राप्त झाले. असा ब्राह्मण समोर पाहताच कृपाळू रघुनाथाने शरवृष्टी थांबवून द्विजघात चुकवला. तो ब्राह्मण बाहेर आला म्हणजे मगच बाण सोडावा असा विचार करून श्रीरामाने धनुष्याची ओढ ढिली केली. तो सागरजलातला ब्राह्मण मग श्रीरामाला म्हणाला, "शरण, श्रीरघुनाथा, मी शरण आहे; माझा घात करू नको. मी तुला शरण आलो आहे." नंतर श्रीराम म्हणाला, "हे द्विजवरा, तुझा कोणी अपमान केला का? तुझी संपत्ती किंवा पत्नी कोणी हरण करून नेली काय? मी तुझा कैवार घेईन. आधी द्विजकार्य साधून मग सीतेला सोडवीन. हा रघुनाथ सत्य, त्रिवार सत्य सांगतो आहे. सांग आता मी काय करू? ह्या श्रीरामाला शरण आल्यावर, तुला कल्पान्तीही मरण नाही." श्रीरामाने द्विजाचे चरणवंदन करून, पुन्हा विचारले "मी काय करू?" यावर द्विज म्हणाला, "हे रघुनाथा, मी समुद्र तुला शरण आलो आहे. आता बाण सोडून, माझा घात का करतोस?"

श्रीराम समुद्राला म्हणाला, "तू माझा पूर्वीपासूनचा पूर्वज आहेस; त्यामुळे तुझा योग्य सन्मान करण्यासाठी मी तीन दिवस निर्दोष राहून, दर्भासनावर शयन केले. परंतु तुझ्या अंगी पूर्ण गर्व आहे. त्यामुळे जाणून बुजून भेट दिली नाहीस आणि आता स्वतःचा प्राण वाचावा म्हणून शरण आलो म्हणतो आहेस." यावर सागर म्हणाला, "तुझ्यामुळे सूर्यवंशाची अपकीर्ती झाली, त्या रागाने मी तुझ्या भेटीला आलो नाही. आता तू पराक्रमाची प्रतिष्ठा दाखविलीस, म्हणून मी तुझे दर्शन घेण्यासाठी आलो. तुला मी काही गुह्य सांगण्यासाठी आलो आहे. ते सावधपणे ऐक. वानरांचा कोट्यवधीचा समूह पाहिल्यावर मुठीत रत्नांना घेऊन श्रीरामाच्या चरणावर अर्पण करून, ते चरण मस्तकी लावून त्यांना वंदन केले. कारण श्रीराम हा पूर्णावतार आहे हे मी जाणतो. यासाठी पुनःपुन्हा दंडवत, वारंवार चरणांना वंदन केले. श्रीरामा सावध चित्ताने ऐक. तुला एक गुह्य गोष्ट सांगायची आहे. सूर्यवंशाची कीर्ती मोठी आहे आणि ती तू उफराटी केली आहेस. अरे, हरिश्चन्द्राची कीर्ती त्रिगताने वाखाणली आहे. शिबिराजाने मांस कपोताएवढे तोलून आपली नगरी वैकुंठाप्रति नेली. रुक्मांगदाने धर्मांगदासाठी एकादशी व्रत पाळून, नगरी वैकुंठाला नेली. जगाला ते उपकारकर्ते झाले. माझी सूर्यवंशात उत्पत्ती कशी झाली तेही सांगतो, सावधानतेने ऐक.

सागराकडून पूर्ववृत्ताचे निवेदन

"सगरापासून म्हणून सागर असा हा कथाविस्तार भागवतात आहे. कपिलमुनिचरित्र हे अती विचित्र म्हणून तिन्ही लोकात मानतात. त्या चरित्रामधे कपिलांकडे साठ सहस्र सगरवीरांनी क्षुब्ध दृष्टींनी पाहिले म्हणून वाणीरूपी वज्रप्राय दाढांनी त्यांना कपिलांनी शाप दिला की, 'बलोन्मत्त असे तुम्ही साठ सहस्र सगर आहात. तुमच्या ठिकाणी अणुमात्र भूतदया नाही. तुम्ही सर्व अहोरात्र जळत राहाल' कपिलांनी असे वाग्वज्र सोडले. वज्राचा आघात एकालाच मारतो, पण वाग्वज्राची त्याहून थोरवी असते. साठ सहस्र वीरांना कवळून, वाग्वज्राने एकदमच आग लावली.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

दारुण वज्राघात आला तर शूरवीर बाणाने विंधून त्याचा छेद करतात. वाग्वज्राचे निवारण मात्र कशानेही होत नाही. ब्रह्मशापाहाती बदल घडविता येत नाही, मागे-पुढे गती चालत नाही, त्यामुळे सगर धडधडा जळू लागले. ते सगर महावीर अहोरात्र जळत असलेले पाहून मुनीश्वरांच्या ठिकाणी करुणा उत्पन्न झाली. त्यांनी कपिलांना प्रार्थनापूर्वक सांगून उःशाप मागितला. तेव्हा 'भगापासून उत्पन्न झालेला या वंशात भगीरथ जन्मला आहे. तो प्रयत्नपूर्वक गंगा इथे आणील आणि सर्व सगरांचा उद्धार करील.' याप्रमाणे त्याच वंशातल्या भगीरथाने गंगा आणून सर्व पूर्वज तारले, जग पावन केले. अशी पूर्वजांची ख्याती आहे. त्याच वंशात श्रीरामा तू जन्मला आहेस. पुण्यवान, पूज्य, पवित्र कीर्तीवंत असा तू; पण तुला अपकीर्ती आली."

सागर म्हणाला, "तुम्ही दोघे बंधू धनुर्धारी, कळिकाळाला पायातल्या तोडरांमधे घालणारे; तरी रामपत्नीला चोरून नेलेच. त्यामुळे लोकांमध्ये तुमची अपकीर्ती झाली. पाठीमागून येणारी पत्नी हरवली. त्यामुळे वंशाच्या पुरुषार्थाला लाज आणली, अशी थोर अपकीर्ती तुझ्या माथ्यावर बसली श्रीरघुनाथा. श्रीराम सूर्यवंशातला, सीतेच्या विरहाने तो रडत, पडत आहे, असा वृत्तान्त ऐकून मी दुःखाने ग्रासून गेलो. तू दर्भशयन सेवन केलेस, त्याचा राग येऊन मी क्षोभायमान झालो. ह्यामुळे मी तुझे दर्शन घेतले नाही, हे सत्य आहे श्रीरामा. तुझ्या ठिकाणी संपूर्ण शक्ती असूनही अशक्ताप्रमाणे शरण आलास, याचाही राग आल्यामुळे मी तुझे दर्शन घेतले नाही. रावणाने सीता नेली तेव्हा तिथे पराक्रम न करता, माझ्यासारख्या पूर्वजाचा प्राण घेण्यासाठी अग्नीबाण तू सज्ज केलास?" समुद्राचे हे भाषण ऐकून श्रीराम लज्जित झाला. त्याच्या हातातून धनुष्यबाण गळून पडतील अशा त्याची अवस्था झाली आणि तो घामाने डवडबला. श्रीरामाला त्या अवस्थेत पाहून समुद्राने रामाच्या पायावर डोके ठेवले आणि म्हणाला, "मी जे उद्धटपणाने बोललो ह्याबद्दल मला क्षमा कर. अत्यंत आवेशाने बाण चढवून, माझ्यावर राग धरू नकोस. सिंधू तरून जाणे हे कार्य लहान आणि क्षुद्र आहे."

"मी आपल्या वंशाचा कैवारी आहे. दशरथाने उपकार केलेला आहे. ती कथाही निर्धाराने ऐक." असे श्रीरामाला संबोधून नंतर समुद्राने मूळची कथा सांगायला आरंभ केला. "पूर्वी तारका आणि यम यांच्या युद्धात, मी आणि दशरथ इंद्राला साहाय्य करण्यासाठी गेलो होतो. त्यावेळी मोठे युद्धकंदन झाले. माझा दैत्य घात करणार होते, तेव्हा दशरथ साह्य झाला आणि त्याने सर्व दैत्यांचे दमन करून मला निर्मुक्त केले. शत्रूच्या समूहाला त्रस्त करून दशरथाने सर्व दैत्यांचा घात केला. इंद्राने अत्यंत सुखद संपन्न होऊन, प्रेमाने राजाची पूजा केली. इंद्राने दशरथ राजाला मुकुटमणी दिला. आम्हा दोघांचे पूजन करून, सन्मान देऊन, गौरविले होते. तोच मणी दशरथाने सीतेला प्रेमाने दिला होता; तोच मणी खूण म्हणून सीतेने हनुमानाला दिला. त्यामुळे शोध निश्चित मानता आला. असा मी दशरथाचा उपकृत झालो आहे. प्रति-उपकारी काही नव्हतेच. यासाठी मी तुझा साहाय्यकारी होईन आणि वानरसैन्य सागराच्या पलीकडे जाण्यासाठी मार्गदर्शन करीन."

समुद्राकडून सेतुबंधनाची सूचना

श्रीरामाला समुद्र म्हणाला, "विश्वकर्म्याचा पुत्र नळ नावाने प्रसिद्ध आहे. तो समुद्रावर सेतु (पूल) बांधील. त्याला पित्याचे वरदान असून सेतू बांधण्याच्या कामात तो निष्णात आहे. त्याला आज्ञा करून सेतुबंधन करवावे. रघुनाथा, तू आमच्या वंशातला आहेस, शिवाय दशरथाचा मी उपकृत आहे, यामुळे आपल्यात अत्यंत सुहृदता आहे. त्यामुळे मी तुला कशाप्रकारे साहाय्य करीन ते ऐक. महाग्रास असे मासे तेथे येणार नाहीत. सर्व लाटा मी थांबवीन, तसेच प्रतिकूल वारा

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

सेतुबंधनात आड येणार नाही, याप्रकारे मी तुला साहाय्य करीन. पित्याचे वरदान असल्यामुळे नळ सेतुबंधन करील. आणखी एक चांगले चिन्ह आहे, तेही ऐक. नळाच्या अंगात पूर्ण वानरधर्म आहे. समुद्रात त्याने शाळिग्राम टाकले आहेत. त्यासाठी ऋषिवर्यांनी त्याला रागाने मोठा शापही दिला आहे. त्याची कथाही ऐक. माझ्या तीरावर बसून ऋषी स्नान-संध्या आणि अनुष्ठान करतात. पुढे शाळिग्राम ठेवून ते ध्यानस्थ बसतात. तेथे त्यावेळी हा नळ वानर येऊन ऋषींचे शाळिग्राम हाताने उचलून समुद्रात टाकून देतो. यासाठी ऋषींनी त्याला रागाने शाप दिला की, 'तुझ्या हातांनी समुद्रात टाकलेल्या शिळा कधीही बुडणार नाहीत.' हाही सेतुबंधनाला पूरक असा नळाचा पुरुषार्थ आहे." हे समुद्राचे कथन ऐकून नळ वानर पुढे आला. त्याने रामाच्या चरणांना वंदन केले आणि मग तो गर्जना करत म्हणाला, "मी अवश्य सेतुबंधन करीन. सिंधूने सांगितले ते सर्व सत्य आहे. माझ्याजवळ सेतुबंधनाचे सामर्थ्य आणि कौशल्य आहे. त्यामुळे मी सत्वर सेतु निर्माण करीन. सिंधू अगाध आणि अत्यंत थोर आहे. त्यावर मी सेतुबंधन करत असल्याने स्वामींनी तातडीने वानरांना पर्वत आणण्यासाठी पाठवावे." नळाचे सांगणे आणि त्याची तत्परता पाहून श्रीरामाला सहस्रपटींनी संतोष झाला. श्रीरामाने नळाला सन्मान आणि प्रेम यांनी गौरविले. तसेच समुद्राच्या संबंधात प्रेमाच्या शब्दपुष्पांनी त्याचा गौरव केला. तेव्हा श्रीराम मृदू, मंजुळ, मधुर असे बोलला.

रामबाणाचे विसर्जन, सागराचा सन्मान

श्रीराम समुद्राला म्हणाला, "तुझ्यावरच्या रागाच्या भरात मी धनुष्यावर अग्निबाण लावला असून, मोठ्या प्रौढीने धनुष्याची दोरी ओढली होती. तो बाण मी परत काढणार नाही. तेव्हा हा बाण सोडून मी कोणाचा प्राण घेऊ ते सांग. माझा बाण अत्यंत निर्वाणीचा असतो. हे सत्य आहे समुद्रा." त्यावर समुद्र म्हणाला, "पश्चिम तीरावर दुराचारी मरु दैत्य आहे. तो मला नाना प्रकारे पीडा देतो. त्याचा या बाणाने तू संहार कर." समुद्राची सूचना ऐकताच श्रीरामाने अग्निबाण सोडला. मरु दैत्य क्षणात मेला आणि समुद्राचेही शोषण झाले. श्रीरामाच्या बाणाच्या प्रभावाने समुद्राचे जळ आटले. पृथ्वी अग्नीच्या ज्वाळांनी पोळली आणि श्रीरामाला शरण आली. तिची दयनीयता पाहून श्रीरामाने तिला वरदान देताना म्हटले, "मरुदेश पावन केला आहे. धरणीला पाणी मिळून ती सर्व काळ पिकेल. अत्यंत रसाळ आणि स्वादिष्ट फळ-मूळांचा तेथे सुकाळ होईल. घराघरातील स्त्रियांकडे पाणी मागितले तर त्या दूध अर्पण करतील. पांच रात्रींच्या अंतराने गाईंना पाणी मिळाले तरी त्या अमाप दूध देतील. पशूंना सारखे पाणी नको, पाच दिवसांनी पाण्याचे प्राशन केले, तरी दूध-तुपाचे श्रेष्ठ अन्न भोजनात घरोघरी असेल." ज्यांच्या ठायी सुगंध आहे अशा नाना प्रकारच्या दिव्य औषधी श्रीरामाच्या वराने दिल्या. मरुदेश अशा रीतीने सुखी केला. तिळाच्या ठिकाणी स्नेह असतो याचे कोणाला नवल वाटणार? मरुदेशात प्रत्येक घरीच पूर्ण स्नेह असतो. या प्रदेशाला मारवाड म्हणतात. तेथे जिवाचे लाड पुरतात. श्रीरामाच्या वराचे असे कौतुक की संपूर्ण मरुदेशात सुखाचा सुकाळ झाला. श्रीरामाची ख्याती पाहिल्यावर समुद्राला मनातून आश्चर्य वाटले. त्याने आनंदाने श्रीरामाला वंदन केले. नंतर तो प्रेमाने म्हणाला, "श्रीरामा तू खरोखर कृपाळू आहेस. आपला बाण सोडून तू मरुदैत्याचा वध केलास आणि मरुप्रदेश पूर्ण पावन केलास. तुझ्या प्रतापापुढे समुद्र बापडा काय! मला तू स्पष्ट सुखी केलेस आणि दुःखाचे संकट नाहीसे केलेस" यावर श्रीरामाने संतोषाने आणि अत्यंत प्रेमाने समुद्राची पूजा केली. नंतर अत्यंत आल्हादाने आणि हर्षाने स्वतः समुद्राचा सन्मान केला.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

श्रीराम म्हणाला, "जसा पिता दशरथ, तसाच तू निश्चित मला पूज्य पूर्वज आहेस. मला सेतुबंधनासाठीच्या कार्यासाठी तू सुगत आणि सर्वार्थ असा मार्ग सांगितलास. तू दशरथाचा फार आवडता होतास; पण मला तू त्याहूनही प्रिय आहेस. तुझ्या उपकारानेच तत्त्वतः मी रघुनाथ थोर झालो." श्रीरामाचे वचन ऐकल्यावर समुद्राने रामाला लोटांगण घातले, चरणवंदन केले आणि मग तो आपल्या स्वतःच्या घरी गेला. आता प्रतापी श्रीरामामुळे पाषाण समुद्रात तरंगतील. सेतुबंधन पूर्ण होईल.

अध्याय चाळिसावा

श्रीरामाला नळाकडून सेतुबंधन करून घ्यावे असे सांगून, समुद्राने श्रीरामाच्या पायांना वंदन केले आणि परत जाण्याविषयीची आज्ञा घेऊन तो गेला. समुद्राचे सांगणे ऐकून राम संतोषला आणि नळाला समोर बोलावून त्याला प्रेमळ शब्दात आपले मनोगत रामाने सांगितले.

सेतुबंधनाविषयी श्रीरामाचे निवेदन

श्रीरामाने नळाला प्रेमाने म्हटले, "नळा, तू माझा प्राणप्रिय सखा आहेस. तू आता सेतु निर्माण कर. समुद्राने स्वतःच सांगितले आहे की तुझ्या हातून सेतुबंधन करून घ्यावे. तेव्हा तू वानरगण साहाय्यार्थ घेऊन सेतु निर्माण कर." नंतर श्रीरामाने स्वतःच सुग्रीवाला सांगितले की, "सर्व प्रधान योद्धे, मुख्य हनुमंतासह, समुद्राने सांगितल्याप्रमाणे, राजा सुग्रीवाने सैन्यासह सेतुकार्य करावे. सेतुबंधनासाठी आवश्यक सामग्री वानरांनी त्वरेने आणून नळाच्या स्वाधीन करावी, त्याने सागरात सेतु बांधावा." असे श्रीरामाने आल्हादाने आणि हर्षाने सांगितले. त्यामुळे सुग्रीवाला अद्‌भुत सुख झाले. तो योद्धयांना घेऊन उठला. श्रीरामाच्या बोलण्याने वानरगण सुखावले आणि शतसहस्त्र वानरांनी पर्वत आणण्यासाठी उड्डाण केले. वानरगण सेतुबंधनार्थ सिद्ध होऊन निघालेले पाहून सुग्रीवाने विचार केला की, 'आता विलंब करू नये. कारण सेतु बांधण्यास विलंब झाला आणि जर रावणाला त्याविषयी कळले, तर तो सेतुघात करण्यासाठी अतर्क्य प्रयत्न करेल. ते (राक्षस) आकाशातून जाणारे आणि आम्ही जमिनीवर चालणारे, मधे हा भरलेला सागर, वानर युद्धासाठी जमलेले, तेव्हा सेतु त्वरित बांधला पाहिजे.' असा स्वतःशी विचार केल्यावर राजा सुग्रीव स्वतः दंड थोपटून, त्वरेने सेतुबंधन करावे म्हणून उठला. जर नेता स्वतःच पुढे झाला नाही तर सेवक वानरांकडून सेतु शीघ्र बांधला जाणार नाही म्हणूनही स्वतः राजा उठला. नेतृत्वाशिवाय संघर्ष, रण, सेतुबंधन हे वृथा ठरून, त्यात शीघ्रता येणार नाही. तेच श्रीरामाच्याही मनात होते. 'सेतु लवकर बांधून, रावणाचा वध करून, स्वानंदाने सीतेला आणावी.' हे श्रीरामाचे मनोगत होते. यामुळे सुग्रीव तातडीने कोट्यवधी वानरांसह सेतु बांधण्याच्या कामाला सिद्ध झाला. सुग्रीव उठताच वानरगणही त्वरेने उठले.

सेतुबंधनाची व्यवस्था आणि अडचण

नळ, नीळ, जांबुवंत, गज, गवय, गवाक्ष हे आणि शरभ, गंधमादन असे सर्वजण सेतु बांधण्यासाठी निघाले. अंगद युवराज स्वतः जातीने उठताच असंख्य वानरगण उठले. तर, तरळ, मैंद, द्विविद असे कोट्यानुकोटी वानर काम करायला झेपावले. नळ सेतुबंधन जिथे करायचे होते तिथे बसला. जांबुवंताचे वृद्धत्व लक्षात घेऊन सुग्रीवाने त्याला नळाजवळ सम-विषम सांगण्यासाठी ठेवले. सेतुबंधनासाठी निघालेल्या अगणित वानरांमुळे आकाश कोंदले. वानर दंड थोपटून, रामनामाचा भुभुःकाराने गजर करत वेगाने निघाले. 'किलकिल' हा वानरजातीचा शब्द आहे. 'किलकिल' म्हणजे खरोखर निर्धार-स्थिती; ते वानर नित्य श्रीरामनाम

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

घेतात ही शब्दाची व्युत्पत्ती आणि त्याचा इत्यर्थ आहे. यामुळे किलकिल शब्द रामनामाने अत्यंत शुद्ध असतो. वानर सेतुबंधनामधे आनंदाने सहभागी झाले त्याचे कारण हेच आहे. दक्षिणबाजूला पाच कोटी वानरांच्या ओळी नळाच्या हातात पर्वत देत होत्या. त्यामधे ते अत्यंत त्वरा दाखवत होते. शिवाय वामबाजूच्या (डाव्या) पाच कोटी वानरांकडून त्वरेने पर्वत, वृक्ष दिले जात होते. नळाने शुद्ध शिळा मांडल्या. साठ अती कुशल वानर सर्व काळ नळाजवळ थांबून त्याच्याकडे सामग्री देत होते. नळाची मोठी ख्याती होती. तो दोन्ही हातांनी सेतु बांधत होता; परंतु तिथे एक विपरीत घडले. पर्वत समुद्रात बुडत होते. तोही तटस्थ राहिला. सेतु बांधला जाईना. सुग्रीव आश्चर्य करत म्हणाला, "समुद्रानेच हे सांगितले होते की, नळाच्या हाताने पर्वत तरतात, आता त्याच्याच हाताने ते बुडत आहेत." या विचाराने तो कपिराज खिन्न झाला. त्याने हा वृत्तान्त श्रीरामाला सांगितला. हे त्याचे सांगणे ऐकून श्रीराम हसून म्हणाला, "सेतुबंधनाचे गुह्य हनुमंत जाणतो. त्याला विचारा, तो सांगेल ते करा."

हनुमंताचे कथन, उपाय सापडला

हनुमंत म्हणाला, "ज्याप्रमाणे सूर्यप्रकाशापुढे काजव्यांचा प्रकाश हरवून जातो, त्याप्रमाणे श्रीरामापुढे नळाच्या वराची भाषा चालत नाही. श्रीरामाच्या प्रतापापुढे समुद्र तो बापडा काय आणि नळ तर केवळ किडा! वराच्या भाषेने वेडावलेला, अभिमानाने ग्रासलेला असा तो आहे. 'माझ्या हाताने पाषाण तरतात,' असा नळाला वरामुळे अभिमान वाटतो आहे; परंतु पर्वत तर बुडत आहेत आणि सेतुबंधन होत नाही. अभिमान ज्यांच्या डोक्यात असतो ते तत्त्वतः बुडून जातात. तेव्हा सेतुबंधनासाठी अत्यंत शुद्ध अशी युक्ती मी आता सांगतो. ज्यांना श्रीरामाचे चरण स्पर्श करतील, तेच वृक्ष आणि पाषाण समुद्रात तरतील हे सत्य, सुग्रीवा, तू जाणून घे. श्रीरामाच्या पायाखालचे पर्वत हेच समुद्रात तरतील. त्यांच्यामुळेच सेतुबंधन सिद्ध होईल." हनुमंताने असे गुह्य सांगितले. त्याचे बोलणे ऐकून वानरांना जीवाची खूण सापडली. पुढे सेतुबंधन करण्यापूर्वी त्यांनी हनुमंताच्या चरणांना वंदन केले. नंतर हनुमंत म्हणाला, "ज्या श्रीरामाचे चरण लागताच दुःशिला झालेली अहल्या उद्धरली त्या श्रीरामाच्या चरणस्पर्शाने पर्वत-शिळा समुद्रात सुखाने तरू लागतील." श्रीरामाच्या चरणांचे हे महिमान ऐकल्यावर सर्वजण सावध झाले. हनुमान हे उल्हासाने सांगून प्रतापवंत श्रीरामाच्या पायी लागला.

पुढे हनुमंताने स्वतः श्रीरामचरणांचा स्पर्श झालेल्या शिळा समुद्रात घातल्या, तेव्हा वानरांनी त्या बुडवून पाहिल्या आणि त्या न बुडता तरंगू लागल्या. एकेका पर्वतशिलेवर लक्षावधी वानर बसले तरी त्या बुडल्या नाहीत. उलट त्यांनी वानरांना तारले. वास्तविक स्वतः बुडून इतरांना बुडविण्याचा पाषाणांचा धर्म असतो. ते पाषाण स्वतः तरून वानरांना तारत होते. ह्यामधे पाषाणांचा गुणधर्म, समुद्राचे लक्षण किंवा ऋषींचे वरदान हे काही नसून तो श्रीरामाच्या चरणांचा प्रताप होता. श्रीरामाच्या चरणांचा स्पर्श झालेले पाषाण फुलांसारखे हलके होऊन उचलले जात होते. इतर ते जडपणाने समुद्रात बुडत होते. श्रीरामाच्या चरणांचे हे महिमान असल्याने सेतुबंधन सिद्धीला जाईल असे मारुतीने सांगितल्यामुळे वानरांना ती खूण पटली. हनुमंताचे कथन ऐकल्यावर सुग्रीवाने हनुमानाला आलिंगन दिले; अंगदाने दंडवत घातले; वानरांनी हनुमंताच्या पायांना वंदन केले. हनुमंतामुळेच विघ्नाचे निवारण झाले, त्याच्यामुळेच सेतुबंधन शक्य झाले; तो भवसागर तारक आहे असे सर्वजण म्हणू लागले. सुग्रीव संतोषाने म्हणाला, "श्रीरामचरणांचा महिमा अगाध आहे. तसेच अत्यंत गुह्य असे ज्ञान हनुमान पूर्णपणे जाणतो."

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

अशी श्रीराम आणि हनुमान यांची स्तुती करून पुन्हा सेतुबंधनाचे कार्य करण्यासाठी वानर भुभुःकार, रामनाम जप, करत वेगाने निघाले.

सेतुबंधनाच्या कार्याला गती मिळाली

सुग्रीव म्हणाला, "पूर्व, पश्चिम आणि, दक्षिण या दिशांकडून आणलेले पाषाण बुडतात, तेव्हा ते आणू नयेत. उत्तरेचे जे पर्वत तेच आणावे आणि सेतुबंधन साधावे." सुग्रीवाच्या या सूचनेप्रमाणे सर्व वानर तिकडे निघाले. सुग्रीव पुढे म्हणाला, "उत्तरेकडील पर्वत, वृक्ष, शिळा हे सर्व श्रीरामचरणांनी पावन झाले आहेत. तेव्हा तिकडचेच सेतुबंधनासाठी आणा." नंतर आकाशात टोळ पसरतात तसे वानरसैन्य निघाले. सेतुबंधनाचे कार्य करण्यासाठी ते प्रतापी आणि प्रबळ वानरसैन्य वेगाने आणि उत्साहात निघाले. आकाशातली नक्षत्रे थोडी ठरावी असे ते असंख्य वानर कार्याची तातडी जाणून त्वरेने जाऊ लागले. ते वानर 'मी पुढे, मी पुढे' अशा ईर्षेने एकमेकांपुढे धाव घेत होते आणि मोठ्या हौसेने पर्वत आणत होते. हे सर्वच वानर बलवान आणि समर्थ असल्याने, पर्वत समूळ उपटून आणत होते. त्या पर्वतांच्या माथ्यावर खजुरीचे वृक्ष, अर्जुनवृक्ष हे तर असंख्य होतेच, शिवाय शाल, ताल, तमाल, तिलक असे विस्तीर्ण आणि घटक वृक्षही होतेच. वानरांनी असे असंख्य, शिखरांसहित असलेले पर्वत आणले. त्यामधे नाना जातीचे आणि फळा-फुलांनी समृद्ध झालेले पर्वतही होते. त्यांनी अगणित पर्वत डोक्यावर वाहून, शिखरांसह स्वानंदाने नाचत, गात आणले. त्यावेळी त्यांचा मुखाने 'श्रीराम जय राम' असा गजर चालू होता. पर्वतामागून पर्वताच्या ओळी एकदम समुद्रात वानरांकडून घातल्या जात होत्या. त्यांना सेतुबंधनाचा भारी आल्हाद वाटत होता. शतयोजने लांब, दशयोजने रुंद अशी सेतूची बांधणी विश्वकर्म्याचा पुत्र नळ करत होता. दोरी धरून (ओळंब्यात) नळ पर्वतांच्या कोटी एकमेकांना जोडत होता. त्याला मधे रिकामा वेळ मिळत नव्हता. पर्वत घेण्यासाठी नळाजवळ साठ अत्यंत कुशल असे आणि शिवाय दहा कोटी इतर वानर ठेवलेले होते. कोट्यवधी पर्वत वानरांनी आणले. तसेच ते पुन्हा आणखी कोट्यवधी पर्वत आणायला लगेच धावत होते. पर्वतावर पर्वत पडत असताना एखादा सागरात गहाळ होऊ नये म्हणून वानर नखाच्या टोकांनी पर्वतावर नाव कोरत होते. वानरांच्या कृतीचे नवल असे की, श्रीरघुनाथाला संख्या सांगण्यासाठी पर्वतावर नावे लिहित वानर सेतुबंधनाचे अपूर्व आणि अभिनव कार्य करत होते. पराक्रमी श्रीरामाने समुद्राच्या पाण्यात सेतुबंधन केल्यामुळे स्वर्गलोक, मृत्युलोक आणि सप्त पाताळात त्याचा जयजयकार झाला.

सेतुबंधनाचा दिनक्रम, वानरांचे श्रम

पहिल्या दिवशी समुद्रात प्रत्येक पर्वत समुद्रात बुडाले. त्यामुळे सेतुकार्य खोळंबले आणि फार थोडे काम झाले. पहिल्या दिवशी चौदा योजने सेतुबंध झाला," असे सुग्रीवाने श्रीरामाला सांगितले आणि नंतर तो म्हणाला, "हनुमंत अत्यंत सज्ञान आहे. त्याने सेतुबंधनाच्या कार्याला चालना दिली. आता आमचा पुरुषार्थ पाहा. आम्ही शीघ्र गतीने सेतू बांधू. आता माझे कौशल्य पाहा. अत्यंत लवकर सेतू बांधीन." असे म्हणून सुग्रीव स्वतः दंड थोपटून आकाशात उडाला. श्रीरामाला सुखविण्यासाठी पाच योजने पर्वत उपटून सुग्रीवाने समुद्रात टाकले. अर्धा योजन महाथोर विंध्याद्रीचे दीर्घ शिखर होते, ते सुषेणाने उपटून आणले आणि समुद्रात टाकले. नीळाने मलय पर्वताचे महाथोर शिखर बळाने उपटले. त्यावर शतसहस्त्र वृक्ष होते. ते शिखर वृक्षांसह नीळाने समुद्रात टाकले. चंदनाचे वृक्ष असलेले, सुगंधी फुलांचे वृक्ष असलेले मोठमोठे पर्वत मैंद आणि द्विविद या दोन वानरवीरांनी

https://archive.org/details/@sulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

समुद्रात टाकले. गज, गवाक्ष, गवय, गंधमादन शरभ या पाच जणांनी पाच पर्वत समुद्रात टाकले. याशिवाय इतर वानरवीरांनी मोठे मोठे पर्वत आणले आणि सेतू लवकर तयार व्हावा म्हणून ते पर्वत समुद्रात टाकले. सर्व वानरांनी उत्साहाने दुसऱ्या दिवशीही सेतुबंधनाचे कार्य चालू ठेवले. सव्वीस योजने कार्य पूर्ण झाल्याचे त्यांनी श्रीरामाला सांगितले. नंतर सूर्यास्त झाल्यामुळे वानरगण परतले. श्रीरामाकडे येऊन त्यांनी आपला पुरुषार्थ सांगितला. "आम्ही थोर पर्वत आणले, पर्वतांवर नावे लिहिली, हे सर्व कार्य पाहून श्रीरामाने वानरांचे कौतुक करावे, त्यांचा पुरुषार्थ वाखाणावा. आम्ही कोट्यवधी पर्वत आणले आहेत. स्वामींनी स्वतः येऊन सेतू प्रत्यक्ष पाहावा" यावर "व्यर्थ आपला पुरुषार्थ कशाला सांगावा, श्रीराम सर्वज्ञ आहे, तो जाणतोच." अशा प्रकारे वानरगणांनी सांगितलेल्या वृत्तान्तावर सुग्रीवाने प्रतिक्रिया व्यक्त केली. नंतर श्रीराम म्हणाला, "वानरांनी वेगाने जाऊन पर्वत आणल्यामुळे ते दमले आहेत हे कोणाच्या लक्षातच आले नाही. वानरगण झोपेला आले आहेत. ते डोळे उघडत नाहीत. ते शिळांवरच झोपले आहेत. चाळीस योजने सेतू वानरांनी कष्टाने पूर्ण केला. पुढे साठ योजने उरला आहे. अजून काठापर्यंत गेलेला नाही." श्रीरामाचे हे मनातले विचार हनुमंत जाणून होता. तो तिथेच सूर्योदय होण्याची वाट पाहात गुपचुप बसला होता. तो मनात म्हणत होता, "सेतुबंधनाचे काय मोठे संकट आहे, अर्ध्या घटकेत मी तो बांधीन; परंतु सूर्योदयाची अडचण संपायसाठी थांबले पाहिजे."

हनुमंताची एकट्याची कामगिरी

अरुणोदय होताच हनुमंत उठला, आपले प्रातःकर्म उरकून, तो सेतुबंधनासाठी उडाला. श्रीरामाला न विचारता, वानरांना कळू न देता, सुग्रीवाला न सांगता हनुमान वेगान निघाला. 'हनुमंत पुढे गेला रे' असे कोणी म्हणताच, सर्व वानर प्रातःकर्म उरकून, सत्वर दाही दिशांना धावले. महावीर हनुमंताने एकेक योजन असलेले सात पर्वत उपटून घेतले. दोन पर्वत दोन्ही हातात, दोन पर्वत काखेत, एक डोक्यावर, एक शेपटीत आणि एक हनुवटीखाली असे सात पर्वत घेऊन गात, नाचत, नामस्मरण करत तो महाबळी हनुमान सेतुजवळ आला. सात पर्वत घेऊन येणाऱ्या हनुमंताला पाहून श्रीरामाला आश्चर्य वाटले. मारुतीचे बळ अद्‌भुत होते. प्रभात समयी नळाने आवेशाने एक योजन सेतु पूर्ण केला. हनुमंताच्या सात पर्वतांनी ते कार्य सहज साधले. मोठमोठे पर्वत समुद्रात टाकताच प्रचंड कडकडाट झाला, समुद्रात घडघडाट झाला, त्या नादाने आकाश आणि वैकुंठ कोंदले. तसेच त्या आवाजाने कैलास पर्वतही कोंदला. त्यावेळी ध्यानस्थ असलेल्या शंकराने ध्यान सोडून बाहेर पाहिले. समुद्रात पाषाण तरंगत असून श्रीरामचंद्राचा सेतू सिद्ध झालेला त्याला दिसला; सदाशिव आनंदाने डोलू लागला. श्रीरघुनाथ परब्रह्म आहे हे त्याने जाणले. सर्व सात पर्वतांनी हनुमंताने सेतुबंधन पूर्ण केल्याने रावणाचा अन्त जवळ आला असे शिवाने शिवानीला सांगितले. जेव्हा पर्वत समुद्रात टाकले गेले तेव्हा जे पाणी उसळले ते आकाशापर्यंत गेले. त्या पाण्याने ध्रुवमंडळ भिजवले आणि ते सत्यलोकातही जाऊन आदळले. बाळ मारुती हा बलवान असून त्याने स्वर्गाला सचैल स्नान घडविले; त्याने जणू देवांना प्रायश्चित्त दिले. या कल्पनेने सुरवरांना हसू आले. रावणाच्या बंदीत असलेले देव मुक्त करून सोडविले तेव्हा प्रायश्चित्त अवश्य हवेच, यासाठी हनुमंताने सचैल स्नान करविले. सात पर्वत समुद्रात घालून एकोणपन्नास योजने सेतू हनुमंताने पूर्ण केला याचे ब्रह्मदेवाला आश्चर्य वाटले. सुरवर, ऋषीश्वर, नरवानर, श्रीराम, सौमित्र या सर्वांनाच आश्चर्य वाटले. पुरुषार्थी मारुतीच्या पराक्रमासाठी देवदुंदुभी वाजू

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

लागल्या, सुरांनी पुष्पवृष्टी केली, अप्सरा नृत्य करू लागल्या. तंतीवीणास्वरांनी युक्त असे नृत्य स्वर्गांगना करत राहिल्या. वानर हर्षाने नाचू लागले.

सेतुबंधनाची समाप्ती

श्रीरामाच्या कृपेने सेतू पूर्ण झाला. सुग्रीव तिसऱ्या दिवसाचा वृत्तान्त श्रीरामाला सांगू लागला. "तुझा प्रियभक्त जो हनुमंत, त्याच्यामुळे सेतुबंधन पूर्ण झाले. आमचा सन्मान वाढावा, म्हणून त्याने केवळ दहा योजने अपूर्णता ठेवली आहे. एरवी अर्ध्या क्षणात त्याने तो पूर्ण केला असता. नंतर वानरांनी पर्वत आणून शिल्लक राहिलेला सेतू पूर्ण करण्यास नळाला सांगितले. नळाने स्वानंदाने उर्वरित सेतू बांधला. सर्व वानर आनंदित झाले. एकोणपन्नास योजने सेतू हनुमंताने भरून काढला आणि उर्वरित दहा योजने पुढे नळाने बांधला. तेव्हा वानर नळाला म्हणाले, "हनुमानाने ज्याप्रकारे बांधला, त्याप्रकारे सर्व बांध" असे दोरी धरून वानरांनी पाहिल्यावर सांगितले. ते पुन्हा म्हणाले, "जशी हनुमानाची बांधणी सम आहे, तशी तुझी न दिसता ती विषम वाटते. तेव्हा ती सम करून घे." नंतर त्यांनी नळाकडून बांधणी सम करून घेतली. मग सर्वांनी गर्जना केली. 'सर्व सेतू बांधला हो बांधला.' त्यांच्या गर्जनेप्रमाणे स्वर्गातही सुरवरांची गर्जना झाली. 'समुद्रात सेतू बांधणे अत्यंत अवघड असून वानरांनी तो बांधला.' असे ऋषीश्वर, थोर देवऋषी म्हणाले. कोट्यानुकोटी वानरवीरांनी तातडीने पर्वत आणले आणि त्यांची वानरश्रेष्ठांनी व्यवस्था लावली त्यामुळे सेतू परतीरापर्यंत पोचला.

सेतुबंधन पूर्ण झाल्यामुळे वानरसैन्यातली रणवाद्ये वाजविण्यात आली. ती ऐकताच समस्त वानरवीरांनी हातातले पाषाण आणि पर्वत खाली टाकले. सेतुबंधनापाशी येणाऱ्या यात्रेकरूंना अद्याप ते पाहायला मिळतात. दहा योजने रुंद, शतयोजन लांब असे संपूर्ण सेतुबंधन श्रीरामप्रतापाने नळाकडून पूर्ण झाले. सेतुबंधाला मूळ मलयगिरी, तेथून लंकेपर्यंत असा सेतू नळाने चांगल्या प्रकारे आणि मंदारगिरीच्या प्रभेसम बांधला. सेतू परतटापर्यंत पोचला; तेव्हा रामनाम कोट्यवधी वानरांकडून उच्चारले गेले. वानर आनंदाने नाचू लागले. त्यांच्या नामगजराचा नाद नभाच्या पोकळीतही न मावणारा होता. वानर हर्षाने एकमेकांच्या अंगावर उड्या मारत होते, नाचत होते, श्रीरामापुढे येऊन त्याला दंडवत घालत होते. एकमेकाला गुदगुल्या करत, वेडावून दाखवत असतानाच 'श्रीराम आमची माउली सेतुबंधनाने सुखावली' असे वानर म्हणत होते. सेतू पूर्ण झाला म्हणून हर्षाने गर्जना करत सर्व वानरवीर रामापाशी आले. ते हर्षात, स्वानंदात होते. समुद्रात सिद्ध झालेला सेतू पाहून सुरवर म्हणत होते, 'श्रीरामाची अगाध कीर्ती यामुळे त्रिजगतात विस्तारली.' सेतुबंधन पूर्ण होताच नळाने त्वरेने येऊन श्रीरामाला नमस्कार केला. श्रीरामाने त्याला प्रेमाने आलिंगन दिले. त्या सुखद मीलनाच्या वेळी रामाने त्याची पाठ थोपटली. तेव्हा वानरांनी आनंदाने टाळी पिटली आणि अंगदाने आरोळी ठोकली.

अंगद म्हणाला, "सेतुबंधन सिद्धीला गेले. आता बापडे रावण, इंद्रजित, कुंभकर्ण काय आहेत. राक्षसांचे निर्दाळण होणार. नरांतक, सुरांतक, अतिकाय इत्यादी अनेक कुमार मी रणात मारीन. दशमुख रावणालाही सामोरा जाईन. महोदर, प्रहस्त, महापार्श्व, शुक, सारण या प्रधानांचे रावणादेखत कंदन करीन. लंकाधीशाचे निर्दाळण करून, श्रीरामा, अर्ध्या क्षणात तुझी सीता मी आणीन. मला लेकरू समजू नको, मी तर वालीचा पुत्र आहे. रावणाचा वध करून, सीतेचा उद्धार करीन. जोवर समुद्र आडवा होता तोंवर वानरवीर तेथे अडले होते; आता लंकापुर जिंकायला सत्वर सिद्ध होतील. अवघे वानर मिळून

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

रावणाचे दहा कंठ छेदण्यासाठी तुझीच वाट पाहात आहेत. ते वानर अत्यंत चांगले योद्धे आहेत." मग वानरांनी रामनामाचा जयजयकार आणि भुभुःकार केला. देवांनी पुष्पवृष्टी केली. सेतुबंधन सिद्ध झाल्यामुळे श्रीरामाचे लंकेत गमन सहज सुलभ झाले.

अध्याय एकेचाळीसावा

नळाने सेतू बांधला म्हणून त्याला नळसेतू म्हणतात; परंतु तो श्रीरामाचा पुरुषार्थ याच दृष्टीने तिन्ही लोकात प्रसिद्ध झाला आहे. सेतू पूर्ण झाल्याने संतुष्ट झालेला सुग्रीव श्रीरामाच्या चरणांना वंदन करून स्वतः स्वानंदाने म्हणाला, "समुद्रात पायवाट लाभल्यामुळे आमचे मोठे कष्ट वाचले आहेत. आता आम्ही रावणाचा वध करून लंका सपाट करू. प्रधान, सेनानी परिवारासह आणि राक्षसांचे समुदाय, त्यातले दुर्धर वीर यांना मी रणात मारीन, तरच तुझा सेवक म्हणवीन. सेतू पूर्ण होताच, लंका हताहत झाली; आता लंकानाथ रणात मरणार यात कसलाही संदेह नाही." हे सुग्रीवाचे बोलणे ऐकून आणि पूर्ण झालेला सेतू पाहून श्रीराम उल्हसित झाला. त्याने शीघ्रतेने जाऊन सीतेची सुटका करण्यासाठी लंकेत लक्ष्मणासह जाण्याचे ठरविले.

जांबुवंताच्या मनातली भीती, रामाला विनंती

श्रीराम लक्ष्मणासह लंकेत जाऊ लागला त्यावेळी जांबुवंताने हाक देऊन, गर्जना केली की, "श्रीरघुनंदन पायी चालत असताना वेगळेच काही घडेल. श्रीरामाच्या चरणांचा स्पर्श झालेल्या शिळा तरंगल्या; तेव्हा राम-लक्ष्मण हे दोघे जात असता सेतू उद्धरेल, आणि आम्ही ऐलतीरावरच किलकिल करत राहू. श्रीरामाचे चरण लागताच सेतू उद्धरेल, राम-लक्ष्मण दोघेच जातील लंकेत निघून आणि आम्ही इथेच राहू. श्रीराम एकटाच जाऊन सर्व कार्य साधेल; मग आमचा रणसाह्यार्थ उपयोग होणार नाही; असा अनर्थ होऊ पाहतोय." हा जांबुवंताचा संशय ऐकून, सगळ्यांना त्यात सत्यार्थ वाटला. सुग्रीव श्रीरामाला थांबवण्यासाठी धावत गेला. त्याने श्रीरामाला दंडवत घालून, त्याचे पाय घट्ट धरून, स्वतःच्या विचाराने योग्य ते सांगू लागला, "सर्व वानर तुला शरण आहेत. आम्हाला इथे सोडून, एकट्याने लंकेत जाणे उचित नाही श्रीरामा. तुझे चरण लागताच सेतूचे उद्धरण होईल आणि आम्ही वानरे इथे अडकून राहू; आम्हाला जाणे शक्य होणार नाही. पर्वत आणताना आम्हाला खूप कष्ट झाले आहेत. सेतूही आनंदात पूर्ण केला आहे. रघुनाथा, तू एकटा जाशील तर आमचे जीवन धिक् होईल. तू एकटाच कार्य साधशील हे आम्हाला मान्य आहे. पण आमचे जीवित व्यर्थ ठरेल. आमच्या पुरुषार्थाची प्रौढी धिक् धिक् ठरते आहे. रावणाला सपरिवार मारून, श्रीराम सीतेला सोडवील, तेव्हा आमचे काळे तोंड कपिकुळाला धिक्कारा-योग्य ठरेल. यासाठी सर्व वानरगणांना बरोबर घेऊनच तू लंकेला जावेस." एवढे बोलून सुग्रीव श्रीरामाच्या चरणांवर माथा टेकवून थांबला. श्रीराम सुखसंपन्न झाला. हनुमंत येऊन श्रीरामाचे वहन झाला.

मारुती-नीळाच्या खांद्यांवरून राम-लक्ष्मण

श्रीरामाने सुग्रीवाचे म्हणणे मान्य केले. श्रीराम हनुमंताच्या खांद्यावर चढला आणि सौमित्राला नीळाने उत्साहाने आपल्या खांद्यावर बसविले. जसे सज्जन गुणातीत (त्रिगुणांच्या पलीकडे) चढतात तसा श्रीराम मारुतीच्या खांद्यावर चढला. वानरांनी जयजयकार केला. देवांनी पुष्पवृष्टी केली. ज्याप्रमाणे आत्मबोधाच्या माथ्यावर साधू निरपेक्षपणे चढतो, त्याप्रमाणे नीळाच्या खांद्यावर सौमित्र चढून बसला. त्यावेळी हर्षाने वानरवीरांनी रामनामाचा जयजयकार केला. काही वानर आनंदाने नाचू लागले आणि भुभुःकारातून

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

हरिनाम घेऊ लागले. अशा प्रकारे श्रीरघुनाथ लंकेत जायला निघाला. असंख्य वानरही त्याच्याबरोबर निघाले. सेतूवर वानरसमुदाय दाटला. त्यांचा रामनामाचा गजर चालूच होता. कोणी नाचत, कोणी रामनाम गर्जत, कोणी रामनामामृताने डोलत, रामनामाची हाक घालत होते. श्रीरामाच्या दोन्ही बाजूंनी सुग्रीव आणि बिभीषण नेटकेपणाने जात होते. नळ, नीळ, अंगद सर्वांच्या पुढे होते. पाठीमागून गाढे वीर तरस, तरळ जात होते. श्रीरामाजवळ जांबुवंत हा निकटवर्ती, बुद्धिमान चालला होता. वैद्यराज सुषेण हा समर्थ वीर सुग्रीवाचा आप्त होऊन निघाला.

वानरांसह श्रीराम लंकेत

वानरसेनेत पांढरे, पिवळे, तांबडे असे फुलांनी बहरलेले वृक्ष उंच धरलेले होते; कर्दळीची पाने डोलत होती, त्यामुळे ते सैन्य अत्यंत शोभायमान दिसत होते. वानरांनी माड, ताल झेलत, तेच दुर्धर महाध्वज समजून धारण केले होते. रामनाम गर्जत जाणारे ते वानरवीर लक्षणीय प्रकार करत होते. कोणी समुद्रात उड्या घेत होते; कोणी बुड्या घेत होते, काही धडधडा धावताना शेपटीच्या गुढ्या उभारत होते; काहीजण श्रीरामाबरोबर जाताना जलतरणातले विविध प्रकार दाखवत होते. काही सेतूच्या कडेने जात होते तर काही पाण्यात नाचत होते. त्यातले काही वानर सेतूला स्पर्श न करता आकाशातून चालले होते. श्रीरामापाशी काहीजण होते. सेतूवर वानरवीरांची अशी दाटी झाली होती की काहींना वाट मिळत नव्हती, काही धक्क्याने समुद्रात पडत होते आणि लगेच उड्डाण करत होते. सेतूच्या काठावरून वानरांच्या रांगा चालत होत्या. काही वानर आकाशात उसळी मारून पलीकडे लंकेच्या तटावर पोचले होते. कोटीकोटी प्रतापवंत वानरवीर समुद्र पार करून गेल्याचे श्रीरामाने पाहिले. त्यांनी शतयोजने सेतू मधे कुठेही न थांबता पार करून मुहूर्तावर ते लंकेत पोचले. हनुमंताने श्रीरामाला पाठीवरून शीघ्रगतीने आणले. त्याच्या बरोबरीने वानरगण जात असताना चालणे विसरले आणि श्रीरामावर लक्ष ठेवून जाण्याने त्यांचे श्रमही नाहीसे झाले. श्रीरामासह जाताना त्यांचे श्रम, दमलेपण विरून गेले. सर्व वानर श्रीरामाच्या बरोबर जात असल्याने त्यांची श्रमनिवृत्ती झाली, सुगम गती त्यांना प्राप्त झाली. परमपद प्राप्त होऊन ते स्वानंदात मग्न झाले. पैलतटावर येताच त्यांना रत्नकळसाने शोभिवंत झालेले लंकाभुवन दिसले. ते परिपूर्ण तेजाने झळकत होते. त्यापुढे अलकावती, भोगावती, अमरावती बापुडवाण्या ठरत असून त्याचे तेज कैलासाप्रमाणे दिसत होते. त्याच्या तेजाने दशदिशा उजळून निघाल्या होत्या. अशी लंका पाहून जगजेठी वानरवीर उड्डाण करून त्रिकुटावर जाण्यासाठी उत्सुक झाले.

बिभीषणाला श्रीराम जवळ ठेवतो

वानरवीरांची त्रिकुटावर जाण्याची उत्सुकता पाहून बिभीषणाने त्यांना बाजूला केले आणि तो स्वतः गदा घेऊन सर्वांच्या पुढे होऊन निघाला. राक्षस कपटी, गुप्तघाती असल्याने वानरांना मारतील तेव्हा त्यांचे निर्दाळण युक्ती-प्रयुक्तीने कसे करायचे हे बिभीषण जाणत होता. त्याचे चार प्रधान हेही राक्षसगतीचे निवारण करणे जाणत होते. यासाठी बिभीषण आणि प्रधान हे पुढे होऊन वानरगणांना घेऊन चालले. गदाधारी बिभीषणासमोर राक्षस तृणप्राय होते. त्याला सामोरे कोण येणार, नुसत्या त्याच्या धाकाने प्राण जायचा. त्यावेळी बिभीषण पुढे चाललेला पाहून श्रीरामाने हनुमंताला म्हटले, "बिभीषणाला पुढे जाऊ देऊ नये. यामागचा तात्त्विक विचार ऐक. राक्षसांनी कपटाने त्याचा घात केला तर आमचे जीवित्व आणि पुरुषार्थ व्यर्थ ठरेल. त्याहीपेक्षा मोठा अनर्थ

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

हा की आम्हाला शरण आले त्याचा घात झाला तर आम्हीच स्वतः प्राणत्याग करू. मग सीतेची सुटका कोण करील? असा दारुण अनर्थ घडेल.'' तेव्हा मोठ्या प्रयत्नाने बिभीषणाला थांबवून, श्रीरामाने त्याला आपल्या हातांनी धरून, जवळ बसविला. श्रीराम असा कृपामूर्ती कृपाळू होता.

नंतर राक्षसगतीचे निवारण करू शकणारे चौघे प्रधान पुढे पाठविण्यात आले. ते अतिशय सावध, शहाणे असे युद्धकुशल वीरयोद्धे होते. समुद्राच्या पैलतटावर जिथे फळमूळ-जळ यांचा संभार होता तिथे वानरगणांच्या रांगा स्वानंदात डोलत बसल्या होत्या. श्रीराम हा समुद्रतीरावर, सुग्रीवाच्या वानरसैन्यासह, बसलेला पाहून त्या जगजेठीवर सुरांनी पुष्पवृष्टी केली, ते म्हणाले, ''शत्रूला जिंकणारा तू समर्थ आहेस. समुद्रवलयांकित पृथ्वीचा प्रतिपाळ करणारा आहेस. दहा सहस्र वर्षात शत्रूविरहित राज्य प्राप्त करून, देवांना त्यांच्या बंदिवासातून सोडवून तू श्रीरामा तुझा पुरुषार्थ दाखव. सुरवरांना बंधमुक्त केल्याने आम्ही तुझे कृतोपकारी होऊन, जन्मजन्मांतरी तुझे स्मरण करू.'' असे सांगून त्यांनी श्रीरामाचा जयजयकार केला.

समुद्र श्रीरामभेटीला येतो

सेतूबंधन पूर्ण झाले, श्रीराम सैन्यासह समुद्र ओलांडून गेला, वानरसमूह पार झाला हे कळल्याने सिंधूला पश्चात्ताप झाला. ''पूर्वी श्रीरामाला भेटलो, सेतुबंधनाची युक्ती सांगितली, परंतु श्रीरामाची पूजा केली नाही, असा मी मूर्खपणा केला. मी ज्येष्ठ आणि श्रीराम कनिष्ठ असे मानतो तो पापिष्ठ ठरतो. त्याच अभिमानामुळे मी दुष्टपणाने श्रीरामाचे वरिष्ठपण न मानता पूजा केली नाही. श्रीरामाला कनिष्ठ मानणारा मी त्रिजगतात महापापी ठरलो. माझ्या पापाची मुक्ती सेतुबंधात नाही. सेतुबंधनाने माझी पापमुक्ती होणार नाही की नळाच्या वरदानविषयक सांगण्यानेही होणार नाही. पर्वत तरले ते श्रीरामाच्या चरणप्रभावाने. सर्व सेतुसामग्री ही श्रीरामामुळेच जमली. ज्याच्या सामर्थ्याने पर्वत समुद्रात तरले त्या श्रीरामाला मी कनिष्ठ मानला, तेव्हा माझ्यापेक्षा मोठा पापी आणि दुष्ट दुसरा कोणी नसणार.'' अशा पश्चात्तापाच्या वृत्तीने श्रीराममूर्ती-पूजनासाठी श्रद्धावान सिंधू अलंकारसंपत्ती घेऊन आला. विजयलाभाच्या अनुकूल वृत्तीने सेतूबंधन पूर्ण झाले. पैलतीरावर श्रीरघुपती वानरराज सुग्रीवासह समुद्राने पाहिला. समोर लंका दृष्टीसमोर ठेवून वानरांच्या ओळी बसल्या होत्या. रावणाचा त्वरित वध करण्याचा त्या वानरांना उत्साह होता. असा श्रीरघुनंदन पाहून समुद्राने दंडवत घालून रामाचे चरणवंदन केले. तो नंतर म्हणाला, ''तू आम्हाला पूर्ण ज्येष्ठच आहेस. जेष्ठ आणि कनिष्ठ असा अभिमान बाळगल्याने माझ्याकडून दोषपूर्ण वर्तन घडले आहे. श्रीरामाचे माहात्म्य असे की तो आपले ज्येष्ठपण कळू देत नाही. खांबातून नृसिंह प्रकटला तो काय प्रल्हादाहून धाकटा का मानायचा! तसाच श्रीरामा तू ज्येष्ठ आहेस, धाकटेपण तुला नाही. पायांच्या स्पर्शाने तू पाषाण तारतोस, असा तू तो परिपूर्ण परमात्माच आहेस. तुला कनिष्ठपण तर नाहीच, उलट तू ज्येष्ठात जेष्ठ आहेस. तू परब्रह्म, ब्रह्मस्थिती, परमात्मा, परंज्योती, चिदात्मा, चिन्मूर्ती, सगुणस्वरूपात निर्गुणत्वे वागणारा आहेस. तू सगुणरूपात दिसत असलास तरी सर्वांगाने निर्गुण आहेस. ही खूणही उणी ठरावी असा तू श्रीराम म्हणजे पूर्ण परब्रह्मच आहेस.''

श्रीरघुनाथ समुद्र पार करून आला. समुद्र स्वतः तिथे आला. त्या दोघांना लक्ष्मण, सुग्रीव, जांबुवंत, बिभीषण आणि सर्व वानरगणांनी वंदन केले. दोघेही अत्यंत श्रेष्ठ आणि सर्व वानरगणांनी वंदन केले. दोघेही अत्यंत श्रेष्ठ आणि समर्थ होते. समुद्राने स्तवन केल्यावर श्रीरामानेही समुद्राच्या

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

चरणांना वंदन केले. श्रीराम त्याला म्हणाला, "आम्हाला तू सर्वार्थाने ज्येष्ठच आहेस." त्यावर समुद्र म्हणाला, "ज्येष्ठ-कनिष्ठपणाची कथा पूर्वी मी यथार्थ बोललोच आहे. आता मी काही विनंती करतो आहे ती कृपावंता, श्रीरघुनाथा, ऐकून घे. श्रीरामा, मुनिवेषाने रणांगणात युद्ध करता येत नाही. याविषयी मुनिवेषाबद्दलची कथाच मी तुला सांगतो. मुनिवेष निवृत्तीच्या, शांतीच्या, परमार्थीयांच्या दृष्टीने अवश्य पाहिजे. युद्धकंदनाच्या कामी नको. पूर्वीचे राजे, नरवीर, हे युद्धासाठी वीरशृंगार करत. युद्धासाठी मुनिवेषधारी कोणी आला तर तो झुंजार वीर मानत नाहीत. मुनिवेषात असतानाच तू त्रिशिरा, खर, दूषण मारलेस आणि मुनिवेषाचे लक्षण स्वभावे निरूपण केलेस. परंतु त्यामुळे संन्यासी आणि बलाढ्य स्वार ही म्हण प्राप्त होईल. मुनिवेष हा युद्धकंदनार्थ आहे हे शास्त्रार्थाने आणि श्रुतिमूळ दृष्टीने योग्य नाही. श्रीरामा, तू निधडा, समर्थ वीर आहेस, तेव्हा माझ्या मनात असे आहे की श्रीरघुनाथ अलंकारयुक्त असा श्रद्धेने पूजावा. सर्व अलंकार आभूषणांनी युक्त असा श्रीराम रणांगणात उभा राहिलेला पाहून आमचे डोळे धन्य होतील." असे म्हणून समुद्राने पुन्हा श्रीरामाचे पाय धरले.

समुद्राने अत्यंत श्रद्धेने श्रीरामाला म्हटले, "आता अलंकारयुक्त श्रीरघुनाथ मी केव्हा पाहीन असे मला झाले आहे. एवढे माझे मनोरथ पूर्ण कर." यापुढे सुग्रीव अंगद इत्यादी वानरयोद्धे सालंकृत असा श्रीरघुपती पाहण्यासाठी उत्सुक झाले. त्यांच्या चित्तात आल्हाद आणि स्वानंद भरला. "श्रीरघुनंदन रत्नाभरणे ल्यालेला पाहून आमच्या डोळ्यांचे पारणे फिटेल. वल्कलांचे धरणे उठून मुनिवेषाची बोळवण होईल. विविध प्रकारचे अलंकार श्रीरामाने धारण केल्यामुळे आमचे डोळे तृप्त होतील. श्रीरामा, तुझे मुख पाहताच चिन्मात्र सुख कोंदल्याचा अनुभव येतो. श्रीरामाच्या दर्शनाने मनाच्या सर्व आधि-व्याधी आणि अहम्-कोहम्-सोहम् याही उपाधी नाहीशा होतात; चित्त चैतन्य होते; बुद्धी समाधान पावते; प्रपंच ब्रह्मार्पण होतो हे सर्व श्रेष्ठ अशा श्रीरामाच्या दर्शनाने होते." असे सुग्रीवादी म्हणाले.

श्रीरामाचे वस्त्रालंकारयुक्त दर्शन

समुद्र, सुग्रीव आणि वानरगण यांनी श्रीरामाचा जयजयकार करून विनंती केल्यावर श्रीरघुनाथ कृपावंत आणि संतुष्ट झाला. त्याने सिंधू-सुग्रीवादींची विनंती प्रसन्न मनाने मान्य केली आणि तो मुनिवेषत्यागाला सिद्ध झाला. त्याने वल्कलांच्या वस्त्रांचा त्याग करून पीतांबर वेढून घेतला. तो अत्यंत मनोहर पीतांबर समुद्राने स्वतः आणला होता. श्रीरामाच्या कमरेला लागून जणू वीजच अस्ताला जाण्याचे विसरली, तसा तो पीतांबर तेजस्वी, देदीप्यमान होता. स्वतः श्रीरामाने आपल्या जटा फुलांनी झाकल्या, मग त्यावर समुद्राने पूर्ण मुकुट चढविला. तो मुकुट अनर्घ्यरत्नांनी गच्च मढविलेला, तेजस्वी होता. त्यामुळे श्रीरघुनंदन जनांच्या नयनांना सुख देणारा, शोभिवंत दिसला. आत्मतेजाने तेजस्वी असणारा श्रीराम, मस्तकावरच्या मुकुटातील अनर्घ्यमण्यामुळे शिरोमण्यांचा शिरोमणी दिसत असून अलंकारांनी शोभत होता. त्याची कुंडले मकराकार असे लौकिकाचा बाह्य विचार करणारे म्हणाले, तरी तो मुख्यतः मुळात निर्विकार होता. श्रवणांनी विकारांचे तो निर्दाळण करत असे. दोन्ही बाहू आणि दंड यांवर उठून दिसणारी कंकणे श्रेष्ठ श्रेष्ठ मुक्ताफळांची-मोत्यांची-केलेली असून ती मनगटांवर शोभत होती. त्याची मनगटे सुंदर होती. कंठात चौपदरी सर होता, पण रामाला एकसरच आवडे; यातले गुह्य समुद्र जाणत नव्हता. गुणातीत परिपाक हेच श्रीरामाच्या हृदयातले पदक होते; जे जीवशिव एकटक पाहात, अलौकिक आपली सेवा करत होते. कमरेवर मेखला असून, तिला लहान घंटांची चकचकीत माळ जोडली होती. गळ्यात अनर्घ्य रत्नांच्या माळा मोत्यांसह गुंफलेल्या होत्या. वाकी-

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Trust and eGangotri

अंदुवांचा मेळ कळिकाळाला धाक दाखवत होता. त्याच्या चरणकमळातील तोडर पाहून वैरी चळचळा कापत असत.

श्रीरामाचा मुखचंद्र पूर्णपणे निष्कलंक असून त्याच्या उपमेला चंद्र येऊ शकत नव्हता; कारण तो चंद्र सकलंक आणि क्षयी (क्षय पावणारा) होता. मुकुट, कुंडले, मेखला, कमरेला कसलेले सोनेरी वस्त्र, असा तो मेघश्याम श्रीराम पाहून डोळे निवत होते. त्याच्या भाळावर रेखीव पिवळा तिलक होता; कंठात पायापर्यंत येणाऱ्या रत्नमाळा होत्या; असा तो राम तेजस्वी घनःश्यामल होता; त्याला पाहून डोळे तृप्त झाले. गळ्यात तेजस्वी कौस्तुभ, किंकिणी गुंफलेल्या माळा कटिसूत्राच्या ठिकाणी, मुक्तीची दुहेरी मौक्तिकमाळ गळ्यात, न कोमेजणारी ताज्या कमळांची माळ, तुळशीची माळ गळ्यात असा तो घनसावळा श्रीराम शोभत होता. त्याच्या चरणकमळाचे तोडर गर्जत होते. हृदयाशी गंभीर पदक, बाहून आणि मनगटात मनोहर अलंकार असा श्रीरामचंद्र पाहून डोळ्यात सुखाच्या उर्मी नाचत होत्या. अत्यंत लावण्यमय रूप, देखणे ठाणमाण, असा तो रघुनंदन होता. माहेश्वरी ठाण मांडून, हातात धनुष्यबाण घेतलेला राम नयनसुखदायक होता. वीरकंकणांचा झणत्कार, करमुद्रिका दशावतार असा श्रीराम डोळ्यांना सुख देत होता. त्याच्या निर्विकारतेने डोळे निवले; बुद्धी सन्मात्रांनी फुगली; हृदय आनंदले; असा तो चिदचिन्मात्र श्रीरघुनंदन होता. अहम्-कोहम्-सोहम् यांचा अभिमान सोडून आपण जर श्रीरामाचे चरण वंदिले तर स्वानंदाने पूर्ण शांती लाभते. वीरशृंगार केलेली. श्रीराममूर्ती पाहताच इंद्रियवृत्ती परमानंदात जाऊन पूर्ण आणि नित्य तृप्ती देते. या स्वरूपातला श्रीराम पाहून समुद्र तटस्थ झाला. त्याला आणि वानर, सुरवर यांना एकटक श्रीरामचंद्राकडे पाहात राहावे असे वाटले.

श्रीरामदर्शनाने समुद्र, वानर यांना आनंद

श्रीरामाचे वस्त्रालंकार विभूषित दर्शन घेत राहिल्याने पाणी वाहणे विसरले, वारा गती विसरला, सूर्याला दिनमानाचे विस्मरण झाले. समुद्र मनातून सुखावला. सुग्रीव आणि इतर वानरयोद्धे सुखावले. त्यांनी रामनाम भुभुःकारातून घेत रामाचा जयजयकार केला. त्या आवाजाने नभ कोंदले. नंतर समुद्राने श्रीरामाला हाताने धरून वरुणालयात नेले. रामाने वरुणाची वृद्ध मूर्ती पाहून त्याला नमस्कार केला. वरुणाने श्रीराम हा अवतारी पूर्ण ब्रह्म आहे असे जाणून रामाला दंडवत घातले. वरुण म्हणाला, "आता शीघ्र लंकागमन कर. तू निश्चित पूर्ण विजय प्राप्त करशील. जसा श्रीराम शृंगारला तसाच सौमित्रही शृंगारला. दोघे महावीर शूर जसे आकाशातले सूर्यचंद्रच. समुद्राने ओंजळ भरून रत्ने आणून ती रामचंद्रावरून ओवाळून टाकली. त्याने स्वानंद प्राप्त करून घेतला. सुग्रीवानेही लगेच येऊन धन ओवाळून ते धन वाटण्यासाठी समुद्रतीराकडे प्रयाण केले. तो नंतर दिसलाच नाही. श्रीरामाच्या संगतीत लोभ भावना लुप्त झाली; काही मागण्याची मूळ वृत्ती समूळ शांत झाली; सर्वांना स्वानंद तृप्ती लाभली. मागे न पाहता वानरांनी उठाउठी उड्डाण केले आणि रावणाच्या सभेजवळ धन, रत्ने यांची वृष्टी केली. ती रत्नांची वृष्टी कोठून, कोणी केली हे पाहण्यासाठी रावणाने अनेक राक्षसांना पाठविले. कोट्यवधी वानरांचे सैन्य घेऊन जगजेठी श्रीराम लंकेत आल्याचे त्याला समजले. या वार्तेने रावणाच्या मनात चिंता निर्माण झाली. त्याने पुन्हा प्रधानांना पाठवून निश्चित वार्ता मिळवली. तेव्हा लंकेत एकच आकांत झाला. मागे पळायला जागा नाही, पुढून वानरांची धाड आलेली, यांमुळे रावणाची बुद्धी कुंठीत झाली. त्याच्या स्त्रीपुरुषांवर बंधन आले असे त्याने जाणले.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sayajirao Research Academy, Gangotri

अध्याय बेचाळीसावा

श्रीराम ससैन्य आल्याचे समजताच रावण भयभीत झाला. प्रधान आणि सेना उद्विग्न झाली लंकेतले नागरिक कंपित झाले. श्रीराम रणवाद्ये वाजवत, वानरांचा सेनासंभार बरोबर घेऊन आला या वार्तेने रावण चक्रावला. वानरसैन्यातून विविध वाद्यांचा गजर चालू झाला. त्यामधे शंख, भेरी, टाळ, घोळ, काहळा, चिनकाहळ, ढोल, पटह, मांदळ, बुरुंगे, निशाण, विराणी, गिडबिड, अशा अनेक वाद्यांचा समावेश होता. अशा वाद्यांचा गजर करत, वानरदळसंभार घेऊन श्रीरघुवीर लंकेत आला. वानरांनी भुभुःकार केला. श्रीरामाच्या आगमनाने रावणाला कल्पान्त आठवला; तिथे प्रधानांची काय कथा! राक्षसांनाही दुःखाचे कढ आले. लंकापुरीत घरोघरी आकांत सुरू झाला. नर-नारी अत्यंत कळवळून शंख करू लागले. वानरसैन्य एवढे प्रचंड होते की एकापुढे एक, एकामागे एक असे ते चालल्याने कोणीकडे पळावे तर कोठे वाटच मिळत नव्हती. वानरांनी दुर्गाचे बुरुजही बळकावले होते. वानरदळ पाहून 'या रावणाचे कर्मच खोटे, त्यामुळेच सर्वांचे मरण ओढवले आहे. त्या रावणाच्या अपराधासाठी असंख्य राक्षस मरताहेत,' अशी घरोघरी बोंब उठली. 'त्या पापबुद्धी रावणाने श्रीरामाची कांता चोरून आणली आणि लंकेचा घात केला. आता काही उपाय उरला नाही. बिभीषणाने पूर्वी सुचविले होते की रामाला सीता देऊन शरण जावे; पण पापी रावणाने ते ऐकले नाही. आता त्यामुळे राक्षसांचे मरण ओढवलें आहे.' असे सर्वजण म्हणू लागले.

रावणाचा संताप-प्रधानांची निंदा

श्रीराम लंकेत आलेला समजल्यावर रावण अत्यंत संतापला आणि त्याने प्रधानांना बोलावून घेतले. प्रधानांना उद्देशून रावण म्हणाला, "श्रीराम वानरसैन्य घेऊन लंकेत आला तरी तुम्हाला त्याची जाण नाही. मद्य, मैथुन यामुळे तुम्ही विषयांध झाला आहात. श्रीराम सपरिवार येऊन वानर उरावर येऊन बसले, तरी तुम्ही स्त्रियांच्या माडीवर विषयधुंद होऊन पडलेले. श्रीराम, लक्ष्मण आणि वानरांचे समुदाय घेऊन लंकेवर चालून आला. तरीही तुम्ही आळसात, झोपेत राहिलात. आता वैरी दारावर येऊन आदळला तरी तुम्हाला समजले नाही, कारण मद्य-मैथुनात तत्पर होऊन राहिलात. तुमच्या जवळ हेर-चार नाहीत. वैऱ्याने घर घेतले तरी तुम्हा पामरांना कळणार नाही. पंचविषय आणि पंचभूत तुम्हाला निश्चित लागले असून श्रीराम लंकेत आला तरी तुम्ही भ्रांतीमुळे जाणले नाही. पूर्वी तुमचा केवढा मोठेपणा होता; म्हणे वानर बापडे वनचर, पाला खाणारे, आमच्यासमोर कसले येतात; आता तेच वानर महावीर समुद्रावर सेतू बांधून, लंकेत आले आहेत. ते दुर्धर वानरवीर भुभुःकार करत आहेत. त्यातून रामनामाचा गजर करत आहेत. कृतान्तकाळ अशा रावणाला गवतासमान लेखून, सेतू बांधून ते वानरगण दारुण युद्ध करण्यासाठी आले आहेत. इतर सर्व वीरांची उपेक्षा करून, माझ्यावर निश्चित लक्ष ठेऊन ते समर्थ रणवीर युद्धासाठी उत्सुक झाले आहेत. तुम्ही वानर म्हणून ज्यांची अवहेलना केलीत तेच आता युद्धार्थ आले आहेत. ते वानरवीर अत्यंत विचक्षण रणयोद्धे असून तुमचा निश्चित प्राण घेतील."

रावण पुढे म्हणाला, "श्रीराम लंकेत येणे, वानरांनी सेतू बांधणे हे तुम्हाला कळले नाही कारण तुम्ही अती गर्वाने गैरसावध राहिलात. वानरवीरांनी कडकडाट करत सेतू बांधून पूर्ण केला तेही तुम्हा गर्वोन्मत्तांना कळले नाही. मद्याने धुंद होऊन स्त्रियांशी रत होणारे, गर्वाने उन्मत्त

https://archive.org/details/bhaavarth_ramayan_lakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

झाले, सामर्थ्याचा दुरभिमान बाळगणारे तुम्ही सर्व पांचही उन्मत्त झाले आहात. कोणी हेर पाठविले की माझ्या कार्याची आठवण तुम्हा कोणाला झाली, काही नाही. सगळे उन्मादाने विस्मृतीत गेलात. जो सर्वकाळ राजाचे हित विचारात घेतो त्याला मंत्री म्हणतात. तुम्ही ते कार्य केले नाहीत. केवळ विषयमग्न विषयांध झालात. प्रधानच सर्व कार्य करतात अशी अनादी राजनीती आहे. तुम्ही सारे स्वार्थाने वागणारे, विश्वासघातकी आहात. तुमच्यावर मी विश्वास टाकला, तर तुम्ही माझ्याच घातासाठी पेटलात. तुम्हीच श्रीरघुनाथाला समूळ कुलक्षयासाठी लंकेत आणलेत. खरोखर माझा बिभीषण धर्ममूर्ती आहे. तो सत्य तेच बोलला. त्याने 'तुझे प्रधान विश्वासघातकी आहेत' असे सांगितले होते; तेच आता अनुभवाला आले. त्यावेळी बिभीषण म्हणाला होता की, "उन्मादाने मदोन्मत्त झालेले तुझे प्रधान असून, त्यांचे तोंड (बोलणे) अविश्वसनीय आहे." त्याचे प्रत्यक्ष प्रमाणच मला मिळाले. माझा बिभीषण इथे असता, तर त्याने सेतूच बांधू दिला नसता. रामाला येऊ दिले नसते. माझ्या हितासाठी तो परोपकारी होता. तुमच्या वल्गनांवर विश्वासून मी सखा बिभीषण घालविला. आता श्रीराम अंगावर आदळला. माझे प्रधानच कपटी आहेत."

इंद्रजिताचे रावणाला आश्वासन

श्रीरघुनंदन लंकेत आल्याने रावणाचे तोंड रागाने लाल झाले आणि तो रागातच बोलला. ते त्याचे भाषण ऐकून सेना, प्रधान सारेच लज्जायमान झाले. श्रीराम गर्जत आला; विघ्न अंगावर येऊन आदळले यांमुळे लज्जायुक्त प्रधान भयाने कापू लागले. श्रीरामाच्या आगमनाने रागावलेला रावण कृतान्ताप्रमाणे कठोर झाला. त्यामुळे प्रधान, राक्षस यांनी आकांत केला. त्यांना प्राणनाश आठवला. सर्वजण खाली मान घालून स्तब्ध बसले. कोणी काही बोलले नाहीत. त्यावेळी मेघनाद-इंद्रजित आपल्या पित्याला उद्देशून म्हणाला, "श्रीरघुनाथ आला म्हणून तू का व्यर्थ भितोस. काय त्या राम-लक्ष्मणांची कथा, सगळ्या वानरांना तरी कोण मोजतो. मी इंद्र बांधून आणला, सुरगण बंदीत टाकले, त्यावर राम-लक्ष्मण ते कोण? वानरगणांची काय पर्वा करायची. वानर स्वतः पाला खाणारे वनचर, राम-लक्ष्मण मानवप्राणी, तो तर आमचा नित्याचा आहार, मग तुला एवढे दुर्धर भय कसले वाटते आहे. स्वामींनी सुखाने स्वस्थ राहावे. तू माझा पुरुषार्थही जाणतोसच. जे जे इथे आले आहेत ते सर्व मी मारीन. विकट बाणांनी त्यांचा शूर समुदाय आणि राम-लक्ष्मण यांना रणात पाहून घेईन. अंगद, सुग्रीव यांना रणात शोधून मारीन. ज्याचे अपार कौतुक झाले आणि ज्याने लंकेत मोठे विध्वंसन केले तो हनुमंत मी मारीन. दुसरा तो जांबुवंत वधीन. नळ, नीळ, गंधमादन, तरस, तरळ, पनस, सुषेण हे एकेक त्यांच्या सैन्यासह बाणांनी निर्दळीन. माझ्या बाणांची झड राम-लक्ष्मणांना मरण प्राप्त करून देतील. बापडी ती माकडे तर कोटीच्या संख्येने मारीन.

काही प्रधानांची दर्पोक्ती

इंद्रजिताचे आवेशपूर्ण भाषण ऐकून, प्रहस्त गर्जना करीत म्हणाला, "राजा, तुझ्या शत्रूचा प्रतिबंध मी एकटाच करीन. माझ्या मुद्‌गलांच्या घावांपुढे राम-लक्ष्मण बापडे काय आणि बलवान वानर काय सगळेच रणात मारीन. मुसळ साधन चक्राकार फिरून अष्टांगांना विषम मार देते, हे हा प्रहस्त महावीर दाखवून देईल, तेवढे दशशिर राजाने पाहावे. राजा, तुझा शत्रुसंभार माझ्याकडून निश्चित मारला गेला असे समज. तू पद्मिनीकाम-शय्या सुखाने सेवन कर. नाना भोगप्रकार तू स्वतः भोग." या प्रकारचे प्रहस्ताचे नविन्यपूर्ण भाषण ऐकल्यावर धूम्राक्ष गर्जना करत उठून म्हणाला,

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Trust and eGangotri

"वानरसेना पराक्रमी लंकेवर येऊन आदळली. आता आम्ही एकत्र होऊन, रात्रीच्या वेळी जाऊ आणि झोपले असतानाच वानरगणांचा नाश करू. रघुपती, सौमित्र, अंगद, सुग्रीव इत्यादी योद्धे रातोरात जाऊन मारू आणि शत्रूची रणसमाप्ती करू. अशी ख्याती करून लंकापतीला यश मिळवून देऊ. हेच माझ्या चित्ताला आवडेल." असे धूम्राक्ष वीरांना सांगत होता. नंतर ही त्याची युक्ती महोदराने धिःक्कारली. "श्रीरामाने सतत, आणि सुग्रीवाने देखील, वानरांचे सपरिवार रक्षण केले आहे. शिवाय निजलेल्या वानरांचा घात करण्यात तुझा कसला पुरुषार्थ आहे." अशा शब्दात सभेतच महोदराने धूम्राक्षाची हेटाळणी केली. तो पुढे म्हणाला, "श्रीराम नित्य सावधान असतो, आणि वानरांचे स्वतः रक्षण करतो. राजा सुग्रीव स्वतः अहोरात्र दक्षतेने रक्षण करतो. श्रीराम हा नेहमी सावध असतो. कपट करणारा मारीच त्याच्याकडून मारला गेला, शूर्पणखेने स्वतः कपट केल्याने ती विटंबिली गेली. तेव्हा तिथे वानरांच्या घातासाठी म्हणून रात्रीच्या वेळी जाल, तर श्रीरामाच्या बाणवर्षावाने एकेकजण निश्चित मराल."

महोदराने नंतर म्हटले, "श्रीराम तर नित्य पाहणारा आहेच, पण त्याच्या भात्यातले बाणही अंधारातही पाहू शकणारे आहेत. ते शोधून शोधून एकेकाचा प्राण घेतील. श्रीरामाच्या दर्भकाडीने कावळ्याच्या मागे लागून, त्याला तिन्ही लोकात हिंडायला लावून, अखेर त्याचा डावा डोळा बळी घेतला. अशा श्रीरामापुढे घाला घालणे कसे जमेल? तुम्ही राक्षस उन्मत्त आणि वेडे आहात. श्रीरामाच्या बाणांनी नेमके मराल. तेव्हा तुम्ही सर्वजण सावधपणे ऐका. अती उत्साहाने वानर आले आहेत. त्यासाठी आपला दुर्ग सिद्ध आणि बळकट करा. दुर्गाच्या सामर्थ्यानेच त्यांच्याशी आपण युद्ध करू. बुरुज, अटाळे, भिंती, पागरे अशा ठिकठिकाणी यंत्रे जडवा. एकत्र जमून वीरावीरांनी दुर्गाची दारे रक्षावी. वानरांचे दुर्धर बळ लक्षात घेऊन दारांना खिळी, साखळ्या घाला. शृंखला दृढ आहे असे पाहून सैन्याने एकत्रितपणे संरक्षण करावे." ही महोदराची गोष्ट ऐकून अतिकाय गदगदा हसू लागला. महोदर जे जे बोलला त्यातला पुरुषार्थ अतिकायाला व्यर्थ वाटला. तो म्हणाला, "वानरांच्या उड्डाणापुढे लंकादुर्ग बापडा काय आहे. शृंखला, साखळ्या आणि दारे कुठवर आवरणार! चित्रकूटाच्या शिखरांवर जिथे वानरांचे उड्डाण होऊ शकते तिथे तुमच्या दुर्गाची थोरवी काडी किंमतीची नाही."

अतिकाय आपला विचार सांगताना म्हणाला, "पूर्वी बिभीषणाने स्वहित सांगताच त्याला नगराबाहेर घालविलेत. आता मीही जेव्हा पूर्ण स्वधर्म सांगेन तेव्हा सर्वजण रागवाल. जर तुम्ही मला क्षमा कराल तर मी यथार्थ सांगेन. श्रीराम सत्यसंकल्प असून प्रधानांची वल्गनापूर्ण वडबड व्यर्थ आहे. इंद्रजित माझा ज्येष्ठ बंधू आहे; परंतु तो त्याच्या पुरुषार्थाबद्दल असंबद्ध बोलतो आहे. पूर्वी त्याचे वानराशी (हनुमंताशी) युद्ध झाले तेव्हा त्याला व्यवस्थित पीडला होता. तोच इंद्रजित आता आपला पुरुषार्थ न लाजता मोठेपणाने सांगतो आहे. खोट्या भाषणाने राजासमोर अत्यंत थोर पराक्रमाच्या वल्गना करतो आहे. तो म्हणतो राम, लक्ष्मण, सुग्रीव, अंगद, जांबुवंत आणि हनुमंतही मारीन असे सभेत बोलताना त्याला लाजही वाटत नाही. तसाच हा प्रहस्त; जंबुमाळीचा वध झाला तेव्हा याने पुत्रशोकाने शंख केला, पण हनुमंताशी युद्ध काही केले नाही. हनुमंताशी ज्याला युद्ध करवले नाही त्या प्रहस्ताने मुसळ घेऊन धावावे आणि सुग्रीवादी सर्व वानरवीर मारीन म्हणावे ही खोटेपणे केलेली वडबड आहे. धूम्राक्ष हा महाबलवान वीर निजलेल्या सर्व वानरांचा घात

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

करण्याची भाषा बोलतो, हा तर त्याचा पुरुषार्थ! अशा खोटे बोलणाऱ्या प्रधानांनी आपला पराक्रम वृथा का मिरवावा. त्यांच्यावर विश्वास ठेवल्याने रावण दारुण दुःख भोगेल."

अतिकायाकडून हितोपदेश

अतिकायाने त्यावेळी वीराधिराजाला शोभेल अशी उजवा हात उंचावून गर्जना केली की, "राजेन्द्रा मी स्वधर्म पाळून काय सांगतो ते ऐक. राजाने गोब्राह्मणांचे रक्षण करावे; दुष्टांचे निर्दाळण करावे आणि साधूंचा प्रतिपाळ करावा. या रीतीने स्वधर्मनीतीचे पालन करत जे राजे वागतात ते नित्य सुखी होतात आणि निर्भयपणे पृथ्वी भोगतात. विभीषण हित सांगू लागताच त्याला नगरीबाहेर लाथा घालून हाकलले. मीही स्वधर्मच सांगतो म्हणून मला दुष्ट, दुर्जन म्हणू नये. सुबुद्धी सांगणारा विभीषण पवित्र आहे; त्याला शत्रू करून तुम्ही दवडलेत. लंकेशा तू पिता मी तुझा पुत्र-मी धर्मविचार सांगतो तो ऐक. जिकडे नित्य पापाचे आचरण होते, तिकडे अकीर्ती, अपयश आणि अकल्याण होते. अत्यंत निंद्यपणाने मरण येते. हे सत्य आहे लंकेशा. याउलट जेथे नित्य धर्माचरण तेथे यश, कीर्ती, कृतकल्याण असते. त्यामुळे आपण त्रैलोक्यात विजयी होतो. हे सत्य आहे लंकेशा. श्रीराम हा अत्यंत शुद्ध धर्मात्मा आहे. त्याने तुझा काहीही अपराध केलेला नसताना, तू त्याची पत्नी का चोरलीस? त्यामुळे तू निश्चित पापी झालास. सीता पूर्ण पतिव्रता आहे. अशा परस्त्रीचे अपहरण करणारा तू निंद्य पापी ठरलास. अती पापाने कुलनाशच होतो. जेव्हा सीतेला लंकेत आणले तेव्हापासून अनेक उत्पातांना आरंभ झाला. अखयादी सर्व वीरांचा मारुतीने घात केला. परदारेच्या पापसंकटाने वानरांना पाठ दाखवून, इंद्रजित पळाला. सैन्यकोटी मेल्या. परस्त्रीचे अपहरण हे अत्यंत दारुण असे पाप आहे. त्यामुळे वानराकडून रावण गांजला गेला. लंकाभुवन जाळले गेले. असे अनुभव आल्यावरही बलोन्मत्त होऊन ते वृथा मानायचे? गर्व केल्याने लंकाधीशा सैन्यसंपत्तीसहित मरशील."

अतिकायाने नंतर नम्रपणे म्हटले, "माझे रावणाला साष्टांग नमन. दुसरे नमन इंद्रजिताला, तिसरे नमन प्रधानांना. आपले हित कशात आहे ते ऐका. माझ्या आवडीचे तेच सांगतो. श्रीरामाला सीता अर्पण करून लंकेशाला वाचवा. सर्व राक्षसांना वाचवा. श्रीरामाला शरण जाऊन सीता त्याला अर्पण करावी. तसे केल्याने रावण आणि कुमार अक्षय होतील. हे माझे सत्य वचन आहे. मी त्रिवार सत्य सांगतो की यामुळे सेना, प्रधान, राक्षसकुळ, लंकाभुवन हे अक्षय होतील. भुक्तिमुक्ती पूर्ण अक्षय होतील. तेव्हा सीता अर्पण करून श्रीरामाला शरण गेल्याने स्वप्नातही जन्म-मरण नाही; उलट परम किर्ती आणि कल्याण मिळेल." हे स्वहिताचे कथन स्वतः रावणाने मानले नाही. प्रधान, कुमार यांनीही मानले नाही. ते सारे उन्मादाने मरणाला आतुर झाले होते. "मद्य, धन, बळ, राज्य आणि गर्व या पाचांनी उन्मत्त झालेले ते सगळे मरणार्थी झाले होते. ज्याप्रमाणे पतंग दीपावर झडपतो, जळून तुपात बुडतो, तरी पुन्हा मागचा पतंग झडप टाकतो, त्याप्रमाणे ते सर्व उन्मत्त मरणोन्मत्त होते. सीतेची अभिलाषा धरून, श्रीरामाशी वैर-विरोध करून रावणा गर्वोन्मदाने मरशील. त्यातच सैन्य, संपत्ती नष्ट होईल. रावणा समक्ष लंकेत मारुती वानराने आकांत केला; तोही तुम्ही सारे मान्य करत नाही; कारण तुम्ही गर्वाने मरणार्थी झाला आहात. मी संकोच सोडून कठोर भाषण केले, यासाठी मी दंडवत घालतो, क्षमा करा, हे माझे बालकाचे भाषण आहे." अतिकायाने स्वहिताचे सांगितलेले विचार रावणाने मान्य केले नाहीत. त्यामुळे अतिकायाला दुःख होऊन, अश्रू ढाळून तो

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

रडू लागला. मग तो अबोल राहिला. आपली माता दुःख पावेल अशा प्रकारचे शब्द न उच्चारता तो मौन धरून स्तब्ध राहिला. त्याचे भाषण ऐकून सर्वजण खजिल झाले. कोणीही प्रत्युत्तर दिले नाही.

सुंदरकाण्डाच्या समाप्तीचे नाथकृत कथन

'एका जनार्दन शरण आहे; वक्ता-श्रोते अबोल झाले. श्रीजनार्दनकृपेने सुंदरकाण्ड समाप्त झाले. वालीचे बंड मोडून सुग्रीवाला प्रचंड राज्य दिले. वानरसैन्य आणून सुंदरकाण्ड संपविले. सीतोशोधाच्या इच्छेने वानरांनी वनात, हेमविवरात झटून यत्न केले. समुद्राचा अडथळा पाहून प्राणत्याग ठरविला; त्यावेळी नेमकाच संपाती भेटला. समुद्र उल्लंघून हनुमानाने तातडीने सीताशोध पूर्ण केला. अशोकवन उपटले, राक्षस मारले, इंद्रजिताला गांजले, किंकर-वनरक्षक-अखया यांचा वध केला. लंका जाळली. नंतर परतून श्रीरामापुढे सीताशोध सांगितला. श्रीराम स्वतः समुद्राच्या तीरावर आला. समुद्राचा अभिमान संपवून, अनेक योजनांचा सेतू बांधून श्रीराम लंकेत आला. यापुढे युद्धकाण्डाला आरंभ होईल. श्रीराम राक्षसांचा रगडा करील. त्या श्रीरामप्रतापाचे कौतुक आता ऐका.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

ॐ

संत एकनाथकृत भावार्थ रामायण

युद्धकाण्ड

अध्याय पहिला

ईशस्तवन

श्रीसंत एकनाथ म्हणतात, "उदार, गंभीर गोड, असे सुंदरकाण्ड संपविल्यावर आता पुढे अतिशय प्रचंड आणि प्रतापी युद्धकाण्ड आले आहे. युद्धकाण्डाचे वर्णन करायला माझी वाणी कुठली योग्य असणार; परंतु माझ्यावर सद्‌गुरू जनार्दनस्वामींची अखंड कृपा असल्याने, त्यांनी माझ्याकडून काण्डा-काण्डाचा अर्थ वदविला. रामायणातील सखोल अर्थ सांगणारा वक्ता, म्हणजे समर्थ जनार्दनगुरूच होते. सबाह्य परिपूर्ण श्रीरघुनाथ हा ग्रंथातील परमार्थ म्हणजे श्रीराम आहे. रामायणाचे मूळ सार क्षराक्षरात कोंदले असून पदापदार्थ चिद्‌चिन्मात्र असलेली ही पवित्र रामकथा आहे. कथेमधील कथार्थ म्हणजे सबाह्य कोंदलेला श्रीरघुनाथ आहे, हाच ग्रंथामधील परमार्थ असून, साधकाला आत्मस्वार्थ साधू देतो.

नाथांचे आत्मनिवेदन-निरूपणाचे फळ

श्रीरामचरित्र हे जरी अवघड असले, तरी ती चरित्रकथा चिन्मात्र आहे आहे. सद्‌गुरू जनार्दन हे अत्यंत उदार असल्याने ही कथा सुख आणि स्वानंद देणारी झाली. स्वतः श्रीरामच माझे बोलणारे तोंड झाला असून, वचनावचनामध्ये पवित्र रामकथा श्रीरामानेच निर्वाचित केली आहे. श्रीरामकथेचा गुह्यार्थ यथार्थपणे सांगून श्रीरामच, माझ्या हातात लेखणी-दौत देऊन माझ्याकडून लिहून घेतो आहे. श्रीरामच माझ्या दृष्टीचे पाहणे होऊन कथानिरूपण दाखवतो आहे. मी ते जागृती -स्वप्न-सुषुप्ती या अवस्थांमध्ये पाहतो आहे. जागृत अवस्थेत मी स्वतः कर्म करतो तेव्हा त्या कर्मात श्रीरामकथा प्रकट होते. स्वप्नात श्रीरामच स्वतःची गुह्यवार्ता प्रकट करून सांगतो. सुषुप्तीमध्ये सुखाने झोपलो म्हणजे तेथे जन्म-मरण, कर्म-धर्माचरण नसते तर सुषुप्ती ही पूर्णपणे श्रीरामच असते. मी भोजन करतो तेव्हा घासाघासात रामायण आणि जेवणात गोड श्रीरामभजन श्रीराम दाखवतो. चव चाखताना रसामध्ये रसस्वाद श्रीरघुनाथ असतो. भोजनाचा शेवट करून रामायणार्थ श्रीरामाकडून दाखविला जातो. रसास्वाद चाखून पाहताना रस-रसना ही श्रीरघुनंदन; श्रीरामामुळे स्वानंदभोजन; असे ते रामायण गोड वाटते. जेव्हा रामायणाची गोडी मी चाखतो तेव्हा रस-रसना रसत्व सोडून देतात. दृश्य दृश्यता टाकून रामकथा जोडली जाते. सुखाने शयन करू गेलो तरी रामायण विसरले जात नाही. माझी शय्या, बाज आणि अंथरूण हे सर्व स्वतः श्रीरामच होतो. रामायण लिहावे या दृष्टीने जागृती-स्वप्न-सुषुप्ती या तीनही अवस्थात श्रीरघुपती विसंबत नाही आणि मग अहोरात्र श्रीरामकथाच उरते.

श्रीरामाने रामायण लिहिण्यासाठी माझी पाठ पुरवली; त्यामुळे मीपण तत्काळ नाहीसे होऊन, ही मराठी रामकथा स्वतः श्रीरामच दाखवतो. श्रीरामाची रामकथा ही चारी मुक्तींना लाथेने दूर करते, चारी पुरुषार्थांची निर्भत्सना करते आणि कथार्थात परब्रह्म प्रकटते. शुद्ध परमार्थ असलेली

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

रडू लागला. मग तो अबोल राहिला. आपली माता दुःख पावेल अशा प्रकारचे शब्द न उच्चारता तो मौन धरून स्तब्ध राहिला. त्याचे भाषण ऐकून सर्वजण खजिल झाले. कोणीही प्रत्युत्तर दिले नाही.

सुंदरकाण्डाच्या समाप्तीचे नाथकृत कथन

'एका जनार्दन शरण आहे; वक्ता-श्रोते अबोल झाले. श्रीजनार्दनकृपेने सुंदरकाण्ड समाप्त झाले. वालीचे बंड मोडून सुग्रीवाला प्रचंड राज्य दिले. वानरसैन्य आणून सुंदरकाण्ड संपविले. सीतोशोधाच्या इच्छेने वानरांनी वनात, हेमविवरात झटून यत्न केले. समुद्राचा अडथळा पाहून प्राणत्याग ठरविला; त्यावेळी नेमकाच संपाती भेटला. समुद्र उल्लंघून हनुमानाने तातडीने सीताशोध पूर्ण केला. अशोकवन उपटले, राक्षस मारले, इंद्रजिताला गांजले, किंकर-वनरक्षक-अखया यांचा वध केला. लंका जाळली. नंतर परतून श्रीरामापुढे सीताशोध सांगितला. श्रीराम स्वतः समुद्राच्या तीरावर आला. समुद्राचा अभिमान संपवून, अनेक योजनांचा सेतू बांधून श्रीराम लंकेत आला. यापुढे युद्धकाण्डाला आरंभ होईल. श्रीराम राक्षसांचा रगडा करील. त्या श्रीरामप्रतापाचे कौतुक आता ऐका.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

ॐ

संत एकनाथकृत भावार्थ रामायण

युद्धकाण्ड

अध्याय पहिला

ईशस्तवन

श्रीसंत एकनाथ म्हणतात, "उदार, गंभीर गोड, असे सुंदरकाण्ड संपविल्यावर आता पुढे अतिशय प्रचंड आणि प्रतापी युद्धकाण्ड आले आहे. युद्धकाण्डाचे वर्णन करायला माझी वाणी कुठली योग्य असणार; परंतु माझ्यावर सद्‌गुरू जनार्दनस्वामींची अखंड कृपा असल्याने, त्यांनी माझ्याकडून काण्डा-काण्डाचा अर्थ वदविला. रामायणातील सखोल अर्थ सांगणारा वक्ता, म्हणजे समर्थ जनार्दनगुरूच होते. सबाह्य परिपूर्ण श्रीरघुनाथ हा ग्रंथातील परमार्थ म्हणजे श्रीराम आहे. रामायणाचे मूळ सार क्षराक्षरात कोंदले असून पदापदार्थ चिद्‌चिन्मात्र असलेली ही पवित्र रामकथा आहे. कथेमधील कथार्थ म्हणजे सबाह्य कोंदलेला श्रीरघुनाथ आहे, हाच ग्रंथामधील परमार्थ असून, साधकाला आत्मस्वार्थ साधू देतो.

नाथांचे आत्मनिवेदन-निरूपणाचे फळ

श्रीरामचरित्र हे जरी अवघड असले, तरी ती चरित्रकथा चिन्मात्र आहे आहे. सद्‌गुरू जनार्दन हे अत्यंत उदार असल्याने ही कथा सुख आणि स्वानंद देणारी झाली. स्वतः श्रीरामच माझे बोलणारे तोंड झाला असून, वचनावचनामध्ये पवित्र रामकथा श्रीरामानेच निर्वाचित केली आहे. श्रीरामकथेचा गुह्यार्थ यथार्थपणे सांगून श्रीरामच, माझ्या हातात लेखणी-दौत देऊन माझ्याकडून लिहून घेतो आहे. श्रीरामच माझ्या दृष्टीचे पाहणे होऊन कथानिरूपण दाखवतो आहे. मी ते जागृती -स्वप्न-सुषुप्ती या अवस्थांमध्ये पाहतो आहे. जागृत अवस्थेत मी स्वतः कर्म करतो तेव्हा त्या कर्मात श्रीरामकथा प्रकट होते. स्वप्नात श्रीरामच स्वतःची गुह्यवार्ता प्रकट करून सांगतो. सुषुप्तीमध्ये सुखाने झोपलो म्हणजे तेथे जन्म-मरण, कर्म-धर्माचरण नसते तर सुषुप्ती ही पूर्णपणे श्रीरामच असते. मी भोजन करतो तेव्हा घासाघासात रामायण आणि जेवणात गोड श्रीरामभजन श्रीराम दाखवतो. चव चाखताना रसामध्ये रसस्वाद श्रीरघुनाथ असतो. भोजनाचा शेवट करून रामायणार्थ श्रीरामाकडून दाखविला जातो. रसास्वाद चाखून पाहताना रस-रसना ही श्रीरघुनंदन; श्रीरामामुळे स्वानंदभोजन; असे ते रामायण गोड वाटते. जेव्हा रामायणाची गोडी मी चाखतो तेव्हा रस-रसना रसत्व सोडून देतात. दृश्य दृश्यता टाकून रामकथा जोडली जाते. सुखाने शयन करू गेलो तरी रामायण विसरले जात नाही. माझी शय्या, बाज आणि अंथरूण हे सर्व स्वतः श्रीरामच होतो. रामायण लिहावे या दृष्टीने जागृती-स्वप्न-सुषुप्ती या तीनही अवस्थात श्रीरघुपती विसंबत नाही आणि मग अहोरात्र श्रीरामकथाच उरते.

श्रीरामाने रामायण लिहिण्यासाठी माझी पाठ पुरवली; त्यामुळे मीपण तत्काळ नाहीसे होऊन, ही मराठी रामकथा स्वतः श्रीरामच दाखवतो. श्रीरामाची रामकथा ही चारी मुक्तींना लाथेने दूर करते, चारी पुरुषार्थांची निर्भर्त्सना करते आणि कथार्थात परब्रह्म प्रकटते. शुद्ध परमार्थ असलेली

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Muthulakshmi Research Academy · Sarayu Foundation Trust and eGangotri

रडू लागला. मग तो अबोल राहिला. आपली माता दुःख पावेल अशा प्रकारचे शब्द न उच्चारता तो मौन धरून स्तब्ध राहिला. त्याचे भाषण ऐकून सर्वजण खजिल झाले. कोणीही प्रत्युत्तर दिले नाही.

सुंदरकाण्डाच्या समाप्तीचे नाथकृत कथन

'एका जनार्दन शरण आहे; वक्ता-श्रोते अबोल झाले. श्रीजनार्दनकृपेने सुंदरकाण्ड समाप्त झाले. वालीचे बंड मोडून सुग्रीवाला प्रचंड राज्य दिले. वानरसैन्य आणून सुंदरकाण्ड संपविले. सीतोशोधाच्या इच्छेने वानरांनी वनात, हेमविवरात झटून यत्न केले. समुद्राचा अडथळा पाहून प्राणत्याग ठरविला; त्यावेळी नेमकाच संपाती भेटला. समुद्र उल्लंघून हनुमानाने तातडीने सीताशोध पूर्ण केला. अशोकवन उपटले, राक्षस मारले, इंद्रजिताला गांजले, किंकर-वनरक्षक-अखया यांचा वध केला. लंका जाळली. नंतर परतून श्रीरामापुढे सीताशोध सांगितला. श्रीराम स्वतः समुद्राच्या तीरावर आला. समुद्राचा अभिमान संपवून, अनेक योजनांचा सेतू बांधून श्रीराम लंकेत आला. यापुढे युद्धकाण्डाला आरंभ होईल. श्रीराम राक्षसांचा रगडा करील. त्या श्रीरामप्रतापाचे कौतुक आता ऐका.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

ॐ

संत एकनाथकृत भावार्थ रामायण

युद्धकाण्ड

अध्याय पहिला

ईशस्तवन

श्रीसंत एकनाथ म्हणतात, "उदार, गंभीर गोड, असे सुंदरकाण्ड संपविल्यावर आता पुढे अतिशय प्रचंड आणि प्रतापी युद्धकाण्ड आले आहे. युद्धकाण्डाचे वर्णन करायला माझी वाणी कुठली योग्य असणार; परंतु माझ्यावर सद्‌गुरू जनार्दनस्वामींची अखंड कृपा असल्याने, त्यांनी माझ्याकडून काण्डा-काण्डाचा अर्थ वदविला. रामायणातील सखोल अर्थ सांगणारा वक्ता, म्हणजे समर्थ जनार्दनगुरूच होते. सबाह्य परिपूर्ण श्रीरघुनाथ हा ग्रंथातील परमार्थ म्हणजे श्रीराम आहे. रामायणाचे मूळ सार क्षराक्षरात कोंदले असून पदापदार्थ चिद्‌चिन्मात्र असलेली ही पवित्र रामकथा आहे. कथेमधील कथार्थ म्हणजे सबाह्य कोंदलेला श्रीरघुनाथ आहे, हाच ग्रंथामधील परमार्थ असून, साधकाला आत्मस्वार्थ साधू देतो.

नाथांचे आत्मनिवेदन-निरूपणाचे फळ

श्रीरामचरित्र हे जरी अवघड असले, तरी ती चरित्रकथा चिन्मात्र आहे आहे. सद्‌गुरू जनार्दन हे अत्यंत उदार असल्याने ही कथा सुख आणि स्वानंद देणारी झाली. स्वतः श्रीरामच माझे बोलणारे तोंड झाला असून, वचनावचनामध्ये पवित्र रामकथा श्रीरामानेच निर्वाचित केली आहे. श्रीरामकथेचा गुह्यार्थ यथार्थपणे सांगून श्रीरामच, माझ्या हातात लेखणी-दौत देऊन माझ्याकडून लिहून घेतो आहे. श्रीरामच माझ्या दृष्टीचे पाहणे होऊन कथानिरूपण दाखवतो आहे. मी ते जागृती -स्वप्न-सुषुप्ती या अवस्थांमध्ये पाहतो आहे. जागृत अवस्थेत मी स्वतः कर्म करतो तेव्हा त्या कर्मात श्रीरामकथा प्रकट होते. स्वप्नात श्रीरामच स्वतःची गुह्यवार्ता प्रकट करून सांगतो. सुषुप्तीमध्ये सुखाने झोपलो म्हणजे तेथे जन्म-मरण, कर्म-धर्माचरण नसते तर सुषुप्ती ही पूर्णपणे श्रीरामच असते. मी भोजन करतो तेव्हा घासाघासात रामायण आणि जेवणात गोड श्रीरामभजन श्रीराम दाखवतो. चव चाखताना रसामध्ये रसस्वाद श्रीरघुनाथ असतो. भोजनाचा शेवट करून रामायणार्थ श्रीरामाकडून दाखविला जातो. रसास्वाद चाखून पाहताना रस-रसना ही श्रीरघुनंदन; श्रीरामामुळे स्वानंदभोजन; असे ते रामायण गोड वाटते. जेव्हा रामायणाची गोडी मी चाखतो तेव्हा रस-रसना रसत्व सोडून देतात. दृश्य दृश्यता टाकून रामकथा जोडली जाते. सुखाने शयन करू गेलो तरी रामायण विसरले जात नाही. माझी शय्या, बाज आणि अंथरूण हे सर्व स्वतः श्रीरामच होतो. रामायण लिहावे या दृष्टीने जागृती-स्वप्न-सुषुप्ती या तीनही अवस्थात श्रीरघुपती विसंबत नाही आणि मग अहोरात्र श्रीरामकथाच उरते.

श्रीरामाने रामायण लिहिण्यासाठी माझी पाठ पुरवली; त्यामुळे मीपण तत्काळ नाहीसे होऊन, ही मराठी रामकथा स्वतः श्रीरामच दाखवतो. श्रीरामाची रामकथा ही चारी मुक्तींना लाथेने दूर करते, चारी पुरुषार्थांची निर्भत्सना करते आणि कथार्थात परब्रह्म प्रकटते. शुद्ध परमार्थ असलेली

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Muthulakshmi Research Academy / Sarayu Foundation Trust and eGangotri

रडू लागला. मग तो अबोल राहिला. आपली माता दुःख पावेल अशा प्रकारचे शब्द न उच्चारता तो मौन धरून स्तब्ध राहिला. त्याचे भाषण ऐकून सर्वजण खजिल झाले. कोणीही प्रत्युत्तर दिले नाही.

सुंदरकाण्डाच्या समाप्तीचे नाथकृत कथन

'एका जनार्दन शरण आहे; वक्ता-श्रोते अबोल झाले. श्रीजनार्दनकृपेने सुंदरकाण्ड समाप्त झाले. वालीचे बंड मोडून सुग्रीवाला प्रचंड राज्य दिले. वानरसैन्य आणून सुंदरकाण्ड संपविले. सीतोशोधाच्या इच्छेने वानरांनी वनात, हेमविवरात झटून यत्न केले. समुद्राचा अडथळा पाहून प्राणत्याग ठरविला; त्यावेळी नेमकाच संपाती भेटला. समुद्र उल्लंघून हनुमानाने तातडीने सीताशोध पूर्ण केला. अशोकवन उपटले, राक्षस मारले, इंद्रजिताला गांजले, किंकर-वनरक्षक-अखया यांचा वध केला. लंका जाळली. नंतर परतून श्रीरामापुढे सीताशोध सांगितला. श्रीराम स्वतः समुद्राच्या तीरावर आला. समुद्राचा अभिमान संपवून, अनेक योजनांचा सेतू बांधून श्रीराम लंकेत आला. यापुढे युद्धकाण्डाला आरंभ होईल. श्रीराम राक्षसांचा रगडा करील. त्या श्रीरामप्रतापाचे कौतुक आता ऐका.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized By Sarayu Foundation Trust and eGangotri

ॐ

संत एकनाथकृत भावार्थ रामायण

युद्धकाण्ड

अध्याय पहिला

ईशस्तवन

श्रीसंत एकनाथ म्हणतात, "उदार, गंभीर गोड, असे सुंदरकाण्ड संपविल्यावर आता पुढे अतिशय प्रचंड आणि प्रतापी युद्धकाण्ड आले आहे. युद्धकाण्डाचे वर्णन करायला माझी वाणी कुठली योग्य असणार; परंतु माझ्यावर सद्‌गुरू जनार्दनस्वामींची अखंड कृपा असल्याने, त्यांनी माझ्याकडून काण्डा-काण्डाचा अर्थ वदविला. रामायणातील सखोल अर्थ सांगणारा वक्ता, म्हणजे समर्थ जनार्दनगुरूच होते. सबाह्य परिपूर्ण श्रीरघुनाथ हा ग्रंथातील परमार्थ म्हणजे श्रीराम आहे. रामायणाचे मूळ सार क्षराक्षरात कोंदले असून पदापदार्थ चिद्‌चिन्मात्र असलेली ही पवित्र रामकथा आहे. कथेमधील कथार्थ म्हणजे सबाह्य कोंदलेला श्रीरघुनाथ आहे, हाच ग्रंथामधील परमार्थ असून, साधकाला आत्मस्वार्थ साधू देतो.

नाथांचे आत्मनिवेदन-निरूपणाचे फळ

श्रीरामचरित्र हे जरी अवघड असले, तरी ती चरित्रकथा चिन्मात्र आहे आहे. सद्‌गुरू जनार्दन हे अत्यंत उदार असल्याने ही कथा सुख आणि स्वानंद देणारी झाली. स्वतः श्रीरामच माझे बोलणारे तोंड झाला असून, वचनावचनामध्ये पवित्र रामकथा श्रीरामानेच निर्वाचित केली आहे. श्रीरामकथेचा गुह्यार्थ यथार्थपणे सांगून श्रीरामच, माझ्या हातात लेखणी-दौत देऊन माझ्याकडून लिहून घेतो आहे. श्रीरामच माझ्या दृष्टीचे पाहणे होऊन कथानिरूपण दाखवतो आहे. मी ते जागृती -स्वप्न-सुषुप्ती या अवस्थांमध्ये पाहतो आहे. जागृत अवस्थेत मी स्वतः कर्म करतो तेव्हा त्या कर्मात श्रीरामकथा प्रकट होते. स्वप्नात श्रीरामच स्वतःची गुह्यवार्ता प्रकट करून सांगतो. सुषुप्तीमध्ये सुखाने झोपलो म्हणजे तेथे जन्म-मरण, कर्म-धर्माचरण नसते तर सुषुप्ती ही पूर्णपणे श्रीरामच असते. मी भोजन करतो तेव्हा घासाघासात रामायण आणि जेवणात गोड श्रीरामभजन श्रीराम दाखवतो. चव चाखताना रसामध्ये रसस्वाद श्रीरघुनाथ असतो. भोजनाचा शेवट करून रामायणार्थ श्रीरामाकडून दाखविला जातो. रसास्वाद चाखून पाहताना रस-रसना ही श्रीरघुनंदन; श्रीरामामुळे स्वानंदभोजन; असे ते रामायण गोड वाटते. जेव्हा रामायणाची गोडी मी चाखतो तेव्हा रस-रसना रसत्व सोडून देतात. दृश्य दृश्यता टाकून रामकथा जोडली जाते. सुखाने शयन करू गेलो तरी रामायण विसरले जात नाही. माझी शय्या, बाज आणि अंथरूण हे सर्व स्वतः श्रीरामच होतो. रामायण लिहावे या दृष्टीने जागृती-स्वप्न-सुषुप्ती या तीनही अवस्थात श्रीरघुपती विसंबत नाही आणि मग अहोरात्र श्रीरामकथाच उरते.

श्रीरामाने रामायण लिहिण्यासाठी माझी पाठ पुरवली; त्यामुळे मीपण तत्काळ नाहीसे होऊन, ही मराठी रामकथा स्वतः श्रीरामच दाखवतो. श्रीरामाची रामकथा ही चारी मुक्तींना लाथेने दूर करते, चारी पुरुषार्थांची निर्भत्सना करते आणि कथार्थात परब्रह्म प्रकटते. शुद्ध परमार्थ असलेली

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Muthulakshmi Research Academy

रडू लागला. मग तो अबोल राहिला. आपली माता दुःख पावेल अशा प्रकारचे शब्द न उच्चारता तो मौन धरून स्तब्ध राहिला. त्याचे भाषण ऐकून सर्वजण खजिल झाले. कोणीही प्रत्युत्तर दिले नाही.

सुंदरकाण्डाच्या समाप्तीचे नाथकृत कथन

'एका जनार्दन शरण आहे; वक्ता-श्रोते अबोल झाले. श्रीजनार्दनकृपेने सुंदरकाण्ड समाप्त झाले. वालीचे बंड मोडून सुग्रीवाला प्रचंड राज्य दिले. वानरसैन्य आणून सुंदरकाण्ड संपविले. सीतोशोधाच्या इच्छेने वानरांनी वनात, हेमविवरात झटून यत्न केले. समुद्राचा अडथळा पाहून प्राणत्याग ठरविला; त्यावेळी नेमकाच संपाती भेटला. समुद्र उल्लंघून हनुमानाने तातडीने सीताशोध पूर्ण केला. अशोकवन उपटले, राक्षस मारले, इंद्रजिताला गांजले, किंकर-वनरक्षक-अखया यांचा वध केला. लंका जाळली. नंतर परतून श्रीरामापुढे सीताशोध सांगितला. श्रीराम स्वतः समुद्राच्या तीरावर आला. समुद्राचा अभिमान संपवून, अनेक योजनांचा सेतू बांधून श्रीराम लंकेत आला. यापुढे युद्धकाण्डाला आरंभ होईल. श्रीराम राक्षसांचा रगडा करील. त्या श्रीरामप्रतापाचे कौतुक आता ऐका.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

ॐ

संत एकनाथकृत भावार्थ रामायण

युद्धकाण्ड

अध्याय पहिला

ईशस्तवन

श्रीसंत एकनाथ म्हणतात, "उदार, गंभीर गोड, असे सुंदरकाण्ड संपविल्यावर आता पुढे अतिशय प्रचंड आणि प्रतापी युद्धकाण्ड आले आहे. युद्धकाण्डाचे वर्णन करायला माझी वाणी कुठली योग्य असणार; परंतु माझ्यावर सद्‌गुरू जनार्दनस्वामींची अखंड कृपा असल्याने, त्यांनी माझ्याकडून काण्डा-काण्डाचा अर्थ वदविला. रामायणातील सखोल अर्थ सांगणारा वक्ता, म्हणजे समर्थ जनार्दनगुरूच होते. सबाह्य परिपूर्ण श्रीरघुनाथ हा ग्रंथातील परमार्थ म्हणजे श्रीराम आहे. रामायणाचे मूळ सार क्षराक्षरात कोंदले असून पदापदार्थ चिद्‌चिन्मात्र असलेली ही पवित्र रामकथा आहे. कथेमधील कथार्थ म्हणजे सबाह्य कोंदलेला श्रीरघुनाथ आहे, हाच ग्रंथामधील परमार्थ असून, साधकाला आत्मस्वार्थ साधू देतो.

नाथांचे आत्मनिवेदन-निरूपणाचे फळ

श्रीरामचरित्र हे जरी अवघड असले, तरी ती चरित्रकथा चिन्मात्र आहे आहे. सद्‌गुरू जनार्दन हे अत्यंत उदार असल्याने ही कथा सुख आणि स्वानंद देणारी झाली. स्वतः श्रीरामच माझे बोलणारे तोंड झाला असून, वचनावचनामध्ये पवित्र रामकथा श्रीरामानेच निर्वाचित केली आहे. श्रीरामकथेचा गुह्यार्थ यथार्थपणे सांगून श्रीरामच, माझ्या हातात लेखणी-दौत देऊन माझ्याकडून लिहून घेतो आहे. श्रीरामच माझ्या दृष्टीचे पाहणे होऊन कथानिरूपण दाखवतो आहे. मी ते जागृती -स्वप्न-सुषुप्ती या अवस्थांमध्ये पाहतो आहे. जागृत अवस्थेत मी स्वतः कर्म करतो तेव्हा त्या कर्मात श्रीरामकथा प्रकट होते. स्वप्नात श्रीरामच स्वतःची गुह्यवार्ता प्रकट करून सांगतो. सुषुप्तीमध्ये सुखाने झोपलो म्हणजे तेथे जन्म-मरण, कर्म-धर्माचरण नसते तर सुषुप्ती ही पूर्णपणे श्रीरामच असते. मी भोजन करतो तेव्हा घासाघासात रामायण आणि जेवणात गोड श्रीरामभजन श्रीराम दाखवतो. चव चाखताना रसामध्ये रसस्वाद श्रीरघुनाथ असतो. भोजनाचा शेवट करून रामायणार्थ श्रीरामाकडून दाखविला जातो. रसास्वाद चाखून पाहताना रस-रसना ही श्रीरघुनंदन; श्रीरामामुळे स्वानंदभोजन; असे ते रामायण गोड वाटते. जेव्हा रामायणाची गोडी मी चाखतो तेव्हा रस-रसना रसत्व सोडून देतात. दृश्य दृश्यता टाकून रामकथा जोडली जाते. सुखाने शयन करू गेलो तरी रामायण विसरले जात नाही. माझी शय्या, बाज आणि अंथरूण हे सर्व स्वतः श्रीरामच होतो. रामायण लिहावे या दृष्टीने जागृती-स्वप्न-सुषुप्ती या तीनही अवस्थात श्रीरघुपती विसंबत नाही आणि मग अहोरात्र श्रीरामकथाच उरते.

श्रीरामाने रामायण लिहिण्यासाठी माझी पाठ पुरवली; त्यामुळे मीपण तत्काळ नाहीसे होऊन, ही मराठी रामकथा स्वतः श्रीरामच दाखवतो. श्रीरामाची रामकथा ही चारी मुक्तींना लाथेने दूर करते, चारी पुरुषार्थांची निर्भत्सना करते आणि कथार्थात परब्रह्म प्रकटते. शुद्ध परमार्थ असलेली

https://archive.org/details/@sarayufoundation / Bhavarth Ramayan, lucknowacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

रडू लागला. मग तो अबोल राहिला. आपली माता दुःख पावेल अशा प्रकारचे शब्द न उच्चारता तो मौन धरून स्तब्ध राहिला. त्याचे भाषण ऐकून सर्वजण खजिल झाले. कोणीही प्रत्युत्तर दिले नाही.

सुंदरकाण्डाच्या समाप्तीचे नाथकृत कथन

'एका जनार्दन शरण आहे; वक्ता-श्रोते अबोल झाले. श्रीजनार्दनकृपेने सुंदरकाण्ड समाप्त झाले. वालीचे बंड मोडून सुग्रीवाला प्रचंड राज्य दिले. वानरसैन्य आणून सुंदरकाण्ड संपविले. सीतोशोधाच्या इच्छेने वानरांनी वनात, हेमविवरात झटून यत्न केले. समुद्राचा अडथळा पाहून प्राणत्याग ठरविला; त्यावेळी नेमकाच संपाती भेटला. समुद्र उल्लंघून हनुमानाने तातडीने सीताशोध पूर्ण केला. अशोकवन उपटले, राक्षस मारले, इंद्रजिताला गांजले, किंकर-वनरक्षक-अखया यांचा वध केला. लंका जाळली. नंतर परतून श्रीरामापुढे सीताशोध सांगितला. श्रीराम स्वतः समुद्राच्या तीरावर आला. समुद्राचा अभिमान संपवून, अनेक योजनांचा सेतू बांधून श्रीराम लंकेत आला. यापुढे युद्धकाण्डाला आरंभ होईल. श्रीराम राक्षसांचा रगडा करील. त्या श्रीरामप्रतापाचे कौतुक आता ऐका.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sayajirao Research Academy, Gangotri

ॐ

संत एकनाथकृत भावार्थ रामायण

युद्धकाण्ड

अध्याय पहिला

ईशस्तवन

श्रीसंत एकनाथ म्हणतात, "उदार, गंभीर गोड, असे सुंदरकाण्ड संपविल्यावर आता पुढे अतिशय प्रचंड आणि प्रतापी युद्धकाण्ड आले आहे. युद्धकाण्डाचे वर्णन करायला माझी वाणी कुठली योग्य असणार; परंतु माझ्यावर सद्‌गुरू जनार्दनस्वामींची अखंड कृपा असल्याने, त्यांनी माझ्याकडून काण्डा-काण्डाचा अर्थ वदविला. रामायणातील सखोल अर्थ सांगणारा वक्ता, म्हणजे समर्थ जनार्दनगुरूच होते. सबाह्य परिपूर्ण श्रीरघुनाथ हा ग्रंथातील परमार्थ म्हणजे श्रीराम आहे. रामायणाचे मूळ सार क्षराक्षरात कोंदले असून पदापदार्थ चिद्‌चिन्मात्र असलेली ही पवित्र रामकथा आहे. कथेमधील कथार्थ म्हणजे सबाह्य कोंदलेला श्रीरघुनाथ आहे, हाच ग्रंथामधील परमार्थ असून, साधकाला आत्मस्वार्थ साधू देतो.

नाथांचे आत्मनिवेदन-निरूपणाचे फळ

श्रीरामचरित्र हे जरी अवघड असले, तरी ती चरित्रकथा चिन्मात्र आहे आहे. सद्‌गुरू जनार्दन हे अत्यंत उदार असल्याने ही कथा सुख आणि स्वानंद देणारी झाली. स्वतः श्रीरामच माझे बोलणारे तोंड झाला असून, वचनावचनामध्ये पवित्र रामकथा श्रीरामानेच निर्वाचित केली आहे. श्रीरामकथेचा गुह्यार्थ यथार्थपणे सांगून श्रीरामच, माझ्या हातात लेखणी-दौत देऊन माझ्याकडून लिहून घेतो आहे. श्रीरामच माझ्या दृष्टीचे पाहणे होऊन कथानिरूपण दाखवतो आहे. मी ते जागृती -स्वप्न-सुषुप्ती या अवस्थांमध्ये पाहतो आहे. जागृत अवस्थेत मी स्वतः कर्म करतो तेव्हा त्या कर्मात श्रीरामकथा प्रकट होते. स्वप्नात श्रीरामच स्वतःची गुह्यवार्ता प्रकट करून सांगतो. सुषुप्तीमध्ये सुखाने झोपलो म्हणजे तेथे जन्म-मरण, कर्म-धर्माचरण नसते तर सुषुप्ती ही पूर्णपणे श्रीरामच असते. मी भोजन करतो तेव्हा घासाघासात रामायण आणि जेवणात गोड श्रीरामभजन श्रीराम दाखवतो. चव चाखताना रसामध्ये रसस्वाद श्रीरघुनाथ असतो. भोजनाचा शेवट करून रामायणार्थ श्रीरामाकडून दाखविला जातो. रसास्वाद चाखून पाहताना रस-रसना ही श्रीरघुनंदन; श्रीरामामुळे स्वानंदभोजन; असे ते रामायण गोड वाटते. जेव्हा रामायणाची गोडी मी चाखतो तेव्हा रस-रसना रसत्व सोडून देतात. दृश्य दृश्यता टाकून रामकथा जोडली जाते. सुखाने शयन करू गेलो तरी रामायण विसरले जात नाही. माझी शय्या, बाज आणि अंथरूण हे सर्व स्वतः श्रीरामच होतो. रामायण लिहावे या दृष्टीने जागृती-स्वप्न-सुषुप्ती या तीनही अवस्थात श्रीरघुपती विसंबत नाही आणि मग अहोरात्र श्रीरामकथाच उरते.

श्रीरामाने रामायण लिहिण्यासाठी माझी पाठ पुरवली; त्यामुळे मीपण तत्काळ नाहीसे होऊन, ही मराठी रामकथा स्वतः श्रीरामच दाखवतो. श्रीरामाची रामकथा ही चारी मुक्तींना लाथेने दूर करते, चारी पुरुषार्थांची निर्भत्सना करते आणि कथार्थात परब्रह्म प्रकटते. शुद्ध परमार्थ असलेली

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Muthulakshmi Research Academy

रामकथा, साधकाचा स्वार्थ साधावा म्हणून श्रीराम स्वतः माझ्याकडून लिहवितो आहे. हे असो. श्रीहरिकथा निरूपण, नित्य नामस्मरण केले म्हणजे जसा वासरासाठी गाईला पान्हा फुटावा, तसा ब्रह्माला स्वतःला प्रेमपान्हा फुटतो. रामनामस्मरण करून परब्रह्माची भेट होते. जे करंटे-दुर्भागी असतात ते रामनाम सोडून यज्ञ-यजन करत दर्भ-मातीचा खटाटोप करत बसतात. कर्माने किंवा श्रुती निर्माण करून, पदप्राप्ती होत नाही. कर्मे ही देहधर्म-स्थिती आहे, तर रामनाम ही परब्रह्मप्राप्ती आहे. अशी रामनामाची ख्याती आहे. असा तो श्रीराम लंकाधीश रावणाला शासन करण्यासाठी, समुद्रावर सेतू बांधून, वानरसेना घेऊन, रणवाद्यांच्या गजरात लंकेत आला.

रावणाकडून हेरांची पाठवणी

श्रीराम लंकेत आला हे कळताच रावण उद्विग्न झाला. त्याने शुक आणि सारण यांना बोलावले, तेव्हा त्यांना रावण अतिशय दुःखी दिसला. रावण त्यांना म्हणाला, "माझे प्रधान पूर्ण उन्मत्त आहेत. त्यांना स्वहिताचीही आठवण नाही. ते मद्य, स्त्री यांच्या सेवनात मग्न आहेत. त्यामुळे ते कुठले हेर पाठवतात. असो ही माझ्या प्रधानांची कथा, माझी मलाच चिंता पडली आहे की श्रीराम लंकेत आल्यावर मी काय करावे. तर तुम्ही हेरवृत्तीने जाऊन, श्रीरामाचे सैन्य किती आहे, त्यातले झुंजार आणि वीरवृत्ती कोण आणि किती आहेत यांची संख्या माझ्याकडे येऊन सांगा. श्रीरामाचा पूर्ण उत्साह, त्याची शस्त्रास्त्रे आणि दुर्धर बाण यांविषयी आणि त्याचा सखा सौमित्र जो लक्ष्मण, त्याच्या पराक्रमाविषयी मला यथार्थ सांगा. त्या श्रीरामाचे सैन्यबळ, वानरांचे शौर्यशील आणि लक्ष्मणाचा रणकल्लोळ हे सर्व मला स्पष्ट विशद करा. तुम्ही राक्षसवेषात गेलात तर वानर तुमचा घात करतील. तेव्हा तुम्ही वानरवेषात, वानररूपात जा आणि सैन्यास्थितीची गणना करा." रावणाचे सांगणे ऐकून शुक आणि सारण हे वानररूप धारण करून वानरसैन्यामध्ये मिसळून गेले. त्यांनी वानरांची लक्षपूर्वक पाहणी सुरू केली, त्यावेळी त्यांना सर्वत्र वानरच असल्याचे दिसले. वानरांशिवाय सृष्टीतला मोकळा भागच दिसेना, मागे, पुढे सर्वत्र वानरच होते. भूतलावर, आकाशात, जळी, स्थळी, प्रत्यक्ष लंकेत वानरांचा कलकलाट चालू होता. त्या वानरांची गणना करताना शंखसंख्या पुरत नव्हती. त्यामुळे शुक आणि सारण हे थक्क झाले; त्यांना वानरांची गणना करताच येईना. काही वानर लंकेत येऊन पडलेले, काही आकाशात, काही पृथ्वीवर, काही समुद्रतीरावर, असे ते अगणित, असंख्य, सर्वत्र कोंदलेले आढळले. त्यानंतर वानरांचे प्रकार आणि वेगात धावणे यांमुळेही गणनेत अडचण येत होते. नळ, नीळ, अंगद इत्यादी वानरवीर कडाडून आले होते. श्रीरामाच्या पाठीमागे अर्बुद, निर्बुद, पद्मनिकर संख्येने वानर होते. त्याच्या मागे असंख्य वानरांचा सुग्रीवाचा सैन्यसमूह होता. यापेक्षा वेगळे असे अगणित मल्लयोद्धे आणि अपार वानरसमूह होते. त्यांची गणना करताना शंखसंख्या (एकम्-दहम्. . .) अपुरी पडत होती. अशा रीतीने शुक आणि सारण हे पाळत ठेवून वानरसैन्याचा शोध घेत असताना, त्यांची एकूण लक्षणे ही वानरांच्या लक्षणांसारखी नसल्याचे लक्षात येऊन बिभीषणाने त्यांना ओळखले.

हेर रामापुढे आणले जातात, त्यांची मुक्तता

बिभीषणाने त्या दोन हेरांची लक्षणे मोठ्या कौशल्याने आणि लक्षपूर्वक पाहून ओळखली. ते हेर असलेले शुक आणि सारण राक्षस वानररूपात असले, तरी त्यांना वानरांप्रमाणे उड्डाण, कोलांट्या, उलट-सुलट वळणे हे काही करता येत नव्हते. मग सर्वांनी त्या कपटी हेरांना धरण्यासाठी धाव घेतली पण ते दोघे कुशलतेने निसटून पळू लागले. त्यावेळी बिभीषण सर्व राक्षसांना ओळखत असल्याने त्यानेच त्यांना पकडले. मग त्या वानरवेषातल्या राक्षसहेरांना बांधून श्रीरामापुढे

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Trust and eGangotri

आणले गेले. राम सर्व प्राणिमात्रांशी कृपाळूपणे वागणारा असल्यामुळे तो हेरांना म्हणाला, "रावण चोर आणि तुम्ही त्याचे हेर आहात, त्यामुळे शास्त्र सांगते की तुम्ही वधाला योग्य आहात; पण मी तुम्हाला खरोखर मारणार नाही. माझा हा वानरसमूह पाहा." नंतर ते हेर इतरांच्या हातातून निसटतील म्हणून श्रीरामाने त्यांना हनुमंताच्या स्वाधीन केले. कारण राक्षसांची मायिक युक्ती ही मारुतीच्या शेपटीपुढे चालत नसे. मारुतीने त्यांना शेपटीत पकडून हळू हळू वानरयोद्ध्यांची संपत्ती रावणाला सांगण्यासाठी दाखविली. नंतर श्रीरामाने "तुम्हा दोघांना मारले तर आमचा मोठेपणा रावणापाशी कोण सांगणार? तेव्हा माझे वचन ऐका आणि रावणापाशी स्वतः गर्जना करीत सांगा. प्रातःकाळी कडकडाट करून राक्षसांना सपाट करीन. नंतर बाणांनी त्रिकूट भेदून दशकंठ रावणाला छेदीन. माझे बाण सुटल्यावर तोरणे पताका झडतील. लंका बाणांनी विध्वंसून दशमुखाला मारीन." श्रीराम अपराधी आणि निरपराधी यांना समान बुद्धीने पाहतो. त्यामुळे त्याने दोघा हेरांना शुद्धपणे सोडून दिले. श्रीराम कृपाळू आणि कृपावंत आहे. त्या दोघांना आपला पराक्रम आणि पुरुषार्थ सांगून सोडून दिले. मग ते दोघे चळचळा कापत लंकेमधे परतले.

हेर-रावण भेट, हेरांची सूचना

श्रीरामाने चोर, अपराधी असे हेर वधाला योग्य असूनही सोडून दिले, हा रामाचा पुरुषार्थ हेरांना एवढा धसका देऊन गेला की ते चळचळा कापत, धावत लंकेत परतले. तेथे रावण दिसताच त्याला काही ते सांगणेही त्यांना शक्य होईना; त्यांच्या पोटात भीती होती, बोबडी वळली होती आणि ते सतत कांपत होते. काही वेळ गेल्यावरच ते स्वस्थ आणि शांत झाले; नंतर रावणपुढे निवेदन करताना ते म्हणाले, "वानरसैन्य असंख्य आणि दृढ असल्याने त्यांची निश्चित गणना करणे जमत नाही. आम्ही दोघे जेव्हा तिकडे गेलो, तेव्हा बिभीषणाने आम्हाला ओळखले आणि आम्हाला बांधून श्रीरामाकडे नेले. आता आमचे मरण निश्चित झाले असे आम्हाला वाटले. कारण, बिभीषण, वानरगण आम्हाला मारावे असेच म्हणत होते; परंतु राम हा धर्मात्मा खरा, त्याने आम्हाला प्रतापदृष्टीने सोडून दिले. शिवाय तो म्हणाला की, 'हे दोघे जण मारल्यामुळे आम्ही रावण जिंकला असे थोडेच होणार आहे. तेव्हा यांना आपले वानरसैन्य दाखवा आणि त्याची गणना सांगा.' नंतर रामाने आम्हाला हनुमंताच्या स्वाधीन केले. आम्हाला त्याने संपूर्ण सैन्यसंपत्ती दाखविली. त्यामध्ये वानरांच्या असंख्य जाती आहेत. त्यांची मोजणी करणे शक्य नाही. त्यातला प्रत्येक वानर, दशाननाचा वध करण्यासाठी उत्सुक होता. त्या वानरांचे बळही फार मोठे आहे. लंकेला तर ते क्षुद्र फोलकट मानतात. तट, तोरण यांच्यासह लंकाभुवनाचा विध्वंस करण्याएवढा पराक्रम त्यातल्या चौघांपाशी आहे. ते चौघे म्हणजे श्रीराम, लक्ष्मण, घरचा भेदी झालेला बिभीषण आणि वानरराज विजयी सुग्रीव हे असून 'क्षणात रावणाचे निर्दाळण करू' अशी त्यांची भाषा आहे. संपूर्ण लंका उपटून समुद्राच्या पाण्यात फेकण्यासारखा पराक्रम ते करतील आणि राक्षसांचीही होळी करतील. त्यातले तिघे सोडा एकटा राम हाही बाणांच्या वर्षावाने रावणवध करून लंकेचे भस्म करू शकणार आहे. यावेळी जर प्रधान, इंद्रजित, मकराक्ष, कुंभकर्ण, अतिकायादी पुत्र हे आडवे आले, तर त्यांचे निर्दाळण करून लंकेचे तो भस्म करील. राक्षसांची जात संपूर्णपणे तो रणात संपवील. तो श्रीरघुपती असा प्रतापी आहे की एकटाच त्रैलोक्याचे दमन करू शकेल. हे सर्व स्वतः रघुनंदन आपला पराक्रम आणि पुरुषार्थ सांगताना गर्जून म्हणाला. त्याने, 'प्रभातकाळीच रणकंदन करून रावणाचा वध करीन.' असेही म्हटले आहे." असे सारणाने सांगितले.

सारणाचे भाषण ऐकून रावण उद्विग्न झाला.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

रामकथा, साधकाचा स्वार्थ साधावा म्हणून श्रीराम स्वतः माझ्याकडून लिहवितो आहे. हे असो. श्रीहरिकथा निरूपण, नित्य नामस्मरण केले म्हणजे जसा वासरासाठी गाईला पान्हा फुटावा, तसा ब्रह्माला स्वतःला प्रेमपान्हा फुटतो. रामनामस्मरण करून परब्रह्माची भेट होते. जे करंटे-दुर्भागी असतात ते रामनाम सोडून यज्ञ-यजन करत दर्भ-मातीचा खटाटोप करत बसतात. कर्माने किंवा श्रुती निर्माण करून, पदप्राप्ती होत नाही. कर्मे ही देहधर्म-स्थिती आहे, तर रामनाम ही परब्रह्मप्राप्ती आहे. अशी रामनामाची ख्याती आहे. असा तो श्रीराम लंकाधीश रावणाला शासन करण्यासाठी, समुद्रावर सेतू बांधून, वानरसेना घेऊन, रणवाद्यांच्या गजरात लंकेत आला.

रावणाकडून हेरांची पाठवणी

श्रीराम लंकेत आला हे कळताच रावण उद्विग्न झाला. त्याने शुक आणि सारण यांना बोलावले, तेव्हा त्यांना रावण अतिशय दुःखी दिसला. रावण त्यांना म्हणाला, "माझे प्रधान पूर्ण उन्मत्त आहेत. त्यांना स्वहिताचीही आठवण नाही. ते मद्य, स्त्री यांच्या सेवनात मग्न आहेत. त्यामुळे ते कुठले हेर पाठवतात. असो ही माझ्या प्रधानांची कथा, माझी मलाच चिंता पडली आहे की श्रीराम लंकेत आल्यावर मी काय करावे. तर तुम्ही हेरवृत्तीने जाऊन, श्रीरामाचे सैन्य किती आहे, त्यातले झुंजार आणि वीरवृत्ती कोण आणि किती आहेत यांची संख्या माझ्याकडे येऊन सांगा. श्रीरामाचा पूर्ण उत्साह, त्याची शस्त्रास्त्रे आणि दुर्धर बाण यांविषयी आणि त्याचा सखा सौमित्र जो लक्ष्मण, त्याच्या पराक्रमाविषयी मला यथार्थ सांगा. त्या श्रीरामाचे सैन्यबळ, वानरांचे शौर्यशील आणि लक्ष्मणाचा रणकल्लोळ हे सर्व मला स्पष्ट विशद करा. तुम्ही राक्षसवेषात गेलात तर वानर तुमचा घात करतील. तेव्हा तुम्ही वानरवेषात, वानररूपात जा आणि सैन्यास्थितीची गणना करा." रावणाचे सांगणे ऐकून शुक आणि सारण हे वानररूप धारण करून वानरसैन्यामध्ये मिसळून गेले. त्यांनी वानरांची लक्षपूर्वक पाहणी सुरू केली, त्यावेळी त्यांना सर्वत्र वानरच असल्याचे दिसले. वानरांशिवाय सृष्टीतला मोकळा भागच दिसेना, मागे, पुढे सर्वत्र वानरच होते. भूतलावर, आकाशात, जळी, स्थळी, प्रत्यक्ष लंकेत वानरांचा कलकलाट चालू होता. त्या वानरांची गणना करताना शंखसंख्या पुरत नव्हती. त्यामुळे शुक आणि सारण हे थक्क झाले; त्यांना वानरांची गणना करताच येईना. काही वानर लंकेत येऊन पडलेले, काही आकाशात, काही पृथ्वीवर, काही समुद्रतीरावर, असे ते अगणित, असंख्य, सर्वत्र कोंदलेले आढळले. त्यानंतर वानरांचे प्रकार आणि वेगात धावणे यांमुळेही गणनेत अडचण येत होते. नळ, नीळ, अंगद इत्यादी वानरवीर कडाडून आले होते. श्रीरामाच्या पाठीमागे अर्बुद, निर्बुद, पद्मनिकर संख्येने वानर होते. त्याच्या मागे असंख्य वानरांचा सुग्रीवाचा सैन्यसमूह होता. यापेक्षा वेगळे असे अगणित मल्लयोद्धे आणि अपार वानरसमूह होते. त्यांची गणना करताना शंखसंख्या (एकम्-दहम्. . .) अपुरी पडत होती. अशा रीतीने शुक आणि सारण हे पाळत ठेवून वानरसैन्याचा शोध घेत असताना, त्यांची एकूण लक्षणे ही वानरांच्या लक्षणांसारखी नसल्याचे लक्षात येऊन बिभीषणाने त्यांना ओळखले.

हेर रामापुढे आणले जातात, त्यांची मुक्तता

बिभीषणाने त्या दोन हेरांची लक्षणे मोठ्या कौशल्याने आणि लक्षपूर्वक पाहून ओळखली. ते हेर असलेले शुक आणि सारण राक्षस वानररूपात असले, तरी त्यांना वानरांप्रमाणे उड्डाण, कोलांट्या, उलट-सुलट वळणे हे काही करता येत नव्हते. मग सर्वांनी त्या कपटी हेरांना धरण्यासाठी धाव घेतली पण ते दोघे कुशलतेने निसटून पळू लागले. त्यावेळी बिभीषण सर्व राक्षसांना ओळखत असल्याने त्यानेच त्यांना पकडले. मग त्या वानरवेषातल्या राक्षसहेरांना बांधून श्रीरामापुढे

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

आणले गेले. राम सर्व प्राणिमात्रांशी कृपाळूपणे वागणारा असल्यामुळे तो हेरांना म्हणाला, "रावण चोर आणि तुम्ही त्याचे हेर आहात, त्यामुळे शास्त्र सांगते की तुम्ही वधाला योग्य आहात; पण मी तुम्हाला खरोखर मारणार नाही. माझा हा वानरसमूह पाहा." नंतर ते हेर इतरांच्या हातातून निसटतील म्हणून श्रीरामाने त्यांना हनुमंताच्या स्वाधीन केले. कारण राक्षसांची मायिक युक्ती ही मारुतीच्या शेपटीपुढे चालत नसे. मारुतीने त्यांना शेपटीत पकडून हळू हळू वानरयोद्ध्यांची संपत्ती रावणाला सांगण्यासाठी दाखविली. नंतर श्रीरामाने "तुम्हा दोघांना मारले तर आमचा मोठेपणा रावणापाशी कोण सांगणार? तेव्हा माझे वचन ऐका आणि रावणापाशी स्वतः गर्जना करीत सांगा. प्रातःकाळी कडकडाट करून राक्षसांना सपाट करीन. नंतर बाणांनी त्रिकूट भेदून दशकंठ रावणाला छेदीन. माझे बाण सुटल्यावर तोरणे पताका झडतील. लंका बाणांनी विध्वंसून दशमुखाला मारीन." श्रीराम अपराधी आणि निरपराधी यांना समान बुद्धीने पाहतो. त्यामुळे त्याने दोघा हेरांना शुद्धपणे सोडून दिले. श्रीराम कृपाळू आणि कृपावंत आहे. त्या दोघांना आपला पराक्रम आणि पुरुषार्थ सांगून सोडून दिले. मग ते दोघे चळचळा कापत लंकेमधे परतले.

हेर-रावण भेट, हेरांची सूचना

श्रीरामाने चोर, अपराधी असे हेर वधाला योग्य असूनही सोडून दिले, हा रामाचा पुरुषार्थ हेरांना एवढा धसका देऊन गेला की ते चळचळा कापत, धावत लंकेत परतले. तेथे रावण दिसताच त्याला काही ते सांगणेही त्यांना शक्य होईना; त्यांच्या पोटात भीती होती, बोबडी वळली होती आणि ते सतत कांपत होते. काही वेळ गेल्यावरच ते स्वस्थ आणि शांत झाले; नंतर रावणपुढे निवेदन करताना ते म्हणाले, "वानरसैन्य असंख्य आणि दृढ असल्याने त्यांची निश्चित गणना करणे जमत नाही. आम्ही दोघे जेव्हा तिकडे गेलो, तेव्हा बिभीषणाने आम्हाला ओळखले आणि आम्हाला बांधून श्रीरामाकडे नेले. आता आमचे मरण निश्चित झाले असे आम्हाला वाटले. कारण, बिभीषण, वानरगण आम्हाला मारावे असेच म्हणत होते; परंतु राम हा धर्मात्मा खरा, त्याने आम्हाला प्रतापदृष्टीने सोडून दिले. शिवाय तो म्हणाला की, 'हे दोघे जण मारल्यामुळे आम्ही रावण जिंकला असे थोडेच होणार आहे. तेव्हा यांना आपले वानरसैन्य दाखवा आणि त्याची गणना सांगा.' नंतर रामाने आम्हाला हनुमंताच्या स्वाधीन केले. आम्हाला त्याने संपूर्ण सैन्यसंपत्ती दाखविली. त्यामध्ये वानरांच्या असंख्य जाती आहेत. त्यांची मोजणी करणे शक्य नाही. त्यातला प्रत्येक वानर, दशाननाचा वध करण्यासाठी उत्सुक होता. त्या वानरांचे बळही फार मोठे आहे. लंकेला तर ते क्षुद्र फोलकट मानतात. तट, तोरण यांच्यासह लंकाभुवनाचा विध्वंस करण्याएवढा पराक्रम त्यातल्या चौघांपाशी आहे. ते चौघे म्हणजे श्रीराम, लक्ष्मण, घरचा भेदी झालेला बिभीषण आणि वानरराज विजयी सुग्रीव हे असून 'क्षणात रावणाचे निर्दाळण करू' अशी त्यांची भाषा आहे. संपूर्ण लंका उपटून समुद्राच्या पाण्यात फेकण्यासारखा पराक्रम ते करतील आणि राक्षसांचीही होळी करतील. त्यातले तिघे सोडा एकटा राम हाही बाणांच्या वर्षावाने रावणवध करून लंकेचे भस्म करू शकणार आहे. यावेळी जर प्रधान, इंद्रजित, मकराक्ष, कुंभकर्ण, अतिकायादी पुत्र हे आडवे आले, तर त्यांचे निर्दाळण करून लंकेचे तो भस्म करील. राक्षसांची जात संपूर्णपणे तो रणात संपवील. तो श्रीरघुपती असा प्रतापी आहे की एकटाच त्रैलोक्याचे दमन करू शकेल. हे सर्व स्वतः रघुनंदन आपला पराक्रम आणि पुरुषार्थ सांगताना गर्जून म्हणाला. त्याने, 'प्रभातकाळीच रणकंदन करून रावणाचा वध करीन.' असेही म्हटले आहे." असे सारणाने सांगितले.

सारणाचे भाषण ऐकून रावण उद्विग्न झाला.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

ते रावणाचे चिन्ह दिसताच सारणाने पुढे त्याला हिताची सूचना देणारे निवेदन केले. "हे लंकाधीश दशानना, युद्ध करू गेल्यास वानर रणात आटोपणार नाहीत. राक्षसांचे निर्दाळण करून ते लंकापुरी नष्ट करतील. वानरांपुढे आपले सैन्य टिकणार नाही, त्यांच्यापुढे आपले बळ चालणार नाही. यासाठी वानरांबरोबर युद्धकल्लोळ सर्वथा करू नये. तो श्रीराम आणि त्याचा बंधू लक्ष्मण हे दोघे शस्त्रास्त्र-विद्येत प्रवीण आहेत. त्यांच्याशी युद्ध करू नये, कारण त्यांचे बाण सुटल्यावर निश्चित प्राणांत होणार. त्यांच्यातले चौघे युद्ध करण्यासाठी हर्षाने उद्युक्त असून श्रीराम राक्षसांमधे शस्त्रास्त्रांनी सिद्ध होऊन शिरणार आहे; परंतु वानरांनी युद्धात रघुनाथाला थांबवून स्वतः रावणाचे निर्दाळण करण्यासाठी आल्हादाने आज्ञा मागितली आहे. ही विजयध्वज फडकावणारी वानरसेना सुग्रीवाच्या अधीन असून, रावणवधासाठी पराक्रमी आहे. राजा सुग्रीव हा सहजपणे त्रिकूटावर उडी घेऊन असंख्य राक्षसांना मारील; सर्वात शेवटी रावणवध करील. असो. तर ही त्या महावीरांची गोष्ट बाजूला राहू दे. एकटा एक हनुमंत लंकाघात करू पाहतोय; त्याचा पराक्रम तुम्हाला माहितीच आहे. तेव्हा आपण त्यांच्याशी युद्ध करू नये हेच खरे आणि योग्य आहे. रावणा, सीता देऊन शरण गेल्याने तू कृतकल्याण पावशील. सीता रघुनाथाला अर्पण कर, त्यासाठी मी तुझ्या पाया पडतो. युद्धकथा नको. कारण त्यामुळे प्राणांतव्यथा प्राप्त होईल. जर सीता अवश्य देऊन रघुकुलतिलक रामाशी सख्य केलेस तर तुला इहलोकाचे आणि परलोकाचे सार्थक मिळून, तू परम सुख मिळवशील." सारणाचे हे हितकर, पूर्ण सत्य आणि पथ्यकर भाषण ऐकून दुष्ट, दुर्जन अशा रावणाने त्यावर दुरुत्तरे केली.

रावणाची प्रतिक्रिया

"अरे सारणा, देव, दानव, गंधर्व यांच्यासह सुरेंद्र जरी पाया पडत आला, तरी मी सीतेला मुक्त करणार नाही हे निश्चित समज. शिव त्रिशूळ घेऊन आला किंवा ब्रह्मा शाप देत आला, त्यांनी प्राणान्त मांडला तरीही मी सीतेला सोडणार नाही. तू तर भित्रा, हीन, दीन आहेस. वानरसैन्य पाहूनच तू दारुण भयाने कांपू लागला आहेस. भयामुळे आता म्हणतो आहेस की सीता रामाला अर्पण करावी; परंतु तुझी ही सभय सांगितलेली गोष्ट मी कधीच ऐकणार नाही. आता माझ्या लक्षात आले की रामाने तुझा घात केला नाही, तुम्हा दोघांना जिवंत सोडले. यासाठीच तू सीता रामाला दे म्हणतो आहेस. तू श्रीरामाला अनुसरलास आणि त्याची मला भीती घालतो आहेस. जे जे सांगतो आहेस ते खोटे आहे. तुम्ही दोघेही भ्याड, नपुंसक आहात. जो ज्याचे जीवित रक्षण करतो, तो त्याचा जवळचा आप्त झालेला असतो. त्या दृष्टीनेच तू सीतेला मुक्त करावी असे सांगतो आहेस. आता तुम्ही दोघे श्रीरामाचे पूर्ण आप्त झाला आहात, म्हणूनच माझ्यासमोर माझे अवगुण कठोरपणे बोलता आहात."

नंतर रावण संतापून म्हणाला, "जे राजदोष बोलून दाखवतात ते अपराधी, शास्त्राच्या नीतीप्रमाणे माझ्या हातून दंड प्राप्त करतात. तुम्ही दोघे पापमूर्ती आहात. वैऱ्याचे वीर्य, शौर्य, बळ, गुण पूर्णपणे वर्णन करताय, आणि माझे अवगुण तेवढे सांगता आहात. यामुळे तुम्ही दोघे पूर्णपणे वधास योग्य आहात." एवढे बोलून, सत्य-असत्य याचा विवेक न करता रावण शुक आणि सारण यांचा वध करण्यासाठी शस्त्र घेऊन उठला. "वानरगण रावणाला मारतील असे तुम्ही दोघे म्हणालात, तेव्हा तुम्ही रामाचे पक्षपाती आहात, म्हणून मी तुमचा प्राण घेईन." असे रावण म्हणाला. त्याचवेळी त्याचा मनात आले, 'हेर हे पूर्णपणे अवध्य असतात म्हणून रामाने यांना सोडून दिले. मग मी तरी त्यांची हत्त्या कशी करावी.' या विचाराने रावण लज्जायमान झाला. नंतर रावणाने शुक आणि सारण यांना सोडून दिले, तो त्यांना रागाने म्हणाला, "तुमचे काळे

https://archive.org/details/bhavarthramayan/ Bhavan Vani Trust, Lucknow

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

तोंड पुन्हा मला दाखवू नका.'' यावर शुक, सारण यांनी जाण्यापूर्वी रावणाची जयजयकाराने स्तुती केली. रावण रघुपतीला सबळ पाहून चिंतेत पडला.

शार्दूल हेराची पाठवणी, रामाकडून मुक्तता

शुक आणि सारण गेल्यावर रावण काळजीत पडला. मग त्याने शार्दूल नावाच्या चिकित्सक हेराला निवडून वानरसैन्याची गणना करण्यासाठी पाठविले. हा शार्दूल हेर सर्व हेरांमधे प्रबळ, बलवान, कावेबाज आणि कुशल होता. त्यावरूनच त्याला शार्दूल नाव मिळाले होते. शार्दूल जेव्हा स्वतः पाहून मोजू लागला तेव्हा वानरसैन्य असंख्य असून, गणना करायला त्याची वाणी स्तब्ध होऊन तो चक्रावला. शार्दूल येत आहे हे पाहून बिभीषणाने त्याला ओळखले आणि दृढ पाशात बांधून त्याने त्याला श्रीरामापुढे नेले. तेव्हा वानरांनी मुठींनी, लाथांनी कमरेवर, पाठीवर जोरदार फटके मारले. श्रीरामाने कृपाळूपणाने त्याला सोडून दिले. अत्यंत कष्टाने त्याला पकडून आणले असूनही श्रीरामने त्याला सोडले. कारण असे हेर मारल्यामुळे कोणते मोठेपण मिळणार होते, त्यात कसला पराक्रम होणार होता! तशी बुद्धी ही क्षुद्र आणि करंटी म्हणावी. नंतर श्रीरामाने शार्दूलाला बोलावून त्याला सर्व वानरसैन्य दाखविले, त्याचा सन्मान करून, त्याला सोडून दिले. श्रीरामाने सोडताच शार्दूल वानरांचा धाक वाटून तडक लंकेकडे जाऊन रावणासमोर जाऊन उभा राहिला. सर्वांग रक्ताने माखलेला शार्दूल येताना पाहून, लंकानाथ दचकला, वानर बलोद्धत असल्याचे त्याला जाणवले. शार्दूलाचा असा पुरुषार्थ की त्याला वानरांनी लाथा घातल्या. नंतर तो रडत, पडत, कण्हत, कुंथत आणि थकून सभेत आला. श्रीरामाच्या सैन्यात हेरपण चालत नाही. बिभीषणाच्या भयाने तो हेर धरला जातो. त्याला घट्ट बांधून रामापुढे नेले की राम त्याला सोडून देतो. असा प्रकार होत होता.

अध्याय दुसरा

शार्दूल रावणाच्या सभेत रडत, पडत, कुंथत असा, रक्ताने माखून आल्यावर, त्या दुःखित हेराला रावण म्हणला, ''शार्दूला, तूही शत्रूच्या तावडीत सापडलास वाटते, कारण रक्ताने माखून निघाला आहेस.'' रावणाने आदराने असे म्हणून शार्दूलाला बोलते केले.

शार्दूलाचे निवेदन

रावणाने आस्थेने विचारल्यावर शार्दूल कण्हत कुंथत आपले निवेदन करू लागला. त्याने म्हटले, 'वानरांचे सैन्य असंख्यात असून त्यांची संख्या मोजणे शक्य नाही. अमूक एका संख्येचे वानर आहेत असे सांगणे कल्पनेच्या पलीकडचे आहे. वानरांनाच विचारले तर तेही असंख्य एवढेच सांगतात. वाचस्पतीची वाणी बंद पडेल, वेदांची वाणी बोबडी होईल, पण रामाच्या सैन्याची मोजणी होणार नाही हेच खरोखर सत्य आहे; लंकानाथा, श्रीरामाच्या सैन्याची गणिती संख्या करणे ब्रह्मदेवालाही शक्य होणार नाही, तिथे आम्ही क्षुद्र राक्षस काय मोजणार. श्रीरामाच्या सैन्यात जाऊन हेरपणा करणे अशक्य आहे, कारण तेथे आमचा मुख्य वैरी बिभीषण असून तो आम्हाला ओळखून पकडतो. आम्ही मायावेषात गुप्तपणे गेलो तरी बिभीषणापुढे आमची माया चालतच नाही. मला त्यानेच पकडून वानरांकडे दिले. वानरांनी मला सैन्यात हळू हळू हिंडवले आणि लाथा, बुक्या, टोले मारत राहिले. अशा प्रकारे रावणाला आपले बळ सांगण्यासाठी सैन्य दाखवत हिंडवून मला त्यांनी कल्पान्तीचा मार देत कासावीस केले आणि मग श्रीरामाकडे नेले. त्यावेळी श्रीरामाने, 'हेराला मारण्यात काय पुरुषार्थ?' असे म्हणून मला सोडून दिले. त्यामुळे मी निदान जिवंत राहिलो. श्रीरामाचे प्रतापबळ, सबळ असे असंख्य वानरदल, यांच्याशी युद्ध करण्यापेक्षा जानकी अर्पण करावी हेच योग्य ठरेल.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

ते रावणाचे चिन्ह दिसताच सारणाने पुढे त्याला हिताची सूचना देणारे निवेदन केले. "हे लंकाधीश दशानना, युद्ध करू गेल्यास वानर रणात आटोपणार नाहीत. राक्षसांचे निर्दाळण करून ते लंकापुरी नष्ट करतील. वानरांपुढे आपले सैन्य टिकणार नाही, त्यांच्यापुढे आपले बळ चालणार नाही. यासाठी वानरांबरोबर युद्धकल्लोळ सर्वथा करू नये. तो श्रीराम आणि त्याचा बंधू लक्ष्मण हे दोघे शस्त्रास्त्र-विद्येत प्रवीण आहेत. त्यांच्याशी युद्ध करू नये, कारण त्यांचे बाण सुटल्यावर निश्चित प्राणांत होणार. त्यांच्यातले चौघे युद्ध करण्यासाठी हर्षाने उद्युक्त असून श्रीराम राक्षसांमधे शस्त्रास्त्रांनी सिद्ध होऊन शिरणार आहे; परंतु वानरांनी युद्धात रघुनाथाला थांबवून स्वतः रावणाचे निर्दाळण करण्यासाठी आल्हादाने आज्ञा मागितली आहे. ही विजयध्वज फडकावणारी वानरसेना सुग्रीवाच्या अधीन असून, रावणवधासाठी पराक्रमी आहे. राजा सुग्रीव हा सहजपणे त्रिकूटावर उडी घेऊन असंख्य राक्षसांना मारील; सर्वात शेवटी रावणवध करील. असो. तर ही त्या महावीरांची गोष्ट बाजूला राहू दे. एकटा एक हनुमंत लंकाघात करू पाहतोय; त्याचा पराक्रम तुम्हाला माहितीच आहे. तेव्हा आपण त्यांच्याशी युद्ध करू नये हेच खरे आणि योग्य आहे. रावणा, सीता देऊन शरण गेल्याने तू कृतकल्याण पावशील. सीता रघुनाथाला अर्पण कर, त्यासाठी मी तुझ्या पाया पडतो. युद्धकथा नको. कारण त्यामुळे प्राणांतव्यथा प्राप्त होईल. जर सीता अवश्य देऊन रघुकुलतिलक रामाशी सख्य केलेस तर तुला इहलोकाचे आणि परलोकाचे सार्थक मिळून, तू परम सुख मिळवशील." सारणाचे हे हितकर, पूर्ण सत्य आणि पथ्यकर भाषण ऐकून दुष्ट, दुर्जन अशा रावणाने त्यावर दुरुत्तरे केली.

रावणाची प्रतिक्रिया

"अरे सारणा, देव, दानव, गंधर्व यांच्यासह सुरेंद्र जरी पाया पडत आला, तरी मी सीतेला मुक्त करणार नाही हे निश्चित समज. शिव त्रिशूळ घेऊन आला किंवा ब्रह्मा शाप देत आला, त्यांनी प्राणान्त मांडला तरीही मी सीतेला सोडणार नाही. तू तर भित्रा, हीन, दीन आहेस. वानरसैन्य पाहूनच तू दारुण भयाने कांपू लागला आहेस. भयामुळे आता म्हणतो आहेस की सीता रामाला अर्पण करावी; परंतु तुझी ही सभय सांगितलेली गोष्ट मी कधीच ऐकणार नाही. आता माझ्या लक्षात आले की रामाने तुझा घात केला नाही, तुम्हा दोघांना जिवंत सोडले. यासाठीच तू सीता रामाला दे म्हणतो आहेस. तू श्रीरामाला अनुसरलास आणि त्याची मला भीती घालतो आहेस. जे जे सांगतो आहेस ते खोटे आहे. तुम्ही दोघेही भ्याड, नपुंसक आहात. जो ज्याचे जीवित रक्षण करतो, तो त्याचा जवळचा आप्त झालेला असतो. त्या दृष्टीनेच तू सीतेला मुक्त करावी असे सांगतो आहेस. आता तुम्ही दोघे श्रीरामाचे पूर्ण आप्त झाला आहात, म्हणूनच माझ्यासमोर माझे अवगुण कठोरपणे बोलता आहात."

नंतर रावण संतापून म्हणाला, "जे राजदोष बोलून दाखवतात ते अपराधी, शास्त्राच्या नीतीप्रमाणे माझ्या हातून दंड प्राप्त करतात. तुम्ही दोघे पापमूर्ती आहात. वैऱ्याचे वीर्य, शौर्य, बळ, गुण पूर्णपणे वर्णन करताय, आणि माझे अवगुण तेवढे सांगता आहात. यामुळे तुम्ही दोघे पूर्णपणे वधास योग्य आहात." एवढे बोलून, सत्य-असत्य याचा विवेक न करता रावण शुक आणि सारण यांचा वध करण्यासाठी शस्त्र घेऊन उठला. "वानरगण रावणाला मारतील असे तुम्ही दोघे म्हणालात, तेव्हा तुम्ही रामाचे पक्षपाती आहात, म्हणून मी तुमचा प्राण घेईन." असे रावण म्हणाला. त्याचवेळी त्याचा मनात आले, 'हेर हे पूर्णपणे अवध्य असतात म्हणून रामाने यांना सोडून दिले. मग मी तरी त्यांची हत्या कशी करावी.' या विचाराने रावण लज्जायमान झाला. नंतर रावणाने शुक आणि सारण यांना सोडून दिले, तो त्यांना रागाने म्हणाला, "तुमचे काळे

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Trust and eGangotri

तोंड पुन्हा मला दाखवू नका.'' यावर शुक, सारण यांनी जाण्यापूर्वी रावणाची जयजयकाराने स्तुती केली. रावण रघुपतीला सबळ पाहून चिंतेत पडला.

शार्दूल हेराची पाठवणी, रामाकडून मुक्तता

शुक आणि सारण गेल्यावर रावण काळजीत पडला. मग त्याने शार्दूल नावाच्या चिकित्सक हेराला निवडून वानरसैन्याची गणना करण्यासाठी पाठविले. हा शार्दूल हेर सर्व हेरांमधे प्रबळ, बलवान, कावेबाज आणि कुशल होता. त्यावरूनच त्याला शार्दूल नाव मिळाले होते. शार्दूल जेव्हा स्वतः पाहून मोजू लागला तेव्हा वानरसैन्य असंख्य असून, गणना करायला त्याची वाणी स्तब्ध होऊन तो चक्रावला. शार्दूल येत आहे हे पाहून बिभीषणाने त्याला ओळखले आणि दृढ पाशात बांधून त्याने त्याला श्रीरामापुढे नेले. तेव्हा वानरांनी मुठींनी, लाथांनी कमरेवर, पाठीवर जोरदार फटके मारले. श्रीरामाने कृपाळूपणाने त्याला सोडून दिले. अत्यंत कष्टाने त्याला पकडून आणले असूनही श्रीरामने त्याला सोडले. कारण असे हेर मारल्यामुळे कोणते मोठेपण मिळणार होते, त्यात कसला पराक्रम होणार होता! तशी बुद्धी ही क्षुद्र आणि करंटी म्हणावी. नंतर श्रीरामाने शार्दूलाला बोलावून त्याला सर्व वानरसैन्य दाखविले, त्याचा सन्मान करून, त्याला सोडून दिले. श्रीरामाने सोडताच शार्दूल वानरांचा धाक वाटून तडक लंकेकडे जाऊन रावणासमोर जाऊन उभा राहिला. सर्वांग रक्ताने माखलेला शार्दूल येताना पाहून, लंकानाथ दचकला, वानर बलोद्धत असल्याचे त्याला जाणवले. शार्दूलाचा असा पुरुषार्थ की त्याला वानरांनी लाथा घातल्या. नंतर तो रडत, पडत, कण्हत, कुंथत आणि थकून सभेत आला. श्रीरामाच्या सैन्यात हेरपण चालत नाही. बिभीषणाच्या भयाने तो हेर धरला जातो. त्याला घट्ट बांधून रामापुढे नेले की राम त्याला सोडून देतो. असा प्रकार होत होता.

अध्याय दुसरा

शार्दूल रावणाच्या सभेत रडत, पडत, कुंथत असा, रक्ताने माखून आल्यावर, त्या दुःखित हेराला रावण म्हणला, ''शार्दूला, तूही शत्रूच्या तावडीत सापडलास वाटते, कारण रक्ताने माखून निघाला आहेस.'' रावणाने आदराने असे म्हणून शार्दूलाला बोलते केले.

शार्दूलाचे निवेदन

रावणाने आस्थेने विचारल्यावर शार्दूल कण्हत कुंथत आपले निवेदन करू लागला. त्याने म्हटले, 'वानरांचे सैन्य असंख्यात असून त्यांची संख्या मोजणे शक्य नाही. अमूक एका संख्येचे वानर आहेत असे सांगणे कल्पनेच्या पलीकडचे आहे. वानरांनाच विचारले तर तेही असंख्य एवढेच सांगतात. वाचस्पतीची वाणी बंद पडेल, वेदांची वाणी बोबडी होईल, पण रामाच्या सैन्याची मोजणी होणार नाही हेच खरोखर सत्य आहे; लंकानाथा, श्रीरामाच्या सैन्याची गणिती संख्या करणे ब्रह्मदेवालाही शक्य होणार नाही, तिथे आम्ही क्षुद्र राक्षस काय मोजणार. श्रीरामाच्या सैन्यात जाऊन हेरपणा करणे अशक्य आहे, कारण तेथे आमचा मुख्य वैरी बिभीषण असून तो आम्हाला ओळखून पकडतो. आम्ही मायावेषात गुप्तपणे गेलो तरी बिभीषणापुढे आमची माया चालतच नाही. मला त्यानेच पकडून वानरांकडे दिले. वानरांनी मला सैन्यात हळू हळू हिंडवले आणि लाथा, बुक्या, टोले मारत राहिले. अशा प्रकारे रावणाला आपले बळ सांगण्यासाठी सैन्य दाखवत हिंडवून मला त्यांनी कल्पान्तीचा मार देत कासावीस केले आणि मग श्रीरामाकडे नेले. त्यावेळी श्रीरामाने, 'हेराला मारण्यात काय पुरुषार्थ?' असे म्हणून मला सोडून दिले. त्यामुळे मी निदान जिवंत राहिलो. श्रीरामाचे प्रतापबळ, सबळ असे असंख्य वानरदल, यांच्याशी युद्ध करण्यापेक्षा जानकी अर्पण करावी हेच योग्य ठरेल.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Muthulakshmi Research Academy / Sarayu Foundation Trust and eGangotri

सीता श्रीरामाला अर्पण केल्याने लंकानाथा, तुला मरणोन्मुक्ती मिळेल आणि सर्व राक्षसांना तिन्ही लोकात निर्भयता आणि स्वस्थता लाभेल."

शार्दूल पुढे म्हणाला, "लंकानाथा, वानरवीर उड्डाण करून प्राकारांसहित लंका घेतील. तेव्हा जो काही विचार करायचा तो लवकर करावा. युद्ध करायचे की सीता श्रीरामाला द्यायची, याविषयी निश्चित विचार करण्यास विलंब केला तर कुलक्षय होईल." हे शार्दूलाचे भाषण ऐकून रावण कंपायमान झाला आणि खोटा दुरभिमान धरून, स्वतः गर्जना करीत म्हणाला, "श्रीराम आणि त्याला साहाय्य करण्यासाठी जरी देव, दानव, दैत्य, गंधर्व असे सर्व आले तरी मी स्वतः कदापीही सीतेला सोडणार नाही. सर्व राक्षस मारून श्रीरामाने कुलघात केला किंवा माझा प्राणान्त मांडला तरीही मी सीतेला मुक्त करणार नाही. मी रावण जिवंतपणी तर सीतेला कधीच सोडणार नाही." हे बोलत असताना मनातून रावण पूर्ण चिंताग्रस्त झालेला होता. श्रीराम हेर किंवा दूत यांना मारत नाही, तर सोडून देतो. नंतर ते हेर परत येऊन मला सीतेला त्वरित अर्पण कर हेच तत्त्वतः सांगतात. पूर्वी बिभीषण तसेच बोलला आणि आताही शुक, सारण, शार्दूल हे रामाच्या भयाने तेच सांगताहेत' असे त्याच्या मनात विचार चालू होते. मग त्याने श्रीरामाच्या वानरवीरांमध्ये कोण कोण मुख्य वीर आहेत, त्यातले मल्लयोद्धे कोण, झुंजार वीर कोण याविषयी शार्दूलाकडे विचारणा केली.

शार्दूलाकडून वानरवीरांविषयी कथन

रावणाने शार्दूलाला "वानरसैन्यात कोणते आणि किती वीर आहेत?" असा प्रश्न केला. त्यावर शार्दूल म्हणाला, "नळ, नीळ, रंभ, पनस, पन्नक, मैंद, द्विविद, सुमुख, दुर्मुख, केशरी, शतबळी, दधिमुख, गवय, गवाक्ष हे वानर महावीर आहेत. तसेच विनीत, प्रमाथी, क्रोधन, ऋषभ, शरभ, गंधमादन, फरश, नाग, सुषेण, इंद्रजानू असेही वीरयोद्धे आहेत. शिवाय गज, गोरभ, तार, तरळ, उन्नाह, सन्नाह, कुमुद, कुशल, क्रकच, विक्राळ, हे रणकुशल वानरयोद्धे आहेत. जांबुवंताचा ज्येष्ठ बंधू धूम्राक्ष नावाचा प्रसिद्ध आणि रणमारात विशेष गाजलेला योद्धा अस्वलांच्या सेनेसह आहे. श्रीरामाजवळ असलेला बुद्धिमान आणि महापराक्रमी जांबुवंत राक्षसांना क्षुद्र किडे आणि कुंभकर्णाला गवतासमान मानतो. दुर्धर आणि लंकेत आकांत निर्माण करणारा वीर हनुमंत हा सैन्यात अग्रणी आहे. त्याचा पुरुषार्थ तुम्ही जाणताच." असे शार्दूलाने सांगितले. (संत एकनाथ म्हणतात, "ऋषींच्या रामायणात अपार वीरांची नावनिशी आली आहे; परंतु कथेचा फार विस्तार होईल म्हणून मी ते सर्व उल्लेखिले नाहीत.) शार्दूलाने शेवटी हनुमंताचा उल्लेख केलेला ऐकताच रावण दचकला. इतर महावीरांचा उल्लेख तरी लंकेशाला काय सहन होणार होता. श्रीरामाचे प्रतापबळ आणि सबळ वानरसेनेचे वर्णन ऐकून रावण तळमळला आणि सीता आपल्याला लाभणार नाही असे त्याला वाटले.

नंतर रावणाने वानरवीर अपार आहेत, पण कोण कोणाचा पुत्र, पौत्र याविषयी आणि त्या वानरांचे सत्कुळ आहे की ते वनचर आहेत याविषयी माहिती घेण्यासाठी विचारणा केली. त्यावर त्याला सांगण्यात आले की, 'त्यांच्यात मुख्य म्हणजे ब्रह्मयाचा सुत, महापराक्रमी, बुद्धिवंत असा जांबुवंत हा अस्वलराज विख्यात रणयोद्धा आहे. सूर्याचा सुत सुग्रीवराजा हाही प्रसिद्ध वीर आहे. तो राक्षसांचा नाश करण्यासाठी लंकेत शिरायला पाहतो आहे. युवराज अंगद हा स्वतः शक्राचा नातू असून तो लंका उपटून नेण्याएवढा सशक्त आहे आणि कृतान्तकाळ असा रणयोद्धाही आहे. यमाचा पुत्र सुषेण, चंद्राचा पुत्र दधिमुख, हे दोघे नेटाचे वीर रणमारात काळाचेही काळ आहेत. सुमुख आणि दुर्मुख हे मृत्यूचे पुत्र म्हणजे जणू मृत्यूचाच अवतार आहेत. रणात ते

https://archive.org/details/muthulakshmiacademy Bhavan Vedic Trust, Lucknow

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

राक्षसांना मारतील. त्यांच्या समोर कोण टिकणार? नीळ नावाचा अग्निपुत्र हा वानरदळ अधीन असलेला सेनापती असून स्वतः राक्षसकुलाचा घात करण्याएवढा प्रबळ वीर आहे. अश्विनीदेवांचे मैद, द्विविद हे महावीर; यमाचे पाच पुत्र; गज, गवाक्ष, गवय, शरभ आणि गंधमादन; वैवस्वताचे पाच पुत्र; हे सर्व युद्धात दारुण रणमार करणारे आहेत. विश्वकर्म्याचा सुत म्हणजे नळ; यानेच सेतुबंधन केले; त्यावरूनच वानरसैन्य आले. तोही लंकादहन करायला आला आहे. त्याशिवाय केशरीचा क्षेत्रज पुत्र, वायुपुत्र म्हणून विख्यात असलेला हनुमंत सैन्यात असून, त्याचा पुरुषार्थ त्रिलोकात गाजतो आहे. हनुमंत हा अत्यंत बलवान वीर असून, तो लंकेचे भस्म करू इच्छितो; राक्षसांचा रणात नाश करून, त्यांच्या शिरांची चेंडूफळी खेळणारा तो वीर आहे.''

''वानरवीर दशकोटी, श्रेष्ठ प्रमुख सेनानी तेही असंख्य, अपार आहेत. त्यांची संख्या मुखाने सांगणेही शक्य नाही. एकवेळ पृथ्वीवरचे अंकुर मोजता येतील किंवा पाऊसाच्या धारांची सुखात गणती करता येईल; परंतु वानरभाराची गणती करवत नाही, हे सत्य आहे. वानरांचा सबळ असा सद्भाव आहे. एकेकाच्या हाताखाली कोट्यानुकोटी अर्बुद, खर्व अशी सेना ते वागवत आहेत. (एकनाथ म्हणतात : प्रत्येक वीरा-वीराची सैन्यसंख्या लिहू लागल्यास ग्रंथविस्तार होईल. तेव्हा केवळ सुग्रीवराजा आणि अंगद युवराज या दोघांची सैन्यसंपत्ती थोडक्यात सांगतो. श्रीरामाच्या आज्ञेने अंगदाला युवराजपद प्राप्त झाले आणि सुग्रीवाला राजा म्हणून अभिषिंचन झाले; या गोष्टी मंत्रयुक्त आणि उल्हासात पार पडल्या. वाल्मीकी ऋषींनी आपल्या ग्रंथात अंगदाची म्हणून जी सैन्यसंपत्ती सांगितली आहे, तीच ग्राह्य धरून, व्यवस्थितपणे सांगतो. ऐका.) ''शंभर सहस्रांना लक्ष म्हणतात, शंभर लक्षांना कोटी आणि शंभर कोटींना अर्बूद आणि अर्बूदांच्या शंभरांना निर्बुद अशी संज्ञा आहे. शंभर निर्बुदांची गणती खर्व, शंभर खर्व हे निखर्व आणि शंभर निखर्व हे एक पद्म म्हटले जाते. अंगदाच्या डाव्या बाजूने सहस्र पद्म संख्येने वीर रणरंगात चालतात. तसेच उजव्या भागाच्या प्रयोगात चालणारे वीरविभाग पुढीलप्रमाणे आहेत. शंभर पद्म म्हणजे शंकू आणि असे शंभर शंकू अंगदाच्या उजव्या हाताकडून चालत होते. पुरुषार्थी अंगद म्हणाला, ''राक्षससैन्य, प्रधान ही घुंगुरटी ती काय, मी रणात रावणालाच मारीन, त्याला युद्धार्थ येऊ दे.'' अंगदाच्या डाव्या बाजूने सहस्रपद्म आणि उजव्या बाजूने शंभर शंकू अशी सेना आहे. ते रणकंदनात महाबळी आहेत.'' ही अंगदाची सैन्यसंपत्ती ऐकल्यावर राक्षसांनी जोराने शंख केला. रावण मनातून दचकला. प्रधान चिंतेत पडले. मग शार्दूल रावणाला म्हणला, ''हे दशानना, राजचिन्हांचा गडगडाट ऐकूं येतोय, त्यावरून राजा सुग्रीवाची सेना आली असावी. त्या सेनेचीही गणती आता तू ऐक.''

शार्दूल म्हणाला, ''सुग्रीव हा श्रीरामाचा सेवक झाला आहे, कारण रामानेच त्याला राज्याचा अधिकार मिळवून दिला. त्याच्या सैन्याचा संभार सविस्तर ऐक. श्रीरामाने वालीला मारून सुग्रीवाला राज्य दिले. त्यामुळे त्याच्यापाशी राजसेना सिद्ध आहे. सहस्र कोटी आणि शतशंकू एवढे सैन्य नित्य सुग्रीवापुढे तत्पर असते. त्यामध्ये एक एक रणयोद्धा असून ते वानरवीर सुग्रीवाच्या डाव्या आणि उजव्या बाजूंनी असतात. ते वानर रावणाचा घात करायला लंकेवर लक्ष ठेवून आहेत. राक्षसांचे निर्दाळण करण्यासाठी वानरवीर लंकाशिखरावर उड्डाण करत आहेत. त्यांना मुख्यतः रावणाला मारायचे आहे. हे दशकंठा, वानरसेनेविषयी मी सविस्तर सांगितले आहे. याउपर जे तुझ्या मनात असेल त्याप्रमाणे कर पण ते त्वरित पूर्ण कर.'' शार्दूलने वानरसेनेविषयी सांगितलेले ऐकून राजा रावणाला संताप आला. तो सिंहासनावरून खाली उतरून, स्वतःच आपल्या

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

डोळ्यांनी पाहावे म्हणून उठला. सात मजली इमारतीच्या वर असलेल्या गोपुरावर (मनोऱ्यावर) चढून तो समोर पसरलेला वानरसमूह पाहू लागला. सात ताडाहून अधिक उंची असलेल्या, पांढऱ्या वर्णाच्या प्रासादावर चढून तो तेथून वानरसैन्य न्याहाळू लागला. त्याच्या पाठोपाठ हेर, दूत, सहा प्रधान आणि लंकाजन तेथे चढले आणि वानरसैन्याचा समुदाय पाहू लागले.

समुद्र तटावर, लंकेच्या निकट, वाळूच्या किनारी अशी सर्वत्र वानरांची दाटी झाली होती. कुठे रिकामी जमीन दिसत नव्हती. वानरांनी लंकेभोवती दृढ वेढा घातला असल्याने मागे-पुढे हलणे शक्य नव्हते. प्रत्येक बुरुजावर वानरच दिसत होते. जशा मुंग्या गुळाला झोंबतात, तसे वानर लंकेच्या चौफेर आवेशाने झोंबून रावणाचा शोध घेत होते. जळ, स्थळ, कुलाचल, दशदिशा, नभाची पोकळी हे सर्व वानरांमुळे कोंदले होते. अत्यंत सापेक्षपणे वानरसेना पाहाताना दृष्टी थकली आणि रावणाच्या वीसही डोळ्यांना मूर्च्छा आली. गाढ आणि असंख्य वानरसैन्य पाहात असताना दृष्टी दमली, डोळ्यांवर झापड आली; कोठे रिकामी जागा दिसेना. वानरसेना समक्ष डोळ्यांनी पाहिल्यावर लंकेत आकांत झाला. रावण चकित झाला. राक्षसांचा किलकिलाट सुरू होता. वानसेनेच्या दर्शनाने रावण, तटस्थ, घराघरांत आकांत सुरू झाला. राक्षस कांपू लागले.

रावणाची छत्रे श्रीराम छेदतो

प्रासादाच्या गोपुरांवरून रावण वानरसैन्य न्याहाळत असताना, त्याच्या शिरावरच्या दहा छत्रांची सावली वानरसैन्यावर पडली. ती सावली पाहून श्रीरामाने बिभीषणाला विचारले, "ही अकाली अभ्रे कशी?" त्यावर बिभीषण म्हणाला, "श्रीरघुनाथा, तुझा शत्रू तुझ्या सैन्याची पाहणी करत असून, त्याच्या छत्रांची इथे सर्वांवर सावली पडली आहे. ही अभ्रे नाहीत." बिभीषणाने हे सांगताच श्रीरामाला राग आला. त्याने धनुष्यबाण सज्ज करून म्हटले, "शत्रूची छाया माझ्या सैन्यावर पडणे हे मला लज्जास्पद आहे." नंतर त्याने धनुष्य सज्ज करून मोठ्या आवेशाने त्यावर बाण चढवला. श्रीराम हा नव्या मेघाचा वर्ण असलेला मेघश्याम, पीतांबर नेसलेला शोभायमान, कमलनयन आणि आजानुबाहू होता. त्याने मुकुट, कुंडले, वनमाला, गळ्यात पदक, कटीला मेखला, पायात वाजणारे तोडर, परिधान केले होते. कळिकाळालाही त्याचा धाक वाटे. वीरकंकणे आणि मुद्रिका हातात घातलेला, दशावतारी सुरेख टीका धारण केलेला श्रीराम धनुष्य सज्ज करून लंकेकडे रागाने पाहात होता. तो उजव्या हातात बाण खेळवत रावणाला मारायच्या विचारात होता; परंतु असावध शत्रूलाही मारू नये असा विचार करून, त्याने केवळ रावणाची छत्रे छेदण्याचे ठरविले.

श्रीरामाने चमत्काराने बाण सोडून, रावणाची दहाही छत्रे छेदली आणि त्यातून बाहेर पडलेला बाण पुन्हा भात्यात प्रवेशला. आपली छत्रे पडलेली पाहून रावणाला आपल्या शत्रूच्या कौशल्याचे कौतुक वाटले. तो मनात म्हणाला, 'खरोखर श्रीराम धर्मात्मा आहे; त्याने शिरच्छेद केला नाही. ज्याने दहाही छत्रे छेदली, त्याला दहा शिरेही क्षणात छेदता आली असती; परंतु श्रीरघुवीराने अधर्म केला नाही. दशाननाने रामाचे गुण ओळखले. श्रीरामाच्या गुणाचे रावण कौतुक करत असताना प्रहस्त प्रधान म्हणाला, "आता दुसरा बाण सुटला तर घात होईल." हे प्रहस्ताचे बोलणे ऐकताच श्रीरामाच्या बाणाचे भय धरून, रावण तिथून पळाला आणि त्याने अचूक मरण चुकवले. श्रीरामाने अचूक संधानाने लक्ष्य भेदले की रामबाण जिथल्या तिथे म्हणजे भात्यात परत येतो हे रामाचे धनुर्विद्येतले अद्भुत कौशल्य होते. रावणाची छत्रे

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Trust and eGangotri

छेदली गेली, हे पाहून लंकाजन म्हणू लागले की हा मोठाच अपशकुन असून, युद्धात रावण मरेल. श्रीरामाच्या अनुसंधानाने रावणाची छत्रे छेदली गेली तेव्हा ते पाहून वानरांच्या सेनेतही तो रावणाला अपशकुन झाला आणि त्याचा कल्पान्त आला हीच प्रतिक्रिया झाली.

अध्याय तिसरा

श्रीरामाशी प्रत्यक्ष युद्ध सुरू होण्यापूर्वीच रावणाला आरंभी छत्रभंजनाचा अपशकुन झाला. त्यामुळे रावण उद्विग्न झाला. त्याने प्रधानांना त्यांच्या ठिकाणी पाठविले आणि तो स्वतः आपल्या भुवनात आला. 'सबळ समर्थ असा श्रीराम, वानरसैन्यही असंख्यात, तेव्हा आता मी काय करावे' अशी प्रबळ चिंता त्याला सतावू लागली. यावरच्या उपायाचा तो विचार करू लागला.

रावण सूडासाठी कपटाचा आश्रय करतो

रावणाच्या विचारात गोंधळ होता. 'आपण सीता बळाने भोगू म्हटले, तर आपल्यापेक्षा ती अधिक बलवान आहे. ती माझा घात करू शकते; मी तिला मारू शकत नाही. कारण श्रीरामाची सेवा केल्यामुळे ती जन्म-मरणाच्या पलीकडे नित्य वसती करून आहे; त्यामुळे तिला निश्चित मारता येत नाही. श्रीरामनामस्मरण केले म्हणजे मरणालाच मरण येते. सीता पूर्णपणे विदेही आहे. त्यामुळे तिच्यासंबंधात मारकपण चालत नाही. रामनामाच्या स्मरणाने जन्ममरण उठून पळते. भोगावे म्हटले तर सीता भोगता येत नाही; मारू जाता मारली जात नाही, रामाला युद्धात जिंकता येत नाही. तर आता मी काय करावे? रणात रघुनाथाला मारले, तर जानकी वश होण्याची शक्यता; पण श्रीराम मारला जाणे शक्य नाही. तेव्हा आता कपटाने सीता वश करावी' असे कपटी रावणाने ठरविले. रावण स्वतः कपटी होताच, पण विद्युज्जिव्ह हा पूर्ण कपटी राक्षस होता. सीतेशी कपट करण्याचे मनातले गुपित रावणाने विद्युज्जिव्हाला सांगितले. "सीतेशी कपट करण्यासाठी आपण श्रीरामाचे संपूर्ण शिर धनुष्यबाणासहित मायिकपणे करावे." हे रावणाने सांगताच तो राक्षस म्हणाला, "आता त्वरित शिर निर्माण करतो." यामुळे संतुष्ट झालेल्या रावणाने त्याला हातातले सोन्याचे कंकण दिले; परंतु श्रीरामाचे मायिक शिर विद्युज्जिव्हाला करता करवेना. त्यामुळे तो काळजीत पडला. श्रीरामाचे शिर करताना त्याची हत्यारेच बोथट झाली; सांधे कोरास कोर बसेनात; ते शिर तयार होत नव्हते. श्रीरामाचा रंग साधेना, सगळे रंग ओघळू लागले. रावण रागावेल म्हणून विद्युज्जिव्ह अत्यंत दुःखी झाला. सर्व माया जाणणाऱ्या श्रीरामाशी मायावीपणा चालत नाही. त्यामुळे विद्युज्जिव्हाला मोठी काळजी पडली. श्रीरामाला माया चालत नाही म्हणून त्याचे मायिक शिर घडवले जात नाही. यामुळे परम चिंताग्रस्त झालेला आणि कासावीस झालेला विद्युज्जिव्ह तडक विश्वकर्म्याकडे गेला.

विश्वकर्म्याची प्रतिक्रया, ध्यानमूर्तीचे वरदान

विद्युज्जिव्ह विश्वकर्म्याचे चरणवंदन करून म्हणाला, "आपण श्रीरामाचे मायिक शिर निश्चयाने करून द्यावे." त्यावर विश्वकर्मा म्हणाला, 'श्रीरामाचे मायिक शिर असे वाचेने नुसते म्हटले तरी वाचेला कुष्ट लागेल. हे बोलणे म्हणजे कुलनाशाचे मूळ ठरेल. जेथे कपट तेथे तळपट असे वेदात धडधडीत म्हटले आहे. रावण भ्रमाने फसला जाऊन कुळासह मरेल. श्रीराम हा सत्याचे निजसत्य असून माया ही असत्य आहे. अशा रामाचे मायिक शिर मला सर्वथा करता येणार नाही. तुमचा सर्वनाश जवळ आला, यामुळे तुम्ही हे खोटे कपट करत आहात. सीतेपुढे हे चालणार नाही; तुम्ही मात्र रणात मराल." हे विश्वकर्म्याचे बोलणे ऐकून विद्युज्जिव्ह रडू लागला आणि म्हणाला, "श्रीरामाचे

https://archive.org/details/@sarayu_trust_lucknow

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

डोळ्यांनी पाहावे म्हणून उठला. सात मजली इमारतीच्या वर असलेल्या गोपुरावर (मनोऱ्यावर) चढून तो समोर पसरलेला वानरसमूह पाहू लागला. सात ताडाहून अधिक उंची असलेल्या, पांढऱ्या वर्णाच्या प्रासादावर चढून तो तेथून वानरसैन्य न्याहाळू लागला. त्याच्या पाठोपाठ हेर, दूत, सहा प्रधान आणि लंकाजन तेथे चढले आणि वानरसैन्याचा समुदाय पाहू लागले.

समुद्र तटावर, लंकेच्या निकट, वाळूच्या किनारी अशी सर्वत्र वानरांची दाटी झाली होती. कुठे रिकामी जमीन दिसत नव्हती. वानरांनी लंकेभोवती दृढ वेढा घातला असल्याने मागे-पुढे हलणे शक्य नव्हते. प्रत्येक बुरुजावर वानरच दिसत होते. जशा मुंग्या गुळाला झोंबतात, तसे वानर लंकेच्या चौफेर आवेशाने झोंबून रावणाचा शोध घेत होते. जळ, स्थळ, कुलाचल, दशदिशा, नभाची पोकळी हे सर्व वानरांमुळे कोंदले होते. अत्यंत सापेक्षपणे वानरसेना पाहाताना दृष्टी थकली आणि रावणाच्या वीसही डोळ्यांना मूर्च्छा आली. गाढ आणि असंख्य वानरसैन्य पाहात असताना दृष्टी दमली, डोळ्यांवर झापड आली; कोठे रिकामी जागा दिसेना. वानरसेना समक्ष डोळ्यांनी पाहिल्यावर लंकेत आकांत झाला. रावण चकित झाला. राक्षसांचा किलकिलाट सुरू होता. वानसेनेच्या दर्शनाने रावण, तटस्थ, घराघरांत आकांत सुरू झाला. राक्षस कांपू लागले.

रावणाची छत्रे श्रीराम छेदतो

प्रासादाच्या गोपुरांवरून रावण वानरसैन्य न्याहाळत असताना, त्याच्या शिरावरच्या दहा छत्रांची सावली वानरसैन्यावर पडली. ती सावली पाहून श्रीरामाने बिभीषणाला विचारले, "ही अकाली अभ्रे कशी?" त्यावर बिभीषण म्हणाला, "श्रीरघुनाथा, तुझा शत्रू तुझ्या सैन्याची पाहणी करत असून, त्याच्या छत्रांची इथे सर्वांवर सावली पडली आहे. ही अभ्रे नाहीत." बिभीषणाने हे सांगताच श्रीरामाला राग आला. त्याने धनुष्यबाण सज्ज करून म्हटले, "शत्रूची छाया माझ्या सैन्यावर पडणे हे मला लज्जास्पद आहे." नंतर त्याने धनुष्य सज्ज करून मोठ्या आवेशाने त्यावर बाण चढवला. श्रीराम हा नव्या मेघाचा वर्ण असलेला मेघश्याम, पीतांबर नेसलेला शोभायमान, कमलनयन आणि आजानुबाहू होता. त्याने मुकुट, कुंडले, वनमाला, गळ्यात पदक, कटीला मेखला, पायात वाजणारे तोडर, परिधान केले होते. कळिकाळालाही त्याचा धाक वाटे. वीरकंकणे आणि मुद्रिका हातात घातलेला, दशावतारी सुरेख टीका धारण केलेला श्रीराम धनुष्य सज्ज करून लंकेकडे रागाने पाहात होता. तो उजव्या हातात बाण खेळवत रावणाला मारायच्या विचारात होता; परंतु असावध शत्रूलाही मारू नये असा विचार करून, त्याने केवळ रावणाची छत्रे छेदण्याचे ठरविले.

श्रीरामाने चमत्काराने बाण सोडून, रावणाची दहाही छत्रे छेदली आणि त्यातून बाहेर पडलेला बाण पुन्हा भात्यात प्रवेशला. आपली छत्रे पडलेली पाहून रावणाला आपल्या शत्रूच्या कौशल्याचे कौतुक वाटले. तो मनात म्हणाला, 'खरोखर श्रीराम धर्मात्मा आहे; त्याने शिरच्छेद केला नाही. ज्याने दहाही छत्रे छेदली, त्याला दहा शिरेही क्षणात छेदता आली असती; परंतु श्रीरघुवीराने अधर्म केला नाही. दशाननाने रामाचे गुण ओळखले. श्रीरामाच्या गुणाचे रावण कौतुक करत असताना प्रहस्त प्रधान म्हणाला, "आता दुसरा बाण सुटला तर घात होईल." हे प्रहस्ताचे बोलणे ऐकताच श्रीरामाच्या बाणाचे भय धरून, रावण तिथून पळाला आणि त्याने अचूक मरण चुकवले. श्रीरामाने अचूक संधानाने लक्ष्य भेदले की रामबाण जिथल्या तिथे म्हणजे भात्यात परत येतो हे रामाचे धनुर्विद्येतले अद्‌भुत कौशल्य होते. रावणाची छत्रे

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

छेदली गेली, हे पाहून लंकाजन म्हणू लागले की हा मोठाच अपशकुन असून, युद्धात रावण मरेल. श्रीरामाच्या अनुसंधानाने रावणाची छत्रे छेदली गेली तेव्हा ते पाहून वानरांच्या सेनेतही तो रावणाला अपशकुन झाला आणि त्याचा कल्पान्त आला हीच प्रतिक्रिया झाली.

अध्याय तिसरा

श्रीरामाशी प्रत्यक्ष युद्ध सुरू होण्यापूर्वीच रावणाला आरंभी छत्रभंजनाचा अपशकुन झाला. त्यामुळे रावण उद्विग्न झाला. त्याने प्रधानांना त्यांच्या ठिकाणी पाठविले आणि तो स्वतः आपल्या भुवनात आला. 'सबळ समर्थ असा श्रीराम, वानरसैन्यही असंख्यात, तेव्हा आता मी काय करावे' अशी प्रबळ चिंता त्याला सतावू लागली. यावरच्या उपायाचा तो विचार करू लागला.

रावण सूडासाठी कपटाचा आश्रय करतो

रावणाच्या विचारात गोंधळ होता. 'आपण सीता बळाने भोगू म्हटले, तर आपल्यापेक्षा ती अधिक बलवान आहे. ती माझा घात करू शकते; मी तिला मारू शकत नाही. कारण श्रीरामाची सेवा केल्यामुळे ती जन्म-मरणाच्या पलीकडे नित्य वसती करून आहे; त्यामुळे तिला निश्चित मारता येत नाही. श्रीरामनामस्मरण केले म्हणजे मरणालाच मरण येते. सीता पूर्णपणे विदेही आहे. त्यामुळे तिच्यासंबंधात मारकपण चालत नाही. रामनामाच्या स्मरणाने जन्ममरण उठून पळते. भोगावे म्हटले तर सीता भोगता येत नाही; मारू जाता मारली जात नाही, रामाला युद्धात जिंकता येत नाही. तर आता मी काय करावे? रणात रघुनाथाला मारले, तर जानकी वश होण्याची शक्यता; पण श्रीराम मारला जाणे शक्य नाही. तेव्हा आता कपटाने सीता वश करावी' असे कपटी रावणाने ठरविले. रावण स्वतः कपटी होताच, पण विद्युज्जिव्ह हा पूर्ण कपटी राक्षस होता. सीतेशी कपट करण्याचे मनातले गुपित रावणाने विद्युज्जिव्हाला सांगितले. "सीतेशी कपट करण्यासाठी आपण श्रीरामाचे संपूर्ण शिर धनुष्यबाणासहित मायिकपणे करावे." हे रावणाने सांगताच तो राक्षस म्हणाला, "आता त्वरित शिर निर्माण करतो." यामुळे संतुष्ट झालेल्या रावणाने त्याला हातातले सोन्याचे कंकण दिले; परंतु श्रीरामाचे मायिक शिर विद्युज्जिव्हाला करता करवेना. त्यामुळे तो काळजीत पडला. श्रीरामाचे शिर करताना त्याची हत्यारेच बोथट झाली; सांधे कोरास कोर बसेनात; ते शिर तयार होत नव्हते. श्रीरामाचा रंग साधेना, सगळे रंग ओघळू लागले. रावण रागावेल म्हणून विद्युज्जिव्ह अत्यंत दुःखी झाला. सर्व माया जाणणाऱ्या श्रीरामाशी मायावीपणा चालत नाही. त्यामुळे विद्युज्जिव्हाला मोठी काळजी पडली. श्रीरामाला माया चालत नाही म्हणून त्याचे मायिक शिर घडवले जात नाही. यामुळे परम चिंताग्रस्त झालेला आणि कासावीस झालेला विद्युज्जिव्ह तडक विश्वकर्म्याकडे गेला.

विश्वकर्म्याची प्रतिक्रया, ध्यानमूर्तीचे वरदान

विद्युज्जिव्ह विश्वकर्म्याचे चरणवंदन करून म्हणाला, "आपण श्रीरामाचे मायिक शिर निश्चयाने करून द्यावे." त्यावर विश्वकर्मा म्हणाला, 'श्रीरामाचे मायिक शिर असे वाचेने नुसते म्हटले तरी वाचेला कुष्ट लागेल. हे बोलणे म्हणजे कुलनाशाचे मूळ ठरेल. जेथे कपट तेथे तळपट असे वेदात धडधडीत म्हटले आहे. रावण भ्रमाने फसला जाऊन कुळासह मरेल. श्रीराम हा सत्याचे निजसत्य असून माया ही असत्य आहे. अशा रामाचे मायिक शिर मला सर्वथा करता येणार नाही. तुमचा सर्वनाश जवळ आला, यामुळे तुम्ही हे खोटे कपट करत आहात. सीतेपुढे हे चालणार नाही; तुम्ही मात्र रणात मराल." हे विश्वकर्म्याचे बोलणे ऐकून विद्युज्जिव्ह रडू लागला आणि म्हणाला, "श्रीरामाचे

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Muthulakshmi Research Academy

मायिक शिर मी नेले नाही तर रावण मला मारील. त्याला सीतेची एवढी अभिलाषा आहे की त्याला ना स्वार्थ कळतो, ना परमार्थ समजतो. तो माझा निश्चित घात करील, तेवढा अनर्थ आपण चुकवावा. मी दातात अंगठे धरतो, मस्तकावर तुझे चरण दृढ धरतो, मी तुझा पूर्वीपासूनचा शिष्य आहे, यासाठी माझे प्राण वाचव, तुझ्यापासूनच मला मायिक विद्येची शिकवण मिळाली आहे; परंतु ती श्रीरामाच्या बाबतीत चालत नाही. तेव्हा तू कृपा करून वाचव." असे म्हणून विद्युज्जिव्हाने विश्वकर्म्याचे पाय घट्ट धरले आणि नंतर लोटांगण घातले. या सर्व विनवणीने कृपावंत विश्वकर्मा कळवळला.

विश्वकर्म्याने संतचरणरजांना वंदन करून द्विजचरणतीर्थाचे प्राशन करून, स्वतः श्रीरामाचे ध्यान करायला आरंभ केला. जेव्हा द्विजचरणरज वंदिले जातात, तेव्हा सर्व तऱ्हेच्या संपत्तीची प्राप्ती होते; समस्त संकटांचे निर्दाळण होऊन, स्वतः श्रीराममूर्ती भेटते. द्विजचरणरजाचे माहात्म्य असे की जे जे वांछित ते सार्थ, संपूर्ण होते; भुक्ती मुक्ती त्याला आंदण मिळतात, श्रीराम सुप्रसन्न होतो." या नंतर विश्वकर्म्याची ध्यानस्थिती असताना श्रीराममूर्ती प्रकट झाली. मायिक रामशिराची प्राप्ती व्हावी असे त्याने वरदान मागितले. विश्वकर्म्याची ध्यानमूर्ती त्याला म्हणाली, "तुझी वरदानाची मागणी प्राप्त होणे कठीण आहे, नीट ऐक. शिर करणे हे शक्य नाही. शिर स्वतःला घडविता येत नाही. काल्पनिक अशी शिर-संस्था मी वरदानात देईन. आरसा प्रतिवदनाचे बिंब दाखवितो, रूपरेखा समसमान दिसते, त्याप्रमाणे संपूर्ण कल्पित शिर योग्य समयी पावशील. जेव्हा रावण शिर मागेल, त्यावेळी विद्युज्जिव्हा समजून ऐस की काल्पनिक संपूर्ण शिर स्वतः त्याला प्राप्त होईल. आरशात प्रतिमुख दिसते, पण ते मुख त्या आरशामध्ये नसते; मनःकल्पित शिर त्याप्रमाणे अनायासे प्राप्त होईल. तेही शिर अचेतन असेल आणि कल्पित धनुष्यबाणही योग्य वेळी प्राप्त होईल हे जाणून घे." असे वरदान मिळवून विद्युज्जिव्ह परत येताच, रावण मोठ्या आवेशाने अशोकवनाकडे निघाला.

रावण सीतेच्या भेटीला अशोकवनात

रावण स्वतः आनंदाने गर्जना करत अशोकवनात सीतेला प्रलोभन दाखविण्यासाठी आला. सीता त्यावेळी बाह्यतः मलिन, दीन दिसत होती; अंतरात ती सुखाने श्रीरामाचे ध्यान करत होती. सीतेला पाहून रावण म्हणाला, "श्रीरामाच्या सामर्थ्याचा अभिनिवेश बाळगून माझ्या बोलण्याची उपेक्षा करतेस; रामाची प्रौढी अहोरात्र नित्य सांगत असतेस; हे खरे ना? म्हणे त्याने त्रिशिरा, खर यांना मारले, असा श्रीरामचंद्र मोठा बलवान आहे; परंतु इंद्रजित कुमार त्या रामाला मारून त्याचे शिर घेऊन आला आहे. त्या रामाला उपेक्षून शिर घेऊन आला आहे. त्या रामाला उद्देशून शूर, श्रेष्ठ, वीर, योद्धा आहे असे म्हणून, तो रणश्रेष्ठ असल्याचे वर्णन करतेस आणि मला क्षुद्र फोलपट मानतेस. ज्याच्या बळावर मला नेहमी शल्य पोचवतेस, त्या रामाला मी निर्मूळ केला आहे. तेव्हा आता तत्काळ मला वर. रणात रघुनाथाला मारले आहे. आता सीतेला कोण सोडवील? तेव्हा त्याची चिंता, वार्ता सोडून दे आणि मला या लंकानाथाला उल्हासाने वर. गर्वाने स्वतःला पतिव्रता म्हणतेस, तीच तू लंकानाथाला प्राप्त होशील. मी तुला कधीच सोडणार नाही, तेव्हा उत्साहाने माझा स्वीकार करून, मला वर. आता रावणाला वरण्याशिवाय तुला अन्य पर्याय नाही. यासाठी मूर्खपणा सोडून तू लंकाधीशाची पत्नी हो. युद्धात राम, लक्ष्मण मारले गेले. वानरसैन्याचे निर्दाळण झाले. आता तुझा हट्ट कशासाठी? तू या रावणाला प्रिय पती म्हणून स्वीकार. श्रीराम रणात पडल्यावर, सौमित्रासह वानरगणांनी रणवाद्ये वाजवून मान्य केले की, सीता रावणाची राणी

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized By Saymu Foundation Trust and eGangotri

झाली. सीते, श्रीरामाचे मरण ऐकूनही तू रडत नाहीस, माझे बोलणे खोटे आहे असे म्हणतेस, तर पुढे रणकंदन कसे झाले तेच ऐक.'' रावणाने असे सांगितल्यावरही सीता काही बोलली नाही.

रावण सीतेला म्हणाला, ''इंद्रजिताने घाला घालून रणात रघुनाथाचा वध केला. हे तू सत्य मानत नसशील तर रणवृत्तान्त ऐक. ज्याप्रमाणे इंद्राने वृत्रासुराला मारले, त्याप्रमाणे राक्षसांनी श्रीरामाला मारले. तुझा नवरा कोणत्या ठिकाणी मारला गेला तेही तुला सांगतो. सेतू बांधून श्रीराम वानरांच्या समुदायासह गर्जत दक्षिण तीरावर येऊन राहिला. त्यानंतर जेव्हा सूर्यास्त झाला तेव्हा वाटचालीने दमलेले वानरगण राम-लक्ष्मणासह सुखाने झोपी गेले. आम्हाला बिभीषणाचे विशेष भय होते; पण तोही झोपी गेला. अशी पूर्ण शोधवार्ता मिळवून प्रहस्त प्रधान निघाला. त्यावेळी इंद्रजित सैन्यासह आणि प्रहस्तासह गेला आणि त्यांनी रातोरात घाला घातला. त्यामध्ये झोपेतच रामाला लक्ष्मणासह मारले. तसेच मध्यरात्री निद्रेत असलेल्या सुग्रीवादी वानरांना प्रहस्ताने घाला घालून मारले. त्यावेळी फरश, पट्टिश, तोमर, गदा, मुद्‌गल, बाण, चक्र अशा सर्व शस्त्रांचा वापर करून वानरांना रणात मारले. निष्ठुर प्रहस्ताने आपल्या हाताने तुझ्या पतीला श्रीरामाला मारून त्याचे शिर येथे खरोखर आणले आहे. श्रीरामाला मारून त्याचे धनुष्यबाणही आणले आहे.'' असे रावणाने सांगूनही सीता रडली नाही. रणात श्रीरामचंद्र मारला हे सीतेला खरे वाटेना, तिला ते मान्य नव्हते. त्यामुळे संतापून रावणाने रणातला महाघात वर्णन केला.

रावण सांगू लागला की, ''राम आणि लक्ष्मण झोपेतच मारले, सुग्रीवाची मान तोडली, हनुमंत आघाताने मेला, जांबुवंताची कंबर मोडली, इंद्रजानूला गुडघे तोडून रणात पाडला, सुषेणाला शूलाने फाडला, गंधमादन पट्टीशाने मारला. तसेच नळ, नीळ, मैंद, द्विविद या प्रबळ वानरांचे कपाळ तलवारीने छेदले. तार, तरळ गवाक्ष, कुमुद हे पाचही महावीर अनेक शस्त्रांचा वर्षाव करून निःशेष मारले. पिकलेला फणस झाडापासून झडतो तसे पनसाचे शिर धडापासून झडून पडले. असे अनेक गाढे वानरवीर रणात स्पष्टपणे मारले. हरिमुख, दधिमुख, सुमुख, दुर्मुख आणि वानरसैन्य एक एक शोधून मारले. अंगदाचे हात खांद्यापासून तोडून त्याला रणात पाडला. निशाचर (राक्षस) हे रात्री विशेष करून जागे राहतात. त्यामुळे त्यांनी वानरांचे रणकंदन केले. घोडे रगडले, हत्ती चिरडले आणि अशा रीतीने वानरांचे संपूर्ण सैन्य रणात मारले. दिवसा वानर प्रबळ, तर रात्री निशाचर दुर्धर असतात. त्यामुळे त्यांनी रात्री घाला घालून नर--वानर रणात निःशेष मारले. माझे सैन्य आणि सेनापती हे सर्व निशाचरांचेच आहे. त्यामुळे त्यांनी रात्रीच त्वरेने जाऊन, निजल्या जागी श्रीरामाला मारून त्याचे शिर आणले. माझ्या बोलण्यातले शब्द सीतेला सत्य वाटत नाहीत असे दिसते. तर मग हे घे रामाचे शिर तुझ्या हातात देतो. निवांत आपल्या पतीला स्वानंदाने भेट.'' ह्या रावणाच्या गोष्टी ऐकून सज्ञान सीता फसली नाही. तिने आपल्या पदरात शकुनगाठ बांधली असून श्रीरामाची अचूक भेट जाणली. शत्रूच्या तोंडचे बोल हे चिद्‌घन रामच बोलवतो. 'तुला रामाला भेटवतो' हे शब्द राम परिपूर्ण भेटेल असाच अर्थ सांगतात, हे तिने जाणले. शिवाय रावण जरी उपहासाने म्हणाला की, 'तुला लवकरच रामाला भेटवीन', तरी तोही शकुनच असे सीतेने मानले. नंतर कपट बुद्धीने रावणाने शिर दाखविण्यासाठी, 'विद्युज्जिव्हा, शीघ्र श्रीरामाचे सुंदर शिर आण आणि लवकर सीतेला दे.''

खोटे रामशिर पाहून सीतेची प्रतिक्रिया

श्रीरामाचे मायिक शिर सीतेला देताना विद्युज्जिव्हाला कापरे भरले होते. शिर दिले नाही तर

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Muthulakshmi Research Academy

मायिक शिर मी नेले नाही तर रावण मला मारील. त्याला सीतेची एवढी अभिलाषा आहे की त्याला ना स्वार्थ कळतो, ना परमार्थ समजतो. तो माझा निश्चित घात करील, तेवढा अनर्थ आपण चुकवावा. मी दातात अंगठे धरतो, मस्तकावर तुझे चरण दृढ धरतो, मी तुझा पूर्वीपासूनचा शिष्य आहे, यासाठी माझे प्राण वाचव, तुझ्यापासूनच मला मायिक विद्येची शिकवण मिळाली आहे; परंतु ती श्रीरामाच्या बाबतीत चालत नाही. तेव्हा तू कृपा करून वाचव.'' असे म्हणून विद्युज्जिव्हाने विश्वकर्म्याचे पाय घट्ट धरले आणि नंतर लोटांगण घातले. या सर्व विनवणीने कृपावंत विश्वकर्मा कळवळला.

विश्वकर्म्याने संतचरणरजांना वंदन करून द्विजचरणतीर्थाचे प्राशन करून, स्वतः श्रीरामाचे ध्यान करायला आरंभ केला. जेव्हा द्विजचरणरज वंदिले जातात, तेव्हा सर्व तऱ्हेच्या संपत्तीची प्राप्ती होते; समस्त संकटांचे निर्दाळण होऊन, स्वतः श्रीराममूर्ती भेटते. द्विजचरणरजाचे माहात्म्य असे की जे जे वांछित ते सार्थ, संपूर्ण होते; भुक्ती मुक्ती त्याला आंदण मिळतात, श्रीराम सुप्रसन्न होतो.'' या नंतर विश्वकर्म्याची ध्यानस्थिती असताना श्रीराममूर्ती प्रकट झाली. मायिक रामशिराची प्राप्ती व्हावी असे त्याने वरदान मागितले. विश्वकर्म्याची ध्यानमूर्ती त्याला म्हणाली, ''तुझी वरदानाची मागणी प्राप्त होणे कठीण आहे, नीट ऐक. शिर करणे हे शक्य नाही. शिर स्वतःला घडविता येत नाही. काल्पनिक अशी शिर-संस्था मी वरदानात देईन. आरसा प्रतिवदनाचे बिंब दाखवितो, रूपरेखा समसमान दिसते, त्याप्रमाणे संपूर्ण कल्पित शिर योग्य समयी पावशील. जेव्हा रावण शिर मागेल, त्यावेळी विद्युज्जिव्हा समजून ऐस की काल्पनिक संपूर्ण शिर स्वतः त्याला प्राप्त होईल. आरशात प्रतिमुख दिसते, पण ते मुख त्या आरशामध्ये नसते; मनःकल्पित शिर त्याप्रमाणे अनायासे प्राप्त होईल. तेही शिर अचेतन असेल आणि कल्पित धनुष्यबाणही योग्य वेळी प्राप्त होईल हे जाणून घे.'' असे वरदान मिळवून विद्युज्जिव्ह परत येताच, रावण मोठ्या आवेशाने अशोकवनाकडे निघाला.

रावण सीतेच्या भेटीला अशोकवनात

रावण स्वतः आनंदाने गर्जना करत अशोकवनात सीतेला प्रलोभन दाखविण्यासाठी आला. सीता त्यावेळी बाह्यतः मलिन, दीन दिसत होती; अंतरात ती सुखाने श्रीरामाचे ध्यान करत होती. सीतेला पाहून रावण म्हणाला, ''श्रीरामाच्या सामर्थ्याचा अभिनिवेश बाळगून माझ्या बोलण्याची उपेक्षा करतेस; रामाची प्रौढी अहोरात्र नित्य सांगत असतेस; हे खरे ना? म्हणे त्याने त्रिशिरा, खर यांना मारले, असा श्रीरामचंद्र मोठा बलवान आहे; परंतु इंद्रजित कुमार त्या रामाला मारून त्याचे शिर घेऊन आला आहे. त्या रामाला उपेक्षून शिर घेऊन आला आहे. त्या रामाला उद्देशून शूर, श्रेष्ठ, वीर, योद्धा आहे असे म्हणून, तो रणश्रेष्ठ असल्याचे वर्णन करतेस आणि मला क्षुद्र फोलपट मानतेस. ज्याच्या बळावर मला नेहमी शल्य पोचवतेस, त्या रामाला मी निर्मूळ केला आहे. तेव्हा आता तत्काळ मला वर. रणात रघुनाथाला मारले आहे. आता सीतेला कोण सोडवील? तेव्हा त्याची चिंता, वार्ता सोडून दे आणि मला या लंकानाथाला उल्हासाने वर. गर्वाने स्वतःला पतिव्रता म्हणतेस, तीच तू लंकानाथाला प्राप्त होशील. मी तुला कधीच सोडणार नाही, तेव्हा उत्साहाने माझा स्वीकार करून, मला वर. आता रावणाला वरण्याशिवाय तुला अन्य पर्याय नाही. यासाठी मूर्खपणा सोडून तू लंकाधीशाची पत्नी हो. युद्धात राम, लक्ष्मण मारले गेले. वानरसैन्याचे निर्दाळण झाले. आता तुझा हट्ट कशासाठी? तू या रावणाला प्रिय पती म्हणून स्वीकार. श्रीराम रणात पडल्यावर, सौमित्रासह वानरगणांनी रणवाद्ये वाजवून मान्य केले की, सीता रावणाची राणी

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

झाली. सीते, श्रीरामाचे मरण ऐकूनही तू रडत नाहीस, माझे बोलणे खोटे आहे असे म्हणतेस, तर पुढे रणकंदन कसे झाले तेच ऐक.'' रावणाने असे सांगितल्यावरही सीता काही बोलली नाही.

रावण सीतेला म्हणाला, ''इंद्रजिताने घाला घालून रणात रघुनाथाचा वध केला. हे तू सत्य मानत नसशील तर रणवृत्तान्त ऐक. ज्याप्रमाणे इंद्राने वृत्रासुराला मारले, त्याप्रमाणे राक्षसांनी श्रीरामाला मारले. तुझा नवरा कोणत्या ठिकाणी मारला गेला तेही तुला सांगतो. सेतू बांधून श्रीराम वानरांच्या समुदायासह गर्जत दक्षिण तीरावर येऊन राहिला. त्यानंतर जेव्हा सूर्यास्त झाला तेव्हा वाटचालीने दमलेले वानरगण राम-लक्ष्मणासह सुखाने झोपी गेले. आम्हाला विभीषणाचे विशेष भय होते; पण तोही झोपी गेला. अशी पूर्ण शोधवार्ता मिळवून प्रहस्त प्रधान निघाला. त्यावेळी इंद्रजित सैन्यासह आणि प्रहस्तासह गेला आणि त्यांनी रातोरात घाला घातला. त्यामध्ये झोपेतच रामाला लक्ष्मणासह मारले. तसेच मध्यरात्री निद्रेत असलेल्या सुग्रीवादी वानरांना प्रहस्ताने घाला घालून मारले. त्यावेळी फरश, पट्टिश, तोमर, गदा, मुद्गल, बाण, चक्र अशा सर्व शस्त्रांचा वापर करून वानरांना रणात मारले. निष्ठुर प्रहस्ताने आपल्या हाताने तुझ्या पतीला श्रीरामाला मारून त्याचे शिर येथे खरोखर आणले आहे. श्रीरामाला मारून त्याचे धनुष्यबाणही आणले आहे.'' असे रावणाने सांगूनही सीता रडली नाही. रणात श्रीरामचंद्र मारला हे सीतेला खरे वाटेना, तिला ते मान्य नव्हते. त्यामुळे संतापून रावणाने रणातला महाघात वर्णन केला.

रावण सांगू लागला की, ''राम आणि लक्ष्मण झोपेतच मारले, सुग्रीवाची मान तोडली, हनुमंत आघाताने मेला, जांबुवंताची कंबर मोडली, इंद्रजानूला गुडघे तोडून रणात पाडला, सुषेणाला शूलाने फाडला, गंधमादन पट्टीशाने मारला. तसेच नळ, नीळ, मैंद, द्विविद या प्रबळ वानरांचे कपाळ तलवारीने छेदले. तार, तरळ गवाक्ष, कुमुद हे पाचही महावीर अनेक शस्त्रांचा वर्षाव करून निःशेष मारले. पिकलेला फणस झाडापासून झडतो तसे पनसाचे शिर धडापासून झडून पडले. असे अनेक गाढे वानरवीर रणात स्पष्टपणे मारले. हरिमुख, दधिमुख, सुमुख, दुर्मुख आणि वानरसैन्य एक एक शोधून मारले. अंगदाचे हात खांद्यापासून तोडून त्याला रणात पाडला. निशाचर (राक्षस) हे रात्री विशेष करून जागे राहतात. त्यामुळे त्यांनी वानरांचे रणकंदन केले. घोडे रगडले, हत्ती चिरडले आणि अशा रीतीने वानरांचे संपूर्ण सैन्य रणात मारले. दिवसा वानर प्रबळ, तर रात्री निशाचर दुर्धर असतात. त्यामुळे त्यांनी रात्री घाला घालून नर--वानर रणात निःशेष मारले. माझे सैन्य आणि सेनापती हे सर्व निशाचरांचेच आहे. त्यामुळे त्यांनी रात्रीच त्वरेने जाऊन, निजल्या जागी श्रीरामाला मारून त्याचे शिर आणले. माझ्या बोलण्यातले शब्द सीतेला सत्य वाटत नाहीत असे दिसते. तर मग हे घे रामाचे शिर तुझ्या हातात देतो. निवांत आपल्या पतीला स्वानंदाने भेट.'' ह्या रावणाच्या गोष्टी ऐकून सज्ञान सीता फसली नाही. तिने आपल्या पदरात शकुनगाठ बांधली असून श्रीरामाची अचूक भेट जाणली. शत्रूच्या तोंडचे बोल हे चिद्घन रामच बोलवतो. 'तुला रामाला भेटवतो' हे शब्द राम परिपूर्ण भेटेल असाच अर्थ सांगतात, हे तिने जाणले. शिवाय रावण जरी उपहासाने म्हणाला की, 'तुला लवकरच रामाला भेटवीन', तरी तोही शकुनच असे सीतेने मानले. नंतर कपट बुद्धीने रावणाने शिर दाखविण्यासाठी, 'विद्युज्जिव्हा, शीघ्र श्रीरामाचे सुंदर शिर आण आणि लवकर सीतेला दे.''

खोटे रामशिर पाहून सीतेची प्रतिक्रिया

श्रीरामाचे मायिक शिर सीतेला देताना विद्युज्जिव्हाला कापरे भरले होते. शिर दिले नाही तर

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

रावणाकडून शिक्षा केली जाईल अशी त्याला भिती वाटत होती. तसेच खोटे शिर सीतेला दिले तर ती पतिव्रता रागाने शाप देईल अशी त्याला भीती वाटत होती. त्यामुळे भयभीत झालेला विद्युज्जिव्ह न कळता पळून गेला. सीतेला दिले गेलेले रामाचे शिर खोटे आहे असे समजल्यावरही सीतेने तेथे रावणाच्या समक्ष भक्ती-तत्परता दाखविली. तिने त्या श्रीरामशिराला साष्टांग नमस्कार घातला. श्रीरामाचे धनुष्यबाण पाहून सीतेने त्यापुढे लोटांगण घातले. हे रावण पाहात होता. श्रीरामाचे तुटलेले शिर खोटे आहे याची पूर्ण जाणीव असूनही सीता खोटेच रडू लागली. तिने तसे रडता रडताच रावणाला ऐकायला जाईल अशा रीतीने श्रीरामाचे माहात्म्य सांगायला आरंभ केला. "श्रीराम हा जन्म-मरणाच्या पलीकडे नित्य राहात असल्याने, त्याचा राक्षसांनी घात केला, हे सत्यतः घडेलच कसे रामा? एकवेळ स्वतःच्या बळावर काजव्याने सूर्याचा घात केला असे होईल; पण राक्षसांनी श्रीरामाला रणात मारणे शक्य होणार नाही. श्रीराम नित्य सावधान असतो. तो जागृती-स्वप्न-सुषुप्ती विहीन असल्याने त्याला झोपेतच राक्षसांनी मारले, हे घडणे कसे शक्य आहे. धुराने आकाशातला चंद्र धुरकटला असे होणारच नाही; त्याप्रमाणे श्रीरामाला निद्रा लागतच नाही, तर त्याचा सुखावस्थेत वध केला हे निश्चित कसे मानावे. पाण्यात आकाश असते, पण त्याचे अंग ओले होत नाही (पाण्यातले प्रतिबिंब), त्याप्रमाणे श्रीराम हा द्वंद्वविहीन असल्यामुळे, त्याचे मरण हे सत्य कसे मानायचे. पर्जन्यधारा समुद्राला कधीच रुपत नाहीत (कारण त्या ज्याच्यापासून त्यालाच कशा रुपतील?), त्याप्रमाणे शस्त्रास्त्रे श्रीरामाच्या स्वतःच्या अंगाला लागणार नाहीत. कधी उंदीर चंद्र कुरतडू शकतो हेही होईल; पण मंदबुद्धी राक्षस श्रीरामाचा शिरच्छेद करू शकणार नाहीत. तेव्हा ही असंबद्ध वार्ता मी कशी खरी मानावी?" अशा प्रकारे श्रीरामाची थोरवी सांगत असतानाच सीता ओक्साबोक्सी रडत होती. त्यामुळे रावण चरफडत राहिला. सीतेपुढे त्याचे कपट चालले नाही. सीता पुढे असेही म्हणाली की, "स्वयंवराच्या प्रसंगी शिवधनुष्य उचलताना रावणाने काळे तोंड केले (त्याची दुर्दशा झाली पण राम विजयी झाला). तेव्हा श्रीरामाचे स्वतःचे प्रचंड धनुष्य कुठले घुंगुरटे आणू शकेल? श्रीरामाचा स्वतःचा बाण हा रणात शत्रूचा नाश करून स्वतःच परतून भात्यात येऊन राहतो; तर तो वेगळा कोण करू शकेल?" सीतेचे हे बोलणे आणि रडणे चालले असताना रावण कपाळ बडवून घेत होता. सीतेशी कपट चालत नाही असे जाणून तो तिच्या अभिलाषेने तळमळत राहिला. त्याचवेळी काही वेगळे घडले, सीतेला श्रीरामाचे विज्ञान कळून, ती ते सुचिन्ह मानू लागली.

सीतेला रामशिराची कृत्रिमता समजली

सीतेने श्रीरामाचे ते सुंदर शिर पाहिले. श्रीरामासारखे हुबेहुब असले तरी ते खरे नव्हे याची सीतेला पूर्ण निश्चिती वाटत होती. तेव्हा ती गंभीरपणे एक श्लोकपद म्हणाली. तो (संस्कृत) श्लोक असा

"सा सीता तच्छिरो दृष्ट्वा तच्च कार्मुकमुत्तमम्।
नयने मुखवर्णं च भर्तुस्तत्सदृशं भवेत्॥

या सुरस श्लोकपदात श्रीरामशिराशी 'सादृश्य' हाच पदगर्भविलास होता. तो ती जाणून होती. श्लोकपदगर्भ गंभीर अर्थ की श्रीरामाच्या शिरासारखे शिर म्हणजे खरेच श्रीरामाचे नव्हते हे सीतेला पूर्णपणे ज्ञात झाले होते. नेत्र, मुख, कान, नाक, ओठ, तोंड, दात, भुवया इत्यादी सर्वच श्रीरामाच्या मुखासमान होते पण ते वेगळे कृत्रिमपणे केलेले सीतेने जाणले होते. श्रीरामाचा घात खोटाच सांगितला गेला, पण सीता त्यामुळे गडबडली नाही. कारण राक्षसांना श्रीरामाला मारता येणे शक्य नाही असा तिला विश्वास होता. सतेज-

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized By Sayu Foundation Trust and eGangotri

धारदार-शस्त्रे परजून गगनाचा छेद सर्वथा होत नाही, तसेच श्रीरामाचे शिर कापणे राक्षसांकडून होणार नाही. दुधारी शस्त्राचे वार करून मुख तोडलेला उंदीर मरतो. राक्षसांना रामाचे शिर तोडता येणार नाही, उलट रामच राक्षसांना मारील. माशी सर्व रस चाखते पण दीप चाखायला गेली तर तोंड पोळते; तसेच राक्षस रामाला मारायला गेले तर राम राक्षसांचा प्राणान्त करतो. श्रीरघुनाथाचे कृत्रिम शिर घडवता घडत नाही सीता जेव्हा त्याच्याकडे मोठ्या आदराने पाहू लागली. तेव्हा ते अदृश्य झाले. विद्युज्जिव्ह जसा सीतेकडे शिर देऊन लगेच बाहेर पळाला; तसे ते शिर सीता निर्धाराने पाहू लागताच क्षणात अदृश्य झाले.

एखाद्या डबक्यातील पाण्यात सूर्य विंबलेला दिसतो; पण तो काढू म्हटले तर तो तिथे नसतो. त्याच प्रकारे कल्पित शिराची नवलाई ही की जागच्या जागी ते अदृश्य होते. कृत्रिम शिराप्रमाणेच धनुष्यबाणाकडे सीता जेव्हा निर्धारपूर्वक पाहू लागली तेव्हा उडून जाऊन धनुष्यबाण अदृश्य झाले; कारण ते संपूर्ण असत्य होते. सीतेच्या दृष्टीपुढे खोटे टिकून राहात नाही; खोटेपणामुळे ते समूळ उडून जाते. सीतेच्या मागे-पुढे श्रीराम असतो. सीतेचा भजनानुक्रम तसाच असतो. तिच्या नयनी, वदनी, शयनी, जीवनी एक श्रीरामच असतो. त्यामुळेच तिच्यापुढे भ्रम टिकत नाही. तिच्या स्मरणात, कृतीत तसेच पंचभूतांच्या धरणीत आणि क्षराक्षरांच्या वाणीत रामच असतो, मग तिच्यापुढे भ्रम कसा राहील. कर्मी, धर्मी राम; आश्रम, विश्राम हेही राम; स्वधर्मात नित्य राम, अशा कारणाने तिच्यासमोर भ्रम कसा काय राहणार. गती, स्थिती, वृत्ती, धृती हे सर्व राममय आणि सर्वाभूती नेहमी श्रीरामच असल्यावर तिथे भ्रम कुठला टिकणार. अशी ती सीता पतिव्रता श्रीरामभक्तीत समरसली असल्यामुळे तिच्या बाबतीत कपट-कारस्थान चालत नाही. हे त्या लंकाधिपती मूर्ख रावणाला समजलेच नाही.

त्याचवेळी अत्यंत विव्हल झालेला उत्तरेकडच्या दारावरचा द्वारपाल आला. त्याने विव्हळत, भयभीत होऊन रावणाला म्हटले, "राम-लक्ष्मण हे दुर्धर बाण सज्ज करून, वानरगणांच्या संपूर्ण परिवारासह रणवाद्ये वाजवत लंकेवर चालून आले आहेत. लंकाभुवनाचा विध्वंस करून, राक्षसांचे कंदन करून, दशाननाचा वध करण्यासाठी ते राम-लक्ष्मण स्वतःच आले आहेत. आता यावेळी आपण सीतेचा छळ करत काय थांबला आहात, तत्काळ संग्रामासाठी निघा. नाहीतर जानकी श्रीरामाला देऊन त्याला शरण तरी जा." द्वारपालाचे बोलणे ऐकून, सीतेचे छळण सोडून, रावण तातडीने राजसभेत गेला. इकडे अशोकवनात सीता होती त्याठिकाणी राखण करण्यासाठी रावणाने सरमा ही राक्षसी नेमली होती. या सरमा राक्षसीची सीतेशी मैत्री झाली होती. ती नेहमी सीतेशी अगदी आप्तभावाने वागत असे. रावणाने कपटाने सीतेचा छळ केल्याचे समजल्यावर सरमेने सीतेला धीर देऊन आश्वासनपूर्वक म्हटले, "तुला छळण्यासाठीच त्या खोट्या आणि कपटी रावणाने राम मारल्याचे सांगितले; पण श्रीरामाचा वध झालेला नाही. तू अगदी स्वस्थचित्त राहा जानकी." सर्व जाणून सरमा पुढे म्हणाली, "सीते, राम लक्ष्मण हे सुखरूप आहेत. लाडका हनुमंत आणि सर्व वानरगण स्वस्थ आणि सुखी आहेत. तुझा छळ करण्यासाठी रावणाने ते मायिक शिर आणि धनुष्यबाण तुला दाखविले. तो पूर्ण कपटी आणि महापापी आहे. एवढेच नाही तर श्रीरामाबरोबर वानरसैन्य आणि अंगद, सुग्रीव हेही रावणवधासाठी लंकेच्या समोर, जवळ आले आहेत. पलीकडे पाहा तो वानरसमूह गडगजर करत

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

रावणाकडून शिक्षा केली जाईल अशी त्याला भिती वाटत होती. तसेच खोटे शिर सीतेला दिले तर ती पतिव्रता रागाने शाप देईल अशी त्याला भीती वाटत होती. त्यामुळे भयभीत झालेला विद्युज्जिव्ह न कळता पळून गेला. सीतेला दिले गेलेले रामाचे शिर खोटे आहे असे समजल्यावरही सीतेने तेथे रावणाच्या समक्ष भक्ती-तत्परता दाखविली. तिने त्या श्रीरामशिराला साष्टांग नमस्कार घातला. श्रीरामाचे धनुष्यबाण पाहून सीतेने त्यापुढे लोटांगण घातले. हे रावण पाहात होता. श्रीरामाचे तुटलेले शिर खोटे आहे याची पूर्ण जाणीव असूनही सीता खोटेच रडू लागली. तिने तसे रडता रडताच रावणाला ऐकायला जाईल अशा रीतीने श्रीरामाचे माहात्म्य सांगायला आरंभ केला. "श्रीराम हा जन्म-मरणाच्या पलीकडे नित्य राहात असल्याने, त्याचा राक्षसांनी घात केला, हे सत्यतः घडेलच कसे रामा? एकवेळ स्वतःच्या बळावर काजव्याने सूर्याचा घात केला असे होईल; पण राक्षसांनी श्रीरामाला रणात मारणे शक्य होणार नाही. श्रीराम नित्य सावधान असतो. तो जागृती-स्वप्न-सुषुप्ती विहीन असल्याने त्याला झोपेतच राक्षसांनी मारले, हे घडणे कसे शक्य आहे. धुराने आकाशातला चंद्र धुरकटला असे होणारच नाही; त्याप्रमाणे श्रीरामाला निद्रा लागतच नाही, तर त्याचा सुखावस्थेत वध केला हे निश्चित कसे मानावे. पाण्यात आकाश असते, पण त्याचे अंग ओले होत नाही (पाण्यातले प्रतिबिंब), त्याप्रमाणे श्रीराम हा द्वंद्वविहीन असल्यामुळे, त्याचे मरण हे सत्य कसे मानायचे. पर्जन्यधारा समुद्राला कधीच रुपत नाहीत (कारण त्या ज्याच्यापासून त्यालाच कशा रुपतील?), त्याप्रमाणे शस्त्रास्त्रे श्रीरामाच्या स्वतःच्या अंगाला लागणार नाहीत. कधी उंदीर चंद्र कुरतडू शकतो हेही होईल; पण मंदबुद्धी राक्षस श्रीरामाचा शिरच्छेद करू शकणार नाहीत. तेव्हा ही असंबद्ध वार्ता मी कशी खरी मानावी?" अशा प्रकारे श्रीरामाची थोरवी सांगत असतानाच सीता ओक्साबोक्सी रडत होती. त्यामुळे रावण चरफडत राहिला. सीतेपुढे त्याचे कपट चालले नाही. सीता पुढे असेही म्हणाली की, "स्वयंवराच्या प्रसंगी शिवधनुष्य उचलताना रावणाने काळे तोंड केले (त्याची दुर्दशा झाली पण राम विजयी झाला). तेव्हा श्रीरामाचे स्वतःचे प्रचंड धनुष्य कुठले घुंगुरटे आणू शकेल? श्रीरामाचा स्वतःचा बाण हा रणात शत्रूचा नाश करून स्वतःच परतून भात्यात येऊन राहतो; तर तो वेगळा कोण करू शकेल?" सीतेचे हे बोलणे आणि रडणे चालले असताना रावण कपाळ बडवून घेत होता. सीतेशी कपट चालत नाही असे जाणून तो तिच्या अभिलाषेने तळमळत राहिला. त्याचवेळी काही वेगळे घडले, सीतेला श्रीरामाचे विज्ञान कळून, ती ते सुचिन्ह मानू लागली.

सीतेला रामशिराची कृत्रिमता समजली

सीतेने श्रीरामाचे ते सुंदर शिर पाहिले. श्रीरामासारखे हुबेहूब असले तरी ते खरे नव्हे याची सीतेला पूर्ण निश्चिती वाटत होती. तेव्हा ती गंभीरपणे एक श्लोकपद म्हणाली. तो (संस्कृत) श्लोक असा

"सा सीता तच्छिरो दृष्ट्वा तच्च कार्मुकमुत्तमम्।
नयने मुखवर्णं च भर्तुस्तत्सदृशं भवेत्॥

या सुरस श्लोकपदात श्रीरामशिराशी 'सादृश्य' हाच पदगर्भविलास होता. तो ती जाणून होती. श्लोकपदगर्भ गंभीर अर्थ की श्रीरामाच्या शिरासारखे शिर म्हणजे खरेच श्रीरामाचे नव्हते हे सीतेला पूर्णपणे ज्ञात झाले होते. नेत्र, मुख, कान, नाक, ओठ, तोंड, दात, भुवया इत्यादी सर्वच श्रीरामाच्या मुखासमान होते पण ते वेगळे कृत्रिमपणे केलेले सीतेने जाणले होते. श्रीरामाचा घात खोटाच सांगितला गेला, पण सीता त्यामुळे गडबडली नाही. कारण राक्षसांना श्रीरामाला मारता येणे शक्य नाही असा तिला विश्वास होता. सतेज-

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sayaji Lakshmi Research Academy eGangotri

धारदार-शस्त्रे परजून गगनाचा छेद सर्वथा होत नाही, तसेच श्रीरामाचे शिर कापणे राक्षसांकडून होणार नाही. दुधारी शस्त्राचे वार करून मुख तोडलेला उंदीर मरतो. राक्षसांना रामाचे शिर तोडता येणार नाही, उलट रामच राक्षसांना मारील. माशी सर्व रस चाखते पण दीप चाखायला गेली तर तोंड पोळते; तसेच राक्षस रामाला मारायला गेले तर राम राक्षसांचा प्राणान्त करतो. श्रीरघुनाथाचे कृत्रिम शिर घडवता घडत नाही सीता जेव्हा त्याच्याकडे मोठ्या आदराने पाहू लागली. तेव्हा ते अदृश्य झाले. विद्युज्जिव्ह जसा सीतेकडे शिर देऊन लगेच बाहेर पळाला; तसे ते शिर सीता निर्धाराने पाहू लागताच क्षणात अदृश्य झाले.

एखाद्या डबक्यातील पाण्यात सूर्य विंबलेला दिसतो; पण तो काढू म्हटले तर तो तिथे नसतो. त्याच प्रकारे कल्पित शिराची नवलाई ही की जागच्या जागी ते अदृश्य होते. कृत्रिम शिराप्रमाणेच धनुष्यबाणाकडे सीता जेव्हा निर्धारपूर्वक पाहू लागली तेव्हा उडून जाऊन धनुष्यबाण अदृश्य झाले; कारण ते संपूर्ण असत्य होते. सीतेच्या दृष्टीपुढे खोटे टिकून राहात नाही; खोटेपणामुळे ते समूळ उडून जाते. सीतेच्या मागे-पुढे श्रीराम असतो. सीतेचा भजनानुक्रम तसाच असतो. तिच्या नयनी, वदनी, शयनी, जीवनी एक श्रीरामच असतो. त्यामुळेच तिच्यापुढे भ्रम टिकत नाही. तिच्या स्मरणात, कृतीत तसेच पंचभूतांच्या धरणीत आणि क्षराक्षरांच्या वाणीत रामच असतो, मग तिच्यापुढे भ्रम कसा राहील. कर्मी, धर्मी राम; आश्रम, विश्राम हेही राम; स्वधर्मात नित्य राम, अशा कारणाने तिच्यासमोर भ्रम कसा काय राहणार. गती, स्थिती, वृत्ती, धृती हे सर्व राममय आणि सर्वाभूती नेहमी श्रीरामच असल्यावर तिथे भ्रम कुठला टिकणार. अशी ती सीता पतिव्रता श्रीरामभक्तीत समरसली असल्यामुळे तिच्या बाबतीत कपट-कारस्थान चालत नाही. हे त्या लंकाधिपती मूर्ख रावणाला समजलेच नाही.

त्याचवेळी अत्यंत विव्हल झालेला उत्तरेकडच्या दारावरचा द्वारपाल आला. त्याने विव्हळत, भयभीत होऊन रावणाला म्हटले, "राम-लक्ष्मण हे दुर्धर बाण सज्ज करून, वानरगणांच्या संपूर्ण परिवारासह रणवाद्ये वाजवत लंकेवर चालून आले आहेत. लंकाभुवनाचा विध्वंस करून, राक्षसांचे कंदन करून, दशाननाचा वध करण्यासाठी ते राम-लक्ष्मण स्वतःच आले आहेत. आता यावेळी आपण सीतेचा छळ करत काय थांबला आहात, तत्काळ संग्रामासाठी निघा. नाहीतर जानकी श्रीरामाला देऊन त्याला शरण तरी जा." द्वारपालाचे बोलणे ऐकून, सीतेचे छळण सोडून, रावण तातडीने राजसभेत गेला. इकडे अशोकवनात सीता होती त्याठिकाणी राखण करण्यासाठी रावणाने सरमा ही राक्षसी नेमली होती. या सरमा राक्षसीची सीतेशी मैत्री झाली होती. ती नेहमी सीतेशी अगदी आप्तभावाने वागत असे. रावणाने कपटाने सीतेचा छळ केल्याचे समजल्यावर सरमेने सीतेला धीर देऊन आश्वासनपूर्वक म्हटले, "तुला छळण्यासाठीच त्या खोट्या आणि कपटी रावणाने राम मारल्याचे सांगितले; पण श्रीरामाचा वध झालेला नाही. तू अगदी स्वस्थचित्त राहा जानकी." सर्व जाणून सरमा पुढे म्हणाली, "सीते, राम लक्ष्मण हे सुखरूप आहेत. लाडका हनुमंत आणि सर्व वानरगण स्वस्थ आणि सुखी आहेत. तुझा छळ करण्यासाठी रावणाने ते मायिक शिर आणि धनुष्यबाण तुला दाखविले. तो पूर्ण कपटी आणि महापापी आहे. एवढेच नाही तर श्रीरामाबरोबर वानरसैन्य आणि अंगद, सुग्रीव हेही रावणवधासाठी लंकेच्या समोर, जवळ आले आहेत. पलीकडे पाहा तो वानरसमूह गडगजर करत

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sayyed Foundation Research Academy

आला आहे." हे सरमेचे बोलणे ऐकून जानकी सुखसंपन्न झाली. तिने सरमेला आलिंगन दिले आणि आनंदाने आपले करकंकणही दिले.

अध्याय चौथा

श्रीरघुनंदन हा प्रबळ बळासहित आल्याचे ऐकून अत्यंत चिंताग्रस्त झालेला रावण ग्लानवदन घेऊन सभेत आला. तेव्हा वाद्यांचा गजर आणि त्यातच वानरांचा भुभुःकार ऐकू आला. रावण त्यामुळे दचकला आणि काही क्षण स्तब्ध राहिला. कार्य-कारण-कर्तव्य यातले त्याला काही आठवेना. मग माल्यवंत हा हिताचे काही शिकवावे म्हणून बोलण्यासाठी पुढे आला.

माल्यवंताचे कथन, सूचना, त्याचा धिक्कार

रावणाचा जवळचा आप्त, वृद्ध राक्षस माल्यवंत, हा बहुश्रुत, बुद्धिमंत, धर्मवंत, सुनीतिमंत असा होता. तो रावणाला उद्देशून म्हणाला, "लंकानाथा, स्वर्गात, भूमीवर, अंतरिक्षात विविध उत्पात होत असलेले लंकेला वेढून आहेत. त्यावरून राक्षसांचा कुलाघात सूचित होतो आहे. मध्याह्नी उल्कापात होत आहे, राजद्वारात जमिनीला तडे जाऊन खड्डे पडत आहेत, घुबडे बळाने घरात शिरून झडपत आहेत, नगरीवर रक्ताच्या धारांची वृष्टी होत आहे, चौफेर कोल्हेकुई गर्जत आहे, अन्न पात्रांसकट घरींकडून झडपून नेले जात आहे, या चिन्हांवरून राक्षसांचा सर्वनाश जवळ आल्याचे दिसत आहे. यासाठी हे लंकानाथा, श्रीरामाला सीता अर्पण करून राम-रावणाचे सख्य त्वरित घडवून आण. सध्याच्या कलहाचे मुख्य कारण सीतेचे हरण हेच आहे. तेव्हा ती रामार्पण केली तर सर्वांचे कृतकल्याण होईल. सीता श्रीरामाची पत्नी आहे, ती रामाला अर्पण करताना तुला निष्कारण व्यथा का व्हावी! कुळाघाताचे तेच मुख्य कारण आहे. श्रीरामाचा प्रताप फार मोठा आहे. त्याने समुद्रात पाषाणं तरत ठेवले आणि वानरसैन्य लंकेत आणले. त्या रामासमोर कोण टिकून राहणार आहे? हत्तीपुढे चिलट, सिंहावर भुंकणारे कुत्रे, याप्रमाणे श्रीरामाशी युद्ध करणारा रावण ठरून, तो नष्ट होईल. सूर्याशी युद्ध करणाऱ्या तुपाच्या कणांप्रमाणे स्थिती रावणाची होऊन श्रीरामाशी युद्ध करताना तो रणात मरेल. पतंगाने अग्नीशी झगडा केला तर त्याचे पंख झडून जातात, तसे श्रीरामाशी युद्ध करणाऱ्या रावणाचे होऊन, तो एकाच बाणाने निश्चित मरेल. तेव्हा शहाणपणाने मी सांगतो तशी सुबुद्धी मानून, सीता रामार्पण करून, कुळकल्याण साधावे."

माल्यवंताचे हिताचे बोलणे हे रावणाला, नासलेली खीर किंवा कडू विष, याप्रमाणे वाटले. त्या हितकर बोलण्याचे सुख न वाटता, रावणाला अत्यंत दुःख झाले. नंतर अत्यंत रागाने डोळे वटारून, रावण माल्यवानाला म्हणाला, "तू अत्यंत दुष्ट असा स्वामीनिंदक आहेस. शठ, नष्ट माल्यवंता, अरे राम बापडा मनुष्य, तो वानरांना घेऊन आला आहे; तर त्यांचे थोर थोर म्हणून वर्णन करतोस आणि मी राज्याचा स्वामी असून माझी निंदा करतोस! शत्रूपक्षाचा अभिमान धरून राममहिमा सांगतोस, रामाकडून कुळनिर्दाळण होईल म्हणतोस आणि माझी या रावणाची, निंदा करतोस! रामाशी युद्ध करताना राक्षसांचा नाश होईल आणि मुख्यतः रावण मरेल, असे कठोर भाषण करतोस! तुला त्या रामाने भेडसावले तरी मला त्या रामाचे कसले भय असणार. रणात मी वानरसैन्यासमवेत त्या राम-लक्ष्मणांना निश्चित मारीन. माझ्या विरुद्ध बोलणाऱ्या तुझा मी खरे तर घातच करायला हवा; पण तू अत्यंत वृद्ध आणि जवळचा आप्त म्हणून हात आवरला." रावण संतापलेला दिसताच तो माल्यवंत स्वतःच दूर होऊन सत्वर निघून गेला. त्याने मागे वळूनही पाहिले नाही. श्रीरघुनाथाला सीता अर्पावी असे

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

माल्यवंताने सांगितल्यामुळे, रावण त्याचा घात करू पाहील हे जाणून माल्यवंत अदृश्य होऊन निघून गेला.

रावणाकडून सैन्यरचनेविषयी आदेश

माल्यवंत निघून गेल्यावर रावणाने प्रधानांना सांगितले की, "दुर्गांची दारुण सज्जता करा आणि सर्व वीरांना सावधान राहण्याविषयी सांगा." मग रावणाने स्वतःच दुर्गांच्या व्यवस्थेविषयी योजना केली. पूर्वेकडच्या दारावर प्रहस्त ठेवला. महोदर तथा महापार्श्व याला दक्षिणेकडच्या दारावर पाठविला. पश्चिमेकडील दाराशी जेष्ठ पुत्र इंद्रजिताची योजना केली. त्या प्रत्येकाबरोबर कोट्यवधी राक्षससैन्य दिलेले होते. शुक-सारण यांना उत्तरेला असलेल्या दारावर ठेवले. शिवाय रावण स्वतः सहपरिवार त्याच उत्तरद्वारी राहिला. श्रीराम निश्चितपणे उत्तरेकडील दाराशी येईल या कल्पनेने स्वतः तेथे रावण सावधान राहिला. विरुपाक्षाला अगणित सैन्य देऊन मध्यभागात राहण्यास सांगितले. तसेच ज्या दाराशी काही उणीव दिसेल तेथे विरुपाक्षाने त्वरित जावे असे ठरविले. श्रीरामाच्या सैन्यातील वानरांनी लंकाभुवन पाहिले. त्यांनी दुर्ग जिंकून घेण्यासाठी उत्सुकता दाखविली आणि ते सर्व वानरगण रामाभोवती हात जोडून उभे राहिले. सर्वांनी श्रीरामचंद्राला वंदन करून म्हटले, "आम्हाला लंकापुर जिंकण्यासाठी सत्वर आज्ञा द्यावी स्वामी." योद्ध्यांनी आज्ञा मागताच बिभीषणाने त्यांना थांबविले आणि त्याने श्रीरामाला दुर्गाच्या संबंधातली माहिती सांगितली.

बिभीषण लंकादुर्गाच्या रक्षणाविषयी सांगतो

बिभीषण म्हणाला, "आपण रणकंदन करू गेलो तर दुर्गाचे कौशल्य असे आहे की शत्रूंचे सैन्य मारले जावे. गुप्त गोल शतघ्नी तोफा, अग्निगोल, प्रबळ पाषाण, असे प्रबळ साहित्य, शत्रूच्या सैन्याचे निर्दाळण करण्यासाठी योजून दुर्ग प्रबळ केलेला आहे. माझे चौघेही प्रधान लंकाभुवन धुंडाळून दुर्गाचे मारक कौशल्य आणि रक्षणव्यवस्थेची माहिती घेऊन आले आहेत." यावर श्रीरामाने बिभीषणाला प्रश्न केला की, "तुझ्या चारही प्रधानांना सर्वत्र सर्वजण ओळखत असताना त्यांनी माहिती आणली कशी?" बिभीषण म्हणाला, "माझ्या चार प्रधानांची नावे अनळ, हर, प्रघस आणि संपाती अशी आहेत. ते चौघे अत्यंत हुषार, विचक्षण आणि इच्छेनुसार रूप बदलू शकणारे आहेत. त्यामुळे पक्ष्याच्या रूपात जाऊन, लंकेत प्रवेश करून, दुर्गाची संरक्षण-व्यवस्था यथार्थपणे जाणून घेतली आणि त्वरित ते इकडे आले आहेत. पूर्वेला प्रहस्त, दक्षिणेला महोदर किंवा महापार्श्वद, पश्चिमेला इंद्रजित असून त्यांच्याबरोबर सशस्त्र सैन्य आहे. उत्तरेकडच्या दारावर नावापुरते शुक-सारण असले तरी सर्व सैन्यासह स्वतः रावण तेथे आहे. शिवाय मध्यभागात सैन्यसमुदाय ठेवला असून त्याचा प्रमुख विरुपाक्ष आहे. ज्या दाराशी काही उणीव दिसेल तेथे त्याने साहाय्यार्थ जायचे असे ठरले आहे. वानरांचा समूह मारावा यासाठी प्रत्येक बुरुजावर गुप्तपणे अनेक यंत्रे (तोफा) त्या क्रोधाच्या आहारी गेलेल्या रावणाने लावून ठेवली आहेत. वानर दुर्गाला झोंबले तर त्यांचा गुप्तपणे घात करण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारची यंत्रे रावणाने रणमारासाठी लावून ठेवली आहेत. दुर्गाची कडेकोट सज्जता केलेली आहे. दुर्गाला वानर भिडले की यंत्राच्या माराने मरतील. तेव्हा आपण तसे करू नये. प्रत्येक तोफेवर पांढरा, पिवळा, तांबडा इत्यादी रंगांच्या ध्वजा असून दुर्गाभोवताली समसमान उभारल्याने शोभत आहेत. प्रत्येक मोठ्या बुरुजाला देखाव्याची तोंडे असून, वेगवेगळ्या पद्धतीने कडे तासलेले आहेत. सर्वत्र सजलेल्या पताका-ध्वज असून राक्षस दृढपणे राखण करत आहेत."

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

आला आहे.'' हे सरमेचे बोलणे ऐकून जानकी सुखसंपन्न झाली. तिने सरमेला आलिंगन दिले आणि आनंदाने आपले करकंकणही दिले.

अध्याय चौथा

श्रीरघुनंदन हा प्रबळ बळासहित आल्याचे ऐकून अत्यंत चिंताग्रस्त झालेला रावण ग्लानवदन घेऊन सभेत आला. तेव्हा वाद्यांचा गजर आणि त्यातच वानरांचा भुभुःकार ऐकू आला. रावण त्यामुळे दचकला आणि काही क्षण स्तब्ध राहिला. कार्य-कारण-कर्तव्य यातले त्याला काही आठवेना. मग माल्यवंत हा हिताचे काही शिकवावे म्हणून बोलण्यासाठी पुढे आला.

माल्यवंताचे कथन, सूचना, त्याचा धिक्कार

रावणाचा जवळचा आप्त, वृद्ध राक्षस माल्यवंत, हा बहुश्रुत, बुद्धिमंत, धर्मवंत, सुनीतिमंत असा होता. तो रावणाला उद्देशून म्हणाला, ''लंकानाथा, स्वर्गात, भूमीवर, अंतरिक्षात विविध उत्पात होत असलेले लंकेला वेढून आहेत. त्यावरून राक्षसांचा कुलाघात सूचित होतो आहे. मध्याह्नी उल्कापात होत आहे, राजद्वारात जमिनीला तडे जाऊन खड्डे पडत आहेत, घुबडे बळाने घरात शिरून झडपत आहेत, नगरीवर रक्ताच्या धारांची वृष्टी होत आहे, चौफेर कोल्हेकुई गर्जत आहे, अन्न पात्रांसकट घारींकडून झडपून नेले जात आहे, या चिन्हांवरून राक्षसांचा सर्वनाश जवळ आल्याचे दिसत आहे. यासाठी हे लंकानाथा, श्रीरामाला सीता अर्पण करून राम-रावणाचे सख्य त्वरित घडवून आण. सध्याच्या कलहाचे मुख्य कारण सीतेचे हरण हेच आहे. तेव्हा ती रामार्पण केली तर सर्वांचे कृतकल्याण होईल. सीता श्रीरामाची पत्नी आहे, ती रामाला अर्पण करताना तुला निष्कारण व्यथा का व्हावी! कुळाघाताचे तेच मुख्य कारण आहे. श्रीरामाचा प्रताप फार मोठा आहे. त्याने समुद्रात पाषाणं तरत ठेवले आणि वानरसैन्य लंकेत आणले. त्या रामासमोर कोण टिकून राहणार आहे? हत्तीपुढे चिलट, सिंहावर भुंकणारे कुत्रे, याप्रमाणे श्रीरामाशी युद्ध करणारा रावण ठरून, तो नष्ट होईल. सूर्याशी युद्ध करणाऱ्या तुपाच्या कणांप्रमाणे स्थिती रावणाची होऊन श्रीरामाशी युद्ध करताना तो रणात मरेल. पतंगाने अग्नीशी झगडा केला तर त्याचे पंख झडून जातात, तसे श्रीरामाशी युद्ध करणाऱ्या रावणाचे होऊन, तो एकाच बाणाने निश्चित मरेल. तेव्हा शहाणपणाने मी सांगतो तशी सुबुद्धी मानून, सीता रामार्पण करून, कुळकल्याण साधावे.''

माल्यवंताचे हिताचे बोलणे हे रावणाला, नासलेली खीर किंवा कडू विष, याप्रमाणे वाटले. त्या हितकर बोलण्याचे सुख न वाटता, रावणाला अत्यंत दुःख झाले. नंतर अत्यंत रागाने डोळे वटारून, रावण माल्यवानाला म्हणाला, ''तू अत्यंत दुष्ट असा स्वामीनिंदक आहेस. शठ, नष्ट माल्यवंता, अरे राम बापडा मनुष्य, तो वानरांना घेऊन आला आहे; तर त्यांचे थोर थोर म्हणून वर्णन करतोस आणि मी राज्याचा स्वामी असून माझी निंदा करतोस! शत्रूपक्षाचा अभिमान धरून राममहिमा सांगतोस, रामाकडून कुळनिर्दाळण होईल म्हणतोस आणि माझी या रावणाची, निंदा करतोस! रामाशी युद्ध करताना राक्षसांचा नाश होईल आणि मुख्यतः रावण मरेल, असे कठोर भाषण करतोस! तुला त्या रामाने भेडसावले तरी मला त्या रामाचे कसले भय असणार. रणात मी वानरसैन्यासमवेत त्या राम-लक्ष्मणांना निश्चित मारीन. माझ्या विरुद्ध बोलणाऱ्या तुझा मी खरे तर घातच करायला हवा; पण तू अत्यंत वृद्ध आणि जवळचा आप्त म्हणून हात आवरला.'' रावण संतापलेला दिसताच तो माल्यवंत स्वतःच दूर होऊन सत्वर निघून गेला. त्याने मागे वळूनही पाहिले नाही. श्रीरघुनाथाला सीता अर्पावी असे

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

माल्यवंताने सांगितल्यामुळे, रावण त्याचा घात करू पाहील हे जाणून माल्यवंत अदृश्य होऊन निघून गेला.

रावणाकडून सैन्यरचनेविषयी आदेश

माल्यवंत निघून गेल्यावर रावणाने प्रधानांना सांगितले की, "दुर्गांची दारुण सज्जता करा आणि सर्व वीरांना सावधान राहण्याविषयी सांगा." मग रावणाने स्वतःच दुर्गांच्या व्यवस्थेविषयी योजना केली. पूर्वेकडच्या दारावर प्रहस्त ठेवला. महोदर तथा महापार्श्व याला दक्षिणेकडच्या दारावर पाठविला. पश्चिमेकडील दाराशी जेष्ठ पुत्र इंद्रजिताची योजना केली. त्या प्रत्येकाबरोबर कोट्यवधी राक्षससैन्य दिलेले होते. शुक-सारण यांना उत्तरेला असलेल्या दारावर ठेवले. शिवाय रावण स्वतः सहपरिवार त्याच उत्तरद्वारी राहिला. श्रीराम निश्चितपणे उत्तरेकडील दाराशी येईल या कल्पनेने स्वतः तेथे रावण सावधान राहिला. विरुपाक्षाला अगणित सैन्य देऊन मध्यभागात राहण्यास सांगितले. तसेच ज्या दाराशी काही उणीव दिसेल तेथे विरुपाक्षाने त्वरित जावे असे ठरविले. श्रीरामाच्या सैन्यातील वानरांनी लंकाभुवन पाहिले. त्यांनी दुर्ग जिंकून घेण्यासाठी उत्सुकता दाखविली आणि ते सर्व वानरगणं रामाभोवती हात जोडून उभे राहिले. सर्वांनी श्रीरामचंद्राला वंदन करून म्हटले, "आम्हाला लंकापुर जिंकण्यासाठी सत्वर आज्ञा द्यावी स्वामी." योद्धयांनी आज्ञा मागताच बिभीषणाने त्यांना थांबविले आणि त्याने श्रीरामाला दुर्गाच्या संबंधातली माहिती सांगितली.

बिभीषण लंकादुर्गाच्या रक्षणाविषयी सांगतो

बिभीषण म्हणाला, "आपण रणकंदन करू गेलो तर दुर्गाचे कौशल्य असे आहे की शत्रूचे सैन्य मारले जावे. गुप्त गोल शतघ्नी तोफा, अग्निगोल, प्रबळ पाषाण, असे प्रबळ साहित्य, शत्रूच्या सैन्याचे निर्दाळण करण्यासाठी योजून दुर्ग प्रबळ केलेला आहे. माझे चौघेही प्रधान लंकाभुवन धुंडाळून दुर्गाचे मारक कौशल्य आणि रक्षणव्यवस्थेची माहिती घेऊन आले आहेत." यावर श्रीरामाने बिभीषणाला प्रश्न केला की, "तुझ्या चारही प्रधानांना सर्वत्र सर्वजण ओळखत असताना त्यांनी माहिती आणली कशी?" बिभीषण म्हणाला, "माझ्या चार प्रधानांची नावे अनळ, हर, प्रघस आणि संपाती अशी आहेत. ते चौघे अत्यंत हुषार, विचक्षण आणि इच्छेनुसार रूप बदलू शकणारे आहेत. त्यामुळे पक्ष्याच्या रूपात जाऊन, लंकेत प्रवेश करून, दुर्गाची संरक्षण-व्यवस्था यथार्थपणे जाणून घेतली आणि त्वरित ते इकडे आले आहेत. पूर्वेला प्रहस्त, दक्षिणेला महोदर किंवा महापार्श्वद, पश्चिमेला इंद्रजित असून त्यांच्याबरोबर सशस्त्र सैन्य आहे. उत्तरेकडच्या दारावर नावापुरते शुक-सारण असले तरी सर्व सैन्यासह स्वतः रावण तेथे आहे. शिवाय मध्यभागात सैन्यसमुदाय ठेवला असून त्याचा प्रमुख विरुपाक्ष आहे. ज्या दाराशी काही उणीव दिसेल तेथे त्याने साहाय्यार्थ जायचे असे ठरले आहे. वानरांचा समूह मारावा यासाठी प्रत्येक बुरुजावर गुप्तपणे अनेक यंत्रे (तोफा) त्या क्रोधाच्या आहारी गेलेल्या रावणाने लावून ठेवली आहेत. वानर दुर्गाला झोंबले तर त्यांचा गुप्तपणे घात करण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारची यंत्रे रावणाने रणमारासाठी लावून ठेवली आहेत. दुर्गाची कडेकोट सज्जता केलेली आहे. दुर्गाला वानर भिडले की यंत्राच्या माराने मरतील. तेव्हा आपण तसे करू नये. प्रत्येक तोफेवर पांढरा, पिवळा, तांवडा इत्यादी रंगांच्या ध्वजा असून दुर्गाभोवताली समसमान उभारल्याने शोभत आहेत. प्रत्येक मोठ्या बुरुजाला देखाव्याची तोंडे असून, वेगवेगळ्या पद्धतीने कडे तासलेले आहेत. सर्वत्र सजलेल्या पताका-ध्वज असून राक्षस दृढपणे राखण करत आहेत."

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

वानरांची प्रतिक्रिया, राम सैन्यव्यूह करतो

बिभीषणाचे निवेदन ऐकून, वानर म्हणाले, "आमच्या उड्डाणांच्या रीतीला दुर्ग आणि यंत्रे काय आहेत. वानरांनी एकदम लंकेच्या शिखरावरच उड्डाण केले तर तिथे दुर्गावरील यंत्राचा मार कोणावर पडणार." हे वानरांचे बोलणे ऐकून बिभीषण आश्चर्य चकित झाला. श्रीराम वानरांचा पुरुषार्थ ऐकून स्वानंदाने हसू लागला. 'दुर्गाच्या तळाशी जे राहतील ते तोफांच्या माऱ्यामुळे मरतील; वानर दुर्गाच्या वर उड्डाण करू शकतात तर यंत्रे समोर सुसाट मारा करतात.' ही जी बिभीषणाने सांगितलेली माहिती आणि दुर्गाची घडण-स्थिती त्यांचा विचार करून श्रीरामाने सुग्रीवाला सूचना देताना सांगितले की, "दुर्गाची दारे अडवून धरा. दुर्गाला तडा जाईल अशा रीतीने पाणथळ धरावे. दुर्गाला चहू बाजूंनी वेढावे. कोणालाही मागे-पुढे जाऊ देऊ नये. आत गेला तो बाहेर येणार नाही. बाहेरचा आत येणार नाही, अशा प्रकारे दुर्गाचा निरोध प्रतिवंध करा. पूर्वेकडील दारावर प्रहस्त आहे, त्याला नीळ हा उत्तम प्रतीच्या वानरदळासह जाऊन भिडेल. दक्षिण दिशेला असलेल्या दाराशी महोदर महापार्श्व हा महावीर आहे त्यावर वालीपुत्र अंगद चालून जाऊन दारासाठी निर्धाराने रणकंदन करील. पश्चिमेचे दार इंद्रजित राखतो आहे. त्याचा घात करायला बलवान हनुमंत हा राक्षसांच्या कंदनार्थ नेमा. मुख्यतः कपटी रावण हा उत्तरेकडच्या दाराशी आहे. त्याचे कुळनिर्दाळण करण्यासाठी आम्ही राम-लक्ष्मण असे दोघे आहोत. राजा सुग्रीव हा शरणागत बिभीषणासह सर्व सैन्यावर लक्ष ठेवून मध्यभागात राहील. कोणत्या दाराशी कसे युद्ध चालू आहे; वानरवीर रणकंदन करताना कुठे कमी पडत आहेत हे पाहून, त्यांच्या साहाय्यार्थ हे जातील."

श्रीरामाने दुर्गाचा प्रतिबंध आणि सैन्याची रचना यांविषयी सांगितल्यावर, वानरांनी त्याच्या सूचनेप्रमाणे नियुक्त केलेल्या दाराकडे जाऊन मोठा पराक्रम करण्याचे ठरविले. वानरवीरांनी केलेल्या अद्भुत गोष्टी लक्षणीय होत्या. त्या वीरांनी दुर्गाच्या तळाशी राहिल्यास तोफांचा मारा होईल हे ओळखले, आणि निराळीच योजना केली. लंकेहून उंच असे पर्वत आणून त्यांनी ते दारापुढे ठेवले. त्या पर्वतावर वानरवीर चढले आणि त्यामुळे लंकेचा दुर्ग तळाशी राहिला. नंतर राक्षससैन्य दुर्गाच्या भिंतीत सापडून घाव सहन करू लागले. वानरवीरांनी त्यांच्यावर शिळा, शिखर यांचे घाव घालून त्यांची शरीरे चूर केली. वानरांनी महामार केल्यामुळे दुर्गरक्षक पळून गेले. एरवी वीर धीर असणारे आणि दुर्गाच्या बुरजा-बुरजांवर नित्य जागृत असणारे राक्षस वानर आपल्यापेक्षा उंच जागी गेलेले पाहून गडबडले. 'आम्ही तळाशी आणि वानर दुर्गाच्याही वर, ही विपरीत तऱ्हा झाली. त्यांनी मोठे पर्वत आणून, ते त्यावर चढले.' असे म्हणत राक्षस आश्चर्य करू लागले. प्रत्येक बुरुजावर असंख्य राक्षसवीर होते. त्यांच्यावर वानरवीर पर्वतांचे आघात करत होते. सहस्र वीर त्या आघातांनी चूर्ण होत असताना बुरूजही खचत होते. ही महामारी होत असतानाच वानरांनी दुर्गावर ज्या तोफा होत्या त्या सर्व उचलून समुद्रात फेकून दिल्या. दुर्गाभोवती असलेल्या प्रत्येक बुरुजावर वानरांकडून रक्षकांवर फार जोराचे आघात झाल्यामुळे त्यांची दुर्दशा झाली. कोणी मेले, कोणी घायाळ होऊन कण्हत पडले, उरले ते जीव घेऊन पळाले. वानरांच्या भयाने दुर्ग मोकळा झाला. दुर्गाच्या भिंती-भिंतीवर असलेल्या राक्षसांचा नाश झाला. वानरवीरांचा पराक्रम असा की त्यांनी दुर्गाच्या आतल्या लंकानगरीतही गोंधळ घातला. कोणाचा मुकुट ओढ, कोणाची शस्त्रे हिसकावून घे, असा वानरांचा उद्योग चालू असताना, एखाद्या राक्षसवीराने त्यांच्यावर घाव घातला तर वानर आकाशात उड्डाण घेत होते. वानर बाजारातल्या रत्नांना, मोत्यांना हात लावत नव्हते, तर

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Trust and eGangotri

बाजारात विकायला आलेली फळे बळाने हिसकावून आणून सुखाने खात होते; गुळाच्या ढेपा मटामटा खात होते; दुकानातला मधाचा साठा लुबाडून घटाघटा पीत होते; फुटाण्यांच्या पाट्या आणून लाळेत घोटत होते; बोरे खात लंकेच्या चव्हाट्यावर नाचत होते. ही वानरांची आलेली धाड पाहून, राक्षस दडी मारून बसले. घराघरात तोडफोड करून वानरांनी राक्षसांची केविलवाणी अवस्था केली.

श्रीराम सुवेळागिरीवरून युद्ध पाहतो

श्रीरामाने विचार केला की आपण सुवेळागिरीवर चढून तेथून वानरवीरांनी लंकागिरीवर चालविलेले युद्ध पाहावे. तेव्हा त्याने लक्ष्मणाचा विचार घेतला, राजा सुग्रीवाला सांगितले, बिभीषणाची अनुमती घेतली आणि मगच तो निघाला. "आता नित्याची वस्ती सुवेळेवरच करीन." असे त्याने सर्वांना सांगूनच वेगाने गमन केले. श्रीरामाने सांगितलेले ऐकताच वानरवीरांनी सुवेळागिरीवर धावत जाऊन तिथल्या शिळा सारख्या करून आंथरल्या. सुवेळागिरीवरून लंकेच्या आतला वृत्तान्त दिसत असल्यामुळेच श्रीराम तेथे राहिला. रणवाद्यांच्या गजरात आणि वानरसमूहाने वेढलेला असताना श्रीराम त्या पर्वतावर चढला. श्रीरामाने तेथून लंका पाहिली आणि मग त्याने वानरांना सूचना दिल्या. "लंकाधीशाला त्रस्त करून तातडीने दुर्ग जिंकून घ्या. राक्षस भयभीत झाले आहेत, कोणी लंकेबाहेर येत नाहीत; तेव्हा आपणच आपल्या परिवारासह आत प्रवेशून दुर्ग जिंकावा." ही सूचना ऐकून सुग्रीवाने वानरांना "राक्षसांचा घात करून दुर्गाच्या आत प्रवेश करा." असे सांगितले.

बिभीषण श्रीरामापाशी जाऊन म्हणाला. "लंकेतल्या दुर्गाच्या तळाशी जे येतात ते नाश पावतात. यासाठी रावणाने गुप्त अशा जागी तोफा ठेवल्या होत्या. लंकेत वारा वाहताना भितो, पक्षी तेथे आसपास फिरू शकत नाहीत; पण वानरांनी मोठाच चमत्कार केला आणि वेगळेच घडले. लंकेहूनही उंच पर्वत वानरांनी आणले. त्यावर वानरवीर चढून राक्षसांच्या रणकंदनासाठी सिद्ध झाले. श्रीरामप्रतापाची नवलाई की लंकादुर्ग तळाशी राहिला; वानरवीरांनी पर्वतावरून सामर्थ्याने राक्षसांची राखरांगोळी केली. त्या वानरांना श्रीरामाकडून सामर्थ्य मिळून त्यांना हा चमत्कार करता आला. पर्वताला पर्वत जोडून संपूर्ण लंकाच त्यांनी अडवली आहे. दुर्गाच्या भिंती पाडून, तोफा समूळ उपटून, त्यातल्या गोळ्यांनी समुद्र भरून टाकला. खरोखर वानर महापराक्रमी आहेत. वानरांच्या भयाने लंकेतले बाजार, चव्हाटे ओस पडले आहेत. कोणी बाहेरच पडत नाही. अशी राक्षसांची दुर्दशा आहे." असे बोलून बिभीषण नंतर वानरांना उद्देशून म्हणाला, "आता रणकंदन करत लंकाभुवन घ्या. श्रीराम पाठीराखा असताना त्या दशमुखाची काय योग्यता! कोणतीही शंका न घेता, तुम्ही लंका अवश्य जिंका." हे ऐकून वानरांनी रामनामाचा जयजयकार, आणि भुभुःकार केला. नंतर ते लंकेकडे निघाले.

लंकेला वेढा घालून वानर लंकेत प्रवेशले

श्रीरामाच्या आज्ञेप्रमाणे वानरांनी लंका वेढली. त्यावेळी गुळाला मुंग्यांची ओळ झोंबू लागावी, तसे वानर लंकेच्या दुर्गाला झोंबले. त्यांना अडसर काढावे लागले नाहीत, शृंखला तोडाव्या लागल्या नाहीत, दारे उघडावी लागली नाहीत, वानरांनी उड्डाणाने दुर्ग घेतला. राक्षसांनी वानरांना शस्त्राने मारावे तर ते उंच पर्वतमाथ्यावर. यंत्रांचा मार करावा तर वानरांनी यंत्रे समुद्रात बुडवलेली होती. वानरांनी पर्वतांच्या साहाय्याने दुसरी लंकाच उभी केली आणि त्यावर चढून त्या वानर महावीरांनी दुर्गाच्या आत प्रवेश केला. लंकात्रिकूटावर असंख्य वानरांनी जाऊन कोट्यवधी राक्षस मारले, त्यावेळी सुग्रीवाने त्यांची पाठराखण केली. वानर

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

वानरांची प्रतिक्रिया, राम सैन्यव्यूह करतो

बिभीषणाचे निवेदन ऐकून, वानर म्हणाले, "आमच्या उड्डाणाच्या रीतीला दुर्ग आणि यंत्रे काय आहेत. वानरांनी एकदम लंकेच्या शिखरावरच उड्डाण केले तर तिथे दुर्गावरील यंत्राचा मार कोणावर पडणार." हे वानरांचे बोलणे ऐकून बिभीषण आश्चर्य चकित झाला. श्रीराम वानरांचा पुरुषार्थ ऐकून स्वानंदाने हसू लागला. 'दुर्गाच्या तळाशी जे राहतील ते तोफांच्या माऱ्यामुळे मरतील; वानर दुर्गाच्या वर उड्डाण करू शकतात तर यंत्रे समोर सुसाट मारा करतात.' ही जी बिभीषणाने सांगितलेली माहिती आणि दुर्गाची घडण-स्थिती त्यांचा विचार करून श्रीरामाने सुग्रीवाला सूचना देताना सांगितले की, "दुर्गाची दारे अडवून धरा. दुर्गाला तडा जाईल अशा रीतीने पाणथळ धरावे. दुर्गाला चहू बाजूंनी वेढावे. कोणालाही मागे-पुढे जाऊ देऊ नये. आत गेला तो बाहेर येणार नाही. बाहेरचा आत येणार नाही, अशा प्रकारे दुर्गाचा निरोध प्रतिबंध करा. पूर्वेकडील दारावर प्रहस्त आहे, त्याला नीळ हा उत्तम प्रतीच्या वानरदळासह जाऊन भिडेल. दक्षिण दिशेला असलेल्या दाराशी महोदर महापार्श्व हा महावीर आहे त्यावर वालीपुत्र अंगद चालून जाऊन दारासाठी निर्धाराने रणकंदन करील. पश्चिमेचे दार इंद्रजित राखतो आहे. त्याचा घात करायला बलवान हनुमंत हा राक्षसांच्या कंदनार्थ नेमा. मुख्यतः कपटी रावण हा उत्तरेकडच्या दाराशी आहे. त्याचे कुळनिर्दाळण करण्यासाठी आम्ही राम-लक्ष्मण असे दोघे आहोत. राजा सुग्रीव हा शरणागत बिभीषणासह सर्व सैन्यावर लक्ष ठेवून मध्यभागात राहील. कोणत्या दाराशी कसे युद्ध चालू आहे; वानरवीर रणकंदन करताना कुठे कमी पडत आहेत हे पाहून, त्यांच्या साहाय्यार्थ हे जातील."

श्रीरामाने दुर्गाचा प्रतिबंध आणि सैन्याची रचना यांविषयी सांगितल्यावर, वानरांनी त्याच्या सूचनेप्रमाणे नियुक्त केलेल्या दाराकडे जाऊन मोठा पराक्रम करण्याचे ठरविले. वानरवीरांनी केलेल्या अद्‌भुत गोष्टी लक्षणीय होत्या. त्या वीरांनी दुर्गाच्या तळाशी राहिल्यास तोफांचा मारा होईल हे ओळखले, आणि निराळीच योजना केली. लंकेहून उंच असे पर्वत आणून त्यांनी ते दारापुढे ठेवले. त्या पर्वतावर वानरवीर चढले आणि त्यामुळे लंकेचा दुर्ग तळाशी राहिला. नंतर राक्षससैन्य दुर्गाच्या भिंतीत सापडून घाव सहन करू लागले. वानरवीरांनी त्यांच्यावर शिळा, शिखर यांचे घाव घालून त्यांची शरीरे चूर केली. वानरांनी महामार केल्यामुळे दुर्गरक्षक पळून गेले. एरवी वीर धीर असणारे आणि दुर्गाच्या बुरजा-बुरजांवर नित्य जागृत असणारे राक्षस वानर आपल्यापेक्षा उंच जागी गेलेले पाहून गडबडले. 'आम्ही तळाशी आणि वानर दुर्गाच्याही वर, ही विपरीत तऱ्हा झाली. त्यांनी मोठे पर्वत आणून, ते त्यावर चढले.' असे म्हणत राक्षस आश्चर्य करू लागले. प्रत्येक बुरुजावर असंख्य राक्षसवीर होते. त्यांच्यावर वानरवीर पर्वतांचे आघात करत होते. सहस्र वीर त्या आघातांनी चूर्ण होत असताना बुरूजही खचत होते. ही महामारी होत असतानाच वानरांनी दुर्गावर ज्या तोफा होत्या त्या सर्व उचलून समुद्रात फेकून दिल्या. दुर्गाभोवती असलेल्या प्रत्येक बुरुजावर वानरांकडून रक्षकांवर फार जोराचे आघात झाल्यामुळे त्यांची दुर्दशा झाली. कोणी मेले, कोणी घायाळ होऊन कण्हत पडले, उरले ते जीव घेऊन पळाले. वानरांच्या भयाने दुर्ग मोकळा झाला. दुर्गाच्या भिंती-भिंतीवर असलेल्या राक्षसांचा नाश झाला. वानरवीरांचा पराक्रम असा की त्यांनी दुर्गाच्या आतल्या लंकानगरीतही गोंधळ घातला. कोणाचा मुकुट ओढ, कोणाची शस्त्रे हिसकावून घे, असा वानरांचा उद्योग चालू असताना, एखाद्या राक्षसवीराने त्यांच्यावर घाव घातला तर वानर आकाशात उड्डाण घेत होते. वानर बाजारातल्या रत्नांना, मोत्यांना हात लावत नव्हते, तर

https://archive.org/details/bhavarthramayan Bhavan Vedic Trust, Lucknow

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

बाजारात विकायला आलेली फळे बळाने हिसकावून आणून सुखाने खात होते; गुळाच्या ढेपा मटामटा खात होते; दुकानातला मधाचा साठा लुबाडून घटाघटा पीत होते; फुटाण्यांच्या पाट्या आणून लाळेत घोटत होते; बोरे खात लंकेच्या चव्हाट्यावर नाचत होते. ही वानरांची आलेली धाड पाहून, राक्षस दडी मारून बसले. घराघरात तोडफोड करून वानरांनी राक्षसांची केविलवाणी अवस्था केली.

श्रीराम सुवेळागिरीवरून युद्ध पाहतो

श्रीरामाने विचार केला की आपण सुवेळागिरीवर चढून तेथून वानरवीरांनी लंकागिरीवर चालविलेले युद्ध पाहावे. तेव्हा त्याने लक्ष्मणाचा विचार घेतला, राजा सुग्रीवाला सांगितले, बिभीषणाची अनुमती घेतली आणि मगच तो निघाला. "आता नित्याची वस्ती सुवेळेवरच करीन." असे त्याने सर्वांना सांगूनच वेगाने गमन केले. श्रीरामाने सांगितलेले ऐकताच वानरवीरांनी सुवेळागिरीवर धावत जाऊन तिथल्या शिळा सारख्या करून आंथरल्या. सुवेळागिरीवरून लंकेच्या आतला वृत्तान्त दिसत असल्यामुळेच श्रीराम तेथे राहिला. रणवाद्यांच्या गजरात आणि वानरसमूहाने वेढलेला असताना श्रीराम त्या पर्वतावर चढला. श्रीरामाने तेथून लंका पाहिली आणि मग त्याने वानरांना सूचना दिल्या. "लंकाधीशाला त्रस्त करून तातडीने दुर्ग जिंकून घ्या. राक्षस भयभीत झाले आहेत, कोणी लंकेबाहेर येत नाहीत; तेव्हा आपणच आपल्या परिवारासह आत प्रवेशून दुर्ग जिंकावा." ही सूचना ऐकून सुग्रीवाने वानरांना "राक्षसांचा घात करून दुर्गाच्या आत प्रवेश करा." असे सांगितले.

बिभीषण श्रीरामापाशी जाऊन म्हणाला. "लंकेतल्या दुर्गाच्या तळाशी जे येतात ते नाश पावतात. यासाठी रावणाने गुप्त अशा जागी तोफा ठेवल्या होत्या. लंकेत वारा वाहताना भितो, पक्षी तेथे आसपास फिरू शकत नाहीत; पण वानरांनी मोठाच चमत्कार केला आणि वेगळेच घडले. लंकेहूनही उंच पर्वत वानरांनी आणले. त्यावर वानरवीर चढून राक्षसांच्या रणकंदनासाठी सिद्ध झाले. श्रीरामप्रतापाची नवलाई की लंकादुर्ग तळाशी राहिला; वानरवीरांनी पर्वतावरून सामर्थ्याने राक्षसांची राखरांगोळी केली. त्या वानरांना श्रीरामाकडून सामर्थ्य मिळून त्यांना हा चमत्कार करता आला. पर्वताला पर्वत जोडून संपूर्ण लंकाच त्यांनी अडवली आहे. दुर्गाच्या भिंती पाडून, तोफा समूळ उपटून, त्यातल्या गोळ्यांनी समुद्र भरून टाकला. खरोखर वानर महापराक्रमी आहेत. वानरांच्या भयाने लंकेतले बाजार, चव्हाटे ओस पडले आहेत. कोणी बाहेरच पडत नाही. अशी राक्षसांची दुर्दशा आहे." असे बोलून बिभीषण नंतर वानरांना उद्देशून म्हणाला, "आता रणकंदन करत लंकाभुवन घ्या. श्रीराम पाठीराखा असताना त्या दशमुखाची काय योग्यता! कोणतीही शंका न घेता, तुम्ही लंका अवश्य जिंका." हे ऐकून वानरांनी रामनामाचा जयजयकार, आणि भुभुःकार केला. नंतर ते लंकेकडे निघाले.

लंकेला वेढा घालून वानर लंकेत प्रवेशले

श्रीरामाच्या आज्ञेप्रमाणे वानरांनी लंका वेढली. त्यावेळी गुळाला मुंग्यांची ओळ झोंबू लागावी, तसे वानर लंकेच्या दुर्गाला झोंबले. त्यांना अडसर काढावे लागले नाहीत, शृंखला तोडाव्या लागल्या नाहीत, दारे उघडावी लागली नाहीत, वानरांनी उड्डाणाने दुर्ग घेतला. राक्षसांनी वानरांना शस्त्राने मारावे तर ते उंच पर्वतमाथ्यावर, यंत्रांचा मार करावा तर वानरांनी यंत्रे समुद्रात बुडवलेली होती. वानरांनी पर्वतांच्या साहाय्याने दुसरी लंकाच उभी केली आणि त्यावर चढून त्या वानर महावीरांनी दुर्गाच्या आत प्रवेश केला. लंकात्रिकूटावर असंख्य वानरांनी जाऊन कोट्यवधी राक्षस मारले, त्यावेळी सुग्रीवाने त्यांची पाठराखण केली. वानर

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

वानरांची प्रतिक्रिया, राम सैन्यव्यूह करतो

बिभीषणाचे निवेदन ऐकून, वानर म्हणाले, "आमच्या उड्डाणाच्या रीतीला दुर्ग आणि यंत्रे काय आहेत. वानरांनी एकदम लंकेच्या शिखरावरच उड्डाण केले तर तिथे दुर्गावरील यंत्राचा मार कोणावर पडणार." हे वानरांचे बोलणे ऐकून बिभीषण आश्चर्य चकित झाला. श्रीराम वानरांचा पुरुषार्थ ऐकून स्वानंदाने हसू लागला. 'दुर्गाच्या तळाशी जे राहतील ते तोफांच्या माऱ्यामुळे मरतील; वानर दुर्गाच्या वर उड्डाण करू शकतात तर यंत्रे समोर सुसाट मारा करतात.' ही जी बिभीषणाने सांगितलेली माहिती आणि दुर्गाची घडण-स्थिती त्यांचा विचार करून श्रीरामाने सुग्रीवाला सूचना देताना सांगितले की, "दुर्गाची दारे अडवून धरा. दुर्गाला तडा जाईल अशा रीतीने पाणथळ धरावे. दुर्गाला चहू बाजूंनी वेढावे. कोणालाही मागे-पुढे जाऊ देऊ नये. आत गेला तो बाहेर येणार नाही. बाहेरचा आत येणार नाही, अशा प्रकारे दुर्गाचा निरोध प्रतिबंध करा. पूर्वेकडील दारावर प्रहस्त आहे, त्याला नीळ हा उत्तम प्रतीच्या वानरदळासह जाऊन भिडेल. दक्षिण दिशेला असलेल्या दाराशी महोदर महापार्श्व हा महावीर आहे त्यावर वालीपुत्र अंगद चालून जाऊन दारासाठी निर्धाराने रणकंदन करील. पश्चिमेचे दार इंद्रजित राखतो आहे. त्याचा घात करायला बलवान हनुमंत हा राक्षसांच्या कंदनार्थ नेमा. मुख्यतः कपटी रावण हा उत्तरेकडच्या दाराशी आहे. त्याचे कुळनिर्दाळण करण्यासाठी आम्ही राम-लक्ष्मण असे दोघे आहोत. राजा सुग्रीव हा शरणागत बिभीषणासह सर्व सैन्यावर लक्ष ठेवून मध्यभागात राहील. कोणत्या दाराशी कसे युद्ध चालू आहे; वानरवीर रणकंदन करताना कुठे कमी पडत आहेत हे पाहून, त्यांच्या साहाय्यार्थ हे जातील."

श्रीरामाने दुर्गाचा प्रतिबंध आणि सैन्याची रचना यांविषयी सांगितल्यावर, वानरांनी त्याच्या सूचनेप्रमाणे नियुक्त केलेल्या दाराकडे जाऊन मोठा पराक्रम करण्याचे ठरविले. वानरवीरांनी केलेल्या अद्भुत गोष्टी लक्षणीय होत्या. त्या वीरांनी दुर्गाच्या तळाशी राहिल्यास तोफांचा मारा होईल हे ओळखले, आणि निराळीच योजना केली. लंकेहून उंच असे पर्वत आणून त्यांनी ते दारापुढे ठेवले. त्या पर्वतावर वानरवीर चढले आणि त्यामुळे लंकेचा दुर्ग तळाशी राहिला. नंतर राक्षससैन्य दुर्गाच्या भिंतीत सापडून घाव सहन करू लागले. वानरवीरांनी त्यांच्यावर शिळा, शिखर यांचे घाव घालून त्यांची शरीरे चूर केली. वानरांनी महामार केल्यामुळे दुर्गरक्षक पळून गेले. एरवी वीर धीर असणारे आणि दुर्गाच्या बुरजा-बुरजांवर नित्य जागृत असणारे राक्षस वानर आपल्यापेक्षा उंच जागी गेलेले पाहून गडबडले. 'आम्ही तळाशी आणि वानर दुर्गाच्याही वर, ही विपरीत तऱ्हा झाली. त्यांनी मोठे पर्वत आणून, ते त्यावर चढले.' असे म्हणत राक्षस आश्चर्य करू लागले. प्रत्येक बुरुजावर असंख्य राक्षसवीर होते. त्यांच्यावर वानरवीर पर्वतांचे आघात करत होते. सहस्र वीर त्या आघातांनी चूर्ण होत असताना बुरूजही खचत होते. ही महामारी होत असतानाच वानरांनी दुर्गावर ज्या तोफा होत्या त्या सर्व उचलून समुद्रात फेकून दिल्या. दुर्गाभोवती असलेल्या प्रत्येक बुरुजावर वानरांकडून रक्षकांवर फार जोराचे आघात झाल्यामुळे त्यांची दुर्दशा झाली. कोणी मेले, कोणी घायाळ होऊन कण्हत पडले, उरले ते जीव घेऊन पळाले. वानरांच्या भयाने दुर्ग मोकळा झाला. दुर्गाच्या भिंती-भिंतीवर असलेल्या राक्षसांचा नाश झाला. वानरवीरांचा पराक्रम असा की त्यांनी दुर्गाच्या आतल्या लंकानगरीतही गोंधळ घातला. कोणाचा मुकुट ओढ, कोणाची शस्त्रे हिसकावून घे, असा वानरांचा उद्योग चालू असताना, एखाद्या राक्षसवीराने त्यांच्यावर घाव घातला तर वानर आकाशात उड्डाण घेत होते. वानर बाजारातल्या रत्नांना, मोत्यांना हात लावत नव्हते, तर

https://archive.org/details/@sulakshmiacademy Bhavan Vani Trust, Lucknow

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

बाजारात विकायला आलेली फळे बळाने हिसकावून आणून सुखाने खात होते; गुळाच्या ढेपा मटामटा खात होते; दुकानातला मधाचा साठा लुबाडून घटाघटा पीत होते; फुटाण्यांच्या पाट्या आणून लाळेत घोटत होते; बोरे खात लंकेच्या चव्हाट्यावर नाचत होते. ही वानरांची आलेली धाड पाहून, राक्षस दडी मारून बसले. घराघरात तोडफोड करून वानरांनी राक्षसांची केविलवाणी अवस्था केली.

श्रीराम सुवेळागिरीवरून युद्ध पाहतो

श्रीरामाने विचार केला की आपण सुवेळागिरीवर चढून तेथून वानरवीरांनी लंकागिरीवर चालविलेले युद्ध पाहावे. तेव्हा त्याने लक्ष्मणाचा विचार घेतला, राजा सुग्रीवाला सांगितले, बिभीषणाची अनुमती घेतली आणि मगच तो निघाला. "आता नित्याची वस्ती सुवेळेवरच करीन." असे त्याने सर्वांना सांगूनच वेगाने गमन केले. श्रीरामाने सांगितलेले ऐकताच वानरवीरांनी सुवेळागिरीवर धावत जाऊन तिथल्या शिळा सारख्या करून आंथरल्या. सुवेळागिरीवरून लंकेच्या आतला वृत्तान्त दिसत असल्यामुळेच श्रीराम तेथे राहिला. रणवाद्यांच्या गजरात आणि वानरसमूहाने वेढलेला असताना श्रीराम त्या पर्वतावर चढला. श्रीरामाने तेथून लंका पाहिली आणि मग त्याने वानरांना सूचना दिल्या. "लंकाधीशाला त्रस्त करून तातडीने दुर्ग जिंकून घ्या. राक्षस भयभीत झाले आहेत, कोणी लंकेबाहेर येत नाहीत; तेव्हा आपणच आपल्या परिवारासह आत प्रवेशून दुर्ग जिंकावा." ही सूचना ऐकून सुग्रीवाने वानरांना "राक्षसांचा घात करून दुर्गाच्या आत प्रवेश करा." असे सांगितले.

बिभीषण श्रीरामापाशी जाऊन म्हणाला, "लंकेतल्या दुर्गाच्या तळाशी जे येतात ते नाश पावतात. यासाठी रावणाने गुप्त अशा जागी तोफा ठेवल्या होत्या. लंकेत वारा वाहताना भितो, पक्षी तेथे आसपास फिरू शकत नाहीत; पण वानरांनी मोठाच चमत्कार केला आणि वेगळेच घडले. लंकेहूनही उंच पर्वत वानरांनी आणले. त्यावर वानरवीर चढून राक्षसांच्या रणकंदनासाठी सिद्ध झाले. श्रीरामप्रतापाची नवलाई की लंकादुर्ग तळाशी राहिला; वानरवीरांनी पर्वतावरून सामर्थ्याने राक्षसांची राखरांगोळी केली. त्या वानरांना श्रीरामाकडून सामर्थ्य मिळून त्यांना हा चमत्कार करता आला. पर्वताला पर्वत जोडून संपूर्ण लंकाच त्यांनी अडवली आहे. दुर्गाच्या भिंती पाडून, तोफा समूळ उपटून, त्यातल्या गोळ्यांनी समुद्र भरून टाकला. खरोखर वानर महापराक्रमी आहेत. वानरांच्या भयाने लंकेतले बाजार, चव्हाटे ओस पडले आहेत. कोणी बाहेरच पडत नाही. अशी राक्षसांची दुर्दशा आहे." असे बोलून बिभीषण नंतर वानरांना उद्देशून म्हणाला, "आता रणकंदन करत लंकाभुवन घ्या. श्रीराम पाठीराखा असताना त्या दशमुखाची काय योग्यता! कोणतीही शंका न घेता, तुम्ही लंका अवश्य जिंका." हे ऐकून वानरांनी रामनामाचा जयजयकार, आणि भुभुःकार केला. नंतर ते लंकेकडे निघाले.

लंकेला वेढा घालून वानर लंकेत प्रवेशले

श्रीरामाच्या आज्ञेप्रमाणे वानरांनी लंका वेढली. त्यावेळी गुळाला मुंग्यांची ओळ झोंबू लागावी, तसे वानर लंकेच्या दुर्गाला झोंबले. त्यांना अडसर काढावे लागले नाहीत, शृंखला तोडाव्या लागल्या नाहीत, दारे उघडावी लागली नाहीत, वानरांनी उड्डाणाने दुर्ग घेतला. राक्षसांनी वानरांना शस्त्राने मारावे तर ते उंच पर्वतमाथ्यावर, यंत्रांचा मार करावा तर वानरांनी यंत्रे समुद्रात बुडवलेली होती. वानरांनी पर्वतांच्या साहाय्याने दुसरी लंकाच उभी केली आणि त्यावर चढून त्या वानर महावीरांनी दुर्गाच्या आत प्रवेश केला. लंकात्रिकूटावर असंख्य वानरांनी जाऊन कोट्यवधी राक्षस मारले, त्यावेळी सुग्रीवाने त्यांची पाठराखण केली. वानर

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

लंकेत शिरून राक्षसांना मारत असताना लंकेत घरोघरी आकांत झाला. अशी राक्षसांची वानरांनी वाताहात केली. श्रीरामाचे आज्ञाधारक असे लक्षावधी-कोट्यवधी, समूहच्या समूह लंकेमध्ये प्रवेशले. वानरांमधले प्रमुख सेनापती लंकेमधले मठ, मंडप यांचा आवेशाने विध्वंस करण्यासाठी घुसले. पताका फाडणे, तोरणे तोडणे, तसेच सात खणांची राजभवने आणि मंदिरे पाडणे, अशा नाना प्रकारांनी विध्वंसाचे कार्य वानर करत होते. खंदकात माती, पर्वतशिखरे, लाकडे घालून त्यांनी संपूर्ण खंदक सर्व बाजूंनी बुजवून टाकला. दुर्गाच्या भिंती पाडून, राक्षसांचा घात करत, पराक्रमी वानर जयाची टाळी पिटत होते. "आम्ही श्रीरामाचे दूत लंकेत प्रवेश करून आलो. श्रीराम यशवंत झाला, त्याला नित्य विजय मिळतो. लक्ष्मण नित्य यशस्वी होणारा आहे. श्रीरामामुळे सुग्रीवाला राज्य प्राप्त झाले, तोही निश्चित विजयी होतो." अशा हर्षयुक्त गर्जना करत होते. रामनामाचा जयजयकार करत "आम्ही सत्वर लंका जिंकली, श्रीरामचंद्र नित्य विजयी आहे. संपूर्ण लंकेचे राज्य बिभीषणाला प्राप्त झाले" असे वानरांकडून हर्षयुक्त स्वानंदाने म्हटले जात होते. अशा रीतीने वानर नाचत, गर्जत, लंकेत हर्षाने वावरत होते. राक्षस त्रासून गेले आणि त्यांनी रावणाला हा आकांत निवेदन केला. "पर्वत, शिळा, शिखरे यांचा मारा करत वानर आले. दुर्गापासून योजनभर लंकेभोवती त्यांनी पर्वत आणले. त्यावर चढून वानरांनी राक्षसांचा नाश चालविला आहे. ते महाबलवान वानर पर्वतावर आणि लंकादुर्ग राहिला तळाशी; त्यामुळे वरून पर्वत-शिळा-शिखरे यांचा वर्षाव होऊन राक्षस त्याखाली मारले जात आहेत. वानरांवर हत्यार चालविता येत नाही म्हणून राक्षस चरफडत आहेत. पर्वताच्या टोकावर वानर असल्यामुळे यंत्रमारही चालत नाही. राक्षस पूर्णपणे अगतिक झाले आहेत. वानरांना दुर्ग पाडणे, दार उघडणे यातले काहीच करावे लागत नाही. आपल्या सत्राण उड्यांनी त्यांनी त्रिकूट गाठले आहे. कोट्यवधी वानर पलीकडे लंकापीठात त्रिकूटावर जमले आहेत. वानरांकडून होणाऱ्या माराच्या भयाने, राक्षस जीव घेऊन पळत असून, दुर्गरक्षण होत नाही."

"अशा प्रकारे लंका मुक्त करून रामदूत वानर प्रवेशले आहेत. ते रामनामाचा गजर करत आहेत. प्रधान वृथा प्रौढीने म्हणत होते की 'आम्ही कोटी वानर मारू'; पण प्रत्यक्ष वानरांची धाड आल्यावर ते दडी मारून लपले आहेत. वानरांनी वेगाने धाड घालून दुर्गाचे तट आणि भिंती पाडल्या, खंदक नेटाने बुजवले आणि लंकेत तोडाफोड सुरू केली आहे." राक्षसांकडून ही वार्ता ऐकल्यावर रावण गडबडून गेला. मग तो भुवनाच्या माथ्यावर (गच्चीवर) चढून लंकेत शिरलेले वानर पाहू लागला. गोपुरावरून पाहताना त्याला दिसले की लंकेच्या आत-बाहेर, वना-उपवनांमध्ये सर्वत्र वानरांचे समूह दाटले आहेत. वानरसैन्य असंख्य असल्यामुळे ते लंकेत मावत नव्हते. त्यामुळे ते भिंतीवर, तटांवर वृक्षांवर असे सर्वत्र दाटून राहिले होते. वानरांनी व्यापून गेलेले दुर्गाचे तट पिवळे दिसत होते, वृक्ष, वने हीही पिवळी दिसत होती. हा वानरांच्या रंगप्रभेचा परिणाम होता. लंकेच्या परिसरात आत-बाहेर सर्वत्र वानरांच्या समूहांची गर्दी पाहून रावणाला कापरे भरले. 'इतक्या जवळ ही वानरांची धाड कशी?' या विचाराने तो चिंताग्रस्त झाला. यावेळी गोपुरावर चढलेला रावण दिसताच प्रत्येक वानर पुनःपुन्हा त्याला युद्धासाठी बोलावत होते, 'नपुंसका बाहेर ये' म्हणत हेटाळणी करत होते. काही उड्या मारून रावणाला चिडवत होते. हे सर्व चाळे पाहून रावण उद्विग्न झाला. 'माझ्यासमोर ही पाला खाणारी वानरे युद्धासाठी धावताहेत, तेव्हा ती महापराक्रमी असणार;' असा विचार करून तो वानरांच्या पारिपत्यासाठी गोपुरावरून खाली उतरला आणि त्वरित सैन्य पाठविण्याचे त्याने ठरविले.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

राक्षससैन्य आणि वानरसैन्य यांचे युद्ध

वानरसैन्याने लंकेत प्रवेश केल्यामुळे लंकाधीश रावण संतापला आणि त्याने स्वतःचे सैन्य वानरांचे निदार्लण करण्यासाठी पाठविले. राक्षससैन्य आणि वानरसैन्य यांच्यात अटीतटीचे युद्ध सुरू झाले. एकमेकांचा पराभव करण्यासाठी दोन्ही सैन्ये जोमाने लढू लागली. राक्षस आरोळ्या ठोकत आले, तर वानरांनी रामनामाचा भुभुःकार केला. एकमेक दुसऱ्याचा उपमर्द करत घाव हाणत निष्ठुरपणे झोंबू लागले. राक्षसांकडून शस्त्रांचा वर्षाव होई आणि वानर तत्परतेने तो सहज चुकवत. वानरांनी पर्वताचा आघात केला म्हणजे राक्षस कण्हत राहात. राक्षस जेव्हा वानरांची शेपूट धरून आवेशाने उपटू पाहात, तेव्हा वानर डोळ्यांना ओरबाडून राक्षसांना आंधळे करीत. डाव्या हाताने डोळा फोडून आणि उजव्या हाताने थप्पड मारून वानर राक्षसांना खाली पाडत; नंतर रागारागाने राक्षसांचे नाक, कान कुरतडत. वानरांचे पाय धरून राक्षस ते उपटू लागत तेव्हा वानर आपल्या शेपटीने राक्षसांची मान मुरगळून त्यांना जमिनीवर पाडत. राक्षस आणि वानर यांची रणात झटापट चालू झाली. केस धरून वानर राक्षसांना खाली पाडत आणि मग निष्ठुरपणे मुठींचे प्रहार करत. राक्षसांकडून आवेशाने गदा, मुद्‌गल, शूळ, शक्ती यांचे प्रहार केले जात, तर वानर शाल, ताल वृक्ष, तसेच शिळा-पर्वत यांचा मारा करीत. दंडी, मुंडासी, उरावर, डोक्यावर असे वानरांकडून आघात होत आणि शिवाय शेपूट राक्षसांच्या उरावर आदळून त्यांना पाडले जाई. अशा प्रकारे तेथे राक्षसांच्या ओळीच्या ओळी पडत राहात.

राक्षस शस्त्रास्त्रांचा घडघडाट करत, रथातून आले, की ते पाहून वानर रथाजवळ स्वतःच जात. राक्षसांनी शस्त्रे मारली की वानर उसळून आकाशात जात. मग वानर पर्वतांचा वर्षाव करून, रथांचा चक्काचूर करत. वानर वेगाने येऊन क्षणात रथांचे मकराकृती तोंड धरून जमिनीवर जोराने आपटून रथांचे भस्म करीत. त्यांनी असे असंख्य रथ नष्ट केले. त्यामुळे राक्षसांनी रणात आणि लंकात्रिकूटावर एकच आकांत केला. जेव्हा काही वानर रणात पडत तेव्हा श्रीरामाच्या नामस्मरणाने त्यांच्या व्यथा दूर होऊन ते पुन्हा संग्रामाला सिद्ध होत. नामस्मरणाने प्रल्हादाच्या अंगाला शस्त्रे खुपली नाहीत; येथे प्रत्यक्ष श्रीरामच पाठीशी असल्याने वानरांना भय कसले असणार! श्रीरामाचे आम्ही दूत आहोत असे वानर सतत म्हणत असल्याने, त्यांना गज, घोडे, रथ यांचा आणि राक्षसांचा नाश करता आला. राक्षस आणि वानर क्रमाक्रमाने एकमेकांशी युद्ध करू लागले. रणांगणात रक्त-मांसाचा चिखल झाला. पर्वत, पाषाणांचा खच पडला वानरांकडून पर्वतांचे आघात केले गेले; त्यामुळे राक्षसांना प्राणान्त आठवला. घाव चुकवण्यासाठी समोर ढाल धरून राक्षस रणात राहात, तेव्हा त्यांना ढालीसह मरण येत होते. पर्वतांच्या आघातांनी राक्षसांना अचूक मरण येई. पर्वतांवर शस्त्राचे घाव निरुपयोगी, बाणांचा मारा व्यर्थ, असे होत असल्याने राक्षस आकांत करत लंकेत पळाले. दोन्ही सैन्ये समान शूर, सम बळाची त्यामुळे त्यांचे घनघोर युद्ध झाले. परस्परांवर गर्जत, दुःख देत, नाचत, रणोन्मत्त होऊन ती सैन्ये लढली. राक्षस वानरांच्या पर्वताघाताने त्रासले आणि पळाले. राक्षसांनी माघार घेतली आणि वानरसैन्य विजयी झाले हे पाहून श्रीराम आणि सुग्रीव यांना आनंद झाला.

अध्याय पाचवा

सुवेळेवर बसून श्रीराम मनोहर लंका पाहात होता. त्याच्या जवळ सुग्रीव वानरसमूहासह थांबला होता. दोन योजने असलेल्या सुवेळागिरीच्या टोकावर वानरांची सभा शोभिवंत दिसत होती.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

लंकेत शिरून राक्षसांना मारत असताना लंकेत घरोघरी आकांत झाला. अशी राक्षसांची वानरांनी वाताहात केली. श्रीरामाचे आज्ञाधारक असे लक्षावधी-कोट्यवधी, समूहच्या समूह लंकेमध्ये प्रवेशले. वानरांमधले प्रमुख सेनापती लंकेमधले मठ, मंडप यांचा आवेशाने विध्वंस करण्यासाठी घुसले. पताका फाडणे, तोरणे तोडणे, तसेच सात खणांची राजभवने आणि मंदिरे पाडणे, अशा नाना प्रकारांनी विध्वंसाचे कार्य वानर करत होते. खंदकात माती, पर्वतशिखरे, लाकडे घालून त्यांनी संपूर्ण खंदक सर्व बाजूंनी बुजवून टाकला. दुर्गाच्या भिंती पाडून, राक्षसांचा घात करत, पराक्रमी वानर जयाची टाळी पिटत होते. "आम्ही श्रीरामाचे दूत लंकेत प्रवेश करून आलो. श्रीराम यशवंत झाला, त्याला नित्य विजय मिळतो. लक्ष्मण नित्य यशस्वी होणारा आहे. श्रीरामामुळे सुग्रीवाला राज्य प्राप्त झाले, तोही निश्चित विजयी होतो." अशा हर्षयुक्त गर्जना करत होते. रामनामाचा जयजयकार करत "आम्ही सत्वर लंका जिंकली, श्रीरामचंद्र नित्य विजयी आहे. संपूर्ण लंकेचे राज्य बिभीषणाला प्राप्त झाले" असे वानरांकडून हर्षयुक्त स्वानंदाने म्हटले जात होते. अशा रीतीने वानर नाचत, गर्जत, लंकेत हर्षाने वावरत होते. राक्षस त्रासून गेले आणि त्यांनी रावणाला हा आकांत निवेदन केला. "पर्वत, शिळा, शिखरे यांचा मारा करत वानर आले. दुर्गापासून योजनभर लंकेभोवती त्यांनी पर्वत आणले. त्यावर चढून वानरांनी राक्षसांचा नाश चालविला आहे. ते महाबलवान वानर पर्वतावर आणि लंकादुर्ग राहिला तळाशी; त्यामुळे वरून पर्वत-शिळा-शिखरे यांचा वर्षाव होऊन राक्षस त्याखाली मारले जात आहेत. वानरांवर हत्यार चालविता येत नाही म्हणून राक्षस चरफडत आहेत. पर्वताच्या टोकावर वानर असल्यामुळे यंत्रमारही चालत नाही. राक्षस पूर्णपणे अगतिक झाले आहेत. वानरांना दुर्ग पाडणे, दार उघडणे यातले काहीच करावे लागत नाही. आपल्या सत्राण उड्यांनी त्यांनी त्रिकूट गाठले आहे. कोट्यवधी वानर पलीकडे लंकापीठात त्रिकूटावर जमले आहेत. वानरांकडून होणाऱ्या माराच्या भयाने, राक्षस जीव घेऊन पळत असून, दुर्गरक्षण होत नाही."

"अशा प्रकारे लंका मुक्त करून रामदूत वानर प्रवेशले आहेत. ते रामनामाचा गजर करत आहेत. प्रधान वृथा प्रौढीने म्हणत होते की 'आम्ही कोटी वानर मारू'; पण प्रत्यक्ष वानरांची धाड आल्यावर ते दडी मारून लपले आहेत. वानरांनी वेगाने धाड घालून दुर्गाचे तट आणि भिंती पाडल्या, खंदक नेटाने बुजवले आणि लंकेत तोडाफोड सुरू केली आहे." राक्षसांकडून ही वार्ता ऐकल्यावर रावण गडबडून गेला. मग तो भुवनाच्या माथ्यावर (गच्चीवर) चढून लंकेत शिरलेले वानर पाहू लागला. गोपुरावरून पाहताना त्याला दिसले की लंकेच्या आत-बाहेर, वना-उपवनांमध्ये सर्वत्र वानरांचे समूह दाटले आहेत. वानरसैन्य असंख्य असल्यामुळे ते लंकेत मावत नव्हते. त्यामुळे ते भिंतीवर, तटांवर वृक्षांवर असे सर्वत्र दाटून राहिले होते. वानरांनी व्यापून गेलेले दुर्गाचे तट पिवळे दिसत होते, वृक्ष, वने हीही पिवळी दिसत होती. हा वानरांच्या रंगप्रभेचा परिणाम होता. लंकेच्या परिसरात आत-बाहेर सर्वत्र वानरांच्या समूहांची गर्दी पाहून रावणाला कापरे भरले. 'इतक्या जवळ ही वानरांची धाड कशी?' या विचाराने तो चिंताग्रस्त झाला. यावेळी गोपुरावर चढलेला रावण दिसताच प्रत्येक वानर पुनःपुन्हा त्याला युद्धासाठी बोलावत होते, 'नपुंसका बाहेर ये' म्हणत हेटाळणी करत होते. काही उड्या मारून रावणाला चिडवत होते. हे सर्व चाळे पाहून रावण उद्विग्न झाला. 'माझ्यासमोर ही पाला खाणारी वानरे युद्धासाठी धावताहेत, तेव्हा ती महापराक्रमी असणार;' असा विचार करून तो वानरांच्या पारिपत्यासाठी गोपुरावरून खाली उतरला आणि त्वरित सैन्य पाठविण्याचे त्याने ठरविले.

https://archive.org/details/@bhavan_vatsatrust_lucknow · Bhavan Vatsa Trust, Lucknow

CC-0. In Public Domain. Digitized by Sayyu Foundation Research Academy, eGangotri

राक्षससैन्य आणि वानरसैन्य यांचे युद्ध

वानरसैन्याने लंकेत प्रवेश केल्यामुळे लंकाधीश रावण संतापला आणि त्याने स्वतःचे सैन्य वानरांचे निदार्लण करण्यासाठी पाठविले. राक्षससैन्य आणि वानरसैन्य यांच्यात अटीतटीचे युद्ध सुरू झाले. एकमेकांचा पराभव करण्यासाठी दोन्ही सैन्ये जोमाने लढू लागली. राक्षस आरोळ्या ठोकत आले, तर वानरांनी रामनामाचा भुभुःकार केला. एकमेक दुसऱ्याचा उपमर्द करत घाव हाणत निष्ठुरपणे झोंबू लागले. राक्षसांकडून शस्त्रांचा वर्षाव होई आणि वानर तत्परतेने तो सहज चुकवत. वानरांनी पर्वताचा आघात केला म्हणजे राक्षस कण्हत राहात. राक्षस जेव्हा वानरांची शेपूट धरून आवेशाने उपटू पाहात, तेव्हा वानर डोळ्यांना ओरबाडून राक्षसांना आंधळे करीत. डाव्या हाताने डोळा फोडून आणि उजव्या हाताने थप्पड मारून वानर राक्षसांना खाली पाडत; नंतर रागारागाने राक्षसांचे नाक, कान कुरतडत. वानरांचे पाय धरून राक्षस ते उपटू लागत तेव्हा वानर आपल्या शेपटीने राक्षसांची मान मुरगळून त्यांना जमिनीवर पाडत. राक्षस आणि वानर यांची रणात झटापट चालू झाली. केस धरून वानर राक्षसांना खाली पाडत आणि मग निष्ठुरपणे मुठींचे प्रहार करत. राक्षसांकडून आवेशाने गदा, मुद्गल, शूळ, शक्ती यांचे प्रहार केले जात, तर वानर शाल, ताल वृक्ष, तसेच शिळा-पर्वत यांचा मारा करीत. दंडी, मुंडासी, उरावर, डोक्यावर असे वानरांकडून आघात होत आणि शिवाय शेपूट राक्षसांच्या उरावर आदळून त्यांना पाडले जाई. अशा प्रकारे तेथे राक्षसांच्या ओळीच्या ओळी पडत राहात.

राक्षस शस्त्रास्त्रांचा घडघडाट करत, रथातून आले, की ते पाहून वानर रथाजवळ स्वतःच जात. राक्षसांनी शस्त्रे मारली की वानर उसळून आकाशात जात. मग वानर पर्वतांचा वर्षाव करून, रथांचा चक्काचूर करत. वानर वेगाने येऊन क्षणात रथांचे मकराकृती तोंड धरून जमिनीवर जोराने आपटून रथांचे भस्म करीत. त्यांनी असे असंख्य रथ नष्ट केले. त्यामुळे राक्षसांनी रणात आणि लंकात्रिकूटावर एकच आकांत केला. जेव्हा काही वानर रणात पडत तेव्हा श्रीरामाच्या नामस्मरणाने त्यांच्या व्यथा दूर होऊन ते पुन्हा संग्रामाला सिद्ध होत. नामस्मरणाने प्रल्हादाच्या अंगाला शस्त्रे खुपली नाहीत; येथे प्रत्यक्ष श्रीरामच पाठीशी असल्याने वानरांना भय कसले असणार! श्रीरामाचे आम्ही दूत आहोत असे वानर सतत म्हणत असल्याने, त्यांना गज, घोडे, रथ यांचा आणि राक्षसांचा नाश करता आला. राक्षस आणि वानर क्रमाक्रमाने एकमेकांशी युद्ध करू लागले. रणांगणात रक्तामांसाचा चिखल झाला. पर्वत, पाषाणांचा खच पडला वानरांकडून पर्वतांचे आघात केले गेले; त्यामुळे राक्षसांना प्राणान्त आठवला. घाव चुकवण्यासाठी समोर ढाल धरून राक्षस रणात राहात, तेव्हा त्यांना ढालीसह मरण येत होते. पर्वतांच्या आघातांनी राक्षसांना अचूक मरण येई. पर्वतांवर शस्त्राचे घाव निरुपयोगी, बाणांचा मारा व्यर्थ, असे होत असल्याने राक्षस आकांत करत लंकेत पळाले. दोन्ही सैन्ये समान शूर, सम बळाची त्यामुळे त्यांचे घनघोर युद्ध झाले. परस्परांवर गर्जत, दुःख देत, नाचत, रणोन्मत्त होऊन ती सैन्ये लढली. राक्षस वानरांच्या पर्वताघाताने त्रासले आणि पळाले. राक्षसांनी माघार घेतली आणि वानरसैन्य विजयी झाले हे पाहून श्रीराम आणि सुग्रीव यांना आनंद झाला.

अध्याय पाचवा

सुवेळेवर बसून श्रीराम मनोहर लंका पाहात होता. त्याच्या जवळ सुग्रीव वानरसमूहासह थांबला होता. दोन योजने असलेल्या सुवेळागिरीच्या टोकावर वानरांची सभा शोभिवंत दिसत होती.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

तेथून त्यांना लंकानगरी, तिथली सुंदर वने, राने, रावणाच्या भुवनाचे गोपुर, हे सारे रमणीय दिसत होते. श्रीरामाच्या सैन्यातला वानरसमूह लंकेत आला हे ऐकून, त्याला पाहण्यासाठी रावण तातडीने गोपुरावर चढला. रावण काजळासारखा काळा होता. उज्जवल सुवर्णालंकार त्याने धारण केले होते. तो तांबडे वस्त्र नेसला होता. त्याच्या गळ्यात लाल रत्नांनी मढवलेल्या माळा होत्या. त्याच्या बरोबर राक्षससमूह होता. त्याच्यावर दोन चवऱ्या ढाळल्या जात होत्या आणि डोक्यावर छत्र धरलेले होते. अशा थाटात असलेल्या रावणाला पाहून सुग्रीवाचा राग उफाळून आला. "माझ्या स्वामीची कांता चोरली आणि याच्या डोक्यावर छत्र कसले; मी याचा घात करीन" असे म्हणत आवेशाने तो खवळला. त्याने आपल्या शेपटीचा आकडा वळला. त्याचे रोम थरथरत होते. त्याचा वेग न धरवेल एवढा गाढा होता. तसाच तो अत्यंत चपळाईने उडाला. श्रीरामाला न विचारता, कोणालाही स्वतःचा विचार न सांगता, एकदम गोपुराच्या आत रावणासमोर जाऊन पोचला.

रावणाशी सुग्रीवाचे युद्ध

सुग्रीवाची उडी गोपुरात पडताच राक्षस भांबावले, रावण शंकाकुल झाला, सर्वांची बोबडीच वळली, काय करावे हे राक्षसांना समजेना. त्यावेळी सुग्रीवच रावणाला उद्देशून गर्जना करत म्हणाला, "श्रीरामाचा सखा सांगाती आणि खरोखर सेवक असा मी सुग्रीव म्हणून विख्यात आहे. येथे तुझा घात करायला आलो आहे. माझ्या हातून आता लंकानाथ जिवंत राहात नाही." असे कठोर भाषण करून वीर सुग्रीव निःशंक उभा राहिला. त्यावर कोणीही प्रत्युत्तर दिले नाही. सर्व राक्षस खाली तोंड करून स्तब्ध राहिले. सुग्रीव क्षणभर उभा राहिला, तरीही रावण काही बोलला नाही. तेव्हा सुग्रीवाने उडी मारून रावणाच्या छातीवर लाथ मारली; मुकुटाला हात घातला. मुकुट तत्काळ हिसडल्यामुळे दोघेही पराक्रमी महावीर जमिनीवर आदळले. रावण त्यावेळी मूर्च्छित झाला. त्याबरोबर सुग्रीव मुकुट घेउन त्वरेने निघाला. तेवढ्यात रावण सावध होऊन, मुकुट घेऊन सुग्रीव चाललेला पाहून, त्याला म्हणाला, "थांब, मी दुश्चित असा मूर्च्छित होतो; पण तू युद्ध न करता कसा जातोस? माझ्यावर उडी घालून, आता तातडीने पळतो आहेस काय. माझ्या हाताच्या तळव्याने एक थप्पड मारून तुझी मानच निश्चित मोडून पाडीन. जर तुझ्यापाशी पराक्रमी पुरुषार्थ असेल तर पुन्हा युद्ध करायला ये. तसाच गेलास तर तुझे तोंड काळे." रावण रागाने सुग्रीवाला म्हणाला. लगेच रावणाने उडी मारली आणि त्याने सुग्रीवाला हिसकून पाडायचा प्रयत्न केला. तेव्हा सुग्रीव गदगदा हसत राहून म्हणाला, "तुझा पुरुषार्थ एवढाच का?" नंतर सुग्रीवाने रावणाला हिसकले तर रावण तोंडघशी पडला. आपले वीस हात टेकून रावण मग सावरून उठला.

रावणाला आता अत्यंत राग आला. त्याने शस्त्रास्त्रांनी युद्ध करण्याचे सोडून अंगलट करत, निराळ्याच विचाराने तो सुग्रीवावर आदळला. रावणाच्या मनात विचार चालला होता की, "वानराला दोनच हात आहेत, मी वीस हातांमुळे समर्थ आहे. या वानराच्या सर्वांगात कळा आणून त्याला मारीन. हे पालाखाणारे वानर ते काय, त्याची शक्ती ती किती? मी बळाने सबळ असा लंकापती या वानराला हातोहात मारीन." रावणाने असे म्हणताच त्या महावीर सुग्रीवाने रावणाच्या वीसही हातांची तत्काळ शेपटीने मोळी बांधली. या प्रकाराने रावण गडबडला, त्याने शेपटीचा चावा घेतला. तेव्हा सुग्रीवाने हासून त्याला सोडून दिला. आणि त्याची उपेक्षा केली. नंतर मल्लविद्येच्या आधारे ते एकमेकांना भिडले. ही कुस्ती करताना त्यांनी पलटी, लोट, गुप्त थप्पड, हातांचे आघात अशा अनेक डावांची घडामोड केली. त्यांच्या त्या अद्‌भुत आणि दीर्घकाळ चाललेल्या झोंबाझोंबीने

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

दोघेही घामाने डबडवले. एकमेक जेव्हा वर्मी घाव घालत तेव्हा कळा लागत आणि काही काळ निश्चेष्ट पडत होते. नखांनी अंगावर सर्व ठिकाणी ओरबाडल्यामुळे त्यांच्या अंगातून रक्ताच्या धारा वाहात होत्या, त्यावेळी ते महावीर वसंत ऋतूत फुललेल्या किंशुक वृक्षाप्रमाणे भासत होते. एकाने कसून मुठीचा आघात केला तर दुसरा तो चुकवत होता. तो घाव चुकवला की ते आवेशाने लाथ मारत. लाथ चुकवली की लगेच हाताने मारत आणि त्यामुळे एकमेकांना जमिनीवर पाडत. नंतर कोपराने दणके देत. लाथांनी मारल्यावर मग परस्परांना टोले देत ते एकमेकांच्या उरावर बसून, गडबडा लोळत डोक्यावर हातांनी मारू लागत. अशा प्रकारे त्या दोघांचे घनघोर युद्ध चाललेले असताना ते दुर्धर युद्ध पाहण्यासाठी सुरवर, वानर आणि राक्षस ठिकठिकाणी गोळा झाले होते.

गोपुराच्या सपाट भूमीवर त्या दोघांचे युद्ध बराच काळ चालले होते. ते त्यांचे युद्ध पाहून कळिकाळ चळचळा कापत होता. त्यांचे युद्ध सुरू असताना दोन्ही बाजूने प्रमुख वीर त्यांना आवरण्यासाठी धावून जात होते. त्यावेळी त्यांनाही मल्लविद्येचा वापर करावा लागत होता. एकमेकांना खाली पाडून ते पराक्रमी वीर जेव्हा बाजूला करू लागत तेव्हा दुसरा त्याला धरून बाजूला ढकलत असे. अशी एकमेकांशी झोंबी घेत आणि कमरेत, गळ्यात जोर लावत अखेर ते वीर निश्चेष्ट पडत. त्यावेळी दोहोंचे खवळून युद्ध होई. डाव्या, उजव्या बाजूंनी विचित्र टोले, लाथा, कोपरखळ्या हाणत एकमेकांच्या पोटांवर घाव घातले जात. तोंडावर थपडा मारून, गोल फिरत एकमेक दुसऱ्याला गरगरा फिरवत. नंतर गोपुरावरून जमिनीवर पडताना ते सभास्थानात जाऊन पडले. तेव्हा जमिनीला अंग न लावता ते आकाशात उड्डाण करून एकमेकांना भिडले. वानर (सुग्रीव) स्वतः आकाशात झेपावणारा आणि दुसरा (रावण) स्वतः आकाशात संचार करणारा असे ते असल्यामुळे दोघे निराधार होऊन अवकाशात झुंजत होते. ते त्यांचे युद्ध पाहून सुरासुर आश्चर्यचकित झाले.

सुग्रीव आणि रावण हे महावीर मधेच क्षणभर थांबून, लागलेला दम जिरवून, पुन्हा एकमेकांना हाकारून दुर्धर युद्धाला भिडले. हाताच्या विळख्यात घेऊन, जोर लावून ते प्रतिस्पर्ध्याला जमिनीवर पाडत होते. कोणीच कोणाला आवरत नव्हता, कारण दोघेही मल्लयुद्धात सारखेच निष्णात होते. रावण वीस हातांनी सपाटे लावू लागताच सुग्रीवाने धडका दिल्या. त्यामुळे रावणाच्या दहा मस्तकात झिणझिण्या आल्या आणि तो कळवळला. आपल्याला वानर आटोपत नाही हे लंकानाथाच्या ध्यानात आले; त्याला युद्धाचा आवेश सोडवत नव्हता. तो पुन्हा युद्धासाठी सज्ज झाला. मग मागे-पुढे होत, वेगाने चढाई करत आपले युद्धकौशल्य ते दोघे दाखवू लागले. हाता-पायांचे आघात करत दोघेही मल्लविद्येतल्या संकेतानुसार झुंजत राहिले. ते दोघे एकमेकांची हाडे चुरण्यासाठी उत्सुक होऊन मिठ्या मारू लागले. त्यावेळी वीस हातांनी रावणाने घातलेले बंधन दोन हातांनी मोकळे करताना सुग्रीवाने अशी कळ काढली की रावण कासावीस झाला. सुग्रीवाची अढी एवढी बळकट होती की आता रावणाचा प्राण राहात नाही असे वाटले. परंतु सुग्रीवाने त्याला मोकळे सोडले, मग पुन्हा रावण युद्धासाठी आला. उरावर धडका, डोईवर डोक्याचा दणका, दंडी मुंडपी ढाका आणि पायाच्या रेट्याने लोटणे असे करत त्यांची झुंज होत राहिली. पायांचे कुशल पवित्रे घेऊन ते एकमेकाला भिडले आणि गोपुराच्या भूमीवर धाडकन दोघेही आपटले. बोटे मोडणे, हुलकणीने हिसकणे, मुठींचे प्रहार, उलट-सुलट फिरणे असे अनेक प्रकार करत आणि अनेक प्रकारचे खोडे घालणारे डावपेच करत ते दोघे कुशलतेने झुंजत राहिले.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

तेथून त्यांना लंकानगरी, तिथली सुंदर वने, राने, रावणाच्या भुवनाचे गोपुर, हे सारे रमणीय दिसत होते. श्रीरामाच्या सैन्यातला वानरसमूह लंकेत आला हे ऐकून, त्याला पाहण्यासाठी रावण तातडीने गोपुरावर चढला. रावण काजळासारखा काळा होता. उज्जवल सुवर्णालंकार त्याने धारण केले होते. तो तांबडे वस्त्र नेसला होता. त्याच्या गळ्यात लाल रत्नांनी मढवलेल्या माळा होत्या. त्याच्या बरोबर राक्षससमूह होता. त्याच्यावर दोन चवऱ्या ढाळल्या जात होत्या आणि डोक्यावर छत्र धरलेले होते. अशा थाटात असलेल्या रावणाला पाहून सुग्रीवाचा राग उफाळून आला. "माझ्या स्वामीची कांता चोरली आणि याच्या डोक्यावर छत्र कसले; मी याचा घात करीन" असे म्हणत आवेशाने तो खवळला. त्याने आपल्या शेपटीचा आकडा वळला. त्याचे रोम थरथरत होते. त्याचा वेग न धरवेल एवढा गाढा होता. तसाच तो अत्यंत चपळाईने उडाला. श्रीरामाला न विचारता, कोणालाही स्वतःचा विचार न सांगता, एकदम गोपुराच्या आत रावणासमोर जाऊन पोचला.

रावणाशी सुग्रीवाचे युद्ध

सुग्रीवाची उडी गोपुरात पडताच राक्षस भांबावले, रावण शंकाकुल झाला, सर्वांची बोबडीच वळली, काय करावे हे राक्षसांना समजेना. त्यावेळी सुग्रीवच रावणाला उद्देशून गर्जना करत म्हणाला, "श्रीरामाचा सखा सांगाती आणि खरोखर सेवक असा मी सुग्रीव म्हणून विख्यात आहे. येथे तुझा घात करायला आलो आहे. माझ्या हातून आता लंकानाथ जिवंत राहात नाही." असे कठोर भाषण करून वीर सुग्रीव निःशंक उभा राहिला. त्यावर कोणीही प्रत्युत्तर दिले नाही. सर्व राक्षस खाली तोंड करून स्तब्ध राहिले. सुग्रीव क्षणभर उभा राहिला, तरीही रावण काही बोलला नाही. तेव्हा सुग्रीवाने उडी मारून रावणाच्या छातीवर लाथ मारली; मुकुटाला हात घातला. मुकुट तत्काळ हिसडल्यामुळे दोघेही पराक्रमी महावीर जमिनीवर आदळले. रावण त्यावेळी मूर्च्छित झाला. त्याबरोबर सुग्रीव मुकुट घेउन त्वरेने निघाला. तेवढ्यात रावण सावध होऊन, मुकुट घेऊन सुग्रीव चाललेला पाहून, त्याला म्हणाला, "थांब, मी दुश्चित असा मूर्च्छित होतो; पण तू युद्ध न करता कसा जातोस? माझ्यावर उडी घालून, आता तातडीने पळतो आहेस काय. माझ्या हाताच्या तळव्याने एक थप्पड मारून तुझी मानच निश्चित मोडून पाडीन. जर तुझ्यापाशी पराक्रमी पुरुषार्थ असेल तर पुन्हा युद्ध करायला ये. तसाच गेलास तर तुझे तोंड काळे." रावण रागाने सुग्रीवाला म्हणाला. लगेच रावणाने उडी मारली आणि त्याने सुग्रीवाला हिसकून पाडायचा प्रयत्न केला. तेव्हा सुग्रीव गदगदा हसत राहून म्हणाला, "तुझा पुरुषार्थ एवढाच का?" नंतर सुग्रीवाने रावणाला हिसकले तर रावण तोंडघशी पडला. आपले वीस हात टेकून रावण मग सावरून उठला.

रावणाला आता अत्यंत राग आला. त्याने शस्त्रास्त्रांनी युद्ध करण्याचे सोडून अंगलट करत, निराळ्याच विचाराने तो सुग्रीवावर आदळला. रावणाच्या मनात विचार चालला होता की, "वानराला दोनच हात आहेत, मी वीस हातांमुळे समर्थ आहे. या वानराच्या सर्वांगात कळा आणून त्याला मारीन. हे पालाखाणारे वानर ते काय, त्याची शक्ती ती किती? मी बळाने सबळ असा लंकापती या वानराला हातोहात मारीन." रावणाने असे म्हणताच त्या महावीर सुग्रीवाने रावणाच्या वीसही हातांची तत्काळ शेपटीने मोळी बांधली. या प्रकाराने रावण गडबडला, त्याने शेपटीचा चावा घेतला. तेव्हा सुग्रीवाने हासून त्याला सोडून दिला. आणि त्याची उपेक्षा केली. नंतर मल्लविद्येच्या आधारे ते एकमेकांना भिडले. ही कुस्ती करताना त्यांनी पलटी, लोट, गुप्त थप्पड, हातांचे आघात अशा अनेक डावांची घडामोड केली. त्यांच्या त्या अद्भुत आणि दीर्घकाळ चाललेल्या झोंबाझोंबीने

https://archive.org/details/@lakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized By Sarayu Foundation Trust and eGangotri

दोघेही घामाने डबडवले. एकमेक जेव्हा वर्मी घाव घालत तेव्हा कळा लागत आणि काही काळ निश्चेष्ट पडत होते. नखांनी अंगावर सर्व ठिकाणी ओरबाडल्यामुळे त्यांच्या अंगातून रक्ताच्या धारा वाहात होत्या, त्यावेळी ते महावीर वसंत ऋतूत फुललेल्या किंशुक वृक्षाप्रमाणे भासत होते. एकाने कसून मुठीचा आघात केला तर दुसरा तो चुकवत होता. तो घाव चुकवला की ते आवेशाने लाथ मारत. लाथ चुकवली की लगेच हाताने मारत आणि त्यामुळे एकमेकांना जमिनीवर पाडत. नंतर कोपराने दणके देत. लाथांनी मारल्यावर मग परस्परांना टोले देत ते एकमेकांच्या उरावर बसून, गडबडा लोळत डोक्यावर हातांनी मारू लागत. अशा प्रकारे त्या दोघांचे घनघोर युद्ध चाललेले असताना ते दुर्धर युद्ध पाहण्यासाठी सुरवर, वानर आणि राक्षस ठिकठिकाणी गोळा झाले होते.

गोपुराच्या सपाट भूमीवर त्या दोघांचे युद्ध बराच काळ चालले होते. ते त्यांचे युद्ध पाहून कळिकाळ चळचळा कापत होता. त्यांचे युद्ध सुरू असताना दोन्ही बाजूने प्रमुख वीर त्यांना आवरण्यासाठी धावून जात होते. त्यावेळी त्यांनाही मल्लविद्येचा वापर करावा लागत होता. एकमेकांना खाली पाडून ते पराक्रमी वीर जेव्हा बाजूला करू लागत तेव्हा दुसरा त्याला धरून बाजूला ढकलत असे. अशी एकमेकांशी झोंबी घेत आणि कमरेत, गळ्यात जोर लावत अखेर ते वीर निश्चेष्ट पडत. त्यावेळी दोहोंचे खवळून युद्ध होई. डाव्या, उजव्या बाजूंनी विचित्र टोले, लाथा, कोपरखळ्या हाणत एकमेकांच्या पोटांवर घाव घातले जात. तोंडावर थपडा मारून, गोल फिरत एकमेक दुसऱ्याला गरगरा फिरवत. नंतर गोपुरावरून जमिनीवर पडताना ते सभास्थानात जाऊन पडले. तेव्हा जमिनीला अंग न लावता ते आकाशात उड्डाण करून एकमेकांना भिडले. वानर (सुग्रीव) स्वतः आकाशात झेपावणारा आणि दुसरा (रावण) स्वतः आकाशात संचार करणारा असे ते असल्यामुळे दोघे निराधार होऊन अवकाशात झुंजत होते. ते त्यांचे युद्ध पाहून सुरासुर आश्चर्यचकित झाले.

सुग्रीव आणि रावण हे महावीर मधेच क्षणभर थांबून, लागलेला दम जिरवून, पुन्हा एकमेकांना हाकारून दुर्धर युद्धाला भिडले. हाताच्या विळख्यात घेऊन, जोर लावून ते प्रतिस्पर्ध्याला जमिनीवर पाडत होते. कोणीच कोणाला आवरत नव्हता, कारण दोघेही मल्लयुद्धात सारखेच निष्णात होते. रावण वीस हातांनी सपाटे लावू लागताच सुग्रीवाने धडका दिल्या. त्यामुळे रावणाच्या दहा मस्तकात झिणझिण्या आल्या आणि तो कळवळला. आपल्याला वानर आटोपत नाही हे लंकानाथाच्या ध्यानात आले; त्याला युद्धाचा आवेश सोडवत नव्हता. तो पुन्हा युद्धासाठी सज्ज झाला. मग मागे-पुढे होत, वेगाने चढाई करत आपले युद्धकौशल्य ते दोघे दाखवू लागले. हाता-पायांचे आघात करत दोघेही मल्लविद्येतल्या संकेतानुसार झुंजत राहिले. ते दोघे एकमेकांची हाडे चुरण्यासाठी उत्सुक होऊन मिठ्या मारू लागले. त्यावेळी वीस हातांनी रावणाने घातलेले बंधन दोन हातांनी मोकळे करताना सुग्रीवाने अशी कळ काढली की रावण कासावीस झाला. सुग्रीवाची अढी एवढी बळकट होती की आता रावणाचा प्राण राहात नाही असे वाटले. परंतु सुग्रीवाने त्याला मोकळे सोडले, मग पुन्हा रावण युद्धासाठी आला. उरावर धडका, डोईवर डोक्याचा दणका, दंडी मुंडपी ढाका आणि पायाच्या रेट्याने लोटणे असे करत त्यांची झुंज होत राहिली. पायांचे कुशल पवित्रे घेऊन ते एकमेकाला भिडले आणि गोपुराच्या भूमीवर धाडकन दोघेही आपटले. बोटे मोडणे, हुलकणीने हिसकणे, मुठींचे प्रहार, उलट-सुलट फिरणे असे अनेक प्रकार करत आणि अनेक प्रकारचे खोडे घालणारे डावपेच करत ते दोघे कुशलतेने झुंजत राहिले.

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

सुग्रीव आणि रावण हे दोघे राजे मल्लयुद्धाची खरी शिक्षा आणि दीक्षा जाणून असल्याने अंतराळ लंघून चक्राकार फिरत होते; त्यांना त्यामुळे घेरी येत नव्हती. युद्धविषयक ज्ञानाचा उपयोग करत राहिल्याने त्यांना खेद वाटत नव्हता, उलट त्यांना रणमद चढून अत्यंत आनंदच वाटत होता. हत्ती जसे आपल्या दातांचा वापर करून प्रतिस्पर्ध्याशी झगडतात तसे दोघे वीर हाताच्या बळाने युद्ध करत होते. दोघांनी दीर्घकाळ युद्ध केले तरी त्यांना थोडेही श्रम वाटले नाहीत. क्रौंचाकार मंडळ, चक्राकार फिरकी, सुरंगाकार उचलून आदळणे असे त्यांचे रणकंदन चालूच राहिले. त्यांच्याकडून युद्धात मृगगती, मेंढागती, ससाण्याची गती, गजगती, कुक्कुटगती यांचा वापर केला जात होता. ते युद्धात मागे हटत नव्हते. कधी सिंहाप्रमाणे आवेशाने एकमेकांवर उड्या मारून जात होते. त्या दोघांनाही युद्धशास्त्राचे पूर्ण ज्ञान होते, नाना मंडळे, विविध गती माहिती होत्या त्यामुळे दोघेही विजयासाठी उन्मत्त होऊन रणमार करत होते. मल्लविद्येतील कौशल्याने दोघे सर्वांगाला ग्रहण लावून एकमेकांना युद्धात मारण्यासाठी निर्वाणीचे घाव घालत होते. तिरकस, चक्राकृती असे झोल देत ते पायाचे पवित्रे बदलून घाव चुकवून, मांजर दुसऱ्या मांजरावर गुरगुरते तसे एकमेकांवर गुरकावत झुंजत होते. बोकडाप्रमाणे थोडे मागे सरून नंतर धाव घेऊन एकमेकांना भिडत होते. नाना प्रकारच्या गती, विगती, वापरून मार देत होते. बैलाच्या मूत्राप्रमाणे वक्रगती, स्थान, मान, मंडळे यांचा वापर करून दुसऱ्यावर मात करण्यासाठी झटत होते. एकमेकांना पायांच्या पवित्र्यांनी खाली पाडत आणि मग रणात जणू मरून पडलेला वीर पायांनी लाथाडावा तसा पायाने उलथून, घोळसून टाकत ते परस्परांना लाथाडत होते. भिडत, पडत, उसळत, मिठ्या मारत ते परस्परांच्या वर्माला कळ लावू पाहात होते. अशी वर्माला कळ लागली की पुन्हा उसळून, दुसऱ्याला हिसडून, आदळून, छातीवर ताडन करून सर्वांग झोडपून काढत ते झोंबत होते. धरणे, मारणे, सोडणे, पायाची चाट घालून पाडणे, ओरडणे चालू ठेवून त्यांचे युद्ध चालले होते. आता युद्ध संपेल असे वाटत असले तरी त्यांचे युद्ध संपत नव्हते.

सुग्रीव आणि रावण दोघेही एकमेकांवर धावून जात होते. घसरत, आदळत एकमेकांना एका ठिकाणी बसवून ठेवत होते. त्या बसल्या ठिकाणाहून त्यांना सरळ उठता येत नव्हते. मग आपली आत्मशक्ती वापरून बळाने उठत होते. कधी पाठमोरे होऊन, कधी समोरासमोर भिडून एकमेकांना कापायला लावून ते सरळ पाडत होते. जमिनीवर पडताच तिथून उसळी मारून अंतराळात जात नाना प्रकारे ते युद्ध करत होते. गुडघा, कोपर, मुठी यांचे आघात; मुंडी मुडपणे, मुरडणे यांनी प्रतिस्पर्ध्यावर घाव घालत, त्याचे घाव शरीर बारीक करून चुकवून, ते दोघे कुशल, प्रवीण योद्धे निकराने झुंजत होते. अखेर सुग्रीवाने रावणाला शीण आणला. रावणाने मायाशक्ती वापरून सुग्रीवाला कपटाने धरावा असे योजले; परंतु हे सुग्रीवाच्या ध्यानात येताच त्याने एक युक्ती केली. हात हाताने धरून, पायांनी पाय आवळून डोके डोक्यावर आदळत सुग्रीवाने आपले शेपूट रावणाच्या नाकात घातले. रावणाला सटासटा शिंका येऊन तो अस्वस्थ झाला. त्यावेळी सुग्रीवाने रावणाला बुकलून काढला. रावण खाली तोंड करून पडला. तेव्हा सुग्रीवाने त्वरेने रावणाच्या दहा कंठांभोवती शेपूट गुंडाळून कळ आणली. त्यामुळे रावण सर्वांगाने विकल होऊन सुग्रीवाकडून निपचीत पाडला गेला.

सुग्रीव रावणाला न मारता त्याचा मुकुट नेतो

रावण सुग्रीवासमोर मूर्च्छित होऊन पडला असताना सुग्रीवाच्या मनात विचार आला की, 'याला मारायला एक क्षणही लागणार नाही; पण

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Trust and eGangotri

याला जिवानिशी मारला तर श्रीरामाचा कोप होईल. कारण श्रीरामाने शपथ वाहिली आहे की स्वहस्ते रावण मारीन. तेव्हा आपण रावणाचा वध केला तर श्रीरामाला अत्यंत राग येईल. श्रीरामाची प्रतिज्ञा खोटी करण्यामुळे रामाची अवज्ञा होईल. रावणाला मारण्याने आपण श्रीरामाशी द्रोह केला असे होऊन विनाकारण श्रीरामाच्या सेवेत अंतर पडेल म्हणून या रावणाला आपण मारू नये?' असे त्या सर्वज्ञ सुग्रीवाला जाणवले म्हणून त्याने रावणाचा वध केला नाही. नंतर त्याने गर्जना केली, "मी सुग्रीव रावणाला युद्धात त्रस्त करून, त्याचा मुकुट घेऊन जातो आहे. इंद्रजित, कुंभकर्ण, कोणी निधडे वीर, प्रधान यांपैकी ज्याला कोणाला माझ्याशी युद्ध करण्याचा पुरुषार्थ असेल त्याने पुढे यावे." ही सुग्रीवाची गर्जना झाली तेव्हा कुंभकर्ण गाढ निद्रेत होता. इंद्रजिताला भीतीने कापरे भरले, प्रधान सैन्यासह लपून बसले, सर्व राक्षसवीर स्वस्थ आणि अबोल झाले. या गर्जनेने लंकेतल्या लोकांना आव्हान दिल्यावर सुग्रीव रावणाचा मुकुट घेऊन आकाशात उडाला. सुग्रीव निधडा, शूरवीर होता. एवढा संग्राम करूनही त्याला घाम फुटला नाही की श्रम वाटले नाहीत. अपार आकाश उल्लंघून तो श्रीरामाकडे आला. 'रावणाला मूर्च्छित पाडून, त्याला न कळता त्याचा मुकुट आपण आणला,' असा विजयाचा अभिनिवेश त्याच्या मनात होता.

'सुग्रीव हा वानरांच्या राज्याचा राजेंद्र, त्याने दशशिर रावणाला स्वतः दुर्धर रण करून जिंकला. जो सुर-असुरांना, यक्ष-किन्नरांना, नृप-नरवरांना, घोर दानवांना, दुर्धर दैत्यांना कोणालाच आटोपत नाही आणि ज्याचा त्रिलोकात दरारा आहे त्या रावणाला सुग्रीवाने जिंकले. सुग्रीवाच्या संग्रामाची कीर्ती असुर, सुर, नर वाखाणत आहेत. एवढी विजयकीर्ती संपादन करून सुग्रीव वानरराज आकाश आक्रमून श्रीरामापाशी आला. वानरसेनेत असलेल्या श्रीरामाला वंदन करण्यासाठी रावणविजयाने अत्यंत विख्यात झालेला, सूर्यपुत्र सुग्रीव अत्यंत उत्सुक झाला होता. रावणाचा मुकुट श्रीरामाच्या पायाशी ठेवून, तो अत्यंत उल्हासाने आणि स्वानंदाने श्रीरामाच्या पाया पडला. सुग्रीवाची ख्याती म्हणजे एकट्याने लंकाधीश रावणाला जिंकले म्हणून वानर आनंदले, पाया पडले आणि त्यांनी जयजयकार केला. सुग्रीवाच्या विजयाने श्रीरामही सुखावला. श्रीरामाच्या कृपादृष्टीने सुग्रीवाच्या विजयाला पुष्टी मिळाली आणि एकट्या त्याने सृष्टीत न मावणारा स्वानंदकोटीचा आनंद अनुभवला. रघुवंशीच्या रघुनाथाला सुख द्यावे म्हणून सुग्रीवाने रावणाला जिंकले, यासाठी वानरांनी वानरराजाची पूजा केली.

श्रीराम सुग्रीवाला चूक सांगतो-क्षमायाचना

श्रीरामाने युद्धात विजयी झालेल्या सुग्रीवाला प्रेमाने आलिंगन दिले आणि नंतर म्हटले, "सुग्रीवा तू राजा आहेस. मला न विचारताच एकट्याने जाऊन तू युद्ध केलेस खरे पण हे काही नेत्याला शोभणारे नाही. आज माझे भाग्य थोर म्हणून तू जिवंत परत आलास. जर तुलाच रावणाने मारले असते तर माझा प्राणान्त ओढवला असता. सुग्रीव आणि लंकानाथ भिडताच माझा प्राण निश्चित गेला असता, बिभीषणालाही कल्पान्त आठवला असता, विनाकारण संग्रामात तू पुरुषार्थ केलास. एकट्याने संग्रामाला जाण्याची तुझी बुद्धी ही खोटी आहे. कोट्यवधी सैन्य असता हा व्यर्थ खटाटोप कशासाठी? सुग्रीव माझा शरणागत असता तो जर मेला असता तर भरत, शत्रुघ्न आणि तिन्ही माता यांनी, तसेच सीता प्राप्त झाली असती तर तिनेही प्राण ठेवला नसता. शरणागताचे मरण तेच माझेही मरण; लक्ष्मण सखा असूनही माझे प्राण तो वाचवू शकला नसता. मी जर प्राण सोडला असता तर सीता आणि लक्ष्मण हेही मरण पावले असते, भरत, शत्रुघ्न यांनीही प्राणत्याग केला असता आणि त्यामुळे सूर्यवंशाचे कंदन झाले

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

असते. रावणाने सुग्रीवाचा घात केला असता, तर सूर्यवंशाचा नाश झाला असता. दैवानेच हे कंदन चुकवले. पुन्हा पुढे अशी कृती करू नकोस. सुग्रीवा युद्धात तू समर्थ आहेस हे आणि तुझा पुरुषार्थ मला माहिती आहे. ज्यामुळे कुळाचे कंदन होईल असा अनर्थ पुढे करू नको."

श्रीरामाचे भाषण ऐकल्यावर सुग्रीवाने लोटांगण घातले आणि श्रीरामाच्या चरणांना मस्तकी धरून तो म्हणाला, "तुझी भार्या चोरून नेल्यावर लंकानाथाला पाहून मला धीर धरवला नाही. त्यामुळे त्याचा घात करायला खवळून त्याच्याकडे गेलो. माझ्या पुरुषार्थाचा पूर दाटला आणि तुला विचारण्याचे मनाला सुचले नाही. युद्धात रावणाला मारावे या दृष्टीने वेगाने मी उड्डाण केले. अंगात पराक्रम असला की अर्धा क्षणही धीर धरवत नाही हेच पुरुषार्थाचे खरे लक्षण आहे हे तू समजून घे श्रीरामा." हे सुग्रीवाचे सांगणे ऐकल्यावर पुरुषार्थाचे तेच लक्षण जाणून श्रीरघुनंदन संतुष्ट झाला आणि त्याने सुग्रीवाला आलिंगन दिले. नंतर श्रीरामाने लक्ष्मीवंत लक्ष्मणाला सांगून, सुग्रीवाच्या विजयासाठी अत्युत्तम फुले, फळे आणवून, श्रीरामाने सुग्रीवाला अभिषिंचन केले.

अध्याय सहावा

श्रीरामाला दिसले की पूर्वेकडील युद्धप्रसंगात वानरांनी अनेक राक्षसवीरांना मारले असून त्यांचे रक्त प्रवाहाप्रमाणे वाहात आहे. या दृश्याने श्रीराम कळवळला. त्याच्या चित्तात कृपा उपजली. "एकाच्या अपकारामुळे सर्वांचा घात करू नये, कारण तो राजधर्म नाही," असे त्याने सुग्रीवाराजा, जांबुवंत, अंगदादी सर्व वानरवीर आणि नळ, नीळ, हनुमंत, शरणागत बिभीषण यांना सांगितले. दुर्गाचा परिघ आणि बंद दारे, तसेच राक्षसांचा वध करण्यासाठी, वानरसैन्य तयार ठेवले असून त्यात अनेक पराक्रमी वानर होते. यानंतर काय करायचे यासंबंधी श्रीरामाने सर्वांना प्रश्न विचारला. तेव्हा ते म्हणाले, "रघुनाथा, आता तत्त्वतः युद्ध करावे. तुम्ही वृद्ध, धर्मयुक्त, बुद्धिवंत आणि सुबुद्ध आहात. यासाठी पुढे काय ते कर्तव्य निश्चित करून आम्हाला सांगा. एक तर सेतू बांधून आम्ही वानरभार घेऊन लंकेवर आलो आहोत. लंकानाथ रावणाला सैन्यासह मारावे. यावर आता दुसरा विचार कशाला करायचा?" असे सर्वांनी सांगितले; परंतु श्रीरामाला ते मान्य झाले नाही.

श्रीराम आणि वानरवीर यांचा मतभेद

श्रीरामाने "जो वेदविहित राजधर्म आहे, तो पाळल्यानेच परमार्थ साधतो." असे म्हणून सच्छास्त्र धर्म निरूपण केला. "अतिशयाकडे तसाच समर्थ शिष्ट लंकेत पाठवावा" असा जेव्हा श्रीरामाने विचार मांडला, तेव्हा वानरांनी, "आमची सीता चोरून नेली आणि आम्हीच आता शिष्ट (शिष्टाईसाठी) पाठवायचा हे अयोग्य वाटते. श्रीरामा युद्ध करण्यात भय कशाचे? आम्ही युद्धात कमी पडलो नाही की रणातून मागे हटलो नाही. असे असूनही आम्हीच शिष्ट पाठवणे हे आम्हाला फार लाजिरवाणे वाटते." हा सर्व वानरांचा विचार ऐकल्यावर श्रीरामाने राजधर्माचा मूलार्थ, भूतदया आणि परमार्थ याविषयी समचित्ताने निरूपण केले. तो म्हणाला, "युद्धधर्म हा चार प्रकारचा असतो. साम, दाम, दंड, भेद हे चार प्रकार अनादी काळापासून प्रसिद्ध आहेत. त्यांचे मी सार्थ विवरण करतो. ऐका. शत्रू प्रबळ असेल तर त्याच्याशी युद्ध कोण करील? हत्ती, घोडे, रथ, द्रव्य देऊन शत्रुत्व मिटवून वैर संपवावे. त्याही पुढे देश, दुर्ग देऊन आपल्या आणि शत्रूच्या पराक्रमाला वाचवावे. यालाच सामप्रयोग असे म्हणतात. आता भेदविभाग ऐका. अगदी अखेर दारुण युद्धच करावे लागणार आणि

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Trust and Lakshmi Research Academy, Gangotri

आपल्याकडे सैन्य-सेनानी तयार नसतील तर शत्रूसैन्यात भेद करून (फितुरी करून) त्यानुसार युद्ध करावे. भेदनीतीला अनुसरून केलेल्या युद्धात पराक्रमाने ख्याती करणे ही भेदाची गती आणि पद्धती आहे."

"आता सामस्थितीविषयी ऐका. युद्धाच्या प्रसंगात सामाचा अनुक्रम हा मुख्य राजधर्म असून सामामध्ये भूतदयासंभ्रम आणि श्रेष्ठ परमार्थ आहे समजा साम न करता दारुण युद्धच केले, तर त्यामध्ये असंख्य प्राणी मरतात; ती हत्या कोण सोसणार? स्वतः साम न करता, साम मानणारा असेल त्याच्या माथी भूतहत्या येणार हीच राजधर्मातली सुनीती आहे." श्रीरामाने स्वतः परब्रह्म असून राजधर्म सांगितला, "ती निःसीम भूतदया की संग्रामातच परम परमार्थ आहे. रणकंदनार्थ युद्ध केले असता, तेथेच परमार्थ लाभतो." असे श्रीरामाने म्हणताच वेद आणि विधाता विस्मय पावले. श्रीरघुपतीने स्वधर्म सांगताच बृहस्पती चक्रावला, वेदश्रुती चकित झाल्या आणि टकमका त्यांनी शास्त्रार्थ पाहिला. (गीतेमध्ये भगवंतांनी युद्धाच्या प्रसंगी जो परमार्थ सांगितला तोच परमार्थ श्रीरामाने सांगितला.) ज्याला रणाभिमान नाही; कर्मात कर्माभिमान नाही; देहात असून देहाभिमान नाही, तो नित्यमुक्त असे समजावे. त्याच्याकडून जे कर्माचरण होते, ते कर्मच पूर्णब्रह्म असते. चैतन्य व आत्मदृष्टीने त्यांना दोष लागत नाही. ज्यांच्या ठायी देह आणि देही दोन्ही नसतात त्यांना कर्माची बाधा होत नाही ते पुरुष देही असून विदेही असतात. अशा पुरुषांनी युद्ध केले तरी ते मरणारे किंवा मारणारे ठरत नाहीत. ते अगदी ठासून आवेशाने रणमार करत युद्ध करतात. ब्रह्मप्राप्ती होऊन जो तटस्थ असतो, तो सत्त्वगुणांनी ग्रासलेला असतो. त्रिगुणांना जिंकून जो पुरुषश्रेष्ठ युद्धात टिकतो तो खरा शूर." अशी स्वधर्माची समूळ कथा श्रीरामाने सांगितल्यावर हनुमंत चकित झाला आणि जांबुवंत तटस्थ झाला. मारुती, अंगद, सुग्रीव, विभीषण यांनी वानरगणांसह श्रीरामाला दंडवत घातले. नंतर ते म्हणाले, "यापुढे श्रीरघुनाथा आमची बुद्धी खुंटली; तुला जे योग्य वाटेल ते कार्य तू ठरव."

शिष्टाईसाठी कोण आणि कसा असावा

श्रीरामाने वानरांचे बोलणे ऐकून त्यांना स्वतः सर्वज्ञ असूनही रामाने विचारले, "तुम्ही शिष्टाईसाठी कोणाला पाठवावे याविषयी निवड करून मला सांगा. जो शिष्ट निवडाल त्याने भीड वाळगू नये. तो भित्रा नसावा. तो बोलका आणि धैर्यवान असावा. आपल्या सामर्थ्यात तो प्रौढ असावा, लाजाळू, शिष्ट नसून प्रेमळ असावा. ज्ञानमूढ आणि घमेंडखोर नसावा. तो अती चतुर, उत्तराला प्रत्युत्तर देणारा, नेत्यासमोर उभे राहून स्पष्ट बोलणारा असून, त्या स्पष्ट बोलण्याने सभा संतप्त झाली तरी त्याची त्याने पर्वा न करता आपला पुरुषार्थ दाखवला पाहिजे. स्वामीचे कार्य साधणारा असा तो वीर दूत हवा. त्याला संताप आला तर तो दशकंठाला त्रस्त करील आणि रावणाच्या सभेचा गर्व आणि उन्माद त्या रणमर्दाच्या पराक्रमाने नष्ट होईल असा तो असावा." या श्रीरामाच्या मत-प्रदर्शनाला मान देऊन वानर म्हणाले, "श्रीरामाच्या ठिकाणी शुद्ध सर्वज्ञत्व आहे; आम्ही तर सामान्य वानर आणि माकडे आहोत. आम्ही तुझ्यापुढे काय तर सूर्यापुढे काजवे. जे दूतासंबंधी तू सांगितलेस, तसा दूत आमच्या दृष्टीसमोर येत नाही. तेव्हा रघुनाथा, जो तुला मान्य होईल तोच दूत तू पाठव."

योग्य दूतासंबंधी विचार, अंगदाची निवड

श्रीराम आणि वानर यांच्यात मग योग्य दूत निवडण्यासाठी एकेका वानरवीराचा विचार सुरू झाला. 'हनुमंताला शिष्टाईसाठी धाडावा तर त्याने रावणाला त्रस्त केले आहे, शिवाय लंकादहन केले आहे, तेव्हा आता त्याला धाडू नये. नीळ हा चिकित्सक आहे, सुलक्षणी वक्ता आहे; पण

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

त्याच्या ठिकाणी एक अवगुण आणि अपलक्षण आहे की त्याला बळाभिमानाचा मोठा गर्व आहे त्यामुळे रावणाने शिष्टाई मान्य केली नाही तर नीळ तसाच परत न येता रावणाशी लगेच रणकंदन करेल. नळही त्याच्या सारखाच आहे. स्वामीकार्याची मर्यादा न कळल्याने एकदम रावणाला झोंबेल आणि बाहुबळाने त्याला मारू पाहील. दूत म्हणून दधिमुखाची निवड केली आणि रावणाला संधी मान्य झाला नाही; तर हा अत्यंत दुःखी होऊन लंकेचा नाश करण्याची अविवेकी कृती करील. जांबुवंत वृद्ध आणि पायाने अशक्त आहे; तो बुद्धिमान असून उचित सल्ला देणारा मंत्री असल्याने त्याला श्रीरामापाशीच असू द्यावे. पनस हा दूत म्हणून पाठवावे, तर तो कर्कश स्वभावाचा असून, चांगल्या बोलण्याने एखाद्याच्या अंतरात प्रवेश करणे त्याला जमत नाही. तो रावणाशी उगाच झोंबेल. कुमुद दूत म्हणून गेला तर तो रावणाशी वाद घालील आणि बोलता बोलता क्रोध येऊन तो रावणाचा अपमान करील. सुषेण हा सुलक्षणी चतुर बोलका आहे पण रावणाने संधी मान्य केला नाही तर हा सीतेसाठी प्राण देईल. श्रेष्ठत्व असलेला केसरी दूत म्हणून पाठवावा तर त्याचा रावणाला अत्यंत राग असून ते दोघे एकमेकांशी साप-मुंगसाप्रमाणे लढतील. ऋषभ, शरभ, गवय, गवाक्ष, मैंद, द्विविद, रंभ, पद्माक्ष यांची संग्रामातली दक्षता लक्षणीय असली तरी त्यांना शिष्टाईचा विषय माहिती नाही. या शिवाय जे जे वानरवीर आहेत त्यांना शिष्टाईचा प्रकार ठाऊक नाही. ते रावणवधासाठी उत्सुकतेने उठतील. सुग्रीव हा वानरराज आहे त्याला दूतकार्यासाठी धाडणे योग्य नाही.' श्रीरामाने दूत शोधण्यासाठी वानरसमूह शोधून पाहिला. बिभीषणाला दूत म्हणून पाठविला तर रावणाकडून तो अवश्य मारला जाईल; मग माझे प्राण देणे प्राप्त होईल, तेव्हा तेही करता येत नाही'' असा विचार करून श्रीराम स्वस्थ बसला. तेव्हा हनुमंत म्हणाला, "श्रीरामा, माझी विनंती ऐका. युवराज दूतकार्य निश्चित साधेल.''

नंतर अंगदाच्या योग्यतेसंबंधी हनुमान श्रीरामाला म्हणाला, "मुख्य मुख्य धुरीणांच्या गणनेत, वीस पद्म संख्येत; महापराक्रमी अनेक आहेत. त्यामध्ये वालीपुत्र अंगद बलवान म्हणून विशेष प्रसिद्ध आहे. रावणाच्या सभेत जाऊन बोलायला तो समर्थ आणि अत्यंत योग्य आहे. तो बोलल्यामुळे राक्षससभेत संताप निर्माण झाला तरी त्याची अंगदाला बाधा होणार नाही. शत्रूच्या भाषेचा तो भाषेने निषेध करील. अत्यंत बोलका आणि तसाच तो सुबुद्ध आहे तो घटवलेला बोलका, धैर्यवान योद्धा असून, रावणाला तो गांजू शकणारा श्रेष्ठ शूरवीर आहे. अंगदाचा आत्मनिर्धार हा क्षीरसागराप्रमाणे गंभीर आहे. रावणाच्या कपटी युक्तीला अंगदाजवळ अनेक युक्त्या आहेत. तो राक्षसांशी रणकंदन करायला एकटा पराक्रमी पुरेल. तो निधडा वीर आहे. स्वामीकार्य पूर्ण करण्यासाठी अंगदाजवळ अनेक युक्ती, अगाध शक्ती आहे. वालीपुत्र अंगद हा दूतकार्याला अत्यंत योग्य आहे.'' मारुतीची सूचना ऐकून श्रीराम संतुष्ट झाला.

श्रीराम अंगदाला रावणासाठी निरोप देतो

श्रीरामाला हनुमंताची सूचना मान्य झाली. त्याने अंगदाला जवळ बोलावून त्याला प्रेमाने आलिंगन दिले. नंतर श्रीराम म्हणाला, "अंगदा, तू शिष्ट म्हणून रावणाकडे जाऊन माझे महत्त्वाचे सांगणे त्याला ऐकव. त्याला म्हणावे, चोरी करणाराला शिक्षा होते. तू माझी पत्नी चोरली आहेस. तेव्हा तुला शिक्षा करण्यासाठी मी सीतापती राम निर्धाराने बाण घेऊन आलो आहे. परस्त्रीचे अपहरण हे तुझ्या मरणाचे मुख्य कारण आहे. माझे दुर्धर बाण सुटल्यावर तुझे रक्षण कोण करील? दशमुखा, सावध होऊन ऐक. मी माझ्या बाणांच्या निकटत्वाने तुझे बंधू, पुत्र, सैन्य

https://archive.org/details/muthulakshmiacademy Bhuvan Vani Trust, Lucknow

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

यांच्यासह संपूर्ण लंका राक्षसविरहित करीन. माझी पत्नी लंकेत आणलीस आणि श्रीरामाकडून तिची सुटका होणार नाही असे म्हणतोस, तर आता मी तुझ्या वधासाठी आलो आहे. कुठे पळशील? पूर्वी सीतेची अभिलाषा धरणाऱ्या एका कावळ्याच्या मागे मी दर्भाची काडी लावली होती, तेव्हा त्याला पळता पळता तिन्ही लोकात आश्रय मिळाला नव्हता. अखेर तो मला शरण आला. त्यावेळी मी त्याचा डावा डोळा घेऊन त्याचे प्राण वाचविले. हे एक दर्भाच्या काडीचे कौशल्य असून, ते किती दारुण होते पाहा. यापुढे माझे दुर्धर बाण सुटले तर पक्षी होऊन पळणाऱ्या रावणाला मी निश्चित मारीन. तो रावण त्रिलोकात, दशदिशा कुठेही पळाला तरी माझा बाण त्याची पाठ सोडणार नाही. माझ्या दृष्टीला पडला की रावणाचा वध झालाच. त्या कावळ्याने अपराध केला होता; परंतु तो मला अनन्यभावे शरण आला आणि शरणागताला मारायचे नाही, यामुळे मी त्याचा प्राण वाचवला होता. रावणा, तूही सीता मला देऊन, शरण आलास, तर तुझी लंकेच्या राज्यावर स्थापना करीन आणि तुझी जन्ममरणातून सुटकाही करीन."

श्रीराम पुढे म्हणाला, "रावणाला हेही सांग की, बिभीषणाला लंका दान केली, यासाठी सावधानपणे ऐक. मी नवी लंका निर्माण करून बिभीषणाची तिथे स्थापना करीन. ज्या मी सागरात पाषाण तरंगत ठेवले त्या मला नवी लंका निर्माण करायला अर्धा क्षणही लागणार नाही. यामुळे श्रीरामाला सीता अर्पण करण्याने लंकाधीशाला आणि त्याच्या लंकाराज्याला स्वस्थता लाभेल. हे सर्व श्रीरामाच्या धर्माने होईल." असे अंगदाला श्रीरामाने स्वतःच सांगितले. नंतर अमृतफळे देऊन अंगदाला लंकेत पाठविले. श्रीराम जेव्हा अमृतफळांचा शकुन करून एखाद्याला पाठवितो तेव्हा परक्यांचा मानाभिमान मर्दून तो गेलेला विजयी होतो. श्रीरामाने अंगदाला सांगितले की, "अंगदा तुझी शौर्यशक्ती, धैर्य, सहनशक्ती, शांती, कीर्ती आणि परम पुरुषार्थाची ख्याती हनुमंताने मला सांगितली आहे." त्यावर अंगद म्हणाला, "श्रीरघुनाथा, मला आज्ञा मान्य आहे. आपण आपला पुरुषार्थ स्वतःच्या तोंडाने सांगणे यात मूर्खपणाच दिसतो. ते असो. आमचा पुरुषार्थ म्हणजे तुझी आज्ञा श्रीरामा हीच कार्यसिद्धीच्या शिरावर आहे. त्यानेच आम्हाला विजय प्राप्त होतो. आम्ही पाला खाणारे सामान्य वानर आता श्रीरामाचे सेवक झालो, त्यामुळे आमचा पराक्रम थोर ठरून सुरासुरांकडून तो वर्णन केला जातो. श्रीरामा तुझ्या आज्ञेपुढे रावण तो काय बापडा! माझे भाग्य शुद्ध म्हणून मला हे कार्य सांगितले आहे. आज माझे मनोरथ सुफल झाले. श्रीरामाने स्वतः आपल्या मुखाने मला कार्य नेमून दिले यामुळे मी भाग्यवंत ठरलो. सद्गुरू हनुमानाने धर्मबुद्धीने मला श्रीरामाचा संतोष मिळवून दिला." अंगदाला श्रीरामाने आज्ञा दिली यामुळे तो अत्यंत उल्हसित झाला आणि लंकेला जायला तो सिद्ध झाला. त्याने श्रीरामाला प्रदक्षिणा घातली, त्याचे चरणवंदन करून चरणतीर्थ प्राशन केले. श्रीरामाला दंडवत, लक्ष्मण, बिभीषण यांना वंदन असे उपचार झाल्यावर त्याने सुग्रीवाचे पाय धरले.

सुग्रीवाने अंगदाला आशीर्वाद देताना म्हटले, "श्रीरामाची आज्ञा शिरसावंद्य मानून तू आपले जीवित श्रीरामाला अर्पण करून वानरवंशाला श्रेष्ठत्व मिळवून दिले आहेस. आता श्रीरामाचे कार्य शीघ्र साधावेस." अंगदाने नळ, नीळ, जांबुवंत, सुषेण अशा सर्वांना दंडवत घालून त्यांची आज्ञा मागितली. त्यावेळी सर्व म्हणाले, "वालिसुता अंगदा, तू आपल्या मृदू, मंजुळ, विनम्र वागण्याने आम्हा सर्वांना सुखी केले आहेस. तू निश्चित विजयश्री संपादन करशील. नंतर अंगदाने हनुमानाला पाहून उल्हासाने त्याच्या पायावर मस्तक टेकले. त्यावेळी तो प्रेमभावाने सद्गदित झाला होता. अंगद हनुमानाचा भक्त होता. त्याची

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust, Lucknow

त्याच्या ठिकाणी एक अवगुण आणि अपलक्षण आहे की त्याला बळाभिमानाचा मोठा गर्व आहे त्यामुळे रावणाने शिष्टाई मान्य केली नाही तर नीळ तसाच परत न येता रावणाशी लगेच रणकंदन करेल. नळही त्याच्या सारखाच आहे. स्वामीकार्याची मर्यादा न कळल्याने एकदम रावणाला झोंबेल आणि बाहुबळाने त्याला मारू पाहील. दूत म्हणून दधिमुखाची निवड केली आणि रावणाला संधी मान्य झाला नाही; तर हा अत्यंत दुःखी होऊन लंकेचा नाश करण्याची अविवेकी कृती करील. जांबुवंत वृद्ध आणि पायाने अशक्त आहे; तो बुद्धिमान असून उचित सल्ला देणारा मंत्री असल्याने त्याला श्रीरामापाशीच असू द्यावे. पनस हा दूत म्हणून पाठवावे, तर तो कर्कश स्वभावाचा असून, चांगल्या बोलण्याने एखाद्याच्या अंतरात प्रवेश करणे त्याला जमत नाही. तो रावणाशी उगाच झोंबेल. कुमुद दूत म्हणून गेला तर तो रावणाशी वाद घालील आणि बोलता बोलता क्रोध येऊन तो रावणाचा अपमान करील. सुषेण हा सुलक्षणी चतुर बोलका आहे पण रावणाने संधी मान्य केला नाही तर हा सीतेसाठी प्राण देईल. श्रेष्ठत्व असलेला केसरी दूत म्हणून पाठवावा तर त्याचा रावणाला अत्यंत राग असून ते दोघे एकमेकांशी साप-मुंगसाप्रमाणे लढतील. ऋषभ, शरभ, गवय, गवाक्ष, मैंद, द्विविद, रंभ, पद्माक्ष यांची संग्रामातली दक्षता लक्षणीय असली तरी त्यांना शिष्टाईचा विषय माहिती नाही. या शिवाय जे जे वानरवीर आहेत त्यांना शिष्टाईचा प्रकार ठाऊक नाही. ते रावणवधासाठी उत्सुकतेने उठतील. सुग्रीव हा वानरराज आहे त्याला दूतकार्यासाठी धाडणे योग्य नाही.' श्रीरामाने दूत शोधण्यासाठी वानरसमूह शोधून पाहिला. बिभीषणाला दूत म्हणून पाठविला तर रावणाकडून तो अवश्य मारला जाईल; मग माझे प्राण देणे प्राप्त होईल, तेव्हा तेही करता येत नाही'' असा विचार करून श्रीराम स्वस्थ बसला. तेव्हा हनुमंत म्हणाला, ''श्रीरामा, माझी विनंती ऐका. युवराज दूतकार्य निश्चित साधेल.''

नंतर अंगदाच्या योग्यतेसंबंधी हनुमान श्रीरामाला म्हणाला, ''मुख्य मुख्य धुरीणांच्या गणनेत, वीस पद्म संख्येत; महापराक्रमी अनेक आहेत. त्यामध्ये वालीपुत्र अंगद बलवान म्हणून विशेष प्रसिद्ध आहे. रावणाच्या सभेत जाऊन बोलायला तो समर्थ आणि अत्यंत योग्य आहे. तो बोलल्यामुळे राक्षससभेत संताप निर्माण झाला तरी त्याची अंगदाला बाधा होणार नाही. शत्रूच्या भाषेचा तो भाषेने निषेध करील. अत्यंत बोलका आणि तसाच तो सुबुद्ध आहे तो घटवलेला बोलका, धैर्यवान योद्धा असून, रावणाला तो गांजू शकणारा श्रेष्ठ शूरवीर आहे. अंगदाचा आत्मनिर्धार हा क्षीरसागराप्रमाणे गंभीर आहे. रावणाच्या कपटी युक्तीला अंगदाजवळ अनेक युक्त्या आहेत. तो राक्षसांशी रणकंदन करायला एकटा पराक्रमी पुरेल. तो निधडा वीर आहे. स्वामीकार्य पूर्ण करण्यासाठी अंगदाजवळ अनेक युक्ती, अगाध शक्ती आहे. वालीपुत्र अंगद हा दूतकार्याला अत्यंत योग्य आहे.'' मारुतीची सूचना ऐकून श्रीराम संतुष्ट झाला.

श्रीराम अंगदाला रावणासाठी निरोप देतो

श्रीरामाला हनुमंताची सूचना मान्य झाली. त्याने अंगदाला जवळ बोलावून त्याला प्रेमाने आलिंगन दिले. नंतर श्रीराम म्हणाला, ''अंगदा, तू शिष्ट म्हणून रावणाकडे जाऊन माझे महत्त्वाचे सांगणे त्याला ऐकव. त्याला म्हणावे, चोरी करणाराला शिक्षा होते. तू माझी पत्नी चोरली आहेस. तेव्हा तुला शिक्षा करण्यासाठी मी सीतापती राम निर्धाराने बाण घेऊन आलो आहे. परस्त्रीचे अपहरण हे तुझ्या मरणाचे मुख्य कारण आहे. माझे दुर्धर बाण सुटल्यावर तुझे रक्षण कोण करील? दशमुखा, सावध होऊन ऐक. मी माझ्या बाणांच्या निकटत्वाने तुझे बंधू, पुत्र, सैन्य

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Muthulakshmi Research Academy

यांच्यासह संपूर्ण लंका राक्षसविरहित करीन. माझी पत्नी लंकेत आणलीस आणि श्रीरामाकडून तिची सुटका होणार नाही असे म्हणतोस, तर आता मी तुझ्या वधासाठी आलो आहे. कुठे पळशील? पूर्वी सीतेची अभिलाषा धरणाऱ्या एका कावळ्याच्या मागे मी दर्भाची काडी लावली होती. तेव्हा त्याला पळता पळता तिन्ही लोकात आश्रय मिळाला नव्हता. अखेर तो मला शरण आला. त्यावेळी मी त्याचा डावा डोळा घेऊन त्याचे प्राण वाचविले. हे एक दर्भाच्या काडीचे कौशल्य असून, ते किती दारुण होते पाहा. यापुढे माझे दुर्धर वाण सुटले तर पक्षी होऊन पळणाऱ्या रावणाला मी निश्चित मारीन. तो रावण त्रिलोकात, दशदिशा कुठेही पळाला तरी माझा वाण त्याची पाठ सोडणार नाही. माझ्या दृष्टीला पडला की रावणाचा वध झालाच. त्या कावळ्याने अपराध केला होता; परंतु तो मला अनन्यभावे शरण आला आणि शरणागताला मारायचे नाही, यामुळे मी त्याचा प्राण वाचवला होता. रावणा, तूही सीता मला देऊन, शरण आलास, तर तुझी लंकेच्या राज्यावर स्थापना करीन आणि तुझी जन्ममरणातून सुटकाही करीन.''

श्रीराम पुढे म्हणाला, ''रावणाला हेही सांग की, बिभीषणाला लंका दान केली, यासाठी सावधानपणे ऐक. मी नवी लंका निर्माण करून बिभीषणाची तिथे स्थापना करीन. ज्या मी सागरात पाषाण तरंगत ठेवले त्या मला नवी लंका निर्माण करायला अर्धा क्षणही लागणार नाही. यामुळे श्रीरामाला सीता अर्पण करण्याने लंकाधीशाला आणि त्याच्या लंकाराज्याला स्वस्थता लाभेल. हे सर्व श्रीरामाच्या धर्माने होईल.'' असे अंगदाला श्रीरामाने स्वतःच सांगितले. नंतर अमृतफळे देऊन अंगदाला लंकेत पाठविले. श्रीराम जेव्हा अमृतफळांचा शकुन करून एखाद्याला पाठवितो तेव्हा परक्यांचा मानाभिमान मर्दून तो गेलेला विजयी होतो. श्रीरामाने अंगदाला सांगितले की,

''अंगदा तुझी शौर्यशक्ती, धैर्य, सहनशक्ती, शांती, कीर्ती आणि परम पुरुषार्थाची ख्याती हनुमंताने मला सांगितली आहे.'' त्यावर अंगद म्हणाला, ''श्रीरघुनाथा, मला आज्ञा मान्य आहे. आपण आपला पुरुषार्थ स्वतःच्या तोंडाने सांगणे यात मूर्खपणाच दिसतो. ते असो. आमचा पुरुषार्थ म्हणजे तुझी आज्ञा श्रीरामा हीच कार्यसिद्धीच्या शिरावर आहे. त्यानेच आम्हाला विजय प्राप्त होतो. आम्ही पाला खाणारे सामान्य वानर आता श्रीरामाचे सेवक झालो, त्यामुळे आमचा पराक्रम थोर ठरून सुरासुरांकडून तो वर्णन केला जातो. श्रीरामा तुझ्या आज्ञेपुढे रावण तो काय बापडा! माझे भाग्य शुद्ध म्हणून मला हे कार्य सांगितले आहे. आज माझे मनोरथ सुफल झाले. श्रीरामाने स्वतः आपल्या मुखाने मला कार्य नेमून दिले यामुळे मी भाग्यवंत ठरलो. सद्गुरू हनुमानाने धर्मबुद्धीने मला श्रीरामाचा संतोष मिळवून दिला.'' अंगदाला श्रीरामाने आज्ञा दिली यामुळे तो अत्यंत उल्हसित झाला आणि लंकेला जायला तो सिद्ध झाला. त्याने श्रीरामाला प्रदक्षिणा घातली, त्याचे चरणवंदन करून चरणतीर्थ प्राशन केले. श्रीरामाला दंडवत, लक्ष्मण, बिभीषण यांना वंदन असे उपचार झाल्यावर त्याने सुग्रीवाचे पाय धरले.

सुग्रीवाने अंगदाला आशीर्वाद देताना म्हटले, ''श्रीरामाची आज्ञा शिरसावंद्य मानून तू आपले जीवित श्रीरामाला अर्पण करून वानरवंशाला श्रेष्ठत्व मिळवून दिले आहेस. आता श्रीरामाचे कार्य शीघ्र साधावेस.'' अंगदाने नळ, नीळ, जांबुवंत, सुषेण अशा सर्वांना दंडवत घालून त्यांची आज्ञा मागितली. त्यावेळी सर्व म्हणाले, ''वालिसुता अंगदा, तू आपल्या मृदू, मंजुळ, विनम्र वागण्याने आम्हा सर्वांना सुखी केले आहेस. तू निश्चित विजयश्री संपादन करशील. नंतर अंगदाने हनुमानाला पाहून उल्हासाने त्याच्या पायावर मस्तक टेकले. त्यावेळी तो प्रेमभावाने सद्‌गदित झाला होता. अंगद हनुमानाचा भक्त होता. त्याची

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Trust and eGangotri

हनुमानाविषयी प्रेमभावना होती. त्यावेळी हनुमानाने अंगदाला शीघ्र लंकेला जाण्याची आज्ञा दिली. हनुमंताने अंगदाला वरदहस्त मस्तकावर ठेवून आश्वासन दिले; "लंकाधीशाला गांजण्यासाठी लंकेला जावेस." अंगदाने पुन्हा श्रीरामाला साष्टांग नमस्कार घालून लंकानगरी अवलोकन करून, रामनामाचा गजर करत उसळी घेतली.

अंगदाचे लंकेकडे प्रयाण

अंगदवीराने आकाशात झेप घेताच सुग्रीवादी वानरवीरांनी जयजयकार करत रामनामाचा गजर केला. जसा श्रीरामाचा बाण जावा, तसे अंगदाचे उड्डाण होते. घाईघाईने पुढे पुढे जात आकाशातून अंगद लंकेत पोचला. आकाशाची पोकळी पायतळी घालून निराधार, निरालंब आकाशात वरवर चढत तो लंकेत आला होता. त्यावेळी बालसूर्याचा रस ओतून सिद्ध झाल्याप्रमाणे किंवा अग्नितेजाने घडविल्याप्रमाणे अंगद शोभत होता. अंगद उड्डाण करून लंकेत तर पोचला.

अध्याय सातवा

अंगद आकाशमार्गाने शीघ्रतेने लंकेत येऊन रावणाच्या सभेत अत्यंत चतुराईने पोचला. एकदम रावणाच्या सभेतच अंगदाची उडी पडली. त्यामुळे रावण दचकून कंपायमान झाला. लंकेत गोंधळ माजला, राक्षसवीर दडून बसले आणि सर्व केविलवाणे झाले. सर्वांचा घात करण्यासाठी पुन्हा हनुमंत आला अशी भीती लंकावासींना वाटून ते आकांत करू लागले. वानराच्या भीतीने समस्त रावणसभा एखाद्या चित्राप्रमाणे स्तब्ध आणि तटस्थ दिसू लागली. अंगद समोर, जवळ असून दशमुख रावण बोलू शकला नाही, मग इतर सामान्य राक्षसांची चिलटे काय बोलणार! नुसते टकमक पाहात राहिले. अंगदाचे आगमन होताच राक्षसांना मौन पडले, रावण दचकला. तेव्हा अंगदाने आपणहून बोलायला आरंभ केला.

अंगदाचे प्रारंभीचे भाषण

अंगद म्हणाला, "मी तुमच्या सभेत अतिथी म्हणून आलो असताना तुम्ही कोणी माझे स्वागत केले नाही. त्यावरून असे वाटते की तुम्ही एकतर भयभ्रमाने भ्रांत झाला आहात किंवा निश्चित महामूर्ख आहात. तुम्हाला सर्वांना मौन पडले आहे त्याचे कारण मला पूर्णपणे लक्षात आले आहे. मी जे सांगतो ते सावधपणे ऐका. वानरांच्या सैन्यात महावीर पराक्रमी श्रीराम आला आहे त्यामुळे तुमची दातखिळी बसून तुम्हाला बोलणे अशक्य झाले आहे, श्रीरामाने अचूक शरसंधान करून छत्रे पाडली त्यामुळे रावण गोंधळून गेला आणि योग्यायोग्यता विसरला आहे. श्रीरघुनंदन येत असल्याचे पाहून प्रधानांची आणि राक्षसभेतल्या सभासदांची वाचा बंद झाली आहे. श्रीरामाच्या ख्यातीचे असो, तुम्हाला ज्याने पूर्णपणे गांजले त्या वीर हनुमंताच्या स्मरणानेच तुमची वाणी खुंटली आहे. त्या हनुमान बळीने अशोकवनात राक्षसांची राखरांगोळी केली; त्याच्या शेपटीच्या ज्वाळांनी लंकेची होळी केली, रावणाने अग्नीज्वाळा फुंकताच त्याच्या खांडमिशांनी पेट घेतला, हनुमंताने राक्षसांना रणात सतावले, या सर्वांमुळे राक्षसवीरांची दातखिळी बसून त्यांचे बोलणे बंद झाले आहे. कोणी कोणाला काहीच विचारत नाही. अशा प्रकारे लंकेत धुमाकूळ घालून तो पराक्रमी हनुमंत सैन्यात कसा आहे याविषयी सांगतो ते ऐका. ज्या हनुमंताने अशोकवन उद्ध्वस्त केले; अखयाचा वध करून, राक्षसांचा निःपात केला; वनरक्षक किंकर, प्रधानपुत्र हे सर्व मारले; रावणाचा ज्येष्ठ पुत्र इंद्रजित याला त्रस्त करून त्याची सेना निर्दाळली; रावणाचा मोठा अपमान करून लंका जाळून, असंख्य राक्षसांना मारले आणि राक्षसांच्या दातांच्या राशी तो कुडव्याने मोजत होता, तो हनुमंत श्रीरामाच्या सैन्यातला महावीर म्हटला जात नाही. सांप्रत असे पाहा की चिट्ठीपत्र पोचविणारा एक सामान्य सेवक म्हणून

https://archive.org/details/@sarayuacademy Bhavan Varanasi Trust, Lucknow

CC-0. In Public Domain. Digitized by Sri Muthulakshmi Research Academy. eGangotri

त्या सामान्य हनुमंताला लंकेत धाडले होते."

रावणाचे दुरूत्तर, अंगदाची प्रतिक्रिया

अंगदाचा छळ करण्यासाठी, रावणाने कौशल्यपूर्ण दुरुत्तर करताना म्हटले, "दुर्गाच्या दारातून येणारा सरळ जमिनीवरचा मार्ग सोडून; तू आडमार्गाने येथे आलास, यामुळे तुझ्याशी आम्ही बोललो नाही आणि मौन धरून राहिलो. आडमार्गाने येणाऱ्याशी बोलणे हे आम्ही दूषण मानतो" हे रावणाचे बोलणे ऐकून अंगद हसू लागला. मग अंगद म्हणाला, "रावणा, नीट ऐक. इतरांचे अवगुण पाहतात, आपले दूषण पाहात नाहीत ते पूर्णतया गाढवच म्हणावे. त्या गाढवाचे शेपूट हेही लांडे नी त्या गधड्याचे ठिकाणी स्वधर्मविवेक नसतो. असे नर म्हणजे भुईला भार आहेत. आम्हा वानरांचे आकाशगमन हा तर आमचा स्वभावधर्म आहे. जो स्वधर्माला दूषण येईल असे वागतो तो डुक्कर किंवा कुत्रा म्हणावा. सर्वात मुख्य अधर्म म्हणजे चोरी करणे; त्यातही परस्त्रीचे अपहरण विशेष अधर्म. रावणा, तू खरा महापापी असून, त्रिलोकात तुझे तोंड काळे झाले आहे. तू वेदबाह्य असे कृत्य केलेस आणि स्वधर्मकर्मात तुला दूषण लागले आहे. तू असा पापकर्मा आहेस." रावण जवळ आहे हे पाहून, त्याचे निर्दाळण करावे असे स्फुरण अंगदाच्या ठिकाणी निर्माण होऊन त्याचे रोम थरारले. 'रावणाला मी मारीन, पण त्याला मारल्याने शिष्टाईमधे व्यत्यय येईल' या तऱ्हेचा विचार मनात आला आणि अंगद सावरला.

रावणाने अंगद खवळलेला पाहिला आणि त्याला कापरे भरले. प्रधान, राक्षस यांना हे दुसरे विघ्न आले असे वाटून ते कंपायमान झाले. 'पहिला होळी करून गेला; हा दुसरा त्याच्यापेक्षा बलवान आला;' या विचाराने सर्वजण भयभीत झाले. 'श्रीरामाने लंकेचा प्रतिबंध केला आहे. हा एकटा रामदूत निःशंकपणे आमचा अन्त करण्यासाठी आला आहे', अशा प्रकारचे विचार मनात येऊन राक्षस भयग्रस्त झाले. अंगदाकडे पाहताच रावणाला भ्रमिष्टासारखे झाले; राक्षससैनिक केविलवाणे झाले; राक्षसगण एकमेकांमागे दडू लागले. यावेळी अंगदाच्या मनात विचार आला, 'श्रीरघुनाथच रावणाचा वध करणार आहे म्हणून हनुमानाने रावणाला मारले नाही. मी उन्मत्त होऊन रावणवध करण्याचा मूर्खपणा करणार होतो.' मग अंगदाने श्रीरामनामस्मरण केले. त्यामुळे त्याचे मूर्खपणाचे विचार नाहीसे होऊन, त्याच्या मनातली रागाची भावना नाहीशी झाली आणि अंगद सावध-स्वस्थ झाला. श्रीरामाने स्वस्तःच म्हटले होते त्याप्रमाणे अंगदाच्या ठिकाणी शौर्य आणि शांती असल्यामुळे त्याने क्रोध गिळला आणि रावणाच्या सभेत तो स्वस्थचित्त होऊन बसला.

रावणापुढे अंगदाचे वर्तन आणि कथन

अंगदाने पाहिले की रावणाचे सिंहासन चौऱ्याऐंशी योजने उंच आहे, तेव्हा त्यानेही ठरविले की आपणही तसेच आसन घालायचे. ज्याप्रमाणे हनुमंताने पूर्वी लंकादहनाच्या हेतूने पुच्छ वाढविले होते, त्याचप्रमाणे रावणासारखे आसन हवे म्हणून अंगदाने पुच्छाचा पराक्रम केला. त्याने आपले शेपूट वाढवून, त्याच्या वेटोळ्यांचे आसन सिद्ध करून, त्या आसनावर रावणासमोर अंगद बसला. अंगद निःशंकपणे समोर बसलेला रावणाने टकमक पाहिला, राक्षस साशंक होऊन पाहात राहिले. अंगदाला "तू येथून बाजूला हो," असे म्हणायला रावण धजला नाही, एवढा तो अंगद वानरवीर अतिशय उग्र दिसत होता. रावणाच्या सिंहासनाच्या समोर, शेपटीच्या वेटोळ्यांच्या आसनावर बसून अंगद वाकुल्या दाखवणे, फळे खाणे, डोळे मिचकावणे हे चाळे करत होता. अंगद हा श्रीरामाचा दूत एकटाच आला होता तरी राक्षसांना आकांत आठवत होता आणि रावण भयाकुल झाला होता. अंगद निवांत बसलेला पाहून

https://archive.org/details/muthulakshmiacademy

CC-0. In Public Domain. Digitized by Sarayu Foundation Research Academy, eGangotri

हनुमानाविषयी प्रेमभावना होती. त्यावेळी हनुमानाने अंगदाला शीघ्र लंकेला जाण्याची आज्ञा दिली. हनुमंताने अंगदाला वरदहस्त मस्तकावर ठेवून आश्वासन दिले; "लंकाधीशाला गांजण्यासाठी लंकेला जावेस." अंगदाने पुन्हा श्रीरामाला साष्टांग नमस्कार घालून लंकानगरी अवलोकन करून, रामनामाचा गजर करत उसळी घेतली.

अंगदाचे लंकेकडे प्रयाण

अंगदवीराने आकाशात झेप घेताच सुग्रीवादी वानरवीरांनी जयजयकार करत रामनामाचा गजर केला. जसा श्रीरामाचा बाण जावा, तसे अंगदाचे उड्डाण होते. घाईघाईने पुढे पुढे जात आकाशातून अंगद लंकेत पोचला. आकाशाची पोकळी पायतळी घालून निराधार, निरालंब आकाशात वरवर चढत तो लंकेत आला होता. त्यावेळी बालसूर्याचा रस ओतून सिद्ध झाल्याप्रमाणे किंवा अग्नितेजाने घडविल्याप्रमाणे अंगद शोभत होता. अंगद उड्डाण करून लंकेत तर पोचला.

अध्याय सातवा

अंगद आकाशमार्गाने शीघ्रतेने लंकेत येऊन रावणाच्या सभेत अत्यंत चतुराईने पोचला. एकदम रावणाच्या सभेतच अंगदाची उडी पडली. त्यामुळे रावण दचकून कंपायमान झाला. लंकेत गोंधळ माजला, राक्षसवीर दडून बसले आणि सर्व केविलवाणे झाले. सर्वांचा घात करण्यासाठी पुन्हा हनुमंत आला अशी भीती लंकावासींना वाटून ते आकांत करू लागले. वानराच्या भीतीने समस्त रावणसभा एखाद्या चित्राप्रमाणे स्तब्ध आणि तटस्थ दिसू लागली. अंगद समोर, जवळ असून दशमुख रावण बोलू शकला नाही, मग इतर सामान्य राक्षसांची चिलटे काय बोलणार! नुसते टकमक पाहात राहिले. अंगदाचे आगमन होताच राक्षसांना मौन पडले, रावण दचकला. तेव्हा अंगदाने आपणहून बोलायला आरंभ केला.

अंगदाचे प्रारंभीचे भाषण

अंगद म्हणाला, "मी तुमच्या सभेत अतिथी म्हणून आलो असताना तुम्ही कोणी माझे स्वागत केले नाही. त्यावरून असे वाटते की तुम्ही एकतर भयभ्रमाने भ्रांत झाला आहात किंवा निश्चित महामूर्ख आहात. तुम्हाला सर्वांना मौन पडले आहे त्याचे कारण मला पूर्णपणे लक्षात आले आहे. मी जे सांगतो ते सावधपणे ऐका. वानरांच्या सैन्यात महावीर पराक्रमी श्रीराम आला आहे त्यामुळे तुमची दातखिळी बसून तुम्हाला बोलणे अशक्य झाले आहे. श्रीरामाने अचूक शरसंधान करून छत्रे पाडली त्यामुळे रावण गोंधळून गेला आणि योग्यायोग्यता विसरला आहे. श्रीरघुनंदन येत असल्याचे पाहून प्रधानांची आणि राक्षसभेतल्या सभासदांची वाचा बंद झाली आहे. श्रीरामाच्या ख्यातीचे असो, तुम्हाला ज्याने पूर्णपणे गांजले त्या वीर हनुमंताच्या स्मरणानेच तुमची वाणी खुंटली आहे. त्या हनुमान बळीने अशोकवनात राक्षसांची राखरांगोळी केली; त्याच्या शेपटीच्या ज्वाळांनी लंकेची होळी केली, रावणाने अग्नीज्वाळा फुंकताच त्याच्या खांडमिशांनी पेट घेतला, हनुमंताने राक्षसांना रणात सतावले, या सर्वांमुळे राक्षसवीरांची दातखिळी बसून त्यांचे बोलणे बंद झाले आहे. कोणी कोणाला काहीच विचारत नाही. अशा प्रकारे लंकेत धुमाकूळ घालून तो पराक्रमी हनुमंत सैन्यात कसा आहे याविषयी सांगतो ते ऐका. ज्या हनुमंताने अशोकवन उद्ध्वस्त केले; अखयाचा वध करून, राक्षसांचा निःपात केला; वनरक्षक किंकर, प्रधानपुत्र हे सर्व मारले; रावणाचा ज्येष्ठ पुत्र इंद्रजित याला त्रस्त करून त्याची सेना निर्दाळली; रावणाचा मोठा अपमान करून लंका जाळून, असंख्य राक्षसांना मारले आणि राक्षसांच्या दातांच्या राशी तो कुडव्याने मोजत होता, तो हनुमंत श्रीरामाच्या सैन्यातला महावीर म्हटला जात नाही. सांप्रत असे पाहा की चिठ्ठीपत्र पोचविणारा एक सामान्य सेवक म्हणून

https://archive.org/details/@sarayuacademy Bhavan Vani Trust, Lucknow

CC-0. In Public Domain. Digitized by Muthulakshmi Research Academy

त्या सामान्य हनुमंताला लंकेत धाडले होते.''

रावणाचे दुरूत्तर, अंगदाची प्रतिक्रिया

अंगदाचा छळ करण्यासाठी, रावणाने कौशल्यपूर्ण दुरुत्तर करताना म्हटले, ''दुर्गाच्या दारातून येणारा सरळ जमिनीवरचा मार्ग सोडून; तू आडमार्गाने येथे आलास, यामुळे तुझ्याशी आम्ही बोललो नाही आणि मौन धरून राहिलो. आडमार्गाने येणाऱ्याशी बोलणे हे आम्ही दूषण मानतो'' हे रावणाचे बोलणे ऐकून अंगद हसू लागला. मग अंगद म्हणाला, ''रावणा, नीट ऐक. इतरांचे अवगुण पाहतात, आपले दूषण पाहात नाहीत ते पूर्णतया गाढवच म्हणावे. त्या गाढवाचे शेपूट हेही लांडे नी त्या गधड्याचे ठिकाणी स्वधर्मविवेक नसतो. असे नर म्हणजे भुईला भार आहेत. आम्हा वानरांचे आकाशगमन हा तर आमचा स्वभावधर्म आहे. जो स्वधर्माला दूषण येईल असे वागतो तो डुक्कर किंवा कुत्रा म्हणावा. सर्वात मुख्य अधर्म म्हणजे चोरी करणे; त्यातही परस्त्रीचे अपहरण विशेष अधर्म. रावणा, तू खरा महापापी असून, त्रिलोकात तुझे तोंड काळे झाले आहे. तू वेदबाह्य असे कृत्य केलेस आणि स्वधर्मकर्मात तुला दूषण लागले आहे. तू असा पापकर्मा आहेस.'' रावण जवळ आहे हे पाहून, त्याचे निर्दाळण करावे असे स्फुरण अंगदाच्या ठिकाणी निर्माण होऊन त्याचे रोम थरारले. 'रावणाला मी मारीन, पण त्याला मारल्याने शिष्टाईमधे व्यत्यय येईल' या तऱ्हेचा विचार मनात आला आणि अंगद सावरला.

रावणाने अंगद खवळलेला पाहिला आणि त्याला कापरे भरले. प्रधान, राक्षस यांना हे दुसरे विघ्न आले असे वाटून ते कंपायमान झाले. 'पहिला होळी करून गेला; हा दुसरा त्याच्यापेक्षा बलवान आला;' या विचाराने सर्वजण भयभीत झाले. 'श्रीरामाने लंकेचा प्रतिबंध केला आहे. हा एकटा रामदूत निःशंकपणे आमचा अन्त करण्यासाठी आला आहे', अशा प्रकारचे विचार मनात येऊन राक्षस भयग्रस्त झाले. अंगदाकडे पाहताच रावणाला भ्रमिष्टासारखे झाले; राक्षससैनिक केविलवाणे झाले; राक्षसगण एकमेकांमागे दडू लागले. यावेळी अंगदाच्या मनात विचार आला, 'श्रीरघुनाथच रावणाचा वध करणार आहे म्हणून हनुमानाने रावणाला मारले नाही. मी उन्मत्त होऊन रावणवध करण्याचा मूर्खपणा करणार होतो.' मग अंगदाने श्रीरामनामस्मरण केले. त्यामुळे त्याचे मूर्खपणाचे विचार नाहीसे होऊन, त्याच्या मनातली रागाची भावना नाहीशी झाली आणि अंगद सावध-स्वस्थ झाला. श्रीरामाने स्वस्तःच म्हटले होते त्याप्रमाणे अंगदाच्या ठिकाणी शौर्य आणि शांती असल्यामुळे त्याने क्रोध गिळला आणि रावणाच्या सभेत तो स्वस्थचित्त होऊन बसला.

रावणापुढे अंगदाचे वर्तन आणि कथन

अंगदाने पाहिले की रावणाचे सिंहासन चौऱ्याऐंशी योजने उंच आहे, तेव्हा त्यानेही ठरविले की आपणही तसेच आसन घालायचे. ज्याप्रमाणे हनुमंताने पूर्वी लंकादहनाच्या हेतूने पुच्छ वाढविले होते, त्याचप्रमाणे रावणासारखे आसन हवे म्हणून अंगदाने पुच्छाचा पराक्रम केला. त्याने आपले शेपूट वाढवून, त्याच्या वेटोळ्यांचे आसन सिद्ध करून, त्या आसनावर रावणासमोर अंगद बसला. अंगद निःशंकपणे समोर बसलेला रावणाने टकमक पाहिला, राक्षस साशंक होऊन पाहात राहिले. अंगदाला ''तू येथून बाजूला हो,'' असे म्हणायला रावण धजला नाही, एवढा तो अंगद वानरवीर अतिशय उग्र दिसत होता. रावणाच्या सिंहासनाच्या समोर, शेपटीच्या वेटोळ्यांच्या आसनावर बसून अंगद वाकुल्या दाखवणे, फळे खाणे, डोळे मिचकावणे हे चाळे करत होता. अंगद हा श्रीरामाचा दूत एकटाच आला होता तरी राक्षसांना आकांत आठवत होता आणि रावण भयाकुल झाला होता. अंगद निवांत बसलेला पाहून

https://archive.org/details/muthulakshmiacademy